# भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल : एक दृष्टीक्षेप



- डॉ. जी. ए. बुवा

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल : एक दृष्टीक्षेप

**डॉ. जी. ए. बुवा**

‘मौनोत्कर्ष’, तोरणे पाणंद, सबनीसवाडा,
सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ४१६५१०
भ्रमणध्वनी : ९४२२०५४९७८, ९१६८५४३४७८
ई–मेल : gangadharbuva@gmail.com

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

¾00µ0 634-1

- **पुस्तकाचे नाव :** भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल : एक दृष्टीक्षेप

- **लेखक :** डॉ. जी. ए. बुवा

- **प्रथमावृत्ती :** २०१९

- **प्रकाशक :**

  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
  पु. ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी आवार,
  सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.



- **© प्रकाशकाधीन :**



- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

- **किंमत : रु. ९२२/-**



या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे निवेदन

प्राचीन भारताच्या सांस्कृतिक संचितांचा शोध घेत असताना प्रामुख्याने आपल्या नजरेसमोर येते ती येथील ज्ञान साधना. ही ज्ञान साधना मौखिक व लिखित साधनांच्या माध्यमातून शतकानुशतके वाटचाल करत राहिली आहे. या ज्ञानसाधनेतून प्राप्त झालेल्या ज्ञानाचे संग्रहण केवळ मौखिक स्वरूपात करणे शक्य नाही, याची जाणीव होताच मानवाने ज्ञान संग्रहणासाठी विविध साधनांचा शोध घेतला व घेत आहे. भुर्जपत्रे, पर्णपृष्ठे, वृक्षांच्या साली, प्राण्यांची कातडी, दगड, मातीच्या विटा, लाकूड, धातू अशा विविध साधनांतून प्राप्त ज्ञान संग्रहित करणे जेव्हा मानवास अशक्यप्राय वाटू लागले तेव्हा त्याने कागद ते डिजिटलायझेशन अशा आधुनिक साधनसामुग्रीपर्यंत वाटचाल केलेली आहे. अर्थात ही वाटचाल खूप अवघड होती; पण ज्ञान हे सदैव वर्धेष्णू असल्याने त्याचे संग्रहण कसे करावयाचे, हा प्रश्न मानवास पुढेही भेडसावीत राहीलच. या संग्रहण साधनांबरोबच प्रत्यक्ष लेखनसामग्री बोरू पेन, पेन्सिल, शाई व मुद्रणाचे खिळे, संगणक या साधनांनी मानवाच्या ज्ञान संग्रहण प्रक्रियेस फार मोठा हातभार लावलेला आहे. या वा अशा साधनांतून संग्रहण करताना प्राप्त ज्ञानाची हस्तलिखिते, ग्रंथ व विविध तंत्रसाधने (सीडीज् इ.) ही अस्तित्वात आली आणि या वाटचालीतून ग्रंथालयाची निर्मिती झाली.

ऐतिहासिक काळापासूनच्या ज्ञानाचा विचार करता हस्तलिखित स्वरूपातील ग्रंथवजा पोथी अथवा मातीच्या विटांवरील लेखनाचे संग्रहण मानवाने केल्याचे अनेक पुरावे आजही उपलब्ध आहेत. प्रत्यक्षात आजच्या काळातील ग्रंथालयासारखे त्यांचे स्वरूप नव्हते इतकेच. अशी ग्रंथालये, मंदिर, देवालये, राजेरजवाड्यांचे निवास अशा ठिकाणी आजही आपले अस्तित्व टिकवून आहेत. यामध्ये काही आश्चर्यकारक बाबीही आढळतात. त्या म्हणजे त्या काळात ही सूची करण्यास प्राधान्य देण्यात आले होतेच. शिवाय, विषयवार ग्रंथरचना असेही त्यांचे स्वरूप होते. एकूणच जरी ही सर्व ग्रंथालये समाजाभिमुख नव्हती तरीही ज्ञान संग्रहण व त्यांचे संप्रेषण यामध्ये त्यांचे योगदान लक्षणीय होते.

आपल्या देशाच्या परंपरांचा विचार करता, या ग्रंथसंग्रहणास भिन्न भिन्न नामाभिधाने दिल्याचेही निदर्शनास येते. जसे, चाणक्याने अर्थशास्त्रीय रचनेत त्यांचे ग्रंथालयास ''निबंध स्थान'' असे संबोधिले आहे, तर नालंदा विद्यापीठातील संग्रहाचा उल्लेख ''धर्मगंज'' म्हणून करण्यात आलेला होता. तेथे ''मोतीगंज व माणिकगंज'' अशी इतर कक्षांना नावे देण्यात आली होती. जैन मठातील ग्रंथसंग्रहास ज्ञानभांडार, शास्त्रभांडार अशी नामाभिधाने वापरण्यात आलेली होती, तर दक्षिण भारतातील प्राचीन शीलालेखात ग्रंथालयाचे नामकरण ''भारती भांडार'' असे केल्याचे निदर्शनास येते. तंजावर प्रांतात सरफोजी राजाच्या ग्रंथसंग्रहालयास ''सरस्वती महाल'' तर मुस्लीम राजवटीत ''किताबखाने'' व पेशवेकालीन ''पुस्तकशाळा'' असा ग्रंथालयांचा नामनिर्देश केल्याचे आढळते. विजयनगर साम्राज्यात ''विद्याशाळा'' या नावाने पोथी संग्रहाचा उल्लेख केल्याचे निदर्शनास येते.

प्रत्यक्षात इंग्रजांच्या कालखंडात आपल्याकडे पब्लिक लायब्ररीज, सार्वजनिक ग्रंथालये असा ग्रंथालयाचा उल्लेख केला जाऊ लागला. ब्रिटीशांनी खरे तर या ग्रंथालयाची स्थापना ''नेटिव्ह जनजर लायब्ररीज'' अशा नावाने केलेली होती.

या देशातील इंग्रज अधिकारी, इंग्रज लोक व येथील सरदार, याच्याकरिता ही ग्रंथालये प्रामुख्याने स्थापन करण्यात आलेली होती.

प्राचीन, मध्ययुगीन कालखंडातही आपल्याकडील ग्रंथालये समृद्ध होती. ग्रंथालये आणि त्यातील ग्रंथसंग्रह यांचे महत्त्व या सर्व काळात समाजातील उच्च स्तरावर ज्ञात होतेच. यामुळे त्यांचे महत्त्व सामाजिक व सांस्कृतिक जतन संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आल्यानेच परकीय राजवटीत येथील ''ग्रंथसंग्रह'' प्रसंगी उद्ध्वस्त केल्याचे व जाळून टाकल्याचे पुरावेही आढळतात. एकूणच ग्रंथालयातील या ज्ञानसंग्रहाचे साठे म्हणजे समाज परिवर्तनाचे एक उत्तम साधन याची जाणीव येथील समाजास होती. तशीच ती परकीयांनाही होती. ग्रंथालयाच्या उद्ध्वस्ततेच्या काळातही येतील एतद्देशीय राजेलोकांनी स्वत: तत्कालीन व्यक्तिगत अभ्यासकाचे पोथी संग्रह या मंदिरातील संग्रह केवळ जतन केले नाहीत तर प्रसंगी ते दक्षिणेतून राजस्थानकडे पाठवून दिले.

स्वातंत्र्यपूव काळातील राजे–रजवाड्यांचे सार्वजनिक ग्रंथालयाच्या संरक्षणाचे व प्रसाराचे धोरण यांचा विचार करता, या वाटचालीत बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांना अग्रस्थान द्यावे लागेल. ग्रंथालय चळवळ खऱ्या अर्थाने सुरु केली तर ती सयाजीराव गायकवाड महाराजांनीच !

महाराजांनी अमेरिका दौऱ्यात ग्रंथालय व्यवस्था जवळून बघितली होती. तशी योजना बडोद्यात सुरु करण्यासाठी डॉ. बोर्डेन नावाच्या ग्रंथालय व्यवस्थापन तज्ज्ञास त्यांनी बडोद्यात सन्मानाने बोलावले. ग्रंथालय संचालक म्हणून नेमले. त्यांच्या मदतीने बडोद्यातील सातशे गावांत वाचनालयांचे जाळे निर्माण केले. जे गाव छोटे असेल तिथे २५–३० पुस्तकांची पत्र्याची पेटी पुरवली. पंधरा दिवसांनी ती पेटी बदलून, दुसरी तेथे आणली जाई. हा फिरत्या पेटीतल्या वाचनालयाचा प्रयोग बडोद्यापूर्वी फक्त विलायतेत स्कॉटलँड येथे सुरु होता. डॉ. बोर्डेनच्या मदतीने बडोद्यात मध्यवर्ती पुस्तकालय (सेंट्रल लायब्ररी) आधुनिक पद्धतीने उभारले. येथील पुस्तकांचा हा संग्रह आशियातील सर्वांत मोठा असावा. तेथे वाचकांना पुस्तके मोफत वाचायला मिळत.

ग्रंथप्रसार, ग्रंथ प्रकाशन या दोन्ही कार्यात सर्व हिंदुस्थानातला हा अभिनव उपक्रम होता. एवढेच नव्हे तर मराठी, गुजराती, लेखक–प्रकाशकांचे सयाजीराव पोशिंदे ठरले. या अल्पकाळात बडोद्यातून ८१७ पुस्तकांचे प्रकाशन झाले. त्या काळात एवढी पुस्तके एकाही प्रकाशकाने प्रकाशित केल्याचे दिसत नाही. मात्र सयाजीरावांनी बडोदे संस्थानतर्फे शिक्षण, ग्रंथप्रेम आणि ज्ञानलालसेपोटी केलेला हा विक्रमच म्हणावा लागेल. त्यांनी ग्रंथ साहित्य प्रसार व ग्रंथालयाची स्थापना करणे हे राजाचे कर्तव्य मानूनच या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

बडोदे म्हणजे हिंदुस्थानातील ग्रंथालय चळवळीचा पायाच आहे. सयाजीराव महाराजांचे ग्रंथप्रेम आणि दानशूरवृत्ती यामागे होती. जगभरातील प्रवासात त्यांनी अनुभवले की, ग्रंथ हेच प्रगती आणि परिवर्तनाचे साधन आहे. हे ग्रंथ सामान्य जनतेला सहज मोफत मिळण्यासाठी वाचनालये हा एकच उत्तम मार्ग आहे. याकरिता ग्रंथालयातील तज्ज्ञांची नेमणूक करून बडोदे संस्थानातील खेड्यापाड्यांत ग्रंथालयाची साखळी निर्माण केली. केवळ ग्रंथालये सुरु करून पुरेसे नाही, तर त्यासाठी उत्तम ग्रंथही सहज उपलब्ध व्हावेत. हे काम त्यांनी शिक्षण विभागाकडे सोपविले होते. विद्याधिकारी त्याचा प्रमुख असे. त्यांनी वेगवेगळ्या विषयांच्या तज्ज्ञ लेखकमंडळींना मदतीला देऊन पुस्तके लिहून घेतली होती.

त्यांच्या काळात बडोदे संस्थानात ९८२ ग्रंथालये सुरु झाली. या ग्रंथालयांना लागणारे सामान, पुस्तके, मासिके, किफायतशीर रीतीने पुरविले. गुजरातमध्ये प्रकाशित ८००० पुस्तकांच्या वर्गवारीच्या किमतीसह यादी त्यांनी तयार करून घेतली होती. ''पुस्तकालय'' नावाने गुजराती मासिकही सुरु केले होते. पहिल्या वीस वर्षांत सरकारने वीस लक्ष त्रेपन्न हजार रुपये ग्रंथालयासाठी खर्च केले होते.

सयाजीराव महाराजांनी जगभरात प्रवास केला. प्रत्येक देशात आपआपल्या देशी भाषांत समृद्ध साहित्य प्रकाशित होत असल्याचे त्यांनी बघितले. साहित्य, ज्ञान आणि माहिती देशी भाषेत प्रकाशित झाली तर सामान्य रयतेपर्यंत ती पोहोचू शकते, हे त्यांनी ओळखले आणि परभाषेतील साहित्य देशी भाषेत प्रकाशित करण्याची योजना आखली. स्वतंत्र भाषांतर शाखा सुरु केली. प्रा. गज्जर यांना प्रमुख नेमले. साहित्यासोबत शास्त्रीय विषयाचे ग्रंथही देशी भाषांत यावेत, याकरिता ''श्री सयाजी ज्ञानमंजूषा'' व ''श्री सयाजी लघु ज्ञानमंजूषा'' या शास्त्रीय ग्रंथमाला सुरु केल्या.

याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील बहुतांशी विभागांत सार्वजनिक ग्रंथालयांची निर्मिती ही शिक्षण प्रसाराबरोबरच स्वातंत्र्य चळवळीस जोडण्यात आली होती. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बडोदा, महाराष्ट्र या प्रगत व पुरोगामी विभागाबरोबच केरळ, तामिळनाडू, ओरिसा, आंध्र प्रदेश, आसाम, राजस्थान, बंगाल अशा विभागांतून या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा वापर अत्यंत कौशल्याने स्वातंत्र्य संग्रामाचे आंदोलन अधिकाधिक सक्षम व समाजाभिमुख होण्यासाठी करण्यात आलेला होता. त्या काळातही सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणप्रेमींनी केवळ आर्थिक सहकार्यच नव्हे तर प्रसंगी शारिरीक झळ सोसून ग्रंथालयाचे जाळे खेडोपाडी, दुर्गम भागात विणले होते. स्वातंत्र्यप्राप्तीकरिता सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून दिलेले हे योगदान खरोखरच लक्षणीय तर होतेच, शिवाय याद्वारे देशप्रेम, देशभक्ती यांचेही दर्शन घडते.

समाजास उपकारक असलेल्या या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे स्वरूप, स्वातंत्र्योत्तर काळातही प्रगतिपथावर राहिले, ''गाव तेथे ग्रंथालय'' ही संकल्पना पुढे आली. ही योजना सर्वच राज्यांत सर्व स्तरावर जरी प्रत्यक्षात आली नसली तरी देखील विविध राज्यांतून ग्रामीण ग्रंथालयाबरोबरच तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. आज

यापैकी काही ग्रंथालये हस्तलिखित संग्रह ते डिजिटल ग्रंथालये अशी वाटचाल करत आहेत. समाजाशी संवाद साधण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन या ग्रंथालयाद्वारे केले जात आहे. खऱ्या अर्थाने ही सर्व ग्रंथालये लोक विद्यापीठाची भूमिका बजावत माहिती केंद्रे म्हणून भविष्यात समाजाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकारण्यासाठी सिद्ध करता येण्यासारखी आहेत.

अशा या पार्श्वभूमीवर डॉ. जी. ए. बुवा यांचा ''भारतातील सार्वजनिक भारतातील ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल – एक दृष्टीक्षेप'' हा प्रकल्प मंडळाकडे आला. त्यांनीही निर्धारित वेळेत सदरहू प्रकल्प सादर करताना या प्रकल्पात, सार्वजनिक ग्रंथालयांची ऐतिहासिक वाटचाल, विविध राज्यांतील सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाचे स्वरूप, ग्रंथालय संघाचे राज्य स्तरावरील योगदान, देश व राज्य पातळीवर ग्रंथालयविषयक समित्या व आयोग यांचे गठण व ग्रंथालय कायदा या सर्वांची फलश्रुती विषयक आढावा तर घेतलेला आहेच.

शिवाय विविध ठिकाणची महत्त्वपूर्ण सार्वजनिक ग्रंथालये, ग्रंथालय क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे योगदान याचाही उचित आढावा घेऊन प्रस्तुत प्रकल्प परिपूर्ण करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. अशा या महत्त्वपूर्ण लेखन प्रपंचाचा सर्वत्र प्रसार व्हावा म्हणूनच मंडळाने सरदहू प्रकल्प लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला.

हा बृहत ग्रंथ सर्व स्तरावरील ग्रंथप्रेमी वाचकांस उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो. तसेच या ग्रंथाचे सर्व स्तरावर उचित स्वागत होईल अशी मनिषा प्रगट करतो.

**अध्यक्ष,**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई

# मनोगत

ग्रंथालय शास्त्राचा एक विद्यार्थी या नात्याने ग्रंथालय परंपरेचा अभ्यास करत असताना नकळत ग्रंथालयाचे ऐतिहासिक महत्त्व मनात रूजत गेले. पदवी प्राप्त केल्यानंतर अपघाताने ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासक्रमाकरीता शिवाजी विद्यापीठात दाखल झालो. ग्रंथालय शास्त्राची पदवी प्राप्त केल्यानंतर सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) येथील श्री पंचम खेमराज महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून रुजू झालो. सावंतवाडीत दाखल झाल्यानंतर येथील श्रीराम वाचन मंदिर, सावंतवाडी या १८ एप्रिल १८५२ रोजी स्थापन झालेल्या सार्वजनिक ग्रंथालयाकडे आकृष्ट झालो. येथील दुर्मिळ वाचन साहित्यामुळे ग्रंथालयाबद्दलचे प्रेम व आस्था वृद्धींगत झाली. १९७५ च्या काळात या संस्थेने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय महासंघाचे २७ वे अधिवेशन सावंतवाडी येथे अत्यंत यशस्वीपणे संपन्न केले. या अधिवेशन प्रसंगी सार्वजनिक ग्रंथालयाचे स्वरूप अधिकाधिक कळत गेले. पुढे १९९७ मध्ये येथे पुनश्च महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे ४३ वे अधिवेशन अत्यंत यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. या प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेल्या ''ग्रंथोपजीवी'' या स्मरणिकेचे संपादन करण्याचे भाग्य ही लाभले. या स्मरणिकेचे कौतुक झाले. नंतरच्या काळात या ग्रंथालयाच्या संचालक मंडळातही सामील होण्याचा योग आला व १० वर्षे कार्याध्यक्ष म्हणून पदभार सांभाळला. या सर्वच काळात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची गरज प्रकर्षाने जाणवत गेली. या वाटचालीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे ग्रंथालय माहिती शास्त्राचे, अभ्यासक्रम श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी येथे सुरु करण्याचा योग आला. पदवी व पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करत असताना ग्रंथालयाच्या ऐतिहासिक वाटचालीची मनास अधिकाधिक भुरळ पडली. याच वाटचालीत मराठी साहित्याचे चिकित्सक अभ्यासक डॉ. रमेश वरखेडे यांचे सान्निध्य लाभले. संशोधनपर लिहिण्याची प्रेरणा त्यांच्या सहवासाने अधिकच दृढ झाली.

या पार्श्वभूमीवरच ''महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे भारतातील ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल'' हा प्रकल्प सादर करण्याची संधी चालून आली. मंडळाकडे सादर केलेल्या प्रस्तावास मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड व समितीचे सर्व सदस्य आणि या विभागाच्या सचिव मा. मीनाक्षी रा. पाटील यांचेकडून मंजुरी प्राप्त झाली. प्रकल्पास अनुमती प्राप्त होताच आनंद झालाच, पण आव्हान मोठेच होते. भारतातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या वाटचालीचा आढावा घेणे, ही बाब आव्हानात्मक तर होतीच. शिवाय वेळेचे बंधन सांभाळणे गरजेचे होते. पण सर्वांच्या सहकार्याने ते आव्हान पेलावयाचे असे ठरविले.

या आव्हानास पेलण्यास माझ्या कुटुंबियांची व मित्रपरिवार प्रा. संभाजी मोरे, डॉ. बाहेती, प्रा. मासुले, डॉ. प्रदिप कर्णिक, प्रा. सुरेश मुक्कणावर, प्रा. सुधीर बुवा, प्रा. राजेंद्र शिंत्रे, प्रा. जी. एम्. शिरोडकर यांची साथ लाभलीच शिवाय माझे एम्. फिल्., व पी. एच. डी. चे विद्यार्थी डॉ. शोभा घाटगे,

डॉ. गोपाळ प्रभू, डॉ. केशव धुरी, डॉ. विनोद हुले व सौ. भक्ती गावस आणि श्री. प्रसाद गावस यांच्या सहकार्याने संदर्भ शोध व लेखनाच्या जुळणीकरिता वाचन साहित्याचे संकलन करणे सोपे झाले. तसेच पुणे विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल गुरुवर्य डॉ. शां. ग. महाजन यांनी पत्ररुपाने केलेले मार्गदर्शन बहुमोलाचे ठरले. प्राथमिक स्तरावर प्रकल्पाचे अक्षरजुळणी करत असताना ऐनवेळी माझे मित्र नितीन तळेकर व सौ. निशा नितीन तळेकर आणि श्री. कमलेश गोसावी यांचे लाभलेले सहकार्य लाखमोलाचे असे आहे.

मंडळाच्या सचिव मा. मिनाक्षी पाटील, कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी दिलेले सहकार्य यांच्यामुळेच प्रकल्प वेळेत पूर्ण करणे शक्य झाले. प्रकल्प सादर केल्यानंतर त्याचा स्वीकार करून ग्रंथरूपाने तो प्रकाशित करण्याच्या प्रक्रियेस मंडळाकडून मंजुरी प्राप्त झाली याचे समाधान वाटले. मुद्रणाकरिता शासन व लेखन सामुग्री विभाग मुंबई व कोल्हापूर यांनी दिलेले सहकार्य हे ही तेवढेच महत्त्वाचे आहे.

या सर्वांनाच मन:पूर्वक धन्यवाद!



**डॉ. जी. ए. बुवा**
सावंतवाडी

# अनुक्रमणिका

प्रकरण १ ले

**ग्रंथ आणि ग्रंथालयांची पूर्वपिठीका** १ – ६६

प्रकरण २ रे

**विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे स्वरुप** ६७ – २८२

प्रकरण ३ रे

**विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय संघांचे योगदान** २८३ – ४७०

प्रकरण ४ थे

**विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायदा, समित्या व आयोग** ४७१ – ६९४

प्रकरण ५ वे

**विविध राज्यातील निवडक सार्वजनिक ग्रंथालये** ६९५ – १०१६

प्रकरण ६ वे

**सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील नामवंत व्यक्ती** १०१७ – ११५०

**परिशिष्टे** ११५१ – १२१२

**संदर्भसूची** १२१३ – १२२०

**छायाचित्रे** १२२१ – १२३८



¾00µ0 634-2

**प्रकरण १ ले**

# ग्रंथ आणि ग्रंथालयांची पूर्वपिठीका

१.१ प्रस्तावना

१.२ लेखन कला

१.३ ग्रंथलेखन साधने

१.४ भारतातील मुद्रण कलेची सुरवात

१.५ प्राचीन ग्रंथालय संस्कृतीचा वारसा

१.६ प्राचीन भारतातील ग्रंथसंग्रहालय

१.७ मध्ययुगीन ग्रंथालये

१.८ ब्रिटीश कालखंड

१.९ अर्वाचीन काळातील ग्रंथालय

१.१० आधुनिक ग्रंथालयांची वाटचाल

१.११ सार्वजनिक ग्रंथालये : संकल्पना आणि स्वरूप

१.१२ सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व

१.१३ सार्वजनिक ग्रंथालये: लोकशिक्षणाची विद्यापीठे

१.१४ सार्वजनिक ग्रंथालय आणि ज्ञान प्रसार

१.१५ स्थानिक माहिती केंद्र

१.१६ सार्वजनिक ग्रंथालयाचे बदलते स्वरूप

## प्रकरण १

# ग्रंथ आणि ग्रंथालयांची पूर्वपिठीका

### १.१ प्रस्तावना :

भारताच्या प्रार्गतिहासीक इतिहासाविषयी आढावा घेत असताना ही परंपरा सिंधू संस्कृतीपर्यंत जाऊन भिडते. संस्कृतीच्या पाऊलखूणा या विविध उत्खननातून सापडलेल्या वस्तूच्या माध्यमातून निदर्शनास आलेल्या आहेत. या उत्खननात सापडलेल्या विविध वस्तू, चिन्हे व खुणा यांचा अर्थ आजही पूर्णत्वाने समजलेला नाही. आजवर प्राप्त झालेल्या अर्थातून हाच निष्कर्ष निघतो की ही चिन्हे संदेश संप्रेषणासाठी तसेच प्राप्त ज्ञानाच्या संग्रहासाठी वापरली जात असत. याचबरोबर या एकमेकांशी संबंधीत असलेल्या चिन्हाच्या माध्यमातून लिपी ही त्या काळी होती. पण या लिपीचा अर्थबोध अद्यापही न झाल्याने तत्कालीन सांस्कृतिक संदर्भ आणि ज्ञानसंग्रह याविषयी उपलब्ध असलेली माहिती निदर्शनास येत नाही.

या चिन्हाच्या व लिपीच्या माध्यमातून तत्कालीन मानवाने प्राप्त झालेल्या अनुभवाच्या भाव भावना त्याना सुचलेल्या नवनवकल्पना याचा अंतर्भाव या सर्व लेखनातून ध्वनीत होत असणार. विद्यमान मानवाच्या ज्ञानसंग्रहणाची आणि संप्रेषणाची प्राप्त झालेली पूर्वपिठीका म्हणून या उत्खनातून सापडलेल्या खुणा, चिन्हे आणि एकूणच लिपीमाला या सर्वांकडे पाहावे लागेल.

पृथ्वीवर झालेले अनेक उत्पात, भूकंप, ज्वालामूखी, महापूर अशा नैसर्गिक उत्पातातून या पाऊलखुणा काळाच्या पडद्याआड गेल्या असा हा निष्कर्ष पुढील काळात नोंदविला गेला. या निष्कर्षाबरोबरच तत्कालीन समाजामध्ये असलेले टोळीजीवन म्हणजे परस्पर विरोधी मताचे गटाचे सामाजिक गट यांच्यातील संघर्षामुळेदेखील या पाऊलखुणा पुसल्या गेल्या असाव्यात. मधील काळातील तुटलेल्या दुव्यामुळे आदिमानवाने व त्या पुढील काळातील मानवाच्या वंशजाने गुहातून रेखाटलेली चित्रे, रेघोट्या तसेच दगडावर व कातळावर

कोरलेली चिन्हे, प्रसंगी आजही या सर्वच पुष्कळशा स्वरुपात अज्ञात आहेत. कोकण परीसरात २१ व्या शतकात सापडलेली कातळ शिल्पे हेही अपवाद राहिलेले नाहीत. अशा या लेखन वाटचालीच्या परंपरेने मानव विद्यमान डिजीटल युगात म्हणजेच पुन:श्च सांकेतिक चिन्हाच्या आधुनिक युगापर्यंत पोहचलेला आहे.

आपल्या देशाबाहेर अनेक ठिकाणी वेध घेतलेल्या वंशाचा शोध घेत असताना ६००० वर्षापूर्वीचे प्राथमिक अवस्थेतील लेखन पूर्वपीठीकेचा वारसा मानवाला सापडल्यामुळे त्याच्या पुढील वाटचालीच्या पाऊलखुणा वेळोवेळी विविध माध्यमाच्याव्दारे उमटवीत राहिला. आपल्या प्राप्त ज्ञानाचा व भावनांचा ठसा उमटविण्यासाठी त्याने कालसापेक्ष साधनाचा शोध घेतला. अशा साधनामध्ये मातीच्या विटा, दगड, धातू, प्राण्याची कातडी, झाडाची साले,पाने, पॅपीरस पेपर (झाडाच्या पानावर केलेले लिखाण) अशा नैसर्गिक साधनाबरोबर पुढील काळात कृत्रिम साधनांचा शोध घेण्यास सुरुवात केली. यात काच, कागद अशा साधनांवर लेखन करु लागला. या उत्खनातून सापडलेल्या मानवी शिल्पकृती प्राण्याच्या आकृती आणि त्यावरील लेखन याचे अवलोकन करत असताना तत्कालीन मानवाने अत्यंत पध्दतशीरपणे आपल्या नगर रचनेबरोबर उत्कृष्ट असे कलेचे नमुनेही तयार केले होते असे निदर्शनास येते आणि यावरुनच कला वस्तूचे संग्रहण करण्याची वृत्ती त्या काळात मानवाकडे होती असा ढोबळ निष्कर्ष काढणे शक्य होते.

इ.स. पूर्व कालखंडाचा विचार करतानाही इ.स. पूर्व ३००० दरम्यान अवगड येथील पहिल्या सारगन राजाने केलेल्या संग्रहाचा सर्वात प्राचीन संग्रह म्हणून उल्लेख केल्याचा आढळतो. या संग्रहामध्ये माती व विटावर केलेल्या लेखनाचे पुरावे संग्रहित केल्याचे आढळते. सुमारे इ.स. पूर्व २५००–२००० काळात बॅबीलोना मधील नगरातून मातीवर कोरलेल्या सुमारे २५००० विटांचा संग्रह प्रकाशझोतात आलेला आहे. या विटांवर केलेल्या लेखनातून ताऱ्याचे परिभ्रमण, स्तुतीपर रचना, गाथा, देवदैत्यांच्या कथा अशा प्रचलीत बाबी विषयक लेखन केल्याचे निदर्शनास येते. विटावरील लेखनाच्या बरोबर इजिप्तमध्ये तत्कालीन संग्रहातून पॅपीरस म्हणजे पर्णपृष्ठांची भेंडोळी संहग्रहीत केलेली निदर्शनास येतात. अशा लेखनातून धार्मिक विषय, अतींद्रिय कथा, तत्वज्ञान, विज्ञान, आरोग्य, मनोरंजन आणि विनोद अशा स्वरुपाचे लेखन केलेले आढळते.

इ. स. पूर्व ४ थ्या शतकाच्या होवरी अलेक्झांड्रिया येथे स्थापन झालेले संग्रहालय फार प्रसिध्दीला आले होते. त्यात सुमारे ७ लाख पॅपीरसचे गुंडाळे होते असे इतिहासकार सांगतात. एवढ्या मोठ्या संग्रहाची माहिती वाचकाना व्यवस्थित पुरवायची तर सूची असणे क्रमप्राप्त होते. ती १२० विषय शीर्षके देऊन विषयवार केली होती. आधुनिक ग्रंथसूंचीची सुरवात अलेक्झांड्रीयामधील संग्रहालयात झाली असे ग्रंथपालन तंत्राचे म्हणणे आहे. कारण विचार व्यक्त करण्यास उपयुक्त असणारी साधने योग्य तऱ्हेने गोळा करुन ठेवून त्याची शिस्तशीर रचना करणे जतन व रक्षण करणे व त्याचा व्यवस्थित उपयोग करुन देता येण्याजोगी व्यवस्था ठेवणे हेच तर संग्रहालयाचे काम असे. जूपीटर सेरॅपीस या देवतेच्या मंदिराचा एक भाग म्हणून हे समृध्द ग्रंथालय सुचविले होते. त्या काळातील हे एक अत्यंत समृध्द संग्रहालय होते असे त्याचे वर्णन केले जाते. *(श्री. ना. बा. मराठे, पृष्ठ –१८)*

एकूणच ऐतिहासिक आढावा घेत असताना भारताच्या तत्कालीन, शैक्षणिक ग्रंथालय विषयक वाटचालीचा विचार करत असताना तक्षशीला व नालंदा विद्यापीठाची आणि काशी, अयोध्या अवंतिका परीसरातील तत्कालीन भारतीय शिक्षण पध्दतीत अस्तित्वात असलेली विद्यापीठे आणि येथील ग्रंथसंग्रह याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते दुर्दैवाने परकीय आक्रमणे आणि एकूणच ऐतिहासिक वाटचालीत या शिक्षणकेंद्राविषयी आणि ग्रंथसंग्रहाविषयी सर्वांगीण माहिती आजही उपलब्ध झालेली नाही. हळूहळू कालसापेक्ष या शिक्षणकेंद्राच्या विषयी माहिती प्रकाशझोतात येवू लागली. आपल्या देशाविषयी प्राचीन परंपरा विषयक माहिती उपलब्ध होत असताना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते. दुसरीकडे इतर ठिकाणच्या ज्ञानसंग्रहाचा विचार करत असता त्याबाबत माहिती उपलब्ध होऊ शकते. उदा. ऑरेलीपने ॲलेक्झींड्रीया ग्रंथसंग्रह जाळून टाकलेला होता असे असूनही त्या ठिकाणी चाळीस तज्ञ सेवक ग्रंथसंग्रहालयाचे कामकाज पाहत असत आणि त्या ठिकाणी तत्कालीन लेखन साधनाचे भेंडोळी ठेवण्यासाठी लाकडी, कच्चे किंवा चिनी मातीची मोठ्या आकाराची भांडी वापरली जात. हाही तपशील उपलब्ध होतो. पुढील काळातील रोमन लोकानी स्थापन केलेली ग्रंथसंग्रहालये किंवा वस्तू संग्रहालये प्रसिध्द असल्याचे पुरावे आढळतात. रोमन लोकांनी इतर देशावर स्वाऱ्या करुन आपल्या ताब्यात घेतलेल्या परिसरातून तेथील

वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती व इतर वस्तू या संग्रहीत करून ते स्वत:बरोबर रोमला घेऊन जात. त्यांच्या या ज्ञान व कला विषयक आवडीमुळे तेथे वैयक्तिक स्वरुपातील राजे, महाराजे यांच्या दरबारी स्थापन केलेली संग्रहालये प्रचलीत झाली. इतिहासकालीन सुप्रसिध्द वीर ज्युलीयट सिझर आणि त्याचा दत्तक पुत्र ऑगस्टस या दोघानीही वस्तूसंग्रहालयाची छंद म्हणून स्थापन केली होती.

हे सर्व संग्रह सुव्यवस्थितपणे संरचीत केलेले असत आणि या विषयक केलेली टिपणे तयार केली जात. इतकेच काय पण या संग्रहीत वाङमयात कोणकोणत्या गोष्टी अंतर्भूत आहेत याविषयी चिकीत्सक माहिती देणारे पंडीतही राजदरबारी मोठ्या सन्मानाने ठेवले जात. त्या काळात महिलांनाही ज्ञान वाचनच्या साधनेपासून परावृत केले जात नसे.

भारतातील प्राचीन परंपरेचा वेध घेत असताना येथे पंडीत ही परंपरा जोपासण्यात आली होती. हे पंडीत राजदरबारी कार्यरत असताना बहुतांशी ज्ञान मुखोद्गत करत असत.असे मुखोद्गत ज्ञान आपल्या स्मरणशक्तीच्या आधारे दुसऱ्या पीढीकडे प्रवाहीत केले जात असे. ज्ञान संग्रहणासाठी मानवी स्मरणशक्तीचा आधार मोठ्या प्रमाणात घेतला जात असे. हे कार्य वंश परंपरेने किंवा शिष्य परंपरेने पिढ्यानपिढ्या प्रवाहित होत असे. या अशा परंपरेमुळेच दशग्रंथी ब्राम्हण ही संकल्पना येथे रुढ झाली असावी. दशग्रंथी ब्राम्हण हे त्या काळातील फिरती ग्रंथालयेच होती असे म्हटल्यास वावगे ठरु नये. इतकेच काय प्राचीन भारतातही भारतीय पंडीत हे विविध क्षेत्रात तज्ञ असल्याचे उल्लेख आढळतात.

इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकात सम्राट अशोकाने बौध्द धर्म प्रसारासाठी कोरलेले शिलालेख, बौध्द भिक्षुकींनी केलेले भ्रमण याविषयीचे पुरावे याची उदाहरणे आहेत. चीनमध्ये महायान पंथाची स्थापना आचार्य कुमारजी यानी केली. तसेच बौध्दधर्म विषयक १०५ आकारग्रंथाची केलेली भाषांतरे ही सर्वश्रूत आहेत. नालंदा, तक्षशीला ही इ. स. पूर्व १४ व्या शतकातील विद्यापीठे युवान त्संग या चीनी प्रवाशाने केलेल्या प्रवासवर्णन लेखनातून या विद्यापीठातून केलेला प्रवास हा ६२९ ते ६४५ या काळातील असून त्याने या काळात काश्मिरमधील राजवाड्यात जाऊन तेथे दोन वर्षे वास्तव्य करुन तेथील दस्तऐवजांचा केलेला अभ्यास आणि येथील राजाने त्यास मदत करण्याकरीता उपलब्ध करुन दिलेले बौध्द भिक्षूक आणि

तसेच लेखन नोंदीकरीता पुरविलेले २० लिपीक व त्याच्या देखभालीकरीता पुरविलेले ५ सहाय्यक असे उल्लेख, येथील ज्ञानसाधनेचे स्वरुप सर्वानाच अचंबित करणारे आहे.

व्याकरणकार पाणीनी, राजकारण व अर्थकारण निपुण आर्य चाणक्य, आचार्य चरक व जीवक यांनी विद्यापीठातून केलेले अध्ययन याचा अत्यंत गौरवाने केलेला उल्लेख पाश्चात्य देशातील ऐतिहासिक लेखनातून आढळतो. हे प्राचीन पुरावे १९१२ मध्ये जॉन मार्शल यानी उत्खनाच्या माध्यमातून सर्व जगाच्या निदर्शनास आणले आणि याव्दारे भारतातील ज्ञानसाधना जगासमोर अधोरेखीतच करण्यात आली.

**१.२ लेखन कला :**

लेखन कलेचा जागतिक स्तरावर आढावा घेत असताना गुहामधून व दगडावर केलेल्या सांख्यिकीय चिन्हाच्या माध्यमातून लेखनाची परंपरा सर्वश्रूत आहे.

इ.स. पूर्व काळामध्ये ४ थ्या शतकात इजिप्तवर स्वारी करुन तेथे राज्य स्थापन केल्यावर केलेले लेखन हे कालसापेक्ष झालेल्या उत्पातातून गाडले गेले होते. १९ व्या शतकात हे लेखन उत्खननाच्या माध्यमातून जगासमोर आले. या उत्खनामध्ये हिरॉग्जिफिक लिपीतील पॅपिरसवर लिहिलेले ग्रंथ आढळले. हे सारे ग्रंथ पॅपीरसवर लिहिलेले होते आणि त्याकरीता वारलेली लिपी अज्ञात होती पुढे ज्या प्राँन्स्वाँ शांपोलीया व सर थॉमस यंग यांनी अलेक्झांड्रीया जवळच्या रीसेटा शिलाखंडातील लिपी वाचण्यात यश मिळविले. त्यावेळी या पॉपीरस ग्रंथाच्या लिपीचाही उलगडा झाला.

भारतातील लेखन कलेविषयक वेध घेत असताना ऋग्वेदामध्ये लेखनकलेचा उल्लेख आढळतो. यावरुन ऋग्वेद काळामध्ये वावरणाऱ्या आर्य लोकाना लिपी ज्ञात होती. मोहेंजदोडो व हडप्पा येथील उत्खननातून सापडलेल्या विविध वस्तुवरील आढळलेल्या लेखनाचा उलगडा करण्यात अजूनही यश प्राप्त झालेले नाही. या लेखनात एका विशिष्ट लिपीत कोरण्यात आलेली अक्षरे यावरुन तत्कालीन संस्कृतित लिपी प्रचलित होती हे स्पष्ट होते. तसेच पाणिनीच्या अष्टामध्यातील लिपी आणि यवनानी लिपी इत्यादी आलेले लेखनातील शब्द त्या काळात लिपी प्रचलीत होती हे स्पष्ट करतात.

बुध्द काळात हस्तलिखित स्वरुपात लेखन मोठ्या प्रमाणात झाल्याचे पुरावे आढळतात हे लेखन बौध्द विहारातून संग्रहीत केलेले होते. नालंदा, तक्षशिला येथे अशा प्रकारे केलेले लेखन या विद्यापीटात होते. येथे सापडलेली भूर्जपत्रे, ताडपत्रे यावरील लेखन सर्वश्रूत आहे तसेच बौध्द भिक्षूक फा–हि–एन याने भारतात ४०० हस्तलिखित ग्रंथ नकला करुन चीनमध्ये नेल्याचा उल्लेख व प्रवासी इतसिंग यूवानसंग यानेही विविध ठिकाणहून हस्तलिखिताच्या केलेल्या नकला यावरुन येथील लेखन परंपरा सुस्पष्ट होते. या काळात सापडलेले लिखाण व त्याचा विद्वानांनी लावलेला अर्थ अन्य देशाकडून याबाबत केलेले लेखन याबाबत एकवाक्यता नाही. असे असले तरी काही निश्चित असे लेखन विषयक पुरावे समोर येतात. यामध्ये हडाप्पामधील उलगडा न होऊ शकलेली नाणी, वरिष्ठ धर्मशास्त्रातील निर्देशीत अक्षरसारखे शब्द, पाणिनीच्या व्याकरण शास्त्रातील लिपी आणि लिपीकार, भगवान बुध्दाचे पावन कार्य असे कित्येकदा सबंध या देशात आढळतात. लेखकाकडून होणारे लेखनकार्य हे पूजनीय असे जातकाच्या म्हणण्यानुसार आज्ञापत्र वा धार्मिक ज्ञान हे चांदीच्या पात्रात कोरले जाई. लिपीकाळात तर बुध्दाचा धार्मिक संदेश लाकडावर लिहिलेला असे. इतकेच नव्हे तर कांही ठिकाणी पाटी व लेखणी या लेखन सामुग्री म्हणून शालेय मुलाकरीता वापरल्याचा संदर्भ दिसून येतो. या सर्व गोष्टीवरुन खाजगी वा सार्वजनिक माहिती वितरणाकरीता त्याचा वापर होत असे. पाणिनी लेखनामधील ख्रि. पू. सहावे शतक यात सर्वसाधारणत: ख्रि. पू. चौथे व सातवे या शतकातील अंदाज घेता येईल. वेदांचा कालावधी शक्यते पलीकडचा आहे. सर्वात शेवटी आपण या निष्कर्षाप्रत येऊ शकतो की, भारतातील लेखनकला साधारणत: ख्रि. पू. सहाव्या शतकातील आहे. मात्र हा पूर्वीचा कालखंड कांहीसा अज्ञातच राहतो. मोहेंजोदडो, हडाप्पा नाण्यातील लिपीबाबत मात्र ती स्वदेशी वा परदेशी असल्याबाबत आजवरही एकवाक्यता झालेली नाही.

अक्षरलेखनाचा अभ्यास(शैली), स्वाभाविकता, प्रकार, त्यांचा विकास, वापर, ग्रंथालय स्थापनेकरीताचे प्रोत्साहन या सर्वाच्या कालखंडाबाबत आपण जरी ठाम नसलो तरी लिपीचा उगम व त्यातील कालानुक्रमे होत गेलेले बदल जाणू शकतो. भारतातील पुराणवस्तू खोदकामातील आढळलेल्या विविध लिपी जैन सुत्रातील १८ तर ललित विस्तारातील ६४ आढळल्या आहेत. आरंभीच्या काळात लेखनशैलीत ‘खरौष्टी व ब्राम्ही लिपीचा अंमल

दिसून येतो. त्यातही ब्राम्ही लिपीचा वापर प्रामुख्याने आढळतो. ख्रि. पू. दुसऱ्या शतकात खरौष्टी लिपी 'इंडोग्रीक व इंडोनिथीअन' नाण्यावर दिसते. भारत व भारतीय लिपीशी त्याचा संबंध महत्त्वाचा वाटतो. तथापि भारत आणि अफगाणिस्तान सिमेवरील 'शहाबाजगरी' येथील सन१८३६ च्या खोदकामात एक शिळा मिळाली. या शिळेवर सम्राट अशोकाच्या आज्ञापत्राचा अनुवाद होता. पूर्व तुर्कस्थान येथील सर ऑरल स्टेन यांना सापडलेली खरोष्टी लिपीतील काष्ट, कातडे वा कागदावरील अक्षर शिल्पे प्रामुख्याने भारतीय व खासकरुन बौध्द धर्मियांनी वापरात आणलेली दिसून येतात. या लिपीचे खास वैशिष्ट म्हणजे ती स्मारकावरील वा शिलालेखावरील लिपी नसून डावीकडून उजवीकडे लिहीता येणारी सुप्रसिद्ध व परिचित कॉर्सीव लिपी होती. ख्रि. पू. पहिल्या व सहस्त्रकातील दुसऱ्या भागातील (पहिली पाच शतके वगळून) ही पूर्वेकडील फार महत्त्वाची लिपी मानण्यात येत असे.

ब्राम्हीचा विचार करता, काही तज्ञांच्या मते द्रवीडीयन मूळ लिपी आहे. तर काहींच्या मते चित्र लिपीनंतर तिचा विकास झाला. तिचा संबंध सिंधुखोऱ्यातील लिपीशी असावा असा काहींचा तर्क आहे. परंतु यामध्ये एक अडचण अशी आहे की, आज अस्तित्वात असलेल्या व सहस्त्रकांच्या अंतिम टप्प्यातील ज्ञानात पुष्कळ अंतर आहे. मोहेंजोदडो नागरीकीकरणातील अदमासे तारीख आणि सहस्त्रकाच्या पूर्वार्धात भारतीय लेखन शैलीच्या नमुन्यांचा आढळ असे हे आहे. उपलब्ध दाखल्यांनुसार जरी आपण एक ठाम मत निष्पन्न करु शकत नसलो तरी एक गोष्ट मात्र ठामपणे सांगू शकतो की आरंभीची ब्राम्ही व पूर्णपणे विकसित झालेली ब्राम्ही नामांकीत ध्वनीमूल्य असल्यामुळे प्राचीन लोकांपेक्षाही त्यापुढील भारतीय निश्चित प्रगती साधू शकेल. कारण त्यातील उच्चारण स्पष्ट असे. परंतु ब्राम्ही मूळाक्षराबाबत मात्र ख्रि. पू. सहाव्या शतकातील तिच्या वापराबाबत संभ्रम आहे.

'खरौष्टी आणि ब्राम्ही' त्यापुढे फार मोठ्या प्रमाणावर भारतीय लिपी विकसित झाली. परंतु त्यांच्यातील गुंतागुंत व विभिन्नता यामुळे त्यांचा अभ्यास क्लिष्ट झाला. महान भारतीय लेखनशैली तज्ञ बुहलर याने भारतीय लिपीचे सहा मुख्य प्रकार नोंदविले आहेत. १) मुळ ब्राम्ही –उजवीकडून डावीकडे लेखन पण नमुन्यादाखल फार थोडी उदाहरणे, २) मौर्य लिपी

– पाषाण लेण्यांच्या भिंती वा खांब यावरील कोरीव अक्षरे, ३) कलिंगा वा द्रविडी प्रकार – भारताच्या आग्नेय किनाऱ्याकडील भागात, ४) डेक्कनचा पश्चिमेकडील भाग वा आंध्र येथे वापरात येणारी ख्रि. पू. दुसऱ्या शतकातील, ५) मौर्यकालीन – बिहारकडील भागातील वायव्य इशान्येकडील प्रदेश पण तुलनेने कमी. ६) सुंग प्रकार – सुंग कालीन संस्कृत साहित्य. हा विकसितपणा केवळ ब्राम्ही शाळांकरीता तर ब्राम्ही संस्कृतीकरीता संस्कृतचा वापर झाला. बौध्द संस्कृतीकरीता पालीचा तर अर्ध मागधीचा जैन संस्कृतीत वापर झाला. ख्रिस्त कालखंडातील दुसऱ्या शतकात सामान्यपणे संस्कृतचा वापर रुढ झाला. तर भारताच्या इतिहासातील मध्ययुगीन कालखंडात शिक्षणाकरीता वा राष्ट्र व्यवहाराकरीता संस्कृतने पाय रोवले. बोली भाषेकरीता वरील सहा लिपी भारतीय लिपीत रुढ झाल्या. भारतातील उत्तरेकडील भागात, गुप्तच्या कालखंडात मूळ ब्राम्ही, कालिंगा व द्रविडी, सुंग या लिपी म्हणून गणल्या जाऊ लागल्या. नागरी वा देवनागरी लिपीच्या वापरातून आधुनिक भारतात गुप्तची वैशिष्ट्ये दिसून आली. नागरी लिपीतील ध्वनी उच्चारणाच्या परिपूर्णतेमुळे उत्तर व मध्यभारत व महाराष्ट्र या ठिकाणी ती मुख्य लिपी गणली जाऊ लागली. त्याचप्रमाणे दक्षिण भारतातील ग्रंथलिपीत कन्नड, तेलगू, तुलू–मल्याळम आणि तामिळ स्विकारल्या जाऊ लागल्या.

लेखनाकरिता वापरलेल्या सामुग्रीवर दृष्टीक्षेप टाकायचा झाला तर मागील कित्येक शतके शिलालेखावर मानवी हाताने कोरलेल्या अक्षरांचे नमुने दिसून येतात. अक्षर लेखनाकरीता देणगी स्वरुपाची ताम्रपत्रे वापरली जात तर काही ठिकाणी लोह, सुवर्ण, चांदी वा इतर धातू, माती, विटा या सारखी सामुग्री वापरली जाई. भूर्जपत्रे व ताडपत्रांचाही (Leaves of palm tree) वापर अक्षर लेखनाकरीता केल्याचा पुरावा मिळतो. ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकात धम्मपद लिहिण्याकरीताचे एमएमएस (MMS) साधनसामग्री तर उत्तरेकडील भागात तालपत्र उल्लेखलेले 'अर्थशास्त्र' हा जंगल सामुग्रीचे वैशिष्ट्य दर्शवितो. हस्तदंताचा वापर लक्ष वेधून घेतो तर काही ठिकाणी कापड चांगले चोळून टर्मारीन बीयांची पेस्ट लावून, सुकवून त्यावर कोळशाच्या भुकटीने काळेशार केले जाई. मठवासी बौध्दचरित्र लिहिण्यासाठी लाकडी फलकाचा वापर करीत असल्याचे दिसून येते.

प्राचीनकाळी पर्णपत्रांचाही वापर होत असे. याचा वापर खास करुन देशातील उत्तरेकडील भागात होत असे. बहराच्या कालावधीत पामेरा वृक्षाची पाने खुडून, पढे ती वाळवून, उकडून, पुनश्च वाळवून, शंखशिल्पांनी घासून गुळगुळीतपणाचा मुलामा येई. सर्वसाधारणपणे १ ते ३ इंच लांबी व सव्वा ते ४ इंच असा आकार असे. तो कागद (कापड) शाईत बुडवून बोर्ड तयार केला जाई. त्यास एकाबाजूने दोर असे. प्राचीनकाळी जरी चीनमध्ये कागदाचा शोध लागलेला होता तरी चिनी प्रवासी त्याचा क्वचितच वापर करीत. पुराणातील निर्देशानुसार प्राचीन काळी भारतात शाईचा वापर होई. ग्रीक प्रवासी निर्चस याने लेखनाकरीता कापडावरील शाईचा निर्देश केला आहे. ख्रि. पू. चौथ्या शतकात आणि सम्राट अशोकाच्या पत्रव्यवहार इतिहासात शाईचा वापर दर्शवितो. तत्पूर्वी पपीरस किंवा झाडाची पाने वापरली गेल्याची शक्यता विद्वान वर्तवितात.

लेखनकला, लेखनसामुग्री याच बरोबर प्राचीन कालीन भारतातील शिक्षणवृध्दीबाबत विचार करता हे सर्व ग्रंथालयाचे पायाभूत घटक आहेत. अक्षर लेखन (लिपी), लेखन सामुग्री यासोबत लेखकाचे कसबही तितकेच महत्त्वाचे आहे. वेद, उपनिषदे, काव्य, बौद्ध धर्मिय साहित्य या लिखीत पुराव्याव्दारे ज्ञानसंपदा प्रवाहीत झाली. राजे महाराजे काळात साधू पुरुषांकडून प्रसारीत अथवा प्रवाहीत होणारी ज्ञानसाधना मुखोद्गत स्वरुपाची होती. लिखीत स्वरुपातील दाखले दुर्मिळ होते. या कालावधीत लिखीत स्वरुपे अल्पाशाने होती. काही कालखंडातच ब्राम्हणवर्गाप्रत असलेल्या ज्ञानाच्या प्रसाराबाबत ते फारच कंजुषपणा करु लागले. ब्राम्हणी शाळांमध्ये पोहचणारे ज्ञान इतर वर्गातील लोकांना पोहचले नाही. त्यामुळे त्याला बहर आला नाही. याउलट स्थिती पाहता जैन वा बौध्दधर्मिय शाळांमध्ये शिल्पकला, लेखनशैली यास प्रोत्साहन दिले गेले. तो एक धार्मिक अनुष्ठानाचा भाग बनला. चीनी प्रवाशांकडून याचा पुरावा मिळतो. फा-हायन व इट-सींग हे चौथ्या व सातव्या शतकात भारत भेटीस आले होते. त्यांचसोबत त्यांनी एमएमएस च्या भरपूर प्रती आणल्या होत्या. यातून एक निष्कर्ष असा निघू शकेल की पारंपारिक शिक्षण व अभ्यास पद्धतीत हस्त लिखितांचा समावेश होता.

गुप्तच्या काळात हर्षकालीन हिंदू पुनरुज्जीवनासंबंधी विद्या व्यासंग दिसून येतो. विद्या व्यासंगामध्ये जैन धर्मियांचे कार्यही हातभार लावते. पायस जैनांनीही लिखीत या मौखीक स्वरुपात भर घातली होती. तत्पूर्वीच्या जैन साहित्याचे मात्र नमूने उपलब्ध नाहीत. कदाचीत त्याकाळी अल्पावधीतच नष्ट होणाऱ्या सामुग्रीवर साहित्याचे लेखन झाले असावे. परंतु तद्नंतरच्या कालावधीतील समक्ष उपलब्ध दाखल्यानुसार पार्श्वभूमी अशी की सिध्दार्थ जयसिंह व त्याचा उत्तराधिकारी कुमार पाल याने धर्मातीत सामर्थ्य दर्शविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. तोच वारसा पुढे चालू राहिला. एका उत्कृष्ट दाखल्यानुसार मंडूचा लक्षाधीश संग्राम सोनियाने कल्पसुत्रांच्या प्रतीकरीता व तत्सम कार्याकरीता दोन लाखांहून जास्त सुवर्णमुद्रा खर्च केल्या. त्यातूनच पुढे जैन भांडार व ग्रंथालयाची स्थापना व कार्य चालू राहिले. जीन भद्र् सुरीने ती प्रसिध्द ग्रंथालये पुढे जैसलमेर, दौलताबाद, मंडू, अहमदाबाद, खंबाट, पाटण आणि इतर ठिकाणी प्रसारीत केली. त्यातील काही आजही प्राचीन व मध्ययुगीन भारतातील जीवंत स्मारके उपलब्ध आहेत.

भारतातील लेखनकलेचा प्रारंभ, तिचे कार्य त्यारीकता वापरण्यात येणार सामुग्री, त्यांचे प्रकार व त्यांची उत्क्रांती, एकंदरीत प्राचीन ग्रंथालयांचे कार्य नेमके कशासाठी होते त्याची शक्यता व त्यांच्या विकासास पोषक अथवा त्यांची वृध्दी खंडीत करणारेही घटक होते. सर्वसाधारणपणे ज्ञानाचा विकास होण्याकरीताच प्राचीन भारतात पोषक घटक कार्यरत होते. प्राचीन कालीन ग्रंथाबाबत त्यांच्या निकडीसंबंधी विचार करता त्याबाबत मात्र संघर्षात्मक वाद कार्यरत आहे. काहीच्या मते बुध्दाच्या काळात ग्रंथालय ही एक सामान्य संस्था होती. तर काहींच्या मते मुस्लीमपूर्व भारतात देशभावनेने प्रेरीत होऊन काही विद्वानांनी ग्रंथालयाचे अस्तित्व टिकवून ठेवले होते. उपलब्ध संदर्भाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर देशभावना हीच ग्रंथालयांच्या अस्तित्वाचे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट होते.

साहित्य आणि शिक्षण याचा कार्यकाल आपल्या भारतात युगानुयुगे आहे. त्यामुळेच सांस्कृतिक वारसा जपला गेला. हेही सत्य आहे की त्यावेळी एमएमएस साठवणी केंद्रे होती. पण दुर्दैवाने फार प्राचीन काळापासून ग्रंथालये होती त्याचे ठोस दाखले नाहीत. याचे मुख्य कारण असे असावे की त्याकाळी ग्रंथालय वाढीकरीता पोषक वातावरण नव्हते. उच्चवर्गीयांना

प्राप्त झालेले ज्ञान हे तात्पुरत्या संचयीत स्वरुपाचे होते. महान योगी, तपस्वी, विद्वान सामाजाभिमुख नव्हते. ज्ञान हे फक्त उच्चवर्णियांपूरते सीमित असल्याच्या त्यांच्या प्रधान हेतूने वा भविष्य कालीन आंतरीक भितीने ते समाजात पसरत नव्हते. ब्राम्हणी शाळांमध्ये मुखोद्गत ज्ञान प्रसाराचे कार्य चालल्याने त्याचे लिखीत स्वरुप उपलब्ध नाही.

कागदाचा शोध चीनमध्ये फार पूर्वी लागल्याचे दाखले उपलब्ध आहेत. तथापि भारतामध्ये मात्र काही शतकोत्तर त्याची उपलब्धी झाली. इटसींग या चिनी प्रवाशाने आवश्यकतेनुसार कागदांची मागणी चीनमधूनच केली. त्यानुसार सातव्या शतकापर्यंत भारतामध्ये कागदी लिखीते उपलब्ध नव्हती. इटसींगच्या पाहणीनुसार बुध्द चैत्य यांची प्रतिमा रेशमी व कागदांवर होती. यावरुन आपण असेही म्हणू शकतो की अत्यंत दुर्मिळ अवस्थेत पण धार्मिक हेतूकरीता त्याचा वापर होई.

## १.३ ग्रंथलेखन साधने :

लिपीचा शोध लागताच मानवाने आपले अनुभवजन्य ज्ञान लिपीबध्द करण्यासाठी आजूबाजूच्या साधनाचा वापर करावयास सुरवात केली. या साधनाचा वापर करताना देखील मानवाने तत्कालीन लिपीमध्ये ही साधने अधिकाअधिक स्वरुपात कशी दिसतील याचा विचार केल्याचे लक्षात येते. अशा साधनामध्ये प्रामुख्याने मातीच्या विटा – दगड जनावरांची कातडी धातू युगात धातूचे पत्रे, झाडांच्या साली व पाने, बाबूंच्या पट्टया अशी ऊनवारा, सूर्यप्रकाश, पाणी यापासूनच तत्कालीन स्थितीत दिर्घकाळ टिकणारी साधने म्हणून या साधन सामुग्रीचा उपयोग लेखनासाठी केल्याचे निदर्शनास येते.

### १) विटा :

प्राचीन परंपरांचा शोध घेण्यासाठी पाश्चात्य संशोधकानी १९ व्या शतकात विविध ठिकाणी उत्खनन केले. अशाच उत्खनामध्ये आशीया म्यानमार परिसरात केलेले उत्खनन हे सर्वश्रूत आहे. या परिसरातील उत्खननामध्ये इ. स. पूर्वी ७ व्या शतकातील अशियन असुरअवनीपाल (असूर बनीपाल) याच्या राजप्रसादाच्या परिसरात विटावर केलेले लेखन ग्रंथस्वरुपात आढळते अनेक विटावरील लेखनाने सलग अशी ग्रंथ निर्मिती केल्याचे ही या उत्खनातून निर्देशनास आले. अशा अनेक विटामधून हेही जाणवते की तेथे एक ग्रंथालय स्थापन केलेले असावे.

अलेक्झांड्रीया येथील राजानेदेखील अशा विटावरील लेखनाने युक्त असे ग्रंथालय जिनेव्हे येथे स्थापण्याचे आढळून आले. हा परिसर म्हणजे तैग्रिस व इफ्रोटिस या नद्यानी तयार झालेले समृध्द अशा मिसापोटीयाचा प्रदेश होय. बहूतांशी नद्यांच्या गाळापुढे तयार झालेल्या या प्रदेशात दगड फारच दुर्मिळ असयचा आणि असल्यास कठिण दगड उपलब्ध नव्हते आणि याच परिस्थितीत लेखन साधन म्हणून मातीच्या विटाचा वापर या परिसरात केला असावा. या विटांची सर्वसाधारण लांबी ५′ इतकी आढळण्यात आली. या विटा ओलसर असताना टोकदार साधनाने विटाच्या पृष्ठभागावर लेखन केले जात असे. या लेखनास एक विशिष्ट अशी वळणदार शैली आपोआपच प्राप्त झाली आणि  शैली क्यूनेफॉर लिपी म्हणून ओळखली जाऊ लागली. अशा लेखन केलेल्या विटा नंतर त्या सुकवून भट्टीत भाजल्या जात असत. या विटाची क्रमवार रचना करण्यासाठी त्यावर अंक टाकले जात. अशा सलग लेखनातून एक ग्रंथ सिध्द होत असे. इ. स. च्या काळात असे लेखन प्रचलीत होते.

अशा प्रकारच्या विटा मोहेंजदोडो, हडप्पा अशा परिसरातही आढळून आलेल्या आहेत.

**२) दगड :**

ज्या परिसरामध्ये कठीण दगड आढळत अशा ठिकाणी दगडावर धातूच्या टोकदार साधनाने लेखन करण्याची पध्दती इ.स.पूर्व ३ ऱ्या शतकात अस्तित्वात आल्याचे निदर्शनास येते. सम्राट अशोकाच्या कालखंडामध्ये असे कोरण्यात आलेले शिलालेख, मंदिराच्या दगडी खांबावर कोरण्यात आलेली चित्रे, वेलबुट्टी आणि काही सांकेतिक खुणा या आधारे दगडाचा लेखनाकरीता साधन म्हणून उपयोग केला जात असे. अर्थात दगडाचे संग्रहण करुन एक दीर्घ लेखन करुन संग्रहण तयार करण्याकरीता लागणाऱ्या जागेचा विचार करता ग्रंथलेखनाकरिता दगडांचा वापर केल्याचे कानावर आलेले नाही.

**३) कातडे :**

विटावरील ग्रंथलेखन संग्रहीत करण्यामधील अडचणी जशा मानवास जाणवू लागल्या तसतसे त्यांनी लेखनासाठी इतर साधनांचा शोध घेण्याचे सुरु केले. प्राचीन काळी शिकार हा अविभाज्य भाग असल्याने साहजिकच त्याकडे मानवाचे लक्ष वेधले गेले. प्राण्याच्या

कातड्यावर धातूच्या टोकदार साधनाने लेखन केले जाऊ लागले. या साधनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे हे एक टिकावू तर आहेच शिवाय यावर दोनही बाजूनी लिहिण्याची सुविधा आणि एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी नेण्यास सुलभ असल्याने याचा वापर केला गेल्याचे निदर्शनास येते.

इजिप्तमध्ये इ.स. पूर्व ४ थ्या शतकातील कातड्यावर केलेल्या लिखाणाचा नुमना सापडला आहे. १९४७ मध्ये मृत समुद्राचे उत्खनन झाले तेव्हा मातीच्या रांजणात ठेवलेल्या कातड्याच्या सुरळ्यांची पुस्तके सापडली. फक्त टिकावू पुस्तकांसाठी कातड्याचा उपयोग केला जात असे. पोस्त या इराणी शब्दाचा अर्थ कातडे असाच आहे आणि पुस्तक हा शब्द या पोस्तवरूनच आला आहे. पुस्तक शब्द संस्कृतमध्ये वापरला गेला असला तरी तो मूळ इराणी आहे व त्याचा कातड्यावर लिहिल्या जाणाऱ्या लेखनाचे साधन असा अर्थ आहे.

कातड्याच्या उपयोगामुळे लेखन साहित्याच्या इतिहासात फार महत्त्वाचा फरक झाला, तो त्याच्या आकारात. पॅपीरसच्या गुंडाळ्या करुन ठेवीत. हीच पध्दत काही काळ कातड्याच्या बाबतीत चालू होती. पॅपीरसपेक्षा कातड्याचा आकार फार मोठा असे म्हणून पुढे त्याच्या घड्या घालून लिहिण्याची प्रथा सुरु झाली. एक घडी, दोन घड्या, तीन घड्या याप्रमाणे घड्या घालून मोठ्या कातड्याची फीतीओ, क्वाटॉ, ऑक्टोहा अशी अधिकाधिक लहान आकाराची पाने तयार होऊ लागली. ही दुमडलेली कातडी डाव्या बाजूने किंवा माथ्याच्याबाजूने शिवून त्याला जाड पुठ्ठा चिकटवून आजच्या पुस्तकासारखे स्वरुप रुढ झाले. *( श्री. ना. बा. मराठे, पृष्ठ २१)*

अशा ग्रंथाला त्या काळामध्ये कोडेक्स असे संबोधले जात असे. बांधीव ग्रंथाला त्या काळात बायबल म्हणत. याचे कारण म्हणजे बायबल लिहिण्यासाठी फक्त व्हेलमचा उपयोग करण्याची पध्दत होती व त्याची बांधणी ही करण्याची रीत होती हे होय. ख्रिस्ती धर्मग्रंथ किंवा बायबल लिहिण्यासाठी पॅपीरसचा उपयोग करण्यात आला नाही. *( भारतीय संस्कृती कोष, खंड –३ पृष्ठ २२)*

मध्ययुगीन काळात व्हेलम ग्रंथाचा प्रसार होऊन पुढे त्याचा वापर धर्म ग्रंथाव्यतिरिक्त इतर ग्रंथलेखनासाठी करण्यात येवू लागला.

**४) पॅपीरस :**

पॅपीरस ही एक लव्हाळच्या जातीतील वनस्पती असून या झाडाच्या फांद्या काढून दाब देऊन कागदाच्या आकाराची पट्टी तयार करण्यात येत असे. या पट्ट्या एकमेकांना जोडून लेखनासाठी त्याचा वापर केला जात असे. इजिप्तमधील नाईल नदीच्या परिसरात पॅपीरस नावाची ही वनस्पती विपुल प्रमाणात आढळत असे. लेखन संदर्भात त्याचा वापर प्राचीन काळामध्ये इ. स. पूर्व ३०० च्या दरम्यान याचा लेखनासाठी वापर इजिप्त, ग्रीस व रोम येथील ग्रंथालयामध्ये केल्याचे पुरावे तेथील लेखन संकलनावरुन निदर्शनास येतात. आजही या साधनाचे अवशेष आपल्या देशात अन्यत्र आढळतात, शिवाय ब्रिटीश म्युझियममध्ये अशा लेखनाची १३३ फूट लांबीची पट्टी आजही ठेवण्यात असल्याचे आढळते. विविध ठिकाणी केलेल्या उत्खनातून ही साधने उजेडात आली आहे.

**५) भूर्जपत्रे व ताडपत्रे :**

आपल्या देशातील पंजाब व गुजरात परिसरात सिंधू संस्कृती अस्तित्वात होती आणि ती एक प्रगल्भ संस्कृती होती याचे पुरावे उत्खनातून समोर आलेले आहेत. याठिकाणी सापडलेल्या विविध वस्तूवरील कोरीव लेखन यावरुन तत्कालीन संस्कृतीतील व्यक्तींना लेखनकला अवगत होती हे निदर्शनास येते. मात्र अद्यापि या लीपीचा उलगडा करण्यात संशोधकाना यश प्राप्त झाले नाही. इ.स. पूर्व काळात लिपी अवगत होती हेही पुढील लेखनातून निदर्शनास आले आहे. भूर्जपत्रे, ताडपत्रे याचाही उल्लेख कौटील्य अर्थशास्त्रात केलेला आढळतो. त्या काळात ह्या साधनाच्या लेखनासाठी अधिकाधिक उपयोग केल्याचे निदर्शनास येते. आजही अशी सामुग्री भारतातील विविध राज्यातील वस्तूसंग्रहालये वा ग्रंथालयांमध्ये सुरक्षित असल्याचे निदर्शनास येते.

ताड व भूर्ज या वृक्षाची रुंद व मोठी पाने असल्याने आणि ती टिकावयास सुलभ असल्याने यावर लेखन करण्याची परंपरा रुढ झाली. ही भूर्जपत्रे ही साधारणत: ३०० वर्षे हून अधिक काळ टिकतात. अणकुचिदार सळईने वा अन्य साधनाने काजळाची शाई करुन हे लिखाण केले जाई.

### ६) धातूवरील लेखन :

धातू युगात तांब्याच्या पत्र्याचा वापर करुन दस्तऐवजाबाबत केलेले लेखन रुढ असल्याचे पुरावे आढळतात. राजाकडून पंडितांना वा इतर सन्माननीय घराण्याना दिलेले ताम्रपट देण्याचे उत्तम उदाहरण सर्वश्रुत आहे. हे साधन दीर्घकाळ टिकत असले तरी लेखनास लागणारा वेळ व संग्रहण करणे सुलभ नसल्याने अशा धातूच्या पत्र्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात केल्याचे आढळून येत नाही.

### ७) कागद :

कागदाचा शोध चीनमध्ये लागला आणि लेखनकला सुलभ झाली. चीनमध्ये हा शोध इ. स. २ च्या शतकात लागला. या अगोदर तो लाकडी ठोकळ्यांवर अक्षरे कोरुन त्याची छाप उमटवण्याची पध्दत चीनी लोकांनी शोधून काढली. सुरवातीच्या काळातील हे लेखन मग सुत्रे अशा स्वरुपाचे होते. ९ व्या शतकात अशा ठोकळ्याचा वापर करुन पुस्तके छापू लागले. एकूणच ही मुद्रण कलेची पहिली पायरी होती. याचबरोबर काश्मीरमध्ये ही तेथील सुलतानानी आपल्या परिसरात खास प्रकारचा कागद बनविण्याऱ्या लोकांना उत्तेजन दिले. यामुळे असाही एक समज प्रचलित आहे. काश्मीरमध्ये पहिल्यांदा हात कागद बनविण्याची कला सुरु झाली. जगभर इंडिया पेपर म्हणून गौरव केला जातो आणि अधिक टिकावू समजला जातो. त्याचे मूळ चीनच्या या परिसरात आढळते. एकूणच सर्वदूर प्रसार झाला आणि कागद हे लेखनाचे प्रमुख साधन बनले. काजळीपासून बनविलेली शाई व कागद याची संगती जुळून आली आणि हस्तलिखित ग्रंथ रचनेस चालना प्राप्त झाली.

लेखनासाठी अशी ही साधने कालसापेक्ष अस्तित्वात आली आणि ग्रंथालयाचे जाळे पुढील शतकात सर्वदूर पोहोचले.

### ८) मुद्रण कला :

या कलेच्या शोधाचा विचार करता ही कला प्रथमत: चीनमध्ये सुरु झाली. मातीच्या खापऱ्यांचे ठसे व लाकडाच्या ठोकळ्याचा वापर करुन मुद्रणाची आद्य सुरवात करण्याचा मान चीनकडे जातो. ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता चीनमध्ये ११ मे ८६८ रोजी वांगचे या इसमाने आपल्या आईवडीलांबद्दल स्मृतीचिन्ह म्हणून आदरयुक्त भावनेने एक ग्रंथ छापून फूकट वाटला.

त्यानंतर एक हजार वर्षाच्या कालावधीत मुद्रणाची कला सर्व जगभर फिरली आहे. पाश्चात्य देशात ही कला अतिशय प्रगत अवस्थेत गेली असून ज्ञानप्रसाराचे हे प्रभावी शास्त्र झालेले आहे. पंधराव्या शतकाच्या मध्यावर जर्मनीमध्ये जोहान गुटेनबर्ग याने आधुनिक मुद्रणतंत्राचा शोध लावला असे मानले जाते. चीनमध्ये त्यापूर्वी लाखो ठसे वापरुन मुद्रण होत असे, परंतु गुटेनबर्ग याच्या मुद्रणानंतर प्रसार सर्वत्र झपाट्याने झाला व ग्रंथालयनिर्मिती व प्रसाराच्या कक्षा, मुद्रणतंत्राचा विस्तार होत गेला.

मुद्रणकलेचा परिचय पोर्तुगीजांना इ.स. १५५४ साली आणि भारतात इ.स. १५६० साली झाला. भारतात इ. स. १५६० मध्ये पहिले पुस्तक छापले गेले. देवनागरी लिपीने टंक पाडण्यात इ. स. १८०४ पासून सुरवात झाली. हे काम कलकत्यात एका कारागीराने सुरु केले. १८१२ मध्ये देवनागरी लिपीचा एक संच तयार झाला. परंतु दुबईचे जावजी दाराजी यांच्या वेळेपर्यंत मराठी मुद्रणाचे काम शीळा छपाईने होई. *( डॉ. रमेश शकोकार, ज्ञानगंगोत्री, डिसेंबर २००५, पृष्ठ)*

**१.४ भारतातील मुद्रण कलेची सुरवात :**

भारतात मुद्रणकला आणण्याचा प्रयत्न पोर्तुगीज व डच मिशनऱ्यानी केला. पोर्तुगीजांनी गोव्यात आपले बस्तान बसविल्यावर त्यानी ख्रिस्तीय धर्माच्या प्रचारासाठी मुद्रणपत्रे भारतात आणली. गोव्यातील धर्मगुरुंनी आरंभी पोर्तुगीज व लॅटीन भाषेत धार्मिक पुस्तके छापली. पोर्तुगीज भाषेतील धर्मप्रचार पुस्तक १५५६ मध्ये गोव्यात छापले गेले. हेच भारतातील पहिले छापील पुस्तक होय. नंतर मात्र छापखान्यातून इंग्रजी पुस्तकेही निघाली. गोव्याजवळील साष्टी येथील छापखान्यातून मराठी (कोकणी) भाषेतील पण रोमन लिपीत छापलेले पुस्तक १६१६ साली निघाले. हे पुस्तक म्हणजे फादर, स्टिफन्स याने लिहिलेले ख्रिस्तपुराण, मद्रास इलाख्यातही डच मिशनऱ्यानी १७१२ साली एक छापखाना स्थापन केला. तेथे त्यानी जर्मनीतून ओतून आणलेल्या तामीळ अक्षराच्या टाइपात पुस्तके छापली. भारतात खिळाक्षरे तयार होण्याचा पहिला मान तामीळ भाषेकडे जातो. गोव्यात पोर्तूगीज (ख्रिस्ती) धर्मप्रचारकांनी छापलेल्या पुस्तकात, छापखाना या अर्थी 'लिहीत मंडप' हा शब्दप्रयोग वापरलेला आढळतो. *(राहळकर, मराठी मुद्रक, पृष्ठ १२–१३)*

मुद्रणाचा हा चंचूप्रवास हळूहळू भारतात सर्वदूर पसरु लागला. १८२८ सुमारास मुंबई येथील अमेरीकन मिशन प्रेस या कारखान्यात गणपत कृष्णाजी हे एक कामगार म्हणून काम करत असताना त्याना एका गोष्टीची जाणीव झाली म्हणजे मिशनरी लोक धर्मप्रसारासाठी हे छोटीमोठी पुस्तके मुद्रीत करुन ती स्वस्त किमतीत वा फूकटही येथे लोकाना वाटत. पुढे या कारखान्यात ऋग्वेदातील पहिल्या मंडळाचे मूळ संस्कृत व मराठी, इंग्रजी भाषांतर दिलेले आहे. असा ग्रंथ 'त्रिविद्या त्रिगुणात्मकीका' या नावाने छापून हळूहळू हिंदू धर्मीयाना उपयोगी ठरतील अशी पुस्तके या छापखान्यातून छापली जाऊ लागली. या सर्वाचे सूक्ष्म अवलोकन करताना गणपतरावाना आपणही अशी पुस्तके मुद्रित करुन हिंदू धर्मियांसाठी का वितरीत करु नये असा विचार केला आणि यातूनच पुढे ते परदेश यंत्रणेपेक्षा खिळाप्रेस करीता आवश्यक ती शाई बनविण्याच्या प्रयोगाकडे वळते आणि १८३० पर्यंत ही सर्व तयारी पूर्ण झाल्यावर त्यांनी एक लोखंडी दाब प्रेस मुंबईतच बनवून घेतला. मोठमोठ्या खिळा खरेदी केल्या आणि स्वत: १८३१ साली त्यानी स्वत:चा स्वतंत्र छापखाना 'गणपत कृष्णाजीचा छापखाना' या नावाने चालू केला. सामान्य लोकांची गरज ओळखून त्यांनी सुरवातीस एक पंचाग तयार करुन छापले. त्यामध्ये वर्षफल, वर्षभविष्य अशी माहिती दिली. त्यांनी या आपल्या प्रकाशनाची किंमत आठ आणे इतकी ठेवली. पंचांग छापण्याचा उद्योग ही त्यांनी केला. पुढे त्यांनी स्वस्त दरात धार्मिक पुस्तके मुद्रित करण्याचा उपक्रम सुरु केला. एका हिंदू धर्मियाने पंचागाच्या प्रकाशनाच्या माध्यमातून हिंदू धर्म विषयक पुस्तके मुद्रित करुन ती विकण्याचा शुभारंभ केला. याचे सारे श्रेय गणपत कृष्णाजीना जाते. अशा या पहिल्या मराठी मुद्रकाचा जन्म १८०० च्या सुमारास कुलाबा जिल्ह्यात झाला असावा. इतकीच माहिती त्याच्याबद्दल उपलब्ध आहे. गणपतराव खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे गुटेनबर्ग होय. त्यांनी सुरवातीस लाकडी प्रेस, खिळा छापखाना सुरुवात करुन पुढे सर्व बाबतीत आघाडीवर नेला. जागतिक स्तरावरील मुद्रणकेलेच्या विकासाप्रमाणे मुद्रण विषयक वाटचालीचा विकास झाल्याचे निदर्शनास येते. याच्या एकूण वाटचालीचे साम्य हे इ. स. १४५० मध्ये गुटेनबर्गयाने लाकडी ठशापासून लाकडी पत्र्याच्या सहाय्याने मुद्रणास सुरुवात केली. गणपत कृष्णाजी आणि गुटेनबर्ग यांच्या प्रयत्नामधील साधर्म्य विचारात घेऊन गणपत कृष्णाजी याना महाराष्ट्राचा गुटेनबर्ग म्हणणे सार्थकी आहे.

या देशात प्रांतिक भाषेत मुद्रणाचा प्रथम मान मिळतो तो तामिळ भाषेला.१५०४ मध्ये छापलेल्या पुस्तकात तामिळ मजकूर लॅटीन टाईपमध्ये छापला होता. ज्यूऑन गॉन्साल्वेस या स्पॅनीश कारागीराने १५५७ मध्ये आणि पुढे फारीयाने क्बूबॉन मध्ये १५७८ साली तामीळ टाईप पाडले होते. भारतीय लिपीतील ते पहिले टाईप होते. इ. स. १५७८ मध्ये क्यूबॉनला मुद्रित करण्यात आलेले 'दौगिंग ख्रिस्ता' हे पुस्तक दोनही टाईपमध्ये मुद्रित करण्यात आले होते. भारतामध्ये स्थानिक भाषेत आणि लिपीतील हे पहिले पुस्तक होय. तसेच येथे १६७८ मध्ये मुद्रित करण्यात आलेल्या 'इंडीकस मन्लाबरिकस'(IndiCas Mantabaracus) या पुस्तकात कोकणी व देवनागरी लिपीत ताम्रपट मुद्रित केल्याचे निदर्शनास येते. या ग्रंथाची प्रत मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे. देवनागरी लिपीतील पहिला मजकूर असला तरी त्याचे आपल्या देशाबाहेर पहिले मुद्रण झाल्याचे निदर्शनास येते. *(नाईक बापूराव, डिसेंबर, ज्ञानगंगोत्री २००५, जानेवारी २००६, पृष्ट २६)*

भारतात मुद्रणाच्या दृष्टीकोनातून खरी सुरवात झाली ती १७७८ पासून हॉलडे लिखित बंगाली व्याकरणाच्या ग्रंथाने. पुढे देवनागरी लिपीतील टाईप वुइल्यम १७९५ मध्ये तयार केले होते. पक्ष दुर्दैवाने ही सामुग्री नष्ट झाली. पुढे इंग्लंडला परत गेल्यानंतर नव्याने टाईप तयार करुन संस्कृत ग्राम 'इस्ट कॉलेज' हर्टफर्ट येथे १८०८ मध्ये मुद्रित केले.

कलकत्त्याबरोबरच पुढे मुद्रणाचा विकास झाला तो अमेरीकन मिशनने १८१७ साली सुरु केलेल्या छापखान्याच्या माध्यमातून. इंग्लंडमध्ये तयार केलेल्या टाईपच्या माध्यमातून १८२२ मध्ये 'पंचोपाख्यान' हे पहिले संपूर्ण मराठी पुस्तक देवनागरी टाईपात मुद्रित करण्यात आले होते. याकरीता विल्कीसन याने तयार केलेला टाईपचा वापर करण्यात आला होता. मुंबईत मुद्रणाची सुरवात झाली आणि त्याचबरोबर देशातही या अगोदर सुरवात झालेली मुद्रण परंपरा यामुळे ग्रंथ निर्मितीस चालना मिळाली. नियतकालिके ही प्रकाशित होऊ लागली. १८४१ मध्ये प्रसिध्द झालेले हे पहिले साप्ताहिक मुंबई येथील गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यात मुद्रीत करण्यात आले होते. तसेच ज्ञानप्रसारक हेही मासिक १८५० मध्ये येथूनच छापले जात असे.

गणपत कृष्णाजी यांचा मुंबईतील छापखाना ग्रंथनिर्मितीपासून नियतकालीक प्रकाशनाच्या निर्मितीस योगदान देऊन पुढे त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजीव कानोबा गणपत यांनी १८६५ पर्यंत हा छापखाना सक्षमपणे चालविला. पुढे हा कारखाना त्याचे नातू आत्माराम कानोबा यांनीही उत्तम प्रकारे चालवून छापखान्याचा लौकीक कायम ठेवला होता. दुर्दैवाने त्यांच्या पश्चात हा छापखाना बंद पडला. मुंबईमध्ये याच काळात जावजी दादाजी यांचा निर्णयसागर छापखाना याचेही योगदान मुद्रणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्राचा विचार करता पुणे येथील मराठी माणसाने सुरु केलेले छापखाने व देशातील इतर ठिकाणी सुरु झालेला मुद्रण व्यवसाय यामुळे एकूणच भारतातील मुद्रणास गती आली. सुरवातीस खिळा प्रेसवर छापली जाणारी पुस्तके ही पुढे स्वतंत्र खिळाटाईप अस्तित्वात आला. यातूनच खिळाटाईप अशा दोन्ही प्रकारचे काम चालू झाले. याचवरुन स्थानिक स्तरावरील भाषेतून ग्रंथ प्रकाशनास चालना मिळाली. उदा. मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत व अन्य भाषा याच्या प्रकाशानाने हळूहळू देशाच्या विकासाची वाट चोखाळली. अशा या पुस्तक प्रकाशनाच्या काळात धार्मिक पुस्तकाबरोबर इतरही विषयाशी संबंधीत पुस्तके प्रकाशीत होवू लागली. इतकेच काय मुद्रण व्यवसायात एका सहीष्णू वृत्तीने काम सुरु झाले. या देशातील धर्मप्रसारासाठी इतर धर्मीयानी मराठी मुद्रकाना आव्हान केल्यावर मदत करण्याची वृत्ती येथील मुद्रकानी जपली होती. उदा. गणपत कृष्णाजी यांनी ज्यू लोकाकरीता धर्मविषयक पुस्तके मराठीतून छापण्यासाठी केलेली मदत होय. याच पार्श्वभूमीवर त्यानी ज्यू लोकाना दोन धार्मिक पुस्तके छापून दिली होती. यामध्ये १) गरिब लोकांना धर्म करण्याविषयी बोध (१८५६) २) प्रायश्चिताच्या दिवशी पापाविषयी कबूली देणे.

या देशातील शीळाप्रेसवर छापलेली १८०५ ते १८६७ या काळातील पुस्तके ही दोलामुलीते म्हणून ओळखली जातात. एकूणच ग्रंथ नोंदणी कायदा अस्तित्वात येण्यापुर्वी ग्रंथप्रकाशन व्यवसाय सुरु असला तरी देखील त्यावर तत्कालीन इंग्रजी राजवटीचे निश्चितच लक्ष होते.

मुद्रण कालखंडाचा विचार करता मराठी ग्रंथ मुद्रण प्रकाशनाला प्रारंभापासूनच संस्थानीक, राजराजवाडे यांचे सहकार्य लाभले होते. राजाश्रयाच्या सहाय्याने सुरु असलेले हे छापखाने

विचारात घेता मराठी ग्रंथ मुद्रणाचा दृष्टीकोनातून बडोदा नरेश महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) याचेही योगदान उल्लेखनीय आहे. साधारण १९ व्या शतकाच्या अखेरीस काही संस्थानातून राज्यावर आलेले संस्थानिक मात्र नव्या प्रकारचे शिक्षण मिळालेले आणि शिक्षण प्रबोधनाच्या कार्यात रस घेणारे होते. यात अर्थातच अग्रगण्य होते बडोद्याचे सयाजीराव गायकवाड (तिसरे). त्यांनी डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन संस्थेच्या पुनरुज्जीवनास तर भरघोस मदत केली होतीच परंतु बडोद्यामध्ये विविध प्रकारच्या ग्रंथप्रकाशनाच्या योजना घडवून आणल्या. श्री. सयाजी साहित्यमाला, मृगया ग्रंथमाला, श्री. सयाजी प्रश्नमंजूषा अशा अनेक उपक्रमातून मराठी ग्रंथनिर्मीती प्रकाशनाला मोठ्या प्रमाणावर चालना दिली. दामोदर सावळाराम शिंदे यांच्या ग्रंथप्रकाशन क्षेत्रातील कार्यालाही भरघोस मदत केली. कोल्हापूरच्या शाहू महाराजानी विजापूरकरच्या ग्रंथमालेला मदत केली आहे. औंधच्या बाळासाहेब प्रतिनिधी यांनीही ग्रंथप्रकाशनाला चांगले सहाय्य केले आहे. इंचलकरंजी ग्रंथमाला, होळकर ग्रंथमाला अशा ग्रंथमालाही प्रकाशीत झालेल्या दिसतात. हे संस्थानी सहाय्य साधारणपणे १९३९ – ४० सालापर्यंत चालू असलेले दिसते. या प्रकारचे सहाय्य उपलब्ध झाल्यामुळे बडोदे, इंदूर, देवास, धार अशा महाराष्ट्राबाहेरच्या ठिकाणाहूनही मराठी ग्रंथप्रकाशने घडून आली. *(गोगटे शरद, ज्ञानगंगोत्री डिसेंबर २००५ ते जानेवारी –फेब्रुवारी २००६, पृष्ठ ८६)*

संस्थानिकाच्या प्रकाशन व्यवस्थापनासाठी असलेल्या योगदानाविषयी विचार करत असताना तंजावरचे राजे सरफोजी यांनी दरबारी मुद्रण स्थापन केलेले होते. १८०९ – १० च्या दरम्यान या मुद्रणालयात बालबोध मुक्तावली छापण्यात आली होती.

अशा या वाटचालीत पुढे स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मुद्रण व्यवसायामध्ये स्वतंत्र वाटचाल करत वाचन साहित्याची उपलब्धता सर्वदूर पोहचवली. या वाटचालीत अनेक नवनवीन मुद्रण व्यवसायिक पुढे आले आणि ग्रंथालयाच्या विकासालाही त्यामुळे चालना मिळाली. ग्रंथालय विकास होत असताना कालसापेक्ष वाचन साहित्याचे स्वरुप बदलत गेले. सुरवातीपासून अदृष्य स्वरुपात मौखिक परंपरेतून सुरु झालेली ज्ञानसंग्रहाची वाटचाल झाडांची पाने, साली, प्राण्यांची कातडी, दगड, लाकूड, माती अशा साधनांच्या सहाय्याने ती

कागदावर अवतरली. ग्रंथालये समृध्द झाली.  नव्या विज्ञान व तंत्रयुगामध्ये आता ज्ञान साधनाचे स्वरुप बदलू लागले आहे. नव्या पेपरलेसच्या वाटेवर ही साधने व डिजीटल ग्रंथालय परंपरेचा आढावा घेताना या सगळ्या वाटचालीचा उल्लेख हा मानवी जीवनाच्या विकासात्मक वाटचालीचा लेखाजोगा ठरणारा आहे.

**१.५ प्राचीन ग्रंथालय संस्कृतीचा वारसा :**

प्राचीन परंपराचा वारसा घेत असताना साहजीकच ग्रंथालय ही संकल्पना म्हणजे ज्ञानसंग्रहणाची सुरुवात कोठून व कशी झाली याचा जागतिक स्तरावर आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. अशा वाटचालीतील काही सांस्कृतिक टप्पे

**१) सुमेरीयन ग्रंथ संस्कृती :**

या संस्कृतीचा कालखंड साधारणतः इ.स. पूर्व २७०० वर्षांचा मानला जातो. या परिसरातील उध्वस्त शहराचा शोध घेत असताना प्राप्त झालेल्या अवशेषांच्या आधारे तेथे खाजगी व सार्वजनिक ग्रंथालये होती असा निष्कर्ष काढला जातो. या ग्रंथसंग्रहात मातीच्या वीटावर मुद्रण केलेले ३०,००० ग्रंथ ठेलो येथील संग्रहालयात संग्रहीत करण्यात आले होते. उपलब्ध पुराव्यावरुन उरटानाच्या कालखंडात इ.स. पूर्व ३१०० मध्ये इतिहास लेखनाला आरंभ झाला होता. हा इतिहास त्यानी क्यूनिफार्म लिपीतून ठेवला होता. अशा इतिहास लेखनातून या संस्कृतीचे पुढे मानव समाजास दिलेली ही एक महत्वपूर्ण भेट होय.

या चिकणमातीच्या आधारे तयार केलेल्या पाचराच्या आकाराच्या विटावर अक्षरे कोरुन त्या घट्ट होईपर्यंत भाजल्या जात. मानवाने अशा प्रकारे तयार केलेली व विटावर मुद्रीत केलेली पहिली पुस्तके होय. या वीटावरील तत्वज्ञानाविषयक वाङ्मय इतिहास समजण्यास सहकार्य प्राप्त होते.

**२) बॉबिलोनियन :**

ही संस्कृती सुमेरीयन संस्कृतीच्या पश्चात अस्तित्वात आलेली. ऐतिहासिक वाटचालीत सुमेरीयन संस्कृतीचा प्रसार बेबिलोनियान मध्ये झाला होता. येथेही भाजलेल्या विटांचा वापर ग्रंथलेखनासाठी केला जात असे. आणि हा संग्रह देवालये, राजप्रसाद या मधून केला जात असे तत्कालीन परिस्थितीत संग्रहालये ग्रंथालये म्हणून ओळखली जात. या परिसरात

बोराटिप्पायेथे सापडलेल्या विटांचा संग्रह हा एक महत्त्वपूर्ण संग्रह म्हणून ओळखला जातो. तसेच प्रसिध्द हमूराब्बी या राजाने कायद्याची संहिता ही जागतिक स्तरावरील पहिला कायदा संहिता म्हणून ओळखली जात असून बॅबीलीयोन संस्कृतीच्या वैशिष्ट्याचा महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून ओळखला जातो. केवळ कायदेकानून नव्हे तर व्यापार कालपटलेख, राजाचे वटहुकूम, धार्मिक विधी, रितीरिवाज या संदर्भातील स्वतंत्र दप्तर विटांच्या माध्यमातून संग्रहीत केले जात असे. टामुरावी राजाने तयार केलेली कायद्याची संहिता पॅरीसमधीला लूव्हू वस्तुसंग्रहालयात पहायला मिळते.

**३) ॲसिरियन संस्कृती :**

ही संस्कृती बॅबिलीयन राज्य संस्कृतीशी समकालीन मानली जाते. इ.स. पूर्व ६६८ ते ६२६ या काळातील ॲसिरियन राजा असुरबतीपाल हा ग्रंथपालनावर टिका करणारा राजा म्हणून ओळखला जातो. या ज्ञानाची आवड असणाऱ्या राजाने अशिरीयन बॉबेलियन वाङ्मय आपल्याकडे ओढण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न केला. यासाठी त्याने आपल्या पदरी असणारे लेखक बोरशिप्पा येथील संग्रहालयात पाठवून तेथील विटावरील ग्रंथाच्या प्रति करण्यास व त्याचे भाषांतर करण्याचे काम सोपवून त्या सर्व विटा आपल्या संग्रहालयात जमा करण्यात सांगितले. या राजाने आपल्या नेनोवो येथील ग्रंथालयात अशाप्रकारे २०,००० ग्रंथ विटा संग्रहित केल्या आणि एक नवा ऐतिहासिक वारसा सिध्द केला संग्रहात असलेल्या विटा ग्रंथालयामध्ये अभिजात वाङ्मयीन साहित्य, शास्त्रीय अभियान लेखन, कालपट, वटहुकूम आणि उतारवयातील मुर्खपणाचे नमुने इत्यादी विषय हाताळलेले आहेत. या विटावर संग्रहण करण्यासाठी दिग्दर्शन स्वरुपात चिन्हेही कोरलेली आहेत. ग्रंथालय इतिहासाच्या वाटचालीत निनेवे येथील विटेवरील ग्रंथाच्या सापडलेल्या सूची या आद्य सूची होय. वाङ्मयीन रचना विषयवार अथवा आकारानुसार करण्यात आली होती. या संग्रहालयाची केलेली मांडणी हे ग्रंथ संग्रहालय वापराचे आद्य उदाहरण म्हणून पाहण्यात येईल. तसेच सुमेरीयन बॅबिलियन अशिरीयन या संस्कृती प्रगल्भ होत्या. लेखन व ज्ञानसंग्रहालय याना किती महत्त्व दिले होते हे स्पष्ट होते.समृध्द मानवी जीवनाचा हा वारसा १८५० साली ऑस्टीन लेपर्डस येथे उत्खनन केल्यावर जगाच्या नजरेस आला. इतकेच नव्हे तर हे

ग्रंथालय वाचकाना ग्रंथ बाहेर वाचावयास देत असे. मुक्तव्दार ग्रंथपध्दती तेथे अस्तित्वात होती.

आजही येथील काही इष्टिका ग्रंथ ब्रिटीश म्युझियममध्ये संग्रहीत करण्यात आलेले आहेत.

**४) इजिप्तशियन संस्कृती :**

ही संस्कृती ही सुमेरियन, बॅबिलीनियन, ॲसिरियन या संस्कृतीच्या काळाशी संलग्नीत होती. या संस्कृतीने ग्रंथालयाचा वारसा जोपासला होता. या ग्रंथालयातून पॅपीरसचा लेखनासाठी वापर केल्याचे निदर्शनास येते. असे लेखनविषयक भेंडोळी येथे जपून नेली जात. या भेंडोळीची उंची १ फूट व लांबी २० फूट असे. या वरील लेखनासाठी क्यूनेफॉर्म व हिरोग्लीफीक या लीपीचा वापर केला जात असे. हे सर्व लेखन धार्मिक, नैतिक व राजकीय स्वरुपाचे होते. या लेखनासाठी वापरलेल्या लिपीमध्ये व्यंजनाची संख्या २४ इतकी होती आणि मूळाक्षराचा वापर केलेला होता. मूळाक्षराबरोबर शब्दांमध्ये अंतर विरामचिन्हे यांचा वापर केला जात असे. लेखन डावीकडून उजवीकडे केले जात असे. लेखन शीर्षके दिली जात. अशाप्रकारे लेखन केलेली भेंडोळी खाजगी व मंदीर संग्रहालयातून चिनी मातीचे डेरे किंवा धातूचे गोल सिलिंडर यातूनच संग्रहित केले जात. या भेंडोळ्यावर ग्रंथाचे बोधांक असत. तसेच डेरे व सिलिंडर ठेवण्यासाठी मोठीमोठी फडताळेही असत. इजिप्तमधील सर्वात मोठे ग्रंथालय इ.स.पूर्व २५०० मध्ये गिसे येथे स्थापन केले होते. तर दुसरे ग्रंथालय इ.स.पूर्व १२५०–७५ या कालखंडात टामेसीस दुसऱ्या याने येबीस येथे स्थापन केले होते. याचे काही अवशेष अजूनही शिल्लक आहेत.

प्रिसे पॅपीरस हे सर्वात जुने म्हणून समजले गेलेले पॅपीरसवरील पुस्तक सध्या पॅपीरसमधील Bibliotheque Nationale या ग्रंथालयात असून ते इ.स. पूर्व २८८० मध्ये लिहिलेले असावे असा तर्क आहे.

**५) अलेक्झांड्रीया :**

सिकंदरने इ.स. पूर्व ३३० मध्ये प्राचीन काळात अलेक्झांड्रीया ग्रंथालयाची स्थापना येथे केल्याचे निदर्शनास येते. सिकंदरच्या पश्चात टॉलेनी (प्रथम) व टॉलेनी (व्दितीय) या

राजांनी या ग्रंथालयाचा विकास केला अन्य ठिकाणाहून पुस्तके मागून त्याच्या प्रती तयार करुन घेत. यामध्ये प्राचीन पट्ट्या मोठ्या प्रमाणावर संग्रहीत केलेल्या होत्या. टॉलेनी (व्दितीय) याने ७२ ज्यू विद्वानाना बायबल हिब्रू भाषेतून इराणी भाषेत अनुवादीत करण्यासाठी नेमले होते. *(द वर्ल्ड इनस्कालोपीडीया, इन रेवती नरगुंदे पृ. २३१)*

या विद्वानांनी सेम्यूअगिन्ट बायबल तयार केले. ज्यूलीयस सीझरच्या काळीअलेक्झांड्रीया ग्रंथसंग्रहालयात सात लाख ग्रंथ होते. प्राचीन पट्ट्या, पॅपीरस यासारख्या साधनावर लेखन करुन या साहित्याचा संग्रह करणे ही फार कठीण बाब होती. अर्थात त्या काळातील इतक्या मोठ्या प्रमाणात संग्रहित केलेला हा संग्रह अचंबित करणारा आहे. त्याकाळात तेथे ग्रंथालयाचे काम पाहण्यासाठी डेमिरिअस सिनॉडोटस् अपोलोनियस्, ॲरिस्टोकेनिसे् ॲरिस्टोर्चस्, कॅलीमॅचस् या सर्व व्यक्ती तत्कालीन ग्रंथापालच होत. तसेच त्यांना सूची ग्रंथसंपादन आणि ग्रंथरचना आणि भाषांतर याचेही ज्ञान होते. या सर्वानी अनेक ग्रंथसंग्रह एकत्र करुन भाषांवार वर्गीकरण केले व सूचीही केली होती.

रोमन सम्राटांनी या सर्व परंपरेचा विध्वंस केला.

**६) फिजिशियन, अर्मिनियम व हिब्रू :**

व्यापारी वृत्तीच्या या लोकांचा संबंध सागर किनाऱ्यावरील नागरी जीवनाशी आला. व्यापार करत असताना या लोकानी पॅपीरसवरील लेखन व त्यावरील ज्ञान याचा सर्वदूर प्रसार केला. आर्मीयम लोकांनी साहित्य व भाषा विकसित केली. यासाठी त्यांनी इजिप्त व फिनेशिया यांचेकडून वर्णाक्षराची ओळख झाल्यावर आदानप्रदान प्रक्रियेसाठी लेखनात त्याचा वापर सुरु केला. अरबाची अक्षरही मूळ आरमेनियम होती. तसेच येशू ख्रिस्ताची मातृभाषा ही आरमेनियम होती.

हिब्रू लोकांनी आपली भाषा चांगली विकसित केली होती. बायबलमधील जूना करार हा हिब्रूमध्ये लिहिलेला आहे. दुर्दैवाने या विषयक अपेक्षित संदर्भ मात्र आज उपलब्ध नाहीत.

**७) ग्रीक :**

ग्रीक लोक लिहिण्यासाठी पॅपिरसचा उपयोग करायचे. इ. स. पूर्व ५०० मध्ये ग्रीकमध्ये ग्रंथालये स्थापन झाली होती. ग्रीक संस्कृतीचा एकूण १२०० वर्षांचा कालखंड आहे.

त्यातील पहिल्या ६०० वर्षात लेखनकला वा ग्रंथलेखनाबाबतचे उल्लेख सापडत नाहीत. ग्रीकमध्ये ॲरिस्टॉटल, प्लेटो, युरिपिडीझ, पिंडर यांसारख्या मंडळींनी अभिजात साहित्याची निर्मिती केली. पॅपिरसऐवजी पोस्त म्हणजे कातडे यावर लिखाण केल्यामुळे ते अधिक टिकाऊ होते.

**८) रोमन :**

पॅपिरस, व्हेलम, पार्चमेंट या साधनांवर रोमन लोक लिखाणासाठी पक्षाचे पीस वापरत असत. रोममधील राज्यकर्त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना केली होती. इ. स. ४ थ्या शतकातील कोडेक्स व्हॅटिकन हे हस्तलिखित उपलब्ध आहे. रोमन लढवय्ये युध्दाच्या प्रसंगी ग्रीसमधील ग्रंथसंग्रह लुटून आणीत. सार्वजनिक ठिकाणी ग्रंथसंग्रह करण्याबरोबर रोमन लोक वैयक्तिक / घरीही ग्रंथसंग्रह करीत. सिसॅरो (Cicero) (इसपू.१०६–४३) याचा खाजगी ग्रंथसंग्रह होता. लुकलस (Lucullus) येथील ग्रंथालय वैशिष्ट्यपूर्ण होते. रोमन ग्रंथालयातून ग्रीक व लॅटिन ग्रंथांचे वर्गीकरण करुन ठेवण्यात आले होते. वाचनगृहात पॅपिरसच्या गुंडाळ्या करून ठेवण्यात येत असत व त्या तेथेच वाचनासाठी उपलब्ध होत. चौथ्या शतकाच्या मध्याला रोममध्ये एकाच शहरात अठ्ठावीस ग्रंथालये होती. इटलीमधील अन्य शहरांमध्येही अशाच स्वरुपाची ग्रंथालये स्थापन करण्यात आली होती. व त्यांची व्यवस्था धर्माधिकारी पाहत असत. रोममध्ये ख्रिस्ती धर्मग्रंथाचा भरणा असलेले व एक लाखाहून जास्त ग्रंथसंख्या असलेले ग्रंथालय होते. रानटी टोळ्यांनी रोमवर केलेल्या हल्ल्यात रोमन संस्कृतीबरोबर ही ग्रंथालयेही उद्ध्वस्त झालीत. सुमारे पाचवे शतक ते पंधरावे शतक या कालखंडात ग्रंथसंग्रह जतन करण्याचे मोठे काम धर्ममठांनी केले. ख्रिश्चन धर्माचा प्रसार कोडेक्स या ग्रंथामुळे मोठ्या प्रमाणात झाला. ग्रंथाच्या बहुप्रती करून घेण्यासाठी नकलानवीसांचा एक मोठा वर्ग कार्यरत असायचा. पार्चमेंट किंवा व्हेलमवरील अक्षरे विविध रंगांच्या शाईत लिहिलेली असत व कलाकुसरही त्या ठिकाणी करण्यात येत असे.

**९) चीन :**

प्राचीन चीनमध्ये गुळगुळीत मातीच्या खापरावर अक्षरे कोरून त्यांचे छाप उठविण्याची पध्दत होती. या कोरीव छापावरून अनेक प्रती बनविण्यात येत असत. इ.स.पू. ३०००

वर्षांपूर्वी चीनमध्ये चित्रलिपीच्या माध्यमातून लिखाण होत असे. चीनने इ.स. दुसऱ्या शतकात कागद बनविण्याची कला शोधून काढली. इ.स. १७५ पासून छापण्याची कला चीनमध्ये अस्तित्वात असल्याचे दाखले आहेत. दहाव्या शतकापासून छापलेली पुस्तके चीनमध्ये आजही उपलब्ध आहेत. इ.स. १०२ मध्ये छपाईसाठी वापरण्यात येणारा कागद चीनमधील लेयंग प्रांतातील हुनान गावी त्साई–टून या कामगाराने प्रथम तयार केला. त्यानंतर आशियातील समर्कदच्या लढाईत अरबांनी चिनी कागद तयार करणाऱ्या कारागिरांनी पकडून आपल्या देशात नेले. खिळ्यांनी छापण्याची कला पंधराव्या शतकात आली व पहिले छापलेले पुस्तक चीनमध्ये तयार झाले. चीनची लेखनकला सुमेरीयन, बॉबिलोनियन किंवा प्राचीन इजिप्तच्या लिखाणाइतकी जुनी नाही. ख्रिस्तपूर्व ११व्या शतकात लिहिण्याचा उगम चीनमध्ये झाला. चीनने कागदाचा शोध लावण्याच्या बाबतीत आघाडी मारली.

**१.६ प्राचीन भारतातील ग्रंथसंग्रहालये :**

सिंधू संस्कृती भारतातील सर्वात जुनी संस्कृती आहे. सिंधू संस्कृतीचा कालखंड अद्यापही इतिहासकारांना निश्चित करता आलेला नाही. उत्खनात ज्या मुद्रा (सील्स) सापडल्यात त्यावरील मजकूरही वाचण्यात अद्याप यश आलेले नाही. मात्र काहीतरी संदेश संप्रेषित करण्याच्या दृष्टीकोनातून हा मजकूर लिहिण्यात येत होता म्हणजेच लिपीचा वापर करण्यात येत होता. मोहंजोदडो लिपी ही भारत आणि पाकिस्तानातील ज्ञात असलेली सर्वात जुनी लिपी आहे. पाकिस्तानातील मंगमरी जिल्ह्यात हडप्पा आणि सिंध प्रांताच्या लार्कात जिल्ह्यात मोहंजोदडो या गावी लिपी असलेल्या अनेक मुद्रा सापडल्या आहेत. १९२२ मध्ये जॉन मार्शल यांनी मोहेंजोदडो व हडप्पा येथे उत्खनन केले व त्यातून त्यांना ब्रांझयुगीन संस्कृतीचा अविष्कार झाला. मोहेंजोदडो येथील मुद्रांवर किंवा खापरांवर लिहिलेले लेख हे उजवीकडून डावीकडे व काही ठिकाणी पहिली ओळ उजवीकडून डावीकडे व दुसरी ओळ डावीकडून उजवीकडे अशा पध्दतीने लिखाण झाले आहे. उत्खननात प्राणी व पक्ष्यांची चित्रेही सापडलेली असून त्या चित्रांच्या काही विशिष्ट भागांवर खुणा आहेत. काही खुणा पोटावर, काही शेपटीवर आहेत. या खुणांवरुन काही तरी संप्रेषण होत असावे होत असावे एवढाच अंदाज बांधता येतो. अशा स्वरुपाचे लिखाण किंवा सांकेतिक चिन्हांचा

मजकूर सिंधू संस्कृतीच्या काळी उपलब्ध होता एवढीच माहिती प्राप्त होते; मात्र ग्रंथालयाच्या संदर्भातील कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

प्राचीन भारतात जी विद्यापीठे स्थापन झाली होती त्यामुळे ग्रंथलेखन आणि ग्रंथसंग्रह निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून या विद्यापीठांचे योगदान मोठे आहे.

**१. तक्षशीला विद्यापीठ :**

प्राचीन भारतात तक्षशीला विद्यापीठ हे अध्ययनाचे फार मोठे केंद्र होते. तक्षशीला ही गंधर्व प्रांताची राजधानी होती. सध्या पाकिस्तानातील रावळपिंडी शहरापासून २० मैलावर हे ठिकाण आहे. या विद्यापीठात वैद्यक साहित्य, तत्वज्ञान आणि अठरा शिल्पे यांवर अध्ययन – अध्यापन चालत असे. मिथिला, उज्जेन, राजगृह आणि बनारस येथून या विद्यापीठात विद्यार्थी येत असत. तक्षशीला विद्यापीठ अनेक कारणांसाठी प्रसिध्द आहे. या विद्यापीठातील आचार्यात पाणिनी, आर्य चाणक्य, वैद्यराज चरक व जीवक यांसारख्या ऋषीमुनींचा अंतर्भाव होता. या विद्यापीठात एकूण ५०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असे. त्यामध्ये १०१ राजघराण्यातील व अन्य परदेशी विद्यार्थ्यांचा समावेश असे. विद्यापीठाचे ग्रंथालय सुस्थितीत होते. त्यामध्ये हिंदुत्व, राज्यशास्त्र, साहित्य, वैद्यक व तत्वज्ञान या विषयासंबंधीचे वाचनसाहित्य संग्रहीत करण्यात आले होते. हूण लोकांनी ५ व्या शतकात 'तक्षशीला' या नगरीचा पूर्ण विध्वंस केला त्यात विद्यापीठ आणि ग्रंथालयही नाश पावले.

**२. नालंदा विद्यापीठ :**

इ.स. ४०० च्या सुमारास नालंदा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. चिनी प्रवासी युआन त्संग यांनी आपल्या प्रवासवर्णनात या विद्यापीठासंदर्भातील माहिती लिहून ठेवली आहे. हे विद्यापीठ बौध्द संस्कृतीचे केंद्र होते. बिहार राज्यातील पाटणा शहराच्या नैऋत्येस ४० मैलावर हे विद्यापीठ वसले होते. नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय मोठे होते. हजारो विद्यार्थी आणि शिक्षक हे कला आणि विज्ञानाच्या अभ्यासक्रमाशी निगडीत असायचे. नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय हे तीन सुंदर इमारतीमध्ये विभागण्यात आले होते. ग्रंथालय विभागास 'धर्मगंज' असे नाव देण्यात आले होते, तर 'रत्नसागर, रत्नोदधी आणि रत्नरंजक' या नावाने तीन इमारती ओळखल्या जात. रत्नसागर इमारत ९ मजली होती, तर अन्य दोन

इमारती ६ मजली होत्या. ''बौध्द धर्माचे आणि अन्य विषयांचे वाचनसाहित्य या ग्रंथालयात उपलब्ध होते. एक चिनी प्रवासी इत्सिंग १० वर्षे या विद्यापीठात राहिला. त्याने ४०० संस्कृत ग्रंथांचा अनुवाद केला, तो ५,००,००० अध्याय एवढा होता.''

इत्सिंग आणि युवान त्संग यांनी केलेल्या वर्णनानुसार नालंदा येथे १०,००० भिक्षू रहात होते. हे विद्यापीठ वसतिगृहयुक्त असल्याने सर्व भिक्षूंची जेवणाची व राहण्याची व्यवस्था येथे केली जात असे. भिक्षूंच्या निवासासाठी ४००० खोल्या होत्या. निवासस्थळी ओटा व दिव्यासाठी कोनाडा असायचा. १५०० पेक्षा जास्त अध्यापक येथे कार्यरत होते. आचार्य शीलभद्र हे कुलपती होते. इतर आचार्यांची नावे युवान त्संगने आपल्या प्रवास वर्णनात लिहून ठेवली आहेत. धर्मपाल, चंद्रपाल, स्थिरमती, प्रभामित्र ज्ञानचंद्र, नागार्जुन, आर्यदेव, वसुंबध, दिङनाग, गुणमती या महापंडीतांनी आपल्या लेखनाने विद्यापीठाचे नाव अजरामर करुन ठेवले आहे.

**३. विक्रमशीला विद्यापीठ :**

इ. स. आठव्या शतकात धर्मपाल राजाने विक्रमशीला विहाराची स्थापना केली. विक्रमशीला विद्यापीठ हे ४०० वर्षे बुध्दभिक्षूंचे विद्याकेंद्र म्हणून अस्तित्वात होते. बिहारमधील भागलपूर शहराच्या पूर्वेस हा विहार बांधला. भारतातील विद्यार्थ्यांबरोबरच तिबेटमधील विद्यार्थी येथे अध्ययनासाठी येत असत. या विद्यापीठाचे महत्व एवढे वाढले, की तेथे ३००० विद्यार्थी राहत असत. विद्यापीठाला जोडून ग्रंथालय होते. चहुबाजूंनी तटबंदी असलेल्या या विद्यापीठाचा इ. स. १२०३ मध्ये बखत्यार खिलजीने नायनाट केला.

ताबकत–इ–नासरी (Tabkat-E- Nasari) या ग्रंथात विक्रमशीला विद्यापीठाचे व ग्रंथालयाचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

या विद्यापीठामध्ये हिंदूधर्मावरील (बौध्द धर्मावरील) अनेक ग्रंथ होते, मुस्लीम सैनिकांनी तेथील ग्रंथ (पोथ्या) पाहताच हिंदूना त्यांची माहिती देण्यासाठी पाचारण केले. सर्व हिंदू मारले गेल्यामुळे कोणीही माहिती देण्यासाठी जिवंत नव्हता, पुस्तकांतर्गत माहिती लक्षात घेता त्यांना बुध्दाचा विहार आहे हे कळले. तटबंदीच्या आत ते विद्यापीठ होते त्यांना नंतर कळून चुकले.''

**४. उदंतपुरी विद्यापीठ :**

इ.स. ७४९ मध्ये उदंतपुरी विद्यापीठ बांधऱ्यात आले. तिबेटीयन मठाचे ते उत्कृष्ट अध्ययन केंद्र बनले. या विद्यापीठाच्या विकासासाठी पाला राजांनी सढळ हस्ते मदत केली. बौध्द धर्माच्या होनयान पंथाचे ते चांगले केंद्र बनले. बौध्द धर्माचा प्रसार करण्याच्या दृष्टीकोनातून लागणारे बुध्दभिक्षू तयार करणे हा उदंतपुरी विहाराचा प्रमुख भाग होता. अध्ययन – अध्यापनासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोठा ग्रंथसंग्रह या ठिकाणी करण्यात आला होता. विद्यार्थी या ग्रंथसंग्रहातील मूळ पुस्तकांच्या नकला करून घेत. या विद्यापीठात १००० बौद्धभिक्षू राहण्याची व्यवस्था होती.

**५. सोमपुरी विद्यापीठ :**

धर्मपाल राजाच्या काळात (७६९–८२७) सोमपुरी विहार विक्रमशीला विहाराइतकेच अध्ययन अध्यापनाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले. नालंदा विद्यापीठाप्रमाणे या विद्यापीठात ग्रंथालय होते. अतिश दीपकर याने या विद्यापीठात थांबून 'माध्यमक रत्नदीप' या भावविवेकाचा ग्रंथ अनुवादित केला आहे. ११ व्या शतकाच्या विपुल त्रीमित्र या बुध्दभिक्षुकाने या विद्यापीठाची डागडुजी करण्याचा प्रयत्न केला, परंतु पूर्वीचे सौंदर्य तसेच ग्रंथसंग्रहाचे मात्र नुकसान झाले.

**६. जगदल विहार :**

उत्तर बंगालमधील रामावती शहरात राजा रामपाल यांच्या आश्रयाने जगदल विहार सधन झाला होता. अध्ययनाबरोबरच हस्तलिखितांचे लिखाण, संपादन, आणि भाषांतर हे कार्य इतर विद्यापीठांप्रमाणे या विद्यापीठाच्या ग्रंथालयातही पार पडत असे. वज्रयान व कालचरयान या ग्रंथाचा लेखक महापंडीत विभूतिचंद्र याच विद्याकेंद्रात होता. हा विहार ११ व्या व १२ व्या शतकात कार्यरत होता.

भारतात अन्य काही विद्यापीठांची ग्रंथालयेही अस्तित्वात होती. मात्र त्यासंदर्भातील फारशी माहिती उपलब्ध होत नाही. यामध्ये गुणशीला, अयोध्या ही जैन विद्यापीठे व कुंडिनपूर, कांची, मथुरा ही हिंदू विद्यापीठे अस्तित्वात होती.

दक्षिण भारतात कृष्णा नदीच्या तीरावर नागार्जुन विद्यापीठ गुंतूर जिल्ह्यात स्थापन झाले होते. हे विद्यापीठ सातव्या शतकापर्यंत कार्यरत होते. या विद्यापीठाचा ग्रंथसंग्रह पाच

मजली इमारतीत ठेवण्यात आला होता. या ग्रंथालयात बौध्द धर्मावरील ग्रंथांची मोठी संख्या होती. श्रीलंका, ब्रह्मदेश आणि चीनमधून मोठ्या प्रमाणावर बौध्दभिक्षू या ठिकाणी ग्रंथालयास भेट देत असत.

**१.७ मध्ययुगीन ग्रंथालये :**

मध्ययुगीन ग्रंथालयांची पूर्व पिठीका अवलोकनासाठी गोव्यातील मुद्रण पंरपरेवर दृष्टीक्षेप टाकणे गरजेचे ठरते.

**गोव्याचा छापखाना (इ. स. १५५६)**

इ. स. १५५६ साली पोर्तुगीजांनी गोमंतकात आणलेला छापखाना हा भारतीय व आशियातील पहिला छापखाना, पूर्वेकडे धर्मप्रसार करण्यासाठी ख्रिस्ती मिशनऱ्यांना बायबल व ख्रिस्ती धर्मातील इतर ग्रंथाची जरूरी भासे. त्यावेळी दळणवळणाची साधने आजच्या युगाएवढी प्रगत झालेली नसल्याने युरोपमध्ये प्रसिध्द झालेले ग्रंथ भारतात सहजासहजी आणता येत नसत, म्हणून इथिओपियात एक छापखाना स्थापन करावा अशी मिशनऱ्यांनी कल्पना काढली व त्याप्रमाणे एका छापखान्याचे सामान जहाजावर चढविण्यात आले. दैवाचा फेरा असा की हे जहाज वादळात सापडल्याने नावाड्यांना ते इथिओपियात न नेता गोव्यापर्यंत न्यावे लागले व तो छापखाना तेथेच उतरवून घेण्यात आला आणि सुरुही करण्यात आला. या छापखान्यातून तत्कालीन प्रसिद्ध सेंट फ्रान्सिस्को झेवियर यांनी लिहिलेले 'दोत्रिन क्रिस्तांव' हे पुस्तक इ. स. १५५७ साली छापण्यात आले. भारतात व आशियात प्रथमच छापलेल्या या पुस्तकाची प्रत सध्यातरी कुठे उपलब्ध नाही. परंतु त्या प्रेसमध्ये छापलेली कोंपेदिओ एस्पिरिच्युअल् फे क्रिस्तॉन् या पुस्तकाची प्रत न्यूयॉर्कमधील पब्लिक लायब्ररीत उपलब्ध आहे.

गोव्यातील हा पहिलावहिला छापखाना इ. स. १५७३ साली बंद पडला व इ. स. १६१५ साली गोव्यातीलच रायतूर मुक्कामी पुन:सुरु करण्यात आला. फादर स्टीफन्सचे प्रसिध्द मराठी ख्रिस्तपुराण इ. स. १६१५ साली रोमन लिपीतून छापले गेले इ. स. १६६० सालपर्यंत चालून हाही छापखाना बंद पडला. या चाळीसबेचाळीस वर्षाच्या काळात तेथे सुमारे पंचेचाळीस ग्रंथ छापण्यात आले.

**मोगल काल : बाबर ते औरंगजेब (१५२६-१७०७)**

झईरुद्दीन महंमद बाबर हा मोगल घराण्याचा संस्थापक – बाबर ते औरंगझेब पर्यंतच्या वंशपरंपरेने आलेल्या सहा मोगल बादशहानी ऐषआराम केला, नबाबीथाट वाढवला. उत्तमोत्तम स्थापत्यकलेचे नमुने उभारुन आणले व आपले नांव इतिहासास अमर करण्याचा प्रयत्न केला. संगीत, नृत्य इत्यादि कलाक्षेत्रांना वाव दिला. मुस्लिम संस्कृतीचा रुबाब वाढविण्यास हातभार लावला. औरंगजेब सोडल्यास ते इतर धार्मिक संस्थाच्या प्रगतीस तसे आड आले नाहीत, किंबहुना त्यापैकी निदान काहीनी संस्कृत मधील तत्वज्ञान, वैद्यक, ज्योतिष वगैरे विषयातील ग्रंथांची पर्शियन, अरेबिक भाषेत अनुवाद करून घेण्यास प्रोत्साहन दिले. हस्तलिखित ग्रंथाच्या प्रती करण्याचा जणू काही कारखानाच या उण्यापुरा दोनशे वर्षाच्या कालखंडात चालू होता. त्यासाठी कागद निर्मिती व विशेष करामतीची बांधणी यांनाही महत्त्व आले होते. कारण अकबर खेरीज बहुतेक बादशहा स्वतः हस्तलेखनतज्ञ होते, व त्या कलेला प्रोत्साहन देणारे होते. स्वतः बाबरला किताबखान्याचे जबरदस्त आकर्षण होते. कट्टर हिंदूधर्म व्देष्टा औरंगजेब स्वतः भक्तिभावाने कुराणाचे लेखन करी. अकबरला मात्र लिहावाचायला येत नसे असे म्हणतात. पण वेगवेगळ्या धर्मग्रंथाची पारायणे ऐकून वैचारिक दृष्ट्या सर्व बादशहात त्याचेच विचार अधिक उदारमतवादी बनले होते. पूर्वीपासून चालत आलेल्या किताबखान्याला सर्वच बादशहानी उत्तेजन दिले व त्यात भर घातली. एवढेच काय, बादशहांच्या घराण्यातील स्त्रिया शिक्षित असत. त्यांच्यासाठीही खास किताबखाना उघडण्यात आला होता. तत्कालीन प्रत्येक मद्रासामध्ये ग्रंथसंग्रह अवश्य असे. बाबरचा तर मोंगल बादशहाचा आणखी एक विशेष म्हणजे प्रत्येकाच्या कारकीर्दीचा एक अधिकृत नामा म्हणचे दैनंदिनी लिहिलेली असे. बाबरनाम्यपासून त्याला प्रारंभ झाला व या तवारिखामुळे तत्कालीन इतिहासातील उघडकीला न आलेल्या अशा बाबी फारच कमी आहेत. युध्दावर जातानासुध्दा शाही इतमामात किताबखाना व तारे सांभाळणारा किताबदार हजर असे.

अकबराने जेथे जेथे स्वाऱ्या त्या ठिकाणच्या राजांचे वा सरदारांचे ग्रंथसंग्रह जप्त करुन आपल्याबरोबर आणण्यास तो विसरत नसे. त्यामुळे गुजरात, जोधपूर, काश्मीर, बिहार, बंगाल, दख्खन या भागांमधील बरीच हस्लिखिते आणून त्याने शाही किताबखान्यात जमा

केली. प्रसिध्द लेखक फैजीच्या संग्रहात ४,३०० हस्तलिखित ग्रंथ होते. तो निवर्तल्यावर ते सारे शाही किताबखान्यात जमा केले गेले. पिर्झाखान खानान याचेही नांव या संबंधात मशहूर आहे. त्याच्या खाजगी किताबखान्यात ९५ लोक कामावर होते, त्यात पुस्तक बांधणी करणारे, हस्तलेखन करणारे, भाषांतरकार, इत्यादि होते. मौलान इब्राहिम नक्कश हा त्याचा किताबदार होता. गुजरातच्या स्वारीवरून परत येताना तेथून आणलेल्या लुटीतील ग्रंथसंग्रह दिल्लीत आणण्यास कित्येक मालवाहू उंट लागले अशा तपशीलासह त्याबद्दलची माहिती लिहून ठेवलेली आहे.

या कालखंडात कित्येक संस्कृत ग्रंथाची पर्शियन भाषेत भाषांतरे झाली. महाभारताचे नकीबखान, बदौनीचे मौलाना अब्दुल कादीर व ठाणेश्वरचा शेख या नावाने ओळखले जात होते. बदौनीच्या मौलाना अब्दुल कादीरने चार वर्षे खपून रामायणाचाही पर्शियन अनुवाद केला होता. ( इ.स. १५८९) हाजी इब्राहिम सिहिंद याने अथर्ववेदाचाही अनुवाद केला होता. फैझीने लीलावती या प्रसिध्द भास्कराचार्यांचा ज्योतिर्गणित विषयक ग्रंथाचा अनुवाद केला होता. कल्हणाच्या राजतरंगिणीचाही अनुवाद शाह महंमद या शहाबादच्या मौलानासाहेबांनी केला होता. शिवाय जलदमन, कालिया मर्दन वेगरेसारख्या कित्येक फुटकळ ग्रंथ भाषांतरीत केले गेले.

जेसुइट लोकांनी अकबरला बरेच ग्रंथ भेट म्हणून दिले. त्यापैकी सात खंडातील हिब्रू, खालदी, लॅटिन व ग्रीक या चार भाषांत छापलेली खास प्रतीची बांधणी करून त्याला देण्यात आली होती. ही प्रत फिलीप दुसरा या राजासाठी इ. स. १५६९–७२ या चार वर्षात छापून काढली होती. ही प्रत अकबराने कॅथॉलिक लोकांच्या फादर्स ग्रंथालयात मौजूद होती. या ग्रंथालयाबरोरच अकबराने आपल्याकडील कित्येक कॅथॉलिक फादर्सना बक्षीस दिले होते. अकबराला वाचनिकाकडून पुस्तके वाचवून घेण्याचा दुर्दम्य छंद होता. एका दिवसात जेथे ते ग्रंथवाचन थांबे तेथे फरडी सही ठोकणे हा त्याचा आणखी एक नाद होता. ही सहीसुध्दा त्याने करवून घेतलेली मोहोर होती. 'मुहम्मद अकबर पादशाह–ई–गाझी' हा शिक्का तेथे उठायचा. हे शिक्के असलेली कित्येक हस्तलिखिते उत्तम स्थितीत उपलब्ध आहेत. जयपूरच्या दरबार ग्रंथसंग्रहालयात अकबरचा शिक्का असलेले 'रज्मनामा' म्हणजे

युध्दकथा हे महाभारताचे पद्यमय पर्शियन भाषांतराचे पुस्तक आहे. सुंदर वेलबुट्या वा कलाकुसरीने मढविलेले पुस्तक खरेदी करण्यास अकबराने ४० हजार दिन दिले होते असे सांगतात. 'आईने अकबरी' या अब्दुल फाझलने लिहिलेल्या चरित्रात्मक ग्रंथात अकबर हा पेंटिगचा कसा भोक्ता होता व त्यासाठी वाटेल तो वारेमाप खर्च करण्यास कचरत नसे याचे वर्णन दिले आहे. हुबेहुब रंगसंगती व तजेल कायम रहावा म्हणून माणिक, प्रवाळ, मोती, सोने यांचे चूर्ण करुन त्यांचे रंग बनविले जाते. ज्यांना ज्यांना अशी चित्रे प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य लाभते त्या प्रत्येकाला साडेतीनशे वर्षाच्या कालावधीनंतरही ते ते रंग आजही इतके तजेलदार दिसतात याचे आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाही. त्या रंगासाठी मुळात वापरलेल्या अमूल्य वस्तूंचा विचार करता ते फिक्के कसे पडतील.

दिल्लीचा 'पूराणा किल्ला' ही वास्तू शेंरशहाने इ. स. १५४१ मध्ये मनोरंजनासाठी बांधली होती व शेरमहाल म्हणून तो ओळखला जाई. हुमायूने त्याचे ग्रंथालयात रुपांतर केले. आग्र्याला त्याने 'खाना–इ–तिलस्म' ही उत्कृष्ट शिल्पकाम असलेली इमारत बांधली. त्यात किताबखान्यासाठी दुसरा मजला राखून ठेवण्यात आला होता. हुमायूनची ग्रंथालयाबाबत आवड एवढी दांडगी होती. की बिचाऱ्याचा मृत्यू देखील किताबखान्याच्या पायरीवरुन घसरुन पडल्यामुळे घडून आला.

अकबराचा मुलगा जहांगीर याने आपल्या कारकीर्दीत फर्मान काढून वारस नसलेल्या सरदारांचे किताबखाने शाही किताबखान्यात भरती करण्यात यावेत असे जाहीर करून टाकले. त्याबरहुकूम कित्येक खाजगी ग्रंथसंग्रह शाही किताबखान्यात जमा झाले. साऱ्या ग्रंथसंग्रहालयाची दुरुस्ती करून ती अद्ययावत राहिली पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असे. किताबखान्याला जोडून जहांगीराने कलावस्तु संग्रहालयही स्थापन केले होते. यात बहुधा पेंटिग्ज ठेवलेली असत. 'जहांगीरनामा' या त्याच्या चरित्रात्मक पुस्तकातही ठिकठिकाणी हुबेहुब चित्रे काढून घेतली आहे. कारण ही कथनपध्दती शब्दांकित होती, तेव्हा वाचता न येणाराला सुध्दा नुसत्या चित्रांवरुनही आतील कथावस्तूचा बोध व्हावा असे त्याला वाटे. जहांगीरची प्रियसी राणी नुरजहाँ हिचे खाजगी ग्रंथ संग्रहालय होते. 'दिवान–इ–कामरान्' हे तिचे तीन मोहरा देऊन विकत घेतलेले पुस्तक सध्या पटणा येथील खुदाबक्ष लायब्ररीत पहायला मिळते. या पुस्तकावर तशी नोंदही आहे.

मोंगल घराणे विद्याप्रेमी असल्याने तख्तावर नवीन बादशहा आला तरी ग्रंथावरील त्याची भिस्त कमी होत नसे. जहांगीरनंतर शहाजहाँ आला तरी तोही विद्याप्रेमी होता. विविध ग्रंथकारानी लिहून त्याला नावानिशी अर्पण केलेल्या ग्रंथाची यादी बरीच मोठी भरेल. त्याचा ज्येष्ठ मुलगा दारा सुको हा तर स्वत: संस्कृत जाणणारा होता. त्याने स्वत: केलेल्या उपनिषदांच्या पर्शियन भाषांतराचे इंग्रजी भाषांतर आता उपलब्ध झाले आहे.

इ. स. १६३८ मध्ये भारतात आलेल्या जोहान आल्बर्ट हॉन मल्डेस्ला या जर्मन लेखकाने आपले प्रवासवर्णन लिहून ठेवले आहेत. त्यात तो लिहितो, 'शहाजहांच्या शाही ग्रंथालयात २४,००० उत्कृष्ट बांधणीचे ग्रंथ आहे.' मुख्य अधिकाऱ्याला 'दारोगा–इ– किताबखाना' म्हणत असत.

हा शाही किताबखाना इ. स. १७५९ साली अहमदशाह अब्दालीने लुटून नेला, काही पुस्तके जाळली, तर काही उध्वस्त केलीत.

**पाश्चात्य लोकांचे भारतीय वसाहतीतील ग्रंथसंग्रह :**

३१ डिसेंबर इ. स. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. तेव्हापासून ब्रिटिशांचे तांडे जहाजातून भारतात उतरू लागले. व्यापारासाठी पाऊल ठेवणाऱ्या या ब्रिटीशांनी हळूहळू आपले पाय सर्वत्र पसरून अवघा हिंदुस्थान व्यापून टाकला, तो १९४७ पर्यंत अखंड अविच्छिन्न राज्य करण्यासाठीच! या लोकांचा हा साडेतीनशे वर्षांचा इतिहास हा त्यांच्या ग्रंथ लेखन व प्रकाशन यावर प्रकाश झोत टाकणारा आहे. इंग्रजांनी स्वत: तसेच फ्रेंच, डच, पोर्तुगीज, जर्मन इत्यादींनी या कालात इतके अमाप वाङ्मय लिहून ठेवले आहे, की त्याचा नुसता आढावा घेणेही मोठे कठीण काम आहे. ग्रंथालयाच्या इतिहासात पाश्चात्यांचे योगदान बरेच मोठे आहे. किंबहुना आधुनिक मोफत ग्रंथालयाची कल्पना सर्वस्वी त्यांचीच आहे. लोकशाही व लोकशाहीच्या वाढीसाठी लागणारी साधने यांचा मुक्तहस्ते वापर, या दोन्ही गोष्टींची मुहूर्तमेढ त्यांनीच भारतात रोवली हे मान्य करावेच लागेल व त्याच दृष्टीतून या विषयाचा अभ्यास करावयास हवा. मात्र येथे तो सूत्ररुपात त्यातील फक्त ठळक ठळक घटनांचाच परामर्श घेता येणे शक्य आहे.

Society for Promotion of Christian knowledge या संस्थेने सर्वात प्रथम इ. स. १७०९ मध्ये पुस्तके वाचावयास द्यावीत, या हेतूने इंग्रजांनी फिरती ग्रंथालये सुरू केली. या प्रकारची भारतातील हे पहिले ग्रंथालय समजले पाहिजे. ही पुस्तकांची बंडले कोणतेही भाडे न घेता आकारता जहाजातून पाठविण्यात आली होती.

भारतातील ब्रिटिशाचे काम जसजसे वाढू लागले त्या प्रमाणात सनदी नोकरांची चणचण वाढू लागली. युरोपातून आलेल्या तरुणांना भारतीय वातावरण, येथील भाषा, चालचलणूक, रीतिरिवाज इत्यादी सारेच नवीन! त्यांना शिक्षण मिळून ते उत्तम सनदी नोकर व्हावे म्हणून २४ नोव्हेंबर १८०० मध्ये फोर्ट विल्यम कॉलेज (कलकत्ता) स्थापन करण्यात आले, त्याचबरोबर आवश्यक असलेले ग्रंथालयही. टिपू सुलतानाचा पाडाव केल्यावर लूट म्हणून आणलेली पुस्तके या संग्रहालयात ठेवण्यात आली. त्याशिवाय इंग्लंडमधूनही पुस्तके मागविण्यात येत होतीच. सुरुवातीला पर्शियन, अरेबिक व हिंदुस्थानी भाषांचे धढे विद्यार्थ्यांना मिळत. त्यानंतर संस्कृतसुध्दा शिकविले जाई. तत्कालीन शिरस्त्याप्रमाणे मोंगल कालापासून राजकीय दप्तर हे पर्शियन उर्दूमधूनच चाले. ब्रिटिशांना तसे ठेवणे क्रमप्राप्त होते. १७८४ मध्ये रॉयल एशियाटिक सोसायटीचेही ग्रंथालय याच लोकांनी सुरु केले. तेथे खासकरून पौर्वात्य पुस्तकांचा संग्रह करावयाचे ठरले, म्हणून फोर्ट विल्यम मधील पौवार्त्य विभाग एशियाटिक सोसायटीच्या ताब्यात देण्यात आला. दरम्यानच्या काळात इ. स. १८३६ ऑक्टोबरमध्ये कलकत्ता पब्लिक लायब्ररी (सन १९०३ मध्ये इंपीरीयल लायब्ररी) व १९४७ पासून नॅशनल लायब्ररी स्थापन करण्यात आली. या लायब्ररीला फोर्ट विल्यम कॉलेज लायब्ररीची राहिलेले पुस्तके देण्यात आली. (इ.स. १८३९). या ग्रंथाची संख्या बरीच मोठी होती. ५२२४ मुद्रित पाश्चात्य भाषेतील, १५,७३८ मुद्रित पौवार्त्य भाषेतील, ४,२५३ पौवार्त्य हस्तलिखित संग्रह. बरीचशी हस्तलिखिते सुंदर वेलबुट्टीने विभूषित होती.

**१.८ ब्रिटीश कालखंड :**

भारतात ब्रिटीशांच्या कालखंडात खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालये 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' च्या स्वरूपात अस्तित्वात आली. ब्रिटीशांनी आपले पाय भारतात घट्ट केल्यावर विविध ठिकाणी येथे येणाऱ्या ब्रिटीशांकरिता ग्रंथालये स्थापन करण्यास सुरूवात केली. या

पार्श्वभूमीवर स्थापन झालेली ग्रंथालये ही 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' म्हणून ओळखली जाऊ लागली. भारतातील विविध राज्यात अशी ग्रंथालये स्थापन करण्यात आली. यापैकी काही,

ब्रिटीशांनी सर्वप्रथम मुंबई, कलकत्ता, मद्रास येथे 'नेटिव्ह जनरल लायब्ररीची' स्थापना केली. व पुढे महाराष्ट्र, गुजरात आणि प.बंगालमध्ये ग्रंथालयांची स्थापना केली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात अॅड्रयुज लायब्ररी (१८५०), सुरत गया पब्लिक लायब्ररी, गया (१८५५), लांग लायब्ररी (१८५६), राजकोट, कानमिरा पब्लिक लायब्ररी १८६०, मद्रास गर्व्हरमेंट लायब्ररी १८६७, जुनागढ अड्यार लायब्ररी (१८८६) अड्यार, मद्रास दाही लक्ष्मी लायब्ररी (१८९२), नादियाड, तसेच आप्पाराव भोलानाथ लायब्ररी, अहमदनगर, रिचंद विपचंद लायब्ररी, भडोच, स्टूअर्ट लायब्ररी गोधरा, जे.एन.लायब्ररी, अंकलेश्वर आणि व्हिकोरिया डायमंड ज्युबली, जलालपूर येथे अनुक्रमे १८५०, १८५५,१८६६ आणि १८९७ मध्ये नेटिव्ह लायब्ररीची स्थापना झाली.

केवळ महाराष्ट्राचा विचार करता येथे या काळात स्थापन झालेली नेटिव्ह जनरल लायब्ररीज मध्ये रत्नागिरी (१८२६), अहमदनगर (१८३८), नाशिक (१८४०), मुंबई (१८४५), पुणे (१८४८), कोल्हापूर (१८५०), सावंतवाडी (१८५२), सातारा (१८५२), ठाणे (१८५४) याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. अशाच प्रकारे या सुरवातीच्या काळात देशातील तत्कालीन छोट्या मोठ्या संस्थापासून परगाण्यापर्यंत अशा नेटीव्ह ग्रंथालयाच्या स्थापनेत ग्रंथालय सेवा मर्यादित घटकांचाही सार्वजनिक स्वरुपात सुरू केली होती. यापैकी बरीचशी ग्रंथालय त्यांचे शतकोत्तर महोत्सव करुन दीड शतकाच्या उंबरठा ओलांडताना आढळतात. या प्रदीर्घ वाटचालीस प्रस्तूत ग्रंथालयांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. अनेक ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथांचे इतर प्रलेख अभ्यासक्रमास सदैव खुणावत राहिले आहेत. समाजाभिमुख विविध उपक्रम राबवून ही ग्रंथालये सामाजिक प्रबोधनाकरिता आपली संप्रेषण भूमिका चोखपणे बजावत आहेत.

इंग्रजी राजवटीत बंगालची फाळणी, राजकीय जागरुकता यामुळे जनतेची साक्षरता महत्त्वाची मानली जाऊ लागली. समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता जनतेत सामाजिक जागृती निर्माण करणे व जनतेची साक्षरता यांकरिता ग्रंथालये हा मोठा आधार वाटू लागली.

याचाच परिणाम म्हणजे भारतात सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना झाली. गुजरातमध्ये स्थापन झालेली प्रसिद्ध मित्रमंडळ ग्रंथालये ही यामध्ये समाविष्ट आहेत. या ग्रंथालयांची संख्या जवळजवळ १५०इतकी होती. ही योजना श्री. मोताभाई आणि त्यांचे सहकारी यांनी सुरू केली होती. साधारपणे एका खेड्याने वर्षाकाठी दहा रुपये अथवा पंधरा रुपये एवढी नाममात्र वर्गणी भरावयाची यानंतर त्या खेड्यातील वर्गणीमूल्यापेक्षा अधिक किंमतीचे ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे तेथील नागरीकांना वाचावयास उपलब्ध केली जात असत. संपादक, लेखक हे या योजनेतील तोटा भरुन काढत असत. अशा तऱ्हेची चळवळ श्री. याज्ञिक यांच्या मार्गदर्शनाखाली कळवाणी मंडळाने गोखले ग्रंथालय म्हणून स्थापन केली होती. बडोद्याच्या श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी १९१० मध्ये ग्रंथालयाची स्थापना केली. त्यांनी १९०७ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व विनामूल्य केले. तद्नंतर १९०८ साली अमेरिका दौऱ्यावर असताना आपल्या मुख्यमंत्र्याला बडोद्यात देवघेव ग्रंथालये स्थापन करण्यासाठी रु. ३०,०००/- खर्च करण्याची सूचना दिली. बडोदा राज्याच्या शिक्षण विभागाने या ग्रंथालयासाठी योजना सादर करताना वर्षाकाठी रु.२४/- नियतकालिकांसाठी मंजूर केले. श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनी बॉर्डन यांना ग्रंथालय पद्धतीचे व्यवस्थापन करण्यास आपल्यासोबत आणले. श्री. बॉर्डन यांनी स्टेट सेंट्रल लायब्ररी व इतर शाखा ग्रंथालये स्थापन केली आणि ग्रंथालय प्रशिक्षण वर्गही सुरू केले. या काळात 'लायब्ररी मिसेलनी' नावाचे नियतकालिक मराठी, गुजराती व इंग्रजी भाषेत एकत्रितपणे त्यांनी सुरू केले. महाराजा गायकवाडांनी स्वत: लायब्ररीला २०,००० पुस्तकांची भेट दिली. इतकेच नव्हे तर लायब्ररी बिल्डिंगमध्ये मुले व स्त्रिया यांच्याकरिता स्वतंत्र कक्षाचीही स्थापना करण्यात आली होती. सयाजीराव महाराज तिसरे यांच्या काळात ३००० हून अधिक सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यात आली. याचबरोबर सार्वजनिक ग्रंथालयांचा प्रसार आंध्रप्रदेशा पर्यंत होऊन १९१४ साली आंध्रप्रदेश लायब्ररी असोशिएशनची स्थापना झाली व ग्रंथालय प्रशिक्षण वर्गही सुरू करण्यात आले होते. आंध्रप्रदेश लायब्ररी असोशिएशनने प्रथम मद्रासमध्ये ऑल इंडिया लायब्ररी कॉन्फरन्स भरवली होती. पुढे याच संघटनेचे ऑल इंडिया पब्लिक लायब्ररीमध्ये रुपांतर झाले. या संस्थेने इंग्रजी भाषेतून 'इंडियन लायब्ररी

जर्नल' हे ग्रंथालयीन व्यवसायाकरिता पहिले  नियतकालिक सुरू केले. या असोशिएशनने बंगाल लायब्ररी असोशिएशन, मद्रास लायब्ररी असोशिएशन व पंजाब लायब्ररी असोशिएशन यांना प्रेरणा दिली. बंगाल लायब्ररी असोशिएशनची स्थापना १९२५ मध्ये झाली. या असोशिएशनने बंगालमध्ये ग्रंथालय चळवळीचा प्रसार केला. तसेच नियमित परिसंवाद, चर्चासत्र आयोजित केली आणि ग्रंथालय कर्मचाऱ्यांकरिता प्रशिक्षण वर्गही सुरू केले. या प्रकारच्या कामाध्ये कुमार मुनिचंद्र देव रॉय यांनी सुरुवातीच्या काळात ग्रंथालय विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. मद्रास लायब्ररी असोशिएशनची स्थापना १९२८ साली झाली आणि डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथालयाद्वारे महत्त्वाच्या सेवा देण्याची व्यवस्था करण्यात आली. या असोशिएशनने ग्रंथालय प्रशिक्षण वर्ग सुरू केले होते. मन्नरगुडी येथे १९३१ साली फिरत्या ग्रंथालयाची सेवा उपलब्ध करुन दिली गेली. तसेच तुरुंगात व दवाखान्यात ग्रंथालय सेवेची ओळख करुन दिली गेली होती. पंजाब लायब्ररी असोशिएशनची स्थापना १९२९ मध्ये  झाली. या संस्थेने सातवी 'ऑल इंडिया पब्लिक लायब्ररी कॉन्फरन्स' आयोजित केली होती. ग्रंथालयांच्या प्रसाराकरिता व्यासपीठ निर्माण करण्याच्या दृष्टिने 'मॉडर्न लायब्ररीयन' हे नियतकालिक सुरू करून ते १० वर्षे यशस्वीपणे चालविले होते. यानंतर १९३३ मध्ये कलकत्त्यात इंडियन  लायब्ररी असोसिएशनची स्थापन झाली. या संघटनेने ग्रंथालय निर्देशिका संकलित केल्या आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाला उत्तेजन दिले. या असोशिएशनचे १९४७ साली दिल्लीला  स्थलांतर झाले. डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली या असोशिएनने ग्रंथालय चळवळीच्या विकासाकरीता भरीव कार्य केले. त्यांनी १९४९ मध्ये 'अबगिला' (Annuals, Bulletin & Granthalaya of ILA) हे नियतकालिक सुरू केले. पुढे हे नियतकालीक बंद पडल्यावर १९५३ मध्ये  आय.एल.ए. बुलेटीन सुरू करण्यात आले. या संस्थेद्वारे  चर्चासत्रे, परिसंवाद अशा उपक्रमांचे  नियमीतपणे आयोजन केले जाते. तसेच या संस्थेने काही हिंदी व इंग्रजी प्रकाशनेही प्रसिद्ध केली आहेत. पुढे युनेस्कोच्या मदतीने साऊथ इस्ट एशियातील युनियन कॅटलॉग ऑफ सायंटिफीक पिरिऑडिकल्स संकलित करण्याची योजना आखली. डॉ. एस.आर.रंगनाथन यांनी दिल्ली पब्लिक लायब्ररी व इन्सडॉक या संस्था स्थापन करून

ग्रंथालय चळवळीला एक नवे परिमाण दिले.दिल्ली पब्लिक लायब्ररीचे उद्‌घाटन इ.स.१९५१ मध्ये पं. जवाहरलाल नेहरुंच्या हस्ते झाले. या ग्रंथालयात विविध भाषेतील विपूल ग्रंथसंग्रह, वर्तमानपत्रे, नियतकालिके उपलब्ध करून देण्यात आली. या ग्रंथालयाने सेवा केंद्रे व १२ फिरती ग्रंथालये सुरू केली. सद्यस्थितीत ६५लाखाहून अधिक ग्रंथ व जवळजवळ १३०० नियतकालिकांचा संग्रह येथे आहे.

चौथ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करताना नियोजन मंडळाने इ.स. १९६४ मध्ये डॉ.के.आर.राव यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यकारी गट नियुक्त केला होता. या कार्यकारी गटाने ग्रंथालयाचा आराखडा तयार करण्यासाठी नियोजनमंडळापुढे काही उद्दिष्टे ठेवण्यात आली होती. योग्य सार्वजनिक सेवा देण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यामध्ये जबाबदारीची विभागणी करणे, केंद्र सरकारसाठी ऑल इंडिया लायब्ररी कौन्सिलची तसेच राज्य सरकारसाठी स्टेट लायब्ररी अॅडव्हायझरी कौन्सिलची स्थापना करणे, योग्य ग्रंथालय सेवा देण्यासाठी आर्थिक स्त्रोताद्वारे मदत करणे, ग्रंथ निर्मितीकरिता प्रोत्साहन देणे अशी उद्दिष्टे समोर ठेवून नियोजन मंडळाने आराखडा तयार करावा हे उद्दिष्ट होते. तसेच १० वर्षामध्ये २००० लोकसंख्या असलेल्या खेड्यात त्यांची स्वत:ची ग्रंथालये असावीत म्हणून या कार्यकारी गटाने ३१० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले होते. या कार्यकारी गटाने ग्रंथालयासंबंधात केलेल्या सुचनेनुसार १९६६ मध्ये सरकारने शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक नॅशनल अॅव्हायसरी बोर्ड फॉर लायब्ररीज स्थापन केले होते. या मंडळाचे केंद्रिय व राज्यसरकारने ग्रंथालयाच्या मान्यतेसाठी व विकासासाठी सल्ला देणे, वेगवेगळ्या ग्रंथालयांमध्ये सहसंबंध प्रस्थापीत करणे हे कार्ये होते. एकूणच आपल्या देशात ग्रंथालया संदर्भातील जाणिव विकसित होऊन ग्रंथालये एक सामाजिक संस्था असून समाजाच्या हितासाठी या संस्थेचे संवर्धन करणे गरजेचे असल्याचे तत्कालिन समाजधुरीनांच्या लक्षात आले. ग्रंथालयांच्या निर्मितीमुळे समाजातील आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक घटनासंदर्भात व संस्कृतीसंवर्धाना संदर्भात जाणिव प्रगल्भ होऊन समाज प्रबोधनाचे कार्य सुलभ होते; याची जाणिव तत्कालिन समाजाला झाल्यानेच सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाकरिता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्य पश्चात कालखंडात विविध राज्यात लक्ष वेधले गेले. यामुळे या देशातील प्राचीन

ग्रंथालय परंपरेचे एक प्रकारे पुनरुज्जीवन झाले. जरी ग्रंथालये या कालखंडात स्थापन झाली असली तरी देखील पुरेशा आर्थिक तरतूदी अभावी साहित्य निर्मितीच्या गतीमान ओघामुळे ग्रंथालयांच्या इमारती अपूऱ्या पडू लागल्या आणि यामुळेच पुढे सार्वजनिक ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणाची समस्या निर्माण झाली. ही समस्या दूर करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न सुरू झाले आणि यातूनच ग्रंथालयामध्ये तंत्रज्ञानाचा अवलंब केला जाऊ लागला. हा अवलंब प्रामुख्याने शैक्षणिक व संशोधन ग्रंथालयामध्ये सुरूवातीस करण्यात आला व पुढे ही ग्रंथालये सेवा देण्यामध्ये अधिक सक्षम झाली.

**१.९ अर्वाचीन काळातील ग्रंथालये :**

पाश्चात्त्यांच्या प्रेरणेने आणि ब्रिटिश शासनाच्या प्रोत्साहनाने भारतात ग्रंथालयांची स्थापना होऊ लागली. अर्वाचीन काळात भारतातील सर्वांत पहिले ग्रंथालय स्थापन करण्याचा मान युरोपीय ख्रिस्ती धर्मोपदेशकांकडे जातो. सोसायटी फॉर प्रमोशन ऑफ ख्रिश्चन नॉलेज यामध्ये स्थापन केलेल्या संस्थेने मद्रास व बंगालमध्ये ग्रंथालयाच्या बाबतीत भरीव असे कार्य केले. रेव्ह. जे. लाँग व बेंजामिन ॲडम्स ही दोन नावे या संदर्भात उल्लेखनीय आहेत. ब्रिटिश सनदी नोकरांत धर्मोपदेशक, विद्वान पंडित, भाषाशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ या सर्वांचा समावेश होता. मध्ये कलकत्ता येथे एशियाटिक सोसायटीची स्थापना झाली. कलकत्त्याचे न्यायाधीश व एक भाषातज्ञ सर विल्यम ज्योन्स हे या संस्थेचे अध्यक्ष होते. पाश्चात्त्य व पौर्वात्य पंडितांनी एकत्र येऊन स्थापना केलेली ही संस्था होती. या संस्थेच्या ग्रंथालयात संस्कृत, अरबी, इटालियन, नेपाळी इ. भाषांतील दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखिते जमा झाली. एशियाटिक रिसर्चेस व बिब्लिओथेका इंडिका या संस्थांच्या दोन मासिकांना संशोधनक्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. मद्रासच्या सर विल्यम कॉलेजच्या संग्रहात असलेला टिपू सुलतानाचा ग्रंथसंग्रह  मध्ये एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात विलीन झाला. डॉ. राजेंद्रलाल मित्र व महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री यांनी या ग्रंथालयाच्या उभारणीस महत्त्वाचा हातभार लावला.

भारतातील पहिले सार्वजनिक ग्रंथालयही कलकत्ता येथेच स्थापन झाले. खाजगी व्यक्तींनी एकत्र येऊन कलकत्ता पब्लिक लायब्ररी या ग्रंथालयाची स्थापना केली. त्याच्या

अनुकरणाने भारतातील प्रमुख शहरांतून सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना झाली. खऱ्या अर्थाने ही वर्गणी–ग्रंथालयेच होती; कारण समाजातील सर्वांना तेथे मोफत प्रवेश नव्हता. कलकत्त्याच्या पब्लिक लायब्ररीचे मध्ये मेट्काफ हॉल येथे स्थलांतर झाले. प्यारेचंद मित्र हे सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार या ग्रंथालयाचे पहिले हिंदी ग्रंथपाल होते. पुढे मध्ये या ग्रंथालयाचे इंपीरियल लायब्ररीत रूपांतर झाले. ब्रिटिश म्युझीयम ग्रंथालयाचा. साहाय्यक ग्रंथपाल जॉन मॅकफर्लेन व बंगाली भाषातज्ञ हरिनाथ डे हे या ग्रंथालयाचे ग्रंथपाल होते. याच ग्रंथालयाचे रूपांतर पुढे भारताच्या राष्ट्रीय ग्रंथालयात झाले. नोव्हेंबर रोजी मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर जोनाथन डंकन यांच्या निवासस्थानी सतरा पौर्वात्य विद्याप्रेमी ब्रिटिश नागरिकांच्या भरलेल्या सभेत लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे या संस्थेची स्थापना झाली. या बैठकीत संस्थेच्या अध्यक्षपदी सरन्यायाधीश जेम्स मॅकिंटाश व चिटणीस म्हणून सुप्रसिद्ध इतिहासकार विल्यम अर्स्किन यांची नियुक्ती झाली. भारतीय भाषा, विद्या व कला यांचा अभ्यास व संशोधन व्हावे या उद्देशाने स्थापन झालेल्या या संस्थेच्या त्रैमासिक बैठकीत तत्संबंधी निबंधवाचन व चर्चा करण्याचेही ठरले. अभ्यासास उपयुक्त अशा ग्रंथालयाची आवश्यकता वाटू लागल्यामुळे मुंबईच्या एका बंद पडलेल्या संस्थेचा ग्रंथसंग्रह विकत घेण्यात आला. संस्थेचे नामांतर होऊन तिला रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन अँड आयर्लंड (मुंबई शाखा) असे संबोधण्यात येऊ लागले. प्रस्तुत संस्था व तिचे ग्रंथालय नवीनच बांधलेल्या टाउन हॉलच्या इमारतीत आले व गेली कित्येक वर्षे हे त्याच ठिकाणी आहे. संस्थेने वेळोवेळी केलेली खरेदी व मिळालेल्या ग्रंथांच्या देणग्या यांमुळे हे ग्रंथालय आज समृद्ध झाले आहे व त्याचा ग्रंथसंग्रह दोन लाखांवर गेलेला आहे. संस्थेजवळ विविध विषयांवरचे आणि विशेषतः भारतीय इतिहास, विद्या व संस्कृती यांसंबंधीचे हजारो व दुर्मिळ व मूल्यवान ग्रंथ, हस्तलिखिते व पुरातन नाण्यांचा अमोल संग्रहही आहे. कवी दान्ते याच्या 'डिव्हाइन कॉमेडी' या ग्रंथाचे चौदाव्या शतकातील आकर्षक हस्तलिखित हे या संस्थेच्या ग्रंथसंग्रहाचे अपूर्व लेणे आहे.

पेशवाई नष्ट झाल्यानंतर इंग्रजांनी पुढाकार घेऊन राज्यपाल, जिल्हाधिकारी, मामलेदार, न्यायाधीश, शिक्षणाधिकारी यांसारख्या अधिकाऱ्यांमार्फत नेटिव्ह जनरल लायब्ऱ्या स्थापन

केल्या आणि त्यांच्या विकासासाठी प्रयत्न केले. त्याचप्रमाणे मुंबई प्रांतात रजिस्ट्रेशनचा कायदा मंजूर करवून घेतला. आणखी एक महत्त्वाचा प्रयत्न ग्रंथालयांच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे, तो म्हणजे हस्तलिखित ग्रंथांचा शोध. पीटर पीटरसन, रा. गो. भांडारकर, आबाजी विष्णू काथवटे या पंडितांनी ठिकठिकाणी विखुरलेली वीस हजार हस्तलिखिते जमा केली. आज ही हस्तलिखिते भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरात संग्रहीत केलेली आहेत.

अहमदनगर, नासिक, मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा , सोलापूर या नेटिव्ह जनरल ग्रंथालयांच्या जोडीने एका महत्त्वपूर्ण ग्रंथालयाचा उल्लेख करावयास हवा, ते म्हणजे ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालय. केवळ मराठी भाषेतील ग्रंथांचा संग्रह करण्याच्या हेतूने १ जून १८९३ रोजी महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांनी स्थापन केलेले ग्रंथालय अपूर्व होते. नेटिव्ह जनरल लायब्ररींना प्रेरणा व प्रत्यक्ष साह्य होते ते सनदी नोकरांचे; परंतु मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना झाली होती ती न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने. पुणतांबेकर प्रभृतींनी मराठी ग्रंथांचा संग्रह करण्यासाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. शंकर श्रीकृष्ण देव यांनीही धुळे येथे सत्यशोधक सभेची स्थापना करून तेथे रामदासी वाङ्मयाचा संग्रह केला. याशिवाय माशेल (गोवा) येथे नाईक व करंडेशास्त्री यांनी गोवा हिंदु वाचनालय या ग्रंथालयाची स्थापना केली होती. एकीकडे नेटिव्ह जनरल लायब्ऱ्यांची स्थापना होत असताना दुसरीकडे देशाभिमानाने प्रेरित होऊन समाजशिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली ही ग्रंथालये म्हणजे स्वातंत्र्यप्रेमाची व जागृतीची प्रतीकेच होती.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात बडोदे संस्थानात सार्वजनिक ग्रंथालयाचा पाया घातला गेला. त्याचे पडसाद शेजारच्या प्रांतांतून उठले व तेथेही ग्रंथालयांची नव्याने स्थापना झाली. कलकत्ता येथेही १९४८ मध्ये राष्ट्रीय ग्रंथालय स्थापन करण्यात आले. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या साहाय्याने बहुतेक राज्यांत विद्यापीठ ग्रंथालयाची नव्या धर्तीवर स्थापना होऊन त्यांची प्रगती होऊ लागली. तेव्हा पासून राष्ट्रीय ग्रंथसूची प्रसिद्ध होऊ लागली, देशातील प्रत्येक राज्यात ग्रंथालयसंघ स्थापन झाले. ग्रंथपालनशास्त्रविषयक नियतकालिके प्रसिद्ध होऊ लागली व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वसामान्य जनतेत

मुक्तद्वार सार्वजनिक ग्रंथालयाबद्दलची जाणीव निर्माण झाली. या सर्व गोष्टी ग्रंथालयप्रगतीच्या निदर्शक म्हणता येतील.

बडोदे संस्थानचे विद्याप्रेमी व दानशूर राजे सयाजीराव गायकवाड यांनी बॉर्डन या अमेरिकन तज्ञास मुद्दाम आणवून १९१० मध्ये आदर्श अशी सार्वजनिक ग्रंथालय-पद्धती उभारली. बडोदे येथे एक मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन करून संस्थानातील प्रत्येक गावात व खेड्यात ग्रंथालय राहील, अशी व्यवस्था केली. ग्रंथालयाचे लोण ८५ टक्के जनतेपर्यंत पोहोचले. बॉर्डन, मोतीभाई अमिन, न्यूटन, मोहन दत्त, ज. स. कुडाळकर व त्यांच्यानंतर त्र्यं. दि. वाकनीस हे संस्थानच्या मध्यवर्ती ग्रंथालयाचे प्रमुख होते. ग्रंथालय क्षेत्रात जे जे नाविन्यपूर्ण उपक्रम भारतात सुरू झाले; त्यांचे उगमस्थान बडोदे हे होते. ग्रंथपालनशिक्षणाची सोय, मुलांचे ग्रंथालय, स्त्रियांसाठी स्वतंत्र विभाग, फिरते वाचनालय, ग्रंथपालन शिक्षण व लायब्ररी क्लब या गोष्टी प्रथम बडोदे संस्थानातच सुरू झाल्या. संस्थानातील सर्व ग्रंथालयाची व्यवस्था साहाय्यक ग्रंथालयाधिकारी यांच्यामार्फत होई. जिल्हा बोर्ड, म्युनिसिपालटी यांच्यामार्फत ग्रंथालयांना अनुदान मिळे. खाजगी व्यक्ती व संस्था यांना ग्रंथालय स्थापन करण्यास उत्तेजन देण्यासाठी सरकार निम्मा खर्च तर सोसत असेच, पण त्याशिवाय सुरुवातीच्या ग्रंथसंग्रहासाठी अनुदान मिळे. भारतीय ग्रंथालयाच्या इतिहासात बडोदे संस्थानातील ग्रंथालये व त्यांचे जनक सयाजीराव गायकवाड यांना फार मोठे स्थान आहे.

**राष्ट्रीय ग्रंथालय :**

स्थापन केलेल्या कलकत्ता पब्लिक लायब्ररीचे रूपांतर इंपीरियल लायब्ररीत झाले. त्याचेच पुनर्रूपांतर होऊन भारताच्या राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना झाली. जॉन मॅकफर्लेन, के. एम. असादुल्ला यांच्यानंतर बी. एस. केशवन व यादवराव मुळे यांनी या ग्रंथालयाच्या प्रगतीस हातभार लावला. या ग्रंथालयात आज तेरा लाख ग्रंथ असून दहा हजार नियतकालिके व संस्कृत, अरेबिक, इराणी, उर्दू इ. भाषांतील अनेक हस्तलिखिते आहेत. वार्षिक अंदाजपत्रक चार लाखांचे असून प्रतिवर्षी सु. बहात्तर हजार नागरिक या ग्रंथालयाचा फायदा घेतात. सध्या लेखाधिकार कायद्याप्रमाणे देशातील प्रत्येक भाषेतील प्रत्येक पुस्तकाची एक प्रत या ग्रंथालयात येते. भारतीय राष्ट्रीय ग्रंथसूची तयार करण्याचे काम याच ग्रंथालयाच्या सहकार्याने होत असते.

**दिल्ली पब्लिक लायब्ररी :**

युनेस्को या जागतिक संस्थेच्या सहकार्याने भारत सरकारने अद्ययावत व आदर्श अशा प्रायोगिक ग्रंथालयाची स्थापना केली. या ग्रंथालयाची रचना पाश्चात्त्य धर्तीवर केलेली असून सर्वांना मुक्तप्रवेश; संदर्भ, नियतकालिके हे स्वतंत्र विभाग; मुले व अंधांसाठी सोयी तसेच फिरते वाचनालय इ. वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम या ग्रंथालयाने प्रारंभापासूनच सुरू केले आहेत.

**इन्सडॉक :**

भारत सरकारने युनेस्कोच्या सहकार्याने इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर या संस्थेची स्थापना केल्याने ग्रंथालय क्षेत्रात प्रगतीचे पुढचे पाऊल पडले आहे. प्रथम नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेचे कार्य चालू होते. परंतु कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेच्या नियंत्रणाखाली या संस्थेचे कार्य चालू असून बी. एस. केशवन हे या संस्थेचे पहिले संचालक होत. देशातील संशोधनासाठी आवश्यक अशी शास्त्रीय नियतकालिके जमविणे व त्यांचे जतन करणे; नवीन अद्ययावत लेखांची माहिती वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, संशोधक यांना देणे; परभाषेतील लेखांची इंग्रजी भाषांतरे उपलब्ध करून देणे; प्रकाशित वा हस्तलिखित शास्त्रीय ग्रंथ व लेख जतन करणे आणि जागतिक संशोधन संस्थांशी संपर्क राखणे ही या संस्थेची उद्दिष्टे आहेत. दक्षिण व नैर्ऋत्य आशियातील वैज्ञानिक नियतकालिकांचे ॲनल्स ऑफ लायब्ररी सायन्स अँड डॉक्युमेंटेशन हे त्रैमासिक व अन्य प्रकाशने प्रकाशित करणे आणि प्रलेखपोषणाचा (डॉक्युमेंटेशनचा) शिक्षण वर्ग चालविणे ही या संस्थेची वैशिष्ट्ये होत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्रात लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाने स्वातंत्र्य चळवळीस सुरुवात झालेली होती. या काळात राजकीय कार्याचे व्यासपीठ या दृष्टीने पुढाऱ्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांचा उपयोग करून घेतला. त्यावेळच्या मुंबई सरकारच्या ध्यानात ही गोष्ट आल्यानंतर ही ग्रंथालये सरकारकडे नोंदविण्यासाठी सरकारने नियमावली तयार केली. सरकारने निषिद्ध ठरविलेले वाङ्मय ग्रंथालयात ठेवू नये तसेच ग्रंथालयाची जागा राजकीय कारणासाठी वापरू नये अशा अटी होत्या. लोकमान्य टिळक यांच्या

मृत्यूनंतर त्यांचे स्मारक म्हणून महाराष्ट्रात ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली. या काळात स्थापन झालेली महाराष्ट्रातील काही ग्रंथालयांमध्ये भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे; विदर्भ साहित्य संघ, श्री. शिवाजी (गडकरी) ग्रंथालय, नागपूर; कैवल्यधाम ग्रंथालय, लोणावळा; प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई ; भोसला वेदशास्त्र महाविद्यालय, नागपूर; राजवाडे संशोधन मंदिर, धुळे; शारदाश्रम ग्रंथालय, यवतमाळ; श्रीरामकृष्ण आश्रम ग्रंथालय, नागपूर; केसरी–मराठा ग्रंथशाळा, पुणे; श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे; भारतीय विद्याभवन मुंबई ही त्यांपैकी काही प्रमुख ग्रंथालये होत.

मुंबई सरकारने ग्रंथालय–चळवळीचा आढावा घेण्यासाठी नियुक्त केलेल्या फैजी समितीच्या शिफारशीप्रमाणे १९३९ साली राज्याच्या मध्यवर्ती ग्रंथालय संस्थेशी हे संग्रहालय संलग्न करून टाउन हॉलच्या इमारतीत ते स्थापन करण्यात आले. तेव्हापासून लेखाधिकार कायद्यान्वये प्राप्त झालेले व पुढे होणारे ग्रंथ या मध्यवर्ती ग्रंथालयाच्या स्वाधीन करण्यात आले व येतील. याशिवाय डिलिव्हरी ऑफ बुक्स कायद्यान्वये भारतात प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक ग्रंथ व वृत्तपत्र यांच्या प्रतीही या ग्रंथालयाकडे येत असतात.. कोणाही नागरिकाला या ग्रंथालयात वाचनाभ्यासासाठी मुक्त प्रवेश मिळू शकतो. संस्थेला महाराष्ट्र शासन व भारत सरकारकडून अनुक्रमे मध्यवर्ती ग्रंथालय व डिलिव्हरी ऑफ बुक्स ग्रंथसंग्रह यांच्या व्यवस्थेसाठी अनुदान मिळत असते. एशियाटिक सोसायटीचा सदस्य होणाऱ्या व्यक्तीला तिच्या ग्रंथालयातील ग्रंथ वाचनासाठी बाहेर नेता येतात. भारतातील अर्वाचीन काळचे हे सर्वांत जुने ग्रंथालय आज अत्यंत उपयुक्त कार्य करीत आहे.

कलकत्ता संस्कृत कॉलेज, रूडकी एंजिनिअरिंग कॉलेज ग्रंथालय, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, कलकत्ता विद्यापीठ ग्रंथालय, अलाहाबाद पब्लिक लायब्ररी, इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, खुदाबक्ष ग्रंथालय, पाटणा, व कोन्नेमारा पब्लिक लायब्ररी, मद्रास ही या काळातील महत्त्वाची ग्रंथालये होत.

पाटणा येथील खुदाबक्ष ग्रंथालय वैशिष्ट्यपूर्ण आहे. एका पर्शियन पंडिताने आपल्या पित्याचा मूळचा, हस्तलिखितांचा संग्रह पाच हजारांपर्यंत वाढविला व आपल्या पित्याच्या मरणसमयी ग्रंथसंग्रह समृद्ध खुदाबक्ष ग्रंथालय (ओरिएंटल अँड पब्लिक लायब्ररी), पाटणा.

खुदाबक्ष ग्रंथालय (ओरिएंटल अँड पब्लिक लायब्ररी), पाटणा. करण्याचे दिलेले वचन आयुष्यभराच्या परिश्रमाने पुरे केले. पुढे या ग्रंथालयाचे विश्वस्त संस्थेत रूपांतर करण्यात आले व सर्वांसाठी ग्रंथालय खुले करण्यात येऊन त्याला ओरिएंटल अँड पब्लिक लायब्ररी असे नाव देण्यात आले. खुदाबक्ष यांनी या ग्रंथालयांतील हस्तलिखितांची सूची प्रसिद्ध केली असून त्यांनी अन्य देणगीदारांना आपले खाजगी हस्तलिखितसंग्रह या ग्रंथालयाला देण्यासाठी प्रवृत्त केले. ग्रंथालयविषयक त्यांचे कार्य इतके मोठे आहे, की जदुनाथ सरकार या इतिहासकाराने त्यांना भारताचे बॉडले असे संबोधले आहे. हे ग्रंथालय अद्यापि खुदाबक्ष ग्रंथालय या नावानेच ओळखले जाते.

बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याप्रमाणे भोर, औंध, फलटण, मिरज, जमखंडी, इचलकरंजी येथील संस्थानिकांनीही आपापल्या संस्थानांत ग्रंथालये स्थापन केली. संस्थाने विलीन झाल्यानंतर ती सर्व ग्रंथालये इतर मोठ्या ग्रंथालयांत समाविष्ट झाली. लो. टिळक, रँ. परांजपे, डॉ. जयकर, डॉ. भांडारकर, डॉ. आंबेडकर व शं. ग. दाते या विद्वान व्यक्तींचे ग्रंथसंग्रह महाराष्ट्रातील ख्यातनाम ग्रंथालयांत देणगी म्हणून दाखल झाले असून या निवडक व मूल्यवान ग्रंथांची भर पडल्याने संबंधित ग्रंथालये समृद्ध आहेत.

मुंबई सरकारने नेमलेल्या फैजी समितीच्या शिफारशीप्रमाणे पुणे, मुंबई येथे मध्यवर्ती व अहमदाबाद आणि धारवाड येथे प्रादेशिक ग्रंथालये स्थापन झाली. जिल्हा, तालुका या ठिकाणच्या काही जुन्या ग्रंथालयांना अनुदाने मिळू लागली, तर काहींची स्थापना नव्याने झाली. शासनाच्या प्रयत्नाबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांनीही ठिकठिकाणी मोफत वाचनालये सुरू केली आहेत. याशिवाय या काळात विविध संस्था, शाळा, महाविद्यालये, तांत्रिक शिक्षणसंस्था व संशोधन संस्था यांमधून ग्रंथालयांची मोठ्या प्रमाणावर स्थापना झाली. महाराष्ट्र राज्याचा ग्रंथालय कायदा डिसेंबर १९६७ मध्ये मंजूर झाला व त्याची कार्यवाही मे पासून सुरू झाली. या कायद्यान्वये स्वतंत्र ग्रंथालय संचालनालय अस्तित्वात आले. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय योजनेचे नियोजन, व्यवस्थापन, संघटन व प्रगती यांची संपूर्ण जबाबदारी ग्रंथालय संचालनालयावर सोपविण्यात आली आहे. जुन्या आणि दुर्मिळ ग्रंथांचा, नियतकालिकांचा तसेच हस्तलिखितांचा संग्रह करणे व तो जतन करणे,

ग्रंथालयशास्त्रांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे, राज्यात प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची सूची तयार करणे इ. महत्त्वाची कामेही संचालनालयाकडून केली जातात. या कायद्याप्रमाणे शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय परिषद (सल्लागार समिती) नेमण्यात आलेली असून तीत राज्य ग्रंथालयसंघ, साहित्य महामंडळ, महापालिका, जिल्हा परिषदा व नगरपालिकांचे प्रतिनिधी असून विधानसभा – विधानपरिषदांचे प्रतिनिधी, शिक्षणसंचालक, शिक्षण खात्याचे सचिव, धर्मादाय आयुक्त व काही ग्रंथालयशास्त्रतज्ञ यांचीही नियुक्ती या समितीवर करण्यात आली आहे. या कायद्याच्या नियमान्वये राज्यात आज एक मध्यवर्ती ग्रंथालय (मुंबई), चार शासकीय विभागीय ग्रंथालये (पुणे, नागपूर, नासिक व औरंगाबाद), जिल्हा ग्रंथालये, तालुका ग्रंथालये, इतर ग्रंथालये आणि यांशिवाय ग्राम ग्रंथालये अनुदानासाठी मान्यतापात्र ठरलेली असून लोकसंख्येच्या प्रमाणात आणखी ग्रंथालये स्थापन करण्याची किंवा प्रस्थापित ग्रंथालयांना मान्यता देण्याची योजना आहे. या सर्व ग्रंथालयांना त्यांच्या स्थानिक दर्जाप्रमाणे नियुक्त अनुदान देण्यात येते, मात्र या मान्य ग्रंथालयांनी आपल्या वास्तूत स्थानिक नागरिकाला ग्रंथ, वृत्तपत्रे व मासिके निःशुल्क वाचावयास देण्याची त्यांवर सक्ती असते. ग्रंथालयांनी संग्रहित करावयाच्या ग्रंथांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने एक ग्रंथनिवड समितीही नियुक्त केली आहे. तसेच इमारतबांधणी, साधनसामग्री व तिच्या वाढीसाठी अनुदान देण्याचीही तरतूद ह्या कायद्यात करण्यात आल्यामुळे अनेक ग्रंथालयांना आकर्षक, विस्तृत व पक्क्या इमारतींचा लाभ झाला आहे. या कायद्याचा प्रमुख विशेष म्हणजे ग्रंथालयकायद्यांप्रमाणे यात ग्रंथालय कराचा अवलंब केलेला नसून शासनाने वार्षिक पंचवीस लक्ष रुपयांचा स्वतंत्र ग्रंथालयनिधी राखून ठेवलेला आहे व त्यातून या योजनेतील ग्रंथालयांना अनुदाने देण्यात येत आहेत. या कायद्यान्वये पाश्चात्त्य देशांप्रमाणे सार्वजनिक निःशुल्क ग्रंथालयाची संपूर्ण सेवा जरी आज येथे जनतेला उपलब्ध होत नसली, तरी गरजू वाचकाला ग्रंथालयाच्या इमारतीत वाचनाची सवलत मिळू शकते.

**१.१० आधुनिक ग्रंथालयांची वाटचाल :**

सर्वच राज्यात कायदे नसले तरी ही सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली राज्यमध्यवर्ती ग्रंथालय ते विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावर प्रणाली अंतर्गत ग्रंथालये स्थापन झालेली

आहेत.शासनाचे विविध पंच वार्षिक योजनेअंतर्गत ग्रंथालयाच्या विकासाकरिता विचार करुन आयोगाची स्थापना केलेली आहे. या आयोगी केलेल्या शिफारशीच्या पार्श्वभूमीवर राजाराम मोहनरॉय प्रतिष्ठान, कोलकत्ता, ज्ञान आयोग राष्ट्रीय ग्रंथालय धोरण (नॅशनल लायब्ररी मिशन) यांचे गठन होऊन या माध्यमातून प्राप्त झालेल्या शिफारशीची अम्मलबजावणी देशांतर्गत सुरू झालेली आहे. आज विविध राज्यातील मध्यवर्ती ग्रंथालये आधुनिक डिजीटल ग्रंथालयाच्या वाटेवर पोहोचलेली आहेत. अद्ययावत इमारतीत व वाचकाभिमुख सेवा व सुविधा हे या ग्रंथालयांचे मुलभूत उद्दिष्ट आहे. नव्या डिजिटल युगाकडे वाटचाल जरुर सुरू झालेली आहे. देशाच्या एकंदरीन विस्तार पहाता 'गाव तेथे ग्रंथालय' हे आजही स्वप्नच असले तरीदेखील बदलत्या आभासी ग्रंथालयाच्या विश्वात ग्रंथालय सेवा सर्वदूर ग्रामीण वाचकांपर्यंत पोहचतील असा विश्वास वाटतो आहे. नंतर ज्ञानाने केलेली अपेक्षीत प्रगती हेच या वाटचालीचे मुलभूत उदाहरण आहे. सध्याच्या स्मार्ट फोनच्या जमान्यात बदलत्या ग्रंथालय संकल्पनेत प्रत्यक्ष वापर हा वाचकाभिमूख सर्वदूर होणार आहे.

अशा पार्श्वभूमीवर आपल्या देशातील सार्वजनिक ग्रंथालयांची परंपरा, त्यांची विविध कालखंडातील वाटचाल, शासन, संघटना यांचे या वाटचालीस लाभलेले योगदान, अस्तित्वात असलेले कायदे यांचा आढावा पुढील प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

**१.११ सार्वजनिक ग्रंथालये : संकल्पना आणि स्वरूप :**

लोकांनी लोकांच्यासाठी चालवलेले ग्रंथालय ते सार्वजनिक ग्रंथालय असा सामान्यपणे समज प्रचलित आहे. समाजाच्या विकासाकरिता आवश्यक असणारे लोकविद्यापीठ म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय. याचबरोबर समाजाचे मनोरंजन व प्रबोधन करणे हे सार्वजनकि ग्रंथालयांचे कार्य असून अभिरूचीसंपन्न समाजास माहिती स्त्रोत उपलब्ध करून देणे ही आजच्या सार्वजनिक ग्रंथालयांची जबाबदारी आहे. मानवाचे विचार, त्याच्या कल्पना आणि त्याने स्वत:च्या प्रतिभेने निर्माण केलेल्या साहित्याचे अशा ग्रंथालयात उर्पाजन करुन जतन केले जाते व ते जनतेला उपलब्ध करुन दिले जाते. शैक्षणिक गरजांच्या पलीकडे ज्ञानाची गरज भागविण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालये करीत असतात.

सार्वजनिक ग्रंथालयाच्या सर्व गुणवैशिष्ट्यांचा समावेश असणारी व्यापक व्याख्या युनेस्कोने १९४९ साली केली. सन १९६२ मध्ये त्यामध्ये  कालानुक्रमे बदल करुन ती अचूक केली गेली.  या व्याख्याचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

**सार्वजनिक ग्रंथालये म्हणजे –**

१) त्यावरील खर्चाचा मोठा हिस्सा हा सार्वजनिक निधीतून जमा होत असतो.

२) ग्रंथालय मुक्तद्वार असते व तेथे सर्व जाती धर्माच्या वाचकांना, कोणताही भेदभाव न करता मोफत ग्रंथालयीन सेवा दिली जाते.

३) ग्रंथालयाचे स्वरुप एखाद्या स्वयंसेवी शैक्षणिक संस्थेसारखे असते. तेथे निरंतर शिक्षण देण्याचे कार्य सातत्याने होत असते.

४) वाचकांना विविध विषयावरील माहिती कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय निरपेक्षपणे उपलब्ध करुन दिली जाते. त्यासाठी विविध शैक्षणिक माहिती प्रदान करणारी साधने एकत्रित केलेली असतात. विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम हाती घेतले जातात.

सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे वाचकांना विनामूल्य सेवा दिल्या जातात. हे सार्वजनिक ग्रंथालयाचे वैशिष्ट्य आहे. शासनाकडून वाचनालयाला पुरेशी रक्कम मिळत नसल्याने ग्रंथालये वाचकाकडून अनामत रक्कम घेतात. तसेच मासिक वर्गणी घेतली जाते. ग्रंथालयासाठी येणारा खर्च, वाचकाच्या वाढत्या मागण्या व कमी होत जाणारे शासनाचे अनुदान यासाठी वाचकाकडून असे शुल्क आकारावे लागते. महाराष्ट्रातील ग्रंथालयांना अशा प्रकारे आपले अभियान चालवावे लागते. मात्र सार्वजनिक ग्रंथालयांच्या मूळ संकल्पनेत सार्वजनिक ग्रंथालये ही मोफतच असावी असे आहे. भारताने हे तत्त्व मान्य केले आहे. काही राज्यात याची अंमलबजावणी सुरू झालेली आहे.

सार्वजनिक ग्रंथालयांनी विनामूल्य सेवा द्यावी हे जरी खरे असले तरी आर्थिक उपलब्धतेचा प्रश्न उद्‌भवतो आणि हा प्रश्न ग्रंथालय कर सेवेद्वारे सोडवण्यात येतो. सरकार ग्रंथालया करिता निधी विविध कराद्वारे उभा करते. उदा. कर्नाटक राज्यात लेव्ही रुपाये ३ टक्के दराने मालमत्ता, व्यवसाय वाहन इ. करावर ग्रंथालय कराची आकारणी केली जाते. हा निधी अपुरा पडत असल्याने राज्यशासन आपल्या महसुली उत्पन्नातील काही हिस्सा

ग्रंथालय करावर खर्च करु शकते. याशिवाय जगातील कोणत्याही संघटनेकडून किंवा केंद्र सरकार कडून अर्थसहाय्य मिळू शकते; तसेच लहान मोठ्या देणग्याद्वारे ग्रंथालय निधीत भर पडते.

ग्रंथालये मानवाचा सर्वांगिण विकास करतात. मानवाच्या विकासात ग्रंथाचा पर्यायाने ग्रंथालयांचा मोठा वाटा असतो. ग्रंथालयांचा विकास हाच मानवाचा विकास असे म्हटल्यास वावगे ठरु नये. अशी व्यापक उद्दिष्टे ठरवून सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापन केली गेली आहे.

**सार्वजनिक ग्रंथालयांची उद्दिष्टे :**

१) समाजाला स्वयंशिक्षणासाठी मदत करणे.

२) प्रत्येक व्यक्तीला निरंतर शिक्षणाची सवय लावणे. त्याना बौद्धीक चालना देणे.

३) समाजोपयोगी वाचनसाहित्याचे आजिव संकलन, जतन व त्वरीत वितरणाची व्यवस्था करणे.

४) उपलब्ध सर्वज्ञानसाहित्य (वाचनसाहित्य) कोणताही भेदभाव न करता सर्वांना उपलब्ध करुन देणे.

५) संपूर्ण समाजाला सुशिक्षित व सुसंस्कृत करणे.

६) समाजाचा रिकामा वेळ सत्करणी लावण्यासाठी व त्याचा बौद्धिक व वैचारिक दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे.

७) सर्व प्रकारच्या संशोधकांना संबंधित विषयाची अद्ययावत व संदर्भ माहिती पुरवून त्यांच्या संशोधनाला सहाय्य करणे.

८) ऐतिहासिक व प्राचीन साहित्य (मुद्रित व अमुद्रित) संशोधनासाठी जतन करुन ठेवणे.

९) ग्रंथालयातील समाजाभिमुख साहित्य लक्षात घेता व सामाजिक संस्था या नात्याने निरंतर समाज कल्याणासाठी कार्य करणे.

१०) भारत एक प्रगत राष्ट्र होईल, त्याचा विकास होईल असे साहित्य पुरविणे.

११) भारताच्या सर्वांगिण प्रगतीची माहिती सर्व सामान्य जनतेपर्यंत पोचवणे.

थोडक्यात वाचन संस्कृती रुजविणे, लोकांना वाचण्यास प्रवृत्त करणे, कमीत कमी अंतरावर वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे म्हणजे ज्ञानगंगा घरोघरी पोचविणे अशी सार्वजनिक ग्रंथालयाची उद्दिष्टे म्हणून नोंदविलेली आहे.

**युनेस्कोच्या जाहिरनाम्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची वैशिष्ट्ये :**

१. विनामूल्य सेवा द्यावी.
२. जनसंपर्काचे माध्यम म्हणून कार्य करुन व्यक्तीगत व सामूदायिक समाजकल्याण, शांतता व आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी प्रयत्न करावेत.
३. समाजातील सर्व घटकांना अपेक्षित अशी वाचनसेवा बालवाचक, प्रौढ वाचक, विद्यार्थी, महिला, अपंग इ. वाचकांना उपलब्ध करुन द्यावी.
४. विशेष वाचकांना ग्रंथ व दृक श्राव्य फितीद्वारे अत्याधुनिक व अद्ययावत सेवा द्यावी.
५. ग्रंथालयांच्या ग्रामीण व शहरी भागात शाखा सुरू करुन आंतर ग्रंथालयीन सेवेला प्रोत्साहन द्यावे.
६. प्रशिक्षित व कार्यक्षम सेवक ग्रंथालयातून उपलब्ध करुन द्यावेत.
७. माहिती केंद्र, उद्‌बोधककेंद्रे व सांस्कृतिक केंद्रांचे कार्य करावे.

या उद्दिष्टांनुसार जगातील सर्व सार्वजनिक ग्रंथालये कार्य प्रवण झाल्यास निरक्षरता दूर करुन ग्रंथालयाचे जाळे विकसित होण्यास मदत होईल.

ज्याप्रमाणे युनेस्कोने सार्वजनिक ग्रंथालयाची उद्दिष्टे निश्चित केली त्याप्रमाणेच १९४९ मध्ये युनेस्कोने सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या केलेली असून सन १९७२ मध्ये ती पुढीलप्रमाणे सुधारण्यात आली.

**१.१२ सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व :**

समाजाला भूतकाळाविषयी परंपरा, रूढी, चालीरिती विषयी सखोल ज्ञान आवश्यक असते. इतिहासाकडून प्रेरणा, वर्तमानकालीन अनुभव व भविष्यकालीन विकास या सर्वच गोष्टींकरिता प्रत्येकास ज्ञानाची आवश्यकता भासते. मानवाची ही मुलभूत गरज सार्वजनिक ग्रंथालयाकडून पूरी केली जाते. माणसाजवळ भरपूर संपत्ती असेल, पण संपत्तीचा विनियोग कशा प्रकारे करावा याचे ज्ञान नसेल तर तो आपली प्रगती करू शकणार नाही. ग्रंथालयात

विविध विषयावरील पुस्तके असतात शिवाय तेथे प्रवेशाकरिता जाती, धर्म, भाषा, जमातीचे असे कोणतेच बंधन नसते. म्हणून ग्रंथालये ही खरी ज्ञानमंदिरे आहेत. लोकांमध्ये उत्साह निर्माण करणे अशा क्रियात्मक बाबींबरोबर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, पर्यावरण, समाज, मानवता, सहकार्य, स्वातंत्र्य, लोकशाही या सर्वांचीच जाणीव ग्रंथालयातील उपलब्ध ज्ञानस्त्रोताद्वारे करून दिली जाते. यास्तव ग्रंथपालाचे सहकार्य आवश्यक असते. मेलवील डूईच्या मते १०० वर्षांपूर्वी पुस्तके केवळ साठवणुकीपेक्षा वापराकरिता होती. डॉ. रंगनाथन यांनी लोकांची निरक्षरता दूर करून त्यांच्यात साक्षरतेने विश्वास निर्माण करणे हे ग्रंथालयांचे मुख्य कार्य असल्याचे नमूद केले आहे. युनेस्को ने सार्वजनिक ग्रंथालयांशिवाय लोकशाही, लोकस्वातंत्र्य मिळत नाही. असे नमुद केले आहे. या नोंदीवरून सार्वजनिक ग्रंथालयांचे राष्ट्राच्या विकासातील महत्त्व लक्षात येते.

सार्वजनिक ग्रंथालये ही जनसामान्यांच्या हिताकरिता असून संशोधन व ज्ञान, माहिती, मनोरंजनाद्वारे ही ग्रंथालये जनसामान्यांना प्रेरित करतात. शाळा, विद्यालये केवळ परीक्षेकरिता आवश्यक पुस्तकी ज्ञान पुरवितात. शिक्षकही मुलांना गरजेपुरते शिकवितात. पुढे ग्रंथाद्वारेच माणसाचे ज्ञानक्षेत्र विकसित होते. यास्तव समाजाच्या आदरास ग्रंथालये पात्र ठरलेली आहेत.

आधुनिक जगात ग्रंथालयांचा विकास करण्यासाठी शास्त्रीय व तंत्रज्ञानावर आधारित माहितीच्या सहाय्याने विकास करणे गरजेचे असून याकरिता सातत्यपूर्ण संशोधनाची गरज आहे. सेन्सेसच्या पहाणीनुसार स्वातंत्र्यपूर्व काळात अशी कित्येक राज्ये होती की ज्याठिकाणी काही तहसिल भागात हिंदी बोलण्याऱ्या स्त्रियांची संख्या केवळ २० टक्के होती व त्यामध्ये वाढही होत नव्हती. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतरही बदल होत नव्हता. अशावेळी ग्रंथालयांच्या वापरामुळे स्त्री शिक्षणाचा विकास होऊ लागला.

अर्नेस्टाईन रोझने पुस्तके ही ज्ञानवृद्धी व संस्कृतीचे संवर्धन करून समाजाचा विकास करतात असे नमूद केले आहे. (Ernestine Rose, pp. 181-182) लोकांना मोफत वाचनासाठी पुस्तके दिल्याने एक समाजोपयोगी काम केल्याचे समाधान मिळते. ग्रंथालये ही अबाल वृद्धांकरिता खुली करावीत. ग्रंथालये ज्ञानप्रदानाचे कार्य करून लोकशाही सक्षम करण्यास

मदत करतात. म्हणूनच समाजात त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. शहर आणि ग्रामीण परिसरातील ग्रंथालये संग्रह व सुविधा यादृष्टिने भिन्न असतात.पण ज्ञान, मनोरंजन व माहिती संप्रेषणाचे ग्रंथालयाचे कार्य सर्वत्र सारखे असते. यास्तव लोकांचा फावला वेळ सत्कारणी लावण्योकरिता ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावतात. मुद्रित प्रती ह्या उत्तम निवड तंत्राद्वारे घ्याव्यात व त्यांच्या यथायोग्य नोंदी ठेवाव्यात. आवशक्यतेनुसार पुस्तकांची खरेदी व्हावी. तंत्रदृष्ट्या त्यांची मांडणी करून योग्य पद्धतीने तालीका तयार करून त्यांची देवघेव व्हावी. लोकांना वाचनाकरिता दिल्या गेलेल्या पुस्तकांच्या योग्य नोंदी करून ती पुस्तके वाचकांना उपलब्ध करावीत. वाचनसाहित्यांचा पिढ्यानपिढ्या वापर होणार आहे हे लक्षात ठेवून वाचनसाहित्यांचे संरक्षण करणे गरजेचे असते. वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकांच्या प्रती, पुस्तके, नियतकालिके, मासिके, दैनिके या सर्वांची नोंद ठेवणे गरजेचे असते. तसेच लोकांच्या मागणीनुसार संग्रहीत ठेवलेल्या प्रतींचे काळजी पूर्वक वितरीत करणे आवश्यक ठरते.

सार्वजनिक ग्रंथालये केवळ ज्ञान मिळवून देतात असे नाही तर कित्येक पटीने ज्ञान वाढवतात, त्यांचा संग्रह करून ठेवतात. लोकांच्या फावल्या वेळात त्यांना अमूल्य माहिती उपलब्ध करून देऊन माहिती व ज्ञानसंपन्न बनवितात. एखाद्या सामाजिक संस्थेसारखे समाज बांधणीचे, समाज जडणघडणीचे, व्यक्ती व्यक्तींच्या महनीय कार्यांचे उदात्त कार्य ग्रंथालये करतात. ग्रंथालये ही शाळा, महाविद्यालयांसारख्या संस्था नसल्या तरी देखील ती ज्ञान संप्रेषणाचे कार्य करून व्यक्ती–व्यक्तींना योग्ययोग्यतेची जाणिव करून देतात. आपल्यावरील अन्यायाचा सामना करण्याकरिता व्यक्तींना बळ देतात, त्यांच्या फावल्या वेळात त्यांचे मनोरंजन करून समाजबांधणीचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. कायमस्वरूपी शिक्षण, प्रौढ शिक्षण या अभियानास ग्रंथालये सहकार्य करतात.

ज्ञानसंपादन आयुष्याच्या अंतापर्यंत असते पण तारूण्यावस्थेत वाचनाची गोडी निर्माण होते. ग्रहणक्षमतेबरोबरच ते साठविण्याची क्षमता याच वयात प्राप्त होते म्हणून तर वय वर्षे २५ ते ३५ या कालावधीत मनुष्य (तरूण) खरा सक्षम असतो. त्यापूर्वीच्या वयोगटात म्हणजेच बाल्यावस्था, कुमारावस्थेची पहिली पाच वर्षे या वयोगटांत शिक्षणाची आसक्ती असते. अशा वयात योग्य दिशेने वाचन करण्याची व माहिती लिहून घेण्याची सोय

ग्रंथालयात केलेली असते. ग्रंथपाल हा वाचकाचा मार्गदर्शक (गुरू) असतो. डॉ. एस.राधाकृष्णन यांनी ग्रंथपालाला गुरूची उपमा दिली आहे. इतकेच नव्हे तर पुस्तकांच्या सहवासातील पुजारीही म्हटले आहे. तरूण पिढीवर उत्तम संस्कार करण्याची त्याच्यावर जबाबदारी आहे व आपल्या राष्ट्राची बुद्धीवंत पिढी घडविण्याची जबाबदारीही ग्रंथपालावर असल्याचे नमूद केले आहे. सार्वजनिक ग्रंथालयांनी गरजेनुसार व आवडीच्या मागणीनुसार पुस्तके द्यावीत. वाचकांबरोबर जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करावेत. कारण 'The libraries are now modern temples. Infacet they more than relegious places.' (Vyas, S.D., 1998, P.1)

आज माहिती व तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्याद्वारे वेगवेगळ्या प्रकारच्या माध्यमातून समाजातील लोकांकरिता माहिती उपलब्ध होत आहे. पूर्वी ग्रंथालयांतील पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके याद्वारे माहिती उपलब्ध केली जायची. पुढे आकाशवाणी, दुरदर्शन यासारख्या माध्यमांतूनही माहिती प्रसारित होऊ लागली. आजकाल ग्रंथालयक्षेत्रात दकृश्राव्य माध्यमाने बरीच प्रगती केली आहे. आज ग्रंथालयाचे आधुनिकीकरण होत आहे. या प्रक्रियेत सार्वजनिक ग्रंथालयांनी अद्याप पुढाकार घेतलेला नाही. भविष्यात मात्र त्यांना निश्चितच सुयोग्य दिशा देणे गरजेचे आहे. अशा आधुनिक दिशेद्वारे नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून लोकांकरिता माहितीचे उत्कृष्टरित्या जतन व माहिती उपलब्ध करून देणे करणे हे सार्वजनिक ग्रंथालयांना यामुळे शक्य होणार आहे. आधुनिक समाजाच्या जडणघडणीत ग्रंथालये महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. तथापि लोकांच्या सहकार्यातूनही या कार्याला मोठा हातभार लागणे गरजेचे आहे. आधुनिक युगात भारतात सार्वजनिक ग्रंथालयाकडे अधिकाधीक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

**१.१३ सार्वजनिक ग्रंथालये: लोकशिक्षणाची विद्यापीठे :**

विविध वयोगटांमध्ये ज्ञानग्रहण करण्याच्या पद्धतीचा विचार केला असता २५ ते ३५ वयोगटातील तरूण वर्ग ज्ञानग्रहण करण्यास अधिक सक्षम असतो. स्वयंअध्ययन पद्धतीचा अभाव बाल्यावस्था व कुमाराव्यवस्था मध्ये आढळतो. या वयोगटातील मुलांना दिले जाणारे ज्ञान व शिक्षण ती आत्मसात करण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु ठराविक एका दिशेने वा आवश्यक वाटणाऱ्या ज्ञानाच्या दिशा मात्र ती शोधू शकत नाहीत. कुमार अवस्थेपलीकडे

म्हणजे २५ ते ३५ या वयोगटामध्ये ग्रहणक्षमता विकसित झालेली असते, पुढील वयोगटातज्ञानाच्या दिशा शोधण्याची उर्मी बळावत जाते. वाचनातील नेमकेपणा, वाचनाच्या आवडी, त्यातील प्रकार निवडण्याचे तंत्र इत्यादी घटक विकसित झालेले असतात, असा विचार थॉर्डाक्सिने मांडला आहे.

शिक्षणाच्या विविध पद्धती असून स्वयंसेवी संस्था, शाळा–महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा, शिक्षण पद्धती, अध्ययन, कौशल्य याकरिता ग्रंथालयातून आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकते. आज ग्रंथालयात वाचन, आवश्यक ती टिपणी काढण्यासाठी पुरेसा वेळ व जागा आवश्यक असल्यास कागद इ. सामुग्री उपलब्ध असते. अर्थात योग्य त्या संदर्भ स्त्रोताकरिता वा संदर्भ ग्रंथाकरिता ग्रंथपालाची गरज असते. म्हणून तर ब्रायसनच्या मते, ''ग्रंथपाल हा ग्रंथालयाचा शिक्षक असतो.'' म्हणूनच ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल, वाचकांचा अप्रत्यक्ष बौद्धिक विकास करत असतो. ग्रंथपालाद्वारे अशा विविध प्रकारच्या अवलंबामुळे ज्ञानाची कक्षा रूंदावण्यास मदत होऊ शकते. स्थानिक समाजाच्या गरजेप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालय साहित्य आणि शैक्षणिक, माहितीसाधने निवडून त्यांचे व्यवस्थापन करते. सार्वजनिक ग्रंथालय ही सामाजिक संस्था असल्याने येथे सर्व प्रकारचे व वयोगटाचे लोक येतात. ग्रंथालये प्रौढ लोकांची कुशलता, त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील क्षमता वाढविण्याकरिता शैक्षणिक साधने उपलब्ध करून देते. शेतीविषयक कार्याच्या पद्धती या सर्वांकरिता स्वतंत्र प्रबोधनाची गरज असते, अशी गरज ग्रंथालये पुरी करू शकतात. विविध संस्थाद्वारे राबविले जाणारे शालेय उपक्रम आवश्यकतेनुसार वा सूचनेनुसार शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी संदर्भपुस्तके, एखादे चर्चासत्र यासारख्या कार्यक्रमांतूनच ग्रंथालये समाजाच्या शिक्षणक्षेत्रात व ज्ञानप्रसारात सहभागी होऊ शकतात.

पाश्चात्य देशात सार्वजनिक ग्रंथालय त्यांच्या परिसरातील सांस्कृतिक साहित्याची ओळख करून घेऊन असे साहित्य संग्रहित करणे इतकेच नव्हे, तर अशा प्रकारचे साहित्य सांस्कृतिक ठेवा म्हणून जतनही करून ठेवते. प्रौढ शिक्षणाच्या बाबतीत एक पाऊल पुढे जाऊन काही ग्रंथालयांनी त्याकरिता वेगळी दालने उपलब्ध केलेली असून त्यांच्यातील कलागुणांना संधी मिळण्याकरिता वा ते अधिक प्रमाणात विकसित करण्याकरिता उत्तम

प्रशिक्षकांचीही नियुक्ती केलेली असते. समाजातील अनेक प्रकारच्या व्यक्तींना चालना देण्याचे उत्तम कार्य ग्रंथालयाकडून होते. उदा. साहित्यसंच, नाट्यसंच वा अध्यापक संघ या सर्वांच्या कार्यासाठी ग्रंथालयाचे आवार, ग्रंथालयात उपलब्ध असलेले शैक्षणिक वा सांस्कृतिक साहित्य उपलब्ध होऊ शकते. यास्तव असे उपक्रम सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून राबवून लोकांना अधिकाधिक प्रबोधित करण्यासारखे काम आपल्या देशात करणे गरजेचे आहे.

समाजात भिन्न–भिन्न गटाचे लोक राहतात. या व्यक्तींचे एकाच विषयावर भिन्न–भिन्न मतप्रवाह असतात. या सर्व व्यक्तींना विचार करण्याची एक उत्तम संधी देण्याचे कार्य ग्रंथालये करतात. या सर्वांमुळे ग्रंथालयाद्वारे माणसाच्या आकलनशक्तीत वाढ होते इतकेच नव्हे तर ज्ञान आत्मसात करण्याची वृत्ती विकसित होते.

सार्वजनिक ग्रंथालय सांस्कृतिक व सामाजिक कार्यामुळे लोकांमध्ये सलोख्याचे संबंध दृढ करते. परस्परांविषयी आदर, जिव्हाळा वाढीस लावते. इतकेच नव्हे तर दुसऱ्यांची भाषा, रूढी, धर्म या सर्वांचे आकलन करून देऊन त्याविषयी आत्मीयता वाढीस लागते. याद्वारे सार्वजनिक ग्रंथालय ही लोकशाही संस्था असल्याचे सिद्ध होते. ही ग्रंथालये वाचकाचा फावला वेळ सत्कारणी लावतात.

समाजातील चालीरिती, इतिहास व ज्ञान या संदर्भाची माहिती समाजातील सर्व थरांतील लोकांना प्राप्त होणे गरजेचे आहे. शालेय अध्ययन ही ज्ञानसंपादनाची पहिली पायरी समजली जाते. लहान मुलांना ज्ञान व माहिती प्रबोधनाचे काम शाळाद्वारे केले जाते. परंतु अभ्यासक्रमातील तरतुदीपेक्षा त्यांना विशेष अशी कोणतीच अतिरीक्त माहिती यास्तरावर पुरविली जात नसल्याचे आढळते. यास्तरावर बहुविध माहिती उपलब्ध होणे व तिचा प्रसार शिक्षणाच्या माध्यमातून शालेय स्तरावर वा त्यापुढील उच्चशैक्षणिक स्तरावर नसल्याने प्रौढ अवस्थेतही सुशिक्षित लोकांमध्ये वाचनाची विशेष आवड दिसून येत नाही आणि अशिक्षितांच्या ज्ञानाच्या कक्षाही विस्तारत नाहीत. अशा वेळी ग्रंथालय माहितीसाक्षरतेचा परिचय करून देऊन त्यांना परंपरा, चालीरिती आणि सद्यस्थितीची ओळख करून देणे हे समाजातील सुशिक्षित किंबहूना वाचनप्रिय माणसाचे आद्यकर्तव्य असते. या सर्वांकरिता सार्वजनिक ग्रंथालयांनी व तेथील ग्रंथपालांनी ही धुरा स्वत: सांभाळणे गरजेचे असते.

बऱ्याचदा लोकांच्यामध्ये वाचनाची आवड नसल्याचे तसेच शालेय वा महाविद्यालयीन मुलांमध्ये वाचनाचे प्रमाण बहुतांशी कमी असल्याचे दिसते. American Association of Adult Education (A.A.A.E.) या संस्थेनेही प्रौढशिक्षणाचा अभ्यास करताना त्यांच्या ध्यानात आले की, वाचनप्रियतेच्या बाबतीत निराशेचा सुर असण्यामागचे मुख्य कारण, आवश्यक व यथायोग्य पुस्तकांची उपलब्धता नसणे हेच आहे. वाचनप्रिय पुस्तकामध्ये असाही निकष लागतो की जी वाचकाकरिता सुटसुटीत शब्दांची, सुरेख अनुभव वा माहितीची तसेच सोप्या भाषेतील मांडणीची पुस्तके असतात. ती निश्चितच अल्पकाळात वाचकप्रिय होतात. अशापुस्तकांच्यामुळे वाचनाची गोडी लागू शकते. म्हणून ग्रंथालयात तंत्रदृष्ट्या विकसित व गाजलेली पुस्तके उपलब्ध असणे ही गरजेची बाब आहे.

मानव निवाऱ्याकरिता नियोजनबद्ध इमारतीची रचना करतो. पर्यावरणाचा अभ्यास करून पूरक व पोषक वातावरणात रहाणे पसंत करतो. योग्य आहार, उत्तम निंद्रा यासोबत उत्तम आरोग्याकरिता तो सदैव दक्ष असतो. उत्तम ज्ञानाकरिताच उत्तमोत्तम ग्रंथ, उत्तम ज्ञान याचीही त्याला गरज आहे. दुर्दैवाने असे असूनही बहुतांशी लोक ग्रंथालयाचा लाभ घेत नाहीत. यास्तव पुस्तके थेट वाचकांच्यापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी ग्रंथपालाची असते. त्यादृष्टीने लोकांकरिता ग्रंथालयामार्फत सुविधा कार्यान्वीत केल्या गेल्या पाहिजेत. अमेरिकेमध्ये न्यूयॉर्कच्या एका ग्रंथालयशाखेचे ग्रंथपाल यांनी समाजसेवकाचे सुंदर कार्य आपल्या हाती घेतले आहे. या करिता ते बालोद्यानात आपल्या चिमुकल्यांना घेऊन जाणाऱ्या मातांशी संवाद साधतात. त्यांच्या समस्या जाणून घेऊन, त्यांना उत्कृष्ट माहितीबद्ध व निराशा दूर करण्याची पुस्तके उपलब्ध करून देतात. यास्तव सार्वजनिक ग्रंथालये ही जनविद्यापीठे ठरावीत या करिता एककेंद्री वा केंद्रीभूत ग्रंथालयापेक्षा ग्रामीण स्तरावर ग्रंथालयांची स्थापना होणे गरजेचे आहे. ग्रंथपालांनी लोकापर्यंत पोहोचून त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक असते. संबंधित विभागाच्या सामाजिक नेत्यानेही यासंदर्भात पुढाकार घेणे गरजेचे आहे. समाजात केवळ मूठभर व्यक्ती उच्चशिक्षित होऊन त्या समाजाचे कल्याण होणार नाही. त्याकरिता सर्व समाज सुशिक्षित व्हावयास हवा. ग्रंथालयातील पुस्तके जनकल्याण करतीलच त्याचबरोबर विज्ञानाचे महत्त्व पटवून देऊन लोकांतील असामंजस्य दूर करण्यासाठी

उपयुक्त ठरतील. अशा विचारधारेमागे मुलभूत असलेला दृष्टिकोन म्हणजे 'सार्वजनिक ग्रंथालये हीच खरी लोक विद्यापीठे' होत. यास्तव सार्वजनिक ग्रंथालयांचा भारतासारख्या देशात विकास केल्यास येथील समाज राष्ट्र भावनेसाठी एक होऊन विकास गतीमान होईल.

**१.१४ सार्वजनिक ग्रंथालय आणि ज्ञान प्रसार :**

ग्रंथ हे गुरू शिवाय ज्ञानप्रसाराचे कार्य करतात. यामुळेच कोणत्याही धर्माच्या, पंथांच्या, अनुयायाच्या, जाती बांधवांना ग्रंथालयात प्रवेश असतो. थोर व्यक्तींची चरित्रे, संस्कृती अभ्यास, माहितीपूर्ण लेखन, तंत्रज्ञानाची माहिती, शास्त्रीय माहिती या सर्वांच्याच ज्ञानाची कवाडे येथे खुली झालेली दिसतात. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी वर्ग, महिला, पुरूष तसेच वृद्ध व्यक्तींनाही येथे प्रतिबंध नसतो. ग्रंथालये ज्ञानवृद्धी बरोबरच समाजात क्रांती घडवून आणू शकतात. शाळा, महाविद्यालयामध्ये राबविले जाणारे कार्यक्रम ग्रंथालयातही राबवले जातात. शालेय, महाविद्यालयीन खुल्या गटातील वाचकांना वेगवेगळे विषय देऊन त्यावर स्पर्धा कार्यक्रम ग्रंथालये घेतात यामध्ये ग्रंथालयांना कोणत्याही आर्थिक प्राप्तीची अपेक्षा नसते. समाजातील प्रत्येक स्तरावर ज्ञान प्रसार व्हावा हीच त्यांची भूमिका असते. केवळ साक्षरांकरिताच नव्हे तर निरक्षर, प्रौढ वर्गांकरिताही निरनिराळ्या माध्यमांतून शिक्षण अभियान सर्वदूर पोहचविण्याचे काम ग्रंथालये करतात. दुर्दैवाने आपल्याकडे वाचन संस्कृती विकसित झालेली नाही. बहुसंख्य मुलांची वाचनाची आवड दिवसेंदिवस कमी झाल्याची चर्चा स्थानिक पातळीवर केली जाते. याला कारणीभूत स्थानिक पातळीवरील ग्रंथालये आहेत. आज अमेरिका प्रगतशील राष्ट्र आहे कारण तेथे ग्रंथांचे महत्त्व समजले आहे. याला कारण तेथील समाजव्यवस्था नव्हे तर त्या समाजास ग्रंथ महत्त्व पटवून देणारे त्यासाठी सातत्याने प्रयत्नरत असणारे व कित्येक वर्षे एकदिलाने मागच्याकडून प्रेरणा घेत कार्य करणारे ग्रंथपाल आहेत. सार्वजनिक उद्याने वा ज्या ज्या ठिकाणी सार्वजनिक स्थळे आहेत तेथे त्याचबरोबर शाळा, महाविद्यालये या ठिकाणी जाऊन लोकांशी, मुलांशी हितगुज करणारे, त्यांना पुस्तकांचे, ग्रंथांचे महत्त्व पटवून मार्गदर्शन करणारे ग्रंथपाल तेथे कार्यरत असल्यामुळे अशा प्रकारच्या सेवांमुळे तेथे वाचन चळवळ विकसित झाली आहे. कारण यामागे कित्येक वर्षांची तपस्या व परिश्रम आहेत. वाचकवर्ग मिळत नाही अशी पुस्तके

कित्येक वर्षे धूळ खात ठेऊन देणे ही ग्रंथपालाची भूमिका चुकीची आहे. जरी वाचकवर्ग नसला तरी अशा पुस्तकांची निगा राखणे हे ग्रंथपालाचे कर्तव्य आहे. सर्वसाकल्याने विचार करता ग्रंथपालाने कायम वाचकवर्ग वाढविण्याच्या प्रयत्नात रहावे. केवळ सभासद म्हणून वाचक समोर येण्यापेक्षा आपण सभासद वाचक वाढविणे, शाळांना भेटी देणे, मुलांना पुस्तकाचे महत्त्व पटवून देण्याकरिता स्पर्धा भरविणे, सार्वजनिक ठिकाणी लोकांना भेटी देत त्यांच्याशी चर्चा करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे सातत्याने उत्कृष्ट कार्यक्रम राबवून लोकांना पुस्तकांचे महत्त्व पटवून द्यावयास हवे. यामुळे भविष्यात समाजातील मुलांमध्ये दर्जेदार कलाभिरूची निर्माण होऊ शकते. याची सुरूवात ग्रंथपालाकडून व्हावयास हवी. अमेरिकेच्या इक्वीटी लायब्ररी थिएटर स्थापना १९४३ साली झाली, पुढे पाच वर्षाच्या कालावधीत तेथे सदनिकांचीही ग्रंथालयात सोय झाली आणि समाजाकरिता उत्तमोत्तम कार्यक्रमही राबवले गेले. अशाचप्रकारे आपल्याकडे शैक्षणिक कार्यक्रम, शेती मालावर, उद्योगधंद्यावर वा करियरवर आधारित कार्यक्रम राबविले जाणे गरजेचे आहे. ग्रंथालय ही संस्था आर्थिक अपेक्षा करत नसून समाजजागृती हेच तिचे एकमेव ध्येय असते. लोकशाही राज्य, उत्तम प्रशासन, सेवाभावी संस्था, आदर्श नागरिक, हुशार मुले या सर्वांचा पाया ग्रंथालय आहे आणि त्याचा पुजारी ग्रंथपाल हाच आहे. १९१६ मध्ये जॉन कोटनदाना याबाबतचे विचार व्यक्त करताना 'लोकांचे एकीकरण करणे, त्यांच्यातील अंधश्रद्धा दूर करणे, समाजास उत्तम दर्जा प्राप्त करून देणे, विद्वान निर्माण करणे हे ग्रंथालयाचे कार्य आहे.' असे विधान करतात. याचे कारणच असे आहे की लोकजागृती हेच ग्रंथालयांचे कार्य असून त्यासाठी ग्रंथपालांनी पुढाकार घेतला पाहिजे. आजच्या प्रगत अशा माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालये आणि ग्रंथपाल यांची भूमिका अधिक सक्षम होणे गरजेचे असते. पाश्चात्य देशांशी तुलना करताना प्राचीन काळी प्रगत अशी ग्रंथालय संस्कृती भारतासारख्या देशात असतानाही आज स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतरही येथील ग्रंथालयांची उपेक्षा होत आहे. सार्वजनिक ग्रंथालयांची स्थिती तर या देशात अत्यंत शोचनीय आहे. येथील ग्रंथालये अविकसित असल्यामुळे ग्रंथपालही सक्षम सेवा देऊ शकत नाहीत. तुटपूंजे आर्थिक स्त्रोत व राजकीय आणि सामाजिक उदासिनता हेच यामागचे प्रमुख कारण आहे. देशाच्या विकासासाठी ही उदासिनता टाळून ग्रंथालयांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

## १.१५ स्थानिक माहिती केंद्रे :

स्थानिक तरूणांच्या बाबतीत त्यांच्या उद्योगधंद्यांच्या दृष्टिने गावात वा शहरातील दैंनदिन जीवनात काही रोचक घडामोडी, उद्योग व्यवसायातील आवडी, प्रशिक्षण अशा सर्व स्तरीय घडामोडी करिता माहिती हे प्रभावी साधन आहे.

ग्रामीण पातळीवर युवकांकरिता माहिती प्रसारणाचे कार्य करणे गरजेचे आहे. त्याकरिता विद्यार्थीवर्गास आवश्यक असणारी नियतकालिके ही हिंदी, इंग्रजी वा प्रादेशिक स्तरावरील भाषेतून उपलब्ध होणे गरजेचे आहे. या विद्यार्थ्यांच्या योग्य करियर निवडी करिता वा संदर्भीय अभ्यासक्रमाकरिता मिळणाऱ्या शिष्यवृत्तीकरिता योग्य ती माहिती मासिके पुरवितात. बहुतांशी लोकांना त्यांच्या आरोग्याविषयक तक्रारी व सहज उपलब्धीच्या उपाययोजना या आरोग्याविषयक माहितीद्वारे पुरविल्या जातात. यामध्ये औषधे व तज्ञ डॉक्टरांचा सल्लाही दिला जातो.

कृषीविषयक, हवामानविषयक, योग्यप्रकाची बी–बियाणी, आर्थिक, शास्त्रीय क्षेत्राबद्दलची माहितीची लोकांना गरज असते. शेतकऱ्यांना हवामानविषयक माहितीची आवश्यकता असून कोळीबांधवांना दिवसभर बदलत्या हवामानाच्या परिस्थितीबाबत सातत्याने माहितीची गरज असते. शैक्षणिक गरजांसोबत व्यावसायिक क्षेत्राच्या माहितीचीही आवश्यकता असते.

कित्येक लोकांना सरकारची धोरणे, कायदे, अमंलबजावणी, विविध एजन्सीज, शेअर बाजार याबद्दलची माहिती, तर काहींना रेल्वे वेळापत्रक, बसभाडे, रेल्वेभाडे, टेलिफोन क्रमांक, जिल्हास्तरीय संकुले याविषयी विविध प्रकारच्या माहितीची गरज असते. प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शाळा व महाविद्यालये यांची शहरातील वा जिल्ह्यातील संख्या, तालुक्यांची संख्या, दवाखाने यांचीही माहिती हवी असते. विविध प्रकारचे ग्रंथ, शब्दकोश, दैनंदिनी, निर्देशिका, माहितीपत्रके, सूचीपत्रके अशा साधनातून ही माहिती सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे उपलब्ध करून देता येते.

भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाने एक अधिकार समिती नेमली त्या समितीचे माहितीच्या राष्ट्रीय धोरणांचे कार्यक्रम प्रत्यक्ष कार्यवाहीत आणणे हे उद्दिष्ट होते. या अधिकार समितीने आपला अहवाल सादर केला. त्या अहवालाची छाननी केल्यावर असे आढळते

की, अधिकार समितीचे काही निर्णय प्रत्यक्ष अंमलात आणणे थोडेसे अवघड आहे. या कार्यकारी गटाने १३ जून १९९२ मध्ये आपल्या सूचना सादर केल्या. भारत सरकारने त्या पुढील कार्यवाहीसाठी स्विकारल्या. अधिकार समितीच्या काही गोष्टी कार्यकारी समितीने स्विकारल्या. त्यामध्ये राष्ट्रीय ग्रंथालयाचा संचालक हा केंद्रिय संदर्भ ग्रंथालयाचा मुख्य राहील. ग्रंथालय, प्रलेखन व माहितीशास्त्र संबंधात सरकारी स्तरावर राष्ट्रीय समिती स्थापण्यास पुढाकार घेणे, सार्वजनिक ग्रंथालये, मुलांसाठी ग्रंथालये ही दूर शिक्षणासाठी योग्य तऱ्हेने सेवारत करणे, शैक्षणिक ग्रंथालये, भारतीय विद्यापीठ संघाने शैक्षणिक ग्रंथालयाची प्रमाणके ठरविणे, राष्ट्रीय ग्रंथालय पद्धत, ग्रंथालय व माहितीशास्त्रासाठी राष्ट्रीय संशोधन व विकास केंद्रे स्थापन करणे. Local Information Centre (L.I.C) ही राज्यस्तरीय वा केंद्र सरकार स्तरीय पातळीवर अल्पस्वरूपात वित्त घेऊन सार्वजनिक ग्रंथालये चालू शकतात. यामध्ये सभासदाकरिता एका वर्षासाठी अल्पस्वरूपात फी आकरणी होते. अशा सभासदांमध्ये स्थानिक लोकांचा समावेश होतो. लोकांच्या मागणीनुसार त्यांना प्रकाशनांचा पुरवठा करता येतो. स्थानिक व्यापाऱ्याकडून वा विभागातील छोट्या व्यावसायिकांकडून देणग्याही स्वीकारल्या जाऊ शकतात.

भारत देश हा विकसनशील होत आहे. या पार्श्वभूमीवर चालू घडामोडी ह्या विकसित राष्ट्राकडून घेणे गरजेचे आहे. आपल्या देशात मात्र त्याबाबत असमर्थता दर्शविली जाते. सर्व विकासशील राष्ट्रांनाही याबाबत आवश्यक ती प्रगती गाठता आलेली नाही. यास्तव युनेस्कोच्या अधिपत्याखाली स्थापन झालेल्या निस्साटच्या तंज्ञाच्या मतानुसार खालील महत्त्वांच्या बाबींवर प्रकाशझोत टाकला आहे. विभागवार माहितीकेंद्रे ही भारत सरकारच्या अधिपत्याखाली स्थापन व्हावीत. यामध्ये १. फुड टेक्नॉलॉजी, लेदर टेक्नॉलॉजी व मशिन साधने यांचा समावेश होतो. २. स्थानिक माहितीकेंद्रे निर्माण व्हावीत. ३. ग्रंथालये व संशोधन केंद्रे यांच्याकडून उपलब्ध झालेली उपयुक्त माहिती साठविली जावी. त्याचबरोबर काही सहकारी एजन्सीचे कार्य पाहाता राष्ट्रीय साक्षरता मिशनची स्थापना ग्रामीण स्तरावर केली आहे. या अंतर्गत विविध विभागांच्या कार्याचे स्वरूप पुढील प्रमाणे राहील.

**१. वनखाते :** पर्यावरणविषयक माहिती जंगल विभागाने पुरवायची आहे. आर्थिक विभागाने संस्थाकरिता पैसा व तत्सम साधनांची उपलब्धतता करावी.

**२. सार्वजनिक आरोग्य विभाग :** औषधे, लसी यांची उपलब्धता सार्वजनिक आरोग्य केंद्राद्वारे करण्यात यावा.

**३. राज्य स्तरीय प्रौढ शिक्षण खाते :** स्थानिक पातळीवर साक्षरता अभियान राबविणे.

**४. स्वयंसेवी संस्था :** स्वयंसेवी संस्थांनी प्रौढशिक्षण कार्यक्रम स्थानिक स्तरावर राबवावेत.

अशा पार्श्वभूमीवर एकूणच माहितीकेंद्रे म्हणून सार्वजनिक ग्रंथालयांची भूमिका ही शासकीय पातळीवर विचारात घेण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात सार्वजनिक ग्रंथालये माहितीकेंद्रे म्हणून सक्षमपणे विकसित झाल्यास पर्यटनासारख्या सांस्कृतिक उद्योगामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतील. तसेच ग्रामीण स्तरावर माहितीकेंद्राद्वारे माहितीस्त्रोत उपलब्ध करून सर्वांगीण विकासासाठी भविष्यात प्रयत्न करणे ही सार्वजनिक ग्रंथालयांची महत्त्वपूर्ण भूमिका राहील. तसा प्रयत्न सुरू आहे. विविध राज्या अंतर्गत कायद्याद्वारे ग्रंथालयांचे स्वरुप स्पष्ट करताना सर्व साधारणतः पुढील प्रमाणे विचार केला आहे.

१) राज्य शासनाने जनतेसाठी स्थापन केलेले आणि त्याचे व्यवस्थापन केलेले ग्रंथालय.

२) सध्या अस्तित्वात असलेल्यांपैकी ज्या ग्रंथालयांना ग्रंथालय संचालक ग्रंथालय निधीमधून अनुदान देण्यासाठी मान्यता देईल असे ग्रंथालय.

३) याशिवाय ज्या ग्रंथालयांना या अधिनियमानुसार सार्वजनिक ग्रंथालय म्हणून घोषित केले जाईल असे ग्रंथालय.

सार्वजनिक ग्रंथालये समाजाच्या ज्ञानाची क्षितिजे विकसित करण्यासाठी मदत करतात. या ग्रंथालयांच्या सेवा ग्रामीण स्तरावर सक्षम झाल्यास समाज विकसित व सुसंस्कृत होण्यास मदत होईल व सर्वधर्म समभाव निर्माण होईल.

या पार्श्वभूमीवर विवेचनावरुन सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या करावयाची झाल्यास जात, वर्ग, लिंगभेद न मानता लोकशाही तत्वावर आधारीत विनामूल्य वाचनसेवा देणारी सार्वजनिक संस्था म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय.

**सार्वजनिक ग्रंथालयांची प्रणाली :**

राज्यस्तरावर सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली पुढील प्रमाणे असते –

१) राज्य मध्यवर्ती ग्रंथालये

२) प्रादेशिक ग्रंथालये

३) शहरी ग्रंथालये

४) जिल्हा ग्रंथालये

५) विभागीय ग्रंथालये

६) फिरते ग्रंथालय

७) ग्राम ग्रंथालय

८) बुक डिपॉझिट सेंटर

''शैक्षणिक संस्था, दवाखाने व तुरुंग ग्रंथालये, इतर शासनमान्य सर्व ग्रंथालयाचा समावेश सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीत होतो.

प्रत्यक्ष रचनेमध्ये राज्याच्या शिखर स्थानावर राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, विभागीय पातळीवरील ग्रंथालये, जिल्ह्याच्या शिखरस्थानी जिल्हा ग्रंथालय, तालुका स्तरावर तालुका ग्रंथालये व त्यातील ग्रामीण स्तरावर ग्राम ग्रंथालये अशा प्रकारची एकमेकात गुंफलेली प्रणाली तालुक्याशी जिल्हा विभागाशी जोडली जाणारी साखळी असावी.

''विशिष्ट आणि निश्चित अशा भौगोलिक परिक्षात्रामध्ये कार्य करणाऱ्या ग्रंथालयाची एकसंघ ग्रंथालय प्रणाली स्थापन करण्याचे निश्चितपणे अनेक फायदे आहेत.'' *(बालेकर, सं. शं., १९९७, पृ.४२)*

**१.१६ सार्वजनिक ग्रंथालयाचे बदलते स्वरूप :**

सार्वजनिक ग्रंथालय शैक्षणिक व सांस्कृतिक माहितीकेंद्र म्हणून आजच्या जगात कार्यरत असणे गरजेचे आहे. आपल्याकडे लोकसंख्या मोठ्याप्रमाणात आहे. याचाच अर्थ मनुष्यबळासाठी आपल्याकडे कमतरता नाही. तथापि हे मनुष्यबळ अप्रशिक्षित निरक्षर व अकुशल असे आहे. ते प्रशिक्षित, साक्षर व कार्यकुशल करण्याचे काम ग्रंथालये करु शकतात. सर्वसामान्य अज्ञानी माणसाला हवी असणारी माहिती त्याच्या भाषेत त्याच्या

घरापर्यंत पोचवली गेली पाहिजे. यासाठी ग्रामीण विभागात जेथे बहुसंख्य कष्टकरी समाज रहातो. तेथे सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करुन त्यांना माहितीकेंद्राचे स्वरुप द्यावे लागेल. ही माहिती प्रामुख्याने कृषी व कृषीपुरक व्यवसाय, पर्यावरण संवर्धन, सामाजिक अभिसरण, आरोग्य, प्रशासन व्यवस्थापन आणि पर्यटनासारखे लोकसंस्कृती उद्योग यांच्या अनुषंगाने दिली गेली पाहिजे. माहिती देताना ती पुस्तकांशिवाय इतर माध्यमातून दिली गेली पाहिजे. उदा. तोंडी चर्चा, भाषणे, दृक श्राव्य कार्यक्रम यांचा याकरिता अवलंब करणे गरजेचे आहे. कारण ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने तेथे वाचकांपेक्षा श्रोता तयार केला पाहिजे. बोलणे आणि ऐकणे यांच्या माध्यमातून माहितीचा प्रसार केला गेला पाहिजे.

ग्रामीण समाज हा अद्यापही दारिद्र्य रेषेतच वावरत आहे. त्यामुळेच अज्ञान, उद्योगधंद्यांच्या सोयींचा अभाव, भांडवली कमतरता असे दुष्टचक्र दिसून येते. यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी सर्व प्रथम ग्रामीण लोकांचे राहणीमान कसे उंचावेल या हेतूने माहिती व ज्ञान दिले पाहिजे. त्यामध्ये आधुनिक पद्धतीने शेती कशी करायची, छोटा जोड धंदा कसा करायचा याबाबतचे ज्ञान देऊन तेथील सर्वसामान्य माणूस स्वावलंबी, उद्योगी झाला तर तो आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह योग्यप्रकारे चालवू शकेल. आर्थिकदृष्ट्या सक्षम बनू शकेल आणि खेड्यांतून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर थांबू शकेल. यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी खेड्यातील आर्थिक व सामाजिक उन्नतीचा विचार करून नवी माहिती, नव नवे उपक्रम याद्वारे ज्ञानाचा प्रसार समाजामध्ये केला पाहिजे ही आजच्या काळाची गरज आहे. यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी एक माहिती केंद्र म्हणून अधिक कृतीशील झाले पाहिजे.

सार्वजनिक ग्रंथालयाने शैक्षणिक स्वरुपाची माहिती व ज्ञान यांचे वितरण करुन शिक्षणसंस्थांप्रमाणेच पूरक असे समाजाभिमुख कार्य करणे ही आजच्या काळाची अपेक्षा आहे.

***

## प्रकरण २ रे

# विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे स्वरुप

२.१ प्रस्तावना

२.२ केरळ

२.३ आंध्रप्रदेश

२.४ आसाम

२.५ उत्तरप्रदेश

२.६ ओरिसा

२.७ कर्नाटक

२.८ गुजरात

२.९ बिहार

२.१० मणिपूर

२.११ मध्यप्रदेश

२.१२ छत्तीसगड

२.१३ हरियाणा

२.१४ राजस्थान

२.१५ पंजाब

२.१६ जम्मू–काश्मिर

२.१७ पश्चिम बंगाल

२.१८ उत्तराचल

२.१९ अरुणाचल प्रदेश

२.२० झारखंड राज्य

२.२१ सिक्कीम

२.२२ त्रिपुरा

२.२३ नागालँड

२.२४ मेघालय

२.२५ हिमाचल प्रदेश

२.२६ मिझोराम

२.२७ अंदमान – निकोबार

२.२८ दादर नागरहवेली

२.२९ दमण आणि दीव

२.३० लक्षद्वीप

२.३१ पाँडेचरी

२.३२ दिल्ली व केंद्रशासित विभाग

२.३३ तामिळनाडू

२.३४ महाराष्ट्र

२.३५ गोवा

## प्रकरण २ रे

# विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे स्वरुप

**२.१ प्रस्तावना :**

भारतामध्ये ग्रंथालयांची परंपरा ही प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. ऐतिहासिक वाटचालीत या देशावर अनेक परकीयांनी आक्रमणे केली. या आक्रमणांनी येथील ग्रंथालय परंपरेस कुंठीत अवस्था प्राप्त झाली. शिक्षणाचा मर्यादित प्रसार हे ही त्यामागचे एक कारण होते. ब्रिटिश कालखंडात येथे शिक्षणाचा प्रसार झाला. परिणामत: सर्व समाज घटकातील युवा पिढीस परकियांच्या आक्रमणाने भान येऊन १९ व्या शतकाच्या सुरुवातीस शिक्षण प्रसार बरोबरच ग्रंथालय स्थापनेस चालना मिळाली. समाज सुधारक, राजकिय नेते यांनांही समाज प्रबोधनासाठी संघटनाचे महत्त्व समजले. आज आपल्या परिसरात त्यांनी ग्रंथालय स्थापनेस चालना दिली. अशा ग्रंथालय चळवळीस अधिष्ठान लाभले ते बडोदा नरेश सयाजीराव महाराज (तिसरे)अशा नरेशाचे. देशभर ग्रंथालय चळवळीचे वारे वाहू लागले. स्वातंत्र्य संग्रामास बळ प्राप्त झाले. देशास स्वातंत्र्य प्राप्त झाले. पुढील काळात ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला. राज्या राज्यात ग्रंथालय प्रणाली अंतरंग ग्रंथालये स्थापन होऊ लागली. सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील धुरीतानी ही चळवळ बळकट करावयाचा प्रयत्न केला. विविध राज्यातील या ग्रंथालय चळवळीच्या वाटचालीचा आढावा पुढे राज्य निहाय घेण्यात आला आहे.

या चळवळीच्या मागची पूर्व पिठिका विचारात घेता, सन १८७५ ते १९०० या काळात एकूणच राष्ट्रीय स्तरावर वातावरण स्वाभिमानाच्या भावनेने भारुन गेले होते. अशा वातावरणात स्थानिक भाषेतील ग्रंथलेखनास चालना मिळाली. या लेखनाने स्थानिक स्तरावर जनजागृती करण्यासाठी स्थानिक पातळीवर अनेक व्यक्ती व संस्था यांच्याद्वारे ग्रंथालय स्थापनेस चालना मिळाली. या  प्रयत्नाचा लेखाजोगा येथे विषद करण्यात आलेला आहे.

## २.२ केरळ :

केरळमध्ये प्राचीन काळी शिक्षण प्रसााराविषयी सामान्यलोकात जनजागृती होती आणि त्याचबरोबर तिथे हस्तलिखित संग्रहांचे व शिक्षणाचे महत्त्व ज्ञात होते. स्वत: वडील आपल्या मुलाला शिक्षण देत असत. तेथील प्राचीन ग्रंथालयांचे स्वरुप हे वैयक्तिक स्वरुपाचे होते व ही ग्रंथालये शिक्षण व्यवस्थेशी जोडलेली होती. शिक्षण पध्दती गुरुकुल पध्दतीची होती. विद्वानांच्या घरामध्ये हस्तलिखितांचा विपुल संग्रह असे आणि पिढ्यान्पिढ्या या संग्रहामध्ये भर पडत असे. विद्यार्थी व इतर इच्छुक  लोक या संग्रहाचा वापर करत असत. तत्कालीन स्थितीत हस्तलिखित ही ग्रंथालयेच होती. या सर्व ग्रंथालयातील हस्तलिखिते वर्गीकृत करुन तालिका करण्यात आलेली असे. त्याचे सर्वेक्षणही व्यवस्थितपणे करण्यात आलेले होते. आजही ही परंपरा अस्तित्वात असून विविध कलाप्रकार, संगीत, आयुर्वेद अशा विषयाकरिता ही परंपरा जोपासल्याची निदर्शनास येते. त्या त्या घरात महत्वपूर्ण हस्तलिखिते उपलब्ध आहेत.  केरळमधील प्राचीन ग्रंथालये त्या काळी खूपच प्रसिध्दीच्या झोतात होती आणि तत्कालीन स्थितीत ही ग्रंथालये सार्वजनिक स्वरुपात सर्वांना खुली असत. फक्त त्यांचा  विद्यमान सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुषंगाने मुलभूत फरक म्हणजे विद्यमान सार्वजनिक ग्रंथालय ही सर्वच विषयाचे ग्रंथ संग्रहीत करत असतात. तर प्राचीन काळची ही ग्रंथालये एका विषयाला वाहिलेली असत. त्यामुळे त्यांचे स्वरुप शैक्षणिक स्वरुपाचे वाटते. त्यांच्या सेवा मात्र विद्यार्थ्यांसाठी मर्यादित नसून सर्वांसाठी खुल्या होत्या. मात्र ही सर्व ग्रंथालये एकमेकांशी सहकार्य करत असल्यामुळे त्यांचेही जाळे तयार झालेले होते. या परिसराचा संपर्क अलेक्झंडरीया यांच्याशी असल्याने तेथील मोठ्या ग्रंथालयाची परंपरा येथेही अस्तित्वात आलेली होती. मदुराईच्या राजाने २००० वर्षांपूर्वी एक मोठे ग्रंथालय मदुराई येथे स्थापन केलेले होते. विद्वजनांच्या घराबरोबरच देवालये आणि समाज यामध्ये शिक्षण प्रसार होताच देवालये ही सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थानंची केंद्रे बनली. उत्तरेतील नालंदा विक्रमशीला, पटालवी इत्यादी शैक्षणिक संस्थानच्या संस्था केरळमध्ये स्थापन झाल्या. त्याचा उल्लेख साधारण शाळा असा केला जाईल. या सर्व शाळा देवालयाशी संलग्न होत्या. ही सर्व उच्च शिक्षित केंद्र होती. या सर्व विद्यार्थ्यांचा शिक्षण व जेवणाचा खर्च

देवालयाकडून केला जात असे. या सर्व संस्थांशी देखभाल करणारी व्यक्ती म्हणजे ग्रंथपाल उच्च विद्याविभूषित व्यक्ती असे. अशा विद्वान ग्रंथपालाची परंपरा येथे मध्य युगापर्यंत अस्तित्वात होती. आर्यांच्या आगमनाच्या काळात येथील सामाजिक व आर्थिक क्षेत्रात व्यत्यय येऊन येथील शिक्षण व ग्रंथालय व्यवस्था यावर विपरीत परिणाम झाला. पिढ्यानपिढ्या जोपासलेला येथील दर्जेदार ग्रंथसंग्रह जे विद्वजनांच्या त्यागातून शतकानुशतके जोपासले होते ते नष्ट झाले व या शासनाच्या इच्छेखातर स्थानिक लोक आपल्या शैक्षणिक परंपरेपासून भिऊन अधिकाधिक दूर गेले व निरक्षर बनले.

१९५६ मध्ये स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आलेल्या केरळ राज्यातील ग्रंथालय चळवळीचा विकास हा येथील शैक्षणिक आणि सामाजिक विकासाबरोबर झाल्याचे निदर्शनास येते. या राज्यात एकूण १३ जिल्हे सामावलेले असून या राज्याचे साक्षरता प्रमाण देशात अग्रस्थानी आहे. या राज्यात १९ व्या शतकाच्या मध्यावर येथील उत्साही तरुणाच्या माध्यमातून येथील सार्वजनिक ग्रंथालयाची चळवळ उभी केली. दुर्दैवाने या ग्रंथालय चळवळीस पुरेसे आर्थिक स्त्रोत उपलब्ध न झाल्यामुळे ही चळवळ थंडावली. त्यामुळे फक्त काही ग्रंथालये भविष्यात आपले अस्तित्व टिकवत शिल्लक राहिली. येथील त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय हे कर्नल 'एडवर्ड कॉगडन या ब्रिटीश व्यक्तीने स्थापन केले. ते ब्रिटीश म्युझियमचे संस्थापक सर 'स्लोयेन' (Sir H. N. Slone) यांचे नातू होत. ते त्रावणकर येथे राहत होते. आपल्या तेथील वास्तव्यात त्यांनी १८२९ मध्ये प्रस्तुत ग्रंथालयाची स्थापना केली. हा कालखंड 'श्री स्वात्य तिरुमल' या त्रावणकोरच्या महाराजाचा होय. हे ग्रंथालय स्थापन झाल्यावर १८४७ मध्ये स्वतःच्या इमारतीत स्थिरस्थावर झाले. पुढे कोत्याराम सार्वजनिक ग्रंथालय हे १८५८ मध्ये स्थापन झाले, आणि अरनाकुलम सार्वजनिक ग्रंथालय १८७० मध्ये स्थापन करण्यात आले. त्याचबरोबर 'सुगुणापोशीनी' वायनासाला, वंचेयूर ही सार्वजनिक ग्रंथालय १८८४ मध्ये स्थापन झाली. ही सर्व ग्रंथालये सुरु असताना इतर छोटी छोटी सार्वजनिक ग्रंथालये केरळामध्ये कार्यरत होती. येथील ग्रंथशाळा संघ हा १९४५ मध्ये स्थापन झाला. थोड्याच अवधीत या संघाचे एका वटवृक्षामध्ये रूपांतर होऊन तो केरळातील सामाजिक व शैक्षणिक अभियानाचे व्यासपीठ म्हणून ओळखला जाऊ लागला. या संघाशी

केरळमधील ४००० ग्रंथालये संलग्नित होती. या राज्यात ग्रंथालय कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी संघाच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालयाच्या निधीची उपलब्धता सुरु झाली होती. प्रत्यक्षात केरळ सार्वजनिक ग्रंथालय कायदा हा विधानसभेसमोर फेब्रुवारी १९८९ मध्ये ठेवण्यात आला. बहुचर्चेनंतर अनेक दुरुस्त्या सुचवून सर्वानुमते हा कायदा पास झाला. या कायद्यानंतर त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय हे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय म्हणून ओळखले जाऊ लागले, आणि राज्य ग्रंथालय संघटनेची स्थापना करुन त्याद्वारे ह्या सर्व ग्रंथालयाचे व्यवस्थापन पाहण्यात येऊ लागले. संघाच्या माध्यमातून निधीचे वितरण होऊ लागले. या राज्यातील ग्रंथालय चळवळीचा साकल्याने विचार करता चार कालखंडात विभाजन करणे संयुक्त ठरते.

१) प्राथमिक वाटचाल १८२९ ते १९४५

२) विकास कालखंड १९४५ ते १९७७

३) समस्येचा काळ १९७७ ते १९९४

४) आधुनिक काळ १९९४ पासून पुढे

**१) प्राथमिक वाटचाल (१८२९ ते १९४५)**

केरळा डिस्ट्रीक्ट गॅझेटीयरनुसार त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय हे १८२९ मध्ये तेथील त्रावणखोरचे राजे स्वाती थिरुनल यांच्या कालखंडात सुरु झालेले भारतातील काही आद्य ग्रंथालयापैकी एक होय. तिरुअनंतपुरच्या राजानी १८२९ ते १८४७ या कालखंडात आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. ते एक उच्च अभिरुचीचे राजे असल्यामुळे त्यांना शिक्षणाबद्दल आस्था होती. अशा दूरदृष्टी असलेल्या महाराजाकडे कडगन यांनी राज्यातील ग्रंथालयाची गरज विशद केली. या उभयताच्या प्रयत्नातून त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय अस्तित्वात आले. या महाराजानी आपल्या संपूर्ण कालखंडामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाच्या कारभारात विशेष आस्था दाखविली होती. हे ग्रंथालय प्रथमत: त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय समितीच्या व्यवस्थापनाखाली कार्यरत होते. या समितीचे अध्यक्ष हे ब्रिटीश रेसिडंट होते. सन १८८९ मध्ये या ग्रंथालय समितीने एका करारन्वये ग्रंथालयाची सर्व मालमत्ता शासनाकडे सुपूर्द केली. या करारात एक विशेष अट घालण्यात आली होती ती म्हणजे शासनाने प्रस्तुत

ग्रंथालयासाठी इमारत बांधून ते एक उत्तम ग्रंथसंग्रह असलेले संदर्भ ग्रंथालय म्हणून विकसित करावे व या ग्रंथालयाची देखभाल शेवटपर्यंत करावी.

या कराराप्रमाणे शासनाने हे ग्रंथालय ताब्यात घेऊन त्याला शासनाच्या एका विभागात उपविभागाचा दर्जा दिला. या काळात ब्रिटीश रेसिडंट हेच या समितीचे अध्यक्ष राहिले.

**पूर्वपिठिका –**

पूर्वीच्या त्रावणखोर संस्थानात मल्याळम भाषेतील पुस्तकांचा संग्रह करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पुढे सार्वजनिक ग्रंथालयाची सुरुवात महाराजा विशाकम थिरुणनल महाराज यांच्या काळात सुरु झाली. या अभियानातील पहिले ग्रंथालय म्हणजे, १८९४ मध्ये त्रिवेंद्रममधील वांचीयर (Vanchiyoor) येथील सुगुनापोशनी (Sugunaposhni) हे ग्रंथालय होय. हे ग्रंथालय साधारणत: दोन वर्षापेक्षा जास्त काळ अस्तित्वात होते. १९०९ च्या कालखंडात त्रावणकोर मधील दक्षिण भागातील नेयातीकरा (Neyyattinkra) येथे जननाप्रद्यायनी हे ग्रंथालय स्थापन करण्यात आले. नंतरच्या काळात राज्यातील मध्यवर्ती विभागात 'छेन्गानुर शंकराविलासम' हे ग्रंथालय स्थापन करण्यात आले. पुढील दशकात आणखीन काही ग्रंथालयांची येथे स्थापना करण्यात आली. यापैकी काही महत्त्वपूर्ण ग्रंथालय म्हणजे,

१) दिवायएमसिए ग्रंथालय, किसाकरा (१९११)

२) राजा वर्मा ग्रंथालय, ओचीरा (१९१३)

३) श्री चितीरा थिरुनल ग्रंथालय, त्रिवेंद्रम (१९१४)

४) ललिता विलासिनी ग्रंथालय व अभ्यासिका, पद्मनाभपुरम (१९१६)

५) जनना प्रदायनी ग्रंथालय, मावेलीकेरा (१९१६)

६) मर्थानंद विलासम ग्रंथालय, इरानील (१९१७)

७) सर मुलम स्लिवर ज्युबली ग्रंथालय, धोडूपुझा (१९१७)

८) भारती विलासम ग्रंथालय, कोत्यायम (१९१९)

सन १८८१ मध्ये कोत्यायम सार्वजनिक ग्रंथालय हे त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालयाच्यानंतर स्थापन झालेले दुसऱ्या क्रमांकाचे ग्रंथालय होय. त्रावणकोर शासनाने या ग्रंथालयाना अनुदान देण्यासाठी काही नियम तयार केले. या नियमांतर्गत सुरुवातीस मुख्यवस्तीत सुरु

असलेली ३७ ग्रंथालये व अभ्यासिकांना १९१७ ते १९१८ च्या कालखंडात अनुदान देणे सुरु केले. या संदर्भातील ग्रंथालय विषयक ठराव प्रथमतः त्रावणखोर येथील ग्रंथालयासंदर्भात २३ सप्टेंबर १९१७ रोजी मंजूर करण्यात आला. वरील ग्रंथालयाबरोबरच शासनाने कोचीन व मलबार येथील ग्रंथालयांना सहकार्य करणे सुरु केले. याच पार्श्वभूमीवर १९१७ मध्ये एर्नाकुलुम या कोचीनच्या राजधानीमध्ये सार्वजनिक ग्रंथालय स्थापन झाले. पुढे त्रिचूर ग्रंथालय १८७८, तेलियरी ग्रंथालय १९०१, कालीकम ग्रंथालय १९२४, कानूर ग्रंथालय १९२७ आणि खेड्यापाड्यातील ग्रंथालये व अभ्यासिका अस्तित्वात आल्या. या सर्व ग्रंथालयांना स्थानिक पातळीवर निधी व देणग्या प्राप्त झाल्या होत्या. *(नायर, रामानुजम, लायब्ररी मुमेंट इन केरळा, त्रिवेंद्रम, रायटर्स क्लब १९७४)*

राज्यातील विविध भागात ग्रंथालये अस्तित्वात येत असताना ती कायमस्वरुपी चालविण्यात येणाऱ्या अडचणीमुळे यापैकी बरीच ग्रंथालये बंद पडली. यामुळेच ग्रंथालय चळवळीच्या उभारणीची गरज तीव्रतर झाली. दुर्दैवाने ही चळवळ बळ धरु शकली नाही. पुढे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या पार्श्वभूमीवर येथे ग्रंथालय चळवळ, सामाजिक सुधारणा चळवळ, विविध जातीच्या संरचना व राजकीय चळवळीचा उठाव होऊन यातूनच पुढे राजकीय पक्षाचा उदय झाला आणि १९२० ते ३० च्या कालखंडात सार्वजनिक ग्रंथालयाचा विकास खुंटत चालला असतानाच या सगळ्या प्रेरणांच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षात ग्रंथालय चळवळ खऱ्या अर्थाने केरळ राज्यात अस्तित्वात आली.

**ग्रंथालय परिषद आणि केरळ ग्रंथालय संघ यांची स्थापना :**

जरी १९४५ मध्ये केरळा ग्रंथालय संघ अस्तित्वात आला होता. तरी ग्रंथालय चळवळ त्या अगोदर काही दशके येथे अस्तित्वात होती. केरळा राज्य अस्तित्वात येण्याच्या अगोदर नजिकच असलेली त्रावणकर, कोचीन, मलबार ही राज्ये भौगोलिक संलग्नतेने जवळ होती. या प्रत्येक विभागात स्वतंत्रपणे ग्रंथालये अस्तित्वात आली होती. अनेक व्यक्तींच्या प्रयत्नातून येथील सर्व ग्रंथालये एका संघटनेच्या छत्राखाली येण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. या पार्श्वभूमीवर पहिल्यांदा १९२४ मध्ये लोकसहभागातून ग्रंथालय चळवळ उभी राहिली. यामध्ये विविध विभागातील मान्यवर व्यक्तिंनी एकत्रित येऊन आपल्या विचारांचे आदानप्रदान

करून ग्रामीण ग्रंथालये कशी सुरु राहतील याबाबत चर्चा केली. या सगळ्या हालचाली दरम्यान नेयातीनकरा (Neyatinkra) या त्रिवेंद्रमजवळील गावातील ‘जनन प्रदायनी’ ग्रंथालयांमध्ये त्रिवेंद्रम आणि त्रावणकोरमधील सर्व ग्रंथालयांची परिषद याचवर्षी भरविण्यात आली. ही परिषद महाराजा कॉलेज त्रिवेंद्रम येथील विद्वान प्राध्यापक सी. व्ही. चंद्रशेखरन यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. केरळमधील अशा प्रकारची ही पहिलीच ग्रंथालय परिषद होती. यानंतर दुसरी परिषद १९३३ मध्ये त्रिवेंद्रम येथे श्री चिथीरातिरुणाल ग्रंथालय येथे संपन्न झाली. १९३७ मध्ये त्रावणकोर ग्रंथालय परिषदेचे तिसऱ्यांदा दिवाण नानोपिलई मेमोरियल ग्रंथालय नेचूर येथे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेस परिसरातील मान्यवर सुशिक्षित, शिक्षणतज्ञ व कायदेतज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सी. व्ही. चंद्रशेखरन, पी. के. नारायणन पिलई व मार्लोर गोविदा पिलई यांचा समावेश होता. या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे ग्रंथालय चळवळीची गरज सर्वांना जाणवली. तसेच या परिषदेमुळे सार्वजनिक ग्रंथालयांना निधी उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी असल्याची जाणीव सर्वांना झाली.

कोचीन आणि मलबार विभागातील उत्तर भागात ग्रंथालय चळवळ ही २० व्या शतकाच्या सुरुवातीस अस्तित्वात आली होती. १९२७ च्या डिसेंबर महिन्यात ४ थी ग्रंथालय परिषद मद्रास येथे भरली होती. यामध्ये केरळातील प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालय चळवळीसंदर्भात त्यांना प्रोत्साहन तर प्राप्त झालेच शिवाय ग्रंथालये व ग्रंथालय चळवळीच्या आद्य स्वरुपाची जाणीव त्यांना खऱ्या अर्थाने झाली. मद्रास येथील ग्रंथालय व्यवस्थापन समितीमध्ये १९२८ मध्ये मल्याळी विद्वानाचा समावेश होता. यापैकी काही प्रमुख म्हणजे डॉ. के. सी. चाको, ॲम्बट शिवराम, श्री. चेकूलांथू गोपाळ मेनन होय. या व्यक्तींच्या सहकार्याने व प्रोत्साहनानेच कोचीन व मलबार येथील ग्रंथालय चळवळीचा विकास झाला. १९२६ च्या कालखंडात कोचीन शासनाने प्रौढ साक्षरता अभियानाचा एक भाग म्हणून प्रायोगिक स्वरुपात विविध ग्रामीण भागात ग्रामीण ग्रंथालये स्थापन केली. याचा परिणाम म्हणूनच पुढील वीस वर्षात ग्रंथालयांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. १९४८ च्या काळात कोचीनमध्ये सार्वजनिक ग्रंथालये,

विस्तारीत ग्राम ग्रंथालये व खेडेगावातील ग्रंथालये अशा तीन प्रकारची ग्रंथालये सुरु करण्यात आली होती. राजकीय पक्षांनीदेखील येथील ग्रंथालय संघटनामध्ये लक्ष देऊन ग्रंथालय चळवळीच्या विकासास हातभार लावला होता. याचे एक उदाहरण म्हणजे मद्रास जिल्हा काँग्रेसची बैठक ४ मे १९१६ रोजी पालघाटमध्ये संपन्न झाली होती. या बैठकीच्या अध्यक्षपदी ॲनी बेझंट होत्या. याच सभेत स्वतंत्र पंचायत स्थापून या पंचायतीस प्रत्येक गावागावात शाळा व ग्रंथालय सुरु करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. या उपक्रमाचे एक राजकीय अंग म्हणजे केरळ पंचायत काँग्रेस समितीची वार्षिक सभा २४ जुलै १९२४ मध्ये संपन्न झाली होती. या सभेत काँग्रेसच्या धोरणाचा प्रसार ग्रंथालयांच्या माध्यमातूनच पोहचविण्याविषयी प्रयत्न करणे आणि याकरिता स्थानिक ग्रंथालये प्रत्येक स्थानिक काँग्रेस समितीने उभी करावीत अशी चर्चा झाली होती. यास्तव सभेत काँग्रेस समितीबरोबरच ग्रंथालय समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मार्च १९३१ मध्ये संपूर्ण केरळ ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात येऊन थ्रीसूर हे मुख्य कार्यालय म्हणून निश्चित करण्यात आले. लवकरच येथे संपूर्ण केरळ समितीची बैठक होऊन यामध्ये समस्त केरळ पुस्तकालय समिती गठीत करण्यात आली. ग्रंथालय चळवळ भक्कम करण्यासाठी करावयाच्या उपक्रमाची रूपरेषा आखण्यात आली. या उपक्रमामध्ये पुढील उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला होता.

१) समितीद्वारे केरळमधील ६००० खेड्यामध्ये ग्रंथालये स्थापन करण्यासाठी दबाव गट तयार करणे.

२) या समितीद्वारे शासन, स्थानिक संस्था व समाजातील श्रीमंत वर्गास ग्रंथालय चळवळीचे महत्त्व पटवून देणे.

३) ग्रंथ व नियतकालिके यांची निवड करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करणे.

४) पुस्तक जत्रांचे / मेळाव्यांचे आयोजन करणे.

५) नवीन ग्रंथालयांच्या स्थापनेस सहकार्य करणे.

याच समितीने पुढे 'ग्रंथ विहार' हा पहिला ग्रंथ वर्षभरातच प्रकाशित केला. या परिषदेचे अध्यक्षही काँग्रेसचे नेते के. केलाप्पन हे होते. या परिषदेमध्येच 'मलबार वयानशाळा संघ' ची स्थापना झाली. राजकीय नेत्यांचाच या परिषदेच्या पदाधिकारी वर्गात समावेश होता. ई. रामन मेमन हे अध्यक्ष व के. दामोदरन हे सचिवपदी विराजमान झाले होते. या सक्रीय राजकीय नेत्यांच्याकडे चळवळीकरिता पुरेसा वेळ नसल्याने ते ग्रंथालय चळवळीकरिता पुरेसा वेळ देऊ शकले नाहीत. परिणामत: चळवळीची हानी झाली. या पार्श्वभूमीवर चळवळीचे पुनर्गठन करण्यासाठी एक मध्यवर्ती समितीची स्थापना करण्यासाठी थालासेरी येथे १९४३ मध्ये एक सभा बोलाविण्यात आली. या सभेत 'संपूर्ण केरळ ग्रंथालय संघ' स्थापण्यासंदर्भात ठराव पारीत करण्यात आला. त्याचबरोबर मलबार येथील श्री मधुवनम कृष्णा कुरुप या सक्षम काँग्रेस नेत्याच्या नेतृत्वाखाली 'केरळ ग्रंथालय संघाची' स्थापना करण्यात येऊन डिसेंबर १९४३ मध्ये त्याची नोंदणीही करण्यात आली. ग्रंथालय शास्त्राचे जनक श्री. एस्. आर. रंगनाथन यांनी संघटनेच्या माध्यमातून मलबार विभागातील ग्रंथालयाना भेटी देऊन काही व्याख्याने दिली. दुर्दैवाने याचा उपयोग ग्रंथालय चळवळीस दिशा देण्याच्या दृष्टीने फारसा उपयुक्त ठरला नाही. *(रामानुजन नायर पृ. २४)*

**२) विकास कालखंड (१९४५ – १९४७) :**

केरळातील ग्रंथालय चळवळीच्या दृष्टीने हा एक कठीण काळ होता. सार्वजनिक ग्रंथालय चळवळ ही एक जीवनाचा एक अविभाज्य भाग असून तिच्याकडे अधिकाधिक लक्ष देणे कसे गरजेचे आहे हे शासन व लोकांना पटवून देणे हेच संघटनेसमोरील सर्वात मोठे आव्हान होते. हे आव्हान पेलण्यासाठी संघटनेद्वारे प्रयत्न सुरु असताना, ग्रंथालयांच्या करिता पुरेशा प्रमाणात कायमस्वरुपी निधी, पूर्ण वेळ कर्मचारी, स्वत: ची इमारत इ. आवश्यकता ग्रंथालय कार्यकर्त्यांसमोर मांडून याकरिता एक मध्यवर्ती संघटनेची आवश्यकता सर्वांना पटवून देण्यात आली. अशा प्रयत्नातूनच सार्वजनिक ग्रंथालयांचे अस्तित्व टिकविणे शक्य होईल हेही सर्वांच्या मनावर बिंबविण्यात आले. या सर्व प्रयत्नांची फलश्रुती म्हणूनच केरळच्या ऐतिहासिक वाटचालीत प्रथमत:च सप्टेंबर १९४५ मध्ये त्रावणकोर परिसरातील ४७ कार्यरत ग्रंथालयांचे प्रतिनिधी, इतर त्रावणकोरमधील अंबल पुझा येथील पी. के.

मेमोरीयल ग्रंथालयामध्ये श्री. पी. एन . पणीकर व त्रावणकोरचे दिवाण सी. पी. रामस्वामी अय्यर यांच्या उपस्थितीत एकत्रित आले. या प्रसंगी 'संपूर्ण त्रावणकोर ग्रंथशाळा संघ'चे उद्‌घाटन करण्यात आले. पुढे ४७ ग्रंथालय सदस्यांसह सेवाभावी संघटना म्हणून या संघाची नोंदणी करण्यात आली. या संघाच्या पहिल्या सभेत के. एन्. केशवन यांची अध्यक्षपदी तर पी. एन. पनीकर यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. १९४७ मध्येच या संघाची त्रावणकोर कंपनी ॲक्ट १९३९ अंतर्गत नोंदणी करण्यात आली. या संघाच्या नोंदणीनंतर एक कार्यकारी समिती गठीत करून श्री. पी. एन्. पनीकर यांची संयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आली. लवकरच त्यांनी त्रावणकोरच्या दिवाणांच्याकडे ग्रंथालयांचे अनुदान वाढविण्यासाठी प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावाचा विचार करून दिवाणांनी अनुदान रु. २००/– वरून रु. २५०/– प्रती वर्ष याप्रमाणे मंजूर केले. तसेच त्रावणकोर ग्रंथशाळा संघास विशेष अनुदान म्हणून रु. २५०/– इतकी रक्कम मंजूर केली. संघाने पुढे बंद पडलेल्या व शिथिल झालेल्या ग्रंथालयांच्या पुनरुज्जीवनाकरिता १) श्री. पी. एन. पणीकर (प्रमुख संघटक) २) श्री. एस्. के. स्वामी (दक्षिण विभाग) ३) श्री. पी. माधवन पिलई (मध्यवर्ती विभाग) ४) श्री. डब्ल्यू. ओ. जॉर्ज (उत्तर विभाग) अशा चार संघटकांची नियुक्ती केली.

या उपक्रमामुळे लवकरच संघाच्या माध्यमातून मोठ्या संख्येने ग्रंथालये स्थापन करण्यात आली. विशेष म्हणजे शासनाने त्रावणकोर विद्यापीठाचे ग्रंथालय संघाशी संलग्नित करावे असा आदेश काढला. या सर्व चळवळीतील श्री. पी. एन. पणशीकर यांचे योगदान हे विशेष स्वरुपाचे होते. ते स्वत: सनातन धर्म, ज्ञानशाळा, निलमपूर यांच्याशी संलग्नित होते. या ग्रंथालयास शासनाकडून रुपये १०,००,०००/– इतके अनुदान प्राप्त करण्यात ते यशस्वी ठरले. त्यांना एकूणच ग्रंथालय चळवळीच्या उत्थानाकरिता शासनाबरोबरच इतर सरकारी कार्यालयांची महत्त्वपूर्ण स्वरुपाची गरज आहे याची जाणीव होती. याकरीता त्यांनी संपूर्ण त्रावणकोर परिसराचा प्रवास करून ग्रंथालय चळवळीविषयक आस्था असलेल्या व्यक्तींची व्यक्तिश: भेट घेऊन ग्रामीण ग्रंथालयाकरीता सर्व प्रकारचे सहाय्य घेण्यात ते सवार्थाने यशस्वी ठरले. त्यांनी आपले आयुष्य ग्रंथालय विकासाकरीता वाहिलेले होते.

याचबरोबर त्रावणकोरचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी यांनीही ग्रंथालय चळवळीकरीता दिलेले प्रोत्साहन महत्त्वपूर्ण होते. ते खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना आणि ग्रंथालय चळवळ या विषयी आस्था बाळगून होते. सुरुवातीस संघाचे कार्यालय अंबलपूजा येथे होते. एक वर्षानंतर ते त्रिवेंद्रम येथे स्थलांतरीत करण्यात आले.

**त्रावणकोर कोचीन ग्रंथशाला संघ :**

त्रावणकोर ग्रंथालय संघटनेच्या स्थापनेपासून त्यानी आपले कार्यक्षेत्र कोचीन व मलबार या विभागापर्यंत विस्तारीत केले होते. या समितीने त्रावणकोर कोचीन विभागातील ग्रंथालयांना भेटी देऊन तेथील क्रियाशील ग्रंथालयाकरीता एक सर्वसमावेशक आकृतीबंध तयार केला. याकरीता एक विशेष सभेचे आयोजन अरनाकुलम सार्वजनिक ग्रंथालय येथे करून २१ सभासदांची समिती स्थापन केली. तेथील ग्रंथालयाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी सर्वसामान्य आकृतीबंधाचा अवलंब करून त्याबाबत एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याची जबाबदारी या समितीवर सोपवलेली होती. या काळात २४० ग्रंथालये कोचीन विभागात कार्यरत होती. कोचीन आणि त्रावणकोर या राज्यांचे एकत्रिकरण झाल्यावर कोचीन येथील ग्रंथालय विभाग विसर्जित करून सर्व स्थानिक ग्रंथालये संघाशी संलग्निकरण्यात आली आणि संघाचे नाव बदलून त्रावणकोर कोचीन ग्रंथशाला संघ असे करण्यात आले. या कालखंडात मलबार विभागातील सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांना अभ्यासिकांची स्थापना करून त्याचे ग्रंथालयामध्ये रूपांतर करण्यासंबंधी असलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांना होती. याचदरम्यान १९४८ मध्ये मद्रास ग्रंथालय कायद्याची अंमलबजावणी या परिसरात करून स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापनाही करण्यात आली. या स्थानिक समित्या लोकांच्याकडून कर वसूल करून त्याचा विनियोग ग्रंथालयासाठी करु लागले. दुर्दैवाने स्थानिक ग्रंथालय संघटनेने स्थापन केलेली ग्रंथालये ही शासकीय संस्था म्हणून जरी कार्यरत होती तरीदेखील त्याच्याद्वारे लोकांना चांगल्या सेवा दिल्या जात नसत. या परिस्थितीची पहाणी करून ग्रंथशाला संघाने नवीन आकृतीबंधनुसार ग्रंथालयाची स्थापना करून त्याना अनुदान प्राप्त करून देण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले.

**केरळ ग्रंथशाला संघ :**

सन १९५६ च्या कालखंडात त्रावणकोर कोचीन आणि मलबार यांचे एकत्रीकरण करून केरळ राज्याची निर्मिती झाल्यावर १९५८ मध्ये त्रावणकोर कोचीन ग्रंथशाला संघ 'केरळ ग्रंथशाला संघ' म्हणून ओळखला जाऊ लागला. या संघांतर्गत तिन्ही विभागातील ग्रंथालये संघाशी संलग्नित करण्यात आली. या एकत्रिकरणामुळे केरळमधील ग्रंथालय चळवळीच्या इतिहासात एक नवे पर्व सुरु झाले. अशाप्रकारे एकत्रिकरण करून लोकशाहीच्या पध्दतीने अस्तित्वात आलेला संघ म्हणजे केरळ सांस्कृतिक जीवनाचे द्योतक होय. या पद्धतीने खोलवर पाळेमुळे रुजलेले संघटनाचे अधिष्ठान आणि त्याला जोडलेली ग्रामीण ग्रंथालये ही त्या काळात केरळमधील सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमाची केंद्रे म्हणून ओळखली जाऊ लागली. केरळ येथील एकूण पाच हजारहून अधिक ग्रंथालये लोकांच्या मध्ये वाचन, संस्कृती रुजविण्यासाठी महत्वाची केंद्रे म्हणून ओळखली जाऊ लागली. ही ग्रंथालये साक्षरता अभियान व अपारंपारिक शिक्षणाचा उपक्रम राज्यभर राबविण्यासाठी सहभागी झाली.

राज्यभर सामाजिक व सांस्कृतिक प्रगती करण्यासाठी संघटना एक भक्कम शक्ती म्ळणून याच काळात उभी राहिली. १९५५ मध्ये एकूण १७४७ ग्रंथालये संघाशी संलग्नित होती. हीच संख्या १९७५ मध्ये ४२८० पर्यंत पोचली. यावरूनच संघाद्वारे केरळभर ग्रंथालय चळवळ राबविण्यासाठी केलेले प्रयत्न लक्षात येण्यासारखे आहेत. पुढे १९६१ मध्ये संघाची जबाबदारी रद्दबातल करून ही जबाबदारी तालुका संघटनेकडे सोपविण्यात आली. केरळ ग्रंथशाला संघ हा एक क्रियाशील संघ म्हणून ओळखला जाणारा संघ होय. या संघाने डिसेंबर १९७० मध्ये आपला रौप्यमहोत्सव साजरा करताना विविध चर्चासत्राचे, परिषद, प्रदर्शने यांचे दिमाखदार आयोजन केले होते. उत्तर केरळापासून दक्षिण केरळपर्यंत सर्व स्तरावर सांस्कृतिक मिरवणुकीचे आयोजन या प्रसंगी केले होते. संघाच्या इतिहासातील ऐतिहासिक क्षण म्हणून हा उपक्रम नोंदविला गेला. या संघाने केवळ ग्रामीण ग्रंथालय चळवळीला विश्वास दिला नसून संघाद्वारे सामाजिक सहोदराचे उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविताना चर्चासत्रे, परिषदा, खेळ आणि तद्स्वरुप उपक्रम राबवून एक नवे अभियान सुरु

केले. राज्यभर सर्वेक्षण करून राज्यातील निरक्षरता कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. दुर्गम परिसरातील लोकांच्यामध्ये साक्षरतेचे महत्त्व पटवून देताना वाचा आणि जगा, विचार करा आणि कार्यरत व्हा, अशा घोषणाही तयार केल्या गेल्या. या ग्रंथालय संघाचे आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण कार्य म्हणजे त्यांनी स्थानिक ग्रंथालय कार्यकर्त्यांच्या सहकार्याने भारत सरकारकडून १९७१मध्ये साक्षरता अभियान राबविण्याचा एक प्रकल्प केरळमधील अभिनुराव, मालापुरम उत्तर व दक्षिण विभागात यशस्वीपणे राबविला. या उपक्रमाद्वारे साक्षरता मोहिमेबरोबरच लोकांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकासावर भर देण्यात आला होता.

तसेच संघाद्वारे तज्ज्ञांची समिती स्थापून त्याच्यामार्फत हस्तपुस्तिका, मार्गदर्शकपुस्तिका, कार्यपुस्तिका, साक्षरता तक्ते तयार करून ते साक्षरता केंद्राकडे सोपविण्यात आले. नवसाक्षरताकरीता प्रशिक्षणवर्ग मासिक चर्चासत्रे, साहित्यिकांची कार्यशाळा यांचे आयोजन केले. तसेच पाठपुरावा करणारी साधने, नव्या साक्षरतेकरीता साप्ताहिके उदा. 'साक्षर केरळ' इत्यादीचे प्रकाशन १९७३ पासून केले. या प्रकारचे काम सातत्यपूर्ण करणाऱ्या ग्रंथालयाला दरवर्षी उत्तम ग्रंथालय कार्यकर्ता पारितोषिक सुरु केले. उत्तम विद्यार्थी वाचकांकरीताही पारितोषिक जाहीर करण्यात आले. ही ग्रंथालये सामाजिक केंद्रे म्हणून विकसित करण्यात आली. संघाच्या या प्रौढ साक्षरता उपक्रमाचा युनेस्कोकडून १९७५ मध्ये गौरव करण्यात आला. भारतामध्ये अशाप्रकारचे पारितोषिक प्राप्त करणारा हा एकमेव संघ असून या पारितोषिकामुळे संघास एक अधिष्ठान व बळ प्राप्त झाले.

**आधुनिक कालखंड (१९७७ ते १९९४) :**

राजकीय हस्तक्षेपामुळे संघटनेच्या कार्यामध्ये समस्या निर्माण होताच संघाचे व्यवस्थापन शासनाकडे गेले. या पार्श्वभूमीवर १९७७ मध्ये एका आदेशाने १६/०३/१९७७ रोजी कायदा क्रमांक १९(१९७७) अन्वये शासनाने एका नियंत्रण मंडळाची स्थापना करून केरळ ग्रंथशाला संघ या मंडळाच्या अंतर्गत घेण्यात आला. याकरीता शिक्षणमंत्री सी. ए. कट्टी कार्याध्यक्ष व श्री. पणीकर यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. इतर पाच सदस्य व राज्याचा आर्थिक सचिव यांचे मंडळ गठीत करण्यात आले होते. जरी हे मंडळ

अल्पकाळासाठी गठीत करण्यात आले होते तरीदेखील त्याचे १९७८, १९८०, १९८१, १९८२, १९८७ मध्ये पुनर्गठन करुन नवीन सदस्यांची नेमणूक केली. असे हे मंडळ १९९४ पर्यंत कार्यरत राहिले. अशा शासकीय हस्तक्षेपामुळे लोकशाही पद्धतीने संघाच्या चाललेल्या कार्यास खीळ बसली. त्याचा परिणाम ग्रंथालय चळवळीतील लोकसहभागावर होऊन संघटनेच्या संपूर्ण कार्यपद्धतीची फार मोठी हानी झाली. या काळात जवळजवळ सर्व उपक्रमांना पूर्णार्थाने खीळ बसली होती. त्यामुळे सर्वदूरच्या संलग्नित ग्रामीण ग्रंथालयातील उपक्रमाची फारच हानी झाली.

**ग्रंथालय कायद्यासाठी प्रयत्न :**

नव्या लोकशाही आघाडीस १९८७ मध्ये नियंत्रण मंडळाच्या नेमणुकीनंतर नवीन ग्रंथालय कायदा तयार करण्यासाठी व लोकशाही पद्धतीने सार्वजनिक ग्रंथालय अभियान कार्यरत करण्यासाठी विशेष रस असल्याने त्यांनी विधानसभेसमोर फेब्रुवारी १९८९ मध्ये केरळ सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा मसुदा मांडला. त्यावर पुष्कळशी चर्चा होऊन व अनेक दुरुस्त्या करून हा कायदा पारित करण्यात आला आणि खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालय कायदा केरळामध्ये अस्तित्वात आला. या कायद्यान्वये राज्य मध्यवर्ती ग्रंथालयास स्वतंत्र विभागाचा दर्जा प्राप्त झाला व ग्रंथालयाच्या संघटनासाठी आणि व्यवस्थापनासाठी जिल्हास्तरीय व्यवस्थापन पद्धती अस्तित्वात आली. या सर्वांवर उच्चपदी केरळ शासन, या त्रिस्तरीय रचनेमध्ये राज्य ग्रंथालय परिषद, जिल्हा ग्रंथालय परिषद आणि तालुका ग्रंथालय संघ अस्तित्वात आले. पुढे सन २००० साली एका दुरुस्तीनंतर तालुका ग्रंथालय संघाचे नामकरण तालुका ग्रंथालय परिषद असे करण्यात आले. या सगळ्यावर राज्य ग्रंथालय संचनालयाचे नियंत्रण राहिले. जरी प्रत्यक्षात केरळमध्ये ग्रंथालय कायदा १९८९ मध्ये अस्तित्वात आला असला तरीदेखील ग्रंथालय संघाच्या निवडीसाठी नियमावली तयार करण्यासाठी पुढे ३ वर्षाचा काळ लोटला. केरळ राज्य ग्रंथालय परिषद ही प्रत्यक्षात केरळ पब्लिक सार्वजनिक ॲक्ट १९८९ प्रमाणे अस्तित्वात आलेली एक संघटना होती. कायदा लागू होताक्षणी ग्रंथशाला संघाची सर्व कार्ये या परिषदेकडे सोपविण्यात आली तसेच संघाची सर्व मालमत्ता व जबाबदाऱ्या याचेही हस्तांतरण परिषदेकडे करण्यात आले या परिषदेचे

कार्य १९९४ पासून सुरु झाले. हा बदल इतर राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या विभागासारखा होता.

**केरळा ग्रंथशाला संघाची उद्दिष्टे :**

केरळ ग्रंथालय संघ अस्तित्वात येताना या संघाने पुढील उद्दिष्टे निर्धारीत केलेली होती.

१) राज्यातील सर्व ग्रंथालयाकरीता मध्यवर्ती संघटना म्हणून कार्यरत राहणे.

२) विद्यमान ग्रंथालयांच्या सुव्यवस्थेसाठी कार्य करणे.

३) प्रौढ शिक्षण अभियान राबविण्यासाठी सर्व प्रकारची मदत करणे.

४) नवसाक्षरांना पुन्हा निरक्षर होण्यापासून प्रतिबंध घालण्यासाठी, वाचनासाठी, ज्ञान प्राप्त करण्यासाठी व सुशिक्षित करण्यासाठी सुविधा पुरविणे.

५) रात्रशाळा चालविणे.

६) राज्याच्या ग्रंथालय विभाग स्थापनेसाठी प्रयत्न करणे.

७) ग्रंथालय सेवकांकरीता प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे आयोज करणे.

८) भाषेच्या विकासाकरीता प्रयत्न करणे.

९) ग्रंथालय सेवकांना उपलब्ध ठरतील असे प्रकाशन विषयक उपक्रम सुरु करणे.

१०) प्रत्येक तालुक्यात मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करणे.

११) संघाच्या कार्याप्रमाणे कार्यरत असणाऱ्या इतर संघटनाच्या सुधारणाकरीता प्रयत्न करणे.

अशा उद्दिष्टांवर कार्यरत असणाऱ्या संघाकडून केरळ राज्य ग्रंथालय परिषदेने कार्यभार स्विकारल्यानंतर झालेले महत्त्वपूर्ण बदल –

**१) अनुदानामध्ये सुधारणा :**

संघाद्वारे संलग्नित ग्रंथालयाकरीता पुरविला जाणारा निधी हा फारच अल्प होता हे लक्षात येताच परिषदेद्वारे वाचन साहित्याच्या किंमती वाढल्यामुळे वाचन साहित्य खरेदी करीता सार्वजनिक ग्रंथालयाची कमी झालेली क्षमता विचारात घेऊन ग्रंथालयाद्वारे वाचकांना

पुरेसे वाचन साहित्य पुरविताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन सेवक वर्ग आणि वाचन साहित्य खरेदीकरीता या अनुदानामध्ये वाढ करण्याचे ठरविण्यात आले.

**२) आदर्श अधिनियम :**

ग्रंथालय परिषदेच्या नियमानुसार आदर्श अधिनियम तयार करण्यात येऊन ते सदस्य ग्रंथालयांना तालुका ग्रंथालय परिषदेद्वारे वितरीत करण्यात आले. हे सर्व अधिनियम ग्रंथालयाच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करुन पुढे तालुका ग्रंथालयाच्या माध्यमातून राज्य ग्रंथालय परिषदेकडे सुपुर्द करण्यात आले.

**३) चिन्ह / निशाणी :**

ग्रंथालय परिषदेसाठी चिन्ह म्हणून दोन हत्तींच्या मध्ये प्रकाशित केलेला कंदील व दोन्ही बाजूला दोन हत्ती व फोल्डरवरील उघडा ग्रंथ आणि त्याच्याखाली केरळ स्टेट लायब्ररी कौन्सिल असे इंग्रजीत आणि केरळ ग्रंथशाला संघ असे मल्याळम भाषेमध्ये लिहिलेला मजकूर असे. या चिन्हाचे स्वरूप संघटनेद्वारे स्विकारण्यात आले.

**केरळ सार्वजनिक ग्रंथालय पद्धितीची वैशिष्ट्ये :**

केरळामध्ये ग्रंथशाला संघाच्या माध्यमातून व पुढे ग्रंथालय परिषदेच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालयाची चळवळ कार्यरत झाली.

**वैशिष्ट्ये :**

१) राज्यशासन व लोकसहभाग

२) नोकरशाहीपासून अलिप्त असलेली सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्था.

३) शासन विरहीत संघटनाची प्रमुख भूमिका.

४) सर्व स्थरातील समाजाकरीता विकासात्मक प्रयत्न.

५) सुशिक्षिताच्या अधिपत्याखाली असलेली सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्था.

केरळातील सार्वजनिक ग्रंथालयाकरिता १९७१-७२ साली प्राप्त झालेली अनुदानाची रक्कम रुपये १,३६,७७२/- इतकी होती. *(मराठे ना. बा. पृष्ठ १०६)* यावरूनच चळवळीची ५० वर्षामध्ये या ग्रंथालय अभियानाची बैठक किती खोलवर रुजली होती, हे

सुस्पष्ट होते. येथील ग्रंथालयांच्या विकासाची पार्श्वभूमी पाहता १९५४ – ५५ व १९७६–७७ असा विश्लेषणात्मक आढावा घेतल्यास येथील वर्गनिहाय ग्रंथालयांचे स्वरूप स्पष्ट होते.

| **ग्रंथालयांचे वर्ग** | **१९५४–५५ मधील ग्रंथालयांची संख्या** | **१९७६–७७ मधील ग्रंथालयांची संख्या** |
|---|---|---|
| अ | ३ | ९ |
| अ | ४ | ११६ |
| ब | ८ | ३१३ |
| क | १० | ५२१ |
| ड | २८ | ८६८ |
| ई | ८१ | ५५८ |
| फ | २७० | ६४० |
| ग | ४४८ | ४३२ |
| ह | ३८९ | --- |

या ग्रंथालयांना अनुदान स्वरुपात ७६–७७ मध्ये प्राप्त झालेली रक्कम २०,४९,४५० इतकी होती. केरळ राज्यातील ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वाची अडचण म्हणजे येथील ग्रंथालय संघाशी संलग्नित असलेली ग्रंथालये ही सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली पासून दूर असून संघास संलग्नित असलेली प्रत्येक ग्रंथालये स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहेत. त्यामुळे त्यांचे स्वरुप एका विशिष्ट विभागापुरतेच मर्यादित आहे. केवळ वर्गणीवरच ही ग्रंथालये सुरु असल्याने ही समाजातील छोट्या परिसरास सेवा उपलब्ध करुन देऊ शकतात. शासनाव्दारे उपलब्ध करुन दिलेला निधी हा सर्व राज्यासाठी असतो आणि राज्यातील छोट्या छोट्या ग्रंथालयांची संख्या विचारात घेता उपलब्ध करुन दिलेला निधी लाखो रुपयांचा सकृत दर्शनी दिसत असला, तरी ग्रंथालयांची संख्या विचारात घेता तो अत्यंत कमी असल्याने, या ग्रंथालयांना विकासाच्या दृष्टीने फारसा उपयोग होत नाही. याचमुळे शासनाव्दारे वितरीत करण्यात आलेल्या या निधीचा उपयोग लोकांच्या दृष्टीने नगण्य स्वरुपात राहतो.

या मर्यादित आर्थिक स्त्रोतामुळे सार्वजनिक ग्रंथालय ही संकल्पना बाजूला जाऊन या ग्रंथालयांच्या सेवा फारच मर्यादित स्वरुपात उपलब्ध करुन देणे शक्य होते त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांचे समाज प्रबोधनाचे व शिक्षण प्रसाराचे उद्दिष्ट सर्वार्थाने साध्य होत नाही. जरी या परिसरामध्ये ग्रंथालयांची संख्यात्मक वाढ झाली असली तरी देखील या ग्रंथालयांची वाढ वा विकास झालेला नाही. सेवा व ग्रंथसंग्रह यादृष्टीनेही येथील बहूतांशी ग्रंथ हे देणगीच्या स्वरुपात उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे ग्रंथालयातील व्यक्तीमागे पुस्तकाची संख्या आणि येथील शिक्षण प्रसाराचा उच्च दर लक्षात घेता हे प्रमाण फारच कमी आहे. या ठिकाणी ग्रंथालयातील ग्रथांची संख्या ही एकाच ग्रंथाच्या अनेक प्रती अशा स्वरुपाची असून आणि येथील बहुतांशी ग्रंथ संग्रह हे कादंबरी स्वरुपातील आहेत. शैक्षणिक स्पर्धात्मक परीक्षेसाठी उपयुक्त ग्रंथ व संदर्भ ग्रंथ याकडे अत्यंत दुर्लक्ष केले जाते. येथील ग्रंथालये ही शास्त्रीय पद्धतीने संरचित केलेली नाहीत आणि यासाठी मर्यादित स्त्रोतामुळे प्रशिक्षित ग्रंथपालही येथे नेमणे शक्य होत नाही. अशा या स्थितीमध्ये येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ वाटचाल करीत असताना राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कलकत्ता कडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा वापर हा बहुतांशी इमारत उभी करणे व फर्निचर इत्यादिवरच अधिक प्रमाणामध्ये खर्च झाल्याचे लक्षात येते. संस्थेकडे पुरेसे आर्थिक पाठबळ समतुल्य अनुदानाचा लाभ घेण्याच्या दृष्टीने नसल्याने प्रतिष्ठानच्या महत्त्वपूर्ण योजनांचा लाभ या ग्रंथालयांना घेता येत नाही.

## २.३ आंध्रप्रदेश :

आंध्र प्रदेशाची निर्मिती १९५६ मध्ये झाली. या निर्मिती प्रक्रियेत मद्रास राज्य तेलंगणाचा काही भाग, हैद्राबाद विभागातील काही प्रदेश यांचा यामध्ये समावेश होता. यामुळेच या नव्या राज्यात मद्रास सार्वजनिक ग्रंथालय कायदा स्वतंत्र राज्य निर्मितीपूर्वीच अस्तित्वात होता.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

पूर्वी राजे लोक आपणाकडे खाजगी ग्रंथसंग्रह करत असत. याच पार्श्वभूमीवर आंध्रातील विशाखापट्टणचे बहुभाषिक राजे रामेश्वरापुलूरायसाहेब (१८६१–६५) यांनी स्वत:चा खाजगी ग्रंथसंग्रह करून तो प्रजेतील सुशिक्षित व्यक्तींकरिता खुला केला होता. गुस्तावने आपल्या अहवालात म्हटले आहे की, '१८६८ मध्ये केवळ विशाखापट्टणमध्येच ३० पुस्तकालये आहेत.' *(ना. बा. मराठे, पृ. ९९)* . मात्र या अहवालात पुस्तकांचे स्वरूप व संख्या यांचा तपशील देण्यात आलेला नाही. १८८६ च्या कालखंडात 'सरस्वती निलम' हे सार्वजनिक ग्रंथालय विशाखापट्टण मधील श्री आदिनारायण मूर्ती या शालेय शिक्षकाने सुरु करून स्वत: या ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून सलग २० वर्षे काम केले. लोकचळवळीतून पुढील काळात छोट्या मोठ्या शहरातून सार्वजनिक पुस्तकालये व वाचनालये स्थापन करण्यात आली.

**प्राचीन ग्रंथालय परंपरा :**

आंध्रप्रदेशामध्ये बुध्द धर्माचा प्रसार होत असताना येथे प्राचीन बौध्द धर्मीय ग्रंथालयांची स्थापना झाल्याचे निदर्शनास येते. बुध्द धर्मियांनी चैत्य आणि विहारामध्ये ग्रंथसंग्रहास चालना देऊन तेथे ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली होती. चैत्य हे धार्मिक परंपरा व तत्वज्ञान यांचे शिक्षण घेणाऱ्यांचे ठिकाण असून विहारामध्ये बौध्द भिक्षुकांची राहण्याची सोय केलेली असे.

या बौध्द भिक्षुंनी धार्मिक ग्रंथांचे लिखाण करणे व त्यांच्या नकला करण्यास चालना दिलेली होती. या हस्तलिखित स्वरुपातील ग्रंथांचा हे बुध्द भिक्षू बौध्द धर्माचा प्रसार व बौध्द धर्माचे शिक्षण देण्यासाठी सर्वदूर वापर करत असत. याच चळवळीतून पुढे तत्वज्ञान व ग्रंथविषयक शिक्षण देणारी विद्यापीठे स्थापन झाली. अशा या शैक्षणिक केंद्रातून हस्तलिखिते

संग्रहित केली जाऊ लागली. या हस्तलिखितांच्या संग्रहासाठी व संरक्षणासाठी भांडी व कपाटे यांचा वापर केला जात असे.

**अमरावती मठ ग्रंथालय :**

आंध्रामध्ये बुध्द विहार अमरावती मध्ये बांधण्यात आला. सध्या हे स्थान गुंटूर जिल्ह्यात येते. या जागेस 'धानयाकतामक', 'धारानिकाता' अशा सदृश अनेक नावांनी ओळखले जाते. या ठिकाणी सुप्रसिध्द हिंदू देवालय अमर लिंगेश्वर स्वामी हे आहे.

'धानयाकताकम येथील विद्यापीठाचे वर्णन करताना ''या ठिकाणी पुष्कळ महाविद्यालये होती व या महाविद्यालयांतून विविध विषयाशी संबंधित अनेक विशेषतज्ञ येथील ग्रंथालयाचा लाभ घेत असत. या विविध विषयामध्ये साहित्य, मूर्तीकला, चित्रकला, संगीत, नृत्य, औषध, हस्तकला इत्यादींचा समावेश होता आणि याला धर्मशास्त्र व तत्वज्ञान यांची जोड देण्यात आली होती. या सर्व ज्ञान शाखांना वाहिलेली समृध्द ग्रंथालये येथे अस्तित्वात होती. प्राकृत, संस्कृत, पैशाची अशा भाषांचा वापर ग्रंथलेखनासाठी या ठिकाणी केला जात असे.''

इ. पूर्व ६२९–६४५ या काळात चिनी प्रवासी ह्युयांन त्संग हा धन्यकटक येथे बुध्द धर्माचे शिक्षण व अध्ययन करण्यासाठी राहिला असल्याचा उल्लेखही आढळतो.

**विजयपुरी ग्रंथालय :**

हे स्थळ गुंटूर जिल्ह्यातील पालनंदू विभागात कृष्णा नदीच्या काठी आहे. हे स्थान आंध्रातील पहिला स्थानिक राजा सातवाहन याच्या राजधानीचे ठिकाण होय. सातवाहनांनी मगध साम्राज्याच्या पराभवानंतर या ठिकाणी ही आपली राजधानी उभी केलेली होती. तेलुगु भाषेसाठी स्वतंत्र लिपी नसल्यामुळे ब्राम्ही लिपीचा वापर करुन प्राकृत भाषेत लेखन केले जात असे. बौध्द धर्मीय आचार्य नागार्जुन यांचे हे स्थान असल्याने राजा यंगश्री सत्कर्णी याने चैत्य आणि विहार बांधून नागार्जुनांना अर्पण केलेले होते. पुढे नागार्जुन यांनी नागव्दिपास जाऊन तेथून प्रजन पारमितासुत्रे स्वत: बरोबर आणली. तसेच त्यांनी महायान बुध्दिष्ठ तत्वज्ञान प्रशालेची स्थापना केली. ते स्वत: शास्त्रज्ञ होत त्याच्या विशेष आवडीचा विषय रसायन शास्त्र होता. येथे उभ्या केलेल्या पाच मजली विद्यापीठ इमारतीमध्ये सर्वात वरच्या

मजल्यावर ग्रंथालय स्थापन करण्यात आलेले होते. चीन, ब्रह्मदेश, सिमला व इतर अनेक ठिकाणांहून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असत.

या ठिकाणी बौध्द धर्म, भूगोल, रसायनशास्त्र, अवकाश विज्ञान, रत्ने, आरोग्य, औषधे या विषयक (ग्रंथांचा) त्रिपाठीकांचा समावेश यामध्ये होता. या त्रिपाठीकांची संख्या जवळजवळ ८४००० होती.

गुटूंपल्ली ग्रंथालयाबरोबरच येथील बौध्द विहार त्याकाळी विशेष प्रसिध्द होते. याचा उल्लेख ह्युयान त्संग याने केलेला असून त्याच्या नोंदीनुसार येथील २०० विहारातून ५००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांच्यासाठी या विहारातून ग्रंथालये उभी करण्यात आलेली होती. ही जरी शैक्षणिक विद्यापीठाशी सलग्नित ग्रंथालये असली तरी देखील इतरांनाही या ग्रंथालयातील हस्तलिखितांचा वापर करण्याची मुभा असल्याने या ग्रंथालयांचे स्वरुप ही सार्वजनिक ग्रंथालयासारखेच होते.

**आंध्रप्रदेशातील मध्ययुगीन ग्रंथ व ग्रंथालये :**

चालुक्यांच्या राजवट काळात याच परिसरात शिक्षणप्रसार व ग्रंथालये स्थापन केल्याचे पुरावे ताम्रपटातच्या स्वरुपात उपलब्ध झालेले आहेत. नागई येथे केलेल्या उत्खनामध्ये त्या ठिकाणी असलेल्या मोठमोठ्या इमारती आणि त्याची मोठमोठी प्रवेशव्दारे व त्या अंतर्गत २ रांगांमधील असलेल्या खोल्या व रांगाच्यामध्ये दगडी बाकांची रचना यावरुन तेथे ग्रंथालय असावे असे वाटण्याइतपत पुरावे सापडलेले आहेत. या काळात स्थापन केलेली ग्रंथालये अत्यंत समृध्द होती. ही ग्रंथालये सहा ग्रंथपालांच्या ताब्यात होती. त्यांना सरस्वती भांडारीका या नावाने संबोधले जात होते. या ठिकाणी सापडलेल्या पुराव्यावरुन येथील जमीनीचे वाटप करत असताना ग्रंथपालांना देखील जमीनीचे वाटप केल्याचा उल्लेख आढळतो. या उपलब्ध माहितीमधील महत्वाचा भाग म्हणजे वेतन व दर्जा आणि अध्ययनाचे केंद्र यांचाही यामध्ये उल्लेख आहे. या उपलब्ध पुराव्यावरुन ग्रंथपालाचा दर्जा हा शिक्षकाइतका होता हे समजते. या चालुक्याच्या राजवटीमध्ये तेलगू भाषेतील अनुवर्णाची स्वतंत्रपणे रचना करण्यात आली होती. या नव्या तेगलू लिपीतून नानचट्या या कवीने रचलेल्या पहिल्या महाभारत या अक्षरग्रंथाची निर्मिती राज महेंद्रवर्णम येथे करण्यात आली. पुढील काळात

राजराजा नरेंद्र यांच्या राजमहेंद्रवर्णम या राजधानीच्या ठिकाणी कवि पुराणीक, व्याकरणकार, तत्त्वज्ञ, तर्कशास्त्रज्ञ, शास्त्रज्ञ अशा विद्वजनाचे केंद्र अस्तित्वात आले होते. याचे महत्वाचे कारण म्हणजे या राजाने अध्ययन आणि त्याकरीता शिष्यवृत्ती अशी आश्वासक परिस्थिती निर्माण केली होती. याचबरोबर तेलगू, संस्कृत व इतर द्रविडीयन भाषेतील विद्वजन यानाही या राजानी प्रोत्साहन दिलेले होते. यापुढील काळातील या राजानीही तेलगू भाषेच्या प्रसारासाठी, साहित्यासाठी विशेष आस्था दाखविली होती. या राजे लोकांनी त्याच्याकडे असलेल्या हस्तलिखिताचे संरक्षण ही केले होते. पुढील काळात विजयनगर येथील राजा श्रीकृष्णदेवराय हा देखील ज्ञानाचा व साहित्याचा चाहता होता. तो स्वत: देखील कवी होता. 'अमुक्ता मालयता' हा त्याचा काव्यसंग्रह सर्वत्र ओळखला जातो. या काळात येथे आपल्या विद्वत्तापूर्ण शैलीने कविता करणारे आठ कवी होते. याना अष्टदिग्ज असे संबोधले जात असे. येथील अल्हासनीपेडन्ना यांना तेलगू काव्याचे पितामहर्षी म्हणून ओळखले जात असे. त्यांनी आपल्या 'मनुचरित्र' या ग्रंथात पामपृष्ठावरील लेखनाची उपयुक्तता नमूद केलेली आहे. त्याचे समकालीन तेनालीरामकृष्णन यांनीही पामपृष्ठावरील लेखन विषयक उल्लेख केलेला असून पांडुरंगमहात्मे या ग्रंथाची रचना पामपृष्ठावर केली आहे. त्याच्या मतानुसार पामपृष्ठ हस्तलिखिते ही मातीच्या भांड्यात ठेवली जात असत.ही भांडी कापडाने बांधून ग्रंथालयात ठेवली जात. या ग्रंथालयाना त्या काळात सरस्वती भांडारगृह म्हणून ओळखले जात असे. तत्कालीन कवींची वैचारिक ग्रंथालये त्याकाळी असत. तेनालीरामन यांनी आपल्या ग्रंथात नमूद केले आहे की, अशा ग्रंथालयांना आग, कमी वापर आणि चोरी याचे भय असे. असे त्यांनी नमूद करुन ठेवले आहे. पुढील काळात तंजावर सरस्वती महाल ग्रंथालय याची देखील देखभाल चौलान यांच्या राजवटीत करण्यात आली होती. मराठी राजा सरफोजी यांनीही या ग्रंथालयाची देखभाल उत्तम प्रकारे केली होती. विजयनगरच्या अस्तानंतर खऱ्या अर्थाने तेलगू कवि आणि एकूण साहित्यास आणि पर्यायाने ग्रंथालयांना खरा आधार मिळाला तो नायक राजाच्या कालखंडात. या नायक राजाच्या राजवटीमध्ये ग्रंथालयाविषयी असलेली आस्था ही कोरीव लेखनातून श्रीरंग येथील रंगनाथ देवालयात आढळते. या लेखनात असा उल्लेख करण्यात आला आहे की पालापटला येथील निळकंठ

राजाने ग्रंथालयाच्या वास्तूत सरस्वती, वेदव्यास व ह्यग्रीव या तिघांच्या प्रतीमा मंडपात उभ्या केलेल्या होत्या. राजाने केवळ ग्रंथालयाच्या आस्थेपाटी या प्रतिमा उभ्या केलेल्या असाव्या असे निदर्शनास येते. तेलगू भाषेचा उल्लेख ह्युयांनत्सेंग यांनी आपल्या प्रवास वर्णनात केला आहे. तेलगू भाषेतून मुद्रण कलेची सुरुवात १९०० शतकात झाली आणि तेलगू भाषेमधील पहिले पुस्तक भारतात प्रसिध्द झाले नाही, तर जर्मनीमध्ये पहिल्यांदा प्रकाशित झाले. रेण्टडन ल्जूझ ( १६८९–१७६०) यांनी हे पुस्तक जर्मनीतील हेले येथे प्रसिध्द केले होते, तर भारतात पहिल्यादा प्रसिध्द झाले ते तेलगू पुस्तक हे बायबल असून हे पुस्तक'कोबोली बंधनालू' बायबलच्या न्यू हेल्टमिंटचा तेलगूमधून १८११ मध्ये रचना केलेली होती. तसेच विल्यम कॅरीनी ग्रामर ऑफ तेलगू लँग्वेज हा ग्रंथ १८१४ साली प्रकाशित केला होता. पुढे कॅम्पल यांनी ग्रामर ऑफ तेलगू लँग्वेज १८१६ मध्ये प्रकाशित केला होता. पुढील काळात डेव्हीड ब्राऊन यांनी देखील तेलगू भाषा व साहित्याकरिता महत्वपूर्ण योगदान दिले. ब्राऊन यांनी आपल्याकडील ५००० पामहस्तलिखिते देणगी दाखल दिली. ही पामहस्तलिखिते स्वत:च्या खिशातून रु. ३००००/– खर्चून घेतलेली होती. तसेच वेमन्मचि चे १२१५ सर्व भाषांतरीत करुन स्वत:च्या पैशातून प्रकाशित केले होते. १९०० शतकाच्या उत्तरार्धात या परिसरात तेलगू भाषेतील प्रकाशनास विशेष चालना मिळाली. २० व्या शतकात बरेच ग्रंथ या भाषेतून प्रसिध्द करण्यात आले. पुढे क्रमिक पुस्तके या भाषेतून प्रकाशित करण्यात येऊ लागली. २० व्या शतकामध्ये इथे अनेक प्रकाशन पुढे आले. ग्रंथ प्रकाशनासाठी त्यांनी अभिनव उपक्रम सुरु केले. यापैकी एक उपक्रम म्हणजे शेषाचलन आणि कंपनी यांनी सुरु केलेला 'ग्रंथालय तुमच्या घरी' (लायब्ररी ॲट युजर होम) या योजने अंतर्गत पुस्तके कमी किंमतीत प्रकाशित केली. वाङमयाचे देखील प्रकाशन रुपये ४, ५ इतक्या कमी किंमतीत करुन त्यांचे वितरण केले. त्यांनी पुढील काळात 'ना नफा ना तोटा' व्यवसाय सुरु केला होता. तसेच अर्धशासकीय व शासकीय पातळीवर पुस्तक प्रदर्शनास पुरस्कृत करुन संशोधनपर ग्रंथ, अक्षर वाङमय व सामाजिक मूल्ये असलेल्या काही ग्रंथांच्या लेखनांना विशेष प्रोत्साहन दिले. यामध्ये आंध्रप्रदेश राज्य निर्देशिका, आंध्रप्रदेश साहित्य अकादमी (हैद्राबाद) तेलगू अकादमी (हैद्राबाद) इत्यादी

संस्थांचे महत्वपूर्ण योगदान आहे. या साहित्यावर सूचीय नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने आंध्र वाङ्मय सूचीचे प्रकाशन श्री. काशीनयूनी नागेश्वरराव यांनी १९२९ मध्ये प्रकाशित केले. या सूचीमध्ये १२२५६ शीर्षके व १९२० लेखक समाविष्ट असून एकूण पृष्ठ संख्या ६२३ इतकी आहे. तसेच तेलगू ॲकादमीव्दारे दुसरी एक सूची १९७२ मध्ये 'ग्रंथ सुचिका' (१८६३–१९६९) ही डॉ. वेलंकका वेंकटाप्पा यांनी संपादित केलेली आहे. सन १९१२ च्या काळात ब्रिटीश म्युझियमन्सी त्याच्या ग्रंथालयात असलेल्या तेलगू ग्रंथालयाची तालिका प्रकाशित केलेली आहे.

**आधुनिक काळ :**

या काळात ग्रंथालयाची वाढ झपाट्याने न होता संथ गतीने पध्दतीने होत असताना स्वदेशी चळवळीच्या अनुषंगाने व राष्ट्रीय कॉलेजच्या निर्मितीने आपल्या संस्कृतीचे आणि परंपरांचे पुनरुत्थान होताना ग्रंथालयानाही एक नवे अधिष्ठान प्राप्त झाले. राष्ट्रीय जागृतीच्या माध्यमातून या देशातील सार्वजनिक ग्रंथालये एक नवा आकार धारण करु लागली. पुढील काळात गांधींच्या असहकार चळवळीतून ग्रंथालय चळवळीलाही बळकटी येऊन हळूहळू देशभर सार्वजनिक ग्रंथालये स्थापन होऊ लागली याची परिणिती म्हणजे आंध्रप्रदेशातील सार्वजनिक ग्रंथालयाना नव्याने प्राप्त झालेले प्रेरणादायी स्वरुप होय. सुरवातीच्या काळात ही ग्रंथालये म्हणजे जनसमुदायाची जागृती महाविद्यालये म्हणून ओळखू जाऊ लागली. याच चळवळीच्या पार्श्वभूमीवर १८८६ मध्ये पहिले सार्वजनिक ग्रंथालय सरस्वती ग्रंथालय या नावाने सुरु झाले. आंध्रप्रदेशाच्या या भूमीत दुसरे ग्रंथालय निलयम या नावाने पुलीवेंद्रा येथे स्थापन करण्यात आले. हळूहळू या ग्रंथालयाचे वारे सर्व दूर पसरू लागले. सन १८९० मध्ये स्थापन झालेली ओंगल येथील सिव्हएन अध्यापिका सिमचलापट्टी ग्रंथालय विजयनगर (१८९४) नौशिनी क्लब उंडी (१८९५) विर सालिंगा कवि साम्राज्य, कूमदावती (१८९९), कोलूर येथील अध्यापिका (१८९९), विर सारलिंगम ग्रंथालय, राजदूमूंद्री (१९००) अंगोर ग्रंथालय (१९०१) व व्हिक्टोरीया मेमोरीयल ग्रंथालय यासुलीपट्टण (१९०१), श्री. राजा नरेंद्र आंध्र भाषा नियलायमू, हनूमकोंडा (१९०४), आंध्र समावर्धीनी, सिकंदराबाद (१९०५), या ग्रंथालयाची स्थापना पुढील काळात झाली. एकूणच स्वदेशीच्या नाऱ्याने

सार्वजनिक ग्रंथालयांना नवी चालना मिळण्यास खूपच मदत झाल्याचे निदर्शनास येते. १९१४ पर्यंत अशा स्वरुपात स्थापन करण्यात आलेल्या सार्वजनिक ग्रंथालयाची संख्या १६३ होती. या मोहिमेचे श्रेय जाते ते निरपेक्षपणे काम करणाऱ्या श्री. सुरी वेंकट नृसिंह शास्त्री आयंका वेंकटमैया यांचेकडेच.

तत्कालीन शिक्षित लोकांच्या प्रेरणेने बरीच लहान मोठी सार्वजनिक पुस्तकालये व वाचनालये शहरातून स्थापन झाली. सार्वजनिक पुस्तकालये स्थापण्याचे हे कार्य अविरत चालावे व त्याला चालना मिळावी म्हणून श्री. सुरी वेंकट नृसिंह शास्त्र व आयंकी वेंकटरमैया यांनी १९१४ मध्ये विजयवाडा येथे ग्रंथालय संमेलन भरवले. या संमेलनात सुमारे २०० प्रतिनिधींनी भाग घेतला होता. संमेलनातून स्फूर्ती घेऊन आंध्र प्रदेशातील कित्येक शहरे व खेडी यामधून पुस्तकालये, वाचनालयाची स्थापना झाली. अशातऱ्हेचे भारतातील हे पहिलेच ग्रंथालय संमेलन होते. १९४७ पर्यंत या प्रयत्नातून जवळजवळ ३००० ग्रंथालये स्थापन झाली. ही बहुतेक ग्रंथालये स्थानिक संस्थांनी चालविलेली होती.

आंध्र प्रदेशाचा तेलगु भाषाप्रांत मद्रास इलाक्यात समाविष्ट होता. त्यामुळे १९४८ मध्ये लागू करण्यात आलेला ग्रंथालय कायदा आंध्रमध्येही लागू होऊन सरकारी पद्धतीने प्रत्येक जिल्ह्याला एकेक केंद्र ग्रंथालय व त्या योजनेनुसार इतर ग्रंथालये हळूहळू स्थापन होऊ लागली. १९५५ मध्ये हैद्राबाद संस्थानामध्येही मद्रासच्या पावलावर पाऊल टाकून ग्रंथालय कायदा अंमलात आणल्याने तेलगूभाषी तेलंगण भागात तो अमंलात आला.

आंध्रप्रदेशाचे १९५८ मध्ये भाषावर पुनर्रचनेप्रमाणे पुनर्घटना झाल्यावर मद्रास व हैद्राबाद ग्रंथालय कायद्याची फेर जुळणी करून सर्व राज्यासाठी १९६० मध्ये तो आंध्र प्रदेश ग्रंथालय कायदा म्हणून कायम करण्यात येऊन त्याची अम्मलबजावणी करण्यात आली. पुनःश्च १९६४–१९६९ मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. १९६८–६९ यामध्ये संचालकांच्या अंतर्गत कारभारात पुढील ग्रंथालये समाविष्ट करण्यात आली होती. सरकारी ग्रंथालये –७, जिल्हा केंद्रीय ग्रंथालये –२०, नगर केंद्रीय ग्रंथालये –०१, शाखा ग्रंथालये – ५०६, विकास विभाग ग्रंथालये – ५५०, खाजगी ग्रंथालये – २७२२ (सरकारी सहाय्य न घेणारी खाजगी ग्रंथालये ३०००) १९७१–७२ मध्ये रु. २१.९४ लाख ग्रंथालय कर जमा

झाला.व रु. १८.९५ लाख सरकारी मदत मिळाली. एकूण खर्च रु. ४०–८९ लाख झाला. ५१५ ग्रंथालयीन सेवकांपैकी प्रशिक्षित सेवक ११५, प्रशस्तिपत्रक घेतले ४०० सेवक कार्यरत होते. या सरकारी ग्रंथालयाखेरीज सूचना मंत्रालयामार्फत काही माहिती व सूचनाकेंद्रे स्थापन केली होती. यामध्ये राज्य सूचना केंद्रे –२, जिल्हा सूचना केंद्रे– १९, खंड सूचना केंद्रे – ३२१ इतक्यांचा समावेश होता. *(मराठे ना. वा. पृ. १००)*

याचबरोबर विविध संस्थानच्या माध्यमातून ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रशस्तिपत्रक दिले जात असे. अशा संस्था ७ होत्या यामध्ये २०० हून अधिक विद्यार्थी प्रवेश घेतात. आंध्रप्रदेश हे देशातील एक अग्रणीय राज्य म्हणून ग्रंथालय चळवळीसंदर्भात ओळखले जाते. देशात ग्रंथालय कायदा लागू करणारे हे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून येथील ग्रंथालय कायद्यामधील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे खाजगी ग्रंथालयाकरीता शासकीय अनुदानाची करण्यात आलेली तरतूद हे एक नाविन्यपूर्ण वैशिष्ट्य म्हणून ओळखले जाते.

पुढील काळातील आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या पाऊल खुणांचा आढावा घेता १९७७ मध्ये या शासनव्दारे सार्वजनिक ग्रंथालयाकरीता संचालकांचे पद निर्माण करण्यात येऊन या पदावर श्री. के. राघव रेड्डी यांची नेमणूक करण्यात आली व सार्वजनिक ग्रंथालयाच्या कारभाराकरीता स्वतंत्र विभाग अस्तित्वात आला. सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे येथील प्रणेते राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांचा सन्मान सन १९६८ मध्ये करण्यात आला. तसेच १९६८ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा दुसऱ्यांदा दुरुस्त करण्यात आला. ग्रंथालयाना चालना देताना १९६९ च्या काळात आंध्र शासनाव्दारे हस्तलिखित ग्रंथालयाची स्थापना हैद्राबाद येथे केली. त्यांचेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी अभिलेखागरे विभागाकडे सोपविण्यात आली. या ग्रंथालयाचे उद्घाटन तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री नामदार श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या हस्ते करण्यात आले होते. सन १९६९ मधील सार्वजनिक ग्रंथालयांच्या दृष्टीने आणखी काही महत्वपूर्ण क्षण म्हणजे–

१) बाबनी ग्रंथालयाच्या ( जगग्यापेठ) सुवर्ण महोत्सवी समारंभ
२) राज्य मध्यवर्ती ग्रंथालय हैद्राबादच्या इमारतीचा पायाभरणी समारंग
३) आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायद्यामध्ये करण्यात आलेली सुधारणा गॅझेटमध्ये प्रकाशित करण्यात आली.

४) तिरुपती येथे १८ व्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे आयोजन.

५) ३३ व्या आंध्रप्रदेश परिषदेचे तिरुपती येथे २७ ते २५ डिसेंबर या काळात सार्वजनिक ग्रंथालय विभागाचे संचालक जनाब अब्दुल महमूद यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते.

या वाटचालीत १९७१ मध्ये आंध्रप्रदेश शासनाद्वारे सार्वजनिक ग्रंथालय विभागाचा स्वतंत्र कारभार असलेल्या मंत्री महोदयांकडे सार्वजनिक ग्रंथालय विभागाचा स्वतंत्र कार्यभार देण्यात आला. याच वर्षी सार्वजनिक संचालकपदी श्री. के. व्ही. सुब्बा राजू यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्याच अध्यक्षतेखाली पुढे गुंटूर जिल्हा ग्रंथालय परिषदेचे उद्‌घाटनही करण्यात आले. ज्या आयंकांनी या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीकरिता विशेष परिश्रम घेतले होते, त्यांना पद्मश्री हा किताब देऊन भारत सरकारने त्यांचा गौरव केला.

या वर्षीच आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय परिषदेचे आयोजन शासनाच्या सार्वजनिक विभागाव्दारे करण्यात आले होते. तसेच या विभागाव्दारे संचालक श्री. नहमूद यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या ग्रंथपालाना प्रशिक्षण देण्यासाठी एक योजना तयार करण्यासाठी समितीही स्थापन करण्यात आली होती. आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाच्या सर्वसाधारण सभेत या वर्षी ३ महत्वपूर्ण ठराव पारीत करण्यात आले होते. यामध्ये १) जिल्हा ग्रंथालय संघाना राज्य ग्रंथालय संघास देणगी देण्याविषयी परवानगी देणे. २) राज्य शासनाने वार्षिक रु. १०,०००/- इतके अनुदान द्यावे. या अनुदानास शासनाने १९०५ मध्ये तत्वत: मान्यता दिली होती. ३) जिल्हा ग्रंथालय संघाच्या कर्मचारी वर्गास शासकीय कर्मचारी म्हणून घोषित करण्यात यावे.

पुढे कर्मचारी वर्गास हा लाभ १९०५ मध्ये नाकारण्यात आला. १९७३ मध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (हैद्राबाद)द्वारे फिरत्या ग्रंथालयाची व्हॅन मधून सुविधा उपलब्ध करुन दिली होती. तसेच २० व्या अखिल भारतीय परिषदेचे हैद्राबाद येथील आयोजन ग्रेटर हैद्राबाद ग्रंथालय परिषदेचे हैद्राबाद येथील आयोजन हे याच वर्षात करण्यात आले होते. १९७४ मध्ये दुसरी आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय परिषद हैद्राबाद येथे संपन्न झाली होती. तसेच याचवर्षी शासनाने ग्रंथालय करामध्ये वाढ करताना हा कर ४ पैशावरुन ६ पैशापर्यंत

वाढविला. पुढील १९७६ ते २००० या काळात राज्य सार्वजनिक ग्रंथालय विभाग व ग्रंथालय संघ यांच्या स्तरावर अधिवेशन, चर्चासत्रे परिषदांचे आयोजन करुन सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस कालसापेक्ष सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. साहित्य प्रकाशने, ग्रंथालय विषयक प्रकाशने यांचा विकास व सन्मान या काळात झाला. ग्रंथालय क्षेत्राकरिता विशेष देवा देणाऱ्या व्यक्तीच्या कार्याची शासकीय स्तरावर दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

इ. स. २००० मध्ये पतूरीनागभूषण महिला व बाल ग्रंथालयाची विजयवाडा येथे स्थापना करण्यात आली होती. नागभूषण यांच्या कार्याचे स्मरण या ग्रंथालयाच्या स्थापनेने करण्यात आलेले होते. २००१ मध्ये जिल्हा ग्रंथालय संस्था सेवकानी सार्वजनिक ग्रंथालयाच्या दर्जाकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष याच्या विरोधात राज्यव्यापी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. २००४ मध्ये डॉ. पी. एस. जी कुमार यांच्या ग्रंथालय क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेऊन २५ एप्रिल रोजी नागपूर येथे त्यांचा गौरव करण्यात आला होता. सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाच्या अनुशंगाने हैद्राबाद येथील शहर मध्यवर्ती ग्रंथालयाव्दारे २८ फेब्रुवारी ते २ मार्च या काळात एक राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चेचा विषय होता भारतातील सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास. या पुढील काळात येथील संघटनेच्या माध्यमातून ग्रंथालयांचे आधुनिकीकरण व त्यातील समस्या या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते.

आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाने व त्याच्या संलग्नित जिल्हा ग्रंथालय संघानी या राज्यातील ग्रंथालय चळवळ जागृत ठेवण्यासाठी केलेले प्रयत्न स्तुत्य असले तरीही ऐतिहासिक आढाव्याच्या पार्श्वभूमीवर येथील ग्रंथालय संघाचे काम काही प्रमाणात शिथिल झाल्याचे तीव्रतेने जाणवते. या मागे सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्याच्या शासनाच्या धोरणामुळे हे घडत असावे असे तीव्रतेने वाटते.

## २.४ आसाम :

आसाम राज्यातील ग्रंथालय चळवळीची पुर्वपिठिका पाहता तेथील स्थानिक वस्तु संग्रहालये व अभिलेखागरे आणि ॲक्स्ट्रा ग्रंथालय याचबरोबर नामवर येथील हस्तलिखित संग्रह या माध्यमातून येथील लोकांना धार्मिक सूचनेबरोबरच धार्मिक ग्रंथाचेही ज्ञान व माहिती उपलब्ध होत असे. आधुनिक ग्रंथालयाची सुरुवात करत असताना ब्रिटिशांचे योगदान लाभलेच, त्याचबरोबर येथील कूयदेश्वर बारठाकूर या प्राथमिक सेवानिवृत्त शिक्षकाने आसाममधील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या विकासाची मुहूर्तमेढ सक्षमपणाने रोवली. त्याना बडोदा संस्थानास भेट देण्याची संधी मिळाली होती. बडोदा येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीने प्रेरीत होऊन या प्रकारची चळवळ आसाम परिसरात सुरु करण्याची प्रेरणा त्याच्या मनात जागृत झाली. त्याच्या या चळवळीला आसामचे तत्कालीन लोकप्रिय मुख्यमंत्री गोपीनाथ बार्डोली यांनी सहकार्य केले. तसेच इतरही राजकीय व सामाजिक नेते व कार्यकर्ते याचे सहकार्य लाभले आणि यातूनच ही चळवळ उभी राहिली. या शिक्षकानी सुरुवातीच्या काळात तरुणाना चहापाण्याच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून एकत्रित करुन जोहारी परिसरात आपल्या सार्वजनिक ग्रंथालय चळवळ अभियानाचा प्रसार केला. त्यांच्या या उपक्रमाला युवकांबरोबरच सुशिक्षित व विद्वान लोकांचा प्रतिसाद लाभला आणि आसाम ग्रंथालय परिषदेची स्थापना १९३८–४० च्या काळात होऊन आसाम ग्रंथालय संघ अस्तित्वात येऊन बारठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विविध ठिकाणी ग्रंथालयाची स्थापना झाली. या संघाच्या माध्यमातून पुढे ग्रंथालय चळवळीस बळकटी येत गेली. याचकाळात देश एका संघर्षाच्या वाटेवर चालत असताना महात्मा गांधीच्या असहकार चळवळीचा नारा आसाम परिसरात पोहचलेला होता. ही असहकाराची चळवळ आसाम परिसरात अधिक सक्षमपणे दुर्गम भागात पोहचविण्यासाठी अधिकाधिक लोकांचे असहकाराकरिता मतपरिवर्तन करण्यासाठी या नव्याने स्थापन झालेल्या सार्वजनिक ग्रंथालयानी अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच या संघाच्या माध्यमातून सुरु केलेल्या ग्रंथालय चळवळीमुळे येथे वाचन अभिरुची विकसित होण्यास मदत झाली. या चळवळीतून पुढे येथील काही मान्यवर व्यक्तीच्या ग्रंथालयांचा लाभ सर्वसामान्य लोकांना होऊ लागला. या ठिकाणी पुढील

काळात आलेल्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेच्या प्रतिनीधीनी बारठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना केली. शिवाय जाहीर व्याख्याने, जाहिराती, चित्रपटाचे प्रदर्शन आणि निवेदने वाटून सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेबाबत ग्रामीण परिसरातील लोकांच्या मनामध्ये जागृती निर्माण केली. येथील लोकांना थोड्याशा ज्ञानाने आपले जीवन कसे प्रकाशमान होते आणि आपण आरोग्यदायी व बौध्दिकदृष्ट्या जागृत राहण्यास कशी मदत होते हे सर्वांना पटवून दिले. ग्रंथालय चळवळीचा प्रसार करत असताना या कार्यकर्त्यांनी ग्रामीण परिसरात बाजाराचा दिवस निवडून बाजाराच्या निमीत्ताने एकत्र आलेल्या लोकांना साक्षरता व ग्रंथालये याचे महत्त्व पटवून दिले. येथील स्थानिक वृत्तापत्रातून या अभियानास प्रसिध्दी दिली. मुष्टीभिक्षा अभियान सुरू केले. या अभियानास विद्यार्थी वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मूठभर धान्य ही संकल्पना लोकांच्या मनामध्ये ग्रंथालय विषयक एक कूतुहल निर्माण करुन गेली. या कुतुहलापोटी सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाचा पाया रोवला गेला. बारठाकूर यांनी देखील अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेत उपस्थिती दर्शविल्यामुळे काही नव्या संकल्पना आत्मसात करुन सरकारला सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी विशेष आवाहन केले. येथील शासनास देखील ग्रंथालय चळवळीचे महत्व लक्षात आले. या सर्वांच्या फलश्रुती पडताळत असताना येथील गोलाघाट परिसरात स्थापन केलेल्या ग्रंथालयाची दखल घेणे ही क्रमप्राप्त ठरते.

गोलाघाट येथील चहाच्यामळ्याचा मालक जॉर्ज विल्यम्सन यानी सन १८६५ मध्ये या परिसरात शिक्षण विकास व ग्रंथालय स्थापना करण्याकरीता १०,००० पौंड उपलब्ध करून देऊन शासनास सहकार्य केले. त्यामुळे तेथील तत्कालीन शासनाने प्रायोगिक तत्वावर सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेकरीता प्रयत्न सुरु केले. या पार्श्वभूमीवर१९०१ मध्ये शासकीय स्तरावर शिलाँगमध्ये पहिले शासकीय ग्रंथालय स्थापन झाले. हे ग्रंथालय अगदी छोट्या इमारतीत होते. मोजकीच पुस्तके, वर्तमानपत्रे, प्रशासकीय प्रकाशने येथे उपलब्ध करण्यात आली होती. हे ग्रंथालय सरकारी नोकरवर्गाबरोबर इतरांनाही खुले होते.

सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या प्रयत्नाची फलश्रुती म्हणून पुढे ब्रिटिश शासनाने १९०२ व १९०३ च्या काळात ध्रुवी, गोहाटी, नायगाव, जोहरत, तेजपूर, शिलाँग, शिवसागर,

गोलपाटा, दिब्रुगड, हाईलकुंडा इ. ठिकाणी ग्रंथालयाची स्थापना करून ही स्थानिक ग्रंथालये मंडळाकडे सुपुर्द केली. शासनाच्या या उपक्रमामुळे लोकजागृती होऊन ग्रामीण परिसरामध्ये काही ग्रामीण ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून आसाम ग्रंथालय संघटना १९३८ मध्ये अस्तित्वात आली. या संघटनेमुळे विविध विभागात सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेकरीता सर्वतोपरी सहकार्य करण्यात आले. आसाममधील मध्यवर्ती ग्रंथालय जे १९०३ मध्ये स्थापन झाले होते त्याचे रूपांतर १९५६ मध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालयात करण्यात आले व प्रशिक्षित ग्रंथपालाची निवड करण्यात आली.

संथ गतीने या ग्रंथालयांच्या विकासाची सुरुवात झाली. जिल्हा ग्रंथालये ही स्थानिक नगरपालिकेच्या इमारतीमध्ये अगदीच अपुऱ्या जागेत आपला प्रपंच थाटून ग्रंथालय सेवासारखे महत्त्वपूर्ण कार्य सुरु ठेवत. यासाठी शासनाकडे पाठपुरावा केल्यावर पुढे केंद्रसरकारकडून आर्थिक सहाय्याचा ओघ सुरु झाला आणि शिलाँग, गोहत्ती, जेजपूर, नौगाव, जोऱ्हाट आणि सिल्चर या जिल्हा ग्रंथालयांनी १९५७ ते १९६० कालखंडात स्वतःच्या इमारतीत आपला कारभार सुरु केला. जिल्हा ग्रंथालयांच्या वाटचालीस गती मिळत असतानाच विविध विभागातील ग्रंथालय स्थापनेस चालना मिळून १९६७–७० च्या काळात करमिगंज, शिवसागर, गोलाघाट, गवालपाडा, उत्तरी लखमकीपुरा, बारपेटा, कोक्राझार, हाईल कांडी, नालपांडी येथील ग्रंथालयांच्या वाटचालीस खऱ्या अर्थाने चालना मिळाली.

या अभियानात १९५५–५६ मध्ये एकूण १७० ठिकाणी मोटारीतून पुस्तके पुरविण्याची सुविधा उपलब्ध करून देऊन फिरत्या ग्रंथालयाची मुहुर्तमेढ रोवली. या चळवळीस बळकटी देण्यासाठी जिल्हा ग्रंथालयातून स्वतंत्र बालविभागाची सुरुवात करण्यात आली.

१९७५ –९६ च्या काळात तिनसुखीचा, धेयाजी आणि जोनार्ड या ठिकाणी नवीन विभागीय ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली तसेच उत्तर लखनापूर, शिवसागर, कोक्राझर, करिमगंज, गोलपार, गोलाघाट येथील विभागीय ग्रंथालये ही विकसित करण्यात आली. तसेच दुर्गम टेकड्यांच्या परिसरात आपलाम, बदिपू येथील विभागीय ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली आणि त्यातील जिल्हा ग्रंथालये म्हणून घोषित करण्यात आली.

सन १९८५ मध्ये करबी हगालोन जिल्ह्यातील हामरेन येथे उपविभागीय ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. तसेच शिलाँग येथून राजधानीचे स्थलांतर गोहाटी येथे होताच राज्य मध्यवर्ती ग्रंथालय हे गोहाटी येथे डिसेंबर १९७३ मध्ये स्थलांतरीत करण्यात आले होते. या राजधानीच्या ठिकाणी काम करणाऱ्या लोकांकरीता या मध्यवर्ती ग्रंथालयाची एक शाखा विलबूर कॅपीटल कॉम्प्लेक्समध्ये करण्यात आलेली होती. १९८४ च्या काळात ग्रंथालयाचे महत्व लक्षात घेऊन राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे रुपांतर ग्रंथालय संचालनालयामध्ये करण्यात आले आणि त्याचा कार्यभार शिक्षण विभागाकडे सोपविण्यात आला. पुढील काळात विविध उपविभागीय ग्रंथालये अद्ययावत करुन त्यांना जिल्हा ग्रंथालयाचा दर्जा देण्यात आला. या ग्रंथालयामध्ये होनाई चराईदेव, दक्षिण सलमा, ओडलगुरी, मोरगाव देपाजी, निसुखीचा, हैलकदी या ग्रंथालयाचा समावेश होतो. विद्यमान स्थितीत जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यरत असलेली २२ ग्रंथालये असून १९८७ मध्ये बालग्रंथालयाची सेवा ही गोहाटी येथील विष्णू निर्मल ट्रस्टच्या इमारतीत करुन देण्यात आली आहे. नजिकच्या काळात बारा ग्रंथालये स्थापन करण्याचे कार्य हाती घेतले आहे. तसेच शिक्षणास चालना देण्यासाठी राज्य मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये एक स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून या विभागाव्दारे विविध विषयावर सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. या विभागाकडे दक्षिणपूर्व विभागातील जमाती विषयक, हस्तलिखिते, कागदपत्रे, समाजशास्त्र याचाही ग्रंथसंग्रह येथे करण्यात आला आहे. तसेच १९८७ मध्ये राज्याच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून स्वतंत्र विज्ञान व तंत्रज्ञान विभाग सुरु करण्यात आला आहे.

आसामचा बहुतेक परिसर हा ग्रामीण भागात विखुरलेला असल्याने ग्रामीण ग्रंथालयाच्या विकासासाठी १९८५–८६ मध्ये ग्रामीण ग्रंथालय योजना लागू करण्यात आली. या योजनेनुसार येथील ७१४ गाव पंचायतीमध्ये तसेच डोंगराळ भागात २०४ खेड्यातून ग्रंथालये सुरु करण्याबाबत योजना जाहीर करण्यात आलेली होती. निधी अभावी ही योजना पूर्णपणे राबविण्यात आलेली नाही. तरीदेखील १७५ ग्रामीण ग्रंथालये ९१६ ग्रामीण शालेय ग्रंथालये स्थापन करण्याचे उद्दिष्ट शासनाद्वारे घोषित करण्यात आलेले आहे. १६ ग्रामीण ग्रंथालये ९१६ ग्रामीण शालेय ग्रंथालये जिल्ह्यातून स्थापन करण्यासाठी केंद्रशासनानेही सहकार्य करण्याचे घोषित केले होते.

आसामचा ८०% भाग हा ग्रामीण लोकसंख्येने व्यापलेला असून या दुर्गम परिसरातील खेड्यापाड्यातून शासनाव्दारे उपलब्ध केलेला निधी ग्रंथालय सेवांच्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात उपयुक्त ठरु शकत नाही. मात्र सेवाभावीवृत्तीने तरुण वर्ग व विद्यार्थी वर्गाने व ग्रंथप्रेमीनी ग्रंथालय स्थापनेकरीता विशेष प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते. तरुणानी व विद्यार्थ्यानी ही ग्रंथालये सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध करुन या ग्रंथालयाद्वारे ग्रंथालय सेवा खेडोपाडी पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक स्तरावर निधी संकलित करुन ग्रंथ, फर्निचर व भौगोलिक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. शासनही काही प्रमाणात अलीकडे प्रौढ साक्षरता अभियानास चालना देताना प्रौढाना सहाय्य करणाऱ्या या ग्रंथालयांची शासनाव्दारे अ, ब, क वर्गात इमारत, वाचक संस्था व ग्रंथसंग्रह या निकषावर आधारीत वर्गवारी केली आहे. सद्यस्थितीत ४०० हून अधिक ग्रंथालये इथे अस्तित्वात असून सेवाभावी स्वरुपात सुरु असलेल्या ५०० हून अधिक ग्रंथालयांना अधिक सक्षम करण्यासाठी येथील विद्यार्थीवर्ग व युवा वर्ग अधिक गंभीर स्वरुपात प्रयत्नशील नसल्याने त्यांचे अस्तित्व धोक्यात येत चालले आहे. तरुणांची व विद्यार्थ्यांची पुढील पिढी व एकूणच समाजात बदलत चालली असल्याने या ग्रंथालयाचे अस्तित्व आजकाल अंधारमय होत आहे. ही सर्व ग्रंथालये बहुतांशी बांबूच्या सहाय्याने उभी केलेली असल्यामुळे येथील वातावरणात दीर्घकाळ टिकू शकत नाही. तसेच त्याची दुरुस्ती करणे हे देखील खर्चाचे व जिकिरीचे आहे. यामुळे या ग्रंथालयच्या सेवा शास्त्रीय पध्दतीने देणे शक्य होत नाही. असे असले तरी या तरुणाचे सार्वजनिक ग्रंथालयासंदर्भातील योगदान अगदी दुर्लक्ष करण्याइतके नाही. यापैकी काही ग्रंथालयाना पुस्तक खरेदीसाठी २०० ते ५०० रुपयापर्यंत सामाजिक शिक्षण विभागाकडून आर्थिक साहाय्य उपलध करुन दिले जाते. हा निधी अत्यंत अपुरा असल्याने या ग्रंथालयाना सेवा देत असताना अधिक आर्थिक सहाय्याची गरज आहे. दुर्दैवाने अलिकडे आसाममधील शिक्षण विभागाचे कार्य धुसर होत असल्याने या ग्रामीण ग्रंथालयाचे अस्तित्व धोक्यात येऊन ही ग्राम ग्रंथालय चळवळ पुढे येण्याची जबाबदारी स्थानिक तरुण व स्थानिक संस्था यांच्यावरच येऊन ठेपली आहे. सध्या शासनाव्दारे ग्रामीण चळवळी संदर्भात २०८ ग्रंथालयांची जबाबदारी ग्रंथालय संचालनालयाने स्विकारली असून चतुर्थश्रेणी ग्रंथालय सेवकांना शासनाद्वारे

समाविष्ट करण्यात आलेले आहे. या ग्रंथालयांना राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाकडून निवडक ग्रंथ गरजेनुसार उपलब्ध करुन दिले जातात. प्रशासनीय खर्च व किरकोळ खर्च यासाठी अल्पसा निधीही उपलब्ध करुन दिला जात असल्याने येथील जिल्ह्यातून जिल्हा ग्रंथालयात इमारती उभ्या करण्यात आलेल्या आहेत. लवकरच इतर ग्रंथालयांच्या इमारतीचे काम हाती घेण्याचा शासनाचा मनोदय आहे. तसेच राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांच्या विस्ताराचाही विचार विविध विभागात करण्यात येत आहे. लवकरच आधुनिक स्वरुपाचे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय येथे अस्तित्वात येईल. याद्वारे राज्यामध्ये संगणकीकरण व इंटरनेट सुविधा याना चालना देण्यासाठी कालबध्द प्रयत्न सुरु आहेत.

आसाम परिसरातील ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात येणे काळाची गरज आहे. आवश्यक ते नियम व प्रमाणित मसुदा शासनाच्या विचाराधीन आहे.

**ग्रामीण ग्रंथालय चळवळ :**

स्वातंत्र्यपूर्व काळात येथे ग्रामीण ग्रंथालयाची स्थापना समाधानकारक स्वरुपात झालेली होती. येथील लोक क्लब वा संघाच्या माध्यमातून वाचन इच्छुक बनलेले होते. क्लब अथवा संघाची केंद्रे इथे लोक केवळ ग्रंथ वाचनासाठीच जात नसत तर इतर उपक्रमाकरीताही ते आवर्जून उपस्थित रहात. होमन बोरगोहेत या साहित्यिकाने ग्रामीण ग्रंथालयाच्या सामाजिक भूमिकेचे चित्रण करुन येथील तरुणांच्या व्यक्तिमत्वास एक आकार देण्याचा प्रयत्न केलेला होता. त्याच्या ''साऊदेर पुतेके नाऊ मेली जाय'' या कादंबरीमध्ये त्याने बापूकम (विक्रम) आणि दुलाल ही व्यक्तिचित्रे उभी करुन यांच्याबद्दलच्या कुतुहलातूनच येथील ग्रामीण ग्रंथालय स्थापनेस चालना प्राप्त झाली. हरगोविंद ग्रंथालयाची ग्रामीण परिसरातील स्थापना १९४१–४२ मध्ये लखीमपूर जिल्ह्यात झाली. यामागची प्रेरणाही याच कुतुहलजनक वाचनातून निर्माण झालेली होती. अशाच प्रकारची ग्रंथालये म्हणजे सिध्देश्वरी पुथीभाल व दक्षिण कामरुप येथील ग्रामीण ग्रंथालय होय. ही ग्रंथालये १९५१ मध्ये येथील ग्रामीण परिसरातील युवकांनी स्थापन केलेली होती. या ग्रंथालयांची सद्यस्थिती जरी समाधानकारक नसली तरी देखील एकेकाळी सर्वच विकासात्मक उपक्रमांची केंद्रे म्हणून ती सर्वदूर परिचित होती.

येथील ग्रंथालयाच्या सन २००३ मधील सांख्यिकीय तपशीलानुसार १९४१–४२ ते १९९६ पर्यंत येथे १६ ग्रामीण ग्रंथालये स्थापन झाल्याचे निदर्शनास येते. एकूणच येथील ग्रंथालयांची एकेकाळी उत्साहाने झालेली स्थापना आणि आजच्या दूरदर्शनच्या व मोबाईल/स्मार्ट फोनच्या जमान्यात या ग्रंथालयांची वाचकांकडून व समाजाकडून होत असलेली अवहेलना दुर्दैवी असून ग्रंथालयांच्या अभ्यासिका भाड्याने द्याव्या लागल्या आहेत. वीजेचे बील न भरल्यामुळे वीज जोडणी तोडल्याच्या नामुष्कीस सामोरे जाण्याचे प्रसंग या ग्रंथालयावर आलेले आहेत. *( पी. एस. जी कुमार, खंड १३)*

येथील ग्रामीण ग्रंथालय चळवळीची सद्यस्थिती खालावण्यास वैयक्तिक ग्रंथ खरेदी, इलेक्ट्रॉनिक संसाधनांची उपलब्धता, सार्वजनिक ग्रंथालयाकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, राजकीय हस्तक्षेप, चांगल्या सेवा संधीसाठी ग्रामीण परिसरातील लोकांचा शहराकडे वाढणारा कल, ग्रंथालय कायद्याबद्दलची अनास्था, आर्थिक समस्या, शासकीय अनुदान वा देणग्या या बद्दलची अनास्था, सामान्य दर्जाच्या भौतिक सुविधा, असंबंधित ग्रंथसंग्रह, ग्रंथालयाच्या वेळा, ग्रंथांच्या व्यवस्थापनाबद्दलची अनास्था हेच घटक कारणीभूत असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

ग्रामीण ग्रंथालयाची आसाम राज्यातील सद्यस्थिती –

| अनुक्रमांक | ग्रंथालय संलग्नता / नोंदणी | ग्रंथालयांची संख्या |
|---|---|---|
| १ | ग्रंथालय संचालनालय | २०४ |
| २ | आसाम ग्रंथालय संघ | १६९ |
| ३ | सदाऊ आसाम ग्राम पुभीभरल संघ | ४४६ |
| ४ | आसाम ग्रामीण ग्रंथालय सेवक संघ | ३८३ |
| | एकूण | १२०२ |
| | दोन्हीकडे नोंदणी असणाऱ्या ग्रंथांलयांची संख्या | – २९ |
| | प्रत्यक्षात एकूण | ११७३ |

अलीकडील काळातील स्थितीकडे दृष्टीक्षेप टाकताना २००१ नंतरच्या काळात बारपेटा, बोनगाईगाव, मोरीगाव, निनसुकीय आणि करीमगंज येथील जिल्हा ग्रंथालच्या इमारतीकरीता केंद्र शासनाकडून रु. ७.५ कोटी इतके अनुदान प्राप्त झालेली असून अकराव्या आर्थिक आयोगाच्या माध्यमातून ग्रंथालयाच्या भौतिक सुविधांच्या विकासाकरीता राज्य ग्रंथालय संचलनालयास रु. ५.६/– कोटी इतका निधी २००४ – ०५ मध्ये उपलब्ध झालेला आहे. ग्रंथालय संगणकीकरणाकरीता रु. ५० लाख इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. समतुल्य अनुदानाचा लाभ ही येथील ग्रंथालयाव्दारे घेतला जात असून सन २००३–०४ मध्ये राज्य ग्रंथालय संचालनालयाव्दारे ग्रंथखरेदीसाठी रु. १५ लाख व फर्निचरसाठी (कपाटे व रॅक्स) व प्रशिक्षणासाठी ही अनुदान उपलब्ध झालेले असून सेवाभावी संस्थाद्वारे समतुल्य स्वरुपात रु. १४, १२, १४.५ लाख इतका निधी उपलब्ध केल्याचे निदर्शनास येते. एकूणच या आर्थिक स्थितीचे स्वरुप पहाता सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हे अत्यंत तुटपुंजेच आहे हे स्पष्ट होते.

येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सातत्यपूर्वक लक्ष देऊन या सार्वजनिक ग्रंथालयाना विकासाच्या वाटेवर घेवून जाण्यासाठी आसाम ग्रंथालय संघ, सदावू आसाम ग्राम्यपुलीभारल संस्था, ग्रामीण ग्रंथालय सेवक संघ आसाम, गुहाटी ग्रंथालय संघ, अशा संघटनाचे सहकार्यही तेवढेच महत्वाचे आहे.

**२.५ उत्तरप्रदेश :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात १९५६ मध्ये या राज्याची निर्मिती झाली. लखनौ हे राजधानीचे ठिकाण निश्चित करुन ७० जिल्हे या राज्यांतर्गत समाविष्ट करण्यात आले आहेत. शैक्षणिक दृष्ट्या हा एक अप्रगत भाग म्हणून ओळखला जात असला, तरीदेखील ऐतिहासिक काशी विद्यापीठासारखे उच्च विद्येचे केंद्र येथे स्थापन झाले होते. पंडीत मदन मोहन मालवीयसारख्या विद्वत्जनामुळे येथे १९१५ मध्ये हिंदू युनिव्हर्सिटीची झालेली स्थापना व अलिगढ येथील १९२१ मध्ये स्थापन झालेले मुस्लीम विद्यापीठ अशी ही शैक्षणिक केंद्रे असूनही सार्वजनिक ग्रंथालयाची चळवळ येथे अपेक्षेप्रमाणे प्रगतीपथावर आलेली नव्हती.

एकूणच सार्वजनिक ग्रंथालयाच्या वाटचालीचा येथील मागोवा घेताना बनारस येथील हस्तलिखित पोथ्यांसाठी ज्ञात असलेले सरस्वती भवन ग्रंथालय हे भारतात सर्वश्रुत होते. विद्यापीठांसारखी उच्च शैक्षणिक केंद्रे, संशोधन ग्रंथालये येथे अस्तित्वात आलेली होती. या उच्च शैक्षणिक केंद्राबरोबर १९१० मध्ये येथे एकूण १७ सार्वजनिक ग्रंथालये अस्तित्वात होती. यामधील कालखंडनिहाय महत्त्वपूर्ण म्हणून ओळखली जाणारी ग्रंथालये,

१) लॉमल लायब्ररी अँड रिडींग रुम, मीरत (१८४६)

२) अलाहाबाद पब्लिक लायब्ररी, अलाहाबाद (१८६४)

३) कारमायेल लायब्ररी, वाराणसी (१८७२)

४) अमीर उद्दौला पब्लिक लायब्ररी, लखनौ (१९१०)

येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस खऱ्या अर्थाने चालना मिळाली ती १९३५ मधील स्थानिक स्वराज्य कायद्यामुळेच. स्थानिक लोकांची हाती प्रशासकीय सूत्रे येण्याच्या या काळात राजकारणातील व्यक्तिंच्यामुळे साक्षरता अभियानास येथे चालना मिळाली. या साक्षरता मोहिमेस बळकटी देण्यासाठी या व्यक्तींचे लक्ष ग्रामीण ग्रंथालय चळवळीकडे वळले. यामुळे खेडोपाडी ग्रंथालये – वाचनालये सुरु करण्याची मोहीमच त्यांनी उघडली. या विभागात १९३७ मध्ये साक्षरता अभियानाच्या पार्श्वभूमीवर ७६८ ग्रंथालये व ३५०० वाचनालये येथे सुरु करण्यात आली. साक्षरता प्रसाराच्या अभियानाची मुहुर्तमेढ ग्रंथालयांच्या स्थापनेतून झाली हे एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण म्हणून सर्वत्र नोंदविले गेले. पुढे १९४१–४२

पर्यंत यामध्ये वाढ होऊन ही संख्या १०४० ग्रंथालये व वाचनालये ५००० पर्यंत पोहोचली. येथील चळवळीचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे शासनाने स्थापन केलेल्या खाजगी ग्रंथालयांना श्रेणीनुसार प्रतिवर्षी रु. ९६,६०,३६ अशी आर्थिक उपलब्धता करून देऊन स्वतंत्रपणे वृत्तपत्रे उपलब्ध करून दिली जात असत. ग्रंथालय चळवळीच्या खर्चाची नोंद घेताना १९४१–४८ या काळात एकूण २,२३,४६० रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची नोंद आढळते.

उत्तरप्रदेश ग्रंथालय संघाची सुरुवात १९४९ मध्ये होऊन या संघाद्वारे लखनौ व कानपूरमध्ये हॉस्पिटल ग्रंथालय सेवा सुरु करण्यात आली. डॉ. एस्. आर. रंगनाथन यांनी उत्तरप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा मसुदा तयार करून त्यांनी तो ''लायब्ररी डेव्हलपमेंट प्लान'' या पुस्तकातून प्रकाशित केला. पुढे हा मसुदा शासनाकडे १९६० मध्ये पाठविण्यात आला होता पण त्यास मान्यता मिळू शकली नाही.

कायदा अस्तित्वात नसतानाही या राज्यात ग्रंथालयास बळकटी देण्याकरिता दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अलाहाबाद येथील गव्हर्नमेंट सेंट्रल प्रॉव्हिलान्सीयल लायब्ररीचे सेंट्रल स्टेट लायब्ररीत नामांतर करण्यात आले. या मध्यवर्ती ग्रंथालयाच्या अधिपत्याखाली आग्रा, अल्मोडा, बरेली, गोरखपूर, झाँसी, कानपूर, मथुरा व मीरत, वाराणसी या नऊ जिल्ह्यात जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. या ग्रंथालयाकरिता रु. २९,६५,०००/– इतकी आर्थिक तरतूद करण्यात येऊन या उपक्रमांतर्गत १४०० ग्रंथालयांचा समावेश करण्यात आला. या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीसंदर्भात विशेष नोंदविण्यासारखी बाब म्हणजे शिक्षण खात्याबरोबरच समाजकल्याण, पंचायत राज्य, हरिजन कल्याण, सूचना व माहिती विभाग, कामगार व शैक्षणिक योजना व विकास या खात्यांतर्गत ग्रंथालय चळवळींकरिता निधी उपलब्ध करून दिला जातो. विविध योजनांतर्गत अशा आर्थिक उपलब्धतेचा तपशील, विचार घेता, १) पहिली योजना – रु.५ लाख २) दुसरी योजना – रु. १६ लाख ३) तिसरी योजना रु. २० लाख ४) चौथी योजना रु. २५ लाख अशी तरतूद करण्यात आली होती. अर्थात एकूण ग्रंथालयांची संख्या विचारात घेता हा निधी पुरेसा नाही हे ही तेवढेच सत्य आहे. मधील काळात लखनौ ग्रंथालय संघाद्वारे ''लखनौ लायब्ररीयन'' या नावाचे एक नियतकालिकही सुरु करण्यात आले होते.

विस्ताराने व लोकसंख्येने मोठे राज्य असून या राज्याची सार्वजनिक ग्रंथालय चळवळी विषयीची पूर्वपिठिका पाहता स्वातंत्र्योत्तरकाळात ग्रंथालय चळवळीने खऱ्या अर्थाने येथे जोर धरल्याचे निदर्शनास येते. 'पुस्तकालय कि निता' एवंम 'पढतिका विकास' योजने अंतर्गत येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस १९८०-८१ मध्ये संरचनात्मक दृष्टीने सुरुवात झाली. याचवर्षी प्रथमत: उत्तर प्रदेश ग्रंथालय विभागाची शिक्षण विभागाअंतर्गत स्थापना करण्यात आली. या विभागाची स्थापना करताना उत्तरप्रदेशमधील सार्वजनिक ग्रंथालय स्थापनेस प्रोत्साहन देणे हा उद्देश होता. १९८०-८१ पासून या विभागाचे कार्य शिस्तबद्ध पध्दतीने चालू आहे असे असले तरी सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६ मध्ये मंजूर करण्यात आला. सार्वजनिक ग्रंथालय कायदा मंजूर करणारे हे पंधराव्या क्रमांकाचे राज्य होय.

राज्यातील शहरी व ग्रामीण परिसरातील सार्वजनिक ग्रंथालय सेवा प्रभावीपणे उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करणे आणि त्याचे संघटन आणि व्यवस्थापन सुव्यवस्थित करुन या ग्रंथालयाचा विकास मोफत व परिणामकारक व्हावा आणि या चळवळीस गती प्राप्त व्हावी अशा स्वरुपाची अपेक्षा प्रस्तृत ग्रंथालय कायद्याअंतर्गत व्यक्त करण्यात आली आहे. प्रत्यक्षात हा कायदा २०११ पासून लागू झाला. या कायद्याअंतर्गत राज्य परिषदेची निर्मिती स्थापित करुन विविध समित्यांची स्थापना करताना यामध्ये राज्यग्रंथालय परिषद, राज्य स्थायी समिती, जिल्हा ग्रंथालय समिती, राज्य उत्तर प्रदेश सार्वजनिक ग्रंथालय विकास निधी समिती अंतर्गत निधी समिती गठीत करुन या समितीव्दारे विविध प्रकारच्या योजना सुचविण्यात आल्या. यामध्ये जिल्हा ग्रंथालयाची स्थापना व त्याच्यामध्ये सुधारणा या करिता,

१) २०१५-१६ मध्ये रु.१८,३३,५०००/- इतकी आर्थिक सुविधा करण्यात आलेली असून याचा लाभ शासकीय जिल्हा ग्रंथालयाना होणार आहे. यापैकी ६० जिल्हा ग्रंथालयानी स्वत:च्या कायमस्वरुपी इमारती बांधलेल्या आहेत. तर ६० जिल्हा ग्रंथालय इमारतीचे काम सुरु करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. ३ ग्रंथालयांचे काम प्रगतीपथावर आहे.

२) ग्रंथालय व अभ्यासिकेकरीता अनुदान– या योजनेअंतर्गत २०१५–१६ साली उत्तरप्रदेश शासनाने रु.१०,००,०००/– इतके अनुदान ३४ सेवाभावी ग्रंथालयाना उपलब्ध करुन दिले आहे. अशाप्रकारचे अनुदान उपलब्ध करुन देताना या ग्रंथालयाची पडताळणी शासकीय पर्यवेक्षकामार्फत अथवा जिल्हा ग्रंथपालामार्फत करण्यात येते. या अनुदानाचा विनियोग लोकांना ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणे व त्याद्वारे लोकांना सुशिक्षित करणे हा आहे.

३) आचार्य नरेंद्र देव लखनौ हे ग्रंथालय, मोतीलाल मेमोरियल सोसायटी भारतसंस्था या संस्थेद्वारे चालवले जात असून उत्तरप्रदेश राज्याच्या ग्रंथालय विभागाकडून दरवर्षी या ग्रंथालयास रुपये २,००,०००/– इतके अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.

४) तसेच २०१५–१६ मधील आर्थिक तरतूदी अंतर्गत लखनौ येथील अमतीतदुल्हा सार्वजनिक ग्रंथालय विकासाकरिता व आधुनिकीकरणाकरीता रुपये ६१,५०,०००/– इतके अनुदान उपलब्ध करुन दिले आहे.

५) सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाकरीता या राज्यातील सर्व सेवाभावी संस्थाना उत्तरप्रदेश शासनाने ग्रंथालय विकास योजनेअंतर्गत रुपये १०,००,०००/– तरतूद करण्यात आलेली असून यासाठी जाहिरात प्रसारीत करुन संबंधीत संस्थांकडून या योजनेचा लाभ घेऊ इच्छीणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालय संस्थाकडून प्रस्ताव मागविले जातात. खर्चाची पडताळणी करुन प्रत्यक्षात जिल्हा पर्यवेक्षक शिक्षण विभाग अथवा जिल्हा ग्रंथपाल प्रत्यक्ष पाहणी करुन आपला अहवाल सादर करताच त्यानंतर निधीचे वितरण संबंधीतांना करण्यात येते.

६) बाल विभागासाठी देखील अशाच प्रकारची तरतूद करण्यात आली असून ही तरतूद सर्व साधारणपणे रु. १,१०,०००/– इतकी रक्कम सहभागी ग्रंथालयाना उपलब्ध करुन दिली जाते. २०१५–१६ मध्ये अंदाजे २,५०,६६,०००/– अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेले आहे.

या अनुदानाचा विनियोग ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासाठी केला जातो. सामान्यत: राज्य मध्यवर्ती ग्रंथालय आग्रा, जिल्हा स्तरावर वाराणशी, कानपूर, गोरखपूर, झाशी, मथूरा, पटेली, मिरत या शासकीय जिल्हा ग्रंथालयाना लाभ मिळाला असून याचबरोबर या ग्रंथालयांना त्याचा आवश्यकतेनुसार रुपये १०,००००० /- इतकी रक्कम सहभागी ग्रंथालयाना उपलब्ध करुन दिली जाते.

शासकीय जिल्हा ग्रंथालय विकास व राज्यातील नव्या ग्रंथालयाच्या स्थापनेकरीता २०१५-१६ या सालात अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली असून यासाठी रुपये ५,७९,७८,०००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या रकमेचा विनियोग सहभागी ग्रंथालयाना करुन घेता योतो.

याचबरोबर राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान राष्ट्रीय ग्रंथालय धोरण या अंतर्गत योजनातूनही अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. २०१५-१६ मध्ये येथील ३ ग्रंथालयांना सुविधांच्या विकासासाठी एकूण ६,३१,८३,०००/- इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच बिल व मिलीदा गेटस् प्रतिष्ठान या प्रकल्पाअंतर्गत या अनुदानाचा लाभ या राज्यातील ग्रंथालयाना मिळत असून इतरही काही संस्था प्रकल्पामध्ये सहभागी होऊन सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. यामध्ये प्रामुख्याने नेसकॉम प्रतिष्ठान, डिजीटल एम्पॉपरमेंट प्रतिष्ठान, फर्स्ट एज्यूकेशन प्रतिष्ठान, राजीव गांधी प्रतिष्ठान इ. समावेश आहे. या प्रकल्पामध्ये सहभागी झालेली जिल्हा ग्रंथालये बारबंकी, गाझीयाबाद, बालीया, कानपूर, नगर, युनाव, लखमिपूर या सहा जिल्ह्याशी संबंधीत आहेत.

एकूणच या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रशासनाद्वारे सहा प्रकारच्या समित्यांच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाचे अभियान राबविले जात आहे. या समित्या बरोबरच शासनाने इ- ग्रंथालयासारखा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेला असून याव्दारे राज्यातील सर्व जिल्हाग्रंथालये एकाच गेटवेव्दारे जोडली जाऊन ऑनलाईन वाचन साहित्याची उपलब्धतता करण्यात येणार आहे. (शहा, अनुभव व सोनकर, एस.के.)

## २.६ ओरिसा :

प्राचीन परंपरा पाहता ज्ञानसंग्रहण आणि त्याचे पुढील पिढीकरीता हस्तांतरण हे मौखिक स्वरुपात होत असे. या मौखिक ज्ञानपरंपरेमध्ये उच्चस्तरीय संस्कृतीचे जतन करण्यात आले होते. याच परंपरेतून वाचन साहित्याच्या निर्मितीची सुरुवात होत असताना तत्वज्ञानासारखे विषय सूत्रांच्या माध्यमातून पुढे विकासित झाले. ही सूत्रे म्हणजे एक प्रकारे मुखोद्गत केलेले ग्रंथच होते. याच परंपरेतून  पुढे लेखन परंपरा अस्तित्वात आली आणि ग्रंथाची निर्मिती लिखित स्वरुपात सुरु झाली. दगडावरील लेखन अस्तित्वात येऊन ही परंपरा ओरीसामध्ये रुढ झाली. याचबरोबर गुहेमधील भिंतीवर चित्र लिपीतील लेखन दृष्टोत्पत्तीस येऊन अशाप्रकारचे लेखन ओरीसा परिसरातील गुदाहंडी येथील धर्मगृह येथील उगविभागात सापडलेल्या गुहातून सापडले. हा परिसर ओरीसा राज्यातील कोलाहंडी राज्यामध्ये येतो. याचबरोबर गुहाहंडीच्या जंगलात चारपाच भौमितीय चित्रे देखील आढळून आली या चित्रांची रचना ही चौरस, आयत, वर्तुळ अशा स्वरुपामध्ये आहे. अशाच प्रकारची कातळ शिल्पे महाराष्ट्रातील कोकण परिसरातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातळावर आढळलेली आहेत. तसेच पुढील काळात मानवाने आपल्या दैनंदिन कामकाजासाठी पशूंचा वापर सुरु केला, आणि यातून या प्राण्यांचे चित्रीकरण मठातून केल्याचे ओरीसा परिसरात आढळते. नौपारा विभागातील जोगी मठात गुहातील चित्रे आढळून आली असून हाही परिसर कलाहंडी या जिल्ह्यात येतो. अशाच प्रकारचे लेखन मणीखुडा (सुंदरग्रह) जिल्हा, उषाकोटी व विक्रमकोल, (संबोलपूर जिल्हा) या ठिकाणी आढळले आहे.

अतिप्राचीन काळात विद्यमान ओरीसा परिसरामध्ये म्हणजेच प्राचीन उत्तर भारतातील कलिंगा परिसरात तक्षशिला, नालंदा यासारखी विद्यापीठे देखील अस्तित्वात होती. या ठिकाणी विविध ज्ञानशाखांचे शिक्षण दिले जात होते. या दोन विद्यापीठांबरोबरच पुष्पगिरी हे विद्यापीठ रत्नगिरी, उदयगिरी, ललितागिरी या कटक जिल्ह्यातील विभागात आढळून आले आहे.

हे विद्यापीठ विशेषत्वाने योगाच्या शिक्षणविषयक ओळखले जाई. या विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये योगशास्त्रविषयक साहित्य विशेष प्रमाणात उपलब्ध होते. तसेच या परिसरातील

खेडे गावातील घरातूनही योगशास्त्र विषयक ग्रंथ मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. सम्राट अशोकांच्या कालखंडामध्ये देखील हस्तलिखित स्वरुपातील लेखन अस्तित्वात असल्याचे पुरावे नंतरच्या काळात आढळलेले असून खडकावरील कोरी लेखन ही मगध राजवटीमध्ये निदर्शनास आलेले आहे. सुरवातीच्या काळातील पुरावे हस्तलखित वाचन साहित्याचे असे संग्रह म्हणजे ग्रंथालयांची एक प्राथमिक अवस्थाच होती. त्या काळामध्ये राजे लोक मठातील या प्रलेखांचा वापर करीत असत. विशेषत्वाने हा वापर धर्मशास्त्र विषयक वाचन साहित्याशी संबंधित असे. अशा प्रकारचे ग्रंथ हे मठातील ग्रंथालयासाठी संग्रहीत केले जात. साधारणत: इ. पू. ३०० वर्ष या काळात प्राचीन मठातून असे लेखन आढळलेले असून अशा लेखनाविषयक वाचन साहित्याचे संग्रहण म्हणजेच त्या काळातील ही शैक्षणिक ग्रंथालयेच होती. अर्थात ही प्रसंगोपात इतर जणांना खुली असत. सम्राट अशोकाच्या काळामध्ये कलिंग युध्दानंतर भोजाकागिरी विहार हा मोठा मठ बांधलेला होता. अशा मठातून संग्रहित केलेली हस्तलिखिते ही लिपिकांच्या ताब्यात असत. या लिपिकारांच्याकडे विविध प्रकारचे दस्ताऐवज संग्रहित करण्याची पद्धत ही त्या काळात रुढ होती.

या पार्श्वभूमीवर या परिसरात ग्रंथालय पद्धतीचा विकास होत असताना गुहांच्यामध्ये केलेले लेखन या काळात खंडगिरी व उदयगिरी या परिसरामध्ये आढळले. या पंरपरेतूनच पुढे अशोकाच्या कालखंडात मठातील ग्रंथालये विकसित होत असताना त्यांना अत्यंत कठीण काळातून पुढे जावे लागले. ओरीसामध्ये अशा मठातील ग्रंथालयांची संख्या अधिक असून या मठातील ग्रंथालयांपैकी ताम्रलिप्ती, ओद्रा, चरित्रा (पुरी), गया, कंगोठा, कलिंगा या मठ ग्रंथालयांचा उल्लेख करावा लागेल. चिनी प्रवाशांनी केलेल्या उल्लेखानुसार या परिसरात ताम्रलिप्ती येथे १० मठ, ओद्रा येथे १०० मठ. चरीत्रा येथे ५, कलींगा येथे १०, दक्षिण कोसला येथे १०० याचबरोबर कंगोडा येथे आणखीन मठ असल्याचा उल्लेख केलेला असून यापैकी पुष्पगिरी व पोलोमोलोकिली हे महत्वपूर्ण मठ होते. ओरीसामधील भोरासाई येथे बौध्द अभ्यासकांचे एक महत्वपूर्ण केंद्र होते व दिन आचार्य दिगदाजी यांनी स्थापन केलेले ग्रंथालये ही तेथे अस्तित्वात होती. तत्कालीन आधुनिक स्वरुपाचे ग्रंथालय अग्रहार कालखंडात आढळून येते. या कालखंडामध्ये ब्राम्हणांची सत्ता प्रभावीपणे अस्तित्वात

आली. दगडावरील कोरीव लेखनामध्ये या परिसरात प्रगती झाल्याचे निदर्शनास येते. गुप्त काळामधील हे संस्कृत अभ्यासाचे केंद्र होते. या केंद्रातून वैदिक वाङमय, पुराण, तत्वज्ञान अशा विषयांचा अभ्यास केला जात असे.या अग्रहार कालखंडात नैतिकतेचे जतन करुन अध्यात्मविषयक वाचन पवित्र ग्रंथाच्या माध्यमातून केले जात असे. यातूनच पुढे यांना देवालयातील ग्रंथालयांचे स्वरुप प्राप्त होऊन ही ग्रंथालये त्या काळातील आधुनिक ग्रंथालये म्हणून ओळखली जाऊ लागली. चौथ्या व पाचव्या शतकातील ताम्रपट लेखनाचा या परिसरामध्ये उदय होऊन असे ताम्रपट जमीन विषयक दानाविषयी ब्राम्हण वर्गास दिल्याचे पुरावे ही आढळतात.

सहाव्या शतकामध्ये येथे देवालयातून ग्रंथालये अस्तित्वात आली. या मंदिरातील भिंतीवर नैतिक देखावे व बोधपर कथा कोरण्यात येत. अशाप्रकारची मंदिरे भुवनेश्वर परिसरामध्ये आढळून आली. या मंदिर ग्रंथालयामध्ये परशुरामेश्वर, सुवर्णजलेश्वर या साइलोबधावस येथील मंदिरातून काही बाबी निदर्शनास आल्या. यामध्ये,

१) पाम पृष्ठावरील हस्तलिखिते या मंदिरातून वाचनासाठी उपलब्ध करून दिली जात असत.

२) या हस्तलिखित ग्रंथांचे वाचन करणाऱ्या लोकांच्याकडे डोक्यावर ठेवण्यासाठी केसांचे आवरण असे. दोऱ्यासारखे एक गोलाकार कडे असे. याचा वापर कमरपट्टा स्वरुपात वा गुडघ्याच्या ठिकाणी केला जात असे.

३) ग्रंथवाचन करणाऱ्या व्यक्तीच्या हातामध्ये एक मण्यांची माळ व एक मातीचे भांडे असे आणि हस्तलिखित दुसऱ्या हातात असे.

४) वाचक वाचनाच्यावेळी बसण्यासाठी बैठकीचा वापर करत.

५) ही पाम पृष्ठावरील हस्तलिखिते हाताळण्यास सूलभ होती.

यावरुन तत्कालीन मंदिर ग्रंथालयांचे हे पुरावे, परंपरा स्पष्ट करण्यास पुरेसे आहेत. या मंदिर ग्रंथालयांमध्ये सांकेतिक भाषेतील रामायण महाभारतातील कथा संग्रहित केलेल्या असत. यावरूनच त्यांचे संदर्भ मूल्य ही लक्षात येते. या हस्तलिखित लेखनासाठी संस्कृत भाषेचा वापर केला जात असे व ही हस्तलिखिते अनेक लेखकांच्याकडून लिहिली जात

असत. ओरीसा मधील ही एक मान्यता प्राप्त पद्धती होती. या लेखनासाठी पामपृष्ठांचा केला जात असलेला वापर कधी सुरु झाला याचा निश्चित कालखंड नमुद करणे, हे पुराव्याअभावी शक्य होत नाही.

अगदी सुरुवातीच्या काळाचा विचार करता दुसऱ्या शतकात भारतामध्ये लिहिल्या गेलेल्या पुस्तकाचा पुरावा अंश स्वरुपात आढळला असे असले तरी देखील येथे दहाव्या शतकापर्यंत पामपृष्ठ हस्तलिखिते निश्चितपणे अस्तित्वात होती असे ठोस पुरावे आढळत नाहीत. अर्थात आजही येथील वैयक्तिक स्वरुपातील अथवा मंदिरातील पाम पृष्ठावरील हस्तलिखितांचा सखोल व संशोधनात्मकदृष्ट्या अभ्यास झाल्याचे निदर्शनास येत नाही. अशा अभ्यासातून पाम हस्तलिखितांचा कालखंड निश्चित करणे शक्य होईल. पुढील काळात कागदांचा शोध लागल्यावर पाम पृष्ठांचा हस्तलेखनासाठीचा वापर कमी होऊ लागला. मठ ग्रंथालयांबरोबरच ग्रामीण ग्रंथालये देखील या परिसरात नंतरच्या काळात रूढ झाली. या ग्रामीण ग्रंथालयांचा विचार करता ओरीसामध्ये पुराण ग्रंथांचा अभ्यास करण्यारसाठी प्रत्येक खेडेगावामध्ये देवालयात अथवा गढी घराद्वारे व्यवस्था केली जात असे. या गढीघरांचे स्वरूप सार्वजनिक ग्रंथालयांसारखेच होते. ही गढीघरे लोक वर्गणीतून व देणगीतून संग्रहीत करण्यात आलेल्या पाम हस्तलिखितांच्या माध्यमातून प्रत्येक गावात सुरु केली जात असत. त्यांचे सार्वजनिक वापरासाठी संरक्षणही केले जात असे. या परिसरातील बऱ्याच गावांतून यासाठी कायमस्वरुपी नेमणूक केली जात असे. संध्याकाळी अशा खेड्यातील लोक तेथे जाऊन या पुराण ग्रंथ वाचनाचा व विवेचनाचा लाभ घेत. हे पुराण कथन साधारणत: एक तासभर चालत असे. आजही ओरीसा परिसरातील काही खेड्यांमध्ये ही परंपरा अस्तित्वात आहे.

बुध्द विहारातील ग्रंथालये ही संदर्भ संग्रहालये – ग्रंथालये म्हणून पुढील काळात राजाश्रयामुळे अस्तित्वात आली. फा हेन ह्युयांग त्संग या चिनी प्रवाशांनी ओरीसा परिसरामध्ये पाचव्या व सातव्या शतकामध्ये येथील विहारांना भेट देऊन महत्वपूर्ण मठांची नोंद केल्याचे निदर्शनाद येते. यापैकी महत्वपूर्ण मठ म्हणजे भोनासालीया, ताम्रलिपी, चिलीतेलो, भारहमठ, भुचलिंदामठ, बुध्द विहार अशा मठांचा यामध्ये समावेश आहे.

मध्य युगातील भागवतघरे ही देखील ग्रामीण परिसरातील ग्रंथालये म्हणून ओळखली जात. या घरातून लोकांना ज्ञानाविषयी व सामाजिक जीवनाविषयी आस्था निर्माण झाल्याचे लक्षात येते. या सर्वच भागवतघरांना एक धार्मिक अधिष्ठान होते.

प्राचीन परंपरेचा वेध घेता ग्रंथ संग्रह करण्याची वृत्ती येथील लोकांच्यामध्ये होतीच, तसेच येथील संस्थानिकांनी देखील या परंपरेस चालना दिली होती. मराठा राजवटीत येथे वाचन अभिरूचीचा प्रभाव अस्तित्वात असल्याच्या पाऊलखुणा आढळतात. याच परंपरेतून मयुरगंज या वैचारीक दृष्ट्या प्रगत संस्थानामध्ये १८९३ मध्ये श्रीराम चौधरी सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना तत्कालीन समाज धुरीनांनी केल्याचे निदर्शनास येते. संस्थानिक, ब्राम्हण वर्ग यांच्या घरातून आपापल्या आवडीनुसार ग्रंथ संग्रह करण्याची परंपरा येथे रूढ होती. आधुनिक काळातही या परिसरातील ब्राम्हण वर्गांकडून प्राचीन ताडपत्रे- भुर्जपत्रे यावरील पोथ्या देवघरात पुजल्या जातात. यावरूनच येथील लोकांच्यामध्ये ग्रंथालयाबद्दलचा व ग्रंथांच्याबद्दल आस्थेचे आणि आत्मीयतेचे दर्शन घडते.

या परिसरात उडीया लिपीतील पैलपार संहितेची प्रत आजही ब्राम्हणांच्या घरी उपलब्ध असलचे पुरावे मिळतात. कट्टर धार्मिक वृत्तीने या हस्तलिखिताची जपणूक केलेली असल्यामुळे अशा स्वरुपाचे लेखन पुढे येण्यास अडथळा निर्माण झाला आहे.

इंग्रजी राजवटीत येथे मयुरगंज या ठिकाणी १८६८ च्या काळात ग्रंथालयांचे दप्तर व्यवस्थित सांभाळल्याचे आढळून येते. हे दप्तर वर्गीकृत पद्धतीने संरचीत केलेले होते. तसेच पुढील काळात येथे कायदेविषयक ग्रंथालये, वैद्यकीय ग्रंथालये, कारागृह ग्रंथालये, दरबार ग्रंथालये यांचे अस्तित्व १९०७ ते १९४० च्या काळात असल्याचे निदर्शनास येते. ही सर्व ग्रंथालये सार्वजनिक नसली तरी याचे कार्य सार्वजनिक जीवनाशी संबंधीत असे होते. येथे पुरातत्व विभागाची स्थापना १९२५ मध्ये करुन या ठिकाणी हस्तलिखिते व काही दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह करण्यात आला होता. या विभागाच्या ग्रंथालयाकरिता नियतकालिके देखील खरेदी केली जात. या ग्रंथालयात काही दुर्मिळ ग्रंथ होते यामध्ये इंपिग्राफिकल इंडीयाचे ४० खंड, पार्शियन ऐतिहासिक ग्रंथ, आयीने-आ-अकबर, अकबरनामा अशा ग्रंथाचा समावेश होता. हळूहळू हा ग्रंथ संग्रह वाढत जाऊन या ग्रंथालयास तेथील महाराजाकडून

विकत अथवा देणगी स्वरुपात ग्रंथ उपलब्ध करुन हा ग्रंथसंग्रह वृध्दिंगत करण्यात आला. या काळात राज्य पुरातत्व विभागाचे प्रमुख म्हणून परमानंद आचार्य हेच ग्रंथालयाचे काम पाहत असत. कालाहंडी परिसरामध्ये महाराजा पि. के. देव यांच्या देखरेखीखाली ते होते. तेव्हा केदारनाथ महापागा हे अधिकारी होते. या ग्रंथालयामध्ये जुने दस्तऐवज होते. तर पाटणा संस्थानासाठी पुरातत्व विभागाच्या ग्रंथालयाचे काम पी. सी. राव हे पहात असत. प्राचीन दस्ताऐवजाबरोबरच जमीनदारांची कागदपत्रे देखील अशा ग्रंथालयातून जतन केली जात. मयूरगंज येथे दरबार ग्रंथालयाची स्थापना करण्यात आलेली होती. या ग्रंथालयात देणगीदाखल प्राप्त झालेले ग्रंथ हे दरबार ग्रंथालयाकडून व्हिक्टोरिया हिरक महोत्सवाची ग्रंथालयासाठी तत्कालीन पॉलिटिकल एजंटना १९१२-१३ या साली ते प्राप्त झाले होते. या दरबार ग्रंथालयाला इम्पेरीयल ग्रंथालयाकडून सुविधा उपलब्ध करून दिल्या जात. या सुविधामध्ये  ग्रंथालय देवघेव सुविधा, ही महत्वपूर्ण होती. याचबरोबर येथे गेस्टहाऊस लायब्ररी देखील संस्थानाव्दारे उभी करण्यात आली होती. एकूणच मयूरगंज संस्थानात ग्रंथालय सुविधा ब्रिटिशांच्या सहकार्याने विकसित झालेली होती. ब्रिटिशाच्या प्रशासनाखाली १८७२-१९१० या काळात देखील ग्रंथालय प्रशासनाकडे लक्ष देण्यात आले होते. या चळवळीतून पुढे सार्वजनिक ग्रंथालयांचे बीजारोपण अधिक सक्षमपणे झाले. ओरीसामधील पहिले सार्वजनिक ग्रंथालय म्हणून स्थापन करण्यात आले. प्रत्यक्षात हे ग्रंथालय म्हणून व्हिक्टोरिया मेमोरीयल ज्युबेली ग्रंथालय बारीपाडा येथे २२ जून १८९८ मध्ये स्थापन करण्यात आले. प्रत्यक्षात हे ग्रंथालय १८९९ पासून कार्यरत झाले. ३१ मार्च १८९९ मध्ये या ग्रंथालयाकडे २२४५ ग्रंथ होते. न्यायालयाच्या आवारात या ग्रंथालयासाठी इमारत उभी करण्यात आली होती. या ग्रंथालयासाठी काही दर्जेदार नियतकालिका बरोबरच १८९८-९९ या काळात इंग्रजी साहित्य, इतिहास प्रवासवर्णन, तत्वज्ञान हे इंग्रजी ग्रंथ, बंगाली व ओरीसा भाषेतील महत्वपूर्ण साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले होते. हेच ग्रंथालय पुढे रामचंद्र ग्रंथालय म्हणून ओळखले जाऊ लागले. आज शतकोत्तरीत कार्यरत असलेली ग्रंथालये म्हणजे अनंतपत्रघर, श्री. रामचंद्र पुरी (१७०७) कुमारंग ग्रंथासन, पुरी (१९१२) फकिरपतग्रह, विररामचंद्रपुर, साकीगोपाल (१९१५) यांचा समावेश केला जातो. याचबरोबर

या परिसरात बदलत्या राजवटीनुरुप इस्लामिक ग्रंथालये, दर्गा ग्रंथालये, चर्च ग्रंथालये इथे अस्तित्वात होती. आधुनिक काळात येथे ग्रंथालय पध्दती अस्तित्वात येऊन सांस्कृतिक विभागाअंतर्गत येथील सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली विकसित झाल्याचे निदर्शनास येते. या प्रणाली अंतर्गत राज्य, ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालय, उपविभागीय ग्रंथालये जिल्हा मंडळ ग्रंथालय, संलग्नित ग्रंथालये व ग्रामीण ग्रंथालये अशी संरचना असून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्यक्षात या ग्रंथालच्या इमारतीचे काम १९६० ला सुरु करण्यात आले व ते सन १९६४ मध्ये पूर्ण झाले. या इमारतीमध्ये तीनच खोल्या राज्य मध्यवर्ती ग्रंथालयासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या, व इतर भाग सार्वजनिक सूचना संचालकासाठी उपलब्ध करुन दिल्याने या मध्यवर्ती ग्रंथालयाचे कामकाज सर्वांगीण दृष्टीने सुरु करण्यात आले नव्हते. ३१ डिसेंबर १९९५ रोजी सार्वजनिक सूचना विभागाचे कार्यालय त्याच्या नव्या इमारतीत स्थलांतर केल्यानंतर या राज्य मध्यवर्ती ग्रंथालयास संपूर्ण इमारत वापरावयास मिळाली. या ग्रंथालयात ३३,१५६ इतका ग्रंथसंग्रह  आहे. भुवनेश्वरमधील राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे नामकरण १९८६ मध्ये डॉ. हरिकृष्ण महनाब याचे स्मरणार्थ करण्यात आले.  या राज्यात १७ जिल्हा ग्रंथालये ४ उपविभागीय ग्रंथालये, १५०० ग्रामीण ग्रंथालये कार्यरत असून क नगरपारिषद ग्रंथालय (१२) ब्लॉक ग्रंथालये (३१४) इतकी आहेत. तसेच कृष्णमूर्ती प्रतिष्ठान भारतीय ग्रंथालय नेटवर्कचा लाभ सर्व जिल्हा केंद्राना उपलब्ध करुन दिलेला असून या अंतर्गत ग्रंथालयांचे नेटवर्क तयार करण्यात आलेले आहे.

## २.७ कर्नाटक :

येथील ग्रंथालयांची पूर्वपिठिका पहाता पुढील विभागातील विभाग विचारात घेणे गरजेचे ठरते.

१) कर्नाटक शासन

२) मुस्लिम शासन

३) इंग्रजी शासन

४) स्वातंत्र्य कालखंड

येथील ग्रंथालये सांस्कृतिक परंपरेची दर्शक असून भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे जतन व करत सुरुवातीच्या काळात ग्रंथालय परंपरा प्रत्यक्षात आली. येथील शासनकर्ते कदंब, राजष्ट्रकूट, चालुक्य, होसला आणि इतर राजघराणी यांनी आपल्या घराण्यातील ज्ञान संस्कृतीची जोपासना करण्यासाठी महत्वपूर्ण ग्रंथालयाची स्थापना केलेली होती. चालुक्य राजवटीमध्ये इ.स. ९४५ च्या काळात १२५ एकरात विद्यापीठ स्थापन केले होते. यावरुनच येथील ज्ञानसाधानांची सकल्पना सुस्पष्ट होते. या ज्ञानकेंद्राना जोडूनच ग्रंथालयाची स्थापना करुन तेथील कला, वास्तुशास्त्र, साहित्य यांचे जतन केलेले होते. अग्रघर, मठ, घटीकासंस्था यामधून या ज्ञानसंग्रहाचे पुरावे जतन केल्याचे दर्शनास येतात. मठ, मंदिरे व घटीका संस्था ही शिक्षणकेंद्रे तर होतीच याच बरोबरीने तेथील ग्रंथालय परंपरा विकसित होत गेली. या प्राचीन ग्रंथालय पद्धतीचे वर्गीकरण वैयक्तिक ग्रंथालय व सार्वजनिक ग्रंथालय असे करणे शक्य आहे. विद्वानानी आपल्याकडील पामपृष्ठे, हस्तलिखिते जतन केलेली होती. येथील विद्वान, देशातील इतर भागात १३ व्या शतकापासून धर्मचर्चेत सहभागी होण्यासाठी विविध ठिकाणी जात असत. अशा विद्वत चर्चेत सहभागी होताना विद्वान आपला संदर्भ संग्रह हत्तीवरुन सोबत नेत असत.

येथील सार्वजनिक ग्रंथालयाचे दोन गटात विभाजन करणे शक्य आहे.

१) मठामध्ये आणि मंदिरामध्ये स्थापन करण्यात आलेली ग्रंथालये. मठातील ग्रंथालयातून ज्ञानसाधना बरोबरच ग्रंथसंग्रहण केले जात असे. यामध्ये वैदिक साहित्य, पुराण, व्याकरण

व विज्ञानविषयक अशा विषयांचा समावेश असे. विरशैव, जैन व ब्राम्हण मठामधून चित्रदुर्ग, मोठाबिद्रे, शृंगेरी या ठिकाणी दर्जेदार हस्तलिखितांचे संग्रह करण्यात आले होते. मंदिर परंपरेचा विचार करता कोलाड येथील सोमेश्वर मंदिरामध्ये दर्जेदार हस्तलिखित संग्रह जतन करण्यात आलेला होता. त्याच्या देखरेखेसाठी ग्रंथपालाची नेमणूक करण्यात आलेली होती. गुलबर्गा जिल्ह्यातील नागई येथील कोरीव लेखनातून कर्नाटकच्या इतिहासाचे व संस्कृतीचे दर्शन घडते. या परिसरात नागई हे ठिकाण घटीका संस्थासाठी ११ व्या शतकात मशहूर होते. ही घटीकागृहे म्हणजे पदवीधर अभ्यासकेंद्र होय. या ग्रंथालयांचे ग्रंथपाल हे अत्यंत विद्वान असत.

याचबरोबर विजयनगर येथील राजवटीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचा विकास झाल्याचे निदर्शनास येते. बूकराजाच्या कारकिर्दीमध्ये बूक राजानी १३२९ मध्ये पौराणिक कवी कृष्णभट यास ग्रंथालयाच्या नूतनीकरणासाठी जमीन दान दिल्याचे पुरावे आढळतात. ही ग्रंथालये श्रृंगेरी मठास सलग्न होती. या ग्रंथालयाकडे पामपृष्ठावरील ५०० हस्तलिखिते व अनेक मुद्रित पुस्तके उपलब्ध आहेत. नृसिंहभारती ओडीयार यांनी एक ट्रस्ट स्थापन करुन पुस्तक भंडारा ग्रंथालय पेरदूर उडपी तालुक्यामध्ये स्थापन करण्यासाठी १४०६ मध्ये प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते.

मुस्लिम राजवटीमध्ये येथे ग्रंथालयाचे महत्व अबाधित राहिल्याचे निदर्शनास येते. १५२६ च्या कालखंडात बाहमनी राजानी येथे शैक्षणिक केंद्रे व ग्रंथालये स्थापन केली होती. येथील शैक्षणिक संस्थातून ग्रंथालये स्थापन्यात आलेली होती. या काळात उर्दू ग्रंथ लेखनास चालना मिळाल्याचे निदर्शनास येते. तसेच दर्ग्यातून ही ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली होती. मोहम्मद शहा, बाहामणी, टिपू सुल्तान, आदिलशहा (विजापूर) हे पुस्तकांचे व ग्रंथालयाचे चाहते होते. या राजे लोकांनी वैयक्तिक ग्रंथसंग्रह जोपासले होते. यामध्ये मोहम्मद गोहान याने स्वतःच्या खासगी ग्रंथालयात जवळ जवळ ३५००० हस्तलिखितांचा संग्रह करुन विद्वानाना खुला ठेवला होता. पुढे बिढर येथे त्याने एक महाविद्यालय स्थापन केले.

ब्रिटिशांच्या कारकिर्दीत १८४८ मध्ये बेळगाव येथे सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करण्यत आली. या ग्रंथालयास 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे संबोधण्यात आले. या ग्रंथालयाच्या स्थापनेबरोबरच कर्नाटकधील सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाची वाटचाल सुरु झाली. आजही हे ग्रंथालय बेळगाव येथे उत्तमप्रकारे कार्यरत आहे. पुढे १८५४ मध्ये धारवाड जिल्ह्यामध्ये व १८६५ मध्ये हुबळी येथे गर्ग सिध्दलिंगाप्पा म्युनिसिपल सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करण्यात आले. आजही हे ग्रंथालय कार्यरत आहे. यानंतर विजापूर, उत्तर कॅनरा जिल्हा या ठिकाणी अनेक तालुका ग्रंथालये स्थापन झाली. यामध्ये राणी बेन्नूर ग्रंथालय (१८७३), लोकमान्य धनमार्थ वाचनालय सिराहष्टी (१८८८) गदग येथील अभ्यासिका (१८७६), निपाणी येथील वाचनालय (१८७५) अशी एकूण डझनभर ग्रंथालये या दोन दशकाच्या काळामध्ये कर्नाटकामध्ये स्थापन झाली. याच पार्श्वभूमीवर पुढे क्वीन व्हिक्टोरिया रौप्यमहोत्सवी ग्रंथालये स्थापन करण्यात आली. यांमध्ये१८६८ बागलकोट, १८८१ श्रीहट्टी, १८८२ नवलगुंद आणि १८९० बिजापूर येथे ग्रंथालयांची एक साखळीच निर्माण होत गेली. या ग्रंथालयांच्या स्थापनेमागे राजकीय जागृतीचे कारणही तितकेच महत्वाचे होते. या राज्यातील बिजापूर जिल्ह्यामध्ये ग्रंथालय चळवळ मोठ्या प्रमाणात गतिमान होत असताना सात ग्रंथालये तेथे अल्पावधीत स्थापन झाली. यापैकी बागलकोट, बागेवाडी, कडलगी, विजापूर येथील ग्रंथालये ही अंशत: नगर परिषदेच्या अनुदानातून चालविली जात असत. याच दरम्यान उत्तर कॅनरा विभागामध्ये सार्वजनिक ग्रंथालय चळवळ ही अत्यंत संथगतीने सुरु होती. १८८० पर्यंत फक्त चारच ग्रंथालये स्थापन करण्यात आली होती. यामध्ये कारवार, कुमठा, हरीयल, सिरशी यांचा समावेश होता.

१८६४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या कारवार सार्वजनिक ग्रंथालय व वस्तुसंग्रहालयाचे १९४८ मध्ये जिल्हा ग्रंथालयामध्ये परिवर्तन करण्यात आले. येथील ग्रंथालय चळवळीस चालना देण्याचा प्रयत्न कवी शांताकवी उर्फ बालाचार सक्री यांच्या प्रेरणेतून होऊन अनेक ठिकाणी ग्रंथालये स्थापन करण्यात आली. जयरामाचार्य कुप्पल यांनी किर्तनातून लोक जागृती करुन ग्रंथालय स्थापनेस प्रोत्साहन दिले. दिवाण पी. पी. माधवराव यांनी देखील

कर्नाटकमध्ये राजकीय व्यासपीठावरून सार्वजनिक ग्रंथालयाच्या चालनेस प्रोत्साहन दिले. कुर्ग परिसरामध्ये मेराक्का बुक क्लबच्या माध्यमातून ग्रंथालयाची स्थापना करण्यात आलेली होती. नंतर हे ग्रंथालय फोर्ड क्लब मेराक्का यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले. तसेच याच परिसरात १९२६ मध्ये सामाजिक कार्यकर्ते श्री. बी. आए. गेनापती यांच्या प्रेरणेतून व त्यांच्या मित्र परिवाराद्वारे विराजपेठ येथे गणपती सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करण्यात आले होते. कर्नाटक राज्यात पूर्वी असलेल्या हैद्राबाद व मद्रास परिसरातही काही ग्रंथालये त्या काळात स्थापन करण्यात आलेली होती. कर्नाटक राज्याची इतर राज्यांशी तुलना करता येथील ग्रंथालयांची वाटचाल संथ गतीनेच चाललेली होती. आधुनिक काळामध्ये ग्रंथालय संघाच्या माध्यमातून येथे ग्रंथालय स्थापन करणाऱ्यास चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला होता. संघाने आपले मुखपत्र १८९७ मध्ये वाघभूषण या नावाने सुरु केलेले होते. या मुखपत्रात ग्रंथालये स्थापनेबाबात आवाहन करण्यात आले होते.

येथील ग्रंथालय चळवळीची पूर्वपिठिका पाहता राष्ट्रीय मनोवृत्तीचे नेते श्री. अरुल, वेंकटराव यांनी सार्वजनिक ग्रंथालयाच्या व्यासपीठावरुन राजकीय विचार जनसमुदायावर बिंबवण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करताना त्यांनी ग्रंथालयांच्या विकासासाठी एक योजनाबध्द आराखडा तयार केला. या आराखड्यानुसार धारवाड मध्ये कन्नड भाषेतील ग्रंथ कर्नाटक विद्यावर्धन संघ ग्रंथालयाद्वारे संकलित करण्यात आले. के. एल. ई. सोसायटीद्वारे वीर शैव आणि संबंधित विषयावर ग्रंथ संग्रहीत करण्यात आले. संस्कृत ग्रंथ हे पाठशाळातून व सामाजिक व राजकीय ग्रंथ भारत वाचनालय येथे संग्रहित करण्याचा प्रयत्न श्री. अरूल यांनी सन १८३३ कालखंडात स्वत: सुरु केला होता. १९१४ कालखंडामध्ये कर्नाटक ऐतिहासिक संशोधन संस्थेची स्थापना धारवाड येथे करण्यात येऊन या संस्थेच्या उद्दिष्टांनुसार कर्नाटकातील भूतकाळातील वैभवास पुनश्च: चालना देण्याच्या विचारातून त्यांनी सार्वजनिक ग्रंथालय स्थापनेस चालना दिली. याच प्रेरणेतून पुढे बेंगलोर सार्वजनिक ग्रंथालय, म्हैसूर सार्वजनिक ग्रंथालय यांचीही स्थापना करण्यात आली. तसेच ग्रामीण परिसरातही ग्रंथालय स्थापनेस चालना देण्यात आली.

१९२४ च्या काळात काँग्रेस अधिवेशन महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली बेळगाव येथे आयोजित करण्यात आले होते. याच अनुषंगाने श्री. सी. आर. दास यांच्या अध्यक्षतेखाली २६ डिसेंबर १९२४ रोजी अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात देशबंधु दास यांनी असे ही व्यक्तव्य केले की, 'राष्ट्राची एकता टिकविण्यामध्ये ग्रंथालयांनी महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.' पुढे १९२७–२८ 'कन्नडीका कुटा७ धारवाड येथे अस्तित्वात येऊन त्याचे सचिव श्री. हसुर यांनी परीश्रमपुर्वक कर्नाटकातील सार्वजनिक ग्रंथालयांची निर्देशिका तयार केली.


पुढे १९२९ मध्ये धारवाड येथे संतेशा वाचनलयामध्ये पहिली अखिल मुंबई–कर्नाटक ग्रंथालय परिषद संपन्न झाली. या परिषदेचे अध्यक्ष स्थान व्यंकटनारायण शास्त्री यांनी भूषविलेले होते. ते आंध्र ग्रंथालय संघाचे अध्यक्ष होते. या प्रसंगी नियतकालिके व वृत्तपत्रे यांचे प्रदर्शन भरविण्यात आलेले होते. ही सर्व प्रकाशने कर्नाटकातीलच होती. या प्रेरणेतूनच पुढे कर्नाटक ग्रंथालय संघ अस्तित्वात आला. तत्कालीन सर्वेक्षणातून असे लक्षात आले होते की, मुंबई – कर्नाटक परीसरात जवळ जवळ ४०० ग्रंथालये अस्तित्वात होती. पुढे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात येथील ग्रंथालय चळवळीस ग्रहण लागले. दरम्यान १९३९ च्या काळात ग्रंथालय विकासाकरिता फैजी समितीची स्थापना करण्यात आलेली होती. या समितीच्या उद्दिष्टांतर्गत मुंबई येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, विभागीय ग्रंथालये ही पुणे, धारवाड, अहमदाबाद येथे स्थापन करणे व छोट्या ग्रंथालयांचे जाळे निर्माण करणे अशा शिफारसी करण्यात आलेल्या होत्या. पण तत्कालीन काँग्रेस पक्षांनी १९४२ मधील क्वीट इंडिया चळवळीच्या काळात राजीनामे दिल्याने फैजी समितीच्या शिफारसींचा विचार झाला नाही.

स्वातंत्र्याच्या काळात येथे मध्यवर्ती ग्रंथालय आणि ३ विभागीय ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली. या नंतर धारवाड येथे प्रथमत: कर्नाटक विद्यावर्धन संघाच्या माध्यमातून कर्नाटक विभागीय ग्रंथालयाची स्थापना करण्यात येऊन हे ग्रंथालय १९४८ मध्ये लोकांच्यासाठी खुले करण्यात आले. विद्यमान स्थितीत शासनाच्या दुर्लक्षामुळे या ग्रंथालयाची

अवस्था समाधानकारक नाही. दरम्यानच्या काळात येथे १९४८ च्या काळात दुसरी अखिल मुंबई कर्नाटक परिषद न्यायमुर्ती एम्. सी.छागला यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या प्रसंगी कन्नड भाषेतील दुर्मिळ ग्रंथ, नियतकालिके व चित्रे यांचे प्रदर्शनही धारवाड येथे भरवण्यात आले होते. १९५२ आणि ५३ मध्ये कुंडभोल व कुमठा येथे अशाच प्रकारच्या परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. पाचवी परिषद पुनश्च धारवाड येथे १९५८ मध्ये संपन्न झाली. या परिषदेचे अध्यक्ष पद श्री. बी. एस. केशवन हे होते.

सन १९५६ मध्ये म्हैसूर राज्याची निर्मिती होऊन पुढे १ नोव्हेंबर १९७३ रोजी कर्नाटक राज्य असे नामकरण करण्यात आले. प्रत्यक्षात या दरम्यान या राज्यात म्हैसूर सार्वजनिक ग्रंथालय कायदा हा २२ एप्रिल १९६५ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रयत्नाने पारित करण्यात आला. याकरिता रंगनाथन यांनी ग्रंथालय संघटनासाठी विशेष प्रयत्न करुन या कायद्याची अम्मल बजावणी १ नोव्हेंबर १९६६ पासून अधिकाधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला. कर्नाटक राज्याची वैशिष्ट्ये म्हणजे, स्वतंत्र सार्वजनिक टेक्निकल ग्रंथालय पिनीया येथे सुरु आहे. येथील सार्वजनिक ग्रंथालय विभाग सुरु झाल्यावर राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची बंगलोर येथे १९६५ मध्ये स्थापना करण्यात आली. आज हे ग्रंथालय राज्यातील सर्वोच ग्रंथालयाची पतपेढी म्हणून कार्यरत झाले आहे. मध्यवर्ती ग्रंथालयाचा कारभार शेषाद्री मेमोरियल हॉलमधून पाहिला जात असून १९७२ मध्ये येथे सर्वसाधारणतः ७००० वाचक नोंदणीकृत वाचक असल्याचे व दर दिवशी १५०० वाचक ग्रंथालयाचा लाभ उठवत असल्याची नोंद आढळते. पुस्तक देवघेव ही साधारणतः दरदिवशी ७०० च्या जवळपास होत असे. लाखो ग्रंथांनी युक्त असलेले हे ग्रंथालय ग्रंथ हक्क ब्युरोची सुरुवात करण्यात अग्रेसर आहे. या राज्यात एकूण २७ जिल्हा ग्रंथालये, २६ मध्यवर्ती ग्रंथालये कार्यरत असून ही ग्रंथालये प्रामुख्याने बंगलोर, म्हैसूर, हुबळी, धारवाड, बेळगाव अशा शहरात कार्यरत आहेत. ग्रंथालय विभागास ग्रंथालय शिक्षण विभाग जोडलेला असून या विभागाद्वारे ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविला जातो.

या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली पुढील प्रमाणे आहे –




बंगलोर येथील राज्य मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये २०१५ च्या सांख्येकिय तपशिलानुसार येथील ग्रंथसंग्रह ३ लाख १४ हजार इतका असून येथे दरदिवशी ४०० ते ५०० वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात. स्वतंत्र बालविभाग कार्यरत असून या ग्रंथालयाचे कामकाज आज आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त स्वरुपात सुरु आहे. येथील सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या विचारात घेता राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (१), इंदिरा प्रियदर्शनी बाल ग्रंथालय (१) सार्वजनिक तांत्रिक ग्रंथालय (१) जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय (२७), शहर मध्यवर्ती ग्रंथालय (१९)फिरती ग्रंथालये (जिल्हा शहर विभाग) (४४०), सेवा केंद्रे जिल्हा व शहर (१०७), अभ्यासिका (३१), ग्रामपंचायत ग्रंथालय (३२५१), ग्रंथ जिल्हा केंद्र (६५), अनुदानित जिल्हा व शहर ग्रंथालय (२१) आज या ग्रंथालय विभागाच्या संरचने विषयी नव्याने विचार करण्यात येत असून या संरचने अंतर्गत या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाची विकासात्मक वाटचाल सुरु केल्यास या सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीतून प्रभावीपणे सेवा वाचकांना उपलब्ध होईल.

## २.८ गुजरात :

**गुजरातमधील सार्वजनिक ग्रंथालयाची पूर्वपिठीका :**

अकबराच्या कालखंडामध्ये या परिसरात मदरसा आणि ग्रंथालये स्थापन केल्याचे आढळतात. अकबर हा स्वत: एक विद्‌वान बादशहा होता तर विद्‌वजनाबद्दल त्याला आदर होता. त्याने स्वत:चे ग्रंथालय उभे केले होते. ही लायब्ररी म्हणजे एम्पोरीयल ग्रंथालय होय. ते सर्वदूर ज्ञान होते. त्याचबरोबर अकबराच्या कालखंडात अनेक विद्‌वानांकडे स्वत:चे ग्रंथसंग्रह होते. यापैकी एक संग्रह म्हणजे गुजरातचा तत्कालीन गव्हर्नर अब्दूल रहीम खान ई–खान याचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह होय. हा ग्रंथ संग्रह आमदार परिसरात होता. अत्यंत दर्जेदार असा हा ग्रंथसंग्रह अनेक इतिहासकारानी गौरविलेला होता. तसेच अनेक विद्‌वान या ग्रंथालयांना भेट देत असत. अब्दुल रद्दीम स्वत: विद्‌वान होता व अनेक भाषा त्यास ज्ञात होत्या. यामध्ये अरेबीक, पार्शियन, तुर्की, संस्कृत या भाषेचा समावेश होता. त्याने बाबरच्या दैनंदिनीचे तूर्कीमधून भाषांतर केले होते. त्याचे ग्रंथालय अत्यंतपणे सौरचित केले होते. त्या त्या क्षेत्रातील तज्ञांची नेमणूक करुन या संग्रहातील ग्रंथ व्यवस्थित करुन संरक्षण करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविण्यात आली होती. या सेवकामध्ये साधारणत: किताबदार (लेखनिक), चित्रकार, बाईंडर यांचा समावेश असे. या ग्रंथालयातील एकूण कर्मचारी एकेकाळी ९५ इतके होते. शेख बरहमी एक ख्यातकीर्त कवी आणि त्याचा मुलगा शेख अब्दूल सलाम हे या ग्रंथालयाचे सलग ग्रंथपाल होते. पुढील काळात ख्वाजा हबीबल्लाह हरवी हा जहांगीरच्या काळात या ग्रंथालयाचा ग्रंथपाल होता. ग्रंथालयातील उच्चपद नाझिम हे होते व एकेकाळी हे पद तूर्कस्थानमधील अत्यंत विद्‌वान साहिद मिर बागी महावारा हबरी यांनी भूषविलेले होते. अत्यंत दर्जेदार चित्रकार, भाषांतारकार व बूकबायंडर यानीही या ग्रंथालयामध्ये काम केले होते. मोहम्मद हमिन खुशाहीन हा एक त्या काळातील सुप्रसिध्द बायंडर म्हणून ओळखला जात असे. त्याने दीर्घकाळ मशरतेच्या ग्रंथालयात काम केले होते. त्या काळात त्याला दरमहा ४००/– इतका पगार मिळे. याच खुशारीनने अब्री कागदाचा शोध लावला होता. यासाठी त्याला सन्मानीत करण्यात आले होते. तसेच येथील मुल्ला मोहम्मद सेन उत्तम चित्रकार व बायंडर होता त्याने या ग्रंथालयात ३५ वर्षे काम केले होते.

ग्रंथालयातील एक विश्वासू आणि जाणकार व्यक्ती अशी त्यांची ओळख होती. अशा प्रकारचे अनेक कुशल सेवक या ग्रंथालयात काम करत होते व त्यांना दूरदूरच्या परिसरातून बोलविण्यात आले होते. या ग्रंथालयामध्ये लेखकाने स्वत: लिहीलेली हस्तलिखित पुस्तके संग्रहीत करण्यात आली होती. अशा पुस्तकामध्ये बादशहा जहांगीर शहाजान यांच्या हाताचा स्पर्श झालेली व त्यांची स्वाक्षरी असलेली पुस्तके या संग्रहात होती. या पुस्तकाच्यावर सुवर्ण शीर्षक रेखाटलेले आहे, पृष्ठाना मुलांमा दिलेला असून व आतील भागात सोन्याच्या पावडरचा शिडकाव केलेला आहे. कुराणाचीही प्रत १९१९ मध्ये रॉयल एशियाटीक सोसायटी कलकत्ता येथे दाखल झाली व आजही ती तेथे जतन करुन ठेवण्यात आली आहे.

सन १९६० मध्ये मुंबई व गुजराथ अशा द्वैभाषिक राज्याची निर्मिती झाली. यामध्ये गुजराती व मराठी भाषिकांचा समावेश होता. तसेच बडोदा संस्थान व मुंबई राज्यातील काही जिल्ह्यांचा समावेश होता. बडोदा राज्यामध्ये तत्कलीन नरेश महाराज सयाजीराव गायकवाड यांनी खऱ्या अर्थाने भारतातील व स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रंथालय चळवळीचा इतिहास रचला यामुळेच येथील प्राथमिक ग्रंथालय चळवळीचा आढावा घेताना ऐतिहासिक विभागांचा स्वतंत्रपणे विचार करणे क्रमप्राप्त ठरते. यामध्ये १) मुंबई इलाक्यातील भाग २) सौराष्ट्र विभाग ३) बडोदा परिसर ४) कच्छ व इतर संलग्नीत भाग.

**१) मुंबई इलाका :**

या इलाक्यात १८०४ साली ग्रंथालय चळवळीचा पाया रचला गेला. मुद्रण कलेचा हा आद्यकाल असल्याने येथे मुद्रण कलेने आपले जाळे पसरले आणि त्यामुळे येथे विविध पुस्तके प्रकाशित होऊ लागली. यामध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांचे योगदान मोठे व मोलाचे आहे. पुस्तक प्रकाशनास व आपल्या धार्मिक व ऐतिहासिक परंपरा जोपासणाऱ्या ग्रंथाच्या निर्मितीकरता महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या सहकार्यातून; उपनिषद भाग – २ या ग्रंथाचे कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी भाषांतर केलेले आहे. १८९९ मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत श्री. केळूसकर यांनी पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे. 'श्रीमंत महाराज सरकारनी अनेक अज्ञात शस्त्र अश्वैपती आदी करून प्राचीन महाशय राजर्षीच्या ठायी आढळणाऱ्या स्वजिज्ञासा वृत्तीचा अवलंब करून आपल्या प्राकृत

प्रजाजनास पुरातन महर्षींचे धर्मसंबंधी व तात्विक विचार सुगम करून देण्याचा परम स्तुत्य हेतू मनात आणून प्राकृत भाषांतरकारास महाराष्ट्रजनांची अल्पमात्र सेवा करण्याचा हा तृतीय मौका आणला. त्याबद्दल तो महाराज सरकाराचे अत्यंत कृतज्ञतापूर्वक अंतःकरणपूर्वक आभार मानतो. *(ता. ५ माहे डिसेंबर स. १८९९ इ. (भाषांतरकार))*

मुद्रण कलेच्या विकासाबरोबर पुस्तकांच्या प्रकाशनास गती आल्याने; याची ब्रिटिश शासनाने गंभीर दखल घेतली व अशा पुस्तकाची सूची सरकारला उपलब्ध व्हावी याकरीता साहित्या प्रोत्साहन योजना जाहिर करून त्याकरीता अनुदानाची सोय केली. यामुळे शासनास प्रकाशित पुस्तकाची आपोआप सूची प्राप्त होऊ लागली. या योजनेअंतर्गत पुढे प्रकाशित पुस्तकाची प्रत शासनाकडे जमा करण्याविषयी आदेश काढण्यात आला होता. याच पार्श्वभूमीवर पुढे प्रेस ऑफ रजिस्ट्रेशन ॲक्ट अस्तित्वात आला. याच काळात इंग्रजी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नातून नेटिण्ट जनरल लायब्ररीचे अभियान सुरु झाले. तसेच वर्गणी ग्रंथालयाची ही भारतभर निर्मिती झाली. शिक्षण प्रसाराबरोबर येथील लोकांच्यामध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व्हावा व येथे इंग्रजी भाषेचा फैलाव व्हावा हा त्या पाठीमागे हेतू होता असे त्याकाळात मानले जाई हे जरी खरे असले तरी इंग्रजी राजवटीने ग्रंथालय प्रसारास चालना मिळाली हे नाकारता येणारे नाही. याच पार्श्वभूमीवर स्थापन झालेली काही ग्रंथालये म्हणजे १) नेटीव्ह व्हर्नाक्युलर संस्था ग्रंथालय, अहमदाबाद (१८४७), २) नेटीव्ह ग्रंथालय, अहमदाबाद (१८४९), ३) ॲड्रयूज लायब्ररी, सूरत (१८५०)

या ग्रंथालयामध्ये बहुतांशी इंग्रज ग्रंथ घेतले जात. पुढे १८५७ मध्ये अहमदाबाद येथील ग्रंथालय उभारणीसाठी श्रीम. हिमाबाई यांनी मोठी देणगी दिल्याने या ग्रंथालयाचे नामकरण हिमाबाई सार्वजनिक पुस्तकालय असे करण्यात आले. गुजरातमधील सर्वात महत्त्वाचे व जुने म्हणून हे ग्रंथालय ओळखले जाते. ॲड्रयूज ग्रंथालय उभारणीमध्ये बबेजानी कोतवाल या पार्सी व्यक्तीने उपलब्ध करून दिलेल्या ग्रंथसंग्रहाचा मोठा वाटा आहे. या ग्रंथालयाचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीय डब्ल्यू. सी. ॲड्रयूज यांच्या हस्ते झाले. त्यांचेच नाव या ग्रंथालयास देण्यास आले. या ग्रंथालयाच्या वाटचालीतील दखल घेण्यासारखी एक घटना म्हणजे, या ग्रंथालयाने स्वतःच्या संग्रहातील २००० ग्रंथ अधिक किंमतीस विकून त्याऐवजी

नवीन ग्रंथ खरेदी केले. ही घटना १८६६ मधील. आज हे ग्रंथालय नवीनचंद्र भवनमध्ये स्थलांतरीत झालेले असून १७ व्या व १८व्या शतकातील अनेक इंग्रजी ग्रंथ येथे संग्रहीत केलेले आहेत. आज हे ग्रंथालय गुजरात विद्यासभा या नावाने ओळखले जाते. या ठिकाणी प्राचीन गुजराती वाङ्मयावरील विपुल ग्रंथसंग्रह असून त्यांचा गुजराती भाषा व साहित्य संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. येथील १९व्या शतकातील काही महत्त्वपूर्ण ग्रंथालय म्हणजे,

१) राजचंद्र दिपचंद ग्रंथालय, भडोच (१८५५) २) स्टुअर्ट ग्रंथालय, गोहरा (१८५६) ३) अप्पाराव भोलानाथ ग्रंथालय, अहमदाबाद (१८७०) ४) जे. एन. पेटीट ग्रंथालय, अंकलेश्वर (१८८६) ५) लक्ष्मी ग्रंथालय – नडियाद (१८९२), ६) व्हिक्टोरिया डायमंड ज्युबिली ग्रंथालय, जलालपूर (१८९७)त्या काळात ही ग्रंथालये वर्गणी ग्रंथालये म्हणून ओळखली जात. याचबरोबर मुंबई सरकार स्थानिक पातळीवरही नगरपंचायतीकडून आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन नेत असे. १९३९ मध्ये ए. ए. पेनी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीकडे भारतातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या पाहणीची जबाबदारी सोपवली होती. या समितीच्या अहवालामुळे पुढे सार्वत्रिक ग्रंथालयांना अनुदान मिळणे शक्य झाले. याच समितीच्या प्रमुख शिफारशीमधील महत्त्वपूर्ण शिफारस म्हणजे मुंबई येथील एशिएटीक सोसायटी ग्रंथालय हे होय. हे तत्कालिक मुंबई राज्याचे मध्यवर्ती ग्रंथालय करण्यात यावे व तसेच म्युनिसिपल लायब्ररी – अहमदाबाद सिटी जनरल लायब्ररी, पुणे व कर्नाटक विद्यावर्धक संघ ग्रंथशाळा, धारवाड ही विभागीय ग्रंथालये म्हणून ओळखली जावीत या समितीने केंद्रीय ग्रंथालय, नगर ग्रंथालय, ग्राम ग्रंथालय याकरिता वार्षिक अनुदानाचे स्वरुप ठरविले होते. तसेच ग्रामग्रंथालयाकरिता लोकसंख्येचा निकषही सुचविण्यात आला होता. या समितीच्या शिफारशी स्वातंत्र्यानंतर स्वीकारण्यात आल्या. १९६० मध्ये गुजरात राज्य स्थापन झाल्यावर सरकारी अनुदानाचे स्वरूप नव्याने निर्धारित करण्यात आले. अनुदानास पात्र ग्रंथालय ही केंद्रीय ग्रंथालय (०१), विभागीय ग्रंथालय (०१), जिल्हा ग्रंथालय (९५), नगर ग्रंथालये (४८), बाल ग्रंथालय (१८), ग्राम ग्रंथालय (२९९५) अशी होती. अशा ३१६६ ग्रंथालयांना एकूण ४,०८,९८२ रुपये इतके अनुदान दिले जात असे.

**१) सौराष्ट्र विभाग :**

सौराष्ट्र हे ऐतिहासिक संस्थान असल्याने तेथील राजानी सार्वजनिक ग्रंथालयाची सुरुवात केलेली होती. यापैकी काही महत्त्वपूर्ण ग्रंथालये म्हणजे लंग ग्रंथालय – राजकोट (१८५६), राजकीय ग्रंथालय –जुनागढ (१८५७), लेखाजी राजनगर ग्रंथालय – राजकोट (१८६८), महुबा ग्रंथालय–महुबा (१८७७), बार्टन ग्रंथालय–भावनगर (१८८२), भागवत सिंहजी ग्रंथालय–गोंडल (१८८४), व्हिक्टोरिया ज्युबली ग्रंथालय – बाकनेर (१८९१), लखतसिंहजी ग्रंथालय–बोसद (१८९२)

१९ व्या शतकाच्या काळात तेथील राजानी ग्रंथालय प्रसाराकरिता रु. १,००,०००/– चा निधी उपलब्ध करून दिला होता. या निधीतून ग्रंथालयांना वार्षिक स्वरुपात आर्थिक सहाय्य करून दिले जात असे. याचबरोबर येथील दानशूर व्यक्ती मेघराज पेढराज यांनी ग्रामीण ग्रंथालयाच्या निर्मितीकरिता रुपये ४,००,०००/– इतका निधी उपलब्ध करून दिला होता. याद्वारे प्रत्येक ग्रंथालयास ग्रंथालयसंग्रहाबरोबर ५००/– रुपये किंमतीचे कपाट तेथील पंचायतीकडे दिले जाई. तसेच पुढील काळात आर्थिक सहकार्य पंचायतींनी करावे असे ठरविण्यात आले होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत या विभागाने ग्रंथालय चळवळीसाठी विशेष लक्ष पुरवून भावनगर, जामनगर, जुनागड, राजकोट, सुरेंद्र नगर या जिल्ह्यातून ग्रंथालय इमारती उभारण्यासाठी १,५०,०००/– रुपये निधी उपलब्ध करण्यात आला होता. ग्रंथ खरेदी, फर्निचरसाठी इतक्याच निधीची उपलब्धता करण्यात आली होती. या चळवळीअंतर्गत ग्रामीण परिसरातील ग्रंथालयांना ग्रंथ उपलब्ध करून देण्यासाठी एक जीप पुरविण्यात आली होती. याशिवाय परिसरातील ग्रंथालयांना पुस्तके उपलब्ध करून दिली जात. स्वतंत्र गुजरात राज्य अस्तित्वात आल्यावर तेथे १५०० शासकीय ग्रंथालये होती व या ग्रंथालयाकरिता ३,००,०००/– हून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात येत असे.

**२) बडोदा परिसर :**

या परिसरातील ग्रंथालयाच्या विकासाचे सारे श्रेय सयाजीराव महाराजांना देणे उचित ठरते. आपल्या अमेरिका व युरोप भेटीत त्यांनी तेथील ग्रंथालयांचे अवलोकन करून आपल्या संस्थानात येथील परिस्थितीस सहाय्यभूत ठरेल अशी सार्वजनिक ग्रंथालय

चळवळ उभी केली होती. संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व आवश्यक करून या शिक्षणाच्या विकासासाठी व दीर्घकालीन उपाययोजना म्हणून सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची जोड दिली होती. प्रौढ साक्षरता अभियान व सार्वजनिक ग्रंथालय चळवळ यांचा सहसंबंध निर्माण करून तेथे ग्रंथालय प्रसाराचे एक नवे व अनुकरणीय दालन महाराजांनी उघडले होते. यासाठी अमेरिकेतील श्री. बोर्डनसारख्या ग्रंथालय तज्ज्ञास बडोद्यात बोलवून व पुढे श्री. वाकनीस यांना प्रशिक्षणासाठी इंग्लंडला पाठवून आणि श्री. मोतीभाई आमीनी यांची नेमणूक करुन हे अभियान बळकट केले होते. तसेच ग्रंथालय क्षेत्रातील व्यक्तींकरिता प्रशिक्षणाची सोय करून ग्रंथपालन शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली होती. १९१२ ते १९२० या कालखंडात लायब्ररी मिसलिनी नावाचे मराठी, गुजराती, इंग्रजी भाषेतील त्रैमासिक चालवून ग्रंथप्रसारास चालना दिली होती. हे नियतकालिक पुढील काळात जनार्दन सखाराम कुडाळकर चालवित होते. तसेच श्री. दत्त व श्रीमती टिळक यांचे बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळीच्या विकासातील योगदान महत्त्वपूर्ण असेच होते. या सगळ्यांच्यामागे मूलभूत प्रेरणा स्त्रोत म्हणून खंबीरपणे उभे होते ते महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) हे होय. महाराजांनी केवळ ग्रंथालय चळवळीच्या प्रसाराकरिता प्रयत्न केले नव्हते तर इतर अनेक सुधारणाबरोबरच ग्रंथालय चळवळीस बळकटी देण्याकरिता लेखकास चालना देणे. ग्रंथप्रदर्शनाकरीता आर्थिक सहाय्य पुरविणे याकरिता त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. ते खऱ्या अर्थाने ग्रंथ, ग्रंथालये आणि ग्रंथनिर्माते (प्रकाशक, लेखक) यांचे पोशिंदे होते. त्यांच्या या कार्याचा स्वतंत्रपणी आढावा घेण्यात आला आहे. या संस्थानातील ग्रंथालय चळवळ ही १९२५ मध्ये ग्रंथालय संघाच्या माध्यमातून राबविण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरु झाला. 'पुस्तकालये' या नावाचे मुखपत्रही ही या सातत्यपूर्ण ५० वर्षाहून अधिक काळ सुरु ठेवले. आजही याचे एक हजाराहून अधिक सभासद आहेत. या विभागातील जुनी ग्रंथालये १९ असून ही साधारणतः १८७१ ते १८९८ या काळात स्थापन झालेली आहेत.

**३) कच्छ व इतर संलग्नित विभाग :**

ग्रंथालय चळवळीच्या दृष्टीने हा काहीसा मागासलेला भाग म्हणून ओळखला जात असे. या परिसरात ग्रंथालय चळवळ फारशी बळकटी धरु शकलेली नसली तरीदेखील

१९व्या शतकात काही सार्वजनिक ग्रंथालये स्थापन झाल्याची नोंद आढळते. ही ग्रंथालये म्हणजे – १) व्ही. जे. ग्रंथालय –पालनपूर (१८७२) २) श्री. चंद्रासहानी ग्रंथालय– छोटा उदयपूर (१८७६) ३) श्री रमण पुस्तकालय – प्रान्विब (१८८१) ४) महाराज श्री विजयरावजी जनग्रंथालय – भूज (१८८३) ५) महाराणा नरेंद्रदेव ग्रंथालय – धरमपूर (१८८६), ६) बी. जे. ग्रंथालय – राजपिपला (१८८७)

गुजरात राज्याच्या १ मे १९६० रोजीच्या स्वतंत्र निर्मितीनंतर संस्थान काळातील बडोदा संस्थानातील ८ जिल्ह्याकरिता वेगवेगळे अनुदान दिले जात असल्यामुळे या सर्वांचा एकत्रित स्वरूपात विचार करताना ग्रंथालय व्यवस्थापनाकरिता व अनुदानाकरिता एक स्वतंत्र नियमावली केली गेली. अनेक बदलानंतर या नियमावलीनुसार प्रत्यक्षात अंमल बजावणी १९६४ पासून करण्यात आली. विविध प्रकारच्या ग्रंथालयांना अनुदान देण्यासाठी लोकसंख्येचे निकष लावण्यात आले होते. स्वतंत्र महिला ग्रंथालय व बाल ग्रंथालय याचा समावेश करण्यात आला होता. तसेच या ग्रंथालयांनी सेवकाकरिता वेतन श्रेणीही निश्चित करण्यात आली होती. ग्रंथालय प्रबंधकाची ग्रंखालयांची देखभाल करण्याकरीता नियुक्ती करण्यात आली होती.

**१९ व्या शतकातील बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळीचे स्वरुप:**

एक गुजरात राज्यातील ग्रंथालयीन चळवळ एकमेवाव्दितीय स्वरुपाची सार्वजनिक ग्रंथालय चळवळ म्हणून ओळखली जाते ही एक विकसित प्रणाली आहे. गुजरात राज्याची निर्मिती ही छोट्या छोट्या विभागातून संस्थानाचे एकत्रीकरण करुन करण्यात आलेली आहे. यामध्ये कच्छ, सौराष्ट्र व मुंबई या विभागाचा समावेश असून याचा मूलभूत गाभा बडोदा संस्थानातील आहे. या सर्व विभागाना र्सावजनिक बडोदा संस्थानात असताना तेथील ग्रंथालय चळवळीला सामोरे जावे लागले आहे. गुजरात मधील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या पार्श्वभूमीवर तेथे १९ व्या शतकात काही महत्वपूर्ण सार्वजनिक ग्रंथालये स्थापन झाली. यामध्ये (१) अॅन्ड्रयू ग्रंथालय, सुरत (१९५०) (२) रामचंद्र दिपचंद्र ग्रंथालय भडोच (१८५५) (३) लॉब ग्रंथालय, राजकोट (१८५६) ४) बर्टन ग्रंथालय, भावनगर (१८८२) ५) दाहिलक्ष्मी ग्रंथालय नंदीयाड (१८९२) त्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

२० व्या शतकाच्या सुरवातीस भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या वाटचालीची नोंद घेऊन गुजरात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीकडे पहावे लागेल. येथील पहिली महत्त्वपूर्ण बाब म्हणजे या संस्थानातील प्राथमिक शिक्षक मोतीलाल आमिन यांनी लोकांकरीता मोफत ग्रंथालय सेवा सुरू केली ही घटना होय. त्यांनी मित्रमंडळ ग्रंथालय या नावाने सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्याच्या दृष्टीने शिक्षकांच्या सहकार्याने १९०६ मध्ये हे अभियान सुरु केले. या उपक्रमाच्या द्वारे १५० ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली. दरम्यानच्या काळात शासकीय योजनेअंतर्गत फिरत्या ग्रंथालयाची सुविधा १९०७ पासून अधिक प्रभावी स्वरुपात सुरु करण्यात आली. यातूनच मित्रमंडळ ग्रंथालये व फिरती ग्रंथालये यांनी आपल्या उपक्रमात चालना दिली असताना या अभियानास परीस स्पर्श झाला तो बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांचा. खऱ्या अर्थाने भारतात ग्रंथालय चळवळीच्या अभियानाचे श्रेय या महाराजाना जाते. भारतातील हे पहिले राजे ज्यानी १९०७ पासून आपल्या संस्थानात सक्तीचे शिक्षण सुरु केले. आपल्या परदेशी दौऱ्यात ते तेथील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीमुळे अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यानी तात्काळ निर्णय घेतला की आपल्या प्रजेस अशी सुविधा उपलब्ध करुन द्यावी. १९१० मध्ये महाराजानी आपल्या राज्यात अमेरीकेतील श्री. विल्यम बोर्डन यांना आंमत्रित करुन सार्वजनिक ग्रंथालय चळवळ विकसित करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. १९१०–१३ च्या काळात श्री. बोर्डन यांनी योजनापूर्वक सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे उभे करताना राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, चार जिल्हा ग्रंथालये, ४५ शहर ग्रंथालये व १००० हून अधिक ग्रामीण ग्रंथालये याची मुहूर्तमेढ रोवली. अशा प्रकार खऱ्या अर्थाने ग्रंथालय चळवळ रुजविणारे बोर्डन हे पहिले राज्यस्तरीय ग्रंथालय संचालक होत. पुढे गुजरात परिसरात ग्रंथालयाचे जाळे विकसित होऊन बोर्डन यांच्या पश्चात येथे ग्रंथालय चळवळीची जबाबदारी श्री. जे. एस. कुडाळकर, श्री. न्यूटन मोहन दत व श्री. टी. डी. वाकनीस यांनी सांभळली. कुडाळकर व वाकनीस यांनी १९१४ –१५ च्या काळात येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सर्वार्थाने विकसित केली. पुढील काळात १९२१ मध्ये श्री. दत राज्याच्या ग्रंथालय विभागाचे अधिक्षक झाले. आपल्या १९२१–३४ च्या काळात त्यांनी ग्रंथालय चळवळीला एक दिशा देत असताना १९२४ मध्ये त्यांनी ग्रंथालय सहकारी

सोसायटीची बडोदा येथे स्थापना केली. ही संस्था सध्या पुस्तकालय सहाय्यक सहकारी मंहळ मर्यादित या नावाने ओळखली जात आहे. या संस्थेच्या माध्यमातून ग्रंथालयाचा कारभार आर्थिकदृष्ट्या परिणामकारक व प्रभावी होणे शक्य झाले. याच दरम्यान पहिली ग्रंथालय परिषद १९२५ मध्ये गंडेरी सार्वजनिक ग्रंथालयात संपन्न झाली. १९३२ मध्ये बडोदा शासनाने ग्रामीण ग्रंथालय विकास चळवळ राबविण्यासाठी ५ एप्रिल १९३२ रोजी आदेश निर्गमित केला. पुढील दोन वर्षात १०० सार्वजनिक ग्रंथालये वेगवेगळ्या खेड्यात स्थापन करण्यात आली. दत्त यांच्या कालखंडात मध्यवर्ती ग्रंथालय विभागाने बडोद्यातच नव्हे तर भारतातच आपली एक प्रभावी परंपरा निर्माण करुन भारतातील ग्रंथालय चळवळीमध्ये येथील अलौकिक कार्याचा ठसा उमटवला. १९३४ मध्ये श्री. वाकनीस हे अधिक्षक म्हणून काम पाहू लागले. त्याच्या कालखंडात सार्वजनिक ग्रंथालयाचे अभियान अधिक सक्षम होवून त्या काळात १११६ ग्रामीण ग्रंथालये १०८० ग्रामीण शाळा मध्ये सार्वजनिक ग्रंथालये स्थापन केली होती. १९३६ अखेर या ठिकाणी ग्रंथालयाचे जाळे इतक्या प्रभावीपणे राबविण्यात आले होती की, तत्कालीन लोकसंख्येच्या ८४% लोकाना ग्रंथालयसेवा उपलब्ध होत असत. बडोदा संस्थानातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ अत्युच्च शिखरावर असताना या चळवळीचे प्रणेते महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे ६ फेब्रुवारी १९३९ रोजी निधन झाले. आणि या चळवळीला उतरती कळा लागली. स्वातंत्र्योत्तर काळात बडोदा संस्थान व्दैभाविक राज्यात मुंबई इलाक्यात १९४९ मध्ये समाविष्ट झाल्याने सार्वजनिक ग्रंथालय चळवळ ही अर्ध्यावाटेवरच शिथील झाली. एकूणच भारतीय ग्रंथालय चळवळीचा विचार करता या चळवळीने आपल्या उज्ज्वल वाटचालीचा प्रभाव भारतातील इतर राज्यावरही पसरविलेला होता आणि हेच खऱ्या अर्थाने बडोदा ग्रंथालय चळवळीचे यश म्हणावे लागेल.

बडोदा परिसराबरोबरच लगतच्या परिसरामध्ये विशेषत्वाने मुंबई, भावनगर, या परिसरात देखील ग्रंथालय चळवळ हळूहळू विकसित झाली. या चळवळीस खऱ्या अर्थाने बडोदा येथील ग्रंथालय चलवळीचे अधिष्ठान प्राप्त झाले नव्हते. या काळात मुंबई परिसरात सोशलसेवा विभागाच्या वतीने मुंबई परिसरात देखील काही मोफत शाखा उघडण्यात आल्या. या केंद्राच्या माध्यमातून लोकांच्यामध्ये वाचन अभिरुची विकसित करण्याचा

प्रयत्न केला. पुढे ही केंद्रे शिक्षणाच्या उप्रकमाशी जोडली गेली. त्या काळातील मोफत ग्रंथालयाना फिरती ग्रंथालये संबोधली जात असत.पण प्रत्यक्षात त्याचे स्वरुप फिरत्या ग्रंथालयासारखे नव्हते ही केवळ केंद्रे होती. अशी केंद्रे मुंबई शहरात उभी करुन सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून चालविली जात. यामध्ये एका पेटीत ५० पुस्तके ठेवलेली असत. यापैकी २५ पुस्तके साहित्य, १० पुस्तके इतिहास व चरित्रे, १० पुस्तके निबंध, प्रवासवर्णन, धर्म विषयक असत. संबंधीत सामाजिक कार्यकर्ता ग्रंथपाल म्हणून काम पाहत असे. त्याच्या माध्यमातून या पुस्तकाचे वितरण केले जाई या संस्थाद्वारे साप्ताहिक अहवाल मध्यवर्ती ग्रंथालयाकडे सादर केला जात असे. एक पेटी एका केंद्रावर २ महिने ठेवली जात असे. दोन महिन्यांवर ती बदलली जात असे. अशा केंद्रावर तपासणी करण्यासाठी मानद सचिव नेमले जात. पुढे तत्कालीन मुंबई– गुजरात या राज्याचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांनी ग्रंथालय प्रणालीच्या अवलंबनाकरिता फैजी समिती१९३९ मध्ये स्थापना केली होती. या समितीच्या माध्यमातून राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व अहमदाबाद, पुणे व धारवाड येथे विभागीय ग्रंथालये स्थापन करण्याबाबतची शिफारस करण्यात आलेली होती. तसेच तालूका व पेठा ग्रंथालये, ग्रामीण ग्रंथालये अशी स्तरीय संरचना सुचविलेली होती.

१९३९ मध्ये हा अहवाल शासनाने प्रकाशीत केला. पण दुसऱ्या महायुध्दामुळे त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. पुढे स्वातंत्र्योतर कालखंडात याची अंमलबजावणी होऊन १९४७ –४८ मध्ये मध्यवर्ती ग्रंथालय१, विभागीय ग्रंथालय ३ स्थापन करण्यात आली आणि पुढे १९४८ – ४९ व १९४९–५० मध्ये दुसऱ्या व तिसऱ्या स्तरावरील शिफारशीची अम्मलबजावणी करण्यात आली आणि या माध्यमातून पुढील प्रमाणे ग्रंथालये स्थापन करण्यात आली.

| विभाग | जिल्हा ग्रंथालये | तालुका व पेठा ग्रंथालये |
|---|---|---|
| १) महाराष्ट्र | १३ | १०५ |
| २) गुजरात | १० | ६० |
| ३) कर्नाटक | ४ | ३४ |

तसेच या ग्रंथालयाना अनुदान सुरु करण्यात येऊन त्याचे स्वरुप मध्यवर्ती ग्रंथालये (३०,०००/–) विभागीय ग्रंथालये (१०००० ते १३०००/–, जिल्हा ग्रंथालये ४०००/), तालुका अथवा पेठा ग्रंथालय (४५०/–) याप्रमाणे वार्षिक अनुदानाची तरतूद करण्यात आली होती. याकरिता एक अट लागू करण्यात आली होती. या अटीनुसार शासनाच्या अनुदानाच्या रकमेइतकी रक्कम उभी करावी, तसेच सेवक संरचना, मध्यवर्ती व विभागीय ग्रंथालयाची निर्मिती इत्यादी विषयक सूचना ही या वेळी प्रस्तूत करण्यात आलेल्या होत्या.

यापूर्वीच्या काळात गुजरातमध्ये मित्रमंडळ ग्रंथालये स्थापन केलेली होती. या मोहीमेचे प्रणेते अमितभाई हे बडोदा शासकानडे काम करु लागल्यानंतर या योजनेचा कार्यभार श्री. इंदूलाल यांनी स्वीकारला. ही चळवळ पुढे होमरुल ग्रंथालय म्हणून ओळखली जाऊ लागली. मित्रमंडळाचे कामकाज १९०६, १९१० पर्यंत सुरु होते नंतर ही योजना बडोदा संस्थानाकडे सोपविण्यात आली. एकूणच बडोदा परिसरात सार्वजनिक ग्रंथालय विषयक जागृती निर्माण होत असताना येथील लोकांनी शासनाच्या सहकार्याची अपेक्षा न करता स्वत: देखील या चळवळीकरिता झोकून दिले होते. जिथून मदत प्राप्त होईल तेथून मदत स्विकारुन व काही योगदान देऊन ही ग्रंथालय चळवळ उभी राहिली. यासाठी घरोघरी फिरुन देणगी वा वर्गणी गोळा करणे, विवाहप्रसंगी इच्छूक स्वरुपात कर आकारणी करणे अशा सातत्यपर्वक प्रयत्नातन येथील ग्रंथालय चळवळ सुरु ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आलेला होता. भावनगर राज्यामध्ये तेथील राजे श्री. कृष्णकुमार सिंह बहादूर यांनी रुपये १,००,००० ठेवीतून प्राप्त होणाऱ्या वार्षिक ५०००/– रुपये व्याजातून ग्रंथालयाचे उपक्रम सुरु करण्याविषयी तरतूद केली. ही जबाबदारी एका लेखनिकाकडे सोपविली होती. यासाठी १) योजना तयार करुन या अंतर्गत अशा उपक्रमासाठी एक केंद्र स्थापन करणे २) राज्याकडून अनुदान प्राप्त होणाऱ्या ग्रंथालयाना नवीन तरतूदीनुसार अनुदानाचे वितरण करणे ३) एक छोटेखानी फिरते ग्रंथालय तयार करणे. या तीन मुद्द्याच्या आधारे फिरत्या ग्रंथालयाची स्थापना करुन या ग्रंथालयाचा प्रसार करण्यासाठी सुरवातीस शास्त्रीय पध्दतीचा वापर करुन लोकांच्यामध्ये याविषयी अधिक आवड निर्माण करणे. अशा प्रकारची ग्रंथालये निर्माण करण्याकरिता ५० स्वतंत्र कपाटे तयार करण्यात

आली. यापैकी ३५ खेड्यातून २० कपाटे वितरीत करण्यात आली. तसेच १४ खेड्याना प्रत्येकी २ पेट्या व एका खेड्यास ३ पेट्या वितरीत करण्यात आल्या. हे वितरण ३५ खेड्या पर्यंत पोहचविण्यात आले. १८३८ पुस्तकाचे वितरण २६८३ वाचकाना ३५ केंद्रावरुन करण्यात आले होते. यापैकी १९४१ पुरुष, ९५ स्त्रिया, ६४७ बालके अशी वाचकांची वर्गवारी होती. या सर्वांचा तपशील नोंदविण्यासाठी एक नोंदवही ठेवून त्यामध्ये किती वाचकाना किती पुस्तके दिली. यापैकी पुरुष, महिला व बालकांची संख्या किती? कुठली पुस्तके वितरीत केली. कोणत्या जातीतील लोक पुस्तकांचे वाचन करतात? अशा प्रकारचे सर्वांगीण सांख्यिकीय तपशील मिळवले जात. या सर्वेक्षणातून निदर्शनास आले की, ग्रामीण लोक धार्मिक पुस्तकाकडे अधिकाधिक आकर्षिले जातात. तसेच आणखी एक विशेष बाब या योजनेतून लक्षात आली ती म्हणजे शेतकरी वर्गातील (कुणबी लोकांनी) ३९१ वाचकानी या योजनेचा लाभ घेतला होता. निश्चित केलेल्या नियमानुसार सर्वच खेड्यातील लोकाना नियोजन पूर्वक १५०० पुस्तकांचा लाभ ५० पेट्यातील ग्रंथाव्दारे दिला जात असे. आणि हा लाभ ३५ खेड्यात पोहचविला जात असे. भावनगरमधील ही योजना बडोदा राज्यातील योजनेप्रमाणे होती. पण काही प्रमाणात स्थानिक परिस्थितीनुसार बदल करण्यात आले होते.या योजनेचा अधिकाअधीक प्रसार करण्यासाठी पुस्तकावर अधिकाधिक आकर्षक कलात्मक लेबल चिकटविले जाई. एकूणच भावनगर राज्यातील ग्रंथालय चळवळ ही कुतूहलाचा विषय ठरलेली होती. अशा प्रकारची चळवळ मुंबईमध्ये करण्याचा प्रयत्न केला होता. पण ती यशस्वी होऊ शकली नाही.पुढे भावनगर परिसरात भावनगरचे महाराज तक्तासिंग बहादूर यांच्या स्मरणार्थ लोक सहभागातून मध्यवर्ती स्वरुपात १९३५ मध्ये कार्यालये स्थापन रण्यात आली. या अगोदर महाराज तक्तासिंग यानी हे काठेवाडचे पोलीटिकल एजंट ८१०० एल. सी. बर्टन या मित्राच्या स्मरणार्थ १८९६ मध्ये भावनगर येथे 'बर्टन ग्रंथालयाची' स्थापना केली होती. भावनगर व्यतिरिक्त इतरही समाजाची काही ग्रंथालये या संस्थानात होती. यामध्ये जैन मंदीरातील जैन ग्रंथालये हे एक असून येथे दुर्मिळ हस्तलिखिताचा मोठा संग्रह होता. तसेच येथे दुर्मिळ वस्तूसंग्रहाचे वस्तूसंग्रहालय होते. या व्यतिरिक्त तेथे अनुदान प्राप्त करणारी ११ ग्रंथालये अस्तित्वात होती.

**गुजरात राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचा इतिहास :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये ग्रंथालयांची येथे वाढ ग्रंथालय कायदा अस्तित्वात नसतानाही पुर्वपिठिकेच्या पार्श्वभूमीवर उत्तम प्रकारे होत राहिली. १९६० च्या कालखंडात येथे ३४७६ ग्रंथालये होती. पुढील तीस वर्षांच्या कालखंडामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे निदर्शनास येते. दशक निहाय आढावा घेताना १९७० च्या कालखंडात येथे ४४६५ ग्रंथालये अस्तित्वात होती व या ग्रंथालयांवर होणारा एकूण खर्च १२ लाख ७९ हजार ९२५ रुपये इतका होता. पुढील दशकात म्हणजेच १९८०–८१ च्या कालखंडात ग्रंथालयांची संख्या ६१३३ इतकी झाली आणि या ग्रंथालयांवर रुपये ५३ लाख ८ हजार ५०० इतक्या रकमेचा विनियोग झाल्याचे लक्षात येते. यात पुढील दशकात दरवर्षी सातत्यपूर्वक ग्रंथालयांच्या देखभाली साठी एकूण खर्च रुपये २ कोटी १० लाख ७ हजार ४५० इतका झाल्याचे निदर्शनास येते. या ७२५० ग्रंथालयांची वर्गवारी करता यापैकी शासकीय ग्रंथालये (७३), शहर ग्रंथालये (३२), शहर शाखा ग्रंथालये (६८), शहर ब वर्ग ग्रंथालये (११८), शहर वर्ग २ ग्रंथालये (३०२), महिला ग्रंथालये (१०१), बालकांसाठी ग्रंथालये (९१) व ग्रामीण ग्रंथालये (६४५८) आणि अंधांच्या करीता ग्रंथालये (७) अशा प्रकारे असल्याचे निदर्शनास येते. येथील ग्रंथालय विकासाचे बोधवाक्य हे 'जेथे जेथे प्राथमिक शाळा, तेथे तेथे ग्रंथालय' हे होते. याच पार्श्वभूमीवर येथील ग्रंथालय चळवळीमध्ये सातत्यपूर्वक विकास झाल्याचे निदर्शनास येते. येथील अनुदान प्रक्रियेमध्ये सातत्यपूर्वक वाढ झाल्याचे निदर्शनास येते. १९६४ मध्ये अनुदानासाठी तयार करण्यात आलेले नियम हे पुढे १९७४ मध्ये सुधारण्यात आले. पुढे त्यामध्ये पुनश्च सुधारणा १९८९ मध्ये करण्यात आली.

या अनुदानामध्ये पुनश्च २००७–०८ मध्ये वाढ करण्यात आली असून तिचे स्वरुप –

| | |
|---|---|
| १) शहर ग्रंथालये | ७० हजार रुपये |
| २) अंध ग्रंथालये | ७० हजार रुपये |
| ३) शहर शाखा ग्रंथालये | ३० हजार रुपये |
| ४) शहर वर्ग १ ग्रंथालये | २५ हजार रुपये |
| ५) शहर वर्ग २ ग्रंथालये | २० हजार रुपये |

| | |
|---|---|
| ६) महिला ग्रंथालये | १० हजार रुपये |
| ७) बाल ग्रंथालये | १० हजार रुपये |
| ८) ग्रामीण ग्रंथालये | ५ हजार रुपये |
| ९) मान्यता प्राप्त राज्य ग्रंथालय संघ | ३० हजार रुपये |

**येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे वैशिष्ट्ये म्हणजे**

१) या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास प्रभावीपणे करण्यासाठी राज्याची सात विभागात केलेली विभागणी. हे विभाग अहमदाबाद, भावनगर, कुच, महसाना, राजकोट, सुरत, वडोदरा (बडोदा) हे होत. याप्रत्येक विभागाकरिता एक सहाय्यक ग्रंथालय संचालक नेमण्यात आलेला असून या अधिकाऱ्यावर शासकीय जिल्हा व तालुका ग्रंथालयाच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी सापेविण्यात आली आहे.

२) गुजरात हे देशातील पहिले राज्य जेथे राज्य मध्यवर्ती डिपॉझीटरी केंद्र महेसाना येथे १९९१ मध्ये स्थापन केले. या केंद्राच्या ठिकाणी विविध ग्रंथालयातून रद्दबातल केलेले ग्रंथ व वापरात नसलेले ग्रंथ हे एकत्र केले जातात.मध्यवर्ती डिपॉझीटरी केंद्राची इतर कार्याचे स्वरुप अ) या सर्व वाचन साहित्याची संदर्भसुची तयार करुन याद्वारे संशोधकांना सहाय्य केले जाते. ब) दुर्मिळ पुस्तकांचे पुनर्मुद्रण आधुनिक तंत्रज्ञानाने केले जाते. क) नॉनबुक पध्दतीचे सर्व दुर्मिळ साहित्य या ठिकाणी संग्रहीत केले जाते. ड) राज्यातील हस्तलिखितांचे संग्रहण व जतन केले जाते. इ) प्रलेख देवघेवीचे कार्य करणे व अंतर ग्रंथालय देवघेवीस प्रोत्साहन देणे ही जाबाबदारी याच ग्रंथालयाकडे सोपवण्यात आली आहे.

३) या राज्यात सातत्यपूर्वक दर पाच वर्षांनी अनुदान विषयक सुधारणा केली जाते.

४) मोतीभाई आमीन ग्रंथालय पुरस्काराची तरतूद

५) ग्रंथालयांसाठी स्पर्धांचे प्रत्येक वर्षी आयोजन व हे परितोषिक रक्कम स्वरुपात संबंधित ग्रंथालयास व ग्रंथपालास दिले जाते.

६) ग्रामपंचायती, शहर पंचायती व स्थानिक संस्था यांच्याद्वारे ग्रंथालयाचे व अभ्यासिकांचे केले जात असलेले व्यवस्थापन, पंचायत ग्रंथालय व स्थानिक ग्रंथालयांना करण्यात आलेली अनुदानाची सोय.

७) शासकीय ग्रंथालयांव्यतिरिक्त शहर, ग्रामीण या ग्रंथालयासाठी सहकार्य करणे तसेच अंध, महिला व बाल ग्रंथालयांना सहकार्य करणे.

८) नवीन ग्रंथालयांसाठी प्रोत्साहनपर ग्रंथांची सुविधा, याचबरोबर परिषदा,चर्चासत्रे, ग्रंथालय शिक्षण व ग्रंथालयविषयक प्रशिक्षण व ग्रंथालय विषयक साहित्य यांच्या प्रकाशनास चालना व २००१ पासून अस्तित्वात आलेला ग्रंथालय कायदा या दिशेने सर्वच बाबींचा विचार करता येथील ग्रंथालय चळवळ ही निश्चितपणाने एका प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे निदर्शनास येते.

या राज्यातील चळवळीचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे येथे ६ वर्षांखालील मुलांच्यासाठी स्थापन करण्यात आलेली खेळणी ग्रंथालये होय. अशा प्रकारचे ग्रंथालय भुज येथे रामकृष्ण युवक मंडळाने सुरु केलेले असून दुसरे असेच खेळणी ग्रंथालय फोमा टॉय हाऊस हे उत्तर गुजरात मधील वीसनगर येथे करण्यात आलेले आहे. तर तिसरे हे बडोदा येथे आणि चौथे अहमदनगर मधील ग्रंथालय हे एम. जे. बाल पुस्तकालय या नावाने चालविले जाते. याची खऱ्या अर्थाने सुरुवात बडोदा येथील मध्यवर्ती ग्रंथालयात १९१३ मध्ये महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांच्या प्रोत्साहनाने या ग्रंथालयात स्वतंत्र बाल विभाग सुरु करुन करण्यात आली होती. आज या ग्रंथालयात २० हजारातून अधिक ग्रंथ इंग्रजी, गुजराती, मराठी, हिंदी या भाषेतील आहेत.

सयाजीराव महाराजांसारख्या प्रगतीशील विचाराच्या राजपुरुषाने येथे ग्रंथालय चळवळ रुजविली असली तरीदेखील या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायदा पास होऊन त्याची अंमलबजावणी २००१ करण्यासाठी आज या राज्यात २ राज्यमध्यवर्ती ग्रंथालये, २६३ शासकीय ग्रंथालये, ४५३४ अनुदानीत ग्रंथालये ही ग्रंथालय संचनालयामार्फत चालविली जात आहेत.

## २.९ बिहार :

बौध्द काळात येथे शिक्षणाचा प्रसार होऊन तत्कालीन स्थितीत जागतिक स्थरावर ओळखली जाणारी विद्यापीठे कार्यरत होती. या विद्यापीठाची ग्रंथालये समृध्द होती. शैक्षणिक केंद्राशी जोडलेली ही ग्रंथालये इतर विद्‌वजनाना खुली असत. विशेषत: चीनी प्रवासी, ह्युयांग त्सेंग, फाहेन सिंग, त्सेंग यांनी येथील ग्रंथालय विषयक प्रवास वर्णनात नोंद केली असून या परिसरात दिर्घकाळ, जवळजवळ १० वर्षे वास्तव्य करुन येथील बौध्द वाङमयाच्या नकला केल्याचे निदर्शनास येते. नालंदा येथील विद्यापीठाचे ग्रंथालय हे धर्मगंज या नावाने अथवा दयागंज या नावाने ओळखले जात असे. हे ग्रंथालय रत्नसंग्रह, रत्नदधी रत्नसंग्रह, रत्नरंजका अशा तीन प्रशस्त इमारतीमध्ये उभे करण्यात आले होते. यातील रत्नदधी हे नऊ मजली इमारतीत स्थापन केलेले ग्रंथालय होते. या ठिकाणी दुर्मिळ अशा प्रजन पामीलि सुत्र आणि तांत्रिक हस्तलिखिते यांचा संग्रह केला होता. नवव्या शतकातील हे संग्रहालय अनेक ज्ञानशाखांच्या हस्तलिखितानी समृध्द होते. विज्ञान, कला, तत्वज्ञान व व्यवहार उपयोगी माहिती असणारी हस्तलिखिते या ठिकाणी संग्रहीत केली होती. मुस्लिम राजवटीमध्ये ही ग्रंथालये व शैक्षणिक केंद्रे उध्वस्त केली गेली. याचबरोबर या परिसरात ओंदनपुरी हे विद्यापीठ ७४९ मध्ये उभे करण्यात आले होते. बौध्द वाङ्मय व ब्राम्हणीय साहित्य मोठ्या प्रमाणात संग्रहीत करुन एक उत्तम ग्रंथालय उभे करण्यात आले होते. मोहम्मद खिलजी याने हे ग्रंथालय व विद्यापीठही उध्वस्त केले. इस्लामिक राजवटीमध्ये पवित्र ठिकाणी अनेक उत्तम ग्रंथालये स्थापन करण्यात आली होती. अशा ठिकाणी पर्शियन, अरेबिक, भाषेतील अनेक हस्तलिखिते व ग्रंथ संग्रहित करण्यात आलेले होते. अशाच ग्रंथालयापैकी काही ग्रंथालये म्हणजे खानकूट मूनिर शरिफ यांचे ग्रंथालय. हे ग्रंथालय हजरत मखदुम सरफूद्‌दीन मुनिर यांच्या कालखंडात स्थापन करण्यात आले होते. त्यानी स्वत: लिहिलेली काही पुस्तके व त्यांच्या काही मित्राची पुस्तके उदा. गालीब व शहाफजुद्दीन या सुफी संताची पुस्तके या ठिकाणी जतन केलेली होती. स्वत: ते सुप्रसिध्द संत म्हणून मशहूर होते. ते १३७० मध्ये पैगबरवासी झाले. याचबरोबर खानकूट इस्लामपूर हे ग्रंथालय मौलाना शहा मोहम्मद अब्दुल कादीर खुदाही यांनी स्थापन करुन यामध्ये अरेबी, पार्शियन,

ऊर्दू भाषेतील हजारो ग्रंथ पुष्कळ वर्षे जतन करण्यात आले होते. तसेच दुर्मिळ व दर्जेदार हस्तलिखितासाठी हे ग्रंथालय सर्वदूर परिचित होते. स्वतः कादीरसाहेब सुशिक्षीत व विद्वान व्यक्ती म्हणून मशहूर होते. त्यांच्याच नावाने हे ग्रंथालय तूबखान–ई–कादीरी या नावाने ओळखले जाऊ लागले. तत्कालीन स्थितीत खानकूट मौजताबिट हे आशिया खंडातील दुसऱ्या क्रमाचे ग्रंथालय म्हणून ओळखले जात असे. तर पाटणा येथील खुदाबक्ष ग्रंथालय पहिल्या क्रमाचे होते. असे असूनही खुदाबक्ष ग्रंथालयामध्ये अत्यंत महत्वपर्ण व दुर्मिळ अशी जी पुस्तके उपलब्ध नाहीत ती मात्र खानकूट मौजताबीट ग्रंथालयात उपलब्ध आहेत. आजही या ग्रंथालयाचा संग्रह वाढत असल्याचे निदर्शनास येते. अशी अनेक दुर्मिळ ग्रंथालये पाटणा परिसरात व बिहारच्या इतर परिसरात सर्वदूर परिचित होती. याचबरोबर मदरसा मधूनही दर्जेदार ग्रंथ संग्रहीत केले जात असत. या काळात हिंदू व्यक्तीची वैचारीक ग्रंथालये ही दर्जेदार ग्रंथानी युक्त होती. अशा व्यक्तीमध्ये राजा सितपराय, राजा कल्याणसिंग, राजा रामनारायण अशा व्यक्तींची ग्रंथालये उल्लेखनीय होती. हे सर्वजण उत्तम कवी होते त्यांच्या ग्रंथ संग्रहात पार्शियन व अरबी भाषेतील ग्रंथ होते.

बिहारमधील ग्रंथालयाची पूर्वपिठिका पाहता ब्रिटिश कालखंडात या परिसरात एतद्देशी पब्लिक लायब्ररी स्थापन करण्यात आली होती. याठिकाणी हस्तलिखित संग्रह जतन करण्यात आला होता. तसेच शासकीय ग्रंथालय व खुदाबक्ष ओरीएंटल ग्रंथालय पाटणा येथे स्थापन करण्यात आले होते. ही अगदी सुरुवातीच्या काळातील ग्रंथालये होती. याच ग्रंथालयांच्या शृंखलेतून पुढे १९ व्या शतकामध्ये ग्रंथालय चळवळीची वाटचाल बिहार परिसरात सुरु झाली. येथील शिक्षण प्रसाराने या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला चालना मिळून येथे १९०१ ते १९२७ या काळात येथील ग्रंथालय चळवळ अधिक गतीमान झाली. या कालखंडात येथे ९ सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यात आली होती. पुढील काळामध्ये या चळवळीला उतरती कळा लागली. या उदासीनतेमागचे कारण म्हणजे तत्कालीन इंग्रजी राजवटीमध्ये या ग्रंथालयाना अत्यंत अल्प स्वरुपात आर्थिक सहाय्य केले जाई. असे असूनही १९३१–४० च्या कालखंडात येथील सार्वजनिक ग्रंथालये आपल्या शाखांच्या माध्यमातून ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करत असत. अशा

वाटचालीतच १८८२ मध्ये आधुनिक काळातील दुसरे सार्वजनिक ग्रंथालय गया येथे स्थापन करण्यात आले. त्या काळात हे ग्रंथालय सामाजिक व राजकीय चळवळीचे स्वातंत्र्यपूर्व काळातील केंद्र म्हणून कार्यरत होते. या ग्रंथालयाच्या माध्यमातून साक्षरता अभियान उभे करण्यात आले. या ग्रंथालयाच्या माध्यमातून सुरुवातीच्या काळात ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीस ही ग्रंथालये पाटणा शहरात होती. ग्रंथाचे चाहते रायसाहेब प्रसाद यांनी ग्रंथालयाच्या स्थापनेसाठी आर्थिक सहाय्य केले. १८९७ मध्ये हे ग्रंथालय नवीन इमारतीत नेण्यात आले. दुर्दैवाने भूकंपात हे ग्रंथालय उध्वस्त झाले. पुढे नव्याने हे ग्रंथालय गांधी सरोवर परिसरात स्थापन करुन राज्य शासनाने रुपये ४५,०००/– उपलब्ध करुन दिले. असेच एक जुने ग्रंथालय म्हणजे शासकीय ग्रंथालय, पाटणा याची स्थापना १८८९ मधील या राज्यातील सुरुवातीच्या ग्रंथालयापैकी हे एक ग्रंथालय या पार्श्वभूमीवर पुढे २० व्या शतकाच्या सुरुवातीस आराहा जिल्ह्यात पहिले सार्वजनिक ग्रंथालय स्थापन झाले. दुसरे जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय १९१६ मध्ये मधुबनी येथे स्थापन करण्यात आले आणि नंतरच्या काळात अशा प्रकारचे इतर ग्रंथालयेही या परिसरात स्थापन करण्यात आली. यापैकी एक महत्वाचे ग्रंथालय म्हणजे 'गाईट सार्वजनिक ग्रंथालय' होय. हे ग्रंथालय बिहारचे पहिले गव्हर्नर सर एडवर्ड गाईट यांच्या स्मरणार्थ स्थापन करण्यात आले. या ग्रंथालयाचे नाव नंतर बदलण्यात आले. प्रत्यक्षात १९१६ मध्ये हे एक विशेष सार्वजनिक ग्रंथालय म्हणून स्वतः गाईट यांनी स्थापन केले होते. या ग्रंथालयाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे स्थानिक गरीब मुलांसाठी येथे शाळा चालविली जात असे. तसेच एक संगीत संस्था, महिला हस्तकला प्रशिक्षण, आरोग्य विषयक चर्चेबरोबरच सामाजिक व राजकीय चर्चासत्राचे आयोजन, स्पर्धा, प्रश्नमंजूषा, विशेष प्रौढ शिक्षण चर्चा सत्रे अशा उपक्रमाबरोबर मुलांच्या खेळण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष येथे स्थापना करण्यात आला होता.

देशातील हे एक लोकसंख्येने मोठे राज्य असून येथील साक्षरतेचे प्रमाण तुलनेत फारच कमी आहे. यामुळे येथील जनतेत आजही वाचनविषयकअभिरुची अल्प स्वरुपात आढळते. खरे तर ऐतिहासिक कालखंडात हा विभाग शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जात असे.

पाटलीपुत्रासारखे समृद्ध शहर, सम्राट अशोक, चंद्रगुप्त या सम्राटांचा  वैभवशाली इतिहास असलेला मगध विभाग बिहारमध्ये येतो. येथील ज्ञानसाधनेने केवळ भारतातील नव्हे तर परदेशातील व्यासंगी लाकांचे पाय बिहारभूमीस लागले होते हा इतिहास आहे. येथील नालंदा, विक्रमशिला, ओंदतपुरीसारखी विद्यापीठे आणि ज्ञानसंग्रहाने समृद्ध असलेली तेथील हस्तलिखिते ही येथील ग्रंथालयाची ओळख सर्वदूर पोहचवत होती. ह्यू एन त्संग सारख्या चिनी पंडितानी येथील ज्ञानसंग्रहाचे कौतुक आपल्या प्रवास वर्णनात केले आहे. तसेच येथील हस्तखिखितांच्या नकलादेखील केल्याचे निदर्शनास येते. मध्ययुगीन काळातील मिथिला नगरीतील न्यायमिमांसा व नवनव्या विषयावर केलेले दर्जेदार ग्रंथलेखन या प्रदेशातील ऐतिहासिक काळातील विद्वतेच्या दृष्टीने महत्त्व व थोरवी सुस्पष्ट करणारी आहे. येथील खुदाबक्ष हस्तलिखित ग्रंथालय, पटना, दरभंगा येथील मिथिला संस्थेचे ग्रंथालय व पटनाचे जयस्वाल संस्थेचे ग्रंथालय ही सर्वश्रूत आहेत. अशा या विद्वत् जनाच्या व सम्राटाच्या भूमीत १९व्या शतकात सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना झालेली होती. या कालामधील काही महत्त्वपूर्ण ग्रंथालये म्हणजे –

१) भागलपूर इन्स्टिटय़ूट ग्रंथालय – भागलपूर (१८३८), २) गया पब्लिक लायब्ररी – गया (१८५५) ३) हजारीबाग युनियन क्लब (१८८२) ४) बिहार हिरैष पुस्तकालय –पाटना (१८८३) ही होत.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात येथे सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना मोठ्या प्रमाणात झाली होती. दुर्दैवाने पुढील काळात या ग्रंथालयाना स्थैर्य देण्याच्या दृष्टीकोनातून समाजातील समविचारी लोकांना बरोबर घेऊन सार्वजनिक ग्रंथालय दृढ करण्यासाठी आवश्यक ते खंबीर नेतृत्व न लाभल्यामुळे बिहार राज्याची स्वतंत्र राज्य म्हणून गणना होईपर्यंत ही चळवळ पुष्कळशा प्रमाणात शिथिल झालेली होती. मधल्या काळात डॉ. सचिदानंद सिन्हा व त्यांचे कुटुंबियांच्या सहकार्याने १९३६ मध्ये एक प्रयत्न जरुर झाला होता. या कुटुंबियांच्या प्रयत्नामुळेच प्रांतीय ग्रंथालय संमेलन भरविण्याचा पहिला प्रयत्न केला गेला. या प्रयत्नामुळे येथील निद्रिस्त अवस्थेतील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस पुनश्च पुनर्जीवन प्राप्त होऊन बिहार ग्रंथालय संघाची स्थापना करण्यात आली.

पुढे संघाचे प्रयत्न तोकडे पडल्यामुळे १९५१ पर्यंत या चळवळीची प्रगती कासवगतीने झाली. ही प्रगती केवळ नगण्य स्वरुपाचीच होती. याच काळात भागलपूरमध्ये ग्रंथालय संमेलन भरविण्याचा प्रयत्न झाला व त्यास बिहार शासनाने मान्यता देऊन वार्षिक अनुदान रु. ३०,०००/– इतके मंजूर केले. शासनाच्या अशा सहकार्यामुळे ग्रंथालय संघटनेस एक नवे चैतन्य प्राप्त झाले. १९३९–४० मधल्या काळात सत्तेवर असलेल्या प्रांतीय शासनाने ग्रंथालयांच्या विकासाकरीता अल्पशा स्वरुपात आर्थिक उपलब्धता करून दिली होती. या आर्थिक मदतीचे स्वरुप जुन्या ग्रंथालयांना रु. २०,०००/– व नवीन ग्रंथालयास रु. १०,०००/– असे होते. अशा अत्यंत तुटपुंज्या आर्थिक सहकार्यामुळे ही चळवळ केवळ आपले अस्तित्व टिकून ठेऊ शकली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आलेल्या शासनाने या चळवळीकडे विशेष लक्ष देऊन १९४९–५० मध्ये रु. ६,७०,०००/– इतका निधी उपलब्ध करून दिला. ग्रंथालयाचे पुर्नप्रस्थापन करण्यासाठी या आर्थिक उपलब्धतेचा काही प्रमाणात फायदा झाला. तसेच राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना पाटणा येथे करण्यास व जिल्ह्याकरीता जिल्हा ग्रंथालयाची निर्मिती करण्यास मंजुरी देऊन या योजनेच्या अंमलबजावणीकरीता स्वतंत्रपणे ग्रंथालय अधिक्षकाची व्यवस्था करण्यात आली. याच काळात पहिली पंचवार्षिक योजना राबविण्यात आली. शासन व्यवस्थेत ग्रंथालयासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णयांचे अधिकार ग्रंथालय अधिक्षकाकडे नसल्यामुळे व त्याची अंमलबजावणी परस्पर शिक्षण विभागातील अधिकारी वर्गाकडे सुपुर्द केलेली असल्याने या योजनेचा ग्रंथालय चळवळीच्या विकासाकरीता फारच अल्प प्रमाणात लाभ झाला. या पार्श्वभूमीवर १९६९–७० पर्यंत येथे केवळ १२ जिल्हा ग्रंथालये, २१ तालुका ग्रंथालये, ४,५४२ ग्रामग्रंथालये आणि शहर स्तरावर श्रेणीय ग्रंथालये अनुक्रमे अ– २७९, ब–४६४, क–८८४, ड–२६४४ व विशेष ग्रंथालये २०१ इतकीच स्थापन होऊ शकली. ही संख्या जरी समाधानकारक दिसत असली तरी या ग्रंथालयांना प्राप्त होणारे अनुदान मात्र केवळ रु. ८५ ते १५० या मर्यादेत ग्रामीण ग्रंथालयांना श्रेणीनुसार उपलब्ध होत असे. १९६९–७० मध्ये शासनाकडून मिळणारी अनुदानाची रक्कम सर्वस्तरीय ग्रंथालयांना मिळून केवळ रुपये १८१४ लाख इतकी होती. *(ना. बा. मराठे पृ. १२७)* येथील ग्रंथालय शास्त्राचे

शिक्षण – प्रशिक्षण स्वरुपात अधिक्षकामार्फत दिले जाते हा कालखंड तीन महिन्याचा असतो. ग्रंथालय संघाद्वारे 'पुस्तकमाया' हे मासिक प्रकाशित केले जाते.

स्वातंत्र्यपूर्व दशकात येथे ग्रंथालय कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी सार्वजनिक ग्रंथालय कायदा प्रणाली अंतर्गत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (०१) विभागीय ग्रंथालय (०८) विभागीय जिल्हा ग्रंथालय (३१) शहर /नगर ग्रंथालये (३४) विभागीय सार्वजनिक ग्रंथालये (२७) ब्लॉक सार्वजनिक ग्रंथालये (४२८) ग्रामीण सार्वजनिक ग्रंथालये (४०००), फिरते ग्रंथालय (१७) स्थापन करण्यात आलेली होती. पुढील १९७८–८० या काळात येथे राज्य ग्रंथालये (०१) जिल्हा ग्रंथालये (३८) उपविभागीय ग्रंथालये (२५) ब्लॉक ग्रंथालये (१२८), ग्रामीण ग्रंथालये (२००) अशी एकण ३७४ ग्रंथालये कार्यरत होती. व शासनाव्दारे ४,२९,००,०००/ – इतकी रक्कम खर्च करण्यात आली होती. १९८३–८४ मधील हेच चित्र पाहता येथे एकूण ५५९ ग्रंथालये कार्यरत होती आणि त्याच्या व्यवस्थापनेसाठी रुपये ४,७८,००,०००/– इतकी रक्कम खर्च करण्यात आली होती.

या राज्यात २००८ साली ग्रंथालय कायदा लागू करण्यात आला. या अंतर्गत येथे ग्रंथालयाची संरचना राज्य ग्रंथालय, विभागीय ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालय, उपविभागीय ग्रंथालये, विशेष ग्रंथालये, ब्लॉक ग्रंथालय, ग्रामीण ग्रंथालय अशी प्रणाली अस्तित्वात आली. या कायद्याचा मुख्य उद्देश नमूद करताना ग्रामीण व शहर विभागातील सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना ही लोक सहभागातून करुन याव्दारे सामान्य लोकांच्या मध्ये वाचन अभिरुची विषयी आस्था निर्माण करुन या ग्रंथालयांचा ज्ञान प्रसार माध्यम म्हणून उपयोग करणे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे.

## २.१० मणिपूर :

मणिपूर परिसरात साहित्याचे जतन हे पंडितांच्याकडून करण्यात येत असे. या पंडिताना राजाश्रय देण्यात येत असे. विविध विषयातील समस्या संदर्भात हे विद्वानजन राजाला सल्ला देत असत. अशा विद्वान पंडिताच्याकडे स्वत:चे वैयक्तिक ग्रंथालय असे. या पंडित परंपरेतून ज्ञानाचे जतनही केले जाई. त्याचबरोबर इतिहास विषयक भूतकालीन दप्तर ही सांभाळले जाई. या सर्व ज्ञानसंग्रहाचा उपयोग प्रशासन, धार्मिक परंपरा, सामाजिक समस्या व न्यायदान आणि सांस्कृतिक परंपरा या करीताच प्रामुख्याने केला जात असे. चैथाराल कूम्बाब हे एकमेव अक्षर स्वरुपाचे एतिहासिक इतिवृत्त (रॉयल क्रोनीकल) असून याव्दारे २००० वर्षापूर्वीच्या ऐतिहासिक घटनांचे संकलन करण्यात आले आहे. हा कालखंड साधारणत: राजा नोगांडा लैरेन परवंडा (३३ – १४५) ते महाराज बुध्दाचंद्र सिंग ( १९४१–४५) ४५ या साधारणत: २००० वर्षातील असून या दीर्घ कालखंडाचे दर्शन घडविणारे हे ऐतिहासिक वृत्त 'मैतेई' लिपीतील आहे. हे इतिवृत्त राजवाड्यामध्ये ठेवले जात असे व विद्‌वत जनांना हे इतिवृत पाहण्याची सुविधा करण्यात आली होती. आजची ही परंपरा अस्तित्वात आहे. अशाप्रकारच्या इतिवृत्तासाठी कोणत्याही प्रकारची वर्गकृत रचना केलेली नसल्यामुळे त्यांचा शोध घेताना केवळ स्मरणावरच अवलंबून रहावे लागत असे. या परिसरामध्ये त्या काळात ही ग्रंथालये सर्वांसाठी खुली नव्हती. फक्त काही विद्‌वतजन यांच वापर करत असत. येथील ज्ञानसंग्रहाच्या वाटचालीचा विचार करत असताना डिसेंबर आणि जानेवारी महिन्यातील तेविसावा दिवस हा ज्ञानाचे जतन करण्याच्या पार्श्वभूमीवर १७२९ मध्ये काळा दिवस म्हणून पाळण्यात आला होता. कारण, या दिवशी तत्कालीन राजा गरीब निवाज याने वैष्णव इझमच्या संरक्षणार्थ प्रवचनकार शांतीदास, भगवानदास, नारायणदास आणि इतर यांच्या दबावाने १३० हस्तलिखिते आणि दप्तर जाळून टाकले. ही घटना 'दप्तर दहन दिवस' म्हणून ओळखली जाते.

या घटनेमुळे ज्ञान संवर्धन संदर्भात मणिपूर विभागात फारच मोठी हानी झाली आहे. यापैकी काही परंपरातून या ज्ञानाचे संग्रहण करुन त्याचे जतन केले आहे आणि आजही त्याचा वापर केला जातो.

या परिसरामध्ये ज्ञानसंग्रहाची परंपरा फारच उशीराने उदयास आली. १९२७ मध्ये मणीपर क्लबची स्थापना करुन ग्रंथालय सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न डॉ. अतुलचंद्र सिंग यांनी पहिल्यांदा केला. याच क्लबचे पुनर्नामांकन १ जानेवारी १९३१ मध्ये करण्यात येऊन 'मणीपूर क्लब ग्रंथालय' असे करण्यात आले. पुढे १९३३ मध्ये हा क्लब जुना बत्ती मेमोरियल ग्रंथालय म्हणून ओळखला जाऊ लागला. दुसऱ्या महायुद्धात हे ग्रंथालय बंद पडले. १९३४ मध्ये इंफाला येथे एक ग्रंथालय स्थापन झाले होते ते पण १९९४ मध्ये बंद पडले. या ठिकाणी यांनी १९२२ मध्ये 'मैतेई चानू' हे मासिक पहिल्यांदा चालू करण्यात आले होते. या मासिकाचे संपादन जननेता हजिम इराबोत १९२२ मध्ये केलेले होते. दुर्दैवाने हे मासिक आर्थिक सहकार्या अभावी लवकरच बंद पडले. याचबरोबर या परिसरातील संस्कृत व बंगाली भाषेच्या प्रभावामुळे येथील स्थानिक भाषेतील साहित्य मुलभूत स्वरुपात आढळत नाही. इराबोतनेच काही प्रमाणात असा प्रयत्न केलेला होता. १९४० च्या कालखंडात येथे नाँग मैथेम गोपाल सिंग (उरीपोक) यांनी काही स्थानिक स्वयंसेवकांच्या मदतीने खवई सार्वजनिक ग्रंथालय पहिल्यांदाच येथे सुरु केले आणि यानंतर हळूहळू येथे ग्रंथालयांचा विकास होऊ लागला.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये मणिपूर हा प्रदेश दुर्गम प्रदेश म्हणून ओळखला जाई. त्यामुळे शिक्षणाच्या प्रसारास या परिसरात फारशी चालना दिली जात नव्हती. पण १९४७ मध्ये येथील लोकजागृतीला सुरुवात होऊन येथे साक्षरता अभियान सुरु झाले. हा विभाग केंद्रशासित राहिल्याने येथे सुरुवातीच्या काळात साक्षरतेचे प्रमाण १९५१ मध्ये १०% होते. पुढील काळात १९७१ मध्ये हे प्रमाण जवळजवळ ३३% पर्यंत पोहोचले होते. त्यामुळेच पुढील ग्रंथालय चळवळीस येथे चालना मिळाली होती. १९४६ मध्ये येथे सचिवालय स्थापन केल्यावर केवळ इन्फाला येथे अवघ्या १० वर्षाच्या काळात ५ ग्रंथालये अस्तित्वात आली. ही ग्रंथालये पुढीलप्रमाणे होत,

१) मध्यवर्ती जिल्हा ग्रंथालय – इंफाळ (१९५४) २) मणिपुर महाराजा राजभवन ग्रंथालय–इंफाळ (१९५९) ३) संग्रहालय ग्रंथालय–इंफाळ (१९६४) ४) गांधी स्मारक ग्रंथालय – इंफाळ (१९६७) ५) नेताजी स्मारक ग्रंथालय – मोहरांग (१९६८).

१९३६ मध्ये मणिपूर साहित्य परिषदेने पाचशे हस्तलिखित ग्रंथ तत्कालीन ग्रंथालयामध्ये जमा केल्याची नोंद आढळते. या हस्तलिखिताची सूची प्रकाशित करण्यात आली आहे. या ग्रंथालयातून ७००० पुस्तके जमा करण्यात आली होती. या परिसरात मिशनरी लोकांनी आपले कार्य सुरु केल्यावर त्यांनी स्वत:करिता सार्वजनिक ग्रंथालये सुरु केल्याचा पुरावा आढळतो. पुढे २६ ऑगस्ट १९७० मध्ये येथे जिल्हा ग्रंथालय, बाल ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय यांची स्थापना होऊन याचवेळी वस्तुसंग्रहालयाचे राज्य मध्यवर्ती ग्रंथालयात रूपांतर करण्यात आले. सध्या येथे ९० पेक्षा जास्त ग्रंथालये, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व २१५ ही सेवाभावी संस्थांनी चालविलेली ग्रंथालये कार्यरत आहेत.

एकूणच येथील सार्वजनिक ग्रंथालयांचा आढावा घेताना येथे १९५४ ते १९७०च्या कालखंडामध्ये पुढील ग्रंथालये कालसापेक्ष स्थापन झालेली आढळतात यामध्ये –

१) सचिवालय ग्रंथालय (१९४९)

२) जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय, इंफाला (१९५४)

३) राजभुवन ग्रंथालय (१९५९)

४) म्युझियम ग्रंथालय (१९६५)

५) गांधी मेमोरीयल ग्रंथालय, इंफाला (१९६७)

६) नेताजी मेमोरीयल ग्रंथालय, मोईरंग (१९६८)

येथील सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाचा विचार करता १९५४ मध्ये जिल्हा ग्रंथालयाची व बाल ग्रंथालय – वस्तु संग्रहालये यांची इंफाला येथे स्थापना करुन ग्रंथालय चळवळीची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. १९७०मध्ये जिल्हा ग्रंथालयाचा दर्जा उंचावून त्याचे मणीपूर मध्यवर्ती ग्रंथालय असे नामकरण करण्यात येऊन त्यास बाल ग्रंथालय – वस्तु संग्रहालय जोडण्यात आले. या राज्यातील हे मध्यवर्ती ग्रंथालय सर्वात मोठे असून या ठिकाणी १९९३ मध्ये १,२३,७६२ ग्रंथ व ३,४५० नियतकालिकांचे बांधीव खंड संग्रहित केलेले होते. १९७७ मध्ये या राज्यात चंडल येथे दुसरे जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आले. या राज्यात ग्रंथालय कायदा १९८८ मध्ये मंजूर करण्यात आला. अद्यापही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मणीपूर ग्रंथालय संघ आजही सातत्यपर्ण प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास येते.

**२.११ मध्यप्रदेश :**

येथील पौराणिक ज्ञानसंग्रहाचा वेध घेताना अवंती येथील उत्खनामध्ये सापडलेले चित्रलिपीतील लिखाण मोहोंदजो दडो संस्कृतीशी नाते सांगणारे आहे. वैदिक कालखंडामध्ये येथे भूर्जपत्रे लेखनासाठी वापरली जात. महाभारतामध्ये उल्लेखलेला श्रीकृष्ण व सुदामा यांनी शिक्षण घेतलेला सांदीपनी मुनीचा आश्रम याच परिसरामध्ये उज्जैनी जवळ होता. ब्राम्ही लिपीतील लेखन कला येथे महाभारत काळापासून प्रचलित होती. अशोकाच्या काळातील सांची येथील स्तूपावर ब्राम्ही लिपीतील लेखन आढळते. प्राचीन काळातील उज्जैनी हे ठिकाण केवळ महाकाळांचे आध्यात्मिक केंद्र नव्हते तर ते एक शिक्षणाचे महत्वपर्ण केंद्र होते. येथील मंदिरातून सापडलेल्या लेखनविषयक पुराव्यातून येथील ज्ञान परंपरा लक्षात येते. या परिसरात विद्वत जन एकत्रित येऊन कवी व लेखक यांची परीक्षा घेत असत.

येथील जैन भांडारे, शिव वैष्णव मंदिरे यामध्ये दुर्मिळ हस्तलिखितांनी समृध्द असलेले संग्रह जोपासण्यात आलेले होते. येथील राज भोज, राजा जयसिंह यांनी विद्वत जनांचा आदर करत ते साहित्य आणि काव्य यांचे चाहते होते. राजा जयसिंहाने माळवा प्रांतातील विजयानंतर येथून बैलगाडीतून १,२५,००० इतकी हस्तलिखिते आणि हालबाद पट्टण येथे नेल्याचा उल्लेखही ऐतिहासिक दस्ताऐवजात आढळतो. धार, नालचा येथेही उत्तम ग्रंथालये असल्याचे पुरावे आढळतात. उज्जैनी येथील महाकाल मंदिरात एक संपन्न ग्रंथालय स्थापन करण्यात आलेले होते. या मंदिर ग्रंथालयास कवी, नाटककार व इतर साहित्यिक आपले लेखन अर्पण करत असत. कवी जनांचा सन्मान ही परंपरा येथे जपलेली होती. या ठिकाणी विद्वत जनांची परीक्षा घेऊन त्यांना पदवी ही दिली जात असे. राजा भोज व्दितीय याच्या काळात वेणूकवीस 'कविंद्र' ही पदी दिल्याचा उल्लेखही आढळतो. ऐतिहासिक काळात येथील ग्रंथालये ही राजवाडा, मंदिरे व इतर सार्वजनिक ठिकाणांची अविभाज्य भाग असत आणि तत्कालीन परिस्थितीतील ही सार्वजनिक ग्रंथालये होत. इंग्रजांच्या राजवटीत येथील महत्वपूर्ण हस्तलिखिते पाश्चात्य देशातील ग्रंथालयात वा वस्तु संग्रहालयात दाखल झाल्याचे निदर्शनास येते. येथील ग्रंथालय विषयक पुराव्यांचा वेध घेता बाराव्या शतकातील

धार येथील भोज राजाचे ग्रंथालय हे या प्रदेशातील सर्व प्रथम ग्रंथालय होय. चालुक्य राजा सिद्धराज याने या राज्यावर आपली सत्ता प्रस्तापित केल्यानंतर हे ग्रंथालय पाटणा येथे स्थलांतरीत करण्यात आले आणि ते रॉयल चालुक्य ग्रंथालयामध्ये समाविष्ट करण्यात आले. भोपाळ येथील नवाबाकडे देखील उर्दू व पर्शियन ग्रंथ आणि हस्तलिखिते यांचा एक समृध्द संग्रह राजवाड्यातील ग्रंथालयामध्ये करण्यात आलेला होता. सुसिध्द कवी कालीदास, भवभूती, गंगाधर, वराहमिहिर, आचार्य केशवदास, बिहारी, भूषण, पद्माकर, विक्रमादित्य, बैजू, तानसेन आणि रुपमती यांची ही भूमी होय.

या राज्याची निर्मिती १९५६ मध्ये झाली व या राज्यात त्याकाळी ४८ तालुके समाविष्ट करण्यात आले. भोपाळ हे राजधानीचे ठिकाण निश्चित करण्यात आले. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता या प्रदेशामध्ये भोपाळ, विंध्यप्रदेश व महाकौशल आणि मध्यभारत या भागाचा समावेश होता. हे एक पूर्वापार सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत संस्थान म्हणून ओळखले जात असे. येथे विविध क्षेत्रात आपल्या व्यक्तित्वाचा ठसा उमटविणारे राजे, कवी, गायक यांचा वारस होता. अशा व्यक्तिंमध्ये महाकवि कालिदास, राजाभवभूती, राजा विक्रमादित्य, वराहमिहीर, आचार्य केशवदास, कवी बिहारी, भूषण, पद्माकर, बैजू, तानसेन, रूपमती या व्यक्तिंचा समावेश होतो. चालुक्य राजा सिद्धराज यांने हा प्रदेश जिंकून घेतल्यावर धामनगर येथील पोथीघर बडोदा संस्थानामधील पाटण येथील शासकीय चालुक्य पुस्तक शाळेत समाविष्ट करण्यात आले. भोपाळच्या नबाबांचा उर्दू आणि पर्शियन हस्तलिखिताचा संग्रह व किताबखाना त्याच्या राजवाड्यात होता. अशी ऐतिहासिक परंपरा असलेल्या या विभागात येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देण्यात आले होते. याची उदहारणे म्हणून १८५४ मध्ये स्थापन झालेली इंदूर जनरल लायब्ररी व येथील महाराजे यांच्या प्रोत्साहनातून स्थापन झालेली ग्रंथाले १) इंदूर जनरल लायब्ररी (१८५४), २) महाकोशल महाविद्यालय – जबलपूर (१८७३), ३) डिस्ट्रीक्ट लायब्ररी – जबलपूर (१८८५), ४) होळकर कॉलेज लायब्ररी – इंदूर (१८९०) ५) माधव कॉलेज लायब्ररी – उज्जैन (१८९१) ६) माधव पुस्तकालय – ग्वाल्हेर (१९०३) ७) पब्लिक लायब्ररी – सागर (१९०९) ८) हमिदिया स्टेट लायब्ररी –भोपाळ (१९११) याचा उल्लेख करावा लागेल. १९२८ मध्ये स्थापन

झालेले ग्वाल्हेर येथील मध्यवर्ती ग्रंथालये (सेंट्रल लायब्ररी) याच्या निर्मितीनंतर या प्रदेशातील इतर संस्थांनी आपल्या संस्थानात ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय स्थापण्यासाठी प्रोत्साहन दिले. अशा शहरात प्रामुख्याने रेवा पन्ना, नागोडा, दलिया, मतपुर, विक्रमगड, महिहर, कोठी इत्यादींचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये १९४८–४९ च्या काळात येथील शासनाने ग्रामीण ग्रंथालय स्थापनेला चालना देताना पंचायत केंद्राच्या ठिकाणी ग्रामग्रंथालय स्थापन करणे हा या योजनेचा उद्देश होता. या योजनेसाठी १९५०–५१ मध्ये रुपये ५७,०००/– मंजूर करण्यात आले होते. तेथील शासनाने मध्यप्रदेशातील ग्रंथालय विकासाची पाहणी करून उपाय सुचविण्यासाठी श्री. एफ. एम. गार्डनर यांना इंग्लंडहून खास बोलाविले होते. त्यांनी सादर केलेला अहवालानुसार या योजनेसाठी दरवर्षी येणारा लाखो रुपयाचा खर्चाचा तपशील पाहिल्यावर शासनाने या अहवालावर कोणतीही कार्यवाही केली नाही. पुढे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जबलपूर–रेवा–भोपाळ या तीन ठिकाणी मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली होती तर महाकौशल्य, विंध्यप्रदेश, भोपाळ या विभागात अनुक्रमे १४,७,२ अशी जिल्हा ग्रंथालये स्थापन केली होती तर नगर ग्रंथालयाची संख्या ही १३१ होती व यामध्ये महाकौशल (७५), मध्यभारत (३९), विंध्यप्रदेश (१६), भोपाळ (१) यांचा समावेश होता. ग्रंथ वितरणासाठी येथे स्वतंत्रपणे जबलपूर, झांसी, उम्रा अशा तीन ठिकाणी केंद्रे स्थापन करण्यात आली होती. पुढे दोन पंचवार्षिक योजनेच्या काळात या राज्यात सार्वजनिक ग्रंथालयाची वाढ पुष्कळशी खुंटलेली होती. या काळातील महत्त्वाची घटना म्हणजे इंदूर येथे श्रीमंत अहिल्याबाई सेंट्रल लायब्ररीची १९६१ मध्ये करण्यात आलेली स्थापना होय. याकरिता स्व. महाराज यशवंतराव होळकर यांनी रुपये १,५०,०००/– इतकी देणगी दिली होती. ग्रामीण ग्रंथालयाचे अभियान येथे समाज कल्याण खात्याच्याद्वारे राबविण्यात आले होते. या माध्यमातून महाकौशल या विभागात १२२४, मध्यभारत विभागात ४२३९ अशी ग्रंथकेंद्रे सुरु करण्यात आली. पंचायतीकडील पुस्तक केंद्रे व प्राथमिक शाळेतून उपलब्ध करून दिलेली पुस्तके यांची अदलाबदल वितर केंद्रामार्फत करण्यात येत असे. या राज्यातील एकूण ४३ जिल्ह्यापैकी २३ जिल्ह्यात जिल्हा ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आलेली असून जबलपूर, रेवा, भोपाळ, ग्वाल्हेर, इंदूर

याठिकाणी विभागीय ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली होती. याचबरोबर खाजगी संस्थानाच्या माध्यमातून वर्गणी ग्रंथालये स्वतंत्रपणे चालवली जात आहेत. येथील ग्रंथालय चळवळीस चालना देण्यासाठी डॉ. रंगनाथन यांनी १९४६ मध्ये ग्रंथालय कायद्याचा मसुदा तयार करून ग्रंथालय विभागाकडे सादर केला होता. पण त्याच्यावर दीर्घकाळ कोणताही विचारविनिमय झाला नाही. १९६८ च्या काळात इंदूरमध्ये ग्रंथालय कायद्याविषयी अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेमध्ये याबाबत विचार करण्यात आला आणि या संदर्भातील जबाबदारी मध्यप्रदेश ग्रंथालय संघटनेकडे सोपविण्यात आली. यानुसार डॉ. जी. डी. भार्गव व श्री. व्ही. एस. मोघे यांनी स्वतंत्र मसुदा तयार करून शिक्षण यंत्रणेकडे सादर केला. त्याच्यावर दीर्घकाळ कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

पंचवार्षिक योजनेअंतर्गत येथील ग्रंथालय विकासासाठी प्रयत्न करण्यात आले होते. १९६९–७४ या पंचवार्षिक योजनेअंतर्गत या विभागास केवळ २,००,००,०००/– रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. पाचव्या, सहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत सार्वजनिक ग्रंथालय विकासासाठी कोणतीच तरतूद करण्यात आली नव्हती. या काळातील आर्थिक तरतदी अभावी या एकेकाळच्या शैक्षणिक व सांस्कृतिक भूमीस येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला खीळ बसलेली होती. या काळात कोणत्याही एका विभागाकडे सार्वजनिक ग्रंथालयची जबाबदारी सोबविण्यात आली नव्हती. एका विशिष्ट विभागाकडे ग्रंथालयाची जबाबदारी सोपविण्याऐवजी शिक्षण विभाग, पंचायत विभाग, माहिती व प्रसारण विभाग या तीन विभागावर जबाबदारी सोपवली होती. या तिघांमध्ये समन्वय नसल्याने येथील ग्रंथालय प्रणालीचा विकास होऊ शकला नाही. या राज्यात बऱ्याच शहरात खाजगी व सार्वजनिक ग्रंथालये असून या ग्रंथालयाना वार्षिक अनुदान शासनाकडन उपलब्ध करुन दिले जाते. १९८२ च्या कालखंडात येथील सार्वजनिक ग्रंथालयाची स्थिती विचारात घेता विभागीय ग्रंथालये (०५), जिल्हा ग्रंथालय (४२) माहितीकेंद्रे (०६) खाजगी सार्वजनिक ग्रंथालये (८०) व ग्रामपंचायत ग्रंथालये (५,५००) अशी स्थिती होती. ही सर्व ग्रंथालये स्वतंत्र असून आपल्याकडील मर्यादित साधनाच्या आधारे सार्वजनिक ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देत असत. *(स्तोत्र – भार्गव जी. डी. इन कूमार, पी. एस. जी. खंड – १०)*

या राज्यात ग्रंथालय कायदा लागू केला नसल्यामुळे येथील ही १) संचालक सार्वजनिक सुचना प्रसार व २) पंचायत आणि समाज कल्याण विभाग या दोन विभागाव्दारे या ग्रंथालयाचे पर्यवेक्षण केले जात असून शहरी ग्रंथालयाचा विचार करता ही सर्व ग्रंथालये सार्वजनिक सूचना विभागा अंतर्गत कार्यरत आहेत. या अंतर्गत विभागीय व जिल्हा ग्रंथालयाचा समावेश होतो. ही ग्रंथालये शहरी विभागात येतात. ग्रामीण व दुर्गम परिसरातील ग्रंथालये ही पंचायत व समाज कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत आहे. हे विभाग साधारणत:

१) **भोपाल विभाग –** या विभागाअंतर्गत भोपाल, रायसेन, राजगड, निदाशा, तुलसीनगर या जिल्हा ग्रंथालयाचा समावेश होतो.

२) **हौसंगा विभागात –** हौसांगाबाद, खांडवा, बैतूर, सेवोनी, चिंदवाड, नगसिंगपूर या जिल्हा ग्रंथालयाचा समावेश होतो.

३) **जबलपूर विभागात –** बालाघाट, मंडाळा, जबलपूर अशा जिल्हा ग्रंथालयाचा समावेश होतो.

४) **सागर विभागात –** सागर, दामोटो, पन्ना, छत्रपूर, तिमकगड

५) **ग्वाल्हेर विभागात –** ग्वाल्हेर भिंड, मोरेना, शिवपुर्रा, गुना, दलीया, दादरा (ग्वाल्हेर)

६) **इंदोर विभागात –** इंदोर, देवास, धार, खरघोर, झावू,

७) **नैन विभागात –** रतलम, मणसुर, शाजापूर,

८) **रेवा विभागात –** रेवा, सरना, सिध्दी, नवगड, शहादोल या ग्रंथालयाचा समावेश होतो तर

९) **सुरगूना विभागात –** सुरगूना. अशा प्रकारे ग्रंथालयांची स्थापना करण्यात आलेली आहे.

ही सर्व शासकीय ग्रंथालये आहेत. या यिभागीय आणि जिल्हा ग्रंथालयात कोणताही समन्वय नाही ही स्वतंत्र ग्रंथालये असून ही एकाच छत्राखाली कार्यरत आहेत. विभागीय ग्रंथालयाचे व्यवस्थापन जिल्हा निहाय वेगवेगळे असून जिल्हा ग्रंथालय मात्र शिक्षणाधिकाऱ्याच्या नियमाखाली कार्यरत आहेत. या ग्रंथालया व्यतिरिक्त शिक्षण विभागाअंतर्गत ३०० खासगी ग्रंथालये कार्यरत असून त्यांना शिक्षण विभागामार्फत अनुदान दिले जाते.

पंचायत आणि समाज कल्याण संचालनालयाअंतर्गत ग्रामीण व दुर्गम ग्रंथालयाचे पर्यवेक्षण केले जात असून या विभागाच्या अंतर्गत त्रिस्तरीय योजनेनुसार ही ग्रंथालये कार्यरत आहेत.

**१) ग्राम ग्रंथालय योजना :**

या योजनेअंतर्गत १४६९१ ग्रंथालये कार्यरत असून शासनाने स्थापन केलेल्या ग्रंथ निवडसमितीमार्फत या ग्रंथालयाना पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. साधारणतः या सर्व ग्रंथालयांसाठी वार्षिक रु.५,००,०००/– अनुदान दिले जाते. तसेच रु.३,५०,०००/– इतका निधी इतर खर्चासाठी पुरविला जातो. दुर्गम भागासाठी रु.१,७१,०००/– इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**२) ग्राम अभ्यासिका योजना :**

या योजनेअंतर्गत काही ग्रामपंचायतीची निवड करुन त्यांना अभ्यासिका सुरु करण्यासाठी रुपये ७००/– इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली जाते. या रकमेचा विनियोग वृत्तपत्रे व मासिके खरेदीसाठी रुपये २००/– व फर्निचर व इतर साधनांसाठी रुपये ५००/– अशा प्रकारे केला जातो. या अभ्यासिकेची संख्या १६,४०० इतकी आहे.. याचबरोबर या राज्यात नोंदणीकृत संस्थासाठी अनुदान योजना राबविली जात असून ज्या ठिकाणी लोकसंख्या ५००० हून अधिक आहे. अशा ठिकाणी एखादे ग्रंथालय सुरु केल्यास आणि त्यास कोणत्याही विभागाकडून अनुदान प्राप्त होत नसल्यास त्याला फक्त रुपये ५००/– इतके अनुदान उलब्ध करुन दिले जाते. अशा ग्रंथालयांची संख्या १०० रुपये आहे.

पंचायत आणि समाजकल्याण संचालनालयाव्दारे ग्रंथालय इमारतीसाठी रुपये ५०,०००/– इतके अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. प्रत्यक्षात हे अनुदान केंद्रशासनाकडून उपलब्ध होत असते. मात्र याकरीता राज्य व पंचायत व समाजकल्याण संचालनालयाव्दारे शिफारशीची आवश्यकता असते. येथील खाजगी संस्थानी सुरु केलेल्या ग्रंथालयाची संख्या ४५० असून यापैकी ३०० ग्रंथालयाना अनुदान प्राप्त होते.

या राज्यातील विद्यमान स्थितीचा विचार करता २००८–०९ या काळात येथे जिल्हा ग्रंथालयाची संख्या ३७ असून ही संख्या ०८ विभागात विभागलेली आहे. या जिल्हा

ग्रंथालयांना २००८-०९ मध्ये उपलब्ध झालेल्या आर्थिक तरतूदीचा तपशील,

१) इमारतीची देखभाल व सुशोभीकरण रुपये ११.१० कोटी.

२) फर्निचर, संगणक, एलसीडी, नियतकालिके, वृत्तपत्रे याकरिता - रुपये ५.५५ कोटी

३) वॉटर कूलर, एसी, जनरेटर, व्हॅक्यूमक्लीनर, इंटरनेट - रुपये २.२२ कोटी

४) प्रकल्पाकरिता - रुपये ०.१३ कोटी

अशाप्रकारे रु. १८.८७ कोटीची अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली आहे.

## २.१२ छत्तीसगड :

हा मध्यप्रदेशचा भाग असून हे स्वतंत्र राज्य व्हावे अशी १९५६ पासून मागणी होती. ही मागणी २००० मध्ये अस्तित्वात येवून या राज्याचे पाच विभागात संरचना करण्यात आली. बस्तर, विलासपूर, रायपर, दुर्ग हे विभाग असून जिल्हा ग्रंथालयाची स्थापना बिलासपूर १९५५, रायपूर (१९५६), राजगृह (१९८०), राजनंदगाव (१९८१) अशा ६ ठिकाणी करण्यात आली. ही सर्व शासकीय ग्रंथालये आहेत.

या ग्रंथालयांच्या व्यवस्थापनाकरिता २००८ मध्ये रुपये ६०,०००/– इतकी रक्कम ग्रंथ व नियतकालिके खरेदीसाठी प्रत्येकी उपलब्ध करुन देण्यात आली होती.

२००८ मध्ये येथील सार्वजनिक ग्रंथालय कायद्यात मंजुरी प्राप्त झाली. राज्यातील काही महत्वपूर्ण ग्रंथालये गूंजापारा अभिषेक ग्रंथालय – दूर्ग, महात्मा गांधी वाचनालय, कवरधा, कोरबा सार्वजनिक ग्रंथालय कोरबा, मशामूद ग्रंथालय, मशामूद, दुर्गकीय ग्रंथालय, रायपर, महंत सर्वदास ग्रंथालय, महंतघाटीदास स्मारक ग्रंथालय रायपूर, पंडित सुंदरलाल ग्रंथालय, रायपर, विवेकानंद स्मारक ग्रंथालय, रायपूर, कणकनगर परिषद ग्रंथालय, शोभाराम वाचनालय, विलासपूर, डॉ. इ. राजेंद्रराव ग्रंथालय ईलासपूर इ. चा समावेश होतो.

## २.१३ हरियाणा :

हरियानातील ग्रंथालय चळवळ विषयक विचार करत असताना या परिसरातील वैदिक संस्कृतीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते ही भूमी अनेक लढवय्ये, विचारवंत, दानशूर व्यक्तींची कर्मभूमी होय. यामध्ये अर्जून, हर्ष पृथ्वीराज चव्हाण, हेम तुलाराम अशा महत्वपूर्ण व्यक्तीचा समावेश होता. या परिसरात प्राचीन काळामध्ये ऋषी व योगीमुनी यांनी येथे मौखिक स्वरुपात ज्ञान साधना करुन ती परंपरेने पुढील पिढ्यांना प्रदान केली. कुरुक्षेत्र हे सुध्दा एक शैक्षणिक क्षेत्र होते.'ऋग्वेद' जागतिक स्तरावर पहिले पुस्तक हरियाणा भूमीमध्ये तयार केले गेले. आर्यानी वसाहत केलेली ही पहिली भूमी होय. व्यास यानी वेद, उपनिषिदे, सुत्रे आणि महाभारतासारखे महान ग्रंथ या परिसरात निर्माण झाले. हा भाग पूर्वी दिल्लीशी १८०३ पासून जोडण्यात आला होता. नंतर १८३४ मध्ये उत्तर पश्चिम विभागाशी आणि १८५८ मध्ये तो पंजाबशी जोडला गेला. या स्थलांतरामुळे विकासास खीळ बसली. पंजाबमधील विभागाशी संलग्नित असताना येथे १८८४ पासून सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे विणले जाऊ लागले आणि विद्यमान हरियाणा परिसरातील अंबाला नारनूल या विभागात जिल्हा ग्रंथालये अस्त्विात आली. हीच हरियाणा विभागातील ग्रंथालयाची सुरुवात म्हणून ओळखली जाते. हरियाणाची स्वतंत्र निर्मिती झाल्यानंतर जिल्हा ग्रंथालयाचे रुपांतर पुढे मध्यवर्ती राज्य ग्रंथालयामध्ये करुन राज्यातील विकासाकरीता उपक्रम सुचविण्याची जबाबदारी या ग्रंथालयावर सोपविण्यात आली. या राज्यातील हिसार (१९६७), कर्नाळा (१९६८), जिंद (१९६९), गूरगाव (१९७०), रोहटक (१९७१) या ठिकाणी जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. या राज्यात १९८९ मध्ये ग्रंथालय कायद्यास मंजुरी प्राप्त होऊन येथे राज्य ग्रंथालय संचालनालय अस्तित्वात आले. या संरचनेमध्ये ग्रंथालय विभागाचा मंत्री अध्यक्ष ग्रंथालय संचालक (सचिव), राज्य ग्रंथालय संचालक हेच सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाविषयक प्रयत्न करतात. जिल्हा ग्रंथालय समितीकडे जिल्हा ग्रंथालयाचे व्यवस्थापन सोपविण्यात आले. १९८९ च्या काळात हरियाणामध्ये ग्रंथालयाची स्थिती विचारात घेता राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (०१), जिल्हा ग्रंथालये (१२), नगरपरिषद ग्रंथालय (११) सेवाभावी संस्थांची ग्रंथालये (०६) व इतर खाजगी संस्थांची ग्रंथालये १०० इतकी

ग्रंथालये या राज्यात कार्यरत आहेत. येथील ग्रंथालयाना वार्षिक अनुदान प्राप्त होत असून राज्य शासनाव्दारे ग्रंथालय देखभाल ग्रंथ व नियतकालिक खरेदी आणि इतर किरकोळ खर्चाकरीता आर्थिक उपलब्धता करुन दिली जाते.

येथे नगरपरिषदांची ७२ ग्रंथालये असून इतर सार्वजनिक ग्रंथालयाची संख्या जवळजवळ ३० इतकी आहे.

ज्यावेळी येथे जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली तेव्हा प्रत्येकी ४०,०००/- रुपये इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली होती. यापैकी ग्रंथ खरेदीकरिता २५०००/- रुपये, फर्निचर १०,०००/- रुपये, नियतकालिके व वृत्तपत्रे ५०००/- रुपये इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली होती. चौथ्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा ग्रंथालयाच्या विभागासाठी स्वतंत्रपणे ४,६०,०००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली होती. या ग्रंथालयांना प्राप्त होणारा निधी मर्यादित असून प्रशिक्षक मनुष्यबळाचा अभाव आणि सर्वच वर्गास प्रोत्साहन देण्याचा अभाव यामुळे येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस आजही एक दर्जेदार रुप प्राप्त झाल्याचे दिसत नाही. तसेच येथे शिक्षणाचा प्रसार अल्प प्रमाणात असल्यामूळे ग्रंथालये, महिला ग्रंथालये स्थापन करण्याविषयी या परिसरात जाणीवपूर्वक प्रयत्न झाल्याचे निदर्शनास येत नाही.

हरियाणा मूळचा पंजाबचा भाग. त्याचे विभाजन होऊन १९६६ मध्ये त्यास स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाला. येथील ९ जिल्ह्यापैकी ३ जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आलेली असून अंबाला येथे राज्य मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १९६७ मध्ये करण्यात आली. ग्रंथालयाच्या विभागाकरीता स्वतंत्रपणे अधिकारी नेमण्यात आले असून येथील ग्रंथालय चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे मुक्तद्वार ग्रंथालय पद्धती राबविण्यासाठी या राज्याने १९८९ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा पारित केलेला आहे. येथील ग्रंथालयाचा कारभार संचालक उच्च शिक्षण विभाग यांच्यामार्फत चालविला जातो.

**२.१४ राजस्थान :**

राजस्थानचा हा सर्व भूप्रदेश ऐतिहासिक परंपरेचा वारसा जोपासत असलेला भाग म्हणून ओळखला जातो. ही भूमी राजे महाराजेंची भूमी म्हणून ओळखली जाते. या राजे लोकांकडे पिढीजात सांस्कृतिक अभिरुची असल्यामुळे ज्ञानसंग्रहास चालना देण्याची वृत्ती अनेक उदाहरणातून दृष्टोत्पत्तीस येते. मध्ययुगात येथे जैसलमेर, नागोड, जयपूर, बिकानेर, उदेपूर, झुझुणू, सुजनगड, अजमेर या भागात तेथील राज्यांच्या आश्रयाने पोथ्यांचा संग्रह राजवाड्यात केला जाई. राजा मानसिंग याचा १६ व्या शतकातील पोथीखाना, येथील दर्जेदार हस्तलिखितासाठी सर्वदूर ओळखला जात असे. तसेच जयपूरचे महाराज सवाई जयसिंग हे स्वत: विद्येचे व कलेचे चाहते होते. त्यांनी आपला हस्तलिखित संग्रह दर्जेदार करण्यासाठी विशेष लक्ष पुरविले होते. आजकाल सरस्वती भांडार या नावाने कार्यरत असलेले उदयपूरच्या वाणी विलास संग्रहामध्ये १६१६ मध्ये ११५ वेष्टणातून बांधून ठेवलेले ३०००हून अधिक ग्रंथ संग्रहीत केले होते. याचबरोबर महाराजा अनुपसिंग यांनी आपल्या नावानी स्थापन केलेले उदयपूर येथील अनुपग्रंथालय आजही दुर्मिळ पोथ्यांच्या संग्रहासाठी प्रसिद्ध आहे. ब्रिटिश कालखंडात हे पोथीसंग्रह समाजासाठी कालसापेक्षा उपलब्ध होऊ लागले.

सार्वजनिक ग्रंथालयविषयक येथे पूर्वपिठिकाचा विचार करता १४ व्या शतकामध्ये येथे सार्वजनिक ग्रंथालये अस्तित्वात होती. या भूप्रदेशातील राजे हे जसे लढवय्ये होते तसेच ज्ञानाचे उपासक होते. आणि म्हणूनच वैचारिक स्वरुपात आपली ग्रंथ भांडारे उभारली होती. तसेच पोथीखानाही स्थापन केला होता. १४ व्या व १५ व्या शतकात गुजरात व इतर परिसरातून स्थलांतरीत झालेल्या व्यक्तींना राजस्थानात आश्रय प्राप्त झाल्यावर त्यांनी स्वत:ची ग्रंथभांडारे उभी केली होती. त्या काळातील ही सार्वजनिक ग्रंथालयेच होती. पहिला पोथीखाना जयपूर राज्यात महाराजा मानसिंग यानी १५९२ मध्ये अंबेर येथे स्थापन केला होता. येथील दुर्मिळ हस्तलिखिताचा संग्रह पुढील राजानी देखील विकसित केला होता. सवाई जयसिंग (दुसरे) (१६९९ ते १७४३) यानी पोथ्याखान्यात लक्षणीय वाढ करून हस्तलिखिता व्यतिरीक्त त्यानी १७०४ मध्ये ७६ ग्रंथ विकत घेतलेले होते तर

१७११ मध्ये ४१० ग्रंथ १७१६ मध्ये ३३६ ग्रंथ विकत घेतल्याची नोंद आढळते. हे सर्व ग्रंथ पोथीखान्यात ठेवले होते. ज्ञानसंग्रहाच्या दृष्टीने हा कालखंड जयपूरच्या इतिहासात सुवर्णकाळ म्हणून ओळखला जात असे. स्वत: सवाई जयसिंह (दुसरे) एक उत्तम गणिततज्ञ, एक अभिजात खगोलतज्ञ म्हणून ओळखले जात. यानी हा पोथीखाना जयपूरमध्ये स्थलांतरीत केला. मिर्झाराजे रामसिंग, सवाई जयसिंग हे सर्व ग्रंथाचे चाहते होते. सवाई राजे जयसिंह यांनी १७२७ मध्ये पोथीखान्याकडे विशेष लक्ष देऊन त्याचे ३६ विभागात व्यवस्थापन केलेले होते. त्यांनी हस्तलिखिताबरोबर ग्रंथ याची खरेदी देखील केली होती. पोथीखान्याच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व्यवस्थापकाची नेमणूक करुन प्रति लेखक व इतर सेवकवर्गाची नेमणूक करुन हा पोथीखाना अत्यंत व्यवस्थितपणे विकसित केलेला होता. सवाई प्रतापसिंग, सवाई मानसिंग यांनी देखील वस्तु संग्रहालय य पोथीखाने याचे जतन केले होते.

पूर्वपिठिकेचा विचार करता येथील राजे लोकांच्या काळात उदयपूर घराणे, जोधपर घराणे (महाराज रजतसिंग, मानसिंग, गजसिंग) बिकानेर घराणे या राज घराण्यांच्या माध्यमातून येथील ग्रंथालयांच्या विकासात महत्वाची भर घातली गेली. बिकानेर घराण्याचे राजे अनुयसिंग यांनी ग्रंथालयांच्या सर्वधनामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. ते स्वत: संस्कृत भाषेचे पंडित होते. त्यांचे लेखन फोर्ट ग्रंथालयात आजही जतन केलेले आहे. त्यांनी विशेषत्वाने धर्मशास्त्र, औषधविज्ञान, अवकाशविज्ञान या विषयावर लेखन केलेले होते तसेच इतर विद्वानांनी केलेले लेखनही येथे जतन करुन ठेवण्यात आलेले आहे. ज्यावेळी दक्षिण भारतात औरंगजेबाने गोवळकोंडा परिसरावर स्वारी केली होती. त्यावेळेला तेथील ब्राम्हण वर्गास आपला ग्रंथसंग्रह नाश केला जाईल याची भिती होती. ही बाब लक्षात येताच महाराज अनुपसिंग यांनी हे ग्रंथ खरेदी करुन आपली राजधानी बिकानेर येथे फोर्ट ग्रंथालयामध्ये पाठवून दिले. आजही हे ग्रंथ येथे जतन केलेले आहेत. दुर्मिळ हस्तलिखितांच्या संग्रहामुळे या ग्रंथालयाची ख्याती इंग्लंड, हॉलंड, जर्मनी व इतर अनेक पाश्चात्य देशांतील विद्वान लोकांच्यामध्ये पसरलेली होती. या ग्रंथालयामध्ये आज ५५२५ संस्कृत हस्तलिखिते, राजस्थानी हस्तलिखिते येथे मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. पार्शियन हस्तलिखितांचे बांधीव खंड ही येथे जतन केलेले असून त्यांची संख्या २८ इतकी आहे.

या वाटचालीचा पूर्व आढावा घेताना बडोद्यानंतर जयपूरमध्ये राजा सवाई रामसिंग दुसरे यांनी १८६६ मध्ये महाराजा सार्वजनिक पुस्तकालयाची स्थापना केली. त्यांनी ग्रंथखरेदीसाठी खास २०,०००/– रुपयांची देणगी देऊन भारतात उपलब्ध नसलेली पुस्तके इंग्लंडहून मागविली होती. या ग्रंथालयाचा पाया शास्त्रशुद्ध पद्धतीने उभा करण्यासाठी सर फ्रँक अलेक्झांडर यांना बोलाविले होते. याचबरोबर स्थानिक पातळीवरील तज्ज्ञ व्यक्तींची एक ग्रंथालय समिती स्थापन करून तिच्याद्वारे आदर्श ग्रंथालय स्थापण्याचा अभिनव उपक्रम राबविला. इतकेच नव्हे तर १८३३ मध्ये या संग्रहातील ग्रंथाची सूची करून ती प्रकाशित केली. पुढील काळात अनुक्रमे १८८६, १९०२, १९१८ यावर्षी ती अद्ययावत करून प्रकाशित केली. जयपूरचे दिवाण सर मिर्झा इस्माईल यांनी १९४३ मध्ये ग्रंथालयांचे आधुनिकीकरण करताना येथे दर्जेदार असे आधुनिक फर्निचर तयार करून घेतले. संस्थानामध्ये ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी ग्रंथालय पद्धतीचा पायंडा पडताना. १९४८ च्या कालखंडात येथे १५३ ग्रामग्रंथालये व १२ शहर वाचनालये स्थापन करण्यात आली होती.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये तत्कालीन राजस्थान सरकारने विभागवार ग्रंथालयाचे वर्ग पाडून जयपूर, जोधपूर, उदयपूर या ठिकाणच्या ग्रंथालयांना 'अ' वर्ग दिला तर इतर शहरातील ग्रंथालयांना 'ब' वर्ग देण्यात आला होता. ही योजना पुढे चालू राहून तिसऱ्या वार्षिक योजनेचा लाभ घेण्यासाठी १५ ऑगस्ट १९५६ पासून ग्रंथालयाना चालना देताना एक राज्यात केंद्र ग्रंथालय (०१), विभागीय ग्रंथालये (०५), जिल्हा ग्रंथालये (२४), तहसिल ग्रंथालय (०१), ग्राम ग्रंथालय (८६) व देवघेव विक्रेता केंद्रे (५००) अशी सुरु करण्यात आली. या योजनाबद्ध पद्धतीमुळे राजस्थानमधील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा विकास सुरळीतपणे सुरु राहिला. हा कारभार एका पद्धतीने चालल्याने येथील शासनास ग्रंथालय कायद्याची गरज भासली नाही. शासनाने शिस्त व समाजखात्याच्या उपसंचालकाच्या अधिपत्याखाली ग्रंथालयाचा कारभार सुरु केला. १९७२ च्या कालखंडामध्ये येथे एक राज्य ग्रंथालय (०१), विभागीय ग्रंथालये (०५), जिल्हा ग्रंथालये (२४), तहसिल ग्रंथालय (०९) तर मोफत देवघेव केंद्रे (२२८) आणि फिरती देवघेव ग्रंथालये (०५) अशाप्रकारे येथील

स्थिती होती. वरील केंद्राबरोबरच इतर १००हून अधिक ग्रंथालयांना आर्थिक सहाय्य केले जात असे. या व्यतिरिक्त स्थानिक स्तरावर नगरपालिकानी स्वतःची मोफत ग्रंथालय सुरु केलेली होती. पुढील काळात केंद्रीय शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना जयपूर, जोधपूर, उदयपूर, अलवार, कोटा, बिकानेर, आजमेर या माहिती केंद्राची निर्मिती करण्यात आली होती.

या राज्यात ७ व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत १९८४–८५ मध्ये राजस्थान सरकारच्या प्राथमिक व माध्यमिक विभागाचे संचालकांनी एक समिती स्थापन करुन राज्यातील ग्रंथालयाच्या विकासाकरीता एक योजना तयार करावयास सुचविले. या समितीने आपल्या अहवालाव्दारे राज्यात ग्रंथालय संचालनालय स्थापन करुन त्याकिरता स्वतंत्र व्यवस्थापनाची सोय करावी; आणि या विभागाचा कारभार प्रभावीपणे चालविण्यासाठी विशेष अधिकाऱ्याची (ओ. एस. डी.) नियुक्ती करण्याविषयी शिफारस केलेली होती. अशाच प्रकारची शिफारस राज्यातील शिक्षण विभागासंदर्भात नेमलेल्या माथूर समितीने केलेली होती. या शिफारसीचा एक मसुदा शासनाव्दारे मंजूर करण्यात येऊन अशा अम्मलबजावणीसाठी रु. २,६६,७६१ लाख इतकी तरतूद ग्रंथालयांच्या विकासाकरीता करण्यात आली होती. प्रत्यक्षात आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (१९९२–९७) ग्रंथालय विकासाकरीता केवळ रु. ४४–२४ लाख इतक्या रकमेचा विनियोग करण्यात आला होता. या अगोदर सातव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत कांही मोजक्याच बाबी ग्रंथालयाच्या दृष्टीने या राज्यात साध्य झालेल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने –

१) दौसा (जयपूर), बारग (कोला) व ढोलपूर या जिल्ह्यातून जिल्हा ग्रंथालयांची स्थापना
२) विभागीय ग्रंथालयांच्या सेवकांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा
३) ग्रंथालय विकासाकरीता राज्यस्तरीय ग्रंथालय सल्लागार समितीची शिक्षण सचिवा द्वारे नियुक्ती
४) या जिल्ह्याकरीता जिल्हा ग्रंथालयांच्या इमारती उभारणीसाठी रु. १५ लाखाची तरतूद
५) सार्वजनिक ग्रंथालय संररचनेची राज्याअंतर्गत शिफारस व भविष्यातील राज्य विभागीय जिल्हा व तहाशील स्तरावरील ग्रंथालयाचा आकृतीबंध विषयक शिफारस.

६) राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे नव्या इमारतीत स्थलांतर व डॉ. राधाकृष्णन राज्य मध्यवर्ती ग्रंथालय जयपूर असे नामकरण करण्यात आले.

याचबरोबर १९९३–९४ या वर्षाकरीता रु. २० लाख इतक्या रमकेची तरतूद ग्रंथालयाच्या विकासाकरीता करण्यात आलेली होती. यापैकी रु. १०.४० लाख इतक्या रकमेची तरतूद निर्धारीत ग्रंथालयाच्या विकासाकरीता होती. तर उर्वरीत रक्कम ग्रंथालय संचलनालयाची स्थापना व २ नवीन जिल्हा ग्रंथालयांच्या स्थापनेकरीता आणि विभागीय ग्रंथालयांच्या विकासाकरीता राखून ठेवण्यात आली होती. याच काळातील आणखीन एक महत्वपूर्ण बाब म्हणजे राज्य स्तरीय ग्रंथालय सल्लागार समितीची स्थापना ही होय. या समितीच्या २ सभा होऊन या समितीव्दारे पुढील शिफारशी करण्यात आल्या होत्या.

१) राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची भूमिका व कार्ये
२) राजस्थानी भाषेतील साहित्याची खरेदी व संघटन
३) ग्रंथालयांच्या विकासाकरीता पुढील १० वर्षातील नियोजन आराखडा तयार करणे
४) ग्रंथालय कायद्याचा सुधारीत मसुदा कायदा विभागास सादर करणे
५) सुक्ष्मचित्र फिती सुविधांचे राज्य मध्यवर्ती ग्रंथालयात सुविधांचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रंथालय क्षेत्रातील तज्ञांची समिती गठीत करणे.
६) आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ग्रंथालय विकासाकरीता अंदाजपत्रकाचा सखोल आराखडा सादर करणे. तसेच १९९३ –९४ मधील वार्षिक विनियोगाकरीता रु. २० लाखांची तरतूद करणे. राज्य ग्रंथालय संचलनालयाव्दारे पुढे आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ग्रंथालया संदर्भातील विविध उपक्रमाकरीता रु. १०४–९० लाख रकमेचा आराखडा सादर करण्यात आला होता. या व्यतिरिक्त ६ विभागीय, ३१ जिल्हा व तालुका ग्रंथालये व जयपूर, जोधपूर येथील अभ्यासिका यांचाही या योजने अंतर्गत विचार करण्यात आला होता. राज्य मध्यवर्ती ग्रंथालय हे केवळ संदर्भ ग्रंथालय म्हणून कार्य होते. १९९२ मध्ये त्याच्या वार्षिक आर्थिक तरतुदीमध्ये वाढ करताना रु. १० लाख वरुन रु. ५०,००० लाख पर्यंत सुधारणा करण्यात आली होती. तसेच १९९६ मध्ये रु. १५.५ लाख इतकी रक्कम अतिरिक्त अनुदान स्वरुपात ग्रंथालयांच्या

विविध उपक्रमाकरीता मंजूर करण्यात आली होती. या काळात मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये ३४,६९५ इतका ग्रंथसंग्रह (३१ मार्च १९९८ पर्यंत) होता. तसेच अनेक वृत्तपत्रे व नियतकालिके ग्रंथालयात येत असत. या ग्रंथालयाच्या संदर्भातील योजनेच्या अम्मलबजावणी संदर्भात राज्य सभागृहात एक प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या प्रश्नास सभागृहाकडून आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत या योजनेची अम्मलबजावणी होणार असल्याचे उत्तर ही देण्यात आले होते. ग्रंथालया संर्भातील राज्यामधील ही जागरुक लक्षवेधी अशाच स्वरुपाची होती. येथील ग्रंथालयांच्या व्यवस्थापना संदर्भात विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती १९५५ पासूनच करण्यात आलेली होती. तसेच १९९४ पासून अतिरीक्त संचालकांचे पद ही तयार करण्यात आले आहे.

राजस्थापनेनंतर भाषा व ग्रंथालय विभागाचे आजवरचे विकास स्वरुप पहाता पुढीलबाबींची नोंद घेणे क्रमप्राप्त ठरते.

१. ग्रंथालय कायद्यास मंजूरी व अम्मलबजावणी
२. सार्वजनिक ग्रंथालयांच्या संरचनेमध्ये ४५ वरुन २७६ पर्यंत झालेली वाढ.
३. नवीन जिल्हा ग्रंथालयांची जयपूर, उदयपूर, कोटा इ. ठिकाणी स्थापना
४. प्रताप नगर व संगनेर येथे अभ्यासिकांची स्थापना
५. पंचायत समितीच्या मुख्यालय ठिकाणी पूर्ण वेळ ग्रंथालयाची निर्मिती
६. मंडदल, पुस्तकालय, अजमेर व जिल्हा ग्रंथालय, बनसवाडा व भिलवाडा या ग्रंथालयाकरिता नवीन इमारतीची उभारणी
७. पंचायत समिती ग्रंथालयाकरिता इमारतींची उभारणी जवळ जवळ १०० इमारतींची पुर्तता
८. स्वातंत्र्यसैनिक, कॅप्टन दुर्गाप्रसाद चौधरी जन्मशताब्दी समारंभाचे आयोजन
९. सूद व सीकार येथे नवीन जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना
१०. डॉ. राधाकृष्णन राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा विकास एक आदर्श ग्रंथालय म्हणून करणे
११. सार्वजनिक ग्रंथालयातून अभ्यासिकेची स्थापना

१२. महाराजा सार्वजनिक मंडळ पुस्तकालयास पहिल्या ‘हेरीटेज ऑनलाईन’ ग्रंथालयाचा दर्जा देणे

१३. जिल्हा ग्रंथालयामध्ये संगणक सुविधा पुरविणे

१४. राज्यातील हेरीटेज ग्रंथालयांच्या संरक्षणाकरीता स्वतंत्र योजना

१५. सार्वजनिक ग्रंथालयातील वाचन साहित्याची १५ लाखापर्यंत वृध्दी

१६. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये ग्रंथ देवघेवीमध्ये ७ लाखापर्यंत झालेली वृध्दी.

सध्या येथील ग्रंथालयांची डिजिटलायझेशन दिशेने चाललेली वाटचाल ही कौतुकास्पदच आहे. या राज्यातील ग्रंथालयाच्या सुलभ व्यवस्थापनाकरीता सार्वजनिक ग्रंथालय नियमावली (१९५०), ग्रंथालय सेवा विषयक नियमावली (१९५७) ही अत्यंत सूचीबध्द पध्दतीने तयार केलेली असून या नियमावलीस प्राप्त झालेले शासकीय अधिष्ठान हे विशेष लक्षणीय स्वरुपाचे असून येथील सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासास ते चालना देणारे व दिशादर्शक स्वरुपाचेच आहे.

## २.१५ पंजाब :

संस्थानकाळामध्ये ज्या संस्थानांनी ग्रंथालयाच्या विकासासाठी प्रयत्न केला अशा संस्थानातील अग्रणीय संस्थान म्हणून बडोदा संस्थान ओळखले जात असले तरी या पाठोपाठ ग्रंथालयाचा विकास करणारे संस्थान म्हणजे पंजाब होय. प्राचीन काळात पंजाबमधील प्रमुख पाच नद्याच्या प्रमुख परिसरात वैदिक संस्कृती समृद्ध स्वरुपात अस्तित्वात आली होती. ज्ञानसाधनेसाठी विशेष लौकीक प्राप्त झालेला हा प्रदेश समृद्ध प्रदेश म्हणून ओळखला जातो . आजही प्राचीन ग्रंथालयाचा उल्लेख होत असताना तक्षशिला ग्रंथालय सर्वतोमुखी असते. व्याकरणकार पाणिनी राजनितीतज्ज्ञ, अर्थतज्ञ आर्य चाणक्य, आयुर्वेदाचे प्रणेते चरक या तत्कालीन महान आचार्यांची भूमी म्हणूनच हा भूप्रदेश ओळखला जातो. बुद्ध कालातही येथील जालंदर, विहार आणि राजा कनिष्ठाच्या काळातील जयेंद्र विहार हे सर्वदूर परिचित होते. जम्मूमधील 'रघुनाथ मंदिर' ग्रंथालयामध्ये कित्येक जुन्या हस्तलिखिताची बाडे सुरक्षित ठेवलेली आहेत तसेच सध्या हिमाचल प्रदेशामध्ये गेलेल्या कांगडामधील बादशहा फिरोजशहाने इ. स. १३७२ च्या सुमारास स्थापन केलेले तेथील मंदिरातील सुमारे २३०० पोथ्या असलेले हस्तलिखित, संग्रहालय, तत्कालीन फार मोठे ग्रंथालय समजले जात होते. (ना. व. मराठे) पतियाळा येथील सार्वजनिक ग्रंथालय हे एक ऐतिहासिक ग्रंथालय असून येथे अनेक दुर्मिळ पोथ्यांचा संग्रह करण्यात आलेला आहे. या संग्रहात ११५० मधील जैन पोथी उपलब्ध असून हे ग्रंथालय पूर्वी कपूरथळा संस्थानिकाच्या 'कजली' महलामध्ये स्थापन करण्यात आले होते. पुढे हेच ग्रंथालय पतियाला सार्वजनिक ग्रंथालय म्हणून सर्वश्रुत झाले. होशियारमधील विश्वेश्वरानंद वैदिक संस्थान हे देखील प्राचीन काळी दुर्मिळ पोथ्यांसाठी ओळखले जात असे. एकूणच ऐतिहासिक कालापासून आजपर्यंत पंजाबातील परिसर दुर्मिळ ज्ञानसाधने व वाचन साहित्य संग्रह यासाठी प्रसिद्ध आहे. शिक्षणासाठी हा एक लौकिकपूर्ण विभाग म्हणून ओळखला जात होता. १९१६ मध्ये या परिसरात 'ग्रंथालय प्रवेशिका' नावाचे ग्रंथपालन विषयक लिहिलेले पहिले पुस्तक हे देखील येथील ग्रंथालय चळवळीचे द्योतक होय. विद्यापीठ स्तरावर ग्रंथालय विषयक कार्यरत असणारे अमेरिकन तज्ज्ञ एचिडिन्सन यांनी येथील ग्रंथाल चळवळीमध्ये विशेष रस

घेतलेला होता. तसेच पंजाब ग्रंथालय संघाच्या स्थापनेसाठीही त्याचे योगदान महत्वपूर्ण होते. १८८५ मध्ये तत्कालीन गव्हर्नर सर चार्ल्स एचिडिन्सन यानी पहिल्या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना येथे केली. अल्पकाळात हे ग्रंथालय केंद्रीय स्थानी आले. हे एक वर्गणी ग्रंथालय म्हणूनच अस्तित्वात आले होते. एकूणच १८८५ ते १९०० हा कालखंड येथील ग्रंथालय चळवळीचा विशेष काळ म्हणून ओळखला जाई. या काळात येथे सार्वजनिक ग्रंथालयाबरोबरच महापालिका ग्रंथालये, शालेय ग्रंथालये, महाविद्यालय ग्रंथालये अस्तित्वात आली. या चळवळीला तेथील सरदार व दानशूर यांनी दिलेले योगदानही महत्त्वपूर्ण स्वरुपाचे होते. अशा दानशूराच्या माध्यमातून स्थापन झालेले ग्रंथालय म्हणजे सरदार दयालसिंग मजिदिया यांच्या उदार दातृत्वातून स्थापन झालेले दयालसिंह सार्वजनिक ग्रंथालय होय. तसेच लाला लजपतराय यांच्या हस्ते स्थापन करण्यात आलेले द्वारकादास ग्रंथालय. हे ग्रंथालय जनसेवक संस्थेद्वारे स्थापन करण्यात आले होते. पतियालाचे महाराज व अलवारचे महाराज यांच्या सर्वतोपरी सहाय्याने कुरुक्षेत्र येथे गीता मंदिरात १९२९ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करण्यात आले होते. धार्मिक पुस्तक संग्रहासाठी हे ग्रंथालय सर्वश्रुत होते.

फाळणीपूर्वी पंजाब विभागामध्ये अस्तित्वात असलेली सार्वजनिक ग्रंथालये ही विशेषकरुन लाहोर परिसरातच होती. या ग्रंथालयाच्या माध्यमातून तत्कालीन भारतातील स्वातंत्र्य चळवळीला सहकार्य लाभलेले होते. ही ग्रंथालये त्यावेळी राजकीय कैद्यांनाही ग्रंथालय सेवा प्रभावीपणे देत असत. या ग्रंथालयांमध्ये प्रामुख्याने दयालसिंग सार्वजनिक ग्रंथालय, लाहोर (१९०८), व्दारकादास ग्रंथालय व व्यावसायिक केंद्र लाहोर (१९२३), पंजाब वेदिक ग्रंथालय, लाहोर (१८९८), या महत्वपूर्ण ग्रंथालयांचा समावेश होता.

येथील नगरपरिषदा आणि ग्रामीण ग्रंथालये याविषयी दृष्टीक्षेप टाकताना पंजाबमध्ये स्थापन करण्यात आलेले नगरपरिषद सार्वजनिक ग्रंथालय लुधियाना (१८७८), नगरपरिषद सार्वजनिक ग्रंथालय, पतीयाळ (१८९९), नगर परिषद सार्वजनिक ग्रंथालय अमृतसर (१९००), नगर परीषद सार्वजनिक ग्रंथालय कपूरताळा (१९०४) यांचा उल्लेख करावा लागेल. या काळात ग्रामीण ग्रंथालयाची स्थापना शिक्षण व सहकार विभाग पंजाबशासन

यांच्याकडून करण्यात आलेली होती. १९२२–२७ या काळात शिक्षण प्रसारास चालना देत असताना जिल्हा मंडळाने १८७ माध्यमिक शाळांना इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. या इमारतीमधूनच ग्रामीण ग्रंथालयांची स्थापना करण्यात आलेली होती. या ग्रंथालयाद्वारे प्रौढ व मुले यांच्याकरीता ग्रंथालये ही मनोरंजन व अभ्यास यांची केंद्रे म्हणूनच ओळखली जात. अशा केंद्रांची संख्या जवळपास १५०० इतकी होती. याचबरोबर शहरी विभागातून ग्रंथालया सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. याच काळात जुन्या ग्रंथालयाचे नुतनीकरण करुन नवीन ग्रंथालयांचे अधिकाधिक नुतनीकरण करण्याचा प्रयत्न केलेला होता. या ग्रंथालयातून मनोरंजनात्मक साहित्य वृत्तपत्रे, नियतकालिके, पत्रके, ग्रंथ याचबरोबर कृषि व सहकार विभागाची काही प्रकाशने वाचनसाहित्य स्वरुपात उपलब्ध करुन दिली जात असत. या ग्रंथालयाच्या ग्रंथपाल पदी ज्येष्ठ शिक्षकाची नेमणूक करुन त्यास रुपये चाळीस इतका वार्षिक भत्ता दिला जात असे. तर कनिष्ठ माध्यमिक शाळांतील शिक्षकास हा भत्ता प्रतिवर्षी रुपये तीस इतका दिला जात असे.

या शिक्षक ग्रंथपालांची जबाबदारी म्हणजे अशिक्षित लोकांना पुस्तके वाचून दाखवणे, त्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या विषयावर चर्चा करणे. तसेच नॉर्मल स्कूल मधून ज्येष्ठ विद्यार्थ्यांस ग्रंथपालाच्या जबाबदारीसाठी प्रशिक्षण दिले जात असे. या विद्यार्थ्यांकडून स्थानिक भाषेतील शिक्षणाचा प्रसार व प्रौढ साक्षरता अभियान या विषयक समाधानकारक प्रगती केल्याचे लक्षात येते. या संदर्भातील श्री. संतराम भाटिया यांनी मॉर्डन लायब्ररीयन मधून लेखन करताना पुढील उल्लेख केलेला होता '' या काळात पंजाब शासनाने १६०० ग्रामीण ग्रंथालये, माध्यमिक शाळांना संलग्नित स्वरुपात स्थापन केलेली होती. या ठिकाणी शालेय शिक्षक सार्वजनिक ग्रंथपालाचे काम शाळेच्या वेळे व्यतिरिक्त काळात पाहात असे. त्याकरीता त्याला या ज्यादा कामासाठी विशेष भत्ता दिला जात असे. *(साधू एस. एन. व सराफ बी. एन, पी. एस. जी कुमार खंड ९)*

एकूणच या परिसरामध्ये सार्वजनिक ग्रंथालय प्रसाराचे कार्य मर्यादित स्वरुपात सुरु होते. १९५० च्या काळात येथे एकूण नगर परिषद ग्रंथालयांची संख्या ९७ होती तर जिल्हा ग्रंथालयांची संख्या ८ इतकी होती. ग्रामीण शाखा ग्रंथालयाकडे नजर टाकता ही संख्या

शहरी विभागात ५००० ते ५०००० लोकसंख्येचे दरम्यान ११९ इतकी होती. तर ग्रामीण शाखा ग्रंथालयांची संख्या ११९ इतकीच होती. ग्रंथ वितरण व फिरती ग्रंथालये यांचा विचार करता एकूण ५०६४ गावांमध्ये व ८२०५ खेड्यांमध्ये एकूण ग्रंथ वितरण केंद्रे १०४६४ इतकी होती. तर फिरती ग्रंथालये ५१६ इतकी होती.

चंदिगढ परिसराचा विचार करता येथे १९५५ मध्ये टी.एस. मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. यासाठी भारत सरकारने तरलोकसिंग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली होती. पाचव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ही ग्रंथालये स्थापन करण्यात येऊन तरलोक सिंग यांचेच नाव देण्यात आलेले आहे. पुढे १९७७ मध्ये जवळच एक अभ्यासिका उघडण्यात येऊन याठिकाणी वृत्तपत्रे वाचण्याची सुविधा ज्येष्ठ नागरीकांकरीता करण्यात आलेली होती. तसेच फिरत्या ग्रंथालयाची सुविधा करण्यात आली होती. या फिरत्या ग्रंथालयांच्या माध्यमातून आठवड्यातून पाच दिवस सेवा उपलब्ध करुन दिली जाते. या ग्रंथालयाचा लाभ ज्येष्ठ नागरीक, गृहिणी, मुले व अपंग व्यक्तींना अधिकाधिक प्रमाणात देण्याचा प्रयत्न केला जातो. पुढील काळात येथे १९८८ मध्ये मॉडेल ग्रामीण ग्रंथालयाची स्थापना बुरेल येथे करण्यात आली. तर १९९२ मध्ये बधेरी गावात असे ग्रंथालय स्थापन करण्यात आले. यासाठी ग्रामपंचायतीने मोफत जागा उपलब्ध करून दिलेली आहे. या ठिकाणी सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून व्दारकादास ग्रंथालय, गांधीभुवन ग्रंथालय, नेहरु युवा केंद्र ग्रंथालय व आदर्श ग्रंथालय स्थापन करण्यात आलेले आहे.काही पुस्तक  विक्रेते देखील ग्रंथालये चालवत आहेत.

स्वातंत्र्यानंतर १९४७ मध्ये लाहोर परिसरातील सर्व ग्रंथालये पाकिस्तानमध्ये गेली. त्यामुळे नवीन पंजाब परिसरामध्ये ग्रंथालय चळवळीस बळकटी देण्याचा विशेष प्रयत्न करण्यात आला. १९४९ ते ५४ पर्यंत यासाठी ग्रंथालय संघाच्या माध्यमातून विविध संमेलने भरविण्यात आली.  १९५० मध्ये ग्रंथालयाच्या स्थितीचे अवलोकन करण्यासाठी राज्य ग्रंथालय समिती डॉ. आर. एस. रंधवा यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली होती. या सामितीने तालुका, जिल्हा अशा तळापासून वरपर्यंत एका साखळीत गुंफलेल्या ग्रंथालय प्रणालीची स्थापना करण्यासाठी या समितीच्या अहवालात शिफारस करण्यात

आली होती. रंधवा योजना या नावाने पंजाबभर ही योजना ओळखली गेली. या समितीच्या शिफारशीचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

१) सार्वजनिक ग्रंथालयाचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे.

२) स्थानिक ग्रंथालय इतिहासास चालना देऊन तेथील दर्जेदार चित्रे व दस्तऐवज संग्रहीत करून त्याचे संरक्षण करणे. त्यांच्या दर्जानुसार ते वेळोवेळी प्रदर्शित केले जावेत.

३) ग्रंथालयाकडे सामान्य लोक आकृष्ट होण्यासाठी आवश्यक त्या बाबींचा अवलंब करणे अशा खर्चाकरीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करताना शासकीय तरतुदीबरोबरच स्थानिक लोकांच्याकडून देणगी स्वरुपात वर्गणी गोळा करणे. या योजनेअंतर्गत पंजाबमधील ग्रंथालयाचे पुनर्गठन करण्यासाठी अंबाला, रेवाडी, हिसार अशा ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालयामध्ये बालविभाग सुरु करण्यात आले. या काळात पंजाबमध्ये नगर ग्रंथालय (३००), ग्रामग्रंथालय (१२००) याबरोबरच पंचायती ग्रंथालये आणि नवयुवक किसान यासारख्या माध्यमातून ३०००हून अधिक ग्रंथालये उभारण्यात आली होती. या राज्याने प्रामुख्याने तीन पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रंथालयाकरीता अधिकाअधिक मदत मिळविण्यासाठी प्रयत्न केला. याची परिणिती म्हणजे केंद्रीय राज्य ग्रंथालय (चंदीगढ), केंद्रीय सार्वजनिक ग्रंथालय (पतियाळा) याच्या स्थापनेबरोबरच जालंदर, खंबाला या तीन ठिकाणी ग्रंथालय स्थापन करण्यात आली व पुढे नानुनौल व गुरुदास या जिल्हा ग्रंथालयाची स्थापना झाली. यावेळच्या प्रयत्नातून चंदीगढ, पतियाळा याठिकाणी ग्रंथालय इमारती, उत्कृष्ट वास्तुशिल्प स्वरुपात उभ्या राहिल्या. तसेच लाला लजपतराय यांच्या प्रयत्नातून स्थापन करण्यात आलेले द्वारकादास ग्रंथालय हे चंदीगढ येथील लजपतराय भवनामध्ये स्थलांतरीत करण्यात आले आणि महर्षी टंडन बाल पुस्तकालय भवनजवळच उभे करण्यात आले. एकूणच पंजाबमधील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ एका स्थिर बैठकीवर विकसित करताना १९७१ मध्ये ग्रंथालय संघाच्या माध्यमातून ग्रंथालय कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला.या मसुद्याचे आजवर कायद्यात रूपांतर करण्यात आलेले नाही. येथील ग्रंथालय संघटनांनी ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग, ग्रंथालय परिषदा, चर्चासत्रे यांच्या आयोजनाचा वेळोवेळी यशस्वी प्रयत्न करून ग्रंथालयविषयक वाचन साहित्याच्या प्रकाशनासाठी चालना देण्याचा प्रयत्न सातत्यपूर्वक सुरू ठेवलेला आहे.

## २.१६ जम्मु–काश्मिर :

पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून ओळख असणाऱ्या या प्रदेशाला नैसर्गिक सौंदर्याचे अधिष्ठान असल्यामुळे ही भूमी ज्ञानसाधनेसाठी सर्वश्रुत आहे. ज्ञानपरंपरेत पारंगत असणाऱ्या काश्मिर पंडितांनी विविध ग्रंथ रचून आपले नाव अजरामर केलेले आहे. काश्मिरमधील विहारात बौद्ध धर्म विषयक अनेक हस्तलिखिते संग्रहीत करण्यात आली होती. या हस्तलिखितांच्या नकला करण्यासाठी सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युयांनत्सेंन याने या विहारात कित्येक वर्षे राहून अशा पोथ्यांच्या नकला केल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो. आपल्या प्रवासवर्णनात त्यांनी यासंदर्भातील सर्व नोंदी करून ठेवल्या आहेत.

ह्युयानत्संग याने या परिसरात६२९ ते ६४५ या काळात भेट दिलेली होती. सुरुवातीला तो आल्या आल्या एक रात्र जयेंद्रमठामध्ये राहिला. दुसऱ्या दिवशी तो राजवाड्यातील निमंत्रणानुसार तिथे गेला आणि त्या ठिकाणी तो २ वर्ष राहिला. पुढे तेथील राजाने ह्युयांनत्संग यास बौध्द भिक्षू व भदंत यांच्या समवेत ठेवून घेतले. तसेच काही यात्रेकरुंना बोलवून तेथील हस्तलिखितांच्या वाचनाची सोय करुन दिली. याचबरोबर २० लिपिक हस्तलिखितांच्या प्रती करण्यासाठी आणि ५ व्यक्ती सहाय्यक म्हणन उपलब्ध करुन दिल्या. ह्युयानत्संग यास उपलब्ध करून दिलेली ही सुविधा लक्षात घेता तत्कालीन काळात काश्मिर मधील राजवाड्यातील ग्रंथालयांचे विषयांचे महत्त्व व सेवा पद्धती लक्षात येते. हस्तलिखितांचे वाचन व त्यांच्या नकला करणेची सुविधा या ग्रंथालयात उपलब्ध करून दिलेली होती. ही त्याकाळातील एक महत्त्वपूर्ण बाब म्हणून समोर येते. मुगल कालखंडात सुलतान जहिन अबद्दीन हा एक विद्वान बादशहा या परिसरात होऊन गेला. त्याने या परिसरात शिक्षणाच्या सुविधेबरोबरच ग्रंथालयांची उत्तम सुविधा विद्वान लोकांसाठी उपलब्ध करून दिलेली होती. त्याने स्थापन केलेल्या ग्रंथालयात पर्शियन, संस्कृत भाषेतील हस्तलिखितांचा संग्रह होता. या संग्रहात जवळजवळ २५००० इतकी हस्तलिखिते संग्रहित केलेली होती. एकूणच शिक्षण, लेखन व ग्रंथालये विषयी या बादशहास असलेले प्रेम हे त्याने श्रीनगरपासून जवळच नवसारा येथे १४२० ते १४७० च्या दरम्यान उभारलेल्या कागद कारखान्यावरुन सुस्पष्ट होते. त्याने आपल्या कालखंडात संस्कृत व अरेबिक

भाषेतील अनेक  हस्तलिखिते, पार्शियन व काश्मिरी भाषेत भाषांतरीत केलेली होती. या काळात येथील सुप्रसिध्द कवी, लेखक यांच्याकडे त्यांची खाजगी ग्रंथालये होती व या ग्रंथालयात दर्जेदार वाचनसाहित्य संग्रह होता.

मुस्लिम राजवटीमध्ये येथे ग्रंथालय स्थापन करण्यात आल्याचे उल्लेख आढळतात. काश्मिरचा पहिला मुस्लिम सुल्तान सद्रद्दीन याने मदरसा व त्यास जोडून ग्रंथालय उभे केल्याचे निदर्शनास येते. ग्रंथालयाचे पहिले चित्र हे हजरत शहा यांच्या दर्ग्यावर आढळले. त्यांचे मूळ नाव सफरुद्दीन सयद्द अब्दूल रहमान तुर्कीस्तानी असे होते. हा काश्मिरमधील इस्लामचा पहिला धर्म प्रसारक होय. काश्मिरच्या राजाने इस्लामचा १३२० मध्ये स्वीकार केल्यावर त्यांचे नाव सुलतान सदरुद्दीन असे ठेवण्यात आले. तो काश्मिरचा पहिला मुस्लिम बादशहा होता. याचबरोबर अमिर कवि सय्यद अम्मदानी हा एक विद्वान होता. त्याने स्वतःचे ग्रंथालय स्थापन केले होते. तो इराणमधून १४ व्या शतकात काश्मिरमध्ये आला होता. त्याने पुष्कळ ग्रंथ लिहिले होते. यापैकी मजमा–उल अहदलत व इतर ग्रंथ प्रसिध्द होते. पुढे त्याचा मुलगा मिर मोहम्मद अम्दानी याने देखील मदरसामध्ये ग्रंथालयाची स्थापना काश्मिरमध्ये अनेक ठिकाणी केली. मदरसा व त्याला जोडून ग्रंथालय याकरीता या सुलतानाने पुष्कळ खर्च केला होता. सुलतान रत्न–उल–अबेदिन–उल–मरुफ–बेरी बादशहाने आपल्या कालखंडात ग्रंथालयाचा विकास केला. तो स्वतः काश्मिरी, पार्शियन, अरेबियन, हिंदी, तिबाटी, संस्कृत या भाषेंचा चाहता होता. त्याने आपल्या दरबारात कला विज्ञान क्षेत्रातील अनेक विद्वानाना राजाश्रम दिलेला होता. त्याच्या या शिक्षण विषयक आस्थेमुळे काश्मिरी प्रजा त्याला काश्मिरचा अकबर म्हणून ओळखत असे. त्याच्या काळात हस्तकला व साहित्य याना विशेष प्रोत्साहन मिळून ग्रंथालयानाही खूपच प्रसिध्दी प्राप्त झाली. या बादशहास भेटीदाखल बरेच ग्रंथ येत असत. तो या भेटी आपल्या लिपिकाकडे पाठवून ग्रंथसंग्रहीत (हस्तलिखित) संग्रहीत करत असे. त्याची स्वतःची लायब्ररी सर्वदूर परिचित होती. अनेक विद्वान या ग्रंथालयाचा उपयोग करत असत. जवळजवळ १०० वर्षे हे ग्रंथालय सुस्थितीत होते. या बादशहाने इतिहास लेखनासाठी स्वतंत्र कार्यालय स्थापन केले होते. यामुळे ग्रंथालय विकासासाठी त्याचा उपयोग झाला. या ठिकाणी अनेक भाषांतून

लेखन करण्यात आले. काश्मिरच्या इतिहासविषयक 'राजतरंगीणी' हा ग्रंथ काश्मिर भाषेत लिहिण्यात आला होता. पुढे हा ग्रंथ मुल्ला अहमद काश्मिरी यानी पार्शियन भाषेत भाषांतर करुन त्याला 'बहर – उल असमे' असे शीर्षक दिलेले होते.जेव्हा अकबर काश्मिरला गेला तेव्हा त्याला हे पुस्तक भेटीदाखल देण्यात आले होते. अशा प्रकारे ग्रंथ व ग्रंथालयाची परंपरा मुस्लिम राजवटीमध्ये जोपासण्यात आली होती. पुढे या परिसरात हिंदू व मुस्लिम परंपरेतून शिक्षणाची पध्दती विकसित करत असताना विशेष करुन धार्मिक शिक्षण दिले जात असे. यासाठी अरेबिक व संस्कृत भाषेचा उपयोग केला जात असे. त्या काळात श्रीनगर, मांटंग व जम्मू, पुरामंडळ, उत्तरबहानी या ठिकाणी हिंदूची शैक्षणिक केंद्रे होती. या परिसरात १९ व्या शतकाच्या मध्यावर महाराजा रणविरसिंग यांच्या देणगीतून येथे दर्जेदार ग्रंथसंग्रह उभा करण्यात आला होता. या काळात सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत होते. तसेच शिष्यवृत्तीच्या सुविधेबरोबर मोफत पुस्तके आणि वाचनाची व राहण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांकरीता करण्यात आली होती.

राजा रणवीरसिंग यांनी सर्व जातीतील लोकांना एकत्र आणून रघुनाथ मंदिर, रणबीरेश्वरम मंदिर, गतधारणी मंदिर अशा मंदिरातून पाठशाळांची स्थापना करण्यात आली होती. या मंदिराच्या माध्यमातून सार्वजनिक स्वरुपात ग्रंथालयांचा लाभही सर्वांना उपलब्ध करुन देत असत. ग्रंथालयाचा असा मुक्त वापर करण्याची सुविधा हे त्या काळातील एकमेवाव्दितीय उदाहरण असेल. शिक्षणासाठी व ग्रंथालयासाठी महाराज रणविरसिंग व इतर धनवान लोकांनी निधी उपलब्ध करुन दिला होता. त्याचे हे आर्थिक योगदान कौतुकास्पद असून ब्रिटिश कालखंडात १८६४ मध्ये डोंगरा प्रमुख गुलाबसिंग हा काश्मिरचा राजा झाल्यावर शिक्षणाचा प्रसार या परिसरात झाला पण ग्रंथालयांच्या विकासासाठी फारसा प्रयत्न केला गेला नाही. मात्र पुढील काळात येथे महाराजा रणविरसिंग ग्रंथालय (१८७९) मध्ये महाराणा प्रतापसिंग ग्रंथालय (१८९८) या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना जम्मू व श्रीनगर येथे करण्यात आली. महाराजा प्रतापसिंग यानी ग्रंथालय निर्मितीसाठी व विकासासठी महसूल उपलब्ध करुन दिला होता.

या ग्रंथालयातून विविध भाषेतील व विविध विषयावरील ग्रंथाचा संग्रह करण्यात आला होता. या ग्रंथालयाचा १९४५ – ४६ या काळाचा तपशील –

| ग्रंथालयानेच नाव | पुस्तक देवघेव क्रमांक | अभ्यासीकेतील ग्रंथ देवघेव |
|---|---|---|
| श्री. रणबीर सार्वजनिक ग्रंथालय | ५,६७६ | १२०० |
| श्री. प्रतापतसिंग सार्वजनिक ग्रंथालय, श्रीनगर | १०,१८५ | ७४७३ |
| एकूण | १५,८६१ | ८६७३ |

या ठिकाणी १९०४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या संशोधन व प्रकाशन विभागामध्ये स्वतंत्र ग्रंथालये उभे करण्यात आली होती. या ग्रंथालयात अनेक दर्जेदार हस्तलिखिते व चित्रे होती. येथे पूँछ राजाने आपल्या विभागात सार्वजनिक ग्रंथालये स्थापन केली होती. १९६१ मध्ये येथे तीन ग्रंथालये कार्यरत होती. विविध चर्चासत्रे व पारिषदांच्या पार्श्वभूमीवर या परिसरात सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना व विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला होता.

१९३८ मध्ये शिक्षण विषयक सुधारणा संदर्भात समितीही स्थापन करण्यात आली होती. या समितीने ग्रामीण विभागातील ग्रंथालयाच्या स्थापनेसाठी शिफारशी केल्या होत्या. शाळाना जोडून या ग्रंथालयाची स्थापना करणे व शाळेतील शिक्षकाकडे ग्रंथालया संदर्भात अधिकार सोपवणे या विशेष सूचना केल्या होत्या. १९३८ मध्ये येथे सुरु केलेल्या प्रौढ साक्षरता अभियानामध्ये पुँच, महागिरीमध्ये १९४०–४१ मध्ये येथील ग्रंथालयांच्या स्थापनेसाठी चालना दिलेली होती. या ठिकाणी प्रौढासाठी असलेल्या ग्रंथालयाची संख्या एकूण ३८० ग्रंथालयापैकी ३०० इतकी होती.

स्वातंत्र्यकालखंडामध्ये काही सामाजिक व धार्मिक संघटनाच्या माध्यमातून शिक्षण प्रसार या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ग्रंथालये स्थापन केली होती. यामध्ये आर्यसमाज विवेकानंद संस्था, रामकृष्ण मिशन समिती, जमात ए– ईल्लामी, राष्ट्रभाषा प्रचार समिती याचे योगदान

महत्वपूर्ण होते. सुरुवातीस त्यानी मोफत ग्रंथालय सेवा, संघटना स्तरावर उपलब्ध करुन दिली पुढे शहर पातळीवर ही सेवा सुरु केली. पुढे सर्वच सार्वजनिक ग्रंथालयाव्दारे मोफत सेवा देणे सुरु केले. यामुळे ग्रंथालय विकासास विशेष चालना प्राप्त झाली. सन १९६१ मध्ये इथे ग्रंथालयाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून स्वतंत्र ग्रंथालय संचालनालय व निर्देशिका अभिलेखागार विभाग सुरु करुन प्रा. बशीरउद्दीन या ग्रंथपालाकडे यांची जबाबदारी सोपवली. या संचालनालयाव्दारे जिल्हा व शाखा ग्रंथालये स्थापना करण्या विषयी सूचना करण्यात आली. या योजनेअंतर्गत १९६१–६२ मध्ये जिल्हा ग्रंथालयाची स्थापना श्रीनगर, अनंतनाग बारामुल्ला, लेह, डोडा, उदमपूर या ठिकाणी करण्यात आली. दुर्दैवाने पुढील २० वर्षाच्या काळात फारशी सुधारणा झाली नाही.

ग्रंथालय विभाग १९७७ – १९८२ मध्ये शिक्षण विभागात समाविष्ट करण्यात आला. सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाच्या दृष्टीने ही घटना दुर्दैवी ठरली. पुढे १९८६ मध्ये ग्रंथालय संचालनालयाची पुनर्स्थापना करुन त्याला नवा आकार देण्याचा प्रयत्न करताना दोन उपसंचलाकाची नियुक्ती काश्मिर व जम्मूसाठी स्वतंत्रपणे करण्यात आली. दरम्यानच्या काळात १९७५ मध्ये ग्रंथालय विभागाच्या विकासासाठी रंधवा समिती नेमण्यात आली होती. डी. एम. एस. रंधवा (पंजाब कृषी विद्यापीठाचे कुलगुरु) हे समितीचे अध्यक्ष होते व इतर ०९ सदस्य समितीमध्ये होते. यामध्ये निमंत्रक म्हणून डॉ. एम. एस. इक्बाल, संचालक, ग्रंथालय व संशोधन व वस्तुसंग्रहालय विभाग म्हणून नियुक्त करण्यातआले होते. या समितीने ग्रंथालय कायदा, निधी सार्वजनिक ग्रंथालय संरचना, ग्रंथालय विभागाची कार्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व जिल्हा ग्रंथालयाची कार्ये याविषयी शिफारशी केल्या होत्या. याशिवाय ग्रंथालय सेवक आकृतिबंध याविषयी ही शिफारशी केल्या होत्या. सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीसाठी स्वतंत्रपणेही ११ सूचना सुचविण्यात आल्या होत्या.

रंधवा समितीच्या शिफारशींपैकी केवळ सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीचा स्वीकार राज्य शासनाने केल्याचे निदर्शनास येते. या पार्श्वभूमीवर आज राज्यात राज्य मध्यवर्ती ग्रंथालय जम्मू व श्रीनगर या दोन ठिकाणी स्थापन करण्यात आले असून १४ जिल्हा ग्रंथालये, ५ तहसील ग्रंथालये,५ गट ग्रंथालये अशा सार्वजनिक प्रणाली अंतरगत ग्रंथालयांची स्थापना

करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त अभ्यासिका, देवघेव केंद्र, सरहद्द गट ग्रंथालये पवित्र स्थानी असलेली ग्रंथालये येथे सेवा देत आहेत.

जिल्हा निहाय सर्व प्रकारच्या सार्वजनिक ग्रंथालयांची राज्यातील स्थिती पुढील प्रमाणे,

| अ. क्र. | जिल्हा | लोकसंख्या | ग्रंथालये | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हा | इतर | |
| १ | जम्मू | १५,८८,७७२ | १ | १५ | १६ |
| २ | उधमपूर | ७,४३,५०९ | १ | ५ | ६ |
| ३ | डोडा | ६,९१,९२९ | १ | ८ | ९ |
| ४ | खानू | ५,५०,०८४ | १ | ९ | १० |
| ५ | राजौरी | ४,८३,२८४ | १ | ९ | १० |
| ६ | पूँध | ३,७२,६१३ | १ | ४ | ५ |
| ७ | श्रीनगर | १२,०२,४६७ | १ | १३ | १४ |
| ८ | अनंतनाग | ११,७२,४३४ | १ | ६ | ७ |
| ९ | बारामुल्ला | ११,६९,७८० | १ | २० | २१ |
| १० | पुलवामा | ६,५२,६०७ | १ | ४ | ५ |
| ११ | कुपवाडा | ६,५०,३९३ | १ | ११ | १२ |
| १२ | बाडगाव | ६,२९,३०९ | १ | ९ | १० |
| १३ | सेह | १,१७,२३२ | १ | ३ | ४ |
| १४ | कारगील | १,१९,३०७ | १ | ६ | ७ |
| | **एकूण** | **१,०१,४३,७००** | **१४** | **१२२** | **१३६** |

*(संदर्भ पी. एस्. जी. कुमार खंड ९ भाग ९)*

या राज्यातील प्रत्येक शहरामध्ये तहसिल ग्रंथालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. या ग्रंथालयामधील वाचन साहित्य संग्रह ९०० ते ३५०० इतका आहे.

शासनाद्वारे येथे सरहद्द ग्रंथालयाची अधिकाधिक स्थापना करण्याचा प्रयत्न असून या ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह ४०० ते ३५०० एवढा असावा या दृष्टिने प्रयत्न सुरू आहेत. येथील शासनाचा स्तुत्य प्रयत्न म्हणून पवित्र ठिकाणच्या ग्रंथालयांचा उल्लेख करावा लागेल. पवित्र ठिकाणी नव्याने काही ग्रंथालये स्थापन करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून या ग्रंथलयांची देखभाल स्थानिक लोक प्रतिनिधी (आमदार) कडून करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. या ठिकाणच्या ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तींमध्ये प्रा. पी.एन. कौल, प्रा. बसीरुद्दीन, प्रा. जूर, उल हसन खान, प्रा. एम. एल. वाली इत्यादींचे योगदान उल्लेखनीय आहे. सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या माध्यमातून देखील ग्रंथालयांची संख्या काही प्रमाणात वाढलेली आहे. सार्वजनिक ग्रंथालयांबरोबर येथे खाजगी/वैयक्तिक ग्रंथसंग्रहाची परंपरा आजही अस्तित्वात आहे.

येथील एकूण १३६ ग्रंथालयापैकी जम्मू परिसरात ५६ ग्रंथालये कार्यरत असून, काश्मिर परिसरात ६९ ग्रंथालये कार्यरत आहेत. व ११ ग्रंथलये कारगिल व लोहे या लडारवाहू विभागातील जिल्ह्यात आहेत. या परिसरातील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रलेख/व्यक्ती सरासरी प्रमाण १:४० असे असून साहित्याच्या अनुषंगाने विचार करता हे प्रमाण साधारणतः १:१० असे आहे. या परिसरातील सार्वजनिक ग्रंथालयाकरिता शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा तीन दशकापूर्वीचा निधी विचारात घेता. त्याचे स्वरुप १९८७–८८ मध्ये ५३.८२ लाख, १९८८–८९ मध्ये ५९.२६ लाख, १९८९ –९० मध्ये ६१.४९ लाख असे असून निधीमध्ये सातत्यपूर्वक वाढ झाल्याचे निदर्शनास येते. २००९ मधील सांख्यकीय तपशिलावरुन येथे ८ राज्य मध्यवर्ती ग्रंथालये, १४ जिल्हा ग्रंथालये, ५१ तहसील ग्रंथालये, १८ विभागीय ग्रंथालये कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त गट व पवित्र ठिकाणची ग्रंथालये स्वतंत्रपणे सेवा देत आहेतच.

येथील बहुतांशी ग्रंथालये छोट्या जागेत कार्यरत असून भाडे तत्वावर इमारतीत कार्यरत आहेत. या ग्रंथालयांची स्थिती फारशी समाधानकारक नाही. सरहद्द विभागातील

ग्रंथालये विचारात घेत काश्मिरमध्ये त्यांची संख्या १९ व जम्मू मध्ये १७ इतकी आहे. तसेच खोऱ्यातून ही अशा सरहद्द ग्रंथालयांची स्थापनेचा प्रयत्न येथे करण्यात आलेला आहे. दुर्गम परिसरातील अशांत परिसरातील ग्रंथालयांची स्थिती समाधानकारक नाही. येथील सार्वजनिक ग्रंथालय विषयक जम्मू ग्रंथालय संचनालयाकरिता सांख्यकिय तपशीलानुसार निधीची तरतूद २००३-०४ व २००५ -०६ मध्ये पुढील प्रमाणे करण्यात आलेली होती.

| घटक | निधीचे वितरण लाखात | |
|---|---|---|
| | **२००३-०४ रु.** | **२००५-०६ रु.** |
| १. वेतन | १४७.५३ | १६८.०९ |
| २. प्रवास | ०.४० | ०.९५ |
| ३. कार्यालयीन खर्च | २.०५ | २.३५ |
| ४. वीजबिल | १.५३ | २.०० |
| ५. भाडे | ५.५० | ६.०० |
| ६. साहित्य | ०.५० | ०.९० |
| ७. ग्रंथ/नियतकालिके | १८.०३ | ९.२५ |
| ८. दूरध्वनी | ०.७१ | ०.७५ |
| ९. प्रोजेक्टर यंत्रणा | - | १.०१ |
| १०. प्रशिक्षण | ०.५२ | ०.२० |
| **एकूण** | **१७६.७७** | **१९१.५०** |

निधी उपलब्धतेमध्ये राज्य स्तरावर विचार करता अन्य स्वरुपाची वाढ होत असल्याचे निदर्शनास येते.

**२.१७ पश्चिम बंगाल :**

प. बंगालमध्ये बौध्द काळात ग्रंथालयांचा विकास बौध्द विहारातून झाल्याचे निर्दशनास येते. त्या काळातील हस्तलिखिते सर्वदूर परिचित होती.

चिनी प्रवासी फाहेन (५ वे शतक) व हुयानत्संग (७ वे शतक) यांनी देखील बौध्द विहाराना भेटी दिलेल्या होत्या. हस्तलिखित ग्रंथामध्ये पूर्वीही बंगाल परिसरात ५ व्या शतकात फानहेस यास बौध्द संग्रह, ताम्रलिप्ता ( सध्याचे तालूक) मदीनापूर विभागात आढळले होते. या ठिकाणी त्याने दोन वर्षे वास्तव्य केले होते. आपल्या वास्तव्यात बौध्द धर्मीय साहित्य व चित्रे यांचा त्याने अभ्यास केला होता. या उल्लेखावरुन येथे विहारास ग्रंथालये जोडण्यात आली होती हे निर्दशनास येते. तसेच १२ व्या शतकामधील तिबेटीयन संत नागत्सो याने ही भगतपूर जवळील विक्रमशील विहारात हस्तलिखित संग्रहाचे मोठे ग्रंथालय होते असा उल्लेख केलेला आहे. बिहारमधील या परिसरात पाल राजवटीमध्ये ८००० विद्वान या ठिकाणी राहत असत. हा विहार राजा धर्मपाल याने आठव्या शतकात स्थापन केला होता. याचबरोबर सोमपूर महाविहार हा विद्यमान बांगलादेशामध्ये राजशहानीतल परहपूरनजीक होता या ठिकाणीही हस्तलिखित संग्रह मोठ्या प्रमाणावर जतन केला होता. पुढील काळातील राजेलोकानी ११ व्या शतकातील आपल्या राजवाड्यास जोडून मोठे ग्रंथालय स्थापन केल्याचे निदर्शनास येते. मध्ययुगीन काळात १५ व्या शतकात पूर्वी कुरशीदास येथील राजवाडा ग्रंथालयामध्ये हस्तलिखित ग्रंथालये असल्याचा उल्लेख आढळतो. हे ग्रंथालय बंगालच्या नबाबाने स्थापन केलेले होते. बंगालमधील मुस्लिम शासकानी हस्तलिखित ग्रंथालये जतन केल्याचे दाखले आढळतात. मुरशीदाबादचे नबाबच्या काळात येथे मोईन उदाउलाह याने ग्रंथालय उभे केलेले होते. या ग्रंथालयात अनेक ग्रंथ संग्रहीत केलेले होते.

तसेच निरमोहम्मद अलीखान ग्रंथालयामध्ये २००० ग्रंथ होते. या ग्रंथालयाचा लाभ अनेक विद्वत्जन घेत असत. हैबतजंग ग्रंथालय हेही त्या काळातील महत्वपूर्ण ग्रंथालय होते. एकूणच १७ व्या व १८व्या शतकात मुस्लीम राजवटीमध्ये येथे मदरसा ग्रंथालये बंगालच्या सर्वदूर परिसरात स्थापन करण्यात आली होती. एका शासकीय अहवालानुसार

या परिसरात वरील कालखंडात १००० मदरसा होते. यावरुनच येथील ग्रंथालयाची कल्पना येऊ शकते. प्लासी १७५७ मधील, लढाई नंतर येथील शिक्षण व्यवस्थेला घरघर लागून ग्रंथालयांचे अस्तित्व धोक्यात आले. काही संस्थाच्या माध्यमातून १८१९ च्या काळात वाचनाची सुविधा उपलब्ध करुन दिली जात असे. अशा प्रयत्नातून उभे केलेल्या ग्रंथालयात जवळजवळ २७००० ग्रंथ संग्रहीत केलेले होते. या संग्रहात दर महिन्याला नवनवीन ग्रंथांची भर पडत असे. सुरुवातीच्या काळात सभासद शुल्क १६०/- होते. व मासिक वर्गणी ६/- इतकी होती. लवकरच यामध्ये वाढ होऊन सभासद २००रुपये शुल्क व साहित्य वर्गणी रुपये ८/- इतकी वाढे वर्गणीदाराकरीता या ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करण्यात आली. हे ग्रंथालय १९३१ मध्ये बंद पडले. याचबरोबर येथे मेसर्स कूक मॅक्सेवेल कंपनी कलकत्ता येथे स्थापन करण्यात आली. या कंपनीच्या माध्यमातून फिरती ग्रंथालये विकत घेऊन यातूनच पुढे फिरत्या ग्रंथालयाचा प्रसार कलकत्यामध्ये करण्यात आला.

या परिसरात हरमूल ग्रंथालय व इतर फिरती ग्रंथालये अस्तित्वात येऊन ग्रंथालय सेवा देत असताना आपला पुस्तक विक्रीचा व्यवसायही सांभाळत असत. याच पार्श्वभूमीवर हरमूल यानी आपले ग्रंथालय विक्रीस काढले असताना त्यांच्याकडील ग्रंथसंग्रह अनेक व्यक्तींनी वेगवेगळ्या वेळी विकत घेतला. या परिसरात सैनिकी ग्रंथालयाचा उदय १९२१ मध्ये इंग्रज सैनिकांसाठी झाल्याचे निदर्शनास येते. वेगवेगळ्या सैनिकी केंद्रांवर अशी ग्रंथालये उभी करण्यात आली होती. त्याकरीता भारताच्या वेगवेगळ्या विभागात ०७ सैनिकी ग्रंथालय केंद्रे उभी करण्यात आली होती. यापैकी ०३ बंगाल विभागात होती. यांनाही स्वतंत्र नियम तयार करत असताना नमूद करण्यात आले होते की, हे ग्रंथालय सैनिकी केंद्रावरील धर्मगुरुच्या मार्गदर्शनाखाली चालवावे. त्याच्या हाताखाली काम करण्यासाठी एक इंग्रज सैनिकाची नेमणूक करण्यात यावी. ग्रंथालयाच्या वेळा धर्मगुरुच्या सल्ल्याने ठरविण्यात याव्यात. नियम व व्यवस्थापन यासाठी धर्मगुरुनी कमांडींग ऑफीसररच्या परवानगीने नियम व व्यवस्थापन चालवावे. या सैनिकी केंद्रावरून ग्रंथालयामधील पुस्तकाच्या सूचीवरुन, ही ग्रंथालये अधिकाअधिक अद्ययावत करण्यासाठी कशाप्रकारे प्रयत्न करण्यात आले होते हे निदर्शनास येते.

या राज्यातील ग्रंथालयविषयक चळवळीचा विकास कलकत्यास ईस्ट इंडिया कंपनीबरोबरच झाला असे म्हटल्यास चुकीचे ठरु नये. इंग्रजांनी व्यापाऱ्याच्या निमित्ताने पाय रोवताना या कंपनीच्या माध्यमातून १७८४ मध्ये येथे ऐसीयाटीक सोसायटी स्थापन करण्यात आली. पुढे याच पार्श्वभूमीवर १८३५–३६ च्या कालखंडात कलकत्ता सार्वजनिक ग्रंथालय अस्तित्वात आले. १९०३ मध्ये या ग्रंथालयाचे नामकरण 'इंपिरियल ग्रंथालय' असे झाले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतातील सर्व भाषेतील भविष्यातील साहित्य निर्मिती विचार घेऊन १९४८ मध्ये प्रस्तृत ग्रंथालयाचे नामकरण भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय असे करण्यात आले.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर पंडीत नेहरु, राजगोपालचारी आणि मौलाना आझाद या दूरदर्शी नेत्यांनी कलकत्त्यातील एका बाजूला 'बेल्वेडियर' राजवाडा २ लक्ष रुपये खर्चून ग्रंथालयाच्या दृष्टीने सुधारुन तो ग्रंथालयासाठी उपलब्ध करुन दिला आणि पूर्वी इंग्रजीचे प्राध्यापक असून, लंडनाला ग्रंथालयाची पदवी घेतलेले बहुभाषी श्री. केशवन या चतुरस्त्र गृहस्थांना राष्ट्रीय ग्रंथालयाचे शिल्पकार म्हणून निवडले. ग्रंथालयाचा आजचा विस्तार त्याच्या इमारतीवरुन लक्षात येणारा आहे. ग्रंथालयाच्या विविध विभागांचे क्षेत्रफळ पहाता हा विस्तार लक्षात येणार आहे.

| **विभाग** | **क्षेत्रफळ (चौ. मी)** |
|---|---|
| १) भाषा भवन | ४०,०००.००० |
| २) प्रमुख इमारत | ९,७८७.९४४ |
| ३) विस्तारीत इमारत | १०,०८४.७५९ |
| ४) नवीन विस्तार | २७८७.००० |
| ५) विकसित वाचनकक्ष | १६५.४५४ |
| **एकूण** | **६२,८२५.१५७** |

आज या ग्रंथालयाचे सभासद ४०,००० हून अधिक असून पुस्तकाची संख्या विपूल आहे. ५५०० हजार व्यक्तींना वर्षभराच्या कालखंडामध्ये व संदर्भ विभागाच्या माध्यमातून सेवा पुरविल्या जातात. १९९०–९१ च्या वर्षभराच्या काळात या विभागाद्वारे ३,१५,२९६

लोकांना सेवा पुरविण्यात आल्या होत्या तर २००५-२००६ च्या काळात ५,३६,८४० व्यक्तींना सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. यावरूनच येथील कामाच्या व्यापाचे स्वरुप लक्षात येते. आज हे ग्रंथालय आधुनिक साधनाने परिपूर्ण असून सेवा अधिकाधिक आधुनिक पद्धतीने देण्यासाठी प्रयत्नशील आहे. ऐतिहासिक काळाचा विचार करता १७७८ मधील सुटा टाईपद्वारे पुस्तकाचे मुद्रण सुरु झाल्यावर कलकत्ता हे ग्रंथनिर्मितीचे मुख्य केंद्र बनले. ब्रिटिशांच्या प्रेरणेने येथे प्रामुख्याने फोर्ट विल्यम कॉलेज ग्रंथालय (१८००), हिंदू कॉलेज ग्रंथालय (१८१७), ओरिएंटल सेमिनार (१८२३), संस्कृत कॉलेज लायब्ररी (१८२४) उत्तरपाठा पब्लिक लायब्ररी (हुगळी जिल्हा) (१८५९) ही १९ व्या शतकात स्थापन झालेली महत्त्वपूर्ण ग्रंथालये होत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात पंचवार्षिक योजनेंतर्गत येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या विकासास चालना मिळाली. ग्रंथालयाचा कारभार राज्य शासनाच्या अधिपत्याखाली सुरु करण्यात आला. येथे सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी वर्गाची राज्यस्तरीय संघटना 'वंगीय ग्रंथागार परिषद' या नावाने स्थापन करण्यात आलेली होती. स्वत:चे कार्यक्रमाकरीता परिषदेने स्वत:ची इमारत उभी केलेली असून या संघटनेच्या माध्यमातून प्रमाणपत्र दर्जाचा अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. तसेच 'ग्रंथागार' हे बंगाली भाषेतील मासिक संघटनेचे मुखपत्र म्हणून प्रकाशित केले जाते.

पुढील काळात येथे १९७९ मध्ये ग्रंथालय कायद्यास मंजुरी देण्यात आली. ७ जानेवारी १९८० रोजी या कायद्यास कलकत्ता गॅझेटीअरमध्ये प्रसिद्धी देण्यात आली असा कायदा मंजूर करणारे हे देशातील ५ व्या क्रमांकाचे राज्य होय. या कायद्याच्या मसुद्यातील प्रस्तावनेमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करणे, विद्यमान ग्रंथालयाचा कारभार सुरळीत करणे व त्यांना अनुदान उपलब्ध करून देणे व ग्रामीण व शहरी विभागातील ग्रंथालयाद्वारे लोकांना प्रभावी सेवा उपलब्ध करून देणे ही उद्दिष्टे नमूद करण्यात आलेली आहेत. या कायद्याच्या सर्वसामान्य वैशिष्ट्याबरोबरच स्थानिक ग्रंथालय संस्थावर सोपविण्यात आलेली आर्थिक जबाबदारी हे विशेष होय. निधी संकलनाची साधने म्हणून वर्गणी, देणग्या, इंडाऊनमेंटस बरोबरच शासकीय निधी, स्थानिक ग्रंथालय संस्थाच्याद्वारे कायद्यांतर्गत तरतूदीनुसार निधी संकलन यांचा निर्देश करण्यात आलेला आहे.

पूर्व इतिहास १९०० च्या काळात येथे ५० सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत होती. ग्रंथालयांच्या विकासाकरीता येथील सरकारने ७ स्तरीय विकास योजना अंमलात आणताना, राज्य मध्यवर्ती ग्रंथालये, जिल्हा ग्रंथालये, उपविभागीय ग्रंथालये / परिसर ग्रंथालये, ग्रामीण ग्रंथालये, ग्राम ग्रंथालये व वितरण केंद्रे / ग्रंथ ठेव केंद्रे असे स्तर केले होते. या योजनेनुसार १९९६ पर्यंत येथे मध्यवर्ती ग्रंथालय (१), जिल्हा ग्रंथालये (२२), उपविभागीय ग्रंथालय (१२०), ग्रामीण ग्रंथालये (२२७६) या व्यतिरिक्त ३००० हून अधिक अशासकीय सार्वजनिक ग्रंथालये अस्तित्वात होती.

येथील सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रणालीसाठी शासन पुरस्कृत सार्वजनिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन निवडलेल्या व्यवस्थापन समितीद्वारे पाहिले जाते. या समितीमध्ये नगरपरीषद, नगरपालिका, विभागातील नामनिर्देशित अधिकारी हे शहर व पंचायत समितीमधून ग्रामीण ग्रंथालयासाठी निवडले जातात. सबंधित ग्रंथालयाचा ग्रंथपाल हा या समितीचा सहसचिव असतो. जिल्हा ग्रंथालयाचे व्यवस्थापन समितीमध्ये जिल्हा परिषदेचे प्रतिनिधी हे कार्यालयीन बाहेरील सदस्य असतात. तर जिल्हा ग्रंथालय अधिकारी हा या समितीचा अध्यक्ष असतो. पुरस्कृत ग्रंथालयातील सेवक हे स्थानिक ग्रंथालय संघटनेचे प्रतिनिधी म्हणून स्विकारले जातात. शासकीय ग्रंथालयाकरीता शासनाव्दारे सल्लागार समिती निवडली जाते. या संचलनालयाकडून ग्रंथ व्यवहाराच्या दृष्टीने सुचीय नियंत्रण ठेवले जाते. तसेच ग्रंथालय प्रसाराकरीता वाचन अभिरुची वृध्दीसाठी ग्रंथ जत्रांचे आयोजन केले जाते. या जत्रांचे

**प्रमुख उद्देश :**

१) ग्रंथ खरेदीच्या दृष्टीकोनातून ग्रंथपाल व ग्रंथप्रेमीना एकत्र जत्रेत विविध विषयावरील अधिकाधिक ग्रंथ पहावयास मिळतील/ यामुळे ग्रंथनिवड करण्यास सुलभ होईल.

२) प्रकाशकाना आपल्या पुस्तकाचे प्रदर्शन मांडून ग्रंथ व्यापार वृध्दिंगत करण्यासाठी मदत करणे तसेच ग्रंथालये व वाचक यांच्याशी संवाद साधणे यासाठी संधी उपलब्ध करुन देणे.

३) वाचन अभिरुचीस प्रोत्साहन देणे व याव्दारे अपुरस्कृत ग्रंथालये व अशासकीय ग्रंथालये याना सहकार्य करणे.

४) प. बंगाल मधील ग्रंथालय संचालनालयाने सार्वजनिक ग्रंथालयाचा डाटाबेस तयार करण्याचे हाती घेतले असून याद्वारे ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी राज्यशासनाने राजा राममोहन रॉय फाऊंडेशन यांच्या सहयोगाने हे अभियान प्रगतीवर नेले आहे.

५) प. बंगामधील सार्वजनिक ग्रंथालयाचा विचार करता ग्रंथालयाच्या सर्वसामान्य सेवाबरोबरच अभ्यासिका सेवा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सेवा, अंध – मुक – बधीर यांच्याकरता विशेष सेवा, बरोबरच समाज ग्रंथालय माहिती सेवा केंद्र ही सेवा ग्रामपंचायत विभागामध्ये अधिक पुरविली जाते. अशा सेवा पुरविण्यासाठी येथे ग्रामपंचायतीव्दारे जागेची उपलब्धता करुन दिली जाते. या केंद्राचे कामकाज स्थानिक शिक्षक अथवा वाचक यांच्याव्दारे पाहिले जाते. हे केंद्र किमान तीस तास, आठवड्यातील पाच दिवस उघडे ठेवले जाते. येथे काम पाहण्याऱ्या व्यक्तीस दरमहा ८००/– रुपये इतके मानधन दिले जाते. या केंद्राना जि. परिषदांच्या माध्यमातून अनुदान राज्य शासनाव्दारे दिले जाते. या केंद्राच्या समितीमध्ये ग्रामपंचायतीचा प्रमुख, कार्याध्यक्ष असतो. स्थानिक स्तरावरील महाविद्यालयातील शिक्षक अथवा माध्यमिक शिक्षक, सहाय्य शिक्षक या स्तरातून एका शिक्षकाची निवड केली जाते. पुरस्कृत ग्रंथालयाचा ग्रंथपाल अथवा उपग्रंथपाल संबंधित पंचायत समिती विभागातून निवडला जातो. साक्षरता अभियाना संदर्भात अथवा विज्ञान अथवा संस्कृती विभागामध्ये रुजू असणाऱ्या एका व्यक्तीची निवड केली जाते.

संबंधित ग्रामपंचायतीचा ग्रामसेवक समाज ग्रंथालय संघटक हा निमंत्रक असतो. या केंद्रावरील वाचकातून ०३ वाचकाची निवड केली जाते. या समितीवर केली जाते. यामध्ये ०१ महिला असते. या परिसरातील ग्रंथालय व ग्रंथालय संचालनालयाने आधुनिकीकरणासाठी वाटचाल सुरु केली असून प. बंगालचे तत्कालीन मुख्यमंत्री बुध्ददेव भट्टाचार्य यांच्याहस्ते २००५ साली या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय हस्तलिखित अभियानाअंतर्गत हस्तलिखितांचे संग्रहण व जतन हेही कार्य राज्य सार्वजनिक ग्रंथालयाने हाती घेतले आहे. येथील ग्रंथालय विषयक वाटचालीचा आढावा घेता ग्रंथालयासाठी उपलब्ध करुन दिलेली आर्थिक तरतूद जवळजवळ दुप्पट आहे.

१९९२–९३ मध्ये देण्यात येणारी रक्कम ही रुपये १,६१,५६,०००/– इतकी होती. पुढील पाच वर्षात १९९६–९७ मध्ये याच्यामध्ये वाढ होऊन ही रक्कम रुपये २६,३१,१२,९२७/– इतकी होती. पुढील पाच वर्षात २००१–०२ मध्ये ती रुपये ५३,९६,००,६७२/– इतकी होती. २००७ मध्ये ती ५,६९,३१,०७,७८३/– इतकी होती. म्हणजे १५ वर्षाच्या कालखंडामध्ये आर्थिक तरतूदीमध्ये सतत वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

राज्यमध्यवर्ती ग्रंथालयाच्या तपशीलाकडे लक्ष वेधता याठिकाणी २००५–०६ मध्ये मंजूर ३८ पदापैकी ३२ पदे भरण्यात आली होती. तर वर्षभरामध्ये ३,९४७ इतके ग्रंथ खरेदी करण्यात आले होते. नव्याने १६ नियकालिके खरेदी करण्यात आली होती. या सर्व व्यवस्थापनासाठी वर्षभरात रुपये ५,२५,०००/– इतक्या निधीचा विनियोग करण्यात आला होता.

**२.१८ उत्तरांचल :**

उत्तर प्रदेशातून विभाजित होऊन ९ नोव्हेंबर २००० रोजी हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आलेले हे ७ वे राज्य होय. या राज्याच्या निर्मितीनंतर उत्तर प्रदेशातील राजवटीत या विभागात कार्यरत असणारी सर्व सार्वजनिक ग्रंथालये उत्तरांचल राज्याच्या अधिपत्याखाली आली. या राज्याचे साक्षरता प्रमाण हे ७२% हून अधिक असल्याने विद्यमान राज्यशासन येथील सुशिक्षित जनतेकरीता सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे उभारल्यामुळे विशेष उत्सुक असल्यानेच स्वतंत्र राज्याच्या निर्मितीनंतर अवघ्या ४/५ वर्षात उत्तराचल सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००५ मध्ये मंजूर करण्यात आला. राज्यात अशाप्रकारचा कायदा करणारे हे १३ वे राज्य होय. उत्तर प्रदेशातील राजवटीत विशेष कार्यरत असणाऱ्या ग्रंथालयांच्या विकासाकरीता नव्या राजवटीने लक्ष पुरविताना या प्रदेशात १४ व्या शतकापासून राजस्थानांतर्गत स्थापन करण्यात आलेले समृद्ध असे हस्तलिखित संग्रह, पोथी खाते, राणा कुंभाने १४४८ मध्ये स्थापन केलेले सरस्वती भांडार ग्रंथालय, १५९२ मधील पोथी खाना यांचेबरोबरच भरतपूर संस्थानातील १९०७ मधील आद्य सार्वजनिक ग्रंथालय, सीकर येथील १९०८ मधील ग्रंथालय व कोटा (१९१०) फत्तेपूर (१९१०), जोधपूर (१९१०) या सार्वजनिक ग्रंथालयांकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. १९५६ मध्ये येथे विभागीय ग्रंथालये (७), जिल्हा ग्रंथालये (२४), तहसील ग्रंथालये (४), ग्रंथ प्रसरण केंद्रे (६००) कार्यरत होती. या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करण्यासाठी मोबाईल व्हॅनही उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

**२.१९ अरुणाचल प्रदेश :**

या उत्तरेकडील भूप्रदेशात १९५० च्या कालखंडात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सुरु झाली. १९८७ मध्ये प्रदेशास स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त होऊन ईटानगर येथे राजधानी स्थापन करण्यात आली. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात येथे सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाचे अभियान सुरु करण्यात आले. या योजनेअंतर्गत राज्य ग्रंथालयाबरोबर, विभागीय ग्रंथालयाची स्थापना करून राजधानीच्या ठिकाणी फिरते ग्रंथालय योजना राबविण्यात आली. प्रत्यक्षात १९५६ ते १९६८ च्या काळात सार्वजनिक ग्रंथालय सेवा या प्रदेशात सुरु करण्यात आली होती. या काळात सर्व जिल्हा केंद्राच्या ठिकाणी ग्रंथालये स्थापन करुन त्याचा कारभार जिल्हा संशोधन अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आला होता. या ग्रंथालयाचे मुख्यालय सिलाँग येथे मध्यवर्ती स्वरुपात स्थापन करण्यात आले आणि उपविभागीय केंद्रे दापोरीजो व रोईंग येथे १९६०–६२ या काळात स्थापन करण्यात आली. पुढे १९६६ मध्ये तिरप जिल्ह्यातील यालाँग येथे ग्रंथालय स्थापन करण्यात आले. लवकरच लावग व शेफा येथेही ग्रंथालये स्थापन करण्यात आली. कोलोराम व तूतींग येथे १९६७–६८ मध्ये ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देण्यात येऊन मेखूका येथे ग्रंथालय सुरु करण्यात आले होते.

पुढील काळात १९७८ अरुणाचल प्रदेशाची राजधानी इटानगरमधून सिलाँग येथून स्थलांतरीत करण्यात आली. या ठिकाणी मध्यवर्ती ग्रंथालय, सचिवालय इमारतीत स्थलांतरीत करुन त्याचे नामरकरण राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, इटानगर असे करण्यात आले. येथे लवकरच प्रशिक्षित ग्रंथपालाची नियुक्ती करुन लोकांच्या वाढत्यामागणीनुसार जिल्हा ग्रंथालये, गट ग्रंथालये, सर्कल ग्रंथालये यांची स्थापना करण्यात आली. २००० च्या काळात येथे राज्य ग्रंथालये (०१), जिल्हा ग्रंथालये (१२) गट ग्रंथालये (१८) सर्कल ग्रंथालये (३८) शाखा ग्रंथालये (०२) उपविभागीय ग्रंथालये(१३) अशी एकूण ८४ ग्रंथालये कार्यरत होती. या ग्रंथालयाच्या विकासाकरीता १९८६ पासून राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठानाकडून विशेष आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देवून येथील ग्रंथालय विकासास चालना दिली आहे. याठिकाणी आजही छोट्या छोट्या ग्रंथालयातही किमान ३००० ग्रंथ असावेत अशी अपेक्षा ठेवण्यात आली आहे.

येथील शाखा ग्रंथालयातून वाचकाची संख्या घटत असल्याचे दिसन येते. या ग्रंथालयात १९८५ च्या काळात  जवळ जवळ ७००० वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेत होते. यामध्ये वाढ होऊन १९८७ मध्ये १२७५० इतकी झाली. पुढील दशकाच्या काळात वाचकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होताना ही संख्या इ.स. २००० मध्ये ३,५२७ होती. तर २००४ मध्ये ती जवळजवळ १००० पर्यंत येऊन ठेपली होती. या ग्रंथालयाच्या विकासासाठी नव्याने लक्ष देणे गरजेचे आहे. याठिकाणी ग्रंथालय कायदा २००९ मध्ये अस्तित्वात आलेला आहे.

**२.२० झारखंड राज्य :**

हे राज्य पूर्वीच्या बिहार राज्याचा एक भाग होय. स्वतंत्र राज्याचा दर्जा या परिसरात १५ नोव्हेंबर २००० रोजी प्राप्त झाला व रांची हे राजधानीचे ठिकाण म्हणून घोषित करण्यात आले. या राज्यात १८ सार्वजनिक ग्रंथालये शासनाद्वारे स्थापन करण्यात आली असून येथील ग्रंथालय संरचनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे,

१) राज्य सार्वजनिक ग्रंथालये ४ असून रांची, चार्टबसा, धनबाद, दूमका या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे ग्रंथालय उभे करण्यात आलेले आहे.

२) हाजिराबाल येथे एक विभागीय ग्रंथालय स्थापन करण्यात आले आहे.

३) पाच जिल्हा ग्रंथालये अनुक्रमे गुमला, लोहार दागा, दाल्तोगंजा, गोडा येथे प्रत्येकी एक याप्रमाणे स्थापन करण्यात आलेली आहे.

४) आठ उपविभागीय ग्रंथालये अनुक्रमे गरुहवा, लायसेर, पापूर, सिमडेगा, छात्रा, साहेबग, सारईकेला आणि खुंटी (करण) याठिकाणी स्थापन करण्यात आलेली आहेत. येथे अद्यापही सार्वजनिक ग्रंथालय कायदा लागू करण्यात आलेला नाही. येथील ग्रंथालयाची स्थिती समाधानकारक नाही.

याचबरोबर येथे शासकीय ग्रंथालयाव्यतिरिक्त खाजगी संस्थाकडून चालविली जाणारी ग्रंथालये सेवा देत आहेत. यामध्ये श्रीरामकृष्ण मिशन ग्रंथालय रांची, श्री योगदा आश्रम ग्रंथालय रांची, बुधीचा सार्वजनिक ग्रंथालय रांची, आंतरराष्ट्रीय ग्रंथालय व सांस्कृतिक ग्रंथालय रांची यांचा समावेश होतो. २००० सालातील सांख्येकीय तपशीलानुसार येथील ग्रंथ संग्रहातील वाचन साहित्य फारच अल्प प्रमाणात संग्रहित केल्याचे निदर्शनास येते. उदा. रांची (३७०३), धरबा (३१९९०), दुतका (१२७२७), चार्टबसा (२५७५७). येथील ग्रंथालयाचे वर्गीकरण व तालीकीकरण ही समाधानकारक नाही. आज येथे ग्रंथालय कायदा अस्तित्वात आलेला नाही. या ग्रंथालयाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून झारखंड माहिती व ग्रंथालय संघटना एप्रिल २००७ मध्ये स्थापन करण्यात आली असून ग्रंथालय कायद्यासाठी ती प्रयत्नशील आहे.

**२.२१ सिक्कीम :**

हा पूर्वीचा भाग मोगल राज घराण्याचे छोटेसे संस्थान होय. २६ एप्रिल १९७५ रोजी या संस्थानाचे भारतात २२ वे राज्य म्हणून विलिनीकरण करण्यात आले. गंगटोक ठिकाण राजधानी म्हणून घोषित करण्यात आले. येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ शासकीय ग्रंथालयाच्या प्रभावातून अस्तित्वात आलेली आहे. १९७५ नंतर स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त होताच येथील लोकांनी सार्वजनिक ग्रंथालयाचे महत्त्व लक्षात घेऊन ग्रंथालय चळवळीचे अभियान सुरु करण्यात आले. येथे सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्रंथालयाची स्थापन करण्यात आलेली असून या सर्व ग्रंथालयाचा कारभार शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून पाहिला जातो. आजही येथे ग्रंथालय कायदा अस्तित्वात आलेला नसून ग्रंथालयाची  स्थानिक स्थिती असमाधानकारक आहे. येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन्यात आलेले नसून एकूण ४ सार्वजनिक ग्रंथालयावर १९८६–२००७ या काळात केवळ रुपये५ लाख इतकी अल्प रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. या घटनेवरुन राज्य शासनाची ग्रंथालय विकासासंदर्भातील उदासीनता स्पष्ट होणारी आहेत.

## २.२२ त्रिपुरा :

येथील सांख्यिकीय तपशीलानुसार लक्षात येते की येथे स्टेट लायब्ररी (०१), उपविभागीय ग्रंथालये (१७), शाखा ग्रंथालये (१७) वितरण केंद्रे (३००) कार्यरत असन १९७५ येथे ग्रंथालय कायद्याचा मसुदा तयार करण्यात आलेला असून त्याची अंमलबाजवणी झाली नाही असे असतानाही येथे विरचंद्र सार्वजनिक ग्रंथालय व कामीला या ग्रंथालयानी १९६२ पासून वेगवेगळ्या कालखंडात कार्यरत असताना या ग्रंथालयानी दिलेली सेवा महत्वपूर्ण असून हे ग्रंथालय त्रिपुरा विभागातील ग्रंथालयाच्या विकासाचे पाऊलखूण म्हणून ओळखले जाते. केवळ राजघराण्याच्या ज्ञानविषयक आस्थेमुळे या ग्रंथालयाचा विकास झाला आहे. राज घराण्याकडे आलेले पाहूणे देखील या ग्रंथालयास भेट देत असून येथील ग्रंथसंग्रह अत्यंत दर्जेदार आहे. येथील ग्रंथसंग्रहाविषयी उल्लेख करताना त्यानी येथील बंगाली संस्कृत भाषेतील साहित्य व वैष्णव साहित्य व हस्तलिखिते ही खऱ्या अर्थाने विशेष आकर्षणीय केंद्र असल्याचे नमूद केले आहे.

हे पूर्वीचे छोटेखानी संस्थान असून १९५० मध्ये स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश म्हणून १५ ऑगस्ट १९५० रोजी भारतात समाविष्ट करण्यात आला. पुढे २१ जानेवारी १९७२ रोजी यास स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्यात आला. या प्रदेशास एक ऐतिहासिक वारसा असल्याने महाराजा विरचंद्र माणीक्य याने १८९६ मध्ये विजेयता पॅलेस ग्रंथालयाची स्थापना आगरतळा येथे केली व पुढे त्याचे नाव विरचंद्रा ग्रंथालय असे करुन सार्वजनिक ग्रंथालयाचा  दर्जा देण्यात आला.

१९५३ मध्ये या ग्रंथालयाचे नामकरण शासनाने विरेंद्र सार्वजनिक ग्रंथालय असे करून १९७७ मध्ये या ग्रंथालयास राज्य ग्रंथालय असा दर्जा देऊन पुनर्नामकरण विरचंद्र राज्य मध्यवर्ती ग्रंथालय असे करण्यात आले. येथील सार्वजनिक ग्रंथालये ही उच्च शिक्षण व तंत्र विभागाच्या अंतर्गत कार्यरत असून आज येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (१), जिल्हा ग्रंथालये (३), उपविभागीय ग्रंथालये (७), ब्लॉक सार्वजनिक ग्रंथालये (१०), ग्रामीण ग्रंथालये (२), बाल ग्रंथालये (१), याजबरोबर शासनाच्या सामाजिक शिक्षण व पंचायत राज्य याच्याद्वारे काही सार्वजनिक ग्रंथालये चालविली जातात. येथे अद्यापही ग्रंथालय कायदा लागू करण्यात आलेला नाही.

**२.२३ नागालँड :**

१९६१ मध्ये केंद्रशासित प्रदेश म्हणून समावेश झाल्यानंतर १९६३ मध्ये प्रदेशास स्वतंत्र राज्याचा दर्जा देऊन कोहीमा येथे राजधानी स्थापन करण्यात आली. या राज्यात १९८१ मध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना कोहीमा येथे करण्यात आली. तसेच जिल्हा ग्रंथालय (८), ग्रामीण ग्रंथालय (३३०), ही कला व सांस्कृतिक विभागांतर्गत कार्यरत असून अद्यापी येथे राज्य ग्रंथालय कायदा अस्तित्वात आलेला नाही. येथील चार जिल्हा ग्रंथालयांचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे.

**२.२४ मेघालय :**

हा प्रदेश १९७२ पासून आसाममधून वेगळा करून मेघालय राज्याची स्थापना करण्यात आली व शिलाँग ही राजधानी करण्यात आली. याचवेळेला १९०३ मध्ये स्थापन झालेल्या आसाम राज्यामध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा समावेश या राज्यात करण्यात आला. या राज्यात ग्रंथालयाचा विकास करण्यासाठी उत्तरपूर्व कौन्सिलची १९७२ मध्ये स्थापना करून या अंतर्गत स्वतंत्र अशी ग्रंथालय सल्लागार समिती स्थापन करण्यात आली. आज येथे राज्य मध्यवती ग्रंथालय (१), जिल्हा ग्रंथालय (४), कार्यरत असून सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून काही सार्वजनिक ग्रंथालये चालविली जातात. येथे मेघालय ग्रंथालय संघटनेची स्थापना १९९४ मध्ये करण्यात आलेली आहे. ही संघटना ग्रंथालयाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्नशील आहे. आजही येथे ग्रंथालय कायदा अस्तित्वात आलेला नाही.

**२.२५ हिमाचल प्रदेश :**

या प्रदेशास संपूर्ण राज्याचा दर्जा २३ जानेवारी १९७१ मध्ये देण्यात आला व सिमला हे शहर राजधानीचे ठिकाण म्हणून जाहीर करण्यात आले. संघटित ग्रंथालय सेवा या उपक्रमांतर्गत शिक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून येथे १९५२ मध्ये काही प्रमाणात सार्वजनिक चळवळीस चालना मिळाली. १९५९ मध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना 'सोलन' मध्ये करण्यात येऊन पुढील दोन वर्षाच्या कालखंडात ६ जिल्हा ग्रंथालये सुरु करण्यात आली. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांतर्गत संदर्भ विभाग, देवघेव विभाग, नियतकालिक विभाग व बालविभाग असे चार स्वतंत्र विभागात सुरु करण्यात येऊन येथील लोकांकरीता मोफत सेवा सुरु करण्यात आली. या राज्यात एक मध्यवर्ती ग्रंथालय, ११ जिल्हा ग्रंथालये, १५ समाज केंद्रीय ग्रंथालये, १०१ वरिष्ठ माध्यमिक शालेय सार्वजनिक ग्रंथालये सुरु करण्यात आली. शालेय तासिकानंतर शालेय ग्रंथालयांचा वापर सार्वजनिक ग्रंथालय स्वरुपात केला जातो. *(जयनायक, १८११, पृ. ६६)* ग्रामीण भागातील लोकांच्या ग्रंथालय सेवा विषयक गरजांचा पुरवठा करण्यासाठी दोन फिरती ग्रंथालयेही सुरु करण्यात आली आहेत.

सध्याच्या कालखंडात येथे तहसील सार्वजनिक ग्रंथालये पंगी, भारमुर, रामपुर, भूषाहार, रोहक, सरकघाट, बसल, खंडाघाट आणि राजघर येथे स्थापन केलेली होती. १९८५ च्या कालखंडात येथे ११ जिल्हा सार्वजनिक ग्रंथालये, १३ तहसील/ समाजकेंद्र सार्वजनिक ग्रंथालये अस्तित्वात होती. सातव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत येथे (०१) राज्य सार्वजनिक ग्रंथालय सिमला येथे (०२) तहसील ग्रंथालय कोरखाई (सिमला) आणि सिवूया (शाबा) येथे व (१०१) उच्च माध्यमिक शाळांची ग्रंथालये सार्वजनिक ग्रंथालये म्हणून जाहीर करण्यात आली. ही ग्रंथालये लोकांसाठी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत खुली ठेवण्यात आली होती. येथील सर्वच ग्रंथालयामध्ये प्रशिक्षित सहाय्यक ग्रंथपालाची नेमणक करण्यात आली होती. राज्यस्तरीय सार्वजनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन व प्रशासन व त्यावरील नियंत्रण हे शिक्षणविभागाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या धोरण निश्चिती व सल्लागार मंडळ आणि खरेदी समिती या केंद्रीय नियोजन समितीव्दारे केले जाते. जिल्हा स्तरावर सर्वांगीण नियंत्रण हे महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे असते. स्थानिक जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्या सहाय्याने

जिल्हा सल्लागार समिती या ग्रंथालयांचे व्यवस्थापन पाहते. स्थानिक स्थरावरील ग्रंथालयाचे कार्य हे शाळेचे मुख्याध्यापक अथवा जिल्हा ग्रंथपाल यांच्या नियंत्रणाखाली चालते. येथील सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली ही राज्य शासनाव्दारे चालविली जाते. क्वचितच एखादी स्वायत्त स्वयंसंस्था या क्षेत्रात कार्यरत आहे.

येथे १९८९–९० मध्ये एकूण १२९ ग्रंथालये कार्यरत होती. तर २००७ –०८ मध्ये ही संख्या १२२६ पर्यंत पोहचली होती. यामध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (०१), जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय (११) तहसील / समाजकेंद्र सार्वजनिक ग्रंथालय (१०), जमाती ग्रंथालय (०३), राज्य सार्वजनिक ग्रंथालय (०१), वरिष्ठ माध्यमिक शालेय ग्रंथालये (१२००) यांचा समावेश करण्यात आला होता.

शालेय स्तरावरील ग्रंथालयाना राज्य शासनाव्दारे सार्वजनिक ग्रंथालये म्हणन घोषित करणे विषयक निवेदन १९८६ मध्ये जाहिर करण्यात आले. या प्रदेशातील शासनाव्दारे येथील ग्रंथालय प्रणालीसाठी अुनदानाची उपलब्धता अल्प प्रमाणात उपलब्ध केल्याने या ग्रंथालयाची प्रगती खुंटलेली आहे. या ठिकाणी ग्रंथालयाविषयक कोणताही कर आकारण्यात आला नाही. १९८८–८९ मध्ये या सर्व सार्वजनिक ग्रंथालयाकरीता रुपये ५०,००००० /– इतकी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आली होती. ग्रामीण परिसरात येथे सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे उभे करणे हे गरजेचे आहे. या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन राज्याच्या शिक्षण विभागाने राज्य ग्रंथालय सोलन च्या माध्यमातून व इतर जिल्हा ग्रंथालय यांच्या सहकार्यातून १९६१ मध्ये फिरत्या व्हॅनचा उपयोग करुन फिरते ग्रंथालय सुरु केले होते. पण एक दशकभर हा उपक्रम सुरु राहून निधीअभावी तो बंद पडलेला आहे.

या राज्यामध्ये मुलांसाठी ग्रंथालय सुविधा राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या माध्यमातून सुरु करुन या ग्रंथालयात १०,००० हून अधिक ग्रंथ असून यांचा कारभार सहाय्यक ग्रंथपालाव्दारे पाहिला जातो. या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करताना येथे दृकश्राव्य साधनांचीही उपलब्धता करण्यात आली आहे. या ग्रंथालयामध्ये बालवाचकांची संख्या १५०० इतकी आहे. इतर जिल्हा ग्रंथालयात मात्र बाल विभागांची संख्या समाधानकारक नाही. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाव्दारे ०९ महिने सक्तीचा ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम १९७१ पर्यंत सुरु करण्यात आलेला होता.

## २.२६ मिझोराम :

येथील ग्रंथालयाच्या विकासाचा आढावा घेता राज्य ग्रंथालय अजवाल याचे २००४–०५ मध्ये ७,५३७ सभासद होते व ग्रंथसंग्रह ५६,१६७ इतका होता आणि दररोज येणाऱ्या वाचकांची संख्या ३,९५७ इतकी होती. ही संख्या २००५ –०६ मध्ये सभासद ७६३२, ग्रंथसंग्रह ५७,८२४ व वाचक ये जा संख्या ३००४ इतकीच होती. यावरुन येथील घटत जाणाऱ्या वाचक सभासदांची संख्या लक्षात येते. जिल्हा ग्रंथालयाचा विचार करता यांचे सांख्यकीय स्वरुप पुढीलप्रमाणे –

| जिल्हा ग्रंथालय ग्रंथालये | २००४ | | | २००५–०६ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद | ग्रंथसंख्या | रोजचे वाचक | सभासद | ग्रंथसंख्या | रोजचे वाचक |
| अजवाल | ३०४० | २७२४३ | ३७०५ | ३६८८ | २८६७८ | ६३०४ |
| लंगेई | ४१० | १७५५९ | ३९६५ | ४६४ | १७८७३ | ३६२२ |
| चंपाई | ३१० | १५७०० | ६२५४ | १०५७ | १५९०० | ५५३७ |
| कोलासीब | ११६८ | १४२६३ | २००० | १२२७ | १५०३८ | ५१०२ |
| साईटा | ५२६ | १२८८५ | २३० | ५३३ | १३६५८ | ९४७ |
| | १२९९१ | ४४११७ | २०१११ | १४६०१ | १४८९७२ | २४९१५ |

मिझोराममधील राज्य ग्रंथालय समितीने राजा रामोहन रॉय प्रतिष्ठान अंतर्गत १९८१ पासन ४२४ ग्रंथालयांची निवड केलेली आहे. समतुल्य अनुदानाअंतर्गत या ग्रंथालयांना अनुदानाचा लाभ मिळत आहे. एकण या ग्रंथालयांपैकी ३८० ग्रंथालये ही युवा मिझो संघाव्दारे विविध विभागात स्थापन करण्यात आली आहेत. याचबरोबर २९० ग्रामीण ग्रंथालये या संघाने सुरु केलेली आहेत. या संघाचे मिझोराम मधील ग्रंथालय स्थापनेचे योगदान महत्वपूर्ण असून या संघाने येथील समाजामध्ये शिक्षण, आर्थिक व सांस्कृतिक सुधारणा यामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या संघाने या विभागात ग्रंथालय विकासाच्या अनुषंगाने वाचन साहित्याचे संग्रहण अभ्यासिकांची निर्मिती स्थानिक स्तरावर ग्रंथ देवघेव, ग्रामीण समाज घटक सहाय्यातून साहित्याचे वितरण, ग्रंथ प्रदर्शन व गटचर्चा

अशा उपक्रमाकरीता दृकश्राव्य साधनांचा उपयोग अशा उद्दीष्टाअंतर्गत ग्रंथालय विकासाचे कार्य हाती घेतले आहे.

**जिल्हानिहाय ग्रंथालय तपशील :**

| ग्रामीण | ग्रामीण ग्रंथालयांची एकूण संख्या | एकूण मान्यताप्राप्त ग्रंथालये |
|---|---|---|
| १. आइझवल | १०५ | १६४ |
| २. चंपाई | ६४ | ८८ |
| ३. कोलाशी | ३४ | २७ |
| ४. लुंगताईली | १४९ | ७ |
| ५. लुंगेई | १५ | ५६ |
| ६. मामीत | ८० | ३२ |
| ७. साईह | ५० | ७ |
| ८. शेरचीप | ३४ | ४३ |
| एकूण | ६७४ | ४२४ |

मिझोराम शासनाने आजवर शहरी विभागात वाचन अभिरुची विकासाकरीता प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते. येथील सार्वजनिक ग्रंथालयांचे नाते शालेय ग्रंथालयाशी जोडून युवा वाचन अभिरुची विकास व ग्रामीण ग्रंथालयांच्या विकासाकरीता विशेष प्रयत्नशील रहाणे हे आज येथील शासनासमोरील आव्हान आहे. ग्रामीण स्तरावरील वाचनालयांचा विकासासंदर्भात युवा ग्रंथालय संघ व मिझोराम ग्रंथालय संघ यांचे योगदान ही येथे प्रशंसनीय स्वरुपाचे आहे.

या राज्याची पूर्वपिठिका पहाता भारतातील हे एक छोटेसे राज्य असून केंद्रशासित प्रदेश म्हणून १९७२ साली मान्यता प्राप्त होऊन पुढे १९८७ मध्ये संपूर्ण राज्याचा दर्जा देण्यात आला आहे. या अगोदर आसामच्या शासनाच्या राजवटीमध्ये अझवाल येथे १९६४ मध्ये उपविभागीय ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली होती. सध्या अझवाल येथील हे ग्रंथालय राज्य ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाल्यावर लुंगली व शिव येथे प्रत्येकी एक प्रमाणे एकेक जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आले आहे. तसेच युवा मीझो संघटना (YMA) व इतर काही सामाजिक संघटनांच्या माध्यमातून

ग्रामीण ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली असून या ग्रंथालयांना शासनाद्वारे पुस्तके उपलब्ध करून देऊन सहकार्य करण्यात येते. राज्य ग्रंथालयाने १९८० मध्ये मिझोराम सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा मसुदा १९८० मध्ये तयार करून तो शासनाकडे सुपुर्द केलेला आहे. या मसुद्यास १९९३ मध्ये मान्यत देण्यात येऊन त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

सध्या येथे राज्य ग्रंथालय, ५ जिल्हा ग्रंथालये, ४२४ युवा संघटनांनी स्थापन केलेली सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत.

**२.२७ अंदमान – निकोबार :**

१ नोव्हेंबर १९५६ रोजी अंदमान आणि निकोबार बेटे ही केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आली. प. बंगालमधील परिसरातील बेटे ब्रिटिशकाळात तुरूंगाकरीता वापरली जात. याच पार्श्वभूमीवर या ग्रंथालयाची ओळख १९३० मध्ये तुरुंग ग्रंथालयात प्रथमत: झाली. स्वातंत्र्योत्तर काळात १९५९ मध्ये हिंदू ग्रंथालय पोर्ट ब्लेअर येथे स्थापन करण्यात आले होते. हिंदू ग्रंथालयास १९७६ मध्ये राज्य ग्रंथालयाचा दर्जा देण्यात आला. यानंतर या परिसरात निकोबार येथे जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करून १३ विभागीय ग्रंथालये सुरु करण्यात आली. फिरत्या ग्रंथालयाची सेवा सप्टेंबर २००० मध्ये सुरु करण्यात आली. या सार्वजनिक ग्रंथालय पद्धतीसंदर्भात आराखडा अंदमान निकोबार संघटनेने तयार करून तो सरकारकडे मंजूरीसाठी सुपूर्द केला. याच दरम्यान १९७८ मध्ये येथील शासनाने अंदमान आणि निकोबार ग्रंथालय नियोजन समितीची स्थापना केली. ग्रंथालय कायद्यासाठी येथील संघटना सातत्यपूर्ण प्रयत्नशील आहे. येथील जिल्हा ग्रंथालयाचा विस्तार १९७७ मध्ये करण्यात आला. सार्वजनिक ग्रंथालये ही शिक्षण आणि अर्थविभाग अंतर्गत कार्यरत असून या विभागाचे धोरण सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार करणे असे आहे. सध्या येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (१), राज्य ग्रंथालय (१), जिल्हा ग्रंथालये (२), विभागीय ग्रंथालये (१२), सार्वजनिक ग्रंथालये (३), वर्गणी ग्रंथालये (४) कार्यरत आहेत. येथील ग्रंथालय संघ सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाकरीता सक्रीय सहभाग दर्शवत आहे.

## २.२८ दादरा नागरहवेली :

स्वातंत्र्यपूर्व काळात पोर्तुगीजांच्या अधिपत्याखाली असलेल्या या प्रदेशास ११ ऑगस्ट १९६१ मध्ये केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा प्राप्त झाला. सिल्वासा या राजधानीच्या ठिकाणी राज्य मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन करण्यात आलेले असून ग्रंथालये नरोली, कानवेल, रंदा, किल्वानी मध्यवर्ती दापोली, अमोली, दुषणी व मंदोनी या ठिकाणी स्थापन करण्यात आली आहेत. सिल्वासा व नरोली येथील ग्रंथालये ही अनुक्रमे १९५४ व १९६५ मध्ये स्थापन करण्यात आलेली आहेत. सिल्वासा दादरा, कानवेल या ग्रंथालयास स्वतःच्या इमारती असून तर ग्रंथालये भाडेतत्वावर प्राथमिक शाळेतून सुरु करण्यात आलेली आहेत. या परिसरात सेवाभावी संघटनांच्या माध्यमातून एकही सार्वजनिक ग्रंथालय सुरु करण्यात आलेले नाही. येथील ग्रंथालय सेवांची देखभाल शिक्षण संचालकांच्या अधिपत्याखाली चालते. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या माध्यमातून येथील सिल्वासा, नरोली या ग्रंथालयांना मोफत ग्रंथ पुरवठा करण्यात आलेला असून या प्रतिष्ठानकडून एकूण ५८९५ ग्रंथ उपलब्ध करून दिलेले आहेत. ग्रंथ खरेदीसाठी दरवर्षी रुपये ५०,०००/– इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**२.२९ दमण आणि दीव :**

या विभागात नगर परिषद ग्रंथालये (३) ही मोजीदमण, मानी दमण व दीव या ठिकाणी सुरु करण्यात आलेली आहेत. हा भूप्रदेश १९६१ मध्ये स्वतंत्र झाल्याने तो १२ व्या घटना दुरुस्ती अंतर्गत १९६२ मध्ये गोवा विभागास जोडण्यात आला आणि १९८७ मध्ये त्यास केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा प्राप्त झाला आहे. अशा या भूविभागामध्ये आज मध्यवर्ती ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालय व फिरते ग्रंथालय स्थापन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. येथे अद्यापही ग्रंथालय कायदा अस्तित्वात आलेला नाही. सध्या दोन्ही जिल्ह्याच्या ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत.

## २.३० लक्षद्वीप :

या प्रदेशास १९५६ मध्ये केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा प्राप्त झाला असून तत्पूर्वी १९५१ मध्ये कारावती येथे पहिले सार्वजनिक ग्रंथालय सुरु करण्यात आले होते. तसेच या बेटावर १९५८ मध्ये स्वातंत्र्य सैनिक मध्यवर्ती कार्यालयाची स्थापना करण्यात आलेली होती. पुढे येथे लक्षद्वीप मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालयाची उत्तमप्रकारे स्थापना करण्यात आलेली असून लक्षद्वीप मध्यवर्ती ग्रंथालय हेच राज्य मध्यवर्ती ग्रंथालय म्हणून कार्यरत आहे. येथील प्रशासनाने या प्रदेशात १० विभागात सार्वजनिक ग्रंथालये सुरु केलेली असून हे विभाग अंद्रोती, अमिनी, अंगाती, बिटा, चेतलत, कदमत, काळेपेणी, करावती, किल्टोन व मिनीकॉय असे आहेत. सुरुवातीला या ग्रंथालयांना वाचनालय व ग्रंथालय अशा स्वरुपाचा दर्जा देण्यात आलेला होता. येथील ग्रंथालयाचे कामकाज ग्रंथालय विकास अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली चालत असून या अधिकाऱ्याचे कामकाज संचालक, समाजकल्याण व सांस्कृतिक विभाग यांच्या अधिपत्याखाली चालते. या परिसरातील ग्रंथालय चळवळ विकसित करून ती निगर्मित करण्यासाठी येथील प्रशासनाने लक्षद्वीप राज्य ग्रंथालय समिती १९९४ मध्ये स्थापन केलेली असून यामध्ये १० सभासदांचा समावेश करण्यात आलेला आहे. या विभागात साक्षरता प्रमाण ७९.२५% इतके असल्याने ग्रंथालयासाठी मागणी खूप आहे. देशातील इतर विभागापेक्षा लोकसंख्येच्या प्रमाणात येथील ग्रंथालय सभासद संख्या प्रमाण देशात सर्वोच्च आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात येथे उपलब्ध ग्रंथाचे प्रमाण अधिक आहे.मिनीकॉय येथे हे प्रमाण १:१ आहे. तर कारावती येथे हे प्रमाण १:३ आहे. काळापाणी येथे हे प्रमाण १:२ असे आहे.

**२.३१ पाँडेचरी :**

हा विभाग फ्रेंच लोकांच्या अधिपत्याखाली ३०० वर्षे होता. स्वातंत्र्यनंतर तो केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आला. १८२७ मध्ये येथे सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. त्याचे नामकरण रोलंड ग्रंथालय असे करण्यात आले हे ग्रंथालय विविध प्रकारच्या ग्रंथांनी समृद्ध होते. भारतातील ब्रिटीश प्रशासनाने देखील या ग्रंथालयास काही पुस्तके भेटीदाखल दिलेली होती. १९६७ मध्ये 'रोमेन रोलंड' ग्रंथालय असे नामकरण करण्यात आलेले होते. रोमेन रोलंड हा एक फ्रेंच विद्वान होता. हे ग्रंथालय १९७४ मध्ये नव्या इमारतीत स्थलांतरीत करण्यात आले. या ग्रंथालयाव्यतिरिक्त कारीकल व माहे येथे सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १८९० मध्ये करण्यात आली होती. तत्कालीन सर्वसाधारण सभागृहाने १८९२ मध्ये कारीकल ग्रंथालयाच्या स्थापनेस मान्यतेद्वारे ग्रंथालयाच्या प्रशासनासंदर्भात सल्ला देण्यासाठी व ग्रंथालयाच्या विकासाची सुधारणा ठरविण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले. या ग्रंथालयाचे सुरुवातीचे नाव Bibliotheque Coloniate व पुढे ते Bibiliotheque Publique असे करण्यात आले. १९५२ मध्ये या ग्रंथालयास विभागीय ग्रंथालयाचा दर्जा देऊन त्या ग्रंथालयास शासकीय सार्वजनिक ग्रंथालय म्हणून संबोधण्यात आले. या परिसरात माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून १९१८ मध्ये ग्रंथालयाची सुरुवात करण्यात आली. येथील केंद्रशासीत प्रदेशाने १९६४ मध्ये शाखा ग्रंथालयाच्या निर्मितीसंदर्भात ग्रामीण परिसराचा विचार करून त्याबाबतचे धोरण जाहीर केले. या धोरणाअंतर्गत येथील चार विभागामध्ये पुष्कळशा शाखा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. या चार विभागातून अनुक्रमे पाँडेचेरी (४६), कारिकल (१४), माहे (३), व यानम (२) अशी एकूण ६५ शाखा ग्रंथालये स्थापन करण्यात आली. १९५४ ते १९९१ च्या काळात शिक्षण संचालकांच्या अधिपत्याखाली या ग्रंथालयाचा कार्यभार सुरु ठेवण्यात आलेला होता. १९९१ नंतर विभागाच्या संचालकाच्या अधिपत्याखाली यांचे व्यवस्थापन सुरु ठेवण्यात आले. येथे ३ सहाय्यक ग्रंथालय व माहिती अधिकारी ग्रंथालयाचे कामकाजावर देखरेख करीत आहेत.

## २.३२ दिल्ली व केंद्रशासित विभाग :

सध्या राष्ट्रीय राजधानी विभाग दिल्ली म्हणून ओळखला जातो. या परिसरात अनेक सार्वजनिक ग्रंथालय अनेक सामाजिक संस्थाच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेली आहेत. पहिल्यांदा १८६२ मध्ये येथे हार्डीन ग्रंथालय सुरु करण्यात आले. हे ग्रंथालय टाऊनहॉलमध्ये सुरु करण्यात आलेले होते. दिल्ली नगरपरिषद समितीने त्या ग्रंथालयाचे नाव हार्डिंग नगरपरिषद सार्वजनिक ग्रंथालय असे १९४२ मध्ये केले आणि पुढे ते १९७० मध्ये हरदयाळ नगरपरिषद सार्वजनिक ग्रंथालय या नावाने ओळखले जाऊ लागले. हरदयाळलाल हे एक विद्वान स्वातंत्र्य सैनिक होते. याचबरोबर मारवाडी सार्वजनिक ग्रंथालय आणि वेदिक ग्रंथालय हे १९१५ मध्ये स्थापन करण्यात आले होते. तर फतेपूर वस्तुसंग्रहालय ग्रंथालय हे १९२८ मध्ये स्थापन करण्यात आले होते आणि रामकृष्ण मिशन ग्रंथालय १९३४ मध्ये स्थापन झाले. या ग्रंथालय स्थापनेकरीता ब्रिटीश कॉन्सील ग्रंथालय व अमेरिकन इन्फर्मेशन रिसर्च सेंटर यांनी येथील सार्वजनिक ग्रंथालयाच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्याच्यादृष्टीने आधुनिक तंत्रसाधने पुरवून सार्वजनिक ग्रंथालयाची सेवा सक्षम करण्यासाठी सहकार्य उपलब्ध करून दिले होते. युनेस्कोच्या प्रकल्पाअंतर्गत भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने १९५१ मध्ये दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. हे विकसित ग्रंथालय असून १) देशातील डिपॉझिटरी ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. दिल्ली ग्रंथालय मंडळाने १९५४ पासून या ग्रंथालयाची काळजी घेऊन ग्रंथालय कायद्याच्या मंजुरीकरिता १९५४ पासून विशेष प्रयत्न केलले आहेत. याच पार्श्वभूमीवर भारतीय ग्रंथालय संघटना (ILA) व रंगनाथन संशोधन सर्कल (RRC) यांनी डॉ. रंगनाथन यांच्या जयंतीप्रित्यर्थ ११ ऑगस्ट १९९६ रोजी एका चर्चासत्राचे आयोजन केले हेते. या चर्चासत्रात डॉ. व्ही. वेंकट्टापती यांनी दिल्ली सार्वजनिक ग्रंथालय व माहिती सेवा कायदा या विषयावर नमुना निबंध (मॉडेल पेपर) सादर केला. यामध्ये प्रा. कृष्ण कुमार व इतरांनी हा कायद्याचा मसुदा दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्याकडे प्रा. पी. एन. कौल यांचे हस्ते सादर केला. दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयांतर्गत मध्यवर्ती ग्रंथालय विभागीय ग्रंथालय, शाखा ग्रंथालय व उपशाखा

ग्रंथालय व सामाजिक ग्रंथालय, वसाहती ग्रंथालय, खेळविषयक ग्रंथालये आणि फिरती ग्रंथालये यांचे जाळे दिल्लीच्या ग्रामीण आणि शहरी विभागात उभे केलेले आहेत.
(भट्ट २००१, पृ. ५)

देशाच्या राजधानीत अजूनही ग्रंथालय कायदा मंजूर करण्यासाठी केवळ मुख्यमंत्री पातळीवर आश्वासनाव्यतिरिक्त कोणतीच कार्यवाही झालेली नाही.

**२.३३ तामिळनाडू :**

प्राचीन काळी या प्रदेशामध्ये धार्मिक पीठातून अनेक हस्तलिखित संग्रह स्वरुपात ग्रंथालये कार्यरत असल्याचे दृष्टीस येते. या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह हा बऱ्याच वेळेला पामपृष्ठावर लिहिलेल्या मजकुरांचा समुह असे. हे सर्व लिखाण धार्मिक तत्वाशी संबंधित असे. पाम पृष्ठावरील लिहिलेली ही हस्तलिखिते धार्मिक संस्थानची एक अविभाज्य घटक होती. याचे पुरावे पाम वृक्षावरील पुढील लिखाणावरुन स्पष्ट होते.

**१) 'नबिगत, वरलारू' हे हस्तलिखित नबिज इतिहासाविषयी आहे.**

**२) 'याकोपो (जाकोब) वयियम' हे हस्तलिखित ख्रिश्चन लोकांनी लिहिलेले आहे. येथील ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेताना असे निदर्शनास येते की ही पाम हस्तलिखिते ग्रंथालयाबाहेर दिली जात. वैयक्तिक ग्रंथ संग्रहातील ही हस्तलिखिते बाहेर देत असताना या हस्तलिखितावर स्पष्ट स्वरुपात सूचना नमुद केलेल्या असत. या सूचना ही तत्कालीन धार्मिक प्रभावाचे स्वरुप स्पष्ट करणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ १) जर आपण हे पुस्तक वेळीच परत केले नाही अथवा खराब केले तर एखाद्या गायीला मारण्यासारखे पाप आपल्या हातून घडल्यासारखे होईल.**

**३) एखाद्याने हे पुस्तक बाहेर नेल्यास व वेळेत परत न केल्यास अथवा खराब केल्यास भगवान विष्णू आपला नाश करेल.**

**४) जो कोणी हे पुस्तक बाहेर घेऊन जाईल त्याला हत्तीच्या पायी बांधून अंतिमता हत्तीच्यापायी चिरडून टाकण्यात येईल व यावेळीच इतर अनेक व्यक्तीद्वारे त्याला मारण्यात येईल.**

**५) जो हे पुस्तक परत करणार नाही त्याची बोटे तोडण्यात येतील.**

**६) 'सुबमनीयार गनानम' हे पुस्तक आपण एखाद्या अपात्र माणसाकडे देऊ नये. जरी त्याने याकरीता आपला सतत १२ वर्षे पाठपुरावा केला तरी त्याला हे पुस्तक देऊ नये वा त्याला पहायला देऊ नये. जर असे कराल तर तुमचा नाश होईल.**

**७) 'अगतीयार सुत्रम' तुम्ही कोणाला देऊ नका अथवा घेऊ नका.**

यावरून एक बाब स्पष्ट होते की हस्तलिखित ग्रंथालयातून ही पुस्तके बाहेर दिली जात व ही पुस्तके सुव्यवस्थित परत यावीत अशी ग्रंथालयाची अपेक्षा असे. आणखीन एक उदाहरण यासंदर्भात निदर्शनास येते ते म्हणजे 'सगदेवन संदाई' हे एक हस्तलिखित वेलापट्टी येथे शाळेची स्थापना केल्यावर लिहिलेले पाम हस्तलिखित होय. या संदर्भातील सूचना –

'जी व्यक्ती हे पुस्तक घेईल त्याने हे पुस्तक वाचन झाल्यावर परत त्याने ते जेथून घेतले होते तेथे परत ठेवावे.'

एकूणच या हस्तलिखितांचे महत्व व या संदर्भातील व्यवस्थापनाची जाणीव ही वरील उदाहरणावरुन स्पष्ट होते. तामीळनाडूच्या ग्रंथालय विषयक वाटचालीचा आढावा घेताना हे लक्षात येते की मुद्रित ग्रंथांचेही पुनश्च: लेखन पाम वृक्षाच्या पानावर केले जाई. 'सेनकुंतर पिलई तमीळ' हे पुस्तक तारांगणी मुद्रणालयामध्ये मुद्रित केलेले होते. हे मुद्रणालय मईलाई लक्ष्मणस्वामी मुदलीयार हे चालवित असत. असे हे मुद्रित पुस्तक पुनश्च: पाम पृष्ठावरती हस्तलिखित स्वरुपात लिहून तशी नोंद ही या पाम हस्तलिखितावर केली जात असे. या पुस्तकावर त्याची किंमत ही नमुद करण्यात आलेली होती. असे हे मुद्रणाकडून पुनश्च: पाम वृक्षावरील हस्तलिखिताकडे वाटचाल करणारे ऐतिहासिक प्रकाशन १८८६ मधील होय. सुरुवातीच्या काळात धार्मिक मठ तंजावर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात होते. या मठामध्ये प्रामुख्याने धर्मपुरम मठ, तिरुवधू थुरा मठ, हे मायापुरम तालुक्यामध्ये होते. सध्या हा तालुका मैलातुथुराई म्हणून ओळखला जातो. तर कुंभकोमन तालुम्यामध्ये थिरुपानंदल व शंकराचार्य मठ अस्तित्वात होते. या सर्वच मठातून ग्रंथालये संलग्नित होती. धर्मपुरम मठ मायावरम पासून पुर्वेस दोन मैलांवर मनामपंदल येथे असून सा मठातील ग्रंथालयात पाम पृष्ठावर लिहिलेली तामिळ व संस्कृत मधील ५०० हस्तलिखिते होती. येथील मुद्रित ग्रंथाची संख्या १२००० हून अधिक आहे.

येथील दुसरा मठ तिरुपतीथाराई मठ हा मायावरम पासून पश्चिम दक्षिण विभागात १० मैलावर आहे. हा मठ नमाशिवाय मुर्ती यानी स्थापन केली असून हा साधारणत: ५०० वर्षापासून अधिक जुना असावा असे मानले जाते. या मठाच्या ग्रंथालयास सरस्वती महाल

असे नाव असून या ठिकाणी पामपृष्ठावरील अनेक हस्तलिखिते असून १७०० या शतकात या मठाच्या ग्रंथालयाच्या इमारतीचा विकास करण्यात आला. या ठिकाणी तामिळी, मल्याळम, तेलगू, संस्कृत, इंग्रजी इ. भाषेतील रुपये ५०००/– किमंतीची पुस्तके ग्रंथालय विस्तार प्रसंगी खरेदी करण्यात आली होती. या मठाचे मठाधीपती म्हणून कार्यरत असताना श्री. अंबालावनदेशीगार यांनी (१८८८ – १९२०) यांनी श्री. शिग्रंरावल मुदलीयार यानी तामीळ भाषेत लिहिलेला ज्ञान कोश 'अभिधन चिंतामणी' या करिता आर्थिक मदत केल्याचा उल्लेख आढळतो. तसेच या मठाधीपतीनी यू. व्ही. स्वामीनाथ अय्यर याना तामिळमधून बरीच पुस्तके प्रकाशित करण्यासाठी मदत केली होती. हे स्वामीनाथ अय्यर तामिळ भाषेतील एक तज्ञ होतेच शिवाय मठाधीपती देशीगार यांच्या काळात ग्रंथालयात तामिळ कवी कोनुथ्थूवर मूर्ती यांच्याबरोबर त्यांनी काम पाहिले होते.

या मठातील ग्रंथ नोंदवही ही विषयानुसार २७ विभागात विभागली गेलेली होती. येथील ग्रंथ लाकडी पेटाऱ्यातून ठेवलेली असत. हे पेटारे विषयानुरुप स्वतंत्र असत. तसेच २७ विभागाना वर्गांक देण्यात आले होते. या ठिकाणी पाम पृष्ठावरील १०,००० ग्रंथ स्वतंत्रपणे ठेवण्यातआलेले होते. पंचतंत्र हे सतरावे मठाधिपती श्री. देशीगार यांनी लिहिलेले दुर्मिळ हस्तलिखित होय. हे हस्तलिखित म्हणजे शिवप्रार्थना आहे. या मठाची शाखा ग्रंथालये तिरुविधाईमा, डलूर (१८९०) विक्रम सिंगापुरम (१९३९), आरशलवाईपोदी (१९५०) तिंटकोलाई (१९५०) या ठिकाणी स्थापन केलेली असून तसेच या मठाने चित्राहिंदू ग्रंथालय (नागेरकोलाई) या ग्रंथालयास देणगीही दिली आहे. याचबरोबर अशा मठांची इतर ग्रंथालये म्हणजे श्री. काशीमठ ग्रंथालय १९४४ मध्ये स्थापन केले असून याही मठाच्या शाखा अन्यत्र स्थापन करण्यात आलेल्या आहेत. जगद्गुरु श्री. शंकराचार्य स्वामीगर श्री. मठम कमकोनम, श्री. मंगलविलास ग्रंथालय, श्री. आदीगकूमेश्वर देवालय कुंभकौनम ही या परिसरातील मठ ग्रंथालये दुर्मिळ हस्तलिखिते व ग्रंथ यांनी युक्त असून या ठिकाणी पामपृष्ठावर लिहिलेले ग्रंथ आजही चांगल्या स्थितीत आढळतात.

बौध्द व जैन काळातही या परिसरात साहित्यसेवा व ग्रंथालये प्रचलीत होती. ही जैन काळातील ग्रंथालये बस्तीशी सलंग्नीत होती. जैन ग्रंथालयाचे नाव नेमीशास्त्रालय असे होते.

अशा प्रकारचे एक मोठे शास्त्रालय कूंककोनम येथे होते. या ठिकाणी या ग्रंथालयास जैन साहित्याचे ग्रंथालय म्हणून ओळखले जात असे. जैन लोकांनी देखील पामपृष्ठावर लेखन करुन हस्तलिखिते तयार केलेली होती. या पुस्तकांचे वाचन करण्यासाठी स्वतंत्र तक्ते तयार केले होते. या हस्तलिखित ग्रंथांना जैन लोकांच्या हृदयात देवाच्या बरोबरीने स्थान होते. ही हस्तलिखिते लाल कापडात बांधून सुव्यवस्थितपणे ठेवली जात. जैन लोकांनी श्री. महावीर ग्रंथालय तंजावर मध्ये सार्वजनिक स्वरुपात १४–१०– १९३७ रोजी सुरु केलेले होते. या ग्रंथालयांना नंतरच्या काळात नेमीशास्त्रालय म्हणून संबोधले जात असे. याचबरोबर येथे मुस्लिमानी देखील तामीळ साहित्य निर्माण केल्याचे पुरावे आढळतात. हेही साहित्य विपुल प्रमाणात असून यामध्ये काही ग्रंथांचा उल्लेख करावा तर १८४२ मध्ये सिरपपुराणम – उमरुपपुलवार या ग्रंथाचे मद्रास येथे मुद्रण करण्यात आले होते. तर १८७१ मध्ये थारासुतम इस्लाम सय्यद मोहम्मद लेबाई अशा काही मोजक्या ग्रंथाचा उल्लेख करणे उचित ठरणारे आहे. याचबरोबर येथे वैयक्तिक स्वरुपातही काही संस्कृत हस्तलिखित संग्रह सांभाळण्यात आलेले होते. अशाप्रकारची या ठिकाणी ३० ग्रंथालये असल्याचा उल्लेख आढळतात. दक्षिण भारतातील खाजगी संस्कृत ग्रंथालयाची सूची गुस्ताव ओपेरट यानी तीन खंडात तयार करुन ती १८८० मध्ये शासकीय मुद्रणालय मद्रास येथून प्रकाशित केलेल्याचा उल्लेख सूचीमध्ये आढळतो. एकूणच विविध राजवटीचे कालखंड आणि त्या त्या काळात या राजकर्त्यांनी तामिळमधून अथवा संस्कृतमधून केलेल्या लेखनाचे हस्तलिखित संग्रह हे तामिळ राज्यातील ग्रंथालयाची पूर्वपिठीका सुस्पष्ट करण्यास पुरक ठरतात. *(स्तोत्र कुमार पी. एस. जी. खंड ५)*

**तंजावर येथील फिरत्या ग्रंथालयांचा एक अभिनव उपक्रम :**

ग्रंथालय चळवळ इतर सामाजिक सुविधा ग्रामीण परिसरात पोहचविण्यात यासाठी ब्रिटीश शासकानी मॉंटेग्वो चम्सफोर्ट सुधारणा अभियान भारतात राबविण्यासाठी जिल्हा मंडळ, तालुका मंडळामध्ये निवडून आणलेल्या प्रतिनीधीना सूचना दिलेली होती. १९२० मध्ये अशा निवडणूका संपन्न झाल्यानंतर तंजावर जिल्ह्याचे पहिले जिल्हा अध्यक्ष देश पातळीवर निवडले गेले ते म्हणजे श्री. ए. टी. पानीरलेलवम तर तालुका अध्यक्ष म्हणून श्री.

टी. व्ही. उमा महेश्वरनपिल्ल हे निवडले गेले होते. हे एक पुरोगामी विचाराचे नेतृत्व होते आणि म्हणूनच त्यांनी ग्रामीण परिसरात ग्रंथालय सेवा तंजावर जिल्ह्यात सुरु करण्याचा विचार केला. तत्कालीन मद्रास शासनास ग्रामीण परिसराबद्दल विशेष आस्था असल्याने त्यानी या प्रकल्पाना मंजुरी देऊन रुपये १५,००,०००/– इतके अनुदान जिल्हा मंडळास दिले. १९३६ मध्ये तंजावर जिल्हा मंडळाने ग्रामीण ग्रंथालयाबरोबर परिसरात वैद्यकीय सुविधा पुरविण्याचा विचार केला. याकरिता त्यानी एक व्हॅन तयार करुन या व्हॅनमध्ये ग्रंथालयाची पुस्तके, सेवक, औषधे, वैद्यकीय साधने इ. ठेवून हे फिरते ग्रंथालय व वैद्यकीय युनिट फिरता दवाखाना सुरू केला. भारतातील अशा प्रकारचा हा पहिला उपक्रम होय. या सेवेचे उद्घाटन ७ मे १९३६ रोजी करण्यात आलेले होते. याकरीता वापरण्यात आलेल्या व्हॅनचा क्रमांक एम.जी.आर. १६३ असा होता. ही एकच व्हॅन पुरे पडेना म्हणून मद्रास शासनाचे तत्कालीन प्रमुख श्री. सी. राजगोपालचारी यांनी २९ जाने. १९३९ रोजी दुसरी व्हॅन उपलब्ध करुन दिली. तंजावर जिल्हा मंडळाद्वारे रौप्य महोत्सवी ग्रंथालय हे जिल्हा बोर्ड ग्रंथालयाच्या परिसरात उभे करुन किंग जॉर्ज यांच्या राज्याभिषेकाचा रौप्य महोत्सव साजरा केला. याच पार्श्वभूमीवर या फिरत्या व्हॅनचा उपयोग ग्रंथ व औषधोपचार, साधन सामुग्री बरोबर घेऊन जाण्यासाठी केला. निवडक पुस्तके त्या त्या ठिकाणच्या शाखेतील अथवा स्थानिक पंचायती बोर्डच्या अध्यक्षाकडे किंवा काही मान्यवर जमिनदारांकडे ठेवून या पुस्तकाची देवघेव करणे सुरु केले. नंतर ती परत प्राप्त झाल्यावर मुख्यालयाकडे पाठवली जात. या फिरत्या ग्रंथालयामध्ये रेडिओ, ग्रामोफोन, माईक, अँप्लीफायर फिल्म प्रोजेक्टर अशी तांत्रिक उपकरणे उपलब्ध केली होती. खेड्यात पोहचताच लोकाना आकर्षित करण्यासाठी रेडीओ व ग्रामफोन सुरु केले जात. लोकांचा जमाव जमा होताच या प्रकल्पाचा कार्यलयीन प्रमुख ग्रंथवाचनाचे महत्व या विषयी मार्गदर्शन करत असे. हे फिरते दवाखाने देखील ग्रामीण परिसरात प्रसिध्द झाले व या फिरत्या दवाखान्याचा पाठलाग तेथील लोक करत असत. ह्या दवाखान्यातून ही छोट्यामोठ्या आजारांची देखभाल तेथल्या तेथे केली जाई. क्रॉनिक आजराकरिता तपासणी करुन सल्ला दिला जात असे. फिरत्या दवाखान्यातील सर्जन, सहा. सर्जन स्थानिक लोकानाही आरोग्यविषयक पबोधन करत असत. या फिरत्या

ग्रंथालयातून अनेक पुस्तके देण्यासाठी ठेवलेली असत. तसेच या फिरत्या ग्रंथालयाकरीता ग्रंथ देवघेवीची सुविधा करण्यासाठी एक ग्रंथ यादी सुध्दा पुरविलेली होती. विलवरायनथम येथील फिरत्या ग्रंथालयात १६५ पुस्तके त्याकाळी उपलब्ध करून दिलेली होती. सर्वच पुस्तके आकर्षक व कुतुहलजनक होती. ही पुस्तके आजारी लोक वाचत असत. मल्याळी भाषेतील सुध्दा पुस्तकाची गरज भासल्यावर वैयक्तिक पातळीवर ही पुस्तके उपलब्ध करुन दिली जात असत. यामध्ये कादंबरी, धार्मिक पुस्तके, धार्मिक ख्रिश्चन धर्मीयांची पुस्तके, हिंदूधर्म ग्रंथ उदा. रामायण, महाभारत, भगवद्गीता याचा समावेश होता.

अशा या फिरत्या हॉस्पिटल व ग्रंथालय सेवेला तत्कालीन संचालक आरोग्य विभाग श्री. रेड्डी यानी भेट दिली होती. या प्रसंगी त्यांच्या समवेत जिल्हा अधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकारी सुध्दा होते. या भेटीत या ग्रंथालयामध्ये काही चित्रे असलेली नियतकालिके व विनोदी साप्ताहिक याचा समावेश करण्यात आला होता. ही हॉस्पिटल ग्रंथालय सेवा त्या परिसरात मद्रास ग्रंथालय संघाव्दारे आयोजित करण्यात आलेली होती. ही सेवा पुढे शिक्षण विभागाशी जोडण्यात आली. पुढे ती कॅमेडॉल मूकबधीर शाळा, तुरुंग, अनाथगृहे यानाही जोड्ण्यात आलेली होती. अशा फिरत्या ग्रंथालयांसाठी तामिळनाडू मध्ये सायकलवरील ग्रंथालये व बैलगाडीतील फिरती ग्रंथालये ही दुर्गम परिसरात सुरु करण्यात आलेली होती. स्वतंत्र्यपूर्वकाळातील दुर्गम परिसरात तामिळनाडूमध्ये फिरत्या ग्रंथालयाचे सुरु केलेले अभियान अत्यंत कौतुकास्पद होते.

**ब्रिटीश कालखंड :**

ब्रिटीशानी भारतात आपले पाय रोवल्यानंतर १६६१ मध्ये मद्रास परिसरात ते दाखल झाले. तेथे त्यांनी फोर्ट सेंटर जॉर्ज येथे ग्रंथालय स्थापन करण्याचा प्रयत्न केला. या अनुषंगाने प्रयत्न करताना श्री. नित्यम विंल्साकिल्ड याना धर्मगुरुनी ग्रंथालय स्थापनेसाठी प्रयत्न करताना त्यानी ब्रिटीश प्रतिनिधीकडे ग्रंथांच्या गरजेविषयी लक्ष वेधले तसेच स्थानिक व्यापाऱ्याच्या निदर्शनास आणून दिले की तेथे ग्रंथालय नाही. वैयक्तिक स्वरुपात आपल्यालाही या ग्रंथालयाची आवश्यकता भासते त्याच्या ह्या सूचनेला व्यापारी वर्गाकडून उत्फूर्त प्रतिसाद लाभला. या वाचनालयांची काही रक्कम त्यानी गोळा करुन त्याची गुंतवणूक कापडाच्या

गठ्ठ्यात केली. हे गट्ठे बोटीव्दारे १६६१–६२ च्या काळात इंग्लंडला पोहचविण्यात आले. कंपनीच्या गव्हर्नरला या विक्रीतून प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून पुस्तके खरेदी करण्याविषयी विनंती करण्यात आलेली होती. कोणती पुस्तके खरेदी करावीत याची यादीही सोबत पाठविलेली होती. अशा उपक्रमातून उपलब्ध झालेल्या रक्कमेतून पुढील काळात पुस्तके खरेदी करुन ती फोर्ट ग्रंथालयास देण्यात आली. हीच खऱ्या अर्थाने फोर्ट ग्रंथालयाची सुरुवात होय. पुढे अशा प्रकारे संचालकाला पुस्तके उपलब्ध होत राहिली आणि पुढील काळात पुस्तक खरेदीलाही निधी उपलब्ध होत राहिला. नंतरच्या काळात ब्रिटीश कंपनीव्दारे इतर कंपनीमधून ग्रंथालये स्थापन केली. मासुलीपट्टम येथे तर १६७१ पुर्वी ग्रंथालय स्थापन केल्याचे आढळते. १६७८ मध्ये या ग्रंथालयाकडे ७३ पुस्तके होती तसेच कंपनीने कलकत्ता येथेही ग्रंथालये स्थापन केल्याची नोंद आढळते. ही नोंद १७०० पूर्वीची असावी.

पोर्तुगीज या परिसरात दाखल झाल्यानंतर फोर्ट सेंट जॉर्ज येथे पोर्तुगीज साहित्यातील ३०० ग्रंथ असलेले एक ग्रंथालय सुरु केलेले होते. ब्रिटीश वसाहतीच्या काळात ही पुस्तके १६९५ मध्ये संग्रहीत करण्यात आलेली होती. या ठिकाणची आणखी ठळक महत्वपूर्ण नोंद आढळते म्हणजे पोर्तुगीज भाषेतील हे ग्रंथ ज्याना ती भाषा समजते त्याना उपलब्ध करण्याविषयी सुचना निर्गमीत झाली होती. या करीता पुस्तक देवघेवेची नोंद ही ठेवण्यात आली होती. असे पुस्तक एखाद्याने घेतल्यास त्यांची परत मागणी केल्यास ते परत न केल्यास त्यास एक पॅग्रोडा इतका दंड आकारण्याची तरतुद करण्यात आली होती. या ग्रंथालयांचे व्यवस्थापन विषयी दक्षता घेतल्याचे निदर्शनास येते. ग्रंथ देवघेव विषयक सुव्यवस्थितपणा येण्यासाठी पुस्तकावर स्टॅम्प मारणे, त्याची सुची तयार करणे अशा प्रकारचे उपस्कार ग्रंथालयात करण्यात आलेचे निदर्शनास येते. फोर्ट एस. टी. डेव्हीड लूर येथेही ग्रंथालय स्थापन केल्याच्या काही खुणा सापडतात. हा काळ साधारणत: १६९० सालचा होता. दरम्यानच्या काळात फोर्ट जॉर्ज येथील ग्रंथालयात ग्रंथसंग्रह वाढवून त्यालाही चांगला आकार देण्यात आलेला होता.  तत्कालीन ब्रिटीश प्रवासी चार्लस लॉ कीचर यानी १७०३ मध्ये या किल्ल्यास भेट देऊन येथील फोर्ट ग्रंथालयातील पुस्तकांचा संदर्भ दिलेला होता. या संदर्भात त्यांनी लिहिलेल्या १७११ मधील प्रकाशित पुस्तकात नमूद केले होते की,

''या ग्रंथालयातील देव व धर्म विषयक ग्रंथाची किंमत साधारणत: ४३८.६ पौंड इतकी होती.'' अशा नोंदीवरुन ग्रंथालयाचे अस्तित्व सुस्पष्ट होण्यास मदत होते. पुढील काळातील धर्मगुरुनी ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाच्या व्यवस्थापनासाठी प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते. या किल्ल्यातील ग्रंथालयांचा लाभ सर्वसाधारणत: इंग्रज लोक घेत असत. काही स्थानिक कर्मचाऱ्याना त्याचा लाभ प्राप्त होत असे.

या राज्यात २२ मार्च १८९० मध्ये मद्रासमधील कन्नेमेरा सार्वजनिक ग्रंथालयाचा कोनशीला समारंभ मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड कन्नेमेरा यांच्या हस्ते होऊन पुढे प्रत्यक्षात या ग्रंथालयाचे उद्घाटन १४ एप्रिल १८९६ रोजी करण्यात आले. या ग्रंथालयास पुस्तक प्रकाशन कायदा १९५४ अंतर्गत प्रकाशित पुस्तके उपलब्ध होऊ लागल्याने विविध भाषेतील पुस्तकांचा संग्रह या ठिकाणी कित्येक लाखोंच्या घरात गेला आहे. फिरत्या ग्रंथालयाचे अभियान या राज्यात २१ ऑक्टोबर १९३१ रोजी तंजोरमधील मनारगड गावात करण्यात आले. पुस्तके ठेवण्यसाठी अभियंता एन. व्ही. कन्नगरु पिल्ले यांच्या कल्पकतेतून तयार करण्यात आलेल्या बैलगाडीतून ही पुस्तके वाचकांना पुरविले जात. १९३२ च्या कालखंडात या योजनेअंतर्गत ७५ गावांना याचा लाभ झाला. पुढे ही संस्था १९३६ च्या कालखंडात ४७१ पर्यंत पोहोचली. फिरते ग्रंथालय सुरु करताना सुरुवातील १३८० पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. या अभियानातून प्रेरणा घेऊन या परिसरातील गावकऱ्यांनी १७ गावामध्ये ग्रंथालये सुरु केली. तसेच मथुरा जिल्ह्यातील एन्डीपट्टी या गावात १९३५ मध्ये फिरत्या ग्रंथालयाचा लाभ उपलब्ध करून देण्यात आलेला होता. या बैलगाडीस 'ज्ञानरथ' असे संबोधले जाई. यामध्ये केवळ ७८ पुस्तके उपलब्ध करून दिली जात. वाचकांच्या संख्येच्या तुलनेत पुस्तकांची संख्या फारच अल्प होती. २५ गावातून फिरणाऱ्या या ज्ञानरथाचे सर्वत्र आतुरतेने स्वागत केले जाई. अशाचप्रकारे 'ग्रंथ' नावाने मथुरा जिल्ह्यात एक फिरते ग्रंथालय सुरु करण्यात आलेले होते. या ग्रंथालयात ७ माणसांची बैठक व्यवस्था करण्यात आलेली होती. पुस्तक देवघेवीबरोबरच ग्रामोफोन, रेकॉर्ड, मॅझिक, लॅटर्न ही तत्कालीन तंत्रसाधने उपलब्ध करून दिली जात. देशातील ग्रंथालय कायदा सर्वप्रथम १९४८ मध्ये मंजूर करुन तामीळनाडूने खऱ्या अर्थाने आपले पुरोगामित्व सिद्ध केले. या

कायद्यानुसार राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (१), जिल्हा ग्रंथालय (१२), शाखा ग्रंथालये (१५००), विभागीय ग्रंथालये (२५००) व फिरती ग्रंथालये (४) अशी शिफारस करण्यात आली होती. या राज्याचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे १९२९ मध्ये सर्वप्रथम ग्रंथालय संघामार्फत ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. या अभ्यासक्रमाचा कालखंड ३ महिन्यांचा होता. या कायद्याअंतर्गत १९५० मध्ये स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीचे पहिले अध्यक्ष सी. एम. रामचंद्रन चेट्रीया हे होते. जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालयांनी १९५२ पासून ग्रंथालय सेवा सार्वजनिक स्वरुपात उपलब्ध करून दिली. ही सेवा व्हिक्टोरिया टाऊन हॉल या इमारतीत सुरुवातीला सुरु करण्यात आली होती. लोकांच्या मिळणाऱ्या उत्कृष्ट प्रतिसादामुळे ही सेवा १९५६ मध्ये गांधी मेमोरियल ग्रंथालय इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आली. कोईमत्तुर येथील जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालयास पुढे नव्या इमारतीत स्थलांतरीत करून या ग्रंथालयाद्वारे समाजातील सुशिक्षित लोकांसाठी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच येथील संदर्भ साधनांचा अधिकाधिक उपयोग करण्यसाठी व वाचन अभिरुची विकसित करण्यासाठी वाचकांना प्रोत्साहन देण्यात आले. आज येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (१), जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालये (३०), शाखा ग्रंथालये (१६६७), फिरती ग्रंथालये (१२), ग्रामीण ग्रंथालये (१७२७) अर्धवेळ ग्रंथालये (४८७) अशी एकूण ३९२४ ग्रंथालये कार्यरत आहेत. (सार्वजनिक ग्रंथालय संचालनालय अहवाल २००७-०८) येथील सार्वजनिक संचलनालयाला ग्रंथालय कर्मचारी वर्गाकरिता टाईम स्केल लागू केलेले असून त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे

१) ग्रामीण ग्रंथालय - ग्रंथपाल वर्ग (III) रुपये ३२००-८५-४९००

२) संमत्रण - ७३९ ग्रामीण ग्रंथालयातील ग्रंथपालांना पदोन्नती देऊन त्यांना ग्रंथपाल वर्ग (III) मध्ये वर्गीकृत करण्यात आले व विविध ग्रंथालयातून नेमणूका देण्यात आल्या. यासाठी त्यांना नोव्हेंबर, डिसेंबर २००६ मध्ये विशेष संमत्रण ग्रंथालय विभागामार्फत करण्यात आलेले होते. ग्रंथालय विभागाद्वारे अशा प्रकारचा विशेष उपक्रम राबविण्यात आलेला आहे.

३) कॉनमेरा सार्वजनिक ग्रंथालयाच्या जुन्या इमारतीचे नूतनीकरण करण्याकरीता रुपये १,२८,०००/- इतका खर्च करण्यात आला. पुनःश्च या ग्रंथालयाचे लोकावरण करताना २२/११/२००६ रोजी मंत्रीमहोदयांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न झाला.

४) नवीन जिल्हा ग्रंथालयाकरिता कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले तसेच क्रिशनगिरी जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालयातदेखील असे स्वतंत्र कार्यलय सुरु करण्यात आले.

१९७५ ते २००१ च्या काळात येथील ग्रंथालयात विशेष वृध्दी झाल्याचे आढळून येते. आणि ही वृध्दी साधारणतः २००० नंतरच विशेष गतिमान झाल्याचे पुढील तक्त्यावरुन निदर्शनात येते.

| वर्ष | | ग्रंथालयांची संख्या | ग्रंथवाचक | एकूण ग्रंथ संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १९७५-७६ | १४५४ | २९१२ | ८.७८ लक्ष |
| २ | १९८०-८१ | १४५५ | २०३१ | ८.७४ लक्ष |
| ३ | १९८५-८६ | १५२२ | २०५१ | ९.३३ लक्ष |
| ४ | १९९०-९१ | १५५८ | २७२१ | ८.४७ लक्ष |
| ५ | १९९५-९६ | १५६७ | १५६९३ | ८.१२ लक्ष |
| ६ | २०००-२००१ | २८८३ | ७३८६ | ९.२२ लक्ष |
| ७ | २००४-२००५ | ३७५० | १०६४९ | १४.८६ लक्ष |

## २.३४ महाराष्ट्र :

### पूर्वपिठीका :

महाराष्ट्र राज्यातील ज्ञानसंग्रहन हे परंपरेने पूर्वापार चालत आलेले आहे. पूर्वीच्या काळी ज्ञानाचे पाठांतर करुन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्याचे हस्तांतर केले जाई. नंतर दगड, विटा,लाकूड, तांबे, जस्त, लोखंड, ताडपत्र, भुर्जपत्रे यांचा उपयोग ज्ञान संग्रहनासाठी केला गेला. कागदाचा शोध लागल्यानंतर हस्तलिखिते निर्माण झाली. इ.स. १८१४ ते इ. स. १८९२ या कालावधीमध्ये प्रसिध्द गणिती भास्कराचार्यांच्या ग्रंथालयात संस्कृत हस्तलिखिते होती. म्हणूनच भास्कराचार्यांना पहिले ग्रंथपाल म्हटले जाते. तसेच शास्त्री, पुराणिक, मंदिरे, मठ, राजे राजवाडे यांच्याकडेही हस्तलिखितांचा संग्रह असे.

१२ व्या शतकाच्या शेवटी व १३ व्या शतकाच्या सुरुवातीला मराठी भूमीमध्ये अनेक संतांनी ग्रंथ, अभंग, ओवी, काव्य, श्लोक या स्वरुपात लेखन केले होते. त्यामुळे ग्रंथनिर्मिती होऊन ग्रंथालयांची स्थापना होऊ लागली. रामदास स्वामींनी ११०० हून अधिक मठ स्थापन करुन तेथे ग्रंथाचा संग्रह केलेला होता. सध्या अनेक हस्तलिखिकांचा संग्रह श्री. कृष्णदेव यांनी धुळे येथील श्री समर्थ वाग्वदेवता मंदिरात केला आहे.

महाराष्ट्रातील पूर्वांपार परंपरेचा विचार करता नाशिक, गंगावाडी, कोल्हापूर जवळील ब्रम्हगिरी येथील उत्खननामध्ये येथील सामाजिक जीवनासंदर्भातील अश्मयुगीन पुरावे उपलब्ध झालेले आहेत. पूर्वीचा हा प्रदेश म्हणजे दंडकारण्याचा प्रदेश होय. महाराष्ट्र हे नाव सहाव्या शतकापासून रुढ झाले.

या भूप्रदेशासंदर्भात पुराण काळापासून उल्लेख आढळत असून या प्रदेशातील विविध विभागात सत्यवाहन, वाकटक, राष्ट्रकूट अशा घराण्यांनी येथे राज्य केलेले असून अजंठा, वेरूळ सारखी दुर्मिळ लेणी ही याच परिसरात आढळतात. चाणक्य काळात देखील त्यांचे राज्य अप्रांत प्रदेशात म्हणजे उत्तर कोकणामध्ये विस्तारीत झालेले होते. हा परिसर म्हणजे विद्यमान रत्नागिरी, चिपळूण हा भाग होय. शिलाहार राजाने आपला राज्यविस्तार ठाणे, कुलाबा या परिसरात केलेला होता. एकूणच महाराष्ट्राचा हा प्रदेश अनेक राजवटींनी पादाक्रांत करुन आपल्या वास्तव्याच्या पाऊलखूणा येथे उमटवल्याचे पुरावे येथे आढळतात.

येथील ज्ञानसंग्रहण परंपरेचा विचार करता ही परंपरा फारच जुनी आहे. कोकण प्रांताचा विचार करता अलीकडेच कोकणचे सुपूत्र डॉ. बाळकृष्ण लळीत यांनी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातळशिल्पांचा शोध घेत असताना २००२ मध्ये राजापूरच्या कातळावर तब्बल चौदा चौरस किलोमीटर परिसरात अनाकलनीय शिल्पे आढळली आहेत. मासे, जलकुंभ, जलसर्प अशा जलस्थानाशी निगडीत शिल्पकृती या कातळांवर कोरलेल्या आहेत. कोकणातल्या जांभा दगडाच्या कातळावर आढळणारी ही शिल्पे आजही एक मोठे गूढ आहे. विविध चित्रे आणि अगम्य अशा आकृत्या व नकाशांनी ही शिल्पे समृध्द आहेत. अनेक ठिकाणी रस्ता रुंदीकरणात किंवा नवीन इमारतींच्या बांधकामामुळे अशी दुर्मिळ शिल्पे गायब झाली आहेत. ही चित्रे, नकाशे आणि आकृत्या कोणी आणि कधी काढल्या असाव्यात याची नेमकी कालगणना आज तरी उपलब्ध नाही. काहींच्या मताप्रमाणे ही कातळ चित्रे इसवी सन पूर्व ६००० वर्षे इतकी जुनी असावीत. कोकणात सर्वदूर पसरलेल्या कातळावर सुंदर शिल्पे रेखाटलेली आजही पाहायला मिळत आहेत. प्राचीन काळी ही शिल्पकला किती प्रगत होती याची साक्ष देणाऱ्या शिल्पांचे गूढ अजूनही उकललेले नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मालवण तालुक्यातील हिवाळे आणि कुडोपी येथील कातळशिल्पांच्या सविस्तर माहितीचे छायाचित्रांसह सादरीकरण डॉ. लळीत यांनी केले. स्वत: लळीत हे मुळचे सिंधुदुर्ग जिल्ह्याचे रहिवासी आहेत. 'रॉक आर्ट' म्हणून ओळखली जाणारी आणि आदिमानवाने खोदलेली कातळशिल्पे, दगडावर रेखाटलेली रंगचित्रे, जगाच्या विविध भागामध्ये आढळून येतात. भारतामध्ये मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील गुहेतील रंगचित्रे ही सुध्दा 'रॉक आर्ट'चाच एक प्रकार मानला जातो. कुडोपी या गावाजवळच्या डोंगरावरील जांभ्या दगडाच्या कातळावर (सड्यावर) खोदण्यात आलेली सुमारे साठ कातळशिल्पे (रॉक आर्ट, पेट्रोग्लिक्स) हीसुध्दा अशाच प्रकारची आहेत. या कातळशिल्पांमध्ये मानवाकृती, मासे, विविध प्रकारची वर्तुळे, पक्षी, चित्रविचित्र आकृती मोठ्या प्रमाणात असून ती इसवी सन पूर्व चार ते सात हजार वर्षांपूर्वीची असावीत. एवढ्या मोठ्या संख्येने कातळशिल्पे आढळण्याची ही पहिलीच वेळ आहे. देवाचे गोठण्यातील रावणाचा माळ येथे असलेल्या एका कातळशिल्पाच्या परिसरात होकायंत्र लावले असता ते चालत नाही असेही आढळून आले आहे. याठिकाणी

असलेले मातृदेवतेचे शिल्प विशेष उल्लेखनीय आहे. हिवाळे येथील सड्यावरही कातळशिल्पांचा शोध सतीश लळीत व त्यांचे बंधू प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत यांनी २००२ मध्ये लावला होता. पश्चिम किनार पट्टीवर गोव्यातील उसगाळीमळ, महाराष्ट्र– गोवा सीमेवरील विर्डी, हिवाळे, कुडोपी, खानवली (राजापूर), निवळी (रत्नागिरी) अशा अनेक ठिकाणी ही कातळशिल्पे आढळली असून त्यामध्ये काही परस्परासंबंध असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

सिंधुदुर्गप्रमाणे कोकणातील ठाणे, रायगड आणि रत्नागिरी या अन्य जिल्ह्यात विविध चित्रे, नकाशे, काष्ठ शिल्पे, गुहा, लेणी, मंदिरे आढळून येतात. मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्गावर हातखांब्याच्या पुढे निवळी तिठ्याजवळ जांभा दगडावर कोरलेला एक भला मोठा पथदर्शक नकाशा हा कुतूहलाचा विषय होता. सध्या मात्र हा पथदर्शक नकाशा निदर्शनास येत नाही. कोकणातील पाषाण प्रस्तरावर निर्मित झालेली चित्र व शिल्प संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण असून ती फारच अतिप्राचिन आहे. या कलात्मक संस्कृतीची निश्चित कालगणना होणे गरजेचे आहे. ही कलानिर्मिती कोणत्या कारणासाठी, कधी, कोणासाठी निर्माण झाली आणि कोणी निर्माण केली. याबद्दलचे ठोस पुरावे अद्यापपर्यंत उपलब्ध झालेले नाहीत किंवा त्यांचा साधा मागमुसही सापडलेला नाही. कोकण किनारपट्टीवरील हिवाळे आणि कुडोपीसारखी अनेक ठिकाणे पुरातत्वियदृष्ट्या खूप महत्वाची असून ती या भागातील आदिम मानवी समूहाची वस्त्यांची वस्तीस्थाने यांच्याबद्दल कदाचित माहिती उपलब्ध करून देऊ शकतील. अशी ही दुर्मिळ कातळ शिल्पे केवळ कोकणचाच नव्हे तर आपल्या देशाचा सांस्कृतिक वारशाचा आहे. या वारसाचा संशोधनात्मक दृष्टीकोनातून वेध घेतल्यास येथील प्राचीन संस्कृती, मानवी आदिवास यावर प्रकाशझोत टाकणे शक्य होणार आहे. ही एक प्राचीन ज्ञान संग्रहण परंपराच असून याच परंपरेतून पुढे महाराष्ट्रमध्ये ग्रंथालय परंपरा अस्तित्वात आली आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये.

अशाच प्रकारच्या परंपराचा वेध घेत असताना महाराष्ट्रातील पाटण येथे १२ व्या शतकात संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह असल्याचे पुरावे आढळतात. हा परिसर जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव पासून जवळच आहे. पाटणमधील यादवकालीन शिलालेखावर

देवगिरी येथील यादव राजवटीतील ग्रंथालयांचा उल्लेख आढळतो.  हस्तलिखित परंपरेचा शोध घेत असताना विविध राजे लोकांच्याकडे असा संग्रह असल्याचे निदर्शनास येते. या हस्तलिखितांच्या नकलाही केल्या जात असत. या हस्तलिखितांचे लेखन करत असताना बऱ्याच वेळेला लेखनिकाकडून मूळ लेखनात बदल केला जाई आणि या बदलामुळे मूळ अर्थास बाधा येत असे. अशा प्रसंगी एकाच प्रकारच्या मजकुराच्या उपलब्ध हस्तलिखितांचा संग्रह करून त्यांची तुलना करून योग्य आवृत्तीचे पुर्नलेखन केले जात असे. पेशवाईतील असे लिखाण म्हणजे आनंदीबाई यांच्याकडील महाभारतावरील पोथी होय. भगवत्‌गीता, भागवत, सप्तशती इत्यादी हस्तलिखिते ही अत्यंत लहान आकारात  हस्तलिखित स्वरुपात तयार केल्याचे निदर्शनास येते. प्रसंगी अशी हस्तलिखिते एखाद्या लॉकेट मध्ये बंद करुन ती लॉकेटस्‌ही धारण करण्यात येत असत. अशाप्रकारे धार्मिक हस्तलिखिते जवळ बाळगल्यामुळे स्वतःचे रक्षण होते अशी एक सामाजिक धारणादेखील त्या काळामध्ये रुढ होती.

असे लेखन हे रेशमी कापडावर केल्याचे निदर्शनास येते. चिंचवड – पुणे  नजिकचे संत मोरया गोसावी यांच्याकडे रेशमी कापडावर लिहिलेली हस्तलिखिते होती. विशेष म्हणजे या लेखनासाठी शाई तयार करताना पाण्याऐवजी तुपाचा वापर केल्याचेही आढळते. अशा या लेखन परंपरेतून शास्त्री, पुराणिक, राजे रजवाडे, मंदिर मठ अशा ठिकाणी हस्तलिखितांचा संग्रह केला जात असे. मुद्रण कलेचा शोध पंधराव्या शतकात लागल्यावर एकूणच ग्रंथ व्यवहारामध्ये अमुलाग्र बदल झाला. रघुनाथराव पेशवे यांची स्वतःची दोन ग्रंथालये अनुक्रमे अनंदवल्ली व त्र्यंबकेश्वर येथे १७६७ मध्ये अस्तित्वात होती. पुढील कालखंडात जनार्दन पंत पेशवे यांची पत्नी सगुणाबाई यांचेकडे पुस्तकांची यादी असल्याचा उल्लेख १७८४ मध्ये मिळतो. त्या स्वतः उत्तम वाचक होत्या. पेशव्यांचे ग्रंथालय हे शनिवारवाड्यात होते. पहिले बाजीराव हे स्वतः विद्याप्रेमी होते. व त्यांनीही स्वतःचे खाजगी ग्रंथालय स्थापन केलेले होते. हे ग्रंथालय त्यांच्या समवेत असे. राज्यकारभाराच्या एकूण खात्यांपैकी गोविंदराव आपटे हे या पुस्तकशाळेचे प्रमुख होते. नानासाहेब पेशवे यांच्याकडे खुप मोठा पुस्तक संग्रह होता. पेशव्यांच्या शनिवार वाड्यातील या ग्रंथालयास एडवर्ड स्कॉट वॉरींग यांनी भेट दिलेली होती. त्यांनी या ग्रंथालयात 'व्रतलाराजा'हे पंडित विश्वनाथ भट (काशी–वाराणसी) यांनी लिहिलेले

पुस्तक पाहिल्याचा उल्लेख केलेला आहे. या काळात हस्तलिखितांची देखील विक्री होत असे .या हस्तलिखितांची किंमत त्यातील विषय आणि पृष्ठसंख्या यावरून ठरवली जात असे. भगवत्‌गीतेची १७५० मधील किंमत ३ रुपये असल्याचा उल्लेखही निदर्शनास येतो. तसेच भारत, भागवत, प्रपंचसार ही हस्तलिखिते अनुक्रमे रुपये३६१ रुपये ३६९ रुपये २५ इतक्या किंमतीत विकल्याचाही उल्लेख आढळतो. भारतचंपू, मुद्राराक्षस, छायाग्रंथ व शाकुंतल ही एकत्रित पुस्तके १० रुपयास उपलब्ध होती. पेशवे ग्रंथालयातील पुस्तके गहाळ होऊ नयेत म्हणून त्यांचे परिगणत केले जात असे. १७६४ मध्ये नारोअप्पाजी यांना परिगणन करण्यास व याचा अहवाल सादर करण्यास सांगितल्याचा उल्लेखही आढळतो. अशा प्रकारे पुस्तकांचे जतन करण्याची काळजी उत्तम प्रकारे घेतली जात असे. अशा ग्रंथालयातील धार्मिक ग्रंथाच्या वाचनासाठी पेशवे कुटुंबियांकडून पुराणिक व ब्राम्हण यांचीही नेमणूक केली जात असे.

**मराठी भाषेतील वाचनसाहित्य संग्रहाची गरज :**

ब्रिटीश सत्ता महाराष्ट्रात १८१८ साली पेशवाई नष्ट झाल्यावरच पसरली. मुंबईत इंग्रजांचा अंमल एक–दोन शतके अगोदरच प्रस्थापित झालेला असल्यामुळे आधुनिक प्रकारच्या सामाजिक जीवनाची महाराष्ट्रात प्रथम मुंबईतच सुरुवात झाली. त्यामुळे नव्या परंपरेतील पहिली ग्रंथालयेही मुंबईतच अस्तित्वात आली. १७१५ च्या सुमारास ईस्ट इंडिया कंपनीचे ग्रंथालय अस्तित्वात आले आज ही एशियाटिक सोसायटी या नावाने मुंबईत चालू असलेले हे ग्रंथालय मुंबई शहरातले आद्य सार्वजनिक स्वरुपाचे ग्रंथालय असे म्हणता येईल. अर्थात सार्वजनिक याचा अर्थ सरकारी प्रयत्नाने सुरु झालेले व चाललेले असा नव्हे. हे ग्रंथालय खासगी प्रयत्नांनीच अस्तित्वात आले होते. १८०४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे सरन्यायाधीश जेम्स मकिन्टाश यांच्या पुढाकाराने ग्रंथालयाच्या व साहित्यिक उपक्रमांच्या उपयुक्ततेची चर्चा मान्यवरांच्या सभेत होऊन ‘लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे’ ह्या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेने प्रारंभापासून ग्रंथालयाची योजना समोर ठेऊन संस्थेची स्थापना करण्यात आली. म्हणूनच संस्थेने प्रारंभापासून ग्रंथालयाची योजना कार्यवाहीत आणली. एका डॉक्टरी पेशाच्या माणसाचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह हा ग्रंथालयाचा

मुलाधार होता. १८२९ साली ही संस्था लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीची शाखा बनली. या ग्रंथालयात प्रामुख्याने युरोपीयन आणि संस्कृत, पार्शियन वगैरे प्राचीन भाषांतील ग्रंथाचा संग्रह होई. देशी भाषांकडे चालकांचे मुळीच लक्ष नसे. चुकून एखादा मराठी वा गुजराती ग्रंथ या ग्रंथालयात जमा होई. १८४० पर्यंत संस्थेचा लाभ करुन घेण्यास एतद्देशीयांना बंदी होती. माणेकची खरसेटजी यांनी खटपट करून येथे प्रवेश केला. त्यामुळे पुढे तेलंग, मंडलीक यांच्यासारख्या ज्ञानपिपासू नागरिकांना या ग्रंथालयाचा लाभ घेता आला.

ग्रंथालय चळवळीचा दुसरा प्रयत्न म्हणजे कंपनी सरकारची जेथे मुलकी किंवा लष्करी ठाणी असत तेथे उघडलेली ग्रंथालये या प्रकारची ग्रंथालये रत्नागिरी, सोलापूर, नगर, महाबळेश्वर, बेळगाव, सातारा इत्यादी ठिकाणी स्थापन झाल्याची नोंद आढळते. या सर्व ग्रंथालयांची सारी सूत्रे गोऱ्या लोकांच्याच हाती असत. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेत भारतीयांना तर फारसा वाव नव्हताच, पण गरीब युरोपियन माणसालाही त्याच्या सभासदत्वाची भारी फी परवडणारी नव्हती. त्यामुळे त्यांना ग्रंथाचा फायदा घेणे जड जात असे. म्हणून देशी–विदेशी साधारण लोकांकरता एक स्वतंत्र सार्वजनिक ग्रंथालय उभारावे अशी कल्पना 'बॉम्बे कुरीयर' चे संपादक जे. एच्. स्टॉक्लिर यांच्या मनात आली. त्यानी रॉबर्ट झेवियर कर्फी यांच्या सहकार्याने 'बॉम्बे जनरल लायब्ररी' स्थापन केली. या उपक्रमास मुंबईचे गव्हर्नर सर जॉन माल्कम यांचे सहाय्यही मिळाले होते.

यानंतर अनुकरणाने व सरकारी प्रोत्साहनाने ठिकठिकाणी ग्रंथालये स्थापन झाली. या ग्रंथालयांना शिक्षणावर देखरेख ठेवणाऱ्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे व पुढे १८५५ मध्ये संघटित झालेल्या एज्युकेशन डिपार्टमेंटचे उत्तेजन लाभले. अशी ग्रंथालये स्थापन करण्यात सरकारी अधिकाऱ्यांनीच प्रामुख्याने प्रथम तरी पुढाकार घेतला. १८१३ पासून इंग्रजी शिक्षणाची सुरुवात झाली. सरकारी नोकरीसाठी इंग्रजी शिक्षणाची आवश्यकता असल्यामुळे इंग्रजी शिक्षणाकडे लोकांचा कल वाढला. या नवशिक्षितांना पाश्चात्य ज्ञानाची गोडी लागावी म्हणून ग्रंथालयाची स्थापना करण्याचा विचार कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांच्या मनात उद्‌भवला. या विचारातूनच 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रंथालयाची

स्थापना झाली. महाराष्ट्रातील अनेक शतायू ग्रंथालयांचे मूळ या लायब्ऱ्यांतच आहे. देशातील नेटिव्ह जनरल लायब्ररी १८२८ मध्ये रत्नागिरी येथे स्थापन करण्यात आली. अहमदनगर येथे भिल्ल जमातीवर देखरेख ठेवणाऱ्या पोलीस फोर्सचा कमांडर कॅप्टन पॅट. थिओ. फ्रेंच (Capt. Pat. Theo. Frech) याने नगर येथे १८३८ साली 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' स्थापन केली. अशाच प्रकारची ग्रंथालये इतरत्रही अस्तित्वात आली. पुण्याचे जज्ज हेन्री ब्राऊन यांनी गव्हर्नरच्या सूचनेवरुन नागरिकांची सभा घेतली व २८ जानेवारी १८४८ रोजी ग्रंथालयाची स्थापना झाली. या ग्रंथालयाचे सेक्रेटरी असलेले रा. व. गोपाळराव हरी देशमुख ( लोकहितवादी) यांनी 'प्रभाकर' पत्राच्या २६ मार्च १८४८ च्या अंकात अशा ग्रंथालयाबाबत जो उल्लेख केला आहे त्यावरुन ग्रंथालये स्थापन्याचा उद्देश व त्याचे आद्य प्रवर्तकत्व याविषयी स्पष्ट पुरावा मिळतो. लोकहितवादी लिहितात ''गव्हर्नरसाहेब यांनी हिंदू लोकांचे अज्ञान दूर होण्याचा उपाय पुण्यातच केला असे नाही, असा प्रयत्न अहमदनगर येथे ही करण्यात आला होता. जागोजाग रेसिडेंट वगैरे अधिकारी वर्गात ग्रंथालय स्थापन करण्याविषयी हुकूम पाठविले होते. गव्हर्नरचे खाजगी सचिव कप्तान फ्रेंच यांनी तसेच करण्याची प्रवृत्ती चालू करविली त्याबद्दल त्यांचे उपकार मानले पाहिजेत.''

देशात स्थापन करण्यात आलेल्या या ग्रंथालयांच्या स्थापनेसंदर्भात सरकारी दृष्टीकोन काय होता ते बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या १८५०-५१ च्या अहवालावरुन निर्देशनास येते.

During the period now under review an impulse has been give to the formation of Native libraries in some of the principal zillah - towns of this Presidecy. The first effort in this direction appears to have been made by Captain French, who succeeded in forming a native library at Ahmeduggur, as far back as 1883; Subsequetly the subject came under our cosideration and we recommeded to your Lordship's government that Native Libraries should be ecouraged as much as posible. It appears evident to us that unless such institutions were generally established our plans for the diffusion of knowledge would be icomplete, as the education of the youths brought up in our schools would otherwise cease on their quitting."

अशा ग्रंथालयांना उत्तेजन देण्याचा सरकारचा हेतू वरील आलेखावरुन स्पष्ट होत असला तरी, प्रत्यक्ष साहाय्य मात्र सरकारकडून फारसे मिळू शकले नव्हते. बोर्ड ऑफ एज्युकेशनला मिळणाऱ्या ठराविक रकमेतून अशा ग्रंथालयांना मदत करणे शक्यही नव्हते. म्हणून ठिकठिकाणचे न्यायाधीश, सहाय्यक न्यायाधीश यांनी आपले वजन खर्चून ग्रंथालयाकरीता लोकांकडून वर्गणी जमविली. जे वर्गणी देतील त्यांना देशीभाषात निघणारी सरकारी प्रकाशने मोफत द्यावी. तसेच 'ज्ञानप्रसारक' व 'बोधसागर' अशासारखी नियतकालिके पाठवावी अशी शिफारस बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या अहवालात करण्यात आली होती.

अशी ग्रंथालये पुढे नाशिक, ठाणे, सातारा, अलिबाग, सावंतवाडी इत्यादी ठिकाणी निघाली, सरकारची प्रेरणा असल्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांनीच ग्रंथालये काढण्यात ठिकठिकाणी पुढाकार घेतला. यामुळे नेटिव्ह जनरल ग्रंथालयांच्या कामकाजात सरकारी, इंग्रजी अधिकाऱ्यांचा प्रभाव अधिक असे. कोल्हापूर, मुंबई, बडोदे येथील ग्रंथालयांच्या व्यवस्थापन मंडळात इंग्रजांचाच भरणा अधिक असे. कोल्हापूरच्या ग्रंथालयाचा कारभार रेसिडेंटचा मुख्यतांत्रिक पहात असे. तसेच सरकारी नियंत्रणही बरेच होते. ग्रंथालये नोंदण्याची सक्ती होती. आक्षेपार्ह पुस्तके ठेऊ नयेत, सरकारची तपासणी मान्य करावी, अशा अनेक अटी या ग्रंथालांवर लादण्यात आल्या होत्या.

सरकारी प्रेरणेने स्थापन झालेल्या या संस्था सामान्य लोकांपर्यंत पोहचणेच शक्य नव्हते. सरकारी अधिकारी, मूठभर सुशिक्षित अशा थोड्या लोकांशिवाय या ग्रंथालयापर्यंत सर्वसामान्य जनता पोहचणे शक्य नव्हते. म्हणजे ज्या 'नेटिव्ह लोकांच्या मार्फत प्रबोधनासाठी' ग्रंथालये स्थापण्यात आली. ते लोक मात्र या उप्रकमाबाबत उदासीन होते. नवशिक्षित लोकांनीही मुद्रित ग्रंथांच्या छपाईच्या शाईत गाईची चरबी वापरण्यात आल्याच्या संशयाने ग्रंथाबाबत विशेष कुतूहल दर्शवले नव्हते. यामुळे या उपक्रमास विशेष उतेजन मिळू शकले नाही. शिवाय या ग्रंथालयांचे स्वरुप जुजबी होते. प्रारंभीच्या काळात ही ग्रंथालये फक्त वृत्तपत्रे व मासिके विकत घेत, म्हणून त्यांना ग्रंथालये न म्हणता वाचनालये म्हणणेच योग्य ठरणारे आहे. पुढे सरकारने प्रसिध्द केलेली पुस्तके या ग्रंथालयांना देणगी म्हणून मिळू

लागली. नेटिव्ह ग्रंथालयात ग्रंथांची संख्या कमी असल्यामुळे व प्रामुख्याने त्यांचे स्वरुप वाचनालयाचे असल्यामुळे ग्रंथांचा संग्रह करुन संग्रहालय तयार करण्याचा दृष्टीकोन ही विकसीत झाला नव्हता. त्या काळातील कोणत्याच ग्रंथालयांनी आपल्यापुढे ग्रंथांचा संग्रह करुन पुढील पिढीसाठी त्याची जोपासना करण्याची किंवा सर्व एकत्र उपलब्ध करुन देण्याची दीर्घकालीन योजना ही व्यवस्थापक मंडळा समोर नव्हती. १८६७ च्या 'रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲण्ड पब्लीकेशन्स' या कायद्याने पुस्तकांच्या तीन प्रती प्रकाशकाकडून सरकारकडे जाऊ लागल्या. यापैकी एक प्रत शिक्षण संचालकांकडे ( डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन) जाई. त्रैमासिक याद्या व वार्षिक आढावा याकरिता उपयोग करुन झाल्यावर ही पुस्तके विद्यापीठाकडे संग्रह करण्याच्या दृष्टीने पाठविण्यात येत असत. पण १८९० साली ही पुस्तके ठेवण्याचे मुंबई विद्यापीठाने नाकारले. म्हणून पुस्तके घेण्याबाबत रॉयल एशियाटिक सोसायटीकडे विचारणा करण्यात आली. पण सोसायटीच्या सेक्रेटरीने या पुस्तकांचा संग्रह करणे आपल्या ग्रंथालयाला शक्य नसल्याचे कळविले. म्हणजे संग्रहालयाची कल्पना त्यांची नव्हती. शिवाय हे ग्रंथालय प्रामुख्याने इंग्रजांसाठी व काही प्रमाणात आंग्लशिक्षित हिंदी लोकांसाठी असल्याने देशी प्रकाशकांची त्यांना गरजही वाटत नसावी हे घटनेवरुनही स्पष्ट होते.

नेटिव्ह ग्रंथालयात असलेल्या ग्रंथात इंग्रजी ग्रंथांचीच भर अधिक असे. १८५० साली निरनिराळ्या नेटिव्ह ग्रंथालयांकडून सरकारने त्यांच्या परिस्थितीसंबंधी अहवाल मागितले होते. यावरुन या ग्रंथालयात किती पुस्तके होती व ती कोणत्या भाषेतील होती याची माहिती मिळू शकते. उदाहरणार्थ पुण्याच्या नेटिव्ह ग्रंथालयाचे सचिव रा. ब. गोपाळराव हरी देशमुख ( लोकहितवादी) यांनी सरकारी यंत्रणेला जे उत्तर पाठविले त्यामध्ये पुणे नेटिव्ह लायब्ररीत एकंदर १८४७ पुस्तके असून त्यापैकी १६६२ इंग्रजी, १८५ मराठी व संस्कृत होती. शिवाय ५० हिंदुस्थानी, अरबी व पर्शियन भाषेतील पुस्तके होती असे दिसून येते. त्यावेळी प्रसिध्द झालेल्या संस्कृत व मराठी ग्रंथांची संख्या अगदीच मर्यादित होती हे तर खरेच, पण सर्व मुद्रित पुस्तकांचा संग्रह करण्याची चालकांची वृत्ती असल्याचे जाणवत नाही. शं. ग. दाते यांच्या मराठी ग्रंथ सूचीप्रमाणे १८५० पर्यंत केवळ मराठी पुस्तकेच दोनशेच्यावर प्रसिध्द

झाली होती. शिवाय दाते यांना उपलब्ध न झालेली पुस्तके ही वेगळीच. पुढेही ग्रंथालयातील ग्रंथाबाबतची परिस्थिती सुधारल्याचे आढळत नाही. १८८० च्या सुमारास २००० पेक्षा अधिक ग्रंथ कोणत्याच ग्रंथालयात नव्हते. इंग्रजी ग्रंथाचा भरणा सर्वात अधिक म्हणजे सुमारे ८० टक्के व १०–१२ टक्के मराठी व इतर ८ टक्के इतकी होती. वास्तविक १८८४ सालापर्यंत प्रसिध्द झालेल्या मराठी भाषेतील ग्रंथांची संख्या काही हजाराच्या घरात गेली असतानाही नेटिव्ह ग्रंथालयात फारच अल्प म्हणजे दोनतीनशे मराठी ग्रंथ असल्याचे निदर्शनास येते. एकंदर समाजावर इंग्रजीचा जबरदस्त पगडा बसलेला असल्यामुळे देशी भाषांतील ग्रंथनिर्मिती मुळातच बेताची होती. पण प्रसिध्द झालेल्या ग्रंथानाही त्यांचे नैसर्गिक स्थान मिळत नव्हते. या ग्रंथांना अडगळीतच रहावे लागत होते. 'नेटिव्ह' ग्रंथालयांमध्येच 'नेटिव्ह' ग्रंथांची आबाळ होत होती. हे चित्र खूप विदारक होते.

नेटिव्ह ग्रंथालयांची ही चळवळ सुमारे १८८० सालापर्यंत चालू राहिली. परंतु पुढे महाराष्ट्रातील समाजात एक नवीन जोरदार परिवर्तन घडून यावयास सुरुवात झाली व त्यातून स्वाभिमानी प्रवृत्ती प्रबळ होऊन ग्रंथालयाच्या क्षेत्रातही तिचा प्रभाव पडला आणि ग्रंथालय चळवळीला नवे वळण मिळाले. चळवळीला विकासाच्या वाटेवरुन हळूहळू गतीशिलता प्राप्त झाली.

**परिवर्तनाच्या वाटेवरील ग्रंथालय चळवळ :**

१८१८ साली पेशवाई नष्ट होऊन इंग्रजांचा अंमल महाराष्ट्रावर प्रस्थापित झाला. परकीय सत्तेबरोबरच पाश्चिमात्य संस्कृतीचे वर्चस्व पसरू लागले. या नव्या संस्कृतीने समाजाचे डोळे दिपून गेले व तो स्तिमित झाला. ह्याचा परिणाम असा झाला की, नव्या संस्कृतीतील सर्वच गोष्टी श्रेष्ठ म्हणून स्वीकारार्ह वाटू लागल्या व तुलनेत आपल्या संस्कृतीतील गोष्टी निकृष्ट व त्याज्य वाटू लागल्या. इंग्रजी अंमलात सुरु झालेल्या नव्या इंग्रजी शिक्षणाने प्रतिष्ठा प्राप्त झालेला शिक्षितवर्ग नव्या संस्कृतीचा भाट व प्रचारक बनला व काही काळ असे वातावरण निर्माण झाले की, आमच्या परंपरागत जुन्या संस्कृतीस टिकवावे, अभिमान बाळगावा असे काहीच शिल्लक राहिलेले नाही. सर्वसामान्य जनता तर एकंदर परिस्थितीकडे भयभीत नजरेने पाहात होती. या अशा निराशाजनक वातावरणात सर्वसामान्य जनतेमध्ये एकप्रकारची उदासीनता निर्माण झाली होती.

पाश्चिमात्य संस्कृतीच्या पहिल्या दर्शनाने डोळे दिपून जाऊन अस्मिताच मंदावली होती. या नवसंस्कृतीबरोबर आलेल्या नवशिक्षणाने येथील काहींच्या ठिकाणी विवेकशीलता मात्र निर्माण झाली., आमचे जे चांगले ते न टाकता परकीयांचे चांगले ते स्विकारून पचनी पाडावे असा विवेकी दृष्टीकोन काहीजणांच्यामध्ये निश्चितच निर्माण झाला. बाळशास्त्री जांभेकर, न्या. मू. रानडे, रा. ब. गोपाळराव हरी देशमुख (लोकहितवादी) अशी काही नावे या संदर्भात सहज नमूद करता येतील. कालांतराने आणखी एक जोरदार प्रवाह निर्माण झाला. आंधळ्या आंग्लभक्तीला कसून विरोध करणारा व संस्कृतीच्या तीव्र अभिमानावर आधारलेला विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी प्रचलित केलेला हा प्रवाह होता. या विचारांच्या लोकांचा भर स्वाभिमानी व स्वावलंबी कृतीवर होता. या स्वावलंबी वृत्तीला टिळक – आगरकरांनी आपल्या त्यागपूर्ण व धडाडीच्या कार्याने तेजस्विता प्राप्त करून देण्यात मोलाचे कार्य केले.

तेव्हा नवीन राजवट आल्यावर निर्माण झालेली सुरवातीची भांबावलेली परिस्थिती लवकरच पालटली. नव्या जुन्याची चिकित्सा होऊ लागली व महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादी चळवळींचा उगम झाला. या चळवळी हळूहळू बाळसे धरू लागल्या.

महाराष्ट्रातील विचारमंथनाचा परिणाम वाङमयाच्या क्षेत्रातही दृष्टोत्पत्तीस येऊ लागल्या. इंग्रजी सत्ता महाराष्ट्रात स्थापन झाल्यानंतर शिक्षणकार्याला व तदनुषंगाने ग्रंथनिर्मितीला प्रारंभ झाला. तो सरकारी कृपेनेच, मुंबईचे पहिलेच गव्हर्नर माऊण्ट स्टुअर्ट एलिफिन्स्टन यानी शिक्षणाच्या प्रश्नात आस्थेवाईकपणे लक्ष घातले. देशी भाषांच्या माध्यमातून हिंदी लोकांना शिक्षण देण्याचा उपक्रम १८२० मध्ये हाती घेण्यात आला. शिक्षणप्रसाराच्या प्रयत्नाला सहाय्यभूत म्हणून विद्यार्थ्यांसाठी पुस्तके तयार करण्याचा कार्यक्रमही सुरु झाला. शालोपयोगी पुस्तकांबरोबरच बालसाहित्य अशी विविध विषयांची शेकडो पुस्तके तयार करण्यात आली. गणित, व्याकरण, भूगोल याचप्रमाणे विज्ञानाची पुस्तकेही तयार झाली. ही परिस्थिती १८५४ पर्यंत चालू राहिली. प्राथमिक शिक्षणाखेरीज सर्व शिक्षण इंग्रजी भाषेच्या माध्यमातून देण्याचा निर्णय झाला व देशी भाषांना मिळणारी सरकारी मदत

संपुष्टात आली. सरकारी प्रेरणेने व प्रत्यक्ष बक्षिसाच्या आमिषाने सुरु झालेली ग्रंथ रचनेची आवड पुढेही चालू राहिली. मराठी गद्याचा हा जो इंग्रजी अवतार झाला त्याचे महत्व एवढेच की, मराठी भाषेत विविध विषयांवर ग्रंथरचना होऊ लागली. यामुळे साहित्य प्रसारणाचे एक नवे युग अवतरले.

१८७४ पर्यंतच्या म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेचा जन्म होईपर्यंतच्या काळात इतिहास, धर्म, तत्वज्ञान, प्रवासवर्णने, भौतिकशास्त्रे, चरित्रे इत्यादीविषयक वैविध्यपूर्व वाङ्मय निर्माण झाले. वृत्तपत्रांचीही सुरुवात झाली आणि विविध विषयांना वाहिलेली नियतकालिके सुरू झाली. प्रकाशित ग्रंथांची संख्या वाढली. अर्थात गुणात्मकदृष्ट्या हे ग्रंथ फारच नगण्य होते. म. म. पोतदार यांनी म्हटल्याप्रमाणे, ''एकही अलौकिक किंवा अजरामर ग्रंथ मराठीत झाला नाही. तारांगण पुष्कळ उगवला, पण तमोनाशक चंद्र मात्र कोठेच आढळला नाही. वास्तविक स्वराज्य नाहीसे होऊन पुरती पंचवीस वर्षेही झाली नाहीत तोच जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, भाऊ दाजी, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, मंडलिक, मोडक, भांडारकर, रानडे, तेलंग प्रभूती विद्वान व कर्तबगार पुरुष एकामागून एक निर्माण झाले. त्यांच्यापैकी अनेकांनी इंग्रजीतून नवीन संशोधन करून निबंध लिहिले. पण जांभेकर आणि मंडलिक यांच्यासारख्या विद्वानांनी मराठीतून ग्रंथरचना करताना इंग्रज ग्रंथकारांच्या ओंजळीने पाणी प्यावे ही आश्चर्य वाटण्यासारखी बाब आहे. या प्रकाराला आत्मविश्वासाचा अभाव किंवा न्यूनगंडाची वृत्ती हेच कारण सांगता येईल.''

ज्यांच्याकडून सर्वसामान्य जनतेला मार्गदर्शन व्हावयाचे त्या विव्दानांनीच मराठी भाषा,ग्रंथ वगैरेबाबत अशी अपेक्षा वृत्ती प्रकट केली. अर्थात नेत्यांच्या, विद्वानांच्या या वृत्तीला त्या वेळची परिस्थिती प्रामुख्याने कारणीभूत होती. यामुळे त्यांची वृत्ती क्षम्य मानली तरी तिचा परिणाम मात्र प्रतिकूल झाला. सरकारी नोकरीसाठी वा कृपाप्रसादासाठी इंग्रजी शिक्षण आवश्यक असल्याने त्या शिक्षणावर भर दिला जावा हे साहजिकच होते. विद्वानांनी व नेत्यांनीच विवेक न ठेवल्याने सर्वसामन्य जनतेत त्यांचे अनुकरण होत राहिले. त्याचबरोबर या उपेक्षेबद्दल जनतेची कानउघडणी करणारे काही लोकही होते. 'प्रभाकर' पत्राचे संपादक भाऊ महाजन यांनी ८ मे १८४२ च्या अंकात अशी टीका केली होती की, 'सांप्रत मुंबई

येथील हिंदू लोक इंग्रजी भाषा आणि विद्या यापासून संसारात उपयोग आहे म्हणून त्या शिकणे हाच मोठा पुरुषार्थ मानून त्यात सर्व वेळ खर्च करतात.

तर दादोबा पांडुरंग यांनीही १८७९ साली प्रकाशित केलेल्या आपल्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेस अशी हळहळ व्यक्त केली होती की, '' अलीकडेस २५ वर्षांपासून सर्व लोकांचा भर इंग्लिश भाषा शिकण्यात फार वाढत चालल्यामुळे स्वभाषेविषयी त्याच मानाने मोठी अनास्था वाढत चालली आहे.'' दादोबांनी ही जी हळहळ व्यक्त केली तिचे मुख्य कारण म्हणजे मुंबई विद्यापीठाची स्थापना (१८५७) होईपर्यंत त्यांच्या डोळ्यासमोर अव्वल इंग्रजी अमदानीतील नवशिक्षितांच्या ज्या दोन पिढ्या होऊन गेल्या त्यातील शास्त्री मंडळीनी ज्या आस्थेने आणि उत्साहाने मातृभाषेची सेवा केली ती आस्था आणि तो उत्साह काही नंतर विद्यापीठातून उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या पदवीधरांत त्यांच्या दृष्टीस पडला नाही. पहिल्या दोन पिढ्यांतील बहुतेक नवशिक्षितांनी सरकारी नोकऱ्याच केल्या, पण आपल्याला उपलब्ध आणि अवगत झालेले नवे ज्ञान मराठी भाषेत आणणे हे आपले कर्तव्य मानून मोठ्या हौसेने त्यांनी ग्रंथरचनेचा उद्योगही केला. न्या. रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे वाङ्मय बव्हंशी पोरकट आणि परपुष्ट असले तरी त्यांच्या लिखाणामुळे मराठी वाङ्मयात नवीन कल्पनांचा प्रसार व्हायला अप्रत्यक्ष मदत पुष्कळच झाली.

न्या. रानडे यांनी १८१८ ते १८९६ पर्यंतच्या काळातील मराठी वाङ्मयाचे जे विस्तृत समालोचन 'मराठी वाङ्मयाच्या अभिवृध्दीवरील टिपण्णीत (A Note on the Growth of Marathi Literature १८९८) केले त्यात म्हटले होते की, '' ज्या शिक्षण पध्दतीत त्यांची वाढ होते तिचा दोष जास्त आहे. लोकांना मिळत असलेले शिक्षण हे इतके विलक्षण विदेशी आहे की, आपल्या राष्ट्रीय वाङ्मयाचा व्यासंग करण्याची आणि त्यात भर घालण्याची प्रेरणा त्यांना मुळी अजिबात होत नाही, व वर्षानुवर्षे पदवीधरांची ही अनास्था आणि उपेक्षा सारखी वाढतेच आहे.''

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीही सुशिक्षितांच्या अनास्थेबद्दल अशीच टिका केली. मराठी भाषेची साप्रतची स्थिती वर्णन करताना ते म्हणतात, '' दहावीस वर्षांमागे शिकलेल्या लोकांस मराठीत ग्रंथ लिहिण्याची बरीच हौस वाटत असे; पण आता ती भाषा कोणास डोळ्यासमोरही नको!''

मराठी भाषेच्या या अनास्थेचा दोष प्रामुख्याने आपल्या लोकांकडेच जात असला तरी सरकारी धोरणही देशी भाषांना प्रतिकूल होते. सुरवातीस केलेला देशी भाषांना शिक्षणात प्राधान्य देण्याचा उपक्रम फार काळ टिकला नाही. १८३३ पासूनच उलट दिशेने वारे वाहू लागले व इंग्रजी शिक्षण व इंग्रजी माध्यम यांच्यावरील भर वाढला. बंगालसारख्या प्रांतात राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या त्या काळातील स्थानिक पुढाऱ्यांनी पुरोगामी विचाराचे बीज भारतात रुजण्याच्या दृष्टीने १८२३ पासूनच इंग्रजीच्या बाजूने कौल दिला होता. अर्थात त्याबरोबर हेही खरे की, बंगालमध्ये शैक्षणिक माध्यमाचा झगडा बंगालीविरुध्द इंग्रजी असा नसून, संस्कृत, अरेबिक विरुध्द इंग्रजी असा होता. मुंबई प्रांतात परिस्थिती निराळी होती. येथे मराठीलाच प्राधान्य होते. मराठी राजभाषा होती व सुरुवातीच्या काळात इंग्रजी अंमलातही तिला शिक्षणात मानाचे स्थान होते.  मराठी गुजरातीसारख्या देशी भाषांची उपेक्षा होऊ नये अशी वाजवी अपेक्षा येथील जगन्नाथ शंकरशेट यांच्यासारख्या संस्कृत भाषाभिन्यांची होती. देशी भाषेच्या माध्यमासाठी अव्वल इंग्रजीत मुंबई प्रांताइतका अन्य कोणत्याही प्रांताने प्रतिकार केलेला नाही. सरकारने आपले धोरण प्रतिकारानंतरही बदलले नाही व मराठी भाषेची व वाचनसाहित्याची उपेक्षा सुरू झाली.

१८५७ साली मुंबई विद्यापिठाची स्थापना झाल्यावरही सुरुवातीला देशी भाषांना तेथे स्थान होते. पण पुढे मराठीसारख्या लोकभाषांचे उच्चाटन होऊन त्यांच्या जागी संस्कृतादी प्राचीन अभिजात भाषांची प्रतिष्ठापना झाली. मराठी आदी भाषांना विद्यापीठात मानाचे स्थान मिळावे म्हणून सतत प्रयत्न करण्यात आले. न्या. रानडे, न्या. तेलंग, मोडक आदी व्यक्तिनीही सातत्याने प्रयत्न केले पण ते फोल ठरले आणि अगदी अलीकडच्या काळापर्यंत मराठीला मानाचे स्थान विद्यापीठात मिळू शकले नाही. यामुळे मराठी भाषेला प्रतिष्ठेचे स्थान राहिले नाही. शिवाय आंग्लविद्या विभूषितांचा इतरांपासून निराळा दिसणारा व राहणारा नवा वर्ग अस्तित्वात आला.

मराठी भाषा व ग्रंथ यांची ही केविलवाणी अवस्था केवळ इंग्रजीची उसनवारी केली म्हणून झाली असे नव्हे. इंग्रजी सत्तेबरोबर पाश्चात्य ज्ञानाचा जो परिचय झाला तो काही मर्यादेपर्यंत वरदानासारखाच होता. इंग्रजीला न झिडकारता इंग्रजीत सर्व जगातील जे नवे

ज्ञान उपलब्ध झाले होते ते आत्मसात करणे आवश्यक होते, मराठी भाषा व पर्यायाने समाज हे ज्ञान पचवून पुढे सरसावू शकणार होती व तिची ग्रंथसंपत्ती समृध्द होणार होती. पण हे करताना किती मर्यादेपर्यंत परकीय गोष्टींचा स्वीकार करावयाचा याचा विवेक करणे जरूरीचे होते. नव्या ज्ञानाने दिपून जाऊन आपली वाट सोडून जाण्याचे कारण नव्हते. आपल्या भाषेचे, संस्कृतीचे स्वत्व कायम टिकवणे हे या सुरवातीच्या काळातील लेखकांचे व नेत्यांचे कर्तव्य होते. या कर्तव्याचे भान ठेवण्याचा प्रयत्न झाला नाही असे मुळीच नाही. पण एकंदर सर्वसाधारण चित्र जे दिसले ते मात्र निराशाजनक होते. १८७४ पर्यंतच्या काळात विविधतेने नटलेले वाङमय निर्माण झाले. परंतु ग्रंथनिर्मितीला स्वत्वाचे अधिष्ठान असणे आवश्यक असते ते या काळातील वाङ्मयाला होते असे ठामपणे म्हणता येणार नाही.

अशा या पार्श्वभूमीवर १८७४ साली विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी ‘निबंधमाला सुरु केली. मुख्यत: भाषाशोधनाचा उद्देश पुढे ठेवून निबंधमाला अवतीर्ण झाली.निबंधमालेच्या पहिल्या अंकात देशाभिमानाने ठासून भरलेला लेख प्रसिध्द झाला. शेवटच्या अंकात आपल्या मनातला हेतू बराचसा सिध्दीस गेला असून परिस्थितीत फरक पडल्याचे समाधान चिपळूणकरांनी व्यक्त केले. लोकांच्या मनातील अनेक दुर्मते व दुराग्रह यांचे खंडन करुन लोकांचे समज बरोबर करावे, हा मनोरथ सफल झाल्याचे त्यांनी म्हटले.

निबंधमालेच्या जन्मा आधीही मराठी भाषाभिमानातून काही मासिके प्रकाशित झाली नव्हती असे नाही. मिशनऱ्यांच्या हिंदू धर्मावरील हल्याला तोंड देण्यासाठी निघालेल्या वृत्तपत्रांत व तयार केलेल्या ग्रंथात स्वधर्माविषयीचा अभिमानही आढळून येतो. पण १८७४ पर्यंतच्या काळात जी काही जागृती झाली तिचे कृतिशील स्वरुप प्रामुख्याने धार्मिक व सामाजिक प्रश्नापुरतेच मर्यादित होते. ही जागृती काहीशी प्रतिक्रियात्मक व स्वरंक्षकच होती. पण निबंधमालेने लोकांच्या मनातील न्यूनगंड घालवून तेथे आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी जो विचार प्रस्तुत केला त्याचे सूत्रच मूळी ‘आमच्या देशास काही झाले नाही, त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा काही एक विकार नाही.’ असे होते.

निबंधमालेनंतर चिपळूणकरांनी स्वाभिमानी शिक्षण देण्याच्या उद्‌देशाने न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली व सर्वसाधारण जनतेत स्वाभिमान जागृत करण्यासाठी केसरी व मराठा ही दोन वृत्तपत्रे सुरु केली. स्वभाषा, स्वधर्म, स्वेतिहास, स्वसंस्कृती व स्वदेश यासंबंधीची लोकांची अनास्था, बेपरवाई व गैरसमजुती पाहून चिपळूणकरांना मनस्वी दु:ख होई. परकीयांचे अंधानुकरण पाहून ते बेचैन होत. आपल्या लोकांचे केवळ दुर्गुण दाखविल्याने त्यांचा तेजोभंग होतो व असा तेजोभंग राष्ट्रोद्धाराच्या दृष्टीने घातक होय असे त्यांना वाटे. या भूमिकेवरुन त्यांनी विविध उद्योग आरंभून आपले लेखन केले. अशा प्रकारच्या मनोभूमिकेतून निर्माण झालेले त्यांचे वाङ्मय तेजस्वी, स्वाभिमानद्योतक व स्वधर्म आणि स्वभाषाप्रेमी विचारांनी ओतप्रोत भरलेले होते. लोकहितवादी, विष्णूबुवा ब्रम्हचारी, महात्मा जोतिबा फुले यांच्याजवळ विचारांचा ताजेपणा व काही अंशी विचारांची मौलिकताही होती. विष्णुशास्त्र्यांच्या लेखनाने मात्र लोकांना आकर्षित केले. या वाङमयीन जागृतीकार्याला स्वावलंबनाची व स्वार्थत्यागाची बैठक दिसल्यामुळे ती अधिक प्रभावी ठरली.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी प्रचलित केलेला स्वाभिमानाधिष्ठीत नवा संप्रदाय त्यांचे सहकारी लोकमान्य टिळक व आगरकर या विचारवंतांनी जोपासून त्याचा उत्तम परिपोष केला. एवढेच नव्हे तर, त्यातील स्वाभिमान त्यांनी अधिक प्रखर व युयुत्सू बनविला. टिळक आणि आगरकर यांचे मार्ग बाह्यत: जरी भिन्न झाले तरी त्यांच्या मार्गाची बैठक एकच होती. आगरकरांनी सामाजिक सुधारणेवर भर दिला. लो. टिळकांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे आगरकर पक्के स्वराज्यवादी होते. लो. टिळकांनी सामाजिक सुधारणेला गौण स्थान देऊन राजकीय कार्यावर भर दिला. त्यांची ही भूमिका त्या काळात अधिक फलप्रद ठरली हे नाकारून चालणार नाही. चिपळूणकर, आगरकर व टिळक यांच्यात दारिद्र्य आणि दास्य यांच्या उच्चाटनास आद्य स्थान देण्याबाबत बिलकूल मतभेद नव्हते. लोकमान्य टिळकांनी भाषेच्या विकासाची सांगडही राष्ट्रीय कार्याशी निगडीत असल्याचे प्रतिपादन केले. 'महाराष्ट्र भाषेची वाढ' या विषयावर लिहिलेल्या तीन लेखांत त्यानी ही भूमिका मांडली. ''मराठीस मातृभाषा किंवा मायभाषा म्हटल्याने मराठी भाषेच्या अभिवृध्दीत काही भर पडते असे नाही.'' भाषेची खरी वाढ होण्यास ती भाषा वापरणाऱ्यांचा व्यवहार अधिक वाढला पाहिजे

आणि स्वभाषेत आपले विचार लोकांस कळवून लोकांची प्रवृत्ति किंवा मते फिरविण्याची जरूरही देशांतील पुढाऱ्यांस अधिकाधिक वाटू लागली पाहिजे; असे जेव्हा सामाजिक, राजकीय औद्योगिक आणि शास्त्रिय वाद किंवा चर्चा हरएक प्रसंगी व हरएक वेळी स्वभाषेत होऊं लागेल, जेव्हा धर्मजागृती किंवा सुधारणा करण्यास स्वभाषचाच उपयोग करण्यात येईल आणि जेव्हा दरबारात, कचेरीत, बाजारांत, लष्करांत किंवा विद्यालयांत सर्व व्यवहार स्वभाषंतच चालेल तेव्हा स्वभाषेची खरी वाढ होणार.''

चिपूळणकरांनी प्रचलित केलेल्या या नव्या संप्रदाराने पुढील पंचवीस वर्षात सर्वच क्षेत्रांत नवे मन्वंतर घडून येत होते. महाराष्ट्राप्रमाणेच इतरही अनेक प्रांतातील सांस्कृतिक विचारात बदल घडून येत होत व त्यातूनच नव्या राजकारणाचा जन्म झाला. याच काळात काँग्रेसची स्थापना झाली. साऱ्या भारतात नव्या स्वाभिमानी युगाचा अवतार झाला. महाराष्ट्रातील वाङ्मयक्षेत्रात आधुनिक मराठीचा पाया घालणाऱ्या अनेक चळवळी सुरू झाल्या. कादंबरी, नाटक, निबंध, काव्य इत्यादी वाङमय प्रकारांचा उगम आणि विकास सामान्यत: याच कालखंडात झाला. मराठी नाट्यकलेचा पाया याच काळात घातला गेला. मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन याच काळात भरले. नवनवीन वाङ्मयप्रकार आत्मसात केल्यामुळे मराठी वाङ्मयात वैचित्र्य आले, हा वाङ्मयीन लाभ झाला, पण प्रकारांच्या केवळ कलात्मक विलासात न रमता या कालखंडातल्या कर्तव्यजागृत मराठी साहित्यिकांनी सर्वसामान्य जनतेला व सुशिक्षितांना स्वाभिमानी राष्ट्रवादाचे आणि सुधारणावादाचे मन:पूर्वक शिक्षण दिले.

**ग्रंथालयाच्या क्षेत्रात**

इंग्रजी राज्याच्या पहिल्या अमदानीत दिलेली नजर साफ होण्यासाठी निंबधमाला, केसरी यांनी जागृती करण्यास सुरुवात करताच स्वाभिमानाचे, आत्मप्रतितीचे, देशभक्तीचे, संशोधनाचे नवयुग अवतरले. इंग्रज पुरस्कृत शिक्षणाबद्दल, ग्रंथालयाबद्दल असमाधान उत्पन्न झाले. ग्रंथालयांच्या क्षेत्रात जे असमाधान निर्माण झाले त्यातूनच सरकारी पुरस्काराऐवजी स्वावलंबनाने ग्रंथालये स्थापन करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली असावी. तसेच या स्वाभिमानी वृत्तीचे प्रतीक म्हणून व सामान्यत: मराठी भाषा व ग्रंथ यांची जी

गळचेपी सरकारकडून होत होती तिची प्रतिक्रिया म्हणून केवळ मराठी ग्रंथ एकत्रित करण्याची कल्पना पुढे आली असावी. सरकारी प्रोत्साहनाने स्थापन झालेल्या नेटिव्ह जनरल ग्रंथालयात मराठी ग्रंथांना नाममात्रच स्थान होते. हे लक्षात येताच नवीन विचारांनी स्वभाषेचा येथील लोकांचा अभिमानही जागृत झाला. मराठी ग्रथांची चौफेर व बहुविध वाढही होऊ लागली होती. 'केसरी' सारख्या पत्रातून, ''देशी भाषेंतल्या ग्रंथसंग्रहाकरिता आम्हाला पुढील गोष्टी साधावयाच्या आहेत. १) मराठी भाषेत चांगल्या व उपयुक्त ग्रंथांची प्रसिध्दी २) त्यांचा वाचक वर्गात प्रसार. हे साधण्यास चांगले ग्रंथ निर्माण केले पाहिजेत व लोकांत वाचनाची अभिरूची निर्माण केली पाहिजे.'' (केसरी १– ४– १८९०) अशी चेतावणी देण्यात येत होती. पुन्हा २३–३–८६ च्या अंकात 'केसरी' ने लिहिले, ' कोणत्याही भाषेतील ग्रंथसंग्रह वाढविण्याचे काम ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या अंगी उत्साह आणि कांही विशिष्ट हेतूकरता खटपट करण्याची बुध्दी जागृत असल्याखेरीज होत नाही.'' विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी १८८१ सालीच मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीचे कार्य अधिक कार्यक्षम कसे होईल याबाबत मार्गदर्शन केले होते आणि देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकताही त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केली होती. यामुळे मराठी ग्रंथाचा संग्रह करण्याच्या व त्यासाठी ग्रंथालये स्थापन करण्याच्या विचाराला चालना मिळाली. याबरोबरच काही व्यक्तींची ग्रंथप्रसाराची तळमळही महाराष्ट्रातील खाजगी प्रयत्नानी स्थापना होणाऱ्या ग्रंथालयाच्या वाढीला सहाय्यभूत झाली. अशा व्यक्तींत लोकहितवादींचा (गोपाळराव हरी देशमुख) प्रामुख्याने उल्लेख करावयाला हवा. आयुष्यभर त्यांचा हा 'लोककल्याणनिमित्तक उद्योग' अव्याहत चालू होता. नोकरीच्या निमित्ताने ते ज्या ज्या ठिकाणी गेले त्या त्या ठिकाणी सार्वजनिक संस्था निर्माण करण्याचा उद्योग त्यांनी केला. अहमदाबादसारख्या गुजरातीभाषा शहरातही अनेक सार्वजनिक संस्थांचे जनकत्व लोकहितवादींकडेच होती. याबाबतीतील विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्यांची ज्ञानप्रसाराची असाधारण आणि उत्कट तळमळ, त्यांनी जाहिरात लावून पुस्तकालयांस आणि ज्ञानसंपादनेच्छू व वाचन चळवळीत समाविष्ट होणाऱ्या व्यक्ती आपले ग्रंथ मोफत वाटले. पुण्याची नेटिव्ह लायब्ररीची स्थापना करण्यातही लोकहितवादीचा पुढाकार होता, वाचकवर्गास प्रोत्साहन व ग्रंथालयांची स्थापना असे उपक्रम त्यांनी अन्य ठिकाणीही सुरू केले होते.

१८७५ ते १९९० या काळातील वातावरण स्वाभिमानाच्या स्वभाषेच्या भावनेने व स्वभाषेच्या प्रेमाने भारलेले होते. म्हणून चौफेर ग्रंथ निर्मिती होऊ लागली, त्याप्रमाणेच ग्रंथाचा संग्रह करण्याची कल्पनाही पुढे आली. ही कल्पना साकार करण्याचे श्रेय महाराष्ट्र सारस्वतकार कै. विनायक लक्ष्मण भावे यांच्याकडे जाते. भावे यांनी महाविद्यालयीन जीवनातच ग्रंथवेड जोपासले होते. या वेडामुळे त्यांच्याजवळ हळूहळू त्यावेळच्या मानाने मराठी पुस्तकांचा उत्तम संग्रह निर्माण झाला. शिवाय त्यावेळी ठाणे येथे 'सूर्योदय' नावाचा एक फार जूना छापखाना होता. त्यात पूर्वीपासूनची पुस्तके होती. हा पुस्तकांचा संग्रहही वाढत गेला आणि त्यातच सर्व वेळ जावू लागला, असे भावे यांनी स्वतःच लिहून ठेवले आहे. भावे यांच्या वाङ्मयप्रेमात काव्याला आद्य स्थान होते. इतिहास संशोधनाबद्दलही भावे यांना कमालीची आस्था होती. यामागची त्यांची प्रेरणा सर्वस्वी राष्ट्रीय अस्मितेच्या उत्थापनाची होती. या भावनेतूनच त्यांनी मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना करण्याचे साहस केले. १ जून १८९३ रोजी कै. भावे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने ठाण्याचे मराठी ग्रंथसंग्रहालय स्थापन केले. या संस्थेचा हेतू असा होता की, 'प्रकाशित झालेले मराठी भाषेतील प्रत्येक पुस्तक या ग्रंथालयात असावे.' असा होता.

या संग्रहालयाच्या १८९४ सालच्या पहिल्याच अहवालात पुढील निवेदन केल्याचे आढळते.

'' आपली देशी भाषा सुधारण्यासाठी आजपर्यंत पुष्कळांनी पुष्कळ प्रयत्न केले. कोणी नवीन ग्रंथ लिहिले. कोणी परक्या भाषांतील ग्रंथाची भाषांतरे केली. कोणी जुने ग्रंथ मिळवून तपासून ते प्रसिध्द केले. परंतु त्या सर्वांची मेहनत म्हणजे हे सगळे ग्रंथ एके ठिकाणी जमविण्याचा प्रयत्न कोणी निटसा केलेला ऐकिवांत नाही. आपल्या देशांत पुस्तकालये बरीच आहेत. बहुतेककरुन सर्व चांगल्या ग्रंथसंग्रहालयात इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांतील पुस्तके ठेवण्याचा संप्रदाय असतो. आता इंग्रजी भाषेंत मराठीपेक्षा ग्रंथसंग्रह विशेष चांगला व जास्त यामुळे बहुतेक पैसा इंग्रजी पुस्तके घेण्याकडेच खर्ची पडतो व मराठी ग्रंथांचा संग्रह व्हावा तसा होत नाही, ही आपल्या देशांत भाषेसंबंधाने मोठी उणीव आहे. ही उणीव लक्षात आणून हे 'मराठी ग्रंथसंग्रहालय' स्थापन झाले.'' *(पृ. १७, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय)*

या उताऱ्यावरून निव्वळ मराठी ग्रंथाचा संग्रह करणारे ग्रंथालय स्थापन करण्याची आवश्यकता का निर्माण झाली यावरही प्रकाश पडतो. १) पुस्तकांचा संग्रह करणे २) वाचनाची अभिरुची उत्पन्न करणे ३) जूनी पुस्तके मिळवणे व ४) हस्तलिखित प्रती जमविणे हा मुलभूत प्रयत्न सुरवातीच्या काळात प्राधान्याने या ग्रंथालयाद्वारे करण्यात आला. पुढे सातव्या वार्षिक अहवालातील निरनिराळ्या लोकांची टिका, सूचना वगैरे लक्षात घेऊन संस्थेचा हेतू पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात आला तो असा –

'' या ठिकाणी महाराष्ट्र भाषेतील सर्व तऱ्हेच्या सर्व पुस्तकांचा संग्रह करावयाचा आहे. मग ती कोणीही लिहिलेली असोत. कोणत्याही विषयावर असोत व त्यांचा आकार केवढाही असो. सरकारी कायद्यांनी 'मना न केलेले' असे मराठी भाषेतील कोणतेही पुस्तक येथे असण्याला काहीएक प्रत्यवाय नाही.''

महाराष्ट्र सारस्वतकार भावे यांच्या प्रयत्नाप्रमाणेच केवळ मराठी भाषेतील ग्रंथाचा संग्रह करणारे एक ग्रंथालय विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे स्मारक म्हणून स्थापन करण्याचा प्रयत्न त्यांच्या मृत्यूनंतर पुण्यात झाल्याचा उल्लेख सापडतो. पण या प्रयत्नाला मूर्त स्वरूप आल्याचे मात्र आढळत नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गुजरात व कर्नाटकचा काही भाग यासह अस्तित्वात आलेले मुंबई हे द्वैभाषिक राज्य होय. या राज्यास १ मे १९६० रोजी स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाला. येथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा आढावा घेताना डॉ. शां. ग. महाजन यांनी येथील ग्रंथालय चळवळीची एकूण ९ टप्प्यात वर्गवारी केलेली असून १) मुद्रीत ग्रंथाचे ग्रंथालय २) नेटीव्ह जनरल ग्रंथालयाची स्थापना ३) मराठी ग्रंथ संग्रह ४) मोफत सार्वजनिक वाचनालय ५) महाराष्ट्र मोफत वाचनालय परिषद ६) फैझी समिती अहवाल ७) ग्रंथालय खाते निर्माण करणे ८) महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाची स्थापना ९) ग्रंथालय कायदा मंजूर.

या टप्प्याअंतर्गत महाराष्ट्राची १८०५ मध्ये मुंबईमध्ये लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बेची स्थापना झाली पुढे १८३० मध्ये त्याचे नामकरण 'बॉम्बे ब्रांच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन ॲण्ड आयर्लंड' असे केले. हेच विद्यमान ऐशियाटीक ग्रंथालय होय. यानंतर महाराष्ट्रात अनेक ग्रंथालये स्थापन झाली. १८२१ मध्ये मुंबई सरकारचे

सेक्रेटरी रेकॉर्ड ऑफिस स्थापन होऊन या कार्यालयाकरिता स्वतंत्रपणे ग्रंथालय विभाग सुरु करण्यात आला होता. यामध्ये जुन्या फाईल्स असलेली बाडे, ग्रंथ, हस्तलिखिते व इतर दस्तऐवज यांचा समावेश होता. याच पार्श्वभूमीवर इ.स. १८२८ च्या सुमारास निघालेले रत्नागिरीचे नगर वाचनालय हेच पहिले सार्वजनिक वाचनालय मानले पाहिजे. (ना.बा. मराठे पृ. १३३), सावंतवाडी येथे नेटीव्ह जनरल लायब्ररीची स्थापना १८ एप्रिल १८५२ रोजी झाली. एकूणच या काळात पुढेही अनुक्रमे सोलापूर, अहमदनगर, नाशिक, कोल्हापूर, सातारा, धुळे, गारगोटी अशा ठिकाणी अनेक ग्रंथालये स्थापन झाली. तसेच पुढे इ. सन १८४१ मध्ये नाशिकमध्ये पेशवेवाड्यात स्थापन करण्यात आलेले ग्रंथालय ही परंपरा दृढ करण्यास कारणीभूत ठरले. दुसरा टप्पा हा नेटीव्ह जनरल ग्रंथालयाचा. या टप्प्यामध्ये १८४५ मध्ये पहिल्या ग्रंथालयाची स्थापना झाली. हे ग्रंथालय म्हणजे बॉम्बे नेटीव्ह जनरल लायब्ररी. तिचे नाव नंतर पिपल्स फ्री रिडींग रुम अॅण्ड लायब्ररी असे ठेवण्यात आले. हे ग्रंथालय मुंबई येथील फोर्ट विभागात मेट्रो सिनेमाच्या समोर स्थापन करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर पुढे १) मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे (१८९३), २) मुंबई मराठा ग्रंथ संग्रहालय, मुंबई –१८९८ ३) पुणे ग्रंथ संग्रहालय–पुणे (१९११) ही ग्रंथालये केवळ मराठी भाषेतील वाचन साहित्याचे संग्रह करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेली होती. यानंतरची परंपरा ही मोफत सार्वजनिक ग्रंथालयाची होती. या अंतर्गत १८९१ मध्ये श्री दामोदर गोवर्धनदास सुखडवाला यांच्या उदार देणगीतून मुंबई येथे पिपल्स फ्री किंग्ज सर्कल व लायब्ररीची स्थापना करण्यात आली होती तर बडोद्याचे तत्कालीन महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या प्रोत्साहनाने अमेरिकेतील ग्रंथालय क्षेत्रातील तज्ज्ञ श्री. बोर्डन यांना बडोद्यास बोलावून १९१० मध्ये या उपक्रमास बडोद्यामध्ये चालना देण्यात आली. या परंपरेमध्ये पुढे पुणे येथेही पर्वती मोफत वाचनालय श्री. वि. ग. केतकर यांनी १९१२ मध्ये सुरु केले होते. पाचव्या टप्प्यांतर्गत महाराष्ट्रीय मोफत वाचनालयाची १९२१ मध्ये परिषद पुणे येथे भरली होती. या परिषदेत महाराष्ट्रीय वाचनालय संघ स्थापन होऊन येथील ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला. सहाव्या टप्प्यात मुंबई प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खैर यांनी शिक्षण प्रसारास सार्वजनिक ग्रंथालयाची

उपयुक्तता लक्षात घेऊन अशी ग्रंथालये स्थापन करण्यासाठी श्री. फैजी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती १९३९ मध्ये नेमली होती. या समितीने आपला अहवाल १९४० मध्ये सादर केला होता. या अहवालातील शिफारसीनुसार सार्वजनिक ग्रंथालय सुरु करण्याची चालना मिळण्यास मदत झाली. सातव्या टप्प्यात भारताच्या स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाकरिता स्वतंत्र विभाग तयार करून क्युरेट आफ लायब्ररीज नेमण्याची पद्धती रुढ झाली. या ग्रंथालय खात्याच्या स्वतंत्र विभागांतर्गत फैजी समितीच्या अहवालाच्या शिफारशीनुसार ग्रंथालयाला मान्यता देणे, अनुदान निश्चित करणे याविषयक नियम तयार केले. ग्रंथालय चळवळीस अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने पुणे येथे महाराष्ट्र ग्रंथालय चळवळीची स्थापना झाली व मुंबईमध्ये ग्रंथालय संघ स्थापन करण्यात आला.या संघाचे मुखपत्र, 'साहित्य सहकार' याच काळात प्रकाशित करण्यात येत असे. आठव्या टप्प्यांतर्गत स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाची स्थापना १९६२ मध्ये करण्यात येऊन या अंतर्गत चार विभाग कल्पून तेथे मुंबई ग्रंथालय संघ –१९४२, महाराष्ट्र ग्रंथालय संघ –१९४९, विदर्भ ग्रंथालय संघ –१९५८, मराठवाडा ग्रंथालय संघ–१९५९ असे विभागीय संघ स्थापन करण्यात आले. नव्या टप्प्यांतर्गत ग्रंथालय कायद्यास १९६७ मध्ये मंजुरी प्राप्त होऊन अंतर्गत अंमलबजावणी प्रत्यक्ष सार्वजनिक ग्रंथालयांची प्रणाली निहाय स्थापना करण्यात पुढील अर्धशतकात ग्रंथालय चळवळीसाठी जोरदार प्रयत्न करुन 'गाव तेथे ग्रंथालय'या घोषवाक्याच्या पुर्ततेसाठी प्रयत्न केले. अर्थात ते फारच फलद्रुप झाले नाहीत.

आठव्या टप्प्यात मंजूर झालेल्या विविध संघातील राज्यसंघानी आजवर ४५ हून अधिक अधिवेशने घेऊन ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी प्रयत्न कलेले आहेत. या प्रयत्नातून ग्रंथालयाच्या अनुदानामध्ये दुप्पटीने वाढ होणे, ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणासठी विशेष अनुदानाची मंजूरी, संगणक, झेरॉक्स मशीन इ. तंत्रसाधनांची उपलब्धता यासाठी शासन स्तरावरील प्रयत्न आणि इमारत निधी व विशेष योजना अंतर्गत राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानद्वारे उपलब्ध झालेले आर्थिक सहाय्य यांचा समावेश जरुर आहे. अर्थात आजवरच्या वाटचालीत ही उपलब्धता सार्वजनिक ग्रंथालयांच्या एकूणच विकासासाठी समाधानकारक

व पुरेशी नाही हेही तितकेच खरे. लोकसहभागातून व विविध सामाजिक संघटनाच्या सहयोगातून याही परिस्थितीत विविध ठिकाणची सार्वजनिक ग्रंथालये या राज्यात आपले कार्य नेटाने सुरु ठेवत आहेत. याचबरोबर ग्रंथालय संचलनालयद्वारेदेखील ग्रंथालय कार्यकर्ते व विविध वर्गातील ग्रंथालये यांना दरवर्षी सन्मानीत केले जात ही बाब लक्षणीय आहे. आज या राज्यात १०० वर्षे पूर्ण केलेली १०० हून ग्रंथालये आपली परंपरा दृढ करत आहेत. तसेच या चळवळीला बळकटी देण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून सुरु झालेले विविध वाचनालय संघ यांचेही योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. महाराष्ट्र हे स्वतंत्र्य राज्य होण्यापूर्वी येथे चळवळ बळकट करण्यासाठी १९२१ मध्ये श्री. दत्तोपंत जोशी यांनी बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे आयोजित केलेली मोफत वाचनालय परिषद व पुढे १९२६ ते १९३६ च्या काळात अशा ग्रंथालय परिषदा भरवून महाराष्ट्र वाचनालय संघाची केलेली स्थापना या सगळ्याचे श्रेय श्री. जोशी यांना जाते. पुढील काळात त्यांच्या पुढाकाराने स्थापन झालेले संघ म्हणजे महाराष्ट्रीय वाचनालय संघ, पुणे (१९२१–४९), मुंबई ग्रंथालय संघ–मुंबई (१९४४–४८), पुणे ग्रंथालय संघ–पुणे (१९४५ ते ४९), मराठी ग्रंथालय संघ, ठाणे (१९४५–४९), कुलाबा जिल्हा वाचनालय संघ–अलिबाग (१९४६ –४९), सी. पी. अँड बेरार लायब्ररी असोसिएशन–नागपूर (१९४६–६८), महाराष्ट्र ग्रंथालय संघ–पुणे (१९४९–६८), विदर्भ ग्रंथालय संघ–नागपूर (१९५८–६८), महाराष्ट्र ग्रंथालय संघ – औरंगाबाद (१९५८–६८), मराठवाडा ग्रंथालय संघ–औरंगाबाद (१९५९–६८).

राज्य ग्रंथालय स्थापनेनंतर पुणे, नागपूर, औरंगाबाद ग्रंथालय संघाचे विभाग हे सर्वत्र एकत्रितपणे काम करुन सातत्यापूर्व राज्यपरिषदा व जिल्हा ग्रंथालय संघाद्वारे विभागीय अधिवेशने आयोजित करत असतात. राज्यस्तरीय अधिवेशनामध्ये विविध समस्या मांडण्याची प्रक्रिया सातत्याने चालू असून अशा परिषदामध्ये मांडले जाणारे ठराव व चर्चा यांना साहित्य संघाचे मुखपत्र ‘साहित्य सहकार’ याद्वारे प्रसिद्धी दिली जात असे. अशा ग्रंथालय परिषदांपैकी सावंतवाडीमध्ये १९७५ व १९९७ मध्ये झालेली संघाची २७ वी व ४३ वी परिषद अधिवेशने ही विशेष लक्षणीय ठरली होती. १९९७ मधील अधिवेशनामध्ये ‘ग्रंथोपजीवी’ ही डॉ. जी. ए. बुवा यांनी संपादित केलेली स्मरणिका एक संदर्भ ग्रंथ म्हणूनच उल्लेखली गेली.

(या राज्यात असलेली एकूणच सार्वजनिक ग्रंथालये व त्यांना मिळणारे अनुदान इत्यादीबद्दलची सांख्यिकीय माहिती परिशिष्ट क्र. २ मध्ये देण्यात आलेली आहे.)

महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचे उपक्रम म्हणून विचार घेण्याची विशेष बाब म्हणजे महाराष्ट्र यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या द्वारे चालविण्यात येणारे बी.लिब व एम. लिब. हे अभ्यासक्रम अनुक्रमे सावंतवाडी, रत्नागिरी, नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाद्वारे सक्षमपणे राबविले जातात. या अभ्यासक्रमामुळे पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनाही खेडोपाडी ग्रंथालये स्थापन करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळींचा इतिहास व परंपरा अभिमानास्पद आहे आणि ही चळवळ वाढते आहे ही समाधानाची बाब आहे. पण त्याची अपेक्षीत वाढ आणि प्रगती यांचा विचार केला तर ग्रंथालय चळवळ वर्धिष्णू आहे. तथापि आणखी खूप मोठा पल्ला या चळवळीला गाठायचा आहे. याचे भान ठेवूनच या क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी, ग्रंथपालांनी व वाचनप्रेमी मंडळींनी अथक परिश्रम करणे गरजेचे आहे.

कविवर्य न. शे पोहनेरकरांनी 'ग्रंथबोध' मध्ये म्हटले आहे की,

*'ग्रंथालयाविना जो गाव राही। तया जीवना अर्थ काहीच नाही।।''*

आणि म्हणूनच 'गाव तेथे ग्रंथालय' हे या चळवळीचे घोषवाक्य झाले आहे. या दृष्टीने विचार केला तर महाराष्ट्रात मार्च २०१० अखेर शासनमान्यताप्राप्त सार्वजनिक वाचनालयांची संख्या केवळ २५ टक्के इतकीच आहे. राज्यात ४० हजारांवर खेडी आहेत. 'गाव तेथे ग्रंथालय' असा विचार झाला पण 'गाव तेथे ग्रंथालय' मोहिमेकडे शासनही दुर्लक्ष करीत आले आहे. महाराष्ट्रात १९६७ मध्ये ग्रंथालय कायदा संमत झाला तेव्हापासून आर्थिक अडचण हेच कारण सांगण्यात येत आहे. तरीही ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रयत्न, पाठपुरावा व त्या त्या गावातील ग्रंथप्रेमी, वाचनप्रेमी मंडळींच्या प्रयत्नाने कायदा अस्तित्वात आल्यानंतर शासनाकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे ग्रंथालयांच्या संख्येत निरंतर वाढ होत आली आहे. १९६७ पूर्वी राज्यात जेमतेम ३५० च्या वर असलेली संख्या ४० वर्षात ८ हजारांवर गेली व आज १० हजारापेक्षा जास्त आहे. या मधून नगरपरिषद व महापालिका शहरातील वाचनालयांची संख्या कमी केली तर सुमारे ५००० गावात ही चळवळ पोचली,

रुजली व आपापल्या परीने वाचनप्रेमी मंडळींनी ज्ञान, करमणूक व माहिती, देशविदेशाचा इतिहास, कथा, कादंबऱ्या व ललित साहित्याची भूक भागवण्याचे कार्य करत आहेत. पण उर्वरित ३३ हजार गावात चळवळ पोचवायला अजून किती वर्षे लागतील? हा प्रश्न ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांना भेडसावतो आहे. या राज्यात ग्रंथालय कायदा १९६७ मध्ये पारीत करण्यात आलेला असून १९८७ पासून त्याची अंमलबजावणी झालेली आहे. व्यंकप्पा पत्की समिती अहवालाची अंमलबजावणी व्हावी, महाराष्ट्र शासनाचे माजी आमदार व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने २००२ मध्ये एक अभ्यासपूर्ण व सर्वंकष अहवाल सादर केला. तो तत्त्वत: मान्य केल्याचेही शासनाने विधीमंडळात जाहीर केले. त्यामध्ये प्रामुख्याने –

१) राज्यातील प्रत्येक गावी वाचनालय अस्तित्वात येईल या दृष्टीने १० वर्षांचा नियोजनबद्ध आराखडा शासनाने संघटनेच्या विचारविनिमयाने सादर करावा.

२) ग्रंथालय कायद्यात कालमानानुसार समुचित बदल करून नवा कायदा करावा. अनेक राज्यातील ग्रंथालय कायदे व तेथील चांगल्या तरतुदींचा समावेश करून त्याचा मसुदाही पत्की समितीने २००२ मध्ये शासनाकडे दिला आहे.

३) प्रत्येकवेळी आर्थिक अडचण सांगण्याऐवजी, अन्य काही राज्यात आहे तसा एक 'ग्रंथालय कर' लागू करावा. राज्याच्या एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के आणि शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकाच्या किमान १० टक्के तरी खर्च ग्रंथालय विकासावर व्हावा आणि मुख्य म्हणजे

४) सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व निवृत्ती वेतनासह सेवाशाश्वती द्यावी तरच ग्रंथालय चळवळ खऱ्या अर्थाने यशस्वी होईल.

दीर्घकालीन धोरणात्मक असे टप्पे पाडून पत्की समितीच्या या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी केली तर महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ देशातच नव्हे तर जगाच्या पाठीवरही अग्रगण्य ठरेल. ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रयत्न, मान्यताप्राप्त प्रातिनिधिक असलेल्या सर्व जिल्ह्यातील ग्रंथालय संघ, विभाग ग्रंथालय संघ आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचा पाठपुरावा आणि लोकप्रतिनिधींचे सहकार्य आवश्यक आहे. शासनाने

अशी चर्चा दीर्घकाळ पत्की समितीच्या शिफारशी संदर्भात ग्रंथालय कार्यकर्त्यांमध्ये व समाजामध्ये सर्व स्तरातील लोकांच्यामध्ये सुरु आहे.

**शतायु ग्रंथालये :**

महाराष्ट्रातील ८५ सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांनी १०० वर्षे पूर्ण केली म्हणून प्रत्येकी ५ लाख रुपयाचे विशेष अनुदान देऊन महाराष्ट्र शासनाने समारंभ करून त्यांचा गौरव केला. त्याप्रमाणे २५ वर्षे, ५० वर्षे व ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सार्वजनिक वाचनालयांनाही प्रोत्साहन देण्यासाठी रौप्य, सुवर्ण व हीरक महोत्सव साजरे करताना विशेष अनुदान द्यावे अशी मागणी ग्रंथालय संघाने राज्य ग्रंथालय परिषदेत केली आहे. ग्रंथालय चळवळीच्या इतिहासात व 'गाव तेथे ग्रंथालय' मोहिमेत असलेल्या व यापुढे सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांना या सर्वांची प्रतिक्षा आहे.

**दादर सार्वजनिक वाचनालयाचा शतकोत्सव :**

दादर सार्वजनिक वाचनालयाने २३ ऑगस्ट २००७ ला १०० वर्षे पूर्ण केली आहेत. मुंबई शहरातील आणखी एक जुने ग्रंथालय 'शतायु' झाले आहे. ही बाब महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीतील सर्व कार्यकर्त्यांचे दृष्टीनेही आनंदाची व अभिमानास्पद अशी आहे. प्रतिकूल परिस्थितीत पाया रचणारे व सर्व अडचणींना तोंड देत परिसरातील वाचकांची, संशोधकांची ज्ञानभूक भागवित ही संस्था प्रतिष्ठित करणारे या काळातील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, वाचक सभासद व हितचिंतकही अभिनंदनास पात्र आहेत. जुने अहवाल बघितल्यानंतर लक्षात येते की, दासावाने ७२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले होते. १९८३–८७ मध्ये 'अ' वर्गातील उत्कृष्ट ग्रंथालय म्हणून महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारही या ग्रंथालयाला मिळाला आहे. या काळात साहित्यिक व मान्यवरांची व्याख्याने, अन्य प्रबोधनात्मक व ग्रंथालयीन चळवळीला पूरक व पोषक असंख्य उपक्रमही या ग्रंथालयाने राबविले आहेत. महाराष्ट्रात अशा शतकमहोत्सवी ग्रंथालयांशी आपल्या शताब्दी महोत्सवाप्रसंगी व शतकोत्तर रौप्य महोत्सव समारंभाप्रसंगी प्रकाशित केलेल्या स्मरणिका या राज्यातील ग्रंथालय चळवळीवर प्रकाशझोत टाकण्यास पुरेशा आहेत.

**ग्रंथालय चळवळीचा इतिहास एक दृष्टिक्षेप :**

महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा ज्ञात इतिहास सुमारे १८० वर्षांचा असल्याचे दिसून येते. १५० वर्षे पूर्ण केलेली व समारंभ झालेली वाचनालये राज्यात आहेत. पुरातन काळापासून पोथ्या, पुराणे, जुनी शास्त्रे, तालपत्रे, बखरी, ऐतिहासिक कागदपत्रांचे बाड, मठ, मंदिरे व संस्थानकालीन हस्तलिखिते यांचे संग्रह हा एक जुना भाग झाला. पण छापील ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके व इंग्रजी जुनी पुस्तके असलेली वाचनालये सुमारे १५० वर्षांची आहेत. अनेक मोठ्या शहरातून इंग्रजांनी 'नेटीव ग्रंथालये' स्थापन केली. अशी कितीतरी वाचनालये आता स्थानिक कार्यकर्त्यांनी नेटाने चालवून 'शतायु' केली आहेत.

**राज्य ग्रंथालय संघ – अधिवेशने :**

ग्रंथालयीन चळवळीच्या इतिहासाचा उल्लेख झाला तर ग्रंथालयीन संघटनेच्या प्रारंभिक कालापासूनचा उल्लेखही चळवळीच्या इतिहासाचा विचार करता १९१२ मध्ये पुणे येथे महाराष्ट्रीय वाचनालय परिषद संपन्न झाली. डॉ. बाबासाहेब जयकर हे अध्यक्ष होते. तर या परिषदेची स्थापना १९२० ला झाली. मात्र मराठी ग्रंथालय परिषद पहिले अधिवेशन म्हणून १९४६ मध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात पार पडली. काका कालेलकर हे संमेलनाध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ म्हणून शासनमान्यताप्राप्त असलेल्या प्रातिनिधिक संघटनेचे २२ वे अधिवेशन १९७१ मध्ये दादरच्याच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले व २००६ चे ४९ वे अधिवेशन वारणानगर येथे पार पडले. पूर्वीच्या काळात संघाचे व संमेलनाचे अध्यक्ष असलेल्या उत्तुंग व्यक्तींची यादी बघितली की या मांदियाळीने ग्रंथालय चळवळीला किती सार्थपणे सालंकृत केले आहे याची जाणीव होते. स. का. पाटील. श्री. म. माटे, काकासाहेब गाडगीळ, दत्तो वामन पोतदार, आचार्य दोंदे, वि. स. पागे, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. ग. प्र. प्रधान, ग. त्र्यं. माडखोलकर, शा.शं. रेगे, रणजित देसाई, वसंतदादा पाटील, विद्याधर गोखले, राम शेवाळकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. शिवाजीराव भोसले, माधव गडकरी, अ. चिं. टिकेकर, गोविंदभाई श्रॉफ व रत्नाप्पा कुंभार यांनी राज्याच्या ग्रंथालय संमेलनातून केलेली भाषणे, मांडलेले मौलिक विचार, त्या त्या वेळी झालेले परिसंवाद, ठराव, चर्चा व विचारमंथनाचा मागोवा

घेतला तर मोठा ग्रंथ होईल, प्रबंध होईल. ग्रंथालय चळवळीचा इतिहासच या संकलनातून अधिक सुस्पष्ट होणारा आहे.

**वाचनालयांची लोक चळवळ :**

काही राज्यात वाचनालयांचे सरकारीकरण झालेले आहे. मात्र, महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचे वैशिष्ट्य असे की, राज्यातील ९९% सार्वजनिक वाचनालये लोकांनी, लोकांसाठी चालविलेली व लोकांची आहेत. खऱ्या अर्थाने ही लोकचळवळ आहे. स्वयंस्फूर्तपणे व लोकांच्या पाठबळावर वाचकप्रेमी मंडळींनी पूर्वीच्या काळातही वाचनालये सुरु केली. त्यावेळी अनुदान नव्हते की, शासनाचे पाठबळ नव्हते. उलट, हैद्राबादच्या संस्थानी राजवटीत तर वाचनालयावर वक्रदृष्टी होती. काही वेळा बंदीही घालण्यात आली. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या इतिहासात महत्त्वाचा वाटा उचलण्यात काही वाचनालये अग्रेसर होती असे पुरावे आढळतात. महाराष्ट्र राज्यात १९६७ मध्ये ग्रंथालय कायदा संमत झाल्यावर शासनमान्यता व अनुदान सुरु झाले. व्यापक अर्थान बघितले तर विद्यापीठे, महाविद्यालये, विशिष्ट संस्था व संघटनांनी आपल्या विद्यार्थी, संशोधक व सदस्यांसाठी चालविलेली वाचनालये व शालेय ग्रंथालयेसुद्धा एकूणच ग्रंथालय चळवळीचे अविभाज्य भाग आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय संघटनेचे ज्येष्ठ प्रणेते ॲड. गंगाधर पटणे यांच्या लेखातील मजकूर महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीच्या वाटचालीवर विशेष प्रकाशझोत टाकणारा आहे.

''जवळजवळ १९ व्या शतकापासूनच ग्रंथालय चळवळीची सुरुवात झाली. पारतंत्र्यातील जनतेला स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी करून त्यांच्यात राष्ट्रीयवृत्ती निर्माण व्हावी या उद्देशानेच ग्रंथालय चळवळ सुरु झाली. जनजागृती व उद्‌बोधन म्हणूनही बडोदा व कोल्हापूर संस्थानात या चळवळीला मूळ लाभले. सयाजीराव गायकवाडसारखा द्रष्ट्या राजाने मध्यवर्ती ग्रंथालय, ग्राम ग्रंथालय, जनता ग्रंथालय अशी साखळी निर्माण केली व यास पूर्णत: राजाश्रय दिला होता.

मुंबई सरकारच्या फैजी कमिटीने आपल्या अहवालात या क्षेत्राला तात्विक बैठक मिळावी म्हणून अनेक सूचना केल्या होत्या परंतु त्यांच्या अंमलबजावणीला सदोष प्रशासनामुळे

फारसे यश प्राप्त झाले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील पहिला ग्रंथालय कायदा कोल्हापूर संस्थानाने तयार केला. सामाजिक प्रबोधनाचे माध्यम म्हणून व बौद्धिक भूक भागविण्याचे प्रभावी माध्यम म्हणून ग्रंथालय चळवळ त्या काळात चालविली गेली. १९६० नंतर ग्रंथालय क्षेत्रात खऱ्या अर्थाने परिवर्तनाचे युग सुरु झाले. १९६७ साली ग्रंथालय कायद्याची निर्मिती व १९७० साली अधिनियम तयार होऊन अंमलात आले. लोकशाहीत सामाजिक जाणीव जागृती निर्माण व्हावी तसेच माहिती व ज्ञान मिळविण्याचे केंद्र म्हणूनही ग्रंथालयाच्या निर्मितीकडे जनतेत चढाओढ सुरु झाली. एका ध्येयाप्रती समर्पित होऊन त्या काळात ग्रंथालयाच्या निर्मितीला वेग येऊ लागला. वाचन संस्कृतीची वाढ व्हावी, समाज प्रबोधन व्हावे, जनजागृती व्हावी म्हणूनच त्यावेळी सेवाभावी संस्थांनी व निष्ठावंत कार्यकर्त्यांनी ग्रंथालयांची स्थापना केली. याच काळात शैक्षणिक विकासाला वेग आला व वाचनाची गरज व आवड वाढीला लागली. परंतु १९९० नंतरच्या काळात जुनी ध्येयवेडी कार्यकर्ता मंडळी हळुहळू थकत गेली. चळवळीतून बाहेर पडू लागली व आदर्श ग्रंथालयाच्या संकल्पनेला कुठेतर भोवळ येऊ लागली असे असले तरीही अनेक ग्रंथालये अशी आहेत की वाचन संस्कृती जोपासण्याचे कार्य अविरत करत आहेत. ग्रंथालयातूनच खऱ्या अर्थाने वाचन संस्कृतीचा विकास होतो आहे. परंतु त्याचा वेग हळूहळू कमी होऊ लागला आहे हेही नाकारता येत नाही.

वाचन संस्कृती वाढ न होण्याला जे अडसर ठरत आहेत ते १) निरक्षरता, २) कौटुंबिक वातावरण ३) सामाजिक परिस्थिती ४) शैक्षणिक संस्थांची अनास्था ५) राज्यकर्त्यांचा सामाजिक कार्यकर्त्यांचा व लोकनेत्यांचा उपेक्षित दृष्टीकोन ६) शासनाची चुकीची व उदासीन वृत्ती ७) विचारवंत, ध्येयवेडी कार्यकर्ता मंडळी या चळवळीपासून दूर जाऊ लागलीत ८) वाचक वर्ग निर्माण करण्याच्या प्रयत्नाला खीळ व तरुणांना वाचनाकडे आकर्षित करण्याचे तोकडे प्रयत्न ९) सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास ज्या झपाट्याने व्हावयास पाहिजे तसा होत नसून अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. १०) सार्वजनिक ग्रंथालये अजूनही पारंपरिकतेच्या बंधनातच अडकून पडलेली दिसतात. असे संभाव्य अडथळे पार पाडूनसुद्धा महाराष्ट्रात वाचन संस्कृतीसाठी काही संस्था व व्यक्ती सातत्य टिकवून ठेवून कार्य करीत आहेत.

१) संवाद या माध्यमातून अमरेंद्र गाडगीळांचे प्रयत्न
२) राज्यव्यापी परिषदेद्वारे डोंबिवली ग्रंथालयाच्यावतीने गावोगावी ग्रंथालय मित्रमंडळे
३) औरंगाबाद येथील ग्रामीण भागात 'फिरती ग्रंथालय' योजना
४) बीड येथील प्रा. प्यारेलाल गोहेल यांचा 'कुटुंब ग्रंथालये' हा प्रकल्प
५) शासकीय अधिकारी श्री. शहापुरे यांनी भंडारा व वर्धा जिल्ह्यात सुरु केलेला वाचन संस्कृती प्रकल्प.
६) वर्धा जिल्हा ग्रंथालय संघ थोरामोठ्यांची लहान लहान पॉकेट बुक तयार करून विद्यार्थ्यांना, शाळांना वाटप करीत असतात.
७) पुस्तक विक्रेते व प्रशासनाकडून गावोगावी भरविण्यात येत असलेली प्रदर्शने, ग्रंथोत्सव, पुस्तक जत्रा इत्यादी उपक्रम

वरील सर्व प्रयत्न सार्वजनिक ग्रंथालयांपेक्षा इतर संस्थांच्या माध्यमातून अधिक प्रमाणात होत आहेत. वाचन संस्कृती वाढावी, तिचा विकास व्हावा, ती वृद्धिंगत व्हावी हे कार्यच खरेतर तत्त्वत: सार्वजनिक ग्रंथालयाचे आहे. वाचन संस्कृती रुजविण्याचे तंत्र प्रा. शा. शं. रेगे यांनी अत्यंत सूत्रबद्ध मांडले आहे. जो वाचत नाही त्याला वाचायला लावणे व जो वाचतो त्याला चांगले वाचावयास लावणे व जो चांगले वाचतो त्याला अधिक चांगले वाचावयास लावणे अशी वाचनाची आवड लागली की पुस्तकांची संगत सुटत नाही.

सामाजिक स्वास्थ्य सकस साहित्यावर अवलंबून आहे. ग्रंथालय चळवळ लोकशाही मजबूत करणारे केंद्र आहे. म्हणून सामान्य जनतेचा अपेक्षित सक्रीय सहभाग या चळवळीला मिळवून घेणे क्रमप्राप्त आहे. औपचारिक शिक्षणापासून वंचित असलेल्या सामान्यांना शिक्षण देण्याचे, ज्ञान मिळविण्याचे सार्वजनिक ग्रंथालय माध्यम आहे. त्यांनी परिस्थितीप्रमाणे पूरक माहिती पुरविणारी केंद्रे व्हावीत, माहिती तंत्रज्ञानाचे युग सार्वजनिक ग्रंथालयाचे संक्रमणाचा काळ म्हणून स्वीकारण्याची गरज आहे. ग्रामीण भागात माहितीची साक्षरता आणणे आवश्यक आहे. आरोग्य, शेती, शिक्षण, विज्ञान, सहकार, सामान्य ज्ञान यावरील पुस्तके तिथे ठेवली पाहिजेत. विविध स्पर्धा परीक्षा, व्यवसाय उद्योग, नोकरीची संधी इत्यादी माहिती तरुणांना सार्वजनिक ग्रंथालयांनी पुरविली पाहिजेत. यामुळे तरुणांना वाचनाकडे व ग्रंथालयाकडे आकर्षित करता येऊ शकेल.

मूल्यशिक्षण म्हणजे जगातल्या कोणत्याही एका धर्मातील तत्त्वांचे शिक्षण नव्हे. मूल्यशिक्षण म्हणजे बुद्धिवादी, प्रज्ञाशील, करुणामय व्यक्तिमत्त्वाचा मानव निर्माण करणे होय. याचसाठी 'वाचन संस्कृती विकास अभियान' राबविण्याची गरज निर्माण झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील जिल्हा ग्रंथालयांनी तालुका ग्रंथालयांच्यामार्फत तालुक्यातील अगदीच ग्राम पातळीवर जगणाऱ्या तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत आधुनिक मूल्यांची जोपासना करणाऱ्या साहित्याची पुस्तके पोहचविली पाहिजेत. १००-१०० पुस्तकांचे गठ्ठे करून तालुक्यातील सर्व गावातील शाळांमध्ये एक महिन्यासाठी पोहचवून दिले पाहिजे. एखाद्या सुशिक्षित विद्यार्थ्याला तिथेच त्या त्या पुस्तकावर ५-१० प्रश्न काढायला सांगून त्या त्या विद्यार्थ्यांकडून पुस्तक वाचूनच उत्तरे लिहा असे सांगितले पाहिजे. या निमित्ताने का होईना क्रमिक पुस्तकांच्या व्यतिरिक्त महिन्याकाठी २-४ पुस्तके तरी एक एक विद्यार्थी वाचू शकेल. असे वर्षभर केल्यानंतर १२ ही पेपरचे मार्क्स काढून त्यांना तालुकास्तरावर पुस्तकांच्याच रूपाने पारितोषिक दिले पाहिजे. अशी परीक्षा घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होईल.

वाचन संस्कृती विकास अभियान पहिल्या वर्गापासून ते १२ वी पर्यंतच राबविले पाहिजे. संस्कारांचा पगडा खरे तर बालमनावरच जास्त होत असतो. त्यांना देशातील थोरामोठ्यांचीही चरित्रे वाचावयास दिली पाहिजेत. विद्यार्थ्यांना राम मनोहर लोहिया, राजाराम मोहन रॉय, रामस्वा पेरियार नारकर, महात्मा फुले, रानडे, डॉ. आंबेडकर, लाला लजपतराय, गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज अशाच समाज सुधारकांची पुस्तके त्यांना आवर्जून दिली पाहिजेत.

प्लेटो शिक्षणाकडे ज्ञान प्राप्तीचा मार्ग म्हणून पाहतो. व्यक्तीला तिच्या कर्तव्याची खरी जाणीव करून देणे शिक्षणाचे कार्य होय. शिक्षणामुळे व्यक्तीला सत्याचा आणि सद्‌गुणांचा मार्ग सापडतो असे प्लेटो म्हणतो. मुळात दगड ओबडधोबड असतो, पण छिन्नी हातोड्याने कलावंत त्यातून आपल्या कल्पनेतील मूर्ती जन्माला घालतो. मूर्तीकारांच्या या निर्मितीलाच कला असे म्हणतात. अपरिपक्व मुलांना सुसंस्कारित आणि प्रगल्भ बनविणे हे शिक्षण या कलेचे कार्य होय असे प्लेटो म्हणतो.

प्रारंभीच्या वयात मुलांच्या मानसिक विकासासाठी कुतूहल जागवणाऱ्या, पराक्रमांची प्रेरणा देणाऱ्या आणि सत्प्रवृत्तीपोषक कथा शिकवावे असे प्लेटो सांगतो. लॉकच्या भूमिकेनुसार सद्‌गुण, प्रज्ञान, विद्याव्यासंग आणि संवर्धन यांचा परिपोष करणे हा शिक्षणाचा उद्देश होय. प्रत्येक मुलाने समाजाचा जबाबदार घटक व्हायला हवे. स्वत: सोबत समाजाच्या विकासाचेही भान त्याला असायला हवे. सर्वांगानी विचार करूनच निष्कर्ष काढावा. चिकित्सापूर्वक आणि तर्कशुद्ध पद्धतीने वाचन करण्याची सवय व्यक्तीला लहान वयातच लागायला हवी. झाड लहानच असताना जर आपण अक्षरे कोरली तर झाड जसे मोठे होत जाते त्यासोबत ती अक्षरेही मोठमोठी होत जातात.

ग्रंथप्रदर्शनी, बालसाहित्य संमेलने, साहित्यिकांच्या प्रकट मुलाखती असे कार्यक्रम तालुका ग्रंथालयामार्फत त्या तालुक्यातील ग्रंथालयांच्या सहकार्याने जिल्हा ग्रंथालयाने घेतले पाहिजेत व त्यावर जिल्हा ग्रंथालय संघाने व्यवस्थापन व नियंत्रण ठेवले पाहिजे. आजही माझा विश्वास आहे की या वाचन संस्कृती विकास अभियानाने उद्याचा आदर्श नागरिक घडविण्यात ग्रंथालयांचे महत्त्वाचे स्थान असणार आहे. यासाठी केंद्र शासनाने, राज्य शासनाने, समाजकल्याण विभागाने, महिला व बालकल्याण विभागाने, बाल हक्क अभियानाच्या चळवळीने, जिल्हा परिषद पंचायत समित्यांने आणि त्या त्या परिसरात सामाजिक कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी, ग्रामपंचायत, सार्वजनिक ग्रंथालये, तालुका ग्रंथालये, जिल्हा ग्रंथालये व शासकीय जिल्हा ग्रंथालयांनी या वाचन संस्कृती विकास अभियानात सहभागी होऊन या उदात्त कार्यालयातील चळवळीचा आपला वाटा उचलल्यास येणाऱ्या भविष्यात प्रकाशाची पेरणी झाल्याशिवाय राहणार नाही.

या वाचनसंस्कृती विकास अभियानामुळे जिल्ह्यातील सर्वच ग्रंथालयांची तालुका ग्रंथालयाशी जिल्हा ग्रंथालयाशी जवळीक निर्माण होईल या निमित्ताने जिल्ह्यातील ग्रंथालयांचे, ग्रंथपालांचे, सेवकांचे, वाचकांचे नाते जुळत जाईल व खऱ्या अर्थाने ही लोकचळवळ होईल.

जे निरक्षर आहेत त्यांना साक्षर केले पाहिजे जे साक्षर आहेत त्यांना शिक्षित व वाचक केले पाहिजे. जे शिक्षित असतील त्यांना सुशिक्षित केले पाहिजे. जे सुशिक्षित असतील त्यांना सुसंस्कृत केले पाहिजे, जे सुसंस्कृत असतील त्यांना विद्वत केले पाहिजे व जे विद्वत

असतील त्यांना विचारवंत केले पाहिजे. सतत प्रवाहाची ही प्रक्रिया अखंड चालू ठेवणे सार्वजनिक ग्रंथालयांच्या लोकचळवळीचे महत्वाचे कार्य असणार आहे.

दुसऱ्यांचे दिवे विझवून आपण अत्तर दीप होण्याला अर्थ नाही तर तो अनर्थ आहे. सकलांच्याच अत्तर दीपत्वाची तहान आपल्या ग्रंथालयीन कार्यकर्त्यांना, ग्रंथपालांना, सेवकांना लागली पाहिजे. नवीन युगनिर्माणाचे, समाजापुढे नवी क्षितिजे उघडून देण्याचे आपले अगाध सामर्थ्य अधोरेखित करण्याची मात्र गरज आहे. आपणासारख्या ग्रंथालयीन कार्यकर्त्यांच्या ग्रंथपालांच्या सेवकांच्या या क्रांतिचारित्र्याला अख्खा समाज मग कुर्निसात केल्याशिवाय राहणार नाही. नव्या भारताचे भवितव्य ग्रंथालयांतच घडत राहिले आणि हे भवितव्य घडविणारा शिल्पकार, वाचन संस्कृती विकास अभियान राबविणारा शिल्पकार हा ग्रंथालयीन कार्यकर्ता व ग्रंथपालच राहील. पण या शिल्पकारपणावर आपले नाव कोरुन घेण्यासाठी स्वतःच ज्वलंत परिवर्तन असण्याची, क्रांती असण्याची गरज आहे. *(स्त्रोत – ॲड. गंगाधर पटने 'ग्रंथालय मित्र' ५० वे म. रा. ग्रं. संमेलन, नांदेड २०१३)*

**मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळ : एक मागोवा :**

मराठवाडा ही संतांची पावन भूमी आहे. या भूमीमध्ये अनेक संत होऊन गेले. संतांनी आपल्या किर्तनाच्या माध्यमातून समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे व समाज वाम मार्गाकडे जाऊ नये म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. संतांच्या शिकवणीबरोबरच समाजजातीचे काम ग्रंथालयांनीही पार पाडले आहे. मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळीचा विकास पाहता आपणास स्वातंत्र्यापूर्वीची ग्रंथालय चळवळ व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यात झालेली वाढ याबाबत मागोवा घेणे आवश्यक आहे.

**१) स्वातंत्र्यापूर्वीची मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळ :**

तत्कालीन समाज परिस्थिती पाहता, समाजात साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी होते. समाज राजकीय अंमलाखाली होता. काही समाज सुधारकांनी ग्रंथालयाचे महत्त्व ओळखून ग्रंथालये स्थापन करण्याचे प्रयत्न केले आहेत. उपलब्ध माहितीवरून असे दिसून येते की १९०१ साली परभणी येथे गणेश वाचनालयाची सुरुवात झाली. त्यानंतर १९०५ मध्ये उस्मानाबाद येथे नगर वाचनालयाची स्थापना झाली. मध्यंतरी १५ वर्षांच्या काळात

मराठवाड्यात कुठेही ग्रंथालय स्थापन झाल्याचे दिसून येत नाही. सन १९२१, १९२५ आणि १९२६ मध्ये अनुक्रमे कळमनुरी, बसमत नगर व नळदुर्ग येथे ग्रंथालये स्थापन झाली. यानंतर पुढील २० वर्षात मराठवाड्यात एकूण ६ ग्रंथालये स्थापन झालेली दिसून येतात. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत मराठवाड्यात एकूण ११ ग्रंथालये समाज जागृतीचे काम करीत असल्याचे दिसून येते.

**२) सन १९५० ते १९७५ मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळ :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येक क्षेत्रामध्ये विकासाचे वारे वाहत होते. साक्षरतेचे प्रमाणही वाढत होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६७ मध्ये महाराष्ट्र ग्रंथालय कायदा अस्तित्वात आल्यानंतर मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. मराठवाडा हा तसा मागास भाग असल्यामुळे म्हणावी तेवढी ग्रंथालयांची संख्या वाढल्याचे दिसून येत नाही. या २५ वर्षाच्या काळात मराठवाड्यात एकूण १३६ ग्रंथालये समाजामध्ये वाचन संस्कृती जोपासण्याचे कार्य करीत होती.

**३) सन १९७५ ते २००० ग्रंथालय चळवळीचा विकास :**

मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळीच्या विकासाच्या दृष्टीने हा २५ वर्षाचा काळ म्हणजे सुवर्णकाळच म्हणावा लागेल. या काळात मराठवाड्यात एकूण १५०० ग्रंथालये स्थापन झाली. विविध ग्रंथालय संघटना आपापल्या जिल्ह्यात ग्रंथालय स्थापनेबाबत प्रचार आणि प्रसार करु लागल्या. परिणामी ग्रंथालय चळवळीच्या वाढीस गती प्राप्त झाली.

**४) मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळीची सद्य:स्थिती :**

आज अखेर मराठवाड्यातील ग्रंथालयांची संख्या दोन हजारांच्यावर पोहचली आहे. मागील सात वर्षाच्या काळात मराठवाड्यात ५०० च्या वर ग्रंथालयांची वाढ झाली आहे. आज या विभागात जिल्हा अ ग्रंथालये –०८, तालुका ब – ३४, तालुका क–५, इतर अ – ११, ब – ३९०, क–७९४ आणि ड–८०६ अशाप्रकारे एकूण २०६९ ग्रंथालये मराठवाड्यातील वाचकांच्या सेवेत कार्यरत आहेत. महाराष्ट्रामध्ये हा सर्वात मोठा विभाग असून याच विभागात सर्वात जास्त ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

**५) ग्रंथालय चळवळीपुढे वाचन संस्कृती वाढविण्याचे आव्हान आणि आपली जबाबदारी**

२००१ च्या जनगणनेनुसार या विभागाची लोकसंख्या १,५६,२९,२४८ एवढी आहे आणि सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या २०६९ आहे. दरवर्षी ही वाढत जातेय पण त्या प्रमाणात वाचकांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत नाही. शासनाने ग्रंथालयांची गुणवत्ता वाढावी म्हणून सन २००६ मध्ये नवीन नियम लागू केले आहेत कार्यकर्त्यांना हे नियम जाचक वाटतात पण गुणवत्ता वाढवायची असेल तर हे नियम आवश्यक आहेत. ग्रंथालये ही सुजान व सुसंस्कृत समाज निर्माण करणाऱ्या प्रयोगशाळा आहेत. या प्रयोगशाळा समृद्ध करण्याच्या दृष्टीने शासन विविध योजना, राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानच्या योजना, ग्रंथालयांना पुरस्कार, कार्यकर्ते व सेवकांना पुरस्कार देऊन ग्रंथालयांची निकोप वाढ व्हावी यासाठी प्रयत्नशील आहे. चळवळीतील कार्यकर्ते, कर्मचारी यांनीही आपापल्या ग्रंथालयांचा विकास करावा, वाचकांच्या गरजेनुसार वाचन साहित्य ठेवावे, वाचकांना चांगल्या सेवा द्याव्यात, विविध उपक्रम राबवून वाचन चळवळ कशी वाढीस लागेल यासाठी प्रयत्न करावेत. सध्याची सामाजिक परिस्थिती पाहता वाचन संस्कृती रुजविणे, वृद्धींगत करणे हे ग्रंथालय चळवळीपुढे आव्हान आहे आणि हीच काळाची गरज आहे.

**६) लातूर जिल्हा ग्रंथालय चळवळीचा आढावा :**

जानेवारी २००८ मध्ये लातूर जिल्हा निर्मितीस २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल लातूर जिल्हा रौप्य महोत्सव साजरा करीत आहे. या निमित्ताने लातूर जिल्ह्याच्या ग्रंथालय चळवळीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की स्वातंत्र्यापूर्वी लातूर शहरामध्ये सन १९३० साली बलभीम वाचनालयाची स्थापना झाली व सन १९३९ मध्ये मारवाडी नवयुवक वाचनालयाची स्थापना झाली. लातूर जिल्हा निर्मितीपूर्वी या जिल्ह्यामध्ये ६९ शासनमान्य ग्रंथालये होती. जिल्हा निर्मितीनंतर पुढील २५ वर्षांच्या काळामध्ये या जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने मार्च २००७ अखेर जिल्हा अ–१, तालुका अ–३, तालुका ब–६, इतर अ–३, ब–९०, क–२१५ व ड–१७६ अशाप्रकारे एकूण ४९४ ग्रंथालये वाचकांच्या सेवेत कार्यरत आहेत. मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यापैकी लातूर जिल्ह्यातील ग्रंथालयांची संख्या सर्वात जास्त आहे आणि हाही एक ग्रंथालय चळवळीचा ‘लातूर पॅटर्न’

म्हणावा लागेल. *(स्त्रोत : मुंढे सु. नि. ग्रंथालय, लातूर जि. ग्र. मं. रौप्य महोत्सवी अधिवेशन)* महाराष्ट्रातील तालुका स्तरावरील स्वरुप लक्षात यावे याकरिता प्राथमिक स्वरुपात पुढे उदगीर, विदर्भ तालुक्यातील ग्रंथालय चळवळीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**उदगीर तालुका ग्रंथालय चळवळ :**

या परिसरात जून १९९५ मध्ये चळवळीला गती देण्यासाठी श्यामलाल वाचनालयाने काही उत्साही कार्यकर्त्यांची एक बैठक बोलावली. यामध्ये वाचनालयासंबंधी चर्चा करण्यात आली. ग्रंथालय निरीक्षक डॉ. रा. श. बालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उदगीर तालुका ग्रंथालय संघ स्थापीत करण्यात आला. चळवळीचे काम नेटाने पुढे नेण्याचे ठरले. या संघाने 'ज्ञानदीप लावू जगी' असे ब्रीदवाक्य स्विकारले व गाव तेथे ग्रंथालय हा उपक्रम राबविण्याचा प्रयत्न सुरू केला.

९ ऑगस्ट १९९५ रोजी श्यामलाल वाचनालयातर्फे उदगीर तालुका ग्रंथालय संघाचे पहिले अधिवेशन घेऊन या कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

इ.स. २००१ पासून या संघाने ग्रंथालयाच्या गुणवत्तेत सुधार होण्यासाठी दरवर्षी उत्कृष्ट ग्रंथालये व आदर्श ग्रंथपालाचा गौरव करण्याचा संकल्प केला. या कार्यात हणमंतवाडी देवर्जन येथील रसिक सार्वजनिक वाचनालयाचे सचिव श्री. कुलकर्णी यांनी उदगीर तालुक्यातील क व ब दर्जाच्या वर्गातील उत्कृष्ट वाचनालयास प्रोत्साहन म्हणून दरवर्षी कै. संतुकराव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ रु. ५०० चे रोख पारितोषिक व पत्रकार राम मोतिपवळे यांनी कै. सुर्यकांत मोतिपवळे यांच्या स्मरणार्थ २५१ चे ग्रंथ पारितोषिक म्हणून ड दर्जाच्या वाचनालयास देण्याचे घोषित केले. उदगीर ग्रंथालय संघाचे सातवे अधिवेशन तोंडार येथे पार पडले. यामध्ये महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय, देवणी व बालाजी सार्वजनिक वाचनालय, तिरुका यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

इ. स. २००२ मध्ये लोहारा या गावी संपन्न झालेल्या आठव्या अधिवेशनात जनविकास सार्वजनिक वाचनालय (ब), शंभुउमरगा, चंद्रोदय सार्वजनिक वाचनालय, लोणी क, ज्ञानगंगा सार्वजनिक वाचनालय, माळेवाडी ड व आदर्श ग्रंथपाल म्हणून भोगेश्वर सार्वजनिक वाचनालय, तळेगावचे श्री. जयतीर्थ जोशी या सर्वांना गौरव चिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

संपूर्ण महाराष्ट्रात ज्याप्रमाणे लातूर जिल्हा शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर आहे व शिक्षण क्षेत्रात या जिल्ह्याने एक शैक्षणिक पॅटर्न निर्माण केला आहे. त्याप्रमाणे उदगीर तालुक्याने ग्रंथालय क्षेत्रात ग्रंथालय पॅटर्न निर्माण केला आहे. या अविभक्त तालुक्यातील एकूण २२० गावापैकी १०३ गावामध्ये ग्रंथालये आहेत. या व्यतिरिक्त अनेक नवीन वाचनालयाचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्तावित आहेत. परंतु अद्यापपर्यंत या वाचनालयांना शासकीय मान्यता मिळाली नाही. कालपरत्वे देवणी, जळकोट हे नवीन तालुका अस्तित्वात आले. तरी उदगीर, देवणी, जळकोट हे तिन्ही तालुके संयुक्तरित्या ग्रंथालयाचे कार्य करीत आहेत.

ग्रंथालय चळवळ खऱ्या अर्थाने रुजवायची असेल तर चळवळ शहरापासून खेड्यापर्यंत नेली पाहिजे. आजकाल टी.व्ही, व्हीडीओ, सी.डी, कॅसेट व इतर प्रसार माध्यमामुळे वाचन संस्कृतीवर विपरीत परिणाम होत आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी व वाढ करण्यासाठी खेड्यापाड्यात ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शने व अधिवेशन भरवून ग्रंथालय चळवळ विकसित करण्याचे आटोकाट प्रयत्न होत आहेत.

आतापर्यंत ग्रामीण भागात ९ अधिवेशन संपन्न झाली आहेत. या व्यतिरिक्त उदगीर शहरात मराठवाडा विभागीय स्तराची दोन अधिवेशने संपन्न झालेली आहेत. म. रा. ग्रंथालय संघाचे अध्यक्ष माजी आमदार श्री. गंगाधरराव पटणे मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष श्री. ॲड. त्र्यंबकदास झंवर व श्यामलाल शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. सदाविजय आर्य, जय जवान जय किसान साखर कारखान्याचे चेअरमन श्री. बसवराज पाटील नागराळकर, माजी आमदार श्री. मनोहरराव पटवारी व सौ. शिलाताई पाटील इ. कार्यक्रमाचे प्रत्यक्षदर्शी आहेत.

या अधिवेशनात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख, ना. शिवराज पाटील चाकूरकर, ना. दिलीपराव देशमुख, श्री. जनार्दनराव वाघमारे, ग्रंथालय पितामह श्री. ना. वि. देशांडे, कै. कृ. मु. उजळंबकर, श्री. सेजुळ, श्री पंडीत गणेशदेवजी, प्रा. क्रांतीकुमार बोरगावकर, भारत सातपुते, सहाय्यक ग्रंथालय संचालक कै. मा. सो. कांबळे, श्री. सु. वा. देशपांडे, डॉ. रा. श. बालेकर, माजी आमदार श्री. गोविंदराव केंद्रे,

श्री. रामचंद्रराव नावंदीकर, आमदार श्री. रामभाऊ गुंडीले व माधवराव पाटील शेळगावकर इ. मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन या अधिवेशनाला लाभली होती. या व्यतिरिक्त उदगीर नगर परिषदेचे अध्यक्ष कै. अशोकराव पुदाले, भोगेश्वर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष श्री. भगवानराव पाटील तळेगावकर, श्री. सूर्यकांत शिरसे, श्री. जयतिर्थ जोशी व श्री. दिपक बलसूरकर, श्री. सूर्यकांत जगताप इ. चे या संदर्भात विशेष उल्लेख करावा लागेल. तसेच श्रीमती विमल देशपांडे, सौ. ज्योति पानगावकर, सौ. गोस्वामी ताई, श्री. एम. बी. कासार, श्री. शिवराज आंबुलगे, श्री. यशवंत कुलकर्णी, श्री. देशमुख, श्री. ढग इ. ग्रंथालय चळवळीचे कार्यकर्त्यांनी अधिवेशने यशस्वी करण्यासाठी अपार कष्ट घेतले. ग्रंथालयाच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी या ग्रंथालय संघाने ग्रंथालय चालकांसाठी व ग्रंथपालासाठी एक सहल आयोजित करून त्यांना पुणे, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद, तुळजापूर, औसा इ. ठिकाणची ग्रंथालये, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळे दाखविण्यात आली आहेत. तसेच उदगीर येथील श्यामलाल अभियांत्रिकी महाविद्यालय, पशुवैद्यकीय, शिवाजी महाविद्यालय, उदयगिरी महाविद्यालय व हावगीस्वामी महाविद्यालयांची ग्रंथालये ग्रामीण ग्रंथपालांना दाखवून त्यांना श्री. चंद्रकांत जोशी यांच्यातर्फे मार्गदर्शन करण्यात आले.

माजी ग्रंथालय संचालक कै. कृ. मु. श्री. उजबंळकर यांच्या नेतृत्वाखालील ग्रंथालय समिती व पत्रकार मंडळाने अनेक गावात भेटी देऊन येथील ग्रंथालयाची पहाणी करून तेथील ग्रंथपालांना वाचनालयाचे रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. काही ठिकाणी वाचनालय बंद पडले होते. त्यांना मार्गदर्शन करून पुन्हा ती वाचनालये सुरु करण्यात आली. उदगीर तालुक्यातील अनेक ग्रंथालयांना श्यामलाल संस्थेतर्फे १००-१०० पुस्तकांचे संच भेट देण्यात आले. लातूर जिल्हा साक्षरता अभियानाच्यावेळी ॲड. त्र्यंबकदास झंवर यांच्या प्रयत्नाने लातूरचे तत्कालिन जिल्हाधिकारी श्री. प्रवीणसिंह परदेशी यांच्यातर्फे जिल्ह्यातील अनेक ग्रंथालयांना प्रत्येकी ३०० पुस्तकांचा एक संच भेट देण्यात आला. यामुळे अनेक वाचनालयाच्या दर्जात वाढ होऊन वाचनालयांना आर्थिक लाभ झालेला आहे.

श्यामलाल वाचनालय उदगीर तालुका ग्रंथालय संघ यांच्यावतीने अनेकवेळा कार्यशाळेचे आयोजन करून या तालुक्यातील ग्रंथपालांना मार्गदर्शन करण्यात आले. ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणीचा लाभ मिळावा म्हणून या संघटनेच्या वतीने उदगीर, लातूर, औरंगाबाद, नागपूर व मुंबई येथे जाऊन अनेकवेळा संप, मोर्चे, उपोषणे केलेले आहेत. ग्रामीण भागात अधिवेशने घडवून आणण्यात सर्वप्रथम हुतात्मा श्रीरंग सार्वजनिक वाचनालयाचे सचिव श्री. सुभाष बिरादार, छत्रपती शिवाजी वाचनालयाचे कवठाळचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव हुडे, जनसेवा सार्वजनिक वाचनालय, शंभु उमरगा यांचे अध्यक्ष जी. एस. बिरादार व श्री. गुदळे गुरुजी, केशव भिवाजी सार्वजनिक वाचनालय निडेबनचे श्री. सूर्यकांत जगताप, ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालय, लिंबगावचे श्री. मधुकर पाटील, राणी लक्ष्मी सार्वजनिक वाचनालय तोंडारचे धडाडीचे कार्यकर्ते सचिव श्री. मल्लिकार्जुन बिरादार, ज्ञानोदय सार्वजनिक वाचनालय, चांदेगावचे श्री. शिरसे व समगे इ. उत्साही कार्यकर्त्यांनी अधिवेशन घेण्याचे मोलाचे सहकार्य केले आहे. तसेच लोहारचे कै. दादारावजी वैद्य सार्वजनिक वाचनालयाचे सचिव डॉ. भालचंद्र वैद्य व अध्यक्ष डॉ. रावसाहेब वैद्य व गिताश्री सार्वजनिक वाचनालय जळकोटचे श्री. अशोक कारभारी व सहकारी यांनी जळकोट येथे एक भव्य अधिवेशन घेऊन संघटनेची शान वाढविली.

इ. स. २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय कायदा १९६७ व सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी वेतनश्रेणी व सेवाशर्ती नियमांचा अभ्यास करून शासनाला एक अहवाल सादर करण्यात आला आहे. यासाठी एक उच्चस्तरीय समिती नेमली गेली होती. या समितीती ॲड. झंवरसाहेब व आ. गंगाधर पटने यांची सदस्या म्हणून निवड करण्यात आली होती. या समितीने सर्वंकष अभ्यास करून शासनाला एक अहवाल सादर केला आहे.

मागील दोन वर्षापासून उदगीर ता. ग्रंथालय चळवळीच्या कार्यकर्त्यांत शिथीलता निर्माण झाली आहे. भविष्यात ही चळवळ पुन्हा कार्यरत होईल अशी आशा आहे.

ग्रंथालयाचे अधिवेशन हा एक ग्रंथप्रेमी कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाचा उपक्रम असतो. या अधिवेशनाच्या निमित्ताने अनेक वाचनालयाच्या अडीअडचणी दूर करण्याचे प्रयत्न केले जातात. नवीन वाचनालयासंबंधी विचार विनिमय करण्यात येतो. मान्यवर नेते व अधिकारी

वर्ग यांच्यातर्फे ग्रंथालय कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. अधिवेशनाच्या निमित्ताने सर्वांच्या गाठीभेटी होतात. नवजीवन योजना आखल्या जातात. त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न होतात. *(स्त्रोत – अंबेसंगे शिवाजीराव ग्रंथालय, लातूर जिल्हा ग्रं. सं. रौप्य महोत्सवी अधिवेशन)*

**हिंगोली जिल्हा: सार्वजनिक ग्रंथालय चळवळ एक दृष्टीक्षेप :**

१ मे १९९९ रोजी हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली. प्रारंभी हिंगोली, कळमनुरी, वसमत, सेनगांव व औंढा या परिक्षेत्रात केवळ ३५ ग्रंथालय होते. आज जिल्हा निर्मितीनंतर खेडोपाडी ग्रंथालयाचे जाळे निर्माण झाले आहे. जिल्ह्यात जवळ जवळ पन्नास ग्रंथालय शासनमान्य असून आणखी पन्नास नवीन ग्रंथालय शासनमान्यतेची वाट पहात आहे. जिल्हा निर्मितीनंतर लेगच हिंगोली जिल्हाग्रंथालय संघाची स्थापना झाली. प्राचार्य डॉ. जे. एम. मंत्री, श्री. खंडेराव सरनाईक, प्रा. विलास वैद्य, श्री. शेख इब्राहिम अब्दूल गनी, श्री. गजानन शिंदे, प्रा. डॉ. आदिनाथ सोनटक्के, श्री. विजय हवालदार, प्रा. जी. पी. मुपकलवार, श्री. देवदास देशमुख, श्री. पुंडलीकराव बल्हाळ, सौ. पुष्पा सुराणा, सौ. आरती मार्डीकर, श्री. श्रीधरराव नांदापूरकर, प्रा. विजयकुमार जयस्वाल, श्री. कल्याण वसेकर, श्री. कुंडलीकराव सरकटे, श्री. अशोक आर्धापूरकर, श्री. विश्वनाथ डोंगरे, श्री. दिगंबर मोकाटे, श्री. विनोद कावडे, कु. विद्या वसेकर, श्रीमती पुष्पा बोरा, या सारख्या अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा ग्रंथालय संघाने सातत्यपूर्वक प्रगती केली आहे.

हिंगोली जिल्ह्यात आज खेडोपाडी शाळा, दवाखाने या सोबतच दरवर्षी प्रत्येक गावात ग्रंथालयाचीही स्थापना होत आहे. ही घटना सुसंस्कृत समाजरचनेसाठी मोठी अगत्याची आहे. हिंगोली जिल्हा ग्रंथालय संघाने २६ मार्च २००० रोजी मराठवाडा विभागीय ग्रंथालयाचे संघाचे अधिवेशन राज्य ग्रंथालय अध्यक्ष श्री. गंगाधर पटने यांच्या अध्यक्षतेखाली घेतले. या अधिवेशनामुळे हिंगोली परीसर व खेडोपाडी आवड निर्माण झाली. तसेच जिल्हा ग्रंथालय संघाच्या कार्याला एक नवीन उर्जा प्राप्त झाली हे विशेष होय. पुढे दरवर्षी जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. त्यात प्रामुख्याने जिल्हा ग्रंथालयाचे संघटन, सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रश्न कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणीच्या संदर्भाने सातत्याने चर्चा

होत गेली. वाचन संस्कृतीच्या संदर्भाने मराठवाड्यातील अनेक नामवंतांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले ही सारी अधिवेशने वाचन संस्कृती टिकवण्यात व जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळ विकसित करण्यात महत्त्वपूर्ण ठरत आहेत. हिंगोली जिल्ह्यात प्रतीवर्षी जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने शासनमान्य ग्रंथालय प्रमाणपत्राचे वर्ग घेतले जातात. या निमित्ताने गेल्या पाच सात वर्षापासून ग्रामीण भागातील विद्यार्थी ग्रंथालय विषयक अभ्यासात रुची घेत आहेत. हा वर्ग म्हणजे ग्रंथालय विषयक माहितीदेण्याच्या संदर्भात कृतीशील कार्यशाळा हिंगोली शहरातील कै. रं. रा. बियाणी नूतन साहित्य मंदीर वाचनालय शहरातील वाचक, साहित्यिक व कला प्रेम मंडळीचे वर्दळीचे ठिकाण बनले आहे. नतून महाविद्यालय याच्या माध्यमातून शहरातील वाचन संस्कृती टिकविण्यात मौलाचे कार्य होत आहे. या ग्रंथालयाच्या वतीने विविध उपक्रम घेतले जातात. महाराष्ट्रातील अनेक विचारवंताची व्याख्याने साहित्य विषयावर चर्चासत्र घेण्यात हे ग्रंथालय नेहमीच अग्रेसर असते. हिंगोली शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले सरस्वती वाचनालय लहानमुलांसाठी संस्कार शाळा बनले आहे. उत्तम ग्रंथ निवड व विविध उपक्रमाचे आयोजन ही या ग्रंथालयाची वैशिष्ट्ये आहेत. तसेच वाचनालयाच्या अध्यक्षा सौ. पुष्पा सुराणा व सचिव सौ. आरती मार्डीकर यांच्या रचनात्मक दृष्टीतून हे वाचनालय आकार घेत आहे. हिंगोली जिल्ह्यात विशेष म्हणजे सेनगांव तालुक्यात वाचनालयाचे जाळे मोठ्या वेगाने निर्माण झाले आहे. त्यात केंद्र बु. येथील संत ज्ञानेश्वर वाचनालयाने महत्वपूर्ण कार्य केले आहे. या ग्रंथालयाने परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे एक अधिवेशन व हिंगोली जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन घेऊन आपली ग्रंथ निष्ठा सिध्द केली आहे. या कार्यात श्री. पुंडलीकराव बल्हाळ व श्री. खंडेराव सरनाईक यांचे मोलाचे योगदान आहे. जवळा बु. येथे तरुण ग्रंथपाल गजानन शिंदे यांनी कै. पंडित गुरुजी वाचनालयाची स्थापना करुन वाचन संस्कृती पोहचवली आहे. सेनगाव येथे कविवर्य विश्वास वसेकर वाचनालय स्वतःच्या इमारतीत दाखल झाले असून वाचकांच्या वर्दळीचे ठिकाण बनले आहे. या ग्रंथालयाच्या उभारणीत श्री कल्याण वसेकर व श्री. शिवाजी लाखकर यांचा सिंहाचा वाटा आहे. गोरेगांव येथे श्री. जाधव बंधू माऊली सार्वजनिक वाचनालय या संस्थेव्दारे काव्यवाचन कथाकथन व विविध व्याख्यानाचे आयोजन करतात.

जिल्ह्यातील कळमनूरी तालुक्यात वासुदेवानंद वाचनालय सर्वात जूने असून दुर्मिळ व संशोधनात्मक ग्रंथ संवर्धन करण्यात या ग्रंथालयाने केलेले कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. या वाचनालयाच्या संदर्भात जुन्या पिढीतील कार्यकर्ते श्री. श्रीधरराव नांदापूरकर व डॉ. देशमुख ग्रंथपाल श्री. विनोद कावडे यांची ग्रंथपालनसेवा उल्लेखनीय आहे. दीर्घ परंपरा कळमनुरी तालुक्यातील पेडगांव या डोंगराळ भागात तरुण प्रा. विजय कुमार जैस्वाल यांनी विवेकानंद वाचनालयाच्या माध्यमातून आपल्या जन्मगावी ज्ञानप्रसार केला. औंढा येथे श्री. तेजकुमार झांजरी यांच्या नेतृत्वाखाली नागनाथ मंदीरासमोर ज्ञानदीप वाचनालयाच्या माध्यमातून उत्तम सेवा करीत आहे. या वाचनालयाच्या विकासात उभे करण्यात सर्व कार्यकारीणी सदस्या सोबत ग्रंथपाल श्री. विश्वनाथ डोंगरे यांचे अथक परीश्रम उल्लेखनीय आहेत. हिंगोली जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वसमत तालुक्यात ग्रंथालय चळवळीचे कार्य येथील प्रा. डॉ. आदिनाथ सोनटक्के, यांच्या प्रेरणेने मोठ्या निष्ठेने चालू आहे. तरुण ग्रंथालय कार्यकर्ते शे. इब्राहिम अब्दुल गनि यांच्या सक्रीय सहभागामुळे या परिसरात ग्रंथालय चळवळीत एक नवा उत्साह निर्माण झाला आहे. संपूर्ण वसमत तालुक्यात तरुणांची एक उत्साही पिढी गावोगावी ग्रंथालय स्थापन करण्यात पुढे येत आहे. मराठवाड्यात इतर सर्व जिल्ह्याच्या तुलनेत ग्रंथालय कमी असले तरी वाचन संस्कृती वाढवणे व टिकविण्यासाठी विविध क्षेत्रातील ग्रंथप्रेमी मंडळी निष्ठेने कार्य करीत आहेत. अनेक ग्रंथालय कार्यकर्त्यांची महाराष्ट्र पातळीवर नोंद होत आहे. प्राध्यापक विलास वैद्य यांना साहित्य संस्कृती व ग्रंथालय विषयक कार्य केल्याबद्दल मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने तात्यासाहेब शेणई पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. कथाकार श्री. अशोक आर्धापूरकर यांना सेलू येथील सुभद्रा प्रतिष्ठानच्या वतीने उत्कृष्ट ग्रंथालयविषयक कार्य केल्याबद्दल एक महत्त्वपूर्ण पुरस्कार प्राप्त झाला. तरुण ग्रंथपाल श्री. गजानन शिंदे यांना हिंगोली येथील कै. रं. रा. बियाणी नूतन साहित्य मंदीर वाचनालयाच्या वतीने आदर्श ग्रंथपाल म्हणून पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. जीवन विकास ग्रंथालय औरंगाबाद यांच्या वतीने ग्रंथपाल श्री. दिगंबर मोकाटे यांना वडजीकर उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार नुकताच बहाल करण्यात आला. गेल्या काही वर्षापासून खेड्यापाड्यातील अनेक

तरुण ग्रंथालय स्थापन करण्यात पुढे येत आहेत. सर्वत्र वाचन संस्कृतीच्या बाबत उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे.

हिंगोली जिल्ह्यात ग्रंथालय चळवळ आपली स्वतंत्र अशी मुद्रा महाराष्ट्र पातळीवर उमटत आहे. या कार्यात तेथे ग्रंथालय हि संकल्पना रुढ करण्यात मा. आमदार श्री. भाऊरावजी पाटील गोरेगावकर यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या आमदार निधीतून हिंगोली येथील नूतन साहित्य मंदिर वाचनालय व केंद्रा बु. येथील पंडीत गुरुजी वाचनालयाच्या इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. मा. आमदार गजानन घुगे व पालकमंत्री ना. जयप्रकाश दांडेगावकर हे ही या चळवळीस सातत्याने प्रेरणा देतात. दात्यांचे दातृत्व, कार्यकर्त्यांचे कर्तृत्व, व शासनाचे पितृत्व यांच्या समन्वयातून ही चळवळ निश्चितच यशस्वी होत आहे.

**विदर्भातील प्रारंभीची ग्रंथालये :**

विदर्भाच्या ज्ञानप्रसाराच्या कार्याबरोबरच तत्कालीन स्वतंत्र चळवळीची व सामाजिक, सुधारणेच्या चळवळीची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे आणि साहित्य विषयक चर्चा घडवून आणणे इ. उद्देशाने ग्रंथालये स्थापन झाली. नारायण बाबूजी देशमुख यांनी आपल्या वडीलाच्या स्मरणार्थ जागा देऊन बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला येथे सन १८६० मध्ये स्थापन केले, तर १८६३ मध्ये नागपूरच्या महाल विभागात राष्ट्रीय ग्रंथालय नावाचे एक ग्रंथालय स्थापन झाले. तसेच अमरावती येथे अमरावती नगर वाचनालय १८६७ साली तर नागपूर येथे सिताबर्डी किल्ल्याच्या पायथ्याशी सिताबर्डी नेटीव्ह क्लब स्थापन झाला. १८६७ नंतर १८९५ साली राजाराम सिताराम दिक्षीत वाचनालय असे त्याचे रुपांतर करण्यात आले. त्याचप्रमाणे सार्वजनिक वाचनालय १८६३ साली भंडारा येथे तर लोकमान्य वाचनालयाला १८६५ साली आर्वी येथे सार्वजनिक वाचनालय स्थापन झाले. १८७६ साली नवयुग वाचनालय, अकोट येथे स्थापन झाले. १८९९ ला खामगाव येथे दस्तुर रतनजी ग्रंथालय स्थापन झाले तर हिंगनघाट येथे १८९५ ला सार्वजनिक वाचनालय स्थापन झाले. राजे वाकाटक सार्वजनिक वाचनालय १८९९ मध्ये वाशिम येथे तर अचलपूरला १८९९ मध्ये सार्वजनिक वाचनालय ही ग्रंथालये उदयास आली. अशा रीतीने १८१५ च्या सुमारास निदान २५–३० वाचनालये स्थापन झाली. त्यातून चर्चात्मक बैठका भरविणे, सभा, वाङमयीन चळवळीतून विदर्भाच्या अनेक खेडोगावी वाचनालयाचा विस्तार केला.

**विदर्भातील ग्रंथालय चळवळ, ग्रंथप्रसार व ग्रंथपालन वर्ग :**

भारतात स्वातंत्र्यानंतर ग्रंथालय चळवळीला खरी प्रेरणा मिळण्यास सुरुवात झाली. विदर्भाच्या जुन्या मध्यप्रदेशात अंतर्भाव असल्यामुळे मध्यप्रदेश शासनाने जे नियम ग्रंथालय प्रसाराकरीता मंजूर करण्यात आले होते. त्यांचीच अंमलबजावणी करण्यात आली. त्यानुसार एक केन्द्रीय (मध्यवर्ती) ग्रंथालय व प्रत्येक जिल्ह्यात एक ग्रंथालय अशी ८ जिल्हा ग्रंथालये तसेच १००० फिरती ग्रंथालये अस्तित्वात आली. परंतु सार्वजनिक ग्रंथालये मात्र बहूअंशी उपेक्षित अवस्थेत होती. शासकीय अनुदान वर्गणीच्या रुपाने मिळणारी नाममात्र रक्कम या भरवश्यावरच ग्रंथालयाचा खर्च करण्यात येत असे. ही अनुदाने ग्रंथालयाचा सर्वांगीण विकास करण्यास अपूरी पडत असल्यामुळे ग्रंथ खरेदी व इतर बाबीकरीता पैसा अपुरा असे उदाहरण द्यावयाचे झाल्यास नागपूरातील सर्वात जुने राष्ट्रीय ग्रंथालय सुरू ठेवताना अनंत अडचणींना सामोरे जावे लागते.

त्याप्रमाणे राजाराम वाचनालय हे नागपूरातील अतिशय सुस्थितीत असलेले ग्रंथालय गेल्या अनेक वर्षापासून कठीण आर्थिक परिस्थितीत असल्यामुळे ग्रंथालयाचे उत्पन्न वाढविण्याकरीता इमारतीतील मोकळी जागा. प्रदर्शने, सम्मेलने इ. साठी शुल्क द्वारा देण्यात येते.

स्वातंत्र्यपूर्वी विदर्भात सार्वजनिक वाचनालये नाममात्र अस्तित्वात होती त्यातील अमरावती नगर वाचनालय १८६७, बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला १८६०, राष्ट्रीय वाचनालय, नागपूर १८६३, सार्वजनिक वाचनालय, अचलपूर १८६६, सार्वजनिक वाचनालय, भंडारा १८५३, लोकमान्य वाचनालय, आर्वी १८६५, राजाराम वाचनालय, नागपूर १८६९, दस्तरजा रतनजा वाचनालय, खामगाव १८८९, म्युनिसीपल लायब्ररी, उमरंड १९०७, रामकृष्ण वाचनालय, नागपूर १९३८, हिन्दू धर्म संस्कृती मंदीर, नागपूर १९४३, सदर मुस्लीम लायब्ररी १९२२, म्युन्सिपल लायब्ररी, धामनगांव रेल्वे १९४१, तसेच बलभिम वाचनालय, बल्लारपूर १९४६, आदर्श वाचनालय, बडोदा १९२०, उदय वाचनालय, भानखेडा नागपूर, भगीनी मंडळ ग्रंथालय नागपूर १९२८, सिध्दार्थ वाचनालय, पुसद १९४०, सार्वजनिक वाचनालय, वर्धा १९१६ इ. ग्रंथालयांचा निर्देश करणे क्रमप्राप्त आहे.

नागपूर येथे १९४५ मध्ये राजाराम सिताराम दिक्षित वाचनालय यांच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी भारतातील ग्रंथालय चळवळीचे प्रणेते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री. न. चि. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रदेश ग्रंथालय परिषद पार पडली त्याच वर्षी सी. पी. एन्ड बेरार लायब्ररी असोसिएशनचीही स्थापना करण्यात आली. पुढे १९४९ मध्ये नागपूर अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे अधिवेशन भरले व विदर्भ विभागात ग्रंथालय चळवळ जोम धरू लागली. ग्रंथालय विधेयकाचा मसुदा देखील तयार करण्यात आला. तसेच १९५० मध्ये मध्यप्रदेश सरकारने तयार केलेल्या प्रौढ शिक्षण योजने अंतर्गत ग्रंथालयांना उत्तेजन देण्यात आले. त्यानुसार १९५५ मध्ये नागपूर येथे एक केन्द्रीय ग्रंथालय व जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा ग्रंथालये स्थापन करुन त्याव्दारे खेड्यापाड्यातून ग्रंथ वितरण करण्याची सोय करण्यात आली.

विदर्भ विभागात अमराठी भाषिकांसाठी देखील वाचनालये निघाली. यासंबंधी उर्दू भाषेला वाहिलेले सदर मुस्लीम लायब्ररी, नागपूर १९२२ व बंगाली भाषिकाची सारस्वत सभा ग्रंथालय, नागपूरात १९१७ मध्ये तर भारत हिन्दी पुस्तकालय १९२९ मध्ये प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा.

राज्य पुनर्रचनेपूर्वी १९५५ मध्ये हैद्राबाद संस्थानात हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला व तो मराठवाडा विभागास लागू होता. जिल्ह्याच्या ठिकाणी स्थानिक ग्रंथालय प्राधिकार समिती स्थापन करण्यात आली. तर काही जिल्ह्यातून ग्रंथालय कर देखील जमा करण्यात आला पण या कायद्याची अंमलबजावणी नीटपणे होऊ शकली नाही. मात्र १९६० नंतर सर्वच परिस्थिती बदलली व १९६७ मध्ये सर्व विभागांना महाराष्ट्र शासनाच्या कायद्याची पुनर्रचना होणे गरजेचे आहे. चळवळीतील कार्यकर्त्यांची हिच भूमिका आहे.

१९५६ च्या राज्य पूनर्रचना कायद्यानंतर विदर्भ विभाग नविन मुंबई राज्यात विलीन करण्यात आला परंतु ग्रंथालय चळवळीच्या दृष्टीने पाहिजे त्या प्रमाणात प्रसार वेगाने होण्यास सुरुवात झाली. आज ग्रंथालय चळवळीचे लोण खेडोपाडी पसरविण्यास महाराष्ट्राचा ग्रंथालय कायदा कारणीभूत ठरला आहे. ग्रंथालयाचे स्वरुप व स्थिर न राहता फिरते

राहिल्याने अगदी खेड्याच्या एका टोकाजवळ राहणाऱ्या नागरीकाला देखील त्याचा फायदा मिळू लागला.

ग्रंथालयांची वाढ सतत होत असल्यामुळे त्यासाठी लागणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग अपूरा पडू लागला. वरील गोष्ट लक्षात घेऊन नागपूर विद्यापीठाने १९५६च्या शैक्षणिक सत्रापासून एक वर्षाचा स्नातकोत्तर ग्रंथालय शास्त्राची पदवी अभ्यासक्रम सुरु केला तसेच १९५८ च्या उन्हाळी सत्रापासून विदर्भ ग्रंथालय संघातर्फे प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयतर्फे घेतली जाते व प्रमाणपत्र दिली जातात. प्रथम २५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असे तरी आता ही संख्या ८० पर्यंत पोहोचली असून वर्ग सकाळी व संध्याकाळी अशा दोन सत्रात स्वतंत्रपणे चालविली जातात तसेच अमरावतीच्या नगर वाचनालयात सर्टिफिकेट कोर्स १९६७ पासून सुरु केला गेला. तो अद्यापही चालू आहे. तसेच विदर्भातील अमरावती विद्यापीठ १९८३ ला सुरु झाले असून बी. लीब. कोर्स येथील लोकांच्या व वाचकांच्या मागणीप्रमाणे १९८५ ला अमरावती विद्यापीठातर्फे सुरु करण्यात आला. तसेच अमरावती विद्याभारती महाविद्यालयात बी. लीब. प्रशिक्षण कोर्स १९८५ ला सुरु झाला असून येथील बहुतेक विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाची सोय झाली आहे यामध्ये ३५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचा निरनिराळ्या ठिकाणी वाचनालयातून झालेला आहे. नागपूरात असा अभ्यासक्रम शासनातर्फे चालविला जातो. तसेच अकोल्यात, गडचिरोली, भंडारा, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ व बुलढाणा येथेही सर्टिफिकेट कोर्स सुरु आहेत.

अशाप्रकारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचा उद्‌देश निरनिराळ्या सार्वजनिक, महाविद्यालयीन, शासकीय शैक्षणिक ग्रंथालयात प्रशिक्षित कर्मचारी असावा व त्या दृष्टीने ग्रंथपालन वर्गात प्रवेश देताना विचार करण्यात येत असे परंतु याचा फायदा म्हणावा तसा विविध संस्थांकडून घेण्यात आला नाही. अजूनही सार्वजनिक छोट्या ग्रंथालयात मात्र अप्रशिक्षित कर्मचारीच आढळतात. जर कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असेल तर त्याचा फायदा वाचकांना व ग्रंथालयांना होतो. त्याप्रमाणे वाचकांना पाहिजे असलेली माहिती, साहित्य

मिळण्यास व संदर्भ सेवा, माहिती सेवा मिळण्यास मदत होते. त्यादृष्टीने विदर्भातील सार्वजनिक संस्थांनी व जिल्हा ग्रंथालय संघांनी याबाबतीत प्रयत्न करणे. चळवळीच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. शासनाने प्रशिक्षित ग्रंथपाल अगर कर्मचारी असल्याशिवाय अनुदान पात्र ठरवू नये. याबाबतीत विविध तऱ्हेने पाऊले उचलणे व विचार करणे निकोप ग्रंथालय चळवळीच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे.

**विदर्भातील सार्वजनिक ग्रंथालयांची प्रगती – एक दृष्टीक्षेप :**

महाराष्ट्रात ४ विभागीय ग्रंथालये असून औरंगाबाद विभागात ८२४ सार्वजनिक ग्रंथालये असून नागपूर विभागात ११२५ ग्रंथालये आहेत तर पुणे विभागात १५४५ ग्रंथालये आढळतात व मुंबई विभागात ८७३ सार्वजनिक ग्रंथालये पसरलेली आहेत असे आढळते.

प्रामुख्याने विदर्भ विभागात नागपूर विभागात अ वर्ग ग्रंथालये १६ असून ब वर्ग ग्रंथालये ९६ आहेत तर क वर्गातील ३७४ सार्वजनिक ग्रंथालये असून ड वर्गातील ६३९ ग्रंथालये आहेत. अशी विदर्भात एकूण ११२५ सार्वजनिक ग्रंथालये ठिकठिकाणी पसरलेली आहेत.

विदर्भ विभागात ९ जिल्हे असून अकोला जिल्ह्यात १५४ सार्वजनिक वाचनालये असून अमरावती जिल्ह्यात १९६ ग्रंथालये आहेत. गडचिरोली जिल्हा मागासलेला असून येथे सर्वात कमी म्हणजे फक्त ४८ ग्रंथालये आहेत तर चंद्रपूर जिल्ह्यात ८१ वाचनालये आहेत नागपूर जिल्ह्यात १५३ ग्रंथालये असून बुलढाणा जिल्ह्यात १३३ ग्रंथालये आहेत. तर भंडारा जिल्ह्यात १३६ सार्वजनिक ग्रंथालय आहेत तर यवतमाळ जिल्ह्यात १२८ सार्वजनिक ग्रंथालये आढळतात. वर्धा जिल्ह्यात ९६ ग्रंथालये आहेत. अशाप्रकारे विदर्भ विभागात सर्वात जास्त सार्वजनिक ग्रंथालये ही अमरावती जिल्ह्यात असून सर्वात कमी गडचिरोली जिल्ह्यात सापडतात. अकोला व नागपूर जिल्हा व्दीतीय क्रमांकावर असून जवळपास सारखीच सार्वजनिक वाचनालये आढळतात. विदर्भातील लोकांची बौध्दीक भुक वाढविण्यासाठी व ज्ञान प्रसाराचे कार्याबरोबरच स्वातंत्र्य चळवळीची व सामाजिक सुधारणेच्या चळवळीची माहिती जनतेपर्यंत पोहचविणे आणि त्यासाठी साहित्यिक व सांस्कृतिक चर्चा घडवून आणणे इ. उद्‌देशाने सार्वजनिक ग्रंथालये स्थापन झाली.

विदर्भातील स्वातंत्र्याच्या आधिची सार्वजनिक ग्रंथालये पुढीलप्रमाणे आढळतात.

**स्वातंत्र्याआधीची विदर्भातील जुनी ग्रंथालये**

| स्वातंत्र्याआधीची विदर्भातील जुनी ग्रंथालये | स्थापना वर्ष |
|---|---|
| सार्वजनिक ग्रंथालय, गंडारा | १८५३ |
| बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला | १८६० |
| राष्ट्रीय वाचनालय, नागपूर | १८६३ |
| लोकमान्य वाचनालय, आर्वी | १८६५ |
| सार्वजनिक वाचनालय, अचलपूर | १८६६ |
| अमरावती नगर वाचनालय, अमरावती | १८६७ |
| राजाराम वाचनालय, नागपूर | १८६९ |
| सार्वजनिक वाचनालय, वर्धा | १८७० |
| नवयुग वाचनालय, अकोट | १८७६ |
| सार्वजनिक वाचनालय, हिंगणघाट | १८९५ |
| राजे वाकाटक सार्वजनिक वाचनालय, वाशिम | १८९९ |
| आदर्श वाचनालय, बरोरा | १९२२ |
| मुस्लीम लायब्ररी, भंडारा | १९२३ |
| भगीनी मंडळ ग्रंथालय, नागपूर | १९२८ |
| गणेश वाचनालय, नागपूर | १९३१ |
| रामकृष्ण वाचनालय, नागपूर | १९३२ |
| सदर मुस्लीम लायब्ररी, नागपूर | १९३२ |
| सिध्दार्थ वाचनालय, पुसद | १९४० |
| म्युनिसिपल लायब्ररी, धामनगांव रेल्वे | १९४१ |
| हिन्दु धर्म संस्कृती मंदीर, धंतोली नागपूर | १९४३ |
| जयभिम वाचनालय, बल्लारपूर | १९४६ |

विदर्भातील अशा रितीने स्वातंत्र्याअगोदरची २०-२५ वाचनालये स्थापन झाली. त्यातून चर्चात्मक बैठकी भरविणे, सभा संमेलने घडविणे यासारखे उपक्रम सुरु करण्यात आलेले होते. प्राथमिक स्वरुपाच्या वाङमयीन चळवळीतून विदर्भातील ९ जिल्ह्यातून अनेक तालुक्याच्या ठिकाणी व खेडोपाडी सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे पसरले. या वाचनालयाचा स्वातंत्र्यानंतर विस्तार झालेला दिसतोय. आज विदर्भात ११२५ ग्रंथालयाचे जाळे पसरलेले दिसते.

**चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळ :**

**लोकसंख्या १,४८,९९१**

महाराष्ट्राच्या एका टोकाला असलेला चंद्रपूर जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ २५६४१ चौरस किलोमीटर असून चंद्रपूर जिल्ह्याचा बराचसा भूभाग जंगलात व्याप्त आहे. ह्या जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ३४.६३ टक्के आहे. त्यामुळे ह्या जिल्ह्यात ग्रंथालय चळवळ ही पाहिजे त्याप्रमाणात मूळ धरु शकली नाही. ग्रामीण भागात तर शासनाच्या गांव तेथे ग्रंथालय ही संकल्पना विशेष प्रभावी ठरु शकली नाही. शहरी भागात काही ठिकाणी ग्रंथालय चळवळ प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

या जिल्ह्यातील एकूण ग्रंथालय संख्या विचारात घेता जिल्हा ग्रंथालये (१) तालुका ग्रंथालये (९) व इतर ग्रंथालये (७१) आहेत.

अशाप्रकारे चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ८१ वाचनालये अस्तित्वात आहेत.

**अकोला जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळ :**

ऐतिहासिक पार्श्वभूमी - महाराष्ट्राच्या विदर्भ विभागातील जिल्हा. या जिल्ह्याची लोकसंख्या १८,२६,९५२ असून क्षेत्रफळ १०५७५ चौकोनी आहे. अकोला जिल्ह्यात एकूण १५४ सार्वजनिक ग्रंथालय असून अकोला जिल्ह्यात १३ तालुके आहेत. यात तालुका ग्रंथालये ५ असून जिल्हा ग्रंथालये अ वर्ग १ असून इतर ग्रंथालये १४८ अशी एकूण १५४ सार्वजनिक ग्रंथालये आहेत. महाराष्ट्राच्या ३.४६ टक्के क्षेत्रफळ व ३ टक्के लोकसंख्या या जिल्ह्यात आहे.

अकोलसिंग नावाच्या रजपूत सरदारने अकोला वसविल्याची दंतकथा आहे. आईन–इ–अकबरीत नरसाळा सरकारचे अकोला हे परगणा असलेले शहर असा उल्लेख असून औरंगजेब कालीन असदखा यांचे शिलालेख येथे आढळतात. १८५३ मध्ये निजामाकडून इंग्रजांनी हे शहर घेतले. १८६८ पासून येथे नगरपालिका असून शहर रचना चांगली आहे. येथील हवामान विषम व कोरडे आहे. १९६९ मध्ये पंजाबराव कृषी विद्यापीठ येथे स्थापन झाले आहे. येथील साक्षरता ४८% असून २ दैनिके व ४ साप्ताहिके येथून प्रसिध्द होतात. ३ मोठी ग्रंथालये येथे आहेत. राष्ट्रीय शिक्षणाकरीता १९२० पासून प्रसिध्द असलेले टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर अनेक माध्यमिक शाळा, व्यावसायिक व औद्योगिक शिक्षण संस्था, विज्ञान, वाणिज्य, कायदा, कृषी, शिक्षण शास्त्र, आयुर्वेद, होमिओपॅथी यांची महाविद्यालये येथे आहेत. सुशिक्षित व साक्षर अशा या विभागात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ तळागाळापर्यंत विस्तारणे गरजेचे आहे.

अकोला जिल्हा ग्रंथालय चळवळीला ऐतिहासीक परंपरा आहे. तसे अकोला जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेत वाचनालये कमीच आढळतात. १८६० मध्ये बाबूजी देशमुख सार्वजनिक वाचनालय ग्रंथालय चळवळीस व वाचकांच्या बौध्दीक पातळीस हातभार लावण्यासाठी व माणसे घडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले. हे ग्रंथालय आघाडीवर असून अ श्रेणीत असून जिल्ह्याचे अ वर्ग ग्रंथालये आहे.

अकोला जिल्ह्यात एकूण १३ तालुके असून यासर्व तालुका मिळून एकूण १५४ ग्रंथालये आढळतात. सर्वात जास्त ग्रंथालये अकोट तालुक्यात असून एकूण ४० वाचनालये आहेत. तर अकोला जिल्ह्यात बाबूजी देशमुख वाचनालय जिल्ह्याचे ग्रंथालय असून तालुका ग्रंथालय व श्रेणीत श्री सनातन धर्मसभा पूस्तकालय आहे. सर्वात कमी वाचनालये रिसोड तालुक्यात म्हणजे फक्त २ ड श्रेणीतील वाचनालये आढळतात.

तेल्हारा तालुक्याचा क्रम क्र. ३ वर असून व श्रेणीचे १. क श्रेणीचे ३ ब ड  श्रेणीचे १४ असे एकूण १८ वाचनालये आढळतात.

अशाप्रकारे अकोला जिल्ह्यात एकूण १५४ लहान मोठी वाचनालये असून यापैकी अ दर्जा प्राप्त फक्त बाबूजी देशमुख वाचनालय आहे. बाकी वाचनालये ब, क, ड श्रेणीत मोडतात. दहा हजार लोकसंख्येला एक वाचनालय असावे असे धोरण असताना अकोला जिल्ह्याची लोकसंख्या १८,२६,९५२ असूनही अकोला जिल्ह्यात फक्त १५४ वाचनालये आहेत. तेव्हा अकोल्यात लोकसंख्येच्या तुलनेत वाचनालये कमी दिसतात. त्यामुळे विषम प्रमाणात असणारी वाचनालयांची संख्या ज्ञानप्रेमी जणांना वेदना देणारी आहे. वाचनालये कमी असण्याचे कारण शासन नसून व्यवस्थापनेतील लोकांचा उत्साह कमी आढळतो. सहा महिने दोन हजार पुस्तकांचे वाचनालय चालविले तर त्याला ड वर्ग वाचनालय म्हणून शासनमान्यता मिळते. व २००० रुपये अनुदानही प्राप्त होते. हळूहळू प्रगती करुन वाचनालये अ श्रेणीपर्यंत जाऊ शकते. सामाजिक संस्थांमध्ये सहजासहजी मिळत असेल तर या वृत्तीवर बळावत असल्यामुळे वाचनालय काढणे त्यासाठी कष्ट उपसणे हे कार्य कठीण असून त्यापेक्षा व्यायाम शाळा काढणे यांना सोपे वाटते. मनाची मशागत न करता केवळ शरीराची कसरत वाढविण्याचा उद्योग सामाजिक संस्था करीत आहेत. लोकांनी ग्रंथालय चळवळ राबविण्यासाठी पुढे येणे आवश्यक असताना दिसणारी उदासिनता चळवळीला घातक ठरत आहे. आधुनिक भारतात टी.व्ही. चे माजलेले प्रस्थ हे वाचनाची क्षमता नष्ट करु पहात आहे. टी. व्ही. मुळे बऱ्याच लोकांना वाचनासाठी वेळ मिळत नाही.

अकोला येथील जिल्हा शासकीय ग्रंथालय हे २५००० पुस्तकांचे ग्रंथालय असून त्यात ११०० सदस्य आहेत. पुस्तकांची ने आण करणाऱ्या १२३ संस्था या ग्रंथालयाचा उपयोग घेतात. आजकाल मनोरंजनाकडे वाचकांचा कल अधिक आहे.

एकूणच अकोला विभागातील लोकसंख्या विचारात घेता तुलनात्मकदृष्ट्या येथील विभागातील सार्वजनिक ग्रंथालये फक्त १५४ आढळतात. अकोला शहरात सनातन धर्म वाचनालय व प्रमिलाताई ओक स्मारक वाचनालय अशी दोन वाचनालये आहेत.

बुलढाण्याचे माजी आमदार श्री. बाबूराव पाटील यांनी आमदार असताना आमदार निधीतून तेथील जिल्हा ग्रंथालयाला केवळ संदर्भ ग्रंथासाठी २५ हजार रुपये दिले त्यामुळे बुलढाणा येथील लेखक, संशोधक व वाचकांची चांगली सोय झाली हे कार्य निश्चितच उल्लेखनिय आहे.

**अमरावती जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळ :**

अमरावती जिल्ह्याचे क्षेत्रफळ १२२१२ चौ. मि. असून लोकसंख्या १८६१४१० आहे तर अमरावती १३ तालुके असून जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय तालुका ग्रंथालये ८ व इतर श्रेणीचे १८७ अशी एकूण १९६ ग्रंथालय आढळतात.

विदर्भातील अमरावती जिल्ह्यात महाराष्ट्र विदर्भाच्या इतर जिल्ह्याच्या तुलनेत या जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे १९६ सार्वजनिक वाचनालये आढळतात. जिल्हा पातळीवरील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालय १ असून तालुका पातळीवर ८ ग्रंथालये आहेत व इतर सार्वजनिक ग्रंथालये १८७ अशी एकूण १९६ सार्वजनिक ग्रंथालये आढळतात. त्यातील बहुतांश ग्रामीण भागातील तालुका पातळीवर वाचनालये जास्त आढळतात. *(स्त्रोत: स्मृतीग्रंथ: राजाराम सिताराम दिक्षीत वाचनालय, अमृतमहोत्सव १८९५ ते १९७०)*

## २.३५ गोवा :

मानवाने निसर्गातील कुतूहलांचे अवलोकन करीत असतानाच त्याचे ज्ञानसंग्रहण, निरीक्षण व अनुभव याद्वारे होत राहिले. ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. समाजाच्या बहुतेक साऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी मूलभूत स्वरूपाचे कार्य ग्रंथालय करीत असते. माहिती, ज्ञान, मनोरंजन व संस्कार करुन ग्रंथांच्या माध्यमातून वाचकांची जडणघडण करण्याचे मोठे सामर्थ्य ग्रंथालयांमध्ये असते. शिक्षण, संस्कृतिसंवर्धन, माहितीचे वितरण, रचनात्मक मनोरंजन आणि उदात्त जीवनमुल्येही समाजामध्ये जोपासण्याचे कार्य ग्रंथालयांद्वारे होत असते.

मध्ययुगीन युरोपातील राजघराण्यांत ग्रंथ साखळीने बांधून ठेवीत असत. त्यांचा वापर अत्यंत काटेकोरपणे, विशिष्ट व्यक्तींपुरताच केला जात असे. पुस्तके कपाटात जपून ठेवण्याचे दिवस इतिहास जमा झाले असून आता त्यांचा मुक्तपणे वापर करण्याचा काळ आलेला आहे. ग्रंथालयांच्या सर्व कामकाजांचा मुख्य हेतू पुस्तकातील ज्ञान आणि माहिती लोकांपर्यंत पोचावी हाच असतो. ग्रंथालयाद्वारे समाजाची जास्तीत जास्त सेवा घडावी यासाठी प्रयत्न केले जातात.

ग्रंथांचा विकास व इतिहास हा एकप्रकारे मानवी संस्कृतीच्या विकासाचा इतिहास होय. कोणत्याही राष्ट्राच्या वैभवात ग्रंथनिर्मितीला फार महत्त्वाचे स्थान आहे. आरंभीचे लेखन हे धार्मिक आदेश, मंत्र, तंत्र, राजाज्ञा, न्यायनिवाडे या स्वरुपाचे होते. पाषाण, मातीच्या विटा, बांबूच्या चिरफळ्या, झाडांच्या साली, पाने, पपायरसाचे पापुद्रे, धातूचे पत्रे, कमावलेले कातडे इत्यादी साधनांच्या वापराने मानवाने आपले विचार ग्रंथित करण्यासाठी केला. लेखनकलेचा शोध सुमेरिया, असीरिया व इजिप्त या देशात प्रथम लागला. भारतातही तक्षशीला, नालंदा, गुणशीला, कुंडिनपूर, उदंतपुरी या इसवी सन ६०० वर्षापूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या विद्यापीठांची ग्रंथालये होती. असे असताना गोव्याचा प्रदेश वाचन संस्कृतीपासून दूरच होता.

पोर्तुगीजांच्या गोव्यातील आगमनानंतर येथील धार्मिक, सांस्कृतिक परंपरा, आचारविचार, शिक्षण अशा प्रकारे एकूणच जीवनपद्धतीवर घाला घातला गेला. सुमारे साडेचारशे वर्षे येथील जनतेवर अधिकार गाजवून पोर्तुगीज निघून गेले खरे. पंरतु दोन चांगल्या गोष्टी पोर्तुगीजांनी केल्या. १. देशात सर्वात प्रथम इ.स.१५५६ याली त्यांनी गोव्यात छापखाना सुरू करून धर्मोपदेशकांसाठी पुस्तिका छापली. याच छापखान्यात फादर स्टीफन यांचे ख्रिस्तपुरण छापण्यात आले. २. पणजी येथे १८१७ साली देशातील (आशिया खंडातील) पहिले सार्वजनिक ग्रंथालय स्थापन केले.

प्राचीन काळात गोव्यामध्ये मंदिर, मठ व शाळांच्यामधून ग्रंथालये स्थापून त्यांचा वापर मर्यादित स्वरूपात केल्याचे उल्लेख आढळतात. या परिसरात पुष्कळ विद्वान, पंडित, शास्त्री व संत रहात असत. तसेच या ठिकाणी इतर ठिकाणांहून संत व विद्वान लोक देखील येत असत. या विद्वतजनांकडील हस्तलिखिते मंदिर ग्रंथालयातून संग्रहित केली जात असत. या परंपरेचा शोध घेत असताना ११०७ मध्ये ब्रम्हपूरी येथे सापडलेल्या ताम्रपटावर पुढील स्वरुपाचे उल्लेख आढळतात. ब्राम्हण विद्वानांसाठी ब्रम्हपूरी येथे वसाहत करण्यात आलेली होती. या परिसरात कदंब या राजाने 'भारती' व 'सरस्वती' या दोन इमारती बांधून तेथे ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली होती. हा परिसर मडगाव नजीक आहे. यावरून अकराव्या शतकामध्ये ग्रंथालये अस्तित्वात होती याचा पुरावा उपलब्ध होतो. तसेच विजयनगर साम्राज्याच्यावेळी देखील येथे कश्मीरहून ब्राम्हण येऊन त्यांनी येथे सेनापती पद भूषविल्याचा उल्लेख आढळतो. मधरमंत्री या काश्मीर सेनापतीनेच सप्तकोटीश्वर सारखी मंदिरे उभी करुन पुजारी व पंडीत लोकांना जमिनी दान केल्याचा उल्लेख आढळतो. या ब्रम्हवृंदाकडे पोर्तुगीज लोक देखील १५४८ च्या काळात जात असल्याचा उल्लेख आढळतो. हे पोर्तुगीज लोक हिंदू पंडितांच्याकडील ग्रंथ हिसकावून घेऊन त्यांचा नाश करत असत. पुढील काळात मात्र पोर्तुगिजांच्या प्रवृत्तीमध्ये बदल होऊन त्यांनी हिंदू लोकांना मंदिरे बांधावयाची परवानगी दिली. शिवाय ग्रंथालय व शैक्षणिक संस्था उभ्या करण्यास परवानगी दिली होती. येथे त्यामुळे शिक्षणाचा प्रसार होऊन शाळांची संख्या पर्यायाने ग्रंथालयांची संख्या वाढलेली होती.

गोवा प्राचीन काळी गोमंतक या नावाने ओळखला जात असे. वास्को–द–गामाने १४९८ मध्ये गोव्यात प्रवेश करून पुढे हा परिसर १५१० मध्ये पोर्तुगीजांनी काबीज केला. भारत जरी १९४७ साली स्वतंत्र झाला असला तरी भारताचा एक अविभाज्य भाग असलेला व महाराष्ट्राशी संलग्नित असलेला हा भूप्रदेश स्वतंत्र होण्यास १९६१ हे साल उजाडले. सुरुवातीस केंद्रशासीत प्रदेश म्हणून गोवा आपली वाटचाल करु लागला व पुढे त्यास राज्याचा दर्जा प्राप्त झाला. गोवा आपल्या सांस्कृतिक उत्थानासाठी सिद्ध झाला. येथील प्राचीन ग्रंथालय परंपरेचा वेध घेत असताना १५२५ मध्ये येथे पुराभिलेख कार्यालय सुरु करुन संस्थेद्वारे या कार्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. या ग्रंथालयामध्ये सुरुवातीच्या काळात श्री. पा. सं. पिसुरलेकर यांनी येथील कागदपत्रे सुव्यवस्थितपणे ठेवून ग्रंथालयास एक शिस्त आणली. येथील केंद्रीय ग्रंथालय हे सर्वात जुने असे सार्वजनिक ग्रंथालय असून या ठिकाणी फ्रेंच, लॅटीन, पोर्तुगीज, इंग्रजी भाषेतील अनेक दुर्मिळ ग्रंथ संग्रहीत केलेले आहेत. पोर्तुगिजांच्या राजवटीत येथे समाजातील अभ्यासकांनी विशेष प्रयत्न करून अनेक ग्रंथालय व वाचनालये सुरु केली. अशा प्रकारची जुनी ग्रंथालये जवळवजळ १०० इतकी असावी. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत ही ग्रंथालये कार्यरत असून आज ही ग्रंथालय सेवा देण्यास ती कार्यक्षम झालेली आहेत. १) गोमंतक विद्यानिकेतन ग्रंथालय (१९१२) २) श्री महालक्ष्मी प्रासादिक हिंदू वाचन मंदिर, पणजी (१९०७) (नाभिक समाज) ३) सरस्वती मंदिर, पणजी (१९१३), ४) दुर्गा वाचन मंदिर म्हापसा (१९०८) गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा विचार करत असताना दोन गोष्टी प्रामुख्याने लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. १) पोर्तुगिजांनी १५५६ मध्ये सुरु केलेली पहिली प्रिंटींग प्रेस २) १८१७ मध्ये स्थापन केलेले सार्वजनिक ग्रंथालय.

गोव्यातील पहिले सार्वजनिक ग्रंथालय पेडणे येथे १८७८ मध्ये स्थापन करण्यात आलेले होते. त्याचे नामकरण वास्को–द–गामा पेडणे वाचन मंदिर असे करण्यात आलेले होते. येथे सार्वजनिक ग्रंथालयाचा विकास हळूहळू होऊ लागला. गोव्यातील पहिले मराठी दैनिक 'गोवा देश सुधारणा' या मध्ये १४ मे १९७८ रोजी या ग्रंथालयाच्या स्थापनेची बातमी

प्रस्तूत करण्यात आलेली आहे. तसेच १ जुलै १९७८ रोजी पणजी येथे मेसर्स सदाशिव वाकरकर, विठोबाराव रातबोले, विष्णू गोविंद रेवाळकर, वासुदेव श्रीधर कामत इत्यादिंनी हिंदू वाचनगृह खाजगी स्वरुपात स्थापन केलेले होते. तसेच साखळी येथे १९०४ मध्ये शांतादुर्गा वाचन मंदिर, मडगाव मध्ये स्थापन झाल्याचा उल्लेख आढळतो. याही अगोदर १९०२ मध्ये साखळी येथे ग्रंथालय स्थापन केल्याचे निदर्शनास येते.

पणजी येथील मध्यवर्ती ग्रंथालय हे एक देशातील अग्रणी ग्रंथालयापैकी एक होय. सुरुवातीच्या काळात या ग्रंथालयास बिल्बीओटिका नॅशनल असे नाव होते. पुढे १८३६ मध्ये त्याचे बिब्लिओटिका पब्लिका (Biblioteca Publica)? असे नामकरण करण्यात आले. पुढे १८७१ मध्ये बिब्लिओटिका पब्लिका दे नोवा गोवा (Biblioteca Publica on) (१८२६ । १८७१) असे नामकरण करण्यात आले. पुन्हा १८९७ मध्ये त्याचे पुनर्नामांकन बिब्लोओटिका नॅशनल देनोवा गोवा (Biblioteca National De Nava Goa) असे करण्यात आले आणि त्यास राष्ट्रीय ग्रंथालयाचा दर्जा देण्यात आला. त्याचा राष्ट्रीय स्तर केवळ पोतुगिजांच्या ताब्यातील गोव्यापुरताच मर्यादित होत. गोव्यास १९६१ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इतर संस्थांप्रमाणे गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान मिळू लागले. आणि याद्वारे येथील पोर्तुगीज कालखंडातील जवळजवळ ३०० पेक्षा अधिक ग्रंथालयांना लाभ मिळाला. १९६४–६५ पासून अनुदान पात्र ग्रंथालयांची ंसख्या वाढू लागली व एकाच वर्षात ५३ ग्रंथालयांनी नव्याने अनुदानाचा लाभ उठविलेला होता. गोव्यातील पणजी येथील सर्वात जुने ग्रंथालय हेच पणजी मध्यवर्ती ग्रंथालय म्हणून कार्यरत झाले आणि या ग्रंथालयास कॉपीराईट कायद्यानुसार पुस्तके उपलब्ध होऊ लागली. आज या ग्रंथालयातील वाचनसाहित्य दोन लाखाच्या घरात पोहोचला असून यामध्ये पोर्तुगीज, इंग्रजी, मराठी, कोकणी व इतर भाषेतील ग्रंथांचा समावेश होतो. पोर्तुगीज भाषेतील ग्रंथाचा उपयोग संशोधकांना मोठ्या प्रमाणावर होत असतो. या ग्रंथालयाकडील हस्तलिखिताचे व दुर्मिळ ग्रंथांचे संग्रह मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा दुर्मिळ ग्रंथालयाबरोबरच गोव्यातील परंपरा सांगणारे ग्रंथ व गोमंत लेखकांनी लिहिलेले ग्रंथ यांचा एक स्वतंत्र संग्रह करण्यात आलेला असून या संग्रहास गोवा

लॉजी (Goa Logy) असे नाव देण्यात आलेले आहे. याचबरोबर या ठिकाणी मुलांसाठी ग्रंथालयामध्ये स्वतंत्र कक्ष तयार केलेला असून स्वतंत्रपणे अभ्यासिकेची सोय सुरु करण्यात आलेली आहे. १९७३ पासून ग्रामीण परिसरातील लोकांना ग्रंथालयाचा लाभ देण्यासाठी फिरत्या ग्रंथालयाची सुविधा करण्यात आलेली होती पण अडीअडचणीमुळे ही सेवा १९८० मध्ये बंद करण्यात आली.

**गोमंतकातील पहिले ग्रंथालय :**

गोमंतकात पहिले मराठी ग्रंथसंग्रहालय इ.स. १८८९ मध्ये 'महाशैल' उर्फ माशेल या गावी स्थापन झाले. १८ व्या शतकातील महापंडित महेश्वरभट्ट सुखटणकर यांनी संस्कृत आणि मराठी भाषेत मोलाची ग्रंथनिर्मिती केली होती. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ करंडेशास्त्री, साजूभटजी, दुभाषी, गणुकाका सुखटणकर मंडळींनी संस्कृत व मराठी ग्रंथांचा संग्रह असलेले 'सारस्वत विद्यापीठ पुस्तकालय' हे ग्रंथालय स्थापन केले. पुढे ते २५ वर्षे अखंडितपणे सुरू होते. त्यानंतर ते बंद झाले. परंतु अलीकडच्या काळात 'शारदामंदिर' या नावाने ग्रंथालय व शारदा इंग्लिश हायस्कूल या नावाने विद्यालय सुरु आहे.

**धर्ममूठ वाचनालयांचा काळ :**

सन १९०१ ते १९१० हा दहा वर्षांचा काळ म्हणले धर्ममूठ वाचनालयांचा काळ होता. मुष्टिफंड किंवा धर्ममूठ पद्धतीने गावातील घराघरांतून आठवड्याला मूठ मूठ तांदूळ गोळा करून व जमलेले तांदूळ विकून आलेले उत्पन्न ग्रंथालयासाठी खर्च करण्यात येत असे. या काळात म्हापसा, पणजी, फोंडा, कवळे, शिरोडा, वाडे तळावली, नेरूर, चिखली, पेडणे, करमळी, कुंभारजुवे, डिचोली, साखळी येथे ग्रंथालये निघाली. याच काळात १९०२ साली सावर्डे येथील सावर्डेकर घराण्याने स्वखर्चाने आपल्या घरी मुक्तद्वार ग्रंथालय 'शांतादुर्गा वाचनालय' सुरू केले.

मराठी ग्रंथसंग्रहालयापासून स्फूर्ती घेऊन जनार्दन विष्णू कामत, पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर वगैरे तरूण मंडळींनी १९०८ साली पारोडे गावात 'पारोडे मराठी ग्रंथसंग्रहालय' स्थापन करून व्याख्याने, सभा इत्यादी कार्यक्रम सुरू केले.

**हिंदूंच्या सामाजिक संस्था :**

गोमंतकातील मराठी भाषाप्रेमी आणि विद्वान बाळकृष्ण वामन सावर्डेकर यांनी गोमंतकातील ग्रंथालयांना 'हिंदू सामाजिक संस्था' असे म्हटले आहे. पोर्तुगीज राजवटीखाली दबलेल्या गोमंतकात जी ग्रंथालये उभी राहिली, त्याचे श्रेय हिंदू समाजाला आहे. १९१० साली रिपब्लिकन (प्रजासत्ताक) स्थापना होईपर्यंत घराघरात पोथ्यांप्रमाणे धार्मिक ग्रंथ व महाराष्ट्रातील वृत्तपत्रे एवढेच वाचन होत असे. त्यानंतर मात्र आपले हिंदू संस्कार टिकून रहावेत आणि मराठी भाषेतून शिक्षण मिळावे यासाठी गावागावांत मराठी माध्यमाच्या शाळा व वाचनालये स्थापन करण्यास सुरूवात झाली.

आपल्या गावात आपल्या ज्ञातीचा देव असावा, म्हणून जशी ज्ञातीसंस्थांनी देवालये उभारली त्याचप्रमाणे समाजाच्या उद्धाराकरिता वाचनमंदिरे स्थापन केली गेली. सारस्वत ब्राम्हण समाजाचे मडगावचे 'सारस्वत ब्राम्हण समाज ग्रंथालय' म्हापशाचे 'सारस्वत विद्यालय ग्रंथालय', दैवज्ञ ब्राम्हण समाजाचे म्हापसा येथील 'श्री दुर्गा वाचनमंदिर' नाभिक समाजाचे पणजी येथील ' महालक्ष्मी प्रासादिक हिंदू वाचनमंदिर', गोमंतक मराठा समाजाचे कवळे येथील ग्रंथालय, क्षत्रिय भंडारी समाजाचे पणजी येथील 'श्री पांडुरंग प्रासादिक वाचनालय' इत्यादी वाचनालये ज्ञातिसंस्थांनी चालविली. त्यांचे सभासद त्या त्या ज्ञातीचे असले, तरी वाचनासाठी ग्रंथालये मुक्तद्वार होती. सभासदांनी पुस्तके घरी नेण्यासाठी दिली जात असत.

**गोव्यातील खासगी ग्रंथालये :**

गोमंतकातील बहुतेक ग्रंथालये ही हिंदूंनीच चालविली होती. येथील ख्रिश्चन बहुजनसमाज शिक्षणाला पारखा झालेला होता. पांढरपेशा समाज मात्र पोर्तुगीज शिक्षणात पुढारलेला होता. सार्वजनिक सांस्कृतिक चळवळी उभारण्याची फारशी सवय नसल्यामुळे या लोकांनी स्वत:चा खाजगी ग्रंथसंग्रह करुन वाचनाची हौस भागवली.

गोमंतकातील राजघराण्यांनी आपला ग्रंथसंग्रह जसा जपून ठेवला तसा प्रतिष्ठीत आणि संशोधकांनीही आपला ग्रंथसंग्रह वाढीस लावला. पुढे तो संग्रह अलीकडच्या ग्रंथालयांना भेट दिला. त्यात १. डॉ. पांडुरंग सखाराम शेणवी पिसुर्लेकर ग्रंथसंग्रह, २. डॉ. नूनो

गोन्साल्विस ग्रंथसंग्रह, ३. पेडण्याचे रावराजे देशप्रभू घराण्यातील ग्रंथसंग्रह, ४. साखळीच्या राणे घराण्यातील ग्रंथसंग्रह, ५. मिनेझिस ब्रागांझा घराण्याचा ग्रंथसंग्रह, ६. म्हामई घराण्याचा ग्रंथसंग्रह, ७.वाळवे घराण्याचा ग्रंथसंग्रह, ८. धेंपे घराण्याचा ग्रंथसंग्रह, ९. सावई वेऱ्याचे डॉ. मलबाराव सरदेसाई यांचा संग्रह, १०. पणजीचे गणपती धुपकर यांच्याकडील वेदवेदान्तावरील दुर्मिळ संस्कृत ग्रंथसंग्रह, ११. पणजीचे अरुण पै यांच्या घरात असलेला गुरूनाथ नाईक यांच्या ४१० रहस्यकथा व इतर लेखकांच्या रहस्यकथांचा संग्रह १२. आरोबा – पेडणे येथील राजघराण्यातील दत्ताराम मंगेश भेंडे यांचा ग्रंथसंग्रह, १३. वा. शि. कुंडईकर ग्रंथसंग्रह.

याशिवाय, इतर अनेक मंडळींनी आपल्याकडील मौल्यवान दुर्मिळ ग्रंथसंग्रह प्राणपणाने जपून ठेवला आहे.

**गोव्यातील ग्रंथालयांची वाढ :**

'गाव तेथे ग्रंथालय' या प्रमाणे आज गोमंतकात शैक्षणिक संस्थातील ग्रंथालयाखेरीज १७० सार्वजनिक ग्रंथालये आहेत. १९३० मध्ये प्रसिद्ध झालेल्या वार्षिकात त्या काळात सुरु असलेल्या ३७ ग्रंथालयांची नोंद आहे. त्यांनतर प्रसिध्द झालेल्या वामन सावर्डेकर यांच्या 'गोमंतक परिचय' या ग्रंथात ४१ ग्रंथालयांचर माहिती मिळते. गोमंतक साहित्य सेवक मंडळाच्या १९७८ मध्ये प्रसिध्द केलेल्या सुवर्णमहोत्सवी स्मरणिकेत ९७ सार्वजनिक ग्रंथालयांची नोंद आहे.

मुक्तीपूर्व काळात सरकारी मदत नसताना लोकाश्रयावर चालविली जाणारी ही ग्रंथालये मराठी भाषेतील ग्रंथांचीच होती. यापैकी बऱ्याच ग्रंथालयांनी आपल्या सुसज्ज इमारती बांधल्या. या ग्रंथालयातून शारदोत्सव आणि इतर वार्षिकोत्सव होत असत. बहुतेक ग्रंथालये विद्येची देवता शारदेच्या नावे आहेत. तर इतर ग्रंथालयांना ग्रामदेवतेचे नाव देण्यात आले आहे. मंदिरांना असणारे पावित्र्य व मांगल्य ग्रंथालयांनाही असावे, हीच भावना या नावावरुन दिसते.

गोवा मुक्तीनंतर संपूर्ण गोव्यात ग्रंथालयांची संख्या झपाट्याने वाढत गेली. केवळ सरकारी अनुदान मिळते, म्हणूनही काही ग्रंथालये अस्तित्वात आली. पुढे या ना त्या कारणाने काही ग्रंथालये बंद पडली. ग्रंथालये ही सतत वाढत जाणारी संस्था असल्याने

त्यांच्या वाढीचा व व्याप्तीचा विचार करण्यासाठी आणि एकूणच गोमंतकातील ग्रंथालयांची स्थिती सुधारण्यासाठी ग्रंथालय चळवळीची आवश्यकता निर्माण झाली.

**ग्रंथालय चळवळ आणि गोमंतक ग्रंथालय संघ :**

गोमंतकात ग्रंथालय चळवळ उभी रहावी, ग्रंथपालांना ग्रंथालयाविषयी शास्त्रीय शिक्षण मिळावे, या उद्देशाने दै. गोमंतकाचे तत्कालिन संपादक आणि साहित्यीक बा. द. सातोस्कर यांच्या पुढाकाराने 'गोमंतक ग्रंथालय संघ' ची स्थापना करण्यात आली. संघाच्या पहिल्या कार्यकारिणीत गोमंतकातील ग्रंथपाल व ग्रंथालयीन पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. बा.द. सातोस्कर संघाचे अध्यक्ष होते.

'गोमंतक ग्रंथालय संघा'च्या पुढाकाराने १९६४ साली 'महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे' १५ वे अधिवेशन जांबावली येथे भरले होते. या अधिवेशनास महाराष्ट्रातून दीडशे प्रतिनिधी आले होते. गोमंतकीयांची संख्याही मोठी होती. प्रा. न. र. फाटक अध्यक्षस्थानी होते. या अधिवेशनास गोवा, दमण, दीवचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर, सभापती पां.पु. शिरोडकर, शिक्षणमंत्री वि.सु.करमली उपस्थित होते. या अधिवेशनात ग्रंथालय शास्त्रावरील विविध पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. बा.द.सातोस्कर यांनी गोव्यात ग्रंथालय कायदा करावा. असा विचार मांडला. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी सर्वप्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

संघाने ग्रंथपालांना ग्रंथालयाविषयक मार्गदर्शन करण्यासाठी मडगाव व म्हापसा येथे शिबिरे घेतली. ग्रंथपाल पदविकेचा अभ्यासक्रमही काही वर्षे चालविला. दरवर्षी डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात येते. बा.द.सातोस्कर, डॉ. गोविंद विठोबा शेणवी धुमे, डॉ. अर्चना काकोडकर, बी.आर. फडणीस, व्ही.बी. हुबळी, व्ही. आर. नावेलकर यांनी संघाचे कार्य गोवाभर वाढण्यास चालना दिली.

**दि गोवा लायब्ररी असोसिएशन :**

गोवा विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. पी.व्ही. कोन्नूर आणि विद्यापीठ ग्रंथालयातील कर्मचारी यांच्या पुढाकाराने गोमंतकातील ग्रंथालय व्यावसायिकांनी एकत्र येऊन २००० मध्ये दि गोवा लायब्ररी असोसिएशन  या संघटनेची स्थापना केली.

समाजात ग्रंथालय व्यावसायिकांची प्रतिमा उंचावणे, त्यांच्या कार्याची जाणीव व दखल घेणे, त्यांनी एकत्र येऊन चर्चा करणे, माहितीची देवाणघेवाण करणे, तसेच कल्पना, अनुभव, नैपुण्य व वृद्धीसाठी विविध परिषदा, चर्चासत्रे, व्याख्याने आदींचे आयोजन करणे, अशी संघटनेची उद्दिष्ट्ये ठरवण्यात आली. त्यानंतर गोवा विद्यापीठाच्या सहकार्याने संघटनेने 'पब्लिक रिलेशन' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रही घडवून आणले.

**तज्ज्ञ समिती :**

गोवा शासनाने मध्यवर्ती ग्रंथालय व एकूण गोव्यातील सार्वजनिक प्रणाली यांच्या समस्या जाणण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नियुक्त केलेली होती. यामध्ये प्रा. के. एस. देशपांडे (विभाग प्रमुख) ग्रंथालय विभाग, कर्नाटक विद्यापीठ यांच्या अधिपत्याखाली एक समिती नेमली होती. या समितीचा अहवाल १९८० मध्ये शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. या कमिटीच्या अहवालापूर्वी शासनाने राज्य ग्रंथालय सल्लागार मंडळाची स्थापना मध्यवर्ती ग्रंथालयाकरिता केलेली होती. ती विसर्जित करून नव्याने स्थापन करण्यात आलेल्या राज्य ग्रंथालय सल्लागार मंडळाकडे जून १९८२ मध्ये या संदर्भातील जबाबदारी सुपूर्द करण्यात आलेली आहे. ही समिती तत्कालीन गोव्याचे राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली होती.

**गोमंतकातील ग्रंथालये एक दृष्टीक्षेप :**

गोमंतकात आज अशी अनेक ग्रंथालये केवळ ग्रंथपालांच्या नावे प्रकाशात आल्याचे जाणवते. यापैकी आज अनेक निवृत्त झाले असतील. तरी त्यांची आठवण मात्र कायम आहे. गोवा विद्यापीठाचे व्ही. आर. नावलेकर, डॉ. अर्चना काकोडकर, आणि डॉ. पी. व्ही. कोन्नुर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे शरद इंगळे, कला अकादमीचे डॉ. गोविंद काळे, पुराभिलेख संग्रहाचे मोहन आंगणे, सेन्ट्रल लायब्ररीचे व्ही. बी. हुबळी आणि पिया रॉड्रीग्ज, धेंपे कॉलेज, मिरामारचे बी. आर. फडणीस, धेंपो वाणिज्य कॉलेजच्या कुमुद आपटे, सरस्वती मंदिरच्या नीलिमा आंगले इत्यादींनी ग्रंथालयीन सेवेत महत्त्वाचे कार्य केले आहे.

उत्कृष्ट किंवा समृद्ध ग्रंथसंग्रह म्हणजे काय किंवा तो कसा मानावा, यांचे निकर्ष विचारात घेऊन गोमंतकातील ग्रंथसंग्रहाचे मूल्यमापन करताना ग्रंथालयातील वाचनसाहित्याला

वाचकांकडून असलेली मागणी आणि ग्रंथसंग्रहाला मिळणारा प्रतिसाद याचे विश्लेषण करुन काही निष्कर्ष काढता येतील. एखाद्या ग्रंथालयाकडे असणारे दुर्मिळ ग्रंथ दुसऱ्या ग्रंथालयात सापडणे जेवढे कठीण, तेवढेच एखाद्या पुस्तकाची पहिली आवृत्ती असणेही अभिमानास्पदच बाब होय. अनेक वर्षे धूळ खात पडलेल्या एखाद्या ग्रंथास वाचक भेटतो किंवा एखाद्या वाचकाला हवे असलेले सर्व ग्रंथ एकाच वाचनालयात मिळतात, हेही वाचन संस्कृतीच्या दृष्टीने इष्टच असते.

गोमंतकातील मराठी ग्रंथकारांचे सर्व प्रकारचे ग्रंथ मराठी अकादमीच्या ग्रंथालयात सापडतील. अशी मराठी भाषिकांची अपेक्षा असते. त्याचप्रमाणे विनाप्रयास टेबलावर मांडून ठेवलेली वर्तमानपत्रे आणि मासिके गोमंत विद्या निकेतन, सरस्वती मंदिर, आताईद वाचनालय यासारख्या ग्रंथालयात मिळणार. याची सर्वसामान्य वाचकाला माहिती असते. प्रा. एस. एस. नाडकर्णी पणजीच्या सेंट्रल लायब्ररीविषयी सांगतात, ''आपण बालकवींवरच्या ग्रंथासाठी साहित्य गोळा करीत असताना सहज कुतूहल म्हणून 'ग्रहांकित' या ज्योतिषविषयक नियतकालिकांचा दिवाळी अंक पाहिला, तर त्यात आपणाला बालकवींच्या कुंडलीवर आधारलेला एक लेख सापडला. त्यात त्यांच्या कवितेतील विविध भावनांचा व रंगांचा कुंडलीतील ग्रंहांशी थेट संबंध प्रस्थापित केला होता. त्यामुळे आपल्याला घबाडच मिळाल्याचा आनंद झाला.'' वाचकांचा हा आनंद व समाधान गोव्यातील ग्रंथालये जोपासत होती.

गोमंतकात मूक्तीपूर्वी आणि नंतर अनेक वाचनालये अस्तित्वात आली. काही पारतंत्र्यातच बंद पडली. तर काही या ना त्या कारणाने नंतरच्या काळात बंद पडली. एकेकाळी वाचकांच्या पंसतीस उतरलेल्या श्री रवळनाथ वाचनमंदिर, पेडणे, आत्मोध्दार संघ ग्रंथालय, साखळी, रवींद्र वाचनालय, कालापूर, शारदा वाचनालय, कुंभारजुवे, बालोन्नती समाज ग्रंथालय, केपे, श्री दामोदर वाचनालय मडगाव यासारख्या वाचनालयांच्या आठवणी सांगणारे जुने वाचक अजूनही मिळतात.

गोमंतकातील अनेक जुनी ग्रंथालये एकेकाळी वाचकांनी भरगच्च असत. ती आता संध्याकाळच्या काही तासांपुरती उघडलेली आढळतात. काही ग्रंथालये तर सरकारी अनुदान मिळते म्हणून अस्तित्वात आहेत. काही नामांकित संस्था सोडल्या तर इतर

ग्रंथालयांची स्थिती समाधानकारक नाही. अपुरी जागा, ग्रंथालय सेवकांचे वेतन यामुळे या संस्थांना ग्रंथालय चालविणे कठिण होते. सरकारी ग्रामग्रंथालये प्राथमिक शिक्षकांच्या निवृत्तीनंतर बंद पडल्याची उदाहरणे आहेत.

गोमंतकातील महाविद्यालये आणि काही नामांकित ग्रंथालये सोडली, तर अनेक ग्रंथालयातील ग्रंथांचे शास्त्रीय वर्गीकरण आणि सूचीकरण झालेले दिसून येत नाही. बहुतेक ग्रंथालयात ड्युई डेसिमल पद्धतीने ग्रंथ लावलेले दिसतात. शास्त्रीय शिक्षण घेतलेल्या ग्रंथपालांची जागा खाजगी ग्रंथालयांना आवश्यकता असते. कुणीही नागरिकाला मोफत किंवा अल्प शुल्क भरुन आपल्या आवडी निवडीचे वाचनसाहित्य वाचनालयात वा घरी वाचावयास मिळते. ही अपेक्षा ग्रंथालयाकडून असते. गोमंतकातील बहुतेक सर्व ग्रंथालये सरकारी अनुदानावर चालत असल्याने आणि गोवा सार्वजनिक ग्रंथालय कायद्याच्या व्याख्येत बसत असल्याकारणाने, ही सर्व ग्रंथालये सार्वजनिक आहेत.

माहिती विज्ञानाने वलयंकित झालेल्या २१ व्या शतकातील माहिती ही ग्रंथालयाला पुरक अशीच आहे. टेलीव्हीजन, इंटरनेट जमान्यात ग्रंथांचे व ग्रंथालयांचे महत्त्व अजूनही कमी झालेले नाही. दुर्मिळ जुन्या ग्रंथांचे मायक्रोफिल्मिंग करुन ठेवणे जसे आवश्यक आहे, तसेच संगणकामुळे आपापल्या हव्या असलेल्या ग्रंथाची माहिती ताबडतोब मिळणे सोपे होत आहे. इंटरनेटवर सर्व प्रकारची माहिती उपलब्ध असली तरी साहित्याची गोडी पुस्तक हातात धरुन वाचल्याशिवाय गोमंतकातील वाचकांना समाधान लाभत नाही.

गोमंतकातल्या बहुतेक ग्रंथालयांनी मराठी भाषा आणि संस्कृती सांभाळण्याचे आपल्या परीने कार्य केले आहे. ग्रंथवाचनाची सवय लहानपणापासून जपण्यासाठी गोव्यात प्रयत्न केले जात आहेत.

**गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे भवितव्य :**

मध्यवर्ती (केंद्रीय) ग्रंथालय योजनेअंतर्गत नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीद्वारे गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली संदर्भातील अडीअडचणी, समस्या यांच्या संदर्भात १९८० मध्ये अत्यंत चिकित्सक अभ्यासांती समिती कार्याध्यक्ष प्रा. के. एस्. देशपांडे (विभाग प्रमुख, ग्रंथालय शास्त्र विभाग कर्नाटक विद्यापीठ) यांनी अहवाल गोवा शासनास सादर

केला. या अहवालअगोदरच राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाकरिता गोवा शासनाने एक सल्लागार समिती गठीत केलेली होती. ही समिती त्वरीतच विसर्जित करून राज्य ग्रंथालये समितीची स्थापना जून १९८२ मध्ये केली. या समितीकडून गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस विकासात्मक वाटेवर घेऊन जाण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या. त्याचा परिणाम येथील ग्रंथालय चळवळ बळकट होण्यास पुष्कळच मदत झाली.

**गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची भविष्यातील वाटचाल :**

गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी १९५८ मध्ये नेमलेल्या ग्रंथालय सल्लागार समितीने व तज्ज्ञ समितीने १९८० मध्ये अत्यंत आग्रहपूर्वक उच्चस्थानी ग्रंथालय संचालक नेमून येथील सार्वजकि ग्रंथालय प्रणाली मजबूत करण्यासंदर्भात सूचना केली होती. याची अंतीम परिणिती म्हणजे ग्रंथालय संचालकांना शासकीय व खाजगी सार्वजनिक ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासंदर्भात दिलेले अधिकार होय.

आज १९९२ मध्ये सर्वप्रथम स्थापन झालेल्या पणजी येथील सार्वजनिक ग्रंथालयास राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा दर्जा प्राप्त झालेला असून पणजी येथे या ग्रंथालयाची अत्यंत देखणी अशी आधुनिक स्वरुपाची वास्तू ग्रंथालयाकरिता उभारण्यात आलेली असून या ग्रंथालयात आधुनिक संसाधनाचे प्रभावी पर्व सुरु झालेले आहे. गोव्यातील पाच तालुक्यात ५६ ग्रामीण ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली असून ५ तालुका ग्रंथालयेही स्थापन करण्यात आलेली आहेत. खाजगी / सामाजिक संस्थांद्वारे स्थापन करण्यात आलेल्या ग्रंथालयांना शासन सहकार्य करते यामध्ये प्रामुख्याने सारस्वत विद्यापीठ, पणजी, गोमंतक विद्यानिकेतन ग्रंथालय, मडगाव जनता वाचनालय, वास्को यांचा समावेश आहे. २६ नोव्हेंबर १९९३ मध्ये येथे ग्रंथालय कायदा मंजूर करण्यात येऊन त्याची अंमलबजावणी २९ जुलै १९९५ पासून करण्यात आली. मद्यावर आकारलेला ग्रंथालय कर हे या कायद्याचे वेगळेपण असून याद्वारे ग्रंथालयाकरिता एक कायमस्वरुपी आर्थिक स्त्रोत उपलब्ध झालेला आहे.

गोव्यामध्ये आज ग्रंथालयांचे जाळे अधिकाधिक सक्षम होत असून आधुनिक वाचन साहित्य व तंत्रसाधने यांचा अवलंब येथील ग्रंथालयामधून केला जात आहे. येथील

ग्रंथालयाचा सामाजिक चळवळीचे केंद्रे व माहिती केंद्रे म्हणून विख्यात होत असून साक्षरता प्रसारासाठी साहित्य प्रसारासाठी ही ग्रंथालये महत्त्वपूर्ण योगदान देऊ लागली आहेत.

**नगरपरिषदा ग्रंथालये :**

नगरपरिषदेद्वारे या राज्यात ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली असून पहिले ग्रंथालय हे म्हापसा नगरपालिकेने सुरु केले. याचे नामकरण बिबिओमिका म्युनिसिपल ॲथेडे (Bibliomeca Municipal Athayade) असे असून याची स्थापना १३ नोव्हेंबर १८८३ रोजीची आहे. गोवा मुक्तीनंतर या ग्रंथालयाचे नामकरणे ॲथेडे म्युनिसीपल लायब्ररी (Athayade Municipal Library) असे करण्यात आले. म्युनिसिपल ग्रंथालय हे १९१४ मध्ये स्थापन केलेले होते त्याचे नामकरण बिबिओटिका म्युनिसिपल सर्कलेट सालसेट (Bibiote Municipal Circulate De Salsete) असे करण्यात आले होते. या ग्रंथालयाचे नामकरण अशा स्वरुपात करण्यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे या ग्रंथालयात केवळ पोर्तुगीज भाषेतील पुस्तके वितरीत करण्यासाठी प्रवृत्त केले जाई. सध्या या ग्रंथालयाचे पुन:नामकरण 'दि प्रोपेरसिया कोरीया अफॉन्सो फिजीफिरीडो म्युनिसीपल ग्रंथालय' (D Propercia Correia Afonso Figufeiredo Municipal Library) असे करण्यात आले आहे. या दोन्ही ग्रंथालयाद्वारे अभ्यासिका, ग्रंथ देवघेव व संदर्भ सेवा अशा सेवा दिल्या जातात. येथील कागदपत्रावरून निदर्शनास येते की सांगेलीत फोंडा, पणजी, मडगाव,पेडणे, वाळपई, कानकोण इ. ठिकाणी स्वातंत्र्यापूर्वी येथे ग्रंथालये कार्यरत होती. यापैकी केवळ फोंडा म्युनिसिपल ग्रंथालय हे सध्या कार्यरत असून पणजी म्युनिसिपल ग्रंथालय काही दशके बंद होते ते पुनश्च खाजगी इमारतीत सुरु करण्यात आलेले आहे. मडगाव नगरपालिकेद्वारे सुरु करण्यात आलेले ग्रंथालय हे आज जनता वाचनालय म्हणून ओळखले जात असून हे एका खाजगी संस्थेद्वारे सुरु करण्यात आलेले असून शासनाद्वारे मदत दिली जाते.

**शासकीय तालुका ग्रंथालये :**

गोवा शासनाने १९७५ पासून तालुका ग्रंथालयाच्या निर्मितीस चालना दिली. याची सुरुवात कुंकोळी या तालुक्यापासून सुरु होऊन नंतरच्या काळात पुढे वाळपई आणि काणकोण येथे ग्रंथालयाची स्थापना १९८४ मध्ये करण्यात आली. पुढे डिचोली आणि

सांगवे येथेही १९८८ पर्यंत तालुका ग्रंथालये अस्तित्वात आली. या ग्रंथालयातील संग्रह आज ५ ते ७ हजार ग्रंथापर्यंत मर्यादित असून जुन्या ग्रंथालयामध्ये दुर्मिळ असे संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे या ग्रंथालयाद्वारे राष्ट्रीय ग्रंथालय संप्ताहाच्या कालखंडात विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांना उत्तम प्रतिसाद लाभतो.

**ग्रामीण ग्रंथालये :**

गोवा राज्यामध्ये १९७५ पासून ग्रामीण ग्रंथालय स्थापनेचे अभियान सुरु करण्यात आले. या अभियानाअंतर्गत आगारवाडा (पेडणे), ठाणे (सातेरी), शिरस्त्रल (काणकोण), बाति (कुंकोळी) १९९० च्या कालखंडात यापैकी बहुतांशी ग्रंथालय बंद पडली आणि त्याचे कारण म्हणजे ही ग्रंथालये प्राथमिक शिक्षकांच्याद्वारे चालविली जात. या पार्श्वभूमीवर जुने प्राथमिक शिक्षक निवृत्त झाल्यावर अशा सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांचा अभाव यामुळे या ग्रंथालयाचे कामकाज बंद पडले. ही ग्रंथालये सुरु ठेवण्यासाठी पुढे ही ग्रंथालये ग्रामपंचायतीकडे अथवा सेवाभावी संस्थांकडे सोपविण्यात आली. पुढील काळात साधारणत: ७० ग्रामीण ग्रंथालये शासनाद्वारे चालविली जात असल्याचे निदर्शनास येते. या सर्व ग्रंथालयांचा ग्रंथसंग्रह साधारणत: ४ ते ५ हजार इतका आहे. तसेच या ग्रंथालयाद्वारे वृत्तपत्रे व मासिके केवळ वाचनासाठी उपलब्ध करून दिली जातात व प्रसंगोपात त्याची देवघेवही केली जाते.

**खाजगी व शासन अनुदानित ग्रंथालये :**

स्वातंत्र्यपूर्ण काळातील उपलब्ध कागदपत्रावरुन गोव्यात जवळजवळ ५० खाजगी ग्रंथालये सुरु केल्याचे निदर्शनास येते. ही ग्रंथालये हिंदू समाजातील व्यक्तींनी वैयक्तिक स्वरुपात व संख्या स्वरुपात सुरु केलेली होती. यामागचा मुलभूत उद्देश म्हणजे हिंदू समाजातील व्यक्तींना मराठी व संस्कृत भाषेतून वाचन साहित्य उपलब्ध व्हावे हा होता. अशा ग्रंथालयापैकी सुरुवातीस स्थापन करण्यात आलेले ग्रंथालय म्हणजे १८९९ मध्ये स्थापन करण्यात आलेले सारस्वत विद्यापीठ पुस्तकालय हे होय. हे ग्रंथालय महेश्वर भाट सुखटणकर यांनी मार्शल येथे सुरु केलेले होते व ते पुढे २३ वर्ष कार्यरत होते. या काळात अनेक खाजगी ग्रंथालये सुरु झाली होती परंतु तत्कालीन अनेक सामाजिक व आर्थिक अडचणीमुळे ही ग्रंथालये फार काळ तग धरु शकली नाहीत. सुरुवातीच्या काळात या

ग्रंथालयाद्वारे धार्मिक साहित्याची देवघेव होत असे. पुढील काळात या ग्रंथालयाद्वारे विविध विषयावरील व भारतीय स्वातंत्र्यचळवळीसंबंधित वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात येऊ लागले होते. अशा स्वरुपाचे वाचन साहित्य शासकीय ग्रंथालयातून उपलब्ध करून देण्यात येऊ लागल्याने गोव्यात राजकीय जागृतता निर्माण होण्यास मदत झाली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील या ग्रंथालयाचे योगदान यामुळेच महत्त्वपूर्ण ठरले. या काळात गोव्यात ४७ ग्रंथालये ही ग्रामपंचायतीद्वारे व ४५ ग्रंथालये ही सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून चालवली जात होती व त्यांना शासनाकडून अनुदान दिले जात होते. अनुदानासंदर्भात तरतूद ही ग्रंथालय अनुदा संदर्भातील तरतुदीनुसार केली जात असे. १९०७ मध्ये स्थापन करण्यात आलेले श्री महालक्ष्मी प्रासादिक वाचनमंदिर हे सर्वात सुरुवातीस स्थापन झालेले खाजगी ग्रंथालय होय. हे ग्रंथालय नाभिक वर्गाद्वारे सुरु करण्यात आले होते. याचा वर्ग तालुका ग्रंथालय वर्ग २ असा होता. त्याला अनुदानही मिळत असे. १९१२ मध्ये स्थापन झालेले गोमंतक विद्या निकेतन हे सर्वात उत्तम स्थितीत कार्यरत असलेले पहिले ग्रंथालय होय. हे ग्रंथालय सारस्वत ब्राह्मण समाजाने स्थापन केलेले होते. सद्यस्थितीत या ग्रंथालयाचा वाचन साहित्य संग्रह १५००० हून अधिक असून येथील बहुतांशी वाचनसाहित्य हे मराठी भाषेतील आहे. यामध्ये काही दुर्मिळ मराठी ग्रंथांचा समावेश आहे. श्री सरस्वती मंदिर ग्रंथालय हे १९१३ मध्ये स्थापन करण्यात आलेले होते व या ग्रंथालयाची स्थापना केणी कुटुंबिय व इतर हितचिंतक यांच्या सहकार्याने करण्यात आलेली होती. सुरुवातीस या ग्रंथालयाद्वारे केवळ मराठी भाषेतील वाचन साहित्य उपलब्ध करून दिले जात असे. सद्यस्थितीत येथे इंग्रजी, कोकणी, हिंदी इ. भाषेतून प्रकाशित होणारे वाचनसाहित्य उपलब्ध करून दिले जाते. ही दोन्ही तालुका ग्रंथालये तालुका वर्ग १ स्वरुपाची असून या ग्रंथालयाद्वारे अभ्यासिका ग्रंथ देवघेव संदर्भ सेवा या सेवाबरोबर बहि:शाला उपक्रम राबविले जात असून यामध्ये व्याख्याने, प्रश्नमंजुषासारख्या विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. या राज्यामध्ये पूर्वीपासून खाजगी सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेमध्ये येथील लोकांच्यामध्ये विशेष आस्था होती. या पार्श्वभूमीवर १८८९ मध्ये पहिले खाजगी ग्रंथालय माशेल येथे सुरु करण्यात आल्याचा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रात आढळतो. अशा ग्रंथालयापैकी काही

मोजकी ग्रंथालये गोव्यात अस्तित्वात असून यातील श्री दुर्गा वाचन मंदिर, म्हापसा हे पोर्तुगीज सरकारच्या दबावामुळे १९५४ मध्ये बंद करण्यात आलेले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हे ग्रंथालय १९६२ मध्ये पुनश्च सुरु करण्यात आले. या सर्वच ग्रंथालयाद्वारे अभ्यासिका, व्याख्याने अशा उपक्रमाचे आयोजनही केले जाते. या एकूण ग्रंथालयापैकी गोव्यात २३ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत असून यामध्ये ज्यांचा आदराने उल्लेख करावा अशा ग्रंथालयामध्ये महाराष्ट्र माहिती केंद्र ग्रंथालय, पणजी आणि राष्ट्रभाषा ग्रंथालय – मडगाव (१९६२) यांचा प्रामुख्याने अंतर्भाव करावा लागेल.

***

## प्रकरण ३ रे

# विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय संघांचे योगदान

३.१ प्रस्तावना

३.२ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ

३.३ गोमंतक राज्य ग्रंथालय संघ

३.४ राजस्थान राज्य ग्रंथालय संघ

३.५ हरियाणा राज्य ग्रंथालय संघ

३.६ हिमाचल प्रदेश ग्रंथालय संघ

३.७ जम्मू आणि काश्मिर राज्य ग्रंथालय संघ

३.८ पंजाब राज्य ग्रंथालय संघ

३.९ आसाम राज्य ग्रंथालय संघ

३.१० गुहाटी राज्य ग्रंथालय संघ

३.११ मणिपूर राज्य ग्रंथालय संघ

३.१२ मिझोराम राज्य ग्रंथालय संघ

३.१३ त्रिपुरा राज्य ग्रंथालय संघ

३.१४ छत्तीसगढ राज्य ग्रंथालय संघ

३.१५ ओरीसा राज्य ग्रंथालय संघ

३.१६ मध्यप्रदेश राज्य ग्रंथालय संघ

३.१७ इंदौर विभाग ग्रंथालय संघ

३.१८ तमिळनाडू राज्य ग्रंथालय संघ

३.१९ पाँडेचरी ग्रंथालय संघ

३.२० अंदमान – निकोबार ग्रंथालय संघ

३.२१ केरळ राज्य ग्रंथालय संघ

३.२२ आंध्रप्रदेश राज्य ग्रंथालय संघ

३.२३ कर्नाटक राज्य ग्रंथालय संघ

३.२४ बिहार राज्य ग्रंथालय संघ

३.२५ कोल फिल्ड ग्रंथालय संघ झारखंड

३.२६ गुजरात राज्य ग्रंथालय संघ

३.२७ बंगाल राज्य ग्रंथालय संघ

३.२८ हुबळी जिल्हा ग्रंथालय परिषद

३.२९ उत्तर प्रदेश राज्य ग्रंथालय संघ

३.३० दिल्ली ग्रंथालय संघ

## प्रकरण ३ रे

# विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय संघांचे योगदान

### ३.१ प्रस्तावना :

प्राचीन काळापासूनच आपल्या देशामध्ये ग्रंथालयविषयी पर्यायाने ज्ञानाविषयी आस्था असल्याचे पुरावे आपल्याला आढळतात. राजे–रजवाडे, पंडित, तत्वज्ञ यांनी खाजगी स्वरुपात तत्कालीन लेखन साधनांच्या सहाय्याने ग्रंथ संग्रह करण्यास सुरुवात केलेली होती. या संदर्भातील परंपराचा शोध घेता आपल्या देशापुरताच विचार केल्यास मोहेंजोदडो, हडप्पा येथील उत्खननातून सापडलेल्या विविध शिल्पाकृती, त्यावरील कोरलेली अक्षरे, विटावरील लेखन याद्वारे तत्कालीन जगतातील हे समृध्द नागरी जीवनाचे अवशेष पुरावेच होत. या काळात येथे मातीवर लेखन केलेल्या विटांचा संग्रह याचेही पुरावे उपलब्ध आहेत. तसेच भूजपत्रे, ताम्रपट यावरील लेखनाची भेंडोळी संग्रहीत केल्याचे दाखले ही उपलब्ध आहेत.

नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला याचबरोबर काशी, अयोध्या, अवंतिका या परिसरातील विद्यापीठे व तेथील ज्ञानसंग्रह आणि पुढील काळात बुध्दविहारातील लेखन, सम्राट अशोकाने जागोजागी उभे केलेले शिलालेख, सम्राट अशोकाने देशोदेशी पाठवलेले बौध्द भिक्षू,आचार्य कुमारजीव यांनी चीनची तत्कालीन राजधानी चांगल येथे महायान पंथाची केलेली स्थापना आणि १०५ बुध्द धर्मातील आकार ग्रंथांची चीनी भाषेत केलेली भाषांतरे हा सर्वदूर ज्ञानसंग्रहाचा होणार प्रसार पाहता ग्रंथालयाचे समाज व्यवस्थेतील असाधारण महत्व सुस्पष्ट करण्यास पुरेसे आहे. इतकेच नव्हे तर दक्षिण भारतात देखील अनेक समृध्द ग्रंथालये असल्याचे निदर्शनास येते. पुढील काळात बाराव्या–तेराव्या शतकामध्ये येथील परकियांच्या आक्रमणात जरी काही ग्रंथालयांचा नाश करण्याचा प्रयत्न केला असला तरी मुघल राजानी आपल्या काळात ज्ञान संग्रहालयास सहकार्य केल्याचे पुरावे उपलब्ध होतात. मुहम्मद गजनी याच्या काळात दिल्ली येथे पुस्तक संग्रहालय स्थापन केल्याचे निदर्शनास येते. १२९० मध्ये

जलाल उद्दीन खिलजी याने आपला किताब खाना स्थापन केला होता व तेथील पुस्तक अध्यक्षाचे पद प्रसिध्द संगीततज्ञ व कवि अमीर खुश्रु यांना देऊन केवळ खास, तैनातील उमरावांनाच वापरण्याचा अधिकार असलेला खास पांढरा पोशाख बहाल केला होता. *(श्री. ना. बा. मराठे – पृष्ठ क्रमांक ४८)*

अकबराने १५५६–१६०५ च्या काळात हस्तलिखित स्वरुपातील ग्रंथाचे संग्रहण करत असाताना ग्रंथालयाकरीता स्वतंत्रच खाते उघडले होते. अशा अनेक स्थित्यंतरातून जात असताना सतराव्या शतकामध्ये ब्रिटिशांची राजवट आली आणि त्यांनी खऱ्या अर्थाने येथे सार्वजनिक ग्रंथालयांची मुहुर्तमेढ रोवली. यातूनच पुढील काळात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे नाते शिक्षण प्रसाराबरोबरच स्वातंत्र्य संग्राम चळवळीशी जोडले. विविध राज्यातून ग्रंथालय संघ अस्तित्वात आले आणि खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालय चळवळ अधिकाधिक प्रगती पथावर पोहचून ग्रंथालय शिक्षणास चालनाही मिळाली.

ग्रंथालय शिक्षणाची रितसर सुरुवात प्रथमत: पंजाब विद्यापीठामध्ये झाली आणि हेच जाळे पुढे अवघ्या देशभर पोहचले. विविध संघटनानी उदाहरणार्थ बंगाल ग्रंथालय संघ (१९३७), मुंबई ग्रंथालय संघ, केरळ ग्रंथालय संघ, आंध्रप्रदेश ग्रंथालय संघ अशा संघांच्या माध्यमातून ग्रंथालय शिक्षणाचा प्रसार झाला आणि या क्षेत्रात येणाऱ्या नव्या पिढीकडून ग्रंथालय संघटनांचे जाळे विणले गेले. स्वातंत्र्याच्यानंतर ग्रंथालय संघटनांच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली अस्तित्वात येत राहिली. यासाठी राज्यनिहाय कायदेही काही राज्यात मंजूर झाले. या सर्व वाटचालीत राज्य, देश व उदाहरणदाखल जिल्हा व तालुका स्तरावरील संघटनांच्या वाटचालीचे स्वरुप संक्षिप्तपणे पुढे नमुद करण्यात आलेले आहे. या चळवळीत असणारे कार्यकर्ते, त्यांची ग्रंथालय विकासाकरीताची धडपड केलेले विशेष प्रयत्न व प्रसंगी केलेली पदरमोड या सर्वांचेच दर्शन पुढील विवेचनातून निदर्शनास येणार आहे.

## ३.२ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ :

राज्य पुनर्रचनेअंतर्गत राज्याची निर्मिती होत असताना काही भाषिक प्रदेश अन्य प्रदेशामध्ये समाविष्ट केले गेले होते. या पार्श्वभूमीचा विचार करुन १९६० मध्ये प्रथमच मराठी भाषिकांचे महाराष्ट्र हे राज्य स्वतंत्रपणे अस्तित्वात आले. या नव्या राज्यात एकत्रीतपणा आणण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करत असताना, या कामी ग्रंथालयक्षेत्रासाठी उपयोग करुन घेणे शक्य असल्याची जाणीव विविध विभागातील ग्रंथालय संघाना प्रकर्षाने जाणऊ लागली. राज्य स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सुसुत्र स्वरूपात राज्य स्तरीय ग्रंथालय संघ उपयुक्त ठरेल याचा विचार करुन चारही विभागातील ग्रंथालय संघाच्या पदाधीकारांनी एकत्र येवून अशा राज्यसतरीय संघाकरिता घटनेचा मसुदा तयार केला. या घटनेची एक प्रत पुर्नवलोकनासाठी विभागीय स्तरावरील ग्रंथालय संघाकडे पाठवून या घटनेस सर्व विभागाकडून मान्यता प्राप्त होताच पंढरपुर येथील मराठी ग्रंथालय परिषदेच्या २१ जानेवारी १९६२ रोजी भरविण्यात आलेल्या अधिवेशन प्रसंगी महाराष्ट्र ग्रंथालय संघ स्थापन झाल्याचे जाहिर करण्यात आले. या ऐतिहासीक परिषदेचे अध्यक्ष हे आचार्य काकासाहेब कालेलकर होते, तर घटनानिर्मितीस न्यायमुर्ती प्र. भा. गजेंद्रगडकर यांचे मार्गदर्शन लाभलेले होते. नव्याने स्थापन झालेल्या या राज्यस्तरीय ग्रंथालय संघात मुंबई ग्रंथालय संघ, महाराष्ट्र ग्रंथालय संघ, विदर्भ ग्रंथालय संघ आणि मराठवाडा ग्रंथालय संघ यांचा समावेश करण्यात आला होता. या संघाच्या व्यवस्थापनेसाठी नियोजन मंडळ आणि व्यवस्थापक मंडळ अशी द्रिस्तरीय रचना असुन दैनंदिन कामकाजाच्या देखरेखिकरीता व्यवस्था मंडळाचे कार्याध्यक्ष, उपकार्याध्यक्ष, कार्यवाहक, सहकार्यवाहक हे प्रमुख पदाधिकारी असुन या संघाच्या नियामक मंडळाची सभा २१ जुलै १९६२ रोजी नागपुर येथे पहिल्यांदा भरलेली होती.या सभेत नियामकमंडळावर प्रत्येक विभागातून एक एक व्यक्तीस संघाचा उपाध्यक्ष म्हणून स्विकृत करण्यात आलेले होते. तसेच या पहिल्या राज्य स्तरीय संघटनेचे अध्यक्ष आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी स्विकारले होते.

**राज्य ग्रंथालयाच्या कार्याचे स्वरुप :**

राज्य स्तरीय ग्रंथालय संघाच्या निर्मितीनंतर मराठी ग्रंथालय परिषद भरविण्याचे कार्य राज्य ग्रंथालय संघावर सोपविण्यात आले, आणि परिषदेचे नामकरण महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषद असे करण्यात आले. सुरूवातीच्या काळात परिषदा पुढील ठिकाणी भरविण्यात आलेल्या होत्या.

१४ वी परिषद औरंगाबाद येथे दि. २६, २७ व २८ जानेवारी १९६३ रोजी ना. त्र्य. शि. उर्फ बाळासाहेब भारदे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा ग्रंथालय संघाच्या सहकार्याने भरविण्यात आली. स्वागतअध्यक्ष श्री. बळवंतराव घाटे होते तर उद्घाटक शिक्षणमंत्री श्री. मधूकरराव चौधरी होते.

१५ वी परिषद जांबावाला (गोमंतक) येथे दि. २ व ४ फेब्रुवारी १९६४ रोजी प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली गोमंतक ग्रंथालय संघाच्या सहकार्याने भरविण्यात आली. स्वागतध्यक्ष श्री. आलेयस्तू कॉस्त होते. शिक्षणमंत्री श्री. करमळी यांनी परिषदेचे उद्घाटन केले तर गोव्याचे मुख्यमंत्री श्री. बांदोडकर यांनी समारोप केला.

१६ वी परिषद पुणे येथे दि. २५ व २६ डिसेंबर १९६४ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती श्री. वि.स.पागे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे नगर वाचन मंदीराच्या सहकार्याने भरविण्यात आली. स्वागताध्यक्षपदी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु श्री. काकासाहेब गाडगीळ होते.

राज्य ग्रंथालय परिषदेचे आयोजन पुढे संपन्न होत असताना या परिषदेमध्ये विविध निर्णय घेतले जात. याचे एक उदा. म्हणजे राज्य ग्रंथालय परिषदेने १९७४–७५ मध्ये घेतलेले काही निर्णय होय.

राज्य ग्रंथालय परिषदेने सन १९७४ –७५ मधील पहिली सभा शिक्षणमंत्री मा.अनंत नामजोशी यांच्या अध्यक्षतेखाली १ ऑगस्ट १९७४ रोजी सकाळी सचिवालयात भरली होती. त्यावेळी पाटबंधारे व राज्यमंत्री मा. वसंतदादा पाटील, राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष हे उपस्थित होते. विधानसभेचे अध्यक्ष मा. वि.स.पागे हे ही होते. राज्य ग्रंथालय संघाचे प्रतिनिधी सर्वश्री. अ.ल. लिमये (विदर्भ विभाग), ना. वि. देशपांडे (मराठवाडा विभाग),

मु. शं. औरंगाबादकर (मुंबई विभाग) हे ही सभेस आले होते. सभेत पुढील प्रमाणे निर्णय घेतल्याचे निदर्शनास येते.

सन १९७३–७४ साली ग्रंथालयांना इमारत बांधकामासाठी मिळणाऱ्या अनुदानाबाबत शासनाने निर्णय घेतले होते ते रद्द करण्यात आल्याचे अध्यक्षांनी सभेच्या वेळी सांगीतले. नॅशनल लायब्ररी, दादर सार्वजनिक वाचनालय व जनता केंद्र मुंबई या संस्थाना इमारतीसाठी अनुदान मंजुर करण्यात आल्याचे व नाशिक येथे मुंबई विभागीय ग्रंथालय स्थापन करण्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

वर्धा वाचनालयाच्या संस्थेने शतकाची वाटचाल केल्याबद्दल रु. ५०००/–, कोल्हापूर येथील करवीर नगर वाचनालयाने सव्वाशे वर्षे ग्रंथालय सेवा केल्याबद्दल रु. १०,०००/– व कर्जत वाचनालयाने सुर्वण महोत्सव साजरा करण्यासाठी ग्रंथालयसेवा केल्याबद्दल रु. १०००/– अनुदान देण्याची शिफारस केली होती.

अनुदान निधी शासनाने केलेल्या नियमानुसार जिल्हा ग्रंथालय संघाना दरवर्षी रु. १०००/– अनुदान मिळत असते. तो या पुढे रु. २०००/– करण्याची शिफारस केली गेली.

जिल्हा ग्रंथालय संघ हे कायद्यानुसार राज्य ग्रंथालय संघाचे प्राथमिक घटक मानले जातात. त्या ऐवजी तालुकास्तरीय ग्रंथालय संघ निर्माण केले जावे अशी कल्पना सर्वानुमते विचारासाठी पुढे आली. त्याचा विचार करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती निवडण्यात आली. मा. वि.स.पागे, सर्वश्री नरुभाऊ लिमये, ना. वि. देशपांडे व ग्रंथालय संचालक श्री. कु. द. पुराणीक.

विभाग ग्रंथालय संघाऐवजी विभाग ग्रंथालय समित्या शासनाने पाच वर्षासाठी मान्य केल्या होत्या. ती मुदत आता संपत आली होती. ही मुदत वाढविण्याचा प्रस्ताव सभेपुढे होता. समित्या आहे त्या स्वरुपात आणखी पाच वर्षासाठी मान्य केल्या गेल्या होत्या. विभाग ग्रंथालय समित्यांना निराळ्या समित्याची गरज आहे त्यासाठी अनुदाने मिळावी अशी मागणी पुढे आली असताना ही मागणी काही काळ पुढे ढकलण्यात यावी असे ठरले.

छत्रपती श्री शिवाजी महाराज राज्यरोहण त्रिशताब्दी वर्षानिमित्त प्रत्येक तालुका व जिल्हा वाचनालयात रु. ५००/- इतर वाचनालयास रु. ३००/- अनुदान देण्याचे ठरले. या अनुदानातुन शिवाजी महाराजांविषयी साहित्य विकसीत करावयाचे होते.

महाराजांविषयी अशा प्रकारे परिषदेचे कार्य चालु असताना ग्रंथालयासंबंधी विविध समस्या या संदर्भात विविध चर्चा होत असताना या चर्चे संदर्भात ग्रंथालय कायद्याचा मसुदा राज्य ग्रंथालय योजनेचे सुसूत्रीकरण जिल्हा परिषद अंतर्गत व्यवस्था, ग्रंथालय कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी, वाढीव अनुदान, गाव तेथे ग्रंथालय, ग्रंथालय अंतर्गत परस्पर सहकार्याचे स्वरुप याबाबत चर्चा होत असते. एकूणच ग्रंथालय परिषद म्हणजे महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय विषयक समस्यांचे व ग्रंथालयाचे भवितव्य या अनुषंगाने चर्चा करण्याचे व्यासपीठ म्हणूनच ग्रंथालय परिषदेकडे पाहिले जाते. ग्रंथालय संघाने चळवळीस प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने व जनसामान्यांमध्ये ग्रंथालय विषयक जाणीव विकसीत करण्याच्या दृष्टीने ग्रंथालय सप्ताह आयोजित करण्याचा उपक्रमही हाती घेण्यात आला होता. या सदर्भातील पहिला ग्रंथालय सप्ताह २५ नोव्हेंबर ते २ ऑक्टोबर १९७३ या कालावधीत संपन्न झाला. याकाळात व्याख्याने, ग्रंथप्रदर्शने, चर्चासत्रे असे विविध कार्यक्रम वेगवेगळ्या ग्रंथालयात घेण्यात आले. हीच परंपरा पुढे कार्यान्वित राहीली. अशा प्रकारचा एक अभिनव उपक्रम एक महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाव्दारे १९७५ मध्ये आयोजित करण्यात आलेला होता. या उपक्रमातंर्गत 'वाचनालय' या संघाच्या मुखपत्रापासून ग्रंथालय सप्ताह निमित्य एकूण ६५ व्यक्तींना ग्रंथालय विषयक लेख लिहीण्याची विनंती केली होती.यापैकी ३० व्यक्तींकडून वेळेत प्रतिसाद प्राप्त झाला. तसेच पणजी ते नागपुर, नांदेड ते मुंबई या परिसरातील मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांना एक महिनाभर आधी ग्रंथालय सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथालय संघाकडून पाठवण्यात आलेल्या लेखांना प्रसिद्धी द्यावी, अशी विनंती केलेली होती. या सर्वच वृत्तपत्रांनी होकारात्मक प्रतिसाद देऊन संघास सहकार्य दिले होते. या उपक्रमाचा आढावा घेताना महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या वृत्तपत्रांना एकूणच ५६ मराठी व इंग्रजी भाषेतील लेख प्राप्त झाले होते. यापैकी काही वृत्तपत्रांनी आणिबाणीचा आणि कागद टंचाईचा बाऊ करुन लेखांना जागा देण्यासाठी शक्य नसल्याचे कळविलेले होते. संघाने यावर

पुनश्च ''ग्रंथपालनाने आणिबाणीला कसलीही बाधा होण्यासारखी नाही व इतर ५६ प्रकारच्या मजकुरामध्ये ग्रंथपालानाच जागेची टंचाई नसावी'' (वाचनालय फेब्रुवारी १९७६ पृष्ठ २३) असे कळविले होते. या फेरविनंतीचा परिणाम चांगल्या प्रकारे होवून एकूण ३५ लेख सप्ताह काळास व त्यानंतर नाजिकच्या काळात या लेखनाला प्रसिद्धी मिळाली. या लेखांची स्वतंत्र यादी वाचनालयाच्या फेब्रुवारी १९७६ च्या अंकात पृष्ठ २३ व २४ वर देण्यात आली आहे. एकूणच हे लेख ग्रंथालय समस्या विषयक तर होतेच याही पेक्षा ते विविध ठिकाणच्या ग्रंथालयांची माहिती देणारे होते. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने राबविलेला हा एक महत्वपूर्ण उपक्रम म्हणूनच याची नोंद घ्यावी लागले. या सर्व लेखांचे संकलन व प्रसिद्धीची जबाबदारी श्री. वा.पु. कोल्हटकर यांच्यावर सोपवलेली होती. ग्रंथालय सप्ताहाचा हा उपक्रम आजही काही ग्रंथालयात आवर्जुन केला जातो.

**ग्रंथप्रकाशन :**

ग्रंथालयसंघाद्वारे ग्रंथप्रकाशनाचा उपक्रम खालील मान्यवरांनी मोठ्या उत्साहाने हाती घेतलेला होता. या उपक्रमाअंतर्गत १९६५ च्या कालखंडात,

१. पारखी, र. वा. : द्विबिंदू वर्गिकरण पद्धती

२. बोरगावकर, के. हे. : दशांशवर्गिकरण पद्धती

या दोन पुस्तकांबरोबरच प्रकाशीत झालेले तिसरे पुस्तक म्हणजे महाराष्ट्रातील ग्रंथालयांची सूची हे पुस्तक पुणे विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल डॉ. शा. ग. महाजन यांनी लिहीलेले होते. अशा प्रकारची पुस्तके प्रकाशीत करण्याचे संघाचे धोरण आखण्यात आले होते. महाराष्ट्र ग्रंथालय संघाने ग्रंथालय चळवळ पुढे नेण्यासाठी सातत्यपूर्व मान्यवरांचा पाठपुरावा केला असून या संघाने विविध ठिकाणी राज्यस्तरीय अधिवेशन भरवून ग्रंथालय चळवळ सुरु ठेवण्यासाठी अनेक समस्यांना तोंड देत सातत्यपूर्व प्रयत्न केलेले आहेत. संघाच्या या कार्याची पुर्वपीठीका लक्षात घेण्याच्या दृष्टिने संघाच्या बाराव्या वर्षाचा (१ एप्रिल १९७३ ते ३१ माचे १९७४) कार्यवृत्ताचा संक्षिप्त गोषवारा उदाहरणादाखल देण्यात आला आहे. याद्वारे संघाची तत्कालीन कार्यपध्दती स्पष्ट होते.

**ग्रंथालय संघाच्या बाराव्या वर्षाच्या कार्याचा वृत्तांत :**

**ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांच्या महानिर्वाणाची दखल घेताना :**

महाराष्ट्र ग्रंथालय चळवळीशी अनेक वर्षे निगडीत असलेले मराठी संशोधक प्रा. अ.का. प्रियोळकर (दि. १३ एप्रिल १९७३), नागपुरच्या राष्ट्रीय वाचनालयाचे जुने कार्यकर्ते ॲड. कमलाकर मासोदकर (दि.२१ एप्रिल १९७३), विदर्भातील ज्येष्ठ ग्रंथालयीन कार्यकर्ते श्री. बाळकृष्ण पुंडलीक मोहरीर (दि. २१ मे १९७३), मुंबई येथे भरलेल्या पहिल्या मराठी ग्रंथालय परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. नारायण दाजी सामंत (दि. ८ मे १९७३), 'साहित्य सहकार' मध्ये महाराष्ट्रीय व्यक्ति परिचय या सदराचे संकलन करणारे ग्वाल्हेरचे श्री. नानासाहेब कृष्णराव साळवी (दि. ५ जानेवारी १९७४) हे ग्रंथालय क्षेत्रातील हितैषि व कार्यकर्ते यांदाच्या वर्षी कालवश झाले. या सर्वांच्या निधनाने ग्रंथालय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने या सर्वांना कृतज्ञतेने श्रद्धांजली अर्पण केलेली आहे.

**अधिकारी, मंडळे व त्यांच्या सभा :**

वृत्तांत विषयक वर्षी प्रा. भवानीशंकर पंडित यांनी संघाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. चालु वर्षात व्यवस्थापक मंडळावरील श्री. बा. पुं. मोहरीर व श्री. मुरलीधर गंधे यांच्या जागा रिकाम्या झाल्या. त्यापैकी कै. मोहरीर यांच्या जागी श्री. सो.सो. मेश्राम यांची निवड करण्यात आली. मुंबई शाखा कार्यालयासाठी नेमलेल्या शाखा समितीत या साली बदल करण्यात आला नाही.

चालु वर्षात नियामक मंडळाच्या दोन सभा झाल्या. या सभेत श्री. मोहरीकर यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करणे, सन १९७२–७३ सालचा वार्षिक अहवाल व जमाखर्च संमत करणे. सन १९७४–७५ सालासाठी अंदाजपत्रक संमत करणे. श्री. वा. वि. भट सत्कार निधी स्विकारुन त्यांच्या विनियोगाची व्यवस्था ठरविणे, हिशेब तपासनीसांची निवड करणे ही व अशी कामे करण्यात आली.

या वर्षी व्यवस्थापक मंडळाच्या एकूण पाच सभा झाल्या. या सभातून सन १९७२–७३ सालचा अहवाल व जमाखर्च संमत करणे, सन १९७४–७५ सालचे अंदाजपत्रक

तयार करणे, उपसमित्या नेमुन संघाच्या कामांची सर्वसाधारण व्यवस्था पाहणे, घटना व नियम दुरुस्तीचा मसुदा तयार करणे, संमेलनाच्या रौप्य महोत्सवी अधिवेशनाबद्दलचे निर्णय घेणे, शासनाने नेमिलेल्या ग्रंथ निवड समितीवर राज्य संघाचा प्रतिनिधी नेमणे, ग्रंथालय सेवकांच्या सुधारित वेतनश्रेणीबद्दल निवेदन तयार करणे अशी कामे करण्यात आली.

संघाच्या मुंबई शाखेने 'साहित्य सहकार' व 'वाचनालय' या मासिकांची व्यवस्था, प्रकाशन व्यवस्था व प्रसिद्धी, ग्रंथपालन वर्ग अशा ज्या कामांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली ती कामे व्यवस्थितपणे पार पाडली.

**'साहित्य सहकार' व 'वाचनालय' :**

या वर्षात 'साहित्य सहकार' मासिकाचे सर्व अंक वेळेवर प्रसिद्ध करण्यात आले. श्री. प. त्रि. सहस्त्रबुद्धे यांनी मासिकांच्या संपादनाचे काम पाहिले.

या मासिकाचे वैशिष्ट्ये 'सूची वाङ्मयाचे संपादन व प्रकाशन' हे आहे. मराठी नियतकालिकातील निवडक लेखांची सूची याही वर्षी नियमीतपणे प्रसिद्ध करण्यात आल्या.या खेरीज 'मुंबईतील हिंदू देवालये' या कै.के. रघुनाथजी (कीर्तिकर) यांच्या अत्यंत दुर्मिळ पुस्तकांचे भाषांतर, 'प्रभाकर' या दुर्मिळ साप्ताहिकांतील पहिल्या वर्षाच्या अंकाचे पुनर्मुद्रण, लेखक परिचय, महाराष्ट्रीय व्यक्ती परिचय (१८१८ ते १९६०) ही सदरे सर्व वर्षभर देण्यात आली. याखेरीच कै. भा. रा. तांबे, लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख), प्रा. वा. ल. कुलकर्णी, आचार्य प्र. के. अत्रे, श्री. ग. त्र्य. माडखोलकर यांच्या वाङ्मय सूची तसेच 'दलित जीवन आणि मराठी वाङ्मय', 'रामदासांची काव्यसृष्टी', 'मराठी पोवाडा' या विषयांवरील संदर्भसूची प्रसिद्ध करण्यात आल्या. या सर्व सूची संपादनाच्या कामात शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे, श्री. दि. सी. बर्वे (किर्ति कॉलेज, मुंबई), कु. प्रफुल्लता कारेकर, श्री. रा. शं. साहाणे, सार्वजनिक वाचनालय, नाशिक, कु. गंगावती राघवेंद्र कुलकर्णी, ग्रंथपाल शासकीय विभागीय ग्रंथालय औरंगाबाद, श्री. वा.रा. पालेकर, डॉ. निर्मलकुमार जिनदास फडकुले, डॉ. डी. टी. माने, डॉ. रामचंद्र वामन चिटणीस, डॉ. सुर्यकांत रामचंद्र खांडेकर यांनी सहकार्य केले. 'मुबईतील हिंदू देवालये' या लेखमालचे भाषांतर श्री. प. त्रि. सहस्त्रबुद्धे यांनी परिश्रमपुर्वक करुन दिले. तसेच 'महाराष्ट्र व्यक्ति परिचय' या सदराचे संकलन

श्री. नानासाहेब साळवी यांनी केले. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने सूची प्रसिद्धीसाठी परवानगी दिली. या सर्वांच्या सहकार्याबद्दल संघ त्यांचा आभारी आहे.

सन १९७३-७४ सालासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृति मंडळाकडून 'साहित्य सहकार' च्या प्रकाशन खर्चासाठी रु. ६०००/- चे अनुदान देण्यात आले. या अनुदानाबद्दल संघ साहित्य आणि संस्कृति मंडळाचा आभारी आहे.

'वाचनालय' या संघाच्या मुखपत्राचे यंदाचे तिसरे वर्ष. या कालखंडात मासिकाचे प्रकाशन नियमितपणे करण्यात आले. श्री. प. त्रि.सहस्त्रबुद्धे हे या मासिकाचे कार्यकारी संपादक होते. मासिकाच्या संपादक मंडळापैकी एक श्री. ह. बा. उमराणीकर परदेशी गेल्यामुळे त्यांच्या जागी श्री. म. भि. बेलसरे यांची निवड करण्यात आली. या खेरीज संपादक मंडळात अन्य फेरफार झाला नाही.

साहित्य समालोचन, ग्रंथपाल व ग्रंथालये यांचे परिचय, ग्रंथालय संघ व ग्रंथालयीन संस्थांच्या कामकाजाचे वृत्त, ग्रंथालय चळवळीवरील विविध दृष्टीकोनातील लेख, नवे साहित्य, ग्रंथपालाचे पान, पत्रव्यवहार अशा विविधांगी विषयांचा वाचनालय मधून नियमित परामर्श घेण्यात आला. परखड पण लिहिलेली संपादकीय टिपणे हे वाचनालयाचे एक आकर्षण झाले आहे. 'वाचनालय' हे कार्यकारी संपादक व सहकारी यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे युक्त ठरते.

साहित्य सहकार व वाचनालय या दोन्ही मासिकांची मुद्रण  व्यवस्था सांभाळल्यावर श्री. कृ. के. राहाळकर व श्री. कृ. भि. राऊळ यांचा संघ ऋणी आहे.

**ग्रंथालय सप्ताह :**

यंदाचा ग्रंथालय सप्ताह दि. १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर १९७३ पर्यंत पाळावा या संघाने केलेल्या आवाहनास बऱ्याच संस्थांनी प्रतिसाद दिला. परंतु याही पेक्षा या सप्ताहाकडे अधिक जागरुकपणे लक्ष देणे आवश्यक आहे.

शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे, उस्मानाबाद जिल्हा ग्रंथालय संघ, मुळचंद रामनारायणशेट करवा वाचनालय, महाड, सिन्नर सहकारी वाचनालय, श्री शिवाजी सार्वजनिक वाचनमंदिर, कापूसतळणी, सुभाष सार्वजनिक वाचनालय, दिघोरी, नगर वाचनालय,

कुरूंदवाड, सार्वजनिक वाचनालय नाशिक या संस्थांनी ग्रंथालय सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

**ग्रंथपालन वर्ग :**

सन १९७३ –७४ मधील ग्रंथपालन वर्ग चारही विभाग ग्रंथालय संघामार्फत चालविण्यात आले. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने सर्वसाधारण धोरणाचे मार्गदर्शन केले. मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद व लातुर या आठ ठिकाणी हे वर्ग चालविण्यात आले.

**या वर्गामधील विद्यार्थी संख्येचा तपशील :**

| केंद्र | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी |
|---|---|---|
| मुंबई | ६० | २७ |
| नाशिक | ५० | २४ |
| ठाणे | ३१ | १४ |
| पुणे | ११७ | ६७ |
| कोल्हापूर | ३७ | १३ |
| नागपूर | ६७ | १५ |
| औरंगाबाद | ८१ | २३ |
| लातूर | ३९ | १९ |

आठ केंद्रात एकूण ४७५ विद्यार्थी परीक्षेला बसले व त्यापैकी २०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पुणे येथील पुढील तीन विद्यार्थिनी सर्वप्रथम आल्या. याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे उचित ठरेल. कु. सुमन भालचंद्र ठाकूरदेसाई, कु. शोभा कृष्णाजी कुलकर्णी व कु. शीला हिरसिंग गौड.

**महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषदेमधील कार्य :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषदेवर राज्य संघाच्या श्री. भ. श्रा. पंडित, श्री. ना. वि. देशपांडे, श्री. अ. ल. लिमये, श्री. पु. पा. गोखले व श्री. मु. शं. औरंगाबादकर या पाच सभासदांनी संघाचे प्रतिनिधीत्व केले.

राज्य ग्रंथालय संघ व संलग्न जिल्हा ग्रंथालय संघाचे नियम, ग्रंथालय सेवकांची वेतनश्रेणी सुधारण्यासाठी समिती नेमणे, साहित्य संस्थांच्या ग्रंथालयासाठी सद्यर्थ अनुदान देण्याची व्यवस्था करणे, अशा बाबींचा परिषदेच्या बैठकीत विचार झाला. सर्वांच्या प्रतिनिधीपैकी श्री. मु. श. औरंगाबादकर यांची ग्रंथालय सेवक वेतश्रेणी विचार समितीवर सदस्य म्हणून नेमणुक करण्यात आली. राज्यातील चारही विभाग ग्रंथालय संघांना मान्यता मिळण्याची आवश्यकता संघाच्या प्रतिनिधीनी आग्रहपुर्वक मांडली. या मागणीचा योग्य वेळी विचार होईल असे आश्वासन देण्यात आले. संघाच्या मागणीप्रमाणे चालु वर्षात जिल्हा व तालुका ग्रंथालयाखेरीज अन्य सरकारमान्य ग्रंथालयांना मान्य खर्चाच्या ५० टक्के ऐवजी ७५ टक्के वाढीव देण्याची शिफारस करण्यात आली. परंतु शासनाकडून शिफारशीची कार्यवाही करण्यात आली नाही.

ग्रंथालय परिषदेच्या सभा बोलवणे, त्यातून ग्रंथालय चळवळीच्या विकासाच्या योजना आखणे व त्यांची कार्यवाही करणे याबाबतीत शासनाकडून अनेक वेळा अक्षम्य अशी दिरंगाई होत असते. याचासखेद उल्लेख करणे आवश्यक वाटते. ग्रंथालय विधेयक मान्य झाल्यावर गेल्या काही वर्षात त्या दृष्टीने काय कार्यवाही झाली याचा आढावा घेण्यासाठी एक समिती नेमावी अशी सूचना संघाच्या प्रतिनिधींनी केली होती. परंतु काही तांत्रिक कारणे देऊन तिचा विचार करण्याचे टाळण्यात आले. लोककल्याणकारी अशा क्षेत्रातील उपक्रमांकडे पाहण्याचा शासनाचा व ग्रंथालय अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन अधिक उदार असावा.

**श्री. वा. वि. भट सत्कारनिधी पारितोषिके :**

या वर्षी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाकडे अनामत असलेला हा निधी त्यात स्वत:ची काही भर घालून श्री. वासुदेव विष्णू भट यांनी काही अटींवर महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाकडे कायमचा सोपविला आहे. निधीची एकूण रक्कम रु. १४००१ एवढी आहे. हा निधी कायम ठेवीच्या स्वरुपात गुंतवावा असा निर्णय राज्य संघाने घेतला आहे. चालु वर्षात या

निधीतून खाली पारितोषिके देण्याचे निर्णय घेण्यात आले.

१. ग्रंथालय प्रमाणपत्र परिक्षेत सन १९७३-७४ सालात सर्वप्रथम आल्याबद्दल कु. सुमन भालचंद्र ठाकुरदेसाई हिला रु. १००चे पारितोषिक देण्यात आले.
२. मुबई विभागातील नवीन निघालेल्या ग्रंथालयापैकी गाडगीळ गुरूजी मोफत वाचनालय, त्रिंबक (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) यांना नवीन पुस्तकांसाठी रु. १२५ चे पारितोषिक देण्यात आले.
३. महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीत सातत्याने व सर्वोत्कृष्ट कार्यकर्त्यांला द्यावयाची 'ग्रंथालय भूषण' ही पदवी व रु. ३०० चा रोख पुरस्कार नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह श्री. मु.शं. औरंगाबादकर यांना देण्यात आला.

पारितोषिकांचा रु. १४००१ चा निधी कायम चा महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाला दिल्याबद्दल श्री. वा. वि. भट यांचे आभार महाराष्ट्र राज्य संघाने मानलेले आहेत. तसेच पुरस्कार व पारितोषिके मिळविणाऱ्या व्यक्ती व संस्था यांचे अभिनंदन संघटनेद्वारे करण्यात येते.

**महाराष्ट्र राज्य ग्रंथालय कर्मचारी संघ :**

गेल्या वर्षात स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय कर्मचारी संघ चालु वर्षात धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदवून तो महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाशी संलग्न करण्यात आला.

सार्वजनिक ग्रंथालयातून काम करणाऱ्या सेवकांना न्याय मिळावा यासाठी संघटितरीत्या प्रयत्न करण्यास कर्मचारी संघाने नेटाने सुरवात केली. शासनाने विनंती केल्याप्रमाणे सुधारित वेतन श्रेणी सुचविण्यासयाठी संघाने उपसमिती नेमून आपल्या सूचना राज्य सरकारने नेमलेल्या वेतनश्रेणी समितीकडे पाठविल्या व त्या एका परिपत्रकाद्वारे जाहीर करुन सेवकांमध्ये जागृति निर्माण केली.

कर्मचारी संघातर्फे निवेदन सादर करुन वेतनश्रेणी विषयक सूचना जाहीरपणे राज्य सरकार पुढे मांडल्या.

कर्मचारी संघाचे सर्व महाराष्ट्रभर पाचशे सभासद नोंदण्यात आले असून सन १९७३–७६ सालासाठी खालील अधिकारी मंडळ निवडण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| श्री. द. वा. शेवडे, पुणे | – | अध्यक्ष |
| श्री. ब. भो. व्यवहारे, जळगाव | – | उपाध्यक्ष |
| श्री. पा. दि. देशपांडे, यवतमाळ | – | कार्याध्यक्ष |
| श्री. प्र. भा. भालेराव, औरंगाबाद | – | कोषाध्यक्ष |
| श्री. गो. श्री. कट्टी, औरंगाबाद | – | प्र. कार्यवाह |
| श्री. दि. सी. बर्वे, मुंबई | – | सहकार्यवाह |
| श्री. आठवले, यवतमाळ | – | सभासद |
| श्री. अनंत जोशी,पुणे | – | सभासद |
| श्री. गो. भ. दाभोळकर, मुंबई | – | सभासद |
| श्री. हरीभाऊ कुलकर्णी, श्रीरामपूर | – | सभासद |
| श्री. श्रीकृष्ण जोशी, औरंगाबाद | – | सभासद |
| श्री. अशोक देशपांडे, यवतमाळ | – | सभासद |
| कु. सुधा भट, मुंबई | – | सभासद |

**डॉ. रंगनाथन ग्रंथपालन संशोधन केंद्र :**

भारतातील ग्रंथालय चळवळीचे एक श्रेष्ठ व ज्येष्ठ नेते डॉ. रंगनाथन यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रात त्यांचे स्मारक म्हणून एक ग्रंथपालन संशोधन केंद्र काढावे अशी योजना संघाने आखली आहे. संशोधन केंद्राच्या मार्फत पुढील योजना कार्यान्वित व्हावयाच्या आहेत.

१. ‘डॉ. रंगनाथन यांचे चरित्र व कार्य’ या पुस्तकाचे प्रकाशन

२. ‘महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचा इतिहास’ या ग्रंथाचे प्रकाशन

३. ‘लेखसार संपादन’ मराठी नियतकालिकातील महत्त्वाच्या लेखांचे सार लेखन संपादन करुन घेऊन ते नियमितपणे प्रसिद्ध करणे.

४. नियतकालिक लेखसूची (१९५१ ते १९७५)

५. नियतकालिक लेखसूची – वार्षिक पुरवणी

**महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलनाचे अधिवेशन रौप्य महोत्सवी म्हणून सांगली येथे भरवावे असा निर्णय राज्य संघाच्या व्यवस्थापक मंडळाने घेतला होता. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे वीज व पाटबंधारे मंत्री व ज्येष्ठ राजेकीय कार्यकर्ते आमदार श्री. वसंतदादा पाटील यांची निवडही झाली. परंतु महाराष्ट्रातील अस्थिर परिस्थितीमुळे आयत्यावेळी हे अधिवेशन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे हे संमेलन होऊ शकले नाही.

**अखिल भारतीय ग्रंथालय परिषद :**

या परिषदेचे वार्षिक अधिवेशन जून १९७३ मध्ये हैद्राबाद येथे भरले होते. सदर परिषदेला राज्य संघाचे प्रमुख कार्यवाह श्री. ना. देशपांडे हे आपल्या सहकाऱ्यासह उपस्थित राहिले होते. सर्व सदस्यांनी परिषदेतील कामकाजात उत्साहाने भाग घेतला.

**पुरस्कार – सत्कार :**

महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीत प्रारंभापासून आत्मीयतेने भाग घेणाऱ्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेचा वृत्तांतविषयक वर्षात अमृत महोत्सव साजरा झाला.

संघाच्या आरंभापासून संग्रहालयाचे राज्य संघाला बहुमोल असे सक्रिय सहाय्य झाले आहे व होत ही आहे. महाराष्ट्राच्या या ज्येष्ठ व श्रेष्ठ संस्थेचे भावी जीवन असेच वाढत्या चढत्या वैभवाचे जावो.

महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीचे एक ज्येष्ठ नेते, महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे माजी अध्यक्ष, राज्य ग्रंथालय संघाच्या व्यवस्थापक मंडळाचे उपाध्यक्ष, समाज सेवक श्री. पु. पां. उर्फ बाबूरावजी गोखले यांना वृत्तांत साली पाऊणशे वर्षे पुर्ण होऊन त्यांनी ७६ वर्षात पदार्पण केले. याबद्दल संघाच्या वतीने  अभीष्ट चिंतन करण्यात आले.

**अनुदान :**

वृत्तांत विषयक वर्षात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाला शासनाकडून रु. २४,००० चे अनुदान मिळाले. या अनुदानातून चार विभाग ग्रंथालय संघाना प्रत्येकी रु. ३००० प्रमाणे, रु. १२००० देण्यात आले. या खेरीज मुंबई, पुणे व विदर्भ विभाग ग्रंथालय संमेलनासाठी रु. ९०० चे (प्रत्येकी रु.३००) अनुदान मिळाले.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाकडून 'साहित्य सहकार' मासिकाच्या प्रसिद्धी खर्चासाठी रु.६००० चे अनुदान मिळाले. ग्रंथपालन वर्गासाठी प्रसिद्ध करावयाच्या कार्यक्रमासाठी चालु वर्षात रु.४४१८ चे अनुदान मिळाले. या सर्व अनुदानाबद्दल महाराष्ट्र शासन व राज्य साहित्य सांस्कृति मंडळ यांचा संघ ऋणी आहे.

**प्रकाशन :**

वृत्तांत विषयक वर्षी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या वतीने १. तालिकीकरण – तात्विक, २. तालिकीकरण – प्रात्याक्षिक, ३. संदर्भसेवा आणि संदर्भसाहित्य, ४. ग्रंथसूचीशास्त्र, ५. द्विबिंदू वर्गीकरण तक्ते, व ६. दशांश वर्गीकरण तक्ते अशी एकूण सहा पुस्तके छापून प्रसिद्ध करण्यात आली. वरील क्रमिके व पुस्तके त्वरित लिहून देण्यामध्ये सर्वश्री शां.ग.महाजन, ना. बा. मराठे, के. द. वडजीकर यांचा सहभाग होता. ग्रंथपालन वर्गासाठी उपयुक्त असणारी बाकीची तीन क्रमिके लवकरच प्रसिद्ध करता येतील असा विश्वास संघाने व्यक्त केला आहे.

**संघाचा जमाखर्च :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सन १९७३–७४ सालचे जमाखर्च शेवटी नमूद करण्यात आले आहेत. राज्य संघाचे प्रकाशन, ग्रंथालय, कायम सामान वगैरचे अर्थिक व्यवहार दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे हिशेब ठेवण्याच्या व लिहिण्याच्या पद्धतीत यंदापासून सुधारणा केल्याचे आढळते. वार्षिक जमाखर्च पत्रक व त्याच्या जोडीला ताळेबंद तयार करुन जोडल्यामुळे संघाची खरीखुरी आर्थिक परिस्थिती समजण्यास मदत होईल.

**विभाग व जिल्हा ग्रंथालय संघ :**

गेल्या वर्षापासून ठरविलेल्या नवीन व्यवस्थेप्रमाणे मुबई– ठाणे– नाशिक, पुणे – कोल्हापूर, औरंगाबाद – लातूर व नागपूर येथील ग्रंथपालन वर्गाची व्यवस्था विभाग ग्रंथालय संघानी केली. वर्गाचा अर्थिक व्यवहारही विभाग ग्रंथालय संघाकडे सोपविला होता.

मुंबई विभाग ग्रंथालय संघाचे यंदाचे संमेलन नाशिक येथे दि. १० व ११ नोव्हेंबर १९७३ रोजी पार पडले. संमेलनाचे स्वरुप कामकाजी पद्धतीचे होते.

पुणे विभाग ग्रंथालय संघाचे वार्षिक अधिवेशन तळेगाव- दाभाडे येथे दि. २ डिसेंबर १९७३ रोजी खासदार श्री.विठ्ठलराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडले.

विदर्भ विभाग ग्रंथालय संघाचे कामकाजी अधिवेशन पारसिवनी येथे दि. २३, २४ फेब्रुवारी १९७४ रोजी पार पडले.

काही अपरिहार्य अडचणींमुळे मराठवाडा विभागाचे संमेलन संपन्न झाले नाही.

चालू वर्षात बृहन्मुंबई, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, उस्मानाबाद, परभणी, पुणे, कोल्हापूर, वर्धा, यवतमाळ या जिल्हा ग्रंथालय संघांनी आपल्या विभागात जिल्हा ग्रंथालय संमेलन भरविली.

यंदाच्या वर्षातील एक वैशिष्ट्यपूर्ण घटना म्हणजे मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाने औरंगाबाद येथे संघाच्या इमारतीची योजना आखून तिच्या बांधणीचा संकल्प सोडला आहे. त्यांच्या या अनुकरणीय उपक्रमास अल्पसे सहाय्य म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने रु. १००१ ची देणगी या विभाग संघास दिली आहे. राज्य संघातर्फे आम्ही या विभाग ग्रंथालय संघाचे अभिनंदन करतो.

महाराष्ट्र राज्यातील २६ जिल्ह्यांपैकी सोलापूर व जळगाव या दोन जिल्ह्यांनी विशेष परिश्रमपूर्वक प्रयत्न करुन आपापल्या जिल्ह्यात अनेक नवीन ग्राम ग्रंथालये उघडण्याचा उपक्रम घेतला व त्यात उल्लेखनीय यश मिळविले. या जिल्ह्याचे अनुकरण इतर ठिकाणीही व्हावे अशी अपेक्षा आहे. ग्रंथालयीन चळवळीचे कार्यकर्ते श्री. व. ना. केसकर व श्री. मुरलीधर गंधे यांचे आम्ही अभिनंदन करतो.

नाशिक, धुळे व जळगाव या जिल्ह्यांशी राज्य ग्रंथालय संघाचे असलेले मतभेद मिटवण्याचा प्रयत्न यंदाही करण्यात आला. परंतु वर्ष अखेर पावेतो त्याला यश मिळू शकले नाही. लवकरच हे सर्व जिल्हे राज्य संघाशी समरस होऊन कार्य करतील.

**प्रचार व प्रसिद्धी :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या कार्याचा प्रचार व प्रसिद्धी त्याच्या मुखपत्राच्या द्वारा करण्यात येतोच. त्या खेरीज संघाचे प्रमुख कार्यवाह श्री. ना. वि. देशपांडे, कार्यवाह श्री. द. बा. करमकर, अ. ल. लिमये, मंबई शाखेचे अध्यक्ष श्री. वा. वि. भट, संपादक

श्री. प. त्रि. सहस्त्रबुद्धे, अन्य कार्यकर्ते श्री. के. द. वडजीकर, श्री. गो. य. निसळ, श्री. गो. श्री. कट्टी, श्री. वसंत सुर्यवंशी, श्री. प्र.भा.भालेराव, मु. शं. औरंगाबादकर, श्री. मा. ग. पातकर प्रभुतींनी ठिकठिकाणी दौरे काढून व भेटीगाठी घेऊन संघाच्या कार्याचा प्रचार केला. संघ त्यांचा याबद्दल आभारी आहे. श्री. ना. वि. देशपांडे यांनी उत्तर प्रदेशातील ग्रंथालय कार्यकर्त्यांशी आंतरप्रांतीय पातळीवरही संपर्क साधला.

**आभार :**

या वर्षात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या कार्यात अनेक संस्था व व्यक्ती यांचे सहकार्य लाभले. संघाच्या मुंबई शाखा कार्यालयासाठी मुं. म. ग्रंथ संग्रहालयाने व विभाग संघाच्या कार्यालयासाठी साहित्य सहकार संघाने जागा दिली. ग्रंथपालन वर्गासाठी मुं. म. ग्रंथ संग्रहालय, न्यु हायस्कूल, नाशिक, मो. ह. विद्यालय, ठाणे, नूतन मराठी विद्यालय, पुणे, बीपीज अकाऊंटन्सी क्लास, कोल्हापूर, विदर्भ हिंदी राष्ट्रभाषा प्रचार समिती, नागपूर, सरस्वती भुवन महाविद्यालय, औरंगाबाद, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांनी जागा दिली याबद्दल संघ त्यांचा आभारी आहे.

'साहित्य पुरस्कार' व 'वाचनालय' या मधील सूचीसाठी उपलब्ध नवे मराठी साहित्य (पुस्तके व नियतकालिके) तत्परतेने उपलब्ध करुन दिल्याबद्दल मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे यांचे आम्ही आभारी आहोत.

राज्य ग्रंथालय परिषदेवरील संघाचे प्रतिनिधी सर्वश्री भ. श्री. पंडित, ना. वि. देशपांडे, अ. ल. लिमये, बाबूरावजी गोखले व मु. शृं औरंगाबादकर यांनी संघाचे प्रतिनिधीत्व करुन उपयुक्त कार्य केल्याबद्दल संघ त्यांचा आभारी आहे.

ग्रंथालय कारभार विषयक योग्य मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल ग्रंथालय संचालक श्री. कृ. द. पुराणिक, उपग्रंथपाल संचालक श्री. कृ. मु. उजळंबकर तसेच राज्याचे अन्य सहकारी यांचा संघ आभारी आहे.

**राजा राममोहन रॉय फाऊंडेशन :**

गेल्या वर्षाच्या अहवालात या फाऊंडेशन बद्दल विविध अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. परंतु शासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे आपल्या राज्याला या योजनेचा पुरेसा फायदा घेता आला नाही. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघातर्फे आपल्या विभागातील राज्य

समितीवर प्रतिनिधी नेमण्यात आले आहेत, परंतु हे प्रतिनिधी अगर राज्य संघ यांना विश्वासात घेऊन महाराष्ट्र राज्यासाठी काही योजना ग्रंथालय संचालनालयाला तयार करता आली नाही हे भूषणास्पद वाटत नाही.

यंदा आलेला अनुभव लक्षात घेता या पुढे या योजनेपासून आपल्या राज्यांतील ग्रंथालय चळवळीला अधिकाधिक लाभ कसा घेता येईल याबद्दल राज्य संघाने स्वतंत्रपणे व नेटाने प्रयत्नशील राहाणे अगत्याचे आहे असे आम्हास वाटते.

**उपसंहार :**

संघाच्या या वर्षाच्या कार्यांचा त्रोटक आढावा वर घेतला त्यावरुन त्यांच्या कामाची कल्पना येईल. झालेल्या कामाबद्दल अल्पसंतुष्टता बाळगणे योग्य ठरणार नाही. याची आम्हाला कल्पना आहे. पण विभागीय व जिल्हा स्तरावर तरुण उत्साही कार्यकर्त्यांनी मनावर घेतल्यास ते ही परिस्थिती पालटू शकतील.

ग्रंथालय संघाच्या सर्व कार्यक्रमांना वेळोवेळी प्रसिद्धी देऊन सर्व नियतकालिकांनी संघाला उपकृत केले आहे. तसेच अनेक संबंधित व्यक्ती व संस्था यांनीही सहकार्य केले आहे.

या सहकर्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानणे आमचे कर्तव्य आहे. या सर्वांची आत्मीयता सदैव लाभत राहो अशी विनंती करुन हा अहवाल आम्ही पुरा करतो.

**व्यवस्थापक मंडळाच्या वतीने**

मा. ग. पातकर — मा. तु. दलाल
द. वा. करमरकर — **कार्याध्यक्ष**
के.द. वडजीकर — अ.ल. लिमये
**कार्यवाह** — **प्रमुख कार्यवाह**

*(स्त्रोत – वाचनालय, नोव्हेंबर १९७४, पृ. १४ ते१९)*

या अहवालाव्दारे संघाच्या कार्याच्या पारदर्शकतेची व सार्वजनिक ग्रंथालय चळवळ विषयक चार दशकांपूर्वीची आस्था व तळमळ याचे दर्शन घडते.

**महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ संमेलन :**

महाराष्ट्र ग्रंथालय संघाद्वारे राज्यभर ग्रंथालय चळवळ विकसीत करण्यासाठी विविध ठिकाणी चर्चासत्रे, अधिवेशन यांचे आयोजन केले जाते. या अधिवेशनास राज्यभरातील सार्वजनिक ग्रंथालय कार्यकत्यांचे आणि ग्रंथालयक्षेत्रातील नामवंताचे विशेष लक्ष वेधले जाते. काहीशा प्रतिक्षेनंतर ही अधिवेशने भरु लागल्यावर त्याबद्दल सर्व कार्यकर्त्यांमध्ये एक अधिवेशन विषयक उत्सुकता लागलेली असे. ग्रंथालय संघाच्या वाटचालीत काहीसे शिथिलता प्राप्त झाली असताना आणिबाणीच्या पार्श्वभूमीवर संपन्न झालेले संघाचे २७ वे अधिवेशन हे विशेष लक्षणीय ठरलेले होते. एक तर हे अधिवेशन सावंतवाडी सारख्या दुर्गम परिसरात व ते ही तालुक्याच्या ठिकाणी भरलेले होते. त्यामुळे हे अधिवेशन कशा प्रकारे संपन्न होईल याबद्दल सर्वांच्या मनात शंका बळावू लागली होती. अशा पार्श्वभूमीवर भरलेले हे अधिवेशन एक ऐतिहासीक अधिवेशन ठरले. वाचनालयाच्या जानेवारी १९७६ अंकामध्ये संमेलनामध्ये सहभागी झालेल्या प्रतिनिधींने या अधिवेशनाचा घेतलेला वेध पुढे नमुद करण्यात आलेला आहे. तसेच या अधिवेशनाच्या स्वरुपावरुन एकूण महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे कार्य व या संघाद्वारे आयोजित केलेली संमेलने ही महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळीचे स्वरुप स्पष्ट करणारी असल्याने या ऐतिहासीक अधिवेशनातील महत्वपुर्ण ठराव पुढे नमुद करण्यात आलेले आहेत. या ऐतिहासीक अधिवेशनास आणीबाणीची पार्श्वभूमी ही तेवढीच कारणीभूत होती. त्याचबरोबर स्वत: प्रकल्प कर्त्यांने या अधिवेशनात समग्र सहभाग दर्शवित या प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेमध्ये ग्रंथ, ग्रंथालये व ग्रंथपाल हा लेख प्रकाशीत केला होता. या अधिवेशनाच्या इतिवृत्तात व या अधिवेशनात पारित करण्यात आलेले ठराव येथे उदाहरणादाखल नमुद करण्यात आलेले आहेत. याद्वारे केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील सार्वजनिक ग्रंथालय संघाची वाटचाल सुस्पष्ट होणारी आहे.

**महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, १९७५ :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचा आणखीन एक लेक्षवेधी उपक्रम म्हणजे राज्य स्तरीय संमेलन, सावंतवाडी येथे भरलेल्या या सम्मेलनाचा उदाहरणादाखल आढावा–

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलनाचे २७ वे अधिवेशन सावंतवाडी येथे डिसेंबर दि. २६,२७ व २८ या तीन दिवशी मोठ्या उत्साही वातावरणात पार पडले. सावंतवाडी या तालुक्याच्या ठिकाणी अधिवेशन भरविताना त्याची व्यवस्था सुरळीतपणे पार पडेल की नाही याची काळजी वाटत होती. नेहमीच्या अंदाजानुसार या संमेलनाला सुमारे ५०० प्रतिनिधी येतील अशी अपेक्षा होती व व्यवस्थापकांनी तशी व्यवस्था केली होती. परंतु संमेलनाला अनपेक्षितपणे जवळजवळ दुपटीने प्रतिनिधी उपस्थित राहिले व आयत्यावेळी निमंत्रक संस्थेची थोडी गैरसोय झाली. आरंभीच्या दिवशी झालेल्या थोड्या गडबडीने गांगरुन न जाता अल्पावधीत व्यवस्थाविषयक कौशल्य पणाला लावले व प्रतिनिधींच्या स्वागतात शक्यतो कोणतेही न्यून न ठेवता सर्व व्यवस्था मार्गी लागली.

संमेलनाची सुरवात रीतसरपणे शुक्रवारी दि. २६ रोजी सायंकाळी व्हावयाची होती. पण आदल्या दिवशी सायंकाळपावतो प्रतिनिधी नोंदणीची रीघ लागली व सुमारे पावणेदोनशे प्रतिनिधी डेरेदाखल झाले. शुक्रवारी सांयकाळपावतो प्रतिनिधींची नोंदणी सहाशेवर गेली व संमेलनाचा पहिला दिवस संपून गेला, तरी दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी ही प्रतिनिधी येतच होते. संमेलनाच्या प्रतिनिधीची शेवटची नोंद सुमारे ९५० इतकी होती. संमेलनाच्या गेल्या २७ वर्षाच्या इतिहासात प्रतिनिधी नोंदणीचा हा विक्रम ठरला.

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या व्यवस्थापक व नियामक मंडळाच्या सभा अनुक्रमे सकाळी व सायंकाळी आटोपल्या व संमेलनाच्या नियोजित कार्यक्रमाला सुरूवात झाली. श्री पंचम खेमराज महाविद्यालयाच्या सभागृहांत संमेलनाचे उद्घाटन करण्याची मूळ कल्पना सोडून देऊन समोरच्या खुल्या पटांगणात कार्यक्रम घेण्याची दुरदृष्टी सयोजकांनी दाखविली ती अंत्यत समयोचित ठरली.

ठीक सायंकाळी ६.०० वाजता महाराष्ट्रगीत व स्वागतगीत होऊन स्वागताध्यक्ष जयानंद मठकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात केली. श्री. मठकर यांनी आपल्या भाषणात खालीलप्रमाणे विचार प्रकट केले.

''ग्रंथालय ही आज समाजाची एक अत्यावश्यक गरज बनली आहे. पण तिची प्रगतीच्या दिशेने होणारी वाटचाल फारच मंद गतीने शासकीय अनुदावर दृष्टी ठेऊन

चाललेली आहे. याबद्दल खंत व्यक्त करुन लोकाभिमुख ग्रंथपाल मिळावा असे वाटत असेल तर त्याला पुरेसे वेतन मिळाले पाहिजे. तो असमाधानी असून चालणार नाही. म्हणूनच वेतन समितीच्या अहवालाला विलंब होऊन चालणार नाही. ग्रंथालय कायद्यातील त्रुटीचा उल्लेख करुन चळवळीत फूट पाडायला त्या सहाय्यभूत होणार की काय याची भिती व्यक्त केली जात आहे त्याचाही त्यांनी उल्लेख केला.

उद्घाटक श्री. बा. द. सातोस्कर यांचा अल्प परिचयकरुन देऊन व त्यांना संमेलाचे उद्‌घाटन करण्याची विनंती करुन आपले भाषण त्यांनी संपविले.

संमेलनाच्या या अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना श्री. बा. द. सातोस्कर यांनी जे अधिकारपूर्व विवेचन केले त्यातील महत्त्वाचा भाग असा,

''गेली बारा वर्षे महाराष्ट्रातल्या ग्रंथालय चळवळीपासून दूर होतो पण मनाने मात्र दूर नव्हतो. ग्रंथालय चळवळीसंबंधी वृत्तपत्रातून येणारे लेख वाचत होतो, साहित्य– सहकार आणि नंतर वाचनालय मासिक चाळत होतो. ग्रंथालय संमेलनाचे अहवाल व त्यात मंजूर होणारे ठराव यावरून नजर फिरवीत होतो. या वाचनावरुन ग्रंथालय चळवळीचा व्याप आणि विस्तार केवढा प्रचंड झाला आहे हे पाहून छाती दडपून जात होती. ग्रंथालयांची वाढ, सरकारी अनुदानाची वाढ, कार्यकर्त्यांची वाढ, शासनात ग्रंथालयासाठी झालेली स्वतंत्र डायरेक्टरची निर्मिती, शासकीय समित्यांत कार्यकर्त्यांना मिळालेला वाटा, या साऱ्या गोष्टी वाचून समाधान वाटत होते. पण तरीही मनाला रूखरूख लागून रहात होती.

सावंतवाडीच्या संमेलनाचे नारे लागले आणि 'वाचनालयाचा' डिसेंबरचा अंक हातात पडला आणि हे कोडे थोडे उलगडल्यासारखे वाटले. संपादकीयात सांगली आणि ठाणे संमेलानातील ठरावांची आकडेवारी दिली आहे. तीत अनुक्रमे १७ पैकी १२ आणि २० पैकी १६ ठराव शासकीय कार्यवाही मागणारे ठराव आहेत म्हणजे महाराष्ट्रातील ग्रंथालये ही संपूर्णपणे सार्वजनिक ग्रंथालये व्हावीत ही एके काळी मागणी करीत होती ती मागणी आता प्रत्यक्षात आली काय? ग्रंथाच्या स्पर्धा लावून सरकार जशी त्यांना प्रतिवर्षी बक्षिसे देते तशा ग्रंथालयाच्या व ग्रंथपालांच्या स्पर्धा होत आहेत काय? पण तशा स्पर्धा होत असतील तर निकाल जाहीर झालेले काही वाचले नव्हते. मग महाराष्ट्रातल्या या ग्रंथालय चळवळीत काय

घडते आहे. प्रत्यक्ष पहावे म्हणून सावंतवाडीत म्हणजे माझ्या कल्पनेतल्या विशाला गोमंतकातच भरणाऱ्या या संमेलनाला हजर राहण्याचा विचार मी करीत होतो. एवढ्यात सावंतवाडीचे कार्यकर्ते उद्घाटनाचे आमंत्रण घेऊन माझ्याकडे आले आणि मी ताबडतोब स्वीकारले.

सरकार अनुदान देऊन आणि ग्रंथालय संघ सर्व प्रकारचे प्रयत्न करुन महाराष्ट्रात सर्वत्र नवी ग्रंथालये निघावी आणि असलेली वाढावी म्हणून काम करीत आहे. पंरतु या प्रयत्नांची फलश्रुती काय? गावातल्या लोकांपैकी किती टक्के लोक या ग्रंथालयांचा फायदा घेतात? जे घेतात ते काय वाचतात? हे वाचणारे खरे ग्रंथप्रेमी आहेत की, ग्रंथांशी खेळणारे आहेत? या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक मिळतील काय?

मित्रहो, साक्षर व सुशिक्षितांना ग्रंथांचे आणि ग्रंथालयांचे आकर्षण वाटत नसेल तर ते का? या प्रशनांचा विचार आपण गंभीरपणे केला पाहिजे. ज्यांना जी पुस्तके हवीत ती सहजपणे उपलब्ध होत नाहीत. जी पुस्तके ते वाचतात ती त्यांना समजत नाहीत की ग्रंथांच्या मानवी जीवनातल्या स्थानाचीच कल्पना नाही. म्हणून ग्रंथालायाकडे लोक फिरकत नाहीत? ज्या लहान वयात मुलांना अवांतर वाचनाची सवय जडली पाहिजे ती सवय मुलांना लागत नाही यात दोष कुणाचा? मुलांचा, पालकांचा कि शिक्षकांचा? मुलांचे एक सोडून द्या, आपला शिक्षक व प्राध्यापक ज्यांचा उभा जन्म ग्रंथाच्या सहवासात जातो, तो तरी पाठ्यपुस्तकांशिवाय आपल्या आवडीच्या अशा विषयांवर ग्रंथवाचन करतो काय? ज्या ललित साहित्याबद्दल आपल्याकडे गाजावाजा केला जातो, ते साहित्य तरी फार मोठ्या प्रमाणात विकले व वाचले जाते काय? साहित्यिकांना आज मानधन मिळते, पण राजकीय नेत्याप्रमाणे एकूण सर्व समाजात त्यांना मान मिळतो काय? सरकारी पार्ट्यात परदेशातल्याप्रमाणे आपल्या थोर साहित्यिकांना आवर्जुन बोलावले जाते काय? परवा कऱ्हाड साहित्य संमेलात भाऊसाहेब खांडेकरांसमोर दिल्लीचे शासन नतमस्तक झाले आणि या घटनेचा वृत्तपत्रांनी खूप गाजावाजा केला. ही घटना म्हणजे एक अपवाद म्हणूनच हा गाजाबाजा झाला असे तुम्हाला वाटत नाही काय?

आज आपल्या देशातील लोकांची वैयक्तिक व सामाजिक बौद्धिक पातळी वाढायची असेल तर घरोघरी ग्रंथांनी प्रवेश केला पाहिजे आणि घरोघरच्या लोकांनी ग्रंथालयात गेले

पाहिजे, हे घडून यायला काय करता येईल एवढेच सुचवून मी माझे हे भाषण आवरत आहे. जो एकच उपाय मी सुचविणार आहे तो नवीन नाही. पण आजच्या परिस्थितीत तो पुन्हा एकदा मी आपल्या समोर ठेवीत आहे.

उपाय असा की, लहान वयात मुलांत ग्रंथांविषयीचे प्रेम निर्माण केले पाहिजे व त्यांना ग्रंथालयाची ओढ लावली पाहिजे.

लहान मुलांना पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर ग्रंथांच्या वाचनाची गोडी लावली पाहिजे. प्रत्येक शाळेत ग्रंथालय असलेच पाहिजे आणि प्रत्येक गावात सार्वजनिक ग्रंथालय असलेच पाहिजे. या ग्रंथालयातील पुस्तके मुलांना आवडतील, मुल आपण होऊन ग्रंथालयाकडे जातील अशी पुस्तके लेखकांनी लिहीली पाहिजेत. प्रकाशकांनी ती आकर्षकणे काढली पाहिजेत आणि मुद्रकांनी मुलांना मोह पडेल अशा पद्धतीने छापली पाहिजेत. वृत्तपत्रांनी, शिक्षकांनी आणि समाजनेत्यांनीही ग्रंथप्रचाराच्या कार्याला अग्रक्रम दिला पाहिजे. ग्रंथांची जाहिरात केली पाहिजे. मुलांच्याच नव्हे तर प्रौढांसाठीच्या पुस्तकांचीही – साबण, पावडर आणि नाटके – सिनेमा यांच्यासारखी जाहिरात झाली पाहिजे. आजही महाराष्ट्रात पुस्तकांची प्रदर्शने, सदर्शने, जत्रा अशा प्रकारे पुस्तकांची जाहिरात होते. पण ही जाहिरात जिथे होते तिथे लोकांना जावे लागते. या ऐवजी घरी बसल्या ठिकाणी, लोकांना ग्रंथांची माहिती झाली पाहिजे. फिरत्या ग्रंथालयाची योजना अधिक प्रमाणात कार्यवाहीत आणून ग्रंथानी घराघरात गेले पाहिजे. हे ग्रंथ सुद्धा असे हवेत की ज्यांच्या वाचनाने वाचकांना झोप न येत किंवा मेंदुला बधिरता न येता बुद्धि सतेज व्हावी. असे हे ग्रंथ हवेत.

हा अल्हाददायक अनुभव व ज्ञानक्षेत्रात प्रवेश मिळविण्यासाठी मुलांना आणि प्रौढांनाही आकर्षक वाटेल अशा प्रकारच्या पुस्तकांची निर्मिती जाणिवपूर्वक करणे ही आजची आपली प्रमुख गरज आहे. म्हणूनच आता मी म्हटल्याप्रमाणे हा विषय फक्त ग्रंथालय कार्यकर्त्यांचा नाही, लेखक, मुद्रक, प्रकाशक, संपादक व वाचक आणि ग्रंथालयीन कार्यकर्ते, ग्रंथालयशास्त्रज्ञ व ग्रंथपाल या सर्वांनी एकत्र येऊन व त्यावर विचार करुन निर्णय घ्यायचा आहे.''

संमेलनाचे उद्‌घाटन केल्यानंतर संमेलनाचे अध्यक्ष श्री. शां. शं. रेगे यांचा अल्प परिचय औरंगाबादचे श्री. के. द. वडजीकर यांनी करुन दिला व त्यांना पुष्पहार समर्पण

केल्यावर अध्यक्षपदाची सुत्रे त्यांनी होती घेतली. अध्यक्षांच्या परवानगीने संमेलाला यश चिंतणारे संदेश वाचून दाखविल्यानंतर श्री. वा. वि. भट सत्कार निधीच्या वतीने यंदाचे 'ग्रंथालय भूषण' म्हणून निवडलेले अमरावतीचे श्री. द. पितळे यांचा श्री. अ. ल. लमये यांनी परिचय करुन दिला व अध्यक्षांच्या हस्ते त्यांना 'ग्रंथालय भूषण' पदविकापत्र व रुपये तीनशेचा पुरस्कार अर्पण करण्यात आला. ही रक्कम श्री. पितळे यांनी मराठवाडा विभाग संघास देणगी म्हणून दिल्याचे जाहीर केले. श्री. शां. ग. महाजन यांनी दिलेले ग्रंथ लेखन पारितोषिक, वाचनालयाच्या लेखकाना द्यावयाची पारितोषिके, ग्रंथपालन वर्ग पारितोषिके, जिल्हा संघ पारितोषिक यांचे वितरण झाल्यावर अध्यक्षांनी भाषणास सुरुवात केली.

**विषय नियामक मंडळ :**

संमेलनात येणाऱ्या ठरावांची छाननी करुन त्यातील महत्वाच्या सूचनांची निवड करण्यासाठी विषय नियामक मंडळाच्या सभासदांची बैठक शुक्रवारी रात्रौ ९.३० वाजता भरली होती. बैठकीला सुमारे पन्नास प्रतिनिधी उपस्थित होते. ठरावांची वर्गवारी पूर्वी केलेली नसल्यामुळे हे प्राथमिक काम करण्यासाठी प्रमुख कार्यवाहाना जवळ जवळ पावणे दोन तास लागले व अकरा वाजण्याच्या सुमारास प्रत्यक्ष चर्चेला सुरूवात झाली. श्री. शा. शं. रेगे हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. चर्चेचे संचलन त्यांनी अत्यंत कुशलतेने केले. चर्चेची लांबण पहाटे ५.०० पर्यंत चालूच होती. या मथनातून २७–२८ ठरावाचे मसुदे खुल्या अधिवेशनात मांडण्यासाठी पसंत करण्यात आले. विशेष म्हणजे पुढील खुल्या अधिवेशनात ज्या एकदोन ठरावांवर मोठे वादळ माजले अशा ठरावांची पसंती विषय नियामक मंडळात विशेष चर्चा न होताच झाली होती.

दि. २७ डिसेंबर १९७५ रोजी शनिवारी सकाळी जिल्हा वाचनालय प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली होती व त्या सभेत वाचनालयांपुढे येणाऱ्या विविध अडचणीची चर्चा करण्यात आली. पुस्तकांवरील ॲक्ट्रॉय कर, ग्रंथालय नोंदणीत येणाऱ्या अडचणी, आयकर, व्यवसायकर, प्रवेश अर्जावर स्टँपड्युटी वगैरे प्रश्न ग्रंथालय संचालक श्री. कृ. द. पुराणिक यांच्यापुढे मांडण्यात आले. या सर्व अडचणींची श्री. कृ. द. पुराणिक यांनी नोंद घेतली व आपल्या खात्यातर्फे त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासन दिले. ही चर्चा सायंकाळी पुन्हा चालु होती.

रत्नागिरी जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती श्री. निकम यांना सुरू केलेल्या ग्रामग्रंथालय योजनेची माहिती देण्यासाठी मुद्दाम पाचारण करण्यांत आले होते. त्यांनी आपल्या योजनेची सविस्तर माहिती सांगितली. महाराष्ट्र राज्यातील निरनिराळ्या भागात ग्रामग्रंथालय स्थापनेचे वेगवेगळ्या पद्धतीचे उपक्रम चालु आहेत.या सर्व योजनापेक्षा श्री. निकम यांनी तयार केलेली योजना अधिक व्यवहारी पातळीवरची अशी आहे याची प्रचिती सर्व कार्यकर्त्यांना आली.

दिनांक २७ डिसेंबर १९७५ रोजी दुपारी ठरल्याप्रमाणे ग्रंथालय कर्मचारी संघटनेची बैठक ३.०० वाजता भरली. काही तांत्रिक अडचणींमुळे या संघाचा अहवाल व जमाखर्च या सभेपुढे मांडण्यात न आल्यामुळे बऱ्याच सभासदांनी नापसंती व्यक्त केली व काही वेळ सदस्यामध्ये खळबळ निर्माण झाली. परंतु झालेल्या चुका मान्य करुन पुढील निवडणुकीच्या आत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष व कार्यवाह यांनी आश्वासन दिल्यावर हे पेल्यातील वादळ शांत झाले. मात्र या घटनेपासून धडा घेऊन कर्मचारी संघटना खंबीर पायावर स्थिर करण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा असे ठरले.

शनिवारी सायंकाळी मुंबई विभाग मंडळाची सभा भरली व त्यात १९७४-७५ च्या हिशोबास व अहवालास मान्यता देण्यात आली. धुळे, नाशिक व जळगाव या जिल्ह्यांचा प्रश्न यापुढे मुंबई विभागाकडेच सोपविण्यात आल्यामुळे त्याबद्दल हा विचार झाला.

याच सुमारास आकस्मिकरीत्या विजेचा प्रवाह खंडित झाल्यामुळे पुस्तक खरेदी योजनेची चर्चा स्थगित करण्यात आली. रात्रौ होणारा दशावतारी नाटकाचा करमणुकीचा कार्यक्रमही थोडा उशीरा सुरू करावा लागला. करमणुकीचा हा कार्यक्रम त्यातील नाविण्यामुळे सर्वांना आवडला.

सभासदांच्या सोयीसाठी खुल्या अधिवेशनाचा कार्यक्रम दुपारी घेण्याऐवजी तो सकाळीच घेऊन संमेलनाचा समारोप करण्याचे ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे श्री. शां. शं. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली खुल्या अधिवेशनास सुरुवात करण्यात आली.

खुल्या अधिवेशनात एकूण २७ ठराव एकमताने संमत करण्यात आले. फक्त एका ठरावास संमेलनात गालबोट लागले. ते 'ग्रंथपालाना संस्थांच्या कार्यकारी मंडळात सभासद म्हणून स्थान द्यावे' अशा अर्थाच्या प्रस्तावाचे. या ठरावावर चर्चा होताना प्रतिनिधीत उघड

उघड दोन तट पडल्याचे दिसत होते. व्यक्त्यांच्या उलट सुलट भाषणातून त्यांचे प्रतिध्वनी ही उमटत होते. ठरावावर मत विभागणींची मागणी ही करण्याचा आग्रह करण्यात येत होता. आलेल्या प्रसंगातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने अध्यक्षांनी त्या ठरावाचा विचार एक वर्ष तहकुब करावा असे सुचविले व ते सर्वसंमत होऊन हा समर प्रसंग टळला.

यानंतर अध्यक्ष, स्थानिक निमंत्रक संस्था, कार्यकर्ते यांचे आभार माण्यात येऊन संमेलाचे सूप वाजले.

'सावंतवाडीचे ही संमेलन यशस्वी झाले' हा शब्दप्रयोग अशा औपचारिकपणे करण्यात त्या कार्यकर्त्यांवर अन्याय केल्यासारखे होईल. संमेलनाच्या सुरुवातीपासून अगदी अखेरपर्यंत तहान भुक, विश्रांती, झोप यांची पर्वा न करता ही मंडळी परिश्रमपुर्वक ठामपणे उभी राहिली याबद्दल सर्वांनीच त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच होते. अपुरे माणूसबळ, अपुरी साधने, अपुरी निवासव्यवस्था यावर त्यांनी अक्षरश: मात करुन प्रतिनिधींची शक्य तितकी सोय करण्याची पराकाष्ठा केली. गोव्याच्या सहलीसाठी काही प्रतिनिधींनी आयत्या वेळी नोंदणी करुन त्यांचा अंत पाहिला पण, कोणाला ही नाखूष न करता शेवटच्या सहलीकरांची त्यांनी सोय केली व ती ही खंबीरपणे डोके शांत ठेवून व हसऱ्या चेहऱ्याने. ग्रंथपाल बांदेकर, कार्याध्यक्ष पी. डी. नाईक, स्वागताध्यक्ष जयानंद मठकर यांनी तीन दिवस संमेलनाचा सभामंडप हेच आपले घर केले होते व व्यवस्थेत उणेपणा येणार नाही याची काळजी घेऊन संमेलन यशस्वी केले. प्रतिनिधी पेक्षाही या गुणी कार्यकर्त्यांनीच संमेलन यशस्वी केले.

गोव्याच्या सहलीचे आकर्षण असल्यामुळे संमेलनाला प्रतिनिधी मोठ्या संख्येने आले हे सत्य असले तरी ते पूर्ण सत्य नव्हे. कारण सहलीसाठी गेलेले ४०० प्रतिनिधी सोडले तर बाकीचे ६०० जण केवळ संमेलनाच्या ओढीनेच आले होते असे म्हणता येते. दहाबारा वर्षामागे ग्रंथालय संमेलन ही तीन चारशे निवडक कार्यकर्त्यांपुरतीच मर्यादित असत. पण अलिकडे गेली तीन वर्षे त्यांचा आवाका बराच वाढल्याचे द्योतक होते. संमेलनाच्या नियोजित कार्यक्रमात समाविष्ट न केलेली आयत्यावेळी श्री. द. रा. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्षात आणलेली 'ग्राम ग्रंथालयाच्या चालकांची भरवलेली बैठक' हे या नव्या प्रवाहाचेच प्रसादचिन्ह होते. गेल्या दोन वर्षात ग्रामग्रंथालय चळवळीचा विस्तार ज्या प्रमाणात वाढत

होती. त्याची योग्य दखल चळवळीच्या कार्यकर्त्यांनी घेण्याची वेळ नि:संशयपणे आली. हे या बैठकीमुळे स्पष्ट दिसले. यापुढे केवळ आत्मनिष्ठ व स्वसंतुष्ट राहुन चालणार नाही हे सर्वांनी ओळखले तरच चळवळीची गती व प्रगती कायम राखू शकतील. कर्मचारी संघटनेच्या सभेत जो प्रकार झाला त्यावरुन धडा घेऊन संघटनेतील बैठे धोरण यापुढे सोडण्याची व सुधारण्याची कोशीस सर्वांनी केली पाहिजे असेच सूचित केले गेले. चळवळीत येणारे हे नवीन प्रवाह एकत्रित ठेवून व नवीन कार्यकर्त्यांच्या शक्तीला सामावून घेऊन ग्रंथालय चळवळीला व्यापक स्वरुप देण्याचे धोरण राज्य ग्रंथालय संघटनेने आखले तर चळवळीचे भवितव्य उज्वलच राहील याविषयी शंका वाटत नसल्याचे या अधिवेशनाने स्पष्ट केले होते.

संमेलनाच्या निमित्ताने साहित्य सहकार संघाने जे ग्रंथ प्रदर्शन भरविले त्याचाही उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. संमेलनाच्या सुरूवातीलाच श्री. निकम यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले व संमेलनाच्या तिनही दिवस ते अनेकांनी पाहिले, या उपक्रमाबद्दल साहित्य सहकार संघाला सर्वांनी धन्यवाद दिले.

**अधिवेशनात संमत झालेले ठराव :**

या अधिवेशनाचे व तेथील कामकाजाचे स्वरुप स्पष्ट व्हावे या दृष्टीने अधिवेशनातील ठराव पुढे देण्यात आले आहेत.

**ठराव क्र. १ :**

ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यकर्ते, वसईचे श्री. विनायक ना. सामंत, महाराष्ट्र मित्रमंडळ, ग्रंथसंग्रहालय व मोफत वाचनालय, लालबाग– मुंबई या संस्थेचे श्री. रघुवीर हरिश्चंद्र परब हे नुकतेच कालवंश झाले.श्री. परब वरील संस्थेचे संस्थापक होते. लालबाग सारख्या कामगार विभागात ग्रंथालयीन कार्य शेवटपर्यंत ते उत्साहाने आणि तळमळीने करीत होते. ग्रंथ प्रकाशन व्यवसायामुळे ग्रंथालयाशी निगडीत असलेले श्री. वि. पु. भागवत हे हि दिवंगत झाले. या सर्व माननीयांच्या निधनामुळे ग्रंथालय चळवळीची हानी झाली आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गति लाभो.

**– अध्यक्षांकडून**

**ठराव क्र. २ :**

मराठीतील सुप्रसिद्ध लोकप्रिय साहित्यिक पद्मभूषण भाऊसाहेब खांडेकर ह्यांना भारतीय ज्ञानपीठाचे पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल हे ग्रंथालय संमेलन त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे. त्यांना आयुरारोग्य प्राप्त होवो व त्यांच्या हातून अशीच साहित्यसेवा घडत राहो अशी सदिच्छा व्यक्त करीत आहे.

**–अध्यक्षांकडून**

**ठराव क्र. ३ :**

महाराष्ट्र ग्रंथालय कायद्यातील तरतुदी प्रमाणे इमारत साधन सामुग्री व ग्रंथालयातील निरुपयोगी झालेले ग्रंथ परत विकत घेण्यासाठी ५० टक्के अनुदान मिळू शकते. कायद्यातील नवीन तरतुदी प्रमाणे परिरक्षण अनुदानाचे प्रमाण ५० टक्के वरुन ७५ टक्के पर्यंत वाढविले आहे. याप्रमाणे वरील खर्चावरही ७५ टक्के अनुदान द्यावे व यासाठी कायद्यामध्ये आवश्यक ती तरतूद करावी.

**सूचक : श्री दि. वि. कळवळे, पुलगांव**

**अनुमोदक : श्री. मु. श. औरंगाबादकर, नाशिक**

**ठराव क्र. ४ :**

ज्या वाचनालयांना इमारती बांधण्यासाठी जागा हवी असेल अशा वाचनालयांना स्थानिक स्वराज्य संस्थानी व शासनाने अशा जागा विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच जी वाचनालये सरकारी मालकीच्या अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतीत असतील त्या इमारती वाचनानयाकडे विनामूल्य वर्ग करुन द्याव्यात अशी संबंधितांकडे या संमेलनाची मागणी आहे.

**सूचक : श्री. केशवराव पाटील, भुसावळ**

**अनुमोदक : श्री. ह. र. देशपांडे, जळगांव**

**ठराव क्र. ५ :**

ग्रंथालय चळवळीला गति प्राप्त व्हावी, ग्रंथालयाचे जाळे प्रस्थापित व्हावे व गांव तेथे ग्रंथालय हे घोषवाक्य प्रत्यक्षात उतरावे ही गोष्ट सर्वमान्य आहे. एवढेच नव्हे तर ‘गाव तेथे

ग्रंथालय' ही काळाची गरज आहे, असे म्हणावे लागले. ही गरज पूर्ण करण्याची जबाबदारी एकट्या शासनाची आहे, असे मानून चालणार नाही, तर आपणही हे आपले अंगीकृत कार्य आहे या दृष्टीने कार्यप्रवण, व्हावयाला हवे. ग्रंथालय चळवळीतील ग्राम ग्रंथालय संघ, तालुका ग्रंथालय संघ, जिल्हा ग्रंथालय संघ, विभाग ग्रंथालय संघ, राज्य ग्रंथालय संघ ही त्रीस्तरीय जडण घडण संघटनात्मक दृष्ट्या अधिक घट्ट करण्यात सर्वांनी प्रयत्नशील राहण्याची गरज आहे. आज आपले विभाग व जिल्हा संघ कार्यक्षम करणे, वाचनालय सेवा शहरात अधिक समर्थ करणे, वाचनालय सेवा ग्रामिण भागात पोचविण्याचे कार्य हाती घेणे, राज्य संघटनेचा प्राथमिक दुवा प्रभावी करणे यासाठी कार्यकर्त्यांनी आपले लक्ष केंद्रीत करावे आणि ही चळवळ सर्व थरातून वाढवावी. या किमान कार्यक्रमास येथील प्रत्येक कार्यकर्ता प्रतिज्ञाबद्ध होत आहे.

**सूचक : श्री. द. दा. काळे, ठाणे**
**अनुमोदक : श्री. ना. वि. देशपांडे, औरंगाबाद**

**ठराव क्र. ६ :**

शासनाच्या ग्रंथ निवड समितीने सूची तयार करतांना त्यात दलित साहित्याचा अवश्य विचार करावा.

**सूचक : श्री. वि.रा. घैसास, मुंबई**
**अनुमोदक : श्री. स. सौ. जोग, मुंबई**

**ठराव क्र. ७ :**

ग्रंथालय संचालकांनी जिल्हा व तालुका वाचनालयांना पत्र क्र. १२३२२ – १२५४२ दि. १३–१२–७५ पाठवून असे सुचविले आहे की, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाची प्रकाशने जी प्रकाशने ग्रंथालयांत नसतील ती, संचालनातर्फे अनुदानाचा भाग म्हणून पुरविण्यात येतील. ही सभा ग्रंथालय संचालकांना अशी विनंती करते की, त्यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाची प्रकाशने अनुदानाव्यतिरिक्त विशेष अनुदान म्हणून पुरवावीत व त्यासाठी अनुदानाची रक्कम कमी करु नये.

**सूचक : श्री. ना. वि. देशपांडे, औरंगाबाद**
**अनुमोदक : श्री. मा. ग. पातकर, कोल्हापूर**

**ठराव क्र. ८ :**

ग्रंथालय चळवळीच्या विस्तारासाठी तालुका हा प्राथमिक घटक ठरवून त्याला शासनाने मान्यता द्यावी व तालुका संघास शासनाने अनुदान सुरू करावे. अशा आशयाचा ठराव महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सांगली येथे मंजूर झाला आहे. परंतु अद्याप शासनाने तालुका ग्रंथालय संघास मान्यता दिलेली नाही व अनुदानही दिलेले नाही. तरी शासनाने याबाबत त्वरीत निर्णय घेऊन तालुका ग्रंथालय संघास त्वरीत मान्यता व अनुदान देणेबाबत कार्यवाही करावी असे हे संमेलन शासनास विनंती करीत आहे.

**सूचक : श्री. नारायण जमदाडे, माढा**
**अनुमोदक : श्री. विलास शहा, सोलापूर**

**ठराव क्र. ९ :**

प्रतिवर्षी ग्रंथालय संमेलनामध्ये जे ठराव मंजूर केले जातात ते ठराव संबंधितांकडे कार्यवाहीसाठी पाठविले जातात. परंतु पुष्कळ ठरावांवरील कार्यवाही झालेली नाही, असे स्पष्टपणे दिसत आहे. यामुळे ग्रंथालयीन चळवळीवर अनिष्ट परिणाम होत आहे. शिवाय ठरावांची पुनरावृत्तीही करावी लागते.

या एकूण वस्तुस्थितीबद्दल हे संमेलन खेद व्यक्त करुन असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त करीत आहे की संबंधितानी ठरावातील तांत्रिकदृष्ट्या नव्हे, तर विधायक दृष्ट्या कार्यवाही करण्याची भूमिका ठेवावी.

**सूचक : श्री. राम दसरे, अहमदनगर**
**अनुमोदक : श्री. मु. शं. औरंगाबादकर, नाशिक**

**ठराव क्र. १० :**

ज्या विभागांत सार्वजनिक ग्रंथालये काढण्यांत जनता पुढाकार घेत नाही. त्या भागात शासनाचे वतीने ग्रंथलये उघडली जातील. असे आश्वासन ग्रंथालय कायद्यात दिलेले आहे. पुणे, मुंबई सारख्या शहरांतून झोपडपट्टीतून आर्थिक व सांस्कृतिक उद्धार करण्यासाठी शासनाचे वतीने झोपडपट्यातून स्वखर्चाने सार्वजनिक ग्रंथालये चालवावीत अशी विनंती हे संमेलन ग्रंथालय संचालकांना करीत आहे.

**सूचक : श्री. ग.ल. पवार, पुणे**
**अनुमोदक : श्री. सी.सी. मेश्राम, नागपूर**

**ठराव क्र. ११ :**

महाराष्ट्र राज्यातील सर्व सार्वजनिक सरकारमान्य ग्रंथालयांमध्ये एकसूत्रता यावी म्हणून ग्रंथालय संचालनालयाने एक आदर्श नमुना नियतावली तयार करावी. (स्थानिक सोयी नुसार तिच्यात आवश्यक ते फेरफार करण्याचा अधिकार ग्रंथालयांना राहील.) महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक सरकारमान्य ग्रंथालयांना दैनंदिन कामकाजात सुसूत्रपणा करण्यासाठी, आर्थिक व्यवहारामध्ये सुसंवादित्व निर्माण होण्यासाठी, ग्रंथालय कायदा व नियम यांच्या आधारे ग्रंथालय संचालनालयाकडून मार्गदर्शक परिपत्रके वारवांर निघणे आवश्यक आहे. अशी परिपत्रके काढून ग्रंथालय संचालनालयाकडून याबाबत मार्गदर्शन करावे असे हे संमेलन सुचवीत आहे.

**सूचक : श्री. हरीभाऊ कुलकर्णी, श्रीरामपूर**

**अनुमोदक : श्री. पा. दि. देशपांडे, यवतमाळ**

**ठराव क्र. १२ :**

महाराष्ट्र राज्यांतील सुजाण, सुसंस्कृत जीवनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ग्रंथालय संघांच्या मतदार संघाला स्थानिक स्वराज्य संस्था माध्यमिक शिक्षक व पदवीधर मतदार संघ याप्रमाणेच महाराष्ट्र विधान परिषदेवर प्रतिनिधीत्व मिळावे अशी या संमेलनाची राज्य शासनाकडे विनंती आहे.

**सूचक : श्री. तुकाराम नाईक, सावंतवाडी**

**अनुमोदक : श्री. एस. आर. नाईक, सावंतवाडी**

**ठराव क्र. १३ :**

ग्रंथालय कर्मचारी वेतनश्रेणी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असल्याचे समजते. शासनाने सदर अहवालावर त्वरित निर्णय घेऊन वेतनश्रेणी संबंधी फेब्रुवारी ७६ च्या अंदाजपत्रकी अधिवेशात निश्चित निर्णय जाहीर करावा.

**सूचक : श्री. हरिभाऊ कुलकर्णी, अहमदनगर**

**अनुमोदक : श्री. पा. दि. देशपांडे, यवतमाळ**

**ठराव क्र. १४ :**

ग्रंथालय कायदा आल्यानंतर जी अनुदान संहिता १९७६ साली तयार करण्यात आली त्यावेळच्या वर्तमानपत्रे, मासिके, फर्निचर व इतर वस्तूंच्या किमतीत भरमसाट वाढ झाली आहे. ही तफावत अडीच पटीने वाढली असल्यामुळे अनुदानांची सध्याची कमाल मर्यादा अडीच पटीने वाढविण्यात यावी. तसेच 'ड' वर्गातील वाचनालयांना जी सध्यांची वर्तमानपत्राची अट आहे. ती अट वर्तमानपत्रांच्या वाढीव किंमती लक्षात घेऊन शिथिल करावी.

**सूचक : श्री. ब. ना. केसकर, सोलापूर**

**अनुमोदक : श्री. राम दसरे, अहमदनगर**

**ठराव क्र. १५ :**

महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियमांखाली ग्रंथालयांना इमारतीसाठी मिळणाऱ्या अनुदानात वाढ करावी. 'अ' वर्ग ग्रंथालयांना रुपये ७५,००० ऐवजी,रु. १,००,००० व 'ब' वर्ग ग्रंथालयांना रु. ४८,००० ऐवजी रु. ६०,००० इतके कमाल अनुदान द्यावे असे राज्य ग्रंथालय परिषदेने ठरविलेले आहे. पंरतु हे वाढीव अनुदान शासनाने अद्यापही लागु केलेले नाही, असे समजते. बांधकामाच्या खर्चामध्ये झालेली वाढ ग्रंथालयांना जाचक होत आहे.ती अडचण दुर करावी या हेतूने राज्य ग्रंथालय परिषदेने केलेला हा ठराव अत्यंत आवश्यक असून महाराष्ट्र शासनाने तो त्वरीत मान्य करावा व त्याप्रमाणे वाढीव इमारत अनुदान त्या त्या वर्गाच्या ग्रंथाला मिळावे अशी संमेलनाची तातडीची विनंती आहे.

**सूचक : श्री. वि.ग. नाईक, वेंगुर्ला**

**अनुमोदक : श्री. पी. डी. नाईक, सावंतवाडी**

**ठराव क्र. १६ :**

हल्ली काही नगरपालिका वाचनालयात येणारे साहित्य उदा. वाचन साहित्य, फर्निचर, स्टेशनरी, इत्यादी यांचेवर जकात कर वसूल करतात. वास्तविक पाहता वाचनालयात ज्ञानदानाची कार्ये होत असतात. तेथे कोणत्याही प्रकारची व्यापारविषयक अशी उलाढाल होत नाही. तरी वरील बाबींचा विचार करुन ज्या संस्था अशा प्रकारचा कर वसूल करीत असतील त्यांना महाराष्ट्र शासनाने ग्रंथालयांकडून कोणत्याही प्रकारचा कर वसुल न

करण्याबद्दल कळवावे. व हा ठराव स्थानिक स्वराज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा.

**सूचक : श्री. केशवराव पाटील, भुसावळ**

**अनुमोदक : श्री. जी. एम. कपोते.**

**ठराव क्र. १७ :**

कामगारांच्या शिक्षणाची निकड लक्षात घेऊन कारखान्यांचे आवारांत वाचनालयाची सोय ज्या संस्थानी केली आहे अशा संस्थाना शासनाने, अनुदान पात्र ठरविण्याचा आदेश ग्रंथालय संचालकांस त्वरीत द्यावा. वाचंनामुळे कामगारांची बौद्धिक पातळी वाढून त्यांना आपल्या राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव होईल.

**सूचक : श्री. वि.स. पटवर्धन, मुंबई**

**अनुमोदक : श्री. ल. रा. म्हापसेकर**

**ठराव क्र. १८ :**

उच्च माध्यमिक विद्यालयांस उच्च वर्गांना शिकवणाऱ्या शिक्षकांना तसेच ग्रंथालयाचे जादा काम करणाऱ्या शिक्षकांना त्या कामाचा मोबदला म्हणून जादा वेतन दिले जाते. त्या प्रमाणेच उच्च माध्यमिक विभागासाठी सर्वांगीण ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या ग्रंथपालाससुद्धा जादा वेतनाची सोय करण्यात यावी. हे वतेन कमीतकमी रु. ५० इतके असावे.

**सूचक : श्री. स. पं. शेवडे, अहमदनगर**

**अनुमोदक : श्री. भ. द. शिंदे, सांगली**

**ठराव क्र. १९ :**

माध्यमिक विद्यालयांत ५०० विद्यार्थी संख्येपर्यंत पूर्णवेळ ग्रंथपालांची नेमणूक करावी. तसेच पुढील दर ५०० विद्यार्थ्यांच्या वाढीव संख्येमागे एका सहाय्यक ग्रंथपालाच्या नेमणूकीस सरकारने मान्यता द्यावी.

**सूचक: श्री.रा. पं. शेळके, अहमदनगर**

**अनुमोदक : श्री. अशोक करंदीकर, मालाड**

**ठराव क्र. २० :**

लोकमान्य टिळक वाङ्मयाचे ७ खंड केसरी मराठा संस्थेने प्रकाशित केलेले आहेत. लोकमान्यांचे समग्र वाङ्मय प्रत्येक वाचनालयात असणे आवश्यक असल्यामुळे सदरचे ७ खंड माननीय ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्रातील सर्व वाचनालयांना मोफत देण्याची व्यवस्था करावी अशी विनंती माननीय ग्रंथालय सहाय्यक संचालक महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली.

**सूचक : श्री. रा. ना. चव्हाण, वाई**
**अनुमोदक : श्री. शं. त्रि. चालेकर, अमरावती**

**ठराव क्र. २१ :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचा एक घटक मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ याने अत्यंत परिश्रम पूर्वक खटपट करुन औरंगाबादचे स्वतःचे मालकीचे 'ग्रंथालय सदन' उभारले. या त्यांच्या उपक्रमाबद्दल हे संमेलन त्या संघाचे हार्दिक अभिनंदन करीत आहे. नियमातील काही तांत्रिक अडचणीमुळे शासनाने या विभागाच्या इमारतीसाठी योजनेत दर्शविलेले अनुदान अद्याप मंजुर केले नाही. विभाग ग्रंथालय संघाला मान्यता देऊन ही तांत्रिक अडचण शासनाने दूर करावी, व हे होईपर्यंत विशेष बाब म्हणून राज्य परिषदेने ठरवलेले अनुदान या विभाग ग्रंथालय संघाला द्यावे, अशी मागणी हे संमेलन शासनाकडे करीत आहे. कारण हे अनुदान इतर संघानाही प्रोत्साहनपर ठरणार आहे.

**सूचक : श्री. वा. वि. भट, मुंबई**
**अनुमोदक : श्री. मु. शं. औरंगाबादकर, नाशिक**
**श्री. अ. ल. लिमये, नागपूर**

**ठराव क्र. २२ :**

ग्रंथालय कायद्याच्या ग्रंथालय संघ विषय सध्याच्या नियमावलीमध्ये महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ व जिल्हा ग्रंथालय संघ हे दोनच स्तर मान्यता प्राप्त ठरविण्यात आलेले आहेत. वस्तुतः महाराष्ट्राची ग्रंथालयीन चळवळीची सुरूवात व बांधणी प्रारंभापासून मुख्यत्वे विभाग ग्रंथालय संघानीच केली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता त्यांची मान्यता व अनुदान पात्रता

मुळातच नाकारणे अन्याय व चळवळीला हानीकारक आहे. गेल्या ५–७ वर्षाचा कार्यांचा अनुभवही हेच स्पष्ट करीत आहे. ग्रंथालय कायद्याचा जो मसुदा संमत करण्यात आला त्यातही 'राज्य संघ, विभाग संघ व इतर ग्रंथालय संघ यांना ग्रंथालय संचालकांनी मान्यता द्यावी.' असा अधिकार त्यांना देण्यात आलेला आहे. (पहा: कायदा मसुदा प्रकरण ३ कलम ९ डी) या कायद्याच्या आधारे नियमावली तयार करतना विभागीय ग्रंथालय संघाचा स्तर वगळण्याची जी त्रुटी राहिली ती काढून टाकून महाराष्ट्रातील जिल्हा ग्रंथालय संघाप्रमाणेच राज्य ग्रंथालय संघानाही मान्यता देण्यात यावी व त्यांना ग्रंथालय अनुदान संहितेत स्थान द्यावे अशी मागणी हे संमेलन शासनाकडे आग्रहपूर्वक करीत आहे.

**सूचक : श्री. वा. वि. भट, मुंबई**

**अनुमोदक : श्री. प्र. वा. खुपरेकर**

**ठराव क्र. २३ :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या घटनेतील विभाग ग्रंथालय संघाचे स्थान व महत्त्व व याबाबतीत गेल्या काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता शासनाने संमत केलेल्या ग्रंथालय कायद्याचे मसुद्यात व नियमावलीत काही मूलगामी बदल करणे अवश्यक झालेले आहे, असे या संमेलनाचे मत आहे. हे बदल कोणते असावेत हे ठरविण्यासाठी हे संमेलन खालील प्रमाणे समिती नेमीत आहे.

१. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष (१)
२. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष, कार्योपाध्यक्ष, कोपाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह व कार्यवाह हे सर्व पदाधिकारी (७)
३. व्यवस्थापक मंडळाने नियामक मंडळातून स्विकृत केलेले ५ पर्यंत पदाधिकारी (५)

संघाचे प्रमुख कार्यवाह हे या समितीचे कार्यवाह व निमंत्रक राहतील. या समितीने आजपासून ६ महिन्याच्या अवधीत (जुन १९७६ अखेर) आपल्या शिफारशी तयार कराव्यात व आपल्या प्रतिनिधीमार्फत राज्य संघातर्फे त्या राज्य ग्रंथालय परिषदेपुढे मांडून समंत करुन घेण्याची कोशीस करावी. असा आदेश त्यांना द्यावा असे संमेलन ठरवीत आहे.

**सूचक : श्री. वा. वि. भट, मुंबई**

**अनुमोदक : अ. ल. लिमये, नागपूर**

**ठराव क्र. २४ :**

मराठवाडा विभाग पूर्व हैद्राबाद राज्यात असताना जमा झालेल्या ग्रंथालय कराची रुपये ६४,००० रक्कम हैद्राबाद राज्य सरकारने महाराष्ट्र शासनाच्या सर्वसामान्य निधीत जमा केली आहे. ही रक्कम केवळ मराठवाड्याचीच आहे. जरी महाराष्ट्र सरकार प्रतिवर्षी रु.२५,००,००० हुन अधिक रक्कम ग्रंथालय निधीसाठी उपयोगात आणत असले तरी ती संबंध महाराष्ट्रासाठी आहे. म्हणून वेगळी अशी रक्कम खास मराठवाड्यासाठी दिली जात नाही. यास्तव शासनाने कोणतीही कारण मीमांसा पुढे न करता आणि कायद्याचा बगडा न दाखवता रु. ६४,००० विनाविलंब देणगी रुपाने मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाच्या इमारतीला द्यावेत तसेच ज्या ज्या वाचनालयांनी आणि ग्रंथालय संघानी ह्या इमारत निधीला देणगी दिलेली आहे आणि यापुढे देतच राहतील ती रक्कम अनुदान प्राप्त खर्चात धरण्यात यावी.

**सूचक : श्री. व. ग. सुर्यवंशी, उस्मानाबाद**
**अनुमोदक : कृष्णराव जगताप, तुळजापूर**

**ठराव क्र. २५ :**

ट्रस्ट फंडात वर्गणी रक्कम भरण्याबाबत सर्व शासनमान्य वाचनालयांना शासनाने सुट दिली आहे. असे असुनही शासनमान्य वाचनालयांकडे ट्रस्ट फंडात वर्गणी रक्कम भरण्याबाबत असि. चॅरिटी कमिशनर यांनी नोटिशी काढल्या आहेत व वर्गणी रक्कम भरण्याबद्दल तगादा लावला आहे. तरी शासनमान्य वाचनालयास ट्रस्ट फंडात वर्गणी रक्कम भरण्याबाबत सूट देण्यात आली आहे. हे सर्व असि. चॅरिटी कमिशनर्स यांना शासनाने कळवावे अशी परिषदेची आग्रहाची विनंती आहे.

**सूचक : श्री. मा. ग. पातकर, कोल्हापूर**
**अनुमोदक : श्री. प. हेंद्रे, पनवेल**

**ठराव क्र. २६ :**

ग्रंथालय कायद्यान्वये ग्रामिण भागात ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी साखळी योजनेचा स्विकार केला आहे. यासाठी जिल्हा व तालुका वाचनालयांना इतर वाचनालयापेक्षा

अधिक अनुदान देण्याची तरतुद केली आहे. या तरतुदीनुसार जी जिल्हा व तालुका वाचनालये सेवा उपलब्ध करुन देण्यास तयार नसतील तर त्यांच्या जागी जी वाचनालये साखळी योजनेनुसार इतर वाचनालयात ग्रंथ देवघेव करण्यास तयार असतील अशा वाचनालयांना जिल्हा व तालुका वाचनालय म्हणून मान्यता देण्यात यावी. तसेच या वाचनालयांनी आतापर्यंत मिळणाऱ्या अधिक अनुदानातून घेतलेली पुस्तके अगर ग्रंथ खरेदी न केल्यास जी रक्कम वाचनालयास मिळाली असेल ती त्या त्या नवीन ग्रंथालयास देण्यात यावी.

**सूचक : श्री. प्रभाकर नवरे, राजापूर**

**अनुमोदक : श्री. द. शिंदे, सांगली**

**ठराव क्र. २७ :**

ग्रंथालय संचालकांनी पत्र क्र. १२५४३–१२७६३, दि. १३–१२–७५ नुसार जिल्हा व तालुका वाचनालयांची अनुदाने नियम १८ अन्वये,

१. ग्रंथालयाने वाचनाची आवड निर्माण करणे.

२. इतर सार्वजनिक ग्रंथालयांना उसनवारीने पुस्तके देणे.

३. ग्रंथालय सेवेच्या प्रचारार्थ इतर सार्वजनिक ग्रंथालयांना सहाय्य व मार्गदर्शन करणे ही काम समाधानकारक न केल्यामुळे चालू वर्षी रुपये ५०००–२००० अनुदान कमी करण्याचे ठरविले आहे. वस्तुतः शासनातर्फे साखळी योजनेसाठी आवश्यक ते मार्गदर्शक नियम अद्याप केलेले नाहीत. इतकेच नव्हे तर तज्ञ सेवक वर्ग असण्यासाठी ग्रंथालय संघाने ज्या वेतन श्रेणीचा सातत्याने पाठपुरावा केला तोही प्रश्न गेल्या ३ वर्षापासून अनिर्णित राहिला आहे. या सर्व प्रश्नांत ग्रंथालयीन कार्यकर्त्यांनी अनेक वेळा मा. संचालक यांच्याबरोबर चर्चाही केली आहे. तेव्हा ही सभा मा. ग्रंथालय संचालकांना अशी अग्रहाची विनंती करते की त्यांनी चालू वर्षी कोणत्याही प्रकारे अनुदानात कपात करु नये व यासाठी ग्रंथालय संघाच्या प्रतिनिधी बरोबर चर्चा करुन नंतरच याचा विचार करावा.

**सूचक : श्री. ना. वि. देशपांडे, औरंगाबाद**

**अनुमोदक : श्री. अ. ल. लिमये, नागपूर**

संमेलनात पारीत केलेल्या ठरावातील विषयांचे विविधांगी स्वरुप स्पष्ट तर होतेच शिवाय ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांचा वैचारीक बैठकीवर आधारीत दृष्टीकोन स्पष्ट तर होतोच शिवाय या चळवळीविषयी या सर्वांची आस्था लक्षात येते.

**नाशिक येथील अधिवेशन :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालयाचे लक्षवेधी अधिवेशन हे नाशिक मध्ये दि. २२ व २३ मार्च १९८० रोजी भरलेले होते. या अधिवेशनाचे अध्यक्षपद प्रा. ग.प्र.प्रधान यांनी भूषविलेले होते. तर उद्घाटन कविवर्य कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर यांनी तर स्वागताध्यक्ष नाशिक सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष वि.म.गोगटे हे होते. या प्रसंगी आपल्या उद्घाटनपर भाषणात कविवर्य कुसुमाग्रज यांनी ग्रंथालय चळवळी विषयक काढलेले उद्गार ग्रंथालय चळवळीच्या दृष्टिने लक्षवेधी होते. त्यांच्या भाषणातील काही महत्वपूर्ण विचार,

'वस्तुत: ग्रंथालय चळवळ ही या मातीतील नाही, पाश्चिमात्य आहे. आपल्याकडील राजे – राजवाड्यात पूर्वी ग्रंथसंग्रह होते. उदाहरणादाखल सांगायचेच म्हणजे तंजावरचा ग्रंथसंग्रह. हे वाडेबंद ग्रंथसंग्रह लोकांकरिता खूले केले गेले. या ग्रंथालयाचे रुपांतर वाचनालयात झाले. वाचनालयाची कल्पना प्रथम युरोपात होती. नंतर आपणाकडे आली. त्याकाळचा आपला समाज अंधश्रद्धाळू होता. त्यात नविन जाणीवा निर्माण करण्यासाठी वाचनालयासारख्या संस्था आवश्यक होत्या. नवा विचार प्रसिद्ध करण्यासाठी वेगवेगळ्या संस्था आवश्यक होत्या. तशा संस्था त्या काळी निघाल्याही. ज्ञानाच्या कक्षा रुंदावत होत्या. नव्या जाणीवांचे, नव्या विचारांचे प्रक्षेपण समाजापर्यंत पोचविण्यासाठी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक प्रकारच्या संस्था निर्माण झाल्या. वाचनालयेही त्यातून निर्माण झाली.'

'ग्रंथालय चळचळीचे महत्त्व याच ठिकाणी आहे. समाज शिक्षणाचे शतकापूर्वीचे उद्दिष्ट आजही या चळवळीपुढे असायला हवे.'

'ग्रंथ ही एक अशी गोष्ट आहे की जी माणसाशी प्रत्यक्ष संबंध जोडते. ग्रंथालय चळवळीचे ध्येय म्हणून आजच्या काळात लक्षणीय आहे. निर्णायक असे काही घडवण्यासाठी ग्रंथालय चळवळ हे महत्त्वाचे शाश्वत आहे.'

‘रानडे, फुल्यांसारखी माणसे – कार्यकर्ते या चळवळीला लाभले तर ही चळवळ पुढे जाईल. देश पुढे जाईल. या क्षेत्रातील माणसांनी ही जाणीव ठेवली तर हे कार्य होईल.’

ग्रंथालय चळवळी निराशेच्या गर्दीत कार्यरत असताना या चळवळीला एक शैथिल्य प्राप्त झाले होते. त्यावेळी तात्यासाहेब शिरवाडकरांचे ग्रंथालय चळवळीविषयक तेजस्वी विचार चळवळीच्या कार्यकर्त्यांना स्फुर्ती देऊन गेले. आपल्या अध्यक्षीय भाषणात थोर विचारवंत आमदार ग.प्र.प्रधान यांनी उपस्थिताना संबोधीत करताना–

‘ग्रंथालय चळवळ हा शिक्षण प्रसाराचा एक महत्त्वाचा भाग आहे, याची जी जाणीव बंगाल शासनाने दाखविली आहे ती अभिनंदनीय आहे.’

‘एका बाजूस ग्रंथालय चळवळ वाढली पाहिजे अशी अपेक्षा करावयाची आणि दुसरीकडे ग्रंथालय सेवकांची उपासमार चालू रहावयाची. ही परिस्थिती अत्यंत आक्षेपाहार्य आहे. ग्रंथालय चळवळीबद्दल आस्था बाळगणाऱ्या सर्व समाजधुरीणांनी शासनावर या बाबतीत दडपण आणून ग्रंथालय चळवळीचे पुनरज्जीवन करणे आवश्यक आहे.’

‘आजच्या विकासयुगात त्यावेळेपेक्षा ज्ञान कितीतरी समाजात अधिक समृद्ध झाले आहे. अशा वेळी लोकांपर्यंत नविन ज्ञान व नविन विचार जाण्यासाठी आणि समाज स्वतंत्र विचार करण्याची प्रवृत्ती प्रत्येकाला होण्यासाठी ग्रंथालय चळवळीची नव्या जोमाने उभारणी केली पाहिजे. या कामात निष्ठेने सहभागी व्हावे असेही कळकळीचे आवाहन करतो. मला विश्वास आहे की शासन या बाबतीत जबाबदारी अधिकाराने पार पाडील. असे अशासकीय व शासकीय प्रयत्न नेटाने सुरू झाल्यास मराठी वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळेल आणि ग्रंथालय चळवळ ही प्रबोधनाच्या चळवळीचे साधन बनेल.’

अशा तळमळीच्या आवाहानानंतर प्रत्यक्ष ग्रंथालय चळवळीच्या कामकाजात दाखल होण्यापूर्वी ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रा. प्रधान यांच्या भाषणातून एक उर्जा प्राप्त झाली. या अधिवेशनात पारित झालेले लक्षवेधी ठराव –

**ठराव क्र. ३ :**

अ) ग्रंथालयीन सेवकांच्या वेतन श्रेणीचा प्रश्न विनाविलंब सुटला पाहिजे. शासकीय, निमशासकीय व महामंडळे यांच्या सेवकांचे वेतन विषयक प्रश्न सुटतात त्याच पोटतिडकीने

किंबहूना अग्रहक्काने हा प्रश्न सुटावा. राज्य ग्रंथालय संघाने तातडीचा व अग्रहक्काचा प्रश्न म्हणून हा हाती घेऊन शासनाकडे मागणी करुन ती मिळविण्याचा विनाविलंब प्रयत्न करावा.

ब) ग्रंथालय चळवळीच्या विकासात ग्रंथालय सेवकाचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेता ग्रंथालयाचे व्यवस्थापनात ग्रंथालय सेवकांना योग्य ते प्रतिनिधीत्व देता येईल का? याचा विचार व्हावा.

क) ग्रंथालय कायद्यात संस्थांना आधार मिळाला परंतु ग्रंथालय सेवकांना सेवा शाश्वती निवृत्ती वेतन, रजा आदि सेवासवलतीपासून वंचीत ठेवले. तसे ठेवले जाऊ नये. सेवाविषयक हक्क व सवलती त्यांना सरकारी नियमाप्रमाणे मिळाव्यात, तसेच त्यांना कायद्याचे संरक्षण मिळावे.

ड) ग्रंथालय सेवकांनी प्रभावी संघटना बांधण्यासाठी राज्य ग्रंथालय संघाने पुढाकार घ्यावा व तसे प्रयत्न करावेत.

इ) महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने सेवकांच्या वरील प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधावे. याबाबतीत सहा महिन्यात काहीच प्रतिसाद मिळाला नाही तर ग्रंथालय सप्ताहात महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालये एक दिवस बंद ठेवावीत . असा आदेश हे अधिवेशन देत आहे.

**सूचक : श्री. मु. श. औरंगाबादकर**

**अनुमोदक : श्री. मा. ग. पातकरें**

**ठराव क्र. ४ :**

महाराष्ट्रातील थोर ज्ञानोपासकांनी ग्रंथालय चळवळ सुरू केली. त्यांच्या प्रयत्नाना अनेकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. आणि वाचकांच्या अडचणींवर सुसंस्कार करण्याचे कार्य अनेक गावातून सुरू झाले. स्वातंत्र्योत्तर काळात नवा वाचक वर्ग मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आणि या चळवळीची जबाबदारी वाढली.काही प्रमाणात ग्रंथालय चळवळीची व्याप्ती वाढली, हे खरे असले तरी गेल्या काही वर्षात ही चळवळ समाजाच्या अपेक्षा पुर्ण करु शकली नाही. अशा परिस्थितीत सर्व कार्यकर्त्यांनी व ग्रंथालयातील सेवकांनी एकत्र येऊन

या चळवळीत नवचैतन्य निर्माण करुन त्याची संपूर्ण योजना व्यवस्थापक मंडळाने लवकरात लवकर तयार करुन कार्यकर्त्यांच्या विचारार्थ प्रस्तुत करावी. नव्या जोमाने या चळवळीला गतिमान बनविण्यासाठी विचारपुर्वक पाऊल उचलावे असे कळकळीचे आवाहन हे अधिवेशन करीत आहे.

**सूचक : श्री. वसंत पाध्ये**

**अनुमोदक : श्री. राम दसरे**

या अधिवेशनात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय कायदा अस्तित्वात आल्यापासून संघटनांचे अनुदान विषयक नियम, याविषयी प्रस्थापित त्रुटी व एकूणच विसंगती याचा शोध घेऊन त्याबद्दलचे निवेदन राज्य शासनाकडे सादर करण्यासाठी संघटनेच्या वतीने एक दहा सदस्य असलेली समिती नेमण्यात आलेली होती. यात समितीचे निमंत्रक श्री. मुरलीधर गंधे हे होते. या समितीने आपला अहवाल वजा लेख प्रस्तुत अधिवेशनातील स्मरणीकेमध्ये प्रकाशित करण्यात आला होता. या लेखामध्ये राज्य ग्रंथालय परिषद प्रकरण – पाचवे, ग्रंथालय समित्या नियम प्रकरण – तेरावे, जिल्हा ग्रंथालय समिती, वित्त आणि हिशोब, मान्यतेचे कायदे, अनुदान विषयक नियम या विषयक अशी विविध मुद्यावर चर्चात्मक सुचना करण्यात आलेल्या आहेत. अशा स्वरुपात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय समितीचे कार्य सुरू ठेवून ही चळवळ अधिक बळकट करण्यासाठी विविध ठिकाणच्या अधिवेशनात चर्चा होते.

पुढे ४३ वे अधिवेशन सावंतवाडी येथे १० व ११ जानेवारी १९९८ मध्ये आयोजित केले होते. पुढे मालेगाव, दापोली, पुणे अशा विविध ठिकाणी अधिवेशन संपन्न झाले. प्रत्यक्षात आजवर या चळवळीच्या प्रयत्नास अपेक्षित यश प्राप्त झालेले नसले तरी देखील ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी सर्वच विभागातील जिल्हा ग्रंथालय संघ, विभागीय ग्रंथालय संघ, जनजागृतीचे कार्य जोमाने चालू ठेवत आहेत. ही बाब विशेष लक्षणीय आहे. या राज्यात कार्यरत असणाऱ्या विभागीय संघाबरोबरच नाशिक जिल्हा ग्रंथालय संघ, पुणे, चंद्रपुर जिल्हा ग्रंथालय संघ, ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ, सिंधुदुर्ग जिल्हा ग्रंथालय संघ, रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ, कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सांगली जिल्हा ग्रंथालय संघ, उस्मानाबाद जिल्हा ग्रंथालय संघ, यवतमाळ जिल्हा ग्रंथालय संघ, पुणे जिल्हा

ग्रंथालय संघ, धुळे जिल्हा ग्रंथालय संघ अशा सर्व जिल्ह्यातून ग्रंथालय चळवळ बळकट करण्याचा प्रयत्न करण्यासाठी सातत्यपूर्वक कार्यकर्ते कार्य करताना दिसत. या संदर्भातील विचार करणारी पुस्तीका सावंतवाडीचे माजी आमदार तसेच ग्रंथालय चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी आमदार स्व. जयानंद मठकर यांनी २०१४ मध्ये प्रकाशित केलेली आहे. या पुस्तीकेत त्यांनी महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीविषयक मांडलेले विचार हे अत्यंत मुलगामी असुन एकूणच महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचे आजवरचे यश अपयश यावर प्रकाश टाकणारे आहेत. या पुस्तिकेतील आंदोलन विषयक उद्दिष्टे व सार्वजनिक ग्रंथालय दृष्टीकोन –

''गाव तेथे ग्रंथालय'' या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रभावी जनआंदोलनाची नितांत गरज आहे. हे आंदोलन राज्य ग्रंथालय संघ आणि राज्य ग्रंथालय कर्मचारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयांच्या लाभार्थीच्या आणि ग्रंथालयप्रेमी नागरिकांच्या सहकार्याने उभारावे लागणार आहे. त्यासाठी आंदोलनाची उद्दिष्टे व दिशा निश्चित करावी लागतील. माझ्या मते ग्रंथालय चळवळीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असावीत.

१) लोकांना उत्कृष्ट आणि कायमस्वरुपी ग्रंथालयीन सेवा उपलब्ध होण्यासाठी प्रतिदिनी किमान आठ तास ग्रंथालय सेवा उपलब्ध असणे आवश्यक आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी अर्धवेळ ग्रंथालये मोडीत काढली जाणे अनिवार्य आहे.

२) लोकांना उत्कृष्ट ग्रंथालयीन सेवा उपलब्ध होण्यासाठी ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मचारी प्रशिक्षीत असावेत. सर्व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना शासनाची ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असावे.

३) ग्रंथालयांचे स्वरुप शैक्षणिक संस्था सदृश्य असल्याने राज्यातील शाळा, महाविद्यालये यातील अध्यापक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामसेवकाप्रमाणे ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची जबाबदारी शासनाने पूर्णपणे स्वीकारावी आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी, सेवा शर्ती, निवृत्ती वेतन उपलब्ध करुन देण्यात यावे.

४) राज्याच्या ग्रंथालय कायद्यात व्यंकप्पा पत्की अहवालातील शिफारशीनुसार कालानुरुप बदल करण्यात यावे.

५) जरुर तर ग्रंथालय कायद्यामध्ये ग्रंथालय कराची तरतूद केली जावी. चांगली ग्रंथालयीन सेवा मिळण्यासाठी लोकांनी ग्रंथालय कराचा भार सोसायची तयारी करायला हवी.

६) कायद्यात दुरुस्ती करुन इतर शासकीय समित्यांप्रमाणे ग्रंथालय परिषदेचा कालावधी पाच वर्षांचा ठरविण्यात यावा. परिषदेची मुदत संपण्यापूर्वी परिषदेवरील निवृत्त सभासदांच्या जागी नवीन सभासदांची नियुक्ती करुन परिषदेची पुनर्रचना करावी. नवीन परिषद अस्तित्वात आल्यावरच पूर्वीची परिषद बरखास्त व्हावी.

ग्रंथालय परिषदेचे स्वरुप सल्लागार स्वरुपी न ठेवता ते अधिक व व्यापक व विस्तारीत करण्यात यावे. ग्रंथालयांना आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व प्रबोधन करणारी परिषद असे तिचे स्वरुप असावे. परिषदेच्यावतीने राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर अगर विभागीय स्तरावर चर्चा, परिसंवाद कार्यशाळा अशा स्वरुपाचे उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा आहे.

७) राज्यस्तरीय ग्रंथनिवड समिती तसेच अन्य समित्या यांचा कालावधी पाच वर्षांचा असावा.

८) राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्यावतीने राज्यातील ग्रंथालयांना विविध स्वरुपात मदत दिली जाते. राज्यशासन यासाठी जेवढे अनुदान प्रतिवर्षी प्रतिष्ठानला देते तेवढीच रक्कम प्रतिष्ठान भरीला घालून राज्यातील ग्रंथालयांना मदत देत असते. ही वस्तुस्थिती विचार घेऊन राज्याकडून कमाल मर्यादेपर्यंत प्रतिष्ठानला अनुदान देणे अपेक्षित आहे.

९) ग्रंथालये सार्वजनिक विश्वस्त कायद्याखाली नोंदविलेल्या शासनमान्य स्वयंसेवी संस्थांकडून ग्रंथालय संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि नियंत्रणाखाली चालविली जावी. स्थानिक स्वराज्य संस्था अगर पंचायत राज संस्था यांनी चालविलेल्या ग्रंथालयांनाही इतर ग्रंथालयाप्रमाणेच शासकीय अनुदान देण्यात यावे व त्यांच्यावरही ग्रंथालय संचालनालयाचे नियंत्रण असावे.

१०) राज्यातील उत्कृष्ट ग्रंथालयाला, ग्रंथालयीन कार्यकर्त्याला आणि ग्रंथपालाला राज्यस्तरीय पुरस्कार प्रतिवर्षी देते तसेच अलिकडे विभागीय स्तरावरही असे पुरस्कार देणे सुरु केले आहे यापैकी राज्यस्तरीय पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ करण्यात यावी.

**ग्रंथालयावरील खर्च ही राष्ट्रीय गुंतवणूक :**

गांव तेथे ग्रंथालयाचे उद्दिष्ट साध्य करुन उत्कृष्ट ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी निधीची तरतूद कशी करावयाची ही शासनाला भेडसावणारी खरी समस्या आहे. ग्रंथालयीन सेवा ही शैक्षणिक स्वरुपाची सेवा असल्याने त्यावर होणारा खर्च ही राष्ट्रीय गुंतवणूक म्हणून केला जाणे आवश्यक आहे. ग्रंथालयीन सेवेवर होणाऱ्या खर्च शासनाने स्वीकारणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शासनाला ही जबाबदारी टाळता येणार नाही. ग्रंथालय कराच्या रुपाने ग्रंथालयासाठी येणाऱ्या खर्चाचा काही भार उचलता येईल.

पण या निमित्ताने एका महत्वाच्या मुद्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घ्यावयाचे आहे. भारतीय घटनेने १४ वर्षे वयोगटापर्यंत शिक्षणाची जबाबदारी शासनावर सोपविली आहे. पण शासनाने पूर्व प्राथमिक आणि उच्चशिक्षणाची जबाबदारी टाळली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने कोठारी आयोगापासून जे शैक्षणिक आयोग नेमले आहेत त्या सर्व आयोगानी शिक्षणावर राष्ट्रीय अगर राज्याच्या एकूण उत्पन्नापैकी ८ टक्के रक्कम खर्च करण्याची शिफारस केली आहे. सर्व विकसित राष्ट्रे शिक्षणावर त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या आठ टक्क्याहून अधिक खर्च करीत असतात. दुर्दैवाची गोष्ट ही आहे की, भारत सरकार शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या तीन टक्केही खर्च करीत नाही. महाराष्ट्र सरकारही याला अपवाद नाही. महाराष्ट्र राज्यात शिक्षणावर राज्याच्या एकूण उत्पन्नापैकी तीन टक्क्याहून कमी खर्च केला जात आहे. जर शिक्षणावरील खर्चात कोठारी आणि अन्य आयोगाच्या शिफारशीनुसार वाढ केली तर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा आर्थिक भार महाराष्ट्र शासनाला सहजरित्या पेलता येईल.

**ग्रंथालयांच्या लाभार्थींची उदासिनता खेदजनक :**

महाराष्ट्र राज्यातील ग्रंथालयांच्या मंदगतीच्या वाटचालीमागील ग्रंथालयांच्या लाभार्थींची उदासीनता हे देखील महत्वाचे कारण आहे. शासन हे ग्रंथालयांचे सर्वाधिक लाभार्थी आहे. शासनाच्या लोकाभिमुख विविध योजना समाजापर्यंत पोहोचविण्याची महत्वाची कामगिरी ग्रंथालये बजावीत असतात. तसेच व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा अशा विविध उपक्रमांची समाज प्रबोधनाचे आणि जागृतीचे कार्य ग्रंथालये करीत असतात. पण याची जाण कार्यकर्त्यांना आणि शासकीय अधिकाऱ्यांना नसावी ही अत्यंत खेदजनक गोष्ट आहे.

वाचनालयाचे दुसरे लाभार्थी लोकप्रतिनिधी म्हणजे आमदार, खासदार, नगरसेवक, जि. प. व पंचायतसमिती तसेच ग्रामपंचायतीचे सभासद असतात. जिल्हा परिषदा, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या चांगल्या कामाची प्रसिध्दी वर्तमानपत्राव्दारा लोकांपर्यंत समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य ग्रंथालये करीत असतात. ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीने जिल्हा नियोजन समितीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्थांच्या सभासदांना ८० टक्के प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात आमदार – खासदार जिल्हा नियोजन समितीचे पदसिध्द सभासद आहेत. जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनात ग्रंथालयासाठी तरतूद करणे अनिवार्य असते. पण आमच्या लोकप्रतिनिधींच्या उदासिनतेमुळे जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनात ग्रंथालयांची गरज विचारात घेऊन पुरेशी तरतूद केली जात नाही. आमदार – खासदारांना त्यांच्या स्थानिक विकास निधीतून ग्रंथालयांच्या इमारती, पुस्तके, फर्निचर, संगणक इत्यादी गरजांसाठी मदत देता येते. अपवादात्मक आमदार–खासदार ग्रंथालयांना मदत करायला पुढे येतात. वाचक हा ग्रंथालयांचा मोठा आधार असतो. वाचकवर्गही ग्रंथालयांबाबत पराकोटीचा उदासिन दिसतो. बहुसंख्य ग्रंथालयाच्या वार्षिक अगर सर्वसाधारण सभा कोरमअभावी तहकूब होत असतात.

साहित्यिक म्हणजे कादंबरीकार, कथालेखन, कवि, नाट्यलेखक, समिक्षक त्याचप्रमाणे प्रकाशन संस्था या ग्रंथालयाच्या सर्वाधिक लाभार्थी आहेत. साहित्यिकांची पुस्तके, तसेच प्रकाशन संस्थांनी प्रसिध्द केलेली पुस्तके यांचे सर्वात मोठे गिऱ्हाईक राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये आहेत. साहित्यिकांची पुस्तके तसेच प्रकाशन संस्थांनी प्रसिध्द केलेली पुस्तके सर्वात अधिक प्रमाणात लोकांपर्यंत – समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये आणि या ग्रंथालयातून अर्धपोटी राबणारा ग्रंथालयीन कर्मचारी करीत असतो. ग्रंथालयीन कर्मचारी सन्मानाने जगू शकला तरच तो प्रभावीपणे, परिणामकारकरित्या आणि कार्यक्षमतेने कार्य करू शकेल याचे भान समाज, वाचक, शासन, साहित्यिक आणि प्रकाशन संस्था यांना नसावे हे खऱ्या अर्थाने सामाजिक दु:ख आहे. साहित्यिक आणि प्रकाशन संस्था अनभिज्ञतेमुळे ग्रंथालय चळवळीपासून अलिप्त राहिल्या आहेत. साहित्यिकांची

आणि प्रकाशन संस्थांची ही अलिप्तता राज्यातील ग्रंथालयांच्या विकासाला मारक ठरली आहे. साहित्यिकांच्या आणि प्रकाशकांच्या संमेलनातून ग्रंथालयांच्या आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समस्यांची आजवर गंभीरपणे दखल घेतली गेली नाही ही आम्हा ग्रंथालयीन चळवळीतील कार्यकर्त्यांना जाचणारी खरी खंत आहे.

अनायसे कोकण मराठी साहित्य परिषदेचे वार्षिक संमेलन आणि अखिल मराठी साहित्य संमेलन दोन्हीही पुढे अनुक्रमे दापोली आणि चिपळूण येथे संपन्न झाली. या दोन्ही संमेलनात या राज्यातील ग्रंथालयांच्या आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना आणि आंदोलनाला सक्रिय पाठींबा देणारे ठराव संमत झाले. या संमेलनाव्दारे राज्यातील साहित्यकांना ग्रंथालयांच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते.

**आंदोलन निर्णायक हवे** :

ग्रंथालयाबाबतची शासनाची आणि समाजाची मानसिकता बदलण्यासाठी आणि ग्रंथालयाबाबत सकारात्मक भूमिका स्विकारायला लावण्यासाठी प्रभावी आणि परिणामकारक आंदोलन ग्रंथालय संघाने राज्य ग्रंथालय कर्मचारी संघाच्या सहकार्याने उभारणे अनिवार्य आहे. तसेच हे आंदोलन समयबध्द कालावधीत उभारले जाणे आवश्यक आहे. हे निश्चित झाल्यावर आंदोलनाचे स्वरुप काय असावे? याबाबत विचारमंथन करुन त्यांचे स्वरुप सर्वानुमते निश्चित केले जाणे आवश्यक आहे.

राज्य ग्रंथालय संघाने आणि राज्य ग्रंथालय कर्मचारी संघाने गेली दहा वर्षे संयुक्तपणे सातत्याने मोर्चे, निवेदने, मंत्र्यांच्या गाठीभेटी इत्यादि मार्गाने आंदोलन केले आहे. पण या कालावधीत कोरड्या आश्वासनाशिवाय राज्यकर्त्यांकडून पदरात काही पडलेले नाही. शिक्षणमंत्र्यांनी या कालावधीत विधीमंडळात आणि विधीमंडळाच्या बाहेरही शंभर टक्के अनुदानात पन्नास टक्के वाढ तीही आगामी वर्षापासून जाहिर करुन दिलेल्या आश्वासनाला जाहिरपणे हरताळ फासून विश्वासघात केला आहे. अशाप्रकारे महाराष्ट्र राज्यातील सर्वच सत्तारूढ पक्षानी या क्षेत्राकडे दुर्लक्ष केलेले आढळते.

महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळात मुंबईत विधीमंडळासमोर हे आंदोलन उभारले जाणे या आंदोलनाचे स्वरुप निर्णायक असावे यासाठी ग्रंथालयांच्या

सर्व लाभार्थींना या आंदोलनात सहभागी करुन घेतले जाणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विधीमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळात शिक्षण खात्याच्या मागण्यावरील चर्चेच्यावेळी मुंबईत सत्याग्रहाच्या स्वरुपात हे आंदोलन उभारले जाते. या कालावधीत राज्यातील सर्व ग्रंथालये बेमुदत बंद ठेवून ग्रंथालये चालविणाऱ्या सर्व सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रतिनिधींनी आणि राज्यातील सर्व ग्रंथालवयीन कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात सहभागी होणे अपेक्षित. अनुदानात शंभर टक्के वाढ करुन ग्रंथालयाचा प्रश्न कदापि सुटणार नाही. ग्रंथालय कायदा झाल्यापासून आजवर शासनाने पाच वेळा अनुदानात शंभर टक्के वाढ निरर्थक ठरली आहे. या पार्श्वभूमीवर शंभर टक्के अनुदान वाढीच्या हव्यासाला आम्ही कायमची मूठमाती दिली पाहिजे. उत्कृष्ट ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व ग्रंथालयांचा दैनिक कार्यकाळ आठ तासांचा करुन सर्व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी व सेवाशर्ती मान्य करुन राज्यातील प्रा. शिक्षक, मा. शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामसेवकाप्रमाणे ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनाची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्विकारावी याबाबत आपल्या आंदोलनाची भूमिका ठाम असायला हवी.

ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनाची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्विकारल्यावर ग्रंथालय कर्मचाऱ्यांवरील आपले नियंत्रण कमी होईल. ग्रंथालयीन कर्मचारी मोकाट होतील ही भीती काही सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहस्था चालकांना भेडसावित आहे. पण ही भीती अनाठायी आहे. आज काही अनुदानीत प्रा. शाळा, सर्व माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये खाजगी संस्था चालवित आहेत. पण त्यांचे शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावरील नियंत्रण संस्थांचे यत्किंचतही कमी झालेले नाही. उलट संस्था चालकाकडून कर्मचाऱ्यावर अन्याय होण्याच्या बाबतीत संस्था चालकावर नियंत्रण रहावे. यासाठी ग्रंथालयावर शासकीय नियंत्रण अनिवार्य आहे.

ग्रंथालये आणि ग्रंथालयीन कर्मचारी यांच्या या अंतिम आंदोलनात ग्रंथालयांच्या सर्व लाभार्थींची सहभागी व्हावे अशी अपेक्षा असते. ग्रंथालय वाचक आणि ग्रंथालयप्रेमी नागरिकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होणे अपेक्षित असते. सर्व जिल्ह्यातील ग्रंथालय

चळवळीतील कार्यकर्त्यांनी आपल्या जिल्ह्यातील आमदाराशी प्रत्यक्ष संपर्क साधून अधिवेशनाच्या काळात विविध वैधानिक आयुधांचा (प्रश्न लक्षवेधी र्चाख स्थगन प्रस्ताव) वापर करुन शासनास जाणीव करुन देणे अपेक्षित आहे. जेष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक पद्मभूषण मा. मधु मंगेश कर्णिक स्वत: आपल्या गावात एक ग्रंथालय चालवितात त्यामुळे ग्रंथालयांच्या आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समस्यांची त्यांना पुरेपूर कल्पना आहे. ग्रंथालय चळवळीच्या उद्दिष्टाशी ते बहुतांशी सहमत आहेत. त्यांनी स्वत: आपल्या इतर मान्यवर साहित्यिकासह अशा आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होऊन या आंदोलनाला साहित्यिकांचे नैतिक पाठबळ प्राप्त करुन देणे अपेक्षित आहे. ग्रंथालयप्रेमी नागरिकांनी तसेच राज्यातील प्रकाशन संस्थांनी या आंदोलनाला यशाशक्ती आर्थिक सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे. प्रत्येक जिल्ह्यातील ग्रंथालयीन कार्यकर्त्यांनी व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी या आंदोलनासाठी संघर्ष निधी गोळा करणे अपेक्षित आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून किमान दहा ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी मागण्याबाबत सकारात्मक निर्णय होईपर्यंत सर्वोतोपरी सक्रीय सहभाग रहाणे गरजेचे आहे. स्व. मठकरसाहेबांचे ग्रंथालय चळवळ विषयक विचार सर्वांनाच प्रेरणा देणारे आहेत. *(स्त्रोत – श्री. जयानंद मठकर, पृष्ठ ६ ते १४)*

**१. विदर्भ ग्रंथालय संघ :**

महाराष्ट्राचा उत्तरेकडील वऱ्हाड्या परिसर आणि एकूणच मध्य प्रेदशातील सलंग्न विभाग या भौगोलिक परिभागात सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे विकसित होऊ लागल्यावर या ग्रंथालयांच्या एकूणच विकासाकरिता व भविष्यातील वाटचालीकरिता या सर्व ग्रंथालयांचे एक संघटन असावे अशी भावना तत्कालीन सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये स्वातंत्र्यपुर्व काळामध्ये दृढ होऊ लागली होती. याच दरम्यान नागपुर येथील राजाराम वाचनालयाचा सुवर्णमहोत्सव १९४५ मध्ये आयोजीत करण्याचे ठरले होते. या सुर्वणमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १४ व १५ ऑक्टोबर १९४५ साली संपन्न झालेल्या समारंभ प्रसंगी प्रस्तुत वाचनालयाच्या उत्साही कार्यकर्त्यांनी मध्य प्रदेश ग्रंथालय परिषदेचे अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक म्हणून सर्वश्रुत असलेले पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी भुषविलेले होते. तर

स्वागतध्यक्ष न्यायमुर्ती वा. रा. पुराणीक होते. या नाविण्यपुर्ण अधिवेशनासाठी मध्यप्रदेशातील विविध क्षेत्रातुन अनेक प्रतिनिधीनीं या अधिवेशनाला उपस्थिती दर्शविली. प्रत्यक्ष डॉ. रंगनाथन यांची उपस्थिती, त्यांचे मौलिक मार्गदर्शन यामुळे पुढील काळात संघटनेच्या स्थापनेच्या दृष्टिकोनातुन विचार दृढमोल होऊन या परिषदेमध्ये मध्य प्रात वऱ्हाड ग्रंथालय संघाची स्थापना करण्याविषयी ठराव पारित करण्यात आला. या ठरावामध्ये संघाच्या कार्यालयाविषयी व ग्रंथपालांना सहाय्य करण्याच्या दृष्टिने सर्वस्तरीय विनंती करण्यात येऊन ग्रंथालयाच्या भविष्यातील वाटचालिकरिता मार्गदर्शन सुचित करण्यात आले होते. यानंतर या संघाची १६ जानेवारी १९४६ रोजी मध्य प्रांत व वऱ्हाड ग्रंथालय संघ या नावाने नोंदणी करण्यात आली. ही नोंदणी संस्था नोंदणी कायद्यानुसार करण्यात आली होती. या संघटनेचे उद्दिष्ट नमुद करताना पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती.

१. ग्रंथालयाचा प्रांतभर प्रसार करणे.
२. ग्रंथालय सेवकाच्या प्रशिक्षणाची सोय करणे व त्यांची परिस्थिती सुधारणे.
३. ग्रंथालयाच्या प्रसारासाठी नियतकालिके काढणे व पुस्तके प्रसिद्ध करणे आणि प्रांतात ग्रंथालय कायदा करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

या संघाचे पहिले अध्यक्ष न्यायमुर्ती वा. रा. पुराणिक होते, तर सचिव पदी नागपुर विद्यापीठाचे तत्कालिन ग्रंथपाल या. मु. मुळे यांची निवड करण्यात आली होती. पुढे १९४९ मध्ये नागपुर विद्यापीठाने अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे ८ वे अधिवेशन नागपुर येथे डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केले होते. या अधिवेशनात डॉ. रंगनाथन यांनी तयार केलेला सार्वजनिक ग्रंथालयांचा मसुदा तत्कालिन शिक्षणमंत्री पी. के. देशमुख यांच्या हस्ते मध्य प्रदेश शासनाकडे सुर्पूद करण्यात आला. पुढील काळात या मसुद्यास कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले नाही. तसेच १९५३ मध्ये म. प्रांत हिंदी सम्मेलनाच्या वतीने प्रांतीय ग्रंथालयाचे अधिवेशन नागपुर येथे संपन्न झाले होते.

एकूणच या काळात ग्रंथालय परिषदेमुळे सार्वजनिक ग्रंथालय विषयक सर्वस्तरीय जागृती या विभागात समाधानकारक स्वरुपात झालेली होती. याच पार्श्वभूमीवर २९ ऑक्टोबर १९५५ रोजी प्रस्तुत ग्रंथालय परिषदेचे दुसरे अधिवेशन राजाराम सिताराम

दिक्षीत वाचनालयाच्या हिरकमहोत्सव प्रसंगी आयोजित करण्यात आले होते. हे अधिवेशन कलकत्ता येथील राष्ट्रीय ग्रंथालयाचे उपग्रंथपाल या. मु. मुळे यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले होते. त्याचे उद्‌घाटन न्यायमुर्ती काकासाहेब पुराणीक यांनी केले होते, तर स्वागतअध्यक्ष पदी न्यायमुर्ती अण्णासाहेब मंगलमूर्ती हे होते. अशा बुजुर्ग व्यक्तींच्या उपस्थितीतुन विद्‌वत जनतेची सार्वत्रिक ग्रंथालयाविषयक अस्थाई सुस्पष्ट होते.

पुढील काळात मात्र या संघाच्या कार्यामध्ये पुष्कळदा शैथिलता आल्याचे जाणवते. १९५६ मधील राज्यपुर्नवसन रचना कार्यान्वित झाल्याने मध्यप्रांतातील आठ मराठी भाषिक जिल्हे मुंबई प्रांतात अंतर्भुत करण्यात आले. यामुळे ग्रंथालय संघाची पुर्नरचना करणे क्रमप्राप्त ठरले. याच अनुषंगाने प्रस्तुत संघाचे कार्य केवळ विदर्भ परिसरापुरते मर्यादित करुन २० एप्रिल १९५८ रोजी संघाच्या सभेत संघाची घटना दुरुस्त करुन या दुरुस्तीनुसार संघाचे नामकरण ‘विदर्भ ग्रंथालय संघ’ असे करण्यात आले.अशा पार्श्वभूमीवर विदर्भ परिसरापुरते आपले कार्य सिमीत करण्याच्या उद्देशाने संघाने आपले तिसरे अधिवेशन दि. ८ व ९ ऑगस्ट १९५९ रोजी कारंजा येथे संपन्न केले. या अधिवेशनास अध्यक्ष म्हणून हैद्राबादचे तत्कालिन शिक्षणमंत्री श्री. गोपाळराव एकबोटे हे लाभले होते. तर उद्‌घाटनासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ग. त्र्य. माडखोलकर यांनी उपस्थिती दर्शविली होती. या अधिवेशनात सार्वजनिक ग्रंथालयाविषयक चर्चा होवून विदर्भ ग्रंथालय संघाच्या कार्याचा सर्वदुर प्रसार करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक ठिकाणी ग्रंथालयविषयक शाखा काढण्याचे निश्चित करण्यात आले. या प्रयत्नातुन अस्तित्वात आलेल्या नागपुर जिल्हा ग्रंथालय परिषदेचे पहिले अधिवेशन दि. ३ व ४ फेब्रुवारी १९६० रोजी काटोल येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. या अधिवेशनामध्ये नागपुर जिल्हा ग्रंथालय संघ स्थापनेच्या ठरावास मान्यता देण्यास आली. विदर्भ ग्रंथालय संघाच्या परिषदा पुढे प्रभाविपणे संपन्न होत असताना या परिसरातील वर्धा, भंडारा, यवतमाळ, चांदा या जिल्ह्यातील ग्रंथालय संघाच्या शाखा काढण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या सर्व हालचाली सुरू असताना १९६० साली स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या नव महाराष्ट्रात विविध प्रदेशातील संघटनांनी एकत्र येऊन सार्वजनिक ग्रंथालयाविषयक विचार करण्याच्या दृष्टिने मराठी ग्रंथालय

परिषदेचे १२ वे अधिवेशन नागपुर येथे १२ व १३ फेब्रुवारी १९६१ रोजी न्यायमुर्ती प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाची जबाबदारी महाराष्ट्र ग्रंथालय संघ व विदर्भ ग्रंथालय संघ यांच्या विद्यमानाने मराठी ग्रंथालय परिषदेचे असे हे आगळेवेगळे अधिवेशन पश्चिम महाराष्ट्रा बाहेर आयोजित करण्यात आले होते. या सर्व परिषदांमधुन ग्रंथालयाच्या उन्नतीसाठी बरेच ठराव संमत्त करण्यात आले. त्यामध्ये संपुर्ण राज्यासाठी ग्रंथालय कायदा करावा, सार्वजनिक ग्रंथालयांना अधिकाधिक अनुदान द्यावे, विदर्भातील सर्व प्रकाशनांची सुची व्हावी, ग्रंथालयाच्या सद्यपरिस्थितीची व गरजेची पहाणी करण्यासाठी भारत सरकारने एक राष्ट्रीय ग्रंथालय समिती नेमावी. शालेय ग्रंथालयांना स्वतंत्र जागा व प्रशिक्षीत ग्रंथपाल ही आवश्यक बाब असावी. इत्यादी ठराव प्रामुख्याने मंजूर करण्यात आले होते.

पुढे या ग्रंथालय संघाद्वारे चर्चासत्रांचे व परिषदांचे आयोजन वेळोवेळी करण्यात आले. तसेच १९५५ पासून साधरणत: सहा आठवडे कालावधीचा ग्रंथपालन कोर्स ही चालवण्यास सुरुवात केली. संघाचे कार्य सर्वदुर पोचावे म्हणून संघाचे मुखपत्र म्हणून 'ग्रंथपाल' हे त्रैमासिक सुरू करुन मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन ३ नोव्हेंबर १९५८ रोजी तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. या मुखपत्राच्या सुरवातीच्या अंकाच्या संपादक मंडळावर सुप्रसिद्ध साहित्यिक ग.त्र्यं. माडखोलकर, डॉ. एस. आर. रंगनाथन अशा मान्यवरांनीही आपले योगदान दिले आहे. या अंकातुन हिंदी व इंग्रजी लेखन प्रसिद्ध करण्यात येत असे. या संघाद्वारे पंढरपुर येथे भरलेल्या १३ व्या ग्रंथालय परिषदेत महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाची स्थापना करण्यात आली. या प्रसंगी संघानेही महत्वपुर्ण योगदान दिलेले असुन सुरूवातीची दोन वर्षे याच संघाने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्यालय चालविलेले होते. संघास शासनाची मान्यता असुन, अनुदानही शासनातर्फे उपलब्ध करुन दिले जाते. आजही या परिसरातील कार्यकर्ते राज्यस्तरीय पातळीवर ग्रंथालय चळवळीकरिता महत्वपूर्ण योगदान देत असताना निदर्शनास येतात.

**२. मराठवाडा ग्रंथालय संघ :**

राज्यपुर्नरचनेनंतर मराठवाडा विभागातील पाच जिल्हे विशाल मुंबई प्रातांत १९५६ मध्ये समाविष्ट करण्यात आले. मराठवाड्याचा हा भाग पुर्वी हैद्राबाद राज्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेला असल्याने हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९५८ हा या मराठवाडा विभागातील सार्वजनिक ग्रंथालयांसाठी लागु करण्यात आला होता. या कायद्याच्या तरतुदीनुसार ग्रंथालय कायदा करण्यासंदर्भात व विकासासाठी कर आकारणी करण्यात येत असे. पुढे हाच भाग मुंबई राज्यामध्ये समाविष्ट झाल्यानंतर मुंबई राज्यात ग्रंथालय कायद्याची निर्मिती करण्यात न आल्याने आपोआपच या पाच मराठी भाषिक जिल्ह्यांना ग्रंथालय कायदा अम्मलबजावणी संदर्भात स्थगिती देण्यात आली. या पार्श्वभूमीवर येथील सार्वजनिक ग्रंथालयातील कार्यकर्ते व कर्मचारी यांना स्वतंत्रपणे विभागीय स्तरावर संघ स्थापन करण्याची आवश्यकता भासु लागली. याच विचाराने प्रेरित होऊन २० नोव्हेंबर १९५८ रोजी औरंगाबाद येथील सर्व ग्रंथपालांची सभा गांधी स्मारक ग्रंथालय खाराकुवा येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेत श्री. सराफ व श्री. वडजीकर यांनी ग्रंथालय कायदा व संघ यांच्या आवश्यकतेविषयी उपस्थित ग्रंथपालांना प्रबोधित केले. या विचारांनी प्रेरीत होऊन उपस्थित सर्व ग्रंथपालांनी ग्रंथालय संघ व्यापकतेविषयी सर्वानुमते पाठींबा व्यक्त केला. अशा संघाच्या स्थापनेविषयी पुढे ४ डिसेंबर १९५८ रोजी औरंगाबाद येथील सर्वात जुने बळवंत मोफत वाचनालयात एक सभा आयोजित करण्यात आली. या सभेस औरंगाबादमधील प्रतिष्ठित वक्ती, कार्यकर्ते, ग्रंथप्रेमी यांनी उपस्थिती दर्शविली होती. या सभेमध्ये संघ स्थापनेचा विषय चर्चेसाठी घेऊन श्री. सराफ यांची यासाठी निमंत्रक म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली, व एक अस्थायी समिती ही स्थापन करण्यात आली. या समितीची पहिली सभा बळवंत मोफत वाचनालयात ५ जानेवारी १९६१ रोजी संपन्न होऊन या प्रसंगी कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. या पहिल्यावाहिल्या कालखंडातील पदाधिकारी म्हणून अध्यक्ष श्री बळवंतराव घाटे, कार्यवाह – श्री. रा. य. सराफ, सहकार्यवाह – श्री. के. द. वडजीकर, कोषाध्यक्ष – श्री. वि. ना. कुटूरकर आणि या व्यतिरिक्त १० सभासदांची निवड करण्यात आली.या संघाचे कार्य पुढे हळुहळू विकसीत होऊन अतिमत:

१९५९ रोजी सर्वानुमते 'मराठवाडा ग्रंथालय संघाची' स्थापना झाल्याची घोषणा करण्यात आली. या काळात प्रस्तुत संघाच्या कार्याचे स्वरुप पुढील प्रमाणे होते.

१. मराठवाड्यातील ग्रंथालयांची सद्य:स्थिति समजावून घेण्यासाठी एक प्रश्नावली तयार करुन ती सर्व ग्रंथालयांना पाठविण्यात आली व जमा झालेल्या माहितीच्या आधारे एक लेख तयार करण्यात आला व तो 'मराठवाडा परिचय' या ग्रंथात प्रसिद्ध करण्यात आला.

२. मराठी ग्रंथालय परिषदेचे १४ वे अधिवेशन औरंगाबाद येथे मराठवाडा ग्रंथालय संघाच्या सहकार्याने व महाराष्ट्र ग्रंथालय संघाच्या विद्यमाने दि. २६, २७, व २८ जानेवारी १९६३ रोजी महाराष्ट्र विधानसभेचे सभापती ना. बाळासाहेब भारदे यांच्या अध्यक्ष्यतेखाली भरविण्यात आले होते. नवनिर्मित महाराष्ट्र राज्यातील व पंढरपुर येथे स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघातर्फे भरणारे हे पहिलेच अधिवेशन होय.

३. ग्रंथालयशास्त्राचे मराठी माध्यमातुन शिक्षण देण्यासाठी १९६० पासून औरंगाबाद येथे सरकारमान्य ग्रंथपालन वर्ग सुरु करण्यात आला. पुढे वर्गामध्ये प्रवेश मिळविण्याचे प्रमाण वाढत गेले. वर्गाचे मुख्याध्यापक म्हणून श्री. रा.य. सराफ, श्री. ना.अ. गोरे, श्री. गो.श्री. कट्टी, श्री. वि.ना. कुंटूरकर यांनी काम पाहिले. ग्रंथालय शास्त्रावरील पुस्तकांचे उत्कृष्ट ग्रंथालय स्थापन करण्यात आले. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना विनामूल्य करुन देण्यात आला होता. ग्रंथपालनावरील बरीच नियतकालिकेही मागवण्यात येत असत.

४. चीनने भारतावर आक्रमण केल्यानंतर सैनिकांसाठी जवळ जवळ १००० मासिके जमवून पाठविण्यात आली होती. अशा तऱ्हेने राष्ट्रकार्यात संघाने भाग घेतला होता.

५. महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या लायब्ररी ॲडव्हायजरी कमिटीमध्ये मराठवाड्याचे प्रतिनिधित्व केले.

६. पूर्वी मराठवाड्याला लागू असलेला ग्रंथालय कायदा महाराष्ट्राच्या इतर विभागांना लागू करावा तसेच मराठवाडा हा मागासलेला विभाग असल्यामुळे मराठवाड्यातील ग्रंथालय विकासासाठी जादा अनुदाने मंजुर करावीत, मराठवाड्यासाठी सहाय्यक ग्रंथालय अधिकारी असावा, प्रादेशिक ग्रंथालय स्थापावे,या व अशा प्रकारच्या विविध मागण्यांसाठी

मराठवाडा ग्रंथालय संघाने मराठी ग्रंथालय परिषदेमध्ये ठराव आणून, पुणे येथे २७ ते २९ जानेवारी १९६१ मध्ये भरलेल्या ग्रंथालय सत्रात भाग घेऊन मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री यांचेकडे शिष्टमंडळे नेऊन तसेच निवेदन पाठवून, जुलै १९६२ मध्ये हैद्राबाद ग्रंथालय कायदा रद्द करण्याचे वेळी विधानसभा, परिषद सदस्यांना निवेदन पाठवून व इतर विविध प्रकारे सातत्याने प्रयत्न चालवले होते. या सातत्याच्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश प्राप्त झाले, ही सुदैवाची बाब होय.

पुढे महाराष्ट्र शासनाकडून रितसर अनुदान सुरू झाले तसेच १९६५ मध्ये औरंगाबाद संघाकडूनही अनुदानाची तरतुद करण्यात आली. यापुढील काळात संघाने अनेक उपक्रम हाती घेतले. यापैकी एक म्हणजे मराठवाडा साहित्य परिषदेच्या संयुक्त विद्यमानाने १९७६ मधील शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम या उपक्रमास मराठी साहित्य परिषदेचे तत्कालिन सचिव डॉ. प्रभाकर भीडे यांचे सहकार्य लाभले होते. तसेच या चर्चासत्र कार्यक्रमाची सुरूवात साहित्य शिक्षण मंडळाच्या बैठकीच्या निमित्ताने झालेली होती. या प्रसंगी संघाच्या कार्यकर्त्यांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पद्मश्री पु.ल.देशपांडे, पद्मश्री अनंत काणेकर यांच्या कडून मार्गदर्शन लाभले होते. या बैठकिच्या निमित्ताने कवि वा. रा.कांत, इतिहास संशोधक ग. ह. खरे याचे ही अनुभव लोकांच्यापर्यंत पोहचविणे शक्य झाले होते. संघाच्या विशेष प्रयत्नातून औरंगाबाद विभागातील ग्रामीण परिसराचा दौरा अमेरिकन ग्रंथपालांना घडवून तेथील सार्वजनिक ग्रंथालयाचे दर्शन घडविले होते. संघाच्या अशा उपक्रमामुळे सार्वजनिक ग्रंथालय कार्यकर्त्यांना प्रोत्साहान मिळत होते. शिवाय याद्वारे समाजामध्ये ग्रंथालयविषयक जाणिव निर्माण होण्यासाठी मदत होत असे.

### ३.३ गोमंतक राज्य ग्रंथालय संघ :

श्री. डी.डी. सातोस्कर यांनी गोव्यातील ग्रंथपालांची एक सभा ९ सप्टेंबर १९६३ रोजी बोलावली होती. याची पुर्वपीठीका म्हणजे औरंगाबादमध्ये भरलेल्या ग्रंथालय परिषदेच्यावेळी गोव्यातील काही कार्यकर्ते या परिषदेला उपस्थित होते. या प्रतिनिधींनी परिषदेचे अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांच्याकडे गोव्यात देखील अशा प्रकारची एक संघटना उभी करणे गरजेचे असल्याने यासाठी महाराष्ट्रातील अनुभवी कार्यकर्त्यांकडून काही एक मार्गदर्शन व सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली होती. याच पार्श्वभूमीवर वरील प्रमाणे एक आयोजन करण्यात आलेले होते. या सभेस गोमंतक ग्रंथालय संघाची स्थापना करण्याचे निश्चित करण्यात आले. या प्रसंगी घटना तयार करण्यासाठी एक उपसमिती नेमण्यात आली. पुढे या उपसमीतीने तयार केलेल्या घटनेच्या मसुद्याचे वाचन करुन त्यांना मंजुरी घेण्यासाठी १३ ऑक्टोबर १९६३ रोजी गोमंतक ग्रंथालय संघाच्या घटकांची सभा गोमंतक दैनिकाचे संपादक श्री. बा. द. सातोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. या सभेत प्रस्तुत घटनेत आवश्यक त्या बदलानंतर ही घटना मंजूर होवून संघाच्या पुढील वाटचालीकरिता ९ सभासदांची समिती गठीत करण्यात आली. याचे पदाधिकारी पुढील प्रमाणे,

अध्यक्ष : श्री. आलेयस्क कॉस (नॅशनल लायब्ररी, पणजी)

कार्याध्यक्ष : श्री. बा.द. सातोस्कर (श्री शारदा मंदिर मार्शेल)

कोषाध्यक्ष : डॉ. गो. कृ. धमे (श्री शारदा वाचनालय, कुंभार जुवे)

कार्यवाह : श्री. न.प.सुकेरकर (गोमंतक विद्यानिकेतन, मडगांव)

श्री. सुरेश वा. तारकर, पेडणेकर (श्री महालक्ष्मी प्रासादीक वाचन मंदिर, पणजी) व इतर पाच सभासद काणकोण, वास्को, पणजी येथील पाच व्यक्तींची निवड करण्यात आलेली होती. या संघटनेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे,

१. गोव्यातील ग्रंथालय चळवळीच्या विकासाकरिता प्रयत्न करणे.
२. गोमंतकातील ग्रंथपालाच्या करिता प्रशिक्षण विषयक सुविधा निर्माण करणे.
३. ग्रंथालयशास्त्रातील संशोधनाकरिता साह्य करणे.
४. गोव्यातील ग्रंथपाल आणि ग्रंथालय कार्यकर्ते यांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.

५. राष्ट्रीय विभागातील, स्थानिक स्तरावर संघटनांनी समान उद्दिष्टांकरिता सहकार्य करणे.

या उद्दिष्टाच्या पुरतेसाठी कार्यपद्धती निश्चित करताना या संदर्भातील तपशील व घटनेमध्ये नमुद करण्यात आलेला होता.हे ग्रंथालय विषयक उपक्रम व चळवळ यामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींच्याकरिता सभा, परिषदा व चर्चासत्रे यांचे आयोजन करुन त्यांना एकत्र आणणे व त्यांच्यामध्ये ग्रंथालय विषयक व्यावसायिकता वृद्धिंगत करणे.

१. नविन ग्रंथालयांच्या स्थापनेकरीता मार्गदर्शन व मदत करणे.
२. अस्तित्वात असलेल्या ग्रंथालयाच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी सहकार्य करणे. याचबरोबर ग्रंथालय क्षेत्रात कार्यरत असलेले कर्मचारी वर्गाकरीता प्रशिक्षण, अभ्यासक्रमासाठी सहकार्य करणे.
३. विविध प्रकारच्या ग्रंथालय अंतर्गत सहकार्यासाठी प्रयत्न करणे.
४. ग्रंथालय व ग्रंथपाल चळवळ यांच्या समस्या निरकरणासाठी सज्ञ राहणे.
५. ग्रंथालय विषयक अभ्यासक्रमासाठी सहकार्य करणे. ग्रंथालयाची शास्त्रशुद्ध पद्धतीचे अवलोकन करणे. तसेच शास्त्रशुद्ध पद्धतीने वर्गीकरण, निर्देश या विषयी ग्रंथालयांना सहकार्य करणे.
६. ग्रंथालय संघाच्या सदस्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणे आणि यासाठीची माहिती नियतकालिके व साप्ताहिके यातून प्रस्तुत करणे.
७. ग्रंथालय चळवळी विषयक उपक्रमांना प्रसिद्धी देणे.
८. आवश्यक त्या ठिकाणी ग्रंथपाल विषयक समस्यासंदर्भात पुढाकार घेऊन मार्गदर्शन करणे.
९. ग्रंथालय संघाच्या उद्दिष्ट पुर्ततेसाठी प्राधान्य क्रमाने प्रयत्न करणे.

याचबरोबर १३ ऑक्टोबर १९६३ च्या सभेत घटनेनुसार सभासद वर्ग व त्यांची वर्गणी निश्चित करण्यात आली. महाराष्ट्र राज्य परिषदेचे १६ वे अधिवेशन गोव्यात आयोजित करण्यासाठी निमंत्रण देण्याचे निश्चित करण्यात आले होते. या निमंत्रणास सक्रिय प्रतिसाद

देऊन महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषदेचे १६ वे अधिवेशन प्रा. न.र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली गोव्यात जांभवली येथे दि. २,३ व ४ फेब्रुवारी १९६७ रोजी संपन्न झाले. या प्रसंगी गोमंतक ग्रंथालय परिषदेचे कार्याध्यक्षपद म्हणून बा.द. सातोस्कर यांनी भुषविले होते. या अधिवेशन प्रसंगी गोव्यातील ग्रंथालयांचा सर्वांगीण विकासाबाबत एक योजना तयार करुन गोव्याचे मुख्यमंत्री श्री. बांदोडकर यांना सादर करण्यात आली होती. या अधिवेशनामुळे गोमंतकातील सार्वजनिक ग्रंथालय कार्यकर्ते व कर्मचारी गोव्यामध्ये एक चैतन्य व प्रेरणा निर्माण होऊन गोव्यात ग्रंथालय चळवळ जोमाने सुरू करण्यासाठी वातावरण निर्मिती झाली. या उत्साहाच्या पार्श्वभूमीवर १९६५ मध्ये ग्रंथपाल संघही सुरू करण्यात आला. अशा वातावरणात ही परिषद कार्यरत असताना पुढे मुंबई व पुणे विद्यापीठामध्ये बी.लीब. अभ्यासक्रमामध्ये चार जागा राखून ठेवण्याची व एम.लिब. अभ्यासक्रमासाठी दोन जागा राखून ठेवण्याची सुविधा केवळ गोमंतक ग्रंथालय संघाच्यावतीने प्राप्त झाली. या संघटनेद्वारे पुढे २८ व २९ एप्रिल १९८४ रोजी पणजी येथे गोवा ग्रंथालय परिषदेचे पहिले अधिवेशन श्री. बा. द. सातोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. राज्यपाल श्री. के. टी. सतारवाला यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले होते. या अधिवेशनाकरिता महाराष्ट्र ग्रंथालय संघाकडून पुष्कळ पुढाकर घेण्यात आला होता. या परिषदेची मुख्य विचारधारा पुढीलप्रमाणे होती.

१. सार्वजनिक ग्रंथालये व ग्रंथालय कायदा

२. शैक्षणिक ग्रंथालये व वाचन सवयी.

या प्रसंगी एका स्मरणिका प्रकाशीत करण्यात आली होती. तसेच दुर्मिळ पुस्तके व नियतकालिके यांचे प्रदर्शन भरविण्यात आलेले होते. गोमंतक ग्रंथालय संघाच्या प्रयत्नातुन पुढे गोव्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९९३ मध्ये तयार करण्यात आला व त्याची अम्मल बजावणी प्रत्यक्ष २९ जुलै १९९५ पासून करण्यात आली. या संघटनाच्या माध्यमातून पुढे १९९७ मध्ये अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे अधिवेशन पणजी येथे घेण्यात आलेले होते. या अधिवेशनाची मुख्य विचारधारा २१ व्या शतकातील ग्रंथालये ही होती.

### ३.४ राजस्थान राज्य ग्रंथालय संघ :

राजस्थानमध्ये ग्रंथालय संघ स्थापन करण्याचा निर्णय १२ ऑगस्ट १९६२ मध्ये घेण्यात आला. या मागे एक पार्श्वभूमी होती. ती म्हणजे जयपूर येथील महाराजा सार्वजनीक ग्रंथालयात दोन दिवसाची एक ग्रंथालय परिषद भरलेली होती. या प्रसंगी या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून राजस्थान विद्यापीठाचे ग्रंथपाल प्रा. एस. बसीमाद्दिन यांची निवड करण्यात आली. तसेच राजस्थानचे राज्यपाल सि. सी. भंडारी यांची संस्थापक सचिव पदी निवड करण्यात आली. प्रत्यक्षात या संघाचा उद्‌घाटन समारंभ १३ ऑगस्ट १९६२ रोजी एस.एम.एस. वैद्यकिय महाविद्यालयात संपन्न झाला. या प्रसंगी डॉ. संपूर्णानंद (राज्यपाल राजस्थान राज्य) हे उपस्थित होते. या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. एस.एस.मेहता (कुलगुरू, राजस्थान विद्यापीठ, जयपूर) यांनी भुषविलेले होते. या प्रसंगी राजस्थानचे शिक्षण संचालक व्ही.व्ही. जॉन यांनी संघटनेच्या सदस्यांना संबोधित केले. याच प्रसंगी संघटनेची घटना तयार केली व सुधारणाअंती ती कायम करण्यात आली. पुढे या संघटनेची नोंदणी १९६४ –१९६५ मध्ये करण्यात आली व पुढील काळात घटनेमध्ये १९७२ व १९९३ मध्ये अनुक्रमे ५ व्या व ७ व्या परिषद प्रसंगी घटनेच्या मसुद्यास आजमेर व बेवार याठिकाणी दुरुस्ती करण्यात आली.

**संघटनेची उद्दिष्टे :**

१. राजस्थान मधील ग्रंथालय चळवळ संघटीत करणे व तीचा विकास करणे.
२. राजस्थानमधील ग्रंथालये व ग्रंथपाल यांना संरक्षण देणे व त्यांचे हितसंबंध जोपासणे.
३. येथील ग्रंथालयांना शासनाकडून आवश्यक ते अनुदान शासन, नगरमंडळे, जिल्हा परिषदा आणि सार्वजनिक संस्था यांच्याकडून समाधानकारक आर्थिक स्त्रोत उपलब्ध करुन देवून ग्रंथालयाच्या विकासाकरिता आर्थिक स्थैर्याकरिता प्रयत्न करणे.
४. ग्रंथालय शास्त्राशी संबंधीत अधिकृत नियतकालिके व इतर साहित्य प्रकाशीत करणे.
५. ग्रंथालयशास्त्र विषयक अभ्यासक्रम आयोजित करणे व त्या संबंधीची प्रमाणपत्रके निर्धारीत करणे.

६. ग्रंथालय व्यावसायीकांचे हितसंबंध जोपासणे व त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.

७. प्रसंगरुप परिषदांचे आयोजन करणे. ग्रंथालयाच्या पुढील वाटचालीकरिता समान उद्दिष्ट असणाऱ्या संघटना व संस्था यांच्याशी सहकार्य करणे.

**सभासदत्व :**

राज्यातील संघटनेच्या घटनेनुसार प्रस्तुत संघटनेचे सभासदत्व ग्रंथालयशास्त्रातील सर्व व्यावसायीकांना खुले ठेवण्यात आलेले होते. तसेच सेवानिवृत्त व्यक्ति, शिक्षक, राजस्थान मधील ग्रंथालय विभाग या सर्वांसाठी सदस्यत्व खुले ठेवण्यात आले होते.

विश्वस्त, आजिव, सर्वसामान्य, संस्था असे सभासद वर्ग निश्चित करण्यात आलेले होते. यामुळे या संघटनेला राज्यातील एकमेव प्रतिनीधी संघटना म्हणून मान्यता प्राप्त झाली होती. या संघटनांची द्विस्तरीय रचना करण्यात आलेली होती. यानुसार मध्यवर्ती व्यवस्थापक मंडळ व जिल्हास्तरीय संघटना असे त्याचे स्वरुप होते. पुढे विविध क्षेत्रातील ग्रंथालयाच्या विकासानंतर व त्याठीकाणी कार्यरत असलेल्या ग्रंथपालांच्या विविध समस्या विचारात घेऊन संघटनेचे विकेंद्रीकरण करावे व संबंधीत ग्रंथालयानुसार त्यांचे स्वरुप असावे असा विचार होवून अंतिमत: या संघटनेचे स्वरुप पुढील प्रमाणे करण्यात आले.

**उच्च स्तरीय व्यवस्थापन :**

या व्यवस्थापनाचे मुख्य कार्य म्हणजे विविध उपक्रम व धोरणे निश्चित करणे व त्याची अम्मलबजावणी करणे. या व्यवस्थापकीय स्तरावर अध्यक्ष, उपाध्यक्ष हे प्रभाग सचिव, कोषाध्यक्ष, जनसंपर्क सचिव, इतर पदाधिकारी या संवर्गातील प्रत्येक विभागाशी संबंधीत सचिव, अध्यक्ष यांचा समावेश करण्यात आलेला आहे. संघटनेचे विभाग पाच असून यामध्ये जोधपूर, उदयपुर, बिकानेर, अजमेर, कोटा यांचा समावेश असून या व्यतिरीक्त कार्यरत असणारे इतर विभाग म्हणजे गंजानगर व अलवार यांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. उपविभागाअंतर्गत पाच घटक करण्यात आलेले असून यामध्ये विद्यापीठ, महाविद्यालय, शालेय, सार्वजनिक व विशेष ग्रंथालय सेवा विभाग यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या प्रत्येक घटकाकरिता स्वतंत्र अध्यक्ष तसेच सचिव यांची नियुक्ती केली जाते.

या घटकांचे, विभागांचे मुख्य कार्य म्हणजे संबंधीत घटकांतर्गत गरजा व समस्या यांची पुर्तता करणे. तसेच मध्यवर्ती व्यवस्थापनाकडून निश्चित करण्यात आलेले उपक्रम व धोरणे यांची अंमलबजावणी करणे. जिल्हा स्तरीय संघटनेच्या माध्यमातून जिल्हास्तरावर प्रभावी संघटन होण्यासाठी त्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे. या संघटनेद्वारे विविध परिषदांचे आयोजन राज्यातील विविध ठिकाणी केले जाते. या प्रसंगी ग्रंथालयाच्या विकासासंदर्भात समस्या व त्यांची भविष्यातील वाटचाल याबद्दल चर्चा घडवून विविध ठरावाच्या माध्यमातून या समस्यांच्या निराकरणासाठी शासनाकडे पाठपूरावा केला जातो.

अशा या संघटनांनी आजवर ग्रंथालय चळवळ बळकट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संघटनेच्या विशेष प्रयत्नातून शासकीय ग्रंथपाल नंतर शैक्षणिक क्षेत्रातील ग्रंथपाल यांच्याकरिता वेतनश्रेणी निश्चित करण्यासाठी यशस्वी प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

**सघंटनेची प्रकाशने :**

संघटनेद्वारे १. क्वार्टरली जनर्ल ऑफ आर.एल.ए. (द्विभाषीक नियतकालिक) २. समाचार (हिंदी) याचबरोबर न्यूजलेटर ही प्रकाशीत केली जातात.

आजवर संपन्न झालेल्या परिषदाप्रसंगी प्रकरणी मान्यवरांचे मार्गदर्शन ग्रंथालयशास्त्रातील व्यावसायीकांना लाभले असुन ग्रंथालय क्षेत्राला प्रबोधीत करण्यासाठी राज्यस्तरीय परिषदा, विविध कार्यशाळा, चर्चासत्रे यांचे आयोजन सर्व घटकांतील ग्रंथालयांव्दारे केले जाते. अशा प्रसंगी ग्रंथालय क्षेत्रातील विद्‌वतजनांना आवर्जुन आमंत्रित केले जाते. यामध्ये प्रामुख्याने पद्मश्री व्हि.एस. केशवन, प्रा. पी.बी. मंगला, प्रा. पी.एन. कौला, प्रा. अे.पी. श्रीवास्तव, श्री. एच. सी. मेहता आणि इतर यांचा समावेश आहे.

**राजस्थान ग्रंथालय संघाचे उपक्रम :**

१. राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा व उजळणी वर्ग यांचे आयोजन करणे.

२. राज्यातील सर्व स्तरावर धोरणे, पद्धती, तंत्रे व ग्रंथालय सेवांचे नियम तयार करण्यासाठी पुढाकार घेणे.

३. राज्यात सार्वजनिक ग्रंथालय कायदा लागु करण्यासाठी पुढाकार घेणे.

४. राज्य शासनाने गठीत केलेले विविध आयोग व समित्यामध्ये प्रभावीपणे प्रतिनिधीत्व करणे व या पार्श्वभूमीवर अहवाल सादरीकरण करताना ग्रंथालय शास्त्रातील कर्मचारी, ग्रंथपाल यांचा दर्जा सर्व स्तरावर वृद्धिंगत करण्यासाठी आग्रहपुर्वक नोंदी करणे.

५. वेतनश्रेणी, वर्ग, दर्जा, सेवा अंतर्गत प्रशिक्षण, पदोन्नती, नेमणुक प्रक्रिया व तत्सम लाभ प्राप्त होण्यासाठी ग्रंथालय क्षेत्रातील कर्मचारी वर्गांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न करणे.

६. ग्रामीण स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयाच्या सेवा सक्षमपणे व प्रभावीपणे उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणे.

७. राज्यस्तरावर स्वतंत्र ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग किंवा संचलनालय स्थापण्यासाठी प्रयत्न करणे.

८. उच्चशिक्षण स्तरावरील ग्रंथालयाद्वारे प्रभावी सेवा प्राप्त होण्यासाठी प्रयत्न करणे.

९. ग्रंथालयाविषयक समस्या संदर्भात माहिती वितरीत करणे.

१०. ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्रातील सदस्यांमध्ये अंतर्गत संवाद साधण्यासाठी विविध परिषदामध्ये सहभाग घेणे.

११. राज्यातील ग्रंथालय शिक्षणास चालना देणे.

**संघटनेची कार्ये :**

आजवर संघटनेद्वारे सातत्यपुर्ण संघटनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले आहेत. संघटनेद्वारे प्रामाणिकपणे आजवर घेतलेले परिश्रम व त्याग यांचा फायदा संघटनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ग्रंथपालन व्यवसाय विकसीत करण्यासाठी केलेले प्रयत्न हे निश्चितच ग्रंथालय क्षेत्राच्या दृष्टिने उपकारक आहेत, असा संघटनेला विश्वास वाटतो. पहिल्या पंचवीस वर्षात संघटनेने साध्य केलेली उद्दिष्टे,

१. संघटनेद्वारे विविध परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्रे यांचे आयोजन राज्य व जिल्हा स्तरावर यशस्वीपणे केलेले असून इतर संघटनेद्वारे केलेल्या प्रयत्नांना सहकार्य केलेले आहे. या चर्चासत्रातून करण्यात आलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी

पाठपुरावा करण्यात आलेला आहे. राज्य शासनाद्वारे वेतनश्रेणी विषयक नेमण्यात आलेल्या विविध समित्यांमध्ये प्रभावीपणे प्रातिनिधीत्व करण्यात आलेले आहे.

२. सार्वजनिक ग्रंथालय कायद्यासंदर्भातील मसुदा १९७० मध्ये राज्य शासनाकडे सुर्पूद करण्यात आलेला आहे.

३. शालेय ग्रंथालयाच्या विकासाकरिता १९७३ मध्ये एक योजना शासनाकडे सुर्पद केलेली असुन या योजनेअंतर्गत प्रत्येक शाळेमध्ये ग्रंथालय असणे सुचविण्यात आलेले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाद्वारे यासाठी १५०० जागांची तरतुद करण्यात आलेली आहे.

४. सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाकरिता १९७३ मध्ये एक योजना सादर केलेली असून त्यासंदर्भात राज्य मध्यवर्ती ग्रंथालय निर्मितीसाठी आर्थिक तरतुदी विषयक सुचना करण्यात आलेली आहे.

५. राज्यामध्ये ग्रंथालय व माहितीसेवा विभागासाठी स्वतंत्र संचलनालय स्थापन करण्यासाठी सूचना करण्यात आलेली असून यासाठी डॉ. एस.सी. वर्मा यांच्या कार्यअध्यक्षतेखाली एक कार्यकारी समिती गठीत करुन या शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत.

६. ग्रंथालयक्षेत्रातील सर्व स्तरीय कर्मचारी, ग्रंथपाल यांच्या कामकाजाची स्थिती त्या संदर्भातील नियम अटी, ग्रंथ रद्दबातल धोरण, ग्रंथ गहाळ या संदर्भातील तरतुदी कामकाजाचे स्वरुप यांची निश्चिती करण्यासाठी शासनाचे विविध विभाग, मंडळे व विद्यापीठ इत्यादी स्तरावर सातत्यपूर्व संघर्ष करुन या क्षेत्रातील कर्मचारी वर्गाच्या भल्यासाठी सातत्यपूर्वक प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

७. सातत्यपुर्वक ग्रंथालय सेवांविषयक विविध स्तरावरील प्रमाणके, धोरण, सवलती व विविध समित्यावरील प्रतिनिधीत्व व निकष सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

८. संघटनेद्वारे वार्तापत्रे प्रकाशित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**जयपूर ग्रंथालय आणि माहिती :**

या संस्थेची निर्मिती करण्यामागची मुलभूत पार्श्वभूमी म्हणजे राजस्थान ग्रंथालय संघामध्ये आलेले शैथिल्य व या संघाद्वारे दीर्घकाळ उपक्रमांचे आयोजन न करणे ही होय.

१. ग्रंथालय अणि माहिती क्षेत्रातील कर्मचारी वर्गास आपापसात संवाद साधण्यासाठी एक व्यासपीठ तयार करणे.

२. राजस्थान ग्रंथालय संघाद्वारे केलेले प्रयत्न ज्या स्तरावर यशस्वी ठरले नाहीत अशा प्रयत्नासंदर्भात पुनर्घटन करण्यासाठी प्रयत्न करणे. ग्रंथालय शास्त्रात आलेल्या शैथिल्य परिस्थितीत जयपूर मधील ग्रंथालय शास्त्रातील व्यावसायीकांनी एकत्र येऊन या संघाची स्थापना केली या संदर्भात प्रथमतः १८ एप्रिल १९८५ रोजी नेहरु बालउद्यान या सार्वजनिक बागेत संबंधीत विचारप्रेमी एकत्रित आले आणि त्याच ठिकाणी अनौपचारीक स्वरुपात जयपुर ग्रंथालय सोसायटीची स्थापना करण्यात आली. या सोसायटीची घटना,उद्दिष्टे, ध्येय व उपक्रम ही समानच होती. पुढे ८ ऑगस्ट १९९५ रोजी अजमेर येथील मानसदेवीच्या मंदिरात जयपुर ग्रंथालय व्यावसायीकांची एक सहल आयोजित करण्यात आलेली होती. या सहलीकरिता एकूण ३५ ग्रंथालय व्यावसायिकांनी सहभाग दर्शविला होता. यामध्ये प्रत्यक्षात ५० लोक या सहलीकरीता अंतिम स्वरुपात सामील झाले. या मध्ये शहरातील ज्येष्ठ ग्रंथालय व्यावसायीकांचा समावेश होता. या ठिकाणी एक व्यवस्थापकीय मंडळ नामनिर्देशित करण्यात आले. यामध्ये विश्वस्त श्री. जमनारायण गौर, सल्लागार श्री. बट्टलाल गुप्ता व श्री. मनमोहन शास्त्री, अध्यक्ष डॉ. सुभाष वर्मा, उपाध्यय श्री. योगेश कॅरमहेल, सचिव श्री. सुरेश वर्मा, खजिनदार श्री. सोहनलाल यादव, प्रवक्ता श्री. पुर्णमल शर्मा हे पदाधिकारी म्हणून घोषित करण्यात आले. याच वेळी इतर दहा जणांची सभासद म्हणून नियुक्ती करण्यात आली. श्री. किशोर पारिख या तरुण व उत्साही सहव्यावसायीकाच्या पुढाकाराने ही सोसायटी प्रत्यक्षात अस्तित्वात येऊ शकली. श्री. पारिख हे हरिश्चंद्र माथूर स्टेट इन्स्टिट्युट ऑफ पब्लिक ॲडमिस्ट्रेट्युव्ह या ठिकाणी काम पहात होते. या सोसायटीने न्यूज लेटर प्रकाशित करण्यासाठी खुप प्रयत्न केले. यामुळे सदस्यांमध्ये सोसायटीच्या कामामध्ये अधिकाधिक सहभाग घेण्यासाठी उत्साह निर्माण

झाला. सदस्यांबरोबर इतर व्यावसायीकांची संपर्क साधण्याच्या दृष्टिने पुष्कळ मदत झाली. या वार्तापत्राचे प्रकाशन संघटना मासिक, त्रैमासिक अशा स्वरुपाची राहिले. ही सोसायटी राजस्थान ग्रंथालय संघामध्ये सहभागी होईपर्यंत वार्तापत्र प्रकाशित करण्यात येत होते. या सोसायटीमुळे १९९६ च्या कालखंडात राजस्थान ग्रंथालय संघाचे पुनर्जीवन होण्यास मदत झाली. या वार्तापत्राचे नामकरण 'आरएलए न्युजलेटर' अशा प्रकारे पुढे करण्यात आले. पुढील काळात राजस्थान ग्रंथालय संघाच्या दुर्लक्षामुळे या अंकाचे प्रकाशन २००२ मध्ये संपृष्टात आले. या संघटनेतील नाराजीमुळे २७ ऑगस्ट २००६ रोजी गणेशचतुर्थीच्या दिवशी ग्रंथालयशास्त्रातील व्यावसायीकांचा एक गट राजस्थान विद्यापीठात एकत्रित आला आणि पुनश्च ग्रंथालय सोसायटी पुनर्जीवीत होऊन कार्यरत झाली, आणि तीचे नुतन नामकरण जयपुर ग्रंथालय व माहिती सोसायटी (जेएएलआयएस)असे करण्यात आले. या पुनर्घटनांमुळे ग्रंथालय क्षेत्राला एक चैतन्य येण्यास मात्र मदत झालेली आहे. या पुनर्घटित संघटनेचे विश्‍वस्त म्हणून डॉ. पवनकुमार गुप्ता, अध्यक्ष एम.आय. खान, उपाध्यक्ष डॉ. प्रभा शर्मा, सचिव श्री. दिप सिंग, सहसचिव श्रीमती आनिता गंगार्डे, खजिनदार जितेंद्र अगरवाल व जनसंपर्क अधिकारी सत्यनारायण बागदा असे पदाधिकारी पाहू लागले. याचबरोबर व्यवसायीक मंडळ व इतर पाचसदस्यांचा समावेश पदाधिकारी वर्गात करण्यात आलेला होता. तसेच श्रीमती लता सुरेश यांची संपादक म्हणून आणि श्री. किशोर पारिख यांची सहसंपादक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. या संघटनेची नवीन पुनर्निर्धारीत वैशिष्टे नमुद करण्यात आलेली होती, त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे–

१. सोसायटीच्या नावामध्ये माहिती या संज्ञेचा अंतर्भाव करणे.
२. ग्रंथालयामध्ये व इतर माहिती केंद्रामध्ये आयसीटीच्या वापरासंदर्भात विशेष प्रचार मोहीम हाती घेणे.
३. व्यावसायीकांमध्ये आयसीटी सुविधा उपलब्धते संदर्भात चालना निर्माण करणे.
४. या सदस्याअंतर्गत संपर्काकरिता याहूचा वापर करणेसाठी याहु ग्रुप नेम आयएएलआयएस जयपुर यांचा वापर करणेचे निश्चित करण्यात आले. याद्वारे या क्षेत्रातील नविन व्यावसासीकांनी नविन संकल्पना अमलात आणण्यासाठी प्रयत्न केला गेला.

श्रीमती लता सुरेश यांच्याकडे जेएएलआयएस जयपुरचा अधिकार सोपवण्यात आला.

या संघटनेचा अलिकडील उपक्रम,

१. या नव्या संघटनेचे सभासद सुरवातीस अधिक उत्साहाने कार्यरत होऊन त्यांनी अनेक एक दिवशीय परिषदा,चर्चासत्रे, व्याख्याने, परिसंवाद यांचे आयोजन केले.

२. यासाठी ज्येष्ठ व्यावसायीकांना आमंत्रित करुन, संगणक ज्ञान, आर. एफ. आय. डी. तंत्रज्ञान, माहिती व्यवस्थापन, ग्रंथसंस्कृती विकास, राज्यातील ग्रंथालयाची सद्यस्थिती व भविष्यातील ज्ञान समाज, आयसीटीचा ग्रंथालयात वापर अशा विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

२००८ मध्ये या संघटनेचे पदाधिकारी पुन्हा निवडण्यात आले. याचबरोबर राजस्थानमध्ये जिल्हास्तरावर ग्रंथालय संघटना कार्यरत असून जिल्ह्यातील ग्रामिण स्तरावर ग्रंथालय चळवळ व ग्रंथालय क्षेत्रातील व्यावसायीकांमध्ये संपर्क वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

### ३.५ हरियाणा राज्य ग्रंथालय संघ:

हरियाणामधील ग्रंथपालचा एक गट १९६९ मध्ये औपचारिक रित्या राज्य ग्रंथालय अंबाला येथे वार्षिक राज्य ग्रंथालय जत्रेच्या अनुषंगाने एकत्रित आला असता हरियाणा ग्रंथालय संघटनेची स्थापना करण्यात आली. या सगळ्यांचे प्रवर्तक म्हणजे राज्य ग्रंथपाल श्री. एम. एल. भागी हे होय. सुरवातीच्या कालखंडामध्ये या संघटनेने श्री. भागी यांच्या अध्यक्षतेखाली वाटचाल केली. पुढे १९७६–७७ पासून कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. के.एस. दलाल यांच्या अध्यक्षतेखाली संघटनाची वाटचाल सुरू झाली होती. या संघटनेची घटना तयार करुन या घटनेस दि. २३ मे १९७६ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेत मंजूरी घेण्यात आली. या संघटनेची नोंदणी संस्था नोंदणी कायदा १९६० नुसार करण्यात येऊन पुढे  त्याच्यामध्ये पंजाब सुधारणा कायदा १९५७ अंतर्गत या घटनेत सुधारणा करण्यात येवून या संघटनेची नोंदणी १९७८ मध्ये करण्यात आली. या संघटनेचे कार्यालय कुरूक्षेत्र विद्यापीठात उघडण्यात आले.

**संघटनेची ध्येय आणि धोरणे :**

१. हरियाणा राज्यातील सार्वजनिक, शासकिय व संस्था ग्रंथालयाच्या सेवा सुधारणे.
२. राज्यातील ग्रंथालयातील सेवकांच्या सर्वांगिण स्वास्थ व कामकाजाची स्थिती यामध्ये सुधारणा करणे.
३. हरियाणा राज्यात ग्रंथालय चळवळीस प्राधान्य देणे.
४. ग्रंथालय शास्त्राचे प्रशिक्षण सुरु करण्यास प्राध्यान्य देऊन त्यामध्ये सुधारणा करणे तसेच चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा यांचे आयोजन करणे व राज्यातील ग्रंथालयविषयक जाणिव जागृती वृद्धिंगत करणे.

**संघटनेचे व्यवस्थापन :**

या संघटनेची संरचना अध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, उपाध्यक्ष (२), सचिव, जनसंपर्क अधिकारी आणि प्रकाशन सचिव हे प्रत्येकी एक, चार विभागीय समंत्रक अशा स्वरुपाची होती. या व्यवस्थापक मंडळाची निवड दरवर्षी भरणाऱ्या वार्षिक सभेत करण्यात येते. या संघटनेच्या १ जुलै १९८३ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेत घटनेमध्ये दुरुस्ती करण्यात

येऊन वरिष्ठ उपाध्यक्ष, सचिव, जनसंपर्कअधिकारी आणि प्रकाशने यांच्या संख्येत वाढ करण्यात आली. संघटनेला अधिक बळकटी येण्यासाठी सर्वसाधारण सभेत जिल्हा प्रतिनिधींच्या जागी नऊ समंत्रकांच्या जागा तयार करण्यात आल्या. संघटनेच्या कार्यक्षेत्राचा विचार करुन हरयाणा राज्याची विभागणी अंबाला,हिसार, रोहटक, मोहिंदर गड अशा उपविभागात विभागणी करण्यात आली. या प्रत्येक विभागात तिन जिल्ह्यांचा समावेश करुन प्रत्येक उपविभागाकरिता समंत्रकांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेद्वारे आणि रिक्त स्वरुपात पाच विभागीय समंत्रकांची नेमणुक केली जाते अथवा निवड केली जाते. प्रत्येक विभागातून वेगवेगळ्या प्रकारच्या ग्रंथालयांचा विचार केला जातो. या संघटनेमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या ग्रंथालयाकरिता पाच समंत्रक निवडण्यात येतात. हे विद्यापीठ ग्रंथालय विभाग, महाविद्यालय ग्रंथालय विभाग, सार्वजनिक ग्रंथालय विभाग, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण विभाग, विशेष ग्रंथालय विभाग अशा स्वरुपाचे असतात. विभागीय संरचना करत असताना 'अ' विभागात अंबाला, कुरूक्षेत्र, जिंद .'ब' विभागात हिस्सार, शिरसा, त्रिवाणी. 'क'विभागात महेंद्रगड, फरिदाबाद, गुरगाव तर 'ड' विभागात कर्नाळा, सोनपद, रोहटक अशा जिल्ह्यांचा समावेश होतो. नव्याने संरचना केलेले पानिपत, कतिहाल, रेवाटी व यमुना नगर हे अनुक्रमे अ,ब,क व ड या विभागात अंतरभूत करण्यात आले अशा संरचनेअंतर्गत संघटनेचे सर्व कामकाज कुरुक्षेत्र विद्यापीठ ग्रंथालय या मध्यवर्ती कर्यालयातून चालविले जाते.

**सभासद :**

या संघटनेचे सभासद हे आजिव सभासद, विद्यार्थी सभासद, सर्वसामान्य सभासद, सामुदायिक सभासद, सर्वसामान्य सभासद अशा गटात विभागले असुन या संघटनेचे सभासदत्व ग्रंथालय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींकरिता खुले आहे. सद्यस्थितीत संघटनेची सभासद संख्या १५२ असुन आजिव सभासद २३ आहेत.

**उपक्रम :**

आजवर संघटनेने अनेक ग्रंथप्रदर्शने, चर्चासत्रे, प्रशिक्षण अभ्यासक्रम यांचे आयोजन केलेले असून १९७२ ते ७७ च्या काळात कायम स्वरुपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम अंबाला

कॅम्प मध्ये सुरू करण्यात आलेला होता. या अभ्यासक्रमास हरयाणा सरकारची मान्यता असून कालावधी सहा महिन्यांचा होता. अभ्यासक्रम दोन सत्रामध्ये आयोजित केला जात असे. विद्यार्थी संख्या ३० एवढी होती. अभ्यासक्रम पुर्ततेनंतर प्रत्येक सत्रानंतर संचालक सार्वजनिक सुचना विभाग हरयाणा यांच्या अध्यक्षतेखाली प्रमाणपत्र देण्यात येते. याचबरोबर १९९५ मध्ये राज्यातील विविध शाळाच्या ग्रंथालयांचे कामकाज पाहणाऱ्या शिक्षकांकरिता एक प्रात्याक्षित, शिक्षक गटाकरिता दहा दिवसांच्या कालावधीचे आयोजन करण्यात आलेले होते. या उपक्रमाकरिता राज्य सरकारकडून रु. २५००/- अनुदान देण्यात आले होते. १९७० च्या काळात संघटनेद्वारे आयोजीत केलेल्या चर्चासत्राच्या उद्‌घाटनासाठी राज्याचे तत्कालीन शिक्षणमंत्री चौधरी, भामरु सिंग हे स्वत: उपस्थित होते. तसेच राज्याचे सार्वजनिक सूचना सचिव हे देखील उपस्थित होते. या उपक्रमासाठी राज्य सरकारने अल्प प्रमाणात अनुदान उपलब्ध करुन दिलेले होते. संघटनेद्वारे राज्यातील शालेय ग्रंथालयात ग्रंथपालांची नियुक्ती करण्याबाबत व सार्वजनिक कायदा लागु करण्यासाठी एक मसुदा १९७७-७८ मध्ये राज्य शासनाकडे सुपूर्द केला होता. अलिकडील काळात विविध चर्चासत्रे, कार्यशाळा यांच्या आयोजनासाठी सतत प्रयत्न केले जात असून ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्यपूर्वक प्रयत्न केले जातात. १९७७ ते १९८६ या काळात कुरुक्षेत्र विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. जनकराज यांनी देखील संघटनेस योगदान दिलेले असून संघटनेच्या या वाटचालीत हरियाणा मधील महाविद्यालयीन ग्रंथालयाकरिता प्रमाणके, हरियाणातील ग्रंथालय चळवळ, दुरशिक्षणातील भूमिका, हरियाणातील शालेय ग्रंथालयातील ग्रंथपडताळणी व तिचे स्वरुप, हरियाणातील सार्वजनिक ग्रंथालय पद्धती, संगणक व ग्रंथालये,बालकांसाठी ग्रंथालये अशा विविध विषयांवर १९७६ पासून सातत्यपूर्वक चर्चासत्रे आयोजित केलेली आहेत. तसेच १८ वी अखिल भारतीय ग्रंथालय परिषद संघटनेद्वारे २६ ते २९ डिसेंबर १९९१ या काळात आयोजित केलेली होती. या परिषदेचा विषय भारतातील माहितीकेंद्रामधील व ग्रंथालयातील माहितीचे व्यवस्थापन असा होता. तसेच एस. आर. रंगनाथन यांच्या जन्मशताब्दीच्या पार्श्वभूमीवर संघटनेद्वारे सार्वजनिक ग्रंथालये या विषयावर दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजीत केले होते. या समारंभाचे औचित्य साधून

रंगनाथन यांच्या प्रकाशनाचे प्रदर्शन भरविण्यात आलेले होते. १९९३ मध्ये संघटनेद्वारे बालकांची ग्रंथालये या विषयावर एक परिषद आयोजीत केली होती. संघटनेचे प्रयत्न ग्रंथालय क्षेत्रास उर्जा देण्याच्या दृष्टिने स्तूत्य होते.

**शिक्षा व प्रशिक्षण :**

संघटनेद्वारे राज्यातील ग्रंथालये व ग्रंथशाळा यांना प्रमाणीत करण्याचे धोरण आखले असून या अंतर्गत यमुना नगर येथील सेद जयप्रकाश पॉलिटेक्नीकल सोसायटीने सुरु केलेल्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमात १९८१ मध्ये संघटनेद्वारे प्रामाणित केलेले आहे. याच संस्थेचा पदविका अभ्यासक्रमास मात्र सुविधा अभावी संघटनेने प्रमाणीत केलेला नाही.

**प्रकाशने :**

संघटनेतील सभासदांना संघटनेच्या कामकाजासंदर्भात माहिती वेळोवेळी पुरविण्यासाठी १९८० पासून हरयाणा 'ग्रंथालय संघटन न्युजलेटर' सायक्लोस्टाईल स्वरुपात सुरु करण्यात आले.या वार्तापत्राचे वर्षात दोन अंक प्रकाशित केले जात. याचे प्रथम संपादक डॉ. एन.के.शर्मा हे होते. १९८५ पासून हे वार्तापत्र मुद्रित स्वरुपात वितरीत करण्यात येते.

**व्यावसायीक समस्यांची हाताळणी :**

हरियाणा राज्यात ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी संघटनेद्वारे एक स्थायी समिती स्थापन करुन चंदीगड येथे या संदर्भात आपले विचार मांडण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. याचबरोबर संघटनेने ग्रंथालयक्षेत्रातील व्यावसायिकांचा वेतनश्रेणी दर्जा सुधारण्याचा सातत्यपूर्वक प्रयत्न केला आहे. तसेच या क्षेत्राचा दर्जा सुधारण्यासाठी सातत्यपूर्वक प्रयत्न केलेला आहे. संघटनेच्या या सातत्यपूर्वक प्रयत्नामुळे हरियाणा सार्वजनिक ग्रंथालय कायदा विधानपरिषदेद्वारे १३ सप्टेंबर १९८९ रोजी पारित करण्यात आला. हा कायदा हरियाणा राज्याच्या तत्कालीन शिक्षणमंत्री सुषमा स्वराज यांनी सभागृहात मांडला होता.

### ३.६ हिमाचल प्रदेश ग्रंथालय संघ :

या संघटनेची स्थापना १९६६ मध्ये करण्यात आली. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे राज्यातील ग्रंथालय चळवळ प्रोत्साहीत करणे आणि या क्षेत्रातील व्यावसायीकांचे हितसंबंध जपणे अशा स्वरुपाचे होते.

**उपक्रम :**

या संघटनेद्वारे स्वत:चे मुखपत्र प्रकाशीत केले जाते. याद्वारे संघटनेच्या कार्याचे स्वरुप सभासदापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला जातो. संघटनेद्वारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविला जात असून त्याचा कालखंड एक वर्षाचा आहे. याच बरोबर दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम चालविला जातो. संघटनेद्वारे १९८९ हिमाचल प्रदेशातील ग्रंथालयक्षेत्रातील व्यावसायिकांची सूची प्रकाशित करण्यात आली असून त्याचे संपादन श्री. डी.एस. जसवाल यांनी केलेले आहे. ही सूची न्यूइरा प्रकाशन यांनी प्रकाशित केलेली आहे. या संघटनेच्या २६ ऑगसट १९०२ रोजी भरलेल्या सिमला येथील सभेत नवीन कार्यकारणी गठीत केलेली असून संघटनेचे अध्यक्ष श्री. एम.के.सूद, उपाध्यक्ष श्री. डी.आर. चंडेल, उपाध्यक्ष श्रीमती पुर्णीमा मैसी, सचिव श्री. महेश सुद, उपसचिव श्रीमती एल.डी. नेगी, खजिनदार श्री. कुलदीप नेगी, हिशोबतपासणीस श्री. बलबिंदर आलूवाल, कायदे सल्लागार श्री. सुगन चेरी, वार्तासचिव श्री अरुण बावा अशा पदाधिकाऱ्यांची निवड करुन व इतर ११ सभासद समाविष्ट करण्यात आलेले होते. तर श्री. सोनम तंतू व श्री. महाजन लाल शर्मा यांची सल्लागार म्हणून निवड करण्यात आली होती. प्रस्तुत सभा ही उच्चशिक्षण संचनालयात सिमला येथे श्री. एस.के. मडवा प्रमुख ग्रंथपाल राज्य मध्यवर्ती ग्रंथलय सोलन यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली होती.

**३.७ जम्मू आणि काश्मिर राज्य ग्रंथालय संघ :**

स्वातंत्र्यपूर्वक कालखंडामध्ये श्री. पी.एन. कौला हे एकमेव प्रशिक्षित ग्रंथपाल राज्यात कार्यरत होते. आपला ग्रंथालयशास्त्राचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांनी वृत्तपत्रे व नियतकालिकांतून राज्यातील ग्रंथालयांच्या विकासासंदर्भात एक आराखडा वजा सूचना ही मुख्य विचार धारा समोर ठेवून अनेक लेख प्रकाशित केले.याचबरोबर काश्मिर संदंर्भात त्यांनी 'काश्मिर येन इतिमी इनक्लाब' या नावाने एक पुस्तक ही प्रकाशित केले. त्यांच्या धडपडीतून त्यांनी नागपूर येथे भरलेल्या १९४९ मधील ८ व्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेत राज्याचे प्रतिनिधित्व केले. पुढे त्यांनी राज्यात ग्रंथालय संघटना स्थापण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. तत्कालीन राजकीय अस्थिरतेमुळे त्यांचे हे सर्व प्रयत्न ग्रंथालय संघटना स्थापना विषयी निष्फळ ठरले. याच पार्श्वभूमीवर त्यांना राज्यातील ग्रंथालय विषयक मसुदा सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. ही योजना त्यांनी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शेख मोहम्मद अब्दुला यांच्याकडे सादर केली. या योजनेला अखिल भारतीय ग्रंथालय संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी प्रस्तावना लिहिलेली होती. या समुदायाचे अवलोकन करुन मुख्यमंत्री शेख मोहम्मद अब्दुला यांनी या संदर्भात कार्यवाही करण्याची कबुली दिलेली असताना राजकीय अस्थिरतेमुळे १९५३ मध्ये त्यांचे मंत्रिमंडळ विसर्जित करण्यात आले. पुढे शिक्षणमंत्री यांच्या आमंत्रणावरुन प्रा. कौला यांनी एस.पी.एस. ग्रंथालय, श्रीनगर यांचे परिक्षण करुन या ग्रंथालयाच्या पुनर्घटनाकरीता व विकासाकरिता एक योजना सादर केली. याच बरोबर त्यांनी ग्रंथपालांची एक सभाही १९५६ मध्ये गठीत केलेली होती. या पार्श्वभूमीवर १९५१ ते १९६१ या कालखंडात राज्यात मोफत ग्रंथसेवा पुरविण्यासाठी तीन वेळा ग्रंथालय संघटना स्थापन करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात आले. दुर्दैवाने अधिकारीस्तरावर असहकार्य व निधीची उपलब्धता नसल्यामुळे ही सर्व योजना बारगळली. अशा सर्व पार्श्वभूमीवर २२ एप्रिल १९६४ रोजी काश्मिरमध्ये एक परिषद आयोजीत करण्यात आलेली होती. या परिषदेचे अध्यक्ष जम्मू काश्मिर विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रमुख एम. एच. रझवी यांनी भुषविलेले होते. या सभेमध्ये राज्यातील ग्रंथालय सुधार व ग्रंथालय संघटनेचे गठन या संदर्भातील समस्या यावर साधक–बाधक चर्चा झाली. या चर्चेची फलश्रुती म्हणजे या परिषदेची या संदर्भात

स्थापना करण्यात आली. याकरिता सात सभासद असलेली समिती स्थापण्यात आली. अंतिमत: काश्मिर ग्रंथालय परिषदेच्या सायंकाळच्या सत्रांत ग्रंथपाल व इतर सभासद घटक एकत्रीत येऊन जम्मू – काश्मिर संघटनेची स्थापना श्री. पी. एन. कौला यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. या प्रसंगी संघटनेच्या घटनेचा मसुदा तयार करण्यात आला व त्याची पडताळणी समितीद्वारे व श्री. कौला यांच्याद्वारे करण्यात आली. पुष्कळ चर्चेअंती प्रस्तुत घटना मंजूर करण्यात येवून ही संघटना १९ जून १९६४ रोजी अस्तित्वात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून कुमारी मोहम्मद अहमद (प्राचार्य, मरिता महाविद्यालय, श्रीनगर) तर उपाध्यक्ष श्री. अब्दुल गफार मलिक (ग्रंथपाल, माहितीकेंद्र भारत सरकार श्रीनगर), सचिव श्रीब्रदीनाथ थाता (उपग्रंथपाल, श्रीनगर) या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी संघटनेविषयक विविध सुचना प्रा. पी. एन. पुषक (संचालक, ग्रंथालय आणि अभिलेखागृह) यांच्याद्वारे करण्यात आल्या. जरी या संघटनेला शासकीय सहकार व अनेक तज्ञ व्यक्तिंचा आशीर्वाद लाभलेला होता. तसेच ग्रंथालय संचनालयाकडून सहकार्य होते तरी देखील संघटनेद्वारे फारसे कार्य करता आले नाही, त्यामुळे ही संघटना जम्मू काश्मिर ग्रंथालय व माहितीशास्त्र संघ म्हणून १९९१ मध्ये स्वतंत्रपणे अस्तित्वात आले. संघटनेद्वारे जॅकलीसा हे त्रैमासिक वार्तापत्र सुरू करण्यात येवून याद्वारे ग्रंथालय व्यावसायिकांशी संबंधीत महत्वपूर्ण घटकांना प्रसिद्धी दिली जाई. पुढे ज्यावेळी १९८४ रोजी या संघटनेची एक सभा काश्मिर विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहिती विभागात प्रा. एम. एल. वाडी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेत या नव्या संघटनेचे नाव बदलून पुनस्थ जम्मू काश्मिर लायब्ररी असोसिएशन असे करण्यात येऊन प्रा. वाली यांना अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. या संघटनेने नवीन घटना तयार केली आणि त्या संदर्भात सार्वजनिक ग्रंथालय सेवा विषयक राज्यात सुधारणा करण्यासाठी एक सेमीनार घेणे व महाविद्यालय व ग्रंथालयातील व्यावसायिकांकरिता अद्ययावत राहण्याच्या दृष्टिने व त्यांच्यामधील तांत्रिक कौशल्य व अद्यायावत घटना याबाबत जागृती येण्यासाठी उजळणी वर्गाचे आयोजन करण्याच्या सदंर्भात संघटनेच्या उद्दिष्टामध्ये सुधारणा करण्यात आली. हाच बदल पुढे देशभरातील अशा स्वरुपाच्या संघटनांमध्ये अंतर्भूत करण्यता आला.

### ३.८ पंजाब राज्य ग्रंथालय संघ :

श्री. रॅश डॉन डिकन्सन यांच्या प्रयत्नातून पंजाब ग्रंथालय संघटनेची स्थापना १९१६ मध्ये करण्यात आली. श्री. डिकन्सन हे अनेक क्षेत्रात पुढाकार घेणाऱ्या व्यक्तीपैकी एक होते. प्रत्यक्षात ते लाहोर येथे तीन वर्षाच्या कामाकरिता आलेले होते. अमेरिकेहून येताना ग्रंथालय क्षेत्रातील माहिती त्यांच्या अंतरयामी रुजलेली होती. या मुलभूत पार्श्वभूमीवर त्यांनी एक दिवशी लाहोर मध्ये कार्यरत असणाऱ्या ग्रंथपालांचा स्नेहमेळावा १९१६ मध्ये आयोजित केला. या स्नेह मेळाव्या प्रसंगी डिकन्सन यांनी अमेरिकेतील ग्रंथपालांच्यामध्ये संघटनात्मक कार्याविषयक असलेला विश्वास पंजाबमधील ग्रंथपालांच्या समोर कथन केला. या सर्व ग्रंथपालांच्यामध्ये या कथनाव्दारे संघटनेविषयक बिजारोपण केले. या पार्श्वभूमीवर पुढे प्रस्तुत संघटना अस्तित्वात आली. या संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. ए.सी.ऊलनर यांची नियुक्ती करण्यात आली. तर सचीवपदी मुकुंदलाल भाटी विराजमान झाले. आपला लाहोर येथील कार्यकाल पुरा करुन जाताना डिकन्सन यांनी या संघटनेचे कार्य लाहोर येथील तरुण ग्रंथपालांच्यावर सोपविले. पंजाब सोडत असताना श्री. डिकन्सन यांच्या मनामध्ये अखिल भारतीय संघटना स्थापन करणे शक्य आहे. याविषयी त्यांनी भविष्यवेध घेतलेला होता. या संदर्भातील नोंद पंजाब लायब्ररी प्रिमीयर या ग्रंथात आढळते. ते नमुद करतात "It is to be hoped that recentaly organised Punjab Library Associotion will found ample work to do togather will the means & will to undertaken it. These would seem to be good reason for the enistence of similar organised in Baroda, Calcutta, Bombay & Madras. And we may look for a day when Indian Library Assocoation shall be launched upon a career of usefulness *(In- Kumar, P.S.G., Page 578)*"

पुढे पंजाबमधील घटना आणि इंग्रजांच्या कारकीर्दीतील भारत यावरुन डिकन्सन यांनी कथन केलेले भवितव्य प्रत्ययास येऊन अखिल भारतीय संघटनेची स्थापना १९३३ मध्ये प्रत्यक्षात आली. पंजाबमध्ये ग्रंथपालांनी ग्रंथालयासंदर्भात दाखविलेली आस्था आणि याचबरोबर ग्रंथालयीन स्थिती या अनुषंगाने स्थानिक शासन व केंद्रशासन ग्रंथालय क्षेत्रापासून

दुर राहु शकले नाही. याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने १९३८ रोजी लाहोर येथे अखिल भारतीय ग्रंथपालांची एक परिषद आयोजित केलेली होती. ग्रंथपालांसाठी अखिल भारतीय स्तरावर आयोजित केलेली ही पहिलीच परिषद होती. या परिषदेसमोर ग्रंथालय सहकार, प्रशिक्षण, विज्ञान विषयक, ग्रंथाची संघकालीका इत्यादी विषय समोर होते. तसेच या परिषदेच्या निमित्ताने भारत सरकारचे तत्कालीन शैक्षणिक सल्लागार श्री. हेन्री श्रॉफ यांनी स्थानिक शासन, भारत सरकारचे विविध विभाग, सायन्स काँग्रेस तसेच म्हैसुर, बडोदा इत्यादी राज्यातील संबंधीतांनी परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रीत केले होते. या निमंत्रणास प्रतिसाद प्राप्त होऊन स्थानिक शासनाचे प्रतिनिधी तसेच म्हैसुर, बडोदा राज्यातील प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शवीत या अधिवेशनास डॉ. ए. सी. उन्नर,श्री. रिची अशा शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी संबोधीत केले होते. या परिषदेच्या अनुषंगाने चर्चिलेल्या ग्रंथालयांना एक संदर्भ ग्रंथ बनविण्याविषयी चर्चा करण्यात आली. अशा प्रयत्नांतून वाचकांना सर्वप्रकारे वाचन स्त्रोत सहजपणे हाताळणे शक्य होणार होते. (विषय निर्देश, तालिका, ग्रंथपालांचे प्रशिक्षण, प्रशिक्षित ग्रंथपालांच्या नेमणुका व वेतनश्रेणी) तसेच भारतीय कागदपत्रांचे संरक्षण आणि ग्रंथ नियतकालिके या सर्वांचे संरक्षण व संवर्धन याविषयी चर्चा झालेली होती. या परिषदेच्या माध्यमातून ग्रंथालय क्षेत्रामध्ये एक समन्वय व सहकार साधण्याच्या दृष्टिकोनातून ही परिषद उपयुक्त ठरली. एकूणच डिकन्सन यांनी आपल्या पंजाबमधील वास्तव्यात एकूणच ग्रंथालय संघटना बळकट करण्यासाठी खूप प्रयत्न केले. ते यु. एस. ए. ला निघुन जाताच ही योजना बारगळली आणि पुढे १९२९ मध्ये काही ग्रंथपालांची लाहोर येथे एकत्रित येऊन ग्रंथपाल क्लबची स्थापना केली. या क्लबने १९२९ मध्ये अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय परिषद आयोजित करण्याचे धाडस केले. ही परिषद देखील अत्यंत यशस्वीपणे संपन्न होऊन पंजाब ग्रंथालय संघटनेला पुनश्च जिवदान प्राप्त झाले. पुढे या संघटनेने आपल्या उद्दिष्टात पुनश्च सुधारणा करत भविष्यातील ग्रंथालयांच्या विकासाकरिता आणि सार्वजनिक ग्रंथालयांची उपयुक्तता वाढवण्यासाठी राज्यातील इतर ग्रंथालये ही शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण घटक म्हणुन त्यांच्याद्वारे संप्रेषण अभियान अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रयत्न करणे अशा महत्वपूर्ण उद्दिष्टांचा समावेश

करुन या संघटनेने पुढील वाटचालीकरिता आपले अधिनियम अधिक व्यवस्थितपणे निर्धारीत केले. नियम, अधिनियम दुरुस्त करत असताना भविष्यात त्यांच्यात दुरूस्ती करणे, अनावश्यक बाबी काढून टाकणे यावर वार्षिक सभेत निर्णय घेण्याची तरतुद केली. अशा तरतुदीतून प्रत्यक्षात आलेल्या संघटनेच्या उद्दिष्टामध्ये पुढील बाबींचा समावेश करण्यात आलेला होता.

१. ग्रंथालयाचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी ग्रंथालयाच्या व्यवस्थापनास व प्रशासनांना सल्ला व सहकार पुरविणे.
२. लोकांच्यामध्ये वाचनसंस्कृती विकसीत करण्यासाठी व्याख्याने, प्रदर्शने, वाचक स्पर्धा असे उपक्रम राबवून, विशेषपद्धतीने वाचनाला चालना देणे.
३. ग्रंथालयातील पुस्तकांचा पर्यायी वापर होण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे.
४. ग्रंथालय सेवांची सक्षमता वाढविण. याकरिता एकमेकांच्या सहकार्यातून ग्रंथालयक्षेत्राशी सहसंबंध असणाऱ्याच्या सहकार्याने परिषदा, चर्चासत्रे व सभा यांचे संबंधीत ग्रंथालय कामकाजाच्या अनुषंगाने आयोजन करणे.
५. ग्रंथालय विषयक माहिती देणारे ग्रंथ, छोटी पुस्तके यांचे देशस्तरावर विशेषपद्धतीने पंजाब विभागाव्दारे प्रकाशीत करणे.

वरील उद्दिष्टांची निश्चिती करताना परिषदेने १९३१ मध्ये आधुनिक ग्रंथालय विषयक माहिती व त्यांच्या कामकाजांचे स्वरुप, ग्रंथपाल व ग्रंथालयासंबंधित व्यक्तींपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला होता. त्याचबरोबर ग्रंथालयाचे महत्व शहरातील व राज्यातील लोकमाणसांमध्ये बिंबवण्यासाठी प्रयत्न केलेला होता. एकूणच वाचकअभिरुची संपन्न करण्यासाठी सातत्यपूर्वक विविध लेख प्रसृत करुन संघटनेद्वारे प्रयत्न करण्यात आलेले होते. अशा या ग्रंथालय चळवळीच्या कामात १९२९ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय परिषदेचे लाहोर येथील अधिवेशन हे विशेष लक्षवेधी ठरलेले होते. या अधिवेशनाचे आयोजन करण्यामागे श्री. आर. सी. मनचंदा व श्री. एस. आर. भाटीया यांनी विशेष परिश्रम घेतले होते. ही परिषद राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या चळवळीविषयक समस्या दूर करण्यास उपयुक्त ठरली. श्री. मनचंदा व भाटीया यांनी या काळात लाहोरमध्ये चळवळ योजनेसाठी

केलेले प्रयत्न हे ग्रंथालयक्षेत्रातील अनेक सहकाऱ्यानी जवळून अनुभवलेले होते. त्यांनी या दोघांचा उल्लेख ग्रंथालय चळवळीत 'जुळे भाऊ' असा केलेला होता. या दोघांच्या अथक प्रयत्नाने पंजाब ग्रंथालय संघटनेला पुनश्च जीवदान प्राप्त झाले होते हे ही खरेच.

पंजाब ग्रंथालय संघटनेची पहिली परिषद १९२९ मध्ये भरली. दुसरी परिषद १९३२ मध्ये लाहोर येथे वाय.एम.सी. सभागृहात २८, २९ व ३० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली होती. ही परिषद विशेष स्वरुपात यशस्वीपणे संपन्न झाली होती. या परिषदेला जवळ जवळ १००० प्रतिनिधींनी हजेरी लावलेली होती. या परिषदेमधील बोधवाक्ये ही 'ग्रंथालय हे सुखसाधन नसून ती जीवनावश्यक बाब आहे. ग्रंथालय हे मानवी मनातील अज्ञानाचा वृक्ष नष्ट करण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. ग्रंथालयाशिवाय शहर म्हणजे प्रकाशाविना शहर. जो माणूस वाचतो तो यशस्वी होतो. अधिक वाचा, अधिक विचार करा, कमी बोला.' अशा स्वरुपाची होती. या बोधवाक्यावरुनच ग्रंथालय संघटनेचे सदस्य पंजाब मध्ये अधिक सक्षमपणे परिषद भरविण्यासाठी किती उत्साहाने प्रेरीत झाले होते याची जाणिव होते. या परिषदेचे अध्यक्षस्थान पंजाबमधील तत्कालीन न्यायाधीश सर अब्दुल कादिर यांच्या पत्नी श्रीमती कादिर यांनी भुषविले होते. उपस्थितांना संबोधीत करताना त्यांनी नमुद केले होते की, 'पंजाबमध्ये ग्रंथालय चळवळीची सुरुवात १६ वर्षापूर्वी झालेली असून ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. या संघटनेचे उद्दिष्ट हे सर्वदूर ग्रंथालयांची स्थापना करणे व लोकांच्यामध्ये ग्रंथालय प्रचार करणे असे असून या संघटनेने आजवर पंजाबमध्ये ग्रंथालयांची प्रत्येक ठिकाणी स्थापना करण्यासाठी केलेले प्रयत्न, फिरत्या ग्रंथालयाद्वारे ग्रंथ घरोघेरी वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न, समाजाच्या वाचनाविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी संघटनेने केलेल्या प्रयत्नांचे श्रीमती कादिर यांनी कौतुक केले होते. यानंतर डॉ. वुल्लनर (कुलगुरु पंजाब युनिर्व्हसीटी) व संघटनेचे अध्यक्ष आणि डॉ. एम. मोब्रे वेल्थ पंजाब ग्रंथालय संघटनेचे कार्याध्यक्ष यांनी पंजाब अधिवेशनाचा आढावा ही घेतला. या प्रसंगी संघटनेचे उपाध्यक्ष दास यांनी उपस्थितांना आवाहन करताना आमची उद्दिष्टे ही उच्च प्रतिची जरुर आहेत, पण आमचे संसाधन (आर्थिक स्त्रोत) हे फारच अपुरे आहेत. तसेच पंजाब ग्रंथालय संघ हा इतर संघटनेपेक्षा तरुण असून अल्प काळात त्याने केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे नमुद केले होते.

या परिषदेच्या दुसऱ्या दिवशी निवडणूक होऊन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आलेली होती. यानुसार अध्यक्ष न्या. अब्दुल कादिर, श्री. डी. एम. मॉब्रे वेल्ट कार्याध्यक्ष, प्रा. एम. एन. दास उपाध्यक्ष, श्री. हसनचंद मनचंद व श्री. संतराम भाटीया यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली होती. या संघटनेची तिसरी परिषद गव्हर्नमेंट ट्रेनिंग कॉलेज लाहोर येथे १३ ते १५ एप्रिल १९३३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या परिषदेचे अध्यक्ष स्वागत कमिटीचे कार्याध्यक्ष श्री. डॉ. एस. आर. दत्ता व प्राचार्य फोरमन ख्रिश्चन कौलन लाहोर यांनी या परिषदे प्रसंगी उपस्थितांचे स्वागत केले होते. पंजाबच्या इतिहासास हा एक दीर्घ परंपरेचा आणि अभिमानास्पद असून या शहरामध्ये महत्वपूर्ण अशी पाच ग्रंथालये असून या ग्रंथालयांना आपण जरुर भेट द्यावी असे आवाहन त्यांनी केले होते. या ग्रंथालयामध्ये त्यांनी पंजाब सार्वजनिक ग्रंथालय, पंजाब विद्यापीठ ग्रंथालय व दयालसिंग सार्वजनिक ग्रंथालय, द ओरीयंटल कॉलेज ग्रंथालय व फोरमन ख्रिश्चन कॉलेज यांचा उल्लेख करुन त्यांनी पुढे नमुद केले होते की, या भेटीतून आम्ही आपल्यासमोर आमच्याजवळ कोणत्याप्रकारचे धन आहे ते आपणासमोर ठेवत आहोत. याचे आपण जरुर अवलोकन करा असे भावपूर्ण आवाहन करुन येथील ग्रंथालय परंपरेचा गौरव केलेला होता. या परिषदेचे अध्यक्षपद अण्णा मलाई विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. एम. ओ. थॉमस यांनी भूषविलेले होते.

पंजाब ग्रंथालय संघटनेचे कार्य सुरू असताना १९४४–४६ च्या कालखंडात या संघटनेने एकूण ३० छोटी छोटी पुस्तके 'लायब्ररी इन इंडीया सिरीज' या नावाने प्रकाशीत केलेली होती. याचबरोबर संघटनेद्वारे ग्रंथालयविषयक विविध विषयांचा समावेश असणाऱ्या पंधरा खंडाचा 'मॉडर्न ग्रंथपाल' हा एक ग्रंथ प्रकाशित करण्यता आलेला होता. डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे चरित्र, भारताविषयक साठ पुस्तके व त्यांचे सार, तसेच अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचा वृत्तांत, देशातील ग्रंथालय चळवळ यांचाही आढावा यामध्ये घेण्यात आलेला होता. यामध्ये देशातील मुद्रित अहवालांचा समावेश होता. खऱ्या अर्थाने हे एक अखिल भारतीय स्तरांवरचे जर्नल ठरलेले होते. 'मॉडर्न लायब्ररीयन' हा ग्रंथ ख्रिश्चन ग्रंथालय लाहोर येथून प्रकाशित करण्यात आलेला होता. या परिषदातून या संघटनेद्वारे केलेला विशेष स्त्रोत म्हणजे ग्रंथालय सेवा ब्यूरो होय. सर्वप्रकारच्या ग्रंथालयांसाठी लागणारी

सामुग्री ही त्याकाळी  इग्लंड व अमेरिकेतून प्राप्त होत असे. ही साधनसामुग्री प्रामाणित स्वरुपात उपलब्ध होण्यासाठी काही वेळेला नाईलाजास्तव स्थानिक पुरवठा यावरच अवलंबून रहावे लागत असे. यामुळे दर्जेदार संसाधने उपलब्ध करण्यामध्ये अडचण येत असे. इग्लंड व अमेरीकेमध्ये होणाऱ्या वारंवार सुधारणामुळे अनेक वेळा हा पुरवठा अनिश्चित असे. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करुन ही समस्या दूर करण्यासाठी संघटनेद्वारे एक तज्ञ कमिटी स्थानिक स्तरावर नेमून दिली. इतर विभागातील ग्रंथालयांच्याकडून मार्गदर्शन घेऊन प्रयत्न करण्याविषयी श्री. एस. आर. भाटीया यांनी इंडियन लायब्ररीयन द्वारे आव्हान केले होते.

पुढे पंजाब ग्रंथालय संघटनेचे अधिवेशन १९४६ मध्ये पंजाब विद्यापीठामध्ये संपन्न झाले. या अधिवेशनाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे तत्कालिन क्युरेटर श्री. टी.डी. वाकनीस यांनी केलेले होते. तसेच प्रा. एम. सी. सिंग पंजाब विद्यापीठ हे अध्यक्षस्थानी होते. या परिषदेच्यावेळी भारतासंबंधीत पुस्तकाचे एक प्रदर्शन ही भरविण्यात आलेले होते. मधल्या काळात १९३७–३८ मध्ये श्री. दयाल सिंग यांनी सार्वजनिक ग्रंथालय लाहोर येथे स्थानिक ग्रंथपालांची एक सभा होऊन यामध्ये लाहोर ग्रंथालय संघटनेची स्थापना करण्यात आलेली होती. या संघटनेचे स्वरुप हे पंजाब ग्रंथालय संघटनेला सहकार्य करण्याच्या दृष्टिने, स्थानिक स्तरावर चळवळ दृढ करण्यास मदत करणे या स्वरुपाचे होते. या संघटनेचे तत्कालिन अध्यक्ष हे दयाल सिंग सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. सोहन सिंग हे होते. तर ए. आर. तलवार,  ग्रंथपाल शासकीय महाविद्यालय लाहोर हे खजिनदार होते. आणि सचिवपदी श्री. आर. मनचंदा, ग्रंथपाल, हेली कॉलेज ऑफ कॉमर्स यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. या संघटनेद्वारे एक हस्तपुस्तिका तयार करुन ती संघटनेच्या कामाविषयी कुतूहल असणाऱ्या व्यक्तींकरिता मोफत पुरविण्यात आली होती. या संघटनेचे सभासद शुल्क हे एक रुपये होते  ग्रंथालय चळवळीविषयक आस्था असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला सभासदत्व खुले ठेवण्यात आलेले होते; आणि दयाल सिंग सार्वजनिक ग्रंथालय संघटनेचे कार्यालय म्हणून घोषित करण्यात आलेले होते.

स्वातंत्रपुर्व कालखंडात पंजाब संघटनेचा पुनर्जन्म झाला. मार्च १९४८ मध्ये सिमला येथील यु. एस. क्लब मध्ये श्री. भाटीया यांनी ग्रंथपालांची एक सभा बोलावलेली होती. या सभेचा हेतू हा पंजाब ग्रंथालय संघटनेची पुनर्प्रस्थापना करणे हा होता. ११ ग्रंथपालांनी या सभेस उपस्थिती दर्शविली होती. या सभेत संघटनेचा पूर्व आढावा घेऊन एक व्यवस्थापन समिती स्थापण्यात आली होती. समितीचे अध्यक्ष म्हणून प्रा. डी. सी. शर्मा, श्री. एस. आर. भाटीया, संघटनेचे सचिव म्हणून श्री. तेहराम यांची याप्रसंगी निवड करण्यात आली होती. तद्नंतरच्या काळात संघटनेचे ध्येय आणि उद्दिष्ट सभासद कार्डावर मुद्रित करण्यात आले होते. या पुनर्प्रस्थापित पंजाब ग्रंथालय संघटनेची स्वातंत्र्यानंतरची पहिल्या परिषदेचे उद्घाटन न्या. सेमासिंग (कुलपती, पूर्व पंजाब विद्यापीठ) यांनी केले होते. स्वागतपर संबोधन श्री. रायबहाद्दुर डॉ. के. सी. खन्ना, संचालक सार्वजनिक सुचना विभाग यांनी केले होते. संघटनेची वार्षिक परिषद आणि पुस्तक जत्रा सिमला येथे १६ व १७ नोव्हेंबर १९४९ रोजी आयोजित केली होती. या उद्घाटन समारंभास पंजाबचे शिक्षणमंत्री ना. नरोतमोसिंग उपस्थित होते. पुढे संघटनेने १९५० ते ५२ या काळात परिषदा, सेमीनार, पुस्तक प्रदर्शन यांचे वेळोवेळी आयोजन केले होते. अशा प्रसंगी न्या. इरिकवेटसन, श्रीमती विजयालक्ष्मी पंडीत, प्रा. एन.के. सिद्धांता, इ. मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली होती. या वाटचालीत पुढे संघटनेचा सुवर्णमहोत्सवी समारंभ हा डिसेंबर १९६६ मध्ये राज्यमध्यवर्ती ग्रंथालय चंदीगड येथे सपंन्न झाला. या समारंभाचे अध्यक्षपद आय.सी.एस. चे मुख्य कमिशनर श्री. एम.एस. रंधवा यांनी भुषविलेले होते. याप्रसंगी ज्येष्ठ ग्रंथपाल श्री. जी.एल. त्रेहीन (सचिव पंजाब ग्रंथालय संघटना) यांचा सेवा पारितोषिक देवून सन्मान करण्यात आलेला होता. या प्रसंगी संघटना व राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालय पटियाला यांच्या सहकार्याने एक ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले होते. या समारंभास १००० हून अधिक प्रातनिधिद्वारे उपस्थिती दर्शविण्यात आली होती. तसेच 'पंजाबमधील ग्रंथालय चळवळीची ५० वर्षे 'श्री. जी. एल. त्रेहान यांच्या इंग्रजी भाषेतील ग्रंथाचे प्रकाशन करुन उपस्थितांना वितरीत करण्यात आले होते. या ठिकाणी उपस्थितांना संबोधताना अध्यक्ष रंधवा यांनी 'मंदिर, चर्चेस व गुरुद्वारा हा काळ संपुष्टात आलेला असून सध्यासध्याचा काळ हा

ज्ञानाच्या देवालयांचा असून त्यांचे पुजारी ग्रंथपाल आहेत.' अशा प्रकारे गौरवद्गार काढून बदलत्या ज्ञान पुजेची जाणिव उपस्थितांना करुन दिलेली होती. याचबरोबर चंदीगडने देशाच्या उर्वरीत भागाला ग्रंथालय विषयक विकासासाठी मार्गदर्शन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश दिला होता. यानंतर संपन्न झालेल्या सत्रात ग्रंथालय सेवा आणि त्यांचे भवितव्य याविषयावर चर्चा झाली. या चर्चासत्राचे उद्घाटन बनारस हिंदू विद्यापीठ वाराणसीचे ग्रंथपाल प्रा. पी.एन. कौल यांनी केले होते. तसेच उपस्थितांकरिता संध्याकाळी 'अनारकी वापसी' हा एक एकपात्री प्रयोग आयोजित केला होता. एकूणच ही परिषद संस्मरणीय अशी झाली होती. पुढे चंदीगड येथे १९५५ मध्ये चंदीगड ही पंजाबची राजधानी झाल्यावर तिथे मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली. याचबरोबर राज्य मध्यवर्ती ग्रंथालय हे स्थापण्यात आले. अंबाला, जालंधर, धर्मशाळा अशा ठिकाणी जिल्हा ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली. एकूणच १९५५ ते ६० या काळात विविध ठिकाणी ग्रंथालयांच्या स्थापनेला चालना मिळून याद्वारे संघटना बळकट होण्यासाठी मदत झाली. या काळातील व्हि.एस. गुजराथी व ए.डी. चांद या ग्रंथालयक्षेत्रातील उत्तम व्यवस्थापकांनी ग्रंथालयाद्वारे समाजाला सेवा देऊन ग्रंथालयास अधिष्ठान प्राप्त करुन दिले. याच पार्श्वभूमीवर यु. एस. आय. एस. ग्रंथालय सेमिनार हा मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालय परिषदेद्वारे ३ मे १९५७ रोजी आयोजित केला होता. या सेमिनारसाठी उत्तर भारतातील विविध राज्यातून अनेक मान्यवरांनी सहभाग दर्शविला होता. या सेमिनार प्रसंगी पंजाब ग्रंथालय संघटनेच्या वतीने श्री. भाटीया, श्री. गुजराती, श्री. त्रेहरान यांनी प्रतिनिधीत्व केले होते. या चर्चासत्रात भाटीया व तेहरान यांनी 'समाजातील ग्रंथालयांची भूमिका' या विषयावर आपला शोधनिबंध सादर केला होता. या संघाद्वारे १९५७ पासून 'पंजाब पब्लिक लायब्ररी ईयर बुक १९५७–५८' याचे प्रकाशन २६ जून १९५८ रोजी संघटनेचे अध्यक्ष स्व. बी.एस. गुजराती यांच्या हस्ते केलेले होते. १९, २० मार्च १९६० रोजी राज्य मध्यवर्ती ग्रंथालय चंदीगड येथे 'पंजाबमधील ग्रंथालये' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. त्याचे उद्घाटन ग्रंथालय संघटनेचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय ग्रंथालय कलकत्ताचे संचालक बी.एस. केशवन यांच्या हस्ते केले होते. या प्रसंगी 'पंजाब थ्रु एजिस' या ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले होते.

पुढे संघटनेने १९५८–५९, ५९–६०, ६०–६१ या वर्षात आपले अंक प्रकाशित केले होते. तसेच १९६२ मध्ये आपल्या वर्षांकाबरोबर 'डिरिक्टरी ऑफ लायब्ररीयनस् ऑफ पंजाब' ही प्रकाशित केली होती. १९६३ मध्ये 'अॅकॅडमीक लायब्ररी' या शोधपत्रिका व ग्रंथसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले होते. प्रत्यक्षात या संघटनेची नोंदणी ही अधिनियमाच्या अंतर्गत १९६१ मध्ये करण्यात आली. पुढील काळात संघटनेचे पदाधिकारी म्हणून अनेक मान्यवरांनी कार्य केले होते. यामध्ये प्रा. दासगुप्ता यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. तसेच संघटनेचे ग्रंथालय कायदा विषयक स्वतंत्र चर्चासत्राचे आयोजन करुन या प्रसंगी तेहरान यांनी तयार केलेला ग्रंथालय कायद्याचा मसुदा चर्चिला होता; व त्याचे प्रकाशन वर्षांक १९६२ मध्ये करण्यात आले होते. या काळातील ग्रंथालय चळवळ विषयक कायदा शासनाकडे सुपूर्द करण्याविषयी व आदर्श ग्रंथालय कायदा मसुदा भारत सरकारद्वारे करण्यात आलेला होता. त्याचीही चर्चा १९६३ मधील चर्चासत्रामध्ये करण्यात येऊन या कायद्याची अंमलबजावणी पंजाबमध्ये करण्याची विनंती करण्यात आली होती. एकूणच संघटनेचे सचिव श्री. के. बी. गौरी यांनी या चर्चासत्राचे आयोजन सुसूत्रबद्ध पद्धतीने करुन सार्वजनिक ग्रंथलय विषयक कायद्यासंदर्भात व कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात वातावरण निर्मितीस चालना दिलेली होती. नंतर ही वेळोवेळी विविध सेमीनार या संघटनेद्वारे संपन्न केले गेले.

**संघटनेचे उपक्रम :**

या संघटनेद्वारे अनेक उपक्रम यशस्विरीत्या राबविण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह, पुस्तक प्रदर्शन, आंतर राष्ट्रीय ग्रंथ वर्ष अशांचे वेळोवेळी आयोजन करण्यात आलेले होते. सन १९७२ ते ७५ या काळात संघटना अधिक सक्षमतेने काम करताना जागतीक स्तरावर संघटनेने अनेक सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी संपर्क साधून ग्रंथालयाच्या उपयोजनातून आर्थिक, सामाजिक विकास या दृष्टिने सकारात्मक कार्य केले. या काळातील इंडीयन लायब्ररीयनचे संपादक व पंजाब ग्रंथालय सघंटनेचे अध्यक्ष लाला संतराम भाटीया यांनी विविध लेख आंतरराष्ट्रीय महिला वर्ष १९९५ च्या अनुषंगाने प्रकाशित केलेच शिवाय याकरिता एका विशिष्ट कार्यक्रमाचे आयोजन राज्य मध्यवर्ती ग्रंथालय चंदीगड येथे केले होते. पुढील एका दशकाच्या काळात याच संघटनेच्या सभासदांमध्ये नेतृत्वासंदर्भात दुफळी

निर्माण होऊन संघटनेचे कार्य निष्प्रभ झाले. चंदीगड आणि पंजाब या स्तरावर पडलेली ही दुफळी पंजाब ग्रंथालय संघटनेच्या वाटचालीतील अंध:काराचा काळ होता. अशी दीर्घकाळ निष्क्रीय झालेली संघटना ही १९८९ मध्ये सुखमदुरासिंग सिद्धू, श्री. अर्जुन सिंग, डॉ. जस्मीर सिंग अशा धडाडीच्या कार्यकर्त्यांनी सुरळीत केली.

**पंजाब राज्य शासन ग्रंथपाल संघटना :**

पंजाब राज्यातील शासकीय ग्रंथपालांची एक परिषद २ मे १९८९ रोजी भरलेली होती. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून श्री. ए.एल.त्यागी (ग्रंथपाल, जिल्हा ग्रंथालय अंबाला) यांनी पाहिले. या परिषदेमध्ये या संघटनेची घटना दुरूस्त होऊन यामध्ये –

१. शासकीय ग्रंथालयाकरिता ग्रंथालय सेवा संचलनालयाची स्थापना करणे.
२. शासकीय ग्रंथालय ग्रंथपालांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणे.
३. राज्यातील ग्रंथालयाकरिता सेवक आकृतीबंध लागू करणे.
४. ग्रंथपालांच्या दृष्टिने शासकीय ग्रंथपालांच्याकरिता ग्रंथालय सुरक्षा ठेवी रद्दबातल करणे.
५. राज्यातील ग्रंथपाल व अधिकारी यांच्यातील संबंधाबाबत विचारविनीमय करणे.
६. या संघटनेद्वारे १९६७ मध्ये कोठारी कमीशनच्या अहवालाच्या अनुषंगाने वेतनश्रेणी विषयक निदर्शने करण्यात आलेली होती व या समस्येकडे आमदार, शिक्षणतज्ञ, संलग्नीत संस्थेचे अध्यक्ष यांचे लक्ष वेधण्यात आले होते. याच दरम्यान पंजाब कॉलेज ग्रंथालयाच्या ग्रंथपालांच्या संघटनेची स्थापना जालंदर येथे होऊन त्यांनी १३ मार्च १९८९ मध्ये परिषदेमध्ये 'ग्रंथालय कायद्याची गरज' या विषयी चर्चा घडवून आणली होती.

**चंदीगड ग्रंथालय स्टडी सर्कल :**

१९७६ मध्ये श्री. एल. त्रेहान (सचिव, पंजाब ग्रंथालय संघटना) यांनी चंदीगड मधील व परिसरातील लोकांचे जीवन वाचनसंस्कृतीच्या माध्यमातून समृद्ध करण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत स्टडी सर्कलची स्थापना केली होती. याद्वारे मोफत ग्रंथालय सेवा शहर परिसराशी संलग्नीत ग्रामीण ग्रंथालयात उपलब्ध करुन देणे या विषयी विचार करुन नमुना स्वरुपात

चंदिगडमध्ये अस्तित्वात आलेल्या ग्रंथालयाद्वारे वाचकांच्या सवयींचा आढावा घेणे हे उद्दिष्ट होते. याकरिता फिरत्या ग्रंथालयाचा वापर करणेविषयी चर्चा करण्यात आलेली होती. तसेच ज्येष्ठ नागरिकांकरिता व सेवकांकरिता रोज गार्डनमध्ये एक अभ्यासिका सुरू करणेचा प्रयत्न ही जानेवारी १९७६ रोजी करण्यात आलेला होता. ही अभ्यासिका सकाळ व संध्याकाळी बागेत फिरावयास येणाऱ्या व्यक्तींना याचा लाभ मिळावा या उद्दिष्टाने केलेली होती.

**चंदीगड ग्रंथपाल संघटना :**

श्री. ए. एस. सिद्धू ग्रंथपाल, शासकीय महाविद्यालय चंदीगड यांनी ग्रंथपालांच्या स्वास्थासाठी या संघटनेची स्थापना १९७७ मध्ये केलेली होती. ग्रंथालय समस्या हेच या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट होते. ग्रंथपालांच्या समस्या व समाधान आणि सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम असे या संघटनेचे उद्दिष्ट जरी असले तरी पुढील कालखंडात ग्रंथपालांच्या समस्या हे उद्दिष्ट मागे करुन संघटनेच्या उद्धारणाच्या मर्यादा विस्तृत होऊन या संघटनेचे नामकरण चंदीगड ग्रंथपालांची संघटना असे करण्यता आले. याचे संस्थापक अध्यक्ष श्री. एन. ए. सिद्धु हे होते. तर सचिवपद श्री. आय. बी. वर्मा यांनी संभाळलेले होते. या संघटनेच्या उपक्रमामध्ये ग्रंथालयाविषयक स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले. उदा. रेफरन्स सर्व्हिस स्पर्धा.

या स्पर्धेचा उद्देश विविध ग्रंथालयातील वाचकाना संदर्भशोध घेण्याची सवय लागावी हा होता. तसेच उत्तम वाचक स्पर्धा, सामान्य ज्ञान व बुद्धिमत्ता स्पर्धा या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयाविषयक जाणीव प्रगल्भ होऊन सातत्यपूर्वक संघटने केलेल्या परिश्रमामुळे वर्षानुवर्षे हा उपक्रम अधिक बहारदार स्वरुपात प्रतिसाद मिळवत राहीला. पुढे १९८४ मध्ये 'दी कम्युनिकेशन मास्टर' या नियतकालीकांच्या समन्वयाने ही स्पर्धा 'दी कम्युनिकेशन मास्टर लायब्ररी रिलेशन कॉम्प्युटेयेशन' या नावाने कार्यरत राहिली. यासाठी संघटनेला प्रस्तुत नियतकालीकाचे सहसंपादक श्री. देश दिपक खन्ना यांचे सहकार्य लाभले होते. हळूहळू या स्पर्धाचे सर्व महाविद्यालयातून जाळे विणले गेले. तसेच या उपक्रमातून राज्य ग्रंथालयास प्रसिद्धी प्राप्त होऊन त्यांच्या सभासदांमध्ये वृद्धी होण्यासाठी मदत झाली. या

संघटनेने शाळा, महाविद्यालयातून  आपले अधिष्ठान निर्माण केलेले होते. आपले असे स्थान निर्माण करुन ग्रंथवाचन व ग्रंथालय या विषयी चर्चा भोजन गृहापर्यंत पोहोचवलेली होती. ही स्पर्धा चंदीगड  व परिसरामधील शैक्षणिक जीवनाचे अंग बनून राहीलेली होती. या स्पर्धांचे आयोजन प्राथमिक शाळेपासून विद्यापीठ स्तरावर शिक्षक आणि विद्यार्थी पालक आणि सर्वसामान्य  या सर्वांसाठी खुले होते. ही स्पर्धा इतकी प्रभावी झाली होती की, विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्याकडून स्पर्धा आयोजनासाठी वारंवार मागणी होऊ लागली. ही स्पर्धा तीन स्तरावर संपन्न होऊन वार्षिक आयोजन नोव्हेंबर महिन्यात होत असे.  वार्षिक पारितोषिक वितरणाचे आयोजन जानेवारी महिन्यात केले जाई. पहिले सत्र हे शिक्षक, पालक आणि सर्वसामान्य जनता यांच्यासाठी असे तर दुसरे सत्र नवशिक्षीताकरिता स्पर्धा अशा स्वरूपाचे असे. हा एक द्विस्तरीय चालणारा उपक्रम असतो आणि तिसऱ्या स्तरावर महाविद्यालय, शाळा या स्तरावर संस्थांच्या सहकार्याने आयोजित केला जातो. सातत्यपूर्वक या स्पर्धांना वाढता प्रतिसाद प्राप्त होत असून दिड दशकाहून अधिक काळ या स्पर्धांचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले आहे. साधारणत: चारशे ते सहाशे संस्थांनी यामध्ये सहभाग दर्शविला होता. ग्रंथपाल संघटनेने स्वत:च्या निधीतून सुरु  केलेली अशाप्रकारची ही देशातील एकमेव स्पर्धा असून या संघटनेत अनेक महनीय व्यक्तींनी विविध कार्यक्रम प्रसंगी उपस्थित राहून कौतुक केलेले आहे. संघटनेचे हे कार्य विशेष कौतुकास्पद आणि इतर संघटनांनी अनुकरण करावे असे आहे.

पंजाबमधील संघटना विषयक कार्याचा आढावा घेत असताना चंदीगड येथे २८ सप्टेंबर १९६६ रोजी अखिल भारतीय संघटनेचे अध्यक्ष श्री. पी. एन. कौल यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयशास्त्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहीलले होते. त्यांनी नविन संघटनेची स्थापना करण्याची गरज व्यक्त केलेली होती. या प्रसंगी कौला यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करुन त्यांना समितीमध्ये इतर सदस्याच्या नेमणुका व संघटनेची घटना विषयक अधिकार दिले होते. या संघटनेची संरचना या प्रसगी सुचविण्यात आलेली होती. यानुसार राज्य स्तरीय व इतर संघटनांचे देशातील विभागीय संघ विविध स्तरावरील सभासद तसेच विविध स्तरावरील इच्छुक प्रतिनिधी, विविध विभागातील संघटक व

प्रतिनिधी यांच्या समन्वयातून एक फेडरेशन उभी करणे व सर्वांचा एक संघ स्थापन करणे, अशी विचारधारा पुढे येऊन या संघाद्वारे एक न्युजलेटर प्रकाशीत करणे, ग्रंथालय व ग्रंथालय संघटना यांच्या कार्यात समन्वय साधणे, ग्रंथपालाच्या हिताचे संरक्षण करणे. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर सहकार निर्माण करणे अशा स्वरुपाची ही उद्दिष्टे होती. या संघटनेचे कार्यालय मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालय पतियाळा येथे असावे असे सुचविण्यात आले होते.

एकूणच पंजाबमध्ये ग्रंथालय संघटना बळकट करण्याचा वारंवार प्रयत्न झाला असला तरी या राज्यात ग्रंथालय क्षेत्रातील नामवंतांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण असून त्यांनी अखिल भारतीय स्तरावर ग्रंथालय संघटना व संघ यांच्या स्थापनेची रुजवलेले बीज ही पंजाबच्या भूमीतून कार्यान्वित झोलली होती. याची ऐतिहासिक नोंद घेणे क्रमप्राप्त ठरते.

**३.९ आसाम राज्य ग्रंथालय संघ :**

या संघटनेची स्थापना श्री. कुमुदेश्वर बार ठाकूर विद्याविनोद या माध्यमिक शिक्षकाने केली. बडोदा येथे भरलेल्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेत उपस्थिती दर्शविल्यानंतर त्यांच्या मनात आसाममध्ये देखील अशी संघटना असावी असा विचार बळावू लागला. अशा प्रकारच्या संघटनेसाठी स्थानिक लोकांचे सहकार्य घेता येईल हा ही विचार त्यांनी केला. श्री. कुमुदेश्वर हे शिक्षक होतेच तसेच ते नंतरच्या काळात उपशाळा तपासणीसही म्हणून कार्यरत होते. त्यामुळे आसाममधील विविध विभागात फिरत असताना त्यांनी विविध भागामध्ये एक वाचनालयाभिमुख समाज निर्मितीसाठी ग्रंथालयाच्या अनुषंगाने विचार ग्रामिण परिसरात पसरविला आणि त्यातुनच विविध प्रकारची ग्रंथालये स्थापण्यासाठी मार्गदर्शन केले. यासाठी राज्यातील तेथील युवकांशी चर्चा करुन ग्रंथालयाच्या स्थापनेसाठी त्यांची चर्चा केली. ग्रंथालयांची सेवाभावी स्वरुपात स्थापना करण्यास तरुणांना प्रवृत्त केले. पुढे त्यांनी तरुणांबरोबर स्थानिक पातळीवर कार्यरत असणाऱ्या व्यक्ती आणि विशेषत्वाने शिक्षक यांचा चपखलपणे या कार्यासाठी उपयोग केला. आसाममध्ये एकमेव स्वरुपात अस्तित्वात असलेल्या आसाम साहित्य सभेच्या १९३८ मधील गुहाटी येथील परिषदेत एक प्रतिनिधी म्हणून श्री. कुमुदेश्वर यांनी उपस्थित दर्शवित आसाम ग्रंथालय संघटनेच्या सभा संघाच्या व्यासपीठाचा उपयोग करण्याचे ठरविले. यासाठी त्यांनी युवकांच्या माध्यमातून आपल्या या हेतुची जाहीरात करण्याचे ठरवून उज्ज्ञंनबाजार परिसरात या सभेच्यावेळी चहा व अल्पोपहार उपस्थितांना मोफत देण्यात येईल याची जाहिरातबाजी केली. या त्यांच्या प्रयत्नास प्रतिसाद लाभून आसाम ग्रंथालय संघटनेस अधिकृत अशी एक संरचना प्राप्त झाली. आसाममधील विविध विभागातून यासाठी उपस्थिती दर्शविलेली होती. याप्रसंगी संघटनेच्या अध्यक्षपदी भरतकुमार यांची निवड झाली आणि कुमुदेश्वर यांची सचिवपदी नियुक्ती झाली होती.

**आसाममधील ग्रंथालयांचे स्वरुप :**

या काळात आसाम राज्यात एकही प्रशिक्षीत ग्रंथपाल कार्यरत नव्हता. फारच कमी लोकांना ग्रंथालयाबद्दल आस्था होती. सुस्थितीत केवळ दोनच ग्रंथालये राज्यात कार्यरत होती. ती म्हणजे कॉटन कॉलेज, गुहाटी आणि मूरारीचंद कॉलेज, सिलेट ही होय.

या परिसरातील ज्या व्यक्तींचा खाजगी ग्रंथसंग्रह होता अशा व्यक्तींनी या परिसरात आपल्या शेजारील कुटुंबामध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यास फारच अल्प प्रमाणात सहकार्य केले होते. या काळात श्री. लोबो रामदत्ता, दिब्रूगड, अक्षय घोस, शिवसागर, भगवती प्रसाद बारुआ शासकीय ग्रंथालय सिलोन व धूब्री येथील ग्रंथालयांतील महिला आणि सियालेट येथील बाल ग्रंथालय, बिस्जूराम हॉल, ग्रंथालय –जोहरत, बनी ग्रंथालय, तेजपुर या ग्रंथालयांचा काही प्रमाणात येथील लोक वापर करत असत. याचबरोबर ग्रामीण ग्रंथालये, जी सामुदायीक सुचनांची केंद्र समजली जात आणि जी राष्ट्रीय चळवळीचा एक उपक्रम म्हणून भारतात सुरू केलेली होती. अशा केंद्रांचा अल्पप्रमाणात उपयोग होत असे. जेव्हा अशा ठिकाणी ग्रंथालय चळवळीचे आपले ध्येय श्री. भरत कुमार त्या त्या परिसरातील लोकांसमोर मांडत, तेव्हा तेथील लोक त्यांचे स्वागत कुतूहलपूर्वक करत. त्याचबरोबर ग्रामीण ग्रंथालयाच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी चर्चा होई. तेव्हा या लोकांच्याकडून सहकार्य प्राप्त होईल असेही वातावरण निर्माण होऊ लागले. काही वेळा बार ठाकूर यांचे स्वागत साप्ताहीक भेटीच्या वेळी अत्यंत संथपणे केले जाई. अशा साप्ताहीक भेटीच्या वेळी कायरूक जिल्ह्यातील परिसरात त्यांना अशा अल्प प्रतिसादास सामोरे जावे लागत असे. अशी ठिकाणे त्यांनी जाणिवपूर्वक प्रभावी ग्रंथ प्रसाराकरिता निवडली होती. एका खलाशाने श्री. बार ठाकूर यांच्यावर त्यांच्या चळवळीविरोधात हल्ला देखील केलेला होता. अशा हल्ल्यातुन सुटका करुन पुढे नगरबेरा या परिसरात आपल्या पुढील कार्यासाठी ते शांतपणे निघून गेले. ग्रंथालय चळवळी विषयक त्यांची आस्था आणि संयमी वृत्ती पुष्कळवेळा उपयोगी ठरली. या त्यांच्या फिरतीमध्ये अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी त्यांना सहकार्य केले. शिवाय अशा सभेचे आयोजन करण्यात देखील पुष्कळ मदत केली.

श्री. बार ठाकूर यांच्या चळवळीस सहकार्य करणाऱ्यामध्ये गोपीनाथ बारडोली, ए.पी.गोस्वामी, सुरेन्द्र भारती, पुर्णा गोस्वामी, तनूशेखर चूटीया, हरेंद्रनाथा बाऊआ, बेनोधर शर्मा, रघूनाथ चौधरी, प्रदिप चेतीया, तिर्थनाद शर्मा अशा अनेक व्यक्तींनी सहकार्य केले. अशा व्यक्तींच्या सहकार्यामुळे बार ठाकूर यांना आसाम परिसरात ग्रंथालय चळवळ उभी करण्यास खुपच मदत झाली. १९३८ ते ४८ या दशकाच्या कालखंडात श्री. बारठाकूर हे

साधारणत: २०५० ग्रंथालये उभी करण्यात यशस्वी झाले. याचबरोबर या ग्रंथालयात काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी वर्गीकरण, तालिकीकरण, ग्रंथसंरक्षण यांचे मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यान प्रसंगी अत्यंत तळमळीने ते लोकांना आवाहन करीत, ''तुमच्या दैनंदिन जीवनात पैशाची बचत करुन त्याचा वापर ग्रंथ खरेदीसाठी करा. अशाप्रकारे अत्यंत चिकाटीने सुरु केलेले ग्रंथालय चळवळीचे अभियान पुढे अनेक ठिकाणच्या कौटुंबिक ग्रंथालयाच्या संग्रहासाठी वळविले. या कार्यात त्यांना त्या त्या कुटूंबातील तरुण व्यक्तीस सचिव म्हणून नियुक्त करुन आई वडील यांच्यापैकी एकास त्या ग्रंथालयाच्या अध्यक्षपदी नियुक्त केले. अशा ग्रंथालयातून त्या त्या ठिकाणी दिवसा पुस्तके चाळण्याची व्यवस्था केली. पण ही पुस्तके सर्वसामान्यात: देवघेवीद्वारे बाहेर दिली जात नसत. मुलांच्यामध्ये ग्रंथाविषयी आस्था निर्माण होण्यासाठी मुलांना त्यांच्या वाढदिवस प्रसंगी आपल्या पालकांकडे पुस्तकाची मागणी करण्याचे आवाहन केले. शिवाय शाळेमध्ये त्यांन शैक्षणिक प्रगती समाधानकारक केल्यास त्यांचा गौरव केला जात असताना त्यांना पारितोषिक स्वरुपात पुस्तके देण्याविषयीचा आग्रह करण्याविषयी आवाहन करण्यास त्यांनी सुचविले होते. इतकेच नव्हे तर कारखान्यात कामगारांनी, मजुरांनी व इतर सर्व प्रकारच्या कामगारांनी फावल्या वेळेत वाचन करावे यासाठी त्यांना संधी दिली पाहिजे, असा ही आग्रह बार ठाकूर करत असत. याचबरोबर या सर्वांना ग्रंथालय विषयक कळकळीचे आवाहन करत असताना ते आर्थिक दारिद्र्य रेषेखालील लोकांना दरदिवशी मुठभर धान्य साठवून त्यांची विक्री करुन प्राप्त झालेले पैसे ग्रंथालय चळवळीस देणेबाबत आवाहन करत. आसाम सारख्या दुर्गम परिसरातील ग्रंथालय चळवळीच्या अभियानासाठी श्री. बार ठाकूर यांनी केलेले कार्य हे अद्वितीय स्वरुपाचे आहे. पुढे त्यांनी आसामचे राज्यपाल श्री. जयरामदास दौलतराम यांची वैयक्तिक भेट घेऊन त्यांच्याकडे आपल्या मागण्या नोंदविल्या होत्या यामध्ये त्यांनी–

१. गुहाटी विद्यापीठामध्ये पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याविषयी मागणी केली होती.
२. संघटीत सेवा सुरू करण्याविषयी सकारात्मक पावले उचलणे.
३. दर पाचशे लोकसंख्येकरिता एक ग्रंथालय अशा स्वरुपाची ग्रंथालय कायद्यात तरतुद करणे.
४. स्थापन करण्यात आलेल्या ग्रंथालयाकडून नेमकी प्रेरणा घेण्यात यावी.

सन १९३८ –१९७२ या काळात आसाम ग्रंथालय संघटनेचे कार्य काहीशा सुप्त अवस्थेत राहिले. या काळात संघटनेद्वारे एकूण १० वार्षिक परिषदांचे वेगवेगळ्या शहरात आयोजन करण्यात आले होते. श्री. रामेश्वर बरुआ यांनी दिबग्रुड येथे भरलेल्या पहिल्या परिषदेचे अध्यक्षपद भूषविलेले होते तर दुसरी आणि तिसरी परिषद अनुक्रमे तेनपुर, नवगाव या ठिकाणी भरली होती. चौथी परिषद सन १९५५ मध्ये देवेश्वर शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली जोहरत येथे संपन्न झाली होती. या परिषदेचे सचिव श्री. सुरेंन्द्र बारली हे होते. पाचवी परिषदेचे अध्यक्षपद पुर्णागोस्वामी यांनी भुषविले तर सचिवपदाची जबाबदारी श्री. अयोध्याप्रसाद गोस्वामी यांनी सांभाळली होती. बोकरवत यांनी सन १९५७ मधील संघटनेस काँग्रेस पक्षाची मान्यता प्राप्त संघटना म्हणून मंजूरी मिळविली. संघटनेमधील या बदलाबद्दल काही जणांमध्ये नाराजी निर्माण होऊन काही दक्ष कार्यकर्ते संघटनेपासून दुर गेले. यामध्ये प्रामुख्याने अयोध्याप्रसाद गोस्वामी यांचा समावेश होता. यामुळे सचिपपदी कृष्णा गोसावी यांची नियुक्ती करण्यात आली. मंगलदायी या ठिकाणी सन १९५९ रोजी संपन्न झालेल्या सातव्या परिषदप्रसंगी डॉ. महेश्वर नेवोग यांची अध्यक्षपदी तर पुर्णगोस्वामी यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली होती. आठव्या परिषदेचे आयोजन गोहाटी येथे करण्यात आले होते. या परिषदेच्या आयोजनाच्यावेळी सचिव पुर्णाचेताई हे सहभागी न झाल्याने व्यवस्थापक मंडळातील बहुतेक सदस्यांनी अयोध्याप्रसाद गोस्वामी यांना सचिवपदाची जबाबदारी सांभाळण्याची विनंती केली व त्यांनीही ती स्विकारली. सुदैवाने यावेळी ते गोहाटी येथे राज्य सहकारी संघटनेचे प्रकाशन सचिव म्हणून उपस्थित होते. हा योगायोग जुळून आल्याने परिषदेच्या आयोजनाची संधी त्यांच्याकडे चालुन आली. ही परिषद २४ व २५ ऑक्टोबर १९६४ रोजी अत्यंत यशस्वीपणे आयोजित करण्यात आलेली होती. या समितीच्या स्वागतसमितीमध्ये २१ सदस्यांचा समावेश होता आणि या समितीचे अध्यक्षपद प्रा. निनाद शर्मा यांनी संभाळले होते. या परिषदेप्रसंगी पहिल्यांदाच स्मरणिका प्रकाशित करण्यात आली होती. या स्मरणिकेत डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी तयार केलेल्या आसाम ग्रंथालय कायद्याचा मसुदा समाविष्ट करण्यात आला होता. याचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे परिषदेमधील चर्चासत्रामध्ये ग्रंथालय क्षेत्रामधील नामवंत डॉ. रंगनाथन यांच्याबरोबर

पी. एन. कौला, नी. एन. गौर (आय.एल.ए. अध्यक्ष), डॉ. ओ. के. ओहेदेदार (राष्ट्रीय ग्रंथालय कलकत्ता) अशा मान्यवरांनी सहभाग दर्शविला होता. या चर्चासत्राबरोबरच खुल्या अधिवेशनात गटचर्चेत आसाम राज्याचे शिक्षणमंत्री श्री. देवकांत बारुआ, उपशिक्षण मंत्री श्रीमती कमलकुमारी बारुआ याचबरोबर शिक्षण क्षेत्रातील अनेक नामवंतांनी सहभाग दर्शविला होता. या प्रसंगी दहा ठरावांचा स्विकार करुन डॉ. रंगनाथन यांनी सादर केलेल्या ग्रंथालय कायद्यातील मसुद्यास मान्यता दिली होती. या मसुद्यात अंतर्गत राज्यामध्ये ग्रामीण व शहरी ग्रंथालयाचा विकास करणे, शाळा व महाविद्यालयांकरिता ग्रंथालय स्थापन करणे, ग्रंथालयाकरिता पुरेसा निधी देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे तसेच ग्रंथालय विषयक अर्धवेळ अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी गुहाटी विद्यापीठास आवाहन करणे. या अभ्यासक्रमाचा उपयोग राज्यातील ग्रामीण परिसरात काम करणाऱ्या ग्रंथपालांसाठी व्हावा अशा प्रकारची तरतुद या मसुद्यात करण्यात आली होती. आसाम ग्रंथालय संघटनेची ९ वी परिषद गुहाटी येथे ९ मे १९७१ रोजी आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस २०० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेच्या आयोजनासाठी आसाम शासनाच्या सामाजिक शिक्षण विभागाकडून सहकार्य प्राप्त झाले होते. ही परिषद श्री. धर्मदत शर्मा (सामाजिक शिक्षण अधिकारी, आसाम) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या परिषदेच्या प्रसंगी चर्चासत्राचे आयोजन तीन गटात करण्यात आलेले होते. १. शालेय आणि महाविद्यालयीन ग्रंथालये, २. सार्वजनिक ग्रंथालये, ३. ग्रामिण ग्रंथालये अशा स्वरुपात होते. या तिन्ही प्रकारच्या ग्रंथालयांच्या समस्या वेगळ्या असल्यामुळे त्या जाणून घेणे यामुळे शक्य झाले होते. या परिषदेच्या खुल्या अधिवेशनाकरिता आसामचे मुख्यमंत्री श्री. एम. एम. चौधरी प्रमुख उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते. तर कुलगुरू डॉ. एम. एन. गोस्वामी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या अधिवेशनात ग्रंथालय कायदा आसाम राज्यात लागू करण्यासाठी शासनाकडे पुनश्च कळकळीची विनंती करण्यात आली. तसेच या प्रसंगी गुहाटी विद्यापीठाचे ग्रंथालय व माहितीशास्त्राचे प्रमुख जे. शर्मा व प्रा. आर. एल. मित्तल यांनी तयार केलेला मसुदा संघटनेकडे सुर्पूद करण्यात आलेला होता. या संघटनेची नोंदणी १९६४ मध्ये करण्यात आलेली होती. ही संघटना १९६५ मध्ये अखिल

भारतीय संघटनेशी संलग्नीत झालेली होती. संघटनेने आपल्या वाटचालीत ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी १९६६ मध्ये शासनामार्फत कमी काळाचा व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याविषयी प्रयत्न सुरू होते. याचबरोबर आसाम ग्रंथालय संघटनेने राज्यामध्ये विखुरलेल्या ग्रामीण ग्रंथालयाकरिता संघटन उभे करण्यासाठी खुपच प्रयत्न केले. यासाठी विविध ग्रंथालयाकरिता एकात्म स्वरुपाची योजना राबविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्यामागची भुमिका अशी होती की, राज्यातील एकूण ३००० ग्रंथालयांपैकी केवळ १३५० ग्रामीण ग्रंथालयांची अनुदानासाठी शासनाद्वारे नोंद घेण्यात आली होती. उर्वरीत ग्रंथालयाना देखील कालबद्ध पद्धतीने अनुदान देण्यासाठी त्यांचा समावेश करण्याविषयक संघटनेद्वारे शासनाकडे आग्रह धरण्यात आलेला होता. अशा ग्रामीण ग्रंथालयांना संघटनेशी संलग्नीत करताना विविक्षित नमुन्यातील अर्ज तपासून व यासाठी रुपये १० इतके शुल्क आकारुन या सर्व ग्रामीण ग्रंथालयांची नोंदणी करण्यात आलेली होती.

या अधिवेशन प्रसंगी नियुक्ती करण्यात आलेल्या नव्या कार्यकारीणीद्वारे संघटनेचे अर्ध वार्षिक स्वरुपात प्रकाशन करण्याविषयक निर्णय घेण्यात आला होता. त्याचबरोबर जिल्हास्तरीय ग्रामीण ग्रंथालय, उपविभाग व विविध विभाग स्तरावर यासाठी समित्यांचे गठन करुन संघटना प्रभावी करण्याचा निश्चय करुन अशा प्रकारच्या २१ समित्यांची निर्मिती करुन जिल्हा समाज अधिकारी यांची सचिव व जिल्हा अधिकारी यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. या समित्यांच्याद्वारे श्री. मित्तल व शर्मा यांनी तयार केलेला मसुदा सचिवांकडे सुपूर्द करण्यात आलेला होता. या परिषद प्रसंगी विविध समित्यांची निर्मिती करुन संघटनेला व्यवस्थापकीय स्वरुप देण्याचा स्तुत प्रयत्न करण्यात आलेला होता. तसेच श्री. एस.एन. तलूकदार (शिक्षणमंत्री, आसाम राज्य) यांची भेट घेऊन ग्रंथालय कायदा लागु करण्यासाठी आग्रह धरण्यासाठी अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली समिती गठीत करण्यात आली होती, त्याच बरोबर आसाम मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी आणखी एक शिष्ठमंडळ गठीत करण्यात आले होते. या प्रयत्नातून संघटनेचे दोन प्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांची एक सदस्यसमिती शिक्षणमंत्र्यांच्या सल्ल्याने गठीत करण्यात आलेली

होती. पण अंतिमत: कोणताही लाभ झाला नाही. याच काळात शासनाद्वारे संघटनेस आपले मुख्य कार्यालय स्थापन करण्यासाठी उलूभारी येथे दोन गुंठ्यांचा भुखंड ही देण्यात आला. दुर्दैवाने तो वेळत ताब्यात न घेतल्याने ती संधी संघटनेस गमावावी लागली. याचबरोबर आसाम साहित्य संस्थेचे रुपये १०,०००/– चे अनुदान ग्रंथालय संघटनेस मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले होते. पुढील काळात २४ –२५ नोव्हेंबर १९७१ मध्ये संघटनेचे १० वे अधिवेशन नवगाव कॉलेजमध्ये संपन्न झाले. या अधिवेशनास आलेल्या प्रतिनिधींची पाच गटात चर्चासत्राच्या विषयानुसार विभागणी करण्यात आलेली होती. या अधिवेशनापर्यंत एकूण १६९ ग्रामीण ग्रंथालयांनी संस्था सदस्यत्व स्विकारलेले होते. दरम्यान असे लक्षात आले की, संघटनेचे आजीव सभासद असलेला शासनाचा समाज शिक्षण विभाग हा शासनाच्या शिक्षण विभागास जोडण्यात आल्याचे निदर्शनास आले. अशा बदलामुळे समाज शिक्षण विभाग स्वत:चे अस्तित्व गमावून बसला. या बदलामुळे समाजशास्त्र विभागाद्वारे आर्थिक सहाय्य प्राप्त होण्यासाठी संघटीत झालेल्या ग्रामीण ग्रंथालयाच्या भवितव्याविषयी सर्वांना या बदलामुळे एक आश्चर्य वाटून राहीले. म्हणूनच सामाजिक शिक्षण अधिकारी यांनी सर्व ग्रंथालये आसाम ग्रंथालय संघटनेने आपल्याकडे घ्यावीत अशी विनंती केली. अशा बदलामुळे १९३२ पासून १९७७ पर्यंत संघटनेचे अस्तित्वात संपुष्टात आले. १९७२ मध्ये संघटनेच्या जर्नल ग्रंथलोकचा दुसरा अंक १९७२ मध्ये प्रकाशित करण्यात आला आणि तो शेवटचा ठरला. पुढील काळात १९९३ मध्ये गुहाटी ग्रंथालय संघटना अस्तित्वात आली आणि यातुनच पुढे आसाम ग्रंथालय संघटनेच्या पुन:स्थापनेची गरज सर्वांना वाटू लागली.

या करिता गुहाटी ग्रंथालय संघाचे प्रयत्न व आसाम ग्रंथालय संघटनेचे अध्यक्ष डॉ. जे. शर्मा यांच्या प्रयत्नातून १२ ऑक्टोबर १९९६ मध्ये या संघटनेची पुर्ननिर्मिती करण्यासाठी श्री. एन. लाखर व श्री. बी. गोस्वामी यांची अस्थायी समितीच्या संमत्रकपदी नियुक्ती होऊन २२ फेब्रुवारी १९९७ रोजी संघटनेच्या व्यवस्थापक मंडळाची पुन:स्थापना डॉ. एस. के. चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. या कार्यकारणीचे इतर पदाधिकारी म्हणून पी. बी. बोराह – कार्यकारी अध्यक्ष, डॉ. एन. एस. शर्मा – उपाध्यक्ष, डॉ. एम. एन. बोरा–

उपाध्यक्ष, डॉ. एन. लाखर– मुख्य सचिव व डॉ. आर. के. बर्मन – खजिनदार यांची नियुक्ती या संघटनेद्वारे करण्यात येऊन तळागाळापर्यंत ग्रंथालय चळवळ रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. याकरिता जिल्हा स्तरावर समित्यांचे गठन करण्यात आले. या समितीद्वारे ग्रंथालय कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा व ग्रंथालय क्षेत्राचे भवितव्य उज्ज्वल करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### ३.१० गुहाटी राज्य ग्रंथालय संघ :

या संघटनेची स्थापना ही ८ फेब्रुवारी १९९३ मध्ये उपसंचालक ग्रंथालय सेवा आसाम राज्य श्री. बोर्डोली यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या व्यावसायीकांच्या सभेतून करण्यात आली. याच प्रसंगी या संघटनेच्या कामकाजाकरिता एक अस्थायी समिती गठीत करण्यात आली होती. पुढील सहा महिन्यात म्हणजे ६ डिसेंबर १९९३ रोजी सर्वसाधारण सभेत या अस्थायी समितीचे विसर्जन करुन अस्थायी समितीने तयार केलेली संस्थेची घटना स्विकारण्यात येऊन नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पुढे या संघटनेची नोंदणी ११ मे १९९४ रोजी करण्यात आली. आसाम ग्रंथालय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या नवीन संघटनेचे सभासदत्व स्विकारण्यासाठी नव्याने वर्गणी देण्याचे टाळले. पुढे या संघटनेने विविध समित्या गठीत करुन संघटनेच्या कार्यामध्ये गती आणण्याचा प्रयत्न वारंवार केला. या संघटनेने प्रथमत: १२ ऑगस्ट १९९४ रोजी ग्रंथपाल दिवस साजरा केला. या प्रसंगी या कार्यक्रमाचे उद्‌घाटन एन.एम.शर्मा यांनी केले व डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयाची जी पाऊलवाट उचलेली आहे ती प्रगतीपथावर नेण्याचे आवाहन उपस्थितांना केले. या प्रसंगी आसाम मधील ग्रंथालय चळवळीचे उद्‌गाते आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. अयोध्याप्रसाद गोस्वामी व श्री. राम गोस्वामी (उपग्रंथपाल, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, आसाम) यांचा ग्रंथालय चळवळीतील योगदानाकरिता विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आपले विचार व्यक्त करताना प्रमुख अतिथी प्रा. अनिल कुमार (माजी खासदार) यांनी मानवाच्या बौध्दिक विकासाकरिता त्यांच्या उत्क्रांतीच्या वाटचालीत ग्रंथालयांनी महत्वपूर्ण भूमीका असल्याचे स्पष्ट करुन भविष्यातील सामाजिक वाटचालीचा विचार करुन ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. तर दुसऱ्या वक्त्या श्रीमती अलख बूरागोहेन (गोहाटी विद्यापीठ) यांनी दुर्मिळ पुस्तकातील व प्रलेखातील आपल्या सांस्कृतिक संपन्नतेचे जतन करण्याचे आवाहन करताना राज्य सरकारने आसाम मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा लागू करण्याविषयी कार्यकारणीला विनंती केली. पुढे संघटनेद्वारे १९९७–९८ ते २००१ व पुढे सातत्यपूर्वक 'ग्रंथपाल दिन' साजरे करुन संघटनेमध्ये जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न वारंवार केले. या संघटनेची पहिली वार्षिक

परिषद १९९५ मध्ये खानपारा येथे आयोजित करण्यात आलेली होती. या परिषदेचा मुख्य उद्देश आसाममधील ग्रंथालय कायदा यावर चर्चासत्रांचे आयोजन हा होता.या चर्चासत्राचे ३ सत्रामध्ये आयोजन करताना पहिले सत्र हे 'ग्रंथालय कायदा – एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप', 'आदर्श सार्वजनिक ग्रंथालय कायदा आसाम' या विषयांवर केंद्रीत करण्यात आले होते. तर दुसरे व तिसरे सत्र हे 'आसाममधील ग्रंथालय कायद्याविषयक विविध स्तरावरील ग्रंथालय संघटनाची भूमिका' या विषयी संबंधीत होते. या तिन्ही सत्रांचे आयोजन श्री. राम गोस्वामी, श्री. अमितकुमार शर्मा, श्री. धर्मदत्त शर्मा यांनी केले होते. या प्रसंगी 'ग्रंथपालनः आसाममधील एक आव्हानात्मक कार्य' या आशयाचे शीर्षक असलेली एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आली होती. या संघटनेने शासनाकडे पुढील बाबींकरिता सातत्यपूर्वक पाठपुरवठा केला होता.

१. आसाममध्ये ग्रंथालय कायदा लागु करणे.
२. उच्च माध्यमिक स्तरावर ग्रंथालयशास्त्र पदवीधरांची नेमणुका करणे.
३. राज्यातील ग्रंथपाल आणि विशेष ग्रंथालयाकरिता ग्रंथपाल यांना वेतनश्रेणी लागु करणे.
४. महाविद्यालयीन स्तरावर उपग्रंथपालाची नेमणुक करणे.
५. गुहाटी ग्रंथालय संघटनेस वार्षिक अनुदान उपलब्ध करणे.

ग्रंथालय संघटना बळकट करण्यासाठी प्रयत्न करताना संघटनेने ग्रंथालय विषयक बाबी संदर्भात वेगवेगळ्या शहरातून सातत्यपूर्वक चर्चासत्रांचे आयोजन करुन जागृतीचे अभियान आजही सुरू ठेवलेले आहे. या संघटनेच्या उद्दिष्टांचे स्वरुप सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे–

१. आसाम राज्यात ग्रंथालय चळवळीस प्राधान्य देऊन ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रयत्न करणे.
२. ग्रंथालय क्षेत्राशी संबंधीत सर्व स्तरातील व्यक्तींकरिता सर्वसामान्य व्यासपीठ उपलब्ध करुन देऊन सभा, परिषदा व चर्चासत्रे यांचे व्यावसायिक दृष्टिकोनातून आयोजन करणे.
३. आसाम राज्यात ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी पुढाकार घेणे.

४. संदर्भसूची विषयक प्रलेख आणि माहिती उपक्रम व संशोधन यांना प्राधान्य देणे.

५. बूलेटीन, नियतकालिके व ग्रंथ यांचे प्रकाशन करणे.

६. ग्रंथालय व्यावसायिकांचा दर्जा उंचावणे.

वरील उद्दिष्ट्यांच्या पुर्ततेसाठी वेळोवेळी गरजेनुरूप पाऊले उचलणे. एकूणच या संघटनेची घटना अधिकाधिक मुद्‌देसुद करण्याचा संघटनेद्वारे प्रयत्न करण्यात आलेला होता.

## ३.११ मणिपूर राज्य ग्रंथालय संघ :

सन १९७५ च्या कालखंडात ग्रंथालय व्यावसायिकांनी एकत्रित येऊन मणिपूर ग्रंथालय संघटनेची स्थापना केली. या परिसरातील एकूणच व्यावसायिकांची संख्या व लोकांचा असहकार यामुळे ही संघटना विसर्जीत झाली. पुढे एक दशकाच्या कालखंडानंतर या राज्यातील ग्रंथालय व्यावसायिकांची संख्या वाढली. तसेच त्यांच्या समस्येत ही भर पडली आणि यातुनच संघटनेची गरज सर्वांना भासू लागली. या पार्श्वभूमीवर १४ मे १९८७ रोजी मणीपुर ग्रंथालय संघटनेचे पुनर्घटन होऊन त्यांचे संक्षिप्त रुप 'एम. एल. ए.' असे करण्यात आले. या नव्या पुनर्घटीत संघटनेने केवळ पूर्वीच्या संघटनेच्या ध्येय धोरणात बदल केला असे नव्हे तर सर्वसामान्य व्यक्तींना देखील ग्रंथालय चळवळीमध्ये सामील होण्यासाठी प्रयत्न केले. मणिपूर शासन, राजा राम मोहन रॉय प्रतिष्ठान इतर सेवाभावी संस्था व सर्वसामान्य लोक समुदाय यांच्या उत्तम सहकार्यामुळे संघटनेला सार्वजनिक ग्रंथालय चळवळ राज्यात अधिकाधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे शक्य झाले. आजवर या संघटनेने तीन राज्यस्तरीय चर्चासत्रे, पन्नासपेक्षा जास्त ग्रंथालय जागृती विषयक उद्‌बोधन उपक्रम, याचबरोबर वार्षिक उपक्रम, मोर्चा, निबंध स्पर्धा, ग्रंथप्रदर्शन, एस.आर. रंगनाथन शताब्दी वर्ष अशा विविध उपक्रमातुन ग्रंथालयशास्त्रासाठी मणिपूर राज्यात चैतन्यपुर्ण वातावरण निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेले असून संघटनेद्वारे १९८८ पासुन 'ग्रंथालय चळवळ' या नावाचे एक त्रैमासिक प्रकाशित केले जात आहे.

### ३.१२ मिझोरम राज्य ग्रंथालय संघ :

या राज्यामध्ये ग्रंथालयविषयक पहिली संघटना मिझोरम ग्रंथालय असोसिएशन म्हणून १९८७ मध्ये अजबाल येथे स्थापन करण्यात आली. या संघटनेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे,

१. मिझोरम मधील ग्रंथालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यक्ती व ग्रंथालय क्षेत्रात असणाऱ्या व्यक्ती यांचे संघटन करणे.

२. ग्रंथालयाची स्थापना करणे.

३. ग्रंथालय व ग्रंथालय सेवांचा विकास करण्यासाठी प्राधान्य देणे.

४. ग्रंथालय व्यावसायिकांचा दर्जा उंचावणे.

५. ग्रंथालयाचे व्यवस्थापन सुधारण्यास व अधिक चांगले करण्यासाठी प्राधान्य देणे.

६. मिझोरम मधील ग्रंथालयाची स्थापना व विकास करुन ग्रंथालयाचा वापर अधिकाधिक करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

७. ग्रंथालय व्यवसायाविषयक शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी प्रोत्साहन देणे.

स्थापनेनंतर या संघटनेने ग्रंथालया क्षेत्राच्या विकासासाठी सातत्यपूर्व परिश्रम घेतलेले असून यासाठी त्यांनी राबविलेल्या उपक्रमांचे स्वरुप साधारणत: पुढील प्रमाणे आहे–

१. राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानच्या कला व सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने विविध चर्चासत्रे व प्रशिक्षणे १९८९ पासुन एक वर्षाआड आयोजित करुन ग्रंथालय क्षेत्र अद्यावत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

२. संघटनेद्वारे स्थानिक आणि ग्रामीण स्तरातील ग्रंथालयातील ग्रंथपालांना जाग्यावर प्रशिक्षण देण्यासाठी १९९२ पासून विशेष प्रयत्न केले असून आजवर ४५ हून अधिक ग्रंथालयांना संघटनेच्या प्रतिनिधींनी भेट दिली आहे.

३. कला आणि सांस्कृतीक विभागाच्या संघटनेद्वारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र प्रमाणपत्र अध्यापनाचे १९९७ पासुन अनवाल येथे आयोजन केलेले असून या वर्गाचा आजवर २० हून अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतलेला आहे.

या संघटनेद्वारे 'शिक्षण पुस्तिका' व 'ग्रंथालय मार्गदर्शन' ही प्रकाशने ग्रामीण ग्रंथालयासाठी प्रकाशित केलेली आहेत.

या परिसरातील ग्राम ग्रंथालयांच्या विकासासाठी २००३ पासून उत्तम ग्राम ग्रंथालयाकरिता पारितोषिक जाहिर केलेले असून या पारितोषिकांच्या रक्कमेचे स्वरुप–

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | – | १०,०००/– | रु. |
| द्वितीय पारितोषिक | – | ७,०००/– | रु. |
| तृतिय पारितोषिक | – | ५,०००/– | रु. |
| चतुर्थ पारितोषिक | – | ३,०००/– | रु. |
| पाचवे पारितोषिक | – | २,०००/– | रु. |

या पारितोषिका बरोबर एक प्रमाणपत्र ही ग्रंथालयांना दिले जाते. मिझोरममध्ये वाचन साहित्याचा विकास करण्यासाठी ग्रामीण परिसरातील ग्रंथालयांना वाचन साहित्य विशेष प्रमाणात उपलब्ध करुन दिले जावे यासाठी युवा मिझो संघटना व मिझोरम ग्रंथालय संघटना यांचे सहकार्य लाभत असून एकूणच या दोन्ही संघटनांनी ग्रामीण ग्रंथालयाच्या निर्मितीसाठी व विकासासाठी केलेले प्रयत्न स्तुत्य असे आहेत.

## ३.१३ त्रिपुरा राज्य ग्रंथालय संघ :

या राज्यामध्ये प्रस्तुत संघटना कार्यरत असून या संघटनेद्वारे राज्यात ग्रंथालय संघटना स्थापण्याचा प्रयत्न करण्यात आला. या पार्श्वभूमीवर ग्रंथालय संघटनेव्दारे १९ सार्वजनिक ग्रंथालये, ७०४ पंचायत ग्रंथालये आणि इतर २०० ग्रंथालये विभागाशी सामाजिक शिक्षण विभागाशी संलग्नित आहेत. यांची स्थापना होण्यामध्ये या संघटनेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असुन या स्थापने मधील संघटनेची भूमिका अंत्यत स्तुत्य स्वरुपाची आहे. संघटनेद्वारे विद्यापीठ व शासन स्तरावरील ग्रंथालय विषयक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ग्रंथालयविषयक विविध चर्चासत्रे यांचे आयोजन करण्यासाठी संघटना प्रयत्न करित असते. या चर्चासत्राना ग्रंथालयातील सेवकांकडून उत्तम प्रतिसाद लाभत असतो. अशा चर्चासत्रामधून 'ग्रामीण ग्रंथालयांचे उद्‌बोधन' 'त्रिपुरामधील ग्रंथालयातील संदर्भसेवा', 'त्रिपुरामधील ग्रंथालय व वाचक' अशा आशयावर आधारित चर्चासत्रांचे आयोजन केले जाते .

## ३.१४ छत्तीसगढ राज्य ग्रंथालय संघ :

सन १९७२ च्या कालखंडात रायपुर येथे ५ वा राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह आयोजित केला होता. या प्रसंगी राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह १९७३ मध्ये विलासपुर येथे आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार याप्रसंगी एक ग्रंथप्रदर्शन व कला प्रदर्शने, नागरीक परिसंवाद आणि व्याख्यानमाला आयोजित करुन ग्रंथालयविषयक सर्वांगीण समस्याविषयी चर्चा आयोजित करण्यात आलेली होती. यानंतर हा पुस्तक सप्ताह पुढील काळात मोठ्या प्रमाणात आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. याच अनुषंगाने चर्चा करताना छत्तीसगढ येथे संघ स्थापण्याचा विचार पुढे आला व याप्रसंगी झालेल्या चर्चेतूनच या संघाची स्थापना झाली. या संघाच्या स्थापनेच्या माध्यमातून पुढील काळात ग्रंथालयविषक चळवळीला गती आली. दरम्यान रायपुर विद्यापीठाचे तत्कालीन ग्रंथपाल श्री. विश्वनाथ शास्त्री व विलासपुर विद्यापीठाचे ग्रंथपाल पी. एल. मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय संघाची स्थापना झाली. ग्रंथपाल मित्र मंडळ उर्फ विभागीय ग्रंथालय संघ आणि छत्तीसगढ ग्रंथालय संघ या संघाबरोबर दिलाई पुस्तकालय संघ यांच्या माध्यमातून ग्रंथालयाच्या विकासासाठी पुढे उल्लेखनीय काम झाले. त्यांच्या या संघटन कार्यासाठी छत्तीसगढचे तत्कालिन आरोग्य व क्रीडा मंत्री डॉ. श्रीधर मिश्रा व इतर शासकिय कर्मचारी यांचे ही ग्रंथालस चळवळीस विशेष सहकार्य प्राप्त झाले. या आंदोलनातून ग्रंथालयाच्या विकासाबरोबरच प्रौढ शिक्षण विकास आंदोलनाला चालना मिळाली. या राज्याचा परिसर मध्यप्रदेशामध्ये समाविष्ट असताना डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या कालखंडातील १९४६,१९५१, १९५६ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा मंजुरीसाठी वेळोवेळी प्रयत्न करण्यात आले पण ते वेळोवेळी यशस्वी होऊ शकेल नाहीत. तसेच पुढे १९७७ व ८० मध्ये या संदर्भातील प्रयत्न अयशस्वी ठरले. मध्यप्रदेशात २७ व २८ फेब्रुवारी १९९९ मध्ये महाविद्यालयीन ग्रंथपालन संघटनेचे अधिवेशन भरले असता या प्रसंगी देखील उद्‌घाटनासाठी राज्याचे शिक्षणमंत्री श्री. कृष्ण कुमार गुप्ता यांच्या माध्यमातूनही ग्रंथालय कायदा मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता, हा ही प्रयत्न असफल ठरला. यानंतर २००९ मध्ये संघाच्या माध्यमातून ग्रंथालय कायदा लागू करण्याचा प्रयत्न या राज्यात करण्यात आला व तो यशस्वी ठरला. आज हा ग्रंथालय संघ सार्वजनिक ग्रंथालयाचे अभियान पुढे नेण्यासाठी सातत्यपूर्वक प्रयत्न करत आहे.

**३.१५ ओरीसा राज्य ग्रंथालय संघ :**

ओरीसामधील पहिली ग्रंथालय संघटना म्हणून उत्कल ग्रंथालय संघाकडे पाहिले जाते. येथील भारती ग्रंथालय गजम या ठिकाणी ३ ऑक्टोबर १९३९ मध्ये श्री. सरनिबस कवीरत्न आणि श्री. कृपासिंधू नरेंद्रदेव यांनी एक परिषद श्री. लक्ष्मण नारायण साधू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केली होती. या परिषदेमध्ये उत्कल ग्रंथालय संघाविषयी एक ठराव पास करण्यात आला होता. या संघटनेची पहिली परिषद ७ मार्च १९४४ रोजी कटक येथे श्री. एस. पी. रगलन (प्राचार्य, महाराजा कॉलेज परलकी मेदी) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्‌घाटन पंडीत गोदावरीश मिश्रा (शिक्षणमंत्री ओरीसा) यांच्या हस्ते करण्यात आले होते. या परिषदेच्या शेवटच्या सत्रात अखिल उत्कल ग्रंथालय संघाची स्थापना करण्यात येऊन पुरी हे मुख्यालय म्हणून निश्चित करण्यात आले. या प्रसंगी श्री. गंगाधर रामण्यदास कैसरियन यांची अध्यक्षपदी तर सरनिबस कविरत्न व श्री. कृपासिंधू नरेंद्रदेव यां दोघांची सहसचिव म्हणून निवड करण्यात आली होती. या संघटनेचे १९४९ रोजी एक परिषद नयाग्रह येथे श्री. लीगशन मिश्रा यांच्या विशेष प्रयत्नातून आयोजीत करण्यात आली होती. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून मा.हरिकृष्ण मेहताब यांना सौ. मंजिरी ग्रंथालय नयाग्रह यांचेद्वारे आमंत्रित करण्यात आले होते. तर उद्‌घाटनाकरिता श्री. चिंतामणी आचार्य (कुलगुरू उत्कल युनिव्हर्सिटी) यांना पाचारण करण्यात आले होते. या परिषदेच्या प्रसंगी प्रस्तूत संघटना सोसायटी कायद्याअंतर्गत नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या संघटनेद्वारे या परिसरातील ग्रंथालय चळवळीस बळकटी देण्याचा अथक प्रयत्न केलेला होता तरी त्यास अपेक्षित यश लाभले नव्हते. तसेच ग्रंथालय कायद्याच्या अम्मल बजावणीसाठीसुद्धा प्रयत्न करण्यात आलेला होता. पण या ही प्रयत्नांना फारसे यश लाभले नव्हते. दुर्दैवाने ग्रंथालय क्षेत्रातील सेवक व कार्यकर्ते यांच्या अपेक्षेप्रमणे या संघटनेकडून कार्य घडलेले नव्हते.

**ओरिसा शैक्षणिक व सार्वजनिक ग्रंथालय संघ :**

या संघटनेची पहिली परिषद २७ जानेवारी १९७४ रोजी शासकीय प्रशिक्षण महाविद्यालय बोलगीर येथे संपन्न झाली. या परिषदेचे अध्यक्षस्थान श्री. राधा गोविंददास यांनी भूषविले होते. या प्रसंगी राज्य ग्रंथालयाचे पुनर्घटन, ग्रंथालयशास्त्र या विषयाचे पदवीस्तरावर

उपयोजन, ग्रंथपाल प्रशिक्षण, महाविद्यालय ग्रंथालयाकरिता पुरेसे मनुष्यबळ, गहाळ ग्रंथ, वेतनश्रेणी विषयक अनेक ठराव मंजूर करण्यात आलेले होते. या संघटनेचे पदाधिकारी म्हणून अध्यक्ष – श्री. राधागोविंद दास, सचिव – बी.बी. शुक्ला, उपाध्यक्ष – श्री. विराची सुना, कोषाध्यक्ष – श्री. सुक्लाभे पटनाईक, सहसचिव – श्री. ए. के. सादू आणि एच.एस.बेहरा यांची निवड करण्यात आलेली होती. या संघटनेचे पुढील सचिव डॉ. बी. बी. शुक्ला यांना पुढे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. त्यांनी या राज्यात ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले पण ते अयशस्वी ठरले. पुढील काळात ही संघटना अल्पजीवी ठरली.

**ओरीसा ग्रंथालय समाज :**

ओरीसा  हे एक सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असे राज्य असून या ठिकाणी ऐतिहासिक काळातील अनेक विशेष स्थळे या परिसरात आढळतात. यामध्ये प्रामुख्याने बौद्ध मिशन केंद्र यांचे विहार मंदिर, मठ, मदरसा, बट्टा, तुंगीज, चर्चिस, स्कूल क्लब, सभा अशा विविध घटकांचा यामध्ये समावेश आहे. ही सर्व ठिकाणे म्हणजे तत्कालीन ऐतिहासिक काळातील ग्रंथालये असून हा एक ग्रंथालयाचा सांस्कृतिक ठेवा जतन, संवर्धन आणि संशोधन करण्याच्या दृष्टीने एका संस्थेच्या अथवा संघटनेच्या स्थापनेचा विचार पुढे आला अशा संघटनेची तात्काल गरज असल्याने एक स्वतंत्र विचाराचे विचारवंत डॉ. बी.बी.पाढार यांनी नेतृत्व स्विकारुन ऑक्टोबर १९८७ च्या मध्यांतरात आपल्या कार्यालयात एक मैत्रीपूर्ण सभेचे आयोजन करुन या सांस्कृतीक विषयक संवर्धनाची काळजी घेण्यासाठी एका व्यावसायीक संघटनेची नितांत आवश्यकता असल्याचे सुस्पष्ट केले. या गरजेचे स्वरुप सुस्पष्ट करताना त्यांनी पुढील मुद्दे उपस्थितांसमोर ठेवले.

१. ओरीसामधील ग्रंथालय चळवळ
२. ग्रामीण ग्रंथालयातील ग्रंथालय सेवकांना प्रशिक्षण देण्यास प्राधान्य देणे.
३. ग्रंथालय क्षेत्रातील सेवकांचा दर्जा व सेवा विषयक शर्ती व अटी यांचा दर्जा सुधारणे.
४. ओरीसातील सांस्कृतिक ग्रंथालयाच्या अनुषंगाने विविध घटकांशी संबंधित संवर्धन प्रकल्प हाती घेणे.

५. ओरीसामधील ग्रामीण ग्रंथालयातील ग्रंथपालांकरिता प्रशिक्षण उपक्रम राबविणे.
६. चर्चासत्र, परिषदा यांचे आयोजन करणे.
७. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय पद्धती संघटनाकरिता एक विशेष मार्गदर्शक मंडळ म्हणून भूमिका बजावणे.
८. ग्रंथालय सेवा विषयक सल्ला सेवा उपलब्ध करुन देणे.
९. अशा या मैत्रीपूर्ण बैठकीच्या पार्श्वभूमीवर पुढे ओरीसा ग्रंथालय समाज अस्तित्वात येऊन त्यांची नोंदणी ३ जून १९८८ रोजी क्र. व्ही.बी.एस.आर/११८११ –७५ चे १९८८–८९ याद्वारे करण्यात आली.

**ग्रंथालय काँग्रेस ओरीसा :**

या संघटनेची स्थापना १५ जुलै १९७३ रोजी बेहरामपुर येथे श्री. पी. एस. पांडा बेहरापुर विद्यापीठ यांच्या प्रयत्नातून झाली. संघाची प्रमुख उद्दिष्टे –

१. राज्याचे तत्कालिन राज्यपाल श्री. बी. डी. जती यांच्याकडे सार्वजनिक ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी निवेदन देणे.
२. ग्रंथपालांच्या वेतनश्रेणी विषयक प्रयत्न करणे.
३. ग्रंथपालांची वेतनश्रेणी उंचावणे.
४. बेहरापुर नगरपरिषदेकडे परिसरात सर्वत्र अभ्यासिका सुरु करण्यासाठी निवेदन सादर करणे.
५. बेहरापुर नगरपारिषदेच्या विनंतीनुसार बेहरापुर सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली विषयक योजना तयार करणे.

या संघाचे अध्यक्ष हेच या समितीचे निमंत्रक होते. या संघाद्वारे राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताहाचे आयोजन 'न्यूज लेटरचे' प्रकाशन इत्यादी उपक्रम राबविण्यात आले होते.

**३.१६ मध्यप्रदेश राज्य ग्रंथालय संघ :**

ही एक नोंदणीकृत संस्था असून ही भोपाळ येथे कार्यरत आहे. या संघाची मुलभूत उद्दिष्टे पुढीलप्रमाणे,

१. मध्य प्रदेश राज्यामध्ये ग्रंथालयसेवांना प्रोत्साहन देणे.

२. मध्य प्रदेश राज्याकरिता ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी प्रयत्न करणे.

३. ग्रंथालय विषयक साहित्याच्या प्रसारास प्रोत्साहन देणे.

४. ग्रंथालय परिषद, चर्चासत्रे, कार्यशाळा इत्यादीचे आयोजन करणे.

५. ग्रंथालय विषयक प्रशिक्षण अभ्यासक्रम व उजळणीवर्ग यांचे आयोजन करणे.

६. मध्य प्रदेश राज्यातील लोकांच्यामध्ये वाचन सवयी विषयक जाणीव विकसीत करणे.

७. इतर राज्यातील ग्रंथालय संघाशी सहकार्य करणे. विशेषत्वाने अखिल भारतीय ग्रंथालय संघ, तत्सम ग्रंथालय संघटना यांच्याशी सहकार्य करणे.

या संघाच्या सभासदामध्ये विश्वस्त, लाभार्थी, देणगीदार, आजिव सभासद, सर्व सामान्य सभासद असे वर्ग असून याचबरोबर ग्रंथालय, इतर संघटना, राज्यस्तरीय, विभागीय आणि शहरी संघटना संस्थाच्या अशा संस्था करिता स्वतंत्रपणे वर्गणी आकारुन त्यांना सभासद करुन घेण्याची तरतुद करण्यात आली आहे. अशा संघटनाकरिता सभासदत्व देताना संघटनेच्या ६२ व्या कलमाखाली तरतुद करण्यात आलेली असून ही संघटना प्रस्तुत संघटनेची शाखा म्हणून समजण्यात येईल. तसेच तिचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्यात येईल. या संलग्नीत संस्थेत संघटनेस कार्यकारणीवर आपले प्रतिनिधी पाठवण्याचा हक्क ही राहील. एकूण सभासदांच्या पंधरा सभासदापाठीमागे एक प्रतिनिधी आणि जास्तीतजास्त पाच प्रतिनिधी स्विकारण्याची तरतुद संघटनेच्या घटनेत करण्यात आलेली आहे. एखादी संघटना संलग्नीत झाल्यास या संघटनेच्या सभासदांना प्रस्तुत संघटनेचे सभासदत्व आपोआप प्राप्त होईल. तसेच संघटनेच्या कार्यकारणीमंडळावर प्रतिनिधीत्व प्राप्त करण्यासाठी निवडणूक लढविण्याचा हक्कही अबाधीत ठेवण्यात येईल. एकूणच अशा प्रकारच्या स्वातंत्र्यासंदर्भात

वेळोवेळी संघटनेच्या सभेमध्ये निर्णय घेण्याची तरतुद करण्यात आलेली होती. या संघाची त्रिस्तरीय रचना करण्याची तरतुद करण्यात आली असून या मध्ये–

१. सर्वसाधारण मंडळ

२. कार्यकारिणी मंडळ

३. व्यवस्थापकीय समिती

एकूणच या त्रिस्तरीय रचनेमध्ये संघटनेची संरचना आणि त्या त्या स्तरावरील कार्ये यांची तरतुदी संघटनेच्या घटनेत करण्यात आलेल्या असुन सभेचे आयोजन त्यांचा कालावधी या सभेचे अधिकार व पदाधिकारी यांचेही विवरण संघटनेच्या घटनेत केलेले असून संघटनेची घटना बदलावयाची झाल्यास त्या करिता विशेष सर्वसाधारण सभा बोलावून घटना बदलावी व कार्यवाही २/३ बहुमताने करण्याची तरतुद करण्यात आलेली होती. या संघटनेमध्ये जरी इतर संघटना समाविष्ट असल्या तरीदेखील येथील शैक्षणिक ग्रंथालये आणि त्यांच्या ग्रंथालय संघटना या सर्वांच्यामध्ये फारसे उत्साहवर्धक वातावरण नसल्यामुळे मध्यप्रदेश ग्रंथालय संघाचे कार्य नाममात्र स्वरुपाचे आहे. यामुळे या क्षेत्रातील सेवकांच्या अनेक समस्या आजही प्रलंबित असून केवळ या व्यवसायातील राज्य स्तरीय सक्षम नेतृत्वाच्या अभावामुळे या संघटनेचे कार्य अस्तित्वदर्शक उरलेले नाही. या संघटनेला उर्जितावस्थेत आणण्यासाठी पुष्कळ प्रयत्नांची गरज आहे.

### ३.१७ इंदौर विभाग ग्रंथालय संघ :

श्री. व्ही. एस. मोघे यांच्या प्रयत्नातुन या संघाची स्थापना १९६७ मध्ये करण्यात आली. या संघटनेने सुरूवातीच्या काळात पुस्तकालय संदेश या नावाचे एक प्रकाशन १९६८ मध्ये सुरू केलेले होते. पण ते अल्पजीवी ठरुन १९७२ मध्ये बंद पडले. श्री. मोघे अत्यंत कार्यतत्पर असल्याने त्यांच्या प्रयत्नातुन या राज्यात ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यांनी ग्रंथालय मसुदा तयार करुन संघटनेच्या माध्यमातून शासनाकडे सुपूर्त केला. दुर्दैवाने या प्रयत्नास यश आले नाही. पुढे १९७७ मध्ये जनता पक्षाच्या शासनाच्यावेळी पुनश्चः या संदर्भात प्रयत्न करण्यात आले. याचकाळात डिसेंबर १९७७ मध्ये बून्हानपुर येथे मध्यप्रदेश सार्वजनिक ग्रंथालयांचे पहिले अधिवेशन प्रसंगी राज्याचे तत्कालिन शिक्षणमंत्री श्री.ओमप्रकाश रावळ हे उपस्थित होते. या संघटनेने मध्यप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा मसुदा १९७८ मध्ये श्री. रावळ यांच्याकडे सादर केला. पुढे १९७९ मध्ये कायदा आयोगाने हा मसुदा मंजुर केला. या संघटनेच्याद्वारे सार्वजनिक ग्रंथालय कायदा मंजूर करण्यासाठी राज्यस्तरीय संघटनेच्या माध्यमातून वेळोवेळी परिश्रमपूर्वक प्रयत्न केले गेले. प्रस्तुत संघटना ही क्रियाशील असून ग्रंथालय व्यावसायिकांच्या वैचारिक स्तरावरिल समस्येच्या पूर्ततेसाठी संघटनेद्वारे सातत्यपूर्वक पाठपुरवठा केला जातो. ग्रंथालय सेवेचा दर्जा वाढावा म्हणून व त्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून संघटनेद्वारे वेळोवेळी सभांचे आयोजन करुन चर्चासत्रे, परिषदा यामध्ये उहापोह केला जातो. तसेच ही संघटना पुस्तक प्रदर्शन, जागतिक ग्रंथालय दिन साजरा करण्यामध्ये पुढाकार घेत असून यामध्ये इतर संघटनाही सहाय्य करत असतात. या संघटनेचे पदाधिकारी म्हणून श्री. पी. जी. कोरी अध्यक्ष व डॉ. जी. ए. अगरवाल हे सचिव म्हणून काम पाहत होते. संघटनेचे मुख्यालय इंदौर येथे संजय मेमोरीयल भवन मध्ये स्थापना करण्यात आलेले आहे.

### ३.१८ तमिळनाडू राज्य ग्रंथालय संघ :

### १. मद्रास ग्रंथालय संघ :

सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाबद्दल विशेष आस्था असणाऱ्या काही सभ्य गृहस्थांनी ३ जानेवारी १९२८ रोजी मलइंपुर येथे श्री. के. व्ही. कृष्णस्वामी यांच्या निवासस्थानी सायंकाळी ग्रंथालय चळवळ अधिक बळकट करण्यासाठी, राज्यातील ग्रामीण व शहर स्तरातील ही चळवळ प्रगती पथावर नेण्यासाठी करावयाच्या प्रयत्नासंबंधी चर्चा करण्यासाठी या सर्व व्यक्ती एकत्रित झालेल्या होत्या. या प्रसंगी सुरवातीस डॉ. एफ. एच. ग्रॅव्हल यांनी अध्यक्षपद स्विकारुन कामकाजास सुरूवात केली. सभेच्या उत्तरार्धात दिवाण बहादुरराव, नंदन पिलई यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळत ही सभा संपन्न झाली. या प्रसंगी राज्यातील ग्रंथालय चळवळी विषयीच्या सद्यस्थितीच्या अनुषंगाने चर्चा होताना आंध्रप्रदेशमध्ये बडोदा या ठिकाणचे सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे कार्य हाती घेण्याच्या दृष्टिने एक केंद्रीय संघटनेची स्थापना करता येईल का या बाबतचा विचार विनीमय देखील प्रस्तुत चर्चेच्या केंद्रस्थानी होता. या प्रसंगी सभेसमोर हे ही निर्देशनास आणले गेले की, ग्रामीण ग्रंथालये ही सामाजिक केंद्र स्वरुपात व महत्त्वपूर्ण माहितीकेंद्रे म्हणून रयतेला सेवा देत आहेत. ही बाब विचारात घेऊन या अनुषंगाने एक संघटना स्थापन करण्याविषक निश्चित स्वरुपाचा आराखडा तयार करण्याविषयी तात्पुरती समिती स्थापन करण्यासाठी या चर्चेअंती एकमत झाले. याची फलनिष्पत्ती म्हणून या कमिटीचे कार्याध्यक्ष म्हणून श्री. के. व्ही. कृष्णस्वामी अय्यर यांची तर एस.आर. रंजनायर यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली. दिवाण बहादुर एस. भावनंदन पिलई, डॉ. एम. एच. ग्रॅव्हल, मेसर्स ए. रंगास्वामी अय्यंगार, ए. रामस्वामी मुदलीयार, आर. कृष्णराव भोसले, सी. आर. श्रीनिवास, ए. व्ही. व्येंकटरमण अय्यर, एस. रामस्वामी अय्यर, एम. एम. मुदलीयार विनायक राव, टी. राजगोपाल राव, के. नागेश्वर राव, सदगोपालाचार, अच्चुत मेनन आणि इतर व्यक्तींची सभासदपदी नियुक्ती करण्यात आली. या समितीची पहिली सभा १६ जानेवारी १९२८ रोजी संपन्न झाली आणि सभेत पुढील ठराव पारित करण्यात आले होते.

१. या संघाचे नाव मद्रास ग्रंथालय संघ असे राहील आणि ही संघटना ग्रंथालय चळवळ मद्रास राज्यातील शहर व ग्रामीण परिसरात भक्कम करण्यासाठी प्रयत्न करेल.

२. मेसर्स के.व्ही. कृष्णस्वामी अय्यर यांच्या नियंत्रणाखाली समिती गठीत करुन एस. रामस्वामी अय्यर हे कोषाध्यक्ष म्हणून निश्चित करण्यात आले. इतर सर्व सदस्य ज्यांच्यामध्ये एस. आर. रंगनाथन यांचा समावेश होता. या समितीद्वारे सभासद नोंदणीचे कार्य हाती घेण्यास अधिकार देण्यात आले.

३. ठराव क्रमांक ३ मध्ये पन्नास सभासदांची नोंदणी होताच निमंत्रकांनी लवकरात लवकर सगळ्याच्या सोयीने सभा बोलविण्याचे अधिकार निमंत्रकास देण्यात आले होते. या सभेत संघटनेची घटना तयार करणे व पदाधिकाऱ्यांची नियुक्ती या संदर्भात विचार करण्यात येणार होते.

४. चौथ्या ठरावानुसार संघटनेच्या नियमावलीत बदल करण्याच्या अर्जावर संघटनेच्या सर्वसाधारण सभासदांची फी चार महिन्याकरिता रुपये १/– इतकी निश्चित करण्यात आलेली होती.

५. या समितीद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, समितीने एक तात्पुरती घटना तयार करुन समितीच्या पहिल्या सभेसमोर ठेवावी. या संघटनेचे मुळ उद्दिष्ट हे ग्रंथालय चळवळीस प्राधान्य देणे, या करिता संघटनेस पुढील अधिकार देण्यात आलेले होते. हे अधिकार प्रामुख्याने मद्रास राज्यातील परिसर व शहरी विभाग या ठिकाणी ग्रंथालस चळवळीचा प्रसार करण्यासाठी निश्चित करण्यात आले होते त्यांचे स्वरुप –

१. जाहिरातबाजी करणे व सभा बोलाविणे.

२. या संबधी ग्रंथालय संदर्भात व्याख्याने, मॅजीक लॅटर्नसचा उपयोग करुन व्याख्यान देणे. चित्रपट दाखविणे याद्वारे समाजामध्ये ग्रंथालय चळवळी विषयक जागृती करणे.

३. ज्या व्यक्तींना अथवा संस्थांना ग्रंथालयाच्या स्थापनेत स्वारस्य आहे अथवा ग्रंथालयाचा विस्तार करावयाचा आहे अशांना सल्ला देणे व सहकार्य करणे.

४. जिल्हा व तालुका स्तरावरील ग्रंथालय संघटनेच्या स्थापनेसाठी प्रोत्साहन देणे व त्यांच्यामध्ये संलग्नीता प्रस्थापित करणे.

५. उपलब्ध ग्रंथालय सुविधांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

६. मद्रास राज्यातील शहर व ग्रामीण प्रदेशात ग्रंथालय स्थापनेस प्रोत्साहन देणे.

७. सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेस, व्यवस्थापनेस व दैनंदिन कामकाजास सहाय्यभूत ठरेल अशा ग्रंथालय कायद्याचा निर्मितीकरता प्रोत्साहन देणे.

८. प्रशिक्षित ग्रंथपालांच्या निर्मितीस चालना देणे.

९. ग्रंथालय चळवळीत उपयोग होईल अशी पुस्तके व तत्सम साहित्य संग्रहीत करुन त्याकरिता ग्रंथालय व वस्तूसंग्रहालय उभे करणे व त्याची देखभाल करणे.

१०. सार्वजनिक ग्रंथालयांकरिता नियतकालीक व पुस्तके आणि पुस्तिका इत्यादीचे प्रकाशन करणे.

११. ग्रंथालय चळवळीच्या भविष्यातील विकासासाठी देणग्या स्विकारणे व निधी उभा करणे.

१२. संदर्भ सूचीविषयक अभ्यासास प्रोत्साहन देऊन अशा सूची साधनांचे प्रकाशन करणे.

१३. तसेच या अनुषंगाने सभा व परिषदा यांचे आयोजन करणे.

एकूणच ग्रंथालय चळवळीस उपयुक्त ठरतील अशा सर्वच बाबींचा अवलंब करणे या अनुषंगाने या संघटनेची उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली होती. तसेच या अनुषंगाने संबंधितांना आवाहन करताना सर्वांनी संघटनेमध्ये सहभागी व्हावे व दुर्गम भागातील व्यक्तींनी आपली वर्गणी पाठवावी, असे आवाहन करण्यात आलेले होते. तर मद्रासमधील सभासदांनी समितीच्या कोणाही सभासदाकडे आपली वर्गणी सुपूर्द करण्याचे सुचविण्यात आलेले होते.

**संघटनेची स्थापना व उपक्रम :**

या संघटनेची स्थापना ३१ जानेवारी १९२८ रोजी केली होती. या संघटनेस रावबहादुर के. व्ही. कृष्णकुमार अय्यर यांचे पाठबळ प्राप्त झाल्यामुळे तसेच त्यांच्याकडे असलेली संघटनेच्या स्थापनेची क्षमता यामुळे ही संघटना उत्तम प्रकारे कार्यरत होण्यास मदत झालेली होती. त्यांच्या प्रयत्नातुन पहिल्यावर्षी ४१७ व्यक्तींनी या संघटनेचे सभासदत्व

स्विकारलेले होते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे जे मुलभूत सभासद होते त्यांनी संघटनेस देणगी दिली होती, किंवा आजिव सभासदत्व स्विकारलेले होते, अशा या उत्स्फूर्त निधी संकलनामुळे संघटनेस आपले उपक्रम व योजना पुढील काळात प्रभावीपणे राबविणे शक्य झाले. या समितीने सभासद नोंदणीसाठी एक आवाहन पत्र तयार करुन ते नगरपरिषदा, स्थानिक मंडळे, जिल्हा मंडळे, जिल्हा शैक्षणिक परिषद, विविध संस्था, ग्रंथालय, क्लब वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांच्याकडे पाठविलेले होते. या निवेदनाद्वारे या सर्वांनी आपापल्या ठिकाणी ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथालयांची स्थापना करण्याविषयी कळकळीचे आवाहन केले होते. इतकेच नव्हे तर ग्रंथालय विषयक संस्था असणाऱ्या समाजातील सन्माननीय व्यक्तींना स्वतंत्ररित्या मद्रास राज्यातील परिसरात पत्रे ही पाठविलेली होती. संघटनेच्या या आवाहानास उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला होता. तसेच सर्वत्र कौतुक होऊन या चळवळीविषयी आस्था ही व्यक्त करण्यात आलेली होती. समाजातील सर्वसामान्य व्यक्तींना या चळवळीत समाविष्ट करण्याच्या दृष्टिने कमीतकमी वर्गणी आकारण्यात आलेली होती. या पाठीमागे अशी एक धारणा होती की, ग्रंथालय चळवळीस मोठ्या संख्येने लोक सामील होतील, आणि चळवळीच्या बळकटीसाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग होईल. अशी आशा व्यक्त केली होती. ही चळवळ कोणत्याही प्रकारे राजकीय उद्दिष्टाने स्थापन करण्यात आलेली नाही हे ही सुस्पष्टपणे नमुद करण्यात आले. स्थानिक पातळीवरील संस्थाकरिता सभासदांची सोय केलेली असल्याने त्यांच्या माध्यमातून केंद्रीय संघटनेद्वारे मदत होण्यास या संस्थेचा उपयोग होऊ शकेल असा या पाठीमागचा उद्देश होता. शिवाय उपक्रमांच्या आयोजनात या संस्था सहाय्यभूत ठरतील तसेच ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहनासाठी त्यांचा मोठ्याप्रमाणावर उपयोग होईल ही ही विचारधारा होती. अशा या जाहिरातबाजीमुळे पहिल्याच वर्षी संघटनेकडे समाजातील व्यक्तींचे लक्ष वेधले गेले याला अधिक प्रमाणात जोड दिली गेली ती वृत्तपत्रातील लेख व विविध प्रदर्शनातुन ग्रंथालय चळवळी विषयक माहिती प्रस्तुत करणारा बुथ उभारुन या बुथद्वारे ग्रंथालयाची माहिती देणाऱ्या घडीपुस्तिका, पत्रके व व्यक्तीगत प्रसार अशा पद्धतीचा अवलंब ग्रंथालयचळवळीच्या प्रसाराकरिता करण्यात आलेला होता. ही चळवळ तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी प्रत्येक

जिल्हातील सर्वदुर परिसरात प्रत्यक्ष भेटी घेऊन चळवळीचा प्रसार करण्यात आलेला होता. या चळवळीत पुढे मि. एस. कौशिक सारख्या संभाषण कौशल्य आणि समाजावर छाप टाकणारे व्यक्तीमत्त्व झाल्याने या त्यांच्या कौशल्याचा उपयोग होऊन संघटनेच्या दृष्टिकोनातुन ही एक जमेची बाजू ठरली. या चळवळीतून सभासदाची संख्या केवळ वाढली नव्हती तर ग्रंथालय विषयक जागृती व एक जाणिव लोकांच्यामध्ये निर्माण होण्यास विशेष मदत झालेली होती. एकूणच या संघटनेद्वारे ग्रंथालय चळवळीचा प्रसार करताना संघटनेने प्रथमत:च प्राधान्यपणे राबविलेला उपक्रम म्हणजे विद्यमान ग्रंथालय सुविधांचा प्रभावी वापर हे होय. या अंतर्गत संघटनेने कोनोमेरा सार्वजनिक ग्रंथालयाचे मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये रुपांतर करण्यासाठी आग्रह धरताना प्रमुख तीन मागण्या केलेल्या होत्या.

१. शहरातील रहिवाशाकरिता ग्रंथ घरी घेऊन जाण्याविषयी सुविधा करण्यात यावी.
२. नजिकच्या ग्रामिण परिसरातील व्यक्तींना प्रस्तुत ग्रंथालयातील वाचन स्त्रोत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने स्थानिक स्तरावरील मान्यताप्राप्त ग्रंथालयाचा उपयोग करुन घेण्यात यावा.
३. पूर्ण वेळ प्रशिक्षीत ग्रंथपालांची नेमणुक करण्यात यावी.

या मागण्यांची पुर्तता १ जानेवारी १९३० पासून करण्यात आली. याच वर्षी मद्रास विद्यापीठ ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब करण्यता आला. अशा प्रकारे विविध सुविधा देण्यास सुरुवात करण्यात आली होती. या उपक्रमाची दखल स्थानिक स्तरावरील दैनिकांनी घेतली होती. तसेच स्थानिक स्तरावरील व्यक्तींनीही मुक्तद्वार उपक्रमामुळे वाचकाला आपल्याला हवे असलेल्या पुस्तकाची निवड करण्याची सुविधा आजमावता येते, शिवाय यामुळे ग्रंथ आणि वाचक यामधील अडसर दूर झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली होती. या ग्रंथप्रसाराच्या उपक्रमामुळे शालेय ग्रंथालयाच्या विकासास मद्रास परिसरात विशेष चालना मिळाली होती. तसेच संघाच्या प्रयत्नातून शिक्षकांना ग्रंथालय विषयक प्रशिक्षण देण्याची सुविधा, शाळेमध्ये ग्रंथालय तासिकांचे आयोजन याची सुरवात ९ ऑक्टोबर १९३४ पासून करण्यात आलेली होती. इतकेच नव्हे तर ग्रंथालयविषयक प्रशिक्षणासाठी शाळेतील शिक्षणासाठी ख्रिसमसच्या सुट्टीत आयोजन करण्याचे धोरणही तत्कालीन सार्वजनिक

संप्रेषण संचालकांनी जाहिर केले होते. याच प्रयत्नातुन पुढे संघटनेद्वारे प्रत्येक वर्षी ग्रंथालय सोबती  हे (एसएसएलसी इंग्लीश टेक्स) क्रमिक पुस्तक सर्व हायस्कुलना मोफत पुरविले जाई. या करिता सार्वजनिक संपर्क संचालकांची परवानगी घेतली जाई.

पहिल्याच वर्षी संघटनेद्वारे दक्षिण भारतातील भाषेमध्ये एक निवडक ग्रंथांची यादी देखील तयार करण्यात आली होती. ही यादी सार्वजनिक संप्रेषण मंत्रालयाच्या सहाय्याने व सहकार्याने राज्यातील ग्रंथालयांना मोफत वितरित करण्यात आली होती. अशा प्रकारच्या याद्या तामिळभाषेत तीन व तेलगु भाषेत दोन तर मल्याळम व केरळीय भाषेत प्रत्येकी एक यादी अशाप्रकारे प्रकाशित करण्यात आल्या होत्या. याचबरोबर एक अद्ययावत स्थायीक यादी इंग्रजी पुस्तकाकरिता कार्ड फॉर्ममध्से तयार करुन त्याची रचना ग्रंथालयांना सहजपणे गरजेनुसार हाताळण्यासाठी सुलभ होईल अशाप्रकारे तयार करण्यात आली होती. अशाप्रकारे १०० हुन अधिक ग्रंथालयांना सहकार्य करण्यात आलेले होते. ग्रंथालयास उपयुक्त असणाऱ्या तामिळ  भाषेतील ग्रंथाची यादी सर्वांगीण स्वरुपात तयार करुन ती १९३७ अखेर मुद्रीत करण्यात आलेली होती. ही यादी वर्गिकृत स्वरुपात तयार करण्यात आली होती. या उपक्रमाअंतर्गत ५०,००० ग्रंथांच्या नोंदी करण्यता आलेल्या आहेत. या प्रकारची संरचना लेखक, वर्गीकृत व क्रमन्वय पद्धतीने करण्यात आलेली आहे. दरम्यानच्या काळात शालेय ग्रंथालयास अल्प स्वरुपात अनुदान देण्यास सुरुवात करुन या पार्श्वभूमीवर १९३६ मध्ये ग्रंथालयाद्वारे विनियोग करण्यात आलेल्या आर्थिक उपलब्धतेचे सर्वेक्षण करण्यात आलेले होते. या सर्वेक्षणासाठी सहकारी बँकांचे सचिव स्व. व्ही. सी. रंगास्वामी यांचे खूपच सहकार्य लाभले होते. सहकारी संस्थेद्वारे सार्वजनिक ग्रंथालय सुरू करत असताना या सर्वसामान्य निधी विनियोगातून सार्वजनिक ग्रंथालयाची निर्मिती करावी असे आवाहन करण्यात आलेले होते. या आवाहनास मोजक्याच संस्थाकडून प्रतिसाद प्राप्त झाला होता.

या संघटनेद्वारे आरोग्यकेंद्र सेवा सप्टेंबर १९३२ मध्ये सुरू करण्यात आलेली होती. या साठी शहरातील आरोग्यकेंद्राचे प्रमुख सर्जन व अधिकारी यांचे सहकार्य लाभले होते. अशाच प्रकारची सेवा परिसरातील कुडाप्पा, कुडालूर, मदुरा या केंद्रावरही उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. ही सर्व सेवा सेवाभावी तत्वावर उपलब्ध करण्यात आलेली होती.

सेवा पुरविण्यासाठी ग्रंथ व नियतकालिके देणगी स्वरुपात मद्रासमध्ये २७ संस्थाकडून संकलीत करण्यात आलेली होती. संघटनेने वाचन अभिरुची वृद्धिंगत करण्यासाठी विविध विषयांवरील ग्रंथाची सुची मुद्रित करुन ती मोफत स्वरुपात वितरीत केली होती. ग्रंथालय क्षेत्रातील सेवकाकरिता एक छोटेसे ग्रंथालय देखील संघटनेद्वारे सुरू करण्यात आलेले होते.

फिरत्या ग्रंथालयाची सुविधा हा एक संघटनेचा अभिनव उपक्रम म्हणून ओळखला जात असे. १९३१ च्या काळात रावसाहेब एस.व्ही. कन्नक स्वामी पिलई, मन्नरगुडी हे योजनेचे संस्थापक होते. पुढे अशा प्रकारची फिरती ग्रंथालये विविध ठिकाणी उघडण्यात आली. या योजनेस तंजावर, मदुराई, टिनेवली, करूनार आणि गुंटर या जिल्हा मंडळाकडून विशेष सहकार्य प्राप्त झाले. या सर्व उपक्रमाची फलश्रुती म्हणून संघटनेची एक अपेक्षा होती ती म्हणजे या परिसरातील ग्रामीण स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयाची निर्मिती उपक्रम स्वरुपात व्हावी ही होय. ही उद्दिष्टे साध्य झाल्यास संघटनेला स्वतःहुन काही केल्याचे समाधान लाभणारे होते. या सगळ्याच चळवळीमुळे मद्रास विद्यापीठ ग्रंथालयाने आपल्या सेवांचा सर्वदुर विस्तार करुन आपल्या कामकाजाच्या वेळेमध्ये देखील रात्री ८.०० पर्यंत वाढ केलेली होती. एकूणच मद्रास शहरातील लोकांचा ग्रंथालय सेवेस उत्तम प्रतिसाद लाभत होता. अधिकाधीक दर्जेदार सेवेमुळे त्यांच्यामध्ये अधिक वाचन अभिरुची वृद्धि होत आहे. अशा या अभिनव उपक्रमाबरोबरच संघटना ग्रंथालयांची सूची वार्षिक अहवालामध्ये प्रकाशित केली जात होती. याची सुरवात १९३७ मध्ये पहिल्यांदा करण्यात आलेली होती. या सूचीमध्ये २१२ ग्रंथालयांचा समावेश होता. या संघटनेने प्रौढ साक्षरता अभियानास देखील सहकार्य केलेले असून याकरिता एक ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. तामीळ भाषेतील या ग्रंथात वैयक्तीक आरोग्य, ग्रामीण सांडपाणी व्यवस्था, ग्रामपंचायत, कृषिविभाग, ग्रामीण अर्थव्यवस्था, नागरिकशास्त्र, वित्त अशा उपविषयांचा समावेश असून या ग्रंथामध्ये तज्ञ लेखकांनी आपले योगदान दिलेले आहे. असा हा हस्तपुस्तिका स्वरुपातील ग्रंथ प्रसिद्ध करण्यासाठी विविध ग्रंथालयातील ३० हुन तज्ञ व्यक्तींचे सहकार्य लाभलेले होते. हा ग्रंथ एकूणच साक्षरता उपक्रम अभियान अधिक सक्षमपणे नागरिक स्तरावर राबविण्यासाठी मार्गदर्शक ठरणारा होता.

तामिळ भाषेतिल एका परिषदेच्याद्वारे तामिळ साहित्याच्या प्रसाराबरोबरच सार्वजनिक ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी सहकार्य केले आहे. या संघाद्वारे सुट्टीमधील ग्रंथालय शास्त्राचे अभ्यासक्रम १९२९ मध्ये मद्रास विद्यापीठ ग्रंथालयाने आयोजित केले होते. या वर्गांना डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे मार्गदर्शन लाभले होते. या संघाद्वारे प्रसिद्ध केलेल्या प्रकाशनाचे स्वरुप हे ग्रंथालय चळवळ, रंगनाथन यांची ग्रंथालय पंचसुत्री, द्विबिंदु वर्गीकरण, वर्गीकृत तालिका, ग्रंथालय प्रशासन ग्रंथ वर्गीकरण, तालिकीकरण तात्विक, शालेय व महाविद्यालयीन ग्रंथालय, संदर्भग्रंथ व संदर्भसूची अशा विविध प्रकाशनांचा समोवश होता. ग्रंथालय व्यावसायिकांना एक अद्ययावत ग्रंथसूची उपलब्ध करुन देण्यात या संघटनेचे योगदान महत्त्वपूर्ण असेच आहे. याचबरोबर वर्तमान घडामोडी विषयक नवनविन शाखाविषयक पुस्तकांच्या स्थानिक भाषांमधून प्रकाशनाचा उपक्रम आर्थिक उपलब्धते अभावी व स्थानिक लोकांच्या प्रतिसादा अभावी स्थगित करावा लागला. सार्वजनिक ग्रंथालयासाठी निधी उपलब्धता विषयक संघटनेने केलेले प्रयत्न ही स्तुत्य स्वरुपाचे असून याकरिता ग्रंथालय विषयक शासनाचे धोरण सौहार्द पूर्ण असण्यासाठी संघटनेने वेळोवेळी प्रयत्न करताना–

१. वाचन साहित्याचे सार्वजनिक ग्रंथालयांकरिता मोफत वितरण हे विशेषतत्वाने वितरण ग्रामिण परिसरातील ग्रंथालयांची गरज ओळखून करण्यात यावे.
२. सक्षम ग्रंथालयाअभावी संघटना प्रसारास होणारा अडथळा आणि प्राथमिक शिक्षणाकरिता केलेला खर्च वाया जाण्याची भिती या मुद्यांचा विचार करणे.
३. खाजगी स्तरावर मोफत ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणे आणि ही सेवा भविष्यात सार्वजनिक निधीच्या वापराच्या दृष्टिने विचारात घेण्यात येऊ नये यासाठी प्रयत्न करणे.
४. लोकांच्यामध्ये ग्रंथालय विषयक निर्माण झालेली जागृतीही शासनाद्वारे पुरेशा निधी अभावी निष्फळ ठरु नये या दृष्टिने प्रयत्न करणे.
५. ग्रंथालय विषयक जागृती निर्माण करण्यासंबंधी एकदा यशस्वी ठरलेला प्रयत्न वाया गेल्यास दुसऱ्यांदा असा प्रयत्न करणे हे फारच कठीण काम असल्याने या मुलभूत

मुद्याचा विचार करुन संघटनेव्दारे शासनाकडे वेळोवेळी ग्रंथालय धोरणासाठी आग्रह धरण्यात आला होता.

संघटनेची अशी एक धारणा होती की, ग्रंथालय कायदा अस्तित्वात आल्याशिवाय ग्रंथालय सेवा पुरेशा प्रमाणात प्रभावीपणे देणे अशक्य आहे. असा विचार करुन संघाने आदर्श ग्रंथालय कायद्याचा एक मसुदा मुद्रित करुन त्याची लोकांपर्यंत जाहिरात केली आणि अशा काही वर्षाच्या प्रयत्नाने लोकांच्यामध्ये ग्रंथालय कायद्याविषयक महत्व बिंबवण्याचा प्रयत्न केला. अशा या चिकाटीच्या प्रयत्नामुळे ग्रंथालय कायदा अस्तित्वात येण्यास मदत झाली. स्थानिक संस्थांच्यामध्ये ग्रंथालयविषयक जागृती होण्यास मदत झाली. या प्रयत्नाच्या दरम्यान  सरकार समोरील विविध समस्यांचे कारण पुढे करुन ग्रंथालय कायद्यास मंजूरी देण्यासाठी अनेकदा असमर्थतता दर्शविण्यात आली अथवा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

**स्वांतत्र्यत्तोर काळातील योगदान :**

या संघाने स्वातंत्र्यपुर्व काळात युद्धपातळीवर केलेल्या प्रयत्नांची फलश्रुती म्हणून मद्रास सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८ मध्ये अस्तित्वात येण्यास मदत झाली आणि हा कायदा लागू करणारे मद्रास हे देशातील पहिले राज्य ठरले. या संघाचा रौप्य महोत्सव ४ एप्रिल १९५३ रोजी संपन्न झाला. तो पी.एस. हायस्कूल मलायपुर येथे. या प्रसंगी ५ शोधनिबंधाचे सादरीकरण झाले होते. या समारंभास मद्रासचे मुख्यमंत्री श्री. राजगोपाल चारी हे उपस्थित होते. या प्रसंगी चळवळीस विशेष योगदान देणारे श्री. के. व्ही. कृष्णकुमार अय्यर आणि एस.आर. रंगनाथन यांनी ग्रंथालय क्षेत्राच्या विकासाकरिता २५ वर्षे दिलेले योगदान या अनुषंगाने सत्कार करण्यात आलेला होता. तसेच ३ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आलेले होते. हे ग्रंथ अनुक्रमे –

१. ट्विंटी फार्इव्ह इयर्स प्रोगेस ऑफ दी मद्रास लायब्ररी असोसिएशन.

२. रिपोर्ट ऑफ दी सिल्वर ज्युबली सेलीब्रेशन ॲण्ड सिम्पोझीयम ऑफ द लायब्ररी.

३. लायब्ररी सायन्स इन इंडिया.

**सुवर्ण महोत्सव समारंभ :**

संघटनेचे दीर्घकाळ चालू असेलेले उपक्रम व भविष्यात संघाने महाविद्यालयीन संशोधन, संशोधन आणि औद्योगिक ग्रंथपाल या माध्यमातून स्वत:चे स्थान निश्चित करण्याचा विचार केलेला होता. याचबरोबर संस्थेचे पूर्वाध्यक्ष डॉ. एस. आर. रंगनाथन आपल्या प्रकाशनांच्या माध्यमातून इमारत फंडासाठी निधी उपलब्ध करुन दिला होता. या माध्यमातून संघास १९७६ मध्ये स्वत: एक इमारत उभी करणे शक्य झाले. ही इमारत गोखले शास्त्री इन्स्टिट्युट मलासपूर याचा एक भाग म्हणून कार्यरत राहीली. पुढे १९८० मध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ. व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते सुर्वण महोत्सवी समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. पुढील काळात संघटनेने विविध उपक्रम करीत असताना ग्रंथ निर्मिती, ग्रंथालय संगणकीकरण, सार्वजनिक ग्रंथालय आणि माहितीचे जाळे अशा आधुनिक विषयांवर १९९० पासून चर्चासत्राचे आयोजन केले. याकरिता सर्वदूरच्या ग्रंथपालांना बोलावून मार्गदर्शन घडविले. ग्रंथपालांची वेतनश्रेणी, ग्रंथालय व माहितीशास्त्राचे राष्ट्रीय धोरण, अशा विविध उपक्रमाचे आयोजन याकरिता संघ सातत्यपूर्व प्रयत्न करत राहीला. तसेच स्वत:चे न्युजलेटरही संघाने सुरु केले. भविष्यातील राष्ट्रीय व जागतिक स्तरावरील संप्रेषणामध्ये सहकार्य हे संघाचे उद्दिष्ट असून निरंतर शिक्षणासाठी योगदान देताना स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांचे आयोजन या दृष्टिने संघ प्रयत्नशील आहे. आपल्या आजवरच्या वाटचालीत संघाद्वारे ग्रंथालय व्यावसायिकांना अद्ययावत ठेवण्यासाठी विविध आधुनिक संकल्पनेवर आधारित व्याख्याने घडवून आणली. या पार्श्वभूमीवर १९९२ मध्ये स्व. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जन्मशताब्दीच्या अनुषंगाने राबविलेले उपक्रम विशेष लक्षणीय आहेत.

१. संघाची दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद, प्रमुख विषय – ज्ञान संगठन
२. रंगनाथन यांच्या स्मरणार्थ पोस्टल तिकीटांचे वितरण.
३. द मॅन ॲण्ड हीज मिशन ही इंग्रजी, तामिळ, कन्नड व हिंदी भाषेतील चित्रफीत
४. रंगनाथन यांचा अर्धपुतळा

एकूणच या संघटनेने आपल्या पाऊण शतकाच्या वाटचालीत ग्रंथालय क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्याच्या आधुनिकीकरणासाठी दिलेले योगदान महत्वपूर्ण स्वरुपाचे आहे.

**२. तमिळनाडू ग्रंथपाल संघ :**

या संघाची स्थापना १९७४ मध्ये तिरुचन्नापल्ली येथे झाली. या संघाची प्रमुख उद्दिष्टे ग्रंथपालांमध्ये समन्वय साधणे हे होते. १९७५ मध्ये या संघटनेने वाचन अभिरुची प्रोत्साहन या अनुषंगाने एक परिषद आयोजित केलेली होती. या प्रसंगी श्री. ए. सप्रे यांनी 'डॉ. रंगनाथन यांचे ग्रंथपाल क्षेत्रात योगदान' या विषयावर व्याख्यान झाले. या संघटनेद्वारे या प्रसंगी महाविद्यालय ग्रंथालयात मुक्त प्रवेश असावा यासाठी मद्रास विद्यापीठाकडे एक ठराव पारीत करण्यात आला होता. तसेच महाविद्यालयीन ग्रंथपालांकरिता उन्हाळी सत्रात एक कार्यशाळा आयोजनासाठी विनंती करण्यात आली होती. संघटनेचे दुसरे अधिवेशन १९८२ रोजी मद्रासमध्ये भरले होते. या अधिवेशनाचे उद्‌घाटन डॉ. एन.डी. सुंदरवधीवेलू (संचालक, रंगनाथन ग्रंथालय आणि माहितीशास्त्र उपयोजित संशोधन केंद्र) यांनी केले होते. तर अध्यक्षपद संचालक सार्वजनिक ग्रंथालय विभाग मद्रास मि. एम.सदाशिवन यांनी भूषविले होते. या परिषदेमध्ये सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालयाच्या समस्या, ग्रंथालय व माहितीशास्त्र केंद्रीय ग्रंथालय कायदा या विषयांवर आधारित सत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. या संघटनेची १९८३ मध्ये बैठक घेऊन या बैठकीअंतर्गत ग्रंथालय आणि ग्रंथपाल यांच्या समस्येविषयी चर्चा करण्यात येऊन तसेच राज्यातील विद्यापीठातील बुक बँक योजना सुरू करण्याचा ठराव करण्यात आला होता. एकूणच या संघाचे कार्य शैक्षणिक ग्रंथालयाच्या व ग्रंथपालांच्या अनुषंगाने अधिकतर होते. असे असले तरी सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुषंगाने राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय समस्ये विषयक वेळोवेळी आवाज उठवण्याचा प्रयत्न संघाने केला होता. या त्यांच्या अभियानात रंगनाथन संशोधन केंद्राचा देखील महत्त्वपूर्ण सहभाग होता.

### ३. तमिळनाडू ग्रंथालय संघ :

या संघाचे कार्य १९९३ पासून सुरू झाले . त्याचे मुख्यालय चेन्नई येथे होते. हा एक राज्य स्तरीय संघ असून यामध्ये सर्व स्तरीय ग्रंथालय व्यवसायिकांचा समावेश करण्यात आला होता. आजवर या संघटनेची अधिवेशने मद्रास (१९९३), पालमकोटी (१९९५), त्रिचिनापल्ली (१९९६), मदुराई (१९९६), पांडेचारी (२००१), तंजावर (२००३), चेन्नई (२००५) अशा विविध ठिकाणी झालेली असून या अधिवेशनातून ग्रंथालय विषयक समस्या प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

या राज्यात ग्रंथालय व माहितीशास्त्र विकासाच्या अनुषंगाने स्थापना झालेली 'सॅलीज' ही एक आधुनिक विचारधारा जोपासणारी संघटना असून या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट हे ग्रंथालयाच्या आधुनिकरणासाठी प्रयत्न करणे व संशोधनाला चालना देणे हे होते. संस्थेच्या उद्दिष्टांतर्गत समाजामध्ये वाचन अभिरुची वृद्धिंगत करण्यासाठी प्रभावी प्रयत्न करणे हे एक सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस पूरक असे उद्दिष्ट संघाव्दारे अंतर्भूत करण्यात आले होते.

### ३.१९ पाँडेचरी ग्रंथालय संघ :

डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १०४ व्या जयंती प्रित्यर्थ पाँडेचरी ग्रंथालय संघाद्वारे एक दिवशीय चर्चासत्राचे आयोजन ९ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या समारंभास जवळजवळ १०० ग्रंथालय  व्यावसायीकांनी उपस्थिती दर्शविली होती. या चर्चासत्रात एकूण १४ शोधनिबंध सादर करण्यात आले. या चर्चासत्राचे अध्यक्षपद श्री. बी. अप्पलस्वामी (ग्रंथालय विकास अधिकारी) यांनी भूषविलेले होते. उपस्थितांना संबोधित करताना बीजभाषण कोनोमेरा राज्य मध्यवर्ती ग्रंथालय मद्रास चे ग्रंथपाल श्री. विरु एन औनूद्वीपान यांनी केले होते. या संघटनेद्वारे ग्रंथालयशास्त्रातील व्यावसायिकामध्ये जागृती निर्माण केली जात आहे.

**३.२० अंदमान – निकोबार ग्रंथालय संघ :**

या ग्रंथालय संघाची स्थापना १९७७ मध्ये करण्यात आली. हा एक अत्यंत क्रियाशील संघ असून ग्रंथालय विषयक व ग्रंथालय व्यावसायिकांच्या सर्व समस्यांच्या पूर्ततेसाठी हा संघ सातत्यपूर्ण क्रियाशील राहिलेला आहे. या प्रदेशातील ग्रंथालय सेवा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टिने या संघाद्‌वारे करण्यात आलेले उपक्रम म्हणजे –

१. २१ जानेवारी १९७८ रोजी अंदमान व निकोबार बेटावरील उपलब्ध वाचन साहित्याचे प्रदर्शन करण्यात आले होते.
२. वाचनसाहित्य ग्रंथप्रदर्शन प्रसंगी निवडक वाचक साहित्याची सूची, संघतालिका या प्रसंगी प्रकाशित करण्यात आली होती.
३. ग्रामिण ग्रंथालयाच्या विकासाचे महत्त्व या परिसरात पसरविण्यासाठी १४ एप्रिल १९७८ रोजी संघाद्वारे एका परिसंवादाचे आयोजन केले होते.
४. या परिसरातील ग्रंथालयांचे जाळे विकसित करण्यासाठी एक योजना शिक्षण संचनालयाकडे सादर करण्यात आली. या संघाद्वारे विविध चर्चासत्रे, परिसंवादांचे आयोजन करण्यात आलेले असून अंदमान येथील ग्रंथालयाची एक निर्देशिका तयार करण्याचा संघाचा उपक्रम स्तुत्य आहे. येथील साक्षरता अभियानाची जोड ग्रंथालय चळवळीला जोडून ग्रामीण स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकास करण्यासाठी संघाद्वारे प्रबोधन केले जाते.

### ३.२१ केरळ राज्य ग्रंथालय संघ :

या संघाची पूर्वपिठिका विचारात घेताना या परिसरातील ग्रंथालय संघाच्या निर्मितीस कशाप्रकारे वातावरण तयार झाले हे विचारात घेणे आवश्यक आहे. जून १९३७ मध्ये पहिली मलबार ग्रंथालय परिषद कालीकत येथे संपन्न झाली. या परिषदेचे अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक श्री. केल्पन्न हे होते. या परिषदेच्यावेळी मलबार वाचनालय संघ स्थापन करण्यता आला. या संघाची स्थापना या परिसरातील क्रियाशील राजकीय नेत्यांनी केलेली होती. या राजकीय नेत्यांकडे ग्रंथालय चळवळीकरिता पुरेसा वेळ नसल्याने या चळवळीची पुढे फारच हानी झाली. पुढे या परिषदेचे उद्दिष्ट विचारात घेऊन परिषदेचे कार्य केरळ परिसरात सर्वदूर पोहचविण्यासाठी तेलीचरी येथे १९४३ मध्ये एक सभा बोलविण्यात आली. या प्रसंगी करण्यात आलेल्या ठरावानुसार या परिषदेचे नामकरण केरळ ग्रंथालय संघ असे करण्यात येऊन या संघाची नोंद डिसेंबर १९४३ मध्ये करण्यात आली. अशा प्रकारे केरळ राज्यातील ग्रंथालय चळवळीच्या विकासाकरिता स्थापन झालेली ही पहिली संघटना म्हणून ओळखली जाऊ लागली. पुढे हा संघ १९५३ पर्यंत अंत्यत क्रियाशील होता. मलबार विभागात सार्वजनिक ग्रंथालय निर्माण करणे व त्यांच्या विकास करणे याकरिता संघाने लक्षणिय योगदान दिले होते. या संघाच्या आमंत्रणावरुन ग्रंथालय क्षेत्रातील दृढाचार्य डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी १९४५ च्या कालखंडात येथे येऊन ग्रंथालय विकासाची आवश्यकता आणि त्याकरिता सार्वजनिक उपक्रमाचा सहयोग या अनुषंगाने विविध व्याख्याने दिली. यामुळे प्रत्यक्ष रंगनाथन यांनी विविध ग्रंथालयांना दिलेल्या भेटी व येथील कार्यकर्त्यांशी साधलेला संपर्क याची परिणीती म्हणजे या विभागातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या निर्मिती व विकासास मिळालेली विशेष गती होय.

सुरूवातीच्या काळात १९४५ मध्ये या संघाच्या माध्यमातून ४७ ग्रंथालये त्रावणकोर विभागातून संघाशी संलग्नीत करणे शक्य झाले होते. पुढे संघाच्या कार्याचा राज्य स्तरावर विकास करण्याच्या दृष्टिने विचारविनीमय होऊन याचा उद्‌घोष पी. के. मेमोरीयल ग्रंथालय अंबलपुजा येथील सार्वजनिक सभेत करण्यात आला. राज्य स्तरावर ग्रंथालय संघ स्थापनेच्या अनुषंगाने चर्चा करताना ग्रंथालयाचे शैक्षणिकदृष्ट्या असलेले महत्व विचारात घेऊन राज्यात

सर्वत्र आणि विशेष स्तरावर ग्रामीण परिसरातील ग्रंथालयाची स्थापना करण्याचा विचार करण्यात आला. या सर्वांगिण विचाराअंती संघाने राज्यातील ग्रंथालयाचा विकासामध्ये समन्वय साधणे व त्यांच्या व्यवस्थापनावर पर्यवेक्षण करणे या सर्वांची जबाबदारी स्वत: उचलली. अशा या पार्श्वभूमीवर स्थापन झालेल्या संघाने आपल्या कार्यपूर्ततेसाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केलेली होती.

१. राज्यातील सर्व ग्रंथालयांकरिता केंद्रीय संघटना म्हणून कार्यरत राहणे.
२. अस्तित्वात असलेल्या ग्रंथालयाच्या विकासासाठी प्रयत्न करणे.
३. प्रौढ साक्षरता अभियानास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून सर्व प्रकारची मदत करणे.
४. नवसाक्षराना पुन्हा निरक्षरतेपासून वाचवण्याकरिता सर्व प्रकारच्या सुविधा शिक्षण, वाचन आणि ज्ञान संग्रहण या अनुषंगाने उपलब्ध करुन देणे.
५. राज्यातील ग्रंथालय विभागाच्या स्थापनेसाठी योगदान देणे.
६. ग्रंथालय सेवकांना उपयुक्त ठरतील अशा प्रकारच्या साहित्य प्रकाशनासाठी प्रयत्न करणे.
७. प्रत्येक तालुक्यामध्ये मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करणे.
८. मातृभाषेच्या विकासासाठी कार्यरत राहणे.
९. समान उद्दिष्टे असलेल्या इतर संघटना, समिती यांच्या उत्थानाकरिता प्रयत्न करणे.
१०. या संघाच्या पहिल्या सभेस श्री. के. एम. केशवन यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली व पी.एम. पणीकर यांची प्रमुख सचिव म्हणून निवड करण्यात अली. तर कोषाध्यक्षपदी एन. केशवन पिलई यांची निवड करण्यात आली होती.

ग्रंथालय क्षेत्रात विविध स्तरावर कार्यरत असणाऱ्या क्रियाशील व्यक्तींच्या प्रयत्नातून १९४७ मध्ये त्रावणकोर शासनाकडून संघास वार्षिक रुपये २५०/– अनुदान प्राप्त झाले. संघाचे कार्य सुरळीत होण्यासाठी संघाद्वारे चार संघटक नेमण्यात येऊन या चार संघटकांनी सर्वत्र प्रवास करुन विविध ठिकाणी ग्रंथालये स्थापन करण्यासाठी व अस्तित्वात असलेल्या ग्रंथालयांना चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या चौघांच्या नेतृत्वामुळे संघाशी

सलंग्नित असलेल्या संस्थांची संख्या २५३ पर्यंत पोहोचली. तसेच संघाचे कार्य विचारात घेऊन शासनाने संघाला निधी स्वरुपात ५००/– रुपये उपलब्ध करुन दिले. या विशेष प्रयत्नातून ४०१ ग्रंथालये सलंग्नित झाली. या सगळ्या हालचालीमुळे शासनाने विविध ग्रंथालयांना अनुदान देण्याची योजना सुरू केली. या अंतर्गत शासनाद्वारे एकूण ११६ ग्रंथालयांना रुपये १०,६९५/– इतकी रक्कम अनुदान स्वरुपात वितरीत करण्यात आली. कालसापेक्ष या सगळ्यात वृद्धी होत गेली. संघाने पुढे आपले मुखपत्र म्हणून 'ग्रन्थावलोकम' हे मासिक सुरू केले. ते ग्रंथालय क्षेत्रातील एक दर्जेदार नियतकालीक म्हणून ओळखले गेले. ते खंडीत न होता २२ वर्षे सलग प्रकाशित होत गेले. या मासिकाचे स्वरुप संघटना अभियान, सांस्कृतिक मूल्य, नविन पुस्तकांचा परिचय हे सारे विशेषतत्वाने मल्याळी भाषेत असे. ग्रंथालय क्षेत्रातील सेवकांकरिता सूचना तसेच विविध ग्रंथालयांचे उपक्रम व अहवाल या नियतकालिकातून सातत्यपूर्वक प्रकाशीत केले जात असत. संघाने आपली घटना तयार करुन या घटनेतील तरतुदीनुसार जिल्हा, तालुका समितीची निर्मिती करुन त्यांचा समन्वय साधण्याच्या दृष्टिकोनातून अंतर्गत तरतुदी केल्या असून या संघामध्ये सर्वस्तरीय ग्रंथालयाच्या प्रतिनिधींना प्राधान्य देण्यात आलेले आहे. पुढील काळात या संघाकडे त्रावणखोर, कोचीन व इतर शासन मान्य ग्रामिण ग्रंथालय संघाशी संलग्नित करण्यात आले आणि त्यांना निधी वितरीत करण्याची जबाबदारी संघाद्वारे पार पाडण्यात आली. या पार्श्वभूमीवर ग्रंथालय विभाग कोचीन परिसरात करीत असलेले काम संलग्नित करुन या ग्रंथालय विभागाचे विघटन करण्यात आले. याच दरम्यान त्रावणखोर, कोचीन आणि मलबार ही छोटी राज्ये १९५६ मध्ये केरळ राज्यात समाविष्ट करुन स्वतंत्र केरळ राज्य अस्तित्वात आले. हा बदल ग्रंथालय शास्त्रातील इतिहासातील एक लक्षणीय क्षण ठरला. जरी मद्रास ग्रंथालय कायदा मलबार विभागात लागू करण्यात आलेला असला तरी या कायद्याची अंमलबजावणी मलबार परिसरात प्रभावीपणे करण्यात आलेली नव्हती. इतकेच नव्हे तर ग्रंथालय कायद्याद्वारे उपलब्ध केलेल्या रकमेचा ही विनीयोग करण्यात आलेला नव्हता. या परिसरात ५० पेक्षाही कमी ग्रंथालये स्थानिक संस्थाच्या माध्यमातून कार्यरत होती. केरळ राज्याच्या निर्मिती होताच संघाच्या नावात बदल करुन केरळ ग्रंथालय संघ

असे नामकरण करण्यात आले. संघाच्या पुढील वाटचालीत मलबार विभागात १०० हुन अधिक ग्रंथालये संलग्रित झाली. त्यांना अनुदानही प्राप्त झाले. यात संलग्रीत ग्रंथालयांची संख्या ४००० वर पोहचली असून संघानी ग्रंथालय सुरू करण्यासाठी घातलेल्या अटी ६०० संदर्भग्रंथ, ३ दैनिके व ५ नियतकालिके व कार्यालयाकरिता १ खोली व स्वतंत्र अभ्यासिका अशा स्वरुपाच्या आहेत. संघाने निर्धारीत केलेल्या नियमांची व त्या अनुषंगाने दप्तर तयार करणे ही अट संलग्रीत ग्रंथालयांसाठी प्रकर्षाने लागू करण्यात आलेली आहे. संघाशी संलग्रित असलेली सर्व ग्रंथालये या अटींचे समोचीत पालन करत असल्यामुळे संघाच्या दृष्टिने ही अभिमानाची बाब आहे. याचबरोबर संघाने प्राथमिक शाळेशी संलग्रित असलेल्या २५० ग्रामीण ग्रंथालयाची जबाबदारी स्वत:वर घेतलेली आहे. ही सर्वच सार्वजनिक ग्रंथालये उपक्रमाच्या माध्यमातून वाचकांकरिता महत्वपूर्ण योगदान देत आहेत. संघाचे विशेष प्रयत्न म्हणजे तालुका मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना ही होय. यासाठी शासनाकडून ५० टक्के अनुदान उपलब्ध करण्यात आलेले आहे. लवकरच सर्व ग्रामीण ग्रंथालयांनी स्वत:ची इमारत उभी करण्याच्या योजनेचा लाभ उठवत स्वत:च्या इमारती उभ्या केलेल्या आहेत. अशा ग्रंथालयांची संख्या २००० हुन अधिक आहे. ग्रंथालयांना पुस्तक निवड करण्यासाठी संघास तज्ञ लोकांची एक समिती सहकार्य करत असते. या समितीद्वारे तयार करण्यात आलेली ग्रंथसूची ही वेळोवेळी अद्ययावत करण्यात येते. ग्रंथालयाचे कार्य सुरळीत व प्रभावीपणे सुरू ठेवण्यासाठी संघाने ग्रंथालय पुस्तीका व ग्रंथालय निर्देशीका आदर्श नियमावली आणि आदर्श दप्तर यांचे प्रकाशन केलेले आहे. विशेष म्हणजे या संघाचे स्वत:चे मुद्रणालय असुन या मुद्रणालयाद्वारे संघाचे मुखपत्र व पुस्तिका मुद्रित केल्या जातात.

**सचिवालय व आर्थिक स्रोत :**

सचिवालय व आर्थिक स्रोत यांची सांगड घालण्याच्या दृष्टिकोनातून संघाद्वारे स्वत:चे सचिवालय त्रिवेंद्रम येथे स्थापन करुन संघाचा मुख्य सचिव हा कार्यालय प्रमुख म्हणून काम पाहतो. या संघाच्या सचिवालयाच्या व्यवस्थापनाकरिता शासनाकडून प्रत्येकवर्षी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. संघाचा स्वत:चा आर्थिक स्रोत स्वत:च्या प्रकाशनाची विक्री, खाजगी देणग्या व ग्रंथालयाद्वारे प्राप्त वर्गणी हे होय. जवळ जवळ पन्नास

वर्षातील वाटचाल विचारात घेता संघाकडे संलग्नित असलेल्या ग्रंथालयांची संख्या ४००० हुन अधिक असून संघाच्या कार्यकर्त्याच्या क्रियाशीलतेमुळे संघ अधिक प्रभावी होत गेला. आजवर संघाच्या कार्यकर्त्यांची संख्या लाखाच्या घरात असून हे सर्व कार्यकर्ते केरळमधील ग्रंथालय चळवळ अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. संघाचे आजवरचे कार्य लोकशाही पद्धतीने सुरू असून संघामध्ये तालुका, जिल्हा स्तरीय समित्यांचे योगदान व समन्वय हा महत्वपूर्ण स्वरुपाचा आहे. अशा संरचेनत प्रत्येक ग्रंथालयाचे व्यवस्थापन हे निवडून आलेल्या समितीद्वारे पाहिले जाते. संघाचे कामकाज हे नियामक मंडळ व दैनंदिन कामकाजासाठी व्यवस्थापन मंडळ अशा द्विस्तरावर असून या सर्व स्तरावरील पदाधिकाऱ्यांची निवड निवडणुकीद्वारे होत असते. एकूणच संघाने आजवर केलेले कार्य विशेष लक्षणीय असून यातील एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे संघाच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने संघाच्या कार्यकर्त्यांनी आयोजित केलेली सांस्कृतिक दिंडी होय. या दिंडीची सुरूवात ८ नोव्हेंबर १९७० रोजी कासारगड नगरपरिषद ग्रंथालय येथे होऊन ही दिंडी गावोगावी फिरत राहिली. प्रत्येक गावातील ग्रंथालय कार्यकर्त्यांनी या दिंडीचे स्वागत केले. या दिंडीतील सदस्यांनी जागोजागी समुदायास प्रोत्साहीत करणारी व्याख्याने दिली. केरळ राज्याच्या उत्तर भागातून सुरू झालेली ही दिंडी २० डिसेंबर १९७० रोजी राज्याच्या राजधानीत त्रिवेंद्रम येथे पोहोचली. या ठिकाणी राज्याचे मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री यांनी दिंडीचे स्वागत केले. अंतिमत: या दिंडीची सभा संघाच्या त्रिवेंद्रम येथील कार्यालयानजीक होऊन केरळ राज्यात लोकांच्या मध्ये ग्रंथालय चळवळी विषयक आस्था निर्माण झाली. या संघाद्वारे राज्यातील साक्षरता अभियान विस्तृत प्रमाणात राबवण्यासाठी एक योजना शिक्षण व समाज कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे सादर केली होती. या प्रायोगिक व पथदर्शक प्रकल्पाकरिता केंद्रशासनाने रुपये ८५,०००/– इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. याकरिता २५टक्के रक्कम ग्रंथालय संघाद्वारे उपलब्ध करायची होती. या योजनेच्या अंमलबजावणीकरिता २ विभागांची निवड करण्यात आली होती.

१. दक्षिण विभागातील अथिनापुर हा भाग

२. तर दुसरा उत्तर विभाग भारतातील मालापुरम हा होय.

अथिनापूर हा त्रिवेंद्रम जिल्ह्यातील किनारपट्टीचा भाग असून येथे कोळी लोकांची वस्ती मोठ्याप्रमाणात आहे. तर मालापुरम हा विभाग अंत्यत गरिब, कृषी व्यवसायाशी संबंधीत असा आहे. अशा या मागासवर्गीय विभागाची जाणीवपूर्वक निवड या प्राथमिक प्रकल्पाकरिता करण्यात आली होती. या विभागात प्रत्येकी १० केंद्रे निवडण्यात येऊन ही सर्व केंद्रे ग्रामीण ग्रंथालयाशी जोडण्यात आली होती. प्रत्येक केंद्रावर ४० प्रौढांना प्रवेश देण्यात आला होता. या प्रत्येक केंद्राकरिता क्रियाशील अशा ४ शिक्षकांची निवड करण्यात आली होती. या सर्व शिक्षकांना प्रौढांना अध्यापन करणे विषयक प्रशिक्षण देण्यात आले होते. हा उपक्रम पहिल्यांदा अथिनापूर विभागात १ डिसेंबर १९७१ रोजी तर मालापूरम येथे १ जानेवारी १९७२ रोजी सुरू करण्यात आला होता. या समितीचे सदस्य युनिस्कोचे तज्ञ, संघाचे प्रतिनिधी तसेच वृत्तपत्र विभाग आणि त्यांचे प्रतिनिधी यांनी भेट देऊन या केंद्रावरील कार्याच्या स्वरुपाविषयी समाधान व्यक्त करुन स्तूती केली होती. संघाद्वारे या काळात 'साप्ताहिक केरळ' हे साप्ताहीक नव्याने सुरू करण्यात आलेले होते. तसेच या नवसाक्षरता करिता १०० पुस्तके देखील तयार करण्यासाठी व या पुस्तकाच्या प्रकाशनाकरिता आर्थिक उपलब्धतेचे आश्वासन दिले होते. संघाचा असा विश्वास होता की ७००० साक्षरता केंद्राद्वारे प्रौढ साक्षरता अभियान सक्षम करण्याचा प्रयत्न करणे शक्य आहे. त्यासाठी भारत सरकारकडून अनुदान मिळावे, हे या संघास अभिप्रेत होते. संघाद्वारे बालवाडी योजना राबवितांना या सर्व बालवाड्या ग्रामीण ग्रंथालयांना जोडण्यात आलेल्या होत्या. यासाठी कोणतेही अनुदान शासनाकडून प्राप्त झालेले नसतानाही संघाने २०० हून अधिक बालवाड्या सुरू केल्या होत्या. या बालवाडीतील बालकांमध्ये वाचन अभिरुची विकसीत करण्यासाठी संघाद्वारे घरोघरीसायकल योजनेचा उपयोग करुन एक तरुण व्यक्तीस पुस्तकांचा संच उपलब्ध करुन दिला जात असे. ही व्यक्ती घरोघरी जाऊन नवीन पुस्तके घरापर्यंत पोचवत असे व जुने पुस्तक घेत असे. यामुळे घरातील व्यक्तीला (गृहिणींना)घरोघरी वाचन साहित्य उपलब्ध होऊन त्यांच्यामध्ये वाचन अभिरुची विकसीत होण्यासाठी मदत होते. संघाच्या या उपक्रमाची सर्वदूर दखल घेण्यात आली होती.

ग्रंथालय क्षेत्रातील सेवकांना साक्षर करण्यासाठी संघाने १९५८ पासून अल्प मुदतीचे प्रशिक्षण वर्ग सातत्यपूर्वक सुरु केले. या प्रशिक्षणाच्या कालखंडात ३ आठवडे इतका विस्तारीत करुन असा पहिला प्रशिक्षण अभ्यासक्रम ग्रंथालय सेवकांसाठी सुरू केला होता. या सुरुवातीच्या काळात अभ्यासक्रम कालीकत, कोट्यायम, त्रिचुरा, काननऊर, किलान, अलेक्पी, अर्नाकुलम, पालघाट आणि मालापुरम येथे सुरू केले होते. तर ३ महिन्याचे कायमस्वरुपी प्रशिक्षण अभ्यासक्रम अध्यापक संघाद्वारे कालीकत व कोट्यायम येथे राबविला. संघाद्वारे वाचन अभिरुची समाजामध्ये सर्वदूर विकसीत करण्यासाठी राबविलेले उपक्रम विशेष लक्षणीय तर होतेच. त्यांची इतरत्रही नोंद घेणे व अनुकरण करणे हे देशातील वाचन अभिरुची  प्रसारण व शिक्षण प्रसार यादृष्टिने उपयुक्त ठरणारे आहे. या बरोबरच संघाचे कारागृह ग्रंथालय, राज्य भाषा संस्था व शेतकऱ्यांसाठी नविन पुस्तकांचे प्रदर्शन व शेतकरी ग्रंथकोपरा असे १९७४–७५ च्या कालखंडातील उपक्रम विशेष लक्षणीय आहेत.

**संघाचे उपक्रम :**

१. संघाद्वारे केरळमधील वाचक आणि त्यांच्या वाचन सवयी यांचे सर्वेक्षण

२. ग्रंथालयाच्या संख्येमध्ये वाढ व प्रभावी ग्रंथालय सेवा व ग्रंथालयाकरिता दर्जेदार ग्रंथांची उपलब्धता.

३. प्रत्येक ग्रंथालयाचे सांस्कृतीक केंद्रामध्ये रुपांतर, ग्रंथालयांशी संलग्नीत प्रौढ साक्षरता वर्ग, महिला केंद्र, बालवाडी विकास क्लब, साक्षर लोकांकरिता वादविवाद मंडळ, नाट्य संघ, क्रिडा संघ यांची जोड देणे. प्रत्येक ग्रंथालयाकरिता चित्रपट दाखविण्याची सुविधा.

४. नवसाक्षरतांकरिता १००० हुन अधिक पुस्तकांचे प्रदर्शन

५. घरोघरी सायकल योजना

६. प्रौढ साक्षरता अभियानाकरिता दलित वस्तीत केंद्राची निर्मिती

७. साक्षरता गृहाची निर्मिती त्रिवेंद्रम येथे करणे.

८. संघाच्या कार्यालयाची इमारत उभी करणे. त्यांच्याशी संलग्नीत सभागृह, परिषद व माहितीकेंद्र, ग्रंथपाल प्रशिक्षण केंद्र, वस्तुसंग्रहालय, ग्रंथालयशास्त्र व संशोधन याकरिता एक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राची निर्मिती.

९. ग्रंथालय पुस्तीका व निर्देशिका यांची सुधारीत आवृत्ती प्रकाशित करणे.

१०. ग्रामीण ग्रंथालयाच्या ग्रंथपालांना प्रशिक्षणाची सोय.

असे भविष्याचे वेध घेणारे उपक्रम हे संघाच्या कार्याचे द्योतक आहे. १९७७ पासून संघाच्या व्यवस्थापनेकरिता मंडळ केंद्राचे नियंत्रण ठेवून त्याला एक शासकीय अधिष्ठान प्राप्त झाले आणि येथील ग्रंथालयाचा कारभार जिल्हा प्रशासन पर्यवेक्षणाखाली आला. या सगळ्या संरचनेची सुत्रे केरळ शासनाच्या शिक्षणमंत्रालयाकडे सोपविण्यात आलेले आहेत.

**केरळ ग्रंथालय संघटना :**

केरळ मधील ग्रंथपालांची ही एक व्यवस्थापकीय संघटना असून त्यांची नोंदणी १९७१ मध्ये करण्यात आली. याचे केंद्र त्रिवेंद्रम येथे आहे. यांची प्रमुख उद्दिष्टे

१. केरळ मधील सर्व ग्रंथालयाचे संघटन स्थापन करणे तसेच या करिता परिषदा, सभा, चर्चासत्रे आयोजित करुन याद्वारे ग्रंथालय व्यावसायीकांच्या समस्या विषयक चर्चा घडवून आणणे.

२. ग्रंथालय चळवळीचा विकास करणे व ग्रंथालय सेवांचा दर्जा सुधारणे.

३. ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी प्रयत्न करणे.

४. ग्रंथालयाचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे चालविण्यासाठी प्रयत्न करणे.

५. ग्रंथालय शास्त्राच्या शिक्षणास प्रोत्साहन देणे व केरळमधील ग्रंथपालांच्या प्रशिक्षण उपक्रमामध्ये सुधारणा करणे.

६. संदर्भसूची विषयक अभ्यासक्रम आणि संशोधन यांना प्रोत्साहन देणे.

७. केरळमधील ग्रंथालये, प्रलेखन व माहितीकेंद्रे स्थापन करण्यास प्रोत्साहन करणे.

८. सभासदांच्या सेवा व गरजेची माहिती प्रकाशीत करणे व याद्वारे संघटनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

९. ग्रंथपालाचा दर्जा व शिक्षण उंचावण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे.

१०. समान उद्दिष्ट असणाऱ्या केरळमधील संघटनांशी संलग्नता साधणे.

११. वरील उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी गरजेनुसार आवश्यक प्रयत्न करणे या संघटनेचे सभासदत्व सर्व ग्रंथपालासाठी खुले ठेवण्यात आले होते. त्यासाठी शैक्षणिक पात्रता

ही अट घालण्यात आली होती. किमान कोणत्याही शाखेची पदवी व ग्रंथालय शास्त्राची पदवी वा पदविका असे त्याचे स्वरुप होते. सभासदांकरिता वर्ग ठरविण्यात आले होते. यामध्ये सर्वसाधारण सभासद, संलग्नित सभासद, मानद सभासद व आजिव सभासद, सर्वसामान्य सभासद, सभासदत्व आवश्यक पात्रता धारण करण्यासाठी खुले होते. संलग्नित सभासदत्व हे ग्रंथालयशास्त्राशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्धारीत करण्यात आले होते. तर सन्मानीय सभासदत्व ग्रंथालय क्षेत्रातील महत्वपूर्ण व्यक्तींसाठी व शिक्षकांकरिता निर्धारीत करण्यात आले होते. आजीव सभासदत्व सर्वांसाठी खुले ठेवून त्यांची फी २००/– रुपये ठेवण्यात आली होती. या संघटनेची संरचना अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य सचिव, सचिव व एक संघटक सचिव, जनसंपर्क सचिव, एक कार्यालय सचिव, कोषाध्यक्ष व इतर ११ सभासद असे होते. विभागीय समितीचे पदाधिकारी हे देखील यांच्यामध्ये समाविष्ट असत. ही सर्व निवड निवडणूकीद्वारे केली जाते. संघटनेद्वारे स्टडीसर्कल, सुवर्णपदक (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रम परीक्षेस प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांला) व याच बरोबर चर्चासत्रे, परिषदा यांचे आयोजन वेळोवेळी केले होते. या संघटनेद्वारे १९७९ मध्ये २५ व्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे अधीवेशन त्रिवेंद्रम येथे घेण्यात आले होते. तसेच संघटनेने कोचीन सार्वजनिक ग्रंथालय व संशोधन केंद्र यांच्या सहकार्याने २ ते ४ डिसेंबर १९८८ मध्ये शिक्षण व ग्रंथालय या विषयावर आधारित एका राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन केलेले होते. या चर्चासत्रात २०७ प्रतिनिधी उपस्थित होते. शिक्षणमंत्री ना. श्री. चंद्रशेखर यांनी या चर्चासत्राचे उद्घाटन केले होते.

**केरळ व्यावसायीक ग्रंथालय संघ :**

५ मे १९९२ रोजी श्री. के. सोमदेवन व श्री. स्टेनले सेम प्रदीपम या दोघा तरुण ग्रंथपालांनी या संघटनेची स्थापना करताना ग्रंथालय क्षेत्रातील नव्या दिशांचे दिग्दर्शन समव्यावसाययीकांना करणे या दृष्टिकोनातून स्थापन केली होती. या संघटनेची उद्दिष्टे निर्धारीत करताना ग्रंथपालांच्यामध्ये सहकाराची भावना व संपर्क वृद्धिंगत करणे व त्याकरिता

चर्चासत्रे, व्याख्याने, कार्यशाळा, अल्पमुदतीचे अभ्यासक्रम यांचे आयोजन करणे.अभ्यास सहलीचे आयोजन करणे. ग्रंथालय व माहितीकेंद्रांना सेवा पुरविणे तसेच व्यावसायाकरिता प्रकाशन सुरु करणे, संशोधन प्रकल्प हाती घेणे अशा उद्दिष्टाबरोबर ग्रामीण परिसरात ग्रंथालय माहिती सेवा उपक्रमांना चालना देणे. एकूणच समान उद्दिष्टे असणाऱ्या संघटनांशी सहकार्य करुन शासन स्तरावरील मागण्या संदर्भात पाठपुरावा करणे व सर्वांचे व्यावसायीक कल्याण साधणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन संघटनेचे मुखपत्र म्हणून केल्फो बुलेटीन हे अर्ध वार्षिक सुरू केले होते. हे बुलेटीन जुन व डिसेंबर मध्ये प्रकाशित केले जात असे व बुलेटीनद्वारे विशेष प्राधान्य क्रमाने ग्रंथालयशास्त्र व माहिती शास्त्र विषयक लेखन केले जाते. सार्वजनिक ग्रंथालयासाठी या संघटनेने काही उद्दिष्टांचे निर्धारण केले असले तरी बहुतांशी या संघटनेचे कार्य शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त राहीले. या संघाबरोबर केरळ शैक्षणिक ग्रंथपाल संघटना, केरळ असम्बेली ग्रंथपाल कर्मचारी संघटना याही संघानी आपल्या मर्यादीत व्यावसायीक उद्दिष्टाअंतर्गत आपले योगदान दिलेले आहे.

**३.२२ आंध्रप्रदेश राज्य ग्रंथालय संघ :**

या राज्यातील सामाजिक सुधारणा व लोकजागृती यांचे मुलभूत कारण म्हणून 'वंदे मातरम् व विरे सलीग्राम' या चळवळीकडे पाहता येईल. या चळवळीमुळे स्थानिक लोकांना आपल्या मातृभाषेबद्दल आस्था निर्माण होऊन मातृभाषेतील ग्रंथ व नियतकालीके मोठ्या संख्येने तेलगू भाषेतून प्रकाशित करण्यात आली. या चळवळीची परिणीती म्हणून या राज्यात इंग्रजांच्या काळात ग्रंथालयांची स्थापना होण्यास मदत झाली. या सर्व घटना १९ व्या शतकाच्या सुरूवातीस राजकीय जागृतीच्या माध्यमातून हाताळल्या आणि पुढे दशक भरात येथे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ व आंध्र चळवळ बळकट होऊ लागली. याच पार्श्वभूमीवर १९१३ मध्ये आंध्र प्रदेशातील विविध विभागातील १६३ ग्रंथालये जी या अगोदर स्वतंत्रपणे कार्यरत होती ती एकत्रित येऊन कार्यरत होण्यासाठी पहीले प्रयत्न श्री. अय्यान टी. व्यकटरमन यांनी श्री.एस. नरसिंहशास्त्री यांच्या सहकार्याने सुरू केले. याकरिता त्यांनी एक आवाहन प्रसृत केले. यामध्ये प्रामुख्याने अंतभूर्त केलेले मुद्दे –

१. ग्रंथालय सेवकांना सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या सामान्य समस्यांवर चर्चा करणे.
२. जी ग्रंथालये अगोदरच स्थापन झाली आहेत ती योग्य प्रकारे चालू राहण्यासाठी आवश्यक ते मार्ग व साधने यांचा शोध घेणे.
३. नव्या ग्रंथालयांची स्थापना करणे.
४. ग्रंथालय सेवकांमध्ये बंधूभाव निर्माण करणे.
५. ग्रंथालयामध्ये समन्वय व सहकार विकसीत करणे.
६. ग्रंथालय चळवळी विषयक संपूर्ण आंध्रप्रदेशात जाणीव जागृती करणे.

या आवाहानांस प्रतिसाद देऊन १० एप्रिल १९१४ रोजी आंध्रप्रदेशातील व तेलंगणातील २०० प्रतिनिधींनी राम मोहन ग्रंथालय बेझवाडा येथे आयोजित केलेल्या पहिल्या आंध्र प्रदेश ग्रंथालय सेवक परिषदेस उपस्थिती दर्शविली. ही परीषद चिलयमुर्ती लक्ष्मी नरसिंह यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी आपल्या भुप्रदेशात सर्वदुर ज्ञानाचा प्रसार व्हावा असे कळकळीचे आवाहन करत ते अंतिमतः उद्गारले, 'आपण हवा आणि पाणी सहजपणे उपलब्ध करतो. सुर्यप्रकाश ग्रहण करतो आणि आपले

जीवनचक्र अबाधीत ठेवतो. याचप्रकारे सर्वत्र सर्वांना ज्ञान उपलब्ध झाले पाहिजे.' त्यांचे हे कळकळीचे आवाहन अंयकी व्यकट रामय्या यांनी ग्रंथालय वेदम या छोट्याशा पुस्तकात अंतभूर्त केले. या द्वारे या परिसरातील ग्रंथालय सेवकांना ग्रंथालय चळवळ खऱ्या अर्थाने सर्वदूर पसरविण्याची प्रेरणा प्राप्त झाली. या परिषदेद्वारे सर्व ग्रंथालय सेवकांना एकत्र येण्याचे व्यासपीठ निर्माण झाले. त्याचबरोबर ग्रंथालयाद्वारे सुरू असलेल्या विविध ग्रंथालयांचे स्वरुपाविषयी देवाणघेवाण होण्यास मदत झाली. याचबरोबर ग्रंथालय उपक्रमामध्ये सहभागी होणे आणि ग्रंथालयाची सामाजिक भूमीका समजावून घेणे याच्या संदर्भात या काळात जागृती होऊन ग्रंथालये ही केवळ ज्ञान प्राप्तीची ठिकाणे नसुन ती एक सांस्कृतीक संस्था असून राजकीय जागृतीची केंद्रे आहेत. हा संदेश समाजापर्यंत पोहचवण्याची जबाबदारी ही ग्रंथालयांवरच आहे.'' ग्रंथालयविषयी ही विचारधारणा सुस्पष्ट होण्यास ही परिषद उपयुक्त ठरली. या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेशातील ग्रंथालय चळवळीस एक स्थायी स्वरुप प्राप्त होण्याच्या दृष्टिने या परिषदेत सहभागी झालेल्या लोकांनी स्वत:हून 'आंध्र देश ग्रंथ भांडार गृह संघ' या नावाची संघटना स्थापली. याच संघास पुढे आंध्र देश ग्रंथालय संघ या नावाने १९५७ पासुन ओळखले जाऊ लागले. ही घटनामात्र आंध्रप्रदेश राज्य अस्तित्वात आल्यानंतर घडली. या परिषदेमध्ये अनेक ठराव पारीत करण्यात आले. या ठरावाचे विषय ग्रंथालय चळवळ, ग्रंथालय सुरू करणे व त्यांची देखरेख करणे या संदर्भात शासनाशी संबंधीत कामे पार पाडण्यासाठी आंध्रप्रदेश ग्रंथालय संघ या नावाची एक स्थायी कमिटी स्थापने व त्याकरिता सचिवाची नेमणुक करणे, संघटनेचे मुखपत्र म्हणून एक नियतकालीक प्रकाशीत करणे व त्याद्वारे ग्रंथालय चळवळीचा प्रसार करणे अशा विषयांचा अंतर्भाव करण्यात आला होता. या परिषद प्रसंगी श्री. एम. आर. राव यांची अध्यक्ष म्हणून तर श्री. एल. नरसिंह व सुरी व्यंकटनसिंहशास्त्री यांची उपाध्यक्ष तर निलम कृष्णराव व ए.व्ही.रामय्या यांची प्रमुख सचिव म्हणून निवड करण्यात आली. या परिषदेतील ठराव क्र. ४ व्दारे १० एप्रिल १९१४ रोजी आंध्र देश ग्रंथालय संघाची स्थापना करण्यात आली. देशात अशाप्रकारे स्थापन झालेला हा पहिलाच ग्रंथालय संघ होय. या ग्रंथालयाच्या स्थापनेनंतर अंय्यका वेंकटारामय्या यांनी आणि एस. व्ही. नरसिंह यांनी प्रभावीपणे काम करण्यास सुरवात केली. ग्रंथालय

चळवळ सर्वदुर पोहचण्यासाठी  प्राथमिक भाग म्हणून सुरूवातीस संघाद्वारे आंध्रप्रदेशातील पुष्कळ ठिकाणी ग्रंथालये स्थापन करण्यात आली. याचा परिणाम म्हणून १९१३ मध्ये केवळ १६३ ग्रंथालये होती त्यांची संख्या १९१५ मध्ये ४१४ पर्यंत पोहचली. अशाप्रकारे ही संख्या वाढत १९३४ अखेर ६०० वर पोहोचली. ग्रंथालय कार्यकर्त्यांनी या करिता घेतलेले विशेष परिश्रम आणि सरकारी अनुदानापेक्षा लोकनिधीतून या चळवळीस सहकार्य प्राप्त झाल्याने ही संख्या वृद्धिंगत होण्यास मदत झाली. १९६३ च्या कालखंडात जिल्हा निहाय ही संख्या पुढील प्रमाणे होती.

| अ.क्र. | जिल्हा | ग्रंथालयांची संख्या |
|---|---|---|
| १ | गोदावरी | ११० |
| २ | विशाखापट्टण | ५३ |
| ३ | कृष्णा | ८० |
| ४ | कर्णूल | ५२ |
| ५ | अंनंतपुर | १३२ |
| ६ | नेलूर | १०४ |
| ७ | श्रीकाकूलम | २८ |
| ८ | पुर्वगोदावरी | १२४ |
| ९ | गुंटूर | ११८ |
| १० | बेहतारी | ९७ |
| ११ | कुडप्पा | ४२ |
| १२ | चित्तूर | १३९ |

या संघाची प्राथमिक उद्दिष्टे ही ग्रंथालयांचे सर्वदुर जाळे उभे करणे व त्यासाठी लोकजागृती करणे. त्याचबरोबर सांस्कृतिक संवर्धन, राजकीय जागृती अशा स्वरुपाची होती. सुरूवातीच्या काळात या संघटनाद्वारे ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या समस्या विषयी  भर देण्यात आला नव्हता. या बाबीचा पुर्नविचार करुन संघाची नवीन घटना तयार करण्याचा

विचार १९६८ मध्ये पुढे आला. ही घटना नव्या बदलासह ७ ऑक्टोबर १९८० पासुन कार्यरत झाली. या अंतर्गत ग्रंथालय चळवळीचा विकास करणे, सार्वजनिक शिक्षणाचा आणि आंध्रभाषेचा विकास करणे याचबरोबर ज्या ठिकाणी आंध्र प्रदेशातील लोक असतील त्या ठिकाणी आंध्र प्रदेश संस्कृतीच्या व भाषेच्या विकासासाठी प्रयत्न करणे इ. समावेश या उद्दिष्टांबरोबर प्रस्तुत घटनेत अंतर्भूत करण्यात आली होता. तसेच यामध्ये ग्रंथालयाची स्थापना व व्यवस्थापन, समाजशिक्षण आणि माहितीकेंद्रे, भाषा आणि सांस्कृतिक संस्था, परिषदांचे आयोजन, ग्रंथदिंडी व प्रदर्शने आणि प्रकाशन, ग्रंथालय प्रसाराचा विचार, ग्रंथपाल व सामाजिक शिक्षण कार्यकर्ते यांना प्रशिक्षणाची सोय करणे. संघटनेच्या शाखा निर्माण करणे व ग्रंथालयशास्त्र व तेलगु भाषा यांना प्रोत्साहन देणे याबाबत विचार करण्यात आला होता.

या संघटनेची संरचना 'सर्वसाधारण व्यवस्थापकीय मंडळ' अशा स्वरुपाचे ठेवण्यात आलेले होते. सर्वसाधारण मंडळाच्या सभेत मानद अध्यक्षांची निवड केली जाई. त्यांच्या सल्ल्याने संघटनेचे उपक्रम राबविले जात. सभासद वर्गात मानद सभासद, आजिव सभासद, कायम सभासद आणि सर्वसामान्य सभासद व्यक्ती व संस्था स्वरुपात वरील अंतर्गत सभासद तरतूदी घटनेत नमुद करण्यात आल्या होत्या. या संघटनेमध्ये दोन विभाग तयार करण्यात आले होते.

१. प्रत्यक्ष क्षेत्रवार काम करणारे कर्मचारी

२. साक्षरता विभाग

क्षेत्रावर काम करणारे सेवक व सभासद हे मोफत काम करत असत आणि ते ग्रंथालय चळवळीचा संदेश ग्रामीण परिसरात भेटीद्वारे देत असत. या सवेकांनी संघटनांसाठी दिलेले योगदान हे विशेष लक्षणीय स्वरुपाचे होते. साक्षरता विभाग हा तेलगू साहित्यास प्रोत्साहन देण्याचे काम पाहत असे. संघाच्या ऐतिहासिक वाटचालीकडे दृष्टिक्षेप टाकताना लक्षात येते की, ध्येयावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी नंतरच्या काळात १९३४ मध्ये 'आंध्र देश ग्रंथालय सेवक संघ' स्वतंत्र सुरू केला. ही संघटना पुढील काळात राज्यातील ग्रंथालय चळवळीकरिता योगदान देत राहीली आहे. पुढे आंध्र ग्रंथालय संघ १९४६ मध्ये स्थापन करण्यात आला. याचे कार्य म्हणजे देणगीद्वारे प्राप्त अनुदानाचे व्यवस्थापन करणे, इमारत

बांधणे या सर्वच गोष्टी  संघाकरिता केल्या जात. याच पार्श्वभूमीचर पुढे सर्वोत्तम ग्रंथालय संघाने स्वत:च्या मुख्यालयात सुरू केले. संघाने नियमवार येथे फटमाडा परिसरात श्री. सर्वोत्तम भवनात हे ग्रंथालय उभारले आहे.

**संघाचे उपक्रम :**

१. ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहान

२. ग्रंथालय चळवळ ग्रामीण परिसरात पसरवण्यासाठी विशेष प्रयत्नांतर्गत संघाद्वारे रात्रशाळा आणि प्रौढशिक्षण वर्ग हे चालविले जात होते.

३. या माध्यमातून संघाद्वारे लोकांमध्ये ग्रंथाविषयी प्रेम निर्माण करण्याचा पारंपारिक व आधुनिक प्रयत्न केला गेला.

४. मोफत ग्रंथालय आणि त्यांचा सामाजिक शिक्षणाचे साधन म्हणून केलेला उपयोग तसेच ग्रामीण संस्कृती व राजकीय जागृती या करिता ही संघाद्वारे विशेष प्रयत्न करण्यात आले होते.

संघाने या ग्रामीण ग्रंथालयात बालविभाग व महिला विभाग सुरु करण्याविषयी प्रोत्साहान दिले. संघटनेने ग्रंथालय सत्राचे आयोजन ग्रामीण परिसरात विशेषत्वाने पश्चिम गोदावरी, कृष्णा, गुंटूर या जिल्ह्यात केले. या करिता श्री. अय्यकी यांनी खुपच पुढाकार घेतला होता व अशा ग्रंथालयाची स्थापना ग्रामीण परिसरात करण्यासाठी खुप परिश्रम घेतले होते. या अभियानाकरिता फिरती ग्रंथालये सुरू करण्यासाठी बैलगाडी, सायकल ही दळवळणाची साधने सहाय्यभूत ठरली. या साधनांच्या माध्यमातून ग्रंथपेट्या काही खेडेगावातून फिरवील्या. यामध्ये कूप्पम (चितूर), पेढासनगाल (कृष्णा), जगपुरम (विशाखापट्टण) या खेडे गावांचा समावेश आहे. अशा या अभिनव स्वरुपाच्या संघामधील एक तळमळीचे कार्यकर्ते श्री. पट्टरी नागभूषण यांनी बोटीवरील प्रवाशांकरिता १९३५ ते १९४२ या कालखंडात ग्रंथालय सेवा सुरू केलेली होती. यासाठी त्यांनी 'शटल बोट सेवा' तेनाली व निगामपट्टण या दरम्यान सुरू करताना या बोटीवर अभ्यासिका सुरू ठेवली होती. याद्वारे पेढापारु व पेढावदलापुडी व कल्लूरु या घेमटूर जिल्ह्यातील गावात फिरती ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देण्यात आली होती. संघटनेचे महत्त्वपूर्ण व उल्लेखनिय कार्य म्हणजे दुसऱ्या महायुद्धासाठी जाणाऱ्या आंध्र

प्रदेशातील सैनिकांकरिता त्यांनी काही पुस्तके व नियतेकालीके देखील पाठविली होती. संघाच्या या विविधांगी प्रयत्नातुन या परिसरात ग्रंथालयविषयक असलेल्या आस्थेचे दर्शन घडते.

**ग्रंथालय कायद्याकरिता शासनाकडे पाठपुरवठा :**

ग्रंथालय कर्मचारी विषयक सेवाशर्तीची गरज व ग्रंथालयांचा सर्वांगीण विकास सर्वदुर होण्याच्या दृष्टीने संघटनेने केलेले प्रयत्न यशस्वी होऊन मद्रास सामाजिक ग्रंथालय कायदा १९४८ अस्तित्वात आला. याकरिता कायदा मसुदा ठरविण्यासाठी संघटनेद्वारे विजयवाडा येथे १९४८ साली एक विशेष परिषद भरविण्यात आली होती. या मसुद्याअंतर्गत तरतूदी सुधारण्यासाठी आवश्यक ते पुरावे कायदा समितीस संघाद्वारे पुरविण्यात आले होते. कायद्याची गरज आणि कायद्याच्या तरतुदी यासाठी संघटनेने केलेले विशेष सहकार्य यामुळे देशातील पहिला सार्वजनिक ग्रंथालय कायदा प्रत्यक्षात येण्यास मदत झाली. पुढे आंध्रप्रदेश संघाने आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात येण्यासाठी विशेष प्रयत्न करताना १९५९ मध्ये एका चर्चासत्राचे आयोजन करुन यामध्ये मद्रास सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८ व हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९५५ हे दोन्ही विकसीत करुन स्वतंत्र आंध्रप्रदेश ग्रंथालय कायदा तयार करण्यासाठी चर्चा करण्यात आली. या चर्चेअंतर्गत प्राप्त पुरावे पुढे कायदा समितीकडे सुर्पूद केले. तसेच या करीता स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीवर कायद्याच्या एकत्रिकरणासाठी सहकार्य केले. याचबरोबर विविध परिषदांतून कायदा विषयक ठराव पारीत करण्यात आले. तसेच संघाचे मुखपत्र 'ग्रंथालय सर्वस्वमः' या नियतकालीकातून संपादकीय व लेख प्रकाशित केले. या सर्वांचा शासनावर प्रभाव पडून कायद्यास एक निश्चित स्वरुप देण्यासाठी मदत झाली. संघाच्या अशा विविध प्रयत्नातून व निवेदनातून प्रत्यक्षात आंध्र प्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६० मध्ये अस्तित्वात आला व याव्दारे ग्रंथालय विषयक समस्या निराकरणासाठी मदत झाली.

**ग्रंथालयशास्त्र शिक्षणाकरिता संघाचे योगदान :**

संघाने १९२० पासुन ग्रंथपालन विषयक प्रशिक्षणाची जबाबदारी उचललेली होती. याकरिता संघाने सुरूवातीच्या काळात दोन अभ्यासक्रम सुरू केले यामध्ये,

१. ग्रंथ प्रवेशिका हा तीस दिवसांचा अभ्यासक्रम प्राथमिक स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.

२. तर ग्रंथालय विशारद हा तीन महिन्यांचा अभ्यासक्रम व्यावसायिक स्वरुपात सुरू केलेला होता.

या अभ्यासक्राअतंर्गत ग्रंथालय संघटन, ग्रंथालय प्रशासन, विशेष ग्रंथालय, तेलगु साहित्याचा इतिहास, समाजशास्त्र या विषयाचा प्रस्तुत अभ्यासक्रमाचा समावेश करण्यता आला होता. पुढे १९६६ च्या काळात राज्य सरकारच्या मान्यतेनंतर ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम तेलगु भाषेतून सुरू केला गेला. नंतरच्या काळात हा अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमातून सुरू करण्यात आला. या अभ्यासक्रमासाठी ग्रंथालय संघटन, ग्रंथालय प्रशासन,संदर्भसेवा, संदर्भसूची, ग्रंथनिवड, वर्गीकरण, तालिकीकरण हे विषय शिकवले जात. या वर्गांना ग्रंथालय चळवळीतील नेते आणि समाजातील विचारवंत यांच्याद्वारे विशेष व्याख्याने दिली जातात. प्रौढ शिक्षण आणि सामाजिक विस्तार सेवा उपक्रम हे या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून अंतर्भूत करण्यात आले होते. अशा या पहिल्या ग्रंथालयशास्त्र विषयक अभ्यासक्रमाचे १९६६ ते १९६८ या काळातील प्राचार्यपद  हे डॉ. वेंलक्का वेंकटपती यांनी भूषविले होते. सुरूवातीच्या काळात प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला होता. त्याकरिता अभ्यासक्रम निर्मिती, पाठ्यपुस्तकांची निर्मिती आणि एकूणच अभ्यासक्रमाची उभारणी करण्यामध्ये संघाचे योगदान हे विशेष दखल घेण्यासारखे आहे. ग्रंथालयशास्त्र प्रशालेचे नामकरण ‘पतूरी नागभूषण ग्रंथालय शिक्षणालय,विजयवाडा’ असे करण्यात आले होते. या नामकरणा पाठीमागचा उद्देश म्हणजे श्री. नागभूषण यांनी ग्रंथालय संघाकरिता ५ दशकाहून अधिक कालखंड दिलेले योगदान हे ग्रंथालय शास्त्रांच्या विद्यार्थ्यांसमोर यावे तसेच त्यांचे चिरस्मरण व्हावे हा हेतू होता.

**परिषदांचे आयोजन :**

प्रस्तुत संघाद्वारे राज्यातील ग्रामिण परिसरातील विविध ठिकाणी वेळोवेळी परिषदाचे आयोजन करण्यात आले होते. याद्वारे ग्रंथालय सेवकांना एकत्रीत येण्यासाठी व अपले विचार आणि अनुभव यांची देवाण घेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण झाले होते.

अशा चर्चेतुन ग्रंथालयक्षेत्राच्या सद्यस्थितीचा आढावा, चर्चासत्राचे आयोजन, ठराव पारीत करणे, त्या अनुषंगाने उपक्रम, चर्चासत्रे व प्रदर्शने यांचे आयोजन या बाबत ही निर्णय घेणे शक्य होत असे. संघाच्या कार्यकर्त्यांद्वारे आयोजीत केलेली ही नवीन चर्चासत्रे व ग्रंथप्रदर्शने याद्वारे या क्षेत्रातील सेवकांना त्यांच्या या उपक्रमामुळे एक सन्मान प्राप्त झाला. अशा उपक्रमामुळे समाजाचे ग्रंथालय उपक्रमामुळे लक्ष वेधले जाऊन त्यांच्यामध्ये ग्रंथ आणि ग्रंथालये याविषयी विशेष कुतूहल निर्माण होण्यास मदत झाली. सुरूवातीच्या दशकाचा विचार करता १९९४ अखेर संघाद्वारे सातत्यपूर्वक परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. आजही संघाद्वारे विविध उपक्रम जोमाने राबविले जात असून त्यास प्रतिसाद प्राप्त होत आहे.

**बौद्धिक स्वातंत्र्यासाठी लढा :**

निजाम राजवटीत गस्ती निशान या मोहीमे अंतर्गत ग्रंथालयाची स्थापना व सभा आयोजित करण्यासाठी बंदी घालण्यात आली होती. तत्कालीन पोलिस यंत्रणा लोकांच्या प्रबोधनात्मक उपक्रमामध्ये हस्तक्षेप करत असे. याचबरोबर या काळात लोकांच्या मुलभूत हक्कावरही गदा आली होती, म्हणून या संदर्भात संघटनाद्वारे जोरदार निषेद नोंदविण्यात आलेला होता. आंध्रविभागातही मद्रास शासनाने श्री. उन्नवा लक्ष्मी नारायण यांच्या गाजलेल्या 'मालापल्ली' या सामाजिक कादंबरीवर बंदी घातली होती. या संदर्भात संघटनेने तीव्र स्वरुपात निषेध नोंदवून सरकारच्या गिसाडघाईने घेतलेल्या अलोकशाही निर्णयाचा निषेध नोंदविणारा ठराव पारीत केला होता. प्रशासनाविरोधात संघटनेने घेतलेला हा असहकाराचा आग्रही पवित्रा हे या संघाचे जिवंतपणाचे लक्षण म्हणून याची इतिहासत नोंद घेणे महत्त्वपूर्ण ठरते.

**संघाची प्रकाशने :**

अगदी सुरूवातीस संघाद्वारे मुखपत्र म्हणून १९१५ मध्ये अधीकृत स्वरुपात 'ग्रंथालय सर्वोस्वम' हे नियतकालीक सुरू केले होते. या नियतकालीकाच्या माध्यमातून साहित्य, इतिहास आणि इतर सांस्कृतीक विषय याचबरोबर सार्वजनिक ग्रंथालय चळवळ विषयक घडामोडी, विशेष संदर्भयुक्त लक्षवेधी लेखन प्रकाशित केले जात असे. या सगळ्याची

परिणीती म्हणून संघाद्वारे स्थानिक भाषेत एक अंक प्रकाशित केला होता. या विशेष अंकाअंतर्गत ग्रंथालय व त्यांची कार्ये, स्थानिक पातळीवर सर्वांसाठी प्रौढशिक्षण यांची दखल या विशेष अंकात घेण्यात आली होती. दत्तगीरी लक्ष्मी व्यंकटरमण यानी काही वर्षे 'दलरमा ग्रंथालय' हे तेलगू भाषेतील नियतकालीक काही वर्षे चालविले. या नियतकालीकाचा मुख्य उद्देश ग्रंथालय चळवळ हा होता. याचबरोबर नरसिंहशास्त्री यांनीही पुष्कळ पत्रकांबरोबरच आंध्र देशातील ग्रंथालय चळवळीचा विकास या विषयी एक माहितीपुर्ण ग्रंथाचे लेखन ही केलेले होते.

वेलेदेदा श्रीनिवासराव यांनी १९२७ पर्यंत ग्रंथसूची कार्य मोठ्या प्रमाणात होती घेतले होते. याचबरोबर अप्रकाशित तेलगू साहित्य यांचे निर्देशासह प्रकाशन हे देश उद्धाधरक के. ज्ञानेश्वर पंतूलू यांनी संघटित केले होते. या सर्वांचे लेखन करुन त्यांचे यशस्वी प्रकाशन केले. पुढील काळात संघाव्दारे अनेक चांगल्या खंडात्मक ग्रंथाचे लेखन व प्रकाशन करण्यात आले. तसेच संघाच्या हिरकमहोत्सवी प्रसंगी अनुक्रमे संघाद्वारे ग्रंथालय सर्वस्वम: यांचे विशेष अंक काढण्यात आलेले होते. तसेच प्रौढ शिक्षण विषयक काही प्रकाशने संघाद्वारे प्रस्तृत करण्यात आलेली होती. या संघाद्वारे 'देशातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा महत्त्वपूर्ण इतिहास' या विषयाची भूमिका हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण असून या संपूर्ण काळात संघाने लोकांच्यामध्ये ग्रंथालय चळवळीस दिलेली प्रसिद्धी ही विशेष लक्षणीय स्वरुपाची होती. संघाद्वारे प्रकाशित करण्यात आलेली नियतकालीके, निर्देशीका व तत्सम प्रकाशने ही ग्रंथालय चळवळीच्या इतिहासातील 'माईलस्टोन' म्हणून ओळखली जातात.

**संघाचे सर्वांगिण प्रथम स्थान :**

आंध्र प्रदेश ग्रंथालय संघाने ग्रंथालय चळवळीकरिता दिलेले योगदान सर्व पातळीवर विचारात घेता या संघाद्वारे राबविलेले उपक्रम इतर संघाकरिता मार्गदर्शक ठरलेले आहेत. या संघाद्वारे राबवलेले अनेक उपक्रम हे खऱ्या अर्थाने देशात करण्यात आलेले प्रथम प्रयत्न म्हणून ग्रंथालय चळवळीच्या इतिहासात दखल घेणे गरजेचे आहे. यापैकी काही उपक्रम –

**१. देशातील पहिला ग्रंथालय संघ :**

आंध्र ग्रंथालय संघ हा भारतातील पहिला ग्रंथालय संघ होय. या प्रदेशातील ग्रंथपालांची पहिली परिषद १० एप्रिल १९१४ रोजी विजयवाडा येथील राममोहन ग्रंथालयात आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये ६० ग्रंथालयांनी भाग घेतला होता. परिषदेचे अध्यक्षस्थान श्री. चिला कामरायी लक्ष्मी नरसिंह पंतूलू यांनी परिषदप्रसंगी भूषवून पुढीलप्रमाणे ग्रंथाबद्दल उद्‌गार काढले होते –

"The suns light brightness everything so shall knowledge dispet darkness & brighten every life. All gives life to all & is freely accessible so shalk knowledge be within every reach of all breathing life vigour into men. Clear water quenchesthe thirst of all. So shall knoweldge. satisfy the curiocity of curious & the hunger of hungry for it " *(P.S.G. Kumar, Page 40, 2008)*

अशा भावपूर्ण प्रतिक्रियेनंतर पुढील कामकाजात या संघाची स्थापना झाली. याप्रसंगी दिवाण बहादुर रामचंद्र राव यांची अध्यक्षपदी निवड करुन श्री. अय्यकी आणि निलम यांच्यावर भारतातील पहिल्या ग्रंथालय संघाच्या पदाधिकारी पदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

**२. पहिली ग्रंथालय डिरेक्टरी :**

या संघाद्वारे संघटना स्थापन होताच सुरूवातीस हाती घेतलेले कार्य म्हणजे ग्रंथालय डिरेक्टरीचे संपादन हे होय. वर्षभरात या कार्याची पुर्तता करुन त्यांचे प्रकाशन १९१५ मध्ये 'डिरेक्टरी ऑफ आंध्र लायब्ररीज इन १९१५' या नावाने करण्यात आले. अशा प्रकारे ग्रंथालयाकरिता तयार केलेली व प्रकाशित केलेली भारतातील व राज्यस्तरावरील ही पहिली डिरेक्टरी होय.

**३. स्थानिक भाषेतील पहिले ग्रंथालय नियतकालीक :**

या संघाद्वारे १९६१ मध्ये प्रकाशित करण्यात आलेले 'ग्रंथालय सर्वोत्तम' हे संघटनेचे देशातील पहिले मुखपत्र असावे, जे स्थानिक भाषेत प्रकाशित होते. आजही प्रकाशित होत असलेले हे ग्रंथालय विषयक नियतकालीक सर्वात जूने नियतकालीक समजण्यात येते. या

प्रदेशातील लोकांच्यामध्ये ग्रंथालय विषयी जनजागृती, ग्राम उद्धार, प्रौढ शिक्षण आणि स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार या दृष्टिकोनातून हे नियतकालीक प्रबोधकाराची भूमिका बजावत आहे.

**४. पहिली अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय परिषद :**

या संघाने देशातील पहिली अखिल भारतीय ग्रंथालय परिषद मद्रास येथे यशस्वीरित्या भरवली होती. याचे अध्यक्षस्थान बडोदा येथील डी. एस. कुडाळकर यांनी भूषविले होते. वास्तविक पाहता या अगोदर १९१८ मध्ये लाहोर येथे पहिली अखिल भारतीय ग्रंथालय परिषद संपन्न झाली होती. या परिषदेवर सर्व समितीचे वर्चस्व होते. त्यामुळे फारच अल्प ग्रंथपालांनी या परिषदेत देशपातळीवर सहभाग दर्शविला होता. फक्त लाहोर येथील श्री. डिकन्सन हे ग्रंथपाल या अधिवेशनास उपस्थित होते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संघटनेने या अखिल भारतीय परिषदेचे लाहोर परिषदेचे आयोजन केले होते. विजयवाडा येथे संपन्न झालेल्या या परिषदेत अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय संघाची स्थापन झाल्याचे जाहीर करण्यात आले. विजयवाडा हे संघाचे मुख्यालय म्हणून निश्चित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर पहिली अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय परिषद भरविण्याचा मान ही आंध्र संघास प्राप्त झाला.

**५. ग्रंथालय विषयक भारतातील पहिले नियतकालीक :**

श्री. अय्यंकी यांनी ग्रंथालय संघाला वाहिलेले अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे मुखपत्र म्हणून ‘पहिले इंग्रजी नियतकालीक’ सुरू केले. या नियतकालीकाचे प्रकाशन सलग १० वर्षे करण्यात आले.

**६. ग्रंथयात्रा :**

या संघाद्वारे सुरवातीच्या काळात ग्रंथालय जत्रासारखा अभिनव उपक्रम सर्वप्रथम सुरू केला. याचे प्रथम आयोजन पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील भिवरम तालुक्यात १९३६ मध्ये करण्यात आलेले होते. हा देशातील पहिला वहिला अभिनव उपक्रम म्हणून ओळखला जातो.

**७. जगातील पहिले तरंगते ग्रंथालय :**

या प्रदेशातील पेडपेलम येथील मध्यवर्ती ग्रंथालयाने प्रथमत: मोटर व्हॅन ऐवजी बोटीमधून ग्रंथालय सेवा सुरू केली होती. पुढे या सर्वांचा विस्तार ३० खेड्यातून बोटीमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाकरिता करण्यात आलेला होता. अशा अभिनव उपक्रमाचे स्वागत 'तरंगती ग्रंथालय सेवा' या नावाने करण्यात आलेले होते. जागतिक स्तरावरील ग्रंथालय क्षेत्राचा विचार करत असताना अशा प्रकारची सेवा ही सर्वप्रथमच असावी . या योजनेचे श्रेय श्री. पथूरी नागभूषण सचिव, आंध्र देश ग्रंथालय संघ यांना जाते.

**८. बंगाल ग्रंथालय संघ, मद्रास ग्रंथालय संघ अशा संघाच्या निर्मितीतील योगदान:**

श्री. अय्यकी यांनी देशभर ग्रंथालय चळवळीचा प्रसार करण्याच्या हेतू मनामध्ये बाळगून इतर राज्यात राज्य ग्रंथालय संघ स्थापनेसाठी यशस्वी प्रयत्न केले. यामध्ये बंगाल, मद्रास व इतर राज्याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. श्री. अय्यंकी यांनी बडोदा येथील ग्रंथालयाचे अवलोकनाकरिता व ग्रंथालय संघ वृध्दिंगत करण्यासाठी प्रत्यक्ष भेटीद्वारे प्रयत्न केले. तसेच देशातील इतर अनेक ठिकाणी फिरून ग्रंथालय संघाच्या प्रसाराकरिता दिलेले योगदान हे ही एकमेवाद्वितीय स्वरुपाचे आहे.

**७. आंध्र ग्रंथालय ट्रस्ट :**

या ट्रस्टची स्थापना १९४६ मध्ये करण्यात आली. भारतातील ग्रंथालय चळवळीचा विकास करताना ही घटना म्हणजे एक ऐतिहासिक नोंद आहे. देशातील हा एकमेवाद्वितीय उपक्रम सुरूवातीस श्री. कोमासीमा रामनेगुरु यांच्या सौजन्याने संघाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या घरात करण्यात आला होता. पुढे संघाने स्वत:चे 'श्री सर्वोत्तम भवन' उभे केले आणि येथून या ट्रस्ट चा कारभार सुरू करण्यात आला. संघाचे सर्वप्रथम कार्यालय असलेला या देशातील पहिलाच ग्रंथालय संघ होय.

**८. सार्वजनिक ग्रंथालय संचनालय स्थापनेस शासनाकडून प्राधान्य :**

पूर्ण वेळ संचालकांची नियुक्ती करुन राज्यातील स्वतंत्र सार्वजनिक ग्रंथालय संघ सुरू करण्यासाठी आंध्र शासनाने सर्वप्रथम यशस्वी प्रयत्न केला. यासाठी स्वतंत्र मंत्रालय ही निर्माण करुन देण्यात आले. अशा पुढाकारामुळे सार्वजनिक ग्रंथालयाच्या समस्येच्या

पूर्ततेसाठी एक स्वतंत्र मंत्री या राज्याकरिता उपलब्ध करुन दिला. देशातील सर्वप्रथम राज्य जेथे शासनाने सर्वप्रथम ग्रंथालय खाते निर्माण करुन दिले. म्हणून या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला शासनाने दिलेले सहकार्य हे अद्वितीय स्वरुपाचे आहे.

**९. सेवाभावी वृत्तीचे पूर्णवेळ कार्यकर्ते :**

सार्वजनिक ग्रंथालयाकरिता सेवाभावी स्वरुपात पूर्णवेळ कार्य करण्याऱ्या व्यक्तींची रांगच या प्रदेशात लागलेली असून या करिता या संघाचा स्वतंत्रपणे विचार करणे गरजेचे ठरते. ग्रंथालय चळवळीकरिता आपले अवघे जीवन सेवाभावी वृत्तीने वाहिलेल्या अनेक व्यक्ती येथे निदर्शनास येतात. सुरुवातीपासून श्री. अय्यंकी ते पतूरी यांच्या कालखंडाचा विचार करता ग्रंथालय प्रसाराकरिता वाहून घेतलेल्या निस्वार्थी कार्यकर्त्यांचा उत्साह विशेष लक्षणीय आहे. सुरुवतीच्या काळात संघाद्वारे नेमणुक करण्यता आलेल्या फिरता सचिव या पदाची सेवा ही विशेषत्वाने विनावेतन स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आली होती. श्री. पतू राई यांनी सचिव म्हणून संघाकरिता १९३८ पासून आपले सर्व आयुष्य ग्रंथालय संघाच्या कार्यासाठी वाहिलेले होते. यासाठी आंध्रविद्यापीठाच्या हिरकमहोत्सवी प्रसंगी त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला होता. एकूणच या संघाचे सर्वांगीण कार्य हे ग्रंथालय क्षेत्रापासून प्रौढशिक्षण, साहित्य सेवा, संस्कृती संवर्धन, ग्रंथप्रदर्शन, फिरती ग्रंथालय सेवा अशा या उपक्रमांच्या माध्यमातून ग्रंथ प्रसारासाठी दिलेले योगदान हे अमेरिका व इतर पाश्चात्य देशांनी गौरविलेले आहे. अद्ययावत ग्रंथालय चळवळी करिता येथील ग्रंथालय संघाने प्राधान्यक्रमाने आपले लक्ष केंद्रीत केलेले असून साहित्य आणि विज्ञान संस्थाकरिता स्पर्धा परीक्षा, युवा वर्गात ग्रंथालय विषयक निर्माण केलेली विशेष जाणीव व वाचन अभिरुची वृद्धी, ग्रामीण पातळी वरील पसरलेले साक्षरता अभियान या सर्व उपलब्धतीचे श्रेय अंतिमत: येथील ग्रंथालय संघास जाते.

**१०. नव्या युगातील संघाचे योगदान :**

जागतिकिकरणाच्या पातळीवर देश व स्थानिक पातळीवरील युवा वर्ग आपल्या स्थानिक संस्कृती, लोककला, साहित्य आणि इतिहास, भाषा यापासून दूर जात असल्याचे विचारात घेऊन आपले मानदंड जोपासण्यासाठी, युवा वर्गात राष्ट्रीय भावना जोपासण्यासाठी

येथील कार्यकर्त्यांनी नव्याने स्थानिक भाषेतील मुद्रण, ग्रंथनिर्मिती, संशोधन या सर्वांच्या प्रसारणासाठी प्राधान्यक्रमाने कार्य हाती घेऊन नवीन संस्थाची स्थापना केली आहे. हे करत असताना सार्वजनिक ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करताना दुसरीकडे आंध्र सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातून पुराणे, रस्त्यावरील नाटके, पोवाडे यांचा प्रसार करण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या या नव्या वाटचालीचे सर्वदूर कौतुक केले जात आहे.

### ३.२३ कर्नाटक राज्य ग्रंथालय संघ :

#### १. म्हैसुर ग्रंथालय संघ :

धारवाड येथील शांतेश वाचनालयामध्ये १९२९ मध्ये अखिल मुंबई कर्नाटक ग्रंथालय परिषद आयोजीत करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्षस्थान श्री. व्हि.एम. वेंकटनारायण शास्त्री (अध्यक्ष आंध्र ग्रंथालय संघ) यांनी भूषविले होते. या प्रसंगी साहित्यविषयक प्रदर्शन भरविण्यात आले होते. या परिषदेची फलश्रुती म्हणजे या ठिकाणी कर्नाटक ग्रंथालय संघाची स्थापना करण्यात आलेली घटना होय. जरी हा संघ स्थापन करण्यात आला होता तरी देखील पुढील काळात निष्क्रीय राहिला. या संघाच्या कार्याला चालना मिळाली ती १९४८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या कर्नाटक विभागीय ग्रंथालयामुळेच.दुसरी अखिल मुंबई कर्नाटक ग्रंथालय परिषद ही १९४८ मध्ये धारवाड येथे संपन्न झाली. मुंबई हायकोर्टाचे तत्कालिन सरन्यायाधीश श्री. एम. सी. छागला यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन झाले. श्री. हनुमंतराव ग्रंथपाल म्हैसुर विद्यापीठ ग्रंथालय यांनी या परिषदेचे अध्यक्षस्थान भुषविले होते. या प्रसंगी कर्नाटक मधील दूर्मिळ पुस्तके व नियतकालीके यांचे एक प्रदर्शन ही भरविण्यात आलेले होते. अशाच प्रकारे पुढील काळात संघाद्वारे सतत १९५२, ५३ व ५८ मध्ये अनुक्रमे कुंडगोळ, कुंठा व धारवाड या ठिकाणी परिषदा भारविण्यात आल्या. या वाटचालीत १९५० मध्ये राज्य शासनाकडून परिषदेला मान्यता प्राप्त झाली आणि या परिषदेला अनुदान मिळणे सुरू झाले. पुढे अल्प काळात या संघाने ग्रंथालय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. तसेच कन्नड या भाषेतून पुस्तकांचे प्रकाशन केले व कर्नाटक ग्रंथालयाची एक डिरेक्टरी प्रकाशीत केली. डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रभावाखाली १० ऑगस्ट १९६२ मध्ये बंगलोर मधील १२ ग्रंथालये डी आर.टी.सी. येथे एकत्रित येऊन म्हैसुर ग्रंथालय संघ स्थापन केला. या संघाचे कार्याध्यक्ष श्री. बि. व्ही. बलीगा (सभापती, म्हैसुर राज्य विधान परिषद) यांनी स्विकारले होते.

#### २. कर्नाटक राज्य ग्रंथालय संघ :

या संघास शासनाकडून मान्यता प्राप्त होताच या संघाची सर्वसामान्य सभा १४ मे १९८८ रोजी संपन्न होऊन संघाच्या मुळ नावात बदल करुन कर्नाटक ग्रंथालय संघ

असे करण्यात आले. या संघाची घटनेअंतर्गत नमुद केलेली उद्दिष्टे पुढील प्रमाणे,

१. म्हैसुर राज्यातील ग्रंथालय चळवळीस प्राधान्य देणे या अनुषंगाने लोकसंपर्क वाढविणे.
२. ग्रंथालय सेवा व ग्रंथालय विज्ञान यांचा प्रचार करण्यासाठी सभा व परिषदेचे आयोजन करणे.
३. राज्य संघाशी संलग्नित अशा जिल्हा तालुका व स्थानीक ग्रंथालय संघाची स्थापना करण्यास प्रोत्साहन देणे.
४. राज्यातील शहरी व ग्रामीण परिसरातील ग्रंथालय परिषदेस प्रोत्साहन देणे.
५. ग्रंथालयाच्या स्थापनेकरिता, त्यांच्या विकासाकरिता ज्यांना विशेष आस्था आहे अशा हितचिंतकांना तांत्रिक व आर्थिक सहाय्य करणे.
६. विद्यमान ग्रंथालयांतील सेवा अधिक चांगल्याप्रकारे देण्यासाठी साधने उपलब्ध करुन देणे व प्रोत्साहन देणे.
७. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय पद्धती व इतर ग्रंथालय यांच्या व्यवस्थापनाकरिता ग्रंथालय कायदा निर्मिती करिता प्रयत्न करणे.
८. प्रशिक्षित ग्रंथपाल निर्माण करण्यास प्राधान्य देणे.
९. ग्रंथालय शास्त्र विषयातील संशोधनास प्रोत्साहन देणे.
१०. सूची विषयक अभ्यासक्रमासाठी प्रोत्साहन देणे.
११. ग्रंथालयशास्त्र व ग्रंथालय सेवा विषयक नियतकालीके, ग्रंथ, पत्रके, पुस्तिका यांचे प्रकाशन करणे.
१२. सूची विषयक साधनांचे प्रकाशन करणे.
१३. ग्रंथालयशास्त्र व सेवा विषयक ग्रंथ, नियतकालीके संघटीत साहित्य या करिता ग्रंथालय व वस्तुसंग्रहालये स्थापन करणे.

या संघटनेची व्यवस्थापन संरचना, परिषद आणि व्यवस्थापक समिती अशा स्वरुपाची ठेवण्यात आलेली असुन परिषदेद्वारे सर्व समस्या व धोरणे ठरविलेली आहेत. परिषद पदाधिकारी कालखंड ३ वर्षाचा ठेवण्यात आलेला आहे. या साठी सर्वसामान्य सभेद्वारे निवडण्यात आलेल्या १५ ते ३० सदस्यांचा समावेश असतो. कार्यकारी मंडळ हे संघाच्या

दैनंदीन कामकाजांकडे लक्ष पुरविते. संघाच्या सुरवातीच्या कालखंडामध्ये शहरातील व परिसरातील प्रज्ञावंत व्यक्तींनी कार्यकारी मंडळावर काम केलेले असून व्यवसाय शिक्षण, सामाजिक कार्ये, संरक्षण व कायदा या क्षेत्रातील व्यक्तींचा यामध्ये समावेश होता. या संघाद्वारे गुलबर्गा, मंगलोर, म्हैसुर या ठिकाणी आपल्या शाखाही स्थापन करण्यात आल्या होत्या. संघटनेच्या सभासदांमध्ये तीन वर्ग करण्यात आलेले असून आजिव सभासद, वैयक्तीक सभासद व संस्था सभासद यांचा समावेश आहे.

**उपक्रम :**

सर्वसामान्य उपक्रम संघाद्वारे राबविलेले जातात, यामध्ये प्रामुख्याने व्याख्याने, परिषदा, चर्चासत्रे, अभ्यासबैठीका, व्यावसायिक प्रकाशने तसेच ग्रंथालय क्षेत्रातील व्यावसायिकांच्या समस्या पूर्ततेसाठी चर्चा व पाठपुरवठा यांचा समावेश असतो. सुरुवातीच्या काळात जवळ जवळ १४ वर्षे संघाचे कार्य हे अत्यंत मंदगतीने चालले होते, त्याला सुप्तअवस्था प्राप्त झाली होती. या संघाचे उपक्रम १९८९ पासून पुनर्जिवीत करण्यात आलेले आहेत. इतर सामान्य उपक्रमांबरोबरच अभ्यास वर्तुळ हा संघाच्या उपक्रम १९६५ पासुन प्रभावीपणे कार्यरत राहीला. यासाठी प्रत्येक महिन्यास नियमीतपणे सभा होत असत. अशा सभेमध्ये स्थानिक पातळीवरील ग्रंथपाल सहभागी होत. या प्रसंगी ग्रंथालय विषयक तांत्रिक व इतर सेवा समस्या संदर्भात सांगोपांग चर्चा होत असे. या चर्चेमधुन या काळात बंगलोर मधील ग्रंथालयांच्या सेवकात बदल होण्यास पुष्कळ मदत झाली. दरम्यानच्या काळात १९६५ मध्ये डीआरटीसी येथे संशोधन वर्तुळांची सभा गठीत होऊन यामध्ये नवनवीन संशोधनावर चर्चा घडवून आणली जाई. असे हे महत्त्वपूर्ण कार्य दीर्घकाळ सुरु राहु शकले नाही. लवकरच या कार्यात शिथिलता आली. अलीकडेच या महत्त्वपुर्ण कामांचा पुनर्जन्म करण्याचा प्रयत्न चालु आहे. ग्रंथालय सप्ताहासारख्या उपक्रमांचे या संघाद्वारे सुरवातीस प्रभावीपणे आयोजन केले जात असे. या पार्श्वभूमीवर १९६३ मध्ये हा ग्रंथालय सप्ताह साजरा करताना ग्रंथालय विषयक तक्ते, आलेख, चित्रे यांचे प्रदर्शन भरवून व व्याख्यानांचे आयोजन करुन लोकजागृती करण्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर बंगलोर येथे व्याख्यानाचे आयोजन करुन ग्रंथालय कायद्याचे महत्त्व व संघाचे फायदे या संदर्भातील जागृती करण्याचा प्रयत्न

करण्यात आला होता. संघाद्वारे अल्पकाळातील प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जात असे. या संघाद्वारे सल्लासेवा ही विविध संस्थांना उपलब्ध करुन देऊन ग्रंथालय संघाना सहकार्य करण्यात आलेले आहे. संघाद्वारे १९७३ ते ७५ काळात तिमाही स्वरुपाचे संघाचे न्युजलेटर प्रसिद्ध केले जात असे ते १९७५ मध्ये आर्थिक उपलब्धते अभावी बंद पडले. १९८० मध्ये हे न्युज लेटर पुनश्च प्रकाशित करण्यात आले आहे. संघटने सुरवातीच्या काळात आपले वार्षिक अहवाल मुद्रित केलेले होते. सन १९७७ नंतर हे अहवाल चक्रमुद्रांकीत स्वरुपात मुद्रीत करण्यात येऊ लागले. या वार्षिक अहवालात संघाचा वार्षिक तपशील संघाद्वारे आयोजित उपक्रम निहाय आढावा घेण्यात येत असे. संघाने विविध ग्रथांचे प्रकाशन केले असून ग्रंथालय चळवळीस बळकटी दिलेली आहे. म्हैसुर ग्रंथालय कायदा डिसेंबर १९६४ मध्ये मंजुर करण्यामधील संघाचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. संघाद्वारे विशेष उपक्रम, शतकपुर्ती महोत्सव व युद्धविराम या आंतरराष्ट्रीय युद्ध  विरामदिवस यांचे आयोजन करण्याच्या दृष्टिने ५ एप्रिल १९९९ रोजी इंदिरा प्रियदर्शनी बाल ग्रंथालय येथे एका समारंभाचे आयोजन केलेले होते. या समारंभास राज्याच्या सार्वजनिक ग्रंथालय विभागाकडून व महाविद्यालय संघाकडून व कर्नाटक मधील पुस्तक विक्रेते यांच्याकडून सहकार्य प्राप्त झाले होते. या प्रसंगी ३४ जुन्या अनुभवी ग्रंथपालांचा सत्कार करण्यात आलेला होता. या समारंभास ग्रंथालयशास्त्रातील सेवक, विद्यार्थी व संघाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समारंभाचे अध्यक्षस्थान एस. पार्थसारथी (मानद संचालक इन्स्टीट्युट ऑफ इनफॉरमेशन स्टडीज, चेन्नई) यांनी भुषवीले होते. या जुन्या ग्रंथपालांचा सन्मान करताना त्यांना स्मृती चिन्ह देण्यात आले होते. या सर्वांचा परिचय श्री. मलवाड, ग्रंथपाल भारतीय विज्ञान संस्था यांनी करुन दिलेला होता. या प्रसंगी उपस्थितांनी ग्रंथालय व माहिती शास्त्राशी संबंधीत अनेक व्यक्तींना मार्गदर्शन केले होते. या परिसरातील रमाक्का पद्मक्का ट्रस्टद्वारे राज्यातील ग्रंथालय संघ यांच्याद्वारे ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कारही केला जातो. संघटनेला ग्रंथालय क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी विनंती केली जाते. या परितोषिकास KALA पारितोषिक संबोधले जाते. संघाचे न्युजलेटर हे सभासदांना व इतर व्यावसायिकांना मोफत पुरविण्यात येते. या संघाने आपली घटना अत्यंत कोटेकोरपणे तयार केलेली आहे.

या राज्यात 'शारदा रंगनाथन एंडॉमेंट फॉर लायब्ररी सायन्स' ही डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी स्थापन केलेली संस्था आहे. ग्रंथालय क्षेत्रासाठी विशेष योगदान देत असताना या संस्थे अंतर्गत ग्रंथालय क्षेत्राशी संबंधीत चर्चासत्रे, व्याख्याने, कार्यशाळा, सल्लासेवा या आयोजनाविषयी सातत्यपूर्वक पाठपुरवठा केला जातो. या संस्थेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे,

१. भारतातील ग्रंथालये व ग्रंथालय सेवामध्ये सुधारणा करणे.
२. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील सेवकास प्रशिक्षणाची सोय करणे.
३. प्रभावी व सक्षम ग्रंथालय माहितीसेवा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रोत्साहन देणे.
४. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील संशोधनांचे उपयोजन करणे.

या उद्दिष्टपूर्ततेसाठी संस्था ग्रंथ प्रकाशन अहवाल लेखन व नियतकालीकांचे प्रकाशन या माध्यमातून प्रयत्न करत असते. तसेच कार्यशाळा, व्याख्याने, चर्चासत्रे यांचीही जोड देण्यात येते. यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण व आधुनिकीकरण यासाठी संस्थेचे योगदान लक्षणीय आहे. याच संस्थेशी संबंधीत इन्स्टीट्युट ऑफ इनफॉरमेशन स्टडीज, बंगलोर ही उपसंस्था १४ एप्रिल १९८९ पासून ग्रंथालय क्षेत्रातील संशोधन व विकास उपक्रम या अनुषंगाने योगदान देत आहे.

### ३.२४ बिहार राज्य ग्रंथालय संघ :

हा संघ पटना येथे १९३६ मध्ये स्थापन करण्यात आला. या संघाद्वारे १९३७ मध्ये गया येथे पहिल्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून बंगाल ग्रंथालय संघाचे अध्यक्ष श्री. कुमार माणिंद्रदेव रॉय महाशय यांनी भुषविले. या परिषदेत लाहोर मधील ग्रंथालयाच्या विकासाविषयक तयार करण्यात आलेल्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली. अल्पकाळात ही संघटना बंद पडली. या संघटनेद्वारे तयार करण्यात आलेल्या बिहार मधील विकास योजनेचा आराखडा हा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून उल्लेख केला जातो. या योजनेअंतर्गत पटना येथे मध्यवर्ती ग्रंथालय असावे तसेच प्रत्येक ठिकाणी जिल्हा ग्रंथालय असावे, व ग्रामीण परिसरात ग्रंथालय स्थापन करण्याविषयी सुचना ही करण्यात आली होती. या अंतर्गत प्रत्येक ०५ खेड्यात एक ग्रंथालय असा पर्याय सुचविण्यात आला होता. याचबरोबर ग्रामीण परिसरातील शालेय ग्रंथालये ही लोकांसाठी खुली ठेवावी. अशी सुचना करण्यात आली होती. १९३७ मध्ये संघाद्वारे एक प्रश्नावली तयार करुन राज्यातील ८०० ग्रंथालयात वितरीत करण्यात आली होती. या प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त माहिती नुसार एक ग्रंथालय निर्देशिक प्रकाशित करण्याचा विचार केला होता. १९४८ पासून संघटनेद्वारे 'पुस्तकालय' या नावाचे एक मासिक ही प्रकाशित केले गेले. हे मासिक देखील दीर्घकाळ प्रकाशित होऊ शकले नाही. पुढे १९५४ मध्ये 'पुस्तकालय संदेश' नावाचे एक चौमासिक सुरू करण्यात आले. एक वर्षानंतर 'पुस्तकालय संदेश' नावाचे हिंदी मासिक सुरू करण्यात आले. चौमासिकाचे रुपांतर मासिकामध्ये करण्यात आले. पुढे ते मे १९६८ पर्यंत सातत्यपूर्वक प्रकाशित करण्यात आले. संघटनेच्या पुनर्घटनानंतर पुनश्च हे हिंदी मासिक १९७५ पासून प्रकाशित करण्यास सुरवात करण्यात आली. या मासिकाचे वर्गणीदार १२०० पर्यंत असुन या संघटनेचा अहवाल चक्रमुद्रांकीत स्वरुपाचा १९७५ पासून प्रकाशित केला जाऊ लागला.

**बिहार राज्य पुस्तकालय संघ (पुनर्घटीत) :**

हा संघ १९७५ मध्ये पुनर्घटीत झाल्यानंतर या संघाद्वारे बालापूर येथे २७ व २८ ऑक्टोबर १९५१ रोजी संघाचे पाचवे अधिवेशन संपन्न झाले. श्री. शिवरामसिंग हे या

परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेचे उद्घाटन शिक्षणमंत्री मा. आचार्य बद्रीनाथ वर्मा यांनी केले होते. तर अध्यक्षपद जगन्नाथ प्रसाद मिश्रा यांनी भुषविले होते. १९५२ मध्ये या संघाचे नाव बदलुन बिहार राज्य ग्रंथालय संघ असे करण्यात आले. या संघटनेची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न १९५० मध्ये करताना श्री. इंद्रदेव नारायण सिंह (मुख्य सचिव) श्री. रामशोभ सिंग यांनी विशेष परिश्रम घेतले होते. या संघाची प्रमुख उद्दिष्टे,

१. संघटनेची स्थापना करणे, ग्रंथालयांचा विकास करणे,ग्रंथालय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करणे व याद्वारे राज्यातील ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देताना रेडीओ, वृत्तपत्रे व इतर दृकश्राव्य साधनांची मदत घेणे.
२. संघाची जिल्हा, उपविभाग, शहर व गट स्तरावर शाखा कार्यालय स्थापून त्या त्या भौगोलिक परिसराची ग्रंथालये या शाखाशी संलग्नित करणे.
३. ग्रंथालयाचे कामकाज व एकूण प्रशासन व सेवा यशस्वी देण्यासाठी व ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देण्याकरिता नियम व उपविधी आणि योजना तयार करणे.
४. राज्यातील ग्रंथालय सेवा ग्रंथालय चळवळ विषयक साहित्य संकलित करणे व प्रकाशित करणे.
५. राज्यातील ग्रंथपाल व ग्रंथालयसेवक यांच्या सेवाशर्ती विषयक सुधारणा करणे आणि त्यांचे हक्क व समाजातील दर्जा करिता प्रयत्न करणे.
६. प्रौढ साक्षरता उपक्रमांना सहकार्य करण्यासाठी ग्रंथालयांना प्रोत्साहन देणे. ग्रंथालय विकासाकरिता शासनाला सल्ला देणे व योजना सादर करुन त्यांचा पाठपुरवठा करणे.

या संघाच्या जिल्हा व उपविभाग स्तरावर विविध शाखा असुन प्रत्येक जिल्हा परिसरात ग्रंथालय संघ स्थापन करण्यात आलेला आहे. या विविध स्तरावरील शाखा राज्य स्तरीय संघास अनेक प्रकारे मदत करतात.

राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठानकडून प्राप्त अनुदानाद्वारे देखिल या संघटनाना विशेष योगदान दिले जाते.

संघाद्वारे प्रशिक्षण शिबीरे, चर्चासत्रे यांचे जिल्हा स्तरावर आयोजन केले जाते. तसेच राज्य स्तरीय संघाशी संलग्नीत होण्यासाठी उपविभागीय व शाखा स्तरावरील संघ महत्त्वपूर्ण योगदान देतात.

ही संघटना राज्य स्तरावर सुप्रसिद्ध असुन या संघटनेचे सभासदत्व व्यावसायिक दृष्ट्या सुशिक्षीत व्यक्तीस किंवा ग्रंथालय चळवळीशी आस्था असणाऱ्या राज्यातील कोणत्याही व्यक्तीस या स्विकारता येते.

राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालये ही राज्य स्तरीय ग्रंथालयांशी सलग्न आहेत. सध्या या संघाचे सदस्य २२०० इतके असून ही संख्या सातत्यपूर्वक वाढत आहे.

संघाकरिता बहुतांशी आर्थिक उपलब्धता ही वर्गणी, देणगी, प्रकाशन विभाग अल्प स्वरुपातील शासकीय अनुदान याद्वारे केली जाते. हा संघ अखिल भारतीय संघटनेशी संबंधीत आहे.

**संघाचे उपक्रम :**

या संघाद्वारे सर्व साधारणपणे शिक्षण प्रशिक्षण परिषदाचे संघटन, चर्चासत्रे, कार्यशाळा व व्याख्याने यांचे आयोजन, व्यावसायीक व साहित्याचे प्रकाशन आणि ग्रंथालय व्यवसायाच्या समस्यांचा शासकीय स्तरावर पाठपुरवठा करणे, अशा स्वरुपाचे आहे. हा संघ सुरवातीपासून ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी प्रयत्न करत आहे. १९३९ मध्ये संघाव्दारे एक योजना शासनाकडे सादर करण्यात आली होती. या योजनेस १९४० मध्ये पटना येथे अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेने पाठींबा दिला होता. पंरतु तत्कालिन शासनाने ही योजना कार्यान्वित करण्यासाठी असमर्थता दर्शविली होती.

**ग्रंथालय संघ व शासन सहसंबंध :**

बिहार राज्य ग्रंथालय संघाने राज्य शासनाशी सोहार्दपूर्व संबंध प्रस्थापित केलेले असून हा संघ राज्य शासनास विविध प्रकारे सहकार्य करीत असतो. यामध्ये पदव्यूत्तर व पदवी अभ्यासक्रम यांचे नियोजन, संघटन, ग्रंथपालांकरिता प्रशिक्षण राबविण्यासाठी राज्याच्या शिक्षण विभागात पटना, रांची, मुनापुर, बागलपुर इत्यादी ठिकाणी सहकार्य केले जाते. राज्य समितीस ग्रंथालयासंबंधीत संघ योगदान देत असून, संघराज्य ग्रंथालय योजना समिती सदस्य आहे. मध्यवर्ती ग्रंथ खरेदी योजना व नियतकालीके खरेदी योजना यामध्ये ही संघ सहभागी आहे, तसेच राज्यातील सार्वजनीक ग्रंथालयाकरिता सभासद म्हणून वाचनसाहित्य वितरणाकरिता उपलब्ध करुन दिले जाते. संघाद्वारे अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेस

उत्तम प्रकारे सहकार्य देताना १९४० ते १९६४ मध्ये पटना मध्ये आयोजनासाठी खुपच सहकार्य केले होते. तसेच १९६४ मधील अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेच्या वतीने ग्रंथालय कायदा आणि ग्रंथालय विकास या चर्चासत्राच्या वेळी विशेष सहकार्य केले होते. या प्रसंगी डॉ. पी. एन. गौर तत्कालिन राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे ग्रंथपाल यांची अध्यक्ष म्हणून तर डॉ. आर. पी. सिंग यांची राज्य मध्यवर्ती ग्रंथालय पटनाचे सहकारी म्हणून अखिल भारतीय संघटनेकरीता निवड केली होती. श्री. पी. एन. जोशी यांचे आय.एल.ए.च्या संपादक मंडळावर नियुक्ती करण्यात आली होती. या घटनावरुनच अखिल भारतीय ग्रंथालय संघटनाकरिता राज्य ग्रंथालय संघ देत असेलेले योगदान स्पष्ट होते.

या राज्यातील ग्रंथालय चळवळीस महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तीमध्ये श्री. इंद्रनारायण सिंह, स्व. प्रा. जगन्नाथप्रसाद मिश्रा, प्रा. नवलकिशोर गौर, डॉ. प्रभु नारायण गौर, पंडीत रामदयाळ पांडे, श्री. पटमान जोशी अशा अनेक व्यक्तीचा समावेश असून या व्यक्तींच्या परिश्रमातून व त्यागातून येथील ग्रंथालय व्यावसायिकास एक सन्मान प्राप्त होण्यास खुपच मदत झाली आहे.

**बिहार ग्रंथालय सेवा संघ :**

सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस व व्यावसायिकांशी फारच संबंध नसलेल्या काही व्यक्ती राज्य पुस्तकालय संघाच्या व्यासपीठा वरुन आपल्या वर्चस्वाद्वारे ग्रंथालय व्यवस्था व ग्रंथालयाचा दर्जा व समाजातील स्थान व प्रतिमा मलीन करत असल्याची भावना येथील ग्रंथालय सेवक व कार्यकर्ते यांच्यामध्ये निर्माण झाल्याने अशा व्यक्तींनी एकत्रित येऊन २४ जून १९८७ रोजी नव्या ग्रंथालय संघाची स्थापना 'बिहार ग्रंथालय सेवा संघ' या नावाने केली. या संघाचे सभासद म्हणून ग्रंथालय व्यावसायिक, अर्ध व्यावसायिक व इतर ग्रंथालयांमध्ये कार्यरत असणारे, शैक्षणिकदृष्ट्या पात्र व्यक्ती या सर्वांना ग्रंथालयाचे सभासदत्व खुले ठेवण्यात आले होते. या संघामध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र संघाचे शिक्षक व विद्यार्थी यांचाही या संघामध्ये मोठ्या संख्येने सभासदत्व स्विकारले होते.

या संघाच्या युवा विभागाची स्वतंत्र शाखा १९८८ मध्ये स्थापन करण्यात आली. याकरिता ग्रंथालय शाखाच्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती आणण्यासाठी एक चळवळ सुरू

करण्यात आली. यासाठी विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली. या समिती विभागीय स्तरावर निर्माण करण्यात आल्या. या संघाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत,

१. बिहार राज्यातील ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देणे.
२. ग्रंथालय सेवांमध्ये सर्व स्तरावर सुधारणा करणे.
३. सेवाअंतर्गत प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करणे.
४. ग्रंथालय क्षेत्रातील सेवकांचा दर्जा उंचावणे.
५. ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विषयाशी संबंधीत परिषदा, चर्चासत्रे यांचे आयोजन करणे. ग्रंथ, नियतकालीके, वृत्तपत्रे प्रकाशित करणे.
६. सर्व स्तरावर वाचनसंस्कृती विकसित करणे.
७. ग्रंथालयांची स्थापना करणे.
८. ग्रंथालयांच्या मुख्यालयाबरोबरच राज्यातील ग्रंथालय सेवाकरिता नियम, मार्गदर्शन सुचना, प्रमाणके इत्यादी तयार करणे.
९. ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणासाठी प्रयत्न करणे.

अशा उद्दिष्टांवर आधारित ग्रंथालय चळवळ बळकट करताना संघाद्वारे १४६ प्रतिनिधींच्या सह्या केलेले एक आग्रही निवेदन ग्रंथालय कायद्याच्या अंमल बजावणीसाठी राज्यातील सर्व पक्षांकडे पाठवण्यात आले होते. या करिता राज्यव्यापी मोर्चा ही काढण्यात आला होता.

याचबरोबर सार्वजनिक ग्रंथालयांच्या व्यवस्थापनेकरिता व सेवक वर्गाकरिता वेतनश्रेणी व सेवाशर्तीकरिता ही निवेदन सादर करुन प्रयत्न करण्यात आले. राज्यातील प्रभावी चळवळीअभावी संघाद्वारे मर्यादीत स्वरुपात कार्य पार पाडण्यात आले.

**१९४० मधील अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे ४ थे आधिवेशन :**

अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे ४ थे अधिवेशन बिहार मधील पटना येथे संपन्न झाले. या अधिवेशनास ग्रंथालय क्षेत्राच्या दृष्टिने एक दु:खाची झालर लागलेली होती. या घटनेची नोंद ही त्या अधिवेशनाच्या इतिवृत्ताच्या प्रोसेडींगमध्ये सुरवातीस घेण्यात आली होती. भारतामध्ये खऱ्या अर्थाने ग्रंथालय चळवळीचा पाया मजबूत केला आणि तो ही गुजरातसारख्या संस्थानमध्ये अधिक भक्कम केला ते बडोदा नरेश महाराज सयाजीराव

गायकवाड यांच्या फेब्रुवारी १९३९ मध्ये झालेल्या निधनाची नोंद होय. महाराजांनी भारतीय ग्रंथालय केवळ गतिमान केली नाही तर ती अधिक बळकट व गुणात्मकदृष्ट्या सक्षम करण्याचा केलेला प्रयत्न हा जागतिक स्तरावरही नोंदवण्यात आलेला होता. याचबरोबर बडोदा राज्यातील ग्रंथालय विभागाचे तत्कालिन उप क्युरेटर श्री. मोतीभाई एन. अमिन यांचे मार्च १९३९ मध्ये निधन झालेले होते. श्री. मोतीभाईंनी बडोदा राज्यात जिल्हा ग्रंथालय व फिरती ग्रंथालये सुरु करुन एक नवे अभियान सुरू करताना बडोदा राज्यातील ग्रंथालय विकास व ग्रंथालय योजना, ग्रंथालय ग्रामिण संघ  या सर्वांकरिताही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले होते.

या पार्श्वभुमीवर परिषदेच्या प्रारंभीच या दोघांनाही आदरांजली अर्पण करण्यता आली होती. अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे सदस्य असलेले उत्साही कार्यकर्ते व अलाहाबाद विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. सुरजीप्रसाद यांच्याही निधनाची या प्रसंगी दखल घेण्यात आलेली होती. या अधिवेशनामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेल्या ठरावांचा गोषवारा पुढील प्रमाणे,

१. केंद्रीय अणि राज्यशासनाने ग्रंथालय विभागाची निर्मिती करुन ग्रंथालयांची स्थापना, देखभाल, ग्रंथालय सेवांचा विकास याद्वारे सार्वजनिक ग्रंथालय सेवा लोकांना सामाजाभिमुख उपलब्ध करुन द्यावी. तसेच विभागीय ग्रंथालयांचा वापर प्रभावी स्वरुपात लोकांना व्हावा या दृष्टिने त्यांच्यावर शक्य तितके नियंत्रण ठेवावे.
२. अखिल भारतीय ग्रंथालय संघाद्वारे एक माहिती केंद्र सुरू करुन त्याद्वारे सर्व ग्रंथपालांच्या माध्यमातून ग्रंथालय व्यवसायाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त नविन कल्पना संकलित करुन संघाकडे पाठवाव्यात.
३. सर्व राज्याच्या राजधानीमध्ये राज्य ग्रंथालय संघांची स्थापना करण्यात यावी. त्याचबरोबर आदर्श भारतीय ग्रंथालय कायदा व मोफत सार्वजनिक ग्रंथालय चळवळ या विषयी विचार विनीमय करण्यासाठी एक समिती याप्रसंगी गठीत करण्यात आली.
४. बिहार राज्याने व तेथील डॉ. सय्यद मौहमद यांनी सर्व शिक्षा अभियानाच्या अनुषंगातून बिहार ग्रंथालय संघास मदतीविषयी केलेली विनंती, तसेच राज्यातील ग्रंथालय चळवळीद्वारे

नवनवीन ग्रंथालयांच्या स्थापने करिता प्राप्त होत असलेल्या सहकार्याबद्दल संघाद्वारे समाधान व्यक्त करण्यात आले. अशा ठरावाबरोबरच बिहार ग्रंथालय संघाद्वारे तयार करण्यात आलेल्या ग्रंथालय योजनेस मान्यता देणे, ग्रंथालय चळवळी विषयक प्रकाशने सुरू करणे, मॉर्डन लायब्ररीयन या मुखपत्राचे प्रकाशन स्विकारणे. ज्या राज्यातील ग्रंथालय संघांनी ग्रंथालय विषयक सर्वेक्षण सुरू केलेले आहे आणि ज्यांचे काम प्रगतीपथावर आहे अशा संघांना शासनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

भारतातील विविध भाषेतून प्रकाशित केलेल्या ग्रंथयाद्या या इतर भाषेतून भाषांतर करण्यात याव्यात व याद्वारे राज्यातंर्गत समन्वयाचे वातावरण निर्मितीस प्राधान्य देणे. या बाबींचा या परिषदेच्या सभा वृत्तांमध्ये समावेश करण्यात आला होता.

**३.२५ कोल फिल्ड ग्रंथालय संघ झारखंड :**

या संघाची सभा धनबाद येथे ३ मे १९८१ रोजी जिल्हा ग्रंथालयामध्ये संपन्न झाली. या सभेचे अध्यक्षस्थान सौ. रमोला रॉय यांनी स्विकारलेले होते. या सभेस २७ ग्रंथालय व्यावसायिक उपस्थित होते. या प्रसंगी श्री. एम. डेव्हिड (उपग्रंथपाल, इंडीयन स्कूल ऑफ माईन्स) यांनी बिहार राज्यामधील ग्रंथालय कायद्याची गरज हा आपला शोधनिबंध सादर केला तसेच धनबाद परिसरात कार्यरत असणाऱ्या ग्रंथालय सेवकांचे संघटन व सहकार्य यावरही या प्रसंगी चर्चा झाली. या पार्श्वभूमीवर पुढे अंतरग्रंथालयीन देवघेविस स्थानिक पातळीवर प्राधान्य क्रमाने चालना देणे व संघटनेद्वारे ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालू करणे याविषयी ही चर्चा करण्यात आली.

पुढे २८ नोव्हेंबर १९८२ मध्ये धनबाद येथील लिनसे क्लब मध्ये या संघाची सभा होऊन १९८३ सालाकरिता संघाच्या पदाधिकारी वर्गांची एकमताने निवड करण्यात आली. या प्रसंगी श्री. डेव्हिड यांची अध्यक्ष म्हणून तर श्री. जी.ए. वर्मा यांची उपाध्यक्ष, श्री. प्रसाद यांची सचिव म्हणून एकमताने निवड करण्यात आलेली होती. या संघटनेने पुढे २०नोव्हेंबर १९८६ रोजी राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह साजरा केलेला होता. हा सप्ताह ग्रंथालय प्रशिक्षण केंद्र परिसरात आयोजित करण्यात आलेला होता. त्यास मोठ्या संख्येने ग्रंथालय सेवकांनी प्रतिसाद दिलेला होता. पुढे १९ मार्च १९८८ रोजी संघाच्या पदाधिकारीवर्गाची निवड होऊन १९८८ –८९ करिता श्री. मायकेल डेव्हिड यांची पुनश्च अध्यक्ष म्हणून तर श्री. सर्वोसिन्हा यांची उपाध्यक्ष व श्री. शंकर प्रसाद महतो यांची प्रमुख सचिव म्हणून निवड करण्यात आलेली होती.

एकूणच या संघाने ग्रंथालय चळवळीच्या अनुषंगाने मर्यादीत स्वरुपात योगदान दिल्याचे पुढील काळात निर्देशनास येते.

**झारखंड माहिती व ग्रंथालय संघ :**

या संघाची स्थापना १५ एप्रिल २००७ रोजी रांची येथे करण्यात आली. या संघाचे मुख्यालय रांची परिसरातील दोरांदा येथे आहे. या संघाद्वारे १३ व १४ सप्टेंबर २००८ रोजी सार्वजनिक ग्रंथालये आणि माहितीसेवा या समोरील झारखंड मधील आव्हाने व भवितव्य या विषयांच्या अनुषंगाने एका राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन रांची येथे केलेले होते.

देश पातळीवरुन या चर्चासत्राकरिता जवळ जवळ शंभरहून अधिक प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शविलेली होती. या चर्चासत्राचे तीन सत्रांत आयोजन करण्यात आलेले होते. पहिले सत्र उद्‌घाटन, दुसरे – तांत्रिक विषयावर चर्चा आणि तिसरे – समारोप. या चर्चासत्राचे उद्‌घाटन झारखंड राज्याचे मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे मंत्री श्री. बंडू तिरके यांच्या हस्ते करण्यात आलेले होते. या प्रसंगी त्यांनी झारखंडमध्ये प्रभावी ग्रंथालय जाळे उभारण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले आणि अशा ग्रंथालय जाळ्याद्वारे या दूर्गम परिसरात ज्ञानाचा प्रसार सर्वदूर पोहचविणे शक्य होईल. असा आशावाद व्यक्त केलेला होता. याचबरोबर त्यांनी उपस्थित सर्वांना ग्रंथालय आणि माहिती सेवांच्या माध्यमातून समाजामध्ये सुरू केलेल्या शैक्षणिक क्रांतीमध्ये सक्रियपणे सहभागी व्हावे असे हृदयस्पर्शी आवाहन ही केलेले होते.

या संघाच्या अध्यक्षा श्रीमती वासंती जैन यांनी झारखंडमधील सार्वजनिक ग्रंथालयांकरिता भौतिक सुविधा व मनुष्यबळ यांच्यावर राज्यात भर देण्याविषयीची आवश्यकता सुस्पष्ट केली होती. आजच्या आधुनिक काळात ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणाची असलेली गरज व झारखंड राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांकरिता ग्रंथालय कायद्याची असलेली नितांत आवश्यकता याविषयी आग्रहपूर्वक मागणीही त्यांनी केलेली होती.

या प्रसंगी प्रमुख अतिथी मंत्री महोदय श्री. बंडू तिरके यांनी देशाच्या विविध भागातून आलेल्या ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्रातील व्यक्तींशी संवाद साधता आल्याबद्दल समाधान व्यक्त करुन झारखंड राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांच्या अधिकाधिक निर्मितीची गरज स्पष्ट करुन या ग्रंथालयाद्वारे व माहितीकेंद्राद्वारे अधिक चांगल्यासेवा देण्याची गरज ही सुस्पष्टपणे व्यक्त केलेली होती. याचबरोबर शासकिय शाळामध्ये शालेय ग्रंथालयांची स्थापना करण्याची घोषणाही केली. तसेच या ग्रंथालयातून लवकरात लवकर ग्रंथपालांसाठी पद निर्माण करण्यात येईल असे जाहीर केले होते.

राज्यात व्यवस्थितपणे ग्रंथालय व माहिती केंद्राचा विकास करण्यासाठी राज्य स्तरीय राऊंड टेबल सेमीनारचे आयोजन करण्यासाठी मंत्रीमहोदयांनी या संघाच्या सदस्यांना आमंत्रित केलेले होते. या प्रसंगी आपली विशेष इच्छा व्यक्त करत असताना त्यांनी असे

नमुद केले होते की, ग्रंथालय क्षेत्रातील काही निवडक व्यक्तींची निवड करुन देशातील काही उत्तम ग्रंथालये पाहण्यासाठी दौरा आयोजित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला होता. याद्वारे राज्यातील ग्रंथालय चळवळ अधिक बळकट होण्यासाठी लाभदायक होईल असा आशावादही व्यक्त केला होता.आपले विचार सुस्पष्ट करताना अंतिमता त्यांनी राज्याचा विकास हा ग्रंथालयांच्या विकासावर अवलंबुन असतो. असे भावपूर्ण उद्गार ही काढले होते.

झारखंड या नवनिर्मित राज्यातील ही पहिलीच परिषद यशस्वीपणे संपन्न झाली. पुढे २००९ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा ही येथे अस्तित्वात आला.

या अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात प्रमुख व्याख्याते म्हणून आपले विचार व्यक्त करताना सौ. नलिनी कुद्दू यांनी ग्रंथालय व माहितीसेवा या आपल्या ज्ञानाची भूक भागवण्याची साधन होते असे विचार व्यक्त केले होते. श्री. रबिन कुमार यांनी आपला शोध निबंध सादर करत असताना सार्वजनिक ग्रंथालये ही सामाजिक व आर्थिक विकासाकरिता महत्त्वपूर्ण ठरणारी साधने असून स्वतंत्र भारतातील सर्वांगीण विकास हा सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासावर अवलंबून असल्याचे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले होते. श्री. एच. के. सिंग यांनी झारखंड मधील शासनाद्वारे चालविलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांचा दर्जा याविषयी आपले विचार मांडले. तर श्री. नीरज कुमार यांनी झारखंड मधील सार्वजनिक ग्रंथालयांची सद्यस्थिती या विषयावर आपला शोधनिबंध सादर करताना राज्य इतर सर्व संसाधनांनी सिद्ध असताना केवळ ग्रंथालयांच्या विकासाअभावी हे राज्य सुसंपन्न होऊ शकले नाही हे विविध सांख्यकीय तपशिलांच्या आधारे स्पष्ट केले. चर्चासत्राच्या शेवटी राज्य सार्वजनिक ग्रंथालयांचे ग्रंथपाल श्री. सी.डी. सिंग यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रभावी संघटनासाठी व विकासासाठी राज्य शासनावर दबाव आणण्यासाठी एक स्वतंत्र दबाव गट निर्माण करण्याची गरज प्रतिपादन केली. या प्रसंगी कलकत्ता विद्यापीठाचे प्राध्यापक अर्जुनदास गुप्ता यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकास विषयक महत्त्वपूर्ण सूचना केल्या. तात्विक सत्रात जागतिक बुद्धिमत्ता, ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयासंबंधीचे गोंधळपूर्ण धोरण, झारखंडमधील सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास अशा विषयाबरोबरच मुक्त स्त्रोत संगणक प्रणाली या संदर्भात ही चर्चा घडविण्यात आली. तिसऱ्या सत्रातही उपभोक्त्यांच्या वाचन सवयी, तसेच मुक्त व दुर अध्ययन

पद्धतीद्वारे शिक्षण यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची भूमिका, माहिती साक्षरता, ग्रंथालय क्षेत्रातील सेवा संधी, ज्ञान व्यवस्थापन या अनुषंगाने विषयांवर चर्चा झाली.

शेवटचे सत्र हे ग्रंथालय क्षेत्रातील तांत्रिक सेवा या अनुशंगाने संपन्न झाले. या सत्रात पुढील शिफारशी करण्यात आल्या.

१. झारखंड राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रभावी जाळे तयार करुन ही ग्रंथालये सक्षम करणे.
२. सार्वजनिक ग्रंथालयातील सेवकांकरिता समाधानकारक वेतनश्रेणी
३. ग्रंथालय सेवकाद्वारे शासनावर सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाकरिता व भौतिक सुविधा व ग्रंथालय नेटवर्क यासाठी दबाव निर्माण करणे.
४. सार्वजनिक ग्रंथालयांचे ज्ञानकेंद्रामध्ये रुपांतर करणे.
५. माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयातील सेवाकरिता अधिकाधिक अवलंब करणे.
६. समाजातील उपभोक्त्यांकरिता माहिती साक्षरता उपक्रम राबविणे.

अशा या विविधांगी चर्चेनंतर संपन्न झालेली ही ग्रंथालय परिषद सर्वांच्याच दीर्घकाळ स्मरणात राहिली.

### ३.२६ गुजरात राज्य ग्रंथालय संघ :

### १. गुजरात पुस्तकालय मंडळ :

या संघाच्या स्थापनेचे सर्व श्रेय गुजरात राज्यातील ग्रंथालय चळवळीचे प्रणेते स्वर्गीय मोतीभाई अमीन यांचेकडे जाते. त्यांनीच मित्रमंडळ ग्रंथालयाची स्थापना केलेली होती.

सन १९२३ मध्ये बडोदा येथे पहिलीच राज्य ग्रंथालय परिषद भरलेली होती. या प्रसंगी एक मंडळ स्थापावयाचे निश्चित करुन या मंडळाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून श्री. अमीन यांची नियुक्ती करण्यात आली होती. या संघाची उद्दिष्टे –

१. राज्यामध्ये ग्रंथालयांचा विकास करणे व फिरत्या ग्रंथालयाद्वारे ज्ञान प्रसार करणे आणि गुजरात राज्यात ग्रंथालये व अभ्यासिका स्थापन करणे.

२. ग्रंथालय क्षेत्रातील सुलभ आणि सुव्यवस्थित सहकार्याकरिता ग्रंथालय सेवक शासन आणि शासनाच्या संस्था यांच्यामध्ये समन्वय साधणे.

या संघाना मार्गदर्शन करण्यासाठी पाच सदस्य असलेली एक समिती गठीत करण्यात आलेली होती. या समितीचा कार्यकाळ दोन वर्षांकरीता ठेवण्यात आलेला होता. या संघटनेसाठी तालुका व जिल्हा ग्रंथालय संघ संलग्नित करण्यात आलेले होते.

संघटनेचे कार्यालय गुजरात विद्यापीठ अहमदाबाद येथे ठेवण्यात आले. या संघटनेच्या सभासद वर्गामध्ये विश्वस्त, सर्वसामान्य सभासद, आजीव सभासद व संस्था सभासद असे वर्ग ठरविण्यात आले. व सर्वसाधारण सर्वांकाकरिता रुपये ५०/– इतकी वर्गणी ही ठेवण्यात आली होती.

**उपक्रम :**

या संघाच्या उपक्रमांतर्गत परिषदा, चर्चासत्रे यांचे आयोजन, प्रशिक्षण वर्गाचे आयोजन व प्रकाशन आणि ग्रंथालय व्यवसायिकांच्या समस्या शासनासमोर मांडणे. या संघाद्वारे १९६८ पासून ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या अभ्यासक्रमाचा कालावधी ६ महिन्यांचा असून एकावेळी ४०–४५ विद्यार्थ्यांना तुकडीत प्रवेश दिला जातो. या संघाद्वारे परिषदांचे आयोजन अनियमित स्वरुपात केले जाते. संघाद्वारे अनेक पुस्तकांचे गुजराती व इंग्रजी भाषांतून प्रकाशन करण्यात आले असून दरवर्षी वार्षिक अहवाल ही प्रकाशित करण्यात येतो.

संघास गुजरात शासनाची मान्यता असून संघास शासनाद्वारे वार्षिक निधी उपलब्ध करुन दिला जातो.

**गुजरात ग्रंथालय सेवा संघ :**

या संघाची निर्मिती ग्रंथालय व माहिती क्षेत्रातील तज्ञ व उत्साही ग्रंथपालांच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. या संघाचे सभासद सर्व गुजरात राज्यभर विखुरलेले आहेत. संघाची स्थापना सन १९७१ मध्ये अहमदाबाद येथे करण्यात आली.

**संघाचे उद्दिष्टे आणि उपक्रम :**

या संघाचा मुलभूत उद्देश हा गुजरात राज्यामध्ये ग्रंथालय व माहिती सेवा यामध्ये सुधारणा करणे व सर्व राज्यभर ग्रंथालय चळवळीचा विकास करणे हा आहे. याचबरोबर पुढील काही उल्लेखनीय उद्दिष्टांचा समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये –

१. योग्य त्या अधिकाऱ्याकडे ग्रंथालय व ग्रंथपालांच्या सर्वसामान्य समस्यांसाठी पाठपुरवठा करणे.
२. ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण विषयक सहकार्य करणे तसेच, गरजेनुरूप अशा शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यास सहकार्य करणे.
३. ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील संशोधनास चालना देणे.
४. चर्चासत्रे, परिषदा, व्याख्याने, संवाद यांचे आयोजन करणे.
५. गुजरात राज्यातील ग्रंथालय व माहितीसेवा यांच्या भल्यासाठी समान उद्दिष्ट असलेल्या संघटनांना सहकार्य करणे.
६. ग्रंथालय व माहितीशास्त्राशी संबंधीत नियतकालीके व अस्थायी प्रकाशने यांचे प्रकाशन करणे.
७. ग्रंथ प्रदर्शन आयोजित करणे.

या संघाची संरचना विचारात घेता या संघास राज्यशासनाकडून मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच संघास शासनाद्वारे व्यवस्थापनासाठी वार्षिक निधी ही ग्रंथालय संचालनालय यांचेकडून प्रदान केला जातो.

संस्थेची नोंदणी नोंदणीकायद्यातंर्गत करण्यात आली असून संस्थेने आपली घटना मुद्रीत स्वरुपात प्रकाशित केली आहे. संस्थेचे पदाधिकारी म्हणून व्यवस्थापकीय मंडळाबरोबरच पाच विभागीय संघांची संरचनाही अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, सचिव निवडणूकीद्वारे अथवा नामनिर्देशनाद्वारे निवडलेले सदस्य, अशा स्वरुपाचे आहे. सर्व प्रकारच्या सदस्यांना एकाच प्रकारचा मतदान अधिकार ठेवण्यात आलेला आहे.

केंद्रीय व्यवस्थापक मंडळामध्ये प्रत्येक विभागास सदस्यत्व देण्यात येत असून या व्यतिरीक्त सात तज्ञ व्यक्तींना स्वीकृत सदस्य म्हणून समितीवर घेतले जाते. व्यवस्थापक समितीच्या वर्षातून किमान चार सभा घेतल्या जातात. व्यवस्थापक मंडळ विविध योजना व उपक्रम राबविण्यासाठी विभागीय स्तरावरील संस्थांना सहकार्य करते. विभागीय स्तरावर ही अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार अशा पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. वर्गणी सामान्य सभासद रुपये ५०/– आजीव सभासद रुपये ५००/–, विश्वस्त रुपये १०००/– अशा स्वरुपाची असून सभासद संख्या ही सर्वसाधारणता ७५० ते १०००/– च्या घरात दरवर्षी असते.

**उपक्रम :**

मान्यवरांची व्याख्याने, राज्य ग्रंथालय व ग्रंथपालांची डीरेक्टरी, गुजरात मधील नियतकालीकांची संघसुची, चर्चासत्रे व परिषदा यांचे आयोजन, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथालय कायद्याच्या मंजूरीसाठी लोकजागृती, न्यूज लेटर प्रकाशन अशा विविध उपक्रमांबरोबरच गुजरात ग्रंथालय सेवा संघाने विविध ठिकाणी प्रत्येक वर्षी परिषदांचे आयोजन करुन एक जागृतीचे वातावरण तयार केले आहे. याच पार्श्वभूमीवर सन १९७५ मध्ये या प्रकारची पहिली परिषद आयोजित केली होती. या परिषदेस जवळ जवळ ३०० ग्रंथपाल गुजरात राज्यातून उपस्थित राहीले होते. परिषद प्रसंगी जवळ जवळ ३० शोधनिबंध वाचण्यात आले होते व त्यावरही चर्चा घडवून आणलेली होती. आजवर अशा राज्यस्तरीय परिषदा २५ पेक्षा जास्त संपन्न झालेल्या असून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र क्षेत्राच्या विकासाकरिता तज्ञ व्यक्तींच्याद्वारे व्याख्याने आयोजित करुन ग्रंथालय चळवळ सक्षम करण्याचा प्रयत्न सातत्यपूर्वक करण्यात आलेला आहे.

**प्रशिक्षण, उपक्रम व प्रकाशने :**

संघाद्वारे केलेले विशेष उपक्रम पहाता पुढील बाबींची नोंद घेणे आवश्यक ठरते.

१. पायलट डिरेक्टरी ऑफ लायब्ररीज अ‍ॅण्ड इनफॉरमेशन सेंटर्स इन गुजरात १९८१.

२. डिरेक्टरी ऑफ लायब्ररीज अ‍ॅण्ड इनफॉरमेशन सेंटर्स इन गुजरात १९८५ (या डिरेक्टरी मध्ये गुजरातमधील १२७५ सार्वजनिक, शैक्षणिक, खाजगी, शासकीय व विशेष ग्रंथालयाबरोबरच संशोधन संस्थांची ग्रंथालये, यांचा समावेश करण्यात आलेला आहे.)

३. डॉ. चंपकलाल, पी. शुक्ला, स्मरण ग्रंथ १९८४ (इंग्रजी व गुजराती)

४. माहिती विपणन – सी.आर. पटेल (गुजराती)

५. 'ग्रंथलोक' या चौमासिकाचे १९७६ पासून प्रकाशन, हे मासिक इंग्रजी, हिंदी, गुजराती या भाषेतून प्रकाशित करुन संघाच्या सभासदांना मोफत वितरीत करण्यात येते.

६. डिरेक्टरी ऑफ ग्रंथालये आणि माहितीकेंद्रे इन गुजरात (तृतीय आवृत्ती २००१)

७. सन १९९२ –१९९५ या काळामध्ये एएसीआर – २ व सीडीएस/ आयएसआयएस यांचे प्रशिक्षण

याचबरोबर हा संघ अखिल भारतीय ग्रंथालय संघाचा सदस्य असून संघाद्वारे गुजरात प्रशासनातील विविध समित्यांवर प्रतिनिधीत्व केलेले आहे. गुजरातमधील अनेक ग्रंथालयांना त्यांच्या प्रलंबित कामाच्या पुर्ततेसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ संघाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. याचबरोबर ग्रंथोपस्कारासंबंधी राज्यातील इतर ग्रंथालयांना प्रलंबित कामांच्या परीपूर्ततेसाठी संघाद्वारे ठेकेदारी तत्त्वावर कामाची पूर्तता केली जाते.

**३.२७ बंगाल राज्य ग्रंथालय संघ :**

बंगाल प्रदेशामध्ये शहरातून शिक्षणाचा प्रसार झालेला असल्याने व याचबरोबर येथे असलेला राष्ट्रीय जागृतीभियान व राजकीय जागरूकता यामुळे या परिसरात छोट्यामोठ्या वर्गणी ग्रंथालयांची स्थापना होण्यास मदत झालेली आहे. याच पार्श्वभूमीवर सन १९२५ च्या कालखंडात बंगाल ग्रंथालय संघाची स्थापना करण्यात आली. या पाठीमागची पार्श्वभूमी म्हणजे १९२४ मध्ये बेळगाव येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १९३९ च्या अधिवेशनात देशभर ग्रंथालयाचे जाळे स्थापन करण्यासंदर्भात महत्त्व चर्चिले गेले. राजकीय स्तरावर अशी चर्चा पुढे येत असतानाच दि. २६ डिसेंबर १९२४ मध्ये अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे अधिवेशन संपन्न झाले.या अधिवेशनास देशातील विविध राज्यात व प्रांतात ग्रंथालय संघाची स्थापना करण्याचा विषय चर्चिला गेला. या अधिवेशनाला स्व. देशबंधू चितरंजनदास यांच्या समवेत बंगाल मधील प्रतिनिधींचे शिष्टमंडळ ही उपस्थित होते. या सर्व प्रतिनिधींना प्रस्तुत अधिवेशनात देशभर ग्रंथालय संघाची स्थापना करण्याचा ठराव प्राप्त झाला. याद्वारे या सर्वांनाच ग्रंथालय चळवळ विषयक विशेष जाणीव जागृती निर्माण होऊन व प्रोत्साहन प्राप्त होऊन त्यांनी आपल्या प्रांतातही ग्रंथालय संघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाच्या परिपूर्ततेसाठी कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात येऊन या समितीचे सचिव पद श्री. सुशिलकुमार घोष यांच्यावर सोपवण्यात आले. या संदर्भात लवकरच २० डिसेंबर १९२५ रोजी ग्रंथालय सेवक व ग्रंथालयांचे हितचिंतक यांची एक सभा अल्बर्ट हॉल कलकत्ता येथे स्वर्गीय जे.ए.चापमल (ग्रंथपाल, इम्पिरियल ग्रंथालय कलकत्ता) यांच्या अध्यक्षतेखाली बोलवण्यात आली. या प्रसंगी प्राथमिक स्वरुपात बंगाल ग्रंथालय संघाची अधिकृत स्थापना करण्यात आली.

या प्रसंगी कविवर्य रवींद्रनाथ टागोर हे आजारी असल्यामुळे उपस्थित राहू शकले नव्हते. पण या चळवळीस प्रोत्साहन देणारा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी पाठवून दिला होता. या परिषदेच्या प्रसंगी अनेक समाजिक नेते, सांस्कृतिक, शैक्षणिक या क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदवून चर्चेमध्ये सक्रिय पुढाकार घेतला होता.

या संघाची पुढची परिषद जानेवारी १९२८ मध्ये कलकत्ता येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस बंगाल प्रांतातील विविध जिल्ह्यातून प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शवित आपले महत्त्वपूर्ण शोधनिबंध सादर केले होते. अशा व्यक्तींमध्ये स्वर्गीय रामाचंद चटर्जी, सौ. सरलादेवी चौधराणी, स्व. सुरेनकुमार अशा नामवंतांचा समावेश होता. परिषदेचे अध्यक्षस्थान स्व. प्रमाथा चौधरी यांनी भुषविलेले होते. याच वर्षीच्या डिसेंबर महिन्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सर्व पक्षीय संमेलन कलकत्ता येथे आयोजित करण्यात आलेले होते. तसेच याचे पहिले सत्र अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेद्वारे संपन्न करताना या सत्राचे स्वागत अध्यक्ष कवि रवींद्रनाथ टागोर यांची सर्वांनी भेट घेतली. या दुसऱ्या भारतीय बंगाल ग्रंथालय परिषदेमध्ये ग्रंथालय विकासाविषयक संबंधित घटकांच्या अनुषंगाने एक ठराव पारीत करण्यात आला. या ठरावातील महत्त्वाचे मुद्दे म्हणजे,

१. समाजातील श्रीमंत व सन्माननीय व्यक्तींनी ग्रंथालयाकरिता भरघोस देणगी देणेविषयी कळकळीची विनंती करण्यात आली होती.

२. जिल्हा मंडळे, नगर परिषदा व स्थानिक संस्था यांना त्यांच्या परिसरातील ग्रंथालयांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याविषयी विनंती करण्यात आलेली होती.

३. ग्रंथालयाद्वारे संस्कृती संवर्धन व शिक्षण प्रसार याकरिता मातृभाषेचा सर्व सामान्यतः वापर करण्यात यावा.

४. सुप्रसिद्ध कादंबरीकार शरदचंद्र चटर्जी यांच्या पाथरदेवी या बंगाली कादंबरीवरील प्रतिबंध उठवण्याविषयी प्रांतीय शासनास विनंती करण्यात आली होती.

५. सर्व ग्रंथपालांना परीसरातील हस्तलिखिते व दुर्मिळ ग्रंथ यांचे संकलन करण्याविषयी व त्यांचे योग्य संरक्षण करण्याविषयी विशेष लक्ष देणे करिता विनंती करण्यात आलेली होती.

६. ढाका व कलकत्ता येथील विद्यापीठांना ग्रंथालय प्रशासन व संबंधित विषय यांच्या अनुशंगाने बहिस्थ व्याख्यानांचे आयोजन करण्याविषयी विनंती करण्यात आलेली होती. तसेच या व्याख्यानाकरिता पाश्चिमात्य विद्यापीठांनी स्विकारलेला आकृतीबंध प्रतिमा वापरण्याविषयी सुचना करण्यात आलेली होती.

७. स्थानिक शासन व संचालक सार्वजनिक निदेशन यांना त्यांच्या परिसरातील ग्रंथालयांकरिता सातत्यपूर्वक अनुदान उपलब्ध होण्यासाठी त्यांच्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्याविषयी विशेष विनंती करण्यात आली होती.

८. बंगाल विधान परिषदेतील सदस्यांना परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी ग्रंथालयांना आर्थिक स्त्रोत उपलब्ध करण्याविषयी प्रश्न उपस्थित करण्यासाठी विनंती करण्यात आलेली होती.

९. ग्रंथांचे व नियतकालिकांचे संरक्षण व्हावे या दृष्टिकोनातून ग्रंथांच्या काही प्रती दर्जेदार कागदावर मुद्रित करण्याविषयी प्रकाशकांना विनंती करण्यात आलेली होती.

१०. शासनास विनंती करताना कलकत्त्याहून इंपिरीयल ग्रंथालयाचे स्थलांतर करण्याविषयी विनंती करण्यात आलेली होती. तर कलकत्ता नगर परिषदेस व जिल्हा मंडळास आणि नगरपालिकांना त्यांच्या परिसरातील ग्रंथालयांमध्ये बालविभाग सुरू करणे, प्राथमिक शाळा व रात्रशाळा यांनीही बाल ग्रंथालय सुरू करणे विषयीभर द्यावा यासाठी ही कळकळीची विनंती करण्यात आलेली होती.

११. देशात कॉपीराईट ग्रंथालय अस्तित्वात नसल्याने शासनास विश्वभारती ग्रंथालय बोलपूर वंगीय साहित्य परिषद कलकत्ता व बंगाल ग्रंथालय संघ यांना मुद्रित व प्रकाशित ग्रंथांच्या प्रत्येकी एक – एक प्रती मोफत पाठविण्याची विनंती करण्यात आलेली होती. याचबरोबर विविध ग्रंथालयाच्या अधिकारी वर्गास किंवा प्राधिकरणास ग्रंथालयाद्वारे प्रबोधन व मनोरंजन करण्याच्या दृष्टीने किर्तन, कथा कट्टा, गायन यांचे आदर्श प्रतिमान अवलंबावे यासाठी विनंती करण्यात आलेली होती. अखिल बंगाल ग्रंथालय संघ हे नाव बदलून केवळ 'बंगाल ग्रंथालय संघ' असे नामकरण करण्यात येऊन संघाचे सर्व दप्तर बंगाली भाषेतून ठेवण्याविषयी निर्णय घेण्यात आलेला होता.

या परिषदेचे मुख्य आकर्षण म्हणजे अंत्यत सुव्यवस्थितपणे आयोजित केलेले ग्रंथालय प्रदर्शन हे होय. प्रत्येक प्रांताकरिता स्वतंत्र विभाग आखून देण्यात आलेला होता. या विभागात त्यांनी आपल्या प्रांतामध्ये झालेला ग्रंथालयांचा विकास व ग्रंथालय चळवळीचा विकास यांचे चित्रे तक्ते याद्वारे प्रदर्शन करणेविषयी सुचविण्यात आलेले होते. याचबरोबर

कलकत्यामधील मोठ्या ग्रंथालयांना परिषद काळात भेटीचेंही आयोजन प्रतिनिधींसाठी करण्यात आले होते. एकूणच बंगाल राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीकरिता संघाच्या माध्यमातून सातत्यपूर्वक पाठींबा प्राप्त होत आलेला आहे. जिज्ञासू व सक्रीय कार्यकर्ते हेच या परिसराचे वैशिष्ट्ये आहे.

**तिसरी परिषद :**

बंगाल ग्रंथालय परिषदेचे तिसरे अधिवेशन सन १९३१ मध्ये वंगीय साहित्य परिषदेच्या परिसरात कलकत्ता येथे आयोजित करण्यात आले होते. बडोदा राज्याचे तत्कालिन ग्रंथपाल श्री. एम. एन. दत्त यांनी या परिषदेचे अध्यक्षपद भुषविले होते. या परिषदेद्वारे ग्रंथालय प्रसाराविषयक जनजागृतीच्या दृष्टिने विशेष चर्चा होण्यास मदत झाली. विविध ठिकाणी झालेल्या व्याख्यानातून पुढे लोकांच्याकडून सुव्यवस्थित अभ्यासिका, नव्या ग्रंथालय केंद्राची निर्मिती, स्व. बंकीमचद्र चटर्जी यांच्या राहत्या घराचे संरक्षण व संवर्धन याबाबत मागण्या होऊ लागल्या. याचबरोबर कलकत्यावरुन इंम्पीरीअल ग्रंथालयाचे स्थलांतर होऊ नये याकरिता लोकचळवळ उभी करण्यात आली. या संदर्भात आकाशवाणी वरुन भाषणे आयोजित करण्यात आलेली होती. या सर्व उपक्रमांमध्ये बंगाल ग्रंथालय संघाचे योगदान महत्त्वपूर्ण असे होते. अशा जोमदार स्वरुपात कार्यरत असणारी ही संघटना हळूहळू शिथिल होत गेली. तिसऱ्या परिषदेनंतर ग्रंथालय चळवळीविषयक आस्था असणाऱ्या व्यक्तींनी ३ डिसेंबर १९३१ रोजी एक सभा आयोजित केली. या सभेस राज्याचे तत्कालीन शिक्षणमंत्री खाँज्या नसीमउदीन सर, बी.पी. सिंग राय (मंत्री, स्थानिक स्वराज्य संस्था), स्व. एम. एन. दत्त अशा नामवंताबरोबर इतर ही ग्रंथालय क्षेत्राशी संबंधीत व्यक्ती उपस्थित होते. या सभेत बंगाल ग्रंथालय संघाचे पुनरूज्जीवन करण्याचा निर्णय घेऊन त्याची जबाबदारी स्व. कुमार मुंनी देवराय महाशय आणि के. एम. असादूल्ला यांच्याकडे सोपवली. मात्र १९३३ अखेर यामध्ये  फारशी सुधारणा झाली नव्हती. अखिल भारतीय पातळीवर ग्रंथालय परिषदेचे पहिले अधिवशेन कलकत्ता येथे पुढील वर्षी भरवण्यासाठी १९३२ मध्ये एक स्वागत समिती गठीत करण्यात आली होती.

सन १९३३ च्या कालखंडात कलकत्ता येथील अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेच्या अनुषंगाने ग्रंथालय कार्यकर्त्यांनी पुनश्च ग्रंथालय चळवळ सुरू करण्याचा विचार करुन बंगाल ग्रंथालय संघाचे पुर्नजीवन करण्याचा निश्चय केला. यासाठी एक तात्पुरते मंडळ ही गठीत करण्यात आले. या मंडळाचे अध्यक्ष म्हणून कुमार मुनींद्रनाथ देवराय तर श्री. टी.सी. दत्त, श्री.एस.एन.रुद्रा व एम.एफ.वहाब यांची सहा. सचिव म्हणून निवड करण्यात आली. या समितीवर संघाची घटना व नियम तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. या समितीने परिश्रम पुर्वक पुर्तता करुन हे सर्व पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये १९ ऑगस्ट १९३५ मध्ये सादर करुन मंजूर करुन घेतले. प्रस्तुत सभा ही इंम्पीरीअल ग्रंथालयात संपन्न झाली होती. या संघाद्वारे हा दिवस 'ग्रंथालय दिन' म्हणून प्रथमच साजरा केला. पुढे प्रत्येक वर्षी हा दिवस ग्रंथालय दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला. पुढे वेळोवेळी या संघाच्या घटनेमध्ये बदल करण्यात आला. हे बदल अनुक्रमे २१ जुलै १९३८, २४ नोव्हेंबर १९४०, २५ मार्च १९४५, १ जानेवारी १९५१ या रोजी करण्यात आले.

या तात्पुरत्या समितीद्वारे बंगाल ग्रंथालय संघ हा अखिल भारतीय ग्रंथालय संघाशी सलंग्नित करुन या संघाची नोंदणी कायद्याअंतर्गत करुन घेण्यात आली. पुढील काळात या तात्पुरत्या समितीने १९ ऑगस्ट १९४५ च्या सर्वसाधारण सभेत रीतसर कायमस्वरुपी मंडळाची निवड करण्यात आली. खऱ्या अर्थाने या संघटनेची नोंदणी कायद्याअंतर्गत १२ जून १९४६ रोजी प्रत्यक्षात आली.

या संघाद्वारे राज्यातील ग्रंथालय व ग्रंथालय चळवळीकरिता शासनाकडून मदत प्राप्त होण्यासाठी सातत्यपूर्वक प्रयत्न करण्यात आले. या प्रयत्नांच्या पाठपुरवठ्यामुळेच बंगाल मधील ग्रंथालयांना राज्यशासनाकडून सुरूवातीपासूनच अनुदान मिळत गेले. उदा. सन १९४७ मध्ये ना परतावा! अनुदान स्वरुपात राज्यशासनाने १९० ग्रंथालयांना आर्थिक सहकार्य उपलब्ध करुन दिलेले होते. तर १९५० –५१ च्या काळात ५३५ ग्रंथालयांना अनुदानाचा लाभ मिळाला होता. पुढील काळात बंगाल शासनाद्वारे ग्रामीण ग्रंथालयांनाही अनुदान उपलब्ध करुन देताना १९४६ मध्ये १०० ग्रंथालयांना हे अनुदान प्राप्त झाले होते. तर १९५०–५१ मध्ये अनुदान प्राप्त ग्रंथालयांची संख्या ३३७ इतकी होती. याचबरोबर

बनीपूर, कालिंगपाँग व इतर विभागीय ग्रंथालयांना देखील या काळात शासनाद्वारे अनुदान प्राप्त झालेले होते. या नोंदीवरुनच देशाच्या स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळात ग्रंथालय संघ शासनाकडून आर्थिक मदत मिळवण्यासाठी किती सक्षमपणे पाठपुरवठा करीत होता हे लक्षात येते.

येथील संघाच्या प्रेरणातून बंगाल राज्यातील विविध ठिकाणी मध्यवर्ती ग्रंथालयांची स्थापना करताना बंकिपूर येथे शाखा ग्रंथालयांची जोड या मध्यवर्ती ग्रंथालयांना दिल्याचे आढळते. येथील लोकांच्यामध्ये वाचनअभिरुची वृद्धिंगत करण्यासाठी शासनाद्वारे प्रयत्न करताना सलंग्न ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देऊन त्यासाठी ग्रंथपाल, पर्यवेक्षक, सायकल संदेशवाहक अशा पदांची ही निर्मिती केलेली होती. बंगाल शासनाने जिल्हा ग्रंथालय संघ स्थापनेसाठी प्रोत्साहन दिलेले असल्यामुळे येथील १४ जिल्ह्यापैकी किमान १० जिल्ह्यांमध्ये 'जिल्हा ग्रंथालय संघ' अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येते.

एकूणच या संघाद्वारे ग्रंथालय प्रसाराचा पाठपुरावा मोठ्या प्रमाणात केलेला असल्याचे लक्षात येते. यासाठी संघटनेचे सभासदत्व सर्व राज्यभर उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. बंगालच्या विभाजनानंतर बंगालचा दोन तृतीयांश भाग विद्यमान बांगलादेशात (पूर्व बंगाल) गेल्याने संघाची खूपच हानी झाली. आज या संघाचे १००० हून अधिक सभासद असून या सभासदांमध्ये आजीव सभासद, सर्वसाधारण सभासद असे दोन वर्ग आहेत. संघाद्वारे या परिसरात ग्रंथालय अभियान राबविताना सल्ला सेवेबरोबरच  तांत्रिक सहाय्य ही उपलब्ध करुन देऊन ''द ग्रंथागर''  व ''पाथगर'' या बंगाली मुखपत्रातून संघाच्या कार्याचा सातत्यपूर्वक प्रसार केला. तसेच ग्रंथालयांच्याकरिता व ग्रंथालय सेवकांच्याकरिता प्रशिक्षण वर्गही सुरू केले. ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमासोबत अल्पमुदतीचे उन्हाळी अभ्यासक्रमही संघाकडून सुरू करण्यात आले होते. जिल्हा संघाच्या निमंत्रणावरुन विविध ठिकाणी अशा वर्गाचे आयोजन ही करण्यात आले होते. हे सर्व उपक्रम मानद स्वरुपात राबविले जातात.

या संघाची दहावी परिषद एप्रिल १९५६ रोजी मिरजापूर येथील क्रांतीक्लब मध्ये आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये महत्त्वपूर्ण शिफारस म्हणजे राज्यातील

ग्रंथालयांचा प्रभावीपणे कारभार सुरू राहण्यासाठी राज्यस्तरीय स्वतंत्र ग्रंथालय प्राधिकरण नेमणेविषयी केलेली शिफारस होय. याच बरोबर एक महत्त्वपूर्ण ठराव म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय पथदर्शक प्रकल्प शासनाद्वारे व कलकत्ता मधील परिषदेद्वारे राबविण्याविषयी केलेली शिफारस होय. संघाने आजवर आयोजित केलेल्या परिषदांची संख्या पन्नाशीच्या घरात पोहचली असून संघाची ४६ वी परिषद १० ते १२ मार्च २००२ च्या काळात जलपायीगुरी येथे संपन्न झाली. या परिषदेचे अध्यक्ष प्रा.सत्यसाधन चक्रवर्ती (उच्चशिक्षणमंत्री पश्चिम बंगाल) यांनी भूषविले होते. तर उद्‌घाटक म्हणून डॉ. अशोक मित्रा हे उपस्थित राहिले होते. या परिषदेमध्ये विद्यमान स्थितीत ग्रंथालय सेवांचा विकास व विस्तार या अनुषंगाने चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. संघाच्या वाटचालीतील ही एक महत्त्वपूर्ण परिषद म्हणून नोंदविलेली आहे.

**संघाची उद्दिष्टे :**

१. बंगाल राज्यात ग्रंथालय चळवळीचा प्रसार करणे.

२. ग्रंथालयाच्या देखभालीकरिता व संघटनाकरिता शास्त्रीय पद्धतीने ज्ञान उपलब्ध करुन देणे व या करिता व्याख्याने, ग्रंथालय चर्चा, परिषदा व प्रदर्शने यांचे आयोजन करणे.

३. उद्दिष्ट पूर्ततेसाठी संघाद्वारे वृत्तपत्र, पत्रके, ग्रंथ, तक्ते, नियतकालिके, पोस्टर्स, साख्यिकीय तपशील यासारखे साहित्य प्रकाशित करणे.

४. ग्रंथालयाकरिता वस्तूसंग्रहालय उभे करण्यासाठी व चालविण्यासाठी प्रकाशने, ग्रंथालय चळवळीविषयक साहित्य व ग्रंथालय शास्त्राविषयक साहित्य यांचे संकलन करणे.

५. सूचीय अभ्यासक्रमाकरीता प्राधान्य व प्रोत्साहन देणे.

६. तसेच सूची विषयक माहिती प्रकाशित करणे.

७. ग्रंथालय प्रसाराकरीता ग्रंथालय सुविधांचा अधिक चांगला वापर व ग्रंथालय प्रशासनाला उपयुक्त ठरणाऱ्या ग्रंथालय कायद्याच्या अंमलबजावणी करीता पाठपुरावा करणे.

८. इतर संस्थांना मदत करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग चालविणे.

९. तत्सम अभ्यासक्रम सुरू करणे.

१०. ग्रंथालय सेवकांच्या वेतनश्रेणीत व सेवाशर्ती करीता आणि दर्जाकरीता प्रयत्न करणे.

११. ग्रंथालय संघाची स्थापना करणे, संघ स्थापनेस प्रोत्साहन देणे व संस्थांची स्थापना करणे. संघ व ग्रंथालय स्थापनेसाठी आर्थिक उपलब्धता करण्यासाठी सहकार्य करणे.

१२. शैक्षणिक क्षेत्रांना प्रोत्साहन देणाऱ्या व तत्सम समान उद्दिष्टे असणाऱ्या छोट्या संघांना सहकार्य पुरविणे.

१३. ग्रंथालयांमध्ये समन्वय साधणे व त्यांच्या कार्य पद्धतीमध्ये समन्वय साधण्यासाठी मदत करणे.

१४. शासनाकडून अनुदान प्राप्त करण्यासाठी व इतर सार्वजनिक संस्थांकडून आर्थिक मदत उपलब्ध होण्यासाठी इतर ग्रंथालयांना सहकार्य करणे.

१५. ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी देणग्या व ठेवी गोळा करणे.

१६. ग्रंथालय विषयक समस्या संदर्भात माहितीकेंद्र म्हणून सेवा उपलब्ध करुन देणे.

१७. संघाकरिता उपयुक्त ठरेल अशा इमारतीची उभारणी करणे, दुरुस्ती करणे व त्यासंबंधी काम करणे.

अशा उद्दिष्टांचा समावेश सदर संघाच्या घटनेमध्ये करण्यात आलेला आहे. या संघाच्या सभासदांचे स्वरुप विश्वस्त, मानद सदस्य, देणगीदार, आजीव सभासद, वैयक्तिक सभासद अशा प्रकारचे असून या संदर्भातील शुल्क व इतर नियम विषयक तपशील आणि सभासदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या यांचेही संघाच्या घटनेमध्ये विवेचन करण्यात आले आहे. यामध्ये १ अध्यक्ष, ५ उपाध्यक्ष, १ मुख्यसचिव, १ सहसचिव, १ सहा. सचिव, १ खजिनदार, १० सभासद अशी या मंडळाची संरचना असून इतर उपसमित्याही स्थायी स्वरुपात गठीत करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये

१. ग्रंथालयशास्त्र प्रशिक्षण समिती

२. ग्रंथालय समिती

३. ''ग्रंथगार'' व प्रकाशन समिती

४. निधी व इमारत समिती

५. महाविद्यालय व विद्यापीठ ग्रंथालय समिती

६. शालेय ग्रंथालय समिती

७. सार्वजनिक ग्रंथालय समिती

८. विद्यार्थी सहसंबंध समिती

९. निर्देशिका समिती

आजवर संघाने राबविलेल्या उपक्रमामध्ये ग्रंथालय व माहिती सेवांचे महत्त्व समाजमानसात पटवून देऊन समाजामध्ये ग्रंथालय व माहितीसेवाविषयी जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन केलेले असून ग्रंथालय सेवांचा विकास व दर्जा सर्व प्रकारच्या ग्रंथालयांमध्ये वृद्धिंगत करण्यासाठी महत्वपूर्ण सुचना केलेल्या आहेत. तसेच ग्रंथालय सेवकांचा दर्जा व वेतनश्रेणी यासाठी सातत्यपूर्वक प्रयत्न केलेला आहे.

सुरवातीला संघाने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत काम केले असून संघाने आपल्या कार्य विस्तारासाठी आज स्वत:ची अशी चार मजली इमारत उभी केलेली आहे. या इमारतीचा पायाभरणी समारंभ डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या हस्ते फेब्रुवारी १९६७ मध्ये संपन्न झालेला आहे. ग्रंथालयाच्या इमारतीचे उद्‌घाटन विश्वभारतीचे पहिले ग्रंथपाल व कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांचे चरित्रकार श्री. देसीकोत्तम प्रोवतकुमार मुखोपाध्याय यांच्या हस्ते २० सप्टेबर १९६८ रोजी करण्यात आले होते. आज संघाचे कार्य याच इमारतीमध्ये चालले आहे. संघाद्वारे १९४४ मध्ये केवळ संकलित केलेल्या १४३ ग्रंथांच्या माध्यमातून आज एक वाचनसाहित्याने समृद्ध असणारे ग्रंथालय उभे करण्यात आले. या ग्रंथालयात ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयक नियतकालीके व ग्रंथ यांचे मोठ्या प्रमाणात संग्रहण करण्यात आलेले आहे.

आज ५००० हून अधिक वाचनसाहित्य याठिकाणी संग्रहित केलेले असून दरवर्षी यामध्ये मोठ्या प्रमाणात भर पडत आहे. असे हे ग्रंथालयशास्त्राशी संबंधित अनोखे ग्रंथालय कलकत्ता विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. एस. के. मुखर्जी यांच्या प्रोत्साहानाने कलकत्ता विद्यापीठामध्ये सुरू करण्यात आले होते. ग्रंथालय शास्त्राशी संबंधित असणारे

अनोखे ग्रंथालय विद्यार्थ्यांबरोबरच संशोधकांकडून ही मोठ्या प्रमाणात वापरले जात आहे. संघाद्वारे आजवर ग्रंथागर हे नियतकालीक ही प्रकाशित करण्यात आलेले असून याद्वारे ग्रंथालय शास्त्राविषयक लेख, उपक्रम, बातम्या, शासकीय निवेदन, परीक्षणे यांचे प्रकाशन सातत्यपूर्वक केले जात आहे.

या संघाद्वारे विविध व्याख्याने आयोजित केली जातात. यामध्ये वार्षिक स्तरावर दोनदा आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानांचा समावेश असून एक 'सुशीलकुमार घोष मेमोरीयल लेक्चर' आणि दुसरे 'सचीदेवी मेमोरीयल लेक्चर' यांच्या स्मरणार्थ आयोजित केली जातात.

या दोन व्यक्तींच्या स्मरणार्थ केल्या जाणाऱ्या व्याख्यानांची पार्श्वभूमी म्हणजे सुशीलकुमार घोष हे ग्रंथालय संघाचे पहिले सचिव म्हणून त्यांनी ग्रंथालय चळवळीस दिलेले योगदान या प्रित्यार्थ तर दुसरे व्याख्यान हे शुभानंद चटोपाध्याय यांनी पुढील काळात संघाचे अध्यक्षपद भुषविताना संकलित केलेल्या देणगीच्या माध्यमातून चटोपाध्याय यांच्या मातोश्री सचीदेवी यांच्या स्मरणार्थ ही व्याख्याने आयोजित केली जातात. संघाने सातत्यपूर्वक ग्रंथालय परिषदांचे आयोजन केलेले असून या परिषदांचा उल्लेख वंगीय ग्रंथगर सम्मेलन अशा प्रकारे केला जातो. सन १९५३ पासून दीर्घकाळ या परिषदांचे आयोजन सातत्यपूर्वक करण्यात आलेले आहे. या संघाद्वारे प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व ग्रंथालय क्षेत्रातील व्यावसायिकांना त्यांनी 'ग्रंथागर' या मुखपत्रातून लिहिलेल्या उत्तम लेखांना पारितोषिके दिली जातात. ही पारितोषिके–

१. कुमार मुनिंद्रदेव राय महाशय मेडल

२. मैथीली सेनगुप्ता मेडल

३. तीनकौर दत्त मेमोरीयल मेडल

अशी असून पहिले व दुसरे पारितोषिक हे ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये वार्षिक परीक्षेत सर्व प्रथम येणाऱ्या पहिल्या व दुसऱ्या विद्यार्थ्यांस देण्यात येते. प्रस्तुत अभ्यासक्रम हा संघाद्वारे चालविला जातो. तिसरे पारितोषिक हे 'ग्रंथागर' या मुखपत्रातील उत्तम लेखासाठी दिले जाते.

सन १९७७ मध्ये विधान सभेच्या निवडणूका जाहीर झाल्यानंतर विविध पक्षांनी आपला निवडणूक जाहीरनामा जाहीर केला होता. या पार्श्वभूमीवर ग्रंथालय संघाने आपले धोरण सुनिश्चित करुन प्रत्येक राजकीय पक्षाच्या नेत्यांना भेटून त्यांना त्यांच्या जाहिरनाम्यात ग्रंथालयकायदा लागू करण्यासाठी निवडणूक जाहिरनाम्यामध्ये उल्लेख करण्यात यावा असे आवाहन करण्यात आले. संघाच्या या आवाहानास डाव्या आघाडीकडून प्रतिसाद प्राप्त झाला. सार्वजनिक ग्रंथालयांची महत्त्वपूर्ण गरज ही डाव्या आघाडीच्या त्यांच्या लक्षात आल्याने या पक्षाने आपल्या जाहिरनाम्यामध्ये ग्रंथालय कायद्याचा मुद्दा अंर्तभूत केला आणि अशा रितीने डाव्या आघाडीच्या सरकारने पुढे प. बंगालमध्ये दीर्घकाळ प्रतिक्षेत असलेली ग्रंथालय कायद्याची मागणी १२ सप्टेंबर १९७९ रोजी प्रत्यक्षात आली. कायदा लागू होणारे हे देशातील पाचवे राज्य ठरले. या डाव्या आघाडी सरकारने ग्रंथालय सेवांकरिता स्वतंत्र मंत्र्यांकडे कारभार सोपविण्याची गरज ही शासनाच्या लक्षात आल्याने प्राध्यापक पार्थदेव यांच्याकडे पाहिले ग्रंथालय सेवामंत्री म्हणून कार्यभार सोपविला. अशा प्रकारे ग्रंथालय कायद्यासाठी संघाद्वारे केलेले प्रयत्न यशस्वी ठरले. आजवर संघाद्वारे १३ बंगाली ग्रंथ, ५ इंग्रजी ग्रंथ, बंगालमधील पहिले ग्रंथालयशास्त्र विषयक 'ग्रंथागर' हे प्रकाशन ही या ग्रंथालयाची आजवरची प्रकाशने असून या प्रकाशनांच्या माध्यमातून ग्रंथालय शास्त्र व माहितीशास्त्र यांच्या विकासाकरिता संघाने आजवर दिलेले योगदान ही लक्षणीय आहे. ग्रंथालय क्षेत्रास चालना देणारे देशपातळीवरील या संघाचे योगदान ही तेवढेच महत्त्वपूर्ण आहे.

### ३.२८ हुगळी जिल्हा ग्रंथालय परिषद :

ही परिषद २७ जानेवारी १९३३ रोजी सैरामपूर येथे आयोजित करण्यात आलेली होती. या परिषदेचे अध्यक्षपद श्री. एस.एन. मलिक यांनी भूषविलेले होते व २०० प्रतिनिधींनी या परिषदेमध्ये सहभाग नोंदविला होता. या परिषदेच्या दुसऱ्या सत्रामध्ये ग्रंथालयामध्ये बालविभाग या संदर्भात झालेली चर्चा, डॉ. नेवगी यांच्या अध्यक्षतेखाली झालेली होती. बंगालमधील बालकाविषयी पुस्तकांची संख्या अधिक असल्याने त्यासाठी स्वतंत्र विभाग ग्रंथालयात स्थापन करण्याची चर्चा करण्यात आली. सार्वजनिक ग्रंथालयातील बालविभाग स्थापनेच्या या कल्पनेची उपस्थितांतून उत्स्फुर्तपणे दखल घेण्यात आली. या प्रसंगी टी. सी. दत्त यांनी ग्रंथालयांचा वापर करणे विषयी बालकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता व तिचे स्वरुप यांचीही सांगोपान चर्चा केली. या सत्रास उपस्थितांचा उत्तम प्रतिसाद लाभला होता. तसेच ग्रामिण ग्रंथालय विषयक तिसऱ्या सत्रात समाजाच्या सर्वांगीण स्वास्थासाठी स्थानिक ग्रंथालयांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाविषयी चर्चा झाली. असे हे एक लक्षवेधी अधिवेशन हुगळी जिल्हा संघाने आयोजित केले होते. या प्रसंगी एक विशेष प्रदर्शन ही भरविण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये ग्रंथालयविषयक नियतकालीके, माहितीपुस्तिका, प्रपत्रे, पाश्चात्य देशातील ग्रंथालय संघाचे अहवाल, याचबरोबर अमेरिका, दक्षिण आफ्रिका, चीन, मद्रास, बडोदा येथील ग्रंथालय विषयक पोस्टर्स, मुद्रण ब्लॉक, हस्तलिखिते यांची कालखंडनिहाय केलेली मांडणी, ग्रंथालय विषयक नकाशे अशा वैविध्यपूर्ण प्रदर्शनामुळे हे जिल्हा संघाचे अधिवेशन ही लक्षवेधी ठरले होते. याचबरोबर पश्चिम बंगाल मधील ग्रंथालय संघाच्या कार्याचा आढावा घेताना सन १९३३ मध्ये कलकत्ता येथे अखिल भारतीय ग्रंथालय संघाद्वारे आयोजित पहिल्या अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे अधिवेशन यांची नोंद घेणे गरजेचे ठरते. या परिषदेमध्ये पारीत कलेल्या २० ठरावांचा समावेश असून या परिषदेच्या तिसऱ्या सत्रामध्ये अखिल भारतीय ग्रंथालय संघाची घटना या अधिवेशनात चर्चेस ठेऊन अंतिमत: त्यामध्ये काही सुधारणा करुन ही घटना मंजूर करण्यात आलेली होती. हा एक ऐतिहासिक क्षण म्हणून याची दखल घेणे गरजेचे आहे. याचबरोबर प. बंगालमध्ये पुढे सन १९५६ मध्ये ११ वी अखिल भारतीय ग्रंथालय परिषद आयोजित

करण्यात आलेली होती. या परिषदेचे अध्यक्षपद बंगालचे तत्कालिन राज्यपाल डॉ. एच. टी. मुखर्जी यांनी भूषविलेले होते. या परिषदेची मुख्य विचारधारा पुढील प्रमाणे होती,

१. सार्वजनिक ग्रंथालये
२. ग्रंथालय वर्गीकरण, संदर्भसुची व प्रलेखन
३. बाल ग्रंथालये
४. ग्रंथालय शिक्षण
५. शालेय ग्रंथालये

या विषयांच्या अनुषंगाने सर्वांगीण चर्चा या परिषदेमध्ये घडविण्यात आली होती. पुढे १७ व १८ एप्रिल १९६२ रोजी कलकत्ता येथे अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे १२ वे अधिवेशन प्रा. निहारराजन राय व एम.पी. बागेश्वरी विभाग प्रमुख ग्रंथालय शास्त्र फाईन आर्टस शाखा व ग्रंथालयशास्त्र विभाग कलकत्ता विद्यापीठ यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

या परिषदेचा मुख्य विषय सार्वजनिक ग्रंथालय, ग्रंथालय सहकार, वेतनश्रेणी, दर्जा व स्त्रोतांचा सामुहिक वापर यासंबंधित होता. अखिल भारतीय ग्रंथालय संघाची १३ वी परिषद कलकत्ता येथेच संपन्न झालेली होती. ही परिषद १० ते १२ फेब्रुवारी १९६२ रोजी श्री.बी.एस.केशवन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली होती. या परिषदेचे उद्‌घाटन सचिव केंद्रिय शिक्षण विभाग श्री. प्रेमक्रुपाल यांच्या हस्ते करण्यात आले होते.

या परिषदेतील चर्चेचे विषय हे संदर्भसूची व प्रलेखन हे होते. तर कलकत्ता येथे १९८८ मध्ये अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे ३४ वे अधिवेशन कलकत्ता येथे आयोजित करण्यता आलेले होते. हे अधिवेशन अखिल भारतीय ग्रंथालय संघ व अखिल भारतीय विशेष ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने भरविण्यात आलेले होते. या परिषदेतील चर्चेचे विषय हे महाविद्यालयीन ग्रंथालये व ग्रंथालय व माहितीसेवांचे मुल्यमापन असे होते. पुढील काळात कलकत्ता येथे विशेष ग्रंथालय विषयक १९५६ ते १९७२ या काळात चार परिषदांचे आयोजन करण्यात आलेले होते. तर १९६८ ते २००८ या काळात कलकत्ता येथे संपन्न झालेल्या या संघाच्या परिषदेचे हे २४ वे अधिवेशन संपन्न झाले होते व चर्चेचा विषय

ग्रंथालय व्यवसायिकांच्या नव्यारुपाचा शोध अशा स्वरुपाचा होता. याचबरोबर या संघटनेद्वारे १७ कार्यशाळांचे आयोजन १९८६ ते २००७ या काळात करण्यात आलेले होते.

एकूणच पश्चिम बंगाल राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय विकास व ग्रंथालयशास्त्र शिक्षणाचा विकास या अनुषंगाने विशेष ग्रंथालय संघ यांच्या सहकार्याने आजवर महत्तपूर्ण योगदान दिलेले आढळते.

**३.२९ उत्तर प्रदेश राज्य ग्रंथालय संघ :**

या संघाची निर्मिती १९३५ मध्ये १९ ते २२ एप्रिल या कालखंडात लखनऊ येथे भरलेल्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेच्या प्रसंगी करण्यात आली. या संघाचे पहिले अध्यक्ष डॉ. वाली मोहम्मद हे होते. तर मुख्य सचिव श्री. फाजल इलाही हे होते. या काळात ग्रंथपालांमध्ये ग्रंथालयविषयक जाणीव समाधानकारक नसल्याने लवकरच या संघाचे कार्य शिथील झाले. एका तपानंतर आलाबाद येथील ग्रंथपालांनी या संघाचे पुर्नजीवन करण्याचे १९४८ मध्ये ठरवून आलाबाद विद्यापीठाचे तत्कालीन ग्रंथपाल कर्नल रेहमान यांची अध्यक्ष म्हणून निवड केली तर श्री. एम.एम. गोस्वामी यांच्याकडे सचिव पद सोपवण्यात आले. याप्रसंगी घटनेचा मसुदाही तयार करुन त्यात दुरूस्तीही करण्यात आली पण हे ही कार्य फार काळ टिकून राहिले नाही. पुनश्च एका दशकानंतर १ सप्टेंबर १९५६ रोजी उत्तरप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. स्वरुपानंदन यांच्या उपस्थितीत या संघाचे पुनरुज्जीवन करण्यात आले. याकरिता लखनऊ विद्यापीठाचे कुलगूरू डॉ. राधाकमल मुखर्जी यांनी ग्रंथपालांची सभा ही बोलवली होती. या सभेचे अध्यक्ष स्थान अलिगड मुस्लिम विद्यापीठाचे ग्रंथपाल प्रा. एस. बसिरुद्धीन यांनी भूषविलेले होते. या प्रसंगी श्री. सी.जी. विश्वनाथन यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली तर सचिव म्हणून ग्रंथपाल अमीर अदादुल्ला (सार्वजनिक ग्रंथालय लखनऊ) यांची निवड करण्यात आली होती. तेव्हापासून हा ग्रंथालय सक्रीय झालेला आहे.

उत्तर प्रदेश या राज्याचा विस्तार लक्षात घेऊन या सर्वदूरच्या प्रदेशातून संघाच्या सभासदांना एकत्रित येणे सहज शक्य नसल्याने या संघाच्या घटनेतील तरतुदीनुसार जिल्हा शाखा विविध ठिकाणी सुरू करण्यात आल्या. या संघटनेचा कारभार निवडणूकीद्वारे निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाद्वारे पाहिला जातो व कार्यकारी मंडळ व उपसमित्या आणि शाखा समित्या यांच्या माध्यमातून संघाचे उपक्रम राबविले जातात. प्रसंगी यामध्ये शाखा स्तरावर स्वत:चे स्वतंत्र उपक्रम राबविण्याची मुभा ही घटनेअंतर्गत देण्यात आली आहे. या संघटनेचे ५०० हून अधिक आजीव सभासद असून ७०० हून अधिक सर्वसामान्य सभासद आहेत.

**संघटनेची उद्दिष्टे :**

१. राज्यात ग्रंथालय चळवळीचा विकास करणे.

२. ग्रंथालय क्षेत्रातील सेवकांच्या सेवाशर्ती व दर्जा यांच्या मध्ये सुधारणा करणे.

३. राज्यात सार्वजनिक कायदा लागू करण्यासाठी लोकमत तयार करणे.

४. राज्यातील जनसमुदायामध्ये वाचन अभिरुची वृद्धिंगत करणे.

५. सार्वजनिक शिक्षण योजना, सामाजिक संस्था व केंद्रशासन यांच्याद्वारे राबविताना या उपक्रमात सहकार्य करणे.

६. संघटनेच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी गरजेनुरूप कार्यवाही करणे.

या संघाद्वारे ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केलेला असून छोटी ग्रंथालये व शालेय ग्रंथालय सेवक यांच्याकरिता या अभ्यासक्रमाचे उपयोजन १९५९ करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमचा कालखंड चार महिन्याचा असून १९७० पासून उत्तर प्रदेशच्या शिक्षण विभागाने या अभ्यासक्रमाच्या परिक्षा आयोजनाची जबाबदारी स्विकारली आहे. सध्या या अभ्यास केंद्राची २३ केंद्रे असून यामध्ये सर्वसाधारणपणे प्रत्येक वर्षी ५५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. तसेच कमी कालावधीचे उजळणी वर्ग ही आयोजित केले जातात. संघाची प्रकाशने,

१. संघाद्वारे सन १९५७ मध्ये प्रा. सी.जी. विश्वनाथन यांच्या संपादनाखाली ग्रंथालय क्रोनिकल हे नियतकालीक सुरू करण्यात आले होते. पण निधी अभावी ते बंद पडले.

२. संघाच्या लखनऊ शाखेद्वारे 'लखनऊ ग्रंथपाल' हे चौमाही जर्नल १९६५ पासून प्रकाशित होत असून आजवर त्याचे २१ खंड प्रकाशित झाले आहेत.

३. उत्तर प्रदेश स्कूल ऑफ लायब्ररी सायन्सद्वारे 'ग्रंथालय' हे द्वैभाषिक वार्षिक प्रकाशित केले जात असून याद्वारे विद्यार्थ्यांचे लेखन प्रकाशित केले जाते. शिवाय संघाच्या शाखा आणि स्कूल विषयक उपक्रमांना या वार्षिकातून प्रसिद्ध दिली जाते.

४. सन १९८२ पासून संघाद्वारे द्वैमासिक स्वरुपात न्यूज बुलेटिन सुरू केलेले असून आजवर यांचे १२ खंड प्रकाशित झालेले आहेत. लखनऊ शाखेद्वारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयक आजवरच्या नविन घडामोडींचे मुल्यमापन करणारे दोन खंडही प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

### ३.३० दिल्ली ग्रंथालय संघ :

दिल्ली ग्रंथालय संघाची स्थापना १० मार्च १९३९ साली झाली असून या संघाची नोंद नोंदणी कायद्याअंतर्गत १९४० –४१ सालामध्ये करण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर या संघाचे पुनश्च पुनरुज्जीवन १९५३ मध्ये करण्यात येऊन पुढील उद्दिष्टे निर्धारीत करण्यात आली.

१. दिल्ली मधील ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देणे.
२. ग्रंथालयशास्त्राच्या प्रशिक्षणाकरीता सोयी–सुविधा उपलब्ध करुन देणे.
३. दिल्ली मधील ग्रंथालयांच्या सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी सहकार्य वृद्धिंगत करणे.
४. ग्रंथालय सेवकांचा दर्जा व सेवाशर्ती यामध्ये सुधारणा करणे.
५. ग्रंथालय शास्त्राशी संबंधित प्रकाशने सुरू करणे.
६. समान उद्दिष्टांच्या इतर संघटनांना सहकार्य करणे.

गेल्या ७५ वर्षात संघटना ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनेक उपक्रम राबवत आलेली आहे. संघटनेचे सध्या ४०० सदस्य असून ऐकेकाळी या संघटनेचे ७०० हून अधिक सदस्य होते. सध्या संघटनेचे ३२३ आजीव सदस्य आहेत. संघटनेला प्राप्त होणारी आर्थिक मदत एकेकाळी १९५३ मध्ये ती १००० रुपये होती त्यामध्ये लक्षणीय सुधारणा होऊन हे आर्थिक सहकार्य रु. २०,५२,३१० इतके झालेले आहे. संघाला अधिक स्थैर्य प्राप्त होण्यासाठी विशेष करुन संघाद्वारे राबविले जाणारे प्रशिक्षण उपक्रम व इतर प्रकल्प यांची खूपच मदत झालेली आहे. गेली कित्येक वर्षे या संघाचे कार्य हरदयाल नगरपरिषद दिल्ली, गांधी क्रिडांगण येथून दिर्घकाळ चालविले जात होते.१९८० च्या कालखंडात संघाद्वारे स्वत:ची इमारत दक्षिण – पश्चिम दिल्लीतील नरीन विहार या परिसरात उभी केलेली असून या इमारतीला डॉ. एस.आर. रंगनाथन यांचे नाव देण्यात आले आहे. या स्वत:च्या इमारतीमधून १९८९ पासून संघाचे कार्य सुरू ठेवलेले आहे.

संघाचे सगळे उपक्रम हे २२ सदस्यांच्या कार्यकारी समितीद्वारे पाहिले जात असून या सदस्यांची नियुक्ती सर्वसाधारण सभेमध्ये केली जाते. कार्य सुलभतेसाठी संघाद्वारे विविध उपसमित्यांची स्थापना करण्यात आली असून यामध्ये साधारणत: आर्थिक समिती,

प्रशासकिय समिती, आय.टी. समिती या समितींचा समावेश आहे. या समितीद्वारे संघाचे उपक्रम प्रभावीपणे चालविण्यासाठी या उपसमितींचा सल्ला व सहकार्य घेतले जाते. या संघाच्या यशस्वीतेचे रहस्य हे सातत्यपूर्वक गेले काही दशके विविध व्यक्तींच्या सेवाभावी स्वरुपात पदाधिकारी पदावरुन दिलेले योगदान यामुळे शक्य झालेले आहे. संघाद्वारे १९५५ पासून प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात आलेला असून आजवर जवळजवळ ७५०० विद्यार्थ्यांना याचा लाभ घेतलेला आहे. आज ही या अभ्यासक्रमाचे महत्त्व आबाधीत असून प्रत्येक वर्षी साधारण ५०–१०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची नेहमीच गर्दी होते. हा एक सकाळच्या सत्रात चालविलेला एक वर्ष कालावधीचा उपक्रम असून सातत्यपूर्वक तो अद्ययावत करण्यात आलेला आहे. या अभ्यासक्रमासाठी अनुभवी शिक्षक मानद स्वरुपात योगदान देत असल्यामुळे व या अभ्यासक्रमास भारत सरकारची मान्यता असल्याने नोकरीच्या दृष्टीने आज ही हा अभ्यासक्रम प्रकाश झोतात आहे.

या संघाद्वारे प्रकाशन विषयक विविध उपक्रम राबविले जात असून यामध्ये, 'लायब्ररी हेरॉल्ड' हे नियतकालीक १९५८ पासून सातत्यपूर्वक प्रकाशित करण्यात आलेले आहे. सदस्यांना यांचे अंक मोफत पुरविले जातात. या नियतकालिकांचे वर्गणीदार जगभर विखूरलेले आहेत.

संघटनेद्वारे चर्चासत्रे, परिषदा, विशेष व्याख्याने यांचे सातत्यपूर्वक आयोजन केले जात असून याच पार्श्वभूमीवर प्राध्यापक एस.दास गुप्ता व्याख्यानमाला ही प्रत्येक वर्षाच्या १० मार्च रोजी आयोजित केली जाते. तसेच डॉ. रंगनाथन यांच्या स्मरणार्थ व्याख्यानमाला १२ ऑगस्ट रोजी दरवर्षी आयोजित केली जाते. तर प्राध्यापक पी.एन.कौला संस्मरण व्याख्यानमाला ही राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताहच्या काळात दरवर्षी नोव्हेंबर मध्ये आयोजित केली जाते. येथील विद्यार्थ्यांच्यामध्ये वाचन अभिरुची वृद्धिंगत करण्यासाठी ७ वी व ९ वी तील विद्यार्थ्यांकरिता निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. सध्या या संघाचे अध्यक्ष म्हणून प्राध्यापक सी.पी.वसिष्ठ हे काम पाहत असून उपाध्यक्ष म्हणून डॉ. रवींद्रकुमार शर्मा व डॉ. एस. के. वाजपेयी हे कार्यरत आहेत. मुख्यसचिव हे जर्नादन नारायण सिंग तर खजिनदार डॉ. के. पी.सिंग, सचिव नबीहसन, सचिव श्री. कुमार व इतर पदाधिकारी आहेत.

२०१५ –१६ या वर्षी संघाद्वारे ७८ वा स्थापन दिवस १० मार्च २०१६ रोजी रंगनाथन भवन, नरीना विहार, नवी दिल्ली येथे साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डेल नेट चे संचालक डॉ. एच.के. कौल हे उपस्थित होते. या प्रसंगी दोन पारितोषिके देण्यात आली.

१. **डॉ. ए. एल. मुर्ती सेवानिवृत्त संचालक डेसीडॉक जीवन गौरव पुरस्कार २०१५**
   वैयक्तिक कामानिमित्त डॉ. ए.एल.मुर्ती या कार्यक्रमास उपस्थित राहिले नव्हते.
२. **दिल्ली ग्रंथालय संघ व्यवसायिकता आदर्श पुरस्कार २०१५ : हा पुरस्कार डॉ. जगदीश अरोरा (डायरेक्टर ऑफ इन्फ्लिबनेट, गुजरात) यांना देण्यात आला.** या प्रसंगी दास गुप्ता मेमोरियल व्याख्यानमालेच्या १७ व्या समारंभ प्रसंगी डॉ. एच.के. कौल यांनी 'ग्रंथालय व्यावसायिका समोरील आव्हाने' या विषयावर व्याख्यान दिले.
३. १३ व्या रंगनाथन स्मरण व्याख्यानमालेत या वर्षी १२ ऑगस्ट २०१५ या ग्रंथपाल दिनाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथालये आणि संस्कृती यातील संपर्कस्थाने या विषयावर सौ. निती सक्सेना यांनी व्याख्यान दिले.
४. प्रा. पी.एन.कौल स्मरण व्याख्यान मालेत डॉ. रमेश सी. गौर (ग्रंथपाल, जवाहरलाल नेहरु विद्यापीठ नवी दिल्ली) यानी 'भविष्यातील ग्रंथालयांचा वेध आणि डिजीटल युगातील ग्रंथपालांची बदलती भुमिका' या विषयावर व्याख्यान दिले.
५. प्रा. दास गुप्ता स्मरण पदक या वर्षी श्री. राहूल कुमार सिंग या विद्यार्थ्यांस देण्यात आले.
६. एन.के.गोयल पारितोषिक सौ. कुसुम शर्मा यांना देण्यात आले. वरील दोन्ही पारितोषिके १० मार्च २०१६ रोजीच्या संघाच्या स्थापन दिना दिवशी देण्यात आली. तसेच डॉ. एस.आर. रंगनाथन पारितोषिक सौ. सीमा राणी व जोगिंदर सिंग स्कॉलरशीप ही सौ. उपासना यांना देण्यात आले.

संघाचे मुखपत्र 'लायब्ररी हेरॉल्ड' याचा ५३ वा व ५४ वा अंक मार्च २००० मध्ये प्रकाशित करण्यात आला. हा अंक ई – नियतकालिक स्वरुपात प्रकाशित करण्यासाठी ही

आवश्यक त्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. सध्या संघाच्या सभासदांची वर्गणी पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| विश्वस्त | – | रुपये ३०,००० |
| आजीव सभासद | – | रुपये ५,००० |
| सर्वसाधारण सभासद | – | रुपये १,००० |
| विद्यार्थी सभासद | – | रुपये १,००० |
| संस्था सदस्य | – | रुपये ५,००० |

एकदाच संस्था सदस्यवत शुल्क१,००,००० रुपये इतके आहे. संघाने स्व:ताची www.dlaindia.in ही वेबसाईट सुरु केली असून संस्थेचे सचिव डॉ. जयंतसिंग यांच्याद्वारे वेबसाईटची देखभाल केली जाते. या संघाच्या कार्यालयास भेट देऊन अनेक नामवंतांनी संघाच्या कार्याचे कौतुक केले आहे.

***

## प्रकरण ४ थे

# विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायदा, समित्या व आयोग

४.१ प्रस्तावना

४.२ ग्रंथमुद्रण व नोंदणी कायदा १८६७

४.३ इंपिरियल लायब्ररी व्हॅलिडेशन अॅक्ट १९०२

४.४ आदर्श ग्रंथालय कायदा

४.५ सार्वजनिक ग्रंथालय सल्लागार समिती, कायदे व प्रस्ताव

४.६ पंचवार्षिक योजना आणि सार्वजनिक ग्रंथालयाची वाटचाल

४.७ आंध्रप्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६०

४.८ महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७

४.९ हरयाणा राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८९

४.१० केरळ राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८९

४.११ तमिळनाडू राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८

४.१२ कर्नाटक राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६५

४.१३ पश्चिम बंगाल राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९७९

४.१४ मणिपूर राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८८

४.१५ मिझोरम राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९९३

४.१६ गोवा राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९९३

४.१७ राजस्थान राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६

४.१८ उत्तर प्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६

४.१९ बिहार राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००८

४.२० छत्तीसगढ राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००८

४.२१ ग्रंथवाटप (सार्वजनिक ग्रंथालय) नियम १९५५

४.२२ ग्रंथ आणि दैनिक वाटप

४.२३ राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता

४.२४ राष्ट्रीय ज्ञान आयोग भारतीय ग्रंथालय व माहितीशास्त्रविषयक धोरण

४.२५ राष्ट्रीय ग्रंथालय मिशनच्या योजनांची माहिती

**प्रकरण ४ थे**

# विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायदा, समित्या व आयोग

**४.१ प्रस्तावना :**

सार्वजनिक ग्रंथालयाची वाटचाल आपल्या देशात खऱ्या अर्थाने सुरु झाली ती ब्रिटिश कालखंडात; पुढे स्वातंत्र्योत्तर कालखंडात केंद्र शासन आणि राज्य शासन स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास व्हावा या दृष्टीने विचार विनिमय करण्यासाठी काही समित्यांचे गठन अस्थायी स्वरुपात करुन या समित्यांवर सदस्यांची नियुक्ती केल्याचे निदर्शनास येते. या समित्यांची निर्मिती प्रसंगी विभागापुरती वा राज्या पुरती मर्यादित होती. तर काही वेळा त्यांचे क्षेत्र देशपातळी स्वरुपाचे होते. अशा प्रकारच्या समित्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार प्रदान करण्यात आलेले नव्हते. सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्थेचा आढावा घेणे व वास्तवता पडताळून ग्रंथालयांच्या विकासातील त्रुटी वा उणीवा निदर्शनास आणून विकासात्मक वाटचालीकरिता शिफारशी करण्या इतकीच या समित्यांची मर्यादा असल्यामुळे या समित्यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या शिफारशीचा स्वीकार करणे आणि त्यांची प्रत्यक्षात अम्मलबजावणी करणे बंधनकारक नव्हते. अशा समित्यांनी वेळोवेळी केलेल्या शिफारशी वा सूचना बऱ्याच वेळेस प्रत्यक्षात येऊ शकलेल्या नाहीत.

वास्तविक पहाता स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपण लोकशाही प्रणाली स्विकारली. लोकशाही प्रणालीचा आत्मा म्हणजे शिक्षण प्रसार आणि त्याचबरोबर या सुशिक्षित लोकांना सुजाण बनविणे हे ही या प्रणाली अंतर्गत अपेक्षित होते. आपल्या भागाचे प्रतिनिधित्व करणारे प्रतिनिधी लोकशाही मार्गाने निवडून देताना आपला देश, परिसर, राज्य या घटकांचा सुजाणपणे विचार करुन आपल्याला प्राप्त झालेल्या मतांचा अधिकार सुजाणवृत्तीने करण्यासाठी शिक्षण व ग्रंथालयप्रसार यांची आपल्या देशात अत्यावश्यक होती व आहे. या पार्श्वभूमीवर विचार करता ग्रंथहक्क व ग्रंथालय विषयक कायदे, विविध समित्या व आयोग यावर दृष्टीक्षेप टाकणे आवश्यक ठरते.

मुद्रण व्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वी हस्तलिखित स्वरुपातील ग्रंथाच्या प्रती तयार करत असताना मालकी हक्कासंबंधित हक्क सांगितला जात नसे; यामुळे पुस्तकांच्या सहजासहजी प्रती करुन त्याचे वितरण करणे सहज शक्य होत असे. अशा प्रतिवर मूळ लेखकाचेही योगदान मान्य करण्यात येऊन त्याचा निर्देशही केला जात असे. त्यामुळे मालकी हक्काबद्दल फारशी समस्या होत नसे. मुद्रण व्यवस्था अस्तित्वात आल्यावर पुढे पुनरमुद्रण करणे सुलभ होऊ लागले आणि या प्रक्रियेमध्ये मूळ लेखकाच्या मुलभूत हक्काना धक्का लागला आणि यातूनच पुढे ग्रंथहक्क कायदा अस्तित्वात आला. ग्रंथ व्यवहाराच्या पुढील वाटचालीत आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच त्याचे ध्वनीमुद्रण करणे, छायाचित्रण करणे व इतर कलाकृतीसाठी मूळ लेखनाचा वापर करणे हे दुर्लक्षित होऊ लागले या सर्वानाच एक शिस्त यावी म्हणून ग्रंथ हक्क कायदा पुढे अस्तित्वात आला अर्थात हे सहजासहजी घडले असे नाही. जागतिक स्तरावर या संदर्भात चर्चा होऊन अशा स्वरुपाचा ग्रंथहक्कसंकेत युनोत्स्कोने १९५२ मध्ये लागू केला. तत्कालीन स्थितीमध्ये भारताने हा संकेत स्विकारला. पुढे १९५८ मध्ये भारतात हा कायदा अस्तित्वात आला.

या कायद्या संदर्भात एकूणच बौध्दिक पातळीवरील निर्णय घेऊन वाङ्मय, नाट्य, कलात्मक कार्ये, चलचित्रे आणि ध्वनिमुद्रण याचा समावेश सुरुवातीस करण्यात आला होता. या सर्वच बाबीकरिता विविध तरतूदी सुचविण्यात आल्या होत्या. ग्रंथ वा इतर बौध्दिक निर्मिती संदर्भात असा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रंथालय विषयक कायदे भारतात ब्रिटिश अंमलाखाली अस्तित्वात आले होते. याही कायद्याचा संबंध ग्रंथ निर्मितीशी होता. अशा कायद्याअंतर्गत पहिला मुद्रणविषयक कायदा अस्तित्वात आला. केवळ ग्रंथालयांच्या संदर्भात विचार करावयाचा तर विविध समित्या, आयोग आणि कायदे याद्वारे शासन स्तरावर विविध प्रयत्न केलेले आहेत. यासंदर्भातील नीतीबाबतचे प्रश्नमात्र, विविध समस्यामुळे गुंतागुंतीचे ठरलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणात या सर्वांचे स्वरुप मांडण्यात आलेले आहे.

### ४.२ ग्रंथमुद्रण व नोंदणी कायदा १८६७ :

भारतात इंग्रजी राजवट सुरु असताना त्याना या देशामध्ये कोणत्या स्वरुपाचे मुद्रण होते व कोणकोणत्या प्रकारचे साहित्य वा लेखन प्रकाशित केले जाते याची त्याना राजसत्तेच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने जरुर भासू लागली. सामाजिक प्रबोधनाच्या या घटकावर एक प्रकारे नियंत्रण ठेवण्यासाठी प्रस्तुत कायद्याची निर्मिती तत्कालीन ब्रिटिश सरकारने केली होती. अशा नियंत्रणासाठी त्या त्या विभागात मुद्रकाने छापलेल्या ग्रंथाची एक प्रत किंवा एकपेक्षा अधिक प्रती सरकारच्या आदेशानुसार सरकारला मोफत पुरविण्याची तरतूद या कायद्याअंतर्गत करण्यात आलेली होती. अशा मुद्रित पुस्तकाची त्रैमासिक सूची बनवून ती प्रकाशित करणे हे ही ह्या कायद्या अंतर्गत अभिप्रेत होते. या सूचीअंतर्गत पुस्तक विषयक इतर तपशील नमूद करणे हे ही बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले होते. विभागीय शासनाकडे प्राप्त झालेल्या अशा प्रती पैकी केंद्रशासनाकडे एक एक प्रत सूपुर्द करणे आवश्यक होते आणि यापैकी एक प्रत इंग्लंडमधील भारत कार्यालयाकडे पोहचविली जात असे. अशा या तरतूदीमध्ये भारतात प्रकाशित केलेल्या बहुतांशी पुस्तकाचा संग्रह इंडिया ऑफीसच्या कार्यालयात संग्रहीत करण्यात आला. पुढे भाषावार त्याची तालिकाही तयार करण्यात आली. १८०१ मध्ये स्थापन झालेल्या इंडिया ऑफीस ग्रंथालयात त्या काळात अशा पुस्तकाची संख्या अधिक होती.

मुद्रण कायदा १८६७ मध्ये प्रत्यक्षात येण्यापूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकांना 'इनक्युनाब्युला' हा शब्द रुढ होता. मराठी भाषेतील अशा पुस्तकांकरीता ज्येष्ठ संशोधक स्व. अ. का. प्रियोळकर यांनी 'दोलामुद्रिते' हा मराठी भाषेतील शब्द रुढ केलेला आहे.

### ४.३ इंपिरियल लायब्ररी व्हॅलिडेशन ॲक्ट १९०२ :

लॉर्ड कर्झन यांनी ३० जून १९०२ रोजी या कायद्यान्वये कलकत्ता येथे सार्वजनिक ग्रंथालयाचे नामकरण इंपिरियल ग्रंथालय असे करुन या ठिकाणी भारतासंदर्भात लिहिलेला सर्व मजकूर येथे उपलब्ध व्हावा अशी तरतूद या कायद्यान्वये करण्यात आली होती.

या पाठीमागे हा उद्देश होता की भविष्यात समग्र ग्रंथालय व्हावे आणि पुढील काळात भारताविषयक इतिहास लेखनास उपयुक्त ठरणारे सर्वांगीण साहित्य एकत्रित स्वरुपात येथे उपलब्ध व्हावे या विचाराने हा कायदा तयार करण्यात आलेला होता. याच ग्रंथालयाचे पुढे राष्ट्रीय ग्रंथालय कलकता असे नामकरण स्वातंत्र्योत्तर काळात करण्यात आले.

## ४.४ आदर्श ग्रंथालय कायदा :

असा कायदा असावा व ग्रंथालय विकासास त्याचा सर्वांगीण स्वरुपात उपयोग व्हावा या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या प्रस्तावास आदर्श ग्रंथालय कायद्याच्या मसुद्यास कायद्याचे स्वरुप प्राप्त होते आणि अशा कायद्यास संबंधित शासनाच्या विधीमंडळापुढे सादर केल्यानंतर त्यास मंजुरी प्राप्त होताच त्याला कायद्याचे स्वरुप प्राप्त होते. असा प्रयत्न बनारस येथे संपन्न झालेल्या अखिल आशियाच्या शिक्षण परिषदेमध्ये डॉ. रंगनाथन यांनी केलेला होता. डॉ. रंगनाथन यांनी परिश्रमपूर्वक केलेल्या या मसुद्यामध्ये राज्य, केंद्र स्तरावर ग्रंथालय पध्दत लागू करण्यात यावी आणि या ग्रंथालयाचे संघटन व विकास करण्याचे धोरण असावे या विषयक एक विधेयक तयार करुन प्रस्तुत परिषदेसमोर ते सादर केले होते. या विधेयकाच्या मुद्याअंतर्गत राज्यातील शिक्षणमंत्री हा त्या राज्यातील ग्रंथालयानी कारभाराचा मुख्य समजला जावा. त्याने राज्य ग्रंथपालाची नेमणूक करावी आणि प्रत्येक राज्यात ग्रंथालय समिती स्थापन करुन तिच्या सल्ल्यानुसार राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचा कारभार चालवावा असे सुचविण्यात आले होते. प्रत्येक ५०,००० वस्तीच्या शहराकरीता एक शहर ग्रंथालय असावे व शिवाय जिल्हा, तालुका स्तरावर ग्रंथालये असावीत. त्या त्या विभागांत व त्यांच्या सल्ल्याने कारभार चालवावा. राज्यस्तरावर शासनाच्या अनुमतीने प्रसंगी स्थानिक पातळीवर गठित करण्यात आलेल्या समितीस ग्रंथालय कर आकारण्याचाही हक्क असावा.

अशा कायद्यासाठी वारंवार प्रयत्न करुन ते राज्य ग्रंथालय विषयक परिषदेमध्ये मांडण्याचा प्रयत्न १९३१ मध्ये बंगालमध्ये,१९३३ मध्ये मद्रासमध्ये करण्यात आला. त्यास फारसा प्रतिसाद प्राप्त झाला नव्हता. डॉ. रंगनाथन यांनी १९४६ मध्ये पुनश्चः हा प्रयत्न मध्य प्रांतासाठी केला. त्याला नकारात्मक प्रतिसाद प्राप्त झाला. १९४७ मध्ये पुनश्चः त्रावणखोर परिसरासाठी असा मसुदा तयार करुन रंगनाथन यांनी पाठवला. हा ही प्रयत्न असफल ठरला. एकूणच स्वातंत्रपूर्व कालखंडामध्ये ग्रंथालय कायद्याविषयक कोणतीही तरतूद सकारात्मक दृष्टिकोनातून विचारात घेण्यात आली नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये असे प्रयत्न करताना या प्रयत्नांना प्राप्त झालेले यश व प्रत्यक्षात अस्तित्वात आलेले कायदे

विषयक मसुदे व समित्या संदर्भात अहवालातंर्गत शिफारशींचा आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

### १) इम्पेरीयल ग्रंथालय नामंतर प्रस्ताव (१९४८) :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रंथालयविषयक मंजूर करण्यात आलेला हा पहिला कायदा होय. हा कलकत्ता येथील इम्पेरीयल ग्रंथालयाचे नाव बदलण्यासंदर्भात करण्यात आलेला होता. या कायद्याअन्वये १९०२ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी कलकत्ता ग्रंथालयास दिलेले इम्पोरीयल लायब्ररी नावात बदल करुन त्याचे नामकरण राष्ट्रीय ग्रंथालय (नॅशनल लायब्ररी) असे करण्यात आले.

### २) सार्वजनिक ग्रंथालयासाठी ग्रंथ वितरण कायदा १९५४

(Delivery of books for public libraries act - 1954)

भारत सरकारने ग्रंथालयासाठी केलेला हा दुसरा कायदा. त्या अन्वये भारतात प्रसिध्द होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाची एकेक प्रत प्रसिध्द झाल्यापासून एक महिना होण्याचे आत प्रकाशकाने स्वतःच्या खर्चाने पुढील ग्रंथालयाना विनामूल्य पाठवण्याची तरतूद करण्यात आली होती. १) राष्ट्रीय ग्रंथालय कलकत्ता २)एशियाटिक सोसायटीक ग्रंथालय, टाऊन हॉल मुंबई  ३) कन्नेमेरा लायब्ररी मद्रास

हा कायदा १९५६ साली सुधारण्यात आला व तो देशात प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रानाही लागू करण्यात आला. हा कायदा राज्यसरकार व केंद्र सरकारनासुध्दा केवळ कार्यालयीन कामासाठी प्रकाशित केलेल्या माहिती पत्रकाखेरीज इतर प्रकाशनाच्या बाबतीत लागू करण्यात आला. या कायद्याने पुस्तकाना राष्ट्रीय संरक्षण प्राप्त होण्याचा पाया रोवला गेला असे म्हटले जाते.

### ३) सार्वजनिक ग्रंथालयासाठी आदर्श प्रस्ताव (१९६३) :

भारतामध्ये सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली अस्तित्वात आणण्यासाठी प्रशासनाव्दारे १९६० मध्ये एक समिती गठित करण्यात आलेली होती या समितीने आपला अहवाल १९६३ मध्ये सुपुर्द केला. केंद्र शासनाने तो अहवाल राज्य शासनाकडे त्याचे अम्मलबजावणी करण्यासाठी पाठविला. या प्रस्तवाअंतर्गत प्रत्येक राज्याने आपल्या राज्यात एक मध्यवर्ती

ग्रंथालय स्थापावे त्यासाठी राज्य ग्रंथालय परिषद स्थापन करण्यात यावी आणि ग्रंथालय संदर्भातील तांत्रिक घटकाबाबत सल्ला देण्यासाठी एकत्रित समिती गठित करण्यात यावी, तसेच राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कारभारात एकसूत्रीपणा येण्यासाठी स्वतंत्र ग्रंथालय संचालनालय असावे. अशी सूचना करण्यात आलेली होती. याचबरोबर जिल्हा स्तरावर जिल्हा समिती स्थापून त्याव्दारे सार्वजनिक ग्रंथालयाचा जिल्ह्यातील कारभार पाहण्यात यावा अशी सूचना केलेली होती. या समितीने सरचार्ज दर रुपये ६ पैसे प्रमाणे आकारण्याचा अधिकार देण्याविषयी तरतूदही या प्रस्तावाअंतर्गत एक प्रस्ताव सुचविण्यात आला होता.

**४) खुदाबक्ष सार्वजनिक ग्रंथालय कायदा**

(Khudabakash Oriental Public Library Act)

पाटणा येथील खुदाबक्ष ग्रंथालय हे १९ व्या शतकाच्या अखेरीस स्थापन करण्यात आले होते. दुर्मिळ अशा पार्शियन अरेबिक भाषेतील संग्रह येथे करण्यात आला होता हे ग्रंथालय ताब्यात घेण्यासाठी, भारत सरकारने त्यांचे राष्ट्रीयकरण करण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आलेला होता. या कायद्याअंतर्गत या ग्रंथालयास राष्ट्रीय महत्वाचे ग्रंथालय म्हणून संबोधण्यात येऊन त्याच्या व्यवस्थापनेसाठी राज्याच्या राज्यपालाच्या अध्यतेखाली एक मंडळ गठित करण्याची तरतूद करण्यात आलेली होती.

### ४.५ सार्वजनिक ग्रंथालय सल्लागार समिती, कायदे व प्रस्ताव :

### १. सिन्हा समिती :

भारत सरकारने देशातील सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्थेचा सर्वांगीण अभ्यास करुन ग्रंथालय विकासाच्या दृष्टीने एक अहवाल तयार करावा याकरिता डॉ. ए. पी. सिन्हा, संचालक, सार्वजनिक सूचना विभाग बिहार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती १९५७ मध्ये स्थापन करण्यात आली होती. या समितीने देशातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या तत्कालीन स्थितीचा अभ्यास करुन आपला अहवालामध्ये काही सूचना सादर केलेल्या होत्या. या सूचना त्यांनी १२ नोव्हेंबर १९५८ रोजी शिक्षणमंत्री डॉ. के. एल. श्रीमाळी यांच्याकडे सुपुर्द केलेल्या होत्या. या सुचनांचे स्वरुप –

१) भारतातील प्रत्येक नागरीकासाठी ग्रंथालय सेवा मोफत स्वरुपात उपलब्ध झाली पाहिजे.

२) या देशातील ग्रंथालय प्रणालीची सुरुवात ही राष्ट्रीय ग्रंथालय, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालय, गट ग्रंथालय आणि पंचायत अशा स्वरुपात अस्तित्वात येणे गरजेचे आहे.

३) प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र संचालकाची नेमणूक सामाजिक शिक्षण आणि ग्रंथालये यांच्याकरिता राज्य स्तरावर करण्यात यावी याकरिता पूर्णवेळ वर्ग अधिकारी साधारणत: उपसंचालक शिक्षण विभाग या दर्जाचा नेमण्यात येऊन त्याच्याद्वारे सार्वजनिक ग्रंथालयविषयक योजना, संघटन आणि प्रशासन आणि जिल्हा ग्रंथालये यावर नियंत्रण ठेवण्याची तरतूद केली पाहिजे.

४) अखिल भारतीय ग्रंथालय सल्लागार परिषद केंद्रीय स्तरावर गठित करुन याद्वारे राज्य स्तरावरील कामकाजाचा आढावा, पडताळणी या समितीद्वारे करण्यात यावी.

५) ग्रंथालय संघाने देशातील ग्रंथालयाच्या विकासाकरीता अधिकाअधिक कृतीशील राहून अधिकाधिक सहभाग दर्शवावा व सहकार्य करावे.

६) विद्यापीठ ग्रंथालयानी सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीस सहकार्य करुन निवडक सार्वजनिक ग्रंथालयाच्या वाचकाना आपल्याकडील ग्रंथालयाचा वापर करण्यासाठी सहकार्य करावे.

७) राज्य शासनाने सार्वजनिक ग्रंथालय सेवेमार्फत आपआपल्या राज्यामध्ये जबाबदारी स्विकारावी.

८) ग्रंथापालानी समाजशिक्षण कार्य करताना सहकार्य करुन साक्षरता विकासाकरीता ग्रंथालय कर म्हणून मालमत्ता करामध्ये ६ पैसे प्रती रुपया एवढी रक्कम घेण्यात यावी व तिची वसुली करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संघाना देण्यात यावेत. या करापासून जो निधी गोळा होईल तेवढाच निधी सरकारने त्यामध्ये जमा करावा ही सर्व रक्कम ग्रंथालयाच्या इमारतीसाठी तसेच नित्य देखभालीसाठी खर्च करण्यात यावी.

९) ग्रंथालय निधीकरीता स्वतंत्र ग्रंथालय निधीची स्थापना करण्यात यावी. योग्य नियंत्रण ठेवून विविध स्तरावरील ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाकरीता तो उपयोगात आणावा.

१०) राज्य व केंद्रशासनाने ग्रंथालय कायदा आपआपल्या राज्यामध्ये पारीत करुन नागरीकास मोफत ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन द्यावी. केंद्र शासनाने याकरीता राज्य शासनाना आवश्यक ते आर्थिक सहाय्य करावे. या समितीने वरील महत्वपूर्ण सूचना सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाच्या दृष्टीने सुचविलेल्या होत्या मात्र यापैकी फारच कमी प्रमाणात या शिफारशी स्विकारुन त्याची अम्मलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे आजही सार्वजनिक ग्रंथालयाचा अपेक्षित विकास झालेला दिसून येत नाही.

**२) फैजी समिती :**

राज्य स्तरावरील ग्रंथालयाचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून पहिल्यांदा १९३९–४० मध्ये मुंबई प्रांताने श्री. ए. ए. फैजी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. ही फैजी समिती म्हणून ओळखली जाते. या समितीचे क्षेत्र मर्यादा ही तत्कालीन मुंबई प्रांतातील मध्यवर्ती विभाग व काही विभागीय ग्रंथालये एवढ्यापुरतीच मर्यादित होती. असे असतानाही या समितीने मुंबई प्रांतातील एकूणच ग्रंथालय विकासाचे स्वरुप ठरविताना ६ टप्प्यात विचार केलेला होता. किमान १००० पर्यंत लोकवस्ती आहे अशा ठिकाणी ग्रंथालये स्थापन करण्याचा विचार करुन ही एक योजना तयार केली होती.

या योजनेअंतर्गत सुचविलेल्या टप्प्यामध्ये पहिल्या टप्प्यामध्ये मध्यवर्ती ग्रंथालयाची (०३) विभागीय ग्रंथालये यांची स्थापना राज्यात करणे. दुसऱ्या टप्प्याअंतर्गत राज्यातील (१५) जिल्ह्यांमध्ये मुंबई प्रांतात जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करणे. तिसऱ्या टप्प्या अंतर्गत तालुका स्तरावर अथवा पेठा स्तरावर १६७ ग्रंथालयाची स्थापना करणे आणि १०० ग्रंथालयाची स्थापना शहरी स्तरावर करणे. ही शहरी ग्रंथालय तालुका ग्रंथालयाच्या दर्जाची असावीत असेही या समितीव्दारे सुचविण्यात आले होते. चौथ्या टप्प्याअंतर्गत ग्रामीण स्तरावर जसे लोकसंख्या २००० पर्यंत आहे अशा ९७९ खेड्यातून ग्रंथालयाची स्थापना करण्यात यावी. पाचव्या टप्प्याअंतर्गत १००० ते २००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या खेड्यातून २६७६ ग्रंथालये स्थापन करण्यात यावीत. सहाव्या टप्प्याअंतर्गत ज्या खेड्यातली लोकसंख्या १०००हून कमी आहे अशा ठिकाणी १७७५३ खेड्यातून ग्रंथालयाची स्थापना करण्यात यावी, अशी शिफारस या समितीने केली होती. पुरेशा निधीच्या अभावी तत्कालीन महाराष्ट्र शासनास फैजी समितीने सार्वजनिक ग्रंथालय विषयक सुचविलेली जिल्हास्तरीय योजना पूर्णत्वास नेता आली नाही. असे असले तरी या शिफारसी अंतर्गत पुढे २ टप्पे पूर्ण करण्यातआलेले असून राज्यात मुंबई येथे मध्यवर्ती ग्रंथालय व पुणे धारवाड, अमहमदाबाद या ठिकाणी विभागीय ग्रंथालये स्थापन करण्यात आली.

पूर्वी अहमदाबाद, धारवाड हा भाग तत्कालीन मुंबई इलाक्यात असल्यामुळे तेथे विभागीय ग्रंथालये स्थापन करण्यात आली होती. तसेच १५ जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली होती. त्या काळात ही योजना पूर्णत्वास नेण्यास जवळपास रु. १५,००,०००/- निधीची आवश्यकता होती.

**३) न्या. एकबोटे समिती :**

१९७६च्या कालखंडात आंध्रप्रदेश सरकारने न्या. गोपाळराव एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. या समितीचा हा उद्‌देश होता की १९६० मध्ये या राज्यात मंजूर करण्यात आलेल्या सार्वजनिक ग्रंथालय कायद्याची अम्मलबजावणी कितपत झाली आहे यासाठी ही समिती गठित करण्यात आली होती. या समितीकडे राज्यातील कायद्याच्या अम्मलबजावणी संदर्भात आढावा घेऊन आवश्यक त्या दुरुस्त्या

सुचविण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. या समितीने काही महत्वपूर्ण शिफारसी केल्या होत्या आणि आंध्र शासनानेही या समितीच्या अहवाला संदर्भातील कार्यवाही बाबत आवश्यक ती प्रभावी पावले उचलली नव्हती.

पुढे १९७८ मध्ये आंध्र शासनाने अनुदान प्राप्त होत असलेल्या खाजगी ग्रंथालयाच्या वास्तवदर्शी स्थितीचा आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करण्यासाठी १९७८ मध्ये व्हि. गोपाल कृष्णय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने अनुदान वितरण विषयक महत्वपूर्ण सचना केलेल्या होत्या. या सूचनांचा शासनाने साकल्याने विचार करुन अधिकाधिक सूचनांची पूर्तता करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**४) श्री. व्हि. एन. सुब्बारॉय समिती (१९७४) :**

तामिळनाडू राज्यात १९७४ मध्ये श्री. व्ही. एन. सुब्बारॉय याच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय विषयक समितीचा आढावा घेण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. या समितीनेही राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी काही महत्वपूर्ण शिफारसी केल्या होत्या. यापैकी बहुतांशी शिफारशी स्विकारुन त्याची अम्मलबजावणी केलेली आहे. अशा अम्मलबजावणीमध्ये प्रामुख्याने प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा ग्रंथालय अधिकारी नेमण्यात येऊन या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्थापन सुव्यवस्थित करण्यात आले. पुढे १९७८ मध्ये सुब्बाराम समितीच्या शिफारसींचा चिकित्सक अभ्यास करुन त्याच्या अम्मलबजावणीकरिता शासनाने श्री. श्रीनिवासन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. या समितीने चिकित्सक स्वरुपात काही शिफारशी केल्या आणि या शिफारशींची तामिळनाडू शासनाने दखल घेऊन नोव्हेंबर १९७८ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग, या कर्मचारी वर्गाच्या कुटुंबाकरिता निर्वाहनिधी, सेवानिवृत्ती पश्चातनिधी अशा महत्वपूर्ण तरतूदी शासनाव्दारे स्विकारण्यात आल्या.

**५) राष्ट्रीय ग्रंथालय प्रस्ताव (१९७२) :**

१९७२ च्या कालखंडात इम्पिरियल ग्रंथालयाच्या नावामध्ये बदल करण्यासाठी भारत सरकारने १९४८ मध्ये पहिला कायदा मंजूर केला आणि राष्ट्रीय ग्रंथालय असे त्याचे

नामकरण केले पुढे हे ग्रंथालय एक स्वायत्त:संस्था म्हणून कार्यरत रहावे म्हणून डिसेंबर १९७२ मध्ये लोकसभेत बिल मांडण्यात आले. या बिलास विरोधी पक्षानी प्रखर विरोध दर्शविल्यामुळे ते सिलेक्ट कमिटीकडे सादर करण्यात आले.

याच पार्श्वभूमीवर पुढे राष्ट्रीय ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाकरिता कायद्याअंतर्गत तरतूदीनुसार एक मंडळ नेमण्यात आले, आणि एक सल्लागार मंडळ नामनिर्देशित करण्यात आले या व्यवस्थापन मंडळाकडे २००२ मध्ये राष्ट्रीय ग्रंथालयाचे व्यवस्थापन सोपविण्यात आले. या सल्लागार मंडळाचा कालखंड ३ वर्षांचा असून व्यवस्थापन मंडळाचा कालखंड १ वर्षासाठी आहे. या सल्लागार समितीव्दारे धोरण विषयक सल्ला राष्ट्रीय ग्रंथालयाच्या विकासाच्या पार्श्वभूमीवर देण्यात येतो. वार्षिक कृती योजना याला देखील सल्लागार समितीव्दारे वेळोवेळी मान्यता देण्यात येते आणि व्यवस्थापन मंडळ वार्षिक कृती योजना तयार करुन त्याच्यावर नियंत्रण ठेवते. त्याचा अहवाल सल्लागार मंहळाकडे सुपुर्द करण्यात येतो. तसेच केंद्रशासनाच्या सांस्कृतिक विभागाकडे दर त्रैमासिक हा अहवाल सादर केला जातो.

**६) राज राममोहन रॉय प्रतिष्ठान (१९७२) :**

केंद्रीय सांस्कृतिक विभागाद्वारे २० मे १९७२ मध्ये राजा राममोहन रॉय यांच्या व्दिजन्मशताब्दीच्या पार्श्वभूमीवर राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची एक वाचन संस्था म्हणून स्थापन करण्यात आली. या संस्थेच्या माध्यमातून भारतातील सार्वजनिक ग्रंथालयाची स्थिती सुधारावी त्याना आर्थिक व वाचन साहित्य विकास सहकार्य प्राप्त व्हावे, त्यांचा कारभार सुरळीत चालून देशातील ग्रंथालयाविषयक सर्व धोरणे व्यवस्थितपणे तयार केली जावीत. या उद्‌देशातून या प्रतिष्ठानाची १९७२ मध्ये स्थापना करुन त्याचे उपविभाग दिल्ली, मुंबई, चेन्नई येथे स्थापन करण्यात आले.

**४.६ पंचवार्षिक योजना आणि सार्वजनिक ग्रंथालयाची वाटचाल –**

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये ग्रंथालय विकास विषयक विचार करुन स्वतंत्र विभाग या दृष्टीकोनातून सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकास विषयक धोरण प्रत्येक पंचवार्षिक योजनेअंतर्गत सुचविण्यात आले. त्याद्वारे राज्याअंतर्गत नियोजनामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाकडे लक्ष देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे या तरतुदीचे स्वरुप पंचवार्षिक योजना निहाय पुढीलप्रमाणे –

**१) पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ –५६) :**

या योजनेअंतर्गत एक कोटी रुपयाची तरतूद करुन ग्रंथालयसेवामध्ये सुधारणा करण्यासाठी देशभर ग्रंथालयाचे एक जाळे निर्माण करुन त्याचे नियंत्रण राष्ट्रीय मध्यवर्ती ग्रंथालय दिल्ली यांच्याव्दारे करण्याचे धोरण योजना समिती भारत सरकार यांच्या तरतूदी अंतर्गत सुचविण्यात आले होते.

या अंतर्गत जिल्हा राज्य मध्यवर्ती ग्रंथालय यांच्याशी संलग्नीत असे सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे ग्रामीण परिसरात विकसित करणे व ग्रामीण ग्रंथालय चळवळीला पूरक ठरेल असे सामाजिक विकासाचे कार्यक्रम आयोजित करणे, तसेच पुस्तक वितरण कायद्याअंतर्गत तरतूदीची सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुषंगाने अम्मलबजावणी करणे.

या संदर्भातील अंमलबजावणीचे स्वरुप विचारात घेता १९५२ साली नवराज्यामध्ये मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन करण्याची योजना तयार करण्यात आली. तसेच काही जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्यात आली. याचबरोबर राष्ट्रीय स्तरावर मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना आणि मुंबई, मद्रास, कलकत्ता या ठिकाणी तीन साठवणूक (डिपोझटरी ) केंद्राची / ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली.

**२) दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६–६१) :**

या योजनेअंतर्गत पहिल्यांदाच निधीची उपलब्धता करुन देऊन राष्ट्रीय स्तरावर ग्रंथालयाचे जाळे विस्तारण्यासाठी ३२० जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्याचा प्रस्ताव करण्यात आला. हे जाळे राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाव्दारे राष्ट्रीय स्तरावर संपर्क व्यवस्था प्रस्थापित करणारे होते. या तरतूदी अंतर्गत बहुतेक राज्यातून मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन करण्यात येऊन काही प्रमाणात जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली.

### ३) तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१–६६) :

या योजनेअंतर्गत राज्य स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेविषयी अत्यल्प निधी उपलब्ध करुन पूर्वीच्या दोन योजनांमधील तरतुदीवर भर देण्याचे सुचविण्यात आले होते. शासनाच्या या धोरणामुळे राज्यमध्यवर्ती ग्रंथालय, जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय व शाखा विकास ग्रंथालय यांच्या विकासास खीळ बसली. शिवाय एकूणच सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाच्या दृष्टीने फारशी प्रगती होऊ शकली नाही. केवळ या कालखंडात दिल्ली, कलकत्ता, मद्रास, मुंबई येथे चार राष्ट्रीय ग्रंथालये स्थापन करण्यात आली. तसेच १६ पैकी १२ राज्यात राज्य मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन करण्यात आली व ९ पैकी ५ केंद्रशाशित प्रदेशात मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन करण्यात आली. ३२७ पैकी २०३ जिल्हा ग्रंथालये व २७ % विकास गटात तालुका ग्रंथालये स्थापन करण्यात आली.

या कालखंडातील आणखी एक महत्वपूर्ण घटना म्हणजे योजना आयोगाने १९६४ मध्ये एका कार्यकारी गटाची स्थापना करुन या गटाकडे देशातील ग्रंथालय विकासाचा आढावा घेण्याचे काम सोपविण्यात आले. या गटाने आपला अहवाल ७ सप्टेंबर १९६५ रोजी योजना आयोगाकडे सुपुर्द केला. या अहवालातील शिफारसी म्हणजे –

१) केंद्र व राज्य शासन यांनी सार्वजनिक ग्रंथालय सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच शिक्षण मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय शासनातील नवीन शासकीय एजन्सी, राज्यातील ग्रंथालय संचालनालय व राज्य ग्रंथालय सल्लागार मंडळ यानी सार्वजनिक ग्रंथालय विषयक उपक्रमाचे आयोजन प्रभावीपणे करावे.

२) मध्यप्रदेश, म्हैसूर, नागालँड आणि ओरीसा या राज्यात राज्य मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन करण्यात यावीत.

३) राज्यात राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाना पुरेशा इमारती उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) राज्य मध्यवर्ती ग्रंथालयास बाल विभाग जोडण्यात यावा.

५) देशातील ३२७ जिल्ह्यामध्ये ३३५ जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात यावी. ज्या जिल्ह्यात लोकसंख्या अधिक आहे अशा जिल्ह्यात २ जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्याविषयी शिफारस करण्यात आली होती.

६) अस्तित्वात असलेल्या १०० जिल्हा ग्रंथालयाकरिता नवीन इमारती बांधण्यात याव्यात.

७) शाखा ग्रंथालये ही खऱ्या अर्थाने ग्रामीण परिसरातील लोकांची वाचनकेंद्रे असल्यामुळे यास्तव २५०० शाखा ग्रंथालये स्थापन करण्यात यावी. याव्दारे ७५% शाखा मध्ये ही ग्रंथालय कार्यरत राहतील.

८) ग्रामीण व शहरी विभागातील जी ग्रंथालये वर्गणी व देणगीदारावर अवलंबून कार्यरत आहेत अशा ग्रंथालयाना रुपये १०,००,०००/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे.

९) दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयाच्या धर्तीवर (०३) सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यात यावीत.

१०) दिल्ली विद्यापीठामध्ये १९५८-५९ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या ग्रंथालय शाळा संस्था बंद पडलेली असून ती पुन्हा सुरु करण्यात यावी, अशा संस्थांची स्थापना राज्य स्तरावर करण्यात यावी आणि याव्दारे पदवी व पदव्युत्तर स्तरावरील ग्रंथपालासाठी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

११) राष्ट्रीय व राज्य स्तरावरील सर्व संघाना रुपये १०,०००/- इतके अनुदान देण्यात यावे याव्दारे अशा संघामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी चर्चासत्रे, सर्वेक्षण व ग्रंथालय साहित्याचे प्रकाशन करण्याची तरतूद या अंतर्गत करण्यात यावी.

१२) पुस्तक निर्मितीचा उपक्रम हाती घेण्यात यावा.

१३) ग्रंथालय कायद्याचा मसुदा तयार करण्यात यावा.

**४) चौथी पंचवार्षिक योजना (१९६६ ते ७१) :**

या योजनेअंतर्गत ग्रंथालय विकासासाठी ३०.९९ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली होती. अभ्यासगटाने बनविलेल्या या योजनाबद्ध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये ताळमेळाचा अभाव या योजनेअंतर्गत निदर्शनास आला. या काळात सामाजिक शिक्षण उपक्रमाअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेली लक्षवेधी रक्कम फारच अल्प प्रमाणात सार्वजनिक ग्रंथालयाच्या वाट्यास आली.

**५) पाचवी व सहावी पंचवार्षिक योजना (१९७१–८०) :**

कोणतीही नवीन तरतूद करण्यात आली नव्हती. या कालखंडात ग्रंथालय विकास विषयक कार्यक्रम स्वतंत्रपणे न राबविता शासनाच्या विविध विभागाव्दारे राबविण्यात आले. या अंतर्गत ग्रंथालयाच्या इमारतीची बांधणी, ग्रंथालय विकास, केंद्रीय व राज्यस्तरीय कर्मचाऱ्याची नियुक्ती याद्वारे करण्यात आली. तसेच जिल्हा, गट व ग्रामीण ग्रंथालये ही सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विशेष करुन या काळात जिल्हास्तरावर ग्रंथालय प्रणाली विकसित करण्यात भर देण्यात आला होता. यामुळे जिल्हा ग्रंथालयानी जिल्ह्यातील छोट्या ग्रंथालयाकडे लक्ष पुरवून या सर्व छोट्या ग्रंथालयांचे जिल्हा ग्रंथालयाने नेतृत्व करावे, ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. या योजनेतील महत्वपूर्ण घटक म्हणून प्रौढ शिक्षण उपक्रमाकडे लक्ष वेधण्यात आले होते आणि या अभियानास ग्रामीण स्तरावरील गट स्तरावरील ग्रंथालये आणि विविध सामाजिक केंद्रे याव्दारे प्रौढ साक्षरता अभियानास सहकार्य करणे हे अपेक्षित होते. एकूणच या कालखंडात केवळ ग्रामीण व गट ग्रंथालये याच्यावर भर दिलेला असून केंद्र व राज्य, जिल्हा स्तरावरील ग्रंथालये सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

**६) कालखंड (१९७०–८५) :**

या कालखंडात ग्रामीण ग्रंथालयासाठी सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे विकसित करण्यावर भर देण्यात येऊन, ग्रामीण स्तरावर प्रौढ साक्षरता अभियानास पूरक भूमिका बजावण्यात आली. तसेच ग्रामीण स्तरावर माहिती वितरण सुविधा ही सुरु करुन देण्यासाठी विचार करण्यात आला. याचबरोबर शालेय, महाविद्यालय ग्रंथालय ही सार्वजनिक ग्रंथालयाशी संलग्नित करण्याविषयी विचारात घेण्यात आली. एकूण ३१ राज्य व २६ राज्यात राज्य मध्यवर्ती ग्रंथालय स्थापना करण्यात येऊन २९१ जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्यात आली. याच कालखंडात विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रातील माहिती व्यवस्थेची निर्मिती करण्याची कार्ये विचारात घेवून 'निस्साट'(नॅशनल इन्फोरमेशन सिस्टीम फॉर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी) केंद्राची निर्मिती जून १९७७ मध्ये करण्यात आली. निस्साट योजनेच्या संपूर्ण कार्यवाही करिता १९७७–८८ या काळात ३.५ कोटी रुपये खर्च करण्यात येऊन राष्ट्रीय ग्रंथालयाची

स्थापना इन्सडॉक विज्ञान संस्थेत करण्यात आली. हे कार्य ग्रामीण परिसरातील माहिति वितरण करण्याच्या दृष्टिकोनातून हाती घेण्यात आले होते.

**७) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५–९०) :**

या योजनेअंतर्गत एकूण ९९६ कोटी रुपये इतक्या रकमेची ग्रंथालय विकासाकरीता तरतूद करण्यात आली होती. यापैकी १० कोटी रुपये सार्वजनिक, शैक्षणिक व विशेष ग्रंथालयासाठी, ७० कोटी रुपये राष्ट्रीय ग्रंथालयासाठी १० कोटी रुपये माहिती व्यवस्थापनासाठी आणि १५० कोटी रुपये शासकीय माहितीसाठी अशी तरतूद करण्यात आली होती.

एकूणच केवळ ग्रंथालय शास्त्राच्या विकासाच्या अनुषंगाने विचार करता रुपये २ कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. ग्रंथालय संचालनालय, ग्रंथालय संघटना आणि प्रकाशने याचाही विचार या तरतुदी अंतर्गत करण्यात आला होता.

या योजनेअंतर्गत ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणासाठी डॉ. एन. शेषगीरी यांच्या अध्यक्षतेखाली एक अस्थायी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने १९८४ मध्ये आपला अहवाल तयार केला. हा अहवाल दोन भागात तयार करण्यात आला होता. पहिल्या भागामध्ये विविध ग्रंथालयांच्या संघटना, माहिती विषयीचा विचार, सामान्य सूचना वा शिफारसी, ग्रंथालय धोरण, ग्रंथालयासाठी स्वतंत्र विभाग संचालकाची नियुक्ती, ग्रंथालय कर्मचाऱ्याची श्रेणी, ग्रंथालय विषयक विविध प्रकाशने आणि साधनाची निर्मिती आणि माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग इ. विषयी चर्चा करुन शिफारशी सुचविण्यात आल्या होत्या. अहवालाच्या दुसऱ्या भागात माहिती तंत्रज्ञान आणि संगणक प्रणालीचा वापर त्याचे उपयोजन व त्याव्दारे ग्रंथालय सेवकवर्गात संगणक विषयक कौशल्ये विकसित करुन नव्या संगणक संस्कृतीची निर्मिती करणे याचा विचार करुन याकरिता ग्रंथालयातून संगणकाची उपलब्धता व प्रशिक्षणाची सुविधा याविषयी शिफारसी करण्यात आल्या होत्या.

तसेच संगणकाच्या सहाय्याने संघ सुचीची निर्मिती, राष्ट्रीय स्तरावर सूची तयार करणे आणि माहिती सर्वेक्षण विषयक अत्याधुनिक यंत्रणा वापरुन देशात ग्रंथालयांचे सुलभ जाळे उभारणे याबाबत विचारविनियम करण्यात आला होता.

एकूणच या कालखंडात ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणास विशेष चालना देऊन राष्ट्रीय ग्रंथालय व माहिती विषयक धोरण जाहीर करण्यात आले. तसेच सार्वजनिक विकासाच्या साध्यासाठी राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान अधिक सक्षम करण्यात आले. अशा स्तरावरील राष्ट्रीय संस्थाच्या स्थापनेस चालना देऊन त्यांच्या सेवा व सुविधामध्ये विकास करण्यात आला. निसाटच्या माध्यमातून अभ्यासक्रमाना चालना देण्यात आली व याकरिता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय माहितीकेंद्राची उभारणी (NIC) दिल्ली, पुणे, भुवनेश्वर या विभागीय स्तरावर करण्यात आली. याव्दारे केंद्र व राज्य शासनाला उपयुक्त ठरणारी माहिती एकत्रित करण्याचे अभियान सुरु करण्यात आले. या कालखंडात तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने त्यांचा वापर सुरु करण्यात येऊन नव्या संगणक संस्कृतीच्या विकासास चालना मिळण्याची सुरुवात या कालखंडात झाली.

**८) आठवी पंचवार्षिक योजना (१९९०–९५) :**

या काळात केंद्रीय संदर्भ ग्रंथालय याचा समावेश राष्ट्रीय ग्रंथसूची व प्रलेख केंद्रामध्ये करण्यासाठी शिफारस करण्यात आली होती व तसेच दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयाने दोन विभागात नवीन ग्रंथालयाची सेवा सुरु केली. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाना झेरॉक्स उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना करण्यात आली. दुर्मिळ ग्रंथाच्या संरक्षणासाठी व जतनासाठी सहकार्य देण्याचा विचार करण्यात आला. शंभर वर्षाच्या जुन्या ग्रंथालयाना नेटवर्क करिता विशेष सहकार्य करणे या विषयी विचार विनिमय करण्यात आला. या तरतूदी अंतर्गत सार्वजनिक ग्रंथालयाना संगणक प्रणाली, झेरॉक्स यंत्रणा इत्यादी उपलब्ध झाले असून ग्रंथालयाच्या संगणीकीकरणाचे कामही प्राधान्यक्रमाने हाती घेण्यास सुरुवात झाली.

**९) नववी योजना (१९९७–२००२) :**

नवव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राष्ट्रीय ग्रंथालय कलकत्ताव्दारे अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. या अंतर्गत ग्रंथालयाचे ग्रंथसंग्रह अद्यावत करणे, वाचकसेवा आणि ग्रंथालयातील साहित्याचे संघटन याविषयी हे प्रकल्प होते. यापैकी देवघेव विभागचे स्थानिक नेटवर्क, वाचकाच्या सेवांमध्ये सुधारणा, अधिक सक्षमपणे ग्रंथसंग्रहाचे व्यवस्थापन इत्यादी बाबी पूर्ण

झाल्या. मध्यवर्ती संदर्भ ग्रंथालय संचलनाव्दारे अनेक विभागाचे नव्या योजनेअंतर्गत संगणीकीकरण करण्यात आले. यामुळे भारतीय राष्ट्रीय गंथसूची प्रकाशन अद्यावत होण्यास मदत झाली. या सर्व प्रकाशानाचे सर्व संदर्भ ऑन लाईन सेवेव्दारे उपलब्ध झाले. दिल्ली सार्वजनिक ग्रंथालय आणि मध्यवर्ती ग्रंथालय दिल्ली या ग्रंथालयाना विविध भाषेतील नवीन साहित्य खरेदी करण्यास व भौतिक सुविधांचे आधुनिकीकरण करण्यास निधी उपलब्ध करुन देण्यात आला. यामुळे वाचक सेवा, नेटवर्कींग व रिसोर्स शेअरिंग याच्यामध्ये सुधारणा झाली. त्याचा लाभ वाचकांना होऊ लागला. मध्यवर्ती सचिवालय ग्रंथालयाव्दारे संगणक विषयक अनेक उपक्रम राबविण्यात आले. हे सर्व उपक्रम संगणकाचा सामायीक वापर, तांत्रिक आकृतीबंधासंबंधित प्रमाणीकरण आणि सहकारी तत्वावर वाचन साहित्याची मागणी यासंबधी होते. याचबरोबर कोनेमेरा ग्रंथालय चेन्नई, तंजावर महाराज सर्फोजी, सरस्वती महाल ग्रंथालय तंजावर, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई या ग्रंथालयाना ग्रंथालयाचे संगणीकीकरण व आधुनिकीकरण यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तसेच राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कलकत्ताद्वारे वाचन साहित्य संग्रह, इमारत बांधणी, परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्रे याकरिता आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात आले. *(नियोजन आयोग – भारत सरकार १९९७)*

**१०) १० वी पंचवार्षिक योजना (२००२–२००७) :**

या योजनेअंतर्गत सांस्कृतिक विभागाव्दारे प्रामुख्याने वस्तुसंग्रहालय विकासाचे व त्याच्या संरक्षणाचे दृष्टीने अधिकाअधिक शिफारसी करण्यात आल्या होत्या. या अंतर्गत वस्तु संग्रहालयाकरीता राष्ट्रीय आयोगाची स्थापना करुन वस्तुसंग्रहालयाचे आधुनिकीकरण अशा बाबीना अधिक प्राधान्य देण्यात आले होते. ११ व्या तरतूदीअंतर्गत ग्रंथालयविषयी काही धोरणे निश्चित करण्यात आली होती. या अंतर्गत विभागीय भाषा ग्रंथालयाची स्थापना (भाषा पुस्तकालय) ही संदर्भ ग्रंथालय स्वरुपात पश्चिम विभाग ग्रंथालय परेलनगर येथे स्थापन करणे आणि प्रशासकीय विभागाचे संगणीकीकरण २००३ ध्ये करणे, तंजावर महाराज सरफोजी सरस्वती महाल ग्रंथालयाकरीता सहा मजली इमारत उभी करणे. इतर काही इमारतीची उभारणी करणे विशेषत्वाने भाषाभवन कलकत्ता, या करिता या योजनेअंतर्गत

कला संस्कृती विभागास एकूण उपलब्ध करुन द्यावयाची रक्कम ही रुपये २,७०,८३३ कोटी इतकी उपलब्ध करुन देण्याविषयी शिफारस करण्यात आली होती. नवव्या योजनेअंतर्गत ९२०.४१ कोटी रुपये प्रत्यक्षात उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१० व्या योजने अंतर्गत मध्यवर्ती ग्रंथालय व सार्वजनिक ग्रंथालयाचे आधुनिकीकरणचे धोरण नियोजन आयोगाव्दारे निश्चित करण्यात आले होते. प्रत्यक्षात राष्ट्रीय संदर्भ सूची डाटाबेसचा या काळात विकास करण्यात येऊन प्रलेखाच्या सामूहिक वापरास प्राधान्य देण्यात आले; तसेच ग्रंथालय जाळे व वाचक सेवा याचा विकास करण्यात आला. आयोगाने राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालयातील भौतिक सुविधा अधिकाधिक सक्षम करण्याचे ठरविले होते. विद्यमान ग्रंथालयाचा विकास, खाजगी संग्रहाचा विकास आणि सुचीय नियंत्रणाचा विस्तार व प्रलेखन यास प्राधान्य देण्याचे निश्चित केले होते. वाचकाना अधिक प्रभावी सेवा देण्यासाठी राष्ट्रीय ग्रंथालयाने उच्चोतम रेफरल सेंटर म्हणून विविध विषयासाठी सहकार्य करावे असे अपेक्षित होते. याचबरोबर नवीन तंत्रज्ञानाचा अंतर्भाव सार्वजनिक ग्रंथालयात करुन तेथील सेवा अद्यावयात करणे त्याचा दर्जा उंचावणे याचबरोबर मध्यवर्ती व राज्य ग्रंथालयाचे नेटवर्क यास प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले होते. (नियोजन आयोग २००२)

**११) अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-२०१२) :**

या योजनेअंतर्गत राष्ट्रीय ग्रंथालय आयोगाने ग्रंथालय व माहितीप्रणालीकरिता राष्ट्रीय धोरणाचा अकराव्या योजनेअंतर्गत केलेला विचार बाजूला ठेवण्याची शिफारस १२ व्या योजनेअंतर्गत  निश्चित करण्यात आली.

सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहक विषयाची दुरावस्था लक्षात घेवून त्याच्यामध्ये सुधारणा करणे, या दृष्टीने राष्ट्रीय ग्रंथालय आयोगाची स्थापना करणे आणि त्याच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालयाच्या सेवा सर्वसाधारण स्तरावर आणणे याकरिता तीन ते पाच वर्षात प्रयत्न करणे अशा स्वरुपाचे धोरण आखताना ग्रंथालय आयोगाकडे पुढील जबाबदारी सोपविली होती.

१) राज्य सरकारच्या सहकार्याने सार्वजनिक ग्रंथालय विषयक राष्ट्रीय स्तरावर एक डाटाबेस तयार करणे. या अंतर्गत त्या ग्रंथालयातील भौतिक सुविधाचा दर्जा सुधारण्याचा उपक्रम राबविणे विषयी शिफारसी करणे.

२) ग्रंथालय विभागातील मनुष्यबळाचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टिकोनातून विस्तारीत स्वरुपाचा प्रक्षिशण उपक्रम तातडीने हाती घेणे.

३) ग्रंथालय विभागात भारतीय वातावरणात सहाय्यातून ठरेल अशा तंत्रज्ञानाच्या वापराकरीता प्राधान्य देण्यासाठी संशोधनात्मक प्रकल्प हाती घेणे.

४) सार्वजनिक ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रह स्थानिक स्तरावरील स्थितीशी उपकारक स्वरुपात विकसित करण्यासाठी विशेष योजना हाती घेणे.

५) अंध व कर्णबधीर व्यक्तीकरीता विशेष साधानाच्या विकासाकरिता सहाय्य घेणे व अशी साधने निर्माण करणे.

६) प्रत्येक गटात कमीत कमी एका ज्ञानकेंद्राची निर्मिती करणे आणि देशातील सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे उभारणे या विकासाकरीता रुपये ५,००,००,००,०००/- उपलब्ध करुन देण्यासाठी शिफारस करण्यात आली होती. तसेच या पुढील काळाकरीता ७०,००,००,०००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याची शिफारस करण्यात आली होती.

विविध पंचवार्षिक योजना अंतर्गत केलेल्या तरतूदी या पुरेशा नसल्या तरी देखील ग्रंथालय व माहितीक्षेत्राकडे व त्यांच्या आधुनिकीकरणाकडे शासनाने पुरविलेले लक्ष हे महत्त्वपूर्ण स्वरुपाचे आहे. लोक सहभागाबद्दलची उदासीनता, ग्रामीण स्तरावरील स्वयं प्रशिक्षणाचा अभाव अशा कारणांमुळे सार्वजनिक ग्रंथालयांचा देशपातळीवर होणारा विकास सद्यस्थितीत समाधानकारक नाही, हे वास्तव आहे. याचबरोबर घटत चाललेली वाचन अभिरुची हे सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रासमोरील मोठे आव्हान आहे. विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायदे, स्वातंत्र्यानंतर देशातील विविध राज्यांकरिता मंजूर करण्यात

आलेल्या कायद्याचे स्वरुप पुढे विशद करण्यात आलेले आहे. विविध राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचे स्वरुप पुढील प्रमाणे,

१. आंध्रप्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६०

२. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७

३. हरयाणा राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८९

४. केरळ राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८९

५. तमिळनाडू राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८

६. कर्नाटक राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६५

७. पश्चिम बंगाल राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९७९

८. मणिपूर राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८८

९. मिझोराम राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९९३

१०. गोवा राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९९३

११. राजस्थान राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६

१२. उत्तर प्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६

१३. बिहार राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००८

१४. छत्तीसगढ राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००८

## ४.७ आंध्रप्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा (१९६०)

या कायद्याची स्थापना १९६० मध्ये करण्यात आली. या कायद्याअंतर्गत मद्रास व हैद्राबाद राज्याचा बहुतांशी भाग जसच्यातसा घेतला असल्यामुळे त्याला कोणताही विरोध झाला नाही. प्रतिरुपया आकारण्यात येणार सरचार्ज ६ पैसे वरुन तो ४ पैसे पर्यंत वाढविला आहे. तसेच अशा कर आकारणीमुळे जमा होणाऱ्या रकमेएवढी रक्कम ग्रंथालयाच्या विकासाकरता राज्यशासनाव्दारे राखून ठेऊन तिचा विनयोग करण्यात यावा अशी अधिकतर तरतूद या कायद्याअंतर्गत करण्यात आलेली आहे. या व्दारे ग्रंथालयाच्या विधायक कार्याकरीता आवश्यक ती आर्थिक उपलब्धता मंजूर करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून स्विकारला गेला.

या कायद्याअंतर्गत आंध्रप्रदेश ग्रंथालय परिषदे विषयी विवेचन प्रकरण –२ मध्ये करण्यात आलेले असून यामध्ये परिषदेच्या संरचनेतील सदस्य व त्याची पार्श्वभूमी याचे विवेचन करण्यात आले आहे.

याच प्रकरणात परिषदेचे उद्देश, कार्ये, सभापतीच्या कार्याचे स्वरुप, सभापती करिता वेतन व भत्ता विषयक अधिकार त्यांचा कार्यकाल, परिषदेविषयक आर्थिक उपलब्धता या विषयी चर्चा, तरतुदीचे विवेचन या प्रकरणात करण्यात आले आहे. तिसऱ्या प्रकरणात सार्वजनिक ग्रंथालय विषयी विवेचन करताना त्याचे पर्यवेक्षण व इतर कायद्याविषयी चर्चा करण्यात आली असून चौथ्या प्रकरणात जिल्हा ग्रंथालयांचे स्वरुप व कार्ये याविषयी चर्चा करण्यात आली आहे.

पाचव्या आयोगात आर्थिक तरतुदीविषयी विवेचन करताना प्रारंभीच कलम २० (१) (ए) मध्ये अंतर्गत संपत्तीकर अथवा गृहकरच्या प्रत्येक रुपयामागे चार नवे पैसे ग्रंथालय कर वसूल करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. याच अंतर्गत उपघटक (ब) मध्ये जिल्हा ग्रंथालय सरकारच्या पूर्वसंम्मतीने किंवा सरकारने निर्देशित केल्यावर नियमित दरापेक्षा अधिक कर विषयक तरतूद प्रति रुपया, तसेच या वसूल केलेल्या कराविषयी पुढील तरतुदीमध्ये त्याचे संकलन कोठे करावे हे नमूद करण्यात आलेले आहे. यामध्ये,

१) हैद्राबाद व सिकंदराबाद या दोन शहराचा कर हैद्राबाद नगरपालिका येथे एकत्रित जमा करणे.

२) नगरपालिका परिषद विभागातील अधिकाऱ्याच्या माध्यमातून हा कर एकत्रित केला जाईल. ग्रामपंचायतीव्दारे कर एकत्रित करणे. जिल्ह्यातील जी परिक्षणे नगरपरिषद किंवा ग्रामपंचायत यांच्यामध्ये समाविष्ट नाहीत अशी क्षेत्रे स्थानिक पातळीवर संबंधित कार्यान्वये मालमत्ता कर व घर कर या संदर्भात सरकारने निर्देशित केलेल्या सुचनानुसार हा कर गोळा करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली होती. हा एकूण कर जिंदगी व मिळकतीवर, वाहन कर, जमीन महसुल कर या निधींच्या एकत्रित रकमेवर प्रत्येक रुपयामागे ४ पैसे प्रमाणे तरतूद पुढे करण्यात आली. याच रक्कमेवर या एकूण रक्कमेऐवढी रक्कम राज्य शासनाने अनुदान स्वरुपात देण्याची तरतूद केली होती.

या राज्यामध्ये ग्रंथालयसेवा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण २३ विभाग करण्यात आलेले असून हे विभाग जिल्हानिहाय करण्यात आलेले आहेत तसेच या व्यतिरिक्त हैद्राबादशहर हा एक स्वतंत्र विभाग म्हणून विचारात घेण्यात आला आहे. या विभागात जिल्हा स्तरावर प्रत्येकी एक जिल्हा ग्रंथालय संस्था स्वरुपात स्थापन करण्यात आलेले आहे. राज्य स्तरावर स्थापन केलेल्या राज्य ग्रंथालय समितीमध्ये २७ सभासद असून या समितीचे अध्यक्षपद शिक्षण समितीकडे सोपविण्यात आलेले आहे. या समितीव्दारे राज्यातील ग्रंथालयसेवा विषयक सल्ला देण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या संघटनेची संरचना पिरॅमिडसारखी असून उच्चस्तरावर राज्य मध्यवर्ती ग्रंथालय आणि मधल्या पातळीवर जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय, शाखा ग्रंथालय, व प्रादेशिक ग्रंथालय अशी संरचना करण्यात आलेली आहे. तर जिल्हास्तरावर ग्राम ग्रंथालये संचलित करण्यात आलेली आहे.

## ४.८ महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७

ज्या अर्थी महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, परिरक्षण, संघटन व विकास यासाठी आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठराव्या वर्षी, तो पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे:–

**प्रकरण १**

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ :**

**१.** (१) या अधिनियमास,महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ असे म्हणता येईल.

(२) तो, संबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल;

(३) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे या बाबतीत नेमील अशा तारखेस अंमलात येईल; व या राज्याच्या विविध भागात हा अधिनियम अमलात आणण्यासाठी वेगवेगळ्या तारखा नेमता येतील.

२. **संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,**

(१) 'पुस्तक' या संज्ञेत, कोणत्याही भाषेतील प्रत्येक ग्रंथ, ग्रंथाचा भाग किंवा विभाग व पत्रिका आणि स्वतंत्ररित्या मुद्रित किंवा शिलामुद्रित केलेले संगीताचे, नकाशाचे, सागरी नकाशाचे किंवा मानचित्राचे प्रत्येक पान, वृत्तपत्रे, नियतकालिके, दृकश्रुती, माहितीसाठी वापरण्यात येणारी रंगचित्रे, चलचित्रे, सरकचित्रे, तबकड्या व फिती (टेप्स) आणि अशा प्रकारच्या इतर साहित्याचा समावेश होईल.

(२) 'समिती' म्हणजे, कलम १३ अन्वये नेमण्यात आलेली ग्रंथालय समिती:

(३) 'पूरक भत्ता' म्हणजे प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा परिषदेच्या किंवा समितीच्या सदस्यास, अशा परिषदेच्या किंवा समितीच्या सभांना उपस्थित रहाण्याकरीता किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, असे सदस्य म्हणून

इतर कोणतीही कामे पार पाडताना त्यांना करावा लागलेला वैयक्तिक खर्च भागविण्यासाठी देण्यात येईल असा इतर भत्ता,

(४) 'परिषद' म्हणजे कलम ३ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेली राज्य ग्रंथालय परिषद;

(५) 'संचालक' म्हणजे, कलम ८ अन्वये नेमण्यात आलेला ग्रंथालय संचालक;

(६) 'जिल्हा' म्हणजे, महसुली जिल्हा;

(७) 'विभाग' म्हणजे, या अधिनियमाच्या अनुसूचित दिलेला विभाग;

(८) 'महानगरपालिका' म्हणजे, मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, किंवा नागपूर शहर महानगरपलिका अधिनियम, १९४८ या अन्वये प्रस्थापित करण्यात आलेली महानगरपालिका;

(९) 'नगरपालिका' म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, या अन्वये प्रस्थापित केलेली किंवा प्रस्थापित झाल्याचे मानण्यात आलेली नगरपालिका;

(१०) 'विहित' म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले;

(११) 'सार्वजनिक ग्रंथालय' म्हणजे,

(अ) जनतेच्या उपयोगासाठी राज्य सरकारने स्थापन केलेले व चालविलेले ग्रंथालय;

(ब) ग्रंथालय निधीमधून सहाय्यक अनुदान देण्याच्या प्रयोजनासाठी संचालकाने मान्यता दिलेले ग्रंथालय; व

(क) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनाव्दारे सार्वजनिक ग्रंथालय म्हणून जाहिर करील असे कोणतेही इतर ग्रंथालय,

(१२) 'वर्ष' म्हणजे वित्तीय वर्ष.

## प्रकरण २

## राज्य ग्रंथालय परिषद

**राज्य ग्रंथालय परिषदेची प्रस्थापना :**

**३.** अ) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरीता 'राज्य ग्रंथालय परिषद' या नावाने संबोधण्यात येणाऱ्या, एका परिषदेची प्रस्थापना करील.

ब) ही परिषद पुढील सदस्यांची मिळून होईल :–

(१) राज्याचे शिक्षण मंत्री, जे परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतील;

(२) राज्याचे शिक्षण उपमंत्री, जे परिषदेचे पदसिध्द उपाध्यक्ष असतील;

(३) महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व समाजकल्याण विभागाचे त्या त्या वेळी पदावर असलेले सचिव;

(४) धर्मादाय आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा त्याचा नामनिर्देशित इसम;

(५) त्या त्यावेळी पदावर असलेले शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य;

(६) महाराष्ट्र विधानसभेने आपल्या सदस्यांमधून निवडलेले दोन सदस्य;

(७) महाराष्ट्र विधानपरिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडलेला एक इसम;

(८) महाराष्ट्र राज्यात कार्य करीत असलेल्या महानगरपलिकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्य सरकारने नामनिर्देशित केलेला एक इसम;

(९) प्रत्येक विभागात कार्य करीत असलेल्या नगरपलिकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्य सरकारने नामनिर्देशित केलेला एक इसम;

(१०) प्रत्येक विभागात कार्य करीत असलेल्या नगरपालिकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, राज्य सरकारने नामनिर्देशित केलेला त्या त्या विभागातील एकेक सदस्य;

(११) महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्थेचा अध्यक्ष;

(१२) उक्त महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने प्रत्येक विभागातून उक्त विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(१३) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांबाबत अधिनियम, १९५० अन्वये नोंदण्यात आलेल्या व साहित्य महामंडळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थेचा अध्यक्ष;

(१४) राज्य सरकारच्या मते, ज्यांना ग्रंथालय सेवाविषयक बाबींचे विशेष ज्ञान किंवा रुची किंवा प्रत्यक्ष अनुभव असेल अशा व्यक्तींमधून राज्य सरकारने नामनिर्देशित केलेले चार सदस्य;

(१५) ग्रंथालय संचालक, जो परिषदेचा सचिवही असेल,

क) पोट–कलम (२) च्या परिच्छेद (सहा) व सात अन्वये निवडण्यात येईल असा एखादा इसम, महाराष्ट्र विधानसभेचा किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल तर तो इसम परिषदेचा सदस्य असण्याचेही बंद होईल.

४. या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर राज्य सरकारास सल्ला देणे हे परिषदेचे काम असेल.

५. (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, पदसिध्द सदस्य नसतील असे परिषदेचे सदस्य, कलम ३, पोट– कलम (२) अन्वये सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आल्यानंतर परिषदेची पहिली सभा ज्या तारखेस घेण्यात येईल त्या तारखेपासून सुरु होणाऱ्या तीन वर्षांच्या मुदतीकरिता पद धारण करतील.

(२) परिषदेच्या सदस्यांना विहित करण्यात येतील असे पूरक भत्ते विहित करण्यात येतील अशा दरांनी मिळण्याचा हक्क असेल.

६. कालक्रमानुसार रिकाम्या होणाऱ्या जागांखेरीज, परिषदेच्या नामनिर्देशित किंवा निवडलेल्या सदस्यांच्या रिकाम्या झालेल्या जागा, यथास्थिति नामनिर्देशनाव्दारे किंवा निवडणुकीव्दारे भरण्यात येतील, व रिकामी झालेली जागा भरण्यासाठी, नामनिर्देशित करण्यात आलेला किंवा निवडण्यात आलेला इसम, ज्याची जागा त्याने घेतली असेल तो

सदस्य, ज्या मुदतीकरिता नामनिर्देशित करण्यात किंवा निवडण्यात आला असेल त्या मुदतीच्या उर्वरीत मुदतीपर्यंतच पद धारण करील.

७. (१) अध्यक्ष निश्चित करील अशा तारखांस व अशा वेळी, प्रतिवर्षी दोनपेक्षा कमी नसेल इतक्या वेळा, परिषदेची सभा भरेल, आणि लागोपाठच्या दोन सभांमधील कालावधी सहा महिन्यांचा असणार नाही.

(२) परिषदेच्या अध्यक्षास त्यास योग्य वाटेल तेव्हा, परिषदेची सभा बोलविता येईल. व (त्याने) परिषदेच्या एकूण सदस्यांच्या एक तृतियांशाहून कमी नसतील इतक्या सदस्यांच्या लेखी विनंतीवरून व अशी विनंती मिळाल्यानंतर तीस दिवसानंतरची नसेल अशा तारखेस, परिषदेची विशेष सभा बोलाविली पाहिजे.

(३) परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी एक–तृतियांश सदस्यांनी गणपूर्ती होईल.

(४) विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कार्यपध्दतीनुसार परिषद कामकाज चालवील.

## प्रकरण ३

## ग्रंथालय विभाग

८. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्या शासनाकडून ग्रंथालय विभागाची प्रस्थापना करण्यात येईल व ग्रंथालय संचालक त्याचा प्रमुख असेल व राज्य सरकारास योग्य वाटतील असे इतर अधिकारी व सेवक त्यामध्ये असतील.

(२) राज्य सरकार, विहित करण्यात येतील अशा अहर्ता असलेल्या, सार्वकालिक हा या अधिकाऱ्याची ग्रंथालय संचालक म्हणून नेमणूक करील.

९. (१) राज्य शासनाची देखरेख, निर्देशन व नियंत्रण यास अधीन राहून, संचालक हा या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असेल.

(२) विशेषकरुन व पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसामान्यतेस बाध न आणता, संचालक हा–

(अ) सार्वजनिक ग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालय पध्दती यांचे नियोजन, परिक्षण, संघटन व विकास यासाठी जबाबदार असेल;

(ब) सार्वजनिक ग्रंथालयासंबंधातील सर्व बाबींचे अधीक्षण करील व त्यासंबंधित निर्देश देईल;

(क) या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रस्थापनेस प्रोत्साहन देईल;

(ड) या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांनुसार, ग्रंथालय निधीतून सहाय्यक अनुदान देण्याच्या प्रयोजनार्थ, सार्वजनिक ग्रंथालये व राज्य, विभागीय व इतर ग्रंथालय संघ यांना मान्यता देईल व त्यांना अनुदाने मंजूर करील, व अनुदानांचे संवितरण करील;

(इ) ग्रंथालय निधीचे हिशेब ठेवील, व उक्त निधी योग्य प्रकारे वापरण्यात येईल याबद्दल काळजी घेईल;

(फ) राज्यात प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्व पुस्तकांची एक ग्रंथसूची प्रतिवर्षी प्रसिध्द करील;

(ग) या अधिनियमाखालील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कामकाजाचा एक अहवाल, दर वर्षी, राज्य सरकारास सादर करील;

(ह) सार्वजनिक ग्रंथालयात जुनी व दुर्मिळ पुस्तके, नियतकालिके, हस्तलिखिते व शैक्षणिकदृष्ट्या महत्वाचे असतील असे इतर कागदपत्र यांचा संग्रह करील व ते जपून ठेवील;

(आय) उमेदवारांना ग्रंथालय विज्ञानाचे प्रशिक्षण देण्याकरीता कार्यक्रम आखील, व मान्यताप्राप्त ग्रंथालय प्रशिक्षण पाठ्यक्रमाच्या उमेदवारांसाठी परीक्षा घेईल; आणि

(जे) या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांव्दारे त्यास प्रदान करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व त्याजवर लादण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

१०. (१) राज्य शासन, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा स्थापन करील व तीत (सेवेत) इसमांची नेमणूक करील.

(२) महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा ही राज्य सरकार वेळोवेळी निश्चित करील अशा वर्गाची व प्रवर्गांची मिळून होईल. उक्त सेवेतील सर्व इसम सरकारी कर्मचारी असतील व राज्य सरकारकडून वेळोवेळी करण्यात येतील अशा नियमाव्दारे त्यांच्या सेवाप्रवेशाचे व सेवेतील शर्तींचे नियमन होईल.

(३) महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवेतील इसमांचे वेतन भत्ते, उपदान, निवृत्तीवेतन व इतर वित्तलब्धी राज्याच्या एकत्रित निधीतून देण्यात येतील.

## प्रकरण ४

## सार्वजनिक ग्रंथालये

११. (१) राज्य सरकारास, संपूर्ण राज्याकरीता एक राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व प्रत्येक विभागाकरीता एक विभागीय ग्रंथालय प्रस्थापित करता येईल.

(२) कोणत्याही स्थानिक क्षेत्रात कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा, संस्थांच्या नोंदणीबाबत अधिनियम, १८६० अन्वये नोंदण्यात आलेल्या कोणत्याही संस्थेकडून किंवा, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदण्यात आलेल्या कोणत्याही विश्वस्त व्यवस्थेकडून, संचालकांची खात्री पटेल अशा रीतीने, जनतेकरीता ग्रंथालय सेवेची तरतूद करण्यात आली नसेल त्या बाबतीत किंवा राज्य सरकारच्या मत असे कोणतेही स्थानिक प्राधिकरण, संस्था किंवा विश्वस्त व्यवस्था, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, जनतेकरीता ग्रंथालय सेवेची तरतूद करण्यास राजी नसेल त्या बाबतीत किंवा संचालकाची खात्री पटेल अशा रीतीने उपर्युक्त तरतूद करण्यात उक्त प्राधिकरण, संस्था किंवा विश्वस्तव्यवस्था अकार्यक्षम असेल त्या बाबतीत, राज्य सरकारास, त्या क्षेत्रातील जनतेच्या उपयोगासाठी म्हणून, एक ग्रंथालय प्रस्थापित करता येईल;

परंतु उक्त स्थानिक प्राधिकरणास, संस्थेस किंवा यशास्थिती विश्वस्तव्यवस्थेस उक्त स्थानिक क्षेत्रात राज्य सरकारने ग्रंथालय का स्थापन करू नये, याबद्दलचे कारण दाखविण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, असे कोणतेही ग्रंथालय स्थापन करण्यात येणार नाही.

(३) या कलमान्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या सर्व ग्रंथालयांचे परिरक्षण, संघटन आणि विकास या गोष्टी ग्रंथालय विभागामार्फत राज्य शासनाकडून करण्यात येतील.

१२. परिषदेच्या सल्ल्यावरुन विहित करण्यात येतील त्याप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालयांची कामे असतील.

## प्रकरण ५
## ग्रंथालय समित्या

१३. (१) प्रत्येक जिल्ह्याकरिता, राज्य शासन एक ग्रंथालय समिती नेमील.

(२) उक्त समिती ही पुढील सदस्यांची मिळून होईल.

अ. जिल्ह्यात काम करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचा त्या त्या वेळी असलेला सभापती, हा समितीचा पदसिध्द अध्यक्ष असेल;

ब. जिल्ह्याच्या (कोणताही असल्यास) जिल्हा ग्रंथालय संघाचा अध्यक्ष;

क. जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यात काम करणाऱ्या मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांच्या व्यवस्थापन समित्यांच्या सभापतीपैकी राज्य सरकारने नामनिर्देशित केलेला एक इसम;

ड. राज्य सरकारने नामनिर्देशित केलेले पाच इसम, त्यापैकी एकजण विहित करण्यात येतील अशी अर्हता असणारा ग्रंथपाल असेल आणि दोन इसम हे जिल्ह्यातील नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या सीमांतर्गत क्षेत्रातील ग्रंथालयाचे प्रतिनिधित्व करणारे इसम असतील;

इ. जिल्ह्यातील नगरपालिकांच्या अध्यक्षांपैकी राज्य सरकारने नामनिर्देशित केलेला एक इसम;

फ. जिल्ह्यात काम करणाऱ्या जिल्हा परिषदेचा, त्या त्या वेळेचा शिक्षण अधिकारी, हा समितीचा पदसिध्द सचिव असेल.

(३) राज्य शासन बृहन्मुंबईसाठीसुध्दा–

अ. बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचा त्या त्या वेळी असलेला अध्यक्ष जो (ग्रंथालय) समितीचा पदसिध्द अध्यक्ष राहिल;

ब. राज्य शासनाने नियुक्त केलेले पाच इसम ज्यांच्यापैकी एक विहित अर्हता असलेला ग्रंथपाल असेल व दोघे बृहन्मुंबईतील ग्रंथालयांचे प्रतिनिधित्व करणारे इसम असतील;

क. बृहन्मुंबईच्या महानगपालिकेचा त्या त्या वेळी असलेला शिक्षण अधिकारी;

ड. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, जो (ग्रंथालय) समितीचा पदसिध्द सचिव असेल; यांची मिळून बनणारी एक ग्रंथालय समिती नेमील.

१४. (१) या अधिनियमात अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल त्याव्यतिरिक्त, समितीचे नामनिर्देशित सदस्य हे, त्यांच्या नामनिर्देशनानंतर समितीची पहिली बैठक ज्या तारखेस घेण्यात येईल त्या तारखेपासून सुरु होणाऱ्या तीन वर्षांच्या मुदतीकरीता पद धारण करतील.

(२) समितीच्या सदस्यांना, विहित करण्यात येतील अशा दरांनुसार पूरक भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

१५. समितीच्या नामनिर्देशित सदस्याचे पद, कालाच्या ओघात रिकामे होईल त्या खेरीज करून अन्य प्रकारे रिकामे झाल्यास, उक्त पद, भरण्यासाठी नामनिर्देशन करण्यात आलेली व्यक्ती, ज्या सदस्याची जागा तो घेईल असा सदस्य ज्या मुदतीसाठी नामनिर्दिष्ट करण्यात आला होता त्या मुदतीच्या उर्वरीत मुदतीपर्यंतच पद धारण करील.

१६. समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील–

(१) जिल्ह्यातील किंवा, यथास्थिति बृहन्मुंबईतील ग्रंथालय सेवेचा योग्य धर्तीवर विकास करण्यासंबंधीच्या सर्व बाबींवर राज्य सरकारास सल्ला देणे,

(२) सार्वजनिक ग्रंथालयांसंबंधित विहित करण्यात येतील अशी कामे त्यांच्याकडून समाधानकारकपणे पार पाडण्यात येत आहेत याबद्दल खात्री करुन घेणे, आणि

(३) विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

१७. समिती, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कार्यपध्दतीनुसार कामकाज करील.

## प्रकरण ६

## वित्त व हिशेब

१८. (१) ग्रंथालय निधी या नावाने संबोधण्यात येणारा एक निधी राज्य शासन प्रस्थापित करील.

(२) ग्रंथालय निधी हा –

अ. कलम २० अन्वये राज्य सरकारने दिलेले अंशदान;

ब. कलम २१ अन्वये राज्य सरकारने दिलेली कोणतीही विशेष अनुदाने;

क. भारत सरकारने, सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी राज्य शासनास दिलेली कोणतीही अनुदाने; आणि

ड. सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी जनतेकडून देण्यात आलेली कोणतीही अंशदाने अथवा देणग्या, यांचा मिळून होईल.

१९. (१) ग्रंथालय निधीतील पैसा, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी, सरकारकडून वापरण्यात येईल.

(२) पोट–कलम (१) च्या सर्वसामान्यतेस बाधा न पोहोचता पुढील कारणासाठीचा खर्च भागविण्यासाठी राज्य सरकारकडून, ग्रंथालय निधीतील पैशाचा वापर करण्यात येईल:–

अ) सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना, परिरक्षण व विकास,

ब) परिषदेच्या व समितीच्या सदस्यांना देण्याजोगा पूरक भत्ता,

क) ग्रंथालय संचालकांनी या कारणासाठी मान्यता दिलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांना व ग्रंथालय संघांना सहाय्यक अनुदान देणे.

२०. या बाबतीत विधीअन्वये योग्य रित्या विनियोजन करण्यात आल्यानंतर पंचवीस लाख रुपयांपेक्षा कमी नसेल अशी रक्कम दर वर्षी ग्रंथालय निधीस देईल.

२१. राज्य सरकारास ग्रंथालय निधीस विशेष अनुदाने देता येतील.

२२. राज्य सरकारकडून व्यवस्था ठेवण्यात आलेल्या कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रयोजनाकरिता संपादन किंवा धारण केलेली, सर्व जंगम व स्थावर मालमत्ता, राज्य सरकारकडे विहित होईल.

## प्रकरण ७

## अहवाल व निरीक्षण

२३. एखाद्या सार्वजनिक ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचा प्रभारी असलेला प्रत्येक इसम, संचालक वेळोवेळी फर्माविल असे अहवाल व विवरणे, व अशी माहिती संचालकास किंवा या बाबतीत त्यांने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इसमास, सादर करील आणि पुरविल.

२४. संचालकाला किंवा त्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इसमाला, या अधि–नियमाच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधाचे पालन करण्यात येत आहे याविषयी स्वत:ची खात्री करुन घेण्याच्या प्रयोजनाकरिता, कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालयाची किंवा त्यास संलग्न असलेल्या कोणत्याही संस्थेची, तपासणी करण्याची सक्ती असेल.

२५. संचालक, प्रत्येक वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत, त्या वर्षात सार्वजनिक ग्रंथालयांनी केलेल्या प्रगतीचा वार्षिक अहवाल तयार करील आणि विहित करण्यात येईल अशी माहिती आणि तपशील यासह, तो राज्य सरकारकडे सादर करील.

परंतु असा कोणताही अहवाल परिषदेने त्यास मान्यता दिल्याशिवाय राज्य सरकारकडे सादर करता येणार नाही.

## प्रकरण ८

## संकीर्ण

२६. (१) राज्य सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचीव्दारे, आणि पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन राहून, ह्या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्याकरीता नियम करता येतील.

(२) अशा नियमांत विशेषकरुन आणि पूर्ववर्ती शक्तीच्या सामान्यतेस बाध न आणता पुढील, सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल:–

अ. कलम –५, पोट–कलम (२) आणि कलम १४, पोट –कलम (२) अन्वये, परिषदेच्या आणि समितीच्या सदस्यांना देण्याजोगे पूरक भत्ते आणि ज्या दराने असे पूरक भत्ते देण्यात येतील असे दर;

ब. कलम ७, पोट–कलम (४) आणि कलम १७ अन्वये ज्या रीतीने आणि ज्या कार्यपध्दतीनुसार परिषद आणि समिती आपले कामकाज चालवतील ती रीत आणि कार्यपध्दती;

क. कलम – ८, पोट – कलम (२) अन्वये संचालक म्हणून नियुक्ती केली जाण्याकरिता आवश्यक असलेली अर्हता;

ड. कलम–९ पोट–कलम (२) याच्या खंड (ड) अन्वये ग्रंथालय निधींतून सहाय्यक अनुदाने देण्याच्या प्रयोजनार्थ, संचालक, सार्वजनिक ग्रंथालये आणि राज्य, विभागीय व इतर ग्रंथालय संघ यांना ज्या नियमांनुसार मान्यता देईल ते नियम;

इ. कलम ९, पोट–कलम (२) च्या खंड (जे) अन्वये, संचालक ज्या इतर शक्तींचा वापर करील व जी इतर कर्तव्ये पार पाडील त्या शक्ती व ती कर्तव्ये;

फ. कलम १०, पोट –कलम (२) अन्वये महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवेतील व्यक्तींचा सेवाप्रवेश आणि सेवेच्या शर्ती;

ग. कलम १२ अन्वये सार्वजनिक ग्रंथालयाची कामे;

ह. कलम १३ अन्वये समितीवर नामनिर्देशित करावयाच्या ग्रंथपालाच्या अर्हता;

ज. कलम २५ अन्वये राज्य सरकारकडे सादर करावयाची माहिती व तपशील.

(३) या कालमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरीता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय शासकीय

राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल तर अशी अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून, तो नियम, यथास्थिती केवळ अशा फेरफार केलेल्या स्वरुपात अमलात येईल किंवा तो अमलात येणार नाही.तथापि असे कोणतेही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

हा कायदा महाराष्ट्र राज्यात सन १९६७ मध्ये अस्तित्वात आला. ग्रंथालय कायदा पारीत करण्यासाठी पुष्कळ प्रयत्न करावे लागले. संघर्षातून अस्तित्वात आलेल्या या ग्रंथालय कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत,

१) इ. स. १९६७ मध्ये महाराष्ट्रात ग्रंथालय कायदा संमत झाला आणि प्रत्यक्षात इ. स.१९६८ मध्ये त्याची अंमलबजावणी सुरु झाली.

२) यामागे एक निश्चित हेतू पुढीलप्रमाणे होता; सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करुन त्यांचे जतन, संघटन आणि विकास करता, यावा यासाठी हा कायदा संमत करण्यातआला.

३) आंध्रप्रदेश किंवा कर्नाटक राज्याप्रमाणे या कायद्यात 'स्टेट लायब्ररी ॲथॉरिटी' च्या स्थापनेची तरतूद नाही. त्याऐवजी, 'स्टेट लायब्ररी कौन्सिल' ची निर्मिती करण्याची सोय आहे.

४) 'डिपार्टमेंट ऑफ लायब्ररीज' ची निर्मिती करून एक 'पूर्णवेळ' व्यक्तीची नेमणूक करण्याची यात तरतूद केली आहे.

५) याआधी झालेल्या कायद्यांप्रमाणे या कायद्यातही 'ॲडव्हायझरी स्टेट लायब्ररी कौन्सिल'– तयार करण्याची तरतूद असून, त्याचे चेअरमन, शिक्षणमंत्री आणि सचिव म्हणून सार्वजनिक ग्रंथालय संचालक यांची नेमणूक करता येते.

अशी वैशिष्ट्ये असणाऱ्या कायद्यातील पुढील काही गोष्टींची तरतूद केलेली नाही. त्यामुळे काही त्रुटी किंवा उणीवा जाणवतात.

- महाराष्ट्र राज्यात ग्रंथालय सेवा मिळावी म्हणून हा कायदा केला; पण राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांचा विचार केला गेला नाही.
- राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये एकमेकांशी संबंध जोडून ग्रंथालयांचे नेटवर्क करणे सक्तीचे करण्याची तरतूद या मध्ये नाही.

- या कायद्यानुसार ‘जिल्हा ग्रंथालय समिती’ ची स्थापना करता येते; पण त्यात, शैक्षणिक क्षेत्रातील व इतर स्थानिक कार्यातील प्रमुख व्यक्तींना पुरेसे प्रतिनिधित्व दिलेले नाही.
- या कायद्यानुसार कोणत्याही ‘करा’ ची योजना केलेली नाही, तर राज्यसरकारकडून अनुदान मिळण्याची तरतूद आहे. त्यासाठी रु. २५ लाख ही कमीतकमी मर्यादा आहे.
- ‘प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट’ मुळे प्राप्त होणाऱ्या वाचनसाहित्याच्या योग्य उपयोगाची तरतूद केलेली नाही.
- या कायद्यानुसार नि:शुल्क ग्रंथालयसेवेची तरतूद केलेली नाही.
- कोणत्याही ‘करा’ ची योजना नसल्याने ठोस अशा आर्थिक पायाचा आधार ग्रंथालयाला नाही.
- प्रत्येक प्रकारच्या ग्रंथालयाना मिळणाऱ्या अनुदानाची मर्यादा निश्चित केलेली असल्याने, प्रसंगी अनुदान अपुरे पडले तरी वाढू शकत नाही.
- ग्रंथालयांची तपासणी अगर वार्षिक अहवाल याबाबतची ‘अधिकृतता’ (Authenticity) स्पष्ट केलेली नाही.

या कायद्यानुसार सार्वजनिक ग्रंथालयांच्या चार श्रेणी ठरविल्या गेल्या आहेत. त्यांचे नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत –

**✻ ‘अ’ वर्ग :**

ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून त्यास १५,००० हून अधिक ग्रंथ असावेत. ५० नियतकालिकांची त्यांनी दरवर्षी वर्गणी भरली पाहिजे. दररोज कमीत कमी १५ वृत्तपत्रे आली पाहिजेत. वाचक म्हणून किमान ३०० सभासदांची नोंदणी झाली पाहिजे. ग्रंथालयाच्या इमारतीत स्वतंत्र बालविभाग आणि स्त्रियांसाठी खास, वेगळा वाचनकक्ष असला पाहिजे. ग्रंथालयाचे कामकाज सुरळित व्हावे म्हणून १ तरी ‘पूर्णवेळ’ ग्रंथपाल असला पाहिजे. ग्रंथालयाची वेळ कमीतकमी सात तास तरी असावी. विस्तारीत कार्यक्रम म्हणून निदान १० तरी सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी केले पाहिजे.

**※ 'ब' वर्ग :**

या प्रकारच्या ग्रंथालयात ५००० हून अधिक ग्रंथसंख्या असावी. १५ नियतकालिके आणि ५ तरी वृतपत्रे घेतली जावीत. १०० हून अधिक सभासदांनी नोंदणी केलेली असावी. या ग्रंथालयातही बालविभाग स्वतंत्र असावा आणि स्त्रियांसाठी वेगळा वाचनकक्ष असावा. कार्यक्षम ग्रंथालयसेवा देता येईल अशा योग्य फर्निचरची सोय केलेली असावी. ग्रंथालयाची कामकाजाची वेळ किमान सात तास आणि१ तरी 'पूर्णवेळ' ग्रंथपाल नेमला जावा. ग्रंथालयाची प्रसिध्दी व्हावी म्हणून दर तिमाहीस एक तरी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला जावा.

**※ 'क' वर्ग**

या वर्गातील ग्रंथालयांमधील ग्रंथसंख्या १००० हून अधिक असावी. ५ नियतकालिके आणि किमान ३ वृत्तपत्रे येथे घेतली जावीत. सभासदसंख्या ५० हून जास्त असावी. 'पूर्णवेळ किंवा निदान 'अर्धवेळ' तरी ग्रंथपाल नेमलेला असावा. ग्रंथालयीन कामास व वाचकांसाठी पुरेशा फर्निचरची सोय असावी. रोज कमीतकमी ३ तास तरी ग्रंथालयाचे कामकाज चालावे. एकूण संग्रहातील कमीत कमी २०% वाचनसाहित्य बालकांना योग्य असे असावे.

**※ 'ड' वर्ग :**

ड वर्गातील ग्रंथालयांसाठी १०० पेक्षा अधिक ग्रंथ असले पाहिजेत. ५ नियतकालिके आणि ३ वृत्तपत्रे घेतली पाहिजेत. निदान २५ किंवा त्याहून जास्त सभासद असावेत. दररोज किमान ३ तास तरी कामकाज चालावे. एकूण ग्रंथसंग्रहापैकी निदान २०% वाचनसाहित्य बालवाचकांना योग्य असे असावे.

या सर्वच ग्रंथालयांना महाराष्ट्र शासनाकडून वार्षिक अनुदान मिळते. अर्थातच ते सर्व ग्रंथालयांना समान नसते. कारण त्याच्या वेगवेगळ्या वर्गवारीनुसार अनुदान देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. कायद्याअंतर्गत तरतुदीस पुढील काळात विविध शासन निर्णयाद्वारे अनुदानामध्ये केवळ वृद्धी करण्यात आलेली आहे. विद्यमान स्थितीत या तरतुदीकरिता शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र.म.रा.ग्रं.

२००९/३७६/०९ सारी –५ दि. १२ ऑक्टोबर २०११ व ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र. १२/२०१२ –१३/१४७५०, दि. ०१–३–२०१३ व उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. मराग्र २०१३, पत्र क्र. ६९, साशी ६५ दि. २६ एप्रिल २०१३ नुसार अनुदानाचे स्वरुप पुढील प्रमाणे आहे.

| **ग्रंथालयप्रकार** | **अनुदान कमाल रुपये** | |
|---|---|---|
| ग्रंथ देवघेव केंद्र | १०००/– | * पूर्वीच्या तरतुदी |
| ग्राम ग्रंथालय | १००/– | * पूर्वीच्या तरतुदी |
| जिल्हा ग्रंथालय 'अ' | ७,२०,०००/– | |
| इतर ग्रंथालये 'अ' | २,८८,०००/– | |
| जिल्हा ग्रंथालये 'ब' | ३,८४,०००/– | |
| तालुका ग्रंथालये 'ब' | २,८८,०००/– | |
| इतर ग्रंथालये 'ब' | १,९२,०००/– | |
| तालुका ग्रंथालये 'क' | १,४४,०००/– | |
| इतर ग्रंथालये 'क' | ९६,०००/– | |
| सर्व ग्रंथालये 'ड' | ३०,०००/– | |

** संस्था हिस्सा १० टक्के, वेतन ५० टक्के, वेतनेत्तर ५० टक्के*

ग्रंथालयानी मागणी केल्यास त्यांच्या इमारतीसाठीसुध्दा शासनाकडून अनुदान मिळू शकते.

कायद्याअंतर्गत निरीक्षण, वेतन अशा स्वरुपाची महाराष्ट्रातील 'ग्रंथालय संचलनालय' (Library Directorate) कर्तव्ये पूर्ण करते. याशिवाय, ग्रंथालय प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाच्या वर्गांना मान्यता देणे, त्यांची तपासणी करणे, परीक्षा घेऊन प्रशस्तिपत्रके देणे ही कार्येही संचालनालयाकडून होतात.

**महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा एक दृष्टीक्षेप :**

१९२८ साली मद्रास ग्रंथालय संघाची स्थापना करुन सातत्याने २० वर्षे प्रयत्न केल्यानंतर १९४८ साली मद्रास सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला.

डॉ. रंगनाथन यांच्याच मार्गदर्शनाने १९५५ साली हैद्राबाद ग्रंथालय कायद्याची निर्मिती झाली. हैद्राबाद राज्याचे विभाजन झाल्यानंतर हैद्राबाद आणि मद्रास ग्रंथालय कायद्याचे विलिनीकरण होऊन १९६० साली आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायदा अंमलात आला. भाषावार प्रांतरचनेमुळेच १९६५ साली कर्नाटक सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला. इतकेच नव्हे तर महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ ची निर्मिती झाली. याला मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळीची पार्श्वभूमी होती.

१ मे १९६८ पासून महाराष्ट्रात सर्वप्रथम ग्रंथालय संचानालय स्थापन झाले. आज मितीस देखील तामिळनाडू आणि आंध्रराज्यात ग्रंथालयशास्त्र पारंगत स्वतंत्र ग्रंथालय संचालक लाभले नाहीत. तामिळनाडू ग्रंथालय संचालनाचे स्वतंत्र अस्तित्वच नाही. आंध्रप्रदेशात शिक्षण खात्यातीलअधिकारी ग्रंथालय संचालक हे पद भूषवितात. कर्नाटक राज्यात मुख्य ग्रंथपाल आणि ग्रंथालय संचालक हे पद एकाच व्यक्तीने भूषविले आहे. महाराष्ट्र दिनाच्या स्थापनेनंतर आठ वर्षांनी! पद्मश्री शि. रा. रंगनाथन यांचे पट्टशिष्य म्हणून महाराष्ट्र ग्रंथालय कायदा अनेक त्रुटी असूनही समर्थपणे महाराष्ट्राचे अभिरक्षक म्हणून श्री. कृ. र. पुराणिक यांनी ग्रंथालय संचनालय समर्थपणे सांभाळले.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा, १९६७ हा इतर राज्यांपेक्षा काही बाबतीत वेगळा आहे. फैजी समितीच्या अहवालामुळे पूर्वीच्या मुंबई राज्यात मध्यवर्ती ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालये, तालुका–पेठा ग्रंथालये व शहर ग्रंथालये अस्तित्वात आली होती. मध्यवर्ती ग्रंथालय हे एशियाटिक सोसायटीकडे कायमस्वरुपी म्हणून देण्यात आले तर जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी सार्वजनिक विश्वस्त संस्थांनी चालविलेल्या ग्रंथालयांनाच जिल्हा आणि तालुका वाचनालये म्हणून मान्यता आणि खर्चाच्या ७५ % आणि जास्तीतजास्त ६०००/१००० रुपये अनुदान देण्यात येऊ लागले.विदर्भ विभागातील आठ जिल्ह्यांत नागपूर येथील शासकीय ग्रंथालयाबरोबर आठही जिल्ह्यांत भारत सरकारच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेनुसार ग्रंथालय विकास योजना क्रमांक ४ क राबविली जात होती. जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण ग्रंथालयांना केवळ रु. ५०० अनुदान मिळत असे. ग्रंथ आणि फर्निचर हे दोनच मान्य खर्च होते.एकाच गावी एकापेक्षा अधिक ग्रंथालयाना या नियमानुसार

अनुदान मिळे. मराठवाड्यात हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा अंमल सुरु झाला होता. कायद्यानुसार काही जिल्ह्यांत ग्रंथालय कर वसूल होत होता. जिल्हा, तालुका आणि शहर ग्रंथालयांना मर्यादित प्रमाणात अनुदान मिळे.

श्री. कृ. द. पुराणिक यांनी ग्रंथालय संचालक आणि ग्रंथालय शास्त्राचा अभ्यासक या दोन्ही नात्याने तीन राज्यातील कायद्यातील महत्वाच्या तरतुदी बरोबर महाराष्ट्रातील जनतेने चालविलेल्या ग्रंथालयांच्या विकासाकरिता प्रयत्न करताना केवळ रु. ७ लक्षाचे वाटप करीत करीत मूळच्या ३८० या ग्रंथालय संख्येत लक्षणीय वाढ झाली. ग्रामीण ग्रंथालयाच्या विकासात केवळ नियमावर बोट न ठेवता ग्रंथालय संघाना कार्यप्रवणही केले. ग्रंथालय संघआणि शासन एकाच व्यासपीठावर सहकार्याने कार्यरत झाले.

१९६८ ते १९८० हा एक तपाचा कालखंड ग्रंथालयांच्या विकासातील महत्वाचा टप्पा म्हणून ओळखला गेला. राज्य ग्रंथालय परिषद, जिल्हा ग्रंथालय समित्या, जिल्हा विभाग आणि राज्य ग्रंथालय संघाची अधिवेशने खेळीमेळीच्या वातावरणात आयोजित करण्यात आली. श्री. कृ. द. पुराणिक आणि राज्यग्रंथालय संघाचे अध्वर्यु कै.वा. वि. भट, श्री. ना. वि. देशपांडे, श्री. बाळासाहेब लिमये, मा. ग. प्रधान, गंगाधर पटणे, श्री. ना.नि. देशपांडे या व्यक्तींचा सततच्या प्रयत्नातून ग्रंथालय चळवळीचा समर्थ केला आहे महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी अनेक लोकनेत्यांचे, सामाजिक कार्यकर्त्यांचे योगदान मोलाचे आहे.

महाराष्ट्र ग्रंथालय कायद्याचे ठळक वैशिष्ट्ये असे आहे की ग्रंथालय विकासासाठी ग्रंथालय कायद्यात प्रकरण ६, कलम २० मध्ये खाली दिल्याप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

The State Government shall offer due appropriates made by law in this behalf, contribute to the Library Fund,a sum not less than 25 lakhs of rupees.

कै. वि. स. पागे सभापती आणि जळगावचे आमदार राजा मंत्री या दोघांमुळे किमान २५ लक्षाची तरतूद झाली होती.

ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला, त्या वेळी महाराष्ट्रात ग्रंथालयांची संख्या केवळ ३८० होती. महाराष्ट्र शासनाचा ग्रंथालयावरील वार्षिक खर्च केवळ ७ लक्ष रुपये होता. मद्रास आणि आंध्रप्रदेश या राज्यात ग्रंथालय कर वसूल करण्यात येतो. या कराइतकीच रक्कम शासन ग्रंथालय निधीत भर म्हणून टाकते. या दोन्ही राज्यातील एकंदर ग्रंथालय निधी २०-२५ लक्षाच्यावर जवळपास होता. त्यामुळे महाराष्ट्र ग्रंथालय कायद्यात १९६७ साली किमान २५ लक्ष रुपयांची तरतूद निश्चितपणे स्वागतार्ह होती. ग्रंथालय संचालनालयात प्रकाशित केलेले आकडे पाहिल्यास असे दिसून येईल की १९७३-७४ साली केवळ १८ लक्ष, ६२ हजार रुपयेच खर्च झाला. ग्रंथालयाच्या संख्येत १०४५ ग्रंथालयांची नोंद झाली, ही संख्या १ जानेवारी १९८३ रोजी ४००० पर्यंत पोचली. जिल्हा ग्रंथालय संघ आणि राज्य ग्रंथालय संघांना दरवर्षी खर्चाच्या ७५% आणि जास्तीत जास्त रु. १२,००० (आता २४,०००) आणि १,००० ( आता २,०००) अनुदान देणारे महाराष्ट्र हेच एकमेव राज्य आहे. आज तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रव्यतिरिक्त पश्चिम बंगाल, मणिपूर, केरळ आणि हरियाणा या चार राज्यात ग्रंथालय कायदा संमत झालेला आहे. कायदा अस्तित्वात आला त्यावेळी १९६७ साली महाराष्ट्रात २६ जिल्हे होते. त्याही कालखंडात सर्वच जिल्हा ग्रंथालय संघ अनुदान घेत नव्हते. राज्य ग्रंथालय संग मात्र नियमितपणे अनुदान घेत असे. आज ग्रंथालय संघाचे संघ मात्र नियमितपणे अनुदान घेत असे. ग्रंथालय संघाचे अनुदान दुप्पट वाढूनही ३० ग्रंथालय संघ वाढीव रु. २,००० प्रमाणे एकूण रुपये ६०,००० अनुदान घेत नाहीत. राज्य ग्रंथालय संघाचे रु. २४,००० अनुदान घेण्यास राज्य ग्रंथालय संघ अपात्र ठरावा ही बाब त्याकाळात दुर्दैवी होती. ग्रंथालय शास्त्रावरील ग्रंथ प्रकाशनासाठी खर्चाच्या ७५% मिळणारे अनुदान एकदा जे खंडीत झाले ते आजतागायत खंडीतच आहे. श्री. कृ. द. पुराणिक यांच्या निवृत्तीनंतर श्री. कृ. मु. उजळंबकर यांची ग्रंथालय संचालक म्हणून नियुक्ती झाली. एकाच गुरुचे दोन विद्यार्थी एका पाठोपाठ संचालक पदावर आरुढ झाले याला योगायोग म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. हैद्राबाद ग्रंथालय संघाची स्थापना करुन अवघ्या दोन वर्षांच्या कालावधीत ग्रंथालय संघाच्या सामर्थ्यावर हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ घडविण्यात श्री. उजळंबकर

यांचा सिंहाचा वाटा होता. ग्रंथालय हे नियतकालिक नियमितपणे इंग्रजी आणि हिंदी भाषेत त्यांनी चालविले होते. ग्रंथालय शास्त्राचे रिफ्रेशर सर्टिफिकेट आणि डिप्लोमा असे तीन वर्ग संघातर्फे त्यांनी चालविले होते. सुदैवाने महाराष्ट्राला श्री.मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री लाभले. हैद्राबाद राज्याला श्री.गोपाळराव एकबोटे हे शिक्षणमंत्री लाभले. वयाची ८० वर्षे उलटूनही श्री. गोळराव एकबोटे ग्रंथालय चळवळीत सक्रीय भाग घेत असत.

ग्रंथालय विकासाच्या पहिल्या तपात संख्यात्मक वाढ झाली. ती १९८० ते १९९२ या कालखंडातच! ‘गाव तेथे ग्रंथालय’ ही संकल्पना राबविताना ग्रामीण भागात प्रथम नवचैतन्याचे वारे संचारले तरी कार्यकर्त्यांचा उत्साह सतत वृध्दिंगत होण्यासाठी अनुदानात वाढ होण्याची नितांत गरज होती. ग्रंथालयाच्या विकासात कार्यकर्ता आणि ग्रंथपाल या दोघांचा समान वाटा असावा लागतो. विद्यापीठ अनुदान मंडळाने विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या वेतनश्रेणीत प्राध्यापकाच्या वेतनश्रेणी समकक्ष वाढ केली आणि सार्वजनिक ग्रंथालयातील सेवक वर्ग आपल्या तुटपुंज्या वेतन श्रेणीबाबत कुजबुजू लागला. शासनाने शिक्षणमंत्री प्रभाराव समिती नेमली. समितीने अहवाल सादर केला. शासनाने आजमितीपर्यंत हा अहवाल प्रकाशित केला नाही. आजही  जिल्हा, तालुका ग्रंथालयातील पूर्णवेळसेवक वेतश्रेणीपासून वंचित राहिला आहे. वेळोवेळी शासनाने अनुदानात वाढ करताना वाचनालयाच्या एकंदर मान्य खर्चापैकी ४०% अनुदान ग्रंथालय सेवकावर खर्च व्हावे अशी माफक अट सार्वजनिक ग्रंथालयांवर लादली.

सार्वजनिक ग्रंथालय कायद्याच्या वाटचालीत त्यागी ग्रंथालय कार्यकर्त्यांचे योगदान विसरता येणार नाही. त्याचबरोबर आयुष्याची २०–२५ वर्षे ग्रंथालय सेवेत व्यतीत करुनही ग्रंथालय ग्रंथपाल सेवकांना निवृत्ती वेतन, निर्वाह निधीचा देखील लाभ या ग्रंथपालाना मिळाला नाही. श्री. म. सी. चहांदे यांच्या कालखंडात शासनाने दुसऱ्यांदा वाढ पुढेही वेळोवेळी करुनही हा प्रश्न आजही तितकाच तीव्र आहे. आंध्रपप्रदेशाने ग्रंथालय सेवेतील सर्व सेवकांना शासकीय सेवकाप्रमाणे वेतनश्रेणी आणि सेवानिहाय लागू करुन हा प्रश्न समाधानकारपणे सोडविला आहे.

महाराष्ट्र शासनाला हा प्रश्न सोडवायचा असेल तर महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम १९६७, प्रकरण ६ मधील कलम २० मध्ये आजच्या वाढत्या महागाईचा संदर्भ लक्षात घेऊन खालीलप्रमाणे बदल त्वरीत करावा लागेल.

20 : The State Government shall offer a due appropriates made by law in this behalf contribute to the Library Fund, a sumnot less than 10 crores of rupees.

या बदलाबरोबरच शासनाला आणखी एक साहसी पाऊल उचलावे लागले. कलम २१ चा आजपर्यंत विशेष उपयोग केला गेला नाही. साक्षर झालेल्या जनतेची साक्षरता कायम टिकविण्यासाठी गावोगावी सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करण्याची नितांत गरज आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी मोफत ग्रंथालय सेवा उपलब्ध झाली तरच या समाजाला प्रगतीच्या दिशेने मार्ग क्रमण करता येईल. वाट चोखाळता येईल. झोपडपट्टीतून वर्गणी देऊन ग्रंथालय निर्माण होण्याची शक्यता फारच कमी आहे. कलम २१ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करावी:

21 : The State Government shall make special grants of not less than 5 crores of rupees in Five Year Plan.

पुरोगामी महाराष्ट्र राज्यात विशेष स्वरुपात भरघोस अनुदान उपलब्ध करुन देण्याची प्रतिक्षा सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्र करत आहे. पश्चिम बंगालने १९७९ सालीच कोटींची तरतूद केली. आज १० कोटीहून अधिक खर्च करुन पश्चिम बंगालने आघाडी घेतली आहे. महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम १९६७ मधील वरील दोन दुरुस्तीने ग्रंथालयांचा प्रश्न संपूर्णत: मिटेल असे नव्हे. 'गाव तेथे ग्रंथालय' ही कल्पना प्रत्यक्षात येण्यास ग्रंथालय संचालनालय आणि ग्रंथालय कार्यकर्त्यांना याद्वारे प्रेरणादायी वातावरण निश्चितपणे निर्माण होईल.

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय State Central Library**

सार्वजनिक ग्रंथालय कायद्याच्या वाटचालीत राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा सिंहाचा वाटा असतो. ग्रंथालय पध्दतीचे यश अपयश या ग्रंथालयावर अवलंबून असते. भारताच्या ग्रंथालय विकासात सर्वोच्च स्थान राष्ट्रीय ग्रंथालयास 'National Library' आहे. अलीकडे तर पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर असे देशाचे भौगोलिक विभाग करुन राष्ट्रीय ग्रंथालय सेवा देण्यात आली आहे. ब्रिटिश म्युझियम लायब्ररी, लायब्ररी ऑफ कॉँग्रेस, लेनीन पब्लिक

लायब्ररी, बिबिलोथिका फ्राँस ही ग्रंथालये त्या त्या राष्ट्राचे मानबिंदू ठरली आहेत. ज्ञान आणि माहिती जगाच्या कानाकोपऱ्यातून उपलब्ध करुन देऊन आपल्या संशोधकांना तत्परतेने उपलब्ध करून देण्याचा उपक्रम अनुकरणीय आहे.

असे मध्यवर्ती ग्रंथालय एशियाटीक सोसायटीकडे असावे की महाराष्ट्र शासनाकडे यावर अधिक उहापोह न करता राज्यातील जनतेला ग्रंथालय सेवा देण्यावरच अधिक भर द्यायला हवा. महाराष्ट्रातील मध्यवर्ती ग्रंथालय हे भारतातील चार ग्रंथालयांपैकी एक असून Delivery of Act, १९५५ नुसार भारतातील सर्व वाङ्मयाचे जतन करण्याची जबाबदारी या ग्रंथालयावर आहे. सोसायटीच्या ग्रंथालयाची वैभवशाली परंपरा जतन करायला हवीच. तसेच राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाने ग्रंथालय पध्दतीची स्थापना करुन देवाणघेवाण पध्दतीचा अवलंब करुन ग्रंथालय कायद्याच्या विकासातील महत्वाचा वाटा उचलला पाहिजे.

**शासकीय विभागीय ग्रंथालये Government Divisional Library**

प्रशासकीय विभागानुसार महाराष्ट्रात पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक रोड येथे चार शासकीय विभागीय ग्रंथालये स्थापन झाली आहेत. रत्नागिरी येथे पाचवे उपकेंद्र आहे. फिरती ग्रंथालये, शाखा ग्रंथालये, ग्रंथालय केंद्रे, उघडून या ग्रंथालय सेवेचा लाभ विभागातील ज्ञानोपासकांना अधिकाधीक प्रमाणात उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.

**शासकीय जिल्हा ग्रंथालये Government Distrct Library**

भारत सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेत ग्रंथालय विकास योजना क्रमांक ४ म्हणून ही योजना विदर्भातील आठ जिल्ह्यातच राबविली जाते. ग्रामीण भागात वाचनाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने या योजनेतील दोष काढून संपूर्ण महाराष्ट्रात ही योजना राबविली जावी. जिल्हा ग्रंथपाल हा माहिती अधिकाऱ्याचा दर्जा असलेला अधिकारी असावा. या पदावर ग्रंथालय क्षेत्रातील उच्चविद्याभूषीत व्यक्तींची आजकाल निवड केली जात असून ' जिल्हा ग्रंथालय अधिकारी' असे या पदाचे नामकरण करण्यात आले आहे. अनुदानातील वाढ, ग्रंथालय संघाची वेळोवेळी होणारी जिल्हा व राज्य पातळीवरील अधिवेशन यामुळे ग्रंथालय सेवक व कार्यकर्ते क्रियाशील रहाण्यास या कायद्यामुळे प्रोत्साहन प्राप्त झालेले आहे.

**४.९ हरयाणा राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८९ :**

या कायद्याची स्थापन १९८९ मध्ये करण्यात आली. या कायद्याअंतर्गत तरतुदीनुसार सुचविण्यात आलेली ग्रंथालयप्रणाली राज्यस्तरीय ग्रंथालय मंडळ राज्य सार्वजनिक ग्रंथालय आणि सहकारी संस्था या प्रणाली अंतर्गत राज्य स्तरीय अधिकारामध्ये ग्रंथालय खात्याच्या मंत्री या समितीचा अध्यक्ष असेल. इतर शासकीय पदाधिकारी वर्गामध्ये,

सचिव, ग्रंथालय विभाग

सचिव, शिक्षण अर्थ, सांस्कृतिक विभाग

सचिव, स्थानिक मंडळ

सचिव, समाजकल्याण विभाग

आणि सचिव – राज्य पंचायत विकास, विभाग याचबरोबर संचालक सार्वजनिक संपर्क विभाग हरियाणा ग्रंथपाल, राज्य ग्रंथालय, राज्यातील विद्यापीठाचे कुलगुरु, अध्यक्ष, राज्य ग्रंथालय संघटना असे इतर सदस्य असून ग्रंथालय संचालक हा समितीचा सचिव असेल.

याचबरोबर राज्य विधीमंडळाने नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी आणि ग्रंथालय विषयक ज्ञान असणारे तीन (०३) सदस्य याचे नामनिर्देशित समितीच्या अध्यक्षाने करावयाचे आहे. अशा सदस्याचे हे मंडळ वर्षातून कमीत कमी अकरा सभा घेईल आणि राज्यातील ग्रंथालयविषयक बाबी संदर्भात सेक्शन (३) नुसार ग्रंथालयसेवाना प्रोत्साहन देण्यासाठी सल्ला देईल. यातंनर एक स्थायी सल्लागार समिती राज्य ग्रंथालय संचलनालय, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय अशी संरचना करण्यात आली असून. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, त्याची खरेदी, ग्रंथालयाचे विभाग आणि राज्य ग्रंथपाल आणि त्याच्या जबाबदाऱ्या इ. विषयी विवेचन या कायद्याअंतर्गत करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात येऊन याचबरोबर या ग्रंथालयाअंतर्गत कलमानुसार,

अ) महानगर /शहर ग्रंथालय

ब) गट ग्रंथालय

क) ग्राम ग्रंथालय

ड) लहान ग्रंथ साठवण केंद्रे

अशी प्रणाली सुचविण्यात आली आहे. यानंतर जिल्हा ग्रंथालयाचे कार्य व जिल्हा समितीची कार्ये विशद करुन महानगर व शहर समितीचे स्वरुप व त्याचे निकष इत्यादी तरतूद या कायद्यात विशद केलेल्या असून गटग्रंथालय समिती, पंचायत ग्रंथालय समिती याचे स्वरुपही देण्यात आले आहे.

सार्वजनिक ग्रंथालयाचे सेवक आणि त्यानंतर त्याची शैक्षणिक पात्रता, सेवाशर्ती नियम याबाबत सूचना करण्यात आली आहे.

ग्रंथालय निधीबाबत तीन प्रकारचे निधी सुचविले असून राज्य ग्रंथालय निधी, जिल्हा ग्रंथालय निधी, महानगर, शहर गट व ग्रामीण ग्रंथालय निधी अशी तरतूद करण्यात आली आहे.अंतीमत: हा निधी राज्य ग्रंथालय निधीमध्ये समाविष्ट करावयाचा आहे.

ग्रंथालय फी विषयक अंतर्गत ग्रंथालय कर म्हणून मालमत्ता कर, घर कर याची तरतूद करण्यात आली असून या संदर्भातील शासनाच्या सुचनेनुसार हा कर गोळा करावयाचा आहे. यानंतर समितीच्या अधिकार क्षेत्राची समितीनिहाय चर्चा करण्यात आलेली असून नियम तयार करणे. राज्य ग्रंथालय संघ, नियमावली तयार करण्याचे अधिकार या संदर्भात चर्चा करुन प्रत्येक नियम हा राज्य विधानपरिषदेकडून मंजूर करुन घेणे अनिवार्य केलेले आहे. यासंदर्भात पुढील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत.

१) हरयाणा राज्यातील ग्रामीण व शहरी विभागात संरचित ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणे.

२) कायद्याअंतर्गत तरतुदीनुसार राज्यात ग्रंथालयाचे जाळे उभारणे.

३) या ग्रंथालयाच्या विकासाचा विचार करुन त्याना पुरक अशी आर्थिक उपलब्धता करुन देण्याची हमी घेणे.

४) ग्रंथालयातील सेवक, प्रशासन आणि ग्रंथालयाचे व्यवस्थापन यासाठी ग्रंथालय अधिकार मंडळ स्थापन करणे.

५) कायम स्वरुपी एकसारखी प्रभावी व विकासात्मक संचालनालयात्मक ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देण्याची हमी घेणे.

६) उपभोक्ताच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सहज सुलभ ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणे.

### ४.१० केरळ राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८९

हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी कायद्याचा मसुदा व १९७१ मध्ये व १९७७ मध्ये तयार करुन तो सादर करण्यात आला होता. तिन्हीवेळा त्याला राज्य परिषदेकडून प्रतिसाद प्राप्त झाला नाही. अंतिमत: हा कायदा १९८९ मध्ये प्रत्यक्षात आला. हा कायदा एकूण १० प्रकरणात तयार करण्यात आला होता. कायद्याचे वैशिष्ट्ये म्हणजे केरळ शासन उच्चस्तरावर ठेवून त्रिस्तरीय रचना करण्यात आली होती. या संचरनेचे स्वरुप

**१) तीन स्तर**

अ) राज्य ग्रंथालय परिषद

ब) जिल्हा ग्रंथालय परिषद

क) तालुका ग्रंथालय संघटना

२) अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव, सरचिटणीस हे राज्य ग्रंथालय परिषदेवर जिल्हा ग्रंथालय परिषदावर आणि तालुका स्थरावर निवडले जातील आणि ते सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रशासनास व संघ यास जबाबदार असतील.

३) वरील तीन प्रशासनीय स्तर हे कार्पोरेट मंडळ म्हणून कार्य करतील आणि कायद्यातील तरतुदीनुसार हे ग्रंथालय विषयक मालमत्ता धारण करणे, त्याची विल्हेवाट लावणे याचबरोबर कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक बाबीची अम्मलबजावणी करतील.

४) जिल्हा ग्रंथालय परिषद आणि तालुका संघटना यांचे प्रतिनिधी राज्य ग्रंथालय परिषदेवर असून ही सर्व पध्दती लोकशाही तत्वाने संरचीत करण्यात आली आहे.

५) राज्य ग्रंथालय परिषद ही सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाबाबत संबंधित घटकाच्या अनुषंगाने राज्य शासनास सल्ला देईल. जिल्हा ग्रंथालय परिषद आणि तालुका संघटना यांच्याशी समन्वय साधून त्याचा सर्व राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीवर राज्य ग्रंथालय परिषद नियंत्रण ठेवेल.

६) त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय हे राज्य ग्रंथालय म्हणून कार्यरत राहील आणि त्याची स्थापना राजग्रंथालय परिषदेतून करण्यात आलेली आहे. राज ग्रंथालय परिषदेच्या परवानगीने त्याच्या पर्यवेक्षणाखाली जिल्ह्यातील ग्रंथालय सेवा समन्वित व नियंत्रित

करण्याचे काम जिल्हा ग्रंथालय परिषद करेल. तसेच जिल्हा ग्रंथालय परिषद, ग्रंथालय, देशातील सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था आणि ग्रंथालये यांच्यामध्ये सहकार्य निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देईल.

७) या कायद्याची वैशिष्ट्ये. विचारात घेता तालुका संघटनाची घटनात्मक संरचना आणि त्याना दिलेले अधिकार आणि या अधिकाराअंतर्गत त्यांनी ग्रंथालय सेवांचे पर्यवेक्षण करणे, त्यांच्यामध्ये समन्वय साधून नियंत्रण ठेवणे आणि या सर्व संलग्नित ग्रंथालयाना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मार्गदर्शन करणे व सल्ला देणे याबाबतची तरतूद करणे.

८) राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील ग्रंथालयाना वाचन साहित्य केरळ राज्य स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येईल.

९) राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरील मंडळाना दिलेले स्वातंत्र्य हेही या कायद्याचे एक महत्त्वपूर्ण विशेष वैशिष्ट्ये आहे.

१०) या कायद्याचे विशेष उल्लेखनीय वैशिष्ट्ये म्हणजे केरळा ग्रंथालय संघाचे सर्व सेवक भाग भांडवल, जबाबदाऱ्या यासर्वांचे राज्य ग्रंथालय परिषदेमध्ये केलेले विसर्जन हे होय.

११) या कायद्याअंतर्गत ग्रंथालय कर हा घर कर, मालमत्ता कर याच्या माध्यमातून पंचायत नगरपरिषदा आणि नगरपरिषदा यास्तरावर गोळा करणेची तरतूद.

१२) राज्य ग्रंथालय परिषद राज्य ग्रंथालय निधी उभा करेल, त्याव्दारे राज्य ग्रंथालय परिषद, जिल्हा ग्रंथालय परिषदा, संघटना याच्या विषयीच्या खर्चाची तरतूद निधीच्या माध्यमातून करण्यात आली आहे. तसेच राज्य स्तरावर गोळा करण्यात आलेला कर राज्याकडून प्राप्त झालेले अनुदान हे सर्व राज्य ग्रंथालयाच्या निधीमध्ये जमा करण्यात येईल.

१३) सर्व समित्यामध्ये अनुसूचित जाती व जमाती मधील एकमहिला यांच्याकरीता ठेवण्यात आलेले प्रत्येक समितीमध्ये आरक्षण ही या कायद्याचे महत्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे.

१४) संलग्नित अनुदानातील ग्रंथालयाना योग्य मान्यतेची आवश्यकता.

अशी वैशिष्ट्ये असून या कायद्याअंतर्गत पुढील प्रमाणे ग्रंथालय प्रणाली पाच स्तरावर संरचित करण्यात आलेली आहे.

स्तर १ – केरळ शासन

स्तर २ – राज्य ग्रंथालय परिषद

स्तर ३ – त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय व ग्रंथालय परिषद

स्तर ४ – तालुका संघटना, जिल्हा ग्रंथालये, फिरती ग्रंथालय

स्तर ५ – तालुका ग्रंथालये आणि शाखा ग्रंथालय आणि फिरती ग्रंथालये

एकूणच या कायद्यामध्ये बहुतांशी तरतुदी इतर कायद्याप्रमाणे असलेल्या तरी त्याच्या संरचनात्मक रचनेमध्ये बदल आहे. या कायद्याअंतर्गत राज्य ग्रंथालय परिषद, जिल्हा ग्रंथालय परिषद आणि विशेषतत्वाने राज्य ग्रंथालय संघटना याना कोर्पोरेट मंडळ म्हणून दिलेली मान्यता आणि या मंडळावर अध्यक्ष ते सहसचीव पदावर निवड पध्दतीने केली जाणारी नेमणूक ही वैविध्यपूर्ण असून एकूणच ही प्रणाली लोकशाही स्वरुपाची असल्याने ती कौतुकास्पद आहे.

## ४.११ तमिळनाडू राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८
## (दि. १ एप्रिल १९५० पासून लागू)

**प्रस्तावना :**

तामिळनाडू (मद्रास) राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना आणि ग्रामीण व नगरामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचे संगठन करण्याच्या उद्देशाने या अधिनियमाची स्थापना करण्यात आली.

### प्रकरण पहिले
### प्राथमिक

**१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ :**

१. हा अधिनियम तमिळनाडू (मद्रास) राज्य सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९४८ म्हणून संबोधला जाईल.

२. या अधिनियमाचा विस्तार किंवा प्रसार संपूर्ण तमिळनाडू राज्यात होईल.

३. या अधिनियमाचा प्रारंभ राज्य सरकारद्वारे शासकिय राजपत्रात अधिसुचनेद्वारे निर्धारीत तिथीपासून होईल.

**२. व्याख्या:**

या अधिनियमात खालील व्याख्या निर्धारीत केलेल्या आहेत.

१. अनुदान प्राप्त ग्रंथालय म्हणजे,सरकार कडून अनुदान प्राप्त मान्यताप्राप्त ग्रंथालये.

२. निदेशक म्हणजे कलम ४ च्या अंतर्गत नियुक्त केलेला सार्वजनिक ग्रंथालयाचा निर्देशक.

३. जिल्हा म्हणजे राज्यातील जिल्हा.

४. सरकार म्हणजे राज्य सरकार.

५. अधिसूचना म्हणजे, शासकिय राजपत्रात प्रकाशित अधिसूचना.

६. विहित म्हणजे, या अधिनियमाद्वारे निर्धारीत नियम.

७. राज्य म्हणजे तमिळनाडू राज्य

८. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे, सरकार किंवा स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे स्थापन किंवा अनुरक्षित ग्रंथालय.

९. वर्ष म्हणजे आर्थिक वर्ष

## प्रकरण दुसरे

## राज्य ग्रंथालय समिती

**३. राज्य ग्रंथालय समिती आणि त्याची कार्ये :**

१. सरकारला संबंधित विषयामध्ये ग्रंथालयाकडून परामर्ष घेण्याच्या प्रयोजनासाठी राज्य ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात येते.

२. समितीची निर्धारीत नियम व अटीनुसार स्थापना केली जाऊन समितीद्वारे निर्धारीत अधिकारांचे उपयोजन व कर्तव्याचे पालन केले जाईल.

## प्रकरण तिसरे

## निर्देशक आणि त्यांची कर्तव्ये

**४. निदेशकाची नियुक्ती आणि त्यांची कर्तव्ये :**

सरकार राज्य ग्रंथालयाच्या नियंत्रणासाठी निदेशकाची नियुक्ती करेल. निदेशकाद्वारे खालील कर्तव्यांचे पालन केले जाईल.

१. केंद्रीय ग्रंथालय (सरकारद्वारे केंद्रीय ग्रंथालयाच्या स्वरुपात स्थापन केलेले ग्रंथालय किंवा सरकारद्वारे केंद्रीय ग्रंथालयाच्या स्वरुपात मान्यता प्राप्त विद्यमान शासकीय ग्रंथालय) तसेच या ग्रंथालय शाखांचे प्रबंधन करेल.

२. सार्वजनिक ग्रंथालयासंबंधित सर्व बाबींचे परिक्षण आणि निर्देशन करणे.

३. या अधिनियमाच्या अंतर्गत तयार झालेल्या नियमांना अनुसरून सरकारद्वारे अनुदानप्राप्त ग्रंथालयांची घोषणा करणे आणि त्या ग्रंथालयासंबंधित सर्व बाबींचे परीक्षण व निर्देशन करणे.

४. या अधिनियमाच्या अंतर्गत सर्व स्थानिक ग्रंथालय समितीच्या कामकाजाचे नियंत्रण व परिक्षण करणे.

५. या अधिनियमाच्या अंतर्गत प्रतीवर्षीचा ग्रंथालयांच्या कामकाजाचा आढावा सरकारला सादर करेल.

६. या अधिनियमाच्या अंतर्गत तयार झालेल्या नियमांद्वारे अधोरेखित आणि प्रदत्त कर्तव्याचे पालन आणि अधिकाराचा उपयोग करणे.

## प्रकरण चौथे

## स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना

**५. स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना :**

१. राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाच्या निर्मितीसाठी मद्रास राज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात एक–एक स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात येईल.

२. मद्रास शहरासाठी स्थानिक ग्रंथालय समिती असेल.

   अ. मद्रास महानगरपालिकेचे नियुक्त तीन सदस्य

   ब. सरकारद्वारे नियुक्त खालील आठ सदस्य.

      १. मद्रास शहरातील स्थानिक तसेच सरकारद्वारे मान्यताप्राप्त ग्रंथालयाचे तीन पदाधिकारी.

      २. मद्रास शहरातील उच्च महाविद्यालयातील (माध्यमिक विद्यालयातील) दोन वरिष्ठ मुख्याध्यापक आणि मुख्याध्यापिका.

      ३. मद्रास शहराच्या महाविद्यालयांतील एक प्राचार्य.

      ४. सरकारद्वारे योग्यवेळी योग्य पदासाठी निर्धारीत केलेले तत्सम अधिकारी.

३. प्रत्येक जिल्ह्याच्या स्थानिक ग्रंथालय समितीमध्ये पुढील प्रमाणे सदस्य समाविष्ट होतील.

   अ. निदेशकाद्वारे नामांकित सदस्यांमध्ये,

      १. जिल्ह्यामधील स्थानिक तसेच सरकारद्वारे मान्यताप्राप्त ग्रंथालयांचे तीन पदाधिकारी.

      २. जिल्ह्यातील महाविद्यालयाचे प्राचार्य, माध्यमिक विद्यालयाचे पाच मुख्याध्यापक किंवा मुख्याध्यापिका.

      ३. जिल्हा मंडळाद्वारे नियुक्त एक सदस्य तसेच जिल्ह्यामध्ये दोन किंवा दोनपेक्षा अधिक जिल्हा मंडळ असल्यास प्रत्येक जिल्हा मंडळाद्वारे एक – एक सदस्य.

४. जिल्ह्यातील पंचायतसमितीचा अध्यक्ष किंवा प्रत्येक तालुक्यातील पंचायत समित्यांच्या अध्यक्षांद्वारे निर्वाचित एक सदस्य.

५. जिल्ह्यातील नगरपालिका परिषदेद्वारे नियुक्त सदस्य जे जिल्ह्यातील खालील लोकसंख्येच्या मापदंडानुसार निर्वाचित केलेले असतील.

| | | |
|---|---|---|
| १. एक लाख लोकसंख्या असेलेली नगरपालिका | – | एक |
| २. एक लाखापेक्षा जास्त पण दोन लाखापेक्षा कमी | – | दोन |
| ३. दोन लाखापेक्षा अधिक | – | तीन |

६. सरकारद्वारे वेळोवेळी नियुक्त केलेले अधिकारी.

४. अशाप्रकारे उपकलम २ च्या खंड 'स' किंवा उपकलम ३ च्या खंड 'इ' मध्ये संदर्भित सदस्य हा स्थानिक ग्रंथालय समितीचा सचिव असेल.

५. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती आपल्या एकूण सदस्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड करेल.

६. उपकलम ८ च्या तरतुदीनुसार स्थानिक ग्रंथालय समितीच्या नामांकित किंवा निर्वाचित सदस्यांचा कार्यकाल नामांकनापासून किंवा निवडलेल्या तारखेपासून तीन वर्षे असेल.

७. अतिरीक्त ग्रंथालय समितीच्या नामांकित किंवा निर्वाचित सदस्यांचे पद कोणत्याही कारणाने रिक्त झाल्यास उपकलम २ किंवा ३ च्या नियमानुसार नामांकनाद्वारे रिक्त पदाची पूर्ती करण्यात येते. मात्र नवीन नामांकित व्यक्तींचा कार्यकाल हा उपकलम ८ च्या नियमानुसार पूर्वीच्या सदस्यांचा उर्वरीत कार्यकालापर्यंत त्यांची नियुक्ती असेल.

८. विशिष्ट पदावरील व्यक्ती स्थानिक ग्रंथालय समितीचा नामांकित सदस्य असल्यास ती विशिष्ट पदावर कार्यरत असेपर्यंत समितीचा सदस्य राहील.

९. स्थानिक ग्रंथालय समितीचे कोणतेही कार्य विद्यमान समितीमध्ये दोष निर्माण झाल्यास किंवा रिक्त स्थानामुळे अमान्य होणार नाही.

१०. स्थानिक ग्रंथालय समितीचे सदस्य हे पुनर्नामांकन किंवा पुनर्वाचनासाठी पात्र असतील.

**६. ग्रंथालय समितीच्या संघाची स्थापना :**

प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती ज्या क्षेत्रासाठी स्थापन करण्यात येईल त्यानावाने त्या समितीच्या संघाची स्थापना करण्यात येते. त्या संघटनेच्या नावाची नोंदणी होईल. त्याच नावाने दावा व वाद चालवले जातील. समितीसाठी चल व अचल संपत्तीची खरेदी, संपत्तीचा उपयोग किंवा हस्तांरण करण्यात येईल. तसेच ठरावामध्ये भाग घेण्यासाठी तसेच ज्या प्रयोजनासाठी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे त्यासाठी आवश्यक ते योग्य कार्य करण्याची क्षमता या संघामध्ये असे.

**७. स्थानिक ग्रंथालय समितीच्या कार्यकारणी समित्या आणि उपसमित्या :**

१. स्थानिक ग्रंथालय समिती एक कार्यकारणी समितीची स्थापना करू शकेल. ज्यामध्ये जास्तीत जास्त सात सदस्य असतील. या समितीद्वारे अधिनियमाच्या अधीन काही अधिकार आणि कर्तव्याचे पालन केले जाईल.

२. स्थानिक ग्रंथालय समिती संबंधित विषयामध्ये शोध घेण्यासाठी तसेच विवरण व सल्ला देण्यासाठी वेळोवेळी उपसमितीची स्थापना करु शकते.

**८. स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे प्रस्तुत केल्या जाणाऱ्या योजना :**

१. स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना झाल्यानंतर लगेचच निदेशकाच्या आदेशानंतर प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती आपल्या कार्यक्षेत्रात ग्रंथालयांची स्थापना आणि ग्रंथालय सेवेच्या विस्तारासाठी योजना तयार करेल. किंवा समिती जेव्हा स्वत:ला आवश्यक वाटेल तेव्हा योजना तयार करुन निदेशकाच्या स्विकृतीसाठी निदेशाकडे सादर करेल. निदेशक योजना पडताळून आवश्यक त्या ठिकाणी बदल करुन योजना स्विकृत करु शकतो. निदेशकाच्या मंजुरीनंतर स्थानिक ग्रंथालय समिती योजना कार्यान्वित करेल.

२. निदेशक स्वत: किंवा स्थानिक ग्रंथालय समितीच्या अर्जावरुन उपकलम १ च्या अंतर्गत योजनेमध्ये बदल करु शकतो किंवा पूर्ण योजना नव्याने तयार करु शकतो.

**९. स्थानिक ग्रंथालय समितीचे अधिकार :**

१. सार्वजनिक ग्रंथालयासाठी उपयुक्त जमीन किंवा इमारत खरेदी करणे आणि त्यासाठी आवश्यक सोपस्कार, योजना व साधनसुविधांची सोय करणे.

२. ग्रंथालयामध्ये ग्रंथ, नियतकालिके, दैनिके, नकाशे, कला आणि विज्ञानाची कार्ये तसेच प्रायोगिक नमुने, चित्रदर्शी, सिनेमाची रीळे आणि त्यांच्या उपयोगासाठी आवश्यक अन्य वस्तूंची खरेदी करुन त्यांचा संग्रह करणे.

३. अशा ग्रंथालयासाठी वेळोवेळी आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.

४. सरकारच्या पूर्व परवानगीने सार्वजनिक ग्रंथालय बंद करणे किंवा त्यांच्या स्थळामध्ये परिवर्तन करणे.

५. निदेशक सरकारच्या पूर्व परवानगीने ग्रंथ देणगी स्वीकारु शकतो. किंवा सरकारच्या पूर्व परवानगीने ग्रंथालयांच्या कामकाजाच्या उपयोगासाठी देणगी व निधीचा स्वीकार करणे.

६. व्याख्यान आणि वर्गांच्या प्रबंधनासाठी निर्देश करणे.

७. सामान्यत: या अधिनियमाच्या तरतुदीच्या पालनासाठी सर्व आवश्यक कार्ये करु शकतात.

**१०. स्थानिक ग्रंथालय समितीचे संपत्तीमध्ये एकत्रिकरण/ विलीनीकरण :**

कोणत्याही क्षेत्रातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या उपयोगासाठी खरेदी केलेल्या सर्व चल व अचल संपत्तीचे त्या क्षेत्रातील स्थानिक ग्रंथालय समितीमध्ये विलिनीकरण करता येईल.

**११. स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे करण्यात येणाचा नियमांचे स्वरुप :**

या अधिनियमाच्या अंतर्गत बनवण्यात आलेल्या नियमांच्या प्रयोजनासाठी खालील नियम स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे तयार केले जाऊ शकतात. या अधिकारांच्या व्यापकतेचे स्वरुप,

१. आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रंथलयांच्या निर्धारीत अटीनुसार ग्रंथालय शुल्क भरुन व्यक्तीस प्रवेश देण्यासाठी निर्देश देऊ शकते.

२. ग्रंथालयाचा उपभोग घेणाऱ्या व्यक्तीकडून ग्रंथालय संपत्ती खराब झाल्यास, तिचा दुरूपयोग झाल्यास, नुकसान झाल्यास किंवा हरवल्यास त्या साहित्याच्या पूर्ततेसाठी निर्देश देऊ शकते.

३. ग्रंथालय संपत्तीचे व्यक्तीकडून होणाऱ्या हानिस, दुरूपयोग होत असल्यास नष्ट तसेच गायब होत असल्यास त्या संपत्तीच्या संरक्षणासाठी निर्देश देऊ शकते.

४. जी व्यक्ती ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करु शकत नाही. निर्धारीत नियमांचे उल्लंघन करते अथवा शिस्तीचे पालन करत नाही अशा व्यक्तीस ग्रंथालय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत बाहेर हाकलून देण्याचा किंवा ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करण्याचे निर्देश देऊ शकते.

उपकलम १ च्या अंतर्गत स्थानिक ग्रंथालय समितीने तयार केलेले नियम सरकार स्वमतानुसार स्वविवेकाने पूर्णपणे परिवर्तित किंवा रद्द करु शकते.

निर्धारीत अटीनुसार कोणत्याही नियमात बदल करण्यापूर्वी सरकार स्थानिक ग्रंथालय समितीला आपले मत किंवा खुलासा वजा निवेदन देण्यासाठी योग्य वेळ व संधी देईल.

## प्रकरण पाचवे

## वित्त आणि लेखा स्वरुप

### १२. ग्रंथालय उपकर :

१. अ. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती आपल्या कार्यक्षेत्रामध्ये मद्रास चेन्नई नगर नगरपालिका अधिनियम १९१९, तमिळनाडु जिल्हा नगरपालिका अधिनियम १९२० किंवा तमिळनाडू स्थानिक मंडळ अधिनियम १९२० च्या अंतर्गत वसुल करण्यात येणाऱ्या संपत्ती किंवा गृह कराच्या संपूर्ण रकमेवर ६ पैसे ही रक्कम ग्रंथालय उपकर म्हणून वसूल करेल.

ब. सरकारच्या पुर्वपरवानगीने किंवा सरकारच्या आदेशानुसार स्थानिक ग्रंथालय समिती हा उपकर वाढवू शकते.

२. उपकलम १ च्या अंतर्गत वसुल करावायाचा उपकराचे स्वरुप

१. मद्रास शहरामध्ये मद्रास महानगरपालिकेद्वारे

२. नगरपालिका क्षेत्रामधील नगरपालिकेद्वारे

३. पंचायत क्षेत्रामध्ये पंचायतीद्वारे

४. जिल्ह्यामध्ये नगरपालिका परिषद किंवा पंचायत क्षेत्राद्वारे एकत्रित जिल्हा बोर्डाद्वारे

अशाप्रकारे एकत्रित केले जाणारे उपकर, तमिळनाडू नगरपालिका अधिनियम १९१९, मद्रास जिल्हा नगरपालिका अधिनियम १९२० आणि मद्रास स्थानिक मंडळ अधिनियम १९२० च्या अंतर्गत देय असेलेला गृह व संपत्ती कर.

निर्धारित अटीनुसार सरकार अधिसूचनेद्वारे असा निर्देश देऊ शकते की, पूर्वीचा उपकराला एकत्रित करण्याच्या प्रयोजनासाठी मद्रास नगर नगरपालिका अधिनियम १९१९, मद्रास जिल्हा नगरपालिका अधिनियम १९२० किंवा मद्रास स्थानिक मंडळ अधिनियम १९२० च्या नियमांच्या अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट रुपरेषेमध्ये समाविष्ट करता येईल.

३. उपकलम २ च्या अंतर्गत अशा प्रकारे एकत्रित केलेला कर मद्रास महानगरपालिका, नगरपालिका परिषद, पंचायत किंवा जिल्हा मंडळ संबंधित स्थानिक ग्रंथालय समितीकडे सुपुर्द करेल.

**१३. ग्रंथालय निधी :**

१. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती एक निधी निश्चित करेल ज्याला ग्रंथालय निधी संबोधले जाईल. या निधीमधून अधिनियमाच्या अंतर्गत सर्व कार्यांचा खर्च केला जाईल.

२. ग्रंथालय निधीमध्ये खालील रक्कम प्रमाणे जमा केली जाईल.
   १. कलम १२ चे उपकलम २ द्वारे एकत्रित केलेला उपकर.
   २. सार्वजनिक ग्रंथालयांच्या लाभासाठी देण्यात येणारा निधी, देणगी, भेट
   ३. ग्रंथालयाच्या संबंधित किंवा विशिष्ट उद्देशासाठी सरकारद्वारे देण्यात येणारे अनुदान.
   ४. या अधिनियमाच्या अंतर्गत निर्माण झालेले नियम व विनीमयाद्वारे स्थानिक ग्रंथालय समितीकडे संग्रहीत निधी, दंड आणि अन्य स्वरुपात जमा झालेली रक्कम.

३. सरकार मद्रास नगर स्थानिक ग्रंथालय समिती व्यतिरीक्त प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे निर्धारीत केलेला निधी देण्यात येईल. ही रक्कम कलम १२ चे उपकलम २ च्या अंतर्गत एकत्रित केलेल्या रक्कमेपेक्षा जास्त असेल.

**१४. लेखाचे अनुरक्षण :**

१. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समितीच्या उत्पादित खर्चांचा हिशोब ठेवला जाईल.

२. लेखाच्या निरीक्षणासाठी निर्बंध असतील. अस्वीकृत अधिभारासारखे विषय योग्य पद्धतीने हाताळले जातील.

**१५. ग्रंथालय समितीचे पुनरसंघठन :**

या अधिनियमाच्या नियमांनुसार सरकारला ज्या समितीसाठी आवश्यक वाटेल त्या समित्यासाठी नियम असून त्या व्यतिरीक्त नवीन नियम निर्धारीत करु शकते. किंवा कोणत्याही ग्रंथालयाची मान्यता गोठवू शकते किंवा पुनर्स्थापना करु शकते. तसेच सरकार समितीच्या पूनर्स्थापनेसाठी प्रस्तावित स्वरुपात समितीला सूचना देऊ शकते आणि समितीकडून आलेल्या सूचनांचे स्पष्टीकरण विचारात घेऊ शकते.

**प्रकरण सहावे**

**अहवाल, स्पष्टीकरण आणि निरीक्षण**

**१६. अहवाल आणि स्पष्टीकरण :**

प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती, सार्वजनिक ग्रंथालय किंवा अनुदान प्राप्त ग्रंथालयांचा प्रभारी प्रत्येक व्यक्ती निदेशक किंवा त्यांच्या समकक्ष अधिकाऱ्याकडे आपल्या वार्षिक कामकाजाचा अहवाल आणि स्पष्टीकरण निदेशकाला किंवा प्राधिकृत व्यक्तीला वेळावेळी देईल, तसेच आवश्यक माहिती सादर करेल.

**१७. ग्रंथालयांचे निरीक्षण :**

निदेशक किंवा त्यांच्याद्वारे नियुक्त कोणीही समकक्ष व्यक्ती सार्वजनिक ग्रंथालय, अनुदान प्राप्त ग्रंथालय किंवा त्या संबंधित संस्थेद्वारे ग्रंथालयाच्या अधिनियमांचे योग्य पालन होत आहे का? याचे आपल्या समाधानासाठी निरीक्षण करु शकतात.

## प्रकरण सातवे

## नियम

**१८. नियम बनविण्याचा अधिकार :**

१. सरकार अधिसूचनेद्वारे अधिनियमाच्या पालनासाठी योग्य नियम बनवू शकते.

२. विशेषत: पूर्वीच्या अधिकारांची व्यापाकतेनुसार हे नियम असतील.

  १. या अधिनियमाच्या अंतर्गत निर्धारीत करण्यासाठी अपेक्षित किंवा अनुमती मिळालेल्या विषयासाठी नियम करु शकते.

  २. स्थानिक ग्रंथालय समितीच्या सदस्य निवडीसाठी निवडणुकीचे संचालन करण्याची पद्धती किंवा त्यासंबंधित सर्व विषयांसाठी नियम करु शकते.

  ३. कलम ८ मध्ये संदर्भ असलेल्या योजनेमध्ये समाविष्ट होणाऱ्या विषयांसंबंधित नियम करु शकते.

  ४. स्थानिक ग्रंथालय समितीच्या कार्यवाहीच्या कामकाजाच्या कार्यवाहीसाठी योग्य नियम करू शकते.

  ५. समितीच्या सांख्यिकीय लेखापरिक्षण किंवा सांख्यिय अहवाल प्रकाशनासंबंधीत नियमांची व्यवस्था करू शकते.

  ६. निदेशकाद्वारे अनुदान प्राप्त ग्रंथालयांना सरकारी सहाय्य अनुदान निश्चित करण्यासाठी ग्रंथालय अनुदान संहित किंवा ग्रंथालयाच्या निरीक्षण किंवा समन्वयासाठी या ग्रंथालयांव्दारा मानकाद्वारे संरक्षण देण्यासंबंधित योग्य नियम करू शकते.

## प्रकरण आठवे

## विविध

**१९. मुद्रणालय आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ राज्यात लागू करण्यासाठी अवलोकन**

छपाई आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ लागू करण्यासाठी खालील प्रकारे अवलोकन केले जाते.

१. कलम ९ च्या पहिल्या परिच्छेद खंड 'ए' जो सरकारकडून मिळालेल्या सहाय्याशी मुद्रणलयाच्या मुद्रकाव्दारा ग्रंथांच्या अशा पाच प्रती पैकी एक अपलब्ध होते का?

२. याच कलमाच्या पाच खंड १ मध्ये ज्या ग्रंथाची पहिली प्रत किंवा त्यानंतरच्या संस्करणची एक प्रत जी भेट दिलेली आहे. शेवटच्या परिच्छेदातील तरतुदीनुसार ज्या ग्रंथासाठी प्रथम किंवा त्यानंतरच्या संस्करणासाठी पाच प्रती निर्धारीत केलेल्या असतील त्या त्यांची उपलब्ध केली जाईल.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर अल्पावधीतच अस्तित्वात आलेला सार्वजनिक ग्रंथालय कायदा हे या कायद्याचे ऐतिहासिक महत्त्व अबाधीत असून इतर राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायद्याच्या मंजुरीसाठी एक व्यासपीठ तयार झाले. या कायद्याअंतर्गत तरतुदी ही अत्यंत मुलभूत स्वरुपाच्या असल्याने नियोजनबद्ध अशा प्रकारच्या कायद्याची अम्मल बजावणी झाल्यास सार्वजनिक ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम होण्यासाठी यामुळे प्रेरणा प्राप्त होणारी आहे.

## ४.१२ कर्नाटक राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६५

**प्रस्तावना :**

कर्नाटक राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतूने हा कायदा संमत करण्यात आला. तसेच राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी लोकांना मोफत व प्रभावी स्वरुपात सेवा प्राप्त होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करुन त्यांचे संवर्धन व विकास करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे.

कर्नाटक राज्याच्या विधानमंडळाद्वारे भारतीय गणराज्याच्या १६ व्या वर्षी सदर अधिनियमाची निर्मिती करण्यात आली.

### प्रकरण पहिले

### प्रारंभ

**१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ :**

१. हा कायदा कर्नाटक राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६५ म्हणून ओळखला जाईल.

२. संपूर्ण कर्नाटक राज्यात या कायद्याचा विस्तार होईल.

३. राज्य सरकारने निर्धारीत केलेल्या तारखेपासून हा अधिनियम कार्यान्वित करण्यात येईल.

**२. व्याख्या :**

१. शैक्षणिक ग्रंथालय म्हणजे, विश्वविद्यालय, महाविद्यालय किंवा शोध संस्थेद्वारे चालवले गेलेले ग्रंथालय.

२. अनुदान प्राप्त ग्रंथालय म्हणजे, राज्य ग्रंथालयाद्वारे या अधिनियमाच्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांना अनुसरुन सकारकडून अनुदान प्राप्त ग्रंथालय.

**३. ग्रंथ म्हणजे :**

अ) प्रत्येक खंड, खंडाचा कोणताही भाग, कोणत्याही भाषेतील पत्रक, माहिती पुस्तिका.

ब) मुद्रित अथवा शिलामुद्रित आकृतिबंध, नियतकालिके अथवा वृत्तपत्र आणि इतर तत्सम साहित्य.

क) दृकश्राव्य साधने, श्राव्य साधने उदा. टेप, ध्वनीफित, मायक्रोफ्लिम, संगणक, छायाचित्रे इ.

४. मुख्य ग्रंथपाल म्हणजे – शहर मध्यवर्ती ग्रंथालय, जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय किंवा इतर ग्रंथालये व ग्रंथालय सेवा प्रदान करण्यासाठी शहर वा जिल्हा ग्रंथालय प्राधिकरण यांनी नेमलेली व्यक्ती.

५. नगर ग्रंथालय प्राधिकरण म्हणजे, कलम १६ व १७ च्या अंतर्गत नागरी व अन्य शहरी भागासांठी संघटीत केलेले ग्रंथालय प्राधिकारण.

६. राज्य स्वामित्व ग्रंथालय म्हणजे, राज्य सरकारच्या शासनाचा विभाग, राज्य कायदा विभाग, उच्च न्यायलय व इतर न्यायालये व राज्य यांनी चालविलेली ग्रंथालये होय.

७. जिल्हा म्हणजे महसूल जिल्हा.

८. जिल्हा ग्रंथालय प्राधिकरण म्हणजे कलम १६ व १८ अंतर्गत जिल्ह्यासाठी संघटीत केलेले ग्रंथालय प्राधिकरण.

९. ग्रंथालय कर म्हणजे कलम ३० अंतर्गत वसूल केला जाणारा कर.

१०. स्थानिक ग्रंथालय प्राधिकरण म्हणजे, नगर ग्रंथालय प्राधिकरण किंवा जिल्हा ग्रंथालय प्राधिकरण.

११. अधिसूचना म्हणजे, शासकिय राजपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या अधिसूचना.

१२. इतर ग्रंथालये म्हणजे सार्वजनिक ग्रंथालयांव्यतिरिक्त अन्य ग्रंथालये.

१३. निर्धारीत म्हणजे या कायद्याअंतर्गत निर्माण केलेले नियम व तरतूदी.

१४. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे–

१. स्थानिक ग्रंथालय प्राधिकरणाद्वारे स्थापन केलेले किंवा चालवले जाणारे ग्रंथालय. ज्यामध्ये ग्रंथालय शाखा तसेच वितरनदान केंद्राचा समावेश असेल.

२. राज्य सरकारद्वारे स्थापन केलेले किंवा चालवलेले तसेच जनतेसाठी खुले म्हणून घोषित केलेले ग्रंथालय.

३. कोणत्याही स्थानिक संस्थेद्वारे स्थापन केलेले किंवा चालवलेले तसेच जनतेसाठी खुले म्हणुन घोषित ग्रंथालय.

४. राज्य सरकारकडून अनुदान प्राप्त होण्यासाठी पात्र ग्रंथालये, तसेच अनुदान प्राप्त होत असेलेली ग्रंथालये किंवा या कायद्याच्या अंतर्गत राज्य सरकारद्वारे सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्वरुपात अधिसूचीत ग्रंथालये

१५. राज्य केंद्रीय ग्रंथालय म्हणजे प्रकरण ६ अंतर्गत राज्य केंद्रीय ग्रंथालय म्हणून घोषित ग्रंथालय.

१६. सार्वजनिक ग्रंथालय संचालक म्हणजे कायद्यातील तरतूदी अंतर्गत नेमलेला सार्वजनिक ग्रंथालय संचालक होय.

१७. राज्य ग्रंथालय प्राधिकरण म्हणजे कलम ३ अंतर्गत संघटीत प्राधिकरण.

१८. वर्ष म्हणजे आर्थिक वर्ष.

## प्रकरण दुसरे

## कर्नाटक राज्य ग्रंथालय प्राधिकरण

### ३. राज्य ग्रंथालय प्राधिकरणाची स्थापना आणि संरचना :

१. हा कायदा कार्यान्वित झाल्यानंतर लवकरात लवकर राज्य सरकारच्या अधिसूचनेनुसार या कायद्याच्या प्रयोजनासाठी एक ग्रंथालय प्राधिकरण स्थापन करण्यात आले. या प्राधिकरणास राज्य ग्रंथालय समिती असे म्हटले जाईल. या कायद्यानुसार संबंधित विषयासाठी स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा, विसर्जित करण्याचा आणि ती उपयोगात आणण्याचा पूर्ण अधिकार या प्राधिकरणाकडे राहील.

२. राज्य ग्रंथालय प्राधिकरणामध्ये पुढील सभासदांचा समावेश असेल.

१. सार्वजनिक ग्रंथालयाचा अधिकार असलेला मंत्री हा या समितीचा अध्यक्ष असेल.

२. कर्नाटक विधानसभा सदस्यांपैकी विधानसभेवर नियुक्त असलेले चार सदस्य.

३. कर्नाटक विधानपरिषदेद्वारे नियुक्त दोन विधानपरिषद सदस्य.

४. राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाद्वारे त्या मंडळातील नियुक्त केलेली एक व्यक्ती.

५. कर्नाटक ग्रंथालय संघाच्या कार्यकारिणी समितीद्वारे संघ सदस्यापैकी एक नियुक्त व्यक्ती.

६. बँगलोर शहरातील नगर ग्रंथालय समितीच्या सदस्याद्वारे आपल्या सदस्यापैकी एक नियुक्त व्यक्ती.

७. राज्यातील इतर नगर ग्रंथालय समितीपैकी कोणत्याही एक नगर ग्रंथालय समितीने नियुक्त केलेली एक व्यक्ती. ही नियुक्त व्यक्ती राज्य सरकारच्या आदेशाने नियुक्त केलेल्या नगर ग्रंथालय समितीची सदस्य असेल.

८. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे नियुक्त सदस्यापैकी एक सदस्य. मात्र हा सदस्य जिल्हा ग्रंथालय समितीच्या राज्य सरकारच्या परवांनगीने नियुक्त झालेला असेल.

९. राज्य शिक्षण विभागाचा सचिव

१०. कर्नाटक लोक शिक्षण समितीचा निदेशक

११. राज्य सरकारच्या कार्यालयातील ग्रंथालयशास्त्रातील तीन तज्ञ व्यक्ती (वरील ६,७, आणि ८)

३. राज्य ग्रंथालयाचा ग्रंथपाल हा राज्य ग्रंथालय समितीचा पदसिद्ध सचिव असेल.

**४. राज्य ग्रंथालय समितीची कार्ये :**

राज्य ग्रंथालय समिती ही या कायद्यानुसार ग्रंथालयासंबंधित सर्व विषयांवर राज्य सरकारला सल्ला देईल. जो राज्यांच्या केंद्रीय ग्रंथालयाचा सर्व प्रबंधकीय अधिकारी असेल. तसेच या कायद्यानुसार देण्यात आलेले सर्व अधिकार, कर्तव्य आणि कार्ये समितीद्वारे पूर्ण करण्यात येतील. कायद्याद्वारे नियुक्त केलेले अन्य अधिकार व कर्तव्यांचा वापर समिती करु शकले.

**५. निवडणुकी अभावी नामनिर्देश :**

जर कलम ३ चे उपकलम २ मधील संदर्भिय विषयांपैकी कोणताही विषय किंवा निर्धारीत वेळेमध्ये राज्य ग्रंथालय समितीसाठी सदस्यपदाची नियुक्ती केली गेली नसल्यास त्या रिक्त पदाची नियुक्ती राज्य सरकारच्या अधिसूचनेद्वारे पात्र व्यक्तींचे नामांकन करण्यात येईल. नामांकित व्यक्ती ही समितीच्या सदस्यांशी समकक्ष असेल.

**६. पद कार्यकाल :**

१. या कायद्यानुसार अतिरिक्त राज्य ग्रंथालय समितीच्या पदसिद्ध सदस्यांना सोडून इतर सदस्य किंवा कलम ३ नुसार नामांकित किंवा नियुक्त सभासदांचा कार्यकाल हा पहिल्या सभेपासून सुरु होऊन पुढील तीन वर्ष राहिल.

२. निवृत्त झालेला सदस्य हा त्याच्या पदाचा उत्तराधिकारी नियुक्त होईपर्यंत पदावर असतो.

३. निवृत्त सदस्य हा पुन्हा निवडणूक लढवण्यासाठी किंवा नामांकित करण्यासाठी पात्र असेल.

**७. रिक्त**

राज्य ग्रंथालय समितीच्या कोणत्याही सदस्याचा कार्यकाल संपण्यापूर्वी मृत्यू झाल्यास, पदाचा राजीनामा दिल्यास, अपात्र ठरवल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे ते पद रिक्त झाल्यास कलम ३ चे उपकलम २ नुसार नियुक्त अथवा नामांकित व्यक्तीद्वारे भरण्यात येईल. पंरतु निर्धारित व्यक्तीचा कार्यकाल हा पूर्वीच्या नियुक्त असलेल्या सभासदाच्या शिल्लक कार्यकाला इतका राहील.

**८. सदस्य म्हणून कार्यरत राहण्यास अपात्र :**

राज्य ग्रंथालय समितीच्या पदसिद्ध सदस्य सोडून अन्य कोणत्याही सदस्य त्या कालावधीमध्ये नियुक्त अथवा नामांकित केलेला असेल तर तो पुढील कारणांसाठी अपात्र ठरविण्यात येऊ शकतो.

१. समितीच्या मतानुसार योग्य कारणाशिवाय समितीच्या सतत ३ सभांना अनुपस्थित राहील्यास.

२. कलम ३ च्या उपकलम २ नुसार संबंधित विषयासाठी नियुक्त सदस्य संबंधित प्रकरणाच्या विषयावेळी अनुपस्थित राहील्यास समितीमध्ये त्याचे पद रिक्त करण्यात येते.

**९. अपात्रता :**

खालील कारणांसाठी व्यक्ती राज्य ग्रंथालय समितीचा सदस्य म्हणून नियुक्त होण्यासाठी अपात्र ठरु शकते.

१. दंड न्यायालयाद्वारे दोशी ठरवले जाऊन अपराध सिद्ध होऊन तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त काळ कारावासाची शिक्षा झालेली असल्यास. तसेच त्याचा गुन्हा अक्षम्य असल्यास, राज्य सरकारच्या आदेशाद्वारे त्याला दंड केलेला असल्यास.

२. कर्जबाजारी व्यक्ती

३. मानिसिकदृष्ट्या अस्थिर व्यक्ती किंवा मानसिक संतुलन गमावलेली व्यक्ती.

**१०. राज्य ग्रंथालय समितीच्या सभा :**

१. राज्य ग्रंथालय समितीच्या अध्यक्षाद्वारे निश्चित केलेल्या तारखेस वर्षातून कमीत कमी दोन सभा आयोजित करण्यात येतील. त्यापैकी एक सभा ही वार्षिक सभा असेल.

२. अध्यक्षाला योग्य वाटेल त्या दिवशी तो राज्य ग्रंथालय परिषदेच्या अत्यावश्यक कामकाजासाठी विशेष सभा घेऊ शकतो.

३. विहीत अटीसंबंधित विषयासाठी समिती सदस्यांच्या मागणीनुसार अतिमहत्त्वाच्या विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी अध्यक्ष विशेष सभा घेऊ शकतो.

४. राज्य ग्रंथालय समितीच्या सभेच्या कोरमसाठी समिती सदस्यांची संख्या २/५ असणे आवश्यक आहे.

५. समितीच्या बैठकीस अध्यक्ष उपस्थित असल्यास तोच अध्यक्षस्थानी असेल आणि अध्यक्ष उपस्थित नसल्यास उपस्थित सदस्यांपैकी एकजण सभेचे अध्यक्षस्थान स्विकारेल.

**११. राज्य ग्रंथालय समितीचे कामकाज :**

राज्य ग्रंथालय समिती ही विहीत करण्यात आलेल्या प्रक्रिया आणि नियमानुसार कामकाज करते.

## प्रकरण तिसरे

## सार्वजनिक ग्रंथालय विभाग

**१२. सार्वजनिक ग्रंथालय विभाग :**

प्रस्तुत कायद्याच्या प्रयोजनासाठी सार्वजनिक ग्रंथालय विभागाचे संघटन केले जाईल. त्यामध्ये राज्य ग्रंथपाल किंवा सरकारने नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी हे प्रमुख असतील.

**१३. विभागाची कार्ये :**

१. राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली सार्वजनिक ग्रंथालय विभाग हा या कायद्याच्या संचालनासाठी जबाबदार असेल.

२. विशेषत: आणि पूर्वग्रह न धरता पूर्वीच्या अधिकारांसह सार्वजनिक कार्ये करण्यासाठी.

   १. सार्वजनिक ग्रंथालयासंबंधित सर्व विषयांचे परिक्षण आणि मार्गदर्शन करेल.

   २. सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनांना प्रोत्साहन देणे. ज्याद्वारे या कायद्याचे प्रयोजन प्राप्त होईल.

३. राज्य सरकारद्वारे अनुदान प्राप्त होणाऱ्या ग्रंथालयाच्या संबंधित सर्व विषयांचे पर्यवेक्षण, परिक्षण करुन मार्गदर्शन करण्यात येईल.

४. राज्यातील ग्रंथालयांची व ग्रंथपालांची नोंदणी ठेवणे.

५. या कायद्याअंतर्गत स्थानिक ग्रंथालय समितीच्या अधिकाराद्वारे पार पाडलेल्या कर्तव्याचे निरीक्षण करणे, मार्गदर्शन करणे.

६. राज्य ग्रंथालय निधी किंवा सार्वजनिक ग्रंथालय अधिकारांचा योग्य वापर निश्चित करणे.

७. या कायद्याच्या नियमांतर्गत सार्वजनिक ग्रंथालय विभागावर अन्य इतर कार्ये सोपविणे.

**१४. राज्य ग्रंथपाल :**

१. राज्य सरकारद्वारे ग्रंथालय व्यवसाय कार्यान्वित करण्यासाठी पात्रता योग्य असलेल्या अधिकाऱ्याची राज्य ग्रंथपाल म्हणून नियुक्ती करण्यात येते.

२. राज्य ग्रंथपाल,

१. राज्य केंद्रीय ग्रंथालयाचा ग्रंथपाल म्हणून कार्य करेल.

२. छपाई आणि ग्रंथ नोंदणी कायदा १८६७ (केंद्रीय अधिनियम १८६७ च्या २५) च्या संबंधित सर्व विषय तसेच निर्धारीत अधिनियमांतर्गत पाठवण्यात येणाऱ्या ग्रंथांचे सर्वेक्षण तसेच निरीक्षण, मार्गदर्शन आणि नियंत्रण ठेवणे.

३. राज्य ग्रंथालयाचा अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांची नियुक्ती, पदस्थान आणि बदली या वर नियंत्रण ठेवेल.

४. सामान्यत: राज्य ग्रंथालय समितीला त्यांच्या कार्याच्या निर्वाहासाठी सहाय्य करेल.

५. या कायद्याद्वारे किंवा अंतर्गत अधोरेखित सर्व अधिकाराचा उपयोग व कर्तव्याचे पालन करेल.

**१५. राज्य ग्रंथालय सेवा :**

१. सार्वजनिक ग्रंथालय विभाग, राज्य केंद्रीय ग्रंथालय तसेच प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समितीची पदे कर्नाटक राज्य ग्रंथालय सेवाशी संबंधित व्यक्तीची नियुक्ती करण्यात येईल.

२. राज्य ग्रंथपाल, नगर तसेच जिल्ह्याच्या मुख्य ग्रंथालयात राज्य सरकारद्वारे योग्य वेळी नेमता येतील. अन्य वर्गश्रेणीची पदे कर्नाटक राज्य ग्रंथालय सेवे अंतर्गत असतील. सर्व सेवापदी सदस्य हे सरकारी कर्मचारी असतील. त्याची नेमणुक आणि सेवा, अटी या संविधानाच्या अनुच्छेदन ३०९ च्या तरतुदीच्या अधिन तसेच निर्धारीत नियमांनुसार नियंत्रित केल्या जातील.

३. कर्नाटक राज्य ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, उपदान, निवृत्तीवेतन तसेच अन्य लाभ हे राज्याच्या एकत्रित निधीद्वारे देण्यात येतील.

## प्रकरण चौथे

## स्थानिक ग्रंथालय समिती

**१६. स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना :**

१. राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना तसेच व्यवस्थापन करण्याच्या हेतूने पुढील प्रमाणे स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात येईल.

१. बंगलोर, हुबळी, धारवाड, मंगलोर, म्हैसूर आणि बेळगाव शहरामध्ये तसेच अधिक लोकसंख्या असलेल्या नागरी क्षेत्रामध्ये स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना करावी.

२. जेथे नगर ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे अशा क्षेत्राला सोडून प्रत्येक राज्याच्या जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात यावी. बंगलोर जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी जिल्हा ग्रंथालय समितीची स्थापना, बंगलोर शहराला सोडून बंगलोर जिल्ह्यात सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करणे.

२. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती ज्या क्षेत्रासाठी स्थापन केलेली असेल त्या क्षेत्राच्या नावाने असेल. त्या नावाने उत्तराधिकारी तसेच त्याची न्याय मुद्रा असेल. या अधिनियमानुसार संपत्ती खरेदी करण्याचा तसेच विक्री निविदा सादर करण्याचा अधिकार असेल तसेच त्याच नावाने संबंधित दावा सादर करता येईल.

**१७. शहर ग्रंथालय समितीची संरचना :**

१. प्रत्येक नगर ग्रंथालय समितीमध्ये,

१. नगर पालिकेचा महापौर किंवा नगर पालिका परिषद किंवा शहराच्या अन्य भागाचा शहर अध्यक्ष हा समितीचा सभापती असेल.

२. राज्य सरकारद्वारे नोंदणीकृत असलेल्या शहराच्या प्रथम श्रेणी महाविद्यालयाचा प्राचार्य समितीचा उपाध्यक्ष असेल.

३. नगर पालिका, नगरपालिका परिषद किंवा नगर पालिकेद्वारे आपल्या सदस्यांपैकी नामांकित दोन सदस्य.

४. राज्य सरकारद्वारे शहराच्या अनुदान प्राप्त ग्रंथालयातील शासकीय सदस्य.

५. शहरातील उच्च माध्यमिक विद्यालयाचा प्राचार्य जो राज्य सरकारद्वारे नोंदणीकृत असेल.

६. कर्नाटक म्हैसूर ग्रंथालय संघाची शहर शाखा समिती असल्यास त्या समितीची एक व्यक्ती

७. राज्य सरकारद्वारे नामांकित शिक्षण विभाग अधिकारी

८. राज्य सरकारद्वारे नामांकित शहरातील दोन निवासी व्यक्ती.

२. शहराच्या ग्रंथालयाचा मुख्य ग्रंथपाल हा ग्रंथालय समितीचा पदसिद्ध सचिव असेल.

**१८. जिल्हा ग्रंथालय समितीची संरचना :**

१. प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये खालील सभासदांचा समावेश असेल,

१. जिल्हा उपआयुक्त, समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

२. जिल्ह्याचा प्रभारी सार्वजनिक शिक्षण अधिकारी

३. जिल्हा विकास परिषदेच्या सदस्यापैकी दोन नियुक्त सदस्य.

४. जिल्ह्यातील शहर ग्रंथालय समितीची स्थापना झालेल्या क्षेत्रांना सोडून कमीत कमी ७०,००० लोकसंख्या असलेल्या क्षेत्रातील नगरपालिका परिषदेचा नगराध्यक्ष किंवा अन्य नगरपालिका सदस्यापैकी नामांकित एक व्यक्ती.

५. जिल्ह्यातील ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपालिकेचा नगराध्यक्ष किंवा नगरपालिका सदस्यापैकी राज्य सरकारद्वारे नामांकित दोन व्यक्ती.

६. कर्नाटक ग्रंथालय संघाची जिल्हा शाखा परिषद असल्यास त्यांच्याद्वारे नामांकित एक व्यक्ती.

७. राज्य सरकारद्वारे जिल्ह्यातील तालुका विकास मंच सदस्यापैकी एक नामांकित व्यक्ती.

८. राज्य सरकारद्वारे जिल्ह्यातील ग्रामपंचायत आणि नगरपालिका सदस्यापैकी नामांकित दोन व्यक्ती.

९. राज्य सरकारद्वारे नियुक्त जिल्ह्यातील प्रथम श्रेणी महाविद्यालयाचा प्राचार्य.

१०. राज्य सरकारद्वारे नियुक्त जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयाचा मुख्याध्यापक.

११. राज्य सरकारद्वारे नियुक्त जिल्हा किंवा जिल्ह्यातील जनशिक्षण विभागाचा अधिकारी.

१२. साधारणत: जिल्ह्यातील स्थानिक व्यक्तीपैकी राज्य सरकारद्वारे नियुक्त तीन व्यक्ती.

२. जिल्हा ग्रंथालय समितीच्या उपाध्यक्षाची निवड समितीच्या सदस्यांमधून करण्यात येईल.

३. जिल्ह्याचा मुख्य ग्रंथपाल हा जिल्हा ग्रंथालय समितीचा पदसिद्ध सचिव असेल.

**१९. मतदानाशिवाय सदस्याची नेमणूक :**

कलम १७ आणि १८ च्या संबंधित माहितीनुसार नियोजित वेळेमध्ये नगर ग्रंथालय समिती किंवा जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये एखाद्या सदस्याची नियुक्ती करण्यात आलेली नसल्यास, राज्य सरकारच्या अधिसुचनेद्वारे पात्र व्यक्तींची नियुक्ती रिक्त स्थानी करण्यात येईल. अशाप्रकारे नियुक्त केलेला सदस्य वैधानिक स्वरुपात नियुक्त झालेल्या सदस्याशी समकक्ष असे.

**२०. कार्यकाल :**

१. या अधिनियमानुसार स्थानिक ग्रंथालय समितीचा पदसिद्ध सदस्य सोडून इतर सदस्यांचा कार्यकाल हा कलम १७,१८ आणि १९ नुसार सदस्यांच्या नियुक्तीनंतर आयोजित समितीच्या पहिल्या बैठकीपासून पुढील तीन वर्षे असेल.

२. निवृत्त झालेल्या सदस्य हा त्याच्या पदाचा उत्तराधिकारी नियुक्त होईपर्यंत पदावर असतो.

३. निवृत्त सदस्य हा पुन्हा निवडणुक लढवण्यासाठी किंवा नामानिर्देश करण्यासाठी पात्र असेल.

**२१. रिक्त :**

स्थानिक ग्रंथालय समितीच्या कोणत्याही सदस्याचा कार्यकाल संपण्यापूर्वी मृत्यू झाल्यास, पदाचा राजीनामा दिल्यास, अपात्र ठरवल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे ते पद रिक्त झाल्यास कलम १७ आणि १८ नुसार नविन नियुक्त झालेल्या नामनिर्देशीत

व्यक्तीद्वारे भरण्यात येईल. परंतु निर्धारित व्यक्तीचा कार्यकाल हा पूर्वीच्या नियुक्त असलेल्या सभासदाच्या शिल्लक कार्यकाला इतका राहील.

**२२. सदस्य म्हणून कार्यरत राहण्यास अपात्र :**

स्थानिक ग्रंथालय समितीचा पदसिद्ध सदस्या व्यतिरीक्त अन्य कोणताही सदस्य त्या कालावधीमध्ये नियुक्त अथवा नामांकित केलेला असेल तर तो पुढील कारणांसाठी अपात्र ठरु शकतो.

१. समितीच्या पूर्व परवानंगी शिवाय समितीच्या सतत ३ सभांना अनुपस्थित राहील्यास.
२. कलम १७ आणि १८ नुसार नियुक्त सदस्याचे त्याच्या संबंधित कोणतेही कार्ये नसल्यास ते पद रिक्त होऊ शकते.

**२३. अपात्रता :**

खाली कारणांसाठी व्यक्ती स्थानिक ग्रंथालय समितीचा सदस्य म्हणून नियुक्त होण्यासाठी अपात्र ठरु शकते.

१. दंड न्यायालयाद्वारे दोषी ठरवले जाऊन अपराध सिद्ध होऊन तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त काळ कारावासाची शिक्षा झालेली असल्यास. तसेच त्याचा गुन्हा अक्षम्य असल्यास, राज्य सरकारच्या आदेशाद्वारे त्याला दंड दिलेला असल्यास.
२. कर्जबाजारी व्यक्ती
३. मानिसिकदृष्ट्या अस्थिर व्यक्ती किंवा मानसिक संतुलन गमावलेली व्यक्ती.

**२४. स्थानिक ग्रंथालय समितीच्या सभा :**

१. स्थानिक ग्रंथालय समितीच्या अध्यक्षाद्वारे निश्चित केलेल्या तारखेस वर्षातून कमीत कमी दोन सभा आयोजित करण्यात येतील. त्यापैकी एक सभा ही वार्षिक सभा असेल.
२. अध्यक्षाला योग्य वाटेल त्या दिवशी तो स्थानिक ग्रंथालय परिषदेच्या अत्यावश्यक कामकाजासाठी विशेष सभा घेऊ शकतो.
३. विहीत अटीसंबंधित विषयासाठी समिती सदस्यांच्या मागणीनुसार अतिमहत्त्वाच्या विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी अध्यक्ष विशेष सभा घेऊ शकतो.
४. स्थानिक ग्रंथालय समिती विहीत करण्यात आलेल्या प्रक्रियेनुसार कार्य करेल.

**२५. अध्यक्ष आणि उपाध्यक्षाचे अधिकार आणि कर्तव्ये :**

१. स्थानिक ग्रंथालय समितीचा अध्यक्ष :

१. समितीच्या सभेचा अध्यक्षस्थानी असेल.

२. समितीच्या आर्थिक तसेच प्रशासकीय कामकाजावर लक्ष ठेवेल तसेच निरीक्षण आणि नियंत्रण ठेवेल.

२. स्थानिक ग्रंथालय समितीचा उपाध्यक्ष

१. अध्यक्षाच्या अनुपस्थितीमध्ये समितीच्या सभेच्या अध्यक्षस्थानी असेल.

२. अध्यक्षाच्या अनुपस्थितीत अध्यक्षाद्वारे वेळोवेळी केल्याजाणाऱ्या अधिकारांचा वापर आणि कर्तव्याचे पालन करेल.

**२६. स्थानिक ग्रंथालय समितीचे अधिकार आणि कर्तव्ये :**

१. प्रत्येक नगर ग्रंथालय समिती व जिल्हा ग्रंथालय समितीचे कर्तव्य असेल की, त्यांनी आपल्या अधिकार क्षेत्रातील प्रत्येक स्थानिक व्यक्तीस ग्रंथालय सेवा प्रदान करावी. ग्रंथालय समिती, प्रत्येक शहरामध्ये एक शहर केंद्रीय ग्रंथालय तसेच शाखा ग्रंथालय तसेच प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा केंद्रीय ग्रंथालय स्थापन करेल.

२. उपकलम १ नुसार स्थानिक ग्रंथालय समिती,

१. सार्वजनिक ग्रंथालयांसाठी उपयुक्त जमीन व इमारतीसाठी आवश्यक कार्यवाही, अन्य सोपस्कार, उपकरणे तसेच अन्य सुविधा प्रदान करु शकते.

२. सार्वजनिक ग्रंथालयासाठी ग्रंथ, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, नकाशा, ग्रामोफोन, सीडी, पांडुलिपी, कला तसेच विज्ञान प्रयोगाचे नमुने, सिनेमा प्रोजेक्टर, तसेच अन्य साधनसामुग्री प्रदान करु शकते.

३. सरकारच्या पूर्वपरवानगीने सार्वजनिक ग्रंथालयाचे हस्तांतरण करु शकते किंवा ग्रंथालय बंद करु शकते.

४. ग्रंथालयाच्या कार्यासंबंधित किंवा प्रयोजनासाठी निधी किंवा उपहाराचा स्वीकार करु शकते. परंतु अशा संपत्तीचा स्विकार करण्यासाठी धर्मदाय आयुक्ताची परवानगी असणे आवश्यक आहे.

५. या कायद्याच्या प्रयोजनासाठी व्याख्याने आयोजित करु शकते किंवा अन्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

६. प्रबंधकाच्या संमत्तीने तसेच राज्य सरकारच्या पूर्वपरवानगीने राज्य सरकारने अनुमोदित केलेल्या अटी कोणत्याही ग्रंथालयावर लादु शकते.

७. सरकारच्या परवानगीने या कायद्याच्या प्रयोजनाला गतीशीलता प्राप्त करण्यासाठी सहाय्यक कार्यक्रमांचे आयोजन करु शकते.

८. या कायद्याअंतर्गत अधोरेखित अधिकारांचे उपयोजन आणि कर्तव्याचे पालन करेल.

**२७. ग्रंथालय विकास योजना :**

१. राज्य सरकारच्या सामान्य अथवा विशेष आदेशाने स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना झाल्यानंतर लवकरात लवकर राज्य ग्रंथालयाच्या अपेक्षेनुसार प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समितीच्या अधिकारक्षेत्रात ग्रंथालयाची स्थापना करुन ग्रंथालय सेवेचा विकास (याला स्थानिक ग्रंथालय विकास योजना म्हटले जाईल.) करण्यासाठी योजना आखणे. आवश्यकता वाटल्यास स्थानिक ग्रंथालय समिती आवश्यकतेनुसार योजना तयार करेल.

२. उपकलम १ च्या अंतर्गत तयार केलेल्या प्रत्येक स्थानिक ग्रंथालय विकास योजनेचे प्रमुख विशेषत: विहीत नियमांनुसार आणि योजनांमध्ये आवड असलेल्या प्रत्येक व्यक्तीचा सल्ला घेण्यासाठी आमंत्रित करुन ती माहिती प्रकाशित करणे. स्थानिक ग्रंथालय विकास योजनेसंबंधीत कोणत्याही व्यक्तीद्वारे प्राप्त माहिती व सल्ल्याचा विचार केला जाऊन त्या योजनेवर संशोधन करण्यात येईल.

३. स्थानिक ग्रंथालय विकास योजनेच्या उपकलम २ च्या अंतर्गत दर्शविलेल्या विरोध आणि सल्ल्याची प्रत राज्य ग्रंथालयाला पाठवण्यात येईल. राज्य ग्रंथपाल स्थानिक विकास योजनेसंबंधीत आपले मत मांडून त्याच्या स्विकृतीसाठी राज्य सरकारला सादर करेल.

४. राज्य सरकारास योग्य वाटल्यास राज्य ग्रंथालय समितीचा दृष्टिकोन निश्चित झाल्यानंतर राज्यसरकार स्थानिक ग्रंथालय विकास योजनेमध्ये आवश्यक बदल करुन ते स्वीकार

करु शकतो. राज्य सरकार स्थानिक ग्रंथालय समितीने मागणी केल्यास उपकलमांच्या अंतर्गत स्वीकार झालेल्या स्थानिक ग्रंथालय विकास योजनेवर संशोधन करु शकतो.

५. १) उपकलम ४ च्या अंतर्गत राज्य सरकारद्वारे स्थानिक ग्रंथालय विकास योजना स्वीकृत झाल्यानंतर लवकरात लवकर राज्य ग्रंथपाल आयोजित योजनांच्या आकृतीबंधाच्या अनुरूपतेसाठी आदेश जाहीर करेल त्याला त्या क्षेत्रामध्ये स्थानिक ग्रंथालय आदेश म्हटले जाईल. ज्यामध्ये केंद्रीय ग्रंथालय, शाखा ग्रंथालय, शैक्षणिक संस्था, कारागृहे व आरोग्यकेंद्र, सेवा केंद्रामध्ये स्थापन करण्यात आलेल्या शाखांना स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे अनुरक्षित करण्यात येतील. संबंधीत क्षेत्रातील जनतेला ग्रंथालय सेवा प्रदान करण्यासाठी स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे उपाययोजना आखण्यात येतील आणि त्या उपाययोजनांची नोंदणी केली जाईल.

   २. राज्य ग्रंथपाल, स्थानिक ग्रंथालय समितीच्या अहवालावरुन उचित समजेल तेव्हा खंड (ए) च्या अंतर्गत प्रसारीत करण्यात आलेल्या स्थानिक ग्रंथालय आदेशावर पुनरावलोकन करु शकतो.

६. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती राज्य सरकारद्वारा स्वीकृत स्थानिक ग्रंथालय विकास योजनेच्या उपकलम ५ च्या अंतर्गत प्रसारित स्थानिक ग्रंथालयाकरिता आदेश कार्यान्वित करेल.

**२८. स्थानिक ग्रंथालय समितीच्या विविध समित्यांची नियुक्ती :**

१. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती आपल्या सदस्यांची निवडणुकीद्वारे खालील समित्यांचे संघटन करेल.

   १. कार्यकारी समिती

   २. वित्त समिती

२. एक स्थानिक ग्रंथालय प्राधिकरण समिती आणि वित्त समितीची स्थापना करु शकेल.

३. उपकलम १ च्या खंड ए आणि बी च्या अंतर्गत वसूल केलेला उपकर किंवा उपकलम २ च्या अंतर्गत वाढविण्यात आलेला उपकर क्षेत्रअधिकाराच्या क्षेत्रातील नगर पालिका सदस्य, नगरपालिका परिषद किंवा अन्य नगरपालिका सदस्य, ग्राम पंचायत अथवा

अन्य स्थानिक समितीद्वारा एकत्रित केला जाईल. प्रवृत्त करण्यात आलेल्या कायद्यानुसार नियोजित खंडासंबंधिचा उपकर वसूल करुन संबंधित नियोजित कायद्यानुसार सर्व प्रावधानांच्या परिवर्तनाच्या विषयांसाठी लागु होतो.

४. प्रत्येक स्थानिक समितीस एकत्रित केलेल्या रक्कमेपैकी १० टक्के रक्कम संग्रहीत स्वरुपात ठेवणे बंधनकारक असते. तसेच उर्वरीत रक्कम गरजेनुसार नगर ग्रंथालय समिती किंवा जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये वाटण्यात येते.

**३१. जिल्हा ग्रंथालय समितीच्या जमिन महसुलाच्या भागास सरकारी अनुदानाचे स्वरुप:**

१. राज्य सरकार, प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समितीच्या जमीन महसुलाच्या तीन टक्के रक्कम वार्षिक अनुदान म्हणून देते.

२. उपकलम १ च्या अंतर्गत जिल्हा ग्रंथालय समितीच्या अनुदानाची रक्कम नियोजित वेळेमध्ये प्रक्रियेदवारे जिल्हा ग्रंथालय निधी मध्ये जमा करण्यात येईल.

**३२. शहर आणि जिल्हा ग्रंथालय निधी :**

१. प्रत्येक शहर ग्रंथालय समिती, तसेच जिल्हा ग्रंथालय समिती एक निधी निश्चित करते. त्याला शहर ग्रंथालय निधी, जिल्हा ग्रंथालय निधी म्हटले जाते. या कायद्यांतर्गत सर्व तरतुदी उपलब्ध करुन दिल्या जातील.

२. अशाप्रकारे, शहर ग्रंथालय निधी तसेच जिल्हा ग्रंथालय निधी मध्ये खालील रक्कम समाविष्ट करण्यात येईल.

   १. कलम ३० च्या उपकलम ४ च्या अंतर्गत उपकराची रक्कम जी स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे देण्यात येते.

   २. कलम ३१ च्या अंतर्गत अनुदान

   ३. ग्रंथालय समितीला सार्वजनिक ग्रंथालयाच्या लाभासाठी अंशत: स्वरुपातील दान, देणगी आणि वर्गणीतुन प्राप्त होणारी रक्कम

   ४. केंद्र सरकार किंवा राज्य सरकारद्वारे प्राप्त होणारे अनुदान

   ५. या कायद्याअंतर्गत तयार केलेले नियमांना अनुसरुन स्थानिक ग्रंथालय समितीने एकत्रित केलेली रक्कम किंवा निधी.

**३३. राज्य ग्रंथालय निधी :**

१. राज्य ग्रंथालय समिती एक निधी निश्चित करेल त्याला राज्य ग्रंथालय निधी म्हणून संबोधण्यात येईल. या निधीतून सर्व खर्च केला जाईल.

२. राज्य ग्रंथालय निधीमध्ये खालील रक्कम जामा करण्यात येईल.

   १. राज्य सरकारद्वारे राज्य ग्रंथालय समितीला सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी देण्यात येणारे अनुदान.

   २. केंद्र सरकारद्वारे देण्यात येणारे अनुदान

   ३. राज्य ग्रंथालय समितीला देण्यात येणाऱ्या देणग्या.

   ४. या कायद्याच्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांना अनुसरुन राज्य ग्रंथालय समितीद्वारे एकत्रित करण्यात आलेला निधी व अन्य रक्कम.

**३४. लेखा :**

१. राज्य ग्रंथालय समिती, शहर ग्रंथालय समिती आणि जिल्हा ग्रंथालय समितीच्या पावत्या आणि खर्चाचा हिशोब ठेवला जाईल.

२. लेखा परिक्षणावर निर्बंध असतील. तसेच परिक्षण हे अस्वीकृत आणि अतिआवश्यक विषय तसेच अन्य बाबींच्या नियोजन नियमांनुसार विचार करण्यात येईल.

## प्रकरण सहावे

## राज्य केंद्रीय ग्रंथालय

**३५. बंगलोर सार्वजनिक ग्रंथालयांचा राज्य ग्रंथालय समितीमध्ये समावेश :**

१. राज्य सरकारच्या अधिसुचनेद्वारे निर्धारीत तारखेपासून (यानंतर या प्रकरणामध्ये निर्धारित दिवसाचा समावेश केला जाईल.) सार्वजनिक ग्रंथालय बंगलोर चे पूर्ण प्रबंधन आणि नियंत्रण जे आता सार्वजनिक ग्रंथालय बंगलोर च्या प्रबंधन समितीमध्ये समाविष्ट आहे ते राज्य ग्रंथालय समितीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

२. जी सार्वजनिक ग्रंथालये बंगलोरची प्रबंधन समिती कर्नाटक समिती नोंदणीकृत अधिनियम १९०४ च्या अंतर्गत नोंदणीकृत समिती आहे ती आता कर्नाटक समिती नोंदणीकृत अधिनियम १९६० च्या अंतर्गत मानण्यात येईल. समितीचे विघटन नियोजित दिवसापासून किंवा नियोजित दिवसाच्या एक दिवस अगोदर होईल. प्रस्तुत समितीची

संबंधित व नियोजित चल व अचल संपत्ती, समितीचे अधिकार, विशेष अधिकार, कर्तव्य राज्य ग्रंथालय समितीमध्ये समाविष्ट होतील. तसेच या कायद्यानुसार निर्धारीत आणि नियोजित उद्दीष्टांसाठी कार्यरत असतील.

३. नियोजित दिवसापासून प्रस्तुत समितीची सर्व कार्ये राज्य ग्रंथालय समितीवर सोपवण्यात येतील.

४. प्रस्तुत समितीचे सर्व कर्मचारी हे नियुक्त दिवसापासून राज्य सरकारचे कर्मचारी असतील. त्याचा कार्यकाल, कामकाज, निबंधन, प्रतिबंधन, भत्ते, देणगी तसेच अन्य विषयातील अधिकार व विशेषअधिकार हे कर्नाटक राज्य ग्रंथालय समितीच्या सदस्यासमान असतील. राज्य ग्रंथालय सेवा समितीचे सदस्य हे राज्य सरकार च्या अंतर्गत पदनियुक्त असतील, जसे ते प्रस्तुत समितीचे कर्मचारी असताना होते. हे कर्मचारी राज्य सरकारद्वारे देण्यात येणाऱ्या वेतनावर निबंधन तसेच प्रतिबंधनात बदल करत नाहीत तोपर्यंत नियुक्त असतील. किंवा कर्नाटक राज्य सरकार च्या समान कामकाजाचे वेतन, निबंधन आणि प्रतिबंधामध्ये समूचित परिवर्तन केले जात नाही, तोवर नियुक्त असतील.

**३६. कर्नाटक राज्य केंद्रीय ग्रंथालय :**

१. नियोजित दिवसापासून सार्वजनिक ग्रंथालय, बंगलोर हे कर्नाटक राज्य केंद्रीय ग्रंथालय असेल.

२. राज्य ग्रंथालय नियोजनाच्या समुचित कार्याच्या हेतुसाठी कर्नाटक राज्य केंद्रीय ग्रंथालय केंद्र आणि अन्य साधन सामुग्रीचे भांडार संबंधितांकडे सुपुर्द करण्यात आले आहे.

३. सामान्य ग्रंथालयाबरोबरच राज्य केंद्रीय ग्रंथालयामध्ये खालील अन्य विभाग असतील.

१. प्रतिलिपी अधिकाराने नोंदणीकृत केलेल्या सामुग्रीचा राज्य विभाग

२. अंध व्यक्तींसाठी राज्य ग्रंथालय

३. आंतरग्रंथालयीन देवघेव विभाग

४. राज्य वाङ्मय विभाग

५. तांत्रिकसेवा राज्य विभाग

६. अन्य कामकाज विभाग

**३७. राज्य केंद्रीय ग्रंथालयाचे विभाग :**

१. अ) छपाई आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम १८५८ (केंद्रीय अधिनियम १८६७ च्या २५) च्या अंतर्गत प्रत्येक ग्रंथाची एक प्रत प्रतिलिपी अधिकार विभागाद्वारे राज्य केंद्रिय ग्रंथालयात ठेवण्यात येईल.

ब) प्रतिलिपी विभागातील ग्रंथांच्या प्रतीची देवाण घेवाण केली जाणार नाही. मात्र ग्रंथालय परिषदेमध्ये संदर्भासाठी ते ग्रंथ उपलब्ध करुन दिले जातील.

२. अ) राज्य ग्रंथालय विभागाद्वारे अंध व्यक्तींसाठी ग्रंथ, ग्रंथाच्या ध्वनिफीती, अन्य साधन साहित्याची उपलब्धता आणि साठवणूक तसेच अन्य प्रकारचे ग्रंथ आणि साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली जाईल.

ब) राज्य केंद्रीय ग्रंथालय भारतामध्ये अंधव्यक्तींसाठी अन्य ग्रंथालयासोबत कार्य करु शकते. तसेच या कार्याच्या प्रयोजनासाठी मदत पण करु शकते.

३. अ) राज्य आंतर ग्रंथालयीन देव घेव विभाग राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालये, शैक्षणिक ग्रंथालये, राज्य स्वामित्व ग्रंथालये, अभिदान ग्रंथालयामध्ये आंतरग्रंथालयीन देवघेव सेवेच्या नियोजनाच्या योजना कार्यान्वित करतील.

ब) राज्य केंद्रीय ग्रंथालय राज्य सरकारच्या निर्देशावरुन राज्य ग्रंथालयात देवघेव योजनेमध्ये मदत करु शकते.

४. अ) राज्य वाङ्मय विभाग नियोजित वाङ्मयात्मक कार्य करेल किंवा या कार्याच्या प्रयोजनाच्या हेतुने सरकारी विभाग राज्याच्या शैक्षणिक व अन्य विभागांना सहाय्य करेल.

ब) राज्य केंद्रीय ग्रंथालय राज्य सरकारच्या आदेशावरुन भारतामधील वाङ्मय विभाग किंवा संस्थांना मदत करु शकते तसेच अशा मदतीच्या प्रयोजनासाठी आवश्यक वाङ्मयात्मक कार्य करु शकते.

५. अ) सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय, राज्य स्वामित्व ग्रंथालय, अनुदानीत ग्रंथालये आणि अन्य ग्रंथालयांना ग्रंथांची देवाण घेवाण, वर्गीकरण तसेच सूची करण्यासाठी लागणाऱ्या आधुनिक तांत्रिक सेवा या तांत्रिक सेवा राज्य विभागामार्फत पुरविल्या जातील.

ब) राज्य केंद्रीय ग्रंथालय राज्य सरकारच्या अनुमोदनानुसार भारतामध्ये तांत्रिक सेवा विभागाला मदत करु शकते किंवा मदतीच्या हेतुने अन्य तांत्रिक कार्यांची जबाबदारी घेऊ शकते. उपकलम ३ किंवा उपकलम ५ च्या अंतर्गत अन्य ग्रंथालयांना नियंत्रण समितीच्या सहमतीशिवाय कोणत्याही योजना कार्यान्वित करता येणार नाहीत.

## प्रकरण सातवे

## प्रतिवेदन, अहवाल आणि निरीक्षण

### ३८. प्रतिवेदन आणि अहवाल :

प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती तसेच सार्वजनिक ग्रंथालयाच्या अध्यक्षाला राज्य ग्रंथपाल किंवा त्याच्याद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीस वेळोवेळी आदेशानुसार प्रतिवेदन आणि अहवाल सादर करुन माहिती द्यावी लागते.

### ३९. ग्रंथालयांचे निरीक्षण :

राज्य ग्रंथपाल किंवा त्यांच्याद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती स्वत:च्या निश्चित उद्देशाने या अधिनियमांअंतर्गत बनवलेले नियम व उपनियमांचे पालन सार्वजनिक ग्रंथालये व त्याच्याशी संबंधित संस्थाकडून केले जात आहे का? हे पाहण्यासाठी निरीक्षण केले जाते.

### ४०. वार्षिक अहवाल :

१. राज्य ग्रंथपाल प्रत्येक आर्थिक वर्षासाठी स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे वर्षभरामध्ये केलेली प्रगती, माहिती आणि अहवालाबरोबर वार्षिक प्रतिवेदन तयार करेल. आणि प्रस्तुत प्रतिवेदन राज्य सरकारच्या आदेशानुसार नियोजित तारखेच्या पूर्वी राज्य सरकारला सादर करेल.

## प्रकरण आठवे

## विविध

### ४१. नियम तयार करण्याचे अधिकार :

१. राज्य सरकारच्या पूर्व प्रकाशनच्या नंतर अधिसूचनेद्वारे या कायद्याच्या प्रयोजनासाठी नियम तयार करु शकते.

२. विशेषत: वरील अधिकाराच्या व्यापकतेसाठी नियम तयार केले जाऊ शकतात. त्याचे स्वरुप

१. राज्य ग्रंथालय समिती, स्थानिक ग्रंथालय समिती, शाखा ग्रंथालय समिती, ग्राम सेवा ग्रंथालय समितीच्या सदस्यांची निवडणूक आणि नियुक्ती कार्यक्रम.

२. राज्य ग्रंथालय निधी, जिल्हा ग्रंथालय निधी व शहर ग्रंथालय निधीचे वाटप

३. राज्य केंद्रीय ग्रंथालयाचे कामकाज व निरीक्षण

४. राज्य ग्रंथालय समिती, स्थानिक ग्रंथालय समितीच्या लेखाचे परिक्षण करणे. लेखा आणि अहवालाचे प्रकाशन करणे.

५. सहाय्य प्राप्त ग्रंथालयांची अनुदाने आणि या ग्रंथालयांना मानक देणे.

६. ग्रंथालय आणि ग्रंथपालास राज्य नोंदणीकृत करणे.

७. राज्य ग्रंथालय समिती आणि स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे विविध समित्यांची स्थापना करणे.

८. निबंधन आणि प्रतिबंधन विषय ज्यांच्याशी राज्य ग्रंथालय समिती आणि स्थानिक ग्रंथालय समिती करार करु शकते. संपत्तीची खरेदी, उपयोग आणि विसर्जित करु शकते.

३. या कायद्याअंतर्गत तयार केलेला प्रत्येक नियम तयार झाल्यानंतर लवकरात लवकर आपला उद्देश स्पष्ट करण्यासाठी राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सदन कक्षात तीस दिवसात मांडण्यात येईल. तो एक किंवा दोन सत्रात किंवा अधिक सत्रात मांडण्यात येईल. चालू सत्रामध्ये किंवा दोन सत्रामध्ये नियम अवलोकनासाठी मान्य होतो किंवा दोन्ही सत्रामध्ये नियम न बनवण्यासाठी संमत होतो. असा नियम लगेचच अशाप्रकारे अवलंबाकरिता प्रभावी होईल किंवा अप्रभावी होईल. अशाप्रकारे करण्यात आलेले अवलोकन नियमाच्या अंतर्गत केलेल्या कोणतेही कार्याची वैधानिकता पूर्वग्रह रहित असेल.

## ४२. राज्य ग्रंथालय समिती तसेच स्थानिक ग्रंथालय समितीचे नियम तयार करण्याचे अधिकार :

१. राज्य ग्रंथालय समिती आणि प्रत्येक स्थानिक समिती या कायद्याच्या तरतुदीनूसार नियमांच्या विषयासाठी राज्य सरकारच्या पूर्व परवानगीने अधिसुचनेद्वारे या कायद्याच्या प्रयोजनांचे पालन करण्यासाठी नियम तयार करता येतात.

२. विशेषत: वरील अधिकारांची व्यापकता ही पूर्वग्रह विरहित सर्व नियम किंवा खालील सर्व विषयांवर कार्यवाही करू शकतात.

   १. राज्य ग्रंथालय समिती, स्थानिक ग्रंथालय समितीच्या नियंत्रणामध्ये असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांच्या नियमांमधील दर्शवलेल्या अटींच्या विषयांनुसार संबंधीत व्यक्ती ग्रंथालयात प्रवेश करु शकते. हा प्रवेश विनामूल्य असेल.

   २. अशा ग्रंथालयाच्या संपत्तीस हानी पोचविल्यास किंवा तिचा दुरपयोग करणाऱ्या व्यक्तीस ग्रंथालय प्रवेशावर बंदी लादण्यात येईल.

   ३. ग्रंथालयाच्या संपत्तीचा दुरूपयोग, विनाश अथवा हानी पासून संरक्षण करणे.

   ४. या नियमांनुसार तयार केलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्यास किंवा विपरीत आचरण करणाऱ्या व्यक्तीस राज्य ग्रंथालय समिती किंवा स्थानिक ग्रंथालय समितीचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यामार्फत ग्रंथालयातील प्रवेश बंद करण्यात येईल.

३. या कलामांतर्गत तयार झालेली प्रत्येक उपविधी तीस दिवसाच्या अवधीत प्रकाशनाच्या अटीच्या अंतर्गत असून त्याचे प्रकाशन शासकीय राजपत्राद्वारे होईल. तसेच अन्य नियमांनुसार प्रकाशित होईल.

४. राज्य सरकार अधिसुचनेद्वारे राज्य ग्रंथालय समिती किंवा स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे या कलमांच्या अंतर्गत तयार झालेल्या नियमांत बदल करु शकते किंवा नियम रद्द करु शकते.

उपविधीमध्ये बदल व रद्द करण्याच्याआधी राज्य सरकार राज्य ग्रंथालय समिती किंवा संबंधित स्थानिक ग्रंथालय समितीस आपले मत मांडण्यासाठी पुरेसा वेळ देईल.

**४३. अपराध आणि दंड :**

जी व्यक्ती,

१. या कायद्याच्या अंतर्गत असलेली सार्वजनिक ग्रंथालये किंवा अन्य संस्थामध्ये अशा प्रकारचा व्यवहार करेल ज्यामुळे ग्रंथालय आणि संस्थेचा लाभ घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस बाधा निर्माण होईल किंवा हिंसात्मक व्यवहार केला जाणे, तसेच अयोग्य भाषेचा वापर करणे अपराध युक्त आहे.

२. जर कोणी व्यक्ती सूचना देऊनसुद्धा ग्रंथालय बंद झाल्यानंतर तेथे थांबण्याचा आग्रह करत असेल तर ग्रंथालय किंवा संस्था योग्य ती कारवाई करुन आर्थिक दंड करु शकते. त्या दंडाचे स्वरुप रु.१० असेल किंवा अपराध मोठा असल्यास दंडाचे स्वरुप रु.५० पर्यंत वाढवण्यात येईल.

**४४. सरकारद्वारे स्थानिक ग्रंथालय समितीवर नियंत्रण :**

१. राज्य सरकारला आढळून आले की, स्थानिक ग्रंथालय समिती या कायद्याच्या अंतर्गत निर्धारीत केलेली कार्ये पार पाडण्यास असमर्थ आहे किंवा समितीद्वारे त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा दुरूपयोग केला जात आहे, तसेच आपली चूक सुधारण्यामध्ये स्थानिक ग्रंथालय समिती असमर्थ असल्यास राज्य सरकार स्थानिक ग्रंथालय समितीस विर्सजनाचे आदेश देईल.

२. स्थानिक ग्रंथालय समिती विर्सजित केल्या नंतर,

   १. विर्सजीत कालावधिमध्ये समितीच्या सर्व अधिकार व कर्तव्याचे पालन राज्य सरकारद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीकडून करण्यात येतील.

   २. विसर्जित कालावधीमध्ये स्थानिक ग्रंथालय समितीच्या नियंत्रणातील सर्व संपत्ती राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली असेल.

   ३. विसर्जित कालावधी संपल्यानंतर स्थानिक ग्रंथालय समितीचे पुनर्संघटन या कायद्याद्वारे निर्धारीत नियमांनुसार होईल.

**४५. हानी, खराब किंवा दुरूपयोगासंदर्भातील सदस्यांची जबाबदारी :**

१. सदस्यांच्या निष्काळजी पणामुळे स्थानिक ग्रंथालय समितीचा प्रत्येक सदस्य हा समितीची संपत्ती किंवा अन्य संपत्तीस हानी पोचल्यास, खराब झाल्यास किंवा तिचा दुरुपयोग झाल्यास त्यासाठी व्यक्तीगत स्वरुपात जबाबदार असेल.

२. राज्य ग्रंथपालास संबंधीत सदस्याने किंवा सदस्यांनी योग्य स्पष्टीकरण दिल्यास राज्य ग्रंथपाल त्यांना हानी झालेल्या संपत्तीची परिपूर्ती करण्यासाठी लिखित आदेश देईल.

३. जर धनराशीची भरपाई केली गेली नाही तर संबंधीत कायद्याच्या तरतुदीनुसार वसूल करण्यात येईल.

४. राज्य ग्रंथपाल या निर्णयाविरुद्ध कर्नाटक न्यायालयात नियोजित कालावधीमध्ये अपील करु शकतो. त्यानंतर कर्नाटक न्यायालयांच्या अपीलावर देण्यात येणारा निर्णय हा अंतिम असेल.

**४६. ग्रंथालय समितीचे सदस्य व कर्मचारी हे लोकसेवक असतील :**

राज्य ग्रंथालय समिती किंवा स्थानिक ग्रंथालय समितीचे सर्व सदस्य आणि समितीद्वारे नियुक्त सर्व अधिकारी कर्मचारी हे भारतीय दंड संहितेनुसार कलम २१ अंतर्गत लोकसेवक असतील.

**४७. अधिनियमाच्या कार्यवाहीचा कालावधी :**

या अधिनियमांच्या अंतर्गत केलेले कार्य किंवा कार्यवाही फक्त,

१. समिती किंवा समितीच्या संघटनामध्ये कोणताही दोष आढळून आल्यास.

२. या अधिनियम किंवा कार्यवाहीतील गुण दोष, अनियमीतता यामुळे समितीचे विसर्जन होणार नाही.

**४८. वाद किंवा त्या संबंधित नियम :**

१. राज्य ग्रंथालय समिती, स्थानिक ग्रंथालय समितीच्या अंतर्गत कार्यरत असलेले अधिकारी किंवा कर्मचाऱ्या विरुद्ध कोणतीही कार्यवाही नोंदवली जाऊ शकत नाही. जोपर्यंत समितीच्या कार्यालयातून लिखित सूचना संबंधित व्यक्तीच्या निवासस्थानी पोचत नाही. किंवा सूचना देऊन दोन महिने पूर्ण होत नाहीत तापर्यंत तक्रार नोंदविता

येत नाही. या सूचनेमध्ये कार्यवाहीच्या कारणासाठी येणारा खर्च हा व्यक्तीच्या राहण्याच्या ठिकाणी आणि नावे पाठवण्यात येईल.

२. राज्य सरकार, राज्य ग्रंथपाल, राज्य ग्रंथालय समिती, स्थानिक ग्रंथालय समिती किंवा अशा समितीच्या अंतर्गत कार्यरत असलेले सदस्य, अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून सामान्य स्वरुपात अधिनियम किंवा त्याअंतर्गत बनविलेल्या नियम, उपनियम, आदेश किंवा केलेल्या कार्यावर न्यायालयीन दावा नोंदविला जाऊ शकत नाही.

**४९. समस्या निराकरणाचे अधिकार :**

या अधिनियमांच्या तरतुदी संदर्भात ते प्रभावी बनविताना काही समस्या निर्माण झाल्यास राज्य सरकारच्या आदेशावरुन तरतुदीसंदर्भात आवश्यक आणि योग्य असलेले नियम तयार करता येतील.

**५०. ग्रंथालयाचे हस्तांतरण :**

१. अ) राज्य सरकारच्या अधिसूचनेद्वारे निर्धारीत तारखेपासून उपकलमाच्या अनुषंगाने नियोजित दिवसापासून सार्वजनिक ग्रंथालय म्हैसुरचे पुर्ण नियंत्रण चालू स्थितीमध्ये सार्वजनिक ग्रंथालय नियोजन समिती, म्हैसुरमध्ये समाविष्ट होईल. म्हैसुर सार्वजनिक ग्रंथालय, समिती मध्ये समाविष्ट आहे.

ब) नियोजित दिवसापासून म्हैसुर – कर्नाटक समिती नोंदणी अधिनियम १९०४ च्या अंतर्गत नोंदणीकृत समिती, सार्वजनिक ग्रंथालय नियोजन समिती, म्हैसुर ही आता म्हैसुर समिती नोंदणी अधिनियम १९६० च्या अंतर्गत नोंदणीकृत आहे. प्रस्तुत समितीची सर्व चल व अचल संपत्ती, सर्व अधिकार तसेच विशेषअधिकार हे नियोजित दिवसाच्या पहिल्या दिवसापासून म्हैसुर शहर ग्रंथालय समितीमध्ये समाविष्ट असतील. अधिनियमांमध्ये निर्धारीत नसलेल्या आणि निर्धारीत असलेल्या प्रयोजनांवर चर्चा होईल.

क) नियोजित दिवसापासून सदर समितीच्या सर्व जबाबदाऱ्या म्हैसुर शहर ग्रंथालय समितीकडे हस्तांतरीत होतील. तसेच त्यामध्ये समाविष्ट होतील.

ड) सदर समितीचा प्रत्येक कर्मचारी नियुक्त दिवसापासून राज्य सरकारचे कर्मचारी असेल. तसेच राज्य सरकारमध्ये कर्नाटक राज्य ग्रंथालय सेवा समितीचे सदस्य समान कालावधीमध्ये समान कार्यासाठी भत्ते,देणगी तसेच अन्य विषयांसाठी समान अधिकार तसेच विशेष अधिकाराच्या रुपात पूर्वीच्या समितीनुसार कार्यरत असतील. जोपर्यंत ते कार्यरत असतील तोपर्यंत त्याच्या कारभारावर नियंत्रण आणि अटी या राज्य सरकारद्वारा लागु होतील.

२. अ) राज्य सरकार अधिसूचनेद्वारे अधिसुचनेमध्ये समाविष्ट तिथी पासून महात्मा गांधी सार्वजनिक ग्रंथालय, कुर्ग जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये हस्तांतरीत होऊ शकते.

ब) ज्या दिवसापासून ज्यामध्ये हस्तांतरणाची पूर्ती होते तेव्हापासून ग्रंथालय देणग्या, संपत्ती तसेच जबाबदारी कुर्ग जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये हस्तांतरीत व समाविष्ट होतील.

क) ज्या दिवसापासून हस्तांतरण होते त्या दिवसापासून सदरच्या ग्रंथालयाची संबंधित राज्य सरकारद्वारे नियुक्त प्रत्येक व्यक्ती राज्य सरकाच्या अंतर्गत कर्नाटक राज्य ग्रंथालय सेवेच्या सदस्याच्या रुपामध्ये समान कालावधी, समान परिश्रम, समान अटी, भत्ते, वेतन तसेच अन्य विषयासंबंधीत समान अधिकार, विशेषअधिकारावर हे पूर्वीप्रमाणे कार्यरत असतील. आणि ते जोपर्यंत कार्यरत असतील तोपर्यंत त्यांच्यावर नियंत्रण व अटी या राज्य सरकारद्वारे लागू होतील.

३. अ) कलम ४७ मध्ये काहीही नोंदवलेले असले तरी सरकारच्या अधिसूचनेद्वारे निर्धारीत दिवसापासून कर्नाड सदाशिव राव जिल्हा ग्रंथालय, मंगलोरचे पुर्ण निबंधन आणि नियंत्रण मंगलोर शहर ग्रंथालय समितीमध्ये समाविष्ट असेल.

ब) निर्धारीत दिवसापासून सदरच्या जिल्हा केंद्रीय ग्रंथालयाद्वारे दक्षिण कन्नड जिल्हा ग्रंथालय समितीची उपलब्ध सर्व संपत्तीचे दायित्व सरकारद्वारे निर्धारीत प्रक्रियेद्वारे मंगलोर केंद्रीय ग्रंथालय समितीमध्ये तसेच दक्षिण कन्नड जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये समाविष्ट होईल.

क) निर्धारित दिवसापासून दक्षिण कन्नड जिल्हा ग्रंथालय समितीचा प्रत्येक कर्मचारी हा प्रस्तुत समितीद्वारे सदरच्या जिल्हा केंद्रीय ग्रंथालयाच्या संबंधित पूर्ण किंवा प्रमुख स्वरुपात नियुक्त केलेला असेल. निर्धारीत तारखेपासून कर्नाटक राज्य ग्रंथालय सेवकांच्या रुपात असेल. दक्षिण कन्नड जिल्हा ग्रंथालय समितीचे कर्मचारी झाल्यावर प्राप्त समान कालावधी, समान परिश्रम तसेच समान सेवा, अटी, भत्ते व वेतन तसेच अन्य नियमांसाठी समान अधिकारासह राज्य सरकारचे कर्मचारी असतील.

**५१. कर्नाटक राज्यामध्ये छपाई आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ लागू करण्यासंबंधी संशोधन :**

छपाई आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ हा कर्नाटक राज्यात लागू करण्यासंबंधी खालील अवलोकन केले जाईल.

१. कलम ९ च्या खंड ए मधील प्रथम परिच्छेदामध्ये खालील खंड स्थानपन्न केले जातील.

अ) ग्रंथ छपाई पासून प्रकाशित झाल्याच्या एका दिवसानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये एका महिन्यात तीन प्रती

किंवा

२. कलम ९ च्या खंड १ च्या शेवटच्या परिच्छेदामध्ये खालील खंड समाविष्ट केला जाईल.

अ) ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीमध्ये अक्षर छपाईच्या नमुन्यामध्ये किंवा ग्रंथासंबंधित अन्य आवृत्तीमध्ये बदल केला गेला नसल्यास त्या कायद्याच्या अंतर्गत प्रथम कोणत्याही आवृत्तीच्या तीन प्रती सादर कराव्यात.

३) कलम २ च्या पहिल्या तरतुदीमध्ये खालील तरतूद समाविष्ट केली जाईल,

या अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड ए च्या प्रथम परिच्छेदानुसार नोंदविलेल्या गेलेल्या तीन प्रतीपैकी एक प्रत कर्नाटक सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६५ मध्ये समाविष्ट राज्य केंद्रीय ग्रंथालय बँगलोरला पाठवण्यात येईल. तसेच उरलेल्या दोन प्रती राज्य सरकारद्वारे वेळो वेळी निश्चित केलेल्या प्रक्रियेनुसार पाठवल्या जातील.

**५२. दुरूस्ती आणि बचत :**

१. मद्रास सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९४८ (मद्रास अधिनियम १९४८ चा २४ वा) आणि हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९५५ (हैद्राबाद अधिनियम १९५५ चा तृतीय) नुसार दुरुस्ती केली गेली आहे.

२. ही दुरुस्तीचे स्वरुप,

अ) मद्रास सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८ च्या अंतर्गत स्थापन झालेल्या स्थानिक ग्रंथालय समितीचे व या अधिनियम लागू होण्याआधीचे सर्व नियुक्त सदस्य हे अधिनियम लागू झाल्यावर स्थानिक ग्रंथालय समितीच्या सदस्यासमान असतील. जोपर्यंत या सदस्यांचा कार्यकाल संपत नाही तो पर्यंत या अधिनियमातील सर्व कार्ये त्यांच्यावर सोपवली जातील. किंवा या कायद्याअंतर्गत नवीन समिती निर्माण केली जात नाही तोपर्यंत.

ब) प्रस्तुत अधिनियमाच्या अंतर्गत किंवा अधिनियम लागू होण्याच्यावेळी केलेले प्रभावी कार्य किंवा कार्यवाही  ही अधिनियमांच्या नियमांच्या अंतर्गत असेल. ही कार्यवाही किंवा कार्य अधिनियम निष्प्रभावी ठरवत नाही तोपर्यंत असेल. (त्यामध्ये नियुक्ती, प्रत्यायोजन, आधारलेला दंड लागू केलेल्या अधिसूचना, आदेश, नियम, योजना यांचा समावेश असेल.)

अशा प्रकारे कर्नाटक राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. कायद्यातील तरतुदी अंतर्गत अम्मलबजावणीकरिता मात्र शासनाचे धोरण अधिकाधिक लोकाभिमुख व कालसापेक्ष अद्ययावत होणे गरजेचे आहे.

## ४.१३ पश्चिम बंगाल राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९७९

**प्रस्तावना :**

पश्चिम बंगाल राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास, राज्यातील विद्यमान ग्रंथालयांना मान्यता देणे, पश्चिम बंगाल राज्यामध्ये सर्व ग्रामीण जनता आणि नागरिकांना ग्रंथालय सेवा देण्याच्या हेतुने या अधिनियमाची निर्मिती करण्यात आली.

भारतीय गणराज्याच्या ३० व्या वर्षी पश्चिम बंगाल राज्याच्या विधानसभेद्वारे खालील प्रकारे अधिनियमाची निर्मिती करण्यात आली.

### प्रकरण पहिले

### प्राथमिक

**१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ :**

१. हा अधिनियम पश्चिम बंगाल राज्य सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९७९ म्हणून संबोधले जाईल.

२. या अधिनियमाचा विस्तार संपूर्ण पश्चिम बंगाल राज्यात होईल.

३. हा अधिनियम राज्य सरकारद्वारे शासकिय राजपत्रात अधिसूचनेद्वारे प्रकाशित करुन या अधिनियमाचा प्रारंभ करण्यात येईल.

**२. व्याख्या :**

या अधिनियमात खालील व्याख्या निर्धारित केलेल्या आहेत.

१. सहाय्य प्राप्त ग्रंथालय म्हणजे,सरकार किंवा स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे अनुदान प्राप्त मान्यताप्राप्त ग्रंथालय.

२. केंद्रीय ग्रंथालय म्हणजे राज्य सरकारच्या अधिसूचनेद्वारे केंद्रीय ग्रंथालयाच्या स्वरुपातील घोषित केलेले ग्रंथालय.

३. निदेशक म्हणजे कलम ६ च्या अंतर्गत नियुक्त केलेला सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक.

४. जिल्हा म्हणजे महसूली जिल्हा.

५. जिल्हा ग्रंथालय म्हणजे सरकारद्वारे जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्रंथालयाच्या स्वरुपात स्थापन केलेले किंवा मान्यताप्राप्त ग्रंथालय.

६. सरकार म्हणजे पंश्चिम बंगाल राज्य सरकार.

७. अधिसूचना म्हणजे, शासकिय राजपत्रात प्रकाशित अधिसूचना.

८. विहित म्हणजे, या अधिनियमाद्वारे निर्धारीत नियम.

९. खाजगी ग्रंथालय म्हणजे, सहाय्य प्राप्त, मान्यता प्राप्त व सार्वजनिक ग्रंथालयापेक्षा एक वेगळे ग्रंथालय.

१०. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे, सरकार किंवा स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे स्थापन किंवा अनुरक्षित ग्रंथालय.

११. मान्यता प्राप्त ग्रंथालय म्हणजे निदेशकाद्वारे मान्यता प्राप्त तसेच अधिनियमाच्या प्रयोजनासाठी घोषित ग्रंथालय.

## प्रकरण दुसरे

## राज्य ग्रंथालय परिषद

**३. राज्य ग्रंथालय परिषदेची कार्ये :**

१. सरकारला केंद्रीय ग्रंथालयाच्या व्यवस्थेसाठी, सार्वजनिक ग्रंथालयांच्या तांत्रिक विषयावर तसेच त्या संबंधित ग्रंथालय आणि ग्रंथालय सेवाविषयी अन्य विषयांवर सल्ला देण्याच्या उद्देशाने सरकार एका राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना करेल.

२. परिषद प्रकरण तीनच्या अंतर्गत स्थापन केलेल्या स्थानिक ग्रंथालय समितीच्या सल्ल्याने या अधिनियमाच्या आधीन खाजगी ग्रंथालयांव्दारे मान्यता प्राप्त करण्यासाठी किंवा सहाय्य प्राप्त करण्यासाठी योग्य पातत्रा निर्माण करण्यासाठी नियमांचे प्रतिपादन करेल.

३. परिषद निर्धारीत केलेल्या अधिकारांचे उपयोग आणि कर्तव्याचे पालन करेल.

४. परिषदेची रचना:

* परिषदेमध्ये खालील सदस्य असतील.

१. ग्रंथालय विभागाचा प्रभारी मंत्री परिषदेचा सभापती असेल.

२. पश्चिम बंगाल विधान सभेच्या सदस्यापैकी निर्वाचित चार सदस्य

३. विद्यापीठे, पश्चिम बंगाल माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा पश्चिम बंगाल उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे प्रतिनिधित्व करण्याच्या उद्देशाने त्यांच्या निवडलेल्या सदस्यांमधील सरकरद्वारे परिषदेच्या हितासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या चार व्यक्ती.

४. पश्चिम बंगाल ग्रंथालय संघाच्या कार्यसमितीद्वारे प्रस्तुत संघातील कायदेशीर निवडलेल्या सदस्यांमधील निवडलेले दोन प्रतिनिधी.

५. या अधिनियमातंर्गत प्रस्तुत क्षेत्रातील ग्रंथालय कर्मचाऱ्याद्वारे कायदेशीर प्रक्रियेद्वारे नियुक्त निवडलेला एक प्रतिनिधी.

६. स्थानिक ग्रंथालय समितीद्वारे त्या समिती सदस्यापैकी निर्धारीत प्रक्रियेद्वारे नियुक्त दोन प्रतिनिधी.

७. सरकारद्वारे निवडलेला एक जिल्हा ग्रंथालय अधिकारी.

८. सरकारद्वारे निवडलेला एक जिल्हा ग्रंथालय ग्रंथपाल.

९. राज्य सरकारच्या शिक्षण सचिव किंवा त्याने नियुक्त केलेली व्यक्ती.

१०. पश्चिम बंगाल, सार्वजनिक शिक्षण अधिकारी किंवा त्याच्याद्वारे नियुक्त अधिकारी.

११. सरकारद्वारे ग्रंथालय शास्त्र व ग्रंथालय सेवांविषयी तज्ज्ञ असलेले सरकारव्दारे नियुक्त चार व्यक्ती.

१२. पश्चिम बंगाल सार्वजनिक शिक्षण समाज शिक्षणाचा उपनिर्देशक.

१३. माहिती आणि सांस्कृतिक विभागाचा निर्देशक.

१४. केंद्रीय ग्रंथालयाचा ग्रंथपाल.

१५. राष्ट्रीय ग्रंथालय कलकत्ताचे ग्रंथपाल.

१६. निर्देशक हा परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

* पदसिद्ध सदस्या व्यतिरिक्त इतर सदस्यांचा कार्यकाल तीन वर्षांचा असेल.

समितीच्या अटीनुसार विभागवार नियुक्त झालेले विभागीय अधिकारी त्याच्या पदावर तोपर्यंत राहू शकत नाही जोपर्यंत तो त्या पदावर अशाप्रकारे त्याची निवड केली जात नाही. निवड न झाल्यास त्याचे सदस्यत्व आपोआप संपुष्टात येईल.

**५. केंद्रीय ग्रंथालयांचे कार्य :**

केंद्रीय ग्रंथालय एक ग्रंथालय किंवा एक अध्ययन कक्ष चालविण्याव्यतिरिक्त सरकार किंवा सरकारद्वारे निवडलेले अधिकृत अधिकाऱ्याव्दारा वेळोवेळी सोपविलेल्या, जबाबदाऱ्यांचे पालन करेल.

**६. निर्देशकाची नियुक्ती आणि कार्ये :**

सरकार या अधिनियमाच्या अंतर्गत तयार झालेल्या नियमांना अनुसरून ग्रंथालय निदेशकाची नियुक्ती करेल. आणि हा निदेशक सरकारने निर्धारीत केलेल्या खालील कार्यांचे पालन करेल.

१. मान्यता प्राप्त ग्रंथालयांचे सुव्यवस्थापन ठेवणे.
२. केंद्रीय ग्रंथालय आणि त्यांच्या शाखांचे व्यवस्थापन तसेच केंद्रीय ग्रंथालयाशी संबंधित सर्व विषयांवर निर्देश देईल व देखभाल करेल.
३. अधिसूचनेद्वारे या अधिनियमांतर्गत तयार झालेल्या नियमांना अनुसरुन राज्यातील मान्यता प्राप्त ग्रंथालयांचे नाव आणि पत्रे अधिसूचनेव्दारे जाहीर करेल.
४. या अधिनियमाच्या अंतर्गत सर्व स्थानिक ग्रंथालय अधिकाऱ्यांच्या कार्याविषयी संबंधित विषयांवर निर्देश देईल व देखभाल करेल.
५. या अधिनियमाच्या अंतर्गत तयार झालेल्या नियमांना अनुसरून या अधिनियमाच्या अंतर्गत सर्व ग्रंथालयाच्या कार्यप्रणालीवर सरकारला एक अहवाल सादर करेल.
६. सर्व सार्वजनिक तसेच मान्यताप्राप्त ग्रंथालयांच्या वेळेचे निरीक्षण करेल. तसेच अधिकृत अधिकाऱ्यांकडून निरीक्षण करुन घेईल.
७. कलम १ च्या अंतर्गत अधिकृत अधिकाऱ्याने केलेल्या निरीक्षणाचे विवरण प्रस्तुत ग्रंथालयाच्या कार्यप्रणाली मधील दोष दूर करण्यासाठी प्रयत्न करेल. तसेच त्या संबंधित नियमांत बदल करण्यासाठी उपाय सुचवेल. आणि योग्य प्रकरणांमध्ये या

अधिनियमाच्या अंतर्गत तयार नियमांमध्ये निरंतर अयशस्वी ठरल्यास ग्रंथालयांची मान्यता रद्द करण्यात येईल. तसेच आर्थिक व अन्य सहाय्य बंद करण्यासाठी सरकारला कळवले.

८. ग्रंथालयाच्या कार्याच्या पद्धतीवर मार्गदर्शन करुन त्यावर नियंत्रण आणि निरिक्षण करेल.

९. कोणत्याही ग्रंथालयास नुकसान पोचवणाऱ्या जबाबदार व्यक्ती विरुद्ध योग्य पावले उचलणे.

१०. या अधिनियमाच्या अंतर्गत तयार नियमांना अनुसरुन कर्तव्याचे पालन आणि अधिकारांचा उपयोग करेल.

**७. ग्रंथालय निदेशालय :**

१. या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी निर्धारीत संख्येमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यासहित ग्रंथालय निदेशालयाची स्थापना करण्यात येईल.

२. ग्रंथालय निदेशालयाचे अधिकारी व कर्मचारी हे पूर्णवेळ सरकारी कर्मचारी असतील. आणि त्यांच्या सेवा, अटी व नियम निर्धारीत नियम आणि प्रतिबंधनानुसार असतील.

## प्रकरण तिसरे

## स्थानिक ग्रंथालय समिती

**८. स्थानिक ग्रंथालय समित्यांची विभागणी :**

१. सरकारकडून राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करुन त्यांचा विस्तार करण्याच्या हेतुने सरकारद्वारे प्रत्येक राज्यात स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात येईल.

२. स्थानिक ग्रंथालय समितीमध्से जिल्ह्यातील खालील व्यक्तींचा समावेश होईल.

  १. जिल्ह्याचा जिल्हा दंडाधिकारी समितीचा अध्यक्ष असेल.

  २. जिल्हा ग्रंथालय अधिकरी हा समितीचा पदसिद्ध सचिव असेल.

  ३. जिल्हा समाज शिक्षण अधिकारी

  ४. विविध सार्वजनिक ग्रंथालयांच्या कर्मचारी संघामधील सरकारद्वारे निवडलेले दोन प्रतिनिधी.

५. जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या सदस्यांमधून सभापतीकडून निवडलेल्या दोन व्यक्ती.

६. बंगाल ग्रंथालय संघाच्या जिल्हा शाखेच्या कार्यकारी समितीद्वारे निवडलेले दोन प्रतिनिधी.

७. जिल्ह्याच्या जिल्हा परिषद सदस्यापैकी सभाधिपतीद्वारे निवडलेले दोन प्रतिनिधी.

८. जिल्ह्याच्या पंचायत समिती सदस्यापैकी सरकारद्वारे निवडलेल्या दोन व्यक्ती.

९. सरकारद्वारे निवडलेल्या दोन प्रतिनिधी ज्यामध्ये,

   * जिल्ह्यातील एका मान्यताप्राप्त ग्रंथालयामधील सरकारी अधिकारी असलेली एक व्यक्ती.
   * जर जिल्हा ग्रंथालयाच्या अंतर्गत ग्रंथालयाची सल्लागार समिती असल्यास त्यापैकी एक सदस्य.

१०. जिल्ह्यातील महाविद्यालयातील सरकारद्वारे नामांकित एक शिक्षक.

११. जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयातील किंवा उच्च माध्यमिक विद्यालयातील सरकारद्वारे निवडलेले एक शिक्षक.

१२. जिल्ह्यातील प्राथमिक विद्यालयातील सरकारद्वारे निवडलेला एक शिक्षक.

१३. जिल्ह्यातील विधानसभा सदस्यापैकी सरकारद्वारक निवडलेले दोन सदस्य.

१४. जिल्ह्या ग्रंथालयाचा ग्रंथपाल. जिल्ह्यातील अन्य ग्रंथालयाचे ग्रंथपाल.

३. पदसिद्ध सदस्यांना सोडून इतर सदस्यांचा कार्यकाल हा तीन वर्षाचा असेल. जर नामांकित किंवा निवडलेला सदस्य असेल तर त्या पदावर राहणार नाही तसेच तो स्थानिक ग्रंथालय समितीचा सदस्य सुध्दा नसेल.

**९. स्थानिक ग्रंथालय अधिकारी व सामुदायिक मंडळ :**

प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती ज्या कार्यक्षेत्रात स्थापन झाली आहे त्या कार्यक्षेत्राचे,एक मंडळ असेल तसेच एक ग्रंथालय अधिकारी असेल. तो या समितीचा उत्तराधिकारी असेल. तसेच त्याच्याच नावाने संबंधित समितीचे कामकाज, खटला चालवला जाईल. समितीच्या स्थावर, जंगम मालमत्तेचे अर्जन किंवा संपत्तीचे हस्तांतरण करण्याचा अधिकार त्यास आहे.

तसेच नियम करण्याचा आणि ज्या प्रयोजनासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे त्या प्रयोजनाच्या पूर्तीसाठी तो उचित कार्ये करु शकतो.

**१०. स्थानिक ग्रंथालय समितीचे अधिकार :**

एक स्थानिक ग्रंथालय समितीला खालील अधिकार देण्यात आलेले आहेत.

१. सार्वजनिक ग्रंथालयांसाठी आवश्यक जमीन तसेच इमारतीच्या खरेदीचे सोपस्कार, इतर कार्ये, साहित्य व सुविधांचे आयोजन करणे.

२. अशा ग्रंथालयामध्ये ग्रंथ, चरित्र, वर्तमानपत्रे, नियतकालिके, नकाशे, कला आणि विज्ञानाचे नमुने, सूक्ष्मदर्शी, चित्रपट रीळे आणि अन्य आवश्यक सामुग्रीची व्यवस्था/संकलन (साठवणूक करणे)

३. वेळोवेळी आवश्यक ग्रंथालयामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.

४. सरकारच्या पूर्व परवानगीने समितीद्वारे स्थापन केलेले कोणतेही सार्वजनिक ग्रंथालय बंद करण्याचा किंवा त्यांचे स्थान बदलण्याचा अधिकार आहे.

५. कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालयाची मान्यता थांबवण्यासाठी आणि सरकारी सहाय्य बंद करण्यासाठी निदेशकाला सूचना देणे.

६. निर्देशकाच्या पूर्व परवानगीद्वारे भेट स्वरुपात मिळालेल्या ग्रंथांची आणि त्या व्यवहाराच्या उद्देशासाठी सरकारच्या पूर्वपरवानगीच्या आधारे भेट किंवा दान म्हणून स्विकारणे.

७. सामुदायिक विषयांवर व्याख्याने, भाषणे आणि चर्चासत्राचे आयोजन करणे आणि वर्गाचे निरीक्षण करणे.

८. सामान्यत: या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अन्य गोष्टींचे पालन करणे.

**११. स्थानिक ग्रंथालय समित्यांच्या संपत्तीचे विलिनीकरण :**

सर्व चल व अचल संपत्ती ज्या सार्वजनिक ग्रंथालयासाठी अर्जित किंवा धारण केलेली असेल तर ती स्थानिक ग्रंथालय समितीच्या अंतर्गत येईल.

**१२. स्थानिक ग्रंथालय समितीद्वारा करण्यात येणारे नियम :**

या अधिनियमांतर्गत निर्माण झालेल्या नियमांच्या विषयांसाठी स्थानिक ग्रंथालय समिती सरकारच्या पूर्ण अनुमोदनाने या अधिनियमाच्या प्रयोजनाच्या परिपालनासाठी

काही नियम तयार करण्याचा अधिकार समितीला राहिल. तसेच या अधिकाराच्या व्यापकतेसाठी असे नियम पुढीलप्रमाणे–

१. आपल्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या अटीनुसार फी न भरणाऱ्या व्यक्तीस ग्रंथालयातील प्रवेशास निर्देश देऊ शकते.

२. ग्रंथालयाचा उपभोग घेणाऱ्या व्यक्तींनी ग्रंथालयाच्या संपत्तीचा दुरूपयोग, विनाश करण्यापासून नष्ट करण्याविरुध्द किंवा दुरुपयोग करण्याविरुध्द आवश्यक हमीसाठी किंवा भरपाईसाठी निर्देश देऊ शकते.

३. अशा ग्रंथालयाच्या संपत्तीचे नुकसान, दुरुपयोग विनाशापासून संरक्षण करण्यासाठी या ग्रंथालयाच्या संपत्तीच्या उपयोगावर निर्देश करु शकते.

४. या अधिनियमाच्या अंतर्गत बनविलेल्या नियम व प्रतिनियमांच्या प्रावधानांचे जी व्यक्ती उल्लंघन करेल किंवा नियमांचे पालन करणार नाही अशा व्यक्तीस ग्रंथालय अधिकारी कर्मचाऱ्यांमार्फत ग्रंथालय प्रवेशास प्रतिबंध करु शकेल.

**१३. सरकारला नियम रद्द किंवा त्यांचे पुनरावलोकन करण्याचा अधिकार :**

१. जर कोणत्याही वेळी सरकारचे असे मत झाले की स्थानिक ग्रंथालय समितीने तयार केलेल्या नियमांमध्ये पूर्ण किंवा अंशत: स्वरुपात बदल करण्याची आवश्यकता वाटल्यास सरकार त्यासंबंधित ग्रंथालय समितीला सूचना देऊन आपले मत दुसऱ्यांदा व्यक्त करण्यासाठी योग्य वेळ देईल.

२. नियोजित वेळेमध्ये आपले मत व्यक्त न केल्यास सरकार नियोजित वेळेमध्ये अधिसूचनेद्वारे कोणत्याही वेळी असे नियम पूर्णपणे किंवा अंशत: स्वरुपात रद्द किंवा पुनरावलोकन करु शकते.

३. उपकलम २ च्या अंतर्गत नियम रद्द किंवा दुरुस्ती नियोजित तारखेमध्ये न केल्यास सरकार अधिसूचनेद्वारे निर्देश देऊ शकते. अशा नियोजित तारखेचा उल्लेख केला नसल्यास किंवा प्रकाशन तिथीच्या आधी केले गेल्यास ते प्रभावित मानले जातील.

**१४. कार्यकारी समिती :**

स्थानिक ग्रंथालय समिती एक कार्यकारी समितीची नियुक्ती करु शकते. ज्यामध्ये योग्य संख्येमध्ये सदस्य असतील. तसेच या समितीला अधिनियमाच्या अंतर्गत नियोजित अधिकार व कर्तव्यांचा वापर करता येईल.

**१५. आराखडा तयार करणे :**

१. स्थानिक ग्रंथालय समितीची स्थापना झाल्यानंतर लगेचच किंवा निर्देशकांना अपेक्षित वाटेल तर प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती आपल्या कार्यक्षेत्रात ग्रंथालय स्थापन करण्यासाठी तसेच ग्रंथालय सेवेचा विस्तार करण्याच्या उद्देशाने रुपरेषा तयार करुन पूर्वपरवानगीने निर्देशकासमोर योग्यबदल आणि परिवर्तनासाठी सादर करेल. निर्देशकाने प्रस्तुत परिवर्तनलेली रुपरेषा मान्य केल्यास समिती निर्देशकाद्वारे मान्य रुपरेषेला कार्याचे स्वरुप देऊ शकेल.

२. निर्देशक स्वत: किंवा स्थानिक ग्रंथालय समितीच्या विनंती पत्रानुसार उपकलम १ च्या अंतर्गत स्वीकृत आराखड्यात परिवर्तन करु शकते. किंवा नवीन आराखडा स्थापन करु शकते.

**१६. जिल्हा ग्रंथालय अधिकारी किंवा जिल्हा ग्रंथालय :**

१. सरकारद्वारे निर्धारीत बंधन आणि अटीनुसार एका व्यक्तीची नियुक्ती करेल. त्याला जिल्हा ग्रंथालय अधिकारी असे संबोधले जाईल. साधारणपणे निर्देशकाच्या नियंत्रणाखाली जिल्ह्यातील ग्रंथालयीन कार्यावर निर्देशन, परिक्षण आणि नियंत्रण ठेवण्याचे कार्य त्याच्यामार्फत केले जाईल.

२. १. सरकार स्थानिक ग्रंथालय समितीचा परामर्श घेऊन विहित पात्रता आणि अटीनुसार जिल्हा ग्रंथालयावर प्रभारी नियुक्ती करेल त्याला जिल्हा ग्रंथालय ग्रंथपाल म्हटले जाईल.

   २. जिल्हा ग्रंथपाल स्थानिक ग्रंथालय समितीच्या नियंत्रणाखाली जिल्हा ग्रंथालयाची कार्ये करेल.

## प्रकरण चौथे

## वित्त आणि लेखा

**१७. ग्रंथालय निधी :**

१. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती ग्रंथालय निधीचे आयोजन करेल. ज्यामध्ये या निधीचे अधिनियमानुसार वाटप करण्यात येईल.

२. ग्रंथालय निधीमध्ये खालील रकमा जमा केल्या जातील.

१. सार्वजनिक ग्रंथालयाच्या उपयोगासाठी स्थानिक ग्रंथालय समितीला दिली गेलेली देणगी स्वरुपातील अंशत:भेट किंवा धर्मदायाकडून प्राप्त रक्कम.

२. ग्रंथालये आणि सामाजिक शिक्षणाचा विशिष्ट हेतू प्राप्त करण्यासाठी किंवा सामान्य हेतुसाठी सरकारद्वारे दिलेले अनुदान.

३. या अधिनियमाच्या अंतर्गत तयार झालेल्या नियम व प्रतिनियमाच्या अंतर्गत स्थानिक ग्रंथालय समितीने गोळा केलेली रक्कम.

**१८. लेखा आणि हिशेब तपासणी :**

१. प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समितीची सर्व संपत्ती, जबाबदाऱ्या देणग्या, भेट स्वरुपातील वस्तू धर्मदाय व सरकारी अनुदानातून प्राप्त झालेली रक्कम या अधिनियमाच्या अंतर्गत तयार झालेल्या नियमांच्या अंतर्गत ग्रंथालय समितीद्वारा एकत्रित करुन हिशेब तपासणीसह पाठपुरावा केला जाईल.

२. हिशेब तपासणीसह अधिकारी किंवा अधिकार प्राप्त व्यक्तीव्दारे निर्धारीत प्रक्रियेनुसार वार्षिक हिशेब तपासणी केली जाईल. हिशेब तपासणीची एक प्रत सरकारला पाठवण्यात येईल.

## प्रकरण पाचवे

## विविध

**१९. अधिनियमाची वैधानिकता :**

परिषद आणि स्थानिक ग्रंथालय समितीचे कोणतेही कार्य हे कोणत्याही सुरुवातीच्या किंवा नंतरच्या कुठल्याही रिकाम्या जागेसाठी परिषद किंवा समितीच्या विभागणीमध्ये कोणताही दोष आहे म्हणून नाकारले जाणार नाही.

**२०. अहवाल आणि स्पष्टीकरणे :**

प्रत्येक स्थानिक ग्रंथालय समिती तसेच सार्वजनिक ग्रंथालयाची प्रत्येक प्रभारी व्यक्ती निर्देशक किंवा त्याच्याद्‌वारा अधिकार प्राप्त व्यक्तीला वेळोवेळी ग्रंथालयाचा अहवाल आणि स्पष्टीकरण सादर करेल.

**२१. सार्वजनिक ग्रंथालयाचे निरीक्षण :**

निदेशक किंवा त्याच्याद्वारे नियुक्त अधिकार प्राप्त व्यक्ती स्वतःच्या समाधानासाठी या अधिनियमाच्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांचे योग्य पालन होते का हे पाहण्यासाठी कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालय किंवा त्यासंबंधित संस्थांचे निरीक्षण करेल.

**२२. दंड :**

१. कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्याअंतर्गत बनवलेल्या नियमांचे पालन करत नसेल आणि त्यासाठी कोणत्याही अन्य अधिनियमाव्दारे कोणत्याही दंडाची व्यवस्था नसल्यास त्या व्यक्तीस जास्तीतजास्त रु.२५० पर्यंत दंड ठोठवण्यात येईल. तसेच दंडीत व्यक्तीने तीच चूक परत केल्यास दंडाची रक्कम रु. ५०० पर्यंत वाढविली जाऊ शकते.

२. निर्देशकाद्वारे किंवा निर्देशकाव्दारे अधिकार प्राप्त व्यक्तीच्या लेखी तक्रारीशिवाय या अधिनियमाअंतर्गत केलेल्या अपराधासाठी कोणतेही न्यायलय चौकशी करु शकणार नाही.

**२३. नियम बनवण्याचे अधिकार :**

१. या अधिनियमाच्या प्रयोजनाच्या पालनासाठी सरकार अधिसूचनेद्वारे नियम बनवू शकते.

२. विशेषत: पूर्वीच्या अधिकाराच्या व्यापकतेच्या हेतू पूर्वग्रह रहित नियम सर्व गोष्टींमध्ये जे नियमांच्या द्वारे अपेक्षित आहे किंवा शक्य आहे तर त्यासाठी नियम करु शकतात.

३. या अधिनियमाच्या अतंर्गत निर्माण झालेल्या सर्व नियम तयार झाल्यावर लवकरात लवकर १४ दिवसात विधानसभेसमोर ठवले जाऊ शकतात. राज्य विधानसभेव्दारा त्यांच्या समक्ष ठेवलेल्या नियमांमध्ये विषयानुसार रुपांतर करु शकते.

## २४. मुख्यालय आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ चे अवलोकन :

छपाई आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ (१८६७ चा२५ वा)पश्चिम बंगाल राज्यात लागू करण्यासाठी खालील प्रकारे अवलोकन केले जाईल.

१. कलम ९ च्या प्रथम परिच्छेदाचा खंड ए ला खालील खंडात स्थापन केले जाईल.

 १. कोणत्याही स्थितीमध्ये छापलेला ग्रंथ प्रकाशनाच्या पहिल्या दिवसापासून एका महिन्यात तीन प्रती पाठवावा.

 २. कलम ११ च्या प्रथम परिच्छेदामध्ये खालील परिच्छेदात स्थापन केला जाईल. कलम ९ च्या प्रथम परिच्छेदाच्या खंड ए नुसार तीन प्रतीमधील एक प्रत केंद्रीय ग्रंथालयाला पाठवण्यात येईल. आणि उर्वरीत दोन प्रती सरकारद्वारे वेळोवेळी निश्चित केलेल्या योजनेनुसार पाठवण्यात येतील.

पश्चिम बंगाल सार्वजनिक ग्रंथालय कायद्यातील सर्व सामान्य तरतुदी या इतर राज्यातील तरतुदीनुसार असून त्याची अम्मलबजावणी करण्याबद्दल शासकीय पातळीवर धोरण निश्चितीची आवश्यकता असल्याने हा कायदा प्रत्यक्षात येऊन ही सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस अजून ही अपेक्षित गती प्राप्त झालेली नाही.

## ४.१४ मणिपूर राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९८८

**प्रस्तावना :**

मणिपूर राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतुने या अधिनियमाची निर्मिती करण्यात आली.

भारतीय गणराज्याच्या ३९ व्या वर्षी मणिपूर राज्याच्या विधानसभेद्वारे खालील प्रकारे अधिनियम करण्यात आला.

**प्रकरण पहिले**

**प्राथमिक**

**१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ :**

१. हा अधिनियम मणिपूर राज्य सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९८८ म्हणून संबोधले जाईल.

२. या अधिनियमाचा विस्तार किंवा प्रसार संपूर्ण मणिपूर राज्यात होईल.

३. हा अधिनियम राज्य सरकारद्वारे शासकिय राजपत्रात अधिसूचनेद्वारे निर्धारीत तारखेपासून कार्यान्वित करण्यात आला.

**२. व्याख्या :**

या अधिनियमात खालील व्याख्या निर्धारित केलेल्या आहेत.

१. अनुदान प्राप्त ग्रंथालय म्हणजे, निदेशकाद्वारे राज्य सरकार किंवा ग्रंथालय निधीकडून या अधिनियमाच्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांना अनुसरुन अनुदानासाठी पात्र असलेले पुरस्कृत ग्रंथालय.

२. समिती म्हणजे, कलम ३ च्या अंतर्गत संघटीत केलेली राज्य ग्रंथालय समिती.

३. निदेशक म्हणजे कलम ९ च्या अंतर्गत नियुक्त केलेला सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक.

४. जिल्हा म्हणजे राज्यातील जिल्हा.

५. राज्य सरकार म्हणजे मणिपूर राज्य सरकार.

६. अधिनियम म्हणजे, मणिपूर राजपत्रात प्रकाशित अधिसूचना.

७. विहित म्हणजे, या अधिनियमाद्वारे निर्धारीत नियम.

८. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे,

   १. जिल्हा ग्रंथालय प्राधिकराणाद्वारे स्थापन किंवा अनुरक्षित ग्रंथालय ज्यामध्ये ग्रंथालय शाखा आणि परिदान केंद्राचा समावेश होतो.

   २. राज्य सरकारद्वारे स्थापन केलेले जनतेसाठी खुले असलेले पुरस्कृत ग्रंथालय.

   ३. कोणत्याही स्थानिक संस्थेद्वारे किंवा सहकारी समितीद्वारे सामान्य जनतेसाठी खुले असणारे पुरस्कृत ग्रंथालय.

   ४. राज्य सरकार कडून किंवा ग्रंथालय निधी कडून अनुदानासाठी पात्र असलेले पुरस्कृत अनुदानप्राप्त ग्रंथालय. किंवा राज्य सरकारद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्वरुपात अन्य ग्रंथालयांचा समावेश होतो.

९. राज्य म्हणजे, मणिपूर राज्य.

१०. राज्य केंद्रीय ग्रंथालय म्हणजे राज्य सरकारद्वारे राज्य केंद्रीय ग्रंथालयाच्या स्वरुपात स्थापन केलेले ग्रंथालय.

११. जिल्हा ग्रंथालय म्हणजे राज्य सरकारद्वारे जिल्हा ग्रंथालयाच्या स्वरुपात स्थापन असलेले जिल्हा ग्रंथालय.

१२. वर्ष म्हणजे आर्थिक वर्ष

## प्रकरण दुसरे

## राज्य ग्रंथालय समिती

### ३. राज्य ग्रंथालय समितीची स्थापना, संरचना आणि कार्ये :

१. या अधिनियमाला सुरूवात झाल्यानंतर राज्यसरकार लवकरात लवकर या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी एक समिती स्थापन करेल तिला राज्य ग्रंथालय समिती म्हटले जाईल.

२. समितीची संरचना :

   १. शिक्षण प्रभारी मंत्री हा समितीचा अध्यक्ष राहिल.

   २. शिक्षण विभागातील सरकारचा सचिव.

३. सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक.

४. राज्य केंद्रीय ग्रंथालयाचा मुख्य ग्रंथपाल.

५. मणिपुर विद्यापीठ समितीद्वारे नियुक्त एक सदस्य.

६. मणिपुर ग्रंथालय संघाद्वारे नियुक्त एक सदस्य.

७. जिल्हा ग्रंथालय समितीच्या सदस्यामधील राज्य सरकारद्वारे नियुक्त दोन सदस्य.

८. समितीद्वारे सुचविलेला एक सदस्य.

३. समिती या अधिनियमाच्या अंतर्गत निर्माण होणाऱ्या सर्व बाबींमध्ये राज्य सरकारला सल्ला देईल तसेच निर्धारीत अधिकार आणि कर्तव्यांचे पालन व त्यांचा उपयोग करेल.

**४. समितीच्या सदस्यांचा कार्यकाल :**

कलम ३ च्या उपकलम २ च्या अंतर्गत विषयाधीन, पदसिद्ध सदस्यांना सोडून इतर सदस्यांचा कार्यकाल नियुक्तीपासून तीन वर्षापर्यंत.

नियमानुसार पुरस्कृत करण्यात आलेल्या सदस्यांचा कार्यकाल हा ज्या विभागाद्वारे नियुक्ती झालेली आहे अशा विभागामध्ये कार्यरत असेपर्यंत.

**५. समितीचे इतर सदस्य पद अचानक रिक्त झाल्यास :**

समितीच्या नामांकित सदस्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वी पद रिक्त झाल्यास कलम ३ च्या निर्धारित नियमांनुसार अन्य व्यक्तीद्वारे नामनिर्देशानुसार रिक्त पदी नियुक्ती केली जाईल. या प्रकारे नियुक्त झालेल्या सदस्यांचा कार्यकाल हा पूर्वीच्या सदस्यांचा उर्वरीत कार्यकाला इतका असेल.

**६. समितीची सभा :**

समिती निर्धारित वेळी व निर्धारीत स्थानी सभांचे आयोजन करेल. तसेच कार्यवाहीसाठी संचलित नियमांचे पालन केले जाईल.

**७. राज्य ग्रंथालय समितीची कार्ये अनौपचारिक रुपात अमान्य होणार नाहीत :**

राज्य ग्रंथालय समितीची कोणतीही कार्ये समिती स्थापनेमधील दोष किंवा अन्य कोणत्याही कारणांसाठी अमान्य मानली जाणार नाहीत.

**८. राज्य सरकारद्वारे राज्य ग्रंथालय समितीवर नियंत्रण :**

समिती नेमून दिलेली कार्ये पूर्ण करण्यामध्ये असफल असल्यास किंवा या अधिनियमाद्वारे समितीला देण्यात आलेल्या अधिकारांचा दुरुपयोग केला जात आहे असे राज्य सरकारच्या लक्षात आल्यास राज्य सरकार समितीला शासन किंवा शिक्षा देऊ शकते. तसेच समिती आपले वर्तन सुधारण्यामध्ये असमर्थ राहिली किंवा समज देऊनही चुकांची पुनरावृत्ती केल्यास राज्य सरकार समिती बरखास्त करेल.

त्याचप्रमाणे समितीचे सर्व अधिकार व कर्तव्ये एखाद्या संस्था किंवा व्यक्तीकडे सुपूर्द करु शकेल. तसेच नवीन समितीचे संघटन करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे.

## प्रकरण तिसरे

## सार्वजनिक ग्रंथालय विभाग

**८. सार्वजनिक ग्रंथालय विभागाची स्थापना, निदेशकाची नियुक्ती आणि कर्तव्ये :**

या अधिनियमांच्या प्रयोजनासाठी राज्य सरकार एक सार्वजनिक ग्रंथालय विभागाची स्थापना करण्यात येईल. तसेच विभागाच्या प्रभारी निदेशकाची नियुक्ती आणि त्यांची कर्तव्ये ठरविण्यात येतील. अशा प्रकारे नियुक्त करण्यात आलेला निदेशक राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली खालील कर्तव्याचे पालन करेल.

१. राज्य केंद्रीय ग्रंथालय आणि ग्रंथालय शाखांचे निरीक्षण करणे.
२. सार्वजनिक ग्रंथालयाशी संबंधित सर्व बाबींचे निरिक्षण करणे.
३. या अधिनियमांच्या अंतर्गत तयार झालेल्या नियमांचे पालन करुन राज्य सरकारचे सहाय्य प्राप्त ग्रंथालये जाहीर करेल. या संबंधित सर्व बाबींचे निरीक्षण करेल.
४. या अधिनियमाच्या अंतर्गत सर्व जिल्हा ग्रंथालय समितीच्या कार्याचे निरीक्षण करेल व त्याच्यावर नियंत्रण ठेवेल.
५. आवश्यकता वाटल्यास ग्रंथालय कामकाजासंबंधी समितीला सूचना करेल.
६. या अधिनियमाच्या अतंर्गत तयार केलेल्या नियमांनी अधोरेखित केलेल्या कर्तव्याचे पालन करुन अन्य अधिकारांचा योग्य वापर करणे.

## प्रकरण चौथे

## जिल्हा ग्रंथालय समिती

### ९. जिल्हा ग्रंथालय समितीची स्थापना :

१. राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना आणि व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात येईल.

२ प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समिती ज्या भागात स्थापन करण्यात येईल त्या भागाचे नाव त्याला देण्यात येईल. तसेच त्या नावाची मुद्रा तयार करण्यात येईल. सदरच्या समितीला संपत्ती, मालमत्ता खरेदी करण्याचा विकण्याचा तसेच उपयोग करण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत समिती आपल्या नावाने दावा दाखल करु शकते तसेच दावा लढवू शकते.

३. प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समितीने आपल्या अधिकार क्षेत्रात ग्रंथालय सेवा देणे हे महत्त्वाचे कर्तव्य असेल.

### १०. जिल्हा ग्रंथालय समितीची रचना :

१. प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये खालील सदस्य सहभागी असतील.
   १. जिल्ह्यातील शिक्षण आणि सार्वजनिक ग्रंथालयक्षेत्रामध्ये उल्लेखनीय सेवा दिलेली व्यक्ती. तसेच सामाजिक प्रतिष्ठा असलेले राज्य सरकारकडून नियुक्त चार सदस्य.
   २. जिल्ह्याच्या प्रत्येक यास्तव प्रभागातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या कलम २ च्या खंड ३ चे उपखंड ए आणि बी च्या संबंधित सदस्यांना सोडून शिक्षण समितीने आपल्या सदस्याद्वारे स्वत: नियुक्त केलेले दोन सदस्य.
   ३. जिल्हा नगरपालिका मंडळाने किंवा लहान नगर समितीने आपल्या सदस्यापैकी नियुक्त केलेलेदोन सदस्य.
   ४. मणिपूर ग्रंथालय संघाच्या जिल्हा शाखेद्वारे नियुक्त दोन सदस्य.
   ५. जिल्हा ग्रंथालयाचा ग्रंथपाल हा जिल्हा ग्रंथालय समितीचा सचिव असेल.
   ६. जिल्ह्याचा शिक्षणअधिकारी.
२. जिल्हा ग्रंथालय समिती आपल्या सदस्यापैकी एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करेल.

**११. जिल्हा ग्रंथालय समितीच्या सदस्यांचा कार्यकाल :**

१. पदसिद्ध सदस्यांना सोडून जिल्हा ग्रंथालय समितीच्या प्रत्येक सदस्यांचा कार्यकाल नियुक्ती पासून तीन वर्षापर्यंत असेल.

२. कोणत्याही विशेष पदावरील व्यक्ती समितीचा सदस्य असल्यास त्या विशेष पदावर कार्यरत असेपर्यंत तो समितीचा सदस्य राहील.

**१२. जिल्हा ग्रंथालय समितीच्या सदस्यांच्या रिक्त स्थानी नियुक्ती :**

जिल्हा ग्रंथालय समितीच्या नामानिर्देशित सदस्यांचा कार्यकाल समाप्त होण्यापूर्वी त्यांचे स्थान रिक्त झाल्यास अन्य व्यक्तींच्या नामानिर्देशनाद्वारे त्या स्थानावर दुसऱ्याची नियुक्ती उर्वरीत कार्यकालासाठी करण्यात येईल.

**१३. जिल्हा ग्रंथालय समितीचे अधिकार आणि कार्ये :**

१. सार्वजनिक ग्रंथालयांच्यासाठी उपयुक्त जमिनीचे किंवा इमारतीचे आयोजन करणे. तसेच ग्रंथालयासाठी आवश्यक उपकरणे, साधनसामुग्री आणि सुविधांचे नियोजन करणे.

२. सार्वजनिक ग्रंथालयासाठी आवश्यक पुस्तके, कागदपत्रे, वर्तमानपत्रे, हस्तलिखित ग्रंथ, नकाशे, कला आणि विज्ञान कार्यासाठी आवश्यक नमुने, चित्रे, सिनेमा चलत चित्र, रिल, चित्रपट, ध्वनीफित तसेच अन्य सामुग्रीचे उपलब्धता करणे.

३. सार्वजनिक ग्रंथालयासाठी वेळोवेळी आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.

४. राज्य सरकारच्या पूर्व परवानगीने कलम २ चे खंड ८ मध्ये उपखंड ए मध्ये उल्लेखलेल्याप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालय बंद करणे किंवा स्थानांतरित करणे. किंवा कोणत्याही अनुदान प्राप्त ग्रंथालयांचे अनुदान थांबविणे.

५. नियमांनुसार सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणारी सहाय्यता व देणगीचा स्वीकार करणे. परंतु राज्य सरकारच्या पूर्व परवानगीशिवाय स्थावर मालमत्तेचा स्वीकार करु शकत नाही.

६. व्याख्यान आणि परिसंवादाचे आयोजन करणे तसेच सामाजिक शिक्षणाबरोबर सार्वजनिक ग्रंथालय सेवा संबंधित अन्य कार्यक्रमाचे संचालन करणे.

७. समितीचे संचालन मंडळ आणि राज्य सरकारच्या पूर्व परवानगीने कोणते ग्रंथालय खरेदी करु शकतात.

८. सार्वजनिक ग्रंथालय आणि सामाजिक उद्देशाने अनुदानाचे वितरण करणे.

९. सामान्यतः या अधिनियमांच्या अंतर्गत नियमांचे पालन करण्यासाठी आवश्यक सर्व कार्ये करणे.

**१४. जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे निर्धारित केलेल्या योजना :**

१. जिल्हा ग्रंथालय समितीची स्थापना झाल्यावर त्वरीत निदेशकाच्या अपेक्षेनुसार प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समिती आपल्या कार्यक्षेत्रामध्ये ग्रंथालय सेवेचा विस्तार करण्याच्या हेतुने ग्रंथालयाची स्थापना करण्यासाठी विहीत स्वरुपात योजना तयार करुन निदेशकाच्या स्वीकृतीसाठी सादर करेल. निदेशक राज्य सरकारच्या पूर्व अनुमोदनाने जिल्हा ग्रंथालय समितीला आपले निवेदन देण्यासाठी वेळ दिल्या नंतर निवेदनात बदल करु शकतो. यानंतर जिल्हा ग्रंथालय समिती स्वीकृत योजना सादर करेल.

२. निदेशक, राज्य सरकारच्या पुर्व अनुमोदनानुसार संपुर्ण जिल्हा ग्रंथालय समितीच्या आवेदनानुसार उपकलम १ च्या अंतर्गत स्वीकृत योजनेमध्ये बदल करु शकतो किंवा नवीन योजना अंमलात आणू शकतो.

**१६. जिल्हा ग्रंथालय समिती कार्ये अमान्यता :**

समितीच्या स्थापनेमधील दोष किंवा समिती मधील रिक्त स्थान यामुळे जिल्हा ग्रंथालय समितीची कार्ये अमान्य होणार नाहीत.

**१७. जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये संपत्तीचे विलिनीकरण :**

१. कलम २ चे खंड ८ चा उपखंड ए मध्ये नोंदविल्याप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रयोजनासाठी ग्रंथालय समितीद्वारे त्या क्षेत्रातील उपयोगी संपत्ती त्या क्षेत्राच्या जिल्हा ग्रंथालय समितीमध्ये विलीन होईल.

२. जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे उपेक्षित अचल संपत्ती भू खरेदी अधिनियम १८९४ नुसार लोक उद्देशाच्या हेतुने या अधिनियमाने खरेदी करण्यात येईल.

**१८. जिल्हा ग्रंथालय समितीचे नियम बनविण्याचे अधिकार :**

१. कायदा आणि नियमाच्या अंतर्गत संबंधित विषयाची अभिपूर्ती करण्यासाठी सर्वसामान्यपणे जिल्हा ग्रंथालय समिती नियम तयार करु शकते.

२. विशिष्ट आणि पूर्व अधिकारांच्या व्यापकतेसाठी पूर्वग्रहरहित नियम खालील विषयांसाठी किंवा कोणत्याही एका विषयासाठी तयार करण्यात येतात.

  १. आपल्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये निर्धारीत अटीनुसार जनतेचा प्रवेश., अशा निर्धारित अटीने प्रवेशास कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

  २. ग्रंथालयाचा उपयोग करणाऱ्या व्यक्तीकडून ग्रंथालय संपत्तीचे रक्षण करणे तसेच संपत्तीचा दुरूपयोग,विनाश किंवा लोप होण्यापासून वाचवणे.

  ३. ग्रंथालयाची उपयोगी संपत्ती लोप होण्यापासून वाचवणे.

  ४. या अधिनियमा अंतर्गत तयार झालेल्या नियमांचे उल्लघंन किंवा नियमांचे पालन न करणाऱ्या व्यक्तीला अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत बहिष्कृत करण्याचा अधिकार.

  ५. जिल्हा ग्रंथालय समितीच्या सभांचे आयोजन करणे आणि सभेच्या कारभाराचे संचालन करण्याच्या उद्देशाने अटींना अनुसरुन जिल्हा ग्रंथालय समितीच्या कलम २ चे उपकलम २ किंवा उपकलम १२ मध्ये उल्लेखलेल्या सार्वजनिक ग्रंथालय समितीला प्रभावित करणारे नियम बनविण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

३. निदेशक राज्य सरकारच्या पूर्व परवानगीने उपकलम २ च्या अंतर्गत जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे निर्माण केलेल्या नियमांमध्ये बदल व दुरुस्ती करु शकतो.

निर्धारीत अटींना अनुसरून नियमांमध्ये बदल व दुरुस्ती करण्यापूर्वी निदेशक जिल्हा ग्रंथालय समितीला संबंधित विषयामध्ये आपले अनुमोदन सादर करण्यास वेळ देतो.

**१९. राज्य सरकारद्वारे जिल्हा ग्रंथालय समितीवर नियंत्रण :**

जिल्हा ग्रंथालय समिती आपले कार्य पूर्ण करण्यास असमर्थ किंवा असफल झाली किंवा या अधिनियमाद्वारे देण्यात आलेल्या अधिकारांचा दुरूपयोग करते आहे असे राज्य सरकारच्या निदर्शनास आल्यास राज्य सरकार समितीवर आक्षेप घेऊ शकते.

जिल्हा ग्रंथालय समिती निर्धारीत वेळेमध्ये आपण केलेल्या चुकीचे समाधानकारक स्पष्टीकरण देण्यास असमर्थ ठरल्यास राज्य सरकार समिती निलंबित, विघटीत करु शकते. किंवा समितीचे सर्व किंवा ठराविक अधिकार दुसऱ्या व्यक्ती किंवा संस्थेकडे सुपुर्द करु शकते. तसेच समितीची पुनर्स्थापना करु शकते.

## प्रकरण पाचवे

## वित्त आणि लेखा

### २०. ग्रंथालय निधी :

१. प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समिती एक निधी निश्चित करेल त्याला ग्रंथालय निधी असे संबोधण्यात येईल. ज्यामधून या अधिनियमाच्या अंतर्गत येणारे सर्व खर्च भागविण्यात येतील.

२. ग्रंथालय निधीमध्ये खालील बाबी समाविष्ट असतील.

  १. सार्वजनिक ग्रंथालयाच्या लाभासाठी जिल्हा ग्रंथालय समितीला अंशदान किंवा देणगी.

  २. ग्रंथालय आणि सामाजिक शिक्षणासंबंधी विशिष्ट उद्देशाने राज्य सरकारद्वारे देण्यात येणारे विशेष अनुदान.

  ३. निधी आणि अन्य रक्कम जी या अधिनियमांतर्गत तयार झालेल्या नियमांना अनुसरुन जिल्हा ग्रंथालय समितीला देण्यात येते.

३. राज्य सरकार प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे वर्षाला अनुरक्षित ग्रंथालयांना अनुदान देण्यात येते.

### २१. लेखाचे परिक्षण :

१. जिल्हा ग्रंथालय समितीच्या प्रत्येक पावती आणि खर्चाचा हिशोब ठेवण्यात येईल.

२. हिशोबात सूक्ष्म निरीक्षणासाठी निबंर्धन ठेवण्यात येतील. सांख्यिकीय विषय आणि अन्य इतर विषय प्रक्रियेनुसार पूर्ण केले जातील.

## प्रकरण सहावे
## अहवाल, विवरण आणि निरीक्षण

**२२. अहवाल आणि विवरण :**

प्रत्येक जिल्हा ग्रंथालय समिती आणि सार्वजनिक ग्रंथालयाची प्रभारी व्यक्ती आणि निदेशक किंवा त्यांच्याद्वारे नियुक्त व्यक्ती वेळोवेळी अहवाल आणि विवरण सादर करुन सूचना देईल.

**२३. ग्रंथालय निरीक्षण :**

निदेशक किंवा त्यांच्याद्वारे नियुक्त व्यक्तीद्वारे या अधिनियमातंर्गत निर्माण केलेल्या नियमांचे पालन ग्रंथालयाकडून व संस्थेकडून होत आहे का? याचे निरीक्षण केले जाते.

## प्रकरण सातवे
## विविध

**२४. नियम बनविण्याचा अधिकार :**

१. राज्य सरकार या अधिनियमाच्या प्रयोजनाच्या पालनासाठी अधिसूचनेद्वारे नियम बनवू शकते.

२. विशेषत: पूर्वीच्या अधिकारांना अनुसरुन खालील नियम बनवले जातील.

  १. राज्य ग्रंथालय समिती तसेच जिल्हा ग्रंथालय समितीच्या सदस्यांची नियुक्ती, नामांकन आणि निर्वाचनासाठी नियम.

  २. जिल्हा ग्रंथालय समितीच्या लेखांचे सूक्ष्म परिक्षण आणि अहवाल प्रकाशनासंबंधित नियम.

  ३. सहाय्यप्राप्त ग्रंथालयांना अनुदान नियमनासाठी ग्रंथालय अनुदान नियम तसेच ग्रंथालय मानकांचे प्रकाशनासंबंधित नियम.

  ४. ग्रंथालय आणि ग्रंथपालांचे राज्य नोंदणीकृत अनुरक्षणासंबंधित नियम.

३. या अधिनियाअंतर्गत निर्माण झालेले सर्व नियम लवकरात लवकर १४ दिवसाच्या आत राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येतील. राज्य विधानमंडळ या नियमांचे अवलोकन आणि परिक्षण करेल.

**२५. समस्यांचे निराकरण :**

या अधिनियमांतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांना मूर्त स्वरुप देण्यामध्ये येत असलेल्या समस्या राज्य सरकारच्या आदेशाद्वारे दूर करण्यासाठी नियम तयार करु शकते.

सार्वजनिक ग्रंथालय कायद्याच्या निर्मितीनंतर मणिपूर राज्यात सार्वजनिक ग्रंथालयासंदर्भातील तरतुदीविषयक अम्मलबजावणी प्रगती पथावर असून ग्रामीण परिसरात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सर्वदूर राबविण्यासाठी लोक सहभागाची आवश्यकता जाणवत आहे.

## ४.१५ मिझोरम राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९९३

## (२५ फेब्रुवारी १९९३ ला मिझोरम राज्यपालांच्या संमती प्राप्त)

**प्रस्तावना :**

मिझोरम राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतुने या अधिनियमाची निर्मिती करण्यात आली.

भारतीय गणराज्याच्या ४४ व्या वर्षी मिझोरम राज्याच्या विधानसभेद्वारे खालील प्रकारे अधिनियम करण्यात आला.

### प्रकरण पहिले

### प्राथमिक

**१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ :**

१. हा अधिनियम मिझोरम राज्य सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९९३ म्हणून संबोधला जाईल.

२. या अधिनियमाचा विस्तार किंवा प्रसार संपूर्ण मिझोरम राज्यात होईल.

३. हा अधिनियम सरकारद्वारे शासकिय राजपत्रात अधिसूचनेद्वारे निर्धारीत तारखेपासून कार्यान्वित होईल.

**२. व्याख्या :**

या अधिनियमात निर्धारीत करण्यात आलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे,

१. परिषद म्हणजे, राज्य ग्रंथालय परिषद.

२. विभाग म्हणजे, शिक्षण तसेच मानव संसाधन विकास विभाग.

३. निदेशक म्हणजे,सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक स्वरुपात नियुक्त .

४. सरकार म्हणजे, मिझोरम राज्य सरकार.

५. अधिसूचना म्हणजे, मिझोरम शासकिय राजपत्रामध्ये प्रकाशित अधिसूचना.

६. निर्धारित म्हणजे, या अधिनियमांतर्गत निर्मित नियमांचे निर्धारण.

७. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे, सर्वसाधारण जनतेला सेवा देणारे ग्रंथालय. ज्यामध्ये राज्य, जिल्हा, उपप्रभाग, ग्राम ग्रंथालयाचा समावेश होतो.

८. नियम म्हणजे या अधिनियमांतर्गत निर्मित नियम.

९. राज्य म्हणजे मिझोरम राज्य

१०. वर्ष म्हणजे, वित्तीय किंवा आर्थिक वर्ष

## प्रकरण दुसरे

## राज्य ग्रंथालय परिषद

**३. राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना :**

अधिसूचनेद्वारे राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना केली जाईल. ती पुढील प्रमाणे,

**१. पदसिद्ध सदस्य :**

१. शिक्षण आणि मानव संसाधनमंत्री हा परिषदेचा सभापती असेल.

२. शिक्षण आणि मानव संसाधन सचिव हा परिषदेचा सचिव असेल.

३. कला आणि सांस्कृतिक विभाग निदेशक

४. माध्यमिक शिक्षण विभागाचा निदेशक

५. उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभागाचा निदेशक

६. प्रौढ शिक्षण विभागाचा निदेशक

७. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचा निदेशक

८. माहिती आणि जनसंपर्क विभागाचा निदेशक

९. आकाशवाणीचा केंद्र निदेशक

१०. सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक

११. नॉर्थ इस्ट हिल युनिव्हर्सिटी, मिझोरम चा ग्रंथपाल

१२. राज्य ग्रंथपाल

**२. इतर अन्य सदस्य :**

१. मिझोरम विधानसभेचे सरकारद्वारे नामांकित दोन सदस्य

२. मिझोरम ग्रंथालय संघाचा एक प्रतिनिधी

३. केंद्रीय वाय.एम.ए. चा एक प्रतिनिधी

४. मिझो अकादमी ऑफ लेटर्स चा एक प्रतिनिधी

५. मिझोरम प्रकाशन संस्थेचा एक प्रतिनिधी

**४. परिषद सदस्यांचा कार्यकाल :**

परिषद सदस्यांचा कार्यकाल हा नियुक्ती पासून तीन वर्षांचा राहील.

**५. परिषदेची सदस्यता :**

परिषदेच्या सदस्याची ज्या आधारे नियुक्ती किंवा नामांकन झालेले आहे त्या पदाचा भार सदस्य घेत नसल्यास त्याची सदस्यतत्व रद्द करण्यात येते.

**६. परिषदेच्या सदस्यांचे रिक्त स्थान :**

रिक्त झालेल्या पदाच्या सदस्याच्या उर्वरीत कालावधीसाठी नवीन सदस्याची नियुक्ती नामांकनाद्वारे परिषदेमार्फत करण्यात येईल.

**७. परिषदेची सभा आणि कोरम :**

१. परिषदेच्या वर्षभरात दोन सभा आयोजित केल्या जातील.

२. सभापती सभेला उपस्थित नसल्यास उपलब्ध सदस्यापैकी एक सदस्य सभापतीचे स्थान स्विकारले.

३. सभेला सहा सदस्याच्या उपस्थितीचा कोरम आवश्यक आहे.

**८. परिषदेची कर्तव्ये :**

१. या अधिनियमानुसार कायद्याअंतर्गत स्थापीत ग्रंथालयाविषयी राज्यामध्ये ग्रंथालय सेवांच्या विकासासंबंधी सर्व बाबींकरिता सरकारला सल्ला देईल.

२. परिषद सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करुन त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलेल.

## प्रकरण तिसरे

## सार्वजनिक ग्रंथालय विभाग

**९. सार्वजनिक ग्रंथालयांचे संघटन :**

१. हा अधिनियम प्रारंभ झाल्यानंतर ग्रंथालय विभागाचे संघटन करण्यात येईल. ज्याचा प्रमुख निदेशक असेल.

२. निदेशकाला सह निदेशक, उपनिदेशक तसेच अन्य आवश्यक कर्मचारी कामकाजामध्ये सहाय्य करतील.

**१०. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती :**

या अधिनियमाच्या अंतर्गत निर्माण झालेल्या नियमांना अनुसरुन अधिकारी व कर्मचाऱ्यांची सरकारद्वारे नियुक्ती केली जाईल.

**११. विद्यमान ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या विलिनीकरणासंदर्भात अटी :**

विलिनीकरणासाठी विद्यमान कर्मचाऱ्यांना योग्य वेळी आवश्यक असलेली पात्रता प्राप्त करणे आवश्यक आहे.

## प्रकरण चौथे

## सार्वजनिक ग्रंथालयाच्या श्रेणी

**१२. सार्वजनिक ग्रंथालयाच्या श्रेणी :**

राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांना पुढील चार श्रेणीमध्ये विभागण्यात येईल.

१. राज्य ग्रंथालय

२. जिल्हा ग्रंथालय

३. उपप्रभागीय ग्रंथालय

४. ग्रामीण ग्रंथालय

**१३. राज्य ग्रंथालय :**

१. राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी एक राज्य ग्रंथालय असेल.

२. राज्य ग्रंथालयात खालील विभाग असतील.

    १. प्रतिलिपीअधिकार विभाग

    २. अंधासाठी राज्य ग्रंथालय

    ३. आंतरग्रंथालयीन आदान – प्रदान

    ४. राज्य चरित्र विभाग

    ५. तांत्रिक सेवा विभाग

    ६. फिरती सेवा विभाग

**१४. राज्य ग्रंथालयांची कार्ये :**

राज्य ग्रंथालय ग्रंथालयांचे अतिरिक्त ग्रंथागार म्हणूनही कार्य करेल.

**१५. जिल्हा ग्रंथालय :**

राज्याच्या प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एक जिल्हा ग्रंथालय असेल.

**१६. उपप्रभागीय ग्रंथालय :**

प्रत्येक उपप्रभागीय मुख्यालयामध्ये एक उपप्रभागीय ग्रंथालय असेल.

**१७. ग्रामीण ग्रंथालय :**

सरकारद्वारे वेळोवेळी उपयुक्त असलेल्या ग्रामीण ठिकाणी मान्यता प्राप्त ग्रामीण ग्रंथालय असेल.

## प्रकरण पाचवे

## मान्यताप्राप्त ग्रामीण ग्रंथालयांना आर्थिक अनुदान :

**१८. मान्यताप्राप्त ग्रामीण ग्रंथालयांना सहाय्य अनुदान :**

या अधिनियमांच्या अधीन राहून तयार केलेल्या नियमांना अनुसरुन सरकारद्वारे मान्यताप्राप्त ग्रामीण ग्रंथालयांना अनुदान मान्य केलेले असेल.

## प्रकरण सहावे

## विविध स्वरुप

**१९. राज्य ग्रंथालय संघ :**

१. परिषद कोणत्याही एका संघटनेला राज्य ग्रंथालय संघाच्या स्वरुपात मान्यता प्रदान करेल. ज्याचे संविधान परिषदेद्वारे अनुमोदित करण्यात येईल.

२. निदेशक राज्यातील ग्रंथालयांना आणि ग्रंथपालांशी संबंधित महत्वपूर्ण गोष्टींमध्ये ग्रंथालय संघाला सल्ला देईल.

**२०. नियम बनविण्याचे अधिकार :**

१. सरकार या अधिनियमाच्या प्रयोजनाच्या पालनासाठी अधिसूचनेद्वारे नियम बनवू शकते.

२. विशेषत: नियम बनविण्याच्या अधिकाराची व्यापकता पूर्वग्रहरहित असून पुढील काही बाबींमध्ये उद्देश प्रदान करु शकतात.

   १. निदेशक, सहनिदेशक, उपनिदेशक, राज्य ग्रंथपाल, जिल्हा ग्रंथपाल, उपप्रभागीय ग्रंथपाल तसेच अन्य अधिकारी व कर्मचाऱ्याच्या नियुक्तीसाठी त्यांची योग्य शैक्षणिक पात्रता.

   २. मान्यता प्राप्त ग्रंथालयांना वित्तीय सहाय्य तसेच विशेष सहाय्य अनुदानासाठी योग्य निधी प्रक्रिया.

   ३. असे अन्य नियम जे शासनाला आवश्यक वाटतील.

३. या अधिनियमांच्या अंतर्गत तयार झालेला प्रत्येक नियम निर्माण झाल्यानंतर लवकरात लवकर मिझोरम विधानसभेच्या समोर एक किंवा दोन निरंतर सत्रात ठेवण्यात येतील. ज्या सत्रात नियम मांडण्यात येतील त्या सत्राच्या किंवा त्या पुढील सत्र समाप्त होण्याच्या पूर्वी मिझोरम विधानसभेने नियमांमध्ये काही बदल केले किंवा नवीन नियम बनविण्याचा निर्णय घेतल्यास तो नियम त्यानंतर प्रभावी होईल. अशा प्रकारे बदललेले किंवा नव्याने तयार केलेले नियम या अधिनियमांच्या अधीन पूर्वी केलेल्या कार्याला वैधानीक असतील.

## ४.१६ गोवा राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९९३
## (सन १९९७ मध्ये अवलोकनानंतर दुरुस्तीसह)

**प्रस्तावना :**

गोवा  राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतुने या अधिनियमाची निर्मिती करण्यात आली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर  ४४  वर्षांनी गोव्यामध्ये विधानसभेद्वारे खालील प्रकारे सदरच्या अधिनियमाची रचना करण्यात आली.

**१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ :**

१. हा अधिनियम गोवा राज्य सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९९३ म्हणून ओळखला जाईल.

२. या अधिनियमाचा विस्तार किंवा प्रसार संपूर्ण गोवा राज्यात होईल.

३. हा अधिनियम सरकारद्वारे शासकिय राजपत्रात अधिसूचनेद्वारे निर्धारीत तारखेपासून कार्यान्वित होईल.

**२. व्याख्या :**

१. सहाय्यप्राप्त ग्रंथालय म्हणजे, स्वप्रयत्नांवर चालवले जात असलेले सार्वजनिक ग्रंथालय. ज्याला चालू नियमांद्वारे सरकारद्वारे सहाय्य प्राप्त होईल.

२. परिषद म्हणजे, कलम ४ चे उपकलम १ द्वारे स्थापन केलेली राज्य ग्रंथालय परिषद.

३. प्रलेख म्हणजे, दस्ताऐवज किंवा अन्य साहित्य जे भौतिक हस्तारणाच्या उद्देशाने उपयोगी, परिवहनशील तसेच अनादिकाळापर्यंत संग्रही असेल. तसेच त्यामध्ये खालील परंपरागत व अपरांपरागत विचारांचे एकत्रीकरण असेल. यामध्ये मुद्रीत ग्रंथ, हस्तलिखित ग्रंथ, शिलामुद्रीते, संगीत लिपी, गुढ लेख, रेखाटने, नकाशे, मायक्रोफ्लिम, मायक्रो कार्ड, ध्वनिफित, अमुद्रित साहित्य, बातमीपत्र, पत्रिका व अन्य प्रकाशने यांचा समावेश असेल.

४. ग्रंथ म्हणजे,

अ) प्रत्येक खंड, खंडाचा कोणताही भाग, कोणत्याही भाषेतील बातमीपत्र, कागदपत्र, माहितीपत्र आणि विविध लिपीतील लेखन.

ब) कागदावर मुद्रित केलेली संगीत लिपी, संगीत, नकाशे, आराखडे किंवा शिलामुद्रीत केलेली रेखाटने.

क) दृकश्राव्य साधने, श्राव्य साधने उदा. टेप, ध्वनीफित, मायक्रोफ्लिम, संगणक, छायाचित्रे इ.

५. ग्रंथसेवा म्हणजे, संदर्भसेवा, सार्वजनिक ग्रंथालयाच्या सदस्यांना ग्रंथ आदान प्रदान सेवा पुरविणे, जनतेला आवश्यक असलेल्या ग्रंथाचे नाव, तो उपलब्ध करुन देण्यामध्ये सहाय्य करणे तसेच अपेक्षित ग्रंथ प्राप्त करण्यामध्ये सहाय्य करणे.

६. विभागीय ग्रंथालय म्हणजे, शासनाद्वारे विभागाकरिता चालवले जाणारे ग्रंथालय

७. सरकार म्हणजे, गोवा राज्याचे शासन

८. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे

अ. सरकारद्वारे स्थापन केलेले, चालवले जाणारे व सर्व जनतेसाठी खुले असणारे ग्रंथालय.

ब. शासनाकडून किंवा राजा राममोहन रॉय ग्रंथालय संस्थेद्वारे अनुदान प्राप्त ग्रंथालय.

क. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ सरकारद्वारे सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्वरुपात घोषित ग्रंथालय.

९. संदर्भसेवा म्हणजे ग्रंथालय कर्मचाऱ्याद्वारे ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांना ग्रंथ आणि अन्य साधन साहित्या जाणून घेण्यासाठी, शोधण्यासाठी तसेच अन्य साहित्याची माहिती प्राप्त करण्यासाठी मदत करणे.

१०. राज्य म्हणजे गोवा राज्य

११. वर्ष म्हणजे आर्थिक वर्ष

**३. ग्रंथालय सेवेची स्थापना :**

१. सरकार राज्यामध्ये ग्रंथालय सेवेची स्थापना आणि विकास करेल.

२. सरकार उपकलम १ च्या प्रयोजनाच्या पालनासाठी,

   १. जनतेला ग्रंथांचा लाभ प्राप्त होण्याच्या उद्देशाने आणि वाचनाला प्रोत्साहन देणे.

   २. आपल्या सार्वजनिक ग्रंथालयांमध्से उपयुक्त ग्रंथ, संदर्भसेवा पुरवणे.

   ३. सार्वजनिक ग्रंथालयांसाठी योग्य संख्येत ग्रंथ खरेदी करणे.

   ४. जनेतेची आवड व सहभाग बघून सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने संघटना आणि संस्था स्थापन केल्या जातील.

   ५. सर्व सरकारी विभाग, अन्य विभाग, शासकिय अधिकारी यांना ग्रंथालय सेवा देण्यात येईल.

   ६. राज्यात ग्रंथालयांना योग्य प्रशिक्षित कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी ग्रंथालय प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

   ७. राज्यातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांसाठी निर्धारीत सेवा देण्यात येतील.

   ८. सार्वजनिक ग्रंथालये तसेच सांस्कृतिक आणि शैक्षणिक संस्थांच्या उपयोगासाठी प्रोत्साहन देणे.

   ९. उपयोगी साहित्याच्या प्रकाशनासाठी प्रोत्साहन देणे.

   १०. कारागृह ग्रंथालय, चिकित्सालय ग्रंथालय तसेच अन्य गृह ग्रंथालये सुरु करुन त्यांचा विकास करण्यात येईल.

   ११. फिरती ग्रंथालये, अंधासाठी श्राव्य ग्रंथालये, बधिर व्यक्तींसाठी विशेष ग्रंथालये, पाठ्य पुस्तक ग्रंथालय, बाल ग्रंथालयांचे संगणकीकरण, दुर्मिळ साहित्याचे मायक्रोफ्लिंमग करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

   १२. बालक आणि युवकांमध्ये ग्रंथ वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

   १३. सार्वजनिक उपक्रमाद्वारे ग्रंथालय दत्तक घेण्यासाठी बँकांना प्रोत्साहन देणे.

१४. इयत्ता आठवी नंतरच्या सर्व विद्यार्थ्यांना सार्वजनिक ग्रंथालयाचे सभासद म्हणून नोंदणीकृत करणे.

१५. रोजगार कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार म्हणून नोंद करणाऱ्या युवकाकडे सार्वजनिक ग्रंथालयाचे सदस्यत्व प्राप्त असणे आवश्यक आहे.

३. सरकार या कलमातंर्गत आपली कार्ये व जबाबदारी खालील माध्यमाद्वारे पूर्ण करेल.

१. राज्य ग्रंथालय परिषद

२. राज्य ग्रंथालय विकास विभाग

३. राज्य सार्वजनिक ग्रंथालय

४. सहयोगी संस्था

**४. परिषदेची स्थापना आणि संघटन :**

१. शासन या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अधिसूचनेद्वारे निर्धारीत तारखेपासून निर्धारीतठिकाणी मुख्यालयाबरोबरच एका परिषदेची स्थापना करेल त्याला राज्य ग्रंथालय परिषद म्हटले जाईल.

२. परिषदेमध्ये खालील प्रकारचे सदस्य असतील.

अ. निर्धारित पदसिद्ध सदस्य:

१. ग्रंथालयाचा अध्यक्ष हा सभापती असेल.

२. सचिव, शिक्षण विभाग

३. सचिव, वित्त विभाग

४. सभापती किंवा अध्यक्ष राज्य ग्रंथालय संघ

५. राज्य ग्रंथालय अधिकारी, जो सदस्य सचिव असेल.

६. निदेशक, ऐतिहासिक प्राचिन तसेच पुरातनतत्व विभाग

७. ग्रंथपाल, गोवा विद्यापीठ

८. निदेशक, माध्यमिक शिक्षण विभाग

९. राज्य ग्रंथपाल

ब. ग्रंथालय विकासाची आवड असलेला राज्य विधानसभेचा शासनाद्वारे नामांकित सदस्य

क. ग्रंथालय शास्त्रातील तज्ज्ञ व्यक्ती परिषदेच्या सभापतीद्वारे नामांकित असेल.

ड. साहित्याशी संबंधित ग्रंथालयाच्या स्वयंसेवी संस्थांचा सदस्य.

३. परिषदेच्या कलम ३ च्या अंतर्गत उल्लेखनीय सर्व विषयांवर तसेच राज्यात ग्रंथालय सेवांचा विकासासंबंधित सरकारला सल्ला देईल.

४. परिषदेद्वारे ग्रंथालय विकास आणि संघटनाच्या सर्व तांत्रिक गोष्टींवर राज्य ग्रंथालय विकास विभागाला सल्ला देईल.

५. परिषदेद्वारे वर्षाला कमीत कमी दोन सभा घेतल्या जातील. पंरतु दोन सभांमध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त अंतर नसेल.

६. परिषदेच्या नामांकित सदस्यांचा कार्यकाल चार वर्षाचा असेल.

७. कलमाच्या, उपकलम २ च्या संदर्भातील सदस्यांना वगळून इतर सदस्याचा मृत्यू झाल्यास, राजीनामा दिल्यास, सदस्य म्हणून कार्यरत राहण्यास अक्षम असल्यास किंवा बरखास्त केल्यास सरकार संबंधित सदस्याच्या उर्वरित कार्यकालासाठी अन्य सदस्य नामांकित करु शकते.

८. परिषद आपल्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी किंवा अधिनियमांतर्गत ज्या विषयी नियम बनवणे आवश्यक आहेत तेथे नियम बनवून समितीची स्थापना करेल.

**५. राज्य ग्रंथालय विकास विभाग :**

१. सरकार एक राज्य ग्रंथालय विकास विभागाची स्थापना करेल त्यामध्ये सरकारी विभाग असेल. या विभागामार्फत खालील कार्ये करण्यात येतील.

अ. सरकारचा विकास विभाग अन्य संबंधित विभाग तसेच केंद्रीय सरकारच्या सहाय्याने राज्यातील ग्रंथालयांसाठी वार्षिक, अल्पकालीन व दीर्घकालीन योजना तयार करण्यात येतील.

ब. सर्व सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यावर विश्लेषणात्मक व संख्यात्मक अहवाल तयार करुन प्रकाशित करणे.

क. ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या श्रेणीनुसार त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

ड. राज्यातील जिल्हा, तालुका आणि अन्य ग्रंथालयांना सल्लागार सेवा प्रदान करणे व निरीक्षण करणे.

प. सहाय्यता प्राप्त ग्रंथालयांना सहाय्य अनुदान पद्धती लागू करणे तसेच त्यांच्या निरिक्षणाची जबाबदारी स्विकारणे.

२. अधिसुचनेतील नियमांना अनुसरुन सरकारद्वारे नियुक्त व्यक्ती ही राज्य ग्रंथालय विकास विभागाची प्रमुख असेल. (ती व्यक्ती राज्य ग्रंथालय अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल.)

३. राज्य ग्रंथालय अधिकारी खालील कर्तव्यांचे पालन करेल.

अ. परिषद आणि परिषदेद्वारे स्थापन केलेल्या सर्व समितीच्या सर्व सभांमध्ये सहभागी होईल.

ब. परिषदेसाठी सरकारद्वारे अनुमोदित केलेल्या नियमांचे पालन करण्यासाठी जबाबदार असेल.

क. परिषदेद्वारे निर्माण झालेल्या अन्य कर्तव्यांचे पालन करेल.

ड. सरकारद्वारे राज्य ग्रंथालय विकास विभाग विषयाशी संबंधित नियम,

१. परिषदेद्वारे अनुमोदित केलेली वर्षभरातील कार्याच्या योजनेची जबाबदारी

२. सहाय्य प्राप्त ग्रंथालयांना सहाय्य अनुदान योजना लागू करणे.

३. जिल्हा व अन्य ग्रंथालयाच्या स्थापनेसंबंधीचा निर्णय आणि सार्वजनिक ग्रंथालयांचे नियम आणि संविधान अनुमोदित करणे.

४. कोणत्याही सहाय्यप्राप्त ग्रंथालयाला राज्याच्या सार्वजनिक ग्रंथालयामध्ये समाविष्ट करु शकतो.

**६. राज्य ग्रंथालय :**

सरकारच्या आदेशानुसार राज्यामध्ये एक राज्य ग्रंथालयाची स्थापना करण्यात येईल.

### ७. राज्य ग्रंथालयाचे ग्रंथ भंडार :

१. राज्यातील लेखकांच्या राज्यामध्ये प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांच्या दोन प्रती राज्य ग्रंथालयाच्या ग्रंथ भंडारात उपलब्ध असणे प्रस्तुत अधिनियमानुसार अनिवार्य आहे. ह्या प्रती खरेदी, बदली किंवा देणगी अशा कोणत्याही स्वरुपात असू शकतात.

२. राज्य ग्रंथालयाच्या साधन सामुग्रीमध्ये दृकश्राव्य साधने, ध्वनी फित, श्राव्य ध्वनी फित, नकाशे, आराखडे, छायाचित्रे यांचा समावेश असेल.

### ८. राज्य ग्रंथपालाला ग्रंथ प्रदान करणे :

१. सरकारी विभागाच्या अध्यक्षांच्या कार्यालयात उपयोगी नसलेले परंतु राज्य ग्रंथपालाच्या मते ग्रंथालयासाठी उपयुक्त असलेले सर्व ग्रंथ ग्रंथालयाला देणे.

२. राज्य ग्रंथालय अधिकाऱ्याद्वारे खरेदी करण्यात येणारे ग्रंथ आणि अन्य साधनसामुग्रीसाठी प्राधिकरणाद्वारे संघटित ग्रंथ खरेदी समितीच्या सल्ल्याने केली जाईल.

### ९. राज्य ग्रंथालयाचे विभाग :

१. राज्य ग्रंथालयात कमीत कमी दोन विभाग असतील. त्यामध्ये राज्य संदर्भ ग्रंथालय विभाग आणि राज्य अंतर ग्रंथालयीन देवघेव विभाग.

२. राज्य संदर्भ ग्रंथालय विभागात खालील कार्ये पार पाडली जातील.

   १. राज्य संदर्भ ग्रंथालय विभाग कलम ३ च्या उपकलम २ चे खंड बी नुसार एक प्रतिनिधी संग्रहाचे आयोजन करेल. हा संग्रहामार्फत संदर्भ ग्रंथ आणि उल्लेखित प्रकाशने संकलित करेल.

   २. आढावा घेण्यासाठी संदर्भ ग्रंथाच्या बरोबर लोकसभा व राज्य विधान सेभेच्या प्रतिवेदनाचे अहवाल,केंद्र सरकार व राज्य सरकारचे प्रतिवेदन अहवाल, त्यांची प्रकाशने यांची सूची संहिता खरेदी करणे आणि उपलब्ध करुन देणे.

   ३. राज्यातील महत्वपूर्ण शैक्षणिक ग्रंथालयांची सूची उपलब्ध करणे. किंवा तयार करणे.

   ४. संशोधक आणि विद्वान व्यक्तींच्या उपयोगासाठी विशिष्ट वाङ्मय सूची तयार करणे. वाङ्मय कार्याची जबाबदारी घेणे तसेच स्थानिक भाषेतील साहित्याची सूची तयार करणे.

५. विभागीय आणि संशोधन ग्रंथालयाच्या सहाय्याने अन्य शैक्षणिक आणि शोध संस्थेशी संबंधित समूहाला आणि व्यक्तींना ग्रंथ वाङ्मय सेवा प्रदान करणे.

६. मुलांसाठी ग्रंथालय सेवेला प्रोत्साहन देणे.

७. राज्यातील जिल्हा ग्रंथपाल व अन्य ग्रंथपालांना तांत्रिक सहाय्य व माहिती प्राप्त करुन देणे.

८. राज्यातील व राज्याबाहेरील ग्रंथांच्या खरेदीसाठी आणि आंतर ग्रंथालयाला देवघेव केंद्राच्या स्वरुपात कार्य करणे.

९. राज्यातील ग्रंथालये आणि सार्वजनिक ग्रंथालयाच्या कामकाजाचा अहवाल तयार करुन तो सादर करणे.

३. राज्य संदर्भ ग्रंथालयाद्वारे ग्रंथालयाच्या आवाराबाहेर ग्रंथाचा वापर करण्यासाठी देण्यात येणार नाही.

४. राज्य अंतर ग्रंथालयीन देवघेव ग्रंथालयांची खालील कार्ये असतील.

१. अंतर ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करुन देणे.

२. जिल्हा ग्रंथालयाच्या ग्रंथ भांडाराला वेळोवेळी ग्रंथ पुरविणे.

३. सांस्कृतिक आणि शैक्षणिक संस्था तसेच सामाजिक कल्याण संघटनांना ग्रंथ देवघेव सेवा प्रदान करणे.

४. योग्य वेळी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करणे.

५. आपल्या ग्रंथ भांडाराचा प्रसार करणे आणि विस्ताराची व्यवस्था करणे.

६. ग्रंथालय अहवाल आणि साहित्य प्रकाशित करणे.

**१०. राज्य ग्रंथालय अधिकारी :**

१. राज्य ग्रंथालयाचा प्रभारी अधिकारी (प्रभारी अधिकारी हा राज्य ग्रंथपाल म्हणून ओळखला जाईल.)

१. राज्य ग्रंथालयाच्या सर्व विभागाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असेल.

२. राज्य ग्रंथालयाच्या ग्रंथ भांडाराचे रक्षण करणे आणि सर्व अनुमोदित योजना लागू करणे.

३. परिषदेला सर्व तांत्रिक बाबींमध्ये सल्ला देणे.

४. ग्रंथालयाच्या मागील आर्थिक वर्षांच्या योजनांचा अहवाल परिषदेला सादर करणे. या अहवालामध्ये राज्य ग्रंथालयाच्या खात्यामध्ये जमा आणि खर्चाच्या हिशोबाचे स्पष्टीकरण समाविष्ट करणे.

२. राज्य ग्रंथालयाच्या संचालनासाठी राज्य ग्रंथपालास व्यावसायिक तांत्रिक आणि सामान्य कर्मचाऱ्याद्वारे मदत केली जाईल.

३. राज्य ग्रंथपाल हा सरकारच्या पदभर्तीच्या अधिसूचित अटी व नियमांचे सरकारद्वारे नियुक्त व्यक्ती असेल.

**११. जिल्हा ग्रंथालय :**

१. जिल्ह्यातील निवासी जनतेला ग्रंथालय सेवा प्रदान करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा ग्रंथालय असेल.

२. उपकलम १ च्या अंतर्गत जिल्हा ग्रंथालयामध्ये खालील प्रकार पडतात.

१. नगरपालिका ग्रंथालय

२. तालुका ग्रंथालय

३. ग्रामपंचायत ग्रंथालय

**१२. जिल्हा ग्रंथालयाची कार्ये :**

१. जिल्ह्यामध्ये संदर्भ आणि वाङ्मय सेवा प्रदान करणे.

२. ग्रामीण व शहरी क्षेत्रामध्ये ग्रंथालय सेवेचा विस्तार करण्यासाठी तालुका शाखा ग्रंथालये, फिरती ग्रंथालय, केंद्र ग्रंथालयांची स्थापना करणे. तसेच विविध तालुका ग्रंथालय व अन्य ग्रंथालयाच्या योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये ग्रंथालय सेवेचा विस्तार करणे.

३. उपयुक्त ग्रंथाची उपलब्धता करुन देऊन तालुका ग्रंथालयाचे पोषण करणे.

४. राज्य ग्रंथालय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जिल्ह्यामधील सहाय्यप्राप्त ग्रंथालयांना मदत करणे आणि सहाय्यप्राप्त करुन देणे.

५. जनतेला प्रौढ शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याकरिता अन्य सामाजिक संस्था, सामाजिक शिक्षण संस्था आणि कार्यकर्त्यांना मदत करणे.

६. जिल्ह्यामध्ये ग्रंथपाल आणि अन्य ग्रंथालय कार्यकर्त्यांचे संमेलन, परिसंवाद, शिबीर आयोजित करणे.

**१३. जिल्हा ग्रंथालय समिती (१९९७ च्या सुधारित कायद्यानुसार)**

१. राज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा ग्रंथालय समिती असेल. तिची स्थापना परिषदेद्वारे निर्धारीत नियमांनुसार करण्यात येईल.

२. जिल्हा ग्रंथालय समिती परिषदेने अनुमोदित केलेल्या विषयासंबंधित कार्याचे पालन आणि कामकाज करेल.

३. जिल्हा ग्रंथालय समितीची कार्ये खालील प्रमाणे,

 १. जिल्हा ग्रंथालय तसेच विविध ग्रंथालय योजनांच्या कार्यांचे निरीक्षण करणे.

 २. शाखा ग्रंथालय सुरू करणे.

 ३. जिल्ह्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालय सेवेचा विकास होण्यासाठी आवश्यक पावले उचलणे.

 ४. परिषदेने जिल्हा ग्रंथालयासाठी निर्धारीत केलेल्या नियमांच्या पालनासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.

 ५. ग्रंथ, फिल्म, फिल्मस्ट्रीप, ध्वनिफीत, उपकरणे, साधनसामुग्री, ग्रंथ वाहन जिल्हा ग्रंथालयासाठी खरेदी करण्याच्या उद्देशाने आराखडा तयार करणे.

 ६. ग्रंथालयासाठी जमीन किंवा अन्य मालमत्ता घेणे, खरेदी करणे, भाडेतत्त्वावर घेणे, इमारतीची डागडुजी करणे, विस्तार करणे तसेच आवश्यक उपकरणांची खरेदी करण्यासाठी सुविधांचे आयोजन करणे.

 ७. या अधिनियमात निर्धारीत ग्रंथालय सेवांचा विकास आणि वृद्धीच्या प्रयोजनासाठी भेट, मालमत्ता आणि देणगीचा स्वीकार करणे.

 ८. ग्रंथालयासंबंधित संमेलन आणि प्रदर्शनांमध्ये सहभाग घेणे. तसेच अशा संमेलन आणि प्रदर्शनांचे आयोजनासाठी पैसे खर्च करणे. तसेच अशा संमेलन आणि प्रदर्शनांना उपस्थित राहण्यासाठी व्यक्तींची किंवा व्यक्ती समूहांची नियुक्ती करणे.

९. जिल्हा ग्रंथालयाच्या आवारामध्ये कमी कालावधीची व्याख्याने तसेच अन्य सांस्कृतिक आणि शैक्षणिक योजनांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथालय समितीद्वारे ग्रंथालयाच्या दैनंदिन कामकाजाचा कालावधी निश्चित करणे.

११. शाखा ग्रंथालये, फिरती ग्रंथालये आणि संग्रह केंद्राची स्थापना करुन ग्रंथालय सेवेचा विस्तार करणे.

४. विशिष्ट बाबी संबंधित प्रश्न उपस्थित झाल्यास त्यावर ग्रंथालय समिती निर्णय घेईल तो निर्णय अंतिम असेल.

५. सभापती आयोजित करेल तेव्हा जिल्हा ग्रंथालय संघाची सभा घेण्यात येईल. परंतु वर्षातून चार सभा घेण्यात येतील.

**१४. तालुका ग्रंथालय समिती (१९९७ च्या दुरुस्ती केलेला कायदा) :**

१. प्रत्येक तालुका ग्रंथालयासाठी तालुका ग्रंथालय समिती असेल. या समितीची स्थापना जिल्हा ग्रंथालय समितीच्या निर्धारित नियमांनुसार करण्यात येईल.

२. संबंधित जिल्हा ग्रंथालय समितीने अनुमोदित केलेले विषय तालुका ग्रंथालय समिती आपल्या कामकाजात व कार्यामध्ये नियमांनुसार समाविष्ट करेल.

**१५. ग्रामीण ग्रंथालय समिती (१९९७ च्या दुरुस्ती केलेला कायदा) :**

१. प्रत्येक ग्रामीण ग्रंथालयासाठी ग्रामीण ग्रंथालय समिती असेल. तिची स्थापना जिल्हा ग्रंथालय समितीच्या संरचित नियमांनुसार करण्यात येईल.

२. ग्रामीण ग्रंथालय समिती जिल्हा ग्रंथालय समितीने अनुमोदित केलेले विषय आपल्या कामकाजात व कार्यात समाविष्ट करेल.

**१६. सार्वजनिक ग्रंथालयाचे कर्मचारी (१९९७ च्या दुरुस्ती केलेला कायदा) :**

१. शासन सार्वजनिक ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी सरकारी विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या समकक्ष सवर्ग निर्माण करेल. तसेच त्या सवंर्गाद्वारे कर्मचाऱ्यांच्या सेवा, शर्ती, नियम निर्धारित करण्यात येतील.

२. परिषद आपल्या स्थापनेनंतर एका वर्षाच्या आत ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या विविध श्रेणीसाठी नियम तयार करेल.

**१७. ग्रंथालय निधी :**

१. सरकार एक निधी निर्माण करेल त्याला ग्रंथालय निधी म्हटले जाईल.

२. ग्रंथालय निधीत खालील बाबी समाविष्ट असतील.

   १. सरकारद्वारे देण्यात येणारे अनुदान

   २. सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाच्या उद्देशाने राज्य सरकारला भारत सरकारद्वारेदेण्यात येणारे अनुदान

   ३. सरकारद्वारे देण्यात येणारे विशिष्ट अनुदान

   ४. सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी जनतेद्वारे देण्यात येणाऱ्या देणग्यांचे योगदान.

**१८. ग्रंथालय उपकर :**

१. गोवा उत्पादन शुल्क अधिनियम १९६४ च्या अंतर्गत भारतामध्ये निर्मित विदेशी दारु वर प्रति लिटर मागे ५० पैसे आणि बियरवर प्रति लिटर ५० पैसे ग्रंथालय उपकर म्हणून सरकार वसूल करेल.

२. उपकलम १ च्या अंतर्गत या अधिनियमांच्या पालनासाठी वसूल करण्यात आलेला उपकर कायद्याद्वारे एकत्रित करण्यात येईल.

**१९. सार्वजनिक ग्रंथालयासाठी आर्थिक उपलब्धता :**

सरकारी योजनांच्या आयोजनांतर्गत राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे वार्षिक अंदाजपत्रक बनविले जाईल. तसेच राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवांच्या विकासाच्या उद्देशाने शैक्षणिक अंदाजपत्रकाचा १% देण्यात येईल.

**२०. नियमांची रचना (१९९७ च्या दुरुस्ती केलेला कायदा) :**

राज्य ग्रंथालय सेवांच्या संरचेसाठी परिषद संबंधित आदर्श नियम तयार करेल.

**२१. राज्य ग्रंथालय संघ :**

परिषदेद्वारे राज्य ग्रंथालय संघाला फक्त एक सहयोगी संस्थेच्या स्वरुपात मान्यता देण्यात येईल. त्या संघटनेचे संविधान परिषदेद्वारे अनुमोदित करण्यात येतील.

**२२. नियम तयार करण्याचा अधिकार :**

१. या अधिनियमांच्या पालनासाठी शासन, अधिसूचनेद्वारे नियम तयार करु शकते.

२. या कलमांच्या अंतर्गत निर्माण केलेला प्रत्येक नियम व उपनियम लवकरात लवकर राज्य विधानसभेच्या १० दिवसाच्या सत्रामध्ये एक किंवा दोन दिवसात सादर करावेत. नियमांमध्ये केलेले बदल मान्य असल्यास तो नियम त्यानंतर अशाप्रकारे परिवर्तन रुपात प्रभावी होईल. पंरतु या नियमांच्या अधिन येणारे कोणतेही संस्करण पूर्वी झालेले असल्यास ते पूर्ववतच राहील.

गोवा राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायद्यातील बहुतांशी तरतुदी या इतर राज्यातील कायद्यानुसार असल्या तरी या कायद्याचे वैशिष्ट्ये म्हणजे,

१. आठवी नंतरच्या विद्यार्थ्यांची सार्वजनिक ग्रंथालयाकरिता सभासद नोंदणी करणे.

२. रोजगार कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार म्हणून नोंद करण्यासाठी संबंधित युवकाकडे सार्वजनिक ग्रंथालयाचे सदस्यत्व असण्याची आवश्यकता.

३. ग्रंथालय उपकराकरिता मद्य उत्पादनावर प्रतीलिटर कर आकारणी.

या तरतुदीमुळे ग्रंथालयांना आर्थिक स्थैर्य येण्यास मदत झालेली आहेच. शिवाय येथील शासनाने मध्यवर्ती ग्रंथालयाची अद्ययावत स्वरुपात केलेली स्थापना हे ही महत्वपूर्ण कार्य म्हणून नोंद घेणे आवश्यक ठरते.

## ४.१७ राजस्थान राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६

**प्रस्तावना :**

राजस्थान राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतुने हा कायदा संमत करण्यात आला. तसेच राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी लोकांना मोफत व प्रभावी स्वरुपात सेवा प्राप्त होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करुन त्यांचे संवर्धन व विकास करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे.

भारतीय गणराज्याच्या ५७ व्या वर्षी सदर कायद्याची निर्मिती करण्यात आली.

### प्रकरण पहिले

### प्रारंभ

**१. नाव आणि प्रारंभ :**

१. हा कायदा राजस्थान राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६ म्हणून ओळखला जाईल.

२. या कायद्याचा विस्तार किंवा प्रसार पुर्ण राजस्थान राज्यात होईल.

३. हा कायद्याची अंमलबजावणी राजस्थान राज्याच्या राजपत्राच्या निर्धारीत दिनांकानुसार करण्यात येईल.

**२. व्याख्या :**

या कायद्यामध्ये निर्धारीत करण्यात आलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे,

१. पुस्तक म्हणजे,

अ) प्रत्येक खंड, खंडाचा कोणताही भाग, कोणत्याही भाषेतील बातमीपत्र, कागदपत्र, माहितीपत्र आणि विविध लिपीतील लेखन.

आ) कागदावर मुद्रित केलेली संगीत लिपी, संगीत, नकाशे, आराखडे किंवा शिलामुद्रीत केलेली रेखाटने.

इ) दृकश्राव्य साधने, श्राव्य साधने, टेप, ध्वनीफित, मायक्रोफ्लिम, संगणक, छायाचित्रे इ.

ई) कोणत्याही स्वरुपातील संगणकीय कार्यक्रम.

२. पुस्तक जमा केंद्र म्हणजे, असे ठिकाण जिथे पुस्तकांचे संकलन करुन सामान्य व्यक्ती जेथून पुस्तक घेऊ शकते.

३. पुस्तक सेवा केंद्र म्हणजे जिथे ग्रंथालयाचे सदस्य फिरत्या ग्रंथालयाच्या माध्यमातून पुस्तक घेऊ शकतात.

४. अध्यक्ष म्हणजे, या कायद्यानुसार राज्य ग्रंथालय परिषदेचा अध्यक्ष.

५. परिषदेच्या कलम ३ च्या अंतर्गत राजस्थान राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना करण्यात आली.

६. निर्देशक म्हणजे सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक.

७. जिल्हा म्हणजे, राजस्थान भूराज्य कायदा १९५६ च्या घटक क्र. १५ च्या अंतर्गत स्थापन केलेला राज्यातील एक जिल्हा.

८. तालुका म्हणजे, राजस्थान भूराज्य कायदा १९५६ च्या घटक क्र. १५ च्या अंतर्गत स्थापन केलेला जिल्ह्यातील एक तालुका.

९. विस्तार सेवा म्हणजे, यामध्ये समाविष्ट असलेला सांस्कृतिक विभागाच्या परिक्षणासाठी आणि प्रगती तसेच सामाजाच्या बौद्धिक, साहित्यिक आणि वैज्ञानिक स्वरुपात प्रोत्साहन देण्याच्या कार्यक्रमासंदर्भातील सेवा.

१०. ग्रंथालय म्हणजे, पुस्तकांचा संग्रह, पुस्तक जमा केंद्र किंवा ग्रंथालय सेवा किंवा विस्तारित सेवा केंद्र.

११. ग्रंथालय सेवा म्हणजे, वाचनाची सेवा उपलब्ध करुन देणारे आणि पुस्तकासंबंधित माहिती उपलब्ध करण्यासाठी वाचकांना सहाय्य करणे.

१२. स्थानिक प्राधिकरण म्हणजे राजस्थान नगरपालिका कायदा १९५९ (१९५९ च्या कायदा क्र. ३८) च्या नियमांतर्गत स्थापित केलेली नगरपालिका किंवा राजस्थान पंचायतीराज कायदा १९९४ (१९९४ चा कायदा क्र. १३) च्या नियमानुसार स्थापन केलेली पंचायतराज संस्था.

१३. ग्रंथालय सदस्य म्हणजे ग्रंथालयाने नोंदणीकृत केलेले सदस्य.

१४. विहित नियम म्हणजे निर्धारीत केलेले नियम.

१५. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे,

अ. राज्याच्या ग्रंथालय प्रणालीअंतर्गत कोणतेही ग्रंथालय

ब. निदेशकाद्वारे कलम १८ अंतर्गत मान्यताप्राप्त ग्रंथालय

क. असे ग्रंथालय जे राज्य सरकार, राजपत्राच्या नियमाद्वारे या कायद्याच्या आयोजनासाठी सार्वजनिक ग्रंथालय म्हणून जाहीर करणे.

१६. पंचायत समिती म्हणजे राजस्थान पंचायतीराज कायदा १९९४ (१९९४ च्या कायदा स.१३) च्या नियमाअंतर्गत स्थापन केलेली पंचायत समिती.

१७. सार्वजनिक ग्रंथालय संघटन म्हणजे कलम १९ च्या अंतर्गत मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालय संघटन होय.

१८. नियम किंवा विनियम म्हणजे कायद्याअंतर्गत बनविलेले नियम.

१९. वर्ष म्हणजे १ एप्रिल पासून प्रारंभ होऊन ठीक पुढील बारा महिन्यांनी ३१ मार्चला समाप्त होणारा कालावधी

## प्रकरण दुसरे

## राज्य ग्रंथालय परिषद

### ३. राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना :

१. या कायद्याची स्थापना झाल्यानंतर लगेचच राज्य सरकारच्या नियमानुसार या कायद्याच्या प्रयोजनासाठी एका समितीची स्थापना केली. त्या समितीला 'राज्य ग्रंथालय समिती' असे म्हणतात.

### २. राज्य ग्रंथालय समितीची रचना खालीलप्रमाणे असेल,

१. अध्यक्ष : ग्रंथालयाचा प्रभारी मंत्री

२. उपाध्यक्ष : ग्रंथालयाचा उत्तरदायी शासनाचा सचिव

३. सदस्य : वित्त विभाग, राजस्थान प्रमुख सचिव किंवा आपल्या समकक्ष पदाची पुरस्कृत व्यक्ती.

४. सदस्य : निदेशक महाविद्यालय

५. सदस्य : निदेशक, प्राथमिक शिक्षण विभाग

६. सदस्य : निदेशक, माध्यमिक शिक्षण विभाग

७. सदस्य : निदेशक, पंचायतराज

८. सदस्य : निदेशक, स्थानिक स्वशासन

९. सदस्य : अध्यक्ष, माध्यमिक शिक्षण विभाग, राजस्थान

१०. सदस्य : सचिव, राजस्थान राज्य पाठ्यपुस्तक विभाग

११. सदस्य : ग्रंथालय अध्यक्ष, राज्य केंद्रीय ग्रंथालय

१२. सदस्य किंवा सचिव : निदेशक, सार्वजनिक ग्रंथालय

**२. पुरस्कृत सदस्य :**

१. अध्यक्षाद्वारे ग्रंथालय सेवेसंबंधित विषयामध्ये विशेष ज्ञान आणि आवड असलेले तीन पुरस्कृत सदस्य त्यामध्ये एका महिलेचा समावेश असेल.

२. राज्य सरकारद्वारे जिल्हा ग्रंथालयाचा पुरस्कृत अध्यक्ष

३. अध्यक्षाद्वारे पुरस्कृत दोन प्रसिद्ध व ज्ञानी व्यक्ती.

४. राजस्थान विधानसभा अध्यक्षाद्वारे पुरस्कृत केलेले राजस्थान विधान सभेचे दोन सदस्य.

५. परिषदेच्या अध्यक्षाचे अधिकार, कर्तव्य आणि कार्ये निर्धारीत केलेली असतील तीच असणार आहेत.

**४. परिषदेचे मुख्य कार्यालय :**

परिषदेचे मुख्यालय राजस्थानमध्ये असेल किंवा राज्यसरकारने राजपत्रामध्ये निर्देशित केलेल्या ठिकाणी असेल.

**५. परिषदेचे अधिकार आणि कार्ये :**

परिषदेचे अधिकार आणि निर्धारीत केलेली कार्ये ही खालीलप्रमाणे असतील.

१. या कायदा आणि नियमांच्या प्रशासनानुसार सर्व विषयांसंबंधित स्वप्रेरणेने राज्य सरकारला सल्ला देणे.

२. राज्य ग्रंथालय विकास निधी मधील वैध्य नियमांनुसार अनुमोदन देणे.

३. पुस्तक वाचनाची आवड वाढवण्यासाठी प्रोत्साहनासंबधित कार्यक्रमाचे निर्धारण करणे आणि जनतेमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे.

४. सार्वजनिक ग्रंथलयांची कार्ये, प्रशासन आणि प्रगतीसाठी कलम २२ च्या अंतर्गत तयार केलेल्या वार्षिक अंदाजपत्रकावर विचार विनिमय करुन सल्ला देणे आणि शिफारस करणे.

५. सर्व सार्वजनिक ग्रंथालये आणि सार्वजनिक ग्रंथालय संघटनाच्या कार्य आणि प्रशासनाचे अनुक्रमे कलम २० आणि २१ नुसार देण्यात येणाऱ्या अहवाल आणि निरीक्षणाच्या आधारे वेळोवेळी पुनरावलोकन करणे. लोक शिक्षण आणि ग्रंथालय सेवा अधिक प्रभावशाली बनविण्यासाठी तसेच येणाऱ्या अडचणींवर मात करण्यसाठी आर्थिक योजनांचा उपाय सुचविणे.

६. सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रशासनात सुधारणा करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपायासंबंधी राज्य सरकारला शिफारस करणे.

७. सार्वजनिक ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या सहाय्य अनुदान किंवा इतर आर्थिक सहाय्याच्या प्रयोजनासाठी पात्रता हेतू व मानके निश्चित करुन सल्ला देणे.

८. सहाय्य अनुदानाची रक्कम निश्चित करण्यासाठी पद्धती सुचविणे.

९. सहाय्य अनुदानापेक्षा वेगळ्या आर्थिक सहाय्याच्या उद्देशासाठी, प्रयोजनसाठी आणि अशा सहाय्यासाठी केले जाणारे नियम व अटीसंबंधी राज्य सरकारला सल्ला देणे.

१०. ग्रंथालयांच्या वार्षिक विकास योजनांसाठी उपाय सुचविणे व शिफारस करणे.

११. ग्रंथालय परिसंवाद, सभा आणि संमेलनांचे आयोजन आणि संचालन करणे.

१२. ग्रंथालय सेवा क्षेत्रामध्ये राज्य सरकार कडून वेळोवळी निर्धारीत केलेल्या मार्गदर्शक निकषानुसार नियोजित कार्यक्रम तयार करणे.

१३. राज्यातील ग्रंथालय सेवेच्या वाढ आणि विकासासाठी प्रयत्न करणे.

१४. आर्थिक अनुदान मिळविण्यासाठी आणि ग्रंथालय सेवेचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न करणे.

१५. राज्यातील ग्रंथालय सेवांच्या विकासासाठी दिर्घकालीन आणि अल्पकालीन योजना तयार करणे.

१६. ग्रंथालय कायद्याद्वारे तयार करण्यात आलेल्या नियमांना अनुसरुन सर्व अधिकार आणि कार्यांचे पालन करणे.

**६. सदस्यांचा कार्यकाल :**

१. परिषदेने नियुक्त केलेल्या सदस्यांचा कार्यकाल हा नियुक्त कलेल्या तारखेपासून पुढील तीन वर्षापर्यंत असेल.

२. परिषदेचा नियुक्त सदस्य हा आपले पद धारण करण्यास दिरंगाई करेल तेव्हा ज्याद्वारे हा सदस्यपुरस्कृत असेल तो विभाग परिषदेचा सदस्य राहणार नाही.

**७. रिक्त पद :**

परिषदेच्या नियुक्त सदस्यांचा अचानक मृत्यू झाला किंवा कोणत्याही कारणांमुळे त्याला आपले पद सोडावे लागल्यास त्या पदी लवकरात लवकर दुसरा सदस्य नेमण्यात येईल.

**८. परिषदेची सभा :**

१. परिषदेची सभा नियोजित तारीख, वेळ आणि स्थानावर होईल. सभेसाठी गणपूर्ती आवश्यक असेल. या सभेमध्ये कामकाजाच्या सर्व व्यवहारासंबंधीत चर्चा केली जाईल. आणि संबंधित सर्व व्यवहारांची प्रक्रिया ही कायद्याच्या निर्धारित नियमांनुसार होईल. परिषदेच्या सभा या वर्षातून दोनदा होतील. पण दोन सभेमध्ये सहा महिन्यापेक्षा अधिक अंतर नसावे.

२. परिषदेचा अध्यक्ष त्याला योग्य वाटेल तेव्हा परिषदेची सभा घेऊ शकतो. आणि एकूण सभासदांच्या १/३ सभासदांच्या लिखित मागणीनुसार मागणी नंतर ३ दिवसांनी विशेष सभा घेऊ शकतो.

परंतु परिषदेच्या अंतिम सभेनंतर दोन महिन्यांच्या आत विशेष सभा घेता येणार नाही.

**९. समितीची स्थापना :**

परिषद निर्धारित नियमांचे पालन करुन परिषदेच्या सर्व सदस्यांना अंतर्भूत करुन विविध समित्यांची स्थापना केली जाईल. अशा समित्या नियमांनुसार निर्धारित केलेल्या आहेत.

**१०. परिषदेच्या सदस्यांच्या देय भत्त्यांचे आयोजन :**

परिषद आणि त्यांच्या समितीच्या सदस्यांना या कायद्याच्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या कर्तव्याच्या पालनासाठी देय असलेले सर्व नियोजित भत्ते देण्यात येतील.

## प्रकरण तिसरे

## सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक

**११. सार्वजनिक ग्रंथालयांचा निदेशक :**

या कायद्याच्या प्रयोजनासाठी भाषा आणि ग्रंथालयाचा विद्यमान निदेशक हा सार्वजनिक ग्रंथालयांचा निदेशक असेल.

**१२. निदेशाकाची कार्ये :**

राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली निदेशक खालील कार्ये पार पाडेल.

१. राज्य सरकारच्या निरीक्षण, अधिकार आणि नियंत्रणाच्या अंतर्गत निदेशक हा प्रशासनासाठी जबाबदार असेल.

२. नियम आणि उपकलम १ मध्ये निर्धारित करण्यात आलेल्या नियमांच्या व्यापकतेनुसार निदेशक खालील कार्ये करेल.

   १. सार्वजनिक ग्रंथालयासंबंधित सर्व विषयांचे पर्यवेक्षण करणे.

   २. सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापन आणि विकासासाठी उत्तेजन देणे.

   ३. सार्वजनिक ग्रंथालयांच्या योजना, कार्यक्रम विकास आणि पद्धतीच्या स्थापनेसाठी असतील.

   ४. ग्रंथालय सेवा, ग्रंथालय आणि माहितीशास्त्राविषयी अभ्यासक्रमाचे संचालन करणाऱ्या संस्थांना मान्यता देणे. सार्वजनिक ग्रंथालयाचे कर्मचारी आणि इतर व्यक्तींसाठी प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे.

   ५. मान्यता प्राप्त ग्रंथालयाची नोंदणी ठेवणे आणि अशा ग्रंथालयांचे नाव आणि पत्ते प्रकाशित करणे.

   ६. राज्य ग्रंथालय विकास निधीचा उचित हिशोब ठेवणे आणि त्याचा योग्य वापर करणे.

७. सार्वजनिक ग्रंथालयांसाठी उपयोगी प्राचीन आणि दुर्मिळ पुस्तके, भुर्जपत्र आणि इतर दस्तऐवजांचा संग्रह करणे आणि त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था करणे.

८. सार्वजनिक ग्रंथालय आणि संघटना सेवांचे निरीक्षण करुन त्यांना योग्य सल्ला देणे.

९. राज्य सरकारद्वारे परिषदेला करण्यात आलेल्या सर्व शिफारशी कार्यान्वित करणे.

१०. सार्वजनिक ग्रंथालये, सार्वजकि ग्रंथालय संघटना आणि मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांसाठी सहाय्यक अनुदान आणि इतर आर्थिक मदतीसाठी योजना आणि नियमांचे निर्धारण करणे. आणि त्या निमित्त वेळोवेळी नियोजित केलेल्या योजना, नियम आणि मार्गदर्शक सिद्धांन्तानुसार सहाय्य अनुदान आणि अन्य आर्थिक सहाय्याला मंजुरी देणे.

११. कलम २२ अंतर्गत योग्य अहवाल तयार करुन तो सादर करणे.

१२. निदेशक, या कायदा आणि नियमांअंतर्गत येणारे अन्य अधिकार, अन्य कार्य आणि कर्तव्यांचे पालन करेल.

## प्रकरण चौथे

## सार्वजनिक ग्रंथालय पद्धती

### १३. सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना आणि प्रबंध :

१. राज्यसरकार, राज्यासाठी राज्य केंद्रीय ग्रंथालय, जिल्ह्यासाठी जिल्हा ग्रंथालय, तालुक्यासाठी तालुका ग्रंथालय, पंचायत समितीसाठी पंचायत समिती ग्रंथालय आणि अन्य ग्रामीण ग्रंथालयांची आवश्यकता वाटल्यास स्थापना आणि संघटन करेल.

२. उपकलम १ च्या अंतर्गत स्थापन केलेल्या प्रत्येक ग्रंथालयाचा निदेशक हा निर्धारीत सेवा विकसित करेल.

### १४. ग्रंथालय सल्लागार समितीची स्थापना :

१. प्रत्येक ग्रंथालयांसाठी एक ग्रंथालय सल्लागार समितीची स्थापना केली जाईल.

२. राज्य केंद्रीय ग्रंथालय, खंड ग्रंथालय आणि जिल्हा ग्रंथालयासाठी सल्लागार समिती राज्य सरकारद्वारे स्थापन केली जाईल.

३. उपकलम २ मध्ये उल्लेखित ग्रंथालयांपेक्षा वेगळ्या ग्रंथालयांसाठी सल्लागार समितीची स्थापना निदेशकाद्वारे केली जाईल.

४. ग्रंथालय सल्लागार समितीचे उद्दिष्ट आणि कार्ये निर्धारित केली गेलेली असतील.

## प्रकरण पाचवे

## सार्वजनिक ग्रंथालयांसाठी आर्थिक नियोजन

**१५. सार्वजनिक ग्रंथालयाचे अंदाजपत्रक :**

१. निदेशक सार्वजनिक ग्रंथालय संचालनालयाच्या योजना आणि निर्धारीत योजनांसाठी दरवर्षी वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन सरकारला सादर करेल.

२. निदेशक या प्रकारे मंजूर झालेले अनुदान खालील कार्यांच्या पुर्ततेसाठी वापरेल.

   १. या कायदा आणि नियमांचे प्रयोजन कार्यान्वित करण्यासाठी.

   २. राज्यामध्ये नवीन ग्रंथालयाची स्थापना आणि विकास करणे.

   ३. सार्वजनिक ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय संघटनासाठी सहाय्य अनुदान आणि अन्य आर्थिक सहाय्यासाठी प्रयत्न करणे.

   ४. अशा अन्य प्रयोजनासाठी निर्धारीत केलेल्या कार्यांना सहकार्य करणे.

**१६. राज्य ग्रंथालय विकास निधी :**

१. राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांच्या आधुनिकीकरण आणि विकास करण्यासाठी एक निधी असेल त्याचे नाव 'राज्य ग्रंथालय विकास निधी' असे असेल.

२. राज्य ग्रंथालय विकास निधीमध्ये खालील बाबी समाविष्ट असतील.

   १. कलम १५ मधिल उपकलम २ नुसार निर्धारीत निधीपेक्षा भिन्न स्वरुपात प्राप्त राज्य सरकारचे अनुदान.

   २. सार्वजनिक ग्रंथालयांच्या आधुनिकीकरण आणि विकासासाठी केंद्र सरकारद्वारे अंशत: स्वरुपातील विशेष अनुदान.

३. सार्वजनिक ग्रंथालयांच्या आधुनिकीकरण आणि विकासाकरिता जनता किंवा अन्य संस्थेद्वारे देण्यात येणाऱ्या अंशत: स्वरुपात देणगी किंवा देणगीस्वरुपात प्राप्त झालेला धनादेश.

३. राज्य ग्रंथालय विकास निधीमध्ये प्राप्त झालेल्या धनाचा उपयोग निदेशकाद्वारे खालील प्रयोजनासाठी खर्च करण्यात येईल.

१. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे आधुनिकीकरण आणि विकास.

२. कलम १० अंतर्गत परिषदेच्या सदस्यांना देय भत्ता स्वरुपात.

३. अन्य निर्धारीत प्रयोजनासाठी.

**१७. सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रयोजनासाठी अधिक सपंत्तीचे निर्धारण :**

राज्यसरकारद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रयोजनासाठी अर्जित सर्व जंगम व स्थावर मालमत्ता राज्य सरकारच्या मालकीची असेल.

## प्रकरण सहावे

## सार्वजनिक ग्रंथालये आणि सार्वजनिक ग्रंथालय संघटनांना मान्यता

**१८. सार्वजनिक ग्रंथालयांना मान्यता :**

निदेशक, राजस्थान सोसायटी नोंदणी कायदा १९५८ (१९५८ चा कायदा क्र.२८) च्या अंतर्गत राजस्थान लोकन्याय कायदा १९५९ (१९५९ चा कायदा सं.४२) च्या अंतर्गत नोंदणीकृत कोणत्याही स्थानिक संस्थेद्वारे स्थापन केलेल्या ग्रंथालयाला किंवा स्थानिक प्राधिकाराद्वारे स्थापन केलेल्या ग्रंथालयाला जनतेच्या उपयोगासाठी सुरू ठेवून त्याला सहाय्य अनुदान किंवा अन्य वित्तीय सहाय्यतेसाठी नियमानुसार किंवा राज्य सरकारद्वारे नियोजित साधारण: किंवा विशेष आदेशांच्या अंतर्गत सार्वजनिक ग्रंथालयाच्या संबंधित मान्यता देईल.

**१९. सार्वजनिक ग्रंथालय संघटनांना मान्यता :**

निदेशक राज्यातील ग्रंथालयांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने राजस्थान सोसायटी नोंदणी कायदा १९५८ (१९५८ चा कायदा सं.२८) किंवा राजस्थान लोकन्याय कायदा १९५९ (१९५९ चा कायदा सं.४२) च्या अंतर्गत राज्यामधील कोणत्याही सार्वजनिक

ग्रंथालय संघटनांना नियमांनुसार त्यांना सहाय्य अनुदान किंवा अन्य वित्तीय सहाय्याच्या प्रयोजनासाठी मान्यता देऊ शकतात.

## प्रकरण सातवे

## अहवाल आणि निरीक्षण

**२०. अहवाल आणि सुचना :**

अशी प्रत्येक व्यक्ती जी कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालयांचा सभासद असेल आणि अशी व्यक्ती जी सार्वजनिक ग्रंथालय संघटनेचा सभासद असेल, अशी व्यक्ती असा अहवाल, सूचना आणि माहिती देऊ शकते. त्याचा उपयोग वेळोवेळी निदेशकास होईल.

**२१. सार्वजनिक ग्रंथालये आणि सार्वजनिक ग्रंथालय संघटनांचे निरीक्षण :**

निदेशक : त्यांच्याद्वारे पुरस्कृत केलेला अधिकारी आपल्या समाधानासाठी वित्तीय सहाय्य प्राप्त सार्वजनिक ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय संघटना किंवा त्यांना संलग्नित संस्था किंवा ग्रंथालय सेवा तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे शिक्षण अभ्यासक्रम संचालित करणाऱ्या संस्थेद्वारे कायद्यातील नियमांचे पालन केले जाते का? याचे निरीक्षण करण्याचा अधिकार त्यास आहे.

**२२. वार्षिक अहवाल सादर करणे :**

निदेशक, प्रत्येक वर्ष समाप्तीच्या सहा महिन्याच्या आत त्या वर्षातील सार्वजनिक ग्रंथालये आणि सार्वजनिक ग्रंथालय संघटनांच्या कार्याचा आणि कारभाराच्या प्रगतीचा वार्षिक अहवाल तयार करुन तो राज्य सरकारला सादर करेल.

## प्रकरण आठवे

## संकीर्ण

**२३. परिषदेचे सदस्य हे लोक सभासद असतील :**

या कायद्याच्या अंतर्गत बनवलेल्या नियम व उपनियमांना अनुसरून कार्य करत असताना परिषदेचे सर्व सदस्य हे भारतीय दंड संहिता १८६० (१८६० चा केंद्रीय कायदा सं.४५) च्या कलम २१ अंतर्गत लोक सभासद समजले जातील.

**२४. स्वजाणिवपूर्वक बनवलेल्या कार्यवाहीचे संरक्षण :**

या कायद्याच्या अंतर्गत बनवलेल्या नियम व उपनियमांना अनुसरून सद्भावनापूर्वक केल्या जाणाऱ्या कार्यवाहीसाठी परिषद किंवा परिषदेच्या कोणताही सदस्य, अधिकारी किंवा सेवकांने आशयांकित केलेल्या गोष्टीसाठी जबाबदार धरुन त्यावर कार्यवाही केली जाणार नाही.

**२५. कायद्याने निर्धारीत केलेले परिषदेचे कार्य आणि कार्यवाहीचे नियम बनविण्याचा अधिकार :**

परिषद किंवा परिषदेच्या समितीची कार्य व कार्यवाही खालील कारणांमुळे अमान्य होणार नाही.

१. त्यामध्ये कोणत्याही संघटीत त्रुटी.

२. प्रक्रियेला प्रभावित करु न शकणारे गुण आणि प्रक्रियेमधिल अनियमितता.

**२६. नियम बनविण्याचे अधिकार :**

१. राज्य सरकार राजपत्रामध्ये अधिसूचनेद्वारे या नियमांच्या प्रयोजनांना कार्यान्वित करण्यासाठी नियम बनवू शकते.

२. विशिष्टता आणि पूर्वीच्या अधिकारांवर प्रतिकूल प्रभाव टाकल्याशिवाय अशा प्रकारचे नियम खालील विषयांच्या निर्धारणासाठी बनवले जाऊ शकतात.

   १. अध्यक्षाद्वारे कलम ३ च्या उपकलम ३ च्या अंतर्गत निर्धारित केले जाणारे अधिकार, कर्तव्य आणि कार्ये.

   २. राज्य ग्रंथालय विकास निधीच्या कलम ५ च्या खंड २ च्या अंतर्गत अनुमोदित केला जाणारा विषय.

   ३. असे अन्य अधिकार आणि कार्ये ज्यांचे परिषदेद्वारे कलम ५ च्या खंड १६ अंतर्गत प्रयोग आणि पालन केले जाईल.

   ४. परिषद आणि त्यांच्या समितीच्या सदस्यांना देय भत्ते जे कलम १० च्या अंतर्गत देय असतील.

   ५. निदेशकाद्वारे कलम १२ च्या उपकलम २ च्या खंड (ठ) च्या अंतर्गत वापरण्यात येणारे अन्य अधिकार आणि पालन केले जाणारे कार्ये आणि कर्तव्य.

६. कलम १४ च्या अंतर्गत संघटीत किंवा स्थापन केल्या जाणाऱ्या ग्रंथालय सल्लागार समितीची स्थापना आणि त्यांची कार्ये

७. अन्य नियोजनासाठी मंजूर अनुदानाचा उपयोग कलम १५ च्या उपकलम २ च्या खंड (ड) च्या अंतर्गत केला जाऊ शकले.

८. अन्य नियोजनासाठी राज्य ग्रंथालय विकास निधीचा उपयोग कलम १६ च्या उपकलम ३ च्या खंड (ग) अंतर्गत केला जाईल.

९. सार्वजनिक ग्रंथालयांच्या मान्यतेसाठी कलम १८ च्या अंतर्गत तयार केलेले नियम.

१०. सार्वजनिक ग्रंथालय संघटनांच्या मान्यतेसाठी कलम १९ च्या अंतर्गत बनविलेले नियम.

११. वार्षिक अहवालामध्ये कलम २२ च्या अंतर्गत समाविष्ट केली जाणारी माहिती.

१२. असे अन्य विषय जे या कायद्याअंतर्गत निर्धारीत केलेले असतील.

३. या कायद्याअंतर्गत बनविले गेलेले सर्व नियम, लवकरात लवकर राज्य विधान मंडळाच्या समोर सादर करुन चौदा दिवसाचे किंवा दोन क्रमवर्ती सत्रामध्ये समाविष्ट करावेत.

राजस्थान ग्रंथालय कायदाही उशीराच अस्तित्वात आला. या परिसरात पूर्वापार सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेकरिता प्रयत्न केलेले असले तरी सार्वजनिक ग्रंथालय कायद्याच्या अंतरभावामुळे या चळवळीस गती प्राप्त झालेली आहे. या कायद्यांतर्गत परिसरातील दुर्मिळ साहित्याचे जतन, संवर्धनाकडे शासनाचे, संस्थांचे लक्ष वेधले गेले आहे.

## ४.१८ उत्तर प्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६

**प्रस्तावना:**

उत्तर प्रदेश राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतुने हा कायदा संमत करण्यात आला. तसेच राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी लोकांना मोफत व प्रभावी स्वरुपात सेवा प्राप्त होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करुन त्यांचे संवर्धन व विकास करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे.

भारतीय गणराज्याच्या ५७ व्या वर्षी सदर कायद्याची निर्मिती करण्यात आली.

### प्रकरण पहिले

### प्रारंभ

**१. नाव आणि प्रारंभ :**

१. हा कायदा उत्तर प्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६ म्हणून ओळखला जातो.

२. हा कायदा ११ ऑगस्ट २००६ पासून कार्यान्वित करण्यात आला.

**२. या कायद्यानुसार,**

१. पुस्तक म्हणजे,

   अ) प्रत्येक खंड, खंडाचा कोणताही भाग, कोणत्याही भाषेतील बातमीपत्र, कागदपत्र, माहितीपत्र आणि विविध लिपीतील लेखन.

   ब) कागदावर मुद्रित केलेली संगीत लिपी, संगीत, नकाशे, आराखडे किंवा शिलामुद्रित केलेली रेखाटने.

   क) दृकश्राव्य साधने, श्राव्य साधने उदा. टेप, ध्वनीफित, मायक्रोफिल्म, संगणक, छायाचित्रे इ.

२. अध्यक्ष म्हणजे, या कायद्यानुसार राज्य ग्रंथालय परिषदेचा अध्यक्ष.

३. परिषद म्हणजे, या कायद्यातंर्गत तयार करण्यात आलेली राज्य ग्रंथालय परिषद.

४. निदेशक म्हणजे कलम ६ नुसार निर्धारित केलेला सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक.

५. जिल्हा म्हणजे, राज्यातील एक भाग.

६. विशेष अधिकारी म्हणजे ग्रंथालयाच्या कामकाजावर देखरेख करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारद्वारे नियुक्त करण्यात आलेला, ग्रंथालयशास्त्राचे व्यावसायिक शिक्षण घेतलेला अधिकारी, जो उपनिदेशक पदाच्या खालच्या श्रेणीचा नसावा.

७. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे, राज्य सरकारद्वारे सहाय्य प्राप्त करुन स्थापन केलेले आणि सर्व जनतेसाठी खुले असलेले ग्रंथालय किंवा राज्य सरकारच्या नियमाद्वारे मान्यताप्राप्त कोणतेही ग्रंथालय.

८. सहाय्य प्राप्त ग्रंथालय म्हणजे, राज्य सरकारद्वारा सहाय्यप्राप्त ग्रंथालय.

९. वर्ष म्हणजे दिनदर्शिकेमधील एप्रिल महिन्यापासून सुरुवात होऊन पुढील बारा महिन्याचा कालावधी.

## प्रकरण दुसरे

## समिती

**३. राज्य ग्रंथालय परिषदेचे संघटन (स्थापना) आणि कार्ये :**

१. या कायद्याची स्थापना झाल्यानंतर लगेचच राज्य सरकारच्या नियमानुसार या कायद्याच्या प्रयोजनासाठी एका समितीची स्थापना केली. त्या समितीला 'राज्य ग्रंथालय समिती' असे म्हणतात.

**२. राज्य ग्रंथालय समितीची रचना खालीलप्रमाणे असेल,**

१. अध्यक्ष : माध्यमिक शिक्षण विभाग मंत्री, उत्तर प्रदेश

२. उपाध्यक्ष : माध्यमिक शिक्षण विभागाचा प्रमुख सचिव

३. सदस्य : वित्त विभाग, उत्तर प्रदेशाचा प्रमुख सचिव किंवा आपल्या समकक्ष पदाची पुरस्कृत व्यक्ती.

४. सदस्य : सांस्कृतिक विभाग, उत्तर प्रदेशाचा प्रमुख सचिव किंवा आपल्या समकक्ष पदाची पुरस्कृत व्यक्ती.

५. सदस्य : मुख्य सचिव, योजना विभाग उत्तर प्रदेश सरकार किंवा समकक्ष पदाची पुरस्कृत व्यक्ती.

६. सदस्य : विशेष सचिव, माध्यमिक शिक्षण विभाग, उत्तर प्रदेश सरकार किंवा त्यांनी पुरस्कृत केलेली व्यक्ती.

७. सदस्य : निदेशक, माध्यमिक शिक्षण विभाग, उत्तर प्रदेश

८. सदस्य : ग्रंथालय अध्यक्ष, केंद्रीय राज्य ग्रंथालय, माध्यमिक शिक्षण विभाग, उत्तर प्रदेश

९. सदस्य : उत्तर प्रदेश ग्रंथालय संघाद्वारे पुरस्कृत व्यक्ती.

१०. सदस्य : राज्य सरकारने पुरस्कृत केलेला ग्रंथालय अधिकारी.

११. सदस्य : अध्यक्ष, राजाराम मोहनरॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कलकत्ताद्वारे पुरस्कृत व्यक्ती.

१२. सदस्य किंवा सचिव : विशेष कार्यकारी अधिकारी (ग्रंथालय विभाग) माध्यमिक शिक्षण विभाग, उत्तर प्रदेश

३. या कायद्याचे पालन करताना निर्माण होणाऱ्या प्रत्येक समस्येवर परिषदेद्वारे राज्यसरकारला सल्ला देण्यात येईल.निर्धारीत केलेल्या प्रत्येक कार्याचे आणि अधिकारांची अमंलबजावणी या समितीद्वारे करण्यात येईल.

४. वरील ९ ते ११ पर्यंतच्या सदस्यांचा कार्यकाल दोन वर्षाचा असेल.

५. परिषदेचे मुख्यालय लखनऊ येथे असेल.

**४. राज्य स्थायी समितीची स्थापना आणि कार्ये :**

१. एक राज्य स्थायी समिती असेल, तिची रचना खालील प्रमाणे,

१. अध्यक्ष : प्रमुख सचिव, माध्यमिक शिक्षण विभाग, उत्तर प्रदेश

२. सदस्य : प्रमुख सचिव, वित्त विभाग, उत्तर प्रदेश किंवा त्यांनी आपल्या समकक्ष पदाची पुरस्कृत केलेली व्यक्ती.

३. सदस्य : प्रमुख सचिव, योजना विभाग, उत्तर प्रदेश सरकार किंवा त्यांनी आपल्या समकक्ष पदाची पुरस्कृत केलेली व्यक्ती.

४. सदस्य : विशेष सचिव, माध्यमिक शिक्षण विभाग उत्तर प्रदेश सरकार किंवा त्यांनी आपल्या समकक्ष पदाची पुरस्कृत केलेली व्यक्ती.

५. सदस्य : निदेशक, माध्यमिक शिक्षण विभाग, उत्तर प्रदेश

६. सदस्य/ सचिव : विशेष कार्यकारी अधिकारी (ग्रंथालय विभाग) माध्यमिक शिक्षण विभाग, उत्तर प्रदेश सरकार

२. राज्य स्थायी समिती राज्य ग्रंथालय परिषदेमार्फत देण्यात येणारे निर्णय आणि उपाययोजना कार्यान्वित करेल. तसेच राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकाससंबंधित निर्धारीत योजनांचे आयोजन करेल. शिक्षण मंत्रालय भारत सरकार, सांस्कृतिक विभाग, राज्य ग्रंथालय परिषद यांच्याद्वारे सार्वजनिक ग्रंथालय विभागाच्या संदर्भातील कार्यांची अमंलबजावणी करण्यात येईल.

३. कलम २ च्या अंतर्गत येणाऱ्या नियमांना अनुकूल अशी खालील कार्ये राज्य स्थायी समितीद्वारे केली जातील.

१. सार्वजनिक ग्रंथालयांची निती आणि प्रणालीचे नियोजन व संवर्धन करणे.
२. सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकास योजनांच्या संदर्भात अंदाजपत्रक आणि आर्थिक नियोजनाचा आरखडा तयार करणे.
३. सार्वजनिक ग्रंथालय आणि ग्रंथालय प्रणालीच्या विकासासाठी प्रचार करणे आणि मूल्यांकन करणे.
४. स्वयंसेवी सार्वजनिक ग्रंथालय आणि ग्रंथालय संघाना मान्यता देणे.
५. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कामकाजामध्ये समन्वय साधणे आणि त्याचे परिक्षण करणे.
६. ग्रंथालय परिषद आणि स्थायिसमिती संबंधातील बाबी कार्यान्वित करणे.
७. अन्य विविध विभागांमार्फत दिल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवांमध्ये सहयोग आणि संपर्क प्रस्थापित करण्यासाठी उपाय सुचविणे.
८. शिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या ग्रंथालय सेवा कार्यान्वित करणे.
९. राज्यांतर्गत आणि बाह्य व्यावसायिक संस्था आणि संघटनामध्ये संपर्क प्रस्थापित करणे.
१०. राज्य सरकारच्या अन्य विभागांच्या अंतर्गत येणाऱ्या ग्रंथालयासंदर्भात सल्लामसलत करणे.
११. सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीमध्ये ग्रंथपालांसाठी 'ग्रंथालय प्रशिक्षण' कार्यक्रमांचे आयोजन करणे.
१२. तसेच सरकारद्वारे वेळोवेळी निर्धारीत करण्यात येणाऱ्या कार्यांचे अवलंबन करणे.

### ५. जिल्हा ग्रंथालय समितीची स्थापना आणि कार्ये :

१. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा ग्रंथालय समिती असेल. तिची रचना खालील प्रमाणे,

१. अध्यक्ष : जिल्हा न्यायदंडाधिकारी

२. उपाध्यक्ष : मुख्य विकास अधिकारी

३. सदस्य : प्राचार्य, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था

४. सदस्य : सचिव, जिल्हा साक्षरता समिती

५. सदस्य : सचिव, युवा कल्याण अधिकारी

६. सदस्य : निवृत्ती वेतन धारक संघाद्वारे पुरस्कृत व्यक्ती

७. सदस्य : जिल्हा विद्यालय, निरीक्षक

८. सदस्य : जिल्हा माहिती अधिकारी किंवा सहाय्यक माहिती निरीक्षक

९. सदस्य : अध्यक्ष, जिल्हा पंचायत समिती किंवा त्यांनी पुरस्कृत केलेली व्यक्ती

१०. सदस्य : अध्यक्ष, नगर पंचायत किंवा त्यांनी पुरस्कृत केलेली व्यक्ती

११. सदस्य : जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्याद्वारे पुरस्कृत जिल्ह्यातील कोणत्याही महाविद्यालयाचा ग्रंथपाल

१२. सदस्य : जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्याद्वारे पुरस्कृत महाविद्यालयाचे प्राचार्य

१३. सदस्य : महिला विकास मंडळाचा एक प्रतिनिधी

१४. सदस्य : जिल्हा ग्रंथालय संघाचा एक प्रतिनिधी

१५. सदस्य : समन्वयक,नेहरु युवा केंद्र

१६. सदस्य/सचिव : ग्रंथालय अध्यक्ष, जिल्हा शासकीय ग्रंथालय

२. जिल्ह्यातील जिल्हा शासकीय ग्रंथालयात ज्यावेळी ग्रंथालय अध्यक्ष उपलब्ध नसेल तेव्हा वरील समिती रचनेतील १२ व्या क्रमांकाचा सदस्य हा ग्रंथालयाचा सचिव असेल.

३. जिल्हा ग्रंथालय समिती जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीच्या विकासासाठी योजना तयार करुन ग्रंथालय प्रगतीचा आढावा घेईल. तसेच निर्धारीत असलेली विविध कार्ये या समितीद्वारे पार पाडली जातील.

## प्रकरण तिसरे

## सार्वजनिक ग्रंथालयाचे निदेशक

### ६. सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक :

माध्यमिक शिक्षण विभागाचा निदेशक हा उत्तर प्रदेश राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचा निदेशक असेल. आणि या कायद्यातील नियमांचे पालन करण्याची जबाबदारी त्याची असेल.

### ७. निदेशकाची कार्ये :

राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली निदेशक खालील कार्ये पार पाडेल.

१. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली आणि सेवांचा विकास करण्यासाठी निदेशक राज्य सरकार समोर वार्षिक अंदाजपत्रक, वार्षिक व पंचवार्षिक योजना तयार करुन सादर करेल.

२. सर्व सार्वजनिक ग्रंथालय, सरकारी अनुदानप्राप्त ग्रंथालये यांच्या कार्याचे विश्लेषणात्मक आणि सांख्यिकीय अहवाल तयार करणे.

३. ग्रंथालय आणि विविध सार्वजनिक ग्रंथालयांच्या माहिती सेवांची मानके निश्चित करुन राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांसाठी लागू करणे.

४. सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणांचे आयोजन करणे आणि त्यांना सहाय्य करणे.

५. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या नियोजनांचे निरीक्षण करणे.

६. सर्व सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यांचे निरीक्षण करणे आणि त्यामध्ये समन्वय साधणे.

७. जिल्हा स्तरावरील ग्रंथालय समितीच्या नियोजित कार्यांचे संचालन करणे.

८. सार्वजनिक ग्रंथालयांच्या सेवांच्या विकासासाठी वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे आणि सरकार समोर सादर करणे.

९. अशाप्रकारच्या विविध उद्दिष्टांचे नियोजन करणे आणि कर्तव्यांचे पालन करुन राज्य सरकारला वेळावेळी माहिती प्रदान करणे.

## प्रकरण चौथे

## सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीची रचना आणि विविध राज्य केंद्रे आणि ग्रंथालयांची कार्ये

### ८. राज्यस्तरीय ग्रंथालय :

राज्यात दोन राज्यस्तरीय ग्रंथालये असतील. त्यापैकी एक राज्य केंद्रीय ग्रंथालय इलाहाबादमध्ये असेल आणि दुसरे राज्य संदर्भ ग्रंथालय, लखनऊ येथे असेल.

### ९. राज्य केंद्रीय ग्रंथालयाची कार्ये :

राज्य केंद्रीय ग्रंथालयाची कार्ये खालीलप्रमाणे,

१. सामान्य लोकांसाठी उपयोगी वाचनसाहित्याच्या उपलब्धतेची व्यवस्था करणे.

२. सामान्य लोकांसाठी स्ववाचनाची व्यवस्था करणे.

३. राज्यातील इतर सर्वाजनिक ग्रंथालयांसाठी पूरक किंवा अनुरुप कार्ये करणे.

४. व्यापक स्तरावर जनतेमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक प्रदर्शन,व्याख्याने, परिषद आणि परिसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करणे.

५. राज्य आणि केंद्रीय सरकारच्या विविध विकास योजना आणि कल्याणकारी कार्यक्रमांच्या संबंधात माहिती प्रसरणाचे कार्य करणे.

६. आवश्यक असल्यास सामान्य जनतेसाठी पुस्तक उदार देण्याची सेवा प्रदान करणे.

७. अपंग व्यक्तींसाठी वाचनसेवा आणि विशेष सेवा प्रदान करणे.

८. राज्यातील विविध प्रौढ शिक्षण कार्यक्रम प्रणालीसाठी सहाय्य करणे आणि नव साक्षरांसाठी उपयोगी साहित्याची उपलब्धता करणे.

९. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या संगणकीकरणासाठी प्रोत्साहन देणे आणि सार्वजनिक ग्रंथालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना संगणकीकरणाच्या प्रशिक्षणासाठी कार्यक्रम आयोजन करणे.

१०. अशा विविध प्रकारची कार्ये करणे जी राज्य ग्रंथालय परिषद आणि निदेशक राज्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकास आणि सेवांसाठी निर्धारीत केलेली असतील.

**१०. राज्य संदर्भ ग्रंथालयाची कार्ये :**

राज्य संदर्भ ग्रंथालयांची निर्धारीत कार्ये पुढीलप्रमाणे,

१. राज्यातील सर्व प्रकाशित उपयोगी साहित्य उपलब्ध करणे.

२. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची संगणकीकृत संयुक्त सूची उपलब्ध करणे.

३. विद्यार्थी आणि संशोधकांसाठी विशेष स्वरुपात 'मानवकल्याण' आणि 'सामाजिक शास्त्र' क्षेत्रातील विविध विषयांमधील व्यापक संदर्भसाहित्याचे आणि माहितीचे संकलन करुन त्याची सूची प्रकाशित करणे.

४. संदर्भ आणि संशोधनासाठी सामान्य जनतेला वाचनसाहित्य उपलब्ध करुन देणे.

५. राज्यातील विविध स्थळावरील उपलब्ध हस्तलिखिते आणि विविध लिपीतील लिखित साहित्याचा शोध घेणे आणि अशा दुर्मिळ लिपींची संख्या संकलित करुन त्याची सूची प्रकाशित करणे.

६. रासायनिक द्रव्ये आणि मायक्रोफ्लिमच्या सहाय्याने अशा दुर्मिळ लिखित साहित्याचे जतन करणे.

७. सामान्यांच्या हितासंबंर्भातील प्रकाशित झालेल्या लेखांचे आणि बातमीपत्रांच्या कात्रणांचा संग्रह करणे.

८. स्थानिक स्थळांचे महत्व सांगणाऱ्या दस्तऐवजांची ओळख करुन ते साहित्य म्हणून घोषित करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाच्या पुरातत्व विभागाला परिक्षण आणि मूल्यांकन करण्यास सांगणे.

९. अन्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या वाचकांना सुविधा देण्यासाठी ग्रंथालय संचालनालयाच्या विविध विभागात आंतरग्रंथालयीन सेवा देण्यासाठी प्रोत्साहन देणे.

१०. वाचकांना विविध लाभ प्राप्त करुन देण्यासाठी विद्यमान संगणकीकृत ग्रंथालय जाळे किंवा डी.इ.एल.एन.इ.टी. मध्ये सहभाग घेणे.

११. राज्य ग्रंथालय परिषद किंवा निदेशकाद्वारे राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली आणि सेवाच्या विकासासाठी सोपविण्यात येणाऱ्या कार्याचे अवलंबन करणे.

**११. जिल्हा ग्रंथालय :**

प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक राज्य जिल्हा ग्रंथालय असेल. हे ग्रंथालय जिल्ह्यासाठी प्रधान आणि संदर्भ ग्रंथालयाच्या स्वरुपात कार्य करेल. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील इतर ग्रंथालयांसाठी जिल्ह्यात केंद्रीय ग्रंथालय म्हणून कार्य करेल. जिल्हा ग्रंथालयाची कार्ये पुढील प्रमाणे,

१. जनतेसाठी उपयोगी वाचनसाहित्य, अन्य वाचन सामुग्रीची उपलब्धता करणे आणि त्यांचा संग्रह करणे.

२. क्षेत्रीय आणि स्थानिक हितासंबंधीच्या साहित्याचा संग्रह करणे.

३. संदर्भसेवा, महितीसेवा आणि देवघेव सेवा उपलब्ध करुन देणे. वाचनअभिरुची वाढण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी सहाय्य करणे.

४. शहर, तहसीलदार, तालुका आणि ग्रामीण ग्रंथालय आणि अन्य संस्थाद्वारे संचलित ग्रंथालयांचा ग्रंथसंग्रह विकासासाठी प्रयत्न करणे.

५. जिल्ह्यामध्ये आंतरग्रंथालयीन सेवेसाठी प्रोत्साहन देणे आणि त्याचे निरीक्षण करणे.

६. फिरत्या ग्रंथालय सेवेची व्यवस्था करणे आणि जिथे आवश्यक आहे तेथे पुस्तक दान केंद्राची स्थापना करणे.

७. जिल्ह्यातील शासकीय शाखा, तहसीलदार, तालुका आणि ग्रामीण ग्रंथालय आणि फिरते ग्रंथालय सेवा यांच्यामध्ये समन्वय साधणे आणि त्याचे निरीक्षण करणे.

८. जिल्ह्यातील इतर शासकीय ग्रंथालये आणि इतर सहाय्यप्राप्त ग्रंथालयांचे निरीक्षण करणे.

९. जिल्हा ग्रंथालय प्रणालीद्वारे विकास योजनांची तयारी करण्याच्या कामात जिल्हा ग्रंथालय समितीला मदत करणे.

१०. जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे सोपवली गेलेली विविध कार्ये जिल्हा ग्रंथालयामार्फत पूर्ण करणे.

## प्रकरण पाचवे

## वित्त

**१२. वित्त :**

ग्रंथालय विकास योजना ही राज्याच्या केंद्रीय आणि अकेंद्रीय वार्षिक आणि पंचवार्षिक योजनेचा आणि आयोजनांच्या अंदाजपत्रकाचा एक समग्र भाग असते. राज्य सरकारला आवश्यक वाटल्यास सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीच्या सहाय्य आणि विकासासाठी अतिरिक्त अनुदानात वाढ करुन आर्थिक मदत केली जाते.

## प्रकरण सहावे

## मान्यता

**१३. सार्वजनिक ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय सघांना मान्यता :**

१. राज्य सरकार सोसायटी नोंदणी कायदा १८६० च्या अंतर्गत नोंदणीकृत स्वायत्त संस्थेद्वारे स्थापन केलेले ग्रंथालय किंवा जनतेच्या उपयोगासाठी सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्वरुपात स्थानिक प्राधिकाऱ्यामार्फत सुरू केलेल्या ग्रंथालयास सहाय्य अनुदान किंवा अन्य आर्थिक सहाय्य देण्याच्या हेतूस किंवा उद्देशास मान्यता देणे.

२. राज्य सरकारच्या नियमानुसार सहाय्य अनुदान किंवा आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने राज्य सरकार सोसायटी नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणीकृत राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सघांना मान्यता देणे.

## प्रकरण सातवे

## अहवाल आणि निरीक्षण

**१४. अहवाल आणि निरीक्षण :**

१. राज्य सरकारला वेळोवेळी उपयोगी असणारी माहिती अहवालाद्वारे अशा व्यक्तीने उपलब्ध करुन द्यावी जी, सार्वजनिक ग्रंथालयाची सभासद आणि सार्वजनिक ग्रंथालय सघांची सभासद असेल.

२. निदेशक किंवा निदेशकाद्वारे पुरस्कृत असलेल्या व्यक्तीला स्वत:च्या समाधानासाठी या कायद्याच्या अंतर्गत असलेल्या नियमांना अनुसरून सार्वजनिक ग्रंथालय आणि

ग्रंथालय संघ किंवा त्यासंबंधित संस्था तसेच त्यांना आर्थिक सहाय्य प्राप्त असणाऱ्या ग्रंथालय सेवा आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे निरीक्षण करण्याचा अधिकार आहे.

३. सार्वजनिक ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय सघांच्या कार्यप्रणालीद्वारे करण्यात आलेल्या वार्षिक प्रगतीचा अहवाल चालू वर्षाच्या, माहितीपत्रकासमवेत वर्ष समाप्तीच्या सहा महिन्याच्या आत राज्य सरकारला सादर करावा.

**प्रकरण आठवे**

**संकीर्ण**

**१५. परिषदेचे सदस्य हेच लोकसेवक :**

या कायद्याच्या अंतर्गत बनवलेल्या नियम व उपनियमांना अनुसरून कार्य करत असताना परिषदेचे सर्व सदस्य हे भारतीय दंड संहितेच्या कलम १२ च्या अंतर्गत लोक सेवक समजले जातील.

**१६. स्वजाणिवपूर्वक बनवलेल्या कार्यवाहीचे संरक्षण :**

या कायद्याच्या अंतर्गत बनवलेल्या नियम व उपनियमांना अनुसरून सद्भावनापूर्वक केल्या जाणाऱ्या कार्यवाहीसाठी परिषद किंवा परिषदेच्या कोणताही सदस्य किंवा सेवकाविरुद्ध कोणताही वाद, प्रतिवाद, दावा किंवा कारवाई होणार नाही.

**१७. कायद्याने निर्धारीत केलेले परिषदेचे कार्य आणि कार्यवाहीचे नियम बनविण्याचा अधिकार :**

परिषद किंवा परिषदेच्या समितीची कार्ये व कार्यवाही खालील कारणांमुळे अमान्य होणार नाही.

१. त्यामध्ये कोणतीही संघटीत त्रुटी.

२. प्रक्रियेमधील अनियमितता.

**१८.** १. राज्य सरकार या कायद्याच्या अमंलबजावणी कार्यान्वित करण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करु शकते.

२. विशेष स्वरुपात आणि पूर्वीच्या अधिकाराच्या व्यापकतेवर प्रतिकूल प्रभाव टाकल्याशिवाय सर्व किंवा कोणत्याही बाबींचे नियोजन करण्यासाठी पुढील नियम तयार करु शकते.

१. सार्वजनिक ग्रंथालय संघ किंवा ग्रंथालय अधिकाऱ्याद्वारे प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबत.

२. अध्यक्षाद्वारे देण्यात येणारे अधिकार, कर्तव्य आणि कार्ये.

३. असे इतर अधिकार आणि कार्ये ज्यांचा अवलंब आणि निर्धारण परिषदेद्वारे केले जाईल.

४. परिषद आणि समितीच्या सदस्यांना देण्यात येणारे भत्ते आणि त्यांना देण्यात येणारी भरपाई.

५. निदेशक किंवा ग्रंथालय मंडळाद्वारे निर्धारीत आणि अवलंबिले जाणारे अधिकार, कार्ये आणि कर्तव्य.

६. जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे निर्धारीत केली जाणारी कार्ये.

७. सार्वजनिक ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय सघांना मान्यता.

८. वार्षिक अंदाजपत्रकात समाविष्ट असलेली माहिती.

९. अशी कोणतीही बाब जी निर्धारीत असेल किंवा निर्धारीत केली जाणारी असेल.

**१९. नियम बनविण्याचे अधिकार :**

१. परिषद या कायद्याच्या अंतर्गत आपली कार्ये कार्यान्वित करण्यासाठी कायदा आणि त्याद्वारे बनविलेल्या नियमावलीच्या घटकांनुसार नियम बनवू शकते.

२. विशेष स्वरुपात किंवा पूर्वीच्या अधिकारांवर प्रतिकूल प्रभाव टाकल्याशिवाय सर्व किंवा अन्य कोणत्याही बाबींमध्ये नियमांचे घटक करु शकते. जसे,

१. वेळ, दिनांक आणि स्थान जेथे परिषद सभा घेईल किंवा सभेमध्ये आपले कार्य करण्यासंबंधातील नियम ज्यांचे पालन परिषद करेल.

२. अन्य समिती ज्यांचे संघटन परिषदेद्वारे केले जाते त्या समितीतील सदस्य संख्या, त्यांची कार्ये या परिषदेद्वारे निर्धारीत केली जातील.

**२०. निरसन आणि अपवाद :**

१. उत्तरप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय अद्यादेश २००६ नुसार निश्चित करण्यात येईल.

२. असे निश्चित असून सुद्धा कलम १ मध्ये निर्धारीत आदेशानुसार केले जाणारे कोणतेही कार्य किंवा कार्यवाही या कायद्याच्या अंतर्गत निर्धारीत कार्य व कार्यवाही समजली जाईल.

**उद्देश आणि कारण**

राज्य सरकार राज्यातील ग्रंथालय सेवांच्या विनिमय सुदृढीकरण आणि विस्तार करण्यासाठी दहा वर्षांपासून विचार करण्यात येत होता. या कार्यवाहीसाठी भारत सरकार आणि अन्य स्त्रोतांशी चर्चा केली जात असे, पण अतिरीक्त आर्थिक भार असल्यामुळे कायदा बनवला जाऊ शकला नाही. याचदरम्यान इतर राज्यात ग्रंथालय कायदा लागू करण्यात आला होता आणि विविध क्षेत्रामधून ग्रंथालय कायदा लागु करण्याची मागणी केली जात होती. अंतिमत: विचारानुसार राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, व्यवस्थापन, देखरेख आणि विकासाची व्यवस्था करण्यासाठी ग्रंथालय कायद्याची स्थापना करण्याचे निश्चित केले.

राज्य विधान मंडळात हे सत्र नसल्याने आणि कायदा करण्याचे निश्चित केल्यामुळे त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक होते. अंतिमत: राज्यपालाद्वारे ३१ जुलै २००६ मध्ये 'उत्तरप्रदेश राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६' निर्धारित करण्यात आला.

हे विधेयक उपयुक्त कायदा प्रस्थापित करण्यसाठी प्रसिद्ध केले जात आहे.

प्रस्तुत राज्याचा ग्रंथालय कायदा हा एका विविक्षीत पद्धतीनुसार मंजूर करण्यात आलेला आहे. परिषदेच्या सेवकांना या कायद्याअंतर्गत लोकसेवक संबोधण्यात आले आहे. ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. येथील ग्रंथसंग्रह आणि जतन या विषयक कायद्याअंतर्गत प्राधान्यक्रमाने विचार करण्यात आलेला आहे. स्थानिक साहित्य संग्रहास दिलेले महत्त्व हे ही उल्लेखनीय आहे. प्रत्यक्ष कायदा या राज्यात उशीरा मंजूर झाल्याने दुर्मिळ साहित्याचे जतन व संरक्षण या विषयक अंमजबजावणीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. बदलत्या वाचन साहित्य संग्रहाबरोबरच युवावर्गास वाचन अभिरुची विकसित करण्यासाठी विचारात घेतलेले धोरण लक्षवेधी आहे.

## ४.१९ बिहार राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००८

**प्रस्तावना :**

बिहार राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतुने हा कायदा संमत करण्यात आला. तसेच राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी लोकांना मोफत व प्रभावी स्वरुपात सेवा प्राप्त होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करुन त्यांचे संवर्धन व विकास करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे.

भारतीय गणराज्याच्या ६०व्या वर्षी सदर कायद्याची निर्मिती करण्यात आली.

### प्रकरण पहिले

### प्रारंभ

**१. नाव, विस्तार आणि प्रारंभ :**

१. हा कायदा दि. १८ एप्रिल २००८ मध्ये बिहार राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००६ म्हणून  समंत झाला

२. या कायद्याचा विस्तार किंवा प्रसार पूर्ण बिहार राज्यात होईल.

३. या कायद्याची अंमलबजावणी त्वरीत करण्यात आली.

**२. व्याख्या :**

या कायद्यामध्ये निर्धारीत करण्यात आलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे,

१. राज्य ग्रंथालय म्हणजे राज्यसरकारच्या अधिसुचनेद्वारे राज्य ग्रंथालयांच्या रुपात पुरस्कृत ग्रंथालय.

२. राज्यसरकारद्वारे अनुदान प्राप्त ग्रंथालय म्हणजे राज्य ग्रंथालय होय.

३. आर्थिक सहाय्यता प्राप्त ग्रंथालय म्हणजे राज्य सरकार किंवा ग्रंथालय कायद्याद्वारे पूर्णत: किंवा अंशत: अनुदानित ग्रंथालय.

४. विनाअनुदानित ग्रंथालय म्हणजे ज्या ग्रंथालयांना शासनाकडून किंवा ग्रंथालय कायद्याद्वारे कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही, असे ग्रंथालय.

५. विशेष ग्रंथालय म्हणजे, राज्य सरकारने पुरस्कृत केलेले विशेष ग्रंथालय.

६. विभागीय ग्रंथालय म्हणजे राज्यात असलेले विभागीय स्तरावरील ग्रंथालय.

७. जिल्हा ग्रंथालय म्हणजे जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी असलेले ग्रंथालय.

८. तालुकास्तरीय ग्रंथालय म्हणजे तालुक्याच्या ठिकाणी असलेले ग्रंथालय.

९. तालुका विभागीय ग्रंथालय म्हणजे तालुक्याच्या विभागीय स्तरावरील ग्रंथालय.

१०. पंचायत ग्रंथालय म्हणजे पंचायत स्तरावरील ग्रंथालय

११. ग्रामीण ग्रंथालय म्हणजे ग्रामीण भागात असलेले ग्रंथालय.

१२. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे, राज्य शासनाच्या ग्रंथालय कायद्याने मान्यताप्राप्त ग्रंथालय आणि या कायद्याद्वारे जाहीर केलेले कोणतेही ग्रंथालय.

१३. खाजगी ग्रंथालय म्हणजे शासकीय अनुदान प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयापेक्षा वेगळे ग्रंथालय.

१४. संचालक म्हणजे नियम ६ च्या अधिन नियुक्त केलेले संचालक.

१५. जिल्हा म्हणजे राज्यातील एक जिल्हा.

१६. ग्रंथालय कायदा म्हणजे राज्य शासनाद्वारे या कायद्याच्याअंतर्गत राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्राचा कायदा.

१७. सरकार म्हणजे बिहार राज्याचे सरकार.

१८. अधिसूचना म्हणजे बिहार राज्याच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसुचना.

१९. लागू झालेला कायदा म्हणजे या कायद्यानुसार बनविलेला कायदा.

**३. ग्रंथालयाचे प्रकार :**

राज्यात खालील प्रकारची ग्रंथालये असतील.

१. राज्य ग्रंथालय

२. विभागीय ग्रंथालय

३. जिल्हा ग्रंथालय

४. जिल्हा विभागीय ग्रंथालय

५. विशेष ग्रंथालय

६. तालुका ग्रंथालय

७. पंचायत ग्रंथालय

८. ग्रामीण ग्रंथालय

९. खाजगी ग्रंथालय

## प्रकरण दुसरे

## राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्राचा अधिकार

### ४. राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्र प्राधिकारचे संघटन :

राज्य सरकारने बिहार राज्यातील सर्व विभागीय ग्रंथालये आणि ग्रंथालयीन सेवांविषयी सरकारला मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने बिहार राज्याच्या राजपत्रात हा कायदा प्रकाशित केला. या कायद्यानुसार राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्राचे संघटन व पुनर्संघटन होईल. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या सोबत १२ सदस्य असतील.

### ५. राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्राच्या प्राधिकार अध्यक्ष आणि उपाध्यक्षाची नियुक्ती

राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्राच्या प्राधिकारच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षाची नियुक्ती राज्यसरकारद्वारे करण्यात येईल. नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती ही राज्यातील प्रमुख शिक्षणक्षेत्रातील, ग्रंथालय शास्त्रातील तज्ञ, तसेच भाषा, शास्त्र, कला आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेली तसेच व्यावहारीक ज्ञान व अनुभव प्राप्त व्यक्ती असेल.

राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्र प्राधिकरण समिती 'मानव संसाधन विकास' या विभागाद्वारे तयार केली जाईल. या समिती मध्ये अध्यक्ष आणि उपाध्यक्ष याचबरोबर 'मानव संसाधन विभाग' कला, संस्कृती आणि युवा विभाग आणि वित्त विभाग यातील प्रत्येकी एक – एक व्यक्ती प्रतिनिधी किंवा सदस्य तसेच उपसचिव असेल. उर्वरीत सदस्यांची नियुक्ती राज्य सरकारद्वारे करण्यात येईल. निदेशक हा ग्रंथालय आणि माहिती केंद्र प्राधिकारणाचा सचिव असेल.

### ६. बिहार राज्य ग्रंथालय आणि माहितीकेंद्र प्राधिकरणाचे अधिकार आणि कार्ये :

१. राज्य ग्रंथालयाद्वारे निधीचे नियंत्रण करुन ग्रंथालयांना मदत उपलब्ध करुन देणे. तसेच नियम आणि अटींचे निर्धारण करणे.

२. बिहार राज्यात विविध स्तरावर ग्रंथालयाची स्थापना करणे आणि सद्यस्थितीतील ग्रंथालयांचे संचालन करुन त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे आणि त्यासाठी आवश्यक नियम आणि मानकांची निर्मिती करणे.

३. या कायद्याचा उद्देश साध्य करण्यासाठी नियम व नियमावली तयार करणे.

४. ग्रंथालयाच्या विकासासाठी अल्पकालीन आणि दिर्घकालीन योजनांचे आयोजन करुन त्या संबंधिचा अहवाल सरकार समोर सादर करणे.

५. राज्यामध्ये ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाचा प्रसार करणे आणि त्यासाठी विशेष नियम व मानके तयार करणे.

## प्रकरण तिसरे

## ग्रंथालय आणि माहितीकेंद्र संचनालय

**७. संचनालय :**

१. या कायद्याचा उद्देश साध्य करण्यासाठी राज्य सरकारने ग्रंथालय आणि माहितीकेंद्र संचनालयाची निर्मिती करण्यात येईल आणि त्याद्वारे एक संचालक आणि एक सहाय्य संचालक नियुक्त केला जाईल. संचनालयाची कार्ये आणि इतर ग्रंथालय अधिक्षक (ग्रंथपाल) च्या कार्याच्या निर्देशनाचे दायित्व संचनालयाच्या अधिक्षकाचे असेल.

बिहार राज्याच्या राज्य ग्रंथालयाच्या अधिक्षकाचे पद हे संचानालयाच्या मुख्य अधिकारी पदाशी समकक्ष असेल. तसेच सहाय्यक अधिकाऱ्याचे पद हे बिहार शिक्षण सेवा विभागातील अधिकारी पदाशी समकक्ष असेल. सद्यस्थितीमध्ये ग्रंथालय अधिक्षक, बिहार सेवा वर्ग –३ आणि वर्ग –४ च्या कर्मचारी वर्गाशी समकक्ष असेल.

२. ग्रंथालय आणि माहितीकेंद्र संचनालय, बिहार राज्य ग्रंथालय आणि माहितीकेंद्र प्राधिकाराच्या नियमानुसार खालील कार्याचे आयोजन करण्यात आले आहे.

   १. राज्यातील विविध विभागातील ग्रंथालय निधीचा योग्य उपयोग करण्यासाठी निधी नियंत्रण करावे. आणि त्यासाठी वित्त विभाग आणि महालेखा परिक्षक कार्यालयाद्वारे अंकेक्षण, व्यवस्था करुन त्याचा अहवाल मानव संसाधन विकास विभागास सादर करणे.

   २. या कायद्यानुसार राज्य ग्रंथालयातून प्राप्त होणाऱ्या निधीच्या आधारे राज्यातील विविध स्तरावरील ग्रंथालयांना आवश्यक असलेले अनुदान देण्यासाठी मार्गदर्शन करणे.

   ३. राज्यातील ग्रंथालये आणि ग्रंथपालांची संघटना तयार करणे.

४. राज्यातील विविध स्तरावरील ग्रंथालयीन कार्यांविषयी विश्लेषणात्मक आणि समीक्षात्मक विवेचन करुन ते राज्य ग्रंथालय प्राधिकरणाच्या माध्यमाद्वारे सरकारला सादर करणे.

५. केंद्रीय प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट १८६७ संबंधित कार्यांचे निरीक्षण व निर्देशन करणे तसेच स्टेट कॉपीराईट ग्रंथालयाचे संघटन करुन त्या अंतर्गत प्राप्त होणाऱ्या पुस्तकांची सूची तयार करुन त्यांच्या प्रकाशनाची व्यवस्था करणे.

## प्रकरण चौथे

## राज्य ग्रंथालय निधी

### ८. राज्य ग्रंथालय निधी :

राज्य सरकारद्वारे राज्य ग्रंथालय निधी नावाने स्वतंत्र विभाग तयार करुन त्यामध्ये विविध स्वरुपात प्राप्त होणारा निधी जमा करण्यात येईल. त्या निधीचे स्वरुप खालील प्रमाणे,

१. राज्य सरकारकडून अनुदान स्वरुपात प्राप्त झालेली रक्कम

२. राज्यातील विविध स्तरावरील ग्रंथालयांच्या विकासासाठी भारत सरकार किंवा राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान कडून अंशतः स्वरुपात प्राप्त झालेली देणगी.

३. जिल्हा विकास विभागाकडून अनुदान स्वरुपात प्राप्त झालेली रक्कम.

४. या कायद्याच्या अंतर्गत बनविलेल्या नियमांनुसार राज्य ग्रंथालय आणि माहितीकेंद्र प्राधिकरणाद्वारे प्राप्त निधी किंवा रक्कम.

५. राज्य ग्रंथालय आणि माहितीकेंद्र प्राधिकरणाकडे अनामत असलेल्या रक्कमेवरील व्याज किंवा त्याद्वारे प्राप्त होणारे फायदे.

६. खाजगी कंपनी, संस्था किंवा व्यक्तिगत स्वरुपात देण्यात येणारे अनुदान किंवा देणगी.

### ९. ग्रंथालय निधीचा उपयोग :

या कायद्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी राज्य ग्रंथालय आणि माहिती केंद्र प्राधिकरणाद्वारे राज्य ग्रंथालय निधीचा उपयोग खालील कार्यांसाठी करण्यात येतो.

१. राज्यातील ग्रंथालयाच्या संरक्षण आणि विकासासाठी सहाय्य.

२. उप समितीच्या सदस्यांसाठीचे मानधन किंवा इतर भत्ते

३. राज्य ग्रंथालय व माहिती केंद्र संचालनालयाच्या नियमानुसार आवश्यक असलेल्या बाबींसाठी सहाय्य.

**१०. लेखा परिक्षण :**

१. राज्य ग्रंथालय निधी चे लेखा परिक्षण करुन त्याचा अहवाल तयार केला जाईल.

२. या अहवालाचे दरवर्षी लेखा परिक्षक किंवा महालेखागार च्या पदाधिकाऱ्याकडून तपासणी केली जाईल आणि तपासणी झालेली अहवालाची प्रत सरकारकडे सादर केली जाईल.

## प्रकरण पाचवे

## विस्तृत

**११. कायद्याची मान्यता :**

प्राधिकरणाचे कोणतेही कलम, उपकलम प्रारंभी किंवा शेवटी प्राधिकराच्या संघटनामध्ये कोणत्याही त्रुटीच्या कारणाने बेकायदेशीर समजले जाणार नाही.

**१२. प्रतिवेदन आणि स्पष्टीकरण :**

विविध स्तरावरील प्रत्येक ग्रंथालय आणि माहिती केंद्र संचनालय किंवा त्याच्याद्वारे अधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्ती प्रतिवेदन आणि स्पष्टीकरण सादर करेल तसेच वेळोवेळी अधिकृत व्यक्ती सूचना देतील.

**१३. विविध स्तरावरील ग्रंथालयाचे निरीक्षण :**

निदेशक किंवा त्याच्याद्वारे अधिकृत केलेली व्यक्ती कोणत्या भिन्न स्तरावरील ग्रंथालय किंवा त्या संबंधित कोणत्याही संस्थेचे आपल्या शंकांचे निरसण करण्यासाठी निरीक्षण करु शकेल. या अधिनियमांचे नियम आणि पोट नियमांचे पालन पूर्णत: पालन केले गेले आहेत का याची पडताळणी करणे.

**१४. नियमावली बनवण्याचा उद्देश :**

१. राज्य सरकारचे अधिनियम कार्यान्वित करण्यासाठी नियमावली बनविणे.

२. विशेषत: पूर्वीच्या उद्देशांच्या व्यापकतेवर प्रतिकूल परिणाम न होता अशा नियमांचे सर्व किंवा काही प्रमाणात लागू करण्यात येतील. हे नियम मान्य केलेले अथवा मंजूर होण्यासाठी अपेक्षित आहेत, अशा स्वरुपाचे असतील.

३. या कलमांच्या अधिन बनवलेले सर्व नियम लवकरात लवकर विधीमंडळाच्या सभागृहात समोर चौदा दिवस ठेवले जातील. तसेच त्यामध्ये काही फेरबदल केले जातील ते राज्यविधीमंडळाच्या कालावधीत निश्चित होतील.

## प्रकरण सहा

### १५. मुद्रण आणि पुस्तकांची छपाई :

मुद्रण आणि छपाई संबंधित कायदा १८६७ नुसार बिहार राज्यात खालील प्रकारे लागू करण्यात येईल.

बिहार राज्यात चालू आर्थिक वर्षात सर्व प्रकाशित पुस्तकांची एक – एक प्रत प्रकाशक किंवा लेखकाद्वारे पुढील ग्रंथालयांना मोफत पाठवण्यात यावी.

'श्रीमती राधिका सिन्हा इन्स्टीट्यूट आणि सच्चिदानंद सिन्हा लायब्ररी, पटना' या ग्रंथालयांना या कायद्यानुसार पाठवण्यात यावी. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या पुस्तकांची वेगळी नोंद ठेवण्यात येईल. तसेच या पुस्तकांचा उपयोग फक्त संशोधन किंवा संदर्भ शोधण्यासाठी केला जाईल. ग्रंथालयाच्या बाहेर सदरची पुस्तके दिली जाणार नाहीत.

### १६. दंड :

या कायद्यानुसार लेखक किंवा प्रकाशकाने पुस्तक जमा केले नाही तर त्यास दंड केला जाईल. आणि या दंडाचे स्वरुप प्राधिकरण निश्चित करेल.

बिहार राज्यासाठी करण्यात आलेला ग्रंथालय कायदा ही इतर राज्यातील कायद्याच्या पार्श्वभूमीवरच तयार करण्यात आलेला असून, वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपाच्या तरतुदी प्रस्तुत कायद्याअंतर्गत निदर्शनास येत नाही. एकेकाळी ग्रंथालयांची प्राचीन परंपरा जपणारा हा भूप्रदेश ग्रंथालय कायद्याचा अवलंब होऊन ही अद्याप सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाच्या प्रतिक्षेत आहे. या कायद्याच्या निश्चितीमुळे २००१ पासून सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला एक संरचनात्मक वाटचाल करण्यासाठी आधार प्राप्त झालेला आहे.

## ४.२० छत्तीसगढ राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००८

**प्रस्तावना :**

छत्तीसगढ राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, त्यांचे जतन व संवर्धन, संघटन आणि विकास करण्याच्या हेतुने हा कायदा संमत करण्यात आला. तसेच राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी लोकांना मोफत व प्रभावी स्वरुपात सेवा प्राप्त होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना करुन त्यांचे संवर्धन व विकास करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे.

भारतीय गणराज्याच्या ६० व्या वर्षी सदर कायद्याची निर्मिती करण्यात आली.

### प्रकरण पहिले

### प्रारंभ

**१. नाव आणि प्रारंभ :**

१. हा कायदा छत्तीसगढ राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायदा २००८ म्हणून ओळखला जाईल.

२. या कायद्याचा विस्तार किंवा प्रसार पूर्ण छत्तीसगढ राज्यात होईल.

३. हा कायद्याची अंमलबजावणी छत्तीसगढ राज्याच्या राजपत्राच्या दिनांकानुसार करण्यात येईल.

**२. या कायद्यानुसार,**

१. पुस्तक म्हणजे,

   अ) प्रत्येक खंड, खंडाचा कोणताही भाग, कोणत्याही भाषेतील बातमीपत्र, कागदपत्र, माहितीपत्र आणि विविध लिपी.

   ब) कागदावर मुद्रित केलेली संगीत लिपी, संगीत, नकाशे, आराखडे किंवा शिलामुद्रित केलेली रेखाटने.

   क) दृकश्राव्य साधने, श्राव्य साधने उदा. टेप, ध्वनीफित, मायक्रोफ्लिम, संगणक, छायाचित्रे असे वाचनसाहित्य इ.

२. अध्यक्ष म्हणजे, या कायद्यानुसार राज्य ग्रंथालय परिषदेचा अध्यक्ष.

३. परिषद म्हणजे, या कायद्यातंर्गत तयार करण्यात आलेली राज्य ग्रंथालय परिषद.

४. निदेशक म्हणजे कलम ६ नुसार निर्धारित केलेला सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक.

५. जिल्हा म्हणजे, राज्यातील एक जिल्हा.

६. विशेष अधिकारी म्हणजे ग्रंथालयाच्या कामकाजावर देखरेख करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारद्वारे नियुक्त करण्यात आलेला, ग्रंथालयशास्त्राचे व्यावसायिक शिक्षण घेतलेला अधिकारी, जो उपनिदेशक पदाच्या खालच्या श्रेणीचा नसावा.

७. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे, राज्य सरकारद्वारे सहाय्य प्राप्त करुन स्थापन केलेले आणि सर्व जनतेसाठी खुले असलेले ग्रंथालय किंवा राज्य सरकारच्या नियमाद्वारे मान्यताप्राप्त कोणतेही ग्रंथालय.

८. सहाय्य प्राप्त ग्रंथालय म्हणजे, राज्य सरकारद्वारा सहाय्य प्राप्त ग्रंथालय.

९. वर्ष म्हणजे दिनदर्शिकेमधील एप्रिल महिन्यापासून सुरूवात होऊन पुढील बारा महिन्याचा कालावधी.

## प्रकरण दुसरे

## समिती

### ३. राज्य ग्रंथालय परिषदेचे संघटन (स्थापना) आणि कार्ये :

१. या कायद्याची स्थापना झाल्यानंतर लगेचच राज्य सरकारच्या नियमानुसार या कायद्याच्या प्रयोजनासाठी एका समितीची स्थापना केली. त्या समितीला 'राज्य ग्रंथालय समिती' असे म्हणतात.

२. राज्य ग्रंथालय समितीची रचना खालीलप्रमाणे असेल,

 १. अध्यक्ष : माध्यमिक शिक्षण विभाग मंत्री, छत्तीसगढ राज्य

### ४. कार्ये :

१. सार्वजनिक ग्रंथालयांचे नियम व स्वरुप तयार करुन त्यांचे सवंर्धन करणे.

२. सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासंबंधी रुपरेषा तयार करणे, आर्थिक प्रस्ताव तयार करणे, योजना तयार करणे.

३. सार्वजनिक ग्रंथालय आणि ग्रंथालय प्रणालीचा विकास करणे आणि त्यांचे मूल्यांकन करणे.

४. पुस्तके आणि अन्य साहित्याचे राष्ट्रीय स्तरावर खरेदी करणे आणि वितरणाचे नियोजन करुन निरीक्षण, नियंत्रण आणि समन्वय करणे.
५. स्वयंसेवी सार्वजनिक ग्रंथालय आणि ग्रंथालय संघ यांच्या आवेदनांना मान्यता देणे.
६. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यामध्ये समन्वय ठेवणे आणि निरीक्षण करणे.
७. ग्रंथालय समिती आणि स्थायी समिती संबंधित विषय प्रक्रियेमध्ये आणणे.
८. इतर विभागांकडून ग्रंथालयांना देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये संपर्क स्थापन करुन नवीन उपाय योजने.
९. शिक्षण विभागाच्या अंतर्गत ग्रंथालय सेवेमधील विषय प्रक्रियेमध्ये आणणे.
१०. राज्यातील आणि राज्याबाहेरील व्यावसायिक संस्था आणि संघटनांशी संपर्क प्रस्थापित करणे.
११. राज्य सरकारच्या इतर विभागांच्या अंतर्गत ग्रंथालयीन विषयांना मार्गदर्शन करणे.
१२. सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली मध्ये ग्रंथालयांच्या अध्यक्षांसाठी 'अविरत शिक्षा कार्यक्रमाचे' आयोजन करणे.
१३. राज्य सरकारद्वारा वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्याचे स्पष्टीकरण देणे.

**५. जिल्हा ग्रंथालय समितीचे संघटन आणि त्यांची कार्ये :**

१. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा ग्रंथालय समिती असावी तिची रचना खालील प्रमाणे आहे.,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी | | |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पंचायत | | |
| ३. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था | – | सदस्य |
| ४. | सचिव, जिल्हा साक्षरता समिती | – | सदस्य |
| ५. | जिल्हा क्रिडा आणि युवा कल्याण अधिकारी | – | सदस्य |
| ६. | निवृत्तीवेतन उपभोगी संघाची अधिकृत व्यक्ती | – | सदस्य |
| ७. | जिल्हा शिक्षण अधिकारी | – | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | संयुक्त संचालक/उप संचालक, सहाय्य संचालक | – | सदस्य |
| ९. | अध्यक्ष, जिल्हा पंचायतची अधिकृत व्यक्ती | – | सदस्य |
| १०. | अध्यक्ष, नगर निगमची अधिकृत व्यक्ती | – | सदस्य |
| ११. | जिल्हा, पदवी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल (जिल्हा दंडाधिकाऱ्याने अधिकृत केलेली व्यक्ती) | – | सदस्य |
| १२. | शासकिय महाविद्यालयाचे प्राचार्य (जिल्हा दंडाधिकाऱ्याने अधिकृत केलेली व्यक्ती) | – | सदस्य |
| १३. | जिल्हा ग्रंथालय संघाचा एक प्रतिनिधी | – | सदस्य |
| १४. | समन्वयक, नेहरु युवा केंद्र | – | सदस्य |
| १५. | ग्रंथपाल, जिल्हा शासकिय ग्रंथालय | – | सदस्य |

२. ज्याठिकाणी जिल्हामध्ये जिल्हा शासकिय ग्रंथालयाचा ग्रंथपाल नसेल तेथे वरील बारा नंबरची व्यक्ती सदस्य असेल.

३. जिल्हा ग्रंथालय समिती जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीच्या विकासासाठी योजना तयार करेल. तसेच त्या योजनांच्या विकासासाठी पर्यवेक्षण करेल. तसेच इतर विकास कार्यांचे आयोजन केले जाईल.

## प्रकरण तिसरे

## सार्वजनिक ग्रंथालयांचा निदेशक

**६. सार्वजनिक ग्रंथालयाचा निदेशक :**

माध्यमिक शिक्षण विभाग, छत्तीसगढ हे सार्वजनिक ग्रंथालयाचे निदेशक असून या विभागाद्वारे सदर कायद्यातील नियमांच्या पालनासाठी बंधनकारक असतील.

**७. निदेशकांचे कार्य :**

निदेशक हा राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली खालील कार्ये करतो.

१. राज्यात सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली आणि सेवांचा विकास करण्यासाठी वार्षिक अंदाजपत्रक, वार्षिक आणि पंचवार्षिक योजनांचे आराखडे तयार करुन तो सरकारला सादर करणे.

२. सर्व सार्वजनिक ग्रंथालये आणि ज्या ग्रंथालयांना सरकारी अनुदान प्राप्त होते अशा सर्व सार्वजनिक ग्रंथालयांची विश्लेषणात्मक आणि साख्यिकींय माहिती संकलित करणे.

३. ग्रंथालय आणि विविध सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या माहिती सेवांसंबंधित काही उद्दिष्ट्ये निर्धारीत करुन ती राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांसाठी निश्चित केली जातील.

४. विविध प्रकारची ग्रंथालयाद्वारे त्यांच्या दर्जानुसार त्यांच्यामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा, प्रशिक्षणांमध्ये त्यांना मदत करणे.

५. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे निरीक्षण करणे.

६. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यांचे निरीक्षण करुन त्यांच्यामध्ये समन्वय राखणे.

७. जिल्हास्तरीय ग्रंथालय समितीची कार्ये सुनिश्चित करणे.

८. सार्वजनिक ग्रंथालयांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांच्या विकासासंबंधित वार्षिक अहवाल तयार करुन तो सादर करणे.

९. निदेशक हा अशा प्रकारच्या विविध कार्यांचे आणि कर्तव्यांचे पालन करेल. आणि त्याला राज्य सरकारकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे आयोजन करेल.

## प्रकरण चौथे

## सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीची संरचना आणि विविध राजकीय केंद्रे आणि ग्रंथालयांची कार्ये

### ८. राज्य स्तरीय ग्रंथालय :

राज्यामध्ये दोन राज्यस्तरीय ग्रंथालये असतील. त्यापैकी एक राज्य केंद्रीय ग्रंथालय रायपूर मध्ये आणि दुसरे राज्य संदर्भ ग्रंथालय बिलासपूर मध्ये असेल.

### ९. राज्य केंद्रीय ग्रंथालयांची कार्ये :

राज्य केंद्रीय ग्रंथालयाची कार्ये खालील प्रमाणे आहेत.

१. सामान्य जनतेसाठी उपयोगी वाचनसाहित्याची उपलब्धी करुन त्याची व्यवस्था करणे.

२. सामान्य जनतेसाठी स्ववाचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे.
३. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांसाठी पूरक असे कार्य करणे.
४. सामान्य लोकांमध्ये वाचनअभिरुची निर्माण करण्यासाठी पुस्तक प्रदर्शन, व्याख्याने, संमेलने आणि परिसंवादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे.
५. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध विकास योजना आणि कल्याणकारी कार्यक्रमांच्या संबंधित माहितीचा प्रसार करण्याचे कार्य करणे.
६. सामान्य लोकांना पुस्तके उधार देण्यासाठी नवीन सेवांचे आयोजन करणे.
७. क्षेत्रीय आणि स्थानिक विकासाच्या साहित्याचे संग्रह करणे.
८. संदर्भसेवा, माहितीसेवा आणि आदानप्रदान सेवा उपलब्ध करणे आणि वाचन अभिरुची वाढवण्यासाठी आणि विस्तार करण्यासाठी मदत करण्यात येईल.
९. शाखा, तलाठी आणि ग्राम स्तरावरील ग्रंथालय आणि अन्य संस्थाद्वारे संचलित ग्रंथालयांच्या संग्रह विकासासाठी प्रयत्न करणे.
१०. भ्रमण ग्रंथालय सेवांची व्यवस्था करणे आणि जेथे आवश्यकता आहे तेथे सेवा उपलब्ध करुन देणे.
११. जिल्ह्याच्या अन्य शासकिय शाखा, तहसिलदार (तलाठी), ग्राम ग्रंथालय आणि भ्रमण ग्रंथालयसेवांमध्ये संवादाद्वारे समन्वय साधून त्यांचे निरीक्षण करणे.
१२. जिल्ह्यातील शासकिय ग्रंथालय आणि इतर सहाय्य प्राप्त ग्रंथालयांचे निरीक्षण करणे.
१३. जिल्हा ग्रंथालय प्रणालीच्या विकास योजनांच्या तयारीसाठी जिल्हा ग्रंथालय समितीच्या कार्यांमध्ये मदत करणे.
१४. अशाच प्रकारे जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे नेमण्यात येणाऱ्या विविध कार्यांचे नियोजन करणे.

## प्रकरण पाचवे

## वित्त

**१०. वित्त :**

ग्रंथालय विकास योजना ही राज्याच्या केंद्रीय आणि अकेंद्रीय वार्षिक आणि पंचवार्षिक योजनेचा आणि आयोजनांच्याअंतर्गत अंदाजपत्रक तयार करणे. राज्य सरकारला आवश्यक वाटल्यास सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीच्या सहाय्य आणि विकासासाठी अतिरीक्त अनुदानात वाढ करुन आर्थिक मदत केली जाते.

## प्रकरण सहावे

## मान्यता

**११. सार्वजनिक ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय सघांना मान्यता :**

१. राज्य सरकार छत्तीसगढ सोसायटी नोंदणी कायदा १९७३ च्या अंतर्गत नोंदणीकृत संघटनेद्वारे संचलित ग्रंथालय किंवा जनतेच्या उपयोगासाठी चालवल्या जाणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांना सहाय्य अनुदान किंवा अन्य आर्थिक सहाय्यासाठी मान्यता देणे.

२. राज्य सरकारच्या नियमानुसार नोंदणीकृत राज्यातील कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालय संघाला राज्य सरकार सोसायटी नोंदणी कायदा १९७३ अंतर्गत आर्थिक अनुदानाला मान्यता देऊ शकेल.

**१२. मान्यता काढून घेणे :**

कोणत्याही सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे नेमलेल्या नियमांचे पालन केले जात नाही किंवा सदरचे ग्रंथालय नियमांचे पालन करण्यास अयशस्वी आहे असे आढळून आल्यास राज्य सरकार राज्य परिषदेद्वारे निवेदन प्राप्त झाल्यावर त्यावर विचार विनिमयासाठी किंवा निणर्यासाठी वेळ देण्यात येतो. निणर्यप्राप्त झाल्यावर राजपत्रातील लिखित आदेशाद्वारे अशा सार्वजनिक ग्रंथालयांची मान्यता रद्द करण्यात येते.

मात्र संबंधित सार्वजनिक ग्रंथालयाविषयी स्थायी समितीद्वारे राज्य परिषदेला निवेदन पाठवल्यानंतरच राज्य परिषद आपले निवेदन पाठवते.

## प्रकरण सातवे

## अहवाल आणि निरीक्षण

**१३. अहवाल आणि निरीक्षण :**

१. सार्वजनिक ग्रंथालयाची आणि सार्वजनिक ग्रंथालय संघांची सदस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्याद्वारे प्राप्त झालेल्या ग्रंथालयाच्या अहवालाची राज्य सरकारद्वारे वेळोवेळी दखल घेतली जाते.

२. सार्वजनिक ग्रंथालय संचालनालयाचा निदेशक किंवा त्याच्याद्वारे पुरस्कृत कलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास स्वतःच्या समाधानासाठी सार्वजनिक ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय संघ किंवा त्याच्याद्वारे वित्तीय सहाय्य प्राप्त असणारी ग्रंथालय सेवा किंवा ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे शिक्षण देण्यात येणाऱ्या संस्थेचे निरीक्षण करण्याचा अधिकार सदर कायद्यांतर्गत त्या निदेशकाला अथवा अधिकाऱ्याला आहे.

३. प्रत्येक वर्षाच्या समाप्तीच्या आधी सहा महिन्याच्या आत वर्षभरातील माहिती, कागदपत्रे आणि सार्वजनिक ग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालय संघाची कार्यप्रणाली आणि त्यांचे नियमांनुसार त्याच्या प्रगतीचा वार्षिक अहवाल तयार करुन तो निदेशकाला सादर करावा. या आधारे संबंधित निदेशक तो अहवाल राज्यसरकारला सादर करु शकेल.

## प्रकरण आठवे

## संकीर्ण

**१४. परिषदेचे सदस्य सेवक असतील :**

या कायद्याअंतर्गत बनविलेल्या नियमांनुसार कार्य करणारे किंवा परिषदेचे सर्व सदस्य भारतीय दंड संहिता कलम २१ नुसार सेवक मानण्यात येतील.

**१५. सद्भावनेने बनविलेल्या कार्यवाहीचे सरंक्षण :**

या कायद्याच्या अंतर्गत बनवलेल्या नियम व उपनियमांना अनुसरून सद्भावनापूर्वक केल्या जाणाऱ्या कार्यवाहीसाठी परिषद किंवा परिषदेच्या कोणत्याही सदस्य किंवा सेवकाविरुद्ध कोणताही वाद, प्रतिवाद, दावा किंवा कारवाई होणार नाही.

**१६. परिषदेची कार्य आणि कार्यवाही नियममान्य असतील :**

परिषद किंवा परिषदेच्या समितीची कार्य व कार्यवाही खालील कारणांमुळे अमान्य होणार नाही.

१. त्यामध्ये कोणतेही संघटीत त्रुटी.

२. प्रक्रियेमधिल अनियमता.

**१७. नियम बनविण्याचा अधिकार :**

१. राज्य सरकार या कायद्याची अमंलबजावणी कार्यान्वित करण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करु शकतो.

२. विशेष स्वरुपात आणि पूर्वीच्या अधिकाराच्या व्यापकतेवर प्रतिकूल प्रभाव टाकल्याशिवाय सर्व किंवा कोणत्याही बाबींचे नियोजन करण्यासाठी पुढील नियम तयार करु शकते.

   १. सार्वजनिक ग्रंथालय संघ किंवा ग्रंथालय अधिकाऱ्याद्वारे प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबत.

   २. अध्यक्षाद्वारे देण्यात येणारे अधिकार, कर्तव्य आणि कार्ये.

   ३. असे इतर अधिकार आणि कार्ये ज्यांचा अवलंब आणि निर्धारण परिषदेद्वारे केले जाईल.

   ४. परिषद आणि समितीच्या सदस्यांना देण्यात येणारे भत्ते.

   ५. निदेशक किंवा ग्रंथालय मंडळाद्वारे निर्धारीत आणि अवलंबिले जाणारे अधिकार, कार्ये आणि कर्तव्य.

   ६. जिल्हा ग्रंथालय समितीद्वारे निर्धारीत केली जाणारी कार्ये.

   ७. सार्वजनिक ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय सघांना मान्यता.

   ८. वार्षिक अहवालात निर्धारीत केल्या जाणारी माहिती आणि तिचे स्पष्टीकरण

   ९. अशी कोणतीही बाब जी निर्धारीत असेल किंवा निर्धारीत केली जाणारी असेल.

**१८. नियम बनविण्याचे अधिकार :**

१. परिषद या कायद्याच्या अंतर्गत आपली कार्ये कार्यान्वित करण्यासाठी कायदा आणि त्याद्वारे बनविलेल्या नियमावलीच्या घटकांनुसार नियम बनवू शकते.

२. विशेष स्वरुपात किंवा पूर्वीच्या अधिकारांवर प्रतिकूल प्रभाव टाकल्याशिवाय सर्व किंवा अन्य कोणत्याही बाबींमध्ये नियमांचे गठन करु शकते. जसे,

   १. वेळ, दिनांक आणि स्थान जेथे परिषद सभा घेईल किंवा सभेमध्ये आपले कार्य करण्यासंबंधातील नियम ज्यांचे पालन परिषद करेल.

   २. अन्य समिती ज्यांचे संघटन परिषदेद्वारे केले जाते त्या समितीतील सदस्य संख्या, त्यांची कार्ये या परिषदेद्वारे निर्धारीत केली जातील.

**१९. येणाऱ्या समस्यांचे निराकरण :**

१. या कायद्याच्या अंतर्गत नियम कार्यान्वित करताना कोणत्याही प्रकारची समस्या उपलब्ध झाल्यास राज्य सरकार राजपत्रात आदेश प्रकाशित करुन सदर कायद्याला अनुसरुन असा नियम तयार करु शकेल की त्याचा उपयोग आलेली समस्या निवारण्यासाठी होईल.

२. या कलमांतर्गत तयार करण्यात येणारे प्रत्येक आदेश तयार झाल्यावर लवकरात लवकर विधानमंडळासमोर ठेवण्यात येतील.

### ४.२१ ग्रंथवाटप (सार्वजनिक ग्रंथालय) नियम १९५५

एस.आर. ओ. ५८७ नवी दिल्ली ११/०३/१९५५ ग्रंथवाटप ( सार्वजनिक ग्रंथालय) अधिनियम१९५४ चे कलम ८ मध्ये दिलेल्या अधिकारांच्या प्रयोगाने केंद्र सरकारकडून खालील नियम बनविले

**शिर्षकानुसार**

**१) संक्षिप्त शीर्षक**

याला ग्रंथवाटप ( सार्वजनिक ग्रंथालय) अधिनियम १९५५ म्हटले जाईल.

**२) व्याख्या**

या नियमात जोपर्यंत बदलाची आवश्यकता  वाटणार नाही तोपर्यंत.

* ग्रंथवाटप (सार्वजनिक ग्रंथालय) अधिनियम –१९५४ (१९५४ चा २७ वा) असे संबोधले जाईल.
* या अधिनियमाच्या अधीन किंवा अधिनियमाव्दारे त्याला दिलेल्या अधिकारानुसार कोणत्याही कार्याचे पालन करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाची प्रभारी व्यक्ती किंवा यासाठी त्याच्याकडून अधिकार दिलेली अधिकृत व्यक्ती

**३) वाटप पध्दती**

कलम ३ च्या तरतुदीनुसार, प्रकाशकाव्दारे प्रकाशित ग्रंथाची एक प्रत प्रत्येक सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथपालास विशेष संदेशाव्दारे किंवा रजिस्टर (अधिकृत) पोष्टाने वाटप केली जाईल किंवा ग्रंथपालास वरीलप्रमाणे प्रत मिळाली असेल तर त्याबरोबर पाठविलेली पोहोच पावती सही करून रजिस्टर पोष्टाने प्रकाशकास पाठवणे आणि ही पावती या गोष्टीचा पुरावा असेल की संबंधित सार्वजनिक ग्रंथालयास ग्रंथाचे वाटप केले गेलेले आहे.

**४) दोषी प्रकाशकाची अभियोग प्रक्रिया :**

जर २० मे १९५४ नंतरच्या प्रकाशित ग्रंथाची प्रत त्या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर ३० दिवसाच्या आत दिली नाही तर कलम ६ चे उपकलमाव्दारे अधिकार प्राप्त अधिकारी वरील अवधी संपल्यानंतर कोणत्याही वेळी त्या ग्रंथाच्या प्रकाशकाविरुध्द तक्रारीमध्ये

उल्लेखित सार्वजनिक ग्रंथालयास ग्रंथाची प्रत न पाठविल्याबद्दल तक्रार करु शकतो. तसेच अशा तक्रारीची न्यायालयाव्दारे दंड प्रक्रिया संहितानुसार त्याची तपासणी केली जाईल किंवा त्याच्यावर खटला भरण्याचा विचार केला जाईल.

परंतु न्यायालयात तक्रार देण्याअगोदर ग्रंथपालाव्दारे प्रकाशकास एक सूचना दिली जाऊ शकते की त्या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर ३० दिवसांच्या आत ग्रंथ पाठविलेला नाही किंवा ही सूचना मिळाल्यानंतर ३० दिवसांच्या आत ग्रंथ दिला नाही तर कलम ५ अनुसार तो स्वत: दंडासाठी पात्र ठरेल.

**५) ग्रंथ प्रकाशनाच्या अचूक तारखेची सूचना :**

प्रकाशकाद्वारे सार्वजनिक ग्रंथालयास वाटप केल्या गेलेल्या ग्रंथाच्या प्रतीवर प्रकाशनाची तारीख आणि वाटप केलेल्या ग्रंथाची प्रत ( सार्वजनिक ग्रंथालय) अधिनियम १९५४ व्दारे प्रत दिलेली आहे. याची नोंदणी करेल.

**६) ग्रंथाची ओळख :**

प्रत्येक ग्रंथाचा प्रकाशक खालीलप्रमाणे आयश्वकतेनुसार स्पष्टीकरण पाठवेल, अर्थात

* ग्रंथाचे शीर्षक आणि पृष्ठांतील विषय स्वरुप तसेच शीर्षक आणि विषय कल्पना इंग्रजी भाषेत नसेल तर त्याचा इंग्रजी अनुवाद
* ज्या भाषेमध्ये ग्रंथ लिहिला गेला आहे
* लेखक, अनुवादक किंवा संपादक किंवा त्यांचा काही सहभाग
* विषय
* मुद्रण स्थळ किंवा प्रकाशन स्थळ
* मुद्रकाचे नाव किंवा फर्म आणि प्रकाशकाचे नाव आणि
* मुद्रणालयात नोंदलेली तारीख किंवा प्रकाशनाची तारीख
* पृष्ठ आणि पानांची संख्या
* आकृती

* प्रथम, व्दितीय किंवा अन्य संस्करणाची संख्या
* संस्करणामध्ये छापल्या गेलेल्या प्रतींची संख्या
* ग्रंथ मुद्रित आहे किंवा अमुद्रित
* ग्रंथांची जनतेसाठी विक्रीची किंमत
* स्वामित्वाधिकार किंवा स्वामित्वाधिकारातील मालकाचे नाव व निवासस्थान

या तपशीलाची नोंद कायद्यातंर्गत तरतुदीनुसार अचूकपणे होणे अपेक्षित आहे.

## ४.२२ ग्रंथ आणि दैनिक वाटप
## (सार्वजनिक ग्रंथालय) अधिनियम १९५४
## (१९५४ चा २७वा अधिनियम)

ग्रंथाचे वाटप (सार्वजनिक ग्रंथालय) अधिनियम १९५४ (१९५४ चा २७ वा) ग्रंथ वाटप सार्वजनिक ग्रंथालय संशोधन अधिनियम १९५६ (१९५६ चा क्रमांक ९९) व्दारे संशोधित.

राष्ट्रीय ग्रंथालय कोलकाता आणि अन्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथांच्या वाटपासाठी बनविलेला अधिनियम

प्रजासत्ताक भारताच्या पाचव्या वर्षी संसदेव्दारे खालीलप्रमाणे हे अधिनियमित केले गेले आहे:–

### १) संक्षिप्त शीर्षक आणि विस्तार

- ✻ हा अधिनियम ग्रंथ आणि दैनिक वाटप (सार्वजनिक ग्रंथालय) अधिनियम, १९५४ म्हणून ओळखला जाईल.
- ✻ हा अधिनियम जम्मू आणि काश्मिरला सोडून सर्व देशभर लागू होईल.

### २) व्याख्या

या अधिनियमात जोपर्यंत आवश्यक वाटत नाही

- ✻ ग्रंथ म्हणजे कोणत्याही भाषेतील खंडाचा विभाग किंवा अंश आणि पुस्तिका तसेच संगीत, नकाशे, तक्ते, तसेच रुपरेषेचे वेगळ्या रुपात छापलेले किंवा अश्म मुद्रित प्रत्येक पृष्ठ पण त्यामध्ये मुद्रणालय आणि ग्रंथ नोंदणी अधिनियम, १८६७ च्या कलम ५ च्या व्यवस्थेनुसार प्रकाशित दैनिकांचा समावेश केला जाणार नाही.
- ✻ दैनिक म्हणजे छापलेले नियतकालिक तसेच ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ च्या ५ व्या तरतुदीच्या व्यवस्थेनुसार सार्वजनिक बातम्या आणि त्यावरील टीका प्रकाशित करणारे दैनंदिन छपाई कार्य.
- ✻ सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे राष्ट्रीय ग्रंथालय कोलकाता तसेच केंद्र सरकार व्दारे यासाठी सरकारी राजपत्रामध्ये अधिसूचनेव्दारे निर्धारीत तीन अन्य ग्रंथालये.

**३) सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथ वाटप** :

* या अधिनियमाअंतर्गत तयार केलेल्या विषयाधीन परंतु मुद्रणालय तसेच ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ च्या कलम ९ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार कोणतेही पूर्वग्रह न ठेवता ज्या क्षेत्रामध्ये अधिनियम लागू झाला आहे. त्यामध्ये प्रकाशित प्रत्येक ग्रंथाच्या प्रकाशकाने या अधिनियमाच्या निर्मितीनंतर प्रकाशित प्रत्येक ग्रंथाची एक प्रत राष्ट्रीय ग्रंथालय कोलकाता तसेच तीन अन्य सार्वजनिक ग्रंथालयाना ग्रंथाची एक एक प्रत स्वत:च्या खर्चाने पोहचवली पाहिजे.
* राष्ट्रीय ग्रंथालयास दिलेली प्रत, तिच्या सर्वोत्तम प्रतिसमान त्यामध्ये संबंधीत सर्व नकाशे तसेच रेखाचित्रांसह सुस्पष्ट आणि रंगीत प्रत असेल. पाठविलेली प्रत सर्वोत्तम असेल.
* अन्य सार्वजनिक ग्रंथालयांना वाटप केलेल्या प्रती विक्रीसाठी ठेवलेल्या प्रतीसमान असतील आणि त्या प्रतींच्या समकक्ष त्या प्रतींचा कागद असेल.

**३) अ) सार्वजनिक ग्रंथालयांना दैनिकांचे वाटप :**

या अधिनियमांतर्गत निर्माण केल्या जाणाऱ्या नियमांच्या अंतर्गत मुद्रणालय तसेच ग्रंथ नोंदणी अधिनियम १८६७ चे कलम ९ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार ज्या राज्यासाठी निर्माण केला जाईल त्या राज्यातील प्रकाशित प्रत्येक दैनिकाचे प्रकाशक, प्रत्येक दैनिकाची एक प्रत प्रकाशनानंतर लवकरात लवकर सरकारी राजपत्रामध्ये ह्यासंबंधी अधिसूचित सार्वजनिक ग्रंथालयांना स्वत:च्या खर्चाने पाठवेल.

उपकलम १ मध्ये समाविष्ट बाबींचा ग्रंथांच्या दुसऱ्या किंवा अन्य संस्करणावर परिणाम लागू होणार नाही. ज्यामध्ये नकाशे, ग्रंथ मुद्रण, अन्य विखुरलेल्या किंवा अक्षर छपाईत काही बदल किंवा वाढ केली गेली नसेल तर प्रथम किंवा पूर्वीच्या आवृत्तीची एक प्रत या अधिनियमांतर्गत दिली गेली आहे.

**४) दिलेल्या ग्रंथाची पोहोच :**

सार्वजनिक ग्रंथालयाची प्रभारी व्यक्ती (ग्रंथपाल असो वा कोणी अन्य) किंवा त्याच्याव्दारे यासाठी अधिकृत अन्य व्यक्ती कलम ३ च्या अंतर्गत प्रकाशकास त्याच्याकडून प्राप्त अंकाकरिता लेखी पावती देईल.

**५) दंड :**

कोणी एखादा प्रकाशक या अधिनियमातील तरतुदींचा किंवा त्यामधील नियमांचे उल्लंघन करेल तर त्याला ५० रुपयांचा दंड केला जाईल. (परंतु ग्रंथासंबंधी उल्लंघन असेल तर ग्रंथाच्या किमती इतका दंड केला जाईल) अपराधाची पाहणी करणारे न्यायालय हा निर्देश देऊ शकते की, प्रकाशकाकडून संपूर्ण आर्थिक दंड नुकसान भरपाईच्या रुपात प्रकरणाचे गांभीर्य पाहून ज्याला ग्रंथ किंवा दैनिक वाटप दिले गेले पाहिजे किंवा त्या सार्वजनिक वाचनालयास भरपाई द्यावी लागेल.

**६) अपराधांची जाणीव** :

* जोपर्यंत केंद्र सरकारच्या साधारण किंवा विशेष आदेशाव्दारे यासाठी सक्षम अधिकाऱ्याकडून तक्रार केली जाणार नाही तोपर्यंत या अधिनियमांतर्गत कोणतेही न्यायालय पाहणी करणार नाही.
* या अधिनियमांतर्गत दंडनीय अपराधाची पाहणी प्रथम श्रेणी न्यायाधीश किंवा प्रेसीडेन्शियल न्यायाधीशाच्या खालील स्तरावरील न्यायालय करणार नाही.

**७) प्रकाशित ग्रंथ आणि दैनिकांसाठी या अधिनियमाची आवश्यकता :**

हा अधिनियम सरकारी अधिकार प्राप्त अधिकाऱ्याच्या व्दारे प्रकाशित ग्रंथ किंवा दैनिकांसाठी लागू असेल परंतु केवळ कार्यालयीन उपयोगाच्या ग्रंथांसाठी लागू होणार नाही.

**८) नियम बनविण्याचे अधिकार :**

केंद्र सरकार सरकारी राजपत्रात अधिसूचना देऊन या अधिनियमाच्या तरतुदींसाठी आवश्यक ते नियम बनवू शकते.

**समारोप :**

भारतातील १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामधील ग्रंथालय कायदे आपण अवलोकिले आहेत. या कायद्यांबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. **राज्य मध्यवर्ती ग्रंथालय :** १६ राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय असून उत्तरांचल मध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय अस्तित्वात नाही आणि छत्तीसगड येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय नियोजित होते.

२. **ग्रंथालय प्रकार :** राज्यांमध्ये सर्व साधारणपणे जिल्हा ग्रंथालय, विभागीय ग्रंथालय, तालुका ग्रंथालय, तहसिल ग्रंथालय, शहर ग्रंथालय, शाखा ग्रंथालय, ग्रामीण ग्रंथालय, फिरते ग्रंथालय, बाल ग्रंथालय असे प्रकार आढळतात.

   कर्नाटकमध्ये भटकी जमात / आदिवासी यांच्यासाठी ग्रंथालय, बाल समाज केंद्र, गुजरातमध्ये महिला ग्रंथालय, कला ग्रंथालय, अंधांसाठी ग्रंथालय, राजस्थान मध्ये शाळेची ग्रंथालये असून शाळेच्या वेळेनंतर ती लोकांसाठी खुली असतात, उत्तरप्रदेश, छत्तीसगडमध्ये महाविद्यालय ग्रंथालये सार्वजनिक ग्रंथालये म्हणून आढळतात, अरुणाचल प्रदेशमध्ये 'सर्कल ग्रंथालय' हा प्रकार आढळतो.

३. **राज्य ग्रंथालय समिती :** तामिळनाडू, मणिपूर, उत्तरांचल, अरुणाचल प्रदेश या राज्यामध्ये राज्य ग्रंथालय समिती असून बहुतेक ठिकाणी मंत्री हे अध्यक्ष आहेत.

४. **राज्य ग्रंथालय परिषद :** आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, केरळ, मिझोराम, गोवा, ओरिसा, गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, छत्तीसगड या ठिकाणी राज्य ग्रंथालय परिषद असून अध्यक्षपदी ग्रंथालय मंत्री, शिक्षण मंत्री, ओरिसामध्ये पर्यटन मंत्री असून, आंध्रप्रदेशमध्ये ग्रंथालय /शिक्षण तज्ञ असून केरळमध्ये कार्यकारी समिती अस्तित्वात आहे.

५. **राज्य ग्रंथालय प्राधिकरण :** कर्नाटक, हरियाना आणि बिहार येथे राज्य ग्रंथालय प्राधिकरण असून अध्यक्षपदी ग्रंथालय विभागमंत्री आणि बिहारमध्ये तज्ञ मंडळ उपलब्ध आहे.

समिती, परिषद आणि प्राधिकरण यांचे प्रमुख कर्तव्य सार्वजनिक ग्रंथालयांशी संबंधित सर्व बाबींवर राज्य शासनाला सल्ला देणे हे आहे.

६. **स्थानिक ग्रंथालय प्राधिकरण :** तामिळनाडू, कर्नाटक, पश्चिम बंगाल, मणिपूर, ओरिसा, उत्तरांचल या राज्यांमध्ये स्थानिक ग्रंथालय प्राधिकरण कार्यरत असून अधिकार प्राप्त आहेत.

७. **जिल्हा ग्रंथालय समिती :** आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, हरियाना, केरळ, गुजरात, उत्तरप्रदेश, छत्तीसगड, अरुणाचल प्रदेश या राज्यांत जिल्हा ग्रंथालय समिती असून आंध्रप्रदेश, हरियाना, केरळ या राज्यांतील समिती किंवा परिषद यांना अधिकार प्राप्त आहेत.

८. **स्वतंत्र ग्रंथालय विभाग :** फक्त केरळ राज्यामध्ये स्वतंत्र ग्रंथालय विभाग नसून गोवा उत्तरांचल या ठिकाणी ग्रंथालय कक्ष आहे. उर्वरीत राज्यांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय विभाग आहे. ग्रंथालय विभाग प्रमुखपदी ग्रंथालय संचालक असून गोव्यामध्ये ग्रंथालय अधिकारी आणि उत्तरांचलमध्ये विशेष अधिकारी आहे.

९. **ग्रंथालय कर :** तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, हरियाना, केरळ, गोवा या राज्यांमध्ये ग्रंथालय कर आकारणी करण्याची तरतूद असून इतर ठिकाणी शासनाचे अनुदान हेच प्रमुख उत्पन्न आहे.

१०. **ग्रंथ प्राप्ती :** ग्रंथ मुद्रण व ग्रंथ नोंदणी कायदा, १८६७ अन्वये ग्रंथप्राप्तीची तरतूद तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल, मणिपूर, हरियाना, गोवा, बिहार आणि अरुणाचल प्रदेश या राज्यात आहे.

११. **ग्रंथालय तपासणी आणि कागदपत्र प्राप्ती :** ग्रंथालय तपासणी व कागदपत्रे प्राप्तीचे अधिकार ग्रंथालय संचालक यांना असून केरळ मध्ये हे अधिकार परिषद अध्यक्ष यांना आहेत. हरियाना, मिझोराम या कायद्यामध्ये याबाबत उल्लेख आढळत नाही.

१२. **शासनास अहवाल सादर करणे :** प्रत्येक वर्षी सार्वजनिक ग्रंथालये कामकाज प्रगती अहवाल शासनाला सादर करण्याची जबाबदारी ग्रंथालय संचालक यांची असून केरळमध्ये ही जबाबदारी परिषद अध्यक्ष यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मिझोराममध्ये याबाबत उल्लेख आढळत नाही.

**१३. राज्य ग्रंथालय सेवा :** महाराष्ट्रामध्ये सर्वात अधिक १२,१८७ सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सर्वात कमी ग्रंथालये उत्तरांचल (४७) आणि हरियाना (५०) येथे आहेत. क्षेत्रफळ विचारात घेतल्यास केरळमध्ये प्रत्येक ५ स्क्वेअर किलोमीटरमागे एक ग्रंथालय असून लोकसंख्या प्रमाणानुसार मिझोराम येथे २३४६ लोकांपाठीमागे एक ग्रंथालय आहे. महाराष्ट्रामध्ये २५ स्क्रेअर कि. मी. साठी एक तसेच ९२२१ लोकांपाठीमागे एक ग्रंथालय हे प्रमाण आहे.

केरळ राज्याचे क्षेत्रफळ ३८८६३ स्क्व. कि. मी. असून लोकसंख्या ३,३३,८७,६७७ इतकी आहे. केरळमध्ये ग्रंथालय कायदा, १९८९ मध्ये अस्तित्वात आला. केरळमध्ये स्वतंत्र ग्रंथालय विभाग नाही आणि ग्रंथालय संचालक नियुक्तीसुद्धा नाही, तथापि त्या ठिकाणची ग्रंथालय चळवळ अधिक प्रगतशील, कार्यक्षम आढळते. याचे प्रमुख कारण तेथील साक्षरतेचे जवळपास असलेले ९४% प्रमाण असू शकते.

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता अ–समान निधी योजना अंतर्गत अर्थसहाय्य या विषयी एक आढावा घेण्यात आला होता. सन एप्रिल २००० ते मार्च २०१३ या कालावधीमध्ये प्राप्त केले होते. याच कालावधीमध्ये ग्रंथालयांचे प्रस्ताव मंजूर होऊन रु. २,७६,२१,६९४/– इतके अर्थसहाय्य प्राप्त केले होते. यावरुन केरळची कार्यतत्परता लक्षात येते. सार्वजनिक चळवळ प्रगतीबाबत स्पष्ट कल्पना येते.

महाराष्ट्राचे 'गाव तेथे ग्रंथालय' हे उद्दिष्ट आहे. आज महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या १२,००० हून थोडीशी अधिक आहे आणि जिल्हे, तालुके, शहरे व खेडी या सर्वांची एकत्रित संख्या जवळपास ४५,००० इतकी आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचा कालावधी किती लागेल याचा विचारही होणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालये अनुदानासाठी सन २०१६–१७ साठी रु. ७ कोटींची तरतूद आहे. 'गाव तेथे ग्रंथालये' हे उद्दिष्ट साध्य करताना ग्रंथालयांच्या वाढणाऱ्या संख्येबरोबर वाढीव अनुदानाचाही विचार करावाच लागेल.

गुजरातमध्ये शहर ग्रंथालयासाठी वार्षिक अनुदान रु. एक लाख, ग्राम ग्रंथालयांसाठी रु. १०,०००/– इतके अनुदान प्राप्त होते. महाराष्ट्रामध्ये इतर अ– वर्ग ग्रंथालयास रु. २,८८,०००/– आणि ड – वर्ग ग्रंथालयास रु, ३०,०००/– वार्षिक अनुदान प्राप्त होते. 'गाव तेथे ग्रंथालय' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ४५,००० ठिकाणाच्या ग्रंथालयांना अनुदानासाठी किती तरतूद प्रतिवर्षी करावी लागेल आणि या निधीची उपलब्धता राज्य शासनास करणे शक्य होईल का? याचाही विचार करावा लागेल.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय चळवळीमध्ये उत्तरोत्तर वाढ होणे आवश्यक आहेत पण त्यासाठीच्या योजना, मार्ग यांचा सर्वांगाने विचार होणे गरजेचे आहे.

### ४.२३ राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता

भारताच्या ग्रंथालय चळवळीचा इतिहास हा पूर्णपणे सार्वजनिक ग्रंथालय चळवळीशी निगडीत आहे. सार्वजनिक ग्रंथालय सेवेच्या विकासाच्या दृष्टीने भारत सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून तरतूद केल्याचे निदर्शनास येते. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये सामुदायिक विकास कार्यक्रम या अंतर्गत राष्ट्रीय संदर्भ ग्रंथालय, राज्याच्या ठिकाणी राज्य मध्यवर्ती ग्रंथालय आणि जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा ग्रंथालये शासकीय स्तरावर स्थापन करण्यात आली. याच काळामध्ये ग्रंथ प्रदान कायदा, १९५४ करण्यात आला. दुसऱ्या योजनेच्या काळामध्ये हीच तरतूद कायम ठेवून पहिल्या योजनेमध्ये समाविष्ट न झालेली राज्ये या कार्यक्रमामध्ये घेण्यात आली.

भारतीय राज्यघटनेतील विद्यमान तरतुदीप्रमाणे शिक्षण हा विषय राज्याच्या अनुसूचीमध्ये असल्यामुळे व योजनेच्या अंमलबजावणीतील पुनरावृत्ती टाळण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून ही योजना राज्यांकडे अंमलबजावणीसाठी सोपविण्यात आली. तिसऱ्या व चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात राज्यांत अंशदान व सहाय्य देऊन ही योजना राबविण्यात आली. यासर्व बाबी पहाता भारत सरकारने सार्वजनिक ग्रंथालयात चळवळीला पोषक असे कार्य स्वातंत्र्योत्तर काळात चांगल्याप्रकारे केल्याचे आढळते. त्यामुळेच सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील शासन यंत्रणा सार्वजनिक ग्रंथालय विकासाबाबत सक्रिय असल्याचे दिसून येते. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात प्रामुख्याने भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी सरकारने पुढाकार घेऊन स्वायत्त स्वरुपाचे राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान, कलकत्ता येथे स्थापन केले. ग्रंथालय विकासासाठी असे प्रतिष्ठान स्थापन करणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र आहे. ज्ञानप्रसार करण्याकरिता स्थापन झालेले हे प्रतिष्ठान राजा राममोहन रॉय यांचे चिरंतन स्मारक आहे. करण्याकरीता स्थापन झालेले हे प्रतिष्ठान राजा राममोहन रॉय यांचे चिरंतन स्मारक आहे.

**प्रतिष्ठानची निर्मिती :**

प्रतिष्ठानच्या स्थापनेचे १९७२ हे वर्ष अनेक दृष्टीने महत्वपूर्ण होते. भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवाचे हे वर्ष होते. सर्वांकरिता ग्रंथ (Books for all) हे या आंतरराष्ट्रीय ग्रंथ

वर्षाच्या निमित्ताने प्रसिध्द झालेल्या ग्रंथ सनदेचे उद्‌घोषाचे वाक्य होते. आधुनिक भारताचे शिल्पकार थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांच्या व्दितीय जन्म शताब्दीचे हे वर्ष होते.या सर्व पर्वणीचे निमित्त लक्षात घेऊन राष्ट्रीय समितीच्या दिनांक २८ मार्च, १९७२ रोजी झालेल्या बैठकीत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या (सध्याचे नाव मनुष्यबळ विकास मंत्रालय) संस्कृती विभागाअंतर्गत ६ मे १९७२ रोजी प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली. दिनांक २० मे १९७२ रोजी प्रतिष्ठानचे औपचारिक उद्‌घाटन राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकाता येथे करण्यात आले. पश्चिम बंगाल सार्वजनिक विश्वस्त नोंदणी कायद्यान्वये नोंदणी झालेले हे प्रतिष्ठान पूर्णपणे स्वायत्त आहे.

**प्रतिष्ठानची रचना :**

या प्रतिष्ठानचे अध्यक्ष भारत सरकारच्या संस्कृती विभागाचा कार्यभार पाहणारे मंत्री किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी असतात. प्रतिष्ठानच्या सदस्यांमध्ये भारत सरकारच्या संस्कृतिक विभागाचे सचिव, भारत सरकारने नामनिर्देशित केलेले वित्त विभाग, शिक्षण विभाग, समाज कल्याण विभाग यांचे प्रतिनिधी, चार प्रथितयश ग्रंथपाल, नऊ शिक्षण क्षेत्रातील तज्ञ यांचा समावेश आहे. याशिवाय भारतीय ग्रंथालय संघ, साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट या संघटनांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेले आहेत. प्रतिष्ठानचे संचालक हे प्रतिष्ठानचे पदसिध्द सचिव आहेत. सप्टेंबर १९८५ पासून डीडी – ३४, सेक्टर–१, सॉल्ट लेक सिटी कोलकाता येथे स्वतःच्या इमारतीमध्ये प्रतिष्ठान कार्यरत आहे.

**प्रतिष्ठानची उद्दिष्टे :**

सार्वजनिक ग्रंथालय सेवेचा प्रसार करणे आणि त्यासाठी व्यापक सहाय्य करणे या मुख्य उद्दिष्टासाठी प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले आहे. राज्य व केंद्रशासित प्रदेशातील शासनाच्या सहकार्याने व मदतीने उद्दिष्टांची पूर्तता करण्याचे प्रतिष्ठानचे धोरण आहे. प्रतिष्ठानच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशनमध्ये एकूण २९ उद्दिष्टे देण्यात आली आहेत. त्यापैकी महत्वाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) भारतामधील ग्रंथालय चळवळीस उत्तेजन देणे.

२) राष्ट्रीय ग्रंथालय धोरण ठरविणे व त्याची राज्य व केंद्रशासित प्रदेशातील शासनाद्वारे अंमलबजावणी होईल या दृष्टीने प्रयत्न करणे.

३) ग्राम ग्रंथालयापासून राष्ट्रीय ग्रंथालयापर्यंत उत्कृष्ट प्रतीची ग्रंथालयांची साखळी तयार करणे, त्यासाठी आंतर ग्रंथालयीन सेवेच्या माध्यमाचा वापर करणे.

४) सर्व राज्य य केंद्रशासित प्रदेशांनी सार्वजनिक ग्रंथालय कायदा करावा, यावर प्रयत्न करणे.

५) ग्रंथालये, ग्रंथालय संघटना आणि ग्रंथालय विकासासाठी कार्य करणाऱ्या इतर संघटनांना त्यांच्या कार्यासाठी आर्थिक सहाय्य देणे.

६) भारतामध्ये आणि भारताबाहेर ग्रंथालय विकासासाठी पूरक असे समशोधन (Clearing House) गृह म्हणून कार्य करणे.

७) ग्रंथालयांच्या विविध समस्यांवर संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

८) ग्रंथालय विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींसाठी भारत सरकारला मार्गदर्शन करणे.

वरील उद्दिष्टांवरुन भारताच्या ग्रंथालयविषयक कार्यासाठी सल्लागार मंडळ आणि कार्यकारी मंहळ अशा दुहेरी भूमिकेतून भारत सरकारने प्रतिष्ठानची निर्मिती केली आहे हे स्पष्ट होते.

**प्रतिष्ठानची कार्यपध्दती :**

भारतातील सार्वजनिक ग्रंथालयांची परिस्थिती लक्षात घेऊन सर्वप्रथम ग्रंथालयांची संख्या वाढवून जास्तीत जास्त ग्रामीण व दुर्गम भागापर्यंत ग्रंथालय सेवा पोहोचावी या दृष्टीने प्रतिष्ठानचे कार्य सुरु केले. त्यासाठी राज्याचे मध्यवर्ती ग्रंथालय व जिल्ह्याचे जिल्हा ग्रंथालय केंद्रस्थानी स्विकारुन त्यांच्यामार्फत ग्रामीण ग्रंथालये व फिरती ग्रंथालये यांना मदत देण्याचे धोरण अंगिकारण्यात आले.

कालांतराने सर्वांगीण ग्रंथालय विकासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या योजना प्रतिष्ठानतर्फे सुरु करण्यात आल्या. भारत सरकारचे अर्थसहाय्य आणि राज्य व केंद्रशासित प्रदेशातील

शासनांच्या सहकार्यावर व त्यांनी दिलेल्या अंशदानावर प्रतिष्ठानचे सर्व कार्य अवलंबून आहे. संपूर्ण भारतामध्ये सार्वजनिक ग्रंथालय सेवेविषयी जागरुकता व प्रोत्साहक वातावरण निर्माण करण्याचे कार्य प्रतिष्ठान करते आहे. प्रतिष्ठानच्या प्रयत्नामुळे आज देशातील १९ राज्यांमध्ये सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम अंमलात आले आहेत. प्रतिष्ठानच्या निर्मितीनंतर झालेले सार्वजनिक ग्रंथालय कायदे प्रतिष्ठानच्या यशाचे गमक मानता येतील.

भारतातील सार्वजनिक ग्रंथालयांची सर्वांगीण परिस्थिती विचारात घेऊन ग्रंथालयांची संख्या अतिदुर्गम परीसरात व ग्रामीण स्थरावर वाढवून या दुर्लक्षित विभागाकडे ग्रंथालय सेवा पोहचविण्याच्या दृष्टीकोनातून या प्रतिष्ठानने आपल्या कार्यपध्दतीची संरचना केलेली आहे.

या कार्यपध्दतीचे योग्य पद्धतीने उपयोजन व्हावे या दृष्टीने राज्याचे मध्यवर्ती ग्रंथालय व जिल्हा स्थरावरील जिल्हा ग्रंथालय हे केंद्रस्थानी मानून या ग्रंथालयांच्या माध्यमातून ग्रामीण व फिरती ग्रंथालये यांना सर्वांगीण मदत उपलब्ध करुन देण्याचे धोरण प्रतिष्ठानद्वारे अंगिकारण्यात आलेले आहे. या प्राथमिक वाटचालीनंतर पुढील काळात प्रतिष्ठानने ग्रंथालय विकासाकरीता विविध योजनांचा अवलंब केल्याचे निदर्शनास येते. केंद्र शासनाने दिलेले आर्थिक सहाय्य आणि राज्य व केंद्रशासित प्रदेशातील शासनांच्या सहकार्याने व त्यांच्याद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अंशदानावर प्रतिष्ठानचे सर्व कार्य अवलंबून आहे. सार्वजनिक ग्रंथालय विषयक जागरुकता आणि प्रेरणादायी वातावरण संपूर्ण देशभर निर्माण करण्याचे कार्य प्रतिष्ठानद्वारे आजवर करण्यात आलेले आहे.

आज सार्वजनिक ग्रंथालयांना अधिक चांगल्याप्रकारे सहकार्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोनातून प्रतिष्ठानने विभागीय स्तरावर प्रतिष्ठानच्या कार्यालयाची संरचना तयार करुन या कार्यालयाद्वारे सर्वदूर प्रतिष्ठानद्वारे देण्यात येणाऱ्या विविध योजनातंर्गत अनुदानचे वितरण प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी व त्याअंतर्गत उपक्रमांची पडताळणी व प्रतिष्ठानच्या नवनवीन योजनांचे स्वरुप ग्रामीण स्तरावर पोहोचवणे याकरीता ही विभागीय कार्यालये विशेष योगदान देत आहेत. या योजनाअंतर्गत जिल्हा स्तरावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा प्रशिक्षण वर्ग, ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन, ग्रंथालय व जनजागृती कार्यक्रम अर्थसहाय्य इत्यादी

कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. अशा उपक्रमातून जिल्हा स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणारी माहिती उपलब्ध झाल्याने प्रतिष्ठानकडील आर्थिक सहाय्यकरीता मागणी करणाऱ्या ग्रंथालयांच्या संख्येत वाढ तर झालीच आहे. शिवाय, या ग्रंथालयाव्दारे या प्रतिष्ठाच्या उपक्रमांचे आयोजनही अधिकाधिक दर्जेदार स्वरुपात केले जात आहे.

जिल्हा स्तरावर राबवण्यात येणारे ग्रंथोत्सव व त्यास मिळत असलेला प्रतिसाद हा समाधानकारक तर आहेच तसेच कार्यशाळातून चर्चिले जाणारे विषय हे ग्रामीण स्तरावरील ग्रंथालयांना आधुनिकीकरणाच्या नव्या युगात कार्यरत होण्यासाठी मार्गदर्शक ठरत आहे. अशा चर्चासत्रातून अनुदानाचे स्वरुप त्याचे वितरण अनुदानाच्या वितरणासंबंधी व विनियोगासंबंधी तयार करावयाची कागदपत्रे याबाबत ग्रामीण स्तरावर होणारे मार्गदर्शन प्रत्यक्ष विभागीय कार्यालयाच्या प्रतिनिधीच्याद्वारे करण्यात येत असल्याने स्थानिक स्तरावर ग्रामीण परीसरातील ग्रंथालय सेवक व कार्यकर्ते यांचे शंका निरसन होत असून यामुळे प्रतिष्ठानच्या योजनांची बजावणी अधिक सक्षमपणे होण्यास मदत होत आहे तसेच ग्रंथालयांच्या सक्षमीकरणास चालना मिळत आहे.

**राज्य ग्रंथालय नियोजन समिती (State Library Planning Committee) :**

प्रतिष्ठानच्या कामाकाजाच्या दृष्टीने सोय व्हावी व प्रतिष्ठानच्या योजनांची योग्यप्रकारे अंमलबजावणी व नियंत्रण करता यावे यासाठी राज्याच्या पातळीवर एक समिती नेमण्यात यावी असे प्रतिष्ठानचे निर्देश आहेत. या समितीचे अध्यक्ष राज्यातील ग्रंथालय सेवेचे नियंत्रण करणाऱ्या विभागाचे अधिकारी (महाराष्ट्रात उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव) असतात व नियंत्रण म्हणून राज्याच्या ग्रंथालय विभागाचे प्रमुख (महाराष्ट्रात ग्रंथालय संचालक) असतात. याशिवाय प्रतिष्ठानचे अध्यक्ष व संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला एक प्रतिनिधी, राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष किंवा सचिव आणि शिक्षणतज्ञ किंवा लेखक किंवा ग्रंथ निर्मिती प्रक्रियेमध्ये कार्य करणाऱ्या राज्यस्तरीय संघटनेचा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी या राज्य ग्रंथालय समितीत असतात. या समितीला सुरुवातीला राज्य ग्रंथालय समिती असे म्हटले जात होते. साधारणपणे सात ते आठ सदस्यांची समिती प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेशामध्ये सध्या

कार्यरत आहे. ही समिती पूर्णपणे नामनिर्देशित सदस्यांची असते. या राज्य ग्रंथालय समितीने प्रतिवर्षी किमान दोन सभा घेऊन पुढील काम करावे अशी प्रतिष्ठानची अपेक्षा आहे.

**राज्य ग्रंथालय नियोजन समितीची कामे,**

१) प्रतिष्ठानच्या योजनांना पूरक ठरेल अशा प्रकारचा ग्रंथालय सेवेच्या विकासाचा वार्षिक बृहद आराखडा तयार करणे.

२) राज्याचे अंशदान वेळेवर आणि योग्यप्रकारे प्रतिष्ठानकडे प्रदान केले जाईल अशी दक्षता घेणे व त्याप्रमाणे तितकेच अनुदान प्रतिष्ठानतर्फे मिळेल,अशी काळजी घेणे.

३) प्रतिष्ठानच्या मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यातील वाचकांच्या उपयोगी पडतील अशा ग्रथांची निवड करणे, लाभार्थी ग्रंथालयांची संख्या निश्चित करणे.

४) वेगवेगळ्या योजनांसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन योग्य त्या अर्थसहाय्यासाठी प्रतिष्ठानकडे अर्ज शिफारशी करणे.

५) प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याचा व इतर मदतीचा योग्यप्रकारे विनियोग होतो किंवा नाही याची खात्री करणे.

६) ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी पोषक कार्य करणे.

**प्रतिष्ठानची क्षेत्रीय कार्यालये :**

राज्य व केंद्रशासित प्रदेशामध्ये प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याचा प्रभाव व अंमलबजावणी याबाबतचे अवलोकन करण्यासाठी व राज्यस्तरीय समन्वयासाठी देशाच्या पाच भागात पुढीलप्रमाणे क्षेत्रीय कार्यालये स्थापन केली आहेत. या क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकाऱ्याला प्रतिष्ठानतर्फे दिल्या गेलेल्या सहाय्यामधून मिळालेली मालमत्ता व संबंधित अभिलेख तपासासाठी उपलब्ध करून देण्यात आले पाहिजे.

एखादे ग्रंथालय बंद पडल्याचा अहवाल या कार्यालयांमार्फत सादर झाल्यास प्रतिष्ठानच्या सहाय्यातून मिळालेली सर्व मालमत्ता ताब्यात घेण्याचा किंवा ही मालमत्ता ताब्यात घेऊन इतर ग्रंथालयास हस्तांतरीत करण्याचा अधिकार प्रतिष्ठानला आहे.

१) **पूर्व विभागाचे क्षेत्रीय कार्यालय –** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, ब्लॉक डीडी – ३४, सेक्टर – १, सॉल्ट लेक सिटी, कोलकात्ता ७०००६४ ( कार्यक्षेत्र पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड – ओरीसा, अंदमान आणि निकोबार बेट समूह)

२) **उत्तर विभागाचे क्षेत्रिय कार्यालय –** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, १३२, साऊथ पार्क अपार्टमेंट, कालकाजी, नवी दिल्ली ११००१९ ( कार्यक्षेत्र हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, पंजाब, राजस्थान, उत्तरप्रदेश, चंदीगड, दिल्ली)

३) **दक्षिण विभागाचे क्षेत्रीय कार्यालय – राजा राम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान –** एल. एल. ए. बिल्डींग अनेक्स, ७३५ अन्ना सलाई, तळ मजला, चेन्नई ६००००२ ( कार्यक्षेत्र – आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, लक्षव्दिप, पॉण्डेचरी)

४) **पश्चिम विभागाचे क्षेत्रीय कार्यालय –** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, व्दारा ग्रंथालय संचालक, नगर भवन, ५, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई – ४०००२३ ( कार्यक्षेत्र महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, दादरा व नगर हवेली, दिव, दमण)

५) **उत्तर–पूर्व विभागाचे क्षेत्रीय कार्यालय –** जिल्हा ग्रंथालय, गुवाहटी, ऍनॅक्स बिल्डींग, दिघीलीपूखूरी, अंबारी, कायरूप (एम), आसाम – ७८१००१. ( कार्यक्षेत्र – आसाम – अरूणाचलप्रदेश, मणीपूर, मेघालया, मीझोराम, नागालँड आणि त्रिपूरा)

**प्रतिष्ठानच्या विविध योजना :**

प्रतिष्ठाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी वेगवेगळ्या अर्थसहाय्याच्या योजना तयार करण्यात आल्या आहेत. या योजना दोन प्रकारच्या साधनावर आधारीत आहेत. या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या ग्रंथालयाने त्यापूर्वी घेतलेल्या अर्थसहाय्याचा खर्च केल्याबाबतची सर्व कागदपत्रे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्रांसह सादर केली असतील तरच दुसरा नवीन अर्ज विचारात घेतला जातो.

**समान निधी योजना :**

राज्य व केंद्रशासित प्रदेशांनी दिलेले अंशदान व प्रतिष्ठानतर्फे तितक्याच रकमेइतके अंशदान मिळून (५०:५०) उभारलेल्या समान निधीतून अर्थसहाय्य देण्याचा या योजना

आहेत. विकसित, विकसनशील व मागास राज्ये अशा तीन गटांमध्ये भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांची वर्गवारी केली जाते. विकसनशील राज्यांमध्ये राज्य शासनाने अंशदान ४०% व प्रतिष्ठानचे अंशदान ६०% असते. तर मागास राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये ग्रंथालय चळवळीचा प्रचार प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानचे अंशदान ९०% पर्यंत वाढवून मिळते. महाराष्ट्र राज्याचा विकसित राज्यांच्या गटात समावेश असल्याने राज्यशासनाचे अंशदान ५०% व प्रतिष्ठानचे अंशदान ५०% असे मिळून रु. ५००.०० लक्ष इतक्या निधीतून दरवर्षी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अर्थसहाय्य दिले जाते. महाराष्ट्र शासनातर्फे सध्या अंशदानासाठी रुपये २५०.०० लक्ष (रुपये दोन कोटी पन्नास लाख मात्र) तरतूद करण्यात येते. सलग दोन वर्षे अंशदायी योजनेचा वाटा राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या शासनाने उचलला नाही तर प्रतिष्ठानचा हिस्सा व्यापंगत होतो. राज्य व केंद्रशासित प्रदेशातील शासनाने या योजनांसाठी केलेल्या खर्चासाठी (यात आकस्मिक खर्च, ग्रंथ वितरणाचा खर्च यांचा समावेश होतो) एकूण ग्रंथ खरेदीच्या मूळ किमतीच्या ५७ ऑपरेशनल चार्जेस म्हणून प्रतिष्ठानतर्फे देण्यात येतात.

**असमान निधी योजना :**

या योजनांसाठी अर्थसहाय्य देताना प्रतिष्ठानकडून काही योजनांसाठी १००७ अर्थसहाय्याचा लाभ दिला जातो. इमारत बांधकाम व विस्तार यासाठी ७५:२५ प्रमाणात अर्थसहाय्य निधी उपलब्धतेच्या अधीन राहून दिले जाते. *(स्त्रोतः प्रतिष्ठान पुस्तिका)*

## ४.२४ राष्ट्रीय ज्ञान आयोग भारतीय ग्रंथालय व माहितीशास्त्रविषयक धोरण राष्ट्रीय ज्ञान आयोग

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या सर्व क्षेत्रात विशेषत: शिक्षणाचा विकास वेगाने झाला. साधारणपणे १९६० ते १९७० या काळात पारंपारिक शिक्षण १९७० ते १९८५ या काळात व्यावसायिक शिक्षण व १९८५ नंतर इलेक्ट्रॉनिक, संगणक व माहिती संप्रेषण तंत्रज्ञान शिक्षणाचा विकास झाला. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत भारतीयांना अनेक नवीन संधी निर्माण झाल्या. डॉ. अरुण निगवेकर यांच्या मते–

'India has contributed value added human power to the world, particulary in the last decade, which has given us new identity.'

'ज्ञान निर्मितीची' क्षमता असलेला देश अशी नवी ओळख भारताला प्राप्त झाली आहे. कारण एकविसाव्या शतकात ज्ञान हेच भांडवल असून ज्ञानातून संपत्ती निर्माण करण्याची क्षमता फक्त शिक्षण व संशोधनात आहे. अमेरिकन विद्यापीठे विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात तर जपानी विद्यापीठे संशोधनात अग्रेसर आहेत.

विज्ञान तंत्रज्ञान व संशोधनामुळे हे दोन देश जगात अग्रेसर आहेत. विकासाच्या मार्गावर असलेल्या आपल्या देशात ज्ञानधिष्ठीत समाज निर्मितीसाठी राष्ट्रीय स्तरावर दूरगामी व एकमुखी नियोजनाची गरज ओळखून राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय ज्ञान आयोग म्हणजे पंतप्रधानांचे उच्चस्तरीय सल्लागार मंडळ असून ज्ञानधिष्ठीत समाज व अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या हेतूसाठी या आयोगाची निर्मिती करण्यात आली.

**ज्ञान आयोगाची गरज :**

एकविसावे शतक हे ज्ञान पुनरुज्जीवनचे शतक आहे. या ज्ञानधिष्ठीत शतकात ज्ञानातून संपत्ती निर्माण करण्याच्या क्षमतेला फार महत्व आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर विसाव्या शतकाच्या उतरार्धात विज्ञान तंत्रज्ञान, संगणक व माहिती तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन बदलून गेले. जागतिकीकरणामुळे भारतासारख्या विकसनशील देशात शिक्षण, ज्ञान, ज्ञानापासून संपत्तीची निर्मिती व अर्थकारण यांचे नवीन संदर्भ बदलत आहे. ज्ञानाचे

संसाधन म्हणून उपयोग करण्याची क्षमता ज्या देशात आहे तोच देश जागतिक स्पर्धेत टिकू शकतो.

भारतात नजीकच्या दशकात जगातील सर्वाधिक तरुण मनुष्यबळाचे संसाधन निर्माण होणार आहे. त्यामुळे येणाऱ्या संधीचा योग्य उपयोग करुन ज्ञानाधिष्ठीत समाजाची जागतिक आव्हाने पेलण्यासाठी नियोजनात्मक कार्यक्रमाची गरज होती. भारतात विविध शैक्षणिक स्तर व्यावसायिक शिक्षण ग्रामीण व सामाजिक विकासासाठी वेगवेगळी मंडळे अस्तित्वात आहेत. त्यांची कार्यक्षेत्रही वेगवेगळी आहेत. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर एकमुखी व दूरगामी नियोजनाची गरज ओळखून डॉ. मनमोहन सिंग यांनी दि. १३/०६/२००५ रोजी राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना केली. डॉ. सॅम पित्रोदा हे या आयोगाचे अध्यक्ष असून विविध क्षेत्रातीत एकूण सात तज्ञ व्यक्ती या समितीच्या सदस्य आहेत. तीन वर्षाचा कार्यकाल असलेल्या या समितीने आपला अहवाल व शिफारसी पंतप्रधानांना सादर केला आहे.

**ज्ञान आयोगाची उद्दिष्टे :**

ज्ञानाधिष्ठीत समाज निर्मिती हे ज्ञान आयोगाचे प्रमुख उद्दिष्ट असून ज्ञान संकल्पना (Knowledge Concept), ज्ञान निर्मिती (Knowledge Creation), ज्ञान प्राप्तीत सुलभता (Acess to Knowledge), ज्ञानाचे उपयोजन (Knowledge Application) व उत्तम ज्ञानसेवांचा विकास (Delivery of Services) या पाच मूलतत्वांवर आधारीत ज्ञान आयोगाकडे पुढील कार्ये सोपविण्यात आली.

१. ज्ञान निर्मितीचे नवीन मार्ग शोधणे.
२. ज्ञान निर्मितीत सामाजिक सहभाग वाढविणे.
३. समाजातील सर्व स्तरांत ज्ञान उपलब्ध करणे.
४. सशक्त शिक्षण व्यवस्थेसाठी नवीन संस्था निर्माण करणे.
५. संशोधनास चालना देणे.
६. आरोग्य, शिक्षण, कृषी, पाणी, उर्जा व उद्योग या क्षेत्रांत ज्ञानाचे उपयोजन सुलभ करणे.
७. सक्षम प्रशासन व संपर्क व्यवस्थेसाठी माहिती व संप्रेषण साधनांचा उपयोग करणे.

या कार्यासाठी ज्ञान आयोगाने सर्वात प्रथम शिक्षणाचा हक्क भाषा माध्यम भाषांतर कार्य ग्रंथालय ज्ञान साधनाचे राष्ट्रीय जाळे व उपग्रहीय ज्ञान मार्ग (Portal) या सहा क्षेत्रांचा विकास आवश्यक मानून त्यासाठी कार्यगट स्थापन करण्यात आले. या कार्यगटाच्या अहवालाच्या आधारे राष्ट्रीय ज्ञान आयोगाने आपल्या शिफारशी केंद्र सरकारला सादर केल्या आहेत. सध्या ज्ञान आयोगाचा प्रस्ताव केंद्र व राज्य सरकारच्या विचाराधीन असून राजस्थान ओरीसा व आंध्र या राज्यांमध्ये कृतिकार्यक्रमाची रुपरेषा तयार करण्यासाठी विभागावर मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. तसेच राष्ट्रीय ज्ञान जाळे (NKN) राष्ट्रीय नमुना पहाणी कार्यालय (NSSO) ई गर्व्हन्स प्रोजेक्ट (NeGP), इ. व्दारे आयोगाच्या काही शिफारशींची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

**ग्रंथालय कार्यगट :**

ग्रंथालयासाठी दिल्ली येथील सचिवालय ग्रंथालयाच्या माजी संचालक श्रीमती कल्पना दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यगट नियुक्त केला. सोपविलेले कार्य वेळेत पूर्ण करण्यासाठी या गटाने आणखी चार विशेष समित्यांची नियुक्ती केली. कार्यगट व विशेष समित्यांनी भारतातील ग्रंथालयांची पाहणी करुन ग्रंथालय क्षेत्राचा अहवाल व शिफारशी राष्ट्रीय ज्ञान आयोगाकडे सादर करण्याचे कार्य सोपविण्यात आले. कारण राष्ट्रीय आयोगाने स्विकारलेल्या पंचसूत्रीपैकी ज्ञानप्राप्तीची सुलभता (Acess to Knowledge) या सूत्राचा अवलंब करण्यासाठी ग्रंथालये दोन प्रकारची कार्य करु शकतात. पहिले स्थानिक पातळीवरील ज्ञान व माहिती केंद्रे व दुसरे राष्ट्रीय व वैश्विक ज्ञान प्राप्तीचे मार्ग हे होत. माहिती साधन व माहिती निर्धन या दोन समाजगटासाठी ग्रंथालये समान स्तरावर माहिती सेवा देऊ शकतात. त्यामुळे राष्ट्रीय ज्ञान आयोगाने पुढील कार्ये गटाकडे सोपविली.

१. ग्रंथालयाची उद्दिष्टे नव्याने ठरविणे.

२. ग्रंथालयाच्या समस्या व आव्हाने जाणून घेणे.

३. ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासाठी बदल सुचविणे.

४. आधुनिक माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाव्दारे ग्रंथालय सेवा सुधारणे.

५. माहिती साधन व माहिती निर्धन या दोन समाजगटातील अंतर कमी करण्यासाठी नवीन उपक्रमाची शक्यता तपासणे.

६. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणात गुणवत्ता निर्माण करण्याचे मार्ग शोधणे व कार्यरत व्यावसायिकांसाठी उजळणी वर्गाची व्यवस्था करणे.

७. ग्रंथातील सांस्कृतिक व स्वदेशी ठेवा जतन करण्यासाठी सुविधा निर्माण करणे.

८. ज्ञानाचे उपार्जन व उपयोजन सुलभ करण्यासाठी योग्य व पुरेशी यंत्रणा निर्माण करणे.

९. ग्रंथालयाबाबतच्या इतर घटकांचा विचार करणे.

ही कार्ये करण्यासाठी ग्रंथालय कार्यगट व विशेष समित्यांनी ग्रंथालय व्यावसायिकांशी प्रत्यक्ष चर्चा, भेटी व पत्रव्यवहाराव्दारे ग्रंथालयाचा दर्जा, संभाव्य क्षमता व वस्तुस्थितीचा अभ्यास करुन ग्रंथालयासंबंधीचा अहवाल राष्ट्रीय ज्ञान आयोगास सादर केला. या अहवालाच्या आधारे राष्ट्रीय ज्ञान आयोगाने ग्रंथालयासंबंधीच्या शिफारशी पंतप्रधानांकडे सादर केल्या आहेत.

**ज्ञानसंसाधन केंद्र :**

ज्ञानाची निर्मिती वितरण व जतन करण्यासाठी ग्रंथालये आवश्यक आहेत. विषमतामुक्त समाजमध्ये रुपांतर करण्यासाठी ग्रंथालये महत्वपूर्ण भूमिका बजावतात. राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या दृष्टीने ग्रंथालये म्हणजे ज्ञान भांडारे होत. या ज्ञान भांडाराचे भवितव्य केवळ ज्ञानाचे संकलन, साठवण व पुनर्वापर एवढ्यापुरते मर्यादित नसून ज्ञानाची शुध्दीकरण प्रक्रिया यावर अवलंबून आहे. त्यामुळेच महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०११ मध्ये ग्रंथालयांना 'ज्ञान संसाधन केंद्र' असे म्हटले आहे. या ज्ञान संसाधन केंद्रामधील ज्ञानाचा व कौशल्याचा लाभ पूर्ण क्षमतेने होण्यासाठी नवीन माहिती संप्रेषण तंत्र, प्रशिक्षित ज्ञान व्यवस्थापक व एक सुनियंत्रित प्रणालीची गरज आहे.

**ग्रंथालयाचे कार्य :**

ज्ञानाधारीत अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी ग्रंथालयाचे कार्य महत्वाचे आहे. समाजातील सर्व स्तरापर्यंत ज्ञान व माहिती अधिकार उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रंथालय हा उतम मार्ग आहे. तसेच शिक्षण व्यवस्था सशक्त करण्यासाठी व संशोधनास पूरक

म्हणूनही ग्रंथालयाचे कार्य महत्वाचे आहे. राष्ट्रीय स्तरावर प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विविध प्रकारच्या माहितीची गरज भासते. त्यामुळे आरोग्य, शिक्षण, कृषी, उद्योग, उर्जा, पाणी या लक्ष्यक्षेत्रात या माहितीचे उपयोजन करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व संप्रेषण साधनांची आवश्यकता असते. ग्रंथालयाच्या माध्यमातून संशोधन व ज्ञानाच्या निर्मिती कार्यास चालना मिळते.

**ग्रंथालयांची सद्यस्थिती :**

भारतात सध्या ग्रंथालय हा विषय राज्याच्या अखत्यारीत असल्यामुळे या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर एकवाक्यता व समन्वय नाही. भारतातील सर्व प्रकारच्या ग्रंथालयांची अधिकृत व एकसंघ माहिती उपलब्ध नाही. राष्ट्रीय स्तरावर ग्रंथालयांचे नेतृत्व करणारी संस्था नसल्यामुळे या क्षेत्रातील शिक्षण, प्रशिक्षण व संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी मार्गदर्शनाची गरज आहे. तसेच प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता मध्यवर्ती ग्रंथालय निधी, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचे उपयोजन सामाजिक सहभाग व खाजगी संग्रहाची देखभाल इत्यादींसाठी राष्ट्रीय स्तरावर एकसूत्रता असणे आवश्यक आहे. ग्रंथ व अन्य माहिती साधनांमध्ये उपलब्ध असलेल्या स्वदेशी व प्राचीन ज्ञानाचे जतन व संग्रह करण्यासाठी ग्रंथालय या संस्थेचा सर्वांगीण विकास करणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्ञान आयोगाने ग्रंथालय प्रस्तावात म्हटले आहे की,

"There is urgent need for reform in the Libraries and information service sector."

**ग्रंथालया विषयी शिफारशी :**

ग्रंथालय क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी राष्ट्रीय ज्ञान आयागाने दहा शिफारशी केल्या आहेत व या शिफारशी अमलात आणण्याचे मार्गही सुचविले आहे.

१. ग्रंथालयासाठी राष्ट्रीय आयोग स्थापना करणे.
२. देशातील सर्व ग्रंथालयांची मोजदाद करणे.
३. ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन सुविधामध्ये सुधारणा करणे.
४. ग्रंथालयासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाचा आढावा घेणे.
५. केंद्रीय ग्रंथालय निधी निर्माण करणे.

६. ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करणे.
७. ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सामाजिक सहभागास प्रोत्साहन देणे.
८. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या ग्रंथालयातील उपयोजनास चालना देणे.
९. खाजगी वाचन साहित्य संग्रहाची देखभाल करणे.
१०. ग्रंथालय आणि माहिती सेवा विकसित करण्यासाठी सार्वजनिक या खाजगी क्षेत्राच्या भागीदारीत्वास चालना देणे.

या दहा प्रमुख शिफारशींची सविस्तर माहिती अहवालातील परिशिष्ट ५ मध्ये देण्यात आली आहे.

**ग्रंथालय विकासाची गरज :**

भारतात डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथपालनाची तत्वे व ज्ञान व्यवस्थापनाची तंत्रे विकसित करुन ग्रंथालयास शासकीय आधार मिळविण्याचे प्रयत्न केले आहेत. तसेच U.G.C. माध्यमातून ग्रंथालयाच्या विकासाचे प्रयत्न शासनाने केले आहे. परंतु सध्या ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रातील संशोधनाची संख्या मर्यादित आहे. भारतातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विविधतेचा विचार करुन जागतिक घडामोडीबरोबर संतुलन ठेवणे आवश्यक आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत ग्रंथालयीन सेवा साधने व तंत्रज्ञान यांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. ग्रंथालय क्षेत्राबाबत राष्ट्रीय स्तरावर एकसूत्रता व गुणवत्ता राखण्यासाठी राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या शिफारशी तीन प्रकारच्या आहेत. ग्रंथालय विकासासाठी संस्थांची निर्मिती, प्रस्थापित व्यवस्थेत सुधारणा व बाह्यस्त्रोतांची मदत या तीन पध्दतीने ग्रंथालय क्षेत्राचा विकास अपेक्षीत आहे.

**ग्रंथालय विकास :**

ग्रंथालयाच्या माध्यमातून ज्ञान निर्मितीचे नवीन मार्ग, ग्रंथालयाचे सक्षम प्रशासन व सशक्त शिक्षण संस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आयोगाने पुढील सूचना केल्या आहेत. ग्रंथालयाच्या विकासासाठी राष्ट्रीय ग्रंथालय आयोग, राष्ट्रीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संस्था व ग्रंथालय सेवकांसाठी आकृतीबंध या तीन बाबी आवश्यक आहेत.

**अ) राष्ट्रीय ग्रंथालय आयोग स्थापन करणे –** भारतातील सर्व ग्रंथालयात समन्वय, समान मार्गदर्शन व नियंत्रण ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एका शिखर संस्थेची गरज आहे. त्यासाठी प्रथम तीन वर्षांसाठी राष्ट्रीय ग्रंथालय मंडळाची स्थापना करुन पुढे या मंडळाचे कायमस्वरुपी राष्ट्रीय ग्रंथालय आयोगात रुपांतर करावे. या आयोगाने राष्ट्रीय स्तरावर सर्व प्रकारची ग्रंथालये व ग्रंथालयीन कार्ये सेवा संग्रह, तांत्रिक प्रक्रिया प्रशिक्षण इ. ची प्रामाणके तयार करावीत. सार्वजनिक व खाजगी ग्रंथालय विकासासाठी यंत्रणा निर्माण करावी. ग्रंथालय संशोधन व विकास माहिती सेवांचा दर्जा, ग्रंथ व ग्रंथेत्तर प्रकाशने इ. बाबत सुधारात्मक उपाययोजना करावी. तसेच शासनाला ग्रंथालय क्षेत्राबाबत सल्ला व मार्गदर्शन करावे.

ग्रंथालय क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान असलेल्या तज्ञ व विश्वासार्ह व्यक्तींची नेमणूक या आयोगाच्या प्रमुख पदासाठी करण्यात यावी. ग्रंथालयासाठी उपलब्ध केलेल्या निधीचे व्यवस्थापन, शैक्षणिक ग्रंथालय सेवकांचा आकृतिबंध, खाजगी वाचन साहित्य संग्रहाच्या देखभालीसाठी ग्रंथालय मंडळ इ. बाबींचे नियोजन करावे. राष्ट्रीय स्तरावर सर्व प्रकारच्या ग्रंथालयांचे नियंत्रण करणारे हे आयोग असावे. परिशिष्ट एकमध्ये राष्ट्रीय ग्रंथालय आयोगाची निर्मिती व कार्ये सविस्तर दिली आहेत.

**आ) राष्ट्रीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संस्था स्थापन करणे –** ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रातील बदलांचा व नावीन्यीकरणाचा प्रचंड वेग लक्षात घेता या क्षेत्रात संशोधन व विकास या उपक्रमाची गरज असते. जागतिक पातळीवर ग्रंथालय क्षेत्रातील संशोधनाचे उपयोजन इंटरनेटवरील माहिती रचनेसाठी केला जात आहे. तसेच संशोधनातून निर्माण झालेल्या तंत्र व साधनांचा परिणामकारक उपयोग होण्यासाठी योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षणाची गरज आहे. त्यामुळे ग्रंथालय क्षेत्रातील शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन व विकास यासाठी राष्ट्रीय स्तरावर ग्रंथालय माहितीशास्त्र संस्था स्थापन करावी. या प्रस्तावित संस्थेने ग्रंथालयीन व्यावसायिकांसाठी प्रशिक्षण, निरंतर शिक्षण व प्रशिक्षकासाठी प्रशिक्षणाचे उपक्रम व ग्रंथालय क्षेत्रातील संशोधन व विकासाचे उपक्रम राबवावेत. प्रस्तावित संस्थेतील माहिती शास्त्रज्ञ संशोधनासह बाह्य संस्थेचे प्रायोजित

उपक्रम राबवतील व इतर संस्थांना सल्ला – सेवा देतील तसेच सर्व प्रकारच्या माध्यमांव्दारे संशोधनाचे निष्कर्ष प्रसारीत करतील. अशा प्रकारे ही संस्था ग्रंथालय व्यावसायिकांचे नेतृत्व करणारी असावी असे अपेक्षित आहे. या संस्थेचे पालकत्व सांस्कृतिक मंत्रालयाकडे असावे अशी सूचनाही दिलेली आहे.

परिशिष्ट दोनमध्ये राष्ट्रीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संस्थेची निर्मिती व कार्ये सविस्तर दिली आहेत.

**इ) ग्रंथालय सेवकांसाठी आकृतिबंध निश्चित करणे –** राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या दृष्टीने भारतातील सर्वाधिक तरुण मनुष्यबळ हेच ज्ञाननिर्मितीचे प्रमुख स्त्रोत असून त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे सदस्य श्री. नंदन निलकेणी यांच्या मते – "Our human capital needs to be empowered.... they need access to markets and jobs."

राष्ट्रीय ज्ञान आयोगाने कार्यगटाकडे सोपविलेल्या ग्रंथालयीन मनुष्यबळाचा राष्ट्रीय स्तरावर आढावा घेऊन मनुष्यबळाची आवश्यकता व आकृतीबंध निश्चित करावा अशी शिफारस केली आहे. राष्ट्रीय ज्ञान आयोगाने सार्वजनिक ग्रंथालयाचा आकृतिबंध एका परिशिष्टात सविस्तर दिला आहे. तर राष्ट्रीय शैक्षणिक व विशेष ग्रंथालयाच्या मातृसंस्थानी तो निश्चित करण्याचे याच परिशिष्टात नमूद केले आहे.

सार्वजनिक ग्रंथालयाच्या विविध स्तरानुसार वेगवेगळा आकृतिबंध सुचविला असून सेवकांची वर्गवारी चार गटांत केली आहे. तसेच चार ते सहा ग्रंथालयामध्ये समन्वय साधण्यासाठी एक माहिती अधिकारी असावा अशी सूचना केली आहे. परिशिष्ट तीनमध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचा आकृतिबंध व कार्यानुसार वर्गवारी सविस्तर दिलेली आहे. तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम विभागाचाही आकृतिबंध दिलेला आहे.

**ग्रंथालय सुधारणा करणे :**

समाजातील सर्व स्तरांत व लक्ष्यक्षेत्रात ज्ञानाचे उपयोजन माहिती संप्रेषण साधनांव्दारे सुलभ करणे, ज्ञाननिर्मितीसाठी सामजिक सहभाग वाढविणे, ग्रंथालयांची मोजदाद करणे या उद्दिष्टपूर्तीसाठी आयोगाने पुढील सूचना केल्या आहेत.

**अ) ग्रंथालय स्वस्थापनाचे आधुनिकीकरण करणे –** ग्रंथालयीन साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी ग्रंथालयाने प्रथमत: वाचनसाहित्य देवघेव, अभ्यासिका, संदर्भसेवा, इंटरनेट या चार सेवा विनामूल्य द्याव्यात. याशिवाय ग्रंथालय सनद ग्रंथालय जाळे निर्मिती सूचीय नोंदीचा राष्ट्रीय संग्रह व इतर पूरक सेवा अत्यावश्यक केल्या जाव्यात. ग्रंथालय सनदमध्ये ग्रंथालयीन सेवाचे आश्वासन यांचा समावेश करण्यात यावा. ग्रंथालय सनदचा नमुना परिशिष्टामध्ये दिलेला आहे.

ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणासाठी वाचनसाहित्य संग्रह विकास, ग्रंथालयीन सेवा, संग्रह व सेवांचे मूल्यमापन, ग्रंथालयाचे नेटवर्किंग, शोधसुविधा, सूचीय नोंदीचा राष्ट्रीय संग्रह, पायाभूत सुविधा, मानवी संसाधन विकास इ. बाबींचे तपशिलासह मार्गदर्शन शिफारशीमध्ये केलेले आहे व परिशिष्ठ चार मध्ये सविस्तर तपशील दिला आहे.

**आ) खाजगी व वैयक्तिक वाचनसाहित्य संग्रहाची देखभाल करणे –** देशामध्ये खाजगी व व्यक्तिगत वाचनसाहित्य संग्रहाचे जतन करण्यासाठी कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही. राष्ट्रीय ज्ञान आयोगाने तज्ञांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी. त्यासाठी दहा प्रादेशिक केंद्रे स्थापन करावीत अशी सूचना आयोगाने केली आहे. खाजगी संग्रहातील सांस्कृतिक, वारसात्मक, ऐतिहासिक, दुर्मिळ ग्रंथ, पत्र दैनंदिनी, दस्तऐवज साधने यांची वर्गवारी तयार करून त्यांची नोंद व जतन करणेसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी. तसेच खाजगी वाचनसाहित्य संग्रहासाठी मार्गदर्शक तत्वे विकसित करावी अशी शिफारस आयोगाने केली आहे.

**इ) ग्रंथालयांची मोजदाद करणे** – देशातील ग्रंथालयांची साख्यिकीय माहिती अधिकृत व एकसंघपणे उपलब्ध नसल्यामुळे भारत सरकारच्या सांस्कृतिक गटाने एक कृतिगट स्थापन करुन ग्रंथालयाची मोजदाद एक वर्षात करावी. तसेच राष्ट्रीय स्तरावर नमुना पाहणीव्दारे वाचक गरजा व अभिरुचीचे सर्वेक्षण करावे. त्यामुळे ग्रंथालय सेवामध्ये सुधारणा करणे, नियोजन करणे व धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी या माहितीचा उपयोग होणार आहे.

**बाह्य स्त्रोतांची मदत :**

ग्रंथालयांसाठी स्वतंत्र निधी, समाजिक सहभाग व ग्रंथालयीन कामासाठी बाह्य स्त्रोतांची मदत इ. घटकांव्दारे ग्रंथालय विकासाच्या शिफारशी स्वतंत्रपणे दिलेल्या आहेत.

अ) **ग्रंथालय निधी निर्माण करणे –** ग्रंथालय क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी केंद्रीय निधीची गरज आहे. ग्रंथालयासाठी राष्ट्रीय स्तरावर केंद्र सरकार व उद्योजक यांच्यामार्फत समसमान प्रमाणात प्रत्येकी १०० कोटींचा निधी उपलब्ध करावा. तसुेच केंद्र व राज्य सरकारच्या एकूण अनुदानापैकी निश्चित रक्कम ग्रंथालयासाठी ठेवली जावी. या निधीचे व्यवस्थापन राष्ट्रीय ग्रंथालय आयोगाने करावे.

आ) **सामाजिक सहभाग वाढविणे –** राष्ट्रीय ते ग्रामीण स्तरापर्यंत सर्व प्रकारच्या राजकीय, सामाजिक व सार्वजनिक घटकांचा समावेश ग्रंथालय व्यवस्थापन करण्यात यावा अशी शिफारस आयोगाने केली आहे. ग्रंथालय  व्यवस्थापन व निर्णय प्रक्रियेत समाजातील नागरिकांना सहभागी करुन घ्यावे. तसेच ग्राम ग्रंथालये व स्थानिक माहिती केंद्रे पंचायत समिती मार्फत निर्माण करण्यात यावीत. विशेषत: सार्वजनिक ग्रंथालये स्थानिक नागरिकांनीच चालवावीत.

इ) **खाजगी संस्थांची मदत घेणे –** मानव कल्यारासाठी कार्यरत असणाऱ्या सामाजिक संस्था, कारखानदार व इतर खाजगी संस्थांनी ग्रंथालय विकासासाठी एकत्रितपणे मदत करावी. तसेच ग्रंथालयाचा सेवा व दर्जा सुधारण्यासाठी सार्वजनिक व खाजगी भागीदारीस प्रोत्साहन द्यावे अशी शिफारस ज्ञान आयोगाने केलेली आहे.

**ग्रंथालयीन कृतिकार्यक्रम :**

राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या ग्रंथालयसाठी केलेल्या या सर्व शिफारशीच्या कार्यवाहीचा मसुदा ठरविण्यासाठी दिल्ली येथे "Libraries on Agenda" या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांत राष्ट्रीय ते ग्रामीण स्तरावर राजकीय, सामाजिक, सार्वजनिक व खाजगी घटकांची भूमिका, जबाबदारी व कार्यपध्दती निश्चित करण्यात आली. राष्ट्रीय ग्रंथालय आयोगाची रचना व कार्ये, कृतिकार्यक्रम, ग्रंथालय सुविधेची व्यापारी तत्वाची नवी भूमिका व कार्य प्रसाराची दिशा याबाबत चर्चा व अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय स्तरावरील कायक्रमांचे नियोजन करण्यात आले.

ग्रंथालय प्रसारासाठी निश्चित केलेली खालील घोषवाक्ये हे या चर्चासत्राचे विशेष व महत्वपूर्ण फलीत होय.

1. Libraries : a Key to Prosperity — ग्रंथालये : संपन्नतेची गुरूकिल्ली
2. Roots to Research — संशोधनाचे माग
3. READ India — भारत वाचा
4. For Each Village a Library — गाव तेथे ग्रंथालय
5. No School without a Library. — ग्रंथालयाशिवाय शाळा नाही.

या घोषवाक्यात समाजाचा विकास म्हणजेच समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतेचा विकास व त्यासाठी ज्ञान ही मूलभूत गरज तर ग्रंथालये म्हणजे ज्ञानप्राप्तीची पर्यायाने सामाजिक विकासाची गुरुकिल्ली (Key to Prosperity) मानलेली आहे. त्यासाठी ग्रंथालयाच्या माध्यमातून आवश्यक असलेल्या मूलभूत सेवा ते संशोधनासाठी (Root to Research) उत्तम ज्ञानसेवांचा विकास करणे आवश्यक मानले आहे. समाजातील सर्व स्तरांत ज्ञानाचे संप्रेषण (Reach) प्रत्येक समाजघटकांचे सशक्तीकरण (Empower) त्यासाठी ज्ञानसेवांचे उत्तम व्यवस्थापन (Administer) याव्दारे समाजाचा सर्वांगीण विकास (Development) साधण्यासाठी इ. स. २०२० पर्यंत प्रत्येक गावात व प्रत्येक शाळेत ग्रंथालये स्थापन करण्याची रुपरेषा तयार करण्यात आली. तसेच प्रत्येक वर्षी किमान १०% उद्दिष्टपूर्तीचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. या घोषवाक्यात ग्रंथालयाचे धोरण सामावलेले आहे असे म्हणणे संयुक्तिक होईल.

**समारोप :**

राष्ट्रीय ज्ञान आयोगाने ग्रंथालयासाठी केलेल्या या सर्व शिफारशी प्रामुख्याने ज्ञान प्राप्तीत सुलभता (Access to Knowledge) या एका क्षेत्रांतर्गत केलेल्या असल्या तरी या शिफारशींच्या माध्यमातून ज्ञानाची निर्मिती ज्ञानाचे उपयोजन व उत्तम ज्ञानसेवांचा विकासही शक्य झाला आहे.

राष्ट्रीय ग्रंथालय आयोग व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संस्थेची निर्मिती यामुळे शिक्षण व्यवस्था सबळ होऊन संशोधनास चालना मिळते. ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणामुळे

माहिती संप्रेषण व्यवस्था प्रभावी होते. समाजातील सर्व स्तरापर्यंत ज्ञानाचे मार्ग खुले होतात. प्रशासनाची कार्यक्षमता वाढते. स्थानिक पातळीवर सामाजिक सहयोगातून ग्रंथालयाची निर्मिती होऊन स्थानिक माहिती पध्दती विकसित होते. खाजगी वाचन साहित्याची राष्ट्रीय स्तरावर नोंद केल्यामुळे ज्ञान निर्मिती कार्यात समाजाचे योगदान वाढू शकते. राष्ट्रीय स्तरावर ग्रंथालय निधी व ग्रंथालय निर्मिती कार्यात सार्वजनिक संस्था, कारखानदार इ. चा सहभाग वाढतो. अशाप्रकारे ग्रंथालयाच्या शिफारशींच्या माध्यमातून ज्ञानधिष्ठित समाज निर्मितीचा राष्ट्रीय ज्ञान आयोगाचा हेतू सफल होण्यास मदत होऊ शकते.

राष्ट्रीय ग्रंथालय आयोग भारतातील विविध राज्यांशी संपर्कात असून अनेक राज्यांनी आराखडे तयार केले आहेत.भारतातील लोकशाही शासन व्यवस्थेमुळे धोरणांची अंमलबजावणी करण्यात विलंब होत असला तरी जागतिक स्पर्धेत गुणवत्ता निर्माण करण्यासाठी ग्रंथालय क्षेत्राचा विकास अपरिहार्य आहे.

*(स्त्रोत : Gov. of India (2009) Report of National knowledge Commission)*

**राष्ट्रीय ज्ञान आयोग : एक दृष्टीक्षेप :**

**सारांश :**

२१ व्या शतकाला अपेक्षित असणारा ज्ञानाधिष्टीत समाज निर्माण करण्यासाठी आणि त्याव्दारे आपल्या गावाचा, राज्याचा, राष्ट्राचा, साऱ्या विश्वाचा व पर्यायाने मानव समूहाचा विकास साधण्यासाठी ज्ञानभांडाराची म्हणजेच ग्रंथालयाची समृध्दता आणि सबलता ही अत्यंत आवश्यक बाब आहे. ग्रंथालयाव्दारे माहितीची सहज उपलब्धता होऊ शकते ही बाब सर्वमान्य झाली आहे. जगभर माहितीचा परिस्फोट आणि सर्व पातळ्यांवरील व्यवहारांचे जागतिकीकरण होत आहे. त्यासाठी संगणक, इंटरनेट आणि ई–मेल या अत्याधुनिक, शक्तीशाली व गतीमान माहिती तंत्रज्ञानाचा माहिती क्षेत्रातील वापर वाढत चालला आहे. आजची सारी अर्थव्यवस्था ज्ञानाधिष्ठीत स्वरुपाची झालेली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने दूरसंचार क्षेत्रातील नावाजलेले तज्ज्ञ डॉ. सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय ज्ञान आयोग (National Knowledge Commission) नेमला होता. भारतातील माहितीचे मुख्य स्त्रोत असणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयाना उर्जिताव्यवस्था प्राप्त करुन देण्यासाठी

विविध उपाययोजना सुचविणे हा आयोगाकडे सोपविलेल्या कामाचा एक भाग होता. भारतातील ५४००० सार्वजनिक ग्रंथालयासंबंधित आणि त्यांच्या सेवा विकसित करण्यासाठी या अहवालात महत्वाच्या दहा शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) ग्रंथालयासाठी राष्ट्रीय ग्रंथालय अभियान राबविणे आणि त्याचे तीन वर्षानंतर राष्ट्रीय ग्रंथालय आयोगामध्ये परीवर्तन करणे.

२) देशातील ग्रंथालयाची मोजदाद करणे, त्यासाठी आर्थिक व प्रशासकीय व्यवस्था करणे.

३) ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन सुविधांमध्ये सुधारणा करणे

४) ग्रंथालयांना हव्या असणाऱ्या मनुष्यबळाचा आढावा घेणे.

५) रुपये १००० कोटींचा केंद्रीय विकास निधी निर्माण करणे.

६) ग्रंथालय व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करणे.

७) ग्रंथालय व्यवस्थापनातील समजाच्या मोठ्या सहभागास प्रोत्साहन देणे.

८) सर्व ग्रंथालयातील माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या उपयोगास चालना देणे.

९) खाजगी वाचनसाहित्य संग्रहाची देखभाल करणे त्यासाठी देणगी उपलब्ध करुन देणे.

१०) ग्रंथालय व माहिती सेवा विकसित करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारीस प्रोत्साहन देणे.

या शिफारशीच्या अंमलबजावणीस अकराव्या पंचवार्षिक योजनेपासून भारत सरकारने सुरुवात केली आहे. त्यासाठी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान मध्यवर्ती यंत्रणेकडे जबाबदारी देण्यात आली आहे.

**राष्ट्रीय ग्रंथालय अभियानाची माहिती :**

राष्ट्रीय ज्ञान आयोगाने सुचविल्याप्रमाणे भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने त्यांचे परिपत्रक क्रमांक १८/०४/ २००९ एलआयबी (पीटी) दिनांक ४ मे २०१२ अन्वये एक उच्चस्तरीय समिती राष्ट्रीय ग्रंथालय अभियान या नावाने गठीत केली. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाअंतर्गत देशातील ग्रंथालयांचा शाश्वत विकास करण्यासाठी हे अभियान कार्यान्वित करण्यात आले. या उच्चस्तरीय समितीच्या विविध बैठका झाल्या. या बैठकांमधील

चर्चेनुसार नागरिकांना सेवा देणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांच्या उन्नतीसाठी पुढील क्षेत्रात काम करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार कोलकाता येथे दिनांक ३ फेब्रुवारी २०१४ रोजी या प्रकल्पाचे औपचारिक, उद्‌घाटन राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांचे हस्ते करण्यात आले. यासाठी प्रशासकीय, तार्किकता, नियोजन आणि अंदाजपत्रकीय उद्दिष्टासाठी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान मध्यवर्ती यंत्रणेची मदत देण्यात आली आहे.

### ४.२५ राष्ट्रीय ग्रंथालय मिशनच्या योजनांची माहिती :

### १) भारतीय राष्ट्रीय आभासी पुस्तकालय : :

समाजाच्या विभिन्न क्षेत्रातील डिजिटल माहितीची वाढती मागणी आणि अशा माहितीचे संकलन आणि पृथ:करण करण्याची गरज लक्षात घेऊन भारतीय राष्ट्रीय आभासी ग्रंथालय स्थापन करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. बहुभाषिक वातावरणात स्थानिक, राष्ट्रीय आणि वैश्विक स्तरावरील ज्ञानाची साधने एकत्र करुन नागरिकांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्याचे कार्य हे ग्रंथालय करणार आहे. सध्या शासनाच्या विविध खात्यांमधून जसे जी संस्कृती खाते, पर्यावरण खाते, माहिती तंत्रज्ञान खाते, प्रसार भारती, सीडॅक, आकाशवाणी इत्यादी तसेच अनेक अशासकीय संघटना यांच्याकडे विविध प्रकारची डिजिटल माहिती विविध प्रकल्पाच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या माहितीचा संशोधन व प्रक्रिया केलेला सर्वसमावेशक डेटाबेस तयार करुन तो या आभासी ग्रंथालयामार्फत समाजाच्या सर्व क्षेत्रातील वाचकांना युजर फ्रेण्ड्ली इंटफेसव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन भारतातील आणि भारताबाहेरील माहिती सक्षम सर्च इंजिनव्दारे वेब बेस माहिती सेवेच्या स्वरुपात विकसित करण्यात येईल. ज्ञानाधिष्ठीत समाज निर्मितीसाठी नागरीकांना आशय आणि सेवा यादृष्टीने काम करणारे अभासी ग्रंथालय ही मोठी यंत्रणा राहील. तसेच देशातील डिजिटल आशय संरक्षण करणारी ही मोठी यंत्रणा असेल. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, दिव्यांग समूहातील अभ्यासक, संशोधक,डॉक्टर्स, व्यावसायिकसारखे व्यासंगी लोक यांना लक्ष करुन हे ग्रंथालय उभारले जात आहे. या अभासी ग्रंथालयामार्फत पुढील सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

१) इंग्रजी आणि सर्व भारतीय भाषेतील वृत्तपत्रातील बातम्यांचे ॲग्रीगेटर.

२) विदेशी कागदपत्रातून भारताबाबतच्या माहितीचे क्रॉलिंग आणि संकलन करणारे सॉफ्टवेअर विकसित करणे.

३) विविध ज्ञानशाखेतील ई–जर्नल्सचे एग्रीगेटर.

४) डिजिटल रिपॉजेटरी हार्वेस्टर.

५) ई–जर्नल्स, ऑनलाईन डेटाबेस यासाठी फेडरेड सर्च इंजिन.

६) संस्थात्मक आणि डेटा संग्रहण यासाठी संघटन आणि सामंजस्य करार.

७) भारतातील ग्रंथालयांच्या संयुक्त तालिकेचे मुक्त आदानप्रदान.

८) भारतीय भाषांसाठी सक्षम सर्च इंजिन विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे.

९) सार्वजनिक ग्रंथालयांची निर्देशिका.

१०) बालकांसाठी आभासी ग्रंथालय.

आभासी भारतीय स्वत:ची सामग्री, मानक, सेवा अद्ययावत ठेवील. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या मार्गदर्शनानुसार या ग्रंथालयाचे स्थान, जागा आणि नेटवर्क मॉडेल ठरविण्यात येईल. कन्टेन्ट संदर्भात अभ्यास करुन निर्णय घेतला जाणार असून तांत्रिक भागीदार (पार्टनर) ठरविण्यासाठी वैश्विक पातळीवर निविदा काढण्यात येणार आहेत. तांत्रिक भागीदार आशय आराखडा निर्मिती विकास आणि सेवा व्यवस्थापन यासाठी जबाबदार राहील. हे आभासी ग्रंथालय देशातील डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया, राष्ट्रीय हस्तलिखित अभियान यासारख्या किंवा तत्सम डिजिटल कन्टेन्टशी संबंधित संस्था किंवा यंत्रणा यांच्या सोबत समन्वय साधेल. भारतीय कला, चित्रपट, इतिहास, पुराणवस्तुशास्त्र इत्यादीसारख्या संस्थांच्या समतीने त्यांची डिजिटल साधने वापरण्यात येतील. नेटवर्क उभाण्यासाठी सध्या उपलब्ध असलेले राष्ट्रीय माहिती केंद्रासारखे जाळे वापरण्यात येईल. त्यासाठी मुक्त वातावरणात सर्वांना माहिती मिळावी यासाठी योग्य असे माहितीसेवा व्यवस्थापन सॉफ्टवेअर विकसित करण्यात येईल.

**२) एनएमएल मॉडेल लायब्ररीची स्थापना :**

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाअंतर्गत असलेली ६ ग्रंथालये आणि ३५ राज्य मध्यवर्ती ग्रंथालये आणि देशातील ३५ जिल्हा ग्रंथालये यांचा पथदर्शी आदर्श ग्रंथालय म्हणून विकास करण्यात येणार आहे. या ग्रंथालयाव्दारे समाजाच्या सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक गरजा भागविण्यात येतील. शासकीय प्रकाशने, संस्थात्मक प्रकाशने, ऑनलाईन फुलटेक्स्ट साधने यासारख्या सर्व प्रकाशनांसाठी व ग्रंथालयामध्ये मुक्तद्वार असेल. नागरिकांना अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी पाहिजे असलेली सर्व साधने या ग्रंथालयात मिळतील. या योजनेअंतर्गत सध्याच्या जिल्हा ग्रंथालय इमारतीचे नुतनीकरण करणे, तेथे मॉड्युलर

फर्निचरची व उपकरणांची व्यवस्था करणे, ज्येष्ठ नागरीक आणि दिव्यांग नागरीक यांच्यासाठी विशेष सोय करणे ही कामे करण्यात येतील. तसेच आधुनिक तंत्रज्ञान जसे सर्व्हर क्लायंट तंत्रज्ञान, क्लाऊड कॉम्प्युटींग तंत्रज्ञान यांचा वापर करण्यात येईल. त्यासाठी सर्वत्र एकजिनसीपणा येईल असे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर वापरुन ही ग्रंथालये समृध्द करण्यात येतील.

ई–जर्नल्स व ई–बुक सेवा वेब किंवा व्हीपीएन सेवेव्दारे देण्यात येईल. याशिवाय ३५ राज्य मध्यवर्ती ग्रंथालये, देशातील ६२९ जिल्हा ग्रंथालये आणि संस्कृती मंत्रालयाची ६ ग्रंथालये यातून जीबीपीएस नेटवर्क जुळणी करण्यात येईल. ही जुळणी करण्यासाठी राष्ट्रीय माहिती केंद्र किंवा राष्ट्रीय ज्ञान नेटवर्क यांची मदत घेतली जाईल. या योजनेअंतर्गत प्रत्येक राज्यातील एक जिल्हा ग्रंथालयाचे पथदर्शी आदर्श ग्रंथालय म्हणून आधुनिकीकरण,नेटवर्किंग जुळणी करण्यात येईल. ही जुळणी करण्यासाठी राष्ट्रीय माहिती केंद्र किंवा राष्ट्रीय ज्ञान नेटवर्क यांची मदत घेतली जाईल.

राज्य ग्रंथालय नियोजन समितीमार्फत साक्षरता दर आणि विद्यार्थी लोकसंख्या लक्षात घेऊन या ग्रंथालयाची निवड करण्यात येईल. ही निवड करताना आर्थिक मागास भागातील ग्रंथालयाना प्राधान्य दिले जाईल. त्यासाठी राष्ट्रीय ग्रंथालय अभियानाचा हिस्सा ७५ टक्के आणि राज्याचा हिस्सा २५ टक्के (उत्तर पूर्व राज्यांसाठी हे प्रमाण ९०.१० असे आहे) असे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. अभियानाने प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (पीएमयु) संबंधित राज्य शासनाशी या योजनेसाठी सामंजस्य करार करील. राज्याचा हिस्सा मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची तयारी आणि आवर्ती खर्च उचलण्याची तयारी याबाबतचा करार करण्यात येईल.

या आदर्श ग्रंथालयासाठी उत्तर प्रदेश, ओडिशा, गोवा, कर्नाटक, राजस्थान, पश्चिम बंगाल, तेलंगणा, गुजरात, छत्तीसगढ, त्रिपुरा, अरुणाचलप्रदेश, मिझोराम, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, आसाम आणि मणीपूर या राज्यांची निवड प्रक्रिया झाली आहे.

या आदर्श ग्रंथालयांना एकमेकांशी डिजिटल पध्दतीने जोडण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विविध विषयांवरील ग्रंथासोबत

डिजिटल ग्रंथांची सुविधा, वायफाय सुविधा असलेले कक्ष, उत्तम प्रकाश व्यवस्था, अभ्यासू विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग विद्यार्थी यांच्यासाठी वेगळा कक्ष, स्वच्छतागृहे, रेकॉर्डरुम, लहान मुलांसाठी खेळण्याची सुविधा इत्यादी सोयी या ग्रंथालयात करण्यात येतील. तंत्रज्ञानाची जोड अणि पायाभूत सुविधांचा विकास हे योजनेचे मुलभूत वैशिष्ट्ये आहे.

यासोबत राष्ट्रीय अभियानाची आवश्यकता लक्षात घेऊन निवडक ग्रंथालयांचे डिजिटायझेशन करण्याचे कामही राहील.

**३) संख्यात्मक आणि गुणात्मक सर्वेक्षण :**

राष्ट्रीय ग्रंथालय अभियानाअंतर्गत भारतातील सार्वजनिक ग्रंथालयांचे आणि इतर ग्रंथालयांचे संख्यात्मक आणि गुणात्मक सर्वेक्षण करण्याचे ठरविण्यात आले आहे. या सर्वेक्षणाव्दारे या ग्रंथालयांची एकूण संख्या पाहणे, त्यांची गुणवत्ता पडताळणे, या ग्रंथालयातील ग्रंथदेवघेव, वाचनकक्ष उपयोग, वाचकांच्या आवडनिवडीचा कल, वाचकांची ग्रंथालयास भेट देण्याची प्रवृत्ती, त्यांची ग्रंथालय सेवेबाबतच्या समाधानाची पातळी, ग्रंथालय सेवेबाबतच्या अपेक्षा, दिव्यांग व्यक्तिकरीता असलेल्या सोयी यांची माहिती घेतली जाणार आहे. या सर्वेक्षणातून स्थानिक ग्रंथालयाचा नागरीकांच्या जीवनावर आणि त्यांच्या आर्थिक व्यवहारावर पडणार प्रभाव जाणून घेण्याचा प्रयत्न राहील. याकरीता भारतातील सुमारे ५००० सार्वजनिक ग्रंथालयांची निवड करण्यात आली आहे. या ग्रंथालयांकडून वरील लक्षणांची माहिती देणारा प्राथमिक डेटा गोळा करुन सखोल विश्लेषण अभ्यास करुन त्याबाबतचा सल्ला व मार्ग सुचविण्यासाठी राष्ट्रीयस्तरावर काम करणाऱ्या इंडिन मार्केट रिसर्च ग्रुप (आयएमआरबी) या खाजगी यंत्रणेची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय समाजाच्या विभिन्न क्षेत्रातील नागरीकांकडून त्यांच्या वाचनाच्या आवडनिवडीची माहिती घेऊन त्यांच्या गरजा समजून घेण्यात येणार आहेत. भारतातील वेगवेळ्या भागातील ग्रंथालयांचीक्षमता, त्यांची परंपरागत भूमिका आणि आधुनिक काळातील बदलती भूमिका याबाबतची मानसिकता लक्षात घेणे तेच व्यवसाय, धंदा आर्थिक व इतर बाबतीत या ग्रंथालयांची भूमिका यांचाही सर्वेक्षणात विचार करण्यात येईल. या सर्वेक्षणातून गोळा झालेल्या माहितीच्या आधारे भारतातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या भवितव्याचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. हा सर्वेक्षण

अहवाल जानेवारी २०१६ अखेर तयार करणे व निविदा मागवून सर्वेक्षणाचे काम सोपविणे यातील विलंबामुळे हा वेळ लागला असण्याची शक्यता आहे.

**४) मनुष्यबळ प्रशिक्षण :**

भारतातील सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण किंवा कार्यशाळा घेऊन समग्र ग्रंथालय विकासासाठी तयार करणे यासाठी अभियानाने मनुष्यबळ विकास कार्यक्रम आखला आहे. त्यासाठी ऑनलाईन मॉड्युल, ट्युटोरीयल्स, ई–लर्निंग मॉड्युल्स विकसित करणे आणि तंत्रज्ञानामुळे आलेली नवीन साधने आत्मसात करण्यासाठी प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये ग्रंथालय कर्मचाऱ्यांना व्यवस्थापन, विश्लेषण, निर्णय प्रक्रिया, नियोजन, संघटन कौशल्य इत्यादीबाबत ऑनलाईन साधने आणि माहिती तंत्रज्ञान वापराचे ज्ञान देणे यांचा समावेश आहे.

१) माहिती संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारित प्राथमिक आणि प्रगत स्तरावरील प्रशिक्षण, व्यवस्थापकीय आणि संप्रेषण कौशल्याचा समावेश असेल. सर्व वर्गातील (कनिष्ठ, वरिष्ठ आणि उच्च श्रेणी) कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश राहील.

२) ग्रंथालय शास्त्र प्रशिक्षण वर्गातील (नुकतीच पदवी मिंवा प्रमाणपत्र धारण केलेले) विद्यार्थ्यांसह विविध वर्गातील कर्मचारी सहभागी असतील.

३) विविध वर्गाच्या ग्रंथालयातील कर्मचारी सहभागी असतील.

४) इंग्रजी आणि हिंदी भाषेतून अभियान वर्गाचा अभ्यासक्रम विकसित करील. त्यात ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली,आशय व्यवस्थापन प्रणाली, सामुदायिक माहिती प्रणाली, वेब साधने, रिकव्हरी साधने तसेच नेतृत्व आणि व्यवस्थापन कौशल्य यांचा समावेश असेल. दिव्यांगाना देण्यात येणाऱ्या सेवांबाबत प्रशिक्षणात विशेष उल्लेख असेल हे प्रशिक्षण तीन स्तरावर देण्याची योजना आहे. ग्रंथालय कर्मचाऱ्यांना अनुभव आणि शिक्षणाचा स्तर लक्षात घेऊन बेसिक, इंटरमिजिएट आणि एडव्हान्स अशा तीन स्तरावर प्रशिक्षण देण्यात येईल. त्यासाठी त्रिस्तरीय अभ्यासक्रम पुस्तिका तयार करण्यात येईल. या सर्व प्रशिक्षणात एकवाक्यता असावी याची दक्षता घेण्यात येईल. सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना या पुस्तिका वितरीत करण्यात येतील. ई–लर्निंग मॉड्युल

वेबवर उपलब्ध करुन देण्यात येईल. या प्रशिक्षणासाठी INFLIBNET या स्वायत्त संस्थेचे नाव निश्चित करण्यात आले आहे. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, योग्य भौतिक सुविधा आणि साधने असलेल्या ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणासाठी निवड करील. त्यासाठी अभियान ३५ विद्यार्थी असलेल्या ६० वर्ग आणि दिव्यांगासाठी ३५ विद्यार्थी असलेल्या २० वर्गांचे आयोजन करील. या प्रशिक्षणातून चांगल्या सेवा आणि व्यावसायिक सक्षमता वाढण्यास मदत मिळेल अशी धारणा आहे. अद्ययावत माहितीसाठी भारत सरकारच्या www.nmlindia.nic.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाकरिता आयोजित राष्ट्रीय मंडळाचे गठन करण्याविषयी सांस्कृतिक ग्रंथालयास १८/४/२००९ ग्रंथालय दिनांक ४ मे २०१२ रोजी एक अधिसूचना जाहिर करुन राष्ट्रीय ग्रंथालयाची मंडळाची उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्याविषयी सूचना केली होती या समितीव्दारे निर्धारीत केलेली उद्दीष्टे साध्य करण्यासाठी या समितीची बैठक होऊन त्यानी राष्ट्रीय ग्रंथालय मिशन या संदर्भात एक योजना जाहीर केलेली आहे या योजनेअंतर्गत मुख्य उद्दिष्ट समाजाला सेवा देणाऱ्या ग्रंथालयाचा विकास करणे हे होते. या उद्‌दिष्टाअंतर्गत पुढील चार घटकाचा अंतर्भाव करण्यात आलेला होता.

१) भारतीय राष्ट्रीय ग्रंथालयाची निर्मिती आकृतीबंधानुसार आदर्श ग्रंथालयाची निर्मिती करणे याच संदर्भात संख्यात्मक आणि गुणात्मक सर्वेक्षण करणे.

२) योजनेची घटक क्षमता विकसित करणे

राष्ट्रीय आभासी ग्रंथालयव्दारे विस्तृत प्रमाणात समाजाला स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर उपलब्ध ज्ञानस्त्रोताची उपलब्धता एका मुक्त स्तोत्र व्यासपीठाद्वारे बहुभाषिक स्वरुपातील उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. आजवर डिजिटल स्वरुपात संस्कृती मंत्रालय, मानव संसाधन संस्थान विकास मंत्रालय, प्रसार भारती, आकाशवाणी तसेच राज्य सरकार, इतर अशा सक्रीय विविध संस्था सरकारी विभागावरुन प्रकल्पाअंतर्गत मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या सर्वाच्या माध्यमातून आभासी ग्रंथालयाच्या माध्यमातून एकत्रित डाटाबेस या माहितीसाठी करण्यात येऊन याचे सादरीकरण करण्यासाठी उपभोक्ता वापर सुलभता स्वरुपात याव्दारे भारतामध्ये तयार करण्यात

आलेली भारतविषयक सर्व प्रकारची माहिती एका शक्तीमान सर्च इंजिनद्वारे सहजपणे शोधण्याविषयी अनेक वेबवर आधारीत माहिती सेवांचा उत्तम प्रकारे वापर करण्याची सुविधा माहिती तंत्रज्ञानाव्दारे करणे या आभासी ग्रंथालये यांची विस्तृत पायावर सेवाच्या अनुषंगाने व या सेवाना दूर प्रसिध्दी मिळण्याचे दृष्टीने त्याची संरचना करण्यात येणार आहे. याद्वारे एक ज्ञान संपन्न समाज निर्माण करण्यासाठी योग्य माहिती योग्य पध्दतीने संचित करुन या डिजीटल माहितीची उपलब्धता संघटन पुनर्प्राप्ती आणि तिचे वितरण अशा स्वरुपाचे राहणार आहे या ग्रंथालयाचे वाचक म्हणून विद्यार्थी संशोधक, डॉक्टर, विविध व्यावसायिक याचबरोबर शैक्षणिक व सामाजिक व आर्थिकदृष्ट्या व शारीरिकदृष्ट्या सक्षम असलेल्या व्यक्तीगटाना देखील या ग्रंथालयाव्दारे पुढील सेवा पुरविण्याची सेवा करण्यात येणार आहे.

१) भारतातील इंग्रजी व इतर भारतीय भाषातील वृत्तपत्राखाली न्यूज ॲग्रीगेटरची सुविधा भारतातील व परदेशी वृत्तासाठी माहितीचे, बातम्याचे संकलन करण्यासाठी सुविधा, विविध विषयाशी संबंधित इ–जर्नल करिता ॲग्रीगेटरची निर्मिती करणे.

२) डिजीटल डिपॉझेटरी फॉरेस्टरची निर्मिती

३) इ– जर्नरलस ऑन लाईन डाटाबेस यासाठी संघटीत सर्चइंजिनची सुविधा

४) संख्यात्मक डाटा डिपॉझटरी व संघटन करण्यासाठी संस्थाशी संघटनात्मक करार करणे

५) मुक्त कॅटची निर्मिती संघटनाशी करण्यात येऊन याद्वारे संघतालीका भारतातील ग्रंथालयासाठी निर्माण करणे.

६) भारतातील विविध भाषांसाठी सर्च इंजिनच्या शोधासाठी विकासात्मक परिश्रम घेणे.

७) सार्वजनिक निर्देशिका तयार करणे

८) बालकासाठी आभासी ग्रंथालयाची निर्मिती करणे.

या मशिनव्दारे सातत्यपूर्वक मजकूर, तंत्रज्ञान प्रमाणके व सेवा सातत्यपूर्वक अद्ययावत करणे.

## २) NML आदर्श ग्रंथालयाची स्थापना

या मिशनअंतर्गत आदर्श ग्रंथालयाची स्थापना करण्याचा मुळ हेतू देशातील पस्तीस राज्य मध्यवर्ती ग्रंथालय पस्तीस जिल्हा ग्रंथालय आणि सांस्कृतिक ग्रंथालयाकडील सहा ग्रंथालय यांची निवड करुन याव्दारे समाजाच्या मनोरंजनात्मक सांस्कृतिक गरजाची पूर्तता करणे.

सर्व प्रकाशनाची मुक्त उपलब्धता या अंतर्गत शासकीय संख्यात्मक प्रलेख शासकीय व संख्यात्मक प्रलेख व ऑन लाईन फुलटेक्स सोर्स उपलब्ध करुन देऊन समाजाला योग्य स्तोत्र अभ्यास व संशोधनाच्या अनुषंगाने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संदर्भसेवा उपलब्ध करुन देणे या आदर्श ग्रंथालयातील भौतिक सुविधा या विद्यमान ग्रंथालयाच्या इमारतीची दुरुस्ती व विकास करुन आणि आधुनिक फर्निचर आणि संशोधने याची उपलब्धता करुन देण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरीक शारीरिक दृष्ट्या अपंग व्यक्ती बालके यांच्या करीता सुयोग्य सेवांची देखील उपलब्धता करुन देणार आहे. या ग्रंथालयाचे कार्य सुधारण्यासाठी त्यांना आधुनिक संबधित संसाधने पुरविण्यात येणार आहे. या ग्रंथालयाना सुरुवातीस सर्व क्लायन्टेल तंत्रज्ञान उपलब्ध करुन पुढील पायरीवर त्यांचा विकास करताना प्लायवूड सेवा तंत्रज्ञान पुरविण्यात येणार आहे. ह्यासर्व आदर्श आधुनिक ग्रंथालयांना एक प्रकारचे संसाधने हार्डवेअर सॉफ्टवेअर पुरविण्यात येणार आहे. या ग्रंथालयाना राष्ट्रीय माहितीकेंद्रानी विकसित केलेल्या वेब सेवाद्वारे ई–जनरलची वर्गणी ई–बुक सेवा उपलब्ध करुन देण्याची सुविधा करण्यात येणार आहे. याचबरोबर याच ग्रंथालयाना स्थानिक गरजाच्या पूर्ततेसाठी आवश्यक ते वाचन स्त्रोत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

याचबरोबर याच सर्वोच्च ग्रंथालयाना अद्ययावत करण्यासाठी एकूण ३५ राज्य मध्यवर्ती ग्रंथालये ६२९ ग्रंथालये व सहा सांस्कृतिक मंत्रालयाची संदर्भीय ग्रंथालये यांना,

१) GBPS नेटवर्क नेटवर्क जोडणी–राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या राष्ट्रीय माहिती केंद्रामध्ये नेटवर्कच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२) याचबरोबर संगणकाची उपलब्धता प्राथमिक सुविधा यांची पूर्तता नेटवर्क जोडणी करण्याच्या दृष्टीने सहाय्य करण्यात येणार आहे.

**३) संख्यात्मक आणि गुणात्मक सर्वे :**

याचा मूलभूत हेतू हा ग्रंथालय व लोकांच्या संदर्भीय विश्लेषणात्मक सांख्यिक तपशील गोळा करणे. त्यांच्या सांख्यिकीय आकाराची व ग्रंथालय दर्जाची पडताळणी करणे हा असून या बरोबरच ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांच्या पुस्तक देवघेव संख्या वाचकांची ग्रंथालयास येणारी वारंवारीता, वाचकांची, ग्रंथालयात्मक समाधनता, ग्रंथालयाविषयी मत तसेच या ग्रंथालयाव्दारे वाचकांच्या समाज्याच्या ज्ञानाविषयक मागणी कितपत आहे याची पडताळणी करणे सक्षम गटाकरीता सार्वजनिक ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेला तपशील, लोकांच्या राहणीमानावर व आर्थिक उपलब्धतेवर ग्रंथालयाचा होणार परिणाम याचे मोजमापन करण्यासाठी प्रस्तुत सर्वेक्षणात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. भारतातील ५००० ग्रंथालयांचे सर्वेक्षण करताना त्यांच्या महत्वपूर्ण वैशिष्ट्याचा देखील विचार करण्यात येणार आहे. यानंतर नमुना निवड स्वरुपात गुणात्मक अवलोकनासाठी उपयोग कसे आणि उपयोग करण्याची क्षमता याचा विचार करुन निवड करण्यात येईल आणि या गुणात्मक सर्व्हेचे आयोजन सर्वांगीण माहितीद्वारे व ग्रंथालयाच्या क्षमतेचा निर्णय याचा विचार करुन देशाच्या उत्तर दक्षिण पूर्व पश्चिम मध्यवर्ती आणि उत्तरपूर्व विभागांचा त्याच्या परंपरागत भूमिकांचा वाचन प्राधान्य क्षमतेचा आणि त्यांचा नवीन भूमिकांचा विचार करण्यात येणारे आहे. याद्वारे विविध सेवा आणि माहिती पुरवठा केंद्रे ही या उपभोक्त्याची गरजांची कितपत पूर्तता आमच्या इलेक्ट्रॉनिक व इंटरनेट जगात करतात याबाबत पडताळणी करताना या उपगोक्त्याच्या शैक्षणिक व मनोरंजात्मक गरजांचा विचार करण्यात येणार आहे. तसेच विविध गरजाअंतर्गत या उपभोक्त्याच्या व्यावसायिक कामधंदाविषयक आणि आर्थिक गरजांबरोबर इतर संबंधित गरजा याचाही विचार करण्यात येणार आहे. यासाठी प्राथमिक स्वरुपात सर्वे करण्यासाठी महत्वाची राज्ये / केंद्रशासित प्रदेश यांची ग्रामीण व शहर स्तरावर विचार करुन या परिसरातील सार्वजनिक ग्रंथालयाची नमुना स्वरुपात निवड करण्यात येणार आहे. या गुणात्मक सर्वेसाठी नमुना म्हणून सर्व राज्ये / केंद्रशासित प्रदेशातील ७५०० ग्रंथालयाचा विचार करण्यात येणार आहे.

**४) क्षमता विकास :**

या घटकाचा विचार प्रामुख्याने ग्रंथालयातील मनुष्यबळाचा सर्वांगीण विकास करताना प्रशिक्षण कार्यशाळा, ऑनलाईन प्रशिक्षण यांचे ऑनलाईन ट्रेनिंग मोड्युल्स आणि ग्रंथालयातील इ–लर्निंग मोड्युल्स याचा विचार तंत्रज्ञानविषयक संसाधने हाताळण्यासाठी या मुनष्यबळातील कौशल्ये विकसित करणे व त्यांच्याअंतर्गत आवश्यक ते व्यवस्थापकीय विश्लेषणात्मक नियोजन व संघटनात्मक कौशल्य समजाविणे याव्दारे या सर्व कर्मचारी वर्गास प्रशिक्षित करताना स्त्रोतांची ऑनलाईन नोंदणी व इतर ICT विषयक ग्रंथालयाशी संबंधित उपयोजना या विषयक कौशल्य विकसित करणे हा प्रधान हेतू आहे. याअंतर्गत याचे स्वरुप पुढीलप्रमाणे

ICT आधारीत प्राथमिक प्रशिक्षण, उच्चस्तरीय ग्रंथालय उपयोजन, व्यावसायिक व संप्रेषणात्तमक कौशल्ये यांचा विकास करणे

१) प्राथमिक मध्यवर्ती व उच्चस्तरीय अशा सर्व प्रकारच्या मनुष्यबळाचे प्रशिक्षण

२) वेगवेगळ्या प्रकारच्या सहभागाचे प्रशिक्षण या अंतर्गत ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थी ज्यांनी अलिकडेच बी.लीब. ही पदवी प्राप्त केली आहे असे विद्यार्थी.

३) सर्व प्रकारच्या ग्रंथालयातील सर्वप्रकारच्या सहभागाचे प्रशिक्षण.

४) हे सर्व प्रशिक्षण इंग्रजी व हिंदी भाषेतून केले जाणार असून गरजेनुसार या प्रशिक्षणाकरीता स्थानिक भाषांचा विचार करण्यात येणार आहे.

५) अम्मलबजावणी

**५) भारतीय राष्ट्रीय आभासी ग्रंथालय :**

१) NML व्दारे ग्रंथालयाची जागा, संख्या, नेटवर्क मॉडेल याची निवड सांस्कृतिक मंत्रालय व इतर सहभागी याच्या सल्लामसलतीने केली जाईल.

२) एखादा विभाग कशाप्रकारे विकसित करायचा ते त्याचेस्वरुप निश्चित करण्यासाठी स्वरुपाचा सर्वांगीण अभ्यास करताना या अगोदर शासन व अशासकीय संस्था त्याचे करण्यात आलेले डिनोडायलेशनच्या अनुषंगाने करण्यात येईल.

३) तंत्रज्ञान विषयक सहभागाची निवड जागतिक स्तराद्वारे करण्यात येईल. तंत्रज्ञान भागीदार हा आकृतीबंध विकास स्वरुप निश्चिती, व्यवस्थापना व सेवा यासाठी

जबाबदार राहील या संदर्भातील सेवा आभासी ग्रंथालयास पुरवण्यास जबाबदार राहील.

NML भारताचे डिजीटल ग्रंथालय, माहिती व तंत्रज्ञान विभाग व हस्तलिखित विषयक राष्ट्रीय मिशन आणि तत्सम संस्था यांचे डिजिटलायझेशन भारतातील कला, चित्रपट पुरोगामी लेख, इतिहास यांच्या अनुषंगाने झाले आहे. त्यांच्याशी समन्वय साधले तसेच अशा संस्थाची परवानगी घेऊनच ही वाटचाल करेल. ही परवानगी सांस्कृतिक मंत्रालयाच्या माध्यमातून घेतली जाईल.

४) याकरिता एक सुव्यवस्थित व नेटवर्क व्यवस्थापन संच उपलब्ध करताना या कार्यपध्दतीत कोणतीही अडचण येऊ नये अशा पध्दतीने उभारण्यात येईल. आभासी ग्रंथालयाद्वारे संपर्काकरीता मोबाईल व्यासपीठाचा विचार करणे आवश्यक असेल. याकरीता डायटींग / निक यांच्याकडे उपलब्ध असलेले विद्यमान नेटवर्क प्रस्तृत व्यासपीठासाठी वापरता येईल. आभासी ग्रंथालयाद्वारे प्रत्येकास माहितीकरीता संपर्कयंत्रणा उभारताना मुक्त संपर्क वातावरणाचा वापर करण्यात येईल.

६) याद्वारे माहिती सेवांचे व्यवस्थापन करताना स्वतंत्र आज्ञावली ग्रंथालयाद्वारे अवलंबिली जाईल.

**६) NML आदर्श ग्रंथालयाची संरचना :**

**१)** NML द्वारे ३५ राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, ३५ जिल्हा ग्रथालय, ६ सांस्कृतिक मंत्रालयाशी संबंधित ग्रंथालय ही आदर्श ग्रंथालय म्हणून विकसित करताना मिशनद्वारे भौतिक सुविधा व तंत्रज्ञान पुरविण्यात येईल.

२) राज्यातील ग्रंथालयाची निवड करताना याकरीता राज्य ग्रंथालय नियोजन समिती, राज्य ग्रंथालय समिती यांच्याशी विनियोग करण्यात येईल. तसेच या अनुषंगाने त्या त्या परीसरातील साक्षरता प्रमाण याचाही विचार करण्यात येईल. याचबरोबर आर्थिकदृष्ट्या मागास ग्रंथालयाना प्राधान्य देण्यात येईल.

३) या ग्रंथालयाचा आदर्श ग्रंथालय म्हणून विकास करताना या संदर्भातील अटी व तरतुदीचे पालनासंबंधी स्वतंत्रपणे प्रवेश अर्जामध्ये माहिती देण्यात आलेली आहे.

४) याचसंदर्भात या ग्रंथालयाचा लाभार्थी ग्रंथालय राज्यस्तरावरील अधिकारी यांच्याशी NMLव्दारे करार करण्यात येईल. तसेच या कराराअंतर्गत ग्रंथालयविषयक आर्थिक विनियोगाचे प्रमाण, मनुष्यबळाची उपलब्धता व याविषयी खर्च याचाही तपशील या समन्वये करारामध्ये अंतर्भूत करण्यात येईल.

५) ज्या ग्रंथालयाव्दारे NML सुविधा अंतर्गत अशा नेटवर्कचा लाभ घेतला असेल अशा ३५ राज्य मध्यवर्ती ग्रंथालये व ६२९ जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालये यानाही एका करारामुळे सार्वजनिक ग्रंथालयाना इंटरनेट जोडणी उपलब्ध करुन देण्याविषयी उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरणारी आहे.

६) सांस्कृतिक मंत्रालयाअंतर्गत ग्रंथालये आपली योजना संबंधित मंत्रालयाकडे पाठवेल.

७) या मिशनव्दारे निवडक ग्रंथालयांच्या डिजिटायझेशनचा विचार करुन गरजेनुसार ग्रंथालयाची निवड करुन करण्यात येईल.

**७) विश्लेषणात्मक व गुणात्मक सर्वेक्षण :**

१) यासंबंधित माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली विकसित करण्यात येईल. या कार्याची पूर्तता दोन महिन्यात करणे.

२) याकरीता पुढील दोन महिन्यात प्रस्तुत बाबीच्या पूर्ततेकरीता आवश्यक ती एजंसी निवडण्यात येईल.

३) माहितीच्या संकलनासाठी तीन महिन्याचा कालखंड निर्धारीत करण्यात आलेला होता.

४) माहितीचे विश्लेषण व अहवाललेखन व त्याचे सादरीकरण याकरीता पुढील तीन महिन्याचा कालखंड निर्धारीत करण्यात आलेला होता.

**५) क्षमता विकास :**

१) राष्ट्रीय ग्रंथालय मिशन हे या करीता व्यवस्थापन पध्दतीच्या प्रशिक्षणाकरीता एक अभ्यासक्रमाची निर्मिती करेल. तसेच आशय, व्यवस्थापन पद्धती, सामाजिक माहिती पद्धती वेबस्त्रोत व शब्दकोश साधने आणि नेतृत्व व व्यवस्थापन कौशल्य अशा अभ्यासक्रमांचाही विकास मिशनअंतर्गत करण्यात येणार आहे.

२) विशेष क्षमता असणाऱ्या व्यक्तींच्याकरीता सेवा देण्याच्या दृष्टीने प्रस्तृत प्रशिक्षण आराखड्यामध्ये विचार केला जाणार आहे.

३) अभ्यासक्रम स्वरुप हे तीन वेगवेगळ्या स्थरांवर करण्यात येणार असून यामुळे पहिला स्थर पूर्ण केल्यावर पुढील अभ्यासक्रम पूर्ततेकरीता त्यांची तयारी झालेली असेल. यामुळे व्यवस्थापकीय आणि तंत्रज्ञानविषयक तज्ञांचा वेगळा दृष्टीकोन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शक ठरणारा आहे.

४) या संदर्भातील अभ्यासक्रम विषयक साहित्य अगोदरच तयार करुन त्याचे वितरण प्रशिक्षणार्थींना वितरीत करुन त्याद्वारे प्रशिक्षणाच्या सारखेपणाची खात्री प्रशिक्षणार्थींना होणारी आहे. याचबरोबर ई–लर्निंग मोड्युलची उपलब्धता वेबवर करण्याची तरतूदही सुचवण्यात आली आहे.

५) सर्व संसाधनांनी युक्त असणाऱ्या ग्रंथालयातील मनुष्यबळ व तेथील परिपूर्ण भौतिक सुविधा यांची पडताळणी प्रशिक्षण देणाऱ्या राजा राममोहन रॉय फाऊंडेशनद्वारे करण्यात येणार आहे.

६) प्राथमिक स्तरावर ग्रंथालय मिशनद्वारे ३५ इतक्या कर्मचारी वर्गाकरीता एक बॅच तयार करुन ६० प्रशिक्षण उपक्रमांचे आयोजन वर्ग करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. याद्वारे प्रत्येक तुकडीतील व्यावसायिक प्रशिक्षणार्थींचा ग्रंथालय विषयक क्षमता वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

७) विशेष सक्षम असणाऱ्या  व्यक्तीकरीता प्रभावी दर्जेदार सेवा देण्यासाठी मिशनद्वारे प्रत्येक तुकडीत २५ सेवक असणाऱ्या तुकडींचे एकूण २० प्रशिक्षण उपक्रम राबवण्यात येणार आहे.

**८) निधी वितरण व व्यवस्थापन :**

१) या प्रकल्पाअंतर्गत विविध प्रस्तावांची निवड करताना प्रकल्प व्यवस्थापन विभाग हे राष्ट्रीय ग्रंथालय मिशन प्रकल्प विषयक मंजुरीसाठी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान व तांत्रिक भागीदार यांच्याशी चर्चा करुन निवडेल.

२) पुढील स्तरावर प्रस्तुत मिशन आदर्श ग्रंथालयांच्या निर्मितीकरीता गुणात्मक व विश्लेषणात्मक पडताळणी आणि क्षमता निर्मिती यांचा विचार करुन हे प्रपोजल आर्थिक समितीकडे व उच्चस्तरीय समितीकडे संबंधित समितीद्वारे सादर करेल व अंतिमता प्रस्तुत योजनेच्या मंजुरीसाठी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानकडे पाठवण्यात येऊन अनुदान मंजुरीची पूर्तता करण्यात येईल.

३) अशा प्रक्रियेतून विविध संस्थांशी करारानंतर या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी निर्धारीत प्रमाणानुसार आर्थिक स्त्रोतांची उपलब्धता करण्यात येईल. या संदर्भातील आर्थिक जमाखर्चाची देखभाल राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानद्वारे करण्यात येईल. या संदर्भातील निधीवर सर्वार्थाने सांस्कृतिक मंत्रालयाचे नियंत्रण राहील, आणि राष्ट्रीय ग्रंथालय मिशन संदर्भातील उच्चस्तरीय धोरण हे विविध योजना प्रकल्पासाठी आखण्याची जबाबदारी ही उच्चस्तरीय समितीची राहणार असून याकरिता ही समिती या योजनेचे भागधारक आणि राज्यशासन यांचा समन्वय साधण्याची जबाबदारी ही या उच्चस्तरीय समितीचीच असेल.

४) प्रकल्प व्यवस्थापन विभागाची जबाबदारी ही प्रत्यक्ष प्रकल्पविषयक प्रगती कितपत समाधानकारक आहे व ती प्रमाणकानुसार आहे की नाही याची जबाबदारी ही प्रकल्प व्यवस्थापन विभागाकडे सोपवण्यात आली आहे.

५) प्रत्यक्ष या मिशनकरीता स्वतंत्र संचालकाची नियुक्ती करेपर्यंत राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान व राज्य शासन यांचे प्रतिनिधी संचालक पदाची जबाबदारी स्विकारतील.

६) एकूणच प्रकल्पाविषयी निधीचे स्वरुप पात्र ग्रंथालये व त्यांना मिळावयाच्या निधीची मर्यादा व व्याप्ती, भौतिक घटकांचा विकास उदा. वादविवाद अभ्यासिका इंटरनेट केंद्र, यांच्या विकासाकरिता उपलब्ध करुन द्यावयाच्या निधीचे स्वरुप व अटी निधीविषयक वितरणाचे स्वरुप व अटी या सर्वांची तपशीलवार माहिती प्रस्तुत प्रकल्पाच्या ढाच्यातील परीशिष्टामध्ये सविस्तरपणे देण्यात आलेली आहे. तसेच निधी व त्याचे व्यवस्थापन निधीच्या प्राप्तीकरीता सादर करावयाच्या अर्जांचा नमुना निधी

स्वरुपातील अटींचे स्वरुप, कागदपत्रे यांची सविस्तर माहिती परिशिष्टामध्ये देण्यात आलेली आहे. तसेच या सर्व बाबी वेबसाईट वरही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. यासाठी संबंधित व्यक्ती व संस्था www.nmlindia.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

***

**प्रकरण ५ वे**

# विविध राज्यातील निवडक सार्वजनिक ग्रंथालये

५.१ प्रस्तावना

५.२ महाराष्ट्र

५.३ तमिळनाडू

५.४ केरळ

५.५ बिहार

५.६ आंध्रप्रदेश

५.७ हैद्राबाद

५.८ दिल्ली

५.९ उत्तरप्रदेश

५.१० कलकत्ता

५.११ कर्नाटक

५.१२ गुजरात

५.१३ राजस्थान

५.१४ हिमाचल प्रदेश

५.१५ मध्यप्रदेश

५.१६ ओरीसा

५.१७ अरुणाचल प्रदेश

५.१८ आसाम

५.१९ मणिपुर

५.२० मेघालय

५.२१ मिझोरम

५.२२ नागालँड

५.२३ त्रिपुरा

५.२४ गोवा

## प्रकरण ५ वे

# विविध राज्यातील निवडक सार्वजनिक ग्रंथालये

**५.१ प्रस्तावना :**

आपल्या देशातील ग्रंथालय परंपरा ही उल्लेखनीय स्वरुपाची होती. कालसापेक्ष परकीय आक्रमणामुळे येथील ग्रंथसंग्रह बऱ्याचदा उध्वस्त करण्यात आले. अशा परकीय राजवटीच्या अम्मलाखाली या देशातील काही ग्रंथालये अस्तित्वात राहिली. ब्रिटीश कालखंडात येथे नेटिव्ह जनरल लायब्ररी स्थापन झाल्या. या ग्रंथालयांनी व इतर ग्रंथालयांनी पुढे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत व शिक्षण प्रसारात महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक होतकरु कार्यकर्त्यांनी व समाज धुरीणींनी ही ग्रंथालये जपली. या पार्श्वभुमीवर आपल्या देशातील विविध राज्यातील ग्रंथालयांचा व त्यांच्या सामाजिक योगदानाचा ऐतिहासिक आढावा.

**५.२ महाराष्ट्र :**

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई (एशियाटिक ग्रंथालय)**

या ग्रंथालयाची स्थापना तत्कालीन मुंबई सरकारने सन १९३९ मध्ये नेमलेल्या समितीच्या शिफारशी नुसार दि. २६ जून १९४७ मध्ये करण्यात आली. हे ग्रंथालय एशियाटीक सोसायटी मुंबई या खाजगी संस्थेअंतर्गत सुरु करण्यात आलेले होते. सुरवातीस ग्रंथालयाची कार्ये पुढीलप्रमाणे निर्धारीत करण्यात आलेली होती,

१. पुस्तकाची मागणी देखभाल व संरक्षण व नियतकालिकांची स्वीकृतता ही प्रेस ॲण्ड पुस्तक नोंदणी कायदा १८६७ नुसार करणे, डिलिव्हरी ऑफ बुक्स सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९५४ व दुरुस्ती १९५६ या अन्वये या देशांतर्गत प्रकाशित सर्व पुस्तके, वर्तमानपत्रे ,नियतकालिके यांचा स्विकार करणे.
२. सर्वसामान्य लोकांना संदर्भ ग्रंथालय म्हणून सर्व पुस्तके नियतकालिके वृत्तपत्रे यांची कायद्याअंतर्गत तरतूदीनुसार उपलब्धता करणे.
३. किंमती व दुर्मिळ पुस्तकांचे व्यवस्थापन करणे.
४. शैक्षणिक संस्था व ग्रंथालय प्रणाली या अंतर्गत ग्रंथालयीन देवघेव सेवा उपलब्ध करणे.
५. संदर्भ सेवा उपलब्ध करणे, ग्रंथालयात व पत्रोत्तराद्वारे संदर्भ सूची सेवा उपलब्ध करणे, अशा प्रकारच्या सूचीचे संचलन करणे, प्रकाशन करणे, राज्यामध्ये प्रकाशित झालेल्या प्रकाशनांची सूची करणे, तसेच विद्वत्ता प्रचुर व्यक्ती संशोधक यांच्या करता अशी सूची तयार करणे.
६. राज्यांतर्गत ग्रंथालय चळवळीस मार्गदर्शन करणे गरजेनुसार प्रोत्साहन देणे इत्यादी.

सन १९५५ मध्ये केंद्रशासनाने मध्यवर्ती ग्रंथालय हे राष्ट्रीय साठवणूक ग्रंथालय म्हणून १९५४ मधील सार्वजनिक ग्रंथालयाकरिता ग्रंथवितरण कायद्यांतर्गत जाहीर करण्यात आले. हा कायदा १९५५ पासून अंमलात आणण्यात आला होता. या वाढीव जबाबदारीमुळे ग्रंथालयाच्या आर्थिक जबाबदारीमध्ये व दैनंदिन प्रशासनामध्ये वाढत्या जबाबदारीचा विचार करण्यासाठी सन १९७६ मध्ये केंद्रिय शासनाने एक समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशी नुसार, –

अ. मध्यवर्ती ग्रंथालय, एशियाटीक सोसायटी ऑफ मुंबई पासून अलग करण्यात यावे, राज्यसरकारने राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना पब्लिक लायब्ररी कायदा १९६७ अंतर्गत करुन सर्व राज्यासाठी त्याचा विचार करण्यात यावा.

ब. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाकरता विद्यानगरी कलीना कॅम्पस सांताक्रुज मुंबई येथे नवीन इमारत बांधण्यात यावी. अशा नव्या इतारतीच्या उभारणीकरता केंद्रशासनाने आर्थिक मदत करावी. पुढील कायद्याअंतर्गत तरतुदीनुसार दि. १ जुलै १९९४ मध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय एशियाटीक सोसायटी मुंबईकडे हस्तांतरीत करण्यात आले. सध्या या ग्रंथालयात ९,६६,३७० पुस्तके असून या ग्रंथालयाचे एकूण क्षेत्र पुढीलप्रमाणे,

| अनु क्र. | जागाक्षेत्र | चौरस मीटर |
|---|---|---|
| १. | टाऊन हॉल | २०,००० |
| २ | नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय ठाणे पश्चिम | १७,७४६ |
| ३ | जे जे हॉस्पिटल कंपाऊंड मुन्सिपल स्कूल | ३,६०० |
| ४ | सर फिरोजशहा मेहता लायब्ररी मुलुंड | ३,१०० |
| ५ | डिजीटल सबसेंटर अंधेरी पूर्व | ३६४ |

अशा विविध विभागांनी संपन्न असणाऱ्या राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे डिजीटल उपकेंद्र अंधेरी पूर्व करिता मुंबई महानगर पालिके द्वारा स्वतंत्र ३ मजली इमारतीत घाटकोपर लिंक रोड येथे उपलब्ध करुन दिलेले आहे. या ग्रंथालयात सर्व आधुनिक तंत्रज्ञानानीयुक्त साधनाद्वारे सर्व सेवा या ग्रंथालयाद्वारे सर्व स्तरावरील वाचकांकरीता उपलब्ध करुन दिली जात आहे. यामध्ये शाळा महाविद्यालयातील विदयार्थी, अपंग व्यक्ती अशा वाचकांचा समावेश प्राधान्यक्रमाने विचारात घेतला आहे. ग्रंथालयाच्या डिजीटल उपकेंद्राच्या स्वयंचलीत यंत्रणेकरिता स्वतंत्र ग्रंथालय संगणक प्रणालीचा अवलंब करण्यात आला आहे. यामुळे ग्रंथालयाचे सर्व कामकाज संगणक प्रणालीद्वारे करण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे . वेब ओपॅक ही वेब आधारीत शोधसाधने, येथे प्रलेखाची नोंदणी व देवघेव सर्व स्तरीय वाचकांच्या गरजा पुर्ततेसाठी उपयुक्त ठरत आहे.

**ग्रंथालयाचे विभाग :**

**अ. तळमजला**

**१. बालविभाग :**

या विभागात मराठी हिंदी इंग्रजी भाषेच्या ग्रंथांचा समावेश असून त्याचबरोबर ऑडिओ, व्हिडिओ सीडीज, एल. सी. डी. टीव्ही, इंटरनेट, आधुनिक साधने याची उपलब्धता बाल वाचकांना आकर्षित करण्यासाठी उपयोगी पडेल अशा प्रकारची केली आहे.

**२. वृत्तपत्र व नियतकालीक विभाग :**

या विभागात मराठी, हिंदी, इंग्रजी वृत्तपत्रे वाचकांना उपलब्ध करुन दिली जातात.

**३. जेष्ठ नागरीक वाचन सुविधा :**

या इमारतीस लागून असलेल्या मुबई महानगर पालिकेच्याद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या बागेत जेष्ठ नागरीकांना वृत्तपत्रे व ग्रंथ आरामशीर बसून वाचता येतील अशा प्रकारे ही वाचन सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

**४. स्वागत कक्ष व नोंदणी कक्ष :**

हा कक्ष प्रवेशद्वारा शेजारी उभा करण्यात आलेला असून सर्व प्रकारचे वाचक, सर्व भेटी देणाऱ्या व्यक्तीना आधुनिक पध्दतीने सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**५. संगणक अभ्यासिका व इंटरनेट सुविधा :**

या कक्षात ५० एल. सी. डी. संगणक, २५० हून अधिक सीडीज, व्हिसीडी व डिव्हिडीज ज्यामध्ये संदर्भग्रंथ विश्वकोश, शब्दकोश, गॅझेटीयर यांचा समावेश आहे. अशा सीडीज येथे उपलब्ध केलेल्या असून डाटा बेसीस देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या डाटाबेसीस मध्ये ब्रिटीश कौन्सिल ग्रंथालय डेलनेट सेवा, इत्यादींचा समावेश आहे. या कक्षाद्वारे शिक्षक, विद्याथी व संशोधक अशा वाचकांच्या गरजांची पूर्तता केली जाते. ग्रंथालयातील सर्व प्रकारचे तांत्रिक तपशिल लिब्सी या संगणक आज्ञावलीच्या माध्यमातून संगणीकृत करण्यात आलेला आहे.

**दुसरा मजला :**

या मजल्यावर वाचनसाहित्य संग्रह उपलब्ध करुन देण्यात आलेला असून येथील वाचनसाहित्य ३५,००० हून अधिक ग्रंथांनी युक्त अशा स्वरुपाचा आहे. या ग्रंथसंग्रहा अंतर्गत स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या संदर्भ ग्रंथांचा समावेश असून हे ग्रंथ यु. पी. एस. सी., एम.पी.एस.सी. व इतर स्पर्धा परीक्षेची तयारी, मुलाखत व व्यक्तिमत्व विकास यासाठी मार्गदर्शक ठरणारे आहेत.हा सर्व ग्रंथसंग्रह मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील आहे.

**तिसरा मजला :**

हा मजला विविध परिषदांचे आयोजन करण्यासाठी परिषद हॉल म्हणून वापरण्यात येतो.

**ग्रंथालयाचे विभाग :**

ग्रंथालयामध्ये एकुण १० विभाग असुन ते पुढील प्रमाणे,

**१. नविन पुस्तकांचे प्रसरण विभाग :**

प्रेस रजिस्ट्रेशन कायद्या अंतर्गत प्राप्त झालेली पुस्तके, नियतकालीके, देणगीद्वारे प्राप्त झालेली नविन पुस्तके यांचे या ठिकाणी संग्रहण वाचकांकरीता केले जाते. या ठिकाणी पुस्तकांवर कोणतेही सोपस्कार केले जात नाहीत. असे सोपस्कार न केलेली पुस्तके वाचकांचे लक्ष वेधुन घेण्यासाठी मांडलेली असतात. या विभागात प्रवेश मुक्त आहे.

**२. नियतकालिका विभाग :**

या विभागाद्वारे पुस्तक वितरण कायद्या अंतर्गत प्रकाशीत केलेली नियतकालिके व महाराष्ट्रात मुद्रण नोंदणीकायद्यानुसार प्रकाशीत झालेली पुस्तके या ठिकाणी वाचकांला उपलब्ध करुन दिली जातात. येथे उपलब्ध करुन दिलेली मासिके विशेष प्रकारची असुन ती मनोरंजनाच्या दृष्टीने प्रसारीत केलेली असतात.

**३. वृत्तपत्र विभाग :**

देशातील विविध भाषेतील वेगवेगळ्या विषयाला वाहिलेली वृत्तपत्रे या विभागात ठेवण्यात आलेली असतात.

**४. संदर्भ विभाग :**

शब्दकोश, ज्ञानकोश या सारखे संदर्भस्त्रोत या ठिकाणी ठेवलेले असतात.

**५. सर्वसाधारण वाचन कक्ष :**

या विभागात वाचकांना स्वतःची पुस्तके, वह्या इ. अभ्यास विषयक साहित्य घेऊन जाण्याची मुभा असुन ग्रंथालयीन पुस्तके सुध्दा उपलब्ध करुन दिली जातात. या विभागास विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आलेला आहे.

**६. स्पर्धा परिक्षाविभाग :**

अलिकडील युवकांचा स्पर्धा परिक्षेकडे वाढणारा ओघ विचारात घेऊन ग्रंथालयाने १९९७ पासुन हा विभाग स्वतंत्रपणे सुरु केलेला आहे. सामान्यज्ञान विषयक ग्रंथ, विविध स्पर्धा, परिक्षेला लागणारे नोटस् येथे उपलब्ध करुन दिले जातात. या विभागातील प्रवेश मुक्त ठेवण्यात आलेला आहे.

**७. बाल विभाग :**

बालकांची वाचनविषयक अभिरुची जपण्यासाठी १९९८ पासुन येथे हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला आहे. उन्हाळी व दिवाळीच्या सुट्टीमध्ये या विभागास उत्तम प्रतिसाद लाभतो. मुलांना आकर्षित करणारे चित्रमय ग्रंथ, नियतकालिके, मासिके प्रदर्शित केली जातात. या विभागात प्रवेश मुक्तपणे दिला जातो.

**८. मुद्रण आणि नोंदणी कायदा विभाग (प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ॲक्ट सेक्शन) :**

राज्य कायदा विभागाकडुन प्रकाशीत केलेले ग्रंथ, नियतकालिके या ठिकाणी ठेवली जातात. या ठिकाणी प्रवेश बंदिस्त स्वरुपाचा असुन वाचन साहित्य उपलब्धतेची माहिती ओपॅकव्दारे उपलब्ध करुन दिली जाते.

**९. ग्रंथ वितरण कायदा विभाग (डिलीव्हर ऑफ बुक्स ॲक्ट सेक्शन) :**

राज्य व केंद्र कायद्याअंतर्गत प्राप्त झालेल्या प्रलेखांचा संग्रह येथे केला जातो. हा विभाग टाउनहॉल इमारतीच्या तळघरात करण्यात आलेला आहे.येथेही मुक्त प्रवेशास मनाई आहे. येथील वाचन साहित्याचे अवलोकन ओपॅक द्वारे करणे शक्य होते.

**१०. आर्थिक उपलब्धता व विनियोग :**

या ग्रंथालयास राज्य व केंद्र सरकार यांच्या कडुन समप्रमाणात निधीची उपलब्धता करुन दिली जातो. व हा निधी पुढील बाबींकरीता वापरला जातो.

१. पुस्तक वितरण कायदा विभागाची देखभाल.

२. पुस्तक वितरण कायदा विभागाचे प्रशासन.

३. मुद्रण व नोंदणी विभागाची देखभाल.

४. येथे कायद्याअंतर्गत, तरतुदी नुसार उपलब्ध होत असलेल्या पुस्तकांच्या खरेदी करिता फारच अल्पप्रमाणात निधीचा विनियोग केला जातो.

**११. ग्रंथालयाची कार्ये :**

१. सन १८६७ मधील कायद्याअंतर्गत प्राप्त झालेल्या ग्रंथाचे व नियतकालीकाचे व्यवस्थापन व संरक्षण करणे

२. सुधारीत कायदा १९५६ अंतर्गत तरतुदीनुसार देशात प्रकाशीत झालेल्या ग्रंथाची, नियतकालीकांची व वृत्तपत्राची नोंदणी करणे व त्यांचे व्यवस्थापन करणे. देशातील चार सार्वजनिक साठवणुक ग्रंथालयापैकी हे एक महत्वपुर्ण ग्रंथालय म्हणुन ओळखले जाते.

३. अभ्यासक व सर्वसामान्य वाचक यांना दोन्ही कायद्याअंतर्गत (राज्य व केंद्र) प्राप्त ग्रंथ व नियतकालिके या द्वारे संदर्भ उपलब्ध करुन देणे

४. दुर्मिळ व किंमती पुस्तकाची देखभाल करणे

५. ग्रंथालयात व ग्रंथालयाबाहेर संदर्भ सेवा उपलब्ध करुन देणे.

६. ग्रंथसूचीचे संपादन व प्रकाशन करणे व ती सर्वसामान्य वाचक, विद्वत्तजन व संशोधक याना उपलब्ध करुन देणे. याच बरोबर या ग्रंथालयाव्दारे देण्यात येणाऱ्या सेवा करिता अंधेरी, फोर्ट, ठाणे येथे नेटवर्क सेवा उपलब्ध करुन देणे, बुलेटीन सेवा, कात्रण सेवा, संदर्भसूची सेवा, शासकीय गॅझेटीयर व्यवस्थापन सेवा, ई–मेल सेवा, नियतकालीके व जनरल सेवा देणे. अशा विविध प्रकारच्या सेवा पुरविणे.

**७. ग्रंथालयातील उपलब्ध वाचनसाहित्य :**

| अनु. क्र. | प्रलेख | एकूण |
|---|---|---|
| १ | ग्रंथ | ८,९९,५३१<br>(पुस्तक वितरण कायद्यानुसार ६,८८,५३१<br>आणि मुद्रण नोंदणी नुसार २,११,०००) |
| २ | नियतकालीके | १५०० |
| ३ | वृत्तपत्र | ५०० |
| ४ | मायक्रोफिल्म | १५५ रिळे आणि १२८० दुर्मिळ ग्रंथ |
| ५ | डिजीटल ग्रंथ<br>आणि हस्तलिखिते | २५० |
| ६ | ऑडीओ / व्हिडीओ | ५००० |

**८. ग्रंथालयातील वाचक :**

| **देशी** | **विदेशी** |
|---|---|
| १,२०,००० | ३,००० |

**९. ग्रंथालयातील पुस्तके : (१९५५ – ५६ ते २०१२ – १४)**

| **वर्ष** | **पुस्तक संख्या** |
|---|---|
| १. १९५५ – १९६५ | १,०४,१६३ |
| २. १९६५ – १९७५ | १,४५,१९६ |
| ३. १९७५ – १९८५ | १,१४,६२२ |
| ४. १९८५ – १९९५ | ९५,६३१ |
| ५. १९९५ – २००५ | १,०८,९१६ |
| ६. २००५–२०१४ | १,८९,५७५ |

## १०. भाषावार ग्रंथसंपदा संख्या (३१ मार्च २०१४ पर्यंत)

| अनु. क्र. | भाषा | पुस्तकांची संख्या ३१ मार्च २०१३ पर्यंत | पुस्तकांची संख्या एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ | एकूण पुस्तके ३१ मार्च २०१४ अखेर |
|---|---|---|---|---|
| १. | आसामी | ५८९ | ९०० | १४८९ |
| २. | बंगाली | १३४७५ | २००० | १५४७५ |
| ३. | इंग्रजी | १८३५६३ | ४००० | १८७५६३ |
| ४. | गुजराथी | २५३१२ | – | २५३१२ |
| ५. | हिंदी | ९३३२६ | २००० | ९५३२६ |
| ६. | कन्नड | १४४३६ | १००० | १५४३६ |
| ७. | मल्याळम | १७८३९ | ५०० | १८३३९ |
| ८. | मराठी | ७५५५८ | ३००० | ७८५५८ |
| ९. | ओरीया | २ | १०० | १०२ |
| १०. | पंजाबी | ४२१७ | ५० | ४२६७ |
| ११. | संस्कृत | ५०४५ | ४० | ५०८५ |
| १२. | सिंधी | ८१४ | ५०० | १३१५ |
| १३. | तामिळी | ४९१५ | ३६०० | ४९७५३ |
| १४. | तेलगु | ६४७७ | ९०० | ७३७७ |
| १५. | उर्दु | ११६१० | ४१० | १२०२० |
| १६. | इतर | ० | ० | ० |
| | **एकूण** | **५०१४१७** | **२६५१९** | **५२७९३६** |

**११. कर्मचारी संख्या : :**

| अनु. क्र. | रिक्त पदे | डीबीए विभाग | पीआरए विभाग | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | १८ | ५९ | ३५ | ८२ |

एकूण ८२ पदांपैकी १८ पदे रिक्त असल्याने ग्रंथालयास वाचकाभिमुख सेवा देताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. (वरील तपशिल ३१ मार्च २०१४ पर्यंतचा आहे.)

**१४. संगणक डिजिटायझेशन :**

महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशनच्या सहकार्याने ग्रंथालयाकरिता स्वतंत्र आज्ञावली तयार करण्यात आलेली असुन त्याद्वारे अधिकाधिक ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देऊन सर्व दूरवरच्या वाचकांना सेवा समाधान देण्यासाठी ग्रंथालय प्रयत्न करत आहे. आजवर साठ हजाराहुन अधिक ग्रंथ डाटाबेसमध्ये अंतर्भुत करण्यात आलेले असुन सद्यस्थितीत हे काम पुर्णत्वाच्या मार्गावर आहे. दुर्मिळ व मुद्रणबाह्य ग्रंथांच्या डिजिटलायझेशन करण्याचे काम ग्रंथालयाने सुरु केलेले असुन या अंतर्गत शंभराहून अधिक जुन्या इंग्रजी व भारतीय भाषातील पुस्तकांचे डिजीटायझेशन झालेले असुन या अंतर्गत २४२ ग्रंथांची निवड करण्यात आलेली होती. हा सर्व डाटाबेस वेबसाईट ऑफ डिजिटल लायब्ररी ऑफ इंडीया वर उपलब्ध करुन दिलेला असुन त्याची देखभाल आय.आय.टी. बंगलोर संस्थेद्वारे केली जाते. येथे १५५ मायक्रोफिल्मस् संग्रहित केलेल्या असुन याअंतर्गत १२८० पुस्तकांचे सुक्ष्मचित्रफिती मध्ये रुपांतर करण्यात आलेले आहे. या सर्व सुक्ष्मफिती मुलुंड येथील ग्रंथालयाच्या दुर्मिळ ग्रंथ विभागात ठेवण्यात आलेल्या आहेत. या ग्रंथालयामध्ये इंटरनेट द्वारे ५०० हुन अधिक ग्रंथांची मोफत उपलब्धता प्रमुख ग्रंथालयाबरोबरच इतर उपविभागाद्वारे करण्यात आलेली आहे.

या ग्रंथालयाचे इतर विभाग,

**१. नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय (ठाणे पश्चिम ) :**

मध्यवर्ती ग्रंथालयाचे उपकेंद्र असुन या ठिकाणी ई-ग्रंथालय सेवा सर्वांना उपलब्ध करुन दिली जाते. सकाळी १० ते संध्याकाही ५.३० पर्यत खुले असलेले हे ग्रंथालय शाळा

व महाविद्यालयातील अपंग विद्यार्थ्यांकरीता खुले असते व येथील अभ्यासिक सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत खुली ठेवण्यात येते. हे एक अद्यायावत उपकेंद्र असुन ठाणे पश्चिम विभागातील वाचक याचा उपयोग करुन घेतात.

**२. सर फिरोजशहा मेहता ग्रंथालय मुलुंड :**

या ठिकाणी डिजिलायझेशनची सुविधा उपलब्ध असुन याद्वारे दुर्मिळ पुस्तकांचे डिजिटायझेशन करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

**३. जे. जे. हॉस्पीटल कंपाऊंड म्युन्सिपल स्कुल :**

या परिसारात जुनी पुस्तके, गॅझेटीयर्स व बांधनी अंक यांचा संग्रह केलेला असुन हा विभाग सकाळी १० ते ५ खुला असतो. लहान मुले व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यापीठातील विद्यार्थी या ग्रंथालयाचा लाभ माठ्या प्रमाणात घेतात.

**डेव्हिड ससुन लायब्ररी व रीडींग रुम, मुंबई :**

इंजिनिअरिंग व मेकॅनिकल शास्त्राच्या अभ्यासासाठी सन १८४७ साली 'बाँम्बे मॅकेनिक्स इन्स्टिट्युट' या नावाने हे ग्रंथालय स्थापन झाले व त्यांचे उद्‌घाटन एप्रिल १८४८ साली सर न्यायाधीश सर एरीकंन पेरी यांच्या अध्यक्षतेखाली टाऊन हॉलमध्ये झाले.

सन १८६३ साली मुंबईचे दानशुर व्यापारी श्री. डेव्हिड ससुन यांनी इमारतीसाठी ६०,००० रुपयांची सरकारला देणगी दिली व सरकारनेही अंदाजे पंधराशे चौरस फुट इतकी जागा ९९९ वर्षाच्या कराराने दिली.

या संस्थेतर्फे शास्त्र, साहित्य, कला, अशा विषयांवर विद्वानांची व्याख्याने आयोजित केली जात. या शिवाय विज्ञान, शास्त्र व विशेषत: इंजिनीअरींग व आर्किटेक्ट शास्त्रवरील निबंध स्पर्धासाठी सोन्या चांदीची पदके व रोख बक्षिसे दिली जात.

या ग्रंथालयाला १९३८ पासुन ''डेव्हिड ससुन लायब्ररी अँण्ड रिडींग रुम'' असे नाव देण्यात आले. या ग्रंथालयाची आज सभासद संख्या १७०० असुन ग्रंथसंख्या ३५,००० आहे. या शिवाय ३००० संदर्भ ग्रंथ आहेत.

**धी जमशेटजी नसरवानजी पेटीट इन्स्टिट्युट, मुंबई :**

फोर्टमध्ये दादा भाई नवरोजी रोडवर या ग्रंथालयाची दिमाखदार वास्तु उभी आहे. सन १८५६ साली बारा पार्शी ग्रंथप्रेमींनी हे ग्रंथालय स्थापन केले, आणि सन १८६६ साली त्यास 'फोर्ट रिडींग रुम ॲण्ड लायब्ररी' असे नाव देण्यात आले . सन १८९१ पासून पार्शी जमातीशिवाय इतरांना या ग्रंथालयांचे सभासदत्व मिळू लागले. त्याच वर्षी नसरवानजी माणेकजी पेटीट यांनी आपला मुलगा जमशेटजी यांच्या यांच्या स्मरणार्थ २५,००० रुपयांची देणगी दिली. त्यामुळे या ग्रंथालयाला 'जे एन पेटीट फॉर रिडींग रुम ॲण्ड लायब्ररी'असे नाव देण्यात आले. पुढे १८९५ साली त्यांच्या पत्नी दिनबाई यांनी याच मुलांच्या स्मरणार्थ अडीच लाखांची देणगी दिली. त्या देणगीतुनच आजची इमारत उभी राहीली आहे. त्यानंतरही या पेटीट कुटुंबाने पुस्तके, फर्निचर वगैरेसाठी लाखो रुपयांच्या देणग्या दिल्या. सर्व आशिया खंडात या ग्रंथालयासारखी भव्य व सर्वसुखसोयीनि युक्त अशी रिडींग रुम दुसरी नाही. येथे एका वेळी ३०० वाचक आरामशीर बसू शकतात. रविवारी अंदाजे दीड हजार व इतर दिवशी एक हजार वाचक सरासरी या ग्रंथालयात येतात. सभासद संख्या अंदाजे ६ हजार आहे. ग्रंथ संख्या लाखाच्या घरात असुन संदर्भ ग्रंथ ६००० आहेत. टाईम्स ऑफ इंडीया व 'जामे जमशेद' या वर्तमान पत्राचे बांधीव खंड येथे आहेत. भारतीय पौर्वात्य भाषांतील मौल्यावान ग्रंथांची सूची या ग्रंथालयातर्फे प्रकाशित करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक सुट्याखेरीज सकाळी ९ ते ६.३० व शनिवारी ४ पर्यंत हे ग्रंथालय सभासदांसाठी उघडे असते.

**रा. ब. अनंत शिवाजी देसाई वाचनालय व ग्रंथालय (जिल्हा ग्रंथालय), कुडाळ :**

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा मानबिंदु असलेले रा. ब. अनंत शिवाजी देसाई वाचनालय व ग्रंथसंग्राहालयाची स्थापना महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या १०० वर्षे अगोदर म्हणजेच सन ९ मे १८६० रोजी झाली. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी समाज प्रबोधन या सारख्या महान कार्यातही ग्रंथालयाचा मोठा वाटा आहे.

इ.स. १८६० साली कुडाळमधील काही स्थानिक, व्यापारी वर्ग, सरकारी अंमलदार यांनी ज्ञानाची भुक भागविण्यासाठी कुडाळमध्ये ग्रंथालय सुरु केले. अपुरी साधन सामुग्री

असुनही स्थानिक लोकांच्या सहकार्याने आणि जिद्दीने ग्रंथालय सुरू करण्यात आले. सध्याच्या कन्याशाळेमध्ये त्या काळचे हेड मास्टर श्री. गोविंद भिकाजी खाडीलकर यांचे अधिपत्याखाली हे ग्रंथालय सुरळीत चालू राहिले. सन१८७२ नंतरच्या कालावधीत २५० पुस्तकांच्या संग्रहासह हे ग्रंथालय आता अस्तित्वात असलेल्या वाचनालयाच्या जागी एका लहान इमारतीत वसविण्यात आले . सुरुवातीच्या काळात इंग्रजी साहित्याचा ओघ ग्रंथालयात वाढु लागला. त्याकाळी म्हणजे सन १८९८ च्या सुमारास कुडाळमध्ये दिवाणी न्यायालय असल्याने इंग्रजी जाणणाऱ्या भारतीय वकीलांचा ओघ या ग्रंथालयाकडे वाढला. सन १८९८ साली कुडाळ कोर्टातील श्री. नरसिंह यशवंत नाबर हे या वाचनालयाचे सेक्रेटरी होते. त्यांनी हा कार्यभार पाच वर्षे सांभाळला. त्यानंतर १९१४ साला पर्यंत श्री. सदाशिव आत्माराम साखोळकर यांनी हे पद सांभाळले.

सन १९२० साली कुडाळ येथील स्थानिक पण मुंबईत वास्तव्यात असलेल्या व्यक्तींनी ग्रंथालय विकासासाठी निधी जमविला. याच कालावधीत त्याकाळाचे सावंतवाडी संस्थानचे प्रजाजन व मुंबईचे व्यापारी राव बहाद्दुर अनंत शिवाजी देसाई (टोपीवाले) यांनी संस्थेला मोठा निधी उपलब्ध करुन दिल्याने इमारत दुरुस्ती करण्यात आली. रा. ब. अनंत देसाई (टोपीवाले) यांचे चिरंजीव श्रीमंत नारायणराव देसाई टोपीवाले यांनी १००० /– रु प्रॉ नोट दिली. यामुळे या वाचनालयाचे 'मान. श्री. राव बहाद्दुर अनंत शिवाजी देसाई वाचनालय व ग्रंथसंग्रहालय, कुडाळ' असे नामकरण करण्यात आले . यासाठी लागणारी जागा कुडाळ येथील सद्‌गृहस्थ कै. मंगेश भगवंत नाडकर्णी यांनी उपलब्ध करुन दिली.

सन १९१४ नंतरच्या १० ते १५ वर्षाच्या कालावधीत श्री. रा. प. नेरुरकर, श्री. मालवणकर वकील, श्री खानोलकर, श्री. भास्कर अनंत वैद्य, रा. पू. नाडकर्णी, श्री. ना. बा. शिरसाट या सद्‌गृहस्थांनी या संस्थेचा कार्यभार सांभाळला. दरम्यानच्या काळात ग्रंथालयाने आपले सामाजिक प्रबोधन कार्य अविरतपणे चालु ठेवले.

सन १९५७ – ५८ साली संस्था सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांच्याकडे नोंदणी करण्यात आली. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष मंगेश दत्तात्रय नाडकर्णी, उप कार्याध्यक्ष श्री. गोविंद विश्राम वैद्य, कार्यवाह रामचंद्र पुरुषोत्तम नाडकर्णी हे होते. सन १९५८ ते

१९८० या कालावधीत कुडाळ मधील कार्यकर्ते श्री. वामन शंकर पाटणकर यांनी कार्यवाह पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. त्या आगोदर सन १९५० साली मुंबई सरकारने या वाचनालयास तालुका वाचनालय म्हणुन मान्यता दिली. तसेच रुपये ४५०/- (रुपये चारशे पन्नास मात्र) वार्षिक अनुदान मंजुर केले. वाचनालयाचा वाढता व्याप लक्षात घेता हे अनुदान सन १९५८ - ५९ साली १०००/- (रुपये एक हजार मात्र) वार्षिक करण्यास शासनाने मंजुरी दिली. सन १९९२ -९३ मध्ये वाचनालयाला 'जिल्हा ग्रंथालय' दर्जा प्राप्त झाला. बदललेल्या दर्जानुसार वाचनालयाच्या वाचकांना योग्य त्या सुविधा देण्याचा वेळोवेळी प्रयत्न होऊ लागला.

तत्पूर्वी सन १९६० साली स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मिती बरोबरच वाचनालयाचा 'सुवर्ण महोत्सवी सोहळा' पार पडला. हा दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल. सावंतवाडी संस्थानचे राजेसाहेब हिज हायनेस श्रीमंत शिवरामराजे भोंसले यांनी या समारंभाचे उद्‌घाटन केले, तर अध्यक्ष स्थानी सुप्रसिध्द साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर हे होते. मान. भाऊसाहेब खांडेकरांनी त्यावेळी ही एक आदर्श संस्था म्हणुन वाचनालयाला गौरविले होते. या नंतर सन १९८५ ते ८६ साली शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले . हा सोहळा श्री देव कुडाळेश्वर मंदिर येथे पार पडला. या सोहळ्यास उद्‌घाटक म्हणून प्रसिध्द साहित्यिक मान. रणजीत देसाई हे होते. स्वामीकार रणजीत देसाई यांनी ग्रंथालयाला 'चैतन्य केंद्र' म्हणून संबोधले होते.

सुप्रसिध्द व्यापारी कै. शा. कृ .पंतवालावलकर यांनी पंचवीस हजार रुपये देणगी दिली होती. तर विद्यमान सदस्य श्री. विठ्ठल पाटणकर यांचे वडील कै. श्री. वामनराव पाटणकर यांनी आपल्या विम्याची ५०००/- (रु पाच हजार मात्र) रक्कम देणगी दिली. कुडाळ येथील बी. व्ही. थिएटर्सच्या कलाकारांनीही आपल्या कलेच्या माध्यमातुन मिळालेले भरीव मानधन या वाचनालयास दिले. या वर्षभरात विविध सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित केले गेले. शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करताना संस्थेने जुन्या इमारतीस जोडून नवीन इमारत बांधुन पुर्ण केली. याचे सर्व श्रेय कै. विजय कोचरेकर व कै. गायतोंडे गुरुजी यांना जाते.

स्थापने पासूनच्या दिडशे वर्षाच्या कालावधीत संस्थेला अनेकवेळा सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने सन १९९४ –९५ साली एक आदर्श ग्रंथालय म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावे दिला जाणारा 'आदर्श ग्रंथालय राज्य पुरस्कार' या ग्रंथालयास दि २० जुलै १९९५ रोजी मुंबई येथे तात्कालीन तंत्र शिक्षणमंत्री मा. ना. एकनाथजी खडसे यांच्या हस्ते बहाल केला. ग्रंथालयाच्या या शैक्षणिक व सामाजिक योगदाना बद्दल सिंधुदुर्ग जिल्ह्याचे त्यावेळचे पालक मंत्री मा. ना. नारायणराव राणे यांच्या हस्ते २१ सप्टेंबर१९९५ रोजी कुडाळच्या सरपंचाच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयाचा नागरी सत्कार करण्यात आला.

कुडाळ गावाचा ऐतिहासीक वारसा जोपासत ग्रंथालय आता आधुनिकतेकडे झेप घेत आहे. वाचकांच्या सोयीसाठी मुख्य वाचन विभाग, स्वतंत्र महिला विभाग, बाल वाचन विभाग, देव घेव विभाग, संगणक विभाग, स्पर्धा परिक्षा विभाग, अभ्यासिका कक्ष असे स्वतंत्र विभाग करण्यात आले आहे. दुर्मिळ ग्रंथ विभाग, स्पर्धा परिक्षा ग्रंथ विभाग, वाचकांच्या सोयीसाठी सकाळी ०९.०० ते रात्रौ ०८.०० या कालावधीत खुला ठेवण्यात येतात. याचा फायदा अनेक गरजु, होतकरु विद्यार्थ्यांना होत आहे. हे अनेक विद्यार्थी या ग्रंथालयाच्या माध्यमातुन आपला अभ्यास पूर्ण करुन यशस्वी होत विविध स्तरांवर कार्यरत आहेत. या जिल्ह्यात पहिल्या प्रयत्नात केंद्रीय लोकसेवा आयोगाची (सन २००९) परिक्षा उत्तीर्ण झालेल्या श्री. दत्तप्रसाद शिरसाट या गुणी विद्यार्थ्याने ग्रंथालयाच्या सहकार्याबद्दल संस्थेचे आभार मानले. 'प्राथमिक स्तरावरचा सर्व अभ्यास आपण या ग्रंथालयात करु शकलो अशा प्रकारच्या भावना त्याने या प्रसंगी व्यक्त केल्या.' साहित्य, कला, राजकारण आदी विविध क्षेत्रातल्या व्यक्तींनी ग्रंथालयाला भेट दिलेली आहे. यामध्ये मान. श्री. बाबासाहेब पुरंदरे, रणजित देसाई, एकनाथ ठाकुर, मधुमंगेश कर्णिक, वि. स. खांडेकर, आरती प्रभु अशा अनेक मान्यवर व्यक्तींनी संस्थेला भेट देवून शुभेच्छा दिलेल्या आहेत.

ग्रंथालयाच्या जुन्या वास्तुला सुशोभीत व सुसज्य करण्याचा वेळो वेळी प्रयत्न झालेला दिसुन येतो. जुन्या दुमजली वास्तुला अधिक सुसज्य करण्याचा प्रयत्न सन २००४ मध्ये करण्यात आला. दोन मजली असलेली ही वास्तु तत्कालीन कार्यवाह कै. श्री. अनंत

नारायण शिरसाट, विद्यमान सदस्य श्री. भार्गवराम धुरी, सदस्या श्री विठ्ठल पाटणकर व कार्यकारी मंडळ यांच्या विशेष प्रयत्नाने तीन मजली झाली. या नविन वास्तुच्या उद्‌घानट समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मान. श्री. मोहनदास हेगडे, मान. श्री. प्रसाद देसाई (डाईज ॲण्ड केमिकल्स एम्लॉईज युनियन ट्रस्टिज मुंबई) हे होते तर या वास्तूचा उद्‌घाटन समारंभ तात्कालीन खासदार स्व. एकनाथजी ठाकुर यांच्या शुभहस्ते पार पडला.

ग्रंथालयात ५९,१९४ एवढी ग्रंथ संख्या आहे. दरवर्षी मिळणारे वार्षिक अनुदान, देणगीदार राजाराम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ग्रंथदेणगी  योजना इ. माध्यमातून ग्रंथसंपदा वाढते आहे. वाढत्या ग्रंथसंपदेबरोबर जागेचा तुटवडा हा महत्वाचा प्रश्न संस्थाचालकांसमोर आहे. त्या दृष्टीकोनातून नवीन इमारत बांधण्याचा संकल्प मान. श्री. एकनाथजी ठाकुरसाहेब (माजी खासदार) यांचे सहकार्याने प्रत्यक्षात उतरला आहे. मा. श्री .एकनाथजी ठाकुरसाहेब यांनी आपल्या खासदार निधीतून दिनांक ३१ ऑगस्ट २००६ च्या पत्राने रु २५,०००००/- एवढी रक्कम मंजुर केली. त्यामुळेच वाचनालयाची नविन वास्तू पुर्णत्वासआली.

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक स्व. पद्मश्री वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांनी सन १९६० च्या शतसांवत्सारिक समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात या ग्रंथालयाबद्दल पुढील उद्‌गार काढले होते, ''सुहासिनी दीप वाऱ्याने जाऊ नये म्हणुन पदरा आडुन आणतात, त्याप्रमाणे ही संस्था वेळोवेळी कार्यकर्त्यांनी छोट्या देहातील मोठ्या मनानी सांभाळली आहे. हे ग्रंथालय या लहान शहराचे सौभाग्य आहे.'' हे उद्‌गार तत्कालिनी संचालक मंडळ व कार्यकर्ते यांचा गौरव होता. भाऊसाहेबांच्या उदरातील ते मर्म वेळोवेळी जोपासण्याचे कार्य विद्यमान कार्यकारणी व कार्यकर्ते मनोभावे करत आहे. वाढत्या शहरीकरणा बरोबरच आवश्यक अशा सर्व प्रकारच्या सुविधा वाचकांना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हा ग्रंथालय संघ या जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना मार्गदर्शन करणाऱ्या संस्थेंचे कार्यलय या जिल्हा ग्रंथालयात सुरु असुन या संस्थेच्या सहकार्याने जिल्हा ग्रंथालय गेली १५ वर्षे महाराष्ट्र शसनाचा 'ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग' आयोजित करीत आहे.

सध्या ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील १३० वृत्तपत्रे व  नियतकालीके सुरु आहेत. ग्रंथालयाकडे साखळी योजने अंतर्गत ग्रामीण भागातील ३४ संस्था सभासद आहेत. या योजनेद्वारा  ग्रामीण भागातील वाचकांना वाचनसेवा दिली जाते. या ग्रंथालयात ७ कर्मचारी काम करीत आहेत.

**वाचनालयाचा २०१५–१६ मधील सांख्यिकिय तपशील :**

१. वाचकांची एकूण उपस्थिती सरासरी – ७४, घरी१४९८६, ग्रंथालयात – ७१८८, मुख्यवाचन कक्ष सरासरी – ७०

२. दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर ग्रंथसख्या – ६५,३९३

३. वर्गणीदार सभासद संख्या – ११२६

४. पारिरक्षण अनुदान –९,७९,२००/–

५. नियतकालिकांचा तपशील – दैनिक – २०, साप्ताहिके २३, पाक्षिक – ०३, मासिक ६१, इतर ०५,

६. दिवाळी अंक योजना सभासद – ७०

७. सांस्कृतीक कार्यक्रमाची संख्या – २५ असून यामध्ये प्रामुख्याने पुढील उपक्रमांचा यामध्ये समावेश होतो. वकृत्व स्पर्धा, जागतिक ग्रंथ दिन, व्याख्यानमाला, थोरामोठ्यांच्या जयंती, कवी संमेलन, ग्रंथ प्रदर्शने इत्यादी.

**स्वतंत्र स्पर्धा परिक्षा विभाग :**

दि. १० ऑक्टाबर २००५ रोजी  हा विभाग विद्यार्थी व अभ्यासक यांच्या सोयीसाठी ही सेवा सकाळी ते रात्री ८.०० या वेळेत पुरवली जाते त्याचा जास्तीत जास्त विद्यार्थी लाभ घेत आहेत.

**श्री शाहू वाचनालय, गारगोटी.**

शाहू महाराजांच्या कार्याची जाण असणारे थोर गृहस्थ श्री तारी त्र्यंबक बखले हे सन १८७६ साली भुदरगड तालुक्यास मामलेदार म्हणून लाभले. भुदरगड तालुका अत्यंत मागास विभाग म्हणून ओळखला जातो. अशा भागात सन १८७६ साली गारगोटी सारख्या एका लहानशा खेडयात ग्रंथालय स्थापनेचा विचार हे एक आर्श्चयच म्हणावे लागेल. सन १८७६

साली गारगोटी मध्ये धर्मशाळा ही एकच सार्वजनिक इमारत होती. याच इमारतीत सरकारी दवाखाना होता. ग्रंथालय स्थापन करण्यास प्रेरीत झालेले मामलेदार श्री. बखले यांनी या ग्रंथालयाची स्थापना ही या धर्मशाळेच्या एका खोलीत केली.

जनरल लायब्ररी गारगोटी या नावाने संस्था स्थापन झाली. या घटनेचा उल्लेख मुंबई गॅझेट पुस्तक २४ मराठी भाषांतर (प्रकरण ११ वे 'शिक्षण' पृष्ठ ४२६) मध्ये करण्यात आलेला आहे. कोल्हापूर संस्थानामध्ये सन १८८३ सालामध्ये केवळ १४ पुस्तकालये होती. या मोजक्या ग्रंथालयामध्ये गारगोटीच्या ग्रंथालयाचा समावेश होता. ही बाब गारगोटीसारख्या ग्रामीण व दुर्गम भागास भूषणावह अशीच होती.

**संस्थेची स्वतंत्र इमारत :**

पुढील काळात श्री. बखले यांनी जनतेकडून रु. ३००/- जमवून इंग्रजी पद्धतिची एक छोटीशी दगडी इमारत ग्रंथालयासाठी बांधून घेतली. या कामी सरकारचीही मदत प्राप्त झालेली होती. तत्कालीन इमारतीस १६ द१२ चा हॉल व त्यालाच जोडून दक्षिणेकडील बाजूस एक व्हरांडा होता. स्वतंत्र इमारत झाल्यामुळे ग्रंथालयामध्ये वर्तमानपत्रे व मासिके सुरु करुन वर्गणीदारांच्या वाचनाची सोय करण्यात आली.

**प्रथम कालखंड १८७६ ते १९०० वाटचाल :**

सन १८७६ साली स्थापन झालेल्या जनरल लायब्रारी, गारगोटी या संस्थेचे वास्तव्य इ. स. १८८३ पर्यत सरकारी धर्मशाळेतील एका खोलीतच होते. या ८-१० वर्षात संस्थेची स्थिती बेताचीच होती. याच दरम्यान संस्था रजिस्टर झाली व संस्थेस कोल्हापूर सरकारचे गॅझेट १८८३ सालापासून मोफत येऊ लागले. सरकारकडून काही मदत मिळावी म्हणून प्रयत्न सुरु होते. याची परिणीती म्हणजे सन १८९० साली कौन्सिल ठराव ११६ मंजूर होऊन दर साल रु. २५ /- अनुदान मंजूर झाले. याच काळात ग्रंथालयाचे नाव नेटीव्ह जनरल लायब्ररी, गारगोटी असे ठेवण्यात आले. या काळात काही वर्तमानपत्रे व मासिके संस्था विकत घेत असे.

दि. १४-०८-१८८४ रोजी जी सभा झाली तिचे अध्यक्ष श्री. न. ग .थत्ते हे होते. अध्यक्षस्थानी आपल्या संस्थेच्या इतिहासात संस्थेची सांपत्तीक स्थिती समाधानकारक

नाही. वर्गणीदारांची संख्या १५ वरुन ३ वर येऊन ठेपली आहे व शिल्लकही अवघी ३ वर आहे, या सबबीवर त्यांनी आपला राजीनामा सभेपुढे सादर केला व तो मंजूर करण्याची विनंती केली. सभेत उपस्थित असलेल्या मंडळीनी अध्यक्षांना आग्रह करुन आपला राजीनामा मागे घेण्यास भाग पाडले. एकूणच या घटनेतून तत्कालीन स्थितीत दुर्गम परिसरातील संस्कृतीक स्थिती निर्दशनास येते.

भुदरगड तालुका मागासलेला, शिक्षणाचा प्रसार नुकताच सुरु झालेला अशा, परिस्थितीत लोकांना ग्रंथालयाची गरज भासावी हे शक्य नव्हते. ८–१० वर्षे संस्थेची सभाच झाली नव्हती. पुढे तालुक्यातील  सुशिक्षित मंडळी व सरकारी अधिकारी याकडे लक्ष देऊ लागले. कारण यापुढे झालेल्या सभामधून इंग्रजी वर्तमानपत्राची मागणी पुढे आल्याचे निदर्शनास येते. या घटनेद्वारे वाचन विषय जागृतीचे दर्शनही घडते.

इ. स. १८९९ च्या जुलै महिन्यातील २ तारखेस संस्थेची व्यवस्था चांगली असावी म्हणून ग्रंथालय नियमावली समिती नेमली गेली. त्यावेळी श्री. ब. द. पेंढारकर हे मामलेदार होते. संस्थेचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे होते. त्यांच्या प्रयत्नामुळे संस्था बाळसे धरु लागली. श्री पेंढारकरांच्यावेळी नेमलेल्या नियम समितीने तयार केलेल्या नियमानुसार ग्रंथालयाचे कार्य व्यवस्थितपणे सुरु झाले.

श्री. नातू मामलेदार हे वाचनालयाचे अध्यक्ष असताना,ग्रंथालय लिपीकाने आपला मेहनताना वाढवून मिळावा म्हणून अर्ज केला असता सभेने त्याला दरमहा १/– रुपया प्रमाणे वार्षिक १२ रुपये मंजूर केले . त्याकाळी वाचनालयाचे काम करणे हे एक सार्वजनिक कार्य करणे असे मानत होते. अशा काम करणाऱ्या व्यक्तीचे महत्त्व ग्रामीण समाज ओळखू लागला होता.  म्हणूनच तत्कालीन स्थितीत मेहनता त्वरित वाढविण्यात आला असावा हे या घटनेवरुन निर्दशनास येते.

**मित्र समाज :**

गारगोटीमध्ये त्या काळी मित्र समाज या नावाची एक संस्था होती. काही कारणाने ही संस्था बंद पडली परंतु संस्थेच्या सभासदांच्या संमतीने, सचिवाने मित्र समाजाकडे जे काही साहित्य होते ते वाचनालयास द्यावे म्हणून अर्ज केला. त्यावर वाचनालयाच्या कार्यकर्त्यांनी

अशी अट घातली की मित्र समाजाने या बाबतीत ठराव केल्याशिवाय हे साहित्य स्विकारु नये. शेवटी मित्र समाजाच्या सभासदांनी तसा ठराव केल्यानंतरच ते साहित्य स्विकारण्यात आले. या घटनेद्वारे तत्कालीन पारदर्शकतेचे दर्शन ही घडते.

पुढे ग्रंथालयाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन विष्णू विठ्ठल ठाकूर यानी सार्वजनिक सेवा करण्याच्या भावनेने प्रेरीत होऊन वाचनालयाच्या कारकूनाची जबाबदारी विना वेतन करण्याचे ठरविले. सभेने त्यांच्या नेमणूकीसह यास मंजूरी दिली. अशा घटनातून या भूभागातील सेवाभावी वृत्तीचे दर्शन घडते.

सन १९०१ या वर्षाच्या वार्षिक सभेत श्री. ना. र. अलुरकर वकील यांनी वाचनालयाच्या नियमामध्ये दुरुस्ती होण्याची आवश्यकता आहे, असा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या ठरावानुसार या वेळी वाचनालयासंदर्भात काही नवीन नियम करण्यात आले. त्यावेळी वर्गणीदारांचे ४ वर्ग पाडलेले होते.

**ग्रंथपालाची नेमणूक :**

पुढे दि. १९–१०–१९२० रोजी भरलेल्या सभेत वाचनालयाकरिता एक ग्रंथपाल असावा अशी सुचना पुढे आली. त्यावेळी श्री. हरीबुवा वास्कर हे वाचनालयात सेवक म्हणून काम पहात असत. श्री वास्करांना वाचनाची आवड होती. त्यांनाच दरमहा १ रुपये मोबदला दऊन ग्रंथपालाच्या जागी नेमावे असे सर्वानुमते ठरले. श्री. वास्कर हे या वाचनालयाचे पहिले ग्रंथपाल होत. अशा नेमणूकीद्वारे स्वतंत्र्यपणे ग्रंथपाल पदाचे महत्त्व समाज मानसात रुढ होऊ लागल्याचे जाणवते.

**तृतीय कालखंड सन १९२६ ते १९५० :**

सन १९२६ मध्ये वाचनालयाच्या इमारती भोवती नवीन कुंपण घालावे असा विचार करण्यात आला व त्यासाठी देणगी जमविण्यात आली. या वेळी रावसो खंदारे मामलेदार हे वाचनालयाचे अध्यक्ष होते. श्री. साळोखे अव्वल कारकून यांनी वाचनालयाचे नेटीव्ह जनरल लायब्ररी हे नाव बदलून श्री शाहू वाचनालय असे नाव ठेवावे असा ठराव पुढे आणला. श्री. साळोखे यांच्या ठरावास १ ऑगस्ट १९२६ रोजी पाठींबा मिळाला व वाचनालयाचे नाव बदलण्यात आले. इमारती संबंधी असे ठरविण्यात आले की, हल्लीची

इमारत लहान जागेत आहे, जवळ शेतवड आहे तरी जी नवीन इमारत बांधावयाची ठरवण्यात येत आहे ती मामलेदार कचेरीजवळ माळावर स्वच्छ अशा वातावरणात बांधण्यात यावी. इमारतीस लागणारे लाकूड सरकारकडून मोफत मिळण्याबाबत सभेने मागणी केली.

नवीन इमारतीसाठी जागेची निवड चालू असताना श्री. राजाराम गोविंद सावंत (बी. ए., एल. एल. बी.)यांनी आपली मोकळी जागा आपले वडील कै. गो. रा .सामंत यांच्या स्मरणार्थ वाचनालयास बक्षिस देण्याचे ठरविले. या जागेवर एक लहानशी पडसर इमारत होती या इमारतीसह मोकळी जागा वाचनालयास देऊन इमारत निधीसाठी त्यांनी रोख २५ रुपयांची देणगीही दिली.  या जागेला लागूनच सरकारी जागा होती. ती ही वाचनालयास मिळावी असा प्रयत्न करण्यात आला.

जमीन हाती आल्यानंतर जुनी इमारत जागेसह विकून जी रक्कम येईल ती या नवीन इमारतीकरिता सामील करण्यात यावी असे ठरले.

पुढे छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीत सरकारी जमीन वाचनालयास मिळाली. शिवाय सरकारी जंगलातील आवश्यक ते लाकूडही मिळाले. या सर्व कार्यवाहीत रावसो खंदारे मामलेदार यांनी विशेष प्रयत्न केले होते.

नवीन इमारतीचा कोनशीला समारंभ दि. ५–१–१९२७ रोजीच्या शुभमुहुर्तावर संस्थेचे अध्यक्ष रावसो खंदारे मामलेदार यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या समारंभानंतर रावसो खंदारे यांची बदली झाली व श्री. निकम यांनी मामलेदार पदाची व संस्थेच्या अध्यक्ष पदाची सुत्रे हाती घेतली. वाचनालयाच्या इमारतीचे अपूर्ण राहिलेले काम त्यांनी चिकाटीने पुर्ण केले.

वाचनालयासाठी बांधण्यात आलेली इमारत मजबूत व शोभिवंत अशी आहे. इमारतीची लांबी ४०'  रुंदी २७' व उंची १८' आहे. इमारत गारगोटी सारख्या खेड्यात असली तरी शहरी इमारतीसारखी उठावदार अशी बांधण्यात आली. अशा या इमारतीची ग्रामीण परिसरात निर्मिती करत असताना सभासदांनी घेतलेली दक्षता, उदा. आर्थिक बचत, देणगीदारांची वृत्ती आणि इमारत शेजारचे पर्यावरण याद्वारे ग्रंथालयाबद्दलची सामाजिक आस्था व जाणीवांचे स्वरुप ही या घटनेतून लक्षात येते.

**नवीन इमारतीत वाचनालयाचा प्रवेश :**

श्री शाहू वाचनालय म्हणून बांधलेल्या या वाचनालयाचा उद्‌घाटन समारंभ मे. राव आ. बा. लट्ठे (एम. ए., एल. एल. बी.) दिवाण साहेब सरकार करवीर यांच्या हस्ते दि. ७ फेब्रुवारी १९२८ रोजी मोठ्या उत्साहाने व थाटाने करण्यात संपन्न झाला. तालुक्यातील सर्व थरातील लोक या समारंभासाठी आलेले होते. कोल्हापूर संस्थान मधील राजश्री शाहू महराजांचे हेच सर्वप्रथम स्मारक होय. अशीच धारणा या प्रसंगी सर्वांनी व्यक्त केली.

गारगोटीत त्या काळी सार्वजनिक कार्यासाठी उपयोगी पडू शकेल अशी ही एकच इमारत असल्यामुळे अनेक महत्वाच्या सार्वजनिक सभा वाचनालयाच्या सभागृहात भरु लागल्या. श्री मौनी विद्यापिठाच्या स्थापनेची सभा, महाराष्ट्र स्टेट को. ऑप बँक शाखा स्थापन करण्याबाबतीतील सभा, को. ऑप जिल्हा मध्यवती सहकारी बॅकेची शाखा सूरु करण्याबाबतीतील सभा, साखर कारखाना, सह. सेवा संस्था, तालुका शेतकरी संघ, धरण सोसायटीच्या धरणाच्या सभा, भुदरगड तालुक्यात पुर्वी दरसाल प्लेग, कॉलरा आदीची साथ येत असे, अन्य समाज, औषधी उपचारांचा लाभ न घेता अंधश्रध्देमुळे या साथीना बळी पडे म्हणून लोकांनी या साथी विषयी व रोग निवारण्यासाठी व रोग प्रतिबंधासाठी शास्त्रीय माहिती देण्यासाठी प्लेग, कॉलरा निवारक मंडळ स्थापावे अशी कल्पना समोर ठेवून संबंधीतांनी याच वाचनालयात एक सभा घेऊन ही योजना कार्यान्वयीत केली. अशा अनेक महत्वाच्या सभा व समारंभ या वाचनालयाच्या सभागृहात झालेले आहेत. श्री शाहू वाचनालयाच्या सभागृहात अनेक संस्थांचा जन्म झाल्यामुळे तालुक्यातील सर्व जनता या वाचनालयाकडे मातृसंस्था म्हणून गौरवाने पहाते. सार्वजनिक ग्रंथालय हे ग्रामीण परिसरातील खरे खुरे लोकविद्यापीठ व लोक व्यासपीठ हे महत्त्व याद्वारे अधोरेखित होते.

अशा सार्वजनिक सभांच्या व समारंभाच्या निमित्ताने अनेक थोर मंडळीच्या पदस्पर्शाने वाचनालयाची वास्तू पुनीत झाली आहे. प्रथम संस्थेकरता बांधलेली इमारत एवढीच होती. पुढे इलाका पंचायत कडून दक्षिण बाजूस व्हरांडा बांधण्याकरता मदत मिळवून उत्तरेकडील व्हरांड्यासारखाच एक व्हरांडा सन १९३३ मध्ये बांधून संस्थेची इमारत चौकोनी स्वरुपात विस्तारीत करण्यात आली आहे.

**१९४२ राजबंदी :**

सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीतील राजबंदी गारगोटीच्या तुरुंगात स्थानबध्द होते. या स्थानबध्दामध्ये विद्यालयाचे संचालक श्री. गोखले, श्री. उपळेकर इ मंडळीचा समावेश होता. या राजबंद्यासाठी वाचनालयातून पुस्तके पुरविण्याचा एक वैशिष्टयपूर्ण उपक्रम राबविल्याची नोंद ग्रंथालयाच्या दफ्तरी आहे. तसेच हे ग्रंथालय मोफत स्वरुपात पुढे सर्वांथाने खुले ठेवण्यात आले. अशा सामाजिक जाणीवांचा इतिहास वाचनालयाच्या मागे आहे.

**मुख्यमंत्र्यांची भेट :**

दि २८–१०–१९४८ रोजी मुंबई प्रांताचे पहिले लोकनियुक्त मुख्यमंत्री ना. बाळासाहेब खेर हे कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना, गारगोटीत येऊन त्यांनी श्री शाहू वाचनालयास आवर्जुन भेट दिली होती व समाधान व्यक्त केले होते.

**तालुका वाचनालय म्हणून सरकारी मान्यता व अनुदान :**

सन १९४९ रोजी मुंबई सरकारचे क्युरेटर ऑफ लायब्ररीज यांनी वाचनालयास भेट देऊन तेथील कामकाज पाहून समाधान व्यक्त केले. आणि वाचनालयास तालुका वाचनालय म्हणून मान्यता दिली व सरकारी अनुदानही मंजूर केले.

**कालखंड १९५१ ते १९७६ :**

या कालखंडाच्या प्रारंभीच वाचनालयाने आपला हिरक मोहोत्सव दि. १८–०५–१९५१ रोजी साजरा केला. असा एक योगायोग जमून आला की या कालखंडाचा आरंभ हिरक मोहोत्सवाने व शेवट शताब्दी मोहोत्सवाने झाला.

दि. १८–०५–५१ रोजी संस्थेचा हिरक माहोत्सव अतिशय उत्साहवर्धक वातावरणात व थाटाने पार पाडण्यात आला. या समारंभास कोल्हापूर जिल्ह्याचे तत्कालीन कलेक्टर श्री. अ. श.बाम हे अध्यक्ष म्हणून लाभले होते. वाचनालयाचा हा दुसरा मोठा समारंभ, पहिला वाचनालयाच्या उद्‌घाटनाचा, दुसऱ्या समारंभाच्या प्रसंगी अध्यक्षाच्या हस्ते संस्थेच्या पाऊण शतकाचा इतिहासाचे प्रकाशन झाले. महर्षी भारत रत्न श्री. धोडो केशव कर्वे यांनी अतिशय जिव्हाळ्याचा संदेश पाठवला होता. त्याचा आशय, ''एका बजूला असलेल्या या

ठीकाणी इतकी वर्ष चाललेले व हल्ली उर्जित स्थितीत असलेली संस्था अत्यंत अभिनंदनीय आहे . उत्साही कार्यकर्ते कार्य करणारे असल्यास लहानश्या गावी सुध्दा केवढे कार्य होऊ शकते याचे शाहू वाचनालय हे प्रातिक आहे. या संस्थेचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.'' महर्षी कर्वेंच्या सारख्या विभूतींनी अशा दुर्गम परिसरातील वाचनालयाची दखल घ्यावी याद्वारे ग्रंथांच्या ऐतिहासीक वाटचालीतील यशस्वीतेची जाणीव होते.

**मौनी विद्यापीठची स्थापना व सहकारी :**

सन १९५२ मध्ये श्री मौनी विद्यापीठाचे कल्पक शिल्पकार थोर शिक्षणतज्ञ व भारताचे शिक्षण सल्लागार पदमश्री मा. जयवंतरावजी नाईक यांनी श्री शाहू वाचनालयास श्री मौनी विद्यापीठाशी सलग्न करावे अशी कल्पना मांडली. त्या काळी श्री मौनी विद्यापीठासाठी योग्य ग्रंथालयाची व चांगल्या इमारतीची गरज तीव्रतेने जाणवत होती. आपल्या मागासलेल्या भागात श्री मौनी विद्यापीठासारखी एक महान संस्था निर्माण होऊ पहात आहे याची जाणीव वाचनालयाच्या कार्यकर्त्यांना होती. श्री नाईक साहेब यांच्या कल्पनेचे ताबडतोब स्वागत करण्यात आले व त्याची सत्वर कार्यवाही होऊन वाचनालयाचे श्री मौनी विद्यालयाच्या सदनात स्थलांतर करण्यात आले.वाचनालयाचे ग्रंथपाल श्री. य. ना. अलुलकर यांना विद्यापीठाचे पहिले ग्रंथपाल होण्याचाही मान मिळाला. पुढे वाचनालयाचे आपल्या मूळ इमारतीत पुनरागमन झाले. एका सार्वजनिक वाचनालयाने विद्यापीठ स्थापनेकरिता दिलेल्या योगदानाचे हे एकमेवाद्वितीय उदाहरण आहे.

पुढील काळात सन १९५८ मध्ये सरकारकडून नाममात्र किंमतीस जागा उपलब्ध करुन देण्यात आली. स्वतंत्र इमारत बांधण्याची सोय झाली.

**ग्रंथालय शिबीर व सप्ताह :**

सन १९६३ मध्ये श्री मौनी विद्यापीठ व श्री शाहू वाचनालय या दोन संस्थांच्या संयुक्त प्रयत्नामुळे गारगोटीत ग्रंथालय शिबीर भरविण्यात आलेले होते.

श्री मौनी विद्यापीठ व श्री शाहू वाचनालय या दोन्ही संस्थांच्या वतीने गारगोटीत महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या सुचनेप्रमाणे सन १९६४ मध्ये ग्रंथालय सप्ताही साजरा करण्यात आला. या सप्ताहास पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल

श्री. कु. श. हिंगवे हे मुख्य पाहुणे म्हणून लाभलेले होते. अशा संलग्नीत उपक्रमातून मौनीविद्यापीठाच्या काही योजना व उपक्रम राबविण्यात त्याकाळी ग्रंथालयाने अग्रक्रमाने पाऊल उचलले होते.

**ग्रामपंचायत देणगी व त्या संस्थेचा प्रतिनिधी :**

सन १९६३ पासून श्री शाहू वाचनालयास गारगोटी ग्रामपंचायतीद्वारे दरसाल १०० रुपये देणगी म्हणून देण्याचा ठराव करण्यात आला होता. या ठरावास अनुसरुन वाचनालयाचे कार्यकारी मंडळावर ग्रामपंचायतीचा एक प्रतिनीधी घेण्याचेही मान्य करण्यात आले. पुढे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम सन १९६७ नुसार वाचनालयास तालुका वाचनालय म्हणून मान्यता व 'ब'वर्ग देण्यात आला.

**संस्थेला कायमचे उत्पन्न :**

श्री शाहू वाचनालय स्थापन झाल्यापासून संस्था केवळ वर्गणदारांच्या वर्गणीवरच चालत होती. पुरेशा वर्गणीचे व आवश्यक अनुदानाच्या अभावी संस्थेला आर्थिक अडचणीना सलग तोंड द्यावे लागत होते. सन १९७१ साली भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या बाबतीत बराच विचार विनीमय झाला. संस्थेचे एक सभासद व कुशल इंजिनियर श्री. विश्वासराव जाधव यांनी अशी कल्पना मांडली की संस्थेने गरजू लोकांकडून भाड्यापोटी बिनव्याजी म्हणून काही रक्कम घ्यावी व संस्थेच्या शिलकेतून ही रक्कम घेऊन इमारत बांधावी. इमारत बांधून भाड्याच्या स्वरुपात संस्थेला एक कायमचे उत्पन्न होईल. ही कल्पना सर्वाना पसंत पडून सर्वानुमते ही योजना मंजूर करण्यात आली. सुमारे ५५०० रुपये खर्च करुन संस्थेच्या इमारतीस लागून पश्चिमेकडे दुकानाचे ४ गाळे बांधण्यात आले. या योजनेमुळे आज वाचनालयास कायम स्वरुपी उत्पन्न प्राप्त होऊन संस्थेस स्वयं आर्थिक स्त्रोत उपलब्ध झाला आहे.

**जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन :**

रविवार दि. १४-१२-७५ रोजी कोल्हापूर जिल्हा ग्रंथालयाचे ५ वे अधिवेशन श्री शाहू वाचनालय गारगोटी या संस्थेच्या सहकार्याने संपन्न झाले . या सम्मेलनाचे अध्यक्ष म्हणून मा. हिंदूरावजी पाटील अध्यक्ष कोल्हापूर जिल्हा मध्य. सह. बँक हे लाभलेले होते.

सम्मेलनाचे उद्‌घाटन मा. बाळासाहेब माने अध्यक्ष जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या हस्ते झाले. सम्मेलनाकरिता उभारलेल्या भव्य व सुशोभित खंदारे मामलेदार सभागृहाचे उद्‌घाटन मा. दिनकररावजी मुद्राळे उपाध्यक्ष जि. प. कोल्हापूर यांचे हस्ते करण्यात आले.

सम्मेलनानिमित्त वाचनालयात एक भव्य ग्रंथ प्रदर्शन भरवण्यात आलेले होते. त्याचे उद्‌घाटन बिद्री सह. साखर कारखान्याचे अध्यक्ष मा. बा. ज्ञा. देसाई यांच्या हस्ते झाले.

सम्मेलनास मा. पुराणीक ग्रंथालय संचालक (महाराष्ट्र राज्य), व मा. ग. पातकर कार्यवाह कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघ,जिल्ह्यातील ग्रंथालय प्रतिनिधी व तालुक्यातील विविध थरातील कार्यकर्ते व महिला मंडळ सदस्य अशी मंडळी उपस्थित होती.

''ग्रंथ हा माणसाचा जवळचा मार्गदर्शक मित्र आहे. ग्रंथाचा प्रसार झाल्याशिवाय या देशातील जनतेला नविन व प्रगत ज्ञान प्राप्त होणार नाही. ज्ञानप्राप्तीशिवाय मानवाची सर्वागिण उन्नत्ती होणार नाही. समाजाची ज्ञानप्राप्तीची भूक भागविण्यासाठी तसेच ज्ञानाची आराधना व्हावी व आध्यात्मिक ज्ञानप्राप्तीने समाजाची वैचारीक उंची वाढावी ज्यामुळे या देशातील लोकशाही तत्वप्रणाली अधिक दृढमुल होईल.'' सामान्य माणसाचे जीवन सुखी व समृध्द होईल असे विचार जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री .बाळासाहेब माने यांनी अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना व्यक्त केले.

पुढे ग्रामीण विभागात ग्रंथालयाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने विविध औद्योगिक व्यापारी संस्थांनी आपल्या परिसरातील ग्रंथालयांना कमीतकमी शासनाइतके अनुदान दरवर्षी द्यावे अशी मागणी करुन कोल्हापूर जिल्ह्यात ग्रंथालयांचा जास्तीत जास्त प्रसार होण्याच्या दृष्टीने ग्रंथालय प्रसाराचा मास्टर प्लॅन तयार करण्यात यावा असे श्री. माने यांनी आपल्या भाषणात सुचित केले.

जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष व जिल्हा परीषदेचे उपाध्यक्ष श्री. दिनकरराव मुद्राळे आपल्या भाषणात म्हणाले की, ''वेदकालापासून अणुकालापर्यत निर्माण झालेले सुविचाराचे साहित्य ग्रंथालयाने संग्रहित केले पाहिजे. अन्नाने शरीर वाढेल, ताकद वाढेल पण माणसातील व समाजातील सुसंस्कृतपणाच्या वाढीसाठी व सर्व समृध्दीसाठी चांगल्या विचारांचे वाङ्मय, साहित्य व ग्रंथाची आश्यकता आहे.'' असे विचार प्रवर्तक अधिवेशन गारगोटी परिसरात दीर्घकाळ सर्वांच्या स्मरणात राहिले.

आज ग्रंथालयाकडे स्वत:च्या मालकीची इमारत असून या इमारतीचे क्षेत्र ५००० चौ. फू. इतके आहे. तर आाजूबाजूच्या मोकळ्या जागेचे क्षेत्र ७००० चौ. फू. इतके आहे. तालुका 'अ' वर्गातील या ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह २०१५-१६ या आर्थिक वर्षात ३,१,२९५ इतका असून १६ दैनिके, १३ साप्ताहिके, ३ पाक्षिक व ३० मासिके अशा स्वरुपाचे वाचन साहित्य वाचकांना उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच १२०० वर्गणीदार सभासद असून २०१५ – १६ या वर्षाचा सांख्यिकीय तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ग्रंथ देवघेव | – | ४८,८१० (ग्रंथालयात २८,२६० व घरी २०,५५०) |
| वाचक संख्या | – | ३६,४०० |
| संदर्भ ग्रंथ | – | ४,५९५ |
| महिला वाचकांची उपस्थिती | – | २,५५० |
| बाल वाचकांची उपस्थिती | – | ६,५०० |
| संस्थेची स्थावर व जंगम मालमत्ता | – | सुमारे ३०,००,००० रुपये |
| कामकाजाचे दिवस | – | २८९ |
| ग्रंथालयाचे एकूण वार्षिक उत्पन्न | – | २२,४१,५२८ रुपये |
| एकूण वार्षिक खर्च | – | ६०,४,५८३ रुपये |

विविध कार्यकम, चर्चासत्रे याद्वारे वाचनालयाने आपली परंपरा आजवर सातत्यपूर्वक जपलेली असून ग्रंथालयाचे आधुनिकीकरण व संगणकीकरण या दृष्टीने ग्रंथालयाची वाटचाल सुरु ठेवलेली आहे.

**हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर :**

या ग्रंथालयाची स्थापना सन १८५३ साली सोलापुरमध्ये झाली. या वाचनालयाचे नाव नेटीव्ह जनरल लायब्ररी असे होते. प्रारंभी २५ सभासद, सव्वाशे ग्रंथ या वाचनालयामध्ये होते. स्वतंत्र जागेचा अभाव अनेक वर्ष होता. सोलापुर नगरपालिकेचे तात्कालीन नगराध्यक्ष डॉ. वि. वा. मुळे यांच्या विशेष प्रयत्नामुळे वाचनालयास नगरपालिकेच्या वतीने मोफत जागा प्राप्त झाली.

शिक्षणाचे व सुधारणांचे पुरस्कर्ते श्री. हिराचंद नेमचंद यांनी दिलेल्या १४,५००/- रुपयांच्या देणगीतुन वाचनालयाची इमारत बांधण्यात आली होती. सन १९५७ मध्ये कै. हिराचंद नेमचंद यांचे चिरंजीव गुलाबचंद हिराचंद दोशी यांच्या कडुन मिळालेल्या २०,०००/- रुपयांच्या देणगीतुन जनरल ग्रंथालयाचे हिराचंद नेमचंद वाचनालय असे नामकरण करण्यात आले.

वाचनालयाचे भव्य वास्तुत रुपांतर १९९२ साली झाले. पंडीत भिमसेन जोशी यांच्या हस्ते भूमीपुजन झाले तर उद्‌घाटन २५ जुलै १९९४ साली प्रसिध्द लेखक पु. ल. देशपांडे यांच्या हस्ते झाले. या इमारतीत तळ मजल्यावर रंगनाथ विष्णु ललीत मुक्तद्वार मोफत वाचनालयाचा विभाग, पहिल्या मजल्यावर कवी कुंजविहारी दालनात ग्रंथालयाची देवघेव चालते. तळ मजल्यावर महाकवी द. रा. बेंद्रे दालनात संत साहित्य व इतर ग्रंथ ठेवले आहेत. प्रा. श्रीराम पुजारी कला संकुलात २५०० प्रेक्षक बसु शकतील असे वातानुकुलीत सभागृह आहे. पहिल्या मजल्यावर १५० विद्यार्थ्यांकरिता मोफत अभ्यासिकेची सोय करण्यात आली आहे. त्या ठीकाणी स्पर्धा परिक्षेसाठी उपयुक्त पुस्तकांची उपलब्धता करुन वीज नसल्यास अडचण होऊ नये म्हणुन रु. १० लाखाचा जनरेटर, त्याच बरोबर वाचक श्रोते व प्रेक्षकांच्या सोईसाठी ॲक्वागार्ड वॉटर, कलर प्रिंटर व झेरॉक्स मशिनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वाचनालयातील विविध पुस्तकांची माहिती संगणकाद्वारे मिळू शकते. या ग्रंथालयाची वेबसाईट *www.hnlibrary.org* अशी आहे.

सोलापूर बहुभाषिक असल्याने विविध भाषेतील १,१०,००० इतकी ग्रंथ संपदा या ग्रंथालयात आहे. वाचनालयात नियमित २३ दैनिके, १० साप्ताहिके, १३ पाक्षीके, १२० मासिके व २०० पेक्षा जास्त दिवाळी अंक वाचकांना उपलब्ध करुन दिले जातात. लहान मुलांमध्ये वाचनाची ओढ निर्माण व्हावी म्हणुन वाचनालयात १९४८ पासुन बालविभाग सुरु करण्यात आला आहे. सन १९८३ पासुन केंद्र शासनाने स्थापन केलेल्या राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठानाकडून ग्रंथ खरेदीसाठी या वाचनालयास अर्थ सहाय्य मिळते. या अर्थसहाय्यातून ग्रंथ खरेदी केले जातात. कै. साने यांनी कै. मिनाक्षी साने यांच्या स्मरणार्थ दिलेल्या रुपये ३५,०००/- देणगीतुन माहिती विषयक ग्रंथ खरेदी करुन स्वतंत्र दालन सुरु करण्यात

आले  आहे. या वाचनालयात संगीत शिक्षण विभाग असुन त्यामध्ये मराठी , हिंदी गाण्याच्या दुर्मिळ रेकॉडर्स व ५० सीडीज उपलब्ध आहेत. महिन्यातुन एक वेळा रसिक श्रोत्यांना त्या मोफत ऐकविल्या जातात. ॲड. आनंद लळीत विभाग आहे. ॲड. उदय लळीत व त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या १० लाखाच्या देणगीतुन कायदे विषयक ग्रंथ, जर्नलस्, नियतकालीके, अद्यावत सॉफ्टवेअर, उच्च व सार्वोच्च न्यायालयाचे सर्व निर्णय, संसदेने केलेले कायदे या बद्दलची माहिती येथे उपलब्ध होऊ शकते अशी सुविधा असलेले हिराचंद नेमचंद वाचनालय हे भारतातील एकमेव सार्वजनिक ग्रंथालय असावे.

वाचनालयामध्ये शहर वासीयांच्या प्रबोधनासाठी राज्य व राष्ट्रीय पातळीवर नामांकित वक्त्यांची व्याख्याने, प्रसिद्ध गायकांच्या गाण्याच्या मैफिलीही आयोजित केल्या जातात. वाचनालयाद्वारे ३१ गाळ्यांचे भव्य व्यापारी संकुलही बांधण्यात आले आहे. त्यामुळे वाचनालयाला कायमस्वरुपी उत्पन्नाची सोय झाली आहे. वाचनालयाचे माजी अध्यक्ष प्रा. श्रीराम पुजारी यांना त्यांनी केलेल्या ग्रंथालय क्षेत्रातील कार्याबद्दल पुण्याच्या कृ. द. पुराणीक ट्रस्टचा आदर्श ग्रंथालयीन कार्यकर्ता पुरस्कार मिळालेला आहे.

**रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालय, रत्नागिरी :**

पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्रामध्ये पहिले सार्वजनिक गंथालय सन १८२८ मध्ये रत्नागिरी येथे स्थापन झााले. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक बंदर व हापुस आंब्यासाठी जगप्रसिध्द असलेल्या रत्नगिरी मध्ये काही ज्ञानप्रेमी व ग्रंथप्रेमी पतिष्ठीत नागरिक व सरकारी अधिकारी यानी सन १८२८ मध्ये कोकण बूक सोसायटी म्हणून वाचनालयाची स्थापना केली.

सन १८५० मध्ये या वाचनालयाला 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने ओळखण्यात येऊ लागले. याच दरम्यान ब्रिटीश अधिकारी यांना सभासद होण्यासाठी नेटीव्ह ह्या शब्दाची अडचण निर्माण होऊ लागली; त्यामुळे नेटीव्ह हा शब्द वगळून फक्त 'जनरल लायब्ररी' असे नामकरण झााले व ब्रिटीश अधिकारी या वाचनालयाचे सभासद झााले.

स्वातंत्र्य चळवळीस या वाचनालयाकडून पाठींबा मिळत असल्याची शंका ब्रिटीश अधिकाऱ्यांना आली. त्यामुळे हे ग्रंथालय बंद ठेवले गेले व काही दुर्मिळ ग्रंथ खराब झाले.

या ग्रंथालयाच्या कठीण काळात जिल्हा न्यायाधीश खारेघाट यानी स्वतः पुढाकार घेऊन इंग्रज अधीकाऱ्यांना पटवून दिले व हे ग्रंथालय पुन्हा कार्यरत झाले.

स्वातंत्र्यवीर सावरकरच्या कालखंडात त्यानी या ग्रंथालयाचे 'नगर वाचनालय' व सन १९५१ मध्ये रत्नगिरी (जिल्हा) नगर वाचनालय असे नामकरण करण्यात आले. या ग्रंथालयास सन २००० साली महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श ग्रंथालय पुरस्कार' मिळालेला आहे.

या ग्रंथालयाचे पूर्णपणे संगणकीकरण केलेले असल्यामुळे सर्व व्यवहार संगणक प्रणालीव्दारे होतात. या ग्रंथालयात वृत्तपत्र विभाग, महिला विभाग, बालविभाग, संदर्भ विभाग असे स्वतंत्र विभाग असून सांस्कृतिक कार्यक्रमासाठी चार हजार चौरसफूटाचे सभागृह आहे.

ग्रंथालयाद्वारे दरवर्षी ८०% पेक्षा जास्त गुण मिळावलेल्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना नाममात्र शुल्कात सभासदत्व दिले जाते. ग्रामीण शाळा व गंथालयाना साखळी योजनेअंतर्गत ग्रंथ पुरवठा करुन दरवर्षी मुक्तरंग व्याख्यानमाला पुस्तक प्रदर्शन तसेच विद्यार्थ्यांकरिता आकलन स्पर्धा घेतल्या जातात.

रत्नागिरीच्या पुरातन वैभव सादरीकरणासाठी आठवणीतील रत्नगिरी हा अभिनव उपक्रम वाचनालयाने हाती घेऊन त्यासाठी त्याकाळच्या जाणकारांची मते तसेच अनुभव याचे चित्रीकरण केले जात आहे. पारंपारिक ग्रंथालय सेवेबरोबरच कालसापेक्ष सांस्कृतिक सेवा व उपक्रम हे या ग्रंथालयाचे वैशिष्ट्ये आहे.

**अहमदनगर (जिल्हा) नगर वाचनालय, अहमदनगर :**

पहिला साखर कारखाना स्थापन झालेल्या व महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा असलेल्या या जिल्ह्यात इंग्रज अधिकारी कॅ. पी. टी. फ्रेंच यांनी 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' ची स्थापन केली.

नंतर या वाचनायाचे नामकरण 'सिटी लायब्ररी' असे करण्यात आले. कालातरांने या वाचनालयाचे 'अहमगर जिल्हा वाचनालय' असे नामकरण झाले.

या वाचनालयाच्या विकासासाठी निःस्वार्थी कार्यकर्त्यानी अथक परिश्रम घेतले. या वाचनालयाचे संगणीकरण झाले असून गंथ देवघेव संगणाद्वारेच होते.या वाचनालयात

मुक्तव्दार विभाग, महिला विभाग, बालविभाग, पुस्तक देवघेव विभाग असून अठरा दैनिके नियमीत येतात.या वाचनालयला साप्ताहीक सुट्टी नसते.

या ग्रंथालयात वाचन चळवळ वृध्दिगंत होण्यासाठी सातत्याने उपकम राबविले जातात. त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम शालेय  व महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी वक्तृत्व, निबंध, कथाकथन, वादविवाद, काव्यवाचन, नाटयवाचन अभंगवाचन, स्फुर्तीगीत गायन, रांगोळी व चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात.

दरवर्षी १५ ऑगस्टच्या स्वातंत्रदिनाच्या पूर्व संध्येला ग्रंथालयाच्या वतीने निमंत्रित कवीसंमलेन आयोजित केले जाते. प्रजासत्ताक दिनाच्या पुर्वसंध्येला शालेय विद्यार्थ्यासाठी राष्ट्रीय स्फूर्तीगीत गायन स्पर्धेचे आयोजन केले जाते. मे महिन्याच्या सुट्टीत विद्यार्थी–विद्यार्थीनीसाठी संस्कार व व्यक्तीमत्त्व विकासाकरिता कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच मे महिन्यात वाचकासाठी 'वसंत व्याख्यानमाला' आयेजित केली जाते. अंध बांधवासाठी ब्रेललीपीतील पुस्तके विनामुल्य उपलब्ध करुन दिली जातात. दिवाळीत स्वतंत्रपणे पाचशे नियतकालीके उपलब्ध करन दिली जातात.

या ग्रंथालयाच्या दुर्मिळ गंथसंग्रहात भारतीय राज्य घटनेची मुळ प्रत ३ साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्यासहित उपलब्ध आहे. तसेच अनेक हस्तलिखिते येथे संग्रहीत केलेली आहेत. २००३ साली या ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट शहरी विभाग अ वर्ग जिल्हा ग्रंथालय' म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' मिळाला असुन सन २००४ मध्ये या ग्रंथालयाचे ग्रंथपाल संजय लहाने याना 'उत्कृष्ट ग्रंथालय सेवक' म्हणून डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार मिळाला आहे.

या ग्रंथालयाने शहराच्या सावेडी या उपनगरात शाखा सुरू केली असून तेथे ६५० सभासद या ग्रंथालयाचा लाभ घेतात.

**सार्वजनिक वाचनालय, नाशिक :**

सह्याद्री पठारावर वसलेल्या व गोदावरी नदीच्या काठावरील प्रसिध्द तीर्थक्षेत्र असलेल्या नाशिकमध्ये सन १८४० साली नाशिक मधील नागरिक व काही ब्रिटीश अधिकारी यांनी संयुक्तपणे 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' स्थापन केली. पुढे तिचे नामकरण 'सिटी लायब्ररी'

असे होऊन १९२४ साली 'सार्वजनिक वाचनालय' असे नामकरण करण्यात आले. प्रारंभी पेशवे वाड्यात सुरु असलेले ग्रंथालय प्रगतीनंतर सन १९६७ साली स्वतःच्या भव्य व प्रशस्त इमारतीत स्थलांतर झाले. ग्रंथालयाकडे १,७३,००० ग्रंथ असुन यासाठी वेगळा संदर्भ विभाग आहे. या ग्रंथलयात दुर्मिळ ग्रंथ १००० असून ५५०० पोथ्या आहेत. तसेच ५५० हस्तालिखीते आहेत.

ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असल्यामुळे सर्व व्यवहार ग्रंथलयाच्या संगणकप्रणालीद्वारे होतात. काही जुन्या पोथ्या व दुर्मिळ ग्रंथांचे डिजीटायझेशन करण्यात आलेले आहे.

या ग्रंथालयाची इमारत भव्य व प्रशस्त असल्यामुळे ग्रंथलयाचे स्वतःचे नाटयगृह, वस्तूसंग्रहालय आहे. त्याचबरोबर पुस्तक प्रदर्शन, व्याख्याने, अभ्यासिका यासाठी स्वतंत्र हॉलदेखील आहेत, तसेच स्वतंत्र कलादालन आहे.

या ग्रंथालयाच्यावतीने दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात ग्रंथालय सप्ताह आयोजित करण्यात येतो. या निमित्ताने व्याख्यानांचे आयोजन केले जाते. जिल्हा साहित्यिक मेळाव्याच्या माध्यमातुन उल्लेखनीय पुस्तकाना पारितोषिके दिली जातात.

या ग्रंथालयाच्यावतीने काही वर्षापुर्वी दिवाळी अंक प्रकाशीत केला जात असे. या अंकास अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. 'बालभवन व उद्यान' हे ग्रंथालयाचे अभिनव उपकम सुरु आहेत. गंथालयाच्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने या ग्रंथालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श ग्रंथालय पुरस्कार देऊन गौरविले आहे.

**लोकमान्य टिळक स्मारक वाचनमंदिर, चिपळूण :**

नेटिव्ह जनरल लायब्ररी या नावाने सुरु झालेल्या ग्रंथालयापैकी हे एक ग्रंथालय. सन १८६४ मध्ये चिपळूण मध्ये सुरू करण्यात आले. या ग्रंथालयाची सुरुवात येथील ग्रंथप्रेमी वकील बाळाजी सखाराम काशीकर यांनी केली व आपला वैयक्तिक ग्रंथसंग्रह ग्रंथलयासाठी उपलब्ध करून दिला. याच बरोबर या शहरातील व परिसरातील वाचनप्रेमीचा शोध घेऊन सगळ्यांच्या सहकार्याने हे ग्रंथलय सुरु केले. या ग्रंथालयास सुरूवातीच्या काळात तहसील कार्यालयाच्या आवारात जागा मिळाली. तेथे हे ग्रंथालय प्राथमिक स्वरूपात सुरु करण्यात आले. तात्कालीन रत्नागिरी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी एलफिस्टन हे ज्यावेळी चिपळूणला

वार्षिक भेटीला येत, अशा भेटीवेळी ते ग्रंथालयास रू. ५०/– इतके अनुदान देत व तेवढीच रक्कम चिपळूणमधील व्यापारी वर्ग व प्रतिष्ठीत व्यक्ती यांच्याकडून गोळा करून ती वाचनालयाकडे सुपुर्द करत. अशा आर्थिक सहकार्याने हे ग्रंथालय कार्यरत झाले. पुढे या शहराच्या नगरपालिकेने १८८० मध्ये ग्रंथालयाकरिता सव्वासहा गुंठे जागा उपलब्ध करून दिली. जागा उपलब्ध होताच ग्रंथालय व्यवस्थापक मंडळाने उत्साहाने व खूप परिश्रमाने आर्थिक सहकार्य गोळा करून ग्रंथालयाकरिता स्वतंत्र इमारत बांधली. १९४० मध्ये या ग्रंथालयाचे नामकरण लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर असे करण्यात आले. या प्रसंगी सुप्रसिध्द साहित्यिक न.चिं. केळकर हे उपस्थित होते. पुढील काळात १९८६–८७ मध्ये तत्कालिन कार्यकारीणीने ग्रंथालयाच्या इमारतीच्या विस्ताराचा संकल्प सोडून निधीसंकलन केले आणि लोकसहभागातून या मजल्याचे बांधकाम पूर्ण करून ग्रंथालयासाठी सभागृह उपलब्ध करून दिले. या सभागृहाचे नाव यशवंतराव चव्हाण सभागृह असे करण्यात आले. पुढे ग्रंथालय कार्यकारणीने ग्रंथालयाच्या समोरची ८०० चौ. फूट जागा खरेदी करून या ठिकाणी नवी इमारत उभी केली व या इमारतीत स्वातंत्र्यवीर सावरकर ज्ञानमंदिर मुक्तव्दार वाचनविभाग सुरु केले.

सन २०१५ मधील महापुरात या ग्रंथालयामध्ये ५ फूटाहून अधिक उंच पाणी शिरले आणि या नैसर्गिक आपत्तीने येथील ४०,००० पुस्तके खराब केली. दि. २६ जुलै २०१५ च्या या महाप्रलयात १८ तासाहून अधिक काळ ग्रंथालयास पाण्याने वेढलेले होते.या आपत्तीत महत्त्वपूर्ण अशी दोलामुद्रिते, अनेक हस्तलिखीते व दुर्मिळ ग्रंथ नष्ट झाले. ग्रंथालयाची ही हानी कधिही भरून येणारी नाही. या आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी नव्या जोमाने कार्यकर्ते सिध्द झाले. प्रत्यक्ष भेटीव्दारे व वृत्तपत्राच्या माध्यमातून ग्रंथालयाच्या उभारणीसाठी आवाहन केले. विशेष म्हणजे ज्येष्ठ साहित्यीक पानिपतकार विश्वास पाटील यानी 'लोकसत्ता' मध्ये विशेष लेख लिहून सामाजिक आवाहन केले यामूळे सर्वदूर परिसरातून ग्रंथालयाकडे मदतीचा ओघ सुरु झाला. आणि पुनश्च नव्या जोमाने ग्रंथालय वाचनाभीमुख झाले.

अशा  जिद्दी कार्यकर्त्यांच्या प्रोत्साहनाने व प्रयत्नाने आज येथील ग्रंथसंख्या ६४,००० घरात पोहचलेली आहे. या संग्रहालयात ३०० वर्षापुर्वीची अनेक हसतलिखिते असून लेखकांनी स्वाक्षऱ्या केलेल्या पुस्तकांची संख्या ३०० हून अधिक आहे. या ग्रंथालयाव्दारे वाचकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने व ग्रंथालय अधिकाधीक  लोकभिमुख करण्याच्या दृष्टीने दरवर्षी आदर्श बालवाचक पुरस्कार, कथा–कादंबरी पुरस्कार  डॉ. हेगडेवार पुरस्कार दिले जातात. या ग्रंथालयामध्ये सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने व्याख्यानमाला अंतर्गत विविध पुष्पे सलग३० वर्षे गुंफली जात आहेत. संगणीकृत असलेल्या या ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाने १९८८–८९ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श ग्रंथालय पुरस्कार देऊन गौरवीले आहे.

**नगर वाचन मंदिर, पंढरपूर :**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदीर तिर्थक्षेत्राच्या पंढरपूर नगरीत १८७४ मध्ये त्यावेळेचे रावबहाद्दूर, सिव्हील सब जज्ञ श्री लालशंकर उमाशंकर त्रिवेदी यानी या ग्रंथालयाची स्थापना केली. या गंथालयाचे सुरवातीचे नाव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' बदलून 'नगर वाचन मंदीर' असे दि. २४ ऑक्टोबर १९३२ साली पं. मदनमोहन मालवीय याच्या हस्ते नामकरण करण्यात आले.

सन १९५६ मध्ये प्रलयकाळी पुराने या ग्रंथालयास मोठा फटका बसला. त्यावेळी अनेक ग्रंथाना व बहूमोल कागदपत्रानां जलसमाधी मिळाली. अनेक समाजसुधारकांचे कर्तृत्व या ग्रंथालयाचे अस्तित्व राखण्यात उपयुक्त ठरले. चंद्रभागेकाठी असलेल्या दोन मजली इमारतीत पुस्तक देवघेव विभाग, संदर्भ विभाग, वृत्तपत्र विभाग, बालविभाग, महिला विभाग असून ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे.

सन २००२ साली राजा रोममोहन रॉय प्रतिष्ठान यांच्याकडून ५०,०००/– रू. निधी मिळाला. त्यावेळी शतकोत्तर महोत्सव साजरा करून ग्रंथालय संघाचे विभागीय अधिवेशन या ग्रंथालयाच्या वतीने घेण्यात आले. या शतायू ग्रंथालयास ग्रंथालय चळवळीत विशेष कार्य व महाराष्ट्रचा शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत केलेल्या योगदान प्रित्यर्थ महाराष्ट्र शासनाने  ग्रंथालयास २००६ मध्ये सन्मान पत्र प्रदान करून पाच लाख रूपयाचे विशेष अनुदान दिले.

वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच परिसरातील ग्रंथालयांना ग्रंथपुरवठा करून साखळी योजना राबविली जाते. २००० पासुन या ग्रंथालयाने उपनगरामध्ये ग्रंथालय शाखा सुरु केली आहे.

**नगर वाचनालय एरंडोल :**

सन १८६८ मध्ये एरंडोल या तालुक्याच्या गावात भाऊसाहेब गलांडे यानी 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने वाचनालयाची स्थापना केली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर नगर वाचनालय असे नामकरण करण्यात आले.

वाचन संस्कृती रूजविण्याच्या दृष्टिने या वाचनालयातील वाचकांची संख्या वाढल्याबरोबरच बाल विभाग, महिला विभाग, वृत्तपत्र विभाग, संदर्भ विभाग, पुस्तक देवघेव विभग, असे स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आले. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी वाचनसाहित्याद्वारे विविध उपक्रमांचे आयोजन सातत्यपूर्वक करण्यात येते. अशा उपक्रमाचे प्रजासत्ताक दिनी आयोजित करण्यात येणारे कवी संम्मेलन व इतर उपक्रम यांना चांगला प्रतिसाद लाभतो. 'ब' वर्गातील या वाचनालयात अनेक दुर्मिळ ग्रंथ असून एकूण वाचनसाहित्य संख्या २३,००० हून अधिक आहे. दीर्घकाळ यशस्वी वाटचाल करणाऱ्या या ग्रंथालयाचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक चळवळीतील योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने २००४ मध्ये शतायु ग्रंथालय प्रमाणपत्र व रुपये पाच लाख इतके अनुदान देऊन वाचनालयाचा गौरव करण्यात आलेला आहे.

**आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी :**

इचलकरंजीचे जहांगीरदार गोविंदराव आबासाहेब घोरपडे यांच्या प्रेरणेने इचलकरंजीतील प्रसिध्द वकील रामभाऊ आपटे यानी दि. १ जून १८७० मध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने इचलकरंजी या वस्त्रनगरीत ग्रंथालय स्थापन केले. जहागीरदारांनी मगदूम पीर या देवस्थानातील नगरखान्याची जागा ग्रंथालयास दिली. पुढे ही जागा अपुरी पडू लागल्याने आपटे वकीलांनी राजवाड्याच्या समोरच स्वतःच्या जागेत स्वतंत्र इमारत बांधण्यास सुरवात केली. त्यांच्या हयातीत इमारत पूर्ण होऊ न शकल्यामुळे या इमारतीचे काम श्रीमंत

नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनी सन १८९६ मध्ये पुर्ण करुन आपल्याकडील ग्रंथ संपदा ही सुपुर्त केली.

सन १९१० मध्ये आपटे वकिलांच्या ज्ञानपिपासू वृतीतून, ग्रंथालयासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांच्या गौरवार्थ या ग्रंथालयाचे नामकरण आपटे वाचन मंदिर असे करण्यात आले.

संस्थाने विलीन झाल्यावर ग्रंथालयाच्या इमारतीची मालकी शासनाकडे आली. सन १९५३ मध्ये बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणी करुन नविन कार्यकारणी अस्तित्वात आली.

दि. ७ एप्रिल१९८५ मध्ये कार्यकारणी मंडळाच्या अथक प्रयत्नातून तीन मजली इमारतीमध्ये ग्रंथालय सुरु होऊन यामध्ये वृत्तपत्र विभाग, नियतकालीक विभाग, देव घेव विभाग, संदर्भ विभाग बालविभाग, अभ्यासिका असे विविध विभाग करण्यात आले आहेत.

या संगणकीकृत गंथालयामार्फत उत्कृष्ट साहित्यकृतीना पुरस्कार दिले जातात. तसेच इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार, इंदिरा संत विशेष लक्षणीय काव्य संग्रह पुरस्कार, साहित्य संमेलन स्मृती, ट्रस्ट पुरस्कार उत्कृष्ट गद्य पुरस्कार, विशेष लक्षणीय पद्य पुरस्कार, आशाबाई सौदत्तीकार कथासंग्रह पुरस्कार, केराबाई शेळके कादंबरी पुरस्कार, उत्कृष्ट अनुवाद पुरस्कार स्थानिक साहित्यिक गौरव पुरस्कार, शामराव भिडे ललित गद्य पुरस्कार, पार्वती शंकरराव तैलचित्र बाल साहित्यिक पुरस्कार, अशा पुरस्कारांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यासाठी वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, उन्हाळयाच्या सट्टीत वाचन संस्कार शिबीर तसेच स्वर प्रभात व स्वर दीपावली हे संगीताचे कार्यक्रम आयोजित केले जातात. शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान केला जातो. साहित्यिक वा अन्य उपक्रमशील व्यक्तीकरिता मासिक गप्पांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

या शतायू ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय चळवळीतील विशेष कार्य व महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत केलेल्या योगदानाप्रित्यर्थ सन्मान पत्र व पाच लाखाचे विशेष अनुदान देऊन १९९०–९१ सालचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट गंथालय पुरस्कार प्रदान केला आहे.

**श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय, अक्कलकोट :**

सन १८७६ मध्ये श्री स्वामी समर्थ यांचे मंदिर असलेल्या अक्कलकोट शहरात या संस्थानच्या राजमाता लक्ष्मीबाई राणीसाहेब यानी श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालयाची स्थापना केली. संस्थान नरेशाकडून दरवर्षी पंधरा रुपयांचा निधी मिळत होता. '

जुन्या इमारतीच्या नुतनीकरण्यासाठी सन २००३ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या मुख्यमंत्री निधीतुन रु. ५,००,०००/- शतायू ग्रंथालयाचे विशेष अनुदान, रु. ५,००,०००/- वाचनालयाचे रु. ३,००,०००/- असे एकूण रु.१३,००,०००/- रुपयांची प्रशस्त इमारत बांधण्यात आली. यामध्ये वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, संदर्भ विभाग, बालविभाग, महिला विभाग व सभागृह असे विभाग असुन सीमाभाग असल्याने कन्नड दैनिके ही वाचनालयात उपलब्ध करुन दिलेली आहेत.

वाचनसंस्कृती तसेच ग्रंथालय चळवळ वाढावी यासाठी या वाचनालयाच्यावतीने विविध उपक्रम राबविले जातात.

सोलापूर जिल्हयातील 'अ' वर्गातील उत्कृष्ट ग्रंथालय म्हणून २००८ मध्ये सहकार महर्षी शंकरराव मोहीते-पाटील यांच्याहस्ते आदर्श गंथालय पुरस्कार, २००४ साली हरिभाऊशिंदे सार्वजनिक वाचनालय, उरण ता. माठा जि. सोलापूर यांचा जिल्हास्तरीय आदर्श गंथालय पुरस्कार, सन २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रामीण गंथालय हे पुरस्कार या वाचनालयास प्राप्त झालेले आहेत.

या वाचनालयात ४१,००० ग्रंथसंख्या असुन यामध्ये दुर्मिळ ग्रंथ १०० आहेत. दुर्मिळ ग्रंथामध्ये विवेकसिंधु, भावार्थदिपिका, रामायण, महाभारत, काशीकाण्डे, निर्णयसिंधु, भोगवासिष्ठ, यथार्थदिपिका इत्यादींचा समावेश आहे.

**वल्लभदास वालाजी जिल्हा वाचनालय, जळगाव :**

सरदार तुळाजीराव भोईटे यांच्या जळगाव गावात दि. १ जुलै १८७७ रोजी जळगाव नगरीतील ज्ञानप्रेमी, ग्रंथप्रमी नागरिकांनी नेटिव्ह जनरल लायब्ररी ची स्थापना केली. प्रारंभी दहा सभासद असलेले वाचनालयात, वाचकांची व सभासदांची संख्या वाढल्याने नवीन इमारतीची गरज निर्माण झाली. म्हणून सन १९०७ मध्ये वाचनालयाच्या नव्या इमारतीची

कोनाशीला बसवून बांधकाम सन १९०९ ला पूर्ण करण्यात आले. वाचनालयाच्या भरभराटीला मोलाचे योगदान देणाऱ्या मुलाजी जेठा यांचे पुतणे कै. वल्लभदास बालजी याचे नाव वाचनालयास देण्यात आले. याच्या तीन मजली इमारतीत वृत्तपत्र विभाग, बालविभाग, महिला विभाग, ग्रंथ दाखल नोंद विभाग, धार्मिक ग्रंथ दालन, संदर्भ विभाग, पुस्तक देवघेव विभाग, नियतकालीक विभाग, अभ्यासिका व सभागृह असे विविध विभाग असून डिजीटायझेशनचे काम सुरु आहे.

या वाचनालयात १,२७,००० इतकी प्रचंड ग्रंथसंख्या असुन दुर्मिळ ग्रंथसंख्या १०० इतकी आहे. त्यामध्ये चार वेद, पुराणे, प्राचीन मध्ययुगीन चरित्रकोश यांचा समावेश आहे. तसेच अजिंठा लेण्याची चित्रे ही उपलब्ध आहेत. या संगणीकृत वाचनालयाचे सर्वव्यवहार संगणकाद्वारे केले जातात. वाचनालयाची स्वतःची वेबसाईट आहे. यामध्ये विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. उदा. शालेय विद्यार्थ्यासाठी कथाकथन, वक्तृत्व, चित्रकला, वेशभुषा, गीतगायन तसेच महिलांसाठी नाट्यवाचन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, गीतगायन स्पर्धा तसेच ज्येष्ठ नागरिकासाठी दिवाळी अंक निबंध स्पर्धा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी काकासाहेब अत्रे स्मृतिप्रित्यर्थ राज्य स्तरीय वादविवाद स्पर्धा, कथा अभिवाचन स्पर्धा, नाट्यवाचन स्पर्धा घेतल्या जातात. तसेच प्रत्येक महिन्यात नवनव्या पुस्तकावर वाचक व साहित्यिक यांच्यात चर्चा होते. महाराष्ट्र शासनाने सन १९९५–९६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहरी विभाग पुरस्काराने वाचनालयास गौरविले असून २००६–०७ सालचा उत्कृष्ट ग्रंथसेवक पुरस्कार वाचनालयाचे ग्रंथपाल अनिल अत्रे यांना मिळाला आहे.

**महात्मा गांधी वाचनालय, कागल:**

राजर्षी शाहू महाराजाचे वडिल श्रीमंत जयसिंगराव तथा आबासाहेब घाटगे यांनी कागल येथे दि. १२ नोव्हेबर १८८० मध्ये या वाचनालयाची स्थापना केली. प्रारंभीच्या नेटिव्ह जनरल लायब्ररीचे 'महात्मा गांधी वाचनालय' असे नामकरण करण्यात आले.

या ग्रंथालयाचा संपूर्ण खर्च जहागीरीतून देण्याची व्यवस्था केली होती. कालांतराने धर्मादाय उपायुक्त कार्यालयाची स्थापना झाल्यानंतर वाचनालयास शासनाची मान्यता मिळाली व शासनामार्फत अनुदान प्राप्त झाले.

या वाचनालयात वृत्तपत्र विभाग, ग्रंथदेवघेव विभाग, नियतकालीक विभाग, संदर्भ विभाग, महिला विभाग, बाल विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग, अभ्यासिका असे विविध विभाग आहेत.

ग्रंथालय चळवळ वाढावी, तसेच ग्रंथालयाच्या कामकाजातील अडचणी सोडविण्यासाठी, दर्जावाढीसाठी प्रयत्न केले जातात. वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचक स्पर्धा आयोजित केल्या जातात. या वाचनालयास बॅ.बाळासाहेब खर्डेकर, वि. स. खांडेकर अशा मान्यवरांनी भेट दिलेली आहे.

सन २००५–०६ मध्ये ग्रंथालय चळवळीमधील विशेष कार्य व महाराष्ट्रच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत केलेल्या योगदानाप्रित्यर्थ विशेष अनुदान रू. पाच लाख व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले आहे.

**सार्वजनिक वाचनालय , श्रीवर्धन:**

सन १९८३ मध्ये श्रीवर्धन येथे तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिकेच्या वतीने हे ग्रंथालय सुरु झाले. या वाचनालयाचे कार्य मर्यादीत असल्यामुळे नगरपालिकेतील कारकून ग्रंथपाल म्हणून काम पाहत असत. त्यावेळच्या संस्थान सरकार व नगरपालिका यांच्याकडून वाचनालयाचा खर्च केला जाई. ग्रंथालयाची स्वतःची जागा नसल्यामुळे भाडे तत्त्वावरील इमारतीत ग्रंथालयाचे काम चालत असे.

जंजिरा संस्थानच्या काळात वाचनालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी ४२९ रूपये किंमतीची जागा व सागवानी कपाटे जंजिरा संस्थानने दिली होती.

सन १९४२ मध्ये निधी उभा करून वाचनालयाची इमारत बांधण्यात आली. त्यासाठी चार हजार रूपये खर्च आला होता. फर्निचर नसल्यामुळे पुस्तकासाठी बास्केट वा पेटी वापरली जात असे.मोजक्याच वृत्तपत्रांमध्ये केसरी हे दैनिक अग्रक्रमाने घेतले जात होते.

या सार्वजनिक वाचनालयाची स्वतंत्र संस्था म्हणून नोंदणी दिनांक ५/२/१९५३ झाली. सन १९६४ पासुन शासकीय अनुदान १०००/– रूपये मिळत असे.

या 'अ' वर्ग वाचनालयास दै.लोकसत्ताचे संपादक अरूण टिकेकर यांनी आपल्या संग्रहातील ५०० पुस्तके भेट दिली असून, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री सुनील तटकरे यानी २३५ पुस्तके, राजा राममोहन रॉय लायब्ररी फांऊंडेशनकडून पुस्तके तसेच आमदार तुकाराम सुर्वे यानी आमदार निधीतून सव्वा लाख रूपये किंमतीची पुस्तके देणगी स्वरूपात दिली आहेत.

या शतायु ग्रंथलयास ग्रंथालय चळवळ, महाराष्ट्रच्या शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीच्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने पाच लाख रूपये अनुदान व सन्मानपत्र देवून गौरव केला आहे. या ग्रंथालयाच्या इमारत विस्ताराकरिता राजा राममोहन रॉय लायब्ररी फाऊंडेशन कलकत्ता यांचे कडून रु. १,८१,०७५/– निधी प्राप्त झाला होता. व ग्रंथलयास झेरॉक्स मशीन उपलबध करुन देण्यात आली आहे.

ग्रंथालयाद्वारे वाचन संस्कृती वाढावी, ग्रंथालय चळवळ वाढावी यासाठी सतत प्रयत्न केले जातात. या वाचनालयाच्यावतीने रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे २० वे वार्षिक अधिवेशन दि. २२ व २३ फेब्रूवारी १९८६ व ३३ वे वार्षिक अधिवेशन ९ व १० फेब्रवारी १९९९ रोजी आयोजित करण्यात आली होती. सर्व कोकण विभाग ग्रंथालय संघाचे वार्षिक अधिवेशन दि. २५ डिसेंबर २००५ रोजी घेण्यात आले. या वाचनालयाच्यावतीने मुंबई विद्यापीठ बहिशाला शिक्षणकेंद्र १९८१ पासून चालविण्यात येते.

**रामेश्वर सार्वजनिक वाचन मंदिर, आचरा:**

श्री रामेश्वर मंदिराच्या शेजारी सन १८९४ मध्ये या मंदिराच्या सभासदानी ग्रंथालयाची स्थापना केली.

सन १८९४ ते १९५४ या चढउतारतीच्या काळात अनेक समाज सुधारकांच्या सहकार्याने वाचनालयाचे अस्तित्व टिकवण्यासाठी शक्य झाले. हे वाचनालय आचरा व पंचक्रोशीमध्ये वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. या ग्रामीण वाचनलयात धार्मिक वैचारिक, इतिहास, कथा –कांदबऱ्या, नाटके, विज्ञानविषयक ग्रंथ, चरित्रे, दुर्मिळ कोश, स्पर्धा परिक्षासाठी लागणारी पुस्तके असे वाचनसाहित्य उपलब्ध आहे.

या संगणीकृत वाचनालयात वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, नियतकालीक विभाग, संदर्भ विभाग, बाल विभाग, महिला विभाग असे विविध विभाग असून स्वतंत्र अभ्यासकक्ष आहे.

वाचनालयाच्या वतीने वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने, वाचक स्पर्धा, समुह लोकनृत्य, देशभक्तीपर समुहगीत, वक्तृत्व, कथाकथन, हस्ताक्षर, शुध्दलेखन, काव्यवाचन, चित्रकला, प्रश्नमुंजुषा आदी स्पर्धा घेतल्या जातात. त्याचबरोबर स्मृतीग्रंथ योजना, सुलभ आजीवन सभासदत्व उपक्रम, आमचे साथ तुमची बालवाचक वाचनवृध्दी सप्ताह आदी स्तुत्य उपक्रम राबविले जातात.

**शेठ नारायण बेकर वाचनालय, चाळीसगाव :**

चाळीसगाव नगरीत या वाचनालयाची स्थापना ६ जुन १९०६ रोजी 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने झाली. कालांतरांने या वाचानलयाचे 'शेठ नारायण बेकर वाचनालय' असे नामकरण झाले. सन १९६० मध्ये या वाचनालयाची इमारत अग्निप्रलयात भस्मसात झाली होती. या घटनेच्या वेळी येथील महतत्वपूर्ण ग्रंथसंपदेची हानी झाली.

पुढील काळात विशेष परिश्रमातून ग्रंथालयाची पुर्नस्थापना करण्यात आली. वाचनालयाच्या नव्या इमारतीत मुक्तव्दार वाचक विभाग, ग्रंथ देवघेव विभाग, बाल विभाग, महिला विभाग, स्पर्धा परिक्षा विभाग, संदर्भ विभाग, ज्ञानधारा विभाग (ऑडिओ कॅसेट लायब्ररी) असे विभाग आहेत. वाचनालयाच्या ३००० चौ.फु.गॅलरीत गेली ३ वर्षे स्त्री व पुरुषासाठी योगा अभ्यास वर्ग घेतला जात आहे. वाचनालयाचे पुर्णतः संगणकीकरण झाले आहे. या ग्रंथालयात प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग असुन ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, ग्रंथालय सहाय्यक असे कर्मचारी आहेत.

वाचन संस्कृती व ग्रंथालय चळवळ वाढण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. उदा.सन १९३७ पासून प्रतिवर्षी दहा दिवसाची संस्कृती व्याख्यान माला, मुलांसाठी वाचन संस्कृती वर्ग तसेच विविध स्पर्धा त्याचबरोबर सांस्कृतिक शैक्षणिक उपक्रम व प्रबोधनात्मक व्याख्याने व प्रतिवर्षी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन केले जात आहे.

या वाचनालयाच्या अमृतमहोत्सवास ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या हस्ते प्रारंभ झाला तर समारोप संसदपटू मा. डॉ. अशोकरावजी मोडक यांच्या प्रबोधनाने झाला. तर शतक महोत्सव समारंभ शुभारंभ पद्मश्री कविवर्य ना. धों.महानोर यांच्या शुभहस्ते तर समारोह समारंभ जागतिक किर्तीचे जलतज्ञ माधवराव चितळे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

या शतायु ग्रंथालयास ग्रंथालयीन चळवळ व महाराष्ट्रतील शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीच्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने सन्मानपत्र व पाच लाख रूपयाचे विशेष अनुदान सन २००९ मध्ये दिलेले आहे. त्याच बरोबर महाराष्ट्र शासनाच्यावतीने सन २००९-१० चा शहरी विभाग अ वर्ग क्रमांकाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार देण्यात आला आहे.

सन १९९२ ला नाशिक विभागीय अधिवेशनामध्ये जिल्हा ग्रंथालय संघातर्फे आदर्श ग्रंथालय पुरस्कार देण्यात आला आहे. मुंबई विभाग ग्रंथालय संघातर्फे आदर्श ग्रंथपाल पुरस्कार सन १९९२ मध्ये ग्रंथपाल व महाराष्ट्र शासनाचा नाशिक विभागतून डॉ. शि. व. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार सन २००८ ग्रंथपाल श्री. आण्णा धूमाळ यांना प्रदान करण्यात आला आहे.

**पुणे मराठी ग्रंथालय, पुणे :**

पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात या ग्रंथालयाची स्थापना ज्येष्ठ साहित्यिक न. चि. केळकर याच्या प्रेरणेतून करण्यात आली. ग्रंथालय स्थापनेचा दिवस दि. २ ऑक्टोबर १९११ म्हणजेच विजयादशमीच्या शुभमुर्हुतावर शके १८३३ मध्ये करण्यात आली. या ग्रंथालयाची सुरवात श्री.केळकर यांच्या वाड्यातील एका खोलीत करण्यात आली. ग्रंथालयाचे अध्यक्ष म्हणून राव बहादूर नाना साहेब भगवानराव पावगी हे निवडले गेले. हळूहळू या ग्रंथालयाची वृध्दी होत गेली आणि तात्कालिन स्थितीत वाचकाच्या संख्येत वाढ झाली. ग्रंथालयाच्या पुर्वीच्या जागेवर ग्रंथालयाच्या विद्यमान वास्तूची उभारणा केलेली असून या चार मजली इमारतीच्या माध्यमातून ग्रंथालयाकरिता २०००० चौ.फुट इतकी जागा उपलब्ध झालेली आहे. सुरवातीच्या काळात स्व. करमरकर यांच्या उदार सहकार्यामुळे

ग्रंथालयाचा हा विस्तार शक्य झालेला आहे. या ग्रंथालयामध्ये बाल विभाग स्थापण्यासाठी पु.ल. देशपांडे प्रतिष्ठानकडून १९८९ मध्ये देणगी प्राप्त झाली. आज या बालविभागात ११,००० हून अधिक पुस्तके उपलब्ध असून लगतच सुसज्ज असा संगणक कक्ष आहे. या ग्रंथालयाकडे २५० सिडी स्वरुपात अमुद्रित वाचनसाहित्य आहे. या ग्रंथालयाकडे विस्तृत अभ्यासिका असून १९६२ मध्ये सुरू केलेल्या या अभ्यासिकेची क्षमता १००० विद्यार्थी सामावण्याइतकी आहे. या ग्रंथालयामध्ये साधारणतः ८० वर्षापुर्वीचे नियतकालीकाचे संच संग्रहीत केलेले असून या अंकाची संख्या ४६,००० हून अधिक आहे. संशोधक व विशेष अभ्यासक याच्या दृष्टीने असा हा आगळावेगळा संग्रह अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे. ग्रंथालयाव्दारे वर्षभरमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. सदैव वाचकाभिमुख असलेल्या या ग्रंथालयास २००५ मध्ये राजा राममोहन प्रतिष्ठनचा सर्वोत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच २०१२–१३ चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने महाराष्ट्र शासनाने या ग्रंथालयास सन्मानित केलेले आहे.

**श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा :**

श्रीमंत गंगामाई राणीसरकार या श्रीमंत नारायणराव घोरपडे यांच्या धर्मपत्नी. त्याही सुशिक्षित व वाचनप्रेमी होत्या. आजऱ्याच्या वाचनालयाविषयी त्यांना विशेष आस्था होती. सन १९३३ साली आजरा मुक्कामात त्यांनी ग्रंथालयास भेट दिली. ग्रंथालयाला ग्रंथसंख्या वाढविण्यासाठी, पुस्तके ठेवण्यासाठी व वाचकांसाठी आवश्यक बैठक व्यवस्थेसाठी फर्निचर इत्यादीसाठी निधीची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन आपल्या खाजगी निधीतुन ग्रंथालयासाठी त्यांनी रुपये १५,००० इतका भरघोस निधी उपलब्ध करुन दिला. वाचनालयाच्या कामकाजाबद्दल त्यांना वाटणारी आस्था व त्यांनी केलेली भरीव मदत याबद्दल कृतज्ञता म्हणून १९३३ साली ग्रंथालयाचे नामकरण 'श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा' असे करण्यात आले.

**शासनमान्यता व पब्लीक ट्रस्ट नोंदणी :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रंथालयाला महाराष्ट्र शासनाकडून सन १९५०–५१ साली 'तालुका – ब' वर्ग ग्रंथालय अशी मान्यता मिळाली व सन १९४९ पासून मुंबई सरकारच्या

विद्याविकास धोरणानुसार ग्रंथालयास दरवर्षी रु. ४५० इतके अनुदान मिळू लागले. १९५३ साली ग्रंथालयाची धर्मादाय उपायुक्तांकडे पब्लीक ट्रस्ट म्हणून नोंदणी करण्यात झली. २००७ साली ग्रंथालयास तालुका 'अ' वर्ग ग्रंथालय असा दर्जाबदल मिळाला आहे.

**ग्रंथालयाची इमारत :**

ग्रंथालयाचे संस्थापक श्रीमंत नारायणराव घोरपडे यांनी आजरा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणची चार गुंठे जागा ग्रंथालयाला बक्षिस दिली. याच जागेवरील जुन्या कौलारु इमारतीत अनेक वर्षे ग्रंथालयाचे कामकाज चालू होते. सदर जागेवर सध्या ग्रंथालयाने स्वमालकीची सर्व सोयीनीयुक्त दुमजली आर.सी.सी. इमारत उभारली आहे. ग्रंथालय इमारतीत मुक्तव्दार वाचन कक्ष, ग्रंथदेवघेव विभाग, संदर्भ ग्रंथ विभाग व अभ्यासिका, महिला व बाल विभाग, साखळी योजना, स्पर्धा परिक्षा विभाग, ध्वनीफीती, चित्रफिती विभाग व सभागृहाची सुविधा उपलब्ध आहे. आजरा नगरीचे सुपुत्र ख्यातनाम साहित्यीक शिवाजी सावंत यांच्या स्मृतीपित्यार्थ ग्रंथालयाने बांधलेल्या सभागृहाचे 'मृत्युंजयकार शिवाजी सावंत सभागृह' असे नामकरण केले आहे.

**ग्रंथसंपदा, नियतकालिके व वाचकवर्ग :**

आज अखेर ग्रंथालयाकडे विविध विषयातील २९,२३० इतकी ग्रंथसंपदा आहे. प्रामुख्याने मराठी तसेच हिंदी व इंग्रजी भाषेतील समृध्द साहित्य ग्रंथालयात उपलब्ध आहे. ग्रंथालयाच्या संदर्भ विभागात १००० हुन अधिक संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. १०० वर्षापुर्वी प्रकाशीत झालेले १४७ दुर्मिळ ग्रंथ ग्रंथालयात आहेत. परिसरातील अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक व साहित्यीक यांना ग्रंथालयाकडुन विनामुल्य संदर्भसेवा दिली जाते. जेष्ठ पत्रकार किर्लोस्करचे माजी संपादक कै. मुकुंदराव किर्लोस्कर, जेष्ठ इतिहास संशोधक कै. अनंतराव करवीरकर, सामाजिक कार्यकर्त्या गीता शेषू व पत्रकार मीना शेषू यांनी आपल्याकडील मौल्यावान ग्रंथ संपदा ग्रंथालयास भेट स्वरुपात दिली आहे. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कलकत्ता यांचे कडुन ग्रंथालय संचालनालयामार्फत ग्रंथालयास मोठ्या प्रमाणात भेट स्वरुपात पुस्तके मिळाली आहेत. महात्मा गांधी तंटामुक्त गांव समिती व आजरा ग्रामपंचायती मार्फत ग्रंथालयास स्पर्धा परिक्षा संदर्भातील मौल्यवान ग्रंथसंपदा प्राप्त झालेली आहे.

२० दैनिके व विविध विषयांवरील १०० हुन अधिक नियतकालिके ग्रंथालयात नियमित येतात व वाचकांना ती विनामुल्य  उपलबध करुन दिली जातात. स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पुस्तके व संदर्भ साहित्य ग्रंथालयात पुरवीण्यात येते. ग्रंथालयाचे ११०० हुन अधिक सभासद असुन बालवाचकांपासुन ज्येष्ठ नागरीकांपर्यंत समाजातील सर्व वयोगटातील वाचक ग्रंथालयाचा नेहमीच लाभ घेतात.

**आधुनिकीकरण :**

पारंपारिक ग्रंथालय सेवेतील अडचणी लक्षात घेऊन ग्रंथालय व्यवस्थापनाने ग्रंथालयाच्या संगणकीकरणाचा निर्णय घेतला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ग्रंथालयाने संगणकीकरण व बारकोडिंग पुर्ण केले असून सन २०१० पासून ग्रंथालयाचे सर्व कामकाज संगणकाव्दारे केले जाते. यामुळे ग्रंथालयाच्या कामकाजात सुसुत्रता आली असुन वाचकांना कमी वेळेत आवश्यक पुस्तके पुरविणे सुलभ झाले आहे. ग्रंथालयात इंटरनेट, एल.सी.डी. प्रोजेक्टर, झेरॉक्स इ. सुविधा उपलब्ध आहेत.

ग्रंथालय सेवा देण्याबरोबरच ग्रंथालयातर्फे वाचन संस्कृती व ग्रंथालय चळवळ वाढीसाठी नियमितपणे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये ग्रंथप्रदर्शने, चर्चा सत्रे व व्याख्यानमाला, विद्यार्थ्यांकरिता निबंध, वक्तृत्व, उपशास्त्रीय गायन अशा विविध स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येतात. बालवाचकांकरिता सुट्टीच्या कालावधीत मोफत बालवाचन कक्ष सुरु केला जातो. महिला, शेतकरी, ज्येष्ठ नागरीकांसाठी विविध कार्यक्रम नियमित आयोजीत करण्यात येतात. साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याकरिता ग्रंथालयातर्फे 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत कादंबरी पुरस्कार, दाजी टोपले नाट्य लेखन पुरस्कार, मासिक ऋग्वेद, बालसाहित्य पुरस्कार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर लक्षणीय गद्य साहित्य पुरस्कार असे साहित्य पुरस्कार दरवर्षी देण्यात येतात. ग्रंथालयातर्फे २३ व्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे सन २०१२ मध्ये यशस्वी आयोजन करण्यात आले. आजरा तालुक्यातील जवळपास ५० सार्वजनिक वाचनालयाच्या उभारणीत व वाटचालीत श्रीमंत गंगामाई वाचन मंदिराने महत्वपुर्ण योगदान दिले आहे. सन २०१४ –१५ मध्ये ग्रंथालयाचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले . या निमित्ताने वर्षभरात विविध सांस्कृतीक व साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात

आले आहे. राजा राममोहनराय ग्रंथालय प्रतिष्ठान कलकत्ता यांचे कडुन शतकोत्तर रौप्य महोत्सवा निमित्त ग्रंथालयास प्रोत्साहनात्मक विशेष अनुदान प्राप्त झाले.

**भावी उपक्रम :**

भविष्यात 'ई' ग्रंथालय सेवा सुरु करणे, ग्रंथालय इमारतीत ॲम्पी थिअटर उभारणे, 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत स्मृती संग्रहालय उभारण्याचा ग्रंथालयाचा मानस आहे.

**सदिच्छा भेट :**

ग्रंथालयाच्या वाटचालीत अनेक नामवंतानी वाचनालयास भेट देऊन आजऱ्या सारख्या ग्रामिण भागात गेली १२५ वर्षे ग्रंथालय निरंतर पणे करीत असलेल्या कामाबद्दल सदिच्छा व्यक्त केल्या आहेत. आजवर यदुनाथ थत्ते , 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत, 'स्वामी' कार रणजित देसाई, देशभक्त रत्नाप्पण्णा कुंभार, ज्येष्ठ समाज सेवक अण्णा हजारे, अंनिस चे संस्थापक नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंदराव पानसरे, सामाजिक कार्यकत्या सिंधुताई सपकाळ, ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव, ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य पी.बी. पाटील, साहित्यिक विष्णु वाघ, दासू वैद्य, गोविंद गोडबोले, महावीर जोंधळे, श्रीकृष्ण बेडेकर, माहिती आयुक्त विजय कुवळेकर, ज्येष्ठ पत्रकार अनंत दिक्षित, 'झोंबी' कार आनंद यादव, 'पाणिपत' कार विश्वास पाटील, डॉ. अरुणा ढेरे आदिंनी भेट देऊन ग्रंथालयाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

**पुरस्कार :**

ग्रंथालयाला महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय पुरस्कार, शतायू ग्रंथालय जिर्णोध्दार योजनेतून ५ लाखांचे विशेष अनुदान व सन्मानपत्र, कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाचा उत्कृष्ठ ग्रंथालय पुरस्कार तसेच आजरा भूषण पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

**सन २०१४-१५ मधील सांख्यिकीय तपशील :**

ग्रंथालयातील एकुण ग्रंथ संख्या - २९,२३०, पुस्तक खरेदी रक्कम रू. १०,२७५/-, नियतकालिके खरेदी रू. ४३,५२१/-, दैनिके २०, साप्ताहीके १३, पाक्षिके ४, मासिके ४२, त्रैमासिके ४, वार्षिके ५५, सभासद संख्या - १०३१, सेवक वर्ग संख्या -४

**सांस्कृतिक उपक्रम :**

१. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी वक्तृत्व, कथाकथन, गायन स्पर्धांचे आयोजन, स्पर्धा परीक्षा विभागातर्फे मार्गदर्शनपर शिबीरे व व्याख्याने.

२. ग्रंथ प्रदर्शन, काव्य संम्मेलने, व्याख्यानमाला व साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन.

३. शेतकरी मेळावे व शेतीविषयक प्रबोधन. बालकांकरिता विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन

४. राष्ट्रीय सण व थोर व्यक्तींचे जयंती– पुण्यतीथी कार्यक्रम.

५. प्रतिवर्षी उत्कृष्ट कादंबरी लेखनासाठी 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत कादंबरी पुरस्कार.

६. नाट्य लेखनासाठी दाजी टोपले नाट्यलेखन पुरस्कार व बाल वाङ्मयासाठी उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार असे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार देण्यात येतात.

७. ग्रंथालयातर्फे दरवर्षी माता गौरव पुरस्कार देयात येतो.

८. उत्कृष्ट ग्रंथालयाना दरवर्षी जिल्हास्तरीय पुरस्कार देण्यात येतो.

**मराठी ग्रंथ संग्रहालय : ठाणे**

ठाणे शहरातील मराठी ग्रंथसंग्रहालयाला १ जून १९९३ रोजी शंभर वर्ष पूर्ण झाली. १ जून १८९३ रोजी ठाण्यात मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना महाराष्ट्र सारस्वतकार विनायक लक्ष्मण भावे यांनी केली.

माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन (स. १७७९–१८५९) यांच्या प्रेरणेनं अन् प्रोत्साहनानं ब्रिटिश अमदानीत वाचनालयांची अन् ग्रंथसंग्रहालयाची स्थापना झाली. त्या काळातल्या ग्रंथालयात व वाचनालयात प्रामुख्याने इंग्रजी ग्रंथांचाच भरणाच अधिक असे. त्या मानानं मराठी ग्रंथांना त्यामध्ये दुय्यम स्थान असे. नेमकी हीच उणीव ग्रंथसंग्रहालयाचे संस्थापक कै. विनायक लक्ष्मण भावे, कै. विष्णू भास्कर पटवर्धन यांना व अनेक मान्यवरांना खटकत होती. अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सारस्वतकार कै. वि. ल. भावे यांनी पुढाकार घेऊन मराठी ग्रंथांना अग्रस्थान असलेलं महाराष्ट्रातलं पहिले ग्रंथालय स्थापन करण्याचा निश्चिय करुन, तो १८९३ मध्ये पुर्णत्वास नेला. ठाण्याच्या ग्रंथसंग्रहालयानंतरच मुंबई–पुणे येथे

ग्रंथसंग्रहालयाची स्थापना होत गेली. मराठी ग्रंथांसाठी स्थापन झालेले महाराष्ट्रातले पहिले ग्रंथालय या नात्यानं 'ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाकडे' अंगुली निर्देश करावा लागतो. ठाण्याच्या ग्रंथसंग्रहालयाची परंपरा पुढे पुणे व मुंबईच्या ग्रंथसंग्रहालयांनी जपली.

ठाण्यामध्ये ग्रंथालय स्थापण्याचा संकल्प पंडित पाठकांच्या घरच्या ओट्यावर बसून सोडला गेला असं जुन्या माहितगार व्यक्ती त्याकाळी सांगत असत. या ग्रंथसंग्रहालयाच्या स्थापनेत सिंहाचा वाटा कै. विनायक लक्ष्मण भावे यांचाच होता. तसेच याबाबत त्यांना विशेष सहाय्य कै.विष्णु भास्कर उपाख्य, बाबा पटवर्धन या व्यक्तीचे लाभले होते. याशिवाय प्रारंभीच्या काळात कै.आत्माराम मोरेश्वर पाठारे, कै.वामन गोविंद नाईक, कै.महादेवराव मराठे, कै.नारायणराव देशपांडे आणि कै.केशवराव विनायक करमरकर ही मंडळीही या संस्थेच्या संवर्धनात भाग घेत होती. सगळे कार्यकर्ते एकदा एकत्र आले असता चर्चेअंती एक व्यवस्थापक मंडळ स्थापण्याची कल्पना पुढे येऊन पहिले व्यवस्थापक मंडळ पुढील सभासदासह सिद्ध झाले.

१) कै. काशिनाथ विनायक राणे

२) कै. दामोदर सखाराम देशमुख

३) कै. नारायण गोविंद अत्रे

४) कै. वामन लक्ष्मण काळे

५) कै. कृष्णाजी गणेश अभ्यंकर

श्री. गणेश वासुदेव घाणेकर व कै. वामन विनायक काणे हे ग्रंथालयाचे पहिले चिटणीस होते. प्रारंभी मंडळांच्या सभासदांमध्ये चिटणीसांचा उल्लेख नसे. कै.वि.ल. भावे, कै.वि.भा. पटवर्धन यांचे संस्थेला कायम मार्गदर्शन लाभले. हे संग्रहालय स्थापण्याची संकल्पना पहिल्या वार्षिक अहवालात संस्थेने पुढील प्रमाणे नोंदविली आहे.

''आपली देशी भाषा सुधारण्यासाठी आजपर्यंत पुष्कळांनी प्रयत्न केले. कोणी नवीन ग्रंथ लिहिले, कोणी परक्या भाषेतील ग्रंथांची भाषांतरे केली, कोणी जुने ग्रंथ मिळवून, तपासून ते प्रसिद्ध केले. पण हे सगळे ग्रंथ एकेठिकाणी जमविण्याचा प्रयत्न कुणी नीटसा केलेला ऐकिवात नाही. आपल्या देशात पुस्तकालये बरीच आहेत. परंतु मराठी भाषेच्या

संबंधाने पहाता त्यातील व्यवस्था समाधानकारक नाही. बहुत करुन चांगल्या ग्रंथसंग्रहालयात इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांतील पुस्तके ठेवण्याचा संप्रदाय असतो. आता इंग्रजी भाषेत मराठीपेक्षा ग्रंथसंग्रह विशेष चांगला व जास्त, त्यामुळे बहुतेक पैसा इंग्रजी पुस्तके घेण्याकडेच खर्ची पडतो व मराठी ग्रंथांचा संग्रहा व्हावा तसा होत नाही, ही आपल्या देशात भाषेसंबंधाने मोठी उणीव आहे. ही उणीव लक्षात आणून ''मराठी ग्रंथसंग्रहालय'' स्थापन झाले व त्याला आज एक वर्ष पुरे झाले.''

**संस्थेची तत्कालीन उद्दिष्टे :**

१) पुस्तकांचा संग्रह करणे
२) वाचन अभिरुची उत्पन्न करणे
३) जुनी पुस्तके मिळविणे
४) हस्तलिखित प्रती जमविणे

प्रारंभाला उल्लेख केलेल्या दहा व्यक्तींनी ही संस्था स्थापण्यात पुढाकार घेतला. तसेच कै. वि. ल. भावे यांच्या प्रमाणे या गावातील अनेक साहित्य प्रेमींनी आपल्या जवळची पुस्तके संग्रहालयाला भेटी दाखल देऊन ग्रंथसंग्रहात भर घातली.

प्रारंभीच्या काळात संस्थेला भेट म्हणून देणग्या देणाऱ्या व्यक्तींमध्ये पुढील मान्यवरांचा समावेश होता.

१) नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर
२) लोकमान्य टिळक (स. १८५६–१९२०)
३) महर्षी धोंडो केशव कर्वे
४) इतिहासाचार्य वि. का. राजवडे (स. १८६४–२९२६)
५) साहित्यसम्राट न. चिं. केळकर (स. १८७२–१९४७)
६) रागिणीकर्ते वामन मल्हार जोशी
७) नागपूरचे डॉ. ना. भा. खरे
८) म. म. द. वा. पोतदार
९) राजकवी यशवंत

ग्रंथ व पुस्तकं विकत घेतानाही मराठी वाङ्मयाच्या सर्व शाखेतल्या प्रांतातली पुस्तकं विकत घ्यायची असं संस्थेचं प्रारंभापासून धोरण होते. कादंबरी, कथा, नाटक, निबंध, प्रवासवर्णन, चरित्र, इतिहास, धार्मिक ग्रंथ इत्यादी सर्व प्रकारची पुस्तके संस्थेत पहायला मिळतात. शासनानं ज्यांच्यावर बंदी घातलेली नाही अशी मराठीतील गेल्या शतक भरातली पुस्तके या संग्रहालयात हमखास मिळतात. असा या ग्रंथालयाचा गेल्या शंभर वर्षाचा लौकिक आहे. या संग्रहालयाच्या महतीविषयी बोलताना १८९६ च्या वार्षिक समारंभाच्या अध्यक्षपदावरुन लो. टिळक उद्‌गारले होते,

''बाहेरचे लोक असा आक्षेप काढतील की, पुस्तकांचा संग्रह ठाण्यात असून आम्ही बाहेरच्यांनी त्यात मदत करा करावी? मराठी भाषेस उत्तेजन देऊन तिचा ग्रंथसंग्रह वाढवावयाचा हे लक्षात आणले म्हणजे वरील आक्षेप निरर्थक आहे असे वाटेल.''

यावरुनच या ग्रंथालयाच्या ऐतिहासिक वाटचालीची व मराठी अस्मितेची कल्पना येते.

१८९३ साली संस्था स्थापन झाली तेव्हा संस्थेचे वर्गणीदार १७२ होते व ७६ पुस्तके एवढीच सुरुवात होती. प्रारंभाच्या काळात महाराष्ट्रात प्लेगच्या साथीने सन १८९६–१८९८ मध्ये ग्रंथालय बंद राहिले. पुढे विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात राजकीय परिस्थितीमुळं संस्थेला अज्ञातवासात दिवस काढावे लागले. त्यानंतर ग्रंथालय सदैव वर्धिष्णु होत गेलं. १९७१ साली संस्थेचे वर्गणीदार १३०० होते तर संस्थेच्या संग्रही ४०,००० ग्रंथ होते. त्या वर्षी वार्षिक उलाढाल ५५,००० रुपयांच्या घरात होती. १९६९ मध्ये संस्थेने मध्यवर्ती सरकारकडे एक पुस्तक समृद्धी योजना पाठविली होती. ही योजना रु. ५०,०००/– ची होती. योजनेला सरकारनं मंजूरी देऊन रु. ३०,०००/– अनुदानही दिलं. संस्थेने रु. २०,०००/– जमवायाच्या अटीची पुर्तता करुन सदरहू योजना यशस्वीपणे राबविली होती. अभ्यासिकेची सुविधा १९७० मध्ये होती. कोणाही अभ्यासकाला संस्थेच्या वेळात तिथं बसून संदर्भ शाखेतील ग्रंथांचा लाभ घेता येत असे. १९९३ साली संस्थेच्या वर्धापन दिनाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना सुप्रसिद्ध संशोधक व लेखक डॉ. य. दि. फडके यांनी आपल्याला येथील संदर्भ ग्रंथांचा लाभ घेता आला असं मोठ्या अभिमानानं आणि आनंदानं कबूल केलेलं होतं.

संग्रहालयाला प्रारंभाला स्वत:ची अशी जागा नव्हती. पंडित पाठकांच्या घरात संग्रहालय होतं. पुढे विठोबाच्या देवळासमोरच्या कै.भगवंत अप्पाजी पाध्ये यांच्या घरात तत्कालीन मराठी शाळा क्र.१ च्या जवळ ग्रंथालय स्थलांतरीत करण्यात आले होते. असे स्थित्यंतर वारंवार होऊ नये म्हणून संस्थेची स्वत:ची इमारत व्हावी यासाठी १९२० साली तत्कालीन परिस्थितीत ब्राह्मणसभा इमारत संस्थेनं रु. ८५००/– एवढ्याला विकत घेतली. पण दुरुस्तीसाठी व डागडुजीसाठी आणखी ५– ६ हजार रुपयांची आवश्यकता भासली. दुर्दैवाने तेव्हा तेवढी रक्कम जमू न शकल्यानं नुकसान सोसून ती इमारत संस्थेला विकावी लागली. काही काळ संग्रहालय खारकर आळीत पै. फक्रूद्दीन पटेल यांच्या घरात तर काही काळ खारकर आळीतल्या भागवतांच्या घरात होतं. त्यानंतर खारकर आळीच्या टोकाला आर्यक्रीडा मंडळाच्या पटांगणात (म्हणजे पद्माकर ट्रस्टच्या मालकीच्या जागेत) जुन्या सरस्वती मंदिराची जागा संग्रहालयानं भुईभाड्यानं ३५ वर्ष करारावर मिळविली. ती जागा घेण्यापूर्वी ब्राह्मणसभेची इमारत असलेली जागा ब्राह्मणसभेला टेंडर काढून ७२५५ रु. ला विकली. सरस्वती मंदिरच्या संग्रहालयाच्या वास्तूच्या पायाची कोनशीला दि. ११–०५–१९२९ रोजी भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्या हस्ते बसवून इमारतीचं काम सन १९३० अखेर पुर्ण झाले; खारकर आळीतल्या या वास्तूचं उद्‌घाटन ८ जून १९३० रोजी ह.म.ल.रा. पांगारकर यांच्या हस्ते करण्यात आले या इमारतीच्या बांधकामाला सुमारे १८,५०० रु. खर्च आला होता. या इमारतीला सरस्वती मंदिर, असे नाव देण्यात येऊन तिथं संग्रहालय सुरू करण्यात आलं. त्या वेळी वाचनालय विभाग व ,संग्रह विभाग असे दोन भाग होते. सन १९३६ मध्ये नियतकालिक विभाग सुरु करण्यात आला.

सन १९३० मध्ये २१६ सभासद होते १९३९ साली सभासदांची संख्या ८३ तर आली त्याचं कारण संग्रहालय गावाच्या एका टोकाला होतं तर गावाची वाढ दुसया टोकाला होत होती. सभासदांना ही जागा गैरसोयीची वाटत असावी. उत्साहानं सरस्वती मंदिरांची इमारत बांधली खरी पण सोयी गैरसोयीचा प्रश्न कार्यकर्त्यांना तेव्हा सुचलाच नव्हता. या अडचणीला पर्याय म्हणून संग्रहालयांची वाचनलाय शाखा गावात हलविण्यात आली. प्रारंभाला विरोधही

झाला पण नंतर गावांत ग्रंथालय आणले व होणारा व्यवस्थापन खर्च परस्पर जमा करावा असे ठरून १ मार्च १९४० पासून वाचनालयाची शाखा स्टेशन रोडवर सुरू करण्यात आली. ही जागा इलेक्ट्रिक कंपनीच्या कार्यालयच्या दक्षिणेकडील घरात होती. या वाचनालयाचा पहिल्या सहा महिन्याचा खर्च स्वतंत्र निधी जमवून करण्यात आला. यासाठी कार्यकारी मंडळाच्या सभासदांनी व ठाण्यातल्या इतर सद्‌गृहस्थांनी बरीच झीज सोसली. ही नवी योजना खूपच यशस्वी ठरली. १९३९ मध्ये सभासद फक्त ८३ होते ते वाढत जाऊन १६० च्या घरात गेले. त्या वेळच्या कार्यकर्त्यांपैकी श्री. द. दा. काळे हे एक तळमळीचे कार्यकर्ते म्हणून ओळखली जात. संस्थेच्या अध्यक्षपदावरुन वयाच्या ७९ व्या वर्षीही तरुणाला लाजविल इतक्या तडफेने संग्रहालयाचं कार्य करीत होते. पुढे हे ग्रंथालय एक सांस्कृतिक व्यासपीठ बनून येथे अनेक चर्चासत्रे, परिसंवाद, व्याख्यानमाला येथे सुरु झाल्या. ग्रंथालयाच्या या वाटचालीचा आढावा घेता तत्कालीन कार्यकर्त्यांची ग्रंथालय आस्था प्रकर्षाने जाणवते.

सध्याच्या इमारतीची जागा संस्थेनं शासनाकडून ८ वर्षाच्या भाडेपट्ट्याने स. नं. ३९० हि.नं. २ मध्ये सुमारे ४०० चौरस वार जागा मिळविली व त्यावर एक तात्पुरती सिंमेट पत्र्याची शेड बांधली. या शेडच्या पुढं असलेल्या जागेत व्याख्यानं, साहित्य सप्ताह वगैरे कार्यक्रम होऊ लागले. ही जागा ग्रंथालयाच्या वाढत्या व्यापास अपूरी पडू लागल्याने संस्थेने अधिक वर्षाच्या भाडे तत्वावर अगर कायम स्वरूपाची जागा विकत घेण्याचे प्रयत्न सुरु केले. ही जागा व सार्वजनिक बांधकाम खात्या नजिक असलेली रस्त्याची जागा निरूपयोगी असल्याने नगरपालिकेच्या निदर्शनास आणण्यात आले. तेव्हा नगरपालिकेने सर्वसाधारण सभेच्या ठरावात तो रस्ता रद्द करून ही जागा संस्थेला सन १९५९ मध्ये रु ३६५४/ – ला विकत दिली. त्यावेळीच भाडेपट्ट्यात घेतलेली जागाही सरकारनं संस्थेस कायम स्वरूपात विकत देण्यास अनुमती दिली. ही जागा ही १९६० मध्ये संस्थेला मिळाली. अशा तहेने सरकारकडून व नगरपालिकेकडून मिळालेली एकूण ७०५ वार जागा संस्थेची झाली व तेथेच सध्याची ईमारत बांधण्यात आली. पुढे बँकेकडून रु.१,२५,०००/– चं कर्ज घेऊन इमारत उभी करण्यात आली. इमारतीला १,७५ ,१८४ रु खर्च आला. तळमजला बँकेला भाड्यानं देण्यात येऊन पहिला मजला/ संग्रहालयाकडं ठेवण्यात आला. दोन्ही मजल्यांना मॅझनीन फ्लोअर आहेत.

संग्रहालयाच्या या नव्या वास्तूच्या बांधकामासाठी कै. वा. प्र.ओक, कै. मा. वि. हेगडे, कै. का. र. राऊत, श्री. द. दा. काळे, श्री. ह. ठाकूर, कै. दा. बा. देवल यांची एक समिती नेमण्यात येऊन समितीने निधी उभारण्यासाठी व बकेकडून कर्ज काढण्यासाठी धर्मादाय आयुक्तांकडून परवानगी मिळविली. यावेळी शासनाने रु.२५,०००/- इतके विशेष अनुदान म्हणून दिले व रु.९०००/- कार्यकर्त्यांकिडून ठेवीच्या रूपानं जमविण्यात आले.कर्ज फेडीनंतर बँकेकडून संस्थेला भाडे मिळत असून याद्वारे संस्थेस स्वत:चा आर्थिक स्त्रोत उपलब्ध झालेला आहे.

संस्थेच्या या नवीन वास्तूचं उद्‌घाटन तेव्हाचे संरक्षण मंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते कै. द. वा. पोतदार यांचे अध्यक्षतेखाली दि. २१/०४/१९६४ रोजी करण्यात आलं. आता या इमारतीचा दुसया मजल्यावर आणखी एक मजला बांधण्याचा कार्यकर्त्यांचा मानस आहे.

अशा प्रकारे या नव्या वास्तूत संग्रहालयाचे सर्व व्यवहार चालू असतात. पूर्वीच्या जागेवरील ग्रंथालयाची शाखा या नव्या जागेत आणण्यात आली आहे.

**उपक्रम :**

पुढील काळात ग्रंथालय सुस्थितीत येत गेलं याच दरम्यान ठाणे शहराचा परिसर व लोकसंख्याही वाढतच गेली. नौपाड्याच्या परिसरातील लोकांना एकतर लांब पडे. यामुळे संस्था एकाच ठिकाणी येत राहील, हे टाळण्यासाठी नौपाडा परिसरात संग्रहालयाची शाखा काढणं अपरिहार्य झालं. १९४० (शके १८६२) साली स्थापन झालेले स्वस्तिक वाचनालय कै. प. मि. सहस्त्रबुद्धे यांनी स्थानिक सहकायांच्या मदतीनं चालविलेले होते. पुढे जागे अभावी ग्रंथालय अडचणींच्या जागेत हलवावे लागलं. कै. म. त्र्यं. (मधु) जोशी, कै. कर्वे, कै.अभ्यंकर, कै. साने व कै. सोमण इत्यादिंच्या सहकार्याने त्या वाचनालयाची वाढ व विकास होत होता. याच काळात ठाणे ग्रंथालयाचे पदाधिकारी नौपाडा शाखेसाठी जागेच्या शोधात होते. तशी जागा मिळताच १९५४ साली ग्रंथालय सभेतील नामवंत कै. त्र्यं. दि. वाकनीस यांच्या हस्ते भूमीपूजन होऊन संग्रहालयाची नवी वास्तू बांधण्याचं ठरलं. पुढे २४/०४/१९५५ रोजी याच जागेत पूर्वीचं स्वस्तिक वाचनालय आणून त्याच संग्रहालयास

नौपोडा शाखा म्हणून त्याचे विलीनीकरण झाले. पुढे हे वाचनलाय चांगलंच भरभराटीस आले. शाखेची इमारत बांधून झाल्यावर संस्थेकडून तिची किंमत वसूल होईपर्यंत कै. वा. प्र. ओक वकील यानी इमारतीचे विश्वस्त म्हणून काम पाहिलं. आर्थिक व्यवहारांची पुर्तता होताच इमारत संस्थेच्या ताब्यात आली. या नव्या इमारतीस सुमारे रु. १८०००/– खर्च आला होता.

पुढे शासकीय अनुदान सुरू झाले. सुरुवातीस ते केवळ रु.४०००/– इतके होते. १९४२ मध्ये बालविभाग सुरु करुन अभिनव उपक्रमाचा पाया घातला गेला. त्या विभागाचे उद्‌घाटन आचार्य अत्रे यांनी केलं. यानंतर ७९–८० साली लहान मुलांना घरी पुस्तके नेणेसाठी परवानगी देणेत आली व त्यासाठी मासिक वर्गणी १ रु. ठेवणेत आली होती. उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांमध्ये वाचनाची आवड रुजवावी या हेतूने ठाण्यातील निरनिराळ्या विभागात विनामूल्य पुस्तक देऊन तिथं बालवाचनालय चालविण्याचा प्रयत्न संस्था अनेक वर्ष करीत आली आहे. त्यात श्री. द. बा. करमरकर, श्री. पां. के. दातार, आणि यांच्या घरीही बालवाचनालय केंद्रे चालविण्यात आली. अजूनही तशी सोय कुणी करणार असेल तर त्यांच्या घरीही बालवाचन केंद्रे उन्हाळ्याच्या सुट्टीत सुरु करण्याचा संस्थेचा सातत्यपूर्वक प्रयत्न चाललेला असतो.

बालविभागात सध्या सुमारे सहा हजार पुस्तकं आहेत. वाचनालयात महिलांचा खास विभाग नसला तरी शासकीय अनुदान नियमानुसार स्वतंत्र जागा राखून ठेवलेली आहे. या स्वतंत्र विभागाचे उद्‌घाटन ठाणे महापालिकेव्या उपमहापौर सौ.सुलभा ओक यांच्या हस्ते दि.०५/१२/१९९३ रोजी करण्यात आले होते. तिथं दुपारी १२ ते ४ अशा वेळेत फक्त स्त्रिया व लहान मुलांना (१२ वर्षाखालील) प्रवेश देण्यात येतो. या योजनेचा लाभ महिला व बालक मोठ्या संख्येने घेतात. दिवाळी अंक वाचकांना उपलब्ध व्हावेत म्हणून त्याविषयीची विषेश योजनाही संस्था राबवते. संग्रहालयाला प्रतिष्ठित स्थान प्राप्त झाल्यावर तिनं केवळ वाचनालय व ग्रंथसंग्रह एवढेच माफक उद्देश न बाळगता सतत नवे उपक्रम राबवून करून एक वेगळंच सांस्कृतिक व्यासपीठ म्हणून ग्रंथालय आज कार्यरत झालेले आहे. स्टेशन रोडवरील सरस्वती मंदिराची शाखा व नौपाडा शाखा या दोन्ही चांगत्या भरभराटीस

आलेल्या असून त्याना बळकट स्थैर्य प्राप्त झालेलं आहे. ठाण्यात फ्री नाईट इंग्लिश स्कूल या नावाची एक संस्था होती. १९२७ मध्ये संस्था बंद झाल्यावर त्या संस्थेने स्वत:पाशी शिल्लक असलेली ५४९ .५८ ही रक्कम काही अटींवर संग्रहालयाला दिली. त्या रकमेच्या व्याजातून निबंधस्पर्धा व वक्तृत्वस्पर्धा करण्याचा उपक्रम काही काळ संस्थेद्वारे चालविण्यात आला होता. हा उपक्रम नव्याने सुरू करण्यासाठी संस्थेने पाऊल उचलले आहे.

**संग्रहालयाचा सुवर्ण महोत्सव :**

मे १९४४ मध्ये संस्थेचा सुवर्ण महोत्सव साहित्य सम्राट कै.न.चिं.उपाख्य तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यावेळी संग्रहालयाच्या पन्नास वर्षाच्या कार्याची माहिती देणारी पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली होती. महोत्सव तीन दिवस गाजला. दि. ०५/०५/१९४४ रोजी साहित्यसम्राट केळकरांचं भाषण झालं. दुसया दिवशी ०६/०५/१९४४ रोजी प्रख्यात गायिका श्रीमती मोघूबाई कुर्डीकर याचं गायन झालं. दि.०७/०५/१९४४ रोजी ठाणे जिल्हा उपनगर वाचनालय परिषद कै. दि. त्र्यं. वाकनीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तसेच त्याला जोडून कार्यकर्त्यांचं संमेलनही आयोजीत करण्यात आल होत. हा सर्व समारंभ खारकर आळीतील सरस्वती मंदिरात झाला. या महोत्सवामुळं कार्यकर्त्यांना आत्मविश्वासाचे बळ लाभलं. त्यावेळी प्रसिद्ध झालेल्या पुस्तिकेत पुढीलप्रमाणं उल्लेख केलेला आहे, 'संस्थेच्या आयुष्यातील ५० वर्षांचा कालखंड असा उत्साहवर्धक आहे. नवे नवे विचार लोकांना पुरवून त्यांची कार्यक्षमता अधिक वाढवावी आणि महाराष्ट्रातीलच नव्हे, तर ही संस्था अखिल भारतातील प्रमुख संस्था व्हावी अशीच सर्वांची अपेक्षा असणार.' संस्थेचा हा विश्वास आणि वाटचाल खऱ्या अर्थाने महाराष्ट्रीय अस्मितेचे प्रतिक म्हणून नोंदवावा लागेल.

**नाट्यशताब्दी आणि नाट्य प्रयोग :**

मराठी नाट्यकलेला शंभर वर्ष पुरी झाल्यानं १९४४ साली महाराष्ट्रात अनेक ठिकाणी नाट्यशताब्दि साजरी झाली. संग्रहालयाने ही नाट्यशताब्दि नाटक करून साजरी केली. उत्सवाची समाप्ती कै. श्री. बि. वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली झाली.. पुढे काय? या विषयावर कै.. वर्तकांच भाषण झालं. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दिल्लीतल्या स्वातंत्र्य महोत्सवात

सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून नाटकही होते. मुंबई मराठी साहित्य संघाचे 'भाऊबंदकी' हे नाटक दिल्लीत गाजून स्पर्धेत प्रथम आलेलं होतं. संग्रहालयानं या नाटकाचा पहिला प्रयोग खुल्या नाट्यगृहात तात्पुरता रंगमंच बांधून ठाणेकरांना सादर केला. तेव्हापासनं दरवर्षी खुल्या नाट्यगृहात संस्था सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून नाटक सादर करीत असे. रंगमंचावर स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्यात या भूमिकेला संग्रहालयानं प्रोत्साहन दिलं. त्यास अनुसरून संस्थेत कुसुम कुळकर्णी (हेगडे) शकुंतला डोंगरे (मुंबईत सादर झालेल्या शाकुंतला नाटकांतील शकुंतलेचं काम करणारी) लिला मुळे (सुप्रसिद्ध नट कै. विवेक अभ्यंकर यांच्या पत्नी) चंदा दिवेकर, कु. सुर्यवंशी, कुमुद दिघे इत्यादि मुलींनी नाट्यकलेचा श्रीगणेशा संग्रहालयाच्या व्यासपीठांवर गिरविला.

डॉ. भालेराव यांच्या मान्यते मुळे आणि संग्रहालयाच्या श्री. द. दां. काळे, कै. प. त्रिं. सहस्त्रबुद्धे व श्री. द. बा. करमरकर यांच्या प्रयत्नात साहित्यसंघाचं संशयकल्लोळ हे नाटक संस्थेतर्फे आर्यक्रीडा मंडळाच्या मोकळ्या पटांगणात करण्याचं ठरवलं होतं. हा प्रयोग अतिशय यशस्वी झाल्यानं दरवर्षी नाटक करण्याच्या उपक्रमाचा प्रारंभ झाला . हा उपक्रम सर्वसाधारणपणे सन १९५३ पासून १९७० पर्यंत चालू होता. नंतर न्यू इंग्लिश स्कूल व मो. ह. विद्यालयाच्या प्रांगणात मंडप घालून नाटके करावी लागत. काही काळ न्यू इंग्लिश स्कूल व मो. ह. विद्यालयानं व्यासपीठ बांधल्यावर तिथं नाटकं होऊ लागली. गडकरी रंगायतन झाल्यावर ठेकेदारच नाटक लावू लागल्यानं संग्रहालयाच्या व अन्य संस्थांच्या मदतीसाठी होणारी नाटके जवळ जवळ बंद पडली. या आधी १९३२ मध्ये पण संस्थेच्यां मदतीप्रीत्यर्थ नाटकाचा प्रयत्न झाला. भारत सेवक नाटकमंडळ या संस्थेने संग्रहालयाच्या मदतीसाठी ११ जून १९३२ रोजी 'रक्तरंगण' नाटकाचा प्रयोग तेव्हाचे लोकप्रिय कलेक्टर श्री. एम. डी. भट यांच्या अध्यक्षतेखाली केला होता. त्यावेळी संस्थेस उत्पन्न मिळालं. अशा प्रकारे सुरवातीच्या नाट्यप्रयोगामुळं काही उत्पन्न संस्थेला लाभत असे. संग्रहालयाच्या आर्थिक प्रगतीला नाट्यप्रयोग पूरक ठरले. फार पूर्वी देखील नाटक लावून सस्थेनं निधी जमविला होता. मुंबई मराठी साहित्य संघानं मोठ्या धाडसाने कै. मामा वरेरकरांच्या पुरस्कारानं लोकनाट्य (तमाशा) सादर केल्यावर त्या कलेला प्रतिष्ठा लाभली. त्याचं

अनुकरण म्हणून' संग्रहालयानं पण लोकनाट्य (तमाशा) न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात सादर केला, तेव्हा जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळेच जणू काय लोकनाट्याला ठाण्यात प्रवेश मिळून नंतर दर शनिवार–रविवार काही व्यक्ति लोकनाट्य सादर करू लागल्या.

**व्याख्यानमालांमुळे झालेलं प्रबोधन :**

प्रसिद्ध गायक नट व विख्यात हार्मोनियमपटू कै. गोविंदराव टेंबे यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) ही व्याख्यानमाला गुंफली जात असे. १९६७ साली संग्रहालयाचे द्वाराही व्याख्यानमाला परिषदेनं घडवून आणली. संगीततज्ञ व ॲडव्होकेट बाबुराव जोशी यांनी प्रात्यक्षिकांसह गोविंदरावांची संगीतास देणगी, नाट्यसंगीताबद्दल अपेक्षा व संगीत शिक्षणाचा नवा दृष्टिकोन, या विषयांवर व्यख्यानं दिली. कै . गोविंदरावांचे चिरंजीव श्री. भाऊ साहेब टेंबे याचं पेटीवादनही झालं. ही व्याख्यानं अतिशय लोकप्रिय झाली. संस्थेला स्थैर्य आल्यावर सांस्कृतिक प्रबोधनासाठी व्याख्यानं व व्याख्यानमाला घडवून आणण्याचा प्रयत्न संग्रहालयाने सतत केला. सांस्कृतिक चळवळीचा एक भाग म्हणून ही व्याखानं होत गेली. एवढंच नव्हे तर साहित्य सप्ताह, काव्यगायन, ग्रंथांवर चर्चा; कथाकथनं अभिरुप न्यायालय इत्यादि कार्यक्रम करण्यातही संग्रहालय सदैव आघाडीवर राहितेलं आहे. नुसतीच पुस्तकेमविणं हा हेतू संस्था प्रतिष्ठित झाल्यावर राहिला नाही. समाजाला सुसंस्कृत करावं हा मानसही संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या मनात होता व आहे.

निरनिराळ्या कार्यक्रमात साहित्य सप्ताह चर्चा, चक्री व्याख्यानं, होलिकोत्सव, अभिरूप लोकसभा (मॉक पार्लमेंट) अभिरूप न्यायसभा, कथाकथन, काव्यगायन, पुस्तकांवर व नाटकांवर चर्चा, भजनी मंडळांचे कार्यक्रम, बहि:शाल व्याख्यानमालेच्या वक्त्यांची व्याख्यानं, चांदणे समेलनं इत्यादी कार्यक्रम संग्रहालयाने मोठ्या उत्साहानं केले. समाज प्रबोधन हाच हेतू यामागे होता. पुस्तकावर चर्चा होत तेव्हा पुस्तकाच्या लेखकालाही निमंत्रण असे. महाराष्ट्रातल्या सर्व नामवंत व्याख्यात्यांनी व्याख्यानं संग्रहालयानं दीर्घकाळ केली व तो उपक्रम अजूनही चालू आहे. या व्याख्यानांमुळं समाज प्रबोधनाचे मोठ काम संग्रहालयाला साधता आलं.

**आणखी काही विविध उपक्रम :**

संग्रहालय प्रतिष्ठा पावल्यावर संस्थेने लोकांना उपकारक होतील असे अनेक उपक्रम सार्वजनिक हिताच्या दृष्टीनं राबवण्यात मुळीच कसूर केली नाही. अनेक विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी जागेची सोय नसते हे जाणून संस्थेनं अभ्यासिनी चालू केली. रात्री ८.३० ते ११ या वेळात कसलाही मोबदला न घेता विद्यार्थ्यांना या अभ्यासिनीत अभ्यास करता येतो. विद्यार्थ्यांकडून आगाऊ सूचना मिळाल्यास परिक्षेसाठी पुस्तकेही उपलब्ध केली जातात. याचा लाभ सुमारे ५० ते ६० विद्यार्थी घेत असतात. ही अभ्यासिनीं डिसेंबर ते एप्रिलपर्यंत चालविण्यात येते. शालान्त परिक्षेसाठी नेमलेत्या पाठ्यपुस्तकांची रस ग्रहणं करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा उपक्रमही संस्थेने केलेला होता. दरवर्षी ते होणं आवश्यक आहे. मध्यंतरीच्या काळात स. १९५९ ते स. १९६५ या काळात महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेच्या विद्यमानं होणा–या परिक्षांची केंद्रे संस्था चालवित होती. संस्थेचे तेव्हाचे कार्यवाह श्री. दत्ता कणेकर हे या केंद्राचे प्रमुख होते. कणेकरानंतर काही वर्षे श्री. प्रभाकर पाध्ये व नंतर श्री. पां. के. दातार यांनी केंद्रे चालविली. या केंद्रातर्फे प्रथमा, प्रवेश, प्राच्य व विशारद या परिक्षा घेण्यात येत . या परिक्षांपैकी विशारद या परीक्षेत श्री. रा. ह. शिंदे प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. प्राच्य परिक्षेत वैजनाथ मेहेंदळे हे महाराष्ट्रात दुसरे तर मालती महाजन प्रवेश परिक्षेत पहिली आली होती. सांप्रत या परिक्षा घेण्यात येत नाहीत. पैशाच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन निधी जमविलेला होता. त्यासाठी सीलबंद पेट्या स्वयंसेवकांना देण्यात आल्या होत्या.

**ग्रंथालय इतिहास समृद्धी योजना :**

सन १९६९– ७० च्या आर्थिक वर्षात कार्यकारी मंडळात ग्रंथालय समृद्धी योजना तयार करून ती सप्टेंबर १९७० अखेर पुरी केली. ही योजना कार्यवाहीत आणण्यात श्री. पां के. दातार यांनी पुढाकार घेऊन विशेष परिश्रम घेतले. त्याना इतर सहका–यांची मदत झाली . निविदा टेंडर मागवून जी पुस्तके व सामान खरेदी करण्यात आली त्यासाठी कार्यकारी मंडळाची मंजूरी मिळवली. पुस्तकं खरेदीसाठी दाते, सूची, साहित्य सहकारचे, ललित मासिकाचे अंक, प्रकाशकांच्या याद्यां व राष्ट्रीय ग्रंथसूची इत्यादी साहित्याचा उपयोग

करण्यात आला. दाते सूची व साहित्य सहकारचे अंक वापरण्यास मुंबई ग्रंथ संग्रहालयाने मदत केली होती. या योजनेला केंद्र सरकारने रु. ३०,०००/- चे अनुदान दिले होते. रु. २०,०००/- संस्थेने जमवायच होते. त्यापैकी सर्वसाधारण सभेच्या संमतीने गंगाजळीतले कायम ठेव म्हणून ठेवलेले रु१५,०००/- परत घेऊन वापरण्यात आले. तसेच रु. ४,०००/- च्या ठेवी द.सा.द.शे. ६ टक्के दराने स्वीकारण्यात आल्या. सौ. सुवर्णा मनोहर मेहेंदळे रु.१,५००/- सौ. विमल दत्तात्रय काळे: रु.१.०००/-, कै. पंढरीनाथ वि. जोशी रु. १०००/- सौ. सुनेत्रा पांडुरंग दातार रु.५००/- या ठेवीसाठी सर्व साधारण सभेची मंजूरी घेतलेली होती. रु. १,३७८ देणगी रूपानं मिळाले. ही संपूर्ण योजना रु. ५२, ७३६ .१९ ची झाली होती. (तसेच ३७ लोखंडी कपाटे, १६ कार्ड इंडेक्स पेट्या, १२ वीजेचे पंखे,' २ वीजेची घड्याळे, १२ लाकडी खुर्च्या, ६ केनिंगच्या व १०० लोखंडी फोल्डिंगच्या खुर्च्या, १ लोखंडी स्टूल, ५ लोखंडी रॅक्स, १२ टेबले, ११ लहान मोठी स्टुले, ११ बाके, ४ पेपर स्टँड व १ शोकेस, रु. १३,११९/- ची पुस्तके इत्यादी समाविष्ट होती) ग्रंथालय समृद्धी योजनेसाठी पुढील व्यक्तीनी निधी जमा करण्यास सहाय्य केले होते. सर्वश्री द. दा. काळे, कै. दा. बा. देवल, कै. का. र. राऊत, व. कृ. आपटे, ज. के. दातार, ना. पु. करंदीकी, सौ.सुलभा दिवेकर, पां. के. दातार, म. पु. करमरकर, वि. शं. जोशी, शं. बा. मठ, वि. स. सरदेशपांडे, शरद साठे इत्यादी. पुस्तक मोजणीचे व जड वस्तुसंग्रह पडताळणीचे काम करावे असे शासनाकडून १९६३-६४ पासून 'सांगण्यात आल्यावर कार्यकारी मंडळाच्या ६/७/७४ च्या ठरावानुसार ते काम श्री. पां. के. दातार यांनी जातीनं तयार केलं. या कामासाठी १८ सेवक नेमले होते. नौपाडा शाखा, वाचनालय शाखा व शेवटी संदर्भ शाखा या ठिकाणीही कामे करण्यात आली . ही सर्व पुस्तकं नोंदताना आदि-अंत नाही, वाळवी लागलेली व फाटलेली अशा प्रकारच्या पुस्तकांची नोंद वहीत न नोंदवता बाजूला काढली. या पुस्तकांची संख्या ३,०३७ होती. ती शासनाच्या परवानगीने रद्द करण्यात आली. जड वस्तू संग्रह पडताळणीचे काम १३/०१/१९७५ रोजी भरलेल्या बैठकीत श्री. पां. के. दातार यांनी करण्याचं ठरले होते. त्यानुसार त्यांनी ते काम पूर्ण केलं. नव्या सामानाची वही करण्यात येऊन त्यात ३१ मार्च १९७४ अखेर असलेल्या सर्व सामानाची नोंद करण्यात आली होती.

**ग्रंथांची यादी– ग्रंथप्रदर्शने–सन्मान सभासदत्वाचा बहुमान :**

सन १८९५ मध्ये पुस्तकाची यादी प्रथम प्रसिद्ध करण्यात येऊन त्याचा खर्च संस्थेच्या पहिल्या वार्षिक सभेचे अध्यक्ष डॉ. कीर्तिकर यांनी दिला त्यावेळी संग्रहालयात १०८७ पुस्तके होती. दि. ३१.०१ .१९५० रोजी संस्थेत ८८५० ग्रंथ होते. १९५० मध्ये त्याची पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली होती. संस्थेत दुर्मिळ ग्रंथांचा खजिना आहे. नवीन ग्रंथही सतत येतच असतात. काही वेळा दुर्मिळ ग्रंथांची तर काही वेळा नवीन आणलेल्या पुस्तकांचीही प्रदर्शनेही भरविण्यात आली आहेत. नामवंत लेखकांची व्याख्याने संस्थेत होतात त्या लेखकाची सर्व पुस्तकंही प्रदर्शन म्हणून ठेवण्याची प्रथा संस्थेत आहे. संस्थेतल्या जुन्या ग्रंथाचं प्रदर्शन ठाण्याबाहेर भरविण्यात आलेलं आहे त्या प्रमाणे ठाणे जिल्ह्यातल्या लेखकांच्या ग्रंथांचं प्रदर्शनही भरविण्यात आलेलं आहे. २६–८– १९५७ च्या सर्व साधारण सभेत ठरत्याप्रमाणं संस्थेच्या वार्षिक सभेच्या अध्यक्षांना संस्थेचे सन्मान्य सभासद मानण्यात येते. स्थानिक चित्रकारांच्या कलाकृतींना वाव व उत्तेजन देण्याच्या हेतूने ठाणे शहरातील चित्रकार मंडळाचे सर्वश्री व्ही. सिन्नरकर, कैलास टकले यांच्या सहकाऱ्याने व मार्गदर्शनाखाली परांजपे दांते वाडी बालवाचन केंद्र विवेकानंद केंद्र विषणूनगर, नौपाडा, ठाणे, रमाकांत केशव देऊसकर यांच्या घरी, चरई ठाणे, वैजनाथ विद्यालय, डुमगाव, ता. कर्जत, राधाकृष्ण भंडार शासनाच्या ग्रंथालय साखळी योजना सुरु होती . राज्यस्तरापासुन ग्रामपंचायतीपर्यंत एकमेकांनं वरच्या स्तरावर सभासद होऊन त्या त्या केंद्राकडून पुस्तक उपलब्ध करून ती वाचकांना पुरविण्याची ही साखळी योजना यशस्वीपणे राबविली होती. संग्रहालय या योजनेचे सभासद असून संस्थेकडे जिल्हा वाचनालय म्हणून तालुका व ग्राम वाचनालये सभासद आहेत ते  पुस्तक नेत असतात.

**ग्रंथालय संघटना – ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ :**

ग्रंथालयांची संघटना व्हावी व त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रात पदार्पण कराव या हेतून ठाणे जिल्ह्यातील ग्रंथालयांचे अधिवेशन सन १९४४मध्ये ठाणे येथील खारकर आळीतील सरस्वती मंदिरात घेण्यात आलं होतं. त्याचे अध्यक्ष, सयाजीराव गायकवाड वाचनालयाचे (बडोदे) ग्रंथपाल कै. त्र्य. दि. वाकनीस व पुढे महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक हे होते.

त्याच वेळी फैजी कमेटीचे एक सदस्य व लॉ कॉलेजचे नियुक्त रजिस्ट्रार श्री. कर्वे हे उद्‌घाटक होते. कै. बाळासाहेब खेर जेव्हा हंगामी मंत्रीमंडळात शिक्षणमंत्री होते तेव्हा ग्रंथालयांचा विकास, प्रसार, इ. जाणून जोगेश्वरीच्या इस्माईल कॉलेजचे प्राचार्य श्री. फैजी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीचां वृतान्तही तेव्हा (स. १९३९) हाती आलेला होता . त्या समितीनं ग्रंथालय चळवळ ही अत्यंत आवश्यक आहे असं आग्रहानं प्रतिपादन केलं होतं. त्यातूनच तेव्हाचे शिक्षणमंत्री कै. बाळासाहेब खेर यांनी एक सूत्र प्रसारित केल की गाव तिथं जसं मंदीर, पंचायत, चावडी, शाळा, तसंच ग्रंथालयही असलं पाहिजे. त्यावेळेचे कार्येकर्ते ही गोष्ट तत्वत: मानत आलेले होते 'तेव्हा खालील दोन ठराव त्या अधिवेशनात केले गेले. १) फैजी समितीचा अहवाल तत्काळ अंमलात आणावा व २) ग्रंथालयांची गरज लक्षात घेऊन ग्रंथालय विकासासाठी ग्रंथालयाची संघटना असावी. त्यावेळी असलेलं लायब्ररी असोसिएशन या विषयात यथाशक्ति काम करीत होतं. ग्रंथालय कायदा होण्यापूर्वीच ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाची स्थापना करणेसाठी त्यावेळचे संग्रहालयाचे कार्यवाह पां. के. दातार यांची दि. १७–१०–६७ रोजी सभा झाली. पुढे संबंधितांना पत्रे पाठवून एक सभा आयोजित केली गेली. त्या नुसार दि. २९–१०–१९६७ रोजी झाली. त्या स्थापनेच्या दिवशी महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय अधिक्षक श्री. कृ. मु. उजळंबकर व महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी ग्रंथालय संघाचं महत्व विषद केलं, त्याच सभेत २९–१०–६७ रोजी ग्रंथालय संघ स्थापन झाला. या संघास २९–१०–१९९२ रोजी पंचवीस वर्ष पूर्ण झाली. म्हणून २५–४–९३ रोजी एक सांगता समारंभ भिवंडीस होऊन त्या प्रीत्यर्थ एक स्मरणिकाही काढण्यात आली होती. सध्या ठाणे जिल्ह्यात तालुका वाचनालये मिळून १०१ शासनमान्य संस्था आहेत. ग्रंथालय संघामुळं ग्रंथालयांची वाटचाल सुकरपणं होण्यास मदत झाली. तसेच एकमेकांचे संबंध जुळवून आणण्यास व सहकार्यं मिळविण्यास हा. संघ माध्यम म्हणून उपयोगी पडतो' जिल्हा वाचनालयाचा कार्यंवाह जिल्हा संघाचे कार्यकारणीवर व जिल्हा संघाचा एक कार्यवाह जिल्हा वाचनालयाचे कार्यकारी मंडळावर पदसिद्ध सभासद म्हणून घेतले जातात. त्यामुळं दोन्ही संस्थांचं सहकार्य साधलं जातं. एकमेकास माहिती मिळू शकते. ग्रंथालय संघाच्या माध्यमातून दरवर्षी जिल्हा, विभाग व

राज्य ग्रंथालयसंमेलने होत असतात. यामध्ये संग्रहालय भाग घेते. संघाचं कार्यालय ग्रंथालयाच्या जागेत असून. संघाला संग्रहालयाकडून सर्वतोपरी मदत होते.

**साहित्यिक मेळावे – साहित्य संमेलने :**

१९५३ साली ग्रंथालयाच्या वतीने ठाणे जिल्हा साहित्य संमेलन कै. वि. म. भुस्कुटे यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आलं; जिल्ह्यातील पुष्कळ् साहित्यिक त्या वेळी उपस्थित होते. नागरिकांचं सहकार्यही संमेलनास मिळालं होतं. १९६३ मध्ये संग्रहालयाचे वतीने स्थानिक साहित्यिकांचा मेळावा भरवण्यात आला होता. साहित्यिकांनी लिहिलेल्या कथा–कविता त्या वेळी वाचून दाखवाव्यात व त्यावर चर्चा व्हावी अशी अपेक्षा होती. पण या गोष्टीला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून हा उपक्रम थांबवण्यात आला. परंतु या प्रकारचे तीन मेळावे दि. १२/१०/६३, ३१/१/९४, २४/३/९४ रोजी भरले होते. त्या वेळी कै. वसंत वैद्य यांची संगीतिका,. कवी पंकज याचं काव्यगायन, कै. श्याम फडके व श्रीहरी जोशी यांच्या एकांकिका तसेच श्री. पाटील, सी. फडके व कै. दा. बा. देवल यांनी कविता वाचन केले होते.

१९६० साली मे महिन्यात ४२ वे मराठी साहित्य संमेलन संस्थेच्या वतीने ठाण्यात भरवण्यात आलेलं होतं. संमेलनाचे अध्यक्ष कै. प्रा. रा. श्री. जोग हे होते, तर स्वागताध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष कै. वा. प्र. ओक हे होते. कार्याध्यक्ष श्री. द. दा. काळे होते. कार्योपाध्यक्ष सर्वश्री शं. ना. यादव, बापू जोशी व स. पां. जोशी होते. कै. प. त्रि. सहसबुद्धे हे सरचिटणीस तर कै. व. रा. कर्णिक, कै. दा. बा. देवल, बि. बा. पाटणकर, सौ.प्रभावती हळदणकर व द. बा. करमरकर या मंडळीनी चिटणीस म्हणून काम केलं तर खजिनदार य. वि. मराठे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर हे पहिलंच साहित्य संमेलन भरत असल्यानं ते अतिशय थाटात पार पाडण्याचं श्रेय संग्रहालयाला मिळालं. संस्थेच्या कार्यकर्त्यांच, स्थानिक संस्थाचं व अनेक नागरिकांचं त्यावेळी उत्तम सहकार्य संग्रहालयाला लाभलं. कविवर्यं पी. सावळाराम, भं. दि. गांगल या साहित्यिकांनी या संमेलनात भाग घेतला. खर्च वजा जाता रु. ३१ ७. ०० एवढी रकम संस्थेकडे जमा करण्यात आली होती.

दि. १, २, ३ जानेवारी १९८८ रोजी प्रसिद्ध नाटककार व साहित्यिक श्री. वसंतराव कानेटकर यांच्या अध्यक्षतेखाली दादोजी कोंडदेव मैदानात ठाण्याला पुन्हा मराठी साहित्य संमेलन भरले. यावेळी ठाणे महापालीकेनं फार मोठं आर्थिक सहाय्य या संमेलनाला केलं. ठाणे महापालिकेचे तेव्हाचे अध्यक्ष श्री. वसंतराव डावखरे हे त्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. संमेलनाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध गुर्जर साहित्यिक श्री. गुलाबदास ब्रोकर यांनी केलं. संग्रहालयाच्या अनेक कार्यकत्यांनी या संमेलनात भाग घेतला. संस्थेचे अध्यक्ष श्री. द. दा. काळे यांनी सल्लागार या नात्यानं व श्री. पां. के. दातार यांनी कार्यवाह या नात्याने संमेलनात विविध कामगिऱ्या पार पाडल्या. त्यावेळी काढलेल्या स्मरणिकेसंदर्भातही संग्रहालयाच्यां कार्यकर्त्यांनी विविध कामं पार पाडली. संमेलनाचे कार्यालय संग्रहालयाच्या गच्चीत होते. त्याचे प्रमुख श्री. मं. पां. भावे होते. या व्यतिरिक्त संग्रहालयाच्या कार्यकर्त्यांपैकी सौ. शोभा मराठे, कै. दा. बा. देवल, श्री. वसंत आपटे, श्री. भा. शं. प्रधान, श्री. शशी जोशी यांनीही संमेलनात सहभाग दिला. संग्रहालयातल्या दुर्मिळ ग्रंथांचं प्रदर्शन या संमेलनाव्या वेळी भरविण्यात आलं होत.

स. १९३२ मध्ये संग्रहालयानं पुढाकार घेऊन कोकण प्रांतीय साहित्य संमेलन ठाण्यात भरविलेलं होतं. त्या कामाचा अनुभव असल्याने संग्रहालयाच्या वतीनं १९३६च्या डिसेंबर मध्ये पुन्हा ठाण्यात मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे तिसरे अधिवेशन ठाण्यात भरलं होते.

कै. सीताराम महादेव अभ्यंकर यांनी सुरुवातीच्या काळात खारकर आळीतील पद्माकर ट्रस्टकडून भाडे पट्ट्यावर जागा घेऊन सरस्वती मंदिराची इमारत उभी केली. ही इमारत उभी करण्यामध्ये अभ्यंकरांचा सिंहाचा वाटा होता . अशा प्रकारे त्यांनी मोठ्या दक्षतेने व आत्मियतेने संस्थेचे काम केले व संस्था नावारूपास आणण्यास सतत झटत राहिले. कोकण साहित्य संमेलन ठाणे येथे झाले. त्यात त्यांचा मोठा वाटा होता. संस्थेमध्ये ३१ व्या वर्षी (म्हणजे २३– २४ मध्ये) प्रवेश केल्यापासून सुरुवातीस काही वर्षे कार्यवाह व नंतर उपाध्यक्ष' म्हणून कार्यरत होते. अशा प्रकारे त्यांनी ३१ वर्षे संस्थेत पदभार सांभाळला. अशाच काही व्यक्तींनी या ग्रंथालयास नावारुपास आणले. त्यामध्ये –

**१) कै. वामनराव प्रभाकर ओक :**

ओक हे ठाण्यातील नाणावलेले व विख्यात वकील. आपला वकीलीचा व्यवसाय सांभाळून ते सार्वजनिक संस्थांमध्येही कार्य करीत असत. ते वाङ्मयप्रेमी असल्यानं त्यांचा स्वतःचा खाजगी ग्रंथसंग्रहही नमुनेदार होता. काही काळ ते ठाण्याच्या मो. ह. विद्यालयात हौसेन विनावेतन शिक्षकाचेही काम करीत. ग्रंथ संग्रहालयाचे ते २२ वर्ष अध्यक्ष होते. एक वर्ष ते उपाध्यक्षही होते. खालच्या. पदावरही त्यांनी तितक्याच नेकीनं काम केलं. त्यांच्याच कारकिंर्दीत नौपाडा वाचनालयाची इमारत बांधून झाली. त्यावेळी ठेवीदारांचे विश्वस्त म्हणूनही त्यांनी काम केलं. सर्व कर्ज फिटल्यावर दि. २५/४/१९६६ रोजी इमारत संग्रहालयाच्या नावावर करून देताना त्यातील कायदेशीर व तांत्रिक कामे त्यांनी चोखपणे केली : १९६० साली त्याच्याच कारकीर्दीत कै. रा. श्री. जोग यांच्या अध्यक्षतेखाली ४२ वे मराठी साहित्य संमेलन ठाण्याला झाले. तेव्हा त्या संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. संरम्थेत . पूर्वी विश्वस्त हे पद नव्हते. परंतु सेंट्रल बँकेला जागा भाड्यानं देण्याच्या वेळी म्हणजे १९७० मध्ये विश्वस्तपदाची संकल्पना त्यांनी मांडली व नंतर विश्वस्तपद निर्माण झालं. सध्याच्या सरस्वती 'मंदिर इमारतींचे बांधकामही त्यांच्याच कारकीर्दीत झाले. सन १९७७ मध्ये श्री. वामनराव ओक कालवश झाले. कै. का. र. राऊत हे मुंबई हायकोर्टात ग्रंथपाल असल्यानं ग्रंथसंग्रहालयाशी त्यांना घनिष्ट संबंध आला. आपल्या ग्रंथसंग्रहालयाच्या कामात ते समरस होत. कार्यकारी मंडळ, कार्यवाह, उपाध्यक्ष व शेवटी बिश्वस्त या नात्यानंही या संस्थेत ३८ वर्षे मोठ्या निष्ठेन त्यांनी काम केले. हायकोर्टात ग्रंथपाल असल्यामुळे हायकोर्टातील अतिशय विद्वान मंडळींना पुस्तके पुरविण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यामुळे त्यांचे अंगी ग्रंथप्रेम आणि ग्रंथालयाबद्दल प्रेम होते. त्याचाच उपयोग ठाण्याचे ग्रंथ संग्रहालयास झाला.

**२) कविवर्य कै. वसंत रा. वैद्य :**

हे महाराष्ट्रात विख्यात कवी म्हणून नावाजलेले होते. महाराष्ट्रामध्ये नुकतीच काव्य गायनाची प्रथा सुरू झाली होती. ती लोकप्रिय आणि रूढ करण्यामध्ये वैद्य हे अग्रभागी होते. त्यांचा गळा अतिशय सुरेल होता. ते त्यांच्या कविता जेव्हा म्हणत तेव्हा त्या श्रोत्यांच्या

अंत:करणाला भिडत असत. अशा तऱ्हेने साहित्य प्रांतामध्ये काव्य गायन या विषयाचं वर्णन करावयाचे म्हटलं तर याही काळाला वैद्यांचा काळ अस म्हणावं लागेल.ग्रंथ संग्रहालयात कार्यकारी मंडळ, कार्यवाह व उपाध्यक्ष या विविध पदांवर त्यांनी २७ वर्षे काम केलं. त्या खेरीज वाङ्मयीन चर्चा, काव्यगायन, चक्रीव्याख्यानं वगैरे कार्यक्रमात ते सहभागी होते.

**३) श्री. द. दा. काळे :**

श्री. द. दा. काळे हे मुळचे नाशिकचे. परंतु ठाण्याला आल्यावर ते पूर्णपणे ठाणेकर झाले. ठाण्याच्या अनेक संस्थोमध्ये व सार्वजनिक क्षेत्रात ते अजूनही मोठ्या धडाडीन पंचाहत्तरी ओलांडल्यावरही काम करीत. गावाच्या टोकाला वाचनालय गेल्यावर वास्तू जरी नवीन व स्वत:ची असली तरी सभासद व वाचक कमी होऊ लागले. अशावेळी श्री. काळे यांनी लक्ष घालण्यास सुरुवात केली. ही संस्था बाजारपेठेत आणण्यासाठी वेगवेगळ्या सहका–यांना घेऊन त्यांनी धडाडीनं काम केले. ०१/०३/१९४० पासून स्टेशनरोडवर वाचनालय विभाग सुरु करण्यात व नंतर सध्याच्या वास्तूत संग्रहालयाची स्थापन करण्यात काळे यांचा सिंहाचा वाटा होता. नवीन नवीन कल्पना मांडून संस्थेचा गाडा पुढं रेटण्यात त्याचं कौशल्य कौतुकास्पद होत. सतत अर्धशतकापेक्षा जास्त (५५ वर्ष) संस्थेत पदाधिकारीपदावर राहून त्यांनी संस्थेत कार्यकारी मंडळ, हिशेब तपासनीस कार्याध्यक्ष, अध्यक्ष आणि विश्वस्त ही संस्थेतली सारी पदं त्यांनी सांभाळून आपलं असामान्य कर्तुत्व दाखविलेलं आहे. या सर्व कार्यामध्ये त्यांच्या पत्नी सौ. विमलाताई काळे यांचेही सहकार्य लाभले.

**४) श्री. द. बा. करमरकर :**

करमरकर हे ग्रंथालय महर्षीच होत. ग्रंथालयाशी व ग्रंथालय संघाशी त्यांचा दीर्घकाळ संबंध आला. संग्रहालयात त्यांनी विविध पदांवर काम केलं. विभागीय ग्रंथालय संघावर ते पदाधिकारी होते. ग्रंथालय संघाच्या वाढीसाठी त्यांनी अविरत श्रम केले व त्या प्रीत्यर्थ त्यांनी बराच प्रवासही केला. अनेक वाचनालयांना त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झालेला आहे.

**ठाणे, नगर वाचन मंदिर :**

ठाणे जिल्ह्यातील सर्वात जुने असलेले वाचनालय १८५० साली स्थापन करण्यात आले. त्यावेळी त्याचे नाव ठाणे नेटिव्ह जनरल लायब्ररी असे होते. याचा कारभार १५ X १० च्या पत्र्याच्या शेडमध्ये सुरू करण्यात आला. १८५२–१८५३ मध्ये या ग्रंथालयात ६८४ पुस्तक होती. त्यापैकी ४४० इंग्रजी, ९६४ मराठी तर बाकी इतर भाषिक होती. सभासद संख्या ९३ होती. त्यातील ११ युरोपियन तर ८२ स्थानिक होते. १८८२ साली संस्थेची जुनी इमारत बांधण्यात आली. हे ग्रंथालय त्यावेळी प्रामुख्याने इंग्रजी पुस्तकाचे ग्रंथालय होते. १८८२ साली या वाचनालयाचे नाव बदलून म्युलक लायब्ररी असे ठेवण्यात आल्याचे दिसून येते. नामकरण झाल्यानंतर झालेल्या पहिल्या कार्यकारी मंडळात खालील पदाधिकारी असल्याची नोंद मिळते. (१) अध्यक्ष श्री. डब्ल्यू. बी. म्युलक, कलेक्टर, (२) उपाध्यक्ष डॉ. के. आर. कीर्तीकर, सिव्हील सर्जन, (३) चिटणीस श्री. जे. बी. मोडक, हेडमास्तर, बी. जे. हायस्कूल, (४)खजिनदार श्री. र. गं. भोर. ठाण्यात पुढे इ. स. १८९३ च्या १ जूनला फक्त मराठी ग्रंथांसाठी मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना झाली. त्यामुळे तेथे मराठीतील चांगली पुस्तके उपलब्ध होऊ लागल्यावर वाचकांचा ओघ मराठी ग्रंथसंग्रहालयाकडे मोठ्या प्रमाणावर वळला. परिणामी म्युलक लायब्ररीतील सभासद संख्या आणखी कमी होऊ लागली. पुढे पहिल्या महायुद्धाच्या काळात तत्कालिन राजकीय परिस्थितीमुळे हे ग्रंथालय बंद पडले. ग्रंथालय कायमचे बंद पडू नये म्हणून डॉ. एफ. ए. मूस, परशराम आबाजी भट, सर गोविंद बळवंत प्रधान, रा. ब. सखाराम केशव भागवत, रा. ब. भगवंत, हरी शृंगारपुरे व त्रिभुवनदास जमनादास या ग्रंथप्रेमी नागरिकांनी एक सभा आयोजित करून लायब्ररी पुन्हा चालू करण्यासाठी प्रयत्न केले व संस्थेच्या कामाला चालना देण्यात आली. वर्गणीदारांची नवीन यादी, नवीन नियमावली तयार करण्यात आली. एप्रिल १९५१ पासून अर्धवेळ काम करणारे पगारी ग्रंथपाल नेमण्यात आले. संस्थेला स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून शहरातील प्रतिष्ठीत नागरिकांनी सतत प्रयत्न चालू ठेवले. ही संस्था इंग्रजी पुस्तकाचे ग्रंथालय म्हणूनच स्थापन झाली, परंतु वाचकवर्गाचा कल मराठी पुस्तक वाचण्याकडे असल्यामुळे असंख्य सभासदांच्या मागणीवरून मराठी पुस्तकांची खरेदी जास्त प्रमाणात

करावी असे संस्थेने १९३३ मध्ये ठरविल्याप्रमाणे मराठी पुस्तकांची जास्त प्रमाणात खरेदी करण्यात येऊ लागली.

सन १९४५ नंतर उत्पन्नाचे व खर्चाचे आकडे रु. २०००/– चे वर गेले, परंतु वाचकवर्गाच्या अपेक्षेपेक्षा फारच कमी नवीन ग्रंथखरेदी कली जात असे. त्यासाठी सभासद वर्गणी शिवाय इतर उत्पन्नाचे मार्ग शोधणे गरजेचे झाले. संस्थेच्या इमारती बाहेरील खुली जागा भुई भाड्याने देण्याचे धोरण संस्थेला स्वीकारावे लागले. परंतु यामुळे वार्षिक उत्पन्नात रू. ७००–८०० पर्यतच वाढ झाली. अर्थात यामुळे पुस्तक खरेदीवर थोडा अधिक पैसा खर्च करता येऊ लागला. संरथेचे काम विनामूल्य करणारे निष्ठावंत कार्यकर्ते संस्थेला मिळाल्यामुळे संस्थेला प्रगती करता आली.

संस्थेच्या स्थापनेपासून पुस्तक घरी नेऊन वाचणाऱ्या सभासदांचे तीन वर्ग होते व फक्त वाचनालयात येऊन अर्थात वर्गणी देऊन वाचणारा निराळा वर्ग होता. पारतंत्र्यापासून १९३८ अखेरपर्यंत सभासद वर्गणी खालीलप्रमाणे होती. पहिला वर्ग एक रुपया, दुसरा वर्ग आठ आणे, तिसरा वर्ग चार आणे, फक्त वाचक वर्ग दरमहा दोन आणे. पहिल्या वर्गाचे सभासदास एका वेळी तीन पुस्तक, दुसऱ्या वर्गाचे सभासदास दोन पुस्तक, तिसऱ्या वर्गाचे सभासदास एका वेळी एकच पुस्तक नेता येत असे. जानेवारी १९३९ पासून आश्रयदाते व आजीव सभासद असे दोन वर्ग सुरू करण्यात आले. त्यावेळी आश्रयदात्यास एकूण वर्गणी १५० रू. व आजीव सभासदास रु. ५० ठेवण्यात आली. १९४६ पासून दुसऱ्या वर्गाचे सभासदास आठ आण्याऐवजी सहा आणे वर्गणी करण्यात आली. यानंतर जानेवारी १९५८ पासून फक्त तिसऱ्या वर्गाची वर्गणी दरमहा सहा आण्याऐवजी आठ आणे करण्यात आली. तसेच जानेवारी १९६३ पासून आजीव सभासदांस वर्गणी रु. ५० ऐवजी शंभर रुपये करण्यात आली. १ जानेवारी १९६५ पासून ग्रंथालयाचे 'म्युलक लायब्ररी' हे नाव बदलून 'ठाणे नगरवाचन मंदिर' असे ठेवण्यात आले. त्यावेळी नवीन नियमावली मंजूर करण्यात आली व वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे ठरवले गेले. आश्रयदाते रू. ३००/– ,आजीव सभासद रु. १५०/– , पहिला वर्ग दरमहा रू. १७५, दुसरा वर्ग रु. १२५ , तिसरा वर्ग दरमहा रु. ०.७५ वाचकवर्ग दरमहा ०.४० पैसे, ऑगस्ट १९७३ पासून पुन्हा वर्गणीदरात वाढ

करण्यात आली. आश्रयदाते रु. ५००/– , आजीव रु. २५०/– सभासदांचे तीन वर्ग होते. त्याऐवजी पहिला व दुसरा असे दोन वर्ग करण्यात आले. शिवाय वाचनालयास सरकारी मान्यता मिळाल्यामुळे व शासकीय अनुदानही मिळू लोगल्यामुळे शासकीय नियमानुसार वाचनालय मुक्तद्वार झाले. यामुळे संस्थेत येऊन वाचणाऱ्या वाचकवर्गास वर्गणी माफ करण्यात आली. पुढे वेळोवेळी वर्गणीत वाढ करणे आवश्यक झाले. २००० साली सभासद वर्गणी पुढीतप्रमाणे आहे. आश्रयदाते रु. ५०००/–, आजीव रु. २०००/–, वर्ग पहिला अनामत रु. ३००/– व द्वैमासिक वर्गणी रू. ४०/– , वर्ग दुसरा अनामत रु. १५०/– , मासिक वर्गणी रु. २०/– , बालविभाग अनामत रु. १५/– , मासिक वर्गणी रु. १ /– २००६ पासून वर्गणीत पुन्हा वाढ करण्यात आली आहे.

संस्थेची जुनी इमारत इ.स. १८८२ साली बांधली होती. ती जीर्ण झाली असत्यामुळे नवीन इमारत बांधणे आवश्यक होते. १९६२ पासून या दृष्टीने खटपट करण्यास सुरुवात झाली. ठाण्यातील इंजिनियर व ठाणे नगरपालिकेचे माजी मुख्याधिकारी के. का. वि. नातू यांनी ग्रंथालयासाठी उपयुक्त अशी योजना तयार केली व इमारत बांधण्यास परवानगी मिळताच बांधकामास सुरूवात करण्यात आली. बांधकामास सुरुवात होताच तळमजल्यावरील जागांना मागणी आली. नागरिकांकडून देणग्याही मिळण्यास सुरुवात झाली. ठाण्यातील सुप्रसिद्ध वकील वामनराव अनंत रेगे यांनी दुस–या मजल्यावरील सभागृहाकरिता रु. २५०००/– ची देणगी दिली. सारस्वत बँकेला पहिल्या मजल्यावरील जागा त्यांची शाखा उघडण्यासाठी भाड्याने द्यावयाचे ठरविल्यामुळे त्यांनी अल्प व्याजदराने रु. ५०,०००/– कर्जाऊ दिले व अशाप्रकारे तळमजला व दोन मजल्यांची इमारत १९७० साली पूर्ण झाली.

२५ वर्षानंतर ह्या इमारतीच्या छतातून पावसाचे पाणी आत येत असे. ह्या पाण्यामुळे पुस्तकाचे, लाकूड सामानाचे नुकसान होत असे. वाचनालयाची जागा अपुरी पडत असल्यामुळे दुसऱ्या मजल्यावर सिमेंटच्या पत्र्याची शेड टाकून तिसरा मजला उभा करावा असा निर्णय कार्यकत्यांनी सन १९९४ साली घेतला. 'ऑल दी बेस्ट' हे चंद्रलेखांचे नाटक गडकरी रंगायतनमध्ये लावले. जाहिरातदारांच्या आणि शासनाच्या अनुदानाने अखेर ग्रंथालयावर तिसरा मजला चढला. आता या ठिकाणी सांस्कृतिक, साहित्यिक कार्यक्रम, महिला विभाग,

बालविभाग, संदर्भ विभाग, अभ्यासिका यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक इ. वाचक तिसऱ्या मजल्यावरील सुसज्ज अभ्यासिकेचा लाभ घेतात. सध्याच्या इमारतीच्या ठिकाणी सहा किंवा आठ मजली भव्य वास्तू उभारण्याच्या दृष्टीने गंभीरपणे विचार केला जात आहे. आवश्यक त्या परवानगीसाठी व निधी उभारण्यासाठी नेटाने प्रयत्न सुरू आहेत. सध्या हे ग्रंथालय– तालुका 'अ' दर्जाचे आहे. ४४००० ग्रंथ संख्या आहे. बालविभागात ९७६ पुस्तक आहेत. सभासद संख्या ६१७ आहे. १५ मराठी, १ हिंदी व ६ इंग्रजी वर्तमानपत्रे येतात. ४८ मासिके, १६ साप्ताहिक व ३पाक्षिके ग्रंथालयातर्फे घेतली जातात. ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले असून त्यासाठी डॉल्फीन प्रणाली वापरण्यात आली आहे.

**करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर :**

करवीर संस्थानचे छत्रपती शिवाजी महाराज (तिसरे) उर्फ बाबासाहेब महाराज यांच्या कारकिर्दीत ''कोल्हापूर नेटिव्ह लायब्ररी'' या संस्थेची स्थापना दि.१५ जून १८५० रोजी त्यावेळचे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट, कर्नल एच.एल.अँडरसन यांनी केली. त्यांनी येथील रविवारवाड्यात सार्वजनिक सभा बोलावून संस्था स्थापन करण्याचा उद्देश व त्यापासून होणारे फायदे निवेदन केले. त्यानंतर जागच्या जागी पाच हजार रुपये जमा केले. त्यापैकी रु.१०००/– करवीर सरकारने दिले होते. ही रक्कम जमा झाल्यावर २५०८ रु. ८ आणे खर्च करुन लायब्ररीची इमारत हल्ली सिव्हील सर्जन राहतात त्या ठिकाणी बांधली. रु.१०५०–१३–१० पै ची पुस्तके, रु.३२–३–२ पै चे इतर सामान खरेदी करण्यात आले. या संस्थेस जोडून म्युझियम काढण्यासाठी रु.१०६३–९–० पै इतकी रक्कम राखून ठेवण्यात आली होती. यावरुन तत्कालीन आर्थिक सहाय्याची कल्पना येते.

स्थापनेच्या वेळी वर्गणीदारांची संख्या १७ व दरमहाचे उत्पन्न रु.१५/– होते. पुस्तकांची संख्या ४४२ होती. त्यापैकी काही करवीर सरकारने, काही दक्षिणा कमिटीने व काही मिशनरी लोकांनी दिली होती. ग्रंथालयात सुरुवातीस ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, वर्तमान दीपिका, धूमकेतू इ. वृत्तपत्रे येत होती. संस्थेची व्यवस्था पाहण्याचे काम बहुधा पोलिटिकल खात्याचे हेडक्लार्क पहात असत. जमा होईल ती रक्कम करवीर सरकाचे खजिन्यात ठेवली

जात असे. निरनिराळ्या पोलिटिकल अधिकायाच्या देखरेखीखाली व श्री छत्रपती शिवाजी महाराज (तिसरे) उर्फ बाळासाहेब महाराज यांच्या प्रयत्नांमुळे संस्थेची भरभराट झाली. सतरा वर्षे कालक्रमण केल्यानंतर युरोपियन लोकांनी स्थानिक वर्गणीदारांचा आश्रय कमी केला या सबबीवर ग्रंथालयाचा संबंध सोडून ''एजन्सी बुक क्लब'' या नावाची आपली स्वतंत्र संस्था काढली. तथापि पुस्तक संग्रह व फंड मुळ संस्थेकडे राहू दिला. संस्थेस पहिली मालकीची इमारत लाभली पण लोकाश्रयाअभावी संस्थेची सांपत्तिक स्थिती फारच खालावली. त्याकाळात केवळ १८.५ रु. इतकीच वर्गणी गोळा होत असे. करवीर सरकारने संस्थेची इमारत दवाखान्यासाठी विकत घेतल्याने शनिवार पेठेतील मारुतीच्या देवालयालगतच्या चावडीत संस्थेचे स्थलांतर झाले.

१८६७ साली इंग्रज अधिकारी व शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती यांची सभा घेऊन ग्रंथालयाचे नियम निश्चित करण्यात आले. १८६९ साली विद्यार्थ्यांसाठी कमी वर्गणीचा एक वर्ग काढण्यात आला. या साली रु.२५६९–६–८ पै पोलिटिकल एजंट कडून लायब्ररीची जुनी इमारत विकत घेतल्याबद्दल मिळाले. यापूर्वी १८६८ मध्ये ग्रंथालयाचे स्थलांतर नागपूर वाड्यात  करण्यात आले होते.

१८७० साल संस्थेच्या दृष्टीने फार महत्त्वाचे गेले. संस्थेचे सेक्रेटरी श्री.कृष्णाजी भिकाजी गोखले यानी घुडणपिराजवळ संस्थेकरिता एक घर रु.५००/– स खरेदी करण्याच ठरविले होते. परंतु गुजरीतील फरीदभाई बोहरी यांची हवेली दहा वर्षांच्या कराराने गहाण हक्काने रु.२५००/– मिळाल्याने जागेची अडचण दूर झाली. पोलिटिकल एजंट कर्नल एच.एल.अँडरसन यांनी १८७६ साली ग्रंथालयास ५५ पुस्तके बक्षीस दिली.

१८७९ साली ग्रंथालयाच्या इमारतीचे काम सुरु होऊन १८८१ साली पुरे झाली. या इमारतीसाठी २७०००/– रु. खर्च आला. १५/०१/१८८८ ची जनरल सभा नव्या इमारतीत भरली होती. तेव्हा पासून ही संस्था याच सुंदर इमारतीत आहे. यावेळी कागलचे अधिपती श्री.जयसिंगराव आबासाहेब घाटगे संस्थेचे ऑनररी प्रेसिडेंट झाले.

भास्करराव जाधव हे बडोद्याला गेल्यावेळी त्यांनी तेथील सेंट्रल लायब्ररीचे अवलोकन करुन पुस्तकांच्या देवघेवीसाठी कार्ड सिस्टीमची पद्धत अंमलात आणली. त्यामुळे देवघेव

झालेल्या पुस्तकांची माहिती मिळण्यास सुलभ झाले. पुस्तकांचे वर्गीकरण करुन पुस्तके कपाटात विषयवार ठेव्यात आली.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची सन १८८६–८७ साली ‘"India under British Rule" या विषयावर, १८९३ साली ""Our various activities" या विषयावर व १८९४–९५ साली ""Our Educated Men" या विषयावर महत्त्वपूर्ण व्याख्याने झाली.

१६ जुलै १९१६ रोजी श्री. वासुदेव रघुनाथ रेगे व श्री.सिदामय्या गदगय्या स्वामी यांनी केलेले नवीन नियम मंजूर करण्यात आले. १६ जुलै १९१६ रोजी भरलेल्या सभेने मंजूरी दिल्याप्रमाणे श्री.भास्करराव जाधव यांच्या देखरेखीखाली नवीन वाचन मंदिराचे काम काँट्रॅक्टर मार्फत सुरु झाले व ही इमारत पुर्ण झाल्यानंतर संस्थेच्या ग्रंथसंग्रहालय व वाचनमंदिर अशा २ वेगवेगळ्या शाखा सुरु करण्याची योजना आखण्यात आली.

१९१० साली छापण्यात आलेल्या पुस्तकांच्या कॅटलॉगमध्ये पुन्हा नवीन भर घालून बडोदा सिस्टीम प्रमाणे अद्ययावतरित्या छापून घेण्यात आले. त्याचप्रमाणे इंग्रजी व मराठी मासिके एकत्र बांधून घेण्यात आली. सन १८५० ते १९१६–१७ अखेर ६७ वर्षांचा ‘‘कोल्हापूर नेटिव्ह लायब्ररी या संस्थेचा समग्र इतिहास’’ संस्थेचे कार्यवाह श्री.वासुदेव रघुनाथ रेगे यांनी लिहून ऑगस्ट १९१७ साली प्रकाशित केला. संस्थेचा सुरुवातीपासूनचा इतिहास समजण्यासाठी हा ग्रंथ हे एकच साधन होय. या ग्रंथाची प्रस्तावना श्री.भास्करराव जाधव यांनी लिहिली आहे. २९ जुलै १९१७ रोजी दिवाण बहाद्दुर रघुनाथ व्यंकोजी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जनरल सभेत रावसाो. कृष्णाजी भिकाजी गोखले यांनी सेक्रेटरी, ऑडीटर, सभासद व अध्यक्ष या नात्याने १८७० ते १९०७ अखेर १७ वर्षे केलेली संस्थेची सेवा लक्षात घेऊन त्यांना सन्माननीय वर्गणीदार समजण्यात यावे, असा ठराव पास करण्यात आला.

प्रिन्स शिवाजी रीडिंग हॉलला राजर्षि शाहू महाराज यांचे पुत्र श्रीमंत शिवाजी महाराजांचे नाव देण्यात आलेले आहे.

संस्थेच्या स्थापनेपासून संस्था सर्वथैव सरकारी अधिकाऱ्यांच्याच देखरेखीखाली चालली असल्याने संस्थेस कुठल्याही प्रकारची अडचण पडली नाही. इतकेच नव्हे तर

संस्थेस नवीन इमारत बांधून देऊन तिची दरसाल दुरुस्ती करण्याचे काम दरबार तर्फे चालू असे. संस्थेचे रुपांतर मध्यवर्ती वाचनालयामध्ये झाल्याने संस्थेच्या नोकरांवर होणारा सर्व खर्च संस्थेस मदत म्हणून दरबार कडून मिळत असे.

संस्थेच्या स्थापनेपासून बुक इन्स्पेक्शन कमिटी नेमण्यात आली नव्हती. तिची गरज तीव्रतेने भासू लागली तेव्हा १ मे १९२१ रोजी भरलेल्या वार्षिक सभेत या प्रश्नाचा उहापोह होऊन पगारी माणूस नेमून हे काम करुन घ्यावे असा निर्णय घेण्यात आला. १९१८ सालापासून एक स्वतंत्र ब्लँक बुक ठेवण्यात येऊन त्यामध्ये थकीत वर्गणीदारांची नोंद करण्यात आली.

संस्थेचे नाव ''कोल्हापूर नेटीव्ह लायब्ररी'' असे होते. १९२४-२५ सालापासून संस्थेचे नाव ''कोल्हापूर जनरल लायब्ररी'' असे ठेवण्यात आले. ता.०४/०५/१९२४ रोजी झालेल्या संस्थेच्या सर्वसाधारण सभेत हा बदल मान्य करण्यात आला. संस्थेचा स्थापना दि.१५ जून १८५० असा असून तो दरवर्षी साजरा करण्यात येतो.

ता. २५/११/१९३१ ते २७/११/१९३१ अखेर संस्थेचा ज्युबिली समारंभ साजरा करण्यात आला. ता.२५ रोजी श्रीमन्महाराज राजाराम छत्रपती यांनी सकाळी १० वाजता महोत्सवाचे उद्‌घाटन केले. या समारंभासाठी रु.१८८७ देणगी रुपाने गोळा झाले व ९८२ रु. १४ आणे खर्च आला. शिल्लक रक्कम मुदतबंदीने ठेवून त्या रक्कमेवरील येणाऱ्या व्याजाच्या रक्कमेत परगावच्या मंडळींचा साहित्य व संगीत विषयक कार्यक्रम लायब्ररी तर्फे करावा असे ठरले. दरबाराने आणखी रु.२०० ची ग्रँट वाढवून ती रु.८००/- केली.यावरुन या सालातील ग्रंथालयाची समाजभिमुखता स्पष्ट होते.

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे १७ वे अधिवेशन करवीर नगर वाचन मंदिराच्या विद्यमाने भरविण्यात आले होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी बडोद्याचे महाराज सर सयाजीराव गायकवाड यांची निवड झाली व स्वागताध्यक्षपदी रावबहाद्दूर दत्ताजीराव माधवराव भोसले यांची निवड करण्यात आली होती. प्रत्यक्षात सयाजीराव महाराज आजारी पडल्याने अधिवेशनास उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांचे भाषण वाचून दाखविण्यात आले. दि.२७/१२/१९३२ रोजी साहित्य संमेलनाचे अधिवेशन मोठ्या थाटाने सुरु झाले. महाराष्ट्र

साहित्य परिषदेच्या झालेल्या अधिवेशनात साहित्य संमेलनाला जोडून शाखा संमेलनाचे अधिवेशन घेण्याची प्रथा प्रथम कोल्हापूरने सुरु केली. हा एक ऐतिहासिक क्षण वाचनालयाच्या आदर्श पद्धतीचा दार्शनिक आहे.

ता. १९ जानेवारी १९३४ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये ''जनरल लायब्ररी'' ऐवजी ''करवीर नगर वाचन मंदिर'' असे मराठी नाव द्यावे असे ठरले. त्याप्रमाणे ता. २४ फेब्रुवारी १९३४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ग्रंथालयाचे नाव ''करवीर नगर वाचन मंदिर'' असे ठेवण्यात आले.

संस्थेचा सुवर्ण महोत्सव वाढदिवस समारंभ ता.२९/११/१९३६ रोजी साजरा करण्यात आला होता. त्यावेळी श्रीक्षात्रजगद्गुरु यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याचे श्री.लक्ष्मण बळवंत भोपटकर उर्फ अण्णासाहेब भोपटकर यांचे भाषण झाले व रात्रौ मास्टर निवृत्तीनाथ यांचे गायन झाले.

ता.२८/०३/१९४१ रोजी कवि गिरीश यांचे अध्यक्षतेखाली सोलापूरच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री.वि.स.खांडेकर ह्यांचा संस्थेने सत्कार केला. ता. २२/१०/४१ ला कहाड येथे भरलेल्या दक्षिण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व सांगलीचे राजकवी श्री. साधुदास यांच्या अभिनंदनार्थ श्री. वि. स. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेतर्फे जाहीर सभा घेण्यात आली.

ता. ०८/०४/१९४२ ला भरलेल्या वार्षिक सभेने एक नियम सुधारणा समिती नेमली. तिने अपाले निवेदन सात–आठ महिन्यांनी तयार करुन मुद्याम बोलाविलेल्या वर्गणीदारांच्या विशेष साधारण सभेत सादर केले. त्या सर्वांचा विचार करण्यासाठी साधारण सभेच्या दोन महिन्यात सहा बैठका झाला. ता.०१/०६/१९४३ पासून संस्थेचे हे नवे मियम व घटना यांची अंमलबजावणी रितसर चालू झाली.

१९४४ साली लायब्ररी संबंधी करवीर सरकारचा कायदा झाला. एज्युकेशन मिनिस्टर, कोल्हापूर स्टेट यांचेकडून ता.२५/०७/१९४४ रोजी आलेल्या पत्रानुसार संस्थेचे रुपांतर मध्यवर्ती वाचनालयात करावे, यासाठी ता.०९/०८/१९४४ रोजी प्रा.ना.सी.फडके यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. सभेस संस्थेच्या आमंत्रणावरुन एज्युकेशन मिनिस्टर

हजर होते. या सभेत बराच उहापोह होऊन सरकारशी विचारविनिमय करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. संस्थेचे सभासद व सरकार नियुक्त केलेले सभासद यांनी तयार केलेली घटना ता.२५/०२/१९४५ च्या वार्षिक साधारण सभेत मंजूर करण्यात आली.

१९४४ साली करवीर दरबाराने वाचनालय कायदा केला. त्यामध्ये एक मध्यवर्ती वाचनालय ठेवून तालुका वाचनालये, ग्रामवाचनालये व फिरती वाचनालय ठेवायची व या सर्व लहान–लहान वाचनालयांचा संबंध मध्यवर्ती वाचनालयाशी असावा अशी योजना होती. त्याप्रमाणे १५ ग्रामवाचनालयाची नोंदणी करण्यात आली व त्यांना प्रत्येकी रु.१००/– प्राथमिक मदत देण्यात आली. त्याचप्रमाणे फिरत्या वाचनालयांसाठी ३० पेट्या तयार करुन घेऊन त्याकरिता पुस्तके मागविण्यात आली.

ता. ३१ मार्च १९४९ रोजी कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलीन झाले व मुंबई सरकारचे क्युरेटर ऑफ लायब्ररीज यांचा संस्थेशी पत्रव्यवहार सुरु झाला. ता. २१/०५/१९४९ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेत संस्थेचे अध्यक्ष श्री. स. श्री. जोशी यांनी क्युरेटर यांचे पत्र वाचून दाखविले व या वाचन मंदिराचे जिल्हा ग्रंथालयात रुपांतर होताना कोल्हापूर दरबाजरची सरकारी मदत व वाचन मंदिराचा दर्जा शक्यतो पुर्ववत राहील याबद्दल व्यवस्थापक समितीने प्रयत्न करावा असे ठरले. मुंबई सरकारची त्यावर्षी १३७१६ रु.ची मदत झाली. तद्नंतर १९५० साली जिल्हा वाचनालय म्हणून करवीर नगर वाचन मंदिरास मुंबई सरकारची मान्यता मिळाली.

बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० यास अनुसरुन करवीर नगर वाचन मंदिर ता.३०/०५/१९५२ रोजी रजिस्टर करणेत आले.

क्युरेटर ऑफ लायब्ररीज, मुंबई यांचेकडील परिपत्रकानुसार संस्थेत १९५५–५६ पासून बालविभाग सुरु करण्यात आला.

म. वि. गोखले यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी संस्थेच्या इमारत फंडासाठी रु.११०००/– ची देणगी दिल्याबद्दल संस्थेच्या मुख्य सभागृहास श्री. म. वि. गोखले, कोल्हापूर संस्थानचे माजी सरन्यायाधीश व करवीर नगर वाचन मंदिराचे एक वेळचे कार्यवाह कै. विश्वनाथरावजी गोखले व त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांच्या नावाने

''कै. विश्वनाथ पार्वती गोखले सभागृह'' असे नामकरण व कै. विश्वनाथ रावजी यांच्या तैलचित्राचे अनावरण हे दोन समारंभ न्यायमूर्ती श. बा. ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली (१९५७-५८) करण्यात आले.

ता.१६ मे १९५७ रोजी वसंत व्याख्यानमालेचे उद्‌घाटन श्री. एस. एम. जोशी यांच्या मार्फत करण्यात आले. ही व्याख्यानमाला पुढे ५-६ वर्षे सातत्याने सुरु होती. परंतु त्यानंतर जवळ जवळ ८ वर्षे ही व्याख्यानमाला होऊ शकली नाही. १९७१ साली व्याख्यानमाला समितीचे चेअरमन श्री. मु. ग. गुळवणी यांच्या प्रयत्नाने ही व्याख्यानमाला पुन्हा सुरु झाली. दि.१९/०५/१९७१ रोजी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.अप्पासाहेब पवार यांच्या हस्ते या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन होऊन सलग ९ दिवस महाराष्ट्रातील नामवंत वक्त्यांची व्याख्याने झाली. यानंतर बहुधा दरवर्षी वसंत व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

ता. २४, २५ व २६ जानेवारी १९६० या तीन दिवशी करवीर नगर वाचन मंदिराच्या विद्यमाने मराठी ग्रंथालय परिषदेचे ११ वे अधिवेशन उत्साहाने पार पाडण्यात आले. परिषदेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. द. घाटे होते. स्वागताध्यक्ष येथील उद्योगपती श्री. शि. ह. गर्दे होते. परिषदेचे उद्‌घाटन छत्रपती इंदुमती राणीसाहेब यांच्या हस्ते झाले. संस्थेच्या प्रिन्स शिवाजी हॉलमध्ये एक ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. परगावाहून ८० वर प्रतिनिधी हजर होते. स्थानिक पातळीवर ६०० स्वागत सभासदांनी भाग घेतला होता.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर जन्मशताब्दी महोत्सव समितीने १९६२-६३ साली गुरुदेव टागोर यांच्या पुस्तकांची लायब्ररी, दोन स्टील कपाटे व गुरुदेव टागोर यांनी लिहिलेली पुस्तके करवीर नगर वाचन मंदिराच्या ताब्यात व्यवस्थेसाठी दिली. याकामी ॲड.एम.जी.दाभोळकर व छत्रपती इंदुमती राणीसाहेब प्रभृतींचे प्रयत्न कारणीभूत झाले होते. छत्रपती इंदुमती राणीसाहेब यांनी वरील समितीच्या वतीने १९७०-७१ साली ग्रंथ खरेदीसाठी राहिलेली देणगी रु.११२७.४० करवीर नगर वाचन मंदिराकडे सुपूर्द केली.

शिवराज्याभिषेक त्रिशत सांवत्सरिक महोत्सव २ जून १९७४ रोजी संस्थेच्यावतीने साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने श्री शिवाजी महाराजांच्या जीवनातील ठळक प्रसंगांच्या चित्रांचे व छायाचित्रांचे व शिवजीवनविषयक ग्रंथांचे आणि रंगावलीचे प्रदर्शन एक आठवडाभर

भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन दै.पुढारीचे कार्यकारी संपादक श्री. प्रतापसिंह जाधव यांनी केले. दोन दिवस संस्थेच्या इमारतीवर विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

दि.३० जून १९७४ रोजी प्रात:काळी चौघडा व सनईच्या मंगल स्वरात करवीर नगर वाचन मंदिरात श्री शाहू जन्मशताब्दि महोत्सवास प्रारंभ झाला. प्रथमत: आमदार श्रीपतराव बोंद्रे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. महोत्सवानिमित्त श्री शाहू महाराजांच्या जुन्या तैलचित्रांस सुप्रसिद्ध चित्रकार रवींद्र मिस्त्री यांच्याकडून रिटचिंग करुन घेण्यात आले होते व त्यास काच व सोनेरी फ्रेम नव्याने लावण्यात आली होती. करवीर नगर वाचन मंदिराच्या दर्शनी भिंतीवर मध्यभागी लावण्यात आलेल्या या तैलचित्रास संस्थेचे अध्यक्ष आम.पी.बी.साळुंखे यांनी पुष्पहार अर्पण केला व पेढे वाटले. जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त कोल्हापूर महानगरपालिकेचे प्रशासक श्री.द्वारकानाथ कपूर यांच्या अध्यक्षतेखाली पद्मश्री बाळसाो पाटील (सत्यवादीकार) यांचे तसेच, प्रा. सौ. मीना ब. कुलकर्णी, डॉ. एल. आर. नसिराबादकर, प्रा. गं. बा. सरकार यांची भाषणे झाली.

युनायटेड स्टेट इन्फर्मेशन सर्व्हीस व ब्रिटिश कौन्सिल मार्फत चालू असलेल्या डिपॉझीट कलेक्शन सर्व्हिस स्कीम प्रमाणे लोन बेसीसर पुस्तके आणून ती वाचकांना देण्याची योजना सन १९५९–६० सालापासून संस्थेने कार्यान्वित केली आहे. त्यामुळे अमेरिकन व ब्रिटिश कौन्सिलकडून निरनिराळ्या विषयांवरील नवीन बहुमोल इंग्रजी ग्रंथ सभासदांना घरी वाचावयास मिळतात. या योजनेची प्राथमिक माहिती श्री.सी.गो.सरदेसाई यांचेकडून संस्थेस मिळाली होती.

राजा राममोहन रॉय लायब्ररी फौंडेशन, कलकत्ता या योजनेखाली अद्ययावत ग्रंथ मा.ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत करवीर नगर वाचन मंदिरास देण्यात येतात. ही पुस्तके साखळी योजनेसाठी वापरण्यासाठी आहेत.

याशिवाय मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, भारत सरकार, माहिती व संचनालय विभाग महाराष्ट्र राज्य, अ.भा, भारत कोरिया मैत्री संघ नवी दिल्ली, शिक्षण संचालक, मुंबई, शिक्षण समाजकल्याण खाते, महाराष्ट्र सरकार वगैरेंकडून पुस्तके विनामूल्य देण्यात येतात. त्यामुळे संस्थेचा ग्रंथसंग्रह समृद्ध होण्यास सहाय्य झाले आहे.

नामवंत कवि, लेखक, पत्रकार व साहित्यिक वगैरेंचे सत्कार समारंभ, जयत्युंत्सव, शताब्दि, स्मृतिदिन करवीर नगर वाचन मंदिरामार्फत प्रसंगानुरुप साजरे केले जातात.

कविवर्य माधव ज्युलियन स्मृतिदिन, गोविंदराव टेंबे स्मृतिदिन, बालगंधर्व स्मृतिदिन, नटवर्य वि. ह. औंधकर स्मृतिदिन, ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर स्मृतिदिन, कादंबरीकार ह. ना. आपटे जन्मशताब्दि याशिवाय लो. टिळक पुण्यतिथी, म. गांधी जयंती, प्रजासत्ताक दिन, समाजशिक्षण दिन, स्वातंत्र्यदिन संस्थेतर्फे दरसाल साजरे केले जातात. वाचनसाहित्य संग्रहाकरिता सध्या कॉम्प्यॅक्ट स्टोरेजची सोय करण्यात आली आहे. दुर्मिळ ग्रंथसंग्रहासाठी हे ग्रंथालय सर्वदूर नावाजले जाते.

**एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय, मुंबई :**

मुंबईच्या फोर्ट विभागातील टाऊन हॉलमध्ये असलेले एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय हे महाराष्ट्रातील मुद्रित ग्रंथांचे पहिले ग्रंथालय आहे. २६ नोव्हेंबर १८०४ रोजी मुंबईतील सतरा युरोपियन परळ येथील गव्हर्मेंट हाऊसमध्ये एकत्र जमले आणि त्यांनी 'लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे' या नावाने संस्था स्थापन केली. विविध विषयावरील ज्ञानाचे सवंर्धन करणे, विशेषत: भारताविषयीचे दुर्मिळ ज्ञान एकत्रित करणे हे या संस्थेपुढील प्रमुख उद्दिष्ट होते. संस्थेच्या अध्यक्षपदी सर जेम्स मॅकिनटॉश हे होते. ग्रंथालयाचे कार्य १८०५ मध्ये सुरू झाले. सुरूवातीला ग्रंथालयात काही ग्रंथ व मासिके होती. वाचनालयाची वार्षिक वर्गणी १०० रूपये असून सर्व सभासद युरोपियन होते. अध्यक्ष मॅकिनटॉश यांनी ग्रंथालयाच्या वाढीसाठी एक लाखाची योजना आखली आणि १८३० मध्ये ग्रंथालयाची सध्याची इमारत बांधण्यात आली. प्रशस्त जागेत इमारतीचे कामकाज सुरू झाले. संस्थेचे नाव 'बॉम्बे ब्रांच ऑफ दी रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन अॅण्ड आयर्लंड'असे ठेवण्यात आले. ग्रंथालयांच्या कारभारामध्ये अनेक गव्हर्नर्सनी भाग घेतला. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हे १८१९ ते १८२७ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष होते.

सन १८६३ मध्ये करसेटजी जमशेटजी व १८३९ मध्ये माणकजी करसेटजी या भारतीयांना ग्रंथालयामध्ये प्रवेश देण्यात आला. त्यानंतर जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी, प्रा. दादाभाई नौरोजी यांना ग्रंथालयात प्रवेश देण्यात आला अशा प्रकारे सन १८८५ पासून ग्रंथालयामध्ये निवासी सभासदांचा प्रवेश वाढला. याकाळात १५२ निवासी आणि

६३ अनिवासी सभासद होते. तेव्हा १५ हजार रूपये वर्गणी जमा झाली. त्यावेळी ६२१ नविन पुस्तके घेण्यात आली आणि ग्रंथसंख्या ३०,००० पर्यंत वाढली. २० व्या शतकात अनेक भारतीय सभासद या ग्रंथालयाचे सभासद बनले. १९१७ आणि १९२२ ग्रंथालयाची ग्रंथसूची प्रसिद्ध करण्यात आली. १९२० मध्ये ग्रंथसंख्या १ लाख एवढी झाली. स्वातंत्र्यानंतर ग्रंथालयाचे नामांकरण 'एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे' असे करण्यात आले. फैजी कमिटीच्या अहवालानुसार ग्रंथालयाला मुंबई प्रांताचे 'केंद्रिय ग्रंथालय' म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे भारतामध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची एक प्रत या ग्रंथालयाकडे पाठविण्यात येते.

गेल्या दशकात महाराष्ट्राचे स्वतंत्र केंद्रिय ग्रंथालय स्थापन करण्यात आले. त्याची इमारत सांताक्रुझ येथील कालिना परिसरामध्ये बांधण्यात आली. या ग्रंथालयास एशियाटीक सोसायटी ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रहाचा उपयोग झाला. या ग्रंथसंग्रहाचा उपयोग करून अनेक विद्वानांनी ग्रंथरचना केली आहे. त्यामध्ये महादेव गोविंद रानडे, का. त्र्यं. तेलंग, डॉ. भाऊ दाजी लाड, कै. दुर्गा भागवत यांचा समावेश आहे. या ग्रंथालयाची संशोधन परंपरा आजही चालू आहे.

**पीपल्स फ्री रीडिंग रूम अँड लायब्ररी : (१८४५) मुंबई** :

धोबीतलाव येथील 'पीपल्स फ्री रीडिंग रूम अँण्ड लायब्ररी' हे मुंबईतील दुसरे महत्त्वाचे ग्रंथालय आहे. 'बॉम्बे नेटीव्ह जनरल लायब्ररी ' या नावाने या ग्रंथालयाची स्थापना १८४५ मध्ये झाली. या ग्रंथालयात सुरूवातीपासून भारतीयांना प्रवेश होता. त्यांना सहज प्रवेश मिळावा म्हणून तिसऱ्या प्रतीच्या वर्गणीदाराकरिता दरमहा चार आणे वर्गणी ठेवण्यात आली होती. या ग्रंथालयामध्ये दादाभाई नौरोजी प्रभृती युवकांनी स्थापन केलेल्या स्टुडंटस् ज्ञानप्रसारक लायब्ररीचे विलनीकरण करण्यात आले. या ग्रंथालयाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे हे होते.

**श्रीराम वाचनमंदिर व क्रीडाभुवन, सावंतवाडी : (१८ एप्रिल १८५२)**

सार्वजनिक ग्रंथालय चळवळ महाराष्ट्रात १९ व्या शतकात सुरू झाली. त्यावेळी अशा ग्रंथालयांचे स्वरूप आजच्या सार्वजनीक ग्रंथालयांपेक्षा खूपच वेगळे होते. इंग्रजांनी प्रथमत:

नेटीव्ह जनरल लायब्ररीची स्थापना १९ व्या शतकाच्या पूर्वाधात केली. यामधील काही मोजकी ग्रंथालये आजही अस्तित्वात आहेत. त्यापैकी सावंतवाडीचे श्रीराम वाचन मंदिर व क्रिडा भुवन हे एक होय.

पुण्याचे नगर वाचन मंदिर व सावंतवाडीचे श्रीराम वाचन मंदिर समकालीन ग्रंथालये होत. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यासारख्या शहरात त्या काळात ग्रंथालयांच्या स्थापनेसाठी मेहनतीने १५०० रूपये जमा झाले होते. तर पुण्याशी तुलना करता सावंतवाडीसारख्या छोट्या गावात ८४८ रूपये तात्काल जमवून ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली होती.

पुण्याच्या नगर वाचन मंदिराचे संस्थापक कै. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी आपल्या शतपत्रांपैकी तिसऱ्या पत्रात नमुद केल आहे की, 'पुण्यातील बहुसंख्य लोकांना ग्रंथालय म्हणजे काय हे माहित नसल्याने सरदार लोकांनी व कामगार लोकांनी उदारपणे मदत केली नाही.'

या पार्श्वभूमीवर सावंतवाडीच्या वाचनालयाबद्दल Report of the Board of education मध्ये दिलेल्या वाचनालयाच्या स्थापनेच्या नोंदीचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे –

''तत्कालीन पोलिटिकल एजंट श्री अंडरसन यांनी त्यावेळी मौलिक सहकार्य दिले. त्याचबरोबर ही चळवळ स्थानिक रहिवाशांच्या मनात जागृत होऊन अनेकांनी उस्फुर्तपणे आपले विचार व्यक्त केले की ग्रंथालयाची स्थापना केली गेलीच पाहिजे.''

सुरूवातीला या वाचनालयाचे नाव नेटिव्ह जनरल लायब्ररी असे होते. पुढे १८९७ साली या वाचनालयास जिमखाना जोडण्यात आल्याने त्याचे नाव नेटिव्ह जनरल लायब्ररी व जिमखाना असे करण्यात आले. त्याकाळी ग्रंथालयाच्या उत्पन्नाचा लाभ जिमखान्यास मिळत असे. १९३५ मध्ये सावंतवाडीचे भूतपूर्व नृपती कै. बापूसाहेब महाराज यांच्या कारकिर्दीत या वाचनालयाचे नाव बदलून श्रीराम वाचन मंदिर व क्रिडाभुवन असे करण्यात आले.

या वाचनालयातील ग्रंथाची संख्या १००० च्या वर जाण्यास २५ वर्षाचा कालावधी लागला होता. १८७७ साली वाचनालयातील पुस्तकांची संख्या १९०७ होती, तर सभासद संख्या ५६ होती. संस्थेच्या स्थापनेपासून सावंतवाडीचे पोलिटीकल एजंट हे वाचनालयाचे अध्यक्ष होते. तर न्यायाधिशांसारखे अधिकारी कार्याध्यक्षांची जागा भुषवित होते आणि

इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापक चिटणीसाचे पद भुषवित. १९१७–१८ सालच्या सुमारास स्वतंत्र पोलिटीकल एजंट नेमण्याचे बंद केल्यापासून प्रथम ॲडमीनिस्ट्रेटर व पुढे अधिकारी व विद्याप्रेमी माणसे सतत नेमली गेल्यामुळे वाचनालयात उत्कृष्ट ग्रंथसंग्रहाची भर पडत होती. विशेषत: उत्तम इंग्रजी ग्रंथाचा संग्रह वाचनालयाला उपलब्ध होत होता. त्याकाळी सावंतवाडीच्या वाचनालया एवढा ग्रंथसग्रंह रत्नागिरी वाचनालयात सुद्धा नव्हता. कित्येक वर्षे युरोपियन पोलिटीकल एजंट वाचनालयाचे अध्यक्ष असल्याने त्यांची इंग्रजी वाचनसाहित्याची निवड ही उत्तम होतीच त्याच बरोबर ते स्वत: कडील वाचनसाहित्य देणगी दाखल ग्रंथालयाला देत असत. वाचनालयात उत्तम प्रकारचे वाचनसाहित्य असल्याने वेंगुर्ले, मालवण मधील वाचक या वाचनालयाचे सभासद झाले होते.

सावंतवाडी संस्थानचे भुतपूर्व नृपती कै. बापूसाहेब महाराजांनी आपल्या कडील बहुसंख्य वाचनसाहित्याने वाचनालयाच्या ग्रंथसंग्रहात मोलाची भर घातली होती. तसेच अनेक व्यक्तींनी ग्रंथालयास देणगीरूपाने ग्रंथ देऊन वाचनालयाचे ग्रंथ भांडार समृद्ध करण्यास मौलिक सहकार्य केले आहे. सध्या ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह ५४,२९७ हून अधिक असून १०० वर्षापूर्वीची अनेक पुस्तके येथे उपलब्ध आहेत. तसेच ५० नियतकालिके, २३ वर्तमानपत्रे, २१ साप्ताहिके घेतली जातात. संस्थेस सध्या रु. ३,९३,७१०/– इतके शासकीय अनुदान मिळते.

सुरूवातीला ग्रंथालयाची स्वत:ची इमारत नसल्याने सध्याच्या प्राथमिक शाळा नं.१ च्या इमारतीमध्ये हे ग्रंथालय सुरू करण्यात आले. १८५५ मध्ये पोलिटीकल एजंटने मोती तलावाच्या काठी असलेला आपल्या राहण्याचा बंगला वाचनालयासाठी उपलब्ध करून दिला. वाचनालयाच्या वाढत्या व्यापामुळे ही इमारत अपुरी पडू लागल्याने १९७५ मध्ये वाचनालयाच्या तत्कालीन कार्यकारी मंडळाने जुनी इमारत पाडून आजची दुमजली इमारत उभी केली. पण तीही इमारत अपुरी पडू लागल्याने व्यवस्थापक मंडळाने इमारतीच्या पूर्वेकडील सुमारे २५० फुट मोकळ्या जागेवर व पश्चिमेकडील सुमारे २२५० चौ. फुट जागेवर वास्तू उभारण्याची महत्त्वाकांक्षा हाती घेतली व सध्याची इमारत बांधून पूर्ण झाली आहे.

सद्यस्थितीत हे ग्रंथालय अत्यंत चांगल्या स्थितीत असून वाचकाभिमूख सेवा देत आहे. परिसरातील अनेक लोक या ग्रंथालयाचा लाभ घेत आहेत. हे ग्रंथालय हे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ मधील तरतुदीनुसार ग्रामीण 'अ' वर्ग ग्रंथालय म्हणून कार्यरत आहे. ग्रंथालयाची जागा ही स्वत:ची असून तीचे क्षेत्रफळ १४८० चौ.मी. आहे. ग्रंथालयाच्या इमारतीमध्ये खुला वाचन विभाग, महिला विभाग, बालविभाग, संदर्भ विभाग, देवघेव विभाग, बहूउद्देशीय हॉल असे विविध विभाग आहेत. ग्रंथालय सोमवार ते शनिवार दोन सत्रात उघडे असते.

प्रतिदीनी ३०० हुन अधिक वाचक तर वर्षाकाठी जवळ जवळ १ लाखाहून अधिक वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेतात. संदर्भ विभागाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील अनेक वाचक या वाचनालयात येतात. या वाचकांमध्ये एम. ए., एम. एस्सी, बी. लीब., एम. लीब असे पदव्युत्तर शिक्षण घेणारे वाचक आहेत.

महाराष्ट्र शासनाची राजा राम मोहन रॉय साखळी योजना हे ग्रंथालय राबवित आहे. या साखळी योजनेचा लाभ पंचक्रोशीतील १४ ग्रंथालये घेत आहेत. संस्थेने १९७५ मध्ये व १९९७ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रंथालय महासंघाची रोज अधिवेशने यशस्वीपणे घेतली आहेत.

ग्रंथालयाद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी. लिब., एम. लिब., व वृत्तपत्रविद्या हे अभ्यासवर्ग चालविले जातात. या वर्गातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी स्तरावर सुवर्णपदके प्राप्त केली आहेत. या ग्रंथालयाद्वारे ग्रामीण ग्रंथालयांना मार्गदर्शन केले जाते. ग्रंथालयामध्ये दरवर्षी विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये कथाकथन, काव्यवाचन स्पर्धा, कोरगांवकर व्याख्यानमाला, ग्रंथप्रदर्शन, परिसंवाद इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात. यासाठी नामवंत व्यक्ती, लेखक, वक्ते यांना आमंत्रित केले जाते. या उपक्रमांत देशभक्त प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमाला, कथा कथन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा यांचा समावेश आहे.

सदरच्या ग्रंथालयाला १६५ वर्षे पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार, ग्रंथ मित्र पुरस्कार, उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार अशा प्रकारचे मानाचे पुरस्कार ग्रंथालयास मिळाले आहेत. १८ एप्रिल १८५२ रोजी शिळाप्रेसवर छापलेली मूळ घटना आजही संस्थेच्या दप्तरी आहे. (पहा छायाचित्रे)

श्रीराम वाचन मंदिर हे ग्रंथालय जिल्ह्याचा मानबिंदू असून सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सहभाग घेणारे हे ग्रंथालय सार्वजनिक ग्रंथालयाच्या क्षेत्रात प्रेरणादायी ठरले आहे. स्व. जयानंदजी मठकर (माजी आमदार) यांनी दीर्घकाळ या वाचनालयाचे अध्यक्षस्थान भूषवून वाचनालयाचा नावलौकिक वाढविला.

**जमशेटजी नसरवानजी पेटिट ग्रंथालय : (१८५६)**

मुंबईचे फोर्ट विभागातील जे. एन. पेटीट ग्रंथालय हे मुंबईचे भूषण आहे. या ग्रंथालयाचे सुरूवातीचे नाव 'फोर्ट इम्पूव्हमेंट लायब्ररी' असे होते. या ग्रंथालयाची स्थापना १८५६ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान वाढवण्यासाठी केली होती. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ग्रंथालयाची मासिक वर्गणी पाच आणे ठेवण्यात आली होती. जमसेटजी नसरवानजी पेटीट यांनी १८९५ साली ग्रंथालयाच्या इमारतीसाठी अडीच लाख रूपये दिल्याने ग्रंथालयाचे नाव बदलून 'जमशेटजी नसरवानजी पेटीट ग्रंथालय' असे करण्यात आले. कमी ग्रंथालय वर्गणी देणाऱ्या सभासदास ग्रंथालयाची निवडणूक लढवता यावी व पदाधिकारी होण्याचा अधिकार मिळावा म्हणून या ग्रंथालयाने लढा दिला होता. वाचकांच्या सोईसाठी सकाळ – संध्याकाळ व सुट्टिच्या दिवशी ग्रंथालय खूले ठेवण्यात येते. ग्रंथालयाची इमारत भव्य असून खिडकीची तावदाने कलाकुसरीचीच्या काचेची आहेत. वर्तमानपत्रे व नियतकालीके यांचे वाचन करण्याकरिता खूला वाचक विभाग या ग्रंथालयात आहे. त्याचबरोबर समृद्ध असे सभागृह आहे. या सभागृहात व्याख्याने, सत्कार समारंभ असे विविध कार्यक्रम होतात. या ग्रंथालयात अभ्यास करणारे अनेक विद्यार्थी मोठे ग्रंथकार झाले आहेत. ग्रंथालयाची काही जागा भाड्याने दिल्याने ग्रंथालयाला भक्कम आर्थिक पाठबळ मिळाले आहे.

**वाचन मंदिर, भिवंडी: (१८६३)**

सन १८५७ देशात इंग्रजी राजवट अस्तित्वात आली. त्यावेळी जरी क्रांती यशस्वी झाली नसली तरी त्यातून काहीतरी चांगले निष्पन्न झाले. त्याकाळी भारतात म्युनिसीपालटी, विद्यालये, वाचनालये, सार्वजनिक सभा, कायदे, सामाजिक, राजकिय, शैक्षणिक संस्था अस्तित्वात आल्या. त्यावेळी नविन विचारांचे वारे पुणे, मुंबई बरोबरच भिवंडी सारख्या दुरच्या शहरात वाहू लागले. याचाच परिणाम म्हणून भिवंडीत म्युनिसिपालटी शाळांची स्थापना झाली व त्याचबरोबर वाचनालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले.

वाचनालय स्थापन करण्यासाठी भिवंडीचे त्यावेळचे मामलेदार श्री. गोपाळ बर्वे, शावकशा शेट, आत्माराम वकिल, हुरमसजी शेट, दादाजी नाना शेट, मोरेश्वर घनवटकर, गणपत मांडे या सर्वांनी वाचनालय स्थापनेची कल्पना मांडली आणि ६ मार्च १८६३ रोजी मुर्त स्वरूपात आणली. प्रथम संस्थेसाठी १५० रूपये जमविण्यात आले. सुरूवातीला संस्थेचे नाव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे होते. १९३७ मध्ये कॉंग्रेसचे पहिले मंत्रिमंडळ आले त्यावेळी वाचनालयाचे मुळ नाव बदलून १४ ऑक्टोबर १९३९ मध्ये 'वाचनमंदिर, भिवंडी' असे ठेवण्यात आले.

१८६६ ते १८७२ या कालावधीत दरमहा १५ रूपये ग्रँट वाचनालयाला म्युनिसीपालटीकडनू मिळत असत. त्याचबरोबर इतर सामाजिक कार्यकर्त्यांनी वाचनालयाला मोलाची मदत केली आहे. या मदतीमध्ये गणपत मांडे यांचा मोलाचा वाटा आहे. सुरूवातीस ग्रंथालय वासुदेव कर्वे यांच्या घरात वार्षिक १८ रूपये भाड्यावर होते. १८७३ मध्ये वाचनालय श्रीमती लक्ष्मीबाई दुर्वे यांच्या वाड्यात नेण्यात आले. १८७३ पासून पुढे ६० वर्षे वाचनालय तेथेच होते. वाचनालयाची सभासद संख्या १५ वरून १९०६ पर्यंत ६० पर्यंत गेली व ग्रंथसंख्या ५२२ पर्यंत झाली. १९०६ साली वाचनालयाची पहिली घटना तयार करण्यात आली. ७ नोव्हेंबर १९१३ रोजी वाचनालयाला सरकारी मान्यता मिळाली. मात्र त्या कालावधीत १९१७ मध्ये श्री. मयुरेश मोफत वाचनालय स्थापन झाले. हे वाचनालय १९३२ मध्ये वाचन मंदिर भिवंडीमध्ये समाविष्ट करण्यात आले. या कार्यात मयुरेश वाचनालयाचे संस्थापक आप्पासाहेब कुंटे यांनी पुढाकार घेतला. त्याच कालावधीत १९३३ मध्ये वाचनालय आजच्या इमारतीमध्ये म्हणजे टिळक मंदिरात स्थलांतरीत करण्यात आले. मयुरेश वाचन मंदिरामुळे या वाचनमंदिराच्या ग्रंथसंपदा, फर्निचर या साहित्यात भर पडली.

१९३७ मध्ये वाचनालयातील सभासद संख्या ८७ होती तर ग्रंथसंख्या १४५० होती. अशा प्रकारे वाचनालयाची उत्तरोत्तर प्रगती होत असताना वाचनालयाने १९४९ मध्ये तालुका ग्रंथालय म्हणून कामकाज स्विकारले व त्यामूळेच अनुदानात वाढ होऊ न ते अनूदान ४५० रूपये झाले. १९५७ – ५८ मध्ये या अनुदानात वाढ होऊन ते १००० रूपये झाले व म्युनिसीपल ग्रँट १५० रूपयांवरून २०१रूपये झाली. त्यानंतर ५०१ रूपये झाली.

आज ग्रंथालयाला तालुका 'अ' वर्गाचा दर्जा मिळाला आहे. ग्रंथालयाच्या जागेचे क्षेत्रफळ २६०० चौ. फुट आहे. वाचनालय कायम सुरू असते. वाचनालयात रोज येणाऱ्या वाचकांची संख्या ७५ असून वर्षाकाठी २६,०२५ वाचक ग्रंथालयात येतात. वाचनालयाची ग्रंथसंपदा ४६,८५२ असून नियतकालीकांची संख्या १०५ आहे. वाचनालयाचे एकूण ६७१ वर्गणीदार आहेत. संदर्भ विभागातील ग्रंथसंख्या १७४० असून सरासरी २५ वाचक या विभागाचा लाभ घेतात. वाचनालयाला संदर्भविभागाबरोबरच बालविभाग व महिला विभाग आहे. वाचनालयाच्या जंगम मालमत्तेची किंमत १६,२७,२४७.७७ रूपये एवढी आहे. वाचनालयाद्वारे साखळी योजना राबवली जाते. वाचनालयात टिळक पुण्यतिथी, शारदीय प्रबोधनमाला, वर्धापन दिन, जागतिक महिला दिन, व्याख्याने असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात.

ग्रंथालयात १ ग्रंथपाल, ७ सहाय्यक ग्रंथपाल, २ परिचर, १ शिपाई व १ सफाई कामगार असा सेवक वर्ग आहे.

**लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर, चिपळूण : (१८६४)**

इंग्रजी अंमलात ग्रंथांचे महत्त्व बुद्धीजीवींच्या ध्यानात आले. उत्तर पेशवाईतला धामधुमीचा काळ संपला. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर इंग्रजांना युद्धाने नव्हे तर बुद्धीनेच हटविता येईल हे ध्यानात येऊन ज्ञानोपासनेला बळ आले. या कालखंडात देशात विविध ठिकाणी ग्रंथालये सुरू झाली.

याच पार्श्वभूमीवर १८६४ मध्ये चिपळूणमध्ये ग्रंथालय सुरू झाले. चिपळूण मधील तत्कालीन नामवंत वकील कै. बाळाजी सखाराम काशीकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रंथालय सुरू केले. त्यांनी 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने ग्रंथालय सुरू केले. आजच्या तहसिलदार कार्यालयाच्या आवारात एका खोलीत ग्रंथालयाला जागा मिळाली. ग्रंथालयाला त्यावेळी कार्यकर्त्यांची वानवा होती. त्यामूळे 'सेक्रेटरी' आणि 'खजिनदार' अशी दोन्ही पदे कै. काशीकर वकीलांनी पार पाडली होती. त्या काळीचे रत्नागिरी जिल्ह्याचे कलेक्टर एल्फिन्स्टन यांना वाचनाची आवड होती. त्यांनी चिपळूण ग्रंथालयाला भेट देवून वाचनालयाला दरवर्षी ५० रूपये अनूदान म्हणून देत असत. त्याचबरोबर मे. बाळाजी

नारायण चितळे हे महाजन फंडातून दरवर्षी ५०–७५ रूपयांचे अर्थसहाय्य देत. याच अर्थसहाय्यावर नेटिव्ह जनरल लायब्ररी चालू राहिली होती.

ग्रंथालयाचे कामकाज वाढत होते. त्याचबरोबर जागेची कमतरता भासू लागल्याने कै. काशिनाथपंत सोमण यांनी जागा मिळण्यासाठी चिपळूण नगरपालिकेकडे अर्ज केला होता. फेब्रुवारी १८८० मध्ये हा प्रस्ताव मान्य करून सव्वासहा गुंठे जागा वाचनालयाच्या इमारतीसाठी दिली. पण इमारत बांधण्यासाठी पैशाचा प्रश्न उभा राहिला तेव्हा कै. गणेश तथा भाऊसाहेब देशमुख यांनी १०० रूपयांची देणगी दिली. तसेच कै. आबासाहेब बापट, के. गोपाळ सोमण, कै. नानासाहेब कान्हेरे या वकिलांनी प्रत्येकी २५ रूपयांची देणगी दिली. शहरातील आदरणीय व्यक्तींनी लोकांकडून २५० रूपयांची देणगी जमवली. म्युनिसिपालिटीने ७५० रूपयांची देणगी इमारतीसाठी दिली. अशा प्रकारे १६०० रूपयांची भक्कम मदत जमवून इमारत बांधकामाला सुरूवात केली आणि १८९७ मध्ये इमारत बांधून झाली व इमारतीचे स्थलांतर नविन इमारतीमध्ये करण्यात आले. ग्रंथालयाचा व्याप अधिकच वाढल्याने १० रूपये मासिक पगारावर ग्रंथपालाची नेमणूक करण्यात आली. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर चिपळूण येथे लोकमान्यांचे स्मारक उभारावे अशी टिळकभक्तांची इच्छा होती. पण निधी जमवून ही हे स्मारक बांधण्यात आले नाही. त्यामूळे जमवलेली रक्कम व जागा वाचनालयाला देऊन लोकमान्य टिळकांचे नाव वाचनालयास देण्यात आले. ३ मार्च १९३८ रोजी ठराव करून नेटिव्ह जनरल लायब्ररी हे नाम बदलून लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर असे देण्यात आले. १८८६ –८७ मध्ये चिपळूणचे आमदार नानासाहेब जोशी यांनी ग्रंथालयासाठी ७५ लाख रूपयांचे अनूदान मिळून दिले आणि राजा राम मोहनरॉय फौंडेशनने पन्नास हजार रूपयांचे अनूदान दिले. त्यामूळे ग्रंथालयाच्या वरच्या मजल्यावर यशवंतराव चव्हाण सभागृह बांधण्यात आले. ग्रंथालयात उत्कृष्ट ग्रंथसंग्रह, संदर्भ विभाग, महिला विभाग, बाल विभाग, देवघेव विभाग, वृत्तपत्र विभाग, सभागृह असे विविध विभाग आहेत. दूर्मिळ हस्तलिखीते व ग्रंथ, विविध प्रकारची तैलचित्रे ग्रंथालयात आहेत. ग्रंथालयाची होणारी प्रगती पाहून १९८८–८९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार प्राप्त झाला.

**नगर वाचनालय, राजापूर : (१८६७)**

नगर वाचनालय, राजापूर या संस्थेची स्थापना १८६७ मध्ये झाली. वाचनालयाची इमारत वाचनालयाच्या मालकीची असून कार्यालयीन क्षेत्रफळ २००० चौ. फूट आहे व वाचनालयाच्या परिसरातील मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ ९०० चौ. फूट आहे. वाचनालयाला तालूका 'अ' वर्गाचा दर्जा प्राप्त झाला आहे. नोंदणीक्रमांक आर.टी.एन–ई–१३ आहे. वाचनालय दोन स्त्रात उघडे असून साप्ताहिक सुट्टी मंगळवारी असते. वाचनालयात सरासरी वर्षभर १०,९२० वाचक येतात. वाचनालयाची सभासद संख्या ६४५ आहे. वाचनालयाची ग्रंथसंपदा ३२,७६३ असून १८ दैनिके, ८ साप्ताहिके, ६० मासिके, इतर ३ नियतकालीके वाचनालयात येतात. वाचनालयाला संदर्भविभाग, महिला विभाग व बालविभाग आहे. संदर्भ विभागात येणाऱ्या वाचकांची संख्या २१८४ असून संदर्भविभागाची ग्रंथसंख्या ७८४ आहे. वाचनालयाद्वारे साखळी योजना राबवली जात असून १२ ग्रंथालये या योजनेचा लाभ घेतात. ग्रंथालयाची स्थावर जंगम मालमत्ता रु. ८,०१,१५२ आहे. वाचनालयाला ग्रंथालय संचलनायाकडून परिरक्षणासाठी ३,८३,९८० रूपयांचे अनूदान सन २००७–०८ मध्ये मिळाले आहे. ग्रंथालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर, बक्षीस वितरण समांरभ, निबंध स्पर्धा, स्वातंत्र्य दिन, वक्तृत्व स्पर्धा, व्याख्यान व सत्कार, बालदिन, गणराज्य दिन, पुस्तक परिक्षण स्पर्धा असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात.

**नगर वाचनालय, वेंगुर्ले : (१८७१)**

वेंगुर्लेसारख्या दुर्गम परिसरात व सागरतिरी १३८ वर्षे कार्यरत असणारे नगर वाचनालय ही संस्था म्हणजे या शहराचा मानबिंदू तर आहेच शिवाय वेंगुर्ले आणि परिसरातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा तो एक दिपस्तंभ आहे. १३८ वर्षांची परंपरा लाभलेली ही संस्था आजवर कार्यरत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे कार्यकर्त्यांचा उत्साह व सेवाभावी वृत्ती हे होय. ही संस्था निर्माण करण्यापाठीमागे समाजसुधारणा हा मुलभूत उद्देश होता.

नगर वाचनालय वेंगुर्ले या संस्थेची स्थापना इ.स.१८७१ मध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' वेंगुर्ले या नावाने झाली. महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आद्यव्याकरणकार

श्री. दादाबो पांडुरंग, लोकहीतवादी चिपळूणकर इत्यादी नेत्यांनी लोकजागृतीसाठी, ज्ञानवृद्धीसाठी वाचनालयाची चळवळ जोरात सुरू केली गेली. त्याचवेळी गावोगावी नेटिव्ह जनरल लायब्ऱ्या सुरू करण्यात आली. त्यापैकी वेंगुर्ले येथील नगरवाचनालय हे एक होय. या संस्थेची पहिल्या ४० वर्षांची सुसंगत माहिती देण्यास आज साधने उपलब्ध नाहीत. मात्र वेंगुर्लेमधील ज्येष्ठ मंडळी यांच्याकडून सांगण्यात येते गावातील प्रमुख व्यापारी, नागरीक, काही सुविज्ञ सरकारी अधिकारी, वकीलवर्ग व शिक्षक वर्ग यांच्या प्रोत्साहनाने व सहकार्याने ही संस्था जन्मास आलेली आहे.

ज्यावेळी ही संस्था स्थापन झाली त्यावेळी जिल्ह्यातील इतर शहरांच्या मानाने वेंगुर्ले शहर हे व्यपारदृष्ट्या फार पुढारलेले होते. वेंगुर्ले शहराच्या या भरभराटीच्या काळात सुद्धा साक्षरतेचे प्रमाण आजच्यापेक्षर अत्यल्प असल्यामुळे व त्यावेळी प्रसिद्ध होणारी वृत्तपत्रे अगदीच थोडी असल्यामूळे त्यावेळचे मराठी शाळा नं. १ चे हेडमास्तर श्री. रामचंद्र खोत, श्री. लक्ष्मण पावसकर, श्री. वामन केळकर या प्रभुती ग्रंथालयाचे काम पहात असत. वाचनालयात वेंगुर्ले वृत्त, बेळगांव समाचार, धारवाड वृत्त, सत्यशोधक व बकुळ, जगत हितेच्छु, ज्ञानप्रकाश व केसरी, इंदुप्रकाश, टाईम्स ऑफ इंडीया अशी वृत्तपत्रे येत असत. पुढे सरकारी धोरणानुसार 'केसरी' हे क्रांतीकारी वृत्तपत्र ठेवले गेल्यामुळे वाचनालयात ते ठेवण्यास बंदी करण्यात आली होती.

ही संस्था २१ जुलै १९१२ रोजी त्यावेळच्या कायद्यानुसार रजिस्टर करण्यात आली. तेव्हापासून अध्यक्ष, कार्यकारी मंडळ याची नोंद मिळते. त्यावेळी कै. विठ्ठलदास विरजी व कै. गणेश काळबा गडेकर अनुक्रमे अध्यक्ष व चिटणीस होते. यावेळेपासून वाचनालयास स्वतंत्र असा ग्रंथपाल नेमण्यास सुरूवात झाली. सन १९५० चा मु. पब्लिक ट्रस्ट ॲक्ट चालू झाल्यानंतर सन १९५३ मध्ये संस्था त्या कायद्याखाली रजिस्टर करण्यात आली. संस्थेचा रजिस्टर नं. र.नं.आर/एफ–२४ असा आहे.

वाचनालयास स्वातंत्र्यवीर बॅ. वि.दा. सावरकर यांनी भेट दिली त्यावेळी 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' या परकीय व अपमानास्पद नावाबद्दल त्यांनी नाराजी दर्शवली. या नावा ऐवजी 'नगर ग्रंथालय' अगर युक्त असेल ते स्वदेशी नाव ठेवावे असे सुचविले. १९३४ साली

संस्थेचा नामकरण समारंभ करून संस्थेचे नाव 'नगर वाचनालय, वेंगुर्ले' असे ठेवण्यात आले. आज ही संस्था याच नावाने ओळखली जाते.

सुरूवातीच्या काळात वाचनालयाची आर्थिक स्थिती १९२४ पर्यंत साधारण बरी होती. त्यानंतर शहरात वारंवार उद्‌भवणारी प्लेगची साथ व व्यापारावर झालेला अनिष्ट परिणाम याची झळ वाचनालयास लागली. १९३३ पर्यंत वाचनालयाची स्थिती हालाखीची होती. अत्यंत काटकसरीत वाचनालय चालविले जात होते. कार्यकर्त्यांचे प्रयत्न व नागरीकांचा मिळालेला प्रतिसाद यामुळे १९३४ पासून वाचनालयाची स्थिती सुधारू लागली. कार्यकर्त्यांच्या जोरदार प्रयत्नामुळे १९४७ सालापासून वाचनालयाची सिथती समाधानकारक बनत गेली. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारी अनुदानासाठी प्रयत्न करण्यात आला. १९४८ पासून ४५० रूपयांचे सरकारी अनूदान मिळू लागले. संस्थेच्या दृष्टिने त्याकाळी अनुदान अत्यंत मोलाचे होते.

नगर वाचनालय वेंगुर्ले या संस्थेची घटना लोकशाहीप्रधान असल्याने कोणत्याही जाती धर्माच्या स्त्री– पुरूषास संस्थेचे वर्गणीदार होता येते. १८ वर्षे पूर्ण झालेल्या वर्गणीदारास सभासदत्वाचा हक्क प्राप्त होत असे. अत्यंत पारदर्शक व सुलभ स्वरूपाची घटना हे या संस्थेचे वैशिष्ट्ये होय.

इंग्रजी राजवटीत उभारण्यात आलेली वाचनालयाची इमारत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. वाचनालयाच्या समोर छोटासा बगीचा, एका बाजूस तलाव तर दुसऱ्या बाजूस बागाईत अशी निसर्गरम्य रचना असल्याने वाचकांना अल्हाददायक वातावरण मिळत असे.

वाचनालयात येणाऱ्या मराठी, इंग्रजी दैनिके, मासिके व तत्सम अन्य भाषेतील दैनिके यासाठी वाचकांच्या सोयीसाठी मोठी टेबल्स मांडण्यात आलेली आहेत. किंमती व बहुमूल्य अशा दुर्मिळ ग्रंथांचे संरक्षण होण्यासाठी काचेची मोठी कपाटे आहेत.

वाचनालय दोन सत्रात वाचकांसाठी खुले असते. वाचकांनी सुचविलेल्या सुचनांचा विचार करून त्याचा अंतर्भाव वाचनालयात करण्यात येतो. वाचनालयाची सभासदसंख्या जवळ जवळ १५०० पर्यंत आहे. संस्थेकडे अभ्यासकास उपयुक्त असे दुर्मिळ ग्रंथ व मासिकांच्या फाईल्स उपलब्ध आहेत. वाचनालयाचा ग्रंथसंग्रह ३९,००० च्या जवळपास

आहे. वाचनालयात एकूण ८५ नियतकालीके येतात. १९६१ च्या ग्रंथसंख्येच्या पार्श्वभूमीवर गेल्या ४५ वर्षात ग्रंथसंख्येत लक्षणिय वाढ झाली आहे.

मध्यंतरीच्या काळात महिला वर्ग, शिवण वर्ग, आरोग्य केंद्र वगैरे सामाजिक कार्ये सुरू करण्यात आली. पुणे बहि:शाल व्याख्यानमाला ग्रंथालयात सुरू करण्यात आली. वाचनालयात विविध प्रकारचे सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि साहित्यीक कार्यक्रम नेहमी चालू असतात. वाचनालयाची इमारत बांधताना संस्थेसाठी शासनाने ५०० रूपयांची देणगी दिली. १९९८ पासून वाचनालयाला शासकीय अनुदान मिळू लागले. आज संस्थेला १,२८,०००रूपयांचे वार्षिक अनुदान मिळते. वाचनालयाला तालुका 'अ' वर्ग दर्जा मिळाला आहे.

सद्यस्थितीमध्ये वाचनालयाचे क्षेत्रफळ २००१ चौ. फूट आहे. ग्रंथालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल (कनिष्ठ), १ शिपाई असा कर्मचारी वर्ग आहे. वाचनालयातील पुस्तकांचे विषय निहाय वर्गीकरण करण्यात आलेले आहे. वाचनालयातील ग्रंथ धुळीच्या व वाळवीच्या भक्षस्थानी पडू नयेत म्हणून विशेष काळजी घेण्यात येते. वाचनालयात देवघेव विभाग असून त्यामध्ये वाचकांना बसण्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे.

ग्रंथ रद्दबातल करण्यासाठी शासकीय नियमानुसार या ग्रंथालयात कार्यवाही केली जाते. गहाळ झालेले, खराब झालेले ग्रंथ एकत्रित करून त्यांच्या याद्या दोन प्रतिमध्ये मा. सहा. ग्रंथालय संचालक, मुंबई यांच्याकडे पाठविल्या जातात. त्यांच्या मान्यतेनंतर कार्यकारी मंउळात ठराव करून सदर ग्रंथ रद्दबातल केले जातात. आतापर्यंत १६५५ खराब ग्रंथ रद्दबातल केलेले आहेत. ग्रंथ पडताळणी ५ वर्षातून एकदा केली जाते.

**सार्वजनिक वाचनालय, कल्याण: (१८७८)**

सार्वजनिक वाचनालय कल्याण या संस्थेला आज १३० वर्षापेक्षा अधिक वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र या वाटचालीत या ग्रंथालयास अनेक स्थित्यांतरांना सामोरे जावे लागले. विष्णू शास्त्री चिपळणूकर १८८२ मध्ये निर्वतल्यानंतर मराठीचा अभिमान जोपासणारे केवळ मराठी पुस्तकांचे ग्रंथालय स्थापन करावे अशी संकल्पना पुढे येऊन १ जून १८९३ रोजी ठाण्याचे मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना करण्यात आली. मात्र कल्याण शहराने त्या आधिच एक तप सार्वजनिक वाचनालय, कल्याण या ग्रंथालयाची स्थापना केली होती.

सन १८६४ मध्ये रा.ब.साठे मामलेदार म्हणून कल्याण येथे आले होते. त्यावेळेपासून कल्याणमध्ये नेटिव्ह लायब्ररीची स्थापना करावी अशी त्यांची धारणा होती. पण त्याच वेळी त्यांची बेळगाव येथे बदली झाल्याने त्यांची कल्पना मुर्त स्वरूप धारण करू शकली नाही. त्यानंतर २४ मे १८७५ मध्ये त्यांची ठाणे येथे डेप्युटी कलेक्टर म्हणून नियुक्ती झाली. त्यावेळी ते कल्याण येथे रहावयास होते. त्यावेळी वाचनालय स्थापनेच्या त्यांच्या कल्पनेस पुन्हा चालना मिळाली. त्यावेळी बदलापूर येथे रहाणारे श्री. प्रभाकर ओक हे सार्वजनिक कार्यास उस्फुर्तपणे मदत करीत असत. त्यामुळे श्री. साठे यांच्याबरोबर श्री. ओक व कल्याण मधील काही राजघराण्यातील व्यक्तींनी एकत्र येऊन श्री. साठे यांच्या जागेत ३फेब्रुवारी १८७८ रोजी  वाचनालयाची स्थापना केली.

वाचनालयास सुरूवातीस श्री. साठे यांनी आपल्याकडील ग्रंथसंग्रह व मासिक वर्गणी १ रूपया दिल्याची नोंद त्यांच्या दैंनदिनीत आहे. पुढे काही काळ वाचनालय श्री. दामोदर गणेश जोशी यांच्या वाड्यात नेण्यात आले होते. मात्र संस्थेचा वाढता वाचकवर्ग व होणारी प्रगती लक्षात घेता वाचनालयाची स्वत:ची इमारत असावी असे संस्थाचालकांच्या लक्षात आले.  या कल्पनेला मुर्त स्वरूप देण्यासाठी श्री. सिताराम आवळेकर, रा. ब. साठे व गावातील इतर पुढारी मंडळी यांच्या मदतीने वाचनालये गावच्या डागबंगल्याच्या इमारतीत नेण्यात आले. या इमारतीचे उद्‍घाटन मि.म्युलक यांच्या हस्ते करण्यात आले व वाचनालयाचे नाव ‘म्युलक जनरल लायब्ररी’ असे करण्यात आले.  त्याकाळी वाचनालयास ‘टाऊन लायब्ररी’ असे म्हणत. रा.ब. साठे व त्यांच्या सहकार्यांनी संस्थेवर नितांत प्रेम केले. त्यांच्या निधनानंतर संस्थेचे नाव बदलून ‘नेटिव्ह जनरल लायब्ररी’ असे ठेवण्यात आले. ज्यावेळी लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने कल्याण मध्ये स्वदेशीभक्तीचे वारे वाहू लागले तेव्हा वाचनालयाच्या नावातील नेटिव्ह हा शब्द जाऊन सार्वजनिक वाचनालय, कल्याण असे नामकरण करण्यात आले. आजही हेच नाव सर्वत्र रूढ झाले आहे.

वाचनालयाचा वाढता व्याप व वाचकवर्ग लक्षात घेतल्यावर जागेची कमतरता भासू लागली. त्यामूळे इमारत वाढवण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येऊ  लागला. त्यासाठी

दि. १२ एप्रिल १९५८ रोजी एक समिती स्थापन केली व त्या समितीने इमारतीसाठी कर्ज, सहाय्य व निधीद्वारे ३५,००० रूपये इमारतीसाठी जमवून योजना आखून २७ डिसेंबर १९५८ पर्यंत इमारतीचे बांधकाम पूर्ण केले. बांधकाम काळात वाचकांची गैरसोय होऊ नये म्हणून शंकरराव चौकातील तरूण गुजराती मंडळाच्या जागेत वाचलयाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत वाचनालय नेण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील हे आदर्श वाचनालय ठरावे या दृष्टिने वाचनालयात इंग्रजी, मराठी, ज्ञानकोश, ग्रंथाचे ग्रंथालयशास्त्राप्रमाणे वर्गीकरण, विद्यार्थ्यांना अभ्यासिका, सभागृह, अद्ययावत फर्निचर अशा प्रकारे विविध सोयी सुविधा वाचनालयात उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यावेळी सामाजिक कार्यास मदत करणाऱ्या रोटरी कल्ब ने वाचनालयास वरचा मजला उभारण्यासाठी २०,००० रूपयांची मदत केली.

संस्थेने बरीच वर्षे प्रयत्न करून सुद्धा संस्थेस मुक्तद्वार वाचनालय म्हणून मान्यता मिळत नव्हती त्यावेळी श्री.घाराप यांनी प्रयत्न करून १ एप्रिल १९५१ रोजी सरकारमान्य मुक्तद्वार वाचनालय म्हणून संस्थेस मान्यता मिळविली. त्याचबरोबर वाचनालयास 'ब' वर्ग मिळवून अनुदानात वाढ झाली.

कल्याणची वाढती लोकसंख्या, वाचनालयाचा वाढता वाचक वर्ग आणि लोकांच्या मागण्यावरून १ ऑक्टोबर १९७२ मध्ये रामबाग व ४ जानेवारी १९७३ मध्ये सुभाषरोड परिसरात वाचनालयाच्या नविन दोन शाखा सुरू केल्या. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी १ मे १९७७ रोजी बालविभाग सुरू करून त्याची वर्गणी १ रूपया ठेवण्यात आली.

वाचकांना विविध दिवाळी अंक वाचायला मिळावेत यासाठी विविध प्रकारचे ६०० हून अधिक दिवाळी अंक घेऊन वाचकांसाठी एक स्वतंत्र विभाग उघडला गेला. विद्यार्थ्यांना शांततेमध्ये अभ्यास करता येण्यासाठी अभ्यासिकाविभाग व संदर्भग्रंथ विभाग उघडला गेला.

सद्यस्थितीमध्ये वाचनालयाची इमारत वाचनालयाच्या मालकीची असून तिचे क्षेत्रफळ ३००० चौ. फुट आहे. ग्रंथालयाचा दर्जा तालुका 'अ' आहे. वाचनालय दोन सत्रात खुले असून गुरूवारी बंद असते. वर्षाकाठी १६,१०५ वाचक वाचनालयाचा लाभ घेतात. त्यापैकी

जवळ जवळ ३०० वाचक संदर्भ विभागाचा लाभ घेतात. ग्रंथालयात १८ दैनिके, ११ साप्ताहिके, ३ पाक्षिके, ६२ मासिके येतात. ग्रंथालयाची ग्रंथसंपदा ६१,४९२ आहे. वाचनालयाची सभासद संख्या ३,१९० एवढी आहे. ग्रंथालयाला ३,८४,००० रूपये अनूदान मिळते. बाल विभागाची वर्गणी वाढवून १ रूपया वरून २ रूपये करण्यात आली आहे. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, ८ कारकून व १ शिपाई असा सेवकवर्ग आहे.

वाचनालयात व्याख्याने, भाषादिन, स्वातंत्रदिन, काव्यसम्मेलन, दसरा, लक्ष्मीपूजन, प्रजासत्ताकदिन असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम वर्षभरात घेतले जातात.

**जंजिरा – मुरूड सार्वजनिक वाचनालय : (१८८२)**

निसर्गरम्य मुरूड शहरामध्ये नारळी पोफळीच्या बागेने नटलेल्या मुरूड शहराच्या मध्यवर्ती ठीकाणी वाचनालयाच्या ऐतिहासिक वास्तूची स्थापना १८८२ साली झालेली आहे. सदर संस्था १९५३ साली नोंदणीकृत करण्यात आली. संस्थेचा नोंदणी क्रमांक ई २१ कुलाबा (रायगड) असा आहे. वाचनालयात अत्यंत दुर्मिळ तथा मौलीक ग्रंथसंग्रह आहे. तत्कालिन मुख्यमंत्री कै. बाळासाहेब खेर यांच्या प्रमुख उपस्थितीत सन १९४८ मध्ये वाचनालयाचा हिरक महोत्सव साजरा करण्यात आला. वाचनालयात १९५९ पासून गणेशोत्सव साजरा करण्यात येऊ लागला. १९६१ मध्ये नामदार नवाबसाहेब जंजिरा संस्थान यांनी वाचनालयास भेट देऊन २०१ रूपयांची देणगी दिली. १९६० पूर्वी वाचनालयाचे नाव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे होते. २२ ऑगस्ट १९७४ ला कार्यकारी मंडळाच्या ठरावाप्रमाणे वाचनालयाचे नामांतरण करून 'सार्वजनिक वाचनालय, मुरूड जंजिरा' असे ठेवण्यात आले.

वाचनालयाची प्रशस्त इमारत स्वतःच्या मालकीची असून तिला १२५ वर्षे पूर्ण झाली आहेत. मुंबईचे प्रतिथ यश वास्तुशिल्पज्ञ विशारद श्री. सुभाष गुर्जर यांनी या जुन्या वास्तूची प्रशंसा केली असून ही वास्तू जतन केली जावी अशी आग्रही शिफारश कार्यकारी मंडळास केली आहे.

सन २००० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालयाचा पुरस्कार वाचनालयास मिळाला. श्री. विश्वास पाटील, मधु मंगेश कर्णिक, सच्चिदानंद शेवडे, जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी वाचनालयास भेटी दिल्या आहेत.

वाचनालयाला तालूका ‘अ’ वर्ग प्राप्त झाला आहे. वाचनालयात २५ दैनिके, १२ साप्ताहिके, ३ पाक्षिके, ४४ मासिके, व इतर २० अशी एकूण१०४ नियतकालीके येतात. एकूण ग्रंथसंग्रह २३,२७४ आहे. वाचनालयाचे कार्यालयीन क्षेत्रफळ १४४० चौ. फूट आहे. यामध्ये बालविभाग, महिलाविभाग, देवघेव विभाग, वाचनकक्ष, कार्यालय व संदर्भ सेवाविभाग असे विविध विभाग आहेत. वाचनालयाचे ५१० सभासद आहेत. वाचनालयाला प्रतिवर्षी २,५६,००० रूपये सरकारी व नगरपरिषदेकडून १०,००० रूपये अनुदान मिळते. या वाचनालयास शासन नियमानुसार चार सेवक पूर्ण वेळ कार्यरत आहेत. वाचनांलयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. राजा राम मोहन रॉय फाऊंडेशन मार्फत साखळी योजना राबवली जाते. भविष्यात वाचनालय इमारतीचे नुतनीकरण करण्याचा कार्यकारणीचा मानस आहे. मुरूड तालुक्यातील अन्य गावांमध्ये ‘गाव तेथे ग्रंथालय’ ही संकल्पना रूजविण्याचा प्रयत्न वाचनालयातर्फे केला जातो. सध्या वाचनालयाची माजगाव येथे शाखा कार्यरत आहे.

**सार्वजनिक वाचनालय, श्रीवर्धन: (१८९३)**

स्वातंत्र्योत्तर काळानंतर संस्था विलनीकरणासारख्या सामाजिक चळवळीत श्रीवर्धन हे छोटेसे गाव सहभागी झाले होते. या काळात श्रीवर्धन नगरपालिकेने १ ऑगस्ट १८९३ मध्ये हे वाचनालय स्थापन केले. बाल्यावस्थेत असल्यामुळे वाचनालयाचे काम फार मर्यादित होते. नगरपालिकेचा कारकून त्यावेळी ग्रंथपाल म्हणून काम पहात असे. संस्थान व नगरपालिका ही ग्रंथालयाचा खर्च भागवत. वाचनालय सुरूवातीला भाड्याच्या घरात चालवले जात असे.

१९४२ मध्ये ग्रंथालयाची स्वतःची इमारत बांधण्यात आली. त्यासाठी ४,००० रूपये खर्च आला. फर्निचर व्यवस्था नसल्याने बास्केट व पेटी वापरली जात असे. वर्तमानपत्राची संख्या मोजकीच होती. त्यापैकी केसरी हे साप्ताहिक पोष्टाने येत असे. वाचनालयासाठी जागा जंजिऱ्याच्या नबाबाने दिली व त्याचबरोबर काही रोख रक्कम दिली.

५ फेब्रुवारी १९५३ रोजी वाचनालयाची स्वतंत्र संस्था म्हणून नोंदणी झाली. अनेक सन्मानिय व्यक्तींनी संस्थेचे कार्यकारी सदस्य म्हणून काम पाहिले व वाचनालयास प्रगतीपथावर नेले आहे.

वाचनालयाला १९६४ पासून सरकारी अनूदान म्हणून शासनाकडून १००० रूपये मिळू लागले. या अनूदानाचा उपयोग संस्थेस प्रगतीकडे नेण्यासाठी झाला. १९६८ च्या वार्षिक सभेत संस्थेची घटना व नियम तयार करून घटना मंजूर करण्यात आली. १९७० मध्ये वाचनालयाला मान्यता मिळाली. १९९६ ला घटनेमध्ये दुरूस्ती करून १९९६ च्या सर्वसाधारण सभेत घटनेला सर्वांनूमते मंजूरी देण्यात आली.

वाचनालयातर्फे मुंबई विद्यापीठ बहिशाल केंद्र म्हणून १९८१ पासून चालवले जात असून आतापर्यंत माजी कुलगुरू कै. प्रा. राम जोशी, श्री. दा.कृ. सोमण, प्रा. राम बिवलकर, मधुकर जाधव, श्री. प्रविण दावणे व अन्य अनेक मान्यवर व्यक्तींनी संस्थेस भेट दिली आहे.

सार्वजनिक वाचनालयातर्फे रायगड जिल्ह्या ग्रंथालय संघाचे २० वे अधिवेशन २२ व २३ फेब्रुवारीला घेण्यात आले होते. त्यानंतर ३३ वे वार्षिक अधिवेशन ९ व १० जानेवारीला १९९९ मध्ये घेण्यात आले.

वाचनालयाला अनेक जणांनी बहुमोल ग्रंथ देणगी देऊ न ग्रंथसंग्रहात मोलाची भर घातली.

सद्यस्थितीत वाचनालयाला तालुका ‘अ’ वर्गाचा दर्जा मिळाला आहे. ग्रंथालयाची जागा स्वत:ची आहे. ग्रंथालय दोन सत्रात सुरु असून साप्ताहिक सुट्टी शुक्रवारी असते. ग्रंथालयात येणारी वार्षिक वाचकसंख्या सरासरी १५,९५० आहे. तर ग्रंथसंख्या २२,५२७ आहे. नियतकालिकांची संख्या ७४ आहे. ग्रंथालयाची सभासद संख्या ३७० आहे. ग्रंथालयाला संदर्भ विभाग असून संदर्भग्रंथाची संख्या २२७ असून त्या विभागाचा लाभ घेणाऱ्या वाचकसंख्या २४० आहे. संदर्भ विभागाबरोबरच महिला विभाग व बालविभाग आहेत. संस्थेची स्थावर जंगम मालमत्ता ५,८९,२०४ रूपयांची आहे. ग्रंथालयाला २,५६,००० रूपये एवढे शासकिय अनूदान मिळते.

ग्रंथालयात शैक्षणिक शिबीर, प्रथमोपचार शिबिर, स्वातंत्र्य दिन, सरस्वती पुजन, भजन, कथाकथन, एकपात्री प्रयोग, हस्ताक्षर स्पर्धा, गितगायन स्पर्धा, व्याख्याने, प्रजासत्ताकदिन असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. ग्रंथालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई असा सेवक वर्ग आहे.

**नट्ट वाचनालय, बांदा: (१८९३)**

सावंतवाडी तालुक्याच्या ठिकाणाहून केवळ १२ कि.मी. वर असलेले बांदा गाव आजही इतिहासाची साक्ष देत आहेत.

बांदा गावात नट्ट वाचनालयाची स्थापना १८९३ मध्ये पोलिटीकल एजंट नट यांच्या स्मरणार्थ  करण्यात आली. पोलिटिकल एजंट नट हे १८९३ मध्ये सावंतवाडी संस्थानचा कारभार बघण्यासाठी येत असत. या ठिकाणच्या निसर्गसौंदर्याने व सात्वीक लोकांच्या सहवासाने ते भारावून जात. त्यांना वाचनाची आवड होती. त्यांनी गावातील सुशिक्षित लोकांच्या सहकार्याने बांद्याच्या मध्यभागी वाचनालयाची स्थापना केली. या ग्रंथालयाला ११६ वर्षे पुर्ण झालेली असून ते वाचकांच्या सेवेसाठी सज्ज आहे. वाचनालयामध्ये असलेली काही कपाटे व लाकडी सामान नट यांनी दिलेले आहे.

पुर्वीची वाचनालयाची इमारत इंग्लिश पद्धतीची होती. मात्र आता ही इमारत पाडून त्याजागी नविन अद्ययावात इमारत बांधण्यात आली आहे. वाचनालयाला  कै. शांताराम कमळाजी नाडकर्णी व कै. मंगेश कमळाजी नाडकर्णी यांच्या कुटूंबियांनी बांधून दिलेले नाडकर्णी सभागृह आहे.या सभागृहात विविध प्रकारचे कार्यक्रम व सभा घेण्यात येतात. मध्यंतरीच्या काळात वाचनालयाकडे दुर्लक्ष झाल्याने काही ग्रंथ वाळवीच्या भक्षस्थानी पडले. परंतु १९८५ पासून सर्व ग्रथांची व्यवस्थित काळजी घेतली जात आहे. या वाचनालयाला 'इतर ब' दर्जा प्राप्त झाला आहे.

वाचनालयात अतिशय दुर्मिळ अशा प्रकारची अनेक जुनी पुस्तके उपलब्ध आहेत. काही पुस्तकांना १०० वर्षाहून अधिक वर्षे झालेली आहेत. आज वाचनालयात एकूण ८१५४ पुस्तके आहेत. वाचनालय दररोज सहा तास खुले असते. वाचनालयाचा सुट्टीचा वार शनिवार आहे. १ जानेवारी २००१ पासून सुट्टीच्या दिवशी वाचक वर्तमानपत्र वाचण्यासाठी सायंकाळी ५ ते ७.३० या वेळत वाचनालयात येतात. ग्रंथालयात ११ दैनिके, ९ साप्ताहिके, ८ पाक्षिके, १३ वार्षिके येतात.

वाचनालयाच्या इमारतीचे क्षेत्रफळ १,१२० चौ. फू. आहे. ग्रंथालयात वाचकांना देवघेव, संदर्भसेवा, कात्रणसेवा, माहितीसेवा अशा विविध प्रकारच्या सेवा दिल्या जातात.

ग्रंथालया मार्फत वाचकस्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, कथाकथन स्पर्धा, कवि संमेलन, वकृत्व स्पर्धा असे विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम ग्रंथालयामार्फत राबविले जातात. ग्रंथालयातील ग्रंथाचे विषयानुसार वर्गिकरण केले आहे. ग्रंथाच्या सरंक्षणासाठी वाळवी प्रतिबंधक द्रव्यांची फवारणी करण्यात येते.

**मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव: (१८९८)**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव या संस्थेची स्थापना १ ऑगस्ट १८९८ मध्ये नारळी पोर्णिमेच्या दिवशी झाली. त्यादिवशी मुंबईच्या अकरा तरूणांनी एकत्र ज्ञानसागरात विद्येचे गलबत सोडण्यासाठी श्रीफळ अर्पण करण्याचे ठरविले. या मध्यमवर्गातील तरूणांची ज्ञानाची भूक उदंड होती. गगनाला गवसणी घालण्याची तयारी होती.

मित्रांजवळील व स्वत:जवळील ३०० ग्रंथाचे भांडवल, जिद्द आणि तळमळ याच्या जोरावर त्यांनी 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची' स्थापना केली. दरमहा ५ रूपये भाड्याच्या खोलीत वाचनालयाची स्थापना झाली. या छोट्याश्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले.

संस्था स्थापन झाली असली तरी समस्या भेडसावत होत्या. श्रीमंत सयाजीराव गायकवाड, दादाभाई नौरोजी यांनी आपल्या मार्गदर्शनाचा लाभ या ग्रंथालयास दिला. यावेळी कै. न्यायमुर्ती रानडे यांनी ग्रंथालयाचे कौतूक करातना म्हणाले, ''संस्थेचे काम आज जरी क्षुल्लक दिसत असले तरी तिच्या कार्यकर्त्यांच्या उत्साह दांडगा आहे. कालांतराने ही संस्था प्रचंड आकार धारण करील याची मला खात्री आहे.'' हे त्यांचे कौतूक उद्‌गार खरे ठरले.

कै. विनायक ओक हे संस्था स्थापनेच्या समारंभाचे अध्यक्ष होते. तर अमृतमहोत्सवाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे ज्ञानप्रिय भूतपूर्व अर्थमंत्री मधूकर चौधरी होते. कै. डॉ. बाबासाहेब जयकर, डॉ. फडके, आचार्य दोंदे, ना.वि. मोडक, डॉ. नानासाहेब देशमूख आणि अ. का. प्रियोळकर या सारख्या महान व्यक्तींचे मार्गदर्शन संस्थेस लाभत गेले आणि संस्थेचा विस्तार वाढत गेला.

सन १९५१ च्या सुमारास कै. स. का. पाटील संस्थेच्या अध्यक्षपदी होते. त्यांनी संस्थेचा वाढता आवाका लक्षात घेऊन संस्थेसाठी भव्य व अद्ययावत वास्तूची गरज

ओळखून आपल्या महापौरच्या कारकिर्दीत महापालीकेकडून नायगाव येथे चाडेचार हजार चौ. वार जागा वार्षिक करारावर संस्थेस दिली. तसेच पुढील दहा वर्षाच्या काळात नायगाव येथे रंगमंदिर व संस्थेची भव्य व अद्ययावत वास्तू उभारून कार्य जोमाने सुरू ठेवले.

आज संस्थेचे कार्य वाढले आहे. आता संस्था ही ग्रंथालयाइतकीच मर्यादीत न रहाता तीचे सांस्कृतिक केंद्रात रूपांतर झाले आहे. मराठी लोकजीवनाशी निगडीत होऊन त्यांच्या कार्याला अनेक दिशा लाभल्या आहेत. आज या संस्थेच्या ४४ शाखा असून शाखेतील ग्रंथसंपदा पावनेचार लाख आहे. सभासद संख्या १२,३०० आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल १ कोटी २२ लाखापेक्षा अधिक आहे. संस्थेच्या संदर्भविभागात दीड लाख हस्तलिखीते व ८९० दोलामुद्रिते आहेत. संदर्भ विभाग हा दैनिके, साप्ताहिके, लेखसूची यांनी समृद्ध आहे.

मराठी भाषा व इतिहास वाङ्मय सर्वांगांनी समृद्ध व्हावे याकरिता संस्थेने १९४८ मध्ये मराठी संशोधन मंडळ व १९५८ मध्ये इतिहास संशोधन मंडळ स्थापन केले. दूर्मिळ हस्तलिखीते व ग्रंथ गोळा करून ती सर्वसामान्य वाचकापर्यंत पोचवण्याचे कार्य हे ग्रंथालय करते. यात काही प्रमाणात वाङ्मय कोशांचा समावेश केला जातो.

मराठी ग्रंथसूची हे अत्यंत अपूर्व कार्य शं. गो. दाते यांच्या अकाली मृत्यूमूळे मराठी नियतकालीकांची सूची या संकल्पीत ग्रंथाचे कार्य प्राथमिक अवस्थेतच पडून होते ते पूर्ण करण्यासाठी ग्रंथसंग्रहालयाने सूची मंडळाचे कार्य १९६८ मध्ये आर्थिक चणचण असूनसूद्धा पूर्ण केले. या सूचीमध्ये १८०० ते १९५० या काळातील नियतकालीकांची तपशीलवार सूची ग्रंथरूपाने प्रसिद्ध केली. या नियतकालीकांच्या सूचीचे तीन खंड असून खंड २ चे १ ते ५ भाग आणि खंड ३ चे सात भाग लवकरच येत आहेत. हे तिन्ही खंड ४३५ रुपयांना अभ्यासकांना उपलब्ध करुन दिले जातात.

येथे ज्वलंत विषयावर नामवंत अधिकारी व साहित्यिक यांची व्याख्याने होतात. येथे व्याख्यानमाला, शारदाउत्सव, ख्यातनाम व्यक्तींच्या जन्मतिथी, पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात. कै. म. ना. दामले यांच्या सेवाभावी वृत्तीच्या सहकार्याने १९६५ पासून मराठी लघुलेखक वर्ग चालविले जातात. १९६८ पासून ग्रंथालयाच्या माध्यमातून ज्ञानार्जन व शास्त्रोक्त प्रशिक्षण दिले जाते.

सद्यस्थितीमध्ये ग्रंथालयाची जागा स्वत:ची असून जागेचे क्षेत्रफळ १९०१२ चौ. फूट आहे. ग्रंथालयाला जिल्हा 'अ' वर्ग प्राप्त आहे. ग्रंथालय दोन सत्रामध्ये खूले असते. ग्रंथालय सोमवारी बंद असते. ग्रंथालय सरासरी ८४,३३५ वाचक येतात. ग्रंथालयाचे एकूण सभासद १,१८९ आहेत. ग्रंथालयाची ग्रंथसंख्या २,०१,२९१ आहे. ग्रंथालयात ४० दैनिक, २१ साप्ताहिके व पाक्षिके, १८० मासिके येतात. संदर्भ विभाग असून संदर्भविभागात १,४६,८१० ग्रंथसंख्या आहे. १६,४६० वाचक संदर्भविभागाचा लाभ घेतात. ग्रंथालयात महिला व बाल विभाग आहे. ग्रंथालयाची स्थावर जंगम मालमत्तेची किंमत रु. ९,७४,८६३ आहे. ग्रंथालयाला सन २००७-०८ मध्ये ग्रंथालय संचालक अनुदानामधून परिक्षणासाठी ४,८०,००० रूपयांचे अनुदान मिळाले आहे. ग्रंथालयात २ सहाय्यक ग्रंथपाल, ८ शाखा सहाय्यक व २ शिपाई आहेत.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय हे एक ऐतिहासिक वारसा लाभलेले व मराठी साहित्याच्या परिवर्तनाचे, सामाजिक व राजकिय, अर्थिक आर्वतनाचे विविध अनुभव उराशी जपलेले ऐकमेव ग्रंथसंग्रहालय आहे.

**पाली, सार्वजनिक वाचनालय : (१९०६)**

भोर संस्थानातील सुधागड तालुक्यातील मुख्य ठिकाण म्हणजे पाली होय. सर्व धर्माच्या लोकांची वस्ती असलेला हा गाव श्री बल्लाळेश्वराच्या निवासामुळे गणपतीचे महाक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. शिक्षीत समाज मोठ्या प्रमाणावर असल्याने तेथील लोक प्रगत विचारांचे असून गावातील लोकांचे नातेवाईक, आप्तेष्ट व मित्रमंडळी मोठ्या प्रमाणात शहरात असल्याने त्यांच्या विचारांना नागरी वळण लागण्यास मदत झाली.

या गावात १८९५ मध्ये पोस्ट ऑफीस सुरू झाले. पोस्टाने पत्र व साप्ताहिके येण्यास सुरूवात झाली. श्री. चांदवाडकर यांच्या घरात साप्ताहिके वाचण्यासाठी मोठ्या उत्सुकतेने मंडळी जमू लागली. श्री. वामनराव चांदोरकर, श्री. माधवराव धारप असे ५-६जण मिळून कायद्याची पुस्तके वाचत. याच काळात श्री. विष्णू आप्पा चांदवडकर पूण्याहून श्री. आप्पासाहेब लिमिये, श्री. हरिभाऊ लिमिये पालीत येत तेव्हा वाचनालयाचा विषय काढीत. वृत्तपत्र आणून वाचनालयाची सुरुवात झाली पण तो उपक्रम बंद पडला. श्री. भिडे यांचे घरी

वृत्तपत्रे वाचली जात असत पण त्याला वाचनालयाचे रूप नव्हते. याचवेळी गावातील लोकांच्या मनात गावामध्ये ग्रंथालय असावे अशी इच्छा निर्माण झाली. त्यावेळी दोन – तीन वेळा प्रयत्न केले पण ते फुकट गेले. मात्र इच्छा बलवत्तर असल्यावर मार्ग सापडतो या उक्तीप्रमाणे गावकऱ्यांच्या चौथ्या प्रयत्नाला यश आले. परिणामी ८ जानेवारी १९०६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता शुभमुहुर्तावर 'पाली सार्वजनिक वाचनालय' या ग्रंथालयाची स्थापना झाली.

वाचनालयासाठी विष्णू चांदवडकर यांनी घरोघरी प्रचार व जमवाजमव करून ७० रूपयांची देणगी जमा केली. वाचनालयासाठी भाऊसाहेब वर्तक यांनी स्वत:ची जागा, टेबल, खुर्च्या आणि पेटी आणि १० रूपयांची देणगी दिली. श्री. वासूदेव गणेश महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली आणि संवर्तक सभा व व्यवस्थापक सभा अशी घटना तयार करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष भाऊ साहेब वर्तक व उपाध्यक्ष नारायणराव चांदवाडकर होते. संस्थेचे सभासद, वर्गणी, व्यवस्थापक मंडळ, खर्च इ. बाबत ५७ नियम करण्यात आले. सन १९२४ मध्ये या नियमांत एकसुत्रता आणण्यात आली.

लोकांमध्ये प्रेम वाढावे, ज्ञानाची प्राप्ती व्हावी, ज्ञानाचा प्रसार व्हावा हा हेतू वाचनालयाच्या स्थापनेच्या पाठीमागे होता. वाचनालय दिवसभर उघडे असते. रविवारी वाचनालयात व्याख्याने, करमणूकीची कार्यक्रम, बुद्धीबळ यासारख्या बसक्या खेळांची तजवीज केली जात असे. केसरी, मुंबई वैभव, भाला, सत्यशोधक, देशसेवक, हिंदूपंच, ज्ञानप्रकाश सारखी वर्तमानपत्रे, मनोरंजन, शेतकरी, बालबोध सारखी मासिके ग्रंथालयात येत होती. ग्रंथालयामध्ये सुरूवातीला धर्म, इतिहास, कायदा, कादंबऱ्या व संकीर्ण अशा विषयांची १५० पुस्तके होती. इंदूर, नंदूरबार, पुणे, रोहे येथून दैनिके, मासिके येत असत.

स्वातंत्र्यपूर्ण काळात काही वर्तमानपत्रे शाळा, ग्रंथालये यावर ब्रिटीश सरकारने नियंत्रण आणले होते. अशावेळी वाचनालय ब्रिटीश सरकार व संस्थान सरकारकडे नोंद करणे आवश्यक होते. ७ ऑगसट १९१० रोजी झालेल्या सभेत संस्था रजिस्टर करण्यात आली. यानंतर वाचनालयामध्ये कोणती वृत्तपत्रे, मासिके येतात, वर्गणीदार कोण आहेत ही सर्व माहिती संस्थान सरकारला द्यावी लागत असे.

१९१३ मध्ये वाचनालयाची जागा भाऊ साहेब वर्तक यांच्या जागेतून स्थलांतरीत करण्याचा निर्णय सभासदांनी घेतला. पण त्यांच्या या निर्णयाला भाऊसाहेब वर्तक यांनी आक्षेप घेऊन १९१९ पर्यंत वाचनालय आपल्याच जागेत ठेवले. याच दरम्यान १९१९ मध्ये बाबासाहेब पंतसचिव यांनी ग्रंथालयासाठी देणगी दिली आणि १९२२ मध्ये वाचनालय श्री. महादेव भिडे यांच्या जागेत स्थलांतरीत करण्यात आले. १९२२ मध्ये साखळचंद शहा यांनी चिटणीसाचे काम स्विकारले. त्यांनी वर्गणीदारांच्या संख्येत वाढ केली. लोकमान्य, स्वराज्य या सारखी वृत्तपत्रे व नविन मासिके सुरू केली. सरकारी ग्रँट नसताना देखील वाचनालयाची स्थिती मजबूत होती. त्यावेळी वाचनालयाचे ६९ सभासद होते. २३२ रू १२ आणे एवढा फंड होता.

सन १९२४ ते १९२६ मध्ये श्रीमंत सरकार बाबासाहेब पंतसचिवांनी वाचनालयास भेट देऊन १०० रूपयांची देणगी दिली. मराठी भाषासम्राट न. चि. केळकर यांनी १९२६ मध्ये वाचनालयास भेट देऊन वाचनालयाची स्तुती केली. त्याचदरम्यान अनेक मान्यवरांनी वाचनालयास भेट दिली. त्यामध्ये श्रीनिवास प्रधान यांनी वाचनालयास भेट दिली व त्याचबरोबर समाजसेवा संघास इमारतीसाठी वर्गणी देऊन वाचनालयास स्वतःची जागा मिळेपर्यंत इमारतीच्या वरच्या मजल्यावर ग्रंथालयासाठी विनामोबदला जागा उपलब्ध करून दिली. आजही वाचनालय त्याच जागेत कार्यरत आहेत.

१९२७ पासून वाचनालयाचे सचिव म्हणून लक्ष्मण केशव भावे काम पाहत होते. या कामात गणेश जोशी त्यांना मदत करीत असत. त्यावेळी वाचनालयात नवाकाळ, केसरी, इंडियन डेली मेल सारखी वर्तमानपत्रे व यशवंत, मनोरमा सारखी मासिके सुरू केली. त्याचबरोबर चर्चा मंडळे सुरू केली. याच कालखंडात वाचनालयात स्वातंत्र्य मिळवण्याचे वारे वाहू लागले.

डिसेंबर १९३२ रोजी दोन दिवशीय ग्रंथालयाचा रौप्य महोत्सव श्री. कृष्णा निलकंठ चाफेकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला गेला. १९५२ मध्ये संस्था मा. धर्मदाय आयुक्त, मुंबई यांच्या कडे नोदंविण्यात आली. प्रथम वाचनालयाला 'ड' दर्जा देण्यात आला. १९५६ मध्ये वाचनालयाचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला.१९६५–६६

मध्ये वाचनालयास 'क' दर्जा देण्यात आला. १९७२–७३ मध्ये वाचनालयाला तालुका 'ब' दर्जा देण्यात आला. ग्रंथालयाला तालुका 'ब' वर्गाचा दर्जा देण्यात आल्याने अनुदानात वाढ झाली. पुढे शासकिय धोरणे व ग्रंथालय संघाच्या मागण्यामुळे अनुदानात बरीच वाढ झाल्याचे दिसून येते. आज वाचनालयाला १,९२,००० रूपये अनुदान मिळते.

१९६२ पासून वाचनालयात पूणे विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांच्याकडून बहिःशाल शिक्षण केंद्राचे वर्ग सूरू केले गेले. वाचनालयाला १९९८–९९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालयांचा पुरस्कार मिळाला.

वाचनालयात विविध विषयावरील २२,२१५ पूस्तेके उपलब्ध आहेत. वाचनालयात १२ दैनिके, १६ साप्ताहिके, २ पाक्षिके, ३२ मासिके येतात. वाचनालयाची सभासद संख्या २९९ आहे. वाचनालयात संदर्भविभाग असून संदर्भ विभागात ४५०० ग्रंथ आहेत. ५०० वाचक या विभागाचा लाभ घेतात. वाचनालयात ३००० बालवाचनसाहित्य आहे. वाचनालयात महिला विभाग व बालवाचक विभाग आहेत. वाचनालयाच्या जागेचे क्षेत्रफळ १३१२ चौ. फूट. आहे. वाचनालयाद्वारे साखळी योजना राबवली जाते. वाचनालयाला ग्रंथालय संचालयांकडून १,७४,५१६ रूपये अनुदान मिळते. वाचनालयाद्वारे रंगभरण स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा, संस्कृती संवर्धन असे विविध सांस्कृतीक कार्यक्रम केले जातात. वाचनालयात १ ग्रंथपाल,१ सहा. ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई असा कर्मचारी वर्ग आहे.

**दादर सार्वजनिक वाचनालय : (१९०७) :**

विसाव्या शतकाच्या प्रारंभी ज्ञानवृद्धीच्या सर्व चळवळी मुंबईच्या दक्षिण परिसरातच एकवटल्या. अशा वेळी मुंबईच्या उत्तर भागात काही समाजधुरीणांनी वाचनालय स्थापन करावे असे ठरविले. दादरमध्ये वाचनालय सुरू करावे ही कल्पना संस्थेचे आद्य संस्थापक कै. महादेव गणेश गोरे यांची होती. श्री. गोरे यांना वाचनाची फार आवड होती. त्यांनी स्वतःचा असा थोडाफार ग्रंथसंग्रह समृद्ध केला होता. गोरे यांनी आपल्या मित्र परिवारातील कै. श्रीपाद महादेव वर्दे, कै. गंगाधर गोपाळ माचवे आणि कै. लक्ष्मण रघुनाथ सवाई यांच्याशी विचारविनीयम करून दादर मधील भवानीशंकर मार्गावरील श्रीराम मंदिरामध्ये

दादर सार्वजनिक वाचनालयाची स्थापना शुक्रवार दि. २३ ऑगस्ट १९०७ श्रवण शुद्ध पौर्णिमा (नारळी पौर्णिमा) या दिवशी केली.

सुरूवातीला गोरे यांनी आपल्याकडील पुस्तके वाचनालयाला देणगी म्हणून दिली. काही पुस्तके खरेदी करण्यात आली या पुस्तकांची साठवणूक करण्यासाठी एक ट्रंक विकत घेण्यात आला. हीच संस्थेची संपत्ती होती. १९ जानेवारी १९०८ रोजी वाचनालय कै. गो.ना.अक्षीकर यांच्या निवासस्थानी स्थलांतरीत करण्यात आले. पुढे संस्थेस जागा अपूरी पडू लागल्याने दादर पोलीस चौकी जवळच्या देऊबाई चाळीत (सध्याच्या गिरगाव पंचे डेपो दुकानाच्या मागे) जागा भाड्याने घेण्यात आली. ही जागापण अपुरी पडू लागल्याने वाचनालय पाटणकर (सध्याच्या केळकर मार्गावरील दादर एम्पोरियमच्या समोरच्या पदपथावर) यांच्या चाळीत हलविण्यात आले. पुढे काही कारणाने ही जागा सोडावी लागली त्यावेळी कै. बाबासाहेब धुरू यांच्या प्रयत्नाने हल्लीच्या छबिलदास मार्गावर एका नविन इमारतीमध्ये वाचनालयास जागा मिळाली आणि वाचनाल स्थिरावले. पुढे १९२६ मध्ये वाचनालयासाठी जागा विकत घेण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी जून १९२७ मध्ये बऱ्याच प्रयत्नानंतर ३० रू. चौरस वार या दराने ३८१ चौरस वार जागा म्युनिसिपालिटीने संस्थेस ११,२५९ रूपये १४ आणे आणि ६ पैसे या किंमतीस दिली.

१९ मे १९२८ रोजी संस्थेचा पायाभरणीचा कार्यक्रम पार पडला आणि जानेवारी १९२९ मध्ये तळमजला पूर्ण करण्यात आला व पहिल्या मजल्यावर सभागृहाचे बांधकाम सुरू करण्यात आले. ८ सप्टेंबर १९२९ रोजी मोठ्या समारंभाने न्यायमूर्ती कै. सर सीताराम पाटकर यांच्या हस्ते इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले. मात्र याच दरम्यान संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब धुरू यांचे निधन झाले. मात्र त्यांनी संस्थेवरील प्रेमाखातर सभागृह बांधण्यासाठी लागणारा खर्च व फर्निचर या करिता एकूण १३,००० रूपयांची तरतूद करून ठेवली होती. १९४१ मध्ये संस्थेमार्फत स्त्रियांसाठी मुक्तद्वार वाचनालय सुरू करण्यात आले. कार्यकर्त्यांच्या सततच्या प्रयत्नामुळे वाचनालयास १९४४ साली नगरपालिकेकडून प्रथम १०० रूपयांचे अनुदान मिळाले. त्याचवेळी १ सप्टेंबर १९४५ मध्ये मुलांमध्ये वाचनाची आवड वाढावी या हेतूने बालवाचनालय सुरू करण्यात आले. १९५१ पासून

मराठी वाङ्मयाच्या अभ्यासासाठी संदर्भविभाग सुरू करण्यात आला. तर १९५४ मध्ये हिंदी विभाग सुरू करण्यात आला. १९५२ पासून दिवाळ अंक योजना सुरू करण्यात आली.

ग्रंथालय चळवळीचा प्रसार व्हावा व उपनगरीतील नागरीकांनाही लाभ व्हावा या हेतूने ३१ जानेवारी १९६० रोजी स्टेशन कॉलनी, चेंबुर येथे आपली नविन शाखा उघडून कार्यविस्ताराला प्रारंभ करण्यात आला. या शाखेचा विस्तार जोमाने होत राहिला. वाचकाचा चांगलाच प्रतिसाद अल्प कालावधीत मिळाला. वाचकांचा वाढता प्रतिसाद आणि वाढती ग्रंथसंख्या यामूळे जागेची कमतरता भासू लागली. त्यामूळे कार्यकारी मंडळाने दुसरी शाखा उघडण्याचा निर्णय घेऊन १५ मे १९७७ ला दुसरी शाखा उघडली.

वरील दोन्ही शाखा उत्तमपणे कार्यरत होत्या. पण दादरमधील मूळ संस्थेच्या शाखा असल्याने व त्यांना धर्मदाय आयुक्तांकडून वेगळा नोंदणि क्रमांक मिळाला नसल्याने शासकिय व महानगरपालीका यांच्याकडून अनुदान मिळताना अडचण येऊ लागली. व्यवस्थापक मंडळाने याचा सर्व अंगानी विचार करून शाखांना स्वायत्तता देण्याचा निर्णय घेतला आणि १ एप्रिल १९९६ पासून 'चेंबुर सार्वजनिक वाचनालय' आणि 'माहीम सार्वजनिक वाचनालय' या स्वतंत्र नावांनी दोन्ही शाखा कार्यरत झाल्या. आज या दोन्ही संस्थाना महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचलनालयाकडून स्वतंत्र अनुदान प्राप्त होऊ लागले आहे.

संस्थेचा सुवर्णमहोत्सवाचा सोहळा दि. ७ डिसेंबर १९५७ ते १५ डिसेंबर १९५७ असा नऊ दिवस चालला. या महोत्सवात संगीत, नाटक व साहित्य विषयक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. संस्थेचा हीरकमहोत्सव २५ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी १९६८ मध्ये साजरा करण्यात आला. १९८२ मध्ये संस्थेचा अमृतमहोत्स साजरा करण्यात आला. फेब्रुवारी १९९९ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ७२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलल या वाचनालयात आयोजित करण्यात आले होते.

१९०७ मध्ये १० सभासद आणि १०० ग्रंथसंख्या घेऊन सुरू केलेल्या या वाचनालयात आज ५२८१ सभासद संख्या आणि ९५,००० पेक्षा अधिक ग्रंथसंग्रह या वाचनालयात आहे. वाचनालयात अद्ययावात वाचनकक्ष, बालविभाग, महिला विभाग, वृत्तपत्र विभाग, नियतकालिक विभाग, सभागृह असे विविध विभाग असून प्रत्येक विभागात बैठक व्यवस्थेची

उत्तम सोय आहे. लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे ती टिकवणे व वाढविणे हे या संस्थेच्या कार्यकर्त्यांचे मुख्य ध्येय आहे. दुर्मिळ ग्रंथसंग्रह जमविणे, त्यांचे सी.डी.मध्ये रूपांतर करणे, पुस्तकांची सूची करून ती प्रसिद्ध करणे अशा ग्रंथालयाच्या संकल्पित योजना आहेत.

दादरच्या सांस्कृतिक जीवनात गेली १०० वर्षे ज्ञानाचे सदावर्त चालवून वाचनालयाने लोकांचा विश्वास आणि प्रेम संपादन केले आहे व ते कार्य कायम चालू आहे अशी ग्वाही दासावाचे कार्यकर्ते देतात.

**पुणे नगर वाचन मंदिर : (१८४८)**

पुण्याच्या मध्यवस्तीमध्ये तीनमजली दगडी इमारत असलेले ‘पुणे नगर वाचन मंदिर’ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. या वाचनालयाची स्थापना समाजसुधारक लोकहितवादी यांनी ७ फेब्रुवारी १८४८ रोजी केली. सुरूवातीला ग्रंथालयात ३०० पुस्तके आणि ४ वर्तमानपत्रे होती. स्थापनेच्या वेळी पुण्याचे न्यायाधिश हेन्री ब्राऊन उपस्थित होते. वाचनालयाच्या पहिल्या सभेत जमलेल्या मंडळींनी रूपये पंधराशे जमा करून ग्रंथालयाचा कारभार सुरू केला. १८५० साली ९० वर्गणीदार होते त्यांच्याकडून ४९१ रूपये वर्गणी जमा झाली. त्याचवेळी देणगी जमा करून १२१७ रूपयांची देणगी जमा झाली. यामधून नविन ग्रंथ खरेदी करण्यात आले. ग्रंथालयासाठी नविन इमारत बांधून त्याचे उद्‌घाटन १ एप्रिल १८८९ मध्ये करण्यात आले. सुरूवातीला पुणे नेटिव्ह जनरल लायब्ररी असे नाव होते. कालांतराने हे नाव बदलले. या संस्थेची उभारणी महादेव गोविंद रानडे, डॉ. भांडारकर, दिवाणबहादूर गोडबोले, न. चिं. केळकर, ज. स. करंदीकर, ह. ना. आपटे, शिवरापंत पराजपे, दत्तो वामन पोतदार, न. वि. गाडगीळ, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, एस. एम. जोशी या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मंडळीनी केली. समृद्ध ग्रंथसंग्रह व सकाळपासून रात्रीपर्यंत उघडा असलेला वर्तमानपत्र आणि मासिकांचा वाचन विभाग हे या ग्रंथालयांचे वैशिष्ट्ये आहे.

वाचन मंदिराच्या परिसरात अनेक थोर साहित्यिक राहतात व ते ग्रंथालयाचा उपयोग करतात. या ग्रंथालयाने अनेक तरूणांना वाचनाची गोडी लावली. प्रसिद्ध संसदपटू मधू लिमये यांनी आपल्या आत्मवृत्तामध्ये येथे कोणकोणती पुस्तके वाचली, नवीन विचारांचे ग्रंथ

वाचून त्यांच्या जीवनावर प्रभाव कसा टाकला याचे सुंदर कथन केले आहे. येथे नेहमी प्रसिद्ध साहित्यीकांची व्याख्याने, सत्कार समारंभ होतात. आचार्य अत्रे हे ग्रंथालयाचे आधारस्तंभ होते. येथे व्याख्याने ऐकण्यासाठी अनेक लोक येत असतात. या ग्रंथालयात 'गप्पा कट्टा' असे एक वाचकांचे मंडळ आहे. तेथे सांयकाळी वाचक येतात आणि अनेक विषयांवर गप्पा करतात. साहित्यिक म. श्री. दीक्षित यांनी या ग्रंथालयाचे 'सांस्कृतिक केंद्र' म्हणून परिवर्तन केले आहे.

**श्री. छ. प्रतापसिंह महाराज थोरले नगर वाचनालय, सातारा : (१८४९)**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी स्वतःचे 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' नामक पहिले ग्रंथालय सुरू केले. पुढे १८४९ मध्ये श्रीमंत आप्पासाहेबांच्या पत्नी राणी सगुणाबाई यांनी ते जनतेच्या स्वाधीन केले. सन १८५२ मध्ये सातारा शहरात सातारा 'सिटी लायब्ररी' व 'सातारा स्टेशन लायब्ररी' अशी दोन ग्रंथालये होती. ती उपरोक्त संस्थेत १८६६ मध्ये विलीन झाल्यावर संस्थेचे नाव 'सिटी जनरल लायब्ररी' असे झाले.

सन १९०५ मध्ये या वाचनालयाची नवीन इमारत झाल्यावर त्याचे नाव बदलून ते 'नगर वाचनालय' असे ठेवण्यात आले. सन डिसेंबर १९३८ मध्ये वाचनालयाचे नामांकरण 'नगर वाचनालय' असे करण्यात आले.

हे सातारा जिल्ह्यातील सर्वात जुने व मोठे वाचनालय आहे. या ग्रंथालयाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे हे या जिल्ह्यातील पहिले मुक्तद्वार शासनमान्य ग्रंथालय आहे.

समाजात वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी या ग्रंथालयाची निर्मिती छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी केली होती. वाचनालय आपल्या विविध सेवा व उपक्रमाद्वारे वाचन संस्कृती वाढवण्यास मदत करीत आहे. ज्यांनी या वाचनालयाची स्थापना केली त्या श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) यांचे नावच वाचनालयास २००८ मध्ये देण्यात आले.

या वाचनालयाची स्वतःची तीन मजली इमारत आहे. नगर वाचनालयाच्या इमारतीमध्ये वरच्या मजल्यावर मोठे सभागृह आहे. वाचनालयाच्या या इमारतीमध्ये अनेक स्वतंत्र विभाग आहेत. यामध्ये संदर्भविभाग, वर्तमानपत्र विभाग, अभ्यासिका, देवघेव विभाग, कार्यालयीन विभाग असे विविध विभाग आहेत.

वाचकांना ग्रंथालयामध्ये मुक्तद्वार प्रवेश आहे. त्यामुळे वाचक त्यांना हवा तो ग्रंथ स्वत: शोधू शकतो. या ग्रंथालयाचे संगणीकरण झाले असल्याने वाचकांना हवा असलेला ग्रंथ अगदी थोड्या वेळात वाचकापर्यंत पोचविला जातो. वाचकांना जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे सेवा या वाचनालयाकडून पुरविल्या जातात.

वाचनालयात विविध प्रकारची ४० साप्ताहिके, १३७ मासिके, २६२ दिवाळी अंक अशी विविध प्रकारची नियतकालीके येतात. वाचनालयात ४०,००० ग्रंथ उपलब्ध आहेत. विविध विषयात संशोधन करणारे संशोधक, स्पर्धा परिक्षेस बसणारे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, महाविद्यालयीन वाचक, वकील यांना येथील ग्रंथ खूप उपयोगी पडतात. या ग्रंथसंपदेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाचनालयात जागतिक ग्रंथ दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन, श्री. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या वरील चरित्र ग्रंथाचे प्रदर्शन, व्याख्यानमाला, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन, वर्धापन दिन अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन वाचनालयातर्फे केले जातात.

**श्री. हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर : (१८५३)**

'श्री. हिराचंद नेमचंद वाचनालय' या वाचनालयाची स्थापना २८ जानेवारी १८५३ मध्ये सोलापूर येथे झाली असून सदर वाचनालयाला २६ ऑक्टोंबर १९४७ मध्ये मान्यता मिळाली आहे. वाचनालयाची स्वत:ची तीन मजली इमारत असून तीचे क्षेत्रफळ १९,८६६ चौ. फूट आहे. संस्थेचा नोंदणि क्र. ई–२६ सोलापूर आहे. वाचनालयाला जिल्हा 'अ' वर्गाचा दर्जा मिळाला आहे. वाचनालय दोन सत्रात वाचकांसाठी खुले असते. वाचनालयात ९३,०४६ पुस्तके असून वाचनालयातून वाचकांना वर्षाला ८३,३५६ पुस्तके वाचावयास दिली जातात. वाचनालयात वर्षाला २,२५,८३४ वाचक येतात. वाचनालयात एकूण १४८ नियतकालीके येतात. वाचनालयातील सभासद संख्या ३१३३ आहे. वाचनालयात संदर्भविभाग असून त्या विभागात १२७२ संदर्भग्रंथ आहेत. ग्रंथालयाची स्थावर व जंगम मालमत्ता मोठ्या प्रमाणावर आहे. वाचनालयाला आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे शासकिय अनूदान मिळालेले नाही. वाचनालय पूर्णता संगणकीकरण करणे, वाचनालयाची वेब साईट तयार करणे, आधुनिक पद्धतीने देवघेव करणे, वाचकांना इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे, दुर्मिळ

ग्रंथाचे जतन करणे अशा विविध प्रकारच्या वाचनालयाच्या भविष्यातील योजना आहेत. वाचनालयामार्फत लहान मुलांसाठी वाचन कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे ग्रंथदिन, व्याख्यानमाला, ध्वनिमुद्रण कार्यक्रम, सत्कार समारंभ अशा विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात येतात. वाचनालयात संदर्भ विभाग, महिला विभाग, बाल विभाग असे विविध प्रकारचे विभाग ओहत. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते. त्यामध्ये १५ पेक्षा अधिक ग्रंथालयांचा समावेश आहे. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहा. ग्रंथपाल, १ लिपीक, १ निर्गम सहाय्यक, २ परिचर असा सेवक वर्ग आहे.

**नगर वाचनालय, कराड : (१८५७)**

नगर वाचनालय कराड या ग्रंथालयाला १५० वर्षाची परंपरा लाभली आहे. त्याची स्थापना व पूर्वपीठीका अभ्यासताना ऐन ब्रिटीश अमदानीत जावे लागते. १८५७ साल राजकीय दृष्ट्या क्रांतीकारक वर्ष होते याच इंग्रजी आमदानीत हे वाचनालय 'नेटिव्ह लायब्ररी' म्हणून सुरू झाले. सन १९५२ नंतर वाचनालस नगरपालिकेने ताब्यात घेतले.

कराड या तालुक्याच्या ठिकाणी शहराच्या मध्यवर्ती जागेत या वाचनालयाची इमारत आहे. ही इमारत नगरपालिकेच्या मालकीची आहे. बांधलेल्या जागेचे क्षेत्रफळ ९२८६ चौ. फूट आहे. इमारत स्थापत्यकलेचक आदर्श नमुना आहे. इमारतीच्या सभोवताली मोकळी जागा असून तेथे सुंदर बगिचा आहे.

वाचनालयाच्या वरच्या मजल्यावर नाट्यगृह आहे. वाचनालयात संदर्भविभाग, महिला विभाग,बाल विभाग, नियतकालीके विभाग, वृत्तपत्र विभाग, अभ्यासिका, देवघेव विभाग, कार्यालयीन विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत.

वाचनालयास १९४९ मध्ये 'ब' वर्ग म्हणून मान्यता मिळाली तर १९७१ मध्ये तालुका 'अ' वर्ग म्हणून मान्यता मिळाली. वाचनालयास ग्रंथालयीन सेवेमधील उत्कृष्ट कार्याबद्दल गौरविण्यात आले आहे. हे वाचनालय म्हणजे सातारा जिल्ह्यातील जिल्हा पातळीच्या पात्रतेचे त्याहीपेक्षा अधिक सोयींनी युक्त आणि दक्षिण सातारा जिल्ह्यातील ग्रंथप्रेमी वाचकांनी मान्य केलेली जेष्ठ संस्था आहे. वाचनालयात विविध विषयांवरील ग्रंथसंग्रह आहे.

त्याचप्रमाणे आजच्या आधुनिक युगातील संगणक, इंटरनेट या विषयावर माहिती देणारे ग्रंथ, स्पर्धा परिक्षासांठी उपयुक्त संदर्भ साहित्य वाचनालयात उपलब्ध आहे व ते वाढविण्यावर अधिक भर दिला जात आहे.

आज वाचनालयाची ग्रंथसंख्या ४९,२४७ एवढी असून यामध्ये धार्मिक ग्रंथ, मराठी, इंग्रजी, हिंदी अशा सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. वाचनालयात २३ दैनिके, १४ साप्ताहिके, ६ पाक्षिके, ६७ मासिके व दिवाळी अंकासारखी वार्षिके येतात.

वाचनालयात स्वतंत्र महिला विभाग, बालवाचक विभाग, स्वतंत्र संदर्भ विभाग, नियतकालीक व दैनिक विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत. ग्रंथालय शास्त्राप्रमाणे ग्रंथालयातील सर्व पुस्तकांचे ड्युई दंशाश पद्धतीने वर्गीकरण व ए.एल. कॅटलॉग कोड प्रमाणे तालिकीकरण करणारे राज्यातील पहिले ग्रंथालय आहे. हे या ग्रंथालयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वाचनालयात दलित साहित्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्याचे संग्रहण, छत्रपती शिवाजी महाराजांवरील ९५० हून अधिक ग्रंथांचे संग्रहण, जुन्या नियतकालीकांचे ५ हजारहून अधिक बांधीव खंड, दुर्मिळ ग्रंथ संग्रहासाठी स्वतंत्र कॅटलॉग व स्वतंत्र कपाट, १९५२ पासूनचे उपयुक्त लेख, बातम्या यांची कात्रणे, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी लिहीलेली पुस्तके व त्यांच्या जीवनावरील इतर लेखकांची पुस्तके अशा अनेक दुर्मिळ वाचनसाहित्याचा संग्रह या ग्रंथालयात आज उपलब्ध आहे; हे या ग्रंथालयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

वाचनालयात व्याख्यानमाला, विविध नेत्यांच्या जयंत्या व पुण्यतिथी, कथाकथन, काव्यवाचन, परिसंवाद अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

**पुज्य सानेगुरूजी मोफत वाचनालय, गडहिंग्लज : (१८५८)**

सन १८५८ सालापासून इंग्रज सरकारने ग्रंथालयांना देणग्या देण्याचे धोरण अवलंबले. याचा परिणाम म्हणून कोल्हापूर संस्थानाच्या प्रोत्साहनामूळे २६ जानेवारी १८७४ मध्ये 'जनरल लायब्ररी' या नावाने या ग्रंथालयाची स्थापना झाली व सन १९४७ –४८ च्या सुमारास तालुका वाचनालय महणून मान्यता मिळाली; म्हणून जनरल लायब्ररी नाव बदलून 'गडहिंग्लज तालुका जनरल लायब्ररी' असे ठेवण्यात आले.

सन १९५९ मध्ये सदर लायब्ररीचे नगरपालिकेकडे हस्तांतरण झालेनंतर 'गडहिंग्लज नगरपालिका सार्वजनिक तालुका वाचनालय' असे नामाकरण करण्यात आले. पुढे साने गुरूजी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने त्यांचे पुण्यस्मरण चिरस्थायी ठेवण्याच्या दृष्टिने या वाचनालयाचे 'पूज्य सानेगुरूजी मोफत वाचनालय' असे नामाकरण करण्यात आले. या ग्रंथालयाने तालुका 'अ' वर्ग दर्जा मिळवलेला आहे.

सन १८७४ मध्ये २०१ पूस्तके व ७ सभासदांनी या ग्रंथालयाची सुरूवात केली. आज हे वाचनालय गडहिंग्लज तालुक्यातील सांस्कृतिक, शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. गडहिंग्लज नगरपरिषदेमार्फत वाचनालयाचे कामकाज चालविले जाते. नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी वाचनालयाचा प्रमुख असतो. वाचनालयाची दोन मजली स्वत:ची इमारत आहे. वाचनालयाला १५ ऑगस्ट १९५९ मध्ये मान्यता मिळाली. इमारतीचे कार्यालयीन जागेचे क्षेत्रफळ ४३९२ चौ. फूट असून मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ ५,००० चौ. फूट आहे. वाचनालयाला तालूका 'अ' वर्गाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. वाचनालय दोन सत्रात उघडे असून रविवार व शासकिय सुट्टीच्या दिवशी बंद असते. वाचनालयात वर्षाकाठी सरासरी ११,४२० वाचक येतात. वाचनालयाची ग्रंथसंपदा ३०,४९७ असून सभासद संख्या ४०८ आहे. वाचनालयाच्या संदर्भ विभागात २,१२० ग्रंथसंपदा असून सरासरी ११० वाचक या विभागाचा लाभ घेतात. वाचनालयात २३ दैनिके, ११ साप्ताहिके, ४ पाक्षिके व ३१ मासिके येतात. वाचनालयात १८६७ पूर्वीची २६ दोलामुद्रिते आहेत. वाचनालयामार्फत साखळी योजना राबविली जाते. यामध्ये जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सभासदत्व दिले जाते. वाचनालयाला संदर्भ विभागाबरोबच स्वतंत्र महिला व बालविभाग आहे. वाचनालयाला ग्रंथालय संचनालयाकडून परिरक्षणासाठी १,२८,००० रूपयांचे अनूदान मिळते तर नगरपालिकेकडून ८,७६,५२९ रूपयांचे अनूदान मिळते.

वाचनालयात चित्रकला स्पर्धा, ग्रंथप्रदर्शन, वाचक मेळावा, कथाकथन, परिसंवाद, मुलाखत, कविसंमेलन, व्याख्यानमला असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात.वाचनालयामार्फत प्रत्येक वर्षी मराठी साहित्य संमेलन भरविले जाते. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई असा कर्मचारी वर्ग आहे.

**सार्वजनिक वाचनालय, राजगुरूनगर : (१८६२)**

सार्वजनिक वाचनालय, राजगुरूनगर या वाचनालयाची स्थापना जानेवारी १८६२ मध्ये झाली. वाचनालयाला १९५९ मध्ये मान्यता मिळाली. वाचनालयाची जागा स्वत:च्या मालकीची असून तिचे क्षेत्रफळ १५१ चौ. फूट आहे. वाचनालयाला तालुका 'अ' वर्गाचा दर्जा प्राप्त आहे. वाचनालयाचा नोंदणी क्र. ई–३७ असा आहे. वाचनालय वाचकांसाठी दोन सत्रात खुले असून शनिवार हा सुट्टीचा दिवस असून सुद्धा वाचकांना वृत्तपत्र वाचण्यासाठी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत वाचनालय खुले असते. वाचनालयात वर्षाला ९५,३४५ वाचक येतात. वाचनालयाची ग्रंथसंपदा २४,२५५ एवढी आहे. वाचनालयात विविध प्रकारची १०५ नियतकालीके येतात. वाचनालयातील वर्गणीदारांची संख्या ८०० आहे. वाचनालयात स्वतंत्र असा संदर्भ विभाग नसला तरी ५५० संदर्भ ग्रंथ वाचनालयात असून ४०० वाचक या संदर्भ ग्रंथाचा लाभ घेतात. वाचनालयात मोठ्या प्रमाणात महिला व बाल वाचक येतात. वाचनालयाची नविन इमारत बांधणे, अद्ययावत अभ्यासिका करणे, संगणकीकरण करणे अशा वाचनालयाच्या भविष्यातील योजना आहेत.

वाचनालयाची स्थावर जंगम मालमत्ता रु. ४,६६,६६० एवढी आहे. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते, साखळी योजनेची २ ग्रंथालये सभासद आहेत. वाचनालयाला १,२८,००० रूपयांचे अनूदान मिळते. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, १ कारकुन व १ शिपाई असा सेवक वर्ग आहे. गणराज्य दिन, वर्धापन दिन, व्याख्यानमाला, स्पर्धा परिक्षा, काव्यवाचन स्पर्धा असे विविध उपक्रम राबविले जातात.

**सार्वजनिक वाचनालय, बार्शी : (१८६३)**

सार्वजनिक वाचनालय, बार्शी या ग्रंथालयाची स्थापना ५ एप्रिल १८६३ मध्ये झाली आणि १९६८ मध्ये वाचनालयाला शासन मान्यता मिळाली. वाचनालयाचा नोंदणी क्र. ई–८१, सोलापूर असा आहे. वाचनालयाची जागा स्वत:ची असून तिचे क्षेत्रफळ १६७२ चौ. फुट एवढे आहे. वाचनालयाला इतर 'अ' वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. वाचनालय वाचकांसाठी दोन सत्रात खूले असते. रविवारी वाचनालयाचा वृत्तपत्र विभाग सुरू असतो. पुस्तकांची देवघेव होत नाही. वाचनालयातून वर्षाला २६,१२३ एवढी पुस्तके वाचनासाठी

दिली जातात. वाचनालयात वर्षाला ३०,१२१ वाचक येतात. वाचनालयाची ग्रंथसंपदा १८९६२ असून विविध प्रकाची १०१ नियतकालीके येतात. वाचनालयाची सभासदसंख्या २६२ आहे. वाचनालयात संदर्भ विभाग असून त्यामध्ये ९८६ संदर्भ ग्रंथ असून ४०२ वाचक त्यांचा लाभ घेतात. संदर्भ विभागा बरोबर वाचनालयात बाल विभाग, महिला विभाग, वृत्तपत्र विभाग, देवघेव विभाग असे विविध विभाग आहेत.

वाचनालयाची स्थावर जंगम मालमत्ता २० लाखापर्यंत आहे. वाचनालयाला ग्रंथालय संचालकांकडून १,९२,००० रूपयांचे अनुदान मिळते. त्याचबरोबर नगरपालीकेकडून २००० रूपयांचे अनुदान मिळते. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई असा कर्मचारी वर्ग आहे. वाचनालयात वर्धापन दिन, सत्कार समारंभ, ग्रंथ प्रदर्शने, विविध जयंत्या, पुण्यतिथी, व्याख्यानमाला, स्पर्धा परिक्षा असे विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वाचनालयाने वरील वर्ग मिळावा, दुर्मिळ ग्रंथांचे जतन करणे, अभ्यासिका अद्ययावत करणे, संगणकीकरण करणे असे वाचनालयाचे भविष्यातील योजना आहेत.

**सांगली (जिल्हा) नगरवाचनालय, सांगली : (१८६८)**

सांगली नगरवाचनालयाची स्थापना १८६८ मध्ये झाली असून वाचनालयाला १९५० मध्ये मान्यता मिळाली. वाचनालयाची इमारत स्वतःची असून तिचे क्षेत्रफळ ६६९५ आहे. वाचनालयाला जिल्हा ‘अ’ वर्ग दर्जा प्राप्त आहे. वाचनालयाचा नोंदणी क्र. ई–२ आहे. वाचनालय वाचकांसाठी दोन सत्रात खुले असते. वाचनालयात वर्षाला ५१,१०० वाचक येतात. वाचनालयाची ग्रंथसंपदा ८८,६५३ एवढी आहे. वाचनालयात विविध प्रकारची १३६ नियतकालीके येतात. वाचनालयाची सभासद संख्या १७८१ आहे.

वाचनालयात संदर्भ विभाग असून १८१६ संदर्भ ग्रंथ आहेत. २१०० वाचक या विभागाचा लाभ घेतात. संदर्भ विभागा बरोबर महिला विभाग, बाल विभाग, कार्यकारी विभाग, देवघेव विभाग असे विविध विभाग वाचनालयात आहेत. वाचनालयाची स्थावर जंगम मालमत्ता ७,७२,९६६ रूपये एवढी आहे. वाचनालयाला रु. ४,८०,००० एवढे अनुदान मिळते. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते; आणि या योजनेचे ४७ ग्रंथालये सभासद आहेत. वाचनालयात १ ग्रंथपाल, ३ ग्रंथालय सहाय्यक, २ लिपीक, २

अर्धवेळ लेखनिक आणि २ शिपाई असा कर्मचारी वर्ग आहे. वाचनालयात गणराज्य दिन, वर्धापन दिन, पुण्यतिथी, जयंत्या, व्याख्यानमाला, चर्चासत्रे, स्पर्धा परिक्षा, शारदोत्सव असे विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

**विटा तालुका वाचनालय, विटा : (१८६९)**

विटा तालुका वाचनालयाची स्थापना १४ जून १८६९ मध्ये झाली. वाचनालयाला १९७१ मध्ये मान्यता मिळाली. वाचनालयाला तालुका 'ब' वर्गाचा दर्जा मिळाला आहे. वाचनालयाचा नोंदणी क्र. ई.-२१ सांगली असा आहे. वाचकांसाठी वाचनालय दोन सत्रात खूले असते. सोमवार हा सुट्टीचा दिवस आहे. दरवर्षी वाचनालयातून ४२,००० एवढे ग्रंथ वाचकांना वाचण्यासाठी बाहेर दिले जातात. वर्षाला ९६,००० वाचक वाचनालयाचा लाभ घेतात. वाचनालयाची ग्रंथसंख्या १८,५९७ एवढी आहे. वाचनालयात विविध प्रकारची ८७ नियतकालीके येतात. वाचनालयाची वाचक सभासद संख्या ११२१ आहे. वाचनालयाला स्वतंत्र संदर्भ विभाग असून त्या विभागात ९८५ संदर्भग्रंथ आहेत व ५०० वाचक या विभागाचा लाभ घेतात. वाचनालयाची स्थावर व जंगम मालमत्ता रु. ५,००,००० रूपये एवढी आहे. वाचनालयाला रु. १,९२,००० एवढे शासनाकडून अनुदान मिळते. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई असा सवेक वर्ग आहे. वाचनालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन, सत्कार समारंभ, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, स्वातंत्र दिन, विविध जंयत्या, पुस्तक प्रदर्शन, शिवजयंती, वर्धापन दिन असे विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम वाचनालयामार्फत घेण्यात येतात. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते. त्यामध्ये ८ ग्रंथालयांचा समावेश आहे. वाचनालयात संदर्भ विभागा बरोबरच बाल विभाग, महिला विभाग, देवघेव विभाग असे विविध विभाग आहेत.

**आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी : (१८७०)**

सन १८७० च्या सुमारास इचलकरंजी नगराची लोकसंख्या ८,००० पेखा अधिक नव्हती. या जहागिरीतील लोकसंख्येने अधिक असलेले नगर इचलकरंजीच होते. शिवाय हे नगर जहागिरीचे मुख्य केंद्र होते. भारताच्या इतर नगरात जसे नविन प्रयोग राबविले जात होते. त्याचे अनुकरण इचलकरंजीतही होऊ लागले. येथे प्राथमिक शाळा असल्यातरी स्वतंत्र असे वाचनालय नव्हते म्हणून सन १८७० मध्ये येथील संस्थानिक श्रीमंत गोविंदराव

आबासाहेब सरकार यांनी इचलकरंजीवासियांसाठी सुरू केले. या वाचनालयास सुरूवातीस 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' म्हणून संबोधित असत. दुर्दैवाने अल्पावधीतच सरकारांचे निधन झाले. त्यामुळे त्यांनी सोडलेले संकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी इतरांना पार पाडावी लागली. श्रीमंताच्या काळात रामभाऊ आपटे यांनी मोलाचे कार्य केले. त्यांनी वाचनालयास जागा उपलब्ध करून दिली. शिवाय त्या जागेत वाचनालयासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचा प्रयत्न केला. प्रारंभी वाचनालय हे येथील नगरखान्याच्या एका खोलीत होते. रामभाऊ आपटे यांचे व्यक्तीमत्त्व अष्टपैलू होते. व्यवसायाने वकील असल्याने जगात घडणाऱ्या तत्कालिन घटनांची त्यांना माहिती होती. भारतातील अनेक नगरांना त्यांनी भेटी दिल्या व वाचनालयांची माहिती करून घेतली. मोठ्या शहराच्या ठिकाणी वाचनालय कसे चालते यांची त्यांनी स्वत: पहाणी केल्याने तसे वाचनालय इचलकरंजीत उभारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ग्रंथालयासाठी नव्या वास्तूचे बांधकाम त्यांनी हाती घतले. पंरतु त्यांच्या निधनामूळे इमारतीचे बांधकाम अपूरे राहिले. या अपूर्ण राहिलेल्या इमारतीचे बांधकाम श्रीमंत नारायणराव बाबासाहेबांनी पूर्ण केले. १८९३ मध्ये रू. २५ ची ग्रंथालयासाठी पहिली देणगी नगरपालीकेने दिली. त्यावेळेपासून आजपर्यंत वाचनालयासाठी नगरपालिक आर्थिक सहाय्य देत आहे. या ग्रंथालयाच्या उभारणीत, जडणघडणीत श्री. आपटे यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर १८९७ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'आपटे वाचन मंदिर' असा नामकरणाचा ठराव संमत करण्यात आला.

१८७० साली वाचनालयात ३६५ पूस्तके, ९ सभासद व दरमहा ४ रूपये उत्पन्नाने सुरूवात झालेल्या ग्रंथालयात आज६७,०२९ ग्रंथ असून सभासद संख्या २८०० आहे. ग्रंथालयाची इमारत स्वत:ची असून तिचे क्षेत्रफळ ७४२६.६६ चौ. फूट आहे. वाचनालयाला तालुका 'अ' वर्ग वाचनालयाचा दर्जा मिळाला आहे. वाचनालयात वृत्तपत्र विभाग, ग्रंथ देवघेव विभाग, बालविभाग,श्राव्य विभाग कार्यरत आहेत. वाचनालयाला१९९१ मध्ये महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाचनालयाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळालेला आहे.

वाचनालयाची स्थापना जरी १८७० मध्ये झाली असली तरी वाचनालयाला मान्यता १५ जानेवारी १९५३ मध्ये मिळाली आहे. वाचनालय दोन सत्रात उघडे असून रविवारी बंद

असते. दरवर्षि सरासरी ४९,८०० पूस्तके वाचनालयातून वाचकांना वाचनासाठी दिली जातात. ४८,५०० वाचक वर्षाला वाचनालयाचा लाभ घेतात. वाचनालयात २४ वृत्तपत्रे, १५ साप्ताहिके, ५ पाक्षिके, ३४ मासिके, २ त्रैमासिके अशी नियतकालीके येतात. संदर्भ विभागात ३३२२ संदर्भग्रंथ असून ११३ वाचक या विभागाचा लाभ घेतात. वाचनालयात १५ दुर्मिळ हस्तलिखीते, १८६७ पूर्वी प्रकाशीत झालेली ४१ दोलामुद्रिते आहेत. वाचनालयाखची स्थावर जंगम मालमत्ता ३५,७२,२७६.३२ रूपये एवढी आहे. ग्रंथालयामार्फत साखळी योजना राबवली जाते. ग्रंथालय संचनालयाकडून परिक्षणासाठी २,५६,००० रूपयांचे अनुदान मिळते. वाचनालयात व्याख्यानमाला, पुरस्कार सोहळे, वक्तृत्व स्पर्धा, ग्रंथप्रदर्शन, स्वरदीपोत्सव, पुण्यतिथी असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. वाचनालयात १ व्यवस्थापक, १ ग्रंथपाल, १ सहा. ग्रंथपाल, १ लिपीक, ५ ग्रंथालय सहाय्यक, १ परिचर असा कर्मचारी वर्ग आहे. वाचनालयात विभागानुसार फर्निचर व्यवस्था आहे.

**श्री छत्रपती शिवाजी वाचनालय, फलटण : (१८७०)**

श्री छत्रपती शिवाजी वाचनालय,फलटण या वाचनालयाची स्थापना ९ ऑगस्ट १८७० मध्ये झाली असून वाचनालयाला १९५५ मध्ये मान्यता मिळाली. वाचनालयाची जागा स्वतःची असून तीचे क्षेत्रफळ १८० चौ. फुट असे आहे. वाचनालय वाचकांसाठी दोन सत्रात खुले असून मंगळवार हा सुट्टीचा दिवस आहे. वाचनालयाला तालुका 'ब' वर्गाचा दर्जा प्राप्त आहे. वाचनालयात वर्षाला १२,५४० वाचक येतात. वाचनालयाची ग्रंथसंपदा १६,८०५ असून विविध प्रकारची ४३ नियतकालीके वाचनालयात येतात. वाचनालयाची सभासद संख्या ३३७ आहे. वाचनालयात ४० संदर्भ ग्रंथ असून ६० वाचक या ग्रंथाचा लाभ घेतात. वाचनालयासाठी नविन इमारत बांधणे, वाचनालयाचे संगणकीकरण करणे या वाचनालयाच्या संकल्पित योजना आहेत. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई असा सेवक वर्ग आहे. वाचनालयात व्याख्यानमाला, गणराज्य दिन, वर्धापन दिन, कवी संमेलन अशा विविध प्रकारचे उपक्रम वाचनालयामार्फत राबविण्यात येतात. वाचनालयामार्फत साखळी योजना राबविण्यात येते. ५ ग्रंथालये या योजनेचा लाभ घेतात.

**नगर वाचनालय, मंगळवेढा : (१८७५)**

नगर वाचनालय, मंगळवेढा या वाचनालयाची स्थापना १२ जून १८७५ मध्ये झाली. वाचनालयाला शासमान्यता १९५३ मध्ये मिळाली. वाचनालयाची इमारत स्वत:ची असून तीचे क्षेत्रफळ १८८१ चौ. फुट आहे. वाचनालयाला तालुका 'अ' वर्गाचा दर्जा प्राप्त आहे. वाचनालय वाचकांसाठी दोन सत्रात खुले असून. बुधवारी पुस्तक देवघेव बंद असते पण वृत्तपत्र विभाग सुरू असतो. वाचनालयाचा नोंदणि क्र. ई–३५, सोलापूर असा आहे. वाचनालयातू वाचकांना २७,७७१ एवढी ग्रंथसंख्या वाचनासाठी दिली जाते. वाचनालयात वर्षाला १,६५,४३९ वाचक येतात. वाचनालयाची ग्रंथसंख्या १६,६८८ अशी आहे. वाचनालयात विविध प्रकारची ८४ नियतकालीके येतात. वाचनालयाची सभासद संख्या ३१९ आहे. वाचनालयात संदर्भ विभागा असून त्या विभागात १५१ संदर्भ पुस्तके असून ३४ वाचक या विभागाचा लाभ घेतात. संदर्भ विभागाबरोबर वाचनालयात महिला विभाग, बाल विभाग, वृत्तपत्रे विभाग, देवघेव विभाग असे विविध विभाग आहेत.

वाचनालयाची स्थावर जंगम मालमत्ता रु. ५,००,००० अशी आहे. वाचनालयाचे संगणकीकरण करणे, ग्रंथसंख्या वाढविणे, दुर्मिळ ग्रंथाचा संग्रह करणे, सभासद संख्या वाढविणे, इमारतीचे विस्तारीकरण करणे अशा वाचनालयाच्या भविष्यातील योजना आहेत. वाचनालयाला परिक्षण अनूदान म्हणून रु. २,३३,२३३ एवढे मिळते. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल व १ लिपीक असा कर्मचारी वर्ग आहे. वाचनालयाद्वारे ग्रंथप्रदर्शन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी, स्वातंत्र्य दिन, सत्कार समारंभ, प्रजासत्ताक दिन, वर्धापन दिन असे विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते. त्यामध्ये १९ ग्रंथालये सभासद आहेत.

**राजर्षी शाहू नगर वाचन मंदिर, शिरोळ : (१८७७)**

कोल्हापूर संस्थानचे तिसरे छत्रपती महाराज यांच्या कारकिर्दीत 'नेटिव्ह जनरल लायब्ररी, शिरोळ' या संस्थेची स्थापना जून १८७७ मध्ये झाली. शिरोळाचे मामलेदार श्री. मोरो हरी ओक, बाबासो मुनसफ कोर्ट वकील व प्रमुख व्यापारी या सर्वांनी मिळून ही संस्था स्थापन केली. श्री छत्रपती सरकार करवीर यांनी पहिल्याच वर्षी रू.२५ अनुदान मंजूर

केले. दि. ७ डिसेंबर १९४१ च्या सभेत 'नेटिव्ह जनरल लायब्ररी, शिरोळ' या ऐवजी 'श्री छत्रपती पद्माराजे वाचनालय' असे नाव देण्याचा ठराव झाला. परंतू त्यांची कार्यवाही झाली नाही.

१९५४–५५ या काळांत 'सुभाष वाचनालय' म्हणून दुसरी लायब्ररी सुरू होऊन त्याला ग्रँट मंजूर झाली. यातून दोन्ही वाचनालया दरम्यान संघर्ष सुरू झाला. त्यामुळे दोन्ही वाचनालयाच्या कार्यकर्त्यांनी समझोता घडवून आणून दोन्ही वाचनालयांचे एकत्रिकरण करून 'नगर वाचन मंदिर' शिरोळ नामकरण करण्यात आले. सन १९६४ मध्ये नविन घटनेला मंजूरी घेऊन सर्वसाधारण सभेत 'राजर्षी शाहू नगर वाचन मंदिर, शिरोळ' असे नाव देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

१८७७ रोजी वाचनालयाची २९३ ग्रंथसंख्या व १० सभासद व दरमहा १० रूपये उत्पन्न होते. आज ग्रंथालयात ३५,००० ग्रंथसंख्या असून १८०० सभासद आहेत. ग्रंथालयाची स्वतंत्र दोन मजली इमारत असून शिरोळ तालुका ग्रंथालय म्हणून कार्यरत आहे. या ग्रंथालयाला तालुका 'अ' वर्ग प्राप्त झाला आहे. ग्रंथालयात देवघेव विभाग, वृत्तपत्र व नियतकालीक विभाग, स्वतंत्र बाल व महिला विभाग, अभ्यासिका इ. विभाग आहेत. ग्रंथजत्रा, व्याख्याने, वाचक मेळावे या सारखे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम ग्रंथालयात आयोजित केले जातात. १८६७ पूर्वी प्रकाशित झालेली २९ दोलामुद्रिते वाचनालयात आहेत.

**सार्वजनिक वाचनालय, मलकापूर : (१८८१)**

मिळेल तेवढे ग्रंथ जमा करून ज्ञानलालसेपोटी मलाकापूरातील नागरिकांनी सन १८८१ मध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' ची स्थापना केली. सन १८८१ ते १९२८ या कालखंडात वाचनालयाची ग्रंथसंपदा फारच थोडी होती. सन १९२८ च्या दरम्यान 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' ऐवजी 'सरकारी मोफत वाचनालय' असे नाव देणेत आले. १९५३ साली हे वाचनालय पब्लीक ट्रस्ट ॲक्टखाली रजिस्टर झाले. यानंतर 'सरकारी मोफत वाचनालय' हे नाव बदलून 'सार्वजनिक वाचनालय, मलकापूर असे ठेवण्यात आले. सन १९५३ ते १९७३ या कालखंडात मात्र नगरपालीकेचे व शासनाचे अनुदान मिळू लागल्याने ग्रंथसंपदा

वाढून ५,००० झाली. व 'ब' वर्ग दर्जा मिळाला. सन २००२–०३ मध्ये आदर्श ग्रंथालय पुरस्कार मिळाला.

सन १८८१ मध्ये ९८ ग्रंथसंख्या व ६ सभासदांनी सुरूवात केलेल्या या ग्रंथालयाची ग्रंथसंपदा आज १८,५०० व ४०० सभासद आहेत. ग्रंथालयास स्वतंत्र इमारत असून अनेक प्रकारचे उपक्रम ग्रंथालयात राबविले जातात.

**राणी अहिल्यादेवी वाचनालय, सेनापती कापशी : (१८८४)**

दुर्मिळ पुस्तकांचा खजिना असलेले, सेनापती संताजींच्या वारसदारांनी १२० वर्षापूर्वी सूरू केलेले व हुतात्माच्या स्मृती जपणाऱ्या वास्तूत असलेले सेनापती कापशी येथील 'राणी अहिल्यादेवी वाचनमंदिर' इतिहासाचा ठेवा आहे.

सरसेनापती संताजी घोरपडे यांचे नववे वारसदार संताजी घोरपडे यांनी १ एप्रिल १८८४ ला या ग्रंथालयाची स्थापना केली. १३२ पुस्तकांनी सुरू झालेल्या या ग्रंथालयात आज ९७६७ पुस्तके व दुर्मिळ ग्रंथ आहेत. यामध्ये ३००० दूर्मिळ ग्रंथ, पोथी, २०० इंग्रजी ग्रंथ आहेत. २०० वर्षापूर्वीची छत्रपती शिवाजी यांच्यावरील संगीत नाटके, पोवाडे व विविध विषयावरील ग्रंथांचा समावेश आहे. श्रीमंत घोरपडे, ग्रामपंचात, स्वामी सेवा संस्था यांनी ग्रंथालयाला सहकार्य केले आहे. ग्रंथालयात वर्तमानपत्रे विभाग, बालविभाग व महिला वाचक विभाग इ. विभाग आहेत. ग्रंथालयात दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ग्रंथालयात १८६७ पूर्वी प्रकाशित झालेली एकूण २१ दोलामुद्रिते आहेत.

**जत वाचनालय, जत : (१८८५)**

जत वाचनालयाची स्थापना १७ मार्च १८८५ मध्ये झाली असून १९५० मध्ये वाचनालयास मान्यता मिळाली. वाचनालयाची जागा स्वतःची असून तीचे क्षेत्रफळ २३६० चौ.फूट आहे. वाचनालयाला तालुका 'ब' वर्गाचा दर्जा मिळाला आहे. वाचनालयाचा नोंदणी क्र. ई–१७३, सांगली असा आहे. वाचनालय वाचकांसाठी दोन सत्रात खुले असते. वाचनालय बुधावर व शासकिय सुट्ट्याच्या दिवशी बंद असते. वाचनालयात वर्षाला १५,०४५ पर्यंत वाचक येतात. वाचनालयातून वर्षाला १०,००० पर्यंत पुस्तके वाचकांना वाचनासाठी दिली जातात. वाचनालयाची ग्रंथसंख्या २४,३३६ असून वाचनालयात विविध

प्रकारची ५३ नियतकालीके येतात. वाचनालयाची सभासद संख्या ३३२ आहे. वाचनालयाला स्वतंत्र संदर्भ विभाग असून त्या विभागात ४२७ संदर्भ ग्रंथ आहेत व २६५ वाचक या विभागाचा लाभ घेतात. वाचनालयाची स्थावर जंगम मालमत्ता ६,३२,००० रूपये एवढी आहे. वाचनालयाचे विस्तारीकरण करणे ही या वाचनालयाची भविष्यातील योजना आहे. वाचनालयाला १, ६८,१६६ रूपयांचे शासनाकडून अनुदान मिळते. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते. त्याचे १० सभासद आहेत. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई असा सेवक वर्ग आहे. वाचनालयात व्याख्यानमाला, वर्धापन दिन, सत्कार सोहळे, प्रकाशन कार्यक्रम असे विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात.

**नगर वाचन मंदिर, कसबे डिग्रज : (१८८६)**

नगर वाचन मंदिर, कसबे डिग्रज या वाचनालयाची स्थापना १८८६ मध्ये झाली असून १९६८ मध्ये वाचनालयाला मान्यता मिळाली. वाचनालयाची जागा स्वत:ची असून तिचे क्षेत्रफळ ५२५५ चौ. फूट आहे. वाचनालयाच्या सभोवतालच्या मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ ३६५० चौ. फूट आहे. वाचनालयाला इतर 'ब' वर्गाचा दर्जा प्राप्त झाला आहे. वाचनालयाचा संस्था नोंदणी क्र. एनएसई–५ असा आहे. वाचनालय मुक्तद्वार असून वाचकांसाठी कायम दोन सत्रात खुले असते. वाचनालयात वर्षाला ८९,५२८ वाचक येतात. वाचनालयाची ग्रंथसंख्या ९८०५ असून विविध प्रकारची ५२ नियतकालीके येतात. वाचनालयाची सभासदसंख्या २१३ आहे. वाचनालयाला संदर्भ विभाग असून त्यामध्ये ३१४ संदर्भ ग्रंथ आहेत. संदर्भ विभागाचा ५०० वाचक लाभ घेतात. वाचनालयाची स्थावर, जंगम मालमत्ता १७ लाख रूपये असून अद्ययावत अभ्यासिका करणे, फर्निचर करणे, ग्रंथालयास वरचा वर्ग प्राप्त करणे ग्रंथालयाच्या संकल्पित योजना आहेत. वाचनालयाला १,२१,४०४ रूपयांचे अनुदान मिळते. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ लिपिक, १ शिपाई असा सेवक वर्ग आहे. वाचनालयात संदर्भ विभागाबरोबर महिला विभाग, बाल विभाग, देवघेव विभाग, वृत्तपत्र विभाग, सभागृह असे विविध विभाग आहेत. वाचनालयात व्याख्यानमाला, गणराज्य दिन, वर्धापन दिन, चर्चासत्रे, कविसंमेलन, स्पर्धा परिक्षा असे विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.

**सांगोल नगर वाचन मंदिर, सांगोला : (१९०४)**

या वाचनालयाची स्थापना १९०४ मध्ये झाली असून त्याला १९४४ मध्ये मान्यता मिळाली. वाचनालयाची जागा ही भाड्याची असून त्याकरिता ११० रूपये नाममात्र भाडे आकारण्यात येते. वाचनालयाला तालुका 'ब' वर्ग दर्जा मिळाला आहे. वाचनालयाचा नोंदणी क्र. ई–३७ असा आहे. वाचनालय वाचकांसाठी दोन सत्रात खुले असून रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी बंद असते. वाचनालयाची ग्रंथसंख्या २०,१४० आहे. वाचनालयात विविध प्रकारची ६८ नियतकालीके येतात. वाचनालयाची सभासद संख्या ३१६ आहे. वाचनालयात संदर्भ विभाग असून त्या विभागामध्ये ४२५ ग्रंथ आहेत आणि २७५ वाचक त्याचा लाभ घेतात. संदर्भ विभागाबरोबर महिला विभाग, बाल विभाग, देवघेव विभाग असे विविध विभाग आहेत. वाचनालयाची स्थावर जंगम मालमत्ता रू. २,५०,००० एवढी आहे. वाचनालयाला तालुका 'अ' वर्ग मिळविणे या दृष्टिने प्रयत्न करणे ही या ग्रंथालयाची संकल्पित योजना आहे. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवलि जाते. त्यामध्ये ४ ग्रंथालये सभासद आहेत. वाचनालयामध्ये १ ग्रंथपाल, १ लिपीक, १ सेवक असा कर्मचारी वर्ग आहे. वाचनालयात व्याख्यानमाला, ध्वजारोहण, काव्यवाचन, गांधी जयंती असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम वाचनालयामार्फत आयोजित केले जातात.

**बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला : (१८६०)**

इ.स.१८६० मध्ये वाचनालयाची स्थापना झाली. त्यावेळी या गावात शाळा देखील नव्हती. अकोला शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले होते. अशातच ग्रंथालयाची स्थापना होणे ही एक विस्मयकारक घटना होती. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अकोला शैक्षणिकदृष्ट्या जागरूक झाले. नियतकालिके प्रकाशित होऊ लागली. विद्यालयांची संख्या वाढली.

प्रारंभी वाचनालयाचे नाव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे होते. वाचनालयास तेव्हा जागा नव्हती. त्यावेळी श्री. साहू यांच्या निवासस्थानी वाचनालय सुरू करण्यात आले. परंतू अवघ्या ३ वर्षात श्री. साहू यांचे घर पूरात वाहून गेले. १८८० मध्ये बाबुजी देशमुख यांनी वाचनालयाला १००० रूपयांची मोलाची देणगी दिली. त्यामुळे वाचनालयाचे भविष्य उज्वल झाले. १८८४ मध्ये वाचनालयाने नविन इमारतीमध्ये प्रवेश केला. दिवसेंदिवस

वाचनालयाचा विकास होत असल्याने जागा अपुरी पडू लागल्याने वाचनालयाने कर्ज घेऊन नविन इमारत बांधली .

अकोल्याच्या सांस्कृतिक जीवनात वेळोवेळी चैतन्य ओतण्याची जबाबदारी वाचनालयाने पार पाडली. वाचनालयाला सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक, राज–गोपालचारी, सी. डी. देशमुख, मोरारजी देसाई, जगजीवनराम बालगंधर्व, तुकडोजी महाराज, माखनलाल चर्तुर्वेदी, रजनीश या थोरामोठ्यांनी वाचनालयास भेट दिली आहे.

या वाचनालयाची ग्रंथ निवड करणारी मंडळीही निष्णात आणि व्यासंगी आहेत. कथा, कादंबरी प्रमाणेच रामायण, महाभारत, सामवेद, अथर्ववेद, यजुर्वेद, स्कंद पुराण याशिवाय मराठी विश्वकोश, भारतीय संस्कृतीकोश, प्रेमचंद, विनोबा भावे, रजनीश, साने गुरूजी, अत्रे ह्यांचे समग्र साहित्य ग्रंथालयात आहे.

बदलत्या काळाबरोबर वाचनालयाच्या गरजा वाढल्या आहेत. वाचकांसाठी आधुनिक सुखसोयींनीयुक्त प्रशस्त आणि निवांत इमारत बांधलेली आहे. नवीन वास्तुमध्ये ग्रंथालयाचे स्थानांतर करण्यात आले. जुन्या वास्तुमध्ये वाचनकक्ष व्यवस्था ठेवण्यात आली आहे. तसेच गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी रोज एक तास ग्रंथालय जास्त वेळ उघडे ठेवण्यात येते.

दरवर्षी दिवाळी अंकाचे प्रदर्शन भरवले जाते. यामध्ये ७० च्या वर दिवाळी अंक असतात. वाचनालयातर्फे दरवर्षी एप्रिल ते मे या काळात ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा उपक्रम राबविल्या जातो. त्यामध्ये ६० विद्यार्थी सहभागी होतात. वाचनालयाने ५० दुकाने बांधुन ती भाड्याने दिली आहेत.

ज्यावर्षी ग्रंथालयाला मान्यता मिळाली त्यावर्षी वाचनालयाला ‘अ’ वर्ग मिळाला. वाचनालयाच्या वाचकांची आवड वाढवण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, व्याख्यानमाला, ग्रंथमेळावा, वादविवाद यासारखे कार्यक्रम घेतले जातात. ग्रंथालयात येणाऱ्या नियतकालीकांची नोंद रजिस्टर मार्फत ठेवली जाते. १९६२ मध्ये वाचनालयाला जिल्हा ‘अ’ वर्गाचा दर्जा मिळाला. ३० एप्रिल १९६२ मध्ये ग्रंथालयास मान्यता मिळाली.

आज वाचनालयाचे क्षेत्रफळ २५०० चौ. फुट पेक्षा अधिक आहे.  वाचनालयात वाचनकक्ष, स्टॉकरूम, बालविभाग, महिला विभाग असे विविध विभाग आहेत. वाचनालयाचे २८०० पेक्षा अधिक सभासद आहेत.  वाचनालयात ५५,००० पेक्षा अधिक ग्रंथ असून १५० पेक्षा अधिक नियतकालीके येतात. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते त्यामध्ये ६० पेक्षा अधिक ग्रंथालयांचा समावेश आहे. वाचनालयाला रु. ४,००,००० पेक्षा अधिक शासकीय अनुदान  मिळते. वाचनालयातील कर्मचारी वर्गाची संख्या ०६ असून त्यापैकी ५ प्रशिक्षीत आणि १ अप्रशिक्षीत आहेत.

एकेकाळी शुन्यातून निर्माण केलेले हे वाचनालय आज मात्र संपन्न आहे.

**सार्वजनिक वाचनालय परतवाडा : (१८६६)**

६ सप्टेंबर १८६६ रोजी गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर स्थापना झाली. वृत्तपत्रे, पुस्तके, व्याख्याने इ. साधनांचे द्वारे वर्गणीदार आणि इतर लोक  यामध्ये ज्ञानाचा प्रसार करणे व परस्परांचे सहवासाने प्रेमवृद्धी करणे हे या संस्थेचे उद्देश आहेत. या वाचनालयाची स्थापना करण्यात वकील, शिक्षक, व्यापारी, अधिकारी वर्ग तसेच गावातील इतर प्रतिष्ठीत नागरिक सहभागी होते.  यामध्ये मराठी, हिंदी, उर्दु, इंग्रजी, पारशी या सर्वांचा समावेश होता. एका लहानशा घरात वाचनप्रिय शिक्षकांच्या देखरेखेखाली वाचनालयास सुरूवात झाली. त्यावेळी वाचनालयाचे नाव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे होते. नंतर 'मॅकेंझी लायब्ररी' असाही उल्लेख  आढळतो. १९२० साली संस्थेचे नवे नियम झाले.  तेव्हापासून या संस्थेला 'सार्वजनिक वाचनालय परतवाडा' हे नविन नाव ठेवण्यात आले. १८८२ मध्ये मेजर मॅकेंझी यांच्या कारकीर्दीत वाचनालयाची प्रगती झाली. १९१४ मध्ये ३ प्लॉट मिळाले व वाचनालयासाठी प्रशस्त आवार झाले. तारेचे कुंपण घालण्यात आले. १८८२ मध्ये मॅकेंझी यांच्या अध्यक्षतेखाली नवीन इमारतीचा प्रवेश समारंभ झाला.

१९३६ साली वाचनालयाचे विस्तारीकरण करण्यात आले. ग्रंथालयाचा ७३ वा वार्षिक समारंभ स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यांनी आपल्या भाषणात 'देशातील सर्वांगीण दौर्बल्य नाहीसे करीत असा ओजस्वी ग्रंथ संग्रह करा' असा संदेश दिला.

वाचनालयाच्या वतीने गीता जयंती, टिळक पुण्यतिथी, ज्ञानेश्वर जयंती वगैरे साजऱ्या केल्या जातात. योग–प्रयोग, पोवाडे, कलापथक ह्याद्वारे मनोरंजनाबरोबर ज्ञानप्रसाराचे कार्य वाचनालय करते. कै. भालचंद्रपंत सहस्त्रबुद्धे यांनी वाचनालयातील पुस्तकांच्या याद्या, वर्गीकरण, कामकाजाचे नियम, पुस्तकांची नियमीत तपासणी, जमाखर्च व्यवस्था इ. एक चांगला पायंडा घालून दिला. वाचनालयाच्या मुख्य हॉलमध्ये रोजच्या मोफत वाचनासाठी वर्तमानपत्रे, मासिके ठेवण्यात येतात. दुसऱ्या भागात वर्गणीदारांना पुस्तके देण्याघेण्याचे काम चालू असते. महिला व बालविभाग स्वतंत्र आहे. लहान मुलांना वाचनाची आवड लागावी या दृष्टिने उपयुक्त असा चित्रात्मक, मनोरंजनात्मक, शैक्षणिक पुस्तकांचा संग्रह केला जातो.

वाचनालयाच्या मोकळ्या जागेत दुकाने बांधून ती भाड्याने दिली आहेत. या भाड्यातून बऱ्यापैकी उत्पन्न मिळते. १९६० मध्ये ग्रंथालयाला 'ब' दर्जा मिळाला. इमारतीचे क्षेत्रफळ ७५० चौ. फुट आहे. वाचनालयाची सभासद संख्या २५० आहे. वाचनालयाची ग्रंथसंख्या २०,८९० आहे. ग्रंथालयात विविध प्रकारची ४३ नियतकालीके येतात. शासकीय अनुदान म्हणून ७०,००० रूपये मिळतात. ग्रंथालयाचा कर्मचारी वर्ग २ असून त्यापैकी १ प्रशिक्षीत व १ अप्रशिक्षीत असा आहे.

**अमरावती नगर वाचनालय, अमरावती : (१८६७)**

अमरावती नगर वाचनालयाची स्थापना १८६७ मध्ये झाली. भुसारी रोडवर एका घरात या ग्रंथालयाची सुरूवात झाली. त्यावेळी कोणत्याही चळवळीची सुरवात ग्रंथालयातून होत असे. विविध विषयावर सभा वाचनालययात होत असत. त्यावेळी नगरात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस संस्थेचा सेवकवर्ग सभासद बनवत असे. अनेक उत्साही सभासद व सेवकवर्ग यांना वाचनालयाची स्वतंत्र इमारत असावी असे वाटू लागले. संस्था चालकांनी जागा मिळवण्यासाठी अथक परिश्रम घेतले. वर्गणी गोळा केली. म्यु. ऑफीस, टाऊन हॉल आणि ग्रंथालय एकाच इमारतीमध्ये असावे अशी सर्वांची इच्छा होती. त्यासाठी सरकारकडे मोठी जागा व २०,००० रूपयांची मागणी केली. पण सरकारच्या मागण्यांवर अवलंबून न रहाता इमारत बांधणीसाठी तजवीज केली.

सुरूवातीला वाचनालयाचे नाव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे होते. नंतर 'शहर वाचनालय' हे नाव प्रचारात आले. १९३६ मध्ये नवीन प्रशस्त, भव्य इमारतीच्या उद्‌घाटन प्रसंगी व्यवस्थापक मंडळाने वाचनालयाचे नामांकरण 'अमरावती नगर वाचनालय' असे केले.

वाचनालय अधिकाधीक लोकाभिमुख व्हावे व उपयुक्त व्हावे या हेतूने १९४० मध्ये नविन घटना तयार करण्यात आली. वाचनालयाची उपयुक्तता वाढून व्यासंगी लोकांची सोय होण्यासाठी १९४० मध्ये संदर्भ ग्रंथांसाठी वेगळा संदर्भ विभाग सुरू करण्यात आला. संदर्भ विभागात वाचकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली. १९५६ पासून पदव्युत्तर परिक्षेसाठी उपयुक्त संदर्भ पुस्तकांची भर वाचनालयात करण्यात आली. पुस्तकांची विषयवार सूची करून पुस्तकांचे शास्त्रीय वर्गीकरण करण्यात आले. १९४२ पासून मोफत वर्तमानपत्रे वाचावयास वाचकांना दिली जाऊ लागली. मुलांना वाचनाची गोडी लागावी व मुलांचे व्यवहारीक ज्ञान वाढण्यासाठी बालविभाग सुरू केला गेला.

स्थायी उत्पन्न वाढविण्यासाठी वाचनालयाच्या मोकळ्या जागेत दुकाने बांधून ती भाड्याने देण्यात आली. वाचकवर्गाची बैठक व्यवस्था व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमासाठी, व मोठ्या सभांसाठी जागेची कमतरता लक्षात घेऊन संस्थेकडील मोकळ्या जागेत सभागृह बांधण्यात आले.

वाचनालयाला १४० वर्षे पूर्ण झाली असून वाचनालयाच्या माध्यमातून रोजगार उत्पन्न करण्याच्या उद्देशाने वाटचाल सुरु आहे. वाचनालयात भव्य सांस्कृतिक हॉल, बँक व १०–१२ दुकाने नगर वाचनालयाच्या मालकीची आहेत. दिवसेंदिवस वाढणारी सभासद संख्या, ग्रंथसंख्या यामुळे या सर्वांची नोंदवही ठेवणे कठीण झाले आहे. त्यामूळे संगणकाचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे पुस्तकांची देवघेव करणे, पुस्तक शोधणे, ग्रंथ पडताळी करणे यासारखी अनेक कामे सोपी झाली आहेत.

अमरावती नगर वाचनालय हे महाराष्ट्रातील पहिले संगणीकीकृत वाचनालय आहे. ग्रंथालयात व्याख्यानमाला, ग्रंथप्रदर्शन, चर्चासत्र, गणराज्य दिन, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, कथाकथन, स्पर्धा परिक्षा यासारखे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

१९६७ मध्ये ज्यावेळी ग्रंथालय कायदा पास झाला त्यावेळीच ग्रंथालयाला जिल्हा 'अ' वर्गाचा दर्जा म्हणून मान्यता देण्यात आली.

वाचनालयात विविध प्रकारच्या सीडी, ऑडीओ टेप, संगणक, व्हॅक्युम क्लिनर इ. उपकरणे आहेत. प्रतिलीपी सेवा, संदर्भ सेवा, माहितीसेवा, कात्रण सेवा अशा अनेक प्रकारच्या सेवा वाचनालयामार्फत देण्यात येतात. वाचनालयाच्या इमारतीचे क्षेत्रफळ ४११.९८ चौ. फूट असून वाचनालयतील सभासद संख्या २५०० पेक्षा जास्त आहे. वाचनालयाची ग्रंथसंख्या ६० हजारापेक्षा जास्त आहे. ग्रंथालयात २५० हून अधिक नियतकालीके येतात. ग्रंथालयाला रु. २,५०,००० पेक्षा अधिक अनुदान मिळते. ग्रंथालयात एकूण ६ कर्मचारी असून त्यापैकी ३ प्रशिक्षीत व ३ अप्रशिक्षीत कर्मचारी आहेत.

अद्ययावत अभ्यासिका करणे, इमारतीचे विस्तारीकरण करणे, ग्रंथसंग्रह वाढविणे अशा ग्रंथालयाच्या संकल्पित योजना आहेत.

**नवयुग वाचनालय, अकोट : (१८७४)**

वाचनालयाचे सुरूवातीचे नाव 'कोर्नेशन वाचनालय' असे होते. १९५० पासून त्याचे नाव 'नवयुग वाचनालय' असे ठेवण्यात आले. वाचनालयाची स्वत:ची इमारत असून कार्यक्रमासाठी स्वतंत्र हॉल आहे. जे वाचक ग्रंथालयात येतात त्यांना 'वाचक सुसंवाद मेळावा' आयोजित करून ग्रंथालयाने सन्मानित केले. जेणेकरून त्यांना वाचनाबद्दल व वाचनालयाबद्दल आवड निर्माण होईल. ग्रंथालय गावाच्या विकासाचे केंद्र व्हावे म्हणून तालुका ग्रंथालय मेळावा घेण्यात येतो. **हे वाचनालय कोण्या व्यक्तीचा मृत्यू झाला त्या व्यक्तीला कोणी नातेवाईक नसतील अशा व्यक्तींच्या अंतिम संस्काराचा खर्च वाचनालय करते.** १९६८ मध्ये वाचनालयास शासन मान्यता मिळाली. त्यावेळी वाचनालयाचा 'ड' वर्ग दर्जा होता मात्र २००० मध्ये वाचनालयाला तालुका 'क' दर्जा मिळाला आहे.

वाचनालयातर्फे जिल्हा ग्रंथालय मेळावा, वाचक सुसंवाद मेळावा, व्याख्यानमाला, नाटक, ग्रंथमेळावा, वादविवाद, आंबेडकर जंयती, डॉ. हेडगेवार जयंती असे विविध उपक्रम राबविले जातात. वाचनालयाचे क्षेत्रफळ २८० चौ.फूट आहे. वाचनालयाला १०० वर्षे पूर्ण होऊन सुद्धा कोणताच विभाग स्वतंत्र नाही.

**नगर वाचनालय, दारव्हा : (१८८५)**

डेप्युटी कलेक्टर इलियाट यांच्या नावाने हे ग्रंथालय 'इलियाट ग्रंथालय' म्हणून ओळखले जाते. सध्या असलेल्या इमारतीमध्ये १९०२ साली या ग्रंथालयाचे स्थलांतर करण्यात आले. इलियाट यांनी वाचनालयासाठी बराच पैसा उपलब्ध करून दिला. १९७८ मध्ये सहकारी संस्थेने वाचनालय ताब्यात घेतल्याने आधीची माहिती उपलब्ध नाही, पण सर्वश्री शिवाजीराव मोघे यांनी वाचनालयाची पुर्नःस्थापना केली.आज ग्रंथालयाची स्वतःची इमारत असून १७ दुकाने भाड्याने दिलेली आहेत. या भाड्यातून येणाऱ्या पैशामुळे वाचनालयाचा बरासचा खर्च सुटतो.

ग्रंथालयात साप्ताहिके, दैनिके याचबरोबर वाचनालयाची ग्रंथसंपदाही आकर्षक मौलीक आहे. समग्र लोकमान्य टिळक संपूर्ण खंड१–७, सयाजीराव गायकवाड खंड १–३, महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय, डॉ. आंबेडकरावरील नविन पुस्तके वाचनालयात आहेत. रामायण, महाभारत यासारखे मोठे टाईप असलेले ग्रंथ वृद्धांसाठी घेण्यात आलेले आहेत. शेतकरी लोकांना शेतीचे अद्ययावत ज्ञान मिळावे म्हणून वाचनालयात शेतकरी विभाग सुरू करून कृषीवरील विविध पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. गावातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यासाला लागणारा पुस्तकांचा संच वर्षाभराकरिता मोफत दिला जातो. वाचनालयात टिळक पुण्यतिथी, चित्रकला, प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. सन २०००–०१ मध्ये श्री. माणिकराव ठाकरे कृषि वाचनालय सुरू करण्यात आले आहे. या वाचनालयात फक्त शेतीविषयक साहित्य उपलब्ध रहाणार आहे. १९६९ मध्ये वाचनालयास मान्यता मिळाली. त्यावेळी वाचनालय 'क' वर्गात होते. १९७८ मध्ये वाचनालयास 'ब' वर्ग प्राप्त झाला. ग्रंथ व नियतकालीकांची खरेदी तसेच परिगणन प्रत्यक्ष केले जाते. वाचनालयात तालीका व देवघेवीसाठी रजिस्टर पद्धत वापरली जाते. ग्रंथप्रदर्शन, व्याख्यानमाला, कवीसंमेलन, चर्चासत्रे, वादविवाद, चित्रकला, प्रशिक्षण वर्ग, असे विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात.

वाचनालयाचे क्षेत्रफळ १००० चौ.फूट आहे. वर्गणीदारांची संख्या २८९ आहे. वाचनालयातील ग्रंथसंख्या २३४०७ आहे. तर नियतकालीकांची संख्या ४५ आहे.

वाचनालयाला ९६,००० रूपये शासकिय अनुदान मिळते. ग्रंथालयात कर्मचरी वर्ग २ असून त्यामध्ये १ ग्रंथपाल व १ शिपाई असा आहे.

**दस्तुरजी रतनजी वाचनालय, खामगांव : (१८८९)**

दस्तुरजी रतनजी वाचनालय हे बुलढाणा जिल्ह्यातील एक अग्रगण्य वाचनालय म्हणून गणले जाते. १८२० मध्ये खामगांव या नावाला मुळीच महत्त्व नव्हते. ५० वर्षानंतर म्हणजे १८७० मध्ये खामगांवाचा कायापलट झाला. इंग्रजांनी खामगांवाला जिनींग कारखाने उघडले. इंग्रजांची वाचनाची भूक शमवण्यासाठी श्री. दस्तुर रतनजी या पारशी गृहस्थांने आपल्या घरी वाचनालय सुरू केले. पुढे त्यांच्या मुलाने वडिलांचे चिरंतन स्मारक खामगांवाला असावे म्हणून १८८९ मध्ये 'दस्तूरजी रतनजी वाचनालयाची स्थापना केली. १९१२ साली त्यांना ग्रंथालयासाठी शासनाकडून जागा मिळाली. नविन इमारत झाल्यावर वाचनालय लोकाभिमुख होऊ लागले. जनसामान्यांचा ओघ वाचनालयाकडे वळला. १९१३ पासून वाचनालयाने मोफत वाचनविभाग सुरू केला. १९१३ ते १९३८ हा कालावधी अतिशय संथ होता. वाचनालयास शासनाचे कोणतेही अनुदान प्राप्त झाले नाही. १९४८ मध्ये वाचनालयास नगरपालीकेचे भरीव अनुदान मिळाले. वाचनालयाच्या वाढीस सुरूवात झाली . वाचनालयाचा व्याप वाढला. वाढत्या व्यापामूळे जागेची अडचण वाटू लागली. पूर्वीची इमारत एक मजली व पत्रे टाकलेली होती. व्यवस्थापन मंडळाने दूसरा मजला उभारण्याचा निर्णय घेतला. इमारतीवरील टीन पत्रे काढून त्यावर हॉल बांधण्यात आला. इमारतीचे बांधकाम होईपर्यंत नगरपालीकेच्या व्यायामशाळेत वाचनालयाचे स्थानांतर करण्यात आले. १९५५ मध्ये वाचनालय नवीन इमारतीमध्ये आले. त्यावेळी फिरत्या वाचनालयाचा प्रायोगिक आरंभ केला परंतू हा प्रयोग एका वर्षापुरताच मर्यादीत राहीला. अनेक जेष्ठ मंडळींनी विविध कार्यक्रम घेऊन ग्रंथालयास आर्थिक मदत केली.

नवीन इमारतीचे बांधकाम झाल्यावर तरूण कार्यकारणीने बालविभाग उघडला. या विभागाला ५२ वर्षे पूर्ण होत आहेत. १९६० मध्ये ग्रंथालयाला नविन अनुदान मान्य झाले. नविन सभासद व शासनाची प्रेरणा मिळत असतानाच वाचनालयाने २६ नोव्हेंबर १९६६ मध्ये प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली अमृतमहोत्सव साजरा केला. यावेळी

डॉ. वि. भि. कोलते यांनी अमृत महोत्सवी ग्रंथाचे प्रकाशन केले. पुढे महिला विभाग, संदर्भ विभाग, वाचनकक्ष, वृत्तपत्र विभाग सुरू करण्यात आले. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवण्यात येते; २० पेक्षा अधिक ग्रंथालये याचा लाभ घेतात. वाचनालयाला ११८ वर्षे पूर्ण झाली आहेत. वाङ्मयीन क्षेत्राचे आणि ज्ञानदानाचे प्रमुख केंद्र वाचनालय व्हावे अशी वाचनालयाची अपेक्षा आकांक्षा आहे. त्यासाठी वाचनालय पुढील योजना राबवत आहे.

१. विद्वानांच्या व्याख्यानमाला.
२. दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध करून देणे.
३. हस्तलिखीत पोथ्यांचा संग्रहण करणे.
४. अभ्यासिका अद्ययावत करणे.

आज ग्रंथालयाची ग्रंथसंख्या ४०,६९७ आहे. वाचनालयाचे क्षेत्रफळ २५०० चौ. फुट आहे. वाचनालयात ग्रंथखरेदी करताना वाचकांच्या मागण्याचा विचार केला जातो. वाचनालयाची सभासद संख्या ६५० पेक्षा अधिक आहे. वाचनालयात विविध प्रकारची १२६ नियतकालीके येतात. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते जवळ जवळ २० ग्रंथालये या योजनेचा लाभ घेतात. वाचनालयाला १,२८,००० रूपये अनूदान मिळते. वाचनालयात १ ग्रंथपाल, १ सहाय्यक ग्रंथपाल, १ लिपीक, १ शिपाई असा कर्मचारी वर्ग आहे.

**सार्वजनिक वाचनालय, मेहकर : (१८९०)**

१८९० मध्ये मेहकर येथील एस. डी. ओ. विभागाचे अधिकारी कै. सुब्बाराव नायडू यांनी मेहकरमधील नागरीकांच्या मदतीने 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने वाचनालय सुरू केले. वाचनालय गावाच्या बाहेर असल्याने गावातील लोकांनी वाचनालयाची इमारत भाड्याने दिली होती आणि मेहकर वासियांसाठी श्री. बाबासाहेबांच्या देवळात काही दिवस हे वाचनालय चालू ठेवले होते.

३१ मार्च २००० पासून कार्यकारणीमध्ये नवीन सदस्य आले. त्यामुळे वाचनालयाची प्रगती होत आहे. इमारत लहान असल्याने इतर विभाग पाडण्यात आलेले नाहीत. वाचकांना दिवाळी अंक वाचनासाठी रूपये ३० वर्गणी भरावी लागते. ग्रंथांची खरेदी करताना वाचकांच्या मागण्या लक्षात घेतल्या जातात. १९७१ पासून वाचनालय 'क' वर्ग दर्जामध्ये होते.

२००० मध्ये वाचनालयाला 'ब' वर्ग दर्जा मिळाला आहे. वाचनालयाच्या इमारतीचे क्षेत्रफळ ३१६ चौ. फुट आहे. वाचनालयाची सभासदसंख्या १४० आहे. वाचनालयात १३,६७९ पुस्तके असून ४५ विविध प्रकारची नियतकालीके येतात. वाचनालयाला सरकारकडून १५,००० पेक्षा अधिक शासकिय अनुदान मिळते. वाचनालयात दोन कर्मचारी आहेत.

**श्री सार्वजनिक वाचनालय, मलकापूर : (१८९२)**

पारशी गृहस्थ कुमार रूस्तुमजी यांनी श्री. सार्वजनिक वाचनालयाचा पाया घातला. त्यावेळी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी ब्रिटीश डेप्युप्टी कमिशनर एच. सी. ए. फेजेवानरस्की आणि इंग्रज मि. इ. एम. मार्शल होते. १८११ मध्ये वास्तुचे काम सुरू झाले. परंतु काही कारणात्सव ते काम अर्धवट राहिले. तेव्हा टी. जी. परांजपे यांनी पुढाकार घेवून काम पूर्ण केले. त्यांनी वाचनालयासाठी जागा देणगी म्हणून दिली. पूर्वी बुद्धीवान, अधिकारी वर्गच वाचनालयाचा उपयोग घेत असे. सामान्य माणसाना हा अधिकार नव्हता. १८३८ पासून मलकापूर शहराव्या विकासास सुरूवात झाली. याच दरम्यान वाचनालयाच्या मैदानामध्ये आर्य समाजाचे संमेलन झाले. तेव्हा वाचनालयातील नेटीव्ह या शब्दाला विरोध झाला. नेटीव्ह हा शब्द काढून वाचनालयाचे नाव श्री सार्वजनिक वाचनालय करण्यात आले. वाचनालयाच्या पटांगणात दुसरी इमारत होती. त्या इमारतीचा उपयोग व्यायामशाळा म्हणून केला जात असे.

१९३७ मध्ये वाचनालयाच्या इमारतीची डागडूजी करण्यात आली. आज वाचनालयाला ११७ वर्षांनंतर सुद्धा वाचनालयाची इमारत मलाकपूर शहराची प्रतिष्ठा वाढवित डौलाने उभी आहे. **स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी या इमारतीमध्ये इंग्रजाविरूद्ध स्वातंत्र्यसैनिक गुप्त योजना आखत असत. १९३७ मध्ये याच वाचनालयाच्या मैदानात क्रांतीकारी नेता सुभाषचंद्र बोस यांनी 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दुंगा'** हा संदेश जनतेला दिला होता.

राष्ट्रपिता महात्मा गांधी, वि. दा. सावरकर, जयप्रकाश नारायण, क्रंातीवीर नाना पाटील, प्र. के. अत्रे, लोकमान्य टिळक इ. महात्मांनी वाचनालयास भेट दिली. मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, मध्यप्रदेशचे त्यावेळचे मुख्यमंत्री शुक्ला,शरद पवार, वसंतदादा

पाटील, मधुकरराव चौधरी,वसंत साठे, जवाहरलालजी दर्डा इ. नेत्यांनी वाचनालयास भेट देऊन वाचनालयाची प्रशंसा केली.

१९७० वाचनालयास 'ब' दर्जा मिळाला. वादविवाद, कविसंमेलन, व्याख्यानमाला हे कार्यक्रम आयोजित करुन वाचकांची वाचन आवड वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात. ग्रंथालयातील ग्रंथ पडताळणी तीन वर्षांनी एकदा केली जाते.

ग्रंथालयाच्या इमारतीचे क्षेत्रफळ ११०० चौ. फुट असून त्यामध्ये वाचनकक्ष, बालविभाग, महिला विभाग, कार्यालय असे विभाग आहेत. वाचनालयाची सभासद संख्या २५० आहे. वाचनालयाची ग्रंथसंपदा १०,००० च्या वर असून विविध प्रकारची १०० नियतकालीके वाचनालयात येतात. वाचनालयास ३८,६३१ रूपये शासकिय अनुदान मिळते.

**नगर वाचनालय, वणी : (१८९४)**

यवतमाळ जिल्ह्यातील वणी हे एक तालुका स्थान आहे. पूर्वी वणी जिल्हा होता. या गावाचा परिसर पूर्ण जंगलाने वेढलेला होता. म्हणून या शहराला वणी हे नाव पडले. त्याकाळात इलिअेट हे जिल्हाधिकारी होते. त्यावेळी त्यांनी वाचनालय व टाऊनहॉल करीता एक भव्य इमारत बांधून दिली. ही इमारत पुढे 'अे इलियाट लायब्ररी' म्हणून ओळखली जात होती. १९३३ मध्ये ही इमारत शासनाने वाचनालयाला कायम दिली.

१९४९ मध्ये वाचनालयाला 'नगर वाचनालय' असे नाव देण्यात आले. याच काळात वाचनालयाची प्रथम घटना तयार करून वणीतील जेष्ठ नागरिकांनी मिळून प्रथम कार्यकारणी केली व संस्था नोंदणीबद्ध केली. विना अनुदानीत तत्त्वावर वाचनालय सुरू ठेवले. मध्यंतरीच्या काळात वाचनालय बंद पडले होते. १९७८ मध्ये वणी येथील साहित्यीक राम शेवाळकर यांनी पुढाकार घेऊन शीरातील सामाजिक कार्यकर्त्यांची सभा घेतली आणि वाचनालय उर्जितावस्थेत आणण्याचा प्रयत्न केला. वाचनालयाची नवी वाटचाल सुरू केली, त्योवळी वाचनालयात १००० पूस्तके होती. १९८० पासून वाचनालयाला शासकीय अनूदान सुरू झाले आणि वाचनालयाला २००१ मध्ये वाचनालयाला तालुका 'ब' वर्ग म्हणून दर्जा मिळाला. वाचनालयात बालविभाग सुरू करून त्याला 'लोकनायक बापूजी अणे' यांचे नाव देण्यात आले आणि महिला विभागाला 'अहिल्यादेवी महिला वाचनकक्ष'

म्हणून नाव देण्यात आले. वाचनालयाची आर्थिक स्थिती नाजूक असल्याने वाचनालयाने मोकळ्या जागेत गाळे बांधून ते भाड्याने देण्याचे ठरविले. वाचनालयाच्या या बांधकामासाठी शासनाकडून योगदान मिळावे म्हणून कार्यकारणी प्रयत्न करीत आहे. वाचनालयाला 'अ' वर्ग मिळावा म्हणून वाचनालय प्रयत्नशील आहे.

वणी तालुक्यातील नायगांव, पुनवट, शिप्पू, अडगाव या गावातील बंद पडलेली ग्रंथालये पुन्हा सुरू करण्यासाठी हे वाचनालय प्रयत्नशील आहे. ही त्याची संकल्पित योजना आहे. वाचनालयात ग्रंथखरेदी करताना वाचकांच्या मागणीचा विचार केला जातो. देवघेवीसाठी रजिस्टर पद्धत वापरली जाते. दोन वर्षाने एकदा ग्रंथपडताळणी केली जाते. वाचनालयात विविध पुण्यतिथी, जयंत्या, पत्रकार दिन, हस्तकला प्रदर्शन असे कार्यक्रम केले जातात.

वाचनालयाचे कार्यालयीन क्षेत्रफळ १३०० चौ. फूट आहे. वाचनालयाची सभासद संख्या ४३२ आहे. वाचनालयाची ग्रंथसंपदा १५,००० पेक्षा अधिक आहेत. तसेच ३२ नियतकालीके वाचनालयात येतात. वाचनालयाला रु. ५०,००० पर्यंत शासकीय अनुदान मिळते. वाचनालयातील सेवकवर्ग ३ असून त्यामध्ये १ ग्रंथपाल, १ लिपीक व १ शिपाई आहे.

**राजे वाकाटक सार्वजनिक वाचनालय, वाशीम : (१८९९)**

वाशीमच्या सांस्कृतिक उत्कर्षात येथील राजे वाकाटक सार्वजनिक वाचनालयाचे अपूर्व योगदान आहे.

या वाचनालयाने १९९९ साली आपला शतकोत्सव साजरा केला. १८९९ साली ब्रिटीश शासकांनी वाशीम येथे स्थानिक न.प. सभागृहात 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने वाचनालयाची सुरूवात केली. या वाचनालयाचा कारभार पाहण्याची सर्व जबाबदारी नगर प्रशासनाकडे सोपवण्यात आली होती. त्यामुळे वाचनालयाचे स्वतंत्र असे अध्यक्ष नव्हते. त्यानंतर शहरातील दंडे चौकात वाचनालय हलविण्यात आले. नंतर वाचनालयाची स्वतंत्र कार्यकारणी स्थापन करण्यता आली. तेव्हासुद्धा नगरपालीकेद्वारे वाचनालयाला अनुदान दिले जात होते. नंतर वाचनालयाचा विस्तार व प्रगती पाहून वाचनालयाची स्वतंत्र

इमारत असावी असे वाटू लागले. त्यावेळी कै. भाऊसाहेब साने यांनी राजे उदयरामजी यांची मोडकळीस आलेली जागा विकत घेऊन अर्धी जागा वाचनालयास विकत दिली. पुढे कार्यकारणीने जनतेचे सहकार्य घेऊन इमारत बांधली व १९३१ साली विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर वाचनालयाचे उद्घाटन केले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात महागाई वाढल्याने नगरपालीकेद्वारे मिळणारे अनुदान कमी पडू लागले. त्यामुळे वाचनालयाला काही वाईट दिवसांना सामोरे जावे लागले. याचवेळी १९४८ मध्ये वाशीमच्या एका राजकीय व्यक्तीने संस्था आपल्या ताब्यात रहावी या हेतूने १०० सदस्यांची वर्गणी स्वत: भरून मतदान  केले व निवडणूक जिंकून अध्यक्ष पदावर रूढ झाले. याच काळात वाचनालयातील ग्रंथसंपदेचे खूप मोठे नुकसान झाले. अनेक अमूल्य ग्रंथ, संदर्भ ग्रंथ गहाळ झाले. वाचनालयाचा उपयोग शाळा भरविण्यासाठी करण्यात येऊ लागला. लोकांमध्ये अरूची निर्माण झाली. वाचनालयाचे अस्तित्व नाहिसे होण्यासारखी स्थिती निर्माण झाली. या बिकट परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रारंभ केला. १९५३ मध्ये सभा घेऊन नविन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. या कार्यकारणीला वाचनालय पुन्हा उभे करण्यात यश आले. वाचनालयाच्या ग्रंथसंपदेत मोलाची भर पडली.  याचे सर्व श्रेय कै. वासूदेव देशपांडे व समाजसेवी विधिज्ञ मंडळ यांना जाते. १९६१ च्या विदर्भ साहित्य संमेलनाचे  अध्यक्ष बाळशास्त्री हरदास यांनी वाचनालयाचे नामकरण करण्याची प्ररेणा दिली. भव्य नामकरण सोहळा पार पडला. 'राजे वाकाटक सार्वजनिक वाचनालय' असे नामकरण करण्यता आले. १९६७ मध्ये वाचनालयास शासन मान्यता मिळाली व शासनातर्फे अनुदान सुरू झाले. १९६७ मध्ये वाचनालयास 'क' दर्जा, १९७५ मध्ये तालूका 'ब' दर्जा व २००० मध्ये जिल्हा 'अ' दर्जा ग्रंथालयास मिळाला. १९७५ मध्ये अमृतमहोत्स साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान ग. त्र्यं. माडखोलकर यांनी भूषविले होते. वाचनालयास बाबासाहेब पुरंदरे, ग. वा. कविश्वर, श्री. भा. वर्णेकर अशा नामवंतांनी भेटी दिल्या आहेत.

आज ग्रंथालयाची ग्रंथसंपदा ३५,०९८ आहे. वाचनालयात विविध प्रकारची ८६ नियतकालीके येतात. वाचनालयाची सभासद संख्या ५४५ आहे. वाचनालयाचे कार्यालयीन

जागेचे क्षेत्रफळ १५०० चौ. फूट पेक्षा अधिक आहे. वाचनालयामार्फत साखळी योजना राबवली जाते. त्यामध्ये १५ ग्रंथालयांचा समावेश आहे. ग्रंथालयाला १,८९,९०८ रूपये अनूदान मिळते. ग्रंथालयाचा कर्मचारी वर्ग ४ असून त्यापैकी ३ प्रशिक्षीत व १ अप्रशिक्षीत आहेत.

ग्रंथखरेदी करताना वाचकांच्या मागण्यांचा विचार केला जातो. वाचनालयात पर्यटन विषयक ग्रंथसंपदेला अधिक महत्त्व दिले जाते. ग्रंथालयात देवघेव विभाग, बालविभाग, महिला विभाग असे विविध विभाग आहेत.

**बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला :**

अकोलामध्ये सर्वप्रथम ग्रंथालय स्थापन करण्याचे श्रेय श्री. विष्णुपंत पिसोळकर यांना जाते. त्यांनी अकोला येथे १८६० साली ग्रंथालय स्थापन केले. तेव्हा त्या ग्रंथालयाचे नाव होते ‘अकोला नेटीव्ह जनरल लायब्ररी सन१८६७ मध्ये अकोल्याचे तेव्हाचे अतिरिक्त असिस्टंट कमिशनर श्री. बैमनजी जामसाबजी दस्तुर यांनी ग्रंथालयाच्या कामात विशेष लक्ष दिले. त्यांच्याच प्रयत्नामुळे वाचनालयालासेठ श्री. गंगाधर जोरावरमल साहु यांच्या एका घरात जागा मिळाली व तेथे ग्रंथालय चालू झाले. परंतु १८७० मध्ये पुरात हे घर पडले. म्हणतात ना ‘विंचवाचे बिऱ्हाड त्याच्या पाठीवर’ त्याप्रमाणे पुढे हे वाचनालय भाड्याच्या घरात जशी जेथे जागा मिळेल तेथे वाचनालय! ही परिस्थिती १८८४ पर्यंत कायम होती. १८८० मध्ये उगवा येथील रहिवासी श्री. गोविंदराव लक्ष्मणराव देशमुख (बाबूजी देशमुख) यांचे रु. १०००/– चे दान स्वीकारुन वाचनालयाची पक्की इमारत बांधण्यासाठी नवीन वास्तू बांधण्याचा संकल्प विश्वस्तांनी केला. शिवाय तो काळ असा होता की त्यावेळी दानशुर व्यक्तींच्या दानाचा ओघ–धर्मशाळा, मंदीर, नदीचा घाट इकडे वळत असे. या दृष्टीने शैक्षणिक क्षेत्र तेव्हा उपेक्षित होते. विशेषत: एखाद्या वाचनालयास दान देण्याची कल्पना जवळ जवळ अशक्य होते. या पार्श्वभूमीवर वाचनालयास १०००/– रुपये ची देणगी मिळणे ही आश्चर्यजनक घटना होती.

त्याप्रमाणे २७ फेब्रुवारी १८८३ मध्ये तेव्हाचे डेप्युटी कमिशनर कर्नल फिटरजेल्ड यांच्या सुपुत्री कुमारी फिटरजेल्ड यांच्या हस्ते वाचनालयाच्या नवीन इमारतीचा शिलान्यास झाला.

ह्या वास्तुच्या बांधकामासाठी त्यावेळी २८६६ रुपये दहा आणे व पाच पै एवढा खर्च आला. ह्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन २८ एप्रिल १८८४ रोजी डेपुटी कमिशनर श्री. कर्नल फिटरजेल्ड यांच्या हस्ते झाले व वाचनालयाला स्वत:ची इमारत प्राप्त झाली. ही इमारत सध्या जेथे आज वाचनालयाच्या व्यापरी संकुलामध्ये चंद्रदिप एजेंसीचे दुकान आहे तेथे व त्याच्या पूर्वेकडील जागेत होतय. (पूर्वीच्या वतनदार प्रेस ची जागा). बाबुजी देशमुख वाचनालय येथे सन १९२४ पर्यंत होते.

काही वर्षानंतर अंदाजे १९२० च्या सुमारास वाचनालयाचा आवाका वाढल्याने इमारत अपूरी पडू लागली तेव्हा तत्कालीन कार्यकारीणी सदस्यानी भगीरथ प्रयत्न करुन श्री. लक्ष्मीनारायण संस्थान यांचे कडून कर्ज मिळविले व बाबूजी देशमुख वाचनालयाची दूसरी इमारत सन १९२४ मध्ये उभी राहिली.

वाचनालयासाठी १९२४ ते १९४० चा काळ आर्थिक संघर्षाचा होता. अशा कठीण समयी कार्यकारीणीचे सदस्य आणि त्यावेळेचे नव्या दमाचे तरुण नेते श्री. बजलालजी बियाणी यांनी प्रयत्नाची शिकस्त करुन कार्यकारीणीचे सदस्य श्री. सगूनचंदजी कापडिया यांचेकडून १९३७ साली ११०००/– ची रक्कम कर्जाच्या रुपाने वाचनालयास मिळवून दिली. त्यानंतर १९३८ साली कारंजा एज्युकेशन सोसायटीने देखील कर्ज देऊन सहकार्याचा हात पुढे केला. विकासाच्या या वाटेवर अडखळत ठेचाळत का होईना पण वाचनालयाने आपली वाट सुरुच ठेवली.

बाबुजी देशमुख वाचनालय नवीन वास्तुत गेल्यावर जुनी वास्तू श्री. कै. खेळकर यांना भाड्याने देण्यात आली. तेथे त्यांनी वतनदार प्रिंटींग प्रेस सुरु केली. ती प्रेस त्यांच्या निधनानंतर त्यांचे सुपुत्र कै. दादासाहेब खेळकर हे चालवित होते. नवीन व्यापारी संकुल बांधण्यासाठी दादासाहेब खेळकर यांनी त्यांच्या ताब्यातील भाड्याची जागा खाली करुन दिली.

**श्री. बाबुजी देशमुख यांनी मौजे मजलापुर (दापूरा) येथील १६ एकर ३२ गुंठे शेत जमीन ही वाचनालयाला देणगी म्हणून दिली. इ. स. १९०८ मध्ये यांचा परिपाक म्हणून वाचनालयाच्या तेव्हाच्या विश्वस्तांनी वाचनालयाचे अकोला नेटिव्ह जनरल लायब्ररी हे**

**नाव बदलून वाचनालयाला 'बाबूजी देशमुख वाचनालय' असे नामकरण करण्यात आले व वाचनालयाची नवीन घटना दिनांक ०३/१२/१९२९ ला मान्य करण्यात आली.**

वाचनालयाला उत्पन्न व्हावे म्हणून दांडेकर बापट कंपनीला वाचनालयाची खुली जागा थिएटरसाठी २७/०८/१९२५ ला भाड्याने दिली. त्यावेळेस थिएटरचे नाव हाते 'श्रीकृष्ण' थिएटर परंतु १९२७–२९ च्या जागतिक मंदीच्या काळात वरील थिएटर चालविणे दांडेकर बापट कंपनीला जड गेले व श्रीमती वत्सलाबाई उत्तमचंद अग्रवाल च्या नावाने फक्त जमीनीचा भाडेपट्टा करण्यात आला. पुढे यासंदर्भात कोर्ट कचेरी सुरु झाली.

वाचनालयाचा वाढता खर्च व कमी उत्पन्न यांचा मेळ बसविण्यासाठी वेळोवेळी विश्वस्तांनी अनेक प्रयत्न केलेत. त्यांच्या प्रयत्नाने वाचनालयाच्या मालकीच्या जागेचे भाडे वाढविण्यात यश आले. सन २३/०६/१९५९ पासून बाबुजी देशमुख वाचनालयाला रेंट कंट्रोल ॲक्ट पासून लागू न करण्याचा आदेश तेव्हाचे मुंबई सरकारचे सेक्रेटरी श्री. पींपुटकर यांनी काढला, त्यावेळचे चिटणीस कै. शरदचंद्र बरडे यांनाच याचे श्रेय जाते.

चूकीच्या करारामुळे थिएटरची केस हायकोर्टात वाचनालयाच्या विरुध्द गेली. परंतु वाचनालयाच्या तेव्हाच्या तरुण कार्यकर्त्यांनी (ट्रस्टीज) जिद्‌दीने केस सुप्रिम कोर्टात नेली व तेथे वाचनालयातर्फे निकाल लागला व भाडे रु. २५००/– झाले. सुप्रिम कोर्टातील निकालाप्रमाणे थिएटर खाली करुन मिळावे म्हणून तेव्हाचे ट्रस्टीजनी कोर्टात केस दाखल केली. बरेच दिवस कोर्टात केस चालल्यावर आपसात वाचनालयाच्या अटीवर समझोता झाला. त्यामध्ये थिएटरची संपूर्ण इमारत रुपेरी पडदा व थिएटर मधील, खुर्ची, पंखे, फिटींग इत्यादी साहित्य वाचनालयाच्या मालकीची झाली. वाचनालयाचा एकही पैसा खर्च न करता भाड्याचे उत्पन्न ही रु. २५००/– वार्षिक चे रु. ४२०००/– वार्षिक झाले. त्यासाठी त्यावेळेचे वाचनालयाचे अध्यक्ष कै. नानासाहेब सपकाळ, सेक्रेटरी स्व. ओ. प्र. मिश्र, उपाध्यक्ष कै. श्री. डॅडी देशमुख व श्री. पाडिया यांनी विशेष परिश्रम घेतले.

दिनांक ८/६/६६ रोजी अर्थसमिती मध्ये वाचनालयाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून एक प्रस्ताव पारित करून खुल्या जागेत व्यापारी संकूल बांधण्याचा प्रस्ताव पारित केला व तो मंजुरीसाठी कार्यकारीणी पुढे ठेवला कार्यकारिणीची मंजूरी घेऊन

व्यापारी संकुलाचा नकाशा तयार करणे तो मंजूर करुन घेणे, त्याचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा आदी काढणे यामध्येच पुष्कळ वेळ गेला. वाचनालयाजवळ व्यापारी संकुलाच्या उभारणीसाठी लागणारा पैसा नसल्यामुळे धर्मदाय आयुक्त यांच्याकडून दुकाने घेणाऱ्यांजवळून अनामत रक्कम घेण्यासाठी परवानगी मागितली व ती मिळवली. यासाठी श्री. पाडीया यांनी संकुल व वाचनालयाच्या नवीन वाढीव इमारतीचा नकाशा तयार केला. कोनशीला समारंभ तेव्हाचे कलेक्टर श्री. सुरेश जोशी यांच्या हस्ते व पुजा श्री. कै. नानासाहेब सपकाळ यांनी सपत्नीक केली. या इमारतीच्या बांधकामासाठी वाचनालयाजवळ असलेली जमा रक्कम संपल्यावर कर्ज न काढता व्यापाऱ्याजवळून बीन व्याजी अनामत रक्कम घेऊन ही तीन मजली इमारत पूर्ण केली. ह्या व्यापारी संकुलामुळे वाचनालयाच्या भाड्याचे चांगले उत्पन्न मिळाले. वाचनालयाची आर्थिक स्थिती सुधारली. या व्यापारी संकुलाच्या बांधणीचे श्रेय कै. औ. प्र. मिश्र व श्री जुगलकिशोर पाडिया यांनाच आहे. त्यांनी कार्यकारीणीच्या सहकार्याने ही योजना पार पाडली.

ग्रंथालय संचालक श्री. का. शेजुळ यांच्या हस्ते बाबुजी देशमुख वाचनालयाच्या नवनिर्मित वाचन कक्षाचे उद्‌घाटन दिनांक २५ मार्च १९९८ ला करण्यात आले. त्यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात म्हटले की 'वास्तु उद्‌घाटन हे शासकीय अधिकाऱ्याकडून कधीच होत नसते. त्यासाठी राजकीय नेत्यांशी जवळीक साधली जाते. त्यामुळे मला या ठिकाणी आमंत्रित करण्यात आले हा माझ्या कार्यशक्तीचा सन्मान समजतो. ह्यावेळी वचनालयाचे इंजीनीअर श्री. सायमन आणि श्री. मनिष मिश्र व श्री. शेजुळ व श्री. साठे (सहाय्यक ग्रंथालय संचालक) यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार अर्पून सत्कार केला.

वाचनालयाला आर्थिक स्थैर्य लाभताच ग्रंथालय सेवकांना ३०/०९/२००० ला सरसकट मासिक रु. ५००/- पगारवाढ श्री. एम बी. मेश्राम, ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या हस्ते दिली.

वाचनालयाच्या अनेक कार्यकारीणी सभासदांनी विविध क्षेत्रात अनेक पदे विभूषित केलीत. कार्यकारीणी चे सदस्य कै. ब्रजलाल हे जुन्या मध्यप्रदेशाचे अर्थमंत्री होते तत्पूर्वी ते खासदार व नंतर महाराष्ट्राचे आमदार व पर्यटन मंत्री होते. बादे वाचनालयाचे माजी सचीव

कै. नानासाहेब वैराळे हे महाराष्ट्र राज्याचे बांधकाम व पर्यटन मंत्री होते.. वाचनालयाचे कार्यकारीणी सभासद कै. सुमनचंदजी तापडीया हे अकोला नगर परिषदेचे उपाध्यक्ष होते. वाचनालयाचे अध्यक्ष कै. नानासाहेब सपकाळ १९७८ मध्ये राज्य मंत्री होते. वाचनालयाचे माजी सचिव श्री. पन्नालालजी शर्मा हे भारतीय कम्यूनिस्ट पक्षाचे अकोला शहाराचे सचिव होते. वाचनालयाचे अर्थसमिती सचिव श्री. हसू ताले हे माध्यमिक शिक्षक संघाचे व अकोला जिल्हा ग्रंथालय संघाचे संस्थापक सभासद व तह्यात सदस्य, म. राज्य ग्रंथालय संघाचे कार्यकारीणी सभासद राज्य परिषदेचे सदस्य व अनेक सामाजिक संस्थांशी निगडीत होते ते माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हा सचिव होते. वाचनालयाचे कायदे समिती सदस्य व माजी कोषाध्यक्ष श्री. जुगलकिशोर पाडिया यांना डॉ. एस. आर. रंगानाथन् राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार – २००५ साली मुख्यमंत्री यांच्या हस्ते देण्यात आला. विदर्भातून हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळविणारे ते प्रथम ग्रंथालयीन कार्यकर्ते आहेत. ते महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सभासद व इतर सामाजिक व्यापारीक संस्थाशी निगडीत आहेत. त्याप्रमाणेच वाचनालयाचे अनेक आजी/माजी सभासदांनी आपआपल्या क्षेत्रात आपले स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. कार्यकारीणी सदस्य प्रा. मोहन खडसे यांना आदर्श शिक्षक म्हणून राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ही यादी बरीच लांब आहे. परंतु आपल्या आगळ्या वेगळ्या कतृत्वाने वाचनालयाचे माजी अध्यक्ष डॅडी यांनी जीवानात अनेक पदे भुषविली. त्यांनी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्यपद, अकोला नगरपरिषदेचे अध्यक्षपद, चित्रपटक्षेत्रात पदार्पण करुन पहिल्याच ‘देवकी नंदन गोपाला’ चित्रपटाला सुवर्णपदक मिळाले. ही त्यांनी केलेल्या असंख्य कार्यापैकी काही मोजकीच उदाहरणे. त्यांचे अकोलाच्या सांस्कृतिक सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात महत्वूपर्ण योगदान होते. ते शेवट पर्यंत शहराच्या व श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्य पार पाडण्याकरिता झटून राहिले होते. अकोल्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात त्यांनी आमदार बी. टी. देशमुखांकडून लाखो लक्षावधी रुपये आणले.

बाबुजी देशमुख वाचनालयाने आपली शताब्दी १२ एप्रिल १९७० मध्ये फार मोठ्या प्रमाणात साजरी केली. उद्घाटन मा. मधूसूदनजी वैराळे, बांधकाम व पर्यटन मंत्री, महाराष्ट्र

राज्य यांच्या हस्ते व समारोहाच्या अध्यक्ष स्थानी मा. नानासाहेब सपकाळ हे होते. समारोहाला अनेक गणमान्य व्यक्तींनी शुभेच्छा दिल्या. भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती अनेक राज्याचे राज्यपाल व इतर राज्याचे मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे अनेक मंत्री यामध्ये समाविष्ट होते.

यावेळी विदर्भ विभागीय ग्रंथालय परिषदेचे प्रथम अधिवेशन अकोला येथे घेण्यात आले. याचे उद्‌घाटन श्री मा. मधुसुदनजी वैराळे यांनी केले. यावेळेस ग्रंथालय परिषदेचे मा. सुंदरलालजी जैन, माननिया श्री. ग. प्र. प्रधान, डॉ. दे. श. सरनाईक, श्री. कै. ओं प्र. मिश्र, श्री. पाडिया, तेव्हाचे ग्रंथालय संचालक श्री कै. पुराणिक व संपूर्ण विदर्भातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाची सर्व कार्यकारीणी जरी जबाबदार असली तरी, विशेष करुन अध्यक्ष स्व. नानासाहेब सपकाळ, स्व. डॅडी देशमुख, स्व. ओं. प्र. मिश्र, स्व. किशोर मोरे, श्री. जुगलकिशोर पाडिया, प्रा. सुभाष पटनाईक यांनी विशेष मेहनत घेतली.

वाचनालयाच्या नवरात्र व्याख्यान मालेत महाराष्ट्र व बाहेरील अनेक मान्यवरांनी आपली हजेरी लावली आहे. त्यामध्ये आचार्य रजनिश, श्री. दत्ता बाळ, श्री. नरहर कुरुंदकर, आचार्य अत्रे, सेतु माधव पगडी, विद्याधर गोखले, राम शेवाळकर, वि. भि. कोलते, काका कालेलकर, ना. सि. फडके, तुकडोजी महाराज, पु. भा. भावे, वामन चोरघडे, द. मा. मिरासदार, चंद्रशेखर धर्माधिकारी अशा अनेक मान्यवरांचा समावेश आहे. आजमितीस वाचनालय अनेक सांस्कृतिक कार्यक्रम उत्कृष्ट पणे साजरे करते. वाचनायाच्या सर्वच कार्यकारीणी सभासदांच्या व कर्मचारी व वृदांच्या प्रयत्नामुळे वाचनालयाचे उत्पन्न अंदाजे ६ लाख झाले आहे.

वाचनालयाचे कार्यकारीणी अध्यक्ष श्री. महादेवराव भुईभार, तरुण कर्तृत्वान सेक्रेटरी श्री. अनुराभ ओं. मिश्र, जेष्ठ कार्यकारीणी सदस्य श्री. जुगलकिशोर पाडिया व कार्यकारीणीचे इतर सर्व सदस्य हे जोमाने कार्य करत आहेत.

त्याचप्रमाणे वाचनालयाचे जेष्ठ कर्मचारी व लेखापाल श्री. रामकृष्ण वि. लोहकपुरे, ग्रंथपाल श्री. गुलाबराव कदम व सर्व तरुण कर्मचारी हे वाचनालयात तत्परतेने, इनामदारीने वाचनालयाच्या सभासदांना व इतर वाचकांना उत्तम तत्पर सेवा देतात. दर्जेदार ग्रंथसंग्रह हे या वाचनालयाचे वैशिष्ट्ये होय.

**गांधी वाचनालय, चंद्रपूर :**

चंद्रपूर नगर परिषदेव्दारा संचलित शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आझाद बागेत महात्मा गांधी वाचनालयाची इमारत आहे. १९५२ साली अवघ्या ५० पुस्तकांची व सद्स्य संख्या ७५ पासून सुरु झालेल्या या वाचनालयात आज २५,२०० पुस्तके व २५० संदर्भ ग्रंथ आहेत. ८०० सभासदापैकी २० आजीव सभासद आहेत तर सुमारे १०० वाचक वृत्तपत्र वाचनाचा लाभ घेतात. या वाचनालयाला आता जिल्हा ‘अ’ श्रेणी वाचनालयाचा दर्जा प्राप्त झाला असून त्याप्रमाणात अनुदानही मिळते. या ग्रंथालयात बालवाचनालय कक्ष व महिला वाचन कक्ष, पुरुष वाचन कक्ष, पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अध्ययन कक्ष असून त्यात ललित कक्ष, कादंबऱ्या, प्रवासवर्णने, धार्मिक ग्रंथ, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके इत्यादी वाचन साहित्य उपलब्ध आहेत.

या ग्रंथालयातर्फे दरवर्षी वाचन स्पर्धा, वादविवाद स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठान कलकत्ता तर्फे दूरदर्शन संच, व्ही.सी. आर मिळाला असून दरवर्षी ५ शैक्षणिक फिती मिळतात. खेड्यातील छोट्या वाचनालयासाठी त्यांनी महिनाकाठी काही पुस्तके साखळी पध्दतीने पुरविण्यासाठी योजना कार्यान्वीत केली असून येथील सिव्हील लाईन मध्ये असलेल्या हुतात्मा स्मारकात आणखी एक उपशाखाही सुरु केली आहे. गजानन वानखेडे हे या ग्रंथालयाचे ग्रंथपाल आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील हे ग्रंथालय अघाडीवर असून या विभागातील वाचकांना या वाचनालयाचा भरपूर उपयोग होतो. ग्रंथालय चळवळीच्या दृष्टीने हे एक महत्वाचे पाऊल ठरले आहे.

**वर्धमान वाचनालय, चंद्रपूर :**

जैन सेवा समितीव्दारा संचलित वर्धमान वाचनालयाची सुरुवात १९७० साली झाली. १००० पुस्तके व ८० सभासदानीशी झाली असून शहरातील मध्यभागी असलेल्या या

वाचनालयात विविध भाषातील २०,००० पूस्तके आहेत. या वाचनालयाला तालुका अ श्रेणी प्राप्त झाली असून सदरहू वाचनलयातर्फे विविध कार्यक्रम राबविले जातात. आंतरमहाविद्यालयीन स्तरावर वादविवाद स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, पुस्तक प्रदर्शन इ. कार्यक्रम आयोजित केले जातात. एखाद्या व्यक्तीकडून २०० रु. अनामत रक्कम स्विकारुन त्यांच्या नावे इतरांचा वाढदिवस, लग्न समारंभानिमित्त शुभेच्छा, बर्थडे कार्नर, मॅरेज डे कार्नर सारखे उपक्रम राबविले जातात. याला जनतेकडून उत्तम प्रतिसादही मिळतो.

**अमरावती नगर वाचनालय (नेटिव्ह जनरल लायब्ररी) अमरावती नगर वाचनालयाची वाटचाल :**

अमरावती येथील नागरीकांकरिता चालवलेले हे वाचनालय भूषणास्पद आहे. नोव्हेंबर १८६७ साली स्थापन झालेल्या या संस्थेचे बालपण सक्करसाथ या भागातील भूसारी गेट रोड वर एका घराच्या दुसऱ्या मजल्यावर साकारले होते. सदर दुसरा मजला श्रीमंत सावकार सेठ पुरणमलजी बलगांव जहांगीर यांनी संस्थेस बक्षीस रुपाने दिला होता. त्यावेळी शहरातील सर्व सुशिक्षितांची वस्ती भाजीबाजारात असे सुशिक्षितही हाताच्या बोटावर मोजण्यासारखे असत गावातील सर्व शिक्षितांनी मोकळेपणी उठण्या बसणाऱ्याची करमणूक करण्याची एकच जागा म्हणजे सुशिक्षिताचे अग्रेसर श्री. श्रीराम भिकाजी जठार, श्री. बापूजी रंगनाथ उगडीकर, आत्माराम भिकाजी प्रभु, शिरु राजाराम पाठक, एकनाथ ओक व इतरांनी स्थापन केलेली ही लायब्ररी होय. या वाचनालयाचे पहिले चिटणीस आबासाहेब चिखलीकर हे होते. प्रथम अव्वल इंग्रज अमरावतीच्या काळात ग्रंथालय स्थापन झाली तेव्हा त्याच्या नावाचा उल्लेख नेटीव्ह जनरल लायब्ररी असा सापडतो. पुढे पूर्वी युरोपीयन पासून आपला निराळेपणा दाखविणारा नेटिव्ह शब्द हा अपमानास्पद वाटून लायब्ररी, पुस्तकालय वगैरे उल्लेख पुढे आढळतो. सिटी लायब्ररी असे नाव बरेच दिवस प्रचारात होते. ग्रंथालयास कठीण काळ १८९३ च्या सुमारास आला. त्यावेळी श्री. दाजीसाहेब हिरुळकर यांनी शहर लायब्ररी हे शब्द योजले. या लायब्ररीचा जुबीली प्रसंगी १८१८ साली बसविलेला संगमनेरी शिलेवर शहर लायब्ररी असे खोदण्यात आले व १९३४ पासून 'शहर वाचनालय' हा शब्द प्रयोग सुरु झाला. १९३६ ला वाढविलेल्या नविन प्रशस्त व भव्य इमारतीचा उद्‌घाटन प्रसंगी 'नगर' हा शब्द पुढे आला. नगर या शब्दामुळे व्यक्त होणाऱ्या नागरीकांच्या भावना

व नागरीकांनी हे मंदीर उभारले व ७७ वर्षे राबविले ही गोष्ट ध्यानी घेता 'अमरावती नगर वाचनालय' चे नाव व्यवस्थापक मंडळाने सुरु केले ते २३ फेब्रुवारी १९३६ रोजी.

ज्ञानदानाचे पवित्र कार्य अनेक मार्गानी सदर संस्था प्रथमपासून करीत आली आहे. प्रथम सर्व प्रकारची वर्तमानपत्रे व पुस्तके वाचण्याचे हे स्थान होते पण पहिल्या १० वर्षाच्या आतच संस्थेचा पसारा बहरु लागला. मासिक व्याख्यानमाला सुरु झाली श्रीमंत नामदार दादासाहेब खापर्डे यांचे नाव प्रथम दरमहा व्याख्यान मालेत वक्ता म्हणून योजले. १८७२ साली वऱ्हाड वक्तृत्वो जन्म सभा सुरु झाली. १९४४–४५ ला नाट्यप्रवेशासाठी चढाओढ ठेवण्याची कल्पना आली. १९५१–५२ मध्ये डॉ. भट स्मारक निबंध स्पर्धा आयोजित केली. यावर्षी पासून शालेय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्याचे दिसून येते. १९६१ मध्ये टिळक पुण्यतिथी व सत्कार सुरु करून विज्ञान विषयातील व्याख्याने भरविण्यात आली १९५२ ला स्थानिक विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने महाराष्ट्र व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. १९६६ मध्ये केशवसूत शताब्दी निमित्त भाऊ माडखरकर यांच्या हस्ते उद्‌घाटन होून श्री. भोंदू राजाभाऊ कु–हेकर यांनी केशवसुताची तुतारी या कवितेचे गायन केले.

१९४२ साली ग्रंथपरिसर योजनेचा उपक्रम राबविण्यात आला व सभागृह बांधण्याचा संकल्प १९६३ च्या कार्यकारीणीने व्यक्त केला.

१९१७ पर्यंत ग्रंथालयाचे एकूण उत्पन्न ८०० – ९०० रुपये असतानाही पुस्तकांकरिता फारच कमी रक्कम खर्च होते असे. १९२४ साली केवळ ५६१ रुपयांचे ग्रंथ खरेदी करण्यात आले होते.

या ग्रंथालयात लहान मुलांसाठी पुस्तकांचा बाल विभाग आहे. मुलांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे. वाचनालयाचा स्वतंत्र बाईडिंग कक्ष आहे. महत्वाची कागदपत्रे लॅमिनेशन करुन जतन केली जातात.

वाचनालयात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच साहित्य संमेलन, व्याख्यानमाला, आयोजित केली जाते. अशा कार्यक्रमाकरिता अल्प दरात सभागृह उपलब्ध करुन दिले जाते.

शासकीय अनुदान कमी पडते म्हणून हॉलचे भाडे, दुकानाचे भाडे खोल्या भाडे इ. मुळे वाचनालय संस्थेस उत्पन्न मिळते.

वाचनालयात राज राम मोहन रॉय प्रतिष्ठानद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेले टी.व्ही. व्ही.सी.आर. आहेत. इंडीया टूडे, न्यु ट्रक या मासिक वृत्तफिती वाचनालयात दाखविल्या जातात. ऑडीओ कॅसेटचा मोठा संग्रह आहे. अनेक भाषणांच्या कॅसेटस् वाचनालयाने तयार केल्या आहेत. विविध विषयांवर अभ्यासपूर्ण २०० हून अधिक व्याख्याने उपलब्ध आहेत. वाचनालयाद्वारे १९६७ पासून सर्टिफिकेट कोर्स इन लायब्ररी सायन्स चालविला जातो.

वाचनालय सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्ट्या अधिक सशक्त व्हावे. यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. आज वाचनालयास 'अ' वर्ग जिल्हा ग्रंथालयाचा दर्जा प्राप्त झालेला असुन एकुण ग्रंथसंख्या ९१,६०० इतकी आहे. यामध्ये दुर्मिळ अशा २७५० ग्रंथाचा समावेश असुन नियतकालिकांची संख्या १०५ इतकी आहे. हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेतील नियतकालिकांच्या बरोबरच येथे राज्य व देश स्तरावरील ५२ वृत्तपत्रे घेतली जातात. या ग्रंथालयाच्या सभासदांची संख्या २५१० इतकी असुन या पैकी ५६३ आजीव सभासद आहेत. समृध्द संदर्भ विभाग हे या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य आहे. ग्रंथालयाचे संगणिकीकरण १९९६ साली झालेले असुन आधुनिक पद्धतीच्या ग्रंथालय सेवांचे दालन येथे खुले झाले आहे. विद्यापीठाशी सलग्न ग्रंथालय व माहिती विज्ञान वर्ग या ग्रंथालयामार्फत सुरु करुन १९९६ पासुन ग्रंथालयाने शिक्षण प्रसाराचे प्रत्यक्ष कार्य हाती घेतले आहे. पदवी स्तरावरील हा अभ्यासक्रम ग्रंथालय सेवक व विद्यार्थी यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेला आहे. प्रबोधनाचे व्रत सांभाळताना १९७२ पासुन येथे लोकमान्य टिळक व्याख्यान मालेचे आयोजन केले जात असुन या उपक्रमास उत्तम प्रतिसाद लाभतो.

१९९३–९४ साली महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' प्राप्त करुन वाचनालयाने आपल्या वाटचालीत आणखीन एक मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवलेला आहे.

**अंबादेवी संस्थान ग्रंथालय, अमरावती :**

केवळ धार्मीक पुस्तकांचा संग्रह व्हावा या हेतूने सुरु झालेले हे ग्रंथालय आता अमरावतीमधील एक चांगले ग्रंथालय म्हणून नावारुपास आले आहे.

ग्रंथालयात २४,००० हून अधिक पुस्तके आहेत. सदस्य संख्या १८८७ आहे. हे वाचनालय अंबादेवी संस्थानचे पूर्ण आर्थिक पाठबळ असल्यामुळे वाचनालय समृध्द होण्यास कुठलाच अडसर आलेला नाही. या वाचनालयाचे वैशिष्ट्ये म्हणजे धार्मीक वेदांत विषयक व संत वाङमयाचा तसेच पुराण पोथ्यांचा भरपूर संग्रह, अनेक हस्तलिखिते येथे संग्रहीत करून ठेवली आहेत. डिपॉझीट घेऊन पोथ्या व पुराणांची पुस्तके पुरविली जातात. अनेक इंग्रजी पुस्तके संदर्भ ग्रंथ व वाचनीय पुस्तके वाचनालयात आहेत.

एक वर्षात वाचनालयातून वाचकांद्वारे एकूण ४५३१३ पुस्तके सरासरी वाचली जातात. उपलब्ध असलेल्या पुस्तकांची वर्गवारी अशी आहे ती पुढील प्रमाणे,

| | |
|---|---|
| कादंबऱ्या | १८८४० |
| मासिके | १०६२७ |
| कथा संग्रह | ७४५६ |
| बाल वाङमय | २३१६ |
| धर्म ग्रंथ | १३८४ |
| चरित्र ग्रंथ | १०५९ |
| नाटके | ४९३ |
| ज्योतीष विषयक | २७४ |
| संदर्भ ग्रंथ | १५१ |
| इतर | २६७३१७ |

वाचनालयातर्फे मोरोपंत जोशी व्याख्यानमाला दरवर्षी घेण्यात येते. खेड्यांमध्ये वाचनअभिरूची वाढावी म्हणून मोफत पुस्तके पुरविण्याची वाचनालयाची योजना आहे.

अमरावती जिल्ह्याचा विचार करीत असताना दर्यापूर व अचलपूर या दोन गावातील वाचनालयांची दखल घेणे अगत्याचे ठरते. ही दोन्ही वाचनालये अतिशय जूनी आहेत. मात्र अपुऱ्या अर्थ पुरवठ्यांमुळे ती फार प्रगती करू शकली नाहीत. तेथील कार्यकर्त्यांनी ही वाचनालये परिश्रम, कर्ज, प्रसंगी आर्थिक झीज सोसून व्यवस्थित सांभाळून ठेवली आहेत.

**दर्यापूरचे सार्वजनिक वाचनालय :**

दर्यापूरच्या सरस्वती मंदीर व सार्वजनिक वाचनालय या संस्थेचे सचिव श्री. धर्माधिकारी हे असून या वाचनाालयाचे नाव प्रथम किंग एडवर्ड हॉल ॲन्ड जनरल लायब्ररी असे होते. लहानश्या गावातील या वाचनालयात सुमारे ७००० पुस्तके असून १०० वर सदस्य आहेत. सुसज्ज वास्तू असलेल्या या वाचनालयाचा वाचक लाभ घेतात. हे वाचनालय गावातील एक महत्वाचे साहित्यिक व सांस्कृतिक केंद्र झाले आहे. व्याख्यानमाला, संगीताचे कार्यक्रम, चित्रप्रदर्शन इ. विविध कार्यक्रम वाचनालयात आयोजित करण्यात येतात.

ही वाचनालयाची चळवळ दर्यापूरहूनही लहान लहान गावापर्यंत पोहोचावी त्यासाठी सचीव सुधीर धर्माधिकारी हे प्रयत्नशील आहेत.

**यवतमाळ परिसरातील सार्वजनिक ग्रंथालये :**

महाराष्ट्र राज्याच्या अमरावती विभागातील एक जिल्हा. क्षेत्रफळ १३५८४ चौ. कि. लोकसंख्या १७३५३७७ (१९८१) राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४.४१ क्षेत्रफळ व एकूण लोकसंख्येपैकी २.७४% लोकसंख्या यवतमाळ जिल्ह्याची आहे.

यवतमाळ जिल्ह्याच्या उत्तरेस अमरावती जिल्हा पश्चिमेस अकोला व परभणी हे जिल्हे दक्षिणेस नांदेड व आंध्रप्रदेश राज्य पुर्वेस वर्धा व चंद्रपूर हे जिल्हे आहेत. जिल्ह्याच्या पुर्वेकडून वर्धा नदी व दक्षिणेस पैनगंगा नदीची सरहद्द लागली आहे.

ब्रिटीश काळात वऱ्हाड प्रांतात १६६४ साली या जिल्ह्याची स्थापना करण्यात आली. त्यावेळी हा जिल्हा वणी (मराठी) किंवा उन (ऊर्दू) या नावाने ओळखला जाई. १९०५ मध्ये त्याचे यवतमाळ जिल्हा म्हणून नामांतर करण्यात आला. १९५६ पर्यंत या जिल्ह्याच्या पुनर्रचनेत तो मुंबई राज्याला जोडण्यात आला. त्यानंतर १ मे १९६० पासून त्याचा महाराष्ट्र राज्यात समावेश करण्यात आला.

याचे मूळ नांव येवत किंवा यवते असावे आणि त्याला माळ (टेकडी किंवा मैदान) किंवा महल परगण्याचे मुख्य ठिकाण म्हणून यवतमाळ हे नाव बनले असावे 'आऐने ने अकबरी' मध्ये याचा योत–लोहार असा उल्लेख आहे. लोहार हे यवतमाळच्या पश्चीमेस ५ कि.मी. वरील खेडेगांव असून याते हा मूळ यवतचा ऊर्दू अपभ्रंश असावा. पूर्वी उन जिल्ह्याचे मुख्य ठिकाण म्हणून यवतमाळची निवड झाल्यानंतर त्याचे महत्व वाढले. १९०५ मध्ये उन वणी जिल्ह्याचे यवतमाळ जिल्हा असे नामकरण झाले.

यवतमाळ जिल्ह्यात १४ तालुके असून या सर्व तालुक्यातमिळून यवतमाळ जिल्ह्यात एकूण १२८ सार्वजनिक वाचनालये आढळतात. यातील यवतमाळचे नगर वाचनालय 'अ' श्रेणीचे आहे. या नंतर दिग्रस तालुक्यात माणिकलाल बंगनगर वाचनालय ब श्रेणीचे असून या तालुक्यात सर्वात जास्त १६ सार्वजनिक वाचनालये आढळून येतात.

अशाप्रकारे यवतमाळ जिल्ह्यात जिल्ह्याचे अ वर्ग श्रेणीचे नगर वाचनालय, यवतमाळ येथे असून तालुका पातळीवर एकुण ग्रंथालये १० आहेत व इतर ११७ ग्रंथालये आहेत. यवतमाळ जिल्ह्यात दिग्रस नंतर उमरखेड येथे नगरपरिषद वाचनालय तालुका पातळीवरील असून या उमरखेड तालुक्यात एकूण १२ ग्रंथालये आढळतात. या जिल्ह्यात मोरगाव तालुक्यात फक्त एकच सार्वजनिक ग्रंथालय आहे.

**शारदाश्रम संशोधन संस्था व वाचनालय :**

विदर्भातील सुविख्यात इतिहास संशोधक व भाषा शास्त्रज्ञ कै. य. खु. देशपांडे यांनी स्थापन केलेली शारदाश्रम ही संशोधन संस्था आज विदर्भ संशोधन मंडळानंतरची विदर्भातील एकमेव संस्था तर आहेच पण सार्वजनिक वाचनालय म्हणून वाचन चळवळीत तिने मोलाचे योगदान दिलेले आहे. साहित्य संशोधन संस्थांच्या ग्रंथालयांना पुरेशे अनुदान मिळत नाही. म्हणून अशी ग्रंथालये सार्वजनिक ग्रंथालयाची रुपे धारण करुन आपला विकास करु पहात आहे. त्यापैकीच एक शारदाश्रम हे एक होय. दुर्मिळ, हस्तलिखीत ग्रंथ, ताम्रपट, भूर्जपत्रे शिलालेखांची मुद्रिते इत्यादी संशोधन साधनांची उपलब्धता असलेले हे जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथालय आहे. या ग्रंथालयाची आजची परिस्थिती विचारात घेता, संस्थेतील अमोल अशी हस्तलिखिते व ऐतिहासिक कागदपत्रांचे संरक्षण करण्याकरीता मिळालेल्या अनुदानातून

लॅमिनेशन मशिन घेऊन लॅमिनेशन केले आहे. शासनाच्या १८,७५,०००/- अनुदानातून संस्थेची इमारत उभी केली असून संशोधन केंद्र म्हणून सदरहू संस्था विद्यापीठाशी संलग्न करावी म्हणून मागणी केली गेली. आज ग्रंथालयाचे उपाध्यक्ष प्रा. ए. डी. देशपांडे व सदस्य श्री. सी. बी. देशपांडे वाचकांना मार्गदर्शन करतात.

या ग्रंथालयात एकूण ६००० ग्रंथ असून वाचक सभासद २५० आहेत. दररोज किमान ५० वाचक येथे येतात. यवतमाळ जिल्ह्याचे वैभव असलेले हे संशोधन केंद्र नव्या संशोधकांच्या प्रतिक्षेत आहे.

**डॉ. वि. भी. कोलते संशोधन केंद्र वाचनालय :**

शारदाश्रमाच्या धरतीचे आणखी एक संशोधन केंद्र यवतमाळ येथे उदयास आले. या ग्रंथालयात एकूण ५००० ग्रंथ असून सुसज्ज अशी इमारत आहे. प्रा. डॉ. रमाकांत कोलते यांच्या अध्यक्षतेखाली सचिव श्री. प्रा. अशोक राणा असून संशोधनकरीता येथे दुर्मिळ ग्रंथ, मासिके उपलब्ध असून त्याचा लाभ अनेक वाचकांना होणार आहे.

**सार्वजनिक वाचनालय पुसद (जिल्हा यवतमाळ) :**

पुसद शहराच्या मध्यभागी अस्तित्वात असलेले सार्वजनिक वाचनालय हे शहराचे ज्ञानमंदिर आहे. कुठल्याही गावाच्या अगर त्या परिसराच्या सर्वांगीण विकासात त्या विभागाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीला मोलाचे स्थान असते.

इ. स. १८८५ पासून सार्वजनिक वाचनालय पुसदने ज्ञानाचा प्रकाश अखंड तेवत ठेवला आहे. या संस्थेची जडणघडण सतत १०० वर्षापासून होत आली आहे.

या संस्थेचे पहिले नांव नेटिव्ह जनरल लायब्ररी असे होते, अशी यवतमाळ डिस्ट्रीक गॅझेटीयर मध्ये नोंद आहे. सध्याची इमारत १९०५ साली बांधण्यात आली पण प्रत्यक्षात १९५६ सालापर्यंत या इमारतीचा खऱ्या अर्थाने वाचनालयासाठी उपयोग झाला नाही. सुरुवातीच्या काही वर्षात वाचनालयाची पुस्तके आणि कपाटे बालाजी मंदीरात, हरकेश्वर मंदिरात अगर चौबाऱ्यात किंवा कै. येराबर यांच्या बंगल्यात असत. प्रत्यक्ष इमारतीत प्रथमतः नोटिफाईड एरिया कचेरीचे कार्यालय आणि नंतर नगरपरिषदेचे कार्यालय होते. कित्येक वर्ष या वाचनालयाचा व्यवहार हा एका छोट्याशा खोलीतच चालत होता. ग्रंथालयात

वीस हजाराच्या जवळपास पुस्तके आहेत. कथा, कादंबऱ्या, काव्यनाट्य या साहित्यासोबतच धार्मिक तत्वज्ञान विषयक साहित्य नव्हे तर ज्ञान विज्ञान विषयक अनेक मराठी हिन्दी इंग्रजी भाषेतील विपूल साहित्य आहे. औद्योगिक व संदर्भ ग्रंथ, कृषी ग्रंथाची दालने आहेत. दरवर्षी १५ हजाराच्यावर पुस्तकांची भर पडतच आहे.

महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय मसुदा तयार केला. एकागावी एकच मान्यताप्राप्त वाचनालय राहिल ह्या तरतूदीमुळे विदर्भातील अखंड मान्यताप्राप्त वाचनालये नष्ट होणार होती.

त्यावेळी भाऊसाहेब यांनी मुख्यमंत्र्याची भेट घेऊन हा आदेश कसा अन्यायकारक आहे याची जाणीव करुन दिली. त्यावेळची विदर्भातील शे – दिडशे वाचनालये जिवंत राहू शकली ही भाऊंची कामगिरी ग्रंथालय चळवळीच्या इतिहासात महत्वपूर्ण ठरली. त्यावेळी भाऊ या वाचनालये अध्यक्ष म्हणून काम करीत होते. ग्रंथालय कायदा पास झाल्यानंतर विदर्भ ग्रंथालय संघटनेचे पहिले अध्यक्षस्थान भूषवून जिल्हा ग्रंथालय संघटना सक्रिय करण्याचे त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. विदर्भातील ग्रंथाकरांवर होणारा अन्याय दूर होण्यासाठी ते सदैव झटत राहिले. १९४४ पासून १९८२ पर्यंत जवळपास अर्धशतक ते वाचनालयांची संबधीत होते व त्यांचा सहभाग होता.

संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब सरनाईक, जिल्हाग्रंथपाल श्री. पा. दी. देशपांडे, बाळासाहेब लिमये, जगदिश राजे यांनी वाचनालय चळवळीच्या विकासाची ध्वजा येथील चाहतेप्रेमी यांच्या पाठींब्यावर महाराष्ट्र भर पोहोचवली. विदर्भात वाचनालय चळवळीवर आलेली गंडातरे कै. नाईक साहेबांच्या मदतीने निवारुन या चळवळीला कायमचे जीवदान मिळाले सन १९८२ पासून वाचनालयात ध्वनीफिती संग्रह करणे सुरु केले आहे. या ध्वनी फिती महिन्याच्या ४ थ्या शनिवारी वाचकांना ऐकविल्या जातात. सर्वधर्म संत वाङ्मय प्रकल्पांतर्गत सर्वधर्माच्या संतांच्या निरनिराळ्या भाषेतील वाङ्मयाची सूची तयार केली असून त्यासाठी शासनाने २००० रुपये मंजूर केले होते.

हे वाचनालय यवतमाळ जिल्ह्यातील जूने तालुक्यातील सर्वात मोठे वाचनालय असून विदर्भातील ग्रंथालय चळवळीत येथील व्यक्तीनी मोलाचे काम केलेले आढळते. या विभागातील ग्रामस्थ मंडळी व खेड्यापाड्यातील वाचक देखील या वाचनालयाचा फायदा घेतात. १९८३

साली या वाचनालयाला 'अ' दर्जा प्राप्त झाला. या वाचनालयामध्ये अनेक कार्यक्रम आयोजित केले गेले. साने गुरुजी स्मृतीदिन, गांधी जयंती, गावात वाचनालय उपकेंद्र, खेडे विभागात सयंत्र भेटी देणे काही बंद पडलेली वाचनालये सुरु करण्याचा प्रयत्न करणे. काही वाचनालय पूनरुज्जीवीत करण्याचे श्रेय या संस्थेला आहे. ध्वनीफित संग्रह, सर्वधर्म वाङमय प्रकल्प, यांना केंद्रीय अनुसंधान तर्फे १९८६ ला रु. १५००० अनुदान संस्थेस प्राप्त झाले होते.

**नगर वाचनालय, यवतमाळ :**

इ. स. १८८७ साली व्हिक्टोरीया राणीची ज्यूबीली साजरी झाली.त्यावेळेस या वाचनालयाची ज्युबीली लायब्ररी म्हणून स्थापना झाली. त्यावेळेस या वाचनालयाला म्यूनिसिपल ऑफीस पर्यंतची जागा देण्यात आली होती. सध्या अंजूमन हायस्कूल आणि वाचनालय यामधील रस्ता अंजूमन शाळेची इमारत व म्यूनिसिपल कार्यालयाची जागा या वाचनालयाला सरकारकडून मिळालेली होती.

सन१८८७ साली यवतमाळ हे जिल्ह्याचे ठिकाण नव्हते. यवत म्हणूनच लहानसे खेडेगाव होते व जिल्ह्याचे ठिकाण वणी होते. यवतमाळ हे टूमदार टेकड्यांनी वेढलेले गाव, आजूबाजूला रम्य वनश्री व थंड हवेचे ठिकाण म्हणून या ठिकाणी १९०३ साली जिल्ह्याधिकाऱ्याचे कार्यालय आले त्यावेळी यवतमाळची लोकसंख्या २ हजारांचे जवळपास होती. त्यावेळेस हे वाचनालय एका खोलीत होते व येथील निंबा हा सेवक १४ रुपये दरमहा पगारावर या वाचनालयाचे कामकाज पाहात होता. या वाचनालयाचे पहिले अध्यक्ष होते रावबहाद्दूर श्री. बी. व्ही. द्रवीड त्यावेळचे जिल्हाधिकारी यांनी देखील या वाचनालयाला सहाय्य केल्याची नोंद मिळते. १९२५ साली या वाचनालयाच्या विस्ताराला सुरुवात झाली. २७/९/२५ रोजी रावसाहेब द्रविड यांच्या सल्ल्याने ऑक्टोबर १९२५ च्या पहिल्या पंधरवड्यात कोनशिला समारंभ करण्याचे ठरले. त्यासाठी रुपये २५ या समारंभाच्या खर्चासाठी मंजूर करण्यात आले होते. या सभेस श्री. बी. एच. जतकर. श्री. व्हि. एस. फाटक, पृथ्वीगीर हिरगीर, एम. जी. जोगळेकर आणि वाय. के. देशपांडे उपस्थित होते. श्री बापूजी अणे हे यावेळेस संस्थेचे अध्यक्ष होते. इमारतीच्या बांधकामाला २७/७/१९२६

साली सुरुवात झाली. श्री. लोकनारायण अणे यांनी २५० रुपये विहिर बांधण्यासाठी देगणी दिली होती. तसेच गंधर्व नाटक मंडळीने वाचनालयाला ४२२ रुपये १२ आणे पुस्तक खरेदीसाठी देणगी दिली होती. १४/१/१९३४ रोजी शारदाश्रम या संस्थेला वाचनालयात आपली कागदपत्रे ठेवण्यास १ खोली वापरण्यास परवानगी देण्यात आली होती. १९३७ साली वाचनलयासाठी निधी उभारण्यासाठी डिबेंचर्स, शेयर्स घ्यावेत असा ठराव मंजूर करण्यात आला होता. ९/१/१९४८ रोजी वाचनालयाचे ज्यूबीली लायब्ररी हे नाव बदलून नगर वाचनालय हे नाव देण्यात यावे असे एकमताने ठरले. १९४० च्या सुमारास डॉ. टेंबे अध्यक्ष व प्रा. शरदचंद्र डोंगरे हे सचिव होते. १९५० – ५१ साली श्री. मानकर या संस्थेच्या कार्यकारीणीवर सहसचिव म्हणून निवडून आले. वाचनालय प्रगतीच्या दिशेने नविन वळण घेत होते. याच काळात सरकारकडून ९००० रुपये मिळून ५० x २० चे एक दालन बांधले गेले. पुढे १५ x २० चे दालन त्यावर सुसज्ज अतिथी गृह बांधण्यात आले व वाचनालयाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यात आली. ॲड. म. ग. मानकर हे वाचनालयाच्या प्रगतीचे शिल्पकार ठरले. येथील उपक्रमाला हजारांच्या संख्येने श्रोते उपस्थित असतात.

नगर वाचनालय, यवतमाळ हे साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक ग्रंथालयीन चळवळीचे एक केंद्र बनावे व शैक्षणिक क्षेत्रात या संस्थेने अग्रेसर रहावे हा संस्थेचा संकल्प आहे.

या वाचनालयाची सभासद संख्या ९५७ असून त्यात १३९ महिला, ७ बाल सदस्य आहेत. या वाचनालयाची ग्रंथसंपदा ३०२०० आहे त्यामध्ये २२५१६ मराठी, २९२३ हिन्दी, ४१३९ इंग्रजी व इतर ६२२ अशी आहे. या वाचनालयात ११ मराठी, ३ हिन्दी, ५ इंग्रजी, १ ऊर्दू, १ गुजराती अशी एकूण २२ वृत्तपत्रे वर्गणीद्वारे येतात. याशिवाय २१ साप्ताहिके, ६५ मासिके, १२ पाक्षिके विकत घेतली जातात. १० हजाराच्या जवळपास असलेल्या १९४० पर्यंतच्या अंदाजपत्रकात सद्यस्थितीत फार मोठा बदल झालेला आहे. १९८४–८५ सालापर्यंत जमा रु. ४२५१२८ असून खर्च ४१००४३ रुपये होता. यावरुन तीन दशकापर्यंतच्या ग्रंथालयाच्या आर्थिक उलाढालीचे चित्र स्पष्ट होते. या ग्रंथालयात जूने संदर्भ ग्रंथ व जूनी मासिके दुर्मिळ ग्रंथाचा देखील साठा आहे.

या वाचनालयाला नगरपरिषद यवतमाळ कडून दरवर्षी तीन हजार अनुदान प्राप्त होते. हे वाचनालय येथील शहराचे व गावाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक मुल्यांची जपणूक करत आहे.

**लोकमान्य वाचनालय आर्वी ( नेटीव्ह व्हिक्टोरीया लायब्ररी) :**

हे वाचनालय १८६५ साली स्थापन झाले. पूर्वी या वाचनालयाचे नाव जूनी नेटिव्ह लायब्ररी असे होते. हे वाचनालय तेलंगराय देवस्थानात स्थापन झाले. या नेटिव्ह लायब्ररीचे १९०१ ला व्हिक्टोरीया लायब्ररी हे नामांतर होऊन संस्थेच्या स्वमालकीची १९२७ ला ग्रंथालय इमारत उभी झाली.

या ग्रंथालयात २०००० पुस्के असून दैनिक १९, साप्ताहिके ३२ व मासिके ७५ आहेत. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर वाचनालयाचे व्हिक्टोरीया हे नाव बदलून त्याऐवजी १९२० ला लोकमान्य वाचनालय हे नाव ठेवण्यात आले. १९२७ ला वाचनालयाचे सभागृह व टॉवर बांधून झाले. या वाचनालयास अ वर्ग ग्रंथालय दर्जा व विशेष पुरस्कार पण देण्यात आला. या ग्रंथालयाची वैशिष्ट्ये म्हणजे मुक्तव्दार वाचनालय, वाचनालय प्रकाशन योजना, ध्वनीफित लायब्ररी, नामवंत साहित्यीकांच्या व्याख्यानमाला, स्त्री विभाग व बालविभागाची वाचनाची स्वतंत्र व्यवस्था.

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी ४/१२/३७ रोजी म्हणजे वाचनालये स्थापनेनंतर तब्बल ७२ वर्षांनी वाचनलाविषयी स्वहस्ते नोंदविलेला अभिप्राय हा संस्थेने वसा घेतलेल्या राष्ट्रीय विचारांचा परिचारक होता. 'वाचनालय ही पुस्तके व वर्तमानपत्राची देवाण–घेवाणीची केवळ यंत्रणा बनू नये तर येथील परिसरासाठी समाजस्पर्शी विविध चळवळीचे केन्द्र बनावे' हा विचार येथे योजना बध्दतेने साकार करण्यात आला होता.

मुळ सातारा येथील असलेले व राष्ट्रभक्तीच्या संस्कारात वाढलेले लक्ष्मण गोविंद उर्फ आबाजी देऊस्की वकील यांनी पुढाकार घेऊन काही स्थानीकांच्या मदतीने वाचनालय १८६५ ला स्थापन केले. या ग्रंथालयाच्या प्रगतीसाठी ज्यांनी हातभार लावून शैक्षणिक सामाजिक व धार्मिक चळवळींना विविध उपक्रमांना चालना दिली. त्यामध्ये क्रांतीज्योत झाशीची राणी यांचे बंधू चिंतामणी तांबे यांचा १८९९ ते १९०२ पर्यंत विशेष सहभाग होता.

याकाळात आर्वीत विस्तारीत नेटीव्ह लायब्ररीचे व्हिक्टोरीया लायब्ररी असे नामांतर झाले. वाचनालयाच्या संबंधीत कार्यकर्त्यांवर टिळक विचारांचा जबरदस्त पगडा होता. त्यादृष्टीने राष्ट्रीय जागृतीसाठी वाचनालयात विविध उपक्रम राबविण्यात येत होते. विविध चळवळीचे केंद्र हे वाचनालय बनले. सन १९७५ पासून या वाचनालयाचे अध्यक्ष स्थान भुषवित असलेले डॉ. शरद काळे हे अभ्यासू व ग्रंथप्रेमी म्हणून ओळखले जात. राजकारणाच्या धकाधकीत वाचनालयाच्या प्रगतीचा विचार त्यांच्या समोर नेहमी असे. ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या आणि नेमलेल्या प्रभाराव समितीच्या सिफारशी लागू व्हाव्यात म्हणून ते प्रयत्न केले. वाचनालयात दर्जेदार ग्रंथसंग्रह सतत वाढत राहावा. दूर्मिळ पुस्तकांची जोपासना व्हावी व सांस्कृतिक चळवळीचे केद्र म्हणून वाचनालय आघाडीवर रहावे हा प्रयत्न डॉ. काळे त्यांचे ग्रंथप्रेमी सहकारी जयंत देशमुख, चंद्रशेखर होनाडे, हरिभाऊ थिंगळे, अरुण देशमुख, नारायण गोठाने, सतीश जोशी, राजू शेंडे व अनिल साळवी या सहकाऱ्यांसोबत सातत्यपूर्वक करत राहिले.

अशाप्रकारे आर्वीच्या लोकमान्य वाचनालयाची वास्तू व परंपरा ऐतिहासीक असून एक ज्ञानपीठाच्या १२८ वर्षांची ही वाटचाल प्रभावी रितीने ग्रंथालय चळवळीस उत्तम प्रतीसाद देत आलेली आहे.

**गांधी ज्ञान मंदीर, वर्धा :**

येथील वाचकांची वाचनाची सोय करुन बौध्दीक पातळी वाढविणे, वाचकात गांधी साहित्य बहुसंख्येने उपलब्ध करुन देणे, तसेच ज्ञानसंवर्धन व प्रसार हे या वाचनालयाचे उद्दीष्ट आहे. हे वाचनालय १९५४ ला सुरु झाले असून रजि. क्र. २३६ आहे. या वाचनालयाचे उद्घाटन ५/१/१९५४ ला पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे हस्ते झाले. सकाळ–संध्याकाळ हे ग्रंथालय उघडे असते. या वाचनालयासाठी खास ७ एकर जमीन मिळाली असून शहराला लागून निवांत ठिकाणी ग्रंथालयाची वास्तू निर्माण झालेली आहे. इमारतीचा आकार ३४०५ चौ. फूट असून संस्थेच्या मालकीची ग्रंथालय इमारत आहे. वाचनसाहित्य संग्रह कक्ष, अभ्यासिका असे कक्ष असून संदर्भ विभाग आहे. या वाचनालयात कार्डेक्स पध्दती असून अनेक ग्रंथ ओपन रॅक्स मध्ये वाचकांसाठी खुले आहेत. इमारतीच्या

तुलनेत वाचकांसाठी भरपूर फर्निचर असून शंभर ते सव्वाशे वाचक दररोज या वाचनालयाचा लाभ घेतात.

या गांधी ज्ञानमंदिर वर्धे विषयी पू. विनोबा म्हणतात, ''गांधी ज्ञान काय आहे हे प्रश्न समजून घ्यावे आपल्या देशात आत्मज्ञानाचे ज्ञान प्राचीन काळी झाले होते. याचीच परंपरा आजपर्यंत चालू आहे. विज्ञानाची परंपरा आमच्या कडीलच आहे. विज्ञानाची परंपरा आपल्याकडे अखंडीत चालली नाही. आत्मज्ञान व विज्ञानाच्या संयोगाने सामुहिक अहिंसेचा जन्म झाला आहे. त्यालाच गांधी ज्ञान म्हणतात. मला विश्वास आहे यामुळे जगाचे कल्याण होईल इतकेच नव्हे तर या जगात स्वर्ग निर्माण होऊ शकतो. जसे हायड्रोजन व ऑक्सीजन मिळून पाणी होते त्याचप्रमाणे आत्मज्ञान व विज्ञान मिळून सर्वोदय व साम्य योग बनला आहे. हे ग्रंथालय सर्वांचे समग्र जीवन केंद्र बनेल.'' गांधी ज्ञानच गांधी विचार साहित्याचे ग्रंथालय व संशोधन केंद्र असावे व पुढे गांधीरत्न ॲकेडमी निर्माण व्हावी असा विचार सर्वप्रथम १९३७ या वर्षी स्व. जमनलाल बजाज यांच्या मनात होता. येथील कपाटांसाठी रु. १०,००० व ग्रंथासाठी रु. ५००० चे दान मिळाले. या संस्थेचे संचालन विश्वस्त समिती निर्माण झाली होती. यामधील कमलनयन बजाज, जानकी प्रसादजी पोद्दार, व श्री. मन्नारासयण अग्रवाल यांच्या प्रयत्नाने या वाचनालयाची प्रगती झालेली आढळते.

या वाचनलयासाठी सुरुवातीपासून येथे कार्यरत असलेले ग्रंथपाल श्री. इस्माईल खान चांदसा पठान यांनी या ग्रंथालयाच्या प्रगतीस व वाचकांच्या सेवेस परिपूर्ण हातभार व कसोटीने प्रयत्न केले गेले आहेत. या ग्रंथालयात १४०३१ ग्रंथ असून ४२ मासिके आहेत. १२ वर्तमानपत्रे असून ४००० हिन्दी व २००० दुर्मिळ व महत्वाचे ग्रंथ आढळतात. वाचनालयामध्ये ३० वाचक बसू शकतात व बाल विभागासाठी स्वतंत्र कक्ष आहे. १०० वाचक सरासरी दररोज याचा लाभ घेताना दिसतात. ३०० वाचक नियमीत सभासद असून ग्रंथपाल श्री. इस्माईल पठान, श्री. वैद्य, हर्षवर्धन व श्री. प्रशांत उमक यांचे सहकारी कार्यभार सांभाळतात. शासनातर्फे या ग्रंथालयाला दरवर्षी निर्धारीत निधी उपलब्ध होत असून यातून वेतन, ग्रंथ व नियतकालिके यांचा खर्च भागविला जातो. या ग्रंथालयाला विनोबांजींचे सहकार्य लाभले असून श्री रामकृष्ण बजाज (अध्यक्ष) असून श्री. जोशी सचिव

व श्री. एस.  के. डे कार्यभार सांभाळतात व ग्रंथालयाच्या प्रगतीस यांनी हातभार लावलेला आहे.

अशाप्रकारे वर्धा जिल्ह्यात येथील लोकसंख्येच्या तुलनेत सार्वजनिक ग्रंथालये ९६ असून ही ग्रंथालये वाचकांच्या सेवेस सदैव तत्पर असतात.

**मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय :**

**स्थापना आणि संस्थापक :**

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे जवळ जवळ सर्वच संस्थापक कोणी मोठे विद्‌वान, विशेष उच्चशिक्षित तरुण होते असे नव्हे. सामान्य नोकरीपेशात वावरणारीच ही मंडळी होती. पण आपला नोकरीउद्योग सांभाळून फावल्या वेळी काही तरी लोकसेवा आपल्या हातून घडावी अशी इच्छा मात्र त्यांच्या ठिकाणी होती. या इच्छेतून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेचे बीजारोपण झाले. कै. अंबादास गोपाळ पुणतांबेकर यांचा याकरिता विशेष पुढाकार होता.

लोक सेवेच्या हेतूने प्रेरीत झालेल्या काही तरुणांनी 'भारत सेवक समूह' या नावाची एक मंडळी सार्वजनिक काम करण्यासाठी स्थापना केली. 'भारत सेवक समूह' या मंडळीत श्रीधर बाळाजी मोडक, शंकर हरी शेजवलकर व अंबादास गोपाळ पुणतांबेकर असे तीन तरुण होते. उत्व, सभा प्रसंगी किंवा प्लेग, दुष्काळ अशा आपत्तीच्या वेळी जनसेवेच्या कामात उपयोगी पडणारे स्वयंसेवक तयार करण्याच्या उद्‌देशाने हा 'भारत सेवक समूह' अस्तित्वात आला. या सेवक समुहाने मराठी ग्रंथाचे ग्रंथालय स्थापन करावे अशी कल्पना पुढे आणली. पण केवळ मराठी ग्रंथांच्या ग्रंथालयाचे अगत्य त्याकाळी फारच थोड्या नवशिक्षितास होते. पुणतांबेकर अशा विरळ तरूणापैकीच होते. पुणतांबेकरांचाच मुख्यत्वे उल्लेख अशासाठी करावयाचा की, त्यास असल्या संस्थेची उणीव भासल्याबरोबर ती आपण आपल्या प्रयत्नाने भरुन काढावी असे वाटून, त्याप्रमाणे आपल्या उद्‌देशाला कृतिरुप देण्याच्या उद्योगालाही ते लगोलग लागले. पण १८९० पासून पुढे तीन चार वर्षे त्यांच्या उद्योगाला काही फळ येऊ शकले नाही. पण दरम्यान आपल्या मित्रांच्या साहाय्याने

मराठी पुस्तकांचा संग्रह करण्याचे काम त्यांनी सुरु केले. 'भारत सेवक समूहा' तर्फेच हेही काम चाले.

'भारत सेवक समुहा'ने (इ.स. १८९५) या वर्षी 'श्री छत्रपती वाचनालय' या नावाने मराठी पुस्तके आपल्या महाराष्ट्र बांधवास वाचावयास देण्यासाठी एक संस्था स्थापन केली. या संस्थेशी निव्वळ  मराठी पुस्तकांचा संग्रह होता. पुस्तके वाचकांना फुकट वाचावयास द्यावीत असाच वाचनालयाच्या चालकांचा संकल्प होता. छत्रपती वाचनालयाचा हा उपक्रम एकदोन वर्षे नीटपणे चालू राहिला व तो चांगला यशस्वी होऊन वाढीसही लागला असते. पुढे प्लेगमुळे वाचनालयाचे काम बंद पडले व मंडळींची पांगापांग झाली. परंतु या लोकांचा उत्साह मात्र कमी झाला नाही.

प्लेग वगैरेसारख्या अडचणी दूर झाल्यावर भारत सेवक समुहाचे मोडक, शेजवलकर व पुणतांबेकर ह्यांनी वाचनालयाबाबत पूर्वीच्याच जोमाने पुन्हा खटपट सुरु केली. पण ह्यावेळी त्यांनी आपल्या खटपटीला थोडे व्यापक स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. १८९७ सालची गोष्ट आहे. मुंबईतील प्रतिष्ठित, विद्वान मराठी भाषाभिमानी गृहस्थांच्या गाठीभेटी घेऊन, एखाद्या निव्वळ मराठी वाचनालयाची आवश्यकता आहे किंवा काय, अशा विषयी अभिप्राय मिळविण्याचा मंडळींनी उद्योग आरंभिला. ना. न्या. मू. रानडे, डॉ. नानासाहेब देशमुख, रा. ब. घनःश्याम नीळकंठ नाडकर्णी, सर भालचंद्र भाटवडेकर, वे. गोविंद शंकरशास्त्री बापट, रा. सा. विनायक कोंडदेव ओक, शेट तुकाराम जावजी, भवानराव पावगी, इत्यादी विद्वान व प्रतिष्ठित गृहस्थांचे अनुकूल अभिप्राय मिळाले. हे अभिप्राय मिळविण्यात एक वर्ष गेले. मुंबईतील एक लोकप्रिय धन्वंतरी डॉ. नानासाहेब देशमुख यांनी समुहाचे चिटणीस पुणतांबेकर ह्यांस 'वाचनालयाकरिता अवश्य लागणाऱ्या जागेचे दरमहा भाडे स्वतः देण्यास मी कबूल आहे' असे आश्वासन दिले. रा. सा. पावगी यांनीही मासिक काही द्रव्यसाहाय्य देण्याचे कबूल केले.

द्रव्यसाहाय्यांची काही आश्वासने व मोठ्यांचे पाठबळ अशा प्रकारे मिळाल्यामुळे कार्यकर्त्या मंडळींचा उत्साह वाढला व त्यांनी संग्रहालयाची स्थापना करण्याचे ठरवून जागेचे भाडे वगैरेकरिता लागणारा खर्च वर्गणी काढून भागविण्याचे या मंडळीनी ठरविले. या

निर्णयाबद्दल या मंडळींचे आज खरोखर कौतुक वाटते. कार्यकर्त्यांची ही स्वावलंबी निष्ठाच संस्थेच्या पुढील यशाला कारणीभूत झाली. त्रिमूर्ती मोडक, शेजवलकर व पुणतांबेकर यांनी या कामी आणखी सहाय्यक मिळविण्याची खटपट सुरु केली. मोफत वाचनालय सुरु करण्याचा आपला विचार प्रथम त्यांनी नारायण कृष्ण ग्रदे यांस सांगितला. ग्रदे यांचे म्हणणे असे पडले की मुंबईसारख्या सर्व बाजूंनी जबर खर्चाच्या शहरात श्रीमंत सुशिक्षित मंडळींकडून पुरेसे द्रव्य सहाय्य मिळण्याबद्दल खात्री असल्याशिवाय अगदी मोफत वाचनालय आपल्यासारख्या गरीब लोकांकडून चालणे कठीण आहे. गद्रे यांच्या सूचनेवर बराच खल झाल्यावर भांडे, दिवाबत्ती वगैरे किरकोळ खर्च भागविण्यापुरती महिना फक्त दोन आणे वर्गणी वाचकांकडून घ्यावयाचे ठरले. म्हणजे मोफत वाचनाची सोय करण्याची मूळ कल्पना व आवश्यक खर्चाच्या बाबतीत स्वावलंबन अशा दोन्ही टोकांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यानंतर गद्रे यांच्याखेरीज इतर काही मित्रांचे सहकार्य संपादन करण्यात आले. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, अनंत निळकंठ पिटकर, नारायण महादेव बाक्रे, नरहर महादेव जोशी, विठ्ठल वासुदेव टिल्लू, विनायक बळवंत जोशी व गणेश लक्ष्मण पागे अशी आणखी मंडळी या उद्योगात सामील झाली. म्हणजे एकंदर अकरा व्यक्ती ग्रंथसंग्रहालयाच्या कामासाठी एकत्र आल्या. हे 'एकादश रुद्र' च मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे मूळ उत्पादक होत.

संग्रहालयाबद्दल विचार करण्यासाठी एक प्राथमिक सभा दिनांक १० जुलै १८९८ राजी बोलाविण्यात आली.ब्राह्मण सभेच्या दिवाणखान्यात ही सभा झाली. सभेला गणेश लक्ष्मण पागे यांच्या खरीज इतर १० इसम हजर होते. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर यांनी अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर पिटकर यांनी सभा भरविण्याचा हेतू थोडक्यात निवेदन केला. रा. पुणतांबेकर ह्यांनी ते, रा. मोडक व रा. शेजवलकर यांनी या संबंधानेच ३-४ वर्षे चालविलेल्या खटपटीबद्दलची माहिती वाचून दाखविली. त्यांचा प्रयत्न 'फुकट' वाचनालय काढावे. असा होता. तो सद्य:स्थितीत शक्य नाही. 'आजचा प्रयत्न हा अगदी थोडक्यात वर्गणीत मराठी भाषेतील प्रत्येक पुस्तकाचा संग्रह करून ती (पुस्तके) सभासदांस वाचावयास द्यावी असा

आहे.’ रा. नरहरपंत जोशी यांचेही अशाच तऱ्हेचे थोडक्यात भाषण झाल्यावर पहिला ठराव सर्वानुमते संमत झाला तो असा –

ठराव– ‘मुंबई शहरात मराठी ग्रंथसंग्रहालयाची आवश्यकता आहे व ते स्थापन करावे.’

अध्यक्ष रा. गुर्जर यांनी ‘राजाराम वाचनालय’ नावाच्या एका संस्कृत पुस्तकालयाची सभेला माहिती दिली व ते अदगी मोडकळीस आले असून, आपण हाती धरल्यास चांगली स्थिती प्राप्त होईल आणि आपल्या कामास मदत होईल असे सांगितले.

अशा पार्श्वभूमीवर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या स्थापनेचा समारंभ श्रावण शु. ।। १५ शके १८२०, दि. १ ऑगस्ट १८९८ या दिवशी सकाळी झाला व संग्रहालयाची विधिपूर्वक सुरवात झाली. संस्थेसाठी घेतलेली जागा अगदीच लहान असल्यामुळे एकंदर समारंभ शेणवी ठाकुरव्दारातील ब्राम्हणसभेच्या दिवाणखान्यात झाला. ठरवल्याप्रमाणे समारंभाचे अध्यक्षस्थान रा. सा. विनायक कोंडदेव ओक यांनी भूषविले होते.

संस्थेचे चिटणीस रा. बाक्रे यांनी प्रथम अशा उपयुक्त संस्थेची आवश्यकता प्रतिपादन केली व ‘भारत सेवक समूह’ या संस्थेने आपली सर्व म्हणजे चारशे पुस्तके एका कपाटात घालून संग्रहालयाला अर्पण केल्याचे जाहिर केले. पुस्तकांशिवाय बरीचशी जुनी मासिक – पुस्तकेहि भारत सेवक समुहाकडून संग्रहालयाला मिळाली. रा. पागे ह्यानी आपल्या ‘अस्खलित’ वाणीने अशा संस्थेला लोकाश्रयाची जरूर किती आहे ते स्पष्ट केले. त्या काळातील एक सुप्रसिध्द लेखक शिवचरित्रकार कृ. अ. केळुसकर ह्यांनी भाषण करून अशा संस्थेची उपयुक्तता व्यक्त केली. ‘अलिकडे ग्रंथ लेखकास मराठी भाषेत ग्रंथ लिहिण्याचा प्रसंग आल्यास त्यात मागील ग्रंथकारांचा एखाद्या प्रकरणी अभिप्राय त्याच्या शब्दानी रुजू करता येत नाही. कारण आमचे ग्रंथ एकत्र मिळत नाहीत. कित्येकांस कसर लागली आहे व कित्येक वाण्याच्या रद्दीत पडले आहेत, ही स्थिती पालटण्यास संग्रहालयासारख्या संस्था आवश्यक आहेत.

संस्था स्थापन झाली तरी तिला लोकाश्रय सहजी मिळणे शक्य नव्हते, म्हणून थोड्याच दिवसांनी संस्थेतर्फे एक विनंतीपत्रक काढण्यात आले. या पत्रकात मराठी भाषेची

स्थिती सुधारण्यासाठी मराठी पुस्तकांचा संग्रह करण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली होती.

अशा संस्थेच्या प्राथमिक कार्यात दीर्घकाळ सात्याने पुणतांबेकर, बाक्रे, गद्रे, पिटकर, न. म. जोशी इत्यादींनीच भाग घेतला. भारत सेवक समुहात एकत्र आलेल्या त्रिमूर्तीपैकी एक व संस्थेचे पहिले कोषाध्यक्ष शंकर हरी शेजवलकर यांनी संग्रहित केलेले ग्रंथ हाच 'छत्रपती' वाचनालयाचा व पर्यायाने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा पाया होता.

ग्रंथसंग्रहालयाखेरीज गणपत्युत्सव, शिवाची उत्सव इत्यादी राष्ट्रीय चळवळीच्या कार्यक्रमात शेजवलकर मोठ्या आपुलकीने भाग घेत. ग्रंथसंग्रहालयातील त्यांचे सहकारी संस्थापक गद्रे प्रभुतींनी चालविलेल्या 'सरस्वती मंदिर' मासिकाच्या प्रकाशनालाही शेजवलकर यांनी हातभार लावलेला असावा.

**अंबादास गोपाळ पुणतांबेकर :**

'छत्रपती' वाचनालयाचे तिसरे प्रवर्तक अंबादास गोपाळ पुणतांबेकर यांचा मात्र संस्थेशी स्थापनेपासून अव्याहत सुमारे ४५ वर्षे संबंध राहिला. १९३४ पर्यंत तर ते सतत चिटणीसपदावर राहिले व पुढे संस्थेचे उपाध्यक्षपदही त्यांनी भूषविले. पुणतांबेकर संस्थेशी एवढे समरस झालेले होते की, ग्रंथसंग्रहालय म्हणजे पुणतांबेकर असे समीकरण प्रचलित झाले होते. पुणतांबेकर व संग्रहालय यांचे साहचर्य अभिन्न असेच होते. अंबादासानी मूळ कल्पना व तिला साकार करण्याची जिद्द याचे श्रेय कोणा एका व्यक्तीला द्यावयाचे झाल्यास ते अंबादासानाच दिले पाहिजे. बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव महाराजांकडे मोठी देणगी मिळविण्यासाठी जेवढ्या उत्साहाने ते जात तेवढीच मेहनत घेऊन एखाद्या बुकबाइंडरकडे घाऊक दराची चौकशी किंवा रदबदली ते करीत.

संस्थेसाठी पैसा जमविण्याच्या व अधिकाधिक लोकात तिचा परिचय होण्याच्या कामात पुणतांबेकर यांचे विशेष लक्ष असे. संस्थानिक, इनामदार यांच्यासारखे लक्ष्मीपुत्र मुंबईत केव्हा येतात याच्या पाळतीवर ते असत. असा कुणी संभाव्य दाता आल्याचे कळताच पुणतांबेकर लगेच त्याला पानसुपारीला बोलावून त्याचा सत्कार करुन संस्थेची उपयुक्तता व आर्थिक अडचणी त्याच्या नजरेला आणीत व मोठमोठ्या देणग्या मिळवित. स्थानिक व बाहेरच्या लोकांना संस्था दाखवून काहींना ते आश्रयदाते किंवा तहहयात

सभासद करुन घेत. नाटक मंडळ्या, सर्कशी यांच्याकडून धर्मार्थ  खेळ घेण्याची नवी प्रथाही त्यांनीच सुरु केली. पण ग्रंथालयाचे खरे आधारस्तंभ ग्रंथकार होत. तेव्हा धनिकांप्रमाणे मुंबईत येणाऱ्या प्रत्येक मराठी साहित्यिकाचा सन्मान करुन लक्ष्मीरुपाने नाही तर सरस्वतीरुपाने त्यांच्या ग्रंथांच्या प्रती ते संस्थेसाठी मोफत मिळवीत.

अंबादासांच्या एका सत्कार प्रसंगी, साहित्यसम्राट न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांनी त्यांच्या निःस्वार्थी, निरपेक्ष समाजसेवेचा गौरव करताना त्यांना पावसाची सार्थ उपमा दिली होती. तात्यासाहेब म्हणाले की,'' अशा कार्यकर्त्यांना उपमा पावसाचीच देता येईल. बिचारा रात्री अपरात्री कोणाचे दर्शनही होणार नाही अशा ठिकाणी पडून शेतकऱ्याची जमीन सुपीक करतो. सकाळी उठून आभार मानावयास जावे तर तो दूर निघूनही गेलेला असतो.''

अंबादास पुणतांबेकर यांचा अनेक थोरांनीही केलेला हा गौरव अगदी सार्थ होता. मॅट्रीकपर्यंत शिक्षण झालेल्या व आयुष्यभर कारकुनी व्यवसाय केलेल्या या समाजसेवकाचे हे चरित्र अपूर्वच म्हटले पाहिजे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे भाग्य असे थोर की, त्याला एक प्रमुख संस्थापक अशा अपूर्व कर्तृत्वाचा व निष्ठेचा लाभला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या स्थापनेत जसा त्यांचा पुढाकार होता, त्याप्रमाणेच संस्थेच्या सुरवातीच्या काळात त्यांनीच प्रामुख्याने आपल्या खांद्यावर संस्थेची धुरा वाहिली. संस्थेचा पाया भक्कम करण्यात पुणतांबेकर यांचेच कर्तृत्व प्रामुख्याने कारणीभूत झाले. संस्थेच्या कार्याचा व्याप वाढून तिला आज भव्य वैभवी स्वरुप प्राप्त झाले आहे त्याचे श्रेय अंबादासांकडे बरेच जाते. तांबेकरांचे नाव अग्रस्थानी लिहावे लागेल.

संस्थेच्या इतर संस्थापकांपैकी मुकुंद बाळकृष्ण गुर्जर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. भारतसेवक समुहाच्या त्रयीने आपल्या वाचनालयाच्या उद्योगात प्रथम ज्यांना सामील करुन घेतले ते नारायण कृष्ण उर्फ नाना गद्रे यांचा संग्रहालयाशी सुरवातीपासून संबंध होता. १९२४ साली निवृत्त होऊन त्यांनी मुंबईचे वास्तव्य वाईस हलवीपर्यंत हा संबंध अव्याहत टिकला. वाचन – लेखनाचे भोक्ते असल्यामुळे गद्रे ग्रंथालयाच्या कार्याकडे वळले. पण गद्रे यांचे लक्ष ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाकडे विशेष असे. संग्रहालयाच्या दप्तरी कामाची विशेष

आवड नसल्यामुळे प्रत्यक्ष अधिकारपद त्यांनी कधी स्विकारले नाही. पण ग्रंथालयाचे मुख्य वैभव जे ग्रंथ त्यांची जोपासना व संवर्धन त्यांनी मोठ्या हौशीने केली. संग्रहालयातील ग्रंथसंपत्ती संख्या व गुणांच्या दृष्टीनेही समृध्द करण्याकडे नानांचे विशेष लक्ष असे. मुंबईत असेपर्यंत दरवर्षी आपल्याजवळील पुस्तके व मासिके ते संग्रहालयाला देणगी म्हणून देत. नव्या जुन्या मराठी पुस्तकांची बिनचूक माहिती ते करीत. कित्येक दुर्मिळ ग्रंथ, बभ्रा न करता त्यांनी अशा पध्दतीने संग्रहालयाला मिळवून दिले.

संग्रहालयाच्या व्यवस्थापक मंडळाचे पहिले उपाध्यक्ष अनंत निळकंठ पिटकर यांचा संस्थेशी स्थापनेपासून सुमारे २५ वर्षे अव्याहत संबंध होता. संस्थेचा आमरण अभिमान बाळगणऱ्यांपैमी पिटकर एक होते. संस्थेशी एक मूळ उत्पादक म्हणून त्यांचा संबंध आला व पुढे अनेक वर्षे व्यवस्थापक मंडळावर त्यांनी सातत्याने काम केले. संस्थेच्या स्थापनेपासून एकंदर २२ वर्षे ते खजिनदार व व्यवस्थापक मंडळीचे सभासद होते. पिटकर संस्थेच्या कार्यात असा प्रत्यक्ष भाग घेत असले तरी संस्थेच्या दृष्टीने त्यांची विशेष कामगिरी म्हणजे त्यांच्यामुळे संस्थेला केसरीसारख्या वजनदार व महाराष्ट्रातील जनतेत विशेष लोकप्रिय असलेल्या पत्रात सतत उत्तम प्रसिध्दी मिळाली.

१८९८ साली 'पुनःश्च हरी ओम्' या लेखात लो. टिळकांनी आभार प्रदर्शन करताना केसरीचे 'अनंत मित्र' असा श्लेषात्मक उल्लेख पिटकर यांचा केला होता. केसरीकार रा. कृ. प्र. खाडिलकर यांनी आपल्या 'नवाकाळा' त पिटकर यांची प्रशंसा केली असल्याचेही आढळते. संस्थेचे कार्यवाहपद बरीच वर्षे भूषविलेले एक संस्थापक नरहर महादेव जोशी यांना सार्वजनिक कार्याची विशेष आवड होती. संस्थेची अंतर्गत व्यवस्था चांगली ठेवण्याचे श्रेय पुष्कळ अंशी त्यांनाच आहे.

संस्थेचे पहिले चिटणीस नारायण महादेव बाक्रे यांचा १९४३ साली त्यांचा मृत्यू होईपर्यंत संस्थेशी जवळ जवळ सतत संबंध होता. संस्थेच्या शाखा काढून संस्थेचा विस्तार झालेला पाहण्याचे भाग्य बाक्रे यांना लाभले. तसेच नारायण महादेव बाक्रे, गणेश लक्ष्मण पागे, मुकुंद बाळकृष्ण गुर्जर अशा सेवाभावी कार्यकर्त्यांमुळेच ही संस्था अधिकाधीक सक्षम होत गेली.

**संस्थेच्या स्थापनेची पूर्वपिठीका**

**ग्रंथसंग्रह वृध्दीची वाटचाल :**

विविध क्षेत्रातील नामवंतांना संस्थेत बोलावून परिचय करुन देण्याच्या उपक्रमामुळे संस्थेचा महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गात संस्थेला ग्रंथ देण्याच्या आवाहनाला सुरवातीपासूनच चांगला प्रतिसाद मिळाला. पुढे प्रसिध्द ग्रंथकारांकडे विनंतीपत्र पाठविण्याचा परीपाठ ठेवला होता. ग्रंथकारांस आपण केलेली मदत योग्य ठिकाणी आहे. अशाबद्दल खात्री पटावी म्हणून ह्या विनंतीपत्रास ना. न्या. रानडे, ना. डॉ. भालचंद्र ( भाटवडेकर), रा. ब. वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर, रा. ब. घनश्याम नीळकंठ नाडकर्णी, डॉ. देशमुख, शेट तुकाराम जावजी अशा थोर गृहस्थांचे संग्रहालयाविषयी अभिप्राय जोडण्यात येत असत. विनंतीपत्राचा संग्रहालयास चांगला फायदा झाला. अनेक ग्रंथकारांनी व इतरांनीही संग्रहालयास सातत्याने ग्रंथ दिल्याचे आढळते. पहिल्याच वर्षी ग्रंथ देणाऱ्यात निर्णयसागरचे शेट तुकाराम जावजी, बोलबोधकर्ते व संस्थेच्या स्थापना – समारंभाचे अध्यक्ष विनायक कोंडदेव ओक, प्रो. राजाराम रामकृष्ण भागवत, हरी नारायण गोविंद माडगावकर, शं. बा. मुजुमदार, वासुदेव वामनशास्त्री खरे (मिरज), का. र. मित्र अशा त्या काळातील व पुढे गाजलेल्या नामवंताबरोबरच अनेक सर्वसामान्य लोकांनीही संस्थेला ग्रंथदान केले. मुंबई शहरातील व्यक्ती असल्या तरी बाहेरगावच्या व्यक्तीही कमी नव्हत्या. संस्थेचे संस्थापक गुर्जर, गद्रे, पिटकर, पागे, पुणतांबेकर व पुढे संस्थेच्या कामात विशेष सहभागी झाले श्रीपाद भिकाजी बोरवणकर अशा कार्यकर्त्यांनीही संस्थेला ग्रंथ दिले. संस्थेच्या कामात आत्मीयतेने लक्ष घालणारे एक सभासद आत्माराम रावजी जगताप हेही त्यांच्या मृत्यूपर्यंत संस्थेला ग्रंथ देत असल्याचे आढळते.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला ग्रंथदान करण्याचा हा यज्ञ सातत्याने १९३० पर्यंत मोठ्या प्रमाणावर चालू होता. कवी माधवानुज कृ. अ. केळुसकर, कृष्णाजी आबाजी गुरुजी, अनंत वामन बर्वे, यादव माधव काळे ( यवतमाळ), वि. सी. गुर्जर, श्री. कृ. कोल्हटकर, धोंडो केशव कर्वे, तात्या नेमिनाथ पांगळ ( बार्शी), नारायण नरसिंह फडणीस ( जळगाव), रे. टिळक, सांबमूर्तिराव (तंजावर), ज्यूडा डेविड कार्लेकर, पंडिता रमाबाई, मोरो केशव दामे ( नागपूर), शेट पुरुषोत्तम मावजी, त्र्यं, सी. कारखानीस, दत्तात्रय गोविंद सडेकर (खानापूर),

प्रो. माणिकराव (बडोदे), शेट दिनशा दादाभाई दोरडी ( नवसारी), लो. टिळक, नाथमाधव, डॉ. मौलवी हकीम सूफी मीरमहमद याकुबखान, मनुशी इस्माईल भालदार ( पार्शियन मास्ती, हुबळी), द. वा. पोतदार, धारचे काशिनाथ कृष्ण लेले, सौ. कमलाबाई किबे (इंदूर), डॉ. बेलवलकर, डॉ. प. ल. वैद्य, श्रीमती जनाबाई रोकडे, नरहाशास्त्री जोशी, खरशीकर (सातारा) अशी ही यादी आणखीही वाढवता येईल. पण या त्रोटक नामावलीवरुनही मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा ग्रंथसंग्रह नुसता संख्येनेच समृध्द होत होता असे नव्हे तर, महाराष्ट्रातील व बाहेरील अनेक महाराष्ट्रीयांकडून त्याला हातभार लागला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात विविधक्षेत्रात ख्यातनाम ठरलेल्यांकडून हे ग्रंथ आलेले असल्यामुळे संग्रहाला एक ऐतिहासिक व सांस्कृतिक मोलही प्राप्त झाले आहे. ग्रंथसंग्रहालयात संग्रहालय शाखा प्रथमपासून असल्यामुळे आजही हा अनमोल ठेवा उपलब्ध आहे .

तिसऱ्या वर्षी म्हणजे १९०० – १९०१ साली एका पुस्तकाच्या किंमतीत दोन पुस्तके देण्याविषयी निरनिराळ्या ग्रंथकारांस व प्रकाशकांस वर्तमानपत्रांतून विनंती करण्यात आली. या विनंतीला मान देऊन भाटे आदी मंडळी, शेट तुकाराम जावजी, बळवंत गणेश दाभोळकर, बापू नरसिंह भावे ( अलाहाबाद), चिंतामण रघुनाथ अधिकारी (भडोच), शेट दामोदर सावळाराम, विनायक बाळकृष्ण परांजपे, अनंत केशव चितळे वगैरे दहा बारा गृहस्थांनी व मंडळींनी संस्थेच्या विनंतीला चांगला प्रतिसाद दिला. परचुरे पुराणिक आणि मंडळी या प्रकाशकांनीही १९०५–१९०६ साली संस्थेला ग्रंथ भेट दिल्याचा उल्लेख आढळतो. नियतकालिकांकडे अभिप्राय वगैरेसाठी येणारी पुस्तकेही संस्थेला मिळविण्याचा प्रयत्न होत असे. मुंबईचा इंदुप्रकाश, सुबोधपत्रिका, नागपूरचा देशसेवक, ज्ञानोदय, ख्रिस्ती नागरीक, कोल्हापूरचा विश्वबंधु, संभाजी विजय, कामगार समाचार, अशा अनेक नियतकालिकांनी आपल्याकडे आलेले ग्रंथ संस्थेला देऊन ग्रंथवैभव वाढविण्यास मदत केली. ग्रंथांची मदत करणाऱ्यांत अनेक लहान मोठ्या संस्थाचाही मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाने आपल्याकडची काही पुस्तके संग्रहालयाला देऊन आपल्या वडीलकीचे कर्तव्यच जणू बजावले. डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, बडोद्याची विद्याधिकारी कचेरी, पंढरपूरचे अनाथ बालहत्या प्रतिबंधक गृह, मराठा ऐच्छूक सभा, मुंबई लोअर कुलाबा

को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी, धुळ्याची प्राणिरक्षक संस्थाल कित्तेभंडारी ऐक्यवर्धक मंडळी, गोव्यातील रायबंदरचे शारदा वाचन मंदिर, उस्मानाबादचा आर्यमित्रसमाज, वर्धा जिल्ह्यातील सेलूची नेटिव जनरल लायब्ररी, बळवंत संगीत मंडळी, रंगूनची महाराष्ट्र मित्र मंडळी, समर्थ सेवा मंडळ, नासिक अशा नाना प्रकारच्या संस्थांनी ग्रंथ देऊन संस्थेला उपकृत आणि समृध्दही केले.

भेटीदाखल आलेल्या काही ग्रंथाचाही मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. गोविंद अमृत वैद्य यांनी आपल्या 'प्राचीन भरतभूमी' या ग्रंथाच्या ५० प्रती संस्थेला अर्पण केल्या. रा. सा. नागेश विनायक बापट यांनी 'हरिवरदा' सारखा मौल्यवान ग्रंथ अर्पण केला. 'पुण्याचे रा. रा. हरि नारायण आपटे ह्यांनी एकच पुस्तक अर्पण केले आहे. परंतु त्यामुळे संग्रहालय ह्या शाखेचे नाव सार्थ झाले आहे. कारण ते पुस्तक म्हणजे सन १८१४ साली कलकत्ता मुक्कामी मोडी टैपांनी छापलेले आहे. अगदी जुने पुस्तक ह्या दृष्टीने त्यांची योग्यता अधिक आहे.' हा चौथ्या म्हणजे १९०१–०२ सालच्या अहवालातील उल्लेखही असाच उद्बोधक आहे. जयशंकर नर्मदाशंकर या गुजराती गृहस्थांनी काही शेकड्यांनी ग्रंथ संस्थेस दिले. १८६७ च्या ग्रंथ नोंदणी कायद्याने प्रकाशित झालेली सर्व पुस्तके सरकारकडे जमा होत असत. पण या पुस्तकांची नीट व्यवस्था ठेवली जात नसे. मुंबई विद्यापीठाला ही पुस्तके देऊ केली होती. पण विद्यापीठाने ती घेण्याचे नाकारले. म्हणून सरकारकडे जमा होणारी पुस्तके मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने मागवावीत अशी सूचना त्यावेळचे 'रिपोर्टर ऑन धि नेटिव्ह प्रेस' रा. सा. मोरेश्वर गोपाळ साठे ह्यांनी संस्थेच्या पहिल्या वार्षिक समारंभात (१९ ऑगस्ट १८९९) केली होती. परंतु संस्थेला ह्यात यश मिळाले नाही, असे दिसते. पहिल्याच वार्षिक समारंभात कोणा दातार नावाच्या गृहस्थांनी, 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा उद्‌देश केवळ हिंदू धर्माचीच पुस्तके जमविण्याचा दिसत नसून मराठी तेवढ्या पुस्तकांचा संग्रह करण्याचा दिसतो. तेव्हा ख्रिस्ती लोकांनी लिहिलेली मराठी पुस्तके मग त्यात हिंदुस्थानची निंदा का असेना, संग्रही ठेवणे जरूर आहे. पण याकडे संग्रहालयाच्या व्यवस्थापन मंडळीचे लक्ष गेलेले दिसत नाही.' अशी टीका केली होती. पण समारंभाचे अध्यक्ष न्या. मू. रानडे ह्यांनीच या टीकेला उत्तर दिले की ख्रिस्ती पुस्तकास मुळीच शिवायचे नाही असा

काही या मंडळींचा उद्‌देश नाही. ख्रिस्ती पुस्तकात सगळीच संग्रहणीय नाहीत, असा त्यांचा उत्तराचा आशय होता. नवीन पुस्तकांच्या प्रती जितक्या त्वरेने आणि आस्थेने सरकारी अधिकाऱ्याकडे जातत तितक्याच त्वरेने आणि आस्थेने त्या ह्या संग्रहालयातही याव्या, अशी उत्कंठा चालकांना होती.

ग्रंथाप्रमाणेच नियतकालिकांचा संग्रह करण्याबाबतही प्रथमपासूनच दक्षता घेण्यात आली होती. मिळतील ती नियतकालिके गोळा करुन त्यांचे संच पूर्ण करण्यासाठी मुद्‌दाम प्रयत्न करण्यात आल्याचे आढळते. धन्वंतरी मासिक पुस्ताचे कर्ते भाऊसाहेब उर्फ परशुराम नारायण पटवर्धन यांनी आपल्या मासिक पुस्तकांचे आरंभापासून अखेरपर्यंतचे ६५ अंक संग्रहालयास अर्पण केले. विविध ज्ञानविस्तार मासिकाच्या व्यवस्थापकांनी संग्रहालयात नसलेले निननिराळ्या वर्षांचे सुमारे दिडशे फुटकळ अंक देऊन विविधज्ञानविस्ताराची तीस वर्षे पूर्ण केल्याचा उल्लेख चौथ्या (१९०१–०२) वार्षिक अहवालात आढळतो. याच अहवालात, निर्णयसागर छापखान्याचे मालक शेट तुकाराम जावजी ह्यांच्या देणगीने 'काव्यसंग्रह' पुरा झाल्याचाही उल्लेख आहे. धुळ्याचे समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव यांनी ६७५ मासिक पुस्तके दिली.

संस्थेचा संग्रह समृध्द करण्याच्या प्रारंभीच्या काळातील या प्रयत्नांचे विशेष महत्व आहे. संस्थेला पुढे अनेक नामवंत संग्रह मिळाले. प्रा. अ. का. प्रियोळर, मराठी ग्रंथ–सूचिकार शं. ग. दाते अशा पट्टीच्या ग्रंथसंग्रहाकांनी आपले अनेक ग्रंथ संस्थेला दिले. १९५० साली स्वातंत्र्यवीर सावरकर यांजकडून बहुमोल व दुर्मिळ अशी एकूण १५० पुस्तके मिळाली. मुद्‌दाम दुर्मिळ ग्रंथही मिळविण्यात येत असतात. पण सुरवातीच्या काळात ग्रंथसंग्रह समृध्द करण्याचे, सर्व प्रकाशित ग्रंथ मिळविण्याचे जे प्रयत्न कार्यकर्त्यांनी केले त्याला निराळे महत्व आहे. संस्थेच्या बाल्यावस्थेत अशा जिद्दीच्या प्रयत्नांची गरज असते. सर्वच नवीन ग्रंथ विकत घेणे शक्य होत नसल्यामुळे विशेष खटपट करावी लागत असे. कार्यकर्त्यांनी त्यात कसूर केली नाही. सुमारे ४०० पुस्तकांनीशी सुरु झालेल्या संग्रहालयात पहिल्या वर्षाच्या अखेरीस दीड हजारावर पुस्तके जमा झाली होती. काही पुस्तकांच्या

अनेक प्रती होत्या. तरी सुमारे ५०० पुस्तके संग्रहालय विभागात होती. पाच वर्षानंतर संग्रहालयातील पुस्तकांची संख्या १५७९ वर गेली व वाचनालय विभागात ४६४५ ग्रंथ होते. अर्थात काही पुस्तकांची एकापेक्षा अधिक प्रती होत्या. दहा वर्षानंतर संग्रसंग्रह ८ हजारांवर गेला आणि संग्रहालय विभागात ३२६५ ग्रंथ गोळा झाले. १९१८–१९ साली संस्थेचा एकूण ग्रंथसंग्रह १५००० झाला. यापैकी प्रत्यक्ष खरेदी केलेली पुस्तके अर्थातच मर्यादित होती, रौप्यमहोत्सव १९२४ साली साजरा करण्यात आला. त्यावेळी संस्थेतील ग्रंथांची संख्या १५ हजारांच्या आसपास रेंगाळत असल्याचे आढळते.

अनेक दात्यांचे सहकार्य, वर्गणी याद्वारे प्राप्त होणारा निधी हा संस्थेच्या कार्य विस्तारास अपुरा पडे. अशावेळी आर्थिक अडचण दूर करण्यासाठी संस्थेच्या चालकांनी जे अनेक मार्ग चोखाळले त्यात नाट्यसंस्था, सर्कस कंपन्या यांची मदत मिळविण्यात विशेष कल्पकता दाखविण्यातआली. नाटक मंडळीचा वा सर्कशीचा खेळ मदतीसाठी घेण्याचा एक नवाच उपक्रम चालकांनी सुरु केला. संग्रहालयाच्या चालकांनीच अशा तऱ्हेने अभिनव पध्दतीने साहाय्य मिळविण्याचा उद्योग महाराष्ट्रात प्रथम केला असावा. त्यापूर्वी अशा प्रकारचे प्रयत्न झाल्याचे आढळत नाही. ह्याबाबतीत संस्थेचे एक विशेष क्रियाशील कार्यकर्ते श्री. नथुकाका पुणतांबेकर ह्यांनी विशेष पुढाकार घेतला.हा नवा उपक्रम संस्थेला काही वर्षे तरी चांगलाच उपकारक ठरला. पहिल्याच वर्षी संस्थेला याबाबत चांगले यश मिळाले. नटसम्राट गणपतराव जोशी ह्यांच्या शाहूनगरवासी नाटक मंडळीने आपल्या 'हॅम्लेट' या नाटकाचा प्रयोग बऱ्याच सवलतीने संस्थेच्या मदतीसाठी करुन दाखवला. संस्थेला या प्रयोगाचे एकदम रु. ४८० ची मदत मिळाली. ह्या नाट्यप्रयोगासाठी खुद्द न्या. मू. रानडे, डॉ. नानासाहेब देशमुख, काशिनाथ पांडुरंग परब, दाजीसाहेब खरे इत्यादी त्या काळातील थोर गृहस्थांनी आपल्या सह्या देऊन लोकांना संस्थेची ओळख करुन दिली. न्या. मू. रानडे यांनी प्रयोग आपल्या आश्रयाखाली करण्यास परवानगी देऊन 'अखिल आर्यभूमीत गाजत असलेल्या आपल्या थोर नावाचा उपयोग करून घेण्यास परवानगी देऊन संस्थेला विशेष प्रोत्साहन दिले.' दाजीसाहेब खरे यांनी संस्थेच्यावतीने नाटक मंडळीचे भर नाट्यगृहात आभार मानले, वैद्य

बंधूंनी तिकिटे विकण्याचा सर्व बोजा उचलला. शाहूनगरवासी मंडळीने पुढे १९०३–०४ सालीही असाच नाट्यप्रयोग करून संस्थेला मदत केली. यावेळी मुंबई गॅस कंपनीच्या युरोपीयन मॅनेजरने नाटकासाठी फुकट गॅस दिला, असा उल्लेख अहवालात आढळतो. किर्लोस्कर नाटक मंडळी, महाराष्ट्र नाटक मंडळी, स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी यांनीही संस्थेसाठी नाट्यप्रयोगाद्वारा साहाय्य केले. काही क्लबांच्या हौशी नटांनीही असेच नाट्यप्रयोग करून संस्थेला साहाय्य केले. नाटक मंडळ्यांप्रमाणे शेलार यांची इंटरनेशनल सर्कस, देवल सर्कस इत्यादी सर्कस कंपन्यांनीही संस्थेस मदत केली. पुढच्या काळात चित्रपटांच्याव्दारा असाच पैसा उभारण्याचा प्रयत्न झाल्याचे आढळते.

**पहिला वार्षिक समारंभ :**

संग्रहालयाचा वार्षिक समारंभ पहिल्या वर्षापासूनच विशेष गाजू लागला. दरवर्षी या समारंभाला वाढत्या संख्येने लोक हजर राहू लागले होते. यामुळे समारंभासाठी मोठी जागा घ्यावी लागे. मराठी ग्रंथसंग्रहालयाचा समारंभ म्हणजे मराठी भाषेचा उत्सव असे लोक मानू लागतील, असा आशावाद चौख्या वर्षीच्याच अहवालात प्रगट केल्याचे आढळते. सुरवातीला वार्षिक समारंभाला एक अध्यक्ष व एक व्याख्याता असे दोन पाहूणे बोलविण्यात येत. पहिल्या वर्षीचा वार्षिक समारंभ न्या. मू. रानडे ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. ह्या समारंभात रामचंद्र भिकाजी गुंजीकर ह्यांचे मराठी भाषेसंबंधी थोडक्यात भाषण झाले. कानडी भाषेत मराठी भाषेला श्रेष्ठ लोकांची भाषा असे म्हणतात. तेव्हा मराठी भाषेला थोरवी मोठी आहे ही गोष्ट लक्षात घेऊन महाराष्ट्रीयांनी आपल्या मातृभाषेच्या अभिवृध्द्यर्थ अभिमानपूर्वक झटले पाहिजे,अशा आशयाचे श्री. गुंजीकर ह्यांचे प्रतिपादन होते.

प्रस्तुत कालखंडात सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, प्रा. श्री. नी. चाफेकर, डॉ. मो. गो. देशमुख, ल. रा. पांगारकर, रा. सा. ज. ग. आगाशे, प्रा. बाळाजी प्र. मोडक, ले. क. कान्होबा र. कीर्तिकर, लो. बा. गं. टिळक, विष्णू मोरेश्वर महाजनी, रा. सा. पावगी, चिं. वि. वैद्य, हरी नारायण आपटे हे अध्यक्ष वा व्याख्याते म्हणून वार्षिक समारंभात उपस्थित असल्याचे आढळते. १९११ सालच्या समारंभात हरी नारायण आपटे ह्यांचे 'विदग्ध वाङ्मय' या विषयावर व्याख्यान झाले.

**नियामक मंडळ :**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची अशी विविध मार्गांनी वाढ करण्याचे प्रयत्न होत असताना संस्थेच्या कारभाराला व्यवस्थित स्वरुप देण्याकडेहि दुर्लक्ष करण्यात आले नाही. संस्था स्थापन होण्यापूर्वी संस्थापकांच्या बैठका झाल्या त्यात पहिल्याच बैठकीत नियमांचा खर्डा तयार करण्याकरता एक मंडळी नेमण्यात आली होती. व दुसऱ्या बैठकीत १९ नियम पसंत करण्यात आले. संस्था कार्यकर्त्यांच्या खटपटीमुळे वाढत असली तरी संस्थेला शिस्त आणि स्थायी स्वरुप येण्यासाठी नियमांच्या मर्यादा घालणे आवश्यक असते. दुसऱ्यावर्षी वर्गणीदारांचया व व्यवस्थापक मंडळीच्या सभासदांच्या साधारण सभेत मांडून त्यांना संमती घेण्यात आली. यामुळे त्यांना अधिकृतता प्राप्त झाली. पुढे तिसऱ्या वर्षी नियमातील तरतुदीनुसार नियामक मंडळ स्थापन करण्यात आले.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय ह्या संस्थेच्या आजपर्यंतच्या एकंदर इतिहासातील महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे संग्रहालयाच्या इमारतीची कोनशिला बसविण्याचा समारंभ ता. १७ डिसेंबर १९१० रोजी झाला. ही होय. हा समारंभ श्री. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या हस्ते फारच थाटाचा व अपूर्व असा झाला. समारंभास संस्थेचे आश्रयदाते, तहहयात वर्गणीदार, वर्गणीदार व इतर मिळून हजारो महाराष्ट्रीयांचा जमाव जमला होता. ह्यावेळी श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांस संस्थेच्या वतीने मानपत्र अर्पण करण्यात आले. महाराज सरकारनी मानपत्रास उत्तर देताना मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासारख्या संस्थेची उपयुक्तता कितीआहे ते सांगून संस्थेच्या कामाबद्दल आपली सहानुभूती व्यक्त केली व संग्रहालयाच्या इमारत फंडासाठी पांच हजार रुपयांची उदार देणगी त्यांनी दिली.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड ह्यांच्या देणगीमुळे संस्थेची इमारत, काही काळाने का होईना पण उभी राहील असा आत्मविश्वास कार्यकर्त्यांत निर्माण झाला. इचलकरंजीकर श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांनी इमारत फंडासाठी रु. ५०० देणगी दिली. तसेच संस्थेच्या हितचिंतकांनी, वर्गणीदारांनी व इतर मराठी जनतेनेही पाच-दोन रुपयांपासून आपल्या ऐपतीप्रमाणे इमारत निधीस हातभार लावला. संस्थेला भरपूर देणगी देऊन इमारत बांधून देण्याची तयारी दामोदरास सुखाडवाला यांनी दाखविली होती. परंतु मराठी ग्रंथसंग्रहालय

सर्वास मोफत ठेवावे अशी त्यांची प्रमुख अट होती. संग्रहालय सर्वात मोकळे करावयाचे म्हणजे मग ते मराठी ग्रंथालय राहिले नसते व एका व्यक्तीचे नामाभिधान त्याला कदाचित द्यावे लागले असते. म्हणून चालकांनी ही देणगी स्विकारली नसावी. नाटक मंडळ्या, सर्कशी, पुण्याच्या स्टुडंट सोशल क्लबासारख्या संस्था, ह्यांनीही इमारत फंडासाठी प्रयोग करुन मदत दिली. नाटक व सर्कशीच्या प्रयोगांमुळे सुमारे रु. २५०० ची मदत मिळू शकली. नाटक व सर्कस कपन्यांनी संग्रहालयाला केलेली ही मदत गौरवास्पद होती.

तेव्हा, थोड्या मोठ्या देणग्या व सर्वसामान्य जनतेच्या अनेक छोट्या देणग्या आणि भरीला कर्ज उभारून संस्थेची दोन मजल्यांची इमारत उभी राहिली. अर्थात मूळ संकल्प चार मजली इमारतीचा होता. पण निधी अभावी दोन मजल्यांवरच काम थांबविले.

| | |
|---|---|
| वास्तूस जागा | ६०८१–१२–१ |
| वास्तूस मालमसाला आणि बांधणावळ, मजुरी व देखरेखसुध्दा | १८२२४–१०–० |
| नळकाम करणावळ | ६८१–१५–० |
| धुराचे दिवे आणणावळ | ४०९–९–११ |
| व्याज (ठेवीच्या रकमेचे) | २६६–१०–० |
| | २५६६४–९–० |

**उद्घाटन समारंभ :**

इमारत पूर्ण झाल्यावर श्रावण शु. ११ शके १८३४ ह्या दिवशी मंगल वास्तूशांती व पुढे विजयादशमीच्या मुहूर्तावर संग्रहालयाचे नव्या इमारतीत स्थलांतर करण्यात आले. इमारतीच्या उद्घाटनाचा लौकीक समारंभ ७ नोव्हेंबर १९१२ या दिवशी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याच शुभहस्ते पार पाडला. सयाजीरावांच्या निश्चित आश्वासनामुळे व त्यांच्या मदतीमुळे इमारत बांधण्याच्या कामात जोरदार चालना मिळाली. इमारतीची कोनशिलाही त्यांच्याच हस्ते बसविण्यात आली व आता त्यांच्याच हस्ते 'श्रीशारदा मंदिरा' चे महाव्दार उघडण्याचा अपूर्व थाटाचा असा लौकिक समारंभ झाला.

उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी, ''मुंबईतील बहुतेक महाराष्ट्र समाज, साक्षर स्त्री – पुरुष आणि धनिक लोक समारंभासांठी उभारलेल्या मंडपात आणि पुढील खुर्च्या टाकलेल्या

विस्तृत जागेत एकत्र आलेला होता. समारंभोत्तरही दीपोत्सव कायम ठेवण्यात येऊन सर्वांस पानसुपारी, अत्तर गुलाब आणि पुष्पगुच्छ अर्पून त्या दिवसाचा तो अपूर्व आनंदोत्सव दहा घटिका रात्रीनंतर पुरा करण्यात आला.

श्रीमन्ममहाराज सायाजीरावांनी पुस्तकसंग्रहाचे महत्व सर्व लोकांस समजण्यासारखे मोठे उपयुक्त आणि स्वानुभवाने व कळकळीने ओथंबलेले असे उपदेशपर भाषण त्या प्रसंगी केले, आणि या संस्थेच्या चालकांस केलेल्या कामाबद्दल योग्य शब्दांनी गौरवून पुढेही संस्था उत्कर्षाच्या शिखरास पोचेपर्यंत आवश्यक असणाऱ्या त्यांच्या श्रमसाहसास आपली पूर्ण सहानुभूती असल्याचे अभिवचन देऊन अत्यंत उत्तेजीत केले. महाराजांनी समारंभ पुरा करताना मोघमात आपण काही देणग्या देणार असल्याचे कळवून सर्व लोकांचा धन्यवाद संपादिला. त्याप्रमाणे एक हजार रुपये रोख आणि १२५ पुस्तके इतका लाभ महांराजांकडून पुढे अत्यल्प अवधित ह्या संस्थेस झाला. शिवाय गायकवाड सरकारच्या कलाभुवनात महाराजांच्या व कलाभुवनाच्या नावाला साजेल अशी सुंदर चौफेर बसविलेली श्रीमंत सयाजीरावांची एक प्रकाशगृहीत प्रतिमेचीहि प्राप्ति संस्थेस लवरकरच झाली.

सयाजीरावांच्या देणग्यांखेरीज संस्थेला उपयोगी अशा वस्तूंच्या इतरही देणग्या मिळाल्या बँक सिल्व्हर कंपनीकडून 'मंदिराचे महाव्दार' उघडण्यास आवश्यक असणारी व श्रीमंत सयाजीराव यांच्यासारख्या भूपतीच्या हातात देण्यास योग्य अशी रुप्याची किल्ली आली. जी. बी. नाईक आणि कंपनी व हरी केशव गोखले आणि कंपनी ह्या दोघा सुप्रसिध्द घड्याळजींकडून मंदिराच्या वाचन मंडळात ठेवण्यास एक आणि वरील सभास्थान ठेवण्यास एक अशी दोन मोठी घड्याळे मिळाली.

मंदिराचे बाह्यांग त्यास साजेल असेच मनोहर असून त्याच्या वरील भागात मयूरासना शारदादेवी आपल्या मधुर वीणावाणीने सरस्वतीभक्तास आपणाकडे आकर्षित आहे असे एक शुभ्र प्रस्तराचे कोरीव चित्र आहे. आंतील बाजूस तळमजल्यावर वृत्तपत्रे, मासिके वगैरे वाचनालय आहे. सभोवार पुस्तकांची कपाटे आहेत. ह्या मजल्याच्या वरील भागावर एक चौफेर गॅलरी असून तिचा पुढला भाग सुंदर तसबीरींनी शृंगारेला आहे. ह्यांत दर्शनी आपले परमपूज्य सम्राट पंचम जॉर्ज व श्री. महाराज सयाजीराव गायकवाड ह्यांची चित्रे असून

त्यांच्यामध्ये शारदेचे चित्र आहे. व इतर चित्रे महाराष्ट्रातील प्रसिध्द ग्रंथकार व संग्रहालयाचे आश्रयदाते ह्यांची आहेत. ही गॅलरी वाचनालयातील, पुस्तकांच्या कपाटांनी भरून गेली आहे. मजल्यावरील संग्रहालय शाखेच्या पुस्तकांची कपाटे आहेत व येथेच पुढे एक 'ग्रंथकार गॅलरी' काढण्याचा चालकांचा विचार आहे. अगदी शेवटच्या मजल्यावर रंगीबेरंगी काचांच्या तुकड्यांनी खचलेल्या भुईची एक सुंदर गच्ची आहे. संध्याकाळी दिसणारा भोवतालचा भव्य देखावा समोरच असणाऱ्या शांत व गंभीर रत्नकराची सायंकालीन रमणीय शोभा व तेथून येणाऱ्या थंड वायूंच्या लहरी, इत्यादिकांच्या योगाने वाचकास आनंद झाल्यावाचून राहणार नाही. लायब्ररी मिसलेनी, नोव्हेंबर १९१२ मध्ये वरील प्रमाणे या इमारतीचे वर्णन करण्यात आले होते. इमारतीचे सर्व इंजिनिअरींग काम सदाशिव नानाभाई हाटे ह्यांनी संग्रहालयासाठी विनामूल्य करुन दिले. बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या सक्रिय सहाय्यामुळेच ग्रंथालयाची योजनापूर्वक वाढ करुन आपल्या संस्थानात एक नवा आदर्श अगोदरच त्यांनी निर्माण केला होता व आता मराठी ग्रंथालयाला मदतीचा हात देऊन त्यांनी ग्रंथालय चळवळीला एक प्रकारे चालना दिली.

इमारत झाल्याचा आनंद सर्वांना वाटला. जिद्दीने केलेले प्रयत्न यशस्वी झाले. संस्थेच्या स्थैर्यात भर पडली. तातडीचे जागेसारखे प्रश्न सुटले व पुढील वाढीचा आणि नवे उपक्रम हाती घेण्याचा मार्ग मोकळा झाला. ह्या दृष्टीने इमारत पूर्ण होण्याचा टप्पा महत्वाचा ठरतो. पण एवढ्याने सर्व काही निष्कंटक झाले असे नाही. सार्वजनिक संस्थांपुढे समस्या नाहीत, असे क्वचितच घडते. पहिले प्रश्न सोडवून सुटकेचा नि:श्वास सोडावा तो नव्या अडचणी स्पष्ट होऊ लागतात. परंतु हेही खरे की, समस्या सोडविता सोडविताच संस्थेची प्रगती होत असते. किंबहूना समस्या निर्माण होणे हे संस्थेच्या प्रगतीचे एक लक्षमण मानावे लागेल. इमारत झाल्यामुळे जागेची डोकेदुखी संपली. पण इमारतीसाठी झालेला कर्जाचा बोजा संस्थेवर चढला. शिवाय नव्या इमारतीला साजेसे सामानसुमान आणि पुस्तक संग्रह असणे आवश्यक झाले. या उणीवांची जाणीव चालकांना सतत बोचत होती. संस्थेच्या वार्षिक अहवालात याबाबत पुढील गाऱ्हाणे मांडलेले आढळते–

''तथापि संस्थेसाठी उभारलेल्या 'श्री शारदा मंदिरा'स झालेल्या खर्चापैकी अजून रु. ४००० (चार हजारांची फेड) व्हावयाची आहे. दुसरे 'श्री शारदा मंदिर' ह्या बड्या नावास शोभण्यासारखे सामानसुमान आणि पुस्तक संग्रह आमच्या जवळ नाही ही उणीव भरून काढण्यास निदान ३००० रुपये तरी लागतील. तिसरी गोष्ट आजपर्यंतच्या आमच्या अनुभवाने असे ठरल्यासारखेच आहे की ह्या संस्थेचा चालू (प्रतिमासिक) खर्च वर्गणीदारांकडून येणाऱ्या पैशावर काही भागत नाही, तेव्हा तो खर्च अव्याहत चालण्यास काही कायमचे उत्पन्न हवे, तसे उत्पन्न होण्यास ' श्री शारदा मंदिरा'च्या व्याप्तीविषयी जो आमचा मूळचा संकल्प होता त्याप्रमाणे झालेल्या कामावर अजून दोन मजले चढले पाहिजेत. त्यास रुपये ७००० तरी लागतील.''

स्वत:ची इमारत प्राप्त होताच ग्रंथालयास नव नव्या उपक्रमास चालना प्राप्त झाली. ग्रंथालयाच्या इमारतीची दुरुस्ती, विस्तार व इतर खर्च अशा अनेक अडचणीना सामोरे जात असतानाच तिसरा मजला बांधण्याचे काम १९५३–५४ साली हाती घेणे शक्य झाले. बांधकामासाठी सुमारे अठरा हजार रुपये खर्च आला. यापैकी दहा हजार रुपयांची रक्कम संस्थेचे भाडेकरू प्रजा सोशालिस्ट पक्ष यानी आगाऊ भाडे म्हणून संस्थेकडे जमा केली. नवीन मजला मराठी संशोधन मंडळासाठी देण्यात आला. प्रजा सोशालिस्ट पक्षाबरोबर ठरविलेल्या योजनेनुसार त्याची कचेरी तळमजल्यावर हलविण्यात आली. वरील तीनही मजले संग्रहालयाच्या उपयोगासाठी राहिले.

संग्रहालयाची स्वत:ची इमारत उभी राहिली, पण त्यामुळे सर्व अडचणी संपल्या नाहीत, उलट इमारतीची वाढ व दुरुस्ती यांच्याच विवंचना प्रामुख्याने कराव्या लागल्यामुळे इतर महत्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष झाले. या पार्श्वभूमीवर १९१७–१८ सालच्या अहवालाचा समाचार घेताना लायब्ररी मसेलनी नियतकालिकांच्या जानेवारी – एप्रिल १९११ च्या अंकात खालील टीका आढळते.

''फक्त ६७६६ ग्रंथसंख्या ही गोष्ट संस्थेच्या महत्वाकांक्षेला कमीपणा आणणारी आहे. ग्रंथसंग्रहालयाच्या प्रस्तुत इमारतीवर मजल्यावर मजले चढविण्याची हाव धरुन धनिकांकडून द्रव्य मिळविण्यापेक्षा मराठी भाषेतील अनेक जुने ग्रंथसंग्रह मिळविण्याकडे जर अधिक लक्ष

दिले तर संस्थेजवळ संपूर्ण मराठी ग्रंथसंग्रह उपलब्ध होऊन एक आदर्श पुस्तकालय म्हणून त्याची ख्याती होईल.

महाराष्ट्राचे राष्ट्रीय ग्रंथसंग्रहालय होण्याकडे मराठी ग्रंथसंग्रहालयाने जर विशेष लक्ष दिले तर निव्वळ इमारतीचा डोलारा करण्यापेक्षा अधिक प्रशंसनीय होईल.''

**ग्रंथसंग्रह :**

संस्थेची आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक नसल्यामुळे इमारत होऊन भाड्याचा खर्च कमी झाला तरी ग्रंथ हे जे संस्थेचे खरे धन ते अधिक संपन्न करण्यासाठी भरपूर पैसा खर्च करणे याही कालखंडात शक्य झालेले दिसत नाही. प्रसिध्द होणारी नवी पुस्तके खरेदी करण्याबरोबरच जुन्या ग्रंथाचा शोध घून ते मिळविणेहि आवश्यक होते.मराठी ग्रंथसंग्रहालय हे नाव सार्थ करावयाचे तर यासाठी आवर्जून प्रयत्न व्हावयाला हवे होते. पण संग्रहालयाचा पुस्तक खरेदीवरील खर्च लक्षात घेतला तर असे प्रयत्न झाल्याचे आढळत नाही. चालकांच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट होती, एवढे आर्थिक बळ उभे करणे अशक्य होते, ही कारणे सहज ध्यानात येण्यासारखी आहेत. पण यामुळे वस्तुस्थिती बदलत नाही. इमारत झाल्यावर पहिल्याच वर्षी म्हणजे १९१२–१३ साली पुस्तक खरेदीवर रु. ३२६ खर्च करण्यात आल्याचे आढळते. त्या काळातील मराठी ग्रंथांची झालेला हा खर्च आहे हे लक्षात घेतले की, त्याचा अपुरेपणा स्पष्ट होतो. त्या काळातील मराठी ग्रंथांची निर्मिती अगदी मर्यादित होती हे ध्यानात घेतले तरी ग्रंथसंख्येत पडणारी भर अपुरीच होती. ग्रंथखरेदीच्या रकमेत पुढे सालोसाल जी वाढ झाली तीही अगदी थोडी होती. १९१७–१८ साली पुस्तक खरेदीवर रु. ३३८ खर्च पडलेले आढळतात, तर १९२३ साली म्हणजे रौप्यमहोत्सवी वर्षात ग्रंथखरेदी रु. ४७२ वर गेली होती. यामुळे ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी ग्रंथदान मिळविण्याची मोहिम याही काळात नेटाने चालवावी लागली. सुदैवाने तिला प्रतिसाद चांगला मिळत गेला. सुरुवातीच्या कालखंडात ज्या अनेक थोरांचा उल्लेख केला होता त्यांच्याकडून ग्रंथ सतत मिळत राहिलेच. शिवाय इतर सर्वसामान्य लोक व संस्था यांनीही ग्रंथदान करुन संस्थेचा संग्रह समृध्द करण्याला हातभार लावला. भास्करराव जाधव, शिवरामशास्त्री गोरे ( परभणी), ल. ब. भोपटकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, प्रा. श्रीपाद कृष्ण बेलवलकर, श्री. बा. रानडे,

य. दि. पेंढारकर ( कवी यशवंत), ग. त्र्यं. माडखोलकर, यवतमाळचे संशोधक य. खु. देशपांडे, ब्राह्मणपत्रिकेचे संपादक वा. दा. मुंडले अशी काही नवी नावे या संदर्भात सांगता येतील.

पण १९१४–१५ सालच्या अहवालात नवीन मोजणीत गहाळ झालेली पुस्तके गाळून वाचनालय शाखेत ५०३० व संग्रहालय शाखेत ७७९९ ग्रंथ असल्याची नोंद आढळते. पुढे १९१८–१९ सालच्या अहवालात संग्रहालयात सुमारे ८००० व वाचनालयात सुमारे ७००० ग्रंथ असल्याची नोंद आढळते. दोन्ही शाखा मिळून अधिक प्रती जवळजवळ १००० होत्या. संग्रहालयात येणाऱ्या नियतकालिकांची संख्याही भरपूर वाढल्याचे आढळते. यात दैनिके, साप्ताहिके, मासिके इत्यादींचा समावेश होता. मराठी दैनिकांबरोबरच क्रॉनिकल धरून पाच दैनिके संग्रहालयात येत असत. साप्ताहिके, पाक्षिके ह्यांचा भरणा अर्थातच अधिक होता. ही नियतकालिके मुंबई बाहेरील निरनिराळ्या जिल्ह्यांतून व बडोदे, ग्वाल्हेर अशा मराठी संस्थानांतूनही येत असत. यापैकी काही संस्थेला मोफत मिळत तर काही निम्मे किंमतीने मिळत. १९२३ साली ३३ वृत्तपत्रे म्हणजे दैनिके, साप्ताहिके व पाक्षिके व ५७ मासिक पुस्तके संग्रहालयात येत होती. ह्यात १९२३ सालीच सुरू झालेल्या 'नवाकाळ' दैनिकाचाही समावेश होता. क्रॉनिकल या इंग्रजी दैनिकाप्रमाणे काही इंग्रजी मासिकेही संग्रहालयात ठेवण्यात येत असत.

**रौप्य महोत्सव :**

प्रस्तुत कालखंडातील व संस्थेच्या जीवनातीलही एक विशेष उल्लेखनीय व अभिमानाची घटना म्हणजे रौप्यमहोत्सव समारंभ. लहानशा प्रमाणावर व सीमित साधनांनी केवळ सार्वजनिक काम करण्याची आणि त्यासाठी वाटेल ते कष्ट घेण्याची नि:स्वार्थी शक्ती हेच त्यांचे भांडवल होते. अशा तरुणांनी संग्रहालय स्थापन केले. केवळ मराठी पुस्तकांचे ग्रंथालय व अत्यल्प वर्गणीला लोकांना वाचण्यासाठी पुस्तके उपलब्ध करुन देणे अशी त्या काळात काहीशी अव्यहार्य वाटणारी कल्पना पुढे ठेवून संस्था अस्तित्वात आली. यामुळे संस्थेच्या भवितव्याविषयी सर्वसामान्य लोकात साशंकता होती. न्या. मू. रानडे यांनी ही संस्था पुढे श्रेष्ठपदास चढेल असा आशीर्वाद पहिल्याच वर्षी दिला असला तरी लोकांच्या

मनातील साशंकता अगदीच अनाठायी नव्हती. म्हणून संस्था अव्याहत २५ वर्षे चालू राहिली व तिला बरेच स्थैर्य प्राप्त झाले, ही घटना नि:संशय अभिमानास्पद होती. संस्थेच्या जीवनात पंचवीस वर्षांचा काळ हा फार मोठा काळ नव्हे. पण छोट्याशा बीजाचे रोप अंकुरले व त्याने मूळ धरले, ह्याबद्दल आनंद वाटणे स्वाभाविकच होते. या दृष्टीने रौप्यमहोत्सव समारंभ हा संस्थेच्या जीवनातील एक महत्वाचा टप्पा ठरतो.

१९२३ साली संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाली या निमित्त २६ व २७ एप्रिल १९२४ रोजी रौप्यमहोत्सव त्या वेळचे केसरीकार साहित्य सम्राट न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली थाटाने पार पडला. पहिल्या दिवशी वनिता विश्राम सभागृहात मुख्य समारंभ सायंकाळी पार पडला. संस्थेच्या नियामक मंडळाचे त्या वेळचे अध्यक्ष डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख, उपाध्यक्ष यशवंत विष्णू नेने, व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष रा. ब. दामोदर गणेश पाध्ये आणि उपाध्यक्ष प्रो. पांडुरंग वामन काणे ह्यांची भाषणे झाली. रौप्यमहोत्सव समारंभाचे प्रमुख पाहुणे तात्यासाहेब केळकर ह्यांचेही मुख्य भाषण याचवेळी झाले. संस्थेचे एक चिटणिस अंबादास गोपाळ पुणतांबेकर यांनी संस्थेच्या स्थापनेपासूनचा २५ वर्षांचा त्रोटक इतिहास सादर केला. दुसऱ्या दिवशी नाना शंकरशेट यांच्या वाड्याच्या आवारात जाहिर सभा झाली. त्याच दिवशी रात्री संस्थेच्या जागेत मास्तर कृष्णराव यांचे सुश्राव्य गायन झाले.

परंतु या महोत्सवातील एक विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाराष्ट्र सारस्वतकार विनायक लक्ष्मण भावे यांचे ‘‘ महाराष्ट्र भाषा सरस्वतीच्या महालातील एक अज्ञात दालन’’ या विषयावर झालेले व्याख्यान ही होय. त्यांच्या या व्याख्यानाला दुहेरी महत्व होते. मराठी ग्रंथसंग्रहालयांचे आद्य प्रवर्तक या दृष्टीने रौप्यमहोत्सवाच्या प्रसंगी संग्रहालयाने कै. भावे यांचा महनीय प्रवक्ते म्हणून केलेला हा सन्मान यथोचित होता. खुद्द त्यांनाही या सन्मानाची पूर्ण कल्पना होती. व्याख्यानाच्या सुरवातीसच त्यांनी याबद्दल आनंदोद्‌गार काढले होते. या व्याख्यानाचे दुसरे जे महत्व होते ते त्यांच्या विषयात होते. महानुभव पंथाची आणि त्या पंथातील ग्रंथकारांनी निर्माण केलेल्या प्रचंड व मौल्यवान वाङमयाची माहिती महाराष्ट्राला जाहिरपणे या व्याख्यानामुळेच पहिल्या प्रथम मिळाली.

## प्रगतीचे टप्पे : १९२४-२५

संग्रहालयाचा रौप्यमहोत्सव मोठ्या थाटामाटाने साजरा झाला व संस्थेच्या जीवनातील प्राथमिक टप्पा पूर्ण होऊन ती अधिक जोमाने पुढे जाईल अशी अपेक्षा होती. १९३० च्या सुमारास एकंदर सर्वच क्षेत्रात जी मंदीची लाट उसळली तिचेही प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम संस्थेला सोसावे लागले. देशातील एकंदर राजकीय परिस्थितीने व राजकीय चळवळीने निराळे वळण घेतले होते. शिवाय मुळातच संस्थेची आर्थिक परिस्थिती केव्हाच भक्कम नव्हती. आर्थिक अडचणींना तोंड देतच संस्थेला आतापर्यंतची वाटचाल करावी लागली होती.

रौप्यमहोत्सव समारंभ झाल्यावर, व्यवस्थापक मंडळावरील त्रैमासिक वर्गणीदारांच्या दोन प्रतिनिधींनी ६ नोव्हेंबर १९२४ च्या 'इंदुप्रकाश' दैनिकात संस्थेच्या एका सेक्रेटरीकडे २०० रुपये पडून असल्याची तक्रार केली. याच 'ज्युबिलीच्या वेळी काही उजेडात न येण्यासारख्या गोष्टी घडल्या' असेही म्हटले होते. सेक्रेटरीचे भांडण होऊन त्याचा परिणाम संस्थेच्या व्यवस्थेवर झाला. उत्सवात काही पाहुण्या वगैरेंच्या गैरसोयी झाल्या, अशाही तक्रारी झाल्या. अर्थात व्यवस्थापक मंडळाच्या सभेत तक्रार करणाऱ्या सभासदांना आपले म्हणणे पुराव्यानिशी सिध्द करता आले नाही. पण संस्थेच्या कारभारातील पूर्वीचा एकोपा कमी झाल्याची सूचना ह्या प्रकारातून मिळते, असे म्हटले पाहिजे. संस्थेच्या कारभारात जातीय तेढीलाही कळत नकळत थोडाफार वाव मिळत असल्यामुळे त्याचा परिणाम कार्यावर झाला. संस्थेच्या निवडणूकीत अमुक एका जातीचे वर्चस्व ठेवले जात असल्याच्या तक्रारीला वाव मिळावा अशी थोडीफार परिस्थिती त्या काळात असल्याचे संस्थेचे कार्यवाहपद अनेक वर्षे सांभाळलेल्या एका जुन्या कार्यकर्त्यांने ही सूचित केले. एक पुणतांबेकर सोडले तर इतर अनेक कार्यकर्ते इतर संस्थात ही काम करीत. यामुळेही संस्थेच्या कार्यावर अनिष्ट परिणाम झाला. अशा आर्थिक अडचणीला तोंड देत ग्रंथालय वाचकाभीमुख सेवेस सज्ञच राहिले.

मराठी ग्रंथसंग्रहालय, संग्रहालयातील नवे जुने ग्रंथ व ग्रंथकार यांच्याविषयी आस्थेने चर्चा करणारे वाङमय सेवा मंडळ, मराठी भाषेच्या अभिवृध्दीस्तव सर्व महाराष्ट्रभर चळवळ

करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेसारखी विव्दत्सभा व महाराष्ट्र वाङमयाचे अभ्यासकांची परीक्षा अशा या वेगवेगळ्या दिशेने महाराष्ट्र भाषादेवीची उपासना करणाऱ्या संस्थांचा आमच्या व संग्रहालयात समावेश झाल्यामुळे मध्यवर्ती संग्रहालयाला महाराष्ट्र भाषा मंदिराचे (Academy of Maharashtra Literature) स्थान प्राप्त झाल्याबद्दल याच्या सर्व हितचिंतकास अत्यंत आनंद वाटेल अशी खात्री आहे.

संग्रहालयाच्या प्रवर्तकाचे हे स्वप्न म्हणजे अडचणी असूनही संग्रहालयाच्या उज्ज्वल भवितव्याची एकप्रकारे ग्वाहीच होती. संस्थेत शारदीय व्याख्यानमाला सुरु झाली होती. १९३५ साली हेमंत व्याख्यानमाला सुरु करण्यात आली. ही व्याख्यानमाला न्या. मू. तेलंग यांनी पूर्वी चालविली होती व ती त्या काळात गाजलीही होती. पण नंतर ती बंद झाली होती. आता संग्रहालयाच्या नव्या तरुण कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन व्याख्यानमाला पुन्हा सुरु केली. 'नवाकाळ'कार कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांच्या हस्ते १३ जानेवारी १९३५ रोजी मालेचे उद्‌घाटन झाले. त्याचवेळी ग्वाल्हेरचे श्रीमंत चंद्रोजीराव आंग्रे यांनी दिलेल्या लो. टिळकांच्या अर्धपुतळ्याचा अनावरण समारंभही श्री. खाडीलकर यांच्या हस्ते पार पडला. खाडिलकर यांचे 'गीतारहस्य' या विषयावर भाषण झाले. या मालेत भा. वि. वरेरकर, दिनकर शास्त्री कानडे, डॉ. श्री. व्यं केतकर इत्यादींची व्याख्याने झाली. या मालेतील व्याख्यानांचे विस्तृत वृत्त वृत्तपत्रात देण्याचे काम व्यवस्थापक मंडळीचे एक उत्साही सभासद श्री. वासुदेव विष्णु भट यांनी अत्यंत तत्परतेने व निरलेपणे केले. या मालेप्रमाणेच मराठी भाषेच्या अध्यापकाची जागा डेक्कन कॉलेजात कमी करण्यात आल्याबद्दल सरकारचा निषेध करण्यासाठी ७-५-१९३३ रोजी झालेल्या जाहिर सभेत संस्थेने प्रमुख भाग घेतला होता. प्रासंगिक व्याख्यानमाला, वाङमयसेवकांच्या पुण्यतिथ्या वगैरे साजरे करण्याचा उपक्रम धडाडीने सुरु करण्यात आला.

याच बिकट कालखंडात मो. भा. तथा बापूसाहेब भाटवडेकर हे संस्थेचे १९३० साली कार्याध्यक्ष झाले. बापूसाहेबांच्या मार्गदर्शनाचा संस्थेला दीर्घकाळ लाभ मिळाला व संस्थेला त्याचा फायदा झाला. त्यांचे वडील सर डॉ. भालचंद्र भाटवडेकर यांचे संस्थेच्या सुरवातीपासून मार्गदर्शन लाभले. त्याचाच कित्ता बापूसाहेबांनी गिरवला. वै. ल. पेंडसे, वि. गो. फाटक,

वा. दा. गोखले, ना. म. बापट व वासुदेव विष्णू भट हे तरुण कार्यकर्ते संस्थेच्या कार्यात आत्मीयतेने भाग घेऊ लागले होते. पेंडसे व फाटक तर कार्यवाहपदाची धुरा सांभाळू लागले होते. व भट व्यवस्थापक मंडळीचे सभासद होऊन ग्रंथ मोजणीपासून व्याख्यानाचे वृत्तांत लिहिण्यापर्यंत अनेक कामे करु लागले होते. या कठीण कालखंडात संस्थेला मिळालेले हे नवे कार्यकर्तेच कारभारात विशेष पुढे आले.

**प्रगतीचे टप्पे : १९३६–५०**

संग्रहालयाच्या जीवनात साधारणतः १९२८ सालापासून सुरू झालेला आणीबाणीचा काळ मागील कालखंडाअखेर म्हणजे १९३५ पर्यंत तर चालू राहिलाच, पण प्रस्तुतच्या कालखंडातही पहिली सुमारे पाच सहा वर्षे त्याचे दुष्परिणाम कायम राहिले. आर्थिक अडचणींमुळे व जुने कार्यकर्ते कमी झाल्यामुळे संस्थेची प्रगती कुंठीत झाल्यासारखी झाली होती. जीवन गतिमान करण्याचे प्रयत्न मात्र सुरु झाले होते. असा काहिसा हा संक्रमणाचा काळ होता. संस्थेची आर्थिक परिस्थिती, सभासद संख्या मागल्या कालखंडाप्रमाणे अगदी केवीलवाणी चालू राहिली. पण नव्या कार्यकर्त्यांच्या हाती संस्थेची सूत्रे पुर्णपणे १९३७–३८ च्या सुमारास आल्यावर पुढील प्रगतीचा पाया घालण्याचे काम सुरु झाले. संस्थेच्या जीवनात प्रारंभीचे कार्यकर्ते कालांतराने वय वाढल्यामुळे जसे गतिमान राहात नाहीत त्याप्रमाणेच नवीन विचार चटकन स्वीकारण्यासहि तयार होत नाहीत. यामुळे एक संघर्ष निर्माण होतो व काही काळ संस्थेचे जीवन या संघर्षाने झाकाळून जाते. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय अशाच अवस्थेत सामान्यतः १९४० पर्यंत सापडलेले होते. एकंदर समाज परिस्थितीही या काळात फारशी अनुकूल नव्हती.

**चौफेर प्रगती :**

प्रस्तुत कालखंडातील पहिली निराशाजनक परिस्थिती संपल्यावर मात्र संस्थेची झपाट्याने चौफेर प्रगती होऊ लागली. संस्थेची शाखा काढणे व ती चालविणे ही कल्पनाही पटत नव्हती. तेथे लागोपाठ दोन शाखा निघून त्या यशस्वी झाल्या. साहित्यविषयक कार्यक्रमांचे क्षेत्र विस्तारले व ग्रंथालय म्हणजे केवळ पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देणे एवढेच कार्य नव्हे हा विचार पुढे आला. संस्थेच्या संग्रहालय विभागाचा उपयोग अभ्यासकांना व

विद्वानांना प्रथमपासूनच होत होता. पण त्यासाठी खास सोय करण्याचा प्रयत्न झाला तो या कालखंडातच. मराठी संशोधन मंडळासारख्या शाखेची स्थापना करुन तर संग्रहालयाने एक फार मोठे पाऊल टाकले. महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीची खरीखुरी सुरुवात करण्याचे श्रेय संग्रहालयाच्या कार्यकर्त्यांकडेच प्रामुख्याने जाते व त्याची सुरुवात झाली ती याच कालखंडात. ग्रंथप्रकाशनाचा प्रयत्न करण्याचे धाडस करण्यासही संग्रहालयाचे कार्यकर्ते उद्युक्त झाले. शाखांप्रमाणेच फिरत्या वाचनालयाचे उपक्रम केले ते या काळातच. संग्रहालयाच्या कार्याला अशी जोराची चालना मिळाल्यानेच सभासद संख्याही झपाट्याने वाढली व महापालिकेकडून वार्षिक अनुदानही मिळू लागले. या सर्व कार्याचा कळस साधला तो सुवर्णमहोत्सवाच्या भव्य सोहळ्याने. कार्य वाढत जाऊन व्याप वाढला,प्रतिष्ठा प्राप्त झाली व विविध कार्यकर्ते संग्रहालयाच्या कार्यात आले.

**संस्मरणीय उपक्रम :**

१९३६ सालातील संस्थेचा एक विशेष संस्मरणीय उपक्रम म्हणजे मराठीचे व्याकरणकार रा. व. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या व्याकरणाचा शतसांवत्सरीक उत्सव हा होय. संग्रहालयाच्या कामात दीर्घकाळ उत्साहाने भाग घेणारे एक सभासद व अनेक वाङमयीन उलाढालीत सतत गुंतलेले त्या काळातील एक गृहस्थ श्रीपाद केशव नाईक यांनी या कामी विशेष पुढाकार घेतला. असा उत्सव साजरा करावा अशी श्री. नाईक यांनी संग्रहालयाला प्रथम सूचना केली. संग्रहालयाच्या कार्यकारी मंडळाने नाईक यांनी संग्रहालयाला प्रथम सूचना केली. संग्रहालयाच्या कार्यकारी मंडळाने नाईक यांच्या सूचनेला संमती दिली. उत्सवाचा संस्थेला कोणताही खर्च पडणार नसल्यामुळे परवानगी देण्यात आली. हा उत्सव १९,२० व २१ डिसेंबर १९३६ रोजी प्रार्थनासमाजाच्या सभागृहात साजरा करण्यात आला. उत्सवप्रसंगी मराठीतील जुन्या व दुर्मिळ व्याकरण ग्रंथांचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. या उत्सवाप्रमाणेच ४ मे १९३६ रोजी संस्थेच्या विद्यमाने मराठी व गुजराती संगीत नाटककार कै. सोकर बापूजी त्रिलोकेकर यांचा शतसांवत्सरिक स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या उत्सवासाठीही श्रीपाद केशव नाईक यांनी विशेष मेहनत घेतली.

वाङ्मयीन दृष्ट्या महत्वाचा असा या कालखंडात संग्रहालयाने केलेला आणखी एक उपक्रम म्हणजे गुंजीकर व्याख्यानमाला हा होय. 'विविधज्ञानविस्तार' या मासिकाचे संपादक व मराठीचे एक थोर अभ्यासक रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांच्या स्मरणार्थ ही व्याख्यानमाला योजण्यात आली होती. मालेत १८००-१८६७ या काळातील मराठी वाङ्मयाचा परामर्ष घेणारी व्याख्याने करण्याची योजना होती. व्याख्याने लिहून घेऊन ती ग्रंथरुपाने प्रसिध्द करण्याचीही कल्पना होती. १९४३ साली निरनिराळ्या नामवंत अभ्यासकांची दहा व्याख्याने झाली. व्याख्यात्यांत अ. का. प्रियोळकर, य. रा. दाते, कृ. पां. कुळकर्णी, द. के. केळकर, गं. बा. सरदार इत्यादींचा समावेश होता. १९४४ साली या मालेतील तीन व्याख्याने झाली. आणखी पाच व्याख्याने होतील असे १९४४ च्या अहवालात म्हटले होते. व्याख्याने ग्रंथरुपाने प्रसिध्द करण्याचा संकल्पाचाही पुनरुच्चार करण्यात आला होता. पण पुढे ही व्याख्यानमाला पुरी झाल्याचे आढळत नाही. यामुळे ग्रंथ ही प्रसिध्द झाला नाही. हा संकल्प पुरा झाला असता तर, वाङमयीन इतिहासाच्या दृष्टीने एक उत्तम कार्य झाले असते व पुढील कालखंडाचा इतिहासही क्रमाने तयार करण्याचा मानस कृतीत उतरू शकला असता. वाङमयीन दृष्ट्या महत्वाची घटना म्हणजे कॅप्टन सिक्लेअर या सुप्रसिध्द साहित्यिकांच्या साहित्याच्या मराठी भाषांतराचे अधिकार संग्रहालयाला मिळाले.

**ग्रंथालय चळवळ :**

ग्रंथालय चळवळीतही संस्थेचे कार्यकर्ते व संस्था भाग घेऊ लागली ती याच काळात. १९४२ साली अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे पाचवे अधिवेशन मुंबईत भरले होते. या अधिवेशनाला संग्रहालयाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्यवाह श्री. वि. गो. फाटक व श्री. बा. ग. मुर्डेश्वर हे उपस्थित होते. १९३९ साली मुंबई विद्यापिठाचे ग्रंथपाल डॉ. पु. म. जोशी यांची ग्रंथालयशास्त्रावर दहा व्याख्याने झाली. या व्याख्यानाला संग्रहालयाचे कार्यवाह श्री. वि. गो. फाटक व श्री. वा. वि. भट हे मुद्दाम उपस्थित राहिले होते. व त्यांनी ग्रंथालयशास्त्राचा परिचय करुन घेण्याचा स्तुत्य उपक्रम केला. १९४४ साली ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. या निमित्ताने ठाणे येथे मुंबई उपनगर व ठाणे जिल्हा वाचनालय परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेत संग्रहालयाने सहकार्य केले होते. या

परिषदेतूनच ग्रंथालय संघ स्थापन करण्याची कल्पना पुढे आली. याबाबत संग्रहालयाचे वा. वि. भट आदी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. यामुळे परिषदेचे दुसरे अधिवेशन मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या विद्यमाने १९४५ साली भरले. व्यवस्थापक मंडळाच्या २४ जून १९४४ च्या सभेत निर्णय होऊन यासाठी २५ रुपयांपर्यंत खर्च करण्यास संमती देण्यात आली. ऑक्टोबर १९४५ मध्ये बाळासाहेब खरे यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद झाली. याच परिषदेत मराठी ग्रंथालय संघाची स्थापना झाली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे एक कार्यवाह श्री. वा. वि. भट हेच संघाचे कार्यवाह होते. मराठी ग्रंथालय संघाला राज्यव्यापी स्वरुप देण्याचा प्रयत्न होऊन राज्य पातळीवरील मराठी ग्रंथालय परिषदेचे जे पहिले अधिवेशन १९४६ साली मुंबईत भरले त्याचे यजमानपद मराठी ग्रंथालय संघाकडे होते. पण मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय ही संस्थाच या सर्वांच्या मागे प्रकर्षाने उभी होती, यानंतर महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळ जोमाने वाढली व परिषदेची सालोसाल अधिवेशने भरू लागली. चळवळीत इतरही अनेक कार्यकर्ते आले तरी संग्रहालयाचे वासुदेव विष्णु भट व इतर अनेक कार्यकर्ते हेच कार्याचा मोठा वाटा उचलीत आले आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाची सुत्रे अगदी अलिकडेपर्यंत संग्रहालयाच्या इमारतीतूनच हलविली जात होती.

संग्रहालयाचे त्यावेळचे एक कार्यवाह श्री. भट यांच्या सूचनेप्रमाणे 'मराठी ग्रंथ संग्राहक' नावाची एक मासिक पत्रिका काढण्याचा उपक्रम संस्थेने १९४५ साली सुरु केला.

**मराठी संशोधन मंडळ :**

प्रस्तुत कालखंडातील सर्वात उल्लेखनीय घटना म्हणजे संस्थेच्या मराठी संशोधन मंडळाची स्थापना ही होय. मुंबई शहरात अनेक संशोधन संस्था असल्या तरी खास मराठीचे संशोधन करण्यासाठी स्वतंत्र अशी संस्था नव्हती. मराठी वाङमयाच्या संशोधन–संपादन प्रकाशनाचे कार्य गेल्या शतकाच्या उत्तरार्धातच सुरु झाले, पण त्याचे स्वरुप सामान्यत: व्यक्तिगत असेच राहिले. १८५७ साली विद्यापीठाची सोय झाली तरी तेथे मराठीला फारसे स्थान मिळाले नव्हते. यामुळे उच्च दर्जाचे संशोधनही तेथे चालत नव्हते. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना ही गोष्ट त्या दृष्टीने महत्वाची होती. सर्व मराठी ग्रंथांचा 'संग्रह' अशी प्रतिज्ञा आपल्या नावात गुंफून संस्था अस्तित्वात आली. मुंबई विद्यापीठाच्या एम. ए.

परीक्षेसाठी मराठी ग्रंथसंग्रहालयाकडेच यावे लागत असे, याचा उल्लेख मागे केलाच आहे. यामुळे मराठी वाङमयाच्या संशोधनाच्या दृष्टीने काही उद्योग करण्याची कल्पना संग्रहालयातच साकार होणे शक्य होते. १८०० ते १८६७ या कालखंडातील मराठी वाङ्मयाचा संशोधनात्मक आढावा घेण्यासाठी १९४३ व १९८४४ साली गुंजीकर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. या मालेतील अकरावे व्याख्यान ''जुन्या मराठी काव्याचे संपादन व प्रकाशन'' या विषयावर प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी दिले. या व्याख्यानाच्या वेळी त्यावेळचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर चिंतामणराव देशमुख अध्यक्ष होते. श्री. देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषा व वाङमय यांच्या संशोधनासाठी स्वतंत्र संस्था असावी या कल्पनेचा प्रथम उच्चार केला. पुढे बाळशास्त्री जांभेकर यांची शतसांवत्सरिक पुण्यतिथी, ग्रंथसंग्रहालयाने त्यावेळचे मुंबईचे पंतप्रधान व संस्थेचे एक उपाध्यक्ष बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली साजरी केली. त्यावेळी मराठी वाङमय व भाषा यासाठी स्वतंत्र संशोधन मंडळ असण्याच्या कल्पनेचा पुनरुच्चार त्या दिवशीचे प्रमुख वक्ते प्रा. प्रियोळकर यांनी केला. ही गोष्ट १९४६ सालची.

पण श्री. चिंतामणराव देशमुख यांनी केलेली सूचना उचलून धरण्याची घोषणा अन्यत्र झाल्यामुळे, संग्रहालयाने ती मूर्त स्वरुपात येण्याची बराच काळ वाट पाहिली. पण विशेष काही हालचाल न झाल्याने इत:पर इतरांवर विसंबून न राहता स्वत:लाच काय करता येईल ते पहावे, असे संग्रहालयाच्या व्यवस्थापक मंडळाने ठरविले. व्यवस्थापक मंडळाच्या २ फेब्रुवारी १९४७ च्या सभेत जुन्या ग्रंथांच्या संशोधनाची योजना सिध्द करण्यासाठी एक समिती नेमण्याचा ठराव संमत करण्यात आला. पुढे संग्रहालयाच्या वतीने मामा वरेरकर, अ. ह. गद्रे, अ. का. प्रियोळकर, वा. वि. भट, दि. पु. धुपकर यांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान खेर यांची भेट घेतली, व आपली कल्पना त्यांच्यापुढे मांडली. श्री. खेर यांना शिष्टमंडळाची मागणी पटली व त्यांनी आर्थिक साहाय्याचे आश्वासनही दिले.

मुंबई सरकारने १९४७ च्या जूनमध्येच संशोधन कार्यासाठी वार्षिक साडे सात हजार रुपयांचे अनुदान देण्याची इच्छा दर्शविली होती. पण यासाठी ज्या अटी घालण्यात आल्या होत्या त्यात संस्थेत संशोधक म्हणून काम करणाऱ्यांना मुंबई विद्यापीठाकडून पदव्युत्तर

शिक्षणाकरता मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली पाहिजे. अशी एक अट होती. मंडळाचे सन्माननीय संचालक म्हणून निश्चित केलेले नव्हती. प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांना अशी मान्यता आधीच होती. परंतु रीडर म्हणून नियोजित केलेले संशोधक अ. का. प्रियोळकर यांना पदव्युत्तर शिक्षक म्हणून मान्यता यासाठी मुंबई विद्यापीठाकडे जावे लागले. पण प्रियोळकर यांच्या संशोधन कार्यामुळे मुंबई विद्यापीठाने ते फक्त बी. ए. असतानाही पीएच. डी. चे मार्गदर्शक म्हणून त्यांना खास मान्यता दिली. तसेच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला संशोधन कार्याला पाक्ष संस्था म्हणूनही मान्यता मिळाली.

प्राथमिक अडचणी दूर झाल्यावर, नियामक मंडळाने संशोधन मंडळाची योजना व घटना ११ जानेवारी १९४८ च्या सभेत संमत केली. या सभेत डायरेक्टर रीडर, इत्यादींच्या नेमणुकीसही मान्यता देण्यात आली. सभेत या संदर्भात संमत झालेल्या ठरावात सरकारने दिलेल्या रकमेपेक्षा नियामक मंडळाच्या संमतीशिवाय कोणत्याही तऱ्हेचा जादा बोजा संस्थेवर येणार नाही, या अटीवर संशोधनाच्या योजनेला संमती दिली होती. पुढच्या योजनेला संमती दिली होती. पुढच्या एका म्हणजे ७ मार्च १९४८ च्या सभेत तर, संशोधन मंडळ संस्थेच्या घटनेत बसते काय, असा एक हरकतीचा मुद्‌दा श्री. गं. दे. खानोलकर यांनीच उपस्थित केल्याची नोंद आहे. संशोधन मंडळाने कसले संशोधन करावे याबाबतही अनेक सूचना करण्यात आल्याचे आढळते.

१९४८ च्या आरंभी मंडळाच्या कार्याला प्रारंभ झाला. १ फेब्रुवारी १९४८ हा मंडळाचा स्थापना– दिन म. म. पां. बा. काणे हे मंडळाचे पहिले अध्यक्ष होते. वर म्हटल्याप्रमाणे प्रा. कृ. पां. कुळकर्णी संचालक व रीडर म्हणून अ. का. प्रियोळकर यांची नेमणूक झालेली होती. १९५० साली. प्रा. कुळकर्णी संचालक पदावरुन निवृत्त झाले आणि प्रा. प्रियोळकर संचालक झाले. प्रा. प्रियोळकरांनाच विशेष आस्था होती. यामुळे मंडळाच्या कामाशी ते प्रथमपासून समरस झालेले होते. सुरवातीपासून मराठी संशोधन मंडळ म्हणजे प्रियोळकर आणि प्रियोळकर म्हणजे मराठी संशोधन मंडळ असे समीकरण झाले होते. आपल्या कार्यात त्यांनी मंडळाला विद्वज्जनात व शासनातही प्रतिष्ठा व वजन मिळवून दिले. प्रा. प्रियोळकर यांचा पिंडच संशोधन कार्याचा होता. यामुळे त्यांच्या कारकीर्दित मंडळाच्या कार्याला वाढत्या

गतीने उठाव आला. त्यांनी स्वत: अनेक छोटे मोठे संशोधित ग्रंथ तयार केले. त्यांच्या कारकीर्दित मंडळाच्या कार्याला वाढत्या गतीने उठाव आला. त्यांच्या कारकीर्दित मंडळाच्या कार्याला वाढत्या गतीने उठाव आला. त्यांनी स्वत: अनेक छोटे मोठे संशोधित ग्रंथ तयार केले. त्यांच्या कारकीर्दितच सात विद्यार्थ्यांनी पीएच्.डी पदवी मंडळात काम करून मिळविली. १९५३ मध्ये 'मराठी संशोधन पत्रिका' हे मंडळाचे त्रैमासिक मुखपत्र सुरु झाले. १९५६ साली, मंडळाची पदव्युत्तर मार्ग दर्शनाचे केंद्र म्हणून मिळालेली मान्यता कायम करण्यात आली.

**वा. वि. भट :**

संग्रहालयाच्या ७५ वर्षांच्या आयुष्यात कै. अंबादास गोपाळ उर्फ नथुकाका पुणतांबेकर व श्री. वासुदेव विष्णु भट या दोन कार्यकर्त्यांनी संस्थेची सर्वात अधिक सेवा केली. संस्थेचे आजचे जे वैभव आहे, जो व्याप आहे नि बोलबाला आहे त्याचे श्रेय जर कोणा व्यक्तींकडे प्रामुख्याने जात असेल तर ते कै. पुणतांबेकर व श्री. वा. वि. भट यांच्याकडे जाते. संस्थेचे कार्य उभे राहिले ते एकदोघा व्यक्तींच्यामुळे उभे राहिले असे नाही. अनेक ज्ञात अज्ञात कार्यकर्त्यांनी संस्थेकरिता कष्ट घेतले पण संस्थेच्या भव्य शिल्पाचे कै. पुणतांबेकर व श्री. वा. वि. भट हेच दोन प्रमुख कल्पक कारागीर आहेत, असे म्हटले असता ती अतिशययोक्ती ठरणार नाही. संस्थेच्या स्थापनेपासून तो १९३४ साली निवृत्त होईपर्यंत संस्थेची खरी जोपासना केली ती नथुकाका पुणतांबेकरांनी श्री. भट यांचा संस्थेशी प्रथम संबंध आला तो एक अल्पवयीन वाचनवेडा वाचक म्हणून. १९२९ पासून श्री. भट संस्थेच्या कार्यात थोडाफार भाग घेऊ लागले होते. १९३४ साली व्यवस्थापक मंडळात ते निवडून आले आणि १९३८ साली ते प्रथम कार्यवाह झाले. तेव्हापासून मध्यंतरीच्या काही वर्षांचा काळ सोडला तर सुमारे तीन तपे संस्थेची धुरा वाहण्याची कामगिरी श्री. भट यांनी केली. १९५० पर्यंतच्या काळात श्री. भट कार्यवाह असले तरी सारी सूत्रे त्यांच्या हाती नव्हती. पण पुढच्या म्हणजे १९७१ पर्यंतच्या काळात संग्रहालयाची सारी सूत्रे त्यांच्या हाती राहिली. यासाठी त्यांना काही वेळा लढा द्यावा लागला. पण बहुतेक वेळा त्यांनी संस्थेसाठी केलेल्या अविश्रांत कल्पक कार्यामुळे त्यांच्याकडे संस्थेचे सुकाणू राहिले. संस्थेला जुन्या पठडीतून

काढून नवीन स्वरुप देणे, शाखाविस्ताराचे धाडसी पाऊल टाकून कुंचबलेले संस्थेचे जीवन प्रवाही बनविणे, दादरच्या इमारतीसाठी सर्वस्व पणाला लावून प्रयत्न करणे, संस्थेची चौफेर वाढ करुन तिला वैभवाच्या शिखरावर नेणे, अनेक नवनवीन कार्यकर्त्यांना संस्थेच्या कार्यात सामील करून घेणे, संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचा पाया घालून तिची वाढ करणे, संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचा पाया घालून तिची वाढ करणे, अशाप्रकारे श्री. भट यांनी अधिक चिंता वाहिली ती संग्रहालयाच्या संसाराची. आज संस्थेला पुष्कळच अर्थिक स्थैर्य आले आहे. पण संस्थेची एकंदर परिस्थिती अडचणीची होती तेव्हा दैनंदिन कारभार नेटकेपणाने करून तिची प्रगती चालू राहील अशी दक्षता घेण्याचे कर्तृत्वही श्री. भट यांनी दाखविले. संस्थेला अडचणीच्या काळात पुढे नेत तिची जोपासना करण्याची जिद्द श्री. भट यांनी दाखविली, म्हणून तर त्यांच्या कार्याचे एवढे कौतुक व महत्व. संस्थेच्या जीवनातील सुमारे पंचवीस वर्षाच्या कालखंडावर भटांच्या कार्यकर्तृत्वाची छाप आहे.

प्रा. न. र. फाटक यांनी श्री. भट यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती सत्कारच्या वेळा काढण्यात आलेल्या स्मरणिकेत श्री. भट यांच्या कार्याचे खालील शब्दात यथार्थ मूल्यमापन केले होते:–

''मुंबई शहराच्या विसाव्या शतकातील महाराष्ट्रीयांच्या इतिहासात ज्यांच्या कामगिरीची ठसठशीत नोंद करावी लागेल त्यांत श्री. वा. वि. भटांचे नाव कुणालाही वगळून चालणार नाही. एवढे मोठे ज्ञानप्रसाराचे कार्य त्यांनी केले आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय...(या) संस्थेची सूत्रे हाती घेऊन तिला भव्य (केंद्राची इमारत) आणि विस्तृत ( मुंबईतील व उपनगरातील शाखा) स्वरूपास चढविण्याचे श्रेय जर नि:पक्षपातपणे कुणाला द्यावयाचे असेल तर ते जास्तीत जास्त श्री. वा. वि. भट यांच्या कल्पकतेला व कष्टाळू कार्यक्षमतेला दयावे लागेल... शाखांची विविधता हे एक श्री. भटांच्या कार्यक्षमतेचे कौतुक आहे. त्यातलेच इतिहास संशोधन मंडळ आहे. मुंबईत इतिहास संशोधन मंडळ असले पाहिजे ही आकांक्षा सफळ करण्याचे श्रेयही श्री. वा. वि. भटांचे आहे.

**डॉ. रा. कों फाटक :**

सध्या संस्थेचे प्रमुख कार्यवाह असलेले डॉ. रा. कों. फाटक यांचा संस्थेशी गेली सुमारे वीस वर्षे सातत्याने संबंध आहे. संस्थेच्या कार्यात ते नेहमीच पुढाकाराने वावरले आहेत व वडिलकीच्या नात्याने त्यांनी संस्थेच्या अडचणीच्या प्रसंगी मोठ्या जिद्दीने जबाबदारी सांभाळली व अत्यंत परखड शब्दात आपले मत व्यक्त करून संस्थेच्या पेचप्रसंगात मार्ग काढण्यास सहाय्य केले. दादर शाखेचे कार्याध्यक्ष व आता अध्यक्ष, संस्थेचे कोषाध्यक्ष, कला मंडळाचे अध्यक्ष व आता प्रमुख कार्यवाह अशा विविध पदांवर सारख्याच मोकळेपणाने काम करुन कार्याला एक विशेष प्रतिष्ठा त्यांनी प्राप्त करुन दिली. कोणत्याही अडचणीच्यावेळी पुढे होऊन अडचण निभावून नेण्याची व ती ही सगळ्यांना सांभाळून व बरोबर घेऊन जाण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. यामुळेच जेव्हा निवृत्त होऊन स्वस्थ बसावयाचे तेव्हा त्यांनी संस्थेच्या प्रमुख कार्यवाहपदाची जागा स्विकारली. डॉ. फाटक यांच्या मदतीचा संस्थेला इतक्या अगणित वेळा फायदा झाला आहे की त्याची मोजदाद करणेही कठीण. सर्व वृत्तीच्या व वयाच्या कार्यकर्त्यांशी मिळून मिसळून वागण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे कोठल्याही पदावर ते असले वा नसले तरी संस्थेच्या कार्यात त्यांनी नेहमीच स्वयंसेवकाच्या निष्ठेने भाग घेतला आहे.

**ग्रंथसंग्रह :**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासारख्या संस्थेच्या संग्रहातील ग्रंथ हेच खरे वैभव होय. संस्थेच्या संपन्नतेचे मोजमाप संग्रहालयातील ग्रथांची संख्या व गुणवत्ता यावरच मापले पाहिजे. मराठीतील प्रत्येक प्रकाशित ग्रंथाचा संग्रह करणे हेही उद्दिष्ट संस्थेच्या चालकांनी आपल्यापुढे ठेविले होते. वाचकांना वाचनासाठी शक्य तर विनामूल्य, किमान अगदी अल्प मोबदल्यात ग्रंथ उपलब्ध करुन देण्याबरोबरच मराठी ग्रंथांचा संग्रह करुन पुढीलांसाठी त्याची जोपासना करण्याचे व्रतही प्रथमपासूनच चालविण्यात आले होते. यामुळे वाचनालय शाखा व संग्रहालय शाखा असे दोन स्वतंत्र विभाग प्रारंभापासून ठेवण्यात आले होते. संग्रहालय शाखेतील ग्रंथांचा वापर संग्रहालयात बसूनच करण्याचा निर्बंधही होता. संस्थेच्या नियमावलीतील संग्रहालय शाखेतील ग्रंथ विशेष परवानगीने क्वचित बाहेर नेण्यावर सक्त

बंदी घालणारा नियम प्रथमपासून असल्याचे आढळते. आज या नियमात थोडी फार मुरड घालेली असली व अगदी दुर्मिळ नसलेले ग्रंथ विशेष परवनागीने क्वचित बाहेर देण्यास मुभा ठेवण्यात आली असली तरी, ही मोकळिक अपवादात्मकच आहे. यामुळे संग्रहालय शाखेतील ग्रंथांना संस्थेच्या दृष्टीने विशेष महत्व आहे. वाचनालय शाखेतील ग्रंथ वाचकांनी वाचण्यासाठी उपयोगात आणावयाचे असल्यामुळे ते कायम टिकविण्याची कल्पना अभिप्रेत नाही व तसे ते टिकणेही शक्य नाही. वाचनालय शाखेतील ग्रंथांच्या संख्येत नवनवीन ग्रंथांची भर जशी सतत पडत असते त्याप्रमाणेच काही ग्रंथ सतत वापरामुळे फाटून निरुपयोगी ठरतात. अनेक वेळा हे ग्रंथ गहाळही होतात. शक्य तेव्हा व उपलब्ध झाले तर अशा नष्टप्राय वा गहाळ ग्रंथांच्या नव्या प्रती आणविण्यात येतात ही. परंतु याबाबत नेहमीच आग्रह ठेवला जाईलच असे म्हणता येणार नाही. रद्दबादल झालेल्या व लोकप्रियता कमी झालेल्या ग्रंथांच्या नव्या प्रती न घेण्याकडेच कल होण्याची शक्यता अधिक. वाचनालय शाखेत वाचकांच्या आवडीनिवडीला साहजिकच अधिक प्राधान्य द्यावे लागते. यामुळे प्रत्येक ग्रंथ प्रसिध्द झाला की घेतला जाईलच अशी खात्री नसते. ग्रंथाला असलेली मागणी, लेखकाची प्रतिष्ठा, ग्रंथाचे स्वरुप इत्यादी मुद्दे लक्षात घेऊनच वाचनालय शाखेतील ग्रंथांची निवड व खरेदी केली जाते. यामुळे येथे ग्रंथांच्या वाचकांची गरज पुरी करण्याला जरूर महत्व आहे. संग्रहालयाच्या वाचनालय शाखांची संख्या आता ३४ वर गेली आहे.

एकंदर ग्रंथ हे संग्रहालयाचे वैभव असले तरी अनेक दुर्मिळ पुस्तके हे या संग्रहालयातील विशेष मोलाचे असे धन आहे. मराठीतील ग्रंथमुद्रणाला एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून विशेष चालना मिळाली. यामुळे आद्य मुद्रित ग्रंथ म्हणून या काळातील प्रकाशने महत्वाची ठरतात. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी आद्यमुद्रिताचा म्हणजे मुद्रणाच्या बाल्यावस्थेचा काळ १८६७ पर्यंत मराठीपुरता मानावा असे निश्चित केले व ते आता सर्वमान्यही झालेले आहे. १८६७ पर्यंतच्या काळात प्रसिध्द झालेल्या मराठी ग्रंथाना दोलामुद्रिते म्हणजे मुद्रणकलेच्या पाळण्याच्या अवस्थेतील म्हणजे अगदी बाल्यावस्थेतील मुद्रित ग्रंथ असे म्हटले जाते. सर्वच मराठी ग्रंथाचा संग्रह करण्याची संग्रहालयाची प्रतिज्ञा असली तरी आद्यमुद्रिते जास्तीत जास्त मिळविण्यास आगळे महत्व आहे. यापैकी बरेच ग्रंथ केवळ शालोपयोगी किंवा

भाषांतरीत होते. यामुळे त्यातील मजकूर व माहिती आज विशेष उपयुक्त वा मनोरंजक वाटणार नाही. पण आद्यमुद्रिते म्हणून त्यांना मराठी वाङमयाच्या दृष्टीने महत्व आहे. शिवाय महाराष्ट्रातील मुद्रणकलेच्या इतिहासाच्या व ग्रंथविद्येच्या दृष्टीनेहि दोलामुद्रितांचा संग्रह अभ्यासनीय ठरणारा आहे. मुद्रणकलेची सुरुवात महाराष्ट्रातही पाश्चात्यांनीच केल्यामुळे मोडी ही मराठी भाषेची केवळ लिपी आहे हे त्यांच्या सुरुवातीला तरी ध्यानी न आल्याने मोडी टाईपात काही ग्रंथ त्यांनी छापले. तसेच शिळा छपाईने काही ग्रंथ छापले गेले. चित्रांची छपाई, पुस्तकांचा आकार, सजावट इत्यादींच्या अभ्यासाच्या दृष्टीनेही दोलामुद्रितांना महत्व आहे. यामुळे दोलामुद्रिते गोळा करुन त्यांची जोपासना करणे अशा अभ्यासासाठीही आवश्यक आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात या दृष्टीने मुद्दाम गेली अनेक वर्षे यासाठी प्रयत्न केलेला आहे. आज संग्रहालयात ८७७ दोलामुद्रिते आहेत.

संग्रहालयातील आद्यमुद्रितांत अनेक वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ आहेत. मराठीत छापलेले पहिले पुस्तक म्हणजे कलकत्याजवळ श्रीरामपूर येथे १८०५ साली विल्यम कॅरे या मिशनऱ्याने प्रसिध्द केलेले 'अ ग्रामर ऑफ महरट्ट लँग्वेज' हे होय. संस्थेच्या संग्रहालयात हे पुस्तक नाही. पण १८०८ साली मुंबईतील कुरियर छापखान्यात छापलेले पुस्तक संस्थेच्या संग्रहात आहे. रॉबर्ट ड्रमंड याने लिहिलेल्या या पुस्तकाचे नाव 'इलस्ट्रेशन्स ऑफ द ग्रॅमॅटिकल पार्टस् ऑफ द गुजराथी, महरट्ट ॲण्ड इंग्लिश लँग्वेजीस' असे आहे. मराठी, गुजराती व इंग्रजी भाषांच्या व्याकरणविषयक या पुस्तकात मोठी लिपीतील पहिले टाइप वापरलेले आहेत. संस्था स्थापन झाल्यावर तिसऱ्या वर्षी सुप्रसिध्द कादंबरीकार हरी नारायण आपटे यांनी एका मौल्यवान ग्रंथाची भेट दिली. हा ग्रंथ म्हणजे श्रीरामपूर येथेच छापलेले वैजनाथशर्मा यांचे 'सिंहासनबत्तिशी' हे पुस्तक होय. हा संपूर्ण ग्रंथ मोडी लिपीत छापलेला आहे. विल्यम कॅरे याचा मराठी भाषेचा कोशही (डिक्शनरी ऑफ मराठा लँग्वेज) संग्रहायात आहे. १८१० साली छापलेला हा ग्रंथ आहे. हा ग्रंथही श्रीरामपूर येथे छापलेला आहे. मुंबईत छापलेले 'विदुत निती' हे पुस्तकही संस्थेच्या संग्रहात आहे. १८२३ साली मुंबईच्या कुरियर छापखान्यात छापलेले हे पुस्तक आहे. पंडित मंडळीचा कोश म्हणून प्रसिध्द असलेला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' ( प्रथम भाग) हेही संस्थेच्या ग्रंथवैभवाचे एक अमोल लेणे आहे.

दादोबा पांडुरंगाचे सुप्रसिध्द 'मराठी भाषेचे व्याकरण' हा १८३६ साली प्रसिध्द झालेला ग्रंथही संग्रहालयात पहावयाला मिळतो. कोणत्याही ग्रंथालयाची लेणी ठरावी अशी इतरही अनेक पुस्तके संग्रहालयात आहे. 'मराठी ज्ञानप्रसारक या नियतकालिकाच्या एक वर्षाच्या बांधीव अंकाची जवळजवळ १४ पुस्तके संस्थेच्या संग्रहात आहेत.

काही ग्रंथाची मूळ हस्तलिखितेही संग्रहित करण्यात आली आहेत. गंगाधर शास्त्री फडके यांच्या 'भराठी भाषेचे व्याकरण' (१८३३) या ग्रंथाचे हस्तलिखित हा एक अमोल ठेवाच म्हणावा लागेल. नाटककार व कादंबरीकार भा. वि. उर्फ मामा वरेरकर यांच्या 'घरवाली' या ग्रंथाचे हस्तलिखित, ह. ना. आपटे, अ. ब. कोल्हटकर यांच्या अनुक्रमे 'देवमाणूस' व 'विजयाचा टिळा' या ग्रंथाची हस्तलिखिते, तसेच ग. ल. ठोकळ यांच्या कवितांच्या दोन वह्या संस्थेच्या संग्रहात आहे. नाथमाधवांच्या इंग्रजी व मराठी साहित्याची बरीचशी हस्तलिखिते संस्थेकडे नुकतीच आली आहेत. अशा हस्तलिखितांप्रमाणेच मासिकांतून प्रसिध्द झालेल्या लेखांची वा काव्याची संकलित अशी पुस्तके हाही संग्रहाचा एक विशेष म्हणून सांगावा लागेल. कवी वि. के. छत्रे यांचे 'गोदागौरवम्' हे काव्य 'प्रतिष्ठान' मासिकातून प्रसिध्द होत असे. निरनिराळ्या अंकातील भागांचे संकलन करुन पुस्तक बांधून घेतलेले आहे. या संकलनात त्यांच्या साहित्याची सूची अंतर्भूत करण्यात आली आहे. शिवाय त्या काव्यातील स्थळ–व्यक्ती सूचीही या संकलनाला जोडली आहे. 'संक्षिप्त अध्यात्म रामायणम्' हे गणेशशास्त्री पाध्ये यांचे पुस्तक दीपलक्ष्मीच्या अंकातून हप्त्याहप्त्याने क्रमशः प्रसिध्द होत असे. या ग्रंथाचे संकलन करून श्री. वि. क. छत्रे यांनी संग्रहालयाला ते भेट म्हणून दिले आहे. 'गांधीसूक्ती मुक्तावली' या श्री. चिंतामणराव देशमुख यांनी संस्कृतात गुंफलेल्या व मूळ इंग्रजी सूक्तीसह असलेल्या ग्रंथाचा अनुवाद 'मराठी सूक्तीमुक्तावली' या नावाने 'धर्मचक्र' मासिकात प्रसिध्द होत असे, या अनुभवाची कात्रणे काढून तीहि ग्रंथरुपाने संग्रहित केलेली आहेत.

ह. भ. प. बंकटस्वामी यांच्या 'सार्थ ज्ञानेश्वरी'(१९२७) या ग्रंथावरील नक्षीकामाचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. पुस्तकाचे कव्हर मखमली असून त्यावर झिग व टिकल्या लावून पादुका, मंदिराचा कळस वगैरे नक्षीकाम केलेले आहे. 'श्री ज्ञानेश्वरी, जयजय

रामकृष्ण हरी' 'श्री. सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज की जय' असा मजकूर झिगने भरलेला आहे. ज्ञानेश्वरीतील शब्दभांडार, वृत्तदर्पण या पुस्तकात प्रत्येक छापील पानाआड एक कोरे पान बांधून घेतले आहे आणि त्यावर ग्रंथाचे लेखक प्रा. रा. ना. वेलिंगकर यांनी स्वतः केलेली टिपणी आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे 'गोमंतक' हे काव्य हिंदी ब्रेल लिपीत दोन भागात संग्रहालयात संग्रहित केलेले आहे. मुक्तेश्वर, महिपती, श्रीधर, वामपंडित अशा जुन्या कवींच्या अनेक पोथ्याही संग्रहालयात आहेत. पद्मपुराणातील 'विश्वकर्ममहात्म' ही १८६७ साली शिळाप्रेसवर छापलेली पोथी संस्थेत आहे. याशिवाय नासिकेतोपाख्यानाची १८७३ साली छापलेली पोथी, धुंडीमहाराजकृत 'श्री चिंतामणी विजय' (१८९१) अशाही काही पोथ्यांचा उल्लेख करता येईल. अर्थात दोलामुद्रिते, पोथ्या, हस्तलिखिते यांचा संग्रह संस्थेच्या मराठी संशोधन मंडळात विशेष आहे.

संग्रहालयाने अगदी पहिल्या वर्षापासून लोकांकडून भेटरुपाने ग्रंथ गोळा करण्याचा उपक्रम केलेला असल्यामुळे गेल्या ७५ वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील अनेक नामवंतांचे व दूरदूरच्या भागातील ग्रंथसंग्रहात गोळा झाले आहेत. यापैकी अनेक ग्रंथावर ग्रंथदान देणाऱ्यांच्या सह्या किंवा आतील मजकुराच्या अनुषंगाने केलेल्या नोंदीही आढळतात. संग्रहालयाला ग्रंथ भेट म्हणून देणाऱ्या व्यक्तींची वा संस्थांची नावे त्या त्या कालखंडाचा इतिहास पाहताना मागे दिली आहेतच. अशा व्यक्तीत महाराष्ट्रात होऊन गेलेल्या नामवंतांपासून तो सामान्य व्यक्तींचा समावेश होता. यामुळे संग्रहालयाच्या संग्रहाला एक आगळे ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. संस्था स्थापन झाल्यापासूच्या काळात महाराष्ट्रात विविध क्षेत्रात नावारुपाला चढलेली अशी व्यक्ती क्वचितच आढळेल की जिने ग्रंथरुपाने संस्थेला मदत केलेली नाही. मराठी ग्रंथ-सूचीकार शंकर गणेश दाते व भोरचे नानासाहेब भिडे यांचे जुन्या ग्रंथांचे व मासिकांचे मौल्यवान संग्रह संस्थेने खास खटपट करुन विकत घेतले आहेत. वि. पा. जोशी आणि वि. कृ. जोशी यांच्या मदतीने संस्थेला अनेक दुर्मिळ ग्रंथाचा लाभ झालेला आहे.

संस्थेला अनेक नामवंताप्रमाणे अनेक लेखकांनी आपली स्वतःची प्रकाशने स्वाक्षरीसह दिली आहेत. अशा स्वाक्षरी असलेल्या ग्रंथानाही एक निराळेच मोल असते. 'अनुभव संग्रह' या ग्रंथावर एक आद्य लेखक बाबा पद्मनजी यांची सही आहे. कृ. प्र. तथा काकासाहेब खाडिलकर यांचे 'विद्याहरण' हे नाटक त्यांच्या स्वाक्षरीसह संस्थेच्या संग्रहात आहे.

बडोद्याचे एक पत्रकार व अलीकडेच निधन पावलेले 'जागृति' कार पाळेकर यांच्या संस्थेच्या संग्रही असलेल्या 'नव्या मनुतला मराठा' या पुस्तकावर त्यांची सही आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे 'जन्मरहस्य' हे पुस्तकही असेच स्वाक्षरीयुक्त आहे. प्रा. न. र. फाटक, आचार्य अत्रे, कविवर्य बोरकर, शं. के. कानेटकर (कवी गिरीज), वि. स. खांडेकर इत्यादि लेखकांची संस्थेच्या संग्रहात अशीच पुस्तके आहेत. आचार्य विनोबा भावे यांच्या गाजलेल्या 'गीताप्रवचने' या संस्थेच्या संग्रहात असलेल्या ग्रंथावर त्यांची स्वाक्षरी आहे. लेखकांची हस्ताक्षरसह हस्तलिखिते संग्रहित करण्याचा सतत प्रयत्न असतो. जवळ जवळ १५४ व्यक्तींची हस्ताक्षरे व हस्तलिखिते संग्रहालयात आहेत.

संस्थेत अशा विविध स्वरुपाचा ग्रंथसंग्रह असला तरी, स्वातंत्र्यपूर्व काळात सरकारी वक्रदृष्टी अनेक ग्रंथावरही वळत असे. काही ग्रंथ जप्त करण्यात येत असल्यामुळे संग्रहालयातील जप्त ग्रंथ बाजूला काढणे आवश्यक ठरत असे. ९ जून १९१० रोजी झालेल्या व्यवस्थापक मंडळाच्या सभेत 'सरकारी' जाहीरनाम्यात मनाई केलेल्या पुस्तकापैकी जी ह्या संस्थेत असतील ती निराळी काढून कुलपात ठेवावी व कोणासही वाचावयास देऊ नये असे सभेने सर्वानुमते ठरविले. पण आक्षेपार्ह अशी जाहिर केलेली पुस्तके नुसती बाजूला काढून वा 'कुलुपात' ठेवून सरकारचे समाधान होत असे, असे आढळत नाही. १८ जुलै १९१० रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या सभेत 'सरकारजमा' झालेल्या पुस्तकांबद्दल चर्चा होऊन खालील ठराव करण्यात आला.

''सरकारजमा झालेली पुस्तके तूर्त निराळी काढून कुलुपात ठेवली आहेत. त्यासंबंधाने सरकारात कळवून खुलासा विचारावा. ह्या संस्थेचा मुख्य हेतू मराठी भाषेतील सर्व पुस्तकांचा संग्रह हा आहे असे कळवावे.''

''अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचे पत्र नियामक मंडळाचे अध्यक्षांच्या सहीने पाठवावे.''

सरकारकडे अशा तऱ्हेचा पत्रव्यवहार करण्यात आला तरी जप्त केलेली पुस्तके संग्रहालयात ठेवण्यास अधिकाऱ्यांनी परवानगी दिली नसावी असे दिसते. उलट सरकार जमा पुस्तके सरकारकडे जमा करण्याचाच आदेश संस्थेला मिळाला असावा. कारण व्यवस्थापक मंडळाच्या २४ नोव्हेंबर १९१० रोजी झालेल्या सभेत 'सरकारजमा पुस्तकांचा

दुसरा हप्ता पोलीस कमिशनकडे पाठवावा असे ठरविले.' यावरुन वेळोवेळी अनेक जप्त पुस्तके सरकारकडे पाठवावी लागली असावी. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक मराठी पुस्तकांना सरकारबंदी व्हावे लागले होते. यामुळे संग्रहालयाला आपल्या संग्रहालयातील अनेक ग्रंथांना सरकारकडे पाठविण्यात आली याबद्दल मात्र माहिती उपलब्ध नाही. स्वातंत्र्यानंतर सर्व जप्त पुस्तके संग्रहालयाला परत मिळाली असतील असे वाटत नाही. संस्थेच्या दप्तरात याबाबत कोठेच उल्लेख आढळत नाही. पण संस्थेच्या संग्रहाचे यामुळे थोडेफार नुकसान झाले. अनेक जप्त पुस्तकांच्या बंदी उठल्यावर पुढे नव्या आवृत्या निघाल्या व त्या संग्रहालयात आल्याही. पण काही जुन्या आवृत्यांना मात्र संस्थेला मुकावे लागले. संग्रहाच्या दृष्टीने ही हानीच होय.

नियतकालिकांचा संग्रह करण्याचाही उपक्रम प्रथमपासून करण्यात येत आहे. संस्थेची स्थापना होतानाच पुस्तकांच्या जोडीला काही नियतकालिके मिळविण्यात आली होती. प्रामुख्याने मासिकाचे प्रत्येक वर्षीचे पूर्ण बांधीव अंक संग्रहित करण्याचे प्रयत्न करण्यात येतो. अभ्यासाच्या दृष्टीने नियतकालिकांतील अनेक लेखांचा, क्वचित पुस्तकांपेक्षाही अधिक उपयोग करता येऊ शकेल. नियतकाकलिकांप्रमाणे साप्ताहिके व दैनिके यांचाही संग्रह संस्थेकडे आहे. 'प्रभाकर' या सुरुवातीच्या साप्ताहिकाच्या काही वर्षाच्या अंकाची बांधीव फाईल संस्थेच्या संग्रहात आहे. वि. वा. परांजपे यांनी दिलेल्या 'नेटिव ओपिनियन' या मुंबईतील दैनिकाच्या २५ वर्षाच्या फायली संस्थेत आहेत. साताऱ्याच्या 'शुभसूचक' या पत्राच्या १८५८ पासूनच्या ४५ वर्षाच्या फायली संग्रहात आहेत. शिवाय फुटकळ अंकही बरेच आहेत. पण मासिकांच्या तुलनेत वृत्तपत्रांचा संग्रह अगदी किरकोळच आहे.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय हे केवळ मराठी ग्रंथांचा संग्रह करणारे ग्रंथालय असले तरी मराठी भाषा व वाङमय यांच्या अभ्यासासाठी उपयुक्त असे काही इंग्रजी ग्रंथही संस्थेच्या संग्रहात आहेत. संदर्भ ग्रंथ, प्रसिध्द व्यक्तींची चरित्रे, इंग्रजी वाङ्मय, मराठी वाङ्मयासंबंधी इंग्रजीतील लेखन, मराठी पुस्तकांची इंग्रजी भाषांतरे अशा इंग्रजी पुस्तकांचा हा संग्रह आहे. काही निवडक इंग्रजी नाटके, कादंबऱ्या, कविता पत्रवाङमय यांचा ही संग्रह संस्थेकडे आहे. *(स्त्रोत : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इतिवृत्त १९८९)*

**मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, एक स्मरण :**

१ ऑगस्ट १८९७या दिवशी मुंबईच्या अकरा तरुणांनी त्यांची गगनाला गवसणी घालण्याची तयारी होती. मित्रांजवळील व स्वत:कडील असे सुमारे तीनशे ग्रंथ एका ट्रंकेतील संचित या तरुणांचे भांडवल. या छोट्याशा भांडवलावर आणि तळमळ व जिद्दीच्या जोरावर या अकरा तरुणांनी 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' या छोट्याशा संस्थेची स्थापना मुंबई येथील धसवाडीत दरमहा पाच रुपये भाड्याने घेतलेल्या खोलीत केली.

संस्था स्थापन झाली, पण संस्थापकांपुढे बिकट समस्या होत्या. आशिर्वाद सर्वांचे असले तरी जबाबदारी या अकरा तरुणांवरच होती. सुदैवाने श्रीमंत सयाजीराव गायकवाड, दादाभाई नौरोजी वगैरेनी वेळोवेळी आपल्या नेतृत्वाचा व मार्गदर्शनाचा लाभ संग्रहालयास दिला. कोणत्याही नव्या व चांगल्या गोष्टीचे न्यायमूर्ती कै. महादेव गोविंद रानडे यांना कौतुक फार. या अभिनव उपक्रमाचे कौतुक करताना रानडे म्हणाले होते,''संस्थेचे काम आज जरी क्षुल्लक दिसत असले तरी तिच्या कार्यकर्त्यांचा उत्साह दांडगा आहे. कालांतराने ही संस्था प्रचंड आकारधारण करील याची मला खात्री आहे.'' द्रष्ट्या कै. रानडेंची भविष्यवाणी आज सर्वार्थाने खरी ठरली आहे. आज हा सोनियाचा दिवस संस्थेच्या आयुष्यात उगवला आहे. कै. विनायक ओक संस्थेच्या स्थापनेच्या समारंभाचे अध्यक्ष, तर अमृतमहोत्सव समारंभाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे ज्ञानप्रिय भूतपूर्व अर्थमंत्री मधुकरराव चौधरी होते.

कै. डॉ. बाबासाहेब जयकर, डॉ. फडके, आचार्य दोदे, ना. वि. मोडक, डॉ. नानासाहेब देशमुख आणि प्रा. अ. का. प्रियोळकर यांच्यासारख्या महान कर्तबगार व्यक्तींचे मार्गदर्शन संस्थेला लाभत गेले अन् संस्थेच्या कार्यक्षेत्राचा विस्तार वाढत गेला. तसेच कै. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, अनंत नीळकंठ पीठकर, शंकर हरी शेजवलकर, गणेश लक्ष्मण पागे, नरहर महादेव जोशी, विनायक बळवंत जोशी, नारायण महादेव बाक्रे, श्रीधर बाळाजी मोडक, नारायण कृष्णा गद्रे, विठ्ठल वासुदेव टिळू आणि अंबादास गोपाळ पुणतांबेकर या अकरा संस्थापकांचा येथे आवर्जून उल्लेख करणे जरुरीचे आहे.

सन १९५१ च्या सुमारास कै. स. का. पाटील संस्थेच्या अध्यक्षपदी होते. त्यांच्या दृष्टीने संस्थेचा वाढता आवाका त्यांनी जोखला. संस्थेला याहूनही भव्य अद्ययावत वास्तूची

आवश्यकता आहे, हे ओळखून व आपल्या महापौरपदाच्या कारकिर्दीत महापालिकेकडून नायगाव येथील साडेचार हजार चौ. वार जागा, वार्षिक करारावर संस्थेस देवविली. इतक्यावरच त्यांच्या कार्याचा झपाटा थांबला नाही. या दहा वर्षाच्या काळातच नायगाव येथे रंगमदिर व संस्थेची भव्य व अद्ययावत वास्तू उभारून कार्यही जोमाने सुरु केले.

आज मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे क्षेत्र व कार्य याची व्याप्ती किती वाढली आहे, याचा उल्लेख वर आलाच आहे. परंतु संस्थेचे कार्य आता केवळ ग्रंथसंग्रहालयापुरते मर्यादित राहिले नव्हते तर, ती एक भव्य सांस्कृतिक संस्था बनली आहे. मराठी लोकजीवनाशी निगडीत होऊन तिच्या कार्याला अनेक दिशा लाभल्या आहेत. आज मुंबईभर या संस्थेच्या ४४ शाखा कार्यरत आहेत. सर्व शाखांतील ग्रंथसंपदा पावणेचार लाख असून सर्व वर्गवार सभासदांची संख्या १२ हजार, ३०० आहे. वार्षिक उलाढाल एक कोटी, २२ लाखांहून अधिक आहे.

**संस्थेचा बहुमान :**

संस्थेचा ग्रंथपालनविषयक पध्दतशीर कारभार हा ग्रंथपालनाच्या क्षेत्रात आदर्श ठरलेला पाहून मुंबई महानगरपालिकेने आपली २९ ग्रंथालये–वाचनालये संस्थेकडे व्यवस्थापनासाठी सुपूर्द करून तिचा बहुमान केला आहे. महापालिकेसारखी समर्थ संस्थादेखील जेव्हा ग्रंथसंग्रहालयाकडे आपली वाचनालये चालवावयास सोपविते, तेव्हा तो मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कार्यक्षमतेचा बहुमान होय. आज संस्थेतील संदर्भ विभागात ग्रंथसंपदेसह दीड लाख हस्तलिखिते व ८९० दोलामुद्रिते आहेत. हा विभाग दैनिके, साप्ताहिकांची लेखसूची, मासिकांतील लेखसूची व संदर्भमंजूषा यांनी समृध्द आहे. प्रशस्त हवेशीर दालने व उत्तम हवा खेळण्यासाठी १२ फूट उंची हे आज कोठेही होणे कठीण आहे. अनेकांनी येथे वाचन केले. पदव्या संपादन केल्या. डॉक्टरेटस् मिळवल्या. प्रतिदिनी बारा तास अखंड सेवा उपलब्ध करून देणाऱ्या सेवकांचा फार मोठा वाटा या यशात आहे.

**संशोधन मंडळ :**

मराठी ग्रंथसंग्रहालयाचे हे अजोड कार्य आहे. वस्तुतः हे कार्य अत्यंत खर्चिक व कष्टमय आहे. फारच थोड्यांना त्याचे महत्व पटते. महाराष्ट्र साहित्य संस्कृतीच्या प्रगतीचा इतिहास

उपलब्ध असणे ही काळाची गरजच म्हणावी लागेल. मराठी भाषा व इतिहास वाङ्मय सर्वांगानी समृध्द व्हावे याकरिता संग्रहालयाने १९४८ मध्ये मराठी संशोधन मंडळ व १९५८ मध्ये इतिहास संशोधन मंडळ निर्माण केले. जुनी दुर्मिळ हस्तलिखिते व ग्रंथ गोळा करणे आणि ते सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे, हे कार्य या दोन संशोधन विभागाच्या माध्यमातून संस्था करीत आहे. यात काही प्रमाणात वाङ्मय कोशाचेही कार्य आहे.

**सूची मंडळ :**

मराठी ग्रंथसूची या अत्यंत अपूर्व अशा ग्रंथाचे कर्ते कै. शं. गो. दाते याच्या अकाली मृत्यूमुळे मराठी नियतकालिकांची सूची या संकल्पित ग्रंथाचे कार्य प्राथमिक अवस्थेतच पडून होते. ते पूर्ण करण्यासाठी ग्रंथसंग्रहालयाने सूची मंडळाचे कार्य १९६५ सालापासून जिद्दीने सुरु केले आणि अवघ्या चार वर्षांच्या कालावधीत आर्थिक चणचण असूनदेखील या मंडळाच्या माध्यमातून १८०० ते १९५० या काळातील नियतकालिकांची तपशिलवार सूची ग्रंथरुपाने प्रसिध्द केली. मराठी नियतकालिकांची सूची खंड१, खंड २ चे १ ते ५ भाग आणि खंड ३ अशा सात ग्रंथांचा संच केवळ ४३५ रुपयांना अभ्यासकांकरिता उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**महाराष्ट्र प्रबोधन शाखा :**

या शाखेचे कार्य सर्वसुखी आहेच. अनेक ज्वलंत विषयांवर नामवंत अधिकारी व साहित्यिक यांची रसाळ व्याख्याने ऐकण्याचे हक्काचे स्थान म्हणून रसिक श्रोते या व्याख्यानमालेचा लाभ घेतात. डॉ. ग. मा. फडके व्याख्यानमाला, गजेंद्रगडकर व्याख्यानमाला, स्वा. सावरकर व्याख्यानमाला, शारदोत्सव व्याख्यानमाला, ख्यातनाम व्यक्तींच्या जन्म–पुण्यदिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानमाला तसेच इतर प्रासंगिक व्याख्यानमाला सर्व मुंबईकरांच्या चांगल्याच परिचयाच्या आहेत. या लोकशिक्षणाच्या यशस्वी शाळा ठरल्या आहेत. केवळ मुलांसाठी सानेगुरुजी बालविकास मासिक आणि अभ्यास वर्ग या उपक्रमाव्दारे मुलांच्या जडणघडणीचे कार्य केले जात आहे. प्रतिवर्षीच्या निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व चित्रकला स्पर्धा याही शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी माठे कार्य करीत आहे.

कै. म. ना. दामले यांच्या सेवाभावी वृत्तीच्या सहकार्यने नायगाव परिसरातील मुलांकरिताच नव्हे, तर सर्वांसाठी मराठी लघुलेखन वर्ग चालविण्याचे कार्यदेखील ग्रंथसंग्रहालय १९६५ पासून जोमाने सुरु करीत आहे.

कै. वा. वि. भट यांच्या सार्वजनिक ग्रंथालयीन बांधिलकीपोटी व ग्रंथालयाच्या माध्यमातून ज्ञानार्जन व शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्याचे कार्य १९६८ पासून झाले.

**मुंबई मराठी ग्रंथालयाचा उपक्रम :**

दि. ११ जून १९५० रोजी पूज्य साने गुरुजींचे आकस्मिक झालेले महानिर्वाण हा महाराष्ट्राचा भावशक्तीवर झालेला मोठा अपघात होता! या पार्श्वभूमीवर१९५१ साली अ. भा. साने गुरुजी कथामाला निर्माण झाली व तिच्या शेकडो शाखा आज महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर कार्यान्वित असलेल्या दिसून येतात.

महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास ग्रंथरुपाने जतन करणाऱ्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने साने गुरुजींच्या या प्रभावशाली जीवनकार्याची योग्य नोंद घेतली आणि कुमार वयातील मुलांमध्ये पुस्तकाचे अध्ययन करण्याची कुमार वयातील मुलांमध्ये पुस्तकाचे अध्ययन करण्याची प्रवृत्ती वाढावी या हेतूने, शिक्षण महर्षी आचार्य मो. वा. दोंदे यांच्या हस्ते २४ डिसेंबर १९५९ रोजी साने गुरुजी बालविकास मंदिराची स्थापना झाली. ग्रंथसंग्रहालयाशी संलग्न असलेल्या व ग्रंथसंग्रहालयाचे कृपाछत्र लाभलेले बालविकास मंदिर आता साठी गाठत आहे, या संस्थेच्या वतीने बृहन्मुंबईत अगदी नाममात्र वार्षिक वर्गणीत बालवाचनालये चालवण्यात येऊन उत्तम निवडक पुस्तके बालसभासदांना घरी वाचावयास दिली जातात. आरंभीच्या काळात श्री. वामनराव भिडे, कै. मंजुताई भिडे, श्रीमती लीलाताई प्रभू प्रभृति कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करून ही संस्था जोपासली. पुढे ग्रंथसंग्रहालयाचे संस्थाधिकारी कै. वा. वि. भट यांच्या प्रेरणेने श्री. आत्माराम शिंदे प्रभृति आणि सर्व कार्यकर्ते मित्र एकत्र जमली आणि साने गुरुजी बालविकास मंदिराचे हिशेबादी कामकाजाच्या दृष्टीने स्वतंत्र रजिस्ट्रेशन (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाशी संलग्न) करण्यात आले.

नवनवीन कार्यकर्ते संस्थेत सामील झाल्यामुळे संस्थेच्या बालवाचनालयांची संख्या वाढू लागली. लोअर परेल, काळाचौकी, नायगावसारख्या कामगार वस्तीततील किंवा

गोरेगाव सारख्या मध्यम वर्गातील मुले २०–२२ बालवाचनालयांचा लाभ घेऊ लागली. शाखा शाखातून विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रिडा स्पर्धांचे कार्यक्रम यशस्वी होऊ लागले. मुलांच्या शैक्षणिक सहली निघू लागल्या. मुलांबरोबर पालक –शिक्षकांच्या प्रबोधनासाठी विविध सभांचे – शैक्षणिक परिसंवादाचे व परिषदांचे आयोजन होऊ लागले. ठिकठिकाणी निंबध स्पर्धा, चित्रकला आयोजित केल्या गेल्या. कै. वा. वि. भट यांच्यानंतर संस्थाधिपाल कै. अच्युत तारी यांचेही बहुमोल सहकार्य संस्थेला लाभले. हेच प्रेम व जिव्हाळा ग्रंथसंग्रहालयाचे कार्याध्यक्ष नरेंद्र पाटील, प्रमुख कार्यवाह र. दा. कुलकर्णी, ग्रंथसंग्रहालयाची जागरुकपणे देखभाल करणाऱ्या अधीक्षक श्रीमती सुषमा माने यांनी जपले तेच कार्य आजमितीस कायम ठेवला आहे,

**काही महत्त्वूपर्ण क्षण :**

कै. वा. वि. भट यांच्या प्रोत्साहनाने १९६९ साली सुरु झालेले साने गुरुजी बालविकास मंदिराचे मासिक मुखपत्र 'बालविकास' आज महाराष्ट्रातील अनेक घरांतून, वाचनालयांतून व शाळांतून आवडीने वाचले जात आहे. सध्या ग्रंथसंग्रहालयाची जी वास्तू उभी आहे, तिच्या मागील बाजूस त्या काळी बांधलेल्या खुल्या रंगमंचावर महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक अनंत काणेकर यांच्या हस्ते २४/१२/१९६९ रोजी बालविकासाच्या प्रथम अंकाचे प्रकाशन करण्यात आले. पूज्य साने गुरुजींच्या ध्येयधोरणाचा प्रचार व प्रसार करणारे व कुमार युवकांतील लेखन–प्रवृत्तीला उत्तेजन देणारे हे मासिक सर्व कार्यकर्त्यांनी केवळ गुरुजींच्या स्मृतीने गेली ३० वर्षे विनावेतन परिश्रम करून यशस्वीपणे सुरु ठेवले होते.

साने गुरुजी बालविकास मंदिराने आयोजित केलेल्या अनेक समारंभाना जयप्रकाश नारायण, आचार्य दादा धर्माधिकारी, स्वामी अखन्डानन्द सरस्वतीजी, साथी एसेम जोशी, नानासाहेब गोरे, प्रा. सा. बा. हदळीकर, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. सौ. स्नेहलता देशमुख, प्रा. सदानंद वर्दे, प्रा. मधु दंडवते प्रभृति मान्यवर अगत्याने उपस्थित राहिले आहेत. ऐन आणीबाणीच्या काळात एसेम जोशी यांनी साने गुरुजी बाल विकास मंदिराने दाखविलेल्या औचित्याची अनेकांनी प्रशंसा केली होती.

'दूरदर्शनचा होणारा दुष्परीणाम' या परिसंवाद आयोजित केला होता. ना. प्रमोद नवलकर, अप्पा पेंडसे, स्नेहप्रभा प्रधान प्रभृती मान्यवरांनी ह्या परिसंवादात भाग घेतला होता याची साक्ष आज ही वाटते.

चित्रपटांच्या जाहिरातीतून व चित्रपटगृहावर झळकणाऱ्या अशोभनीय, विकृत व बीभत्स पोस्टरांचा निषेध करणारा २५०–३०० मुलामुलींचा भव्य मोर्चा त्याच काळात बालविकास मंदिराने आयोजित केला होता. साने गुरुजींचे धाकटे बंधू श्री. आप्पा क्षीरसागर प्रभृति मान्यवरांनी मोर्चाचे नेतृत्व केले होते. मुलांच्या हाती साने गुरुजींचे विचार प्रदर्शित करणारे छोटे फलक व मुखात गुरुजींची गीते असलेली तो मोर्चा विभागात संस्मरणीय ठरली होती. महात्मा गांधी, साने गुरुजी यांची जीवनदर्शने, सामुदायिक गीत – गायन स्पर्धा, व्यंगचित्रकला – मार्गदर्शन वर्ग असे कितीतरी उपक्रम संस्थेने यशस्वी केले आहेत.

**जिव्हाळा निर्माण करणारे ग्रंथसंग्रहालय :**

महाराष्ट्र राज्य झाल्यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. याकाळात ग्रंथालय चळवळीने महाराष्ट्रात जीव धरला होता. ग्रंथालय अधिवेशन होत होती. १९६७ साली नाशिक येथे ग्रंथालय अधिवेशनात महाराष्ट्र राज्याचा 'ग्रंथालय कायदा संमत झाला. त्यावर १९६८ साली 'पुसद' येथील अधिवेशनात महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी स्वाक्षरी करून शिक्कामोतर्ब केले. ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह वा. वि. भट, नाशिकचे मु. शं. औरंगाबादकर, जळगावचे गंधे इत्यादी उत्साही कार्यकर्ते ग्रंथालय चळवळीला मार्गदर्शन करीत होते. आम्ही सेवक नकळत या चळवळीत समाविष्ट झालो होतो. १९७१ साली मुंबई येथे संग्रहालयात भरलेले ग्रंथालय अधिवेशन संस्मरणीय झाले.

संग्रहालयात संदर्भ विभागाचे प्रमुख ग्रंथपाल श्री. यशवंत रांजणकर होते. शाखांच्या प्रुमख ग्रंथपाल कांत मेणकुरकर तेव्हा होत्या. संदर्शन मांडणे, सूची तयार करणे, नवीन आलेल्या पुस्तकांबद्दलच्या माहितीची सूची इत्यादि केलेले लेखन, ग्रंथसंग्रहालायातून प्रसिध्द होणाऱ्या 'साहित्य सहकार', 'इथे मराठीचीये नगरी' या मासिकातून येत असे. 'दाते सूचींचा संग्रहालयाचा मोठा प्रकल्प होता. त्यासाठी पुण्याहून ग्रंथपाल यांचा शं. ना. बर्वे येत असत. सतत काम करणारे आणि शांत, अशी त्यांची मूर्ती आजही आठवते. प्रसिध्द लेखक,

कवी यांची जन्मशताब्दी साजरी होत असे. अनेक व्याख्याने; व्याख्यानमाला होत होत्या. अभ्यासक, प्राध्यापक, लेखक, विद्वानांपासून ते प्रकाशक, मुद्रक, ग्रंथपाल यांचा सतत राबता असे. मराठी वाङ्मय मंडळात संचालक होते. ते कडक व रुक्ष होते. तेथे हसण्याला, कामाव्यतिरिक्त बोलण्याला अलिखित मनाई होती. ते ज्या खुर्चित बसत, त्यांच्या पाठीमागे मोठी खिडकी होती. त्या खिडकीतून शिरीष वृक्षांच्या फांद्या आणि गुलाबी रंगाची फुले डोलत असत. एक रुक्ष माणूस निसर्गाच्या काव्यात्म सहवासात असणे हा विरोधाभास मला नेहमी जाणवे. अ. कां. प्रियोळकर मराठी संशोधन मंडळाचे संचालक होते तर इतिहास संशोधन मंडळाचे संचालक वा. सी. बेंद्रे व त्यांच्या पत्नी संग्रहालयात वास्तव्य करून होते. 'झेंडूच्या फुलांमुळे निर्माण झालेला वाद प्रा. स. ग. मालशे आणि प्रा. म. वा. धोंड यांच्यातील आलेला वाकडेपणा केबिनची दारे वाजवून उघड केला जात होता. संशोधन मंडळात त्यावेळी प्रपाठक म्हणून डॉ. सु. रा. चुनेकर हे अतिशय तल्लख बुध्दिमत्ता, ग्रंथांच्या ढिगाऱ्यात चालणारे त्यांचे संशोधक, कामात व्यस्त आणि स्वभावात मार्दव असलेले ते तरुण संशोधक होते.

संग्रहालयात मुंबई विद्यापीठातर्फे 'मराठी विभाग' सुरु झाला. पहिले विभाग प्रमुख डॉ. मा. गो. देशमुख होते. एम. ए. च्या विद्यार्थ्यांना लागणारी ढिगभर पुस्तके न कंटाळता आम्ही सेवक काढून देत. अभ्यासकांना फारशा जाचक अटी नव्हत्या, सूचना नव्हत्या. परीक्षाजवळ येण्याच्या काळात महिनाभर रजा घेऊन सकाळी ते रात्रौ ८ वाजेपर्यंत हे विद्यार्थी विद्यापीठात येत, अभ्यास करुन प्रथम क्रमांकाने किंवा पहिल्या वर्गात उत्तीर्ण होत असत. द. दि. पुंडे, जयवंत चुनेकरपासून वसंत पाटणकर, हेमा लेले, अंजली बिनीवाले (किर्तने), नीला पाटणकर, श्यामला धदानी, नंदा आपटे, विद्या नानल असे कितीतरी विद्यार्थी होते. पी. एच. डी करणारे प्रा. राम मंत्री, राधिका पिंपळस्कर होत्या. सेवक या विद्यार्थ्यांना नावाने ओळखण्यापेक्षा ७० ची बॅच अशा सनावळीप्रमाणे लक्षात ठेवत. आज ते विद्यार्थी प्राध्यापक, बँक मॅनेजरपासून मुंबई महानगरपालिका, एस. टी. महामंडळ, मंत्रालय येथे अधिकारी पदावर विराजमान झालेत. ''तुमच्यामुळे या खुर्चीवर आम्ही बसलो आहोत. पुस्तकांबद्दलचे संदर्भ सहकार्य आम्ही विसरु शकत नाही.'' असे त्यांचे कृतज्ञतापूर्वक

उद्गार त्यांच्या विनयाचे दर्शन घडवितात. अभ्यासाबरोबर यात काही धडपडणारे कवी होते. मनोहर ओक, गुरुनाथ धुरी, जयंत वष्ट, तुलसी परब, वसंत गुर्जर, वसंत सावंत, अशोक नायगावकर, अशोक बागवे असे अनेक कवी, संदर्भ विभागाच्या इमारतीतील तळमजल्यावरील सोमय्या प्रकाशनाच्या दुकानाची पायरी ह्या धडपडणाऱ्या कवीनी गजबजलेली असे. पुढे ती'कवी कट्टा' म्हणून प्रसिध्दही झाली. याच कट्ट्यावर हे कवी प्रस्थापित झाले.

श्रीकांत सिनकर यांनी त्यांच्या पोलिस–कथा संदर्भ विभागातल्या बाकावर बसून लिहिल्या आहेत. यावनी सौदर्य असणारे चंद्रकात खोत तेव्हा 'उभयान्वयी' लिहित होते. राम कोलारकर अविरतपणे 'कथे' चे संशोधन करीत होते. चिं.त्र्यं. खानोलकर (आरती प्रभू), बाबूराव बागूल, नकलाकार जोशी यांच्या तर जागाही ठराविक होत्या. संदर्भाचे वातावरण सळसळते, उत्साही, नवनिर्मितीक्षम निकोप, हसते खेळते होते. मला आठवते एखादी कविता, लेख अशा प्रकारचे लेखन केले की वाजून दाखविण्यासाठी संग्रहालयाच्या पाठीमागच्या अंगणात चहावाल्याकडे चहा कॉफीचे घुटके घेताना त्याचे वाचन होत असे. नवीन पाहिलेले नाटक, चित्रपट, वाचलेले पुस्तक, लेख, मासिक याच्यावर चर्चा होत असे. प्रभात चित्र मंडळ आणि ग्रंथाली या संस्था संग्रहालयातच मोठ्या झाल्या.

ग्रंथसंग्रहालयाचे आणखी एक स्वप्न 'शारदा' थिएटर आणि दुसरी नवीन इमारत यामुळे साकार झाले. त्या नवीन इमारतीची कोनशिला व उद्घाटन कवी कुसुमाग्रज म्हणजे वि. वा. शिरवाडकर यांच्या हस्ते झाले. ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेल्या वि. स. खांडेकर यांचा सत्कार नवीन इमारतीच्या तळघरात केला. त्यांनी ज्या पेनाने शेऱ्यासह स्वाक्षरी केला, ते पेन जपून ठेवले आहे. संस्थेचा अमृतमहोत्सव या नवीन इमारतीत झाला.तळघरात ह. वि. मोटे प्रकाशनाचे 'विश्रब्ध शारदा' या पुस्तकातली निवडक मूळ पत्रे, दोलामुद्रिते दुर्मिळ ग्रंथांचे आयोजन करण्यात आले.

विदुषी दुर्गाबाई भागवत वाचक,अभ्यासक, संशोधक, लेखक म्हणून येते. १९७५ मध्ये ५१ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन, कऱ्हाड येथे होते. दुर्गाबाई नियोजित अध्यक्ष होत्या. देशात आणीबाणी व इंदिरा गांधीच्या कट्टर विरोधक होत्या. अध्यक्षीय भाषणासाठी दुर्गाबाई संदर्भच्या खास केबीनमध्ये सकाळी ११ ते ५ वेळात वाचन करीत असत. त्यांना

लागणारे संदर्भ ग्रंथ, संदर्भ साहित्य येथेच घेतले.  दुर्गाबाई कसले वाचन करतात याचा मागोवा घेण्यासाठी लेखक,पत्रकार याबाबत वाचनालयात चौकशी करत असत. अशा जागृकतेचा तो संवेदनशील काळ वाचनालयाचे अनुभव आहेत. *(स्त्रोत: संस्थेची शंतसंवत्सरी स्मरणीका १९९८)*

**श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररी, मिरज : (१८७५)**

मिरजेच्या लक्ष्मी मार्केट चौकात ज्ञान सुगंध मुक्त हस्ते उधळीत एक डौलदार वास्तु उभी आहे. तिचं नांव आहे श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररी या ग्रंथालयाला ५० वर्ष पूर्ण होत आहेत.

मिरजेचे माजी राजे राजर्षि कै. श्रीमंत गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन या लो. टिळक भक्त साहित्यिकाच्या एकसष्टी निमित्त हे ग्रंथालय पुनरूज्ञीवीत करण्यात आले. श्री. प्र. म. कुरणे, डॉ. आर. एम. शिंदे, श्री. म.ना. शिंदे , श्री. प्र.म. कराडे प्रभुतींनी ग्रंथालय विकासासाठी खूपच प्रयत्न केले आहेत.

श्रीमान काकासाहेब मराठे, मिरजेचे राजघराणे, मिरज नगरपालिका, यांच्या हार्दिक सहकार्याने १लाखाची नवीन वास्तू उभी राहिली. महाराष्ट्र सरकारनं या कामासाठी ४८ हजार रुपये अनुदान दिलं.

मिरजेची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन महाराष्ट्र सरकारनं या ग्रंथालयात व वाचनालयास मान्यता दिली आहे. दरसाल ४ हजार रुपये शासन अनुदान देतं. मिरजेच्या राजर्षिनी आपल्या बंधूच्या स्मरणार्थ २५ हजार रुपये देणगी दिली आहे.

१८७५ च्या सुमारास मिरजेत नेटिव्ह जनरल लायब्ररी होती. तिचे रुपांतर १९२६ साली श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररीत झाले. कै. बाळासाहेबांच्या एकसष्टीचे स्मारक म्हणून कै. बापूसाहेब जोशी, कै. रा. धो. शिराळकर, कै. रा. ह. जयकर, इत्यादींनी नेटिव्ह जनरल लायब्ररीचे रुपांतर श्रीमंत बाळासाहेब ज्युबीली ग्रंथालयात केले.

प्रारंभीच्या काळात संस्था स्थिर करण्यासाठी पाच वर्गणीदारांचे कार्यकारी मंडळ व श्री. बाळासाहेब पटवर्धन व श्री. तात्यासाहेब पटवर्धन असे व्यवस्थापक होते. या मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. श्रीपतराव नेने व कै. रा. धो. शिराळकर वकील कार्यवाह होते. यानंतर

कै. बा. का. जोशी, कै. वि. पा. बेडेकर , डॉ. कृ. गो. गोसावी, कै. नि.वि.महाबळ, कै. न. श्री. देशपांडे, कै. द. भि. भडभडे, डॉ. रा. मो. शिंदे, कै. डॉ. खे. मा. तांबोळकर, जी. के. चव्हाण, सरदार कुळेकर, सी. एस.करंदीकर, प्र. नी. महाबाळ, एम. बी. कुरणे यांनी संस्थेचे प्रमुख पदाधिकारी म्हणून संस्था वाढविण्यास हर तऱ्हेने प्रयत्न केले.

या संस्थेची पहिली लोकशाही पद्धतीची घटना दि. १९/०६/१९७५ रोजी श्री. दि. रा. घोरपडे, कै. श्री. गो. नेने, कै. न. श्री. श्री. देशपांडे, ज्ञा. ता. वाघमोडे, शं. गु. कोरे यांनी तयार केली ती मंजूर झाली. डॉ. गोसावींनी इमारतीसाठी झालेले कर्ज फेडून संस्था कर्जमुक्त केली.

या ग्रंथालयाच्या पहिल्या इमारतीचं उद्घाटन साहित्य सम्राट कै. न. चि. केळकर तथा तात्यासाहेब केळकर यांचे शुभहस्ते मोठ्यासमारंभाने झाले. मिरजेचे राजे श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन समारंभास उपस्थित होते.

या संस्थेच्या ग्रंथालयात दहा हजारापेक्षा अधिक दुर्मिळ ग्रंथ व जुन्या पोथ्या आहेत. राजघराण्याकडे आलेली सर्व पुस्तके आजवर या ग्रंथालयात जमा झाली असल्याने इतरत्र नसलेली ग्रंथसंपत्तीही आहे. वाचनालय मोफत आहे. १७ दैनिक २० साप्ताहिके व २१ मासिके इथं घेतली जातात.

संस्थेचे आजीव सभासद १२५ आहेत. वर्गणीदार सभासद ६७० आहेत. संस्थेचे स्वतंत्र बाल व स्त्री विभाग आहेत.

प्रत्येक वर्षी संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त नामवंत साहित्यक अथवा कार्यकर्त्यांचे व्याख्यान होत असत. रेसिडेंट एडवर्डस, थॉमसन, कै. बा. गं. खेर, साने गुरूजी, कमलनयन बजाज, वि. स. खांडेकर, हरिभाऊ पाटसकर, शिवाजीराव भोसले, जयंतराव टिळक, श्री. बाबा कदम , पंडीत श्री. श. नवरे इ. मान्यवरांनी भेटी देऊन संस्थेच्या कार्यास शुभाशीर्वाद दिले आहेत.

सुविख्यात साहित्यिक श्री. गो. नी. दांडेकर यांच्या शुभहस्ते या ग्रंथालयाच्या नव्या वास्तूचे उद्घाटन श्रीमंत गंगाधरराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ मे १९७७ रोजी झाले.

श्री बाळकृष्ण खोत, श्री. सुरेश जामदार हे सेवक आपलं काम चांगल्या रितीनं करतात. श्री. बाळकृष्ण खोत यांनी निष्ठेने, चिकाटीने गेली ३६ वर्षे काम केले आहे.

सध्या संस्थेचे अध्यक्षस्थान श्री. मोहन ने. कामत हे ताज्या दमाचे , तडफदार तरून भूषवित आहेत. संस्थेच्या पूर्वीच्या उज्वल परंपरेप्रमाणे श्री. कामत यांच्या नेतृत्वाखालीही संस्थेचा वाढता उत्कर्ष होईल याची खात्री वाटते.

'ग्रंथालय हे ज्ञानाचं सदावर्त होय ' असं साहित्य सम्राट कै. तात्यासाहेब केळकर यांनी म्हटलं आहे ते अत्यंत सार्थ आहे. जीवनांत पदोपदी ग्रंथगुरू आपणांस मार्ग दाखवत असतात. अशा ग्रंथधनाचा संचय ग्रंथालय सांभाळीत असतात. त्यांतील ज्ञानाची समाजात उधळण करीत असतात.

मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष कै. राजर्षी श्रीमंत गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक भक्त साहित्यिकांच्या एकसष्ठी निमित्त पुनरूज्जीवीत करण्यात आलेल्या, कै. साहित्यसम्राट न. चि. केळकरांचा आशिर्वाद लाभलेल्या श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररीच्या सुवर्ण महोत्सवाचा सोहळा महाराष्ट्राचे तरूण मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे अध्यक्षतेखाली दि. २ मे ला होत आहे. महाराष्ट्राचे नवे, तरूण उमदे, धाडसी, आत्मविश्वासी मुख्यमंत्री हे शुभज्ञानवर्धनाचे कार्य वाढीस लावण्याचे निमित्ताने मिरजेचे प्रथमच येत आहेत म्हणून या उत्सवासाठी झटणाऱ्या तरुणांत, विशेष उत्साह भावना दिसून येत आहे.

या ग्रंथालयाच्या तरूण कार्यकर्त्यांनी, दीड लाख रुपये उभारून या ग्रंथालयाची नवीन इमारत हा हा म्हणता उभी केली. सर्वश्री म. बा. कुरणे, डॉ. आर. एम. शिंदे, म. ना. शिंदे, प्रभाकर कराडे प्रभुतींनी भिरजेचे राजघराण, मिरज नगर परिषद व महाराष्ट्र शासन यांचेकडून, मुक्तद्वार वाचनालयासाठी इमारत बांधवून घेतली. महाराष्ट्र शासन ४८ हजार, मिरजेचे राजपौत्रक रुपये २५,०००/- अशा भरीव देणग्या त्यांनी मिळविल्या.

१८७५ मिरजेत नेटिव्ह जनरल लायब्ररी होती. तिचेच रुपांतर १९२६ श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररीत झाले. कै. रा. घो. शिराळकर, कै. भाऊसाहेब जयकर, बाबूराव जोशी प्रभुतींनी कै. बाळासाहेबांच्या एकसष्टीचे स्मारक म्हणून नेटिव्ह जनरल लायब्ररी, श्रीमंत

बाळासाहेब ज्युबिली लायब्ररी केली. दि. १२ एप्रिल १९२८ रोजी मिरजेचे विद्यमान युवराज श्री. माधवराव पटवर्धन यांच्या वाढदिनी नवीन रुपाने हे ग्रंथालय ऊभे झाले. मिरजेचे विद्यमान राजे श्री. तात्यासाहेब पटवर्धनानी दि ३१ मे २८ रोजी, तिचे औपचारिक उद्‌घाटन केले. कै. बाळासाहेबांना ग्रंथप्रेम विशेष होते. म्हणून त्यांनी आपला निवडक ग्रंथसंग्रह व हिरकमोहोत्सवनिधीचे रुपये दीड हजार या ग्रंथालयास दिले. आगाऊ दोन दोन वर्षाची वर्गणी घेऊन नवीन ग्रंथ आणले गेले. डॉ. रा. द. प्राणींनी नेटिव्ह जनरल लायब्ररीची शिल्लक रु. ४०० संस्थेचे हवाली केली. दैनंदिन खर्चास, मिरज संस्थान, नगरपालिका मदत करत.

सुरूवातीच्या काळात संस्था वाढवून स्थिर करण्यासाठी पाच वर्गणीदारांचे कार्यकारी मंडळ व कै. बाळासाहेब पटवर्धन, श्री. नारायणराव पटवर्धन आश्रयदाते असे व्यवस्थापन होते. पहिले अध्यक्ष कै. श्री. गो. नेने व कार्यवाह कै. रा. धो. शिराळकर होते. यानंतर सर्वश्री बाबुराव जोशी, विष्णुपंत बेडेकर, डॉ. कृ. गो. गोसावी हे होते.

नि. वि. महाबळ, आप्पासाहेब देशपांडे, डॉ. दत्तोपंत भडभडे, डॉ. रा. मो. शिंदे, डॉ. खंडेराव तांबोळकर, जी. के. चव्हाण, सरदार वि. नि. कुर्लोकर, सी. एस. करंदीकर, प्र. नि. महाबळ, एम. बी. कुरणे, म. ना. शिंदे, मो. दे. कामत, प्र. म. कराडे यांनी प्रमुख पदाधिकारी म्हणून संस्था वाढवून ती लोकोपयोगी करण्यास हरतऱ्हेने धडपड केली.

या संस्थेचे लोकशाहीकरण खूप वादानंतर व तापातापीच्या वादळी सभेनंतर झाले. दि. १९/०६/५५ रोजी या संस्थेची श्री. दि.रा.घोरपडे यांनी तयार केलेली पहिली घटना मंजूर झाली. मिरज संस्थानने इमारतीसाठी २३२१ चौरस फूट व सहा हजार नऊशे चौसष्ट चौरसफुट खुली जागा दिली. डॉ. ख. अ. गोसावी यांनी खुल्या जागेत इमारती बांधून काही विकून संस्थेच्या इमारतीसाठी झालले कर्ज फेडून संस्था कर्जमुक्त केली.

या ग्रंथालयाच्या पहिल्या अद्यावत भव्य इमारतीचे उद्‌घाटन साहित्यसम्राट व मिरजेच्या राजघराण्याचे ज्येष्ठ सल्लागार केसरीकार, कै. तात्यासाहेब केळकर यांनी मोठ्या भव्य समारंभाने केले.

ग्रंथालयात अकरा हजाराहून अधिक दुर्मिळ ग्रंथ व पोथ्या आहेत. राज घराण्याकडे आलेले ग्रंथ येथे जमा होत असल्याने अन्यत्र नसलेली ग्रंथसंपत्ती येथे आहे. वाचनालय

मोफत असून त्यात सोळा दैनिके, १५ साप्ताहिके, २ मासिके व दोन पाक्षिके येतात. संयुक्त कर्नाटक हे कानडी दैनिक ही संस्था घेते. संस्थेचे ५५० सभासद असून १२० आजीव सभासद आहेत. संस्थेचे स्वतंत्र बालविभाग व महिला विभाग आहेत. मिरजेत लक्ष्मी मार्केट चौकात मध्यवर्ती जागेत हे ग्रंथालय व वाचनालय असल्याने व वृत्तपत्राच्या सतत वाढत्या किंमतीमुळे सकाळी व सायंकाळी वाचनालयात खूप गर्दी असते.

भरपूर नवी नवी वृत्तपत्रे व पुस्तके, अद्यावत फर्निचर व हवेशीर हॉल व वीज, स्वच्छता, टापटीप, शांत वातावरण ही जशी या संस्थेची आकर्षक वैशिष्ट्ये आहेत त्याचप्रमाणे दरसाल वर्धापनदिनानिमित्त संस्था नामवंत, विचारवंत कार्यकर्त्यास बोलावून सर्वांना रसपान देऊन सन्मान समारंभ घडवून आणते. या संस्थेस रेसीडेंट एडवर्डस थॉमसन, कै. बा. ग. खेर, साने गुरूजी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कलम नयन बजाज, भाऊसाहेब खांडेकर, हरिभाऊ पाटसकर, काकासाहेब गाडगीळ, प्रि. शिवाजीराव भोसले, जयंतराव टिळक आदींना आशिर्वाद दिले आहेत. कै. साने गुरूजी आपल्या सुवाच्य अभिप्रायात लिहितात, ‘इमारत सुंदर आहे. संस्थेत दुर्मिळ ग्रंथ आहेत. ही सुंदर संस्था वाढी व समाजाची ज्ञानमय सेवा करी. ’

महाराष्ट्राचे शास्त्रविचाराचे ब्रेन ट्रस्ट तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अभिप्राय मनोवेधक आहे.

‘मिरजेचे उत्कृष्ट भूषण ! येथील जुना मराठी संग्रह पाहून येथे दोनतीन दिवस घालवावे व एकंदर संग्रहाची उपयुक्तता ध्यानात घ्यावी असे वाटते. इंग्रजी संग्रहही फार वैशिष्ट्यपूर्ण वाटला. संस्कृतमधील पुराण ग्रंथ संग्रहही चांगला आहे. या पुस्तकालयाचा सांभाळ करणारे गृहस्थही चांगले आहेत.’

मिरजेचे भूषण असलेल्या या संस्थेचा आणखी एक अनुकरणीय विशेष असा की, गेल्या १०-१५ वर्षात या संस्थेचे पदाधिकारी तरूण असून अहमिहमिकेने मतदान होऊन ते निवडून येतात व विधायकवृत्तीने संस्था आपापल्या कल्पनेने वाढवतात. अनेक वर्षे वर्षानुवर्षे पदांना चिकटून राहण्याची वृत्ती येथे नाही. नवे रक्त, ताजे रक्त, नव कल्पना येथे येत असल्याने संस्थेचे नाव समाजात नावाजले जाऊ लागले. ७५ वर्षात लोकशाही पद्धतीने

पदाधिकारी येतात, जातात, पण या संस्थेचे रक्षण, संवर्धन व विकास करण्याचे श्रेय संस्थेचे सेवक श्री. बाळकृष्ण हरी खोत यांना दिले पाहिजे. श्री. बाळू खोत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या नम्र सेवकाने ग्रंथालयाचे कामामुळे वृत्तपत्र वितरण सोडले. निष्ठेने, चिकाटीने हरकामे करून सर्वांच्या सहकार्याने संस्था वाढवली. तरुणाच्या कर्तृत्व शक्तीला येथे फार मोठा वाव दिला जात आहे.

मिरजेत टाऊन हॉलमध्ये या पूर्वी जी मुख्य भर वस्तीत लायब्ररी होती. तिचे वर्णन खालीलप्रमाणे ,

उत्तर बाजूस बाहेर छोट्या छोट्या खोल्या होत्या, त्यांना जाळ्या मारल्या होत्या, त्यात अनेक जातीची माकडे, ससे, मोर, कोल्हा, हरणे ठेवली होती.

मध्यभागी इमारतीमध्ये दक्षिणेच्या खोलीमध्ये वर्तमान पत्रे, पुस्तके वाचावयास ठेवली जात असत. त्यामध्ये वाचावयास विशेष करून शिक्षणतज्ज्ञ व सुशिक्षितच जात असत. त्याच्या लगत दुसऱ्या कोठडीमध्ये कै. श्रीमंत बाळासाहेब यांना लोकांनी भेट दिलेल्या व त्यानी स्वखुशीने आणलेल्या निरनिराळ्या पाहण्याजोग्या वस्तुंचा संग्रह केलेला होता. त्या वस्तु त्या खोलीमध्ये कुलूप लावून ठेवल्या होत्या.त्या वस्तु आम्ही लहानपणी दरवाज्याच्या काचेतून बाहेरुनच पहात असू.

मोठ्या हॉलमध्ये तंतुवाद्याची, पेटी वादनाची, तबला वादनाची, संगीताचे सा रे ग म पासून अनेक प्रकारची पुस्तके होती. पेशवाई कालीन, पटवर्धन कालीन, हैद्राबाद कालीन, म्हैसूर, ग्वाल्हेर, कुरूंदवाढ, बडोदा यांच्याशी झालेला पत्रव्यवहार यांची पुस्तके ठेवलेली होती. ब्रिटीश आमदानीच्या वेळची व त्यापूर्वीचीही अनेक दुर्मिळ पुस्तके व ग्रंथ या ठिकाणी ठेवले होते. लायब्ररीच्या चौफेर फार जुनाट अशी सुरूची झाडे होती. इतर निरनिराळी फुलांची झाडे होती. लायब्ररीच्या पाठीमागील बाजूस नावेच्या आकाराचा हौद होता. त्यामध्ये पाणी व मासे रंगीबेरंगी मासे होते. दोन चार किर्लोस्कराची बाके फळ्या मारलेली होती. त्या पाठीमागील भागात कैक लोक फराळ करण्यास बसत. त्यावेळी संध्याकाळी ५ नंतर भिरज संस्थानातील इंजिनिअर जोग साहेब व त्यावेळेचे ओव्हरसिअर आबासाहेब मोकरे हे दोघे

मिरज गावचा विकास करण्या करिता विचारविनिमय करीत असत. लहान मुले त्याठिकाणी मोकळेपणी खेळत असत.

त्यानंतर श्रीमंत बाळासाहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त लायब्ररीसाठी नवीन इमारत बांधली. सन १९२८ जुन्या लायब्ररीतील काही पुस्तके सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजला दिली व बरीच पुस्तके सध्याच्या सरस्वती मंदीर लायब्ररीस दिली.

तेव्हापासून या लायब्ररीची वाढ करण्याचे कामी डॉ. गोसावी, मराठे वकील, बी. के. दिवाण व शिराळकर वकील, डॉ. भडभडे, न्यायाधिश नेने यांनी प्रयत्न केले. आज ही हे ग्रंथालय महाराष्ट्रात प्रसिद्ध होत आहे.

### ५.३ तमिळनाडू :

### सरस्वती महाल ग्रंथालय,तंजावर :

हे एक तामिळनाडूतील आद्य ग्रंथालय असून, त्याची स्थापना येथील राजे सफ्रोजी यांनी येथील स्थानिक संस्कृती विकसित करण्यासाठी १८५५ मध्ये रॉयल पॅलेस ग्रंथालय या नावाने स्थापली. हे ग्रंथालय तत्कालिन स्थितीमध्ये राजे महाराजे यांच्या समाधानसाठी स्थापन करण्यात आलेले होते. येथील नायक राजांच्या राजवटीमध्ये सफ्रोजी दुसरे यांचा कालखंड १७९८ ते १८३२ हा होय. राजे सफ्रोजी हे एक विद्वान व विविध कला व ज्ञानशाखेमध्ये रस घेणारे जिज्ञासू राजे म्हणून ओळखले जात.आपल्या बालवयात त्यांनी जर्मन रेव्हरंड सीझ वार्टस यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी, इटालियन इ. भाषांचा अभ्यास केला. त्यांच्या या विविध भाषेच्या अभ्यासामुळे सहाजिकच या भाषेतील ग्रंथसंग्रहाविषयी जिव्हाळा निर्माण होऊन त्यांनी हे ग्रंथालय समृध्द केले. त्याकरिता त्यांनी बऱ्याचशा विद्वांनांची नेमणूक करुन त्यांना उत्तर भारतातील उल्लेखनीय संस्कृत शिक्षणाची केंद्र अशा ठिकाणी प्रत्यक्ष ग्रंथ हस्तलिखीत विकत घेण्यासाठी वा त्यांची नक्कल करण्यासाठी त्यांना सांगण्यात आले. या कार्याकरिता भारतातील व नजिकच्या दुर्गम भागातुन सुध्दा विशेष परिश्रम घेण्यात आले. १९१८ पासून हे ग्रंथालय तामिळनाडूच्या अधिपत्याखाली आहे. हे ग्रंथालय 'तंजावर महाराज सफ्रोजी सरस्वती महाल ग्रंथालय' या नावाने ओळखले जात असून या महान मराठा राजाच्या स्मरणार्थ उभे करण्यात आलेले आहे. सध्यस्थितीत हे ग्रंथालय सर्वांसाठी खुले आहे. ग्रंथालयातील विविध हस्तलिखितांच्या प्रकाशनासाठी विशेष प्रयत्न केले जात असून येथील महत्वपूर्ण खंडाचे संरक्षण करण्यासाठी सुक्ष्म फितीमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. १९९८ मध्ये या ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात येऊन याचे कामकाज संगणकाव्दारे चालते, येथील हस्तलिखीतांचे डिजीटीलायझेशन करण्यात येत आहे.

### वाचन साहित्य संग्रह :

आज येथे संग्रहीत करण्यात आलेल्या हस्तलिखितांमध्ये देवनागरी, नंदीनागरी, तेलगू लिपीमध्ये तयार करण्यात आलेल्या संस्कृत हस्तलिखीतांची संख्या ३९,३०० आहे.

तामिळ मधील हस्तलिखीतांची संख्या ३५,००० असून यामध्ये साहित्य, संगीत, वैद्यकीय, विषयासंदर्भातील माहिती नमुद करण्यात आली आहे. याचबरोबर या ग्रंथालयात मराठी भाषेतील ३,०७६ हस्तलिखीतांचा समावेश आहे. या हस्तलिखीतामध्ये महाराष्ट्रातील १७ व्या, १८ व्या ,१९ व्या शतकातील संतांची नामावली समाविष्ट केलेली असून ही नामावली रामदासी पंथ व दत्तात्रय मठ इत्यादीशी संबंधित आहे. मराठी भाषेतील हस्तलिखीते ही कागदावर लिहिलेली असून; तेलगू भाषेतील हस्तलिखिते ही पाम वृक्षाच्या पानावर लिहिलेली आहेत. याची संख्या ८६४ आहे. तसेच २२ पार्शियन आणि उर्दू भाषेतील हस्तलिखीते संग्रहित केलेली असून त्यांचा कालखंड १९ व्या शतकातील आहे. आयुर्वेद क्षेत्रातील विद्वानांची कागदपत्रे ही येथे संग्रहित करण्यात आलेली आहेत. या कागदपत्रामध्ये रुग्णांची तपशिलवार माहिती व मुलाखती यांचा सामावेश केलेला असून त्यांचे वर्गीकरण धन्वंतरी विभागात करण्यात आलेले आहे. या सर्वाबरोबरच येथील महाराजांच्या राजवटीतील हस्तलिखीत कागदपत्राची १३४२ बाडे संग्रहीत केलेली असून हे सर्व रेकॉर्ड मोडी लिपीतील आहे . या कागदपत्राद्वारे तत्कालिन राजकीय सामाजिक व प्रशासन हे तंजावर महाराजांच्या कारकिर्दीत कशा स्वरपाचे होते याचे विवेचन करण्यात आलेले आहे. या संग्रहातील काही दुर्मिळ हस्तलिखीते व ग्रंथ,

१. डॉ सॅम्यूअल जॉन्सन डिक्शनरी १७८४
२. द पिक्टोरीयल बायबल प्रिंटेड इन अमस्टरडम १७९१
३. द मद्रास अलमनाक १८०७
४. लेव्हो सीर ट्रेडी इलेमेनटेरर दी चिमी
५. द नोटस ऑ बिशॉप हेबर ऑन राजा सफ्रोजी ।।
६. द करसपॉन्डन्स लेटर्स ऑफ विल्यम टोशन ऑफ लंडन टू परचेस अ लॉट ऑफ बुक्स फॉर राजा सफ्रोजी।। ॲण्ड द सरस्वती महल लायब्ररी
७. द ग्लोब युजड बाय द राजा
८. ॲन्शन्ट मॅप ऑफ वर्ल्ड

९. टाउन प्लॅनिंग डॉक्यूमेटस ऑफ तंजावर इन्क्लूडीग द अंडर ग्राउंड ड्रेनेज सिस्टिम द फ्रेश वॉटर सप्लायर डक्टीगं सिस्टीम

१०. पिक्टोरीयल चार्ट ऑफ द थेरी ऑफ इव्हॅल्यूएशन ऑफ मॅन ॲज एव्हीन्स बाय चार्लस ली ब्रुन.

या ग्रंथालयास जोडून वस्तू संग्रहालयाद्वारे ग्रंथालया संदर्भातील माहिती, प्राचीन हस्तलिखीते, नकाशे, पेंटिग्ज, यांचे सादरीकरण नियोजनबध्द केले असल्यामुळे ग्रंथालयातील बहुमुल्य व विस्तृत संग्रहाची माहिती प्राप्त होते. हे ग्रंथालय तंजावर परिसरात असून येथील दुर्मिळ पुस्तकांच्या संरक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेला आहे. शिवाय वाचकांना सर्व सुविधानी युक्त असलेल्या अभ्यासिका उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. वाचक दुर्मिळ हस्तलिखीतांचे अवलोकन करु शकतात. दुर्मिळ हस्तलिखीतांचे ऑनलाईन कॅटलॉग करुन आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन दिले असल्यामुळे या दुर्मिळ ग्रंथसंग्रहाचे व पामच्या पानावरील हस्तलिखीतांचे कौतुक जगभर होत आहे. येथील दुर्मिळ साहित्याचे सुक्ष्म लिपीमध्ये रुपांतर करण्यास व कॅटलॉग तयार करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९६५ मध्ये भारताच्या नभोवाणी मंत्रालयास सुचना देऊन स्वतंत्र निधी ग्रंथालयाच्या विकासाकरता जाहीर केलेला होता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन दुर्मिळ वाचन साहित्य सर्वदूर पोहचविण्यासाठी राष्ट्रीय हस्तलिखीत धोरणाअंतर्गत येथे हस्तलिखीत संरक्षण व संवर्धन केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**कोनेमेरा सार्वजनिक ग्रंथालय, चेन्नई : तमिळनाडू**

बॉबी रॉबर्ट ब्रुक कोनेमेरा यानी दि. २२ मार्च १८९० रोजी या ग्रंथालयाची स्थापना केली. मद्रास शहरातील सर्वसामान्य व्यक्तीची वाचनविषयक महत्वपुर्ण गरज लक्षात घेवून ऐतिहासीक काळात या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. कोनेमेरा हे मद्रास इलाक्याचे १८८६ ते १८९० या काळातील गर्व्हनर होते. आपल्या काळात ग्रंथालयाची पायाभरणी करत असताना आपल्या उद्‌घाटनपर भाषणात त्यांनी पुढील उद्‌गार काढलेले होते ''माझ्या मनात व माझ्या सहकाऱ्यांच्या मनातही मद्रास येथे मोफत सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करण्याची प्रबळ इच्छा होती. या इलाक्याची ग्रंथालय ही एक गरज

असल्याचे ओळखुन असे ग्रंथालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वत्र मोफत वाचनालये उदयास येत असताना या इलाक्यातील विद्यार्थ्यांना, सुशिक्षीत व्यक्तींना ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध होत नाही. अशी खंत असल्यानेच या ग्रंथालयाद्वारे ही गरज पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.या बाबत मी आपणास आश्वासीत करतो. या ग्रंथालयाच्या माध्यमातुन येथील तरुणांना, वृध्दांना, महिलांना मोफत वाचन सुविधा उपलब्ध होईल व स्वतःच्या समाधानासाठी ते येथील साहित्य आस्वादाचा आनंद घेतील.'' जरी या ग्रंथालयाची इमारत दि. १४ एप्रिल १८९६ रोजी पुर्ण करुन तिचे लोकार्पण झाले होते तरी देखिल प्रत्यक्षात या ग्रंथालयाचा उद्‌घाटन समारंभ मद्रासचे तात्कालिन गर्व्हनर सर ऑथर यांच्या हस्ते ५ डिसेंबर १८९६ रोजी होऊन या ग्रंथालयाचे नामकरण कोनेमेरा असे करण्यात आले. या उद्‌घाटनाच्या दिवसापासुन, या ग्रंथालयाने सातत्यपुर्व सेवा देऊन चेन्नईमधील लोकांच्यामध्ये आपले एक असे वैशिष्ट्येपुर्ण स्थान निर्माण केलेले आहे.

**इमारत :**

उत्तम वास्तूशास्त्राचा नमुना असलेली ग्रंथालय इमारत ही १०० वर्षाहुनही जुनी असुनही तिच्या वैशिष्टपुर्ण रचनेमुळे सर्वांचे लक्ष वेधुन घेते या ग्रंथालयाच्या वास्तूचा आराखडा आर्यनविन यांनी करुन अत्यंत कुशलतेने व सौंदर्यपुर्ण दृष्टीने या इमारतीची उभारणी केलेली असल्यामुळे येथील भव्य हॉल, आकर्षक अभ्यासिका, सुंदर व दर्जेदार फर्निचर,अर्धवर्तुळाकार छप्पर आणि या छप्परा करिता वापरलेले लाकुड व सुंदर काचा, त्यावरील पानाफुलांची नक्षी, नक्षीदार पिलर हे ग्रंथालयाच्या इमारतीचे विशेष आकर्षण आहे. या इमारतीचे प्रवेशद्वारही अर्धवर्तुळाकार असुन लक्ष वेधी आहे. त्या काळातील या बांधकामाची किंमत ५,७५,०००/– हून अधिक होती. या ग्रंथालयातील वाढता पुस्तक संग्रह व वाढता वाचक वर्ग याचा विचार करुन १९५२ मध्ये १,३०,०००/– रुपये खर्च करुन वाचकांच्या करिता स्वतंत्र मेझनीन फ्लोअरची रचना करण्यात आलेली आहे. येथील वाढता ग्रंथ संग्रह विचारात घेऊन केवळ वाचनसाहित्य संग्रहाकरिता २७,००० चौ. फुट इतकी जागा उपलब्ध करुन देण्यात आली होती. लाकडी आणि लोकंडी रॅकस् यांच्या दर्जेदार रचनेमुळे या ठिकाणी विविध प्रकारचे २,५०,००० ग्रंथ संग्रहीत करण्याची तरतुद

करण्यात आली होती. ग्रंथालयाचा वाढता व्याप विचारात घेऊन पुन्हा १९७३ मध्ये टी आकाराची एक तीन मजली इमारत उभी करण्यात आली या इमारतीचे क्षेत्रफळ ७१,७०० चौ. फुट एवढे आहे आणि अंदाजे किंमत १२.७ रु. लक्ष एवढी होती. १९९९ च्या दरम्याने पुनश्च ग्रंथालयास इमारतीची गरज भासताच २१,८२३ चौ. फुटांची तीन मजली इमारत उभी करण्यात आली आहे.

**ग्रंथालयाची वाढ व विकास :**

या ग्रंथालयाच्या उद्घाटन प्रसंगी २३ मार्च १८९० रोजी लॉर्ड कोनेमेरा यांनी आपल्या भाषणातून लगतच्या परिसरातील विविध संस्थानी स्थापन केलेल्या ग्रंथालयानी प्रस्तुत ग्रंथालयाचा उपयोग करुन लोकांना मदत करण्यासाठी आव्हान केल, आणि हे ग्रंथालय मातृसंस्था स्वरुपात कार्यरत झाले. या ग्रंथालयाने सुरुवातीच्या काळात अनेक संस्थाना सहकार्य केले. या मध्ये १८९६ रोजी एक ग्रंथालय जवळ सुरु करण्यात आले ज्याचे उद्घाटन औपचारीक स्वरुपात मद्रास विभागाचे गर्व्हनर सर आर्थर हेलीबॅग हॅवलॉक यांच्या हस्ते दि. ५डिसेंबर १८९६ रोजी करण्यात आले. हे ग्रंथालय जवळच्या शासकीय वस्तू संग्रहालयांच्या अधिपत्याखाली सुरु होते. मातृसंस्था स्वरुपात कार्यरत असणाऱ्या ग्रंथालयास सलंग्रीत ग्रंथालये –

**१. मद्रास लिटररी ग्रंथालय :**

ग्रंथालय दक्षिण विभागामध्ये सुरुवातीस कार्यरत राहीले आणि नंतर या कोनेमेरा ग्रंथालयातून सध्याच्या नुंगम बाकण या ठिकाणी १९०५ मध्ये स्थलांतरीत करण्यात आले.

**२. मद्रास विद्यापीठ ग्रंथालय :**

मद्रास विद्यापीठाच्या स्थापने नंतर विद्यापीठाचे ग्रंथालय कोनेमेरा ग्रंथालयातील मद्रास लिटररी सोसायटी ग्रंथालयाने खाली केलेल्या जागेवरच सुरु करण्यात आले. या जागेत ते १९२८ पर्यंत कार्यरत होते. या नंतर ते येपॉक परिसरातील विद्यापीठ परिसरात स्थलांतरीत करण्यात आले.

**पुर्णवेळ ग्रंथपाल :**

या ग्रंथालयाकरिता श्री. आर. जनार्दन नायडू यांची दि. ९ सप्टेंबर १९२९ रोजी पुर्णवेळ ग्रंथपाल म्हणुन नेमणुक करण्यात आली. आणि ग्रंथालयाचे कामकाज पुर्णवेळ

शासकीय ग्रंथालया पासुन विभाजीत करुन स्वतंत्रपणे सन १९३० पासुन ग्रंथपालाच्या अधिपत्याखाली सुरु झाले.

**स्वतंत्र संस्था :**

दि. १ एप्रिल १९३९ पासुन खऱ्या अर्थाने हे एक स्वतंत्र ग्रंथालय म्हणुन संचालक सार्वजनिक ग्रंथालयाच्या अधिपत्या अंतर्गत सुरु झाले व प्रत्यक्ष कामकाजावर ग्रंथपालाचे स्वतंत्रपणे नियंत्रण आले.

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा दर्जा :**

मद्रास राज्याचा सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८ साली अस्तित्वात आल्या नंतर या ग्रंथालयास दि. १ एप्रिल १९५० रोजी राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा दर्जा प्राप्त झाला व ग्रंथालय संचालकाच्या अधिपत्याखाली याची वाटचाल सुरु झाली.

**ग्रंथालयाचा वाचन साहित्य संग्रह :**

आज या ठिकाणी ७,००,००० इतके ग्रंथ असुन जवळपास ३५०० नियतकालीके, १६० वृत्तपत्रे संग्रहीत केलेली आहेत. विविध देणगीदारांच्या माध्यमातुन प्राप्त होणारा संग्रह स्वतंत्रपणे ठेवण्यात आलेला आहे.

**१. धनकोटी संग्रह :**

राव बहादूर आरकोट धनकोटी मुदलीयार यांनी ग्रंथ खरेदी साठी २०,०००/– देणगी दिली होती. या देणगी अंतर्गत कला शाखेतील ग्रंथांचा संग्रह स्वतंत्रपणे करण्यात आलेला आहे.

**२. मद्रास सार्वजनिक ग्रथालय अंतर्गत प्राप्त होणारे वाचन साहित्य :**

या ग्रंथालयास प्रेस नोंदणी कायदा १८६७ व मद्रास सार्वजनिक ग्रंथालय कायदा अंतर्गत प्राप्त होणाऱ्या वाचन साहित्याचे संग्रहण येथे केले जाते.

**३. पुस्तक वितरण कायद्याअंतर्गत येणारे वाचन साहित्य :**

या योजने अंतर्गत प्रस्तुत ग्रंथालयास दि. १० सप्टेंबर १९५५ पासुन विविध प्रकारचे वाचन साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असुन अशा सर्व साहित्यांचे संग्रहण करणे हे या ग्रंथालया समोरील मोठे आव्हान आहे.

**४. यु .एन. ओ. व एशियन डेव्हलपमेंट बँक इ कडून उपलब्ध होणारे वाचन साहित्य :**

अशा वैशिष्टपुर्ण संस्थांकडून विविध प्रकारचे वाचन साहित्य प्राप्त होत असते.

**५. देणगीद्वारे प्राप्त वाचन साहित्य :**

वैयक्तीक स्वरुपातील देणग्या, संस्थाद्वारे प्राप्त देणग्या व शासकीय स्वरुपातील देणग्या या माध्यमातुन प्राप्त होणाऱ्या वाचन साहित्याची संख्या ही खुपच मोठी आहे.

**६. पुस्तक खरेदी :**

शासनाद्वारे प्राप्त होणारे अनुदान या द्वारे दरवर्षी नियमीतपणे विविध प्रकारचे वाचन साहित्य येथे खरेदी केले जाते. या वाचन साहित्याचाही सातत्यपुर्वक वाढणारा संग्रह हे ही या ग्रंथालया समोरील एक आव्हान आहे.

**७. दुर्मिळ पुस्तक संग्रह :**

या ग्रंथालयात आजवर १,००,००० हून अधिक दुर्मिळ पुस्तके संग्रहीत करण्यात आलेली आहेत.

**ग्रंथालय व्यवस्थापन :**

या ग्रंथालयाचे १३ विभागात कामकाज चालत असुन हे विभाग साधारणत: संदर्भ विभाग, मासिक पुस्तक विभाग, देवघेव विभाग, नियतकालीका विभाग,प्रतिलीपी विभाग,सुक्ष्मचित्रफीत विभाग, भाषा विभाग, सार्वजनिक सेवा अभ्यासकेंद्र, शैक्षणिक उपकरण विभाग, उदा. व्हिडिओ, सीडी, घरपोच देव घेव विभाग, संदर्भसुची विभाग, इंटरनेट सेवा विभाग, संवर्धन सुरक्षा विभाग (सुक्ष्मफित, ग्रंथबांधणी, दुरुस्ती, स्कॅनिंग इ. )

अशा विभागातील कामकाजासाठी आज ५९ कर्मचारी येथे कार्यरत असुन एकुण कामकाजासाठी शासनाने प्रत्यक्षात ११२ जागा मंजुर केलेल्या आहेत. (तपशिल दि ३०/०४/२०१३)

सध्या या ग्रंथालयाचे सभासद १,२७,५७५ इतके असुन या ग्रंथालयाद्वारे वर्षभरामध्ये सर्वसाधारणपणे २ लाखाहून अधिक पुस्तकांची देवघेव होत असते. तसेच वर्षभरामध्ये साधारणत: ३ लाखाहुन अधिक वाचक ग्रंथालयास भेट देत असतात.

**संगणकीकरण व डिजिटायझेशन :**

या ग्रंथालयाच्या आधुनिकरणाचे काम सन १९९० पासुन हाती घेण्यात आले आहे. या कामास खऱ्या अर्थाने कामास चालना मिळाली. ती १९९८ ते २००३ मध्ये, या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी रु. १८,००,०००/– इतकी रक्कम मंजुर करण्यात आलेले होती. या अंतर्गत ग्रंथालयाचे अधिकाधिक आधुनिकरण करुन OPAC व वेब सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. २००६ पासुन या ग्रंथालयातील दुर्मिळ व जुन्या वाचन साहित्याच्या संरक्षणासाठी डिजीटायझेशनचे अभियान हाती घेण्यात आलेले आहे.

या ग्रंथालयातील विविध उपक्रम व आधुनिकीकरण या सर्वांचा विचार करुन या ग्रंथालयास केंद्र शासनाद्वारे 'बेस्ट स्टेट लायब्ररी' पारितोषिक प्रदान करण्यात आले आहे. हा या ग्रंथालयाच्या वाटचालीतील महत्वपुर्ण क्षण होय. या ग्रंथालयाची वेबसाईट

***http://www.connemarapublibriarychennai.com***

**सरकारी प्राच्य – विद्या हस्तलिखीत ग्रंथालय मद्रास : तमिळनाडू**

मद्रास सरकारने या ग्रंथालयाची स्थापना १८२८ मध्ये केली. तत्पुर्वी कर्नल मॅकेझी, डॉ. लिडस जोन्स यांच्या बहुविध प्रयत्नाने दक्षिण भागातुन अनेक हस्तलिखीत गोळा केली होती. तसेच मद्रासच्या सिव्हील सर्व्हिसमधील सी.पी. ब्राउन यांनीही अनेक पोथ्या गोळा करण्यास मदत करुन हे सरकारी ग्रंथालय समृध्द करण्यास मदत केली होती. सुरुवातीला हा ग्रंथसंग्रह मद्रास कॉलेजच्या आवारात पण मद्रास लिटररी सोसायटीच्या ताब्यात ठेवण्यात आला. हा ग्रंथसंग्रह पुढे इ.स. १८७० मध्ये प्रेसिडन्सी कॉलेजच्या आवारात तत्कालिन संस्कृतचे प्राध्यापक पिकफोर्ड यांच्या अधिपत्याखाली ठेवण्यात आला होता. याच काळात ग्रंथालयाच्या वाढीस सुरुवात झाली. पिकफोर्ड नंतर डॉ. गुस्ता ओपर्ट, म. म. एस. खुप्पु स्वामी शास्त्री, पी.पी.एस. शास्त्री इ. प्राच्य विद्यापंडीतांचे मार्गदर्शन या ग्रंथालयास लाभले.

येथील हस्तलिखीतांची संख्या ५०,००० हुन अधिक आहे. संस्कृत व्यतिरीक्त तामीळ, कानडी, उर्दु, फारशी इ. हस्तलिखीतांचा संग्रह येथे आहे. इ.स. १९१० मध्ये येथील संस्कृत पुस्तकांची विवरणात्मक सुची २८ भागात प्रसिध्द झाली व नंतर इतर भाषांतील ग्रंथाची सुची १२ भागात प्रसिध्द झाली.

या ग्रंथालया मार्फत कित्येक संस्कृत ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्या प्रसिध्द झाल्या आहेत. येथुनच ॲनल्स ऑफ ओरिएण्टल रिसर्च हे नियतकालिक प्रकाशित केले जात आहे.

इ.स.१९३९ पासुन या ग्रंथालयाचे स्थलांतर मद्रास युनिव्हरसिटी ग्रंथालयाजवळ झालेले आहे.

**त्रिवेंद्रम हस्तलिखीत ग्रंथालय त्रिवेंद्रम : तमिळनाडू**

सध्या त्रिवेंद्रम युनिव्हरसिटीच्या स्वाधीन असलेले हे ग्रंथालय पुर्वी महाराजा पॅलेस लायब्ररी त्रिवेंद्रम या नावाने ओळखले जात असे. स्वातंत्र्या प्राप्ती पूर्वी त्रावण कोर, कोचिन ही संस्थाने प्रगतशिल व सुधारणाप्रिय होती. येथील राजे साहित्य, संगित व कला यांचे भोक्ते होते. ११ व्या शतकात विद्वानांचा चहाता कुलपुरुष शेखरयै याने हस्तलिखीत संग्रहालयाची मुहुर्तमेढ रोवली. त्यावेळचे ताडपत्रावरचे ग्रंथ अजुनही सुरक्षीत ठेवले असुन आज ही यामध्ये भर पडत राहिलेली आहे.

इ.स.१९२९ ते ४७ या कारकिर्दीत महाराजा स्वामी तिरुनाल यांनी या संग्रहालयाला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करुन त्याचे व्यवस्थापन सुरळीतपणे चालविले. राज महालामध्ये असलेल्या सर्व हस्तलिखीत पोथ्या, पुस्तके, ग्रंथ यांची निगा राखण्यासाठी व नविन ग्रंथाची आवक करण्यासाठी एक स्वतंत्र अधिक्षक नेमण्यात आला होता. तसेच कीडे, वाळवी, कसर यांच्या पासुन पोथ्यांची काळजी घेतली जाऊ लागली.

स्वामी तिरुनल नंतरचे महाराज चित्रासिन नाल (इ.स. १८४७ ते ६०), एलीयम तिरुनाल (इ.स. १८६० ते ८०), विशाखम तिरुनाल (इ.स. १८८० ते ८४) व तदनंतरचे केरळवर्य वालिय तम्पुरान महाराज मुलतिरुनाल, मित्र तिरुनाल व महाराणी सेमु लक्ष्मीबाई यांनी संग्रहाच्या विकासाकडे वैयक्तीक लक्ष घातल्याने पॅलेस लायब्ररीचे नाव, विशषतः दक्षिण भागात सर्वोतोमुखी झाले आहे. इ.स. १९४२ मध्ये पॅलेस लायब्ररी त्रिवेंद्रम युनिव्हरसिटीमध्ये सामील करण्यात येऊन अनंतशयन विश्वविद्यालय हस्तलिखीत ग्रंथालयामध्ये रुपांतरीत करण्यात आली.

इ.स. १८९५ मध्ये मुंबईच्या निर्णयसागर प्रेस ने या ग्रंथालयातील हस्तलिखीतांची एक सुची प्रकाशीत केली. नंतरच्याकाळात ती गणपती शास्त्री, डॉ. के.सी. पशीवशास्त्री इत्यादींनी आठ भागात एक विवरणात्मक सुची केलेली आहे. या ग्रंथालयात सुमारे ३३००० ग्रंथवेष्टणे आहेत. यामध्ये संस्कृत खेरीज तामिळ, मल्याळम भाषेतील पोथ्याही आहेत. त्रिवेंद्रम संस्कृत सिरीज मधून कित्येक ग्रंथाच्या चिकित्सक आवृत्ती प्रकाशीत झाल्या आहेत. असे हे एक वैशिष्ट्यपूर्ण हस्तलिखीत संग्रहालय आहे.

**जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय, कोइमतूर**

ग्रंथालय सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत खूले असते. शुक्रवार व दुसरा शनिवार या ग्रंथालयाला सुट्टी असते. वाचकानी कोणत्याही प्रकारे वाचनसाहित्य खराब करु नये याची सुचना दिलेली असते. या ग्रंथालयाची वार्षिक वर्गणी १०/– रुपये आहे.

ग्रंथालयाच्या पारंपारिक सेवाबरोबर या ग्रंथालयाचे वैशिष्ट्ये म्हणजे या ग्रंथालयास शालेय ग्रंथालयास जोडलेले असून याव्दारे दोन महिन्यातून एकदा देवघेवेची सोय उपलब्ध करुन दिली आहे. या राज्यात १९४८ मध्ये ग्रंथालय कायदा अस्तित्वात आल्यावर स्थानिक ग्रंथालय मंडळाव्दारे कायद्यातील तरतुदीनुसार ०१ समिती सी. एम. रामचंद्रन यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केली आणि कोईमतूर येथे १/६/१९५२ रोजी व्हिक्टोरीया टाऊन हॉलमध्ये या ग्रंथालयाची सुरवात करण्यात आली. या ग्रंथालयाचा विकास झाल्यावर स्थलांतर १९५६ मध्ये गांधी मेमोरीयल ग्रंथालयाच्या इमारतीत करण्यात आले. पुढे या ग्रंथालयासाठी २१४६३ चौफूट जागा असलेली भव्य इमारत उभी करण्यात आली. या इमारतीनजीक विद्यापीठ, महाविद्यालय, कृषी विद्यापीठ, लॉ कॉलेज असा शैक्षणिक परिसर असून या इमारतीचे उद्‌घाटन ६ जून १९८७ रोजी करण्यात आले आहे. या ग्रंथालयाच्या पुढील वाटचालीचा एकूण विचार करता १९९४ मध्ये येथे स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले तसेच झेरॉक्स सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. २००१ मध्ये संगणकीकरण संच या ठीकाणी पुरविण्यात आले आणि याच वर्षी ग्रंथालयाला उत्कृष्ट ग्रंथालय म्हणून दक्षिण विभागातून निवडण्यात आले. तसेच राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान कडून या ग्रंथालयाचा गौरव करण्यात आला. २००५ साली इंटरनेट ब्राऊझींगची सोय करण्यात आली. २००६ मध्ये बारकोड सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली.

या ग्रंथालयाअंतर्गत ०१ जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय, ८५ शाखा ग्रंथालय, ०४ फिरती ग्रंथालये, ७२ ग्रामिण ग्रंथालय, ०४ अर्धवेळ ग्रंथालये अशी एकूण १६६ ग्रंथालये कार्यरत असून या परिसरातील शासकीस ग्रंथालया व्यतिरक्त भाडेतत्वावरील ग्रंथालयांची संख्या विचारात घेता शाखा ग्रंथालये १० व मोफत ग्रंथालय ०७ ही कार्यरत आहेत. तर मोफत तत्वावरील ४६ ग्रंथालये आणि ७१ अर्धवेळ  ग्रंथालये कार्यरत असून या सर्व ग्रंथालयाची संख्या ३०० इतकी आहे. या ग्रंथालयामध्ये एकूण ११५ इतका सेवक वर्ग आहे.

## ५.४ केरळ :

## केरळ राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (तिरुवानंतपुरम) : केरळ

भारतातील हे जुने ग्रंथालय असुन याची स्थपना १८२९ मध्ये झाली. या ग्रंथालयाचे कामकाज कर्नल एडवर्ड कॉर्डगन या तत्कालीन ब्रिटीश रेसिडन्सकडे सोपवण्यात आले होते. तेच या ग्रंथालयाचे पहिले अध्यक्ष होते. कर्नल कॉर्डगन व राजा स्वाती तीरुनल यांनी या ग्रंथालयाच्या उभारणीमध्ये व प्रगतीमध्ये विशेष पुढाकार घेतला होता. विशेष म्हणजे त्यावेळी दरबारामधील कर्मचाऱ्यांना ग्रंथालयामध्ये प्रवेश देण्यात आला होता. पुढील काळात हे ग्रंथालय 'त्रिवेंद्रम पिपल्स लायब्ररी' या नावाने ओळखले जाऊ लागले. हिज हायनेस श्री. मूलम थीरुनल या ग्रंथप्रेमी राजाने प्रस्तूत ग्रंथालयाच्या स्थापनेमध्ये विषेश रस दाखविला. ग्रंथालयाचा सर्वांगीन विकास करण्याचे ठरविले. थीरुनल यांनी १८९९ मध्ये ग्रंथालयासाठी सुंदर व भक्कम इमारत बांधावयाचे आदेश जारी केले. या मागची धारणा अशी होती की, हर मॅजेस्ट्री राणी व्हिक्टोरीया यांच्या डायमंड ज्यूब्ली स्मरण प्रित्यार्थ एक स्मारक म्हणुन हे ग्रंथालय उभे राहावे. सन १९०२ मध्ये या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले व या नव्या जागेत ग्रंथालयाचे स्थलांतर झाले.

सन १९३८ मध्ये या ग्रंथालयाच्या प्रशासनाची जबाबदारी त्रावणकोर विद्यापीठाकडे सोपवण्यात आली. तर १९४८ मध्ये राज्य विधान परिषदेने एका ठरावा द्वारे हे ग्रंथालय राज्य सरकार कडे हस्तांतरीत करण्यात आले व शासनाने त्याचे प्रशासन पहावे अशा सुचना प्रस्तुत केल्या. सन १९५८ मध्ये हे ग्रंथालय राज्य मध्यवर्ती ग्रंथालय म्हणून जाहीर करण्यात आले. सन १९७४ मध्ये या ग्रंथालयाचा हिरक महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा झाला. त्याच बरोबर या ग्रंथालयाला उपविभागाचा दर्जा देऊन त्याचे प्रशासन राज्य शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य ग्रंथपालाची नेमणुक करण्यात आली. सन १९९२ मध्ये शासनाने या ग्रंथालयाचा कारभार मल्याळम भाषेतुन चालवण्याविषयी सुचन प्रस्तुत केली.

**ग्रंथालयाचे व्यवस्थापन :**

या ग्रंथालयाचे व्यवस्थापन एकुण १८ विभागाद्वारे चालवले जाते. तांत्रिक विभाग, देवघेव विभाग, इंग्रजी विभाग, मल्याळम विभाग, तामिळ, हिंदी, संस्कृत विभाग, संदर्भ विभाग, बालविकास, बांधणी विभाग, प्रतिलीपी विभाग, बंदीस्त संग्रह विभाग, सभासद अभ्यासिका ('अ' व 'ब' वर्ग सदस्या करिता) सर्वसाधारण अभ्यासिका ('क' व 'ड' वर्ग सभासद) व सभासद नसलेल्यांकरिता आर्थिक देवघेव विभाग, प्रशासकीय आधिकारी कार्यालय, इंटरनेट सेवा केंद्र, केरळ गॅझेट विभाग, मल्टीमिडीया विभाग आणि डिजीटल ग्रंथालय असे १८ विभाग आहेत. या ग्रंथालयाच्या प्रशासनाच्या दृष्टीने सल्ला देण्यासाठी एक स्वतंत्र सल्लागार समिती नेमलेली असुन, शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव, कार्याध्यक्ष, उच्च शिक्षण विभाग याच बरोबर शासन द्वारे नियुक्त अधिकारी व इतर सदस्य यांचा या समितीत समावेश असून राज्य ग्रंथपाल या समितीचा निमंत्रक म्हणून काम पहातो. याच बरोबर उपराज्य ग्रंथपाल हे ग्रंथालयाच्या प्रशासना करिता मुख्य ग्रंथापालांना मदत करतात. केरळ राज्यातील कायम वास्तव्य करुन असलेल्या व्यक्तीस या ग्रंथालयाचे सभासदत्व घेता येते. सभासदाचे अ,ब,क,ड असे चार वर्ग करण्यात आले आहे. या ठिकाणी मासिक व वार्षिक फी स्विकारली जात नसुन सभासद होत असताना परतावा स्वरुपात ठेव स्वीकारली जाते. पत्यक्ष अर्जा करिता कोणतेही शुल्क स्विकारले जात नाही.

**परवाना ठेवीचे स्वरुप :**

| वर्ग | ठेव रक्कम | वाचन साहित्य सवलत |
|---|---|---|
| अ वर्ग | ४००/– | ५ पुस्तके आणि २ नियत कालीके एका वेळी |
| ब वग | ३००/– | ३ पुस्तके आणि २ नियत कालीके एका वेळी |
| क वर्ग | २००/– | २ पुस्तके आणि १ नियत कालीक एका वेळी |
| ड वर्ग | १००/– | १ पुस्तक आणि १ नियत कालीक एका वेळी |

**ग्रंथ संग्रह :**

सध्या ग्रंथालयात ३,२७,१७७ इतके प्रलेख असुन हे विविध विषया संबंधी इंग्रजी, मल्याळम, तामीळ, संस्कृत भाषेतील आहेत. या व्यतिरीक्त २३ वृत्तपत्रे, एकुण १७० पेक्षा

अधिक देश विदेशी नियतकालीके यांचा यामध्ये समावेश आहे. यांच्या व्यतिरीक्त विविध संस्था, व्यक्ती यांच्या कडून देणगी स्वरुपात मोठ्या संख्येने नियतकालीके पाठवली जातात. या ग्रंथालयात विशेष संग्रह स्वरुपात प्राप्त झालेले संग्रहामध्ये हे श्री. व्ही. के. कृष्णमेनन, प्रा. नंदन मेनन, प्रा. एम. गोपाळ पिल्लई आणि श्री. रंजन विक्रम नायर व के. आर.इलकत ट्रस्ट यांचा समावेश आहे.

**ग्रंथालय सेवा :**

ग्रंथ देवघेव, संदर्भ सेवा याच बरोबर प्रतीलिपी सेवा, गॅझेट, सारसेवा, डेटा कनव्हर्जन, सर्टिफिकेट सेवा, इंटरनेट सेवा इ समावेश या ग्रंथालयाच्या सेवेशी आहे. एखाद्या वाचकाने मागणी केल्यास गॅझेट सार सेवे अंतर्गत प्रमाणित व अप्रमाणित केरळ शासनाच्या गॅझेटचे सार या ग्रंथालयाद्वारे वाचकांना उपलब्ध करुन दिले जातात. या सेवे करिता शुल्क आकारण्यात येते. तसेच शनिवार व्यतिरीक्त इतर कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत पुरविली जाते. डेटा कनव्हर्जन प्रमाणपत्र सेवे अंतर्गत मल्याळम भाषेतुन इंग्रजी भाषेत व अदला बदलीने हे प्रमाणपत्र ग्रंथालयाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येते. या सेवेअंतर्गत प्रत्येक प्रमाण पत्राकरिता रुपये २५/– इतका मोबदला आकारला जातो . ही सेवा कार्यालयीन दिवशी उपलब्ध असते. याच बरोबर आधुनिक सेवा स्वरुपात डिजीटल ग्रंथालय सेवा, मल्टीमिडीया सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. या ग्रंथालयातील सभागृह, भाडे तत्वावर इतर समारंभाकरिता व व्यक्तीश: व राजकीय पक्षांना उपलब्ध करुन दिले जाते. ग्रंथालयाद्वारे ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम सात महिन्याच्या कालावधी करिता राबवीला जातो. या वर्गाची क्षमता ४१ असुन २००५ पासुन कमवा व शिका ही योजना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ग्रंथालयाची वेब साईट *www.statelibrary.kerla.gov.in*

## ५.५ बिहार :

### खुदाबक्ष ग्रंथालय, पाटना :

खुदाबक्ष ओरीयंटल सार्वजनिक ग्रंथालय हे केवळ देशात नव्हे तर जागतीक स्तरावर ओळखले जाणारे सार्वजनिक ग्रंथालय असून ते पाटना शहरातील गंगेच्या काठी वसलेले आहे. पाटना ग्रंथालय हे सम्राट चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक अशा चकवर्ती राजाबरोबरच मखदुम या मणेरी, गुरु गोविंद सिंग, अशा ऐतिहासिक काळातील महान व्यक्तिच्या कर्मभूमीत स्थापन करण्यात आलेले आहे. येथे केवळ पुस्तकांचा संग्रह केलेला जात नसून माहिती स्तोत्रांचासुद्धा विविध विचार व कल्पना यांचे आधुनिक काळाच्या अनुषंगाने संप्रेशण करणारे हे एक ज्ञानसंग्रह केद्र आहे. या ठीकाणी हजारोंच्या संख्येने दुर्मिळ हस्तलिखीते संग्रहित करण्यात आलेली आहेत. ही हस्तलिखीते अरेबीक, पर्सियन, उर्दू , तुर्की, पुश्तु हिंदी, संस्कृत या भाषेतील असून विविध विषयांशी संबंधीत आहेत. तसेच दुर्मिळ असे प्राचीन ग्रंथ संग्रहित करण्यात आलेले आहेत. हे ग्रंथ देखील आशिया खंडातील भाषेबरोबरच पाश्चात्य भाषेमध्येसुध्दा लिहिलेले आहेत. येथील अत्यंत महत्वपूर्ण अशा उर्दु नियतकालिकांचा संग्रह हा वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो. या ज्ञानसंग्रहाबरोबरच मुघल, राजपूत, बौध्द, तुर्किश, इराणीयन व मध्य आशिया शैलीतील नमुनेदार पेंटिग्ज येथे संग्रहित करण्यात आलेली आहेत. दीर्घ ऐतिहासिक परंपरा असणारे हे ग्रंथालय मौलवी खुदाबक्ष खान यांनी १४ जानेवारी १८९१ मध्ये स्थापन केलेले आहे. सुरवातीस येथे ४,००० हस्तलिखीते संग्रहित करुन ते सार्वजनिक स्वरुपात ५ ऑक्टोबर १८९१ रोजी सर्वासाठी खुले करण्यात आले. या ४,००० हस्तलिखीतापैकी १४०० हस्तलिखीते खुदाबक्ष खान यांचे विद्वान पिताजी मौलवी मोहमद बक्षी खान यांच्या संग्रहातील आहेत. इतर सर्व ग्रंथ त्यांच्या वैयक्तिक प्रयत्नातून संग्रहीत केलेले असून ते एका कराराने देशाकडे सोपविण्यात आलेले आहेत.

खुदाबक्ष यांच्या १८४२ ते १९०८ च्या कालखंडात त्यांच्या अखेरपर्यंत व त्यानंतरही सातत्यपूर्ण येथील संग्रह वृध्दींगत होत आलेला आहे. डिसेंबर १९९८ मध्ये एका कायद्याद्वारे संसदेने हे ग्रंथालय म्हणजे देशातील एक महत्वपूर्ण संस्था आहे, असे जाहीर केले. या

अगोदर जुलै १९७० पासून एका स्वायत्य संस्थेच्या माध्यमातून शासनाद्वारे एक व्यवस्थापक मंडळाद्वारे या ग्रंथालयातील कारभारास सुरवात झाली. बिहार राज्याचे राज्यपाल हे या ग्रंथालयाचे पदसिध्द कार्याध्यक्ष असून दैनंदिन कारभाराच्या देखभालीची जबाबदारी स्वतंत्र संचालककाकडे सोपविण्यात आलेली आहे.

**या ग्रंथालयाची उद्दिष्टे व कार्ये :**

१. या ग्रंथालयाद्वारे अभ्यासकांना संशोधनाकरिता सोयी उपलब्ध करुन देणे तसेच महत्वपूर्ण हस्तलिखीते, पेंटीग्ज, दुर्मिळ पुस्तके यांचे संवर्धन व संरक्षण करणे याचबरोबर अरेबिक, पार्शियन, उर्दू व हिंदी या भाषेतील हस्तलिखीतांची सूची व नियतकालिके यांचे प्रकाशित करणे.

२. विद्वान व अभ्यासक यांना संशोधनाकरिता प्रोत्साहन देणे, सामाजिक एकता सांभाळून सार्वजनिक स्वरुपात सेवा उपलब्ध करुन देणे.

३. ग्रंथालयाद्वारे सूरु करण्यात आलेले विविध प्रकल्प, उदा. हस्तलिखीतांचे संपादन, हस्तलिखीतांच्या वर्णनात्मक सूचीचे संपादन, उर्दू नियतकालिकांचे निर्देश, संदर्भसूची इत्यादी कार्यरत ठेवणे. विविध कार्यशाळा, परिषदा, चर्चासत्रे, प्रदर्शने व व्याख्याने आयोजित करुन तरुण अभ्यासकामध्ये जागृती निर्माण करणे.

४. तरुण अभ्यासकांना शैक्षणिक सहकार्याच्या दृष्टीकोनातून केंद्रसरकाच्या सहाय्याने शिष्यवृत्त्या प्रदान करणे .

५. सेवा देण्यासाठी ग्रंथालयाद्वारा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असून याद्वारे संग्रहाचे संवर्धन आणि सुलभ विकसित सेवा देणे.

६. विविध अंतर्गत व बहिस्थ माध्यमातून आणि वैयक्तिक आणि सामुहिक प्रशिक्षणाव्दारे सेवकामध्ये अधिक ज्ञान व तंत्रज्ञान कौशल्ये विकसित करण्याचा ग्रंथालयाद्वारे प्रयत्न केला जात असून अशा उपक्रमांना प्राधान्यक्रम देऊन संघटनात्मक कार्य, तंत्रज्ञान कौशल्य व वाचकाची काळजी सुव्यस्थित घेण्यासंदर्भात व्यवस्थापनाव्दारे विविध प्रयत्न करणे.

**संस्थेची नियमावली व कार्यपध्दती :**

या ग्रंथालयाने कालसापेक्ष नियमावलीमध्ये बदल केलेला असून त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे,

१. खुदाबक्ष ओरीएंटल सार्वजनिक ग्रंथालय कायदा हा प्रत्यक्षात १९६९ मध्ये अस्तित्वात आला.

२. या ग्रंथालयाची नियमावली १९७० मध्ये तयार करण्यात आली आहे.

३. या ग्रंथालयाच्या देखभालीसंदर्भात नियम व कायदा १९८१ मध्ये तयार करण्यात आले व १९८५ मध्ये या मसुद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

४. या ग्रंथालयाच्या व्यवस्थापनेच्या सभेविषयक व प्रशासनविषयक नियमावली १९८४ मध्ये तयार करण्यात आली.

५. याचबरोबर आर्थिक व्यवहाराविषयक नियमावली १९८४ व सेवा विषयक नियमावली १९८६ मध्ये करण्यात आली. पुढे सेवा विषयक नियमावली मध्ये १९८७ मध्ये सुधारणा करण्यात आली.

६. अशा प्रकारे एक नियम बद्ध रचनावली तयार करुन या ग्रंथालयाचा कारभार सुरळीतपणे चाविला जातो. विविध कायदे व नियम या अनुषंगाने ग्रंथालयविषक कार्याची अंमलबजावणी करत असताना केंद्रशासनाची पुर्वपरवानगी घेऊन मगच कोणतेही कामकाज केले जाते. या ग्रंथालयाचे सर्व नियम व कायदे याला कार्यालयीन प्रसिद्धी दिल्यानंतर पुढील कार्यवाही सुरु होते. यामुळे ग्रंथालयाच्या कार्यपध्दतीमध्ये एक सुटसुटीतपणा व अधिकृतपणा आलेला असल्यामुळे कारभार पारदर्शक होण्यास मदत झाली आहे.

**ग्रंथालयाची इमारत व भौतिक सुविधा :**

या ग्रंथालयाचे संस्थापक खुदाबक्ष खान यांनी बांधलेल्या दोन मजली इमारतीमध्ये सन१८९८ मध्ये या ग्रंथालयाचा कारभार सुरु झाला. सन १९३४ मधील भूकंपानंतर या ग्रंथालयाचा दुसरा मजला कामकाजाच्या दृष्टीकोणातून निरुपयोगी ठरला. सन १९३८ मध्ये बिहार राज्यशासनाने ग्रंथालयाच्या परिसरामध्ये एक नवीन इमारत उभी करुन येथील सर्व संग्रह स्थलांतरीत केला. ग्रंथालयातील वाढता वाचन साहित्य संग्रह व कामकाजाचा विस्तार विचारात घेऊन केंद्रशासनाने सन १९६९ मध्ये या इमारतीचा तिसरा मजला

बांधला. पुढील १३ वर्षाच्या कालखंडामध्ये एक स्वतंत्र स्वरुपाची इमारत संलग्नित स्वरुपात उभी करण्यात आली. या इमारतीचे उद्‌घाटन १२ फेब्रुवारी १९८३ मध्ये भारताचे तत्कालीन राष्ट्रपती गॅनी झैलसींग यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथालयात येणाऱ्या संशोधकांकरिता पुढील काळात एक इमारत विकत घेण्यात आली व तिचा निवासाकरिता वापर करण्यात येऊ लागला.

या ग्रंथालयातील भौतिक सुविधांचा विचार करता हस्तलिखीते, दुर्मिळ ग्रंथ यांच्या संवर्धनाकरता वातानुकुलीकरण व बाष्प नियंत्रणासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यात आली आहे. ग्रंथालयातील वाढत्या संग्रहामुळे व कामकाजामुळे ग्रंथालयास अधिक जागेची गरज भासू लागली, या पर्श्वभूमीवर स्वतंत्र इमारतीची मागणी करण्यात आली. याची पुर्तता पुढे १० व्या पंचवार्षिक योजनेत झाली. आज ग्रंथालयात सर्व प्रकारच्या आधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून एक स्वतंत्र संरक्षण संवर्धन प्रयोगशाळा उभारली आहे. येथे लॅमिनेशन, बुकबांधणी, धुरीकरण इ. प्रकारची काळजी घेतली जाते. या ग्रंथालयामध्ये पुढील विभागांतर्गत ग्रंथालयाचे कामकाज चालते. १. वाचन साहित्य मागणी, २. तांत्रिक विभाग, ३. सेवा विभाग, ४. देवघेव विभाग, ५. हस्तलिखीत विभाग, ६. नियतकालिक विभाग अशा विविध विभागाबरोबर कार्यकालीन विभाग या व्यतिरीक्त संरक्षण संवर्धन विभाग, विशेष सेवा विभाग असेही विभाग येथे कार्यरत आहेत. आज ग्रंथालयात ५६ कर्मचारी कार्यरत असून येथील देवघेवीचे स्वरुप विचारात घेता सन १९७५ च्या कालखंडाचा विचार करता आज तर ही वाढ चौपट झाली आहे. तसेच वाचन साहित्य संग्रहात देखील तीप्पटीने वाढ झाली आहे. सन १९७४ – ७५ मध्ये येथे साधारणता ७७,४०० इतके प्रलेख होते ही संख्या सन २००६ –०७ सालापर्यंत २,८०,१२३ पर्यंत पोचली होती. या ग्रंथालयाद्वारे 'खुदाबक्ष लायब्ररी जर्नल' हे प्रकाशन सन१९७७ पासून प्रकाशित केले जात आहे. या ग्रंथ संग्रहात १६,००० हस्तलिखीते, ९०,०००जूनी व दुर्मिळ पुस्तके आणि २००० चित्रे ज्यामध्ये मोघल, राजपुत, इराणी, तूर्किश शैलीतील चित्रे अशांचा समावेश आहे. या ग्रंथालयातील महत्त्वपूर्ण संग्रहामध्ये तारिक – ई – खारद –ई तिपुरी भाट, पादशहा – तमाह, शाहिनशटानमः, शाहनमः ऑफ फिरुदसी (पार्शियन कविता संग्रह),

जामी सुल्कीक मायतीक, दिवान–इ–हाकीज, पोएम ऑफ फादी, दीवान मिर्सा कामरान, स्पेसीमन ऑफ कूरान, साफीनन –उल्क – शैलीया, आमीर खुशर यांची कविता अशा दुर्मिळ मुगल कालीन व पार्शियन ग्रंथाचा समावेश या संग्रहात आहे.

या ग्रंथालयाचे कामकाज पहाण्यासाठी केंद्रीय शासनाच्या अधिकृत गॅझेटप्रमाणे ग्रंथालय बोर्ड स्थापन करण्यात आलेले असून यामध्ये बिहार चे राज्यपाल पदसिध्द कार्याध्यक्ष, अकाऊंट जनरल बिहार, यांच्या बरोबरच मौलवी खुदाबक्ष खान बहादूर मुरादापूर यांच्या कुटुंबातील आठ व्यक्ती या केद्रशासनाद्वारे नामनिर्देशित केल्या जातात. यापैकी चार केंद्रशासन व चार राज्यशासनाद्वारे नामानिर्देशीत केल्या जातात. या मंडळाचा सचीव हा खुदाबक्ष ओरीएंटल सार्वजनिक ग्रंथालयाचा संचालक हा पदसिध्द असतो. या ग्रंथालयाचे अंदाजपत्रक २००५–०६ साली ५,९९,१६,२०९.३३/– इतके होते आज ते ६० कोटी रु. इतके वृध्दींगत झालेले आहे. येथील वर्षभरातील संदर्भ सेवेचा सांख्यिकीय निर्देश हा साधारणत: प्रतिवर्षी ३०,००० हून अधिक असतो.

**शासकीय ऊर्दू ग्रंथालय, पाटणा**

केंद्रशासनाच्या अखत्यारीत असलेले देशातील अशाप्रकारचे हे एकमेव ग्रंथालय होय. हे ग्रंथालय अशोकपथावर खुदाबक्ष ओरीयंटल ग्रंथालयाच्या पुढे आहे. याची स्थापना १८९९ मध्ये करण्यात आली आहे. ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून ३०,०००हून अधिक ग्रंथसंग्रहीत केलेले असून विविध भाषेतील (३५) वृत्तपत्रे घेतली जातात. स्वायत असलेले बिहार राज्यातील हे एकमेव ग्रंथालय होय. या ग्रंथालयाकडे ५०० ऊर्दू, महत्त्वपूर्ण भाषांतरे संग्रहीत करण्यात आली आहेत. या ग्रंथालयाची देखभाल मनुष्यबळ विकास मंत्रालय बिहार यांच्याकडून केली जाते. १९३८ मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री डॉ. सय्यद मेहमूद यांनी या ग्रंथालयाचे पुर्नसंघटन केले. सध्या हे ग्रंथालय सकाळी ८ ते रात्रौ ८ या वेळेत खुले असते व शुक्रवार सुट्टीचा दिवस असतो.

या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह तत्वज्ञान, धर्म, कथाकादंबरी, काव्य, नाटक, चरित्र हा अधिकाअधीक प्रमाणात वाचला जातो. तसेच आजकाल स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे.

ग्रंथालयाकडे नियतकालिके वाचनासाठी स्वतंत्र व्यवस्था केली असून ग्रंथवाचनासाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध करुन देण्यात आला आहे. ग्रंथालय सेवकांकरिता दोन कक्ष उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या ठिकाणी एकूण १० कर्मचारी असून ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, तालीकाकार, ग्रंथालय सहाय्यक, दप्तरी, माळी इ. चा सामेवश आहे. शासनाकडून दरवर्षी रुपये ३,००,००० इतके अनुदान सर्वसाधारणत: उपलब्ध करुन दिले जाते.

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय पाटणा :**

**ऐतिहासिक पुर्वपिठीका :**

लाहोर येथील डॉ. सच्चीदानंद सिन्हा यांच्या पत्नी श्रीमती राधिकादेवी यांच्याकडे १८०० च्या कालखंडात एक सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा होता. त्या पाटणा येथे आल्या तेव्हा या परिसरात मुली व तरुणी यांच्यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ नाही हे पाहून त्यांना धक्का बसला. म्हणूनच श्रीमती राधिका यांची इच्छा होती की स्त्रियांना चर्चा करण्यासाठी व्यासपीठ हवे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी एक मनोदय व्यक्त केला होता. या विचाराने प्रेरीत होऊन डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांनी अशा संस्थेच्या स्थापनेसाठी बिहारचे तत्कालीन राज्यपाल लॉर्ड सिन्हा यांच्याकडे ५०,०००/– रुपये सुपूर्द केले आणि २८ मार्च १९२२ रोजी अशा संस्थेच्या उभारणीचा पायाभरणी कार्यक्रम बिहार ओरिसाचे प्रभारी गव्हर्नर सर हॉलमंड ली मेस्कूर्स यांच्याहस्ते करण्यात आला.

डॉ. सिन्हा यांनी ग्रंथालयासाठी स्वत:च्या संग्रहातील १०,००० ग्रंथ देणगीदाखल दिले. आजही या ग्रंथांचे पैशात मुल्य करणे अशक्य आहे. आज हे ग्रंथालय वाचन साहित्याने समृध्द असून याठिकाणी इतिहास, साहित्य, समाजशास्त्र, दुर्मिळ नियताकालिके संग्रहीत करण्यात आलेली आहेत. डॉ. सिन्हा यांनी संग्रहित केलेले सर्व वाचनसाहित्य दुर्मिळ स्वरुपाचे आहे. १८०० ते १९०० च्या काळातील चार महत्वपूर्ण नियतकालिकांचे संच संग्रहीत करण्यात आले आहेत. हे सर्व संच १८५२ ते १९५१ च्या काळातील आहेत. यामध्ये दि मॉर्डन रिव्ह्यू इंड्यिन पीपल्स, कलकत्ता रिव्ह्यू, हिन्दूस्थान रिव्ह्यू यांचे खंड उत्तमप्रकारे येथे सांभाळलेले आहेत. **तसेच कायस्थ समाजाचे संपूर्ण संच विनंतीवरुन येथे उपलब्ध करुन दिले जातात. या ग्रंथालयात कॉंग्रेस पक्षाची १८५५ ते १९२२ या**

**काळातील सर्व चर्चात्मक कागदपत्रे आणि सभेची इतिवृत्ते येथे संग्रहीत केलेली असून अशा प्रकारचा संग्रह भारतात कुठेही नसावा असा दावा केला जातो.**

काँग्रेस पक्षाच्या अमुल्य धनाची काळजी पक्षाकडून घेणे गरजेचे आहे. हे ग्रंथालय केवळ हा ठेवा सांभाळत आहे. या ग्रंथालयाच्या सुरवातीच्या ट्रस्टीमध्ये मुख्य न्यायाधीश पाटणा, आयसीएस अधिकारी, मंत्री, कुलपती अशा मान्यवराचा समावेश होता. तसेच आजीव सभासदामध्ये देखील उच्चपदस्थ व्यक्ती व उच्चशिक्षीत व्यक्ती यांचा समावेश होता.

या ग्रंथालयातील सेवकास सिन्हा संस्थेकडील देणगीमधून वेतन देत असत. तसेच शासनाकडून याकरिता अल्पस्वरुपात वेतन दिले जात असे. या ग्रंथालयाचे व्यवस्थापन बिहारचे राज्यपाल, बिहार हायकोर्टचे उच्च न्यायधीश, शिक्षण मंत्री व पाटणा विद्यापीठाचे कुलगुरु अधिकृत विश्‍वस्त असून, अजीवन सभासदामध्ये श्री. अवघेश्वर प्रसाद सिन्हा व इतर आठ सदस्यांचा समावेश असून आठवे सदस्य हे अतिरिक्त सचीव शिक्षण विभाग हे होत. विभागीय प्रतिनिधी म्हणून सदस्यांची नियुक्ती केली जात असून विभागाचा वारस म्हणून माननीय सचीन श्री. गोपाळकृष्ण सिन्हा कार्यरत आहेत.

या ठिकाणी या ग्रंथालयात विविध नियतकालिके, वृत्तपत्रे वाचकाकरीता, संशोधन विषयक वाचनाकरीता उपलब्ध करुन दिली जातात. स्वतंत्र महिला कक्ष व अलीकडेच इथे अभ्यासिकेकरिता मोठा कक्ष उपलब्ध करुन दिला आहे. स्वतंत्र ऐतिहासिक ग्रंथालय म्हणून याची दखल घेतली जाते.

राज्य मध्यवर्ती ग्रंथालय हे सर्वसामान्यतः सच्चिदानंद सिन्हा ग्रंथालय किंवा जिल्हा ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. हे ग्रंथालय सुरवातीस राज्य शासनाने १९२४ मध्ये स्थापन करुन या ग्रंथालयास राज्य सार्वजनिक ग्रंथालय बिहार संबोधण्यात येऊ लागले. सुरवातीच्या काळात हे एक अत्यंत महत्वपूर्ण शासकीय ग्रंथालय म्हणून ओळखले जात होते. पुढे डॉ. सच्चिदानंद सिन्हाच्या पत्निच्या मृत्यूपश्चात या संस्थेचे नामकरण श्रीमती राधिका सिन्हा आणि सच्चिदानंद सिन्हा ग्रंथालय असे करण्यात आले आणि त्याचा दर्जा बदलून त्यास राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा दर्जा एका करारान्वये २४ नोव्हेंबर १९९५ रोजी देण्यात आला. हा करार ग्रंथालयाचे विश्‍वस्त व बिहार शासन यांच्यामध्ये करण्यात आलेला आहे. पुढे हे

ग्रंथालय डॉ. सच्चिदानंद सिन्हा यानी बिहार राज्यास भेट म्हणून अर्पण केले. डॉ. सिन्हा यांचे भाग्य म्हणजे ते स्वत: श्रीमंत होते व त्याकाळी ग्रंथांच्या किंमती फारच कमी असत. त्यांनी आपला बहूतांशी वेळ हा ग्रंथवाचनात व्यतीत करुन त्याकरिता अनेक ग्रंथ विकत घेऊन त्याचा संग्रह केला आणि यातून त्यांच्या वैयक्तिक ग्रंथालयाचा जन्म झाला होता.

सध्या हे ग्रंथालय विस्तृत अशा दोन मजली इमारतीमध्ये संग्रहीत करण्यात आलेले असून या ग्रंथालयाने बिहारमधील शैक्षणिक क्षेत्राकरीता महत्वपूर्ण योगदान दिले आहे. या ग्रंथालयाचा लाभ इतर व्यक्तींच्या बरोबर विविध विषयाचे शिक्षक, विद्यार्थी, विद्वान, संशोधक अशा विविध व्यक्तींकडून घेतला जाता आहे. या ग्रंथालयाच्या नवीन इमारतीचा पायाभरणी समारंभ १९८० मध्ये सुप्रसिध्द समाजसेवक श्री. जयप्रकाश नारायण यांच्या हस्ते करण्यात आला होता. श्री. जयप्रकाश नारायण, डॉ. सिन्हा यांचे समकालीन होतेच शिवाय ते त्यांचे निकटवर्तीय मित्रही होते. या नव्या इमारतीच्या तळ मजल्याच्या माध्यमातून ६५०० चौ. फूट जागा उपलब्ध झाली आहे. या नव्या इमारतीमध्ये हे ग्रंथालय स्थलांतरीत करुन जून्या इमारतीमध्ये सेमीनार आयोजन करण्यात येतात. इतर कक्षाचा वापर हा छोटी सम्मेलने, चर्चासत्रे, वाचनपत्रे याकरिता केला जातो. लवकरच येथे ग्रंथालयास भेट देण्याच्या व्यक्तींकरिता छोटे गेस्टरुम उपलब्ध करून देण्याची योजना संस्था चालकांच्या विचारात आहे. उन्हाळाच्या दिवसात वृत्तपत्र विभाग सकाळी ७.३० ते ११ व दुपारी ३.३० ते रात्रौ. ५.३० या वेळेत खुला ठेवतात. ग्रंथांची देवघेव सकाळी ७.४५ ते १०.४५ व दुपारी ३.४५ ते ८.१५ पर्यंत चालते. हिवाळ्याच्या दिवसात अभ्यासिका सकाळी ८ ते ११.३० व दुपारी ३ ते रात्रौ ८ या वेळेत असते. ग्रंथ देवघेव सकाळी ८.१५ ते ११.१५ व दुपारी ३.१५ ते ८.१५ वाजेपर्यंत असते.

हे ग्रंथालय शनिवारी व शासकीय सुट्टीच्या दिवशी पुर्णत: बंद असते. या ग्रंथालयात आज जवळजवळ १,८०,००० इतके ग्रंथ असून नियतकालिके व वृत्तपत्रांचे बांधीव जुने खंड हे अत्यंत दुर्मिळ असून इतर ग्रंथालयात इतक्या प्रमाणात काठेही दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध होणार नाहीत.त्यामुळे या संग्रहाचा संशोधकांना व अभ्यासकांना फारच मोठा लाभ होतो. या ग्रंथालयास केवळ भारतीय विद्यापीठ नव्हे तर परदेशी विद्यापीठातील विद्यार्थी व विद्वान

मंडळी भेट देत असून यामध्ये जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, यू.के. यू.एस. या देशातील व्यक्तींचा समावेश आहे. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी या ग्रंथालयास भेट देऊन ग्रंथालयाबद्दल कौतूकोद्‌गार काढले होते. तसेच अमेरीकेतील अधिकारी श्री. होरासी (अमेरिकन ग्रंथालय व काँग्रेसचे भारत विभागाचे प्रमुख) यानी या ग्रंथालयास भेट देवून हे एक भारतातील अत्यंत दर्जेदार ग्रंथालय असल्याचा उल्लेख केला होता. या ठिकाणी देशी व परदेशी नियतकालीकांची संख्या ६२० एवढी असून ग्रंथालयाची विद्यमान इमारत वाढत्या संग्रहाच्या दृष्टीन अपुरी आहे.

या ग्रंथालयातील विविध विभाग विचारात घेता १) विस्तृत अभ्यासक्रम व संदर्भ विभाग २) स्थानिक साहित्य विभाग ३) देवघेव विभाग, यामध्ये विद्यार्थ्यांना विशेष करुन क्रमिक पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. जे विद्यार्थी स्वतःसाठी पुस्तके विकत घेऊ शकत नाहीत अशांसाठी ही पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. ४) बालकांकरिता अभ्यासिका याव्दारे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अभ्यासिका उपलब्ध करुन दिली आहे. ५) अंध वाचकांसाठी स्वतंत्र विभाग आहे. ६) संशोधकांसाठी स्वतंत्र विभाग ७) नियतकालिके व वृत्तपत्रे विभाग हा विभाग लोकांच्याकडून मोठ्या प्रमाणात वापरला जातो. येथील बालवाचकांची संख्या मोठी असून त्यांच्याकरिता नवनवीन नियतकालिके, गोष्टींची पुस्तके याची उपलब्धता करुन दिली जाते. या ग्रंथालयोमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या २७ इतकी असून यामध्ये प्रशिक्षीत कर्मचारी ०४, अकुशल २३ असून या ग्रंथालयास राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो. हा निधी रु. २०,००,०००/– च्या घरात असतो सभासद संख्या २,५०० इतकी असून दरदिवशी ४०० वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात.

### ५.६ आंध्रप्रदेश :

### ब्राऊन मेमोरीयल ग्रंथालय (कडप्पा) :

सि. पी. ब्राऊन याचा जन्म कलकत्ता येथे (१७९८–१८८४) मध्ये झाला. त्याचे वडील फादर रेवरंड डेव्हिड ब्राऊन हे १७६३–१८१२ या काळात विल्यम कॉलेज कलकत्ता येथे कार्यरत होते. ते स्वतः एक भाषातज्ञ होते. आपल्या मुलानी अनेक भाषा शिकाव्यात अशी त्यांची इच्छा होती. डेव्हिड ब्राऊन वारल्यानंतर त्यांचे कुटूंब लंडनला गेले. तिथे पुढे सि. पी. ब्राऊन यानी हॅलेसबरी महाविद्यालयातून शिक्षण पुरे करताना हिंदूस्थानी व संस्कृत या विषयाचे परितोषिक प्राप्त केले. पुढील काळात ते इस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून भारतात आले. १८२० मध्ये कडप्पा येथे त्यांची कलेक्टर म्हणून नेमणूक करण्यात आली. याच ठिकाणी त्यांनी हिब्रु, ग्रीक, लॅटीन, संस्कृत या भाषेबरोबरच अत्यंत परिश्रमपूर्वक तेलगू भाषा आत्मसात केली आणि पुढील काळात या परिसरातील तेलगू भाषेतील हस्तलिखिते संग्रहीत करुन त्याचे भाषांतर करण्यात सुरुवात केली. या कार्यासाठी त्याच्या अधिपत्याखाली २० पंडीत, तेलगू भाषेतील अक्षर वाङमयाचे भाषांतर करत असत. त्याच्या या साहित्य प्रपंचामुळे त्याचा बंगला हा बाऊन महाविद्यालय या नावाने ओळखला जात असे. या काळात त्यानी ५००० हून अधिक हस्तलिखिते तेलगू, संस्कृत व इतर भाषातून संग्रहीत केली. याच प्रयत्नातून पुढे त्यांनी इंग्रजी तेलगू शब्दकोश प्रकाशीत केला.

एकूणच आपल्या येथील वास्तव्यात त्यांनी तेलगू साहित्याच्या संग्रहासाठी व भाषांतरासाठी मोलाचे योगदान दिले. त्याच्या प्रयत्नातून पामपृष्ठावरील ५००० हस्तलिखिते त्यानी रुपये ३०,०००/– इतक्या किंमतीस स्वतःच्या रकमेतून विकत घेतली होती. तसेच त्यानी वेमनामधील १२१५  सर्ग भाषांतरीत करुन स्वतःच्या रकमेतून प्रकाशीत केले होते. त्याना शिक्षण विषयक विशेष आस्था असल्यामुळे कडप्पा येथे ०२ शाळा व माऊलीपट्टन येथे ०२ शाळा व मद्रास येथे व एक शाळा मोफत स्वरुपात सुरु केल्या. गुंटूर येथे जिल्हा अधिकारी असताना त्यानी १८३२–३३ मधील काळात अनेक वेळा तेथील लोकांना पुष्कळ मदत केली.

आपल्या कालखंडात त्यांनी तेलगू भाषांतकार सरकार म्हणून शासनासाठी योगदान दिले. शिवाय सेवा निवृत्तीनंतर तेलगू भाषेचे प्राध्यापक म्हणून लंडन विद्यापीठात अध्यापन केले. आपल्या आयुष्यातील ८६ वर्षापैकी ६६ वर्षे त्यांनी तेलगू भाषा व साहित्याच्या अभ्यासासाठी व प्रसारासाठी वेचलेली होती.

अशा या असाधारण व्यक्तीमत्वाच्या स्मरणार्थ कडप्पा येथील ब्राऊन याच्या बंगल्यानजीक त्याच्या स्मरणार्थ ब्राऊन ग्रंथालयाची इमारत उभी करण्यात आली. या करिता या परिसरातील स्व. कृष्णास्वामी यांनी आपली जमीन व रुपये ५०,०००/– इतकी रक्कम देणगी दाखल देऊन या इमारतीच्या पायाभरणाचा समारंभ २२ जानेवारी १९८७ रोजी केला.

यासाठी येथील जिल्हा अधिकाराच्या अधिपत्याखाली सि. पी. ब्राऊन मेमोरीयल ट्रस्ट १९८६ मध्ये पूर्वतयारी करिता स्थापन केला होता. या ट्रस्टच्या माध्यमातून व शासनाच्या सहकार्याने येथे ग्रंथालय इमारत उभी करुन हे ग्रंथालय सुरु करण्यात आले. आज या ठिकाणी ६५,००० इतके विविध भाषेतील ग्रंथ असून त्या ठिकाणी दुर्मिळ असे नियतकालीकांचे जूने खंड संग्रहीत करुन ठेवण्यात आले आहेत. या परिसरातील विविध साहित्यिक विद्‌वजन व काही संस्था यांनी या ग्रंथालयाला आपल्या संग्रहातून महत्वपूर्ण पुस्तके देणगीदाखल दिली आहेत.

या ग्रंथालयाला तेलगू विद्यापीठ हैद्राबाद या संस्थेने संशोधन केंद्राचा दर्जा दिला आहे. तसेच या ठिकाणी स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असे ग्रंथही मोठ्या संख्येने संग्रहीत करण्यात आले आहेत. या ग्रंथालयाच्या विकासासाठी आंध्रप्रदेश शासन व राजा राम मोहन रॉय प्रतिष्ठानकडून ही आर्थिक उपलब्धता करुन देण्यात आली आहे. इतरही संस्था व व्यक्ती सीपी ब्राऊन यांच्या कार्याचे स्मरण ठेऊन सहकार्य करत आहेत.

याठिकाणी १८० हस्तलिखिते संग्रहीत केली आहेत. दुर्मिळ अशी ब्रम्हताराखादम – पोतरान्पुलन्ना ही दोन दुर्मिळ हस्तलिखिते येथे संग्रहीत केलेली असून ३० दुर्मिळ ग्रंथ १८६१ ते १९३८ या कालावधीतील आहेत.

**सारस्वत निकेतम वेतापाले (१९१८) :**

भारतातील ग्रामीण ग्रंथालयापैकी हे एक ग्रामीण ग्रंथालय उत्तूकरी सुब्रया श्रेष्ठी आणि त्यांच्या मित्रानी हिंदू युवाजन संघ ग्रंथालयाची स्थापना १५ ऑक्टोबर ११ रोजी केली. सुरवातीस त्याठिकाणी १०० ग्रंथ, २ वृत्तपत्रे, ०१ साप्ताहिक इतके साहित्य होते. पाच वर्षात हे ग्रंथालय निधी अभावी बंद करण्याची वेळ आली. उत्तकरी सुब्राया श्रेष्ठी यांनी ४०००/– रुपये आगाऊ रक्कम देऊन संस्थेवरील कर्जाचा बोजा मोकळा केला व रुपये २०००/– हून अधिक रुपये किंमतीचे ग्रंथ देणगीदाखल दिले व ग्रंथालयाचे पुर्ननामकरण सारस्वत निकेतम असे करण्यात आले. १९२३ मध्ये नवीन इमारत बांधून याठिकाणी १ सप्टेंबर १९२४ रोजी या ग्रंथालयाचे स्थित्यंतर करुन त्याचे उद्घाटन शेठ जमनालाल बजाज यांच्या हस्ते करण्यात येवून, या इमारतीस सुब्रराज महाल असे नाव देण्यात आले. तेव्हापासून श्री. श्रेष्ठी यांनी या ग्रंथालयास अधिकाअधीक सहकार्य करुन सक्षम करण्याचा प्रयत्न केला. वेळोवेळी ते अधिक महत्वपूर्ण ग्रंथ या ग्रंथालयास देत राहिले. वाचकांच्या गरजांच्या पूर्ततेसाठी पुस्तके, आंतरग्रंथालयीन देवघेव स्वरुपात कौनेमिरा पब्लिक लायब्ररी मधून आणली जात. पुढे १९२४ मध्ये या इमारतीचा पायाभरणी कार्यक्रम १८ एप्रिल १९२४ रोजी महात्मा गांधीजी यांच्या हस्ते संपन्न होताना ग्रंथालयाची कोनशीला बसविण्यात आली होती.

श्री. श्रेष्ठी यांच्याबरोबर इतर कुटूंबियानी देखील या ग्रंथालयासाठी पुष्कळ देणगी दिली होती म्हणून या नव्या इमारतीचे नामकरण मीनाक्षीम्मा कोटीलींगम मेमोरीयल ग्रंथालय असे करण्यात आले व त्याचे उद्घाटन आंध्र केसरी तंबूसूरी प्रकाश पेततू यांच्या हस्ते करण्यात आले.

या ग्रंथालयासमोर झेंडावंदनासाठी ध्वजस्तंभाची उभारणी डॉ. राजेंद्रप्रसाद, भारताचे पहिले राष्ट्रपती यांच्या हस्ते २२ नोव्हेंबर १९५३ रोजी करण्यात आली होती.

या ग्रंथालयाचा सांभाळ श्री. श्रेष्ठी यांनी मुलासारखा केला होता. पुढे त्यांनी आपल्या मृत्यूपूर्वी ०७ एकर जमीन ग्रंथालयास दिली होती आणि या जमीनीच्या विक्रीतून प्राप्त होणारी रक्कम गंगाजळी स्वरुपात ग्रंथालयाच्या व्यवस्थापनासाठी वापरण्याची तरतूद केली

होती. श्री. श्रेष्ठी यांच्या पश्चात त्याच्या पत्नी कमलांबा यांनीही ग्रंथालयास सक्रिय मदत केली होती. तसेच त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या भावांनीही या ग्रंथालयाच्या इमारतीकरीता आर्थिक सहकार्य केले होते म्हणूनच त्याचे नाव त्या इमारतीस देण्यात आले आहे. सध्या हे एक अत्यंत सुव्यवस्थित ग्रंथालय म्हणून आंध्रप्रदेशात ओळखले जाते.

**वीर सालिंगा कवी साम्राज्य ग्रंथालय, कुमूदावली :**

हे ग्रंथालय २२ जून १८९७ रोजी श्री. भूपतीराजू तिरुपतीराजू या ग्रंथालय चळवळीतील बूजूर्गांनी स्थापन केले होते. कवी वीर सालिंगम हे समाज सुधारक देखील होते म्हणून त्याच्या स्मरणार्थ हे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. या ग्रंथालयाच्या माध्यमातून स्वातंत्र्यसंग्राम, साक्षरता प्रसार, ग्रामोद्यान असे उपक्रम राबवून सामाजिक उध्दाराचे कार्य केलेले आहे.

सुरवातीस हे ग्रंथालय भूपती राजू लतीराम यांच्या घराच्या व्हरांड्यात सुरु केले होते. नंतर लगतच्या शेडमध्ये सुरु करण्यात आले. पुढे ग्रंथालय विषयाच्या कुतूहलातून ग्रामीण ग्रंथालय म्हणून कौलारु घरात स्थलांतरीत करण्यात आले. दीर्घ प्रतिक्षेनंतर १८८६ रोजी ग्रंथालय नविन काँक्रीट इमारतीत स्थापन करण्यात आले व त्याचे उद्‌घाटन राज्यपाल डॉ. कूमूदाबेन यांच्या हस्ते करण्यात आले होते. ग्रंथालयाच्या निर्धारीत सेवांबरोबर हे ग्रंथालय आज प्रौढ शिक्षणाचे व महिला शिक्षणाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. या ग्रंथालयाव्दारे मोफत वैद्यकीय सेवा, प्रार्थना कक्ष, हिंदी राष्ट्रभाषा प्रसार, अस्पृश्यता निवारण अशा समाजाभिमुख  कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच हे ग्रंथालय आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाच्या या महत्वपूर्ण उपक्रमामध्ये सहभागी होत असून आजूबाजूच्या परिसरात अनेक ग्रंथालये स्थापन करण्याचा यशस्वी प्रयत्न या ग्रंथालयाव्दारे करण्यात आला आहे.

या ग्रंथालयातील संग्रहामध्ये जून्या तेलगू नियतकालीकांच्या बांधणी खंडामध्ये भारती, कृष्णपत्रिका, शारदा, आंध्रपत्रिका, विजयनाम, गृहलक्ष्मी इ. नियतकालिकाचा समावेश असून याचबरोबर अक्षर स्वरुपाचे विविध विषयावरील साहित्य, दुर्मिळ हस्तलिखिते हे या ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहाचे वैशिष्टये आहे.

या ग्रंथालयास एक सांस्कृतिक परंपरा असून ग्रामीण परिसरात या ग्रंथालयाबद्दल एक आस्था, प्रेम अभिमान असून हे ग्रंथालय अत्यंत सुरेखपणे सांभाळण्यात आलेले आहे. लग्नानंतर नवपरिणीत दांपत्य या ग्रंथालयास देणगी देते आणि ही परंपरा सर्व जातीधर्माच्या लोकांनी आजवर सातत्यपूर्वक जपलेली आहे.

या ग्रंथालयाचा शतकोत्तरी समारंभ २७ व २८ डिसेंबर १९९७ रोजी मोंठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी २८ डिसेंबर रोजी ग्रामीण ग्रंथालयाचा विकास या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभास सार्वजनिक ग्रंथालयमंत्री के. इ. प्रभाकर, डॉ. सी. नारायण रेड्डी (ज्ञानपीठ पारितोषिक विजेते), अर्थमंत्री अशोक गजपती राजू, जलसंपदा मंत्री श्री. मूमल्ला नागेश्वर राव व इतर अनेक मान्यवरानी उपस्थिती दर्शविली होती.

**गौतमी ग्रंथालय, राजमुंद्री :**

या ग्रंथालयाची १८९८ मध्ये स्थापना करण्यात आली. पुढे १९२० मध्ये लगतच्या तीन ग्रंथालयांचे या ग्रंथालयात विलीनीकरण करुन त्या ग्रंथालयास विद्यमान नाव देण्यात आले आहे. या ग्रंथालयाच्या उभारणीमध्ये नालम कृष्णराव, अंदकी सत्यनारायण शर्मा व गोदापती सत्यनारायण यानी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. श्री. नालमकृष्ण राव (१८८१–१९६१) या तरुणाच्या मनामध्ये राजमुंद्री येथे स्वतःचे खाजगी ग्रंथालय स्थापन करण्याची इच्छा होती. लहानपणापासून त्यांना ग्रंथांविषयी व साहित्याविषयी विशेष आस्था होती.

त्यांनी अनेक सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय सहभाग दर्शविला होता. अशा या चळवळ्या तरुणाने काही शेकडा पुस्तके गोळा करुन १८९८ मध्ये नालाम वरी सथाम येथे ग्रंथालय स्थापन केले. हे त्याच्या पुर्वजाचे ठिकाण होय. या ग्रंथालयाच्या उभारणीसाठी त्यांच्या मित्राने देखील खूपच सहकार्य केले, अद्यापही ग्रंथालय बऱ्याच प्रमाणात विकसित होणे गरजेचे असताना काही महिन्यासाठी त्याचे स्थलांतर होवून दुसऱ्या इमारतीत नेले व त्या ग्रंथालयास वीर सालेगम ग्रंथालय हे नाव दिले आणि काही काळानंतर ते वीर सालीगम येथे बांधण्यात आलेल्या टाऊन हॉलमध्ये स्थलांतरीत करण्यात आले. पुढील काही समस्यांमुळे १९१४ मध्ये या ग्रंथालयाचे पुर्ननामकरण सार्वजनिक पुस्तक भांडार गृह असे करण्यात आले आणि त्याचे स्थलांतर टाऊन हॉल मधून दुसरीकडे करण्यात आले. या

काळात साहित्यिक युवकाना आकर्षित केले व या ग्रंथालयाच्या सेवा सर्वदूर ओळखल्या जाऊ लागल्या. याच दरम्यान कवी पद्मश्री सुब्रया या राजमुद्री कवीचे पाठराखी अंधाकी सत्यनारायण शर्मा यांनी लगतच्या परीसरात दुसरे एक ग्रंथालय सुरु केले आणि या ग्रंथालयास १९१० मध्ये वासुरीर्य पुस्तक भांडार गृह असे नाव दिले. तसेच या परीसरात पुढे शरदा निलयम हे ग्रंथालय १९१३ मध्ये वासुरीर्य पुस्तक भांडाराबरोबरच शारदा निलयम या ग्रंथालयात समाविष्ट करण्यात आले. सर्वच पुस्तक भांडारचा विकास हा तत्कालीन प्रणेते याच्या सहकार्याने झपाट्याने झाला. या प्रणेत्यामध्ये नालमकृष्णराव, नालमनग्गा राव, नालमपजामीराव आणि कोमकंडा कृष्णमुर्ती इ. या समावेश होता. दुसरीकडे वासुर्यापुस्तक भांडार गृह याचा विकास अंधकी सुर्यनारायण शर्मा,सिंहराव, शंकराव यांच्या प्रयत्नानी झाला.

पुढील काळातील येथील ग्रंथालय चळवळीतील नेत्यांनी राजमुंद्री येथील सर्व स्थानिक ग्रंथालयांचे एकत्रितकरण करण्याचा प्रयत्न करुन आंध्रप्रदेश मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन करण्याचे प्रयत्न केला. या सगळ्या हालचालीचा विचार करुन या दोन्ही ग्रंथालयाच्या व्यवस्थापक मंडळीनी विचार करुन स्थानिक पातळीवर दोन्ही ग्रंथालयांचे एकत्रीकरण होऊन श्री गौतमी ग्रंथालय २४ जानेवारी १९२० रोजी अस्तित्वात आले व त्याची नोंदणी कायदेशीररीत्या करण्यात आली. पुढील काळात ग्रंथालयाचे व्यवस्थापन करताना न्यायमूर्ती सितारामचंद्र राव यांनी दिलेल्या देणगीतून नवीन जागा घेऊन हे ग्रंथालय नवीन जागेत १९३३ मध्ये स्थलांतरीत करण्यात आले. या नव्या विस्तृत जागेत ग्रंथालयाचा वाचनसंग्रह व सेवालया मध्ये लक्षणीय वाढ झाली. राजमुद्री शहराच्या दुसऱ्या भागात रत्नकवी ग्रंथनिलयम कवी कोकणनंद व्यंकटरत्नम यांच्या स्मरणार्थ उभे केलेले ग्रंथालय काही व्यक्तीनी सुरु केलेले होते. या संदर्भात बोडापती सत्यनारायण या गौतमी ग्रंथालयाच्या सदस्याने केलेल्या विशेष प्रयत्नातून रत्नकवी ग्रंथनिलयम हे ग्रंथालय गौतमी ग्रंथालयमध्ये समाविष्ट करण्यात आले. या दोन ग्रंथालयाच्या एकत्रीकरणामुळे सर्व ग्रंथालये एकत्र आली यामध्ये विरसालिंगा पुस्तकभांडार गृह, वासूर्यापुस्तक भांडार गृह व रत्नकवी निलयम ही तिन्ही ग्रंथालय होत. तिन्ही ग्रंथालय आंध्रप्रदेशातील तीन महत्वपूर्ण कवींच्या नावाने सुरु करण्यात आलेली होती.

विकासाच्या कालखंडात सुरवातीस ग्रंथालये भाड्याच्या घरात होती. पुढील काळात या ग्रंथालयाच्या व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांच्या अथक परीश्रमामुळे व उदार दानशुरांच्या आश्रयातून १९२३ मध्ये या ग्रंथालयाला स्वतंत्र इमारत प्राप्त झाली. आज या ग्रंथालयाची एकूण जागा २७९० चौ. मी. आहे.

आज या ग्रंथालयाकडे १९३० पुर्वी प्रकाशित झालेल्या अनेक ग्रंथाच्या पहिल्या आवृत्ती संग्रहीत केलेल्या आहेत. आज या ग्रंथालयाकडे शासकीय अहवालानुसार ६०,००० इतके वाचनसाहित्य असून तेलगू, संस्कृत, हिंदी, ओरीसा, इंग्रजी, कनडा, तामीळ या भाषेतील ग्रंथाबरोबर हस्तलिखित संग्रह देखील याठीकाणी संग्रहीत करण्यात आलेला आहे. यामध्ये पामपृष्ठावरील हस्तलिखिताचा समावेश आहे. या व्यवस्थापनेतील व्यक्तीनी अनेक व्यक्तींशी संपर्क साधून हस्तलिखिते, ताम्रपट यांचे संकलन करुन तेलगू भाषेतील साहित्य व संस्कृती आणि इतिहास यांच्या संबधात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. याठिकाणी असलेली बरीचशी हस्तलिखिते ही राजा वस्सवी जगपती वर्मा पेडापुडचे जमीनदार यांनी दिलेली असून इतर ही अनेक महत्वपूर्ण हस्तलिखिते संग्रहीत करण्यात आलेली आहेत.

ग्रंथालयाच्या पारंपारीक सेवा, चर्चासत्रे, व्याख्याने याच्या आयोजनाबरोबरच योगासन केंद्रे, गौतमी साहित्य, तेलगू साहित्य व भाषा यांच्या प्रचारासाठी स्थापन झालेले केंद्र, संस्कृत भाषा परीक्षाकेंद्र व अनेक सामाजिक उपक्रम येथे राबविले जातात. या उपक्रमामध्ये कवी सम्मेलन, गोष्टी, साहित्य व भाषा विषयक सभा अशा विविध विभागासाठी सहभागृहाचा वापर केला जातो.

या ग्रंथालयाबरोबरच अब्दूल कलाम आझाद ओरीयंटल संस्था व संशोधन संस्था व त्याचे ग्रंथालय, हैद्राबाद आंध्रप्रदेश शासकीय ओरीयंटल हैद्राबाद संशोधन संस्था, आंध्रप्रदेश राज्य, अभिलेखागृह व संशोधनगृह हैद्राबाद, आंध्र सारस्वत परिषदेची ग्रंथालये, ग्रामीण संघ धर्मग्रंथालय विजयवाडा, कृष्णदेवराय आंध्र भाषा निलयम, रामचंद्र ग्रंथालय पोडू, राममोहन मोफत ग्रंथालय विजयवाडा, अशा अनेक जून्या ग्रंथालयांमधून साहित्याचे संग्रहण करुन आंध्रप्रदेशातील साहित्य, संस्कृती व इतिहास व जनजागृती व शिक्षण प्रसारासाठी ग्रामीण परिसरात महत्वपूर्ण भुमिका बजावली जात आहे.

**५.७ हैद्राबाद**

**स्टेट सेंट्रल लायब्ररी, हैदराबाद :**

ग्रंथालय १८९१ मध्ये स्व. मौलवी सय्यद हुसेन बिलग्रामी (नवाब इमादूर मुलक बहाद्दूर) यांच्या अथक प्रयत्नातुन स्थापन करण्यात आले. सुरवातीच्या काळात नवाबांनी स्वत:कडील दुर्मिळ पुस्तके या ग्रंथालयाला दिली, म्हणूनच त्याला असिका राज्य ग्रंथालय म्हणुन ओळखले जात असे आणि ते अबिदस यांनी स्थापन केलेले होते. सय्यद तासको हुसेन या विद्‌वान व्यक्तीला ग्रंथालयाचा अधिकक्ष म्हणुन नेमण्यात आलेले होते. पाश्चात्य भाषांचा व भाषेतील साहित्य यांचा व्यासंग त्यानी केलेला होता. पुढील कामात तेच या ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल म्हणुन नेमण्यात आले. त्या काळात असिका राज्य ग्रंथालय हे जगातील सार्वात मोठे श्रीमंत आणि दर्जेदार ग्रंथालय म्हणुन सन्मानाने ओळखले जात असे. हस्तलिखीत स्वरुपातील ग्रंथाबरोबरच मुद्रित स्वरुपातील ग्रंथ येथे उपलब्ध होते. या ग्रंथालयाचा सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम १९४१ मध्ये संपंन्न झाला. या राज्यात १९५५ साली ग्रंथालय कायदा अस्तित्वात आल्यावर, हे ग्रंथालय राज्य ग्रंथालय म्हणुन ओळखले जाऊ लागले. पुढे भाषीक प्रांतवार रचनेनंतर आंध्रप्रदेश राज्याचे मध्यवर्ती ग्रंथालय म्हणून १९५६ पासुन ते कार्यरत झाले.

**इमारत :**

या ग्रंथालयाच्या इमारतीचा पायाभरणी कार्यक्रम युवराज मीर उस्मान अलि यांच्या हस्ते जानेवारी १९३२ मध्ये झाला. सन १९३६ मध्ये नव्या इमारतीत या ग्रंथालयाचे पदार्पण झाले व रौप्य महोत्सवी समारंभ निजाम (७ वे) यांच्या हस्ते १९३६ मध्ये संपन्न झाला. या ग्रंथालयाची वास्तू एखाद्या राजवाडयासारखी असून या ग्रंथालयाचे ऐतिहासीक महत्व विचारात घेऊन आंध्रप्रदेश राज्यातील या इमारतीस ऐतिहासीक दर्जाचा वारसा २३ मार्च १९२८ रोजी दिलेला आहे. यावरुनच या ग्रंथालयाचे वैशिष्ट्यपुर्ण वास्तू कौशल्य लक्षात येते. या इमारती लगतच या ग्रंथालयाचा वाढता व्याप विचारात घेवून रु ९०,००००/– इतक्या रकमेचा विनियोग करुन विस्तारीत इमारत बांधण्यात आलेली आहे या ग्रंथालयाची उद्दिष्टे –

१. विज्ञान व तंत्रज्ञाना बरोबरच इतर संबंधित विषयावरील वाचन साहित्याचा संग्रह करणे.
२. संशोधक अभ्यासक यांना आवश्यक संदर्भ स्त्रोत उपलब्ध करुन देणे .
३. अंतर्गत ग्रंथालयीन देव घेवीचे प्रमुख केंद्र म्हणुन कार्य करणे.
४. राज्य व केंद्र स्तरावरील महत्वपुर्ण संदर्भस्तोत्राचे संगोपन व व्यवस्थापन करणे.
५. पुस्तक प्रदर्शन, व्यावसायिक परिषदा, चर्चासत्रे, राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह अशा उपक्रमांचे आयोजन करणे.
६. विद्यार्थी वर्गाच्या मनामध्ये वाचन विषयक अभिरुची निर्माण करणे.

राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताहाच्या उपक्रमातून ग्रंथालय सेवांना प्रोत्साहन देणे, अभ्यासक, लहान मुले, विद्यार्थी व इतर वाचक व अंध व्यक्ती यांच्याकरिता सर्व प्रकारचे वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे.

**साहित्य संग्रह :**

या ग्रंथालयात १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून प्रकाशित झालेल्या इंग्रजी, हिंदी, तेलगू, कानडी, मराठी, संस्कृत, अरेबी, पर्शीयन भाषेतील ग्रंथाचा समावेश आहे. या ग्रंथाची खरेदी करत असताना प्राधान्य क्रमाने संशोधक, वाचक – अभ्यासक यांचा अधिक विचार केला जातो. या ग्रंथालयामधील १७,००० दुर्मिळ व महत्वपुर्ण हस्तलिखीतांचे (५ व्या व ६ व्या शतकातील) हस्तांतर आंध्रप्रदेश ओरीएंटल हस्तलिखीत ग्रंथालयाकडे करण्यात आले आहे. विद्वान व्यक्तींनी एक विशिष्ट कालखंडात आपल्याकडील पार्शीयन व अरेबीक साहित्य या ग्रंथालयास देणगी दाखल दिले असून, हे महत्वपुर्ण साहित्य हेच या ग्रंथालयाचे प्रमुख वैशिष्टे आहे . या ग्रंथालयात राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कलकत्ता यांच्या कडुन प्राप्त झालेले ग्रंथ तसेच कुल सचिव पब्लीकेशन विभाग यांचे कडून पाढविण्यात आलेली पुस्तके येथे स्विकारली जातात. ग्रंथालयातील वाचन कक्षात असलेला वाचन साहित्यसंग्रह ८ भाषेतील असुन सध्या वाचन साहित्याची एकुण संख्या ५०,०००० हून अधिक झालेली आहे .दररोज १५०० ते २००० वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेतात. प्रतिलिपी सेवा, स्पर्धा परीक्षा विभाग, संदर्भ विभाग अशा महत्वपुर्ण विभागाचे संगणकीकरण सुरु आहे. दररोजच्या देव घेवी बरोबरच ब्रेल लिपीतील पुस्तकाची देवघेव, बालकांना

मार्गदर्शन आणि इतर साहित्यविषयक उपक्रम या ग्रंथालयाद्वारे राबविले जातात. ग्रंथ संग्रहाचे वर्गीकरण करण्यासाठी दशांश वर्गीकरण पध्दतीचा येथे वापर केला जातो.भव्य अभ्यासिका हे ग्रंथालयाचे आणखी एक वैशिष्ट्ये होय.

वाचन अभिरुची विकसीत करण्याबरोबरच शैक्षणिक क्षेत्राकरिता हे ग्रंथालय महत्वाची भुमिका बजावताना विविध उपक्रमांचे आयोजन करुन माहिती सेवा अधिकाअधिक सक्षमपणे पुरविण्यासाठी आधुनिक पध्दतीने सेवा सुविधा उपलब्ध करुन देत आहे. प्रत्येक वाचकाप्रमाणे सेवा पुरविणे व सर्व स्तरातील वाचकास सेवा पुरवणे हा ग्रंथालयाचा प्रधान हेतू असून ग्रंथालय नेटवर्कींग पध्दतीचा दर्जेदार वापर करण्यात आला आहे. याच बरोबर संदर्भ सूची तयार करणे, तालिका तयार करणे यासाठी इतर ग्रंथालयाना मार्गदर्शन केले जाते. समृध्द संदर्भ विभाग, अभ्यासिका, बाल विभाग या सोयींबरोबरच अंध वाचकांकरिता स्वतंत्र विभाग तयार करण्यात आलेला असुन ब्रेल लिपीतील वाचन साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. या ग्रंथालयाचे वैशिष्ट म्हणजे, अभ्यास विभाग रात्रौ १२ पर्यंत खुला असतो.

या ग्रंथालयाच्या माध्यमातून सामाजिक शिक्षण विभागाच्या सहकार्याने चर्चासत्रे, परिषदा, पुस्तक प्रदर्शन व राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह समारंभ असे विविध उपक्रम राबविले जातात.

## ५.८ दिल्ली :

### दिल्ली सार्वजनिक, ग्रंथालय : दिल्ली

या ग्रंथालयाची स्थापना सन १९५१ मध्ये झाली. या ग्रंथालयाची स्थापना शिक्षण मंत्री भारत सरकार यांच्याद्वारे करत असताना यासाठीचा आर्थिक व तांत्रिक सहाय्य UNESCO ने एक प्राथमिक प्रकल्प या अनुषंगाने केलेले होते. ग्रंथालयाचे उद्‌घाटन भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते दि. २७ ऑक्टोबर १९५१ रोजी करण्यात आले. सध्या या ग्रंथालयाचा कारभार सांस्कृतीक मंत्रालयाच्या अधिपत्याखाली चालतो. एक छोटेसे केंद्र म्हणुन उभ्या राहिलेल्या या ग्रंथालयाचा विस्तार झालेला असुन या ग्रंथालयाद्वारे मोफत सेवे बरोबरच दिल्ली शहरातील सर्व जातीधर्म, वयोगटातील लोकांचे सामाजिक शिक्षणाचे एक व्यासपीठ म्हणून हे ग्रंथालय उभे आहे. या ग्रंथालयाशी संलग्नीत जाळ्याचा विचार करता केंद्रीय ग्रंथालय, विभागीय ग्रंथालय १, शाखा ग्रंथालये ०३, उपशाखा ग्रंथालये २४, समाजगट ग्रंथालय ०१, पुर्ण वसाहत कॉलनी ग्रंथालये ०९, अंध ग्रंथालय ०१, फिरती ग्रंथालये ६४ आणि साठवणुक केंद्रे २५ याचा समावेश आहे हे ग्रंथालय केवळ ग्रंथ देवघेव एवढीच सेवा देऊन न थांबता समाजाभिमुख उपक्रम रावबून बौध्दीक चर्चेस प्राधान्य देत सामाजिक उपक्रमाचे आयोजन करत असते. पुस्तका बरोबरच ऑडीओ व व्हिडीओ कॅसेट कोणतेही शुल्क न आकारता उपलब्ध करुन दिल्या जातात. सर्वच विभागास बैठक व्यवस्था करण्यात आली असुन या ग्रंथालयाद्वारे संदर्भ सेवा,प्रतिलीपी सेवा वाचकाना पुरविल्या जातात. ग्रंथालय विषयक सांख्यिकीय तपशील –

| अ. क्र. | घटक | संख्या | |
|---|---|---|---|
| | | **वर्ष २००४** | **वर्ष २०१५** |
| १. | ग्रंथ | १६,९४,९६५ | १७,८०,६७० |
| २. | वर्गणीदार | १,१७,८७४ | १,३६,१६९ |
| ३. | ग्रंथ देवघेव (शाख ग्रंथालयासह) | १०,९८,७६७ | १२,८०,५४५ |
| ४. | दरदिवशी ग्रंथ देवघेव | ३,११७ | ३,२१५ |
| ५. | अभ्यासिकेतील वाचकांची संख्या | ४,७७,१०७ | ४,२२,१२५ |

| अ. क्र. | घटक | संख्या | |
|---|---|---|---|
| | | वर्ष २००४ | वर्ष २०१५ |
| ६. | पुस्तक वितरण कायदा १९५४ अन्वये सर्व भाषेतील पुस्तकांची संख्या | ३,१९,६२१ | ३,३१,२७२ |
| ७. | संदर्भ ग्रंथ हाताळणी | १५,०५८ | १७,२१५ |
| ८. | ग्रामोफोन रेकॉर्डस, ऑडीओ कॅसेट इ | ९,४३१ | ९,४३१ |
| ९. | सीडी / डीव्हीडी देवघेव | ६,९७५ | ५,४१६ |
| १०. | इंटरनेट सुविधा लाभ | १,८५,९२१ | १,२०,२१६ |
| ११. | वेबसाईट अवलोकन | ४०,५५५ | ४३,२२० |

वरील संख्यिकीय तपशीलावरुन ग्रंथालयाच्या कामकाजाचा व्याप स्पष्ट होतो.

**वैशिष्ट्यपूर्ण बाबी :**

**सभासदांसाठी :**

१. मोफत इंटरनेट सुवीधा

२. सभासदासाठी मोफत सीडी/ डिव्हीडी देवघेव

३. आधुनिक स्वरुपाचा बालविभाग

४. ऑनलाईन कॅटलॉग (या कॅटलॉगचा जगभरातून १,१७,८७४ व्यक्ती लाभ घेतात)

**५. पुस्तक वितरण कायदा विभाग–** हे एक देशातील प्रकाशित वाचन साहित्य स्विकारणारे चौथे केंद्र आहे. भारतातील प्रकाशित वाचन साहित्य विषयक विविध कायद्याअंतर्गत तरतुदीनुसार सर्व भाषेतील वाचन साहित्य सातत्यपूर्ण येथे स्वीकारण्यात येते.

**६. उपक्रम –** या ग्रंथालयाद्वारे दरवर्षी दि. १५ एप्रिल ते २३ एप्रिल या काळात मुलांसाठी व प्रौढांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये वकृत्व स्पर्धा, संगीत स्पर्धा, कविता वाचन, एकपात्री प्रयोग इत्यादीचा समावेश होतो. बालविभागाद्वारे वरील स्पर्धे बरोबरच बाल वाचकाकरीता फॅन्सी ड्रेस, चित्रकला, लोकनृत्य, एकपात्री प्रयोग यांचेही आयोजन केले जाते. या स्पर्धा करिता प्रमाणपत्रा बरोबर रोख रक्कम दिली जाते. या उपक्रमाना उत्तम प्रतिसाद लाभत असतो.

७. **समाजाभिमुख उपक्रम –** या ग्रंथालयाद्वारे दि. १९ मे ते २० जून या काळात समाजाभिूख उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. सन २०१४ मध्ये हा उपक्रम जवळजवळ एक महिनाभर चालला होता ''किताबे कुछ कहती है'' असे या उपक्रमाचे शीर्षक असून या अंतर्गत चित्रपट प्रदर्शन, कथा कथन, विज्ञान कार्यशाळा, अंगठ्याने चित्र काढणे (थंब पेंटींग) क्राफ्ट कार्यशाळा व पेपर फोल्डींग,रोली पत्रे वर्कशॉप याची शालेय विद्यार्थी करिता स्पर्धा आयोजीत केली जाते. लेखक, विषयतज्ञ अशा व्यक्तींना या कार्यशाळेच्या आयोजना करिता निमंत्रीत केले जाते. २००० हुन अधिक शालेय मुले त्यांचे आईवडील, शिक्षक यांनी या उपक्रमात सहभाग दर्शविला होता. असाच एक चित्रपट प्रदर्शन उपक्रम ऑगस्ट २०१४ मध्ये इतर ग्रंथालयामधुनही आयोजीत करण्यात आला होता. या ग्रंथालयाचा २७ ऑक्टोंबर हा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सन २०१४ मधील दि. २७ ते ३० आक्टोंबर या काळातील लाल बहाद्दूर शास्त्री मार्गा वरील अंध सहकार संघटना परिसरात सन १९७९ पासुन कार्यरत असणाऱ्या ग्रंथालयात हा दिवस वाचकांकरिता विविध स्पर्धा भरवून साजरा करण्यात आला होता. या स्पर्धामध्ये ४०० हुन अधिक वाचकांनी सहभाग दर्शविला होता.

सन २०१५ मध्ये ही ''अब चलो किताबों कि दुनिया में'' हा उपक्रम दि. १८ मे ते १२ जून २०१५ या काळात आयोजित करण्यात आला होता. यामध्ये पेपर कौशल्य कार्यशाळा (पेपर फोडींग), कार्टून फन, कथा कथन, हस्त कौशल्य, राष्ट्र वंदन, तिरंगा वंदन, वर्षा वंदन, ग्रंथालय स्थापना दिवस, राष्ट्रीय एकता दिन, सरदार वल्लभभाई पटेल दिन असे अनोखे उपक्रम राबविण्यात आले होते. समाजाभिमुख व विश्वासार्य उपक्रमांचे आयोजन करणे हे या ग्रंथालयाचे एक वैशिष्ट्ये आहे. ग्रंथालयाची वेब साईट ***www.dpl.gov.in***

## ५.९ उत्तरप्रदेश

### रामपूर रझा ग्रंथालय : उत्तरप्रदेश

या ग्रंथालयाची स्थापना नवाब फैझुल्ला खान (रामपूर) यांनी सन १७७४ मध्ये केली. हे ग्रंथालय १९७५ मध्ये संसदीय कायद्यान्वये भारत सरकारने आपल्या ताब्यात घेतले व याचा कारभार सांस्कृतिक मंत्रालयांतर्गत पाहिला जाऊ लागला. उत्तर प्रदेशाचे गव्हर्नर हे या ग्रंथालयाच्या समितीचे कार्याध्यक्ष होते. हे एक वाचन सहित्याच्या दृष्टीने समृद्ध असे ग्रंथालय असुन येथील संग्रहात १७,००० हस्तलिखीते, ५००० महत्वपूर्ण सूक्ष्म पेंटींग, ३००० इस्लामिक लिपीतील हस्तलिखीते, ६०,००० दुर्मिळ ग्रंथ आहेत. हे सर्व साहित्य अरेबीक,पर्शियन,संस्कृत, हिंदी, उर्दू, तुर्की इ. भाषेतील असुन हे ग्रंथ विशिष्ट विषयांशी संबंधित आहेत. इतिहास, तत्वज्ञान, भविष्य, खगोलशास्त्र, विज्ञान, आरोग्य इत्यादी व विविध धर्मशास्त्राशी संबंधीत आहेत. येथील सुक्ष्म पेंटींग ही तुर्की – मुघल, पर्शियन, राजपूत (पहाडी), अवध, दख्खन, इंडो –युरोपीयन शैलितील असुन अद्याप पर्यंत त्यांचे प्रकाशन झालेले नाही. ग्रंथालयानी आजवर अरेबीक, पर्शीयन, संस्कृत, हिंदी, उर्दू भाषेतील १४० ग्रंथांचे प्रकाशन केले असुन ग्रंथालयाने यासाठी स्वतःची वेबसाईट तयार केलेली आहे.

हे ग्रंथालय शंभर वर्षाहुन जुन्या असलेल्या हमीद मंझील या ऐतिकासीक राजवाड्यात स्थापन करण्यात आलेले आहे. इंडो–युरोपीयन शैलीमधील हे देखणी बांधकाम वास्तुशास्त्राचा उत्तर भारतातील एक उत्तम नमुना आहे. याच बरोबर १७ व १८ व्या शतकातील ७० देखण्या इटालियन मार्बल मधील पुतळ्यानी हे ग्रंथालय सजविलेले आहे. या इमारतीच्या भिंती व छत प्लॅस्टर ऑफ पॅरीसने सुशोभित करुन भिंतींचे कोन व छताच्या कडा सोनेरी बॉर्डरने नमुनेदारपणे रंगविलेल्या आहेत. त्यामुळे हे ग्रंथालय अधिकच आकर्षक झालेले आहे.

ग्रंथालयाने १९७५ मध्ये संरक्षण संवर्धन प्रयोगशाळा उभी केलेली असून या प्रयोग शाळेतून आधुनिक पद्धतीने वाचन – साहित्याच्या जतन संरक्षणाची काळजी घेतली जाते. या मध्ये विषेशत्वाने जीर्ण हस्तलिखीते, इस्लामिक कॅलीग्राफी युक्त कलावस्तू, जीर्ण मुद्रित ग्रंथ यांचा प्रामुख्याने समावेश केलेला आहे.

**विशेष उपक्रम –**

**१. इस्लामीक कला व कॅलीग्राफी फेस्टीव्हल ऑफ इंडीया २०१५ :**

मलेशियातील भारताचा राजदुतावास आणि भारताचे सांस्कृतीक मंत्रालय यांनी रामपूर रझा ग्रंथालयाच्या सहकार्याने ''इस्लामीक कला आणि कॅलीग्राफी'' चे प्रदर्शन कौललांपूर व कोटा बहरु येथे आयोजीत केले होते. या प्रदर्शनात ग्रंथालयाने दुर्मिळ अशा ४० इस्लामीक कॅलीग्राफी प्रिंटसचे प्रदर्शन केलेले होते .या प्रिंटस् अरेबीक, पर्शीयन व उर्दू मधील होत्या. पहिल्यांदाच ग्रंथालयातील हे दुर्मिळ संग्रहन मलेशियात प्रदर्शित करण्यात आलेले होते. या प्रदर्शनास अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला भारतीय कॅलिग्राफीक संग्रहाचा मलेशियातील लोकांनी प्रथमच आस्वाद घेतला. इ ७ व्या शतकापासुन ते २० व्या शतका पर्यतचे हे संग्रहन तेथील लोकांना अचंबीत करुन गेले.

**कला व कॅलीग्राफी प्रदर्शन २०१५ मुट्रीटस :**

मुट्रीटस मधील भारतीय दूतावास आणि सांस्कृतीक मंत्रालय भारत सरकार यांनी इस्लामीक सांस्कृतिक केंद्र म्युट्रीटस यांच्या सहकार्याने रामपूर रझा ग्रंथालयातील इस्लामीक कॅलीग्राफी संग्रहाचे प्रदर्शन १६ ते २३ नोव्हेंबर २०१५ मध्ये भरविले होते. या प्रदर्शनात ५० इस्लामीक कॅलीग्राफीचे नमुने प्रदर्शीत करण्यात आले होते. या ग्रंथालयाचे अंतर राष्ट्रीय समाजस्पर्शी व प्राचीन परंपराशी नाते सांगणारे उपक्रम लक्षणीय असून याद्वारे ग्रंथालयाचे महत्व अधोरेखीत करावयास ते पुरेसे आहेत.

**ग्रंथ प्रदर्शन :**

**संस्कृत हस्तलिखितांच्या सुचीचे प्रकाशन :**

या ग्रंथालयात दुर्मिळ अशी ६०० संस्कृत हस्तलिखीते संग्रहीत केलेली आहेत. या हस्त लिखीतांच्या २ खंडातील सुचींचे प्रकाशन गांधी सभागृह राजभवन लखनौ येथे ८ मे २००५ रोजी करण्यात आले. हे प्रकाशन उत्तर प्रदेशाचे गर्व्हनर व रामपुर रझा ग्रंथालयाचे अध्यक्ष राय नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. दि. १७ मे २०१५ रोजी

मंगोलीयाचे अध्यक्ष श्री. तसाकी अलीजन इल बेग दोराज (shri tsakhiaglin elbegdorj) याना मंगोलीया येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी जयाते तवारीख या हटन लिखीत पोथीची प्रतीलीप प्रत भेटी दाखल दिली.

जयाते तवारीख हे १३ व्या शतकातील एक दुर्मिळ हस्तलिखित असुन हा एक मोठा प्रकल्प म्हणुन लखनौचे राजा गझन खान (Llkhanate king ghazan khan १२९५ – १३०४) यांनी घेतला होता, व तो रझाचे वजीर रशीद उद्दीन कजूलाट हमेदानी याने त्याची कार्यवाही केली. हा ग्रंथ पर्शियनमध्ये लिहीलेला असुन या ग्रंथात ओलजेतूज (Oljeitju १३०४ –१३१६) या कालखंडापर्यंत ऐतिहासीक तपशील या हस्तलिखीतात देण्यात आलेला आहे.

याच बरोबर विविध संस्थांच्या सहकार्याने प्रस्तुत ग्रंथालयाने २१ जून २०१५ रोजी आंतराष्ट्रीय योजनांचे आयोजन अत्यंत उत्तम प्रकारे आपल्या परिसरात संपन्न केले. दि. १४ सप्टेंबर २०१५ रोजी पखवाटाचे प्रमुख अथिती प्रा. मुझाईद हुसेन व कुलगुरु एम. जे. पी. रोहीत खंड विद्यापीठ यांच्या हस्ते या समारंभाचे उद्घाटन करण्यात आले व या प्रसंगी राजभाषा पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले . या कार्यक्रमाचे औचित्य साधुन ग्रंथालयाने हिंदी हस्तलिखीते व दुर्मिळ पुस्तके यांचे ग्रंथालयाच्या दरबार हॉलमध्ये दि. १४ –१६सप्टेंबर २०१६ रोजी प्रदर्शन आयोजीत केले होते.

**रझा ग्रंथालय (फेस बुक व टिव्टर) :**

तंत्रज्ञानाचा वापर करुन सामाजिक संप्रेषणाकरिता या ग्रंथालयाने फेसबुक व टिव्टर या माध्यमांचा उपयोग करण्यास सुरवात केली आहे. यासाठी दोन्ही ॲप्स वर स्वत:चे पृष्ठ तयार केले आहे. या द्वारे कोणीही ग्रंथालय संबंधित अद्यावत माहिती नेटवर्क व्दारे उपलब्ध करु शकतो. आधुनिक संगणक साधनांना समोर जाण्यासाठी हा दृष्टीकोन विशेष कौतुकास्पद आहे या ग्रंथालयाच्या कामकाजाचा २०१५ मधील सांख्यिकीय तपशील ग्रंथालयाच्या कामकाजाचे स्वरुप स्पष्ट करणारा आहे.

## सांख्यिकीय तपशील २०१५

| स्वरुप | घटक | संख्या |
|---|---|---|
| संवर्धन | १. पुर्ण संवर्धन | २५,३६० हस्तलिखीते व पुस्तके |
| | २. धुरीकरण | ५०० पुस्तके |
| | ३. दुरुस्त संवर्धन | ३५ पुस्तके |
| | ४. सुक्ष्म चित्रे व कॅलीग्राफीक | २२५० पृष्ठे |
| | ५. हस्तलिखीते | – |
| | ६. मुद्रीत ग्रंथ | ५५८ पृष्ठे |
| | ७. मोठे नकाशे | १० |
| डिजिटायझेशन | हस्तलिखीते ३०० डीपीआय टू टिफ् फॉरमॅट जेपीई | २०००००० पृष्ठे |
| वाचकांची ये – जा | १.सर्वसामान्य भेट देणार | १२८८७६ |
| | २. परदेशी अभ्यासक | ०८ |
| | ३. संशोधक | २४ |
| हस्तलिखीते व ग्रंथ वसंदर्भ देवघेव | १. हस्तलिखीते | १२८ |
| | २. मुद्रित ग्रंथ | ६०४३ |
| | ३. संदर्भ वार्षिक अहवाल | २०१५७ |

**अलाहाबाद सार्वजनिक ग्रंथालय, उत्तरप्रदेश :**

या ग्रंथालयाची स्थापना १८६४ मध्ये करण्यात आली. या ग्रंथालयास थोरणहील मायने मेमोरीयल म्हणून ओळखले जाते. हे उत्तरप्रदेश मधील सर्वात मोठे ग्रंथालय असून या ग्रंथालयाचे स्कॉटीश पध्दतीने तयार करण्यात आलेले वास्तूशिल्प हे स्विर्ड रॉसके बायने या वास्तूविशारदाच्या संकल्पनेतून साकारलेले आहे. या इमारतीच्या बांधकामात ग्रॅनाईट, सॅडस्टोनचा वापर केला असून १८७० मध्ये या बांधकामास एकूण जवळ जवळ ९४०००/– रुपये खर्च आला होता. ही रक्कम अलाहाबादचे तत्कालीन कमीशनर श्री. मायने यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात आली होती. या इमारतीमध्ये उत्तर प्रदेशप्रांताची

राजधानी अलाहाबाद ही असताना येथे विधानपरिषदेचे कामकाज चालत असे. १८७९ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय येथे स्थलांतरीत करण्यात आले. या ग्रंथालयाचा एकूण संग्रह जवळजवळ १२५००० इतका असून विविध ४० भाषेवरील नियतकालिके, हिंदी, उर्दू, बंगाली भाषेतील २८ वृत्तपत्रे येथे घेतली जातात. या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी असलेली अरेबीक हस्तलिखिते, शासनाची जूनी प्रकाशने १९ व्या शतकातील पार्लमेंटरी पेपर्स ब्लू बूकस् हेही वैशिष्ट्य आहे.

या ग्रंथालयाचा लाभ वर्षभरामध्ये ५५१०० इतके वाचक घेत असून वर्गणीदारांची संख्या २०१३–१४ मध्ये १२७३ इतकी होती. या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षेसाठी वाचनसाहित्याची सुविधा केलेली आहेत तसेच इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष म्हणून विभागीय कमीशनर काम पहातात.

**अमिर उल दौला सार्वजनिक ग्रंथालय, लखनऊ :**

वस्तूसंग्रहालयाचा विभाग म्हणून १८८२ मध्ये या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. पुढे हे ग्रंथालय १८८७ मध्ये विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आले. १९१० मध्ये या ग्रंथालयाचे स्थलांतर चोहता छनारमेनी येथे होवून लोकांसाठी खुले करण्यात आले व त्याचे नामकरण सार्वजनिक ग्रंथालय लखनऊ असे करण्यात आले.

दिनांक ६ मार्च १९२६ रोजी ग्रंथालयामध्ये बांधण्यात आलेल्या नव्या इमारतीत स्थलांतर करुन उत्तरप्रदेश शासनाकडे सुपूर्द करण्यात आले आणि याचे नामकरण अमिर उल दौला असे करण्यात आले.

या ग्रंथालयात अरबी, पर्शियन, ऊर्दू भाषेतील विविध विषयावरील हस्तलिखिते आहेत. तसेच टर्किश हिस्ट्री सर्वात हे जूने पुस्तक ग्रंथालयामध्ये संग्रहीत करण्यात आले आहे. विविध देशातील पेंटीग्जचे याठिकाणी संग्रह करण्यात आलेला असून या ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह २००००० इतका असून र्सवसाहित्य हिंदी, इंग्रजी, ऊर्दू, अरेबी, पर्शियन, संस्कृत भाषेतून प्रकाशित करण्यात आले आहे.

या ग्रंथालयाद्वारे पारंपारिक सेवेबरोबरच, इंटरनेट, भाषांतर आणि प्रतीलिपी सेवा ही उपलब्ध करुन दिली जाते. वाचकांच्या मनोरंजनासाठी आणि सभासदांच्या शैक्षणिक

विकासासाठी सीडीज्, डीव्हीडीज् उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. नियतकालिके, जूने अंक व इतर माहितीविषयक साहित्य सभासदांस उपलब्ध करुन दिले जाते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या सभासदासाठी स्वतंत्र कक्ष तयार करुन देण्यात आले आहे. तसेच विविध दुर्मिळ प्रकाशनाबरोबर अरेबीक, पर्शियन, ऊर्दू संग्रह उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. पालकांसाठी स्वतंत्र विभाग सुरु करुन याठिकाणी इंग्रजी, हिंदी, ऊर्दू व इतर भाषेतील पुस्तके, स्वतंत्र नकाशा, तक्ते, खेळणी, खेळ. टी.व्ही. टेपरेकॉर्डर हेही उपलब्ध करुन देण्यात आले आहे. येथील ग्रंथालय शास्त्रविभागात ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणविषयक काही पुस्तके संग्रहित करण्यात आले आहेत. अंध विभागात जुने दुर्मिळ साहित्य, इंग्रजी, ऊर्दू भाषेतील साहित्य उपलब्ध करुन दिलेले आहे. अशा या सार्वजनिक ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह हा विद्यापीठ ग्रंथालयासारखा आहे. येथील अवध व इतर आग्रा प्रांत येथील जुने नकाशे हे या संग्रहाचे वैशिष्ट्य होय.

ग्रंथालयाचा स्वत:चा प्रकाशन विभाग असून बहुमूल्य पांडू लीपीतील ग्रंथ २००० मध्ये प्रकाशित करण्यात आलेले असून तसेच बहूमूल्य संस्कृत पांडूलिपीतील ग्रंथ २००४ मध्ये प्रकाशित करण्यात आले आहेत. अमीवअध्दीला पायीक लायब्ररीतील उपलब्ध पुस्तकांची सुची (हिंदी, संस्कृत २००५), अमरकोश (२००७), गजगायन (२००९), सुखन च–शरीफ (२००६), शिघ्रबोध (२००३), प्रश्नशपीका (२००३), पार्शियन काव्य (२०००), तारीक ई वादस उस्सूरला (अरेबीक) (२०००) अशी प्रकाशने ग्रंथालयाने प्रकाशित केलेली आहेत.

**मध्यवर्ती ग्रंथालय, पतियाला :**

या ग्रंथालयाची स्थापना २३ जूलै १९५६ रोजी पंजाबचे तत्कालीन गव्हर्नर सी. पी. एन. सिंग यांच्या हस्ते उद्‌घाटन करुन करण्यात आली. ग्रंथालयामध्ये विविध विषयाचे समृध्द ग्रंथ असून याठिकाणी ११२२ पर्शियन हस्तलिखिते, ९०७ पंजाबी, ६०७ हिंदी आणि संस्कृत भाषेतील २४३ हस्तलिखिते याचे संग्रहन करण्यात आलेले आहे. दुर्मिळ ग्रंथसंग्रह हे या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य असून ऑक्सफोर्ड विद्यापीठाचे व इतरही देशाचे विद्यापीठ संशोधक येथे अभ्यासासाठी येतात. याठिकाणी असलेल्या 'सीसंतनामा' या

हस्तलिखिताबाबत संशोधकाना विशेष कुतूहल आहे. या ग्रंथालयातील सर्वात जूने हस्तलिखीत ६०० वर्षापुर्वीचे असून जैन विषयसुत्र (१२१६), बिकरामी (११५९) याचबरोबर याच ग्रंथालयामध्ये स्वतंत्र नकाशा संग्रह, चित्रगॅलरी, संगीत विभाग, सुंदर असा बालविभाग, विस्तृत सभागृह उभे करण्यात आलेले असून याठिकाणी सर्व आधुनिक, तांत्रिक उपकरणे देण्यात आली आहेत. एकावेळी २०० माणसे बसू शकतात. एवढी अभ्यासिका येथे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इतर उपक्रमाबरोबर हे ग्रंथालय जिल्हा ग्रंथालयाचा कारभार संभाळत आहे.

## ५.१० कलकत्ता:

### मध्यवर्ती संदर्भ ग्रंथालय,कलकत्ता :

सन १९५५ पासुन राष्ट्रीय ग्रंथालयापासुन स्वतंत्र होऊन या ग्रंथालय परिसरात प्रस्तुत ग्रंथालय सुरु करण्यात आले. नियोजन आयोगाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये अशा प्रकारचे ग्रंथालय स्थापन करण्याचे मान्य केले.भारतीय राष्ट्रीय ग्रंथ सुचीची निर्मीती करण्याची जबाबदारी भारत शासनाची असल्याने आणि ही जबाबदारी पुस्तक कायदा १९५४ अन्वये अत्यावश्यक असल्याने मध्यवर्ती ग्रंथालयाच्या वतीने त्वरीतच राष्ट्रीय ग्रंथ सुची विभागाने काम हाती घेतले .या ग्रंथालयाचे प्रमुख काम कोणते असेल तर राष्ट्रीय ग्रंथ सुची तयार करणे, विकसित करणे व प्रकाशित करणे, तसेच इंडेक्स इंडीया हा निर्देश तयार करणे हे होय. सध्या हे ग्रंथालय राष्ट्रीय ग्रंथसुची एजन्सी म्हणुन देशा करिता कार्यरत आहे. या ग्रंथालयावर सध्या पुढील जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे.

१. भारतीय राष्ट्रीय ग्रंथसूचीचे (INB) तयार करणे, प्रकाशित करणे व विक्री करणे. हे प्रकाशन मासिक स्वरुपात व एकत्रीकरण करुन वार्षिक स्वरुपात प्रकाशित करणे अभिप्रेत आहे.
२. ही सुची म्हणजे भारतातील इंग्रजी सह १४ भाषेतील अद्यावत प्रकाशनाची सुची होय.
३. सुचीची निर्मीती व प्रकाशन भाषानिहाय करणे हे आय एन बी चे प्रमुख उद्दिष्ट आहे.
४. या सुचीची निर्मीती व प्रकाशन व विक्री म्हणजे हा एक निर्देश असून या मध्ये निवडक लेख जे भारतातील विविध नियतकालीकातून वर्तमानकाळात सहा मुख्य भाषेत प्रकाशित झालेले आहे. अशा लेखांची सूची प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

१. मासिक व सहामाही आय. एन. बी. प्रकाशन
२. आय. एन. बी. वार्षिक खंड २०१३ प्रकाशित झाला असून २०१४ हा मुद्रणाकरिता सिध्द झालेला आहे. व २०१५ च्या खंडाचे संपादन सुरु आहे.

**इंडेक्स इंडिया :**

या पंचवार्षिक योजनेअंतर्गत १९९५ मध्ये हाती घेतलेला प्रकल्प असून हा एक निवडक लेखांचा निर्देश असून बंगाली, गुजराती, हिंदी, मल्याळी, मराठी, तामीळ भाषेतीत नियतकालीकातील लेखांची सूची या प्रकल्पांतर्गत तयार करण्यात येणार आहे सध्या १९९९ ते२००३ चे हे प्रकाशन उपलब्ध असून २०१४ पासून या करीता स्वतंत्र आज्ञावलीची तीव्रतेने गरज आहे, या दृष्टीने लवकरच पावले उचलली जात आहेत.

**भाषिक ग्रंथ सूची :**

बंगालीमधील २०१३ –१५, हिंदी मधील २००६– ०७ हे खंड प्रकाशीत झालेले असून २०१०–१४ या काळातील खंडाचे मुद्रण सुरु आहे. तर २००८–०९ मधील खंडाचे अंकी संपादन सुरु आहे. मराठी मधील सूची २०१३–१४ करिता मुद्रीत करण्याचे काम सुरु असुन त्यांचा ऑनलाईन व्हर्शन डायरेक्टरेट ऑफ लायब्ररी गव्हर्नमेंट इन महाराष्ट्रा या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**वेबसाईट ची अद्ययावता :**

या वेबसाईटवर सर्व सुचना अद्ययावत करण्यात आल्या असून प्रकाशनाची यादी जाहीर करण्यात आलेली आहे. तसेच संस्थेचे इतरही उपक्रम अद्ययावत करण्यात आलेले आहेत. वेबसाईट www.crlindia.gox.in अशी आहे. मागण्याकरीता CPENGRAM ही सरळ लिंक उपलब्ध आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने येथे RFID तंत्रज्ञानाचा अवलंब केलेला आहे. या सर्वच उपक्रमाचे सातत्यपुर्व अद्ययावतीकरण केले जाते.

**हिंदी कार्यशाळेचे आयोजन :**

विविध चर्चासत्रे, परिषदा यांचेही येथे आयोजन केले जात असून विविध प्रशिक्षणे नॅशनल मिशन ऑन लायब्ररीज (NML) व इनफ्लिबनेट यांच्या मार्फत आयोजन केले जाते. हा उपकम्र १४ डिसेबर २०१५ ते १८ डिसेबर २०१५ मध्ये आयोजीत करण्यात आला होता.

**उत्तरपुर्व विभागाकरीता विकासात्मक उपक्रम :**

या अंतर्गत वर्षभरात २३ उपक्रम आयोजीत करण्यात आलेले होते. या उपक्रमामध्ये ग्रंथालय शास्त्रातील व्यावसायिकांनी उत्तरपुर्व विभागातून सहभाग दर्शविला होता. या कार्यक्रमाचे स्वरुप कार्यशाळा, चर्चासत्रे अशा स्वरुपाचे असुन या विभागातील विद्यापीठाचे सहकार्य यासाठी घेण्यात आलेले होते.

**मध्यवर्ती सचिवालय ग्रंथालय, कलकत्ता : (Central Secretarial Library)**

सांस्कृतीक मंत्रालया अंतर्गत येणारे हे एक मोठे ग्रंथालय असून या ठिकाणी देशी व विदेशी कार्यालयीन कागदपत्रे हे या ग्रंथालयाचे महत्वाचे वाचन साहित्य मानले जाते. या ग्रंथालयाचे गठन विविध ग्रंथालयाच्या एकत्रीकरणातून झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक ग्रंथालये व विविध संस्था उदा. इंपेरियल सचिवालय ग्रंथालय, सिमला (सध्या हे कलकत्ता येथे आहे.) यांच्या एकत्रीकरणातून उभारलेले हे ग्रंथालय 'सचिवालय ग्रंथालय' म्हणून कार्यरत आहे. येथील वाचन साहित्य संग्रहामध्ये प्रामुख्याने शास्त्रीय अहवाल, गॅझेटस् यांचा समावेश होतो. या ग्रंथालयाद्वारे सर्व मंत्रालय विभागाला सेवा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. याच बरोबर संशोधक, शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती व इतरही व्यक्ती सभासद आहेत. आज येथे आठ लाखाहून अधिक प्रलेख संग्रहीत केलेले असून ग्रंथ व शासकीय प्रकाशने यांचा समावेश आहे या ग्रंथालयामध्ये पुढील विभाग समाविष्ट होतात.

**१. केंद्रीय सचिवालय ग्रंथालय :**

जी विंग शास्त्री भवन,नवी दिल्ली हा प्रमुख विभाग असुन केंद्रीय शासनातील विविध अधिकारी, मंत्रायल विभाग यांना विविध प्रकारची माहिती उपलब्ध करुन देणे ही जबाबदारी या विभागावर सोपवलेली आहे. यामध्ये सामान्य इतिहास, महिलांचा इतिहास, विभागाचा इतिहास, मान्यवरांची चरित्रे असा संग्रह आहे. विशेष करुन नियोजन व विकास अभ्यासावरील प्रलेखाच्या संग्रहणास हे ग्रंथालय प्राधान्य देते. देशाची अधिकृत प्रकाशने व विदेशी कार्यालयीन प्रकाशने यांचे हे साठवणुक ग्रंथालय होय. येथील प्रलेखाची माहिती युनायटेड नेशन, वर्ल्ड बँक, INF अशा संस्थांना संप्रेषीत केली जाते. या ग्रंथालयामध्ये दुर्मिळ पुस्तके संग्रहीत केलेली असून त्यांची संख्या ६५०० हुन अधिक आहे. या संग्रहात इंपीरीयल

साचिवालय ग्रंथालयातील विशेष संग्रह असून येथे त्यांचे संवर्धन, संरक्षणही केले जात असून आजवर १४०० ग्रंथ येथे संवर्धित केलेले आहेत.

**२. हिंदी विभागीय भाषा विभाग – (तुलसी सदन) :**

या ठिकाणी दोन लाखाहुन अधिक ग्रंथ असून भारतातील १४ भाषते लिहीलेले हे ग्रंथ आहेत. या मध्ये अक्षर वाङ्मयाचा समावेश मोठ्या प्रमाणावर आहे. लवकरच हा विभाग नव्या इतारतीत स्थलांतरीत करण्यात येणार आहे.

**३. पदवी स्तरावरील क्रमिक ग्रंथ संग्रहालय – (आर. के. पुरम शाखा) :**

या ग्रंथालयाद्वारे परिसरात रहाणाऱ्या अधिकारी वर्गाच्या वाचनविषयक गरजा पुऱ्या केल्या जातात. २००३–०४ पासुन क्रमिक ग्रंथ येथे संग्रहीत केले जात असून याची निर्मिती केंद्रिय कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या गरजेचा विचार करुन करण्यात आलेली आहे. येथे क्रमिक स्वरुपातील ३६,००० ग्रंथ उपलब्ध असून वातानुकुलीत अशी अभ्यासिका आहे. येथे साधारणतः १२४० ग्रंथाची देवघेव होत असून २५,७०० वाचक या ग्रंथालयास भेट देतात. ५३ नियतकालीके व ३३ वृत्तपत्रे ही येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. येथे ग्रंथदालनाच्या संरक्षणा करिता RFID तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेला आहे.

**४. ग्रंथालयाचे वर्गणीदार :**

शासकीय कर्मचारी वर्गाबरोबरच इतरांनाही वर्गणी भरुन सभासद होण्याची मुभा देण्यात आलेली आहे. सन २०१५ मध्ये नोंदणीकृत सभासद ६,३०० इतके होते.

**५. वाचन साहित्य संग्रह विकास :**

सन २०१६ मध्ये या ग्रंथालयात ७०३० नविन शासकीय प्रलेखाची भर पडलेली असून यामध्ये गॅझेट व इतर कागदपत्रांचा समावेश आहे. याच बरोबर विदेशी प्रलेखाची संख्या २५० इतकी असुन ही वर्ल्ड बँक प्रकाशने आहेत. इतरही विभागाकडून साधारणपणे ३३८० मुद्रीत प्रलेख इथे संग्रहीत करण्यात आलेले आहेत. या ग्रंथालयात २३७ नियतकालिके, ५४ भारतीय व परदेशी वृत्तपत्रे आणि २५० देणगीदाखल/भेटीदाखल येणारी नियतकालीके यांचा समावेश आहे. या ग्रंथालयाद्वारे नियतकालीके व त्यातील लेख शासकीय अधिकाऱ्याना विनंतीनुसार देण्यात येतात. वर्षभरात साधारणतः ८,५०० संदर्भ पुरविले जातात. हे

ग्रंथालय मायक्रोफिल्मींग भारतीय पब्लिकेशन प्रकल्प (MIPP) ची नोडल एजंसी म्हणून काम करत असून संबंधित उपक्रमामध्ये ग्रंथालय सहकार्य करत असते. या करिता मायक्रोफिल्मींगच्या डिपॉझीटरी रुमची येथे निर्मीती करण्यात आलेली आहे. याकरिता आंतरराष्ट्रीय प्रमाणकांच्या काटेकोरपणे अवलंब करण्यात आलेला आहे. सध्या ग्रंथालयात ३७,००० प्रलेख मायक्रोफिल्मींगच्या स्वरुपात उपलब्ध असुन या ममायक्रोफिल्मींची संख्या ३०९६ इतकी आहे. हे सर्व इंग्रजी व १६ भारतीय भाषामधील आहेत. यामधील मुळ वाचन साहित्य हे विविध ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे. या ग्रंथाची निवड करत असताना राष्ट्रीय ग्रंथसुची– भारतीय साहित्य (१९०१–५३) या खंडाचा मुळ स्वरुपात वापर करण्यात आलेला आहे. ब्रिटीश काळातील कागदपत्राचे २५ खंड हे ब्रिटीश लायब्ररी लंडन येथुन उपलब्ध करुन त्याचे मायक्रोफिल्मींग करण्यात आलेले आहे. साधारणत: १२५ पुस्तकांच्या सुक्ष्मफीतीचे अवलोकन करण्यात आलेले आहे. यांचा स्वतंत्र डाटाबेस प्रस्तुत ग्रंथालयात उपलब्ध आहे.

**६. सेवा :**

सभासदांना व शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांना व वाचकाना वर्षभरात साधारणत: १८,६०० पुस्तकाची देवघेव होत असून ८५,७०० पुस्तके संदर्भ स्वरुपात हाताळण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. आंतर ग्रंथालयीन देवघेवीत अंतर्गत दिल्ली परिसरातील ग्रंथालयांना सेवा उपलब्ध करुन दिली जाते. या उपक्रमांतर्गत वर्षभरात साधारणतः १५३ पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. याच बरोबर प्रतिलीपी सेवा (रिप्रोग्राफी), विशेष विनंती वरुन पुस्तके देवघेव, सुक्ष्मचित्रफिती उपलब्धता व इतर तंत्रज्ञान विषयक सेवा या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानयुक्त OPAC , LAN, वेब सुविधा RFID तंत्रज्ञानाचा वापर, डेलनेट डाटाबेस उपलब्धता प्रशिक्षण अशा सुविधांनाही या ग्रंथालयाद्वारे उपलब्ध करुन दिल्या जातात.

**७. कात्रण सेवा :**

कात्रण सेवा ही जेष्ठ शासकीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिली जातात. त्याच बरोबर ३ महीन्याचे प्रशिक्षण अभ्यासक्रमही या ग्रंथालयाद्वारे नवागतांना उपलब्ध करुन दिला जातो.

**मुदियाला ग्रंथालय कलकत्ता :**

परिसरातील एका चळवळ्या तरुणाने हे ग्रंथालय लोक जागृतीच्या दृष्टीकोनातून सुरु केलेले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले जीवन जगत असलेल्या झोपडपट्टीसारख्या परिसरातील लोकांच्या समस्या दूर करण्याच्या दृष्टीने या ग्रंथालयाची स्थापना झाली होती. सामान्यजनांचा प्रतिसाद नसल्यामुळे हे ग्रंथालय वेगवेगळ्या ठिकाणी १९०५ पर्यंत स्थलांतरीत होत राहिले. १९२९ मध्ये या ग्रंथालयाच्या नव्या इमारतीमध्ये स्थलांतर होण्यापूर्वी मुदलीया येथील बाबू मोतीलाल घोष यानी या ग्रंथालयास आपल्या घराच्या ड्रॉइंगरुममध्ये आसरा दिला होता. जवळ जवळ अर्धशतक हे ग्रंथालय वेगवेगळ्या ठिकाणी जात असताना आपल्या अस्तित्वासाठी त्यांना झगडावे लागले आणि अंतिमत: १९१७ मध्ये नवतरुणाच्या स्वयंसेवीवृत्तीमधून या ग्रंथालयाला नवचालना प्राप्त झाली. पुढील काळात हे ग्रंथालय सातत्यपूर्वक प्रगतीपथावर वाटचाल करु लागले. स्थानिक लोकांच्या वाढत्या सहभागामुळे आणि सर्व लोकांच्या हृदयामध्ये या ग्रंथालयाविषयी आस्था निर्माण झाली असल्यामुळे या ग्रंथालयास नव्या इमारतीची आवश्यकता भासू लागल्यावर लोक वर्गणीतून यशस्वीपणे निधी संकलन पुरेशा प्रमाणात झाले. याच दरम्यान येथील एक उत्साही व्यक्ती स्व. बाबू उमेशचंद्र नोगी यांनी ग्रंथालयाकरता स्वत:ची जवळजवळ २ गुंठ्याहून अधिक जागा इमारतीसाठी देणगी दाखल दिली. देणगीव्दारे प्राप्त झालेला निधी इमारत उभी करावयास अपुरा वाटू लागताच या प्रसंगी कलकत्ता कार्पोरेशनने तीन टप्प्यात आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले. आणि इमारतीचे बांधकाम पुरे करण्यास सुलभ झाले. याचबरोबर या परिसरातील स्थानिक गिरण्या, कारखाने यांच्याव्दारे देखील इमारत बांधकामाकरिता सढळ हाताने निधी उलपब्ध करुन देण्यात आला. अशा या लोकसहभागातून उभ्या राहिलेल्या ग्रंथालयाची उभारणी करताना ज्या संस्थानी व व्यक्तीनी मदत केली त्यांचे संस्था चालकांनी मन:पूर्वक आभार व्यक्त केले. या दानशूरव्यक्तींमध्ये कार्पोरेशनचे सदस्य मेसर्स संतोषकुमार बाबू अशा व्यावसायिकांबरोबर डॉ. अदयोनाथ चटर्जी अशा व्यक्तींचा समावेश होता. ही इमारत उभी करण्यासाठी १९३० च्या काळात ६७७७/– रुपये इतका खर्च आलेला होता. तर फर्निचर करिता जवळ २७००/– हून अधिक खर्च करण्यात आला

होता. ही रक्कम १९३४ मध्ये खर्च करण्यात आली होती. १९३४ च्या कालखंडात येथे इंग्रजी व बंगाली भाषेतील ग्रंथांची संख्या ८८१० इतकी होती, आणि त्याची किंमत जवळ जवळ २५०००/– इतकी होती आणि वर्गणीदारांची संख्या ३०० हून अधिक होती.

या नव्या इमारतीमध्ये मोफत अभ्यासिका खुली करण्यात आली होती. पुढील काळात ग्रंथालयाचा प्रसार करऱ्यासाठी निंबध स्पर्धा, पारितोषिके वितरण असे उपक्रम राबवून वाचकाना ग्रंथालयाकडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर स्थानिक लोकांना सभा घेण्यासाठी चर्चा करण्यासाडी एक व्यासपीठही उपलब्ध करुन देऊन ग्रंथालयाव्दारे येथील स्थानिक लोकांच्या जीवनात सामाजिक सामंजस्य आणि संस्कृती या विषयी जाणिव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचे विविध उपक्रम आयोजित करीत असताना लोकांच्या वाढत्या सहभागामुळे इमारतीची जागा अपुरी पडू लागली आणि म्हणूनच इमारत विस्तारासाठी आर्थिक पाठबळ मिळविण्यासाठी येथील स्थानिक लोकांच्या सहभागातून एक निवेदन तयार करुन ते कलकत्ता नगरपरिषदेकडे देण्यात आले. पण या निवेदनास फारसा प्रतिसाद प्राप्त झाला नाही. आजही नव्या नगरपरिषदेच्या माध्यमातून आर्थिक उपलब्धतेसाठी येथील लोकांचे प्रयत्न सुरु आहेत.

**बन्सबेरी सार्वजनिक ग्रंथालय :**

या ग्रंथालयाची स्थापना १८९१ मध्ये करण्यात आलेली असून सुरवातीस या ग्रंथालयाकडे १२९ ग्रंथ होते व १२ सभासद या ग्रंथालयाचा लाभ घेत असत. हूगळी जिल्ह्यातील या गावातील बूध्ददेव मुखोपाध्याय, सत्यानारायण मुखोपाध्याय, क्षितींद्रदेव राय अशा ज्ञानप्रेमी व्यक्तींच्या माध्यमातून हे ग्रंथालया स्थापन करण्यात आले होते. प्रथमत: हे ग्रंथालय ब्रम्हो समाजाच्या परिसरात स्थापन करण्यात आले होते. पण लवकरच त्याचे स्थलांतर वेगवेगळ्या ठिकाणी करावे लागले. या ग्रंथालयाच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाअभावी २ दशकातच हे ग्रंथालय बंद करण्यात आले. सुदैवाने या काळातच युवा पीढीने लवकरच या ग्रंथालयास पुर्नजीवन दिले. या युवकांमध्ये मणीद्ररुद्रा, तीनकोटी दत्ता व अमुल्यधन मुखोपाध्याय यांचा प्रामुख्याने समावेश होता. युवकांच्या या चळवळीस प्रतिसाद देत येथील स्थानिक जमीनदार श्री. मणीद्रदेव राय महाशय आणि त्यांचे कुटुंब यांची साथ नव तरुणांना लाभली

आणि तेव्हापासून दिर्घकाळ या ग्रंथालयाने प्रगतीच्या वाटेवर चालावयास सुरुवात केली. श्री. राय महाशयानी या ग्रंथालयास केवळ सर्व समस्यातून मुक्त कले इतकेच नव्हे तर त्या ग्रंथालयास विकासाच्या वाटेवर घेऊन जावून ते सामान्य लोकापर्यंत पोहचवले. या त्यांच्या योगदानामुळे पुढे ते प. बंगाल मधील ग्रंथालय चळवळीतील आघाडीचे व्यक्तीत्व म्हणून पुढे आले. या तत्कालीन एकत्रित पश्चिम बंगाल मध्ये १९३३ मध्ये पहिल्यांदा या ग्रंथालयात बाल विभाग सुरु करण्यात आला. लवकरच या ठिकाणी लोकसहभागातून देणगीदाखल स्थानिक नगरपालिकेने दिलेल्या ग्रंथालयाकरिता नवी इमारत बांधण्यात आली. या इमारतीचे उद्‌घाटन सुप्रसिध्द स्थानिक इतिहासकार हरीहर यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यानच्या काळात या ग्रंथालयाकडे लोकांचा ओघ वाढू लागला होता. याच उत्साहातून या ग्रंथालयाशी संबंधीत नृपती घोष यांनी १९२७ मध्ये एडीनबर्ग येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय परीषदेस उपस्थिती दर्शविली होती. १९३१ मध्ये या ग्रंथालयाने सुप्रसिध्द रसायनशास्त्रज्ञ श्री. पी. सी. रॉय यांच्या अध्यक्षतेखाली हूगळी जिल्हा ग्रंथालय परिषदेचे पहिले अधिवेशन आयोजित केले होते. अशा प्रकारे हूगळी जिल्ह्यातील ग्रंथालयाचे आणि जिल्हा ग्रंथालय संघाच्या उपक्रमाचे केंद्र म्हणूनच हे ग्रंथालय ओळखले जावू लागले. बंगाल येथे १९३४ मध्ये ग्रंथालयशास्त्रातील पहिला प्रशिक्षण अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला.

राय महाशयाच्या पुढील काळात प्रमीलचंद्र बोस, अमुल्यधन मुखोपाध्याय यांनी देखील या ग्रंथालयाच्या विकासाकरिता महत्वपूर्ण योगदान दिले आहे. १९४१ मध्ये या ग्रंथालयाचा सुवर्ण महोत्सव आणि १९५१ मध्ये हिरक महोत्सव, सुप्रसिध्द साहित्यिक व तत्कालीन विविध क्षेत्रातील व्यक्तिंच्या उपस्थितीत संपन्न झाला. या काळात ग्रंथालय केवळ पारंपारिक सेवा देत नव्हते तर सातत्यपूर्वक साहित्यविषयक सभा आयोजित करत असे. बंगालमधील साहित्यीक व कवी या सभांना उपस्थिती दर्शवित असत.

१९६० च्या पुढील काळात ग्रंथालयाच्या पदाधिकाराच्या संघटना अभावी या ग्रंथालयाची प्रगती खुंटली आणि वाचनसाहित्याचा दर्जा दाखवला आणि महत्वपूर्ण नियतकालिके आणि इतर वाचनसाहित्य याची हानी झाली प्रसंगी चोरी झाली आणि हे ग्रंथालय दुरावस्थेला पोहचले.

सुदैवाने पुढील काळात राज्य शासनाच्या पुरुस्कृतमुळे या ग्रंथालयास रुपये १९००००/- पुर्नजीवनासाठी उपलब्ध झाले आणि विनाशच्या वाटेवरील ग्रंथालयास नवे चैतन्य प्राप्त झाले. येथील इमारतीची दुरुस्ती होवून नवा मजलाही बांधण्यात आला आणि बाल विभागाचे पुर्नसंघटन करण्यात आले. वाढत्या वाचन साहित्याबरोबर वाचकांची संख्या वाढत जावून पुनश्च साहित्य व सांस्कृतिक उपक्रमाचे केंद्र म्हणून नव्या जोमाने कार्यरत राहिले. ५ मे १९९० रोजी या ग्रंथालयाचा शतक महोत्सव मोठ्या दिमाखदार स्वरुपात संपन्न झाला आणि याप्रसंगी येथे जिल्हा ग्रंथालय परिषदेचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. १९९४ मध्ये २२१०१ ग्रंथ व ३४ नियतकालिके असे वाचनसाहित्य होते, वाचक संख्या १०४८ इतकी होती.

या ग्रंथालयाच्या पुर्वइतिहासाकडे वळून पाहताना प. बंगाल मधील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये बालविभाग याच ग्रंथालयाने प्रथम १९३२ मध्ये सुरु करण्यात आला होता. ग्रामीण बंगाल मधील सौ. लार्कीन यांच्या हस्ते या विभागाचे उद्‌घाटन करण्यात आले होते. यासाठी नगरपरिषदेने विशेष देणगी दिली होती. या उपक्रमास परिसरातील शाळामधून मुलेमुली मोठ्या संख्येने उपस्थित राहिली होती. हूगळी परिसरातील अनेक प्रज्ञावत व्यक्तींबरोबर आ.एस.एस. अधिकारी मि. लार्कीन, जिल्हा न्यायाधिश हुगळी हे समारंभाचे अध्यक्ष होते आणि अनेक नामवंत व्यक्तींनी विधान परिषदेच्या सदस्यानी येथे हजेरी लावलेली होती. याप्रसंगी संघाचे अध्यक्ष कुमार मूनीद्रदेवराय महाशय यांनी प्रस्ताविकात 'हे ग्रंथालय सुरवातीच्या काळात प्रौढांच्या ज्ञानविषयक गरजांच्या पुर्ततेकरीता सुरु करण्यात आलेले होते पण आता अशी वेळ आली आहे की, मुलांच्यामध्ये वाचन अभिरुची बिंबवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. लहानपणी मुलांच्यामध्ये असलेली कुतूहलता वाढण्यासाठी व त्यांना परिसरातील घटकांची जाणीव होण्यासाठी अशा ग्रंथालय विभागाची नितांत आवश्यकता आहे' असे नमूद केले होते.

### ५.११ कर्नाटक

### ओरीएंटल लायब्ररी, म्हैसुर : कर्नाटक

दक्षिणे कडील आघाडीच्या प्रगतशील म्हैसुर संस्थानातील राजे हे संस्कृत वाङ्मय, संगीत व कला यांचे भोक्ते होते. इ.स. १८९१ मध्ये महाराजा यामराज ओडीयारी यानी पोथ्यांचा संग्रह विद्वानांना एकत्र मिळावा यासाठी संस्कृत व प्राच्या विद्या ग्रंथालय स्थापन केले. वेळोवेळी दुर्मिळ आणि मौल्यावान ग्रंथांची यात भर घातली. या ग्रंथालयात देवनागरी व इतर लिपीतील २०,००० हुन अधिक हस्तलिखीत ग्रंथ आहेत. इ.स. १८७० मध्ये हे ग्रंथालय म्हैसुर युनिव्हरसिटीच्या हवाली करण्यात आल्यावर हे म्हैसुर प्राच्य विदया ग्रंथालय या नावाने ओळखले जाऊ लागले. येथील हस्तलिखीतांची सूची दोन भागात प्रकाशित झालेली आहे. म्हैसुर ओरियंटल लायब्ररी सीरीज अतंर्गत अनेक विद्वानांचे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. भारतातील हे एक अग्रणी हस्तलिखित ग्रंथालय म्हणून ओळखले जाते.

### सरस्वती वाचनालय, शहापूर बेळगाव : कर्नाटक

महाराष्ट्र  कर्नाटक सीमा भागातील हे एक ऐतिहासिक ग्रंथालय म्हणून ओळखले जाते ज्ञानाबद्दल व ग्रंथाबद्दल विशेष आस्था बाळगणारे शिक्षक श्री. सरजामे गुरुजी यानी बेळगावमधील शहापूर परिसरात १८७४ साली अत्यंत तुटपुंज्या ग्रंथसंग्रहाच्या सहाय्याने हे ग्रंथालय सुरु केले. हळूहळू ग्रंथलयाचा विस्तार होत गेला. ग्रंथालयाचा वाढता विस्तार विचारात घेऊन ग्रंथालयाचे स्थलांतर जागे अभावी करण्यास भाग पडले. सन १९३४ मध्ये या ग्रंथालयास सांगलीच्या पटवर्धन संस्थानिकांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून या ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत उभी राहीली. या कामाकरिता लोकाश्रय देखील उत्तम प्रकारे लाभला. सांगली संस्थानाकडून उपलब्ध झालेल्या निधीचे वैशिष्ट्य म्हणजे सन १९३२ च्या दुष्काळाकरिता सांगली संस्थानाकडून जो निधी उपलब्ध करून दिला होता त्याचे वितरण केल्यावर निधीतून शिल्लक राहिलेल्या पैशातून ग्रंथालय इमारत बांधण्यात आली. सीमाभागातील मराठी अस्मितेच्या बळावर हे ग्रंथालय सुरु राहिले. राजाश्रय लोप पावताच या ग्रंथालयाचा विकास खुंटला. आज या ग्रंथालयाकडे ३८,००० हून अधिक ग्रंथसंग्रह

असुन यामध्ये ३००० दुर्मिळ ग्रंथांचा समावेश आहे. ग्रंथालयाद्वारे विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्यवीर विनायक दा.सावरकर स्मृती व्याख्यानमाला व यशवंतराव चव्हाण स्मृती व्याख्यानमाला यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. या वाचन व्याख्यानमालेस उत्स्फुर्त प्रतिसाद लाभतो. या ग्रंथालयाचा आणखी एक अभिनव उपक्रम म्हणजे दशकाहून अधिक काळ सुरु असलेला येथील संगीतकला मंच हा विभाग होय. या विभागाद्वारे अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय संचलित अभ्यासक्रमाची परिक्षा प्रतिवर्षी दोन वेळा घेतली जाते. या परिक्षांना उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत असून प्रत्येक वेळेस साधारणता ८०० विद्यार्थी ही परिक्षा देतात. पंडित कुमार गंधर्व स्मृती संम्मेलन २०१२ पासुन भरविले जाते. या दोन दिवस चालणाऱ्या उपक्रमास साधारणतः चार लाख इतका खर्च येतो. बेळगावची ही संगीत परंपरा संस्थानकालीन असून या ग्रंथालयाने या कलेचे प्रस्तृत उपक्रमाद्वारे  पुनर्जीवन केलेले आहे. त्याचबरोबर या ग्रंथालयाव्दारे प्रतिवर्षी ग्रंथालयाचे माजी संचालक संजय शंकर सैंदगी यांच्या स्मरणार्थ दरवर्षी भजनसंध्या आयोजित केली जाते. मराठी साहित्य सम्मेलनाच्या आयोजनामध्ये या ग्रंथालयाने विशेष योगदान दिलेले असून अशा उपक्रमाच्या माध्यमातून ग्रंथालयाने कला, संस्कृती आणि ज्ञान संवर्धनाचे चालविलेले हे कार्य विशेष लक्षणीय असेच आहे. या कार्यामुळेच या ग्रंथालयास महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे याच्यावतीने भिमराव पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे. तर कर्नाटक शासनाने २००८–०९ साली डॉ. एस. आर. रंगनाथन पुरस्कार देऊन या वाचनालयाचा गौरव केलेला आहे.

**सार्वजनिक वाचनालय बेळगाव : (स्थापना १८४८)**

बेळगावचे सार्वजनिक वाचनालय अस्तित्वात येण्यापूर्वी बेळगांवच्या भुईकोट किल्ल्यात दुसरे एक वाचनालय होते, पण ते शहरातील सर्वसाधारण नागरिकांना खुले नव्हते. लष्करी अधिकारी किंवा उच्च श्रेणीचे सनदी अधिकारी, काही संस्थानिक, जहागिरदार, कांही धनसंपन्न आणि इंग्रजी जाणणारे तत्कालीन ब्रिटिश सेवेतील अधिकारी वर्गापुरता प्रस्तुतच्या ग्रंथालयाचा वापर मर्यादित होता.

**सार्वजनिक वाचनालयाची स्थापना :**

इ. स. १८४८ मध्ये बेळगांवच्या सार्वजनिक वाचनालयाची स्थापना झाली. हे नगर वाचनालय स्थापन करण्याच्या कामी त्यावेळचे बेळगांव जिल्ह्याचे कलेक्टर 'इन्वीराईटी' यांचा प्रामुख्याने पुढाकार होता. वाचनालय स्थापन केल्यावर त्याला नेटिव्ह जनरल लायब्ररी, हे नाव प्रथम देण्यात आले होते. आरंभी या वाचनालयाचे ८५ वर्गणीदार होते. ग्रंथ विभागात एकूण १०३६ पुस्तके होती. वाचकांसाठी इंग्रजी, मराठी व गुजराथी अशी एकूण तेरा नियतकालिके व वृत्तपत्रे उपलब्ध करण्यात आली होती.

**वाचनालयाची वाटचाल :**

त्यावेळी बेळगांव जिल्ह्याचे कलेक्टर हेच बेळगांव नगरपालिकेचे पदसिद्ध अध्यक्ष असत. इन्वीराईटी हे त्यावेळी कलेक्टर होते. त्यांनी नगरपालिकेच्यावतीते हे नगर वाचनालय चालू करण्याचे योजिले. हल्ली ज्या जागेत मराठी मुलांची शाळा क्र. १ आहे त्या जागेत या ग्रंथालयाची सुरवात झाली. वाचनालयाकरिता सुरवातीलस सरकार कडून काही अनुदान देण्याची व्यवस्थाही या कलेक्टरनी केली होती.

वाचनालयात आनंद भास्कर या नावाचे एक उत्साही लिपिक होते. त्यांनी अतिशय कष्ट घेऊन फिरून वाचनालयाकरता बरीच देणगी गोळा केली. बेळगांव जिल्ह्याचे मुख्य न्यायाधीश यांनी वाचनालयाकरता पैसा उभा करण्यासाठी एक अभिनव कल्पना काढली. प्रथम त्यांनी स्वत: देणगी म्हणून वाचनालयाकरिता एक हजार रुपये दिले. नंतर त्यांच्या पुढे खटले चालत. त्यात खटल्याचा निकाल ज्या पक्षाच्या बाजूने लागत असे त्या पक्षाला नगर वाचनालयाकरता इच्छेनुसार शक्य तितकी देणगी देऊन त्याची पावती घ्या, असे ते सुचवित असत.

या न्यायाधिशांच्यासमोर एक मोठा सावकारी खटला चालू झाला. फिर्यादी पक्षाची बाजू नामदार द. व्यं. बेळवी व गो. ह. केळकर या प्रख्यात वकिलांनी घेतली होती. खटल्याचा निकाल फिर्यादी पक्षाच्या बाजूने लागला. फिर्यादी पक्ष धनसंपन्न होता. स्वत: न्यायाधीश, नामदार बेळवी आणि केळकर या तिघांनी त्या धनसंपन्न सावकाराकडील दहा हजार देणगीतून वाचनालयाचा, उमा महेश्वर गोडबोले हॉल, उभा केला. कै. नामदार बेळवी

हेच त्यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष होते. पुढे या हॉल मध्ये वाचनालयाच्यावतीने नामवंत वक्त्यांची व्याख्याने बेळवी यांच्या कारकिर्दीत झाली.

वाचनालयाचे प्रारंभीचे संपूर्ण इंग्रजी नावातील 'नेटिव्ह' शब्दाचे उच्चाटन करुन १९०७ मध्ये केवळ जनरल लायब्ररी 'सार्वजनिक वाचनालय, बेळगांव' असा बदल केला. पुढे सन १९२१ मध्ये तत्कालीन कार्यकारिणीने ग्रंथालयाची मोठी इमारत पाडून त्याच जागी ग्रंथालयासाठी एक भव्य वास्तु उभी करण्याचा निर्णय घेतला. पण त्याला मूर्त स्वरूप येण्यास १९२५ साल उजाडावे लागले. या वर्षीच्या कार्यकारिणीने एका ठरावाद्वारे वाचनालयाच्या बांधकामासाठी तीन हजार रुपये मंजूर केले व त्याहून जादा खर्चाची आवश्यकता निर्माण झाल्यास इमारतीतील भाडेकरु कडून दोन वर्षाचे भाडे आगाऊ घेऊन खर्च भागवावा अशी शिफारस होती. तसेच वर्गणीचे दर वाढविले आणि गावातील श्रीमंत, व्यापारी व छोटेमोठे धंदेवाले यांच्याकडून१४,५४५ रुपये देणगीच्या रुपाने गोळा करुन बांधकामास सुरवात केली. इमारत आकारास येत असतानाच बेळगाव नगरपालिकेने इमारतीवर एक भव्य कळस करण्यासाठी १५०० रुपये मंजूर केले व केवळ लोकाश्रयातून सार्वजनिक वाचनालयाची भव्य वास्तु उभी राहिली.

बेळगांवच्या सार्वजनिक वाचनालयाच्या पाठीशी १५० वर्षाच्या मराठी अस्मितेचा सांस्कृतिक इतिहास उभा आहे. या प्रदीर्घ कालावधीत संस्थेने प्रबोधनाचे, ज्ञानदानाचे आणि संस्कृती संवर्धनाचे कार्य अत्यंत चिकाटीने सुरू ठेवलेले आहे. प्रतिकूल राजकीय परिस्थितीत ही ते खंडित न होता आज अखंडपणे सुरू आहे.

वाचनालयाद्वारे मोफत विभागात मराठी, कन्नड, इंग्रजी या भाषातील आघाडीची सर्व वृत्तपत्रे त्याचबरोबर महत्त्वाची नियतकालीके वाचकांना मोफत स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येतात. एकाचवेळी किमान शंभर वाचक या योजनेचा लाभ घेऊ शकतात. सकाळी आठ ते रात्री आठ या कालावधीत शेकडो वाचक या मोफत विभागात येतात. वृत्तपत्रांच्या आणि नियताकालिकांच्या किंमती सतत वाढत असल्या कारणाने या विभागाचा वाढता आर्थिक ताण हे ग्रंथालयासमोरील एक आव्हान आहे. पण वाचक वर्गाची कुचंबणा होऊ नये, सर्वसामान्य गरीब वाचक व विशेषत: विद्यार्थी वर्गात वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा मोफत विभाग वाचनालय अशा प्रतिकुल परिस्थितीत ही चालवत आहे.

या ग्रंथालयात मराठी, कन्नड, इंग्रजी, हिंदी, संस्कृत या भाषांमधील एकूण साठ हजार पुस्तके आहेत. विशेषत: ज्योतिषशास्त्र, आयुर्वेद इत्यादी विषयांवरील पोथी वजा अत्यंत दुर्मिळ ग्रंथ वाचनालयाने जतन करुन ठेवले आहेत. संस्था मराठी असली तरी या संस्थेत इतर भाषेतील वाचन साहित्याकडेही संस्था पुरेसे लक्ष देते हे येथील ग्रंथसंग्रहावरुन सर्वाच्या लक्षात येणारे आहे.

ग्रंथालयामध्ये वेगळा संदर्भ विभाग आहे. संशोधन करणाऱ्या विद्यार्थी, पत्रकार, लेखक यांच्यासाठी हा कक्ष सदैव खुला असतो. या संदर्भ विभागाचा आपल्या लेखनात उपयोग झाल्याचे अनेक मान्यवर लेखक व विचारवंतांनी आपल्या पुस्तकांच्या प्रस्तावनेत आर्वजुन नमूद केले आहे.

**बॅ. नाथ पै व्याख्यानमाला :**

बेळगांव शहराच्या सांस्कृतिक जीवनात बॅ. नाथ पै व्याख्यानमालेला विशेष महत्व आहे. ही व्याख्यानमाला म्हणजे एक सांस्कृतिक सोहळाच असतो. ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, प्रभावी वक्ते, संसदपटू बॅ. नाथ पै यांच्या स्मरणार्थ ही व्याख्यानमाला संस्थेने सुरू केली आहे. महाराष्ट्रातील थोर विचारवंत, कवी, पत्रकार, कलाकार, वक्ते यांच्या व्याख्यानांचा व कलाकारांच्या अंगभूत कलागुणांचा लाभ या व्याख्यानमालेद्वारा बेळगावातील नागरिकांना आजवर झाला आहे. मराठी संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने व्याख्यानमाला अखंडीतपणे सुरू राहणे अत्यंत आवश्यक आहे. प्रसंगी आर्थिक झीज सोसूनही हा ज्ञानयज्ञ प्रज्वलित ठेवणे ही काळाची गरज आहे, असे धोरण ग्रंथालयाच्या संवर्धनासाठी अवलंबिलेले आहे.

**बालविभाग :**

बालवयातच विद्यार्थ्यांना साहित्याची ओळख व्हावी या उद्देशाने एक सुसज्ज बालविभाग सुरू करण्याची योजना आखण्यात आली आहे. मुलांना बालसाहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच दृकश्राव्य (ऑडिओ–व्हिज्युएल) कार्यक्रमांद्वारे विविध विषयांची माहिती उपलब्ध करून देण्याकरिता हा एक उपक्रम विचारधीन आहे. बालवयातच संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचा हा प्रयत्न आहे. याबरोबरच ज्या शालेय विद्यार्थ्यांना घरी अभ्यास करण्यासाठी जागा नाही अशा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जागा आणि साहित्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न संस्थेने पुढील काळात  करण्यासाठी योजनाबद्ध वाटचाल सुरू केलेली आहे.

### ५.१२ गुजरात :

**बडोदा मध्यवर्ती ग्रंथालय :**

महाराज सयाजीराव (३) हे बडोदा संस्थानास लाभलेले सर्वाधिक शिक्षणप्रेमी राजे होय. त्यांनी १९०६ पासून आपल्या संस्थानात मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली. या शिक्षणाला जोड देण्यासाठी ग्रंथालयास विशेष महत्व दिले. बडोदा येथे मध्यवर्ती ग्रंथालय स्थापून शहर व ग्रामीण परिसरात ग्रंथालयांचे जाळे उभे केले.

मध्यवर्ती ग्रंथालय बडोद्याची स्थापना १९१०–११ मध्ये करण्यात आली. हे एक देशातील सर्वोत्तम ग्रंथालय होय. इतकेच काय तर जगातील सर्वोत्तम ग्रंथालयाच्या तोडीस तोड असे ग्रंथालय उभे करण्याचा प्रयत्न महाराजानी केला होता. दर्जेदार फर्निचर व ग्रंथालयास सर्वदृष्टीने उपयुक्त इमारत आणि याहीपेक्षा दर्जेदार ग्रंथसंग्रह हे या ग्रंथालयाचे वैशिष्ट्ये होय.

या ग्रंथालयाची प्रथम स्थापना सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या लक्ष्मीविलास राजवाड्यात झाली. सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रणेते म्हणून ओळखले जाणारे सयाजीराव गायकवाड यांनी सार्वजनिक ग्रंथालयाचे भारतात प्रथमच बिजारोपण करण्यात सुरवात केलेली होती. अशा या ग्रंथप्रेमी महाराजांनी मध्यवर्ती ग्रंथालयाकरीता २०००० पुस्तके देणगी दाखल मुलभूत संग्रह या दृष्टीने उपलब्ध करुन दिली व ग्रंथालय सेवेचा पाया मजबूत केला. सुरवातीस हे ग्रंथालय सरकारवाडा येथे कार्यरत राहिले. पुढील काळात महाराजा आपला अमेरिका दौरा करत असताना त्यांच्या अमेरिकेतील भेटीत न्यू जर्सी येथील इन्टिट्यूट ऑफ न्यू हेवन येथील संस्थेचे  तरुण ग्रंथपाल विल्यम अलॅनबोर्डेन याची भेट झाली. या भेटीने महाराज खुपच प्रभावी झाले.  पुढे याची परिणीती म्हणजे महाराजानी बडोद्यातील मध्यवर्ती ग्रंथालयाच्या विकासाकरिता आणि बडोद्यातील ग्रंथालय चळवळीची रुपरेषा निर्धारीत करण्याची महत्वकांक्षी योजना राबविण्यासाठी श्री. बोर्डेन यांना बडोदा संस्थानात आमंत्रित केले.  या आमंत्रणाचा स्विकार करुन ते बडोद्यात १९१० मध्ये दाखल झाले.

श्री. बोर्डेन आणि नव्या दिल्लीतील एक बांधकाम व्यावसायिक सर एडवर्डस् न्यूटसन व बडोदा राज्याचे वास्तू विशारद यांनी महाराजाच्या मनातील मध्यवर्ती ग्रंथालयाच्या इमारातीचे वास्तूशिल्प चित्र तयार केले. पुढील काळात या इमारतीचे बांधकाम हळूहळू पुर्ण होवून १९३१ मध्ये या ग्रंथालयाची सर्वांगसुंदर इमारत उभी राहिली. या इमारतीकरीता रुपये ४०००००/– व फर्निचरकरीता रुपये १०००००/– व ग्रंथ, नियतकालिके यासाठी रुपये १०००००/– खर्च करण्यात आला. हे ग्रंथालय जून्या बडोदा शहरातील मांडवी विभागामध्ये डौलाने उभे आहे.

येथील ग्रंथसंग्रह विभागाचे दालन हे चार मजली असून त्याची लांबी ८५ फूट, रुंदी ३५ फूट इतकी आहे. येथील मजबूत रॅक्सवर ३५०००० ग्रंथसंग्रह सुव्यवस्थितपणे मांडलेला आहे. मोठमोठी काचेची तावदाने, खिडक्यांसाठी वापरल्याने येथे दिवसादेखील भरपूर सुर्यप्रकाश उपलब्ध होतो. येथील लाकडी छपरामुळे या ग्रंथालयातील वातावरण आल्हाददायक राहते. शिवाय रॅक्सच्या शिस्तबध्द रचनेमुळे ग्रंथ देवघेव सुलभ होते.

या अंतर्गत विकासाचा आराखडा हा जेस्नेड आणि कंपनी यू. एस. ए. यांनी तयार केलेल्या लायब्ररी ऑफ काँग्रेस वॉशिंग्टनच्या आराखड्याशी मिळता जुळता असून त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या ग्रंथसंग्रह दालनातील वातावरण सदैव आल्हाददायक राहते.

अशा या संरचनेचा फायदा पुढील काळात जाणवला तो २००१ साली गुजरात येथे भुकंपाच्यावेळी होय. आश्चर्यकारक घटना म्हणजे या ग्रंथालयातील एक ही पुस्तक रॅकवरुन हलले नव्हते. या ग्रंथालयामध्ये दुर्मिळ, अमुल्य ग्रंथ संग्रहीत करण्यात आले आहेत. दुर्मिळ संग्रहात सर्व खासदारानी सह्या केलेली भारताच्या घटनेची मुळ प्रत, सेन्सस–रिपोर्ट व वार्षिक अहवाल (बडोदा राज्य) अशा दुर्मिळ वाचनसाहितयाचा उल्लेख करावा लागेल. याचबरोबर या ग्रंथालयात छोट्या ग्रंथाकरीता छोटे रॅक्सही तयार करण्यात आले आहेत. या छोट्या पुस्तकामध्ये ७३ ग्रंथाचा समावेश असून येथील सर्वात मोठे पुस्तक हे 'इंडियन प्रिन्सेस' १८८७–१९०१ हे असून त्याची लांबी २ फूट ९ व रुंदी १.५ इतकी आहे. हे पुस्तक स्वत: सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी खरेदी करुन ग्रंथालयास देणगी दाखल दिले आहे.

सध्या हे ग्रंथालय संचालनालय गुजरात राज्य, याच्या व्यवस्थापनेखाली चालत असून गुजरात हे असे राज्य आहे की या राज्यात (०२) राज्य ग्रंथालये आहेत. दुसरे राज्य ग्रंथालय गांधीनगर येथे १९८२–८३ मध्ये स्थापन करण्यात आले आहे. या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण व संगणकीकरण झालेले असून येथील बालविभागात व्हिडीओ सुविधा उपलब्धता करुन दिली आहे. अद्ययावत व दुर्मिळ ग्रंथालय असे याची ओळख करुन दिली जाते. आज या ग्रंथालयाचे एकूण ८००० सभासद असून ग्रंथसंग्रह २,३८,९९६६ इतका आहे. यामध्ये १,१५,६४९ गुजराती भाषेतील ग्रंथाचा समावेश आहे. एकूण सभासद संख्या २२,५०० इतकी आहे. यापैकी जिल्ह्यातील सभासद ८००० इतके आहेत. दरदिवशी पुस्तक देवघेव सेवा सरासरी ११५७ इतकी असून १७७५ वाचक दरदिवशी ग्रंथालयास भेट देतात. फिरत्या ग्रंथालयाची संख्या (९०) इतकी आहे.

**बर्टन ग्रंथालय, भावनगर :**

हे ग्रंथालय १९५९ मध्ये स्थापन करण्यात आले. भावनगर येथील दिवाणपाटा रस्त्यावर आहे. या ग्रंथालयाच्या स्थापनेकरिता गुजरात कवी दलपतराम यांनी पुढाकार घेतला. कवि दलपतराम यांना भावनगरचे तत्कालीन राजे महाराज विजयसिंग यांनी पहिल्यांदा १८९१ मध्ये निमंत्रित केले होते. पुढे महाराज जसवंतसिंग यांनी १८५९ मध्ये दुसऱ्यांदा त्यांना निमंत्रित केले होते. याप्रसंगी कवि दलपतराम यांनी विजयनगर येथे कविता लिहिली. या कवितेचे नाव 'विजयकश्मा' असे होते. या कवितेने महाराज प्रभावीत झाले, व त्यानी कवि दलपतराम यांना रुपये २०००/– इतके बक्षीस दिले, व शाल देऊन सन्मान केला. हा सन्मान स्विकारताना महाराजाना कवी दलपतराम यांनी अशी अट घातली की जर भविष्यात महाराज येथे पुस्तकालय सुरु करणार असलतील तरच मी या सन्मानाचा स्विकार करेन. महाराजानी देखील या अटीचा स्विकार केला. आणि यातूनच भावनगर येथील ग्रंथालयाचे बीजारोपण झाले. या ग्रंथालयाचे नाव श्री छगनभाई देसाई पुस्तकालय असे ठेवण्यात आले होते. देसाई हे एक भावनगरमधील उत्तम प्रशासक म्हणून ओळखले जात.

१८७० मध्ये या संस्थानचा कारभार महाराज तक्तासिंगजी या अल्पवयीन युवराजकडे आला. पुढे १८७८ मध्ये तक्तसिंगजी सज्ञान झाल्यावर संस्थानचा कारभार पाहू लागले. या दरम्यान पोलीटीकल एजंट श्री. अलसी बर्टन हे भावनगरचा कारभार पाहत असत. भावनगर संस्थानशी त्यांचे चांगले संबंध होते. म्हणूनच श्री. बर्टन यांच्या स्मरणाप्रित्यर्थ महाराज तक्तसिंग यानी या ग्रंथालयाचे नाव बदलून बर्टन लायब्ररी असे पुनःरनामकरण १८८२ केले. या काळात या ग्रंथालयामध्ये १०,००० हून अधिक ग्रंथसंग्रह होता. या ग्रंथालयाची नवी इमारत बांधताना ३० डिसेंबर १८८२ रोजी या इमारतीचा कोनशीला समारंभ सौ. बर्टन यांच्या हस्ते संपन्न झाला होता. ही कोनशीला बसवित असताना त्याठिकाणी एक ऐतिहासिक नोट (तपशील) तयार करुन त्याच्यावर बर्टन यांची सही घेण्यात आली होती. ही नोट व त्यावेळी प्रकाशित करण्यात आलेल्या वृत्तपत्राच्या प्रती व नाण्यांनी भरलेली बाटली त्यामध्ये ठेवण्यात आली होती. ही इमारत पुढे १८९५ मध्ये पुर्ण झाली आणि ग्रंथालयाकरीता ५३०० फूट इतकी जागा इमारतीव्दारे उपलब्ध झाली.

१९२९ मध्ये या ग्रंथालयाचे ४५० सदस्य होते या ग्रंथालयाच्या विकासामध्ये अनेक व्यक्तींचा सहभाग असून यामध्ये प्रा. गुलाबराव देसाई, सी. टी. दाते, प्रा. जे. बी. शांडील्य इत्यादी बरोबरच ग्रंथपाल श्री. इंदूभाई बोस यांचेही योगदान महत्वपूर्ण मानले जाते. ते उत्तम प्रशासक, प्रशिक्षित ग्रंथपाल व एक ज्ञानी व्यक्ती म्हणून ओळखले जात. ग्रंथालय सेवा हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते आणि त्याच्या चतूरस्त्र व्यक्तिमत्वामुळे या ग्रंथालयाचा सर्वांगीण विकास होऊन दर्जेदार ग्रंथसंग्रह व उत्तम सेवेकरीता हे ग्रंथालय सर्वदूर ओळखले जाऊ लागले. १९७७ मध्ये या ग्रंथालयाच्या सुव्यवस्थित व्यवस्थापनाची, दीर्घकालीन सेवेची दखल घेऊन गुजरात राज्याव्दारे स्व. मोतीभाई अमिन पारितोषिक उत्तम ग्रंथालयास देऊन या ग्रंथालयाचा गौरव करण्यात आला होता. या प्रसंगी कार्यरत असलेले ग्रंथपाल स्व. हिराभाई बूच यांचाही उत्तम ग्रंथपाल म्हणून सत्कार करण्यात आला होता.

म. गांधी देखील या ग्रंथालयाचे एक वाचक होते. अशा या ग्रंथालय संग्रहात ६१,७६३ ग्रंथ असून यापैकी २५८७६ गुजराती ग्रंथ, ८९३७ इंग्रजी व ४७४१ हिंदी व १२५३ संस्कृत ग्रंथ अशा दुर्मिळ ग्रंथांचा समावेश आहे. ११ वृत्तपत्रे इंग्रजी, गुजराती भाषेतून उपलब्ध करुन

दिली जातात. दरदिवशी सरासरी १४५० वाचक पुस्तक देवघेवीचा लाभ घेतात व नियतकालिके, वृत्तपत्रे याचा लाभ घेणाऱ्यांची संख्या १,००,००० इतकी आहे.

विद्यमान स्थितीमध्ये या ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासाठी व्यवस्थापन मंडळ प्रयत्नशील असून या ग्रंथालयास पुर्वीचा दर्जा व सौंदर्य प्राप्त करून देण्याचा त्यांचा मानस आहे.

**सर जयसिंहराव सार्वजनिक ग्रंथालय, बडोदा :**

हे एक गुजरात राज्यातील जुने ग्रंथालय असून याची स्थापना १८७७ मध्ये श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी केलेली होती. या ग्रंथालयाचा पायाभरणी समारंभ १ मार्च १८७७ रोजी करण्यात आलेला होता. हे ग्रंथालय शासकीय परिसरात असून शासनाव्दारे निधी प्राप्त होतो. सयाजीराव महाराजांचे शिक्षक श्री एम. एच. एलीयंट आणि प्राचार्य बडोदा हायस्कूल सर जे. व्हि. एस. स्पोक यांच्या मनामध्ये बडोद्यामध्ये एक आदर्श ग्रंथालय स्थापन करावे अशी इच्छा होती. याच पार्श्वभूमीवर २१ एप्रिल १८७६ रोजी एक सभा बोलावून या सभेत एक आदर्श ग्रंथालयाच्या स्थापनेची कल्पना पुढे येवून याव्दारे प्रत्येक व्यक्तींचे जीवनभर शिक्षण व्हावे स्वयंशिक्षणाच्या माहिती विषयक लोकांची गरज भागावी हाही उद्देश होता. अशा पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या ग्रंथालयाची इमारत १८८२ मध्ये पुरी करण्यात आली. संस्थानकाळात हे ग्रंथालय तत्कालीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोरील रावपुरा विभागात बांधण्यात आले होते. या ग्रंथालयाचे उद्घाटन होताच कामकाजास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाकरीता श्री. एफ. एम. इलियार यांची एक समिती निवडण्यात येऊन सेवक संघ स्थापना करण्यात आला. पहिल्यावर्षी ६१ सभासद होते. या समितीचे पहिले सदस्य हे महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे हे होते. पुढील बारा वर्षांच्या काळात श्री. एलीयंट यांनी ग्रंथालयाच्या कामकाजास आदर्शवत मार्गदर्शन केले. सुरवातीस या ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाकरीता व सेवकवर्गाच्या वेतनाकरीता शासनाकडून अनुदान दिले जाई. हे अनुदान १९२२ पर्यंत सुरु होते. तसेच समितीतील सदस्यांकडून ग्रंथालयाकरीता आर्थिक सहकार्य उपलब्ध होत असे. १९२३ पासून पुढील काळात बडोदा नगरपरिषदेकडून ग्रंथालयसमितीस आर्थिक सहाय्य

उपलब्ध करुन देण्यात आले होते. याचबरोबर गायकवाड राजघराण्याकडून या ग्रंथालयास आर्थिक सहकार्य करण्यात येत असे.

९ मार्च १९२४ रोजी या ग्रंथालयाचे नाव बदलून सर जयसिंहराव सार्वजनिक ग्रंथालय असे करण्यात आले. श्री. जयसिंहराव महाराज सयाजीराव महाराज यांचे जेष्ठ चिरंजीव, या नामकरण प्रसंगी जयसिंहरावाच्या पत्नी श्रीमंत शकुंतला राजे गायकवाड यांनी ग्रंथालय विकासाकरीता देणगी दिली होती.

पुढील काळात १९५९ पासून या ग्रंथालयास सामाजिक कल्याण मंडळ दिल्ली यांच्याकडून आर्थिक पुरवठा गुजरात शासनामार्फत करण्यात येत असे. याच पार्श्वभूमीवर १९६० मध्ये केंद्रीय शासनाने नवीन ग्रंथ खरेदीसाठी व फर्निचर व कपाटासाठी जयसिंहराव ग्रंथालयास गुजरात शासनाच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य उपलब्ध करुन देण्यात आले होते. १९७८ मध्ये गुजरात शासनाने सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानाविषयी नवीन नियम तयार केले आणि या नियमानुसार हे ग्रंथालय सर्वसामान्य लोकांच्याकरिता खुले केल्यास त्यास रुपये ४००० इतके वार्षिक अनुदान देण्याची तरतूद केली. या पार्श्वभूमीवर तत्कालीन ग्रंथालय मंडळाने राज्य सरकारकडून अशा प्रकारचे अनुदान घ्यावयाचे नाही असा निर्णय घेतला.

या ग्रंथालयाचे व्यवस्थापन पाहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्थापन समिती असून यामध्ये संस्थेच्या नियमानुसार (०९) निवडून आलेले प्रतिनिधी आहेत. या (०९) निवडून आलेल्या प्रतिनिधीतून स्विकृत सदस्य म्हणून घेतलेले (०२) सदस्य, तसेच बडोदा नगरपरिषदेने नामनिर्देशित केलेले (०२) प्रतिनिधी आणि देणगीदाराचा (०१) प्रतिनिधी अशा सभासदामधून समितीकरीता (०१) कार्याध्यक्ष (०१) सचिव (०१) उपसचिव (०२), हिशोबतपासनीस यांची समितीसदस्याकडून निवड करण्यात येते.

हे ग्रंथालय १३४ वर्षे  या परिसरात सर्वांना सेवा देत असून दरवर्षी ग्रंथालयाकडे वाचक आकृष्ट होण्यासाठी सभा व संमेलने होत असतात.  त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रातून केली जाते. या ग्रंथालयासाठी स्वतंत्र बालविभाग व महिला विभाग सुरु करण्यात आलेले होते पण आज त्याचा वापर होत नाही. सुरवातीच्या दिवसामध्ये मुलांकरिता

कथाकथन, बालसाहित्याचे प्रदर्शन, एकांकीका अशा उपक्रमाबरोबरच बालदिन मोठ्या प्रमाणात साजरा केला जात असे. याचबरोबर जादूचे प्रयोग आयोजित केले जात असत. १९९२ अखेरपर्यंत या ग्रंथालयाव्दारे सुरवातीच्या काळात मुलांकरिता विविध खेळांचे आयोजन केले जात असे. या उपक्रमातून त्यांच्यातील प्रतिभेस चालना देण्याचे विविध उपक्रम ग्रंथालयाद्वारे चालविले जात म्हणून अशा उपयुक्त उपक्रमामध्ये शाळेमधील मुले उत्साहाने सहभागी होत असत. आज नव्या युगात शाळेतील अभ्यासक्रम व वाढता व्याप यामुळे या विभागास म्हणावा तेवढा प्रतिसाद लाभला नाही. याचबरोबर महिला विभागाचीसुध्दा हीच परिस्थिती आहे. तसेच आर्थिक अभावही आहे. केवळ महिला व मुले पुस्तक देवघेवीसाठी या ग्रंथालयाचा वापर करतात. नव्या बदलास सामोरे जाण्यासाठी ग्रंथालयास सुसज्ज करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

### ५.१३ राजस्थान

**शासकीय महाराज सार्वजनिक विभागीय ग्रंथालय, जयपूर :**

हे एक राज्यातील जूने ग्रंथालय असून १६५२ मध्ये स्थापन झालेले आहे. या ग्रंथालयाची स्थापना महाराजा मानसिंग यांनी केली आहे. १७०४ च्या कालखंडात सवाई जयसिंह यांनी या ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये मोलाची भर घालून, त्याचे स्थलांतर १७१६ मध्ये जेलेफचौक येथे करण्यात आले. या ग्रंथालयाच्या वाटचालीतील महत्वाची घटना म्हणजे महाराज मानसिंग यांनी १८६६ मध्ये या ग्रंथालयाचे नामकरण महाराणा ग्रंथालय असे करुन सर्वांसाठी खुले केले. या ग्रंथालयाची विद्यमान इमारत १८६६ मध्ये महाराजा मानसिंह यांनी बांधली. ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल मेसर्स हरजीवन गौसरमहीमचंद सेन, प्रफूलचंद्रा चॅटर्जी या सर्वांनी या ग्रंथालयाच्या विकासासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. आज हे ग्रंथालय जयपूर शहरापुरते मर्यादीत नसून परिसरातील शहरे व आजूबाजूची खेडी यासाठी ग्रंथालय सेवा देत आहे.

जवळ जवळ पावणेचारशे वर्षांची परंपरा असलेल्या ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह १,५०,००० पर्यंत पोहचलेला असून हिंदी, संस्कृत, उर्दू भाषेतील ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. आज येथे ३०,००० संदर्भ ग्रंथ, १०८ दुर्मिळ ग्रंथ, ३३३ हस्तलिखिते याचा समावेश असून या दुर्मिळ संग्रहात पर्शियन भाषेतील महाभारताचे अकबर यानी केलेले भाषांतर, अभीलेखागृहाच्या संदर्भातील कॅलींग हॉग यांचा अहवाल याच बरोबर २०० वर्षाहून जूने असलेली भ्रुगू संहीतेची प्रत, १८३५ मधील एशियन कार्पेट इ. समावेश आहे. आज येथील ग्रंथसंग्रहाचा लाभ २००६–०७ मधील तपशीलावरुन वर्षभरात ३९९७६ वाचक घेतल्याचे निदर्शनास येते. तसेच ७५०० पुस्तकांची देवघेव झाल्याचे निदर्शनास येते. आज या ठिकाणी २८ वर्तमानपत्रे १३५ नियतकालिके (विविध भाषेतील) व वृत्तपत्राचे जुने खंड उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. याचबरोबर वाचनसाहीत्य संग्रहामध्ये गॅझेट ऑफ इंडिया १८७६–१९८६ च्या काळातील खंड, पायोनीर, स्टेटसमन या नियतकालीकाचे १८७६ पासूनचे अंक राष्ट्रदूत आणि हिंदूस्थान टाईम्सचे स्वातंत्र्यानंतरचे सर्व अंक अशा दुर्मिळ वाचनासाहीत्याचे जतन येथे करण्यात आले आहे.

या ग्रंथालयात १९४५ साली मुलांच्याकरिता स्वतंत्र बाल ग्रंथालय सुरु करण्यात आले होते. याठिकाणी २४७०० ग्रंथ असून अनेक नियतकालिके उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. या विगाभाचा लाभ ४००हूनअधिक सभासद घेत असून मुलांना आठवड्यासाठी ग्रंथालय मोफत स्वरुपात पुस्तकाची देवघेव करते. तसेच कॅरम, लुडो, चेस इ. खेळाबरोबर मुलांसाठी सिनेमा ही दाखवला जातो. मुलांच्या आवडीच्या ९० हून अधिक सीडी संग्रहीत करण्यात आल्या आहेत.

या ग्रंथालयाचे संगणकीकरण २००६–०७ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे. संगणकीकरण पुर्ण करणारे हे राज्यातील अग्रणी ग्रंथालय असून देशपातळीवर त्याचा दुसरा क्रमांक लागतो. या ग्रंथालयाची वेबसाईट www.maharajalibrary.org आहे.

**शासकीय विभागीय ग्रंथालय, बिकानेर :**

राजा श्री गंगासिंग बहादूर यांनी आपल्या बिकानेर या संस्थानात लोकांच्या कल्याणासाठी अनेक कामे केली. त्यांच्या राज्यरोहणाच्या सुवर्णमहोत्सवी समारंभाच्या पार्श्वभूमीवर १९३७ मध्ये काही लोकोपयोगी कामे करण्यात आली. या वेळीच एक महत्वपूर्ण घटना म्हणजे किंग एडवर्ड जॉर्ज पाचवे यांच्या स्मरणार्थ १९३७ मध्ये स्थापन करण्यात आलेले सार्वजनिक ग्रंथालय होय. याच ग्रंथालयाचे नामकरण पुढे शासकीय विभागीय ग्रंथालय असे करण्यात आले. पण येथील लोक आजही या ग्रंथालयाचा उल्लेख राज्य ग्रंथालय असाच करतात.

सुरवातीस व्हटरनरी कॉलेजच्या ॲनाटॉमी विभागामध्ये ऑक्टोबर १९३७ ला हे ग्रंथालय सुरु करण्यात आले. पुढील काळात लोकांनी विविधप्रकारे गोळा केलेल्या निधीतून या ग्रंथालयाकरीता १९५४ मध्ये वर्तुळाकार इमारत उभी करुन या इमारतीत ग्रंथालय सुरु केले. या ग्रंथालयामध्ये ग्रंथसंग्रह वुध्दींगत करण्यासाठी महाराजा गंगासिंग यांनी आपल्या ‘अनुप संस्कृत पुस्तकालय’ या खाजगी ग्रंथालयातील ग्रंथ या ग्रंथालयाकडे हस्तांतरीत केले. या संग्रहात १८८० पूर्वी प्रकाशित झालेली अनेक पुस्तके होती. आज या ग्रंथालयाकडे राजस्थानी भाषेतील समृध्द ग्रंथ संग्रह असून तसेच इतर देशी व युरोपीयन चित्रे, ऐतिहासिक कागदपत्रे, विविध भाषेतील शब्दकोश, अकरा खंडातील हिंदी शब्दकोश, बारा खंडातील हिंदी शब्दकोश, जॉग्रोफिकल सर्व्हे ऑफ इंडीयाची प्रकाशने, नरेंद्र मंडळ या बिकानेर

संस्थानामधील मंडळाच्या सभांचे इतिवृत्त आणि नियम याविषयक कागदपत्रे आणि वेदपुराण ज्योतिष  विषयक अनेक ग्रंथ, नियतकालिके, गॅझेटीअर (बिकानेर स्टेट) व भारतातील इतर राज्यांची गॅझेटीअर्स असे समृध्द वाचनसाहित्य या ग्रंथालयात संग्रहीत करण्यात आलेले आहे. पारंपारिक ग्रंथालय सेवांबरोबरच या ग्रंथालयाद्वारे विशेष संदर्भसेवा या अंतर्गत इतिहास, संस्कृती, प्रशासन विषयक बिकानेर संस्थानशी संबंधित माहिती उपलब्ध करुन दिली जाते. या ग्रंथालयामध्ये वाचनसाहीत्य खरेदी करताना वाचकांच्या गरजांना प्राधान्य दिले जाते. याचबरोबर मुलांच्या विषयक विशेष वाचन साहित्य, स्पर्धा परीक्षा संग्रह यांचा विकास पध्दतशीरपणे करण्यात आलेला आहे. विशेष उपक्रमांतर्गत या ठिकाणी दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. या प्रसंगी चित्रकला स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा यांचे आयोजन केले जाते. या ग्रंथालयात मुलांच्यासाठी २००७ पासून एक स्वतंत्र विभाग राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान कलकत्ता यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अर्थसहाय्यातून सुरु करण्यात आलेला आहे. या ठिकाणी मुलांच्याकरीता संगणक, टि.व्ही. व इतर दृकश्राव्य साधने उपलब्ध करुन देऊन त्यांना खेळांची व सामान्यज्ञान विकासाची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याचबरोबर प्रोत्साहन स्वरुपात बालसाहित्यिकांचा मेळावा, पुस्तक प्रकाशन, लेखक, वाचक, संवाद, ग्रंथ प्रदर्शन, चित्रकला इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. लवकरच परिसरातील सांस्कृतिक व साहित्य विषयक उपक्रमांना चालना देण्यासाठी या ठिकाणी सांस्कृतिक हब सुरु करण्यात येणार आहे.

या राज्यातील महत्वपूर्ण ग्रंथालयामध्ये शासकीय जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय सिकर (१९५६), व्हिक्टोरीया हॉल ग्रंथालय उदयपूर (१८८७), राज्य सार्वजनिक ग्रंथालय भरतपूर (१९०७), सार्वजनिक ग्रंथालय जोधपूर (१९१५) अशा ग्रंथालयांचा समावेश होतो.

**शासकीय सार्वजनिक ग्रंथालय, जोधपूर :**

शासकीय सार्वजनिक ग्रंथालय जोधपूर विभागातील एक मोठे ग्रंथालय आहे. या ग्रंथालयाची इमारत अत्यंत देखणी असून या ग्रंथालयामध्ये संदर्भ विभागास लागूनच एक

प्रशस्त अभ्यासिका उभी करण्यात आली आहे. आज या ग्रंथालयात २३ नियतकालिके, १२ वृत्तपत्रे, व इतर महत्वपूर्ण वाचन साहित्य वाचकांना उपलब्ध करुन दिले जाते. या दुर्मिळ व महत्वपूर्ण वाचनसाहित्यामध्ये भारत, चीन, इंडोनेशिया, पार्शी, कांगा, राजस्थानी, हिंदी व मुघल शैलीतील दुर्मिळ पुस्तके संग्रहित करण्यात आलेली आहेत. याचबरोबर नृत्य, धर्म, भिंतीवरील चित्रकला इत्यादी विषयक महत्वपूर्ण ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. येथील वाचन साहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी असलेले वेगवेगळ्या प्रकारचे विश्वकोष होय. या संग्रहात हिंदी, संस्कृत, ऊर्द, दक्षिणेकडील भाषा, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, नेपाळी, आसामी, पार्शी इत्यादी भाषेतील ग्रंथ संग्रहित करण्यात आलेले आहेत. तसेच निमॅस्टी सोसायटी ऑफ इंडिया, युनायटेड प्रोव्हन्स ऑफ इंडिया, हिस्टॉरीकल सोसायटी, इंडीयन कल्चर १९३६, ऐशियाटीक सोसायटी, बंगालचा ऐशियाटीक रिसर्च १९१० इत्यादी जुने अंक या ठिकाणी संग्रहित करण्यात आलेले आहेत. ग्रंथालयात ६०,००० हून अधिक ग्रंथ असून एप्रिल ते सप्टेंबर या काळात हे ग्रंथालय सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत खुले असते. तसेच ऑक्टोबर ते मार्च या काळात हे ग्रंथालय सकाळी ८.३० ते रात्री ७.३० या वेळेत खुले असते. मंगळवार या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीही हे ग्रंथालय सकाळी २ तास खुले असते.

**महाराजा मानसिंग पुस्तक प्रकाशन ग्रंथालय, जोधपूर :**

हे ग्रंथालय जोधपूर येथील महारंगगड येथे आहे. महाराजा मानसिंग १८०३ –४३ हे एक कवी, साहित्याचे चाहते, विद्वान राजे म्हणून ओळखले जात. त्यांच्या कालखंडात मारवाडमधील अनेक ग्रंथाचे लेखन करण्यात आले. आपल्या कालखंडात झालेल्या या लेखनाचा एक संग्रह एका सुरक्षित ठिकाणी करावा या उद्देशाने त्यांनी २ जानेवारी १८०५ रोजी गडावर एक ग्रंथालय स्थापन केले.

हे ग्रंथालय मारवाड कायदा १८८३–८४ यावरुन ते दौलका कोठार येथे किल्ल्यावर होते असे निदर्शनास येते. या ग्रंथालयात संस्कृत मधील ग्रंथांच्या व भारतीय अक्षर ग्रंथाच्या प्रती संग्रहीत करण्यात आल्या होत्या. याचबरोबर अरेबीयन पार्शी भाषेतील साहित्य या ग्रंथालयात ठेवण्यात आले होते. दरम्यानच्या काळात पुस्तक प्रकाश हे ग्रंथालय सूमेर ग्रंथालयात विलीन करण्यात आले. नंतर हे ग्रंथालय उमेदभवन येथे स्थलांतरीत करुन ते

संशोधकाकरीता खुले करण्यात आले. १९७७ मध्ये हे ग्रंथालय महरमगड येथे स्थलांतरीत करुन त्याचे नामकरण महाराज मानसिंग पुस्तक प्रकाशन शोध असे करण्यात आले.

या ग्रंथालयात जवळ जवळ ५००० हस्तलखिते असून ही सर्व हस्तलखिते संस्कृत, पाली, प्राकृत राजस्थानी दिगल, हिंदी या भाषेतील असून यामधील संस्कृत पाली प्राकृत भाषेतील हस्तलिखिते, वेदवेदांत, इतिहास, धर्म, भक्ती, निती, तंत्र, काव्य, व्याकरण, श्राव्यसार, शिल्पशास्त्र, रत्नशास्त्र, कामशास्त्र, आयुर्वेद, ज्योतीष, विज्ञान इ. विषयासंबंधीत आहेत. याचबरोबर याच ग्रंथालयात नाथ सांप्रदायविषयक साहित्य हे अत्यंत दर्जेदार असून भारतातील इतर अन्य ग्रंथालयात इतके विपुल साहित्य नाथसांप्रदायावर आढळत नाही.

या दुर्मिळ साहित्याच्या संरक्षणासाठी इतिहास संशोधन मंडळाकडून आर्थिक योगदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. याच ग्रंथालयात महाराज अजितसिंग ते सुरदाससिंग यांच्या काळातील त्याच्या वैयक्तिक संग्रहातील ३००० पुस्तके संग्रहित करण्यात आलेली आहेत. याचबरोबर येथे स्त्रियांचे दागिने, नाणी, मौल्यवान कपडे, अनेक बाबीवरील खर्चाचा तपशील विशेष करुन विवाह व इतर जमीनीविषयक कागदपत्रे याठिकाणी सुव्यवस्थितपणे जपून ठेवली आहेत.

विवाह विषयक कागदपत्रामध्ये संबंधीत वस्तूंची किंमत, मजूरी, दैनंदिन खर्च, चूना, वाळू, लाकूड, दगड याचाही उल्लेख आहे. या कायदापत्रावरुन तत्कालीन आर्थिक परिस्थितीची कल्पना येते.

काही दप्तराचे वजन १०–१२ किलो इतके आहे. याठिकाणी ११ कपाटे ही पुस्तकांनी भरलेली असून हे ग्रंथ हिंदी, राजस्थानी, इंग्रजी भाषेतील आहेत आणि इतिहास, साहित्य, धर्म इ. विषय या ग्रंथातून मांडलेले आहेत. या पुस्तकाबरोबरच जोधपूर, बिकानेर, बन्सवाडा, डोंगरपूर इ. परिसरातील आठवणी, प्रवास, राजे लोकांचे संरक्षण, पार्शी व ब्रिटीश व्यक्तींचे अनुभव याविषयी आठवणी संदर्भातील लेखनही या संग्रहात आढळून येते.

या ग्रंथालयाचे वैशिष्ट्ये म्हणजे या ग्रंथालयाच्या उद्दिष्टामध्ये पुस्तक प्रकाशन हे उद्दिष्ट अंतर्भूत करुन या अंतर्गत हिंदी, राजस्थानी पुस्तकाचे प्रकाशन करणे असाही उल्लेख आढळतो. यावरुनच या ग्रंथालयाचे नामकरण करत असताना महाराणा मानसिंग पुस्तकालय असे करण्यात आले आहे.

या ग्रंथालयाव्दारे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमामध्ये महत्वाचे उपक्रम म्हणजे १९९४ मध्ये राजस्थान प्राच्यविद्या प्रतिष्ठान जोधपूर याच्या विद्यमानाने आयोजित करण्यात आलेल्या १९९४ मधील नाथसांप्रदाय परिषद व १९९५ मधील राष्ट्रीय स्तरावरील राजस्थानी संस्कृती व साहित्य परिषद होय. असे हे एक ऐतिहासिक परंपरा जपणारे वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथालय म्हणून यांची ख्याती आहे. *(डॉ. हरिश शिवनानी इन पी. एस. जी. कुमार, खंड ७)*

## ५.१४ हिमाचल प्रदेश

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय सोलन :**

या ग्रंथालयाची सुरुवात१८५९ मध्ये करण्यात आली. सुरवातीस भाड्याच्या इमारतीत हे ग्रंथालय सुरु करण्यात आले होते. केवळ ग्रंथ देवघेव, संदर्भसेवा या पुरतेच कार्य मर्यादित होते. १९६१ मध्ये आणखी एक इमारत भाड्याने घेऊन नियतकालिक विभाग, संदर्भ विभाग, प्रशासकीय विभाग सुरु करण्यात आले. मुख्य प्रशासकीय विभाग नव्या इमारतीत स्थलांतर करण्यात आला. या ग्रंथालयाचे कामकाज एप्रिल ते सप्टेंबर या काळात सकाळी ९.०० ते दुपारी १२.३० व सायंकाळी ५.०० ते रात्री ८.०० असे चालते. हिवाळ्यामध्ये ऑक्टोबर ते मार्च या काळात ग्रंथालय ९.३० ते १.०० खुले असते व दुपारी ४.०० ते ७.०० या काळात खुले ठेवण्यात येते. ग्रंथालय मंगळवारी व शेवटच्या शनिवारी बंद असते. सुट्टीच्या वेळी हे ग्रंथालय पुर्णतः बंद असते.

हिमाचल प्रदेशामधील सर्व रहिवाशांसाठी सभासदत्व खुले असते. येथील सभासदांच्या वर्गाचे स्वरुप पुढीलप्रमाणे अधोरेखीत करण्यात आले आहे.

१) शासकीय राजपत्र अधिकारी (हरियाणाचा रहिवासी)

२) संसद सदस्य हरियाणा विभाग

३) हरियाणा विधानसभा

४) सदस्य स्थानिक नगरपरिषद

५) ग्रंथालयाच्या परिसरातील शैक्षणिक संस्थेतील अधिकृत प्रमुख

६) शासकीय महाविद्यालय व शाळा यांचे शिक्षक व अधीव्याख्यात (ग्रंथालय परिसरातील)

या ठिकाणी रहाणारी व्यक्ती किंवा कामकाजा निमित्त आलेली व्यक्ती ही सभासद होऊ शकते पण त्यांना वरील १ ते ६ या वर्गातील एखाद्या व्यक्तीकडून प्रशस्तीपत्रक देणे गरजेचे असते.

रुपये २५/– इतकी परतावा ठेव सभासदत्व रद्द करताना परत करण्याच्या अटीवर हे सभासदत्व देण्यात येते. शासकीय अधिकारी व सेवक यांना ही ठेव रुपये १०/– इतकी आहे. या व्यतिरिक्त स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देखील सभासदत्व मोफत

स्वरुपात देण्यात येते. मात्र यासाठी त्याचा अर्ज हा संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या शिफारशीनुसार व महाविद्यालयाकडील सुरक्षीत ठेव हीच ग्रंथालयाची ठेव राहिल असा शेरा शिफारस पत्रावर असणे आवश्यक आहे. या ग्रंथालयाचे सभासदत्व प्राप्त केल्यानंतर या ग्रंथालयाकडून या ग्रंथालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन संबंधित विद्यार्थ्यांना वर्गक्रमांक किंवा प्रमाणपत्रे दिली जातात.

येथील ग्रंथसंग्रह ३६,००० इतका असून हा सर्व ग्रंथसंग्रह इंग्रजी व हिंदी भाषेतील आहे. काही ऊर्दू, पंजाबी व बंगाली भाषेतील ग्रंथाचा यामध्ये समावेश आहे. ग्रंथालयामध्ये मुक्त प्रवेश दिला जातो. येथील दुर्मिळ वाचन साहित्य विशेषत: हिमालयाशी संबंधीत आणि रविंद्रनाथ टागोर यांचे स्वतंत्र समृद्ध संग्रह हे बाहेर दिले जात नाहीत. येथे भारतातील व परदेशातील १५० नियतकालिके घेतली जात असून यामध्ये वृत्तपत्रे, साप्ताहिके याचा समावेश आहे. याठिकाणी वाचकांसाठी स्वतंत्र ३ विभाग, करुन खरेदी विभाग, नियतकालिके विभाग, देवघेव विभाग इत्यादी ठिकाणचा समावेश केला आहे.

पुस्तकाची देवघेव दरदिवशी सरासरी १३० इतकी होते. ग्रंथालयाचे २५०० सभासद असून या सभासदाना केवळ दोनपेक्षा अधिक पुस्तके दिली जात नाही. ही पुस्तके जास्तीत जास्त दोन आठवडे ठेवता येतात. दुरच्या ठिकाणी रहाणाऱ्या सभासदाकरिता ही मुदत महिन्याची ठेवण्यात आली आहे. आंतरग्रंथालयीन देवघेव सुविधा येथे उपलब्ध करुन देण्यात येते.

या ग्रंथालयाचे वैशिष्ट्ये म्हणजे येथील बालविभाग होय. याठिकाणी पुस्तकांबरोबर शैक्षणिक खेळणी बालकांना उपलब्ध करुन दिली जातात. येथील मुलांसाठी चित्रफिती दाखवल्या जातात. आठवड्याला कथाकथन व प्रगटवाचन अशा उपक्रमाचे आयोजन केले जाते. दरवर्षी १४ नोव्हेंबरला बालदिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरदिवशी याठिकाणी १०० बालवाचक या ग्रंथालयाचा लाभ घेतात. या ग्रंथालयाचे व्यवस्थापन मंडळ २५ जानेवारी १९७१ पुर्वी येथे शिक्षण संचालक हिमाचल प्रदेश, कार्याध्यक्ष यांच्या अधिपत्याखाली गठीत करण्यात आली होते. यानंतर हिमाचल राज्यास स्वतंत्र दर्जा प्राप्त होताच ही प्रादेशिक स्वतंत्र कमीटी बरखास्त करण्यात आली. सध्या येथे राज्य ग्रंथालय

मंडळ, शिक्षण मंत्री याच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे. या ग्रंथालयामध्ये खरेदी करावयाच्या वाचन साहित्या संदर्भात या मंडळाकडून मान्यता घ्यावी लागते. हीच अट जिल्हा ग्रंथालयाना लागू करण्यात आली आहे. तसेच हेच मंडळ जिल्हा व राज्य ग्रंथालयासंदर्भात निर्णय घेते. शिक्षण विभागाच्या अंतर्गत या राज्य ग्रंथालयास आर्थिक उपलब्धता करुन देण्यात येते.

**राज्य ग्रंथालय, सिमला :**

सिमला येथील नगर परिषद ग्रंथालय हे १९८६ मध्ये राज्य ग्रंथालय म्हणून घोषित करण्यात आले आणि १० एप्रिल पासून या ग्रंथालयाची कार्यवाही सुरु झाली. आज या ग्रंथलयाकडे ६५००० हून अधिक ग्रंथसंग्रह असून येथे १३ नियतकालिके, २० मासिके घेतली जातात. २००८–०९ मध्ये या ग्रंथालयाचे ५५६६ सभासद होते. तर यापैकी ३९९९ प्रौढ व १५६७ मुले याचा समावेश यामध्ये होता. दरदिवशी ४५ ते ५५ सदस्य या ग्रंथालयाचा लाभ घेतात. याठिकाणी ०३ ग्रंथपाल, ०४ सहाय्यक ग्रंथपाल, ०१ लिपीक, ०१ शिपाई, ०१ दप्तरी, २ शिपाई इतका स्टाफ असून या ग्रंथालयामध्ये प्रौढ विभाग व बालविभाग, महिला विभाग, जेष्ठ नागरीक कक्ष असे विभाग करण्यात आलेले आहेत.

दोन वेगवेगळ्या इमारतीत हे ग्रंथालय उभे करण्यात आलेले असून याचे संगणकीकरण पुर्ण झाले आहे. आज हे ग्रंथालय प्रगतीपथावर आहे.

**५.१५ मध्यप्रदेश**

**शासकीय मध्यवर्ती ग्रंथालय, ग्वाल्हेर :**

या ग्रंथालयाची स्थापना १९२७ मध्ये करण्यात आली. यावेळी या ग्रंथालयाकडे २८ पुस्तके एवढेच वाचनसाहित्य होते. आज ग्रंथालयाकडे १,५०,००० हून अधिक पुस्तके आहेत. येथील वाचन साहित्य संग्रह, हिंदी, ऊर्दू, तामिळ, तेलगू इ. विविध भाषातील असून ८ स्थानिक वृत्तपत्रे व २ इंग्रजी वृत्तपत्रे घेतली जातात.

बाल विभाग, जेष्ठ नागरीक विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग असे विभाग आहेत. या ग्रंथालयाचे सदस्य साधारणत: १५०० च्या घरात असून सभासद शुल्क रुपये १००/– व अनामत रक्कम रुपये ५००/– आकारली जाते. हे ग्रंथालय सकाळी ७.३० ते १०.३० यावेळेत आणि दुपारी ४.३० ते ७.३० या वेळेत उघडे असते. थंडीच्या दिवसात हे ग्रंथालय दुपारी ४ ते ७ या वेळेत खुले ठेवले जाते. बाल विभागाची स्थापना या ग्रंथालयात १९५८ पासून करण्यात आलेली असून या विभागात मुलांच्या करिता ग्रंथ, नियतकालिके, त्यांना मनोरंजनाकरिता व त्यांना प्रोत्साहन प्राप्त होण्यासाठी सुविधा करण्यात आली आहे. यासाठी दुर्मिळ वनस्पती आणि प्राणी याचे प्रदर्शन करणारे एक वस्तू संग्रहालय उभे करण्यात आलेले असून या विभागाव्दारे नवीन शोध व संशोधन या विषयी माहिती उपलब्ध करुन दिली जाते. चित्रपट प्रदर्शनासाठी सुंदर थिएटर उभारलेले असून येथे मुलांना प्रेरणा देणारे व मनोरंजनात्मक स्वरुपाचे चित्रपट दाखवले जातात. ग्रंथालयाव्दारे मुलांकरिता सातत्याने ज्ञानभारती उपक्रम व स्पर्धांचे आयोजन केले जाते. या अंतर्गत वाचन, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा आणि खेळाचे प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. याठिकाणी नेटवर्क संदर्भातील उपलब्धता करत असताना राजीव गांधी शिक्षा अभियान व राज्य शैक्षणिक उपक्रम या माध्यमातून सर्व जिल्हा ग्रंथालयाना इंटरनेट जोडणी उपलब्ध करुन दिली जाते. तसेच प्रतिलीपी सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. या उपक्रमासाठी रुपये २०,००,०००/– इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली होती. या ग्रंथालयाचे व केंद्राचे व्यवस्थापन स्वायत्त संस्थांकडे सोपविण्यात आले आहे.ही सर्व केंद्रे स्वयंआर्थिक उत्पन्नावर उभी असून ती सक्षम होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. इंटरनेटद्वारे उपलब्ध सुविधांची उपलब्धता करण्याची सुविधा करण्यात आली आहे.

भविष्यात शिक्षण विभागाच्या कल्पनेनुसार ही सर्व केंद्रे इंटरनेटद्वारे राष्ट्रीय स्तरावरील जाळ्यांना जोडण्याचा विचार आहे. तसेच मुलांच्यामध्ये सांस्कृतिक अभिरुची निर्माण होऊन ही केंद्रे सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमाची अधिष्ठान बनवून मुलांच्यामध्ये वाचन अभिरुची वृध्दींगत करण्याचा प्रयत्न ग्रंथालयाव्दारे पुढील काळात करण्यात येणार आहे.

राष्ट्रकवी मैथीलीशरण गुप्त याच्या स्मरणार्थ एक कलादालन उभे करणे व जेष्ठ नागरीकांकरिता स्वतंत्र दालन सुरु करणे असा उपक्रम व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येणार आहे.

याठिकाणी व्ही. ए. मोघे व एस. एस. शर्मा यांच्या प्रयत्नातून १९५६–५७ पासून ग्रंथालय प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. मध्य प्रदेशातील ग्रंथालय शास्त्रविषयक प्रशिक्षण अभ्यासक्रम पहिल्यांदा येथे सुरु करण्यात आला होता. १९७७–७८ मध्ये हा अभ्यासक्रम भोपाळमध्ये स्थलांतरीत करण्यात आला होता पण पुढीलवर्षी तो त्वरीतच या ग्रंथालयाकडे वर्ग करण्यात आला आणि १९९५–९६ मध्ये पुर्णत: बंद करण्यात आला.

**मध्यवर्ती ग्रंथालय, इंदोर (अहिल्या ग्रंथालय) :**

या ग्रंथालयाची विद्यमान इमारत ही शासकीय अहिल्या केंद्र पुस्तकालय म्हणून ओळखली जाते. याच ग्रंथालयास अहिल्या ग्रंथालय असे म्हटले जाते. ही इमारत १९०० पुर्वी बांधलेली असून पुर्वी हिचा वापर मध्य भारताचे तत्कालीन पंतप्रधान यांचा शासकीय निवास या दृष्टीने केला जात असे आणि या परिसरास 'सफेद कोठी' या नावाने संबोधीत केले जात असे.

प्रत्यक्षात ही इमारत निवासाच्या दृष्टीने बांधण्यात आलेली असल्यामुळे ग्रंथालयाच्या दृष्टीकोनातून येथील जागेचा वापर करत असताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. आज या इमारतीत अभ्यास देवघेव काऊंटर, अभ्यास कक्ष, ग्रंथसंग्रह कक्ष, बाल म्युझीयम कक्ष, ग्रंथपाल कक्ष, साठवण कक्ष व भोजन कक्ष अशा स्वरुपाच्या कक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथालयाचा वाचन साहित्य संग्रह ५०,००० च्या घरात पोहचला असून या ठिकाणी ३२ नियतकालिके, २७ वृत्तपत्रे, वाचकांकरिता उपलब्ध करुन दिली जातात. दरदिवशी १००० वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात. ग्रंथालय

सकाळी ८ ते ११ व दुपारी ४ ते ८.३० या काळात एप्रिल ते ऑक्टोबर महिन्यात खुले असते. थंडीच्या दिवसात नोव्हेंबर ते मार्च या कालखंडात ग्रंथालयच्या वेळा सकाळी ८.३० ते ११.३० व दुपारी ५ ते ८ अशा असतात.

या ग्रंथालयाच्या नुतनीकरणाचे काम जिल्हा प्रशासन आणि इंदोर गौरव प्रतिष्ठानच्या माध्यमातून हाती घेण्यात आले असून येथे इ–लायब्ररी सुविधा उपलब्ध करण्यात आलेली असून या कक्षात १० संगणकाच्या माध्यमातून संगणकाविषयक सर्व तांत्रिकीकरण सामुग्री उपलब्ध करुन देऊन सुसज्ज इ–ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. अद्यावत अभ्यासिका, विभागीय ग्रंथपालाचे व इतर सेवकांचे कार्यालय हेही अद्ययावत करण्यात आलेले आहे. ही इमारत ग्रंथालयासाठी अधिकाधिक उपयुक्त करण्याच्या दृष्टीने नुतनीकरण करुन इमारतीसमोर रंगनाथन यांच्या स्मरणार्थ एक सुंदर बगीचा तयार करण्याचा प्रयत्न व्यवस्थापकाव्दारे हाती घेण्यात आला आहे. नुतनीकरणाच्या कामासाठी रुपये १,००,००,०००/–इतकी रक्कम खर्च झालेली असून एकूणच या कामाच्या पुर्ततेसाठी अद्यापही १,५०,०००/– इतका खर्च येईल असे नमूद करण्यात आले आहे. यामुळेच हे ग्रंथालय अद्यावत सेवा देण्यास सुसज्ज होत आहे. नवलपूर मध्यवर्ती व जिल्हा ग्रंथालय, रेवा मध्यवर्ती ग्रंथालये, मौलाना आझाद ग्रंथालय, भोपाळ शासकीय ग्रंथालये तसेच इकबाल ग्रंथालय, भोपाळ, युवराज जनरल ग्रंथालय, उज्जैन ही सर्वच ग्रंथालये या परिसरात परंपरागत सेवा देत असून अलीकडील काळात त्यांची वाटचाल इ–ग्रंथालयाच्या दिशेने सुरु आहे.

**५.१६ ओरीसा :**

**हरे कृष्ण महताब राज्य ग्रंथालय, भूवनेश्वर :**

पहिल्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत या ग्रंथालयाचे काम हाती घेऊन १९५९ मध्ये ग्रंथालयासाठी एक सुंदर इमारत उभी करण्यात आली आणि ग्रंथालयाकरीता १६००० चौ. फूट इतकी जागा उपलब्ध करुन देण्यात आली. भुवनेश्वरमधील महत्वपूर्ण परिसरात ३ एकरात या ग्रंथालयाकरिता जागा उपलब्ध करण्यात आली आहे.

भव्य इमारतीच्या एका कोपऱ्यात हे ग्रंथालय सुरु करण्यात आले होते. १९८७ मध्ये प्रा. डी. आर. कालीया याच्या प्रयत्नातून भारतातील ग्रंथालयप्रणालीचे नुतनीकरण होत असताना या इमारतीमधील सर्व जागा ग्रंथालयाच्या विस्ताराकरीता उपलब्ध करुन देण्यात येऊन याठिकाणी २ ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली.

**१) राज्य ग्रंथालय –**

या माध्यमातून राज्य मध्यवर्ती ग्रंथालय हे ओरीसा राज्यातील राज्य सार्वजनिक प्रणालीचे केंद्र म्हणून कार्यरत राहिले आणि दुसरे भुवनेश्वर सार्वजनिक प्रणालीचे केंद्र झाले. यानंतर १९८७ मध्ये शासनाने या दोन्ही ग्रंथालयांचे पुनर्नामकरण करताना यास 'हरेकृष्ण महताब राज्य ग्रंथालय' असे नाव देण्यात आले.

डॉ. हरेकृष्ण महताब हे नव्या ओरीसा राज्याचे आणि भूवनेश्वर सार्वजनिक ग्रंथालयाचे निर्माते म्हणून ओळखले जातात. या दोन्ही ग्रंथालयाच्या माध्यमातून ४०० वाचकाना सकाळी ८ ते रात्रौ ८ पर्यंत सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

या ग्रंथालयाचे प्रशासन विभाग, तांत्रिक सेवा विभाग आणि वाचक सेवा विभाग असे तीन विभाग करण्यात आले असून प्रशासकीय विभागाद्वारे सर्वांगीण प्रशासन, आर्थिक व्यवहार व देखभाल आणि दैनंदिन कामकाज पाहिले जाते; तर तांत्रिक विभागातून ग्रंथनिवड, ग्रंथमागणी, वर्गीकरण, तांत्रिकीकरण, ग्रंथ संरक्षण, बांधणी अशा स्वरुपाचे काम केले जाते. याचबरोबर मुद्रण आणि नोंदणी कायदा १८६७ अंतर्गत राजा राममोहन राय प्रतिष्ठान कलकत्ता व इतर ठिकाणाहून आलेल्या देणग्यापैकी दोन प्रतीतील एक प्रत १८६७ च्या कायद्यातील तरतुदीनुसार ती साठवण विभागाकडे ओरीसा राज्य संदर्भ सूची

संकलनासाठी पाठवली जाते व दुसरी प्रत संबंधीत विभागाकडे पाठवली जाते. या प्रक्रीयेनंतर संबंधीत प्रलेख संबधित विभागाच्या वाचन विभागाकडे पाठवला जातो. वाचक सेवा विभागामध्ये सभासद नोंदणी, प्रलेख संघटन, ओरीसा राज्य संदर्भ सूची संकलन, संदर्भ सेवा, देवघेव, प्रतीलिपी सेवा या संबंधित विभागाकडून उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच या विविध विभागात संबंधित विभागांशी आवश्यक ते वाचन साहित्य संग्रहित केले जाते. उदा. महिलाविषयक अभ्यासक्रमामध्ये जमातीविषयक वाचनसाहित्य, साठवण संग्रहण कार्यालयीन प्रलेख संग्रह, कार्पोरेट प्रकाशन इ. समावेश असतो.

या ग्रंथालयाकडे १५०००० हून अधिक ग्रंथ उपलब्ध असून, १६ वृत्तपत्रे, ६५ नियतकालिके घेतली जात असून नोंदणीकृत सभासदांची संख्या ही ४००० हून अधिक आहे. दर दिवशी २०० हून अधिक वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात.

**बैठक व्यवस्था :**

१) भुवनेश्वर सार्वजनिक ग्रंथालय – १३५

२) बालविभाग – १८

३) भाषा व साहित्य विभाग – ०८

४) नियतकालिके विभाग – ८४

५) संशोधन व संदर्भ विभाग – २०

अशा प्रकारे २६५ इतकी बैठक व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे. सभासदांसाठी आकारण्यात येणारे नोंदणी शुल्क पुढीलप्रमाणे आहे.

१) राज्य ग्रंथालय सभासदत्व – अर्जाचे शूल्क रुपये १५/– व अनामत रक्कम – रु. २००/–

२) भुवनेश्वर सार्वजनिक ग्रंथालय – अर्ज शूल्क रुपये १५/– व अमानत रक्कम – रुपये १००/–

३) बालविभाग – अर्ज शूल्क – रु. १५/– व अनामत रक्कम – रु. ५०/–

या ठिकाणी सभासद होत असताना सभासदास दोन छायाचित्रे, एच.एस.सी. प्रमाणपत्र, शेवटचे शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र, संस्था प्रमुख अथवा परिचीत राजपत्र अधिकारी यांचे शिफारस पत्र याची आवश्यकता असते.

**राज्य ग्रंथालय :**

१) **संशोधन व संदर्भ विभाग –** या विभागात विषयनिहाय वाचकांची व संशोधकाची अभिरुची लक्षात घेऊन रचना केलेली असते. हे सर्व वाचनसाहित्य ओरीसा राज्याच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरणारे असते. या व्यतिरिक्त महिलांचा अभ्यास विषयक महत्वपूर्ण वाचन साहित्यसंग्रह येथे करण्यात आला आहे. तसेच कला व संस्कृती, जगन्नाथ परंपरा इ. विषयक साहित्य येथे संग्रहीत केले जाते. याठिकाणी दुर्मिळ पुस्तकांचे संग्रहण करण्यात आलेले असून यामध्ये डब्लू सी लायस यांचे ओरीया ग्रामर, भारतीय घटनेचे कॅटऑग्राफी प्रत, पार्शिंन कला विषयक ग्रंथ आणि चित्रे अशा वाचनसाहित्याचा समावेश आहे.

२) **साठवणूक कार्यालयीन कागदपत्रे विभाग –** या विभागात ओरीसामध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांच्या ओरीसा राज्य ग्रंथसूची संकलनासाठी संग्रहीत केलेली अद्ययावत पुस्तके उदा. १९९५–९७ मधील पहिल्यांदा प्रकाशित केलेली राज्य सूची. या व्यतिरिक्त शासनाची कागदपत्रे, सहकार संस्थांचे कागदपत्र व संदर्भग्रंथ, डॉ. सिताराम मोहपात्रा याचा विशेष संग्रह, या संग्रहात १२०२ ग्रंथ आहेत. अशा दुर्मिळ वाचनसाहित्याचे संग्रह केले जातात.

**भुवनेश्वर सार्वजनिक ग्रंथालय, ओरिसा :**

या ग्रंथालयामध्ये सहा भाषेतील वाचनसाहित्य संग्रहीत करण्यात आले असून यामध्ये इंग्रजी, हिंदी, ऊर्दू, संस्कृत, बंगाली, ओरीया या भाषेतील साहित्याचा समावेश आहे. संशोधक विद्यार्थी व सर्वसामान्यांसाठी हे ग्रंथालय खुले असते. स्पर्धेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाचन साहित्य उपलब्ध करण्यात आले आहे. या ग्रंथालयात ५३ नियतकालिके, १४ वृत्तपत्रे घेतली जात असून ५ ते १२ वयोगटातील मुलांसाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आला आहे. अंध व्यक्तींसाठी ब्रेल लिपीतील साहित्य संग्रहीत करण्यात आले आहे.

हे ग्रंथालय सकाळी ८ ते रात्रौ ८ यावेळेत खुले राहते. ग्रंथालयाच्या सेवा प्रभावीपणे देण्यासाठी सेवकांची संख्या एकूण ८८ इतकी असून यापैकी ३३ सेवक हे प्रशिक्षीत आहेत.

या ग्रंथालयाच्या विकासासाठी रुपये १०००००००/– निधीची तरतूद करण्यात आली होती. ग्रंथालयासाठी सुसज्ज अशी ४ मजली इमारत असून या इमारतीची रचना कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयाच्या आधारावर करण्यात आलेलीआहे. नजीकच्या काळात हे ग्रंथालय राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानच्या माध्यमातून लवकरच संगणकीकृत करण्यात येणार आहे. तेसच ग्रंथालयाद्वारे ओरिसामधील प्रकाशकांची निर्देशिका आणि अप्रशिक्षीत ग्रंथालयाकरिता प्रशिक्षण पुस्तिका प्रकाशीत करण्यात येणार आहे.

**म्युनसीपल सार्वजनिक ग्रंथालय, बेहरामपूर :**

या ग्रंथालयाची स्थापना १९३६ मध्ये करण्यात आली. या ग्रंथालयाचे नामकरण पिगूमार्ती विश्वनाथ राव मेमोरीयल ग्रंथालय असे करण्यात आले होते. या ग्रंथालयात १०,००० हून अधिक ग्रंथसंग्रह असून ओरीसा भाषेतील ६००० ग्रंथ, तेलगू भाषेतील ३००, इंग्रजी भाषेतील १८३२ असे दुर्मिळ ग्रंथ संग्रहीत करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त या ग्रंथालयात ६३ नियतकालिके, २४ वृत्तपत्रे यामध्ये ११ ओरीया, १ तेलगू व १२ इंग्रजी वृत्तपत्राचा समावेश आहे. याशिवाय बालविभागात ३०० ग्रंथांचा संग्रह असून ग्रंथालय सकाळी ७ ते १० व ४.३० ते ८.३० या वेळेत खुले असते.

या ग्रंथालयाची इमारत १९३६ मध्ये बांधण्यात आलेली असून त्याचे नुतनीकरण १९९१ मध्ये करण्यात आलेले आहे. या ग्रंथालयाचे नोंदणीकृत सभासद ५०० हून अधिक असून याचे व्यवस्थापन नगरपरिषदेने नामनिर्देशित केल्या ५ सदस्यांचा समितीव्दारे पाहिले जाते. ग्रंथालयास दरवर्षी रुपये ५०,०००/– इतकी अंदाजी तरतूद केली जाते.

त्याचबरोबर येथे काही वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथालये कार्यरत असून डायमंड ज्युबिली सार्वजनिक ग्रंथालय, केंद्रपारा ग्रंथालय, रघूनंदन ग्रंथालय, पुरी, जगन्नाथ मध्यवर्ती ग्रंथालय आणि संशोधन केंद्र, पुरी, उरकूल साहित्य समाज, रामकृष्ण मिशन ग्रंथालय, पुरी, आंध्र भाषा समाज ग्रंथालय, बेहरामपूर (१९०९) ही ग्रंथालये या परिसरात २० व्या शतकाच्या सुरवातीपासून वाचकाना सेवा देत आहे.

### ५.१७ अरुणाचल प्रदेश :

### राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, इटानगर :

१९५६ च्या कालखंडामध्ये अरुणाचल प्रदेशामध्ये सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस सुरवात झाली आणि याच पार्श्वभूमीवर इटानगर येथे राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना केली. पुढील काळात हे ग्रंथालय सचिवालय इमारतीत स्थालंतर करताना या ग्रंथालयाचे नामकरण राज्य मध्यवर्ती ग्रंथालय करण्यात आले. १९९५ मध्ये १,२७,००,०००/– इतके रुपये खर्चून स्वतंत्र इमारत बांधण्यात आली. १२ खोल्यांनीयुक्त असलेल्या या इमारतीमध्ये एकूण १०० चौ. मी. इतकी जागा उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच अभ्यासिकेमध्ये १०० व्यक्तींच्या बसण्याची सोय होईल इतकी जागा उपलब्ध करण्यात आलेली आहे. या ग्रंथालयाचे सभासदत्व शूल्क २१/– रुपये असून सभासदत्व सर्वांसाठी खुले आहे. आज या ग्रंथालयाचा लाभ येथील नागरीक घेत असून बाल वाचकांची संख्या ५१ इतकी आहे.

ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह आज ३०,००० च्या घरात पोहचला असून यामध्ये २५०० संदर्भ ग्रंथाचा समावेश आहे. ०३ हस्तलिखिते संग्रहीत करण्यात आली आहेत. हिंदी, इंग्रजी भाषेतील ग्रंथसंग्रहाबरोबर इतर स्थानिक भाषेतील ग्रंथसंग्रह संग्रहीत करण्यात आले आहेत. या ग्रंथालयात मुक्तव्दार प्रवेश असून १६ कर्मचारी कार्यरत आहेत. या ग्रंथालयाचे व्यवस्थापन अरुणाचलप्रदेश शासनाचे शासकीय सचिव यांच्या अधिपत्याखाली चालते. ग्रंथालय एकूण ७ तास खुले असते. सरासरी ३५,००,०००/– रुपये इतकी अंदाजपत्रकी तरतूद दरवर्षी या संस्थेकरिता केली जाते.

## ५.१८ आसाम

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, गोहाटी :**

१९५४ मध्ये या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली होती. ग्रंथालयाच्या इमारतीसाठी स्वत:ची जागा असून जवळजवळ १६० चौ. मी. इतकी जागा ग्रंथालयाकरीता उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह समृध्द असून सुमारे ८०,०००/– ग्रंथ येथे संग्रहीत करण्यात आले आहेत. १०५० बांधीव खंड असून ५१ नियतकालिके व ५४ वृत्तपत्रे या ग्रंथालयात घेतली जातात.

या ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंग्रहामध्ये ग्रंथांचे भाषावार विभाजन विचारात घेता इंग्रजी ४२,७५०, हिंदी ३५०० व इतर स्थानिक भाषा २६९०२, इतर भाषा ७२१५ असे आहे. या ग्रंथालयाद्वारे पारंपारीक ग्रंथालय सेवेबरोबरच सूची सेवा उपलब्ध करुन दिली जाते. आज या ठिकाणी ८ कर्मचारी उपलब्ध असून ग्रंथालय १० ते ०५ या वेळेत उघडे असते. याचे व्यवस्थापन संचालक सार्वजनिक ग्रंथालय विभाग यांच्या अंतर्गत चालते.

या ग्रंथालयाकरीता कोणतीही फी आकारली जात नाही. सर्व व्यक्तींसाठी हे ग्रंथालय खुले असून दरदिवशी सरासरी ३०० वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात.

## ५.१९ मणिपूर

**इम्फाला सार्वजनिक ग्रंथालय :**

या ग्रंथालयाची स्थापना १९४० मध्ये करण्यात आली. सुरवातीच्या काळात ग्रंथालयास खावई सार्वजनिक ग्रंथालय म्हणून ओळखले जात असे. सुरवातीस हे ग्रंथालय टॉबीनसन इंग्लीश शाळेच्या परिसरात होते. ३ खोल्यांच्या तात्पुरत्या शेडमध्ये उभ्या केलेल्या ग्रंथालयाकरिता इमारत बांधणीसाठी जागा उपलब्ध व्हावी याकरिता ग्रंथालाचे मुख्यसचिव श्री. नोनगीकाप्पम गोपालसिंग यांनी मणिपूर राज्य दरबाराकडे एक अर्ज सादर केला. या अर्जाला दरबारकडून प्रतिसाद मिळून १९४० च्या कालखंडात एक २२४० चौ. फुटांची जागा ग्रंथालयाकरिता उपलब्ध करुन देण्यात आली. १९४२–४५ च्या कालखंडामध्ये दुसऱ्या जागतिक युध्दाच्या दरम्यान मणिपूर येथे झालेल्या लढाईत खावई सार्वजनिक ग्रंथालय नष्ट झाले. पुढे १ फेब्रुवारी १९४७ रोजी या ग्रंथालयाचे नाव इम्फाळ सार्वजनिक ग्रंथालय असे करण्यात आले.

दुर्दैवाने २००४ च्या कालखंडात इम्फाल शहराचा विस्तार करत असताना मणिपूर शासनाने ग्रंथालयाकरिता दिलेली जागा ताब्यात घेऊन ग्रंथालय इमारत पाडून टाकली अशाप्रकारे ग्रंथालयाचे अस्तित्व धोक्यात आले.

**मणिपूर सार्वजनिक ग्रंथालय :**

१९५० मध्ये मणिपूर सार्वजनिक ग्रंथालय गांधी मेमोरीयल हॉल जवळ इम्फाल येथे सुरु करण्यात आले. याकरिता येथील मारवाडी व्यापारी श्री. बालचंद्र पटनी यांनी आपले वडील श्री. प्रेमसुख पटनी यांच्या स्मरणार्थ ग्रंथालयाकरिता इमारत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन दिली. हे ग्रंथालय एका समितीव्दारे चालविली जात असे. सध्या त्याचे कार्य मात्र स्थगित झालेले आहे.

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मणिपूर :**

मणिपूर येथील ग्रंथालय चळवळ ही उशीरा सुरु झाली असली तरी देखील राज्य ग्रंथालय हे आघाडीचे ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. इम्फाल येथे स्थापन करण्यात आलेले हे ग्रंथालय वाचन साहित्याने समृध्द असून जवळजवळ १,५०,००० ग्रंथ येथे

संग्रहीत करण्यात आलेले आहेत आणि  संगणकीकरण सुरुवात करण्यात आलेली असून एक माहिती केंद्र येथे सुरु करण्यात आले होते.

पुढील वाटचालीत दुर्दैवाने  २००५ मध्ये  हे ग्रंथालय आगीच्या भक्षस्थानी पडले या ग्रंथालयाच्या उभारणीसाठी नव्याने प्रयत्न सुरु करताना नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

या ग्रंथालयाची पुर्नस्थापना नव्या इमारतीत करण्यात आली असून या ग्रंथालयाचे जवळ जवळ २८०० इतके सभासद असून सभासदत्व मोफत दिले जाते. पारंपारीक सेवाबरोबरच येथे इंटरनेट सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या ग्रंथालयाचे कामकाज कला व सांस्कृतिक विभागाच्या अंतर्गत चालते. एकूण ३५ कर्मचारी कार्यरत असून १० प्रशिक्षित सेवक येथे कार्यरत आहेत. ग्रंथालय सकाळी ११ ते ५ या वेळेत उघडे असते.

## ५.२० मेघालय

**रविंद्र सन्मित्र ग्रंथालय, शिलाँग :**

या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना शिलाँग येथे १९४२ मध्ये स्वयंसेवी संघाच्या माध्यमातून करण्यात आली. या ठिकाणी बांगाली भाषेतील १०००० ग्रंथ संग्रहीत करण्यात आले असून सभासदासाठी अनामत रक्कमेबरोबर रुपये २/– इतकी मासिक वर्गणी आकारली जाते. सार्वजनिक स्वरुपात या ग्रंथालयाचा वापर १९५४ मध्ये करण्यास सुरवात झाली. शिलाँगमध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय अस्तित्वात आल्यावर याच ग्रंथालयाची सेवा विस्तारीत स्वरुपात देण्यास सुरुवात झाली. या ग्रंथालयाचे खऱ्या अर्थाने विभाजन झाले. मेघालय व आसाम ही दोन राज्ये १९७२ मध्ये अस्तित्वात आल्यावर हे विभाजन झाले. मेघालय शासनाने स्वतंत्र राज्य म्हणून या विभाजीत ग्रंथालयाच्या विकासासाठी सुरवातीपासूनच योगदान देण्यास सुरुवात केली.

आज या ग्रंथालयाकडे १,६०,००० ग्रंथ असून ५००० ग्रंथ राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान कलकत्ता यांच्याकडून प्राप्त झालेले आहेत. विविध नियतकालिके व वृत्तपत्रे या ग्रंथालयाव्दारे उपलब्ध करुन दिली जात आहेत आणि या ग्रंथालयामध्ये विविध प्रकारच्या वाचकांसाठी विभाग सुरु करण्यात आलेले आहेत. उदा. बाल विभाग, जेष्ठ नागरीक कक्ष, महिला कक्ष इ. वाचकांना सक्षमपणे सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, शिलाँग**

या ग्रंथालयाची स्थापना १९५८ रोजी झालेली असून या ठिकाणी ग्रंथालयाची इमारत स्वतःची असून २०० व्यक्ती बसण्याची सुविधा करण्यात आलेली आहे. ग्रंथालयात सभासदाना वर्गणी शुल्क आकारले जात नाही. सभासदत्व सर्वांसाठी खुले आहे. आज ग्रंथालयाकडे जवळजवळ १७५००० ग्रंथ संग्रह असून ७५ नियतकालिके, २५ वृत्तपत्रे याठिकाणी सुरु करण्यात आलेली आहेत. ग्रंथालयाच्या पारंपारीक सेवेबरोबर अंतर्गत सेवा देखील उपलब्ध करुन देण्यात येते. या ग्रंथालयास सरासरी रुपये ३०,००,०००/– इतकी रक्कम दरवर्षी उपलब्ध करुन दिली जाते. ३३ कर्मचारी कार्यरत असून हे ग्रंथालय ६ तास खुले असते. ग्रंथालयाचे व्यवस्थापन शासनाच्या सुविधा अंतर्गत पाहिले जाते.

या ग्रंथालयाच्या पूर्वइतिहासाकडे नजर टाकल्यास हे ग्रंथालय आसाम शासनाद्वारे १९५० च्या कालखंडात स्थापन करण्यात आले. राज्य विभाजनानंतर विभाजीत ग्रंथालयाचे हस्तांतर मेघालय शासनाकडे १९ जानेवारी १९७४ रोजी करण्यात आले.

आज या ग्रंथालयाचे २४१०० नोंदणीकृत सभासद असून १८४२९ प्रौढ सभासद आणि ५७१७ बाल सभासदाचा सभावेश आहे. दर दिवशी येथे सरासरी २५० ग्रंथाची देवघेव होते. सभासद वाचकाबरोबर इतर वाचक ही मोठ्या संख्येने या ग्रंथालयास भेट देत असतात. सुंदर व सुसज्ज सभागृह हे या ग्रंथालयाचे प्रमूख आकर्षण आहे. या सभागृहात एका वेळेला १८९० लोक बसू शकतात आणि विविध कार्यक्रमाचे आयोजन वर्षभर येथील स्थानिक लोकांकडून सातत्यपूर्वक केले जाते. या ग्रंथालयास जोहायी सूईन, सूटा विल्यमनगर ही जिल्हा ग्रंथालये जोडण्यात आली आहेत. या ग्रंथालयाच्या उद्दीष्टाअंतर्गत १) वाचकांच्या माहितीविषयक गरजांची पुर्तता २) बालक, विद्यार्थी व तरुण यांच्यामध्ये वाचन अभिरुची वृध्दींगत करणे ३) येथील लोकांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय विकासास चालना देणे, या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

भविष्यात या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करण्यात येऊन इंटरनेटच्या माध्यमातून सर्वदूर सेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मधील काळातील या ग्रंथालयाची दुरावस्था दूर होऊन हे ग्रंथालय शासनाच्या विशेष सहकार्यामुळे नवे चैतन्य घेऊन उभे रहात आहे.

### ५.२१ मिझोरम

**मिझोराम राज्य मध्यवर्ती ग्रंथालय :**

या ग्रंथालयाची स्थापना १९८४ मध्ये करण्यात आलेली आहे. या ग्रंथालयाकडे १७००० इतका ग्रंथ असून ५० नियतकालिके व १८ वृत्तपत्रे घेतली जातात. आज सभासद संख्या २५००च्या घरात पोहचली आहे. पारंपारीक ग्रंथालय सेवांबरोबर सूचीसेवा व संदर्भसेवा उपलब्ध करुन दिली जाते. आज या ठिकाणी १२ कर्मचारी कार्यरत आहेत. साधारणत: सरासरी रुपये २१,००,०००/– इतकी रक्कम ग्रंथालयाकरिता दरवर्षी ग्रंथालय व ग्रंथालय प्रणालीकरिता व्यतीत केली जाते. ग्रंथालय ९ ते ५ या वेळेत खुले असते आणि सांस्कृतिक विभागाच्या संचलकांतर्गत या ग्रंथालयाचे कामकाज पाहिले जाते.

### ५.२२ नागालँड

**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय :**

हे ग्रंथालय कोहीमा येथे कार्यरत असून याची स्थापना १९८१ मध्ये करण्यात आलेली आहे. येथे सभासदत्व सर्वांसाठी खुले असून सभासदांकरिता कोणतेही शुल्क आकारले जात नाही. आज या ग्रंथालयाचे १५०० सभासद आहे. येथे १४ सेवक कार्यरत असून राज्यातील ग्रंथालय प्रणालीकरिता वार्षिक सरासरी रुपये ६५,००,००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली जाते. ग्रंथालय सकाळी ८ ते ५ या वेळेत खुले असते. ग्रंथालयाचे व्यवस्थापन संचालक सांस्कृतिक विभाग यांच्या अंतर्गत पाहिले जाते.

## ५.२३ त्रिपुरा

**बिराचंद्र राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, अगरताला :**

भारतातील एक जून्या ग्रंथालयापैकी हे एक ग्रंथालय त्रिपुरा येथील राजवाड्यात स्थापन करण्यात आले होते आणि संस्थान काळात त्याचा विकास करण्यात आला होता. हेच ग्रंथालय पुढे स्वातंत्र्य कालखंडा मध्ये राज्य शासनाने आपल्या ताब्यात घेतले. त्रिपुराचे महाराज बिराचंद्र माणिक्य हे कला, साहित्य आणि संगीत याचे जाणकार होते. त्याच्या १८६२ ते १८९६ या कालखंडात त्रिपुरा संस्थानात कला व संस्कृती यांचे संवर्धन झाले. याच पार्श्वभूमीवर पुढे १८९६ मध्ये बिराचंद्र सार्वजनिक ग्रंथालय कोटामीला येथे स्थापन करण्यात आले. हे ठिकाण सध्या बांगलादेशात आहे. पुढे १८९६ ते १९०९ च्या काळात बिराचंद्रचे सुपुत्र राधाकिशोर माणीक्य यांच्याकडे १८९६ ते १९०९ या काळात राज्यकारभार आला.याच कालखंडात बहुतेक करुन राधाकिशोर यांनी ग्रंथालयाचे विभाजन इंग्रजी आणि स्थानिक भाषा या दोन विभागात केले.

इंग्रजी विभाग हा उज्जैयंता राजवाड्यामध्ये ठेवण्यात आला. स्थानिक भाषेतील साहित्य राजवाड्याबाहेर लोकांकरिता खुले करण्यात आले. आणि अशाप्रकारे हे ग्रंथालय दोन स्वतंत्र विभागात उभे राहिले.

१९०८ ते १९२३ या कालखंडात महाराज विराचंद्र किशोर यांच्याद्वारे १९२३ मध्ये यांनी ग्रंथालयाकरिता नवी इमारत बांधण्यात आली. स्थानिक भाषेतील साहित्य संग्रहाचे अनेक ठिकाणी स्थलांतर होऊन १९२४ मध्ये ते विद्यमान जागेत ठेवण्यात येऊन त्याचे उद्‌घाटन करण्यात आले. महाराज विरविक्रम किशोर माणीक्य १९२३ ते १९४७ या कालखंडात त्रिपुराचे शेवटचे राजे होत. ते आपल्या पुर्वजाप्रमाणे कला व ज्ञानाचे चाहते होते. त्यानी आपल्या कालखंडात विविध प्रकारचे ग्रंथ संग्रहीत केले होते. दुर्दैवाने या ग्रंथालयात राजवाड्यातील इंग्रजी ग्रंथ आज अस्तित्वात नाहीत, परंतू सार्वजनिक विभाग मात्र अस्तित्वात आहे. त्रिपुरा राज्य भारतामध्ये १९४९ मध्ये समाविष्ट केल्यानंतर १९५३ मध्ये

विरचंद्र ग्रंथालय हे त्रिपुराच्या शिक्षण विभागाच्या अखत्यारीत आले आणि त्याचे नामकरण १९७७ मध्ये विरचंद्र राज्य मध्यवर्ती ग्रंथालय असे करण्यात आले.

सध्या या ग्रंथालयाचे व्यवस्थापन संचलनालय, उच्च शिक्षण विभाग त्रिपुरा शासन यांच्याव्दारे पाहिले जाते.१९९५ मध्ये ग्रंथालयाकडे १२०१३० इतका ग्रंथसंग्रह होता सभासद संख्या १०१७९ इतकी होती. आज या संग्रहात लक्षणीय वाढ झालेली आहे.

## ५.२४ गोवा

### कृष्णदास शर्मा गोवा राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, पणजी

हे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय भारतीयांनी अभिमान बाळगावे असे ग्रंथालय असून येथील गोव्याच्या इतिहासाचे व संस्कृतीचे संचित व दुर्मिळ वाचन साहित्य हे संग्रहालयाचे वैशिष्ट्ये होय. या ग्रंथालयाची स्थापना १५ सप्टेंबर १८३२ मध्ये व्हाईसरॉय डोम मॅन्यूअल दी पोर्तूगाल इ – कॅस्ट्रॉ यानी पुस्तिका जिव्हारिया या नावाने केली. या ग्रंथालयाचे नाव बदलून बिब्लीओथीका पब्लिका असे करण्यात येऊन पुढे ते ग्रंथसंग्रहाच्या दृष्टीने समृध्द करण्यात आले. या काळात येथे अनेक धार्मिक प्रलेखाचे संग्रहण प्रामुख्याने करण्यात आले. मात्र गणित व संरक्षणविज्ञान या संदर्भातील ग्रंथसंग्रह शैक्षणिक संस्थांकडून सुपूर्द करण्यात येऊन प्रशासन आणि कायदा विषयक ग्रंथ हे सचिवालय ग्रंथालयाकडे संग्रहीत करण्यात आले.

१५ फेब्रुवारी १८९७ रोजी या ग्रंथालयाला राष्ट्रीय ग्रंथालयाचा दर्जा देऊन त्याचे नामकरण  बिब्लिओथीका नॅशनल दी, नोव्हा गोवा असे करण्यात आले. १९२५ मध्ये हे ग्रंथालय वास्को द गामा शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेला जोडण्यात आले आणि त्याचे नामकरण बिब्लिओथीका नॅशनल वास्को द गामा असे करण्यात आले आणि देकरी कायदा क्रमांक ३६६८०४, १८ मार्च १९५२ या अन्वये नावात बदल करण्यात आलेला हा देकरी कायदा ग्रंथालयाच्या अंतर्गत ग्रंथवितरणाकरिता आपोआपच ग्रंथालयास लागू झाला आणि यातील तरतुदीनुसार पोर्तुगीज आणि त्यांचे इतर प्रांत येथे प्रकाशित झालेली पुस्तके या ग्रंथालयात आपोआपच दाखल होऊ लागली.

१९५९ पासून बिब्लिओथीका हे वास्को द गामा या संस्थेपासून वेगळे करुन ते सर्व्हिस कोदी 'इन्स्ट्रोअ इ साऊदी' म्हणजेच शैक्षणिक व आरोग्य विभागाकडे या ग्रंथालयाचे प्रशासन सोपवण्यात आले आणि पुनश्च त्याचे नामकरण बिब्लीओथीका दी गोवा असे करण्यात आले.

गोवा मुक्तीपूर्वी येथे असलेला सर्व वाचनसाहित्य संग्रह हा प्रामुख्याने पोतुर्गिज, लॅटीन इंग्रजी या भाषेतील असून कोकणी व मराठीत भाषेतील फारच कमी पुस्तके त्या काळात संग्रहीत करण्यात आली होती. गोवा मुक्तीपूर्वी येथील ग्रंथसंग्रह ४०,४८७ इतका होता. या ग्रंथालयात असलेले सुरुवातीचे पुस्तक "Repertorium singularium Super Toto Codico lugdini by Baldi pusblished in 1539" हे होय. ग्रंथालयाच्या संग्रहात हस्तलिखिते, सांकेतिक भाषेतील संग्रहामध्ये १७ व्या व १८ व्या शतकातील पोर्तुगीज, कॅष्ट्रेलीयन लॅटीन, तामिळ, सिलोनी, कॅनरी आणि कोकणी या भाषेतील वाचन साहित्य संग्रह होता. स्थानिक स्तरावरील वृत्तपत्रामध्ये इस्तादोदा इंडिया, पोर्तुगीजचे १८५६ ते १९६१ मधील अंक आणि १९६१ पासून चे पुढील सर्व अंक संग्रहीत करण्यात आले आहेत.

हे ग्रंथालय भारत पोर्तुगीज अभ्यासाचे एक महत्वपूर्ण केंद्र म्हणून ओळखले जाते. शिवाय पोर्तुगीज वसाहत विषयक अभ्यासाचे केंद्र असा ही एक लौकिक आहे. तसेच इंडोपोर्तुगीज साहित्याचे साठवण केंद्र म्हणून हे ग्रंथालय ओळखले जाते. येथील संग्रहामध्ये महत्वपूर्ण संग्रह म्हणजे बोलेतील ऑफिशीयल (राजपत्र) हे १८३७ पासून आजपर्यंत संग्रहीत करण्यात आले आहेत. याचबरोबर हे ग्रंथालय, ग्रंथालय कायदा १९५४ अंतर्गत साठवणूक ग्रंथालयाची जबाबदारी संभाळत आहे. ग्रंथालयाची सद्यस्थिती लक्षात घेता येथील तरुणामध्ये वाचन अभिरूची वृध्दींगत करुन त्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आज ग्रंथालयाकरिता भव्य इमारत पणजी शहराच्या मध्यस्थानी उभी करण्यात येऊन हे ग्रंथालय गोव्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीचे सर्वोच्च केंद्र म्हणून काम पाहते आहे. देशातील राष्ट्रीय ग्रंथालय मिशन (एन्.एम्.एल्.) आदर्श ग्रंथालय प्रणाली अंतर्गत हे ग्रंथालय निवडण्यात आले आहे.

या ग्रंथालयांतर्गत (०७) तालुका ग्रंथालये, (०१) जिल्हा ग्रंथालय, (१५१) ग्राम ग्रंथालये यामध्ये स्वायत्त संस्थांची ग्रंथालये व ग्रामपंचायत ग्रंथालये व शासनाची ग्रामीण ग्रंथालये याचा समावेश असून ग्रंथालय सर्व ग्रंथालयांच्या विकासाकरिता मदत करीत असते.

ग्रंथालय सकाळी ९ ते ७.३०, सोमवार ते शुक्रवार आणि शनिवार व रविवार या दोन दिवशी ९.३० ते ५.४५ या वेळेत खुले असते. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बंद असते.

१६ व्या शतकातील साहित्यिक आणि कोकणी साहित्याचे जनक यांच्या साहित्य योगदानाच्या स्मरणार्थ या ग्रंथालयाचे नामकण कृष्णदास शर्मा (केलोसीकर) असे करण्यात आले आहे. श्री. शर्मा हे कोकणी पद्य साहित्याचे संस्थापक म्हणून ओळखले जात. ग्रंथालयाकडे १२,१०० चौ. मीटर इतकी जागा उपलब्ध असून ग्रंथालयात २.४ लाखाहून अधिक ग्रंथ संग्रहीत केलेले आहेत. हे ग्रंथ इंग्रजी, हिंदी, मराठी, कोकणी आणि पोर्तुगीज भाषेतील आहेत.

पोर्तुगीज भाषेतील संग्रह हे अगदी सुरवातीपासून असून हे ग्रंथालय पोर्तुगीज भाषेतील ग्रंथांची आशिया खंडातील सर्वात मोठी डिपॉझीटरी म्हणून ओळखले जाते. आज या ग्रंथालयात आधुनिक सुविधा अंतर्गत स्मार्ट कार्ड, सेल्फ चेकींग/चेक आऊट किस्को बुक ड्रॉप बॉक्स इत्यादी सुविधा बरोबरच आरएफआयडी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आलेला आहे. आधुनिक अल्ट्रा मॉडेल अत्याधुनिक ग्रंथसंरक्षण प्रयोगशाळा उभी करण्यात आली आहे. ग्रंथालयाच्या संगणकीकरणासाठी नेटवर्क सुविधा उपलब्ध करुन देताना आज या ठिकाणी २८१३ इंटरनेट सुविधा जी.बी.बी.एम. द्वारे उपलब्ध करुन सर्व तालुका ग्रंथालये एकमेकांशी जोडण्यात आलेली आहेत. याकरिता एल.एस. प्रिमीया या प्रणालीचा लीब्सी आज्ञावलीअंतर्गत वापर करण्यात आलेला आहे. अशा आधुनिक प्रणालीच्या जोडणीमुळे भविष्यात येथील ग्रंथालयाचे जाळे अधिकाधीक सक्षमपणे कार्यरत होण्यासाठी मदत होणार आहे. येथील महत्वपूर्ण सुविधा म्हणजे–

१) विविध वैशिष्ट्यांसह उपभोक्ता सुलभ वापर
२) विविध भाषा सहाय्य
३) संघटीत शोध – प्रगत शोध सुविधेव्दारे
४) गुगलबुक, बुकफाईंडर इ. सुविधा
५) विविध वैशिष्ट्यांतर्गत सुविधामध्ये, ऑन लाईन सुविधांतर्गत रिव्हयूज, नुतनीकरण,आरक्षण इत्यादी

६) केंद्रीभूत मागणी आणि स्थानदर्शक मागणीप्रतीक्षेस चालना

७) ग्रंथालयाची वैशिट्यपूर्ण सेवा

८) लेखसूची सेवा

१) या अंतर्गत स्थानिक वृत्तपत्रे, नियतकालिके यामधील लेखांची सूची तयार करुन तीची सुलभ उपलब्धता संशोधन व निर्धारीत प्रकल्पाकरिता उपलब्ध करुन दिली जाते. २) प्रत्येक विभागामध्ये प्रतीलिपी यंत्रणेची सुविधा ३) संघटीत ओपॅक ही सुविधा गोवा युनीयन कॅटलॉग अंतर्गत करण्यात आली आहे. डाटाबेस हा एकच क्लिकवर उपलब्ध करुन देण्याची सुविधा, ग्रंथ निरीक्षण व स्वयंपडताळणी सुविधा याकरिता आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाची सुविधा, महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही ची उपलब्धता. ५) संपूर्ण वातानुकुलीत सुविधा. ही अंतर्गत ह्युमीडी फायरसह २४ तास विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुविधा.

या ग्रंथालयाच्या इमारतीमधील विविध विभाग संरचना पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

**१) पहिला मजला–**

* **वृत्तपत्र व नियतकालिके विभाग** – याठिकाणी ३० वृत्तपत्रे, ५५ जर्नलस् व २७० मासिके ही वाचकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.
* देवघेव काऊंटर – आरएफआयडी यंत्रणेसह
* अंधाकरिता विभाग – या विभागात २११ ब्रेललिपीतील ग्रंथ व २०० मासिके, २८ नकाशे, १७ तक्ते, ४० ब्रेललिपी संदर्भातील साधने, २४ स्कप्लचर, सीसीटीव्ही.
* बूकड्रॉप्सस् बॉक्स – ग्रंथ परत देण्याची सुविधा आरएफडीआय अंतर्गत
* बुकलीफ्ट – टचस्क्रीन मॉनीटर जलद तालिका शोधाकरिता
* सभासद विभाग – या विभागात सभासद नोंदणीचे कामकाज चालत असून आज या ग्रंथालयाचे २५४७ प्रौढ सभासद असून १२२८ बालसभासद आहेत. एक पुस्तक + एक मासिक उपलब्ध होण्यासाठी रुपये २००/– तर दोन पुस्तके + दोन मासिके – ४०० /– शुल्क, तीन पुस्तके + तीन मासिके – ७५०/– शूल्क या प्रकारे शूल्क आकारण्यात येते.

**२) दुसरा मजला –**

याठिकाणी बालविभाग यामध्ये विविध प्रकारची खेळणी, सौंदर्यपूर्ण रचना, वैशिष्ट्यपूर्ण रॅक्स आणि एकूणच आकर्षक रचना यामुळे मुले या विभागाकडे आकर्षिली जातात. या विभागात ४७०९ ग्रंथ व ३६ मासिके ठेवण्यात आलेली आहेत. बालकांसाठी विविध विषयाचा समावेश आहे. खास बालविकासासाठी इंटरनेट, ब्राऊझींगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**दृकश्राव्य कक्ष –** या ठिकाणी दूरदर्शन संच, थ्रीडी ग्लासेस, हेडफोन अशी सुविधा बालकांसाठी करण्यात आली आहे.

**नकाशा विभाग –** याविभागात २८४ नकाशे, पोर्तुगीज फोटोग्राफ्स्, जागतिक नकाशे, भौगोलीक व भौतिक नकाशे याचबरोबर तक्ते, पृथ्वीचे गोल इ. साधने वाचकांकरिता उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

**इंटरनेट ब्राउझींग केंद्र –** या ठिकाणी (३१) संगणकाच्या माध्यमातून विविध डाटाबेस उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. यामध्ये वर्ल्ड इ–बूक ग्रंथालय, डेलनेट इ. चा समावेश आहे. याव्दारे २०० इ–जर्नल्स, इ–बुक, इ–डाटाबेसीस आणि इंटरनेट फॅसीलिटी, शैक्षणिक संशोधकांकरिता शुल्क आकारणीनंतर उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच या ठिकाणी २७०५ सीडी देवघेवी करिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

**३) तिसरा मजला :**

पुस्तक देवघेव विभाग व ग्रंथसंग्रह विभाग – या विभागात ९४८४९ एवढे ग्रंथ संग्रहीत केलेले असून विविध भाषेतील ग्रंथाची रचना दशांश वर्गीकरण पध्दतीप्रमाणे करण्यात आली आहे. या विभागातील ग्रंथ हे अभियांत्रिकी, संगणक, स्पर्धापरिक्षा, कलादर्शक चाचणी, कायदा, शिक्षण, कला, निबंध, तत्वज्ञान, धर्म, संगीत, साहित्य, काव्य, नाटक इतिहास इ. विषयाशी संबंधीत आहे. या विभागाव्दारे २२२ मासिके २०१५–१६ मध्ये विकत घेण्यात आली होती. तसेच दिवाळी अंकाचे १६१९ मागील खंड संग्रहीत केलेले असून हे खंड विविध भाषाशी संबंधीत आहेत. हे खंड देवघेवसेवेसाठी वापरले जातात. दरवर्षी साधारणत: ३४८ दिवाळी अंक वाचकांकरिता उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच ओपॅक यंत्रणेव्दारे अवाश्यक त्या माहितीचा शोध घेतला जातो.

आपले प्रकल्प पूर्ततेसाठी विद्यार्थी या विभागाचा वापर करतात. तसेच प्रतीलीपी सेवाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विशेष म्हणजे याठिकाणी वाचकांकरिता पुस्तक शिफारस रजिस्टर ठेवण्यात आलेले असून या शिफारसीचा अथवा सूचनांचा उपयोग पुस्तक खरेदी वेळी जाणीवपूर्वक केला जातो. या विभागाव्दारे अंतरग्रंथालय देवघेव सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. ही सुविधा तालुका,जिल्हा ग्रंथालयाच्या मागणीनुसार ओपॅक नेटवर्कींग सुविधाचा वापर करुन दिली जाते. अशाप्रकारे मागणी केलेला ग्रंथ हा साधारणत: पंधरा दिवसांकरिता उपलब्ध करुन दिला जातो. तसेच मध्यवर्ती ग्रंथालयाच्या सभासदाना पुस्तक देवघेव सुविधा जवळच्या जिल्हा व तालुका ग्रंथालयाव्दारे उपलब्ध करुन दिली जाते. २०१५ –१६ या वर्षामध्ये अंतरग्रंथालयीन देवघेवीचा लाभ २७८ सभासदानी घेतला होता.

यावर्षी वाचकानी २२१ सूचना, पुस्तक खरेदी करिता केलेल्या होत्या या सूचनानुसार ग्रंथालयाद्वारे ३६ पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत.

**प्रशासकीय विभाग :**

या विभागात प्रशासकीय दृष्टीकोनातून सेवक, अनुदान, पत्रव्यवहार, अहवाल लेखन व कार्यालयीन माहितीविषयक कामकाज मुख्यलिपीकाद्वारे चालते.

**अकाऊंट विभाग :**

सर्व प्रकारची देयके व आर्थिक व्यवहार या विभागाव्दारे पाहिला जातो. गेल्या पाच वर्षातील अंदाजपत्रकाविषयी तपशीलावरुन या विभागाच्या कार्यभाराचे स्वरुप लक्षात येईल.

| वर्ष | अंदाजपत्रक (तरतुदी लाखात) | खर्च |
|---|---|---|
| २०११–१२ | ८८०.०१ | ५९८.७८ |
| २०१२–१३ | १०६९.१५ | ८१४.८५ |
| २०१३–१४ | १११९.८५ | ८१९.१६ |
| २०१४–१५ | १४३०.०५ | ९९३.८९ |
| २०१५–१६ | १४६९.९० | १३५९.४३ |

**तांत्रिक विभाग :**

या ठिकाणचे सर्व कामकाज आर.एफ.आय.डी. तंत्रानुसार केले जाते. ग्रंथनिवड ही समितीव्दारे केली जाते. अधिक्षक ही सूची, ग्रंथपरीक्षण याच्या माध्यमातून ग्रंथ शिफारस करत असतात. ग्रंथ खरेदीचा तपशील येथील वाढत्या वाचन साहित्याच्या व्यापाची प्रचिती देणारा आहे. गेल्या पाच वर्षाचा तपशील पुढीलप्रमाणे,

**वाचन साहित्य खरेदी तपशील :**

| वर्ष | ग्रंथसंख्या | खर्च (रुपयामध्ये) | | तालुका ग्रंथालयाकरीता वाचनसाहित्य खर्च |
|---|---|---|---|---|
| | | ग्रंथ करीता | नियतकालिके करीता | |
| २०१०-११ | ३४४६ | ५४७३९२ | ८९०७८२ | ६९०६१९ |
| २०११-१२ | १७८७० | ३२२८८४२ | ४६३६७८ | ६६३४८६ |
| २०१२-१३ | १४३७१ | १७१२६३३ | ११८८६९३ | ८५३६०९ |
| २०१३-१४ | ६३२० | २५१३८१९ | ७७२७८६ | ९३३०९५ |
| २०१४-१५ | ५०७५ | ५३२७९३ | ११२६५०१ | ५७०४९७ |
| २०१५-१६ | १३१६६ | १४४५९०६० | ९५७११२ | ७८६५६१ |

**ग्रंथालयात झालेली गेल्या तीन वर्षातील वाढ ही पुढीलप्रमाणे आहे.**

| वर्ष | इंग्रजी | मराठी | हिंदी | कोकणी | कादंबरी | बालसाहित्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ७५३२० | ४०२४० | ८१६३ | ४४४५ | ७९०० | २२३८७ | २९६७२ |
| २०१४-१५ | ७५९३९ | ४१२६३ | ८३८७ | ४६२० | ८०७९ | २२७२३ | ३००७४ |
| २०१५-१६ | ८१९४८ | ४४७५५ | ८८९९ | ४९७६ | ८५९६ | २५४७३ | ३०४२५ |

| इतर देणगी ग्रंथ | एकूण रक्कम रु. |
|---|---|
| १४५५० | २३९७७८/- |
| १६६४६ | २४४८३१/- |
| १८४६८ | २६१०२२/- |

**राजा राममोहन राय ग्रंथालय प्रतिष्ठान विभाग –**

या विभागाकडून सातत्यपूर्वक या ग्रंथालयास आर्थिक मदत केली जाते. ही मदत समतुल्य व असमतुल्य अनुदानात केली जाते. या योजनेअंतर्गत पुस्तक खरेदी, तांत्रिक उपस्कार, ग्रंथाचे वितरण या विभागाव्दारे केले जाते. यावर्षी रुपये १५,००,०००/– प्रतिष्ठानाकडून प्राप्त झाले व राज्य शासनाकडून १०,००,०००/– निधी समतुल्य योजनेअंतर्गत देण्यात आला. समतुल्य अनुदानाअंतर्गत ३५४ कोकणी, मराठी, हिंदी शीर्षकांच्या प्रती जास्त प्रमाणात खरेदी करण्यात आल्या. ही सर्व पुस्तके गोव्यातील लेखक आणि प्रकाशकानी २०१५ मध्ये प्रकाशित केलेली होती. या पुस्तकाच्या खरेदीमध्ये एकूण २४,४०,३२५/– रुपये खर्च करण्यात आलेले असून गोव्यातील एकूण २६ स्वयंसेवी ग्रामीण सार्वजनिक ग्रंथालयाना ही पुस्तके वितरीत करण्यात आली आहेत. साठवणूक स्वरुपात ग्रंथालयास २०१५ साली ४६७ पुस्तके प्राप्त झाली होती.

**सूची विभाग –**

या विभागाअंतर्गत कोकणी, मराठी वृत्तपत्रातील लेखनाचे सूचीकरण करण्यात आलेले असून या सूचीच्या माध्यमातून वाचकाना संबंधीत माहिती शोधणे सोपे जाते. अशा प्रकारे आज येथे स्थानिक वृत्तपत्रासंदर्भात सूचीकरण करण्यात आलेले आहे. यामध्ये १) सुनाप्रांत (१९८७–२०१२) २) गोमंतक (डिसेंबर २००९–२०१२) नवहिंद टाईम्स (२०१३) यांचा समावेश आहे.

**बांधणी विभाग –**

या विभागा अंतर्गत तळघरात असलेल्या या विभागामध्ये आधुनिक बायडींग यंत्राव्दारे ग्रंथबांधणीचे व नियतकालीके बांधणीचे काम केले जाते. यामध्ये पेपरबॅक, रिबायडींग किंवा जाड कव्हरच्या पुस्तकाची बांधणी, पुर्वबांधणी, खराब पुस्तकांची बांधणी केली जाते.

२०१५–१६ मध्ये या विभागाद्वारे नवीन पुस्तकांची प्लास्टिक कव्हरसह शिलाई करण्यात आलेली आहे. अशा पुस्तकाची संख्या ११९४ आहे. जाड कव्हरसह बांधणी केलेल्या रजिस्टरची संख्या ५४ इतकी आहे. पृष्ठ दुरुस्ती, प्लास्टिक कव्हर व हार्ड बायडींग ही जून्या ६७२ ग्रंथाना करण्यात आलेले आहे. संभासद अर्जांची बांधणी जाड पुठ्ठ्याच्या माध्यमातून करण्यात आली असून त्याची संख्या १५ इतकी आहे. वृत्तपत्र व नियतकालिके यांचे बांधणी खंड ३५८ आहेत. यावरुन येथील कामाचे स्वरुप लक्षात येते.

**व्याख्यान व परिषद कक्ष :**

हा एक विस्तृत कक्ष असून याठिकाणी १०० व्यक्ती व्याख्यान हॉल मध्ये बसू शकतील एवढी क्षमता असून परिषद कक्षातील क्षमता तितकीच आहे. या ठिकाणी हे सर्व कक्ष आधुनिक तंत्रसाधनानी युक्त असून भाडेतत्वावर कार्यशाळा, परिषदा, सभा याकरिता उपलब्ध करुन दिले जातात. तसेच या ग्रंथालयाव्दारे संशोधकांसाठी क्यूबीकल (०९) उपलब्ध करुन इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या सुविधा दरमहा १०००/– रुपये व वार्षिक रुपये १०,०००/– अशा स्वरुपात भाडे तत्वावर संशोधकाच्या सोयीनुसार उपलब्ध करुन दिल्या जातात. याचबरोबर येथे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची सोय करण्याच्या दृष्टीने अभ्यासिका मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थी स्वत:ची पुस्तके बरोबर घेऊन गृहपाठ अथवा प्रकल्प पुरा करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

**दुर्मिळ ग्रंथ आणि गोमंतक इतिहास विभाग :**

या विभागात जुन्या पोतुर्गिज संग्रहातील पुस्तकाबरोबरच नवीन पुस्तके उपलब्ध केलेली आहेत. या विभागात ग्रंथ, हस्तलिखिते मुद्रित साहित्यात अहवाल, अमुद्रित साहित्य, व्यवस्थित ठेवण्यात आलेले आहेत. या संग्रहात दुर्मिळ जुनी हस्तलिखिते, १६ व्या शतकातील दुर्मिळ पुस्तकेही संग्रहीत करण्यात आलेली असून ही पुस्तके जुन्या गोव्यातील जुन्या कॉलेजमधून संग्रहीत करण्यात आलेली आहेत. तसेच १७ व्या शतकात गोव्यात प्रकाशित झालेले ग्रंथ संग्रहीत करण्यात आलेले आहेत. जून्या बिब्लीओथिका नॅशनल ग्रंथालयातील गोवा स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रंथही संग्रहीत करण्यात आलेले असून यामध्ये प्रेस नोंदणी कायदा १८६७ अंतर्गत आलेली पुस्तके येथे संग्रहीत केली जातात.

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्थानिक वृत्तपत्रे, नियतकालिके यांचे संग्रहण करण्यात आलेले असून १६१७ शीर्षकाचा यामध्ये समावेश आहे. हे एक अत्यंत महत्वपूर्ण आणि एकमेवाद्वितीय असलेले वाचन साहित्य संग्रहण असून या व्यतिरीक्त पोर्तुगालमध्येही असे संग्रहण करण्यात आले आहे. याद्वारे गोव्याच्या इतिहासावर प्रकाश झोत टाकला जातो.

बोलेटीम दो गर्व्हनो व बोलेतीम ऑफिशीयल इस्तदादो दा इंडिया पोर्तुगिज हे प्रकाशन गोव्यातील शासकीय राजपत्रासारखे असून याच धरतीवर प्रकाशीत करण्यात आले होते.

* स्थानिक भारतीय पोर्तुगिज इतिहास विषयक ग्रंथ
* कोकणी, मराठी, इंग्रजी, संस्कृत व फ्रेंच भाषेतील, प्रेस व नोंदणी कायद्याअंतर्गत प्राप्त झालेले ग्रंथ
* गोवा मुक्तीच्यानंतर काळातील वृत्तपत्रे, मासिके यांचा संग्रह
* ग्रंथालयाकडे प्राप्त होणारे शासनाचे विविध प्रकारचे अहवाल
* वरिल पैकी काहींच्या सुक्ष्मफितींचे संग्रह
* गोव्यात प्रकाशित झालेली पुस्तके किंवा जगातील कुठल्या देशात गोव्याविषयी माहिती देणाऱ्या पुस्तकांचा संग्रह
* कोकणीचा संग्रह
* कोकणी लेखनाची पुस्तके
* हस्तलिखिते, राजपत्रे
* विधानपरिषद सभाग्रहाच्या सीडींचा संग्रह

असा संग्रह येथे केला जात असून या संग्रहात २०१५–१६ मध्ये पुढील प्रमाणे ग्रंथ दाखल झालेले आहेत.

| **भाषा** | **ग्रंथसंग्रह** |
|---|---|
| पोर्तुगिज | २५५ |
| कोकणी, रोमन | ९९ |
| इंग्रजी | ५३९ |
| मराठी | ६५५ |
| हिंदी | ३१ |
| **एकूण** | **२०७७** |

तसेच प्रेस आणि नोंदणी कायद्याअंतर्गत २०१५–१६ साली ४९८ ग्रंथ प्राप्त झाले आहेत. येथे सूचीकरणाबरोबर, स्कॅनींग, मायक्रो फिल्म सुविधा उपलब्ध आहे. आजवर येथे २८०० ग्रंथाचे व मासिकाचे मायक्रोफिल्मींग करण्यात आले असून पृष्ठाची संख्या १५०००००० एवढी आहे. १६ एमएमच्या मायक्रोफिल्मचे रीळ संग्रहित करण्यात आलेले असून हे सर्व रीळ पॉझीटीव्ह स्वरुपात आहेत.

डाटा इमेजींग सेंटरची व स्कॅनरची व ओव्हरहेड कॅमेराची सुविधा असून याद्वारे जुन्या प्रलेखाचे येथे डाटा इमेजींग करण्यात येते. यामध्ये १६ व्या – १७ व्या शतकातील दुर्मिळ ग्रंथाचे स्कॅनींग करणे शक्य आहे. त्याची सुरुवात ही करण्यात आलेली आहे. अशा दुर्मिळ पुस्तकांचे झेरॉक्सींग केले जात नाही. केवळ स्कॅन कॉपीज वाचकांना मागणीनुसार पुरविल्या जातात. याचे दरही निश्चित करण्यात आलेले आहेत. हे दर कागदाचा आकार, रंग व प्रतिचे स्वरुप यावर निर्धारीत करण्यात आलेले असून मागणीनुसार ही सेवा दिली जाते. २०१५–१६ मध्ये येथे एकूण २२९ प्रलेखाचे डिजीटायझेशन करण्यात आले आहे.

**संरक्षण व धूरीकरण प्रयोगशाळा :**

हा विभाग २०13 मध्ये सुरु करुन येथे दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, नियतकालिके यांचे संरक्षण करण्यासाठी व दीर्घकाळ टिकविण्यासाठी प्रयत्न केले जातात. सेवकाना राष्ट्रीय अभिलेखागृह न्यू दिल्ली व सीएसपीडीएस वस्तुसंग्रहालय आणि आर्ट कॉनझरवेशन मुंबई येथील तज्ञाकडून प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच गोवा विद्यापिठातील एम. ए. भाग–२ च्या विद्यार्थ्यांना 'पेपर कॉझव्हेशन फॉर नॅशनल प्रॉस्पेरीटी' या उपक्रमाअंतर्गत ६ जुलै २०१५ ते १५ जुलै २०१५ या काळात या ग्रंथालयाच्या विभातातील सेवकांव्दारे प्रशिक्षण देण्यात आलेले होते. येथे हस्तलिखिते, सुरुवातीची मुद्रणे, राजपत्रे, वृत्तपत्रे व १७ व्या शतकातील ग्रंथ अशा कागदपत्रांचे संरक्षण करण्यात येते.

एकूणच हे ग्रंथालय अत्याधुनिक असून याव्दारे अधिकाधिक दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न येथील कर्मचारी वर्ग मोठ्या उत्साहाने करत असून ग्रंथालयाचे अभिरक्षक श्री. कार्लोस्कर एम फर्नांडीस व ग्रंथपाल सौ. सुलक्षा शोधन कुळमूळे या सक्षमपणे काम करत आहेत. आज या ग्रंथालयात असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या १२२ इतकी आहे.

**डॉ. फ्रान्सिस लूईस गोम्स जिल्हा ग्रंथालय, नाव्हेलीम, सालसेत गोवा :**

डॉ. लुईस गोम्स जिल्हा ग्रंथालय सालसेत हे मडगाव शहराच्या बाहेर असून गोमंतकामधील विसान फ्रान्सिस लुईस याच्या नावाने उभे करण्यात आले आहे. ते एक डॉक्टर, अर्थतज्ञ, लेखक, राजनिती, पोर्तुगिज सदस्य होते. त्याचबरोबर ते कोकणी, पोर्तुगिज, फ्रेंच, इंग्रजी, रशियन, स्पॅनिश, लॅटीन आणि मराठी या भाषांचे जाणकार होते. त्यांच्या स्मरणार्थ हे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. पायाभरणी समारंभ २००५ रोजी करण्यात आला. या ग्रंथालयाचे उद्घाटन २० नोव्हेंबर २०१० रोजी करण्यात आले. आज या ग्रंथालयाकडे ५७,८३८ इतका ग्रंथसंग्रह असून यामध्ये इंग्रजी, मराठी, हिंदी, कोकणी, संस्कृत भाषेतील साहित्य आहे. सभासद संख्या ७०११ इतकी आहे.

या ग्रंथालयाचा देवघेव विभाग तळमजल्यावर असून याठिकाणी ७३०८ चौ. फूट इतकी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या देवघेव विभागात ३६६७५ ग्रंथ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. नियतकालिक विभाग हा पहिल्या मजल्यावर असून २६ वृत्तपत्रे व २७९ मासिके उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ग्रंथविभाग हा पहिल्या मजल्यावर असून तो नियतकालिके विभागाशी संलग्नित आहे. या ठिकाणी २४ ब्रेल ग्रंथ व सुलभ ब्रेल साधने, जिवशास्त्रविषयक तक्ते, भौगोलिक नकाशे ठेवण्यात आलेले आहेत. या ग्रंथालयामध्ये स्वत:ची पुस्तके वाचण्यासाठी एक स्वतंत्र अभ्यासिका आहे. या ठिकाणी वाचकांना स्वत:चे पुस्तके व लॅपटॉप सोबत घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. याचा लाभ अधिकाधीक विद्यार्थी घेत असतात. संदर्भ विभाग दुसऱ्या मजल्यावर आहे. यासाठी ४१०० चौफूट जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विविध विषयातील १८,११७ पुस्तके उपलब्ध करण्यात आलेली आहेत. या ठिकाणी एनसाक्लोपीडिया व इतर उपयुक्त संदर्भ स्त्रोत उपलब्ध करण्यात आले असून विद्यार्थी याचा लाभ घेतात.

इंटरनेट सुविधा तिसऱ्या मजल्यावर असून याठिकाणी वाचकांना इंटरनेट ब्राऊझिंग बरोबर प्रिंटर वापरण्याची सोय आहे.

बाल विभाग तिसऱ्या मजल्यावर असून या ठिकाणी ७२७६ ग्रंथ, १२७४ सीडी, टिव्ही उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच संदर्भपुस्तके, दृकश्राव्य साधने, खेळणी, खेळ, मुलांची मासिके याचबरोबर मुलांसाठी संगणक कक्ष ही उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

नोंदणीकृत सदस्य येऊन ग्रंथ व नियतकालिके एक महिन्यासाठी घेऊन जाऊ शकतात. या ग्रंथालयामधील गोवा विषयक विभाग हा चौथ्या मजल्यावर असून या ठिकाणी २७८२ ग्रंथ उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. यापैकी केवळ गोवा संस्कृतीशी संबंधीत १३५१ ग्रंथाचा समावेश असून कायदाविषयक ग्रंथांची संख्या १४३१ इतकी आहे. या संग्रहात गोवा विषयक उत्तम वाचन साहित्य आहे. या विभागाव्दारे संदर्भसेवेबरोबरच प्रतीलीपी सेवा, माहिती सेवा पुरविली जाते. तसेच येथे भौतिक व राजकीय नकाशे उपलब्ध करुन देण्यात आले असून भारतातील विविध राज्याशी ते संबंधीत आहेत.

विविध सेवांतर्गत वाचकाना संयुक्त तालिका, डेलनेट ऑन लाईन बेव, सीडीरॉम/डीव्हिडी, डॉक्युम्यूमेंटरी, अंतरग्रंथालय देवघेव सुविधा, ग्रंथ देवघेव, इंटरनेट ब्राऊझींग, रेफरेल सेवा, प्रतिलीपी सेवा इ. उपलब्ध करुन दिल्या जातात. २०१६ मध्ये पुढीलप्रमाणे पुस्तके खरेदी करण्यात आली. इंग्रजी – २७९०, मराठी १६९६, हिंदी – ३७१, कोकणी – २६, बालसाहित्य १७००, राजा राम मोहनरॉय प्रतिष्ठानकडून ७२२, देणगी ६८७ अशा स्वरुपात ३७०० इंग्रजी व १९६२ मराठी ग्रंथ येथे वर्षभरात दाखल झालेले आहेत. एकूण ग्रंथसंग्रह ६५९४० इतका आहे. या ग्रंथालयामध्ये २०१५–१६ साली दाखल झालेल्या एकूण ग्रंथांची संख्या ८१०२ असून ग्रंथखरेदी करिता एकूण ५२६७७२५/– रुपये खर्च करण्यात आलेले असून नियतकालिकांकरिता १,८२,१२३/– रुपये खर्च करण्यात आलेले आहेत.

या ग्रंथालयाकडे कार्यरत सेवकांची संख्या २७ असून यामध्ये ग्रंथपाल वर्ग एक (१) उपग्रंथपाल (०६) ग्रंथपाल वर्ग दोन (३) व परिचर (११) असा सेवक वर्ग आहे. तसेच (०१) सांस्कृतिक सहाय्यक (०५) इतर सेवक यांचा समावेश आहे.

**गोमंतक मराठी अकादमीचे ग्रंथालय :**

गोव्यात मराठी भाषा व संस्कृतीच्या जतन, संवर्धनासाठी गोमंतक मराठी अकादमीची १९८७ साली पणजी येथे स्थापना करण्यात आली. स्थापनेबरोबरच अकादमीचे ग्रंथालय सुरू करण्यात आले. येथे प्रामुख्याने मराठी ग्रंथसंग्रह आहे. या ग्रंथालयात ८,००० पुस्तके असून नामवंत प्राध्यापक, विचारवंत, अभ्यासकांनी आपला अमूल्य ग्रंथसंग्रह भेट दिला

आहे. यामध्ये डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, डॉ. वि. भा. प्रभुदेसाई, बा. द. सातोस्कर, प्रा. अ. का. प्रियोळकर, प्रभाकर पिसुर्लेकर, ग. ना. कापडी, डॉ. केशव सद्रे, सुरेश वाळिंबे, प्रा.एस.एस.नाडकर्णी, प्रा. मुरलीधर कुलकर्णी अशा नामवंतांचा समावेश आहे.

**पुराभिलेख, पुरातत्त्व खात्याचे ग्रंथालय :**

पणजी येथील पुराभिलेख व पुरातत्त्व खाते ही सरकारी जुन्या कागदपत्रांचा संग्रह असलेली संस्था. येथे जुने सरकारी दफ्तर, कागदपत्रे, गोमंतकातील गावांसंबंधीची नोंद पुस्तके आहेत. १९६४ पासून या दफ्तरखान्याचा ताबा केंद्र सरकारकडे होता. १९६९ मध्ये गोवा सरकारने आपले पुराभिलेख व पुरातत्त्व खाते स्थापून या संस्थेचा ताबा मिळवला. भारतातील जुना दफ्तरखाना म्हणून प्रसिद्ध असलेल्या या संग्रहालयात १४९८ सालातील दुर्मिळ पुस्तके आहेत. उपलब्ध पोर्तुगीज कागदपत्रांनुसार साडेचारशे वर्षांचा पोर्तुगीज वसाहतीचा इतिहास येथे आहे. त्याचबरोबर डच, इंग्रज, फ्रेंच वसाहतींचा इतिहासही येथे आहे.

मराठा, टीपू सुलतान, हैदरअली यांच्या संबंधीची कागदपत्रेही येथे आहेत. तसेच मोडी लिपीतील प्रचंड खजिना येथे आहे. मुगल–मराठी युद्धांचा मोडी नकाशा, शिवाजी महाराज जंजिऱ्यावर आल्याचे कोंडाजी भोसले यांचे व्हाईसरॉयला पाठविलेले पत्रही येथे आहे.

संदर्भ ग्रंथालयात ५० हजार संदर्भग्रंथ आहेत. यामध्ये इतिहास, तत्त्वज्ञान, धार्मिक ग्रंथ, ताराबाईकालीन कागदपत्रे, चित्रकला, नाणी, करवीर रियासतची कागदपत्रे यांचा समावेश आहे.

**महाराष्ट्र परिचय केंद्र ग्रंथालय, पणजी :**

महाराष्ट्र आणि गोवा यामधील पूर्वापार चालत आलेले सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक संबंध लोकांमधील स्नेहबंध अधिक दृढ व वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क कार्यालयाने महाराष्ट्र परिचय केंद्र या माहिती कार्यालयाची गोव्यात स्थापना केली. गोव्याच्या मुक्तीनंतर पाच वर्षांनी, मुक्तिदिनीच १९ डिसेंबर १९६६ रोजी मडगावमध्ये हे केंद्र सुरू करण्यात आले. त्यानंतर गोव्याची राजधानी पणजी शहरात

या केंद्राचे स्थलांतर १९ डिसेंबर १९६९ रोजी करण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांच्या हस्ते या केंद्राचे औपचारिक उद्‌घाटन करण्यात आले.

केंद्राची आजवरची वाटचाल पाहता स्थापनेमागील उद्देशापेक्षा अधिक मोठी मजल मारली आहे. कारण सुरूवातीला महाराष्ट्राचे गोव्यात एक जनसंपर्क केंद्र असावे. या उद्देशाने ते सुरू करण्यात आले होते. परंतु या केंद्राने गोव्यात विविध क्षेत्रात कार्य करून आपला नावलौकीक अल्पावधीतच वाढविला. माहिती केंद्राबरोबरच ग्रंथालय सुरू करण्यात आले व त्यानंतर माहिती केंद्र व ग्रंथालयामार्फत गोवाभर कला, साहित्य, संस्कृती, संस्कार, प्रबोधनाच्या अंगाने कार्यक्रमाला सुरूवात केली.

मुक्तीनंतरचे गोव्यातील सामाजिक जीवन सत्तांतराच्या पार्श्वभूमीवर थोडेसे मरगळलेले होते. महाराष्ट्र गोमंतकाचा पूर्वापारचा सांस्कृतिक अनुबंध आणि मराठी साहित्याविषयीची आत्मियता यांच्या मुक्त अभिसरणाच्या प्रक्रियेत केंद्राने जागल्याचे काम केले. साहित्य – सांस्कृतिक अनुबंधांना झळाळीयुक्त परिणाम दिले.

गोव्यातील मराठी भाषा व संस्कृती संवर्धनाच्या कार्यात इतर संस्थांना पूरक अशी कामगिरी महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे करण्यात येते. विविध विषयावरील व्याख्याने परिसंवाद, साहित्य संमेलन, साहित्य मेळावे, ग्रंथालय चळवळ, मराठी वृत्तपत्रे व नियतकालिकातून महाराष्ट्र सरकारच्या लोकापयोगी उपक्रमांना प्रसिद्धी, ज्येष्ठ साहित्यीक, विचारवंताच्या गोवेकरांशी भेटीगाठी अशा उपक्रमांना चालना देऊन या केंद्राने महाराष्ट्राचा सांस्कृतिक राजदूत होण्याची यशस्वी भूमिका पार पाडली.

मराठी साहित्यविश्वातील नामवंतांना चर्चा, परिसंवाद, व्याख्यानाच्या निमित्ताने केंद्राने गोव्यात आणले. मराठीतील अभिजात प्रतिभा गोमंतकातील नवोन्मेषांना अभिमुख झाली. मराठी साहित्याची नवी जाण, नवे भान, त्यांचा संस्कार, नव्या प्रवाहांचे दिशा – दिग्दर्शन नव्या गोमंतकीय पिढीला घडवले. त्यामुळे गोमंतकीयांना आपल्यातील प्रतिभेचा परिचय घडला. नव्या पिढीला नव्या वाटचालीच्या दिशेचे भान गवसले. या अर्थाने या माहिती केंद्रांच्या कार्यातून मुक्तीनंतरची एक सक्षम पिढी आकारला येण्यास मोलाचा हातभार लागला.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. गं. बा. सरदार, पं. महादेवशास्त्री जोशी, प्रा. गोवर्धनदास पारीख, प्रा. नरहर कुरूंदकर, डॉ. जयंत नारळीकर, पु. ल. देशपांडे, अशोकजी परांजपे, प्रा. रा. भि.जोशी, डॉ. विद्याधर पुंडलिक, डॉ. रा.शं. वाळिंबे, बाबा आमटे, सेतुमाधव पगडी, इंदिरा संत, जयंतराव टिळक, मारूती चितमपल्ली, दिलीप चित्रे, ग. त्र्यं. माडखोलकर, ग. दि. माडगुळकर, व्यंकटेश माडगुळकर अशा मान्यवरांचे कार्यक्रम या केंद्रातर्फे आयोजित करण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक दिग्गजांचे मार्गदर्शन गोमंतकीयांना लाभले. मान्यवरांच्या ज्ञानप्रकाशाचे कण इथल्या जिज्ञासूंना आणि रसिकांना वेचता आले. अगदी मुक्तपणे, गोमंतकीयांच्या मोकळेपणाच्या व अतिथ्यशीलतेच्या स्मृती आपल्या ह्रदयात सतत जपल्या. दोन्ही प्रदेशांतील लोकांमधील स्नेहभावाचे बंध बळकट करण्यात या माहिती केंद्र व ग्रंथालयाने मोठा वाटा उचलला.

या केंद्राचे ग्रंथालयही समृद्ध असून दररोज अनेक वाचक ग्रंथालयात येतात. महाराष्ट्र व गोव्यातून प्रसिद्ध होणारी दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके येथे उपलब्ध असतात. तसेच इंग्रजी, हिंदी भाषेतील निवडक नियतकालिकेही ठेवली जातात. याशिवाय इतर ग्रंथसंग्रह येथे आहे. त्याचा लाभ अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक घेतात. पर्वरी, माशेल, कुर्टी, खडपाबांध, बोरी अशा पाच ठिकाणी ग्रंथालयाची वाचनकेंद्रे आहेत.

येथील मराठी माणसाचे दिवाळी अंकाचे वेड सर्वश्रुत आहे. येथील निवडक ग्रंथांची संख्या ६,००० पेक्षा जास्त असून प्रामुख्याने मराठी साहित्य, इतिहास, संदर्भग्रंथ, महाराष्ट्रासंबंधी साहित्याचा समावेश आहे. नाममात्र शुल्क भरून या ग्रंथालयाचा सभासद होता येते. सभासद संख्या ६५० आहे.

या केंद्राने गोमंतक मराठी अकादमीच्या सहकार्याने दिवाळी अंक वाचनोत्सवाचा उपक्रम राबवून वाचकांची चांगली सोय केली आहे. हा उपक्रम नियमीतपणे सुरू आहे.

गोव्यात मुक्तीपूर्वीपासून ग्रंथालय चळवळ मोठ्या जोमाने सुरू असून मुक्तीनंतरही त्यात खंड पडलेला नाही. प्रामुख्याने या चळवळीने मराठी भाषा, संस्कृती जोपासण्याचे कार्य केले आहे. मुक्तीनंतर येथे स्थापन झालेली ग्रंथालये नव्या जोमाने कार्यरत आहेत.

**सरकारी तालुका ग्रंथालये :**

गोमंतकात तालुका ग्रंथालयांची सुरुवात १९७५ साली कुडचडे आणि वाळपई येथे ग्रंथालये स्थापन करुन झाली. त्यानंतर काणकोण, डिचोली आणि सांगे येथे तालुका ग्रंथालये उघडण्यात आली. आज ही ग्रंथालये आसपासची गावे, विद्यालये, महाविद्यालये आणि इतर सरकारी संस्थांच्या वाचनासबंधीच्या गरजा भागवीत आहेत.

सरकार आणि 'राजा राममोहन रॉय फाऊंडेशन' तर्फे या ग्रंथालयांना मदत केली जाते. कुडचडे येथील ग्रंथालयात जवळ जवळ ५०,००० ग्रंथ असून, वाळपई २०,०००, काणकोण ३०,००० सांगे २२,००० आणि डिचोली येथे जवळ जवळ १५,००० ग्रंथ उपलब्ध आहेत. विविध शब्दकोश, विश्वकोश, प्राचीन व अर्वाचीन काळातील वाङ्मय इथे विपूल प्रमाणात आढळते. या सर्व ग्रंथालयात मराठी ग्रंथांचा भरणा जास्त असून त्याशिवाय इंग्रजी, हिंदी व कोकणी भाषांतील पुस्तके उपलब्ध आहेत. संदर्भविभाग, बालविभाग असे वेगळे विभाग सर्व ग्रंथालयांत असून ग्रंथालयातर्फे राष्ट्रीय पुस्तक सप्ताह, पुस्तकप्रदर्शन, व्याख्याने इत्यादी कार्यक्रम केले जातात.

**नगरपालिका ग्रंथालये :**

या ग्रंथालयांचा कारभार नगरपालिका पाहते. गोवामुक्तीपूर्वी सांगे, फोंडा, पणजी, साखळी, मुरगाव, वाळपई आणि काणकोण नगरपालिकांची ग्रंथालये अस्तित्वात होती. आज केवळ म्हापसा, मडगाव, फोंडा, पणजी, वास्को आणि पेडणे – नगरपालिकांची ग्रंथालये आहेत.

**जनता वाचनालय, वास्को :**

मुरगाव नगरपालिकेचे हे ग्रंथालय खाजगी संस्थेमार्फत चालविले जाते आणि त्याला सरकारी अनुदान मिळते. या ग्रंथालयात अनेक मराठी ग्रंथ आढळतात. या वाचनालयाच्या वाचनकक्षात मुलाखती, चर्चासत्रे, व्याख्याने, काव्यरजनी,परिसंवाद, इत्यादी कार्यक्रम नियमितपणे होत असतात. त्याशिवाय वाचकांसाठी विविध लेखनस्पर्धा वाचनालय आयोजित करते.

फोंडा, पणजी आणि पेडणे नगरपालिकांच्या ग्रंथालयात विपुल असा ग्रंथसंग्रह असून त्या परिसरातले वाचक त्याचा फायदा घेताना दिसतात.

### श्री सरस्वती वाचनालय, वेलिंग :

शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'श्री सरस्वती सांस्कृतिक मंडळ' या संस्थेची स्थापना २६ जानेवारी १९७४ या शुभदिनी झाली. एका लहानशा गावात कार्यरत असलेली ही संस्था वेलिंग – म्हार्दोळ आणि पर्यायाने अंत्रुज महालाचे भूषण आहे. कुमार प्रियोळकर, वसंत गावडे व रवींद्र वेलिंगकर या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नातून या संस्थेचे वाचनालय उभे राहिले. या परिसरातील ग्रंथप्रेमी लोकांना पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत, हे ग्रंथालय स्थापनेमागील प्रमुख उद्दिष्ट होते. अनेक हितचिंतक आणि इतर लोकांकडून पुस्तकरुपाने आणि अन्य स्वरुपात वाचनालयाला देणग्या मिळाल्या. राजा राममोहन रॉय लायब्ररी फाऊंडेशन, श्री सरस्वती मंदिर, सेंट्रल लायब्ररी इ. संस्थांचे वाचनालयास सहकार्य लाभले. आतापर्यंत ग्रंथालयाची ग्रंथसंख्या २०,००० पेक्षा जास्त असून त्यामध्ये मराठी, कोकणी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील कविता, कथा, कांदबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित लेखन, बालवाङ्मय, कोशवाङ्मय, पुराणे इत्यादी शाखांतील पुस्तके उपलब्ध आहेत.

लोकाश्रयावर उभी राहिलेली ही संस्था दरवर्षी एक विद्यार्थी 'ग्रंथालय पदविका' या परीक्षेसाठी पाठवते. गोमंतक मराठी साहित्य संमेलन, पं. जितेंद्र अभिषेकी राज्य सत्कारसोहळा, आंतर महाविद्यालयीन नाट्यवाचनस्पर्धा, संगितसंमेलन, बालमेळावा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन या ग्रंथालयाने केले आहे.

### आताईद मुनिसिपल वाचनालय, म्हापसा : (१८८३) :

मॉन्त द गिरीम या गिरी येथील शिक्षणसंस्थेचे ऐकेकाळचे संस्थापक फादर फ्रान्सिसलुईस गोन्झागा दि आताईद यांनी तरुणांसाठी शिक्षणाचे केलेले भरीव कार्य लक्षात घेऊन, त्यांच्या नावाने १८८३ साली सुरू केलेले ग्रंथालय म्हणजे आताचे म्हापसा नगरपालिकेचे आताईद वाचनालय होय.

या वाचनालयाचा कारभार ९ एप्रिल १८९७ या दिवशी काम्र बार्देश अर्थात बारदेश नगरपालिकेकडे सोपविण्यात आला.

गोव्याच्या स्वातंत्र्यानंतर १९६८ साली म्हापसा नगरपालिकेकडे हे ग्रंथालय सोपवण्यात आले. पोर्तुगीज, इंग्रजी, मराठी, हिंदी, कोकणी इत्यादी भाषांतील मिळून चाळीस हजारापेक्षा

अधिक ग्रंथ, ५० नियतकालिके, २४ वर्तमानपत्रे इत्यादी ग्रंथसाहित्य इथे उपलब्ध आहे. दर दिवशी शेकडो लोक येथे संदर्भासाठी येत असतात.

इथे पोर्तुगीज पुस्तकांची संख्या उल्लेखनीय असून पोर्तुगीज कायदे आणि कागदपत्रांचा अभ्यास करणाऱ्यांना हे एक समृद्ध ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात सरकारी राजपत्रांचा १८२८ पासूनचा संग्रह आहे. त्याशिवाय विविध शब्दकोश, विश्वकोश आणि इतर संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत.

मुक्तीनंतर या ग्रंथालयात मराठी ग्रंथांचा मोठ्या प्रमाणात भरणा केलेला दिसून येतो. यामध्ये भारतीय संस्कृतिकोश, मराठी विश्वकोश, स्वामी विवेकानंद ग्रंथावली, समग्र सावरकर इत्यादी ग्रंथाचा समावेश आहे.

डॉ. आन्तोनिओ मारीओ द कुन्हा, हडफडे आणि मोंसियोर सेबास्तियाँव रुदाल्फ दाल्गाद, आसगाव या नामवंतांनी आपला बहुमोल ग्रंथसंग्रह ग्रंथालयास भेट दिला आहे. विद्यार्थ्यांसाठी आणि संदर्भासाठी वेगळा वाचनकक्ष असून नियतकालिके आणि संदर्भासाठी मोठा वाचनकक्ष आहे. संशोधक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमी या ग्रंथालयाचा वापर करताना दिसतात.

**श्री महालक्ष्मी प्रासादिक हिंदू वाचनमंदिर, पणजी : (१९०७) :**

पोर्तुगिजांच्या परकीय राजसत्तेत गोवेकरांवर खूप अत्याचार झाले. गोमंतकियांनी भारतीय संस्कृतीचे अस्तित्व टिकवण्यासाठी बरेच कष्ट घेतले. फिरंग्याची शासकिय भाषा पोर्तुगीज असल्यामुळे त्याच लोकांना राजदरबारी राज्याश्रय होता, महत्त्व होते. परंतु गोमंतकीयांना आपली संस्कृती प्रिय होती, आणि ही संस्कृती अबाबधित राखण्यासाठी मराठीतूनच शिक्षणाचे धडे गिरवीणे गरजेचे आहे असे मानले जात होते. राजकीय दडपणामुळे साहित्याची, राज्यांत व राज्याबाहेरील वार्तालापापासून, जागतिक घडामोडीपासून ते बरेच दुर असल्याचे जाणवत होते. त्यामुळे राजधानी पणजी शहरातील नाभिक समाजांतील शिक्षित तरूणांनी एकत्र येऊन विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर एकत्र येऊन १९०६ रोजी या विषयावर सखोल चर्चा केली. या चर्चेमध्ये भावी पिढीच्या तरूणांसाठी, त्यांचे भविष्य

उज्ज्वल बनवण्यासाठी पूर्वापार चालत आलेल्या भारतीय संस्कृती विषयी, ज्ञानार्जनाची विद्यार्जनाची वाचनाची आवड निर्माण झाल्या शिवाय हे शक्य नाही. वाचनालय हाच सर्व गुरूंचा गुरू. ह्याच युक्तीनुसार एका वाचनालयाची स्थापना करावी, असे सर्वांचे एकमत झाले. त्या कामासाठी कै. नानू तारकर पेडणेकर, कै. शिवा तारकर पेडणेकर, कै. शेटकर, कै. विष्णू कोरगांवकर, कै. गणा बोरकर, कै. पांडुरंग कारापूरकर, कै. बाळकृष्ण मणेरकर, कै. अनंत मार्दोळकर, कै. दामू तारकर पेडणेकर, कै. वासू उजगांवकर, कै. डोंगरीकर व कै. खांडोळकर यांनी पुढाकार घेतला.

घेतलेल्या निणर्यानुसार पणजी मळा विभागांत एक भाड्याची खोली घेऊन १० जानेवारी १९०७ रोजी 'श्री महालक्ष्मी प्रासादिक वाचन मंदिर' या नावाने, गोमंतकाच्या अंधारमय भूमीत पहिल्या सार्वजनिक वाचनालयाच्या रूपाने शिक्षणाचा उषःकाल झाला. दात्यांकडून अनेक प्रकारचे, वेगवेगळ्या विषयांवरील साहित्यांने ग्रंथ सामुग्रीत भर पडत होती. मिळतील तशी पुस्तके विकत घेत होते. वाचनालय सुरू झाले. त्यास अनेकांचे सहकार्य मिळाले. संस्था सदस्य ही बनत होते. नियमावली तयार करून ती १९११ मध्ये सरकार नोंदणी करुन घेतली. सदस्यांकडून मासिक भाड्यासाठी एकेक पैसा वसुल करुन त्याद्वारे भाडे दिले जात होते. वाचनालयाचा कारभार व्यवस्थित चालत होता. वाचक वाढू लागले. पुस्तक भंडारही वाढत होते. पुस्तके ठेवण्यास कपाटे अपूरी पडू लागली. त्यातच १९१३ मध्ये 'शिशीर व्याख्यान माला' चालू केली. वेगवेगळ्या विचारवंतांची व्याख्याने होऊ लागली. व्याख्यानामुळे जनतेत विचार करण्याची, शिक्षणाबाबतचे प्रेम वाढू लागले. त्यामुळे वाचकांच्या संख्येत बरीच भर पडू लागली. त्यामुळे व्यवस्थापक मंडळ नविन जागा घेण्याचा प्रयत्न करू लागले. 'मळा' विभागातच नवीन जागा विकत घेण्याचे ठरले. सदस्यांनी जागा पाहिली. व्यवहार झाला व संस्थेने स्वतःच्या मालकीची जागा घेतली.

तत्कालीन काळात पैशाची बऱ्याच प्रमाणात चणचण भासली. सदस्य संख्येतही वाढ झाली. परंतु जागा खरेदीसाठी वाचनालयाच्या शिल्लेकेतील पैसे खर्च झाल्याने इमारत बांधकामासाठी आर्थिक मदत मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. परंतु हवे तसे यश मिळत नव्हते. निधीसाठीं नाट्य प्रयोग करण्याचे ठरविले. त्यानुसार सं. सरवूबाई व सं. मानापमान

या दोन नाटकांचे प्रयोग झाले. पंरतू म्हणावे तसे यश मिळाले नाही. तरीपण १ जानेवारी १९१५ रोजी यथायोग्य विधीद्वारे इमारत बांधकामास कोनशिला बसवून प्रारंभ केला. जे काम एका वर्षात पूर्ण करावयाचे होते ते पैशा अभावी सहा वर्षे चालले. काही जणांकडून इमारत बांधकामासाठी कर्जाऊ रक्कम घ्यावी लागली. सन १९२१ मध्ये श्री महालक्ष्मी प्रासादिक हिंदू वाचन मंदिराच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. संस्थेचे स्वप्न साकार झाले. इमारत उभी करण्यासाठी सर्वांनी अथक कष्ट घेतले. वाचनालयाचे स्थलांतर नव्या जागेत विधीपूर्वक करण्यात आले.

सन १९२१ – ४५ या चोवीस वर्षाच्या कालखंडात इमारत बांधकामासाठी ज्या ज्या व्यक्तींकडून कर्जरोख्याद्वारे कर्जाऊ रक्कम घेतली होती त्यापैकी ३००० रूपयांची परतफेड करण्यात आली होती. राहिलेल्या पैशासाठी इतर कर्जदारांनी तगादा लावला होता. रक्कम परतफेड न झाल्याने त्यांनी कोर्टात दावा दाखल केला. संस्था लिलावात जाण्याची परिस्थिती निर्माण झाली. व्याजासह एकूण १२०० रूपयांची आत्यांतिक गरज होती. एवढे पैसे कोठून जमावयाचे असा प्रश्न व्यवस्थापकांना पडला. मोठ्या धैर्यांने पुढाकार घेऊन 'कॅश इकोनोमी पोस्टल' कडून दस्तअैवजाद्वारे १२०० रूपये कर्ज घेतले आणि त्या कर्जाची परतफेड केली. त्यानंतर सदस्यांनी नविन देणग्या घेण्यास सुरवात केली. निधीकरिता 'संगीत पाणीग्रहण' हा नाट्यप्रयोग सादर केला. अशा प्रकारे विविध मार्गांनी पैसा जमवला व कर्जाऊ घेतलेली सर्व रक्कम व्याजासह परत केली आणि संस्था कर्जमुक्त झाली.

गोवा स्वातंत्र्यानंतर श्री महालक्ष्मी प्रासादिक हिंदू वाचन मंदिर संस्थेने वाचनालय व्यतिरीक्त सर्व कार्यक्रम रद्द केले आणि फक्त वाचनालयाकडे लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले. गोव्यातील वाचनालयांच्या समस्या सोडविण्यासाठी 'गोमंतक ग्रंथालय संघ' स्थापनेत पुढाकार घेतला. त्यांनतर गोव्यातील सर्व ग्रंथालयांना अनुदान देण्याचा सरकारने निर्णय घेतला. अनुदानामुळे वाचनालय चालविण्यासाठी, नवनविन साहित्य संपदा वाढविण्याच्या कामी काही अंशी या अनुदानामुळे मदत होऊ लागली. सन १९६३ मध्ये कै. वसंतराव धेंपोंच्या अध्यक्षतेखाली ५६ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. वाचनालयात वेगवेगळ्या सुधारणा होत होत्या. पुस्तकांची संख्या वाढत होती. नविन कपाटे बनविण्यात आली होती.

सन १९८२ मध्ये वाचनालयाने ७५ वर्षात पर्दापण केले होते. 'अमृत महोत्सव' साजरा करण्यासाठी कै. वसंतराव धेंपोंच्या अध्यक्षतेखाली 'अमृत महोत्सव समिती' स्थापन करण्यात आली. या समितीने कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बरीच मेहनत घेतली व कार्यक्रम यशस्वी केला. या समारंभासाठी गोव्याचे मुख्यमंत्री श्री. प्रतापसिंह राणे यांना प्रमुख पाहुणे म्हणून व महाराष्ट्रातील विचारवंत व ग्रंथालय चळवळीतील अग्रगण्य शिलेदार श्री. ग. प्र. प्रधान प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. स्मरणिका, जुन्यापुस्तकांचे प्रदर्शन, परीसंवाद, अभिरुप विधान सभा व करमणुकींच्या कार्यक्रमांनी हा सोहळा संपन्न झाला. त्यावेळेचे औचित्य साधून गोव्यातील ग्रंथालय चळवळीतील मान्यवरांचा सत्कार ही करण्यात आला.

या ग्रंथालयाने गोव्यात काही वेगळ्या प्रथा सुरू केल्या. उदा. मुक्त वाचनाची सोय, व्याख्यानमाला, मागासलेल्यांसाठी मोफत मराठी शाळा सुरू केल्या. नाट्यगीत स्पर्धा,भक्तिगीत स्पर्धा, बा.भ. बोरकर काव्यलेखन स्पर्धा, लक्ष्मणराव सरदेसाई स्मृती कथास्पर्धा आयोजित केली जाते. त्याचबरोबर युवकांना विज्ञान, शास्त्रे व ललितकला या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी लागणारी साधने उपलब्ध करून दिली जातात. पणजी शहराबाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे ज्ञानसाहित्य पुरवले जाते.

ग्रंथालयात ८७०० मराठी पुस्तके असून त्याशिवाय इंग्रजी, हिंदी, कोकणी भाषेतील पुस्तके आहेत. १०५ नियतकालिके सध्या सुरू आहेत. तसेच स्थानिक व पुणे, मुंबई येथील वर्तमानपत्रे नियमित येथे घेतली जातात. त्यांचा वेगळा वाचक वर्ग आहे.

**दुर्गा वाचनमंदिर, म्हापसा : (१९०८)**

पोतुगीज राजवटीखाली गोमंतकात मराठी शिक्षणाची सोय नव्हती. ती सोय करण्यासाठी म्हापशात वैश्य मंडळाने १९०८ साली 'ज्ञानप्रसारक मंडळ' ची स्थापना केली. त्यानंतर त्वरीत मोफत मराठी शाळा आणि 'दुर्गा वाचनमंदिर' ची स्थापना केली.

रवळू शंभू शेट खलप, वामन अनंत शेट खलप, सीताराम ग मणेरकर, महाबळेश्वर डांगी, रामकृष्ण अर्जुन कर्पे आणि सहकाऱ्यांनी सदर वाचनालय १९०८ ते १९५४ पर्यंत व्यवस्थित सुरू ठेवले होते. पोर्तुगीज गव्हर्नरांनी संस्थेस भेट दिली असता त्यांना सुभाषचंद्र बोसांचे मुखपृष्ठ असलेले पुस्तक दिसले. तेव्हा त्यांनी ग्रंथालय बंद करण्याचा आदेश दिला

आणि ग्रंथालय बंद झाले. गोवामुक्तीनंतर १९६२ मध्ये हे ग्रंथालय पुन्हा सुरू झाले. साधारणत: ५,००० पुस्तके येथे उपलब्ध आहेत.

**गोमंत विद्यानिकेतन ग्रंथालय, मडगाव: (१९१२)**

अलीकडच्या काळात गोव्याची आर्थिक राजधानी म्हणून मडगावची ओळख असली तरी शैक्षणिक, सांस्कृतिक वारसा जपण्याचे महान कार्यही या शहराने केले आहे. समाजप्रबोधन, संस्कृतिसंवर्धन आणि शिक्षणप्रसारक या कार्याला वाहून घेतलेली 'गोमंत विद्यानिकेतन' ही गोव्यातील अग्रगण्य सामाजिक संस्था. या संस्थेने मडगाव परिसरात ग्रंथालय आणि व्याख्यानमाला यांच्या माध्यमाद्वारे प्रचंड कार्य केले.

तत्कालिन पोर्तुगीज राजवटीत सर्वत्र भितीचे, असुरक्षिततेचे वातावरण होते. परंतु या काळातही या संस्थेने मराठी भाषा, मराठी संस्कृतीचे संवर्धन व संगोपन हा ध्यास घेऊन कार्य केले आणि याच ध्यासाने चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३४ म्हणजेच १९ मार्च १९१२ रोजी मडगाव येथे 'सारस्वत ब्राम्हण समाज' या संस्थेची स्थापना केली. २९ नोव्हेंबर १९६२ रोजी 'गोमंत विद्यानिकेतन' असे नवीन नामाभिधान करण्यात आले.

गोमंत विद्या निकेतन ही गोमंतकातील एक अग्रगण्य संस्था असून आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अंत्यत प्रगतिशील अशा वाटचालीला सोमवार दि. १९ मार्च २०१२ साली शंभरी पूर्ण झाली. मंगळवार दि. १९ मार्च १९१२ रोजी तत्कालिन काळातील प्रबोधनाचा वसा घेतलेल्या नऊ युवकांनी या संस्थेचा पाया घातला होता. यामध्ये यशवंत सूर्याजी सरदेसाई, भिकाजी पुरूषोत्तम पै भले, काशिनाथ दामोदर नायक, केशव अनंत नायक, सदाशिव वासुदेव केंकरे, गोविंद सखाराम पाणंदीकर, रामचंद्र व्यंकटेश नायक, रामकृष्ण नारायण बाळे, केशव कृष्ण नायक या धाडसी, दूरदृष्टीच्या नेतृत्वाचा समावेश होता.

संस्थेचे संस्थापक, सभासद संस्थेच्या स्थापनेपूर्वी काही वर्षे मडगावच्या 'मोती' नावाच्या टेकडीवर फिरावयास जात असत. तेथे हिंदुस्थानातील परिस्थिती, स्वातंत्र्य लढा याबद्दल चर्चा, विचारविनमय होत असे. ही सर्व मंडळी पुरोगामी विचारधारेची कास धरणारी असल्यामुळे सामाजिक सुधारणा करण्यासाठी पुढे झाली. आणि मंगळवार दि. १९ मार्च १९१२ रोजी या संस्थेची स्थापना करण्यात आली.

सुरूवातीच्या काळात केरोसिनच्या डब्यापासून बनविलेली पेटी व एक मोडके टेबल असा या ग्रंथालयाचा संसार होता. तरीसुद्धा त्यावेळी ग्रथालयात १० – १५ वाचक नियमीत येत असत. पुस्तकांची देवघेव सुरू होती. आज या ग्रंथालयात १०,००० पेक्षा अधिक ग्रंथसंग्रह आहे. जवळ जवळ २५ दैनिके, १२० नियताकालिके या ग्रंथालयाने वाचकांना उपलब्ध करून दिलेली आहेत.

**श्री सरस्वती वाचन मंदिर, पणजी (१९१३)**

गोमंत विद्या निकेतनच्या खालोखाल महत्त्वाचे व जुने ग्रंथालय म्हणजे पणजीचे श्रीसरस्वती मंदीर होय. ’निकेतन’ नंतर फक्त दीड वर्षाने १९१३ सालच्या विजयादशमीस त्यांची स्थापना झाली. ‘गोवा हिंदू पुस्तकालया’ चा ग्रंथसंग्रह व शिल्लक असलेली रू.४०० रक्कम हे या ग्रंथालयाचे सुरवातीचे भांडवल. या भांडवलावर संस्थेने आपला व्याप हळुहळू वाढविला. या ग्रंथालयाचा पणजी शहरात पणजी बाहेरून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड भागविण्यात फार मोठा उपयोग झाला.

सुरूवातीच्या काळात सरस्वती मंदिराने आपले सारे लक्ष फक्त ग्रंथालयाच्या विकासावर केंद्रित केल्यामुळे सभा, समारंभ, व्याख्याने वा इतर सांस्कृतिक केले जात नसत फक्त वर्षादिनाचा समारंभ मात्र होत असे. या वेळी संस्थेचा वार्षिक अहवाल वाचून दाखविला जाई. आजपण ही वर्षा दिनाची प्रथा चालू आहे.

या संस्थेची स्थापना श्री. शके १८३५ दि. ९ ओक्टोबर १९१३ रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर झाली. या संस्थेचा पाया त्या अगोदर काही वर्षे श्रीमान विष्णू गिरीधर शेणवी धेंपे यांच्या उदार आश्रयाने सर्वश्री डॉ.पुरूषोत्तम वा. शिरगांवकर, शांबाराव सरदेसाई, शिवा फटू, पै आंगले, प्रभुती व त्यावेळच्या इतर होतकरु तरूणांनी स्थापन केलेल्या ‘गोवा हिंदू पुस्तकालय’ या छोट्या वाचनालयाने घातला गेला.

संस्थेच्या दप्तरातील जो पहिल्या अहवालात या संस्थेचे संस्थापक म्हणून स्व. नारायण शेणवी केंकरे आगशीकर, अनंत वासुदेव प्रभु मोये, पांडुरंग केशव कामत म्हामाई इत्यादी गृहस्थांचा उल्लेख आहे. संस्थेच्या प्रगतीस त्या काळात शहरवासीयांकडून बरेच आर्थिक सहाय्य लाभले.

वाचनालयाची सुरवात श्री. अनंत नागोजी नाईक यांच्या घराच्या माडीवर झाली व नंतर काही वर्षांनी जुलै १९२३मध्ये वाचनालय श्री. नेवरेंकर यांच्या माडीवर हलविण्यात आले. या वाचनालयाची स्वतःची इमारत असावी असे वाचनालयांच्या सभासदांची इच्छा होती. त्यासाठी संस्थेच्या स्थापनेनंतर सात वर्षात शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी ४०० चौ. फुट जागा खरेदी करण्यात आली. पण काही कारणांमुळे इमारत बांधणीचे काम होऊ शकले नाही. अनेक वेळा झालेल्या खाजगी व जाहीर चर्चेत इमारतीचा प्रश्न ताबडतोब हाती घ्यावा असे सांगण्यात आले. पण ते शक्य झाले नाही. त्यानंतर संस्थेच्या २७ ऑक्टोबर १९४६ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेत इमारत बांधणीचा निर्णय पक्का करण्यात आला. त्यानुसार श्री. अनंत विश्वनाथ केणी व प्रा. रामचंद्र शंकर नायक या सभासदांनी इमारतीचा संकल्पित नकाशा तयार करून घेतला. आणि संस्थेच्या दि. ९ फेब्रुवारी १९४७ रोजी भरविलेल्या सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आला. संकल्पित नकाशास मान्यता मिळाल्यानंतर कार्याच्या अंमलबजावणीसाठी 'मंदिर समिती' या नावाने समिती स्थापन करण्यात आली.

अपेक्षीत निधी जमा होताच शके १८७२ वैशाख शु. द्वादशी दि. २९ एप्रिल १९५० रोजी संस्थेच्या मालकीच्या जागेत संकल्पित इमारतीचा शिलान्यास समारंभ संस्थेचे अध्यक्ष श्री. अनंत विश्वनाथ केणी यांच्या अधिपत्याखाली करण्यात आला.

परंतु, इमारत उभी करण्याची संधी आली होती, पण काही अडचणींमुळे शक्य झाले नाही. मात्र इमारतीची आवश्यकता संस्थेच्या हितचिंतकांना सताऊ लागली. हे कार्य पूर्णत्वास नेण्याच्या हेतून ४ एप्रिल १९६९ रोजी श्री. पुरूषोत्तम रामनाथ केणी यांच्या हस्ते पाया घालण्यात आला. मात्र इमारतीच्या पूर्वी तयार करण्यात आलेल्या नकाशा ऐवजी दुसरा आधुनिक नकाशा स्थापत्य विशारद श्री. शिवाजी वा. आमोणकर यांच्याकडून तयार करुन घेण्यात आला व बांधकामास सुरूवात झाली. आज संस्थेची जी इमारत आहे त्याच्या श्रेयामध्ये स्व. अनंत केणी यांचा मोठा वाटा आहे.

**संस्थेची घटना :**

वर उल्लेखीत केल्याप्रमाणे 'श्री सरस्वती मंदीर' ही संस्था श्री शके १८३५ आश्विन शु. दशमी, दि. ९ ऑक्टोबर १९१३ रोजी श्रीमान श्रीनिवास वैकुंठ शेणवी धेंपो यांच्या

अधिपत्याखाली स्थापन झाली व तीची घटना गोवा सरकारच्या हुकूमनामा नं. १३ दि. ६ जानेवारी १९१६ ने संमत करण्यात आली. त्यानंतर १९६९ साली मुळ घटनेत संपूर्ण फेरबदल करून संस्थेला व्यापक स्वरूप देण्यात आले व ती नवीन घटना सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अन्वये, ऑर्डर क्र.२३९ दि. २४ जून १९६९ नुसार रजिस्टर करण्यात आली. संस्थेचे सदस्यत्व चार वर्गात विभागले असून, पहिला – वाली, दुसरा – उपकर्ता, तिसरा – आजीव व चौथा वर्ग – सामान्य सदस्य म्हणून गणले जाते.

अशा प्रकारे गोमंतक विद्या निकेतनच्या बरोबरीने एक अग्रगण्य ग्रंथालय म्हणून श्री सरस्वती मंदिर, पणजी या संस्थेचा नावलौकिक आहे. ९ ऑक्टोबर १९१३ रोजी विजयादशमीच्या शुभमुहुर्तावर या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. या संस्थेचा पाय त्याअगोदर काही वर्षे विष्णू गिरिधर शेणवी धेंपे यांच्या उदार आश्रयाने डॉ. पुरूषोत्तम वा. शिरगावकर, शांबाराव सरदेसाई, शिवा फटू पै आंगले व त्यावेळच्या इतर होतकरू तरूणांनी स्थापना केलेल्या 'गोवा हिंदू पुस्तकालय' या छोट्या वाचनालयाने घातला गेला. अल्पावधीत ते बंद पडले. या संस्थेची सर्व पुस्तके पुढे श्री सरस्वती मंदिराच्या ग्रंथालयास मिळाली.संस्थेच्या इमारतीचा पहिला मजला केवळ वाचनालयासाठी आहे. स्त्रिया व मुले यांच्या वाचनासाठी वेगळी दालने आहेत. अभ्यासकांसाठी खास वाचनकक्ष आहे. ग्रंथाचे शास्त्रीय पद्धतीने वर्गीकरण व तालिकीकरण करणारे हे गोव्यातील सर्वात पहिले ग्रंथालय. या ग्रंथालयात इंग्रजी, हिंदी, कोकणी भाषेतील साहित्य आहे. आज ग्रंथालयात ३३,००० ग्रंथ असून १०५ नियतकालिके, स्थानिक, राष्ट्रीय वर्तमानपत्रे वाचकांसाठी उपलब्ध असतात. ग्रंथालयातर्फे विविध स्पर्धा व व्याख्याने आयोजित केली जातात.

आजवर अनेक नामवंत व्यक्तिंनी आणि साहित्यीकांनी या ग्रंथालयास भेट दिली आहे. त्यामध्ये श्री. व्यं. केतकर, वि.स.खांडेकर, जमनालाल बजाज, न.चि.केळकर, ग. त्र्यं. माडखोलकर, अरविंद गोखले, गिरीजा कौर, वसंत सावंत, मंगेश पाडगावकर, जितेंद्र अभिषेकी इत्यादी यांचा समावेश आहे.

***

## प्रकरण ६ वे

# सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील नामवंत व्यक्ती

६.१ प्रस्तावना

६.२ महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे ग्रंथालय क्षेत्रात योगदान

६.३ ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन

६.४ आंध्रप्रदेश

६.५ महाराष्ट्र

६.६ पश्चिम बंगाल

६.७ कर्नाटक राज्य

६.८ गुजरात

६.९ पंजाब राज्य

६.१० तमिळनाडू राज्य

६.११ बिहार

६.१२ आसाम

६.१३ मध्यप्रदेश

# प्रकरण ६ वे

# सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील नामवंत व्यक्ती

## ६.१ प्रस्तावना :

सार्वजनिक ग्रंथालये ही शिक्षण क्षेत्राची एक अविभाज्य घटक असल्याची जाणीव स्वातंत्र्यपूर्व काळात येथील अनेक लोक नेत्यांना, सामाजिक कार्यकर्त्यांना व राजकीय कार्यकर्त्यांना आणि शिक्षण क्षेत्रातील नामवंतांना उत्तम प्रकारे होती. शिक्षणाचा सर्वदूर प्रसार झाल्याशिवाय या देशाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न पाहता येणार नाही, याची जाणीव सर्वच प्रज्ञावंत सामाजिक नेत्यांना होती. नवशिक्षित व साक्षर लोकांना ही साक्षरता कायम स्वरुपात जपण्यासाठी ग्रंथालय हे एक एकमेव साधन असल्याची जाणीव ही या सर्वानाच होती.

आपल्या प्राचीन परंपरेचा अभ्यास करत असताना या काळातील राजांनाही ज्ञानाबद्दल विशेष आस्था होती आणि म्हणूनच त्यांनी स्वतःचा असा खाजगी हस्तलिखित संग्रह व मुद्रण काळानंतर मुद्रित ग्रंथसंग्रह मोठ्या प्रमाणात जपल्याची उदाहरणे आपल्या देशात अनेक संस्थानातून आढळतात. तसेच धर्मपीठे, आश्रम मंदिरे अशा महत्त्वपूर्ण सामाजिक केंद्रामध्ये तत्कालीन वाचन साहित्याचे संग्रहण होत असल्याचे सबळ पुरावे आढळतात. या सर्वच काळात शिक्षण प्रसार व ज्ञानार्जन हे समाजातील मोजक्याच लोकांना उपलब्ध होत असे. ब्रिटीश कालखंडात शिक्षण प्रसाराचे अभियान आपल्या देशात सर्वदूर व समाजातील सर्व स्तरांमध्ये हळूहळू पसरू लागले. या शिक्षण विस्ताराच्या पार्श्वभूमीवरच पाश्चात्यांच्या संकल्पनेतून आकारास आलेली सार्वजनिक ग्रंथालय संकल्पना या देशातही हळूहळू दृढ होण्यास मदत झाली. अर्थात या काळातील सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये इंग्रजी माध्यमातील वाचन साहित्याची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर करुन दिली जात असे. पुढील काळात स्थानिक भाषांतून शिक्षण प्रसाराला चालना मिळताच त्या त्या प्रदेशातील भाषेमधून वाचन साहित्य प्रकाशित होऊ लागले. या स्थानिक भाषेतील वाचन साहित्याचे संग्रहण सार्वजनिक ग्रंथालयातून केले जाऊ लागले. अशा या ग्रंथालय क्षेत्राच्या उषःकाली बडोदा नरेश

सयाजीराव महाराज (तिसरे) यांनी पाश्चात्य देशातील विशेषत्वाने अमेरिकेतील सार्वजनिक ग्रंथालयांचे सुक्ष्म अवलोकन करुन आपल्या संस्थानात सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास व विस्तार केला. अमेरिकेतील ग्रंथालय शास्त्राचे तज्ञ श्री बोर्डन यांना सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. या अभियानाला समाजातील तत्कालीन सुशिक्षीत धुरीणांच्याकडून ही देशभर साथ लाभली. तसेच या ठिकाणी कार्यरत असणारे तत्कालीन ब्रिटीश शिक्षणतज्ञ व्यक्ती व इतर व्यक्तींनी सहकार्याचा हात पुढे केला. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीने २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात जोर धरला असता ही स्वातंत्र्य चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेची गरज ही या चळवळीतील समाज धुरीणांना जाणवली. ही ग्रंथालय चळवळ अधिक बळकट करण्यासाठी पाश्चात्य देशातील ग्रंथालय शास्त्राचे पद्धतशीर शिक्षण घेऊन पुढे आलेले डॉ. एस.आर.रंगनाथन, श्री. त्र्यं.ब. वाकनीस अशा देश भरातील नामवंतांची देखील या सार्वजनिक ग्रंथालय अभियानास साथ लाभली आणि देशभरात हळूहळू ग्रंथालय चळवळ विकासाची पाऊलवाट चोखाळू लागली. या प्रक्रियेस अधिकाधिक साथ लाभण्यास मदत झाली ती इ. स. १९१५ मध्ये ग्रंथपालन वर्गाच्या प्रशिक्षण वर्गाच्या पंजाब विद्यापिठातील अभियानाने पंजाब विद्यापिठाचे पहिले प्रशिक्षित ग्रंथपाल श्री. ॲश डिकर्सन्सन यांनी या वर्गाचा अभ्यासक्रम तयार केला होता. त्यांच्या विद्यार्थ्यांनी पुढील काळात देशातील विविध ठिकाणी ग्रंथालयशास्त्राचे सक्षम विद्यार्थी उपलब्ध करुन दिले. तसेच इतर ग्रंथालय चळवळीचे प्रणेते यांनी ही योगदान दिले.

या वाटचालीतील योगदानाचा आपल्या अथक परीश्रमातून आपला खारीचा वाटा उचलणाऱ्या काही नामवंतांचा अल्पपरिचय पुढे करण्यात आलेला आहे. राज्यनिहाय केलेला हा अल्प परिचय त्या त्या परीसरातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीवर प्रकाश झोत टाकण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. महाराज सयाजीराव गायकवाड व भारतातील ग्रंथालय महर्षी यांचे सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासातील योगदान विचारात घेऊन सुरुवातीस या दोन महनीय व्यक्तींच्या योगदानाचे विशेष स्वरुप नमूद केलेले आहे. राज्यनिहाय कामही पुन:श्च अल्प कार्य परिचय जाणीवपूर्वक उल्लेखिलेले आहे.

## ६.२ महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे )यांचे ग्रंथालय क्षेत्रात योगदान :

### सयाजीराव महाराज यांची अमेरिका भेट (१९०६) :

सयाजीराव महाराज हे ध्येयनिष्ठ प्रवासी होती. प्रवासामुळे आपल्या ज्ञानात भर पडत असल्यामुळे प्रवास हे शिक्षणाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे अशी त्यांची धारणा होती. १९०६ पर्यंत त्यांनी युरोपाचा प्रवास अनेकवेळा केला होता पण अटलांटिक परिसरात प्रवास केलेला नव्हता. या पार्श्वभूमीवरच एका उद्दिष्टानेच त्यांनी अमेरिकेतील संघ राज्यांच्या प्रवासाची आखणी केली. आपल्या कुटुंबासमवेत (महाराणीसाहेब व छोटे बंधू संपतराव समवेत) या प्रवासाचा बेत योजला होता. अमेरिकेतील लोक जीवन आणि त्यांची राज्यपद्धती जाणून घेण्यासंबंधी ते खूपच उत्सुक होते. आपल्या राज्याची बैठक (विकास) ही भारतातील संस्थानामध्ये आदर्श नमुनेदार उदाहरण सर्वांसमोर ठेवावयाचे याच उद्देशाने ते प्रेरीत झाले होते. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचा प्रवास करताना एक विद्यार्थी बनूनच या प्रवासात सर्व बाबींचे तपशीलवार निरीक्षण करून त्यांनी नोंदी केल्या. शिक्षण हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असल्याने त्यांनी अमेरिकेतील शिक्षणपद्धती आणि तेथील शिक्षण तज्ञांचे कार्य यांचे अत्यंत सूक्ष्मपणे अवलोकन केले. पुढे यातील काही शिक्षण तज्ञांनी महाराजांच्या निमंत्रणावरून बडोदा संस्थानास भेट दिली व येथील शिक्षण व्यवस्थेच्या सुधारणेकरिता काही सूचना केल्या. भविष्यात बडोद्यातील शिक्षण व्यवस्थेचा अधिक दर्जेदार स्वरुपात विकास करण्यासाठी याचा चांगलाच उपयोग झाला. या भेटीत महाराजांनी अमेरिकेतील ज्या ज्या बाबींची कुतुहलपूर्वक माहिती घेतली त्यामध्ये औद्यागिक विकास, कृषी, कामगार चळवळीबरोबरच बाल वाचनालये आणि फिरती ग्रंथालये यांचा समावेश होता. या सर्वांमध्ये त्यांनी अधिक प्राधान्य दिले होते ते ग्रंथालयांना. या संदर्भातील श्री. राईस यांची महाराजसंदर्भात नोंद बोलकी आहे. ''सक्तीच्या शिक्षणाशी ग्रंथालय चळवळ ही अविभाज्य असणे हेच संस्थानाचे वैशिष्ट्य होते.''

*(राईस स्टेनले, लाईफ ऑफ सयाजीराव ऑफ बडोदरा, खंड २, पृ. ७०-७१)*

**बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळ :**

वास्तव स्वरूपात पहावयाचेच तर बडोदा संस्थानचे नरेश महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) हेच भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे जनक होय. मोफत सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे अवघ्या संस्थानात उभे करणारे भारतातील हे पहिलेच संस्थान होय. येथील ग्रंथालयामध्ये सर्व जाती, धर्माच्या सर्व स्तरातील लोकांना मोफत प्रवेश खुला करण्यात आला होता हे ही या चळवळीचे वैशिष्ट्ये होते. अशा या एकमेवाद्वितीय ग्रंथालय चळवळीचे देशात व देशाबाहेर कौतुक तर झालेच शिवाय ग्रंथालय चळवळीचे महत्त्व सर्वदूर पोहचविण्यात हे एक यशस्वी व अनुकरणीय अभियान ठरले.

स्वत: महाराजांनी १८८१ साली राज्य सत्ताधिकार लाभताच त्वरितच त्यांनी संस्थानातील शिक्षण प्रसार सांस्कृतिक संवर्धन याकडे विशेष लक्ष पुरविले. या संदर्भातील अभ्यास सर्व स्तरावर उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधान्यक्रम देण्याचा त्यांनी पायंडाच पाडला. यासाठी राजकीय इच्छाशक्तीबरोबरच आर्थिक, सामाजिक स्तरावरही ग्रंथालय चळवळ व शिक्षण याकडे त्यांनी विशेष अग्रक्रमाने लक्ष दिले. यामागचे मुलभूत कारण म्हणजे १९०६ मधील त्यांची अमेरिका भेट हे होय. या संदर्भात ग्रंथालय क्षेत्रातील एक नामवंत श्री. कुडाळकरांनी नमूद केलेली विधाने बोलकी आहेत.

''शिक्षण विषयक आस्था असणाऱ्या व आपल्या संस्थानामध्ये सक्तीच्या व मोफत शिक्षणाची सोय करणाऱ्या सयाजीराव महाराजांसारख्या राजास अमेरिकेमधील भेटीच्यावेळी तेथील हजारो सार्वजनिक ग्रंथालयानी प्रभावीत केल्यास नवल ते काय?'' अमेरिकेतील ग्रंथालयाचा विस्तार पाहूनच भारतात येण्यापूर्वीच त्यांनी तारेने संस्थानातील शिक्षण आयोगास पुढीलप्रमाणे आदेशवजा संदेश पाठवला होता.''

''ग्रामीण परिसरातील लोकांना ग्रंथ, वृत्तपत्रे व नियतकालिके वाचनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थानातील प्रत्येक तालुक्यात ग्रंथालय स्थापण्याची आवश्यकता आहे'' *(बडोदा राजधानी.... १९२७, पृ. ४२)* पुढे या संदेशाच्या परिणितीचे स्वरूप संस्थानच्या १८९५ सालातील अशासकीय अहवालात प्रतिबिंब झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

''शिक्षण आयोगास या संदर्भातील उद्दिष्टाच्या तात्काळ पूर्ततेकरिता एक आराखडा तयार करण्यासाठी काही सूचना देण्यात आल्या होत्या. इतकेच नव्हे, तर स्वत: महाराजांनी आपल्या मंत्र्यांना अशी ग्वाही दिली होती की, अमेरिकेतील स्वत:च्या अनुभवावर आधारीत गरजेनुसार आवश्यक त्या सूचना देण्यास ते तयार आहेत. या कामी अमेरिकेस संस्थानाचे सहकार्यही उपलब्ध होणार असल्याचे महाराजांनी अप्रत्यक्षपणे सुचित केले होते.'' (Ad. Report 1906-07, P. 157) याबाबत महाराजांचे अंडर सेक्रेटरी श्री. ए. एन. दातार यांनी बडोदा संस्थानच्या दिवाण साहेबांना पाठविलेल्या पत्रातील मजकूरही एकूणच ग्रंथालय उभारणीसाठी महाराज किती आस्था दाखवत होते हे सुस्पष्ट करणारा आहे. या पत्रात ते नमूद करतात,

''महाराजासाहेब यांच्या मनात सध्या असे विचार येत आहेत की, छोट्या शहरातून व गावागावातून अथवा दशक्रोशीमध्ये (दहा गावात एक) एक अशाप्रकारे संस्थानात ग्रंथालयांची स्थापना केल्यास लोकांच्यामध्ये वाचनाची आवड व वाचनाबद्दल, ग्रंथाबद्दल प्रेम निर्माण होण्यास मदत होणारी आहे. याद्वारे ज्ञानप्रसारास चालना मिळणारी आहे. तसेच महाराजांची इच्छा या पत्रातून स्पष्ट करताना पुढे असे स्पष्ट केले होते की, ग्रंथालयाचा लाभ सुभ्यास व नायब सुभ्यास आणि तालुका व जिल्हा स्तरावरील स्थानिक मंडळाच्या सभासदांना व्हावा. त्याचबरोबर त्यांना याची जाणीव द्यावी की, या सदस्यांनी स्वत:च अशा संस्था स्थापन केल्यास संस्थान प्रशासन त्यांना सहकार्य / सहाय्य करण्याचा प्रयत्न करील. यासंदर्भात अशा सदस्यांकडून कोणत्याही प्रकारचे अभिवचन नसले तरी चालेल'' एकूणच या पत्राचा आशय विचारात घेता आपल्या संस्थानातील प्रजेला ग्रंथालयाचा लाभ व्हावा, त्याद्वारे प्रजेमध्ये ज्ञानाचा – शिक्षणाचा प्रसार व्हावा यामागची महाराजांची तळमळ व दूरदृष्टी लक्षात येते.

**ग्रंथालय सुरु करण्यासंदर्भातील मसुदा** :

यासंदर्भात याच आशयाचे पत्र श्री. दातार यांनी प्रो. बुम्पस यांना याच तारखेस लिहिले होते. या पत्राचा आशय, ''बडोदा संस्थानात फिरती ग्रंथालये सुरु करण्यासाठी तयार केलेला कच्चा मसुदा (नियमावली) आपणाकडे पाठविण्यास सुचविण्यात आले आहे.

महाराजांची अशी इच्छा आहे की, आपण हा मसुदा वाचून यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक वाटल्यास किंवा बदल करणे गरजेचे असल्यास सुचवाव्यात'' ग्रंथालयात क्षेत्रातील एक तज्ज्ञ, एक जाणकार या नात्यानेच महाराजांनी श्री. बुम्पस यांचेकडून ही अपेक्षा व्यक्त केली होती. आपण केलेला मसुदा हा कच्चा आराखडा असल्याची महाराजांना पुरेपूर जाणीव होती आणि महाराजांना एखादी गोष्ट भावल्यास त्या त्या विषयातील जाणकाराकडून त्याबाबत सहाय्य घेण्याचा उदार दृष्टीकोन महाराजांकडे होता. म्हणून पुढे या पत्रात त्यांनी असे नमूद केले होते, ''आपण या मसुद्याच्याविषयी विशेष मार्गदर्शन, प्रकाशझोत अधिकाधिक टाकू शकाल कारण या क्षेत्रातील आपले ज्ञान आणि अनुभव याचा याकामी अधिक उपयोग होणारा आहे.'' अशा स्वरुपाची एखाद्या क्षेत्रातील तज्ज्ञाबद्दलची महाराजांची धारणा, हे त्यांच्यातील एक कर्तव्यनिष्ठ राजा, एक चिकित्सक प्रशासक या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष पैलूवर प्रकाशझोत टाकणारी घटना आहे. आपल्या दस्ताऐवजाबाबत महाराज किती चिकित्सक होते हे पुढील नोंदीवरून स्पष्ट होते

''कच्चे नियम हे ११ असून याची प्रत्येक तालुका विभागात (पेठा वा महाल) एक ग्रंथालय अशी संरचना करण्यात आली होती. ग्रंथ खरेदीकरिताची तरतूद, ग्रंथालयांचे पर्यवेक्षण, ग्रंथ देवघेव हेही या अंतर्गत सुचविण्यात आले होते. तसेच शासनाने अस्थायी स्वरुपात तीन वर्षासाठी अनुदानाची सरकारने अशा संस्थांना अनुदान उपलब्ध करून देणेविषयी सूचना केली होती. वाचकांची दखल घेताना समाजातील प्रत्येक व्यक्तीस ग्रंथालयात प्रवेश देण्याचा व तेथील ग्रंथ, नियतकालिकांचे वाचन करण्याचा हक्क विनाअडथळा असावा असे सुस्पष्ट नमूद करण्यात आले होते. *(शिक्षण अहवाल १९१८/१९, पृ.५३)*

**वाचन साहित्याचे पुष्टीकरण :**

सांस्कृतिक संवर्धनाचा एक भाग म्हणूनच महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सुरु केली होती. अमेरिका, युरोप, खंडातील नव्या युगाची पहाट आपल्याही संस्थानात उदयास यावी हा महाराजांचा यामागचा दृष्टिकोन होता. म्हणूनच केवळ सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे अभियान वा मोफत प्राथमिक प्रशिक्षण प्रसार एवढेच करून महाराज थांबले नाहीत तर साहित्य निर्मिती व प्रकाशन या करीताही

त्यांनी प्राधान्य क्रमाने सहकार्य केले. आपल्या स्थानिक भाषेत चांगल्या साहित्याची निर्मिती व इतर भाषेतील दर्जेदार साहित्याचे स्थानिक भाषेत भाषांतर करून त्याची उपलब्धता आपल्या प्रजेस व्हावी याकरिताही त्यांनी विशेष प्रयत्न केले. तज्ञ व्यक्तींच्याद्वारे इतर भाषेतील दर्जेदार साहित्यकृतीचे महाराजांनी जाणीवपूर्वक करुन घेतलेले भाषांतर हे त्याचे उत्तम उदाहरण होय.

गुजराती भाषेतील साहित्य प्रसाराकरिता चालना देण्यासाठी त्यांनी प्रत्येकी रु.२००/– निधी उपलब्ध करून दिला होता. 'सयाजी साहित्य माला' या मालेअंतर्गत दर्जेदार व उपयुक्त इंग्रजी भाषेतील ग्रंथाचे गुजराथीमध्ये भाषांतर करण्यासाठी सुरुवात केली. तसेच यानंतर १९१८ /१९ मध्ये एक नवीन पुस्तक प्रकाशन माला सुरु करून बालवाङ्मय प्रकाशनास चालना दिली. या मालेचे नाव होते 'सयाजी बालअध्ययनमाला.' या मागे एक गतीशील अशी विचारधारा होती आणि ती म्हणजे तरुण शालेय शिक्षणातून बाहेर पडल्यावर त्यांच्याशी साहित्याद्वारे संपर्क करता यावा. त्यांना पुढील काळासाठी तत्वज्ञानाच्या सतत संपर्काकरिता वाचन साहित्य उपलब्ध व्हावे जसे प्राचीन काव्य माला (शिक्षण अहवाल १९१८–१९ पृ. ५९) नावाची एक माला सुरु करून त्याद्वारे प्राचीन काव्याची जाणीव / ओळख युवकांना करून देणे. हा प्रधान हेतू महाराजांच्या मनात होता. गुजराथमधील अनेकविधी सांस्कृतिक संस्थांनी गुजराथी भाषेतील साहित्याचा प्राधान्यक्रमाने प्रसार करण्यासाठी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. यामुळे गुजरातमधील वाचन चळवळ व ग्रंथालय चळवळ याचा विकास व वाढ होण्यास पुष्कळच मदत झाली. अशा अनेक संस्थांमध्ये प्रामुख्याने विचार करता उल्लेख करावा अशी संस्था म्हणजे ''गुजराथ व्हर्न्याक्युलर सोसायटी, अहमदाबाद'' होय. एखाद्या संस्थेने रु. ५०/– भरून आपल्या संस्थेची नोंदणी केल्यास व्हर्न्याक्युलर संस्थेद्वारे अशा संस्थेस रु. १/– इतक्या किंमतीपर्यंतची सर्व पुस्तके व बुद्धी प्रकाश हे मासिक मोफत पाठविण्यात येत असे.

**सयाजी महाराजांचे ग्रंथालय चळवळीस योगदान :**

व्यक्तीशः सयाजीराव महाराज (तिसरे) यांचे अध्ययन उशीरा झाले असले तरीदेखील अल्पावधीत आपल्या चतुस्त्र, अभ्यासू वृत्तीमुळे त्यांनी प्रशासनाबरोबरच इतर विविध

विषयांचे ज्ञान अत्यंत चिकाटीने आत्मसात केले. या पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्वत्‌जणांबरोबर विचाराची देवाणघेवाण, प्रवास आणि सुक्ष्म निरीक्षणवृत्ती याद्वारे त्यांनी स्वत:ला कालसापेक्ष केवळ अद्ययावत ठेवले आहे असे नव्हे तर काळाची पाऊले ओळखून त्यांनी सातत्यपूर्वक भविष्याचा वेध घेत सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाकरिता पाऊले उचलली होती. १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात मोफत सार्वजनिक ग्रंथालये ही संकल्पना नवीन राहिलेली नव्हती. याच चळवळीच्या पुढील काळातील भारतभर विकासाचे खरेखुरे श्रेय जाते ते महाराज सयाजीराव गायकवाड यांचेकडे होय. बडोद्यापुरतेच नव्हे तर मुंबईसारख्या तत्कालीन महानगरातील ग्रंथालय उभारणीसाठीही महाराजांनी सहकार्य केले होते. याचे उदाहरण म्हणजे १८ नोव्हेंबर १९०६ रोजी मुंबई मराठी संग्रहालयास त्यांनी प्रथमच भेट दिली. या भेटीप्रित्यर्थ महाराजांच्या स्वागताकरिता संस्थेद्वारे पानसुपारीचा समारंभ आयोजित केला होता. संस्थेची जागा लहान असल्यामुळे हा समारंभ नानू नारायण कोठारे यांच्या ‘इंद्रभवनात’ आयोजित केला होता. अशा भेटीद्वारे महाराजांचे समाधान न झाल्याने त्यांनी संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन ग्रंथालयाची जागा व ग्रंथसंग्रहासंदर्भात सूक्ष्म निरीक्षण केले. संस्थेची एकंदरीत स्थिती पाहून नवीन वास्तू उभी करताना स्वत:हून मदतीचे आश्वासन दिले. सयाजीराव महाराजांच्या उपस्थितीबद्दल व योगदानाबद्दल मुंबई मराठी ग्रंथालयासंदर्भातील लेखनामध्ये विस्ताराने आला आहे.

पुढे मुंबई मराठी ग्रंथालयाची नवीन इमारत बांधताना डिसेंबर १९१० मध्ये संस्थेने अशा आशयाचा ठराव केला की, काम लवकर सुरु करण्यासाठी धार्मिक विधी तातडीने करून लौकीक समारंभ श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याहस्ते करण्याचे ठरविले. या समारंभप्रसंगी ग्रंथसंग्रहालयाच्या इमारतीचा मुख्य दगड – चांदीची कोनशिला महाराजांच्या हस्ते बसवावी. या संदर्भात महाराजांशी संपर्क साधला असता त्यांनी संस्थेच्या समारंभास उपस्थित रहाण्याची संमती दिली. या अगोदर महाराज युरोपच्या दौऱ्यावर होते. ते १६ डिसेंबर १९१० रोजी सकाळी मुंबईला पोहोचले. शनिवार दि. १७ डिसेंबर १९१० रोजी मुंबई मराठी ग्रंथालय संग्रहालयाचा पायाभरणी समारंभ महाराजांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात पार पडला. याचे वृत्तही टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने ठळकपणे दिले होते. या

वृत्तात महाराजांनी समारंभ प्रसंगी सभेला मराठी भाषेतून संबोधित करताना ग्रंथालयाचे महत्त्व विषद केले होते. ''ज्ञान प्रसारासाठी अशा संस्थांची मोठी आवश्यकता असून शिक्षण ही या देशाची मोठी गरज आहे, या देशात देशासाठी काही तरी उत्तम, दर्जेदार करण्याची क्षमता असलेले अनेक लोक आहेत पण त्यांची ज्ञान विज्ञानाकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती, या बाबींपासून परावृत्त करत असल्याने ते जीवनाचा उच्चस्तरीय आनंद लुटू शकत नाहीत.'' मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाने या घटनेसंदर्भात पुढील उल्लेख केलेला आहे.

''मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेच्या आजपर्यंत एकंदर इतिहासातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे संग्रहालयाच्या इमारतीचा कोनशिला बसविण्याचा समारंभ ता. १७ डिसेंबर १९१० रोजी झाला ही होय. हा समारंभ श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे हस्ते फारच थाटाचा व अपूर्व असा झाला. समारंभास संस्थेचे आश्रयदाते, तहहयात वर्गणीदार व इतर मिळून हजारो महाराष्ट्रीयांचा जमाव जमला होता. यावेळी श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांस संस्थेच्यावतीने मानपत्र अर्पण करण्यात आले. महाराज सरकारानी मानपत्रास उत्तर देताना मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासारख्या संस्थेची उपयुक्तता किती आहे ते सांगून संस्थेच्या कामाबद्दल आपली सहानुभूती व्यक्त केली व संग्रहालयाच्या इमारत फंडासाठी पाच हजार रुपयांची उदार देणगी दिली. या देगणीमुळे भविष्यात लवकरच ही इमारत उभी राहिल असा आत्मविश्वास संस्थेच्या कार्यकर्त्यात निर्माण झाला. पुढे या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ ७ नोव्हेंबर १९१२ या दिवशी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याच हस्ते पार पडला. याप्रसंगी महाराजांनी ग्रंथालयाचे महत्त्व विषद करणारे विस्तृत भाषण इंग्रजीतून केले व रु. १०००/- देणगी, १२५ पुस्तके संस्थेस दिली. पुढे महाराजांचे एक सुंदर छायाचित्र प्राप्त झाले. *(मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय १९०८-१९७३ पृ. ६०)* या समारंभातील भाषणात १९१० मधील पायभरणी समारंभाचा उल्लेख करून अत्यंत अभिमानाने नमूद केले की,

I have brought the founding or the reorganisaion of over 300 free public libraries in my own state. Small libraries are many of them.

पुढे ते ग्रंथालयाविषयी नमूद करतात–

But whether his mind incline him to action or to meditation he must first cenrol himself as a public in the "The peoples University, The Library"

(लायब्ररी मिसलेनी नोव्हेंबर १९१२) या वरून शिक्षण आणि एकूणच मानवी जीवनातील ग्रंथालयांचे असाधारण महत्त्व महाराजांनी कशाप्रकारे ओळखले होते ते स्पष्ट होते.

याच भाषणाच्या समारोपात त्यांनी पुढे माणसाप्रमाणेच ग्रंथालयाची देखील जडणघडण करणे गरजेचे असते. ही जडणघडण सावकाशपणे व काळजीपूर्वक करणे गरजेचे असते. ग्रंथालयासारख्या संस्था या चिरकाल टिकणाऱ्या असतात. याद्वारे भविष्यातील विचार प्रक्रिया व त्यांचे विचार याचाही आपण आदर केला पाहिजे. ''अशी ही संस्था मराठी माणसासाठी, भविष्यातील विकासासाठी मराठी माणसाच्या ऐतिहासिक कामगिरीची ही आठवण करून देणारी आहे.'' अशा आशयाचे उद्‌गार महाराजांनी काढले होते. ग्रंथालये आणि मराठी माणूस याच्या भविष्यातील विकासाची चिंता महाराजांना किती तीव्र स्वरूपाची होती हे ही या विचारातून व्यक्त होते.

अशाप्रकारे ग्रंथालयाचे महत्त्व जाणूनच याअगोदर १९१० मध्ये आपल्या अमेरीकेतील भेटी प्रसंगीच त्यांनी 'बोर्डन' या अमेरिकन ग्रंथपालाना बडोद्यात मुद्दामच बोलावून घेतले होते. महाराज बडोद्याला पोहचण्यापूर्वीच बोर्डन बडोद्यात दाखल झाले होते. या संदर्भात महाराजांचे मुंबईत आगमन होण्यापूर्वीच ही बाब महाराजांना कळावी यासाठी श्री. सेडन सी. एन. यांनी २ डिसेंबर १९१० रोजी महाराजांना एक पत्र लिहिले होते. हे पत्र महाराजांना 'एडन' येथे मिळावे अशाप्रकारे पाठविण्याची व्यवस्था केली होती. तसेच बोर्डन यांच्या येण्याविषयी या अगोदरच महाराजांना कळविल्याचा उल्लेख करण्यात आला होता. एकूणच या पत्राच्या आशयावरून ग्रंथालय चळवळी विषयक महाराज किती जागरुकतेने सगळ्या तपशिलाकडे – बोर्डन यांच्या बडोदा येथील आगमनाबद्दल महाराज किती सतर्क होते हे लक्षात येते. एकूणच महाराजांनी आपल्या युरोपच्या भेटीत 'ग्रंथालय धर्म ' ही संकल्पना स्वत:च्या मनावर खोलवर बिंबवली होती. हा धर्म लोकोद्धाराचे एक उत्तम साधन आहे याची पुरेपूर जाणीव महाराजांना झालेली होती.

**सयाजीराव महारांचे ग्रंथालयविषयक तत्त्वज्ञान :**

सयाजीराव महाराजांनी ग्रंथालयाबद्दल असलेले प्रेम आणि ग्रंथालय स्थापनेसंदर्भातील त्यांचे धोरण हे दूरदृष्टीने केलेले असे. सेंट्रल लायब्ररीच्या नव्या इमारतीकरिता त्यांनी बडोद्यामधील सुरसागर परिसरात जागा निश्चित केलेली होती. याचबरोबर त्यांची दृष्टी ही विज्ञानिष्ट असल्याने आणि विज्ञान व वैज्ञानिक प्रयोग याद्वारेच औद्योगिक विकास साधता येणार आहे याचीही महाराजांना तीव्रतेने जाणीव होती आणि म्हणूनच त्यांनी सेंट्रल लायब्ररीकरिता निश्चित केलेली जागा ही विज्ञान संस्थेला दिली. यामागे एखाद्या बाबीचा प्राधान्यक्रम विचारात घेण्याची त्यांची विशालदृष्टी व दृष्टीकोन याचीही जाणीव होते. महाराज हे खऱ्या अर्थाने शाळेमध्ये जाऊन कधीच शिकले नव्हते पण खाजगी शिक्षणाबरोबरच स्वयं अध्ययनाने त्यांनी आपले व्यक्तिमत्त्व व विचारधारा आणि चिंतनशीलता हे पैलु आपल्या अंगी जोपासले होते. या संदर्भातील त्यांची चिकाटी व श्रम यामुळेच ते स्वतःला एक सुसंस्कृत व्यक्ती बनवू शकले. त्यांची वैयक्तिक स्वरूपाची धारणा होती की, कोणतीही सामान्य व्यक्ती स्वतःला पुस्तकांच्या माध्यमातून एक दर्जेदार व्यक्ती बनवू शकते यासाठी सातत्यपूर्वक वाचन साधनाही महत्त्वाची असते. वाचनाला चिंतनाची जोड देऊन व्यवहारात या विचारांचे अनुकरण केल्यास मानवजातीच्या कल्याणाची बीजे सर्व स्तरावर रुजून मानवी जीवन पारदर्शी व सुखमय होण्यास मदत होते. त्यांचा असा विश्वास होता की, ग्रंथालयाची समाजाकरीता एकदा निर्मिती केल्यास समाजाकरीता ग्रंथालय सुरु केल्यास लोक पुस्तके वाचतात आणि ही प्रक्रिया सातत्यपूर्वक सुरु राहते. याकरिता सार्वजनिक ग्रंथालयांनी खर्च केलेला पैसा, श्रम, मनुष्यबळ आणि वेळ हे ग्रंथालयाचा योग्य प्रसार न केल्यास फुकट जाण्याची शक्यता असते. यासाठी वाचन अभिरुची विकसित करण्यासाठीचे सातत्यपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे असते. नाहीतर पुस्तकांना वाचक भेटणार नाहीत, अशी पुस्तके केवळ कपाटात धुळ खात पडून राहतील. म्हणूनच पुस्तकांच्या अधिकाधिक वापराकरिता ग्रंथालयाकडे वाचकवर्ग सातत्याने आकृष्ट होईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. प्रसंगी यासाठी वाचकांच्या घरापर्यंत जाऊन ग्रंथालय सेवा पुरविणे गरजेचे आहे. प्रभावी ग्रंथालय सेवा देण्यासाठी ग्रंथालयाचा प्रसार व प्रचार सर्वस्तरावर प्रभावीपणे करणे हे गरजेचे असते.

डॉ. रंगनाथन यांच्या पंचसूत्रीतील तत्त्वज्ञान आणि महाराजांचे ग्रंथालयाविषयक चिंतन यातील साम्य यावरून सहजच लक्षात येते व महाराजांचा ग्रंथालयविषयक विशाल दृष्टीकोन सुस्पष्ट होतो. असा विशाल दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून आपल्या अमेरिका भेटीत त्यांनी बोर्डन यांना बडोद्यामध्ये निमंत्रित केले होते. श्री. बोर्डन हे स्वत: मिशनरी होते. वाचकांना पुस्तके देण्यातील आनंद हा फार मोठा असून हे एक प्रतिष्ठेचे काम आहे अशी त्यांची वैयक्तिक धारणा होती. एखादे छोटेसे ग्रंथालय स्थानिक स्टोअरमध्ये ठेवून स्टोअरकीपरद्वारे ते सहजपण चालवता येईल अशी त्यांची धारणा होती. त्यांनी 'न्यू हेवन क्रेक्टीकट' (अमेरिका) येथे घरपोच ग्रंथ देवघेव सुरु केली होती. यासाठी ते स्वत:ची कार वापरत असत व स्वत: गाडी चालवत. नोंदणीकृत सभासदांना घरपोच पुस्तके पोच करत असत. *(श्री सयाजीराव गायकवाड महाराज ऑफ बडोदा – द प्राईम प्रमोटर ऑफ लायब्ररीज इंटरनॅशनल लायब्ररी सेंटर, कोलंबस (१९९२)*

प्रत्यक्षात बडोद्यातील शालेय शिक्षकांनाही ग्रामीण ग्रंथालयांचे व्यवस्थापन करणे जिकीरीचे वाटत असे. खरे तर राज्याच्या शिक्षण विभागानेच शालेय शिक्षकांनी ग्रामीण ग्रंथालयाचे व्यवस्थापन सांभाळणे हे त्याच्या कर्तव्याचे/जबाबदारीचे अंग असल्याचे सुस्पष्ट केलेले असतानाही शिक्षकांना मात्र ही जबाबदारी जिकीरीची वाटत होती, सयाजी महाराजांनी खरोखरच ग्रंथालयाच्या तात्विक बैठकीचा मुलभूत विचार करून ग्रंथालयाचे हे काम शाळेतील इंग्रजी व मराठी विभागानी सांभाळावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. म्हणूनच त्यांनी याबद्दलची आपली भूमिका याप्रसंगी सुस्पष्ट केली होती.

समाजातील उच्चस्तरीय घटकानाच ग्रंथालयाचा केवळ लाभ व्हावा आणि बहुसंख्य लोक ग्रंथालयाच्या लाभापासून वंचित रहावेत हे महाराजांना अयोग्य वाटत होते. म्हणून त्यांनी असे उद्‌गार काढले होते की, ''ग्रामीण ग्रंथालयांना प्रोत्साहन देण्याचा मानस बाळगूनच मी छोट्या छोट्या ग्रामीण ग्रंथालयाची स्थापना खेड्यापाड्यातून करण्याचे धोरण अंगीकारले.'' हे धोरण अंगीकारताना महाराजांनी ग्रंथालय ही केवळ देणगी वा भेट म्हणून बहाल केलेली नव्हती. लोकांनी ग्रंथालयाच्या उभारणीत आपलाही खारीचा वाटा उचलावा अशी त्यांची स्पष्ट धारणा होती. महाराज हे खऱ्या अर्थाने एक देशभक्त होते आणि

भारताच्या अभ्युदयाचा विचार त्यांच्या मनात सतत घोळत असे. असे विचार करताना त्यांना सदैव असे वाटे की ''त्रासाशिवाय/कष्टाशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होत नाही. तसेच ज्ञान हे स्वत:च्या त्यागाशिवाय साध्य होत नाही.'' अशा देशभक्त महाराजांनी बडोदा येथे बडोदा ग्रंथालय क्लबच्या सभेत ग्रंथपालांना पुढील शब्दात समुपदेशन केले होते.

''आपले कर्तव्य आणि जबाबदाऱ्या या अत्यंत महत्त्वपूर्ण असून त्यांची योग्यता मॅजिस्ट्रेट आणि विभागीय आयुक्त यांच्याहून श्रेष्ठ आहे.''

अशाप्रकारे ग्रंथालयाचे महत्त्व जाणणारे व ग्रंथालयाच्या कामाचे स्वरूप व उपयुक्तता जाणणारे महाराज श्री. बोर्डन यांच्या कामाबद्दल खूपच समाधानी होते. म्हणूनच त्यांनी नमूद केले होते,

''श्री बोर्डन यांनी या कामाचे महत्त्व ओळखले असून ते बाल ग्रंथालयाविषयाच्या आपल्या कल्पना कर्मचारी वर्गाच्या सहाय्याने प्रत्यक्षात आणतील असा मला विश्वास वाटते. *(सयाजीराव (तिसरे) महाराजा ऑफ बडोदा स्पीचेच अँड अ‍ॅड्रेसीस, लंडन, मॅकमिलन १९२८, पृ. ५२०)*

एकूणच ग्रंथालयांचे असाधारण महत्त्व महाराजांनी ओळखले होते. त्यांची विचारधारा सार्वजनिक ग्रंथालये आणि शालेय शिक्षण यांची सांगड घालूनच शिक्षणाचा प्रसार केला तर ते अधिक संयुक्तिक ठरेल अशाप्रकारची होती. सार्वजनिक ग्रंथालये ही केवळ शिक्षणाशी जोडण्यापेक्षी ती एक शिक्षणाचे अविभाज्य घटक होत. अशाप्रकारे सार्वजनिक ग्रंथालयांचे नाते शिक्षणाशी जोडले गेले पाहिजे. केवळ काही विषयांच्या ज्ञानाशी संबंधित ग्रंथांची खरेदी करणे आणि त्या त्या विषयाच्या ज्ञानापुरताच ग्रंथालयांचा वापर करणे अशा प्रकारचा दृष्टीकोन बदलून ग्रंथालयांतर्गत सर्व प्रकारच्या ज्ञान साधनांचा, ग्रंथांचा वापर ग्रंथालयाच्या ज्ञानसंग्रहण वातावरणात करणे गरजेचे असल्याने , शिक्षण क्षेत्रातील ग्रंथालयांची अतीव गरज विचारात घेऊनच शिक्षणाचे अभियान राबविले पाहिजे. अशी महाराजांच्या सारखी अशी सखोल विचारसरणी इतरांच्यात क्वचित आढळते. वर्तमानकाळातील वास्तव्याचा विचार करून भविष्यातील वाटचालीकरिता काहीही करताना संबंधितास भूतकाळाची जाणीव हवी. तसेच इतर व्यक्ती ही याच समान स्तरावर काय करत आहेत याचेही भान हवे.

अशा भानामुळे कोणत्याही भविष्यकालीन अथवा विद्यमान योजनांची आखणी, अंमलबजावणी करणे शक्य होते. ते संयुक्तिक ठरते आणि असे भान अथवा अशी जाण येण्यासाठी, निर्माण होण्यासाठी अद्ययावत व सुव्यवस्थीत ग्रंथालयाची नितांत गरज आहे, याची अंतरिक तळमळ महाराजांच्या मनात रुंजी घालत असे. म्हणूनच बडोदा राज्यातील शिक्षणाचा प्रसार करताना महाराजानी हा दृष्टीकोन समोर ठेवून गावोगावी ग्रंथालय स्थापनेस चालना दिली होती.

या संदर्भात राव बहाद्दूर व्ही. टी. कृष्णमाचारी यांनी बडोद्यातील शिक्षणाशी संलग्नित ग्रंथालयाचा विकास या बाबीचे विशेष कौतुक करून नमूद केले होते की,

''बडोद्यातील ग्रंथालय चळवळ ही सर्वांसाठीचे शिक्षण योजनेचा एक भाग म्हणून अत्यंत काळजीपूर्वक आखलेली योजना महाराजांनी १८९३ मध्ये सुरु केली होती. ही योजना राज्याच्या अमरेली जिल्हा परीसरातील प्रायोगिक तत्वावर सुरु केली व हळुहळू या योजनेचा विस्तार करून १९०७ पर्यंत सर्व राज्यभर मोफत प्राथमिक शिक्षणाचे अभियान राबविले. महाराजांना याची पुरेपूर जाणीव होती की सक्तीच्या शिक्षणास ग्रंथालयाची जोड नसल्यास ते कुचकामी ठरेल'' अशी नोंद करताना कृष्णामाचारी पुढे म्हणतात,

His Highness soon realised that Universal eduucation required as an essential suppliment to it a network of free public libraries which would keep litteracy alive and enable men and women in rural areas to have access to sources of knowledge not hitherto open to them. Libraries should not limit their benefits to the English, knowing readers but should see to it many that their good work permitted through to the many and that Vernacular libraries should be encourages so that every citizen of the state may enrol himself as a pupil in the people University" *(The library Newotn Mohan Dut, Baroda and its libraries, Baroda. Central Library 1927 (PXXii))*

**सयाजीराव महाराजांचे स्फूर्तीस्त्रोत्र कारनेज (Carnegie) :**

कार्नेज प्रतिष्ठानकडून मिळणारा निधी आणि बडोदा राज्याचे आर्थिक सहाय्य या संदर्भात तौलनिक मांडणी करताना श्री. वाकनीस नमूद करतात ''कायमस्वरुपी ग्रंथालय

इमारत बांधण्यासाठी कार्नेज निधी उपलब्ध करून देत असे पण बडोदा राज्याकडून कायमस्वरुपी वा सातत्यपूर्वक निधी दिला जात नसे. हे खरे नव्हते. जे बडोदा राज्याकडून प्राप्त होई ते कर स्वरुपातील निधीमधूनच. हा पैसा लोकांनी दिलेल्या करातूनच जमा झालेला असे. कार्नेजबाबत अशी स्थिती नव्हती, कारण ज्या संस्थानात ग्रंथालये उभी केली त्या संस्थानाचे ते शासक नव्हते. कार्नेज यांनी जे समाजास दिले ते स्वतःच्या कमाईतून. म्हणून सातत्यपूर्वक राज्याकडून निधी उपलबध करुन दिला जावा याचे समर्थन वाकनीस यांनी केले नव्हते.

ग्रंथालयासंदर्भातील कर आकाराणी बडोदा राज्यामध्ये अप्रत्यक्षपणे केली जाई. राज्याकडून व स्थानिक मंडळाकडून मिळणारा निधी हा लोकांच्या करातून प्राप्त झालेला असे. सर्वसाधारण फंडाकरिता वर्गणी भरून लोक स्वतः ग्रंथालयाचे मालक, व्यवस्थापक व चालक झाले. ही बाब महत्त्वपूर्ण होय. तशीच ती खटकणारीही आहे. महत्त्वाचे म्हणजे सयाजीराव महाराज हे कार्नेज यांच्या उदार दातृत्वाने प्रभावीत झाले होते. दोघांचाही हेतू एकच होता तो म्हणजे बालपणी जे या दोघांना प्राप्त झाले नव्हते ते त्यांनी लोकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. कार्नेज यांच्या महाराजावरील प्रभावासंदर्भात श्री. आर. पी. मसानी यांनी आपल्या Sayajirao Gaikwas A few Reminisences - Commensrution या लेखकाने पुढील प्रमाणे नोंद घेतलेली आहे.

'The reasons to recall Carnegia Gospel of Wealth is to indicate the inpetus given by the American Millionaries in Sayajirao's days to the provision of free libraries.'

याचबरोबर बॉम्बे सोशल सर्व्हिस लेग्यू (मुंबई सामाजिक सेवा संघ) यांचादेखील बडोद्यातील ग्रंथपालांनी सन्मानपूर्वक उल्लेख केलेला आहे. यामागची धारणा अशी की, या संघाने सुरु केलेली 'फिरती ग्रंथालये सुविधा' ही अभिनव संकल्पना होय. या संघाच्या सचिवानी याकरिता बडोदा व अमेरिका, यांचे आभार व्यक्त केले होते. एकूणच महाराजांना त्यांच्या युरोप भेटीत, शिक्षण आणि ग्रंथालय विषयक जे उत्तम वाटले, आढळले ते त्यांनी आपल्या प्रजेकरीता उपलब्ध करून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यासाठी नवनव्या

सुधारणांचा त्यांनी ध्यास घेतला. महाराजांच्या या भविष्यवेधी कार्याची दखल तत्कालीन ग्रंथालय व शिक्षण क्षेत्रातील तज्ञानी व मान्यवरांनी घेतल्याचे दृष्टोत्पतीस येते.

**ग्रंथालय शास्त्राच्या शिक्षणाविषयी सयाजीराव महाराजांचा दृष्टीकोन :**

नोव्हेंबर १९१२ मधील बडोदा लायब्ररी क्लबच्या एका सभेत बडोदा कॉलेजचे प्राचार्य क्लार्क यांनी ग्रंथालय शास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याविषयी सूचना केली होती. या सभेस स्वतः महाराज उपस्थित होते पण त्यांनी आपण एक श्रोता म्हणूनच केवळ या सभेत उपस्थित राहिल्याचे नमूद केले होते. या सभेत भारतातील उपस्थित अधिकाऱ्यांनी व विभागप्रमुख यांनी ग्रंथालय शास्त्राच्या शिक्षणाची भारतातील आवश्यकतेबाबत चर्चा सुरु केली व असा अभ्यासक्रम बडोदा कॉलेजमध्ये सुरु करावा यासाठी आग्रह धरला. हा आग्रह धरताना त्यांनी बडोदा राज्यातील ग्रंथालय चळवळ ही देशात अग्रेसर असल्याने ग्रंथालय शास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानही बडोद्यासच मिळावयास हवा असे मत प्रतिपादन केले. तसेच देशातील इतर राज्यानी बडोदा कॉलेजकडे अशा प्रशिक्षित मनुष्यबळाबद्दल चौकशी केली असल्याचे नमूद केले असता या प्रस्तावास उचलून धरताना दोन वर्षाचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची आवश्यकता याकरिता श्री. बोर्डन हे फारच आग्रही असून, असे प्रशिक्षित मनुष्यबळ देशातील इतर राज्यात उपलब्ध करून देण्यासाठी श्री. बोर्डन यांची उत्सुकतेची जाणिव महाराजांना झाली. तसेच प्रत्यक्ष बोर्डन यांचे अमेरिकेतील कामही महाराजांना ज्ञात असल्याने त्यांनी याप्रसंगी आपली श्रोत्याची भूमिका सोडून पुढील विचार मांडले.

**श्रीमंत महाराज गायकवाड यांचे विचार :**

''मी या सभेला केवळ श्रोता या नात्याने आलो होतो परंतु व्याख्याते व अध्यक्ष यांचे ग्रंथालयशास्त्राच्या शिक्षणासंबंधी उद्गार ऐकून मलाही बोलण्याचा मोह उत्पन्न झाला. अशाप्रकारच्या वर्गाची हिंदुस्थानात अत्यंत जरुरी आहे व बडोदे संस्थानातील पुस्तकालयासंबंधाच्या व्यापक चळवळीमुळे बडोदे कॉलेजमध्येच असा वर्ग उघडणे अत्यंत इष्ट दिसते. अशा वर्गातून शिक्षण मिळविलेल्या ग्रंथालयशास्त्र विशारदांची सर्व देशात लवकरच जरूर भासणार आहे. आपल्या संस्थानाने घालून दिलेल्या धड्याचे अनुकरण

करण्यास बरीच देशी संस्थाने तयार आहेत व त्यापैकी कित्येकांकडून या कामात निष्णात अशा माणसांची मजकडे मागणीही आली आहे. परंतु मला माहीत आहे की, मि. बॉर्डन हे बडोद्यातील ग्रंथालयांच्या कामात अत्यंत मग्न असल्यामुळे त्यांना आपल्या मदतनीसांना इतर ठिकाणी अशा कामाकरिता मग हे काम कितीही जरूरीचे असो, पाठविता येणे शक्य नाही. परंतु त्यांना या कामात अतिशय उत्साह वाटत असल्यामुळे सर्व देशात या कार्याचा प्रसार करतील इतर लोकांना ते शिक्षण देऊन तयार करू शकतील. अशा रितीने मि. बॉर्डन यांच्या ग्रथालयप्राविण्याचा व तद्नुषंगिक विषयात बडोदे कॉलेजाकडून होणाऱ्या मदतीचा जर फायदा घेतला तर सर्व देशास अत्यंत हितकर अशा एका संस्थेची स्थापना करता येईल पण ही कल्पना काही नवीन नाही. मि. बॉर्डन जेव्हा प्रथम बडोद्यात आले तेव्हा पुस्तकालयशास्त्रात मोफत शिक्षण देण्याची या संस्थानाची तयार आहे अशाबद्दलची खबर सर्व ठिकाणी दिली होती. परंतु दुःखाची गोष्ट की याचा फायदा घेण्यास फारच थोडी मंडळी पुढे आली त्यांची संख्या फक्त बडोदे राज्यासच पुरी पडण्याइतकी होती. ज्यांनी या संधीचा फायदा घेतला नाही त्यांना ग्रंथालयकार्याचे महत्त्व कळण्याइतकी दूरदृष्टी नव्हती असे दुःखाने म्हणावे लागते परंतु सुदैवाने आता पुन्हा एक अमूल्य संधी आली आहे.''

श्री महाराज आणखी म्हणाले की, ''ग्रंथालयाचे दोन प्रकार आहेत, इंग्रजी व देशी. दोहोंचाही प्रसार करणे इष्ट आहे. इंग्रजी पुस्तकालयाचा लाभ सुशिक्षितांसच मिळतो. बहुजनसमाजास मिळणे शक्य नाही. ग्रंथालयाने आपल्या ज्ञानामृताचा लाभ इंग्रजी जाणणाऱ्यापुरताच मर्यादित न करता बहुजनसमाजासही तो देण्याचा प्रयत्न करावा. यासाठी देशी ग्रंथालयांचा प्रसार होणे इष्ट आहे. यासाठी आपल्या राज्यात खेड्यापाड्यात ग्रंथालये स्थापन करण्याचा माझा उद्देश आहे. परंतु या योजनेस लोकांनीदेखील आपल्या शक्तीप्रमाणे मदत करणे जरूर आहे. कोणतीही गोष्ट श्रमाशिवाय साध्य होत नाही. स्वार्थत्यागाशिवाय ज्ञानप्राप्ती होणे शक्य नाही. हिंदुस्थान देश निर्धन आहे व त्याच्या गरजा बऱ्याच आहेत. परंतु या परिस्थितीस धैर्याने तोंड दिले पाहिजे. प्रत्येक जनसमाजाने आपल्या परिस्थितीने बद्ध न होता तिच्या बाहेर येण्याचा प्रयत्न केला पाहिजे व अधिकाधिक ज्ञान मिळविणे ही आपली सर्वांत मोठी गरज आहे, व सर्वांत मोठी उणीव आहे, अशी भावना त्यास झाली

पाहिजे. त्यांना पुस्तकांची म्हणजे चित्ताकर्षक बाह्यांगाची किंवा सुंदर चित्रांची नव्हे तर त्यातील विषयांची आवड वाटू लागली पाहिजे. पुस्तके आपल्या जीविताचे एक अत्यंत अंग आहे अशी त्यांना जाणीव झाली तरच पुस्तकालये ही निवळ चैनींची साधने नसून आपल्या जीवनास त्यांची अत्यंत जरुर आहे असा समज उत्पन्न होईल. जीवन दोन प्रकारांचे आहे, शारीरिक व मानसिक दोहोंचीही प्रत्येकास जरुरी आहे. परंतु आयुष्य सुखी व सार्थक निवडण्यास मानसिक जीवनाची अत्यंत जरुरी आहे. मानसिक जीवनाच्या अभावी आपणास बऱ्याच निसर्गदत्त सुखांस व संधीस मुकावे लागते. आपल्या सर्व शक्ती विकसीत झाल्या नाहीत, तेव्हा आपण त्यांचा विकास केला पाहिजे व इतरांस तेच करण्यास शिकवले पाहिजे. ह्याच कार्यासाठी पुस्तकालयांचा जन्म आहे. ह्याच कार्यासाठी तुम्हा सर्वांची (ग्रंथालयाधिकाऱ्यांची) जरुरी आहे. तुमची कामगिरी व जबाबदारी फार मोठी आहे. न्यायाधिश व सुभे (कलेक्टर) ह्यांच्याहून ही मोठी आहे. तुम्ही सर्व समाजाचे सेवक आहात. तेव्हा पुस्तकांचा अधिकाधिक लाभ घेण्याकडे त्यांची मने वळवा व पुढील पिढ्यांना आधारभूत अशा बालक वर्गांकडे तुमचे विशेष लक्ष असू द्या. शेवटी वाचकवर्ग, मग तो कोणत्याहि दर्जाचा किंवा वर्णांचा असो, त्यांच्याशी प्रेमळ व विनयपूर्ण वर्तन ठेवणे हे तुमचे आद्य कर्तव्य आहे व ह्यावर तुमच्या कामाचे पूर्ण यश अवलंबून आहे. *(लायब्ररी मिसलेनी, पुस्तक १, फेब्रुवारी १९१३, पृ. ४४ ते ४६ )* महाराजांना ग्रंथालय चळवळीबद्दल ग्रंथालय शास्त्राच्या शिक्षणाबद्दल तळमळ होती. त्याच बरोबर लोकांच्याकडून सर्वस्तरावर प्राप्त होणारा प्रतिसाद याबाबतच ते काहीसे नाराज होते. सर्वदूर साक्षरता प्रसाराकरिता शिक्षणाबरोबरच ग्रंथालयांची गरज त्यांनी पूर्णतः ओळखली होती. लोकांना हे कळत असूनही वळत नव्हते. याचीच खंत महाराजांना होती. म्हणूनच आपली नाराजी व्यक्त करतानाही त्यांनी श्री. बोर्डन व श्री. क्लार्क यांच्या सहकार्याने एक नवे यशस्वी अभियान सुरु होऊन समाजातील निरक्षरता कमी होईल असा विश्वास व्यक्त केला होता. असे असतानाही बडोदा महाविद्यालयातील ग्रंथालय शिक्षणाचे प्रथम अभियान मात्र प्रत्यक्षात येऊ शकले नाही.

श्री. जयसिंगराव ग्रंथालयाचा हिरक महोत्सवी समारंभ २६ डिसेंबर १९३७ रोजी संपन्न झाला. याप्रसंगी काहीएक बोलावयाची त्यांची इच्छा नव्हती पण या समारंभप्रसंगी व्याख्यात्याने जगातील ग्रंथालयाचे एका विशिष्ट पद्धतीचे कुतुहलजनक चित्र उभे केल्यानेच महाराजांना याप्रसंगी आपले विचार मांडण्याचा मोह आवरता आला नाही. ते उद्गारले–

''याप्रसंगी मला पूर्वीच्या विविध प्रसंगांची आठवण होत आहे. या ग्रंथालयाची स्थापना झाली त्यावेळचा या ग्रंथालयालगतचा परिसर मला चांगलाच आठवतो. हा परिसर एखाद्या बजबजपुरीसारखा होता. आजुबाजूला गल्लीबोळ आणि अंधाऱ्या गल्ल्या. अस्ताव्यस्त अनाकर्षक दुकाने, चमत्कारीक घरे आणि भाड्याच्या जागा, देवळे हे सारे इतके ओंगळ होते की या परिसरातून जाणाऱ्या पादचाऱ्यांना तो अनारोग्यकारक व अस्वस्थ करणारा होता. पण आज हेच बदलते चित्र आनंददायी, आल्हाददायक दिसत आहे. आपले शहर हे विस्तृत रस्ते आणि दुतर्फा लावलेली रेखीव झाडे व पथकदर्शक फलक यामुळे आकर्षक दिसत आहे. उंच, भव्य इमारती, विविध शाळा व त्यांच्या रेखीव वास्तू याचबरोबर आधुनिक पद्धतीची जीवनशैली जे आज आपण अनुभवत आहोत. माझ्या मते हा केवळ भास नसून हे सारे आकर्षक व आनंददायी आहे. ही पार्श्वभूमी विषद करून त्यांनी व्याख्याते फादर हर्ष यांच्या व्याख्यानाचाच निर्देश करत त्यांनी सुस्पष्ट केले की ''मी माझ्या प्रजेचे, लोकांचे कल्याण करण्यामध्ये काही अंशी यशस्वी जरुर झालो आहे. आपणा सर्वांनाच जीवनात समानसंधी मिळत नाही हे खरेच. तसेच आपण अपेक्षिलेले समाधान – मनोरंजन आपणास हवे तसे प्राप्त होत नाही. पण मी माझ्या मर्यादेत जे काही उत्तम केले आहे त्यात मी समाधानी आहे आणि मी हे नमूद करताना मला अतिशय आनंद वाटतो की, मी माझ्या लोकांकरिता ग्रंथालयाचे जाळे उभे केले. याद्वारे एक आकर्षक बदल बाह्यरूपात सांस्कृतिक आणि सामान्यज्ञानात करु शकलो.'' पुढे ते म्हणाले,

''फादर हर्ष यांनी विविध स्वरूपांचा ग्रंथसंग्रह आणि हस्तलिखिते यांचे विविध काळातील व राष्ट्रातील संग्रहाचे आकर्षक स्वरूपात वर्णन केले आहे. या संग्रहामुळे ज्ञानाचा प्रवाह सर्वत्र पसरून त्याद्वारे मानवतेच्या जीवनात प्रकाश व आनंद पसरलेला आहे. ज्या स्पेन या विभागातून आजचे व्याख्याते श्री. हर्ष हे आलेले आहेत त्या प्रदेशातील प्राचीन, महत्त्वपूर्ण

वैशिष्ट्ये राजकीय उद्रेकामुळे पूर्णत: नष्ट झाली आहेत. तिची उपेक्षा झाली आहे. आपण अशी अपेक्षा करुया या सर्वच अडचणी लवकरच दूर होतील आणि कोणताही व्यत्य न येता तेथे शांतता नांदून स्पेनमधील प्राचीन संस्कृती आणि सुधारणा यांचे संरक्षण केले जाईल.

प्राचीन काळात भारतीय संस्कृतीद्वारे जगाला प्रकाश दिलेला होता. पण मधल्या अत्यंत अंधाऱ्या आणि अज्ञानाच्या काळात भारत ही परंपरा जपण्यामध्ये अयशस्वी ठरलेला आहे. तसेच भविष्याकरतादेखील योग्य असे नियोजन ही याबाबत भारतास करता आलेले नाही. आपल्याला जर जागतिक स्तरावरती आपल्या दैनंदिन जीवनात शांतता निर्माण करावयाची असेल तर आपण अधिकाधिक ज्ञान संपादन करणे आणि त्याचा सर्वदूर प्रसार करणे ही फार मोठी गरज आहे.

आपण आपली प्रगती इतर लोकांच्या सान्निध्यात आल्याशिवाय योजता येणारी नाही. आपण इतरांनी साध्य केलेल्या बाबींचा परिचय करून घेतला पाहिजे. याकरिता आपण आपल्या आजुबाजूच्या व दूरच्या देशाचा प्रवास केला पाहिजे आणि केवळ याचप्रकारे आपण आपली ज्ञानक्षेत्रे विस्तारु शकू व आपण कोठे आहोत हे जाणून घेऊन मगच आपल्याला भविष्यातील प्रगतीकरिता कोणता मार्ग स्विकारायचा ते ठरविता येईल. हे खरे आहे की, वाचन आणि अभ्यास याद्वारे अधिक ज्ञान प्राप्त करता येते. आपल्या व्यवसायासाठी हे ज्ञान उपयुक्त ठरेल. निसर्गात: सर्व सुधारणा आपल्यासाठी चांगल्या असतील असे नाही. त्यातील काही अव्यवहारी असतील पण इतरांच्या ज्या चांगल्या सुधारणा व पद्धती आहेत त्याचा अभ्यास करून, त्या स्विकारुन आणि आपल्या गरजेनुसार त्यामध्ये बदल करून आपण आपल्यामध्ये सुधारणा करु शकतो.

आपल्याला असे ज्ञात आहे की, काही एक फेरबदलामुळे व अनेक स्थित्यंतरावरून आपला देश गेलेला आहे आणि या काळातील पराभवामुळे आपली प्रगती होऊन एक राष्ट्र म्हणून आपल्या देशाचा विकास थांबलेला होता. आपल्या देशाच्या मागासपणाबद्दलची माझी भावना अशी आहे की अज्ञान आणि अनैसर्गिक स्वरूपातील समाजातील वर्गवारी हेच याचे मुलभूत कारण आहे. आपल्या देशाच्या ३५ कोटी लोकसंख्येमधील आपले निरक्षरतेचे प्रमाण धक्कादायक आहे. हाच विचार आपल्याला खरे तर आपणास लाज व आपला

थरकाप उडण्यास पुरेसा आहे. यासाठी आपली मुलभूत गरज ही अत्यावश्यक. ही शिक्षण व ज्ञानप्रसार आहे. हेच उद्दिष्ट समोर ठेऊन मी पुष्कळशा शाळा आणि ग्रंथालय सुरु केलेली आहेत. मी आपणास विनंती करतो या सर्वांचा पुरेपूर लाभ आपण घ्यावा.

आपण खरोखरच आपल्या प्रगतीसंदर्भात आसुसलेले असून त्यासाठी आपण खूप काम केले पाहिजे व धडपडले पाहिजे. यासाठी पाश्चात्यांनी वापरलेल्या पद्धतीचा अभ्यास करून हे ज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारून आपल्या विविध धार्मिक व राजकीय समस्या सोडविण्यासाठी त्याचा वापर करा. मी आपणास विनंती करतो आपल्यातील चुकीच्या धार्मिक चालीरिती व मते मतांतर सोडून द्या. तसेच आपल्यातील दुर्गुणाचा त्याग करा. खरे तर हे सारे आपल्या पारतंत्र्याचे फळ आहे. आपल्याला सौख्य आणि आरोग्य प्राप्त करून देणाऱ्या सुधारणा स्विकारताना कुचराई करु नका. त्या नाकारु नका. आनंद आणि भरभराट मग ती एका व्यक्तीची किंवा समाजाची असू देत ती प्रामुख्याने ज्ञानार्जनावर अवलंबून असते.

आपल्या अंत:करणातील उदारता आणि ज्ञानाचे एकत्रीकरण याद्वारे आपण सर्व ईश्वराची लेकरे आहोत याचा बोध आपणास होईल. आपल्याला जेव्हा सर्वार्थाने सत्याची जाणीव होईल तेव्हाच आपण मानवतेसाठी सेवाभावी वृत्तीने काम करु शकतो हेच उद्दिष्ट आपल्या नजरेसमोर ठेवून तुमच्यातील अंतर्मनाच्या प्रकाशानुसार तुम्ही सदैव कार्यरत रहा. आपल्या प्रत्येकाकडे काही प्रमाणात शक्ती असते पण खरी शक्ती ही एकतेमध्ये सामावलेली असते. अशी शक्ती प्राप्त करून इतरांसाठी कार्यरत रहा. तुम्ही स्वत:ला चांगले बनवून समाजासाठी काम करा. मग प्रगती आपल्या पाठोपाठच येईल.

आपल्यात एकता निर्माण करण्यासाठी आपल्यातील जात, धर्माचे भेद विसरून राष्ट्र या भावनेने एकत्र या. अशाप्रकारे आपल्या देशाबद्दलची कळकळ व्यक्त करून महाराजांनी आपल्या मुलाचे नाव 'जयसिंगराव' ग्रंथालयास देऊन उल्लेख केला आहे. त्याला हॅरोवर हार्वड (युएस) येथे शिक्षणासाठी पाठविल्याचा उल्लेख करून आपल्याला विद्यापीठ दर्जाचे शिक्षण घेता न आल्याची खंत व्यक्त करून आपण ज्ञानप्राप्त करण्यासाठी आपल्याला प्राप्त असलेल्या विविध स्तोत्रांचा अभ्यास घेतला. हे विशद करताना दर्जेदार ग्रंथाच्या

वाचनाचा उपयोग झाल्याचे त्यांनी नमूद केले. अशा व्यासंगातून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा वापर आपल्यासमोरील विविध दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी करून त्याद्वारे आपल्या प्रजेस सुखसमाधान प्राप्त होण्यासाठी महाराजांनी प्रयत्न केल्याचे स्पष्ट केले. महाराजांचे वाचन विषयक धोरण या विचारधारेतून स्पष्ट झालेले असून ग्रंथ विषयाची जाणीव महाराजांच्या मनात किती खोलवर रुजलेली होती याची प्रचिती येते. महाराजांना ग्रंथालयाबद्दल असलेली आस्था सर्वश्रूत आहे व ग्रंथालयाच्या विकासासाठी सातत्यपूर्वक प्रयत्न करणेही त्याची मनिषा असली तरीदेखील एक राजा म्हणून ते तितकेच व्यवहारी होते. एक प्रशासक म्हणून ते कोणत्याही गोष्टीचा पाठपुरावा करताना अत्यंत दक्ष असत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पॅरीसहून महाराजांनी आपल्या दिवाणांना ग्रंथालयविषयक ७ जून १९३३ रोजी लिहिलेल्या पत्रातून हे सुस्पष्ट होते. या पत्रामध्ये,

१) ग्रामीण ग्रंथालये स्थापन करण्याविषयीचे धोरण आपण अंगिकारले आणि त्याकरिता प्रोत्साहन दिले. माझी इच्छा आहे की ही योजना संथगतीने पुढे न्यावी, याबाबत माझ्या मनात काही शंका आहेत. या संदर्भातील ताण पंचायती व राज्ये यांच्या तिजोरीवर पडेल. जरी एखादा घटक योग्य व छोटा असला तरीदेखील एकत्र विचार करता या संदर्भातील एकूण रक्कम अधिक असेल. असे असूनही प्राथमिक शाळेतून प्राप्त झालेले ज्ञान सार्थ ठरविण्यामध्ये जर हे आवश्यक असले तरीदेखील या घटकांचा विचार करणे गरजेचे आहे.

२) आपल्याकडे असलेल्या तुटपुंज्या पैशाचा खेड्यासाठी वापर करताना आपण काळजीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे. कारण अजून खेडयात पुष्कळ बाबी करणे गरजेचे आहे.

३) खेड्यातील ग्रामस्थांनी ग्रंथालयासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून न दिल्यास ग्रंथालय स्थापनेची योजना संथबुद्धीने सुरु ठेवा.

४) आजवर केलेल्या खर्चाचे मोजमाप करून आणि एकत्रित खर्च किती येईल हे पडताळून हा सर्व खर्च पंचायत व राज्याच्या आर्थिक विभाग यांच्यासमोर ठेवून त्यास मान्यता द्या.

५) मा. दिवाण यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहार म्हणजे महाराजांच्या चिकित्सक वृत्तीचा वस्तुपाठच होय. ग्रंथालय प्रसार हा त्याचा श्वास असला तरीदेखील त्याबाबत ते तितकेच व्यवहारी होते हे वरील उदाहरणावरून सुस्पष्ट होते.

बडोदा येथील सेंट्रल लायब्ररी उभारतानाही व बडोदा शहर सुशोभित करतानासुद्धा खर्चाच्या तपशीलाबाबत महाराज अत्यंत दक्ष होते हे त्यांच्या पत्रव्यवहारातून जागोजागी जाणवते. केवळ एखाद्या योजनेवर अमाप खर्च करणे हे महाराजांच्या धोरणात बसत नसे, ते करावयाचे भव्यदिव्य असे त्यांचे स्वप्न असले तरीदेखील महाराज असूनही उपलब्ध निधी व त्याची व्यवहारता याची ते सदैव पडताळणी करत असत.

महाराजांच्या बडोद्यातील ग्रंथालय चळवळीची दखल न्यूयॉर्क लायब्ररी असोशिएशनने देखील घेतलेली होती. सप्टेंबर २२ ते २७, १९१३ रोजी संपन्न झालेल्या त्यांच्या २३ व्या वार्षिक सभेत त्यांनी याबाबत पुढीलप्रमाणे एकमताने ठराव पारिध केलेला होता.

Sept 27. This was a day of Passing Several resolutions among which there was one of great importance to the library movement in Baroda. This was resolution put forth by Dr. Hill of Brooklyn Public Library for conferring on a choosen few the special honour of being electeditionary member of the New York Library Association. Among the choosen fre figured pre eminently H. H. he Maharaja of Baroda the Pioneer of free public library movement in India & Dr. Melvil Dewey the father of the modern library movement in America as also Mr. Kudalkar the present Director of State libraries of Baroda Dr. Putnam & Dr. Bostwick. This resolution which won carried unanimously amidst loud cheers indicators the high sense of appreciations of the work of the Maharaja Gaikwad & of the Library Department organised by him on the part of the library profession of America & is indeed very gratifying to the Baroda State."

तसेच महाराजांच्या शिक्षण विषयक व ग्रंथालयविषयक कार्याची स्तुती करताना बडोदा विद्यापीठाचे तत्कालीन श्री. जे. एम. मेहता यांनी पुढील आशयाचे मत विद्यापीठाच्या स्मरणीकेच्या प्रस्तावनेत नमूद केले होते.

''ब्रिटीशांच्या महासत्तेच्या अधिपत्याखाली भारतातील संस्थाने कार्यरत असताना त्यांनी कोणत्याही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याकरिता संस्थानांना प्रोत्साहन दिले नव्हते. भविष्यातील तौलनिक विचारावर अशी चर्चा होऊ नये ही त्यामागची ब्रिटीशांची भावना होती. या पार्श्वभूमीवर एक राज्यकर्ता या नात्याने सयाजीराव महाराजांनी केलेल्या सुधारणाची स्तुती करणे भाग पडले. याद्वारे महाराजांचे धैर्य आणि देशभक्ती निदर्शनास येते''

अर्थात आपल्या देशभक्तीच्या बदल्यात महाराजांना त्याची किंमत मोजावी लागली होती हे अलाहिदा. ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देण्याकरिता बडोद्यामधील ग्रंथालय चळवळीचे स्वरूप विशद करणारे महत्त्वपूर्ण साधन म्हणजे येथून प्रकाशित होणारे 'लायब्ररी मिसलेनी' हे त्रैमासिक होय. इंग्रजी, मराठी, गुजराती या भाषात प्रकाशित होणारे हे एक एकमेवाद्वितीय मासिक ऑगस्ट १९१२ मध्ये प्रकाशित झाले. त्याची दखल देशातील विविध प्रकाशनानी त्वरीतच घेतली होती. इंदू प्रकाशनाने त्याचा उल्लेख पुढील शब्दात केला होता.

'लायब्ररी मिसलेनी या नावाचे इंग्रजी, मराठी व गुजराती या तीन भाषेतील एक मासिक नुकतेच प्रसिद्ध होऊ लागले आहे. सदर खात्याच्या मुख्याधिकाऱ्याचे उत्साही सहाय्यक रा. कुडाळकर हे या उपयुक्त मासिकाचे संपादक असून लायब्ररीसंबंधाची विस्तृत उपयुक्त आणि नवीन माहिती या मासिक पुस्तकात देण्याचा त्यांचा विचार आहे. हिंदुस्थानात किंबहुना सगळ्या आशिया खंडात अशा प्रकारचे हे पहिलेच मासिक पुस्तक असावे' *(लायब्ररी मिसलेनी नोव्हेंबर १९१२ खंड १, क्र. २, पृष्ठ vii )* तर 'ज्ञान प्रकाश' ने याची नोंद 'वाचनालय कोठे व कशाकरिता स्थापन केले त्यातील ग्रंथसंग्रह कोणत्या दृष्टीने करण्यात आलेला आहे त्याची वर्गीकरणाची काय धर्ती आहे, लोकांना त्यातील पुस्तके मिळण्याची विशेष तजवीज काय केली आहे वगैरे संबंधीची माहिती मासिकाच्या किंवा पाक्षिकाच्या द्वारे लोकांना कळवून त्यांच्यामध्ये वाचनाची अभिरुची उत्पन्न करण्यात आल्याशिवाय वाचनालयाच्या उद्देशाची पूर्तता होत नाही. या अंकात (लायब्ररी मिसलेनी) वाचनालयासंबंधाने ठिकठिकाणची माहिती दिली आहे. मासिकाची वार्षिक वर्गणी २ रुपये असून ते लायब्ररी चालविणाऱ्यास व पुस्तकालये काढणाऱ्यास उपयुक्त झाल्यावाचून राहणार नाही' तसेच सरस्वती (हिंदी) The Dial of Chicago Library World England,

गुजराथी पंच सायंवर्तमान (गुजराथी), पंजाबी, पार्शी अशा विविध भाषेतील मासिकांनी व वृत्तपत्रांनी मिसलेनीची दखल घेऊन त्याची उपयुक्तता स्पष्ट केली होती. इंग्रजीतील लायब्ररीवर्ल्डने तर या उपक्रमाचे विशेष कौतुक पुढील शब्दात केले होते.

"We are glad to record the apperance of the Library miscellany, a new magazine devoted to the gutorer of Librarianship published at Baroda, India. It is printed in English, Gujarathi and Marathi and will thus be enable to circulate the greater part of India. We wish the Library Miscellany every sucess and trust that it will be the means of inducing many other Indian States to follow the example Baroda in providing easily accessible Libraries for the Public.

*(द लायब्ररी मिसलेनी, १९१२ अ.१, क्र. २, पृ.१)*

''लिटररी जनरल ऑफ अमेरिका'' हे एक उत्तम प्रिंटींगचा नमुना होता व तीन भाषेत प्रदर्शित होत असे या जर्नलमधील परंपरा, मुद्रणाच्या स्वरूपात जपत असताना लायब्ररी मिसलरी हे प्रकाशनाच्या दृष्टीने धोक्यात आले असता या नियतकालिकास महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी पुनश्च जीवनदान दिले. या संदर्भात प्रस्तुत मासिकाचे प्रकाशक श्री. बी. एम. दादाछानजी यांनी मिसलीनी संदर्भात महाराजांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे असल्याचे नमूद केले होते. परराज्याच्या ग्रंथालयविषयक आस्थेची अशाच एका घटनेची दखल या मासिकात घेण्यात आली होती. श्री. कुडाळकर हे बडोद्यातील एक ग्रंथालय अधिकारी यांना ग्रंथालयशास्त्राच्या उच्च शिक्षणासाठी युरोप, अमेरिका येथे पाठवून तेथील ग्रंथालय संघटनाचा अभ्यास करण्यासाठी महाराजांनी पाठविले होते. या संदर्भातील या उपक्रमाचे मिसलीनीद्वारे मे १९१३ च्या अंकात (पृ. १८) कौतुक पुढील प्रमाणे करण्यात आलेले होते.

''महाराज आपल्या परदेशी प्रवासात पुष्कळ काही शिकले आणि त्यांना परदेशी प्रवासात शिक्षण विषयक संस्थानचे महत्त्व पटले. त्यांच्या परदेशी दौऱ्यात त्यांच्याबरोबर मोठ्या संख्येने अधिकारी असत. त्याचबरोबर खर्चही पुष्कळ आला. याच पार्श्वभूमीवर त्यांनी बडोद्यातील सेंट्रल लायब्ररी डिपार्टमेंटचे श्री. जयेश कुडाळकर (उपसंचालक,

राज्यग्रंथालय–बडोदा) यांची अमेरिका व युरोपमधील ग्रंथालयाचा अभ्यास करण्यासाठी निवड केली. या घटनेचे कौतुक करताना पुढे असे नमूद केले होते की, 'हा क्षण एक संस्मरणीय क्षण असून भारतीय ग्रंथालयांच्या इतिहासात पहिल्यांदा एक व्यक्ती परदेश दौऱ्यासाठी जात आहे. याद्वारे भारतातील ग्रंथालयाच्या विकासाची नवी पहाट सुरु होईल' अशा आशयाचा आशावाद व्यक्त करून याकरिता महाराजांचे आभार व्यक्त केले होते.

**लायब्ररी मिसलेनी :**

एकूणच सयाजीराव महाराजांच्या सहकार्याने सुरु झालेले 'लायब्ररी मिसलेनी' हे मासिक सर्वार्थाने ग्रंथालय चळवळीला वाहिलेले तीन भाषेतील नियतकालिक हे भारतातील एकमेवाद्वितीय असे होते. या नियतकालिकातून ग्रंथालयाचा विकास महत्त्व देशातील व परदेशातील ग्रंथालये आणि त्यांचे उपक्रम याबाबत सातत्यपूर्व आढावा घेतला जात असे. त्यामुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभर सुरु असलेल्या ग्रंथालय चळवळीची माहिती भारतीय अभ्यासकांना उपलब्ध होत असे. आजही  ही माहिती उपयुक्त ठरणारी आहे.

**बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळ :**

महाराजांनी १९०७ मध्ये संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून शिक्षण प्रसारास चालना देताना ते सार्वत्रिक केले. शिक्षणाचे हे एक अभियान अधिक सक्षम होण्यासाठी व ते दीर्घकाळ टिकण्यासाठी 'जेथे शाळा तेथे ग्रंथालय' या नव्या उपक्रमाचे अभियान महाराजांनी आपल्या संस्थानातील पाच जिल्ह्यात सुरु केले व या राज्यात ग्रंथालय कायदा अस्तित्वात नसतानाही ग्रंथालय विषयक नियम तयार केले हे नियम केवळ दोनच होते.

१) अनुदानप्राप्त करणाऱ्या ग्रंथालयाने वाचकात मतभेद करायचा नाही.

२) एका गावी केवळ एकाच ग्रंथालयास अनुदान मिळेल. या अनुदानाची सुरुवात ग्राम ग्रंथालय –१०० रुपये, नगर ग्रंथालय – ३०० रुपये, जिल्हा ग्रंथालय – ५०० रुपये असे होते. या अनुदानातील ७०% ते ८०% रक्कम वाचनसाहित्य संग्रह खरेदी करण्यासाठी केले जाईल व उर्वरीत २०% रक्कम इतर खर्चासाठी वापरली जाईल.

ग्रामीण परिसरातील ग्रंथालयाशीसंबंधीत कामाचे स्वरुप पहाता, खेडेगावातील ग्रंथालयाचे काम तेथील प्राथमिक शिक्षकाकडे विनावेतन सोपवले होते. त्याला केवळ शिक्षकाचा पगार

मिळत असे. इतर जिल्ह्यात मॅट्रीकपर्यंत झालेले लोक काम करत तसेच ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे शिक्षण ही ते घेत. खेडेगावात फिरत्या ग्रंथालयाकरिता पुस्तके पुरविली जात त्यामुळे तेथील लोकांना नवनवीन पुस्तके वाचावयास मिळत. या पुस्तकाकरिता लोकांच्या रांगा लागत. वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करण्यासाठी फिरत्या शैक्षणिक चित्रपटाची सुविधा ग्रंथालयाद्वारे केली जाई. या उपक्रमामुळे वाचनास कंटाळलेल्या वाचकांबरोबरच वाचनाची नावड असलेल्या व्यक्ती, निरक्षर व्यक्ती या चित्रपटाकडे आकर्षित होत असत. हा उपक्रम खूपच लोकप्रिय झाला होता. लोकात ग्रंथालयाविषयी आपुलकी निर्माण व्हावी म्हणून ग्रंथालय उभारण्यासाठी लोक सहभागाचा आग्रह महाराजांनी धरलेला होता. त्यामुळे ही ग्रंथालये आपलीच आहेत असे स्थानिक लोकांना वाटत असे. प्रत्येक वाचकाला पुस्तक उपलब्ध झालेच पाहिजे यासाठी महाराजांनी सक्त सूचना केली होती. सर्वांना पुस्तक नाही असे म्हणण्याची वेळ येऊ देऊ नका अशी सक्त सूचना महाराजांनी केली होती. ग्रंथालयाचे एकूण कामकाज मुक्तद्वार स्वरूपाचे होते. कपाटात पुस्तके बंद करून ठेवण्यापेक्षा ती सेल्फवर ठेवली जात त्यामुळे वाचकांना सहजच पुस्तकाचे अवलोकन करणे शक्य होत असे. १९१० मध्ये बडोदा येथील ग्रंथालय विषयक महाराजांचा दृष्टीकोन भारतात एक ग्रंथालय क्षेत्राकरिता नवे चैतन्य घेऊन आला. ग्रंथालयास भेट देण्यासाठी पाहुण्यांना जाणीवपूर्वक आग्रह केला जाई. केवळ भारतातील नव्हे परदेशातील पाहुण्यांना बडोद्यास गेल्यावर जरुर तेथील निरनिराळ्या स्वरुपातील ग्रंथालये आवर्जून पहा अशा सूचना केल्या जात. ग्रंथालयातील सेवकांना वाचकांप्रती आदरभाव, जिव्हाळा, आस्था जपला जाई. शिवाय ग्रंथसंग्रहाची वर्गीकृत मांडणी आणि तेथील स्वच्छता हेदेखील उल्लेखनीय असे होते. या चळवळीमागे महाराज सयाजीराव खंबीरपणे उभे होते. त्यांना श्री. बोर्डन, कुडाळकर दत्त वाकनीस यांचे सहकार्य उत्तमप्रकारे लाभले होते. महाराजांच्या सदैव प्रोत्साहनाने ग्रंथालय क्षेत्रातील हे सर्व महर्षी त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रंथालयाच्या कामकाजाकरिता वेडे मुशाफिर बनले होते. त्यामुळे १९१०–११ साली बडोद्यातील सेंट्रल लायब्ररीचे उद्‌घाटन झाले तेव्हा त्याचे स्वागत भारतातील सर्वप्रथम जनता ग्रंथालय म्हणून झाले. सेंट्रल ग्रंथालयाची ही इमारत म्हणजे भव्य राजवाडाच होता. प्रशस्त दालने, सर्व भौतीक सुविधा, दर्जेदार

फर्निचर, भरपूर सूर्यप्रकाश, उत्तम वायुविजन यामुळे वाचकांना या ग्रंथालयाचा लाभ घेताना खूप आनंद होई. अशा सर्व सोईंनी युक्त असलेले ग्रंथालय मोफत होते. हे केवळ महाराजांच्या प्रोत्साहनाने व सहकार्याने साध्य झालेले होते. फिरत्या ग्रंथालयातील नवनव्या पुस्तकांचा भरणा असलेल्या पेट्या, त्याचबरोबर त्यासोबत मुलांचे खेळ, चित्रसंग्रह असे काहीसे करमणुकीस चालना देणारे साहित्य पाठविले जाई. प्रत्येक गावात या पेट्या साधारणपणे ३ महिने ठेवल्या जात व त्याची अदलाबदल होत असे. आपल्या संस्थानातील लोकांना सर्व पाश्चात्य देशातील सर्व आधुनिक ग्रंथालय सुविधा उपलब्ध व्हाव्यात हा दृष्टीकोन ठेवून याकरिता महाराजांनी आपल्या अमेरिकेतील प्रवासादरम्यान महागडे असे एक सिनेमॅटोग्राफ व मॅजिकल लॅटर्न यंत्र खरेदी केले होते तेही त्यांनी उदारपणे लोकांना दाखविण्याकरिता ग्रंथालय विभागाकडे दिले. या यंत्राचे काही प्रयोग ग्रंथालय व बडोदा कॉलेज येथे विद्यार्थ्यांसाठी केले होते व बाहेरगावीसुद्धा तसे प्रयोग करवून दाखविण्याचा उपक्रम आयोजित केला होता. या उपक्रमाद्वारे ज्या व्यक्तीला वाचता येत नसे त्यांना जगातील सुप्रसिद्ध स्थळाची, संस्थानाची व व्यक्तीची माहिती चित्राद्वारे देवून त्याच्या मनात शिक्षणाबद्दल आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाई. याकरिता स्टेरोओस्कोप व सिनेमॅटोग्राफ मॅजिकल लॅटर्न याचा उपयोग केला जाईल अशा आधुनिक सुविधांबरोबरच भारतातील संस्कृत वाङ्मयाबद्दल देखील महाराज आग्रही होते. बडोद्यामध्ये म्हैसूर, मद्रास, काशी, काश्मीर या ठिकाणाप्रमाणे दर्जेदार संस्कृत ग्रंथ बडोद्यामध्ये असावा असे वाटल्याने त्यांनी असा संग्रह एकत्रित करण्याचे प्रयत्न सुरु केले. याची प्राथमिक सुरुवात म्हणून पूर्वी विठ्ठल मंदिरात असलेला संस्कृत पुस्तकांचा संग्रह सेंट्रल लायब्ररीत ठेवण्यात आला. या संग्रहात श्रीमंत संपतराव यांनी स्वतःच्या ग्रंथालयातील जवळजवळ ७०० – ८०० संस्कृत ग्रंथांची भर घातली. सेंट्रल लायब्ररीमध्ये ग्रंथ वर्गीकरण सुरु केल्यामुळे या संस्कृत ग्रंथाचे वर्गीकरण करण्यासाठी मद्रासकडील एका शास्त्रींना बोलावून हा संग्रह पाहून त्या अंतर्गत विषयाचे योग्य पद्धतीने वर्गीकरण करण्यासाठी सूचना करण्याचे काम त्याच्याकडे सोपविलेले होते. ग्रंथालये चळवळीस अधिक सक्षम करण्यासाठी महाराजांच्या प्रेरणेने बडोदा लायब्ररी क्लबची स्थापना बोर्डन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. याचे उपाध्यक्ष श्री. जे. एस. कुडाळकर हे होते.

२१ ऑगस्ट १९१२ रोजी या क्लबच्या झालेल्या वार्षिक सभेत एकूण २६ सदस्यांनी या क्लबचे सदस्यत्व स्विकारले. या क्लबचे पुढे कामकाज जोमाने सुरु राहिले. ग्रंथालय विषयक व्याख्याने, नवनवीन उपक्रम याबाबत दर तिमाहीस चर्चा होई. या क्लबमधील बोर्डन यांचे पुस्तकालये लोकप्रिय कशी करावीत व श्री. अनंत कृष्णा शास्त्री यांनी जुन्या संस्कृत हस्तलिखिताचा संग्रह या विषयावर दिलेले व्याख्यान सुरुवातीस फारच उद्‌बोधक ठरले होते. या क्लबच्या सभांना प्रसंगी महाराज उपस्थित राहून ग्रंथालय विषयक आपले विचार मांडत असत.

महाराजांच्या ग्रंथालय विषयक कायद्याची दखल विविध परिषदा, संमेलने यामध्ये आवर्जून घेतली जाई. महाराष्ट्र साहित्य संमेलन व ग्रंथालय संघ १९१२ मध्ये अकोला येथे भरले गेले होते. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष रा. ब. महाजनी यांनी याप्रसंगी महाराजांची ग्रंथालय विषयक कार्याची दखल घेताना पुढील उद्‌गार काढले होते ''ग्रंथालयातील बरीचशी चांगली पुस्तके कपाटात पडून राहतात, त्यांची योग्यता समजावून घेणे, त्याचा प्रचार वाचकवर्गात करणे, सारस्वताचे मार्मिक रितीने अध्ययन करवणे, वाचक वर्गाची संख्या वाढवून त्याची वृद्धी, सक्षम व विवेकी करणे, त्यांच्या मनात उदार कल्पनाची वाढ करणे ही कामे ग्रंथसंग्रहालयप्रवर्तकाची आहेत याची जाणीवही कित्येकास नव्हती. ती उत्पन्न करण्याकरिता श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी ही योजना केली. ती हिंदुस्थानात अपूर्व आहे या कामी (लायब्ररी मिसलेनी) म्हणून तेथील ग्रंथसंग्रहालयाचे अधिकाऱ्यामार्फत मासिक निघण्यास सुरुवात झाली आहे. त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.''

*(लायब्ररी मिसलेनी, नोव्हेंबर १९१२ , पुस्तक १, अंक २, पृष्ठ ३५)*

महाराजांना व्यक्तीची पारख नेमकेपणाने होती याची उदाहरण म्हणजे ग्रंथालयाच्या प्रसाराकरिता श्री. बोर्डन यांची केलेली निवड व श्री. वाकनीस यास अमेरिकेतील ग्रंथालय शास्त्राच्या प्रशिक्षणास पाठविणे. याचेच आणखीन उदाहरण म्हणजे मोतीभाई अमीन यांची 'असिस्टंट ऑपरेटर ऑफ गव्हर्मेंट लायब्ररीज' या पदावर केलेली नेमणूक होय. श्री. मोतीभाई हे मुळचे गुजराथमधील खेडा जिल्ह्यातील चरोतरचे. मॅट्रीकचे शिक्षण घेताना १८९४ साली त्यांनी अकरा विद्यार्थ्यांच्या सहकार्याने या साहित्यप्रेमी विद्यार्थांच्या समाजाचे

सार्वजनिक वाचनालयात रूपांत केले' *(भागवत स्त्रिया व कमान अविनाश (२००४) इथे सयाजी जेथे नगरी, मातृमी सेवा ट्रस्ट, मुंबई, पृ. १६६)* पुढे ते बडोद्यातील पाटण शहरात शिक्षक झाले. तेथेही तयांनी मुलांना वाचनाची गोडी लावली व तेथील फतेसिंहराव वाचनालाच्या माध्यमातून पुस्तकप्रेमी मंडळ स्थापन केले. त्यांच्यातील हे शिक्षणाविषयीचे पुस्तकप्रेम पाहून महाराजांनी त्यांची नेमणूक तारेचे असिस्टंट क्युरेटरपदी केली होती. महाराजांच्या या निर्णयाचे सर्वांनाच आश्चर्य वाटले होते. १९१० मध्ये बोर्डन यांची बडोद्यास येऊन आशिया खंडातील सर्वात मोठ्या 'सेंट्रल लायब्ररी' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची आखणी केली होती. या कामात बोर्डन व्यस्त असल्यामुळे व ग्रंथालयांचा खेडोपाडी प्रसार करण्याच्या प्रकल्प भाषेतील अडसरामुळे महाराजांनी ग्रामीण ग्रंथालयाचा प्रकल्प गतीमान करण्यासाठी मोतीभाईंची सत्वर याकरिता निवड केली होती. या पार्श्वभूमीवर 'संस्थानव्यापी ग्रंथालयाच्या प्रकल्पासाठी मोतीभाईंची खेडोपाडी भ्रमंती सुरु झाली. कोणत्याही गावास ग्रंथालय अगदी फुकट प्राप्त झाल्यास त्यांची किंमत वाटणार नाही या विचाराने महाराजांनी गायकवाड सरकार अर्धा खर्च करील व अर्धी जबाबदारी प्रजा व ग्रामपंचायत यांनी उचलावी असे धोरण ठरवले. वस्पे व पेटलाद येथे अशी कामे मोतीभाईंनी केलीच होती. नव्या गावात जाताच ते वाचन सुशिक्षित तरुण गोळा करून त्यांना या योजनेचे महत्त्व पटवून देत. ग्रामस्थांनी जमवल्याच्या निधीची शुभसुरुवात ते स्वतःच्या देणगीने करत. सरकारी अधिकारी असून प्रजेस स्नेहभाव निर्माण करत, पाहता पाहता ते अपरिचित लोकांचे स्वजन बनत. दोनच वर्षात त्यांनी चारशे नवी पुस्तकालये निर्माण केली. त्यांनी प्रजेस वाचनाची इतकी गोडी लावली की पुस्तकांचा खप जबरदस्त वेगाने वाढू लागला. बडोदा राज्यात ४.३५ लक्ष साक्षर प्रजा आणि ग्रंथालयात ९.०७ लक्ष पुस्तके अशी परिस्थिती निर्माण झाली. ग्रंथालयाच्या सभासदांची संख्या होती १.४९ लक्ष *(इये सयाजीचिये नगरी, पृष्ठ १६८)*

मोतीभाई बडोद्यास गेल्यावर पुढे २ वर्षानी बोर्डन अमेरिकेला जाताना ग्रंथालय प्रकल्पाची सूत्रे मोतीभाईंच्याकडे सोपवून गेले (पुढे मोतीभाईंचा गौरव करताना अखिल हिंदी पुस्तकालय परिषदेने १९३३ साली त्यांना ग्रंथपाल उद्यम पितामह ही पदवी बहाल केली) प्रकल्प कार्याचे स्वरूप आणि त्याकरिता व्यक्तीची निवड याबाबतचे महाराजांचे धोरण किती अचूक

होते, हे या उदाहरणावरून लक्षात येते. महाराजांचे चरित्रकार श्री. फिलीप सार्जंट यांनी महाराजांना एकदा त्यांच्या कार्यालयातील सर्वोत्तम कार्य कोणते असा प्रश्न विचारला असता क्षणार्धात महाराज उत्तरले, ''अर्थात शिक्षण प्रसार आणि लायब्ररी मुव्हमेंट'' *(इये सयाजीचिये नगरी, पृ. ८५)*

महाराजांच्या ग्रंथालय सेवेतील योगदानाची दखल घेऊन ब्रिटीश लायब्ररी असोसिएशनने त्यांची परिषदेच्या उपाध्यक्षपदी ऑक्टोबर १९३५ मध्ये निवड करून त्यांचा गौरव केला.

## ६.३ भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक : डॉ. एस. आर. रंगनाथन :

जगभरात ग्रंथालयशास्त्रात नावलौकिक करणारे प्रथम भारतीय ग्रंथपाल व ग्रंथालय चळवळीचे आद्य प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे डॉ. एस. आर. रंगनाथन ज्यांच्या कर्तृत्वाने भारताला ग्रंथालय क्षेत्रात जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. अशा या महान व्यक्तीची १२ ऑगस्ट रोजी जयंती साजरी केली जाते. या निमित्ताने ग्रंथालय प्रेमींसाठी त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा थोडक्यात परिचय. त्यांच्या जन्मदिनानिमित्त ग्रंथपाल दिन देशभरात साजरा केला जातो.

ग्रंथालय हे सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी शालेय शिक्षणासोबतच निरंतर शिक्षणदेखील किती आवश्यक असते, यांचे महत्व ग्रंथालयशास्त्राचे पितामह डॉ. रंगनाथन यांनी सर्वप्रथम पटवून दिले आहे. त्यासाठी ग्रंथालयाचा विकास, प्रसार होऊन देशातील सर्वसामान्य जनतेसाठी ज्ञानाची कवाडे विनामूल्य खुली करून द्यायला हवी. यासोबतच वाचन संस्कृती रुजविण्यासाठी व जनतेला वाचनाकडे प्रवृत्त केले पाहिजे, असा विचार डॉ. रंगनाथन यांनी सर्वप्रथम देशात रुजविला. देशातील ग्रंथालय चळवळीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

डॉ. रंगनाथन यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ रोजी तत्कालिन मद्रास प्रांतातील तंजावर जिल्ह्यातील शियाली या गावात झाला. शालेय शिक्षण शियालीला आणि महाविद्यालयीन शिक्षण मद्रास येथे झाले. १९१६ साली त्यांनी गणित या विषयात पदवी मिळविली. अध्यापनाची आवड असल्याने त्यांनी अध्यापन हे आपले कार्यक्षेत्र निश्चित केले.  साली मद्रास विद्यापीठातील अध्यापन शास्त्रातील एल.टी. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. या काळात एक कुशल प्राध्यापक, संशोधक म्हणून त्यांनी मान मिळविला होता. १९२४ रोजी प्रेसिडेन्सी कॉलेजमधील नोकरी सोडून ते मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून सेवेत रुजू झाले. तेव्हा मद्रास विद्यापीठाने त्यांना सप्टेंबर १९२४ ते जुले १९२५ या कालखंडात ग्रंथालयाच्या प्रशिक्षणासाठी आणि ग्रंथालयाचा अभ्यास करण्यासाठी इंग्लडला पाठविले.

इंग्लंड येथे एक वर्ष राहून तेथील युनिव्हर्सिटी कॉलेजचा ग्रंथालय शास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करून १९२५ साली मायदेशी परतल्यावर डॉ. रंगनाथन यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या पुनर्रचनेचे कार्य जोमाने सुरु केले. विविध कार्यक्रम व उपक्रमाद्वारे ग्रंथालयात चैतन्य निर्माण

केले. म्हणजेच मद्रासच्या वास्तव्यात त्यांनी भारतीय ग्रंथालय चळवळीचा पाया घातला. मद्रास विद्यापीठाचा कायापालट करीत असतानाच त्यांच्या मनात सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रसाराचा विचार सुरु झाला होता. आर्थिक विकासाला आणि लोकशाहीच्या प्रगतीला शिक्षण प्रसाराइतकी मुलभूत कोणतीही प्रेरणा नाही, अशी त्यांची धारणा होती. समाजातील सर्वांना शिक्षण प्रसारासारखी म्हणजेच ज्ञानाचे लोकशाहीकरण करण्यासाठी ग्रंथालयाइतके सहाय्यक दुसरे माध्यम कोणतेच नाही, अशी त्यांची धारणा होती. हे लक्षात घेऊन त्यांनी मद्रास ग्रंथालय संघाची स्थापना १९२८ रोजी केली. या संघाचे चिटणीस व पदाधिकारी म्हणून १९४५ पर्यंत काम केले. या संघाच्या स्थापनेची आणि त्यांच्यातर्फे मांडल्या जाणाऱ्या विविध योजनापासून स्फूर्ती घेऊन इतर राज्यात ग्रंथालय संघ स्थापन झाले आणि सार्वजनिक चळवळीला नवीन तेज आले.

डॉ. रंगनाथन यांच्या विविध उपक्रमामुळे ग्रंथालयाच्या आवश्यकतेची जाणीव समाजात निर्माण होऊ लागली. त्यामुळे प्रत्येक राज्यात सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यासंबंधी कायद्याची जाणीव निर्माण झाली. त्यासाठी त्यांच्या पुढाकाराने मद्रासमध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा अंमलात आला. त्यामुळे दक्षिण भारतात सार्वजनिक ग्रंथालयाची वाढ मोठ्या प्रमाणात झाली. त्यांच्या प्रेरणेने ग्रंथालय कायदा करणारे मद्रास हे भारतातील पहिले राज्य ठरले. डॉ. रंगनाथन यांचा कार्यकाळ भारतीय ग्रंथालय शास्त्रातील हे पर्व ऐतिहासिक ठरले आहे. आजही ग्रंथालय शास्त्रातील त्यांचे अजरामर व अमूल्य सिद्धांत, विविध सूत्रे, नियम आदर्श मानले जातात.

ग्रंथालयशास्त्राच्या विविध पैलूंपैकी प्रत्येक पैलूंची डॉ. रंगनाथन यांच्या वैचारिक परिसस्पर्शाने सोने झाले आहे . ग्रंथालयशास्त्रातील १९३० चे दशक विशेषत्वाने क्रांतिकारी ठरले. याच दशकात डॉ.रंगनाथन यांनी ग्रंथालयशास्त्राचे पाच सूत्र कोलन क्लासिफिकेशन, क्लासिफाईड कॅटलॉग कोड, ग्रंथालय प्रकाशन प्रोलेगोमिना टू लायब्ररी, क्लासिफिकेशन थिअरी ऑफ लायब्ररी तसेच रेफरन्स सर्व्हिस ॲण्ड बिबलिओग्राफी इत्यादी अमूल्य ग्रंथाचे लेखन व प्रकाशन केले. त्यांनी या क्षेत्रातील घोडदौड पुढे चालू ठेवून त्यांनी १९३१ मध्ये मद्रास बैलगाडीतील पहिल्या फिरत्या ग्रंथालयाची सुरुवात केली.

डॉ. रंगनाथन यांनी १९३६ मध्ये प्रथम लायब्ररी बील मद्राससाठी तयार केले. ग्रंथालयशास्त्रातील प्रमाणपत्र तसेच पदविकास्तरावरील अभ्यासक्रमाचे प्रारूप तयार करून ग्रंथालयशास्त्र शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जगभरात आपली नवीन ओळख निर्माण केली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या कामाची व संशोधन कार्याची योग्य दखल घेऊन ब्रिटीश सरकारने १९३५ साली डॉ. रंगनाथन यांना रावसाहेब हा पुरस्कार दिला. त्यानंतर त्यांनी स्वकष्टाने जमा केलेले एक लाख रुपये मद्रास विद्यापीठाला देणगी म्हणून दिले.

ग्रंथालयशास्त्रातील प्रमाणपत्र बी. लिब., एम. लिब. इत्यादीसाठी अभ्यासक्रम तसेच शारदा रंगनाथन विज्ञान संघटन आणि शारदा रंगनाथन ग्रंथालय शास्त्रपीठ यांची स्थापनाही ऐतिहासिक क्षणामध्ये आजपण गणली जाते.

भारत सरकारने १९५७ मध्ये पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलिक लिखाणाबद्दल डी. लिट. ही सर्वोच्च पदवी १९४७ साली आणि १९६४ साली अमेरिकेतील पिटर्सबर्ग विद्यापीठाकडून त्यांना मिळाली होती. वर्गीकरण व तालिकाकरण या विषयातील संशोधनाबद्दल त्यांना अमेरिकन लायब्ररी असोसिशनकडून मार्गारिट हे पारितोषिक देण्यात आले आहे. रंगनाथन यांनी भारतीय ग्रंथालय चळवळही वाढवली. भारतीय ग्रंथालय परिषदांचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. त्याचप्रमाणे युनेस्को इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ असोशिएशन व इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ डॉंक्युमेन्टेशन यासारख्या आंतरराष्ट्रीय समित्यावरही त्यांनी उल्लेखनिय कामगिरी केली.

डॉ. रंगनाथन यांच्या कार्याच्या स्मरणार्थ ग्रंथालय चळवळीत योगदान देणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील कार्यकर्ते, सेवक यांनी अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून महाराष्ट्र सरकारच्या वतीने उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवकासाठी एस आर रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार' देण्याच्या अभिनव योजना सन १९९३–९४ पासून सुरु केलेली आहे. त्यामध्ये राज्यस्तरावरील एकेक कार्यकर्ता व सेवक यांना रुपये २५ हजार तसेच राज्यातील सहा महसुली विभागातून एकेक कार्यकर्ता व सेवक

यांना रुपये १५ हजार, गौरवचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येते. त्यांच्या कार्याची व्याप्ती अतुलनीय आहे. म्हणूनच डॉ. रंगनाथन यांनी मांडलेले पाच पुस्तकालय विज्ञान हे सिद्धांत भारतीय पुस्तकालय विज्ञानाचा पाया समजला जातो. डॉ रंगनाथन यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारतीय ग्रंथालयाच्या विकासासाठी अर्पण केले.

## ६.४ आंधप्रदेश:

### १. भूपतीराजू तिरुपतीराजू (१८६७ –१९५१) :

यांचा जन्म १८६७ मध्ये कुमूदावल्ली येथे झाला. हे ठिकाण भिमवरम तालुका, पश्चिम गोदावरी जिल्हा या भूप्रदेशात येते. शालेय शिक्षणानंतर त्यांनी सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून दिले. या प्रदेशातील सामाजिक कार्यकर्ते श्री. कंडूकुरी विरसालीगम पंथूलू यांच्या कार्याचा प्रभाव भूपतीराजूंच्यावर मोठ्या प्रमाणात पडलेला होता. त्यांच्या पुढील वाटचालीत श्री. कलाकुरी नरसिंह, कोकपल यांच्या प्रोत्साहानाने विरसालीगा पकवी समाज ग्रंथालय कुमुदावल्ली येथे १८९७ रोजी स्थापन केले. या सहकार्यातूनच ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत उभी राहिली. यानंतर त्यांनी १९३० च्या कालखंडात भिमवरम तालुक्यामध्ये ग्रंथालय जत्रांचे विविध ठिकाणी आयोजन केले. या उपक्रमांचे ग्रामिण परिसरात कौतुक होऊन त्यांचे अनुकरण इतर ठिकाणी करण्यात येऊन या तालुक्यातील अनेक खेडे गावांतून ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली. या कार्याबरोबरच त्यांनी साक्षरता प्रसार, महिला शिक्षण, विधवा विवाह, अस्पृशता निवारण, हिंदी भाषेचा प्रसार यांचा प्रसार गांधीजींच्या मार्गाने आपल्या आयुष्यभर केला. त्यांची शताब्दी २ ऑक्टोबर १९७१ रोजी मोठ्या प्रमाणावर त्यांच्या गावी साजरी करण्यात आली.

### २. चिलाकामुर्ती लक्ष्मी नरसिंह (१८५७–१९४६) :

ते एक उत्तम कवी होते. त्यांच्या मनात ग्रंथालयाबद्दल व साहित्याबद्दल विशेष आस्था होती. त्यांनी वीरसालेगम या ग्रंथालयाचे अध्यक्षपद भुषविलेले होते. हे ग्रंथालय श्री. निलमकृष्णाराव यांनी राजमुंद्री या ठिकाणी स्थापन केलेले होते. या ग्रंथालयाचे नाव बदलण्याचा घाट पुढील काळामध्ये घातला असता त्यांनी या ग्रंथालयाचा अध्यक्ष या नात्याने या बाबीस विरोध केला. पुढील काळात या ग्रंथालयाचे पुर्ननामांकन होऊन प्रजा ग्रंथालय असे करण्यात आले. हे ग्रंथालय पुढे वसुराय ग्रंथालयामध्ये विसर्जित करण्यात येऊन गोवथानी ग्रंथालय म्हणून १९१९मध्ये स्थापन करण्यात आले.

चिलाकामुर्ती यांनी आंध्र देश ग्रंथ भांडार गृह महासभेचे अध्यक्षपद १९१४ मध्ये भूषविलेले होते. ही आंध्रप्रदेशमधील पहिली ग्रंथालय परिषद होय. ही परिषद बेजवाडा येथे

म्हणजेच सध्याच्या विजयवाडा येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी अध्यक्षपदावरुन आपले विचार मांडताना भारताच्या ग्रंथालय चळवळीच्या पाऊलखुणांचा आढावा घेऊन त्यांचा ग्रंथालयवेद असा उल्लेख केलेला होता. हे वेद डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी इंग्रजीमध्ये भाषांतरीत केलेले होते. खऱ्या अर्थाने हे ग्रंथालय कायदेच होत. याचे मराठी रुपांतर 'सुर्यप्रकाश सर्वच वस्तूंना चकाकी देतो. अशा प्रकारचे ज्ञान ही अंधकाराला दूर सारते. प्रत्येकाचे जीवन उजळून टाकते. अथवा सर्वांसाठी जीवन देते जे सर्वांसाठी मोफत आहे. म्हणूनच ज्ञान ही सर्वांसाठी सहजपणे उपलब्ध व्हावे. श्वास त्यांना जीवन जोम देतो. निर्मळ पाणी सर्वांचीही तृष्णा शांत करते. ज्ञानही सर्वांना हेच समाधान देते. जिज्ञासूंची जिज्ञासा आणि भूकेल्यांची भूक ही तृप्त करते.'

या अध्यक्षीय भाषणात त्यांनी ''भारतीय हे सध्या ज्ञानाच्या दृष्टिकोनातून मागासलेले असल्याने त्यांच्या उत्थानाची गरज आहे. ज्या देशामध्ये शाळा व ग्रंथालयांची संख्या कमी आहे तो देश मागासलेलाच होय. शाळा व ग्रंथालये हेच खरे ज्ञानाचे स्त्रोत आहेत. ग्रंथांचे वाचन करणे म्हणजे आपला अमुल्य वेळ आपल्या उत्तम मित्रांबरोबर व्यतीत करणे होय. ग्रंथालये ही आपले नातेवाईक आणि भाऊ याहून अधिक निकटवर्तीय आहेत. म्हणूनच आपणास अधिकाधिक भोजनालयांऐवजी ज्ञानालयांची गरज आहे.'' या प्रसंगी त्यांनी ग्रंथालयांचा संदेश सर्वदूर पसरविण्यासाठी एक नियतकालिक सुरू करण्यासाठी सुचना ही केली . तसे हे ही जाहीर केले की, जशी प्रत्येक गावात तळी, विहिरी असतात त्याचप्रमाणे प्रत्येक गावात ग्रंथालये असणे गरजेचे आहे.

त्यांनी 'सरस्वती' व 'मनोरमा' व 'देशमाता' या नियतकालीकांचे संपादन केले होते. या नियतकालीकांतून त्यांनी केवळ तेलगु साहित्याचा प्रसार केला नव्हता तर इंग्रज शासनाने या भूमीचा केलेल्या गैरवापरास वाचा फोडलेली होती. त्यांच्या ७१ व्या जयंती निमित्त त्यांना १९२८ मध्ये आंध्र विद्यापीठाद्वारे या विद्यावाचस्पती पदवीने सन्मानित करण्यात आलेले होते. ते खरे देशभक्त होते आणि आपली मातृभाषा तेलगु यांचा त्यांना रास्त अभिमान होता. सन १९१५-१६ व १९१७-१८ मध्ये त्यांनी आंध्रदेश ग्रंथालय उपाध्यक्ष पद भूषविलेले होते.

### ३. एकबोटे गोपाळराव (१९१२–१९९४) :

श्री. एकबोटे यांचा जन्म १ जून १९१२ रोजी झाला. त्यांचे माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण औरंगाबाद येथे झाले. पुढे त्यांनी उस्मानाबाद विद्यापीठातून पदवी व कायदा विषयक शिक्षण पूर्ण केले आणि २८ नोव्हेंबर १९४८ रोजी हैदराबाद हायकोर्ट कडून वकिलीची सनद घेतली. तर १९५१ मध्ये सुप्रीमकोर्टची ही सनद घेतली. त्यांनी सार्वजनिक स्वरुपात अधिक दावे चालविले. तसेच तत्कालीन हैदराबाद राज्यामध्ये २६ जानेवारी १९५४ ते ३१ ऑक्टोबर १९५६ या काळात शिक्षणमंत्री म्हणून काम पाहिले. सन १९५६ मध्ये ते आंध्रप्रदेशच्या विधानसभेचे सदस्य ही होते. पुढे त्यांची नियुक्ती आंध्रप्रदेशच्या उच्च न्यायालयाचे अतिरीक्त न्यायाधीश म्हणून १९६२–१९६४ या काळाकरिता झाली. आणि १९७२–७४ या काळात आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहिले.

बालपणापासून त्यांना ग्रंथालयविषयक विशेष आवड होती. ग्रंथालयाविषयी संबंधित संस्थांशी त्यांनी संस्थापक सदस्य, सचिव व अध्यक्ष म्हणून त्यांनी आपले योगदान दिले. त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे ते १९५५ मध्ये हैदराबाद राज्याचे शिक्षणमंत्री असताना त्यांनी ग्रंथालय कायदा या राज्यासाठी मंजूर करुन घेतला. ग्रंथालय संघ पातळीवर काम करत असताना त्यांनी हैदराबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या दोन ग्रंथालय परिषदांचे अध्यक्षपद भूषविले. तसेच विदर्भ, मराठवाडा, हैदराबाद येथील ग्रंथालय चळवळीमध्ये त्यांनी सक्रीय सहभाग  दर्शविला होता. आंध्रप्रदेश शासनाने १९७६ मध्ये ग्रंथालय कायदा विषयक अंमलबजावणीचे स्वरुप यांचा आढावा घेण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते. या समितीने विविध ठिकाणी भेटी देऊन सादर केलेल्या अहवालामध्ये या राज्यातील ग्रंथालय कायद्याच्या कार्यवाही संदर्भात अनेक सुधारणा सुचविलेल्या होत्या. न्या. एकबोटे यांनी हैद्राबाद राज्य ग्रंथालय परिषद, शहर मध्यवर्ती ग्रंथालय हैद्राबाद प्रमाणीकरण समिती व ग्रंथालयाशी संबंधीत विविध समित्यांवर प्रतिनिधीत्व केलेले होते. तसेच ते उस्मानीया या विद्यापीठाचे सिनेट व सिंडीकेट सदस्य होते. त्यांनी दिलेले हैद्राबाद क्षेत्रातील ग्रंथालय चळवळीसाठीचे योगदान उल्लेखनीय स्वरुपाचे आहे.

## ४. श्री. गडीचेरा हरी सर्वोत्तम राव (१८८३-१९६०) :

श्री गडीचेरा यांचा जन्म आंध्रप्रदेशातील कुर्नुल जिल्ह्यात झाला. श्री. गडीचेरा यांच्या स्वभाव वैशिष्ट्य व कार्याविषयी डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी आंध्रप्रदेशचा सिंह असा त्यांचा उल्लेख करुन त्यांच्यातील नितीमुल्यांविषयी असलेली आस्था आणि त्यांची सत्यासाठी लढण्याची वृत्ती या त्यांच्या गुणांचा गौरव केलेला होता. त्यांच्या ग्रंथालय चळवळीतील योगदानाविषयी उल्लेख करताना अयंक्की व्यंकट रामन्नाया यांनी पुढील उद्‌गार काढले होते, ''जोवर आंध्र ग्रंथालय चळवळ अस्तित्वात आहे तोवर ते लोकांच्या हृदयात सामावलेले असतील.'' आंध्रदेश ग्रंथालय संघाचे अध्यक्ष व भारतीय संघाचे उपाध्यक्ष म्हणून सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेकरिता व प्रौढ शिक्षण प्रसाराकरिता श्री.राव यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली होती. याचबरोबर उन्हाळी शाळांची स्थापना, निरक्षरता निर्मुलन यासाठीचे त्यांचे योगदान विचारात घेऊन प्राध्यापक एम.जी.रंगा यांनी जनसमुदाय नेता/ गुरू म्हणून श्री राव यांचा उल्लेख केलेला होता. श्री. राव यांनी आंध्रप्रदेशातील ग्रंथालय चळवळीकरिता दोन शतके सातत्यपूर्वक योगदान देताना ते आंध्र ग्रंथालय संघाचे १९३४ मध्ये अध्यक्ष होते. या राज्यातील विविध ठिकाणी सभा घेऊन ग्रंथालय चळवळीचा प्रसार करण्यासाठी श्री. सुरावरण प्रताप रेड्डी यांच्या सहकार्याने त्यांनी दिलेले योगदान तेथील लोकांना सदैव प्रेरणा देत राहिले आणि यामुळेच तेथील लोकांनी ग्रंथालय चळवळीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग दर्शविला. सन १९५३ मध्ये हैदराबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे त्यांनी अंत्यत यशस्वीपणे आयोजन केले होते. ते विज्ञान निकेतन (खामम), सुर्यपेठ ग्रंथालय व श्री कृष्णदेव राय ग्रंथालय हैद्राबादचे विश्वस्त ही होते. आंध्र विभागातही त्यांनी अनेक ग्रंथालये सुरू केली. त्याच बरोबर बंद पडण्याच्या वाटेवर असणाऱ्या ग्रंथालयांना पुनर्‌जिवीत करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. विविध शैक्षणिक संस्थातून व्याख्याने देत असताना त्यांनी ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून ग्रंथालयांमध्ये मनोरंजन विषयक वाचन साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी आग्रह धरलेला होता. दक्षिण भारतातील प्रौढ शिक्षण संघातील  सक्रीय सहभागासाठी त्यांनी आंध्र प्रदेशाचा केलेला सर्वदूर दौरा व याद्वारे ग्रंथालय चळवळीसाठी दिलेले योगदान हे विशेष लक्षणीय मानले जाते. राज्य आणि

राज्याबाहेर ग्रंथालय चळवळीचा ध्यास घेऊन विविध चर्चासत्रात त्यांनी दिलेले योगदान ही तितकेच महत्त्वपूर्ण.'जर्नल अडल्ट एज्युकेशन रीव्हीव' हे जर्नल सुरू करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न ही उल्लेखनीय आहेत. तसेच सुट्टीच्या काळामध्ये उन्हाळी पुनर्वर्गांचे सेवक व विद्यार्थ्यांकरिता आयोजनासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम या सर्वांमुळेच ते आंध्रप्रदेश ग्रंथालय चळवळीचे अग्रणी म्हणून ओळखले गेले.

**५. अयंक्की व्यंकट रामण्णा (१८९० – १९७९) :**

यांचा जन्म २४ जुलै १८९० रोजी पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील कोन्कुदूरु या गावी झाला. यांनी आपले प्राथमिक शिक्षण १९०३ मध्ये पूर्ण केले. स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झाल्यामुळे ते पुढील शिक्षण घेऊ शकले नाहीत. असे असूनही पुढील काळात भारतातील सामाजिक व आर्थिक समस्यांचे मुख्य कारण हे निरक्षरता हेच असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या समस्येच्या निराकरणासाठी म्हणजेच साक्षरता प्रसाराकरिता ग्रंथालय हे एक महत्त्वपूर्ण साधन असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या विचारधारेतून ते ग्रंथालय चळवळीकडे वळले. पुढे ते १९११ मध्ये राम मोहन ग्रंथालयाचे सचिव झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली या ग्रंथालयाचा विकास झाला. सन १९१४ –१९३९ या काळात आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाचे सचिव म्हणून काम करताना आंध्रातील ग्रंथालय चळवळ बांधण्यासाठी त्यांचे योगदान व याद्वारे ग्रंथालय चळवळीच्या उभारणीसाठी सर्व देश पातळीवर त्यांनी निर्माण केलेली प्रयत्न फारच गौरविले गेले होते.

लोकांशी समरस होऊन ग्रंथालय चळवळीकरिता पद्मश्री अयंकी व्यंकट रामण यांनी आंध्रातील ग्रंथालय चळवळीमध्ये निर्माण केलेली स्फूर्ती यामुळे ते 'अयंकी' या एकेरी नावाने संबोधले जाऊ लागले. त्यांच्या या असाधारण व्यक्तीमत्त्वामुळे ग्रंथालय विषयक सभांच्या आयोजनामध्ये ते हिरीरीने पुढाकार घेत. त्यांच्या या पुढाकारामुळे जवळ जवळ २५ ग्रंथालय परिषदांचे यशस्वी आयोजन केले होते. यामुळे राज्यात ग्रंथालय विषयक जाणीव व आस्था लोकांच्यामध्ये प्रभावीपणे रुजण्यास खूपच मदत झाली. मद्रासमध्ये प्रथमच १९१९ मध्ये आयोजित करण्यात आलेली अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय परिषद ही केवळ अय्यंकी व आंध्रप्रदेश ग्रंथालय संघ यांच्या प्रयत्नामुळेच संपन्न झालेली

होती. ही परिषद म्हणजे भारतीय ग्रंथालय चळवळीतील एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून ओळखले जाते. यामुळे इतर संघाना विशेषत्वाने पंजाब ग्रंथालय संघ, बंगाल ग्रंथालय संघ, मद्रास ग्रंथालय संघ यांना समाजासाठी असलेली ग्रंथालयांची गरज प्रकर्षाने जाणवली. सन १९२३ मध्ये संपन्न झालेल्या दुसऱ्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेमध्ये श्री. अयंक्की यांची अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय संघाचे मुख्य सचिव म्हणून निवड करण्यात आली. या संघाचे सचिव म्हणून त्यांनी ग्रंथालय जत्रांच्या आयोजनास प्राधान्य दिले. यामुळे ग्रामिण परिसरामध्ये ग्रंथालय चळवळीविषयक कुतूहल निर्माण होण्यास खुपच मदत झाली. ग्रंथालय चळवळ व प्रौढ शिक्षण यांच्यातील सहसंबंध वृद्धिंगत करण्यासाठी त्यांनी खूपच प्रयत्न केले. या दोन्ही घटकांच्या प्रसाराकरिता त्यांनी अनेक ग्रंथ प्रदर्शने, सांस्कृतिक जत्रा याचे आयोजन करुन व्याख्याने देताना ग्रामीण परीसरातील सांडपाणी व्यवस्थापन, कृषिव्यवसाय यांनाही प्राधान्य दिल्यामुळे ग्रंथालय चळवळीचा एक भाग म्हणून प्रौढ शिक्षण विकासास चालना मिळाली. श्री अंयक्की हे केवळ ग्रामीण ग्रंथालयांची स्थापना करुन थांबले नाहीत तर या चळवळीस बळकटी देण्यासाठी त्यांनी 'ग्रंथालय सर्वस्मम्' हे तेलगु भाषेतील नियतकालिक आंध्र ग्रंथालये संघाच्या पुढाकाराने सुरु केले. सन १९२४ – १९३६ या काळात 'इंडीयन लायब्ररी जर्नल' चे त्यांनी संपादन केले होते. प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत व स्वातंत्र्यप्रिय नागरीक व्हावी या उद्देशान त्यांनी विजयवाडा येथे 'सरस्वती सामराज्यम्' ची स्थापना केली. श्री. अय्यंकी यांच्या ग्रंथालय चळवळीतील योगदानाची विशेष दखल घेऊन 'सरस्वती सामराज्यम्' या संस्थेचा पायाभरणी समारंभ प्रसंगी भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती श्री. व्ही.व्ही.गिरी यांनी श्री. अय्यंकी यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेसाठी व ग्रंथालय प्रसारासाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या योगदानाबद्दल विशेष अभिनंदन केले. रंगनाथन यांनी ही श्री. अय्यंकी यांच्या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या योगदानाबद्दल खूपच कौतुक केले.

ग्रंथालय चळवळीच्या प्रसाराकरिता श्री. अय्यंकी यांनी घेतलेले परिश्रम व त्याग यांची दखल घेऊन १९७२ मध्ये भारत सरकारद्वारे त्यांना 'पद्मश्री' हा किताब सन्मानपूर्वक बहाल केला होता. याचबरोबर त्यांना 'कौला' सुवर्णपदक सन्मानपुर्वक देण्यात आले.

आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांनी ग्रंथालय प्रसार हाच ध्यास घेतलेला होता. खऱ्या अर्थाने आंध्र प्रदेशातील ग्रंथालय चळवळीचा आढावा म्हणजे श्री. अय्यंकी यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास होय.

**६. कोडत्ती नारायण राव (१९१४ – २००२) :**

आंध्रदेश ग्रंथालय भांडार गृह संघाच्या स्थापनेच्या १९१४ या वर्षीच श्री. कोडत्ती यांचा जन्म झाला. त्यांच्या रेबाला या जन्मगावामध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'श्री लक्ष्मी नरसिंह मनोहर भारती पुस्तक भांडार गृहम्' या ग्रंथालयाच्या स्थापनेपासून कोडत्ती यांच्या ग्रंथालय चळवळीतील योगदानास सुरूवात झाली. ग्रंथालय चळवळीतील एक कार्यकर्ता ते आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाचे अध्यक्ष व आंध्रप्रदेश ग्रंथालय परिषदेचे कार्याध्यक्ष ही त्यांची वाटचाल त्यांचे ग्रंथालय चळवळीतील योगदान सुस्पष्ट करणारी आहे. त्यांच्या शहर ग्रंथालय संस्था हैद्राबादच्या कार्याध्यक्ष कालखंडात त्यांनी खाजगी अनुदानातील ग्रंथालयांच्या विकासाकरिता विशेष लक्ष दिले होते.

श्री. कृष्ण देवराव आंध्रभाषा निलायम चा शताब्दी महोत्सव व आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाचा सुवर्ण महोत्सव व हिरक महोत्सव हे त्यांच्याच नेतृत्वाखाली यशस्वीपणे संपन्न झाले होते. ग्रंथालय क्षेत्राच्या विकासाकरिता विशेष योगदान देताना त्यांनी आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाचे अध्यक्षपद १९६० पासून जीवनातील अंतिम क्षणापर्यंत यशस्वीपणे सांभाळले होते.

कोडत्ती नारायण राव यांनी विज्ञान निकेतन हे ग्रंथालय खामाम येथे सुरू करुन लोकांच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी शिक्षण दिले. त्याकाळात या परिसरामध्ये शिक्षणाचा प्रसार न झाल्यामुळे ग्रंथालयाचा लाभ घेण्यासाठी वाचकवर्ग अल्प प्रमाणात येत असे. यावर उपाय म्हणून कोडत्ती नारायण राव यांनी स्वत:च ग्रंथ व वृत्तपत्रे यांचे वाचन निरक्षर लोकांच्यासमोर केले. यामुळे वाचकांची संख्या वाढावयास खूपच मदत झाली आणि लवकरच हे ग्रंथालय राज्यातील एक उत्तम ग्रंथालय म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांच्या या योगदानाबद्दल समाजातील अनेक सन्माननीय व्यक्तींनी त्यांचे कौतुक केले. या कार्याबरोबरच त्यांनी हरिजन सेवा संघ, युवाजन संघ, क्रमिका संघ (श्रमिक संघ) अशा संघटनाही

स्थापन केल्या. तसेच त्यांनी आपल्या विद्यार्थी दशेत 'गोवळकोंडा' व 'भाग्यनगर' या वृत्तपत्रातून पुष्कळ लेखन केले. पुढे त्यांनी 'आंध्रवाणी', 'आंध्रपत्रिका', 'आंध्रप्रभा' या ही वृत्तपत्रांद्वारे समाज जागृतीविषयक  लेखन केले होते. त्यांनी आपल्या आयुष्यभर साधी राहणी पसंद केली व कधी ही स्वार्थी व अल्पसंतुष्टी कामाचा पाठपुरवा केला नाही. आपल्या आयुष्यभर मुल्यांपासून कधीही ते विचलीत झाले नव्हते.

**७. काशीनंदिनी नागेशराव पंथलू (१८७६ –१९३८) :**

श्री. काशीनंदिनी यांचा जन्म १ मे १८७६ रोजी कृष्णा जिल्ह्यातील येल्लाकुरु या गावी झाला. त्यांनी आपले शिक्षण मद्रास व गुंटूर येथे पुरे केले. पुढे नोकरी व व्यवसायानिमित्ताने ते मुंबईला गेले. या वाटचालीतच त्यांनी पुढील काळात तेलगु वृत्तपत्र, आंध्रपत्रिका हे ९ सप्टेंबर १९०८ रोजी मुंबई येथून सुरू केले. राष्ट्रीय चळवळीचा प्रसार हे त्यांचे धोरण होते. पुढे हे वृत्तपत्र त्यांनी १९१४ मध्ये मद्रास मधून सुरू केले व त्याचे रुपांतर दैनिकात केले. सन १९२० मध्ये गांधीजींच्या असहकार चळवळीमध्ये ते दाखल झाले आणि सन १९३५ मध्ये केंद्रीय राज्य मंडळाचे ते सदस्य झाले. त्यांच्या अशा लोकाभिमुख कार्यासाठी गांधीजींनी 'विश्वदाता' म्हणून त्यांचा सन्मान केला. त्यांनी ग्रंथालय चळवळीमध्ये विशेष सहभाग दर्शवत नेल्लरू येथे संपन्न झालेल्या तिसऱ्या आंध्रदेश ग्रंथालय परिषदेचे अध्यक्ष स्थान भूषविले. तसेच सन १९२०–२१ च्या काळात आंध्रदेश ग्रंथालय संघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. सन १९२९ मध्ये त्यांनी राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या स्थापनेसाठी विशेष भर दिला. याचबरोबर त्यांनी आपले दैनिक, आंध्रपत्रिका, साप्ताहिक 'भारती' हे नव्याने स्थापन झालेल्या ग्रंथालयांना मोफत स्वरुपात पुरविले. याचबरोबर श्री. नागेशराव यांनी तेलगु साहित्याचा प्रसार करण्यासाठी सन १९२६ पासून 'आंध्र ग्रंथमाला ' प्रकाशन संस्था स्थापन केली होती. त्यांनी तेलगु भाषेतील २० ग्रंथ प्रकाशित केले तसेच या व्यतीरीक्त 'तेलगु अक्षर वाङ्मय पुनर्मुद्रित केले. त्यांनी या पुस्तकांच्या किंमतीही अत्यंत कमी ठेवल्या होत्या, त्या सर्वसामान्यांना परवडाव्यात अशा होत्या. त्यांच्या प्रयत्नातून २० व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांमध्ये १२० ग्रंथालये आंध्रातील जिल्ह्यातून स्थापन होण्यास चालना मिळाली. ते काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते होतेच शिवाय त्यांच्या ग्रंथालय

क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांच्या नावाने पोष्टाचे तिकिटही प्रकाशित करण्यात आलेले असून त्यांच्या स्मरणार्थ महलापूर, चैन्नई येथे देशाद्धारक 'नागेश्वरराव पार्क' चार एकरात उभा केलेला आहे.

**८. कोम्मा सितारामय्या (१८८६-१९७४) :**

कोम्मा सितारामय्या यांचा जन्म सन १८८६ मध्ये झाला. ते विजयवाडा बाहेरील पटमाटा येथील रहीवाशी होते. विजयवाडा येथे भरलेल्या सन १९१४ मधील पहिल्या आंध्रदेश ग्रंथालय परिषदेमधील कोम्मा यांच्या सहभागापासून त्यांच्या सामाजिक कार्यांची सुरूवात झाली. त्यांनी आपल्या राहत्या गावी त्वरीतच १९१४ मध्ये राजा राममोहन रॉय धर्म ग्रंथालय सुरू केले. सन १९२४ मध्ये हे ग्रंथालय महात्मा गांधी धर्म पुस्तक भांडारमध्ये समाविष्ट करण्यात आले. पुढे १९३९ मध्ये त्यांनी पटमाटा मधील आपली एक एकर जमील आंध्रदेश ग्रंथालय संघाच्या इमारती करिता उपलब्ध करुन दिली व यासाठीच १००० रुपयांची देणगीही दिली. पुढे १९१४ मध्ये आंध्रदेश ग्रंथालय संघाच्या खजिनदार पदी त्यांची निवड झाली. नंतरच्या काळात त्यांनी तीन एकर जमीन उपलब्ध करुन देऊन आंध्र ग्रंथालय ट्रस्टची १९४८ मध्ये स्थापना केली. या जागेवर १९४९ मध्ये 'सर्वोत्तम भवन' ही इमारत बांधण्यात आली. या प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**९. मडपती हनुमंत राव (१८८५-१९७०) :**

श्री. हनुमंत राव यांना आंध्र प्रदेशातील तेलंगण विभागामधील ग्रंथालय चळवळीचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाते. तेलगु भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्या संरक्षण संवर्धन व पुर्ननिर्माणाकरिता त्यांनी दिलेले योगदान हे महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना आंध्र पितामह म्हणून ओळखले जाते. त्यांच्या काळात दुर्गम भागात ग्रंथालय स्थापनेसाठी कोणीही प्रयत्न केले नव्हते. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालये अशा दुर्गम भागात कार्य करत असताना कर्मठ मंडळींच्याकडून त्यांना अनेक प्रकारच्या व्यत्ययांना तोंड द्यावे लागले. दुर्गम परिसरात ग्रंथालय चळवळ राबविताना सन १९०१ मध्ये कोमराजू व्यंकट लक्ष्मणराव व रविचेत्तू रंगराव यांचे सहकार्य त्यांना प्राप्त झाले. या सगळ्यांच्या प्रयत्नातूनच हैद्राबाद येथे १९०१ मध्ये श्री. कृष्णदेवराय आंध्रभाषा निलायम स्थापन करण्यात आले. तसेच श्री राजराजा आंध्र भाषा निलायम हे हनुमकोंडा येथे १९०४ मध्ये स्थापन करण्यात आले.

निजामशासन तर सार्वजनिक ग्रंथालयांच्याकडे अत्यंत संशयाने पाहत असे व ग्रंथालयांना ते स्वातंत्र्य संग्रामाचे घटकच म्हणून ओळखत असे. अशाही परिस्थितीत श्री. मडपती यांनी वरंगळ येथील स्वत:च्या अनुभवावर आधारीत हैद्राबाद शहरामध्ये ग्रंथालय स्थापन करण्यासाठी तेथील लोकांना प्रोत्साहन दिले. तसेच जिल्हा स्तरावर व दुर्गम ग्रामीण भागातही ग्रंथालय स्थापनेसाठी त्यांनी लोकांना प्रोत्साहन  व धीर दिला. त्यांची अशी धारणा होती की, ग्रंथालये केवळ राजकीय ज्ञानच वाचकांना पुरवत नाहीत तर ती विज्ञान विषयक माहिती व आधुनिक साहित्य या विषयाची वाचकांची तहानही भागवतात. त्यांनी प्रौढ साक्षरता केंद्राची ग्रंथालयामध्ये स्थापना केली यामुळे निरक्षारता निर्मुलनासाठी ग्रामिण परिसरात फारच मोठी मदत झाली. ते सन १९१४ मध्ये 'कृष्णदेवराय' आंध्रभाषा निलायम् चे सचिव म्हणून ते निवडले गेले. सुलतान बाजार परिसरात आंध्रभाषा निलम् साठी इमारत उभी करण्याकरिता त्यांनी खुपच परिश्रम घेतले व अंतिम: ही इमारत १९२१ मध्ये पूर्ण झाली. त्यांच्या या योगदानाबद्दल भारत सरकारद्वारे सन १९५५ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सन १९८५ मध्ये हैद्राबादमध्ये त्यांची जन्म शताब्दी मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. त्यांनी 'हिस्ट्ररी ऑफ रोमन इम्पायर' व 'लाईफ ऑ गॅरीबल्डी' या दोन ग्रंथाचे लेखन केलेले असून तसेच त्यांनी तेलगु माध्यमांचे एक हायस्कुल ही सुरू केलेले होते. त्या प्रशालेस राज्यशासन, उस्मानीया विद्यापीठ, आंध्र विद्यापीठाकडून मान्यता न मिळाल्याने अंतिम:त्यांनी पुणे येथील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाकडून या प्रशालेस मान्यता प्राप्त करुन घेतली. ते उस्मानीया विद्यापीठाच्या सिनेटचे व सिडीकेटचे सदस्य ही होते.

### १०. पतुरीनागभूषणम (१९०७ –१९८७) :

श्री पतुरी यांचा जन्म १९०७ मध्ये झाला. पुढील काळात आपल्या समवेत असणारे सामाजिक नेते, स्वातंत्र्य सैनिक यांच्या सहवासातून त्यांना ग्रंथालय चळवळीविषयक आस्था निर्माण झाली. त्यांनी आपल्या निवासी गावामध्ये म्हणजेच गुंटूर जिल्ह्यातील पेडापाल्यम गावामध्ये लहान वयातच प्रौढांना शिक्षण देणे सुरू केले. प्रौढ शिक्षणाकरीता दोन वर्षे रात्रीचे वर्ग माचवानम येथे सुरू केले.  उन्हाळी सत्रातील कॅम्पचे त्यांनी आयोजक म्हणून

आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाच्या व्यासपीठावरुन काम केले. त्यांच्यामुळे इतर युवकांनी प्रेरणा घेऊन या कामाची जबाबदारी स्विकारली. हे काम म्हणजे नैतिक जबाबदारी अशी यामागे पतुरी यांची धारणा होती. प्रौढ शिक्षणासाठी दिर्घकाळ असलेली बांधिलकी, ही जी. हरी सर्वोत्तम राव यांची पुस्तके प्रकाशित करण्यास त्यांना प्रवृत्त करुन गेली. तसेच प्रौढ शिक्षणाविषयक तक्ते, गोराचे 'अवर लेसन्स' यांचे ही प्रकाशन त्यांनी केले. त्यांनी पश्चिम आणि पूर्व पंरपरामध्ये उत्तम प्रकारे समन्वय साधत आपले कार्य पुढे नेले.

१. सदस्य – भारतीय प्रौढ शिक्षण संघ कार्यकारणी
२. विभागीय सचिव दक्षिण भारत प्रौढ शिक्षण संघ मद्रास
३. संचालक, दक्षिण भारत प्रौढ शिक्षण सहकारी संस्था मर्यादित, मद्रास
४. परीक्षक नवसाक्षर ग्रंथ मुल्यमापन समिती
५. सचिव स्वागत समिती व संघटक आंध्रदेश प्रौढ शिक्षण विशेष परिषद तेनाली

अशा जबाबदाऱ्या सांभाळतानाच त्यांनी ग्रंथालय क्षेत्रासाठी योगदान देत केलेले कार्य ही असेच लक्षणीय स्वरुपाचे आहे. या कार्याचे स्वरुप –

१. सचिव व ग्रंथपाल म्हणून बाल सरस्वती ग्रंथालय पेडापालेम या ठिकाणी काम करत असताना त्यांनी 'बोट ग्रंथालय सेवा' या अभिनव ग्रंथालय सेवा सुरु केली. बोटीवरील प्रवासी यांच्याकरिता फिरत्या बोटीतून केलेली ग्रंथालयाची सेवा ही सात वर्षे सुरू होती. या त्यांच्या नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे त्यांची ओळख सर्वदूर पोहचलीच तसेच जागतिक स्तरावर विविध ठिकाणी या गोष्टीचे विशेष कौतुक करण्यात आले.
२. त्यांनी स्वत: १००० ग्रंथ देणगी दाखल देऊन मध्यवर्ती ग्रंथालयाकरिता ६००० ग्रंथ जमा केले. या मध्यवर्ती ग्रंथालयाच्या माध्यमातून त्यांनी आजुबाजूच्या ४० खेड्यातून ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन दिली. या ग्रंथालयाच्या गुंटूर जिल्ह्यामध्ये दुग्गीराला व पेडावडलपुद्दी या दोन ठिकाणी शाखा स्थापन केल्या. हे ग्रंथालय नंतर 'सेवाश्रम वाणी मंदिर' म्हणून ओळखले जाऊ लागले. याच ग्रंथालयाचे त्यांनी ग्रंथपाल म्हणून काम पाहिले.
३. सचिव – तेनाली तालुका ग्रंथालय संघ गुंटूर जिल्हा.

४. सचिव – गुंटूर जिल्हा ग्रंथालय संघ
५. सचिव – आंध्रप्रदेश ग्रंथालय संघ
६. मानद सचिव व संपर्क अधिकारी आंध्र ग्रंथालय ट्रस्ट
७. सदस्य राज्य ग्रंथालय समिती, या समितीचे ते २० वर्षे सदस्य होते.
८. सदस्य गुटूंर जिल्हा स्थानिक ग्रंथालय मंडळ
९. सदस्य कृष्णा जिल्हा स्थानिक ग्रंथालय मंडळ. या मंडळावर सलग दोन वेळा ते निवडून आले होते.
१०. संपादक – आंध्र ग्रंथालय त्रैमासिकाचे एक वर्ष संपादक होते.
११. ग्रंथालय सरस्वम या प्रकाशनाचे १२ व्या खंडापासून ते ३७ व्या खंडापर्यंत संपादन केले.
१२. आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायदा मसुदा समितीचे ते सदस्य होते.
१३. सदस्य भारतीय ग्रंथालय संघ, कार्यकारणी

अशी विविध पदे भूषवितांना त्यांनी दिलेले ग्रंथालय संघासाठीचे योगदान विचारात घेऊन त्यांचे पोस्टाचे तिकिट ही प्रकाशित करण्यात आले होते.

गांधीजींचा जीवनमार्ग अवलंबताना गांधीजींच्या संदर्भातील कामाविषयक विविध समितींच्यावर त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. याचप्रमाणे एक स्वातंत्र सैनिक म्हणून त्यांनी दिलेले योगदान ही विशेष महत्त्वाचे आहे.

श्री अय्यंकी व्यंकटरमण हे आंध्रप्रदेशातील ग्रंथालय चळवळीचे पितामह म्हणून ओळखले जातात. त्यांच्याच प्रयत्नातून स्थापन झाले तसेच आंधप्रदेशामध्ये त्यांनी ग्रंथालय चळवळ सर्वदूर पोहचविताना गावोगावी ग्रंथालये स्थापन केली व या क्षेत्राकरिता समन्वयाचे जाळे तयार केले. पुढे त्यांचे हे कार्य श्री. नागभूषण हे सचिव म्हणून निवडून गेल्यावर तेव्हा त्यांच्याकडे केवळ एक छोटेसे हस्तलिखीत स्वरुपातील सभावृत्त व काही रॅक या ग्रंथालयाकडे होते. पुढील काळात श्री. नागभूषण यांच्या विशेष योगदानामुळे सर्वोत्तम भवन व बापोजी मंदिर व गोटेटी जोगी राजू इमारत व याचबरोबर एक एकर जमीन ही उपलब्ध झाली. ग्रंथालय चळवळीच्या प्रसाराबरोबरच व प्रौढ शिक्षण योगदानाबरोबरच त्यांनी इमारती व

ग्रंथालयाना दिलेले आकार हे ही तितकेच महत्त्वपूर्ण आहेत. आपल्या आयुष्यातील वाटचालीत त्यांनी एक शिक्षक, प्रवचनकार व प्रचारक या त्यांच्या भूमिकांबरोबरच काणतेही कार्य सिध्दीस नेणारा एक विचारवंत म्हणून त्यांनी स्व. कोम्मा सितारामच्या यांच्यासोबत घेतलेले अंत्यंतीक परिश्रम आठवून येथील ग्रंथालय चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळतात.

खऱ्या अर्थाने नागभूषण हे आंध्रप्रदेशाचे एक रत्नच होते. ते आयुष्यभर एक विद्यार्थी म्हणूनच वावरले. शिक्षण हे माणसाला संपन्न बनवते ही त्यांची विचारधारा होती. त्यांच्या योगदानाबद्दल आंध्र विद्यापीठाने त्यांना 'कलाप्रपूर्ण' या सन्मानाने त्यांचा गौरव केला.

**११. श्री. उत्तकूरी मकट सुब्रया श्रेष्ठी :**

यांचा जन्म १८९४ मध्ये झाला ते प्रकाश जिल्ह्यातील वेलापालेम या गावचे रहिवाशी. सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या उत्तकूरी यांनी १९१८ मध्ये हिंदू यूवा जन संघ वेनपिले येथे स्थापन केला. सदस्यांच्या सहभागा अभावी हा संघ लवकरच बंद पडला. यानंतर उत्तूकूरी यांनी या संघाची मालमत्ता ताब्यात घेऊन सारस्वत निकेतन या संस्थेची स्थापना सन १९२४ मध्ये केली. श्री. श्रेष्ठी यांना अपत्य नसल्याने ग्रंथालयाला आपली मुलगी मानुन ग्रंथालय कार्याकरिता ग्रंथ, दुर्मिळ ग्रंथ असतील तेथून परिश्रमपूर्वक संग्रहीत केले व स्वत:चे घर सुब्रया महाल ग्रंथालयास देणगी दाखल देऊन व्यवस्थापन खर्चासाठी ३११६/– रुपये देखील दिले. इतकेच नव्हे तर ग्रंथालयाच्या देखभाली करता येणाऱ्या खर्चासाठी कमतरता पडल्यास स्वत:कडील रक्कम उपलब्ध करुन दिली. वेळोवेळी स्वत:च्या पैशातून ग्रंथालयाकरिता पुस्तके व फर्निचर वेळोवेळी खरेदी केले. परिसरामध्ये भेटी देऊन गावोगावी लोकांना ते ग्रंथालय सुरू करण्याविषयक प्रोत्साहन देत असत. ग्रंथालय परिषदांना सातत्यपूर्वक उपस्थिती दर्शवित त्यांनी आंध्र देश ग्रंथालय संघाचे सभासदत्व भुषविलेले होते. त्यांनी एकूणच आंध्रप्रदेश ग्रंथालय परिषदेच्या ४० परिषदांना उपस्थिती दर्शवीली होती.

**१२. पद्मभूषण वावेलाल गोपाळ कृष्णया :**

यांचा जन्म १७ सप्टेंबर १९०६ रोजी सातेनपल्ली या गुंटूर जिल्ह्यातील गावी झाला. आपल्या जन्म गावी त्यांनी १९२९ मध्ये 'शारदा ग्रंथालय' स्थापन केले. त्यांनी आंध्रप्रदेशातील ग्रंथालय चळवळीचे प्रणेते श्री. अय्यंकी यांच्याकडे १९३४ मध्ये विजयवाडा येथे ग्रंथालय प्रशिक्षण पुरे केले. या प्रशिक्षणामुळे त्यांच्यातील ग्रंथालय चळवळीविषयक आस्था वृद्धिंगत होण्यास मदत झाली.रंगनाथन यांनी तयार केलेल्या सन १९३० मधील आदर्श ग्रंथालय कायद्याचे श्री. व्ही. ही. लाल यांनी पुनरावलोकन करुन त्याच्यात पुष्कळ सुचना सुचविल्या. त्यांनी स्वत: पर्यायी आदर्श ग्रंथालय कायद्याचा मसुदा करुन सन १९४८ मध्ये शासनाकडे सादर केला. तसेच कायदा करत असताना या मसुद्यातील पुष्कळ सुधारणा केल्या. आंध्र प्रदेश शासनाद्वारे नेमलेल्या ग्रंथालय पुनरावलोकन समितीमध्ये आपला सहभाग दर्शविला होता. न्या. एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय कायद्याविषयक ही समिती गठीत करण्यात आलेली होती. तसेच राज्य शासनाने वावेलाव यांच्या अध्यक्षतेखाली खाजगी अनुदानीत ग्रंथालयांच्या विकासाकरिता विविध मार्ग व संसाधने यांच्या अनुषंगाने एक समिती ही गठित केलेली होती. त्यांची राज्य परिषदेवर अनेक वेळा नियुक्ती झालेली होती. तसेच त्यांनी कार्यालयीन भाषा आयोजनाचे अध्यक्षपद भूषविलेले होते. सन १९८१ मध्ये शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांच्या आयोजनासाठी गुटूंर येथे संस्था स्थापन केली होती. तसेच राज्य परिषदेवरही अध्यक्षपद म्हणून काम पाहिले होते. या माध्यमातून विविध देशात फिरून तेथील परिषदांना उपस्थिती दर्शवित जागतीक स्तरावरील शांतता व देशातील शांतता यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

**१३. वेलगा वेंकटापयी (१९३२ –२०१४) :**

यांचा जन्म पेडनंदीपोड या गुटूंर जिल्ह्यातील गावी सन १९३२ मध्ये झाला. माध्यमिक शालेय स्तरावर शिक्षण घेत असताना, ग्रामीण ग्रंथालयांची गरज त्यांना तीव्रतेने जाणवली. याच पार्श्वभूमीवर पुढील शिक्षण पुरे करताना त्यांनी सन १९६२ मध्ये उस्मानिया विद्यापीठातून ग्रंथालयशास्त्राचा पदवी अभ्यासक्रम पुर्ण केला. पुढे त्यांनी आंध्रविद्यापीठाकडून बाल साहित्यावर प्रबंध सादर करुन पीएच.डी. पदवी संपादन केली. ग्रंथालय शाखासाठी त्यांनी

दिलेले योगदान विविधांगी असून ते ग्रंथालय व्यवसायाशी बांधीलकी असणारे विशेषस्वरुपाचे व्यक्तीमत्त्व म्हणून ओळखले गेले. या क्षेत्रासाठी योगदान देत असताना त्यांनी श्री. अय्यंकी सारख्या ग्रंथालय क्षेत्रातील महानुभवाचे आदर्श आपल्या समोर ठेवले होते. 'आंध्रप्रदेशातील सार्वजनिक ग्रंथालयांचा चालता' बोलत एक ज्ञानकोश म्हणून स्वत:कडे पाहीले. ते एक उत्तम लेखक, भाषांतरकार,संपादक, संदर्भसूचीकार म्हणून ग्रंथालय शास्त्रात ओळखले जात. त्यांनी ग्रंथपालन क्षेत्राशी संबंधीत अनेक ग्रंथ प्रकाशित केले. यामध्ये वर्गीकरण, तालिकीकरण, संदर्भसेवा व व्यवस्थापन यांचा समावेश होता. तसेच त्यांनी अनेक संदर्भसूची व ३०० हून अधिक लेख व तेलगु साहित्य व ग्रंथालय चळवळीशी संबंधीत अनेक व्याख्याने आकाशवाणीवरुन दिली. त्यांची ओळख ही एक आदर्श ग्रंथपाल, प्रशासक म्हणून सर्वदूर ज्ञात होती. त्यांनी आजवर ४५ ग्रंथ, १५ संपादकीय खंड, १६ स्मरणिका व विशेष स्वरुपात १३ संदर्भसूची, ३ निर्देश, ५०० हून अधिक लेख, २०० हून अधिक पुस्तक परिक्षणे इंग्रजीतून व तेलगू भाषेतून लिहीलेली आहेत. त्यांना अनेक पारितोषिके प्राप्त झाली असून त्यांच्यामध्ये दक्षिणभाषा ग्रंथ ट्रस्ट, भारत शासन, आंध्रप्रदेश साहित्य अकादमी, आंध्र विद्यापीठ यांच्याकडून त्यांना ही विविध पारितोषीके प्राप्त झाली आहेत. प्रा. कौला 'एनडोओमेंट ग्रंथालय व माहितीशास्त्र' या संस्थेचे ते सचिव असून त्यांनी आंध्रप्रदेश शासनाद्वारे नेमलेल्या सार्वजनिक ग्रंथालय विषयक समितीवर काम केलेले आहे. त्यांचे सार्वजनिक ग्रंथालय विभाग समितीसाठी अखिल भारतीय ग्रंथालय संघाकडून नामनिर्देशन करण्यात आलेले होते. उत्तर प्रदेशाच्या ग्रंथालय कायद्याविषयक ट्रस्टी म्हणून काम पाहिलेले आहे. अनेक परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा व व्याख्याने यामधून त्यांनी सहभाग दर्शविला असून रशियाला भेट देऊन तेथील महत्त्वपूर्ण ग्रंथालयांना भेटी दिलेल्या आहेत. ग्रंथालयशास्त्रातील नवनवीन बदलांच्या संदर्भात ते स्वत:ला अद्ययावत ठेवत राहिले. विजयवाडा येथील ग्रंथालय प्रशालेचे प्राचार्यपद ही त्यांनी भूषविलेले होते. तसेच ग्रंथप्रदर्शन व राष्ट्रीय ग्रंथालय सभा हा त्यांना एखाद्या सणासमारंभासारखा वाटत असे. ग्रंथालय विषयक जनजागृती करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान ही तेवढेच महत्त्वपूर्ण आहे.

**१४. अदूसुमुल्ली श्रीनिवास राव (१९०१ – १९८१) :**

अदूसुमुल्ली यांचा जन्म १० जानेवारी १९०१ रोजी इनकोलू या गावात झाला. येथेच त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. माध्यमिक स्तरावर बापटला येथे शिक्षण घेत असताना त्यांना ग्रंथालय विषयी प्रेम निर्माण झाले तेव्हा सार्वजनिक स्थानिक ग्रंथालयांची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय होती. अशा काळात ते रेल्वेस्टेशनवर जाऊन ग्रंथालयासाठी निधी गोळा करण्याकरिता भिक्षा मागत असत. याचबरोबर बापटला या ठिकाणी पवित्र समुद्र स्नानासाठी लोक येत असत, तेव्हा त्यांच्याकडे ही ते निधी संकलनाकरिता याचनापुर्वक आग्रह करत. बापटला येथे १९१३ मध्ये संपन्न झालेल्या पहिल्या महासभेने ते खुपच प्रभावी झाले. पुढे त्यांनी वेटापालम येथे १९२१ मध्ये शिक्षकाची नोकरी पत्करली. या ठिकाणी ते स्थानिक सारस्वत निकेतन या संस्थेशी संलग्नीत झाले ते अखेर पर्यंत. या संस्थेच्या सुरवातीस त्यांनी सचिव म्हणून काम पाहिले. व पुढे ते अध्यक्ष झाले. या संस्थेकरिता त्यांनी अत्यंत मोलाची सेवा बजावली. सन १९३१ मध्ये या ग्रंथालयास भेट देण्याकरिता त्यांनी गांधीजींना आमंत्रित केले होते. अनेक ग्रंथालय परिषदांचे त्यांनी आयोजन केले होते. पुष्कळ परिषदांना उपस्थिती दर्शवली होती. त्यांनी कुटूंर जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्यत्व स्विकारलेले होते. तसेच प्रकाशन जिल्हा ग्रंथालय संघाचे ते कार्याध्यक्ष होते. राज्यशासनाने त्यांचा सन १९७५ मध्ये जागतिक तेलगु परिषदेच्या व्यासपीठावरुन 'ग्रंथालय महासारथी' हा किताब देऊन सन्मान केलेला होता. अशा या असाधारण ग्रंथालय सेवकाने या जगाचा १२ मार्च १९८१ रोजी निरोप घेतला.

**१५. बंडारु चंद्रशेखर (१९२०–२००५) :**

श्री. चंद्रशेखरराव यांचा जन्म सन १९२० मध्ये वेमुलपल्ली या कृष्णा जिल्ह्यातील गावी झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणानंतर त्यांनी आपले पदवी पर्यंतचे शिक्षण निझाम महाविद्यालय हैद्राबाद येथून पूर्ण केले. यानंतर काही काळ त्यांनी रेल्वे मध्ये नोकरी केली. पुढील काळात ते स्वातंत्र्य चळवळीकडे आकृष्ट होऊन वरंगल भागाचे त्यांनी नेतृत्व केले. याच ठिकाणाहून त्यांनी कायदाविषयक सेवा सुरू केली. शिक्षणविषयक कार्यात झोकून देताना त्यांनी विश्वेश्वर संस्कृत महाविद्यालय, दुर्गेश्वर महिला कलाशाळा, अनंत लक्ष्मी

आर्युवेद कलाशाळा अशा संस्थांच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. याचबरोबर तेलंगण मुक्ती आंदोलनामध्ये ते सक्रीय सहभागी झाले. हानमकोंडा येथील शासकीय महाविद्यालयामध्ये ते भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय पी.व्ही. नरसिंहराव यांचे ते वर्गमित्र होते. याचबरोबर त्यांनी कोडात्ती, पत्तूरी अशा ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांच्या खाद्यांला खांदा लाऊन ग्रंथालय प्रसाराकरिता महत्त्वपूर्ण योगदान आंध्र परिसरात दिलेले आहे. वरंगळ येथे त्यांनी सन १९८१ मध्ये आंध्रप्रदेश ग्रंथालय परिषदेचे यशस्वी आयोजन केलेले होते. आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाच्या कार्यकारी समितीचे ते १९८८ ते १९९४ मध्ये सदस्य होते तर १९९४ ते १९९७ या काळात त्यांनी या संघाचे उपाध्यक्ष पद भूषविलेले होते. दि. २७ मे २००५ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला.

**१६. बोईनापल्ली व्यंकटराम राव (१९२० – ) :**

यांचा जन्म सन १९२० मध्ये तोताली या करीमनगर जिल्ह्यातील तेलंगण विभागात झाला.त्यांनी विद्याभिवर्धिनी ग्रंथालयाची स्थापना तोतापल्ली येथे सन १९३९ मध्ये केली. तसेच गडिचेरा, पतुरी आणि सुरावरम या आंध्र, तेलंगणा विभागातील ग्रंथालय चळवळीतील महर्षींच्या सानिध्यात ग्रंथालय चळवळीकरिता अगदी जवळून योगदान दिलेले आहे. त्यांना हस्तलिखिते, नाणी, कागदावरील हस्तलिखीते यांचा संग्रह करण्याचा विशेष छंद होता. आंध्रप्रदेश ग्रंथालय संघाचे सचिवपद त्यांनी अत्यंत सक्षमपणे सांभाळले होते. ‘प्राच्यलिखित पुस्तक भंडार’ त्यांनी स्थापन केलेले होते. धर्म, जात, राजकारण विरहीत जीवन व्यतीत करणे ही त्यांची जीवनशैली होती. ग्रंथालयास जोडूनच त्यांनी प्रौढ साक्षरता शाळाही सुरू केलेली होती. तसेच त्यांनी साक्षरता संघटना देखील ‘ज्योती मित्रमंडळी’ या नावाने स्थापन केली होती. याचबरोबर सारस्वत ज्योती या नावाचे एक नियतकालिक देखील त्यांनी १९५० च्या काळात सुरू केलेले होते.

**१७. बुरगुल्ला रामकृष्णराव (१८९९–१९६७) :**

श्री रामकृष्णराव हे एक अष्टपैलु व्यक्तीमत्त्व म्हणून ओळखले जात असत. स्वातंत्र्य चळवळीतील ते एक क्रियाशील कार्यकर्ते होते. तसेच भाषा तज्ञ, राजकारणी आणि या ही पेक्षा ग्रंथालय चळवळीतील तेलंगण विभागातील एक सक्षम कार्यकर्ता म्हणून त्यांना ओळखले

जात असे. १३ मार्च १८९९ रोजी बुरागुल्ला या गावी महाहूब नगर या जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला. त्यांनी आपली पदवी फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथून प्राप्त केली, तर एल.एल.बी. ही पदवी मुंबई विद्यापीठातून प्राप्त केली आणि १९२३ पासून त्यांनी हैद्राबाद येथे आपला वकीली व्यवसाय सुरू केला. त्यांना तेलगु, इंग्रजी, उर्दू, मराठी, कन्नड इत्यादी भाषा उत्तम प्रकारे येत असत. हैद्राबाद परिसरातील ग्रंथालय चळवळीमध्ये ते सहभागी झाले, तसेच ते हैद्राबाद राज्य कॉंग्रेस चे संस्थापक ही होते. चले जाव चळवळीमध्ये त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. सन १९४८ मध्ये हैद्राबाद राज्याचे महसुलमंत्री म्हणून ते कार्यरत राहिले व पुढे १९५२ मध्ये ते राज्याचे मुख्यमंत्री झाले. श्री कृष्णदेवराय आंध्र भाषा निलयम हैद्रराबाद या संस्थेशी त्यांचा अगदी जवळचा संबंध होता. सिनगारेनी येथे संपन्न झालेल्या २५ व्या ग्रंथालय परिषदेचे ते अध्यक्ष होते. या परिसरात शाळा व ग्रंथालय स्थापनेतील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असे होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कालखंडात हैद्रराबाद सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९५५ मध्ये मंजूर करण्यात आला. कायदा मंजूरी संदर्भातील त्यांची भूमिका फारच महत्त्वपूर्ण होती. ग्रंथालय चळवळीशी जवळून नाते असणाऱ्या एका धडाडीच्या नेतृत्वाचा अंत १४ सेप्टेंबर १९६७ रोजी झाला.

**१८. कलाकुरी नरसिंह (१८६२–१९२६) :**

गोदावरी जिल्ह्यातील कोपाल्ले या खेडेगावात श्री कलाकुरी यांचा जन्म १८६२ मध्ये झाला. त्यांनी पूर्व पंरपरेनुसार आपले शिक्षण वडीलांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण करुन त्यांचा परंपरागत व्यवसाय सुरू केला. त्यांच्या इंग्रजीच्या ज्ञानामुळे त्यांचा लोकसंग्रह वाढत गेला. लोकांच्या समस्येविषयक शासन दरबारी अर्ज करताना ते भाषांतराचे काम करीत. देशाच्या प्रगतीसाठी ग्रंथालयाच्या स्थापनेची गरज ओळखून त्यांनी ग्रंथालय चळवळीत स्वत:ला झोकून दिले व पुढे सुजानंदन ग्रंथालय रायकुडूरु येथे स्थापन केले. हे त्या तालुक्यातील पहिलेच ग्रंथालय होते. सन १८९५ मध्ये कोपाल्ले या त्यांच्या जन्म गावी श्री व्ह्यूम यांच्या नावाने त्यांनी ग्रंथालय सुरू केले. तसेच याचवर्षी त्यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना ही केली आणि आणखीन एक ग्रंथालय उंडी येथे दादाभाई नौरोजी यांच्या नावाने सुरू केले. ग्रंथालय चळवळीतील आंध्रप्रदेशातील आघाडीचे कार्यकर्ते भूपतीराजू, तीरुपतीराजू, वदरंगी,

चिनम्माराजू, भूपतीरामाराजू व इतर यांच्या सहकार्याने त्यांनी विरसलींगाकवी समाज ग्रंथालय कुमुदावल्ली येथे स्थापन केले. याचबरोबर या परिसरातील पेडामिरम, चेरुकुमिली, पालाकोदेरु, भोगालू, वेंद्रा इत्यादी ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालय स्थापनेमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अशा अनेक ठिकाणी ग्रंथालय स्थापून ग्रंथालय चळवळ अधिक बळकट करण्याचे स्वप्न अपुरेच ठेवून त्यांनी १९२६ मध्ये या जगाचा निरोप घेतला.

**१९. कोंडा व्यकंटाप्पा पंथूलू (१८६६ –१९४८) :**

हे व्यवसायाने एक वकील होते. ते कृष्ण पत्रिकाचे संस्थापक होते. तसेच ग्रंथालय चळवळीतले आघाडीचे कार्यकर्ते अयंकी यांचे ते निकटवर्तीय होते. आंध्र देश ग्रंथालय भांडारगृह महासभा पहिल्यांदाच बेझवाडा (विजयवाडा) येथे १९१४ मध्ये संपन्न करण्यासाठी त्यांनी अयंकीना संपूर्ण सहकार्य दिलेले होते. ग्रंथालय विषयक विविध समस्ये संदर्भात ते अयंकीच्या बरोबरीने कार्यरत राहिले होते. त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे मद्रास राज्यातील खाजगी ग्रंथालयांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी मद्रास विधान परिषदेमध्ये केलेले विशेष यशस्वी प्रयत्न हे होय.

## ६.५ महाराष्ट्र

### १. श्री. त्र्यंबक दिनकर वाकनीस :

श्री. वाकनीस यांचा जन्म १६ डिसेंबर १९०२ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणही पुण्यास झाले. इंग्रजी व संस्कृत घेऊन १९२३ साली बी.ए. (ऑनर्स) झाल्यानंतर त्यांना कॉलेजात फेलोशिप मिळाली व त्यामुळे त्यांनी एम.ए.चा अभ्याक्रम सुरू केला. प्राध्यापक किंवा उच्च अधिकारी कारकुनी हे त्यांचे ध्येय नव्हते. तत्कालीन कुशाग्र तरुणाचे लक्ष आय.सी.एस. च्या दर्जेदार मानमरातबी परीक्षेकडे असे. श्री. वाकनीसांनी तयारी करुन भारतातील केंद्रातही परीक्षा दिली पण त्यांना इष्ट तो क्रम मिळाला नाही. विवाहानंतर इंग्लंडला जाऊन अभ्यास करुन त्यांनी पुन्हा एकदा परिक्षेचा प्रयत्न केला पण त्यातही त्यांना अपयश आले म्हणून ते पुण्यास परतले. परिक्षेत नियुक्ती न झालेल्या पण उच्च क्रमांक मिळविलेल्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना बडोदे राज्यात सनदी नोकरी मिळत असे. त्याप्रमाणे सन १९२६ साली महसूल खात्याचा अधिकारी म्हणून श्री. वाकनीसांना निवडण्यात आले. सन १९३३ साली बडोदा राज्याचे ग्रंथालय अभिरक्षक न्यूटन मोहन दत्त निवर्तले तेव्हा त्या जागी कुणाला नेमावे याचा दरबारी विचार सुरू झाला. श्री. वाकनीस यांची कुशाग्र बुद्धी, कार्यक्षमता आणि लोकप्रियता सयाजीरावांच्या कानावर गेली होती. त्यामुळे अभिरक्षकपदी त्यांची नियुक्ती केली गेली. वास्तविक पूर्वानुभव किंवा तंत्रज्ञान अंगी नसताना केलेली त्यांची ही नियुक्ती अघटीतच वाटत होती. पण सयाजीराव द्रष्टे होते त्यांना माणसांची पारख अचूक असे. ही नियुक्ती केल्यानंतर महाराजांनी वाकनीसांना प्रशिक्षणासाठी व अनुभवासाठी लंडनला पाठविले. सन १९३४ साली श्री. वाकनिसांनी अभ्यासक्रम पूर्ण करुन लंडन विद्यापीठाची ग्रंथपालन पदवी प्राप्त केली. याचबरोबर त्यांनी तिथल्या नामवंत ग्रंथालयाचे आणि ग्रंथालय चळवळीचे निरीक्षणही केले.

बडोद्याला पतरल्यानंतर वाकनीसांनी ग्रंथालय हेच आपले कार्यक्षेत्र असे मानल्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण लक्ष गुंतवले. बडोदे नगरात जरी बहुसंख्य मराठी जनता असली तरी संस्थानाचा काही जिल्ह्यात आणि ग्रामिण भागात अधिकांश वस्ती गुजराथी लोकांची म्हणून गुजराथी भाषा आत्मसात केली. वाकनीसांनी भाषेबरोबर संस्थानच्या भूगोलाचाही अभ्यास

केला. प्रत्येक खेडे, पेटा, जिल्हा यांची लोकवस्ती, चालीरिती, अस्मिता आणि व्यवसायिक वैशिष्ट्ये जाणून घेऊन तिथल्या ग्रंथालय चळवळीला अनुरूप मुरड घालावयाचा उपक्रम त्यांनी कार्यवाहीत आणला. डॉ. रंगनाथन यांनी आपली पंचसुत्री जाहीर करण्यापूर्वीच वाकनीसांनी बडोदे संस्थानात 'ग्रंथ हे सर्वांसाठी आहेत' हे तत्व व्यवहारात यशस्वीरित्या राबवून दाखवले होते. छोट्या ग्रंथालयाच्या ग्रंथपालनासाठी अभ्यासवर्ग व शिबिरे सुरू करुन ग्रंथाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे मंत्र आणि तंत्र त्यांना शिकविले होते. मध्यवर्ती ग्रंथालयातल्या आणि ग्रंथालय विभागातल्या आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांना ग्रंथालयसेवेच्याद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य कसे करावयाचे याची जाणीव करुन दिली होती. अल्पावधीत त्यांनी ग्रंथालय चळवळीसाठी एवढे श्रम घेतले की त्यांच्या या उपक्रमाची वार्षिक अहवालात सादर केलेली माहिती वाचून सयाजीराव महाराजांना आपल्या यथार्थ निवडीबद्दल खास धन्यता वाटली असेल. सयाजीरावांचा सक्रीय आश्रय आणि वाकनीसांसारख्या कर्तबगार अभिरक्षक बडोदे संस्थानातल्या ग्रंथाल चळवळीला लाभला म्हणूनच भारतातल्या ग्रंथालय चळवळीला एक आदर्श निर्माण होऊ शकला आणि आंतरराष्ट्रीय ग्रंथालय जगतात तिला गौरवपद प्राप्त झाले.

श्री. वाकनिसांनी ठाणे ग्रंथालय परिषद प्रसंगी अस्खलित सुबोध मराठी भाषेत त्यांनी आपले आटोपशीर अध्यक्षीय भाषण केले. भोजनाच्यावेळी दुपारी प्रतिनिधींसमवेत ठाण्याच्या तापलेल्या रस्त्यावरुन ते खानावळीत गेले. तिथे पाटावर बसून गप्पा मारत चवीने जेवले. भोजनानंतर ठाण्याचे ग्रंथालय आपणहून नीट पाहिले. कार्यकर्त्यांशी गप्पा मारल्या आणि ठराव वगैरे झाल्यानंतर समारोपाच्या भाषणात कार्यकर्त्यांना सहकार्याचे आश्वासन दिले व निरोप घेतला.

श्री. वाकनीसांची ही अनौपचारीकता व जिव्हाळ्याची वागणूक सन १९४९ साली ते मुंबई राज्याचे ग्रंथालय अभिरक्षक झाल्यानंतरही टिकून राहिली. वेंगुल्यास झालेल्या रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय परिषदेच्या अधिवेशनातही ते असेच साधेपणाने वागले. वेंगुर्ल्याच्या किनाऱ्यावरच्या रम्य परिसरात असलेल्या डाकबंगल्यात त्यांचे निवासस्थान शासकीय अधिकारी म्हणून असूनही ते तिथे अलिप्तपणे राहिले नाहीत. मुंबईच्या चार कार्यकर्त्यांनी त्यांनी आपल्याबरोबर तिथे ओढून नेले.

बडोद्याचे ग्रंथालय चळवळीतले त्यांचे कार्य नेत्रदीपक असे होते याची माहिती त्यांनी इंग्रजीत लिहिलेल्या छोट्या पुस्तिकेत दिलेली होती. पण विशेष म्हणजे या माहितीचा अहंभाव, अट्टाहास किंवा आदर्श निर्माण करण्याची घमेंड कुठे आढळत नाही. आपल्या परदेशी दौऱ्याची आणि तिथल्या ग्रंथालयाची माहिती दिलेल्या आणखी एका पुस्तिकेतही त्यांची अभ्यासू निरीक्षणवृत्ती आणि विनम्रभाव असाच प्रकट झालेला आहे. सन १९३९ साली सयाजीराव महाराज निर्वतले तोपर्यंत जिद्दीने, उत्साहाने आणि कष्टाने वाकनीसांनी बडोद्याच्या ग्रंथालय चळवळीला वाहून घेतले होते. ना. खेर मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री असताना मुंबई राज्यासाठी ग्रंथालय योजना तयार करण्यासाठी त्यांनी जी 'फैजी समिती' नेमली होती. या समितीस बडोदे संस्थानचे ग्रंथालय अधिकारी श्री. वाकनीस यांची नियुक्ती करता आली नाही, तरीसुद्धा त्यांनी सदस्यांना बडोद्याची पद्धती अभ्यासण्याची आणि श्री. वाकनीयांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळविण्याची सूचना केली होती. फैजी समितीच्या अहवालात सादर केलेली आणि मुंबई राज्यात कार्यान्वित झालेली ग्रंथालय पद्धत ही बडोदे राज्याच्या ग्रंथालय योजनेची इष्ट शासकीय बदल करुन केलेली हुबेहुब नक्कल आहे.

सयाजी महाराजांच्या पश्चात संस्थानच्या राजवटीचे बडोद्याच्या ग्रंथालय योजनेकडे दिवसेंदिवस दुर्लक्ष होत जाऊ लागले. तरीसुद्धा वाकनीसांनी धीर सोडला नाही. प्राप्त परिस्थितीत जेवढे त्यांना टिकवता येणे शक्य होते तेवढे त्यांनी सांभाळले. ग्रंथालय खात्याच्या सहकार्यांना एकत्र बोलावून त्यांनी त्यांना परिस्थितीची जाणीव करुन दिली. पण त्याचबरोबर सयाजीरावांचा हा बहुमोल वारसा निष्ठेने आणि कष्टाने जतन करण्याचे आवाहन केले. मोतीभाई अमीन, रामभाई पटेल, चिमणभाई अमीन, चुनीभाई शहा, मणीलाल काशीवाला, वाचजीभाई अमीन व परळीकर इत्यादी त्यांचे सहकारी श्री. वाकनीसांना फारच मानत. त्यांनी श्री. वाकनीसांचा शब्द खाली पडू दिला नाही व ते त्यांना उत्साहाने साथ देऊ लागले. दिवसेंदिवस ग्रंथालयाचा संसार आटोपशीर होत गेला तरी त्यांची कार्यक्षमता टिकून राहिली. याचे श्रेय श्री. वाकनीसांच्या जिद्दीला आणि प्रसंगावधनी वृत्तीलाच द्यावे लागले होते.

श्री. वाकनीसांचे नाव व कार्य फैजी समितीच्या गौरवपूर्ण उल्लेखामुळे बडोद्याबाहेर पोहचू लागले होते. सन १९४४ साली ठाण्याचे आमंत्रण स्विकारुन पुढील कार्यास सुरवात केली. सन १९४५ साली त्यांना 'इंडिया बुक लीग'च्या लाहोर येथे भरलेल्या समारोहाचे उद्‌घाटन करण्याचे निमंत्रण मिळाले आणि त्यांनी ते स्विकारुन ग्रंथव्यवहारासंबंधी एक उत्कृष्ट भाषण इंग्रजीतून केले. श्री. वाकनीस हे १९४६ पर्यंत बडोद्याच्या ग्रंथालय योजनेचे अभिरक्षक म्हणून काम पाहत होते. ग्रंथालयाचा व्याप कमी करण्याचे शासनाने ठरविल्यानंतर या ज्येष्ठ संस्थांनी अधिकाऱ्यांची शिक्षण खात्यात चिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली. सन १९४९ पर्यंत त्यांनी हे काम नाईलाजाने पाहिले. तरी त्यांचे मन त्यामध्ये रमेना. त्याचवर्षी पुण्याला पहिली मराठी ग्रंथालय परिषद भरली तेव्हा तिचे अध्यक्षपद सहाजिकच वाकनीसांकडे आले. त्यांच्या जन्मगावी झालेल्या गौरवामुळे त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला. याचवर्षी मुंबई राज्याचे ग्रंथालय अभिरक्षक म्हणून त्यांची शासनाने नियुक्ती केली. या यर्थाथ नियुक्तीचे श्रेय मुंबई राज्याचे मुख्यमंत्री कै. नामदार बाळासाहेब खेर यांनाच आहे. बडोद्याची ग्रंथालय योजना व वाकनीसांचे कार्य खेरसाहेबांच्या परिचयाचे होते. बडोद्याच्या तोडीस तोड अशी ग्रंथालय योजना आपल्या राज्यात सुरू करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी त्यांनी फैजी समिती नेमली होती. या योजनेच्या कार्यवाहीची सूत्रे समितीचे एक सदस्य कै. र.पु. कर्वे यांच्या हाती सोपवली होती. कर्वे हे पूर्वी गव्हरन्मेंट लॉ कॉलेजचे ग्रंथपाल व रजिस्ट्रार होते. त्यांच्या अभिरक्षकाच्या कारकिर्दीत फैजी समितीच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही सुरू झाली पण तिला अपेक्षित जोम आला नव्हता. श्री. वाकनीसांच्या हाती सूत्रे सोपवताना नामदार खेरसाहेबांना आपल्या अपेक्षा सार्थ होतील अशी खात्री होती आणि वाकनीसांनी ही नवीन जोमाने व मुख्यमंत्र्यांच्या पाठिंब्याने जलद पावले टाकण्यास सुरूवात केली. भारतात अद्वितीय अशा मुंबईच्या 'बालभवनाची योजना व कार्यवाही' हे वाकनीसांच्या कतृत्वाचे फळ आहे.

ग्रंथालयखात्याची सूत्रे हाती घेताच वाकनिसांनी मध्यवर्ती ग्रंथालयापासून तो तालुका ग्रंथालयापर्यंत प्रत्येक ग्रंथालयाला त्यांनी भेट दिली व तिथल्या कार्यवाहीचे निरीक्षण करुन मार्गदर्शक सूचना केल्या. स्थानिक कार्यकर्त्यांना योजनेचे महत्त्व व त्याअनुषंगाने त्यांच्यावर

येणाऱ्या उत्तरदायित्वाची जाणीव करुन दिली. आपल्या सहकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांनीही प्रेमळपणे विश्वासात घेतले.

आपल्या कारकिर्दीत वाकनीसांनी एकही ग्रंथालय परिषद चुकविली नाही. परिषदेत त्यांची वास्तव्याची सोय जरी अधिकारी म्हणून स्वतंत्र करण्यात आली असली तरी या अलगपणात ते समाधानी नसत. दैनिक सोपस्कार उरकल्यावर ते विविध भागांच्या प्रतिनिधींच्या खोलीत आपणहून जात आणि कुणाशी गप्पा करीत. अनौपचारीक खेळकर वृत्तीने ते वागत. आपल्या हाताखालच्या कारकुनाशी आणि शिपायाशी ही त्यांचे वागणे अगदी घरोब्याचे असे. ज्या परिषदांना ते अध्यक्ष म्हणून उपस्थित राहीले तिथेही एकूण वातावरण असेच खेळीमेळीचे असे. इंदोरच्या १९५१ साली भरलेल्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेत त्यांनी आपल्या विचारपूर्ण आणि अस्खलित वक्तृत्वाने तथाकथीत बुजुर्गांवर प्रभाव तर पाडलाच पण सर्व प्रदेशातल्या प्रतिनिधींची ओळख करुन घेऊन जवळीक निर्माण केली. त्यांच्या या लोकप्रियतेमुळे ते भारतीय ग्रंथालय संघाचे १९४० ते १९४६ पर्यंत उपाध्यक्ष म्हणून नियुक्त झालेले होते. लाहोरच्या ग्रंथप्रदर्शनानंतर श्री. संतराम भाटियांनी आपल्या 'इंडियन लायब्रेरियन' या ग्रंथालय नियतकालिकांचे अभ्यागत संपादन व तहहयात संपादक व सल्लागार म्हणून श्री. वाकनिसांना नेमून टाकले ते त्यांच्या ग्रंथालय क्षेत्रातल्या अधिकार व अनुभवाइतकेच त्यांच्या स्नेहशील सौजन्य वृत्तीमुळे.

श्री. वाकनीस हे महाराष्ट्रातील नव्याने रुजू लागलेल्या ग्रंथालय चळवळीचे एक स्फुर्तीस्थान होते. प्रत्येक छोट्या मोठ्या ग्रंथालय परिषदेत मानमरातब व दर्जा बाजूला ठेवून ते हिरीरीने भाग घेत असत. त्यांचे अध्यक्षीय भाषण जितके कळकळीचे व विचारपूर्ण असे तितकेच त्यांचे एखाद्या ठरावावरचे छोटे व्यक्तव्यही प्रभावी असे त्यांचे विचार ठाम असत व ते आग्रहाने पण हसतमुखत मांडण्याची त्यांची हातोटी होती. ग्रंथालय अभिरक्षकाच्या स्थानावरुन जेव्हा सन १९५८ साली ते निवृत्त झाले तेव्हा त्यांचा अनुभव व प्रशासन कार्यक्षमता याचा लाभ घेण्याचे एशियाटिक सोसायटीच्या कार्यकारी मंडळाने ठरविले. तिथल्या ग्रंथपालाची जागा त्यावेळी रिकामी होती. ती स्विकारुन त्या ग्रंथालयाला त्यांनी यथायोग्य शिस्त लावावी अशी अपेक्षा होती. जस्टीस बावडेकरांनी यासाठी जातीने वाकनीसांना

विनंती केली व आणखी काही स्नेही सदस्यांनी त्यांना साथ दिल्यामुळे वाकनीसांनी दोन वर्षासाठी हे काम पत्करले. या काळात सोसायटीच्या ग्रंथालयांचा कारभार त्यांनी मार्गावर आणला होता. त्यांनी ही नोकरी पत्करली त्यावेळी त्यांच्या ग्रंथालयीन चळवळीतल्या कार्याला व तत्संबंधी उपक्रमांना तसेच पूर्वाधिकाराच्या इतमामाला धक्का लागणार नाही असे आश्वासन त्यांना देण्यात आले होते. पण एके दिवशी एस.एन.डी.टी. युनिव्हसीटीच्या ग्रंथपालन वर्गासाठी त्यांच्या ठरलेल्या व्याख्यानाला ते गेल्याचे समजल्यावर एकेकाळी वाकनीस अभिरक्षक असताना त्यांच्या नाकदुऱ्या काढणाऱ्या चिटणीसांनी त्यांच्या या उपक्रमांबद्दल त्यांच्या टेबलावर जाबाचे पत्र लिहिले. दुसऱ्या दिवशी ग्रंथालयात हजर झाल्यावर वाकनीसांनी ते पत्र वाचले. चिटणीसांच्या या अशिष्ट वर्तणुकीचा त्यांना नक्कीचे राग आला. पण तो न दर्शविता त्यांनी शिष्ट भाषेत राजिनाम्याचे पत्र लिहिले व ग्रंथालयाच्या तिजोरीच्या चाव्यासह शिपायाबरोबर ते पत्र पाठवून सहाय्यकांनाही काही न जाणवू देता हसतमुखाने ते ग्रंथालयाबाहेर पडले.

सन १९५८ साली भारत सरकारने भारतातील ग्रंथालयांची परिस्थितीचे निरीक्षण करुन ग्रंथालयांसाठी सुसूत्र योजना सुचवण्यासाठी सिन्हा समिती नेमली. या समितीवर भारतातल्या निरनिराळ्या प्रांतातले ग्रंथालयतज्ञ सदस्य म्हणून नियुक्त केले गेले त्यात श्री. वाकनीसांची नियुक्ती झाली. या समितीने ठिकठीकाणी फिरुन ग्रंथालये पाहिले व ग्रंथपालांच्या आणि चळवळीतल्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या. या समितीत तज्ञ ग्रंथपाल अनेक होते. तरीसुद्धा ग्रंथालय चळवळीचा निकट, व्यापक व सर्वांगिण अनुभव असणारे असे फक्त एक वाकनीस असल्यामुळे प्रश्न विचारणे, माहिती घेणे ती सुसूत्र जुळवणे व त्यानुसार टिप्पण्या करण्याचे बहुतांश काम त्यांच्यावर पडले आणि त्यांनी ते कळकळीने केले.

श्री. वाकनीस हे जसे उत्तम वक्ते आहेत तसेच ते उत्तम शिक्षक होते. मुंबई, बडोदे व एस.एन.डी.टी. विद्यापीठातल्या ग्रंथपालन वर्गाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या या शिक्षणतज्ञतेचा व शास्त्राच्या अद्यावत अभ्यासाचा प्रत्यय वेळोवेळी येथे आला. एस.एन.डी.टी. व बडोदे विद्यापीठातील वर्गात आवश्यक तेव्हा गुजरातीतून स्पष्टीकरण करण्याचा त्यांच्या हातोटीमुळे विद्यार्थ्यांना फारच लाभ होत असे.

श्री. वाकनीस हे जसे कार्यक्षम ग्रंथपाल आहेत तसेच ते रसिक वाचकही आहेत. बडोद्यात असल्यापासून त्यांना वाचनाची आवड होती व ती आजही टिकून आहे. इंग्रजी भाषेतले विविध विषयावरचे उत्तम साहित्य त्यांनी जसे वाचले आहे तसेच मराठी व गुजराथी साहित्याचा त्यांचा परिचयही गाढा आहे. ग्रंथालयशास्त्र तर त्यांचे जिव्हाळ्याचे, त्या शास्त्रातल्या नियतकालीकांचा आणि ग्रंथांचा अभ्यास तर ते कटाक्षाने करत असत. त्यांच्या व्याख्यानात वेळोवळी या शास्त्रातल्या व चळवळीतल्या नव्या प्रवृत्तीचा व व्यवहारांचा उल्लेख नेहमी येत असे तो एकून अनेकांना आश्चर्य वाटत असे. व्याख्यानापेक्षा लेखनाबाबत ते अधिक जागरुक असत. एखाद्या सामान्य व्यावसायिक नियतकालिकातला लेख असो वा अध्यक्षीय भाषणाचे लेखन असो त्यासाठी ते पूर्वाभ्यास करुन अचूक संदर्भासाठी टिप्पण्या करीत असतात. त्यामुळे त्यांचे हे लेख अभ्यासपूर्ण माहितीने भरलेले व सुबोध शैलीत लिहिले गेले असतात. नाशिक सार्वजनिक ग्रंथालयाच्या महोत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेल्या 'प्रदक्षिणा' या ग्रंथात त्यांनी लिहिलेला 'आदर्श ग्रंथालय' हा प्रदीर्घ लेख. 'सह्याद्री' मासिकातला 'रंगनाथी वर्गीकरण' हा लेख. 'केसरी व साहित्य सहकार' मधले ग्रंथालय चळवळीसंबंधाने वेळावेळी केलेले लेखन किंवा 'इंडियन लायब्ररीयन' मधले इंग्रजी लेख त्यांच्या लेखनप्रभूत्वाची सहज साक्ष देतात. ग्रंथालयीन परिभाषा मराठीत तयार करण्यासाठी ते कटाक्षाने प्रयत्न करीत. परिभाषिक शब्द हा अर्थवाही व सुबोध असण्यापेक्षा तो मूळ व्यवहाराशी व तो व्यक्त करणाऱ्या इंग्रजी शब्दाशी अनुरूप व अचूक असला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे 'ग्रंथसंस्कार' व 'तालिकादर्श' या त्यांच्या छोट्या मार्गदर्शक ग्रंथात अनेकदा क्लिष्टता आली आहे. वाकनीसांचे 'ग्रंथालय संघटन' हे पुस्तक पाहिले तर त्यांची सुबोध लेखन शैली व अभ्यासूवृत्ती यांचा प्रत्यय येतो. (स्त्रोत : वाचनालय)

**२. अविटकर भास्कर बाळकृष्ण :**

हे ग्रंथालय चळवळीतील क्रियाशील कार्यकर्ते म्हणून ओळखले जात. मराठवाडा विभागातील ग्रंथालय चळवळीसाठी त्यांनी ४० वर्षे योगदान दिले असून महाराष्ट्र शासननिर्मित ग्रंथमित्र पुरस्कार देऊन त्यांना गौरविले आहे. मराठवाडा ग्रंथालय संघाचे त्यांनी सहा वर्षे अध्यक्षपद भूषविलेले असून त्यांच्या ग्रंथालयातील योगदानासाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने

त्यांना डी.व्ही.तात्यासाहेब शेणई खाटकरे पुरस्कार देऊन गौरविले होते. औरंगाबाद येथील जीवन विकास ग्रंथालय व प्रसार वाचनालय यांच्या विकासातील त्यांचे योगदान उल्लेखनीय स्वरुपाचे आहे. याच बरोबर त्यांनी पैठण परिसरात फिरत्या ग्रंथालयांसाठी प्रकल्प राबविलेला होता. 'ग्रंथपरिवार' या नियतकालीकाचे त्यांनी सहाय्यक संपादक स्वरुपात २० वर्षे काम पाहिले.

**३. औरंगाबादर मुरलीधर शंकर (१९२५) :**

हे एक सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील अत्यंत क्रियाशील कार्यकर्ते म्हणून नाशिक परिसरात ओळखले जात. नाशिक येथील सार्वजनिक ग्रंथालयाचे सचिव पद सन १९६० –६४ या काळात त्यांनी सांभाळले होते. तसेच १९६४–६६ या काळात ते या ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष होते. मराठवाडा ग्रंथालय संघावर त्यांनी विविध स्तरावर आपले योगदान दिलेले असून यामध्ये सदस्य कार्यकारी मंडळ सचिव (१९६३–६७), ग्रंथालय प्रशिक्षण अभ्यासक्रम नाशिक (समंत्रक), महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ कार्यकारणी (सदस्य), ग्रंथालय सल्लागार समिती महाराष्ट्र शासन (सदस्य), खडक व मालेगाव येथील सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांना 'ग्रंथालयभूषण' (१९७५), 'आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता' (पुणे मराठी ग्रंथालय १९९२), 'आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता' (शिव–पार्वती प्रतिष्ठान), 'ज्येष्ठ ग्रंथालय कार्यकर्ता' (नगरपरिषद नाशिक) असे पुरस्कार प्राप्त झाले होते. एकूणच त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयासाठी दिलेले योगदान नाशिक व महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.

**४. बर्वे शंकर नारायण (१९१०–१९९६) :**

श्री. बर्वे यांनी आपली कारकीर्द ग्रंथपाल म्हणून अहमदनगर शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातून सुरू केली. विद्यार्थी दशेतच त्यांनी ग्रंथालयाचा कारभार सांभाळला होता. पुढील काळात ते केसरी मराठा ग्रंथालयाचे ग्रंथपाल झाले. ते महाराष्ट्र ग्रंथालय संघाशी स्थापनेपासूनच संबंधीत होते. ग्रंथालय क्षेत्राकरीता त्यांनी दिलेले योगदान हे महत्त्वपूर्ण आहे. ते संपादक मंडळ साहित्य सहकारचे अध्यक्ष, पुणे परिषदेचे १९६१ मध्ये समंत्रक, कूलाबा जिल्हा ग्रंथालय परिषदेचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे सदस्य व उपाध्यक्ष

होते. याचबरोबर ग्रंथालयाशी संबंधीत विविध समित्यांवर त्यांनी आपले योगदान दिलेले होते. त्यांचे  दोन ग्रंथ व अनेक लेख ग्रंथालय क्षेत्राविषयी प्रसिद्ध झालेले आहेत. ग्रंथालय क्षेत्रातील एक बूजूर्ग कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख सर्वदूर पसरलेली आहे. तसेच ते दाते सूची मंडळाचे व लोकमान्य टिळक शताब्दी सूचीचे संपादक होते. या संबंधीत त्यांचे योगदान ही महत्त्वपूर्ण स्वरुपाचे आहे.

**५. भट वा. वी. (१९११ –८२) :**

मुबई मराठी ग्रंथालयाचे सचिवपद भूषविताना त्यांनी या ग्रंथालयाच्या विकासासाठी दिलेले योगदान लक्षात घेऊनच त्यांना मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. या ग्रंथालयाचे ते १९३८–४७ या काळात ते सचिव होते. तसेच त्यांनी आजवर पुढील पदे भूषविलेली आहेत.

१. कार्यवाह: मुंबई व उपनगर साहित्य संमेलन

२. कार्यवाह: मुंबई उपनगर व ठाणे जिल्हा वाचनालय परिषद, १९४५

३. कार्यवाह: प्रमुख कार्यवाह १९५०–६५, कार्याध्यक्ष १९६५–६७

४. संस्थापक सदस्य व कार्योपाध्यय: महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ १९६२–६७

सदस्य, संपादक मंडळ, साहित्य सहकार व १६ वर्षे साहित्य सहकाराच्या प्रकाशनाची सर्व व्यवस्था, १७ वर्षे महाविद्यालयीन ग्रंथालय परिषदेची आयोजन, कार्यक्रम, नियोजन व ठराव इत्यादी व्यवस्था पाहिली. महाराष्ट्र शासन ग्रंथालय सल्लागार समिती सभासद, सरकारकडे वेळोवेळी नेलेल्या शिष्टमंडळाचे त्यांनी नेतृत्व ही केलेले आहे.

**इतर कार्ये :**

संस्थापक व कार्यवाह साहित्य सहकार संघ ली. १९५०–६४, कार्याध्यक्ष १९६५–६७, सदस्य नियामक मंडळ महाराष्ट्र साहित्य परिषद, संचालक युगवाणी प्रकाशन १९५०–५५, संचालक फेमस प्रिंटर्स १९५०–६०, प्रकाशक, ग्रंथालयाच्या प्रश्नावर स्फूट लेखन.

सेवानिवृत्तीनंतर ते महाराष्ट्र ग्रंथालय चळवळीचे कामकाज आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत करत राहीले. ग्रंथालय चळवळीस योगदान देताना त्यांनी महाराष्ट्र ग्रंथालय संघाची स्थापना १३ मे १९४९ रोजी केली. या चळवळीला बळकटी देण्यासाठी त्यांच्याच

कल्पनेतून 'साहित्य सहकार' हे संघाचे मुखपत्र म्हणून प्रकाशित करण्यास सुरवात केली. पुढे त्याचेच नामकरण १९७१ मध्ये 'वाचनालय' असे करण्यात आले. त्यांचे मोठेपण म्हणजे त्यांनी अनेक नवलेखकांना व ग्रंथालय क्षेत्रातील कार्यकर्त्यांना सतत प्रोत्साहन दिले. यातूनच पुणे विद्यापीठाचे ग्रंथपाल शा.ग. महाजन यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. महाराष्ट्र ग्रंथपाल, ग्रंथालय सेवक व कार्यकर्ते आणि 'महाराष्ट्र ग्रंथालयाची सूची' या ग्रंथाच्या लेखनासाठी दिलेले प्रोत्साहन हे अशा स्वरुपाचे आहे.तसेच वा.वी. भट यांना ६० वर्षे पुर्ण होताच मुंबई येथील महाराष्ट्र ग्रंथालय संमेलनाच्या प्रसंगी १९७१ मध्ये ग्रंथालय कार्यकारणीने त्यांचा सत्कार करुन त्यांना १०,००० रुपयांची थैली अर्पण केली. या रक्कमेत त्यांनी स्वत: भर घालून त्या निधीचा योग्य प्रकारे वापर होण्यासाठी त्यांनी मराठीत ग्रंथालय शास्त्र विषयक उत्तम ग्रंथाला पारितोषिक द्यावे अशी सूचना त्यांनी मांडली. प्रत्यक्षात या निधीच्या उपयोगासाठी एक स्पर्धा घेण्यात आली होती. या निधीतून प्राप्त झालेल्या समर्पक सूचनांना पारितोषिक ही घोषित करण्यात आलेली होती. या सुचनाविषयक पारितोषिकांचे मानकरी ठरलेले डॉ. पेढे व डॉ. शा.ग. महाजन पुढे यागोयोगाने उत्तम ग्रंथाला पारितोषिक या सूचनेअंतर्गत डॉ. महाजन यांच्या पुढील दोन ग्रंथांना हे राज्य स्तरीय पुरस्कार प्राप्त झाले,

१. ग्रंथालयीन तालिकीकरण प्रात्याक्षिक – खंड १ (१९७४, सावंतवाडी येथील अधिवेशनात प्रकाशन)
२. ग्रंथालयीन तालिकीकरण प्रात्याक्षिक – खंड २ (१९७९, मालेगाव येथील ग्रंथालय अधिवेशनात प्रकाशन)

पुढे याच निधीतून ग्रंथालयभूषण हा पुरस्कार काही ग्रंथपालांना व कार्यकर्त्यांना देण्यात आला. ग्रंथालय क्षेत्रासाठी भट यांनी आपले आयुष्य वेचले आहे.

**६. हिंगवे, कृ.श. (१९१५ –१९९९) :**

ग्रंथालय क्षेत्रातील ते एक शिस्तप्रिय व्यक्ती म्हणून सुपरिचीत होते व नेमकेपणा व स्पष्टवक्तेपणा हे त्यांचे गुणविशेष होते. त्यांनी आपल्या ग्रंथालय क्षेत्राची सुरवात सहाय्यक म्हणून केली व पुढे ते डेक्कन कॉलजचे ग्रंथपाल म्हणून काम सांभाळले. या काळात त्यांनी पुणे ग्रंथालय संघाद्वारे चालविलेल्या ग्रंथालय अभ्यासक्रमासाठी १९४७–५० या काळात

योगदान दिले व पुढे महाराष्ट्र ग्रंथालय संघाद्वारे सुरू केलेल्या अभ्यासक्रास १९५१–६० या काळात सहकार्य केले. ते ग्रंथालय संघाचे संस्थापक, सचीव होते तर महाराष्ट्र ग्रंथालय संघाशी संबंधीत काम करत असताना संघाचे मुखपत्र 'साहित्य सहकार' यांचे १९५४–५८ या काळात संपादक पद सांभाळले होते. गहू खरेदी योजनेअंतर्गत त्यांनी अमेरिकेला भेट दिलेली होती. व युनोस्कोच्या सभेत १९६१ मध्ये सहभाग दर्शविताना वाचन साहित्य या अनुषंगाने तेथे त्यांनी दर्शविलेला सहभाग उल्लेखनीय स्वरुपाचा होता. तसेच सार्वजनिक ग्रंथालयाशी योगदान देत असताना अध्यक्ष म्हणून जिल्हा ग्रंथालय संघासाठी १९६५ मध्ये दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असून विविध ग्रंथालय परिषदातून त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान ही महत्त्वपूर्ण असून अनेक विद्यापीठस्तरावरील परिषदांमध्ये आपले शोधनिबंध सादर करुन ग्रंथालय शास्त्राचा सातत्यपूर्वक प्रसार केला. पुणे विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून कार्यरत असताना त्यांनी या ग्रंथालयाला एका उंचीवर नेऊन ठेवले. तसेच या विषयात त्यांनी अनेक विद्यार्थी, लेखक, ग्रंथपाल घडविले. ग्रंथालयशास्त्राविषयक त्यांनी ग्रंथवर्गीकरण तात्विक, सुलभ तालिकीकरण ही प्रमाणपत्र अभ्यासासाठी लिहिलेली पुस्तके अत्यंत सुलभ असून सेवा निवृत्तीनंतर विद्यापीठ अनुदान प्रकल्पातंर्गत त्यांनी ग्रंथालय व्यवस्थापन हे इंग्रजी भाषेतील पुस्तक लिहीले. अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेमध्ये भाग घेऊन त्यांनी निबंध सादर केले होते. विद्यापीठ मंडळाच्या समितीवरही त्यांनी सभासद म्हणून काम पाहिले होते. कोलंबो येथे संपन्न झालेल्या युनोस्को आयोजित ग्रंथजगत या चर्चासत्रात भारतावे प्रतिनिधीत्व केले होते. तसेच धारवाड येथील 'आयस्लीक' परिषदेचे अध्यक्ष स्थान भूषविलेले होते. ते एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून सर्व विद्यार्थ्यांना प्रिय होते. याचबरोबर एक उत्तम वाचन संस्कृतीचा पुरस्कर्ता हीच त्यांची खरी ओळख होय.

**७. पारखी रघुनाथ शतानंद (१९०२–१९६८) :**

श्री पारखी हे देशातील ग्रंथपालन व्यवसायाचे भूषण म्हणून ओळखले जात. फर्ग्युसन कॉलेजचे ग्रंथपाल म्हणून सन १९२१–१९५० या काळात कार्यरत होते. वाचकाभिमुख सेवा हे त्यांच्या ग्रंथालय सेवेतील महत्त्वपूर्ण योगदान. आपल्या पुढील काळात त्यांनी

एशियाटीक सोसायटी, मुंबई व गोखले इन्स्टिटट्यूट पुणे या दोन ख्यातनाम संस्थांचे ग्रंथपाल पद भूषविलेले. ग्रंथालयाचे महत्त्व समाज माणसात रुजविण्यासाठी त्यांनी ग्रंथ व ग्रंथालयाचे महत्त्व, वाचन संस्कृती व ग्रंथालय सेवा या अनुषंगाने पुष्कळच लेखन केलेले आहे. 'ग्रंथालय शास्त्राचा ओनामा' व 'द्विबिंदू वर्गीकरण पद्धती' हे त्यांचे मराठी भाषेतील गाजलेले ग्रंथ. तसेच 'डेसिमल व कोलन वर्गीकरण पद्धती यांचा तौलानिक अभ्यास' हा इंग्रजी भाषेतील ग्रंथ खूपच गाजला होता. भारतामधील विविध ग्रंथालय परिषदांमध्ये सहभाग दर्शवून त्यांनी सादर केलेले ग्रंथ हे नेहमीच लक्षवेधी ठरले. तसेच भारतीय ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष पद ही त्यांनी भूषविलेले होते. त्यांच्या संस्कारातून तयार झालेले अनेक विद्यार्थी भारतात सर्वदूर पसरलेले आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबर त्यांनी पुढे ग्रंथालय संघ व महाराष्ट्र ग्रंथालय संघ यांनी सुरु केलेल्या ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासाकरिता १९३८ ते १९६३ या काळात शिक्षक म्हणून दिलेले योगदान ही विशेष लक्षणीय आहे. महाराष्ट्र ग्रंथालय संघाद्वारे त्यांची ६१ शी साजरी करण्यात आली होती. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी त्यांना पर्सफंड देऊन गौरविले होते. या फंडाद्वारे प्राप्त रंक्कम त्यांनी पुन्हा विद्यापीठाला देणगीदाखल देऊन या रक्कमेतून ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या पदवी स्तरावरील वर्गीकरण या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांस पारितोषिक ही जाहीर केले होते. ग्रंथालयक्षेत्राच्या अनुषंगाने त्यांनी इंग्रजी व मराठीतून एकूण १० ग्रंथ लिहिलेले आहेत.

**८. पाठक विष्णू गोपाळ (१९०५ ते ) :**

ग्रंथालय शास्त्रातील पदविका अभ्यासक्रम पुरा केल्यानंतर मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय येथे सहसचिव म्हणून १९३२ मध्ये दाखल झाले. सन १९४९ अखेर हे पद सांभाळताना त्यांनी फिरती ग्रंथालय सेवा, हेमंत व्याख्यानमाला हे महत्त्वपूर्ण उपक्रम प्रस्तुत ग्रंथालयाच्या लॅमिल्टन शाखेमधून राबविले होते. दादर येथील परिसरात या ग्रंथालयासाठी इमारत उभी करण्यासाठी जमीन प्राप्त करणेसाठी त्यांनी खूपच परीश्रम घेतलेले होते. तसेच ते कुलाबा ग्रंथालय संघाचे संस्थापक सदस्य होते. प्राध्यापक जयकर यांना स्वत:ची लायब्ररी उभीकरण्यासाठी त्यांनी मदत केली होती. त्यांनी पनवेल तालुक्यात पालघर या त्यांच्या राहत्या गावी ग्रंथालय ही सुरू केले होते. तसेच क्रांतीवीर वासुदेव वसंत फडके स्मारक

समिती शिरढोणचे ते संस्थापक ही होते. स्वातंत्र्यापुर्व काळातील त्यांचे सार्वजनिक ग्रंथालयासाठी दिलेले योगदान पनवेल कोलाबा परिसरात त्याकाळी गौरविलेले होते.

**९. कृ. द. पुराणिक (१९२२ –१९९०) :**

श्री. पुराणिक यांनी आपले महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर एम.लिब. हा अभ्यासक्रम दिल्ली विद्यापीठातून पुरा केला. सुरवातीच्या काळात त्यांनी बृहन् महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज, पुणे येथे १९४३–४६ या काळात व स.प.महाविद्यालय पुणे येथे १९४७–४८ या काळात ग्रंथपाल म्हणून काम पाहिले. पुढे १९५१–५८ या काळात ते रतन टाटा ग्रंथालय दिल्ली व स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत ग्रंथपाल म्हणून काम पाहिले. त्यांनी १९५८–१९६७ या काळात महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय अभिरक्षक म्हणून कार्यभार सांभाळला आणि १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक म्हणून कार्यभार स्विकारला तो १९८२ अखेर महाराष्ट्र राज्य ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासाकरीता त्यांनी क्रमिक पुस्तके तयार करुन घेतली. ग्रंथालय क्षेत्रातील एक पारदर्शक व्यक्ती म्हणून त्यांनी महाराष्ट्र राज्यातील ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी दिलेले योगदान हे अंत्यत उल्लेखनीय असून ग्रंथालय चळवळीतील सामान्यातल्या सामान्य कार्यकर्त्यांच्या समस्या समजावून घेण्याची त्यांची हातोटी, यामुळे त्यांनी या चळवळीतील अनेक कार्यकर्ते जोडले. ही चळवळ अधिक सक्षम केली. या राज्यातील चळवळीला एक पायाभूम स्वरुपात दिशा देण्यासाठीचे त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. ग्रंथालय शास्त्राशी संबंधित २२ हून अधिक लेख त्यांनी मराठी व इंग्रजी मधून प्रकाशित केले. त्यांच्या या गौरवपूर्ण कार्याची दखल घेऊन साहित्यसुची मासिकाने पुराणिक विशेषांक प्रकाशित केला आहे.

**१०. प्रियोळकर अ. का. (१८९५–१९७३) :**

प्रियोळकर हे एक इतिहास संशोधक व भाषा संशोधक म्हणून सर्वश्रुत असले तरी ग्रंथालय क्षेत्रासाठीचे योगदान ही महत्त्वपूर्ण आहे. प्रत्यक्षात ते मराठी संशोधन मंडळाशी संबंधीत असले तरी त्यांचा मुंबई मराठी ग्रंथालय संग्रहाशी विशेष संबंध होता. गोरेगाव येथे संपन्न झालेल्या कुलाबा जिल्हा वाचनालय परिषदेचे ते अध्यक्ष होते. तसेच १९४९ मध्ये पुणे येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेमध्ये ग्रंथ प्रदर्शन उपक्रमाचे त्यांनी उद्घाटन

केलेले होते. त्यांनी ग्रंथालय विषयक पुष्कळच संशोधनपर लेखन करताना ग्रंथसंग्रह, ग्रंथाचे सुरवातीचे मुद्रण स्वरुप, मुद्रण कलेचा इतिहास, मुद्रण कला व दोलामुद्रिते या विषयांवर त्यांनी केलेले लेखन हे आदर्श संशोधनाचे द्योतक असेच आहे. त्यांनी केलेल्या विशेष लेखनामध्ये मराठी दोलामुद्रिते, भारतातील मुद्रण कला, मुंबई इलाख्यातील ग्रंथालय चळवळीची सुरवात व विकास या अनुषंगाने केलेले ग्रंथरुप लेखन विशेष उल्लेखनीय आहे. गोव्याच्या इतिहास विषयक त्यांचा 'द गोवा इक्विजिशन' हा एक अमुल्य ग्रंथ म्हणून ओळखला जातो. सन १९५१ मध्ये कारवार येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ही त्यांनी भूषविलेले होते.

**११. रेगे शांताराम शंकर (१९१९ ते ) :**

पदवी अभ्यासक्रमानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठापासून ग्रंथालयशास्त्राच्या पदवीका अभ्यासक्रम पुरा करुन मुंबई येथील सिद्धार्थ कॉलेजमध्ये सन १९४३ मध्ये नोकरी स्विकारली ती सेवानिवृत्तीपर्यंत . महाविद्यालयीन स्तरावर काम करत असताना त्यांनी सार्वजनिक ग्रंथालय चळवळीमध्ये सेवानिवृत्त होताच त्वरीत मुंबई ग्रंथालयाचे सचिव म्हणून काम पाहू लागले. पुढे १९६२ मध्ये या संघाचे ते अध्यक्ष ही झाले. या संघाद्वारे चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण वर्गाचे संचालक म्हणून १९५०–६७ या काळात काम पाहिले. दरम्यानच्या काळात त्यांनी कामगार कल्याण मंडळाकडून चालविणाऱ्या ग्रंथालय अभ्यासक्रमाच्या समंत्र कार्याची जबाबदारी १९६२–६३ या काळात सांभाळली. ते महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथ निवड समितीचे सदस्य ही होते. तसेच ग्रंथालयाकरिता काम पाहणारे योजना समितीचे सदस्यत्व ही १९६४–६५ या काळात भूषविले होते. मुबई विद्यापीठाद्वारे चालविल्या जाणाऱ्या ग्रंथालयशास्त्र विषयाच्या पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षक म्हणून १९६५–६७ या काळात काम पाहिले. अनेक लेख त्यांनी साहित्य सहकार व इतर वृत्तपत्रे व व्यावसायीक जनरल मधून प्रकाशित केले ते उत्तम कथा लेखक होते. तसेच त्यांनी अनेक पुस्तके ही लिहीली.

सावंतवाडी येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे संमेलन श्रीराम वाचनमंदिर सावंतवाडी येथे डिसेंबर १९९५ मध्ये श्री. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनात त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सुरवातीस ग्रंथपाल म्हणून होत असणाऱ्या

त्यांच्या सत्काराबद्दल समाधान व्यक्त करुन या व्यवसायाचा अभिमान असल्याचे नमुद केले होते. सन १९७५ हे वर्ष जगभर महीला वर्ष म्हणून मानले गेले. या पार्श्वभूमीवर त्यांनी विचार व्यक्त करताना केलेला ठळक उल्लेख म्हणजे, '' ठाण्यात पहिले मराठी ग्रंथसंग्रहालय सुरु झाले. नंतर त्यांचे अनुकरण इतर ठिकाणी झाले. त्याच ठाण्यात महाराष्ट्रातील केवळ महीलांनी सुरू केले व चालविलेले पहिले वाचनालय आता उभे राहीले आहे. त्याचे नाव आहे 'शारदा वाचनालय'.'' होय.

त्यांनी ६ ऑक्टोबर १९७३ रोजी स्थापन केलेल्या राजमाता जिजाबाई ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी महिलांच्या वाचनालयाची कल्पना मांडून जागा दिली, सहकार्य केले, प्रथम स्त्रियांची स्थायी समिती नेमली. सभासद केले, घटना तयार केली. २० डिसेंबर १९७३ च्या सभेत घटना संमत करुन घेतली. त्यामध्ये महिलांचे कार्यकारी मंडळ निवडले. आज हे वाचनालय 'ड' वर्गात आहे. ठाणे गावातील स्त्रियांच्या सहकार्य मिळत असल्याने त्यांचा विकास लवकर होईल याचा विश्वास वाटतो.

**१२. उजळंबकर कृष्णा मुकूंद (१९२४–२००६) :**

हे हैद्राबाद संस्थामधील मराठवाडा विभागाचे रहिवासी. त्यांनी पदव्युत्तर पदवी बरोबर कायद्याची पदवी घेतल्यानंतर पुढे दिल्ली येथे ग्रंथालय महर्षी डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर पदवी घेतली. या काळात त्यांच्यावर रंगनाथन यांचा पुष्कळ प्रभाव पडला आणि म्हणूनच आयुष्याच्या पुढील काळात रंगनाथन यांच्या कार्याचा आणि विचारांचा वसा पुढे नेला. त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायद्यास प्राप्त केलेली मंजूरी हे होय. हाच कायदा पुढे आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायदा म्हणून अस्तित्वात आला. हैद्राबाद मध्ये ग्रंथपाल म्हणून केंद्रीय ग्रंथालय करण्याची संधी असताना ते तत्कालीन संयुक्त महाराष्ट्रामध्ये ग्रंथालय चळवळी विषयक कार्य करण्यास पुष्कळ संधी असल्याचे लक्षात घेऊन मुंबई येथील सचिवालय केंद्रीय ग्रंथालयाचा ग्रंथपाल म्हणून सन १९५६–५७ मध्ये कार्यरत होते. पुढे १९५७–६२ या काळात त्यांनी शासकीय ग्रंथालय नागपूर व सहाय्यक ग्रंथालय अधिक्षक विदर्भ विभाग म्हणून काम पाहिले. त्यांनी चार खंडातील मराठी ग्रंथाची सूची टंकलिखीत स्वरुपात तयार केली. सन १९८० –८२ या

कालखंडात त्यांनी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालक म्हणून काम पाहिले. सन १९६२ मध्ये डॉ. रंगनाथन यांचा ७१ वा वाढदिवस जगभर साजरा झाला. यासाठी श्री. उजंबळकर यांनी रंगनाथन गौरव समिती स्थापन केली. व या समितीच्या माध्यमातून डॉ. रंगनाथन यांचे इंग्रजी चरित्राचा अनुवाद व ग्रंथालयशास्त्र विषयक पुस्तिका प्रकाशित केला. साहित्यिक म्हणून त्यांनी अनेक कथा, कांदबऱ्या लिहील्या. तसेच 'बहुत सुकृताची जोडी' हे आत्मचरित्र प्रकाशित केले. 'कृष्णा मिळाली कोयनेला' हे भारताचे संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर लिहीलेली कांदबरी खूपच गाजली. त्यांनी लिहिलेल्या साहित्याची संख्या २३ इतकी आहे. त्यांनी लेखक व पुस्तक विक्रेता व ग्रंथालयशास्त्रातील प्रधान अधिकारी व ग्रंथालय चळवळीसाठी स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करणारा एक सच्चा ग्रंथालय कार्यकर्ता या सर्व भूमिका सक्षमपणे पार पाडल्या.

**१३. डॉ. महाजन शांताराम गजानन (१९३२) :**

हे पुण्याच्या जुन्नेरचे रहिवाशी.  प्राथमिक शिक्षण जून्नर येथे पार पाडले. अनेक छोटी मोठी कामे करत ते शिक्षण काळात स्वत:च्या कमाईतून कुटूंबास मदत करत होते. एस.सी.सी. झाल्यानंतर केसरी व मराठा ग्रंथालयात त्यांनी नोकरी स्विकारली व टंक लेखन शिकून घेतले. ही नोकरी करत असताना त्यांनी ग्रंथालय प्रमाणपत्र हा अभ्यासक्रम पूर्ण केला. पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना ग्रंथालय पदवी अभ्यासक्रम आणि बंगलोर येथे डॉक्युमेंटेशन विषयक अभ्यासक्रम त्यांनी पूरा केला. सन १९७२  मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठातून इतिहास विषयात पी.एच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांचा विषय होता 'महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा विकास (१८०५-१९२१)' असा होता. त्यांची कार्यालयीन कारकिर्द पुढील प्रमाणे,

१. केसरी - मराठा ग्रंथशाला १९४९-१९५४
२. पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालयीन कारकीर्द १९५४ -१९९२
३. लायब्ररी असिस्टंट - १९५४-१९५७
४. कॅटलॉगर कमसिनीयर असिस्टंट : १९५७-६१
५. चीफ कॅटलॉगर : १९६१-१९७०

६. डॉक्युमेंटेशन ऑफीसर : १९७०– १९७६
७. उपग्रंथपाल : १९७६ – १९८३
८. विद्यापीठ ग्रंथपाल: १९८३–१९८५
९. विद्यापीठ ग्रंथपाल व ग्रंथालय व माहितीशास्त्र प्राध्यापक :१९८५–१९९२

त्यांनी पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयपदी काम करत असताना विविध उपक्रम राबविले. तसेच या विभागातर्फे विविध परिषदा, चर्चासत्रे, उजळणी वर्ग यांचे आयोजन केले.त्यांनी १९८८ मध्ये ब्रिटीश कौन्सीलच्या वतीने ग्रंथालयाचा अभ्यासक्रम करण्यासाठी अभ्यास दौरा केला असून पॅरीस येथे आंतरराष्ट्रीय दप्तरखाना परिषदेत भाग घेऊन निबंध सादर केला होता. तसेच वेल्स येथे जावून रंगनाथन यांचा पत्रव्यवहार जमा केला व स्थानिक इतिहास दालनाचा अभ्यासही केला आहे. त्यांचे विशेष कार्य पुढील प्रमाणे,

**विशेष कार्य :**

१. सन १९८९ मध्ये ३५ वी अखिल भारतीय ग्रंथालय परिषद भरवली (७ ते १० नोव्हेंबर १९८९)
२. युजीसी मध्ये ग्रंथालयशास्त्र पॅनेलवर सभासद म्हणून कार्य. युजीसी करिक्युलम डेव्हलपमेंट कमिटीवर सभासद म्हणून कार्य
३. दहावी आयस्लीक ग्रंथालय परिषद आयोजित केली. (१९९२)
४. १७ मार्च १९९४ रोजी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रम (बी.लीब.) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे मानद संचालक पदी नियुक्ती, सन १९९६ मध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे सुरू करण्यात डॉ. महाजन यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. ३४ मराठी ग्रंथांची निर्मिती केली.
५. ११ फेब्रुवारी २००४ मध्ये दिल्ली येथे इन्फर्मेशन ॲण्ड लायब्ररी नेटवर्क तर्फे कॅलीबर आंतरराष्ट्रीय ग्रंथालय परिषदेमध्ये प्रा. यशपाल यांचे हस्ते सत्कार झाला. University & College libraaianship in India 21st Century या  महाजन गौरवग्रंथाचे प्रा. अरुण निगवेकर यांचे हस्ते प्रसिद्ध झाला.

६. सन २०१० आयस्लीक या अखिल भारतीय ग्रंथालय संघटनेचा ए.के.मुखर्जी जीवन गौरव पुरस्कार प्रदान केला.

**पारितोषिके :**

१. डॉ. महाजन यांना बेस्ट टीचर्स अॅवार्ड प्रदान (१९९२)

२. सन २००३ मध्ये पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान ही विश्वस्त संस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे ११ फेब्रुवारी २००४ रोजी पुणे शहराचा ज्ञानकोश प्रसिद्ध झाला. या ज्ञानकोशास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा श्री. श्रीपाद जोशी पुरस्कार (२००४) व केसरी मराठा संस्थेचा जयवंतराव टिळक स्मृती पुरस्कार प्राप्त (२००६).

(महाजन,शा.ग. (२००७) यशोगाथा ज्ञानसाधनेची, पुणे उत्कर्ष प्रकाशन)

**१४. श्री. मठकर जयानंद शिवराम (१९२९–२०१६) :**

यांचा जन्म मुंबई येथे १२ ऑक्टोबर १९२९ रोजी झाला. मठकर हे चतूरस्त्र व्यक्ती म्हणून केवळ सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातच नसुन महाराष्ट्रात सर्वदूर परिचीत आहेत. गोवा मुक्ती संग्राम, भारतीय स्वातंत्र्य लढा, प्रजापरिषद सावंतवाडी या चळवळीतील ते एक अग्रणी व्यक्ती म्हणून ओळखले जात. स्व. नाथ पै, मधू दंडवते, ना.ग.गोरे, जयप्रकाश नारायण अशा महनीय व्यक्तींच्या सानिध्यात येऊन राजकारभार व समाजकारण क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दीले आहे. सन १९७४–७८ या काळात ते तत्कालीन सावंतवाडी मतदारसंघातून दोन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले होते. कामगार विभागात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून विडी कामगार, बांधकाम कामगार या संदर्भातील त्यांचे काम विशेष लक्षणीय असून या श्रमिक वर्गासाठी विविध चळवळी उभ्या करुन व त्यांच्या समस्यावर लेख लिहून कामगारांचे निराकरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. सभेत पत्रकार क्षेत्रातील त्यांचे योगदान ही विशेष लक्षणिय आहे. त्यांनी साप्ताहिक, मासिक याचबरोबर २९ ऑक्टोबर १९२४ रोजी सुरू केलेल्या व आजवर सातत्यपूर्ण प्रकाशित होणाऱ्या 'वैनतीय' या साप्ताहिकाचे सन १९६० पासून संपादक म्हणून अत्यंत सक्षमपणे आपल्या जीवनाच्या अखेर पर्यंत संपादन केले. अनेक पुस्तकांचे लेखनही केलेले असून या सर्वांसाठीही ग्रंथालय क्षेत्रातील त्यांचे योगदान विशेष लक्षणीय आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक सार्वजनिक ग्रंथालय स्थापनेत त्यांचा पुढाकार होता.

**ग्रंथालय क्षेत्रातील कार्ये :**

१. १६४ व्या वर्षात पदार्पण केलेल्या सावंतवाडी येथील श्रीराम वाचनमंदिराचे अखेरपर्यंत (२०१६) अध्यक्ष.

२. सिंधुदुर्ग जिल्हा ग्रंथालय संघाचे संस्थापक व पहिले अध्यक्ष.

३. सन १९७५ साली सावंतवाडी येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलनाचे स्वागताध्यक्ष

४. सन १९९८ साली सावंतवाडी येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलनाचे अध्यक्ष.

५. महाराष्ट्र विधान सभेचे प्रतिनिधी म्हणून राज्य ग्रंथालय परिषदेवर दोन वेळा नियुक्त.

६. सन १९९८–९९ या कालावधीत महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष.

७. राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष या नात्याने १९९८–९९ या कालावधीत राज्य ग्रंथालय परिषदेचे सदस्य.

८. कै. बनूताई पई ग्रंथालय व संस्कार केंद्र मडूरा (ता. सावंतवाडी) या ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष.

९. वयाच्या ७५ रीच्या निमित्ताने ग्रंथालयाद्वारे मिळालेल्या सुमारे ५५० पुस्तकामध्ये आपली ४८० हून अधिक पुस्तके घालून १००० हून अधीक अंदाजे २ लाख रुपये किंमतीची पुस्तके जिल्ह्यातील ग्रंथालयांना देणगी दाखल दिली आहेत.

१०. वैनतेय, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, साधना, ग्रंथ परिवार या नियतकालीकातून ग्रंथालयाचा प्रश्नांवर वेळोवेळी लेख लीहून ग्रंथालयाच्या विविध समस्याबांबत उहापोह केला आहे.

११. महाराष्ट्र शासनाच्यावतीने ग्रंथालय महर्षी डॉ. रंगनाथन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा 'ग्रंथमित्र' पुरस्काराचे सन २००० सालाचे मानकरी.

१२. एस. एस. जोशी संशोधन फाउंडेशन व ना. ग. गोरे अकादमी यां संस्थेच्या प्रा. मधू दंडवते ग्रंथालय च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य.

१३. सावंतवाडी श्रीराम वाचन मंदीराच्या वतीने यशवंतरा चव्हाण मुक्त विद्यापीठाचे बि.लिब., आणि एम. लिब., पदवी परीक्षांचे वर्ग सुरू करण्यास पुढाकार.

ग्रंथालय क्षेत्रातील श्री. मठकर यांचे योगदानाबद्दल त्यांना व इतर कार्याबद्दल ही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.ते पुरस्कार पुढील प्रमाणे,

१. त्यांना ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देणारी दोन पुस्तके प्रकाशित करण्यात आली असून 'ज्ञानगंगोत्री या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या नियतकालिकातून प्रकाशित करण्यात आले. त्यांनी एकूण १० पुस्तके प्रकाशित केली असून विविध विषयांवर अनेक लेख लिहीले आहेत. आपल्या संपादकीय कारकिर्दीत 'वैनतेय' या साप्ताहीकामधून त्यांनी सातत्यपूर्ण ग्रंथालय चळवळीस ज्ञान देऊन या परिसरातील व राज्यातील ग्रंथालयांनी राबविलेल्या विविध उपक्रमांना जाणिवपूर्वक बातमीस्वरुपात प्राप्ती ही दिली आहे.

**पुरस्कार :**

१. पत्रकार क्षेत्रातील बाळशास्त्री जांभेकर स्मृती प्रित्यार्थ दिला जाणारा 'दर्पण' पुरस्काराचे मानकरी.
२. महाराष्ट्र जेष्ठ पत्रकार व स्वातंत्र्य सैनिक कै. नरभाऊ लिमये यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणाऱ्या 'आर्यभूषण' पुरस्काराचे मानकरी.
३. महाराष्ट्र शासनाच्यावतीने ग्रंथालय क्षेत्रातील कार्यासाठी डॉ. रंगनाथन यांच्या स्मृती प्रित्यार्थ दिला जाणारा 'ग्रंथमित्र' पुरस्काराचे मानकरी.
४. राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथालय विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या राज्य स्तरीय 'ग्रंथालय सन्मान' पुरस्काराचे पहिले मानकरी.
५. सिंधुदुर्ग जिल्हा वृत्तपत्र संपादक संघाच्या वतीने संपादक गौरव पुरस्कार २००३
६. मराठी वृत्तपत्र लेख संघाचा कोकण विषयक लेखन पुरस्कार.
७. मुंबई मराठी ग्रंथालयातर्फे दिला जाणारा शेणई खटखटे पुरस्कार
८. कै. भाई सावंत मित्र परिवारातर्फे दिला जाणारा भाईसाहेब सावंत स्मृती सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार.

**१५. श्री. ना. वि. देशपांडे :**

मराठवाडा परिसरातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासातील कार्य महत्त्वपूर्ण असून अशा या ग्रंथालय चळवळीच्या कार्यकर्त्याचा जन्म १४ एप्रिल १९३१ रोजी झाला. त्यांचे

वडील विविध आंदोलनात  कार्यरत असल्यामुळे सहाजिकच श्री. देशपांडे यांना चळवळीचे बाळकडू त्यांना त्यांच्या वडीलांकडून मिळाले. शालेय शिक्षण पूर्ण करताच त्यांनी उच्च शिक्षणाकडे  न वळता नोकरी करण्याचे ठरविले. पुढे ते नोकरी करत असताना वाचनाची अभिरुची जोपासत होते. सुरवातीच्या नगरपालिकेच्या नोकरीत वाचन अभिरुचीमुळे त्यांचे मन रमेना म्हणून ती नोकरी सोडून ते औरंगाबाद येथे सन १९६४ दाखल झाले.

तेथे श्री. बळवंतराव घाटे (निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश) यांच्याशी त्यांचा सपर्क आला. श्री. बळवंत घाटे यांच्यामुळे श्री. रा.य.सराफ, श्री. के.द.वडजीकर, श्री. म. भी. चिटणीस या मंडळींशी त्यांचा परिचय झाला. ही सर्व मंडळी मराठवाडा ग्रंथालय संघामध्ये काम करत होती. गावागावातून ग्रंथालये काढणे, लोकांना वाचनालयासाठी प्रवृत्त करणे ही सर्व कामे ही मंडळी या संघामार्फत करत होती.

श्री. देशपांडे यांनी 'दी बूक सेंटर प्रा. ली. औरंगाबाद' येथे नोकरी पत्करली. हे ग्रंथाचे दुकान असल्यामुळे त्यांची  वाचनाची सवय पुन्हा दुपट्टीने जोमात सुरू झाली. ही कंपनी सर्व प्रकारची पुस्तके ठेवीत असल्यामुळे येणाऱ्या प्रकाशित पुस्तकांचा त्यांना लवकर लाभ होऊ लागला. त्यावेळी वेतनाशिवाय दैनिक भत्ता, पहिल्या वर्गाचे रेल्वे किंवा विमान प्रवास खर्च कंपनी देत होती. परंतु श्री. देशपांडे प्रलोभनांवर लाथ मारुन श्री. वा. वि. भटांच्या शब्दाला मान देऊन ग्रंथालय चळवळीसाठी स्वत: वाहुन घेतले आणि त्यांचा मराठवाडा ग्रंथालय संघाचा संबंध दृढ होत गेला. ते ग्रंथालय संघाच्या कामात मोठ्या उत्साहाने भाग घेऊ लागले. त्यांच्या बरोबर ग्रंथालय संघाच्या अधिवेशनासाठी ही जाऊ लागले. त्यामुळे त्यांचा महाराष्ट्रातील ग्रंथालय संघाच्या वाढीसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांशी घनिष्ठ संबंध येऊ लागला आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते त्यांना आपल्या कुटूंबातील व्यक्ती समजून त्यांना सहकार्य करु लागले. श्री. वि. वा. भट हे मुंबई ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह व महाराष्ट्र ग्रंथालय चळवळीचे पुरस्कर्ते  आणि एक उत्कृष्ट मार्गदर्शक होते. त्यांच्या दृष्टीस श्री. देशपांडेंचे कार्य पडले. श्री. भटानी त्यांना मराठवाड्याच्या पातळीवरुन महाराष्ट्र पातळीवर काम करण्याची गळ घातली. त्याचा फायदा मराठवाड्याला होणार आहे हे लक्षात घेऊन श्री. बळवंतराव घाटे यांनीही त्यांना राज्यपातळीवर काम करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे महाराष्ट्र ग्रंथालय चळवळीमध्ये काम करण्यासाठी त्यांनी स्वत:ला झोकून दिले.

हे कार्य करत असताना सन १९६४ मध्ये ते मराठवाडा ग्रंथालय संघात दाखल झाले. व सन १९७५ मध्ये त्यांनी या संघाचे सचिवपद संभाळले. मराठवाड्यातील ग्रामिण परिसरात ग्रंथालय चळवळ सर्वदूर पोहोचवण्याासाठी विविध योजना राबवून १९ वर्षे राज्य ग्रंथालय परिषदेच्या माध्यमातून सातत्यपूर्वक ग्रंथालय प्रसाराकरीता प्रयत्न केले. याची परिणीती म्हणजे मराठवाडा परिसरात स्थापन झालेली अनेक ग्रंथालये. ग्रंथालय क्षेत्रातील व त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना डॉ. एस.आर. रंगनाथन पुरस्कार महाराष्ट्र शासनाद्वारे देऊन त्यांचा सन्मान केला. एका क्रियाशील कार्यकर्त्यांच्या नात्याने 'श्री. रामानंदन संशोधन केंद्र ', 'ज्योती विद्यामंदिर औरंगाबाद', 'श्री एकनाथ वाचनमंदिर औरंगाबाद' या ग्रंथालयांच्या व्यवस्थापन मंडळावर पदाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कार्यशैलीचा ठसा उमटवला आहे. एकूणच सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील त्यांच्या योगदानाचा विचार करता, ग्रंथालय स्थापना, ग्रंथालय चळवळीचा विकास, कायद्याची अंमलबजावणी, वेतनश्रेणी, ग्रंथालय इमारतीची उभारणी, प्रकाशनासाठी योगदान, एक नेता म्हणून त्यांची क्रियाशीलता, ग्रंथ प्रसार, ग्रंथालये व सेवक यांच्या समस्या आणि ग्रंथालय जाणीव, जनजागृती, ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम या सर्वांकरिता देशपांडे यांनी केलेले नेतृत्व हे सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाचे आहे.

**१६. रिसवाडकर मधुकर रामचंद्र :**

पुणे व मुंबई विद्यापीठातून ग्रंथालयशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर सहाय्यक ग्रंथपाल डेक्कन कॉलेज पुणे, ग्रंथपाल एच.पी.टी. महाविद्यालय व नाशिक अशा प्रकारे कार्यरत हैद्राबाद येथे करुन पुणे विद्यापीठात प्रचालक म्हणूनच कार्यरत राहिले. पीएच.डी. मार्गदर्शक, अनेक चर्चा परिषदांमधून सहभाग, सेवानिवृत्ती नंतर मुंबईतील ग्रंथालयातून योगदान, तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी महत्त्वपूर्ण योगदान, सार्वजनिक ग्रंथालय चळवळी विषयी विशेष आस्था. एक परखड चिकित्सक, अभ्यासू संशोधक हीच त्यांची खरी ओळख.

**१७. डॉ. धनंजय रामचंद्र (१९०१ – ) :**

ग्रंथालयशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर संचालक गोखले इन्स्टीट्युट व केसरी मराठा संस्था आणि कुलगुरू पुणे विद्यापीठ ही पदे भूषविली. त्यांनी पुणे येथील हिंदू

संघ सेवक ग्रंथालयाकरिता १९३० ते ५२ या काळात योगदान दिले होते. गोखले संस्थेच्या संशोधन ग्रंथालयाच्या विकासाकरिता महत्त्वूपर्ण योगदान दिले होते. त्यांनी ग्रंथालय विकासाकरिता पूणे विभागामध्ये खूपच सहकार्य केले होते. सन १९४५ ते ४९ या काळात ते पुणे ग्रंथालय संघाचे अध्यक्ष होते. तसेच १९४७ ते ५४ या काळात त्यांनी महाराष्ट्र प्रादेशिक ग्रंथालय समितीचे अध्यक्षपद भूषविलेले होते.

**१८. घाटे, बळवंत गिरीराव :**

न्यायमुर्ती घाटे हे मराठवाडा परिसरातील ग्रंथालय चळवळीचे क्रियाशील कार्यकर्ते होते. ते संस्थापक अध्यक्ष म्हणून एकनाथ संशोधन मंदिर व मराठवाडा ग्रंथालय संघात ओळखले जात. ग्रंथालय विषयक मागण्यांविषयी शासनाकडे शिष्टमंडळाचे अनेकवेळा यांनी प्रतिनिधीत्व केलेले होते. महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेच्या स्वागत समितीचे १९६३ मध्ये कार्याध्यक्ष होते. महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे १९४६–६६ या काळात क्रियाशील अध्यक्ष होते. सार्वजनिक ग्रंथालय चळवळ विषयक मराठवाड्यातील त्यांचे योगदान अवघ्या महाराष्ट्रात सर्वश्रुत आहे.

**१९. जोशी पुरुषोत्तम महादेव (१९०६–                ) :**

पदव्युत्तर अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठात पूर्ण केल्यानंतर सन १९३५ मध्ये पीएच.डी. पदवी लंडनमध्ये घेतली. विल्सन कॉलेज मुंबई येथे१९२७–२९ या काळात सेवा दिली होती. मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र आणि मानसशास्त्र विभागात १९२९ ते १९३९ या काळात संशोधन शिष्यवृत्ती धारक म्हणून त्यांनी काम केले होते. १९३५ –४७ या काळात मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल होते. याच काळात १९४२ मध्ये त्यांनी अत्यंत यशस्वीपणे अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे आयोजन मुंबई येथे केले होते. त्यांनी मुंबई विभागाच्या अभिलेखागृहाचे संचालक व पुढे महाराष्ट्र शासनाच्या अभिलेखागृहाचे संचालकपद १९४७–६५ या काळात भूषविले होते, यानंतरपुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून काम केले. ग्रंथालय विकासाकरिता स्थापन केलेल्या फैजी समितीचे १९३९–४० या काळात ते सदस्य होते. मुंबई ग्रंथालय संघाचे संस्थापक सदस्य होते. सन १९४५ मध्ये ते मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्हा वाचनालय परिषदेचे अध्यक्ष होते. सन १९४५ मध्ये

महाराष्ट्र ग्रंथालय परिषद नाशिकचे ते अध्यक्ष अशी महत्त्वपूर्ण पदे त्यांनी भूषविलेली आहेत.त्यांनी मुंबई विद्यापीठामध्ये १९४३ च्या काळात ग्रंथालय शास्त्राच्या पदविका अभ्यासक्रम सुरू केला होता. याचबरोबर  ग्रंथालय विषयक १. लायब्ररी ॲण्ड लिव्हिंग, २. स्कूल लायब्ररी ३. म्युनिसीपल लायब्ररी, ४. ग्रंथालयांची ऐतिहासिक पार्श्वभूमी या पुस्तकांचे लेखन केले आहे.

**२०. कोल्हटकर वासुदेव पुरूषोत्तम (१९११ –      ) :**

सन १९३३ मध्ये त्यांनी पदवी प्राप्त करुन मद्रास येथून १९४२ मध्ये ग्रंथालयशास्त्रातील पदविका अभ्यासक्रम पुर्ण केला. एन.एम. प्रशाळेमध्ये ग्रंथपाल, सन १९४७–४९ मध्ये तांत्रिक सहाय्यक महाराष्ट्र ग्रंथालय, सन १९४९ पासून महाराष्ट्र ग्रंथालयाचे ग्रंथपाल अशी सेवा केलेली आहे. पुढे पुणे ग्रंथलय संघाचे संस्थापक, सन १९४९ मध्ये महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे सचिव, कार्यकारी समिती महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे सदस्य, साहित्य सहकाराचे संपादक अशा विविध पदांवरून त्यांनी ग्रंथालय चळवळीकरिता महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. तसेच ग्रंथालयशास्त्रा विषयक मराठीतून अनेक पुस्तके ही लिहीली आहेत.

**२१. लिमये, अनंत लक्ष्मण :**

विदर्भ परिसरातील ग्रंथालय चळवळीचा एक क्रियाशील कार्यकर्ता ही त्यांची ओळख. नागपूर मधील राजाराम सिताराम दिक्षीत वाचनालयाचे पदाधिकारी, सचिव विदर्भ ग्रंथालय संघ तसेच ग्रंथालय परिषदेच्या आयोजनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान, विदर्भ सार्वजनिक वाचनालय समितीमध्ये विविध पदावर कार्य, राज्य ग्रंथ निवड समिती व सल्लागार समितीचे सदस्य. सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी महाराष्ट्र शासनाने त्यांना रंगनाथन पुरस्काराने गौरविले होते. याचबरोबर त्यांनी विदर्भ ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

**२२. पेठे, मधुकर परशुराम :**

पदव्युत्तर पदवी व पीएच.डी. पदवी पुणे विद्यापीठातून प्राप्त करुन ग्रंथालय शास्त्राची पदविका अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठातून संपादन केला. पुणे विद्यापीठामध्ये सहाय्यक ग्रंथपाल म्हणून दाखल झाले व पुढे सेवानिवृत्त होईपर्यंत १९५० पर्यंत विद्यापीठाचे ग्रंथपाल

म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र ग्रंथालय संघाच्या विविध समित्यांवर त्यांनी १९५५ पासून योगदान दिले आहे. यामध्ये सदस्य, कार्यकारी समिती संपादक मंडळ, साहित्य सहकार १९५५–५६, मुख्य सचिव १९५५ –५६, उपाध्यक्ष १९६७, पुढे पुणे नगरवाचनालयाद्वारे चालविलेल्या ग्रंथालय प्रशिक्षण वर्गाशी संलग्नीत होते. मराठी विश्वकोश विभागाचे संपादक होते. त्यांनी ज्ञानेश्वर, ज्ञानदेव या संदर्भात संशोधन केले होते. साहित्य सहकारामधून त्यांनी अनेक लेख लिहीले आहेत.

**२३. फडके, पांडूरंग श्रीधर :**

नागपूर विद्यापीठातून पदविका अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर मद्रास विद्यापीठातून १९३३ मध्ये ग्रंथालय पदविका प्राप्त केली. ग्रंथालय संघ, नागपूर विद्यापीठ १९२६–४२, ग्रंथपाल नागपूर विद्यापीठ, १९४७–५० व १९५२–५६ ग्रंथपाल व ग्रंथालयशास्त्र विभागाचे नागपूर विद्यापीठातील प्रमुख, १९५६–६१. सहसचिव विदर्भ ग्रंथालय संघ १९४५–५६, सचिव १९५८–६०,सचिव महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ १९६२–६४ एक क्रियाशील कार्यकर्ते म्हणून विदर्भ विभागात सर्वदूर परिचीत होते.

**२४. ओंळाबे महेश्वर रामचंद्र :**

पदवी अभ्यासक्रमानंतर त्यांनी आर.एम. पारधी यांच्याकडे ग्रंथालय शास्त्राचे शिक्षण घेतले होते. ते शिक्षक होते तसेच ग्रंथालय विषयी त्यांना खूपच आस्था होती. नगर वाचनालय सातारा येथे सचीव व अध्यक्षपद भूषविलेले होते. महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे कार्यकारणी सदस्य पद त्यांनी १२ वर्षे भुषविले होते. याच काळात ते या संघाचे दोन वर्षे सचीव व खजिनदार होते. सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील एक क्रियाशील कार्यकर्ता म्हणून त्यांचा सर्वदूर परिचय होता. जिल्ह्यामधील ग्रंथालयाशी संबंधित वार्तापत्र लेखनकरीता ते सदैव तत्पर असत. ग्रंथालय प्रशिक्षण वर्ग त्यांना अत्यंत उत्साहाने चालविलेले होते. मराठी वाङ्मयाचा इतिहास हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे.

**२५. वडजीकर केशव दत्तात्रय :**

औरंगाबाद परिसरातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीमधील ते क्रियाशील कार्यकर्ते होते. मिलींद महाविद्यालय, औरंगाबाद येथे ग्रंथपाल म्हणून कार्यरत होते. मराठवाडा

ग्रंथालय संघाचे ते संस्थापक अध्यक्ष म्हणून ओळखले जात. या संघासाठी अनेक प्रकारे योगादान दिले आहे. सन १९६३ मध्ये औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेच्या आयोजनात त्यांनी सचिव म्हणून बजावलेली महत्त्वाची भूमिका दीर्घकाळ सर्वांच्या स्मरणात होती. याचबरोबर महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सल्लागार समितीचे सदस्य म्हणून दीर्घकाळ कार्यरत होते.

**२६. दत्तोपंत (द.वा.) जोशी :**

ग्रंथालय चळवळ म्हटल्यावर ग्रंथालयाची संघटना उभी करणे. ग्रंथालयाशी संबंधित सर्व व्यक्तींना व संस्थांना एकत्र आणून ग्रंथालयांच्या अडचणीचे निराकण करणे ही संघटनेमागील प्रमुख भूमिका श्री. जोशी यांनी सदैव बजावली होती. याकरिता त्यांचेद्वारे ग्रंथालय परिषदा भरविण्यात आल्या. या धडपडीतूनच ग्रंथालय संघ स्थापन झाले. त्यांनी आपल्या उद्दिष्टाची व्याप्ती कालमानानुसार थोडी वाढवली. या व्याप्ती अंतर्गत ग्रंथपालनाचे शिक्षण, ग्रंथालयशास्त्र संशोधन, ग्रंथपालन, वाङ्मय प्रकाशन तसेच ग्रंथालय सेवकांच्या प्रशिक्षणाचा व वेतनश्रेणीचा अंतर्भाव करण्यात आला. ग्रंथांचा प्रसार व वाचनाची आवड निर्माण करणे हे ही पुरोगामी हेतू घेऊन ग्रंथालय संघ संघटितरित्या काम करु लागला.

महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीची सुरवात १९२१ साली झाली. सन १९२१ साली बॅ. जयकर यांचे अध्यक्षतेखाली पहिली महाराष्ट्रीय मोफत वाचनालय परिषद पुणे येथे भरली. या उपक्रमामागे कळकळीचे प्रयत्न होते ते श्री.दत्तोपंत जोशी यांचेच. त्यानीच १९२१, १९२६ व १९३९ च्या ग्रंथालय परिषदा भरविण्यात पुढाकार घेतला व महाराष्ट्र वाचनालय संघ स्थापन केला. त्याद्वारे महाराष्ट्रातील वाचनालयाची नोंदणी करणे, त्यांना वृत्तपत्रे, मासिके यांच्या वर्गणीत सवलती मिळवून देणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्रंथालय स्थापन करण्यास सांगणे, रा.ब. बोले यांचेमार्फत ग्रंथालय कायद्याचे बिल मुंबई कायदे कौन्सिलमध्ये मांडणे, दप्तरखान्यातील पुस्तकांची कार्य ग्रंथालयामार्फत सुरू करणे हे व यासारखे सर्व त्यांनी उपक्रम सुरू केले. ग्रंथालयांची माहिती जमा केली. पुण्याहून मुंबईस स्थलांतर झाल्यानंतर मुंबई मधील ग्रंथालय चळवळीत, मुंबई ग्रंथालय संघ स्थापनेत, बॉम्बे लायब्ररी स्टाफ युनियनची संघटना करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. तसेच अखिल भारतीय ग्रंथालय संघातही काम केले. कोणत्याही संस्थेचे वा संघटनेचे पाठबळ नसताना

एकाकीपणे परंतु चिकाटीने दत्तोपंतांनी अखंड प्रयत्न केले. ग्रंथालय चळवळीची व्याप्ती त्यांनी वाढवली. ग्रंथालय चळवळीतील १९२१ – १९४२ हा दत्तोपंत जोशीचा कालखंड म्हणूनच ओळखला जातो.

**२७. प्रा. बाळासाहेब मासुले :**

सांगली जिल्ह्यातील कसबे डिग्रज गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात बाळासाहेब मासुले यांचा जन्म झाला. शिक्षणासाठी अनुकुल परिस्थिती नसताना घरच्या शेतीत काबाडकष्ट घेत त्यांनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातील 'कमवा व शिका' या योजनेचा आधार मिळाला. विद्यार्थीदशेपासूनच त्यांना वाचनाची आवड होती. त्यांनी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहु महाराज, देशभक्त अण्णासाहेब लठ्ठे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, धार्मिक व सहकार क्षेत्रात काम करण्याची उर्मी बाळगली. एम.ए., एल.एल.बी., एम.लिब. असे उच्च शिक्षण घेतल्यावर श्रीमती 'कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयात' त्यांना ग्रंथपाल म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. ग्रंथपाल म्हणून नोकरी प्राप्त झाल्यावर व थोडे आर्थिक स्थैर्य लाभल्यावर आपल्या विचारांना प्रत्यक्षात आणण्याचे बळ त्यांना प्राप्त झाले. हळूहळू कामाच्या व्यापाबरोबर राजकिय क्षेत्रातील नेतेमंडळी व कार्यकर्त्यांशी त्यांचा वावर सुरू झाल्याने 'बाळासाहेब मासुले' यांच्या नावाभोवती वेगळे वलय निर्माण झाले.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे कामकाज सांभाळताना ते संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होत असत. सांगली जिल्ह्यात ग्रंथालय चळवळ रुजावी, वाढावी, बहरावी या साठी सरांनी दिलेले योगदान हे महत्त्वपूर्ण आहे. ग्रंथपाल, ग्रंथवाचक व ग्रंथपालन करणारे कर्मचारी यांना एकत्र करुन ग्रंथालय चळवळ वाढवण्यासाठी त्यांनी कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे, ग्रंथ प्रदर्शनांचे आयोजन केले. ग्रंथालयांशी संबंधित कर्मचाऱ्यांना वेगवेगळे आर्थिक लाभ प्राप्त व्हावेत यासाठी विविध संघटनांच्या माध्यमातून सरकार दरबारी त्यांनी प्रयत्न केलेत.

महाविद्यालयात ग्रंथपाल हे पद सांभाळताना विविध अभ्यासक्रमांसाठी त्यांनी अध्यापनाचे ही कार्य केल्याने त्यांना 'प्राध्यापक' ही उपाधी मिळाली. समाजातील गरीब, गरजू व

होतकरु विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महाविद्यालयात रात्र अभ्यासिका व ग्रंथ देवघेव योजनेला त्यांनी मूर्त रुप आणले. शैक्षणिक क्षेत्राबरोबर सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये ही सरांनी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांनी डिग्रज गावामध्ये 'सार्वजनिक वाचनालय' सुरू केलेले आहे. सांगलीमध्ये सर्वप्रथम आपल्या महाविद्यालयामध्ये 'ग्रंथालय व माहितीशास्त्राचा' शिवाजी विद्यापीठाचा सर्टिफिकेट कोर्स त्यांनी सुरू केला.

श्री. मासुले हे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व आहे. एकाचवेळी अनेक आघांडींवर त्यांनी काम केले आहे.

**२८. डॉ. मधुकर शेवाळे :**

नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. सन १९८९–९० या कालावधित पुणे विद्यापीठात एम. लिब. ॲण्ड आय.एस.सी. शिक्षणक्रम पूर्ण करीत असताना ''Growth & Development of Public Library (Sarvajanik Vachnalya) Nashik " या विषयावर प्रबंधिका पूर्ण केली. त्यावेळी त्यांना आदरणीय कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर त्याचबरोबर वाचनालयाचे त्यावेळचे अध्यक्ष मु. श. औरंगाबाद,भारतद्वाज रहाळकर यांचे मार्गदर्शन मिळाले. वाचनालयाला १९९० मध्ये १५० वर्षे पूर्ण होत होती त्यामुळे त्यांच्या प्रबंधिकेस महत्त्व प्राप्त झाले. या प्रंबधिकेच्या निमित्ताने सार्वजनिक ग्रंथालय चळवळ आणि त्यांच्या सेवा यांचा जवळून अभ्यास करता आला. मुक्त विद्यापीठात सहा. ग्रंथपाल, उपग्रंथपाल, प्रमुख ग्रंथपाल यांच बरोबर डॉ. शा. ग. महाजन (पुणे विद्यापीठ), डॉ. एस. आर. गणपुले (मुंबई विद्यापीठ) यांच्या समवेत मुक्त विद्यापीठाचे बी. लिब ॲण्ड आय.एस्सी आणि एम.लिब. ॲण्ड आय. एस्सी.या शिक्षणक्रमाच्या विकासाची धुरा सांभाळता आली. एम.लिब. ॲण्ड आय.एस्सी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने सुरू केलेल्या ज्ञानगंगोत्री नियतकाच्या संपादक मंडळाचे सदस्य, त्यानंतर कार्यकारी संपादक आणि सन २०१३ पासून संपादक म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. सुरुवातीच्या म्हणजे सन १९९० ते १९९४ या काळात नाशिकच्या एच.पी.टी. महाविद्यालयात तालिकीकरण प्रात्याक्षिक आणि तालिकीकरण तात्विक या दोन विषयांकरिता अध्यापन ही त्यांनी केलेले आहे. सुभाष वाचनालय, नाशिक यांच्या माध्यमातून चालणारा प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी (एल.टी.सी.) त्यांनी काही काळ अध्यापन केलेले

आहे. सार्वजनिक वाचनालयात मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब आणि एम.लिब. शिक्षणक्रमास ते सन १९९६ पासून आजतागायत समंत्रक म्हणून काम पाहत आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या अभ्यासक्रम मंडळावरही त्यांनी काम पाहिले आहे. सध्या मुक्त विद्यापीठाच्या विद्वत्त परिषदेचे ते सदस्य आहेत. सन १९९८ मध्ये हाँगकाँग येथे असलेल्या आशियायी ग्रंथालयांच्या परिषदेस उपस्थित राहून त्यांनी पेपर सादर केलेला आहे. सन २००९ मध्ये मुक्त विद्यापीठाने सुरू केलेल्या ''ग्रंथालय संगणकीकरण'' या शिक्षणक्रमाचे संयोजन त्यांनी केले आहे. सार्वजनिक वाचनालयाशी त्यांचे असलेले संबंध आणि पदव्युत्तर पातळीवरील प्रबंधिकेच्या निमित्ताने त्यांचा या विषयावरील गाढा अभ्यास झालेला आहे. ''ज्ञानगंगोत्री''त्रैमासिकाच्या संपादकाची जबाबदारी पार पाडत असताना त्यांनी जाणिवपूर्णक सार्वजनिक वाचनालय चळवळ, सेवा आणि आधुनिकीकरण या विषयावरील लेख वेळोवेळी समाविष्ट करुन एक प्रकारे सार्वजनिक ग्रंथालयाच्या चळवळ वाढीस निश्चितच हातभार लावलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थ्यांनी पी.एच.डी. व पंधरा विद्यार्थ्यांनी एम.फिल. ची पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना ''राणी पार्वतीदेवीसाहेब ग्रंथमित्र प्रतिष्ठान, सावंतवाडी'' यांच्या तर्फे दिला जाणारा सन २०१२ चा ''ग्रंथमित्र'' पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

**२९. यशवंतराव शिंदे गुरूजी :**

जुने नाशिक परिसरातील सुभाष सार्वजनिक वाचनालयाची मूळ स्थापना सन १९४२ सालच्या स्वातंत्र्य लढ्यात राष्ट्र सेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी केलेली आहे. पुढे कार्यकर्त्यांची धरपकड झाल्याने व काही कार्यकर्ते भूमिगत झाल्याने हे वाचनालय बंद पडले.

पुढे या कार्यकर्त्यांच्या ग्रुप मधील एका तरुणाने देश स्वतंत्र झाल्यावर परत या वाचनालयाची पुनर्स्थापना १७ ऑक्टोबर १९५३ साली केली. तो तरुण म्हणजे कै. यशवंतराव शिंदे गुरूजी होय. कै. यशवंतराव शिंदे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील भरवीर या गावात १५ मे १९२५ रोजी झाला. ते लहान असतानाच त्यांच्या आईचा मृत्यू झाल्याने त्यांच्या वडिलांनी तीन भावंडासह त्यांना नाशिकमध्ये आणले. प्राथमिक शाळेत इयत्ता ७ वी मध्ये असताना, वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी शाळा

सोडून देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली होती. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कै. यशवंतराव शिंदे गुरूजी यांनी नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. एके दिवशी ते इगतपुरी येथून नाशिकला रेल्वेने येत असताना त्यांची परमपूज्य साने गुरूजी यांच्याशी भेट झाली. साने गुरूजींनी त्यांना सांगितले की, बंद पडलेले सुभाष वाचनालय परत सुरू करा! देशाला सुशिक्षित नागरिकांबरोबरच सुसंस्कारीत नागरिकांची गरज आहे, आणि ते काम सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून प्रभावीपणे पार पाडता येईल. मा. यशवंतराव शिंदे गुरूजी यांनी मनावर घेतले आणि कोणाकडून टेबल तर कुणाकडून खुर्ची अशी जमवाजमव करुन १७ ऑक्टोबर १९५३ साली एका भाड्याच्या जागेत 'सुभाष सार्वजनिक वाचनालयाची' पुनर्स्थापना केली. दोन ठिकाणी भाड्याच्या जागा बदलून देखील वाचनालयाचा व्याप वाढत असल्याने सन १९६४ साली जुन्या नाशिक परिसरात एक जागा विकत घेऊन त्या जागेवर वाचनालयाची स्वतःच्या मालकीची इमारत उभी करण्याचा संकल्प सोडला. दि. १७ जानेवारी १९६५ रोजी या वाचनालयाच्या इमारतीचे भूमिपूजन भारताचे संरक्षण मंत्री नामदार यशवंराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. मा. शिंदे गुरुजी यांनी दारोदारी फिरून इमारत निधी जमविला. मुख्यमंत्री निधीतून दहा हजार रुपये मिळविले. नाशिकच्या बालाजी देवस्थान ट्रस्ट, देना बँक नाशिक यांच्या कडून एक – एक हजार रुपये मिळविले. आणि एक वर्षात दोन मजली आर.सी.सी. ची इमारत उभी केली. या इमारतीचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार वसंतराव नाईक यांच्या हस्ते सन १९६६ साली करण्यात आले. सन १९७५ साली एक मजला आणि सन १९७८ साली अजून एक मजला अशी चार मजली भव्य इमारतआज दिमाखाने उभी आहे. आज या वाचनालयात मराठी, हिंदी, इंग्रजी आणि ऊर्दू अशा विविध भाषेतील ५० हजार पुस्तके या वाचनालयात आहेत. सुभाष सार्वजनिक वाचनालयाची प्रगती करुन त्याला शासनाचा 'अ' तालुका वाचनालय हा दर्जा मिळवून दिल्यानंतर त्यांनी सन १९८० साली नाशिक जिल्ह्याच्या व महाराष्ट्र राज्याच्या ग्रंथालय चळवळीत स्वतःला झोकून दिले.

''गाव तेथे ग्रंथालय '' ही संकल्पना रुजवण्यासाठी त्यांनी संपूर्ण नाशिक जिल्हा पिंजून काढला. व ग्रामिण भागात अनेक वाचनालये स्थापन केली. सन १९८० साली नाशिक जिल्हा ग्रंथालय संघ व सन १९८५ साली त्यावेळचा मुंबई विभाग ग्रंथालयांची

कार्यालये सुभाष सार्वजनिक वाचनालयाकडे आली. नाशिक जिल्हा ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह व मुंबई विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मृत्यूच्या क्षणापर्यंत काम पाहिले. काही काळ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सदस्य म्हणून काम केले.

सन १९८७ सालापासून शासनमान्य ग्रंथालय प्रमाणपत्र परीक्षा वर्गाचे कार्यालय नाशिक जिल्हा ग्रंथालय संघाकडे आले. या वर्गाचे व्यवस्थापक म्हणून त्यांनी सन १९९५ सालापर्यंत त्यांनी काम केले. सन १९८८ साली महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाची मान्यता काढून घेतली तेव्हा यशवंतराव शिंदे यांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील ग्रंथालय कार्यकर्ते यांचा भव्य मेळावा नाशिक येथे घेतला. व 'महाराष्ट्र राज्य ग्रंथालय चळवळ बचत कृती समिती' स्थापन केली. या घटना समितीचे सदस्य पद्मश्री डॉ. रत्नाप्पाअण्णा कुंभार यांची निवड केली. या समितीची राज्यात विविध जिल्ह्यात वार्षिक अधिवेशने भरवून शासनाला ग्रंथालय चळवळीची दखल घ्यायला भाग पाडले. शासनाने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाला परत मान्यता दिली. ग्रंथालय चळवळीतील योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने त्यांना 'ग्रंथालय भुषण' हा पुरस्कार दिला. तर महाराष्ट्र शासनाने सन १९९९ साली 'डॉ. एस.आर. रंगनाथन् ग्रंथमित्र' हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. एक सच्चा देशभक्त व ग्रंथालय चळवळीच्या या महर्षीने १५ ऑगस्ट १९९९ साली स्वातंत्र्य दिनाचा योग साधून आपला देह सोडला.

**३०. दत्ता गणपतराव पगार (माळी) :**

वाचनाची अत्यंत आवड असल्याने वयाच्या १२ व्या वर्षी म्हणजे सन १९६२ साली सुभाष वाचनालयात स्वयंसेवक म्हणून मदत करण्यास सुरुवात केली. इतर विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी स्वत: ग्रंथवाचन करीत असताना आपल्याबरोबर इतर विद्यार्थ्यांना बसवित असत. म्हणून वाचनालयाचे संस्थापक कै. यशवंतराव शिंदे गुरुजींनी दरमहा १ रुपया मानधनावर वाचनालयाचे ग्रंथपाल म्हणून नेमणूक केली. यावेळी या ग्रंथालयात फक्त ३०० पुस्तके होती. आज या ग्रंथालयात ४६ हजार विविध विषयांवरील मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत व ऊर्दु भाषेतील पुस्तकांनी हे ग्रंथालय समृद्ध झाले आहे. यातील एकूण एक पुस्तक निवडण्याची संधी व्यवस्थापनाने त्यांना दिलेली आहे. त्यांनी आपले माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण संभाळून वाचनालयात काम केले.

सन १९८० सालापासून नाशिक जिल्हा ग्रंथालय चळवळीत भाग घेण्यास सुरूवात केली. सुदैवाने याच वेळेपासून नाशिक जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यालय सुभाष सार्वजनिक वाचनालयाकडे आलेले आहे. शहरी व ग्रामिण भागात नवीन वाचनालय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे. ग्रंथालयाच्या दैनिक कामाबद्दल नोंदवह्या, दप्तर ठेवणेबाबत मार्गदर्शन करणे. ग्रंथालयास शासनमान्यता व अनुदान मिळणेसाठी आवश्यक ती पुर्तता करुन घेणे आदी कामे निस्पृह केल्याने महाराष्ट्र शासनाने त्यांची दखल घेऊन त्यांना ग्रंथालय महर्षी पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन् यांच्या नावाने दिला जाणारा उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक 'ग्रंथमित्र पुरस्कार' सन १९९६ साली देण्यात आला. नाशिक जिल्हा ग्रंथालय संघाच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा वर्गाचे ते गेली २५ वर्षे व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत. राज्यातील एक आदर्श ग्रंथपालन वर्ग म्हणून नाशिक ग्रंथपालन वर्ग समजला जातो, हे त्यांच्या परिश्रमाचे फळ आहे. त्यांनी केलेल्या ग्रंथालय विषयक लिखाणास विविध वृत्तपत्रे, नियतकालिके व इंटरनेट वर प्रसिद्धी मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य व नाशिक विभाग ग्रंथालय संघाच्या अधिवेशनात होणाऱ्या परिसंवादात भाग घेण्यासाठी दरवर्षी त्यांना निमंत्रित केले जाते. राजा राममोहनरॉय प्रतिष्ठान कोलकत्ता यांच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळेसाठी ''संदर्भसेवा'' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी विविध राज्यातून त्यांना निमंत्रित केले जाते. आंतरराष्ट्रीय संस्थेकडून आदिवासी विकास योजनेअंतर्गत आदिवासी भागात विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना निमंत्रित केले जाते. ग्रंथालय सप्ताहाच्या निमित्ताने विद्यालये व महाविद्यालये यांचेकडून प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यासाठी व व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात येते.

पगार हे सुभाष सार्वजनिक वाचनालयाचे प्रमुख ग्रंथपाल, नाशिक जिल्हा ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाहक, नाशिक जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह, शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र परिक्षा वर्ग, नाशिक केंद्राचे वर्ग व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, नागपूरच्या नियामक मंडळ सदस्य, महात्मा फुले बालविद्या निकेतन नाशिकचे मुख्य सचिव व श्री संत सावता माळी मंदिर ट्रस्ट नाशिकचे विश्वस्त आहेत.

## ३१. डॉ. शरदचंद्र रामचंद्र गणपुले

'ग्रंथालयाच्या प्रभावाचे मूल्यमापन' या विषयावर पी. एच्. डी. केलेले डॉ. शरदचंद्र रामचंद्र गणपुले यांनी र. प. गोगटे कॉलेज रत्नागिरी या महाविद्यालयातून बी. ए. ची पदवी घेतली, तर पुणे विद्यापीठ बाह्य विभागातून इकॉनॉमिक्स व पॉलिटीकल सायन्स या विषयाची एम्. ए. ची पदवी घेतली.

सर्टीफिकेट इन लायब्ररियन शिप (महाराष्ट्र सरकार), सर्टिफिकेट (बॉम्बे लायब्ररी असोसिएशन मुंबई), डिप्लोमा इन लायब्ररीयनशिप मुंबई विद्यापीठ, मास्टर इन लायब्ररी सायन्स मुंबई विद्यापीठातून ग्रंथविषयक अभ्यासक्रम पूर्ण केले. त्याचप्रमाणे एम. लिबसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वाचनसवयी या विषयावर ४०० मार्कांचा प्रबंध सादर केला.

तारापूरवाला मरीन बॉयॉलॉजिकल रीसर्च स्टेशन तारापूरवाला ॲक्केरिअम, फिशरीज डिपार्टमेंट महाराष्ट्र सरकार (डिसेंबर १९५१ ते मे १९६३), इंडस्ट्रिअल क्रेडिट ॲण्ड इन्टेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (जून १९६३ ते जुलै १९६८), डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे किर्ती कॉलेज, दादर (ऑगस्ट १९६४ ते सप्टेंबर १९७२), नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पवई, मुंबई (ऑक्टोबर १९८९ ते फेबुवारी १९९५), एशिॲटीक सोसायटी ऑफ बाम्बे (डिसेंबर १९९७ ते जून १९९९), या कालावधीत ग्रंथपाल म्हणून तर डॉक्युमेंटेशन ऑफिसर म्हणून एरिआर स्टडीज प्रोग्रॅम (सो रशिया) युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे डिपार्टमेंट ऑफ पॉलिटीक्स (ऑक्टोबर १९७२ ते मार्च १९७६), विद्यापीठ ग्रंथालय आणि प्रमुख ग्रंथालय आणि मानसशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ (मार्च १९९५ ते नोव्हेंबर १९९७), मानद संयोजक ग्रंथालय आणि मानव्यशास्त्र विभाग यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (जुलै १९९९ ते ऑक्टोबर २००२), संयोजक, सोल सॉफ्टवेअर विभाग INPLIBNET अहमदाबाद (नोव्हेंबर २००२ ते डिसेंबर २००६), मानद प्राध्यापक ग्रंथालय व शास्त्र विभाग, जोशी बेडेकर कॉलेज (जून २००७ ते मार्च २००८) या संस्थेमधून ग्रंथविषयक सेवा बजावली आहे. अभ्यासक मंडळ मुंबई एस. एन. डी. टी, पुणे, शिवाजी स्वामी रामानंद, नांदेड विद्यापीठ Reserch R. R. C वरील सर्व विद्यापीठे, Visiting Proteror वरील विद्यापीठे बा. म. विद्यापीठे औरंगाबाद, अमरावती, उत्तर महाराष्ट्र, जळगाव तसेच केंद्रीय सरकारी समित्या NISSAT - Administration Commitee,

CSIR - INSDOC, LCGC - Lib, Sc. Edu. Commitee या समित्यांवर त्यांनी काम केले आहे. ग्रंथविषयक त्यांचे सुमारे १५ लेख प्रसिद्ध केले असून ग्रंथालय व माहिती शास्त्र संबंधात विद्यार्थी व मित्र यांनी पुढाकार घेऊन १९९५ साली गौरवग्रथ In Search of excellence in Libanianship प्रसिद्ध केला. मुंबई विद्यापीठास एम. लिब. परिक्षेस व्यवस्थापन विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यासाठी आवश्यक ती देणगी त्यांनी आपल्या निवृत्तीच्यावेळी मुंबई विद्यापीठास दिली. सन २००७ साली राजमाता पार्वतीदेवी साहेब ग्रंथमित्र पुरस्कार देऊन त्यांच्या ग्रंथविषयक कार्याचा यशोचित्त गौरव करण्यात आला. सार्वजनिक ग्रंथालय चळवळीविषयी विशेष आस्था असलेल्या व्यक्तिंमध्ये डॉ. शरदचंद्र रामचंद्र गणपुले यांचा उल्लेख आदराने केला जातो.

### ३२. डॉ. सुरेश प्रभाकरराव सातारकर

डॉ. सुरेश प्रभाकरराव सातारकर हे औरंगाबाद जवळील रहिवाशी. त्यांचा जन्म २७ मार्च १९५२ राजी निम्न मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. आजोबा शेतकरी तर वडिल माध्यमिक शिक्षक होते. १९७२ मध्ये बी. एस्सी. आणि १९७३ मध्ये बी. लिब. एस्सी या पदव्या तत्कालिन मराठवाडा विद्यापीठातून प्राप्त करुन डॉ. सातारकर यांनी नगरपालिका औरंगाबाद येथे ग्रंथपाल म्हणून कार्यास सुरुवात केली. या ग्रंथालयातील जवळपास ३५००० ग्रंथांचे दोन वर्षात तालिकीकरण, वर्गीकरण केले. इमारत बांधकाम, फर्निचर खरेदी करुन टेपरेकॉर्डर, रेडिओ, लाऊडस्पिकर अशी साधने १९७५ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान म्हणून मिळवून ग्रंथालय अद्यायावत केले. १९७६ पासून शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अखत्यारितील विविध शासकीय महाविद्यालयात डॉ. सातारकर यांनी ग्रंथपाल म्हणून कार्य केले. विशेष म्हणजे हे करीत असतानाच त्यांनी एम. एससी. (१९७५), एम. लिब. एस्सी. (१९८७) आणि पी. एच. डी. (ग्रंथालयशास्त्र) (१९९९) या पदव्या प्राप्त केल्या. १९९६ पासून नांदेड येथील स्वाम रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून ते कार्यरत होते. या काळात डॉ. सातारकर यांनी विज्ञानसंस्था, औरंगाबाद, शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी आणि औरंगाबाद, शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी आणि औरंगाबाद तसेच प्रस्तुत विद्यापीठातील एक लाखाहून अधिक ग्रंथांचे वर्गीकरण केले आहे.

स्वामी रामानंद तीर्थ, मराठवाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयाचे संपूर्ण संगणीकरण, बारकोड तंत्रज्ञानाचा वापर, इंटरनेट आणि ई जर्नलस सुविधा अशा साधनांनी आधुनिकीकरण करण्यात आले. गेल्या सहा वर्षात त्या करीता विद्यापीठाच्या निधी व्यतिरिक्त रु. एक कोटी बावन्न लाख रुपयांचा निधी डॉ. सातारकर यांच्या प्रयत्नातून मिळाला आहे. आता या विद्यापीठाच्या नऊ कोटी रुपये खर्चाच्या ग्रंथालय इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. डॉ. सातारकर यांची ग्रंथालय शास्त्रावरील नऊ पुस्तके (दोन इंग्रजी व सात मराठी) प्रकाशित झाली आहेत. त्यांचे ४६ लेख (२२ मराठी व २४ इंग्रजीतून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चार विद्यार्थ्यांनी पी. एच. डी. पदवी प्राप्त केली असून आठ विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पुरे केले. अमरावती, पुणे, औरंगाबाद, मुंबई, नागपूर या विद्यापीठांमध्ये ग्रंथालय शास्त्राच्या विविध समित्यांवर डॉ. सातारकर यांनी कार्य केले असून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहुतेक सर्व समित्यांवर त्यांनी काम केले आहे. डॉ. सातारकर सार्वजनिक ग्रंथालय चळवळीशी १९७४ ते १९९६ या काळात निगडीत होते. औरंगाबाद आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह आणि मराठवाडा विभाग ग्रंथालय कार्यवाह म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. रत्नागिरी येथील नगर वाचनालयात १९८२ मध्ये ग्रंथलायन वर्ग सुरू करुन कोकणात या विषयाच्या अध्यापनाची मुहूर्तमेढ त्यांनी रोविली. बी. लिब. सायन्स, एम्. लिब. सायन्स अभ्यासक्रमांना ते १९८६ पासून शिकवित होते. एम्. लिब. सायन्स परीक्षा (१९८७) मध्ये विद्यापीठातून सर्वप्रथम आल्याबद्दल त्यांना डॉ. एम्. आर. कुंभार पारितोषिक आणि कै. प्रभाकरराव भालेराव पारितोषिक प्रदान करण्यात आले आहे. २००८ या ग्रंथमित्र पुरस्कार दक्षिण रत्नागिरी शिक्षण संस्थेने त्यांना प्रदान केला आहे. ग्रंथपरिवार, ज्ञानतिर्थ आणि ज्ञानगंगोत्री या मासिकांचे संपादक, संपादन सहाय्यक म्हणूनही डॉ. सातारकर यांनी काम पाहिले आहे. याशिवाय एम. लिब. एससी प्रकल्प आणि एम. फिल चे लघुशोध प्रबंध तयार करण्याकरीता अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे. विविध परिषदा, चर्चासत्र, उजळणी वर्गांमध्ये तज्ञ साधन व्यक्ती म्हणून त्यांची व्याख्याने झाली आहेत. ग्रंथालय चळवळी विषयी डॉ. सातारकर यांना विशेष अशी आस्था होती.

### ३३. डॉ. प्रदीप लक्ष्मण कर्णिक

एम. ए., एम. लिब. आणि पी. एच्. डी. प्राप्त डॉ. प्रदीप लक्ष्मण कर्णिक यांचा वाङ्मय कोश संपादन मंडळ, मराठी शब्दकोश प्रकल्प संपादन मंडळ, को. म. सा. प. चरित्र कोश निर्मितीत महत्वाचा सहभाग आहे. प्राध्यापक अ. का. प्रयोळकर समिती सदस्य, दुर्गाबाई भागवत यांच्या नेतृत्वाखालील ग्रंथालयीन समस्यांवरील आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला आहे. त्याचप्रमाणे साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार समितीतही त्यांचा सहभाग आहे. रुपारेल महाविद्यालयाच्या इतिहास संकलनाचे कार्य. संवाद या कार्यक्रमात सहभाग, मुंबई मराठी संशोधन मंडळ, संशोधन सहाय्य, दैनिक लोकसत्ताच्या चित्ररंग साप्ताहिकाचे उप संपादक, लोकसत्तातील पुस्तकांच्या पानाचे संपादन, अक्षर स्पंदन, वेलांही, दीप–सौजन्य, समकालीन संस्कृती यामध्ये त्यांचा सहभाग आहे. खटखटे रानई पारितोषिक (प्राध्यापक – गंगाधर गाडगीळ व वासंती गाडगीळ ट्रस्ट), डॉ. आंबेडकर व वासंती (फो. म. सा. प.), राजमाता राणी पार्वती देवी साहेब ग्रंथमित्र पुरस्कार २००८ असे कांही मानाच्या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. जावे ग्रंथाच्या गावे, रक्तरंग, ग्रंथ, ग्रंथालय व ग्रंथसंस्कृती, मित्र शिक्षकांचा या ग्रंथांचे  त्यांनी लेखनही केले आहे. तर झालाचं पाहिजे, तुरुगांतील निखारे, सहवासातील साहित्यिक व अक्षर वेल असे ग्रंथ त्यांनी संपादित केले असून प्रकल्प लेखन (पाठ्यपुस्तक), संशोधन प्रकल्प, स्वरुप लेखन पद्धती हे ग्रंथलेखन तसेच थोरांचे विचार या बाह्यवाङ्मयाचे संकलनही त्यांनी केले आहे.

सार्वजनिक ग्रंथालयांच्याविषयी विशेष आस्था आणि ग्रंथालय चळवळीविषयी कळकळ असणारा एक अभ्यासक ही डॉ. प्रदीप कर्णिक यांची खरी ओळख.

### ३४. स्व. सुनिल सदाशिव तळेकर : (१९६२ – १९९७)

ग्रामीण, दुर्गम भागातील मुलांच्या उत्कर्षासाठी वाचनालयाची गरज ओळखून सुनिल तळेकर यांनी तळेरे येथे वाचनालय सुरु करण्यासाठी जय्यत तयारी सुरु केली होती. मात्र दुर्दैवाने त्यांचे अपघातात अकाली निधन झाले. तळेरे गावचे रहिवाशी श्री. रमाकांत दिनकर वरुणकर यांनी स्व. सुनिलच्या मित्रपरिवारांना एकत्र आणत २६ नोव्हेंबर १९९९ रोजी ‘स्व. सुनिल तळेकर वाचनालया’ची स्थापना करत त्यांचे हे स्वप्न प्रत्यक्षात आणले. गेली १९ वर्षे संस्थेतील विश्वस्तांच्या सहकार्याने आजही ते ही

जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत. ग्रामीण भागात शिक्षण घेणारी मुले-मुली, वाचक प्रेमी, इतिहास प्रेमी, महिला बचत गट, बागायतदार तसेच प्रगतशील शेतकरी यांच्यासाठी हे 'वाचनालय' प्रेरणास्थान असून या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांमुळे वाचन अभिरुचीसाठी पोषक असे वातावरण निर्माण होत आहे.

वाचन संस्कृतीस प्रोत्साहन देत असतानाच कृषिविषयक उपक्रम राबवून परिसरातील शेतकऱ्यांना अधिक उत्पन्नासाठी नवीन कृषितंत्रज्ञानाची ओळख करुन देणे, महिला व तरुणांना कृषि पूरक तसेच व्यावसायिक प्रशिक्षण देऊन रोजगार व्यवसायांच्या संधी उपलब्ध करुन देणे, तसेच सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा असल्याने येथील ऐतिहासिक, सांस्कृतिक संचिताबरोबरच निसर्ग पर्यावरणाबद्दलच्या जाणीवा नवीन पिढीत निर्माण व्हाव्यात यासाठी 'स्व. सुनिल तळेकर चॅरिटेबल ट्रस्ट'चे अध्यक्ष श्री. सुरेश सदाशिव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विश्वस्तांच्या सहकार्याने अभिनव असे उपक्रम या वाचनालयाच्या माध्यमातून सातत्याने राबविले जातात.

डॉ. शांतीभाई पटेल, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल, डॉ. जी. ए. बुवा, डॉ. आनंद यादव - पुणे, साहित्यिक राम मेस्त्री, प्रा. चंद्रकांत पाडगांवकर - कोल्हापूर, सर्वश्री डॉ. सतीश राजमाचीकर, गजानन वालावलकर - मालवण, सुनिलकुमार सरनाईक - कोल्हापूर, संजय खापरे, अनिल काकडे, महेंद्र नाटेकर, चंदिगडचे हिंदी साहित्यिक जसबीर चावला, गझलकार मधुसुदन नानिवडेकर अशा ग्रंथालय चळवळीतील अनेक मान्यवरांनी स्व. सुनिल तळेकर वाचनालयास भेट देऊन स्व. सुनिल तळेकर यांच्या वैयक्तिक वाचन अभिरुचीचे व ग्रंथ, ग्रंथालय विषयक प्रेमाच्या आणि सामाजिक जाणिवेच्या स्मृति जागवल्याबद्दल 'स्व. सुनिल तळेकर वाचनालया'विषयी कौतुकास्पद अभिप्राय नोंदवले आहेत.

जवळपास ८००० ग्रंथ, अद्ययावत संगणक प्रिंटर प्रणालींनी युक्त असे हे ग्रामीण भागातील वाचनालय आहे. ग्रामीण भागातील मुलांना संगणक आणि इंटरनेटच्या सहाय्याने आवश्यक ती माहिती मिळविण्याची कला अवगत व्हावी यासाठी 'सोल' नावाचा उपक्रम वाचनालयातर्फे राबविण्यात आला होता. दिनकर गांगल यांच्या पत्नी सौ. अनुराधा गांगल यांनी सकाळ दैनिकात या उपक्रमाचे विशेष लेख लिहून कौतुक केले होते.

### ६.६ पश्चिम बंगाल:

### १. रविंद्रनाथ टागोर (१८६१–१९४१) :

सुप्रसिद्ध बंगाली कवी, कांदबरीकार, शिक्षणतज्ञ आणि 'नोबल पारितोषिक' मिळविणारे पहिले भारतीय मानकरी त्यांची सन १९२५ मध्ये बंगाल ग्रंथालय संघावर अध्यक्ष म्हणून निवड झाली. ग्रंथालय आणि ग्रंथालयाची प्रमुख कार्ये या त्यांच्या लेखामुळे या परिसरातील ग्रंथालय कार्यकर्त्यांना ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी चालना मिळाली. त्यांच्या प्रोत्साहानामुळे विश्व भारतीय ग्रंथालय आणि फिरते ग्रंथालय यांची जवळच्या भागामध्ये स्थापना करण्यात आली. ग्रंथालय क्षेत्राबाबत त्यांना अत्यंत आस्था होती.

### २. प्रभात कुमार मुखोपाध्याय (१८९२–१९८५) :

मुखोपाध्याय हे विश्व भारतीय ग्रंथपाल होते. तसेच रविंद्रनाथ टागोर यांचे चरित्रकार. रविद्रनाथांच्या सहाय्यामुळे ते ग्रंथालय चळवळीशी जोडले गेले. या क्षेत्राकरिता योगदान देताना कार्यकारणी सदस्य, पुढे उपाध्यक्ष नंतर अध्यक्ष म्हणून बंगाल ग्रंथालय संघाला योगदान दिले. त्यांच्या कालखंडात येथील ग्रंथालय चळवळीस दिलेले प्रोत्साहन याची दखल घेऊन अनेक पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आणि अनेक विद्यापीठाकडून 'डिलीट' ही पदवी सन्मानपूर्वक बहाल करण्यात आली. पश्चिम बंगाल शासन व  साहित्य अकादमीद्वारे त्यांना रविंद्रनाथ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांनी नवीन वर्गीकरण पद्धती शोधून काढल्या होत्या यामध्ये 'बंगाल दशांश वर्गीकरण (१९३५) ', 'हिंदी दशमिक वर्गीकरण (१९५०)', 'बंगाल ग्रंथ वर्गीकरण (१९६९)' यांचा समावेश आहे.

### ३. सुशीलकुमार घोष (१८९४–१९६४) :

श्री. घोष यांनी आपले सर्व आयुष्य बंगाल चळवळीसाठी वेचले. बेळगाव येथे १९२४ साली आयोजित केलेल्या अखिल राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनास त्यांनी उपस्थितांना प्रबोधित करताना समाज जागृतीसाठी आणि राजकिय जागृतीसाठी प्रेरणा प्राप्त होण्यासाठी शिक्षण प्रसाराची गरज असून त्याकरिता  माध्यम म्हणून ग्रंथालय महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. म्हणूनच ग्रामीण स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयाची निर्मिती आवश्यक असल्याचे त्यांनी

प्रतिपादन केले होते.  त्यांनी प्रत्येक ग्रंथामध्ये ग्रंथालय संघाद्वारे ग्रंथालय चळवळीस प्रेत्साहन द्यावे व तिचे संघाद्वारे ग्रंथालय स्थापावित असा आग्रह धरला होता. सन १९२५ मध्ये अखिल बंगाल ग्रंथालयाची स्थापना होत असताना त्यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली. या पदावरून काम करताना त्यांनी बंगाल मधील विविध जिल्ह्यात दौरा करुन ग्रंथालय सेवा आणि चळवळीकरिता लोकमत तयार केले ते पुढे अखिल भारतीय ग्रंथालय संघाशी सन १९३३ पासून संलग्नित होते. त्यांनी ग्रंथालय चळवळीचा पाठपुरवठा करण्यासाठी 'ग्रंथालय आंदोलन' शिक्षणाकरिता या शीर्षकाचे हे पुस्तक ही प्रकाशित केलेले होते.

**४. तिनकूरी दत्त (१८९८–१९६३) :**

श्री दत्त यांनी  आपले आयुष्य ग्रंथालयासाठी वेचले. तसेच त्यांनी बंगाल ग्रंथालय संघाचे कार्य जोमाने केले. या संघाचे सचिव, उपाध्यक्ष, अध्यक्ष म्हणून काम पाहिले. या काळात त्यांनी संघासाठी स्वतंत्र इमारत उभी करण्यासाठी प्रयत्न केले. व संघाद्वारे विविध प्रकाशने प्रकाशित केली. ग्रामीण स्तरावर ग्रंथालय चळवळ दृढ होण्यासाठी ग्रामीण विभागाशी सातत्यपूर्वक संबंध ठेवला होता. ग्रंथालय क्षेत्राचे महर्षी डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्याबद्दल त्यांना आदर होता. शिवाय त्यांच्याशी त्यांचे घरगुती संबंध होते. अखिल भारतीय स्तरावर ग्रंथालयाचे स्वरुप व घडामोडी यांची जाणीव व्हावी या दृष्टिकोनातून त्यांनी सातत्यपूर्वक ग्रंथालय परिषदेला उपस्थिती दर्शविली. या संघाचे खजिनदार म्हणून योगदान दिले होते. पश्चिम बंगालचे तत्कालीन शैला कुमार मुखोपाध्याय यांच्या माध्यमातून ग्रंथालय संघाच्या इमारतीसाठी निधी प. बंगाल सरकार कडून उपलब्ध केली होती. श्री. तीनकरी व शैला कुमार मुखोपाध्याय (कार्यकर्ते व सभापती, प. बंगाल विधानसभा) यांचे संबंध मैत्रीपूर्ण असल्याने संघाच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध झाला होता. याचबरोबर मुखोपाध्याय यांना प.बंगाल संघासाठी विशेष आस्था होती. आणि म्हणून त्यांनी दोन वेळा बंगाल ग्रंथालय परिषदेचे अध्यक्षस्थान भुषविलेले होते.

**५. निहान राजन रॉय (१९०१ –१९८१) :**

श्री. रॉय हे एक शिक्षणतज्ज्ञ व टागोरांच्या साहित्याचे विशेष अभ्यासक होते. तसेच १९६३ साली कलकत्ता विद्यापीठाचे ग्रंथपाल व विभाग प्रमुख होते. बंगाल ग्रंथालय संघाशी त्यांचा निकटचा संबंध होता. या संघासाठी योगदान देताना त्यांनी सचिव, उपाध्यक्ष, अध्यक्ष या प्रकारे योगदान दिले. तसेच ग्रंथालय विषयक प्रशिक्षण अभ्यासक्रमाकरिता संचालक म्हणून संघासाठी योगदान दिले. ग्रंथालय विषयक प्रशिक्षण अभ्यासक्रमाकरिता संचालक म्हणून संघासाठी काम पाहीले होते. याच बरोबर बंगाल मधील ग्रंथालयाची डिरेक्टरीसुद्धा संपादित केली होती. संघाच्या सुवर्णमहोत्सवी प्रसंगी व इतर परिषदांना त्यांनी अध्यक्षपद भुषविलेले होते. ते राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानचे अध्यक्ष व राष्ट्रीय ग्रंथालय, कलकत्ताचे संचालक होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना भारत सरकारतर्फे पद्मभूषण पुरस्कार देण्यात आला होता. आपल्या सेवानिवृत्तीच्या कालखंडात त्यांनी सिमला येथे 'इंडियन इन्स्टीट्युट ऑफ ॲडव्हान्स स्टडी' या संस्थेचे संचालक म्हणून काम पाहीले. तसेच एशियाटीक सोसायटी कलकत्ताचे मुख्य सचिव म्हणून सन १९४९–५० या काळात काम पाहिले होते. त्यांनी इतिहास संशोधक म्हणून दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असून या संदर्भातील ब्रम्हदेशातील बौद्ध धर्म या विषयातील संस्कृत मधील त्यांचे लिखाण प्रसिद्ध आहे.

**६. बंकिमचंद्र बोस (१९०७–१९७६) :**

बंगाल मधील ग्रंथालय चळवळीकरिता त्यांनी पाच दशके संघाच्या स्थापनेपासून सातत्यपूर्वक नेतृत्व दिलेले आहे. सन १९३३ मध्ये लाहोर येथून ग्रंथालय शास्त्राचे शिक्षण घेऊन ते पंचवेरा येथे बंगाल ग्रंथालय संघाने आयोजित केलेल्या प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी जोडले गेले. सन १९३५ मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. या संघाकरिता सचिव, मुख्य सचिव, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून योगदान दिलेले असून या संघाची 'मुखपत्र ग्रंथाघर' म्हणून संपादित केले होते. त्यांनी सर्वप्रथम बंगालमधील ग्रंथालयांचा आढावा घेऊन 'ग्रंथांक' हा वर्गीकरण तक्ता तयार केला व यासाठी बंगाली शीर्षकांचा वापर करुन ग्रंथाक देण्याची पद्धती विकसित केली. संघाच्या ग्रंथाघर

मुखपत्र हे त्यांनी चालविले होते. पुढे ग्रंथालय चळवळीमधील एक कार्यकर्ते गुरूदास बंडोपाध्याय यांनी बंगालमधील ग्रंथालय चळवळ विषयक लेखमाला लिहून या मुखपत्रातून प्रकाशित केली. त्यांचे ही योगदान संघास लाभले असून त्यांनी या संघाचे खजिनदार, उपाध्यक्ष, अध्यक्ष म्हणून योगदान दिलेले असून एक स्वातंत्र्य सैनिक व ग्रंथालय कार्यकर्ते ही त्यांची ओळख बंगाल प्रातांत सर्वदूर परिचित होती.

**७. फणीभूषण रॉय (१९१८–१९९३) :**

बंगाल मधील ग्रंथालय चळवळीचे कुशल संघटक व देशपातळीवरील अग्रणी व्यक्ती म्हणून ओळखले जातात. त्यांनी ग्रंथपाल (ग्रंथालय भारत सरकार) या पदावर दिर्घकाळ योगदान दिले. तसेच ग्रंथालय शाखांच्या स्थापनेच्यावेळी शिक्षक म्हणून जाधवपूर विद्यापीठ व बंगाल ग्रंथालय संघ यांचेकरिता महत्त्वपूर्ण योगदान दिले. बंगाल ग्रंथालय संघ व आयस्लिक या दोन संघाकरिता योगदान देताना 'आयस्लिक बुलेटीनचे' काम पाहिले होते. त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे पश्चिम बंगाल सार्वजनिक कायदा तयार करण्याच्या समितीमध्ये त्यांनी दर्शविलेला सहभाग होय. तसेच राज्य ग्रंथालय परिषदेचे ते सदस्य होते. पश्चिम बंगाल मधील लोकांच्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालय विषयक जाणीव निर्माण करण्यासाठी व सार्वजनिवक ग्रंथालयाचे जाळे पसरविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. याचबरोबर ग्रंथालय शास्त्राचे शिक्षण सार्वजनिक ग्रंथालय विषयक सांख्यिकीय तपशील, सार्वजनिक ग्रंथालयाच्या इमारतीकरिता व अंतर्गत देवघेव विषयक सहाय्याकरिता प्रमाणकाची निश्चिती या करिता त्यांनी केलेले कार्य हे सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाचे ठरले.

**८. सुरेंद्रमोहन गांगुली (१९२८–१९९७) :**

बंगाल ग्रंथालय चळवळीतील एक आघाडीचे नेतृत्व म्हणून सुरेंद्र गांगुली यांना गौरविले जाते. ग्रंथांविषयीचे विशेष प्रेम त्यांना आपोआपच या क्षेत्राकडे आकर्षित करुन गेले. ग्रंथालय पर्यवेक्षक म्हणून त्यांनी सेवा केली ती कलकत्ता महानगरपालिकेमध्ये. पुढे ते 'विधान चंद्र रॉय ग्रंथालय महानती सदन, कलकत्ता' चे ग्रंथपाल झाले. पुढील काळात ते रविंद्रभारती या

विद्यापीठाचे ग्रंथालय शास्त्राचे विभाग प्रमुख व ग्रंथपाल म्हणून कार्यरत झाले. या काळात ग्रंथालय क्षेत्रात योगदान देताना संघाचे सचिवपद, उपाध्यक्षपद, अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. तसेच संघाचे मुखपत्र 'ग्रंथाघर' यामध्ये अमुलाग्र बदल करुन ते द्वैमासिक स्वरुपात प्रकाशित करणे. व या नियतकाळामध्ये सातत्यपूर्वक लेखन करण्यासाठी लेखकांचा एक गट ही त्यांनीच तयार केला. पंश्चिम बंगाल प्रातांत ग्रंथालय कायदा लागू करण्यासाठी त्यांनी केलेले विशेष परिश्रम हे कायदाविषययक लोकमत तयार करण्यास कारणीभूत ठरले. तसेच आयस्लिक साठी मुख्य सचिव म्हणून योगदान देत असताना या संघटनेस एक मजबूत पाया निर्माण केला. या संघटनेचे त्यांनी खजिनदारपद व उपाध्यक्षपद भूषविले असून ते अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे क्रियाशील कार्यकर्ते होते. तसेच राज्य ग्रंथालय परिषदेचे सदस्य व राज्य ग्रंथालय समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. त्यांनी दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले असून त्यांचे विषय सार्वजनिक ग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालय कायदा व समाज हे आहेत.

**९. प्रमिलचंद बोस (१९०७–१९९६) :**

बंगालमधील ग्रंथालय क्षेत्रातील एक नामवंत म्हणून त्यांची ओळख सर्वदूर होती. बंगालमधील ग्रंथालय चळवळीकरिता स्थापनेपासून पुढील पाच दशके योगदान दिले होते. सन १९३३ मध्ये त्यंनी पंजाब विद्यापीठातून प्रशिक्षण घेऊन सन १९३४ मध्ये परत आल्यावर ते बेरीया येथील बिहार ग्रंथालय संघाच्या ग्रंथालय प्रशिक्षणामध्ये सहभागी झाले. सन १९३५ मध्ये ते कलकत्ता विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात ग्रंथपाल पदावर विराजमान झाले. बिहार ग्रंथालय संघात कार्यरत असताना त्यांनी सहसचिव, मुख्यसचिव, उपाध्यक्ष, अध्यक्ष ही पदे अत्यंत सक्षमपणे भूषविली. त्यांनी संघटनेला एक अधिष्ठान प्राप्त करुन दिले.या संघटनेचे मुखपत्र 'ग्रंथघर' याचे पहिले संपादक म्हणून काम पाहिले. तसेच प्रशिक्षण वर्गाचे ते संचालक होते. याचबरोबर बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे सर्वेक्षण त्यांनी  केले. त्यांचे विशेष कार्य म्हणजे ग्रंथांक देण्यासाठी 'ग्रंथकार नाम' तक्ता तयार केला, हे होय.

**१०. गुरूदास बंधोपाध्याय :**

खरे तर गुरूदास बंधोपाध्याय यांची ओळख स्वातंत्र्यसैनिक ही होय. स्वातंत्र्यसैनिक म्हणून काम करत असताना विद्यार्थीदशेतच त्यांचा संबंध ग्रंथालय चळवळीशी होता. स्वातंत्र्यसंग्रामात अनेकवेळा भाग घेतल्यामुळे अनेकवेळा तुरुंगवास भोगावा लागला. त्यांनी शिक्षकीपेशा स्विकारला तरी पुढे ते प्रकाशन व्यवसायात विशेष रुची दर्शवित ग्रंथालय चळवळीशी योगदान देत राहिले. ते बंगाल ग्रंथालय संघाचे खजिनदार, उपाध्यक्ष, अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. बंगाल ग्रंथालयसंघाचे मुखपत्र 'ग्रंथघर' मध्ये त्यांनी बंगाल ग्रंथालय चळवळी विषयी अनेक लेख लिहिले आहेत.

**११. सुबोधकुमार मुखोपाध्याय (१९११–२०००) :**

ग्रंथालय शास्त्राचे शिक्षण घेतल्यावर त्यांनी आपल्या सेवेची सुरुवात इम्पिरीयल ग्रंथालयातून केली. यानंतर ते दिल्ली व बडोदा येथे अनुक्रमे शालेय ग्रंथपाल व ओरीएंटल संस्थेचे ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. काही काळ त्यांनी राष्ट्रीय अभिलेखागार म्हणून नवी दिल्ली येथे काम केले. सहाय्यक ग्रंथपाल म्हणून कलकत्ता विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात काम पाहिले. तेथूनच ते मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात दाखल झाले. पुढे या विभागाचे प्रमुख झाले. समंत्रक म्हणून ग्रंथालयशास्त्र व वृत्तपत्रविद्या विभागाचे काम पाहिले. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी ग्रंथालयशास्त्र महाविद्यालय बेहरामपूर येथे प्राचार्य म्हणून काम पाहिले. बंगाल ग्रंथालय संघाशी त्यांचा दीर्घकाळ संबंध होता. यावेळी मुख्य सचिव, उपाध्यक्ष, अध्यक्ष म्हणून ते कार्यरत राहिले. त्यांच्या 'ग्रंथगर विज्ञान' या पुस्तकास दिल्ली विद्यापीठाचे पारितोषिक प्राप्त झाले होते. तसेच ड्युई डेसिमल वर्गीकरणाचे भारतातील विषयाच्या संदर्भातील सहसंबंध विस्तारीत करणाच्या त्यांच्या प्रयत्नास त्यांना वाटमोल फाऊंडेशन पारितोषिक ही प्राप्त झाले होते. अखिल भारतीय ग्रंथालय संघ, विशेष ग्रंथालय संघ यांचेही ते सदस्य होते.

**१२. विनयनाथ मुखोपाध्याय (१९१५– १९९४) :**

बंगाल मधील ग्रंथालय चळवळीचे ते एक आघाडीचे नेते व संघटक होते. लंडन ग्रंथालय संघाद्वारे त्यांना फेलोशीप प्राप्त झाली होती. संस्कृत महाविद्यालय कलकत्ता व कलकत्ता विद्यापीठ या ठिकाणी ग्रंथपाल म्हणून काम पाहिले होते. नंतरच्या काळात ते बुरूदवन येथील विद्यापीठामध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागात दाखल झाले. तेथे त्यांनी प्रपाठक व विभाग प्रमुख म्हणून योगदान दिले होते. बंगाल ग्रंथालय संघाशी संलग्नित असताना ते सचिव, उपाध्यक्ष, अध्यक्ष म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत होते. ग्रंथालय विकासाचे वेगवेगळ्या ठिकाणी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात त्यांना रस होता. बंगाल ग्रंथालय संघाच्या नव्या इमारतीची उभारणी करण्यासाठी त्यांचा विशेष प्रयत्न होता. लोकशिक्षा (ग्रंथालय व जनशिक्षण), पंडूलिपी कॅटलॉग (हस्तलिखितांची तालिका) संबंधित त्यांनी दोन ग्रंथांचे लेखन केले आहे.

**१३. प्रबीरराय चौधरी (१९३३–२००७) :**

विद्यार्थीदशेपासून त्यांना चळवळीविषयी आकर्षण होते. ते विद्यार्थी नेता म्हणून महाविद्यालयीन जीवनात ओळखले जात. पश्चिम बंगाल राज्य समिती व भारतीय विद्यार्थी संघाचे अध्यक्षही होते. या पार्श्वभूमीवरच ते १९५६ मध्ये ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरिता दाखल झाले. हा अभ्यासक्रम संघाद्वारे चालविला जात असल्यामुळे सहाजिकच राय चौधरी यांनी संघटनात्मक कार्यामध्ये १९५६ पासून स्वत:ला झोकून दिले. आपल्या आयुष्याचा अखेरपर्यंत त्यांनी बंगाल संघाकरिता योगदान दिले होते.

सन १९५७ मध्ये जाधवपूर विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात ‘तालिकाकार’ म्हणून दाखल झाले. पुढे येथे ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रम सुरू केल्यावर ते त्यांचे काम पाहू लागले. दिल्ली विद्यापीठातून एम.लिब. पदवी प्राप्त करताच ते पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून दाखल झाले आणि प्रपाठक व विभागप्रमुख बनले. पश्चिम बंगालमधील सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात आणण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांनी बंगाल ग्रंथालय संघातील चळवळीत आपली नाममुद्रा उमटवली आहे. ‘ग्रंथागर’ या संघाच्या मुखपत्राचे संपादक पदही त्यांनी सांभाळले होते. शिवाय ते ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे

संचालक ही होते. त्यांनी संघटनेद्वारे वेळोवेळी तयार केलेल्या निवेदनाकरिता महत्त्वाची भूमिका बजावली होती. राज्यातील विविध भागात पुस्तक जत्रांचे आयोजन करण्याची त्यांना विशेष आवड होती. देशातील ग्रंथालय चळवळी विषयक त्यांचे योगदान लक्षात घेऊन त्यांना राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान कडून फेलोशिप प्रदान करण्यात आली होती. तसेच कौला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले होते. विशेष ग्रंथालय संघ व अखिल भारतीय ग्रंथालय संघ यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध होता. विशेष ग्रंथालय संघाची नवी घटना तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली होती. याचबरोबर अखिल भारतीय ग्रंथालय चळवळीचे सुवर्णमध्य म्हणून त्यांना गौरविण्यात आले होते. ग्रंथालय संघाबरोबरच अनेक संघटनांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

**१४. निर्मलादि मुखोपाध्याय :**

श्री. मुखोपाध्याय हे एक ग्रंथालय चळवळीचे कार्यकर्ते क्रियाशील होते. त्यांनी आपली सेवा महाराजा मणीनचंद्र महाविद्यालय कलकत्ता येथून सुरु केली. १९६३ मध्ये ते ग्रंथपाल झाले. जर्नल ऑफ इंडियन मेडिकल असोसिएशन कलकत्ता येथे दीर्घकाळ काम करुन सन १९८७ मध्ये सेवानिवृत्त झाले. सुरेंद्र गांगुलीच्या सहवासातून ते बंगाल ग्रंथालय संघाकडे १९५० च्या काळात आकृष्ट झाले. या संघाच्या विविध पदांवर काम करुन अंतिमत: या संघाचे ते अध्यक्ष झाले. संघाच्या ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम व ग्रंथागर या मुखपत्राचा दर्जा उंचावण्यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यांनी ग्रंथालय चळवळीविषयक अनेक लेख लिहिले असून बंगाल मधील ग्रंथालय चळवळीविषयीचे त्यांचे लेखन अप्रकाशित राहिले. विशेष ग्रंथालय संघाशी त्यांचा निकटचा संबंध होता.

## ६.७ कर्नाटक राज्य :

### १. रंगाशास्त्री :

श्री. रंगाशास्त्री यांनी म्हैसूरमधील शहर ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून ३५ वर्षे योगदान देताना ग्रंथालयाविषयक अभिरुची लोकमानसात पसरविण्याचा प्रयत्न केला. अर्धशतक त्यांनी ग्रंथालय चळवळीसाठी सक्रिय योगदान दिले. म्हैसूर ग्रंथालय संघाच्या स्थापनेसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. यामुळे त्यांच्या दूरदृष्टिचा व त्यागाचा फायदा ग्रंथालय सेवकांना होण्यास मदत झाली.

### २. प्राध्यापक देशपांडे के. एस. (१९२५ – ) :

हे एक कर्नाटकातील चतुरस्त्र ग्रंथपाल म्हणून सर्वदूर परिचित होते. त्यांनी कर्नाटक विद्यापीठ, म्हैसूर विद्यापीठ, बंगलोर विद्यापीठ व कृषी विद्यापीठ, धारवाड या ठिकाणी विद्यापीठ ग्रंथपाल म्हणून कार्यभार सांभाळला होता. तसेच ते राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानचे सदस्य होते. सार्वजनिक दृष्टिकोनातून ग्रंथालय चळवळी विषयक महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे गोवा राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कायदा समितीचे त्यांनी अध्यक्षपद भूषविलेले होते. या राज्यातील कायदा परिपूर्ण दृष्टिकोनातून तयार करण्यात त्यांनी केलेले प्रयत्न व कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी केलेले सहकार्य हे उल्लेखनीय आहे. व्यासंगी व्यक्ती हा त्यांचा परिचय असून त्यांनी इंग्रजीमधून ६० व कन्नड भाषेतून ३० संशोधनपर लेख प्रकाशित केलेले आहेत. अनेक ग्रंथांचे संपादन इंग्रजी व कन्नड भाषेतून केलेले आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या समितीवर ही त्यांनी प्रतिनिधित्व केलेले असून उत्तम संशोधक व मार्गदर्शक या पार्श्वभूमीवर पीएच.डी. च्या १० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलेले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव ‘कर्नाटक राज्योत्सव पुरस्काराने’ करण्यात आलेला आहे.

### ३. केशवन बी.एस. (१९०९–२०००) :

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमानंतर त्यांनी लंडन स्कूल ऑफ लायब्रीयनशीप येथून प्रशिक्षण घेऊन पुढे ऑक्सफर्ड आणि क्रॉयडन सार्वजनिक ग्रंथालयामध्ये प्रशिक्षण घेतलेले होते. अमेरीकेमध्ये त्यांनी संस्कृत भाषेचे शिक्षण ओरीयंटल प्रशालेत घेतले होते. राष्ट्रीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणूनही काम केलेले होते. तेसच इन्सडॉक चे संचालक पदही भूषविलेले

होते. अमेरीका व युरोपियन देशांना भेटी दिलेल्या होत्या. ग्रंथालय विषयक अनेक समस्यांवर त्यांनी काम केलेले होते. अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे ते अध्यक्ष ही होते. ग्रंथालय क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल त्यांना राज्य शासनाद्वारे कन्नडा राज्योत्सव पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आलेले होते. भारत सरकारने पद्मश्री हा किताब देऊन गौरविलेले होते.

**४. निलमेघण ए. :**

श्री. निलमेघण हे डॉ. एस.आर. रंगनाथन यांचे सहकारी म्हणून डी. आर. टी. सी. बंगलोर येथे कार्यरत होते. सचिव, शारदा रंगनाथन एंडावमेंट, ग्रंथालयशास्त्र म्हणून काम पाहिलेले आहे. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी प्रकाशन व चर्चासत्रे याद्वारे ग्रंथालय शास्त्राचा सर्वदूर प्रसार करण्याचा प्रयत्न केला. डॉ. रंगनाथन यांना त्यांच्या 'फिजिकल बिब्लोओ फॉर लायब्ररीयन्स १९७५' व पब्लिक लायब्ररी सिस्टिम, कोलन, इंडिया, श्रीलंका आणि युके आणि युएस्ए या ग्रंथाच्या पुनर्लेखनासाठी सहकार्य केले होते. ते कर्नाटक ग्रंथालय संघ व इतर तत्सम संघटनाशी अतिशय जवळून सहभागी होते. विविध प्रशिक्षण अभ्यासक्रम, उजळणी वर्ग, चर्चासत्रे याद्वारे सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीवर व्याख्याने दिलेली होती. तसेच राज्य व अंतरराज्य स्तरावरील परिषदेचे त्यांनी अध्यक्षपद भूषविलेले होते. सन १९८९ मध्ये आंध्र प्रदेश ग्रंथालस संघाने त्यांचा सत्कार केला होता. परदेशी स्तरावर, देश पातळीवर त्यांनी ग्रंथालय प्रसारासाठी व क्षेत्राच्या अद्ययावततेसाठी मौलिक भूमिका बजावली होती. उदा. तमिळनाडू नियोजन, ग्रंथालय नियोजन समिती १९७१ इ. २०० हून अधिक शोधनिबंध, २५ हून अधिक अहवाल व १० ग्रंथ ही त्यांची मौलिक प्रकाशने दर्जेदार संदर्भसाधने म्हणून ओळखली जातात. त्यांना विविध फेलोशिप्स् प्राप्त झाल्या होत्या.

**५. प्रा. गूंजाळ एस. आर (२५ जून १९३२ – ) :**

ग्रंथालयशास्त्र विषयक आपला अभ्यासक्रम दिल्ली विद्यापीठातून पूर्ण केला. कर्नाटक विद्यापीठातून पीएच.डी. पदवी संपादन केली. सुरुवातीला माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत होते. पुढे कॉलेज स्तरावर अधिव्याख्याता म्हणून काम पाहून कर्नाटक व गुलबर्गा

विद्यापीठात ग्रंथपाल म्हणून कार्यरत राहिले आणि अंतिमत: गुलबर्गा विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल व माहिती शास्त्र विभागाचे काम पाहिले. कन्नड भाषेतील साहित्य, धर्म व तत्वज्ञान अनेक कार्यसूचीचे संकलन, चरित्रे, चरित्र लेखन, तालिका व निर्देशक अशी ३० हून अधिक ग्रंथसंपदा आहे. युरोप व अमेरिका येथे त्यांनी भेट दिली असून विविध संघटनाचे ते सदस्य म्हणून कार्यरत राहिले आहेत.

**६. करशिदप्पा सि. आर. :**

ग्रंथालयशास्त्राचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण कर्नाटक विद्यापीठातून पूर्ण करुन तेथेच पीएच.डी. पदवी प्राप्त केली. ग्रंथालय व माहितीशास्त्राचे शिक्षक व पीएच.डी. मार्गदर्शक तसेच अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्षपद भुषविलेले असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अभ्यासक्रम समितीवर २००२ मध्ये योगदान दिलेले आहे. त्यांचे २ ग्रंथ, ८ शोधनिबंध हे त्यांचे लेखन प्रकाशित झालेले असून एक उत्कृष्ट मार्गदर्शक हा त्यांचा लौकिक सर्वदूर पसरलेला आहे. विविध ग्रंथालय संघटनांचे सभासदत्व, इंग्रजी, हिंदी, मराठी, तेलगू या भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे.

### ६.८ गुजरात :

### १. महाराज सयाजीराव गायकवाड (१८६२–१९३९) :

बडोदा संस्थानातीलच नव्हे तर अवघ्या देशभरातील ग्रंथालय चळवळीचे प्रणेते म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल असे महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) हे सन १८८१ मध्ये बडोदा संस्थानच्या गादीवर पूर्ण सत्तेनीशी विराजमान झाले. आपल्या राजपदाच्या कालखंडात अनेक सामाजिक सुधारणांचा त्यांनी अवलंब केला आणि याद्वारे केवळ बडोदा संस्थानमध्येच नव्हे तर भारतामध्ये सामाजिक सुधारणांचे नवे अभियान सुरु करुन जनतेच्या राहणीमानामध्ये आमुलाग्र बदल करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या सुधारणांमध्ये सर्वसाधारणतः विधवा विवाह, जात निर्मूलन, बाल विवाह प्रतिबंध, कृषि अस्पृश्यता निवारण, कृषिक्षेत्र, महसूल, रेल्वे सुविधा, शिक्षण, ग्रंथालय चळवळ, ग्राम सभा, ग्रामपंचायती संघाटना, बँका या क्षेत्रामध्ये सुधारणा करुन बडोदा संस्थानला एका विकासाच्या उंचीवर नेऊन ठेवण्याचा त्यांनी केलेला यशस्वी प्रयत्न त्यांच्या प्रशासकीय कौशल्याचे वैशिष्ट्ये म्हणून गौरविला गेला.

तंत्रशिक्षणासाठी त्यांनी सुरू केलेले कला भवन हा ही असा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम होता. पाश्चात्य जगतातील सुधारणा व तेथील लोकजीवन यांचे अवलोकन करण्याच्या दृष्टीने महाराजांनी सन १९०५ मध्ये युरोप व सन १९०६ मध्ये अमेरीकेचा दौरा केला. या दौऱ्यामध्ये त्यांनी एक जिज्ञासू विद्यार्थी म्हणून तेथील औद्योगिक विकास, कृषी व्यवसाय, कामगार संघटना, शिक्षण आणि ग्रंथालये, बाल संगोपन या विषयाचे चिकित्सक निरीक्षण करुन या विषयाच्या तेथील विकासात्मक धोरणांचे अवलोकन केले. या आपल्या दौऱ्यामध्ये त्यांनी युरोप व अमेरीकेतील लोकांचा वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून घेताना ते प्रभावित झाले. याचबरोबर तेथील शिक्षण आणि मोफत सार्वजनिक ग्रंथालये यांचा तेथील सांस्कृतिक व लोकजीवनावर असलेला प्रभाव पाहून ते चकित झाले. या सर्व सुधारणा पुढील काळात आपल्या संस्थानात राबविण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. महिला शिक्षणाची सुविधा करीत असताना त्यांनी महिलांच्यासाठी प्रशिक्षण विद्यालय सन १८८१ मध्ये सुरू केले. या माध्यमातून महिला शिक्षकांना तयार करणे व स्त्री शिक्षणास चालना देणे हा त्यांचा

मुलभूत हेतू होता. आपल्या संस्थानमध्ये सर्वांगीण विकास व्हावा म्हणून त्यांनी सक्तीचे शिक्षण सुरु केले. व याकरिता ७ ते १० वयोगटातील मुलाने शाळेत दाखल झालेच पाहिजे असा फतवा जाहीर केला.

सक्तीचे शिक्षण आणि ग्रंथालय चळवळ यांचे जवळचे नाते विचारात घेऊन बडोदा संस्थानात त्यांनी ग्रंथालय चळवळीची मुहुर्तमेढ रोवली. सार्वजनिक ग्रंथालये ही लोक विद्यापीठे आहेत, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. कोणत्याही स्तरावर शिक्षण अद्ययावत ठेवण्यासाठी केवळ ग्रंथालयेच सहाय्यभूत ठरू शकतात. याची त्यांना तीव्रतेने जाणीव झाल्यामुळे शिक्षण व ग्रंथालय चळवळ यांची यशस्वी सांगड घालून लोकांना सज्ञान व सुशिक्षित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्ञान हे स्वतःच्या त्यागाशिवाय साध्य करता येत नाही. लोकांचा विकास व त्यांच्या राहणीमानात सर्वांगिण विकासाकरिता ज्ञानाची गरज असून याकरिता लोकांच्यामध्ये पुस्तकाविषयी प्रेम निर्माण केले पाहिजे. ग्रंथ हे त्यांचे जीवनाचे सर्वस्व ही भावना लोकांच्यामध्ये रुजवली पाहिजे. ग्रंथालये ही केवळ चैनीची ठिकाणे नसून आपल्या अस्तित्वाची गरज असलेली मुलभूत ठिकाणे आहेत. अशी महाराजांची ठाम श्रद्धा होती. आणि म्हणूनच संस्थानामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांच्या चळवळीकरिता सन १९१० पासून महाराजांनी एक नवे अभियान उभे करुन त्याला साथ दिली ती सक्तीच्या शिक्षणाची. त्यांच्या या अभियानास खऱ्या अर्थाने लाभदायी ठरला तो त्यांचा अमेरिकेतील दौरा होय. यासाठी त्यांनी अमेरिकेहून ग्रंथालय क्षेत्रातील श्री. विल्यमबोर्डन यांना गुजरात राज्यामध्ये आमंत्रित करुन आधुनिक पद्धतीची ग्रंथालय व्यवस्था स्थापण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. श्री. बोर्डन हे अमेरिकेतील पहिले व्यावसायिकदृष्ट्या प्रशिक्षित ग्रंथपाल होते. त्याचबरोबर ते दशांश वर्गीकरण पद्धतीचे प्रणेते श्री. मेलवीस ड्युई यांचे सहकारी होते. ते सन १९१० मध्ये बडोदा मध्ये दाखल झाले. आणि त्यांच्याकडे महाराजांनी त्यांना पूर्ण मुभा देऊन बडोदा राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे विकसित करण्याची योजना सोपवली. बडोदा राज्य ग्रंथालयाचे संचालक म्हणून त्यांची नियुक्ती केली. हे पद त्यांनी सन १९१३ अखेर भूषविले. आपल्या या ३ वर्षांच्या कालखंडात श्री बोर्डन यांनी परिश्रम पूर्वक ग्रंथालय चळवळीचे अभियान बडोदा राज्यात उभे केले. त्यांच्या या

कार्यात त्यांना साथ मिळाली ती श्री. मोतीभाई अमीन, श्री. टी. डी. वाकनीस , श्री. दत्त यांची. या सर्वांनी मिळून महाराज सयाजीराव गायकवाड यांच्यामध्ये असलेली ग्रंथालय चळवळीविषयक कल्पना व विचार प्रत्यक्षात आणले. केवळ बडोदा राज्यात नव्हे तर मुंबई ग्रंथालय संघाच्या स्थापनेतील महाराजांचे योगदान हे महत्त्वपूर्ण असून बडोद्यातील ग्रंथालय प्रशिक्षणाची सुरुवात सन १९११ मध्ये करण्यात आली. अशा प्रकारे ग्रंथालय प्रशिक्षणाची मुहुर्तमेढ देशात पहिल्यांदा रोवण्यात आली. ती बडोदा संस्थानातच!

तसेच ग्रंथालय शास्त्रविषयक नियतकालिकांचे प्रकाशन 'लायब्ररी मिसलीनी' यांची सुरुवात. ही पहिल्यांदाच बडोदा राज्यात झाली. बाल ग्रंथालयाची स्थापना, खेळणी, ग्रंथालये, सार्वजनिक ग्रंथालयांमधून बाल विभागाची सुरुवात सन १९१३ पासून करण्यात आली. या सुधारणामध्ये मुलभूत अधिष्ठान होते ते महाराज सयाजीराव गायकवाड यांचेच होय. मुंबई येथील मुंबई मराठी ग्रंथालयाच्या उभारण्यामागे बहुमोल सहकार्य होते महाराजांचेच.

**२. श्री. विल्यम बोर्डन (१८५४-१९३१) :**

बडोदा नरेश सयाजीराव महाराज तिसरे यांनी शिक्षण प्रसारासाठी सार्वजनिक ग्रंथालयाची उपयुक्तता विचारात घेऊन आपल्या अमेरीका दौरा प्रसंगी सन १९०६ मध्ये तेथील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे जवळून निरीक्षण केले. पाश्चात्य देशातील या सार्वजनिक ग्रंथालय पद्धतीचा शिक्षण प्रसारासाठी उपयोग करण्याच्या दृष्टिने अशी पद्धत बडोदा संस्थानात अवलंबण्यासाठी परदेशी तज्ञांची गरज असल्याचे त्यांच्या लक्षात आले. याच पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या अमेरीका दौऱ्यात अमेरीकेतील पहिले प्रशिक्षित ग्रंथपाल मि. डब्ल्यू.ए. बोर्डन यांचे अमेरीकेतील गंथालय चळवळीविषयक कार्य विचारात घेऊन त्यांना बडोदा राज्यात प्राचारण करुन त्यांची नेमणूक राज्याच्या ग्रंथालय विभागाचे संचालक म्हणून १९१० मध्ये केली. सुरुवातीस त्यांची ही नेमणूक एक वर्षासाठी होती. बडोद्यातील पहिल्या वर्षांच्या कालखंडात ग्रंथालय क्षेत्राविषयी त्यांना असलेले ज्ञान व आस्था आणि व्यावसायिक जबाबदारीची जाणीव याचबरोबर त्यांचे मैत्रीपूर्ण वागणे आणि लोक संपर्क व विविध उपक्रमाबद्दल व त्यांच्या आयोजनाबद्दल त्यांचा दृष्टिकोन यामुळे ग्रंथालय चळवळीचे कार्य बडोदा संस्थानात खूपच वाखाणले गेले. यातूनच पुढे त्यांना जितका काळ शक्य आहे

तितका काळ बडोद्यात राहण्याविषयी विनंती करण्यात आली. आपल्या तीन वर्षांच्या अल्प कालखंडात त्यांनी बडोदा येथे मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना केली तसेच या संस्थानामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे शहर व ग्रामीण परिसरातून विकसित केले. ग्रामीण परिसरातील दुर्गम भागाकरिता त्यांनी फिरत्या ग्रंथालयांची सुविधा सुरू केली. त्यांच्या या उपक्रमामुळे लोकांमध्ये विश्वास निर्माण होऊन लोकवर्गणी व संस्थानचे आर्थिक सहाय्य या माध्यमातून ग्रामीण परिसरात ग्रंथालय विकासास चालना मिळाली. त्यांच्या या कार्यात अत्यंत विश्वासाने सामील झालेल्या व्यक्तींमध्ये जे.एस.कुडाळकर, मोतीभाई एन.अमीन, एन.एम.दत्त, बी.एम.दादाचांदजी, आनंदीबाई प्रभु देसाई व एन.सी.दिवानजी अशा अनेकांचा समावेश होता. या सर्वच लोकांना बोर्डन यांनी ग्रंथालयशास्त्र विषयक प्रशिक्षण दिलेच होते. बडोद्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला एक अधिष्ठान प्राप्त करुन देणाऱ्या श्री. बोर्डन यांचा जन्म ४ एप्रिल १८५४ मध्ये अमेरीकेतील न्यू बेडफोर्ड येथे झाला. सन १८७० मध्ये आपले शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते कॉर्नेल विद्यापीठात ३ वर्षांसाठी दाखल झाले. आणि विद्यापीठ अभ्यास पूरा करुन ते पुढे त्यांचे वडील श्री. ॲलन बोर्डन यांच्या कार्यालयात कायदा विषयक शिक्षण घेऊ लागले. श्री. ॲलन बोर्डन हे न्यायाधीश होते. याच काळात श्री.बोर्डन यांना स्वत:ला ग्रंथपालन व्यवसायाविषयी आस्था असल्याची जाणीव झाली. या पाठीमागची पार्श्वभूमी म्हणजे त्यांनी सुरुवातीला शेती केली आणि त्यानंतर पुस्तक बांधणीचे ही कार्य केले. यातूनच ग्रंथालय विषयक त्यांच्या मनामध्ये जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले. पुस्तकांची बांधणी करता करतानाच त्यांनी पुढे ग्रंथ पुरवठा करण्यास सुरुवात केली. ग्रंथालयाशी त्यांची निर्माण झालेली जवळीक वृद्धिंगत होऊन त्यांनी पुढे ग्रंथालय तंत्राचा ग्रंथालय शास्त्राच्या श्री. चार्ल्स कटर यांच्या मार्गदर्शनाखाली तीन वर्षाचा अभ्यासक्रम पुरा केला. श्री. कटर हे आधुनिक ग्रंथपालन व्यवसायाचे संस्थापक होते. आणि 'एक्स्पानसिव्ह वर्गीकरण' व 'कटर ऑथर टेबलचे' जनक होते. अशा या ग्रंथालय शास्त्रातील तत्कालीन आधुनिक भीष्माचार्यांच्या हाताखाली श्री. बोर्डन यांनी आपला तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करुन रोचेस्टर परिसरात सन १८८५ मध्ये ग्रामीण ग्रंथालयांचे संघटन करण्यासाठी सहकार्य केले. सन १८८७ मध्ये कोलंबिया विद्यापीठामध्ये ग्रंथालय

शास्त्राचे व्याख्याते म्हणून त्यांची नेमणूक डॉ. मेल्वील ड्यूई यांच्या हाताखाली करण्यात आली. या ठिकाणी त्यांनी पाच वर्षे काम केल्यानंतर पुढे त्यांची नेमणूक ग्रंथपाल म्हणून येल विद्यापीठात झाली. यानंतर त्यांनी 'यंगमन्स इन्स्टिट्युट' (न्यू हेवन) चे संघटक केले. या ग्रंथालयात त्यांनी मुलांसाठी स्वतंत्र कक्ष, ग्रंथालयाविषयक अभ्यासक्रम, फिरती ग्रंथालये अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले. अशा या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाची अमेरीकेमध्ये भेट होताच महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यांची पारख करुन बडोद्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाकरिता जाणिवपूर्वक आमंत्रित केले.

आपल्या बडोद्यातील कालखंडात श्री. बोर्डन यांनी सयाजीराव महाराजांचा हा विश्वास सार्थ ठरविला. तीन वर्षाचा आपला बडोद्यातील कालखंड पूर्ण केल्यानंतर तेथून अमेरिकेस परत जाताना त्यांनी अमेरीकन ग्रंथालय संघाच्या वार्षिक परिषदेमध्ये सादर करण्यासाठी 'बडोदा ॲण्ड इट्स पब्लिक लायब्ररीज' हा लेख तयार केला. त्यांच्या या कार्यातूनच त्यांनी निवडलेल्या या व्यवसायाविषयीची बांधिलकी स्पष्ट होते. बडोद्याहून निघताना त्यांनी येथील वास्तव्याविषयक लिहीताना असे नमूद करुन ठेवले होते की, या ठिकाणी मला राजशिष्टाचार पद्धतीने वागणूक तर मिळालीच शिवाय प्रामाणिकपणे सहकार्य प्राप्त झाले. या ठिकाणी मी स्वत: प्रशिक्षित केलेले माझे सहकारी त्यांना मी येथे ठेवून जात आहे. ते सर्वजण सर्वार्थाने ही चळवळ सक्षमपणे पुढे नेण्यास समर्थ आहेत. या व्यतिरीक्त माणसांनी अधिक चांगले समाधान व साथ देत यापेक्षा काय अपेक्षित करावे. त्यांच्या या लेखणीतून अवतलेल्या भावनाच त्यांच्यातील एक उत्तम प्रशासक व एक प्रज्ञावान माणूस स्पष्ट करण्यासाठी पुरेसे आहेत.

**३. मोतीभाई अमीन (१८७३–            ) :**

हे समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राज्यशासनाचे आधिरक्षक व ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देणारे व्यक्तीमत्त्व म्हणून तत्कालीन बडोदा संस्थानात परिचित होते. त्यांचा जन्म २९ नोव्हेंबर १८७३ रोजी झाला. ग्रंथालय चळवळीचा प्रसार करताना त्यांनी विविध ठिकाणी ग्रंथालयांची स्थापना केली. अशामध्ये खेड, पाटण, पेटलाद, बडोदा या ठिकाणांचा उल्लेख करता येणारा आहे. ग्रामीण स्तरावर शिक्षणाचा प्रसार आवश्यक असून प्रत्येक

खेड्यामध्ये ग्रंथालय स्थापन केले पाहिजे आणि ग्रंथालयांची सेवा मोफत स्वरुपात करुन दिली पाहिजे अशी त्यांची धारणा होती. इतकेच नव्हे तर समाजातील प्रत्येक घटकाने ग्रंथालयांचा वापर केला पाहिजे यासाठी आग्रही होते या विचारधारणेतून त्यांनी परिसरातील ग्रंथालयांची स्थापना केली. ते ग्रंथालयशास्त्रातील भीष्माचार्य होते. त्यांनी बडोदा संस्थानात शिक्षण आणि ग्रंथालय प्रचारासाठी महाराज सयाजीराव गायकवाड यांना मार्गदर्शन व सहकार्य केले होते. त्यांच्या या कार्याचे योगदान लक्षात घेऊन श्री. अमिन मोतीभाई यांच्या स्मरणार्थ 'आदर्श ग्रंथालय पुरस्कार' त्यांच्या नावाने आजही दिला जात आहे. एका ठिकाणी जनसमुदायास प्रोत्साहन करताना ते उद्‍गारले होते, ''मंदिरे व धर्मशाळा स्थापन करतात पण शिक्षण प्रसारासाठी ग्रंथालय सुरू करण्याचा विचार कोणीच करत नाही.' त्यांच्या या कळकळीच्या उद्‍गारातून लोकही त्यांना सहकार्य करीत असत. आपल्या तुटपुंज्या पगारातुन ते ग्रंथालयासाठी स्वतःहून आर्थिक मदत करीत. त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांच्या नावाने 'ॲमेने अमीन' ग्रंथालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यांनी वाचनअभिरुची विद्यार्थी, प्रौढ व महिला यांच्यात विकसित करण्यासाठी देखील विशेष प्रयत्न केलेले असून या अनुषंगाने ते आपल्या 'हिस्ट्री ऑफ लायब्ररी' या ग्रंथात नमुद करतात. जसे अमेरिकन व्यावसायिक त्यांच्या उत्पादनाचे अधिकाधिक विपणन करतो तद्‍वतच ग्रंथपालांनी लोकांनी अधिकाधिक पुस्तके वाचावीत यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी अमेरिकन ग्रंथपालांनी प्रयत्न केले आहेत. यामुळे अमेरिकेतील लोकांमध्ये वाचन अभिरुची वृद्धिंगत झाल्याचे दृष्टोत्पतीस येते. अशा प्रकारचे प्रयत्न भारतात होणे गरजचे आहे.''

**मोतीभाईंच्या उपक्रमांचे ग्रंथालयविषयक उपक्रम :**

१. सन १९०६ मध्ये त्यांनी मित्रमंडळ पुस्तकालय या सार्वजनिक ग्रंथालयाची पहिल्यांदाच पेटालाद या गुजराथमधील गावात स्थापना केली.

२. सन १८९० मध्ये त्यांच्याच प्रयत्नातून वासोग्राम या गावी ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली व अनुदान प्राप्त झालेल्या या ग्रंथालयाच्या इमारतीचे उद्‍घाटन स्वतः महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केले होते.

३. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानामधील अभिरक्षक म्हणून मोतीभाईंची नेमणूक केली होती.

४. सन १८९० मध्ये त्यांनी वासोमध्ये विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालयाची स्थापना मित्रांच्या सहकार्यातून केली होती.

५. सन १९११ मध्ये त्यांनी बडोदा संस्थानात फिरत्या ग्रंथालयाची स्थापना करुन त्यास श्री. बोर्डन यांची मान्यता घेऊन रुपये ६०००/– इतके अनुदान प्राप्त केले होते. १५० पेट्यातून यासाठी पुस्तके वितरीत केली जात असत. या फिरत्या ग्रंथालयामुळे लोकांना ग्रंथालय चळवळीविषयक लाभ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाला.

६. त्यांनी उडी (१), अमरेली (९), नवसारी (९), बडोदा (१४) अशा प्रकारे शिक्षण विभागाच्या परिसरात ग्रंथालयांची स्थापना केली होती. बडोदा संस्थात त्यांनी एकूण २०० ग्रंथालये व छोट्या गावातून २४० छोटी ग्रंथालये स्थापन केली होती. ग्रंथालय व्यवस्थापनास एक दिशा मिळावी म्हणून त्यांनी नोंदणी कार्यासाठी व अनुदान प्राप्त होण्यासाठी व ग्रंथालयाच्या स्थापनेसाठी नियम ही तयार केले होते. या विषयांची लोकांकडून अंमलबजावणी व्हावी यासाठी ते दक्षता घेत असत.

७. तसेच त्यांनी ग्रंथालय स्थापनेविषयी व अधिकतर अनुदानासाठी प्रकल्पही सादर केला होता.

८. संस्थानात ग्रंथालय प्रशिक्षणाविषयक प्रशिक्षित मनुष्यबळ नसल्याने त्यांनी ग्रंथालयशास्त्राचे शिक्षण ही सुरू केलेले होते व याची सुविधा शासकीय विभागाकडून करण्यात आली होती.

९. ‘पुस्तकालय’ नावाचे नियतकालिक ही त्यांनी पुस्तकालयांच्या सहकार्याने सुरू केले होते.

१०. त्यांनी शासकीय निर्णयांचे संपादन करुन ते दोन भागात प्रकाशित केले होते.

११. राज्यस्तरीय ग्रंथालय परिषदेचे त्यांनी सन १९२५ मध्ये आयोजन केले होते. तसेच बडोद्यातील पहिल्या सार्वजनिक ग्रंथालयांचा हिरक महोत्सव ही साजरा केला होता.

१२. महिलांनी शिकले पाहिजे या धारणेतून त्यांनी बाल व महिला ग्रंथालयांची स्थापना केली होती.

१३. या सर्व कार्याबरोबरच सर्व शाळांमधून ग्रंथालये सुरू केली होती.

*(स्त्रोत– प्रकाश जैन इन पी.एस.जी. कुमार, खंड –६)*

**४. कुडाळकर, जे. एस. (१८८२–१९२१) :**

कुडाळकर यांचा जन्म सन १८८२ मध्ये एका गरीब कुटुंबात मुंबई येथे झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले आणि एम.ए. ही पदवी १९०५ मध्ये संपादन केली. तसेच विद्यापीठातून कायदा विषयक ही पदवी प्राप्त केली. या त्यांच्या शिक्षणानंतर लाहोर येथील दयानंद अँग्लो वेदीक शाळेत संस्कृत विषयाचे अधिव्याख्याते म्हणून नेमणूक करण्यात आली. पुढे त्यांची ग्रंथपाल म्हणून महाराजा पॅलेस ग्रंथालयात नेमणूक करण्यात आली, आणि लवकरच ते बडोद्यामधील सार्वजनिक ग्रंथालयाचे कुशल प्रशासक म्हणून पुढे आले. बोर्डन यांना अमेरिकेतून बोलवण्यापूर्वी सयाजीराव महाराज यांनी बडोदा संस्थानातील सार्वजनिक ग्रंथालय विषयक एक सुनिश्चित आराखडा तयार केला होता. पुढे ग्रंथालय चळवळ बळकट करण्याच्या दृष्टिने विविध व्यक्तींचा शोध घेताना महाराजांना अत्यंत गरीब परिवारातून आलेल्या कुडाळकर यांच्या शिक्षणविषयक वाटचालीचा सुगावा लागला. स्वतः महाराज अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमधून राजपदापर्यंत पोहचलेले होते. म्हणूनच श्री. कुडाळकर यांना जाणिवपूर्वक आपल्या पॅलेस ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून निश्चित केले. कुडाळकरांनी देखील महाराजांचा विश्वास सार्थ ठरविला. ग्रंथालयाच्या प्रसारासाठी प्रयत्न सुरू केले. कुडाळकरांच्या कार्यशैलीचा आढावा घेत महाराजांनी सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेचा प्रकल्प पूर्णतः श्री. कुडाळकर यांच्याकडे सोपवला आणि हा उपक्रम महाराजांच्या सुचनेनुसार शैक्षणिक उपक्रमांचा एक भाग म्हणून प्रभावीपणे राबविला. बोर्डन यांनी बडोदा संस्थानातील सार्वजनिक ग्रंथालयांचा आढावा घेतल्यानंतर महाराज सयाजीराव गायकवाड यांनी श्री. कुडाळकर यांची उपसंचालक म्हणून नेमणूक केली. स्वतः महाराजांना बोर्डन यांच्या मुलभूत व यशस्वी मार्गदर्शकाची ओळख असल्याने त्यांनी बोर्डन व कुडाळकर या जोडीस एकत्र आणून खऱ्या अर्थाने बडोद्यातील

सार्वजनिक ग्रंथालय पद्धतीचा पाया रचला. बोर्डन यांना स्पष्ट करण्यात आले होते की, महाराजांची इच्छा ही सार्वजनिक ग्रंथालयांचा संस्थानभर विकास करुन त्या करिता आवश्यक सर्वच स्त्रोत उपलब्ध करुन दिले जातील आणि महाराजांच्या मनातील योजन श्री. कुडाळकर प्रत्यक्षात आणतील. यासाठी प्राथमिक स्वरुपात करावयाच्या प्रयत्नाची श्री. बोर्डन यांनी या देशातून परत अमेरिकेत जाताना पूर्तता करावयाची आहे. श्री. बोर्डन यांनीही येथून तीन वर्षाच्या कालावधीनंतर अमेरिकेला जाताना त्यांच्यावरील विश्वास सकारात्मक कृतीतून व्यक्त केला होता. श्री. कुडाळकर यांच्यातील क्षमतेने संतुष्ट होऊन महाराजांनी त्यांना संस्थानच्या खर्चाने पुढे युरोप, अमेरीका व जपान येथे सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा सर्वांगीण प्रत्यक्षदर्शी अभ्यास करण्यासाठी पाठविले. कुडाळकरांना ही एक सुसंधी वाटली. या संधीचे सोने करत त्यांनी आपल्या या परदेशीय वास्तव्यात ग्रंथालय शास्त्राविषयक पदवी प्राप्त तर केलीच. पुढे त्यांनी बडोद्यातील मध्यवर्ती ग्रंथालय विभागाचे प्रमुख पद भूषविले. ग्रंथालय क्षेत्रातील पदवीसाठी व अभ्यासक्रमासाठी भारतीय ग्रंथालय शास्त्राच्या इतिहासात पहिल्यांदाच एका व्यक्तीस परदेशी पाठवण्यात आले होते.श्री. कुडाळकर यांच्या संदर्भात बडोद्यातून प्रकाशित होणाऱ्या 'लायब्ररी मिसलनी' या नियतकालिकात या घटनेचा गौरवपूर्ण उल्लेख करुन, यापुढे बडोद्यातील ग्रंथालय चळवळ यशस्वी होण्यासाठी याचा खूपच लाभ होईल असा आशावाद व्यक्त करण्यात आला होता. कुडाळकर यांनी पुढे सेवाअंतर्गत प्रशिक्षण वर्ग सुरू करुन व इतर उपक्रमांचे उपयोजन करुन बोर्डन यांना योग्य साथ दिली होती. आणि याच प्रयत्नातून पुढे ग्रंथालय चळवळ अधिक बळकट करण्यासाठी बोर्डन यांनी सुरू केलेल्या प्रकाशनाचे संपादक श्री. कुडाळकर यांना करण्यात आले. कुडाळकरांच्या समर्थ प्रशासनाखाली एक अनुभवी लेखकाच्या हाताखाली 'लायब्ररी मिसलनीने' ग्रंथालय चळवळतील एक अग्रणीय नियतकालिक होण्याचा मान मिळाला. त्यांनी १९१९ मध्ये पुणे येथे भरलेल्या ओरीएंटल परिषदेमध्ये बडोदा राज्याचे प्रतिनिधित्व केलेले होते व आपला शोध निबंध ही सादर केला होता. ते स्वत: मराठीचे उत्तम अध्यापक होते व सातत्यपूर्वक मराठी नियतकालिकातून लेखन करत होते. मराठी परिषदेतून त्यांनी आपला शोध निबंधही सन १९१७ मध्ये सादर केला होता. या पार्श्वभूमीवरच सयाजीराव

महाराजांनी 'गायकवाड ओरीयंटल सिरीज' या प्रकाशनाची सुरुवात श्री. कुडाळकर यांच्या दिग्दर्शनातून केली होती. कुडाळकर यांचे ग्रंथालय शास्त्रातील योगदान व ग्रंथालय प्रशासक म्हणून त्यांचा असलेला अनुभव विचारात घेऊन अनेक संस्थानातून व प्रांतातून ग्रंथालय स्थापन करताना त्याचां सल्ला घेतला जात असे. तसेच विविध ठिकाणांहून ग्रंथालयविषयक प्रशिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी बडोद्यात येत असत. म्हणूनच खऱ्या अर्थाने त्यांना भारतातले ग्रंथालय चळवळीचे संस्थापक म्हटले जाते. याच पार्श्वभूमीवर १९१९ मध्ये मद्रास येथे संपन्न झालेल्या १७ व्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे अध्यक्षपद त्यांना बहाल करण्यात आलेले होते. तसेच त्यांनी सन १९२० मध्ये अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालयाचे अध्यक्षपद भुषविलेले होते. अशा या समर्थ व्यक्तीचा अंत १९२१ मध्ये झाला आणि ग्रंथालय चळवळीतील एक अनमोल हिरा काळाच्या पडद्याआड गेला. यामुळे ग्रंथालय चळवळीची फार मोठी हानी झाली.

**५. दत्त एन. एम. :**

श्री. दत्त हे सन १९१४ मध्ये बडोदा राज्य ग्रंथालयाचे अधिरक्षक म्हणून दाखल झाले. जे.एस. कुडाळकर हे परदेश दौऱ्यावर गेल्यावर तात्पुरत्या स्वरुपात सुरुवातीस श्री. दत्त यांची नियुक्ती केलेली होती. श्री. दत्त दाखल होताच त्यांच्याकडे हा कार्यभार सन १९१४ मध्ये सोपवण्यात आला. पुढे कुडाळकर परत येताच त्यांनी अभिरक्षकाचा कार्यभार सांभाळला व श्री. दत्त यांची राज्य ग्रंथपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली. श्री. कुडाळकरांच्या सन १९२१ मधील निर्वाणानंतर श्री. दत्त यांच्याकडे अभिरक्षकाचा भार सोपवण्यात आला. त्यांनी या काळात म्हणजे सन १९२१ मध्ये 'लायब्ररी हॅण्डबुक' ची दुसरी आवृत्ती प्रकाशित केली. पुढे तिसरी आवृत्ती सन १९२४ मध्ये प्रकाशित केली. बडोदा संस्थानातील ग्रंथालय संघाच्या कार्यात श्री. दत्त यांनी श्री. अमिन यांच्या बरोबर सक्रिय सहभाग दर्शवित सन १९२५ मध्ये गंदेवी येथे परिषद आयोजित करण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच पुढे द्वारका (१९२६), पेटला (१९२८) येथेही परिषदांचे आयोजन यशस्वीपणे केले. याचबरोबर बडोदा पुस्तकालय सहाय्यक सहकारी मंडळ १९२५ मध्ये स्थापन करत असताना महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि याच माध्यमातून पुढे तालुका संघ वाहुदीया येथे १९२६ मध्ये

स्थापन केला. बडोदा ग्रंथालय चळवळ सन १९११ – १९२५ हे प्रकाशन त्यांनी गुजराथीमधून सन १९२७ मध्ये प्रकाशित केले. श्री. दत्त हे एक बडोद्यामधील ग्रंथालय चळवळीस महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींपैकी एक व्यक्ती होत.

**६. मास्टर मोतीलालजी (राजस्थान) (१८७६– ) :**

मोतीलालजी यांचा जन्म २५ एप्रिल १८७६ रोजी जयपूर जिल्ह्यामधील चोमु या शहरी झाला. त्यांचे ६ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण चोमु येथे पार पडले. चोमु येथे पुढील शिक्षणाची सोय नसल्याने ते १८९७ मध्ये जयपूर येथे दाखल झाले. येथूनच त्यांनी अलाहाबाद विद्यापीठाची मॅट्रीक्युलेशन ची परीक्षा दिली. सन १८९९ मध्ये इंटरच्या वर्गात शिकत असताना त्यांनी शिक्षणाला राम राम ठोकला. सन १९०७ ते १९३७ या तीस वर्षाच्या काळात शिक्षकाची नोकरी करुन ते सेवानिवृत्त झाले.

नोकरीच्या काळात ते आपल्या उत्पन्नातील रु.७ ते ८ हे गरिबांच्या अन्नदानाकरिता खर्च करीत अथवा कबुतरांना दाणे घालण्यासाठी वापरत. हा त्यांचा सामाजिक सेवेचा दृष्टिकोन थोडासा बदलून ते रु.१० इतकी रक्कम ग्रंथ खरेदीकरीता व्यतीत करु लागले. या रक्कमेचा विनियोग ते प्रामुख्याने आध्यात्मिक ग्रंथाच्या खरेदीसाठी करत असत. अगोदरच त्यांच्याकडे काही ग्रंथ होते. या संग्रहात भर पडून जवळ जवळ १००० ग्रंथ संग्रहीत होताच त्यांनी 'श्री सन्मती पुस्तकालयाची' १९२० मध्ये स्थापना केली.आपल्या फावल्या वेळेत वा सुट्टीच्या दिवशी ते ओळखीच्या घरामध्ये जाऊन तेथील व्यक्तींना त्यांच्या आवडी निवडी विचारून पुस्तके देत व ती वाचण्यासाठी त्यांना प्रवृत्त करत. तसेच या लोकांना स्वतःकडे ज्ञानसाधने असण्याची आवश्यक्यता स्पष्ट करुन त्यांना चांगल्या मार्गाने जीवनक्रम आचरण्यासाठी त्यांचा उपयोग कशा प्रकारे होईल याबाबत मार्गदर्शन करत. ते स्वतःच वितरीत केलेली पुस्तके परत घेण्यासाठी नियोजित दिवशी संबंधितांच्या घरी जात व आपल्या कडील नवीन पुस्तके त्यांना देत. अशावेळी काही लोकांनी ही पुस्तके केवळ आळसामुळे वाचली नसतील तर त्यांना अभ्यासाची व वाचनाची गरज समजावून सांगत व ग्रंथाविषयी आवड निर्माण करण्याबाबत त्यांना प्रोत्साहीत करत.

सुरवातीच्या काळात आपल्या ग्रंथालयाकरीता ते आपल्या शिक्षकांच्या व्यवसायातून फावला वेळ देत. ग्रंथालयाने आकार घेताच त्यांनी ग्रंथालयाकरिता अधिक वेळ देणे सुरू केले. सेवानिवृत्तीनंतर ते आपला संपूर्ण वेळ ग्रंथालयाकरिताच व्यतीत करत. एकवेळ जेवण व झोप याकरिताच आपल्या घरी जात असत. ग्रंथालयातील आपला सर्व वेळ ते ग्रंथालयाच्या अधिकाधिक उपयोगासाठी कशाप्रकारे खर्च होईल याचाच ते विचार करत. ते ग्रंथालयाचे संस्थापक, लेखक आणि शिपाई सुद्धा म्हणून ग्रंथालयासाठी परिश्रम घेत असत. पुस्तकावरील धूळ झटकणे, पुस्तके खरेदी करणे व त्यांची देवघेव ही करणे. इतकेच काय वाचकाच्या घरी जाऊन वाचकाकडून पुस्तके परत घेत. ते राहणीने अत्यंत साधे होते. स्वदेशीबाणा हा त्यांचा स्थायी भाव होता. ते व्यवसायाने खऱ्या अर्थाने आयुष्यभर शिक्षक राहिले. आपल्या नोकरी व्यतिरीक्त काळात ते मुलांना मोफत शिकवत तसेच त्यांना क्रमिक पुस्तके उपलब्ध करुन देत. याकरिता स्वतःच ते आर्थिक मदत करत. यशस्वी विद्यार्थ्यांना ते पुस्तके परत आणून देण्यास सांगत. तसेच इतर विद्यार्थ्यांना त्यांना आवश्यक नसलेली पुस्तके ग्रंथालयात देण्यास सांगत. यामुळे नवीन विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध होत. कधी कधी ते परस्पर नवीन विद्यार्थ्यांकडे जुन्या विद्यार्थ्यांनी पुस्तके परत देण्याविषयी सुचवत. एकूणच पुस्तकांचा अधिकाधिक वापर व्हावा यासाठी ते प्रयत्न करत. वाचन अभिरुची व पुस्तके याविषयी नितांत आस्था असणारा मास्टर मोतीलालजी यांच्यासारखा ग्रंथालय चाहता दुर्मिळच असतो.

### ६.९ पंजाब राज्य:

### १. खानबहाद्दुर असादुल्लाह के. एन. :

श्री. असादुल्लाह हे सन १९१३ मध्ये ग्रंथालय क्षेत्रात दाखल झाले. यानंतर त्यांनी श्री. डॉन डीकन्सन यांचेकडून ग्रंथपालाचे प्रशिक्षण घेतले व ते सन १९३० मध्ये शासकीय महाविद्यालयात लाहोर येथे ग्रंथपाल म्हणून रुजू झाले. ते 'ग्रंथपाल क्लब' च्या संस्थापक सदस्यापैकी एक होते. त्यांच्या या प्रयत्नातूनच पुढे सन १९३० मध्ये पंजाब ग्रंथालय संघाचा पुनर्जन्म झाला. इंपिरीयल ग्रंथालय कलकत्ता येथे ग्रंथपाल म्हणून काम करत असताना ते डॉ. रंगनाथन यांच्या संपर्कात आले. त्याच दरम्यान भारतीय ग्रंथालय संघ सन १९३३ मध्ये स्थापन करण्यात आला होता. त्याचे ते पहिले सचिव झाले. तेव्हापासून ते भारत स्वतंत्र होईपर्यंत व भारताची फाळणी होईपर्यंत सन १९४७ अखेर ते संघाचे सचिव म्हणून कार्यरत होते. डॉ. रंगनाथन यांनी नेहमीच अब्दुल्ला यांचा आदर ठेवला व कलकत्यातील एक सामाजिक व्यक्ती म्हणून त्यांची दखल घेतली. ते मुंबई येथील अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेच्या अधिवेशन प्रसंगीही उपस्थित होते. अखिल भारतीय संघासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल रंगनाथन यांनी घेऊनच सन १९४७ पर्यंत व पुढे त्यांचा कायम सन्मान केलेला होता.

### २. भाटीया संतराम (१९०१ – १९८५) :

पंजाब विद्यापीठातून ग्रंथालय विषयक शिक्षण घेतल्यावर सन १९२०–२१ मध्ये ते अलिगढ येथील लॅन्टॉन ग्रंथालय व मुस्लिम विद्यापीठ अलिगढ येथे दाखल झाले. पुढे ते सन १९२२ मध्ये ख्रिश्चनियन कॉलेज लाहोर येथे ग्रंथपाल म्हणून रुजू झाले, ते सन १९४७ अखेर पर्यंत. पंजाब मधील ग्रंथपालांच्या 'फिफ्टीन क्लबचे' ते पुरस्कर्ते होते. यातूनच पुढे १९२९ मध्ये पंजाब ग्रंथालय संघाचे पुनरुज्जीवन झाले. कलकत्ता येथील अखिल भारतीय ग्रंथालय संघ स्थापने प्रसंगी सन १९३३ मध्ये ते या संघाचे एक संस्थापक सदस्य होते. त्यांनी 'मॉडर्न लायब्ररीयन' या नियतकालिकाचे संपादन लाहोर येथून सन १९३० –४५ या काळात केले. पुढे १९४७ पासून त्यांनी स्वत:चे 'इंडियन लायब्ररीयन' हे नियतकालिक सुरु केले. हे नियतकालिक भारतातील ग्रंथालय क्षेत्राशी संबंधित अग्रणी नियतकालिक

म्हणून ओळखले जाते. या नियतकालिकातून जगभरातील ग्रंथालय सेवाविषयक ग्रंथालयशास्त्र विषयक लेख प्रकाशित केले जातात.

देशाच्या विभाजनानंतर ते निर्वासित झाले. या काळात त्यांनी अत्यंत धैर्याने 'इंडियन लायब्ररीयन' चे संपादकत्व संभाळत आपल्या पंजाब ग्रंथालय संघातील उपक्रमांचे सिमला येथे पुनरुज्जीवन केले. या काळात त्यांचे सिमला येथे सन १९४८ मध्ये पुर्नवसन करण्यात आले होते. श्री. भाटिया यांच्या प्रयत्नातून पुढे पहिली प्रांतीय ग्रंथालय परिषद व ग्रंथ प्रदर्शन यांचे आयोजन पंजाब ग्रंथालय संघाच्या माध्यमातून सन १९४८ मध्ये करण्यात आले होते. या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे पुस्तकांविषयी आवड निर्माण करणे हे होते. सन १९४८ नंतर त्यांनी ग्रंथालय परिषदा, चर्चासत्रे, ग्रंथ प्रदर्शन यांचे आयोजन सिमला, अंबाला, जालंदर या ठिकाणी करुन लोकांच्यामध्ये केवळ पुस्तकांविषयीच प्रेम नव्हे तर ग्रंथालय विषयी आस्था निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. यातूनच पुढे या परिसरात सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासाविषयीची गरज लोकांना भासू लागली. श्री. भाटीया यांनी विशेष प्रयत्नातून लोकांच्यामध्ये ग्रंथालयाबद्दल आस्था निर्माण करत ग्रंथालयांची निर्मिती, अभ्यासिकांची स्थापना, परिषदांचे आयोजन यास चालना दिली. याच प्रयत्नातून पुढे त्यांनी ग्रंथालय स्थापना, ग्रंथालय साहित्य खरेदी व ग्रंथालय व्यवस्थापनाविषयी माहिती देण्यासाठी ग्रंथपालांच्या व ग्रंथालय मित्रांच्या सभा घेऊन त्यांना सल्ला सेवा व प्रात्यक्षिक प्रशिक्षण ही दिले. नविन ग्रंथालयाच्या स्थापनेविषयक सल्ला सेवा देताना त्यांना खूपच अभिमान वाटत असे. ग्रंथालय चळवळ निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्यपूर्वक आपल्या प्रकाशनातून प्रसिद्धी तर दिलीच शिवाय यासाठी केवळ एकट्याने अत्यंत परिश्रम ही घेतले. पंजाबमध्ये त्यांनी डी.ए.व्ही. कॉलेज जालंदर येथे ग्रंथपाल म्हणून सन १९५० च्या काळात काम पाहिले. सन १९७२ च्या काळात ते पंजाब ग्रंथालय संघाचे अध्यक्ष होते.

पंजाब शासनाने त्यांची अशासकिय सदस्य म्हणून मध्यवर्ती ग्रंथालय समितीवर नियुक्ती केलेली होती. ते वाचकांचे मित्र, ग्रंथ जत्रांचे प्रणेते व एक उत्तम संपादक होते. त्यांचा एक नाविण्यपूर्ण उपक्रम म्हणजे लोकसंख्या निबंध स्पर्धा. ही 'स्पर्धा' त्यांनी जवळ जवळ २५ वर्षे सुरू ठेवलेली होती. त्यांनी केवळ पंजाब परिसरातील ग्रंथालय चळवळीस योगदान

दिलेले नसून भारतामध्ये ग्रंथालय चळवळ अधिक सक्षमपणे विकसित होण्यासाठी त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असून त्यांनी पंजाब ग्रंथालय संघाचे अध्यक्ष असताना ग्रंथपालांच्याकरिता 'उल्लेखनीय ग्रंथालय सेवा प्रमाणपत्र' प्रदान करण्याचा उपक्रम सुरू केलेला होता. त्यांनी तरूण ग्रंथपालांना स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची प्रेरणा तर दिलीच शिवाय या क्षेत्रातील अद्ययावतता जोपासण्याचा संदेश ही दिला.

**३. चोप्रा रजिंदर :**

सौ. रजिंदर चोप्रा हे एक ग्रंथालय क्षेत्रातील उमदे व्यक्तिमत्व. बालपणापासूनच त्यांना त्यांच्या कुटुंबाकडून वाचनाविषयी प्रोत्साहन देण्यात आलेले होते. याच प्रेरणेतून त्यांनी पुढे दिल्ली विद्यापीठातून पदविका अभ्यासक्रम पुरा करुन पंजाब मध्ये चंदिगढ व लुधियाना येथे वरिष्ठ सहाय्यक ग्रंथपाल म्हणून १९६५ मध्ये मध्यवर्ती ग्रंथालयात कार्यभार स्विकारला. या ठिकाणी काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांना ग्रंथालय कामाविषयी अनुभव प्राप्त झाला व संदर्भसूची शोध, प्रशासन, अंतर्गत देवघेव अशा कामांबद्दल विशेष अनुभव मिळाला. त्यांच्यावर सोपवण्यात आलेली प्रमुख कामे म्हणजे प्रौढाची वाचन अभिरुची व ग्रंथालयातील स्त्रोत व सहाय्य यांची देखभाल करणे. त्यांच्या शैक्षणिक वृत्तीमुळे व सेवाभावीवृत्तीमुळे चंदीगड येथील मध्यवर्ती राज्य ग्रंथालयामध्ये वाचकांची संख्या वाढली. वाचकांचा संपर्क साधण्याची त्यांची हातोटी आणि वाचन अभिरुची वृद्धींगत करण्याची शैली यामुळे या ग्रंथालय व वाचक यांच्यामध्ये एक आत्मीयतेचे नाते जोडण्यात ते यशस्वी झाले होते. वाचक प्रिय सेवाभावी ग्रंथपाल अशीच त्यांची सर्वदूर ओळख झाली.

**४. डीकिन्सन ए. डी. (१८७६-१९६०) :**

आपल्या प्राथमिक शिक्षणाच्या पूर्ततेनंतर सन १८९४ मध्ये कोलंबिया लॉ स्कूलमध्ये प्रवेश घेतला. आजारपणामुळे हे शिक्षण त्यांना अपुरे सोडावे लागले. याच पार्श्वभूमीवर पुढे ते कार्नेस्ट ट्रस्टच्या परोपकारी उपक्रमात सहभागी झाले. हे काम करत असताना त्यांनी आपले ग्रंथालय शास्त्रातील शिक्षण न्युयॉर्क व्हेट लायब्ररी अल्बेनी येथून मेलवील ड्युई यांच्या हाताखाली पूर्ण केले. सन १९१२ पर्यंत त्यांनी अनेक सार्वजनिक ग्रंथालयातून काम केले, तसेच महाविद्यालय ग्रंथालयातून काम करताना त्यांनी आपल्यातील लेखन कौशल्याला

वाव दिला. पुढे त्यांनी सन १९१२ –१८ या काळात ‘डबले डे’ बुक पब्लिशिग कंपनीमध्ये संपादक म्हणून काम पाहिले. याच दरम्यान ते एक वर्षासाठी सन १९१५–१६ मध्ये भारतात काम करताना त्यांनी आपल्या लेखनाकडे लक्ष पुरविले होते. त्यांनी अनेक पुस्तकांचे संपादन व संदर्भसूची यांचे काम केले होते. सन १९१७–१८ मधील युद्धकालीन सेवेनंतर ते युनिव्हर्सिटी ऑफ पॉलिसीलहेनिया येथे प्रशिक्षित ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. येथे त्यांनी आपल्या कामाचा ठसा उठवत वाचकांच्यामध्ये प्रेम व आस्था निर्माण केली. सन १९३१ मध्ये त्यांनी ब्रोकीलन कॉलेज ग्रंथालयामध्ये काम करुन या ग्रंथालयाला एक नवे रुप दिले.

डिकन्सन यांना सन १९१५–१६ मध्ये पंजाब विद्यापीठाचा ग्रंथालयामध्ये काम करण्यासाठी प्राचारण करण्यात आले. आपल्या काळामध्ये त्यांनी विद्यापीठाचे ग्रंथालय दर्जेदार करण्यासाठी प्रयत्न घेतले व ग्रंथालयाचे रुप अद्ययावत करुन घेतले. या ग्रंथालयाचे पुनर्तालिकीकरण व वर्गीकरण करुन त्यांनी एखाद्या जादुगारासारखे त्याचे रुप बदलून टाकले. पुढील काळात ग्रंथालयात मनुष्यबळ उपलब्ध व्हावे म्हणून ग्रंथालय प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू केला व ग्रंथालयात मुक्त प्रवेश सुरू केला. त्याचबरोबर विद्यापीठ ग्रंथालयाने पंजाब लायब्ररी प्रिमियर सुरु केले. त्याच बरोबर पंजाब ग्रंथालय संघाची स्थापना केली. श्री. डिकन्सन यांनी सुरू केलेल्या पंजाब लायब्ररी प्रिमियर या प्रकाशनासाठी श्री. लाला मुकुंद भाटीया यांचे सहकार्य लाभले होते. कदाचित हे प्रिमियर म्हणजे भारतातील अशा प्रकारचे पहिलीच ‘ग्रंथालय माहिती पुस्तिका’ असेल. या ग्रंथपालन पुस्तिकेमुळे पंजाबमधील सर्वच ग्रंथालयांना त्यांची ग्रंथालये अद्ययावत करण्यासाठी आणि पुनर्संघटनासाठी खूपच मदत झाली. ही पुस्तिका म्हणजे खऱ्या अर्थाने डिकीन्सन यांना त्यांच्या अमेरीका सेवा काळात तेथील ग्रंथालयीन सेवामधून आलेला अनुभव याचीच फलश्रुती होती. खऱ्या अर्थाने सार्वजनिक, शालेय ग्रंथालयांतील भारतीय ग्रंथपालांनी सदैव वापरावी अशा प्रकारची ही हस्तपुस्तिका होती. डिकन्सन यांनी दंशाश वर्गीकरण पद्धतीचा अवलंब सुरू केला व याचमुळे ही डिकन्सन यांच्या पंजाबमधील वास्तव्यामध्ये भारतातील पहिल्या विद्यापीठ स्तरीय ग्रंथालय शिक्षणाचा पाया घालण्याचे कार्य हे भारतातील ग्रंथालय शिक्षणाच्या दृष्टिने उल्लेखनीय आहे.

### ५. कालीया देशरान (१९२०-२००४) :

आपल्या पदवीस्तरीय अभ्यासक्रमानंतर त्यांनी लाहोर येथील पंजाब विद्यापीठातून ग्रंथालयशास्त्रातून पदविका अभ्यासक्रम पुरा केला. पुढे कायद्याची पदवी घेऊन ते सन १९९३ मध्ये ग्रंथालय क्षेत्रात दाखल झाले. पंजाब विद्यापीठ ग्रंथालय, लाहोर व इतर महाविद्यालय ग्रंथालयामधून त्यांनी सेवा देत असतानाच पुढे त्यांची नियुक्ती दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयाच्या संचालक पदी झाली. येथे संचालक पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर ते सन १९५१ मध्ये युनायटेड स्टेट , कॅनेडियन, युके, कॅनडेन देश या देशांचा अभ्यास दौरा करुन फेब्रुवारी १९५१ मध्ये परत आले. सन १९५५ मध्ये त्यांनी युनोस्को आणि भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने युनोस्को चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्राचा विषय आशिया खंडातील ग्रंथालयाचा विकास हा होता. दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आयोजित केलेल्या या चर्चासत्रात आशिया खंडातील १४ देशातून ग्रंथपालांनी आपली उपस्थिती दर्शविली होती. पुढे त्यांनी एप्रिल १९५७-५९ या काळात ग्रंथालय तज्ञ म्हणून इजिप्त मध्ये काम केले होते. युनोस्को मिशन तांत्रिक सहकारी उपक्रमा अंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात आलेला होता. या काळात त्यांनी ग्रंथपालांच्या करिता एक अभ्यासक्रम सुरू केला होता. हा अभ्यासक्रम अरबी बोलणाऱ्या मोराको ते कुवेत १३ राज्याकरिता आयोजित करण्यात आला होता. याच पार्श्वभूमीवर त्यांनी अरब राज्यातील ग्रंथालय विकासाचा आढावा घेऊन युनेस्कोकडे सादर केला होता. सन १९५७ मध्ये त्यांनी प्रकाशनाची अदलाबदल या अनुषंगाने आयोजित केलेल्या दमस्कारा येथे चर्चासत्रात डायरेक्टर जनरल युनेस्को यांचे प्रतिनिधित्व केलेले होते. एशियन फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशनचे संघटन व आयोजन त्यांनी टोकीयो येथे १९५७ मध्ये सुव्यवस्थितपणे केलेले होते. याच दरम्यान त्यांनी फिलिपाईन्स, दक्षिण व्हिएतनाम, थायलंड, बर्मा व पाकिस्तान या देशाचा दौरा सन १९५७ मध्ये केला होता. ग्रंथालय सल्लागार म्हणून त्यांनी संयुक्त संघाच्या तांत्रिक सहकार्य उपक्रमांअंतर्गत सप्टेंबर १९५९ ते ऑक्टोबर १९६० या काळात ग्रंथालय सल्लागार म्हणून काम पाहिले होते. या काळात त्यांनी बगदाद विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करुन ग्रंथालय शास्त्राविषयक प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे आयोजन केले होते. तसेच फिरत्या

ग्रंथालयाची सुविधा बगदाद शहरात केली होती. ही अरब राज्यातील पहिलीच सेवा होय. मार्च १९६० मध्ये इराक येथे ग्रंथपालांच्याकरिता एक परिषदेचे आयोजन केले होते. सन १९५९ मध्ये बैठक आयोजित केलेल्या अरब राज्यातील ग्रंथालय विषयक युनेस्कोनी आयोजित केलेल्या चर्चासत्रात त्यांनी सार्वजनिक व शालेय ग्रंथालयाच्या गटाचे नेतृत्व केलेले होते. सन १९६० मध्ये त्यांनी जॉर्डन शासनाच्या निमंत्रणावरुन तेथील मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालयाकरिता उत्तम प्रकल्पाची निवड करण्यासाठी निमंत्रित केले होते. याच पार्श्वभूमीवर त्यांनी अंकार तुर्की, डेल्फ, लॉलड (१९६१) येथील विद्यापीठ ग्रंथालयासाठी योगदान दिलेले असून सन १९६२ पासून दिल्ली पब्लिक ग्रंथालयाचे संचालक म्हणून दाखल झाले. दिल्ली सार्वजनिक ग्रंथालय हे युनेस्को व भारत सरकारच्या विद्यमाने चालविले जात असे. ग्रंथालयाचे बजेट १० लाखापेक्षा अधिक असून २०० हून अधिक सेवक कार्यरत आहेत. अशा या ग्रंथालयांमध्ये कार्यालयीन सेवा आधुनिक स्वरुपात या ग्रंथालयाच्या माध्यमातून सुरू केल्या. तसेच अखिल भारतीय ग्रंथालय सेवांकरिता त्यांनी वेगवेगळ्या स्तरावर काम करुन मुख्य सचिव पद भुषविलेले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी ९४ ग्रंथालये आणि माहितीशास्त्र केंद्र सुरू करुन या केंद्राचे मुखपत्र संपादित करत होते. सन २००४ मध्ये त्यांचे निधन झाले.

**६. डॉ. आर.एल. मित्तल (१९३०– ) :**

श्री. मित्तल यांनी ग्रंथालय शास्त्राचे शिक्षण घेतल्यावर ग्रंथालय शास्त्रातील पदे भूषविताना सुरुवातीस ते पंजाब विद्यापीठ चंदीगड येथे कार्यरत होते व गोहाटी विद्यापीठ आसाम येथे ग्रंथालय व माहितीशास्त्राचे अधिव्याख्याता म्हणून काम केले होते. दिल्ली विद्यापीठातून ग्रंथालय शास्त्रातील पदविका अभ्यासक्रम प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला होता. ग्रंथालय शास्त्राचे ते गाढे अभ्यासक म्हणून ओळखले जात. ग्रंथालय प्रशासन हा त्यांचा इंग्रजी भाषेतील ग्रंथ आजही बऱ्याच विद्यापीठात पदवी अभ्यासक्रमासाठी संदर्भ ग्रंथ म्हणून नोंदविलेला आहे. आजवर त्यांनी ६४ संशोधन पर लेख व ०५ ग्रंथ प्रकाशित केलेले असून देशस्तरावरील अनेक चर्चासत्रामध्ये उपस्थिती दर्शवून आपल्या अभ्यासूवृत्तीचा ठसा उमटविलेला आहे. ते अखिल भारतीय ग्रंथालय संघ, आसाम ग्रंथालय

संघ, हरियाणा प्रदेश ग्रंथालय संघ, पंजाब ग्रंथालय संघ व विशेष ग्रंथालय परिषदेचे सदस्य होते. या परिषदेच्या आयोजनातील व कार्यातील त्यांची ओळख सर्वांना सुपरिचित होती. या माध्यमातून त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रशासनासाठी वेळोवेळी योगदान दिलेले होते.

**७. नसिबचंद (१९३३–१९९७) :**

ग्रंथालय शास्त्राचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विविध महाविद्यालयातून व संस्थातून ग्रंथालय क्षेत्रात ते कार्यरत राहीले. सन १९८८–९१ या काळात राज्य मध्यवर्ती ग्रंथालयात ते कार्यरत होते तेथे ग्रंथपाल म्हणून काम करत असताना विविध उपक्रम राबविले व ग्रंथालय चळवळ, ज्ञानाविषयी आस्था व वाचनअभिरुची या संदर्भात लोकांची अभिरुची वृद्धिंगत करण्यासाठी अनेक चर्चासत्रे, प्रश्नमंजूषा, चित्रकला स्पर्धा, वाचन स्पर्धा यांचे आयोजन करुन वाचन जागृतीचे कार्य नियोजनबद्ध केलेले होते. याच बरोबर सामाजिक समस्या विषयक विविध लेख, नियतकालिकामधून लेखन केलेले आहे. विशेष म्हणजे त्यांनी दरवर्षी चंदीगड येथे गुलाबाचे प्रदर्शन भरविले होते. अशा या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाचे स्वरुप त्यांनी भुषविलेल्या पदावरुन सुस्पष्ट होते.

१. सदस्य : व्यवस्थापक समिती भवन विद्यालय, चंदीगड
२. कार्याध्यक्ष : ग्रंथ प्रोत्साहन समिती, साहित्य अकादमी दिल्ली.
३. संघटक : साहित्य सभा युवा ग्रंथपाल समाज संघ, ग्रंथजत्रा या जत्रेचे आयोजन MBT, CBFC, PBC या एजन्सिजच्या माध्यमातून करण्यात आलेले होते.
४. समंत्रक: पंजाब ग्रंथ जत्रा, पंजाब पुस्तक परिक्रमा चंदीगड, जत्रा समिती या त्यांच्या कार्याचा वेध घेऊन त्यांना विविध ठिकाणी गौरविण्यात आलेले होते.
    १. स्व. इंदिरा गांधी यांच्या हस्ते सामाजिक गौरव.
    २. चंदिगड परिसरातील उत्तम लेखक (इंग्रजी भाषा) १९९२–९३
    ३. चंदीगड राज्याद्वारे साहित्य व ग्रंथप्रेम पारितोषिक देऊन सन १९९३ मध्ये गौरविण्यात आले होते.
    ४. उत्तम ग्रंथपाल डॉ. रंगनाथन पारितोषिक १९९३–९४, दर्जेदार ग्रंथालय सेवा पारितोषिक पंजाब ग्रंथालय संघ १९९७.

## ८. रंधवा एम. एस. :

ग्रंथालय चळवळीशी महत्त्वपूर्ण योगदान देणारे एक प्रज्ञावान व्यक्तीमत्व म्हणून त्यांचेकडे पाहिले जाते. वास्तविक रंधवा हे आय.सी.एस. ऑफिसर. सन १९४७ मधील फाळणीच्या दरम्यान पूर्ण पंजाबमधील लोकांचे पुनर्वसन करत असताना त्यांचे लक्ष ग्रंथालय चळवळीकडे वेधले गेले. एक सक्षम प्रशासकीय अधिकारी त्याच बरोबर ग्रंथालयाबद्दल विशेष प्रेम होते. या सर्वांपेक्षा एक दूरदृष्टी माणूस म्हणून सर्वदूर त्यांची ख्याती होती. अंबाला विभागाचे कमिशनर म्हणून काम करत असताना त्यांच्याकडे मध्यवर्ती ग्रंथालय समितीचे कार्याध्यक्ष पद पंजाब शासनाद्वारे सोपविण्यात आले. आणि येथूनच त्यांचे ग्रंथालयाशी ऋणानुबंध जोडले गेले. त्यांनी नव्या ग्रंथालयाच्या उभारणीसाठी सुदंर परिसर, दर्जेदार फर्निचर व पंजाब विषयक चित्रे, पेंटींग, पुतळे इत्यादीचे कलात्मक आयोजन करण्याविषयी एक योजना तयार केली. डॉ. इंधवा यांच्या परिश्रमामुळे ग्रामीण परिसरात ग्रंथालय स्थापन करण्याविषयी अंबाला परिसरात चालना मिळाली. डॉ. रंधवा यांच्या पुढाकाराने पंजाब ग्रंथालय संघाद्वारे अंबाला कॅन्टोनमेंट मध्ये नोव्हेंबर २८ ते ३० डिसेंबर १९५१ मध्ये एक ग्रंथोत्सव भरविण्यात आला. त्यांच्या या कल्पक योजनेस ग्रंथालय क्षेत्राशी संबंधित श्री. संग्राम भाटीया, जी.एल. हान इ. सहकाऱ्यांनी बहुमोल सहकार्य दिल्यामुळे हा ग्रंथोत्सव यशस्वी झाला. या उपक्रमाव्दारे पुष्कळ निधी उपलब्ध झाला. या प्रसंगी आयोजित सांस्कृतिक उत्सवाच्या माध्यमातून हा सर्व निधी श्री. रंधवा यांनी संकलीत करुन अंबाला परिसरातील मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये दर्जेदार फर्निचर, दर्जेदार ग्रंथसंग्रह, सुंदर चित्रे वितरणा करिता उपलब्ध करुन दिला.

पंजाबमधील ग्रंथालय चळवळीचा स्वातंत्र्यपूर्वकाळातील प्रसार करण्यामध्ये डॉ. रंधवा यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी दुर्मिळ पुस्तके, कृषी विषयक संशोधन पर ग्रंथ व सामाजिक ग्रंथ मध्यवर्ती ग्रंथालयास देणगी दाखल दिले. या देणगीचे मध्यवर्ती ग्रंथालय चंदीगड येथे दालन उभे करण्यात आलेले आहे.

**९. रतनचंद मनचंद :**

श्री. रतनचंद यांनी हॅले कॉलेज कॉमर्स येथे ग्रंथपाल म्हणून काम करत असताना पंजाब ग्रंथालय संघ निर्मितीस १९२९ मध्ये दिलेले प्रोत्साहन हे विशेष लक्षणीय स्वरुपाचे आहे. सन १९२९ मध्ये हा संघ शिथिल झालेला असताना श्री. रमनचंद यांनी महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या गटास एकत्र बोलावून ग्रंथपाल क्लबची स्थापना केली. त्याचे नाव 'द फिपीटीन क्लब' असे ठेवण्यात आले. अशा या क्लबच्या माध्यमातून ॲश डॉन डिकन्सन यांनी १९१६ मध्ये स्थापन केलेल्या पंजाब ग्रंथालय संघामध्ये चैतन्य निर्माण केल्याचा व त्यांची पुनर्स्थापन करण्याचा प्रयत्न केला. याच पार्श्वभूमीवर संघाद्वारे अंत्यत धैर्याने सन १९२९ मध्ये अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय परिषद यशस्वीपणे आयोजित करण्यात आली होती. याच परिषदेचे अध्यक्ष डॉ. एम.एम.वेल्ट हे होते. तर सचिव म्हणून श्री. आर. सी. मनचंद हे होते. त्यांच्याच प्रयत्नातून लाहोर येथे १९३१ –३३ या काळात वार्षिक परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. याच बरोबर 'मॉर्डन ग्रंथपाल' हे प्रकाशन विशेष खंडात प्रकाशित करुन परिषदेला महत्त्वपूर्ण स्वरुप प्राप्त करुन दिलेले होते. श्री. मनचंद यांनी सन १९३० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या आशियायी शैक्षणिक परिषदेत पंजाबमधील ग्रंथपाल चळवळ या विषयी आपला निबंध सादर केला होता. या ठिकाणी महाविद्यालये स्थापन करण्यात आलेली आहेत व सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यात आलेली आहेत अशा ठिकाणी महाविद्यालय ग्रंथालयाकडून सार्वजनिक ग्रंथलयाना सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात असा ठराव त्यांनी मांडला. श्री. मानचंद पंजाब मधील २० ग्रंथपालापैकी एक म्हणून पंजाबमध्ये ओळखले जातात.

**१०. गुजराती बी. एस :**

श्री. गुजराती हे चंदीगड येथील मध्यवर्ती राज्य ग्रंथालयाचे संस्थापक म्हणून ओळखले जातात. हे ग्रंथालय १९५६ मध्ये स्थापन करण्यात आले. शासनाद्वारे चालविण्यात येणाऱ्या लाहोर महाविद्यालयामध्ये सुरुवातीच्या काळात ते कार्यरत असताना त्याचा घनिष्ठ संबंध पंजाब ग्रंथालय संघाशी सुरवातीपासूनच आला. ग्रंथजत्रा व तत्सम उपक्रम अशा उपक्रमातून त्यांनी ग्रंथप्रदर्शनाबरोबरच ग्रंथालय क्षेत्रातील व्यावसायिकाशी स्नेहसंबंध जोडून संघटनेअंतर्गत

विविध कार्यामध्ये सक्रिय सहभाग दर्शविला होता. सन १९५६ मध्ये ते मध्यवर्ती ग्रंथालयाचे ग्रंथपाल झाले ते अखेर सेवानिवृत्त होईपर्यंत. या काळात त्यांनी ग्रंथालयाची लक्षणीय प्रगती करुन ग्रंथालयाचे उपक्रम वाचकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. ग्रंथालय शास्त्रातील एक उत्तम नेतृत्व म्हणून त्यांची सर्वदूर ओळख होती.

**११. डॉ. सागर सरमोती :**

यांनी दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून काम पाहिले. याही पेक्षा ग्रंथालय क्षेत्राशी असलेले त्यांचे नाते अतूट होते. लाहोर ग्रंथालय संघाचे ते क्रियाशील सदस्य होते. तसेच दयालसिंग पाठक ग्रंथालयाचे विश्वस्त म्हणून त्यांनी काम पाहिले होते. या परिसरातील ग्रंथालय चळवळीकरिता त्यांनी पार पाडलेली भूमिका सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखी आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ग्रंथालय परिषदेचे आयोजन पंजाब येथील ग्रंथालय संघाने करण्याचे ठरविले होते. या अधिवेशनाकरिता निधी जमवणे एक अवघड गोष्ट होती व अल्पकाळात हे कार्य पूर्ण करणे अवघड होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत डॉ. एम.एम. वेल्ट, एस.एन. दासगुप्ता अशी सर्व मंडळी पुढे आली. आणि यातूनच परिषद आयोजनाची सुरुवात जोरदार झाली. यावेळेला सर्व मंडळी मोती सागर यांना जाऊन भेटली आणि त्यांनी स्वागत समितीचे कार्याध्यक्ष पद स्विकारावे अशी विनंती केली. अनेक बाजूनी विरोध असूनही मोती सागर यांनी हे पद स्विकारले व अल्पावधीत त्यांनी पुष्कळसा निधी गोळा केला आणि ही परिषद यशस्वी केली. भारतातील विविध विभागातून आलेल्या ग्रंथालय व शिक्षण प्रेमींनी या आयोजनाचे खूपच कौतुक केले. खऱ्या अर्थाने पंजाबमध्यील या यशस्वी प्रयत्नाने ग्रंथालय चळवळीचे व संघटनेचे पुनरावरोपण झाले. पुढील वाटचालीकरिता मोती सागर यांनी मोलाची भूमिका बजावली होती. या पहिल्या अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेमध्ये स्वागत अध्यक्ष म्हणून उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले होते, पंजाब मध्ये प्राचीन साहित्य परंपरेची सुरुवात झाली आणि हेच खरे देशातील ग्रंथालयाचे पहिले केंद्र होय. सर्वसाधनांनी सुसज्ज असे ग्रंथालय हे मी माझ्या देशाचे भूषण मानतो. सत्ता, राज्य, धन हे एखाद्या स्वप्नासारखे निघून जातात. पण या प्राचीन परंपरेचा गौरवशाली इतिहास मात्र ग्रंथाच्या अंतर्गत समाविष्ट केलेला असतो आणि तो दीर्घकाळ टिकून राहतो.

ज्या देशामध्ये अशी समृद्ध ग्रंथालये नाहीत पण केवळ भौतिक संपत्ती आहे असे देश खरोखरच दरिद्री आहेत.'' अशी विचारधारा जपणारे श्री. सागरमोती ग्रंथालय चळवळीतील चहात्यांच्या दीर्घकाळ सर्वांच्या स्मरणात राहिले.

**१२. शेठ एस.एस. (१९०८–        ) :**

शेठ यांनी विज्ञान शाखेची पदवी प्राप्त केल्यावर पदव्युत्तर अभ्यास एडीनबर्ग विद्यापीठातून पूर्ण केला.  आणि याच वेळेस लंडन येथून ग्रंथालय शास्त्राचा पदविका अभ्यासक्रम ही पूरा केला. भारतात परत आल्यावर सन १९३४ मध्ये लाहोर येथे ते दयालसिंग ग्रंथालयाचे उप ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. पुढे ते आरोग्य संचालनालयामध्ये ग्रंथपाल म्हणून दिल्ली येथे दाखल झाले. तेथून ते कलकत्ता येथे झूलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया या संस्थेमध्ये ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. पुढे त्यांनी येथेच इंपिरीयल ग्रंथालयामध्ये (सध्याचे राष्ट्रीय ग्रंथालय कलकत्ता) अभ्यासिका विभागाचे अधिक्षक म्हणून काम पाहिले. पुढील काळात सन १९४२ मध्ये लाहोर येथे पंजाब विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. सन १९४८ नंतर ते केंद्रिय शिक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून परराष्ट्र मंत्रालयाच्या ग्रंथालयात दाखल झाले. तेथे त्यांनी सन १९६० अखेर ग्रंथपाल म्हणून काम पाहिले. तेथूनच ते दिल्ली विद्‌यापीठाच्या ग्रंथालयशास्त्र विभागाचे संचालक म्हणून काम करण्यासाठी तीन वर्षांसाठी विशेष विनंतीवरुन दाखल झाले. यानंतर ते युनेस्कोच्या प्रकल्पा अंतर्गत पूर्व नायजेरीयामध्ये ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. पूर्व नायजेरीयातील ओवेरी येथे अद्ययावत शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय सुरू करण्यात आले होते. याच पार्श्वभूमीवर ते नायजेरीयात दाखल झाले होते. अशा विविध ठिकाणी काम करत असताना दयालसिंग ग्रंथालय, लाहोरच्या विकासासाठी ते सदैव प्रयत्नशील राहिले. ज्या ज्या ठिकाणी त्यांनी कार्य केले त्या त्या ठिकाणी ग्रंथालयक्षेत्र प्रमाणभूत मानून आपल्यातील उत्तम ते या क्षेत्रासाठी देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तसेच अखिल भारतीय ग्रंथालय संघ या संघटनेस त्यांनी योगदान देताना तीन वर्षे उपसचिव म्हणून सक्षमपणे जबाबदारी स्विकारली. पुढे ते काही वर्षे भारत शासन ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष ही होते.

या पदावरुन काम करताना त्यांनी ग्रंथपालांच्या वेतनश्रेणी बाबत समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. तसेच युपीएससी च्या माध्यमातून ग्रंथपालांची पदे भरत असताना महत्वपूर्ण भूमिका बजावली. सन १९५७ –५८ मध्ये त्यांनी ग्रंथालय विषयक केंद्र शासनाच्या सल्लागार समितीवर काम केले. तसेच विद्यापीठ अनुदान मंडळ व विशेष ग्रंथालये समिती, राष्ट्रीय सूची समिती अशा विविध समित्यांवरुन महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

ग्रंथालय शिक्षणाच्या प्रसाराकरिता ही त्यांनी विविध ठिकाणी काम करताना महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. या क्षेत्रातील प्रशिक्षण, संशोधन आणि ग्रंथालय विषयक साहित्याचे प्रमाणभूतीकरण करण्यात त्यांनी सक्रीय सहभाग दर्शविलेला होता. पंचवार्षिक योजनांतर्गत दिल्ली विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या विकासासंबंधी आराखडा तयारकरत असताना श्री. शेठ यांनी फारच महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली होती. हे त्यांच्या जीवनातील हे एक महत्त्वपूर्ण काम होय. या प्रकल्पातंर्गत ग्रंथपालन क्षेत्रातील प्रशिक्षणासाठी अमेरीकन शिक्षक अदलाबदलीने येथे येऊन ग्रंथालय क्षेत्रासाठी उत्तम प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ही योजना फारच लाभदायक अशी होती. श्री. शेठ यांना प्राप्त झालेल्या नवनव्या संधी मुळे आपल्यातील प्रतिभेचा कुशलतेने वापर करुन त्यांनी आंतरराष्ट्रीय योजने अंतर्गत ग्रंथालय क्षेत्राच्या विकासासाठी नव्या संधी त्यांनी उपलब्ध करुन दिल्या.

**१३. शर्मा जगदिश सरण (१९०८–१९९०) :**

डॉ. शर्मा हे सन १९५९ पासून पंजाब विद्यापीठात ग्रंथपाल म्हणून कार्यरत होते. या अगोदर ते दिल्ली विद्यापीठात संदर्भग्रंथपाल म्हणून कार्यरत होते. ग्रंथपाल म्हणून गांधी मेमोरीयल म्युझियम न्यू दिल्ली व बनारस येथे हिंदू विद्यापीठ यांचे ग्रंथपाल पद भूषविलेले होते. मिशीगन विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केले होती. अनेक सांस्कृतिक व व्यावसायिक संघटनांशी त्यांचा निकटचा संबंध होता. यामध्ये रॉकफेलर फाऊंडेशन न्यूयॉर्क, अखिल भारतीय ग्रंथालय संघ, अमेरीकन ग्रंथालय संघ शिकागो, उत्तर प्रदेश ग्रंथालय संघ, दिल्ली ग्रंथालय संघ (अध्यक्ष) पंचम ग्रंथालय संघ, सहकारी संपादक (द इंडीयन लायब्ररीयन) अशा विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी ग्रंथालय क्षेत्राच्या विकासासाठी सदैव योगदान दिलेले होते. अमेरीका, युरोप, फिलिपाईन्स, बँकॉक, पोर्टसयद्द अशा अनेक देशांना भेटी

देऊन तेथील विद्यापीठ ग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालये यांचे कामकाज जवळून पाहिले होते. ते एक उत्तम सूची तज्ज्ञ होते. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु, विनोबा भावे यांच्या विषयी त्यांनी लेखन केलेले आहे. याशिवाय 'द सबस्टन्स ऑफ लायब्ररी सायन्स' व ' द लायब्ररी मुव्हमेंट इन इंडिया' आणि इतर विषय या अनुषंगाने त्यांनी विविध स्तरिय लेखन केले होते. अशा या चतुरस्त्र व्यक्तीने १९९० च्या काळात जगाचा निरोप घेतला.

**१४. उल्नर ए. सी. :**

हे पंजाब विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कार्यरत होते. सुरूवातीस त्यांनी काही काळ विद्यापीठाच्या ग्रंथालयांचे काम ही पाहिले होते. ग्रंथालय क्षेत्राविषयी त्यांना खूपच आस्था होती. खऱ्या अर्थाने पंजाब ग्रंथालय संघ व तेथील ग्रंथपाल यांचे ते विश्वस्त होते. ते प्रशिक्षित ग्रंथपाल नव्हते पण पंजाब विद्यापीठाचे मानद ग्रंथपाल म्हणून काम करत असताना त्यांनी या ग्रंथालयाच्या विकासासाठी १९२९ पर्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले होते. डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी श्री. उल्नर यांचा गौरव करताना, 'श्री. उल्नर यांनी सुरूवातीच्या काळात लाहोर येथील ग्रंथालयांचा विकास करताना महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. तसेच भारतामधील प्रशिक्षित ग्रंथपालांची पहिली पिढीही उभी करण्यातील पंजाब मधील त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे.' असे उद्‌गार काढले होते. या करिता त्यांनी फोर्मन ख्रिश्चन कॉलेज हे या सर्व चळवळीचे मुख्यालय म्हणून निवडले होते. उल्नर व डॉ. रंगनाथन यांची इंपिरीयल ग्रंथालय समितीच्या अनुषंगाने दोनदा भेट झाली होती. त्यावेळी उल्नर यांनी रंगनाथन यांचे संदर्भात पुढील उद्‌गार काढले होते. " I am not a professional librarian but I have faith in the social values of libraries, you are among the first of the professional librarians in the country and you have therfore a great responsibility. 'These words of this good old man have been acting as a Roadstar for me during the periods of success as well as suffering and frustration due to political cause and the happenings with in the profession which were more emotion bound than intellect bound"

*(Tehran, G.L.: in P.S.G. Kumar, Vol.9, p.647)*

### ६.१० तमिळनाडू

**१. कृष्णस्वामी अय्यर (            )**

सन १९२७ मध्ये मद्रास मध्ये आयोजित केलेल्या अखिल भारतीय सार्वजनिक ग्रंथालय परिषदेचे ते अध्यक्ष होते. या परिषदेमध्ये मद्रास येथे ही ग्रंथालय संघ स्थापन करण्याची कल्पना पुढे आली होती. कल्पना उचलून धरताना त्यांनी या लढ्याची स्थापना केली व स्वत: या संघाचे अध्यक्ष पद भूषविले. सचिव म्हणून एस.आर. रंगनाथन यांनी कार्यभार स्विकारला. आपल्या कार्यकाळात मद्रास ग्रंथालय चळवळ सर्वदूर पसरविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. राज्यभर त्यांनी ग्रंथालय चळवळीचे खुप कौतुक केले. त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी अध्यक्षपद भुषविले होते. त्यांचे सन १९६५ मध्ये निर्वाण झाले.

**२. जर्नादन नायडू एस :**

कोनेमेरा सार्वजनिक ग्रंथालयामध्ये सन १९३९ मध्ये पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून दाखल होऊन तेथूनच ते निवृत्त झाले. आपल्या दीर्घकाळ सेवाकालखंडात त्यांनी कोनेमेरा सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे विकासात्मक सेवा सुरू करुन पाहिल्या. प्रथम त्यांनी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केला. ग्रंथालय संघटनाच्या माध्यमातून समव्यावसायिकांच्या तमिळनाडूतील संघटनेस त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले असून, कोनेमेरा सार्वजनिक ग्रंथालयाचा दर्जा उंचावलेला आहे.

**३. कनक सभापिल्लई :**

हे खऱ्या अर्थाने एक अभियंता.  पण त्यांना ग्रंथालय विषयक विशेष आस्था होती. दुर्गम ग्रामीण परिसरात शिक्षण प्रसार व ग्रंथालय प्रसार याबद्दल त्यांना विशेष आस्था होती. या दूरवरच्या लोकांना ग्रंथालयाचा लाभ देणेविषयी त्यांनी दीर्घकाळ चिंतनातून सन १९३१ मध्ये पहिल्यांदा बैलगाडीद्वारे फिरते ग्रंथालय सुरू करुन ही सेवा देण्याचा विशेष प्रयत्न केला. कुमार मंगलम या शहरापासून ८२ मैल लांब असलेल्या ग्रामीण परिसरात मन्नगूडी येथे अशा फिरत्या ग्रंथालयाविषयीची सेवा त्यांनी २१ ऑक्टोबर १९३१ रोजी सुरू केली. त्यांनी एका स्वतंत्र बैलगाडीत पुस्तके ठेवण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण रचना केली होती.

अशा या अभिनव बैलगाडीतून पहिल्यांदा तामिळनाडू परिसरात फिरत्या ग्रंथालयाची सेवा सुरु केली. या उपक्रमाचे देशात व परदेशात कौतुक झाले होते. श्री पिल्लई हे एक हरहुन्नरी कार्यकर्ते होते.

**४. सेशाचियन सेसाटा : (२० नोव्हेंबर १९६९) :**

ते कर्झन आणि मद्रास कंपनीचे चालक होते. तसेच मद्रास ग्रंथालय संघाचे खजिनदार म्हणून कार्य केलेले होते. ते ग्रंथालय विषयक जोडणी व फर्निचर या विषयी प्रमाणकाचे तज्ञ म्हणून ओळखले जात. तसेच त्यांनी शारदा रंगनाथन एडाऊमेंट मध्ये ग्रंथालय माहिती शास्त्राचे विश्वस्त म्हणून काम पाहिले होते.

**५. थॉमस एम.ओ. :**

हे एक दक्षिणेतील आघाडीचे ग्रंथपाल म्हणून ओळखले जात. त्यांनी आंध्र विद्यापीठात सेवा दिली असून पुढे ते रंगनाथन यांच्या नंतर मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून कार्यरत राहिले. सन १९३३ मध्ये कलकत्ता येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय परिषदेचे ते अध्यक्ष होते. तसेच मद्रास येथे सन १९३३ साली संपन्न झालेल्या ग्रामीण ग्रंथालय सेवा परिषदेचे ते अध्यक्ष होते. विविध संघटना करिता त्यांनी योगदान दिले आहे.

**६. थिलाई नायगम वेल्लूयमी :**

त्यांनी राज्य मध्यवर्ती ग्रंथालय कोनेमेरा सार्वजनिक ग्रंथालय मद्रासचे ग्रंथपाल म्हणून १९६२ मध्ये काम  पाहत होते. त्यांनी नागपूर विद्यापीठातून पदवी घेतली होती. तसेच ग्रंथालयशास्त्राचा पदवीधर  अभ्यासक्रम दिल्ली विद्यापीठातून १९६२ मध्ये केलेला होता. संचालनालय मद्रास १९४९–५५, उपग्रंथपाल, अन्नामलाई विद्यापीठ १९५५–५७, ग्रंथपाल सार्वजनिक सुचना संचलनालय १९५७–६२, कोनेमरा सार्वजनिक ग्रंथालयाच्या बाल ग्रंथालय विभागाचे ग्रंथपाल म्हणून मे ते डिसेंबर १९६२ पर्यंत कार्यरत होते, आजीव सदस्य भारतीय ग्रंथालय संघ, ग्रंथालय विकास समितीचे चौथ्या पंचवार्षिक योजनेचे सदस्य याचबरोबर समन्वय समिती, ग्रंथ व वृत्तपत्र वितरणाचे सदस्य होते. त्यानी विविध प्रकारचे लेखन करुन ते प्रकाशित केलेले आहे.

## ६.११ बिहार

### १. सहाही श्रीकांत :

यांनी मुझपुर येथून पदवी प्राप्त केल्यानंतर पाटणा विद्यापीठातून पदवीधर अभ्यासक्रम पूर्ण केला. तसेच बिहार शासनाचा ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमही पूर्ण केला. पुढे त्यांनी हिंदी अधिव्याख्याता म्हणून दलासिंग सारई येथील महाविद्यालयात हिंदीचे अधिव्याख्याता म्हणून सन १९६३ मध्ये काम केले. यानंतर ते मुझपूर येथील आर.डी.सी. महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून दाखल झाले. ग्रंथालय चळवळीतले एक क्रियाशील कार्यकर्ते म्हणून ते ओळखले जातात. अखिल भारतीय ग्रंथालय संघ, अखिल भारतीय प्रौढ शिक्षण संघ, अखिल भारतीय बाल उर्जा बारी, बिहार राज्य परिषद, बाल कल्याण अशा विविध संघाचे ते सदस्य होते. या संघटनांच्या माध्यमातून त्यांनी ग्रंथालय क्षेत्राबरोबरच प्रौढ शिक्षण व बालकल्याण या क्षेत्राना योगदान दिले आहे. 'पुस्तकालय दर्शन' व 'अंकील की बात' ही त्यांची पुस्तके प्रकाशित असून 'बाजीका' नावाचे नियतकालिक संपादित करतात. अनेक निबंध ही त्यांनी लिहिलेले आहेत.

## ६.१२ आसाम:

## १. कुमूदेश्वर बार ठाकूर (१८९३–१९६६) :

आसाममधील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ते ओळखले जात होते. श्री. बार ठाकूर हे माध्यमिक शिक्षक होते. एकदा त्यांना बडोदा येथे भेट देण्याचा योग आला. बडोदा येथील ग्रंथालय चळवळीने त्यांना प्रभावित केले आणि अशी चळवळ आसाम परिसरात ही सुरू करणे सबंधी त्यांना तीव्रतेने गरज भासली. त्यांचा संपर्क आसामचे लोकप्रिय मुख्यमंत्री गोपीनाथ बोरोडोलाई यांच्याशी आला. त्यावेळी त्यांनी आसाम परिसरातील ग्रंथालय चळवळीची परिस्थिती मुख्यमंत्र्यासमोर विशद केली. त्यावेळी या चळवळीला मुख्यमंत्र्यांनी प्रोत्साहन व सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. याचबरोबर अनेक राजकीय नेत्यांनी तसेच समाज कार्यकर्त्यांनी विशेष सहकार्य दिले. सन १९३३ मध्ये आसाम साहित्य परिषदेच्या वेळी 'ग्रंथालय दिन' आयोजित करण्याचा त्यांचा विचार होता, पण या उपक्रमास मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दल ते आशादायी नव्हते. म्हणून त्यांनी गोहाटी येथील उनाबानार परिसरातील काही युवकांच्या मदतीने चहा फराळाची व्यवस्था उपस्थित लोकांकरिता केली. या चहा पार्टीची त्यांनी खूपच जाहिरात केली आणि या त्यांच्या जाहिरातीस प्रतिसाद म्हणून लोक एकत्र झाले. या सभेस अनेक साहित्यिक, विद्वान यांनी उपस्थिती दर्शविली होती. या पार्श्वभूमीवर येथे 'ग्रंथालय दिवस' संपन्न होऊन खऱ्या अर्थाने ग्रंथालय चळवळीचे बीजारोपण होण्यास मदत झाली. श्री. बार ठाकूर यांच्या उपक्रमातून ग्रंथालय चळवळीस चालना मिळाली या त्यांच्या चळवळीतून पुढे सन १९३८ मध्ये आसाम ग्रंथालय संघाची स्थापना झाली. श्री. बार ठाकूर यांनी सार्वजनिक ग्रंथालय विकासाकरिता आपले सर्व आयुष्य वेचले.

### ६.१३ मध्यप्रदेश

**१. द्विवेदी केशन प्रसाद (१९२९-            ) :**

बनासरमधून पदव्युत्तर अभ्यास पूर्ण केल्यानंतर ग्रंथालय क्षेत्रात दाखल झाल्यावर ग्रंथालय चळवळीकडे त्यांचे लक्ष वेधले गेले. मद्रास ग्रंथालय संघ, अखिल भारतीय ग्रंथालय संघाचे त्यांनी सभासदत्व स्विकारले. या चळवळीतून विविध स्तरावर योगदान देत असताना त्यांनी ग्रंथालयाविषयक व साहित्यविषयक अनेक लेख प्रकाशित केले. त्यांना भारतीय तत्वज्ञानात विशेष रस होता. ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याचा त्यांना विशेष छंद होता. त्यांनी विभागीय ग्रंथालय मौलाना आझाद ग्रंथालय, भोपाळ येथे ग्रंथपाल म्हणून काम करताना या ग्रंथालयांचा दर्जा उंचावण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**२. मोघे वासुदेव श्रीराम (१९१३-            ) :**

दिल्ली विद्यापीठातून सन १९५३ मध्ये ग्रंथालयशास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर ते ग्वाल्हेर येथील विभागीय ग्रंथालयामध्ये कार्यरत झाले. या ठिकाणी त्यांनी ग्रंथालयशास्त्राचे अधिव्याख्याता म्हणून काम पाहिले. ग्रंथालय चळवळीशी त्यांचा जवळचा संबंध होता. अखिल भारतीय ग्रंथालय संघ, सहसचिव, मध्यप्रदेश ग्रंथालय संघ भोपाळ, सदस्य, त्यांनी हेरॉल्ड ऑफ लायब्ररी सायन्स व इतर नियतकालिकातून लेखन केले. मध्य प्रदेश ग्रंथालय संघाव्दारे १९८३ मध्ये ग्रंथालय चळवळीतील त्यांच्या योगदानाबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला होता. मध्य प्रदेशातील ग्रंथालय चळवळीतील आघाडीची व्यक्ती म्हणून त्यांचा सर्वदूर परिचय होता.

***

# परिशिष्टे

१. देशातील राज्यनिहाय शताब्दी ग्रंथालये

२. बडोदा ग्रंथालय क्षेत्रातील हालचाली : पाऊलखूणा

३. २००१ मधील गुजरात राज्यातील भूकंपग्रस्त ग्रंथालये

४. काही राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची सांख्यकीय स्थिती

५. पंजाबमधील सार्वजनिक ग्रंथालयाच्या आधुनिकीकरण विषयी सद्यस्थिती

६. सार्वजनिक ग्रंथालयाकरिता सर्वसाधारण प्रणाली

७. सार्वजनिक ग्रंथलयांचा विभागनिहाय सांख्यकीय तपशील

८. आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय चळवळीच्या पाऊलखूणा

९. आसाममधील सार्वजनिक ग्रंथालयांची आकडेवारी २००६–०७

१०. महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचलनालय महाराष्ट्र राज्य व
राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठानच्या अर्थसहाय्य अनुदान योजना

११. छायाचित्रे

### परिशिष्ट १

## देशातील राज्यनिहाय शताब्दी ग्रंथालये

### १. महाराष्ट्र

| | | |
|---|---|---|
| १) | रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालय, रत्नागिरी | १८२८ |
| २) | अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर | १८३८ |
| ३) | सार्वजनिक वाचनालय, नाशिक | १८४० |
| ४) | करवीर नगर वाचन मंदीर, कोल्हापूर | १८५० |
| ५) | नगर वाचनालय, सातारा | १८५० |
| ७) | श्रीराम वाचन मंदीर व क्रिडा भुवन, सावंतवाडी | १८५२ |
| ८) | श्री हिराचंद्र वाचनालय, सोलापूर | १८५३ |
| ९) | धोंडा शामराव गरूड वाचनालय, धुळे | १८५४ |
| १०) | नगरपालिका नगर वाचनालय, यशवंतराव चव्हाण स्मृती सदन, कराड | १८५७ |
| ११) | बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला | १८६० |
| १२) | रा. ब. अनंत शिवाजी देसाई वाचनालय व ग्रंथसंग्रह, कुडाळ | १८६० |
| १३) | सार्वजनिक वाचनालय, राजगुरूनगर | १८६२ |
| १४) | राष्ट्रीस वाचनालय, गहाल, नागपूर | १८६३ |
| १५) | सार्वजनिक वाचनालय, बार्शी, सोलापूर | १८६३ |
| १६) | वाचन मंदिर, भिवंडी | १८६३ |
| १७) | प. बा. काकाणी नगर वाचनालय, मालेगाव | १८६४ |
| १८) | लोकमान्य टिळक स्मारक मंदिर, चिपळूण | १८६४ |
| १९) | लोकमान्य वाचनालय, आर्वी | १८६५ |
| २०) | सार्वजनिक वाचनालय, परतवाडा, अमरावती | १८६६ |
| २१) | सार्वजनिक वाचनालय, येवला, नाशिक | १८६६ |

| | |
|---|---|
| २२) अमरावती नगर वाचनालय, अमरावती | १८६७ |
| २३) नगर वाचनालय, राजापूर | १८६७ |
| २४) नगर वाचनालय, एरंडोल, जळगांव | १८६८ |
| २५) राजाराम सिताराम दिक्षीत वाचनालय, सिताबर्डी, नागपूर | १८६९ |
| २६) सांगली जिल्हा नगर वाचनालय, सांगली | १८६९ |
| २७) विटा तालुका नगर वाचनालय, विटा, सांगली | १८६९ |
| २८) सत्यनारायण बजाज सार्वजनिक ग्रंथालय, वर्धा | १८७० |
| २९) सार्वजनिक वाचनालय, भुसावळ, जळगांव | १८७० |
| ३०) आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी, कोल्हापूर | १८७० |
| ३१) श्री छत्रपती शिवाजी वाचनालय, फलटन, सातारा | १८७० |
| ३२) नगर वाचनालय, वेंगुर्ले | १८७१ |
| ३३) पुज्य साने गुरूजी ग्रंथालय व मोफत वाचनालय, अम्मळनेर | १८७२ |
| ३४) नवयुग वाचनालय, अकोला | १८७४ |
| ३५) पू. साने गुरूजी मोफत वाचनालय, गडहिंग्लज | १८७४ |
| ३६) नगर वाचन मंदिर, पंढरपूर | १८७४ |
| ३७) नगर वाचनालय, मंगळवेढा, सोलापूर | १८७५ |
| ३८) श्री शाहू वाचनालय, गारगोटी, कोल्हापूर | १८७६ |
| ३९) श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय, अक्कलकोट | १८७६ |
| ४०) वल्लभदास वालजी जिल्हा वाचनालय, जळगांव | १८७७ |
| ४१) राजर्षी शाहू नगर वाचन मंदिर, शिरोळ, कोल्हापूर | १८७७ |
| ४२) सार्वजनिक वाचनालय, शिवाजी चौक, कल्याण | १८७८ |
| ४३) महात्मा गांधी वाचनालय, कागल, कोल्हापूर | १८८० |
| ४४) सार्वजनिक वाचनालय, मलकापूर, कोल्हापूर | १८८१ |
| ४५) श्री. नारायण मार्तंड वाचनालय, येवले, जळगांव | १८८२ |
| ४६) सार्वजनिक वाचनालय, जंजिरा, रायगड | १८८२ |

| | | |
|---|---|---|
| ४७) | लोकमान्य टिळक सार्वजनिक वाचनालय, नंदूरबार | १८८३ |
| ४८) | श्री राणी अहिल्याबाई वाचन मंदिर, कापशी, कोल्हापूर | १८८४ |
| ४९) | नगर वाचनालय, दारव्हा, यवतमाळ | १८८५ |
| ५०) | महात्मा सार्वजनिक वाचनालय,शेवगांव, अहमदनगर | १८८५ |
| ५१) | नगर वाचन मंदिर, चोपडा, जळगांव | १८८५ |
| ५२) | जत वाचनालय, जत, सांगली | १८८५ |
| ५३) | सार्वजनिक तालुका वाचनालय, इस्लामपूर, सांगली | १८८५ |
| ५४) | देशभक्त शंकरराव सरनाईक सार्वजनिक वाचनालय, पुसद | १८८६ |
| ५५) | नगर वाचन मंदिर, कसबे डिग्रज, सांगली | १८८६ |
| ५६) | नगर वाचनालय, यवतमाळ | १८८७ |
| ५७) | लोकमान्य वाचनालय, जामखेड, अहमदनगर | १८८७ |
| ५८) | दस्तूर रतनजी ग्रंथालय, खामगांव, बुलढाणा | १८८९ |
| ५९) | श्रीमती गंगाबाई वाचनमंदिर, आजरा, कोल्हापूर | १८८९ |
| ६०) | सार्वजनिक वाचनालय, मेहकर, बुलढाणा | १८९० |
| ६१) | श्री सार्वजनिक वाचनालय, मलकापूर, बुलढाणा | १८९१ |
| ६२) | सार्वजनिक वाचनालय, भंडारा | १८९१ |
| ६३) | मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे | १८९३ |
| ६४) | सार्वजनिक वाचनालय, श्रीवर्धन, रायगड | १८९३ |
| ६५) | नट्ट वाचनालय, बांदा, सावंतवाडी | १८९३ |
| ६६) | नगर वाचनालय, वणी, यवतमाळ | १८९४ |
| ६७) | श्री रामेश्वर सार्वजनिक वाचनालय, आचरे, मालवण | १८९४ |
| ६८) | सार्वजनिक वाचनालय, अचलपूर, अमरावती | १८९५ |
| ६९) | करसनदास मुळजी वाचनालय, माथेरान, रायगड | १८९७ |
| ७०) | मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर | १८९८ |
| ७१) | नगर वाचनालय, कुरूंदवाड, कोल्हापूर | १८९८ |

| | | |
|---|---|---|
| ७२) | राजे वाकटक सार्वजनिक वाचनालय, वाशिम | १८९९ |
| ७३) | गणेश वाचनालय, परभणी | १९०१ |
| ७४) | लोकमान्य टिळक वाचनालय, ब्रम्हपूरी, चंद्रपूर | १९०३ |
| ७५) | नगर वाचन मंदिर, सांगोला, सोलापूर | १९०४ |
| ७६) | उर्दू लायब्ररी, मालेगाव, नाशिक | १९०२ |
| ७७) | नगर वाचनालय, कुरूंदवाड, कोल्हापूर | १८९८ |
| ७८) | शेठ नारायण बंकट वाचनालय, चाळीसगाव, जळगांव | १९०६ |
| ७९) | सार्वजनिक वाचनालय, पाली, रायगड | १९०६ |
| ८०) | नगर वाचन मंदिर, मालवण | १९०७ |
| ८१) | रघुनाथ गणेश खटखटे ग्रंथालय, वेंगुर्ला, सिंधुदुर्ग | १९०६ |
| ८२) | दादर सार्वजनिक ग्रंथालय व काशिनाथ धुरू हॉल, दादर | १९०७ |
| ८३) | न्यायमुर्ती रानडे मोफत वाचनालय, केतकर टाऊन हॉल, नाशिक | १९०७ |
| ८४) | मिरज विद्यार्थीसंघ, खरे वाचन मंदिर वाचनालय, मिरज | १९१९ |

## २) केरळ

१) त्रिवेंद्रम सार्वजनिक ग्रंथालय (१८३६)

२) त्रिशूर सार्वजनिक ग्रंथालय व अभ्यासिका (१८७३)

३) त्रिशूर सार्वजनिक ग्रंथालय (१८७३)

४) कोट्याम् सार्वजनिक ग्रंथालय (१८८२)

५) त्रिवेंद्रम लोक ग्रंथालय (१८९७)

६) लिओ ग्रंथालय आणि अभ्यासिका, कायपूझा (१९००)

७) आझाद मेमोरीयल ग्रंथालय, तेलीचेरी (१९०१)

८) भारतीविलासम् ग्रंथालय, कोटयाम (१९०४)

९) चित्तूर म्यूनसिपल ग्रंथालय (१९०५)

१०) विजयसंस्थानी ग्रंथालय आणि अभ्यासिका चेरीझीकील (१९०८)
११) हस्तलिखितांचे ग्रंथालय, त्रिवेंद्रम (१९०८)
१२) संकरा विलासम ग्रंथालय आणि अभ्यासिका चेनगनूर ( १९१०)
१३) आळवे मुन्सिपल ग्रंथालय आणि अभ्यासिका (१९११)
१४) केरल सार्वजनिक ग्रंथालय (१९१४)
१५) लिओ ग्रंथालय आणि अभ्यासिका, चंपाकूलम (१९१४)
१६) मुलम शतीब्दा ग्रंथालय आणि अभ्यासिका (१९१६)
१७) श्री. कृष्णा विलासम ग्रंथालय, मलयानकी (१९१६)

**३) तामीळनाडू**

१) सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर (१६ वे शतक)
२) फोर्ट डेव्हीट (कूडालव) ग्रंथालय (१७०७)
३) साहित्य सामाजिक ग्रंथालय, मद्रास (१८२०)
४) जयर ग्रंथालय आणि संशोधन केंद्र (१८८६)
५) कोन्नेमेरा सार्वजनिक ग्रंथालय (१८९०)

**४) आंध्रप्रदेश**

१) हिंदू अभ्यासिका, विशाखापट्टण (१८४०)
२) थिओसॉफीकल समाज ग्रंथालय, जुने गटूर (१८५०)
३) आर. व्ही. एन. अभ्यासिका (१८८०)
४) नैरोजी ग्रंथालय, उंडी (१८८५)
५) सरस्वती ग्रंथालय, विशाखापट्टणम (१८८६)
६) हूमे ग्रंथालय, कोपले (१८९५)
७) श्री. विरसालिंगाकवी समाज, ग्रंथालय कूमाडवली (१८९७)
८) गौतमी विभागीय ग्रंथालय, राजमुद्री (पुर्वगोदावरी) (१८९८)

९) हिंदू यूवाजन संघ ग्रंथालय, इलूरु (१९०४)

१०) आर्य बाला समाज, पेडापालम (१९०५)

११) सेवकरामा वानी मंदीर, पेडापालम (१९०५)

१२) वसूर्या ग्रंथालय राजमउंद्रे (१९१०)

१३) जेओरज् कोरोनियन ग्रंथालय, वेतापालम (१९११)

१४) राममोहन मुक्त ग्रंथालय आणि अभ्यासिका, विजयवाडा ( १९११)

१५) टिकून विद्यालय, गुंटूर (१९११)

१६) कोदी राममूर्ती नायडू धर्मा ग्रंथालय, विजयवाडा (१९१२)

१७) रामचंद्र ग्रंथालय, पोद्रू (१९१४)

**५) कर्नाटका**

१) नवलगुंडा ग्रंथालय (१८२०)

२) नेटिव्ह सार्वजनिक ग्रंथालय, बेळगाव (१८४०)

३) सार्वजनिक वाचनालय, बेळगाव (१८४८)

४) सार्वजनिक ग्रंथालय, धारवाड (१८५४)

५) नेटिव्ह सार्वजनिक ग्रंथालय, धारवाड (१८५४)

६) सार्वजनिक ग्रंथालय आणि वस्तूसंग्रहालय, कारवार (१८६४)

७) नेटिव्ह सार्वजनिक ग्रंथालय, हुबळी (१८६४)

८) सार्वजनिक ग्रंथालय आणि वस्तूसंग्रहालय, कारवार (१८६४)

९) गोकाक ग्रंथालय (१८६५)

१०) सार्वजनिक ग्रंथालय हुबळी (१८६५)

११) चिक्कोडी ग्रंथालय, बेळगाव (१८६६)

१२) सामपागाम ग्रंथालय (१८६६)

१३) सार्वजनिक ग्रंथालय, बागलकोट (१८६८)

१४) खानापूर ग्रंथालय (१८६८)

१५) सार्वजनिक ग्रंथालय, सौदत्ती (१८७०)

१६) सार्वजनिक ग्रंथालय,शिरशी (१८७०)

१७) सार्वजनिक ग्रंथालय, रंताबेनूर (१८७३)

१८) नारागूंडा ग्रंथालय (१८७३)

१९) निपाणी ग्रंथालय (१८७५)

२०) अभ्यासिका कक्ष, गाडाग (१८७६)

२१) लोकमान्य धर्मार्थ वाचनालय, शिरहट्टी (१८८१)

२२) सार्वजनिक ग्रंथालय, सवदत्ती (१८८१)

२३) शिझाट्टी ग्रंथालय (१८८२)

२४) सार्वजनिक ग्रंथालय (१८९०)

२५) कूडागोल ग्रंथालय (१८९३)

२६) सार्वजनिक ग्रंथालय (१९१२)

२७) सार्वजनिक ग्रंथालय, बंगलोर (१९१५)

२८) साहित्य परिषद, कन्नडा (१९१५)

**६) जम्मू आणि काश्मिर**

१) श्री रणबिर सिंग सार्वजनिक ग्रंथालय, जम्मू (१८७९)

२) श्री. प्रतापसिंग सार्वजनिक ग्रंथालय, श्रीनगर (१८८९)

**७) बिहार**

१) इस्ट इंडिया कंपनीद्वारे नोंदणी ग्रंथालय (१८०८)

२) बिहार हिटेशनी सार्वजनिक ग्रंथालय, पटना (१८८२)

३) सरकारी ऊर्दू सार्वजनिक ग्रंथालय, पटना (१८८९)

४) जिल्हा केंद्र सार्वजनिक ग्रंथालय,आराट (१९०१)

५) देवकुमार जैन ओरीयंटल सार्वजनिक ग्रंथालय (१९०३)

६) श्री शरदा सदन पुस्तकालय, वैशाली (१९१४)

७) जिल्हा केंद्र सार्वजनिक ग्रंथालय, मधूबन (१९१६)

**८) पंजाब**

१) महाराजा रणजितसिंग वैयक्तिक ग्रंथालय (१६ वे शतक)

२) म्यून्सिपल सार्वजनिक ग्रंथालय, लूधियाना (१८७८)

३) पंजाब सार्वजनिक ग्रंथालय, लाहोर (१८८४)

४) हंसराज ग्रंथालय, अंबाला (१८८६)

५) पंजाब वेदिक ग्रंथालय, लाहोर (१८९४)

६) म्यून्सिपल सार्वजनिक ग्रंथालय, पटियाला (१८९८)

७) म्यून्सिपल सार्वजनिक ग्रंथालय,अमृतसर (१९००)

८) मोतिलाल नेहरु, म्यून्सिपल ग्रंथालय, लाहोर (१९००)

९) म्यून्सिपल सार्वजनिक ग्रंथालय, कपूरथाला (१९०४)

१०) दयालसिंग सार्वजनिक ग्रंथालय, लाहोर (१९०८)

११) दयालसिंग सार्वजनिक ग्रंथालय, लाहोर (१९१२)

१२) मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालय, संगरुर (१९१२)

१३) पंजाब ग्रंथालय, लाहोर (१९१६)

**९) राजस्थान**

१) सरस्वती भांडार ग्रंथालय, उदयपूर (१४४६)

२) महाराजा मानसिंग (पहिला पोथी खाना) अंबर पॅलेस(१५१२)

३) महाराजा राजसिंग ग्रंथालय, बिकानेर (१५७१)

४) महाराजा जगतसिंग राजग्रंथालय, उदयपूर (१७ वे शतक)

५) सवाई जयसिंग पोथीखाना, जयपूर (१७२७)

६) महाराजा सार्वजनिक ग्रंथालय, जयपूर (१८५६)

७) व्हिक्टोरीया लाल ग्रंथालय, उदयपूर (१८८७)

८) गार्डन ग्रंथालय, जयपूर (१९००)

९) राज्यस्तरीय सार्वजनिक ग्रंथालय, भरतपूर (१९०७)

१०) महाबीर ग्रंथालय, शिखर (१९०८)

११) सरस्वती पुस्तकालय, फतेहपूर (१९१०)

१२) श्री महाराज भीम सिंग सार्वजनिक ग्रंथालय, कोटा (१९१०)

१३) महाराजा सुमर सिंग सार्वजनिक ग्रंथालय, जोधपूर (१९१५)

**१०) मध्यप्रदेश**

१) सार्वजनिक ग्रंथालय, इंदोर (१८५४)

२) जे. एफ. वूल्नयर्स ओरयन्टल ग्रंथालय, उजैन (१८९३)

३) माधव ग्रंथालय, लष्कर (१८९९)

४) हमीदिया राज्य ग्रंथालय, भोपाळ (१९०९)

५) युवराज जनरल ग्रंथालय, उजैन (१९१३)

**११) ओरिसा**

१) ममूरबानमी राज्य द्वारा सार्वजनिक ग्रंथालय, ओरिसा (१८९८)

२) उत्कल साहित्य समाज ग्रंथालय, कटक (१९०३)

३) जयल ग्रंथालय, मयूरबानजी (१९०८)

४) आंध्रभाषाभिवरयनी समाज, ब्रम्हपूर (१९०९)

**१२) गुजरात**

१) गंगाबाई केशवलाल पांचल सार्वजनिक पुस्तकालय, अथोर (१९१३)

२) शेठ नाथलाल पानचंद सार्वजनिक पुस्तकालय, अजोल (१९१६)

३) एस.एम. पटेल सार्वजनिक पुस्तकालय, अलिना (१८५४)

४) सूर्यापूर संस्कृत पाठशाळा सार्वजनिक ग्रंथालय

५) हजरत पीर मौहमद शाह दरगाह ग्रंथालय, अहमदाबाद (१९१६)

६) हीमाभाई संस्था ग्रंथालय, अहमदाबाद (१८५७)

७) जे. एन. पेटीट ग्रंथालय, अंकलेश्वर (१८८८)

८) सार्वजनिक पुस्तकालय, बहूचरजी (१९०८)

९) सार्वजनिक पुस्तकालय, बकरोल (१९०७)

१०) अंबाईदास भिठादास सार्वजनिक पुस्तकालय, बलिसाना (१९१५)

११) बामनगम सार्वजनिक पुस्तकालय , बामनगम (१९०४)

१२) सार्वजनिक ग्रंथालय, भैली (१९०७)

१३) दादाभाई नौरोजी वाचनालय आणि ग्रंथालय, भरूच (१९०७)

१४) रायचंद दीपचंद ग्रंथालय, भरूच (१८५८)

१५) बारटन ग्रंथालय, भावनगर (१८८२)

१६) महाराज श्रीविजयराजजी सार्वजनिक ग्रंथालय, भूज (१८६८)

१७) जे. बी. पेटीट सार्वजनिक ग्रंथालय, बिलीमोरा (१८८६)

१८) शेठ पानचंद लीलाचंद सार्वजनिक पुस्तकालय,बिलोद्रा (१९१६)

१९) मनिकबाई मोफत ग्रंथालय, बोरसाद (१९०४)

२०) चंचलबेन रेवाभाई चौधरी सार्वजनिक ग्रंथालय, चरदा (१९१४)

२१) मित्रमंडळ सार्वजनिक पुस्तकालय, छनी (१९१६)

२२) डकोर सार्वजनिक पुस्तकालय, डकोर (१९१४)

२३) सार्वजनिक पुस्तकालय, डेहगम (१९१२)

२४) डेनप कसबा सार्वजनिक पुस्तकालय, डेनप (१९१२)

२५) बॅरोडेल ग्रंथालय, धनधूका (१८६७)

२६) सरकारी तालुका ग्रंथालय, धरंगधरा ( १९०१)

२७) भगवतसिंहजी ग्रंथालय, गोंडल (१८८४)

२८) सार्वजनिक पुस्तकालय, गोझरीया (१९१५)
२९) वूड्हाऊस ग्रंथालय, इदर (१८८६)
३०) त्रिभूवनदास भावजीभाई मोफत सार्वजनिक पुस्तकालय, जाफराबाद (१९०२)
३१) व्हिक्टोरिया डायमंड जुबली ग्रंथालय, जलालपूर (१८९७)
३२) सार्वजनिक पुस्तकालय, जन्तराल (१९०७)
३३) सरकारी ग्रंथालय, जूनागड (१८६५)
३४) सार्वजनिक पुस्तकालय, कामना (१९१२)
३५) कामती सार्वजनिक ग्रंथालय, कामती (१९१३)
३६) जे. के. डी. सार्वजनिक ग्रंथालय, कानसा (१९१४)
३७) सार्वजनिक पुस्तकालय, कानसा (१९१३)
३८) सार्वजनिक पुस्तकालय, करननगर (१९०८)
३९) कर्जन सार्वजनिक पुस्तकालय, कर्जन (१९०७)
४०) सार्वजनिक पुस्तकालय, कासोर (१९१५)
४१) सार्वजनिक पुस्तकालय, खांभा (१९०५)
४२) पटेल रेवाभाई वालदास सार्वजनिक पुस्तकालय, खेरवा (१९१२)
४३) पुजाभाई जीवाभाई सार्वजनिक पुस्तकालय, कोयली (१९११)
४४) शेठ बी. एम. पुस्तकालय, कुनियाना (१९१४)
४५) लाडोल सार्वजनिक पुस्तकालय, लाडोल (१९०९)
४६) सर जे. मोफत तालुका पुस्तकालय, लखतर (१९०९)
४७) जसवंतसिंग ग्रंथालय, लिमडी (१८९५)
४८) सार्वजनिक पुस्तकालय, मानेकपूर (१९१५)
४९) कुच अंजूमन ए इस्लाम सार्वजनिक ग्रंथालय, मान्डवी (१९०९)
५०) नरगपालिका ग्रंथालय, मंगरोल (१९१५)
५१) शाह वाडीलाल बेचरदास सार्वजनिक पुस्तकालय, मनूंद (१९०७)
५२) शेठ भाईलालभाई मानचंद सार्वजनिक पुस्तकालय, मेहलव (१९०८)

५३) सी. एस. बुटाला ग्रंथालय, मोडसा(१९००)

५४) महाराव श्री. खेनगरची ग्रंथालय, मुंद्रा (१८७१)

५५) दह्याभाई श्यामलाभाई पटेल सार्वजनिक पुस्तकालय, नार (१९१४)

५६) बी. डी.मित्रमंडळ सार्वजनिक पुस्तकालय, नरडीपूर (१९०७)

५७) सयाजी वैभव सार्वजनिक ग्रंथालय, नवसारी (१९९८)

५८) पालना सार्वजनिक पुस्तकालय, पालना (१९०६)

५९) सार्वजनिक पुस्तकालय, पालसाना (१९१२)

६०) फतेहसिंहराव सार्वजनिक पुस्तकालय, पाटण (१८९०)

६१) देसाई एन. जी. आणि शेठ एस. एच. ग्रंथालय, पोरबंदर (१८८६)

६२) रमण ग्रंथालय, प्रांतीज (१८८१)

६३) बिस्मील्लाखान सार्वजनिक ग्रंथालय, राधनपूर (१९०३)

६४) सनकाभाई मरीभाई नवीन सार्वजनिक पुस्तकालय, पुंधरा (१९१३)

६५) वानरसीभाई रांचोडभाई पटेल सार्वजनिक पुस्तकालय, संदेर (१९०८)

६६) विद्या अंबालाल संपतराम सार्वजनिक पुस्तकालय, संखेडा (१९०८)

६७) सार्वजनिक पुस्तकालय, सयन (१९१५)

६८) उमेदभाई एस. पटेल सार्वजनिक पुस्तकालय, शेरथा (१९११)

६९) सयाजी शतोत्सव सार्वजनिक पुस्तकालय, सिनोर (१९०७)

७०) शेठ मंगलदास बुलाधीदास सार्वजनिक पुस्तकालय,सिपोर (१९१५)

७१) शेठ गोपालदास उकरम सिपोर, सुंधिया (१९१४)

७२) किशाभाई लल्लूभाई सार्वजनिक पुस्तकालय,सुनव (१९०६)

७३) अन्द्रेवस ग्रंथालय,सुरत (१८५०)

७४) रंदेर वाचनालय ग्रंथालय, सुरत (१८८५)

७५) सार्वजनिक मोफत पुस्तकालय, सुरत (१९११)

७६) जे. एन. ग्रंथालय, सुरेंद्रनगर (१९१०)

७७) एम. आर. सार्वजनिक ग्रंथालय, तोरणा (१८७९)

७८) एम. जे. भाकेर सार्वजनिक पुस्तकालय,उमरेठ (१९०९)

७९) पी. एम. एल. सार्वजनिक ग्रंथालय, उमटा (१९०६)

८०) सार्वजनिक पुस्तकालय,उनरा (१९१०)

८१) सार्वजनिक पुस्तकालय, उनवा (१९१०)

८२) शेठ मंगनलाल रवीकरणदास सार्वजनिक पुस्तकालय, उनझा (१९०९)

८३) सार्वजनिक पुस्तकालय,वडवला (१९०८)

८४) शेठ भोगीलाल चकुला विद्यावधर्क बाल पुस्तकालय, वाडनगर (१९०५)

८५) शेठ भोगीलाल चकुला विद्यावर्धक महिला पुस्तकालय, वाडनगर (१९०५)

८६) शेठ भोगीलाल चकुला विद्यावर्धक पुस्तकालय, वाडनगर (१९०५)

८७) मध्यवर्ती ग्रंथालय, वडोदा (१८८०)

८८) बाल पुस्तकालय,वसो (१९१६)

८९) मोतीभाई नरसिंगभाई अमिन सार्वजनिक पुस्तकालय, वसो ( १८८०)

९०) सयाजी गोल्डन जुबली सार्वजनिक पुस्तकालय,विजापूर (१९०९)

९१) पारेख व्ही. एच. सार्वजनिक ग्रंथालय, विझनगर (१८७८)

९२) एच. एन. माने सार्वजनिक पुस्तकालय,वाघोदिया (१८९७)

## परिशिष्ट २

## बडोदा ग्रंथालय क्षेत्रातील हालचाली : पाऊलखूणा

१) सार्वजनिक ग्रंथालय, गांदवी (१८६५)

२) बडोदा राज्य ग्रंथालय (१८७७)

३) श्रीमंत संपतराव गायकवाड ग्रंथालय (१८९१)

४) मित्रमंडळ ग्रंथालय, गुजरात (१९०६)

५) दुर्मिळ ग्रंथालये, बडोदा (१९०७)

६) महिला ग्रंथालय, बडोदा (महिला ट्रेनिंग कॉलेज) (१९०७)

७) बोर्डन यांची अध्यक्ष म्हणून राज्य ग्रंथालयावर नियूक्ती (१९१०–१३)

८) ट्रेनिंग ग्रंथालय बडोदा (१९१० –१४)

९) प्रवासी ग्रंथालये (१९११)

१०) विविध ग्रंथसंग्रह, बडोदा (१९११–१९)

११) ग्रंथालय शिक्षणासाठी श्री. जे.एस. कुडाळकर यांचा परदेशी दौरा (१९१३–१४)

१२) श्री. एम. एन. आमिन यांची ग्रंथालयपदी नियूक्ती (१९१२)

१३) श्री. एन.एम. दत्त यांची ग्रंथालयपदी नियूक्ती (१९१३)

१४) महिला ग्रंथालय केंद्र ग्रंथालयाशी संलग्नीत (१९१४)

१५) श्री. जे. एस. कुडाळकर यांची राज्य ग्रंथपाल म्हणून श्री. दत्त यांच्याबरोबर नियूक्ती (१९१५)

१६) ग्रामीण ग्रंथपालासाठी सहा महिन्याचा प्रशिक्षण वर्ग (१९१२)

१७) ग्रंथालय दृष्टीकोन विभागाचे आयोजन(१९१०)

१८) बालवर्गासाठी खेळणी वर्गाची सुरूवात (१९११)

१९) गायकवाड ओरीसा संघ स्थापन (१९१५)

२०) भारत सरकारचे लाहोर येथे भारतीय ग्रंथालय परिषदेचे आयोजन, प्रतिनिधी श्री. दत्ता, बडोदा (१९०८)

२१) बडोदा ग्रंथालय पुस्तकाची पाहिली आवृत्ती प्रदर्शित (१९१८)

२२) श्री. जी. एस. कुडाळकर यांचे 'बडोदा ग्रंथालयाच्या हालचाली' पुस्तिका प्रदर्शित (पृष्ठे १९) (१९१८)

२३) श्री. कुडाळकर यांच्या अध्यक्षतेखाली मद्रास येथे भारतीय ग्रंथालय परिषदेचे आयोजन (१९१९)

२४) श्री. कुडाळकराच्या निधनानंतर श्री.दत्ता यांची ग्रंथालयपदी नियुक्ती (१९२१)

२५) श्री. एन. एम. दत्ताव्दारे बडोदा ग्रंथालय संघाची दुसरी आवृत्ती प्रदर्शित (पृष्ठे ४८) (१९२१)

२६) बडोदा ग्रंथालय संघाची तिसरी आवृत्ती प्रदर्शित (पृष्ठे ४८) (१९२४)

२७) 'पुस्तकालय सहायक सहकारी मंडळ' ची निर्मिती(१९२५)

२८) 'पुस्तकालय' गुजराती ग्रंथालय मासिकाची सुरुवात (१९२५)

२९) बडोदा ग्रंथालय पुस्तकाची चौथी आवृत्ती प्रदर्शित (पृष्ठे ७६) (१९२६)

३०) व्दारका येथे बडोदा ग्रंथालय संघाची दुसरी संस्था(१९२६)

३१) देशातील पहिल्या तालुका ग्रंथालय संघाची वाघोडीया येथे स्थापना (१९२६)

३२) केंद्र ग्रंथालयातून संस्कृत विभागाची विभागणी होवून 'ओरीयंटल इन्स्टीट्यूटखाली उभारणी, बडोदा (१९२७)

३३) गुजरातधील बडोदा ग्रंथालय हालचाली (१९११–१५) पुस्तक प्रदर्शित (१९२८)

३४) ग्रंथपाल श्री. एन. एम. दत्ता यांची सहकारी म्हणून ब्रिटिश ग्रंथालय संघासाठी नियुक्ती (१९२८)

३५) पेटलाड येथे बडोदा ग्रंथालय संघाच्या तिसऱ्या सभेचे आयोजन (१९२८)

परिशिष्ट ३

## २००१ मधील गुजरात राज्यातील भूकंपग्रस्त ग्रंथालये

| अ. क्र. | स्थळ | ग्रंथालयाचे नाव | प्रकार | एकूण ग्रंथ | खराब झालेल्या ग्रंथांची संख्या | इमारतीच्या नुकसानीचे स्वरुप | एकूण नुकसान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अदिपूर | टोलानी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज पो. बॉ. नं. ११, पीन ३७०२०५ लायब्ररी एरिया 1२४ मीटर | कॉलेज लायब्ररी | ३००० | ९०% ग्रंथ तसेच संगणक फर्निचर, दृकश्राव्य साधने खराब आहेत | इमारत पूर्णपणे खराब | बिल्डिंग रु.०.३० लक्ष, ग्रंथ आणि फर्निचर रु. १.६ लक्ष |
| २. | जूना अंजर तालुका | अंजर नगरपालिका संचालित महाराव श्री खेनगालिनी सर्वांगणीक पुस्तकालय | सार्व. ग्रंथालय | १०,००० | १००% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | बिल्डिंग रु. ५ लक्ष ग्रंथ व फर्निचर रु. ८ लक्ष |
| ३. | नया अंजर | म्युन्सिपल नया अंजर ग्रंथालय बस स्टॅण्ड जवळ, चकला नया अंजर – कूच | सार्व. ग्रंथालय | २,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत दुरुस्तीची गरज | इमारत ०.५० लक्ष ग्रंथ व फर्निचर ०.५० लक्ष |
| ४. | बचऊ तालुका | गव्हर्मेंट तालुका, ग्रंथालय, गव्हर्मेंट हायस्कूल गाऊंड, बचऊ, जिल्हा कूच | सार्व. ग्रंथालय | ५,००० | ८०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत ५ लक्ष ग्रंथ ३ लक्ष |

| अ. क्र. | स्थळ | ग्रंथालयाचे नाव | प्रकार | एकूण ग्रंथ | खराब झालेल्या ग्रंथांची संख्या | इमारतीच्या नुकसानीचे स्वरुप | एकूण नुकसान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | बचऊ तालुका | महारावश्री सीनजी लायब्ररी बचऊ – कूच | सार्व. ग्रंथालय | १०००० | १००% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | ११ लक्ष इमारत १० लक्ष ग्रंथ ५ लक्ष फर्निचर |
| ६. | बचऊ तालुका | लेट श्री विरजीभाई कूरीया ज्ञानजोत ब्रेली लायब्ररी कस्टमचेक पोस्ट समोर बचऊ – कूच | ब्रेली ग्रंथालय सार्व. ग्रंथालय | ५,००० ब्रेली ग्रंथ | १००% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत ग्रंथ फर्निचर ६.५ लक्ष |
| ७. | भूज शहर | विवेकानंद सार्वजनिक ग्रंथालय, प्रसादी प्लॉट, संस्कार नगर, भुमी – कूच पीन – ३७०१४० | सार्व. ग्रंथालय | ५,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत दुरुस्तीची गरज | इमारत १ लक्ष ग्रंथ व फर्निचर ०.२० लक्ष |
| ८. | भूज शहर | गव्हर्मेंट जिल्हा ग्रंथालय, मीडल स्कूल कंपाऊंड, भूज कूच लायब्ररी पीन – ३७०००१ | सार्व. ग्रंथालय | ४०००० | २०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली आहे | इमारत ४० लक्ष ग्रंथ ६ लक्ष फर्निचर ०.२० लक्ष |
| ९. | भूज शहर | महाराजश्री विजय राजजी सार्वजनिक ग्रंथालय, महादेव – नाका, भूज – कूच लायब्ररी | सार्व. ग्रंथालय | १७००० | १००% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली आहे | इमारत ८ लक्ष ग्रंथ व फर्निचर १० लक्ष |

| अ. क्र. | स्थळ | ग्रंथालयाचे नाव | प्रकार | एकूण ग्रंथ | खराब झालेल्या ग्रंथांची संख्या | इमारतीच्या नुकसानीचे स्वरुप | एकूण नुकसान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | भूज शहर | जे. पी. भट पब्लिक ग्रंथालय, रोटरी क्लब | सार्व. ग्रंथालय | ७,००० | १०% ग्रंथ खराब | इमारत नादुरुस्त | इमारत ११ लक्ष |
| ११. | भूज शहर | महाराज ऑफ कूच अपना महल दरबार भूज–कूच पीन – ३७०००१ | वस्तू संग्रहालय स्पेशल ग्रंथालय | ३,००० ग्रंथ २०० हस्त–लिखिते | १०% ग्रंथ खराब | इमारत नादुरुस्त | इमारत ५० लक्ष फर्निचर १.३० लक्ष |
| १२. | भूज शहर | महाराजा अनमारजी स्कूल ग्रंथालय, इंग्रजी मिडियम हास्पिटल रोड भूज | शाळा ग्रंथालय | १,००० | २५% ग्रंथ खराब | इमारत नादुरुस्त | इमारत ४ लक्ष |
| १३. | भूज शहर | महाराजा अनमारजी स्कूल ग्रंथालय, गुजरात मिडियम स्कूल लायब्ररी | शाळा ग्रंथालय | १,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत नादुरुस्त | इमारत ४ लक्ष |
| १४. | भूज शहर | अनमारजी हायस्कूल लायब्ररी, इंग्रजी मिडियम स्कूल लायब्ररी | शाळा ग्रंथालय | १,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत नादुरुस्त | इमारत ४ लक्ष |
| १५. | भूज शहर | अलफ्रेड हायस्कूल ग्रंथालय | शाळा ग्रंथालय | १,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत नादुरुस्त | सरकार कडून अनुदान घेतले आहे |
| १६. | भूज शहर | इंदिराबाई मुलींचे हायस्कूल | शाळा ग्रंथालय | १,००० | २०% ग्रंथ खराब | जूनी इमारत नादुरुस्त नवीन इमारत काम चालू आहे | सरकारी अनुदान प्राप्त आहे. |

| अ. क्र. | स्थळ | ग्रंथालयाचे नाव | प्रकार | एकूण ग्रंथ | खराब झालेल्या ग्रंथांची संख्या | इमारतीच्या नुकसानीचे स्वरुप | एकूण नुकसान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७. | भूज शहर | आर. आर. लेन कॉलेज ग्रंथालय, कॉलेज रोड, भूज | महा विद्यालय ग्रंथालय | ३३००० | ५०% ग्रंथ खराब | इमारत नादुरुस्त | इमारत ४० लक्ष ग्रंथ व फर्निचर २० लक्ष |
| १८. | भूज शहर | शेठ डी. एल. लॉ कॉलेज ग्रंथालय, कॉलेज रोड, भूज–कूच | महा विद्यालय ग्रंथालय | ९,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत दुरुस्तीची गरज | इमारत व ग्रंथ ५० लक्ष |
| १९. | भूज शहर | गव्हर्मेंट इंजिनिअरींग कॉलेज, भूज मिरासपुर रोड, पोलिटेक्निक कॅम्पस, भूज – ३७०००१ | इंजि. कॉलेज ग्रंथालय | ५,००० | ८०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत २० लक्ष ग्रंथ व फर्निचर ८ लक्ष |
| २०. | भूज शहर | गव्हर्मेंट पॉलिटेक्निक कॉलेज ग्रंथालय, भूज | पॉलि टेक्निकल कॉलेज ग्रंथालय | २,००० | ९०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत व ग्रंथ ०.५० लक्ष |
| २१. | मधापूर तालुका | वूमन ग्रंथालय, पटेल अभुदया मित्रमंडळ संचलित, मधापूर नवा–वासा जिल्हा – भूज – कूच | महिला सार्व. ग्रंथालय | २,००० | ९०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत व ग्रंथ ०.५० लक्ष |
| २२. | मधापूर तालुका भूज | पब्लिक ग्रंथालय, पटेल अभुदया मित्रमंडळ संचलित, मधापूर, जिल्हा – भूज – कूच | सार्व. ग्रंथालय | ६,००० | ९०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत व ग्रंथ ०.५० लक्ष |

| अ. क्र. | स्थळ | ग्रंथालयाचे नाव | प्रकार | एकूण ग्रंथ | खराब झालेल्या ग्रंथांची संख्या | इमारतीच्या नुकसानीचे स्वरुप | एकूण नुकसान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २३. | मिर्झापूर तालुका भूज | पब्लिक ग्रंथालय, मिर्झापूर, जिल्हा – भूज – कूच | सार्व. ग्रंथालय | २,००० | ५०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत २ लक्ष व ग्रंथ ०.५० लक्ष |
| २४. | नाखा ट्राना जिल्हा भूज | गव्हर्मेंट तालुका पुस्तकालय नाखाट्राना जिल्हा – भूज | सार्व. ग्रंथालय | ५,००० | ५०% ग्रंथ खराब | इमारत दुरुस्तीची गरज | इमारत २ लक्ष व ग्रंथ ०.५० लक्ष |
| २५. | मिलपर तालुका रापर | हिराबेन एम. सी. जी महिला पुस्तकालय मिलपर, पोष्ट रापर कूच | महिला ग्रंथालय | १,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत ०.१५ लक्ष ग्रंथ ०.१० लक्ष |
| २६. | मिलपर तालुका रापर | हिराबेन सोनी चिल्ड्रन ग्रंथालय | बाल ग्रंथालय सार्व. ग्रंथालय | २,००० | २०% ग्रंथ खराब | इमारत कोसळलेली | इमारत ०.१५ लक्ष ग्रंथ ०.१० लक्ष |

परिशिष्ट -४

## काही राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची सांख्यकीय स्थिती

| अ. क्र. | राज्य | राज्य मध्यवर्ती ग्रंथालये | विभागीय विभाग/जिल्हा ग्रंथालये | उपविभागीय तहसिल ग्रंथालये | नगरपरिषद शहर/शाखा ग्रंथालये | ग्रामीण ग्राम ग्रंथालये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अरुणाचलप्रदेश | १ | १२ | ४७ | ४७ | २४८ |
| २ | आसाम | १ | २२ | १६ | ०१ | २०४+४ व इतर =२४८ |
| ३ | मणिपूर | १ | ०५ | ०१ | १२० | १२७ |
| ४ | मेघालय | १ | ०४ | | | ५ |
| ५ | मिझोराम | १ | ०२ | ०३ | १७८ | १८९ |
| ६ | नचगचइँड | १ | ०८ | ०२ | – | १७८ |

परिशिष्ट – ५

## पंजाबमधील सार्वजनिक ग्रंथालयाच्या आधुनिकीकरण विषयी सद्यस्थिती

| अ. क्र. | ग्रंथालयाचे नाव | संगणक | सॉफ्टवेअर | इ–कॅटलोग | बार | इंटरनेट | प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.एम.केंद्रिय राज्य ग्रंथालय, पटीयाला | ६ | विनीस एम.एस. ऑफीस | Yes ८०,००० ग्रंथ | Yes ४०,००० ग्रंथ | Yes | प्रिंटर्स–३ बारकोड–२ स्कॅनर–१ फोटोसेट–१ फॅक्स–१ |
| २ | जिल्हा ग्रंथालय अमृतसर | ३ | लायब्ररी मॅनेजमेंट सॉफ्टवेअर एम.एस. ऑफीस | Yes ४३५०० ग्रंथ | - | Yes | प्रिंटर्स–१ स्कॅनर–१ फोटोसेट–१ |
| ३ | जिल्हा ग्रंथालय भाटीनडा | – | – | – | – | – | – |
| ४ | जिल्हा फरिदकोट | – | – | – | – | – | – |
| ५ | जिल्हा फिरोझपूर | – | – | – | – | – | – |
| ६ | जिल्हा फतेहगड साहेब | – | – | – | – | – | – |
| ७ | जिल्हा गुरुदासपूर | – | – | – | – | – | – |
| ८ | जिल्हा हिरोशपूर | २ | – | – | – | – | प्रिंटर १ |
| ९ | जिल्हा जालवधर | २ | विनीस, एम.एस. ऑफीस | Yes कार्यरत | – | – | प्रिंटर १ फोटोसेट १ |
| १० | जिल्हा कापूरमाला | २ | एम.एस. ऑफीस | Yes कार्यरत | – | – | प्रिंटर |

| अ. क्र. | ग्रंथालयाचे नाव | संगणक | सॉफ्टवेअर | इ–कॅटलोग | बार | इंटरनेट | प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | जिल्हा मोहाली | १ | विनीस एम.एस. ऑफीस | Yes कार्यरत | – | – | – |
| १२ | जिल्हा मनसा | – | – | – | – | – | – |
| १३ | जिल्हा नाभा | – | – | – | – | – | – |
| १४ | जिल्हा रोपर | २ | विनीस एम.एस. ऑफीस | Yes कार्यरत | – | – | प्रिंटर –१ |
| १५ | जिल्हा संगरूर | – | – | – | – | – | – |

## पंजाबमधील राज्य व जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालयाचे अंदाजपत्रक २०११-१२

| अ. क्र. | ग्रंथालयाचे नाव | वेतन | प्रवास भत्ता | कार्यालयीन खर्च (त्रैमासिक) | विज | प्रकाशन (त्रैमासिक) | साहित्य पुरवठा (त्रैमासिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम. एस. राज्य मध्यवर्ती ग्रंथालय पटीयाला | ७८०००००/- | २८००/- | १४५००/- | ८५०००/- | ३७५००/- | १६६९०/- |
| २ | जिल्हा ग्रंथालय अमृतसर | २००००००/- | २५००/- | ६०००/- | १४०००/- | १२५००/- | १६६६५/- |
| ३ | जिल्हा भतींडा | ८३००००/- | १२००/- | ७५००/- | १३०००/- | १८७५०/- | १६६६५/- |
| ४ | जिल्हा फरिदकोट | ११५००००/- | १२००/- | ६०००/- | २५०००/- | १२५००/- | १६६६५/- |
| ५ | जिल्हा फिरोझपूर | ९०००००/- | १२००/- | ३५००/- | १५०००/- | १२५००/- | १६६६५/- |
| ६ | जिल्हा फतेहगड साहेब | १८०००००/- | १०००/- | ४५००/- | १२०००/- | १८७५०/- | १६६६५/- |
| ७ | जिल्हा गुरुदासपूर | १०७५०००/- | ८००/- | ५५००/- | - | १२५००/- | १६६६५/- |
| ८ | जिल्हा होशीरपूर | ९२००००/- | १०००/- | ६०००/- | १३०००/- | १२५००/- | १६६६५/- |
| ९ | जिल्हा जालनधर | ५५०००००/- | २५००/- | ९०००/- | ४००००/- | २५०००/- | १६६६५/- |
| १० | जिल्हा कपूरथाला | ८०००००/- | ८००/- | ६५००/- | १३०००/- | १८७५०/- | १६६६५/- |
| ११ | जिल्हा मोहाली | १६०००००/- | ५००/- | ५०००/- | १३०००/- | १८७५०/- | १६६६५/- |
| १२ | जिल्हा मानसा | ६५००००/- | १३००/- | ४०००/- | १३०००/- | १२५००/- | १६६६५/- |
| १३ | जिल्हा नाभा | ६७००००/- | १०००/- | ७०००/- | १००००/- | १२५००/- | १६६६५/- |
| १४ | जिल्हा रोपर | १५०००००/- | १०००/- | ६५००/- | २१०००/- | १८७५०/- | १६६६५/- |
| १५ | जिल्हा संगरूर | ९०००००/- | १२००/- | ५०००/- | १३०००/- | १२५००/- | १६६६५/- |

## परिशिष्ट –६

# सार्वजनिक ग्रंथालयाकरिता सर्वसाधारण प्रणाली

सार्वजनिक ग्रंथालयांचा अधिभार असलेला मंत्री

↓

ग्रंथालय परिषद

↓

संचालक, सार्वजनिक ग्रंथालय

↓

राज्य ग्रंथालय परिषद

(राज्य शासनाने व्यवस्थापीत केलेली)

↓

विभागीय मध्यवर्ती ग्रंथालय

(राज्य शासनाच्या व्यवस्थापनाखाली)

↓

विभागीय ग्रंथालये

(प्रत्येक महसुली विभागामधील एक– राज्यशासन व्यवस्थापन)

↓

स्थानिक ग्रंथालय अधिकारी

↓

जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालये

(स्थानिक ग्रंथालय संघटलेच्या देखरेखीखाली)

↓

जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालयाच्या प्रत्येक शहर शाखा

↓

ग्रामीण विभागाकरिता गट मध्यवर्ती ग्रंथालय

↓

ग्राम ग्रंथालये

(गट मध्यवर्ती ग्रंथालयाच्या शाखा)

परिशिष्ट–७

# सार्वजनिक ग्रंथलयाचा विभागनिहाय सांख्यकीय तपशील

**अ) पुर्व विभाग–**

**१) अंदमान आणि निकोबार बेट**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | गाव ग्रंथालय | ०५ |
| | **एकूण** | **०६** |

**२) बिहार आणि झारखंड–**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | प्रादेशिक ग्रंथालय | ०५ |
| ३. | जिल्हा ग्रंथालय | २६ |
| ४. | शहर आणि गाव ग्रंथालय | ६९ |
| ५. | ग्राम ग्रंथालय<br>(Run by NGO & omer) | ४००० |
| | **एकूण** | **४१०१** |

## ३) ओरिसा–

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालय | १७ |
| ३. | माहिती केंद्र आणि वाचन कक्ष (आय अँड पीआर विभागाव्दारे चालविलेला) | ५३ |
| ४. | सांस्कृतिक ग्रंथालये | ०२ |
| ५. | नगरपालीका आणि (NAC - राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाचे केंद्र) ग्रंथालये | १२ |
| ६. | उपविभागीय ग्रंथालये | ०१ |
| ७. | अतिरिक्त जिल्हा ग्रंथालय केंद्र | ०६ |
| ८. | स्मारक कक्ष ग्रंथालये (शहर) | ०६ |
| ९. | स्मारक कक्ष ग्रंथालये (ग्रामीण) | ०२ |
| १०. | ग्रामीण ग्रंथालय | ३०० |
| ११. | शहरी ग्रंथालय | ३०० |
| १२. | ग्रामीण ग्रंथालय (राजा राममोहन रॉय प्रतिष्ठनच्या सौजन्याने) | ६०० |
| | **एकूण** | **१०००** |

### ४) पाश्चिम बंगाल

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | सरकारी ग्रंथालय | ११ |
| ३. | प्रायोजित जिल्हा ग्रंथालये | १९ |
| ४. | नगर ग्रंथालये | २३२ |
| ५. | अनुदानितग्रंथालये | ०७ |
| ६. | विनाअनुदानित ग्रंथालये | २४२६ |
| ७. | सामाजिक ग्रंथालये आणि माहिती केंद्रे | ३१९ |
| ८. | ग्रामीण ग्रंथालय | २२०९ |
| | **एकूण** | **५३२४** |

### ब) उत्तर/ पूर्व विभाग–

### १) आसाम–

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (मध्यवर्ती ग्रंथालय गुहाटीलाच हा दर्जा देण्यात आलेला आहे.) | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | २१ |
| ३. | उपविभागीय ग्रंथालय | १४ |
| ४. | शाखा ग्रंथालये | ०४ |
| ५. | ग्रामीण ग्रंथालये | १९९ |
| ६. | इतर ग्रामीण आणि संस्थाची ग्रंथालये | ११४ |
| | **एकूण** | **३५३** |

## २) अरूणाचल प्रदेश–

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | १८ |
| ३. | विभागीय ग्रंथालये | ०३ |
| ४. | उपविभागीय ग्रंथालये | १३ |
| ५. | शाखा ग्रंथालय | ०२ |
| ६. | विभागवार (गट) ग्रंथालये | ३२ |
| ७. | इतर ग्रामीण आणि संस्थाची ग्रंथालये | ३८ |
| ८. | पारिक्षेत्र ग्रंथालये (Circle Libraries) | ३८ |
| | **एकूण** | **१०७** |

## ३) मणिपूर–

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालय | १० |
| ३. | ग्रामीण ग्रंथालये | ४४ |
| ४. | सेवाभावी संस्थांची ग्रंथालये | ३५६ |
| | एकूण | ४११ |

**४) मिझोराम–**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालय | ०५ |
| ३. | ग्रामीण ग्रंथालये | ४५९ |
| | **एकूण** | **४६५** |

**५) मेघालय**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ०७ |
| ३. | इतर संस्थांची ग्रंथालये / सेवाभावी संस्थांची ग्रंथालये | ८६ |
| | **एकूण** | **९४** |

**६) नागालँड–**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालय | ०८ |
| ३. | ग्रामीण ग्रंथालये | ६०० |
| | **एकूण** | **६०९** |

### ७) सिक्किम–

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालय | ०३ |
| ३. | उपविभागीय ग्रंथालये | ०५ |
| ४. | अनुदानित ग्रंथालये | ०२ |
| | **एकूण** | **११** |

### ८) त्रिपुरा–

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ०७ |
| ३. | उपविभागिय ग्रंथालये | ०८ |
| ४. | नगर ग्रंथालये | ०१ |
| ५. | ग्रामीणग्रंथालये | ०२ |
| ६. | गट ग्रंथालये | ०६ |
| ७. | सेवाभावी ग्रंथालये | २० |
| | एकूण | ४५ |

### क) उत्तरविभाग

### १) चंदिगड–

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | विभागीय ग्रंथालय | ०१ |
| ३. | शाखा ग्रंथालये | ०४ |
| | **एकूण** | **०६** |

२) दिल्ली –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | शहर / नगर ग्रंथालये | ११४ |
| ३. | इतर ग्रंथालये | १०४ |
| | **एकूण** | **२१९** |

३) हरयाणा –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ०६ |
| ३. | शहर / नगर ग्रंथालये | ४३ |
| | **एकूण** | **५०** |

४) हिमाचल प्रदेश –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ११ |
| ३. | नगर ग्रंथालये | ०२ |
| ४. | ग्राम ग्रंथालये | २०७ |
| | **एकूण** | **२२१** |

**५) जम्मु आणि काश्मिर–**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | विभागीय ग्रंथालय | ०१ |
| ३. | जिल्हा ग्रंथालये | १४ |
| ४. | इतर आणि नगर ग्रंथालये | ४४ |
| | **एकूण** | **६०** |

**६) पंजाब –**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ११ |
| ३. | शहर ग्रंथालये | ६८ |
| ४. | गाव ग्रंथालय | ५०० |
| | **एकूण** | **५८०** |

**७) राज्यस्थान –**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ३३ |
| ३. | विभागीय ग्रंथालये | ०७ |
| ४. | तहसिल ग्रंथालये | ०९ |
| ५. | शाळा ग्रंथालय (शाळेच्या वेळेनंतर लोकाकरीता खुली असलेली ग्रंथालये | २२ |
| | **एकूण** | **२७८** |

८) उत्तराखंड –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
| --- | --- | --- |
| १. | सरकारी जिल्हा ग्रंथालये | ०९ |
| २. | सरकारी शाखा ग्रंथालये | १६ |
| ३. | सेवाभावी संस्था ग्रंथालय (शासनमान्यता प्राप्त) | ३२ |
| | **एकूण** | **४७** |

९) उत्तरप्रदेश –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
| --- | --- | --- |
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ७० |
| ३. | ग्रामीण ग्रंथालये | २० |
| ४. | सार्वजनिक ग्रंथालये म्हणून शिफारस केलेली महाविद्यालयीन ग्रंथालये | १५८१ ञ |
| ५. | सार्वजनिक ग्रंथालये (सेवाभावी संस्थेव्दारे चालविलेली) | ४०० |
| | **एकूण** | **२०७२** |

ड) पश्चिम विभाग

१) गोवा –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ०१ |
| ३. | तालुका ग्रंथालये | ०७ |
| ४. | नगरपालिका ग्रंथालये | १० |
| ५. | सरकारी ग्राम ग्रंथालये | ०५ |
| ६. | ग्राम ग्रंथालये | ०५ |
| ७. | पंचायत ग्रंथालये | ४८ |
| ८. | सेवाभावी संस्थांची ग्रंथालये | १०३ |
| | **एकूण** | **१८०** |

२) दमण –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | शहर ग्रंथालय | ०१ |
| २. | दिवे शहर ग्रंथालये | ०१ |
| | **एकूण** | **०२** |

**३) अ) गुजरात (सरकारी सार्वजनिक ग्रंथालये)**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०२ |
| २. | सरकारी जिल्हा ग्रंथालये | २६ |
| ३. | सरकारी तालुका ग्रंथालये | ८३ |
| ४. | सरकारी महिला ग्रंथालये | ०२ |
| ५. | सरकारी फिरते ग्रंथालये | ०८ |
| ६. | राज्य कला ग्रंथालये (अहमदाबाद) | ०१ |
| ७. | राज्य ग्रंथ/ जमा केंद्र (साठवणूक) | ०१ |
| ८. | ग्राम ग्रंथालये व सांस्कृतिक केंद्रे | १४२ |
| ९. | सुवर्ण जयंती नव तालूका ग्रंथालये | ३३ |
| | **एकूण** | **२९८** |

**ब) गुजरात (अनुदानित सार्वजनिक ग्रंथालये)**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | शहर ग्रंथालय | ५२ |
| २. | शहर शाखा ग्रंथालय | ८७ |
| ३. | नगर ग्रंथालये (वर्ग–१) | १०९ |
| ४. | नगर ग्रंथालये (वर्ग–२) | २६५ |
| ५. | महिला ग्रंथालये | ११३ |
| ६. | बाल ग्रंथालये | ९८ |
| ७. | अंधाकरितांची ग्रंथालये | ०९ |
| ८. | ग्राम ग्रंथालये | ३४४५ |
| | **एकूण** | **४१७८** |
| | **एकूण अ + ब = ४१७८ + २९८** | **४४७६** |

४) मध्यप्रदेश –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | विभागीय ग्रंथालये | ०५ |
| ३. | जिल्हा ग्रंथालये | ३८ |
| ४. | राज्य शिक्षण केंद्र ग्रंथालये (प्राथमिक शाळा– सार्वजनिक स्वरूपाचे खुले) | ७००० |
| ५. | राज्य शिक्षण केंद्र ग्रंथालये (माध्यमिक शाळा– सार्वजनिक स्वरूपाचे खुले) | २७००० |
| | **एकूण** | **९७०४४** |

५) महाराष्ट्र –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ३५ |
| ३. | सरकारी विभागीय ग्रंथालये | ०६ |
| ४. | संशोधन ग्रंथालये | ०१ |
| ५. | अनुदानित ग्रंथालय | ११९९८ |
| | **एकूण** | **१२०४१** |

६) छत्तिसगड –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय<br>(बांधकाम चालू आहे) | – |
| २. | जिल्हा ग्रंथालये (कार्यरत) | ०१ |
| ३. | जिल्हा ग्रंथालये<br>(माहितीकेंद्र बांधकाम प्रक्रिया सुरु असलेले) | ०१ |
| ४. | सांस्कृतिक विभाग ग्रंथालय | ०१ |
| ५. | सार्वजनिक उच्च माध्यमिक<br>शाळेची ग्रंथालये<br>(सार्वजनिक स्वरूपाचे खुले असलेले) | १६०८ |
| | **एकूण** | **१६११** |

ड) दक्षिण विभाग

१) आंध्रप्रदेश –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय<br>(विभागणी तेलगंण राज्य) | – |
| २. | जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालये | १३ |
| ३. | शाखा ग्रंथालये | ८८७ |
| ४. | ग्राम ग्रंथालये | २५२ |
| ५. | ग्रंथ जमावर्ती केंद्र<br>(जिल्हा ग्रंथलय संस्थांच्या अधिपत्याखाली) | १२३४ |
| | **एकूण** | **२३८६** |

## २) दादरा आणि नगर हवेली –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालय | ०१ |
| ३. | शहर ग्रंथालय | ०१ |
| | **एकूण** | **०३** |

## ३) कर्नाटक –

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | बाल ग्रंथालये आणि मध्यवर्ती ग्रंथालये | ०३ |
| ३. | शहर मध्यवर्ती ग्रंथालये | २६ |
| ४. | ग्राम पंचायत ग्रंथालये | ५७६६ |
| ५. | शाखा ग्रंथालये | ५९० |
| ६. | विमुक्त व भटक्या जमातीकरिता ग्रंथालये | १२७ |
| ७. | बालकांकरिता सामाजिक केंद्रे | ३१ |
| ८. | फिरती ग्रंथालय | १५ |
| ९. | वाचन कक्ष / अभ्यासिका | ७९ |
| | **एकूण** | **६६३८** |

**४) केरळ –**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालये | ०२ |
| ३. | शहर / नगर ग्रंथालये | ५२ |
| | **एकूण** | **५५** |

**५) तामिळनाडू –**

| अ. क्र. | ग्रंथालयाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालये | ३२ |
| ३. | शाखा ग्रंथालये | १९२५ |
| ४. | फिरते ग्रंथालय | १० |
| ५. | ग्राम ग्रंथालये | १८२१ |
| ६. | अर्धवेळ ग्रंथालये | ७४२ |
| | **एकूण** | **४५३१** |

**परिशिष्ट – ८**

## आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय चळवळीच्या पाऊलखूणा

१) न्या. जेम्स थॉमस व्दारा पुरस्कृत राजमेंहद्री सार्वजनिक ग्रंथालय(१८३९)

२) सार्वजनिक ग्रंथालय, गुंटूर (१८५०)

३) सार्वजनिक ग्रंथालय, सिकंदराबाद (१८७२)

४) सरस्वती सार्वजनिक ग्रंथालय, विशाखापट्टणम (१८८६)

५) सरस्वती विलास पोवरा ग्रंथालय, पूत्तिवेनडला (१८८९)

६) सि. व्हि. एन. वाचन कक्ष, औगोल (१८९०)

७) बोलाराम वाचन कक्ष आणि ग्रंथालय, सिकंदराबाद (१८९२)

८) नौरोजी ग्रंथालय, कुंडी (१८९४)

९) राजामुंद्रीय सार्वजनिक ग्रंथालय, नालामवरी कोल्टरी (१८९८)

१०) कृष्णा देवराया आंध्र भाषा निलायम, हैद्राबाद (१९०४)

११) मुंबई व्दारा आंध्र पत्रिका हस्तपत्र (१९०५)

१२) राममोहन मुक्त ग्रंथालय आणि वाचन कक्ष, विजयवाडा (१९११)

१३) बाला सरस्वती आंध्रप्रदेश निलायम, हैद्राबाद (१९२२)

१४) धर्मा ग्रंथालय (१८२४)

*** आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथ जत्रा (१९३४–१९५१)**

१) गोदावरी जिल्ह्यातील भिमराव तालुक्यातील ४६ गावे (१९३४)

२) पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील टाडेपेतिगडम तालुक्यातील ३८जुनी व १३ नवी ग्रंथालये (१९३५)

३) पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील टाडेपेतिगडम तालुक्यातील ४६ गावे (१९३५)

४) गुंटूर जिल्ह्यातील रिपॅली विभागातील ३४ ग्रंथालये व वाचन कक्ष (१९३६)

५) गोदावरी जिल्ह्यातील टाडेपेतिगडम तालुक्यातील १६ गावे (१९३७)

६) प. गो. जिल्ह्यातील भिमराव तालुक्यातील २४ गावे (१९३७)

७) कृष्णा जिल्ह्यातील ५ गावे (१९४०)

८) पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील ९ गावे (१९४०)

९) पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील १९ गावे (१९४१)

१०) कृष्णा जिल्ह्यातील कायकलूर तालुक्यातील १७ गावे, १९४७

११) गुंटूर जिल्ह्यातील ३० गावे (१९४८)

१२) आंध्र राज्यातील १० जिल्हे (१९५१)

१३) आंध्र राज्याबाहेरील आंध्र सांस्कृतिक संघ (१९५१)

*** परिषदा**

१) आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय प्रतिनिधींची पहिली परिषद, बेझवाडा (१९१४)

२) आंध्रप्रदेश राज्यातील दुसरी ग्रंथालय परिषद, राजामहेंद्रवर (१९१५)

३) आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय संघाचे शेतकी व औद्योगीक प्रदर्शन, बडोदा (१९१६)

४) तिसरी ग्रंथालय परिषद, नेलोर (१९१६)

५) गोदावरी जिल्हा परिषद, अमलापुरम (१९१७)

६) चौथी ग्रंथालय प्रतिनिधी समा, ओरिसा राज्य (१९१७)

७) पाचवी ग्रंथालय परिषद, विभाग (१९१८)

८) पाचवी ग्रंथालय परिषद, मद्रास (१९१९)

९) सातवी ग्रंथालय परिषद, कारनूल जिल्हा (१९२०)

१०) आठवी ग्रंथालय परिषद, गुंटूर (१९२३)

११) तिसरी भारत देशातील ग्रंथालयाची ग्रंथालय परिषद, बेळगाव (१९२४)

१२) आठवी आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय परिषद, कृष्णा (१९२५)

१३) पहिली निझाम राज्य ग्रंथालय परिषद, खम्माम (१९२५)

१४) दहावी आणि अकरावी आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय परिषद, पेडाचूरीकेरू आणि ईलूरा (१९२६)

१५) बारावी ग्रंथालय परिषद, अनंतपूर (१९२७)

१६) तेरावी ग्रंथालय परिषद, गूंटूर (१९२८)

१७) सहावी भारतीय ग्रंथालय परिषद, लाहोर (१९२९)

१८) निझाम सरकारची ग्रंथालय परिषद आणि सभा, हैद्राबाद (१९३०)

१९) चौदावी आंध्र राज्यातील ग्रंथालय परिषद गुंटूर (१९३१)

२०) पंधरावी आणि सोळावी ग्रंथालय परिषद विजयवाडा (१९३३)

२१) सतरावी आणि अठरावी ग्रंथालय परिषद, कोकानडा (१९३४)

२२) एकोणिसावी ग्रंथालय परिषद, मद्रास (१९३४)

२३) दुसरी आंध्रप्रदेश ग्रंथालय कामगार परिषद विशाखापट्टणम (१९३६)

२४) २१ वी आंध्र राज्य ग्रंथालय परिषद, विजयवाडा (१९३७)

२५) ९ वी कृष्णा जिल्ह्यातील ग्रंथालय परिषद गुढीवाडा (१९३९)

२६) २ री बापटाला तालूका ग्रंथालय परिषद, निडूब्रोलू (१९३९)

२७) ३ री आंध्र राज्यातील ग्रंथालय कामगाराची परिषद, संबारम (१९४१)

२८) २२ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय परिषद, राजामुद्री (१९४१)

२९) आंध्रराज्यातील उच्च शिक्षण परिषद, तेनाली (१९४१)

३०) २३ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय परिषद, गुंटूर (१९४२)

३१) २४ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय परिषद, हिंदापूर (१९४२)

३२) चौथी आंध्र राज्यातील ग्रंथालय कामगार परिषद गुंटूर (१९४२)

३३) ६ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय कामगार परिषद गोदावरी (१९४६)

३४) पहिली दक्षिण भारतातील ग्रंथपालाची परिषद, मद्रास (१९४७)

३५) ७ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय कामगार परिषद इंलूरू (१९४७)

३६) २७ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय परिषद सूर्चापाट (१९५०)

३७) ८ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय कामगार परिषद विजयवाडा (१९५०)

३८) २८ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय परिषद जनागामा (१९५३)

३९) १० वी भारतीय ग्रंथालय परिषद, हैद्राबाद (१९५३)

४०) पहिली हैद्राबाद शहर ग्रंथालय परिषद, हैद्राबाद (१९५४)

४१) दुसरी हैद्राबाद शहर ग्रंथालय परिषद, हैद्राबाद (१९५५)

४२) १० वी भारतीय ग्रंथालय परिषद, हैद्राबाद (१९५५)

४३) ९ वी आंध्र राज्यातील ग्रंथालय कामगार परिषद पमारु (१९५६)

४४) १० वी आंध्र राज्यातील ग्रंथालय कामगार परिषद गुडीवाडा(१९५७)

४५) ३० वी आंध्र राज्यातील ग्रंथालय परिषद, कमाम (१९५७)

४६) आंध्रप्रदेश राज्यातील आयोजित मांडणी आणि प्रशासन वर आयोजित चर्चासत्रे हैद्राबाद (१९६२)

४७) ३१ वी आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय परिषद, विजयवाडा (१९६६)

४८) २ री आंध्रप्रदेश कॉलेज ग्रंथपाल परिषद विजयवाडा (१९६६)

४९) चौथे IASLIC चर्चासत्र हैद्राबाद (१९६६)

५०) १८ वी सार्वजनिक ग्रंथालयाची भारतीय ग्रंथालय परिषद, तिरुपती (१९६९)

५१) ३३ वी आंध्रप्रदेश राज्यातील ग्रंथालय परिषद, तिरुपती (१९६९)

५२) गुंटूर जिल्ह्यातील ग्रंथालयाची परिषद, गुंटूर (१९७१)

५३) आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय परिषद (१९७२)

५४) २० वी भारतीय ग्रंथालय परिषद, हैद्राबाद (१९७३)

५५) दुसरी आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय परिषद , हैद्राबाद (१९७४)

५६) पश्चिम गोदावरी जिल्हा ग्रंथालय परिषद, नारासन्नापलेम (१९७६)

५७) दुसरी INDAAL परिषद, तिरुपती (१९७९)

५८) दुसरी आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय परिषद, नारासरोपेट (१९८०)

५९) ३४ वी आंध्रप्रदेश राज्य ग्रंथालय परिषद, वारागल (१९८१)

६०) २६ वी भारतीय ग्रंथालय परिषद, हैद्राबाद (१९८१)

६१) १४ वी IASLIC परिषद विशाखापट्टणम (१९८१)

६२) ३री आंध्रप्रदेश राज्य ग्रंथालय परिषद, तिरुपती (१९८२)

६३) ११ वी  आंध्रप्रदेश परिषद, हैद्राबाद (१९८४)

६४) राष्ट्रीय परिषद 'मायक्रोकॉर्म्स आणि स्पेस मॅनेजमेंट', तिरुपती (१९८४)

६५) राष्ट्रीय परिषद 'रुलर डॉक्यूमेन्टेशन, हैद्राबाद (१९८४)

६६) आंध्रप्रदेश ग्रंथालय संघ पुरस्कृत 'इंटिग्रेटेड रुलर डेव्हलपमेंट' हैद्राबाद (१९८४)

६७) ALSIC पुरस्कृत 'नॅशनल पॉलीसी ऑन युनिव्हर्सिटी लायब्ररी' परिषद, हैद्राबाद (१९८६)

६८) चौथी आंध्रप्रदेश ग्रंथालय परिषद, हैद्राबाद (१९८६)

६९) 'Information Retrival System models & Evaluation Methods' परिषद उस्मानीय विद्यापीठ (१९८७)

७०) 'Collective Mobilization of Library resource' परिषद, तेलगू युनिव्हर्सिटी (१९८७)

७१) 'Audio Visual and Material in Library Science Teaching'  परिषद आंध्रप्रदेश युनिव्हर्सिटी (१९८७)

७२) ३२ वी भारतीय ग्रंथालय परिषद, अनंतपूर (१९८७)

७३) २६ वी खअड्डखउ परिषद तिरुपती (१९८७)

७४) आंतरराष्ट्रीय Tools for knowledge organisation & human interface' परिषद दरमस्तड (१९९०)

७५) Certificate course in library science & library service in ruler area परिषद (१९९१)

७६) Impact of S. R. Ranganathan on growth परिषद ओसमिनिया युनिव्हर्सिटी (१९९२)

७७) S. K. युनिव्हर्सिटी पुरस्कृत Ranganathan work & their impact on the growth of LIS education & Library movement in India अनंतपुर (१९९२)

७८) आंध्रप्रदेश सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कृत National Policy for public library system (१९९२)

७९) ३६ वी आंध्रप्रदेश ग्रंथालय परिषद, विजयवाडा ११ व १२ जानेवारी १९९२ रोजी आयोजित करण्यातआली होती. या परिषदेमध्ये सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली संदर्भातील समस्या.

८०) १९९४ १) तेनाली शाखा ग्रंथालयाची स्थापना

२) राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचा शतकमहोत्सवी कार्यक्रम संपन्न

८१) १९९५ १) राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, जिल्हा मध्यवर्ती ग्रंथालय हैद्राबाद यांच्या संयूक्त विद्यमाने आंध्रप्रदेशमधील सार्वजनिक ग्रंथालयाचे भवितव्य या विषयावर चर्चासत्राचे आयोजन

२) डॉ. पी. एस. जी. कुमार यांच्या अध्यक्षतेखाली ३७ व्या ग्रंथालय परिषदेचे अनंतपूर येथे आयोजन

८२) ४१ व्या अखिल भारतीय परिषदेचे विजयवाडा येथे आयोजन (१९९६)

८३) ४४ व्या अखिल भारतीय परिषदेचे हैद्राबाद येथे २५ ते २८ फेब्रूवारी रोजी आयोजन (१९९९)

८४) पत्तूरीनागभूषण महिला व बाल ग्रंथालय स्थापना विजयवाडा येथे करण्यात आली. (२०००)

८५) घसरत चाललेल्या आंध्रप्रदेश जिल्हा ग्रंथालय संस्था, सेवक संघटनेव्दारे सार्वजनिक ग्रंथालयाच्या दर्जाविषयक शासनाचे दुर्लक्ष याच्या विरोधात राज्यव्यापी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले. (२००१)

८६) मध्यवर्ती ग्रंथालय हैद्राबादव्दारे भारतातील सार्वजनिक ग्रंथालयाचा विकास या अनुषंगाने २८ फेब्रुवारीते २ मार्च या काळात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. (२००५)

परिशिष्ट - ९

## आसाममधील सार्वजनिक ग्रंथालयाची आकडेवारी २००६-०७

| अ. क्र. | सार्वजनिक ग्रंथालयांची नावे | पुस्तक संख्या | वाचक संख्या दररोज | सभासद संख्या ३१.७.०७ पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १. | संदर्भ विभाग ग्रंथालय सेवांची सुची, आसाम | ९३००० | २५ | - |
| २. | दिसपूर शाखा ग्रंथालय, दिसपूर -गूहाटी | ४१२७० | १५ | ३१४६ |
| ३. | विष्णू निर्मला बाल ग्रंथालय, | १०१५२ | ३८ | २६०० |
| ४. | नाबीन उह.बोर्डली, गूहाटी | ११०७६ | ६० | - |
| ५. | जिल्हा ग्रंथालय, गूहाटी | १४४७४३ | १६५ | ३३७६ |
| ६. | जिल्हा ग्रंथालय, गूहाटी | ८४१५६ | ६३ | ११०७२ |
| ७. | जिल्हा ग्रंथालय, करिमगानी | ३३२६६ | ४६ | २५९३ |
| ८. | जिल्हा ग्रंथालय, गोलपारा | ४७१२७ | ३९ | ३३९ |
| ९. | जिल्हा ग्रंथालय, सिबसागर | ६९९९४ | ६८ | ७३०० |
| १०. | जिल्हा ग्रंथालय, कोक्राजहर | ५००७३ | ३६ | ४२५९ |
| ११. | जिल्हा ग्रंथालय, गोलाघाट | ४८६९० | ७० | ५०७५ |
| १२. | जिल्हा ग्रंथालय, डिपू | ६१०२० | २७ | ४०९९ |
| १३. | जिल्हा ग्रंथालय, हाफलाँग | ५०८२७ | १११ | २९०८० |
| १४. | जिल्हा ग्रंथालय, सिलकर | ५९२२८ | १७ | ७७८७ |
| १५. | जिल्हा ग्रंथालय, उतरलाखिपूर | ८०४८८ | ५८१ | ९८७२ |
| १६. | जिल्हा ग्रंथालय, मोनागोलडाई | ५३२९३ | ७६ | ८७६४ |
| १७. | जिल्हा ग्रंथालय, नालबराई | ४८१४५ | ७३ | ४६६४ |
| १८. | जिल्हा ग्रंथालय, जोरहत | १११७०४ | १७५ | १६९७९ |
| १९. | जिल्हा ग्रंथालय, तेजपूर | १०८५३९ | ३० | १२७८१ |
| २०. | जिल्हा ग्रंथालय, नागोन | ९४१५८ | ६८ | १३९०३ |

| अ. क्र. | सार्वजनिक ग्रंथालयांची नावे | पुस्तक संख्या | वाचक संख्या दररोज | सभासद संख्या ३१.७.०७ पर्यंत |
|---|---|---|---|---|
| २१. | जिल्हा ग्रंथालय, थूबरी | ६३७५२ | २७ | ७१७१ |
| २२. | जिल्हा ग्रंथालय, बोरपेटा | ४२९८० | ४० | ५८६० |
| २३. | जिल्हा ग्रंथालय, मोरीगांव | ३८२१७ | ५२ | ४००४ |
| २४. | जिल्हा ग्रंथालय, धेमाजी | ४५५५७ | १० | ३२२४ |
| २५. | जिल्हा ग्रंथालय, तिनसुकीया | ३१७२८ | २३ | ३६७७ |
| २६. | जिल्हा ग्रंथालय, हेलालकांडी | २८४०४ | ८६ | २१४१ |
| | उपविभागीय ग्रंथालय | | | |
| २७. | जिल्हा ग्रंथालय, प्रगीयोथिसपूर | ७६३३ | २८ | ३६४ |
| २८. | जिल्हा ग्रंथालय, रंगिया | १६००६ | ३० | १९०६ |
| २९. | जिल्हा ग्रंथालय, होजाई | ९९३८ | ३८ | ९०५ |
| ३०. | जिल्हा ग्रंथालय, उडलगोरी | ९४९९ | १८ | ८२६ |
| ३१. | जिल्हा ग्रंथालय, बिसवंथ चारलाई | १७१७५ | १५० | २०१९ |
| ३२. | जिल्हा ग्रंथालय, जोनाई | २१०९२ | २३ | १३५१ |
| ३३. | जिल्हा ग्रंथालय, मजूली | १५२२५ | ४२ | ९८७ |
| ३४. | जिल्हा ग्रंथालय, सारुपाथर | ६८९० | ७० | ८३२ |
| ३५. | जिल्हा ग्रंथालय, सोडीया | ११७०४ | २१ | १२५७ |
| ३६. | जिल्हा ग्रंथालय, हमरेन | १७७२३ | १४ | ९१५ |
| ३७. | जिल्हा ग्रंथालय, दक्षिण सलमोरा | ९७९६ | ३१ | ४५६ |
| ३८. | जिल्हा ग्रंथालय, उतर सलमोरा | ६५४१ | ३० | ९८० |
| ३९. | जिल्हा ग्रंथालय, चाराईदेवो | ९१३७ | ८ | ११०८ |
| ४०. | जिल्हा ग्रंथालय, गोसाईगाव | ७५७५ | २० | ५९७ |

*स्त्रोत – ग्रंथालय सेवा सुची आसाम*

## परिशिष्ट १०

## महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्यग्रंथालय संचलनालय :

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालयाचे अधिनियम १९६७ मध्ये संमत झाला. या अधिनियमाच्या अंमलबजावणीकरीता ग्रंथालय संचालनालय या स्वतंत्र विभागाची २ मे १९६८ पासून स्थापना करण्यात आली आहे. या अधिनियमामधील तरतुदीनुसार सार्वजनिक ग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालय पद्धतीची स्थापना, नियोजन, परिक्षण, संघटन आणि विकास यांची जबाबदारी ग्रंथालय संचालनालयावर आहे. राज्य शासनाची देखरेख, निर्देशन आणि नियंत्रण यास अधिन राहून सदर अधिनियमांची अंमलबजावणी करण्यासाठी 'ग्रंथालय संचालक' यांना विभाग प्रमुख म्हणून नेमण्यात आले आहे. आज रोजी ग्रंथालय संचालनालयांतर्गत राज्यात एकूण ५० कार्यालये आहेत. त्यांची संरचना पुढील प्रमाणे आहे.

या तपशिलावरुन महाराष्ट्र राज्यातील शासकीय ग्रंथालयांची व कर्मचारी वर्ग व कार्यालये यांची आकडेवारी लक्षात येते. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या समाधानकारक असल्याचे निदर्शनास येते.

| **ग्रंथालय संचलनालयांतर्गत कार्यालये** | **संख्या** |
|---|---|
| संचालनालयाचे मुख्यालय | ०१ |
| राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| शासकीय विभागीय ग्रंथालये<br>(प्रत्येक महसूली विभागासाठी एक याप्रमाणे) | ०६ |
| विशेष संदर्भ ग्रंथालय, दापोली | ०१ |
| शासकीय जिल्हा ग्रंथालये<br>(२०१०–११ मध्ये जळगाव, औरंगाबाद,<br>अमरावती, परभणी व उस्मानाबाद येथेही स्थापन) | ३५ |
| विभागीय सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालये<br>(महसूल विभागनिहाय) | ०६ |
| आज रोजी एकूण | ५० |
| या सर्व कार्यालयांमधील एकुण कर्मचारी संख्या | ४८१ |

**सार्वजनिक ग्रंथालये विकास योजना :**

ग्रंथालय संचालनालयातर्फे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७ अंतर्गत महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधन सामग्री यासाठी मान्यता) नियम १९७० मधील व अन्य अनुषंगीक नियमांमधील तरतुदीच्या अधीन राहून संचालनालयाची जबाबदारी व कर्तव्य अशी,

१. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयासंबंधीचे नियोजन, व्यवस्थापन व विकास करणे.

२. राज्य ग्रंथालय निधीतून सार्वजनिक ग्रंथालयांना सहाय्यक परिरक्षण, इमारत व विशेष तद्‌यर्थ अनुदान देणे.

३. केंद्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य खात्यांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या विविध योजनांद्वारे राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना अर्थसहाय्य पुरविणे.

४. ग्रंथालय चळवळीच्या प्रोत्साहनार्थ उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना, कार्यकर्ते व सेवक यांना पुरस्कार प्रदान करणे.

५. राज्यात प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांची वर्गीकृत वार्षिक सूची तयार करणे.

६. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयापासून विभागीय, जिल्हा, तालुका व ग्राम पातळीपर्यंत ग्रंथालयांचे व ग्रंथालय सेवांचे जाळे निर्माण करणे.

७. राज्यातील दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखीत संग्रह जतन करणे.

८. राज्यामधील शासकीय व मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासास उत्तेजन देणे व सुजाण व सक्षम नागरिक घडविण्यासाठी अंतिमत: त्याद्वारे राष्ट्र घडणीच्या कार्यासाठी प्रयत्न करणे.

**नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यतेसाठीचे निकष :**

महाराष्ट्र राज्यातील मुंबई विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अथवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांना शासन मान्यता देणे. त्यांचे संवर्धन, विकास, यासाठी सहाय्य करणे हा महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमांचा उद्देश आहे. 'सार्वजनिक ग्रंथालय' हे शासनाने स्वत: स्थापन करावे अथवा जनतेने

पुढाकार घेऊन स्थापन केल्यास त्यास विहीत नियमांनुसार अर्थसहाय्य देईल असे अपेक्षित आहे. लोकांनी एकत्र येऊन सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करावे यासाठी,

१. मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये ग्रंथालयांची नोंदणी करावी.
२. ग्रामपंचायत, नगरपरिषद किंवा महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थानाही सार्वजनिक ग्रंथालसे स्थापन करता येतात. त्यांना वेगळ्या नोंदणीची आवश्यकता नाही.
३. कमीत कमी ३०१ पुस्तके ज्यांची किंमत २५ हजारच्या वर असेल त्यामधील २० टक्क्यापर्यंत बालवाङ्मयाची पुस्तके असतील.
४. ६ नियतकालिके ४ दैनिके सुरू असतील.
५. २६ वर्गणीदार सभासद व ग्रंथालय सर्वांसाठी धर्म, वंश, जात, स्त्री – पुरूष इत्यादी कोणताही भेदभाव न ठेवता खुले असणे आवश्यक आहे.
६. दररोज किमान ३ तास सेवा द्यायला हवी.
७. ग्रंथालयांची जागा पुरेशी, स्वतंत्र स्वरूपाची, आरोग्यमय, चांगल्या उजेडाची आणि हवेशीर असावी.
८. वरील प्रमाणे पुर्तता केल्यानंतर सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करणाऱ्या व्यवस्थापनाला संबंधित विभागगाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालक यांच्या कार्यालयाकडे विहीत प्रपत्रामध्ये विहीत मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह माहिती पाठवून शासनमान्यता व अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करता येतो.

**सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यतेसाठीची प्रक्रिया :**

१. ग्रंथालयाने सादर केलेल्या प्रस्तावाची विभागीय सहाय्यक ग्रंथालय संचालकांच्या कार्यालयातील ग्रंथालय निरीक्षकाद्वारे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येते.
२. प्रस्ताव विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालकामार्फत ग्रंथालय संचालक, मुंबई यांच्याकडे आदेशार्थ पाठविण्यात येतो.

३. शासनमान्यता दिल्यानंतर प्रत्येक वर्षी ग्रंथालयाने मागील वर्षी केलेल्या खर्चावर आधारित परिक्षण अनुदान ग्रंथालयांच्या 'अ', 'ब', 'क' व 'ड' या वर्गवारीनुसार मागील वर्षाच्या खर्चाच्या ९० टक्के वा त्या ग्रंथालयाच्या वर्गास अनुज्ञेय कमाल अनुदान मर्यादेइतके देण्यात येते.

४. परिक्षण अनुदान साधारणपणे दोन हप्त्यामध्ये देण्यात येते.

५. शासनमान्यताप्राप्त ग्रंथालयाने प्रत्येक वर्षी ३० जूनच्या आत सादर केलेल्या वार्षिक अहवालाच्या प्राप्तीनंतर ऑगस्टमध्ये अनुदानाचा पहिला हप्ता देण्यात येतो.

६. ग्रंथालयाच्या तपासणीनंतर व सनदी लेखापालाच्या लेखापरीक्षण अहवाल ३१ ऑक्टोबर पर्यंत प्राप्त झाल्यानंतर फेब्रुवारी मार्चमध्ये अनुदानाचा दुसरा व एकत्रित हप्ता देण्यात येतो.

७. एखाद्या ठिकाणची ग्रंथालय सेवेची गरज लोकसंख्येच्या आधारावर विद्यमान नियमांनुसार खालील प्रमाणे ठरविण्यात येते.

   १. ५०० ते १०,००० लोकसंख्येसाठी १ ग्रंथालय,

   २. १०,००१ ते २५,००० लोकसंख्येसाठी २ ग्रंथालये,

   ३. २५,००१ ते ५०,००० लोकसंख्येसाठी ३ ग्रंथालये,

   ४. ५०,००१ ते १,००,००० लोकसंख्येसाठी ४ ग्रंथालये

## शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानाचे दर (१० मार्च २००५ च्या शासननिर्णयानुसार)

**परिरक्षण अनुदान :**

प्रत्येक वर्षी खालील रकान्यात नमूद केल्याप्रमाणे ग्रंथालयाने मागील आर्थिक वर्षात केलेल्या अनुज्ञेय बाबींवरील खर्चाच्या ९० टक्के अथवा त्या ग्रंथालयांच्या वर्गासाठी असणाऱ्या कमाल अनुदान मर्यादेच्या अधिन राहून देण्यात येते. वार्षिक अनुदान मंजूर करून वितरीत करण्याचे अधिकार संबंधित विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालकांना प्रदान करण्यात आले आहेत.

### ग्रंथालयांना मिळणारे अनुदान

| ग्रंथालयांचा वर्ग | अनुदानाचा सुधारीत दर |
|---|---|
| जिल्हा 'अ' | ४,८०,००० |
| तालुका 'अ' | २,५६,००० |
| इतर 'अ' | १,९२,००० |
| जिल्हा 'ब' | २,५६,००० |
| तालुका 'ब' | १,९२,००० |
| इतर 'ब' | १,२८,००० |
| तालुका 'क' | ९६,००० |
| इतर 'क' | ६४,००० |
| ड वर्ग | २०,००० |

**शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांसाठी अनुदानाच्या अन्य योजना :**

**साधनसामुग्री अनुदान :**

शासनमान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना नवीन फर्निचर जसे कपाटे, रॅक्स, टेबल, खुर्च्या इ. खरेदी करणे, विद्यमान फर्निचर बदलून दुसरे घेणे, ग्रंथालय उपयोगी आवश्यक ती साधनसामुग्री खरेदी करणे, दुर्मिळ पुस्तके, नियमकालिके यांचा संग्रह करून जतन करणे यासाठी साधनसामुग्री अनुदान ग्रंथालय व शासन ५०:५० प्रमाणे देण्यात येते. ग्रंथालयाची किमान गरज आणि विकास लक्षात घेऊन सार केलेल्या प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ५० टक्के व त्या ग्रंथालयांच्या कमाल परिरक्षण अनुदानाच्या मर्यादेइतके साधनसामग्री अनुदान दिले जाते.

**इमारत अनुदान :**

मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांच्या इमारत बांधकामासाठी, दुरूस्तीसाठी किंवा विस्तारासाठी किंवा नवीन इमारत खरेदी करण्यासाठी इमारत अनुदान देण्यात येते. कमाल मर्यादेच्या अधीन राहून खालील दराने इमारत अनुदान देण्यात येते. सामान्यत: प्रगती

पाहून दोन हप्त्यांमध्ये इमारत अनुदान देण्यात येते. एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या असलेल्या ठिकाणी ग्रंथालय असेल तर देय अनुदानाची कमाल रक्कम संचालकांकडून निश्चित करण्यात येते.

**इमारत अनुदान**

| ग्रंथालयाचा वर्ग | अनुदानाचा दर | अनुदानाची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| 'अ' | जमीनीची किंमत धरून एकूण प्रकल्पाच्या खर्चाच्या ५० टक्के | रू. ७५,००० |
| 'ब' | २०,००० पेक्षा अधिक लोकसंख्येच्या ठिकाणी जमिनीची किंमत धरून एकूण प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के ५००० पेक्षा कमी लोकसंख्येच्या ठिकाणी जमिनीची किंमत धरून एकूण प्रकल्प खर्चाच्या ६५ टक्के | रू. ४८,००० |
| 'क' | अनुदानाचा दर वरील 'ब' प्रमाणे | रू. २४,००० |

**प्रोत्साहक अनुदान :**

**अतिरीक्त वर्गणीदार सभासदांवर प्रोत्साहक अनुदान :**

परिक्षण अनुदानाशिवाय वरच्या वर्गासाठी आवश्यक असलेल्या अतिरीक्त सभासदांच्या नाव नोंदणीसाठी प्रत्येक सभासदामागे ६ रूपये प्रोत्साहक अनुदान देण्यात येते.

**अतिरीक्त ग्रंथखरेदीवर प्रोत्साहक अनुदान :**

मान्यता प्राप्त ग्रंथालयाने सरकारमान्य यादीतून वर्गबदलासाठी आवश्यक ग्रंथखरेदीच्या रक्कमेपेक्षा केलेल्या अतिरीक्त ग्रंथ खरेदीसाठी खालील दराने ग्रंथखरेदी प्रोत्साहक अनुदान मिळू शकते. ही दोन्ही प्रोत्साहक अनुदाने त्या ग्रंथालयाचा वर्गबदल होईपर्यंत मिळू शकतात.

## सार्वजनिक ग्रंथालयांना मिळणारी प्रोत्साहक अनुदाने

| ग्रंथालयाचा वर्ग | अनुदानाचा दर |
|---|---|
| ब | जादा खरेदी केलेल्या पुस्तकांच्या खर्चाच्या २५ % परंतू १५,०००/– किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले सार्वजनिक ग्रंथालय. पुस्तके घेण्यास पात्र असणार नाही. |
| क | जादा खरेदी केलेल्या पुस्तकांच्या खर्चाच्या ५०% परंतू ५,०००/– किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले सार्वजनिक ग्रंथालय पुस्तक खरेदी करण्यासाठी असलेले प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही. |
| ड | जादा खरेदी केलेल्या पुस्तकांच्या खर्चाच्या ७५% परंतू १,०००/– किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले सार्वजनिक ग्रंथालय पूस्तक खरेदी करण्यासाठी असलेले प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही. |

**प्रोत्साहक अनुदाने :**

परिक्षण अनुदानखेरीज मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना खालील प्रयोजनांसाठी प्रोत्साहन अनुदाने मंजूर होऊ शकतील.

अ) अतिरीक्त सभासदांच्या नांव नोंदणीसाठी प्रोत्साहक अनुदान ग्रंथालयाच्या वर्गीकरणासाठी ज्या अटी आहेत. त्यामध्ये अ, ब, क व ड वर्ग ग्रंथालयांच्या आवश्यक सभासद संख्यापेक्षा ग्रंथालयाने अतिरिक्त सभासदांच्या नावे नोंदणीसाठी रु. ६ किंवा वार्षिक वर्गणी रु. ६ पेक्षा कमी असेल तर त्या वर्गणीइतके प्रोत्साहक अनुदान नियम २२ (अ) च्या अटीस अधीन राहून ग्रंथालयाला मिळू शकेल.

ब) पुस्तकांच्या खरेदीसाठी प्रोत्साहक अनुदान मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाने ग्रंथालयांना मिळणाऱ्या ग्रंथालयांच्या २५ % रकमेची ग्रंथ खरेदी प्रतीवर्षी करणे आवश्यक आहे.

ही ग्रंथ खरेदी त्या वर्षामध्ये संचालकांकडून होणे अपेक्षित आहे. याशिवाय ग्रंथालयाने अतिरीक्त ग्रंथखरेदी केल्यास खालील उल्लेख केलेल्या दराने अतिरिक्त अनुदान नियम २२ (ब) च्या अधिन राहून ग्रंथालयास प्राप्त होऊ शकतो.

**विशेष महोत्सवी वर्ष अनुदान :**

शासमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या रजत, सुवर्ण, शताब्दी यासारख्या विशेष महोत्सवांसाठी, एखादा विशेष विभाग उघडण्यासाठी, एखाद्या लेखकाच्या शताब्दी महोत्सवाच्या विशेष प्रसंगी पुस्तके खरेदी करण्यासाठी राज्य ग्रंथालय परिषदेच्या शिफारशीनुसार १०,००० रूपयापर्यंत विशेष अनुदान मिळू शकते. तसेच सेवेची १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या ग्रंथालयांना त्यांच्या सेवा कार्याच्या विकासासाठी प्रत्येकी रु. ५ लाख शासनातर्फे दिले जातात. आजपर्यंत अशा ८३ शासनाच्या सार्वजनिक ग्रंथालयांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

**तद्यर्थ अनुदान :**

शासन मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना प्रतिवर्षी मागिल वर्षाच्या अनुदेय खर्चाच्या ७५ % व ग्रंथालयांच्या दर्जा/ वर्ग मर्यादेनुसार परिक्षण अनुदान दिले जाते. मान्यतेच्या प्रथम वर्षासाठी मागील वर्षाचा खर्च विचारात न घेता किमान रुपये ५००/– इतर क वर्गास रुपये १६,०००/– इतर ब वर्गास रु. ३२,०००/– व इतर अ वर्गास रुपये ४८,००० कमाल तद्यर्थ अनुदान मंजूर होऊ शकते.

**विशेष प्रयोजनासाठी अनुदान :**

राज्य ग्रंथालय परिषदेने शिफारस केल्यानंतर एखाद्या मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयास १०,०००/– रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेचे विशेष अनुदान खाली प्रयोजनांसाठी प्राप्त होऊ शकते.

१) संचालकांच्या मते जो महान असेल अशा एखाद्या लेखकाच्या शताब्दी महोत्सवाच्या विशेष प्रसंगी पुस्तक खरेदी करण्यासाठी

२) मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाने अनेक वर्षी स्मरणार्थ केलेल्या रजत, सुवर्ण किंवा शताब्दी इ. सारखे महोत्सव समारंभ आयोजित करण्यासाठी

३) मान्यताप्राप्त ग्रंथालयांमध्ये संचालकांच्या मते महान असलेल्या किंवा असामान्य गुणवत्ता असलेल्या ग्रंथकारांच्या किंवा व्यक्तींच्या स्मृतीप्रित्यर्थ एखादा विशेष विभाग उघडण्यासाठी

**उत्कृष्ट ग्रंथालय, कार्यकर्ता व सेवक यांना पुरस्कार योजना :**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार :**

१९८४ – ८५ पासून अ, ब, क व ड वर्गामधील प्रत्येकी एका ग्रंथालयास याप्रमाणे एकूण चार ग्रंथालयांना पुरस्कार देण्याची नाविण्यपूर्ण योजना सुरू करण्यात आली असून १९८६ –८७ पासून या योजनेचा विस्तार करून शहरी व ग्रामीण अशा दोन विभागातून एकूण आठ ग्रंथालयांना त्यांच्या कार्याच्या उत्तेजनार्थ हे पुरस्कार शासन नियुक्त समितीने शिफारस केल्याप्रमाणे समारंभपूर्वक दिले जातात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार**

| ग्रंथालयाचा वर्ग | ग्रंथालयाचा वर्ग | शेरा |
|---|---|---|
| अ | रू. ५०,००० /– | ग्रामीण व शहरी स्वतंत्ररित्या (प्रत्येकी एक) |
| ब | रू. ३०,००० /– | ग्रामीण व शहरी स्वतंत्ररित्या (प्रत्येकी एक) |
| क | रू. २०,००० /– | ग्रामीण व शहरी स्वतंत्ररित्या (प्रत्येकी एक) |
| ड | रू. १०,००० /– | ग्रामीण व शहरी स्वतंत्ररित्या (प्रत्येकी एक) |

**डॉ. एस.आर. रंगनाथन् ग्रंथमित्र पुरस्कार :**

ही योजना १९९४–९५ पासून सुरू झाली आहे. राज्यातील विभाग ग्रंथालय संघ व सहाय्यक ग्रंथालय संचालक यांच्याकडून शिफासर झालेल्या व्यक्तीपैकी उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक असे दोन पुरस्कार शासन नियुक्त समितीने निवड केलेल्या व्यक्तींना प्रत्येकी रू. ५,००० व सन्मानचिन्हान व मानपत्राने गौरविले जात होते. परंतु सन २००२–०३ पासून राज्यस्तरावर दोन व प्रत्येक विभागातून एकेक कार्यकर्ता व सेवक असे १२ एकूण १४ पुरस्कार देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. पुरस्कार

रक्कमेतही शासनाने भरीव वाढ केलेली आहे. राज्यस्तरावरील पुरस्कार प्रत्येकी रू. २५,०००/– व विभागस्तरावरील पुरस्कार प्रत्येकी रू. १५,००० सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात येते.

**संशोधन साहित्य संस्थांच्या ग्रंथालयांसाठी अनुदानाची योजना :**

मान्यताप्राप्त संशोधन व साहित्य संस्थांच्या ग्रंथालयांना वार्षिक परिक्षण अनुदान मागील वर्षी ग्रंथालयांवर केलेल्या अनुज्ञेय खर्चाच्या ७५ टक्के व कमाल १५,००० रूपये मर्यादेच्या अधीन राहून देण्यात येते. राज्यामध्ये अशा सुमारे ३५ संशोधन संस्था कार्यरत आहेत.

**ग्रंथालय संघांना अनुदान देण्याची योजना :**

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमान्वये जिल्हा ग्रंथालय संघ, विभागीय स्तरावरील विभाग ग्रंथालय संघ व राज्य स्तरावरील राज्य ग्रंथालय संघ यांना शासनमान्यता व अनुदान देण्यात येते. शासनमान्य ग्रंथालय संघांना राज्य ग्रंथालय परिषद, जिल्हा ग्रंथालय समित्यांवर प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. मान्यताप्राप्त ग्रंथालस संघांना खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते.

**ग्रंथालय संघांना अनुदान देण्याची योजना**

| संघाचा स्तर | सुधारीत एकत्रित अनुदान |
|---|---|
| राज्य ग्रंथालय संघ | रू. १,५०,०००/– |
| विभाग ग्रंथालय संघ | रू. ५०,०००/– |
| जिल्हा ग्रंथालय संघ | रू. २५,०००/– |

सार्वजनिक ग्रंथालये व ग्रंथालय संघ यांच्यासाठी असलेल्या सर्व योजनांसाठी इच्छुक ग्रंथालयांनी ग्रंथालय संघांनी विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालकांकडे संपर्क साधावयाचा असतो. अंतिम निर्णय संचालकांना घ्यावा लागतो.

**राजाराम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांचा विविध अर्थसहाय्य अनुदान योजना–**

देशातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांद्वारे सहाय्य करणारे केंद्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेले राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान हे स्वायत्त प्रतिष्ठान आहे. कोलकत्ता येथून १९७२ पासून ते कार्यरत आहे.

**समाननिधी योजना :**

केंद्र व राज्य शासनाच्या ५० : ५० संयुक्त अंशदानामधून राबविण्यात येणाऱ्या योजना खालील प्रमाणे आहेत. हा संयुक्त निधी सध्या ३ कोटींचा आहे. त्यामधून दरवर्षी ग्रंथालयांना खालील योजनांच्या माध्यमातून सहाय्य करण्यात येते.

१. परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्गाचे आयोजन व ग्रंथप्रदर्शने व वाचन संस्कृती रूजविण्यासाठी समान निधी योजनेमधून अर्थसहाय्य. रू. ५०,०००/– व राज्य स्तरावर १,००,०००/– रूपये.

२. सार्वजनिक ग्रंथालयांना शैक्षणिक प्रयोजनांसाठी संगणक टी.व्ही., सी.डी. प्लेअर, डी.व्ही.डी. प्लेअर आणि त्यासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य. रू. १०,००,०००/– रू. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयासाठी २०,००,०००/– रूपये.

३. सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत विस्तारासाठी किंवा बांधणीसाठी अर्थसहाय्य. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांसाठी रू. ७५,००,०००/–, जिल्हा ग्रंथालयासाठी २५,००,०००/–, तालुका ग्रंथालयासाठी रू. १५,००,०००/– व इतर ग्रंथालयासाठी ६,००,०००/– रूपये, ग्रामीण ग्रंथ केंद्राचा विकास व फिरती ग्रंथालय सेवा यासाठी अर्थसहाय्य यासाठी रू. ५०,००० रूपये देण्यात येतात.

४. ग्रंथालयासाठी वाचनीय साहित्य, ग्रंथसंग्रह, वाचन कक्षातील साधनसामग्री जसे कार्ड कॅबिनेट, अग्निशमन यंत्र, झेरॉक्स मशीन इ. साठी अर्थसहाय्य. पुढील प्रमाणे करण्यात येते. १ वर्षासाठी रू. २०,०००/– रूपये, २ वर्षासाठी रू. ५०,०००/– रूपये व ५ वर्षासाठी रू. १,००,०००/– देण्यात येतात.

५. ग्रंथभेट योजना : संचालनालय स्तरावरील समितीतर्फे ग्रंथांची निवड व खरेदी करून राज्यातील ग्रंथालयांना दरवर्षी मोफत ग्रंथसंच भेट देण्यात येतात. साधारणत: दरवर्षी मोफत ग्रंथसंच भेट देण्यात येतात. साधारणत: १,००० ग्रंथालयांना किमान १०,०००/- पर्यंत किंमतीचे ग्रंथसंच भेट देण्यात येतात.

६. फिरते ग्रंथालय सेवा योजना: जेथे ग्रंथालय सेवा उपलब्ध नाहीत. तेथे जवळच्या गावातून उपनगरातून मोठ्या ग्रंथालयांना अशी फिरती ग्रंथालय सेवा या योजनेमधून देता येते. उपनगरातून त्यासाठी १ केंद्राला रू. ५०,००० पर्यंत मदत मिळू शकते.

**असमान निधी योजना :**

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान व प्रस्तावकर्त्या ग्रंथालयाच्या २५ टक्के हिश्श्यातून तसेच प्रतिष्ठानच्या १०० टक्के अनुदानातूनही राबविण्यात येत असलेल्या या योजना आहेत.

१. असमान निधी योजनांतर्गत महोत्सवी वर्ष जये ५०, ६०, ७५,१००, १२५ व १५० वे वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य पुढील प्रमाणे देण्यात येते. ५०, ६० व ७५ वर्षासाठी १,००,०००/- रूपये, १०० , १२५, १७५ वर्षे साजरे करण्यासाठी १,५०,०००/- रूपयांचे सहाय्य करण्यात येते.

२. ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना असमान निधीतून अर्थसहाय्य पुढील प्रमाणे देण्यात येते. इमारत बांधकाम व विस्तार रू. ४,५०,०००/-, ग्रंथ फर्निचर व साधन सामुग्रीसाठी रू. १,५०,०००/- तसेच सार्वजनिक ग्रंथालयातील बाल ग्रंथालय किंवा बालविभाग, महिला विभाग, ज्येष्ठ नागरिक विभाग, नवसाक्षर विभाग यासाठी पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते.

   १. बालविभाग रू. २५,०००/- २. महिला विभाग रू. २०,०००/-

   ३. ज्येष्ठ नागरिक रू. १५,०००/- ४. नवसाक्षर रू. १०,०००/-

   असमान निधी अंतर्गत प्रतिष्ठानच्या सहाय्याने बाल विभाग स्थापन करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना अर्थसहाय्य रू. १,५०,०००/- करण्यात येते.

४. ग्रंथालय विकासासाठी, ग्रंथालय व्यावसायिकांकरिता, विद्यापीठ ग्रंथालयांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या परिसंवाद, चर्चासत्रे व कार्यशाळा यासाठी अर्थसहाय्य रू. १०,०००/- करण्यात येते.

**ग्रंथालय संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या समित्या :**

१. राज्य ग्रंथालय परिषद

२. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान अंतर्गत राज्य ग्रंथालय नियोजन समिती

३. राज्य ग्रंथ निवड समिती

४. हस्तलिखिते सल्लागार समिती

५. पुरस्कार योजना समिती

**ग्रंथालय संचालनालयाच्या भविष्यातील योजना :**

१. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शासकिय जिल्हा ग्रंथालयाचे किमान एक उपकेंद्र स्थापन करण्याचा शासनाना मानस आहे.

२. त्या उपकेंद्रामध्ये समृद्ध स्पर्धा परीक्षा विभाग, डिजीटल संग्रह विभाग व इंटरनेट माहिती सेवा विभाग विकसीत करून सर्व जनतेला अद्ययावत माहिती सेवा देण्याची धोरणात्मक बाब प्रस्तावित आहे.

३. याची पथदर्शी सुरवात म्हणून सन २०१०–११ या वर्षात सातारा, नांदेड, जालना व रायगड या जिल्ह्यांमध्ये अशी उपकेंद्र स्थापन करण्याचा मानस आहे. त्यासाठी रूपये २ कोटी इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

४. सन २०१०–११ मध्ये जळगाव, औरंगाबाद, अमरावती, परभणी व उस्मानाबाद येथे शासकिय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना करण्यात येणार आहे.

५. ज्या शासकीय जिल्हा ग्रंथालयांसाठी व सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांसाठी स्वतःच्या मालकीच्या इमारती नाहीत, त्या ठिकाणी इमारती तयार करणे.

***

# संदर्भसूची

मराठी ग्रंथ


०१. **कर्णिक, प्रदीप (२००५) :** ग्रंथ, ग्रंथालये, ग्रंथसंस्कृती, नवचैतन्य प्रकाशन

०२. **गोगटे, शरद (१९९९) :** प्रकाशन व्यवसाय परिचय, अखिल भारतीय मराठी प्रकाशन संघ.

०३. **जोशी, लक्ष्मणशास्त्री, संपा. (१९७६) :** मराठी विश्वकोश, खंड ५ वा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

०४. **तुळपुळे,शं.ग. (१९७४) :** मराठी ग्रंथ निर्मितीची वाटचाल, महाराष्ट्र ग्रंथजगत संस्था, पुणे.

०५. **दाते, शं.रां. (१९६०) :** मुद्रण प्रवेश, रि. पुना प्रेस ओनर्स, असो. लि. पुणे.

०६. **धारकर, भालचंद्र (२०१३) :** सयाजी नगरीतील साहित्य संपदा, सूची, परिसर, बडोदे.

०७. **नरगुंदे, रेवती (२००२) :** ग्रंथालये आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

०८. **नातू, श्रीराम (१९८४) :** सर्वांसाठी ग्रंथालय, सिद्धार्थ मोफत वाचनालय आणि ग्रंथालय, पुणे.

०९. **पाटील, रामचंद्र श्यामराव (१९३३) :** श्री सयाजी गौरवग्रंथ, सरकारी छापखाना, बडोदा.

१०. **पाटील, सी.श्री. (२००५) :** विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचे, स्नेहल ए ज न्सी ज , देवगड.

११. **पौंडवाल, सुषमा आणि सावे, वसंत (२०१४) :** सार्वजनिक ग्रंथालय प्रगती आणि वस्तुस्थिती, माधवी प्रकाशन, पुणे.

१२. **भागवत, स्मिता आणि कप्तान, अविनाश (२००४) :** सयाजीरावांची नगरी, मातृभूमी सेवा ट्रस्ट, बडोदा

१३. **भांड, बाबा (२०१३) :** लोकपाल राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

१४. **मराठे, ना.बा.,(१९७९) :** भारतीय ग्रंथालयाचा इतिहास, अभिनव प्रकाशन, दादर, मुंबई.

१५. **महाजन,शांताराम, गजानन (१९६५) :** महाराष्ट्रातील ग्रंथालयांची सूची, आनंद मुद्रणालय, पुणे

१६. **महाजन, श. ग. (२०११) :** महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीचे शिल्पकार, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे

१७. **महाराष्ट्र सरकार (प्रका.) (२००७) :** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान व ग्रंथालय संचनालय यांच्या विविध अर्थसहाय्य योजनांची माहिती पुस्तिका, ग्रंथालय संचालनालय, मुंबई.

१८. **रेगे, वा.रं. (१९१७) :** कोल्हापूर नेटीव्ह लायब्ररी या संस्थेचा समग्र इतिहास.

१९. **लिमये, अ.ह. (१९५२) :** ग्रंथ व्यवहार, व्हीनस बुक स्टॉल, पुणे

२०. **लिमये, अनंत, हरी (१९७२) :** मराठी प्रकाशनाचे स्वरुप, प्रसाद प्रकाशन, पुणे.

**मराठी नियतकालिके व स्मरणिका :**


०१. **आर्वीकर, भा.,२००२,** सार्वजनिक ग्रंथालय – आधुनिक तीर्थक्षेत्र, ग्रंथपरिवार, अंक १७ वा.

०२. **आष्टीकर, मधुकर (संपा.) जून १९८०,** ग्रंथालय सेवक – सेवा नियम, वाचनालय, अंक ३ रा,. पृ. ६ ते १०

०३. **उचळंबकर, कृष्ण मुकुंद, २६ जाने. १९६५,** महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९६७, पद्मश्री रंगनाथन स्मारक समिती, पुणे.

०४. **उचळंबकर, कृष्ण मुकुंद.,१९८३,** महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९६७, पद्मश्री रंगनाथन स्मारक समिती, पुणे.

०५. **उचळंबकर, कृष्ण मुकुंद, १९९८,** ग्रंथालय कायद्याचे स्वरूप, ग्रंथोपजीवी स्मरणिका, ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी.

०६. **उरणे, म. वि. आणि दांईगडे, शाम ज. १९९८,** महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचलनालय मार्फत मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना मिळणारी अनुदाने, ग्रंथोपजीवी स्मरणिका, ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी.

०७. **खुराडे, गंगाधर गणपत, १९७३** ग्रामीण वाचनालये काही सूचना, वाचनालय, अंक ६ वा, पृ. १०५ –१९५

०८. **चव्हाण, शंकरराव, १९७६,** सार्वजनिक ग्रंथालये, स्मरणिका : श्री शाहू वाचनालस शताब्दी समारोह, गारगोटी, पृ. ४१ – ४२.

०९. **देशपांडे, ना. वि., २०००,** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकत्ता यांचे मिळणारे अनुदान, ग्रंथपरिवार, औरगांबादः मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ, वर्ष १७ वे, अंक २ रा.

१०. **पवार, रामेश्वर, २०००,** सार्वजनिक ग्रंथालय, ग्रंथपरिवार, औरंगाबादः मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ, वर्ष १७ वे, अंक २ रा.

११. **पाठक, मो., २००२,** ग्रंथालय सेवा समुह – एक अभिनव प्रयोग, ग्रंथपरिवार, अंक १७ वा.

१२. **पोतदार, श्री. पा., २००५,** सार्वजनिक ग्रंथालय अपेक्षा व उपेक्षा, ग्रंथपरिवार, अंक ३ व ४

१३. **बालेकर, सं.शं. १९९७,** राष्ट्रीय विकास व मध्यवर्ती, विभागीय, जिल्हा ग्रंथालयांची भूमिका, ग्रंथोपजीवी स्मरणिका, ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी

१४. **भट, वा.वि., सप्टेंबर १९९५,** ग्रंथ प्रसाराचा नवा मार्ग, वाचनालय, अंक ५ वा, पृ.५

१५. **मठकर, जयानंद, १९९८,** अध्यक्षीय भाषण, ग्रंथोपजीवी स्मरणीका, ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी.

१६. **माळी, मा. गो., १९७६,** ग्रामीण वाचनालयांच्या समस्या शोध व बोध, स्मरणिका, श्री शाहू वाचनालय शताब्दी समारोह, गारगोटी.

१७. **शेजुळ, का. म. १९९८,** सार्वजनिक ग्रंथालये आणि शासनाचे धोरण, ग्रंथोपजीवी स्मरणिका, ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी.

१८. **शेट्ये, चंद्रकांत ना. १९९८,** ग्रंथालयीन व्यवस्थापनातील अडचणी आणि वाचकांच्या अपेक्षा, ग्रंथोपजीवी स्मरणिका, ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी.

१९. **सातारकर, सु.प्र., ऑक्टो, नोव्हें.डिसें, १९९१,** सार्वजनिक ग्रंथालय कसे स्थापन करावे, ग्रंथपरिवार, वर्ष १७ वे, अंक १ ते २.

२०. **वरखेडे, रमेश (संपा.)** मराठी मुद्रणकला द्विशताब्दी विशेषांक, ज्ञानगंगोत्री (डिसेंबर २००५ – फेब्रुवारी २००६) वर्ष ६ वे, अंक ३, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## BIBLIOGRAPHY

1) Agarwal, S. N. and Others (1983) : Perspectives in Library and Information Science Vol. 1.

2) Allauddin, S. K. and Rout, R. K. (1996) : Libraries and Liberianship during Muslim Rule in India, Reliance, New Delhi.

3) Barud, B. P. (1992) : National Policy on Library Information Systems and Services for India, Prospective and Projections, Popular Prakashan, Mumbai.

4) Bhati, N. Sing (Ed.) (1986) : Rajasthan Ke Granthalaya, Rajsthan Sansthan, Jodhapur.

5) Bhatt, R. K. (1995) : History and Development of Libraries in India, New Delhi.

6) Bhattacharge, K. K. (Ed.) (1979) : Modern Trends in Librianship in India, WorldPress, Calcutta.

7) Datta, Bimal Kumar (-) : Libraries in Ancient and Medieval Indian, Atmaram, Dephi.

8) Deshpande, K. S. (1993) : Public Libraries in Karnataka, Suggestions for their Fresher Development, ILA, Diamond Jubilee Semina Volume.

9) Dhyni, Pusha (1999) : Public Libraries in Rajasthan (in Vashistha C. P. and Others (Ed), New Horizon in Library and Information on Science, Madras, T. R. Publication, Madras.

10) Esperanz, Sister, M. (1994) : Perspectives of Library Development in India, BRPC, Delhi.

11) Gidwani, N. N. and Navalani, K. (1974) : Guide to Conference Material on India. Saraswati, Jaipur.

12) Giridhar, Singh, N. (1988) : Development of Libraries in Manipur State, All India Lib. Conf. Souvenir.

13) Gunjal, S. R. (1982) : Libraries in Ancient and Medievel Karnataka (in Raut, R. K. (Ed.) Library Legislation in India, Reliance, Delhi.)

14) Gupta, B. M. (Ed.) (1966) : Handbook of Libraries, Archives and Information Centres in India, Vol. 16, Segment, Delhi.

15) Gupta, S. and Sing Gurudev (2006) : Public Library System in Jammu and Kashmir, Sonal Book Enterprises.

16) Hooks, P. and Turner M.P. (Ed.) (1981) : Public Library : Aims and Objectives, Pub. C. G. Research Group London.

17) Innamdar, N. B. and Shakira C. A. ( - ) : Management of Libraries in the State of Hyderabad (In Gupta B. M. & Others (Ed.), Handbook of Libraries, Archives and Information Centre in India, Auditty Praskashan, New Delhi.

18) Kabir, F. (1988) : The Library of Bengal, 1970-1947 : A Study of Bengali, Renaissance, Promila, Delhi.

19) Kamaiah, P. and Sarojini Poul, G. (1994) : Library Movement and Library Development in India. ILA, New Delhi.

20) Kamal, K. K. (1982) : Public Libraries in Bihar (in Rout R.K. (Ed.) Library, Legislation in India, Reliance, New Delhi.

21) Kanade, R. G. (1931) : Library Handbook and Index with Short Survey of Libraru Management, Bombay.

22) Keshavan, B. S. (1985) : History and Publishing in India, Vol. 1, National Book Trust, Delhi.

23) Khomdan, Singh (1988) : Development in Libraries in Manipur State, All India Lib. Conf. Souvenir.

24) Kumar, P. S. (Ed.) (2001) : Indian Encyclopaedia of Library and Information Science Vol. I, S. Chand and Company Ltd. New Delhi.

25) Kumar, P. S. G. (1998) : Fundamentals of Information Science, S.Chand, New Delhi.

26) Kumar, P. S. G. (2000) : Indian Library Chronology Ed2., Allied Publication, Mumbai.

27) Kumar, P. S. G. (2008) : Library Movement and Library Development in Andhra Pradesh Vol. I, B. R. Publishing Corporation, Delhi.

28) Kumar, P. S. G. (2008) : Library Movement and Library Development in Maharashtra & Goa, Vol. 2., B. R. Publishing Corporation, Delhi.

29) Kumar, P. S. G. (2008) : Library Movement and Library Development in Karnataka, Vol. 3., B. R. Publishing Corporation, Delhi.

30) Kumar, P. S. G. (2008) : Library Movement and Library Development in Kerala & Lakshadweep, Vol. 4., B. R. Publishing Corporation, Delhi.

31) Kumar, P. S. G. (2008) : Library Movement and Library Development in Pondicherry & Andaman and Nicobar, Vol. 5., B. R. Publishing Corporation, Delhi.

32) Kumar, P. S. G. (2008) : Library Movement and Library Development in Gujrat, Dadra, Nagar Haveli and Daman and Div, Vol. 6., B. R. Publishing Corporation, Delhi.

33) Kumar, P. S. G. (2010) : Library Movement and Library Development in Rajasthan, Vol. 7., B. R. Publishing Corporation, Delhi.

34) Kumar, P. S. G. (2010) : Library Movement and Library Development in Delhi and Gandhinagar, Vol. 8., B. R. Publishing Corporation, Delhi.

35) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in North-West India, Vol. 9, Part 1, Haryana, Himachal Pradesh, and Jammu & Kashmir, B. R. Publishing Corporation, Delhi.

36) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in Punjab, Vol. 9, Part 2, B. R. Publishing Corporation, Delhi.

37) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in Madhya Pradesh and Chattisgad, Vol. 10, B. R. Publishing Corporation, Delhi.

38) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in Orissa, Vol. 11, B. R. Publishing Corporation, Delhi.

39) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in West Bengal and Sikkim, Vol. 12, B. R. Publishing Corporation, Delhi.

40) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in North East : Arunachal Pradesh, Assam, Manipur, Nagaland and Tripura, Vol. 13, B. R. Publishing Corporation, Delhi.

41) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in Uttar Pradesh and Uttarakhand, Vol. 14, B. R. Publishing Corporation, Delhi.

42) Kumar, P. S. G. (2011) : Library Movement and Library Development in Bihar and Jharkhand, Vol. 15, B. R. Publishing Corporation, Delhi.

43) Kumar, S. and Shah, Leena (- ) : Public Libraries Acts in India, ESS ESS Publication, New Delhi.

44) Mahajan, S. G. (1984) : History of the Public Library Development in Maharashtra, Subhada Saraswati Publication, Pune.

45) Mangala, P. B. (Ed.) (2001) : Library and Information Services in Indian States and Union Territories, Shipra, New Delhi.

46) Marshal, D. N. (1983) : History of Libraries in Ancient and Mediaeval , Oxford and IBH Pub. Co., New Delhi.

47) Mishra, J. (1979) : History of Libraries and Librarianship in Modern India Since 1850, Atmaram, New Delhi.

48) Mookherjee, S. K. (1969) : Library Movement and Library Science in India, WorldPress, Calcutta.

49) Mujumdar, S. and other (Ed.) (2003) Compendium of Selected Government Reports on Library and Information Science Services in India (Part I and II) Central Secretariat Library, Department of Culture, Ministry of Tourism and Culture, New Delhi.

50) Narasimham, P. V. A. and Kha, M. A. K. (1980) : Andhra Pradesh Public Libraries Act, 1960, Andhra Pradesh Public Library Asso. Hyderabad.

51) Narsimhan, P.V.A., Khan, M.A. Majeed (1980) : Andhra Pradesh Public Library Association, Hyderabad.

52) National Knowledge Commission, India (2007) : Libraries Gateways to Knowledge, Delhi.

53) Ngurtin, K. R. K. (2007) : Rural Libraries in Mizoram : Problems and Prospects (In Lakhar, N. (Ed.) Rural Libraries in North East India, Problems and Prospects), Central Ref. Library, Kolkata.

54) Ohdedar, A. (1966) : A Growth of The Library in Modern India. WorldPress, Calcutta.

55) Ohdedar, A. K. (1996) : Growth of the Library in Modern India, WorldPress, Calcutta.

56) Panda, P. D. (1992) : History of Library Development, Anmol Publicatoon, New Delhi.

57) Patel, Jasunand, Krishkumar (2001) : Libraries and librarians in India, Green wood Press, London.

58) Raju, A. A. N. (1988) : History of Library Movement in Andhra Pradesh, Ajanta, Delhi.
59) Ramasozy, R. (2003) : States of State, Central Libraries in India, Gyan Publishing House, Delhi.
60) Ramnan, N. ( - ) : Public Library Developments, ESS-ESS, New Delhi.
61) Ranganathan, S. R. and Neelameghar, A, (Ed.) (1972) : Public Library Systems, S. R. Endowment for Library Sc., Bangalore.
62) Rangathan, S. R. (1988) : Library Manual, 2nd Ed. Sarada, Ranganathan Endowment for Library Science, Bangalore.
63) Rao, G. S. (-) : Development of Libraries and their Role in Society, IGNOU, New Delhi.
64) Rodrigues, M. P. D. M. (2014) : Text Tomes and Treasures : The Evolution of Goa's Public Library System, Sarada Ranganathan Endowment for Library Science, Bangalore.
65) Roy, N. (1961) : Development of Library Services in West Bengal, West Bengal Education Directorate, Calcutta.
66) Roy, Phanibhushan (1998) : Phanibushan Roy Commemorative Volume, Bengal Library Association, Calcutta.
67) Sharma, C. D. (1990) : Public Libraries in Rajasthan, All India Lib. Con. Souvenir, Jodhpur.
68) Sharma, J. B. (1998) : Professional Leadership in Library Science, Book Enclave, Jaipur.
69) Sharma, S. R. (1987) : Library and Society, ESS Pub, New Delhi.
70) Sharma, S. S. (2004) : Madhya Pradesh Mein Pustakalaya Evam Suchana Yugan ke Badalte Kadam, V. K. Publishers, Agra.
71) Singjh, Balbir & Yadav, Shreeram (1992) : Library Movement in Haryana, Scienetific Book Store, Delhi.
72) Varma, Kusum (2005) : Library Information and Society, Vista International Pub. House, Delhi.
73) Venkatapaiah, V. (Comp. & Ed.) (1990) : Indian Library Legislation, Daya, New Delhi.
74) Venkatapaiah, Velaga (1985) : Andhra Pradesh Granthalayam, Navaratna Book Centre, Vijaywada.
75) Vishwanathan, C. G. (1985) : Public Library Operation Services, Print House India Ltd. Lucknow, 3rd Edn.
76) Vyas, S. D. (1988) : Public Library System, Panchaseal Prakashan, Jaipur.

**Articles**

1) Banerji, B. N. (1937) : Libraries in Bikaner, Modern Librarian P-161-165.

2) Dave, R. K. (1976) : Library Services in Manipur, Herrold and Library Science. Vol. V-15, P.P. 50-54.

3) Justa, H.R. (1993) : Developments of Public Libraries in Himachal Pradesh, Grantham, Vol. 4, P. 57-60.

4) Ranganathan, S. R. (1939) : Achievement and Shortcomings in Madras Modern Librarian, Vol. 9, P. 141-144.

5) Sharma, Devendra Kumar (1977) : Public Library Services in Himachal Pradesh Libraries. Vol. 10, 1972-73, P. 75.

**Ph. D. Thesis**

1. Balekar, R, S, Impact of library legislation on public library-development in Maharashtra, Nagpur University Guide P.S.G.Kumar

2. Karnik, P, K, Assessment of contribution of a public library to the society with special reference to cultural and literary development : A case study of Mumbai Marathi Grantha Sangrahalaya, Pune University, Guide S. R. Ganpule. 3. Narayan, G, J,information as a Commodity An inquiry into the characterise of knowledge, Poona University 1992, Guide Prof. M.S. Riswadkar

4. Mahajan, S, G, History of Public Library Management in western Maharashtra, Poona, 1979, Guide Dr. A. R. Kulkarni

5. Wanashi, M,O,Public Library Provision and document problems in developing societies. A study in Keniyan Indian context, Nagpur University, 1994, Guide P. S. G. Kumar


✻✻✻

# छायाचित्रे

१) अण्णा पब्लिक लायब्ररी, कोट्टापूरम – चेन्नई
२) बंगलोर पब्लिक लायब्ररी, बंगलोर
३) कोनोमेरा पब्लिक लायब्ररी, कोनोमेरा
४) डेव्हिड ससून लायब्ररी, मुंबई – महाराष्ट्र
५) दिल्ली पब्लिक लायब्ररी, दिल्ली
६) इंपियर लायब्ररी, कोलकत्ता
७) खुदाबक्ष ओरिएंटल लायब्ररी, पटना
८) सरस्वती महल लायब्ररी, तंजावर
९) मयो मेमोरियल लायब्ररी, अलाहाबाद
१०) राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकत्ता
११) पब्लिक लायब्ररी, लाहोर
१२) पब्लिक लायब्ररी आणि सरस्वती भवन, गुलाब बाग – उदयपूर
१३) पब्लिक लायब्ररी, जोधपूर
१४) रझा लायब्ररी, रामपूर
१५) एशियाटिक सोसायटी लायब्ररी, मुंबई
१६) गोवा राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, पणजी
१७) ओरियंटल संशोधन केंद्र आणि ग्रंथालय, केरळ
१८) राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, हैद्राबाद
१९) टाऊन हॉल पब्लिक लायब्ररी, केरळ
२०) व्हिक्टोरिया डायमंड ज्युबली लायब्ररी, केरळ
२१) बोट लायब्ररी (नावेतील ग्रंथालय)
२२) गार्डन लायब्ररी
२३) हस्तलिखिते
२४) दोलामुद्रिते
२५) शिलालेख
२६) ताम्रपट
२७) श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी ग्रंथालयाची १८ एप्रिल १८५२ रोजी शिळाप्रेसवर मुद्रित केलेली घटना
२८) श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी ग्रंथालयाची १८ एप्रिल १८५२ रोजी शिळाप्रेसवर मुद्रित केलेली घटना
२९) करवीर वाचन मंदिर, कोल्हापूरच्या प्रवेशद्वारी डॉ. जी. ए. बुवा
३०) श्रीराम वाचन मंदिर, सावंतवाडी येथे पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, डॉ. जी. ए. बुवा, प्रा. प्रविण बांदेकर व महेंद्र पटेल

# विविध राज्यातील काही सार्वजनिक ग्रंथालयांची छायाचित्रे




अण्णा पब्लिक लायब्ररी, कोट्टापूरम – चेन्नई




बंगलोर पब्लिक लायब्ररी, बंगलोर



कोनोमेरा पब्लिक लायब्ररी, कोनोमेरा



डेव्हिड ससून लायब्ररी, मुंबई – महाराष्ट्र




दिल्ली पब्लिक लायब्ररी, दिल्ली




इंपियर लायब्ररी, कोलकत्ता




खुदाबक्ष ओरिएंटल लायब्ररी, पटना



सरस्वती महल लायब्ररी, तंजावर




मयो मेमोरियल लायब्ररी, अलाहाबाद



राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकत्ता



पब्लिक लायब्ररी, लाहोर



पब्लिक लायब्ररी आणि सरस्वती भवन, गुलाब बाग - उदयपूर



पब्लिक लायब्ररी, जोधपूर



रझा लायब्ररी, रामपूर




एशियाटिक सोसायटी लायब्ररी, मुंबई




गोवा राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, पणजी



ओरीएंटल संशोधन केंद्र आणि ग्रंथालय, केरळ



राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, हैद्राबाद



टाऊन हॉल पब्लिक लायब्ररी, केरळ





व्हिक्टोरिया डायमंड ज्युबली लायब्ररी, केरळ




बोट लायब्ररी (नावेतील ग्रंथालय)




गार्डन लायब्ररी




**हस्तलिखिते**




**दोलामुद्रिते**




शिलालेख




ताम्रपट



Rules and Regulations of the Sawunt Warree Native Library.

सुंदरवाडी एथील ग्रंथालयसंबंधीं नियम.

**श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी ग्रंथालयाची**
**१८ एप्रिल १८५२ रोजी शिळाप्रेसवर मुद्रित केलेली घटना**



उघडें राहील तोंपर्यंत ५ व्या नियमांत लिहिलेला मनुष्य तेथें हजीर असावें .

८ ही सभा भरण्याकरितां चिटनिसानें व्यवस्थापक मंडळीच्या अनुमतानें योग्य दिवस नेमून त्याचा पूर्व दिवशीं सभासदांस सूचना द्यावी .

९ ग्रंथालयाचे हिस्सेदार यांनी दरमहा ग्रंथालयांत भरल त्या सर्व [illegible] नियमांत दर्शविलेल्या [illegible] दाखवाव्या .

१० हिस्सेदारा बरोबर कोणी एकादा परकी मनुष्य आल्यास त्याजला ग्रंथालयांत येण्यास मोकळीक आहे .

११ ग्रंथालयाच्या हिस्सेदारांस ग्रंथ आणि वर्तमानपत्रें ग्रंथालयांतून घरीं नेऊन वाचण्यास मोकळीक आहे .

१२ नवीन पुस्तकें आणावीं म्हणजे तीं एक आठवडा ग्रंथालयांत राहून नंतर हिस्सेदारांस घरीं नेऊन वाचावयास मिळतील .

१३ वर्तमानपत्रें आल्या दिवसापासून चार दिवसपर्यंत टेबलावर असावीं . नंतर वाडीतील हिस्सेदार (ज्यांनी ग्रंथालयांत आऊन वाचलीं नसतील) त्यांजकडे पाठवावीं ; आणि [illegible] दिवशीं वाडी बाहेरील हिस्सेदारांस पाठवण्यासाठीं ठरविलीं जावीत , तीं त्यांनी एक दिवस ठेवून दुसरे दिवशीं ग्रंथालयांत परत करावीं .

१४ हिस्सेदारांनीं दरवेळेस एकाहून अधिक पुस्तकें नेऊं नयेत व नेलेलीं एक महिन्यावर ठेवूं नयेत (नवीं पुस्तकें खेरीज करून)

१५ कोणी हिस्सेदार वाडी बाहेर गेला असतां त्यानें आपल्या बरोबर ५ ग्रंथाहून अधिक पुस्तकें नेऊं नयेत व नेलेलीं दोन महिन्यावर आपल्या जवळ ठेवूं नयेत .

१६ हिस्सेदार यांनीं परकी माणसास पुस्तक वाचण्यास देऊं नये , परंतु नेलेल्या वेळांत वाचून ग्रंथालयांत परत पाठवावें .

१७ हिस्सेदार यांनीं नेमलेल्या वेळांत पुस्तक परत नकेल्यास दुसऱ्या खेपेस त्याला सर्वांचा मागून पुस्तक वाचावयास दिलें जाईल .


१८ ग्रंथालयांतील वर्तमानपत्र किंवा पुस्तक कोणी हिस्सेदारानें गमाविलें किंवा खराब केलें असतां त्याची किंमत मंडळी आपल्या विचारानुरूप त्याजपासून घेईल .

१९ ग्रंथालयाच्या हिस्सेदारांतून ज्यास एकादें चमत्कारीक पुस्तक ग्रंथालयाच्या उपयोगाकरितां आणवावयाचें असेल तर तें त्यानें मंडळीस विदित करावें म्हणजे मंडळीचा विचाराम् आलें असतां तें पुस्तक आणविलें जाईल .

तारीख १८ माहे एप्रील सन १८५२ इसवी . रविवार .

| | |
|---|---|
| वेंकटराव वाडणकर | येशवंतराव भास्कर निशाणकर |
| आत्माराम शिवराम चिटणीस | गोविंद [illegible] |
| सदाशीव गोविंद हवालदार | विनायक भिकाजी मडकेकर |
| [illegible] | |

**श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी ग्रंथालयाची**
**१८ एप्रिल १८५२ रोजी शिळाप्रेसवर मुद्रित केलेली घटना**




करवीर नगर वाचन मंदिर,
कोल्हापूरच्या प्रवेशद्वारी  डॉ. जी. ए. बुवा



श्रीराम वाचन मंदिर, सावंतवाडी येथे पद्मश्री मधु मंगेश कर्णिक,
डॉ. जी. ए. बुवा, प्रा. प्रविण बांदेकर व महेंद्र पटेल



## डॉ. जी. ए. बुवा

B.Sc. (Hon.), M.A., M.L.I.Sc., Ph. D.

निवृत्त ग्रंथपाल व उपप्राचार्य
सिंधुदुर्ग जिल्हा गॅझेटियर, संपादक मंडळाचे सदस्य,
सावंतवाडी संस्थानच्या इतिहासाविषयी व येथील पर्यटनविषयासंदर्भात विशेष लेखन,
सार्वजनिक ग्रंथालय चळवळीमध्ये सक्रीय सहभाग,
सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक व साहित्य विषयक चळवळीमध्ये विशेष योगदान,
एम.फिल., पी.एच.डी.चे मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अध्यापन,
शिक्षणप्रेमी, साहित्य, इतिहास, संस्कृती व ग्रंथालय चळवळ इ. विषयी
१० ग्रंथ प्रकाशित. विविध संशोधनपर लेख व वृत्तपत्रीय लेख प्रसिद्ध, राज्य स्तरावरील व सामाजिक संस्था स्तरावरील विविध पुरस्कारांचे मानकरी. सामाजिक संस्था व शिक्षण संस्था, साहित्य विषयक संस्थांवर पदाधिकारी व संचालक म्हणून कार्यरत.
मराठी साहित्यातील नव लेखकाकरिता व्यासपीठ म्हणून ३५ वर्षे कार्यरत असणाऱ्या आरती मासिकाचे कार्यकारी संपादक.

मुखपृष्ठ मुद्रण : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.